GOVERNMENT OF INDIA
NATIONAL LIBRARY, CALCUTTA.

Class No Man
Book No. 294·2
~~M277·D~~ M212d
N. L. 38. Vol 1
MGIPC—S8—37 LNL/55—14-2-56—30,000.

NATIONAL LIBRARY.

This book was taken from the Library on the date last stamped. A late fee of 1 anna will be charged for each day the book is kept beyond a month.

N. L. 44.
MGIPC—S3—30 LNL/55—15-12-55—20,000.

(विद्याविनोद मासिक पुस्तकांतून छापून प्रसिद्ध झालेलें.)

भारतामृत

अथवा

महाभारताचें गोष्टींच्या रूपानें भाषांतर

भाग १.

आदिपर्व-उद्योगपर्व

आवृत्ति दुसरी

लेखक, बळवंत त्र्यंबक द्रवीड.

भारतस्येतिहासस्य ब्राह्मीं ग्रंथार्थसंयुतां ।
संहितां श्रोतुमिच्छामः पुण्यां पापभयापहाम् ॥ १ ॥

पुणें येथें

रावजी श्रीधर बोंधळेकर यांचे जगद्धितेच्छु छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.


[यासबधीं सर्व हक्क कर्त्यानें आपलेकडे ठेविले आहेत.]

सन १९०३.

NATIONAL LIB... No. 14 Date. 13.8.5... CALCUTT...

द. के. गोंधळेकर [illegible]
३३० अ, सदाशिव, पुणे २.

हिज हायनेस दी महाराजा श्री सयाजीराव गायकवाड.



श्रीमन्विद्योतमे त्वं सहजगुणतया सपदाचैव सार्धम् ।
सर्वेषु स्वीय बुध्या सतत समतया ज्ञानदानैकदक्षः ॥
यानात्पाश्चात्य देशेऽविपनयनिपुणस्त्व प्रजाः पासि नित्यम ।
जिवाऽहता दुरन्ता प्रथित इह सदा सद्गुणाधीन चेताः॥ १ ॥
राजन्वाणीश्रीरित्यनयोर्वैयधिकरण्यदोषित्वम् ॥
जनित मिथ्या भवता यत उभय दृश्यते त्वयि सदेदिम् ॥ २ ॥

श्रीमन्महाराज

सयाजीराव गायकवाड

सेनाखासखेल समशेरबहादुर

यांस

त्यांच्या राजगुणास व विद्याभिरुचीस लुब्ध होऊन हें पुस्तक
कर्त्यानें सादर अर्पण केलें आहे.

या संबंधानें अनेक विद्वानांचे व विद्वान पत्रकारांचे अभिप्राय खालीं देत आहों.

अभिप्राय.

केसरी.

भारतामृत, भाग २ रा—रा. रा. बळवंत त्र्यंबक द्रवीड यांनीं विद्याविनोद मासिक पुस्तकाचे द्वारें दिलेला महाभारताच्या उद्योगपर्वाचे अखेरपर्यंतचा विस्तृतगोषवारा सरळ गोष्टींच्या रूपानें मागें त्यांनीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला होता; त्या वेळीं त्यासंबंधानें आह्मीं अभिप्राय केसरींत दिलाच आहे. त्यापुढील ह्मणजे भीष्मपर्वापासून शेवटपर्यंतच्या भारतकथेचा २ रा भागही त्यांनीं नुकताच प्रसिद्ध केला असून तो आमचेकडे अभिप्रायार्थ आला आहे. ईलियड जसें ग्रीक लोकांचें किंवा पाराडाइज लॉस्ट जसें इंग्रजांचें वीररसप्रधान महाकाव्य आहे तसें महाभारत हिंदूंचें आहे, असें ह्मणण्याची वहिवाट आहे; व तें एका दृष्टीनें खरेंही आहे. परंतु आमच्या महाभारतांत वीररसप्रधानकाव्यत्वाखेरीज हिंदुलोकांचे अंतःकरणास भारून टाकणारी जी जादू आहे ती वरील युरोपियन महाकाव्यांत नाहीं. हिंदूंचे आचारविचार, त्यांच्या नैतिक व धार्मिक कल्पना, त्यांचें तत्वज्ञान, त्यांची समाजस्थिती, किंबहुना सर्व आर्यसंस्कृतीचें व आर्यराष्ट्राच्या एकंदर मनोवृत्तींचें तें भांडार आहे. हिंदूंमध्यें कितीही भाषाभेद, जातिभेद, देशभेद किंवा पंथभेद असोत, त्यांचीं अंतःकरणें एकत्र बांधून टाकणारें हिंदुधर्माचे खालोखाल भारतकथा हें एक मोठें बलवत्तर कारण आहे. वेदाचे खालोखालची पायरी महाभारतास जी देतात तें किती यथार्थ आहे, हेंही यावरून उघड होतें. अशा ग्रंथांतील नैतिक विचारांनीं विद्वानांचें, तात्विक विचारांनीं तत्वजिज्ञासूंचें, वीररसप्रचुर कथांनीं शूरांचें आणि त्यांतील असंख्य बोधपर कथांनीं सामान्य जनांचें मन लटपटून जावें व अशा ग्रंथांतील स्वारस्य लोकांपुढें मांडण्यांत हिंदुस्थानच्या सर्व भागांतील साधुसंत व कवी यांनीं आपलें सर्व सामर्थ्य खर्च करावें, यांत कांहींच नवल नाहीं. अशा श्रेष्ठ ग्रंथाचें शब्दशः व समग्र मराठी भाषांतर होणें सर्वथैव इष्ट आहे व त्याप्रमाणें इतरत्र प्रसिद्धही होईल हें खरें; परंतु तें काम फार श्रमाचें, खर्चाचें व दिनावधीचें असल्यामुळें रा. द्रवीड यांनीं या ग्रंथाचा सरळ गोष्टींचे रूपानें लिहिलेला हा विस्तृत गोषवारा महाराष्ट्र वाचकांचे हातीं दिला, याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. ग्रंथाची भाषा सोपी व भारदस्त असून भारतांतील सर्व कथा, उपकथा व विचार यांपैकीं कोणताही महत्वाचा भाग न वगळतां हें भाषांतर केलें आहे. महाभारताच्या भांडारांत कोणकोणतीं व किती रत्नें साठविलीं आहेत, हें समग्र पहावयाची संस्कृत न जाणणाऱ्या सामान्य महाराष्ट्रवाचकांची इच्छा या ग्रंथानें तृप्त होईल, यांत संशय नाहीं. या पुस्तकास ३२ पानांची रा. द्रवीड यांनीं एक प्रस्तावना जोडली असून तीमध्यें, त्याकाळची वर्णाश्रमव्यवस्था, धर्मनीति, राजधर्म, शिक्षण, आध्यात्म, युद्धकला, समाजव्यवस्था, इत्यादिकांचा नवीन पद्धतीप्रमाणें विचार केला आहे. तोही सामान्य वाचकांस मनोरंजक व बोधपर झाल्यावांचून राहणार नाहीं. या दुसऱ्या भागाचीं पृष्ठें १००० वर झालीं असून पांच रुपये त्याची किंमत भाषांतराचे परिश्रम व ग्रंथाचें महत्व यांचे दृष्टीनें फार नाहीं.

Maratha.

With the publication of the Second volume of his Bharatamrita, an abridged Marathi translation of the great Aryan Epic, Mr. B. T. Dravid, the editor of the Vidya Vinoda, has,

after nearly six years of hard self-imposed labour, accomplished a task of stupendous magnitude. While the translation is done in an easy style, the abridgment is made with great discretion. For if on the one hand he has omitted a great number of passages containing repetitions of details occurring over and over again, on the other hand, he has taken care to include the beautiful descriptions and instructive dialogues with which the Epic abounds. The results is that the two volumes of Mr. Dravid's Bharatamrita, taken together, present the pith of the great Epic in a style far better than that of the literary translation issued in three volumes and in lithograph, several years ago, by Messrs Gondhalekar and Co., and in a less voluminous bulk than the strictly literal translation, by Mr. Bhaoo Shastri Lele of Wai, which together with the full text, extends over a number of volumes and proves too costly not only for middle class people, but also for second class libraries. Mr. Dravid's abriged translation no doubt bears some marks of hurry made in bringing the book out of the Press. But the improvements that are needed can be easily made at the time of issuing a second edition of the book. But even as it is, we must say that it is substatial without being costly, and supplies a most urgent want. It goes without saying that so long as the Mahabharata was preserved only in the Sanskrit, hardly five percent of our Graduates took the trouble to read it, though it is well-known that the style of work is for the greater part very easy. But now that the work is rendered in Marathi. and brought into convenient compass, we may be sure that not only most of our Graduates but even ordinarily educated people will feel tempted to make the pith of this great literary treasure their own. Our young girls and ladies in particular will find in the Bharatamrita quite a god send in that it will afford to them a reading material that will last them, interest them and benefit them far more than the Arabian Nights for instance. With a few improvements, the present book might be usefully made a text book for Marathi as well as English standards in our schools. And as it is, it can successfully compare with any book for its kind for patronage by the public, the libraries or the Educational Department. We congratulate Mr. Dravid upon completing this laborious task which he had to drudge at single-handed through exceptionally hard times.

[आपल्या भारतामृताचा दुसरा व अखेरचा भाग प्रसिद्ध करून विद्याविनोद कर्ते रा. बळवंत त्र्यंबक द्रविड यांनीं फक्त विद्याव्यासंग व लोकोपयोग या दोन हेतूंनीं अंगिकारून आज सतत सहा वर्षे चालविलेलें जबरदस्त मेहनतीचें काम हातां वेगळे केले भावहल आह्मी त्यांचें अभिनंदन करितों.

भारतामृत हें प्रसिद्ध महाभारताचें विस्तृत साररूपानें मराठी भाषांतर असून ते सारासार दृष्टीनें व सुलभ शब्द रचनेंत केलेलें आहे. महाभारतांत पुनरावृत्त असे जे अनेक भाग आहेत ते वगळून व दुसरेपक्षी सुंदर वर्णनें आणि उपदेशपर संवाद हे होतां होईतों न सुटतील अशी खबरदारी घेऊन रा. द्रविड यांनीं हें पुस्तक तयार केलें आहे. यापूर्वी भारताचें शब्दशः भाषांतर रा. गोंधळेकर यांनीं प्रसिद्ध केलेलें आहे, परंतु ते फारच अवाढव्य आहे व तसेंच मूलपाठ व शब्दशः भाषांतर हीं दोन्हीं देऊन रा. भाऊशास्त्री लेले बाईकर यांनीं तयार केलेलें भारत अयाप्रि अपुरें असून तें तसेंच अवाढव्य झालेलें आहे व । विकत घेणें हें मध्यम स्थितींतील लोकांस शक्य नाहीं. रा. द्रविड यांनीं दुसरा भाग घाईनें काढल्यामुळें चुका राहिलेल्या आहेत; परंतु त्या दुसऱ्या आवृत्तींचे वेळीं दुरुस्त करतां येण्यासारख्या आहेत. जोंपर्यंत महाभारत हा ग्रंथ केवळ संस्कृतांतच होता तोंपर्यंत शेंकडा ५ म्हाज्युएट लोकांनीं तरी तो वाचला असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. परंतु त्याचे याप्रमाणें मराठी रूपांतर झाल्याचे योगानें साधारण सुशिक्षित लोक सुद्धां तें वाचूं शकतील व अशा रीतीनें त्यांस विद्याविषयक अपूर्व लाभ होईल.। आपल्या स्त्रिया व मुली यांना तर हल्लींचे पुस्तक ही एक ईश्वरी देणगीच मानली पाहिजे. कारण अशा ग्रंथामुळें आरेबियन नाइट्ससारख्या गोष्टीपेक्षां अधिक मनोरंजक असा व त्यांस बरेच दिवस पुरणारा धर्मग्रंथ वाचावयास मिळणारा आहे.]

काळ.

रा. रा. बळवंत त्र्यंबक द्रवीड हे विद्याविनोद मासिक पुस्तकाच्या द्वारानें महाभारतांतील सारांश सोप्या भाषेनें मराठी वाचकांपुढें मांडित आहेत. ही गोष्ट पुष्कळांना आधींच माहीत आहे. विद्याविनोदांत आजपर्यंत प्रसिद्ध झालेला सर्व कथाभाग एकत्र संकलित करून विद्याविनोदाच्या वर्गणीदारांखेरीज इतरांना त्याचा लाभ घेतां यावा म्हणून तो रा. रा. द्रवीड यांनीं स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला आहे व त्याचीं दोन पुस्तकें त्यांनीं आमचेकडे पाठविलीं आहेत. या दोन पुस्तकांत मिळून आदिपर्व, सभापर्व, वनपर्व, विराटपर्व आणि उद्योगपर्व इतक्या पर्वांतील गोष्टींचा सारांश पूर्णपणें आलेला आहे. या दोन पुस्तकांची मिळून एकंदर पृष्ठसंख्या आठशेंच्या वर आहे. व त्याची किं. सहा रुपये आहे. महाभारतासंबंधानें मराठी भाषेमध्यें चालू असलेल्या प्रयत्नांत अग्रस्थान हल्लींचें पुस्तक आणि रा० रा० लेले शास्त्रीकृत भाषांतर यांनाच दिलें पाहिजे; परंतु त्या दोहोंतूनही निवळ मराठी वाचकांना प्रस्तुत पुस्तकापासूनच जास्त फायदा होईल. कारण यांतील कथाभागाचा सरळपणा मूळ संस्कृतांतील कित्येक क्लिष्टस्थळांनीं कोठेंही भग्नता पावलेला नाहीं. आपल्या भारतीय लोकांचें जें कांहीं सर्वस्व आहे तें महाभारतामध्यें आहे. महाभारत हें आपलें ज्ञानभांडार आहे. त्याच्या किल्ल्या रा. रा. द्रवीड हे मराठी वाचकांच्या हातीं हळूं हळूं देत आहेत ह्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

याला जोडलेली प्रस्तावनाही फार उपयुक्त आहे.

सुधारक.

भारतामृत—महाभारताचें गोष्टीच्या रूपानें मराठी भाषांतर, भाग २, पर्व ६ पासून १८ पर्यंत, सुमारें १००० पानांचें पुस्तक, रा. रा. बळवंत त्र्यंबक द्रवीड यांनीं प्रसिद्ध केलें आहे. संस्कृत न येणाऱ्या स्त्रियांस व मुलांस देखील आपल्या राष्ट्राच्या प्राचीन इतिहासांतील कथानकें समजून घेण्याची या पुस्तकाच्या द्वारें उत्तम सोय झाली आहे. भाषा सुबोध व सरळ आहे, आणि पुस्तक फारच रसभरित झालें आहे. शांतिपर्वांतील पुष्कळ भाग चांगला समंजस माणसांनीं देखील वाचून मनन करण्यासारखा आहे. या पुस्तकांत जागोजाग महत्त्वाचीं वाक्यें जाडया अक्षरांनीं छापिलीं आहेत, ही योजना चांगली आहे. या रूपानें महाभारतांतील सार महाराष्ट्रीयांच्या हातीं दिल्याबद्दल रा. द्रवीड यांचे आभार मानिले पाहिजेत.

अभिप्राय.

करमणूक.

भारतामृत भाग २ रा.—यांत भीष्मपर्वापासून स्वर्गारोहण पर्वापर्यंत भारतकथांचा सारांश आला आहे. रा. द्रविड यांचा हा प्रयत्न फार स्तुत्य आहे. महाभारत हें एक आमचें नीतिशिक्षणाचें उत्कृष्ट पुस्तक आहे. यास पांचवा वेद, असें म्हणतात इतकी या ग्रंथाची योग्यता आहे. प्रस्तुत भाषांतरमार बरें उतरलें असून त्याचा उपयोग सर्वत्रांस चांगला होईल, यांत संशय नाहीं. या भागास जोडलेली प्रस्तावना वाचनीय आहे. तींतील कित्येक प्रमेयांबद्दल वाद होण्याचा संभव आहे. तथापि साकल्यानें महाभारताचा विचार केला आहे, हें बरें आहे. पुस्तक संग्रहणीय असून सुमारें हजार पानांच्या या पुस्तकाची किंमत फक्त ५ रुपये आहे.

डाक्तर भांडारकर:—महाभारत या मोठ्या राष्ट्रीय काव्यांतील गोष्टी पुढील पिढीला वीर पुरुषांच्या चरित्रांची ओळख करून देण्याला चांगल्या उपयोगीं पडतील.

प्रोफेसर काथवटे:—भारतामृताचे सदराखालीं भारतीय कथांचे वगैरे तात्पर्य फार चांगलें दिलें आहे. त्यापासून ज्यांना संस्कृत मूळ ग्रंथ समजण्यासारखा नाहीं त्यांना उत्तम उपयोग होईल असा आहे.

प्रस्तावना.

अवतरण:

इतिहासोत्तमाद्स्माज्जायंते कविबुद्धयः
पंचेभ्य इव भूतेभ्यो लोकसंविधयस्त्रयः ॥ १ ॥
इतिहासप्रदीपेन मोहावरणघातिना
लोकगर्भगृहं कृत्स्नं यथावत्संप्रकाशितम ॥ २ ॥

प्रत्येक राष्ट्राचा इतिहास त्या राष्ट्राचा जोम दाखवीत असून त्यावरच त्याची भावी उन्नति किंवा अवनति अवलंबून असते. ज्या राष्ट्राचा पूर्व इतिहास चांगला आहे तें राष्ट्र कालगतीनें निकृष्टदशेला पोंचलें तरी तें आपलें डोकें वर काढण्याचा प्रयत्न करतें व त्यांत त्याला यश आल्यावांचून रहात नाहीं. अशा दृष्टीनें पाहतां या आर्यभूमीच्या इतका प्राचीन व उदात्त इतिहास पृथ्वीच्या पाठीवर दुसऱ्या कोठेंच सांपडावयाचा नाहीं. ख्रिस्ती शकापूर्वी सुमारें तीन चार हजार वर्षांपासून तों तहत इ. स. १८०० पर्यंतचा आमचा इतिहास आह्मांला फार उत्तेजनपर आहे. त्याच्या जोरावरच परकीयांचे अनेक आघात बसून सुद्धां आह्मी अनेक रानटी राष्ट्रांप्रमाणें नामशेष न होतां अनेकवार त्यांतून डोकें वर काढून जिवंत राहिलों आहों. ही गोष्ट आमच्या भावी उन्नतीला आशाजनक आहे. अगदीं प्रथमचा आमचा इतिहास ह्मटला ह्मणजे ख्रिस्तीशतकापूर्वी दोन हजार वर्षांपूर्वीचा वैदिककालाचा असून त्यामध्यें त्या वेळच्या आर्यांचें मूळस्वरूप, त्यांचें स्थलांतर, त्यांचें पराक्रम, त्यांची बसाहत त्याचप्रमाणें त्यांची शारीरिक व मानसिक उन्नति, अनेक शास्त्रीय, औद्योगिक व पारमार्थिक विषयांसंबंधानें त्यांनीं केलेले परिश्रम, दूरदृष्टीनें उभारलेली त्याची समाजघटना-यांची बरोबर माहिती मिळते. या पुढील इ. सनापूर्वीच्या १५० पासून इ. सना पूर्वीच्या १०००।८०० पर्यंतच्या पौराणिक कालाबद्दलही ही त्यांची प्रगति सर्व बाजूंनीं कशी कशी वाढली हें कळतें. या कालांत रामायण व महाभारत हीं जगविख्यात ऐतिहासिक वीररसात्मक महाकाव्यें अवतरलीं. ग्रीसच्या व आमच्या वीररसात्मक काव्यांचा अवतार जवळ जवळ समकालीन दिसतो. पुढील तिसऱ्या काळांत बौद्धधर्माचा प्रसार होऊन राजतरंगिणीसारखे ग्रंथ निर्माण झाले व चवथ्या कालांत महाराष्ट्र साम्राज्य स्थापित होऊन भगवा झेंडा अटकेपर्यंत फडकूं लागला. या वेळचा इतिहास बहुतेक बखरींच्या व पोंवाड्यांच्या रूपानें उपलब्ध असून महाभारताप्रमाणेंच या पोवाड्यांतून महाराष्ट्रीयांच्या शौर्याचें मोठें जोरदार वर्णन आहे. असो. यांपैकीं पौराणिक कालांतील महाभारतासंबंधानें आपल्याला येथें विचार करणें आहे.

महाभारताचा ऐतिहासिकपणा–महाभारताचें इतकें महत्त्व कशांत आहे याचा विचार त्यांतील विषयविवेचनानें करण्यापूर्वी हा भारतप्रसंग ऐतिहासिक आहे किंवा कल्पनात्मक आहे व तो ऐतिहासिक असल्यास तो घडला केव्हां हे जे दोन प्रश्न आधुनिक विद्वानांपुढें उभे राहतात त्यासंबंधानें स्वल्प विचार करणें इष्ट वाटल्यामुळें प्रथम तो विचार करून मग मुख्य विषयाकडे वळण्याचा विचार आहे. हें महाभारताचें भाषांतर विशेषतः सामान्य जनतेच्या उपयोगासाठीं केलें आहे ह्मणून या ठिकाणीं वरील दोन्ही प्रश्नांचा विचार करण्याची आवश्यकता होती असें नाहीं. कारण सामान्य लोकांपुढें हे प्रश्न कधीं येत नसून त्यांना याची विशेष गरजही नसते. व मुख्य ग्रंथांतून जें मिळावयाचें तेवढें त्यांना मिळालें ह्मणजे बस्स होतें. असें जरी आहे तरी हल्लींच्या सारख्या जिज्ञासाप्रधान कालांत महाभारतासारख्या ग्रंथावरच्या पुस्तकांत याचा मुळींच उल्लेख न येणें हेंही ठीक नाहीं. ह्मणून या दोन्ही प्रश्नांवरील अनेक विद्वानांनीं केलेल्या विचाराची उगीच दिशा दाखवून महाभारतांतील विषयांवरून काय काय बोध मिळतो या विषयाकडे वळण्याचा विचार आहे.

महाभारतांतील वर्णिलेला प्रसंग खरोखरच ऐतिहासिक आहे किंवा एखादें रूपक आहे यासंबंधानें पुढील विद्वानांचीं मतें लक्षांत घेण्याजोगीं आहेत. (१) कांहीं विशेष अतिशयोक्तीचीं प्रासंगिक कथानकें खेरीज करून यांत वर्णिलेला मुख्य कथाभाग ऐतिहासिक असल्याबद्दल आज बहुतेक सर्व विद्वानांची एकवाक्यता आहे. (२) या वीररसात्मक काव्यांत, जीं पुढें एक झालीं त्या कुरुपांचाल राष्ट्रांमधील भांडण हा मुख्य आधार आहे, असें प्रोफेसर मॅक्डोनेल व लॅसन यांचें मत आहे. महाभारतांतही यासंबंधानें पुढील वाक्य आहे. 'द्रुपद बलाढ्य असून त्याचें आमचें पूर्वीपासून वैर आहे; तेव्हां पांडवांना त्यांचा अंश देऊन त्यांच्याशीं सख्य जोडणें इष्ट आहे.' असा विदुर धृतराष्ट्राला सल्ला देतात. (३) यथाल रहिवाशांना पूर्णपणें जिंकून आर्य लोकांच्या निरनिराळ्या वसाहती झाल्यावर त्यांमध्यें आपसांत जुंपलेला कलह यांत वर्णिला असावा असें वेबरमाहेबाचेंही मत आहे. (४) यांत वर्णिलेल्या पुरुषांपैकीं मुख्य मुख्य पुरुष व गोष्टी यांचें ऐतिहासिक अस्तित्व मिळत असतां या प्रसंगालाच काल्पनिक ह्मणण्याला तसा सबळ पुरावा हवा. (५) अगदीं जुनाट वेदांमध्यें वाताप्पि व कौरवपांडवांचा आजा शांतनु यांचीं नांवें आढळतात. (६) ऐत्तिरेय व शतपथ ब्राह्मणांत अर्जुनाचा नातु जनमेजय याचें नांव आढळतें. (७) कृष्णयजूची एक शाखा जी कठक संहिता तींत धृतराष्ट्र, विचित्रवीर्य यांचीं नांवें असून या कुरुपांचालाच्या भांडणांचा उल्लेख आहे. (८) तैत्तिरीय आरण्यकांत पंडु व धृतराष्ट्र यांचे जनक जे व्यास व त्यांचे शिष्य वैशंपायन यांचा उल्लेख आहे. (९) शुक्लयजूच्या वंशामध्यें पराशरांच्या कुलाचा उल्लेख आहे, व या पराशरांच्या व कृष्णांच्या (व्यासांच्या) हातून कांहीं ऋग्वेदाचीं सूत्रेंही झालीं असावींत. (१०) सांख्ययान, अश्वलायन यांच्या सूत्रांत व पाणिनी सूत्रांत–हा पाणिनि कांहींच्यामतें इ. स. पूर्वी ४०० व कांहींच्या मतें ९०० वर्षांपूर्वी असावा–कुंति, युधिष्ठिर, वासुदेव, अर्जुन, द्रोण अशा या काव्यांतील ठळक ठळक पुरुषांचीं नांवें आढळतात. (११) इ. स. पूर्वी दुसऱ्या शतकांत होऊन गेलेल्या पतंजलीनें जे कांहीं श्लोक उदाहरणादाखल घेतले आहेत ते महाभारतांत आढळतात. (१२) पांच पांडवांचें एकट्या द्रौपदीशीं झालेल्या लग्नाच्या वेळच्या प्रसंगाच्या वर्णनाकडे पाहतां द्रुपदाच्या तोंडीं घातलेल्या उद्गारावरून पांचांचें एका स्त्रीशीं लग्न हा प्रकार ते वेळीं चालू नसून पूर्वीच्या रानटी लोकांमधील असावा. द्रुपदाला या सूचनेचें आश्चर्य वाटून त्याला दैविक कारण देऊन त्याची समजूत घालावी लागली. तेव्हां ही गोष्ट खरी घडली नसती तर अशी अनार्य गोष्ट व्यासांसारख्यांनीं आपल्या मुख्य पात्रासंबंधानें तरी लिहिली नसती. (१३) त्याचप्रमाणें जीं ह्मणून वीररसात्मक काव्यें आहेत त्या बहुतेकांस सुधारलेल्या लोकांचा रानटी किंवा कमी सुधारलेल्या लोकांशीं प्रसंग जुळवून देऊन त्यांत काव्यकारांनीं सुधारलेल्या लोकांची सरशी दाखविलीं आहे. तेव्हां व्यासांनींही एखाद्या रावणाचीच आपल्या रामाशीं गांठ घालून दिली असती व मुद्दाम लोकशिक्षणासाठीं रचलेल्या या काव्यांत गृहकलहाचें बीज रुजविलें नसतें. परंतु त्यांना घडलेल्याच गोष्टी वर्णावयाच्या असल्यामुळें निरुपायानें त्यांना ह्या घडलेल्या गोष्टी द्याव्या लागल्या असाव्या. (१४) महाभारताशिवाय इतर पुराणांतून कौरवपांडवांचा उल्लेख आहे. महाराष्ट्रांतील हल्लींच्या मराठे शाईतील पोवाड्याप्रमाणें कौरवपांडवांचे पोवाडे ते वेळीं गाइले जात असावे. (१५) केवळ काल्पनिक कादंबरी इतकी लोकमान्य होऊन तिचा इतका सार्वत्रिक प्रसार कधीं होत नसतो. (१६) बहुतेक कपोलकल्पित काव्यांमध्यें कवि त्यांतील निरनिराळ्या प्रसंगांचे ग्रह, नक्षत्र, योग देत बसण्याच्या भानगडींत कधीं पडत नसतात. परंतु या काव्यांतील बहुतेक ठळक ठळक प्रसंगांचे नक्षत्रयोग कवीनें दिलेले असून ते बहुतेक अंशीं एकमेकांशीं इतके जुळतात कीं, ते प्रसंग त्या त्या वेळीं प्रत्यक्ष घडले असावेतसें दिसतें. (१७) या प्रसंगाचा उल्लेख महाभारतावांचून इतर पुराणांतूनही आहे. (१८) याप्रमाणें याला बाहेरचीं प्रमाणें असून शिवाय महाभारतांतही यासंबंधानें थोडासा उल्लेख आढळतो. कौरवपांडवांचें सख्य जुळवण्याचा श्रीकृष्णाचा प्रयत्न फुकट जा-

ऊन दोन्ही पक्षांची युद्धाची तयारी झालेली पाहून धृतराष्ट्र कष्टी झाला असतां त्याची गांठ घेऊन त्याचें समाधान करतांना व्यास ह्मणतात, ' हा दैवी नियमानियमच असल्यानें कोणासही टाळतां येणें शक्य नाहीं. तेव्हां कालाकडे दृष्टि देऊन शोक न करतां जें जें होईल तें तें पहात रहा. मी जाऊन हा भारतप्रसंग लिहून ठेवून कौरवपांडवांची कीर्ति अजरामर करून ठेवितों. '

कालनिर्णय–हा भारतयुद्धप्रसंग द्वापार व कलि यांच्या मधल्या कालांत झाला असल्याबद्दलचा उल्लेख या महाभारतांत दोन तीन ठिकाणीं आहे त्यावरून व यांत वर्णिलेल्या निरनिराळ्या प्रसंगाच्या वेळची जी गृहस्थिति दिलेली आढळते तिच्यावरून निरनिराळ्या विद्वानांनीं महाभारताचा काल ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यामतें हा काळ खिस्ती शकापूर्वी पंधराव्या शतकापासून खिस्ती शकापूर्वी दहाव्या शतकापर्यंत मध्यंतरींचा होता. नुकतेंच रा. रा. वेलंदे गोपाल ऐयर बी. ए. वकील चितूर यांनीं अनेक बाजूंनीं याचा विचार करून हा युद्धाचा काल इ. स. पूर्वी ११९४–९३ ठरविला असून युधिष्ठिराचा स्वर्गारोहणकाल इ. स. पूर्वी ११७७-७६ ठरविला आहे.

महाभारताचें महत्त्व–महाभारत हें हल्लीं जगमान्य वीररसात्मक काव्य झालें असून, आज जगाच्या पाठीवरील सर्व सुधारलेल्या राष्ट्रांना याची योग्यता कळूं लागून हा ग्रंथ त्यांचें लक्ष आपल्याकडे वेधून घेऊं लागला आहे. एवढा थोरला याचा कंटाळवाणा ग्रंथविस्तार असून सुद्धां इंग्रजींत वगैरे याचीं अनेक भाषांतरें झालीं असून इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका अशा दूरदूरच्या सुधारलेल्या राष्ट्रांमधून यासंबंधानें विचार चालू आहेत व यावर अनेक निबंधात्मक लेख या देशांतून प्रसिद्ध होत आहेत.हिंदुस्थानांत तर उत्तरेकडे थेट हिमाल यापासून तों दक्षिणेकडे केप कन्याकुमारीपर्यंत व पूर्वपश्चिम ब्रह्मदेशापासून हाला, सुलेमानच्या सरहद्दीपर्यंत अगदीं कानाकोपऱ्याच्या खेड्यापाड्यांमधून देखील सुशिक्षित अथवा अशिक्षित या वर्गांपैकीं असा क्वचितच मनुष्य आढळेल कीं, ज्याला महाभारताचा गंधही नाहीं. अनेक खेड्यापाड्यांमधून हापकीं निरनिराळ्या प्रसंगांचीं, ललितें, नाटकें इत्यादि रूपांनीं अनेक प्रयोग होत असून ते पाहण्याला प्रेक्षकांचे थवेच्या थवे जमत असतात; अनेक देवळांमधून याचें पठण चालू असतें; व सर्व स्त्रीपुरुषांच्या हृदयांत यांतील कथाभाग सतत जागृत आहे. ज्ञानेश्वर महाराजांनीं यासंबंधानें ह्मटलें आहेः—

भानुतेजें धवळिलें । जैसें त्रैलोक्य दिसे उजळिलें ॥ तैसें व्यासमती कवळिलें । मिरवे विश्व ॥१॥
कां सुक्षेत्रीं बीज घातलें । तें आपुलियापरी विस्तारिलें ॥ तैसें भारती सुरवाडलें । अर्थजात ॥ २॥
नातरी नगरांतरीं वसिजे । तरी नागरिकचि होइजे ॥ तैसें व्यासोक्तितेजें । धवळित सकळ ॥३ ॥
नाना घनीभूत सुवर्ण । जैसें न्याहाळितां साधारण ॥ मग अळंकारीं बरवेपण । निवाड दावी ॥४॥
तैसें व्यासोक्ति अळंकारिलें । आवडे तें बरवेपण पातलें ॥ तें जाणोनि काय आश्रयिलें । इतिहासीं॥५॥
नातरी पुरातिये प्रतिष्ठे लागीं । सानीव धरूनी आंगीं ॥ पुराणें आख्यानरूपें जगीं । भारता आलीं ॥ ६ ॥
ह्मणऊनि महाभारतीं नाहीं । तें नोहेचि लोकीं तिहीं ॥ येणें कारणें ह्मणिपे पाही ॥ व्यासोच्छिष्ट जगत्रय ॥ ७ ॥

यावरून या महाभारताचें महत्त्व लक्षांत येणार आहे. ज्ञानेश्वर महाराजांनींही याला व्यासकृत इतिहासच ह्मटलें आहे. तसेंच महाभारताच्या आदिपर्वांतही याला नाना राजांसंबंधानें घडलेला हा इतिहास व्यासांनीं रचून त्याची उपयुक्तता वाढविण्यासाठीं यांत निरनिराळ्या प्रसंगानें निरनिराळे विषय आणून चारी वेद यांत ओतून हा पांचवा वेद निर्माण केला आहे; व चार वेदांशीं तोलून पाहतां याचेंच पारडें खालीं जाईल असें ह्मटलें आहे व तें अक्षरशः खरें आहे. केवळ पाश्चात्यांच्या दृष्टीनें याचा विचार करून केवळ वीररसात्मक भाग तेवढा एका कवीचा (व्यासांचा) समजून बाकीचा सर्व प्रक्षिप्त समजण्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. कारण वीररसात्मक काव्य केवळ वीररसपोषक ठेवून त्यांत इतर विषयांना जागा यावयाची नाहीं हा पाश्चात्य कवींचा निर्बंध पौर्वात्य पुराणकवी पाळीत आले असल्याचें दिसत नाहीं; व

आपल्या काव्यांत प्रसंगोपात सर्व प्रकारचे विषय घालून तो सर्वसंग्रहात्मक शिक्षणाचा ग्रंथ बनविण्याकडे आमच्या पुराणकवींचा कल दिसतो; व या धोरणावरच सर्व पुराणें रचलेलीं दिसतात. तसेंच ह्या राष्ट्रांत अध्यात्मिक विचारांचें प्राबल्य अधिक असल्यानें प्रत्येक पुराणांत प्रसंगोपात कमी अधिक प्रमाणानें तो विचार गोवला जाणें हेंही साहजिकच आहे. आणि ह्याच धोरणानें निर्दिष्ट केलेल्या उद्देशानें ज्ञानांजनशलाकेनें अज्ञानी लोकांचे डोळे साफ करण्याकरितां या भारतेतिहासांत नानाविध श्रुतिविषय येऊन या पुराणपूर्णचंद्रानें श्रुतिरूप चांदण्याच्या साह्यानें मोहरूपी अंधकार पार नाहींसा केला आहे. याचे जवळ जवळ एक लक्ष श्लोक असून पैकीं जवळ जवळ आठ हजारांचा अर्थ व्यास व शुक यांखेरीज कोणाला कळला नाहीं असें यांत ह्मटलें आहे व त्यासंबंधानें असा उल्लेख यांत आहे कीं, व्यासांना एवढें थोरलें काव्य लिहून काढण्यास जेव्हां कोणी लेखक मिळेना तेव्हां लिहितांना आपली लेखणी न थांबेल तर आपण लिहिण्याचें पतकरतों या अटीवर गणपतींनीं लिहिण्याचें कबूल केलें. तेवेळीं व्यासांनीं अर्थ समजून घेऊन मात्र लिहीत जा असें गणपतीना सांगून त्यांना सुद्धां विचार करण्याला लावण्याजोगे दुर्बोध श्लोक मधून मधून घातले आहेत, असें आदिपर्वात ह्मटलें आहे. हें कसेंही असो व या दुर्बोध श्लोकांची संख्या कितीही असो, पण यांत कांहीं फार दुर्बोध श्लोक आहेत एवढें मात्र खास. असो. याप्रमाणें महाभारताचें महत्त्व असून आजमितीलासुद्धां मनुष्याच्या वर्तनाला योग्य वळण लावून देणारें महाभारत व रामायण यांसारखे दुसरे ग्रंथ सांपडणें कठिण आहे. आज सुमारें तीन हजार वर्षेपर्यंत आह्मीं याला जिवाशीं धरिलें आहे व हल्लीं परदेशांतही जो याचा प्रसार होत आहे त्याचा विचार करतां थोडक्याच काळांत हा ग्रंथ त्या त्या राष्ट्रांतील मुख्य काव्य होऊन बसेल यांत संशय नाहीं.

प्रक्षिप्तवादः-कुरुपांचाल या दोन शेजार शेजारच्या राष्ट्रांमध्यें पूर्वकालीं भांडण झालें असावें, व त्यांचा अलीकडील मराठेशाहींतील पोवाड्याप्रमाणें तेवेळच्या निरनिराळ्या शाहिरांनीं त्याचा इतिहास गाईला असावा व ते सर्व पोवाडे पुढें एक होऊन त्यापासून हें महाभारत काव्य निर्माण झालें असावें, असा पाश्चात्य पंडितांचा त्याचप्रमाणें आमचेकडील कांहीं आंग्लविद्याविभूषित विद्वानांचा अभिप्राय आहे. तत्त्वशोधनाची जिज्ञासा ठेवून तत्त्व शोधून काढणें इष्टच आहे; परंतु आपल्या देशाच्या इतिहासाचें परीक्षण करतेवेळीं आपण परप्रत्ययनेय चष्मा न वापरतां निराळा चष्मा वापरला पाहिजे. प्रस्तुत काव्याचा ऐतिहासिक खरेपणा व कालनिर्णय यासंबंधानें केलेल्या विवेचनावरून यांतील ऐतिहासिक मुख्य कथाभाग व्यासांनीं लिहिला असण्याचा पुष्कळ संभव आहे. तरी हल्लीं आहे एवढें सर्व महाभारत व्यासांनीं खचित लिहिलें नसावें. सूतांनीं शौनकांना, वैशंपायनांनीं जनमेजयाला व यांतील निरनिराळे प्रसंग निरनिराळ्यांनीं निरनिराळ्यांना सांगतेवेळीं त्यांचे स्वतःचे शब्द त्यांत कांहीं येऊन याप्रमाणें हा ग्रंथ बराच फुगला असावा व हा इतका जुनाट ग्रंथ असल्यानें निरनिराळ्यांनीं निरनिराळीं कांहीं त्या त्या कालीं प्रचलित तत्त्वें त्यांत ढकलून दिलीं असावा हें पुष्कळ संभवनीय आहे. तें कसेंही असलें तरी हीं मागून घुसलेलीं तत्त्वेंमूळ व्यासरुतीपासून वेगळीं करण्याचें काम दुरापास्त आहे व हें हल्लींचें महाभारताचें स्वरूप आज जवळ जवळ दोन हजार वर्षांच्या पूर्वीपासूनचें असल्यानें दोन हजार वर्षापूर्वीचा आमच्या पूर्वजांचा इतिहास शिकविणारा या दृष्टीनें ह्याचें अशा स्वरूपामधलें महत्व आह्मां आर्यांना कमी नाहीं.

कथानक—येथवर भारताच्या ऐतिहासिक सत्यतेसंबंधानें व कालनिर्णयासंबंधानें विचार झाला आतां आपण यांतील मुख्य कथानकाकडे वळूं. कौरव व पांडव या दोन भावाभावांच्या कुलामध्यें लहानपणापासून द्वेष वाढत जाऊन दुर्योधनानें पांडवांना-त्यांचा राज्यावर वडीलपणामुळें हक्क असतां राज्यापासून मुकविण्याचे अनेक प्रयत्न केले, व त्या सर्वांचा शेवट अखेरीस घोर युद्धामध्यें होऊन त्यांत कौरवांचा समूळ नाश झाला. भीष्मद्रोणरूपी जिला भक्कम तट असून जयद्रथरूपी जलानें तुडुंबलेली; शल्यरूपी नीलकमलानें मनोहर, कर्णरूपी जिचा वीराचा प्रवाह चाललेला आहे, कर्ण-

रूपी जिच्या तीराची खळबळ उडून राहिली आहे, अश्वत्थामा व विकर्णरूपी घोर मगरींनीं जी भरली आहे व दुर्योधनरूपी भोंवऱ्यांनीं दुर्गम अशी तुफान रणनदी पांडव, केशवरूपी कुशल नावाड्याच्या साह्यानें सुरक्षितपणें तरून पार पडलें. याप्रमाणें याचा मुख्य कथाभाग असून याचें विस्तृत वर्णन व अनेक प्रसंगीं प्रसंगोचित समावेश केलेल्या मागच्या दंतकथा व अन्य विषय यांनीं हा ग्रंथ एवढा फुगला आहे. याचीं अठरा पर्वें असून आदिपर्वात वंशवर्णन, कौरवपांडवांचे जन्म, त्यांचे लहानपणचे व्यवसाय, कौरवपांडवामधील द्वेषाला सुरवात, पांडवरूपी कांटा काढून टाकण्याची दुर्योधनाची खटपट वगैरे भाग आले असून पुढें जळून खाक होणाऱ्या विषवृक्षाचें बीजारोपण यांत झालें आहे. दुसऱ्या सभापर्वात युधिष्ठिराला द्यूताला बोलावून त्यांत त्याचें सर्वस्व हरण करून भरसभेंत द्रौपदीची विडंबना करण्यांत त्या बीजाला अंकुर फुटतो. पुढें वनपर्वात पांडवांना बारा वर्षं वनांत हिंडावें लागलें त्याचें वर्णन आहे. विराटपर्वात विराटाच्या घरीं वेषांतरानें पांडवांचें एक वर्ष अज्ञातवासांत गेलें तो कथाभाग आहे. शेवटीं तेथें उघडकीस आल्यावर पांचव्या उद्योगपर्वात पांडवांनीं दायभाग मागितला असतां दुर्योधन कांहीं तरी खुसपट काढून तो देण्याचें नाकारतो, व दोन्ही बाजूंनीं युद्धाची जय्यत तयारी होते. पुढें भीष्म, द्रोण, कर्ण व शल्य या चार पर्वांत दोन्ही दळाचें युद्ध, दोन्ही पक्षांचा बहुतेक नाश वर्णिला आहे. त्या त्या प्रसंगाचे वेळीं कौरवांच्या बाजूला जे सेनाधिपती होते त्यावरून त्या त्या पर्वांना वरील नांवें पडलीं आहेत. या शल्यपर्वामध्येंच असलेल्या गदापर्वात भीमदुर्योधनांचें गदायुद्ध होऊन त्यांत दुर्योधन पडला आहे. दहाव्या सौप्तिक पर्वात दुर्योधनाला वचन दिल्याप्रमाणें अश्वत्थाम्यांनीं पांडवाच्या गोटामध्यें रात्रीं छापा घालून सर्व पांडवपक्षीयांची कत्तल केली असून पांच पांडवांना श्रीकृष्णानें मोठ्या शिताफीनें वांचविलें आहे. याप्रमाणें भारतयुद्धाचा येथे शेवट होऊन 'सत्यमेव जयते' या न्यायानें जयश्रीनें पांडवांना माल घातली. लढणाऱ्यांपैकीं पांडवांच्या बाजूचे पांच पांडव, श्रीकृष्ण, सात्यकि, युयुत्सु एवढे उरून कौरवांकडचे अश्वत्थामा व कृप हे दोघेच बाकी राहिले. दोन्हीं कडील बाकी सर्वांचा फडशा उडाला. हा युयुत्सु धृतराष्ट्राच्या राखेचा मुलगा असून तो युद्धाच्या आरंभींच पांडवांच्या बाजूला येऊन मिळाला होता. अकराव्या स्त्रीपर्वात युद्धांत मेलेल्या राजांच्या स्त्रियांचा शोक असून बाराव्या शांतिपर्वात व तेराव्या अनुशासन पर्वात स्वजनांना मारल्याबद्दल कष्टी झालेल्या युधिष्ठिराला राजधर्म, मोक्षधर्म, निरनिराळे व्रतनियम सांगून भीष्मांनीं त्याचें समाधान केलें आहे. चवदाव्यांत युधिष्ठिराचा अश्वमेध, पंधराव्यांत धृतराष्ट्राचा आश्रमवास, सोळाव्या मौसलपर्वात यादवांची यादवी व श्रीकृष्णाचें निजधामाला जाणें, व त्यामुळें सतराव्या महाप्रस्थानपर्वात पांडवांचें स्वर्गाला निघणें व अठराव्यांत स्वर्गाला जाणें याप्रमाणें वर्णन आहे.

स्वभाव वर्णन—याप्रमाणें यांतील कथाभाग असून यासारखें पात्रवैचित्र्य व विषयवैचित्र्य दुसऱ्या कोणत्याच ग्रंथांत सांपडावयाचें नाहीं. यामध्यें मानवी स्वभावाचें वैचित्र्यवर्णन कांहीं प्रयासावांचून स्वाभाविकपणें झाल्याचें दिसतें. निरनिराळे मानवस्वभाव दाखविणाऱ्या अनेक ठळक ठळक पुरुषांचा यामध्यें समावेश झाला आहे. व ह्या सर्वांचें ऐतिहासिक अस्तित्वही दुसऱ्या पुराव्यावरून नाकारतां येण्याजोगें नाहीं. स्वामिभक्त व उदारधी परंतु अभिमानी व गर्विष्ठ कर्ण, ज्याचे दुष्परिणाम ढळढळीत दिसत आहेत अशा गोष्टीचासुद्धां मोह दूर करण्याचें अंगीं सामर्थ्य नसणारा पण सत्यप्रिय व धार्मिक युधिष्ठिर, तापट व सूड केव्हां घेईन ह्मणून उतावीळ झालेला भीम, अतुलपराक्रमी व सौम्य अर्जुन, विनयसंपन्न सहदेव, नीतिविशारद श्रीकृष्ण, सरळमार्गी बळरामदादा, सत्यवचनी राजर्षि भीष्म, ब्राह्मणयोद्धे द्रोण, अविचारी व तिखट अश्वत्थामे, मत्सरानें भरलेला अभिमानी दुर्योधन, उलट्या काळजाचा शकुनि, दुबळा धृतराष्ट्र, दरारा ठेवणारी मानी द्रौपदी, पतिव्रता गांधारी इत्यादि यांतील सर्व पात्रांमध्यें स्पष्ट असे वेगवेगळे गुण दिसून येतात, व ते सर्व शिकण्याजोगे आहेत. तरी यांत अग्रस्थान पटकाविणाऱ्या श्रीकृष्णाच्या व भीष्मांच्या स्वभावावरून पुष्कळ शिकतां येण्याजोगें आहे दोन्ही वा-

जूस खुष ठेवून आपला कार्यभाग कसा साधून घ्यावा व सैन्यबलापेक्षां नीतिबल किती श्रेष्ठ आहे हें जर कोणाला शिकावयाचें असेल तर तें या श्रीकृष्णाच्याच वर्तनावरून शिकून घ्यावें. दोघेही कौरव व पांडव याचे आप्त असल्यानें दोघांनाही यानें कधीं दुखविलें नाहीं खरें; पण आपल्या हेतूला आड न येऊं देतां इष्ट हेतु त्यानें अखेरीस कसा साधला हें खरोखर लक्षांत घेण्यासारखें आहे. आप्तपणामुळें अर्जून व दुर्योधन हे दोघेही त्याच्याकडे युद्धाचे पूर्वी मदत मागण्याला गेले असतां दोघांनाही खुष ठेवण्यासाठीं एका बाजूला आपलें सर्व सैन्य व एका बाजूला आपण एकटा, व तेंही हातांत शस्त्र न घेतां येण्याचें कबूल करून यांपैकीं वाटेल त्याची निवड करण्याचें काम त्यानें त्यांवरच सोंपविलें व त्यावरून अर्जुन व दुर्योधन यांच्या अकलेची तसेंच मनुष्यबलापेक्षां बुद्धिबलच श्रेष्ठ आहे याची जगाला साक्ष पटवून दिली. यानें हातांत शस्त्र धरणार नाहीं ह्मणून जरी प्रतिज्ञा केली होती तरी युद्धाचे वेळीं अनेक आणीबाणीच्या प्रसंगीं पांडवांना याच्या ज्या चार युक्तीच्या गोष्टी मिळाल्या त्या मिळाल्या नसत्या तर त्यांना जय खात्रीनें कधीं मिळाला नसता. अगदीं आरंभालाच स्वजनावरील प्रेमानें अर्जुनानें हातपाय गाळून युद्ध करण्याचें नाकारिलें तेव्हां यानें गीतेचा उपदेश करून कर्तव्यजागृति याच्या ठिकाणीं उत्पन्न केली नसती तर पुढें युद्धाची गोष्टच बाजूला राहिली असती. त्याचप्रमाणें भीष्मांकडून त्यांचें मरण काढून घेण्याचा व अश्वत्थामा मेला ह्मणून युधिष्ठिराकडून वदवून द्रोणांनीं योगसमाधि लाविली असतां त्यांना धृष्टद्युम्नाकडून मारविण्याचा उपाय जर यानें सांगितला नसता तर ते द्रोन नरसिंह भीष्मद्रोण कधींच मेले नसते. त्याचप्रमाणें कर्णाशीं अर्जुनाचा जो युद्धप्रसंग झाला ते वेळचें त्याचें सारथ्यकर्म अलौकिकच होतें. भीमदुर्योधनांचें गदायुद्ध अगदीं निकराला आलें असतां गदायुद्धांत दुर्योधनाचें वर्चस्व जाणून मांडीवर थाप मारून खुणेनें दुर्योधनाची मांडी फोडण्याचा सल्ला भीमाला यानेंच दिला. तसेंच पुत्रशोकानें विव्हळ झालेल्या गांधारीचा भीमाला आलिंगन देतांना कवटाळून जाळून टाकण्याचा बेत ओळखून लोखंडी पुतळा प्रथम तिच्यापुढें करून तिचा राग शमल्यावर भीमाला तिला भेटविणें, दुर्वासऋषी वनामध्यें पांडवांचें सत्व घेण्याकरितां आले असतां त्यांचीच फजीति करून परत पाठविणें, दुःशासन भर सभेंत द्रौपदीचीं लुगडीं फेडीत असतां तिला लुगड्यांचा पुरवठा करून तिची अब्रू राखणें, यांवरून पांडवांकडे यांचें किती लक्ष होतें हें उघड होतें.

भीष्मांनीं केवळ बापाच्या सुखाकडे लक्ष देऊन स्वतःच्या सुखावर पूर्ण पाणी सोडून वचनाप्रमाणें राज्यांत, संसारांत राहून दुर्धर ब्रह्मचर्यव्रत पाळून आपल्या मनावरचा अलौकिक दाब दाखविला. या कडकडीत ब्रह्मचर्यव्रताचा इच्छामरणरूपी जो अलौकिक परिणाम यांच्यामध्यें दाखविला आहे तो तर प्रत्येकानें लक्षांत धरण्यासारखा आहे. ज्या ब्रह्मचर्यामध्यें मृत्यूला सुद्धां जिंकण्याचें सामर्थ्य आहे त्यानें यांनीं सर्व पांडव सैन्याची वाताहात लाविली यांत नवल तें काय ?

राज्याचें जूं ज्याच्या मानेवर पडलें होतें त्या धृतराष्ट्रामध्यें कांहींसा सरळपणा व धर्मभीरूपणा जरी दिसून येतो तरी एका आपल्या मुलाला आवरण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं नसल्यानें त्या सर्व गुणांची माती झाली. व आपल्या दुष्ट मुलाच्या मुठींत गेल्यामुळें तो सर्व कुलाच्या नाशाला कारण झाला.

दुर्योधन दीर्घद्वेषी व असूयाखोर असा जरी होता तरी त्याचा मानीपणा फारच विलक्षण होता. पांडव वनवासांत असतां त्यांना हिणविण्यासाठीं हा तिकडे गेला असतां याचाच पराभव करून चित्ररथ गंधर्व याला घेऊन चालला, तेव्हां पांडवांनीं याची सुटका केली. हा अपमान सहन न होऊन तो प्राण देण्यास निघाला! तसेंच आपल्या सर्व सैन्याचा नाश झाल्यावर हा पाण्यांत दडून राहिला असतां पांडवांनीं याला हुडकून काढलें ते वेळचे याच्या तोंडचे उद्गार बाणेदार आहेत. पांडव वनवासाला जाते वेळीं इंगितावरून पुढें सूड घेण्याचा हेतु दाखवून गेले असतां द्रोणांना एक स्वतंत्र राज्य देऊन आपल्या बाजूला करून घेण्यांत तो किती धोरणी होता हेंही कळून येतें. शकुनिमामामध्यें पां-

डवांचा कांटा उपटून टाकण्याविषयीं दुष्ट बेत रचण्याचें सामर्थ्य व दुःशसनामध्यें दादाचे व मामाचे दुष्ट बेत शेवटास नेण्याला हातभार लावणें यांपलीकडे गुण दिसत नाहींत. हे प्रत्येकीं बुद्धिमान व शूर, पण दुष्ट मनुष्याच्या पूर्ण भरीं भरलेल्या पुरुषांची उत्तम उदाहरणें आहेत.

युधिष्ठिर आपल्या धार्मिकपणानें, सरळपणानें व सत्यप्रियतेनें लोकांना फार आवडता होता, व यामुळें त्याची चांगल्या राजांमध्यें गणना होती. त्याच्या सत्यप्रियतेची तर इतकी कमाल होती कीं युद्धाच्या ऐन बाणीच्या प्रसंगीं आपला सर्वस्वी नाश होत असतां सुद्धां खोटें बोलण्याला त्याचें मन धेईना! सर्व पांडवांमध्यें बंधुप्रेम व वडील भावासंबंधानें आदर अतोनात दिसून येतात. अंगांत वाटेल तें प्राप्त करून घेण्याची ताकद असून ते केवळ वडील भावाच्या वचनासाठीं आपल्या बायकोची विटंबना निमुटपणें आपल्या डोळ्यांनीं पहात राहिले व भावाबरोबर वनवासाचे कष्ट सोसण्यास तयार झाले. भीमामध्यें तापटपणा, खूड घेण्याची प्रबळ इच्छा व अलोट बल असून त्याला इलियडमधला अजॅक्स व वीर्यशाली अर्जुनाला ॲकिलीस ह्मणण्यास हरकत नाहीं.

या काव्यामध्यें आलेल्या कुंति, द्रौपदी वगैरे स्त्रियांमध्यें देखील एक प्रकारचा करारीपणा दिसतो. पेशवाईच्या अखेरीस पेशवाईचें दान इंग्रजांचे हातावर सोडण्याला मदत करून आपली जहागीर कायम राखून विजयश्रीनें झळकत आलेल्या आपल्या पतीला एका पटवर्धनकुलतिलकभूत वीरपत्नीनें, रणांतून असें काळें तोंड घेऊन परत येण्यापेक्षां आपल्या पूर्वजांची वाट धरिली असती तर मी स्वतःला धन्य समजलें असतें,' असें ह्मटलें असल्याचें आमच्या वाचण्यांत आहे. तशाच धर्तीचे जोगचे कुंतीचे व द्रौपदीचे पांडवांना युद्धाला उत्तेजन देण्याच्या वेळचे उद्गार आहेत. धर्मराज जेव्हां 'पांच गांवें तरी दे,' ह्मणून भिकाऱ्यासारखें तोंड पसरून मागण्याचा निरोप श्रीकृष्णाबरोबर दुर्योधनाला पाठवूं लागेला तेव्हां कौरवांच्या रक्तानें भरलेल्या हातानें आपली वेणी घातल्याशिवाय दुसऱ्या कशानें आपलें समाधान होणार नाहीं, असें द्रौपदीनें साफ सांगितलें. तसेंच श्रीकृष्ण, शिष्टाईतून परत येत असतां तेरा वर्षें मुलें भेटलीं नाहींत ह्मणून 'मला त्यांकडे घेऊन चल,' असें कांहीं कुंतीच्या तोंडून आलें नाहीं. आधीं कौरवांशी लढून आपलें राज्य परत मिळविण्याविषयींच ती त्यांना निरोप पाठविते. असें होतें तरी तिच्या अंगीं पुत्रवात्सल्य कमी होतें असें नाहीं. यावरून त्यावेळच्या स्त्रियांमधला जोम दिसून येतो. बारा वर्षें वनवासांत राहून द्रौपदीनें आपल्या नवऱ्यांची काळजी कशाप्रकारें घेतली याची कल्पना तिनें सत्यभामेला सांगितलेल्या स्त्रीधर्मासंबंधाच्या तिच्या तोंडच्याच उद्गारांवरून होणार आहे. कारण तो तिचा उपदेश उगीच कांहीं तरी नसून अनुभवजन्य होता. त्याचप्रमाणें गांधारीच्या अंगीं सुद्धां तिच्या नवऱ्यामध्यें नसलेला असा कांहीं करारीपणा दिसतो. नवऱ्यावर निस्सीम भक्ति असूनही एक प्रकारचा तिचा अधिकार त्याच्यावर दिसून येतो. दुर्योधनाची वाट लावून दोन्ही कुलांची शांतता राखण्यास तिनें आपल्या नवऱ्यास अनेक वेळां सांगितलें. प्रत्यक्ष मुलगा युद्धाचें आरंभीं आशीर्वाद घेण्याला आला असतां 'धर्म तेथें जय. तूं खुशाल युद्ध करून स्वर्गाची वाट धर.' असें ती ह्मणते याहून आणखी तो करारीपणा काय असला पाहिजे!

आतां यांतील ठळक ठळक मंडळींपैकीं विदुर राहिले. हे मोठे शहाणे, दूरदर्शी राजनीतिकुशल असे होते. त्यांची बुद्धि अलौकिक असून पांडवावरचें त्यांचें प्रेम निस्सीम होतें. लहानपणीं पांडवांची वाट लावण्याचे जे दुर्योधनानें नानाप्रयत्न केले ते सर्व निष्फळ होण्याला कारण हेंच. यांनीं युधिष्ठिराला सांगितलेली नीति विदुरनीति ह्मणून प्रसिद्ध आहे.

सामाजिक व्यवस्था:—आतां या महाभारतावरून आज दोन तीन हजार वर्षांच्या पूर्वी आमची सामाजिक, औद्योगिक, राजकीय व अध्यात्मिक (धार्मिक) व्यवस्था कशी होती याचा विचार करूं.

वर्णव्यवस्था-एकाच कुटुंबांतील चार माणसांनीं श्रमविभागाच्या तत्त्वावर निरनिराळीं कामें आपसांत वांटून घेऊन निरनिराळ्या कामांची जबाबदारी ज्या त्या कामाला लायख अशा निरनिराळ्या माणसांनीं आपापल्या शिरावर घेतल्यानें त्या कुटुंबाची व्यवस्था ज्याप्रमाणें सुरळीत चालते त्याच तत्त्वावर

आमच्या पूर्वजांनीं आपल्या आर्यकुटुंबाचीं कामें पूर्वी ज्याच्या त्याच्या मगदुरीप्रमाणें वांटून घेतलीं असावींत, व त्यावरूनच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे वर्ण प्रचारांत आले असावेत. त्यांत दूरदर्शीपणाच्या अनेक समाजबंधनांनीं या राष्ट्रशकटाला वाटेवर ठेवण्याचें मोठें जोखमीचें काम ब्राह्मणांनीं आपल्या शिरावर घेतलें व तें त्यांनीं आजपर्यंत किती उत्तम तऱ्हेनें पार पाडलें त्यासंबंधानें प्रसिद्ध इतिहासकार डाक्टर हंटरचे उद्गार आह्मी आमच्या वाचकांसाठीं पुढें देतों. ते ह्मणतात, 'इतिहासाच्या आरंभकालापासून ब्राह्मणांनीं लोकांच्या मनाला नीट वळण लावून देऊन स्वतःला त्यांच्या आदराला पात्र करून घेऊन शांतपणें त्यांवर अम्मल केला आहे, व हिंदुस्थानच्या सर्व रहिवाशांपैकीं अति उच्च ही जात आहे ह्मणून परकीयांनीं सुद्धां कबूल केलें आहे. ब्राह्मणांनीं जें सर्वांवर वर्चस्व मिळविलें आहे त्याला पुष्कळ अंशीं कारण त्यांनीं जें राष्ट्राचें मोठें कल्याण केलें आहे तें आहे. '

(But since the down of history, Brahmin has calmly ruled, swaying the minds and receiving the homage of the people, and accepted by foreign nations as the highest type of Indian mankind. The parmanent position which the Brahmins won result is in no small measure from the Benefit which they bestowed.)

राष्ट्राचे एकंदर नियम कितीही चांगले असले तरी योग्य शासनावांचून त्याची अंतर्व्यवस्था व त्याचें परचक्रापासून रक्षण नीट व्हावयाचें नाहीं, ह्मणून तें काम तरवारबहादर क्षत्रियांवर सोंपविण्यांत आलें व त्यांनींही आपली कामगिरी योग्यरीतीनें बजावून आपलें नांव इतिहासांत आदरास पात्र करून घेतलें आहे, हें भारतेतिहास वाचकांस महशूरच आहे. आतां राष्ट्रोन्नतीला तिसरें मुख्य साधन धनोत्पादन तें वैश्यावर सोंपविण्यांत आलें होतें, व नाना उद्योगधंद्यांची अभिवृद्धि करून व परदेशांशीं व्यापार ठेवून त्यांनीं या आर्यभूमीला संपत्तीचें माहेरघर बनवून सोडून हिला एकबेळीं सुवर्णभूमि हें नांव मिळवून दिलें. व या तीन वर्णांची सेवा करण्याचें काम त्या वेळचे जित जे अनार्य त्यांकडे सोंपविण्यांत आलें. याप्रमाणें श्रमविभागाच्या तत्त्वावर जरी या चौघांनीं कार्यक्रम वांटून घेतला होता तरी याचा व्यतिक्रम अगदीं होत नव्हता असें दिसत नाहीं. ज्याप्रमाणें कुटुंबांतील चार भावांचीं कामें वेगवेगळीं असलीं तरी प्रसंगविशेषीं आपल्या कर्तृत्वशक्तीप्रमाणें ते एकमेकांचीं कामें करतात त्याप्रमाणें हेही चौघे भाऊ एकमेकांचीं कामें करीत असावेतसें दिसतें. भारतयुद्धाचे वेळीं युद्धामध्यें चारी वर्णांचे लोक असल्याचा उल्लेख असून द्रोण, अश्वत्थामा, कृप यांनीं तर पुढाकारच घेतला आहे. तसेंच जनक, युधिष्ठिर, भीष्म, गौतमबुद्ध या क्षत्रियांनीं अध्यात्मविचारामध्यें ब्राह्मणांना मागें सारलें आहे. धर्मराजाच्या राजसूय यज्ञाचे वेळीं यज्ञांतील कृताकृत पाहण्याचें काम भीष्मांकडे असून त्यांनींच पुढें युद्धानंतर युधिष्ठिराला अध्यात्मज्ञान सांगून त्याचा मोह दूर केला आहे. त्याचप्रमाणें आज जगमान्य गीतेचा अवतारही क्षत्रियांपासूनच आहे; कारण श्रीकृष्णपरमात्म्यानें ती आपल्या क्षत्रियावतारांतच अर्जुनाला सांगितली आहे, व रामगीता क्षत्रिय रामानेंच आपल्या भावाला सांगितली. याप्रमाणें एकाचें काम दुसऱ्यानें किंवा प्रसंगविशेषीं एकच काम सर्वांनीं मिळून केल्याचीं जरी कांहीं उदाहरणें सांपडतात तरी उपदेशानें राष्ट्राला योग्य वळण लावून राजाला योग्य सल्ला देण्याचें काम ब्राह्मणाचें, तरवारीच्या जोरावर राष्ट्र संभाळण्याचें काम क्षत्रियाचें, धनोत्पादनानें देशाची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचें काम वैश्याचें व सेवा करण्याचें काम शूद्राचें, याप्रमाणेंच सामान्य श्रमविभागाचें तत्त्व अमलांत असावेसें दिसतें. ब्राह्मणांमधील अनुपमेय दूरदर्शित्व व मंत्रावेशारद्ता व क्षत्रियांमधील अनुपमेय तरवारबहादरी यांवरून मंत्रावांचून बल निरुपयोगी व बलावांचून मंत्र निरुपयोगी या तत्त्वावर ब्राह्मणक्षत्रियांचा संबंध इतका निकट दिसतो कीं, जेव्हां जेव्हां स्वराज्यसुखाचा अनुभव या भरतभूमीला मिळाला आहे तेव्हां तेव्हां रामाबरोबर वसिष्ठ, युधिष्ठिराबरोबर धौम्य, शिवाजीबरोबर रामदास अशी जुळल आढळतेच.

अशा या वर्णव्यवस्थेपासून पुष्कळ फायदे झाले आहेत, हें मागच्या इतिहासावरून स्पष्ट होतें. परंतु अनेक कारणांनीं–विशेषतः लक्ष्मीच्या मदानें–एक प्रकारच्या स्वार्थपरतेनें पछाडलें असतां कर्तव्यपराङ्मुखता येत असते, व त्याच्या योगानें वरचेवर या देशावर अनेक संकटें ओढवलीं आहेत. तरी मुख्य राष्ट्रीय पाया शुद्ध तत्त्वावर उभारला असल्यानें त्या अनेक प्रसंगांतून फिरून फिरून त्यानें वर डोकें काढलें आहे व पुढेंही काढील. ईशप्रातीला ज्याप्रमाणें आमच्या धर्मानें तो कोठें आहे हें हुडकत बसण्याचें कारण आह्मांला ठेविलें नसून त्याला आमच्या हृदयांतच ठेवून स्वतःला ओळखण्यांतच सुलभ असा त्याच्या प्राप्तीचा उपाय करून ठेवला आहे, त्याचप्रमाणें आमची भौतिक उन्नतिही आह्मी स्वतःला ओळखूं लागलों कीं होणार आहे. आज मित्तीला-सुद्धां मुत्सद्दी, (Political), शिपाई (Soldier) व्यापारी (Trader) व नोकर (Servant) असे चार भेद सर्व राष्ट्रांमधून दिसून येत असून तेवेळची वर्णव्यवस्था ह्मणजे यांहून कांहीं वेगळी होती असें दिसत नाहीं. वेदाध्ययन, वैदिककर्में, वगैरे तिन्ही वर्णांना सामान्यतः सारखींच होतीं. फक्त शूद्राला कांहीं हक्क कमी होते. परंतु पहिल्या तीन वर्णांचे जिंकणारे व शूद्र जित होते. हा भेद लक्षांत घेतला असतां मोठमोठ्या पदवीस चढलेल्या पाश्चात्य राष्ट्रांनीं जितांना ज्या रीतीनें बागविलें आहे व बागवित आहेत, त्यापेक्षां त्यांचें शूद्राशीं वर्तन किती तरी उदारपणाचें होतें असें ह्मणावें लागतें. कारण या चारीवर्णांमध्यें रोटीबेटी व्यवहार होत असावा असें एकंदर महाभारतांतील वर्णनावरून अनुमान निघतें. मात्र एवढाच याला प्रतिबंध दिसून येतो कीं, खालच्या वर्णाची मुलगी करण्याला हरकत नसून त्या वर्णांत वरच्या वर्णाची मुलगी देण्याला मात्र प्रतिबंध होता. यावरून यामध्यें सुद्धां त्यांचें किती उदारत्व दिसून येतें तें पहा. एका खालच्या वर्णाच्या मुलीशीं वरच्या वर्णानें संबंध केल्यानें सहज एका मुलीचा वंश उन्नतीला चढविल्याचें श्रेय येतें; तेंच वरच्या वर्णाची मुलगी खालच्या वर्णाला दिल्यानें एका उच्च स्थितींतल्या मुलीला अवनतीला नेल्याचें पाप लागतें. वं कोणालाही उच्च स्थितीपासून नीच स्थितीला जाणें इष्ट नसून नीच स्थितीपासून वर चढण्याची सर्वांचीच हाव असते. चारी वर्णांची उत्पत्ति जरी एकाच देहापासून आहे तरी आचारविचारांच्या योगानें त्यांमध्यें भिन्नता आली आहे, असें यांत स्पष्ट आहे. यावरून त्यावेळीं चारी वर्ण एकमेकांकडे कोणत्या दृष्टीनें पहात होते हें स्पष्ट होतें.

वेदांत चार वर्णांची एकाच पुरुषाच्या ज्या निरनिराळ्या अवयवांपासून उत्पत्ति झाल्याचा उल्लेख आहे, त्याचें स्पष्टीकरण सुद्धां आमच्या वरील विवेचनांतच आहे. ब्राह्मणांचें बल तोंडांत (मंत्रसामर्थ्यावर), क्षत्रियांचें बाहूंत (तरवारीवर), वैश्याचें मांड्यांत (मांड्याच्या श्रमानें द्रव्यार्जनांत) व शूद्रांचें पायांत (भाडोत्री काम करण्यांत) असल्यानें ' ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः । ऊरूतदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रोऽजायत ॥ ' याप्रमाणें या चार वर्णांची ब्रह्मदेवाच्या चार निरनिराळ्या अवयवापासून उत्पत्ति सांगितली आहे. परंतु हल्लींच्या स्थितींत मात्र जित या नात्यानें सर्वांना सेवेवांचून दुसरा धंदा न उरतां शूद्रत्व येत चाललें असून सर्वत्र अधोगती येत चाललली आहे. मोठमोठ्या योग्यांना देखील ज्याचें कोडें पडलें अशा गहन सेवाधर्मांत सुखांत कालक्षेप करावा लागत आहे. कारण व्यापारसुद्धां अनेक कारणांनीं, देशाची सांपत्तिकस्थिति सुधारेल अशा तऱ्हेनें करण्याचें आमच्या हातीं राहिलें नसून केवळ परतंत्रानें अडतागिरी ऊर्फ भाडोतरीपणा करण्याचें तेवढें आमच्या हातीं राहिलें आहे.

आश्रमव्यवस्था—तसेंच ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम त्यावेळपासून अस्तित्वांत असून पहिल्या ब्रह्मचर्याश्रमांत उपनयनानंतर अविवाहित स्थितींत गुरुघरीं विद्याभ्यास पूर्ण करावयाचा, पुढें गुरूच्या आज्ञेनें लग्न करून घेऊन गृहस्थाश्रमामध्यें सर्वांचा परामर्श घेत विषयोपभोग घेतल्यावर पुढें वानप्रस्थाश्रम घेऊन अंशतः विषयोपभोग सोडून परोपकार करीत राहणें, व पुढें पूर्ण विषयत्याग करून स्वरूपज्ञानाच्या खटपटीला लागून परोपकारांत देह खर्ची घालीत राहणें, याप्रमाणें या चार आश्रमांची परंपरा असून, ब्राह्मणांना हे अवश्य,

क्षत्रियवैश्यांना त्यांच्या इच्छेनुरूप सांगितले असून, शूद्राला एका गृहस्थाश्रमावांचून दुसरा आश्रमच सांगितला नाहीं. या चारी आश्रमांची महती जरी निरनिराळ्या ठिकाणीं विशेष गाण्यांत आली आहे तरी एकंदर श्लोकावरून ' प्रपंच साधुनि परमार्थाचा *लाभ ज्यानें केला तो नर भला*' अशा पुढील कालच्या अनेक संतांच्या उपदेशाप्रमाणें देवतातिथिसेवकांचा परामर्श घेत अलिप्तपणें विषयोपभोग भोगीत राहून परोपकाराला संधि देणारा गृहस्थाश्रमच सर्वांत श्रेष्ठ असें यांत अनेक ठिकाणीं म्हटलें आहे. कारण बाकीचे सर्व आश्रम या एका गृहस्थाश्रमावरच अवलंबून आहेत. वासरूं जसें आपल्या आईचीं चारी स्तनें सारखीं पितें त्याप्रमाणें या आश्रमांत राहून धर्मार्थकाममोक्षांकडे सारखें लक्ष द्यावें, असें म्हटलें आहे. अतिथींचा वगैरे सत्कार या आश्रमांत चांगला ठेवण्यांत येत असे. अतिथी घरीं आला असतां पाय धुण्याला पाणी व आसन हीं देण्यांत येत होतींच, पण शक्त्यनुसार गाय देण्यांत येत असे. अतिथि, देव, नोकर, पशुपक्षी, व इतर प्राणी यांना देऊन मग गृहस्थानें खावें असें आहे. वानप्रस्थ व संन्यास हे आश्रम केवळ परोपकारामाठीं असून आपल्या सुखावर पाणी सोडून परोपकार करण्याची प्रवृत्ति असणाऱ्या कांहीं महात्म्यांसाठींच तो आहे. व ब्रह्मचर्य तरुणांचें वीर्य कांहीं काल तरी कायम ठेवून राष्ट्राचा जोम वाढविण्याच्या हेतूनें आहे. या ब्रह्मचर्याला भारतांत फारच महत्त्व दिलें असून केवळ अविवाहित स्थितीलाच ते वेळीं ब्रह्मचर्य म्हणण्याचा परिपाठ नसून विवाहित स्थितींतही स्त्रीशीं संबंध नसेल तर किंवा फक्त ऋतुकालींच संबंध असेल तर त्याला सुद्धां ब्रह्मचर्यच म्हटलें आहे. जर अशा प्रकारचें ब्रह्मचर्य आजमितीला पाळण्यांत येईल तर राष्ट्राचा जोम किती तरी वाढेल ! त्याचप्रमाणें ज्या हल्लींच्या प्रगतीच्या काळीं दांत पडून, केस पिकून नातवंडें पतवंडें पाहून सुद्धां विषयोपभोगांना रजा देण्याचें जिवावर येतें, त्या मानानें पाहतां उतारवय झाल्यावर संसाराचा बोजा मुलावर सोंपवून त्यापासून अलिप्त होणें हा थोडा का आत्मनिग्रह म्हणावा ?

लग्नाचा विचार:—चारी वर्णांमध्यें खालच्या वर्णाची मुलगी वरच्या वर्णाला करतां येत असून खालच्या वर्णाला मात्र मुलगी देतां येत नसे, हें वर सांगितलेंच आहे. लग्नाचे एकंदर आठ प्रकार सांगितले असून पैकीं ब्राह्म, गांधर्व व राक्षस हे विधी कमी अधिक मानानें प्रचारांत असावेत. पैकीं ब्राह्मणाला *ब्राम्हच विधि सांगितला आहे. गांधर्व व राक्षस* क्षत्रियांना प्रशस्य मानला जात असे. भीष्मांनीं विचित्रवीर्याकरितां अंबा व अंबालिका या दोन मुलींना तिसऱ्या विधीनेंच हरण करून आणिल्या. कुंति, गांधारी यांचें ब्राह्म, द्रौपदी, सुभद्रा यांचें गांधर्वविधीनें लग्न झालें आहे. विधि कोणत्याही प्रकारचा असला तरी लग्नाचे वेळीं मुलीचें वय बरेंच असलें पाहिजे. कारण द्रौपदी, सुभद्रा यांनीं तर स्वयंवरानें आपलें पती वरले असून गांधारीला जे वेळीं आपल्याला ज्याला आपल्या बापानें देऊं केली तो आपला नवरा आंधळा (अंध) आहे, असें कळल्याबरोबर आजन्म तीं डोळ्यावर पट्टी बांधून घेऊन राहिली. ही गोष्ट तिला चांगलें समजूं लागण्याच्या वयांत ती असल्यावांचून झाली नसली पाहिजे. त्याचप्रमाणें अर्जुनाचें चित्रांगदेशीं व अभिमन्यूचें उत्तरेशीं हीं दोन लग्नें तर विशेष लक्षांत ठेवण्याजोगीं आहेत. कारण या दोघांना पुढें लगेंच मुलें झालीं आहेत. अज्ञातवासाच्या अखेरीस उत्तरेशीं अभिमन्यूचें लग्न होऊन पुढें लगेंच सुरूं झालेल्या युद्धांत अभिमन्यु पडला तेव्हां ती गर्भार होती. त्याचप्रमाणें एका स्त्रीशीं अनेकांनीं लग्न लावण्याचा प्रचार या कालीं नसून तो पूर्वीच्या रानटी लोकांमधील असावा. आणि म्हणूनच द्रौपदीला पांच पांडवांना देण्याचा विचार ऐकून, द्रुपदाला आश्चर्य वाटून, तसे करण्याला त्याची हरकत आली; व व्यासांना युक्तिवादानें त्याची समजूत घालावी लागली. केशवपनाचा उल्लेख कोठें नसून सतीचा प्रचारही फार नसावासें वाटते. कारण एवढ्या थोरल्या भारत युद्धांतील कत्तलीनंतर मेलेल्या वीरांच्या इतक्या बायका तेथें जमल्या असून उत्तरकार्याचें वर्णन आहे, पण त्यांत सतीचा उल्लेख नाहीं. पंडूच्या दोन बायकांपैकीं माद्री त्याबरोबर सती गेली असें म्हटलें आहे. मुली देण्याघेण्यासंबंधानें इतरांच्या कबुलीपेक्षां मुलीच्या कबुली-

ची मातब्बरी विशेष समजली जाई. बापानें जिचें लग्न करून दिलें नाहीं अशा मुलीनें ऋतु आल्यावर तीन वर्षे बाट पाहून मग स्वतः नवरा पाहून लग्न करावें. याला कांहीं हरकत नसून अशा लग्नापासून होण्याऱ्या प्रजेला कांहीं गौणपणा नाहीं असा यांत उल्लेख आहे. यावरूनही प्रौढविवाह ते बेळीं चालूं असावा; याला पुष्टीकरणच येतें. सप्तपदी होऊन पाणिग्रहण झाल्यावर नवरा बायकोचा संबंध कायमचा समजण्यांत येत असे. आईच्या बाजूनें सपिंड व बापाच्या बाजूनें सगोत्र मुलीशीं लग्न निषिद्ध सांगितलें आहे. अक्षतयोनी मुलीचा नवरा मेला असतां तिच्या मर्जीनुरूप तिनें तप करावें, अगर दुसरा नवरा करावा असें आहे. याहून निराळ्या प्रकारच्या पुनर्विवाहापासून झालेला मुलगा गौण मानण्यांत येत असून त्याला श्राद्धाला बसवूं नये असा उल्लेख आहे, यावरून पुनर्विवाह सशास्त्र मानला जात असून पुनर्विवाहित विशेष प्रसंगासाठीं गौण समजला जात असावा.

विद्यार्जन:—तिन्ही वर्णांच्या लोकांना वेदाध्ययन हें अवश्य शिक्षण मानलें जात असे. शिवाय ज्या त्या वर्णाच्या लोकांना आपापले धंदे शिकविण्यांत येत असावे. विद्यार्जन गुरुगृहीं राहून करण्याचा प्रचार असून हें गुरुगृह बहुतकरून आश्रमाच्या स्वरूपानें गांवाबाहेर असे. ही गांवांतील सर्व बऱ्या वाईट गोष्टींच्या तडाख्याच्या दूर व गांवाबाहेर राहून अभ्यास करण्याची ते वेळची पद्धति हल्लींच्या सुधारलेल्या राष्ट्रांना सुद्धां पसंत पडत चालली आहे; व इंग्लंड वगैरे सुधारलेल्या देशांतून उच्च प्रतीच्या शिक्षणाच्या, एवढेच नव्हे तर कांहीं प्राथमिक शिक्षणाच्या शाळा सुद्धां या पद्धतीबर गांवाबाहेर ठेवून तेथें मुलांच्या कोमल मनाला योग्य वळण देण्यांत येत असतें; आणि हल्लीं तर ज्या ठिकाणीं हिचा मूळ उगम त्या त्या ह्या हिंदुस्थानांतच मुलांना शहरांतून निरनिराळ्या मोहजालांना पुढें ठेवून त्यांमध्यें त्यांना शिक्षण देण्यांत येतें! कौरवपांडवांना सुद्धां द्रोणाचार्यांच्या तालमींतच अशा प्रकारें शिक्षण मिळालें. मुलांच्या शिक्षणक्रमामध्यें तालीम, कुस्त्या, दांडपट्टा वगैरे मर्दानी खेळांचा, गायनवादनादि नाजूक मनोविकार जागृत करणाऱ्या कलांचा, त्याचप्रमाणें पुराणेतिहास व राजनीति यांचा समावेश होत असावा. शिक्षकवर्ग वेदकालापासून बहुतेक ब्राह्मणच असल्याचें दिसतें. ज्या ब्राह्मणांनीं धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, वेदान्त, ज्योतिष, गणितशास्त्र, वैद्यक, इतिहास, नानाविद्या व कला यांवर नेहमीं अल्पसंतुष्ट राहून अमोलिक ग्रंथ निर्माण केले, वे आपल्या बांधवांना—एवढेंच नव्हे तर जगांतील दुसऱ्या राष्ट्रांना सुद्धां—निरपेक्ष बुद्धीनें ज्ञानामृत पाजून उन्नतीला चढविलें,—कारण ज्योतिष, वैद्यक नीतिशास्त्र, वेदान्त, वगैरे सर्वांचा उगम येथेंच असून पुढें तें अरबस्थान, इजिप्त, ग्रीस वगैरे देशांमधून युरोपमध्यें पसरल्याबद्दल बहुतेक विद्वानांनीं आतां निश्चयात्मक सिद्धांत ठरविले आहेत.—त्यांना आपली विद्या स्वतःपाशीं झांकून ठेवून त्याचा दुसऱ्यांना लाभ दिला नाहीं म्हणून नांवें ठेवणें केवळ कुत्सित बुद्धीचें, नीचपणाचें व कृतघ्नतेचें आहे. बगदादचा कालिफ हरूणअलरशीद व शिकंदर बादशाहा यांच्या पदरीं दोन दोन ब्राह्मण वैद्यक शिकविण्यासाठीं असल्याचें कळतें. तसेंच अरबसुद्धां ज्योतिष वगैरे यांच्यापासूनच शिकले. परोपकारासाठीं विद्यादान व आत्मोन्नतीसाठीं विद्यार्जन हें ब्राह्मणांचें ब्रीदच होऊन राहिलें होतें. भैदानांत प्रेक्षक मंडळी जमवून द्रोणांनीं आपल्या शिष्यांची धृतराष्ट्र, भीष्म इत्यादिकांपुढें दिलेल्या परीक्षेचें वर्णन वाचून स्कॉटच्या ऐव्हानोमधील टूर्जामेंटची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं, व यावरून नाइटएरंट्रीचें बंड जें दहाव्या बाराव्या शतकांत युरोपांत माजलें होतें त्याला सुद्धां मूळ महाभारतांतच सांपडतें.

स्त्रीशिक्षण—स्त्रियांना ते वेळीं फार उत्तम उपयोगी शिक्षण मिळत असावें असें मानण्याला पुष्कळ आधार आहे. द्रौपदी, कुंति, गांधारी, शकुंतला, देवयानी वगैरे स्त्रियांच्या तोंडीं जे मधून मधून उद्गार घातले आहेत, त्यावरून आमच्या म्हणण्याची सत्यता कळणार आहे. 'तूं आपल्या पांच नवऱ्यांना मुठींत कसें ठेविलें आहेस,' म्हणून एकदां सत्यभामेनें द्रौपदीला विचारलें असतां तिनें जें उत्तर दिलें आहे तें प्रत्येक गृहिणीनें आपल्या हृत्पटलावर कोरून ठेवण्याजोगें आहे. 'सर्व संसाराचा जमाखर्च मी ठेवीत असतें,' असेंही ती त्यांत म्हणते;

यावरून स्त्रीशिक्षणाची मजल शुद्ध पायावर कोठवर गेली होती हें कळणार आहे. तसेंच तेरा वर्षांच्या वनवासानंतर श्रीकृष्णाकडून आपल्या मुलांचें कुशल कळलें असतां, कुंति त्यांना भेटण्याची गोष्ट बाजूला ठेवून प्रथम सूड घेऊन आपलें राज्य परत मिळविण्यास सांगते. हा निरोप, व युधिष्ठिर, **पांच गांवें तरी दे** म्हणून कृष्णाबरोबर दुर्योधनाला निरोप पाठवीत असतां 'ही वेणी रक्तानें माखलेल्या हातानें घातल्याखेरीज मला दुसऱ्या कशानें समाधान होणार नाहीं,' असें म्हणून द्रौपदीनें पांडवांची केलेली उठावणी, ह्या गोष्टी स्त्रियांमधील ते वेळचा जोम दाखवितात. दुष्यंतशकुंतला, कचदेवयानी, शर्मिष्ठादेवयानी यांच्या संवादावरून स्त्रीशिक्षण किती उच्च प्रतीचें असावें हें कळतें. एवढेंच नव्हे, तर काचित् प्रसंगीं वेदान्तासारख्या विषयावर सुद्धां स्त्रिया चर्चा करतांना आढळतात. गायननर्तनकला विशेषेंकरून स्त्रियांना–कुलीन स्त्रियांना–घरीं शिक्षक ठेवून शिकविण्यांत येत असून, त्यासाठीं गायननर्तनाच्या वेगळ्या शाला असत. अज्ञातवासांत विराटाच्या घरीं अर्जुन त्याच्या मुलींना हीच विद्या शिकवीत होता. केवळ घरींच नव्हे तर बाहेरच्या मंडळींतही बायकापुरुष एकत्र बसून गोष्टी चालत. पांडव व धृतराष्ट्र मंडळींत असतां द्रौपदी व गांधारी त्यांच्याजवळ असून गोष्टी चाललेल्याचा यांत पुष्कळ ठिकाणीं उल्लेख आहे. 'जरबेंत ठेवून राखावा लागणारा सद्गुण कुचकामी आहे.' (That virtue which ever requires to be guarded is scarcely worth the sentinel) म्हणून गोल्डस्मिथचें एका ठिकाणीं वाक्य आहे, त्याप्रमाणें गोष्टामध्यें स्त्रियांना ठेवून त्यांना संभाळण्याची चाल ते वेळीं नव्हती. तरी सीता द्रौपदीसारख्या सतींचीं नांवें पतिव्रतास्त्रियांमध्यें अजरामर होऊन राहिलीं आहेत. यावरून हें सिद्ध होतें कीं, शरीरापेक्षां मनाला अटकाविण्याची अवश्यकता विशेष असून हें काम मनाला शिक्षणानें विकसित करण्यानेंच होतें. पांडव वनवासांत असतां एके वेळीं कृष्ण द्रौपदीला म्हणतो कीं, तूं किंवा कुंतीनें जसें त्यांना (द्रौपदीच्या मुलांना) शिक्षण दिलें असतें तसें सुभद्रा त्यांना देत आहे. यावरून स्त्रीशिक्षण किती उच्च प्रतीचें असावें याची कल्पना करतां येणार आहे.

चित्रकला बऱ्याच पूर्णतेला पोंचलेली दिसते. 'निरनिराळे रंग पांढऱ्या कापडावर ज्याप्रमाणें खुलतात' असा उल्लेख जागजागीं आहे त्यावरून रंगाची विद्या ठाऊक असावी. मल्लविद्या बरीच पूर्णतेला आली असावी हें भीमजरासंध, भीमजीमूत यांच्यामध्यें झालेल्या मल्लयुद्धाच्या वर्णनावरून स्पष्ट होतें. नाटकें, बाहुल्यांचे खेळ वगैरे होत असावेत, परंतु रंगभूमीवर सोंग घेऊन येणें, बहुरुप्याचा किंवा बाहुल्या नाचविणाराचा धंदा करणें, या गोष्टी कमीपणाच्या समजत. जात असाव्या. गणित, ज्योतिष, वैद्यक, इतिहास, भूगोल या सर्वांमध्यें तेवेळची त्यांची प्रगती बरीच दिसून येते.

वैद्यक–त्यावेळच्या मानानें वैद्यकाची बरीच माहिती असावीसें दिसतें. रोगपरीक्षा व औषधोपचार दोन्ही ठाऊक असावे. मस्तकशूळ, खुपऱ्या वगैरे डोळ्याचे रोग, दंतशूळ, गंडमाळा, क्षय, जळोदर, कोड, महारोग, अपस्मार, तृष्णारोग, पटकी, दमा, खोकला, फेपरें वगैरे लहान मोठ्या रोगांची नांवें यांत आलीं आहेत, त्यावरून बऱ्याच बारीक सारीक रोगांची तें वेळीं चिकित्सा होत असावीसें दिसतें. कफ, वात, पित्त ह्या तीन शरीरांतील त्रिदोषांसंबंधानें माहिती होती. निघंट व काय, बाल, ग्रह, ऊर्ध्वांग, शल्य, दंष्ट्रा, जरा, वाजीकरण, ही अष्टांग चिकित्सा हिचा यांत उल्लेख आहे. निरनिराळीं शक्तिवर्धक रसायनें व तुपें बनविण्यांत येत असावीं. शीतानें शीत, उष्णानें उष्ण, विषानें विष याप्रमाणें सूक्ष्मप्रमाण सजातीय उपायांनीं ते ते दोष नाहींसे होतात, ही सजातीय-सूक्ष्म-प्रमाणौषधि-चिकित्सा (Homeopathy) सुद्धां तेवेळीं माहीत असावी. कारण भीमाला जहर विष खावयून पुढें दुर्योधनानें त्याला जेव्हां नदींत फेकून दिलें, तेव्हां त्या नदींतील विषारी सापांच्या विषानें त्याला चारलेल्या विषाचा दोष नाहींसा झाला असा यांत उल्लेख आहे.

ज्योतिषशास्त्र—आकाशांतील ग्रहनक्षत्रादिकांचे वेध घेऊन ग्रहनक्षत्रादिकांसंबंधाचे एकंदर बरेच निर्णय ते वेळीं ठाम ठरविण्यांत आले होते यावरून गणितशास्त्र व ज्योतिषशास्त्र या दोन्हींचा

मजल बरीच पुढें गेलेली दिसते. लव, क्षण, काष्ठा कला, मुहूर्त, दिवस, राव, पक्ष, मास, ऋतू, संवत्सर, युग असे कालाचे भाग, वेदांगज्योतिषांतील पंचवार्षिक युगपद्धति, चांद्र व सौरमान वगैरे गोष्टींची तेवेळीं पूर्ण माहिती होती. चांद्र व सौरमानें केवळ तुसतीं ठाऊक नसून हे कालमानाचे दोन्ही प्रकार प्रचारांत असावे. कारण अज्ञातवासाच्या अखेरीस सौरमानानें तेरा वर्षे पुरीं होण्याच्या पूर्वी पांडव उघडकीस आले म्हणून त्यांनीं फिरून बारा वर्षे वनवासाला गेलें पाहिजे, असें दुर्योधन म्हणूं लागला असतां त्यांचीं तेरा वर्षे पुरीं झालीं आहेत म्हणून भीष्मांनीं जो निकाल दिला तो चांद्रमानावरच. वेदांगज्योतिषाप्रमाणें पांच चांद्र वर्षांत दोन अधिक महिने येतात, त्याप्रमाणें पांडवांच्या तेरा वर्षांच्या वनवासांत चांद्रमानानें चारांहून जास्त अधिक महिने झाले होते. व हाच मुद्दा पुढें आणून भीष्मांनीं त्यांची प्रतिज्ञा पुरी झाली आहे म्हणून निकाल दिला आहे. अगदीं पूर्वकालीं अठावीस नक्षत्रांमधील सूर्याच्या स्थितीवरून कालमान होत होतें, तें यावेळीं सत्तावीस नक्षत्रांमधील स्थितींवरून होऊं लागलें असावें; पण मेषादिराशी यावेळींही ठाऊक नसाव्या; कारण त्यांची त्याचप्रमाणें योग, करणें, यांचीं नांवें सबंध भारतांत कोठें आढळत नाहींत. नक्षत्रें, सप्तर्षी, पांच ग्रह यांचा मात्र यांत उल्लेख पुष्कळ ठिकाणीं आहे. ऋतु शिशिरादि व वसंतादि व महिने मध्वादि व मार्गशीर्षादि असावेत. वेदांगकालीं धनिष्ठेमध्यें उद्गयन होत असून हल्लीं पूर्वाषाढाच्या सुमारास होतें. तेव्हां मध्यंतरीं केव्हां तरी तें श्रवणांत होत असावें. व अशा प्रकारचा उल्लेख यांत आदिपर्वांत व अश्वमेध पर्वांत आहे. शंकर यज्ञरूपी हरणाच्या मागें असल्याचें जें वर्णन आहे तें मृगशीर्ष नक्षत्राच्या स्थितीवरून असावें. पुनर्वसु चंद्राच्या दोन्ही बाजूंला शोभतात असा कर्णपर्वांत उल्लेख आहे. तसेंच हस्ताच्या पांच व विशाखेच्या दोन तारांचा उल्लेख आहे. बुधादि पंच ग्रह तसेंच कोठें कोठें सप्तग्रहांचाही उल्लेख आहे. राहुकेतूंचें ज्ञानही त्यांना होतें. या दोन ग्रहांचें ज्ञान ते दृश्य नसल्यानें ग्रहणें व चंद्राच्या शरासंबंधानेंच होण्याचा विशेष संभव असल्यानें ग्रहणाची खरी उपपत्ति तेवेळीं ठाऊक असावीसें दिसतें. ग्रहांची वक्रगति, त्यांची युति (अति निकटसंबंध) यांचा उल्लेख यांत बराच आहे. पांडव वनवासाला गेले तेवेळीं सूर्यग्रहण असून युद्धाचे आरंभाला कार्तिकी पौर्णिमेला चंद्रग्रहण व पुढें लगेच अमावास्येला सूर्यग्रहण अशीं दोन ग्रहणें एकाच महिन्यांत असून हा पंधरवडा तेरा दिवसांचा होता. वेदांगज्योतिषांतील कोणत्याही सूक्ष्म मध्यम मानानें तेरा दिवसांचा पंधरवडा कधींच येत नाहीं. यावरून स्पष्ट तिथीचें गणित भारतकाळीं होतें–अर्थात् चंद्रसूर्याच्या स्पष्ट गतिस्थितींचें ज्ञान होतें–असें म्हणावें लागतें. निरनिराळ्या ठिकाणीं ग्रहस्थितीचें वर्णन आहे त्यावरून भारतकाळीं ग्रहस्थिति नक्षत्रावरून सांगण्यांत येत असावी. मनुस्मृति वगैरे अनेक ग्रंथांतून जी चार युगांच्या कालाची संख्या आहे, तीच यांत आली आहे. सूर्याचें आकर्षण सर्व पदार्थांवर होत असून तो अचल आहे ही गोष्ट त्यावेळीं माहित होती. त्याचप्रमाणें समुद्राचें पाणी सूर्याच्या उष्णतेनें वर वाफ होऊन जाऊन ढग बनतात व फिरून पाण्याच्या रूपानें खालीं येतें, ही गोष्ट त्यावेळीं माहित होती. कारण वनपर्वांत एके ठिकाणीं मेघ व समुद्र यांना एकमेकांचे जनक असें म्हटलें आहे.

इतिहास—त्याचप्रमाणें आह्मीं या प्रस्तावनेच्या आरंभीं घेतलेल्या यांतील अवतरणावरून त्या इतिहासाचें महत्त्व व त्याची उपयुक्तता किती आहे हें पूर्णपणें कळले असल्याचें दिसतें. ह्या शब्दाच्या व्याख्येवरून इतिहासाचें महत्त्व व त्यापासून घडणारीं कार्यें याची बरोबर कल्पना त्यांच्या डोक्यांत होती. इतिहासानें अज्ञानांधकार दूर होऊन चांगला प्रकाश पडतो, व लोक विद्वान निपजतात असें यांत स्पष्ट आहे. आतां इतिहासांतू इतिवृत्त जसेंच्या तसें लिहिलें असून पद्धतवार पाहिजे. या तत्त्वावर आमच्या पूर्वजांना इतिहास नाहीं असा दोष पाश्चात्य पंडित देतात; व त्यांचीच री आमचेकडील कांहीं आंग्लविद्याविभूषित आधुनिक विद्वान ओढतात; पण ते वेळची वस्तुस्थिति व मध्यंतरींचा काळ ह्या गोष्टींचा हे लोक विचार करीत नाहींत. कोणत्याही गोष्टीला पद्धतशीरपणा येण्याला कांहीं कालावधि

लागत असतो; तसेंच इतिहास ह्मटला ह्मणजे त्यांत वस्तुस्थिती जशीच्या तशी वर्णिली असावी, हें उदात्त तत्त्व दिसण्याला कितीही सुरेख दिसलें तरी याची अम्मलबजावणी हल्लींच्या प्रगतीच्या काळीं सुद्धां कशारीतीनें होत असते याचा विचार केला असतां कळणार आहे. मानवीस्वभाव जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत कोणी कितीही निःपक्षपातानें इतिहास लिहिण्याचें मनांत आणिलें तरी त्यांत स्वाभिमान व त्यापासून उत्पन्न होणारा पक्षपात हे घुसावयाचेच, व याचमुळें हल्लीं देखील इंग्रजांनीं लिहिलेला नेपोलिअनचा किंवा मराठ्यांचा इतिहास किती एकपक्षीय आहे यावरून याची सत्यता वाचकांच्या लक्षांत येईलच. मेकालेसारख्यांना हिंदु कुचकामी, व शिवाजी दरवडेखोर दिसतो. शिवाय पेशवाईतले एक दोन शतकाच्या पूर्वीचेही कागदपत्र हल्लीं अनेक कारणांनीं दुर्मिळ झाले आहेत. तेव्हां आज तीन चार हजार वर्षांच्या पूर्वीची माहिती समग्र मिळावी ह्मटलें तर तें व्हावें कसें ? महाभारत हा इतिहास आहे, असा त्यांत अनेक ठिकाणीं उल्लेख आहे. व स्वदेशाभिमानप्रेरित व प्रक्षिप्त अशा दोन्ही बाजूंनीं त्यांतील पुष्कळ मजकुराला फाटा दिला तरी त्याच्या बाकी राहिलेल्या भागांतून आह्मांला पुष्कळ बोध घेतां येण्याजोगा आहे.

भूगोलः—त्याचप्रमाणें ब्राह्मणांकडून तीर्थयात्रेच्या निमित्तानें, क्षत्रियांकडून दिग्विजयाच्या निमित्तानें व वैश्यांकडून व्यापाराच्या निमित्तानें जगाचें ज्ञान करून घेण्याची बरीच खटपट तेवेळीं होत असावी. परदेशांशीं दळणवळण ठेवून आत्मोन्नति करून घेण्याची हल्लींची पाश्चत्यांची युक्ति नवी नाहीं. याचें बळण आमच्या त्या वेळच्या पूर्वजांना पूर्ण होतें. पण दुर्दैवानें इतर गोष्टींत झालेल्या अवनतीप्रमाणें यांतही पिछेहाट होऊन हल्लीं परदेशगमन सशास्त्र आहे कां अशास्त्र आहे यासंबंधानें आह्मी शुष्क वादांत गढून जाऊन मूर्खाप्रमाणें निंद्य स्थितींत कालक्षेप करीत आहों. एशियाखंडाच्या बऱ्याच भागाविषयीं तेवेळीं यांना चांगली माहिती असावी. भीष्मपर्वाच्या आरंभीं जो भूमिवर्ग दिला आहे त्यांतील बऱ्याच भागांचीं नांवें जरी हल्लीं दुर्बोध आहेत तरी नानादिग्विजयांच्या व तीर्थयात्रांच्या प्रसंगानें जें देशाचें वर्णन आढळतें त्यावरून दक्षिणेस सिलोन, उत्तरेस तिबेट, पूर्वेस चीन व पश्चिमेस इराण येथपर्यंत यांचें नेहमींचें दळणवळण असावेंसें दिसतें.

शेतीः—धृतराष्ट्र वगैरेंच्या जन्माच्या वेळच्या, तसेंच आणखी पुष्कळ ठिकाणच्या राष्ट्रांच्या सुस्थितींच्या वर्णनावरून त्या वेळच्या देशाची स्थिति फार भरभराटीची असून शेती, उद्योग व व्यापार हीं जीं राष्ट्रोन्नतीचीं मुख्य साधनें त्यांकडे त्यावेळच्या राजकारणी पुरुषांचें योग्य लक्ष असावेंसें दिसतें. हिंदुस्थानदेश मुख्यतः शेतीवर अवलंबून असणारा आहे, हें तत्त्व त्यावेळच्या राज्यधोरणी पुरुषांना कळलें असून ही शेती कायमच्या सुस्थितींत ठेवण्याचे उपाय त्यांना स्पष्ट कळले होते असें ह्मणावें लागतें. कारण शेतीची सुस्थिति शेतांत राबणाऱ्या जनावरांवर व पाण्यांवर अवलंबून असते, हें जाणून त्या दिशेनें त्या वेळीं व्यवस्था होत होती. जनावरांची सुबत्ता असेल तरच शेती चालणार ह्मणून त्यांना कसाईखाना दाखविला न जातां हल्लीं इंग्रजसरकार ज्याप्रमाणें माणसांची खानेसुमारी करतें त्याप्रमाणें त्यावेळीं जनावरांची खानेसुमारी होत असून तें काम राजधराण्यांतील जबाबदार मनुष्याच्या हातून होत असावें; व तेवेळीं लहानथोर जनावरांच्या अंगावर निरनिराळ्या खुणा करण्यांत येत असाव्यासें दिसतें. दुर्योधनाला जेव्हां वनवासी पांडवांना खिजवावयाला जावयाचें होतें तेव्हां तो आपल्या बापाला द्वैतवनांतील जनावरांची खानेसुमारी करण्याला जातों ह्मणूनच सांगून गेला. गुरें ही एक दौलत मानली जात असावी. अनेक ठिकाणच्या गुरांच्या वर्णनावरून त्यांची सुबत्ता व महत्त्व किती होतें हें कळतें. आतां शेतीच्या उत्कर्षाचें दुसरें साधन जें पाणी त्यासंबंधी विचारही यांत स्पष्ट प्रकट केला आहे. जो देश मुख्यतः शेतीवर आहे, त्यानें आपली शेती केवळ पावसावर अवलंबून ठेवणें कधींही शहाणपणाचें होणार नाहीं. कारण मनुष्याला गुलाम करण्याची किल्ली जरी मनुष्याच्या हातांत आली तरी मेघराजरूपिकांना रावणाप्रमाणें आपले बंदे गुलाम करण्याचें काम तितकें सोपें नसल्यानें त्याची ए-

खादे वेळीं दृष्टि फिरली असतां त्यामुळें शेतीची नुकसानी न होण्याला मुख्य साधन आगगाड्या, तारायंत्रें नसून देशांत पाण्याचा पुष्कळ सांठा असणें हेंच काय तें आहे, हें ते वेळचे राजे जाणत होतें, व राजनीतीच्या तत्त्वांपैकीं हें एक तत्त्वच बनून राहिलें होतें. कारण नारदांनीं जे युधिष्ठिराला राज्यव्यवस्थेसंबंधानें प्रश्न केले आहेत त्यांत, 'हा देश मुख्यतः शेतीवर असल्यानें आनावर्षाच्या वेळच्या तरतुदीसाठीं विहिरी, तलाव, सरोवरें वगैरे खणून ठेविले आहेस ना' ह्मणून एक प्रश्न आहे.

उद्योग—अनेक ठिकाणीं शिल्पकारांचा उल्लेख आहे, त्यावरून निरनिराळ्या धातूंचीं कामें, जाडे बारीक कपडे, वगैरे बरेच उद्योग चांगल्या भरभराटीच्या स्थितीला आलेले असावेसें दिसतें. युद्धाच्या वेळीं उपयोगाला येणारीं निरनिराळीं हत्यारें, दागिने वगैरे धातूंचीं होत असून नाणीं पाडून त्याबर शिक्के देखील देत असत. मलमलीसारखें बारीक सुती कापड, तागाचें कापड, गोणपाट, उत्तम उत्तम घोंगड्या, शाली, कमावलेलीं कातडीं वगैरे माल तयार होत होता. दारू व मांस विकणें व कातडीं, लोखंड यांचा व्यापार करणें हलकेपणाचें समजलें जात होतें.

व्यापार—ज्या देशांतील लोकांचीं मनें विद्येनें सुशिक्षित झालीं असून उद्योगधंदे जेथें भरभराटीच्या स्थितींत आहेत असें राष्ट्र हातपाय बांधून घरकोंबडेपणानें स्वस्थ कधींच बसावयाचें नाहीं, व या नियमाला धरूनच त्या वेळच्या आर्यांची स्थिति होती. शेती व उद्योग यांनीं माल तयार होऊन पडल्यावर तो कोणी घरीं कुजत ठेवणार नाहीं, त्याला पेठ दिसलीच पाहिजे; आणि याला धरूनच आर्यांचा व्यापार इकडे इराण व इकडे चीनपर्यंत होता. हा व्यापार केवळ खुष्कीनें चाललेला नसून तारवांतूनही मोठ्या जोरानें चालला असावा हें वेदान्तविषयासारख्या गहन विषयाच्या प्रतिपादनाच्या वेळींही उपमा यांतून घेतल्या आहेत यावरून उघड होतें. कर्मानुरूप निरनिराळे देह येतात याला 'ज्याप्रमाणें एक नाव आपला माल दुसऱ्यामध्यें ढकलण्यासाठीं त्याजवळ जाऊन त्यांत आपला माल ढकलून मोकळी होते, त्याप्रमाणें कर्मानुसार मनुष्य निरनिराळे देह घेतो,' अशी उपमा आहे. तसेंच समुद्रामध्यें जाणारे आपापल्या भांडवलाप्रमाणें नफा मिळवितात, असें एका ठिकाणीं ह्मटलें आहे. एकेठिकाणीं भवसागर तरून गेल्याबर मोक्ष हा सौदा आहे, असा उल्लेख आहे. शीड अवजारें वगैरे सामानांचींही यांत नांवें आहेत. यावरून नावेंतून देशांतराला जाऊन निरनिराळ्या देशाशीं यांचा व्यापार चालला असावा हें उघड होतें. सहस्रावधि रत्नांनीं भरलेलीं जहाजें समुद्रावर तरंगत होतीं असा वनपर्वांत एके ठिकाणीं उल्लेख आहे. पुढें अलोट संपत्ति येऊन लक्ष्मीची धुंदी डोळ्यांवर आल्यानें ह्मणा किंवा आपले लोक परदेशांत जाऊन कायमची वसाहत करूं लागले तर आपल्या राष्ट्राची हानि होईल ह्मणून ह्मणा परदेशगमन बंद झालें असावें. व्याजबट्टा सुरू असून राजानें पेढी काढून व्याजानें गरिबांना पैसे देण्यांत येत असावे. या पैशांवर दरमहा दरशेंकडा एक आणा व्याज घ्यावें ह्मणून आहे. यावरून व्याजाचा दर किती माफक होता याची कल्पना होणार आहे. शेतकी, सावकारी वगैरे धंदे प्रामाणिक लोकांच्या हातीं असावेत असें यांत ह्मटलें आहे.

राष्ट्रीय उत्सव—ग्रीस देशांतील आलिंपिक गेम्सच्या धर्तीवर ठिकठिकाणीं जत्रा भरत असून त्यांत कुस्त्या, दांडपट्टे वगैरे मर्दानी खेळांचे प्रसंग होत असावेत. विराट नगरींत अशाच प्रसंगानें आलेल्या जीमूत मल्लाला भीमानें मल्लयुद्धांत जिंकलें. तसेंच सुभद्रेच्या लग्नाच्यापूर्वी रैवतक डोंगरावर असा उत्सव झाल्याचें वर्णन आहे. हल्लींही ठिकठिकाणीं अशा जत्रा भरत असतात. परंतु कुस्त्या, दांडपट्टे जाऊन त्यांच्याजागीं नथनी अडकविलेल्या पोरांचे तमाशे, पत्याच्या डावाचे जुगार वगैरे खेळ आले आहेत; एवढी मात्र शोचनीय गोष्ट आहे !

दारू व जुगार— यांं दोन्हींचे दुष्परिणाम चांगले कळून ते टाळण्यासंबंधाचीं निषेधात्मक वाक्यें यांत अनेक ठिकाणीं आहेत. जुगार तर इतकें वाईट मानण्यांत येत होतें कीं, युधिष्ठिरासारख्या धार्मिक व सत्यप्रिय राजाच्या ठिकाणीं तें व्यसन दाखवून त्याचे दोनवेळ दुष्परिणाम दाखविले आहेत. यावरून त्याचा प्रसारही बराच असावासें दिसतें. शिकारीचा

नादही तेवेळीं फाजील असावा ह्मणून त्याला दारू व जुगार यांच्या मालिकेंत गोंवून दिलें आहे. तसेंच परस्त्रीशीं विशेषतः गुरुपत्नीशीं संबंध ठेवणें याची महापापांत गणना होत होती. प्रत्येक गृहस्थ घरीं अग्नि ठेवीत असून त्यानें तो मेल्यावर त्याला जाळण्याची चाल असे. प्रेतें जाळण्याची चाल असून पुरण्याचाही कचित् प्रसंगीं उल्लेख आहे. ही जाळण्याची चाल हल्लीं पश्चिमात्य राष्ट्रांतून सुद्धां पुष्कळांना पसंत पडत चालली आहे. कारण पुरल्यानें निरनिराळ्या रोगांचें बीज उत्पन्न होऊन हवा बिघडण्याची भीति असते. संततीचें महत्त्व बरेंच वाटत असून निपुत्रिक स्थितींत नवरा मेला असतां किंवा अशाच अन्यप्रसंगीं दिरापासून संतति करून घेण्याची चाल होती. खोटी साक्ष देणें व खोटें बोलणें महापाप समजलें जात असून त्याला कडक शिक्षा होती. तरी खऱ्याखोट्यासंबंधानें सारासारविचार करण्याचीं जीं स्थळें सांगितलीं तीं फार विचार करण्यासारखीं आहेत. बायको, मुलगा व दासी यांच्या पैशावर त्यांचें स्वामित्व मानण्यांत येत नव्हतें. मुलीबद्दल कांहीं ठिकाणीं पैसा घेण्यांत येत असे. दायविभागासंबंधानें, कोणाला कितव्या हिश्शाला हक्क पोंचतो वगैरे बरीच सविस्तर माहिती आहे. अपुत्रिक मृताचा पैसा मुलीला जावा, कारण तिचा मुलगा श्राद्धाला मालक आहेच, असें एके ठिकाणीं ह्मटलें आहे. वर सांगितल्याप्रमाणें जरी वर्णाश्रमव्यवस्था होती तरी जाती मुळींच नव्हत्या असें नाहीं. या चारी वर्णांच्या संकरानें झालेल्या अनेक जातींचें वर्णन आहे. प्रत्यक्ष श्रीकृष्णानें 'या यादव कुळांत अनेक जाती आहेत,' असें एके ठिकाणीं ह्मटलें आहे. ब्राह्मण, तूप, दही वगैरे श्राद्धाचें सामान मिळेल तो दिवस श्राद्धाला चांगला असें मानण्यांत येई.

राजधर्म.

सत्यानृता च परुषा प्रियवादिनीच ।
हिंस्रा दयालुरपि चार्थपरा वदान्या ॥
नित्यव्यया प्रचुरनित्यधनागमा च ।
वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा ॥ १ ॥

राजा—राजधर्माचा विचार या महाभारतांत अनेक ठिकाणीं अनेक प्रसंगांनीं आला आहे. व्यास, नारद, विदुर व भीष्म यांनीं निरनिराळ्या वेळीं हा धर्म धर्मराजाला सांगितला आहे. व एकेठिकाणीं धृतराष्ट्राचा सचिव जो कणिक यानें धृतराष्ट्राला राजनीति सांगितली आहे; पण ती नीति कुटिल समजण्यांत येते. कारण ती धृतराष्ट्राला कुटिल बुद्धीनें सांगण्यांत आली आहे. नाहींपेक्षां वरील अवतरणाप्रमाणें राजनीति अनेकरूप असावयाचीच, ती असलीच पाहिजे व ती असतेही. मात्र तिचा उपयोग करण्याच्या प्रसंगावरून तिला सरळपणाचें किंवा कुटिलपणाचें स्वरूप येतें. असो; या वर सांगितलेल्या प्रसंगांपैकीं भीष्मांनीं शांतिपर्वांत जो युधिष्ठिराला राजधर्म सांगितला आहे तो फार विस्तृत असून, राजाच्या कर्तव्यासंबंधानें अनेक दिशांनीं त्यांत पूर्ण विचार केला आहे. त्यावरून त्यावेळच्या आर्यांची या दिशेनें सुद्धां प्रगतीची मजल कोठवर गेली होती, हें दिसून येतें. ह्मणून त्याचा येथें थोडा विचार करूं.

घोड्याला जसा लगाम किंवा हत्तीला जसा अंकुश त्याप्रमाणें प्रजेला वाटेवर ठेवण्याला राजनीतीची अवश्यकता आहे, असें आरंभालाच सांगून राजाच्या अंगच्या सामान्य गुणांचा यांत प्रथम विचार केला आहे. प्रजानुरंजनामुळेंच राजाला राजा हें नांव मिळत असल्यानें आपल्या प्रजेला संतुष्ट ठेवणें हें राजाचें पहिलें कर्तव्य सांगितलें आहे. याबाबतींत राजाला गर्भिणी स्त्रीची उपमा दिली आहे. ती जशी आपल्या आवडनावडीकडे लक्ष न देतां गर्भाला हिताची अशीच गोष्ट करते, त्याप्रमाणें राजानें प्रजेच्या हितांत दक्ष असलें पाहिजे. तो आत्मनिग्रही, सत्यप्रिय, व्यवसायशील व व्यसनपराङ्मुख असावा. त्यानें सरळ असावें पण नीतीच्या (ज्याला इंग्रजींत Policy ह्मणतात) प्रश्नाचा विचार वेगळ्या दृष्टीनें करावा. हें जें policy चें तत्त्व भीष्मांनीं सांगितलें आहे, त्याला अलीकडच्या सुधारलेल्या राष्ट्रांतून सुद्धां किती महत्त्व आहे याकडे दृष्टि दिली असतां त्याची योग्यता कळणार आहे. राजानें गोड बोलावें पण आपल्या नोकरमाणसांशीं फार सलगी करूं नये; कारण त्यानें पुष्कळ नुकसानी होते. फार कडक किंवा

फार मृदु असूं नये. तोंड गोड, हास्यमुख, संतोषवृत्ति व प्रसन्न मुद्रा वगैरे गुण त्याच्या अंगीं असून त्यानें फार संशयवृत्ति ठेवूं नये. सर्वांवर संशय ठेवून मिळेल तें बुचाडून घेणारा राजा घोटाळ्यांत येतो. प्रजेला पिडल्यानें तो राज्याला मुकतो. शत्रूचें छिद्र पहात राहून आपलें छिद्र त्याला दिसूं देऊं नये. वगैरे सामान्य गुण राजामध्यें असावे ह्मणून सांगून, अमात्य, खजिना, किल्ले, लष्कर, हेर, अंतर्व्यवस्था व बाह्यव्यवस्था, मुलकी व फौजदारीव्यवस्था, शिक्षा वगैरे गोष्टींचा यांत बराच विचार केला आहे. शत्रूला तोंड न देणारा राजा व प्रवास न करणारा ब्राह्मण यांना भूमी गिळून टाकते, असें सांगून लोखंड व दगड यांच्या झटापटींत जसा दगडाचा चुराडा उडतो त्याप्रमाणें ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या झटापटींत अखेरीस क्षत्रियांचा नाश होतो असें सांगितलें आहे. यावरून दोघांच्या कामाची जबाबदारी व त्यांचा संबंध या ठिकाणीं अगदीं व्यक्त केला आहे. व आह्मीं पूर्वी एकवार ह्मटल्याप्रमाणें मंत्राघांचून बल व बलावांचून मंत्र निरर्थक, हेंच तत्त्व येथें सांगून बाहुबलाहून मंत्रबलाचें सामर्थ्य किती अधिक आहे, हें व्यक्त केलें आहे, व ह्या दोहोंपैकीं अधिक जबाबदारीचें मंत्राचें काम ब्राह्मणांचें असल्यानें देशपर्यटनानें चोहोंकडचें ज्ञान त्यानें संपादन करावें, एवढाच त्याला प्रवास करण्याला सांगण्याचा हेतु दिसतो. हेर, गुप्त बातमीदार, यांना वेळच्या वेळीं मुशाहिरा देऊन संतुष्ट ठेवणें, प्रजेपासून युक्तीनें व बेताबातानें कर घेणें, दक्षतेनें प्रजाहितामध्यें गढून राहणें, खऱ्या किंवा खोट्या मार्गानें शत्रूमध्यें फूट पाडणें, प्रसंग पाहून मृदु किंवा कडक शिक्षा देणें, कुलीनांना जवळ करणें, संग्रहणीय वस्तू संग्रहांत ठेवणें, सैन्याला खुष ठेवणें, प्रजेवर नजर ठेवणें, कामाचा कंटाळा नसणें, खजिना वाढवीत रहाणें, नगराचे रक्षण करणें, त्यावर स्वतः पाहणी ठेवणें, कोणावर विसंबून न राहणें, शहरांतील जमाव मोडणें, आपले लोक शत्रूशी कानगोष्टी करतात कीं काय यावर नजर ठेवणें, इत्यादि गोष्टी राजाला अवश्य सांगितल्या आहेत. राजानें आपला मंत्र, शत्रूवर चाल करण्यासाठीं जमविलेलें सैन्य व मनांतील राजकारण, या सर्वांवर सरळपणाचें पांघरूण घालावें. वाटेवर पडलेल्या मांसाच्या तुकड्याप्रमाणें अनेक काकांची यावर धाड पडत असल्यानें केवळ सरळपणानें राज्य चालवितां येणें शक्य नाहीं. याप्रमाणें राजाच्या अंगीं लागणारे सामान्य गुण, त्याचप्रमाणें चारी वर्णांमध्यें क्षत्रियाची महती व त्यावरची जबाबदारी किती आहे, हें सांगून याला चारी आश्रमांची सुद्धां गरज नसून केवळ गृहस्थाश्रमामध्यें क्षात्रधर्माप्रमाणें वागून तो आपल्या राष्ट्राचें व प्रजेचें योग्य रक्षण करील तर त्याला चारी आश्रमांचें श्रेय मिळतें, असें यांत सांगितलें आहे. याप्रमाणें आपल्या कर्तव्यांत दक्ष राहून प्रसंगीं शत्रूला तोंड देऊन प्राण देण्याला तयार राहणें, यासारखा त्याग त्याला दुसरा कोणताच नाहीं. स्वार्थत्याग, सर्वभूतमात्रांवर दया, लोकज्ञान, पालन, लोकांना संकटांतून सोडविणें, रणामध्यें देह ठेवणें यासारखें पुण्यप्रद राजाला कांहींच नाहीं. राजाला आळस उपयोगीं नाहीं. आपल्यावर दाब ठेवून त्यानें नेहमीं महत्त्वाकांक्षा बाळगिली पाहिजे. राजाला दीर्घसूत्रीपणा कामाचा नाहीं. राजाजवळ तेवेळीं शरीर संरक्षक सुद्धां (body-gaurd) असून त्यांचा पोषाख लाल असे.

अराजक स्थिति:—याप्रमाणें राजाच्या अंगचे सामान्य गुण देऊन पुढें अराजक स्थितीचें भयंकर स्वरूप दाखवून देऊन धनजीविताच्या सुस्थितीसाठीं राजाची अवश्यकता सांगितली आहे. पूर्ण प्रजासत्ताक किंवा राजप्रजासत्ताक वगैरे कमी अधिक प्रमाणानें प्रजेनेंच राजावांचून किंवा राजा व प्रजा यांनीं मिळून चालविण्याच्या राज्यपद्धती त्यावेळीं अस्तित्वांत नसाव्या. राजामध्यें सर्व तेज एकवटलेलें असून तो देवांश आहे, असा जरी समज होता तरी तो प्रजेचा प्रतिनिधि समजला जात असून लोकमताला ह्मणारून देऊन वाटेल तसा स्वच्छंदानें वागणारा राजा पदच्युत झालाच पाहिजे, हें तत्त्व तेवेळींसुद्धां पूर्ण माहीत होतें. राजा हा लोकांचा प्रतिनिधी असून त्या नात्यानें त्यानें आपल्या सुखाची पर्वा न करितां लोकांच्या कल्याणामध्यें दक्ष असलें पाहिजे, हें तत्त्व तेवेळचे लोक पूर्ण ओळखून होते; आणि ह्मणूनच याविरुद्ध वागून प्रजेला पीडा देणाऱ्या रा-

जाची प्रजेनें वाटेल तशी वाट लावावी असा अनेक ठिकाणीं स्पष्ट उल्लेख आहे. व तोच कित्ता हल्लीं पाश्चात्य राष्ट्रें गिरवीत आहेत. परंतु स्वजनांमध्यें मान असला तरच शत्रू वचकतात, ह्या तत्त्वावर त्यांनीं त्याला विशेष योग्यतेला चढवून त्याचे देव्हारे माजविले असावे, असें दिसतें. आणि ह्मणूनच त्याच्या हातून आपला अधिकार योग्य बजावला जाण्यासाठीं त्याचें तेज वाढावें ह्मणून बहुमानानें याच्या निरानिराळ्या कामगिऱ्यांवरून याला अग्नि, सूर्य, यम, कुबेर वगैरे स्वरूपांमध्यें लेखण्यांत येऊं लागलें असावें. गादी वंशपरंपरागत वडील मुलाला देण्याचा प्रघात दिसतो.

प्रजापालनविधि--प्रजापालन हें राजाचें मुख्य काम ठरल्यानें तें फार उत्तम तऱ्हेनें यांत सांगितलें आहे. स्वतः दक्ष राहून निर्लोभी व शहाण्या अशा लोकांकडे राज्याचीं कामें त्यानें सोंपवावीं. कामक्रोधादिकांच्या आहारीं जाऊन प्रजेला पीडा देऊं नये. षष्ठांश कर, वसूल केलेला दंड व गोळा केलेले जकातीचे पैसे यांचा अर्थशास्त्राकडे लक्ष देऊन भलतीकडे विनियोग न करितां प्रजेपासून गोळा केलेला पैसा प्रजेच्याच कल्याणाकडे लावावा. भलतेसलते कर घेऊन प्रजेला पीडा देऊन स्वतःच्याच पायावर धोंडा मारून घेऊं नये. अर्थात त्यानें लांकूडतोड्याप्रमाणें मुळाशीं घाव घालण्याचा प्रयत्न न करितां माळ्याप्रमाणें फुलझाडांची नीट जोपासना करून झाडांना न दुखवितां त्यांपासून थोडीं थोडीं फुलें तोडीत रहावें. दुभत्या गाईची नीट शुश्रूषा केल्यानें ज्याप्रमाणें तिच्यापासून अधिक दूध मिळतें त्याप्रमाणें परचक्रापासून प्रजेचें संरक्षण करून त्यांच्या उद्योगधंद्यांना उत्तेजन देत राहिल्यानें कराची आयतीच बाढ होत जाऊन खजिन्याला भरपडत राहतें, व प्रजेलाही सुख होतें; हें तत्त्व यांत चांगलें स्पष्ट केलें आहे. त्याचप्रमाणें राजाची अंतर्बाह्यव्यवस्था नीट राहण्यासाठीं अमात्य, खजिना, किल्ले व फौज यांकडे राजाचें लक्ष नीट असावें, असें सांगून मंत्र्यांची पारख कशी करावी, किल्ले कोणत्या प्रकारचे असून कसे दुरुस्तींत ठेवावे, कोणतें सैन्य कुठें उपयोगी पडतें, हेर कसे असावेत, वगैरे गोष्टींचा यांत सविस्तर विचार केला आहे. त्याचप्रमाणें राजाचें आपल्या ज्ञातीशीं कसें वर्तन राहिल्याने त्याचा नाश होत नाहीं, याचेंही थोडेंसें विवेचन आहे. ज्ञातीचे लोक आपल्या वैभवाचा हेवा करीत असून आपली विपत्ति त्यांना बरी वाटत असते. ह्मणून त्यांच्याशीं मोठ्या खबरदारीनें वागावें लागतें. कारण, त्यांना अगदीं सोडूनही निभाव नसतो, व त्यांवर विसंबून राहण्यांतही अर्थ नसतो. ह्मणून त्यांचा सन्मान करावा, तोंडानें व कृतीनें त्यांच्याशीं गोड असावें, त्यांच्यावर विश्वासल्यासारखें दाखवावें; पण विसंबून मात्र राहूं नये.

राजसेवक व सुहृद—परस्पर साह्याच्या आशेनें, भक्तीमुळें, स्वाभाविकपणें, व कांहीं उपायांनीं अशा चार प्रकारांनीं राजाचे मित्र होत असतात. पैकीं पहिल्या व शेवटच्यासंबंधानें राजानें साशंक राहून मधल्या दोहोंवर पूर्ण विसंबण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें जो धर्मात्मा आहे त्यावर राजाला पूर्ण विश्वास टाकण्यास हरकत नाहीं. पण राजनीतीच्या जोरावर एखादें वाईट काम करण्याचा प्रसंग आला असतां ती गोष्ट मात्र त्याला कळवूं नये. कारण धर्माकडे त्याचे लक्ष असल्यानें राजनीतीची तो पर्वा करीत नाहीं. वाईट गोष्ट मग ती कोणत्याही कारणासाठीं असो, त्याला खपत नसते. आपल्या मित्राची किती भरभराट झाली तरी ज्याला होत पुरें नाहीं व त्याचें थोडें कमी पडलेलें पाहून सुद्धां ज्याला वाईट वाटतें, हें खरें मित्राचें लक्षण असून असे लोक राजानें जवळ करावे. धर्म, अर्थ, बुद्धि व मित्र यांनीं आपण पूर्ण आहों असें राजानें कधीं समजूं नये, व नेहमीं होईल तेवढा यांचा संग्रह करण्याची यानें खटपट करावी. लोभी लोकांना सचोटीचें, भित्र्यांना शूर, गरिबांना श्रीमंत, धर्मलंडांना धार्मिक लोक आवडत नसल्यामुळें ते अशा लोकांचा हेवा करीत असून अशांची नुकसानी करण्याचा विचार करीत असतात; तेव्हां राजानें जवळ केलेल्या लोकांची नीट पारख करून, त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुरूप त्यांच्यावर कामें सोंपवावीं; नाहींपेक्षां कुत्र्याला सिंहाच्या योग्यतेला चढवून एका ऋषींची जशी दशा उडाली तशीच व्यवस्था व्हावयाची. केवळ यजमानाच्या हितासाठीं ह्मणून नोकरी कर-

णारे लोक थोडे असून स्वार्थबुद्धीनेंच ते आपल्या स्वामीची सेवा करीत असतात; तेव्हां अशांची योग्य पारख करणें हें राजाला अत्यावश्यक आहे; व चंचल मनाच्या राज्याच्या हातून हें घडणें शक्य नाहीं. कुत्र्याच्या योग्यतेच्या मनुष्याला कुत्र्याच्या योग्यतेचेंच काम सांगितलें पाहिजे.

मंत्रिमंडळ--आतां प्रातिनिधिक संस्था (Representative Government) हा अजब शोध पाश्चात्यांचाच असून त्याचा उपभोग सुधारणा देवीच्या कृपेंतील पाश्चात्यच घेण्याला पात्र आहेत, अडाणी पौर्वात्यांना ही संस्था उपयोगाची नाहीं, म्हणून नेहमीं सांगण्यांत येत असतें. तेव्हां ही संस्था पाश्चात्यांचीच आहे किंवा आमच्या आर्यांचीच ही त्यांनीं चोरली आहे, याबद्दल या महाभारतांत काय आधार सांपडतो, तें पांहू. राजानें एकट्यानें किंवा आपल्या एका प्रधानासहवर्तमान पाच्छाई गाजबावी असें संबंध महाभारतांत कोठें सांगितलेलें आढळत नाहीं. आणि हा गुण जर अलीकडे आमच्या कांहीं राजांमध्यें दिसून येत असेल तर तो यांनीं मुसलमानांचाच उचलला असला पाहिजे. राष्ट्राचा योग्य बंदोबस्त होऊन राज्य सुरळीत चालून प्रजेला सुख व्हावें म्हणून राजानें मंत्रिमंडळ जवळ करावें, असें सांगून तें कितींचें व त्यांतील लोक कशाप्रकारचे असावेत, हें सुद्धां यांत स्पष्ट सांगितलें आहे. चार विद्वान, धीट, शुद्ध व कुलवान ब्राह्मण, आठ बलवान व सशक्त क्षत्रिय, एकवीस श्रीमान वैश्य, तीन गरीब शुद्ध वर्तमाचे शूद्र, व शुश्रूषादि आठ गुणांनींयुक्त पुराणिकादिकांची माहिती असलेला एक सूत इतक्यांचा मंत्रिमंडळामध्यें समावेश करून यांपैकीं आठांची धीसचिवसभा (Cabinet--प्रत्यक्ष राज्यकारभार पहाणारें मंत्रिमंडळ) असावी म्हणून सांगितले आहे. यावरून प्रातिनिधिक तत्त्व आमच्यामध्यें तीन चार हजार वर्षांमागें कशा तऱ्हेनें प्रचारांत होतें, याची कल्पना होणार आहे. यांत निरनिराळ्या वर्णांचे जेवढे लोक असावे म्हणून सांगितलें आहे त्यावरून सुद्धां त्यांचा पोक्तपणा व दूरदर्शीपणा दिसून येतो. ब्राह्मणांचें ते वेळीं वर्चस्व होतें म्हणून यांतच या मंडळांत ब्राह्मणांचा भरणा केला आहे, असें न करितां ब्राह्मणांचें मुख्य काम मंत्राचें असल्यानें तेवढ्यापुरते चारच ब्राह्मण, क्षत्रियांचें काम त्याहून जोखमीचें असल्यानें आठ क्षत्रिय, व पैशांवांचनं जिकडे तिकडे नडणारें असल्यानें एकवीस वैश्य, याप्रमाणें विचारानें प्रतिनिधींची ही संख्या ठरविली आहे. तसेंच शूद्र सेवा करणाऱ्या वर्गापैकीं म्हणून त्याला न गाळतां त्याचे तीन व संकरात्मक सूत जातीचा एक, याप्रमाणें प्रतिनिधींची निवड केली आहे. आज तीन हजार वर्षांच्यामागें ज्या उदार तत्त्वावर ही व्यवस्था करण्यांत आली आहे, त्याहून अधिक उदार तत्त्वावर हल्लींच्या प्रगतीच्या काळींसुद्धां कोठेंशी व्यवस्था असते. शिवाजीच्या वेळची अष्टप्रधानांची व्यवस्था यावरूनच घेतलेली दिसते. असो. इतक्या विस्तृत तऱ्हेनें मंत्रिमंडळ कांहीं कारणांनीं तयार करितां आलें नाहीं तर निदान तीन मंत्री तरी असावे म्हणून सांगितलें आहे. याप्रमाणें मंत्रिमंडळाची संख्या सांगून त्यांमधील लोकांच्या अंगीं खालील गुण असले पाहिजेत म्हणून सांगितलें आहे.

पहिली गोष्ट राजा व मंत्री यांचें परस्परांवर प्रेम असून ऐक्य असावें. मंत्री हे भिडस्त, आत्मनिग्रही चोख, सरळ, योग्य सल्ला देणारे, विद्वान, शूर, भक्तिमान, कुलीन, शहाणे, बहुश्रुत, राजहितामध्यें दक्ष, वचनाची मातब्बरी कळणारे, आपल्या देशांत जन्मलेले, परंपरागत सद्वर्तनशील, खजिन्याची अफरातफर न करणारे, धैर्य, तेज, क्षमा, शुचिर्भूतता, स्वामीच्या ठिकाणीं प्रेम, या गुणांनीं युक्त, निष्कपटी, देशकालज्ञ व राजहितामध्यें दक्ष असे असून राजानें आपला राज्यकारभार अशांवर सोंपवावा; निस्तेज, कुलहीन, ज्ञानहीन, अनिश्चित बुद्धीचा, व्यवहारशून्य, संकुचित बुद्धीचा, दारूबाज, जुगारी, शिकारी वगैरे दुर्गुण असणारावर राज्यकारभार सोंपवूं नये. नवखा त्याचप्रमाणें ज्याच्या घराण्यांत एकदां आपण कोणाला तरी दुखविलें आहे असा मनुष्य कितीही बुद्धिमान, शहाणा व आपल्यावर प्रेम करणारा असला तरी त्याला मसलतींत घेऊं नये. याप्रमाणें मंत्रिमंडळाची रचना व त्यांच्या अंगचे गुण सांगून, मग यांच्या सल्ल्यानें राष्ट्रांतील व परराष्ट्रासंबंधानें व्यवस्था कशी ठेवावी, याबद्दल यांत विचार केला आहे. मंत्रगुप्तीचें महत्त्व इतकें ठा-

खविलें आहे कीं, मंत्र हें राजाचें चिलखत असून मंत्री हे त्याचे अवयव आहेत, ह्मणून ह्मटलें आहे. याप्रमाणें मंत्रिमंडळाची व्यवस्था केल्यावर मुख्य प्रधान व सेनापती यांच्यामधील गुणांचें पुढें दिल्याप्रमाणें वर्णन आहे. मुख्य प्रधान कुलीन, सत्वसंपन्न, शुद्धशील, बुद्धिमान, धैर्यवान, धर्मशास्त्रपारंगत व मंत्र गूढ ठेवण्याला समर्थ असावा. सेनापतीच्या अंगीं वरील गुण असून शिवाय निरनिराळ्या व्यूहरचनांची व आयुधांची त्याला माहिती असून तो पराक्रमी असावा. याप्रमाणें महत्त्वाचे कामीं पुष्कळ मंत्र्यांचा सल्ला राजानें घ्यावा, ह्मणून जरी सांगितलें आहे तरी निरनिराळ्या सामान्य गोष्टींत त्या त्या कामाकडील एकाच मंत्र्याच्या तंत्रानें वागावें, असें सांगितलें आहे. कारण अशा प्रसंगीं पुष्कळांचा सल्ला घेत राहिल्यानें ते त्या कामाची एकमेकांवर टोलवाटोलवी करून कोणाकडूनच तें होत नसतें.

हेर—राज्यशकट खड्यांत पडून चुरडून न जातां नीट चालण्यास चोहोंकडील बातमीची अवश्यकता आहे, व ती कळण्याला हेरांसारखें दुसरें साधन नाहीं. अशा हेरांची ते वेळीं पुष्कळ योजना होत असे. यावरून ज्याला हल्लीं detective force ह्मणतात त्या वर्गाचें अस्तित्व त्या कालीं होतें. एवढेंच नव्हे तर एकंदर त्यांच्या वर्णनावरून हल्लीं फ्रान्स किंवा अमेरिका येथील हा वर्ग जसा नांवाजलेला आहे, तशा प्रकारचा तो असावासें दिसतें. मुके, आंधळे, पांगळे, स्त्रिया, तापस अशा नाना वेषांनीं त्यांनीं आपल्या व शत्रूच्या देशामधून फिरत राहून, चवाठ्यावरून, देवळांतून, जमावाच्या ठिकाणीं सभांतून वगैरे जेथें जेथें लोक जमण्याचा संभव असतो तेथें तेथें ते काय बोलतात तें ऐकावें असें यांचें वर्णन यांत आहे. हेराची पद्धत इतकी पूर्णतेला गेलेली दिसते कीं, शिखंडी स्त्री असून पुरुष झाल्याची बातमी द्रुपदानें अगदीं गुप्त ठेविली होती, त्याच्या राष्ट्रांतील लोकांना सुद्धां ती माहीत नव्हती, पण भीष्मांना ती हेरांकडून कळली होती, असें भीष्मच युद्धाचे आरंभीं सांगतात.

कर—त्याचप्रमाणें राज्यांतील अंतर व बाह्य व्यवस्था सुरळीत चालण्याला मुख्य साधन जो पैसा त्याची कराच्या रूपानें उभारणी करण्याची व्यवस्था सुद्धां फार दूरदर्शीपणाची दिसते. कराखालीं प्रजेचें डोकें चेपून जाईल असा जबर कर न घेतां विनाकारण कोणी काम करीत नसल्यानें मेहनत व श्रम पाहून दोघांनाही ज्याच्या योगानें फायदा होईल अशा तऱ्हेनें कर घ्यावा ह्मणून मुख्य तत्त्व सांगून, क्रयविक्रय, रस्त्याचें स्वरूप, खाणें, वस्त्रप्रावरण, जमा व शिल्लक, या गोष्टी लक्षांत घेऊन व्यापाऱ्यांवर; उत्पन्न, रोजमुरा व कारखान्याचें स्वरूप पाहून कारखानदारांवर; शेतकऱ्यांवर शेतीच्या उत्पन्नाचा एक षष्ठांश कर घ्यावा ह्मणून सांगितलें आहे. एके ठिकाणीं राजानें द्वशांश कर घ्यावा असें सुद्धां सांगितलें आहे. त्याचप्रमाणें या कराच्या उत्पन्नाच्या विनियोगाचे संबंधानें सांगितलेलें तत्त्व तर हल्लींच्या सुधारणेच्या शिखराला पोंचलेले राज्यकर्ते सुद्धां पाळीत नाहींत. ज्या कामासाठीं कर घेतला असेल त्याचा विनियोग त्याच कामाकडे व्हावा; राष्ट्र व व्यापार यांच्या भरभराटीला कारण जी राष्ट्राची उत्पादक शक्ति ती ज्यानें वाढेल अशा रीतीनें वागावें, असें यांत स्पष्ट आहे. संकटासाठीं गोळा केलेला पैसा वाढवीत ठेवावा ह्मणून उल्लेख आहे, यावरून हा त्या वेळचा दुष्काळ फंडाच्या स्वरूपाचाच पैसा असावासें वाटतें; मात्र याचा विनियोग पूर्वी सांगितल्याप्रमाणें ज्या त्या कामाकडे होत असे. दुष्काळफंड म्हटल्याबरोबर हल्लींप्रमाणेंच तेवेळींही दुष्काळ पडत होता, म्हणून कोणी तर्क काढूं लागतील तर यासंबंधीं महाभारतांत दुष्काळाचा उल्लेख फक्त एक दोन ठिकाणीं आणि तोही मागील गोष्टींच्या उदाहरणांत आला आहे. हल्लींप्रमाणें त्याचा सुकाळ नसून एकंदर वर्णनावरून तो काळ फार भरभराटीचा असावासें दिसतें, हें येथें जातां जातां सांगितलें पाहिजे. दुष्काळफंड हें केवळ नामसादृश्य आम्हीं घेतलें असून इतर राष्ट्रीय संकटांसाठीं गोळा केलेला हा पैसा असावा.

नगराची व किल्ल्यांची व्यवस्था—राजानें राहण्यासाठीं नगर कसें बांधावें, याबद्दल खुलासेवार माहिती यांत पुढें दिल्याप्रमाणें आहे. जंजिरा, भुईकोट, गड, सैन्याचा बुरुज, मातीचा व जंगलांत बांधलेला, अशाप्रकारच्या एखाद्या तटबंदी व भोंवतीं खंदकें असलेल्या किल्ल्याच्या आश्रयानें राज-

धानींचें नगर वसवून त्यांत राजानें रहावें. यांत रथ-दळ, हत्तीदळ, स्वार, आयुधें, धान्यसामुग्री व निरनिराळे कारागीर पुष्कळ ठेवावे; नगरांत चौक, वुतर्फा दुकानें व रुंद रस्ते ठेवावे; नगरांतील सर्व व्यवहार उघड चालला आहे किंवा नाहीं, यावर नजर असावी; व समाजसंबंधी सर्व उत्सव नेहमीं चालू ठेवावे. यावरून रुंद रस्ते वगैरे तयार करण्याची चाल ते वेळीं होती. रस्ते झाडून पाणी शिंपडण्याच्या प्रघाताचाही उल्लेख यांत आहे.

मुलकी व्यवस्था--प्रत्येक गांवावर एक एक अधिकारी नेमून, अशा दहा दहांवर देखरेखीला एक, पुढें विसाविसांवर एक व पुढें शंभरांवर व पुढें हजारांवर एक, याप्रमाणें कामगार असावेत ह्मणून सांगितलें आहे. याच धर्तीवर हल्लींची कुळकर्णी, मामलेदार, कलेक्टर, रेव्हिन्यु कमिशनर ही व्यवस्था आहे. या निरनिराळ्या अधिकाऱ्याच्या वेतनाचें ही मान यांत सांगितलें आहे.

गरिबांची दाद—दिवाणी व फौजदारी व्यवस्था यासंबंधानें शिरजोर लोकांनीं गरिबावर जुलूम केल्यामुळें त्यांना रडत बसण्याची पाळी न येईल, अशी एकंदर व्यवस्था ठेवावी, ह्मणून सामान्य तत्त्व सांगून दिवाणी व फौजदारी खटल्यांत पुरावा कशाप्रकारचा असावा, शिक्षेचें स्वरूप काय असावें, वगैरे सविस्तर माहिती आहे. न्यायासनावर बसून न्याय करणारे, अन्यायी व लाचखाऊ नसावेत. वादीप्रतिवाद्यांच्या खटल्यांत साक्षीच्या जोरावर निकाल द्यावा; परंतु गरिबाला कोणी साक्षी नसल्यास अशा खटल्याकडे राजानें स्वतः विशेष लक्ष पुरवावें व गुन्हेगारांना अपराधानुरूप शिक्षा द्यावी ह्मणून ह्मटलें आहे. राजाला मारण्याची खटपट करणारा, आगलाव्या, चोर व परस्त्रीशीं संबंध ठेवणारा यांना देहांत शिक्षा सांगितली आहे. अशा प्रकारची शिक्षा या अपराधाबद्दल कडक आहे, अशी टीका कांहीं आधुनिक विद्वान करतात; पण समाजव्यवस्था सुरळीत चालून जिकडे तिकडे शांतता नांदण्याला ही कडक शिक्षा लोकांवर जरब बसविण्याला किती उपयोगी आहे, याचा विचार केला असतां या कडकपणाचा उद्देश कळणार आहे. इ. स. १७०५ पर्यंत इंग्लंडमध्यें १०७ हून अधिक अशाप्रकारचे गुन्हे होते कीं, ज्यांना कायद्यांत देहांत शिक्षा सांगितल्या होत्या. यावरून तीन हजार वर्षांपूर्वी ब्राह्मणांची सुधारणा या बाबींत किती पुढें गेली होती हें कळणार आहे.

धर्मदृष्टि—जंगमानें स्थावरांना, दाढेच्या प्राण्यांनीं बिनदाढेच्या प्राण्यांना, बळवानांनीं दुबळ्यांना गिळावें, असा जगाचा सामान्य नियम असल्यानें दुर्लक्षामुळें आपल्यावर एखादा प्रसंग ओढवूं नये, याकडे राजाचें पूर्ण लक्ष असावें. राष्ट्रांत धर्मलंडपणा माजल्यानें लोक दुर्व्यसनी व हलकट बनतात व त्यामुळें राष्ट्रांत व बाहेर राजावर अनेक प्रसंग ओढवतात, ह्मणून स्वतः धर्मानें वागून राष्ट्राला नीट धर्माचें वळण देण्यासाठींच राजाचा किंवा जे कोणी राज्यशकट हातीं घेऊन तें हाकलण्याची जोखीम आपल्या शिरावर घेतात त्यांचा अवतार आहे. तेव्हां हा धर्म नीट संभाळणाराच राजा होय. कोणत्याही राष्ट्रांत धुरीणत्व पतकरणाऱ्या राजाचें त्याकालीं हें पहिलें कर्तव्य समजण्यांत येत होतें व हल्लींही येत आहे. हें तत्त्व हल्लीं सुद्धां तितकेंच लागू पडत असून पाश्चात्यराष्ट्रांना ह्मणजे तें कळत नसतें असें नाहीं; परंतु केवळ स्वार्थपरतेनें धर्मसंबंधीं औदासिन्याचें तत्त्व बाहेर प्रतिपादण्यांत येत असतें. त्याचप्रमाणें गुत्ते, वेश्या, कुंटिणी, जुगारबाज लोक यांना राष्ट्रांत थारा देऊं नये, असें आहे. ग. ल्लोगल्लीं दारूचीं दुकानें घालण्याला कायदेशीर परवानगी देणाऱ्या व आडदांड कामुकांच्या कामवासना जाळण्याला शहरामधून सदासुवासिनींच्या पेठा वसविणाऱ्या, हल्लींच्या सुधारणेचा तोरा मिरविणाऱ्या राजांना या गोष्टींची थोडी शरम वाटली पाहिजे ! सर्वच भिक्षा मागूं लागतील तर काम कोणी करणार नाहीं; तेव्हां अशा लोकांचा बंदोबस्त राजानें करावा ह्मणून सांगितलें आहे. हा हल्लींच्या सुधारलेल्या राष्ट्रांनीं उचललेला आमचा Poor laws नव्हे काय? त्याचप्रमाणें चोरांचा पूर्ण बंदोबस्त करून त्यांना राष्ट्रांतून नाहींसे करावे ह्मणून सांगितलें आहे. आणि ह्मणूनच भीष्मांनीं आपल्या धर्माचें जो रक्षण करील असा स्वधर्मीय राजा निवडावा ह्मणून स्पष्ट सांगितलें आहे. कारण अशा राजाच्या हातून आपल्या प्रजेचा धर्म नीट संभाळला

जातो, व त्यावर स्वराष्ट्राची भावी उन्नति अवलंबून असते. धर्मलंडपणानें रावणी राज्य प्रसंगीं किती बाढलें तरी धर्म व नीतिरूपी पाया भक्कम नसल्यानें रावणराज्याप्रमाणेंच त्याचा अग्नेरीस निकाल लागतो. धर्म न संभाळणाऱ्या राजाला भीष्मांनीं वृषल (धर्माला कापून काढणारा) ह्मटलें असून, कपड्याचा डाग काढून तो ज्याला साफ करतां येत नाहीं, अशा परटाप्रमाणें धर्माकडे दुर्लक्ष करणारा राजा निरुपयोगी आहे, असें त्यांचें मत आहे. हिंवाळ्यांत ऊष्मा होणें, उन्हाळ्यांत थंडी वाजणें, अकाळीं पाऊस पडणें किंवा अनावृष्टि होणें, नानारोग उद्भवणें, या सर्वांना धर्मलोप कारण असून याची जबाबदारी राजावर आहे. कारण राजा कालाला कारण असून, तो बरावाईट आणण्याचें राजाचे हातीं आहे. कालानुरूप राजा होतो, हें ह्मणणें चुकीचें आहे, असें भीष्मांचें मत आहे. राष्ट्रांत राजाचे कामगार लोक फार लोभाविष्ट होऊन प्रजेला रडबून हरप्रयत्नानें त्यांच्यापासून पैसा उकळूं लागले तर तें सुद्धां राजालाच अनिष्टकारक आहे. धर्माला झुगारून देऊन अधर्माकडे प्रवृत्ति ठेवून बलाच्या घमेंडीवर वागणारा लौकरच धर्म व अर्थ या दोहोंनाही मुकतो. प्रत्यक्ष मुलगा युद्धाचे वेळीं आशीर्वाद घेण्यासाठीं आला असतां गांधारी स्त्री असून ' धर्म तिकडे जय, ' ह्मणून आशीर्वाद देते. यावरून धर्माची चाड ते वेळीं किती होती हें दिसतें.

वैभववृद्धि व शत्रूवर चाल—याप्रमाणें मुलकी, दिवाणी व फौजदारी व्यवस्था नीट ठेवून व आपल्या नोकरमाणसांवर पूर्ण नजर ठेवून राष्ट्राची आंतून भरभराट केल्यावर कोणत्या प्रकारच्या शत्रूवर केव्हां चालून जावें, त्याच्याशीं युद्ध कसें करावें, जिंकलेल्या लोकांशीं कसें वागावें, याचा विचार करून आपत्कालीं राजानें कसें वागावें, याचा विचार त्यांत आहे. शत्रूशीं प्रसंग आणण्यापूर्वी यानें आपले मंत्री व नोकर आपल्याशीं कसे आहेत, आपल्या लोकांत कशी जूट आहे, वगैरे गोष्टींचा विचार केला पाहिजे; व आपले लोक आपल्याशीं बिघडण्याला कारण जो लोभ तो यानें दूर केला पाहिजे. यांच्याशीं कडक वागल्यानें हे शत्रूला मिळतात, म्हणून यांना व गांवांतील पुढाऱ्यांना बहुमानानें वागवावें. याप्रमाणें सर्व अंतर्व्यवस्था नीट असल्यावर प्रथम साम व दान हे उपाय योजून त्याचा उपयोग न होईल तर मग शत्रुपक्षामध्यें फूट पाडण्याचा यानें प्रयत्न करून त्याचाही उपयोग न होईल तर त्याच्याशीं दोन हात करून त्याला वठणीला आणावा म्हणून सांगितलें आहे.

दूत—सामानें साधलेला हेतु विशेष हितावह असून मनगटाच्या जोरावर अन्यायानें प्रसंगीं वैभव मिळालें तरी मानमान्यता व कुलीनता कधीं प्राप्त होत नाहींत; हें तत्त्व ओळखून युद्ध जुंपण्याचे पूर्वी शत्रूकडे दूत पाठविण्यांत येत असे. हा केवळ निरोप्या जासूद नसून राज्यकारण साधणारा मंत्रविशारद पुरुष असे. बहुतकरून वयोवृद्ध, वेदपारग, नीतिकुशल अशा ब्राह्मणाची या कामावर योजना होत असे, व ही कामगिरी इतकी पवित्र मानण्यांत येत असे कीं, दूताला कोणी मारावयाचें नाहीं, असा नियम तेवेळीं सुद्धां होता. इंग्रजींत ज्याला ambassador ह्मणतात,अशाच प्रकारचा हा असावा. शत्रूवर चाल करून जाण्याचा काळ मार्गशीर्ष किंवा चैत्र हे दोन महिने होते. मार्गशीर्षांत पावसाळा सरून पीकपाण्याची चोहोंकडे सुबत्ता असल्यानें व चैत्र हा फलपुष्पसंपन्न सुखकर वसंताचा आरंभ असल्यानें हा काल युद्धाला सोईचा ह्मणून निवडला असावासें दिसतें. आमचे मराठे व पेशवे याच तत्त्वावर दसऱ्याच्या सुमुहूर्तानें भगवा झेंडा बाहेर काढीत असावेत. शत्रूशीं युद्ध करतेवेळीं आर्य व अनार्य असा भेद करून अनार्याला वाटेल तसें जिंकून आपल्या ताब्यांत आणावें ह्मणून सांगितलें असून आर्यांशीं युद्ध करतांना मात्र परस्परांनीं चिलखतें घालून, स्वारानें स्वारावर, रथ्यानें रथ्यावर, गजयोध्यानें गजयोध्यावर, व शिपायानें शिपायावर चालून जाऊन ज्यानें त्यानें आपल्या बरोबरीचा योद्धा पाहून त्याच्याशीं युद्ध करावें, स्वारानें रथ्यावर किंवा रथ्यानें गजयोध्यावर, अशा विषम स्थितींत युद्ध करूं नये; सैन्य सोडून परतलेला, जखमी झालेला, भरंवशानें असणारा, दुसऱ्यांशीं भिडलेला, भ्यालेल्या, पडलेला, शरणागत, शस्त्र किंवा चिलखत गळून पडलेला, सारथी, खटारे, ओझीं वाहणारीं

जनावरें, शस्त्रें आणून देणारे, नौबती व शंख वाजविणारे, यांवर कधीं प्रहार करूं नये; विषाचें पाणी दिलेले बाण–तीं दुष्टांचीं आयुधें असल्यानें–वापरूं नयेत. फुटीमुळें शत्रु जखम लागून हातीं आला असेल तर त्याला आपलेकडे ठेवून घेऊन त्याची नीट शुश्रूषा करून जखम बरी करून परत पाठवावें, वगैरे कांहीं नियम आहेत. हल्लींच्या काळाशीं विचार केला असतां सुद्धां हे किती उदात्ततेचे नियम आहेत, हें कळून येणार आहे. पूर्वी विषारीबाणसुद्धां दुष्टांचीं आयुधें म्हणून त्या आर्यांना सोडण्याचा विचार येई; व हल्लीं रोजच्यारोज नवीन प्राणघातक भयंकर हत्यारें निघत असून सुद्धां या भूतदयेनें भरलेल्या ख्रिस्ती राष्ट्रांची तृप्ति न होतां दिवसानुदिवस अधिकाधिक घातुक आयुधें शोधून काढण्यांत त्यांची चढाओढ लागलेली आहे. आतां अशा आमच्या पूर्वीच्या उदार आर्यांनीं अनार्यांशीं युद्ध करतांना कांहीं नियम नको म्हणणें म्हणजे जरा चमत्कारिक दिसतें. पण त्याचा अर्थ एवढाच दिसतो कीं, यांच्याशीं नियम करून लढूं लागलें तरी हे कांहीं नियम पाळणार नाहींत; एवढ्याचसाठीं त्यांच्यासंबंधानें असें म्हटलें असावें. जिंकलेल्या राजाला एक वर्षभर आपलेकडे ठेवून घेऊन पुढें मी आपला गुलाम आहें, असें त्याच्याकडून वदवून तसें तो कबूल न करील तरी त्याला सोडून यावें असें आहे. यावरून जी गुलामगिरी आह्मीं बंद केली म्हणून पाश्चात्य राष्ट्रें प्रौढी मिरवितात, त्या गुलामासंबंधानें आमच्या लोकांचें आज तीन हजार वर्षांपूर्वीचें मत कसें होतें हें कळून येतें; व राजकीय कैद्याला सुद्धां हल्लींपेक्षां किती सवलत मिळे, हेंही दिसून येतें. त्यावेळीं शत्रूवर स्वारी करून त्याला जिंकणें, केवळ आपलें वर्चस्व त्याला कबूल करण्यास लावण्यापुरतेंच असल्यानें जित राजाला व त्याच्या प्रजेला त्याच्या राज्यांतील अंतर्व्यवस्थेंत पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत येऊन त्या राष्ट्राचा जोम व वैभव कायम राखण्यांत येत असे; आणि म्हणून जितजेत्यांमध्यें पूर्ण प्रेम वागत असे. भीमानें जरासंधाला व श्रीकृष्णानें शिशुपालाला मारलें असून त्याचे मुलगे भारतीयुद्धांत पांडवांच्या बाजूनें लढतात, यावरून या आमच्या म्हणण्याची सत्यता लक्षांत येणार आहे. त्याचप्रमाणें लढाईत धरलेल्या मुलींना सुद्धां आपल्याकडील कोणाशीं लग्न करण्याचें तिच्या मनांत नसेल तर सोडून द्यावें, असें आहे. यावरून स्त्रियांना मान किती असे व त्यांच्या पातिव्रत्याकडे किती लक्ष असे हें दिसतें. मुसलमानाकडील एखादी मुलगी हातीं लागली असतां तिला मातेसमान किंवा भगिनीसमान समजून शिवाजी सोडून देत असे, त्याचें मूळ तरी यांतच आहे. जिंकलेल्या देशांतील अनार्य लोकांशीं गोड बोलून व लांचलुचपत देऊन त्यांना खुष ठेवावें, असें आहे, व हाच नियम बहुतेकांशीं हल्लींच्या राजकारणपटु इंग्रजांकडून पाळण्यांत येत असतो. स्वराज्य संरक्षण व परराज्याचें आक्रमण योग्यतऱ्हेनें व्हावें म्हणून रणसंग्रामाला यज्ञाची उपमा देऊन रणांत देह ठेवणाराला नानाविध उत्तम फलें सांगितलीं आहेत.

युद्धकला—ज्याप्रमाणें शत्रूवर चालून कसें जावें, केव्हां जावें, जितशत्रूला कसें वागवावें, वगैरे माहिती राजधर्मांत सविस्तर सांगितली आहे, त्याचप्रमाणें भीष्मपर्वापासून गदापर्वापर्यंतच्या पर्वांवरून रणभूमि कशी निवडावी, सैन्याची व्यूहरचना कशी कशी करावी, निरनिराळ्या व्यूहांची माहिती, निरनिराळीं हत्यारें, असियुद्ध, गदायुद्ध, संकुलयुद्ध, द्वंद्वयुद्ध, निरनिराळीं अस्त्रें, निरनिराळे बाण यांचें जें वर्णन आहे, त्यावरून तेवेळची युद्धकला ही मोठी व्यवस्थित असून त्यांत रानटीपणा कांहीं दिसून येत नाहीं. युद्धाचे वेळीं आपल्या पक्षाकडचा मनुष्य ओळखतां यावा म्हणून कांहीं खुणा ठरविण्यांत येत असत. हत्ती, घोडे, रथ व पायदळ अशा चतुरंग सैन्याचा जरी जागजागीं उल्लेख आहे तरी विशेष युद्धप्रसंग रथांतून किंवा हत्तीवरून दोघांदोघांमध्येंच होत असावा; व रथांतून युद्ध करण्याचा नेहमीं प्रसंग असल्यानें सारथ्याचें महत्त्व रथांतून युद्ध करणाऱ्या योद्ध्याइतकेंच किंबहुना विशेष समजण्यांत येत होतें हें अर्जुनाचें सारथ्य श्रीकृष्णानें व कर्णाचें सारथ्य शल्यानें केलें आहे, यावरून उघड होतें; हत्तीहत्तीचें युद्धही अनेक प्रसंगीं मोठ्या बहारीचें वर्णिलें आहे. भगदत्त, सोमदत्त, वगैरे वीरांचे प्रसंग अशांपैकीं आहेत.

स्वारांचा व पायदळांचा अनेक प्रसंगीं उल्लेख आहे, तरी त्यांच्या युद्धाचें वर्णन महाभारतांत फार थोडें आढळतें. घोड्यावरून विटा फेंकून लढल्याचे थोडे प्रसंग व एकमेकांशीं भिडून तरवारीनें व गदेनें लढल्याचेही कांहीं प्रसंग यांत वर्णिलें आहेत. गदा-युद्धाचें उत्तम वर्णन भीम व दुर्योधन यांच्या युद्धाचे वेळीं केलें आहे. युद्धाला निघतांना बरोबर पाणी, अन्न, पथाऱ्या, भूस, गवत, कोळसे, चिलखतें, कातड्यीं, पडदे, दारू, तोफा, बंदुका, धनुष्यें, बाण, भाते, भाले, बरच्या, फरशा, तरवारी, आंतड्यीं, बाहेर काढणारे वांकडे बाण, विषाचें पाणी दिलेले बाण, पाणी व गोळा फेंकणाऱ्या बंदुका, गोळे, गोफणी, मुद्गल, फाळ लाविलेले सोटे, नांगर, पिचकाऱ्या, करवती, गुप्त्या, कांटे, खिळे, शेवटाला चिकट पदार्थ लावलेले केराळा धरून पाडण्याचे सोटे व दुसरीं लोखंडी हत्यारें, वाद्यें, चित्र्याच्या चामड्यांनीं मढविलेले रथ, दांड, शिंगें, विटा, कुऱ्हाडी, कुदळी, तेलांत भिजविलेले रेशमी कपडे, तूप, काकवी, राळ व दुसरे ज्वालाग्राही पदार्थ, तंबू, बाळू, ढाली, वगैरे सामानाचे खटारे घेण्यांत येत असत. यावरून युद्ध किती शास्त्रीय पद्धतीनें व शिस्तवार होत असेल, याची कल्पना येईल.

आपद्धर्म—शत्रु डोईजड असून न बधणारा असेल व आपला पडता काळ असेल, तर उगीच बरचेबर त्याला डवचीत राहण्यांत अर्थ नाहीं. मनांतून त्याच्याशीं वैरभावानें राहून वरून मित्रभाव दाखवून आपल्या हितामध्यें दक्ष असणाऱ्या लोकांना त्यांवर बाहेर राजद्रोहासारखा एखादा भयंकर आरोप ठेवून त्यांची दौलत जप्त करून आंतून पुष्कळ पैसा पुरवून शत्रूच्या सैन्यांत व त्याच्या लोकांत पाठवून त्यांकडून फूट पाडण्याची सतत खटपट चालवावी; व वेळ आली असतां फिरून वर डोकें करणार नाहीं, अशारीतीनें त्याला चीत करावा. आपल्या व शत्रूच्या बलाचलाचा विचार करून प्रसंग येईपर्यंत वेतसवृत्ति धरावी. प्रसंगीं राजाला बुद्धिबळ व द्रव्यबळ यांसारखें दुसरें कांहीं उपयोगी पडत नाहीं. पैकीं पहिलें जरी स्वतःच्या स्वाधीन असलें तरी दुसरें परस्वाधीन असतें, व द्रव्यबलाबाचून सैन्य जमवितां येऊन कार्यसिद्धि होणें शक्य नसतें. तर संकटसमयीं राजानें धर्माधर्मविचार फारसा करीत न बसतां वाटेल त्या उपायांनीं आपल्या व परराष्ट्रांतून पैसा गोळा करून आपलें बल स्थापित करावें. कारण धर्मसुद्धां बलावर अवलंबून असल्यानें त्यासाठीं राजाच्या हातून जरी थोडा अन्याय झाला तरी हरकत नाहीं. या अन्यायाबद्दल पुढें प्रजेला सुख देऊन त्याला त्यांतून मोकळें होतां येतें. अशासमयीं अन्यायानें पैसा गोळा करण्यास राजा कचरेल तर त्याचा व त्याच्याबरोबर त्याच्या प्रजेचा नाश होतो; व राज्य परक्याच्या हातीं जाऊन राष्ट्राच्या धर्मावरसुद्धां गदा येते. कारण आपला धर्म, व्यापार, उद्योगधंदे, या सर्वांना स्वराज्याची आवश्यकता असून स्वराज्याशिवाय हे कधींही उन्नतीस चढावयाचे नाहींत, हा सिद्धांत आहे. ह्मणून संकटसमयीं राजानें जरा कडक उपायांनीं पैसा गोळा केला असतां चालेल, व अशा वेळीं प्रजेनेंही तो कांकूं न करितां मुकाट्यानें यावा असें यांत सांगितलें आहे. कारण आपत्काळीं एवढेंच नव्हे तर नेहमीं राजा व राष्ट्र यांनीं परस्परांचें रक्षण केलें पाहिजे, असें न करतां जे राष्ट्रहिताला आड येऊन आपलें वैभव वाढवीत राहतात, त्यांचा प्रेतांतल्या किड्याप्रमाणें राष्ट्राच्या मागोमागच नाश होतो.

अशाप्रकारें हा आपद्धर्म भीष्मांनीं युधिष्ठिराला सांगितला आहे, तरी तो किती भीतभीत सांगितला आहे, हें पुढील त्यांच्या उद्गारावरून स्पष्ट होतें. युधिष्ठिरानें 'शत्रूंनीं चोहोंकडून घेरून मित्रांनीं ज्याला सोडलें आहे व ज्याच्यापाशीं द्रव्यबल व मनुष्यबल नाहीं, अशा राजानें काय करावें,' ह्मणून प्रश्न केला असतां ते ह्मणतात, 'तूं हा फार नाजुक (अर्थात् अधर्मप्रवृत्त्यात्मक) प्रश्न विचारला आहेस. शास्त्र फार नाजुक आहे. थोरांच्या वर्तनावरूनच तें कळत असतें' वगैरे उपोद्घात करून मग त्यांनीं हा आपद्धर्म त्याला सांगितला आहे. यावरून त्या वेळच्या लोकांना धर्माची चाड किती होती, हें व्यक्त होत आहे. या वरील एकंदर विवेचनावरून शिवाजीचें एकंदर धोरण आपद्धर्मतत्त्वाला किती धरून होतें; व त्याला चोर, लुटारू, हीं टोपणनांवें देणारांची बडबड किती निरर्थक आहे, याचा निकाल लागतो. वरील एकंदर विवेचनावरून राजा व

प्रजा यांमध्यें पितापुत्रांचा संबंध राहून दोघांनीं एक दिलानें स्वराज्य संभाळण्याला झटणें हें दोघांच्या फायद्याचें असून यांतच दोघांचें हित आहे, हें स्पष्ट होतें. तसेंच राजा व प्रजा यांच्या हिताहितामध्यें धर्मामध्यें ऐक्यभाव असल्यामुळें दोघांनाही सुख होत नसतें. आतां कोणतेंही राष्ट्र दुसऱ्याकडून जिंकलें न जातां सतत स्वातंत्र्याचा उपभोग घेत राहतें, असें क्वचितच होतें. कारण, कालचक्र मनुष्याप्रमाणेंच राष्ट्राच्या मागूनही सुटलें नाहीं. परंतु एखाद्या बलवान राजानें एखादें राष्ट्र जिंकून आपल्या ताब्यांत घेतलें ह्मणून एवढ्यानेंच तो राजा व त्याची नवी प्रजा यांचें हिताहित एक राहील, असें नाहीं. आणि जर तसें राहील तर फारसें नुकसान होत नाहीं; एवढेंच नव्हे तर ह्या जिंकणाऱ्या राजाच्या अंगांतील कांहीं सद्गुणांचा या नव्या प्रजेला फायदा मिळून त्यांचें त्यानें कल्याण होतें. नार्मन लोकांनीं इंग्रजांना पूर्वी जिंकलें तरी त्यापासून त्यांचें नुकसान न होतां त्यांचें उलट कल्याणच झालें, यावरून हें स्पष्ट होतें. परंतु असें होण्यास दोघांचें हिताहित एकाच गोष्टीमध्यें असलें पाहिजे हें उघड आहे. जेथें जिंकणारा आपलें हित जितांच्या हिताहून वेगळें समजत असतो व जितांना आपल्या राज्यकर्त्याच्या हिताहून आपलें हित वेगळें वाटत असतें तेथें दोघांचे विलक्षण हाल होत असतात.

अध्यात्मविचार

धर्मः श्रेयः समुद्दिष्टं श्रेयोऽभ्युदयलक्षणं
सतु पंचविधो ज्ञेयो वेदमूलः सनातनः ॥ १ ॥
विद्वद्भिः सेवितः सद्भिर्नित्यमद्वेषकारिभिः
हृदयेनाभ्यनुज्ञातो यो धर्मस्तं निबोधत ॥ २ ॥

धर्माला वेदांमध्यें मूळ असून सनातनत्व असलें पाहिजे, व तो आत्मोन्नतीला साधनीभूत असला पाहिजे. नीति ह्मणजे अर्थात् नेहमीं कोणाचा द्वेष न करणारे भले व विद्वान ज्या मार्गानें गेले असून आपल्या बुद्धीलाही ज्यासंबंधानें संशय वाटत नाहीं असा मार्ग; व वेदान्त किंवा अध्यात्मविचार ह्मणजे जी ही एवढी थोरली सृष्टि अगदीं एक तंत्रानें नियमितपणें चालली आहे ती कोणाच्या अधिकारानें, यावर विचार करून हिच्या चालकाला शोधून काढणें.

जें कांहीं दिसतें याच्या पलीकडे कांहींच नाहीं अशा नास्तिक वाद्यांच्या मतानें धर्म व वेदान्त यांत कांहीं अर्थ नसून ते यांना नीतीचेच भेद समजतात. समाज सुरळीत चालण्याला कांहीं नीतिबंधनें मात्र अवश्य आहेत, परंतु धर्म हा केवळ अज्ञानी लोकांना लालूच आहे व वेदान्त नीतीचीच वरची पायरी असून या स्वतःसिद्ध नियंत्रित चाललेल्या सृष्टीकडे कौतुकानें पाहण्यापलीकडे यांत कांहीं नाहीं असें त्यांचें मत आहे. ज्याप्रमाणें एखाद्या अगदीं लहान मुलाला खाऊची लालूच दाखवून शाळेला पाठवावें लागतें, तेंच समजूं लागलें ह्मणजे तें आपोआपच शाळेला जाऊं लागतें, व मोठेपणीं शाळेची सुद्धां जरूर न राहतां मनुष्य ज्ञानार्जनाच्या मार्गे लागला असतो, त्याचमाणेंच अज्ञान्यांना नीतीनें चालण्याला मोक्षस्वर्गादिक खाऊ असून समजूं लागल्यावर या खाऊची गरज न उरतां मनुष्य आपोआप समाजहितासाठींच ह्मणून नीतीनें वागूं लागतो व पुढें स्वाभाविकपणेंच नेहमीं नाना चमत्कार डोळ्यापुढें येत राहिल्यानें सृष्टीकडे त्याचें लक्ष वेधतें, असें ते ह्मणतात. ह्या विचारांत तथ्य कितीही असो, पण हा सामान्य विचार असून कोणाही सामान्य मनुष्याच्या डोक्यांत येण्यासारखा आहे. ब ज्या पाश्चात्यांची सर्व धडपड भौतिक सुखासंबंधानें आहे त्यामध्यें या विचाराची मंडळी फार निघावयाची हें सांगावयाला नकोच. तरी आमच्यामध्यें ह्मणजे अशा विचाराचे मुळींच कोणी झाले नाहींत असें नाहीं. दिसतें या पलीकडे कांहीं नाहीं, या तत्त्वावर 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत' या पंथाची कांहीं मंडळी येथेंही झाली आहे. परंतु ही आर्यभूमि-पौर्वात्य देश- केवळ ऋण करून घृत पिण्यासाठीं किंवा सर्व जगाला लुबाडून स्वतःचें क्षणिक नश्वरसुख वाढविण्यासाठीं ह्या भूतलावर अवतरला नसल्यानें याला आपलें कर्तव्य याहून कांहीं वेगळें आहे असें वाटून त्यादिशेनें प्राचीन कालापासून याची खटपट झाली आहे, व अध्यात्मज्ञानाचा अमूल्य ठेवा यानें आमच्यासाठीं ठेवला आहे, आणि हल्लींच्या अशा हीनदीन द-

शेंत सुद्धां आह्मांला अभिमान बाळगतां येण्याजोगा जर एखादा ठेवा आमचेपाशीं असेल तर तो हा आहे; व स्वार्थपर पाश्चात्यलोकांकडून सर्वतोपरी नागविले गेलों असतां ह्या अमोलिक ठेव्यालाही मुकून आह्मी दिगंबर होऊन राहिलों तर मग आमच्यासारखे शहाणे आह्मीच ह्मटलें पाहिजे. तेव्हां ज्यांनीं यावर जन्म घालवून विचार ठरविले आहेत व ज्यांचे विचार हल्लींच्या काळच्या कांहीं विचारी पाश्चात्य विद्वानांना ग्रहणीय वाटत आहेत ते त्यांचे धर्माचे व वेदान्ताचे विचार निदान त्यावर त्याहून अधिक विचार करण्याची जोंपर्यंत स्वतःला संवय करून घेतली नाहीं तोंपर्यंत तरी ग्राह्य मानले पाहिजेत. पापपुण्याप्रमाणें फल मिळालेंच पाहिजे, एका नावेंतून दुसरींत लोटून दिलेल्या मालाप्रमाणें निरनिराळ्या देहामध्यें जीव कर्मफल भोगीत राहतो, हा त्यांचा धर्मविचार असून त्यांचा वेदान्त सच्चिदानंदस्वरूपी परमात्म्याची ओळख करून देतो. केवळ नीतीच्या जोरावर या भवसागरांतून पार पडणारी मंडळी थोडी. नाना इंद्रियविषयरूपी भयंकर जलचरांनीं खळबळ उसळून दिलेल्या या भवसागरांतून पार पडण्याला सामान्य जनांना धर्मरूपी नावेची अत्यावश्यकता आहे. कशाही प्रकारचें सद्वर्तन ठेवणें यालाच धर्मसंज्ञा आहे असें एके ठिकाणीं ह्मटलें आहे. यावरून धर्म व नीति यांचा निकट संबंध किती आहे हें उघड होत आहे. धर्माला फांटा देऊन केवळ नीतीच्या जोरावर राष्ट्र उभारण्याचे गंधर्वनगर उभारण्यामारखे प्रयत्न कोणत्याही स्वतंत्र राष्ट्रांतून होत असल्याचें दिसत नाहीं.

हल्लीं ज्याप्रमाणें सर्व स्वतंत्र राष्ट्रांतून धर्म व नीति या दोन चाकांवर राष्ट्रसुधारणेचा शकट चालविला जात असून त्याचा एक पाय मोडून टाकलेला दिसत नाहीं, त्याचप्रमाणें भारतकालीं हिंदुस्थानची स्थिति दिसते, व भारतकालीं जी आमच्या पूर्वजांनीं मजल मारली होती त्यापुढें हल्लींच्या काळीं प्रगति न दिसतां उलट मागें पाऊलच दिसतें. त्याबेळेचे जे त्यांचे सृष्टिकर्त्यासंबंधानें विचार झाले आहेत ते इतके उदात्त आहेत कीं, हल्लींच्या पाश्चात्य विद्वानांना सुद्धां ते मान्य व आदरणीय वाटतात. जगाच्या उत्पत्तिसंबंधानें त्यांचा जितका विचार झाला आहे व समाजाची इमारत धर्माच्या भक्कम पायावर उभारण्यामध्यें त्यांची जितकी खटपट झाली आहे तेवढा विचार व तेवढी खटपट दुसऱ्या कोठेंच झाल्याचें दिसत नाहीं. ही दृश्य सृष्टि अगदीं नियमितपणें एकतंत्रानें चाललेली पाहून हिला कोणी चालक असावा अशी कल्पना होऊन त्याच्या शोधाला लागून विराट स्वरूपी परमात्म्याचा त्यांनीं शोध लावला. सर्व भूतमात्रांमध्यें एवढेंच नव्हे तर सर्व जडामध्यें सुद्धां परमात्मा भरला आहे हें उदात्त तत्त्व त्यांना कळलें. केवढें हें उदात्त तत्त्व आणि किती जुनाट काळीं याचा शोध! 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' या न्यायानें सर्वच जातीचे व पंथाचे संत या आर्यधर्माला पूज्य आहेत. सर्व जग ब्रह्ममय असून जे जे ह्मणून धर्मोपदेशक साधू आहेत त्या सर्व परमेश्वराच्या विभूति जगाच्या कल्याणासाठीं अवतरल्या असतात, हें उदात्त तत्त्व आज पुरातन कालापासून आमच्यामध्यें बिंबलें असल्यानें जरी अनेक धर्मपंथ ह्या भरतभूमीवर पूर्वीपासून निर्माण झाले आहेत तरी धर्मछल हा शब्दच आम्हांला ठाऊक नाहीं. युरोपमध्यें पंधराव्या शतकांत जी धर्मक्रांति झाली त्यावेळीं जो त्यासंबंधानें रक्तपात झाला त्याकडे व आमच्या अगदीं प्राचीन कालापासून इकडे धर्मपंथ निघाले असून सर्व सरुया भावंडाप्रमाणें गुण्यागोविंदानें वागत आले आहेत याकडे नजर फेंकिली असतां आमच्या ह्मणण्याची सत्यता कळणार आहे. आमची मजल फार झाली तर वाद करून मुद्देसूदपणें आपलें मत दुसऱ्याला स्वीकारावयाला लावावयाचें. त्याला तें न पटेल तर खुशाल त्यानें आपल्या मताप्रमाणें वागावें. आणि ह्मणूनच गौतम, कणाद, कपिल, जैमिनि, पातंजलि, चार्वाक, आर्हत, सौत्रांतिक, वैभाषिक, पाखंडी, शक्ति, रामानुज, कबीर, नानक वगैरे अनेक मतें व पंथ निघून ते सर्व सुखानें एकमेकांशीं स्नेहानें नांदत आले आहेत. धर्मसहिष्णुता (Religious toleration) हें जें मोठें तत्त्व आपल्याला कळलें आहे ह्मणून पाश्चात्य राष्ट्रें अलीकडे दाखवूं लागलीं आहेत

तें तत्त्व केव्हांपासून तरी आमच्यामध्यें पूर्ण बिंबलेलें दिसतें? त्याचप्रमाणें धर्माचा पायाही अहिंसा, सत्य, अक्रोध, परोपकार, सर्व प्राणिमात्रांची कींव करून त्यांवर दया करणें इत्यादि उदार तत्त्वावर उभारला आहे. अशा प्रकारच्या आमच्या या उदात्त धर्माचा,उदात्त नीतीचा व उदात्त वेदान्ताचा या महाभारतांत ठिकठिकाणीं विचार आला आहे. उद्योगपर्वांत सनत्सुजातानीं धृतराष्ट्राला केलेला उपदेश, भीष्मपर्वांत व अश्वमेधपर्वांत श्रीकृष्णानें अर्जुनाला केलेला उपदेश–गीता व अनुगीता–व शांतिपर्वांतर्गत मोक्षपर्वांत भीष्मांनीं युधिष्ठिराला केलेला उपदेश हे अध्यात्मविचारांचें भांडार आहेत. शिवाय वनपर्वांतील अजगरधर्मराजसंवाद वगैरे आणखीही बरेच प्रसंग आहेत. श्रीकृष्णानें अर्जुनाला सांगितलेली गीता तर आज जगमान्य धर्मपुस्तक होऊन बसलें आहे. ऐनप्रसंगीं अर्जुनासारखा वीर विषाद पावून हात पाय गाळून बसला असतां या गीतेनें त्याच्या डोळ्यांत अंजन पडून तो फिरून आपलें कर्तव्य करण्याला तयार झाला. या गीतेंत तसेंच मोक्षपर्वांत आत्मप्राप्तीचे कर्ममार्ग, ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग हे तीन मार्ग सांगून त्यांचीं स्वरूपें सांगितलीं आहेत. शिवाय मोक्ष व अनुशासनपर्वांत मिळून जगाची उत्पत्ति, कर्मफल, जन्ममरण, नरदेह, अनेकसंस्कारविधी, निरनिराळे व्रतनियम, दानविधी, विवाहविधी, स्त्रीसंबंध, निरनिराळे यज्ञ, श्राद्धविधी, वर्णाश्रमवृत्ति, भक्ष्याभक्ष्य विचार, शौच्याशौच्य विचार, स्त्रीधर्म, तापसधर्म, मोक्षधर्म, प्रायश्चित्तविधि, कुलधर्म, जातिधर्म, वगैरे अनेक विषयांवर विचार प्रकट केले आहेत. विशेषतः कर्माचा जो वैदिक काल त्याची जोराची लाट निघून जाऊन हळू हळू ज्ञान मार्गाकडे प्रवृत्ति वळत चाललेला हा काळ दिसतो. व पूर्वीचे हिंसात्मक. यज्ञ आतां घोर वाटूं लागून 'श्रद्धा पत्नी शरीरमिध्मम्,' इत्यादि तत्त्वावर आत्मयज्ञच श्रेष्ठ वाटूं लागले असावे. कारण अशाप्रकारचें उल्लेख एक दोन ठिकाणीं आले असून त्यांत यज्ञांत पशु मारून यज्ञ करणें वाईट असून ज्ञानाग्नीमध्यें इंद्रिय विषयांची आहुति देऊन आत्मयज्ञ करणें हेंच श्रेष्ठ आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. व अग्निहोत्रादि पसारा क्लेशाला कारण आहे असा उल्लेख आहे. अश्वमेधपर्वाच्या शेवटीं यासंबंधानें स्पष्ट उल्लेख आहे. तसेंच या ज्ञानमार्गाचे जे सांख्य, योग, वेदान्त वगैरे भेद यांचेही बरेंच पूर्ण विवरण यांत केलें आहे. या निरनिराळ्या मतांसंबंधानें या सर्वांचा उगम एकाच ठिकाणीं असून एका समुद्राला जाऊन मिळणाऱ्या निरनिराळ्या नद्यांप्रमाणें बंधमुक्त करून मोक्षप्राप्ति करून देणें हीच या सर्वांची दिशा आहे, असें म्हटलें आहे. नंतर सांख्य व योग यांमधील भेद व साम्य दाखविण्यांत आलीं आहे. योग देव-(ईश्वर) वादी असून सांख्य ज्ञानवादी आहे. ईश्वर म्हणून कांहीं निराळी वस्तु नसून मातींत मडकें किंवा बीजामध्यें झाड याप्रमाणें हें विश्व नेहमीं व्यक्ताव्यक्त रूपानें कायम आहे; प्रलयकालीं हें अव्यक्तस्थितींत असून अविद्येच्या योगानें पुढें तें व्यक्ततेला पावतें; पुरुष, प्रकृति, अहंकार, बुद्धि,मन, आकाशादि पंचमहाभूतें,शब्दादि पंचतन्मात्रें,नेत्रादि पंचज्ञानेंद्रियें, पादादि पंच कर्मेंद्रियें अशा प्रकारें या पंचवीस तत्त्वांची उत्पत्ति असून यांतील मुख्य जी प्रकृति हिला बाकींच्यासह सत्व, रज, तम गुणांनीं व्यक्त करतां येतें किंवा लयाला नेतां येतें हें सांख्यांचें मुख्य तत्त्व आहे. क्लेश, कर्म, कर्मफलें, संस्कार हीं ज्याला शिवत नाहींत, असा सच्चिदानंदस्वरूपी ईश्वर म्हणून कोणी वेगळा असून सत्वरजतमोगुणी त्याची वेगळी प्रकृति आहे. तिला आपली करून घेऊन ध्यानानें आपल्याला ईश्वराशीं जोडून घेतां येतें म्हणजे तदाकार होतां येतें हें योगमत आहे. देशकालाद्यनवच्छिन्न असा, सच्छब्दानें उपलक्षित आत्मा अनादि असून आत्मा हाच ब्रह्म आहे व ह्या निरनिराळ्या दिसणाऱ्या वस्तु भ्रांतिमूलक आहेत; अज्ञान हेंच बंधन असून ज्ञान हाच मोक्ष आहे, हें वेदान्ततत्त्व आहे. भारताचे कर्ते व्यासच वेदान्ततत्त्वाचे कर्ते होत. शुद्धता, तप, सर्व प्राणिमात्रांवर दया, व्रत, नियम हीं सांख्य व योग यांना सामान्य आहेत. जाळ्यांत सांपडलेले मोठमोठे मासे जाळें तोडून पार होतात, पण तेच मांसाच्या तुकड्याच्या लालुचीनें त्यांत सांपडलेले लहान लहान मासे नाश पावतात, त्याप्रमाणें मनावर पूर्ण दाब असणारेच योगामध्यें सिद्धि पावतात. इच्छा शक्ति, ईशप्रसाद, कर्मविपाक, पुनर्जन्म, श्रद्धामा

हात्म्य वगैरे सर्व वेदान्तांतील विषय व वरील सांख्य व योगदर्शनांचीं तत्त्वें यांचें विवेचन मोक्षपर्वांत आहे. त्याचप्रमाणें द्वैतवाद, नास्तिकवाद वगैरे विषय घेऊन त्यावर सुद्धां साधक बाधक विचार प्रकट केले आहेत. षड्दर्शनांचें सामान्य तत्त्वः—

आत्मा विनिष्कलो ह्येको देहबुद्धिभिरावृतः ।
तयोरैक्यं प्रपश्यंति किमज्ञानमतःपरम् ॥ १ ॥

एवढ्यांत आहे. आत्मा व देह एक, हा भाव जोंपर्यंत आहे तोंपर्यंत जीवाला बंध असून देहाशीं आपला कांहीं संबंध नाहीं हें तो जाणूं लागला ह्मणजे तो मुक्तच आहे. या सर्व मतांचें पर्यवसान ज्ञानानें दुःख नाहींसें करून घेऊन बंधमुक्तीनें चिरसुख मिळवून देण्याकडे असून या केवळ त्याकडे पोंचविणाऱ्या निरनिराळ्या वाटा आहेत. त्रिविधतापाला देह व आत्मा यांची ऐक्यभावना हेंच कारण आहे. या उदात्ततत्त्वाच्या परिशीलनानें सर्व विश्व परमात्मस्वरूप पाहूं लागण्याची संवय लागली ह्मणजे अहिंसा व परोपकार हे गुण आपोआपच अंगीं बाणतात. त्याचप्रमाणें नीतीकडे विशेष कटाक्ष परंतु निरीश्वरवादी अशा बौद्ध पंथाच्या मताचाही कांहीं ठिकाणीं यांत उल्लेख आहे. त्यावरून या सर्वांनंतर हें महाभारत झालें असावें अगर त्या त्या वेळीं तीं तीं मतें यांत घुसडलीं असावीं असा कांहींचा तर्क आहे. परंतु वर सांगितल्याप्रमाणें एकाच उगमापासून हे निरनिराळे प्रवाह बाहेर पडले असल्यानें उगमालाच गांठणाराला उगमापाशीं सर्वच प्रवाहांची गोडी मिळणें शक्य आहे. देवशर्म्याचा शिष्य विपुल यानें त्यांच्या वायकोच्या डोळ्यांत आपल्या डोळ्यांतील तेज मिळवून देऊन योगसामर्थ्यानें तिचें स्वातंत्र्य अगदीं नाहींसें करून तिला आपल्या ताब्यांत आणिली; तोच योगसामर्थ्याचा प्रकार हल्लीं क्वचित् दिसून येणारा मेस्मिरिझम होय. विदुरांनींही शेवटीं स्वतःला युधिष्ठिरामध्यें असेंच मिळवून दिलें आहे.

आतां बाराव्या तेराव्या शतकांत जोरानें वाढीला लागलेला जो भक्तिमार्ग तो ते वेळीं मुळींच ठाऊक नव्हता असें नाहीं—एवढेंच नव्हे तर त्याचें महत्त्व बरेंच कळलें होतें, असें गीतेवरून व मोक्षपर्वाच्या अखेर अखेरच्या अध्यायांवरून कळतें. हा मार्ग सांख्य मार्गाच्या तोडीचा आहे असें यांत ह्मटलें आहे. मात्र एवढें खरें आहे कीं तो मार्ग सर्वमान्य चोखाळून देण्याचें सर्व श्रेय अलीकडील ज्ञानेश्वर, तुकाराम, कबीर, नानक वगैरे संतांना आहे. निरनिराळ्या फुलांत कुसकरल्यानें ज्याप्रमाणें तिळांना त्या त्या फुलांचा वास लागतो त्याप्रमाणें निरनिराळ्या पुण्यकर्माच्या योगानें अंगीं सत्वगुण येऊन पुढील कार्याला त्याची मदत होते एवढें कर्मांचें काम आहे. अशा दृष्टीनें कर्मांकडे पाहण्याची प्रवृत्ति ते वेळीं बरीच झालेली दिसते. आमच्या धर्मांत कर्म, उपासना, ज्ञान या सर्वांना मन व वासना यांचा निरोध करून आत्मप्राप्तीकडे पोंचविणाऱ्या केवळ पायऱ्या समजल्या असून बाकीचे धर्म यांनाच प्राप्तव्य विषय समजतात, हाच आमच्या व बाकीच्या धर्मांत मोठा भेद आहे. 'आत्मा हा या शरीररूपी तुरुंगांतून सुटण्याचा सतत प्रयत्न करीत असून त्या विषयसुखांनीं शरीरपुष्टी वाढवून या तुरुंगांत त्याला अधिक घट्ट जखडण्यासारखेंच आहे.' असें प्लेटोसारख्या पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांचेंही मत आहे. तेव्हां सुखदुःखादिद्वंद्वें सहन करण्याची संवय न करितां केवळ बहिरंग सोंगांनीं याची प्राप्ति होण्या इतका हा सर्वंग सौदा नाहीं.

आमचा हा सनातन आर्यधर्म, पृथ्वीच्या पाठीवर आजमितीला चालू असलेल्या सर्व धर्मांत अगदीं जुना असून तो केव्हां निघाला हें पाश्चात्य पंडितांना सुद्धां अद्याप निश्चयानें सांगतां येत नाहीं. आह्मी तर त्याला अनादिच मानतों. आणि या धर्मानें आजपर्यंत जितके थोर लोक—थोर अध्यापक, थोर ग्रंथकार, थोर विद्वान, थोर मुत्सद्दी, थोर परोपकारी, थोर स्वदेशाभिमानी निर्माण केले आहेत, तितके दुसऱ्या कोणत्याच धर्मानें केले नाहींत. याचें जितकें जितकें अधिक ज्ञान होत जातें तितकें तितकें यासंबंधानें अधिकाधिक आदर व अधिकाधिक प्रेम उत्पन्न होतें; व या धर्मांत आपण जन्मल्याबद्दल आपल्याला धन्यता वाटूं लागते. असें जरी आहे तरी आपण आपल्याला या धर्माला पात्र करून घेतलें नाहीं तर यापासून आपल्याला यत्किंचितही फायदा होणार नाहीं.

वरील एकंदर विवेचनावरून निरनिराळ्या वि-

वर्षांमध्यें त्या वेळच्या आर्यांचें पाऊल किती पुढें पडलें होतें हें कळणार आहे. याचा इतक्या विस्तृत रीतीनें विचार करण्याचा उद्देश पूर्वजांची महती गाऊन स्वतःची थोरवी वाढवून घेण्याचा नसून ते वेळीं आमची स्थिति काय होती, हल्लीं कशी आहे, कोणत्या बाजूनें पुढें पाऊल आहे, कोणत्या बाजूनें पिछेहाट आहे याचा नीट विचार होऊन त्या दिशेनें आपला मार्ग धरण्याला सोईस्कर व्हावें एवढ्याच साठीं वरील विवेचन जरा विस्तत रीतीनें केलें आहे.

उपसंहारः--असो; यावरून महाभारत हा नानाविध दिव्य रत्नांचा महोदधि आहे, ह्मणून जें आह्मीं ह्मटलें आहे त्याची सत्यता वाचकांच्या लक्षांत आलीच असेल. धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, राजधर्म, क्षात्रधर्म, ज्ञानकांड, कर्मकांड, उपासनामार्ग,भक्तिमार्ग,धर्मसंस्था, लोकसंस्था, वाग्विलास, इतिहास, भूगोल वगैरे सर्व उपयुक्त विषयांची यांत चर्चा आली आहे; व सांप्रत ज्या सामाजिक, राजकीय, त्याचप्रमाणें निरनिराळ्या कला व शास्त्रें यांसंबंधीं सुधारणा पाश्चात्य राष्ट्रांमधून दिसून येत आहेत. त्यांचा ओनामा त्यावेळच्या आमच्या आर्यांच्या संस्थांमधून झळकत आहे, एवढेंच नव्हे, तर कांहीं कांहीं बाबतींत तर त्यामध्यें कांहीं सुधारणा न होतां उलट पिछेहाटच झालेली दिसते. उदाहरणार्थ, नैतिक, धार्मिक व वेदान्तपर विषयांवर ते वेळीं मारलेली मजल अद्याप मोठमोठ्या विद्वानांना थक्क करून सोडीत आहे व भौतिक सुखाच्यामागें लागलेल्या अलीकडच्या राष्ट्रांचें पाऊल त्या बाबतींत पुष्कळ मागें हटलें आहे, असें ह्मणावें लागतें. अहिंसा, सत्य, भूतदया, धर्मसहिष्णुता इत्यादि सात्विक गुणांच्या पायावर रचलेला सर्व जगाकडे परमात्मस्वरूपानें पहाण्याला शिकविणारा आर्यधर्म कोणीकडे, व प्राणोत्क्रमणाच्या वेळीं आपल्या सर्व पापांचा भार एकाच्या शिरावर लादून शेवटीं परमात्म्याच्या कृपेला पूर्ण पात्रता आणून देणारा धर्म कोणीकडे? एक जहाज आपल्यांतील-माल दुसऱ्यांत लोटून मोकळें झालें तरी मालाचा कर्मभोग संपत नाहीं, त्याप्रमाणेंच एक देह जरी आपल्यांतील देहधाऱ्याला आपल्यापासून सोडून मोकळा झाला तरी त्या देहधाऱ्याला-जीवात्म्याला दुसऱ्या जहाजांत बसून-दुसरा देह धरून-कर्मफल भोगल्यावांचून गत्यंतर नाहीं, हा आमच्या धर्माचा सिद्धांत असल्यानें प्रत्येक गोष्ट करतांना मनुष्याला त्याच्या बरेवाईटपणाचा विचार मनांत येऊन वाईट कर्म करण्याला त्याचें मन कचरलेंच पाहिजे. आतां प्रत्येक कर्मासंबंधानें विचार करण्याला लावणारा हा धर्म मनुष्याच्या पुष्कळ व्यवसायांच्या आड येऊन त्याला लुला पाडतो, असा पुष्कळांचा आक्षेप येण्याचा संभव आहे, परंतु त्याचा परिणाम तसा न होतां कुटुंब कल्पनेचा विस्तार व कर्तव्य-जागृति, हेच गुण याच्या योगानें अंगीं विशेष येतात. आपल्या प्रत्यक्ष आप्तबांधवांना कसें मारावें ह्मणून अर्जुनाला मोह पडला असतां या धर्मानेंच त्याच्या ठिकाणीं कर्तव्य-जागृति उत्पन्न करून दुष्टांना मारून जगाचें कल्याण करणें हाच श्रेष्ठ धर्म आहे, हेंच तत्त्व त्याच्या मनांत बिंबवून दिलें आहे. याप्रमाणें भूतदयादि तत्त्वांवर त्यावेळच्या समाजाचा पाया उभारला असल्यानें परोपकार हेंही एक तेवेळीं आदिकर्तव्य समजण्यांत येत असे. अन्यपक्षीं ज्यांच्या समाजाचा पाया स्वार्थावर रचला असतो, त्यांना वाटेल त्या उपायांनीं स्वार्थ साधणें, आपलें कर्तव्य वाटूं लागतें. कित्येकांचीं कृत्ये त्यांनाच इतकीं लाजविणारीं वाटतात कीं, त्यांनासुद्धां त्यांचा जशाचा तसा उल्लेख करणें लाजिरवाणें वाटून त्याला ते नीतीचा पेषा देण्याचा प्रयत्न करतात. दारू, जुगार, वेश्या, दुसऱ्याला फसविणें, या गोष्टी अशा राष्ट्रांना अगदीं साधारण वाटतात,व गल्लोगल्लीं दारूचे पिठे, वेश्यांचीं दुकानें, कोर्टामधून आपल्या तर्फेनें साक्षीदार कसे बनवावें, वगैरे गोष्टींचें लोकांना शिक्षण देऊन हे त्यांना भराभर उन्नतीला चढवीत असतात. ज्यांच्या समाजाचा पाया स्वार्थपरतेवर उभारला असतो त्यांच्याकडून याहून विशेष कामगिरी ती काय व्हावी? सुधारलेल्या व मागसलेल्या लोकांचा संबंध आला असतां सुधारलेल्या लोकांच्या संबंधानें मागसलेले लोक सुधारतात, ही गोष्ट सुधारलेल्या लोकांच्या मनांत तेवढी परोपकारबुद्धि असेल तेव्हां घडत असते. नाहींपेक्षां स्वार्थापुरता एकपणा ठेवून आपल्या कलाकौशल्यमंदिरांत त्यांचा मज्जाव कर-

णाऱ्या स्वार्थपर सुधारलेल्या लोकांकडून दुसऱ्याची सुधारणा फारशी होण्याची आशा नाहीं. त्यांच्याकडून अशांना आळशी, मूर्ख, स्वाभिमानशून्य, देशद्रोही, चुगलखोर, अल्पसंतोषी, अशा प्रकारचे बनण्यालाच पूर्ण शिक्षण मिळून हे अखंड गुलामगिरींत राहून आजन्म आपली तुंबडी भरून देण्याला कसे उपयोगी पडतील, याकडेसच यांचें लक्ष असणार ! हल्लीं जी एककल्ली (भौतिक सुखाकडेसच लक्ष देऊन) पाश्चात्यांची सुधारणा चालली आहे त्याच्या योगानें जगाच्या शांतिसुखाला कितपत भर पडेल, हें पहाणें आहे; व यांचें एकंदर स्वरूप पाहतां त्याची फारशी आशाही दिसत नाहीं. तथापि याच स्वार्थपरतेनें शास्त्रीय शोधांत बरीच मजल मारली आहे, ही गोष्ट प्रांजलपणें कबूल केली पाहिजे; परंतु याला नैतिक व धार्मिक बाजूंनीं अशीच उत्तम जोड मिळाल्यावांचून याचे चांगले परिमाण जागावर कधींही घडावयाचे नाहींत, व त्या दिशेनें प्रयत्न जपानासारख्या एखाद्या स्वतंत्र पौर्वात्य राष्ट्राच्याच हातून झाले तर होतील. कारण हल्लीं पाश्चात्यांची सर्व सुधारणा स्वतःच्या मनगटाच्या जोरावर करण्याच्या घमेंडींत चालली आहे; परंतु सृष्टीची सत्ता अप्रतिहत असून ती कधीं कोणाला मोडतां येणें शक्य नाहीं. जोंपर्यंत मनुष्य तिला नमून असतो तोंपर्यंत त्याला सुखाचा पूर्ण उपभोग सांपडतो. परंतु रावणाप्रमाणें सृष्टिचालकांना हा आपले गुलाम करून तुडवूं लागला कीं, ते त्याला तुडविल्यावांचून कधींही रहात नाहींत. ईश्वराची गिरणी मोठी नामी असून तिच्यांतून पीठ बारीक पण सावकाश निघत असतें. आज दोनशें वर्षांच्या प्रगतिनंतर फिरून जलचिकित्सा, किरणचिकित्सा, श्वासकला, सँडोचें तत्त्व, वगैरे सृष्टीकडे फिरून धांव घेणारीं तत्त्वें निघूं लागलीं आहेत; यावरून आमच्या म्हणण्याची सत्यता लक्षांत येणार आहे.

वरील एकंदर विवेचनावरून या महाभारताला जगांतील एकंदर महाकाव्यामध्यें अग्रस्थान कां मिळालें आहे, हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. 'महाकाव्याचा विषय एकच असून त्यांत अनेक प्रसंग आले असावेत, त्यांतील मुख्य मुख्य पात्रें उच्च वर्गांतील असून उन्नत व उदात्त विचारांचीं असावींत, विषयानुरूप काव्यांचें वृत्त गंभीर व श्रुतिमधुर असावें व निरनिराळ्या पात्रांचे संवाद, आत्मगत विचार व वृत्तकथन यांच्या संमिश्रणानें ते विकास पावले असावेत,' 'वगैरे जी पाश्चात्यांची महाकाव्याची व्याख्या तिच्या कसोटीला हें महाभारतकाव्य किती उतरतें, हेंही सहज लक्षांत येणार आहे. यांत जरी यांतील नायकांचें चरित्रवर्णन आहे तरी तें सहज जातां जातां केलें असूनव्याचा मुख्य कथाभाग भारतीययुद्धप्रसंगाचें वर्णन हाच आहे. यांत कवीच्या काव्यस्फुर्तीला अनुरूप असे प्रसंग इतके पुष्कळ व निरनिराळे आले आहेत कीं, अनेक अर्वाचीन कवींनीं याच मूळ झऱ्यांतील अमृतरसाचा आस्वाद आपल्या वाचकांना करून दिला आहे. अर्थात यांतील निरनिराळे प्रसंग घेऊन त्यांवर त्यांनीं आपलीं काव्यें व नाटकें रचलीं आहेत. अर्थाच्या पुराणककथांचा हा सागर आहे म्हटलें असतां हरकत नाहीं. यातील पात्रें किती उच्च दर्जाचीं आहेत, हेंही या महाभारतवाचनानें कळून येणार आहे यांतील स्त्रीभूमिका उच्च प्रतीच्या तर आहेतच परंतु त्यामध्यें दयाळूपणाची विशेष झांक असल्यानें जगाला आपल्याकडे ओढून घेण्याचें त्यामध्यें विशेष सामर्थ्य आहे. अर्जुनानें सुभद्रेशीं लग्न करून तिला इंद्रप्रस्थाला आणलें, तेव्हां स्त्रीस्वभावाला अनुसरून तिला पाहून द्रौपदीला जरी प्रथम दर्शनीं सवतीमत्सराचा झटका आला तरी लगेच तो आवरून 'पहिला आला किती जरी गच्च आवळला तरी दुसऱ्यानें तो ढिला पडतो, तेव्हां पतीचें मजवरचें लक्ष कमी होणार नाहीं, अशा रीतीनें बाग', एवढाच तिला उपदेश करून तिच्याशीं गुण्यागोविंदानें वागण्यास ती तयार होते यावरून तिचें सौजन्य लक्षांत येतें. कुंति जरी आपल्या मुलांना कौरवांशीं युद्ध करून आपलें राज्य मिळविण्याकरितां त्यांची उठाबणी करते तरी त्यांना राज्य मिळाल्यावर धृतराष्ट्राबरोबर ती वनवासाला निघाली असतां पांडव तिला राज्यांत राहून तिच्या सांगण्यावरून इतक्या सायासानें मिळविलेल्या राज्याचा उपभोग घेण्याविषयीं अग्रह करीत असतां 'तुमच्या बडिलांचे वेळीं मी पुष्कळ सुख भोगलें आहे, तुह्मांला युद्ध करण्याला

सांगण्यांत तुझी नांवालौकिकाला मुकून भिक्षामा गावी अशी माझी इच्छा नव्हती, ह्मणून मीं तो केला,' असें बाणेदार उत्तर तिनें दिलें आहे. व ' आपली मनें थोर ठेवून, धर्मावर नेहमीं भरंसा ठेवा, असा त्यांना उपदेश करण्यांत महाभारताचें जणू सारच तिनें या आपल्या या एका वाक्यांत आणलें आहे.

या महाभारतांतील संभाषणें तर फारच जोरदार व निर्भिडपणाचीं दिसतात. यांतील पात्रांकडून दुसऱ्याला कांहीं सांगतांना आपण कोणाशीं बोलतों आहों व त्याच्याशीं त्याच्या दर्जानुरूप कसें बोललें पाहिजे, याचा विचार न करतां जें सरळ दिसेल तेंच निर्भिडपणानें बोलण्यांत आलें आहे. यांतील अनेक प्रसंगांवरून प्राक्कालीन सत्यनिष्ठ लोकांच्या निर्भिडपणाची साक्ष पटत आहे. प्रसंग वर्णनामध्येंही कवीचे सामर्थ्य स्पष्ट दिसून येतें. कोणतीही गोष्ट जोरदार व स्पष्ट रीतीनें सांगितली असून वर्णनें जोरदार व भारदस्त आहेत. युद्धप्रसंगांत दोन दोन योद्ध्यांमध्यें झालेल्या युद्धांच्या वर्णनांमध्यें जरी तेंच तेंच वर्णन अनेक प्रसंगीं आल्यानें तें जरा वाचकांना कंटाळवाणें झालें आहे तरी अनेक निरनिराळ्या तऱ्हेचे युद्धप्रसंग इतके पुष्कळ यांनीं यांत आणले आहेत व त्यांचें वर्णन इतक्या बहारीचें केलें आहे कीं, तसें दुसऱ्या कोणत्याही वीररसात्मक काव्यांत सांपडणें अशक्य आहे.

या काव्यासाठीं व्यासांनीं निवडलेलें वृत्तही त्याला साजेसेंच आहे. हें काव्य मुख्यतः अनुष्टुप छंदांत लिहिलें आहे. मुख्यतः ह्मणण्याचें एवढेंच कारण कीं, पुष्कळ ठिकाणीं दुसरीं थोडी वृत्तें आलीं असून एक दोन ठिकाणीं तर केवळ गद्याचेंच अवलंबन केलें आहे. इंग्रजीमध्यें वीररसाला अनुरूप जसें आयांबिक वृत्त आहे तसेंच संस्कृतामध्यें हें अनुष्टुप वृत्त आहे. याची भाषा फार गंभीर व महाकाव्याला साजेशी आहे. ती फार सरळ व शुद्ध असून अर्थगांभीर्य त्यामध्यें फार आहे. महाभारताचें एकंदर सार '

ऊर्ध्वबाहु विरोम्यष नच कश्चित् शृणोति माम् ।
धर्मादर्थश्चकामश्च स धर्मा किं न सेव्यते ॥

(धर्मापासून अर्थ व काम यांची उत्पत्ति आहे तेव्हां या धर्माला कोणीकां धरीत नाहीं, ह्मणून मी हात वर करून ओरडत आहें; परंतु माझें कोणीच ऐकत नाहीं) या एक्या वाक्यांत यांत आणलें आहे. या महाभारताच्या परिशीलनानें हें हिंदुस्थान पूर्वी एकवार किती वैभवाच्या शिखराबर होतें व तें फिरून वैभवाला चढविण्याला आपल्याला कसे वागलें पाहिजे याचें उत्तम ज्ञान होणार आहे, आणि ह्मणूनच ' याच्या एकंदर महत्वावरून याला महाभारत, हें नांव दिलें आहे, ' असें व्यासांनीं याच्या शेवटीं ह्मटलें आहे, तें अक्षरशः खरें आहे.

या एकंदर विवेचनावरून महाभारताचें महत्त्व वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. आतां महाभारताचीं अनेक स्वरूपांतरें मराठींत असतांना फिरून हा प्रयत्न करण्याचें काय प्रयोजन होतें, असा आक्षेप येण्याचा संभव आहे. तरी त्यासंबंधानें चार शब्द लिहून हा बराच लांबलेला प्रास्ताविक लेख आटोपूं. आज संस्कृत वाचकांची संख्या शेंकडा एकसुद्धां पडत नसून सर्व सामान्य लोकांची भाषा मराठी असल्यानें निव्वळ मराठींत हा ग्रंथ असणें अवश्य आहे, हें तर सर्वांना कबूल आहे, आतां यावर जे अनेक प्रयत्न झाले आहेत त्यांपैकीं मोरोपंताचें काव्य असून तें अनेक ठिकाणीं संस्कृताइतकेंच कठीण आहे व त्यांत महाभारतांतील सर्व विचार न येतां मुख्य कथानकच आलें आहे. त्याचप्रमाणें जगद्धितेच्छूंत छापलेलें महाभारतसार नांवाप्रमाणें अध्यायवारीनें सार असून पुष्कळ महत्त्वाच्या विषयांना त्यांत काट मिळाला आहे. व भाषाही जुनी व शास्त्रीय पद्धतीची आहे. चालू प्रयत्नापैकीं वाईचे रा. रा. काशिनाथशास्त्री लेले मुळासकट समग्र भाषांतर छापीत आहेत, त्यांची गेल्या सात आठ वर्षांत पांच सहा पर्वेंच झालीं आहेत. व तेवढ्याची किंमतही तीस चाळीस रुपये झाली आहे. यावरून त्यांचीं सर्व पर्वें तयार होण्याला किती वर्षें लागतील व किंमत केवढी वाढेल याचा अंदाज सहज करतां येण्यासारखा आहे. लायब्ऱ्यांत संग्रहांत ठेवण्याला त्यांचें पुस्तक कितीहि चांगलें ठरलें तरी ग्रंथविस्ताराच्या व किंमतीच्या मानानें सद्यःस्थितीकडे पाहतां त्यांच्या ग्रंथाचा सर्व सामान्य लोकांना विशेष फायदा होईलसें दिसत नाहीं. हल्लींची लो-

कांची कंगाल स्थिति व केवळ रात्रंदिवस पोटाकडे धावा लागणारा वेळ, याकडे पाहतां इतका पैसा खर्चून इतका वेळ भारताकडे लावणारी मंडळी फार थोडी सांपडतील. तेव्हां वेळ व पैसा थोडा खर्चून ज्याच्या योगानें महाभारताचा आस्वाद पूर्ण चाखतां येईल, अशा पुस्तकाची अवश्यकता आहे असें वाटून आज सात वर्षांपूर्वी सुमारें रा. रा. लेले शास्त्र्यांबरोबरच हें काम हातीं घेऊन आज हें पुस्तक अशा स्वरूपांत लोकांपुढें ठेवण्याला आम्ही समर्थ झालों आहों. सामान्य लोकांना मुळाचा कांहीं उपयोग नसून त्याच्या योगानें किंमत मात्र वाढते म्हणून मूळ देण्याच्या भानगडींत आम्ही पडलों नाहीं. त्याचप्रमाणें प्रत्येक श्लोकांत येणारीं कवितेमध्येंच शोभणारीं संबोधनें, अनेक ठिकाणीं येणारीं लांबलचक वर्णनें, युद्ध प्रसंगांतील तींच तींच कंटाळवाणीं वर्णनें, तसेंच शिवसहस्रनामावळी, विष्णुसहस्रनामावळी, नागांचीं अनेक नांवें वगैरे जीं नुसतीं वाचण्यास कंटाळवाणीं वाटण्याजोगी आहेत, त्यांचें भाषांतर केलें नाहीं. बाकी सर्व भारताचें हें भाषांतर असून महत्त्वाचा विचार यांत एकसुद्धां गाळला नाहीं व कांहीं भाग गाळण्याला मवड आहे, म्हणून यांतील कांहीं कूट श्लोकांना रजा द्यावी, असेंही केलें नाहीं अशा प्रकारच्या श्लोकांवर बराच विचार करून व प्रसंगीं दुसऱ्याला विचारून टीकेच्या वगैरे साह्यानें त्यांचा अर्थ जितका स्पष्ट करतां आला तितका स्पष्ट केला आहे. त्याचप्रमाणें भाषांतर करतांना कोणत्या शब्दाचें कोणत्या शब्दानें भाषांतर करितां येईल, याकडे विशेष लक्ष न देतां संस्कृतांतला विचार काय आहे व तो कोणत्या शब्दांनीं मराठींत नीट व्यक्त करतां येईल, याकडे विशेष लक्ष पुरवून हें पुस्तक मुद्दाम सामान्य लोकांकरितां तयार केलें असल्यानें होतां होईल तों सोपे मराठी शब्द वापरण्याचा प्रयत्न केला आहे. आतां इतकें करूनही यांत पुनरुक्ति बरीच राहिली आहे. पैकीं कांहीं या ग्रंथाच्या एवढ्या थोरल्या विस्तारामुळें पूर्वापार संबंध लक्षांत ठेवून लिहिण्याला स्मरणशक्तीवर बराच भार पडूं लागल्यानें राहून गेली व कांहीं मुद्दाम ठेवण्यांत आली आहे. कारण अनेक सामान्य तत्त्वें दिसण्यांत सोपीं असलीं तरी फार महत्त्वाचीं असतात व अशा प्रकारचीं तत्त्वें, 'नळी फुंकिली सोनारें,' या न्यायानें एकवार ऐकून सोडण्यांत कांहीं अर्थ नसतो. तेव्हां अशीं तत्त्वें वरच्यावर कर्णरंध्रांतून घुमत रहावीं म्हणून तीं ज्या ज्या ठिकाणीं आलीं आहेत त्या त्या ठिकाणीं तीं कायम ठेविलीं आहेत. दुसरा भाग निघण्याच्यापूर्वीच पहिला भाग संपत येऊन त्याची दुसरी आवृत्ती काढण्याचा सुयोग आला, ही गोष्ट आमचा हा स्वल्प प्रयत्न लोकादरास किती पात्र झाला आहे याची साक्ष पटवीत आहे. व याप्रमाणेंच आमचे बंधू बालकृति गोड करून घेत जातील तर या बालासही आपले बोबडे बोल आपल्या प्रियबंधूंपुढें अधिक अधिक मांडण्यास विशेष कौतुक वाटणार आहे.

असो, विद्येची पूर्ण आवड बाळगून विद्वानांचा परामर्श घेणारे हल्लींच्या काळचे विक्रमादित्य जे बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड त्यांच्या आदराला ही कृति उतरल्याबद्दल त्यांचे, त्याचप्रमाणें ज्यांची या थोर कामाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत झाली आहे त्यांचे आभार मानण्याचें प्रिय काम करून व ज्या विश्वव्यापी परमात्म्यानें ह्या भारतमहोदधीचा ठाव लावून देऊन त्यांतील अमूल्य रत्नांचा लाभ माझ्या प्रिय देशबांधवांना करून देण्याचें श्रेय या स्वल्पमती बालकाच्या पदरीं बांधलें, त्या ईशाला अनन्यभावें शरण जाऊन माझ्या बांधवांची मी येथें रजा घेतों.

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

पुणें, २० जून सन १९०३ } **बळवंत त्र्यंबक ढवीड,** संपादक, विद्याविनोद.

अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठ.
१ आदिपर्व.	
१ कथानक	१
२ शिष्यपरीक्षा	२
३ च्यवनांची कथा	४
४ रुरूची कथा	५
५ आस्तिकाची कथा	६
६ नागांच्या शापाची कथा	८
७ हस्ती व कांसव यांची गोष्ट	१३
८ गरुडाचा जन्म...	१३
९ अमृत व उच्चैःश्रवा यांची उत्पत्ति...	१४
१० मातृशापपरिहारार्थ शेष व वासुकि यांचा यत्न	१६
११ परीक्षितांची कथा	१७
१२ कश्यपाची कथा	१९
१३ जनमेजयसर्पसत्रांची कथा	२०
१४ राजोपरिचराची व व्यासांच्या उत्पत्तीची कथा	२१
१५ राजांचा पृथ्वीवर अवतार	२३
१६ भरतजन्म	२३
१७ कचदेवयानी आख्यान	३१
१८ ययाती आख्यान	३३
१९ प्रतीपांचा वृत्तांत व भीष्मजन्म ...	४३
२० वसुशापवृत्तांत...	४४
२१ शांतनूचा इतिहास व भीष्मप्रतिज्ञा ...	४५
२२ चित्रांगद व विचित्रवीर्य ह्यांचा इतिहास	४८
२३ पंडु, धृतराष्ट्र, विदुर यांचा जन्म ...	४९
२४ यमधर्माला मांडव्यशाप झाल्याची हकीकत	५२
२५ धृतराष्ट्र, पंडु व विदुर ह्यांच्या जन्मकाळीं राष्ट्राची स्थिति	५३
२६ धृतराष्ट्र, पंडु व विदुर ह्यांचा विवाहसमारंभ व पंडूचा दिग्विजय	५४

विषय.	पृष्ठ.
२७ धृतराष्ट्रपुत्रांच्या जन्माची हकीकत.	५६
२८ पंडुपुत्रांच्या जन्माची हकीकत व पंडूचा मृत्यु	५७
२९ पांडव व कौरव यांचे कौमारांतील व्यवसाय	६५
३० कृपाचार्यांची कथा	६७
३१ द्रोणांचा जन्म व त्यांचें हास्तिनापुराला येऊन कौरवकुमारांचें गुरुत्व पतकरणें	६७
३२ द्रोणापासून कौरवकुमारांना अस्त्रविद्या प्राप्ति	६९
३३ कौरवकुमारांचें समाजापुढें अस्त्रपरीक्षण.	७१
३४ द्रुपदराजाचा द्रोणांनीं घेतलेला सूड.	७४
३५ कणिकानें धृतराष्ट्राला सांगितलेली राजनीति	७६
३६ पांडवांना लाक्षागृहांत जाळून टाकण्याची दुर्योधनानें केलेली खटपट ...	७९
३७ हिडिंब वध व घटोत्कचोत्पत्ति ...	८३
३८ बकवध	८७
३९ अर्जुनानें केलेला अंगारपर्णाचा पराभव	९३
४० तपतीची कथा. कुरुजन्म	९४
४१ वसिष्ठांची कथा, कल्माषपाद शाप व पराशराचा इतिहास	९६
४२ पांडव व द्रौपदी ह्यांचें पृथ्वीवर अवतरण्याचें कारण व द्रौपदीस्वयंवर ...	१०१
४३ पांडवांविषयीं कौरवांची दुष्ट मसलत व भीष्मादिकांची त्यांना योग्य सल्ला.	१०८
४४ धृतराष्ट्रानें पांडवांना अर्धराज्य देऊन इंद्रप्रस्थाला पाठविलें. त्या ठिकाणीं युधिष्ठिराची राजनीति व सुंदोपसुंदांची कथा	११२
४५ अर्जुनाच्या वनवासाचें कारण ...	११५
४६ अर्जुनाचा वनवास व सुभद्राप्राप्ति ...	११५

विषय.	पृष्ठ.
४७ कृष्णार्जुनांनीं अग्नीला भक्षणासाठीं खांडव वन दिलें ती कथा	११९
४८ शार्ङ्गकांची कथा	१२१

२ सभापर्व.

४९ मयसभा	१२४
५० नारदांनीं युधिष्ठिराला सांगितलेली राजनीति	१२६
५१ युधिष्ठिराचा राजसूय यज्ञ करण्याचा विचार	१३१
५२ जरासंधवध	१३५
५३ पांडवांनीं केलेला दिग्विजय व राजसूययज्ञ	१४१
५४ शिशुपालवध	१४६
५५ राजसूययज्ञ पाहून दुर्योधनाचा संताप व त्याचे कपटबेत	१५१
५६ यूतांत युधिष्ठिराचें सर्वस्व हरण ...	१५६
५७ यूतनिर्जित द्रौपदीची भर सभेंत विडंबना	१६०
५८ अनुयूत व पांडवांचा वनवास ...	१६७

३ वनपर्व.

५९ सूर्यापासून पांडवांना स्थालीची प्राप्ति.	१६५
६० विदुरांचा धृतराष्ट्रानें केलेला धिःक्कार व समाधानी. दुर्योधनाला झालेला मैत्रेयशाप...	१७१
६१ किर्मीर राक्षसाचा वध	१७७
६२ सौभनाशाची हकीकत	१७८
६३ युधिष्ठिराचा राग उद्दीपित करण्याविषयींचा द्रौपदीचा प्रयत्न व त्यांनीं तिचें केलेलें समाधान	१८६
६४ व्यासापासून प्रतिस्मृति नामक विद्येची प्राप्ति	१८९
६५ अर्जुनाला शंकरांपासून पाशुपतास्त्राची प्राप्ति व लोकपालांपासून इतर अस्त्रांची प्राप्ति	१९४
६६ अर्जुनाला उर्वशीचा शाप	१९७
६७ नलोपाख्यान	२००
६८ युधिष्ठिराची तीर्थयात्रा	२११
६९ अगस्त्यऋषींची व वातापीची कथा ...	२१३
७० परशुरामांचें तेजोहरण	२१५
७१ सगरवंशवर्णन व भगीरथानें गंगा आणल्याचा इतिहास	२१६
७२ ऋष्यशृंगाचा इतिहास...	२१८
७३ रामाची कथा	२२१
७४ प्रभासतीर्थीं पांडवांना रामकृष्ण दर्शन.	२२३
७५ सुकन्येची कथा	२२४
७६ मांधात्याची कथा	२२६
७७ सोमकाची कथा	२२६
७८ उशीनराची कथा	२२७
७९ अष्टावक्राची कथा	२२९
८० रैभ्य व यवक्री यांचा वृत्तांत... ...	२३१
८१ वराहरूपी विष्णूंचें पृथ्वीला समुद्रांतून वर काढणें. पांडवांचा गंधमादनामध्यें प्रवेश	२३४
८२ पांडवांचें बदर्याश्रमाला आगमन ...	२३६
८३ मारुतीची गांठ. विश्वरूपदर्शन. सौगंधिकानयन.	२३७
८४ जटासुरवध	२४४
८५ वृषपर्वा व आर्ष्टिषेण हा ऋषींचें दर्शन व यक्षाबरोबर युद्ध	२४५
८६ अर्जुनाची भेट...	२४९
८७ निवातकवचांचा इतिहास	२५०
८८ अजगराची व पांडवांची गांठ ...	२५२
८९ कर्मफल	२५७
९० ब्राह्मणमाहात्म्य	२५९
९१ वैवस्वत मनूचा वृत्तांत	२६१
९२ विश्वरूपवर्णन व युगमाहात्म्य ...	२६२
९३ परिक्षितांचा वृत्तांत	२६८
९४ बकदाल्भ्यांचा इंद्राशीं संवाद ...	२६९
९५ क्षत्रियमाहात्म्य...	२७०
९६ इंद्रद्युम्नाची कथा	२७२
९७ दानमाहात्म्य	२७२
९८ शुद्धतेविषयीं	२७४
९९ कुवलाश्वाची कथा	२७६
१०० पतिव्रतामाहात्म्य	२७७
१०१ धर्मव्याधाची कथा	२७८

विषय.	पृष्ठ.
१०२ निरनिराळ्या अग्नींची उत्पत्ति ...	२८७
१०३ कुमाराची कथा	२९०
१०४ द्रौपदीसत्यभामासंवाद-पतिव्रताधर्म ...	२९६
१०५ दुर्योधनाची फटफजिती	२९८
१०६ फटफजिती पावलेल्या दुर्योधनाचा आततार्ईपणा	३०४
१०७ कर्णाचा दिग्विजय	३०७
१०८ दुर्योधनाचा वैष्णवयज्ञ	३०८
१०९ मुद्गलकथा	३०९
११० दुर्वास ऋषींचा द्रौपदीचें सत्व घेण्याचा प्रयत्न	३११
१११ जयद्रथकृत द्रौपदीहरण	३१२
११२ रामकथा	३१७
११३ सावित्रीआख्यान	३३०
११४ इंद्र कर्णाचें कवचकुंडल हरण करतो.	३३७
११५ यमधर्म व युधिष्ठिर यांचा संवाद ...	३३९

४ विराटपर्व.

११६ अज्ञातवासाला निघण्यापूर्वी धौम्यानीं पांडवांना सांगितलेला सेवाधर्म ...	३४६
११७ पांडवांना अज्ञातवासापूर्वी देवीचें दर्शन	३४९
११८ अज्ञातवासासाठीं पांडवांचा विराटगृहीं प्रवेश	३५०
११९ जीमूतवध	३५३
१२० कीचकवध	३५४
१२१ पांडवांसंबंधीं दुर्योधनाचा शोध व विराटाच्या गाई हरण करण्याचा बेत ...	३६३
१२२ दक्षिण गोग्रहण	३६६
१२३ उत्तरगोग्रहण	३६८
१२४ उत्तराअभिमन्युविवाह...	३९१

विषय.	पृष्ठ.
५ उद्योगपर्व,	
१२५ अज्ञातवासानंतर पांडवपक्षीयांचा पुढील कार्यक्रमासंबंधानें बिचार... ...	३९३
१२६ अर्जुन व दुर्योधन कृष्णसाह्याकरितां स्वतः त्याकडे जातात...	३९६
१२७ शल्याचा हिरमोड व त्याची आणि युधिष्ठिराची भेट. वृत्राचा इतिहास ...	३९८
१२८ द्रुपदपुरोहिताचें दौत्य	४०४
१२९ संजय शिष्टाई	४०५
१३० संताप पावलेल्या धृतराष्ट्राला विदुरांचा उपदेश	४१३
१३१ सनत्कुमारांचा आत्मानात्मोपदेश ...	४३३
१३२ संजयाचा उलट निरोप व पुढील कार्याची प्रवृत्ति	४३९
१३३ भगवानांचें शिष्टाईसाठीं प्रयाण ...	४५६
१३४ सर्वांच्या भेटी	४६७
१३५ श्रीकृष्णशिष्टाई...	४७५
१३६ कुंतीचा पांडवांना निरोप	४९५
१३७ शिष्टाईनंतर दुर्योधनाची फिरून कानउघाडणी	५०२
१३८ श्रीकृष्णकर्णसंवाद	५०२
१३९ कर्णकुंतीसंवाद...	५०६
१४० शिष्टाईचा निकाल	५०८
१४१ सेनापतीची निवड व पांडवांचा कुरुक्षेत्रीं तळ	५११
१४२ भीष्म सेनाधिपत्य-कौरवांचा तळ ..	५१३
१४३ बलरामांचें सरस्वतीतीर्थाला प्रयाण...	५१६
१४४ रुक्मीचा हिरमोड	५१७
१४५ उलूकसंदेश व प्रतिसंदेश	५१८
१४६ कर्णप्रतिज्ञा	५२३
१४७ शिखंडीचा इतिहास	५२८
१४८ भारत युद्धाचे वेळीस रणव्यवस्था व युद्धाचें नियम	५३८

भारतामृत.

भाग १.

१ आदिपर्व.

१ कथानक. (१. १—२)

कोणे एके वेळीं लोमहर्षणपुत्र उग्रश्रव, नैमिषारण्यांत कुलपति शौनकांच्या बारा वर्षपर्यंत चाललेल्या सत्रांत सुखानें राहिलेल्या तपोनिष्ठ ब्रह्मर्षींकडे आले. त्या वेळीं नानाप्रकारच्या पुराणकथांचें त्यांचें अपरिमित ज्ञान जाणून त्या त्यांच्या तोंडून ऐकण्याच्या उद्देशानें सर्व ऋषिमंडळ त्यांच्या भोंवतीं जमलें. ह्यांना सौति असेंही नांव असे. हे सौति आसनावर बसल्यावर कथेची सुरुवात करविण्याच्या इच्छेनें त्यांपैकीं एका ऋषींनीं, 'आपण कोठून आलां, इतके दिवस कोठें होतां,' म्हणून त्यांना प्रश्न केला. तो ऐकून सौति म्हणाले; 'जनमेजयाच्या सर्पसत्रांत कृष्णद्वैपायनांनीं सांगितलेल्या पुण्यप्रद कथा ऐकून अनेक तीर्थें हिंडत हिंडत कौरवपांडवांचें ज्या ठिकाणीं युद्ध झालें ती **समंतपंचक** नांवाची रणभूमि पाहून तुमच्या दर्शनासाठीं इकडे आलों.' नंतर द्वैपायनांनीं सांगितलेल्या कथा ऐकण्याची त्यांची उत्कट इच्छा पाहून आद्यपुरुष, सर्वांचा स्वामी, पूज्य, सरळ, एकाक्षरसंपन्न, ब्रह्मरूपी, व्यक्त असून अव्यक्त, सनातन, सदसद्विचारांनीं युक्त, सदसतापासून अलिप्त, इष्टानिष्टांचा उत्पादक, पुराण, अविनाशी, मंगलप्रद, प्रकाशमान, सर्व पापांपासून अलिप्त, पवित्र आणि चराचरगुरु असा जो विष्णु त्याला नमस्कार करून अनुक्रमानें जनमेजयसत्र कथेपासून भारत कथेलाँ आरंभ करून त्यांत व्यासांनीं सांगितलल्या सर्व पावन कथा त्यांनीं सांगितल्या. ते म्हणाले;

'कुरुक्षेत्रीं जनमेजयाच्या पुष्कळ दिवसपर्यंत बसलेल्या सत्रांत श्रुतसेन, उग्रसेन व भीमसेन या त्याच्या तिघां भावांनीं त्या ठिकाणीं आलेल्या एका देवांच्या कुत्र्याला मारलें. तो रडत रडत आईकडे गेला, व कां रडतोस,' म्हणून तिनें विचारलें असतां, जनमेजयाच्या भावांनीं मला मारलें,' म्हणून त्यानें तिला सांगितलें. मुलानें कांहीं अपराध केला नसून त्याला मारलें म्हणून कष्टी होऊन ती जनमेजयाच्या सत्राच्या ठिकाणीं आली व 'तुझ्यावर एकाएकीं संकट येऊन गुदरेल,' असा तिनें जनमेजयाला शाप दिला. त्या योगानें खिन्न होऊन सत्र संपल्यावर तो हास्तिनापुराला परत गेला व शापापासून सोडविण्याला समर्थ असा पुरोहित हुडकून काढण्याचा त्यानें मोठा प्रयत्न चालविला. कोणे एके समयीं तो मृगया करीत हिंडत असतां एका अरण्यांत श्रुतश्रव ऋषींचा आश्रम त्याच्या दृष्टीस पडला. त्यांत जाऊन त्यांच्या सोमश्रव नामक तपोनिष्ठ पुत्राला आपला पुरोहित होण्याला त्यानें विनंती केली. तेव्हां ते ऋषी म्हणाले, 'हा माझ्या सर्पापासून झालेला पुत्र नेहमीं वेदाध्ययनामध्यें गर्क असून मोठा तपस्वी आहे. रुद्रासंबंधी पापाखेरीज कोणत्याही पापाचें निरसन करण्यास हा समर्थ आहे. पण एखादा ब्राह्मण याच्याजवळ कांहीं मागावयास आला असतां तें त्याला नाहीं म्हणावयाचें नाहीं असें ह्याचें एक पवित्र व्रत आहे. तें तुला कबूल असेल तर त्याला घेऊन जा.' हें ऋषींचें भाषण ऐकून बरें म्हणून जनमेजय राजा त्या ऋषिपुत्रां-

सहवर्तमान आपल्या भावांकडे आला व 'हे ऋषी सांगतील तें निमूटपणें ऐकत जा,' असें सांगून आपण तक्षशिलेकडे गेला व तो देश त्यानें जिंकून आपल्या ताब्यांत आणिला.'

२ शिष्यपरीक्षा. (१. ३)

यावर शौनकादि ऋषींनीं प्रश्न केल्यावरून धौम्यांनीं आपल्या शिष्यांची परीक्षा केली ती कथा सौतींनीं त्यांना सांगितली. ते म्हणाले;

'ह्याच वेळीं धौम्य नांवाचे केवळ पाण्यावर जीव धरून रहाणारे कोणी ऋषी होते. त्यांचे अरुणि, उपमन्यु व वेद नांवांचे तीन शिष्य होते. त्यांनीं कोणे एके वेळीं अरुणीला शेताला बांध घालून पाणी अडविण्यास सांगितलें. बांधानें पाणी अडेनासें पाहून स्वतः आडवें पडून अरुणीनें पाणी बंद केलें. बरेच दिवस तो आश्रमाकडे परत आला नाहीं, हें पाहून त्या ठिकाणीं जाऊन गुरूंनीं त्याला हाक मारली. त्याबरोबर उठून तो गुरूपुढें जाऊन उभा राहिला व काय आज्ञा आहे ह्मणून नम्रतेनें विचारूं लागला. तेव्हां 'तूं बांध फोडून आला आहेस म्हणून ह्यापुढें तूं उद्दालक ह्या नांवानें प्रसिद्ध राहशील, व माझी आज्ञा तूं मान्य केलीस त्यामुळें तुझें कल्याण होईल.' असें ह्मणून गुरूंनीं त्याला घरीं जाण्याला आज्ञा दिली.

त्यांचा उपमन्यु नांवाचा दुसरा एक शिष्य होता, त्याला त्यांनीं दररोज रानांत जाऊन गाई चारीत जा ह्मणून सांगितलें. त्याप्रमाणें दिवसभर गाई चारून संध्याकाळीं गुरूच्या घरीं यावें असा त्याचा क्रम चालला. एके दिवशीं नित्यनेमाप्रमाणें गुरूंपुढें येऊन त्यानें त्यांना साष्टांग नमस्कार केला. त्यावेळीं त्याच्या तोंडावर दवटवी पाहून गुरूंनीं त्याला विचारलें, 'वत्सा उपमन्यो, तूं कशावर राहतोस ? तुझा पूर्वीचा तजेला अद्यापि कायम आहे.' उपमन्यूनें उत्तर दिलें. गुरुमहाराज मी भिक्षा मागून त्यावर राहतों.' गुरु ह्मणाले, 'प्रथम गुरूला दिल्याशिवाय शिष्यानें खाऊं नये.' बरें ह्मणून तो फिरून गुरें राखण्यास गेला. संध्याकाळीं परत आल्यावर पूर्वीप्रमाणेंच त्याला हुशार पाहून गुरूंनीं विचारलें, 'वत्सा, आज तूं काय खालेंस?' त्यानें उत्तर दिलें, 'प्रथम भिक्षा मागून आणून ती आपल्याला अर्पण केली व पुन्हां भिक्षा मागून आणून ती मीं खाल्ली.' गुरु ह्मणाले, 'ह्याप्रमाणें लोकांना उपद्रव देणें रास्त नाहीं.' उपमन्यु बरें ह्मणून गेला. पण दुसऱ्या दिवशीं रानांतून परत आला तों त्याला पूर्वीप्रमाणेंच गुटगुटीत पाहून गुरूंनीं पहिल्याप्रमाणेंच प्रश्न केला. तेव्हां तो ह्मणाला, 'वांसरें पितांना त्यांच्या तोंडांतुन फेंस बाहेर पडतो त्यावर आज मी राहिलों.' गुरु ह्मणाले, 'अरे, ह्याप्रमाणें त्यांच्या अन्नाला वांटेकरी होणें तुला शोभतें काय ?' दुसरे दिवशीं गुरूंच्या सांगण्यावरून कांहीं न खातां न पितां तो रानांत गुरांमागून फिरत असतां भुकेनें व्याकुळ झाला, व जवळच असलेल्या रुईचीं पानें त्यानें खाल्लीं. त्याच्या योगानें तो आंधळा झाला व चाचपडत चालला असतां वाटेंत एक विहीर होती तींत पडला. संध्याकाळीं तो घरीं परत आला नाहीं असें पाहून गुरु आपल्या इतर शिष्यांना ह्मणाले, 'मीं उपमन्यूला खाण्यापिण्याची अगदीं बंदी केल्यामुळें तो आज रागावून घरीं आला नाहीं तरी चला आपण त्याच्या शोधाला जाऊं.' असें ह्मणून ते त्याचा शोध करीत फिरत असतां तो एका विहिरींत पडलेला त्यांना दिसला. गुरूंनीं त्याला हाक मारून विचारलें तेव्हां विहिरींत पडण्याचें कारण त्यानें त्यांना सांगितलें. तें ऐकून गुरु संतुष्ट झाले व अश्विनीकुमारांचा धांवा कर ह्मणजे ते तुझे डोळे तुला परत देतील असें त्यांनीं त्याला सांगितलें; त्यावरून त्यानें अश्विनीकुमारांचा धांवा केला. ते त्याची प्रार्थना ऐकून संतुष्ट झाले व त्यांनीं त्याचे डोळे त्याला दिले. त्याच्या ह्या गुरुभक्तीनें संतुष्ट होऊन आशीर्वाद देऊन गुरूंनीं त्यास घरीं जाण्यास आज्ञा दिली.

त्यांचा तिसरा वेद नांवाचा शिष्य होता. त्याला गुरूंनीं सांगितलें. 'वत्सा, येथेंच माझ्या घरीं कांहीं दिवस राहिलास तर तुझ्या हातून गुरुसेवा होऊन तुझें कल्याण होईल.' तो बरें ह्मणून गुरुगृहीं त्यांच्या सेवेंस तत्पर असे. गुरु त्याला बैलाप्रमाणें जुंबाला जुंपीत. तरी थंडी, वारा, भूक, इत्यादिकांपासून होणारा ताप सोसून तो तेथें फार दिवस होता ह्यामुळें गुरु त्यावर संतुष्ट झाले व त्यांच्या आशी-

र्वादानें त्याचें कल्याण झालें व त्याला सर्वज्ञता आली. गृहस्थाश्रम स्वीकारून घरीं जाऊन राहण्याविषयींची त्याला गुरूंनीं आज्ञा दिल्यावर तो घरीं गेला. उत्तंक नांवाचा वेदांचा एक शिष्य होता. वेदांला एके वेळीं यज्ञाचें आमंत्रण आल्यावरून बाहेर जाण्याचा प्रसंग आला असतां, 'माझ्या घरीं जें कांहीं कमी पडेल त्याचा बंदोबस्त ठेव,' ह्मणून उत्तंकाला सांगून ते निघून गेले. त्याप्रमाणें गुरूंच्या घरीं रहात असतां गुरुमातेनें त्याला कांहीं गैरशिस्त काम करण्यास सांगितलें. 'बायकांचे सांगण्यावरून असें काम मी करणार नाहीं,' असें त्यानें उत्तर दिलें. पुढें गुरु घरीं आल्यावर त्यांस ती हकीकत कळून फार संतोष झाला. त्यांनीं त्याला घरीं जाण्यास परवानगी दिली. त्यावेळीं शिष्य ह्मणाला, 'आपल्या उपकाराची कांहीं तरी यथाशक्ति फेड करून मग घरीं जावें अशी माझी इच्छा आहे; तर मीं आपणास काय द्यावें हें आपण मला सांगा.' हा त्याचा आग्रह पाहून 'बायकोला विचारून ती सांगेल तें दे,' ह्मणून गुरूंनीं त्याला आज्ञा केली; त्याप्रमाणें त्यानें तिला विचारलें असतां तिनें 'पौष्य राजाच्या बायकोच्या कानांतील कुंडलें मला घालण्याला आणून दे,' ह्मणून त्याला सांगितलें. तिच्या आज्ञेवरून तो पौष्याकडे जाण्यास निघाला असतां वाटेंत एका मोठ्या बैलावर बसलेला एक धिप्पाड पुरुष त्याच्या दृष्टीस पडला. त्याच्या सांगण्यावरून मनांत नसतां त्यानें त्या बैलाचें शेण खाल्लें व तोंडाला पाणी लावून आचमन करून तो पुढें चालला. पुढें पौष्याकडे येऊन त्याला सिंहासनावर बसलेला पाहून त्यानें त्याला आशीर्वाद दिला व 'गुरुदक्षिणेसाठीं कुंडले मागण्याला मी आलों आहें,' असें ह्मणाला. 'अंतःपुरांत जाऊन राणीकडून तीं मागून घ्या,' ह्मणून पौष्यानें त्याला सांगितलें. आंत जाऊन पहातो तों राणी त्याच्या दृष्टीस पडेना. फिरून राजापाशीं येऊन तो ह्मणाला, 'ह्याप्रमाणें घरकरणी आदरातिथ्य दाखवून मला फसविणें तुला योग्य नाहीं.' तें ऐकून राजा ह्मणाला, 'खचित तुझी अपवित्र आहां. ती पतिव्रता अपवित्राच्या दृष्टीस कधीं पडणार नाहीं.' उत्तंक आठवण करून ह्मणाला, 'हो, मीं बैलाचें शेण खाल्लें खरें, परंतु त्यावर मीं तोंडाला पाणी लावून आचमन केलें.' ह्यानंतर पौष्यानें उत्तर केलें, 'चालतां चालतां आचमन करणें सशास्त्र नाहीं.' नंतर उत्तंकानें हातपाय धुवून बसून आचमन केलें. ह्याप्रमाणें तो शुद्ध होऊन अंतःपुरांत गेल्यावर राणी त्याच्या दृष्टीस पडली. तिला त्यानें आपला येण्याचा हेतु कळविला, त्यावर दानाला योग्य हें पात्र आहे असा विचार करून, 'तक्षक राजाची या कुंडलांवर नजर आहे, ह्मणून हीं मोठ्या हुशारीनें घेऊन जा,' असें सांगून तिनें आपलीं कुंडलें काढून त्याच्या स्वाधीन केलीं. तीं घेऊन तो पौष्य राजाकडे आला असतां पौष्य त्याला ह्मणाला, 'तुझी सत्पात्र घरीं आलां आहां, माझी श्राद्ध करण्याची इच्छा आहे, यासाठीं क्षणभर थांबावें.' उत्तंकानें उत्तर दिलें, 'थांबतों. यथोचित फक्त चांगलें अन्न व तेंही लौकर येऊं दे.' राजानें अन्न तयार करवून आणविलें. त्यांत केस सांपडला व तें थंड होतें. ह्यामुळें 'तूं मला असें वाईट अन्न दिलेंस ह्मणून तूं आंधळा होशील,' असा पौष्याला त्यानें शाप दिला. 'चांगल्या अन्नाला दोष दिलास, ह्मणून तूं अनपत्य होशील,' असा पौष्यानेंही त्याला उलट शाप दिला. पुढें तें अन्न ऋषी ह्मणतात त्याप्रमाणें बाईट आहेंसें पाहून त्यानें ऋषीला संतुष्ट करून उच्छाप मागितला. उत्तंक ह्मणाला, 'माझें भाषण खोटें होणार नाहीं. पण तूं आंधळा झाल्यावर फिरून लवकरच तुझे डोळे तुला परत येतील. मलाही तूं उच्छाप दे.' त्यावर पौष्यानें उत्तर दिलें, 'ब्राह्मणाचें हृदय लोण्यासारखें मृदु असून त्याचें तोंडच काय तें तरवारीच्या धारेप्रमाणें आहे. क्षत्रियाचें तसें नाहीं. त्याचे तोंडांत साखर पेरली असून त्याचें हृदय तीक्ष्ण खड्गाप्रमाणें कठोर असतें?' ह्याप्रमाणें आपण फसलोंसें पाहून उत्तंक ह्मणाला, 'ज्याअर्थी चांगल्या अन्नाला दोष दिल्याबद्दल तूं मला शाप दिला आहेस व ज्याअर्थी हें अन्न वाईट आहे, त्याअर्थी तुझा शापच मला लागणार नाहीं.' असें ह्मणून तो परत निघाला. जात असतां वाटेंत मधून मधून नाहींसा होऊन मधून मधून दिसणारा एक संन्यासी त्याच्या दृष्टीस

पडला. मध्ये एके ठिकाणीं तीं कुंडलें जमिनीवर ठेवून उत्तंक एका झऱ्यावर पाणी पिण्यासाठीं गेला असतां त्या संन्याशानें झटकन येऊन तीं कुंडलें उपटलीं व तें रूप टाकून तक्षकाच्या रूपानें एका बिळांत शिरून तो नागलोकाला गेला. उत्तंकाला राणीच्या बोलण्याची आठवण होऊन तो त्याच्या मागून गेला, व इन्द्रानें त्याच्या साहाय्याकरितां पाठविलेल्या वज्रानें तें बिळ पोखरून तोही त्याच्या मागून नागलोकाला गेला. अनेक मंदिरें व क्रीडास्थानें यांनीं सुशोभित असा तो लोक पाहून तो अगदीं थक्क झाला. तेथें त्यानें कुंडलें परत देण्याविषयीं सर्व नागांची निरनिराळी प्रार्थना केली, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें त्याच ठिकाणीं त्यानें दोन स्त्रिया एका मागावर काळ्या व पांढऱ्या सुताचें वस्त्र विणतांना पाहिल्या व तेथें एक चाक असून तें सहा मुलें फिरवीत होतीं. त्याचप्रमाणें एक सुंदर पुरुष व एक घोडाही त्यानें तेथें पाहिला. त्या सर्वांची त्यानें कुंडलांसाठीं प्रार्थना केली व त्या पुरुषाच्या प्रसादानें तीं कुंडलें त्याला परत मिळालीं. तीं नेऊन त्यानें आपल्या गुरुपत्नीच्या स्वाधीन केलीं व एकंदर झालेला व पाहिलेला वृत्तांत गुरूला सांगितला. व तेथें पाहिलेल्या पुरुष वगैरेसंबंधानें गुरूंना माहिती विचारली. तेव्हां गुरु म्हणाले, 'त्या स्त्रिया धाता व विधाता होत. ते पांढरे काळे धागे दिवस व रात्री, सहा मुलांकडून फिरविलें जाणारें तें वर्षचक्र व सहा ऋतु, तो पुरुष पर्जन्य व तो घोडा अग्नि. तूं पौष्य राजाकडे निघालास तेव्हां माझा मित्र जो इन्द्र त्यानें तुला वाटेंत पढें नागलोकीं तुला कांहीं अपाय न होतां तुझें रक्षण व्हावें म्हणूनच शेणाच्या रूपानें अमृत पाजिलें. आणि म्हणूनच नागलोकामध्यें तुझा निभाव लागला.' पुढें तो शिष्य गुरूंची आज्ञा घेऊन आपल्या घरीं गेला.'

---

३ च्यवनांची कथा. (१. ५–७)

भार्गवांना च्यवन हें नांव कोणत्या कारणानें मिळालें तें आह्मांला सांगा म्हणून शौनकांनीं विचारलें असतां सौती म्हणाले.

भृगु ऋषींची बायको पुलोमा नांवाची होती. तिला भृगूंपासून गर्भ राहिला. ते धर्मनिष्ठ ऋषी कोणे एके समयीं स्नानाला गेले असतां त्यांची गर्भवती स्त्री घरीं एकटी होती. ही संधि गांठून पुलोम राक्षस त्यांच्या आश्रमाला आला. भृगु ऋषींच्या बायकोनें रानांतील फलमूलांनीं त्याचें आदरातिथ्य केलें. परंतु तिच्यावर त्याचें मन गेलें असल्यानें बलात्कारानें तिला घेऊन जावें असें त्याच्या मनांत आलें. कारण, तिच्या लग्नापूर्वी तिच्याकरितां त्यानें मागणी घातली होती. पण तिच्या बापानें तिचें भृगूंशीं विधिपूर्वक लग्न लाविलें होतें. ही गोष्ट त्याच्या मनाला नेहमीं खात होती. तेथें पुढें होमकुंडांत पेटलेला अग्नि होता त्याला त्यानें विचारलें, 'अग्ने, तूं देवांचें मुख असून सर्वसाक्षी आहेस तरी मीं हिला पूर्वी मनानें वरिली असून पुढें हिच्या बापानें हिला भृगु ऋषींला दिली. तेव्हां ही कोणाची बायको हें तूंच सांग.' तें ऐकून खोटें बोलावें तरी कठीण, खरें बोलावें तरी भृगूंचा शाप होईल. ह्याप्रमाणें दोहींकडून पेंचांत पडलेल्या अग्नीनें शेवटीं उत्तर दिलें, 'मनानें तिला तूं वरिलें होतेंस खरें, पण भृगुऋषींशीं हिचें सशास्त्र लग्न लागलें आहे. ह्मणून ही त्याचीच बायको झाली.' हे अग्नीचे शब्द ऐकून पुलोम्याला राग आला व तो तिला घेऊन चालला असतां गर्भगळित झालेल्या भृगुऋषींच्या बायकोचा गर्भपात झाला. ह्मणून जो मुलगा झाला त्याला **च्यवन** असें नांव पडलें. मातेच्या उदरांतून बाहेर पडलेल्या त्या सूर्यासारख्या तेजःपुंज मूर्तीला पहातांच तो राक्षस जळून भस्म झाला. भृगुऋषी आश्रमांत आल्यावर त्यांना हें वर्तमान कळून त्यांनीं 'तूं सर्वभक्ष होशील,' असा अग्नीला शाप दिला. अग्नि ह्मणाला, 'ब्रह्मन्, आपण हा काय अविचार करतां? मला विचारलें तें मीं धर्माला स्मरून खरें सांगितलें, ह्यांत माझा कोणता अपराध झाला ? **जो साक्षी माहीत असूनही खोटें बोलतो व जो स्वार्थाकडे लक्ष देऊन पक्षपातानें खोटें बोलतो, तो मागील सात व पुढील सात कुलें नरकांत पाडतो.** मलाही आपल्याला शाप देतां येईल, पण ब्राह्मण मला पूज्य आहेत. आपल्या शापानें एक मोठी अडचण उत्पन्न होणार आहे.

मला देवांचें मुख मानून लोक आहुति देतात व माझ्या द्वारें देवांना अन्न मिळतें. तसेंच अमावास्येला पितरांना, व पौर्णिमेला देवांना माझ्याकडूनच बळी पोहोंचतो. परंतु आतां आपल्या शापानें मी सर्वभक्ष झाल्यास देव व ब्राह्मण यांस त्यांचे भाग कसे पोहोंचणार. यावर भृगुऋषींनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. पुढें शापामुळें अर्थातच अग्नीकडून देवांना कांहीं मिळेनासें, तेव्हां ब्रह्मदेव अग्नीला बोलावून ह्मणाले, ' अपवित्र तेवढें तुझ्या ठिकाणीं जळून भस्म होईल. **ज्याप्रमाणें सूर्यकिरणांचा स्पर्श झाल्यानें सर्व वस्तू शुद्ध होतात** त्याप्रमाणें तुझ्यामध्यें पडून जळलेल्या सर्व वस्तू शुद्ध होतील ह्याप्रमाणें तूं आपल्या तेजानेंच ऋषिशाप खरा करून देवांचेंही कार्य कर. ' बरें ह्मणून अग्नि त्या दिवसापासून ब्रह्मदेवांच्या आज्ञेप्रमाणें वागूं लागला. '

---

४ रुरूची कथा. (१. ८–११)

पूर्वी तपस्वी व विद्यासंपन्न स्थूलकेशी नांवाचे कोणी लोकांच्या कल्याणांत गढलेले ऋषी होऊन गेले. ह्याच वेळीं विश्वावसु नांवाच्या गंधर्वापासून मेनकेला गर्भ राहिला. ती तो गर्भ स्थूलकेशींच्या आश्रमाजवळ नदीतीरीं निर्दयपणें टाकून निघून गेली. पुढें त्या गर्भापासून पहाणारांना दिपवून टाकणारी अशी देवकन्येप्रमाणें सुस्वरूप कन्या उत्पन्न झाली. ती स्थूलकेशींच्या दृष्टीस पडतांच करुणार्द्र होऊन त्यांनीं तिला आपल्या आश्रमांत नेऊन तिचें पालन पोषण केलें. ती रूपवती कन्या त्या आश्रमांत चंद्रकलेप्रमाणें दिवसानुदिवस वाढली. ऋषींनीं तिचे जातकर्मादि संस्कार त्या त्या वेळीं यथाशास्त्र केले. ती सर्व स्त्रियांमध्यें श्रेष्ठ असून सत्व, रूप व गुण ह्यांनीं संपन्न होती ह्मणून ऋषींनीं तिचें **प्रमद्वरा** असें नांव ठेविलें. प्रमतीचा मुलगा व च्यवनाचा नातू जो रुरु राजा त्यानें तिला तेथें पाहिली, तेव्हां त्याचें तिच्यावर मन बसलें. त्यानें बापाकडून स्थूलकेशीजवळ तिच्याकरितां मागणी करविली. त्याबरून ऋषींनीं ती रुरूला देण्याचें कबूल केलें, व लग्नमुहूर्त पुढें ठरविला. थोडक्याच दिवसांनीं लग्न होणार इतक्यांत तिच्या पायाखालून जाणारा साप तिच्या दृष्टीस न पडल्यामुळें त्याचर तिचा पाय पडला व तो आपल्या जातिधर्माला अनुसरून तिला कडकडून चावला. त्याबरोबर पांढरी फटफटीत पडून ती निस्तेज झाली, व सर्व अलंकार व केंस अस्ताव्यस्त होऊन मरून भूमीवर पडली. त्यामुळें आप्तांना फार दुःख झालें. प्रमति, रुरु, आदि सर्व तिला त्या स्थितींत पाहून मोठ्यानें रडूं लागले. रुरूला तर दुःख अनावर होऊन तो एका घोर अरण्यांत जाऊन दीन वाणीनें रडूं लागला. त्याला तसा रडतांना पाहून देवदूत ह्मणाले, ' प्राण्याचें आयुष्य संपून तो मेला ह्मणजे त्याची फिरून जिवंत होण्याची आशा नाहीं खरी, तरी ह्या ठिकाणीं दैवानें तुझ्यासाठीं एक उपाय राखून ठेविला आहे. तूं जर तिला आपलें अर्धं आयुष्य देशील तर ही जिवंत होईल. ' तें ऐकून रुरूनें आपलें अर्धं आयुष्य देण्याचा संकल्प करतांच ती झोंपेतून जागी झाल्याप्रमाणें उठून बसली. आपल्या बायकोला सापानें चावल्यामुळें त्याचा सूड घेण्याच्या उद्देशानें जो जो ह्मणून साप दिसेल त्या सर्वांना मारावयाचें अशी रुरूनें प्रतिज्ञा केली. व त्यासाठीं नेहमीं सशस्त्र होऊन तो अरण्यांत फिरत असे. एके वेळीं रानांत हिंडत असतां त्यानें एक ह्यातारें दुतोंडें पाहिलें. त्याला मारण्याला निघाला असतां तें दुतोंडें राजाला ह्मणालें; ' मीं तुझा कांहीं अपराध केला नसून तूं मला कां मारतोस ! रुरूनें उत्तर केलें, ' माझ्या प्राणप्रियेला पूर्वी साप चावला. तेव्हांपासून जो जो ह्मणून साप दिसेल त्याला मारण्याची मीं घोर प्रतिज्ञा केली आहे. ' दुतोंडें त्याला फिरून ह्मणालें, ' जे लोकांना चावतात ते साप निराळे. सापाच्या नांवावर आह्मां निरुपद्रविक दुतोंड्यांना मारणें तुला उचित नाहीं. **ज्यानें अपराध केला त्यालाच शिक्षा व्हावी हा धर्म** आहे. तूं धर्मज्ञच आहेंस. ' हें ऐकून तो कोणी ऋषि असावा अशी रुरूला शंका येऊन त्यानें त्याला मारलें नाहीं व ' आपल्याला ही दशा कां आली, ' ह्मणून त्यानें त्याला विचारलें. दुतोंड्यानें उत्तर केलें, ' मीं पूर्वी सहस्रपाद नांवाचा ऋषि होतों. तपानें दैदीप्यमान असा सत्य भाषण करणारा खगम नांवाचा एक ब्राह्मण माझा मित्र होता.

एकदां तो अग्निहोत्रांत गढला असतां गवताचा साप करून मीं त्याला भिवविलें. त्यामुळें त्याला मूर्च्छा आली. त्या तपोधनानें सावध झाल्यावर रागानें खवळून जाऊन 'तूं साप होशील' ह्मणून मला शाप दिला. त्याचें तपोबल मला ठाऊक असल्यामुळें खिन्न होऊन हात जोडून मी त्याच्यापुढें उभा राहिलों व 'मित्रा, अविचारानें ह्मण अगर थट्टेनें ह्मण चूक झाली याची क्षमा कर,' अशी त्याची विनंति केली. तो ह्मणाला, 'माझें भाषण कधीं खोटें होणार नाहीं. परंतु रुरुनामक कोणी पवित्र पुरुष उत्पन्न होईल. त्याच्या दर्शनानें तूं शापापासून मुक्त होशील.' तो मी आज तुझ्या दर्शनानें शापमुक्त झालों आहें. मी तुला तुझ्या हिताची एक गोष्ट सांगतों. हे नरश्रेष्ठा, **अहिंसा हा सर्वांत श्रेष्ठ धर्म आहे.** अहिंसा, सत्यवचन, क्षमा आणि वेदाध्ययन हे ब्राह्मणाचे मुख्य धर्म आहेत. तसेंच शस्त्रधारण व क्रौर्य हे क्षत्रियाचे मुख्य धर्म आहेत; म्हणून तूं शस्त्र हातांत धरून हिंसा करूं नकोस. जनमेजयाच्या सर्पसत्रांत भयत्रस्त झालेल्या सर्पांचें रक्षण आस्तीक नामक ब्राह्मणानेंच केलें असें म्हणून तो अंतर्धान पावला.'

---

५. आस्तिकाची कथा. (१. १३–१९, ४४–४८, ५४–५८)

हा आस्तीक कोण ह्मणून शौनकांनीं विचारल्यावरून सौति ह्मणाले.

'ब्रह्मदेवासारखे जाज्वल्य, तपोनिष्ठ, मिताहारी, नेहमीं पर्यटन करीत राहणारे व साधूंमध्यें श्रेष्ठ असे जरत्कारु नांवाचे कोणी मोठे तपस्वी ब्रह्मचारी होते. ते ज्या ठिकाणीं संध्याकाळ होईल त्या ठिकाणीं मुक्काम करून तीर्थें करीत, वायु भक्षण करून डोळ्याला डोळा न लावतां पृथ्वीभर हिंडत होते. हिंडतां हिंडतां कोणे एके काळीं एका मोठ्या खड्ड्यामध्यें अधोमुख लोंबणारे त्याचे पूर्वज त्याच्या दृष्टीस पडले. 'तुह्मी असें कां लोंबत आहां ? माझ्या हातून तुमचें कांहीं हित होण्यासारखें असल्यास तें मी मोठ्या संतोषानें आपलें सर्व तप खर्ची घालून करण्याला तयार आहें. मनांत शंका न धरतां बोला.' असें ते त्यांना म्हणाले. पूर्वज ह्मणाले, 'हे ब्रह्मन्, आह्मी भटकणारे साधू आहोंत. आमचा वंश खुंटत चालल्यामुळें आह्मी खालीं नरकांत चाललों आहों. आमच्या वंशांत जरत्कारु नांवाचा एक मंदभाग्य आहे. तो अपत्य उत्पन्न करण्यासाठीं बायको करीत नाहीं. **ह्या जगांत सुपुत्रापासून जी गति मिळते ती पुष्कळ दिवसांच्या संचित धर्मफलानें अगर तपानें देखील मिळत नाहीं.** बंधूप्रमाणें आमची कीव करणारा तूं कोण आहेस ? आह्मां हतभाग्यासाठीं तुला एवढें वाईट कां वाटत आहे ?' ते ह्मणाले; 'मीच जो जरत्कारु. तुमची इच्छा असेल तर तुमच्यासाठीं मी बायको करून संततीसाठीं खटपट करीन; पण सुख अगर संपत्ति भोगण्यासाठीं मात्र बायको करणार नाहीं. आणि तेंही ह्या अटीवर करीन कीं, ती माझ्या नांवाचीच असून तिच्या आतांनीं भिक्षा ह्मणून ती मला दिली पाहिजे. मी गरीब असल्यामुळें मला अशी बायको मिळणें कठीण आहे.' नंतर लग्न करून गृहस्थाश्रम स्वीकारण्याकरितां 'कन्येची भिक्षा द्या.' असें तीन शब्द उच्चारीत ते सर्व पृथ्वी हिंडत होते. त्यांच्या शोधाकरितां वासुकीनें पाठविलेल्या हेरांनीं येऊन वासुकीला ती वर्दी दिली. तेव्हां वासुकि आदरपूर्वक त्यांना घरीं घेऊन गेला व त्यांचे नांवाची आपली बहीण त्यानें त्यांना दिली. तिचें विधिपूर्वक अग्नीच्या समोर पाणिग्रहण करून नागराजानें दिलेल्या उत्तम घरांत ते तिच्यासह राहूं लागले. त्या ठिकाणीं, 'तूं माझ्या मनाविरुद्ध कांहीं करतां कामा नये, माझ्या सांगण्याविरुद्ध वागलीस तर तुला व तुझ्या घराला सोडून मी चालता होईन,' असें त्यांनीं तिला निक्षून सांगितलें. अशी त्यांची आज्ञा झाल्यामुळें नेहमीं चिंतेंत राहून ती आपल्या कष्टाळू पतीच्या सेवेमध्यें फार सावधगिरीनें तत्पर राहिली. पुढें ऋतुकालीं न्हाऊन पतीकडे गेली असतां अग्नीसारखा तेजःपुंज गर्भ तिला राहिला. तो शुक्ल पक्षांतील चंद्राप्रमाणें वाढत असतां एके दिवशीं जरत्कारु ऋषी श्रमून तिच्या मांडीवर डोकें ठेवून निजले होते. असे ते निजले असतां सूर्य मावळूं लागला. त्या वेळीं तिनें आपल्याशीं विचार केला कीं, ह्या वेळीं काय केल्यानें कर्तव्य बजावल्यासा-

रखें होणार आहे ? यांना उठवावें कां न उठवावें ? हे कष्टाळू नेहमीं धर्माचरणामध्यें गढलेले असतात. काय केलें असतां दोष माझ्या माथीं लागणार नाहीं ? झोंपमोड केली तर या धर्मात्म्याचा मजवर राग होणार, पण न केली तर धर्मलोप होणार. ' **धर्मलोप हें मोठें पातक आहे.** उठविलें तर राग होणार. पण न उठविलें तर संध्येची वेळ टळून स्त्रीनें धर्मलोप होणार. ' असें मनांत ठरवून ती मधुरभाषिणी त्या निद्रिस्त पतीला गोड शब्दांनीं ह्मणाली, ' अहो भाग्यशालि, सूर्य अस्ताला चालला आहे. पाय धुवून संध्यावंदन करा. हा पेटलेला अग्निहोत्राचा अग्नि क्षणभर रमणीय पण मोठा क्रूर दिसत आहे. ही पश्चिमेकडे तिन्हीसांज होत चालली आहे. ' हें ऐकून ओठ थरथरां कांपवीत ते बायकोला ह्मणाले. ' हे सर्पकन्ये, तूं हा माझा मोठा अपराध केला आहेस. तुझ्यापाशीं मी आतां क्षणभरही राहणार नाहीं. आलों तसा चाललों बघ. मी निजलों असतां नियमित वेळीं मावळण्याची सूर्याची प्राज्ञा नाहीं. **अवमान झाल्या ठिकाणीं कोणालाच राहणें आवडणार नाहीं.** ' हें हृदयाला घरें पाडणारें त्यांचें भाषण ऐकून वासुकीची बहीण ह्मणाली, ' हे महाभाग, अपमान करण्याच्या हेतूनें मीं आपल्याला जागें केलें नाहीं. जागें करण्यांत धर्मलोप न व्हावा एवढाच काय तो माझा हेतु होता. ' इष्ट हेतु सफल झाल्यामुळें तिला सोडून जाण्याचा त्यांचा पूर्वीच निश्चय ठरला असल्यामुळें रागानें त्यांनीं तिला उत्तर दिलें. ' **मी कधीं खोटें बोलत नाहीं,** मी तर जाणारच. मीं तुझ्याशीं पूर्वी असा करारच केला होता. मीं येथें सुखांत दिवस घालविले, असें मी येथून गेल्यावर तूं आपल्या भावाला कळीव व माझ्या मागें तूंही मजकरितां शोक करूं नकोस. ' हें भाषण ऐकून दुःखाश्रूंनीं तिचे डोळे अगदीं भरून आले. व गळा दाटून आला, तरी धैर्यानें ती त्यांना हात जोडून ह्मणाली. ' आपण धर्मज्ञ असून धर्माची काळजी घेणारी, पतिहितामध्यें दक्ष व निरपराधी अशा मला सोडून जाणें आपल्याला रास्त वाटतें काय ! मला आपल्याला देण्यांत माझ्या भावाचा जो हेतु होता तो सफल न झाल्यामुळें वासुकि मला काय ह्मणेल ? आईच्या शापानें लोप पावणाऱ्या आमच्या वंशाकरितां आपल्यापासून पुत्राची आह्मीं इच्छा केली होती तो तर अद्यापि झाला नाहीं. आपल्यापासून झालेल्या पुत्राकडून माझ्या जातीचें कल्याण होणार आहे. हा आपला व माझा संबंध व्यर्थ जाऊं नये. **जातीच्या हिताकरितां मी आपल्याला हात जोडतें.** हल्लींचा गर्भ काय आहे त्याचा निकाल लागल्याशिवाय मला निर्दोषिणीला सोडून जाणें आपल्याला बरें नाहीं. ' हें ऐकून मुनी तिला ह्मणाले, ' हे भाग्यशालि, हा तुझा गर्भ अग्नीसारखा तेजःपुंज व धर्मशील आहे. ' असें ह्मणून ते धर्मात्मे आधींच निश्चय ठरल्याप्रमाणें कडक तप करण्याकरितां परत वनाला निघून गेले.

पति आपल्याला सोडून गेल्यावर जरत्कारूनें भावाजवळ येऊन झालेली सर्व हकीकत त्याला कळविली. तेव्हां तें मोठें अरिष्ट गुदरलेलें ऐकून आपल्या गाईसारख्या दीन झालेल्या बहिणीपेक्षां दीन होऊन जाऊन नागराज तिला ह्मणाला, ' तुला त्या ऋषीला देण्यांत माझा काय उद्देश होता हें तुला ठाऊकच आहे. सर्पाच्या कल्याणाकरितां त्यांच्यापासून पुत्रप्राप्तीची आह्मीं इच्छा केली होती. त्यापासून होणारा मुलगा आह्मांला सर्पसत्रांत संकटांतून वांचविणार आहे. तर त्या मुनिवर्यापासून तुला गर्भ राहिला आहे किंवा नाहीं ? अशा थोर पुरुषांचा लग्न करण्याचा हेतु कधीं निष्फळ होणार नाहीं. परंतु कार्याचें गौरव मनांत आणून मला तुला हें विचारावें लागत आहे. त्यांच्या तपाचें सामर्थ्य मला ठाऊक असल्यामुळें त्यांचें मन वळवून त्यांना परत आणणें मला शक्य दिसत नाहीं. कारण तसें केलें असतां ते कदाचित मलाच शाप देतील. तर काय आहे तें सांगून माझ्या हृदयांतील चिंतारूप घोर शल्य उपटून काढ ! याप्रमाणें भावाला चिंतातुर पाहून ती त्याला धीर देऊन ह्मणाली, ' मीं मुलाची गोष्ट काढिली असतां सध्यां असलेला गर्भ मोठा धर्मात्मा मुलगा आहे असें मला सांगून ते एकदम निघून गेले. ते कधीं थट्टेत देखील खोटें बोललेले मला आठवत नाहीं. मग अशा महत्त्वाच्या गोष्टींत ते कसें बरें खोटें बोलतील ? यासाठीं उद्दिष्ट हेतूसंबंधानें काळजी नको. ' अग्नि किंवा सूर्य ह्याप्रमाणें तुला तेज-

स्वी मुलगा होईल, ' असें त्यांनीं मला सांगितलें आहे. ' हें ऐकून अत्यानंदानें बरें ह्मणून वासुकि बहिणीचे बोलण्यावर विसंबून स्वस्थ राहिला, व तिचें शांतवन करून आदरपूर्वक त्यानें तिला मोठ्या सुखांत ठेविलें. त्यानें तिचा मोठा गौरव केला. पुढें शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें वाढतां वाढतां गर्भ पूर्णावस्थेला आल्यावर जरत्कारूला मुलगा झाला. तो तेथेंच नागराजाच्या घरीं मोठा होऊन सर्व सांगवेद च्यवनऋषींपासून शिकला. तो जात्या बुद्धिमान व स्वभावानें सात्विक होता. गर्भामध्यें असतांनाच " आहे " ह्मणून सांगून त्याचा बाप त्याला सोडून गेला होता ह्मणून त्याचें नांव **आस्तीक** असें ठेविलें. लहाणपणापासून वासुकीनें त्याला मोठ्या काळजीनें वाढविलें. पुढें जनमेजयाचें सत्र सुरू झालें तेव्हां जरत्कारू सांपर्णीने आपल्या मुलाला जवळ बोलावून वासुकीच्या सांगण्यावरुन ती त्याला ह्मणाली, ' बाळा, मला तुझ्या पित्याला देण्यांत जो हेतु होता ती वेळ आतां येऊन ठेपली आहे. आतां प्रसंगाला उचित ते कर.' असें ह्मणून तिनें त्याला सर्व वृत्तांत कळविला. दुःखपीडित वासुकीला जणूंकाय त्यांच्यांत फिरून जीवच घालतो आहे अशा तऱ्हेनें धीर देऊन तो ह्मणाला, ' मी तुझी शापापासून मुक्तता करीन. निष्काळजी रहा. तुला कांहीं भीति नाहीं. तुझें कल्याण जेणेंकरून होईल तें करण्याला मी झटेन. ' त्याप्रमाणें वासुकीला धीर देऊन व पुढची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन तो जनमेजयाच्या मोठ्या सत्राकडे एकदम निघून गेला. तेथें यज्ञमंडपांत जाण्यास द्वारपालाकडून त्याला प्रतिबंध झाला असतां त्यानें त्या यज्ञाची स्तुति करुन त्या भव्य मंडपांत आपला शिरकाव करून घेतला व राजा, ऋत्विज, प्रेक्षक, व अग्नि या सर्वाची स्तुति केली. लहान असून त्याचें तें प्रौढ भाषण ऐकून त्याला पाहिजे तो वर द्यावा असें राजाला वाटलें. सभेंतील सर्व विद्वानांनींही त्याची वाहवा केली. ते ह्मणाले, **'जो विद्वान आहे तो लहान असला तरी मानाला पात्र आहे** ह्मणून राजा, तूं ह्या ब्रह्मवर्याला वर दे. तेव्हां जनमेजयानें आस्तीकाला पाहिजे तो वर मागण्यास सांगितलें. या वेळीं तक्षकाची अग्नींत आहुति पडत होती. इतक्यांत ' सत्र बंद पडून अग्नीपासून नागांचें रक्षण व्हावें एवढा वर मला दे,' असें आस्तीकानें मागितलें. राजानें त्याला सोनें, रुपें, गाई, किंवा दुसरी वाटेल ती वस्तु मागण्यास सांगितलें. पण आस्तीक ह्मणाला, ' मला दुसरें कांहीं नको. हें तुझें सर्पसत्र बंद पडून माझ्या आईच्या कुलांतील सर्वांचें कल्याण व्हावें इतकेंच माझें मागणें आहे. ' त्याबेळीं वेदपारंगत सभासदांनीं ' ब्राह्मण मागतो आहे तें त्याला दे, ' ह्मणून सांगितल्यावरून राजानें त्याचें मागणें कबूल केलें. या वरदानानें चिंतातुर होऊन दया भाकणारा तक्षक, वासुकि व दुसरे मोठमोठे नाग ह्यांचें संरक्षण झालें. राजानें आस्तीकाला पुष्कळ द्रव्य व वस्त्रालंकार देऊन परत पाठविलें व माझ्या अश्वमेधाच्या वेळीं सभासद होण्यास फिरून या, ' ह्मणून त्यानें त्याला निमंत्रण दिलें. ह्याप्रमाणें आपलें कार्य साधून व राजालाही संतुष्ट करून मामा व आई ह्यांकडे येऊन झालेली सर्व हकीकत त्यानें त्यांना सांगितली. नाग संतुष्ट होऊन त्यांनीं त्याला वर मागण्यास सांगितलें तेव्हां तो ह्मणाला, " जे माझें हें पुण्यकारक आख्यान ऐकतील, जे असित, आर्तिमत, व सुनीथ ह्यांचें स्मरण करतील, व ' सर्पा दूर हो, तुझें कल्याण असो. जनमेजयाच्या यज्ञाच्या शेवटीं झालेलें आस्तीकाचें भाषण लक्षांत ठेव. ' अशी तुह्मांला आठवण देतील त्यांना तुमच्यापासून कांहीं भय नसावें.' हें ऐकून सर्प ह्मणाले, ' जो हें ऐकून दूर होणार नाहीं, त्याचे डोक्याचे शंकडों तुकडे होतील. ' नंतर ह्या महात्म्याला फार संतोष होऊन तो अरण्यांत गेला व पुत्रपौत्रांसहवर्तमान योग्य कालीं मोक्षाला गेला. त्यानें यज्ञानें देवाला तृप्त करून संततीच्या योगें पितरांचा उद्धार केला. '

---

६. नागांच्या शापाची हकीकत.
(१. १६, २०–२३.)

शौनकांनीं नागांची उत्पत्ति व त्यांना शाप होण्याचें कारण विचारल्यावरून सौति ह्मणाले.

"पूर्वी देवयुगांत कद्रू व विनता नांवाच्या दोन बहिणी कश्यप ऋषींच्या बायका होत्या. त्या ब्रह्म

देवासारख्या तेजस्वी ऋषींनीं आपल्या बायकांवर संतुष्ट होऊन त्यांना वर मागण्यास सांगितलें. कद्रूनें एक हजार मोठे पराक्रमी नाग मला मुलगे असावेत असा वर मागितला. व विनतेनें कद्रूच्या मुलांच्या तोडीचे असे दोनच मुलगे मागितले. कश्यपांनीं त्यांना ते वर दिले, व 'गर्भ मोठ्या काळजीनें संभाळा,' ह्मणून सांगून आपण अरण्यांत तप करण्याकरितां निघून गेले. पुष्कळ काळानें कद्रूनें दहाशें व विनतेनें दोन अंडीं घातलीं. सेवकांनीं मोठ्या आनंदानें तीं अंडीं पांचशें वर्षे एका उबदार भांड्यांत घालून ठेविलीं. त्यानंतर कद्रूचीं नागरूपीं मुलें बाहेर पडलीं. पण विनतेच्या अंड्यांतून जोडपें बाहेर आलें नाहीं. ह्मणून तिला हेवा उत्पन्न होऊन मुलांकरितां अगदीं हापापली असल्यामुळें तिने एक अंडें फोडिलें. त्यांतून डोकें व अर्धे शरीर बनलेला एक मुलगा बाहेर पडला. त्या मुलानें अगदी संतापून जाऊन, 'ज्या अर्थी लोभामुळें तूं मला अमें कुरूप केले आहेस त्या अर्थी जिचा तूं हेवा करतेस त्या सवतीची तूं पांचशें वर्षे दासी होशीळ व माझ्याप्रमाणेंच या माझ्या भावाला तूं जर अकालीं अंडें फोडून बाहेर काढणार नाहींस तर तो महात्मा तुझी या शापापासून सुटका करील,' असा शाप दिला, व 'धीर न सोडतां ह्याच्या जन्मकालाची वाट पहात रहा,' असें सांगून तो आकाशांत उडून गेला. तोच हा अरुण सूर्याच्या रथांत बसून त्याचें सारथ्य करीत आहे. ह्याचवेळीं उच्चैःश्रवा नांवाचा समुद्रमंथनापासून निघालेला घोडा त्या बहिणींच्या दृष्टीस पडला. त्याला पाहून 'याचा वर्ण कोणता आहे तो मला झटकन सांग,' असें कद्रूनें विनतेला विचारलें. विनता ह्मणाली, 'तो सबंध पांढरा आहे.' कद्रू ह्मणाली, 'त्याचे शेपटीचे केंस काळे असावेत असें मला वाटतें.' नंतर जिचें ह्मणणें खरें ठरेल तिचें दुसरीनें दास्य करावें असा पण लावून दुसरे दिवशीं घोडा पहाण्यास जाण्याचें ठरवून त्या आपापल्या घराकडे गेल्या. कपट करण्याचें मनांत आणून, 'काजळासारखे काळे तुळतुळीत केंस होऊन लवकर त्या घोड्याच्या अगाला जाऊन चिकटा ह्मणजे मला विनतेची दासी व्हावें लागणार नाहीं,' अशी कद्रूनें आपल्या हजार मुलांना आज्ञा केली व 'जे माझी आज्ञा मोडतील त्यांना जनमेजयराजाचें सत्र चाललें असतां अग्निनारायण जाळून भस्म करील,' असा त्यांना शाप दिला. तो शाप ऐकून सर्पांच्या अंगीं जालीम विष असल्यामुळें लोककल्याणबुद्धीनें ब्रह्मदेवांनाही तें पसंत पडलें. **जे नेहमीं दुसऱ्याला पीडा देतात त्यांना योग्य दंड दैवच निर्माण करून ठेवीत असतें.** हा शाप ऐकून कश्यपांना हाक मारून ब्रह्मदेव ह्मणाले, 'मोठमोठ्या जालीम विषाच्या सर्पांना त्यांच्या आईनें शाप दिला ह्मणून आपणाला वाईट वाटण्याचें कारण नाहीं. जनमेजयाच्या सर्पनाशक यज्ञांत यांचा नाश पूर्वीच ठरला आहे.' असें सांगून त्या धर्मात्म्यांना संतुष्ट करून ब्रह्मदेवांनीं त्यांना सर्पविषनाशक विद्या दिली. नंतर सूर्योदय झाला असतां त्या दोघी बहिणी उच्चैःश्रव्याला पहाण्यासाठीं निघाल्या. जातांना वाटेंत ज्यामध्यें नानाप्रकारचे जलचर प्राणी मोठ्या आनंदानें क्रीडा करीत होते, जो अनेक रत्नांची केवळ खाण, नागांचें उत्तम गहण्याचें ठिकाण, नद्यांचा पति, वडवानलाचें बिसाव्याचें ठिकाण, देवांचा हितकर्ता, अमृताचा उत्पादक, असा आपल्या पाण्यानें सर्व चराचरांना पावन करणारा जलनिधि समुद्र त्यांच्या दृष्टीस पडला. त्यामध्ये अनेक मोठमोठे भोंवरे असून भरतीच्या वेळीं जोरानें वाहणाऱ्या वाऱ्यानें हलवून सोडल्यामुळें जणूंकाय तो हेलकावेच घेत आहेसें दिसत होतें. चंद्राच्या वृद्धिक्षयानुरूप लाटांमध्यें कमी अधिकपणा होणाऱ्या त्या सागराचा तळ वराहरूपी गोविंदानें पृथ्वी वर आणण्याकरितां अगदीं ढवळून टाकिला असल्यामुळे त्याचे पाणी गढूळ झालें होतें; शंभर वर्षे तप करीत असलेल्या ब्रह्मर्षीनाही याचा अंत लागला नाहीं; सूक्ष्म देहाला विश्रांति देणाऱ्या पद्मनाभाची युगादि कालाची ही शय्या असून इंद्राच्या वज्रानें पीडलेल्या मैनाकाचा हा आश्रयदाता आहे; युद्धांत पीडलेल्या असुरांचें हा आश्रयस्थान असून, याचें पाणी वडवानलाच्या तोंडांत पेटलेल्या अग्नीला पवित्र तुषाच्या ऐवजीं उपयोगीं पडतें. अनेक मोठमोठ्या पवित्र नद्या ह्याकडे मी मी ह्मणून धांव घेतात. असा हा खवळले-

ा महासागर प्रथमच ओलांडून कांहीं नाग आई-
या सांगण्याप्रमाणें न होईल तर ती आपणाला
ाळून टाकील ह्या भीतीनें तिच्या सांगण्या-
ामाणें करण्याचा विचार करून काळ्या के-
ाच्या रूपानें त्या घोड्याच्या अंगाला जाऊन
चेकटले होते. इकडे त्या सवती मोठ्या आनं-
ानें तो महासागर ओलांडून त्या घोड्याजवळ
ेल्या. त्या वेळीं त्या दोघींना त्या चंद्रकिरणासा-
रख्या पांढऱ्या शुभ्र घोड्याची शेपटी काळी दिस-
ली. ती पाहून विनतेचें तोंड खरकन उतरलें. ति-
ला कद्रूचें दास्य पतकरावें लागलें. ह्याप्रमाणें प-
णांत हरल्यामुळें विनता आपल्या सवतीची दासी
होऊन राहिली. इकडे योग्य वेळ आल्यावर विनता
जवळ नसतांही तिनें घातलेल्या अंड्यांतून मोठा
तेजस्वी, शक्तिमान व बाटेल तिकडे जाण्याचें अं-
गांत सामर्थ्य असणारा असा कामरूपी प्रलयका-
लच्या अग्नीसारखा दैदीप्यमान गरुड बाहेर पडून
आकाशांत उडाला. त्याला पाहून तो अग्निच अ-
सावा असा भ्रम पडून देव अग्नीला शरण जाऊन
घाबरून ह्मणाले, 'हे अग्निनारायणा, तूं असा कोप
करूं नकोस. आह्मांला भस्म करून टाकण्याचा
तुझा बेत आहे कीं काय? ह्या तुझ्या ज्वाला कशा
एकसारख्या वाढत आहेत पहा.' तें ऐकून अग्नि
त्यांना ह्मणाला, 'हे दैत्यांची खोड जिरविणारे देव
हो, तुह्मी चुकता. हा माझ्याप्रमाणेंच तेजस्वी, वि-
नतेचा आनंदकर गरुड जन्माला आला आहे. हा
तेजस्वी पिंड पाहून तुह्मांला मोह पडला आहे. हा
कश्यपऋषींचा मोठा शक्तिमान मुलगा नागांचा क्षय
करून देवांचें साहाय्य करील. हा राक्षसांचा शत्रु
आहे. तुह्मांला त्याला भिण्याचें मुळींच कारण
नाहीं.' नंतर त्यांनीं गरुडाची स्तुति केली. ती
ऐकून गरुड ह्मणाला, 'माझें स्वरूप पाहूनच तुह्मां-
ला भिण्याचें कारण नाहीं.' असें ह्मणून त्यानें आ-
पलें तेज कमी केलें. नंतर तो समुद्र ओलांडून प्र-
थम आईजवळ आला व तिला पणांत जिंकली
जाऊन कद्रूची दासी होऊन दुःखांत काळ कंठतां-
ना पाहून त्याला वाईट वाटलें. तेथें असतांना को-
णे एके वेळीं दुःखानें दीन होऊन मुलाच्या मांडी-
वर डोकें टेकून विनता शोक करीत असतां कद्रू
तिला ह्मणाली, 'समुद्राच्या पोटांत नागांचें रम्य
राहण्याचें ठिकाण आहे तिकडे मला घेऊन चल.'
तें ऐकून तिला व तिच्या मुलांना ती व गरुड वा-
हून घेऊन चालले. तेव्हां गरुड वर अगदीं सूर्या-
जवळ जवळ उडाला असतां सूर्यकिरणांनीं हो-
रपळून गेल्यामुळें नागांना मूर्च्छा आली. त्यांची
ती दुर्दशा उडालेली पाहून कद्रूनें इंद्राचा धांवा
केला. ती ह्मणाली, 'हे देवाधिदेवा, हे बलसूदना,
हे नमुचिघ्ना, हे सहस्राक्षा, हे शचीपते, तुला मी
शरण आलें आहे. सूर्यकिरणांनीं आह्मी होरपळून
चाललों आहों. पुष्कळ पाऊस पाडून तूं आह्मांला
तार. हे देवाधिदेवा, तुझ्यावांचून आह्मांला कोणी
नाहीं.' ह्याप्रमाणें कद्रूची स्तुति ऐकून इंद्रानें सर्व
आकाश काळ्या भोर मेघांनीं झांकून टाकलें, व
मुसळधार पाऊस पाडला. भयंकर मेघगर्जना होत
असून मधून मधून विजा चमकत होत्या व सोसा-
क्याच्या वाऱ्यानें ढग चोहोंकडे पसरून सूर्यकिरणें
झांकून गेलीं. ह्याप्रमाणें पाऊस पाडून त्यानें नागां-
ना सुखविलें. जिकडे तिकडे जलमय होऊन गेलें.
पाण्यानें थबथबलेले ते नाग आनंदानें गरुडाच्या
पाठीवर बसून रामणीयक द्वीपाला येऊन पोंहोंचले.
तेथील रम्य वनांत विहार केल्यावर, 'तूं आकाशां-
तून फिरतांना अनेक प्रदेश पाहिले आहेस त्यांपै-
कीं रम्य व जलानें संपन्न अशा दुसऱ्या एखाद्या
द्वीपाला आह्मांला घेऊन चल, 'ह्मणून गरुडाला
त्यांनीं आज्ञा केली. गरुडानें आईला विचारलें,
'आई, ही सर्पांची अरेरावी आमच्यावर कां ह्मणून?'
तिनें उत्तर केलें, 'बाळा, त्यांनीं कपटानें माझा पण
खोटा केल्यामुळें दुर्दैवानें मी आपल्या सवतीची
दासी झालें आहें. तेव्हां त्याचें ह्मणणें आपल्याला
ऐकणें भाग आहे.' हें ऐकून त्या भाषणानें फार कष्टी
होऊन गरुड सर्पांना ह्मणाला, 'हे सर्पांनों, तुह्मांला
कांहीं मोबदला देऊन अथवा **ज्ञान मिळवून**
अगर **पराक्रम दाखवून** किंवा दुसऱ्या कोणत्या
उपायानें मी तुमच्या दास्यापासून आपल्या आ-
ईची मुक्तता करून घेऊं हें सांगा.' तें ऐकून नाग
ह्मणाले, 'तूं आपल्या सामर्थ्यानें अमृत घेऊन ये-
ऊन तें आह्मांला दे; म्हणजे तिची सुटका होईल.'
ह्याप्रमाणें सर्पांचें भाषण ऐकून गरुड आईला म्ह-

णाला, 'मी अमृत आणण्यासाठीं जातों. माझी कांहीं खाण्याची सोय कर.' विनता ह्मणाली, 'बाळा, समुद्राच्या पोटांत निषादांचें एक रम्य ठिकाण आहे. तेथें हजारों निषाद राहतात. त्यांना खाऊन अमृत घेऊन ये. पण ब्राह्मण मारण्याकडे मात्र प्रवृत्ति ठेवूं नकोस. कारण त्यांची उत्पत्ति प्रथम असून वर्णानें ते श्रेष्ठ व सर्वांचे गुरू आहेत. अग्नीप्रमाणें पवित्र असून वाटेल त्याला जाळून भस्म करण्याची त्यांना शक्ति आहे. जा, वाटेंत देव तुझें रक्षण करोत. मी तुझें येथें कल्याण चिंतीत राहतें. ह्या कामांत तुला यश येवो.' हें आईचें भाषण ऐकून प्रतिकाळासारखा तो बुभुक्षित गरुड पंख पसरून आकाशात उडाला व निषादांच्या रहाण्याच्या ठिकाणाला जाऊन सर्व निषादांचा त्यानें फन्ना उडविला. त्यावेळीं पेटलेल्या अग्नीप्रमाणें जाळून भस्म करणारा कोणी ब्राह्मण त्याच्या घशांत अडकला. त्याला गरुड ह्मणाला, 'हे ब्राह्मणश्रेष्ठा, लवकर बाहेर पड. पापकर्मांत नेहमीं रत असलास तरी मला ब्राह्मण मारणें नाहीं.' यावर ब्राह्मण ह्मणाला, 'माझी बायको निषादी आहे तिलाही माझ्याबरोबर बाहेर पडण्याला परवानगी दे.' गरुडानें उत्तर केलें, 'बरें तिला घेऊन लवकर बाहेर पड.' नंतर निषादीसह तो ब्राह्मण बाहेर पडला व गरुडाला आशीर्वाद देऊन इष्ट देशाला चालता झाला. पुढें तो आपल्या बापाकडे गेला. आणि आईकडील इत्थंभूत वर्तमान त्यानें त्यांना कळविलें. 'मुला सर्वांचें कुशल आहेना, तुला खावयाला यथेच्छ मिळतेंना,' असा वडिलांचा प्रश्न ऐकून गरुड ह्मणाला, 'माझी आई खुशाल आहे, भाऊ खुशाल आहे. तसेंच मीही खुशाल आहें. पण बाबा, खाण्याच्यासंबंधानें जर विचाराल तर तें मात्र मला पोटभर मिळत नाहीं. सर्पाच्या आज्ञेनें मी अमृत घेऊन येण्यासाठीं चाललों आहें, व आईला दास्यापासून सोडविण्यासाठीं तें मी आज घेऊन तर येणार. आईनें मला निषादांना खाण्याविषयीं सांगितलें होतें त्याप्रमाणें मीं हजारों निषाद खाल्ले, तरी माझी भूक गेली नाहीं. तर आपण मला दुसरें कांहीं खाण्याला द्या, ह्मणजे तें खाऊन मी अमृत घेऊन येईन.' यावर कश्यप ह्मणाले, 'हें पहा, जवळच देवलोकांत देखील प्रसिद्ध असें एक पवित्र सरोवर आहे. ह्या ठिकाणीं हत्तीचें व कांसवाचें नेहमीं भांडण चालतें. एकमेकांशीं भांडणाऱ्या व एकमेकांला मारण्याला टपलेल्या, ह्या दोघां प्राण्यांना खाऊन आपली भूक भागीव आणि अमृत घेऊन ये.' हें बापाचें भाषण ऐकून तो त्या अनेक पक्षिकुलांनीं गजबजलेल्या सरोवराकडे चालला. बापाच्या आज्ञेप्रमाणें एका पंजानें हत्तीला व दुसऱ्यानें कांसवाला उचलून घेऊन तो आकाशांत उडाला व जवळच एक पवित्र अर्जुनवृक्ष होता त्यावर जाऊन बसला. त्याच्या पंखांपासून निघणाऱ्या वाऱ्यानें हलवून सोडलेलें तें झाड जणूं काय उमळून पडत आहे कीं काय असें वाटलें. त्यावर तो बसतो आहे तों त्याची एक विरळ पानांची खांदी मोडली. त्या खांदीवर कांहीं बालखिल्य लोंबत होते. त्यांना कांहीं अपाय होऊं नये ह्मणून ती खांदी हलकें चोंचींत धरून तो चालला. त्याचें तें अलौकिक कृत्य पाहून ऋषींना मोठें आश्चर्य वाटलें व त्यांनीं त्याला गरुड हें नांव दिलें. हत्ती व कांसव यांना घेऊन पंखांनीं पर्वतांना हलवून सोडीत बालखिल्यांना अपाय होईल ह्या भीतीनें कोठें न बसतां तो पुष्कळ प्रदेश ओलांडीत चालला. पर्वतश्रेष्ठ गंधमाधनाला येऊन पोहोंचल्यावर त्यानें फिरून आपल्या वडिलांचें दर्शन घेतलें. त्याला पाहून कश्यप ह्मणाले, 'वत्सा, हें साहस काय चालविलें आहेस! एखादें संकट आपल्यावर ओढवून घेशील. सूर्यकिरणांवर राहणारे बालखिल्य रागावले तर तुला जाळून टाकतील.' नंतर कश्यप ऋषींनीं मुलासाठीं बालखिल्यांची स्तुति करून त्यांना संतुष्ट केलें. त्यांची प्रार्थना ऐकून ते ती खांदी सोडून पुण्यवान हिमालय पर्वताकडे निघून गेले. नंतर तो वेगवान गरुड त्या हत्तीला व कांसवाला खाऊन त्या पर्वताच्या शिखरावरून उडाला. इकडे देवांना अनिष्ट चिन्हें दिसूं लागलीं. इंद्राचें वज्र भयानें कांपूं लागलें. आकाशांत जिकडे तिकडे धूर पसरून उल्कापात होऊं लागले. त्याचप्रमाणें वसु, आदित्य इत्यादि देवांचीं शस्त्रें गळून पडूं लागलीं. भयत्रस्त झालेल्या इंद्राला अनेक दुष्ट शकुन होऊं लागले. तेव्हां तो बृहस्पतींना ह्मणाला, 'भगवन, असे हे अपशकुन

एकदम कां बरें होऊ लागले आहेत? आमच्यासमोर उभा राहणारा शत्रु तर मला कोणी दिसत नाहीं.' बृहस्पति ह्मणाले, 'देवेंद्रा, तुझ्याच अपराधानें व महर्षी बालखिल्यांच्या तपोबलानें कश्यप व विनता ह्यांपासून गरुड नांवाचा कामचारी पक्षी उत्पन्न झाला आहे. तो पक्षी अमृत घेऊन जाण्यासाठीं येत आहे. हा बलाढ्य असल्यामुळें खास अमृत नेणार. हें ऐकून इंद्रानें अमृतरक्षकांना योग्य बंदोबस्त ठेवण्यास ताकीद दिली. तें ऐकून थक्क झालेले अमृतरक्षक आपापल्या कामांत हुशार राहिले, व नानाप्रकारचीं लखलखीत सुवर्ण कवचें अंगांत अडकवून व हातांत नानाप्रकारचीं आयुधें घेऊन अमृताचें रक्षण करण्याचा निश्चय करून ते त्याला गराडा घालून उभे राहिले. याप्रमाणें देवसैन्य तयार असतां गरुड तेथें आला. त्याला पाहून देव थरथर कांपूं लागले. त्याचें व देवांचें तुंबळ युद्ध जुंपलें. गरुडानें दशदिशा धुळीनें भरून टाकून देवांना अगदीं आंधळे करून सोडलें. त्यामुळें अमृतरक्षकांना कांहींच दिसेनासें झालें. ह्याप्रमाणें स्वर्ग हालवून सोडून चोंचीच्या प्रहारानें त्यानें देवांना जर्जर केलें. इंद्र व इतर सर्व देव कवच घालून खड्ग, गदा, शूल, चक्र इत्यादि आयुधें भेऊन निकरानें लढले. त्यांनीं आपली पराकाष्ठा केली तरी गरुड डगमगला नाहीं व स्वर्ग देवांना मृतप्राय करून ज्या ठिकाणीं अमृत होतें तिकडे तो एकदम जाऊन पोहोंचला. ज्याच्या ज्वाळा चोहोंकडे पसरल्या होत्या असा भयंकर अग्नि तेथें त्याला दिसला. तेव्हां हजारों तोंडांनीं मोठमोठ्या नद्या नद्या गट्ट करून फिरून येऊन त्या पाण्यानें त्यानें शत्रूला तापद असा तो अग्नि विझविला. नंतर अमृतकूपांत शिरण्याकरितां सूक्ष्म देह धारण करून तो आंत शिरतो तों अक्षय फिरणारें, अणकुचीदार व अमृत चोरून नेणाराचे प्राण नाशक असें चक्र व त्या चक्रापाशीं दोन्ही डोळे विषानें भरलेले असे क्रूर नाग अमृताचें रक्षण करण्यासाठीं ठेवलेले त्याच्या दृष्टीस पडले. त्यांपैकीं एकाची दृष्टादृष्ट देखील मनुष्याचे प्राण हरण करण्याला पुरी होती. गरुडानें त्यांच्या डोळ्यांत धूळ टाकून ते झांकून टाकले, व ह्याप्रमाणें ते आंधळे झाल्यावर त्यांना मारून त्यांचे तुकडे तुकडे केले व तें अमृत घेऊन मोठ्या लगबगीनें तो परत चालला. आपल्या पंखांनीं सूर्यकिरणें झांकून टाकून श्रमाला न जुमानतां तो परतला असतां विष्णु मार्गांत त्याला आडवे आले व त्याच्या ह्या अलौकिक कृत्यानें संतुष्ट होऊन 'वर माग,' ह्मणून ह्मणाले. 'आपल्यावर माझें वास्तव्य असून अमृत न पितां मला जरा किंवा मरण नसावें' असा गरुडानें वर मागितला. व विष्णूंनींही त्याला तो दिला. नंतर गरुडानेंही विष्णूंना वर मागण्यास सांगितलें असतां 'तूं माझें वाहन हो,' ह्मणून त्यांनीं मागितलें, व नेहमीं त्याला आपल्यावर ठेवण्यासाठीं त्याची आपल्या ध्वजावर त्यांनीं योजना केली. नंतर त्याला वायुगतीनें अमृत घेऊन चाललेला पाहून इंद्र रागानें त्यावर तुटून गेला, व आपल्या वज्रानें त्यानें त्याला खूप ठोकलें. गरुड हासून ह्मणाला, 'ज्यांच्या अस्थींचें हें वज्र बनलें आहे त्या ऋषींना मान देण्यासाठीं हें मी एक पंख उपटून टाकतों. ह्याच्या अलीकडे तुझ्या वज्राची येण्याची प्राज्ञा नाहीं. तुझ्या वज्रप्रहारानें मला कांहीं अपाय होणार नाहीं.' तसें झालेलें पाहून हा कोणी अलौकिक पक्षी असावा असें वाटून इंद्र त्याला ह्मणाला, 'तूं किती बलवान आहेस हें जाणण्याची व तुझ्याशीं मैत्री करण्याची माझी इच्छा आहे.' गरुड ह्मणाला, 'माझ्याशीं मैत्री करण्याची इच्छा असेल तर त्याला मजकडून हरकत नाहीं. माझें सामर्थ्य विचारशील तर तें कांहीं सांगतां येण्याजोगें नाहीं व तें कोणाला सहनही होणार नाहीं. आतां आत्मबलाची व आत्मगुणाची आपणच श्लाघा करणें हें जरी शहाण्यांना संमत नाहीं तरी तुला मी आपला मित्र समजून तूं विचारल्यावरून तें मी तुला सांगत आहें. **विनाकारण आत्मश्लाघा केल्यानें मात्र मनुष्य दोषाला पात्र होतो.** ही सागरांत पृथ्वी तिच्यावरील सर्व पर्वत व चराचर वस्तूंसह सहज उचलण्याएवढी माझ्या अंगीं शक्ति आहे.' हें ऐकून देवेंद्र त्याला ह्मणाला, 'तूं ह्मणतोस तें सर्व तसेंच असलें पाहिजे. तुझ्या ठिकाणीं सर्व कांहीं संभवतें. तुझ्यासारखा स्नेही मिळणें हें एक मोठें भाग्यच मी समजतों. तुला अमृताचें जर कांहीं काम नसेल तर तें मला परत दे. कारण तूं हें ज्यांना देशील त्यांपासून कदाचित्

आह्मांला त्रास होईल.' गरुड ह्मणाला, 'कांहीं कारणाकरितां मी हें घेऊन चाललों आहें. हें मी कोणाला पिण्याला देणार नाहीं. ज्या ठिकाणीं मी हें ठेवीन तेथून तूं तें चटकन् पळीव,' हें ऐकून इंद्र संतुष्ट होऊन त्यानें त्याला वर मागण्यास सांगितलें. तेव्हां कद्रूच्या मुलांनीं आपल्या आईशीं केलेल्या कपटाचें स्मरण होऊन गरुड ह्मणाला, 'मला कांहीं कमी नाहीं, तरी देतोसच तर मी मागतों तेवढें मला दे ह्मणजे पुरें. हे बलाढ्य साप माझे भक्ष्य असावेत.' बरें ह्मणून इंद्र त्याच्या मागोमाग गेला. गरुड मोठ्या त्वरेनें आपल्या आईपाशीं आला व संतोषमुद्रेनें नागांना ह्मणाला, 'हें मीं अमृत आणिलें आहें. मी हें दर्भासनावर ठेवितों. स्नान करून शुद्ध होऊन मग हें प्या. मीं तुमच्या ह्मणण्याप्रमाणें केलें आहें. आतां माझी आई आजपासून दास्यांतून मुक्त झाली आहे.' बरें ह्मणून नाग स्नानाला गेले. इकडे इंद्र अमृत घेऊन स्वर्गाला गेला. सर्प स्नानजपादि विधि आटोपून परत येतात तों तेथें अमृत नाहींसें पाहून त्यांनीं ती जागा चाटिली. त्याच्यायोगानें त्यांची जीभ दुभंगली व त्यांना तेव्हांपासून **लेलिह** हें नांव मिळालें. गरुडही आपल्या आईला दास्यापासून मुक्त करून लोकमान्य होऊन सर्पांना खात तिच्याबरोबर अरण्यांत विहार करीत, व तिला आनंद देत राहिला.

७ हत्ती व कांसव ह्यांची गोष्ट. (१. २९).

'ऋषी हत्ती व कांसव कां झाले,' ह्मणून शौनकांनीं विचारलें असतां सौति ह्मणालेः—

'विभावसु नांवाचे कोणी एक फार तामसी ऋषी होते. त्यांचे सुप्रतीक नांवाचे धाकटे भाऊ मोठे तपस्वी होते. सुप्रतीकांच्या मनांतून वडिलोपार्जित मिळकत समायिक नसावीसें होतें. ह्मणून ते नेहमीं आपल्या भावाजवळ वांटणी मागत. एके दिवशीं विभावसु त्यांना ह्मणाले. **'असेच लोक नेहमीं मूर्खपणानें वांटणी करण्याला उतावीळ होतात. मग वांटणीच्या वेळीं पैशाच्या लोभानें एकमेकांशीं भांडतात. पुढें वेगळे झाले ह्मणजे स्वार्थाकडे त्यांचे लक्ष लागतें. मित्रद्रुपी शत्रू ह्यांमध्यें बिघाड आणितात. मग कांहीं स्वार्थसाधु आगींत तेल ओततात.** मग ह्यांचा सर्वस्वी नाश होण्याला एक क्षण लागत नाहीं. ह्मणून **शहाण्या लोकांनीं आपसांत दुही माजवूं नये.** तुला माझें सांगणें पटत नाहीं. ज्याअर्थीं तुला हा पैशाचा लोभ सुटला आहे, त्याअर्थीं तूं हत्तीच्या जन्माला जाशील.' हा त्यांचा शाप होतांच सुप्रतीकांनींही 'तूं कांसव होशील,' ह्मणून बिभावसूला उलट शाप दिला. ह्यामाणें **पैशाच्या लोभानें विकारवश झाल्यामुळें त्या दोघां ऋषींना हत्ती व कांसव ह्यांची नीच योनि आली.** ते एकमेकांचा पूर्ण द्वेष करीत असतां गरुडानें पित्याच्या आज्ञेनें त्या दोघांनाही खालें.'

८ गरुडाचा जन्म. (१. ३१)

गरुडाची उत्पत्ति कशी झाली, ह्मणून शौनकांचा प्रश्न ऐकून सौति ह्मणालेः—

'कश्यपऋषी मुलांसाठीं पुत्रकाम्य यज्ञ करीत असतां सर्व ऋषी, देव व गंधर्व ह्यांनीं त्यांना साह्य केलें. त्यावेळीं कश्यपऋषींनीं इंद्र, इतर देव, व बालखिल्य ऋषी ह्यांच्याकडे समिधा आणण्याचें काम सोंपविलें होतें. इंद्र आपल्या शक्तचनुसार डोंगराएवढा समिधांचा भारा सहज उचलून आणीत असतां वाटेंत सर्व मिळून पळसाची एक समिधा घेऊन चाललेले, निराहार करून राहणारे तपोधन व गाईच्या पावला इतक्या पाण्यांत देखील गटंगळ्या खाणारे वामनमूर्ति व तदनुसार सामर्थ्य असणारे कांहीं बालखिल्य ऋषी त्याच्या दृष्टीस पडले. शक्तीच्या मदानें इंद्रानें आश्चर्य दाखवून त्या सर्वांचा उपहास केला, त्यांना ओलांडिलें, व त्यांची अवहेलना करून तो पुढें चालता झाला. तेव्हां त्यांना राग येऊन इंद्राची खोड मोडण्यासाठीं त्यांनीं एक मोठें कृत्य आरंभिलें. विधिपूर्वक अग्नीला होम देऊन अतुल शक्तिमान, इंद्राची गाळण करून सोडणारा, इंद्रापेक्षां शतपट सामर्थ्यवान असा प्रति इंद्र आपल्या तपोबलानें उत्पन्न करण्याच्या खटपटीला ते लागले. तें वर्तमान

ऐकून इंद्र घाबरून जाऊन कश्यप ऋषींना शरण गेला. तेव्हां कश्यप बालखिल्यांकडे गेले व त्यांचें शांतवन करून ह्मणाले, 'ब्रह्मदेवांनीं ह्याला तिन्ही लोकांचा इंद्र केला आहे. तुमचा यत्न तर दुसरा इंद्र निर्माण करण्याचा आहे. हें ब्रह्मदेवांविरुद्ध वर्तन तुह्मांला उचित नाहीं. आतां तुमचे हे यत्न निष्फळ होऊं नयेत ह्मणून तुमच्या तपाच्या प्रभावानें मोठा शक्तिमान पक्ष्यांचा इंद्र उत्पन्न होईल.' हें ऐकून त्या मुनिश्रेष्ठांची पूजा करून ते ह्मणाले, 'आमची ही खटपट इंद्राकरितां चालली असून आपलीही खटपट मुलासाठीं आहे. ह्मणून आमचें सर्व तप आपणालाच आह्मी अर्पण करतों. पुढें आपणाला योग्य दिसेल तसें करा.' इतक्यांत दक्षकन्या विनता कश्यप ऋषींची बायको पुत्रप्राप्तीसाठीं तप करून व्रतस्थ होऊन पुंसवनकालीं कश्यपऋषींकडे आली. तिला ते ह्मणाले, 'प्रिये, तूं जो हेतु धरून आली आहेस तो तुझा हेतु सफल होईल. बालखिल्यांच्या तपोबलानें व माझ्या इच्छाबलेंकरून तुला मोठें बलवान व सर्व जगाला मान्य असे दोन पुत्र होतील. हा गर्भ फार काळजीनें संभाळ. हे पक्ष्यांचे स्वामी होतील,' हें ऋषींचें भाषण ऐकून इंद्र संतुष्ट होऊन स्वर्गाला निघून गेला. विनतेलाही आपला हेतु सफल झाल्यामुळें आनंद झाला. अरुण व गरुड असे दोन पुत्र तिला झाले. त्यांपैकीं अरुण गर्भ पूर्णावस्थेस येण्यापूर्वी सर्व शरीर पूर्ण न बनतां झाला व तो सूर्याचें सारथ्य करूं लागला, व ब्रह्मदेवांनीं गरुडाला पक्ष्यांचा स्वामी केला.'

९ अमृत व उच्चैःश्रवा ह्यांची उत्पत्ति. (१. १७, १९— २४.)

'अमृत व उच्चैःश्रवा यांची उत्पत्ति कशी झाली,' ह्मणून शौनकांनीं विचारल्यावरून सौति ह्मणालेः—

'आपल्या तेजःपुंज सुवर्णशिखरानें सूर्याच्या तेजाला मागें सारणारा, देवगंधर्वांचें वसतिस्थान, पापी लोकांना ज्या ठिकाणीं जातां येत नाहीं, सामान्य जनांला मनानें देखील दुर्गम, अनेक नद्या व वृक्ष यांनीं संपूर्ण, अशा पक्षिसमूहांनीं गलबजलेल्या गगनचुंबित मेरुपर्वताच्या रत्नखचित शिखरावर चढून देव दैत्यांचा त्रास झाल्यामुळें अमृत कसें मिळेल ह्याविषयीं विचार करूं लागले. त्या ठिकाणीं भगवान नारायण ब्रह्मदेवांना ह्मणाला, 'सर्व वनस्पति व रत्नें एकत्र करून देव व दैत्य ह्यांच्या साह्यानें मंदराचलाला रवि व वासुकीला दोरी करून अमृतासाठीं समुद्रमंथन करा.' तेव्हां ज्याचें शिखर मेघांनीं अगदीं झांकून गेलें होतें, व ज्या ठिकाणीं अनेक पक्ष्यांनीं व सर्पादि श्वापदांनीं आपलें कायमचें बिऱ्हाड केलें होतें, अशा त्या अकरा हजार योजनें उंच व तितकाच खोल गेलेला जो देव, किन्नर, इत्यादिकांचें विहारस्थान मन्दार पर्वत तो देव उपटूं लागले असतां त्यांना तो उपटवेना ह्मणून ते ब्रह्माविष्णू बसले होते त्या ठिकाणीं येऊन त्यांना ह्मणाले, 'आपण कृपा करून हा पर्वत उपटण्याला आह्मांला शक्ति या.' बरें ह्मणून विष्णूनें शेषाला आज्ञा केली. नारायणाच्या प्रसादानें त्याच्या अंगांत विलक्षण बळ येऊन त्या पर्वताला त्यावरील सर्व चराचरांसह त्यानें उपटून काढलें. पुढें देवांनीं त्याला समुद्रतीराला नेलें व 'अमृतासाठीं तुला आह्मी घुसळणार,' असें ते समुद्राला ह्मणाले. 'ह्या देवकार्यांत माझाही कांहीं अंश असूं या,' असें ह्मणून समुद्रानें कूर्म राजाला मन्दार पर्वताला टेका देण्यास सांगितलें. त्याच्या आज्ञेप्रमाणें कूर्मानें त्याला आपली पाठ दिली. इंद्रानें आपल्या वज्रानें त्या पर्वताला त्याच्या पाठीवर घट्ट बसविलें व मंदराला रवि व वासुकीला दोरी करून देवदानव समुद्रमंथन करूं लागले. दैत्य त्या वासुकी नागाच्या तोंडाच्या बाजूला होते व देव शेपटीकडे होते. भगवान नारायण नागाची फडी उचलून उचलून पाण्यावर आपटीत होता. त्यावेळीं नागराजाच्या तोंडांतून श्वासाबरोबर धूर व विस्तव बाहेर पडत होता. त्यांचे विजेसह मेघ बनून मोठी वृष्टि झाली. मंथन चालले असतां त्या पर्वताशिखरापासून देवांवर पुष्पवृष्टि चालली होती, व मेघगर्जनेप्रमाणें मोठा शब्द होत होता. अनेक जलचरांचा त्या पर्वताखालीं सांपडून चुराडा उडत होता. त्यावरील मोठमोठीं झाडें एकमेकांवर आपटल्यामुळें उमळून पडत होतीं. त्यांच्या घर्षणापासून निघणारा विजेसारखा अग्नि निळ्या ढगांनीं झांकून गेलेल्या पर्वताला वेष्टून राहून तेथील सर्व गजसिं-

ादि श्वापदांना जाळून टाकीत होता. इंद्रानें तो पेटलेला अग्नि विझविला. त्यावेळीं अनेक झाडांचे व नानाप्रकारच्या वनस्पतींचे रस पाण्यांत गळले. अमृततुल्य त्या रसमिश्रित पाण्याच्या योगानें देव अमर झाले. पुढें त्या रसमिश्रित पाण्यापासून दूध झालें व त्यापासून तूप उत्पन्न झालें. नंतर वरद भगवान जे ब्रह्मदेव त्यांना देव ह्मणाले, 'आह्मी अगदीं थकलों आहों. भगवान नारायणाखेरीज आह्मीं किती जरी खटपट केली तरी अमृत बाहेर पडण्याचें चिन्ह दिसत नाहीं. ह्मणून आह्मांला सामर्थ्य देण्याविषयीं त्यांची प्रार्थना करा.' तेव्हां ब्रह्मदेवांनीं विष्णूची प्रार्थना केली. विष्णूनें त्या सर्वांच्या ठिकाणीं आपलें तेज घातलें, व काम अधिक नेटानें चालविण्यास सांगितलें. नारायणाच्या भाषणानें हुरूप येऊन त्या सर्वांनीं एक जुटीनें फिरून समुद्र जोरानें घुसळण्यास सुरवात केली, तेव्हां प्रथम शीतांशु चन्द्र समुद्रांतून बाहेर पडला. नंतर पांढरें वस्त्र नेसलेली लक्ष्मी बाहेर आली. पुढें पांढरा घोडा व कौस्तुभ मणि निघाले; हा मणि नारायणानें आपल्या गळ्यांत धारण केला. लक्ष्मी देवांच्या बाजूला गेली. पुढें मूर्तिमंत धन्वन्तरी हातांत अमृतकलश घेऊन बाहेर पडला. त्याला पाहून, 'हें आह्मांला पाहिजे, हें आह्मांला पाहिजे;' अशी दैत्यांची अमृतासाठीं एकच धांदल उडून गेली. नंतर चार पांढरे शुभ्र दांत असलेला ऐरावत हत्ती बाहेर आला. तो इंद्रानें आपल्याकरितां ठेविला. पुढें फार जोराच्या घुसळण्यानें मोठ्या जाज्वल्य अग्नीप्रमाणें जालीम कालकूट विष बाहेर पडलें. तें ब्रह्मदेवांच्या विनंतीवरून शंकरांनीं आपल्या कंठामध्यें धारण केलें, ह्मणून त्यांस **नीलकंठ** असें नांव मिळालें हा अद्भुत चमत्कार पाहून अमृत व लक्ष्मी हीं मिळविण्याची अनावर इच्छा होती तरी दानवांना देवतीं आपल्या हातीं लागूं देतीलसें वाटेना. नंतर नारायण मोहिनीचें रूप घेऊन दैत्यापुढें उभा राहिला. तेव्हां त्या मूर्खांना भुरळ पडून त्यांनीं तें अमृत तिच्या स्वाधीन केलें व सशस्त्र होऊन देवांवर धांवले. इकडे देवांनीं तें अमृत विष्णूपासून घेऊन प्राशन केलें. देव तें पीत असतां राहु नांवाचा दैत्य देवाचें रूप धरून त्यांच्यामध्यें शिरला व त्यांबरोबर तें अमृत प्याला. तें त्याच्या गळ्यापर्यंत गेलें नाहीं तोंच देवांचें हित करण्यासाठीं चंद्रसूर्यांनीं ती बातमी विष्णूला दिली व विष्णूनें त्या दैत्याचें डोकें उडविलें. तें त्याचें पर्वतप्राय मस्तक आकाशांत उडालें व धड जमिनीवर पडलें. ह्या चहाडीबद्दल सूड घेण्याकरितां राहु अद्यापि मधून मधून चन्द्रसूर्यांना गिळतो. भगवानानें आपला स्त्रीवेष टाकून दिला. नंतर लवण समुद्राजवळ देवदैत्यांचें घोर युद्ध झालें. अणकुचीदार भाले, बरच्या, इत्यादि नानाप्रकारच्या शस्त्रांचे प्रहार होऊं लागले. दैत्यांना दे माय धरणी ठाव होऊन ते रक्त ओकूं लागले. रक्तबंबाळ होऊन पृथ्वीवर पडलेले दैत्य मनःशिलेनें आच्छादित पर्वतशिखराप्रमाणें दिसत होते. संध्याकाळचे वेळीं भयंकर कत्तल सुरू झाली. 'कापा, तोडा, धांवा, पाडा, पुढें सरा,' अशा प्रकारच्या शब्दांनीं आकाश दुमदुमून राहिलें. इतक्यांत भगवान नारायणानें शत्रूंना ताप देणारें आपलें भयंकर सुदर्शन चक्र सोडून हजारों दैत्यांचा चुराडा उडविला. तेव्हां दैत्य समुद्रांत दडले. ह्याप्रमाणें दैत्यांवर जय मिळवून त्यांनीं मंदाराला परत आपल्या जागीं पोहोंचविलें. इकडे आपण अमृत पीत असतां चंद्रसूर्यांनीं आपली चहाडी केली ह्मणून राहूचें त्यांच्याशीं कायमचें वैर जडलें. आपल्याला वरचेवर राहूचा त्रास होतोसें पाहून सूर्याला राग आला, 'सर्व देवांच्या हितासाठीं मला एकट्यालाच त्यांच्याशीं वैर जोडून घ्यावें लागलें, हें अनर्थकारक पाप मात्र माझ्या माथीं बसलें. **संकटसमयीं कोणी साहाय्य होत नाहीं.** देव तर प्रेक्षकांप्रमाणें राहु मला गिळतांना खुशाल पहात बसतात. ह्मणून हें दुष्ट विश्वच मी जाळून टाकितों.' असा निश्चय करून सूर्य कांहीं काळ न उगवतां मेरु पर्वतांत लपून बसला. महर्षींनीं हा वृत्तांत देवांना जाऊन कळविला. त्याच दिवशीं मध्यरात्रीं सर्व लोकांना भयप्रद व तिन्ही लोक जाळून भस्म करणारा अग्नि उत्पन्न होणार हें वर्तमान त्या ऋषींपासून ऐकून त्यांसह देव ब्रह्मदेवांकडे गेले व 'कसें तरी हें अरिष्ट टाळा,' ह्मणून त्यांनीं त्यांची विनंती केली. ब्रह्मदेव ह्मणाले, 'विश्वाच्या नाशासाठीं आपलें प्रखर तेज प्रकट करण्याचा सूर्याचा उद्देश आहे खरा व तसा तो उग-

वेल तर खाजीनें सर्व लोक भस्म होऊन जातील. पण मीं ह्याबद्दल पूर्वीच तजवीज केली आहे. कश्यप ऋषींचा मोठा तेजस्वी मुलगा अरुण ह्याच्या आड घेऊन त्याचें तेज कमी करून तो त्याचें नेहमीं सारथ्य करील. व पुढें सूर्यापासून कोणाला कांहीं ताप होणार नाहीं.' पुढें सूर्यानें आपलें प्रखर तेज प्रगट केलें असतां ब्रह्मदेवांनीं ह्मटल्याप्रमाणें सर्व घडून आलें. त्या वेळेपासून अरुण सूर्याचें सारथ्य करीत आहे.'

---

१० मातृशापपरिहारार्थ शेष व वासुकि ह्यांचा यत्न. (१. ३६-३९)

मातृशाप ऐकून शेष व वासुकि ह्यांनीं काय केलें,' ह्मणून शौनकांनीं विचारलें असतां सौति ह्मणालेः—

'नागांच्या आईनें त्यांना शाप दिला त्या वेळीं मोठ्या कीर्तिमान वायु भक्षण करून राहणाऱ्या व नेमिष्ठ शेषानें आपली आई व भाऊ ह्यांना सोडून दिलें व इंद्रियनिग्रह करून गंधमादन पर्वतावरील बदर्यादि पवित्र व निर्बाध अशा निर्जन प्रदेशांतून तो एकटा फिरत होता. जटावल्कलें धारण करून व शरीर सुकवून तप करतांना तो ब्रह्मदेवांच्या दृष्टीस पडला. ब्रह्मदेव त्याला म्हणाले, 'शेषा, तूं हें काय आरंभिलें आहेस. लोकांकडे कांहीं तरी नजर दे. ह्या तुझ्या उग्र तपानें लोकांना फार ताप होत आहे. तुझ्या मनांत तरी काय आहे तें मला सांग.' शेष म्हणाला, 'माझे सर्व भाऊ कोत्या व दुष्ट बुद्धीचे आहेत. यांच्याबरोबर राहणें कठिण झालें आहे. तर त्यांची संगति मी इच्छित नाहीं. वैऱ्याप्रमाणें ते नेहमीं एकमेकांचा द्वेष करतात. म्हणून ह्यांचें तोंड पाहूं नये असा निश्चय करून मीं येथें तप आरंभिलें आहे. विनतेचा व°तिच्या मुलांचा ते हेवा करतात. आमचा भाऊ जो विनतेचा मुलगा गरुड तो त्यांच्या डोळ्यांत सलतो. तो नर वडिलांच्या अनुग्रहानें सर्वांपेक्षां बलाढ्य आहे. म्हणून मी तप करून ह्या देहातून मुक्त होऊं इच्छितों. अन्य जन्मीं तरी ईश्वररूपेनें अशांचा संग सुटो.' हें ऐकून ब्रम्हदेव म्हणाले, 'शेषा तुझ्या भावांचीं कर्में मला ठाऊकच आहेत. तुझ्या आईच्या शापामुळें त्यांवर मोठें संकट ओढवणार आहे. पण तुझ्यासारख्या सज्जनाचा त्यावेळीं बचाव व्हावा अशी मीं पूर्वीच तरतूद करून ठेविली आहे. भावांसंबंधानें मात्र मनाला कांहीं वाईट वाटून घेऊं नकोस. तुला वाटेल तो वर माझ्यापासून मागून घे. तुझ्या ठिकाणीं माझें पूर्ण प्रेम आहे. तुझी बुद्धि धर्माकडे लागली हें फार चांगलें झालें. आतां तिला त्यांतच दृढ कर.' शेष ह्मणाला, 'हे प्रभो, धर्म, शान्ति आणि तप ह्यांमध्यें माझी बुद्धि नेहमीं न ढळतां रमो.' हें ऐकून ब्रह्मदेव ह्मणाले,' ह्या तुझ्या भाषणानें मी संतुष्ट झालों आहें. माझ्या आज्ञेनें तूं माझें एक काम कर. ही सर्व चराचरांनीं युक्त पृथ्वी डळमळली आहे. तिला टेंका देऊन तूं पूर्वीप्रमाणें स्थिर कर.' यावर 'आपण ती माझ्या डोक्यावर उचलून द्या ह्मणजे तिला मी हालूं देत नाहीं,' असें शेषाचें भाषण ऐकून ब्रह्मदेव ह्मणाले, 'सर्वश्रेष्ठा, पृथ्वीच्या पोटांत शीर, ती आपण होऊनच तुला मार्ग देईल, हिला तूं मस्तकावर धरल्यानें माझें मोठें काम होणार आहे.' ह्याप्रमाणें शेष समुद्रवलयांकित पृथ्वी अद्यापि आपल्या डोक्यावर घेऊन पाताळ लोकीं रहात आहे. ब्रह्मदेवांनीं गरुडाला त्याचे साह्याला दिलें.

इकडे वासुकि आईचा शाप झाल्यावर त्याचा प्रतिकार कसा करावा ह्मणून भावांशीं विचार करूं लागला. कारण दुसऱ्या कोणत्याही शापापासून आपल्याला सोडवून घेतां येतें परंतु प्रत्यक्ष मातृशाप मात्र टाळतां येत नाहीं. तो ह्मणाला, 'प्रत्यक्ष सत्यस्वरूपी ब्रह्मदेवांसमक्ष हा शाप झाला आहे. तेव्हां हें मोठें अरिष्ट आहे. आपला सर्वांचा नाश खास होणार. सर्वांनीं मिळून कांहीं तरी बचावाचा उपाय केला पाहिजे. आपण सर्व कुशाग्र बुद्धीचे आहों. विचारांतीं एखादा उपाय सुचेल. तो यज्ञ कसा बंद करतां येईल, अगर त्यांत कांहीं अडचणी आणतां येतील किंवा नाहीं ह्याचा विचार केला पाहिजे.' ह्याप्रमाणें सर्व नाग एकत्र जमून विचार करूं लागले असतां कांहीं ह्मणाले, 'आह्मी कडक्कडीत ब्राह्मणाचें रूप घेऊन जनमेजयाला यज्ञ दबं करण्यास सांगूं.' कांहीं पंडितंमन्य ह्मणाले,

आह्मी त्याच्या मर्जीतल्या प्रधानांचीं रूपें घेऊं. मग तो सर्व गोष्टींत आमचा सल्ला घेऊं लागला ह्मणजे जेणेंकरून तो यज्ञ बंद पडेल अशी आह्मी त्याला मसलत देऊं. अथवा त्या यज्ञाचा जो कोणी ऋत्विज असेल त्यालाच कोणी तरी जाऊन चावूं. याजकच मेला ह्मणजे अर्थात् यज्ञ बंद पडेल. इतर याज्ञिकांनाही आह्मी जाऊन चावूं.' त्यांत कांहीं धर्मात्मे होते ते ह्मणाले, 'ही तुमची मसलत चांगली नाहीं. ब्रह्महत्येसारखें दुसरें पातक नाहीं. **संकटसमयीं सद्धर्ममूलक शांतिच मनुष्याला श्रेयस्कर आहे. अधर्म केवळ नाशाला कारण होतो.** 'विजेनें युक्त असे मेघ होऊन त्याचा पेटलेला अग्नि विझवून टाकूं, अथवा रात्रीं याज्ञिक झोंपेंत असतांना त्यांचीं यज्ञपात्रें चोरून नेऊं, मलमूत्रांनीं त्यांचें अन्न दूषित करूं,' असें कांहीं ह्मणूं लागले. कांहीं ह्मणाले, 'तो राजा जलक्रीडा करण्याला गेला असतां त्याला इकडे आणून बांधून ठेवूं अगर त्याला चावूं. तो मेला ह्मणजे अनर्थाचें मूळच नाहींसें होणार आहे. हे वासुके, हें आह्मा सर्वांचें मत आह्मीं कळविलें आहे. आतां तुला जें योग्य वाटेल तसें तूं वेळ न दवडतां कर.' असें ह्मणून सर्व वासुकीच्या तोंडाकडे पाहूं लागले. वासुकि विचार करून ह्मणाला, 'बाबांनो, मला तुमचा कोणाचाच विचार पसंत नाहीं. ज्यांत तुमचें कल्याण असेल तें मला केलें पाहिजे. कश्यपांना संतुष्ट करून त्यांचा अनुग्रह मिळवावा हेंच मला बरें दिसतें. जातीच्या व स्वतःच्या हिताकडे पाहिलें असतां तुमचा कोणाचाच सल्ला मला पसंत नाहीं. कांहीं बरें वाईट झालें तर त्याचें खापर माझ्या डोक्यावर फुटणार; ह्मणून मला जें करणें तें मोठ्या काळजीपूर्वक केलें पाहिजें.' हें वासुकीचें भाषण ऐकून एलापुत्र ह्मणाला, 'तो यज्ञ कालांतरीं बंद पडणार नाहीं. तो राजा सत्यप्रतिज्ञ आहे. दैव फिरल्यावर प्राण्याला नशिबावर हवाला ठेवून राहण्याखेरीज दुसरा उपाय नाहीं. ह्मणून आतां येईल त्याला डोकें देऊन स्वस्थ राहणेंच शहाणपणाचें आहे. आई शाप देतेवेळीं भयानें तिच्या मांडींत शिरलों असतां देवांचें पुढील भाषण माझ्या कानावर पडलें. 'अशीं मुलें मिळालीं असतां कद्रूशिवाय *दुसरी एखादी बायको त्यांना असा घोर शाप देईल काय? ब्रह्मदेव, आपणही शाप देतांना ऐकत असून मुकाट्यानें बसला ह्यांतलें गूढ आह्मांला कळत नाहीं.' तेव्हां ब्रह्मदेव ह्मणाले, 'पुष्कळ क्रूर, विषारी आणि पापाचरण करणारे साप आहेत. त्यांचा ह्या शापानें नाश होईल. जे सन्मार्गानें जाणारे आहेत त्यांचें त्यावेळीं जरत्कारूंचा मुलगा आस्तीक यज्ञ बंद पाडून रक्षण करील. ह्या जरत्कारूपासून त्याच नांवाच्या बायकोला हा आस्तीक होईल.' ह्मणून वासुके, ज्या वेळीं हे जरत्कारु कन्येची भिक्षा मागण्यासाठीं पृथ्वी-पर्यटणाला निघतील त्या वेळीं त्यांना आपली बहीण दे.' हें त्याचें भाषण ऐकून सर्वांना आनंद होऊन ते ह्मणाले, 'शाबास शाबास!' त्या वेळेपासून वासुकीनें आपल्या बहिणीचें मोठ्या काळजीपूर्वक जतन केलें. देवदानवांनीं समुद्रमंथन केलें त्यावेळीं वासुकीनें दोरीच्या ऐवजीं उपयोगीं पडून देवांना साहाय्य दिलें. त्यावेळीं देव संतुष्ट होऊन ब्रह्मदेवांना ह्मणाले, 'मातृशापानें हा वासुकि फार घाबरला आहे त्यांच्या मनांतलें एवढें शल्य उपटून टाका. हा आमचा साह्यकारी असल्यामुळें आपण ह्यावर कृपा केली पाहिजे!' तेव्हां ब्रह्मदेवांनीं वासुकीला आपली बहीण जरत्कारूंना देण्यास सांगितलें, व 'त्यांपासून होणाऱ्या मुलाकडून तुमचें रक्षण होईल,' असें ते ह्मणाले. हा ब्रह्मदेवांचा उच्छाप वासुकीनें सर्वांना सांगून त्यांना जरत्कारूंच्या शोधाला पाठविलें. इकडे जरत्कारु पितरांच्या आज्ञेनें बायकोसाठीं सर्व पृथ्वी हिंडत असतां ते वासुकीच्या हेरांना भेटले. त्यांनीं त्यांना आदरपूर्वक वासुकीकडे नेलें; व वासुकीनें आपली बहीण त्यांना दिली, व पुढें तिच्यापासून होणाऱ्या आस्तिकापासून भल्या नागांचें रक्षण झालें.'

---

११ परिक्षिताची कथा.

(१ ४०. ४३–५०)

सौति ह्मणाले, 'कौरवकुलांत कोणी परिक्षित नांवाचा धर्मात्मा, शूर व प्रजापालक राजा होऊन गेला. त्या श्रीमान व अतुल पराक्रमी राजानें भूमातेचें यथायोग्य रक्षण केलें. त्याचा कोणी द्वेष करीत

नसून तो कोणाचा द्वेष करीत नसे. सर्वांचे ठिकाणीं त्याचा समभाव असे. चारी वर्णांचे लोक त्याचें चांगलें वळण गिरवून आपापल्या धर्मानें रहात असत. विधवा, अनाथ, पंगू इत्यादि दुबळ्यांकडे बापाप्रमाणें त्याचें लक्ष असे. भगवान श्रीकृष्णाची त्यावर मोठी कृपा होती. कुरुकुलाचा नाश झाल्यावर तो उत्तरेचे पोटीं जन्माला ह्मणून ह्या अभिमन्युपुत्राचें **परिक्षित** असें नांव पडलें. त्यानें प्रजेचें साठ वर्षं चांगलें पालन केलें. त्याला शिकारीचा नाद फार असे. तो एकदां तीक्ष्ण बाणानें मृगाला मारून किर्र अरण्यांतून आकाशामध्यें यज्ञमृगाच्या मागें लागलेल्या शंकरांप्रमाणें त्याच्या मागून चालला असतां बाण लागलेल्या त्या मृगामागून राजा फार दूर गेल्यामुळें थकून तहानेनें अगदीं व्याकूळ झाला. फिरतां फिरतां एक मुनी त्याच्या दृष्टीस पडले. त्यांना त्यानें विचारलें 'भगवन्, मी अभिमन्युपुत्र परिक्षित राजा आहें. माझा बाण लागून पळालेला एक मृग आपल्या दृष्टीस पडला काय?' त्या ऋषींनीं मौन व्रत धरलें असल्यामुळें कांहीं उत्तर दिलें नाहीं. यामुळें रागावून त्यांच्या गळ्यांत एक मेलेला साप अडकवून राजा आपल्या नगराकडे चालता झाला. त्या क्षमाशील ऋषींनीं त्या धर्मरत राजसिंहाला तो अपराधी असतांही शाप दिला नाहीं. त्या ऋषींचा पक तरुण, तेजस्वी व तापट स्वभावाचा शृंगी नांवाचा मुलगा होता; तो खेळत असतांना त्याचा मित्र थट्टेत त्याला ह्मणाला, 'तूं इतका तेजस्वी असून तुझ्या बापाच्या गळ्यांत मेलेला साप अडकविला आहे. वृथा डौल कशाला मिरवितोस? तुझा मीपणा केवढा? तुझी बडबड किती? आणि ही मानहानि केवढी? तुझे वडील शांत स्वभावाचे आहेत खरे, पण इतकी शांति उपयोगाची नाहीं.' हें ऐकून शृंगी संतापून गेला. त्यानें विचारलें 'कोणी बरें बाबांच्या गळ्यांत मेलेला साप अडकविला?' मित्रानें उत्तर केलें, 'परिक्षित राजा हरणाच्या मागें लागून आला असतां त्यानें तुझ्या बापाच्या गळ्यांत साप अडकविला.' हें ऐकून रागानें डोळे लाल करून विकारवश झाल्यामुळें, 'ज्यानें ह्या माझ्या कडाळू बाबांच्या गळ्यांत मेलेला साप अडकविला त्या ब्राह्मणअवहेलक कुरुकुलकलंक्याला सात दिवसांच्या आंत सर्पदंश होऊन मरण येईल,' असा त्यानें राजाला शाप दिला. हा शाप देऊन गोळ्यांत बापाकडे येऊन त्यांच्या गळ्यांत मेलेला साप पाहून त्याला फिरून फार संताप झाला व आपण त्या कुरुकुलाधमाला तक्षकदंशानें सात दिवसांच्या आंत मरण येईल ह्मणून शाप दिलेलें वर्तमान त्यानें आपल्या बापाला कळविलें. त्याला त्याप्रमाणें अगदीं संतापलेला पाहून ऋषी ह्मणाले, 'हें तुझें कृत्य मला पसंत नाहीं. हा तापसांचा धर्म नव्हे. आपण त्या धर्मनिष्ठ राजाच्या राज्यांत राहतों. तो आमचें यथायोग्य रक्षण करीत आहे. त्याचें वाईट करण्याचें माझ्या मनांत देखील येत नाहीं. राजाला क्षमा करणें आपला धर्म आहे. **धर्म सोडल्यानें कधीं कल्याण होत नाहीं.** राजानें आपलें रक्षण केलें नसतें तर आपल्याला पुष्कळ त्रास सोसावा लागला असता, व आपल्याला मनाप्रमाणें धर्माचरण करतां आलें नसतें. आपण जें यथेच्छ धर्माचरण करतों त्यांत ह्या पुण्यशील राजाचा वांटा आहे. राजानें कांहीं केलें तरी तें क्षम्य आहे. विशेषेंकरून परिक्षितासारख्या राजाला तर क्षमा केलीच पाहिजे. दमून क्षुधापीडित झाला असल्यामुळें त्याच्या हातून हा अपराध घडला असावेंसें मला वाटतें. **अराजक देशावर नानाप्रकारचीं संकटें ओढवतात, आडमार्गानें जाणारांना राजाच नेहमीं शिक्षा करून ताळ्यावर आणतो व शिक्षेच्या भीतीनें नेहमीं शांतता राहते.** शांतता नसली कीं, धर्माचरण किंवा इतर व्यवसाय चालणार नाहींत. धर्माला बळकटी राजामुळें येते व धर्मानें स्वर्ग मिळतो. यज्ञयागादि क्रियांना राजाच कारण आहे. देव यज्ञावर असून पावसाला ते कारण आहेत व अन्न पावसावर आहे; ह्मणून **अज्ञानें नेहमीं प्रजेचें पालन करणाऱ्या राजाची योग्यता दहा श्रोत्रियांबरोबर आहे असें मत्यक्ष मनु ह्मणतो.** पोरस्वभावामुळें अविचारानें ही अनुचित गोष्ट तुझ्या हातून घडली आहे. राजाला शाप देणें आमच्यासारख्यांना उचित नाहीं.' शृंगी ह्मणाला, 'झाल्या गोष्टीला अविचार ह्मणा, पोरस्वभाव ह्मणा, बरें ह्मणा अगर वाईट ह्मणा; माझें भाषण मात्र

कधीं खोटें होणार नाहीं. कारण थेटेंत देखील मला असत्य भाषण माहीत नाहीं.' शमीक म्हणाले, 'तुझा तापट स्वभाव व सत्यप्रियता मला माहीत असल्यामुळें तुझें भाषण खोटें होणार नाहीं हें मी जाणतों. **मुलगा किती मोठा झाला तरी बापानें त्याला उपदेश केला पाहिजे म्हणजे तो गुणवान होऊन कीर्ति मिळवितो** म्हणून मी सांगतों. तूं अद्यापि लहान असून तपाचा तुला मोठा अभिमान आहे. **अंगीं शक्ति असली म्हणजे त्याबरोबर राग फार असतो.** तूं माझा मुलगा असून अद्यापि लहान व अविचारी आहेस म्हणून मला तुला कांहीं उपदेश करावासें वाटतें. धर्मसंचयाकडे लक्ष देऊन फलमूलादिकांवर राहून राग अगदीं सोडून दे; कारण **राग हा यतींच्या कष्टसंचित धर्मावर पाणी पाडतो, व धर्महीन मनुष्याला सद्गति मिळत नाहीं. क्षमाशील यतींच्या कार्यसिद्धीला शांतिच मुख्य साधन आहे,** व क्षमाशीलांनाच इहलोक व परलोक मिळतात; म्हणून क्षमा धरून इंद्रियें स्वाधीन ठेवून नेहमीं धर्माचरण कर. मी तर शांत आहें, व ह्यावेळीं प्रसंगाला उचित तें करणार. 'राजा, माझा मुलगा लहान व पोरबुद्ध असल्यामुळें तूं केलेली अप्रतिष्ठा त्याला सहन न होऊन सात दिवसांच्या आंत तक्षक चावून तूं मरशील, असा त्यानें तुला अविचारानें शाप दिला आहे, खबरदारी घे,' असा मी त्याला निरोप पाठविणार.' असें म्हणून शिष्याकडून त्यानें राजाला बोलल्याप्रमाणें निरोप पाठविला. मुलाचा राग शांत न करतां आल्यामुळें ऋषींनीं आपल्याला सावध रहाण्यासाठीं पाठविलेला निरोप व त्यावेळीं ते ऋषी मौनव्रत होते ही बातमी शिष्याच्या तोंडून ऐकून राजाला फार वाईट वाटलें. आपल्या हातून घडलेल्या अविचाराबद्दल त्याला जितकें वाईट वाटलें तितकें ती मरणाची वार्ता ऐकून देखील त्याला वाटलें नाहीं. व 'ऋषिमहाराजांची मजवर अशीच कृपा असावी,' म्हणून त्या शिष्याबरोबर त्यानें उलट निरोप पाठविला; व तो निघून गेल्याबरोबर खिन्न मनानें मंत्र्यांशीं विचार करूं लागला. तो जात्या मोठा मंत्रविशारद असल्यामुळें विचारांतीं त्यानें असें ठरविलें कीं, एका खांबावर एक बंगला उभारावा. त्यांत अनेक वैद्य व औषधें तयार ठेवावीं. वायूचा देखील आंत प्रवेश न होईल अशा बंदोबस्तानें त्या ठिकाणीं आपण मंत्र्यासह राहून सर्व राज्यकारभार पहावा.

इकडे तक्षक परिक्षिताकडे येत असतां वाटेंत त्याला कश्यप नांवाचा कोणी मंत्री ब्राह्मण राजाकडे चाललेला भेटला. त्याला पुष्कळ द्रव्य देऊन माघारा परतवून तो स्वतः नागासह हास्तिनापुराला आला व नागांना ब्राह्मणांचीं रूपें देऊन फलपुष्पदर्भादि देऊन राजाकडे पाठविलें. त्यांनीं तीं राजाला नजर केलीं. त्यांचा स्वीकार करून व त्या ब्राह्मणरूपी नागांचा यथायोग्य सन्मान करून त्यानें त्यांना परत पाठविलें. त्यांनीं आणलेलीं फळें मंत्र्यासहवर्तमान प्रसाद म्हणून भक्षण करीत असतां केवळ दैवगतीनेंच ज्या फळांत तक्षक कृमिरूपानें छपून राहिला होता तें त्यानें स्वतः खाण्याकरितां घेतलें. तो तें खात असतां त्या फळांतून एक किडा बाहेर पडला. त्याला हातांत घेऊन तो प्रधानांला म्हणाला; 'आज सातवा दिवस असून सूर्य तर अस्ताला चालला आहे. आतां विषापासून मरणाची भीति मला दिसत नाहीं. ते ऋषी जर सत्यवाक् असतील तर हा किडाच तक्षक होऊन मला चावो म्हणजे ब्रह्मवाक्याला बाध येणार नाहीं.' असें म्हणून तो किडा मानेवर घेऊन तो हासला. इतक्यांत त्या किड्यानें सर्प होऊन फणा काढून त्याच्या मानेला घट्ट वेटोळा घातला व तो त्या राजाला कडकडून चावला. त्याच्या विषापासून उत्पन्न झालेल्या अग्नीनें तो बंगला पेटला. तें पाहून प्रधानमंडळ भयानें दशदिशेला पळालें व तो राजा विजेचा धक्का बसल्याप्रमाणें धाडकन् जमिनीवर मरून पडला.'

१२ कश्यपाची कथा. (१. ४१–४२)

ह्या कश्यप मंत्र्याची काय हकीकत आहे म्हणून शौनकांनीं विचारल्यावरून सौति म्हणालेः–

'परिक्षित राजाला 'तूं तक्षक चावून सात दिवसांच्या आंत मरशील,' असा ब्रह्मशाप झालेला ऐकून कश्यप नांवाचा कोणी एक ब्राह्मण सर्पदंशापासून राजाला बरें करून त्यापासून पुष्कळ द्रव्य मिळवावें म्हणून त्याकडे चालला असतां वाटेंत ब्रा-

ह्मणरूप धारण केलेला तक्षक त्याला भेटला. त्यानें त्याला 'कोठें चालला आहेस,' ह्मणून विचारलें तेव्हां ब्राह्मणानें त्याला आपली खरी हकीकत सांगितली. तेव्हां तक्षक त्याला ह्मणाला, 'मीच तो तक्षक. माझ्या अगर मजसारख्या दुसऱ्या एखाद्या नागाचें विष उतरण्याची ह्या जगांत कोणाची प्राज्ञा नाहीं. जर तुझ्या अंगांत सामर्थ्य असेल तर ह्या वडाच्या झाडाला मी जाऊन भस्म करतों. कर त्याला फिरून जशाचा तसा. दाखीव पाहूं ह्या ठिकाणीं तुझें सामर्थ्य.' ब्राह्मण ह्मणाला, 'तूं त्याला चाव ह्मणजे मी आपलें सामर्थ्य दाखवितों.' असें ह्मणून सर्पदंशानें जळून गेलेल्या त्या झाडाला त्यानें फिरून पूर्ववत् केलें. तो चमत्कार पाहून तक्षक ह्मणाला, 'ब्राह्मणा, तुझें सामर्थ्य विलक्षण दिसतें, तूं त्या राजाकडे काय हेतू धरून चालला आहेस ? त्या राजापासून तुला जें कांहीं मिळवावयाचें असेल त्याहून शतपट अधिक, मग तें दुर्मिळ असलें तरी, तूं माघारा जात असशील तर मी तुला देतों. ब्रह्मशापानें क्षीणायु झालेल्या त्या राजाच्या ठिकाणीं राहूनें ग्रासलेल्या सूर्याप्रमाणें तुझा प्रयत्न व्यर्थ होणार आहे.' कश्यप ह्मणाला, 'मी द्रव्यासाठीं राजाकडे चाललों आहें. तें तूं देशील तर हा मी परत चाललों.' तक्षक ह्मणाला, 'त्या राजापासून जितकें द्रव्य मिळेलसें तुला वाटतें त्यापेक्षां अधिक मी तुला देतों. परत जा.' हें ऐकून ज्ञानचक्षूंनीं तो राजा खरोखरच क्षीणायु आहेसें पाहून तो ब्राह्मण तक्षकापासून पुष्कळ द्रव्य घेऊन परतला.'

---

१३ जनमेजयसर्पसत्राची कथा.

(१. ५१. ५३–५८)

परिक्षिताच्या मरणाची हकीकत ऐकून जनमेजयानीं काय केलें, ह्मणून शौनकानीं विचारल्यावरून सौति ह्मणालेः–

परिक्षित राजा साप चावून मेल्यावर त्याच्या उपाध्यायांनीं व मंत्र्यांनीं त्याची उत्तरक्रिया विधिपूर्वक करून त्याच्या अल्पवयस्क मुलाला गादीवर बसविलें. हा लहान होता तरी त्याची बुद्धि प्रौढ होती. त्यानें मंत्रिपुरोहिताच्या सल्ल्यानें पितृपैतामह राज्यशकट सुरळीत हाकलें. त्यासाठीं मंत्र्यांनीं काशीप राजाच्या वपुष्टमा नामक मुलीला मागणी घातली. त्या राजानेंही सर्व गोष्टींचा यथायोग्य विचार करून त्या राजसिंहाला वपुष्टमा दिली. ती मिळाल्यानें संतोष होऊन जनमेजय अन्य स्त्रियांकडे लक्ष देईनासा झाला. ह्या पतिव्रतेलाही तो राजसिंह मिळाल्यानें संतोष होऊन ती त्याच्याशीं मोठ्या प्रेमानें रममाण झाली. मंत्र्यांनीं पित्याच्या मरणाची वार्ता कळविली तेव्हां त्याला फार संताप येऊन तो विचार करूं लागला. इतक्यांत वेदांचा उत्तंक नांवाचा शिष्य तक्षकानें केलेल्या अपराधामुळें रागावून त्याचा सूड उगविण्याच्या बुद्धीनें हास्तिनापुराला जनमेजयाकडे आला व संप्रदायानुरूप राजाला जयाशी देऊन दैन्य न दाखवितां तो त्याला गंभीर वाणीनें ह्मणाला, 'नृपश्रेष्ठा, ज्या तक्षकानें तुझ्या पित्याला मारलें त्यावर तूं सूड घे. नियमानियमानें ठरलेल्या कार्याची वेळ येऊन ठेपली आहे. होमकुंडांत त्याची आहुति दे.' हें उत्तंकाचें भाषण ऐकून आगींत तूप ओतल्याप्रमाणें होऊन राजा तक्षकावर फारच संतापला. मग उत्तंकाचें प्रिय करण्याच्या उद्देशानें व पित्याचा सूड उगविण्यासाठीं त्यानें सर्पसत्र करण्याची प्रतिज्ञा केली. मग त्या वाक्यविशारद राजानें पुरोहितांना बोलावून हेतुभरित शब्दांनीं तो त्यांना ह्मणाला, 'ज्या दुष्ट तक्षकानें माझ्या वडिलांना मारलें त्याची ज्याच्या योगानें होमकुंडांत आहुति देऊन मला सूड घेतां येईल असा एखादा विधि हुडकून काढा.' ऋत्विज ह्मणाले, 'राजा, सर्पसत्र नांवाचा यज्ञ देवांनीं तुझ्यासाठीं निर्माण केला आहे.' नंतर तें सत्र करण्याचा राजाचा निश्चय पाहून शास्त्रोक्त तयार केलेल्या मंडपांत ऋत्विजांनीं राजाला सर्पसत्राची दीक्षा दिली, व सर्पसत्राचें काम विधिपूर्वक सुरूं केलें. कृष्णवस्त्रें नेसून धुरानें दोन्ही डोळे अगदीं लाल झालेले हे याजक आपापल्या कामांत गढून गेले. होमकुंड पेटून अग्नींत आहुति देण्याला सुरवात झाली. एकंदर सर्व सापांना कांपरें सुटलें. मंत्र उच्चारून त्या सर्वांना अग्नीकडे बोलाविलें जात असतां ते दीनवाणें शब्द करूं लागले. मृतप्राय होऊन धापा टाकूं लागले व एकमेकांला गुंडाळून घे-

ऊन धडपडत त्या पेटलेल्या अग्नींत येऊन पटापट पडूं लागले. ह्याप्रमाणें हजारों क्रूर सर्पांचा संहार सुरूं झाला. अग्नींत पडणाऱ्या व आकाशांत लोंबणाऱ्या व अग्नीमधून होरपळून बाहेर पडणाऱ्या सर्पांच्या शब्दांनीं जिकडे तिकडे एकच कल्होळ उडून गेला होता. प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें जालीम विषाच्या हजारों धिप्पाड सर्पांची त्यांत आहुति पडली. ह्या प्रसंगीं तक्षक इंद्राला शरण गेला. 'पूर्वी मी तुझ्याकरितां ब्रह्मदेवांना संतुष्ट करून वर मागून घेतला आहे. तुला भीति नाहीं. चिंता बाजूला ठेवून स्वस्थ मनानें ऐस, 'असें इंद्रानें त्याला आश्वासन दिलें. तेव्हां तो तेथें सुखांत राहिला. यज्ञ बंद पाडण्यासाठीं वासुकीनें आस्तिकाला पाठविण्याविषयीं आपल्या बहिणीची विनंती केली. इकडे इंद्रानें तक्षकाला आश्रय दिल्यामुळें तो मेलाच पाहिजे ह्या आग्रहानें राजानें **'इंद्रासह तक्षकाची अग्नींत आहुति द्या,'** ह्मणून ऋत्विजांना सांगितले. जनमेजयाच्या सांगण्यावरून ऋत्विज इंद्रासह तक्षकाची आहुति देतात तों तो व इंद्र आकाशांत गडबडले. इंद्र गर्भगळित झाला व तक्षकाला सोडून त्यानें अमरावतीचा रस्ता सुधारला. तक्षक अग्नींत पडत असतांना 'तुझा यज्ञ बंद पडूं,' दे ह्मणून आस्तिकानें वर मागितला. राजानें त्याला तो दिला व त्याच्या योगानें यज्ञ बंद पडला, व घाबरून आकाशात लोंबणारा तक्षक, वासुकि व आतांपर्यंत बचलेल्या इतर भल्या नागांचें रक्षण झालें.'

१४ राजोपरिचराची व व्यासांच्या उत्पत्तीची कथा. (१, ६३.)

या पुढील सर्व कथा सर्पसत्राचे वेळीं वैशंपायनांनीं जनमेजयाला त्यानें भारत कथा ऐकण्याची इच्छा दाखविल्यावरून सांगितल्या व त्याच सौतीनीं नैमिषारण्यांत शौनकादि ऋषींना सांगितल्या.

राजोपरिचर नामक कोणी धार्मिक राजा होऊन गेला. ह्या राजानें शस्त्र धारण न करितां आश्रमवास पतकरून तप करण्याचा निश्चय केला होता. तपाच्या प्रभावानें हा इंद्रपद कदाचित् पटकावील, अशी भीति पडून इंद्रादिदेव त्याच्याकडे आले ह्न त्यांनीं त्याला चार गोडीगुलाबीच्या गोष्टी सांगून प्रत्यक्ष तपापासून पराङ्मुख केलें. इंद्र ह्मणाला, 'मन स्वस्थ करून नेहमीं सद्वर्तनानें वागून धर्म रक्षण केलें असतां महत् पुण्य संचय होऊन शाश्वत लोकाची प्राप्ति होते. स्वर्गीं राहणाऱ्या माझें तूं, ह्या पृथ्वीवर जो प्रदेश तुला रम्य वाटत असेल तेथें राहून साहाय्य कर. हा चेदी देश पशूंना व प्रजेला सुखदायक, पुण्यप्रद, व धनधान्यानें संपन्न असून प्रतिस्वर्गासारखा आहे. येथील प्रजा धर्मानें व सद्वर्तनानें वागणारी असून समाधानवृत्तीची आहे. ह्यांना थट्टेत देखील खोटें भाषण माहीत नाहीं. येथें गुरुहितामध्यें दक्ष असे कुमार नेहमीं गुरुजनसेवेंत तत्पर असतात. व गाईना कोणी जुवाला जुंपीत नाहीं. चारी वर्णांचे लोक ह्या ठिकाणीं आपापल्या धर्मानें वागत आहेत. त्रिभुवनांत चाललेल्या उलाढाली येथें तुला कळतील. देवांना उपभोग्य अशा स्फटिक विमानांतून आकाशांत तूं ह्या देहानेंच देवांप्रमाणें संचार करशील व हा मान मनुष्यांमध्यें तुलाच राहील. कधीं न कोमेजणारी ही विजयप्रद कमलमाला मी तुला देतों. हिच्यायोगानें युद्धांत तुला जखम लागणार नाहीं. ' सत्यप्रिय व शांत लोकांच्या संरक्षणार्थ इंद्रानें त्याला एक बांबूची काठी दिली. पुढें प्रतिवर्षी इंद्राचें स्मारक ह्मणून तो ती जमिनींत रोंवीत असे. तेव्हांपासून अद्यापपर्यंत राजे लोक वर्षाच्या शेवटच्या दिवशीं काठीचा प्रवेश करून दुसरे दिवशीं ती उभारतात, गंधफुलें वाहून भूषणांनीं अलंकृत करून तिला माळा घालतात व कपडे गुंडाळतात व त्याच्या ठिकाणीं भगवान हंसाची भावना करून पूजा करतात. ह्याप्रमाणें इंद्राच्या कृपेनें व त्याच्या आज्ञेनें त्या राजानें चेदि येथें राहून पृथ्वीचें यथान्याय पालन केलें. ह्याला पांच पुत्र झाले. त्यांना ह्यानें निरनिराळे देश तोडून दिले. ह्याच्या ह्या प्रतापवान पुत्रांनीं अनेक देश आपापल्या नांवांनीं वसविलें. गंधर्व व अप्सरा देखील ह्याच्या सेवेला हजर असत ह्मणून ह्याला **राजोपरिचर** नांव मिळालें. ह्याच्या नगरीजवळूनच वाहणाऱ्या मोत्यांनीं भरलेल्या अशा नदीला कोलाहल नांवाच्या एका सचेतन पर्वतानें कामार्त होऊन अडविलें असतां राजोपरिचरानें त्याला लाथ दिली. त्यासरशीं पडलेल्या विव-

रांतून ती नदी बाहेर पडली. त्या पर्वतापासून ह्या नदीला एक जुळें झालें. तें तिनें आपली सुटका केल्याबद्दल तुष्ट होऊन त्या राजाला अर्पण केलें. त्यांपैकीं जो मुलगा होता त्याला वसूनें पुढें आपला सेनापति केला व जी गिरिका नांवाची मुलगी होती तिच्याशीं स्वतः लग्न लाविलें. ऋतुकालीं ही न्हाऊन शुद्ध होऊन पुत्रप्राप्तीसाठीं त्याजकडे आली. त्याच दिवशीं त्याच्या पित्यानें त्याला अरण्यांत जाऊन मृगया करण्याची आज्ञा केली. ती गुरूची आज्ञा मोडतां येईना. ह्मणून सर्व लक्ष गिरिकेकडे ठेवून तो मृगयेला निघाला. ह्याप्रमाणें कामपिडित फिरत असतां झुबकेदार फुलांच्या शाखांनीं संपन्न अशा एका अशोकाच्या छायेखालीं तो विसावा घेण्यासाठीं बसला. संभोगाची इच्छा अनावर झाल्यामुळें त्याचें रेतस्खलन झालें. तें रेत वाया जाऊं नये व बायकोचा ऋतुही निष्फळ होऊं नये ह्मणून राजानें तें एका पानांत धरलें व धर्माचें ज्ञान पूर्ण असल्यामुळें त्यावर अभिमंत्रण करून जवळच असलेल्या एका शीघ्रगामी गृध्राला हाक मारून त्याला तें घरीं बायकोला नेऊन देण्यास सांगितलें. दुसऱ्या एका गृध्रानें त्याला त्यासह उडतांना पाहून आमिषाच्या भ्रांतीनें त्यावर झडप घातली. दोघांचें चोंचीचोंचींनेंच युद्ध चाललें असतां ते रेत यमुनेच्या पाण्यांत पडलें. त्याठिकाणीं अद्रिका नांवाची कोणी अप्सरा ब्रह्मशापानें मच्छरूपानें संचार करीत होती. तिनें तें चटकन गिळलें. पुढें एकेवेळीं कोळ्यांनीं तिला धरलें. दहाव्या महिन्यांत तिच्या पोटांतून एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन मुलें बाहेर पडलीं. ती अप्सरा लागलीच शापमुक्त झालीं. कोळ्यांनीं जाऊन राजाला ती वर्दी दिली असतां राजानें तो मुलगा आपल्याला ठेवून घेतला. हाच **मत्स्य** नांवाचा धार्मिक राजा झाला. व त्या मुलीला 'तुला ही मुलगी असूंदे,' ह्मणून राजानें कोळ्याच्या स्वाधीन केलें. ती रूपानें व गुणांनीं संपन्न होती पण तिच्या अंगाला मात्र माशाची घाण येत असे.

कोणे एके वेळीं ही कोळ्याची मुलगी **सत्यवती** बापाच्या सांगण्यावरून नदींतून नाव हांकीत असतां तीर्थयात्रा करीत करीत हिंडणाऱ्या पराशर ऋषींच्या दृष्टीस पडली. सिद्धांचे मनाला देखील मोह पाडण्यासारखें तिचें अलौकिक सौंदर्य असल्यामुळें त्या मंजुहासिनीला पाहिल्याबरोबर त्या थोर पुरुषांचें तिच्यावर मन जाऊन 'माझ्याशीं संबंध कर' असें ते तिला ह्मणाले, तिनें उत्तर दिलें. 'महाराज हे पहा, पाण्यांत ऋषी उभे आहेत. त्यांच्या दृष्टीसमोर असें कृत्य कसें करतां येईल ?' हें तिचें भाषण ऐकून त्यांनीं एकदम चोहोंकडे अंधार पाडला. हें पाहून आश्चर्यचकित होऊन ती लाजत लाजत ह्मणाली, 'महाराज, मी कुमारी असून वाबांचा मजवर ताबा आहे. आपल्या मनाप्रमाणें केल्यानें माझ्या कौमाराला बट्टा लागणार आहे. मग मीं घरीं तोंड कसें दाखवावें व जिवंत तरी कसें रहावें ? ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन जें उचित असेल तें करा ?' ह्या भाषणानें संतुष्ट होऊन ऋषी ह्मणाले, 'माझें प्रिय केल्यानें तुझा कौमार्यभंग होणार नाहीं. पाहिजे तो वर मागून घे. माझी कृपा आजपर्यंत कधीं व्यर्थ झाली नाहीं.' हें ऐकून माशाची घाण जाऊन अंगापासून नेहेमीं घमघमाट सुवास सुटावा असा तिनें त्यांपासून वर मागून घेतला व त्या वरप्राप्तीनें तुष्ट होऊन स्त्रियांना लागणाऱ्या गुणांनीं मंडित अशा त्या सत्यवतीनें त्या अतर्क्य सामर्थ्यवान ऋषींशीं संबंध केला व त्यापासून गर्भ राहून तिला कृष्णद्वैपायन झाले. जन्मतांच, 'प्रसंगीं आठवण केल्याबरोबर मी तुझ्यापुढें येऊन हजर राहीन,' असें तिला सांगून ते तपश्चर्येला निघून गेले. लहानपणींच त्यांना द्वीपावर सोडल्यामुळें त्यांचें **द्वैपायन** नांव पडलें. युगायुगाला चतुर्थांशानें धर्म कमी होत जाणार हें जाणून व मनुष्यांची आयुर्मर्यादा, सामर्थ्य व सत्ययुगाची स्थिति लक्षांत घेऊन ब्रह्मदेव व ब्राह्मण यांच्यावर कृपा करण्याच्या बुद्धीनें त्यांनीं वेदांची व्यवस्था लाविली ह्मणून त्यांना **व्यास** हें नांव मिळालें. महाभारत धरून पंचवेद त्यांनीं सुमंतु, जैमिनि, पैल, आपला मुलगा शुक व वैशंपायन ह्यांना पढविलें. हेंच व्यास महाभारताचे कर्ते होत.

१५ राजांचा पृथ्वीवर अवतार. (१. ६४)

'देवांसारखे वीर्यशाली राजे पृथ्वीवर कां अवतरले,' म्हणून जनमेजयानें विचारल्यावरून वैशंपायन म्हणालेः—

'पूर्वी एकवीसदां पृथ्वी निःक्षत्रिय करून परशुराम पर्वतश्रेष्ठ महेंद्रावर तप करण्याकरितां गेले. त्यानंतर क्षत्रियस्त्रियांनीं अपत्यांसाठीं ब्राह्मणांशीं संबंध केला. तपानें जाज्वल्य अशा ब्राह्मणांनीं कामहेतु न धरतां केवळ धर्मबुद्धीनें ऋतुकालीं त्यांशीं संबंध करून त्यांना अपत्यप्राप्ति करून दिली. त्यांना मोठे पराक्रमी मुलगे झाले. त्याप्रमाणें ऋषींपासून क्षत्रिय कुल फिरून उदयाला येऊन त्यांतील राजे धर्मानें चालत असल्यामुळें दीर्घायुषी झाले. ह्याप्रमाणें ब्राह्मणोत्तर चार वर्ण व पशुपक्ष्यादि प्राणी ह्यांचा त्यावेळीं स्त्रीशीं केवळ ऋतुकालीं संबंध होत असे. सर्व धर्मानें चालत असल्यामुळें आधिव्याधि वगैरे पीडा त्यांना स्वप्नींही माहीत नसे. अनेक गिरिकाननें व नगरें यांनीं शोभायमान अशा पृथ्वीचें स्वामित्व क्षत्रियांकडे आलें व ते न्यायानें तिचें पालन करीत असल्यामुळें ब्राह्मणादिवर्ण मोठ्या सुखांत होतें. **कामक्रोधादि विकारांच्या वश न होतां राजे अपराध्यांनाच शासन करून प्रजेचें यथायोग्य पालन करीत होते** व धर्ममार्गापलीकडे त्यांचें वर्तन नसल्यामुळें इंद्रही वादेल त्या ठिकाणीं वादेल त्यावेळीं पाऊस पाडून प्रजा सुखी ठेवीत असे. त्यावेळीं कोणी अल्पवयस्क मरत नसे व तारुण्य येण्यापूर्वी कोणाला विषय माहीत होत नसे. ह्याप्रमाणें ही समुद्रवलयांकित पृथ्वी दीर्घायुषी लोकांनीं भरली होती. क्षत्रिय अनेक मोठमोठे यज्ञ करून त्यांत पुष्कळ दक्षिणा देत होते. ब्राह्मण सांग उपनिषदें व वेद ह्यांचें परिशीलन करीत होते. वेदविक्रय होत नसून शूद्रांपुढें वेदोच्चारण कधीं होत नसे. त्याचप्रमाणें वैश्य बैलाच्या साह्यानें शेतकी करीत असत. गाई नांगराला कधीं धरीत नसत. गाईपुढें गवत टाकल्याशिवाय लोक तिची धार काढीत नसत. वाणी लोक खोट्या मापानें माल विकीत नसत. लोकांचें धर्माकडे लक्ष असून कोणतेंही धर्मांत सांगितलेलें कृत्य दक्षतेनें केलें जाई. कोणी आपला धर्म सोडीत नसे. त्या काळीं धर्माचा ऱ्हास माहीत नसून गाई व बायका वेळेवर प्रसूत होत असत. त्या त्या ऋतूंत झाडें पुष्पफलांनीं संपन्न होत असून पृथ्वी लोकांनीं गजबजली होती. इतक्यांत राजांच्या व अनेक पश्वादिकांच्या कुळांत असुर जन्मले. ह्या जन्माला आलेल्या व येणाऱ्या असुरांच्या योगानें पृथ्वीला भार होऊं लागला. पुढें कांहीं बलाढ्य, फार उन्मत्त, ब्राह्मणांना पीडा करणारे व गर्विष्ठ असे असुर दिति व दनु ह्यांपासून जन्मले. त्यांनीं ही आसमुद्र पृथ्वी व्यापून टाकिली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ह्यांना ते पीडा देऊं लागले. ते फार कपटपटु असून शक्तीच्या मदानें त्यांनीं लोकांना फार त्रास देण्यास सुरुवात केल्यामुळें पृथ्वी सर्व प्राण्यांचे जनक जे ब्रह्मदेव त्यांना गोरूपानें शरण गेली व त्या सर्ववंद्य प्रजापतींना वंदन करून आपला आगमनहेतु तिनें त्यांना कळविला. जगत्कर्तेच असल्यामुळें तो त्यांना पूर्वीच कळून चुकला होता. ते ह्मणाले, 'हे वसुंधरे, ज्यासाठीं तूं मजकडे आली आहेस त्याकरितां मी सर्व देवांना पृथ्वीवर अवतार घेण्यास सांगतों.' असें म्हणून तिला निरोप देऊन देवगंधर्वाप्सरादि सर्वांना 'पृथ्वीवर अवतार घेऊन तिचा भार कमी करा,' म्हणून त्यांनीं आज्ञा केली. त्यांच्या आज्ञेवरून विष्णूसह सर्व देव पृथ्वीवर अवतरून त्यांनीं तिचा भार हरण केला.'

---

१६ भरतजन्म. (१. ६५–७४)

'भरत जन्माची कथा सांगा,' म्हणून जनमेजयाची प्रार्थना ऐकून वैशंपायन ह्मणालेः—

'पूर्वी विश्वामित्र ऋषी घोर तप करीत असल्यामुळें इंद्राला मोठी चिंता पडली. उग्र तपाच्या प्रभावानें हा कदाचित् आपल्याला पदभ्रष्ट करील अशी भीति पडून तो मेनकेला ह्मणाला, 'अमानुष रूप व गुण ह्यांयोगानें तूं सर्व अप्सरांमध्यें श्रेष्ठ आहेस, तूं माझें एक काम कर. हा सूर्यासारखा तेजस्वी विश्वामित्र घोर तप करीत आहे. त्यानें माझ्या मनाला मोठी चिंता उत्पन्न केली आहे. त्याला मोह पाडून त्याच्या तपामध्यें विघ्न करून ही माझी चिंता दूर

कर. आपल्या रूपानें, यौवनानें, अभिनयानें व हास्ययुक्त भाषणांनीं त्याला अगदीं वेडा करून तपापासून परावृत्त कर.' मेनका ह्मणाली, 'ते मोठे तेजस्वी, तपस्वी, व रागीट आहेत. ज्यांच्या तेजानें व प्रखर तपानें, आपल्याला देखील भीति पडली आहे, त्यांपासून मला कशी बरें भीति वाटणार नाहीं? एवढ्या थोरल्या वसिष्ठांची व त्यांच्या मुलांची ज्यांनीं ताटातूट केली, प्रथम क्षत्रकुलांत जन्म झाला असून ज्यांनीं आपल्या तपाच्या प्रभावानें ब्राह्मणत्व मिळविलें, ज्यांनीं पावन करण्यासाठीं यथेच्छ पाण्यानें भरलेली कौशिकी नदी निर्माण करून पूर्वी दुष्काळसमयीं व्याध बनलेल्या राजर्षीनें आपल्या स्त्रीचा सांभाळ केल्यामुळें दुष्काळ संपल्यावर परत आश्रमाला आल्यावर ज्यांनीं ह्या नदीचें पार असें नांव ठेविलें व येथेंच मतंग ऋषींनीं अविघ्नपणें यज्ञ केला; ज्यांनीं रागावून नक्षत्र तारादिकांनीं संपन्न प्रतिजग निर्माण केलें, व ज्यांनीं पितृशापपीडित त्रिशंकूला आधार दिला, असा ज्यांचा अतर्क्य महिमा आहे त्यांसंबंधानें मला भीति वाटणें साहजिक आहे. देवेंद्र, त्यांच्या रागानें मी जळून भस्म होणार नाहीं अशी आपण कांहीं तजवीज करा. आत्मतेजानें ते हे सर्व लोक जाळून टाकतील, पायानें पृथ्वी हालबून मोडतील, मेरूलाही रसातळाला दडपण्याचें त्यांचें अंगीं सामर्थ्य आहे. ते इकडची दिशा तिकडे नेतील. भडकलेल्या अग्नीप्रमाणें जाज्वल्य, नेहमीं तपामध्यें रत व इंद्रियनिग्रही यम, सोम, महर्षी व बालखिल्य ज्यांच्यापुढें थरथर कांपतात, अशा ह्यांच्यापुढें माझ्या अबलेचा काय पाड लागणार? आपली आज्ञा तरी मीं कशी मोडावी? ह्मणून माझ्या बचावाची कांहीं तरी तजवीज काढा ह्मणजे मी आपल्या आज्ञेप्रमाणें करण्याला सिद्ध आहें. वायु व मदन ह्यांना आपण माझ्या साह्याला द्या.' नंतर इंद्राज्ञेनें त्या दोघांना घेऊन ती विश्वामित्रांच्या आश्रमाला आली. तेथें तपानें सर्व पाप भस्म करून तपांत गढलेल्या त्या ऋषींना पाहून त्यांना तिनें अभिवंदन केलें; व हास्यमुखानें त्यांपुढें आपला अभिनय सुरू केला. तिचें तें अप्रतिम सौंदर्य पाहून त्यांचें सर्व लक्ष तिच्याकडे वेधलें. तिला त्यांनीं जवळ बोलाविलें. नंतर तेथें पुष्कळ काळ एका घटकेप्रमाणें त्यांनीं यथेच्छ क्रीडा केली. त्यांपासून गर्भ राहून मेनकेला शकुन्तला नांवाची मुलगी झाली. हिमालय पर्वताच्या प्रायथ्याला एका रम्य अशा सपाट प्रदेशांत मालिनी नदीच्या तीरीं तें मूल उपजल्याबरोबर टाकून आलेला हेतु साधल्यामुळें मेनका परत स्वर्गाला निघून गेली. सिंहव्याघ्रादिश्वापदांनीं भरलेल्या त्या निर्जन वनांत तें मूल एकटें पडलेलें पाहून पक्षी त्याच्या भोंवतीं गोळा होऊन मांसहारी प्राण्यांपासून त्यांनीं त्याचें काळजीपूर्वक रक्षण केलें. कोणे एके वेळीं कण्वऋषी तेथें स्नानाकरितां आले असतां त्या स्थितींत ती त्याच्या दृष्टीस पडली. अशा निर्जन वनांत शकुंतांनीं तिचें रक्षण केल्यामुळें ऋषींनीं तिचें **शकुंतला** असें नांव ठेविलें व आपल्या आश्रमाला घेऊन जाऊन त्यांनीं तिचें पालनपोषण केलें. **जन्मदाता, संकटांतून सोडविणारा, व अन्नदाता हे तिघे क्रमानें शास्त्रानें बाप समजले आहेत.** ह्मणून कण्व हे शकुंतलेचे बाप होत. इकडे दुष्यन्त राजा कोणे एके वेळीं पुष्कळ सैन्यानिशीं सशस्त्र होऊन एका निबिड अरण्याकडे मृगयेला निघाला असतां योध्यांच्या जयशब्दांनीं, दुंदुभि आदि वाद्यांच्या गजरानें, रथचक्राच्या घरघर आवाजानें, हत्तीच्या शब्दानें व घोड्याच्या खेंकाळण्यानें दिशा जिकडे तिकडे दणाणून गेल्या होत्या. तो चालला असतां मार्गांत स्त्रिया त्याचा गुणानुवाद गात त्यावर फुलें उधळीत होत्या व ब्राह्मण स्तुतिपूर्वक त्याला आशीर्वाद देत होते. त्या सर्वांचा प्रेमपूर्वक व मोठ्या संतोषानें स्वीकार करीत तो चालला. ब्राह्मण क्षत्रियादि चारी वर्णांचे पौरजन त्याला पोहोंचविण्यासाठीं नगराबाहेर आले होते. त्याच्यामागून बरेंच दूरपर्यंत गेल्यावर त्याचा निरोप घेऊन ते परतल्यावर बिल्वखदिरादि नाना वृक्षांनीं पूर्ण, पुष्कळ योजनेपर्यंत पसरलेल्या व मृगसिंहादि श्वापदांनीं गजबजलेल्या अशा एका निर्जल व निर्मानुष घोर अरण्यांत तो शिरला. तेथें मोठमोठे खडक पर्वतावरून कोसळून जिकडे तिकडे पसरले होते. ह्या ठिकाणीं अनेक पशू मारून त्यानें तें सर्व अरण्य हालबून सोडलें. बाणाच्या सपाट्यांत आलेल्यांना त्यानें मारून पाडलें, विशेष दूर

होते त्यांना जखमी केलें, व जे अगदीं हाताशीं आले त्यांचें त्यानें तरवारीनें तुकडे केले. ह्याप्रमाणें सर्व श्वापदांचा फडशा उडवीत तो फिरत असल्यामुळें सिंह, व्याघ्र, गज इत्यादि प्राण्यांनीं तेथून दीनवाणा शब्द करीत पळ काढला व धांवण्याच्या श्रमानें नद्या कोरड्या पडल्या होत्या तरी त्यांकडे ते धांव घेत होते. व त्यांत पाणी नाहींसें पाहून निराश होऊन भूमीवर धापा टाकीत पडत होते. त्याप्रमाणें तान्हेनें व्याकुळ होऊन पडलेले हे प्राणी त्या नरव्याघ्राचे लोक भुकेनें फार पीडले असल्यामुळें हिंग्वच खाऊन टाकीत होते. कांहीं अग्नि पेटवून त्यावर ते भाजून खात होते. मोठ्या मोठ्या शक्तिमान हत्तीची देखील ह्याच्यापुढें गाळण उडून मलमूत्र विसर्जन करीत व रक्त ओकीत सोंड वर करून ते पळत सुटले. धुळीनें व शरवर्षावानें दिशा अगदीं बंद झाल्या होत्या. ह्याप्रमाणें हजारों मृग मारल्यावर एका मृगाच्या मागें लागून हा राजा चालला असतां श्रमानें त्याला फार तहान लागली. परंतु त्या ओसाड भागांत त्याला पाणी मिळेना. ह्याप्रमाणें भुकेनें व तान्हेनें व्याकुळ होऊन तो चालला असतां पुढें एक उत्तम आश्रम त्याच्या दृष्टीस पडला. तेथें दाट झाडी असल्यामुळें मनाला आल्हाददायक गार वारा सुटला होता. जिकडे तिकडे झाडें फलपुष्पांच्या भारानें वांकून डुलत होतीं. कोकिलादि पक्ष्यांचा मंजुळ स्वर कानीं येत होता. झाडांच्या फांद्या लांबवर पसरल्या असल्यामुळें जिकडे तिकडे सुखदच्छाया पसरली होती. भुंग्यांचा गुणगुण शब्द कानीं येत होता, त्यावरून हें वनश्रीचें क्रीडामंदीरच आहे कीं काय असें भासत होतें. ज्याला फलपुष्प नाहींत, ज्यावर भुंगे नाहींत व जें कांट्यांनीं भरलेलें आहे असें एकही झाड येथें नव्हतें. पुष्पगुच्छांनीं वांकलेल्या झाडांनीं वाऱ्याच्यायोगानें पुष्पांचा वर्षाव करून रंगी बेरंगी गालिचाच खालीं पसरून दिला होता. कांहीं वृक्ष उंच आकाशांत गेले असून चित्रविचित्र फुलांनीं फुलले असल्यामुळें फार शोभिवंत दिसत होते. त्यांच्या फलभारानें वांकलेल्या देंठावर मधुलोलुप भुंगे गुंजारव करीत होते. त्या ठिकाणीं अनेक फुलझाडांनीं व लतागृहांनीं शोभायमान व मनाला आल्हाद देणारे पुष्कळ प्रदेश पाहून त्याच्या मनाला आल्हाद देणारे पुष्कळ प्रदेश पाहून त्याच्या मनाला समाधानी वाटली. सुखद व मंजुळ अशा शीतळ वायूमधून पुष्परेणू उडत असून ते वाऱ्यानें डुलणाऱ्या वृक्षांकडे त्यांबरोबर रममाण होण्यासाठींच जात आहेतसें वाटत होतें. त्या आश्रमाभोंवतीं झाडी दाट असून आंत अग्नि पेटला होता. वालखिल्यादि ऋषी तेथें तप करीत बसले होते. अग्निशाळेतून होमकुंडाभोंवतीं पुष्पांचा गालिचाच पसरून राहिला होता. त्या आश्रमाच्या बाजूनें स्वच्छ व गोड पाण्याची मालिनी नदी वहात असून तिच्या तीराला अनेक पक्ष्यांचा किलकिलाट चालला असल्यामुळें तपोवनाला त्याच्या योगानें फारच शोभा आली होती. सर्व प्राणिमात्रांना आईसारखी असणाऱ्या हिंच्या वाळवंटावर चक्रवाकपक्षी आरडत होते. तिच्या प्रवाहांतून पुष्पें व फेंस वहात चालला होता. ही किन्नरांचें अक्षय्य वसतिस्थान झाली असून अनेक वानर व अस्वल त्या ठिकाणीं यथेच्छ क्रीडा करीत होते. तिच्या तीराला पवित्र वेदाध्ययनाचा घोष सतत चालला होता व मदोन्मत्त अशा गजव्याघ्रादि श्वापदांनीं तर येथें आपलें कायमचें ठाणेंच बसविलें होतें. ऋषिगणांनीं गजबजलेला, मालिनी नदीच्या रम्य तीरावर असल्यामुळें विशेष शोभायमान व नरनारायणाचें वसतिस्थान असा हा कण्वाश्रम पाहून त्या अप्रतिहतरथ व श्रीमान नरवीरानें ऋषींचें दर्शन घेण्याच्या हेतूनें आंत शिरण्याचा निश्चय केला व तपोवनाला बाधा होऊं नये ह्मणून सर्व चतुरंग सैन्य बाहेर ठेवून रजोगुणापासून आलिप्त अशा तपोधन कण्वऋषींचें दर्शन घेण्यासाठीं तो निघाला; व आपण परत येईपर्यंत तेथेंच त्यांना वाट पहात रहाण्यास सांगितलें. प्रति नंदनवनासारख्या त्या रम्य वनांत शिरतांच त्या राजाची भूकतहान हरपली. सर्व राजचिन्हें दूर करून एक प्रधान व पुरोहित ह्यांनिशीं यज्ञकर्म व यजुर्वेद जाणणाऱ्या व मधुर सामवेद गाणाऱ्या ब्रह्मवृंदांनीं शोभायमान अशा त्या प्रति ब्रह्मलोकासारख्या आश्रमांत तो शिरला. तेथें वेदघोष व अनेक शास्त्रांवरची चाललेली चर्चा ऐकून व कांहीं जपांत गर्क झालेले, कांहीं होम करीत असणारे, कांहीं वेदाध्ययन करणारे असे अनेक जन निरनिराळ्या व्यवसायांत रत झाले-

ले पाहून त्याला मोठें समाधान वाटलें. तऱ्हतऱ्हेची डोळ्यांला सुखदायक अशीं आसनें त्या ठिकाणीं पसरलेलीं पाहून त्याला मोठा विस्मय वाटला. संध्यासमयीं ब्राह्मणांनीं बांधलेली देवांची पूजा पाहून तर क्षणभर त्याला आपण ब्रह्मलोकींच आहों कीं काय असें वाटूं लागलें. कश्यपांच्या तपोप्रभावानें रक्षित असा तो तपोवनाला शोभा देणारा आश्रम पाहून राजाची तृप्ति होईना. नंतर प्रधान व पुरोहित ह्यांना बाहेर ठेवून तो एकटाच आश्रमांत शिरला. व 'येथें कोण आहो,' ह्मणून मोठ्यानें त्यानें हाक मारिली. ऋषी आश्रमांत नव्हते. ती हाक ऐकून लक्ष्मीप्रमाणें लावण्यवती तापसाच्या वेषांत असलेली एक मुलगी बाहेर आली व राजाला पाहून तिनें त्याचें स्वागत केलें. त्याला पाय धुण्याला पाणी देऊन बसावयास आसन दिलें. नंतर तिनें त्याची पूजा करून 'ठीक आहेना,' ह्मणून प्रश्न करून हासत हासत 'काय आज्ञा आहे,' ह्मणून विचारलें. ह्या यथोचित सन्मानाचा स्वीकार केल्यावर राजा त्या मधुरभाषिणीला ह्मणाला; 'कल्याणि, मी ऋषिमहाराजांच्या दर्शनासाठीं येथें आलों आहें. भगवान कोठें आहेत?' शकुंतलेनें उत्तर दिलें, 'बाबा फलपुष्पें आणण्याला गेले आहेत. इतक्यांत येतील.' नंतर 'केवळ नेत्रकटाक्षानेंच माझें हृदय एकदम हरण करूं पाहणारी तूं कोण,' ह्मणून राजानें तिला विचारलें. तेव्हां 'मी कण्वबाबांची मुलगी आहें,' असें तिनें उत्तर दिलें. 'ऋषि ब्रह्मचारी असून तूं त्यांची मुलगी ह्मणतेस हें कसें,' ह्मणून राजानें फिरून विचारल्यावरून तिनें आपली सर्व जन्मकथा राजाला सांगितली. तेव्हां तिचा जन्म क्षत्रियापासून आहे असें कळल्यावर दुष्यन्त ह्मणाला, 'तूं राजकन्या आहेस हें तुझा मुखचंद्र स्पष्ट सांगत आहे. हे सुश्रोणि, तूं माझी बायको हो. तुजसाठीं वाटेल तें करण्याला मी सिद्ध आहें. सुवर्णमाला, उत्तम वस्त्रें, सुवर्णकुंडलें, नाना देशांहून आणिलेले हिरे, पाच आदिकरून रत्नें, उत्तम रंगविलेलीं कातडीं वाटेल ते मी तुझ्यासाठीं मिळवीन. माझें सर्व राज्य मी तुझ्या पायावर ठेवितों. हे भीरु, गांधर्वविधीनें तूं माझ्याशीं लग्न लाव. **सर्व विवाहविधींमध्यें क्षत्रियांना गांधर्वविधिच श्रेष्ठ सांगितला आहे.**' शकुन्तलेनें उत्तर दिलें. 'बाबा फळें आणण्याकरितां गेले आहेत, क्षणभर वाट पहा ह्मणजे त्यांची भेट होऊन सर्व आपल्या मनाप्रमाणें होईल.' हें ऐकून दुष्यन्त ह्मणाला; 'हे अनिंदिते, माझा जीव तुझ्यावर गुंतला आहे, आत्महितकर्ता आपल्यावांचून दुसरा कोणी नसून आपल्या बऱ्यावाईटाला धनी दुसरा कोणी होत नाहीं. धर्मदृष्ट्या पाहिलें तरी तूं स्वतःच स्वतःचें दान करण्याला समर्थ आहेस. **स्मृतींत ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस व पैशाच असे लग्नाचे आठ भेद सांगितले आहेत. पैकीं पहिले चार ब्राह्मणांकरितां आहेत, सहा क्षत्रियांकरितां व राजांना तर राक्षसविधि देखील सांगितला आहे. व वैश्य व शूद्र ह्यांना असुरविधि सांगितला आहे. पहिल्या पांचांपैकीं तीन धर्म्य असून बाकी दोन अधर्म्य मानले आहेत. पैशाच व आसुर हे निंद्य मानले आहेत. क्षत्रियांना गांधर्व व राक्षस पृथक् किंवा एकाचवेळीं प्रशस्त मानले आहेत.** ह्याविषयीं मनांत कांहीं संशय आणूं नकोस. **सकाम** असे आपण दोघे परस्परांचा अंगीकार करूं ह्मणजे झालें.' शकुन्तलेनें उत्तर दिलें. 'हा धर्ममार्ग असून माझें स्वतःवर स्वामित्व असेल तर मग माझी अट ऐका. मी जें हल्लीं एकांतांत आपल्याला सांगणार आहें तें अक्षरशः करीन ह्मणून वचन द्या. **मला जो आपल्यापासून मुलगा होईल त्याला यौवराज्य मिळून आपल्यामागें गादी मिळाली पाहिजे.** हें माझें ह्मणणें जर आपल्याला मान्य असेल तर मग आपल्याशीं संबंध करण्याला माझी हरकत नाहीं.' एकदम 'बरें,' आहे असें ह्मणून राजानें विधिपूर्वक तिचें पाणिग्रहण केलें. व 'चतुरंग सैन्य पाठवून मोठ्या थाटानें मी तुला आपल्या नगरीला लवकरच घेऊन जाईन,' असें तिला फिरून फिरून आश्वासन देऊन कण्वऋषींना हें कळलें ह्मणजे ते काय ह्मणतील ह्याची मनांत चिंता करीत तो आपल्या नगरीला निघून गेला. इकडे कण्वऋषी परत आल्यावर शकुन्तला लज्जेनें त्यांच्यापुढें गेली नाहीं. परंतु ज्ञानचक्षूनीं सर्व जाणून ते तिला ह्मणाले, 'भद्रे, आज माझ्या आश्रे-

शिवाय एकांतांत जो तुझा पुरुषाबरोबर व्यवहार घडला तो धर्माविरुद्ध नाहीं. कारण सकाम स्त्रीपुरुषांचा गांधर्व विधीनें अमंत्रक संबंध क्षत्रियांना फारच श्रेष्ठ मानला आहे. पुरुषांमध्यें दुष्यन्त श्रेष्ठ असून धर्मात्मा आहे. मोठा शक्तिमान व कुलीन असा पुत्र तुला होईल. तो समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य करील. त्याच्या हातावर चक्रवर्ती चिन्हें राहून तो शत्रूवर चालला असतां त्याचें सैन्य शत्रूला अजिंक्य होईल.' नंतर बनांतून आणलेलें ओझें खालीं ठेवून पाय धुवून ते बसल्यावर ती त्यांना ह्मणाली; 'मीं दुष्यंत राजाला पति वरला आहे. त्यावर आपली कृपा असली पाहिजे.' कण्व ह्मणाले, 'तुझ्या संबंधानें तर आतां त्यावर माझी विशेष कृपा राहील. हे भाग्यशाले तुला पाहिजे तो वर मागून घे. नंतर दुष्यंताचें हित मनांत आणून पुरुवंशांतल्या राजांचें नेहमीं धर्माकडे लक्ष राहून राज्यापासून भ्रष्ट होण्याची त्यांच्यावर कधीं पाळी न यावी, असा तिनें त्यांपासून वर मागून घेतला.

इकडे दुष्यंत वर सांगितल्याप्रमाणें वचन देऊन आपल्या नगरीला निघून गेल्यावर शकुंतलेला एक मोठा तेजस्वी मुलगा झाला. तो तीन वर्षांचा झाल्यावर कण्वऋषींनीं त्याचे विधिपूर्वक जातकर्मादि संस्कार केले. तो मोठा पराक्रमी असून त्याच्या हातावर चक्र होतें. तो सिंहांना देखील पुरेपुरे करून सोडीत असे. शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें तेथें वाढत असतां सहा वर्षांचा झाला नाहीं तोंच तो सिंह, व्याघ्र, गज व महिष ह्यांना आश्रमाकडे आणून झाडांना बांधून ठेवूं लागला. त्यांवर बसून त्यांना जेरीला आणूं लागला, व खेळत खेळत त्यांच्यामागून चोहोंकडे धांवूं लागला. तो सर्वांना दमवून सोडी म्हणून त्या आश्रमांतील लोकांनीं त्याचें **सर्वदमन** असें नांव ठेविलें. त्याचा पराक्रम, त्याची शक्ति व त्याचीं अमानुष कृत्यें पाहून त्याला युवराज्याभिषेक करण्याचा समय आलासें पाहून शकुंतलेला त्यासह पतिगृहीं पाठविण्याची ऋषींनीं तयारी केली व शिष्यांना बरोबर देऊन तिला दुष्यंताकडे पाठविलें. कारण **तरुण स्त्रियांचें माहेरीं फार दिवस राहणें अकीर्तिकर व धर्माच्या आंड येणारें असून तें लोकनिंदेला कारण होतें** त्यांचे आज्ञानुकारी शिष्य मुलासह तिला घेऊन हास्तिनापुराला निघाले. देवतुल्य त्या कमलेक्षण मुलाला घेऊन ती दुष्यंतापाशीं आली तेव्हां आंत वर्दी पोहोंचून प्रवेश मिळाल्यावर सकाळच्या सूर्याप्रमाणें देदीप्यमान अशा त्या मुलासह पुढें सरून नमस्कारादि व्यवहार आटोपल्यावर ती. राजाला ह्मणाली, 'ह्या तुझ्या मुलाला युवराज्यावर अभिषेक करून ठरलेला संकेत पुरा कर.' हें तिचें भाषण ऐकून विस्मृति दाखवून राजा ह्मणाला, 'हे दुष्ट तापसि, तूं कोण आहेस ? तुझ्याशीं लग्न लावल्याचें मला आठवत नाहीं, येथून चालती हो.' हें निष्ठुर भाषण ऐकून संतापानें अगदीं लाल होऊन त्या बिचारीनें लाजेनें तोंड खालीं घातलें. ती कावरीबावरी दिसूं लागली. रागानें तिचे डोळे लाल झाले. तिचे ओंठ थरथर कांपत होते. दृष्टीनें जणूं काय जाळून भस्मच करून टाकीत आहे कीं काय अशा रीतीनें तिनें राजाकडे नजर लाविली. अनावर त्वेषामुळें हें उग्र स्वरूप झांकून ठेवण्याचा तिचा प्रयत्न व्यर्थ जाऊन तिचें तपसंचित तेज तिच्या तोंडावर स्पष्ट दिसूं लागलें. थोडा वेळ विचार करून दुःखानें व त्वेषानें संतापून जाऊन ती त्याकडे पाहून ह्मणाली, 'हे राजा, तुला सर्व कळत असून सामान्य जनाप्रमाणें निःशंकपणें कृतकर्म नाकबूल करणें तुला शोभतें काय ? ह्या बाबतींत खऱ्याखोट्याची साक्ष तुझें हृदयच तुला देत असेल. **मनांत एक असून बाहेरून जो त्याच्या उलट बोलतो त्या आत्मवंचक चोराच्या हातून आणखी पाप तें कोणतें घडलें पाहिजे;** तूं त्या ठिकाणीं एकटा असल्यामुळें तुझ्या कृत्याला दुसरा कोणी साक्षी नव्हता असें जर तुला वाटत असेल तर तो पुराण साक्षी प्रत्येकाच्या हृदयांत वास्तव्य करीत आहे हें तुला ठाऊक नाहीं वाटतें ? कोणतेंही पापपुण्य त्याला कळून आल्याखेरीज रहात नाहीं. त्या परमात्म्यापुढें तूं हें पाप करीत आहेस. प्राणी पाप करतो व तें कोणाला कळत नाहीं, असें समजतो. पण देव व अंतरसाक्षी पुरुष ह्यांना तें कळल्यावांचून रहात नाहीं. **सूर्य, चंद्र, वायु, अग्नि, आकाश, पृथ्वी जल, हृदय, यम, दिवस, रात्र, व पहाट आणि संध्याकाळ हे माणसांच्या एकूणएक कृ-**

त्यांचे साक्षी आहेत. आपण जें कांहीं करतों त्या सर्वांचा साक्षीभूत आपल्या हृदयस्थ पुरुष ज्या प्राण्यावर संतुष्ट असतो त्याचें पाप देखील यम नाहींसें करतो; पण तो पुरुष ज्यावर असंतुष्ट असतो त्याचें तें तो द्विगुणित करतो. मुद्दाम खोटें बोलणाराचें तो कधीं कल्याण करीत नाहीं. त्याचा आत्मा त्याच्या ह्या कृत्याला मुळीं कारण नसतो. मी तुझ्या बोलावण्याशिवाय आलें आहें ह्मणून माझा असा अनादर करूं नकोस. मानाई अशी मी तुझी लग्नाची बायको आपण होऊन आलें असतां तूं माझा धिक्कार करीत आहेस. प्राकृतजनाप्रमाणें भरसभेमध्यें तूं माझी अशी हेटाळणी मांडली आहेस. माझें हें अरण्यरुदन समजूं नकोस. माझें भाषण तुला ऐकूं येत नाहीं वाटतें? मी इतकी काकुळतीला येत असतांना जर तूं मजकडे दुर्लक्ष करशील तर तुझें मस्तक शतशः विदीर्ण होईल. पति स्त्रीचे ठिकाणीं फिरून जन्म घेतो ह्याच योगानें स्त्रीला जाया ही संज्ञा मिळाली आहे. असें जुन्या विद्वानांचें मत आहे. मनुष्याला अपत्य झालें असतां तें संततीच्या योगानें मागची व पुढची कुळी उद्धरतें. ज्याअर्थी पुत्र पुन्नामक घोर नरकांतून बापाचा उद्धार करतो त्यामुळेंच त्याला पुत्र ही संज्ञा आहे. जी गृहकृत्यांत दक्ष आहे, जिला मूल आहे, जी पतीचा प्राण आहे, आणि जी पतिव्रता आहे, तिलाच बायको हें नांव शोभतें. बायको ही नवऱ्याचें अर्धांग आहे. सर्वांत श्रेष्ठ असा मित्र आहे, धर्मार्थमोक्षाचें साधन आहे, भवाब्धि तरून जाणाराला ही नौका आहे. ज्याला बायको आहे त्याच्या हातूनच सुरळीतपणें सर्व क्रिया घडणें शक्य आहे. गृहस्थाश्रम योग्य रीतीनें पार पडण्यास तीच कारण होते; व सुख व संपत्ति देणारी तीच आहे. ही मंजुभाषिणी एकांतामध्यें उत्तम सखी असून धर्माचरणाचे समयीं पित्यासमान व संकटसमयीं मातेसमान समाधानाला जागा आहे. निर्जनवनांत देखील थकल्या भागलेल्या नवऱ्याला ही आरामदायी होते. कुटुंबी मनुष्यावरच लोकांचा भरंवसा बसतो. ह्मणून हे राजा, बायको हीच मनुष्यानें आपली उत्तम गति समजली पाहिजे. बिकट मार्गानें घोर नरकाकडे चाललेल्या प्रेतामागून देखील पतिव्रता स्त्रीच जाते. ती पूर्वी मेली तर स्वर्गी जाऊन पतीची वाट पहात राहते. व पति आधीं मरण पावला असतां ती त्याच्याबरोबर सहगमन करते. हे राजा, पाणिग्रहण ह्याचकरितां अवश्य सांगितलें आहे. ज्याअर्थी बायको इहलोकींची व परलोकीची सहचरी असून 'पुत्ररूपानें पतीच्या पुनर्जन्माला कारण होते, त्याअर्थी पुरुषानें ह्या आपल्या मुलाच्या आईच्या ठिकाणीं मातृभाव ठेवला पाहिजे. आरशामधील स्वतःच्याच तोंडाप्रमाणें मुलाचें तोंड पाहून त्या भाग्यवान प्राण्याला स्वर्गसुख होतें. ह्या संसारांत आधिव्याधि आदि अनेक दुःखांनीं होरपळलेल्या मनुष्याला घर्मार्त जनांना ज्याप्रमाणें उदक त्याप्रमाणें स्त्रीमुखच आनंद देतें. रति, प्रीति, व धर्म ह्या तीन गोष्टी त्यांवर अवलंबून आहेत, हें पक्कें लक्षांत ठेवून पुरुषानें रागाच्या आवेशांत देखील बायकांचें वाकेंडें करण्याला निघूं नये. स्त्रिया आत्मोत्पत्तीचें पवित्र व सनातन क्षेत्र आहेत. त्यांवांचून प्रजा उत्पन्न करण्याची ऋषींची देखील प्राज्ञा नाहीं. मुलगा धुळीनें अंग भरवून घेऊन बापाच्या मांडीवर लोळूं लागला ह्मणजे त्यापुढें त्याला स्वर्गसुख सुद्धां तुच्छ वाटतें. असें असून आपण होऊन तुझ्याकडे येऊन मोठ्या कौतुकानें तुझ्याकडे टकमक पहाणाऱ्या ह्या आपल्या मुलाचा तूं अव्हेर कां करतोस? मुंग्या देखील आपल्या अंड्यांचें पोषण करतात, त्यांचा नाश करीत नाहींत. तूं आपल्याला धर्मज्ञ ह्मणवीत असून आपल्या मुलाला सोडणें तुला उचित आहे काय? मुलाला आलिंगन देऊन जें स्पर्शसुख मिळतें तें सुख उत्तम वस्त्रापासून, स्त्रियांपासून किंवा शीतोदकाच्या स्पर्शापासून द्वेखील होत नाहींत. द्विपादांमध्यें ब्राह्मण श्रेष्ठ आहे. चतुष्पादांमध्यें गाय श्रेष्ठ आहे. थोर लोकांमध्यें सर्वांत थोर ह्मणजे गुरु होत, व सर्व स्पर्शसुखांमध्यें पुत्रस्पर्शापासून प्राप्त होणारें सुख अनुपमेय आहे. हा बाळ तुला दृढ आलिंगन देण्यासाठीं पहा कसा अधीर झाला आहे? त्याचा हिरमोड करूं नकोस. हे अरिंदमा, तीन वर्षांपूर्वी शो-

क दूर करणारा हा मुलगा मला झाला. ह्याच्या हातून शंभर अश्वमेध होतील अशी पूर्वी आकाशवाणी झाली आहे. देशांतराला गेलेले लोक देखील परत आल्यावर मोठ्या प्रेमानें आपल्या मुलाला मांडीवर घेऊन त्याचें डोकें हुंगून समाधान पावतात. **'माझ्या प्रत्येक अवयवापासून तुझी उत्पत्ति आहे. माझें हृदय तूंच आहेस. हे पुत्रा, तूं माझा आत्मस्वरूपी आहेस. ह्याकरितां तूं शतायु हो. माझे जीवित तुझ्यावर आहे, माझें अस्तित्व तुझ्यावर आहे. म्हणून हे पुत्रा, तूं शंभर वर्षें जग.'** हा वेदोक्त मंत्र मुलाच्या जातकर्माचे वेळीं ब्राह्मण ह्मणत असतात. हें मीं तुला सांगावयाला पाहिजे असें नाहीं. आरशासारख्या स्वच्छ सरोवरामधील आत्मप्रतिबिंबाप्रमाणें तुझें प्रतिबिंब जो तुझ्यापासून झालेला हा मुलगा त्याकडे पहा. ज्याप्रमाणें आहवनीय अग्नीपासून गार्हपत्याग्नि तयार होतो त्याप्रमाणें तुझ्यापासून झालेल्या ह्या पुत्राच्या योगानें तूं पूर्वी एक असून आतां दोन झाला आहेस. पूर्वी मृगयेच्या नादानें एका हरणाच्या मागें लागून आला असतां कण्वबाबांच्या आश्रमांत आपली गांठ पडली. उर्वशी, पूर्वचित्ति, सहजन्या, मेनका, घृताची व विश्वाची ह्या अप्सरांमध्यें श्रेष्ठ ब्रह्मदेवांपासून जन्मलेली जी मेनका तिनें स्वर्गाहून खालीं येऊन हिमालयाच्या पायथ्याशीं विश्वामित्रांपासून मला जन्म दिला व ती निष्ठुर होऊन एखाद्या परक्या पोराप्रमाणें मला टाकून गेली. पूर्वजन्मीं मीं काय पाप केलें होतें नकळे; ह्मणून लहानपणीं आतांनीं मला टाकिलें व आतां तूं सोडीत आहेस. तूं धिक्कारलेंस तर मी पाहिजे तर आश्रमाला परत जाईन; पण ह्या तुझ्या मुलाला सोडणें मात्र तुला शोभत नाहीं.' हें ऐकून दुष्यंत ह्मणाला, 'शकुंतले, माझ्यापासून तुला मुलगा झाल्याचें मला स्मरत नाहीं. **बायकांना खोट्याचें बाळकडूं असतें.** तुझ्या भाषणावर विश्वास कोणी ठेवावा ? अनेक पुरुषांशीं रत होणाऱ्या तुझ्या आईनें निर्दयपणें हिमालयाच्या पायथ्याशीं तुला निर्माल्याप्रमाणें सोडून दिलें. तो क्षत्रकुलोत्पन्न असा ब्राह्मणत्व प्राप्त होण्याविषयीं आतुर झालेला कामलंपट तुझा पिता तरी निष्ठुरच ह्मटला पाहिजे. असो, तरी अप्सरांमध्यें मेनका श्रेष्ठ आहे, व महर्षींमध्यें तुझा पिता श्रेष्ठ आहे असें असून त्यांची मुलगी ह्मणविणारी तूं अशी एखाद्या स्वैरिणी स्त्रीप्रमाणें कां बरळत आहेस ? ज्यावर कोणाचा भरंवसा बसणार नाहीं असे हे असंबद्ध प्रलाप माझ्यापुढें करण्याला तुला लाज कशी वाटत नाहीं ? हे दुष्ट तापसि, चालती हो. त्या सर्वश्रेष्ठा महर्षीची योग्यता केवढी, ती मेनका केवढी व अशी दीन तापसवेष धारण केलेली दैन्यता दाखविणारी तूं कोठें ? हा तुझा धष्टपुष्ट व एखाद्या एरंडाप्रमाणें वाढलेला मुलगा इतक्या अल्पकाळांत इतका मोठा झाला तरी कसा ? तुझी उत्पत्ति निंद्य प्रकारानें असून हें तुझें भाषण एखाद्या पुंश्चलीला शोभणारें आहे. कामवश झालेल्या मेनकेपासून कामाच्या झपाट्यांत तूं उत्पन्न झाली आहेस. तूं ह्मणतेस तें कांहींच मला आठवत नाहीं. मी तुला ओळखत नाहीं. तुला वाटेल तिकडे जा.' शकुंतलेनें उत्तर दिलें, 'राजा, दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ देखील काढण्याला तयार असून आपल्या डोळ्यांतलें एवढें थोरलें मुसळ धडधडीत दिसत असून त्याकडे दुर्लक्ष कां करतोस ? सर्व देवांमध्यें मेनका श्रेष्ठ आहे. देव तिच्या मागून आहेत. हे दुष्यंता, तुझ्या उत्पत्तीपेक्षां माझी उत्पत्ति उच्च आहे. हे राजेंद्रा, तुझा केवळ भूतलावर संचार आहे; पण मला अंतरिक्षीं देखील संचार करण्याचें सामर्थ्य आहे. तुझ्या व माझ्यामधलें अंतर मेरु व राई ह्याप्रमाणें आहे हें पक्कें लक्षांत ठेव. हें माझें भाषण सत्यतादर्शक असून केवळ दृष्टांतासाठीं मी बोलून दाखवीत आहे. द्वेषभाव ह्यांत मुळींच नाहीं. ह्या बोलण्याचा मनांत राग आणूं नकोस. **एखादा विद्रुप मनुष्य जोंपर्यंत आपलें तोंड आरशांत पहात नाहीं तोंपर्यंत मी सर्वांत रूपवान आहें असा त्याला मोठा डौल असतो पण तेंच त्यानें आपलें विद्रुप तोंड एकदां आरशांत पाहिलें ह्मणजे आपल्या व दुसऱ्यामधलें अंतर त्याला एकदम दिसूं लागतें.** स्वतः रूपवान असणारा मनुष्य दुसऱ्याचा अवमान करीत नाहीं. **ज्याचा बडबड्या स्वभाव अस-**

तो तो बहुतकरून परनिंदक असतो. डुकर ज्याप्रमाणें विष्ठेचें ग्रहण करतो त्याप्रमाणें दुसऱ्याचें बरें वाईट भाषण ऐकून घेऊन मूर्ख मनुष्य वाईट तेवढें घेतो, पण हंस ज्याप्रमाणें जलमिश्रित दुधांतून फक्त दूधच काढून घेतो त्याप्रमाणें भला मनुष्य चांगलें तेवढें घेत असतो. साधूला परनिंदेपासून ताप होतो, पण दुष्टाला त्यापासून उलट बरें वाटतें. सज्जनांना वृद्धांना मान देण्यांत सुख होतें, पण मूर्खाला भल्याच्या नांवानें खडे फोडण्यांतच सुख होतें. आत्मदोष न कळतां दुसऱ्याचा दोष काढण्यास टपलेले दुर्जन सुखी समजले पाहिजेत. कारण दुसऱ्यांनीं त्यांची निंदा करावी अशी त्यांची योग्यता असून त्यांनाच दुसऱ्याची निंदा करण्याला सांपडते. दुर्जन स्वतः साधूंना दुर्जन ह्मणतात ह्यापेक्षां विलक्षण गोष्ट दुसरी कोणती असणार? **खवळलेल्या सापाप्रमाणें धर्मभ्रष्ट मनुष्याला पाहून नास्तिक लोकांना देखील थरथरां कांपावें लागतें.** मग इतरांची ती काय कथा? स्वतः पुत्र उत्पन्न करून जो तो आपला नव्हे असें ह्मणून त्याचा धिक्कार करतो त्यावर देवांची देखील इतराजी होते. तो संपत्तीला मुकतो व त्याला उत्तम लोक मिळत नाहीं. पूर्वज मुलाला कुलाचा व वंशाचा आधार मानीत आले आहेत. ह्मणून सर्व धर्माला श्रेष्ठत्व देणारा जो मुलगा त्याचा धिक्कार करणें उचित नाहीं. **विवाहित स्त्रीपासून झालेला, सांपड़लेला, विकत घेतलेला, वाढविलेला व विवाहव्यतिरिक्त स्त्रीपासून झाला असून उपनयनादि संस्कार ज्याचे आपण केले आहेत ह्या पांचांना मनूनें पुत्र ही संज्ञा दिली आहे.** मनुष्यांचा धर्म व कीर्ति ह्यांना कारणीभूत, मनाचा आनंद वाढविणारे, असे मुलगे झाले ह्मणजे ते धर्मरूपी नावेनें पितरांचा नरकापासून उद्धार करतात. ह्मणून हे राजशार्दूला, तूं आत्मरक्षक व सत्यधर्माचा पालक असून स्वतःच्या मुलाला टाकणें तुला कसें न्यायाचें वाटतें? ह्या वेळीं आंत एक बाहेर एक असें वर्तन ठेवणें चांगलें नाहीं. शंभर बावड्या बांधण्याच्या ऐवजीं एक विहीर बांधणें चांगलें. शंभर विहिरी बांधण्यापेक्षां एका यज्ञ करण्याची मातब्बरी अधिक आहे. शंभर यज्ञांपेक्षां देखील एक मुलगा असणें श्रेष्ठ आहे, व शंभर मुलांपेक्षां सत्य पाळणें श्रेष्ठ आहे. **हजार अश्वमेध व सत्य हें जर ताजव्यांत घातलें तर सत्याचेंच पारडें खालीं बसेल.** हे राजा, पूर्ण वेदाध्ययन करणें, अनेक तीर्थांमध्यें स्नान करणें हीं सत्याशीं ताडून पाहतां त्याच्या तोडीला येतील किंवा नाहीं ह्याचा संशयच आहे. **सत्यासारखा दुसरा धर्म नाहीं.** सत्यापेक्षां चांगलें दुसरें कांहीं नाहीं. व असत्यापेक्षां अनिष्ट परिणामदायकही दुसरें कांहीं नाहीं. सत्य हेंच परब्रह्म आहे. सत्य हाच श्रेष्ठ नियम आहे. ह्मणून तूं सत्य सोडूं नकोस. आतां तुला असत्यानें घेरलें असल्यामुळें तुझा स्वतःवर सुद्धां जर विश्वास बसत नसेल तर ही पहा मी चाललें. तुझ्यासारख्या शीं संबंध तरी कशाला पाहिजे? हे दुष्यंता, तुझ्या साहाय्यावांचून हा मुलगा पर्वतांनीं मंडित ह्या समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य करील पहा!' असें ह्मणून ती निघाली. इतक्यांत आकाशवाणी झाली. **'आई केवळ भात्यासारखी असून गर्भोत्पादकाच्या ठिकाणीं खरें जनकत्व येत असल्यामुळें मुलगा हा बापाचाच समजला जातो.** ह्मणून हे राजा, ह्या आपल्या मुलाचें पोषण कर. शकुंतलेला धिक्कारूं नकोस. पित्याच्या रेतापासून झालेला पुत्र त्याचा घोर नरकापासून उद्धार करतो. ह्याच्या गर्भाचा उत्पादक तूंच आहेस. शकुंतलेचें ह्मणणें खोटें नाहीं. आपल्या मुलाला टाकणें उचित नाहीं. आमच्या आज्ञेनें तरी तुला ह्याचें भरण करणें भाग असल्यागुळें हा **भरत** ह्या नांवानें प्रसिद्ध राहील. तें देवांचें भाषण ऐकून संतुष्ट होऊन राजानें त्याचा स्वीकार केला. प्रेमपूर्वक त्याचें मस्तक हुंगून त्यानें त्याला आलिंगिलें व पुढें पित्यानें करावयाचे त्याचे सर्व संस्कार त्यानें केले. पुढें ब्राह्मणाचा आशीर्वाद व भाटांचा स्तुतिपाठ ऐकत अप्रतिम पुत्रसुखामध्यें गर्क होऊन तो राहिला. शकुंतलेचा आदर करून त्यानें तिचें शांतवन केलें. तिला तो ह्मणाला, **'लोकांच्या दृष्टीआड झालेल्या ह्या आपल्या व्यवहारासंबंधानें त्यांना संशय येऊं नये व तुझ्या सचोटीची त्यांना खातरी पटावी ह्म-**

णून मला तुला हें दुःख द्यावें लागलें. प्रिये, रागाच्या झपाट्यांत तूं माझी जी निंदा केलीस त्याबद्दल मला वाईट मुळींच वाटत नाहीं.' असें ह्मणून तिला नेसण्यास उत्तम वस्त्रें, व घालण्याकरितां अलंकार देऊन त्यानें तिचा बहुमान केला, व त्या आपल्या मुलाला यौवराज्याचा अभिषेक केला. तेव्हांपासून ह्या भरताच्या जगविख्यात चक्राचा प्रभाव दिसूं लागला. त्यानें सर्व राजांना जिंकून आपल्या अमलाखालीं आणलें. व साधूंचा मार्ग स्वीकारून उत्तम कीर्ति संपादन केली. त्या चक्रवर्ती राजानें पुष्कळ यज्ञ केले. व कण्वऋषींनीं ते त्याच्याकडून करविले. ह्याप्रमाणें ह्या भरतकुलाला व त्याच्या कीर्तीला मूळ हा आहे. त्याच्या पूर्वी व मागून ह्या कुलांत झालेल्यांना भरत हे नांव पडलें. ह्या कुलांत पुष्कळ देवतुल्य राजे झाले.'

---

१७ कचदेवयानी आख्यान.

(१. ७५—७७)

आमचे पूर्वज ययाति ह्यांना शुक्राचार्यांची मुलगी कशी मिळाली ह्मणून जनमेजयानें विचारल्यावरून वैशंपायन ह्मणालेः—

'संपत्तीसाठीं देवदानवांचें त्रैलोक्यांत तुंबळ युद्ध जुंपलें असतां जयप्राप्तीसाठीं देवांनीं बृहस्पति व दैत्यांनीं सर्वज्ञ शुक्राचार्य यांना आपले गुरु केले. हे दोघेही परस्परांचा हेवा करीत असल्यामुळें देवांनीं दैत्यांना युद्धांत मारलें असतां शुक्राचार्य त्यांना आपल्या संजीविनी विद्येच्या प्रभावानें फिरून जिवंत करीत. ह्यामुळें निरुपाय होऊन त्यांपासून ती विद्या प्राप्त करून घेण्यासाठीं देवांनीं शील, लीनता, मधुर भाषण, आत्मनिग्रह व सदाचरण ह्या गुणांनीं संपन्न अशा बृहस्पतिपुत्र–कचाला–तोच ह्या कामाला समर्थ आहे असें जाणून – शुक्राचार्यांकडे पाठविलें. दैत्येंद्र जो वृषपर्वा त्याच्या नगरीला जाऊन तो शुक्राचार्यांना ह्मणाला, 'मी बृहस्पतिपुत्र कच आहें. आपला शिष्य होण्याच्या इच्छेनें येथें आलों आहें. आपण गुरु होण्याचें कबूल केलें ह्मणजे मी हजार वर्षें कडकडीत ब्रह्मचर्यानें राहून आपली सेवा करीन. शुक्राचार्यांनीं स्वागतपूर्वक त्याची विनंति मान्य केली. नंतर त्यांनीं सांगितल्याप्रमाणें सुमुहूर्तावर त्यानें व्रत धारण केलें. नृत्यवाद्यगायनादि कलेनें गुरु व गुरुकन्या देवयानी ह्यांना तोषवून पुष्पफलें आणून देऊन गुरुसेवेंत तो तत्पर असे. इकडे यौवनसंपन्न देवयानीही त्यानें संतुष्ट होऊन, गायनविहारांनीं त्या व्रतस्थ कचाची बरदास्त ठेवी. ह्याप्रमाणें पांचशें वर्षें लोटलीं. इतक्यांत तो त्या ठिकाणीं ह्याप्रमाणें व्रतस्थ आहे ही बातमी दैत्यांच्या कानीं जाऊन एकेसमयीं तो रानांत एकटा गुरें राखीत असतांना त्याला गांठून बृहस्पतींसंबंधाच्या त्यांच्या द्वेषामुळें व संजीविनी विद्येचें रक्षण व्हावें म्हणून त्यांनीं त्याचे हजारों तुकडे करून लांडग्यांना खाऊं घातले. पुढें गाई कचाशिवाय एकट्याच रानांतून परत आलेल्या पाहून देवयानी पित्याला म्हणाली, 'सूर्यही अस्ताला जाऊन अग्निहोत्राचा अग्नि पेटला आहे. गाईही रानांतून एकट्याच परत आल्या. पण बाबा, कच कोठें आलेला दिसत नाहीं. खात्रीनें त्याला कांहीं तरी अपाय झाला असला पाहिजे, तो मेला असला पाहिजे. मी आपल्याला खचित सांगतें कीं, त्याच्याशिवाय मी आपले प्राण ठेवणार नाहीं.' तें ऐकून शुक्राचार्य ह्मणाले, 'हा मी त्याला हाक मारून फिरून जिवंत करतों पहा.' असें म्हणून संजीविनी विद्येचा प्रयोग करून त्यांनीं कचाला हाक मारली. त्याबरोबर लांडग्यांचीं शरीरें फाडून बाहेर पडून तो गुरूपुढें येऊन उभा राहिला. तुला उशीर कां लागला म्हणून देवयानीनें विचारलें असतां त्यानें उत्तर दिलें, 'समिधा, दर्भ व लांकडाची मोळी घेऊन आश्रमाकडे परत येत असतां जवळच असलेल्या वटवृक्षाखालीं मी विसाव्यासाठीं बसलों. गाईही त्या ठिकाणीं छायेला उभ्या होत्या. इतक्यांत दैत्यांनीं मला पाहून 'तूं कोण आहेस,' म्हणून विचारलें. व मी बृहस्पतिपुत्र कच आहें असें समजल्याबरोबर माझे शेंकडों तुकडे करून त्यांनीं लांडग्यांना खाऊं घातले व घराकडे चालते झाले. भद्रे, गुरूंनीं आपल्या संजीविनी विद्येच्या प्रभावानें मला पुनर्जन्म दिल्यामुळें मी येथें तुझ्यापाशीं फिरून येऊन हजर झालों.' फिरून एकदां देवयानीच्या आ-

झेनें फुलें आणण्याला तो रानांत गेला असतां दैत्यांनीं त्याला गांठून मारून वांटून समुद्राच्या पाण्यांत मिसळून आपल्या घराकडे चालते झाले. फिरून कच आला नाहींसें पाहून देवयानीनें पित्यापाशीं काकुळत केली व फिरून त्यांनीं आपल्या विद्येच्या प्रभावानें हाक मारल्याबरोबर तो गुरूपुढें येऊन हजर झाला व त्यानें घडलेली सर्व हकीकत गुरूंना सांगितली. पुढें तिसऱ्या वेळीं दैत्यांनीं त्याला मारून जाळून भस्म करून तें भस्म दारूमध्यें गुरूंना पाजलें. तेव्हां फिरून देवयानीची प्रार्थना ऐकून शुक्राचार्य म्हणाले, ' अनेकवार मीं त्याला जिवंत केलें असतां दैत्य त्याला फिरून फिरून मारतात, ह्याला काय उपाय करावा ? उगीच त्याबद्दल शोक करूं नकोस.देव, दैत्य व ब्राह्मण तुला हात जोडतात असें असतां यःकश्चित् पामरासाठीं शोक करणें तुला शोभत नाहीं. आतां माझ्यानें ह्याला जिवंत करवत नाहीं. ' हें ऐकून देवयानी म्हणाली, ' बाबा, ज्याचे आजे अंगिरा व ज्याचे वडील बृहस्पती असून जो स्वतः नेहमीं ब्रह्मचर्यानें तपांत गढला असे, अशा ह्या कचासंबंधानें मला शोक कसा बरें होणार नाहीं ? बाबा, मी अन्न न घेतां कचाची वाट धरणार. कारण तो मला फार प्रिय होता. ह्याप्रकारें तिची कटकट ऐकून कर्तव्यतामूढ होऊन शुक्र मनांत म्हणाले, ' हे दैत्य खास माझा द्वेष करतात. कारण ते माझ्या शिष्यावर उठले आहेत. हे दुष्ट पापकर्में करण्यास तयार झाले आहेत. माझ्याशीं ह्यांचें वर्तन योग्य नाहीं. ह्या पापकर्माचा शेवट येथेंच होईल तरी बरें. ब्रह्महत्येच्या तावडींतून कोण सुटला आहे. मग तो इंद्र असला म्हणून काय झालें? ' ह्याप्रकारें विचार करून कचाला त्यांनीं हांक मारतांच तो घाबरून जाऊन पोटांतूनच त्यानें हलके ' ओ ' दिली व तूं कोणत्या मार्गानें पोटांत शिरलास म्हणून गुरूंनीं विचारलें असतां तो म्हणाला, ' महाराज, आपल्या कृपेनें माझी प्रज्ञा अद्यापि कायम आहे. सर्व घडून आलेल्या गोष्टी कशा घडून आल्या हें मला पक्कें स्मरत आहे. माझ्या तपामध्यें कांहीं कमी पडलें असावें म्हणून असे दुःसह क्लेश मला वारंवार सोसाव लागत आहेत. आपल्यापुढें ब्राम्ही अगर आसुरी मायेचा काय पाड लागणार आहे ? ' हें ऐकून शुक्राचार्य मुलीला म्हणाले, ' आज मी तुझें काय प्रिय करूं ? कचाला जिवंत करण्याला माझा प्राण खर्ची घालावा लागणार. माझ्या पोटांतून बाहेर पडण्याला दुसरा मार्ग नाहीं.' देवयानी म्हणाली, 'दोन्ही दुःखें मला सारखींच दुःसह होणार आहेत. कचाच्या मरणानें मला ह्या जगांत कांहींच सुख उरत नाहीं व आपल्या मरणानंतरही माझे प्राण राहणें शक्य नाहीं. शुक्राचार्य म्हणाले, ' हे बृहस्पतिपुत्रा, तूं गुणवान आहेस म्हणून तुझ्या गुणाला लुब्ध होऊन देवयानीची तुझ्यावर भक्ति बसली आहे.जर तूं कचरूपधारी इंद्र नसशील तर माझ्यापासून ही विद्या घेऊन बाहेर पड. माझ्या उदरांतून कोणी ब्राह्मणेतर जिवंत बाहेर पडणार नाहीं. वत्सा, बाहेर पडल्यावर तूं माझा पुत्र झालास. मग तूं मला जिवंत कर. ही विद्या मोठ्या काळजीपूर्वक जतन कर. ' ह्याप्रमाणें गुरूंपासून विद्या घेऊन त्यांचें पोट फाडून शुक्लपक्षांतील पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें तो बाहेर पडला; व शुक्राचार्य मरून भस्मराशी होऊन पडले असतां त्यांना उठवून तो म्हणाला, ' ज्याअर्थीं मज अज्ञानावर आपण अमृत सिंचन केलें आहे, त्याअर्थीं मी आपणाला आपल्या जनकाप्रमाणें समजतों. आपला द्रोह माझ्याकडून कधीं घडणार नाहीं. जे **आपल्यासारख्या ज्ञानभांडारापासून ज्ञान संपादन करून तें देणाऱ्या पूज्य गुरूंला योग्य मान देत नाहींत असे नराधम खचित दुर्गतीला जातात.** ' मद्यप्राशनानें संज्ञा जाऊन हें अरिष्ट ओढवल्यामुळें राग येऊन ब्रह्महित लक्षांत घेऊन, ' **जो कोणी मंदबुद्धि ब्राह्मण आजपासून मूर्खपणानें मद्य प्राशन करील तो इहलोकीं धर्मभ्रष्ट होऊन ब्रह्महत्येचें पाप त्याचे माथीं लागून तो लोकांमध्यें निंद्य होईल,** असा शाप देऊन मद्य प्राशनाचा त्यांनीं निषेध केला. गुरूंपाशीं हजार वर्षे राहिल्यावर व्रतोद्यापन करून गुरूंची आज्ञा घेऊन कच देवलोकाला जाण्याला निघाला असतां देवयानी त्याला म्हणाली, ' हे अंगिरापौत्रा, तूं आपल्या कडकडीत व्रतानें, कुलानें, विद्येनें, तपानें, व आत्मनिग्रहानें कसा झळकत आहेस. अंगिरा व बृहस्पति हे दोघेही मला पूज्य आहेत, हें लक्षांत घेऊन माझें भाषण

नीट ऐकून घे. तूं व्रतस्थ असतां माझें तुझ्याशीं कसें वर्तन होतें ही गोष्ट ध्यानांत आणून विधिपूर्वक माझें पाणिग्रहण करून माझा तूं अंगीकार कर.' तें ऐकून कचानें उत्तर दिलें, 'तुझ्या पित्याहून तूं मला विशेष पूज्य व मान्य आहेस व गुरूजींच्या प्राणासमान अशी तूं मला नेहमीं पूज्यच असणार हें खरें; पण तुझी ही आज्ञा मात्र मला मानतां येत नाहीं. कारण तुझे वडील मला पित्यासमान आहेत.' ती म्हणाली, 'तूं बृहस्पतीचा पुत्र आहेस. बाबांचा नव्हेस. दैत्यांनीं अनेकवार तुझ्या प्राणावर गदा आणिली असतां तुझ्यावरच्या माझ्या प्रेमामुळेंच तुला वाचवून स्नेह व प्रेम ह्यांचा उत्तम मामला मीं तुला दाखविला आहे, हें तूं विसरूं नकोस.' कच म्हणाला, 'हे सुहास्यवदने, तूं अनुचित करण्यास सांगत आहेस. रागावूं नकोस. गुरूंपेक्षांही तूं मला थोर आहेस. ज्या गुरूंच्या उदरांत तूं होतीस तेथेंच मीही पण होतों. म्हणून धर्मदृष्टीनें तूं मला असें करण्यास सांगू नयेस. हे कल्याणि, मीं येथें फार सुखांत दिवस काढिले. तुझ्या भाषणाचा मला राग मुळीं नाहीं. मी आतां तुझा निरोप घेतों. माझा मार्ग सुखकर होवो म्हणून तूं मला आशीर्वाद दे. धर्माच्या आड न येतां कथाप्रसंगीं तूं माझी आठवण ठेव व माझ्या गुरूंची नेहमीं काळजी घे.' देवयानी म्हणाली, 'धर्मकामासाठीं तोंड पसरलें असतां तूं मला झिडकारीत आहेस तर तझी विद्या तुला फलद्रुप होणार नाहीं.' कच म्हणाला, 'तुला नाकारण्यांत माझा अन्य कांहीं हेतु नसून तूं गुरूभगिनी आहेस एवढ्याचमुळें तुझी आज्ञा मला मान्य करतां येत नाहीं. गुरुआज्ञेवांचून ज्याअर्थीं कामाधीन होऊन न्यायान्याय न पाहतां तूं मला हा शाप दिला आहेस त्याअर्थीं तो तुझा काम कधीं सफल होणार नाहीं. कोणीही ऋषिपुत्र तुझें पाणिग्रहण करणार नाहीं. माझी विद्या मला फलद्रुप झाली नाहीं तर ती मी ज्याला शिकवीन त्याला तर ती फलद्रुप होईल.' असें म्हणून तो देवलोकाला निघून गेला.'

१८ ययाति आख्यान. (१. ७८-९३)

'इकडे कच विद्या संपादन करून परत आल्यावर दैत्यांवर स्वारी करून जय मिळविण्याचा समय आलासें वाटून इंद्रासह सर्व देव त्यांच्याशीं युद्ध करण्याकरितां निघून एका अरण्यांत आले. तेथें कांहीं मुली जलक्रीडा करीत असून त्यांचीं वस्त्रें तीरावर पडलीं होतीं; इंद्राने तीं एकांत एक मिसळून टाकिलीं. पाण्यांतून वर आल्यावर त्या मुलींनीं आपापलीं वस्त्रें घेतलीं. वृषपर्व्याची मुलगी शर्मिष्ठा ही चुकून देवयानीचें वस्त्र नेसली. त्यावरून त्यांचें भांडण जुंपलें. देवयानी म्हणाली, 'हे दैत्यकन्ये, तूं माझी शिष्यीण असून माझें वस्त्र कां नेसलीस? कोणाशीं कसें वागावें हें सुद्धां तुला कळत नाहीं. तुझें कधीं कल्याण होणार नाहीं.' शर्मिष्ठा म्हणाली, 'तुझा भिकारडा बाप तर बसल्या उठल्या बाबांचा भाटासारखा स्तुतिपाठ गातो. उगीच दिमाख कशाला लावतेस. तूं त्या भिकारड्या हात पसरण्याऱ्या स्तुतिपाठकाची पोर असून भी तर स्तुतीला पात्र, दाता व कधीं हात न पसरणारा अशा राजाची मुलगी आहें. भिकारडे, तडफड, जळफड, बोटें मोड, डोक्यांत राख घालून घे. वाटेल तें कर. मी कुठें त्याला जुमानतें. उगीच वैर मात्र जोडून घेत आहेस. मला तुझी पर्वा थोडीच आहे.' असें म्हणून तिला विहिरींत ढकलून ती मेली असें समजून मागचा पुढचा पोच न बघतां ती घराकडे तडक चालती झाली. इतक्यांत ययाति राजा हरणाच्या मागें लागून रथाचे घोडे व स्वतः दमून गेल्यामुळें भुकेनें व तहानेनें व्याकुळ होऊन तेथें आला, व त्या कोरड्या ठणठणीत विहिरींत डोकावून पहातो तों अग्निशिखेसारखी ही मुलगी आंत त्याच्या दृष्टीस पडली. मधुर शब्दांनीं तिचें शांतवन करून 'कुंडलें चुरमुडून तोंड लाल झालेली अशी दीर्घ उच्छ्वास टाकणारी तूं कोण? अशी कष्टी होऊन कां रडत आहेत? व गवत व वेली ह्यांनीं भरलेल्या ह्या विहिरींत तूं कशी पडलीस,' म्हणून त्यानें तिला विचारलें; व तिच्यापासून ती शुक्राचार्यांची कन्या आहे असें कळल्यावर तिच्या विनंतीवरून त्यानें तिचा उजवा हात धरून तिला वर काढिलें व तिचा निरोप घेऊन तो आपल्या नगरीला निघून गेला. तो गेल्यावर झालेला वृत्तांत पित्याला कळवून वृषपर्व्याच्या नगरींत मी पाऊल टाकणार नाहीं असें आपल्या पित्याला कळविण्याकरितां देवयानी-

नें आपली घूर्णिका नांवाची सखी त्याकडे पाठविली. ती हकीकत ऐकून शुक्राचार्यांना वाईट वाटलें व मोठ्या लगबगीनें नगराबाहेर येऊन त्या निर्जन भागीं आपल्या मुलीला एकटी पाहून त्यांना गहिंवर आला व तिला आलिंगन देऊन ते ह्मणाले, 'ह्या जगीं सर्वांना त्यांच्या पापपुण्याप्रमाणें सुखदुःख प्राप्त होतें. काहीं तरी संचित पाप असलें पाहिजे, त्याची ही फेड झाली असें मला वाटतें.' देवयानी ह्मणाली, 'तें कांहीं असो. माझें भाषण आपण लक्षपूर्वक ऐका. शर्मिष्ठेचें ह्मणणें जरी अक्षरशः खरें असलें तरी तें फार निष्ठुरतेचें असल्यामुळें त्यानें माझ्या मनाला घरें पाडलीं आहेत. तिच्या ह्मणण्याप्रमाणेंच जर असेल तर मी जाऊन तिचे पाय धरतें.' शुक्राचार्य ह्मणाले, 'ती काय ह्मणते. सर्व दैत्यांच्या संपत्तीचा मी मालक आहें, हें गूढ त्या एका वृषपर्व्याला च ठाऊक आहे. देवयानि **परनिंदा जो निमुटपणें सहन करतो त्यानें सर्व जिंकलें ह्मटलें पाहिजे.** घोड्याप्रमाणें आलेला राग ज्याला आवरतां येतो त्यालाच शहाणे लोक यंता ह्मणतात. **सर्प ज्याप्रमाणें आपली जुनी कात टाकून देतो त्याप्रमाणें आलेला राग जो शांतपणें दूर करतो त्यालाच मनुष्य हें नांव शोभतें.** आलेला राग जो आवरून धरतो, परानिंदा जो सहन करतो, व जो चिडविलें असतांही चिडत नाहीं तोंच लक्ष्मीचें माहेरघर बनतो. **जो मनुष्य न चुकतां शंभर वर्षें महिन्या महिन्याला यज्ञ करतो व जो कोणावर कधीं रागावत नाहीं ह्या दोघांमध्यें तुलना केली असतां दुसराच श्रेष्ठ ठरतो. मुलें अज्ञानानें एकमेकांशीं भांडतात त्यांचें अनुकरण शहाण्यांनीं करूं नये.** मुलांना आपलें व दुसऱ्याचें बलाबल जाणण्याचें सामर्थ्य नसतें.' हा उपदेश ऐकून देवयानी ह्मणाली, 'बाबा, बलाबल व धर्माधर्म" ह्या गोष्टी मला कळत नाहींत असें नाहीं व रागावण्यांत व भांडण्यांत नफानुकसान काय आहे हेंही मला कळतें. परंतु ह्या जगांत ह्मणून ज्याला रहावयाचें आहे त्यानें शिष्याचें टाकून बोलणें कधीं निमुटपणें सोसतां कामा नये. ह्मणून **जेथें चाल बिघडली तेथें राहणें मला प्रशस्त वाटत नाहीं. जे लोक वृत्ति व कुल ह्यासंबंधाचें उणें काढतात अशा पापी लोकांची संगत शहाण्या मनुष्यानें-मग तो गरजू का असेना-टाळावी हेंच श्रेयस्कर आहे.** आपलें कूळ व वृत्ति ह्यांची योग्य पारख असणाऱ्या भल्या गृहस्थाच्या घरीं रहागें चांगलें व कल्याणकारक आहे. वृषपर्व्याच्या मुलीचें टाकून बोलणें अग्नि काढूं पाहणारा ज्याप्रमाणें अरणीला पीडा हेतो त्याप्रमाणें माझ्या हृदयाला घरें पाडीत आहे. **अभिमान बाजूला ठेवून वैऱ्याच्या भव्य संपत्तीचा दास बनून रहाण्यापेक्षां कष्टतर त्रैलोक्यांत दुसरें कांहीं नसेल** असा माझा समज आहे. शहाण्याच्या मतानें मरण देखील ह्यापेक्षां अधिक चांगलें आहे.' हें मुलीचें भाषण ऐकून शुक्राचार्य संतापले व वृषपर्व्याकडे जाऊन त्याला ह्मणाले, 'राजा, **अधर्माचरण जरी भूमीप्रमाणें तात्काल फलद्रूप होत नाहीं तरी कालांतरानें तें कर्त्याचीं पाळेंमुळें खणून काढतें.** जडान्नाप्रमाणें आपल्या पापाचें प्रायश्चित्त आपल्याला ह्मणा अगर आपल्या पोराबाळांना ह्मणा मिळाल्यावांचून रहात नाहीं. प्रथम माझ्या शुश्रूषेंत रत असलेल्या ब्राह्मणशिष्याचा व आतां माझ्या मुलीचा अपराध केल्यामुळें मी तुला व तुझ्या सर्व आप्तवर्गाला सोडून जाणार. तुझ्या राज्यांत आतां माझ्यानें राहवत नाहीं. काय चमत्कार! माझी ही वृथा बडबड चालली आहे असें तुला वाटतें का? ह्मणून कांहीं उत्तर न देतां तूं स्वस्थ माझें भाषण ऐकत बसला आहेस?' वृषपर्वा ह्मणाला, 'गुरुमहाराज, अधर्म अगर असत्य भाषण आपल्या हातून कधीं घडलें नसून धर्माची व सत्याची आपण केवळ मूर्ति आहां. आपली अवकृपा होईल तर आह्मांला समुद्रांतच उडी घेतली पाहिजे. आपल्यावांचून आह्मांला दुसरा आधार नाहीं. अश्वगजादि पृथ्वीवरील सर्व असुरसंपत्तीला मूळ आपण असून त्यांचे स्वामीही आपणच आहां, शुक्राचार्य ह्मणाले, 'हें जर खरें आहे तर देवयानीला संतुष्ट कर.' हें ऐकून तो दैत्य देवयानीजवळ जाऊन तिला ह्मणाला, 'हे सुहास्यवदनें देवयानि, तुला पाहिजे तें माग. तें कितीही दुर्लभ असलें तरी तुला मी मिळवून देण्याला तयार आहें.' देवयानी ह्मणाली, 'हजार दासींसह शर्मिष्ठेनें माझें दास्य क-

रावें एवढेंच मला पाहिजे. बाबा मला देतील तिकडे तिनें माझ्यामागें आलें पाहिजे.' हें ऐकून राजानें शर्मिष्ठेकडे दाई पाठविली. ती जाऊन शर्मिष्ठेला म्हणाली, 'मुली, उठ. ज्ञातीच्या कल्याणाकडे लक्ष दे. देवयानीच्या चिथविण्यावरून आचार्य आपल्या शिष्यांना सोडून जात आहेत. ती म्हणेल तें आज तुला निमूटपणें ऐकलें पाहिजे.' शर्मिष्ठा म्हणाली, 'ही पहा माझ्याकडून तयारी आहे. माझ्यासाठीं गुरूंनीं जाऊं नये.' असें म्हणून पित्याच्या आज्ञेवरून हजार दासींसहवर्तमान ती नगराबाहेर येऊन देवयानीला म्हणाली, 'ही मी हजार दासी घेऊन तुझी दासी होण्याला आलें आहे. आचार्य तुला देतील त्या ठिकाणीं तुझ्यामागें येण्याला मी तयार आहें.' देवयानी म्हणाली, 'मी यःकश्चित भिकाऱ्याच्या स्तुतिपाठकाची मुलगी असून तूं तर ज्याचा नेहमीं जयजयकार होतो अशा त्या वृषपर्व्याची कन्या आहेस. असें असून तूं माझी दासी कशी होतेस?' शर्मिष्ठा म्हणाली, 'संकटांत सांपडलेल्या ज्ञातीचें कसें तरी कल्याण झालें पाहिजे म्हणून मी ह्याला कबूल झालें आहें.' नंतर देवयानी समाधान पावून पित्यासह नगराला परत आली.

पुढें कांहीं दिवसांनीं हजार दासींसह शर्मिष्ठेला बरोबर घेऊन देवयानी क्रीडा करण्याकरितां त्याच वनांत आली असतां अनेक फलपुष्पांचा रसास्वाद घेत ती तेथें विहार करीत हिंडत होती. ययाति राजाही पुन्हां मृगाच्या मागें लागून दमून व तृषाकुल होऊन सहजगत्या त्या ठिकाणीं आला. त्यावेळीं उत्तम वस्त्रालंकारांनीं विभूषित अशा त्या मुली तेथें विहार करतांना त्याच्या दृष्टीस पडल्या. शर्मिष्ठेला देवयानीचे हातपाय रगडतांना पाहून त्या लावण्यवती देवयानीला त्यानें तिचें नांव व गोत्र विचारलें. देवयानीनें सर्व हकीकत सांगितल्यावर 'ही सुभ्रू तुझी दासी म्हणतेस हें कसें,' म्हणून राजानें उलट विचारलें. तेव्हां ती म्हणाली, 'हे नरश्रेष्ठा, ह्या सर्व गोष्टी दैवाधीन आहेत. दैव नाहीं म्हणणाऱ्यांचा केवळ वृथा अभिमान आहे. आपलें रूप तसाच आपला वेष क्षत्रियासारखा दिसत असून आपलें भाषण मात्र ब्राह्मणासारखें आहे. आपण कोण, कोणाचे, कोठून आलां हें जाणण्याची मला उत्कट इच्छा आहे.' ययातीनें उत्तर दिलें, 'ब्रह्मचर्यामध्यें सर्व वेद माझ्या कानावरून गेले आहेत. मी ययाति राजा आहें.' नंतर 'हरणाच्या मागें लागून तृषार्त झाल्यामुळें मी येथें आलों,' असें त्याचें भाषण ऐकून 'शर्मिष्ठा व तिच्या दोन हजार सख्या यांसह मी आपली आहें, माझें आपण पाणिग्रहण करा,' अशी देवयानीनें त्याची प्रार्थना केली. ती ऐकून ययाति म्हणाला, 'हे औशनसे, तुझें कल्याण असो, पण मी तुला योग्य वर नाहीं. राजानीं ब्राह्मणकन्येशीं लग्न लावूं नये. **चतुर्वर्णांची उत्पत्ति जरी एकच देहापासून आहे तरी आचारविचाराच्या योगानें त्यांना भिन्नता येऊन ब्राह्मण सर्वांत श्रेष्ठ गणले आहेत.**' ती म्हणाली, ब्राह्मणापासून क्षत्रियांची उत्पत्ति झाली आहे व क्षत्रियांशीं ब्राह्मणाचा संबंध झाला आहे. आपण स्वतः ऋषिसमान असून माझ्याशीं लग्न लावण्याला योग्य आहां. लग्न होण्याचे पूर्वीच आपण माझें पाणिग्रहण केलें आहे व हा वरण्याचा विधि आतां मागून चालला आहे. म्हणून अशा प्रकारचा पाणिग्रहणमार्ग पूर्वी कधीं कोणाकडूनच घडला नसेल. जो हा माझा पाणि आपण ऋषी म्हणा, अगर ऋषिपुत्र म्हणा, पूर्वी ग्रहण केला आहे, त्याला आतां दुसरा कोण पुरुष स्पर्श करील?' ययाति म्हणाला, 'खवळलेल्या सर्पापेक्षां अगर पेटलेल्या अग्नीपेक्षां ब्राह्मण अधिक जाज्वल्य आहेत. त्यांच्या वाटेस शहाण्यानें कधीं जाऊं नये. सर्प चावून एकालाच ठार करतो. शस्त्रानेंही एकालाच मरण येतें, पण खवळलेल्या ब्राह्मणांपासून सर्व राष्ट्राचा फडशा उडतो. म्हणून हे कल्याणि, तुझ्या पित्याची आज्ञा असेल तर ह्या तुझ्या म्हणण्याला माझा रुकार आहे.' ह्यावर शुक्राचार्यांच्या आज्ञेनें त्यानें तिचें पाणिग्रहण केलें. त्या वेळीं 'देवयानी व शर्मिष्ठा ह्या दोघींच्या ठिकाणीं चांगलें प्रेम ठेव, पण शर्मिष्ठेशीं संबंध ठेवूं नकोस,' असें शुक्राचार्यांनीं त्याला निक्षून सांगितलें. पुढें त्या सर्वांसहवर्तमान आपल्या नगरीला परत येऊन त्यानें देवयानीला अंतःपुरांत ठेविलें व तिच्याच विचारानें अशोकवनाजवळ एक गृह बांधून देऊन तेथें शर्मिष्ठेला ठेविलें. अनेक वर्ष त्यानें देवयानीशीं सुखांत काढिलीं. ऋतुकालीं गर्भ

राहून तिला मुलगा झाला. इकडे शर्मिष्ठेचा ऋतुकाल आला असतां तिला वाटलें. 'ऋतुकाल प्राप्त झाला असून अद्यापि पतीला ठिकाण नाहीं. अशा समयीं काय करणें उचित होणार आहे. काय केल्यानें कर्तव्य केल्यासारखें होईल ? देवयानीला मुलें देखील झालीं. माझें मात्र यौवन व्यर्थ चाललें आहे. तिच्याप्रमाणें राजापासूनच मी पुत्रफल मागून घेतें म्हणजे झालें. त्याला तें नाहीं म्हणतां येणार नाहीं. पण त्या धर्मात्म्याची व माझी एकांतांत गांठ कशी पडावी ? '

इतक्यांत ह्याच समयाला राजा सहजगत्या नगराबाहेर पडला असून शर्मिष्ठेला त्या अशोकवनाजवळ पाहून थांबला. ह्याप्रमाणें त्या ठिकाणीं त्याला एकटा पाहून त्याच्यापुढें जाऊन हात जोडून ती म्हणाली, ' चंद्र, इंद्र, विष्णु, यम, नरुण अथवा हे नाहुषराज, आपण ह्या इतक्यांच्या घरीं परस्त्रीकडे पापदृष्टीनें पहाण्याची कोणाही पुरुषाची छाती नाहीं. माझें रूप, कुल व चाल आपण जाणतांच. आतां जें मी बोलणार त्याबद्दल मला क्षमा करा. हे राजन् माझा ऋतु सफल करा. ' तें ऐकून ययाति म्हणाला, 'दैत्यकन्ये, तूं रूपवती असून दोष काढण्याला तुझ्या ठिकाणीं तिळभर जागा नाहीं हें मी जाणून आहें. परंतु शयनीं तुझ्याशीं संबंध न ठेवण्याविषयीं शुक्राचार्यांची मला साफ आज्ञा आहे. ' शर्मिष्ठा म्हणाली, ' राजन्, थट्टेमध्यें, स्त्रियांच्या बाबतींत, विवाहाच्या बाबतींत, प्राण वांचविण्यासाठीं व सर्व संपत्तीचा नाश होत असला तर त्यापासून त्याचें रक्षण करण्यासाठीं खोटें बोललें असतां त्याची पातकांत गणना होत नाहीं, साक्षीचे वेळीं विचारलें असतां खरें न सांगणारा पतित हें म्हणणें चुकीचें आहे. कारण गाय, ब्राह्मण, स्त्री, दीन व अनाथ ह्यांसाठीं खोटें बोलणें पाप नसून उलट पुण्यकारक आहे. देवयानी व मी आह्मी दोघीजणी येथें एकाच उद्देशानें आलों असून फक्त देवयानीचाच परामर्श घेणें आपलें कर्तव्य समजणारे आपणच असत्य भाषण करणारे नव्हे कां ? याबद्दल मात्र आपण पापाला धनी व्हाल. ' ययाति म्हणाला, ' राजा, सर्वांना प्रमाणभूत असल्यामुळें त्याचें कधीं दुटप्पी वर्तन असूं नये, म्हणून मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगीं देखील गैरशिस्त वर्तन माझ्या हातून घडूं नये. ' शर्मिष्ठा म्हणाली, ' राजन्, सखीचा पति व आपला पति ह्यामध्यें भेद नाहीं. **सख्यासहवर्तमानच्च पाणिग्रहण होत असतें,** माझ्या सखीनें आपणाला वरलें आहे त्याअर्थीं आपण माझेही पति आहां. राजन्, माझ्या हातून अधर्म न घडेल अशी तजवीज करा म्हणजे झालें. आपल्यापासून पुत्रप्राप्ति करून घेऊन लोकांत धर्माचरण करीत राहीन. **ह्या जगांत स्त्री, दास व पुत्र ह्या तिघांचें आपल्या मिळकतीवर स्वामित्व नसून ते ज्यांच्या पदरीं पडतात त्यांचेंच त्यांवर स्वामित्व राहतें.** मी देवयानीची दासी आहें व ती आपली बायको आहे. म्हणून आम्हां दोघींवर आपलें स्वामित्व आहे. ह्याकरितां आपण माझा अंगीकार करा. ' शर्मिष्ठेच्या भाषणांत पुष्कळ तथ्य आहेसें पाहून ' याचकाला नाहीं म्हणावयाचें नाहीं हें माझें व्रत असल्यामुळें केवळ याचना म्हणून मी तुझें म्हणणें मान्य करतों, ' असें म्हणून त्या राजशार्दूलानें तिचा अंगीकार केला. त्यापासून तिला गर्भ राहून योग्यकालीं कमलनेत्र व मनाला आल्हाद देणारा तिला मुलगा झाला. तें देवयानीच्या कानावर गेल्यावर तिनें शर्मिष्ठेची खरड काढिली. तेव्हां ' कोणी वेदपारग अतिथि आला होता त्याच्यापाशीं धर्माचें उल्लंघन न करितां ऋतुकालीं भिक्षा मागितल्यावरून त्यापासून हा मला धर्मानें मुलगा झाला आहे. ' असें तिचें भाषण ऐकून देवयानी समाधान पावली. पुढें कांहीं कालानें देवयानीला दोन व शर्मिष्ठेला तीन मुलगे झाले. पुढें एकेसमयीं देवयानी ययातिसह त्या वनांत गेली असतां तिनें ते शर्मिष्ठेचे देवतुल्य मुलगे खेळतांना पाहून ' तुम्ही कोणाचे ' म्हणून तिनें त्यांना प्रश्न केला. राजाकडे बोट दाखवून, ' आह्मी शर्मिष्ठेपासून झालेले राजपुत्र आहों, ' असें त्यांनीं उत्तर दिलें. तें ऐकून संतापून जाऊन ती शर्मिष्ठेला म्हणाली, ' माझी बटीक असून हें साहस तूं कसें केलेंस ? असुरधर्माला अनुसरून तूं अगदीं निर्भय झालीस. ' शर्मिष्ठा म्हणाली, ' हे चारुहासिनि, ऋषी म्हणून जें मीं तुला सांगितलें तें कांहीं खोटें नव्हतें. न्यायानें व धर्मानें चाललें

असतां मला तुला भिण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. तूं महाराजांना पति वरलेंस त्याचवेळीं ते माझेही पति झाले आहेत. तूं मला पूज्य आहेस, मान्य आहेस, माझ्यापेक्षां थोर• आहेस, तूं ब्रह्मकन्या आहेस; ह्या सर्व गोष्टी खऱ्या. पण ते राजर्षी तुझ्यापेक्षां मला अधिक पूज्य आहेत हें मात्र तूं विसरूं नकोस.' हें शर्मिष्ठेचें भाषण ऐकून राजवाड्यांत पाऊल टाकावयाचें नाहीं असा निश्चय करून देवयानी शुक्राचार्यांकडे जाण्याला निघाली. घाबरून पश्चात्ताप होऊन राजा तिच्या मागून तिची समजूत करीत निघाला. देवयानी पित्याकडे येऊन त्यापुढें उभी राहून म्हणाली, 'अधर्मानें धर्माला मागें सारलें. खऱ्याला काळ व खोट्याला सुकाळ अशी वेळ आली. शर्मिष्ठेनें मला मागें सारलें. धर्मज्ञ म्हणून ज्याच्या नांवाचा डंका त्रिभुवनांत वाजत आहे, त्या ह्या राजानें धर्ममर्यादा सोडली आहे. ह्यापासून शर्मिष्ठेला तीन मुलगे झाले आहेत.' हें ऐकून 'धर्मज्ञ असून अशी अधर्मरति दाखविलीस त्याअर्थी अकालींच तुला जरा प्राप्त होईल,' म्हणून शुक्राचार्यांनीं राजाला शाप दिला. ययातीनें विनंति केली, 'भगवन्, ऋतुकालीं तिनें भिक्षा मागितली असतां अनन्यभावानें केवळ धर्मसंरक्षणार्थ ती मीं तिला घातली. ऋतुकालीं ऋतुभिक्षा जो पुरुष घालीत नाहीं अशा नराधमाला भ्रूणहत्येचें महापातक लागतें. इत्यादि कारणांचा विचार करून हातून अधर्म घडूं नये म्हणून मीं शर्मिष्ठेशीं संबंध केला.' तें ऐकून शुक्राचार्य म्हणाले, 'असें होतें तरी तूं सर्वस्वी माझ्या आधीन असल्यामुळें माझ्या आज्ञेची वाट पहावयाची होतीस. **कांहीं तरी सबबीवर धर्माच्या नांवावर मनःपूतं आचरण करणाऱ्याला चोर ही संज्ञा आहे.** असो. ही तुझी जरा तुला दुसऱ्याला देतां येऊन त्याचें यौवन तुला घेतां येईल. आणि जों तुझा पुत्र आपलें यौवन तुला देऊन तुझी जरा घेईल तोच राज्याचा उपभोग घेईल, व पुण्य व कीर्ति संपादन करील.' असा त्यांनीं त्याला उच्छाप दिला. नंतर राजा आपल्या नगरीला परत गेला.

पुढें शुक्राचार्यांच्या शापानें त्याला अकालीं म्हातारपण येऊन अंगाला सुरकुत्या पडल्या असतां त्यानें आपल्या वडील मुलाला हांक मारून 'माझी जरा घेऊन आपलें यौवन अल्पकालपर्यंत तूं मला देतोस का,' म्हणून विचारलें. तेव्हां तो म्हणाला, 'खाण्यापिण्यासंबंधाच्या अनेक गैरसोयी जरेमध्यें आहेत, जरेनें सर्व गात्रें शिथिल पडतात, केंस पांढरे होतात, उत्साहवृत्ति मुळींच रहात नाहीं, अंगाला सुरकुत्या पडतात, व मनुष्य शक्तिहीन व कृश होतो. म्हणून ती मी घेऊं इच्छित नाहीं. माझ्यापेक्षां आवडते असे आपले दुसरे पुष्कळ मुलगे ह्या कामाला योग्य आहेत, त्यांना विचारा.' हें ऐकून 'मी तुझा जन्मदाता असून तूं मला आपलें यौवन देण्याला नाकारतोस तर माझ्या राज्याचा तुला उपभोग मिळणार नाहीं,' म्हणून ययातीनें त्याला शाप दिला. ह्याचप्रमाणें पुरूखेरीज इतर सर्वांनीं नाकारल्यावर ययातीनें त्यांना अशाच प्रकारचा शाप देऊन पुरूला विचारलें. तेव्हां तो नम्रतेनें म्हणाला, 'महाराज, आपण कराल ती आज्ञा मला शिरसा मान्य आहे. आपल्या आज्ञेवरून हजार वर्षं आपली जरा घेऊन माझें यौवन मी आपल्याला देण्याला तयार आहें. आपण यथेष्ट विषयोपभोग घ्या.' ह्या त्याच्या भाषणानें संतुष्ट होऊन 'तूं राज्याचा व सुखाचा उपभोग घेशील,' असा ययातीनें त्याला आशीर्वाद देऊन, शुक्राचार्यांचें स्मरण करून आपली जरा त्यानें पुरूला दिली, आणि त्याचें यौवन घेऊन तो प्रिय अशा विषयांचा यथेष्ट उपभोग घेत राहिला. यज्ञांनीं देवांना, श्राद्धांनीं पितरांना, गरिबांची इच्छा पूर्ण करून त्यांना, ब्राह्मणांना त्यांना पाहिजे तें देऊन, अभ्यागतांना भोजन घालून, वैश्यांना त्यांचें परिपालन करून, शूद्रांना त्यांवर ममता दाखवून, तसेंच चोरांना सन्मार्गाला लावून त्यानें तुष्ट ठेविले. न्यायमार्गानें चालून प्रजेला संतुष्ट केलें, व धर्माच्या आड न येतां यथेष्ट विषयसुख घेतलें. पुढें तृप्ति न होऊन त्यांचा त्याला वीट मात्र आला. व ठरलेली हजार वर्षेंही संपली. तेव्हां पुरूला हांक मारून तो म्हणाला, 'वत्सा, तुझ्या यौवनानें मी यथेष्ट विषयोपभोग घेतला. **हा विषयोपभोग जसजसा घ्यावा तसतशी त्या संबंधानें इच्छा तृप्त न होतां अग्नींत तूप ओ-**

तल्याप्रमाणें ती अधिकच जोरानें भडकते. आजपर्यंत ह्या भूतलीं कनक व कांता ह्यांसंबंधानें एकाची देखील तृप्ति झाली नाहीं. ह्मणून आशाच दूर करणें श्रेयस्कर आहे. मूर्ख लोकांच्या हातून हिला सोडवत नाहीं; वृद्धापकालानेंही हिला वार्धक्य येत नाहीं. हा प्राणाचा अंत करणारा रोगच आहे. तर अशा तृष्णेला दूर करण्यांतच सुख आहे. आज हजार वर्षें त्यांत मी लंपट असून अद्यापि त्याविषयींची माझी इच्छा वाढतच आहे, म्हणून आतां मी ह्यांना सोडून द्वेषभाव टाकून देऊन, निरभिलाष होऊन मृगांसह अरण्यांत राहण्याचा हेतु मनांत आणिला आहे.' असें ह्मणून यौवन व राज्य हीं दोन्हीं त्यानें पुरूला दिलीं. **वडील मुलाच्या हयातींत धाकट्याचा राज्यावर हक्क कसा पोहोंचतो,** अशी मंत्रिपुरोहितांनी शंका घेतली असतां ययाति ह्मणाला,' पुरूशिवाय इतरांनीं माझी आज्ञा मान्य केली नाहीं; वडिलांची आज्ञा मान्य करून त्यांचें सांगणें ऐकणारा व त्यांच्या ठिकाणीं पुत्रधर्मानें वागणाराच मुलगा भल्यांना संमत आहे; पुरूनें माझी जरा घेतली ह्मणून तोच माझ्या राज्याचा उपभोग घेण्याला पात्र आहे व शुक्राचार्यांची आज्ञाही अशीच आहे.' असें त्यांना सांगून पुरूला राज्याभिषेक करून तो वनाला जाण्याची सर्व तयारी करून तपस्वी ब्राह्मणासहवर्तमान नगराबाहेर पडला. **ह्याच पुरूपासून पुरुवंश झाला.**

ह्याप्रमाणें आपल्या प्रिय पुत्राला राज्य देऊन मोठ्या समाधानानें त्यानें वानप्रस्थाश्रम स्वीकारला. सर्व इंद्रियें स्वाधीन ठेवून ब्राह्मणसमागमांत फलमूलांवर पुष्कळ काळ तो अरण्यांत राहिला. आत्मशुद्धि व इंद्रियनिग्रह करून, क्रोध जिंकून देव व पितर ह्यांना तृप्त करून, वानप्रस्थ विधीनें अग्नीला होम देत त्या ठिकाणीं जे पदार्थ मिळत होते त्यांनीं अतिथींचा सत्कार करून, व मळून नेल्यावर जमिनीवर राहिलेले धान्यकण वेंचून त्यावर आपला उदरनिर्वाह करीत तो तेथें पूर्ण हजार वर्षें तप करीत राहिला. पैकीं तीस वर्षें तो पाण्यावर होता. एक वर्षभर मोठ्या दक्षतेनें वायुभक्षण करून होता. पुढें एक वर्ष पंचाग्निसाधन करून त्यानें तप केलें. सहा महिने एका पायावर वायुभक्षण करीत राहिला. व ह्याप्रमाणें मोठी कीर्ति संपादून तो स्वर्गाला गेला. त्या पुण्यशील वशी राजाचा स्वर्गति देवांकडून मोठा आदर झाला व तो देवलोक, ब्रह्मलोक इत्यादि पहात पुष्कळ काळ त्या ठिकाणीं राहिला. कोणे एके समयीं तो इंद्राकडे गेला असतां 'पुरूनें तुझी जरा घेऊन आपलें यौवन तुला दिलें असतां तूं त्याला काय दिलेंस,' ह्मणून इंद्रानें प्रश्न केला असतां ययातीनें उत्तर दिलें;' मीं त्याला गंगा व यमुना ह्यांच्या मधल्या सर्व प्रदेशाचें स्वामित्व दिलें, व त्याच्या भावांना त्या हद्दीच्या बाहेरच्या म्लेंच्छभूमीचें स्वामित्व दिलें व त्याला पुढील उपदेशही केला; रागिटापेक्षां शांत स्वभावाचा व तापटापेक्षां सहनशील श्रेष्ठ. इतर प्राण्यांहून मनुष्य श्रेष्ठ, व मूर्खाहून विद्वान श्रेष्ठ आहे. **दुसऱ्यांनीं आपल्या नांवानें खडे फोडले तरी आपण उलट तसें करूं नये. सहनशीलाचा संतापच निंदकाला जाळून टाकतो, व निंदकाचें पुण्य त्याला येतें. निंद्य उपायांनीं शत्रूला कधीं जिंकूं नये. ज्यानें दुसऱ्याच्या मनाला दुःख होईल अशी हृदयभेदक दुरुक्ति कधीं उच्चारूं नये.** मर्मभेदक अशा कठोर व लागणाऱ्या वाक्कंटकांनीं जो दुसऱ्याला टोंचतो त्याचें प्रेतस्वरूपी तोंड सटवाईचें माहेरघर समजावें. **वाग्बाणाची वेदना मनुष्याला रात्रंदिवस सोसावी लागते. शत्रूच्या मर्मस्थळाखेरीज भलतीकडे जाऊन ते कधीं लागत नाहींत. ह्मणून ते सोडतांनाच शहाण्यानें विचार करून सोडावेत. पुढें भल्यांचें उदाहरण ठेवून मागून पाठिंबाही त्यांचाच करावा.** वाइटांची निंदा नेहमीं निमूटपणें सहन करून वर्तन चोखं ठेवून भल्यांच्या मार्गानें जावें. **ह्या भूतलावर दया, मैत्री, दान आणि मधुर भाषण ह्यांसारखें वशीकरण दुसरें कांहीं सांपडणार नाहीं. ह्मणून नेहमीं गोड बोलत असावें. कटुभाषण सोडून द्यावें. मानाला योग्य असतांल त्यांना मान द्यावा. दानशील असावें. याचना अगदीं वर्ज करावी.'** नंतर 'तपांत तूं कोणाच्या तोडीचा आहेस,' ह्मणून फि-

रून इंद्रानें नमस्कार केला असतां ययाति ह्मणाला, 'हे देवेंद्रा, मनुष्य, गंधर्व अगर महान् ऋषी ह्यांमध्यें तपानें माझ्या जोडीचा कोणी सांपडणार नाहीं.' हें ऐकून इंद्र ह्मणाला, 'ज्याअर्थीं आत्मशक्ति न ओळखतां आपल्यापेक्षां थोर, लहान व आपल्याबरोबरीचे ह्या सर्वांनाच तूं तुच्छ करीत आहेस त्याअर्थीं तुझें सर्व संचित पुण्य आज लयाला जाऊन तूं विनाशी लोकांमध्यें जाऊन पडशील.' ययाति ह्मणाला, 'देव, गंधर्व व ऋषी ह्यांच्या अबहेलनेमुळें जर मी पुण्यार्जित लोकांना मुकलों आहे तर आतां जाणार त्या ठिकाणीं तरी मला सज्जनसमागम व्हावा.' त्याला आपलें अनुमोदन देऊन इंद्र ह्मणाला, 'त्या ठिकाणीं तूं प्रतिष्ठेला चढशील. परंतु फिरून आपल्यापेक्षां थोर, लहान अगर बरोबरीचे ह्यांना तुच्छ कां लेखीस.' पुढें इंद्रोपभोग्य अशा पुण्य लोकांतून खालीं येत असतां त्याला पाहून सद्धर्मरक्षक अष्टक त्यांपुढें जाऊन त्याला ह्मणाला, 'सूर्याच्या गमनमार्गावर अग्निसारखे दैदीप्यमान आपण कोण ह्याची आह्मांला कल्पना होत नाहीं. इंद्र, सूर्य किंवा विष्णु ह्याप्रमाणें आपला प्रभाव दिसत आहे. आपणाला येथें पाहून आपण खालीं कां येत आहां हें जाणण्याच्या उत्कृष्ट इच्छेनें आह्मी सर्व आपणाकडे आलों आहों. आपणाला प्रथम विचारावें कसें अशी आह्मांला शंका वाटत आहे. पण आपणही मौनव्रत धरल्यासारखें दिसत असल्यामुळें आपण कोण, खालीं कां येत आहां, ह्मणून आपणाला प्रश्न करण्याचें मी साहस करीत आहें. येथें आपणाला भिण्याचें मुळींच कारण नाहीं. खेद व विचार बाजूला ठेवून या. सज्जनांमध्यें आपण येत आहां, तेव्हां इंद्र देखील आपल्या केंसाला धक्का लावण्याला समर्थ नाहीं. उष्णता देणाऱ्या वस्तूंमध्यें ज्याप्रमाणें अग्नीला प्रभुत्व आहे, बीजांना सजीव करणाऱ्यांमध्यें ज्याप्रमाणें भूमि श्रेष्ठ आहे व प्रकाश देणारांमध्यें ज्याप्रमाणें सूर्य श्रेष्ठ आहे, त्याप्रमाणें साधूंवर प्रभुत्व अभ्यागतांचेंच आहे.' ययातीनें उत्तर दिलें, 'मी नहुषपुत्र राजा ययाति व पुरूचा बाप आहें. सर्व भूतांचा अवमान केल्यानें पुण्यार्जित लोकांपासून भ्रष्ट होऊन खालीं पडत आहें. वयानें मीं तुह्मांला मोठा असल्यामुळें नमस्कार केला नाहीं ह्याबद्दल क्षमा मागतों. **ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध व वयोवृद्ध असे तीन प्रकारचे वृद्ध विद्वानांना पूज्य आहेत.**' अष्टक ह्मणाला, 'केवळ वयोवृद्धाला वृद्ध ह्मणतां येणार नाहीं. ज्ञानवृद्ध अगर तपोवृद्ध मात्र श्रेष्ठ असून मानाला पात्र आहे.' ययाति ह्मणाला, 'पाप पुण्याच्या आड येतें ह्मणतात व तें अभिमान्याच्या ठिकाणीं पूर्ण वसत असतें. शहाणे लोक कुमार्गानें कधीं जात नाहींत. धर्माला अनुकूल अमेंच त्यांचें वर्तन असतें. माझें संचित पुण्यधन पुष्कळ होतें. पण तें सर्व अहंकारानें लयाला जाऊन आतां मी किती झटपटलों तरी तें फिरून मिळण्याची आशा नाहीं. तर जो आत्महितांत दक्ष असतो त्यालाच शहाणा समजावें. मनुष्य मोठा धनवान असला तर त्यानें मोठमोठे यज्ञ करावेत, विद्वानांचे ठिकाणीं नम्र असावें व वेदाध्ययन करून तपाकडे देह लावून मोह दूर करून स्वर्गप्राप्ति करून घ्यावी. पुष्कळ **संपत्ति आल्यानें त्याचा कधीं हर्ष मानूं नये.** अहंपणा सोडून वेदाध्ययन करावें; ह्या जगांत बहुतेक लोक भिन्नभिन्न स्वभावाचे असून दैवाधीन असतात. ह्मणून त्यांचे उद्योग व सामर्थ्य ह्यांचें कांहीं चालत नाहीं. **आत्मानात्मविचार करून दैवापुढें कोणाचें कांहीं चालावयाचें नाहीं हें पक्कें लक्षांत ठेवून ज्या ज्या वेळीं जो जो प्रसंग गुदरेल त्याला पाठ दिली पाहिजे. मनुष्याला सुख अगर दुःख नशिबीं असेल तेवढें मिळतें. आपल्या सामर्थ्याचें त्या ठिकाणीं कांहीं चालत नाहीं. ह्मणून दैव बलवत्तर आहे असें मानून दुःख आलें असतां स्वतःला संताप करून घेऊं नये किंवा सुख आलें असतां मोठा हर्ष पावूं नये. सुखदुःखाचे समयीं शहाण्यानें नेहमीं समतोल असावें.** विधात्याच्या मनांत असेल तसा मी ह्या जगांत राहणार, हा विचार मनांत येऊन माझ्या मनाला मुळींच संताप होत नाहीं. चर्मज, अंडज, उद्भिज्ज, सर्प, कीटक, मत्स्यादि जलचर त्याचप्रमाणें तृणकाष्ठपाषाणादि सर्व जड वस्तू आपलें भोक्तृत्व संपलें ह्मणजे आपल्या प्रकृतीला जाऊन मिळतात. **सुख शाश्वत नाहीं अगर दुःखही शाश्वत नाहीं. हें पक्कें**

माहीत असल्यामुळें मला संताप होण्याचें मुळींच कारण नाहीं. विचारानें संताप नाहींसा करणें हेंच शहाण्याला उचित आहे.' हें भाषण ऐकून अष्टकानें त्या आपल्या मातामहाला विचारलें, 'आपण कोणकोणत्या लोकांचा कसकसा व किती किती दिवस उपभोग घेतला तें सर्व इत्थंभूत आम्हांला कृपा करून सांगा. आपण आत्मज्ञान झालेल्या मनुष्याप्रमाणें भाषण करीत आहां.' ययाति म्हणाला, 'मी सार्वभौम राजा होतों. पुढें मीं आपल्या पुण्यांनीं दुर्मिळ लोक मिळविले. तेथें हजार वर्षं राहून पुढें त्याहून श्रेष्ठ लोक प्राप्त करून घेतले. नंतर इंद्राच्या शत योजनें लांब व सहस्र द्वारांनीं संपन्न अशा रमणीय नगरींत हजार वर्षं काढिलीं. नंतर अप्रतिम ब्रह्मलोक मिळवून तेथें हजार वर्षं राहिलों. नंतर विष्णुलोकांत सुखोपभोग घेऊन देवांकडून देखील मान मिळवून अनेक लोकांचा यथेष्ट उपभोग घेतला पुढें लक्षावधि वर्षं नंदनवनांत राहिलों. ह्याप्रमाणें पुष्कळ वर्षं स्वर्गसुखांत निमग्न होऊन काळ काढीत असतां एके दिवशीं उग्र रूप धारण केलेला देवदूत मजपाशीं येऊन तीनदां मोठ्यानें ओरडून म्हणाला, 'खालीं जा.' एवढेंच काय ते मला स्मरतें. पुढें मी क्षीणपुण्य होऊन नंदनवनांतून भ्रष्ट होऊन खालीं येत असतां माझ्याव[र] र कींव करणाऱ्या देवांचें 'अरेरे! फार वाईट झा[ले]लें! हा पुण्यशील व कीर्तिमान ययाति क्षीण[पु]ण्य झाल्यानें फिरून मृत्युलोकीं पडत आहे,' अ[से] रुणायुक्त भाषण ऐकून निदान मी सज्जनांमध्[ये] री कसा जाऊन पडेन असें मीं त्यांना [वि]व त्यांनीं दाखवून दिलेल्या मार्गानें मी [ह्या] भूमीला आलों आहें. यज्ञभूमीची खूण [ही] धूम्रमिश्रित आहुतिगंध मला येथें येण्या[स] र्शक झाला.' 'नंदनवनांत सुखानें [रा]त असतां तें सोडून फिरून आपण खा[ली]ं. हें मला समजत नाहीं,' म्हणून अ[ष्ट]रलें असतां ययाति म्हणाला, 'ज्या [पु]हीन मनुष्याला त्याचे बांधव व [मि]तात, त्याप्रमाणें त्या ठिकाणीं संचित [पु]कीं, त्या मनुष्याला देव लागलींच [ख]ं.' अष्टकानें विचारलें, 'त्या [ठि]य कशानें होतो हें च मला मोठें गूढ पड[तें] हें व सज्जनाला कोणते लोक मिळ[ती] मला सांगा.' ययातीनें उत्तर दि[लें] **ल्या पुण्याची आपल्या तोंडा[नीं] रतात ते फिरून ह्या भौम नरक[ीं] पडतात** व स्वतः क्षीण असतांही [ग]िधाडें, कोल्हीं व कुत्रीं ह्यांच्या [ख]डण्यासाठीं पुत्रपौत्रादिरूपानें वृद्धि [पा]हें दुष्ट व गर्हणीय पाप घडूं देऊं[नये] विचारलें, 'ज्या कालीं पक्षी, गिध[ाडें] कीटकादि प्राणी ह्या देहाचा नाश [क]रतीं जीव कोठें असतो, व फिरून तो [कु]येतो ? आपण म्हणतां त्या भौमनर[काची] कधीं ऐकिलें नाहीं.' ययातीनें [उ]ही देह ठेवल्यावर आपल्या कर्मा[नुसार] उदरांत अव्यक्त रूपानें वृद्धि पा[वून] रूपानें पृथ्वीवर संचार करूं लागत[ो] अनेक वर्षं लोटलीं तरी त्याला [ह्या] म्हणून ह्यालाच भौमनरक ही सं[ज्ञा] लक्ष चाळीस हजार वर्षं आकाशांत [रा]ह्या भौमनरकांत येऊन पडतांना [क्रू]र अमे ह्या पृथ्वीवरील राक्षस त्यां[ना].' अष्टकानें विचारलें, 'कोण[त्या] ठीं वरून खालीं येतांना त्यांना हे तीक्ष्ण [सू]क्ष्म तोडतात, त्याच्या योगानें त्यांचा नाश [हो]त नाहीं, ते कोठें असतात व गर्भवासी [ते] इंद्रियसंपन्न कसे होतात ?' ययातीनें उत्तर [दि]ले, 'खालीं पडणाऱ्या प्राण्याचें शरीर अव्यक्त [आ]हवाही पदार्थरूपानें असून तेंच रेतरूप देहबीज कर्मरूप फलपुष्पांनीं संयुक्त होऊन पुरुषांशीं मिळतें व पुढें ऋतुकालीं पुरुषाकडून स्त्रीयोनींत प्रवेश मिळून तेथें गर्भाशयामध्यें राहतें. हा जलमय जीव आकाशांतून पडत असतां आकाश, वायु व पृथ्वी ह्यांशीं ऐक्यता पावून पुढें ओषधिरूपानें तो चतुष्पाद, द्विपाद इत्यादि प्राण्यांमध्यें अन्नद्वारा प्रवेश करून गर्भरूपी होतो.' अष्टकानें विचारलें, 'देही नरदेहाला येतांना स्वरूपानेंच गर्भांत प्रवेश करतो किंवा शून्य शरीरानें ? व्यक्त शरीर त्याला कसें प्राप्त होतें ? त्याचप्रमाणें डोळे, कान, संज्ञा इत्यादि प्राप्त होण्याला काय कारण होतें ?' ययातीनें उत्तर केलें,

'ऋतुकाळीं पुष्परसमिश्रित स्त्रीरेतांमध्यें संचित कर्मरूप शुक्राला मिसळून वायु गर्भयोनीकडे नेतो. त्या ठिकाणीं एवढ्याचसाठीं तेथें असलेला हा सूक्ष्म पंचभूतात्मक वायु त्याला तेथें वाढवितो. सर्वावयवांनीं पूर्ण असा होतांच पूर्वसंचितांचें स्मरण ठेवून हा गर्भातून बाहेर पडतो. नंतर त्याला मीपणा येतो. श्रोत्रांनीं त्याला शब्दज्ञान होतें; नेत्रांनीं रूपज्ञान होतें; घ्राणेंद्रियानें गंध कळूं लागतो; व जिव्हेनें रसज्ञान होतें. मनानें भाव कळूं लागतो. इंद्रियांच्या योगानें विषय जाणणें हें केवळ सर्वव्यापी जीवाच्या स्थूल शरीराला उपाधिभूत आहे.' अष्टकानें प्रश्न केला, 'मरणानंतर जाळून पुरून अगर अन्य प्रकारें देह नाहींसा झाल्यावर अभावभूत झालेला हा कोणत्या देहानें कसा अस्तित्वांत येतो?' ययातीनें उत्तर केलें, 'प्राणोत्क्रमणानंतर स्वप्नावस्थेप्रमाणें स्थूल देह टाकून संचित सुकृत अगर दुष्कृत ह्यांच्या अनुरोधानें वायु ज्याला साह्याला आहे असा हा निराळ्या देहामध्यें प्रवेश करतो. पुण्यवानाला पुण्ययोनी प्राप्त होते. पाप्याला पापयोनी मिळते. पापी लोक कृमिकीटकांच्या जन्माला जातात. ते सर्व सांगत बसण्याची गरज नाहीं. द्विपाद, चतुष्पाद अथवा षट्पाद प्राणी फिरून गर्भरूपी होतात. आणखी तुझा काय प्रश्न आहे?' अष्टकानें विचारलें, 'कोणत्या कृत्यांनीं मानव श्रेष्ठलोकाला अधिकारी होतो. तपानें कां ज्ञानानें?' 'ययातीनें उत्तर दिलें, तप, दान, शम, दम, भीड, सरळता व सर्व भूतांवर दया हीं सात स्वर्गाचीं मोठीं द्वारें मानिलीं आहेत. **अज्ञानतमानें अंध झालेला पुरुष अहंकारानें नेहमीं नाश पावतो. जो आपणाला शहाणा मानून घेणारा पंडित मूर्ख विद्येच्या घमेंडींत दुसऱ्याचा अवमान करतो तो नाशवंत लोकांचा अधिकारी होतो.** ब्रह्मफल त्याला कधीं मिळत नाहीं. अहंकारानें केलेलें अग्निहोत्र, अहंकारयुक्त धरलेलें मौन, अहंकारयुक्त विद्या व अहंकारानें केलेला यज्ञ हीं चार स्वाभाविक अभयप्रद असून अहंकाराची त्यांना जोड मिळाल्याबरोबर भयप्रद होतात. मान मिळाल्याचा मोठा हर्ष मानूं नये व अवमानामुळें संताप करून घेऊं नये. ह्या जगांत सज्जनांपासूनच सज्जनांना मान मिळतो. दुष्टांना सद्बुद्धि कधीं यावयाची नाहीं. 'हें पहा देतों, हें पहा यज्ञ करतों, हें पहा अध्ययन करतों, हें पहा मी व्रत आचरण करतों,' ह्याप्रमाणें अहंकारपूर्वक ह्या गोष्टी केल्यानें त्यांपासून भय आहे. ह्मणून अहंकार वर्ज करावा. **शहाणे लोक ज्याला मनोमार्गानें अडविलेला असा पुरातन आश्रय समजतात तेंच तुमच्या खऱ्या कल्याणाला उपयोगीं पडणार आहे. त्याच्याशीं ऐक्यतेला पावून उत्तम शांति मिळवावी.**' अष्टकानें विचारलें, 'गृहस्थ, संन्यासी, ब्रह्मचारी, वानप्रस्थ ह्यांचें धर्माला अनुसरून कसें वर्तन असावें ह्यासंबंधानें निरनिराळ्या विद्वानांचें निरनिराळें मत आहे; त्यासंबंधानें आपलें काय मत आहे?' ययातीनें उत्तर केलें, 'गुरूंनीं हाक मारिली असतांच त्यापासून पाठ घेणें, गुरूंचें काम न सांगतां करणें, गुरूंच्या आधीं उठणें, त्यांच्या मागून निजायाला जाणें, सौम्य, जितेंद्रिय, धैर्यशील, सावध व स्वाध्यायशील असणें, ह्यांच्या योगानें ब्रह्मचारी सिद्धि पावतो. धर्माजित द्रव्यानें यज्ञ करणें, सदैव दानशील असून अतिथींना भोजन घालणें, दुसऱ्यांनीं दिल्याशिवाय कांहीं न घेणें, हा सनातन गृहस्थधर्म होय. स्वसामर्थ्यानें उदरनिर्वाह करणें, पापापासून निवृत्त असणें, दान करणें, लोकांना ताप न देणें, आहार व चेष्टा नियमित करून, अरण्यामध्यें वास करणें, ह्यानें वानप्रस्थसिद्धि होते. कृत्रिम पदार्थ सेवन न करणें, सर्व गुणांनीं संपन्न, संयमी व सर्व संगापासून मुक्त असणें, घरांत न निजणें, एकटा राहून नित्य कांहीं तरी प्रवास करीत अनेक देश हिंडणें, ह्यांच्या योगानें संन्याशाचा आश्रम सिद्ध होतो. ज्या दिवशीं कामेच्छा व सुखेच्छा ह्यांपासून मनुष्य निवृत्त होतो त्याच वेळीं अरण्यवास पतकरण्याची त्यानें तयारी करावी. कारण अरण्यवासी आपल्या शरीराच्या निरनिराळ्या विभूत्या अरण्यांत ठेवून पूर्वीचे दहा, मागचे दहा व आपण स्वतः अशा एकवीस पिढ्यांना मोक्षाला पोहोंचवितो.' अष्टकानें विचारलें, 'मुनि कोणाला ह्मणावें व मौन कशाला ह्मणावें?' ययातीनें उत्तर दिलें, 'अरण्यांत राहून जो गांव पाठीशीं करतो व गांवांत असून जो अरण्य जवळ

करतो त्याला मुनि म्हणावें. हें कसें म्हणून विचारशील तर ऐक. अरण्यवृत्तीनें राहणाऱ्या मुनीनें ग्राम्यवस्तूंचा उपभोग केला नाहीं म्हणजे अरण्यांत राहून गांव पाठीशीं केल्याप्रमाणें झालें. त्याचप्रमाणें जो अग्नि न बाळगतां घर सोडून गोत्र व चरण (आत्मकुल व गुरुकुल) ह्यांचा अभिमान बाळगीत नाहीं व जो कौपीनापुरत्याच वस्त्राची व प्राणधारणेपुरत्याच अन्नाची अपेक्षा ठेवतो तो गांवांत असून अरण्य जवळ करतो. जो काम व कर्म ह्यांचा त्याग करून जितेंद्रिय होऊन मौन धारण करतो, त्यालाच लोकांत सिद्धि मिळते. धौतदंत, नखें काढलेला, नित्यस्नायी, मंगलभूषणांनीं मंडित, शुचि व पुण्यकर्मांत रत असा मनुष्य कोणाला पूज्य होणार नाहीं? तपानें कृश झाल्यामुळें शरीराचा पिंजरा उरलेला व रक्त, मांस व अस्थिहीन झालेला असा मुनि भेदाभेद विसरून मौन धारणानें इहलोकाला जिंकून वरील उत्तम लोक मिळवितो. मुनि होऊन पशुवत वर्तन ठेवूं लागला म्हणजे हा लोक देखील त्याला स्वर्गाप्रमाणें भासूं लागतो.' अष्टकानें विचारलें, 'हे राजन्, चंद्रसूर्याप्रमाणें हे दोघ योगी व ज्ञानी धांवूं लागले असतां ह्यांपैकीं प्रथम कोण परमात्म्याच्या सारूप्याला जाऊन मिळतो?' ययातीनें उत्तर केलें, 'ह्यांपैकीं यथेष्ट वर्तन करणाऱ्या गृहस्थांमध्यें रहात असून सर्व बंधनांपासून अलिप्त, गांवांत रहात असून देखील जितेंद्रिय असा ज्ञानी प्रथम ब्रह्मप्राप्ति करून घेतो. योगसाधनाला पाहिजे तेवढा काळ जवळ नसून जो देही योगसाधनाच्या मार्गे लागतो त्याला त्यापासून ताप होतो. अनेक जन्मांच्या अभ्यासानें तो सायुज्यतेला मिळतो. पण ज्ञान्याच्या मनांत खरें तत्त्व ठसलें असल्यामुळें बाह्य विषयोपभोग घेत असतां त्याच्या हातून पापकर्में घडलीं तरी तो मुक्तच असतो. मोक्षबुद्धि नसून धर्माचरण करणें व्यर्थ व निंद्य आहे. त्याचप्रमाणें अजितेंद्रियाचें द्रव्यही व्यर्थ व निंद्य आहे. मोक्षार्थ कर्म करणें तेंच कर्माचें खरें फळ व ज्ञानाचें सार्थक आहे.' अष्टक म्हणाला, 'आपण मालाधारी, रूपवान व वर्चस्वी दिसत असून केवळ पुण्यहीन झाल्यामुळें ह्या मृत्युलोकरूपी नरकांत येऊन पडत आहां. साधुसमागमाचें फळ काय? अंतरिक्षांत किंवा स्वर्गांत माझ्यासाठीं जर कांहीं लोक असतील तर ते मी आपल्याला देतों. आपण असें अनाथासारखें खालीं येऊं नका.' ययाति म्हणाला, 'तुह्मी स्वपुण्यानें स्वर्गांत पुष्कळ लोक आपल्यासाठीं मिळवून ठेविले आहेत, पण माझ्यासारख्याला प्रतिग्रहाचा अधिकार नाहीं. ब्रह्मवित्या ब्राह्मणालाच तो आहे. दान करणें हा आमचा धर्म असून आजपर्यंत मीं पुष्कळांना दिलें आहे. ब्राह्मणेतरानें त्यांची वृत्ति कधींही घेऊं नये. याच्या ही ब्राह्मणाचीच वीरपत्नी आहे. ह्या पृथ्वीवर आजपर्यंत मी धर्मानें राहिलों असून आजपर्यंत हातून न घडलेलें हें कृत्य मी कसें करूं?' नंतर प्रतर्दनानेंही स्वार्जित लोक देण्याचें कबूल करून त्याला खालीं न पडण्याविषयीं विनंति केली. तेव्हां ययाति म्हणाला, 'दुसऱ्यानें सुकृतानें संपादलेलें प्रतिग्रह म्हणून मी कधीं घेणार नाहीं. **दैवाच्या नियमानियमानें संकट आलें असतां शहाण्यानें सरळ मार्ग सोडून कधीं भलत्या मार्गाला लागूं नये.** धर्मानें राहूं इच्छिणाऱ्या मजसारख्या राजानें जें कांहीं यशस्कर असेल तेंच केलें पाहिजे. आजपर्यंत कोणीं केलें नाहीं असें कृत्य मी कसें करूं?' हें ऐकून वसुमान म्हणाला, 'जर पुण्यानें मीं कांहीं लोक मिळविले असतील तर ते मी आपल्याला देतों. प्रतिग्रह दोषावह वाटत असेल तर तृणानें ते आपण मजपासून विकत घ्या.' ययाति म्हणाला, 'कालचक्रांतील शशुमार प्रभृति पुरुषांचें वर्तन माहीत असतां इतरांनीं आजपर्यंत न स्वीकारलेला हा मिथ्याक्रयमार्ग मला संमत नाहीं.' नंतर वसुमान व शिबी ह्यांनीं 'हा मार्ग आपल्याला पसंत नसेल तर आम्ही देतों म्हणून आपण घ्या, आम्ही तिकडे कधीं जाणार नाहीं,' अशी विनंति फिरून फिरून केली तरी 'मला दान घेणें नाहीं,' असें ययातीनें त्यांना साफ उत्तर दिलें. इतक्यांत पांच सुवर्णरथ वरून खालीं आले. ते पाहून अष्टक म्हणाला, 'राजन्, आपण रथांत बसून आकाशमार्गानें जाऊं. आपण सर्वांनीं मिळून आज स्वर्ग जिंकला आहे.' नंतर ते सर्व रथांत बसून आपल्या कांतीनें व धर्मानें पृथ्वी व आकाश ह्यांस व्यापून आकाशमार्गानें वर चालले. आतां

जातां अष्टक ययातीला म्हणाला, 'इंद्र खरोखर माझा हितकर्ता आहे. कारण त्यानें मला आज आपल्यासारख्याचा सहवास दिला. हा शिबि बेगानें आपल्या पुढें कां चालला आहे बरें ?' हा त्याचा प्रश्न ऐकून ययातीनें उत्तर दिलें, 'दान, तप, सत्य, धर्म, सौजन्य, लक्ष्मी, क्षमा, नम्रता व दुसऱ्यावर उपकार करण्याची बुद्धि हे गुण शिबीच्या अंगीं पूर्णपणें वसत असल्यामुळें तो आपल्याहून श्रेष्ठ आहे. नंतर 'आपण कोण, कोठले, कोणाचे पुत्र,' म्हणून कौतूहलपूर्वक अष्टकानें विचारलें असतां ययाति म्हणाला, 'मी तुमचा मातामह आहें. ही पृथ्वी जिंकून विपुल गाई, द्रव्य, सुवर्ण व मेध्य अश्व मीं ब्राह्मणांना दिले आहेत. ही संपूर्ण पृथ्वी ब्राह्मणांला दान केली आहे. ह्या यावापृथ्वीचें व अग्नीचें अस्तित्व माझ्या सत्यामुळेंच आहे. असत्य मला कधीं ठाऊक नाहीं. साधु लोक नेहमीं सत्यालाच मान देतात. हे अष्टका, आतांपर्यंत मीं जें तुला सांगितलें तें केवळ सत्यच आहे. सर्व देव, ऋषी व पितर ह्यांचें सत्य हेंच व्रत असल्यामुळें ते इतके पूज्य झाले आहेत, हें मला पक्कें माहीत आहे.' ह्याप्रमाणें गोष्टी बोलत ते सर्व उत्तम लोकाला गेले.

---

१९ प्रतीपाचा वृत्तांत व भीष्मजन्म.

(१. ९७-९८)

ह्या पुरुवंशांतच संवरणनामक कोणी एक राजा झाला. त्याचे वेळीं राष्ट्रांत मोठा दुष्काळ पडून प्रजेची अगदीं दैना उडाली व तो स्वतः अरण्यांत जाऊन राहिला. पुढें वसिष्ठांनीं त्याचें पौरोहित्य पतकरून यज्ञयागादि कर्मांनीं जिकडे तिकडे सुभिक्ष करून सोडलें. ह्याच पुरुवंशामध्यें प्रतीप नांवाचा कोणी राजा झाला. तो गंगाद्वारीं जाऊन पुष्कळ वर्षें तप करीत असतां कोणे एके वेळीं रूपगुणांनीं संपन्न, स्त्रीरूपधारी, पहातांक्षणीं पाहणाराला मोह पाडणारी अशी देवस्त्री गंगा पाण्यांतून बाहेर येऊन त्याच्या उजव्या मांडीवर बसली. 'हे कल्याणि' तुझें मी काय प्रिय करूं, तूं कोण,' म्हणून प्रतीपानें तिला विचारलें, तेव्हां ती म्हणाली, 'माझें आपल्यावर मन गेलें आहे आपण माझा अंगीकार करा. एखादी स्त्री आपण होऊन आली असतां तिचा अव्हेर करणें दोषार्ह आहे.' यावर 'परस्त्रीशीं किंवा अन्य वर्णाच्या स्त्रीशीं केवळ कामतृप्तीसाठीं संबंध ठेवावयाचा नाहीं असा माझा नेम आहे,' असें त्या राजानें उत्तर दिलें. तें ऐकून ती म्हणाली, 'जवळ करण्याला अगर संबंध ठेवण्याला मी अयोग्य नाहीं. मी कुलीन देवकन्या आहें.' प्रतीप म्हणाला, 'तूं म्हणतेस तसें असलें तरी स्नुषादिकांना उचित अशा उजव्या मांडीवर तूं येऊन बसली आहेस. डावी मांडी स्त्रीला उपभोग्य आहे. म्हणून तुला आलिंगन दिल्यानें अगर तुझ्याशीं संबंध केल्यानें माझी तनु दूषित होणार आहे. पाहिजे तर तूं माझी सून हो.' ती म्हणाली, 'आपण धर्मज्ञ आहां. आपल्या म्हणण्याच्या विरुद्ध मी जाऊं इच्छित नाहीं. आपल्या पुत्राशीं तरी माझा संबंध घडूं द्या. आपल्या पुण्यानें कीर्तीला चढलेल्या भरतकुलाचा मी उद्धार करीन. पृथ्वीवरील सर्व राजांमध्यें आपण श्रेष्ठ आहां. मीं शंभर वर्षें यत्न केला तरी आपले गुण किंवा आपल्या प्रसिद्ध कुलाचा चांगुलपणा माझ्याकडून वर्णिला जाणार नाहीं. पण आपल्या मुलापाशीं माझें जें वर्तन होईल त्याच्या आड त्यानें येऊं नये. ह्याप्रमाणें तो वागेल तर त्यावर माझें दिवसानुदिवस प्रेम बाढेल. धर्मशील व सद्गुणी मुलगे त्याला होऊन त्यांसह तो स्वर्गाला जाईल.' ह्या अटीला राजानें अनुमोदन दिल्यावर ती तेथेंच अदृश्य झाली. राजा तें लक्षांत ठेवून पुत्रप्राप्तीची वाट पहात बायकोसह तप करीत राहिला. त्यांना वृद्धपणीं एक अनेक यज्ञ करणारा मुलगा झाला. शांतप्रकृति झाल्यावर तो झाला म्हणून त्याचें नांव **शांतनु** असें ठेविलें. त्याच्या पूर्वसंचित पुण्याचें त्याला स्मरण असल्यामुळें तो नेहमीं पुण्यकर्मांत गढलेला असे. यौवनामध्यें आल्यावर त्याचें हित मनांत आणून प्रतीप त्याला म्हणाला, 'हे शांतनो, पूर्वी एक स्त्री मजकडे आली होती, तिला मीं तुजसाठीं मागणी घातली आहे. ती लावण्यवती देवस्त्री पुत्रप्राप्तीसाठीं तुजकडे येईल तेव्हां तूं कोणाची कोण वगैरे कांहीं तूं तिला विचारूं नकोस. आणि ती जें कांहीं करील त्यांत तूं मन घालूं नकोस. माझ्या आज्ञेवरून ती तुझ्याकडे येणार

असल्यामुळें तूं तिचा अव्हेर करूं नकोस.' याप्रमाणें त्याला सांगून व त्याला राज्याभिषेक करून प्रतीप तप करण्यासाठीं वनांत गेला. विद्वान शांतनु मृगयाशील असून नेहमीं वनांत गंगेच्या कांठीं एकटा हिंडत असे. कोणे एके वेळीं देदीप्यमान, रूपानें प्रतिलक्ष्मीच, शुभ्रदंती, दिव्यालंकारांनीं भूषित, व दोष काढण्याला जिच्यामध्यें तिळभरही जागा नाहीं, अशी एक लावण्यवती स्त्री त्याच्या दृष्टीस पडली. तिला पाहून त्याच्या अंगावर हर्षरोमांच उभे राहिले, व तिच्या अमानुष रूपानें चकित होऊन तिला किती पाहिलें तरी त्याचे डोळे निवेनात. तिचीही त्या तेजस्वी राजाला पाहून तृप्ति होईना. तो राजा मधुर शब्दांनीं तिला संतुष्ट करून म्हणाला, 'तूं देवस्त्री आस किंवा दानवस्त्री आस; गंधर्वस्त्री, अप्सरा, यक्षस्त्री, नागस्त्री अगर मानवस्त्री आस. कोणी, असेना. माझी प्रार्थना ऐकून तूं मला वरका' हें राजाचें मधुर व मृदु भाषण ऐकून वसूशीं केलेला संकेत पूर्ण करण्याच्या उद्देशानें त्याजवळ जाऊन आपल्या मधुर भाषणानें राजाच्या मनाला आल्हाद देत ती त्याला म्हणाली, 'हे राजा, मी तुझी आज्ञांकित राणी होऊन तुला कधीं न सोडण्याला तयार आहें. परंतु जें कांहीं बरें किंवा वाईट माझ्या हातून घडेल त्यामध्यें तूं मन घालूं नयेस. माझ्याशीं तुझें कधीं गैर वर्तन होऊं नये. हें तुला रुचत असेल तर तुझी प्रार्थना मी मान्य करतें. याच्या उलट तुझें वर्तन घडेल तर मी तुला सोडून जाईन.' हें तिचें म्हणणें कबूल करून तो तिच्या समागमांत यथेच्छ सुखाचा अनुभव घेत राहिला. तिच्या कृत्यांत मन घालावयाचें नाहीं असें ठरलें असल्यानें ती काय करते याविषयीं तो विशेष चौकशी करीत नसे. तिचें शील, वर्तन, रूप, औदार्यादि गुण व आपल्यावरचें तिचें प्रेम ह्यांनीं तो तिच्यावर अगदीं लुब्ध झाला होता. ती निपथगामिनी गंगाही ह्या लावण्यपूरित नररूपधारी शांतनूची बायको झाल्यावर, संभोग, प्रेम, चातुर्य, विलासनर्तनादि कला, ह्यांच्या योगानें त्याच्या मनानुरूप त्याला रंजवीत राहिली. बायकोच्या ह्या अप्रतिम गुणांना लुब्ध होऊन गेल्यामुळें त्याचीं अनेक वर्षें एका क्षणाप्रमाणें लोटलीं. तिच्याशीं यथासुख रत झाला असतां त्याच्यापासून तिला आठ मुलगे झाले. जसजसे ते होत गेले तसतसे 'हें पहा मी तुझें प्रिय करतें,' असें म्हणून ती त्यांना गंगेंत बुडबून टाकी. राजाला तें आवडलें नाहीं; परंतु ती आपल्याला सोडून जाईल या भीतीनें ह्यासंबंधानें तिच्यापाशीं त्यानें एक चकार काढला नाहीं. पुढें आठवा मुलगा झाला त्या वेळीं आपल्याला पुत्र असावा अशी मनांत अनिवार इच्छा उत्पन्न झाल्यानें दीन स्वरानें तो तिला म्हणाला, 'ह्याला तरी मारूं नकोस. तूं कोण कोणाची आहेस? स्वतःच्या मुलांना ह्याप्रमाणें निष्ठुरतेनें कां मारतेस? ह्याच्या योगानें तूं नित्य पाप पदरीं घेत आहेस.' ती म्हणाली, 'हे पुत्रवानांमध्यें श्रेष्ठ अशा पुत्रेच्छु राजा ह्या तुझ्या मुलाला मी मारीत नाहीं; परंतु ठरलेल्या संकेताप्रमाणें माझें ह्या ठिकाणचें राहणें मात्र आतां संपलें. कांहीं देवकार्य शेवटास नेण्याकरितां मी येथें राहिलें होतें. हे अष्टवसु वसिष्ठांच्या शापानें मनुष्ययोनीला आले. त्यांना तुझ्यासारखा जनक व माझ्यासारखी जननी मानवांमध्यें कोणी सांपडणें शक्य नव्हतें; म्हणून त्यांना जन्म देण्यासाठीं मीं हा मानवदेह घेतला. ह्या अष्टवसूंना जन्म देऊन तूं अक्षय लोक संपादन केले आहेस. 'जसे जसे तुझी जन्माला याल तशी तशी मी तुमची मनुष्ययोनींतून सूटका करीन,' म्हणून मीं त्याबरोबर संकेत केला होता. तूं त्यांना जन्म देऊन शापापासून मुक्त केलें आहेस. म्हणून तुझें कल्याण होईल. आतां मी तुझा निरोप घेतें. ह्या व्रतशील उदार पुत्राचें पालन कर. ह्याला म्हणजे पर्यायानें वसूंनाच मी तुझ्यापाशीं ठेवून जात आहें. हा तुला गंगेपासून झालेला पुत्र आहे असें समज.'

२० वसुशापवृत्तांत. (१. ९१—९९)

हे वसिष्ठ कोण व वसूंना शाप कां झाला म्हणून शांतनूनें विचारलें, तेव्हां गंगा म्हणाली, 'वसिष्ठ नांवाचे कोणी एक ऋषी आपव नांवानें प्रसिद्ध वरुणपुत्र होते. पुण्याचरण करणारांमध्यें श्रेष्ठ असे हे मेरुपर्वताजवळ आपल्या पवित्र आश्रमांत तप करीत असत. त्या आश्रमापाशीं सर्व ऋतूंतील फलपुष्पांनीं संपन्न असे नानावृक्ष असून शीतोदकानें परिपूर्ण असे

अनेक झरे होते. कोणे एके वेळीं दक्षकन्येला काश्यपापासून सुरभिनामक धेनु झाली. जगावर उपकार करण्यासाठीं ह्या थोर पुरुषानें त्या सर्व हेतू परिपूर्ण करणाऱ्या होमधेनूला आपल्या आश्रमांत ठेवून घेतलें. ती त्या मुनिरक्षित, पवित्र व रम्य तपोवनांत निर्भयपणें वाटेल तिकडे हिंडत असे. कोणे एके वेळीं पृथु आदि वसु फिरत फिरत त्या ठिकाणीं आले. ते आपल्या स्त्रियांसह त्या रम्य वनांत विहार करीत असतां त्यांपैकीं एका वसूच्या स्त्रीच्या दृष्टीस ही सर्व कामना पूर्ण करणारी नंदिनी पडली. ह्या दर्शनीय, पुष्ट, मोठ्या कांसेच्या व गोंडस गायीला पाहून द्युनामक आपल्या पतीला तिनें तें वर्तमान सांगितलें. त्या गायीच्या रूपाची व गुणांची स्तुति ऐकून तो तिला ह्मणाला, 'ही वसिष्ठऋषींची सुरभिनामक गाय आहे. जो मनुष्य हिचें अमृततुल्य दूध प्राशन करील तो दहा हजार वर्षें यौवनदशेंत राहील.' त्याचें तें भाषण ऐकून ती त्याला ह्मणाली, 'मृत्युलोकामध्यें उशीनस नांवाच्या सत्यसंध राजर्षीची रूपयौवनसंपन्न अशी जितवती नांवाची मुलगी माझी सखी आहे. तिच्यासाठीं ही गाय मला पाहिजे. तर ती आपण कसेंही करून मिळवून या. एवढें माझें प्रिय कराल तर मजवर मोठे उपकार होतील.' हें तिचें भाषण ऐकून तिचें प्रिय करण्याच्या उद्देशानें पृथुआदि बंधूंच्या साह्यानें त्यानें ती गाय हरण केली. त्या ऋषींच्या उग्र तपाचा त्या वेळीं त्याला विसर पडला; म्हणून परिणामाकडे लक्ष न देतां हें गैरवर्तन त्याच्या हातून घडलें. पुढें ऋषी फलपुष्पें घेऊन आश्रमांत परत आल्यावर वत्सासह ती गाय त्यांना तेथें पुष्कळ तपास केला तरी सांपडेना. ज्ञानचक्षूंनीं ती वसूंनीं चोरून नेली आहे असें जाणून ते संतापले व 'ह्यांनीं माझी गाय चोरली त्याअर्थीं ह्या सर्वांना मनुष्ययोनी प्राप्त होईल,' असा त्यांनीं त्यांना शाप दिला. तेव्हां वसू त्यांकडे येऊन त्यांनीं त्यांची हात जोडून विनंती केली; पण त्यांवर त्यांची पूर्ण कृपा झाली नाहीं. 'यूखेरीज बाकीचे तुम्ही एका वर्षाच्या आंत शापमुक्त व्हाल; परंतु ज्यासाठीं तुह्मांला हा शाप मिळाला तो हा द्यु मानवांमध्यें कांहीं दिवस राहील. परंतु मृत्युलोकीं तो संतति उत्पन्न करणार नाहीं व धर्मात्मा व सर्व शास्त्रांत पारंगत होऊन पित्याचा इष्ट हेतु साधण्यासाठीं स्त्री व राज्यसुख ह्यांचा तो त्याग करील,' असा त्या सर्वांना उच्छाप देऊन ऋषी स्तब्ध राहिले. पुढें ते वसू गंगेकडे गेले व मनुष्यरूप धारण करून आह्मांला जन्म दे व जन्माबरोबर गंगेंत बुडीव ह्मणून त्यांनीं तिची प्रार्थना केली. त्या प्रार्थनेवरून शांतनूची बायको होऊन तिनें त्यांना जन्म दिला व गंगेंत बुडविलें. राहिलेला पुत्र द्युहाच गांगेय भीष्म ह्या नांवानें प्रसिद्ध होऊन गुणांनीं शांतनूपेक्षां वरचढ झाला व पित्याचें प्रिय करीत मृत्युलोकीं पुष्कळ दिवस राहिला.

---

२१ शांतनूचा इतिहास व भीष्मप्रतिज्ञा.

(१—१००)

देव व ऋषी ह्यांना देखील मान्य अशा त्या प्राज्ञ व धर्मात्म्या शांतनुराजाची सर्व जगांत सत्यवक्ता ह्मणून ख्याती होती. त्या नरश्रेष्ठामध्यें मनोनिग्रह, दातृत्व, क्षमा, बुद्धि, नम्रता व धैर्य हे गुण पूर्ण जागृत होते. ह्याप्रमाणें गुणसंपन्न, धर्मार्जनामध्यें व संपत्ति मिळविण्यांत दक्ष असा तो राजा भरतकुलाचें व सर्व लोकांचें पुत्राप्रमाणें पालन करीत होता. तो मत्तगजासारखा विक्रमशाली राजा सर्व राजलक्षणांनीं संपन्न होता. त्या कीर्तिमान राजाचें वर्तन पाहून सर्व लोकांना अर्थकामापेक्षां धर्माचीच मातब्बरी अधिक वाटूं लागली. व त्यांच्या वर्तनांत सुद्धां त्याप्रमाणें फरक दिसूं लागला. धर्माच्या बाबतींत त्याच्या तोडीचा दुसरा राजा नव्हता. धार्मिक व न्यायी असल्यानें सर्व राजांनीं आपण होऊन त्याला सार्वभौमत्व दिलें; कारण असा स्वामी रक्षण करण्याला मिळाल्यामुळें सर्व मांडलिक रजाचें दुःख, भीति व संकटें दूर होऊन त्यांना सुखानें झोंप येऊं लागली; व त्यामुळें तेही मोठे कीर्तिमान होऊन त्यांच्या हातून यज्ञदानादि क्रिया घडूं लागल्या. शांतनुप्रभृति धार्मिक राजांकडून संरक्षण होत असल्यामुळें सर्व वर्णांच्या लोकांना आपापला धर्म बराबर पाळतां येऊं लागला. क्षत्रिय ब्राह्मणांच्या आज्ञेप्रमाणें वागत, वैश्य क्षत्रियांना धरून रहात.

ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांविषयीं पूज्यभाव असलेले शूद्र वैश्यांचा आश्रय करून असत. हा राजा कौरवांची रम्य राजधानी हास्तिनापुर येथें राहून समुद्रवलयांकित पृथ्वीचें पालन करीत होता. हा इंद्रासारखा राजा धर्म, सत्यभाषण, सरलता, दान व तप ह्यांच्या योगानें मोठा संपत्तिमान झाला. त्याला राग मुळींच ठाऊक नसून तो कोणाचा द्वेष करीत नसे. दिसण्यांत चंद्रासारखा सौम्य असून तेजानें तो सूर्यासारखा होता. वायूप्रमाणें वेगवान व यमासारखा रागीट असून पृथ्वीप्रमाणें त्याचे ठिकाणीं गांभीर्य होतें. त्याच्या राज्यांत पशुपक्ष्यांचा वध होत नसून अहिंसा हाच श्रेष्ठ धर्म हें तत्त्व पूर्णपणें सर्व जन पाळीत असत. कामक्रोध सोडून तो सर्वांशीं सारखा असे. ह्या वेळीं देव, ऋषी, पितर ह्यांच्या क्रिया व यज्ञयागादि कर्में अबाधित चाललीं होतीं. कोणालाही अन्यायानें शिक्षा मिळत नसे. दुःखी, अनाथ व नीच योनींतले प्राणी ह्यांना तो पित्यासमान असे. तो कुरुश्रेष्ठ सार्वभौम असतांना वाणीला असत्यता माहीत नसून मन दानधर्मापासून पराङ्मुख होत नसे. हा राजसिंह छत्तीस वर्षें स्त्रीसंबंध सोडून अरण्यांत एकटा फिरत होता, रूप, आचार, शील व विद्या ह्या सर्वांमध्यें त्याच्या तोडीचा असा गांगेयनामक त्याला पुत्र झाला. तो सर्व अस्त्रांमध्यें प्रवीण, मोठा शक्तिमान व धैर्यवान होऊन मोठा योद्धा झाला. शांतनु कोणे एके वेळीं मृगया करून गंगेच्या कांठानें हिंडत असतां तिला खांडवे पडून ती पूर्वीप्रमाणें वहात नाहींसें पाहून तो विचारांत मग्न झाला. इतक्यांत मोठा उंच, रूपवान व प्रेक्षणीय असा पुरुष त्या ठिकाणीं प्रकटला. त्यानें आपल्या तीक्ष्ण शरांनीं गंगेला अगदीं झांकून टाकलें. ह्याप्रमाणें तिला शराच्छादित पाहून त्या अमानुष कृत्यानें राजा थक्क होऊन जाऊन त्या पुरुषाकडे पहात राहिला. ह्या आपल्या मुलाला पूर्वी जन्मकाळीं एकदांच त्यानें पाहिलें असल्यामुळें त्याला तो ओळखला नाहीं. ह्याप्रमाणें राजाला मायेनें मोह पाडून तो गांगेय जागच्याजागीं गुप्त झाला. तो चमत्कार पाहून साशंक मनानें 'माझा मुलगा मला दाखीव,' ह्मणून राजा गंगेला ह्मणाला, तेव्हां ती सर्व अलंकारांनीं भूषित अशा आपल्या मुलाला उजव्या हातांत धरून राजापुढें उभी राहून ह्मणाली, 'हे राजा, सर्व नरांमध्यें श्रेष्ठ व सर्व शास्त्रांत निष्णात अशा ह्या माझ्या पोटीं झालेल्या तुझ्या आठव्या मुलाला आजपर्यंत मीं वाढविलें. आतां तूं ह्याला घरीं घेऊन जाऊन संभाळ. उत्तम वीर्यापासून ह्याचा जन्म झाला असून सर्व वेद हा वसिष्ठांपासून शिकला आहे. अस्त्रविद्याही ह्याला प्राप्त झाली आहे. हा मोठा धनुर्धारी आहे. योद्ध्यांमध्यें इंद्राच्या तोडीचा असून युद्धांत देवदानवांना माना डोलवावयाला लावण्यासारखा आहे. शुक्राचार्य व बृहस्पति ह्यांना माहीत असलेलीं सर्व शास्त्रें ह्याला पूर्णपणें अवगत आहेत. त्याचप्रमाणें परशुरामांना जी अस्त्रविद्या माहीत आहे ती ह्याला प्राप्त झाली आहे. ह्या धर्मार्थसंपन्न पुत्राचें आतां तूं परिपालन कर.' ह्याप्रमाणें तिचें भाषण ऐकून सूर्यासारख्या त्या तेजस्वी पुत्राला घेऊन तो आपल्या नगरीला आला. त्या वेळीं त्याला आपण कृतकृत्य झालोंसें वाटलें. पुढें त्यानें प्रजानुरंजक त्या आपल्या गुणवान पुत्राला यौवराज्याचा अभिषेक केला. भीष्मांनींही आपल्या गुणांनीं पित्याला व राष्ट्राला संतुष्ट ठेविलें. पुत्रसमागमांत राजानें आनंदांत चार वर्षें काढलीं. पुढें कोणे एके वेळीं वनांत यमुनेच्या कांठानें फिरत असतां त्याला कांहीं चमत्कारिक वास आल्यामुळें त्याचा शोध करीत चालला असतां एक देवस्त्रीसारखी लावण्यवती धीवरकन्या त्याच्या दृष्टीस पडली. तिला पाहून 'तूं कोणाची कोण, येथें काय करीत असतेस,' ह्मणून त्यानें तिला प्रश्न केला. 'मी कोळ्याची मुलगी पित्याच्या आज्ञेनें येथें धर्मार्थ नाव चालवीत असतें, माझें नांव सत्यवती,' असें तिनें उत्तर दिलें. रूपमाधुर्यादि गुणांनीं संपन्न अशा त्या तरुणीला पाहून त्याचें तिच्यावर मन बसलें; व तिच्या बापाकडे जाऊन तिच्याबद्दल मागणी केली, त्या धीवराधिपाला तो शांतनुराजा आहे असें कळल्यावर त्यानें उत्तर दिलें, 'ही रूपवती मुलगी जन्मतांच मी कोणाला तरी देणार होतों; पण कांहीं कारणानें आजपर्यंत तिला मीं अविवाहित ठेविलें आहे. आपण हिला धर्मपत्नी करून घेण्यासाठीं मागत असाल तर माझी अट ऐका, ती आपल्याला कबूल असेल तर

हिला आपल्याला देण्याला माझी ना नाहीं. हिला आपल्यापेक्षां श्रेष्ठ वर मिळणें खचित शक्य नाहीं.' राजा ह्मणाला, 'हे दाशराज, तुझी अट सांग ह्मणजे मी तिचा विचार करीन. ती कबूल करण्यासारखी असेल तर करीन.' कोळी ह्मणाला, 'हिच्या पोटीं होणाऱ्या आपल्या मुलाला आपल्या मागून राज्य मिळालें पाहिजे.' राजा कामपीडित झाला होता तरी हें त्या कोळ्याचें ह्मणणें त्याला मान्य करवेना. मन अगदीं चंचल झालें होतें तरी तसाच तो हास्तिनापुराला परतला. पुढें एके वेळीं तो शोकांत मग्न होऊन ध्यानस्थ बसला असतां त्याचा आचारशुद्ध मुलगा गांगेय त्याकडे येऊन ह्मणाला, 'सर्व राजे आपले आज्ञांकित आहेत. चिंतेला कारण नसून असे आपण चिंतातुर होऊन नेहमीं अश्रु कां ढाळतां? माझ्याबरोबर बोलतांना माझ्या संबंधानें एखादा मोठा गूढ प्रश्न आपल्या मनांत घोळत असावा अशा तऱ्हेनें आपण नेहमीं मजकडे पहातां. अंगाबर फिकटपणा येऊन तोंडावरचें तेज जात चाललें आहे. आपण झुरत चाललां आहां. घोड्यावर बसून कधीं रपेटीला जात नाहीं. आपल्या चिंतेचें कारण कळेल तर कांहीं उपाय तरी करतां येईल.' हें पुत्राचें भाषण ऐकून राजानें उत्तर दिलें, 'माझ्या मनांत विचार घोळत आहे हें सत्य आहे. आपल्या ह्या एवढ्या मोठ्या कुलांत तूं एकच पुत्र असून तूंही नेहमीं शस्त्र घेऊन कोणत्याना कोणत्या तरी साहसांत गुंतलेला असतोस. वत्सा, मानवदेहाची नश्वरता मनांत येऊन मला काळजी वाटत आहे. पुत्रा, कोणत्याही कारणानें तुला जर कांहीं अपाय होईल तर आमच्या ह्या कुळाची काय वाट होणार. तुझ्यासारख्या एकच पुत्र शंभरांपेक्षां अधिक आहे हें मी जाणतों. पण संतानविच्छित्ति होऊं नये ह्मणून पुन्हां लग्न करावेंसें मला वाटूं लागलें आहे. धर्मवादी लोक एकपुत्रत्व अनपत्यतेप्रमाणेंच मानतात. शिष्यद्वारें वेदांचा अक्षय्य प्रसार व अग्निहोत्र हीं षोडशांशानें देखील अपत्याच्या तोडीला लागणार नाहींत. तूं शूर असल्यामुळें रणाशिवाय तुला मरणाची भीति नाहीं हें खरें, तरी तुझ्यामागें तरी कसें होणार? वत्सा, माझ्या दुःखाचें हेंच कारण आहे, समजलास.' तें ऐकून लगेच पितृहितादिषयीं दक्ष अशा वृद्ध आमात्याकडे जाऊन भीष्मांनीं त्याला धीवरकन्येची हकीकत सांगितली वृद्ध क्षत्रियांना बरोबर घेऊन ते धीवराधिपाकडे गेले व त्याला त्यांनीं ती कन्या आपल्या वडिलांना देण्यास सांगितलें. त्यांचा आदर करून तो धीवराधिप त्यांना ह्मणाला, 'आपणासारखे पुत्र शांतनूला असून फिरून लग्न करण्याची त्यांना काय गरज आहे? तरी आपण मागतां ह्मणून मी आपल्याला माझा विचार सांगतों. हा मनाजोगता श्लाघ्यसंबंध कोणाला नकोसा वाटणार? ही माझी मुलगी गुणांनीं कमी नसून हिची उत्पत्ति सुद्धां थोर पुरुषापासून आहे. ह्मणून ह्या कुलीन मुलीला वरण्याला आपले वडीलच योग्य आहेत. पूर्वी देवर्षी असितांचें हिच्यावर फार मन बसलें होतें. त्यांना देखील ही मीं दिली नाहीं. पण मुलीच्या बापाच्या नात्यानें माझी आपल्याला एक विनंती आहे. सापत्नभाव हीच ह्या संबंधाला एक मोठी अडचण मला दिसते. आपल्यासारख्याचा सापत्नपणा कोणालाही जाचल्याखेरीज राहणार नाहीं. मग तो देव असो, गंधर्व असो वा ऋषि असो. आपल्या क्रोधाग्नीपुढें कोणीही टिकणार नाहीं' विचार करण्याला जागा एवढीच एक आहे.' हें त्याचें भाषण ऐकून सर्व राजेलोकांसमक्ष भीष्मांनीं वडिलांचा हेतु साधण्याला उचित असें उत्तर दिलें, 'हें माझें सत्यवचन ऐक. पूर्वी कोणी कधीं दिलें नाहीं व पुढेंही कधीं देणार नाहीं असें मी वचन देतों. तुझें ह्मणणें मला कबूल आहे. हिचाच मुलगा राज्याचा उपभोग घेईल.' हें ऐकून कोळी पुनः ह्मणाला, 'राज्याच्या चिरायुत्वाची काळजी बाळगून ही दुर्घट प्रतिज्ञा करणारे आपण शांतनूचे नाथ, कन्येचे स्वामी व तिच्या आपत्यांचे प्रभु आहां असें समजलें पाहिजे. हें आपलें सांजन्य विलक्षणच आहे. आतां माझें आणखी एक ह्मणणें ऐका. मुलीच्या बऱ्यासाठीं मी हें बोलतों. सर्व राजे लोकांसमक्ष केलेली ही सत्यवती संबंधाची प्रतिज्ञा आपण खचित खरी कराल, ह्याविषयीं मला संशय मुळींच नाहीं. पण आपल्या अपत्यापासूनही मला तितकीच भीतीला जागा आहे.' ह्यावर भीष्मांनीं उत्तर दिलें, 'हे धीवराधिपा, ह्या राजे लोकांसमक्ष फिरून मी प्रतिज्ञा करतों ऐक. मीं स्वतः

तर ह्यापूर्वीच राज्यावर पाणी सोडलें आहे. अपत्यासंबंधानें विचारशील तर, आजपासून मी ब्रह्मचारी राहून अपुत्र असूनही मरणोत्तर उत्तम लोक मिळवून घेईन.' हें त्यांचें भाषण ऐकून मुलगी देतों म्हणून त्या धीवराधिपानें त्यांना वचन दिलें. पुढें त्या मुलीला रथावर बसवून भीष्म हास्तिनापुराला परत आले, व त्यांनीं पित्याला झालेला सर्व वृत्तांत कळविला. सर्व राजे लोकांनीं त्यांच्या त्या दुर्घट प्रतिज्ञेबद्दल प्रशंसा केली. त्यानें शांतनूला संतोष होऊन 'तुला इच्छामरण येईल,' म्हणून त्यानें त्यांना वर दिला.

२२ चित्रांगद व विचित्रवीर्य ह्यांचा इतिहास. (१. १०१—१०२)

शांतनूला सत्यवतीपासून चित्रांगद व विचित्रवीर्य या नांवाचे दोन मुलगे झाले. ते यौवनदशेंत येण्यापूर्वीच त्यानें कालधर्माला अनुसरून देह ठेविला. तो स्वर्गवासी झाल्यावर भीष्मांनीं सत्यवतीच्या आज्ञेंत राहून तिच्या सांगण्यावरून चित्रांगदाला राज्याभिषेक केला. ह्या चित्रांगदाला स्वबाहुबीर्यामुळें सर्व राजे बुच्छ वाटत असत. कोणीच त्याला आपल्या तोडीचा दिसत नसे. त्याच्याच नांबाच्या कोणी बलवान गंधर्वानें त्यावर स्वारी केली, त्या वेळीं कुरुक्षेत्रामध्यें सरस्वती नदीच्या तीरावर तीन वर्षेपर्यंत मोठें रण माजलें. दोघांच्या झटापटींत तो गंधर्व मायाशास्त्रांत निपुण असल्यामुळें त्यानें त्या कौरवकुलभूषणाला ठार केलें. याप्रमाणें प्रभावशाली चित्रांगद मरण पावल्यावर भीष्मांनीं त्याचा प्रेतसंस्कार करून विचित्रवीर्य अल्पवयस्क होता तरी त्याला राज्याभिषेक केला. विचित्रवीर्यानेंही भीष्मांच्या आज्ञेंत राहून वडिलोपार्जित गादी संभाळली. धर्मशास्त्रामध्यें भीष्मांच्या आज्ञेंत राहून वडिपार्जित गादी संभालली. धर्मशास्त्रामध्यें निष्णात अशा भीष्मांना तो फार मान देत असे व तेही त्याचा पित्याप्रमाणें सांभाळ करीत होते.

विचित्रवीर्य यौवनदशेंत आलासें पाहून त्याच्या विवाहाविषयींचा विचार भीष्मांच्या मनांत घोळूं लागला. इतक्यांत काशीराजाच्या, अप्सरांना मागें टाकणाऱ्या, तीन मुली एकाच वेळीं स्वयंवर करणार आहेत अशी बातमी त्यांना लागतांच मातेची आज्ञा घेऊन रथारूढ होऊन ते तिकडे गेले. त्या ठिकाणीं सभेमध्यें चारी दिशांकडून आलेले राजे त्यांच्या दृष्टीस पडले. एकामागून एक तेथें आलेल्या राजांची, कुल, पराक्रम व कीर्ति सांगितली जाऊन नामावलि उच्चारिली जात असतां ह्या वृद्ध भीष्मांकडे सचिंत दृष्टि फेंकून त्या कन्या पुढें चालल्या. 'मोठा धर्मात्मा म्हणविणारा हा वळ्या पडून केंस पिकलेला थेरडा निर्लज्जपणें येथें कशाला आला? ह्या मिथ्याप्रतिज्ञाला अब्रूची तरी कांहीं चाड पाहिजे होती!' भीष्म ब्रह्मचारी,' असा लोकांत यांच्या नांवाचा उगीच डंका झाला आहे.' ह्याप्रमाणें त्यांची निंदा चालली असून नराधम राजे त्यांना हासत होते. तें त्यांचें भाषण ऐकून भीष्मांना संताप आला. नंतर त्या मुलींना रथांत बसवून मेघाप्रमाणें गर्जना करून ते तेथें जमलेल्या राजांस ह्मणाले, 'गुणवान वराला बोलावून कन्येला अलंकृत करून शक्त्यनुसार पैसा देऊन ती त्याला देणें ह्याला ब्रह्मविधि ह्मणतात. दोन गाई देऊन कन्यादान केलें असतां त्याला आर्ष ह्मणतात. स्वतः धन घेऊन कन्यादान केलें असतां त्याला आसुर ह्मणतात. कन्येला बलात्कारानें हरण करून नेऊन तिच्याशीं लग्न लाविलें असतां तो राक्षसविधि होतो, व तो क्षत्रियांना प्रशस्त सांगितला आहे. वधुवरांच्या एकमेकांच्या संमतीनें विवाह झाला असतां त्याला गांधर्व ह्मणतात. बेशुद्ध कन्येला हरण करून तिच्याशीं लग्न लाविलें असतां तो पैशाचविधि होतो. तसेंच जें केवळ स्वेच्छेनें लग्न लावतात त्याला प्राजापत्यविधि ह्मणतात. ह्यांपैकीं क्षत्रियांना प्रशस्त जो राक्षसविधि त्यानें मी ह्या कन्या बलात्कारानें हरण करीत आहें. युद्ध करून विजयश्रीला अगर अपयशाला वरण्यासाठीं शक्त्यनुसार झटा. हा मी युद्ध करण्याच्या निश्चयानें उभा आहें.' ही गर्वोक्ति त्या राजांना सहन न होऊन ते दांत खाऊन हात चोळूं लागले. लगबगीनें युद्धाला तयार होण्यासाठीं वस्त्रालंकार काढीत असतां त्यांची मोटी धांदल उडून गेली. ताऱ्याप्रमाणें जिकडे तिकडे खालीं फेकल्या जाणाऱ्या भूषणांचा वर्षाव सुरू

झाला. मोठ्या त्वेषानें भिवया चढवून डोळे लाल करून सारथ्यांनीं तयार करून आणलेल्या रथांत ते बसले व सशस्त्र होऊन त्यांनीं भीष्मांचा पाठलाग केला. एकट्या भीष्मांनीं त्या पुष्कळांबरोबर निकरानें युद्ध केलें. हजारों बाण राजांनीं त्यांवर सोडलें. भीष्मांनीं अंगावरील रोमांच्यासारख्या आपल्या असंख्य बाणांनीं ते मध्येंच कापून काढून प्रत्येकावर तीन तीन बाण सोडून सर्वांचा नाश केला. त्या वेळची त्यांची चलाखी व आत्मसंरक्षण करण्याची शक्ति पाहून शत्रूंनीं देखील माना डोलाविल्या. शत्रूंना रणांत जिंकून मुलींना घेऊन ते हास्तिनापुराला निघाले.' त्या समयीं मोठा योद्धा शाल्व त्यांचा पाठलाग करून एका हत्तीच्या पाठीचा चावा ज्याप्रमाणें दुसऱ्यानें घ्यावा त्याप्रमाणें त्यांवर तुटून पडला. तेव्हां खवळून जाऊन पेटलेल्या अग्नीप्रमाणें संतप्त होऊन त्यांनीं धनुष्यबाण घेऊन भिवया चढवून क्षात्रधर्माला अनुसरून शाल्व राजाकडे आपला रथ परतविला. त्यांना परततांना पाहून दुसरे राजे केवळ प्रेक्षकांप्रमाणें तटस्थ उभे होते. त्या घोर युद्धांत शाल्वाला जिंकून जिवंत सोडून देऊन ते हास्तिनापुराला परत आले. तेथें विचित्रवीर्य आपल्या पित्याप्रमाणें पृथ्वीचें पालन करीत असतां त्या काशीराजाच्या मुलींना कन्येप्रमाणें, स्नुषेप्रमाणें व बहिणीप्रमाणें संभाळून हास्तिनापुराला आणून त्यांनीं त्यांना आपल्या धाकट्या भावाच्या स्वाधीन केलें व लग्नाची जंगी तयारी चालविली. लग्न होण्यापूर्वी काशीराजाची वडील मुलगी भीष्मांना म्हणाली, ' मीं सौभपति शाल्वाला पूर्वी मनानें वरलें असून त्यानेंही मला वरलें आहे. व माझ्या पित्याचीही इच्छा अशीच आहे. आपण धर्मज्ञ आहां. हें धर्मतत्त्व लक्षांत घेऊन आपल्याला उचित वाटेल तसें करावें. सर्व विप्रांसमक्ष हें तिचें भाषण ऐकून भीष्म विचारांत पडले, व वेदपारंगत ब्राह्मणांशीं विचार करून त्यांनीं तिला शाल्वाला वरण्याची मोकळीक दिली. नंतर अंबिका व अंबालिका ह्या दोघींचें आपल्या धाकट्या भावाशीं त्यांनीं लग्न लाविलें. त्या रूपयौवनसंपन्न असल्यामुळें विवाहानंतर त्यांवर तो अगदीं आसक्त होऊन राहिला. त्या श्यामवर्ण मुलींचे केंस काळे व कुरळे असून मानेवर रुळत होते. नखें लाल होतीं. त्यांचा जघनभाग व स्तन पुढें आले होते. अनुरूप पति मिळाल्यानें त्याचर त्यांचें फार प्रेम जडून भक्ति बसली. सात वर्षेपर्यंत तो त्यांच्याशीं रममाण झाला होता. पुढें त्याला क्षय होऊन अनेक उपायांचें कांहीं न चालतां सूर्याप्रमाणें तो अस्ताला गेला.

२३ पंडु, धृतराष्ट्र व विदुर ह्यांचा जन्म. (१. १०३ व १०५–११६)

अपत्यासाठीं आतुर व दीन झालेली सत्यवती विचित्रवीर्याच्या मरणानंतर सुनांना धीर देऊन धर्म व कुल ह्यांचा विचार करून भीष्मांना म्हणाली, ' धर्मिष्ठ व कीर्तिमान शांतनूंचा तूंच काय तो एक वंशतंतु उरला असून कीर्ति व संतति ह्यासंबंधानें सर्व आमची भिस्त आतां तुझ्यावर आहे. तुझ्यासारख्या सन्मार्गानें जाणाऱ्याला स्वर्गाची किंवा प्राणाची मुळींच पर्वा नाहीं. तुझ्या हातून धर्माला सोडून वांकडें पाऊल कधीं पडावयाचें नाहीं. सूक्ष्मधर्म पूर्णपणें तुला ठाऊक आहे. कुलाचार, धर्मनिष्ठा व प्रसंगांतून पार पडण्याचें सामर्थ्य शुक्र व बृहस्पति ह्याप्रमाणें तुझ्या ठिकाणीं दिसून येतें. म्हणून माझ्या मनांत आहे तें तुला विचारण्याला मला मुळींच भीति वाटत नाहीं. माझें ह्मणणें ऐकून घेऊन तुला बरें दिसेल तसें कर. तुझा भाऊ अल्पवयांतच अपत्यहीन असून हा लोक सोडून गेला. त्याच्या बायकांनीं अपत्यासाठीं आतुर असावें हें साहजिकच आहे. संततीसाठीं माझ्या आज्ञेनें धर्मानें ह्यांच्याशीं संबंध करून ह्यांना अपत्यप्राप्ति करून दे. पूर्वजांना नरकांत पाडूं नकोस. ' हें मातेचें भाषण ऐकून धर्माला अनुसरून भीष्मांनीं उत्तर दिलें. ते ह्मणाले, ' माते, तूं सांगतेस हा धर्म खरोखरच वाईट नाहीं. परंतु पुत्रोत्पादनाच्या संबंधानें मीं केलेली अभेद्य प्रतिज्ञा ही तुला माहीत आहेच. ती मी कधीं मोडणार नाहीं. त्रैलोक्य अथवा देवलोकाचें राज्य अथवा यापेक्षांही कांहीं विशेष मिळविण्यासाठीं देखील सत्याचा भंग माझ्या हातून होणार नाहीं. **पृथ्वी आपला गंधगुण टाकील, जल आपला रसगुण टाकील, त्याचप्रमाणें तेज आपला रूपगुण टाकील, वायु**

स्पर्शगुणाचा त्याग करील, सूर्य आपलें तेज सोडून देईल, आकाश शब्दगुणाचा त्याग करील, चंद्र आपलें शीतत्व टाकील, इंद्र आपल्या पराक्रमाचा त्याग करील, प्रसंगीं धर्मराज धर्म सोडून देईल; परंतु माझ्या हातून सत्याचा त्याग स्वप्नींही होणार नाहीं.' हें ऐकून सत्यवतीनें उत्तर केलें, 'तुझी सत्यावरची निष्ठा मी पूर्ण ओळखतें. तुझ्या मनांत येईल तर प्रति त्रैलोक्य निर्माण करण्याची तुझ्या अंगांत शक्ति आहे. तूं मजसाठीं केलेली प्रतिज्ञा मला पूर्ण माहीत आहे. पण आपद्धर्म लक्षांत घेऊन हें वडिलोपार्जित जूं आपल्या खांद्यावर घे. ज्याच्या योगानें धर्माच्या आड न येतां संततीमुळें वंश पुढें चालून आप्तवर्गांना संतोष होईल, असें हें कृत्य करण्यास नाहीं म्हणूं नकोस.' हें तिचें दैन्यदर्शक भाषण ऐकून व धर्माचाही विचार मनांत आणून भीष्मांनीं उत्तर दिलें, 'माते, लक्षांत आण. सर्व कुलाचा ह्या प्रकारें नाश करण्यास प्रवृत्त होण्यांत अर्थ नाहीं. क्षत्रियांनीं सत्यापासून ढळावें हें शास्त्रांत फार निंद्य मानलें आहे. ज्याच्या योगानें शांतनूचा वंश पृथ्वीवर अविच्छिन्न राहील, असा पूर्वापर चालत आलेला धर्म मी तुला सांगतों. तो ऐकून घेऊन प्रसंगीं योग्य सल्ला देणाऱ्या पुरोहितांच्या विचारानें लोकव्यवहार मनांत आणून जें उचित वाटेल तें कर. पूर्वी पित्याच्या वधानें संतप्त झालेल्या परशुरामांनीं आपल्या परशूनें हैहयाधिपतीचे सहस्र बाहु कापून त्याला ठार केलें. ते रथांत बसून पृथ्वी जिंकीत असतां एकवीस वेळां त्यांनीं क्षत्रियांचें निर्मूलन करून निःक्षत्रिय पृथ्वी केली. त्या वेळीं क्षत्रिय स्त्रियांनीं ब्राह्मणाबरोबर संबंध ठेवून त्यांपासून अपत्यप्राप्ति करून घेतली. 'ज्याच्याशीं पाणिग्रहण झालें असेल त्याचाच मुलांवर हक्क,' हा वेदप्रणीत धर्मविचार मनांत ठेवून त्यांनीं याप्रमाणें क्षत्रिय कुलाचें पुनरुज्जीवन केलें. या बाबतींत उतथ्यांचा दृष्टांतही आपल्याला आधारभूत आहे तो तुला माहीतच असेल. तो असा कीं, उतथ्यनामक कोणी बुद्धिमान ऋषी होते. ममतानांवाची त्यांची प्रिय पत्नी होती. तिचे धाकटे दीर देवगुरु बृहस्पति एके वेळीं तिच्याबरोबर रममाण होण्याच्या उद्देशानें तिच्याकडे गेले असतां ममता त्यांना म्हणाली, 'आपल्या वडील भावांपासून मी गर्भिणी आहे. हा पुत्र उदरांतच षडंग वेद शिकला आहे. आपला संबंध कधीं व्यर्थ व्हावयाचा नाहीं. उदरांत दोघांना जागा नाहीं. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून मग आपल्याला जें कर्तव्य असेल तें करावें.' काम अनावर झाल्यामुळें ह्या तिच्या भाषणाकडे दुर्लक्ष करून संबंध करीत असतां गर्भस्थ प्राणी त्यांना म्हणाला, 'हे तात, संभोग करूं नका. दोघांना ह्या ठिकाणीं जागा नाहीं. मी नुकताच येथें आलों आहें. आपण मला व्यर्थ पीडा करूं नये.' गर्भस्थाचें तें भाषण मनावर न घेतां बृहस्पतींनीं ममतेशीं संबंध केला. तेव्हां त्या गर्भस्थ मुनीनें पायानें मार्ग अडविला. त्यामुळें बृहस्पतींना राग येऊन त्यांनीं त्या गर्भस्थाला 'ज्याअर्थीं तूं अशा प्रसंगीं माझ्याशीं असें वर्तन केलें आहेस त्याअर्थीं तुला कायमचें अंधत्व प्राप्त होईल,' म्हणून शाप दिला, त्या शापानें पुढें तो दीर्घतमा नांवाचा ऋषि जन्मांध निपजला. त्याला सर्व वेद मुखोद्गत येत होते. व विद्येच्या व बुद्धीच्या प्रभावावर त्यांला प्रद्वेषीनामक स्त्री मिळाली. तिच्यापासून गौतमादि पुत्र झाले. त्यांची स्त्री त्यांचा द्वेष करूं लागली. तूं माझा द्वेष कां करतेस म्हणून पतीनें विचारलें असतां तिनें उत्तर दिलें, '**पतीला स्त्रीच्या भरणानें भर्ता व तिचें पालन केल्यानें पति ही संज्ञा येते.** आपण माझें भरण करण्याला समर्थ नाहींत येवढेंच नव्हे, तर उलट आपण जन्मांध असल्यामुळें आपलें व आपल्या मुलींचें पोषण मला करावें लागतें.' यावर मला एकाद्या क्षत्रियाकडे घेऊन चल म्हणजे मी तुला विपुल धनप्राप्ति करून देतों,' असें ते बोलले असतां ती म्हणाली, 'मला आपली अगर आपल्या पैशाची गरज नाहीं. यापुढें मी आपलें पूर्वीप्रमाणें पोषण करणार नाहीं.' हें ऐकून दीर्घतमा रागावून म्हणाले, 'आजपासून मी लोकांत मर्यादा करून टाकतों. स्त्रीनें यावज्जीव एकाच नवऱ्याशीं संबंध ठेविला पाहिजे. तो जिवंत असो वा मरो. तिनें दुसरा नवरा करतां कामा नये. दुसऱ्याशीं संबंध ठेविल्यानें स्त्री पतित होईल. गतभर्तृका स्त्रीचें जीवन नेहमीं पापी राहील; व तिच्यापाशीं विपुल संपत्ति असली तरी

तिला भोगाशिवाय रहावें लागेल व सतत ती दुष्कीर्ति व लोकापवाद ह्यांना पात्र होईल.' तें ऐकून त्यांची बायको संतापली व तिनें त्यांना गंगेंत फेंकून देण्याला आपल्या मुलांना सांगितलें. गौतम आदिकरून तिच्या मुलांनीं त्यांना बांधून एका नौकेंत घालून नदींत सोडून दिलें व ते घरीं परत आले. ते ऋषी अनेक देशांवरून वहात चालले असतां धर्मज्ञांमध्यें श्रेष्ठ असा बली नांवाचा राजा नदीवर स्नानाला आला होता, त्याच्या ते दृष्टीस पडले. त्यांना बाहेर काढून ते कोण वगैरे कळल्यावर आपल्या स्त्रीच्या ठिकाणीं चांगले धर्मशील व गुणवान पुत्र उत्पन्न करण्याविषयीं त्यानें त्यांची प्रार्थना केली. त्या ऋषींनीं त्याला अनुमोदन दिल्यावर त्यांना घरीं आणून राजानें आपल्या स्त्रीला त्यांच्याकडे जाण्यास आज्ञा केली. पण ते वृद्ध व अंध आहेत असें पाहून तिनें आपल्या दासीला पाठविलें. ही गोष्ट राजाच्या कानीं आल्यावर त्यानें त्या ऋषींची क्षमा मागितली व फिरून आपल्या बायकोला त्यांकडे पाठविलें. तेव्हां त्यांच्यापासून तिला अंग, वंग, कलिंग, पुंड्र, सुह्म असे नामांकित मुलगे झाले. पुढें ते अनेक देशांचे राजे झालें. हे सर्व देश अद्यापि त्यांच्या नांवांनीं प्रसिद्ध आहेत. ह्मणून एकाद्या गुणवान ब्राह्मणाला बोलावून आणून धन देऊन त्यापासून विचित्रवीर्याच्या स्त्रियांच्या पोटीं संतति उत्पन्न करून घे.'

हें ऐकून सत्यवतीनें आपला पराशरऋषींशीं घडलेल्या पूर्वसंबंधाचा वृत्तांत त्यांना सांगितला. तेव्हां कौमारावस्थेंत त्या ऋषींपासून झालेल्या मुलाला बोलावून त्यापासून अपत्य करून घ्यावें असें दोघांच्या विचारानें ठरलें. तेव्हां भीष्म हात जोडून ह्मणाले, 'व्यास प्राज्ञ असून धर्मार्थकामांकडे यथान्याय त्यांची दृष्टि आहे. शांतपणें विचार करून भावि धर्मार्थकामांला उपयोगीं पडेल असेंच त्यांच्या हातून आचरण घडेल. **जो एखादी गोष्ट विचार करून करतो त्यालाच शहाणा ह्मणावें.** तूं ह्मणतेस हें धर्माला अनुसरून असून आपल्या कुलाला हितकारक आहे. तुझें हें कल्याणप्रद भाषण मला पसंत आहे.' ह्याप्रमाणें भीष्मांचें अनुमोदन मिळाल्यावर सत्यवतीनें व्यासांचें स्मरण केलें. त्याबरोबर ते तिच्या पुढें येऊन उभे राहिले. यथाविधि त्यांचा सत्कार करून त्यांना आलिंगन देऊन स्तनांतून पाझरूं लागलेल्या दुधानें त्यांना तिनें न्हवडाविलें. पुत्र फार दिवसांनीं भेटल्यानें तिचे आनंदाश्रु वाहण्याचे बंद होतना. तिला कष्टी पाहून तिच्यावर जलसिंचन करून व्यास तिला ह्मणाले, 'तुझ्या मनांत असेल तें करण्यासाठीं मी आलों आहें. सर्व धर्मतत्त्व तुला पूर्ण कळतेंच आहे. मी काय केलें असतां इष्ट साध्य होणार आहे तें मला सांग.' नंतर पुरोहितांनीं पूजा करून ते आसनावर बसल्यावर कुशल प्रश्न करून सत्यवती त्यांना ह्मणाली, 'तूं शहाणा आहेस. मुलांना बाप व आई हे दोघे सारखेच आहेत. त्यांवर जसें बापाचें तसेंच आईचेंही स्वामित्व आहे. पूर्वपुण्यानें मला तूं पहिला मुलगा झालास, तसाच पुढें विचित्रवीर्य झाला आहे. बापाकडून जसा भीष्म तसा आईकडून तूं त्याचा भाऊ आहेस. हा शांतनुपुत्र भीष्म सत्य पाळण्यासाठीं अपत्याची अगर राज्याची पर्वा करीत नाहीं. ह्मणून तूं हा आपल्या भावाचा वंश पुढें चालावा ह्मणून भीष्माच्या व माझ्या आज्ञेनें सर्व भूतांवर दया करण्यासाठीं मी सांगतें तसें कर. तुझ्या धाकट्या भावाच्या बायका मुलासाठीं फार आतुर झाल्या आहेत, त्यांच्या ठिकाकाणीं अपत्योत्पादन कर.' हें ऐकून व्यासांनीं उत्तर दिलें, 'इष्टानिष्ट धर्म तुला कळत असून धर्माकडे तुझें पूर्ण लक्ष आहे. ह्मणून मी धर्म संरक्षणासाठीं तुझ्या इच्छेनुरूप ही गोष्ट पूर्वापार चालत आलेल्या वहिवाटीप्रमाणें करण्यास सिद्ध आहें. मी भावाला सूर्य व वरुण ह्यांसारखे मुलगे देईन. परंतु एक वर्षभर माझ्या भावजयांनीं मी सांगेन तसें कडकडीत व्रत पाळलें पाहिजे; ह्मणजे त्या शुद्ध होऊन माझा स्पर्श सहन करण्यास समर्थ होतील.' सत्यवती ह्मणाली, 'ज्याच्या योगानें त्यांच्या ठिकाणीं गर्भधारणा होण्यास वेळ लागणार नाहीं असा कांहीं उपाय असेल तर पहा. **अराजक राष्ट्रांत प्रजेला कोणी त्राता नसल्यामुळें त्या अनाथपणें नाश पावतात.** सर्व क्रिया बंद पडतात. पाऊस पडत नाहीं. देवता देखील तें स्थान सोडून जातात. हें अजारक राष्ट्र संभाळावें तरी कोणीं? ह्मणून लव-

कर गर्भोत्पादन करण्याची तजवीज कर. पुढें भीष्म त्यांची काळजी घेईल.' व्यासांनीं उत्तर दिलें, 'तूं अकालीं पुत्र मागतेस तर हें माझें उग्र रूप त्यांना सहन करवेल काय? ह्याचा विचार कर. जर हा गंध, हें रूप व हा वेष पाहून त्यांना भीति वाटणार नाहीं तर आजच कौसल्येच्या ठिकाणीं उत्तम गर्भ उत्पन्न करण्यास मजकडून हरकत नाहीं. तिला शुद्ध होऊन उत्तम वस्त्रें नेसून माझी वाट पहात राहूं दे.' असें ह्मणून ते अंतर्धान पावले. नंतर कौसल्येकडे जाऊन वंशवृद्धीसाठीं दिरापासून पुत्रोत्पादन करून घेण्याविषयीं तिनें तिचें मधुर शब्दांनीं मन वळविलें. नंतर ऋतुकालीं शय्यागृहांत शिरतांना सत्यवती तिला ह्मणाली, 'कौसल्ये, तुझे दीर आज तुझ्याकडे येतील तर तूं मोठ्या हुशारीनें ऐस.' हें सासूचें भाषण ऐकून भीष्म किंवा असाच दुसरा कोणी कौरववंशामधला पुरुष येईल ह्मणून वाट पहात ती उत्तम शय्येवर पडली होती, इतक्यांत दिवा जळत असतां व्यास त्या ठिकाणीं आले. त्यांच्या पिंगट जटा, दाढी व नेत्र पाहून तिनें आपले डोळे मिटले. मातेची इच्छा पूर्ण करण्यासाठीं त्यांनीं तिला संभोग दिला. भयामुळें तिच्यानें त्यांच्याकडे पहावलें नाहीं. ते बाहेर पडले त्या वेळीं त्यांच्याकडे येऊन सत्यवतीनें, हिला गुणवान राजपुत्र होईल किंवा नाहीं ह्मणून विचारलें, तें ऐकून ते ह्मणाले.

'मोठा विद्वान, राजर्षींमध्यें श्रेष्ठ, मोठा भाग्यशाली, तसाच मोठा वीर्यवान व फार बुद्धिवान असा हिला मुलगा होईल, व त्याला दहा हजार हत्तींचें बळ राहील. त्यालाही तशाच प्रकारचे शंभर मुलगे होतील; पण कौसल्येनें डोळे झांकल्यामुळें तो अंध होईल.' कौरवांचा राजा अंध उपयोगाचा नाहीं असें वाटून तिनें त्यांपाशीं दुसरा मुलगा मागितला. 'बरें' ह्मणून ते निघून गेले. पुढें योग्य काळीं ते अंबालिकेकडे गेले. त्यांना पाहून तिचेंही तोंड पांढरें फटफटीत पडलें. तिला तशी पाहून 'तुझा मुलगा पंडुवर्ण होऊन त्यांचें नांवही तेंच पडेल,' असें ह्मणून ते बाहेर पडले व झालेला वृत्तांत त्यांनीं आईला कळविला. तो ऐकून तिनें आणखी एक मुलगा मागितला. 'बरें' ह्मणून ते निघून गेले. पुढें तिनें वडील सुनेला ऋतुकालीं त्यांच्याकडे जाण्यास सांगितलें. तिला त्यांच्या त्या उग्र स्वरूपाची व विलक्षण गंधाची आठवण होऊन तिनें सासूच्या सांगण्याप्रमाणें न करतां आपल्या दासीला वस्त्रालंकारांनीं मंडित करून त्यांकडे पाठविलें. ऋषी आल्याबरोबर ती दासी शांतपणें उठून त्यांना सामोरी गेली व त्यांना नमस्कार करून त्यांच्या आज्ञेनें खालीं बसली. तिनें त्यांची शरीरमर्दनादि सेवा केली. तिच्याबरोबर यथेच्छ रतिसुख घेऊन ऋषी संतुष्ट झाले, व उठून जातांना, 'तूं दास्यांतून मुक्त होशील व हा गर्भ धर्मात्मा होऊन सर्व बुद्धिमानांमध्यें श्रेष्ठ होईल,' असा त्यांनीं तिला वर दिला. तिला व्यासांपासून साक्षात् मर्धच मांडव्याशापानें विदुररूपानें झाले.'

२४. यमधर्माला मांडव्यशाप झाल्याची हकीकत. (१. १०७-१०८)

'यमधर्माला मांडव्यऋषींचा शाप कां झाला,' ह्मणून जनमेजयानें प्रश्न केल्यावरून वैशंपायन ह्मणाले, 'मांडव्यनामक कोणी विद्वान, सर्व धर्मांत निष्णात, सत्यपरायण व तपामध्यें नेहमी गढलेले ऋषी होते. ते आपल्या आश्रमाच्या बाहेरच्या बाजूला एका झाडाखालीं वर हात करून मौनव्रत धरून बसले असतां कोणे एके वेळीं कांहीं चोर राजद्रव्य चोरून त्या आश्रमाकडे आले. त्यांच्या मागून द्रव्यरक्षकही येत होते. राजपुरुष येऊन गांठण्यापूर्वी त्यांनीं तें द्रव्य आश्रमांत लपविलें व आपणही तेथें लपले. राजपुरुषांनीं त्या ठिकाणीं ऋषींना बसलेले पाहून चोर कोणत्या मार्गानें गेले ह्मणून विचारलें. ऋषींनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. पुढें तो आश्रम धुंडाळतांना त्यांना त्यांत त्यांचें द्रव्य व लपलेले चोर सांपडले. तेव्हां त्यांना त्या मुनींचा संशय येऊन चोरांबरोबर त्यांनीं त्या ऋषींनाही बांधून राजाकडे नेलें. राजानें इतरांबरोबर त्यांनाही ठार करण्याचा हुकूम केला. ह्याप्रमाणें अज्ञानानें त्यांना **सुळावर चढविलें**. ते महात्मे त्या सुळावर कांहीं न खातां न पितां बरेच दिवस प्राण धरून होते. त्यांच्याभोंवतीं ऋषी जमूं लागले. त्यांचें सुळावरच तप चाललेलें पाहून ते फार कष्टी झाले. रात्रीच्या वेळीं चाहोंकडून पक्षिरूपानें त्या ठिकाणीं येऊन प्रकट

होऊन, 'भो ब्रह्मन्, आपण काय पाप केलें आहे म्हणून त्याचें हें प्रायश्चित्त भोगीत आहां,' असें ते त्यांना विचारीत. ते मुनिश्रेष्ठ त्यांना ह्मणत, 'मला कोणाला दोष देतां येत नाहीं. कोणीं माझा अपराध केला नाहीं.' त्यांना त्या ठिकाणीं ह्याप्रमाणें फार दिवस जिवंत पाहून राजपुरुषांनीं राजाला ती वर्दी दिली. तें ऐकून राजानें त्या ऋषींची क्षमा मागून त्यांना सुळावरून खालीं उतरविण्यास नोकरांना आज्ञा केली व तो सूळ उपटून काढतां येईना, ह्मणून कापून काढविला. त्या अणीसकट सर्व पृथ्वीवर संचार करून त्या मुनींनीं इतरांना दुर्लभ असे लोक संपादिले; म्हणून लोकांमध्यें अणिमांडव्य या नांवानें ते प्रसिद्ध झाले. ते महात्मे धर्माकडे जाऊन त्याला ह्मणाले, 'माझ्या हातून न जाणतां असें कोणतें पाप घडलें कीं त्याचें हें फळ मला भोगावें लागलें?' धर्मानें उत्तर दिलें, 'साळुंकीच्या पंखांमध्यें आपण सळई टोंचली त्याचें हें आपल्याला फळ मिळालें. ज्याप्रमाणें **अल्प दानाचें फळ मिळतें तसेंच अल्प पापाचें देखील फल मिळाल्यावांचून राहत नाहीं.**' 'यावर माझ्या हातून तें केव्हां घडलें,' ह्मणून ऋषींनीं विचारलें असतां 'बालपणीं,' म्हणून धर्मानें उत्तर दिलें. तें ऐकून अणिमांडव्य ह्मणाले, '**जन्मल्यापासून बारा वर्षेपर्यंत अज्ञानदशेंत जें कांहीं कृत्य घडतें त्याची गणना पापांत मुळींच होत नाहीं. कारण त्या वेळीं प्राण्याला धर्माधर्माचें ज्ञान मुळींच नसतें.** ह्या अल्प अपराधाबद्दल मला एवढी शिक्षा मिळाली. कोणत्याही प्राण्याच्या हत्येपेक्षां ब्रह्महत्या फार निंद्य आहे. त्याकरितां मृत्युलोकीं तूं शूद्रयोनींत जन्माला जाशील. लोकांमध्येंही आजपासून केलेल्या कर्माच्या पापाबद्दल मी ही मर्यादा करून टाकतों. **जन्मल्यापासून चवदा वर्षेपर्यंत मनुष्यांच्या हातून जें कांहीं घडेल त्याची पापपुण्यांत गणना होणार नाहीं.**' ह्या शापानें धर्म विदुररूपानें शूद्रयोनींत जन्माला आले. ते धर्मार्थीमध्यें निष्णात असून त्यांना लोभ किंवा क्रोध मुळींच नव्हता ते दूरदर्शी व शांत होते. नेहमीं कौरवांचें कल्याण त्यांच्या डोळ्यांपुढें असे.

२५ धृतराष्ट्र, पंडु व विदुर ह्यांच्या जन्मकाळीं राष्ट्राची स्थिति. (१. १०९)

धृतराष्ट्र, पंडु व विदुर जन्मले त्या वेळीं कुरुदेश व त्यांतील प्रजा ह्यांची मोठी भरभराट होती. पीक फार जोमदार उगवत असून कणसें रसभरित व ठसठशीत असत. पाऊस वेळच्या वेळीं पडत असे. झाडें फलपुष्पांनीं संपन्न असत. फुलांना उत्तम गंध असे व फळें रसभरित असत. पशुपक्षी देखील आनंदांत असत. नगरांत व्यापारी व शिल्पकार ह्यांची गर्दी उडून गेली होती. लोक सद्गुणी, शूर व विद्यासंपन्न असून मोठ्या सुखांत होते. कोणाला चोरी किंवा धर्मलंडपणा माहीत नसे. राष्ट्रामध्यें जिकडे तिकडे कृतयुग भासूं लागलें. प्रजा यज्ञयागादि धर्मक्रियांमध्यें निमग्न असे. नेकी ठेवून लोक एकमेकांशीं प्रेमानें वागत. अहंकार, राग व लोभ हे त्यांच्या गांवींही नसून एकमेकांचें बरें झालेलें पाहून त्यांना संतोष होत असे. मेघमंडळाप्रमाणें द्वारांवर टांगलेल्या उंचउंच तोरणांनीं व भव्य हवेल्यांनीं त्या नगराला अमरावतीची शोभा आली असून रत्नाकराप्रमाणें सर्व रत्नांनीं तें संपन्न दिसत होतें. लोक नदींतून, वनप्रदेशांतून, मोठमोठ्या विहिरींतून, सरोवरांतून, पर्वतावरून व रम्य अशा वनांतून मोठ्या आनंदानें विहार करीत असत. उत्तर व दक्षिण कुरुंमधील लोक एकमेकांशीं मोठ्या स्नेहानें वागत. त्या कालीं गरीबी कोणाला ठाऊक नव्हती. स्त्रियांना वैधव्य माहीत नसे. राष्ट्रें जिकडे तिकडे ब्राह्मणांचीं घरें, विहिरी, व पुष्पवाटिका, ह्यांनीं भरलेलीं असून सर्व वैभवांनीं संपन्न असल्यामुळें नेहमीं जिकडे तिकडे उत्सव सुरू असलेले दिसत. धर्मानें रक्षिलेल्या त्या राष्ट्राला भीष्मांनीं जिंकून संपादिलेल्या पुष्कळ राष्ट्रांची भर पडून त्याचा विस्तार फारच वाढला होता. जिकडे तिकडे भूमि यज्ञस्तंभांनीं अंकित असल्यामुळें रमणीय दिसत होती. राष्ट्रांमध्यें चोहोंकडे भीष्मांनीं घालून दिलेला धर्म प्रचलित असून कोणी त्याचें उल्लंघन करीत नसे. ह्या भाग्यशाली मुलांचे मौंजीबंधनादि संस्कार केले त्या वेळीं सर्व पौरजनांची एकच धांदल उडून गेली. राजवाड्यांत, त्याचप्रमाणें नागरिकांच्या घरोघर

'घ्या, या' हेच शब्द ऐकूं येत होते. ह्या तिन्ही मुलांचें भीष्मांनीं लहानपणापासून मुलांप्रमाणें पालन केलें. व्रतबंध करून वेदाध्ययनांत, व्यायामांत व द्वंद्वछाकीच्या खेळांत त्यांना निष्णात केलें. ते यौवनदशेंत आले तेव्हां धनुर्विद्या, गदायुद्ध, दांडपट्टा आदिकरून मर्दानी खेळांत, त्याचप्रमाणें नीतिशास्त्र, इतिहास, पुराणें इत्यादि अनेक विद्यांचें शिक्षण त्यांना मिळालें. धनुर्विद्येंत पंडूच्या तोडीचा कोणी नव्हता. धृतराष्ट्राइतकें सामर्थ्य दुसऱ्या कोणाला नव्हतें. शांतनूचा खुंटूं लागलेला वंशवृक्ष फिरून ह्याप्रमाणें जोमदार फुटलेला पाहून सर्व राजांची दांडगाई बंद पडली. अंधत्वामुळें धृतराष्ट्राला व शूद्रयोनीपासून जन्म झाल्यामुळें विदुराला राज्यपद न मिळतां पंडूच गादीचा मालक झाला.

---

२६ धृतराष्ट्र, पंडु व विदुर ह्यांचा विवाहसमारंभ व पंडूचा दिग्विजय.

(१. ११०–११४)

पंडु, विदुर व धृतराष्ट्र ह्यांच्यामुळें पूर्ववत नांवारूपाला चढलेलें कौरवकुल फिरून न बुडतां समुद्राप्रमाणें वाढावें म्हणून भीष्म त्यांच्या लग्नसंबंधानें विचार करूं लागले. सुबलराजाची मुलगी गांधारी हिला शंकराच्या आराधनेनें शंभर मुलगे होतील म्हणून वर मिळाला आहे असें ब्राह्मणांपासून ऐकून भीष्मांनीं त्या राजाकडे दूत पाठविला. ह्या संबंधाच्या बाबतींत धृतराष्ट्र अंध एवढीच काय ती सुबलाला विचाराची बाजू दिसली. परंतु कुल, लौकिक व चाल मनांत आणून तो ह्या संबंधाला कबूल झाला. धृतराष्ट्र अंध असून वडिलांनीं आपल्याला त्याला देण्याचें ठरविलें आहे, ही गोष्ट कानीं पडतांच पतीसंबंधानें द्वेषभाव मनांत उत्पन्न होऊं नये म्हणून त्या पतिव्रतेनें आजन्म फडक्याची जाड पट्टी डोळ्यांवर बांधण्याची शपथ घेऊन लागलीच ती बांधिली. गांधारराजाचा शकुनि नांवाचा मुलगा आपल्या वयोरूपसंपन्न बहिणीला घेऊन हास्तिनापुराला आला. तेथें भीष्मांच्या विचारानें तिचें धृतराष्ट्राशीं मोठ्या थाटानें लग्न लागलें. ह्याप्रमाणें योग्यतेनुरूप दासदासी व वस्त्रालंकार यांसह बहिणीचें लग्न करून देऊन व भीष्मांनीं केलेला सत्कार घेऊन शकुनि आपल्या नगरीला परत गेला. इकडे गांधारी शील, आचार व चाल इत्यादि गुणांनीं सर्व कुरुकुलाला तोषवीत पति हाच काय तो आपलें दैवत असें समजून मोठ्या संतोषानें पतिगृहीं राहून परपुरुषाचें नांव देखील तोंडानें उच्चारीत नसे.

इकडे वसुदेवाचा पिता यादवश्रेष्ठ शूर नांवाचा होता. त्याची पृथा नांवाची मुलगी होती. तिचें सौंदर्य अप्रतिम होतें. सत्यवाक् शूरानें ही आपली मुलगी त्याच्या आतेचा मुलगा व त्याचा स्नेही जो कुंतिभोज त्याच्या स्वाधीन केली. पृथा ह्या आपल्या पालक पित्याच्या गृहीं ब्राह्मण व अतिथि ह्यांचा सत्कार करीत रहात असतां एके वेळीं उग्रतपस्वी व धर्मपरायण असे दुर्वास ऋषि त्या ठिकाणीं आले. मोठ्या दक्षतेनें त्यांची सेवा करून त्यांना तिनें संतुष्ट केलें. भावी आपत्काल मनांत आणून त्याच्या प्रतिकारार्थ **अभिचार** नांवाचा मंत्र तिला देऊन ते ह्मणाले, 'ज्या देवाचें तूं ह्या मंत्रानें स्मरण करशील तो येऊन तुला मुलगा देऊन जाईल.' ह्याप्रमाणें हा वर मिळाल्यावर त्याचा अनुभव पहाण्यासाठीं कुंतीनें कौमारावस्थेंतच सूर्याचें स्मरण केलें. त्याबरोबर तो खालीं येतांना पाहून ती घाबरली. तिच्याकडे येऊन सूर्य ह्मणाला, 'हे गौरांगि, हा मी येथें तुझें प्रिय करण्याला तयार आहें.' कुंती ह्मणाली, 'कोणी ऋषींनीं मला एक वर दिला त्याचा अनुभव पहाण्यासाठीं मीं आपलें स्मरण केलें. ह्याची क्षमा करणार आपणच समर्थ आहां. स्त्रियांचा कोणताही अपराध पोटांत घालणें थोरांना उचित आहे.' सूर्यानें उत्तर दिलें, 'हा दुर्वासवराचा प्रभाव आहे हें मला माहीत आहे. मनांत कांहीं भीति न बाळगतां माझें आगमन सार्थ कर. भीरु, तूं जो दोष समजतेस तो तुला केवळ माझें स्मरण केल्यानेंच लागला जाहे.' हा सूर्याचा बुद्धिवाद ऐकूनही कौमार्य, नैसर्गिक लज्जा व आप्तवर्गाची भीति, ह्यांमुळें त्याच्या ह्मणण्याला तिच्यानें रुकार देववेना. नंतर 'माझ्या कृपेनें तुला ह्याबद्दल दोष मुळींच लागणार नाहीं,' असा धीर देऊन सूर्यानें तिला संभोग दिला. त्यापासून सर्व शास्त्रध-

रांमध्यें श्रेष्ठ, अंगचें कवच धारण करणारा व मुखाला शोभा देणारीं कुंडलें धारण केलेला, भाग्यशाली, रूपसंपन्न, दानशूर व कर्ण ह्या नांवानें सर्व लोकांत प्रसिद्ध असलेला मुलगा तिला झाला. नंतर तिला कौमार्य देऊन सूर्य स्वस्थानाला परत गेला. तो मुलगा झाला तेव्हां काय केलें असतां कर्तव्य बजावल्याप्रमाणें होणार आहे ह्याचा कुंती चिंतातुर होऊन विचार करूं लागली. शेवटीं आप्तवर्गांच्या भीतीनें कृतकर्म छपविण्यासाठीं तिनें त्या वीर्यशाली मुलाला नदींत फेंकून दिलें. कोणी मोठा भाग्यशाली राधा नांवाच्या स्त्रीचा नवरा दुर्योधनाकडे सारथ्याचें काम करीत असे, त्याला तो तेथें सांपडला व त्यानें त्याचें मुलाप्रमाणें पालन केलें. वसूसह तो सांपडला म्हणून त्यानें त्याला **वसुषेण** असें नांव दिलें. तो जसजसा वाढत चालला तसतसा बलवान व सर्व शास्त्रांत निष्णात झाला. तो दुपारपर्यंत सूर्याची आराधना करीत असे. त्यावेळीं कोणी ब्राह्मण त्याकडे कांहीं याचना करण्याला आला असतां त्याला तो विन्मुख पाठवीत नसे. अर्जुनाच्या काळजीनें इंद्र ब्राह्मणरूपानें त्याकडे याचनेला जाऊन त्यानें त्याचें कवच त्याजवळ मागितलें. कर्णानें हात जोडून त्या ब्राह्मणरूपी इंद्राला आपलें अंगचें कवच काढून दिलें. त्यानें संतुष्ट होऊन त्याला शक्ति देऊन इंद्र ह्मणाला, 'देव, असुर, मनुष्य, गंधर्व, सर्प अथवा राक्षस ह्यांपैकीं तुला बाटेल तो एक ह्यानें मरण पावेल. ह्या दातृत्वामुळें **कर्ण** व **वैकर्तन** हीं नांवें त्याला मिळालीं.

ही राजकन्या कुंती यौवनदशेंत आली तेव्हां ती फार खुलून रूपवती दिसूं लागली. पुष्कळ राजांची हिला मागणी येऊं लागली असतां स्वयंवरामध्यें तिला देण्याचा तिच्या पित्यानें निश्चय केला. स्वयंवरकाळीं सभेंत जमलेल्या विशालवक्षें, महाशक्ति राजमंडळामध्यें सर्वांचें तेज झांकून टाकणारा, सूर्यासारखा तेजस्वी अशा राजाशार्दूल पंडूला पाहून कुंतीचें मन अस्वस्थ होऊन लज्जेनें तोंड खालीं घालून तिनें त्याच्या गळ्यांत माळ घातली. कुंतीनें पंडूला वरलें हें पाहून सर्व राजे निराश होऊन माघारे गेले. नंतर पित्यानें तिचें पंडूबरोबर लग्न लावून पौलोमी व इंद्र ह्यांप्रमाणें त्यांचा संबंध जोडून दिला. विवाहविधी आटोपल्यावर पुष्कळ संपत्ति देऊन राजानें त्याला त्याच्या नगरीला पाठविलें. तो आपल्या मोठ्या सैन्यासह ब्राह्मण व महानमहान ऋषी ह्यांचा स्तुतिपाठ ऐकत, जिच्यामध्यें अनेक निशाणें फडकत आहेत, अशा आपल्या नगरींत शिरला व आपल्या प्रियेसाठीं निराळें मंदिर तयार करून त्यांत त्यानें तिला ठेविलें. पुढें पंडूचें दुसरें लग्न करण्याच्या उद्देशानें वृद्ध आमात्यासह भीष्म मद्रदेशाच्या राजाकडे गेले. भीष्म आले आहेत अशी वर्दी लागतांच मद्राधिपति त्यांना सामोरा गेला व त्यांचा सन्मान करून त्यांना नगरांत घेऊन गेला. त्यांना शुभ्र आसन, पाद्य अर्घ्य, मधुपर्क इत्यादि सत्कार देऊन त्यानें त्यांना आगमहेतु विचारला.तेव्हां भीष्म ह्मणाले, 'आपली माद्री पंडूकरितां मागण्यासाठीं मी आलों आहें. हा परस्पर संबंध वावगा नाहीं, हें मनांत आणून विधिपूर्वक पंडूबरोबर तिचें लग्न लावून द्या. ' हें भीष्मांचें भाषण ऐकून मद्राधिपति त्यांना ह्मणाला, ' ह्यापेक्षां इष्ट संबंध मिळणें खचित शक्य नाहीं. परंतु ह्या कुळांत पूर्वापार चालत आलेली एक चाल आहे, ती कशी असली तरी माझ्यानें मोडवत नाहीं. ती लोकप्रसिद्ध असल्यामुळें आपल्यालाही ठाऊकच आहे. **आपल्याला मुलीबद्दल कांहीं तरी पैसा द्यावा लागणार** व आपल्याला ' द्या, ' ह्मणून ह्मणणें कमीपणाचें आहे. भीष्मांनीं उत्तर दिलें, ' राजा, हा उत्तम धर्म प्रत्यक्ष ब्रह्मदेवांनीं सांगितला आहे, ह्यांत कांहीं दोष नाहीं व भल्या लोकांनाहीं तो संमत आहे. ' असें ह्मणून शुद्ध केलेलें व अशुद्ध सोनें तशींच नानाविध रत्नें त्यांनीं त्याला दिलीं. तें द्रव्य घेऊन तो फार संतुष्ट झाला व त्यानें आपल्या मुलीला अलंकार घालून भीष्मांच्या स्वाधीन केलें. भीष्म तिच्यासह हास्तिनापुराला आले. त्या ठिकाणीं विद्वानांना पसंत पडलेल्या उत्तम मुहूर्तावर पंडूनें विधिपूर्वक माद्रीचें पाणिग्रहण केलें. विवाहविधि आटोपल्यावर त्यानें तिला एका निराळ्या मंदिरांत ठेविलें. ह्या दोन स्त्रियांबरोबर यथेच्छ सुखोपभोग घेतल्यावर दिग्विजय करण्याच्या हेतूनें भीष्म आदिकरून थोरांना अभिवादन करून व

धृतराष्ट्रादि कुरुकुलश्रेष्ठांची आज्ञा घेऊन मंगल शिष्टाचार व ब्राह्मणांचे आशीर्वाद घेऊन हत्ती, घोडे, रथ, पायदळ याप्रमाणें चतुरंग सैन्यानिशीं तो नगराबाहेर पडला. ह्या अफाट सैन्यानिशीं त्यानें अनेक शत्रूंवर स्वारी केली. प्रथम अपराधी दशार्णवासी लोक त्यानें युद्धांत जिंकले. नंतर पुष्कळ राजांना त्राहि त्राहि करून सोडणारा व शक्तीचा मोठा आभिमान बाळगणारा मगधाधिपति दीर्घ ह्याला त्यानें युद्धांत ठार केलें. तेथून पुष्कळ संपत्ति व वाहनें घेऊन मिथिलेला जाऊन तो देश त्यानें काबीज केला. त्याचप्रमाणें काशीमध्यें व सुम्ह आणि पुंड्र या देशांत त्यानें कौरवांचें वर्चस्व स्थापित केलें. शरवर्षाव ह्याच ज्याच्या ज्वाळा, शस्त्रें हींच ज्याची ज्योति, अशा शत्रुदमन पंडुरूपी अग्नीच्या तोंडीं पडून राजे होरपळून निघाले. सैन्याच्या साहाय्यानें त्यानें बलवान राजांची शक्ति हरण करून त्यांना अगदीं कौरवांचे आज्ञांकित करून सोडलें. त्यानें जिंकलेले सर्व भूमिपाल भूतलावर त्याला इंद्राच्या तोडीचा मानूं लागले व हात जोडून त्याच्यापुढें उभे राहूं लागले. संपत्ति, नानाविध रत्नें, पाच, मोतीं, पोवळीं, सोनें, रुपें, उत्तम गाई, उत्तम घोडे, उत्तम रथ, हत्ती, गाढव, उंट, म्हशी, त्याचप्रमाणें अप्रतिम कांबळीं व हरणाचीं कातडीं हीं ते त्याला करभार ह्मणून आणून देऊं लागले. हीं सर्व घेऊन स्वराष्ट्रांतील प्रजेला आनंद देत हास्तिनापुराला परत येऊन शांतनु व भरत ह्यांच्या स्मरणांतून निघून गेलेल्या कीर्तीची फिरून त्यानें लोकांना आठवण करून दिली. ज्यांनीं पूर्वी कौरवांच्या देशाचा कांहीं भाग किंवा त्यांची संपत्ति हरण केली होती, त्या सर्वांना ह्यानें पादाक्रांत केलें. भीष्मादि कौरव फार संतुष्ट होऊन तो परत आला त्या वेळीं त्याला सामोरे गेले. नगराबाहेर पडले नाहींत तोंच नानाविध संपत्ति व अनेक प्रकारचे लोक त्यांच्या दृष्टीस पडले. त्या कौसल्यानंदवर्धनानें वडिलांच्या पाया पडून पौरजनांचा यथायोग्य सन्मान केला. भीष्मांनींही अनेक राष्ट्रें जिंकून कृतार्थ होऊन आलेल्या मुलाला आलिंगन देऊन आनंदाश्रु ढाळले. त्या ठिकाणीं होणाऱ्या शंख, दुंदुभि इत्यादि वाद्यांचा शब्द ऐकून नगरवासी लोकांच्या मनांत आनंद मावेना. अशा थाटांत तो नगरामध्यें शिरला व धृतराष्ट्राच्या विचारानें आपण आणलेली सर्व संपत्ति त्यानें भीष्म, सत्यवती व विदुर ह्यांना भेट ह्मणून दिली. त्या धर्मात्म्यानें सर्व सुहृज्जनांना द्रव्य देऊन तृप्त केलें. त्या पराक्रमशाली मुलाला आलिंगन देऊन जयंताला आलिंगन दिल्यानें पौलोमीला होणाऱ्या आनंदाप्रमाणें सत्यवतीला आनंद झाला. आळस बाजूला ठेवून गृहसुखांचा त्याग करून कुंती व माद्री ह्यांच्या समागमांत तो नेहमीं शिकारीच्या मागें वनांत हिंडत असे. हिमालयाच्या पायथ्याशीं शालवृक्षांच्या वनांत विहार करीत हिंडतांना दोन हत्तीणींबरोबर फिरणाऱ्या ऐरावताप्रमाणें तो शोभत असे. तलवार, धनुष्य व बाण घेऊन व अभेद्य कवच घालून सर्व अस्त्रांमध्यें निष्णात असा जो राजा स्त्रियांसहवर्तमान तेथें फिरतांना पाहून सर्व वनवासी लोकांना तो देवासारखा वाटे. धृतराष्ट्राच्या आज्ञेनें सेवकजन दररोज वाटेल ती वस्तु त्याला तेथें पोहोंचवीत. एक शूद्र योनींत ब्राह्मणापासून झालेली मुलगी पाहून धृतराष्ट्रानें तिच्याशीं विदुरांचें लग्न लावून दिलें. तिला विदुरांपासून त्यांसारखे विनयसंपन्न मुलगे झाले.

२७ धृतराष्ट्रपुत्रांच्या जन्माची हकीकत.

(१. ११५—११७)

कोणे एकेसमयीं श्रमून आलेल्या व्यासांची गांधारीनें सेवा करून त्यांना संतुष्ट केलें. त्यांनीं तिला वर दिला, तिनें आपल्या नवऱ्यासारखे शंभर मुलगे आपल्याला व्हावे असा वर मागितला. पुढें धृतराष्ट्रापासून तिला गर्भ राहिला. दोन वर्षें तो तिच्या उदरांत होता. इतक्यांत प्रभातकालच्या सूर्याप्रमाणें तेजस्वी मुलगा कुंतीला झालेला ऐकून तिला मत्सर उत्पन्न होऊन आपल्या गर्भाशयाच्या धारणाशक्तीबद्दल साश्चर्य खेद वाटून ती मोठ्या चिंतेंत पडली. पुढें सवतीमत्सर दुःसह होऊन धृतराष्ट्राला न कळतां तिनें तो गर्भ पोटांतून उपसून काढ्ला. तेव्हां रक्तानें भरलेला मांसपिंड बाहेर पडला. दोन वर्षें पोटांत ठेवलेल्या ह्या गोळ्याला ती

टाकून देण्याला तयार झाली. इतक्यांत अंतर्ज्ञानानें तें जाणून व्यास तिच्याकडे आले व तो मांसपिंड पाहून तूं हें काय केलेंस ह्मणून त्यांनीं तिला विचारलें. तिनें कांहीं गुप्त न ठेवतां मनांतलें सर्व त्यांना कळविलें. नंतर व्यासांच्या आज्ञेवरून त्यावर तिनें थंड पाणी शिंपडलें. त्याबरोबर त्याचे शंभर तुकडे झाले. ते फार सूक्ष्म गर्भपिंड तिनें व्यासांच्या आज्ञेनें तुपानें भरलेल्या भांड्यांत घालून सुस्थळीं त्यांचें मोठ्या काळजीनें जतन केलें. ' फिरून तेवढाच काल गेल्यावर ते फोड, ' ह्मणून सांगून व्यास निघून गेले. पुढें एक महिन्याच्या अंतरानें त्यापासून दुर्योधन, दुःशासन, दुर्मर्षण इत्यादि शंभर मुलगे व दुश्चला नांवाची मुलगी अशीं एकशें एक मुलें झालीं. पैकीं दुर्योधन वडील होता. परंतु जन्मकालाच्या मानानें युधिष्ठिर वडील होता. दुर्योधन जन्मला त्याच दिवशीं बलशाली भीम जन्माला आला. ह्या दुर्योधनानें जन्मतांच गाढवासारखा शब्द केला. गाढव, गिधाडें, कोल्हीं व कावळे ह्यांनीं तो शब्द ऐकून प्रतिशब्द केला. त्यावेळीं तुफान वारा सुटला व सर्व दिशा पेटल्या. हें पाहून अनेक ब्राह्मण, भीष्म व विदुर ह्यांना बोलावून धृतराष्ट्र त्यांना ह्मणाला, ' वडील राजपुत्र युधिष्ठिर आमचा कुलवर्धन आपल्या गुणांनींच राज्याला अधिकारी झाला आहे. ह्यासंबंधानें आतां कांहीं विचार कर्तव्य नाहीं. पण ह्या माझ्या दुर्योधनाला त्याच्या मागून तरी गादी मिळेल किंवा नाहीं ? ' हें त्याचें भाषण संपतें न संपतें तोंच चोहोंकडे क्रूर मांसभक्षक राक्षस व दुश्चिन्हसूचक कोल्हीं ओरडूं लागलीं. तीं घोर दुश्चिन्हें पाहून ते ब्राह्मण व बुद्धिमान विदुर ह्मणाले, ' तुझ्या वडील मुलाच्या जन्मकालीं हे अशुभ शकुन होत आहेत, ह्यावरून तो कुलाचा अंत करणारा होणार हें स्पष्ट आहे. ह्या एकाला टाकून कुलाचें व जगाचें कल्याण करणें श्रेयस्कर आहे. **कुलासाठीं एकाचा, एका गांवासाठीं एका कुलाचा, एका देशासाठीं एका गांवाचा व आपल्यासाठीं सर्व पृथ्वीचा त्याग करावा हें हितावह आहे.** ' असें जरी त्यांनीं सांगितलें तरी पुत्रप्रेम अनावर होऊन त्यानें त्यांच्या म्हण-ण्याकडे दुर्लक्ष केलें. वेड्यापासून धृतराष्ट्राला एक मुलगा झाला. हे सर्व युद्धकलेंत कुशल, वेदपारंगत, सर्व शास्त्रांत निष्णात असे होते. त्यांना अनुरूप मुली पाहून धृतराष्ट्रानें त्यांचे विवाह केले व दुश्चला जयद्रथाला दिली.

२८. पंडुपुत्रांच्या जन्माची हकीकत व पंडूचा मृत्यु. (१. ११८–१२७)

कोणे एके वेळीं पंडू, अनेक श्वापदांनीं गजबजलेल्या एका निबिड अरण्यामधून हिंडत असतां एक मृगाचें जोडपें रतिसुख घेतांना त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां सुवर्णपंखयुक्त असे पांच बाण सोडून त्यानें त्या जोडप्याचा प्राण घेतला. हा एक ऋषिपुत्र स्त्रियेसहवर्तमान मृगरूपानें फिरत होता. हे बाण लागल्याबरोबर मनुष्यवाणीनें दीन शब्द उच्चारून तडफडत तो जमिनीवर पडला व शोकाकुल होऊन ह्मणाला, ' कामक्रोधांच्या तावडींत सांपडलेले बुद्धिहीन पापी देखील असें निष्ठुर कर्म करण्याला प्रवृत्त होत नाहींत; पण बुद्धीची प्राक्तनापुढें कांहीं मात्रा चालत नाहीं. तें बुद्धीला देखील मागें सारतें. शहाण्याला देखील प्राक्तनफल चुकत नाहीं. धर्मसंपन्न अशा उत्तम व थोर कुलांत तुझा जन्म झाला असून काम व लोभ ह्यांना वश होऊन हे राजा, तूं हें निंद्य कर्म करण्याला कसा तयार झालास ? ' पंडूनें उत्तर दिलें, ' हे मृगा, शत्रूप्रमाणेंच मृगांना मारणें राजांचा धर्म सांगितला आहे. हें लक्षांत न आणतां तूं व्यर्थ मला दोष देत आहेस. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मृगांना मारण्यांत कांहीं पाप नाहीं. अगस्त्यऋषींनीं देखील मोठ्या सत्राचे वेळीं सर्व वनवासी मृगांचा वध केला. ह्याप्रमाणें उदाहरणें असून तूं उगीच माझी निंदा कां करतोस? अगस्त्यांच्या मंत्रानेंच तुमचा देह शांत झाला आहे. ' मृग ह्मणाला, ' **छिद्र पाहून शत्रूवर घाला घालणें न्याय्य नाहीं.** त्यांतून प्रत्येक गोष्टीला काल असतो. ' पंडूनें उत्तर दिलें. ' **शत्रु तावडींत आला असतां अनेक क्रूर उपायांनीं त्याला मारावें, मग तो सावध असो वा नसो, असें शास्त्र सांगतें,** ' मृग ह्मणाला, ' राजा, मृगवधाबद्दल तुला दोष देण्यांत माझी स्वार्थबुद्धि नाहीं. परं-

तु समय पाहून कौर्य न दाखवितां कांहीं वेळ तूं वाट पहावयाची होतीस. थोर व निर्मल अशा पुरुवंशांत तुझा जन्म झाला असून असें निष्ठुर, व स्वर्ग आणि कीर्ति ह्यांच्या आड येणारें हें निंद्य कर्म करणें तुला उचित नव्हतें. दुष्ट कृत्यांत निमग्न असणाऱ्या धर्मार्थकामपराङ्मुख पापी लोकांना ताळ्यावर आणण्याचें काम तुझें असून हे नरश्रेष्ठा; निरपराधी, फलमूलाशी, वनवासी, व कोणाला उपद्रव न देणारा अशा मला मारण्याला तूंच प्रथम प्रवृत्त झालास हें नवल नव्हे का ? मला मारून तुला काय मिळालें ? ज्याअर्थी तूं माझा प्राण घेतला आहेस, त्याअर्थी मीही तुला शाप देतों ऐक. तुला देखील अशाच प्रकारानें मृत्यु येईल. तपानें आत्मा पूत झालेला मी किंदम नांवाचा मुनि आहें. जनलज्जेसाठीं मृगरूपानें मृगीसह मी हिंडत होतों. मी कामांध होऊन मृगरूप घेतलें असल्यामुळें मला मारल्यानें तुझ्या हातून ब्रह्महत्या घडली असें मात्र ह्मणतां येत नाहीं. पण तूंही कामांध होऊन स्त्रीशीं संभोग करीत असतां अशाच स्थितींत यमलोकाला जाशील, व मरणकाळीं जिच्याशीं तुझा संबंध होईल तीच शाश्वत अशा परलोकवासामध्यें तुझी भक्तिपूर्वक सहचरी होईल. तूं ज्याप्रमाणें मला सुखांतून काढून दुःखांत ढकललें आहेस त्याचप्रमाणें सुखांत असतांना तुला दुःख प्राप्त होईल. ' असें ह्मणून त्यानें प्राण सोडला. फार कष्टी होऊन पंडूनें त्या शवाची सर्व उत्तरक्रिया आपल्या बांधवांप्रमाणें केली. नंतर तो ह्मणाला, ' कामजालमोहित अशा उच्छृंखल लोकांना थोर कुलांत जन्म असूनही स्वकर्माने दुर्गति प्राप्त होते. प्रत्यक्ष व्यासांपासून माझा जन्म असून दैवानें सोडल्यामुळें मृगयेच्या मार्गे लागून हिंडतांना मला ही अशी संकटांत पाडणारी दुष्ट बुद्धि झाली ! आतां मोक्षसाधन हाच एक उत्तम मार्ग मला उरला आहे. हा मायापाश खचित क्लेशपरंपरेला कारण होतो. वाडवडिलांनीं स्वीकारलेल्या उत्तम मार्गाचें अवलंबन करणें हेंच आतां मला श्रेयस्कर आहे. एकटा राहून उग्र तपामध्यें वनस्पतीवर उपजीविका करीत कालक्षेप करून संन्याशाप्रमाणें आश्रमवासी मला झालें पाहिजे. अंगाला भस्म फांसून ज्या ठिकाणीं लोकांचा त्रास मुळींच होणार नाहीं अशा आश्रमामध्यें अगर एखाद्या वृक्षाखालीं पडून, 'हा आत्मीय हा परकीय,' हा विचार मला अगदीं सोडून दिला पाहिजे. सुखदुःखाची परवा न करतां निंदा अगर स्तुति ह्यांना सारखेंच मानलें पाहिजे. अन्न वर्ज करून, मानापमान बाजूला गुंडाळून ठेवून, कोणापासून परिग्रह न घेतां, कोणाला यर्द्वेत देखील न दुखवितां अगर कोणावर न रागावतां, नेहमीं प्रसन्नमुद्रेनें सर्व प्राण्यांच्या हितामध्यें गढलें पाहिजे. चराचर अशा चतुर्विध वस्तूंची हिंसा न करितां, आपल्या प्रजेप्रमाणें सर्व प्राण्यांबरोबर नेहमीं मी सारखा राहीन, व दिवसांतून एकदां दहापांच घरें भिक्षा मागून तीही न मिळाल्यास उपवास काढून अगर पूर्वसंचितावर निर्वाह करून, एक हात वस्त्रांत झांकून व दुसऱ्याला चंदन फांसून दोघांबद्दल सारखीच काळजी बाळगीत, ना मृत ना जिवंत अशा रीतीनें मी दिवस काढीन. जीवित किंवा मरण ह्यांची सारखीच परवा करून, धूतपाप असा, ऐहिक सुखासाठीं लोक रात्रंदिवस ज्या क्रिया करतात, त्याकडे ढुंकून देखील पहाणार नाहीं, व सर्व मोहजालाला बाजूला झुगारून देऊन कोणाच्या ताब्यांत न जातां वायु भक्षण करीत राहून, निर्भय असा मार्ग स्वीकारून मी आपला देह ठेवीन. हतवीर्य झालेला मी पुन्हां धर्मविरोधी दुष्ट मार्गाचें चुकून देखील अवलंबन करणार नाहीं. चांगली अगर वाईट कोणतीही स्थिति आली असतां कामापलीकडे ज्याचें लक्ष पोहोंचत नाहीं त्याच्या व कुत्र्याच्या जिण्यामध्यें विशेष अंतर नाहीं. ' ह्याप्रमाणें मनाचा निश्चय करून दुःखानें दीर्घोच्छ्वास टाकून, तो कुंति व माद्री ह्यांकडे नजर देऊन ह्मणाला, ' कौसल्या, विदुर, राजा, थोर सत्यवती, भीष्म, बंधुवर्ग, पुरोहित, सोमप्राशन करणारे ब्राह्मण व इतर वृद्ध पौरजन ह्या सर्वांचें शांतवन करून पंडूनें अरण्यतास स्वीकारला असें तुह्मी त्यांना माझ्या वतीनें कळवा. ' हें पतीचें निश्चयात्मक भाषण ऐकून त्याला अनुरूप असेंच त्यांनीं उत्तर दिलें. त्या ह्मणाल्या, ' हे भरतकुलश्रेष्ठ, असे पुष्कळ आश्रम आहेत कीं, ज्यांत आह्मां धर्मपत्नींना घेऊन तपानें मोक्षप्राप्ति करून घेतां येईल. आम्हांलाही अलभ्य स्वर्गफल मिळून त्या ठिकाणीं देखील आपणच

आमचे पति असावें अशी आमची इच्छा आहे. इंद्रियनिग्रह करून कामसुखाचा विचार न करतां आपल्या सेवेमध्यें दक्ष राहिल्यानें आमच्या हातूनही पुण्यसंचय होणार आहे. आपण आह्मांला सोडून गेलां तर आजच आह्मी प्राण सोडूं.' हें ऐकून पंडूनें उत्तर दिलें, 'असा जर तुमचा धर्मविचार ठरला असेल तर माझ्याकडून हरकत नाहीं. मी तर ग्राम्यसुखाचा त्याग करून फलमूलांवर अरण्यांत राहून वल्कलें व चर्म परिधान करून द्विकाल अग्नीला आहुति देत मिताहारी व जटाधारी होऊन थंडी, वारा ऊन्ह ह्यांना न जुमानतां व क्षुत्तृषेच्या आहारीं न जातां, घोर तपानें शरीर झिजविणार. एकांतांत आत्मानात्मविचारांत गर्क होऊन पक्व किंवा अपक्व मिळतील त्या प्रकारच्या वन्यफलांनीं व उदकानें देवता व पितर ह्यांना तृप्त करून बाकी राहिलेलें स्वतः खाऊन बांधव व पौरजन ह्यांकडे मी दृष्टि देखील देणार नाहीं. मग त्यांना दुःखविण्याची गोष्ट तर दूरच राहिली. ह्याप्रमाणे अरण्यवासाचे कडकडीत नियम पाळून देह पडेपर्यंत मी कालक्षेप करणार.' ह्याप्रमाणें स्त्रियांना सांगून चूडामणि, अंगद, कुंडलें, मौल्यवान वस्त्रें व स्त्रियांचे सर्व अलंकार काढून त्यानें ब्राह्मणांना दिले, व 'हास्तिनापुराला जाऊन पंडु ऐहिक वस्तूंवरचा अभिलाष सोडून अरण्यावासी झाला, असा निरोप राजाला कळवा,' ह्मणून त्यानें त्यांना विनवून सांगितलें. त्या भरतश्रेष्ठाचे हे दीनवाणे शब्द ऐकून त्याचे अनुयायी व सेवक मोठ्यानें रडूं लागले, व अश्रु ढाळीत हास्तिनापुराला परतले. तेथें जाऊन त्यांनीं झालेली सर्व हकीकत धृतराष्ट्राला कळविली, व पंडूनें दिलेली ती नानाविध संपत्ति त्यापुढें ठेविली. ती बातमी ऐकून धृतराष्ट्राला फार वाईट वाटलें.

इकडे पंडु आपल्या स्त्रियांसहवर्तमान नागशतपर्वताकडे गेला. पुढें कालकूटवरून हिमालयाच्या पलीकडे गंधमादनाला गेला. सिद्ध व महर्षी ह्यांच्या आश्रयानें मार्ग क्रमीत मुक्काम करीत करीत तो इंद्रद्युम्न सरोवरावरून हंसकूटाच्या पलीकडे जाऊन शतशृंगावर उग्र तप करीत राहिला. त्या ठिकाणीं त्यानें आपल्या तपोबलानें सिद्धचारणांचें देखील मन आपल्याकडे वेधून घेतलें. अहंपणा सोडून उग्र तपांत शरीर झिजवीत स्वतःच्या जोरावर स्वर्ग मिळविण्याच्या तो नादीं लागला. त्या ठिकाणीं त्याला पुष्कळ आप्त झाले; कांहीं सुहृद झाले; व कांहीं तर त्याला मुलाप्रमाणें लेखूं लागले. ह्याप्रमाणें पुष्कळ काळ शुद्ध तपाचा संचय करीत तो ब्रह्मचर्यानें काळ कंठीत राहिला. एका अमावास्येला देव, ऋषी व पितर ह्यांचा मोठा जमाव ब्रह्मलोकीं जमणार होता, त्यासाठीं सर्व ऋषिगण ब्रह्मदेवांच्या दर्शनासाठीं निघाले. तें पाहून आपणही त्यांच्याबरोबर जावें असें मनांत आणून पंडु आपल्या स्त्रियांसहवर्तमान शतशृंगापासून वर निघाला असतां तापस त्याला ह्मणाले, 'ह्या पर्वतावर अनेक दुर्गम प्रदेश, अनेक विमानांनीं गजबजलेलीं व गायनाच्या स्वरानें दुमदुमलेलीं गंधर्वअप्सरांचीं व कुबेराचीं क्रीडास्थानें, अनेक रमणीय उद्यानें, मोठमोठ्या नद्या ज्यांमधून वाहताहेत अशा ह्या पर्वताच्या नितंबभूत मोठमोठ्या दऱ्या आमच्या पाहण्यांत आल्या आहेत. ह्या ठिकाणीं कोठें कोठें तर कायमची थंडी असते, व ज्या ठिकाणीं वृक्ष व पशुपक्षी दिसावयाचे नाहींत असे पुष्कळ प्रदेश आहेत. कोठें कोठें तर मनुष्यसंचारही नाहीं. अशा ठिकाणीं पक्ष्यांचा संचार होणें देखील कठीण, मग इतरांची काय कथा? ह्या ठिकाणीं वायु, सिद्ध व महर्षी इतके मात्र जाण्याला समर्थ आहेत. ज्यांना दुःख स्वप्नीं देखील माहीत नाहीं अशा ह्या राजास्त्रियांना ह्या पर्वतावरून कसें जातां येणार? ह्मणून पुढें येऊं नकोस.' पंडु ह्मणाला, 'हे महाभागहो, अपुत्राला स्वर्गाचें द्वार बंद आहे, ह्यासाठीं पितृऋणापासून कसा मुक्त होईन ह्मणून मला फार चिंता पडली आहे. माझ्यामागें निःसंशय पितर नरकांत पडणार. **देव, ऋषी, पितर व मानव ह्या चौघांच्या ऋणाचा बोजा शिरावर बेऊन प्राणी येथें जन्माला येतो,** व त्यांचें ऋण फेडणें हे त्याचें पहिलें कर्तव्य आहे. जो मनुष्य योग्यकालीं तें फेडीत नाहीं तो वरच्या श्रेष्ठ लोकांना पात्र होत नाहीं असें धर्मवेत्त्यांचें मत आहे. **यज्ञांनीं देव, वेदाध्ययन व तप ह्यांनीं ऋषी, पुत्र व श्राद्ध ह्यांनीं पितर व दयेनें मानवप्राणी तृप्त होतात.** पैकीं देव, ऋषी व मनुष्य ह्या तिघांच्या ऋणांतून मी मुक्त झालों आहे. व हीं राहि-

लीं तरी देहनाशाबरोबर मनुष्य ह्या ऋणांतून मुक्त होतो. परंतु पितृऋण मात्र देहनाश झाला तरी त्याला सुटत नाहीं. ह्या ऋणांतून मी अद्यापि मुक्त झालों नाहीं. ह्या जगांत भल्या लोकांची संततीसाठीं मोठी खटपट असते. ज्याप्रमाणें त्या महर्षींपासून मी आपल्या मातेच्या उदरीं जन्मलों त्याप्रमाणें माझ्या स्त्रियांच्या ठिकाणीं संतति होण्याचा कांहीं तरी मार्ग सांगा.' हें त्याचें दीन भाषण ऐकून ऋषी ह्मणाले, 'हे धर्मात्मन्, तुला देवांसारखे मुलगे होणार आहेत हें आह्मांला अंतर्ज्ञानानें समजलें आहे. ह्या दैवनियुक्त कृत्याला केवळ आतां यत्नाची अपेक्षा आहे. **शहाणा मनुष्य मन स्थिर ठेवून दैवानें नेमलेलें फल यत्नानें मिळवितो;** ह्मणून फलप्राप्तीसाठीं यत्न करणें तुझें कर्तव्य आहे.' तें तापसांचें भाषण ऐकून मृगाच्या शापानें आपल्या जननक्रियेला झालेला प्रतिबंध लक्षांत बाळगून उद्विग्न मनानें तो एकांतांत आपली धर्मपत्नी जी कुंती हिला ह्मणाला, 'ह्या संकटसमयीं पुत्रप्राप्तीसाठीं तुझ्या हातून कांहीं तरी यत्न झाला पाहिजे. जगांत अपत्यच धर्मसंरक्षणाला कारणीभूत आहे. याग, दान, वेदाध्ययन व तपाचरण ह्यांपैकीं कांहीं अनपत्य जो मी त्या माझा उद्धार करण्याला समर्थ नाहींत. मनाला उच्छृंखल सोडल्यानें मृगशापानें माझी जननक्रिया बंद पडली आहे. **विवाहित स्त्रीला स्वतःपासून झालेला औरस, ज्याचा मौंजीबंधनादि संस्कार आपण केला आहे तो क्षेत्रज, दुसऱ्याला धन देऊन त्यापासून आपल्या स्त्रीच्याठायीं उत्पन्न करविलेला परिक्रीत, आपण मेल्यावर आपल्या गतभर्तृका स्त्रीला झालेला पौनर्भव, एखाद्या स्त्रीला कौमार्यामध्यें आपल्यापासून झालेला कानीन, व स्वेच्छाचारी स्त्रीला आपल्यापासून झालेला, हे सहा धर्मदृष्टीनें बंधुदायाद मुलगे समजले जातात. कोणी दिलेला, विकत घेतलेला, कृत्रिम, आपण होऊन आलेला, गर्भिणीशीं लग्न लावून तिच्यापासून झालेला सहोढ, पुतण्या (बंधुरेता) व हीन जातीच्या स्त्रीला आपल्यापासून झालेला, हे सहा अबंधुदायाद होत. ह्यांपैकीं क्रमानें अगोदरचे श्रेष्ठ आहेत.** ह्मणून त्याप्रमाणें पुत्रप्राप्तीचा यत्न करावा. **संकटसमयीं दिरापासून पुत्रप्राप्ति करून घ्यावी** ह्मणून सांगितलें आहे. आपल्याला पुत्र होण्याला प्रतिबंध असल्यास दुसऱ्यापासून आपल्या स्त्रीला पुत्रोत्पादन करून घ्यावें असें मनूचें मत आहे; ह्मणून मी तुला आज हास्तिनापुराला पाठवितों. कोणा तरी योग्य पुरुषापासून श्रेष्ठ अपत्याची प्राप्ति करून घे. वीरपत्नी शारदंडायिनी हिला तिच्या पतीनें पुत्रोत्पादन करण्यास सांगितल्यावरून ऋतुस्नात झाल्यावर तिनें चवथे दिवशीं रात्रीं एक ब्राह्मण पाहून, अग्नींत होम करून पुंसवनविधि आटोपून त्याच्याशीं संबंध केला, व त्यापासून तिला तीन मोठे वीर्यवान मुलगे झाले. त्याप्रमाणें तूंही माझ्या आज्ञेनें तपानें श्रेष्ठ अशा ब्राह्मणापासून अपत्य संपादन करून घेण्यासाठीं विलंब न लावतां यत्न कर.' हें ऐकून कुंतीनें त्या कुरुश्रेष्ठाला उत्तर दिलें, 'आपण धर्मज्ञ आहां. आपल्यासारख्या राजीवलोचनाशीं रममाण होऊन आतां आपण आपल्या ह्या धर्मपत्नीला अशी आज्ञा करावी हें आपल्याला तरी उचित आहे काय? यासंबंधानें मी एक गोष्ट सांगतें ती ऐका. व्युषिताश्व नामक कोणी मोठा धार्मिक पुरुवंशदीपक राजा होता. तो धर्मात्मा यज्ञ करीत असतां महान् महान् ऋषी व प्रत्यक्ष इंद्रादि देव त्या ठिकाणीं त्याच्या सेवेला हजर होते. इंद्राला सोम व ब्राह्मणांला दक्षिणा तृप्ति होईपर्यंत मिळाली. इंद्र व ऋषी सर्व यज्ञकर्म जातीनें करीत होते. हा व्युषिताश्व हिमकालानंतरच्या सूर्याप्रमाणें सर्व मनुष्यांमध्यें तेजस्वी होता. त्यानें चारी दिशांतील राजांना जिंकून आपल्या ताब्यांत आणिलें होतें. त्याला दहा हत्तींचें बळ होतें. समुद्रवलयांकित सर्व पृथ्वी जिंकून पिता ज्याप्रमाणें आपल्या औरसपुत्रांचें पालन करतो त्याप्रमाणेंच तो आपल्या सर्व प्रजेचें पालन करीत होता. अनेक मोठ्या यज्ञांत त्यानें विपुल रत्नें दिलीं. सोम काढून अग्निष्टोम संस्था स्थापन केल्या. त्याची प्रिया काक्षीवत राजाची कन्या भद्रा नांवाची होती. ती रूपानें सर्व जगांत अप्रतिम असून त्यांचें परस्परांवर फार प्रेम होतें. कांहीं दिवसांनीं राजाला क्षय होऊन सूर्याप्रमाणें तो अस्ताला गेला.

त्यानें इहलोक सोडल्यावर त्याच्या अपुत्रा स्त्रीला फार दुःख झालें. 'पतिहीन स्त्रीचें जिणें व्यर्थ आहे. पतीच्याबरोबर मरणें स्त्रीला श्रेयस्कर आहे. हे नरशार्दूल, आपण गेलां त्या ठिकाणीं आपल्या बरोबर येण्याची माझी फार इच्छा आहे. कृपा करून मला घेऊन चला. आपल्याखेरीज क्षणभर देखील मी जिवंत राहूं इच्छित नाहीं. आपली आतां परत येण्याची आशा मुळींच उरली नाहीं. आपल्यामागें छायेप्रमाणें मी येऊं इच्छितें. तेथें आपल्या हितामध्यें मी नेहमीं दक्ष राहीन. आपल्यामागें हा दुःसह वृद्धोग मला पोळून सोडील. ह्या अभागिणीच्या हातून एखाद्या जोडण्याची खचित ताडातोड झाली असली पाहिजे, म्हणूनच हा दुःसह प्रसंग मजवर कोसळला आहे. आजपासून डोळे मिटून दर्भासनावर काळ कंठण्यापलीकडे मला कांहीं उरलें नाहीं. ह्या दुर्निवार्य संकटांत कर्तव्याचा मार्ग दाखविणारे मला आपणच आहां.' ह्याप्रमाणें त्या शवाला आलिंगून ती शोक करीत असतां आकाशवाणी झाली 'हे कल्याणि, शोक करूं नकोस. मी तुला वर देतों. माझ्यापासून तुला अपत्यें होतील. ऋतुकालीं आठव्या किंवा चवदाव्या दिवशीं मी तुला संभोग देईन.' ह्याप्रमाणें त्या राणीला त्यापासून तीन शाल्व व चार मद्र असे सात मुलगे झाले. त्याप्रमाणें केवळ मनानेंच आपल्यापासून मला वीर्यवान मुलगे कां होऊं नयेत? आपल्या सहवर्तमान मी स्वर्गसुख घेणार. मनानें देखील परपुरुषाकडे माझें लक्ष जाणार नाहीं. आपल्याहून श्रेष्ठ ह्या जगांत मला दुसरा पुरुष कोण मिळणार?' तेव्हां राजानें तिला उद्दालकाची गोष्ट सांगितली. तो म्हणाला, 'पूर्वी स्त्रिया अनावृत व कामचारी असत. कौमारावस्थेपासून व्यभिचारानें बागण्यांत अधर्म मुळींच होत नसे. पूर्वी हा धर्म मानला जात असून तो पुरातन धर्म अद्यापि कामक्रोधवर्ज पशुपक्ष्यादि नीच योनींत आढळतो. हा शास्त्रोक्त धर्म अद्यापि उत्तर कुरुदेशांत पूज्य मानला जातो. परंतु उद्दालक म्हणून कोणी मोठे ऋषी होऊन गेले. त्यांचे पुत्र श्वेतकेतु हेही महातपस्वी होते. कोणे एके वेळीं श्वेतकेतूंच्या पित्यासमक्ष कोणी एक ब्राम्हण त्यांच्या मातेचा हात धरून घेऊन चालला. हा मातेवरचा बलात्कार पाहून श्वेतकेतूंना संताप आला. त्यांना त्याप्रमाणें क्रोधयुक्त पाहून उद्दालक म्हणाले, 'वत्सा, व्यर्थ संतापण्यांत अर्थ नाहीं. हा परंपरागत धर्म आहे. ह्या भूतलावर गाईप्रमाणें स्त्रिया अनावृत असून कोणालाही उपभोग्य आहेत.' श्वेतकेतूंना तो धर्म न आवडून त्यांनीं मनुष्यजातीमध्यें स्त्रीपुरुषांसंबंधानें पुढील मर्यादा केली. 'पुत्रप्राप्तीसाठीं पतीच्या आज्ञेनें दुसऱ्यांशीं संबंध ठेवणाऱ्या स्त्रियांखेरीज इतरांना पतीशीं व्यभिचारानें वर्तन ठेविल्यापासून भ्रूणहत्येसारखें घोर पातक लागेल.' व त्या दिवसापासून ही मर्यादा ठरली. माझ्या उत्पत्तीचाही तूं विचार कर. ह्या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन माझ्या आज्ञेप्रमाणें वर्तन करणें तुला श्रेयस्कर आहे. पतिव्रते, ऋतुकालीं स्त्रीनें पतीचें म्हणणें मोडूं नये. अन्यकालीं ती स्वतंत्र आहे. विशेषेंकरून पति जेव्हां पुत्रप्राप्तीविषयीं आतुर असून स्वतः पुत्रोत्पादनाला असमर्थ असतो तेव्हां तो सांगेल तें, धर्माधर्मविचार मनांत न आणतां स्त्रीनें करावें असें वेदशास्त्रांचें मत आहे. सुंदरि, ज्या अर्थी रक्तांगुलि व कमलपत्राप्रमाणें सुकुमार मुलाच्या दर्शनाची मला फार लालसा उत्पन्न झाली आहे, त्या अर्थी माझी विनंती नाकारूं नकोस. हा मी तुझ्या मस्तकावर अनुग्रहाचा हात ठेवितों. माझ्या सांगण्यावरून तपानें श्रेष्ठ अशा ब्राह्मणापासून गुणवान मुलगा मिळवून घे. तुझ्यामुळें मला सुपुत्रवानाची गति मिळो.' हें भाषण ऐकून पतिहितामध्यें दक्ष अशा कुंतीनें दुर्वासऋषींच्या वराची हकीकत त्याला सांगून 'त्या महर्षीच्या प्रभावानें आपल्या सांगण्यावरून देवांपासून मी पुत्रप्राप्ति करून घेतें,' असें ती म्हणाली. नंतर कोणत्या देवाचें स्मरण करूं म्हणून तिनें विचारलें असतां 'क्षत्रियांचा धर्म अधर्माशीं कधीं जुळत नाहीं. धर्मानें दिलेला पुत्र खचित धर्मसंपन्न असला पाहिजे. त्याची प्रवृत्ति अधर्माकडे कधीं होणार नाहीं,' असा विचार करून त्यानें तिला धर्माचें स्मरण करण्यास सांगितलें. ही आज्ञा होतांच 'बरें' म्हणून तिनें नमस्कार केला व प्रदक्षिणा करून बाजि दिला. नंतर दुर्वासांनीं दिलेला मंत्र विधिपूर्वक जपून तिनें धर्माचें स्मरण केलें. धर्मराज सूर्याप्रमाणे दैदीप्यमान विमानांतून खाली

उतरला व हासून 'काय इच्छा आहे,' म्हणून त्यानें तिला विचारलें. तिनेंही हास्यवदन करून मुलगा मागितला. योगमूर्तिधारी धर्माच्या संयोगापासून तिला लोकहितकारी मुलगा झाला. मार्गशीर्ष शुद्ध अष्टमीला माध्यान्हकाळीं चांगल्या वेळेवर कुंती कीर्तिमान पुत्र प्रसवली. त्याच्या जन्मकाळीं पुढील आकाशवाणी झाली, 'हा धार्मिकांमध्यें श्रेष्ठ युधिष्ठिर, शूर, सत्यप्रिय व पृथ्वीचा पालक होऊन तिन्ही लोकांत लौकिक संपादन करील.' असा पुत्र मिळाल्यानें संतुष्ट होऊन पंडु फिरून कुंतीला म्हणाला, 'क्षत्रियकुल बलावर अवलंबून असतें. ह्मणून बलश्रेष्ठ जो वायु त्या पासून आणखी एक मुलगा मिळीव.' महाशक्तिमान वायूचें तिनें स्मरण केल्याबरोबर मृगारूढ होऊन तो त्या ठिकाणीं आला व त्यानें तिला मोठा बलवान, शूर झंजावातासारखा सर्वांचा गर्व परिहार करणारा, व अंगानें धिप्पाड असा भीमनांवाचा मुलगा दिला. जन्मतांच आईच्या मांडीवरून खालीं पडून अंगाखालीं सांपडलेला दगड त्यानें चिरडून टाकला. त्या शब्दाच्या भीतीनें घाबरून उठलेल्या कुंतीला आपल्या मांडीवर आपलाच मुलगा निजला आहे ह्याचें देखील भान राहिलें नाहीं. इतक्यांत तो वज्रदेही मुलगा एका पर्वतावर उडून गेला. तो चमत्कार पाहून पंडूला आश्चर्य वाटलें. भीम जन्मला त्याच दिवशीं दुर्योधन जन्मला. भीम जन्मल्यावर सर्व मानवांमध्यें श्रेष्ठ असा पुत्र आपल्याला कशानें होईल ह्मणून पंडू विचार करूं लागला. तो ह्मणाला, 'हें जग दैव व यत्न ह्या दोहोंवर अवलंबून आहे. पैकीं दैव हें कृतकर्मानुसार फल देतें. देवांचा राजा जो इंद्र त्याचे ठिकाणीं उत्साहशक्ति मोठी असून तो मोठा वीर्यवान व कांतिमान आहे, ह्यासाठीं तपानें त्याला तोषवून त्यापासून वीर्यवान मुलगा मिळवावा. कारण त्यापासून होणारा मुलगा वीर्यवान होऊन देव, असुर व मनुष्य ह्या सर्वांचा खास खमाचार घेण्याजोगा होईल.' असा विचार करून स्वतः उग्रतप सुरूं करून महर्षींच्या सल्ल्यानें कुंतीलाही त्यानें एक वर्षपर्यंत कडक व्रत धरण्यास सांगितलें. ह्या प्रकारें बराच काळ लोटल्यावर इंद्रानें स्वतः येऊन, त्रैलोक्यांत कीर्ति संपादन करणारा, ब्राह्मण, गाई व मित्र ह्यांचा परिपालक दुष्टांना आहि आहि करून सोडणारा, व सर्व बांधवांना आनंद देणारा, असा मुलगा देण्याचें अभिवचन दिलें. नंतर पंडु कुंतीकडे येऊन वर सूर्याकडे तोंड करून ह्मणाला, 'हे कल्याणि, देवेंद्रानें संतुष्ट होऊन तुझ्या इच्छेप्रमाणें कीर्तिमान, शत्रूला तापद, नीतिमान, महात्मा, सूर्यासारखा तेजस्वी, कोणाला हार न जाणारा, असा मुलगा तुला देण्याचें अभिवचन दिलें आहे.' नंतर कुंतीनें स्मरण केल्याबरोबर इंद्रानें येऊन तिला अर्जुन या नांवाचा मुलगा दिला. तो जन्मल्याबरोबर अभिनंदनपूर्वक स्पष्ट व गंभीर आकाशवाणी झाली. 'हे कुंति, हा तुझा कार्तवीर्यासारखा मुलगा, रुद्रासारखा भयप्रद व इंद्रासारखा अजिंक्य होऊन तुझी कीर्ति लोकांमध्यें पसरील. ज्याप्रमाणें अदितीला विष्णु झाल्यामुळें संतोष झाला त्याप्रमाणें विष्णुतुल्य ह्या तुझ्या पुत्रामुळें तुझा संतोष वाढेल. हा मद्रांना, सोमकांना, कुरूंना, चेदिराजांना, काशिराजांना व करुषांना जिंकून कौरवांची लक्ष्मी वाढवील. ह्याच्या बाहुवीर्यानें खांडववनांत अग्नि सर्व प्राण्यांच्या मेदानें तृप्ति पावेल. हा पराक्रमी वीर सर्व मुख्य मुख्य राजांना जिंकून आपल्या बंधुवर्गासहवर्तमान तीन यज्ञ करील. परशुरामाप्रमाणें युद्धांत शंकरांना संतुष्ट करून त्यांपासून पाशुपतास्त्र मिळवील. देवांचा द्वेष करणाऱ्या निवातकवचदैत्यांना इंद्राच्या आज्ञेनें मारील व दिव्यास्त्रें संपादन करून कौरवांचें नष्ट झालेलें वैभव फिरून मिळवील.' ही वाणी ऐकून शतशृंगवासी तापसांना मोठा आनंद झाला. त्याचप्रमाणें आकाशांत इंद्रादिदेवसमुदायांचा व अन्य स्वर्गवासी जनांचा शब्द व दुंदुभींचा नाद मिळून सर्व दिशा दुमदुमल्या. आकाशांतून पुष्पवृष्टि करून देवांनीं अर्जुनाचें अभिनंदन केलें. सर्व देव, ऋषी, गंधर्व, व अप्सरागण अर्जुनाची थोरवी गात वर उभे होते. इकडे पंडुला लोभ उत्पन्न होऊन त्यानें त्या धर्मपत्नीला फिरून पुत्रोत्पादनासाठीं एकाद्या देवाचें स्मरण करण्यास सांगितलें. तें ऐकून कुंती ह्मणाली, 'महाराज, आपण धर्मज्ञ असून ह्याप्रमाणें मला मर्यादा उल्लंघन करण्यास कसें सांगतां? **दुसऱ्यापासून तिघांपेक्षां अधिक मुलगे मिळवून घेण्याला धर्माची आज्ञा नाहीं. चार**

पुरुषांशीं संबंध झाल्यानें स्त्री स्वैरिणी होते व पांचांशीं झाल्यानें कुलटा होते. ह्मणून पुत्रलोभानें आपण मला अशी भलती आज्ञा करूं नये.' इकडे कुंतीला व गांधारीला मुलगे झालेले पाहून माद्री राजाला एकांतांत ह्मणाली, 'महाराज, मजकडे आपलें असावें तितकें लक्ष नाहीं. मी कुंतीपेक्षां वयानें वडील असून धाकटेपणा मजकडे आला आहे, त्याचेंही मला वाईट वाटत नाहीं. त्याचप्रमाणें गांधारीला शंभर मुलगे झालेले पाहूनही मला विशेष दुःख होत नाहीं. परंतु कुंति व मी सारख्या स्थितींत असून तिला मुलगे व्हावे व मला नसावे ही गोष्ट मात्र माझ्या मनाला फार खात आहे. कुंतीपासून तरी आपल्याला संतति झाली हें चांगलेंच आहे. जर कुंति मला अपत्य होण्याला साह्य करील तर मजवर तिचे मोठे उपकार होतील, व आपलेंही हित केल्याप्रमाणें होणार आहे. आपली मजवर कृपा असेल तर आपण तिला सांगून एवढा माझा हेतु सफल करवा.' हें ऐकून पंडूनें उत्तर दिलें, 'माद्रि, माझ्या मनांतही हाच विचार घोळत आहे; परंतु तुला आवडेल किंवा नाहीं ह्या शंकेनें आजपर्यंत मीं तुझ्यापाशीं ही गोष्ट काढली नाहीं. आतां तुझा उद्देश समजल्यावर मी यत्न करून पाहतों. माझी आज्ञा कांहीं कुंति खचित मोडणार नाहीं.' नंतर पंडु एकांतांत कुंतीला ह्मणाला, 'हे कल्याणि, माझ्या कुळाची संतति कायम करून लोकांचें कल्याण कर. माझ्या पूर्वजांना व मला अविच्छेद्य पिंड मिळावा व तुझी कीर्ति अजरामर रहावी ह्मणून मी सांगतों हें तुला जरी दुष्कर वाटत असेल तरी कर. इंद्र देखील कीर्तीसाठीं यज्ञ करतो. वेदज्ञ व महातपस्वी ब्राह्मण देखील मोठ्या आदरानें आपल्या गुरूशीं वागतात. **तपादि सारीं महत्कृत्यें कीर्तीसाठीं आहेत.** तूं माद्रीचा अपत्यरूपी नौकेनें उद्धार कर व तिला आपल्या बरोबर अफ्ल्याचा लाभ देऊन अक्षय्य कीर्ति संपादन कर.' हें राजाचें भाषण ऐकून मंत्र जपून कुंतीनें माद्रीला एकदांच एका देवाचें स्मरण करण्यास सांगितलें. माद्रीनें अश्विनीकुमारांचें स्मरण केलें व त्यांपासून तिला सत्व, रूप व गुण ह्यांनीं संपन्न असे नकुळसहदेव या ह्यांचे दोन जुळे मुलगे झाले. 'लावण्य व उत्साह ह्यांमध्यें अश्विनीकुमारांना देखील हे मागें टाकतील,' अशी त्यांच्या जन्मकाळीं आकाशवाणी झाली. हे पांच पंडुपुत्र पांच संवत्सरांप्रमाणें शोभत होते. ह्यांना उत्साह, वीर्य व सामर्थ्य ह्यांनीं संपन्न पाहून पंडूला फार संतोष झाला. त्या ठिकाणच्या मुनींना व मुनिपत्नींनाही ते फार प्रिय झाले. त्याप्रमाणें हे पांच पंडुपुत्र कीर्तिमान, कुरुवंशाचें नांव गाजविणारे, शुभलक्षणसंपन्न, चंद्राप्रमाणें मनाला आल्हाद देणारे, सिंहासारखे शूर व अभिमानी असे त्या पर्वतावर वाढत असतां त्यांना पाहून आसपासचे मुनिवृंद विस्मित व आनंदित होत असत. ज्याप्रमाणें जलांत कमलें हां हां ह्मणतां वाढतात त्याप्रमाणें पांच पांडव व शंभर कौरव थोड्याच कालांत कौमारावस्थेला आले. इतक्यांत जनमनमोहक वसंत ऋतूंतील एके दिवशीं पलाश, तिलक, आम्र, चंपक इत्यादि अनेक फलपुष्पांनीं वांकलेल्या वृक्षांच्या योगानें रमणीय, व अनेक स्वच्छ जलाशयांच्या योगानें व कमलांनीं शोभिवंत अशा वनामधून पंडु झिरझिरित असें शुभ्र वस्त्र नेसलेल्या माद्रीसह फिरत असतां त्याच्या हृदयांत कामवासना उत्पन्न झाली, व त्या तरुणीला त्या ठिकाणीं त्या स्थितींत पाहून अरण्यांत प्रगटणाऱ्या वणव्याप्रमाणें त्याचा काम भडकून अनावर झाला. त्या अबलेच्या निषेधाला न जुमानतां त्यानें कामवश झाल्यामुळें शापाचा अगदीं विसर पडून बलात्कारानें तिच्याशीं जीवितांतकर संभोग केला. त्याबरोबर तो मरून पडला. तेव्हां शवाला आलिंगन देऊन माद्रीनें दुःखानें मोठ्यानें हंबरडा फोडला. तो ऐकून कुंति मुलांसह त्या ठिकाणीं धांवत आली व माद्रीला व पंडूला भूमीवर त्या स्थितींत पडलेले पाहून घात झाला ह्मणून शोकाकुल होऊन ती माद्रीला ह्मणाली, 'माझी नेहमीं इतकी नजर असतां ह्या शमपर नरेंद्राला शापाची अशी कशी भूल पडली ? माद्रि, तूं तरी त्यांना चार गोष्टी सांगून त्यांचें मन या कृत्यापासून फिरवावयाचें होतेंस. नेहमीं गाईप्रमाणें दीन असून आज एकांतांत तुला पाहून त्यांना असा मोह कसा पडला ? त्यांचें तें प्रसन्न मुख तुला अंतकालीं पहावयाला सांपडलें तेव्हां तूं धन्यच ह्मणावयाचीम.' कुंती ह्याप्रमाणें शोक करीत

असतां माद्री ह्मणाली, 'मी नको नको ह्मणत असतांही दैवलिखित सत्य करण्यासाठींच कीं काय, त्यांनीं माझें मुळींच ऐकिलें नाहीं.' कुंती ह्मणाली, 'मी वडील असून धर्मपत्नी आहें. मुख्य धर्मफळ मलाच मिळणें इष्ट आहे. झाल्या गोष्टी परत येत नाहींत. आतां मी सती जाणार. त्याच्या तरी तूं आड येऊं नकोस. ऊठ, ह्यांना सोड, ह्या मुलांचें नीट परिपालन कर. माझी वाट पहात, असलेल्या प्रियाला जाऊन मला गांठूं दे.' माद्री ह्मणाली, 'माझी कामवासना तृप्त झाली नसून कामेच्छेमुळें माझ्याशीं संभोग करीत असतां हे काळाच्या मुखीं पडले आहेत, तर ती त्यांची इच्छा वर तरी मला पूर्ण केली पाहिजे. बरें, मी मागें राहिलें तरी ह्या मुलांशीं निःपक्षपातानें माझें वर्तन होण्याचा संभव नाहीं आणि व्यर्थ पापाला मात्र मी धनीण होणार. ह्मणून तूं माझ्या मुलांचा आपल्या मुलांप्रमाणें सांभाळ कर. माझ्याशीं रतिसुख घेत असतां त्यांना मरण आलें ह्मणून हा माझा देह त्यांच्या बरोबर जळावा हेंच उचित आहे. तूं वडील आहेस, मला परवानगी दे.' असें ह्मणून त्या धर्मपत्नीनें लागलाच त्या राजसिंहामागून आपला देह टाकला. त्यावेळीं तेथें राहणाऱ्या देवतुल्य ऋषींनीं, त्या यशस्वी राजानें आपलें राज्य व देश सोडून त्या ठिकाणीं त्यांना शरण येऊन उग्र तप आचरण केलें व आपल्या स्त्रियांना व मुलांना त्यांच्या स्वाधीन करून त्यांच्यामध्यें देह ठेविला हा विचार मनांत आणून कुंति व तिचे मुलगे ह्यांसह त्या दंपत्याचीं प्रेतें घेऊन आपलें कर्तव्य समजून ते त्या सर्वांना भीष्म व धृतराष्ट्र ह्यांच्या स्वाधीन करण्याकरितां लागलेच हास्तिनापुराला निघाले. त्या पुत्रवत्सल कुंतीला, मार्ग बराच लांबीचा होता तरी त्यांच्या समागमामध्यें तो फारच जवळचा वाटला. लवकरच हास्तिनापुराच्या वेशीपाशीं ते येऊन पोहोंचले. हजारों पादचारी मुनींसह पांडव आले आहेत ही बातमी नगरांत पसरल्याबरोबर नगरवासी लोकांना अत्यानंद होऊन सूर्योदय होतो न होतो तोंच चारी वर्णांचे आबालवृद्ध, कोणी पायांनीं, कोणी वाहनांतून, मत्सरादि दुष्टभाव बाजूला ठेवून शुद्ध अंतःकरणानें तापसदर्शनासाठीं नगराबाहेर पडले. त्याचप्रमाणें भीष्म, सोमदत्त, बाल्हिक, प्रज्ञाचक्षु धृतराष्ट्र, विदुर, सत्यवती, कौसल्या, राजस्त्रियांसहवर्तमान गांधारी, धृतराष्ट्राचे दुर्योधनप्रभृति मुलगे, हे सर्व त्यांना सामोरे गेले. पुरोहितवर्ग, सर्व कौरव व नागरिकजन त्या महर्षींना साष्टांग नमस्कार करून त्यांच्या आज्ञेनें खालीं बसल्यावर तो सर्व समाज शांत झाला. नंतर भीष्मांनीं अर्घ्यपाद्यादिकांनीं त्या महर्षींची पूजा केली व सर्व राज्य त्यांना समर्पण केलें. नंतर त्यांमध्यें वृद्ध जटावल्कलधारी एक ऋषी उठून इतर ऋषींच्या अनुमतीनें ह्याप्रमाणें बोलले. 'कुरुकुलोत्पन्न पंडुराजा सर्व वासनांचा परित्याग करून शतशृंगावर जाऊन ब्रह्मचर्यव्रतानें तपाचरण करीत असतां त्याला कांहीं अतर्क्य दैविक सिद्धीच्या योगानें साक्षात् धर्मराजापासून हा युधिष्ठिर झाला आहे, वायूपासून बलवानांमध्यें श्रेष्ठ हा भीम झाला आहे. हा अर्जुन इंद्रापासून झाला आहे. हा कीर्तीनें सर्व मोठमोठ्या धनुर्धरांना मागें टाकील. हे दोन माद्रीचे मुलगे अश्विनीकुमारांपासून झाले आहेत. अरण्यवास स्वीकारून धर्मानें कालक्षेप करणाऱ्या पंडूनें पूर्वजांच्या नष्ट झालेल्या वंशाचें पुनरुज्जीवन केलें आहे. ह्या पंडुपुत्रांच्या संगोपनांत व वेदाध्ययनादिकांची काळजी घेण्यांतच तुह्मांला नेहमीं आनंद होवो. पंडु तर सदाचरणानें कालक्षेप करून, आज सात दिवस झाले, पितृलोकाला गेला. माद्रीनें त्याबरोबर सहगमन केलें आहे. हे त्यांचे देह व हे त्यांचे मुलगे ह्यांचा यथाविधि संस्कार करून ह्यांवर अनुग्रह करा. प्रेतकार्य संपूर्ण झाल्यावर ह्या कुरुकुलश्रेष्ठाला पितृमेधप्राप्ति होवो.' असें ह्मणून सर्व कौरव पहात असतां गुह्यकांसहवर्तमान ते सर्व अंतर्धान पावले. नंतर धृतराष्ट्र विदुराला ह्मणाला, 'हे विदुर, पंडु व माद्री ह्यांचे प्रेतसंस्कार राजाला शोभेल अशा थाटानें होऊं दा. ह्यांच्याकरितां वाटेल त्याला वाटेल तितके पशु, वस्त्रें, धन व नानाप्रकारचीं रत्नें द्या. कुंतीच्या मनांत असेल त्याप्रमाणें माद्रीचा सत्कार करा. आणि कुंति वायूच्या किंवा सूर्याच्या देखील दृष्टीस पडणार नाहीं अशी व्यवस्था ठेवा. ज्याला हे देवासमान पांच पुत्र झाले आहेत त्या पुण्यशील व स्तुत्य पंडूबद्दल शोक करण्याचें मुळींच कारण ना-

हीं.' 'बरें,' ह्मणून भीष्मांसहवर्तमान विदुरांनीं एका मोठ्या पवित्र स्थळीं पंडूची प्रेतक्रिया केली. पुरोहितांनीं तुपाचा ज्यांतून घमघमाट बाहेर पडत आहे असा पेटलेला अग्नि नगरांतून बाहेर नेला. त्या ऋतूमध्यें येणाऱ्या सुवासिक पुष्पांनीं व अनेक सुवासिक पदार्थांनीं अलंकृत करून मौल्यवान वस्त्रांनीं झांकून शिबिकेंत माद्री व पंडू ह्यांच्या प्रेतांला माणसांनीं वाहून नेलें. त्यांवर छत्रचामरें उडत असून अनेक प्रकारचीं वाद्यें पुढें वाजत होतीं. त्यांच्या और्ध्वदेहिक क्रियेच्या वेळीं लोक वाटेल तितकें द्रव्य देत होते. शवासाठीं मौल्यवान वस्त्रें व छत्रचामरें आणिलीं होतीं. शुभ्रवस्त्राच्छादित पुरोहित उत्तम पात्रांत प्रदीप्त अग्नीमध्यें तुपाची आहुति देत मंडळीच्यापुढें चालले होते. हजारों ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र शोकपीडित होऊन 'आह्मां अनाथांना कायमच्या दुःखसागरांत बुडवून कोठें चाललां,' ह्मणून रडत प्रेतामागून चालले होते. भीष्म व विदुर हेही विलाप करीत मागून चालले होते. गंगातीरीं एका पुण्यप्रदेशांत ती शिबिका खालीं उतरून त्या दंपत्याच्या चंदनादि सुवासिक पदार्थांनीं चर्चित देहांवर लोकांनीं सुवर्णकलशांनीं पाणी घातलें. नंतर पांढरें शुभ्र चंदन कालागरु वगैरे अंगाला लावून त्यांना पांढरीं शुभ्र वस्त्रें नेसविलीं. उत्तम पर्यंकावर पहुडणारा हा राजा ह्या वस्त्रामध्यें चितेवर पडला असतां जिवंत असून स्वस्थ झोंप घेत आहे असा दिसत होता. नंतर याजकांच्या अनुमतीनें प्रेतविधि उरकल्यावर त्या दंपत्यावर तूप शिंपडून चंदनादि अनेक सुगंधि द्रव्यें लावून विधिपूर्वक त्यांना अग्नि दिला. त्या समयीं त्याचा तो जळणारा देह पाहून कौसल्येला मूर्च्छा येऊन ती भूमीवर पडली. तिचे व कुंतीचे आर्तस्वर ऐकून सर्व जनांना अनावर शोक झाला. नंतर भीष्म, विदुर, सर्व पांडव, कौरव, व स्त्रिया त्यांना पाणी देऊन दुःख करीत नगराला परतल्या. पांडव, त्यांचे आप्तजन व **सर्व पौरजन दहा दिवस जमिनीवर निजत होते.** बारा रात्रीं सर्व नगर निरानंद झालें होतें. भीष्मांनीं बंधुवर्गांना घेऊन पंडूचें सपिंड श्राद्ध केलें, साऱ्या पौरजनांना व श्रेष्ठ ब्राह्मणांना भोजन घातलें व विप्रश्रेष्ठांना उत्तम रत्नें, व गांवें दान दिलीं. **अशौच संपल्यावर** कौरवांसहवर्तमान ती सर्व मंडळी नगरांत शिरली. त्या प्रदेशांतील सर्व जन पंडूसाठीं आपल्या एखाद्या जवळच्या आप्तप्रमाणें शोक करीत होता. उत्तरक्रिया संपूर्ण झाल्यावर सर्व जन ह्याप्रमाणें दुःखार्णवांत बुडालेला पाहून शोकाकुल झालेल्या मातेकडे येऊन भीष्म तिला ह्मणाले, 'सांप्रत काळ असा भयंकर आला आहे कीं, यापुढें सुखाची आशा करणें व्यर्थ आहे. अनेक मायाप्रपंच सुरू होतील व धर्मक्रियेचा लोप होईल. एकाहून एक अधिक भयंकर दिवस उगवेल. **पृथ्वीचा उदयकाल संपून कौरवांच्या दुर्नीतीनें ती अस्ताला जाणार.** तूं जाऊन योगाभ्यास करीत तपोवनांत काल काढ. आपल्या कुलाचा भयंकर क्षय पाहण्याला येथें राहूं नकोस.' बरें म्हणून भीष्माचा निरोप घेऊन सुनांनाबरोबर घेऊन सत्यवती वनाला गेली. आणि त्या ठिकाणीं उग्र तपाचरण करून देह ठेवून इष्ट गतीला गेली.

---

२९ पांडव व कौरव यांचे कौमारांतील व्यवसाय. (१. १२८–१२९)

वेदोक्त संस्कार झाल्यावर पांडव व धार्तराष्ट्र अनेक सुखांचा यथायोग्य उपभोग घेत पितृगृहीं सुखानें वाढत होते. पांडवांच्या नैसर्गिक बुद्धीच्या योगानें सर्व विद्यांत व खेळांत त्याची सर्शी अले. धांवून दूरची एखादी वस्तु अधीं घेऊन येण्यांत, खाण्यांत, व धूळखेळांत भीमसेन सर्व कौरवांना हटवून टाकी. ते मोठ्या आनंदानें खेळत असतां त्यांवर तुटून पडून त्यांच्या खेळाचा विरस करी. त्यांना डोक्यावर घेऊन पांडवांची व त्यांची झुंज लावी. शंभर कौरवांना तो एकटा पुरून उरे. जोरानें त्यांच्या शेंड्या ओढून लाथेखालीं तुडवून, त्यांना जमिनीवरून कोस कोस फरफटत ओढून नेई. पाण्यांत खेळतांना दहा दहा मुलांना मेल्यासारखें बगलेंत गच्च आवळून धरून तो पाण्यांत बुडून रहात असे. कौरव झाडावर चढून फळें तोडूं लागले म्हणजे लाथेनें झाड गदगदा हलवून सोडी, व कचित् प्रसंगीं ह्या लाथेच्या जोरानें तीं झाडें उमळून त्या मुलांसह खालीं येत. कौरव त्याचा हेवा करीत; तरी धांव-

ण्यांत, कुस्त्यांमध्यें व विद्येमध्यें त्यांच्यानें त्याची बरोबरी करवत नसे. ह्याप्रमाणें भीमाच्या हूडपणामुळें मनांत कांहीं दुष्ट हेतु नसून त्याबद्दल धृतराष्ट्राच्या मुलांचा द्वेष दिवसानुदिवस वाढत चालला व तो त्यांच्या डोळ्यांत सलूं लागला. भीमसेनाचें तें लोकविश्रुत बल पाहून दुर्योधन त्याविषयीं उघड द्वेष दाखवूं लागला. धर्मलंड असून नेहमीं मनांत पाप घोळत असल्यामुळें मूर्खपणानें व ऐश्वर्यलोभानें त्याच्या मनांत पाप येऊं लागलें. ह्मणून तो निजला असतां कपटानें त्याला बांधून नगराजवळील बागेंतून गंगेंत फेंकून देऊन त्याच्या वडील भावाला बंदींत टाकून पृथ्वीचें राज्य आपण करावें, अशी पापवासना त्याच्या मनांत उत्पन्न झाली. पुढें तसें करण्याचा निश्चय ठरल्यावर तो नराधम नेहमीं संधीची वाट पहात राहिला. कोणे एके वेळीं नगराबाहेर प्रमाणकोटींत तंबू वगैरे देवून त्यांत खाद्यपेयादिकांची उत्तम व्यवस्था ठेवून त्यानें जलक्रीडेचा बेत ठरविला. हत्ती, घोडे, रथ इत्यादि वाहनांतून ते सर्व जलक्रीडेला निघाले. बागेजवळ आल्यावर बाकीच्या लोकांना रजा देऊन सिंह ज्याप्रमाणें गुहेंत शिरावे त्याप्रमाणें ते सर्व कुमार त्या उद्यानांत शिरले. तेथें शुभ्रवर्णाचीं अनेक प्रार्थनामंदिरें, शोभायमान वळचणी, जाळ्या व खिडक्या असलेलीं गृहें, त्याचप्रमाणें जिकडे तिकडे फिरवून सोडलेलीं जलयंत्रें, चित्रविचित्र कमलांनीं भरलेलीं क्रीडासरोवरें व त्या ऋतुकालाला अनुरूप अशीं मनोरम फलपुष्पें पाहून त्यांच्या मनाला फार आनंद झाला. फरासांनीं झाडून उत्तम उत्तम बिछाइती जमिनीवर पसरल्या होत्या. त्या ठिकाणीं खेळत असतां ते सर्व एकमेकांच्या तोंडांत खाण्याचे पदार्थ देत होते. त्या वेळीं पापी दुर्योधनानें भीमसेनाला मारण्याच्या उद्देशानें अत्यंत कालकूट विष पुष्कळ कालवून तें त्याला आपण स्वतः आग्रह करून यथेच्छ चारलें. व आपल्याला धन्य मानून घेऊन मनांतल्या मनांत तो हासत होता. जलक्रीडा संपल्यावर दमल्यामुळें संध्याकाळीं क्रीडागृहांतच निजण्याचें त्यांनीं ठरविलें. त्या ठिकाणीं व्यायामामुळें दमून गेलेल्या भीमसेनाला त्या विषाच्यायोगानें गुंगी येऊन वारा मंद वहात असल्यामुळें गाढ झोंप लागून तो मेल्याप्रमाणें पडला. त्या वेळीं दुर्योधनानें स्वतः त्याला बांधून गंगेंत फेंकून दिलें. गुंगींतच भीम पाण्याच्या तळाशीं गेला. तेथून नागांना तुडवीत नागलोकामधून चालला असतां पुष्कळ नाग त्याला चावले. त्यामुळें त्याच्या अंगांत भिनलेलें कालकूट विष त्या नागांच्या विषानें नाहींसें झालें. पुढें भीम जागा झाल्यावर सर्व बंधनें तोडून टाकून त्यानें तावडींत आलेल्या नागांचा विध्वंस मांडला. भीमाच्या तडाक्यांतून सुटलेल्या नागांनीं जाऊन ही सर्व हकीकत वासुकीला कळविली. नंतर वासुकि नागांसहवर्तमान भीमाकडे आला. त्यावेळीं पृथेचा आजा आर्यक या नांवाचा नाग त्या ठिकाणीं होता. त्यानें मोठ्या प्रेमानें त्याला दृढालिंगन दिलें. वासुकीलाही संतोष होऊन आर्यकाच्या विनंतीवरून त्यानें ज्या कुंडांमध्यें हजार हत्तींचें बल देणारें अमृत होतें अशा आठ कुंडांतून यथेच्छ अमृत पिण्यास भीमाला आज्ञा दिली. नंतर शुचिर्भूत होऊन पूर्वेकडे पाहून बसून एका घोटाला एक ह्याप्रमाणें आठही कुंडें गट्ट करून तो हस्तिदंताच्या शय्येवर झोंपीं गेला. इकडे पांडव व कौरव जलक्रीडा संपल्यावर 'भीमसेन पुढें निघून गेला,' असें दुर्योधनानें सांगितल्यावरून त्याशिवायच नगराला परतले. स्वतःच्या मनांत पाप नसल्यामुळें आपल्यासारखेंच जग असेल असें समजून दुर्योधनाचे बोलण्याबर युधिष्ठिर विसंबून राहिला. पण बंधुप्रेम फार असल्यामुळें घरीं पोहोंचतांच आईकडे जाऊन प्रथम त्यानें भीमाविषयीं चौकशी केली. त्याच्यासंबंधानें सर्वांना काळजी होतीच व भीम कोठें दिसेना हें पाहून पापशंका मनांत येऊन कुंतीच्या पोटांत धस्स झालें. विदुरांना आणवून त्यांना ती ह्मणाली, 'महाराज, सर्व मुलें जलक्रीडेहून परत आलीं. एकटा भीमच कोठें दिसत नाहीं. तो नेहमीं दुर्योधनाच्या डोळ्यांत सलत असतो. तो क्रूर, निर्दय, क्षुद्र, निर्लज्ज राज्यलोभानें त्याला रागाच्या झपाट्यांत ठार करण्याला देखील मागेंपुढें पाहणार नाहीं. यामुळें चिंतेनें माझें हृदय होरपळून गेलें आहे.' विदुर ह्मणाले, 'चिंता करण्याचें कारण नाहीं. बाकीच्यांना संभाळ ह्मणजे झालें. त्या दुष्टाला खिजविलें तर तो

त्यांनाही अपाय करण्याला चुकणार नाहीं, व्यासांनीं सांगितल्याप्रमाणें तुझे मुलगे दीर्घायु आहेत. तो तुझा भीम परत येऊन तुला आनंद देईल.' असें ह्मणून ते आपल्या बाड्याकडे परत गेले, व कुंति आपल्या पुत्रांसह काळजी करीत बसली.

इकडे आठ दिवसांनीं प्यालेल्या अमृताचें पूर्ण पचन झाल्यावर अंगांत विलक्षण बल येऊन भीम चांगला हुशार झाला. त्याच्या अंगीं दहा हजार नागांचें बळ आलें. पुढें विषनाशक सुगंधी वनस्पतींनीं नागांनीं त्याचें मंगल करून त्याला चांगलें जेऊं घालून उत्तम वस्त्रालंकारांनीं त्याचा सन्मान केला. त्यांचा निरोप घेऊन तो मोठ्या आनंदानें जलांतून वर आला. तो ज्या ठिकाणीं बुडला होता त्याच वनप्रदेशांत त्याला वर आणून सोडून नाग गुप्त झाले. भीम मोठ्या वेगानें आईकडे येऊन तिला व वडील भावाला नमस्कार करून त्यानें धाकट्या भावांचें प्रेमपूर्वक मस्तक हुंगलें, व सर्वांना आलिंगन देऊन एकंदर झालेली हकीकत त्यांना सांगितली. ती ऐकून झाल्या गोष्टीबद्दल संतोष वाटून युधिष्ठिरानें भीमाला गप्प राहण्यास सांगितलें व आपणही मोठ्या हुशारीनें राहिला. धर्मात्मे विदुर नेहमीं त्यांचे सल्लागार असत. फिरून एकदा भीमाच्या अन्नांत फार जालिम विष दुर्योधनानें कालविलें तेंही भीमानें सहज जिरवून टाकलें. ह्याप्रमाणें दुर्योधन, कर्ण व शकुनि हे अनेक उपायांनीं पांडवांना मारण्याला टपले असतां पांडव समजून उमजून विदुरांच्या सल्ल्यानें राग न दाखवितां तें सर्व निमुटपणें सोशीत होते. खेळाकडे त्यांचें लक्ष विशेष जात चाललेलें पाहून शरवनांत जन्मलेल्या वेदशास्त्रज्ञ गौतमांना गुरु करून भीष्मांनीं त्यांना त्यांच्या स्वाधीन केलें. ते कृपाचार्यापासून धनुर्विद्या शिकले.

३० कृपाचार्यांची कथा. (१. १३०)

थोर गौतमऋषींचे शरासह जन्मलेले शरद्वत नांवाचे पुत्र होते. त्यांचें लक्ष धनुर्विद्येकडे जसें लागे तसें वेदांकडे लागत नसे. इतर ब्रह्मचारी ज्याप्रमाणें तप व वेद ह्यांचें साधन करून घेत, त्याप्रमाणें त्यांनीं सर्व अस्त्रांचें साधन करून घेतलें. धनुर्विद्येतल्या त्यांच्या प्राविण्यानें व उग्र तपानें इंद्राला देखील त्यांनीं चिंता उत्पन्न केली. त्यामुळें इंद्रानें जानपदी नांवाच्या देवकन्येला त्यांच्या तपांत विघ्न करण्यास पाठविलें. त्या सुकुमार अप्सरेला एका वस्त्रानिशीं पाहून ऋषींचे नेत्र आरक्त झाले व धनुष्यबाण हातांतून गळून अंगावर रोमांच उभे राहिले. पण त्यांच्या अलौकिक ब्रह्मज्ञानामुळें व तपाच्या सामर्थ्यानें ते हार गेले नाहींत. तरी विकारवश झाल्यानें शरवनांत वीर्य गळून त्याचे दोन भाग झाले. ते मुनी तो आश्रम सोडून गेले. त्या वीर्यापासून जुळें उत्पन्न झालें. पुढें कोणे एके वेळीं शांतनुराजा स्वेच्छाचारानें अरण्यांत मृगया करीत असतां त्याच्या सेवकांपैकीं एकाच्या दृष्टीस तें जुळें पडलें व त्यानें तें राजाला दाखविलें. भूतदयेमुळें राजा त्याला आपल्या नगरीला घेऊन गेला. व पोटच्या मुलाप्रमाणें त्यानें त्याचें पालन केलें. पुढें तें जुळें मोठें झाल्यावर त्याचा त्यानें संस्कार करविला. कृपायुक्त होऊन त्यांना वाढविलें ह्मणून त्यांचीं कृप व कृपी अशीं नांवें पडलीं. पुढें शरद्वतांनीं त्या ठिकाणीं येऊन त्यांचें गोत्रादि सर्व सांगून चार प्रकारची धनुर्विद्या, अनेक शास्त्रें व सर्व गुप्त विद्या त्यांना शिकविल्या. हे कृप पुढें लवकरच मोठ्या आचार्यपदाला चढले. यादव, कौरव, पांडव इत्यादि सर्व क्षत्रिय ह्यांच्यापासूनच धनुर्विद्या शिकले.

३१ द्रोणांचा जन्म व त्यांचें हास्तिनापुराला येऊन कौरवकुमारांचें गुरुत्व पतकरणें. (१. १३१–१३९)

गंगाद्वारीं भारद्वाज नांवाचे कोणी प्रख्यात ऋषी रहात होते. ते एकदां हविर्धान करण्याच्या उद्देशानें स्नानासाठीं गंगेला गेले. त्या ठिकाणीं रूपयौवनसंपन्न एक अप्सरा जलांतून वर येतांना त्यांच्या दृष्टीस पडली. तिचें वस्त्र तीरावर पडलें होतें. तिला त्या ठिकाणीं नग्न पाहून ऋषींचें मन तिच्याबर जाऊन सर्व लक्ष तिच्याकडे लागून राहिलें. इतक्यांत त्यांचें रेतस्खलन झालें. तें त्यांनीं द्रोणांत धरलें. त्यापासून द्रोण झाले. ह्या द्रोणांनीं सर्व वेदवेदांगांचें अध्ययन केलें, व अग्निवेशऋषींनीं भारद्वाजापासून संपादिलेलें मोठें आग्नेय अस्त्र ते त्यांपासून

शिकले. पृषत नांवाचा राजा भरद्वाजांचा मित्र होता. त्याचा पुत्र द्रुपद हाही द्रोणांचा खेळगडी असून त्यांबरोबर अस्त्रविद्या शिकण्याला अग्निवेशांच्या आश्रमाला जात असे. पृषत वारल्यावर महाबाहु द्रुपद उत्तरपांचालाचा राजा झाला. इकडे भगवान भारद्वाजही स्वर्गवासी झाले, व सकल वेदवेदांगांमध्यें प्रवीण असे द्रोण पुढें त्याच आश्रमांत तपाचरणानें सर्व पापांचें भस्म करीत राहिले. पुढें पित्याच्या आज्ञेनें व पुत्रलोभानें नेहमीं अग्निहोत्र व धर्म ह्यांमध्यें गढलेल्या कृपीशीं त्यांनीं लग्न केलें. तिला अश्वत्थामा नामक पुत्र झाला. जन्मतांच तो उच्चैःश्रव्याप्रमाणें मोठ्यानें खिंकाळला म्हणून त्याला **अश्वत्थामा** हें नांव पडलें. त्याला पाहून द्रोणांना फार संतोष झाला. धनुर्विद्येंत गर्क होऊन द्रोण त्या आश्रमांत रहात असतां परशुरामांची धनुर्विद्येंत व दिव्यास्त्रविद्येंत कीर्ति ऐकून त्या त्यांच्यापासून शिकाव्या ह्मणून व्रतस्थ होऊन आपल्या शिष्यांसहवर्तमान ते महेंद्रपर्वताला गेले. तेथें क्षमाशील, दमपर व शत्रूंची खोड जिरविणारे भृगुपुत्र परशुराम सर्व संग परित्याग करून वनाला जाण्यासाठीं निघालेले त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांच्यापाशीं द्रोणांनीं विपुल संपत्ति मागितली. त्यांचें स्वागत करून राम ह्मणाले, 'माझें सर्व द्रव्य मीं ब्राह्मणांना देऊन टाकलें आहे. त्याचप्रमाणें ही सागरांत पृथ्वी कश्यपाला दिली आहे. आंज हा माझा देह व अप्रतिम शस्त्रास्त्रविद्या एवढींच काय तीं मजजवळ शिल्लक आहेत. ह्यांपैकीं वाटेल तें माग.' नंतर द्रोणांनीं 'प्रयोगसंहाराच्या गूढासहित सर्व अस्त्रविद्या मला द्या,' ह्मणून मागितलें. 'बरें' ह्मणून रामांनीं त्यांना सर्व शस्त्रास्त्रविद्या त्यांच्या प्रयोगसंहाराच्या गूढासह शिकविल्या. त्या सर्व ग्रहण करून घराला परत येऊन स्वकर्मांत गढून द्रोण पुत्रस्नेहामध्यें सुखांत काळ घालवीत राहिले. कोणे एके वेळीं धनिकांचीं मुलें दूध पितांना पाहून अश्वत्थामा रडून मला दूध पाहिजे ह्मणून हट्ट घेऊन बसला. तें पाहून द्रोणांना फार वाईट वाटलें; ह्मणून गाईसाठीं सर्व दिशा त्यांनीं धुंडाळल्या; पण गाय कोठें मिळाली नाहीं. आई अश्वत्थाम्याला दूध ह्मणून पीठ कालवून देत असे. तें पिठवणी पिऊन मीही दूध प्यालों ह्मणून तो मुलांमध्यें आनंदानें नाचे. ह्याप्रमाणें त्यांच्या थट्टेला पात्र झालेल्या आपल्या मुलाकडे पाहून द्रोणांच्या पोटांत भडभडून येई. 'हे दरिद्रा द्रोणा, तुला धिक्कार असो, हा तुझा मुलगा दूध ह्मणून पिठवणी पिऊन संतोषानें मुलांमध्यें नाचत आहे!' ह्याप्रमाणें आत्मनिंदा करून घेऊन द्रव्यासाठीं दुसऱ्याला तोंड पसरावयाचें नाहीं असा निर्धार अलूनही पूर्वस्नेह मनांत आणून ते द्रुपदाकडे गाय मागण्याकरितां गेले, व मी तुझा बालपणचा मित्र आहें असें ह्मणाले. एखाद्या दगडाकडे पहावें तसें त्यांकडे पाहून हासून द्रुपद ह्मणाला, 'हे ब्राह्मणा, वार्धक्यामुळें तुझ्या बुद्धीला भ्रंश झाल्यासारखें दिसतें, ह्मणून मूर्खपणानें तूं मला मित्र ह्मणून हाक मारलीस. **श्रोत्रियाची ग्राम्यजनाबरोबर, रथ्याची पादचाऱ्याबरोबर, धनवानाची निर्धनाबरोबर, विद्वानाचो मूर्खाबरोबर, शूराची घंढाबरोबर, राजाची सामान्य जनाबरोबर, मैत्री असलेली कधीं कोणीं ऐकिली आहे काय? सख्य जुळण्याला बरोबरी लागते. भिन्न स्थितींत सख्य जुळणें कधीं शक्य नाहीं, व तेंही कालानें जीर्ण होतें अगर द्वेषानें नाहींसें होतें.** उगीच ह्या पूर्वीच्या सख्याच्या भ्रांतींत राहूं नकोस. तें विसर. राज्य देण्याचें मीं तुला वचन दिलें म्हणून तूं जें म्हणतोस तें मला स्मरत नाहीं. पाहिजे तर मी तुला एक रात्रीं भोजन देईन. ह्याप्रमाणें द्रुपदानें धिक्कार केल्यावर भार्येसह कुरुदेशाला येऊन गुप्तपणें ते कृपाच्या घरीं राहिले. त्या ठिकाणीं त्यांच्या मुलानें आपण कोण हें न कळवितां पार्थांना सर्व अस्त्रविद्या शिकविल्या. कोणे एके वेळीं मुलें एकत्र जमून हास्तिनापुराबाहेर विटीदांडूनें खेळत असतां त्यांची विटी एका विहिरींत पडली. तेव्हां ती वर काढण्याचा त्यांनीं होईल तेवढा प्रयत्न केला तरी कांहीं केल्यानें ती बाहेर निघेना; म्हणून लाजेनें तोंड खालीं घालून फार हिरमुसले होऊन ते एकमेकांकडे पाहूं लागले. त्या ठिकाणीं जवळच श्यामवर्ण, जटाधारी, कृश, आपल्या नित्यकृत्यांत निमग्न होऊन अग्निहोत्र पुढें ठेवून बसलेले वृद्ध तपस्वी द्रोण त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांना पाहून त्यांच्या भोंवतीं ते जमून तुझे ग-

हिले. त्या मुलांचा हेतु जाणून द्रोण विनोदानें ह्मणाले, 'तुमच्या क्षत्रियकुळाला व तुह्मीं शिकलेल्या सर्व शस्त्रास्त्रांना धिक्कार असो. एवढ्या थोरल्या भरतकुळांत जन्मास येऊन एवढीशी विटी तुह्मांला बिहिरींतून बाहेर काढतां येत नाहीं. ही अंगठी आंत टाकून तिच्यासह तुमची विटी मी बाणानें वर काढीन, मात्र मला उत्तम भोजन दिलें पाहिज.' असें म्हणून त्या बिहिरींत आपली अंगठी टाकून बाणांनीं ती त्या विटीसहवर्तमान त्यांनीं बाहेर काढिली. तें आश्चर्य पाहून, 'आपण कोण, कोणाचे, आपलें आह्मीं काय प्रिय करावें,' ह्मणून तीं मुलें त्यांना विचारूं लागलीं. द्रोण ह्मणाले, 'माझें स्वरूप व मीं केलेलें कृत्य तुह्मी भीष्मांना जाऊन कळवा ह्मणजे मी कोण वगैरे सर्व त्यांना कळेल, आणि पुढें जें करावयाचें तें ते करतील.' मुलांनीं जाऊन भीष्मांना त्याप्रमाणें कळविलें. त्यावरून ते द्रोणच असावे असें भीष्मांनीं ताडलें; व आपल्या मुलांना तेच गुरु योग्य आहेत असा विचार करून स्वतः जाऊन ते त्यांना घेऊन आले व त्यांच्यापासून त्यांचा पूर्व वृत्तांत ऐकून घेऊन संतुष्ट होऊन ते ह्मणाले, 'धनुष्य सज्ज करून आमच्या मुलांना उत्तम अस्त्रविद्या शिकवा. सर्व आपणाला मान देतील. आपण आनंदानें कौरवक्षयापर्यंत येथें सुखानें रहा. कौरवांची संपत्ति व राज्य आपलीं आहेत. आपली आज्ञा होण्याचा अवकाश कीं, एखादी गोष्ट झाली ह्मणून समजा. आमच्या सुदैवानें आपलें येथें येणें झालें. माझ्यावर हा आपला अनुग्रहच मी समजतों.' ह्याप्रमाणें त्यांचें गौरव करून त्यांना ठेवून घेऊन भीष्मांनीं आपले नातू शिकण्यासाठीं त्यांच्या पदरीं घातले.

३२ द्रोणांपासून कौरवकुमारांनां अस्त्रविद्याप्राप्ति. (१. १३४-१३५)

द्रोण आपल्या पांडवकौरवशिष्यांसह आनंदांत असतां एके वेळीं ते त्यांना ह्मणाले, 'माझ्या मनांत कांहीं विवक्षित हेतु घोळत आहे.तो तुह्मीं अस्त्रविद्येंत निष्णात झाल्यावर मजकरितां शेवटास नेला पाहिजे.' तें ऐकून कौरव कांहीं बोलले नाहींत. अर्जुनानें मात्र तें करण्याचें अभिवचन दिलें. तेव्हां द्रोणांनीं पुन्हां पुन्हां अर्जुनाचें मस्तक हुंगलें व प्रीतिपूर्वक त्याला आलिंगन देऊन आनंदाश्रु ढाळले. त्यांनीं पांडवांना नानाप्रकारचीं दिव्य व मानुष अस्त्रें शिकविलीं. त्यावेळीं वृष्णी, अंधक, नानादेशचे राजे, सारथीपुत्र कर्ण, व दुसरे राजपुत्र अस्त्रविद्या शिकण्यासाठीं द्रोणांकडे येऊन त्यांचें शिष्यत्व पतकरून राहिले होते. तामसी व मत्सरी कर्ण अर्जुनाचा हेवा करीत असल्यामुळें दुर्योधनाला मिळून तो पांडवांना तुच्छ करी. त्या सर्वांमध्यें शिक्षण, बाहुवीर्य, उद्योग व अस्त्रविद्येची अभिरुचि ह्या सर्वांत, त्याचप्रमाणें अस्त्रप्रयोगांत, चपलतेंत व हुषारींत अर्जुन सर्वांना मागें सारी. द्रोणांना तर अर्जुनासारखा दुसरा कोणीच दिसेना. सर्व मुलांना धनुर्विद्या व अस्त्रविद्या ते शिकवीत असतां ह्या सर्व शिष्यांना भरण्याला उशीर लागणारे चंबू देऊन व आपल्या मुलाला लवकर भरणारा गडवा देऊन ते पाण्याला पाठवीत, व दुसरे परत येण्यापूर्वी ते आपल्या मुलाला शेलके शेलके प्रयोग शिकवून ठेवीत. हें कपट अर्जुनानें ओळखून वारुणास्त्राच्या प्रयोगानेंच आपला चंबू भरून घेऊन तो आचार्यपुत्राबरोबर परत येऊं लागला. बुद्धिमान व अस्त्रविद्येंत निष्णात असल्यामुळें ह्या विशिष्ट अस्त्रांत आचार्यपुत्राला तो हार गेला नाहीं. गुरुभक्ति ठेवून अस्त्राभ्यासांत झटून परिश्रम करीत असल्यामुळें तो द्रोणांना आवडता झाला.बाण मारण्यांत त्याला नेहमीं गर्क झालेला पाहून द्रोणांनीं आचाऱ्याला एके वेळीं एकांतांत बोलावून 'अर्जुनाला अंधारांत तूं कधीं जेवायला वाढूं नकोस,' ह्मणून ताकीद दिली. पुढें एके वेळीं अर्जुन जेवीत असतां वाऱ्यानें दिवा विझला तरी संवयीच्या योगानें हात नीट तोंडांत जातांना पाहून रात्रींच्या वेळीं धनुर्विद्येचा अभ्यास करावा असें त्याच्या मनांत आलें, व सर्व झोंपीं गेल्यावर त्याच्या धनुष्याचा टणत्कार ऐकूं येऊं लागला. तो ऐकून प्रेमपूर्वक जवळ जाऊन द्रोणांनीं त्याला आलिंगन दिलें. ते ह्मणाले, 'ह्या भूतलावर तुझ्यासारखा धनुर्धारी कोणी होणार नाहीं असा मी तुला तयार करीन,' असें ह्मणून अर्जुनाला फिरून गदायुद्ध, अश्वारोहण, रथांतून, जमिनीवरून, अशा

अनेक प्रकारच्या युद्धकला त्यांनीं शिकविल्या. त्यांची ती कीर्ति ऐकून धनुर्विद्या प्राप्त करून घेण्याच्या इच्छेनें हजारों राजे व राजपुत्र त्यांकडे आले. मल्लयुद्धांत, तरवारीच्या फेंकेंत, तोमर, प्रास, शक्ति इत्यादिकांची फेंक करण्यांत, त्याचप्रमाणें मल्लयुद्धांत द्रोणांनी कौरवांना शिक्षण दिलें. त्या काळीं निषादराजपुत्र एकलव्य द्रोणांकडे अस्त्रविद्या शिकण्यासाठीं आला. कौरवांचें हित, व हा निषाद आहे हा विचार मनांत आणून द्रोणांनीं त्याला धनुर्विद्या शिकविण्याचें नाकारिलें. तो त्यांना नमस्कार करून अरण्यांत गेला व तेथें द्रोणांचा मातीचा पुतळा करून त्याच्या ठिकाणीं गुरुभाव ठेवून कडक्कडीत व्रत पाळून त्यानें बाण मारण्याचा अभ्यास सुरू केला. श्रद्धेमुळें एकाग्रतेच्या अभ्यासानें बाण लावून सोडणें व संहार करणें ह्यांमध्यें तो फार प्रवीण झाला. असा त्याचा अभ्यास चालला असतां कोणे एके वेळीं सर्व पांडव द्रोणाज्ञेनें रथांत बसून मृगया करण्याकरितां नगराबाहेर पडले. एक सेवक सामान व एक कुत्रा बरोबर घेऊन त्यांच्यामागून चालला होता. निरनिराळ्या उद्देशानें ते निरनिराळे फिरत असतां तो कुत्रा हिंडतां हिंडतां त्या निषादाजवळ आला, व अंगाला भस्म फांसून मृगाजिन अंगावर घेऊन व जटा वाढवून बसलेल्या त्या निषादाला पाहून तो भुंकत त्याजवळ उभा राहिला. त्या निषादानें आपलें अस्त्रलाघव दाखविण्याच्या हेतूनें त्या कुत्र्याच्या तोंडांत एकदम सात बाण सोडले. तो ते बाण तसेच तोंडांत धरून पांडवांकडे आला. तें अप्रतिम लाघव व तो शब्दवेधीपणा पाहून लाज वाटून बाण सोडणाराची त्यांनीं प्रशंसा केली. पुढें शोधांतीं त्याच वनामध्यें नेहमीं बाण सोडण्याचा अभ्यास करीत राहिलेला तो निषाद त्यांच्या दृष्टीस पडला, व त्या विद्रूप मनुष्याला पाहून 'आपर्ण कोण, कोणाचे,' ह्मणून त्यांनीं त्याला विचारलें. व त्याच्यापासून सर्व हकीकत समजून घेतल्यावर तो तेथें झालेला चमत्कार त्यांनीं द्रोणांना कळविला. पण अर्जुनाचें सर्व लक्ष त्या एकलव्याकडे लागून राहिल्यामुळें त्यानें द्रोणांना एकांतांत गांठून 'तुजसारखा माझा दुसरा कोणी शिष्य होणार नाहीं, असें मला आपण अभिवचन दिलें असून हा निषादराजपुत्र माझ्याहून श्रेष्ठ कसा झाला,' ह्मणून त्यानें त्यांना विचारलें. क्षणभर विचार करून ह्या गूढाचा उलगडा करण्यासाठीं ते अर्जुनाला घेऊन निषादाकडे गेले, तों मलिन, जटाधारी व चर्म परिधान करून धनुष्य हातांत घेऊन बाण सोडण्याचा अभ्यास करतांना तो त्यांच्या दृष्टीस पडला. त्यांना पाहून एकलव्य त्यांजवळ गेला व त्यानें त्यांना साष्टांग नमस्कार केला व विधिपूर्वक त्यांची पूजा करून 'मी आपला शिष्य आहें,' ह्मणून हात जोडून तो त्यांच्यापुढें उभा राहिला. 'तेव्हां तूं माझा शिष्य असशील तर मला गुरुदक्षिणा दे,' असें द्रोण ह्मणाले. तें ऐकून एकलव्य मोठ्या संतोषानें ह्मणाला, 'भगवन, वाटेल ती वस्तु मागा. मजपाशीं असणारी एकादी वस्तु मी गुरूंना देणार नाहीं असें कधींच घडावयाचें नाहीं.' हें ऐकून द्रोणांनीं उजवा अंगठा त्याजपाशीं मागितला व तो त्यानें सत्यवचनाला जागून कांकूं न करितां एकदम मोठ्या संतोषानें कापून दिला. यामुळें पुढें बाण सोडण्यांत त्याची पूर्वीची चलाखी उरली नाहीं. तें पाहून अर्जुनाची काळजी दूर होऊन त्याला समाधान वाटलें. द्रोणांचे शिष्य भीम व दुर्योधन गदाविद्येंत निष्णात झाले. अश्वत्थामा तर सर्व विद्यांत इतरांहून श्रेष्ठ झाला. त्याचप्रमाणें नकुलसहदेवांनीं तरवारीची फेंक करण्यांत नांव मिळविलें. युधिष्ठिर रथविद्येंत श्रेष्ठ झाला. अर्जुन तर सागरांत पृथ्वीमध्यें नांवाजला जाऊन बुद्धि, अभ्यास, शक्ति व उत्सव ह्यांच्या योगानें व सर्व अस्त्रांमध्यें सारखें लक्ष असल्यामुळें अस्त्रांमध्यें त्याचप्रमाणें गुरुप्रेमांत सर्वांना मागें सारीत होता. बलानें श्रेष्ठ भीम व सर्व अस्त्रविद्येंत निष्णात अर्जुन ह्यांचा पापबुद्धि कौरव हेवा करूं लागले. एके वेळीं अस्त्रविद्येंत त्यांची परीक्षा घेण्यासाठीं शिल्पकारांनीं तयार केलेला एक पुतळा निशाण ह्मणून झाडाच्या शेंड्याला शिष्यांना न कळतां टांगून ठेवून गुरूंनीं त्यांना बोलावून त्यावर नेम मारण्यास आज्ञा केली. सर्वांना धनुष्य सज्ज करून पुतळ्याकडे दृष्टि देऊन उभे राहण्यास सांगून मीं सांगितल्याबरोबर त्या पुतळ्याचें मस्तक उडवा ह्मणून त्यांनीं आज्ञा केली. प्रथम युधिष्ठिर धनुष्य-

बाण सज्ज करून उभा राहिल्यावर झाडाच्या शेंड्याला टांगलेला तो पुतळा तुला दिसतो काय म्हणून द्रोणांनीं त्याला विचारलें. त्यानें 'होय' म्हणून उत्तर दिल्यावर, 'बरें तें झाड, तुझे भाऊ व मी तुला दिसतों आहों का,' ह्मणून द्रोणांनीं फिरून त्याला विचारलें. युधिष्टिरानें 'होय' ह्मणून उत्तर दिलें. त्याचप्रमाणें अर्जुनाशिवाय इतर सर्वांनीं उत्तरें दिलीं. त्यानें मात्र त्या पुतळ्याचें मस्तकच फक्त मला दिसत आहे, दुसरें कांहीं दिसत नाहीं, असें उत्तर दिलें. तें ऐकून द्रोणांच्या अंगावर हर्षरोमांच उभे राहून 'तर मग बाण सोड,' ह्मणून त्यांनीं त्याला आज्ञा दिली. त्यानें एकदम बाण सोडून त्याच्या तीक्ष्ण टोंकानें त्या पुतळ्याचें मस्तक खालीं पाडलें. तें पाहून द्रोणांनीं त्याला आलिंगन दिलें व द्रुपदाचा त्याच्या अनुयायांसह पराभव झाल्याप्रमाणें त्यांना वाटूं लागलें. पुढें एके वेळीं ते गंगेला स्नानाला गेले असतां एका मोठ्या सुसरीनें त्यांच्या मांडीला धरलें. तिच्यापासून स्वतःला सोडविण्याचें सामर्थ्य असून त्यांनीं आपल्या शिष्यांना आपली तिच्यापासून सुटका करण्यास सांगितलें. ते शब्द त्यांच्या तोंडांतून बाहेर पडले नाहींत तोंच अर्जुनानें पांच तीक्ष्ण बाण सोडून त्या सुसरीला जलांतच ठार केलें. इतर सर्व वेड्यासारखे जागच्याजागीं उभे होते. अर्जुनालाच विद्या पूर्ण प्राप्त होऊन तो सर्वांत श्रेष्ठ झालेला पाहून द्रोणांना फार संतोष झाला व त्यांनीं त्याला ब्रह्मशिर नांवाचें अतिश्रेष्ठ, कोणाची डाळ न शिजूं देणारें अस्त्र शिकवून त्या अस्त्राच्या अंगीं सर्व जग भस्म करून टाकण्याचें सामर्थ्य असल्यामुळें 'कोणा मानवावर त्याचा प्रयोग करूं नको; पण तुला जेव्हां मानवेतर कोणी अजिंक्य शत्रु भेटेल तेव्हां त्यावर तें सोड,' ह्मणून सांगितलें.

१३ कौरवकुमारांचें समाजापुढें अस्त्रपरीक्षण. (इ. १३६-१३९).

पांडवकौरव सर्वास्त्रविद्येमध्यें निष्णात झालेले पाहून विदुरभीष्मादिकरून शहाण्यांपुढें एका मोठ्या पटांगणांत त्यांची परीक्षा घेण्याविषयीं द्रोणांनीं धृतराष्ट्राला सांगितलें. तेव्हां धृतराष्ट्र फार संतुष्ट होऊन ह्मणाला, 'हे द्विजवर्य, आपण हें महत्कार्य केलें आहे. ज्यावेळीं, ज्या प्रदेशांत व ज्या प्रकारें व्यवस्था करण्यास आपली आज्ञा होईल त्याप्रमाणें सर्व तजवीज ठेवण्याला मी सिद्ध आहें. जे आज माझ्या मुलांचें अस्त्रविद्येंतील कौशल्य प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पहातील त्यांना मी धन्य समजतों.' असें ह्मणून 'आचार्य सांगतील त्याप्रमाणें सर्व व्यवस्था ठेव,' अशी त्यानें विदुरांना आज्ञा केली. याप्रमाणें राजाची आज्ञा होतांच द्रोणांसहवर्तमान विदुर नगराबाहेर पडले व महाप्राज्ञ द्रोणांनीं स्वतः सपाट, ज्या ठिकाणीं झाडझुडूप वगैरे कांहीं नसून पाण्याचे स्वच्छ झरे होते, अशी जागा मापून त्या ठिकाणीं उच्चग्रहयुक्त अशा चांगल्या तिथीला सशास्त्र रीतीनें पुष्कळ बळी दिल्यावर राजघराण्यांतील लोक व स्त्रिया यांसाठीं उत्तम प्रेक्षागृह तयार करवून तेथें सर्व आयुधें तयार ठेविलीं. भोंवतालच्या प्रदेशांत प्रेक्षकांसाठीं पुष्कळ उंच उंच मंचे तयार करविले. श्रीमान लोकांसाठीं तंबू देवविले. नेमलेला दिवस आल्यावर भीष्म, कृप, आचार्य व त्यांच्या मागून राजा हे सर्व मोतीं, वैदूर्य व दुसरीं रत्नें यांनीं मंडित अशा त्या स्वर्गतुल्य सुवर्णमय प्रेक्षागृहांत शिरले. भाग्यशाली गांधारी, कुंति व इतर राजस्त्रिया आपल्या दासी व लवाजमा ह्यांसहवर्तमान देवस्त्रियांप्रमाणें हर्षानें तें कौतुक पाहण्यासाठीं मंचांवर चढल्या. ब्राह्मणक्षत्रियादि चारी वर्णांच्या लोकांचे थवेच्या थवे कुमारांची शिक्षणपरीक्षा पाहण्यासाठीं नगराबाहेर त्या पटांगणाकडे धांवत होते. वाद्यांच्या गजरानें व जनसमूहाच्या गलबल्यानें तो समाज एखाद्या क्षुब्ध झालेल्या महासागराप्रमाणें भासत होता. नंतर मंगळासह दिसणाऱ्या सूर्याप्रमाणें शुभ्रवस्त्र व स्वच्छ यज्ञोपवीत धारण केलेले, पिंगट जटा असून रुद्राक्षमालाधारी असे सर्वांगाला चंदन फांसलेले द्रोणाचार्य कुमारांसहवर्तमान त्या ठिकाणीं आले. समयानुरूप बलिदान वगैरे झाल्याबर मंत्रज्ञ ब्राह्मणांकडून मांगल्य करविलें. त्या पवित्र मंत्रघोषाच्या मागून कांहीं लोक नानाविध आयुधें घेऊन त्या ठिकाणीं आले. नंतर अंगुलित्राण घालून कंबर बांधलेले ते महावीर कुमार खा-

केंत तूणीर लटकावून यथाक्रमानें त्या ठिकाणीं येऊन दिव्य अस्त्रविद्या दाखविण्याला तयार झाले. तें कौतुक पहाण्याच्या उत्कट इच्छेमुळें क्षणांत जिकडे तिकडे शांतता झाली. प्रेक्षकसमूहापैकीं कांहींनीं बाण लागण्याच्या भीतीनें डोकें खालीं वांकविलें होतें, व कांहीं साश्चर्ययुक्त होऊन मोठ्या धैर्यानें त्यांकडे पहात उभे होते. त्या कुमारांनीं घोड्यांवरून धांवतां धांवतां अनेक नामांकित बाणांनीं दूरदूरचीं निशाणें पाडलीं. विस्मयानें डोळे प्रफुल्लित होऊन सहस्रावधि जन 'शाबास, शाबास,' ह्मणत होते. धनुर्विद्येमध्यें आपलें नैपुण्य व हस्तलाघव दाखविल्यावर रथपरीक्षा देऊन ते सर्व कुमार ढालतरवारी घेऊन तरवारीच्या फेंका करूं लागले. त्या ठिकाणीं कुमारांचा प्रयोग, संहार, चपळाई, हस्तलाघव, लालित्य, स्थैर्य, बाहुवीर्य इत्यादि अनेक गुण लोकांच्या उत्तम प्रकारें दृष्टोत्पत्तीस आले. इतक्यांत आत्मशौर्य प्रकट करून एकमेकांवर सरशी करण्यास आतुर झालेले दुर्योधन व भीमसेन गदा घेऊन मैदानांत आले. मत्तगजांप्रमाणें गुरगुरत ते घेर घेत फिरत होते. कुमारांचें हें सर्व कृत्य विदुर धृतराष्ट्रास व कुंति गांधारीस सांगत होते. दुर्योधन व भीमसेन तेथें आले तेव्हां पक्षपातामुळें त्या समुदायामध्यें एकदम दुफळी झाली. 'काय हो तो वीर दुर्योधन ? काय हो तो भीम ! ' असे शब्द एकदम कानीं येऊं लागले. नंतर महार्णवाप्रमाणें तो समुदाय क्षुब्ध झालेला पाहून रंगविक्षोभ होऊं नये ह्मणून भीम व दुर्योधन या वीरांना, त्यांनीं आपापलें कौशल्य दाखवून झालें असल्यामुळें, वेगळे करण्यास सुज्ञ द्रोणांनीं आपल्या मुलाला सांगितल्यावरून प्रलयकालच्या अग्निप्रमाणें क्षुब्ध अशा त्या दोन गंभीर वीरांना त्यानें वेगळें केलें. नंतर मोठ्या मेघगर्जनेप्रमाणें गंभीर नाद करणारें वाद्य बंद करवून 'सर्व शस्त्रास्त्रांत निष्णात जो हा माझा प्रिय पार्थ याचें शिक्षण पहा,' ह्मणून द्रोणांनीं मोठ्यानें समाजाला विनंती केली. नंतर बाहुत्राण व अंगुलित्राण बांधून तुणीर बाणांनीं पूर्ण भरून घेऊन सुवर्णकवच घालून धनुष्य हातांत घेऊन अर्जुन ब्राह्मणांचा आशीर्वाद घेत रंगणामध्यें शिरला. त्या वेळीं तो सूर्य ज्यामधून दिसत आहे अशा इंद्रधनुष्य व विद्युल्लता यांनीं युक्त संध्याकाळच्या मेघाप्रमाणें दिसत होता. त्या वेळीं प्रेक्षकांना मोठा आनंद होऊन जिकडे तिकडे एकच गडबड उडून राहिली. सभोंवार शंख व इतर वाद्यें ह्यांचा गजर होत होता. 'हा कुंतीपुत्र, हा श्रीमान मधला पांडव, हा महेंद्रपुत्र, हा कुरूंचा रक्षणकर्ता, हा अस्त्रविद्येमध्यें श्रेष्ठ, हा धर्मानें वागणाऱ्यांमध्यें व शीलसंपन्न लोकांमध्यें प्रमुख, हा शील व ज्ञान यांचा निधि,' असे उद्गार जिकडे तिकडे प्रेक्षक समूहामधून निघून कानीं पडूं लागले. ते शब्द ऐकून टपटप गळणाऱ्या अश्रूंनीं कुंतीचें उरःस्थल भिजून चिंब झालें. 'हे विदुरा, क्षुब्ध महार्णवाप्रमाणें गगनभेदी हा महाध्वनि रंगभूमीवर एकदम कशाचा उठला आहे,' ह्मणून धृतराष्ट्रानें विदुराला विचारलें. तेव्हां 'पार्थ रंगभूमीवर आल्यामुळें समाजाची ही धांदल उडून गेली आहे,' असें विदुरांनीं सांगितलें. तें ऐकून धृतराष्ट्रानें आपल्याला धन्य मानून घेतलें. तो आनंदसागरांत बुडालेला समाज फिरून स्थिरस्थावर झाल्यावर अर्जुनानें गुरुसमक्ष सर्वांना आपलें अस्त्रलाघव दाखविलें. आग्नेयास्त्रानें अग्नि, वारुणानें पाणी, वायव्यानें वारा, पार्जन्यानें मेघ, व पार्वतानें पर्वत उत्पन्न करीत भौमास्त्राचा प्रयोग करून तो भूमीमध्यें शिरून अंतर्धानास्त्रानें अदृश्य झाला. क्षणांत वर, क्षणांत खालीं, क्षणांत रथाग्रीं, क्षणांत त्याच्या मध्यभागीं, क्षणांत भूमीवर अशा प्रकारें विद्युल्लतेप्रमाणें त्याची हालचाल चालली होती. त्याचें लाघव विलक्षण असल्यामुळें नानाविध शरांनीं त्यानें अनेक नाजुक व सूक्ष्म निशाणें मारलीं. त्या ठिकाणीं धांवणाऱ्या डुकराची प्रतिमा निशाणादाखल ठेविली होती. तिच्या तोंडांत एकाच वेळीं त्यानें पांच बाण सोडले. गाईच्या शिंगांमधून एकदम एकवीस मारले. त्याचप्रमाणें शस्त्रांत, तरवारींत, गदाविद्येंत व अशा प्रकारच्या अनेक विद्यांत कौशल्य दाखवीत तो घेर घेत फिरत होता. त्यानें आपल्या सर्व विद्यांची परीक्षा दाखविल्यावर वाद्यें बंद पडलीं. इतक्यांत वैभव व बलसूचक विजेच्या गडगडाटाप्रमाणें महाशब्द समाजाच्या कानांवर पडला. व तो ऐकून पर्वत फाटताहेत कीं काय, भूमि दुभंगते कीं काय, जलानें थबथबलेल्या मेघांनीं

आकाश भरून गेलें आहे कीं काय, असा संशय पडून एकदम प्रेक्षकांची दृष्टि प्रेक्षागृहाच्या द्वाराकडे गेली. पांच पांडवांमध्यें असणारे द्रोण **सूर्यादि पंचग्रहांमध्यें असणाऱ्या चंद्राप्रमाणें शोभत होते.** दुर्योधन एकदम उठला असतां अश्वत्थाम्यानें त्याला जाग्यावर बसविलें. त्या वेळीं तो गदाधारी दुर्योधन आपल्या शंभर भावांमध्यें दानवांच्या संहारकाळीं देवसमुदायामध्यें उभा असलेल्या इंद्राप्रमाणें शोभत होता. अंगच्या कवचकुंडलांनीं ज्याच्या मुखाला अवर्णनीय शोभा आली होती व ज्यानें हातांत धनुष्यबाण घेऊन कंबरेला तरवार लटकाविली होती असा शत्रुपुरध्वंसी, कीर्तिमान, व पृथेला कौमारांत झालेला सूर्यपुत्र प्रफुल्लित नेत्रांनीं जनसमूहांतून वाट काढीत पटांगणांत येत होता. बल, वीर्य व पराक्रम ह्यांमध्यें हा सिंहासारखा असून कांतीनें व तेजानें सूर्य, चंद्र व अग्नि ह्यांसारखा तेजस्वी होता. सुवर्णतालासमान उंच असून यौवनादि असंख्य गुणांनीं युक्त असा तो रंगणांत येतांना हा एखादा हालचाल करणारा पर्वतच आहे कीं काय असा दिसत होता. प्रथम चोहोंकडे दृष्टि फेंकून द्रोण व कृप ह्यांना फारसा आदर न दाखवितां त्यानें नमस्कार केला. त्याकडे डोळे लावून 'हा कोण, येथें कशाला आला,' ह्मणून तो क्षुब्ध समाज जिज्ञासापूर्वक विचारपूस करीत असतां, अर्जुन आपला बंधु हें न ओळखतां मेघाप्रमाणें गंभीर स्वरानें कर्ण त्याला ह्मणाला, 'पार्था, तूं जे जे ह्मणून कांहीं चमत्कार करून दाखविलेस ते ते मी लोकांना विशेष रीतीनें करून दाखवितों. स्वतःच्या संबंधानें मोठा अभिमान बाळगूं नको.' हें त्याचें भाषण संपल्यावर तो समाज चित्राप्रमाणें तटस्थ झाला व दुर्योधनाला मोठा आनंद झाला. अर्जुनाला लाज वाटून मोठा त्वेष चढला. द्रोणांची आज्ञा घेऊन कर्णानें अर्जुनानें जे जे ह्मणून चमत्कार करून दाखविले होते ते सर्व विशेष रीतीनें करून दाखविले. दुर्योधन मोठ्या आनंदानें कर्णाला आलिंगन देऊन ह्मणाला, 'हे महाबाहो, तुझें स्वागत असो. माझ्या सुदैवानेंच पांडवांचा गर्व खालीं करणारा आज तूं मला मिळालास. हेंच कौरवांचें राज्य तुझें आहे.' कर्णानें उत्तर दिलें, 'मी आपल्याला कृतार्थ समजतों. फक्त तुझा स्नेह मला पुरे आहे. पार्थाबरोबर द्वंद्वयुद्ध करण्याची माझी इच्छा आहे.' हें चीड आणणारें भाषण ऐकून अर्जुन कर्णाला ह्मणाला, 'आगंतुक व उगीच मध्यें बोलणारे ह्यांना त्यांच्या कृतीनें जे लोक मिळतात तेथें मी आज तुला पाठवितों.' कर्णानें उत्तर दिलें, 'फाल्गुना, ह्या रणभूमीवर येण्याला सर्वांना सारखा अधिकार आहे. **राजांना श्रेष्ठत्व त्यांच्या अंगांतील वीर्यामुळें येतें. धर्महीं बलाबाच धरून असतो.** उगीच निरर्थक शर सोडण्यांत मोठें भूषण नाहीं. आज गुरूंच्या समक्ष शरानें तुझें मस्तक उडवितों पहा!' हें ऐकून द्रोणांची आज्ञा घेऊन बंधूंनीं मोठ्या कष्टानें आलिंगन दिल्यावर अर्जुन युद्धाला तयार झाला, व कर्णही दुर्योधनपक्षीयांचें अभिनंदन घेऊन धनुष्यबाणांनिशीं पुढें सरसावला. त्या वेळीं विद्युल्लता व इंद्रधनुष्य ह्यांनीं युक्त अशा गरजणाऱ्या मेघांनीं सर्व आकाश भरून गेलें असून उडणाऱ्या बगळ्यांच्या घोळक्यामुळें ते हास्य करताहेत कीं काय असें वाटत होतें. त्या वेळीं इंद्र स्नेहपूर्वक रंगभूमीकडे पहात आहेसें पाहून सूर्यानेंही सर्व मेघ विसकळून जिकडे तिकडे प्रकाश पाडला. अर्जुनावर मात्र मेघच्छाया पडली होती. कर्ण चांगल्या प्रकाशांत होता. सर्व धार्तराष्ट्र कर्णाच्या बाजूला ओळीनें उभे राहिले. द्रोण, कृप, व भीष्म अर्जुनाच्या बाजूला होते. ह्याप्रमाणें त्याठिकाणीं दुफळी झाली होती. स्त्रियांमध्यें सुद्धां दोन पक्ष दिसून येत होते. कुंतीला मात्र दोघे सारखे, असल्यामुळें ती कावरीबावरी दिसत होती. आपापलीं जड धनुष्यें सज्ज करून उभे असलेल्या ह्या वीरांना द्वंद्वयुद्धकुशल व सर्व धर्म कळणारे कृप ह्मणाले, '**हा पृथेचा धाकटा मुलगा पंडुनंदन कुरुकुलोत्पन्न अर्जुन तुझ्याबरोबर द्वंद्वयुद्ध करण्याला तयार आहे. तूंही आपल्या मातापित्यांचीं नांवें व आपलें कुल सांग. तें कळल्यावर मग पार्थ युद्ध करण्याला तूं योग्य आहेस किंवा नाहीं ह्याचा विचार करील.**' हें ऐकून पावसानें झोडलेल्या कमलाप्रमाणें कर्णाचें तोंड खरकन् उतरलें. दुर्योधन ह्मणाला, 'आचार्य, **थोर कुलीं जन्म, शौर्य, व सेनानायकत्व अ-**

ही तीन मकारची राजांची योग्यता शास्त्रांत सांगितली आहे. अराजाबरोबर अर्जुनाची युद्ध करण्याची इच्छा नसेल तर हा पहा आतां मी कर्णाला **अंगदेशच्या राज्याचा** अभिषेक करतों.' **असें** ह्मणून लागलींच त्यानें **लाह्या व फुलें ह्यांनीं भरलेल्या सुवर्णकलशांनीं सुवर्णपीठावर बसवून त्यावर छत्रचामर धरवून मंत्रज्ञ ब्राह्मणांकडून जयजयकार करीत कर्णाला राज्याभिषेक करविला.** त्या वेळीं कर्ण दुर्योधनाला ह्मणाला, 'ह्या उपकारानुरूप तुझें साह्य करण्याला हा मी येथें तयार आहें.' यावर 'परस्परांच्या स्नेहांत कधीं व्यत्यय येऊं नये एवढेंच मागणें आहे,' असें दुर्योधनाचें उत्तर ऐकून 'ठीक आहे' ह्मणून कर्णानें त्याला दृढालिंगन दिलें, व दोघांनाही परमानंद झाला. त्यासमयीं दुर्योधनाचा सारथी लगबगीनें तेथें आला. त्याचें उपवस्त्र अंगावरून गळून पडलें होतें त्याचीही त्याला शुद्ध नसून तो अगदीं घामाघूम झाला होता. त्याला पाहून धनुष्य खालीं ठेवून पित्याला योग्य अशा आदरानें कर्णानें आपलें अभिषेकानें थबथबलेलें मस्तक त्याच्या पायांवर ठेविलें. तेव्हां त्या सारथ्याची धांदल उडून जाऊन त्यानें पदरानें आपले पाय झांकून घेतले व 'बाळा' ह्मणून स्पष्ट हाक मारून आलिंगन दिलें. पुत्रस्नेहामुळें अत्यानंद पावून त्याचें अभिषिक्त मस्तक फिरून आपल्या आश्रूंनीं त्यानें भिजविलें. त्यावरून हा सारथिपुत्र असावा असा तर्क बांधून भीम त्याची थट्टा करून ह्मणाला, 'हे सारथ्याच्या पोरा, रणांत अर्जुनाच्या हातून मरण्याएवढी तुझी योग्यता नाहीं. आपल्या कुलाला शोभणारा चाबूक हातीं घे ह्मणजे झालें. यज्ञामध्यें अग्निकुंडाजवळचा पुरोडाश खाणाऱ्या कुत्र्याप्रमाणें हें अंगराज्य तुला शोभत नाहीं.' हें ऐकून दांत ओंठ चावीत कर्णानें दीर्घोच्छ्वास टाकून वर सूर्याकडे दृष्टि फेंकिली. त्या वेळीं कमलवनांतून मदोत्कट गज जसा बाहेर पडतो तसा दुर्योधन पुढें येऊन भीमसेनाला ह्मणाला, 'हे वृकोदरा, अशा प्रकारानें टाकून बोलणें तुला शोभत नाहीं. **बलच काय तें क्षत्रियांमध्यें श्रेष्ठ गणलें असून क्षत्रियांबरोबर युद्ध करणें हा क्षत्रियांचा धर्म आहे. शूर व नद्या** ह्यांच्या उगमाचा कधीं कोणीं विचार करूं नये. अग्नीची उत्पत्ति यःकश्चित् जलापासून असून त्यानें हें सर्व चराचर विश्व ग्रासून टाकलें आहे. दधीच ऋषींच्या अस्थीपासून बनलेल्या वज्रानें दानवांचा फडशा उडविला. सर्व देवांचा अंशभूत जो प्रसिद्ध गुह त्याच्या उत्पत्तीचा तर थांगच नाहीं. कोणी तो कृत्तिकेपासून झाला ह्मणतात, कोणी रुद्रापासून झाला ह्मणतात, कोणी अग्नीपासून झाला ह्मणतात, कोणी गंगेपासून झाला ह्मणतात. तृणापासून कृपाची व द्रोणामधून सर्व धनुर्धाऱ्यांमध्यें श्रेष्ठ अशा द्रोणाचार्यांची उत्पत्ति झाली आहे. क्षत्रिय ब्राह्मणापासून झाले ह्मणतात; व प्रत्यक्ष तुमच्या उत्पत्तीसंबंधानें मीं तुह्मांला सांगावयाला पाहिजे असें नाहीं. कवचकुंडलादि सर्व राजलक्षणांनीं संपन्न अशा त्या पुरुषव्याघ्राची यःकश्चित् मृगापासून उत्पत्ति संभवते तरी कशी? हा आपल्या वहुवीर्यानें ह्या पृथ्वीचेंच काय, पण नागलोकांचें देखील राज्य करण्याला पात्र आहे. माझें करणें ज्याला पसंत नसेल त्यानें खुशाल धनुष्य घेऊन माझ्यापुढें उभें रहावें.' हें ऐकून जिकडे तिकडे गडबड उडून राहिली. 'वाहवा वाहवा!' असा शब्द होत असतां सूर्य अस्ताला गेला. मशाली पाजळून त्यांच्या उजेडानें जिकडे तिकडे लखलखाट झालेल्या रंगभूमींतून दुर्योधन कर्णाचा हात धरून बाहेर पडला. द्रोण, कृप व भीष्म यांसहवर्तमान पांडव स्वगृहीं गेले. कर्ण आपल्या बाजूला मिळाल्यामुळें अर्जुनाच्या संबंधानें दुर्योधन निःकाळजी झाला. कर्णासारखा योद्धा कोणी नाहीं असें युधिष्ठिराला देखील वाटूं लागलें.

---

३४ द्रुपदराजाचा द्रोणांनीं घेतलेला सूड. (१. १४०)

पांडव व कौरव अस्त्रविद्येंत निष्णात झाले. तेव्हां गुरुदक्षिणा; मागण्याचा समय आलासें वाटून सर्व शिष्यांना द्रोणांनीं आपल्या जवळ बोलाविलें व 'गुरुदक्षिणेबद्दल द्रुपदाला पकडून आणा,' ह्मणून आज्ञा केली. 'बरें' ह्मणून द्रोणासहवर्तमान ते द्रुपदाकडे निघाले. पांचालदेशास पोहोंचल्यावर मोठमोठे पराक्रमी दुर्योधनप्रभृति कौरवकुमार कर्णा-

सहवर्तमान मीपणाच्या अभिमानानें नगरांत शिरून राजावर चालून गेले. द्रुपदराजाही अंगांत कवच घालून बंधूसहवर्तमान सैन्य घेऊन लगबगीनें वाड्यांतून बाहेर पडला. पांढऱ्या शुभ्र रथांत बसून कोणाला हार न जाणाऱ्या द्रुपदानें चाल करून जाऊन कौरवावर शरवर्षाव सुरू केला. दुर्योधनादि कौरवांच्या अहंपणामुळें, प्रथमच गुरूंना एकांतांत गांठून ' पांचालराजा ह्यांच्या हातीं लागणें शक्य नाहीं, त्यांचा पराक्रम दिसून आल्यावर मागून मला जें कर्तव्य तें मी करीन,' असें सांगून अर्जुन भावांसहवर्तमान नगराच्या बाहेरच अर्ध कोसावर राहिला होता. द्रुपदाच्या तीक्ष्ण बाणांनीं कौरवसैन्याला अगदीं जेरीस आणिलें. ह्या समयीं पंचालनगरींत अनेक वाद्यें वाजत होतीं. दुर्योधनादि कौरव मोठ्या त्वेषानें द्रुपदावर बाण सोडीत होते. पण त्या महाधनुर्धरापुढें त्यांची डाळ शिजेना. त्यानें दुर्योधनादिकांना अर्धवट जळलेल्या ओंडक्याप्रमाणें होरपळून काढलें, तेव्हां सर्व नगरवासी लोकांनीं हातांत मुसळ व काठ्या घेऊन मुसळधारा वर्षणाऱ्या मेघाप्रमाणें कौरवांवर वर्षाव सुरू केला. आबालवृद्ध त्यांवर चालून गेले. त्यानें जर्जर होऊन मृगाप्रमाणें दीन झालेल्या कौरवांनीं पांडवांकडे धांव घेतली. नंतर युधिष्ठिराला स्वस्थ बसण्यास सांगून व माद्रीकुमारांना चक्ररक्षक करून गदाधारी भीमासह अर्जुन द्रुपदसैन्यावर चालून गेला व सर्व दिशा दणाणून सोडून अंतकासमान कोदंडपाणी भीमार्जुन हे सागरांत प्रवेश करणाऱ्या नक्राप्रमाणें त्या अफाट द्रुपदसैन्यांत शिरले व त्यांनीं हत्ती, घोडे, रथ व पायदळ अशा चतुरंग सैन्याची दाणादाण उडवून दिली. युद्धविशारद कालासारख्या अर्जुनानें आपल्या बाहुवीर्यानें व भीमानें आपल्या गदेनें त्या पर्वतप्राय हत्तींचीं गंडस्थळें फोडलीं; तेव्हां त्यांतून रक्तस्राव होत असून ते वज्रानें भेदलेल्या पर्वताप्रमाणें पटापट भूमीवर पडले. इकडे द्रुपदाला शरांनीं झांकून टाकून सहस्रावधि रथ, घोडे, व हत्ती ह्यांना जमीनदोस्त करून प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें खवळलेला अर्जुन आपल्या गुरूचें प्रिय करण्यांत गुंतला होता. त्याचें तें घोर युद्ध फार प्रेक्षणीय चाललें होतें. अर्जुनानें पांचालांना त्राहि त्राहि करून सोडलें. तो बाण धनुष्याला जोडतो केव्हां व सोडतो केव्हां हें देखील कळून येत नव्हतें. ह्याप्रमाणें पांचालसैन्य अगदीं जेरीला आलें असतां, ' शाबास शाबास! ' अशा उद्गारांसह सिंहनाद जिकडून तिकडून ऐकूं येऊं लागले. त्या वेळीं द्रुपदानेंही अर्जुनाला बाणांनीं झांकून टाकलें. तेव्हां महासिंह गजपोताला गिळून टाकतो आहे कीं काय असा संशय पडून जिकडे तिकडे हाहाकार उडाला. तेव्हां इंद्र व विरोचनपुत्र बली याप्रमाणें त्या दोन योद्ध्यांनीं सर्व सैन्य हालवून सोडलें. हें तुंबळ युद्ध चाललें असतां पांचालाच्या रथाच्या चाकांचा कणा मोडला. ही संधि साधून अर्जुन त्याच्या रथांत शांतपणें शिरला व खवळलेल्या समुद्रांतून नागाप्रमाणें त्याला पकडून कौरवांचा तो संबंधी ही गोष्ट मनांत आणून त्याला त्यानें जिवंत गुरूंकडे आणिलें. सर्व पांचालसैन्याची दशदिशांला दाणादाण झाली. गर्व परिहार होऊन संपत्तीलाही मुकून तो त्याप्रमाणें तावडींत सांपडला हें पाहून गतगोष्टीची आठवण देऊन द्रोण त्याला ह्मणाले, ' तुझ्या राष्ट्राचा व नगराचा माझ्या सैन्यानें फडशा उडविला आहे व तुझे प्राण माझ्या हातीं आहेत; आतां येथें पूर्वस्नेहाची बडबड काय उपयोगी पडणार? ' असें ह्मणून किंचित् हासून ते फिरून ह्मणाले, ' हे वीरा, प्राणाची भीति बाळगूं नकोस. आह्मी ब्राह्मण क्षमावान आहों. पूर्वी आश्रमांत आपण बरोबर खेळत होतों. तेव्हांपासून तुजवर माझें प्रेम आहे. त्याच स्नेहाचें पुनरुज्जीवन व्हावें एवढी माझी इच्छा आहे. राजाचा मित्र अराज उपयोगी नाहीं ह्मणून मी तुला अर्ध राज्य देतों. आणि तुजबरोबर लढण्याचें तरी राज्यप्राप्ति हेंच कारण होय. ' असें म्हणून त्याला गंगेच्या दक्षिणतीराचें राज्य देऊन आपण उत्तरेचें राज्य करूं लागले. हें द्रोणाजार्यांचें भाषण ऐकून द्रुपद ह्मणाला, ' ब्रह्मन्, आपण विक्रमशाली महात्मे असल्यानें ही आपली कृति कांहीं आश्चर्य करण्यासारखी मला वाटत नाहीं. आपणाविषयीं माझ्या ठिकाणीं पूर्ण प्रेम आहे; व आपलें कायमचें प्रेम असावें एवढेंच माझें मागणें आहे. ह्याप्रमाणें द्रोण अनसंपन्न माकंदी व कापिल्य ह्या दोन नगरांच्या

उत्तरभागांतील प्रांतावर राज्य करूं लागले; व दक्षिणेकडील चर्मण्वतीपर्यंतच्या प्रदेशावर द्रुपद राज्य करूं लागला. ह्याप्रमाणें ब्राह्मणाकडून आपला पाणउतारा झालेला पाहून आपलें बल व्यर्थ आहेसें वाटून द्रोणाचार्यांची खोड जिरविणारा मुलगा व्हावा ह्मणून पुत्रप्राप्तीसाठीं द्रुपद पृथ्वीपर्यटनाला निघाला.

३९ कणिकानें धृतराष्ट्राला सांगितलेली राजनीति. (१. १४१–१४२.)

पांडवकौरव विद्यासंपन्न होऊन एक वर्ष झालें नाहीं तोंच, धैर्य, स्थैर्य, सहनशीलपणा, अल्प निष्ठुरता, सरळता, आश्रितवात्सल्य, दृढमैत्री इत्यादि गुणांनीं संपन्न अशा युधिष्ठिराला धृतराष्ट्रानें यौवराज्याचा अभिषेक केला. पुढें लवकरच शील, वर्तन, मनमिळाऊपणा ह्या गुणांनीं त्यानें आपल्या वडिलांचें नांव मागें पाडलें. असियुद्ध, गदायुद्ध, व रथांतून युद्ध करणें इत्यादि विद्यांत बलरामाकडून भीमाला आणखी शिक्षण मिळतच होतें. हा शक्तीनें शुमत्सेनासारखा असून आपल्या भावांच्या अर्ध्या वचनांत होता. अर्जुन अनेक प्रकारच्या धनुर्विद्यांत व बाणांच्या सरळ, वक्र, दूर, अशा अनेकविध प्रयोगांत निष्णात झाला. हस्तलाघव व हुशारीनें बिनचूक नेम मारणें ह्यांमध्यें तर त्याच्या तोडीचा वीर सांपडणें कठीण होतें. त्याचें सर्वांवर श्रेष्ठत्व पाहून अग्निवेशापासून मिळालेलें ब्रह्मशिर नामक अस्त्र त्याला देऊन 'युद्धांत माझ्यासमोर उभा राहून तूं माझ्याबरोबर युद्ध केलें पाहिजेस,' ही द्रोणांनीं त्याजवळ गुरुदक्षिणा मागितली. बरें ह्मणून अभिवचन देऊन अर्जुन उत्तरदिशेला गेला. अर्जुनासारखा धनुर्धारी कोणी नाहीं असा डंका सर्व पृथ्वीभर गाजला. नीतिमान सहदेव देखील गुरूंपासून सर्व नीति शिकून भावांच्या अगदीं अंकित होता. नकुलालाही चित्रयोधी व अतिरथी असें नांव मिळालें. गंधर्वांचा त्रास होत असूनही ज्यानें त्रैवार्षिक यज्ञ केले होते त्या अतिबलाढ्य सौवीराला, व जो पंडूला देखील अजिंक्य झाला होता व ज्यापुढें कौरव थरथर कांपत होते त्या यवनाधिपाला अर्जुनानें भावांच्या साहाय्यानें मुठींत आणलें. त्यानें सर्व पाश्चिमात्य व दाक्षिणात्य राजांना जिंकलें. ह्याप्रमाणें पंचपांडवांनीं परराष्ट्रें काबीज करून स्वराष्ट्राला भर घातली. पुढें ह्या विख्यात धनुर्धारी पांडवांच्या सामर्थ्याचा डंका त्रिभुवनांत गाजलेला पाहून धृतराष्ट्राचें मन त्यांच्याविषयीं दूषित झालें. ह्या चिंतेनें त्याला झोंप देखील येईना. तो ह्याप्रमाणें चिंतेनें झुरत चालला असतां मंत्रज्ञ, राजनीतिकुशल मंत्रिश्रेष्ठ जो कणिक त्याला बोलावून तो ह्मणाला, 'पांडव दिवसानुदिवस आपल्या तेजानें पृथ्वी व्यापून टाकीत आहेत, हें मला कांहीं बरें वाटत नाहीं. तर अशा स्थितींत त्यांबरोबर प्रेमभाव ठेवणें नीतीचें होईल किंवा द्वेषभाव ठेवणेंच नीतीचें होईल? ह्यासंबंधानें मला आपलें निश्चित मत पाहिजे; ह्मणजे त्याप्रमाणें पुढे मी वर्तन ठेवीन.' हा प्रश्न ऐकून प्रसन्न मुद्रेनें राजनीतींत मृदु व तीक्ष्ण दोन्ही प्रकारचीं सांगितलेलीं नीतितत्वें कणिकानें त्याला सांगितलीं. तो ह्मणाला, 'राजा, मी सांगतों याकडे दुर्लक्ष करूं नकोस. नेहमीं सशस्त्र असून आपलें सामर्थ्य दाखवीत असावें. **आपलें छिद्र शत्रूच्या लक्षांत येऊं न देतां त्याचें छिद्र पाहून त्या ठिकाणीं घाव द्यावा.** नेहमीं सशस्त्र राहिल्यानें लोकांना आपली भीति राहते. **एखादें काम आरंभिले तर तें व्यवस्थित रीतीनें शेवटास लावावें.** कांटा समूळ उपटून न टाकतां त्याची कूस राखिली तर ती बराच कालपर्यंत त्रास देते. अपकार करणाऱ्या शत्रूला मारणें हेंच न्यायाचें आहे. **शत्रू बलाढ्य असला तर वाट पहात राहून तो संकटांत सांपडला असतां विचार न करितां त्याला चिरडून टाकावें.** एखादा महावीर असला तर त्यावर प्रसंग येण्याची वाट पहात राहून प्रसंगांत त्याला गांठावें. अशा प्रसंगीं मात्र विचार करीत बसण्यांत अर्थ नाहीं. **दुर्बल शत्रूचीही उपेक्षा करणें योग्य नाहीं.** ठिणगी लहान असते तरी तिला साहाय्य मिळाल्याबरोबर ती अरण्याचीं अरण्यें जाळून फडशा उडविते. **प्रसंगीं कानाडोळा अगर ऐकलें न ऐकलेंसें देखील करावें.** कारण अपराध्यांना शासन करण्याचें अंगीं सामर्थ्य नसलें म्हणजे त्यावेळीं त्यांकडे दुर्लक्ष करून आपलें मनुष्य काडीचें आहे असें समजून पा-

रध्याप्रमाणें दबा धरून बसणेंच हिताचें आहे. **सांत्वादि उपायांनीं तो तावडींत आल्यावर शरण आला ह्मणून त्यावर दया न करतां त्याला नाहींसें करावें. शत्रूला नाहींसा केला ह्मणजे कांहीं भीति न उरतां मनाची हुरहुर दूर होते.** ह्या संबंधांत कितीही द्रव्य खर्चण्याचा प्रसंग आला तरी मागें पुढें पाहूं नये. शत्रुरूपी वृक्षाचें मूळच उपटून टाकलें असतां त्याच्या शाखासंबंधानें भीति उरत नाहीं. मुळांत घांव दिल्यानें फांद्याची वाढ अर्थात खुंटते. **शत्रूसंबंधानें दक्ष राहून आपले बेत त्याला कळूं देऊं नयेत,** व त्याच्या छिद्रांकडे आपलें नेहमीं लक्ष असावें. सपत्नासंबंधानें निश्चिंत कधीं असूं नये. अग्निहोत्र,यज्ञ, व काषायवस्त्रधारण इत्यादि दांभिक आचारांनीं शत्रूच्या मनांत विश्वास उत्पन्न करून लांडग्याप्रमाणें त्यावर झडप घालावी. **संपत्ति आपल्याकडे आकर्षवून घेण्याला बाह्य शुचिर्भूतता ही, फल संपन्न शाखेला वांकवून पक्कफळें तोडण्याला ज्याप्रमाणें आंकडी,त्याप्रमाणें उपयोगीं पडते. ह्या जगांत शाहण्यांनीं आरंभिलेलीं कामें शेवटाला जातात. संधि येईपर्यंत वैऱ्याला खांद्यावर देखील वहावें व वेळ आली असतां कच्च्या मडक्याप्रमाणेंच दगडाबर आपटून फोडून टाकावें.** गरीब झाला ह्मणून त्याला सोडूं नये.अपकाऱ्याला ठार करणेंच योग्य आहे.साम,दान, भेद, दंड ह्यांपैकीं कोणत्याही उपायोंने वैऱ्याला ताब्यांत आणून नाहींसें करावें. भितऱ्याला भेदानें, शूरला सामानें, लोभ्याला दानानें व जोडीच्याला दंडानें जिंकावें. ह्या संबंधानें तुला एक गोष्ट सांगतों ऐक.

कोणी एक बुद्धिमान स्वार्थसाधु कोल्हा, वाघ, उंदीर, लांडगा व मुंगूस ह्यांबरोबर सख्य करून एका अरण्यांत रहात होता. तेथें एक बलाढ्य हत्ती होता. त्याला मारण्याला कोणीच समर्थ नसल्यामुळें त्यांनीं आपसांत विचार केला. कोल्हा ह्मणाला, 'वाघोबा, आपण ह्याला मारण्याला अनेक उपाय केले; पण कोणाच्याही अंगीं त्याला मारण्याइतकें सामर्थ्य, चलाखी किंवा कुशाग्रबुद्धि नाहीं. औंतां माझी युक्ति ऐक. हा निजला असतां उंदरानें ह्याचे पाय कुरतडावे. नंतर त्याला मारणें सोपें जाईल. मग आपणा सर्वांना आनंदानें त्याचें मांस खातां येईल. याप्रमाणें सल्ला मिळाल्यावर उंदरानें त्या हत्तीचे पाय कुरतुडले. मग वाघानें त्याला ठार मारलें. तें हत्तीचें धड जमिनीवर पडलेलें पाहून मनांत पापवासना येऊन कोल्हा त्यांना ह्मणाला, 'तुह्मी स्नान करून या. तुह्मी येईपर्यंत मी याचें येथें रक्षण करतों. नंतर ते सर्व नदीला गेले. कोल्हा त्या ठिकाणीं काय युक्ति करावी ह्मणून विचारांत गढून गेला. प्रथम वाघाला आलेला पाहून कोल्ह्यानें त्याकडे चिंतातुर मुद्रेनें पाहिलें. 'तूं असा चिंतातुर कां दिसतो आहेस,' ह्मणून वाघानें त्याला विचारलें असतां तो ह्मणाला, 'त्या शौर्यशाली व्यर्थ गर्जना करणाऱ्या मृगराजाच्या शक्तीला धिक्कार असो, माझ्या बाहुबलाच्या साहाय्यानें मिळालेली ही माझी शिकार खाऊन तो आज आपली भूक भागविणार असें मजपाशीं उंदीर ह्मणत होता.' वाघ ह्मणाला, 'जर त्याचें असें ह्मणणें असेल तर मीही आपल्या बाहुबलानेंच श्वापदें मारून आपली भूक भागवीन.' असें ह्मणून तो निघून गेला. इतक्यांत उंदीर त्या ठिकाणीं आला. त्याला तो ह्मणाला, 'दादा, ईश्वर तुला सुखी ठेवो. आज मुंगूस माझ्यापाशीं ह्मणाला कीं, 'हें हत्तीचें मांस विषतुल्य असल्यानें मी खाणार नाहीं. तूं मुकाट्यानें ऐस. मी उंदरालाच खाऊन टाकतों.' हें ऐकून उंदीर घाबरून बिळांत शिरला. त्याच्या मागून लांडगा तेथें स्नान करून आला. तेव्हां 'वाघ रागावला आहे, मला तुझी धडगत दिसत नाहीं,' अशी त्याला बुचकावणी दाखवून कोल्ह्यानें त्याची तेथून रवानगी केली. इतक्यांत मुंगूसही तेथें आला. त्याला कोल्हा ह्मणाला, 'आपल्या बाहुबलानें व्याघ्रादिकांना जिंकून मीं येथून घालवून दिलें आहे. हें मांस पाहिजे असेल तर प्रथम माझ्यापाशीं युद्ध करून तें मिळीव.' तेव्हां व्याघ्रादिकांना युद्धांत जिंकल्यामुळें त्यांहून हा विशेष पराक्रमी असावासें वाटून तोही तेथून निघून गेला. ह्याप्रमाणें ते सर्व निघून गेल्यावर मोठ्या आनंदानें आपल्या सुनीतीच्या निश्चित फलाचा तो एकटाच उपभोग बेत राहिला.

ह्मणून शत्रुस्थानीं असणारा, मग तो बाल असो, वा मित्र असो, बंधु असो वा बाप असो, किंवा गुरू असो वा कोणी असो, त्याला ठारच केलें पाहिजे. खोटी **शपथ देऊन, द्रव्यानें, विषानें अथवा कपटानें उपेक्षा न करतां शत्रूला ठार करणेंच श्रेयस्कर आहे.** दोघे प्रतिपक्षी ज्या वेळीं सारख्या संकटांत असतील त्या वेळीं मंत्रसिद्धीवर ज्याची विशेष श्रद्धा असते त्यालाच जय मिळतो. कार्याकार्य न जाणणारा उन्मार्गगामी असा गर्विष्ठ मनुष्य प्रत्यक्ष आपला गुरू असला तरी त्याची खोड मोडणेंच रास्त आहे. राग आला तरी तो न दाखवितां भाषण गोड ठेवावें. विकारवश होऊन कोणाचा नाश करण्याला प्रवृत्त होऊं नये. शत्रूवर घाव घालतांना देखील भाषण मिष्ठा असावें, व घाव मारून मग वाटेल तेवढी दया दाखवावी, दुःख प्रदर्शित करावें व अश्रू ढाळावे. सांत्वदानानें शत्रु ताब्यांत आल्यावर त्याला कडकपणानें वागवूं नये. पण तो इकडे तिकडे करूं लागला कीं, त्याला चिरडून टाकावें. **धर्माचा डौल घालणाऱ्या दांभिकानें मोठा अपराध केला तरी तो नीलमेघाच्छादित पर्वताप्रमाणें झांकला जातो. अशा गर्हणीय शत्रूची उपेक्षा उपयोगाची नाहीं. देहांत शासन दिलेल्या मनुष्याचें घर जाळून टाकावें. दरिद्री, धर्मलंड व चोर अशांना अपल्या राष्ट्रांत थारा देऊं नये.** हल्ला, छापा, विषप्रयोग, फितूरी इत्यादि अनेक उपायांनीं शत्रु नाहींसा करावा. त्या संबंधानें कितीही निष्ठुरपणा दाखविला तरी त्यांत दोष नाहीं. शत्रूचा बराबर रीतीनें चावा घेतां यावा ह्मणून आपले दांत चांगले पाजळून ठेवावे व चावा अशा रीतीनें ध्यावा कीं, फिरून त्याला आपलें डोकें वर काढतां येऊं नये. **ज्या संबंधानें शंका घेण्याला मुळींच कारण नाहीं अशा संबंधानें सुद्धां सशंक राहवें** व ज्या संबंधानें शंका घेण्याला जागा आहे त्या संबंधानें तर मोठ्या हुशारीनें असावें. अविश्वसनीयावर कधीं विश्वास टाकूं नये व विश्वसनीयावरही कधीं फारसें विसंबून राहूं नये. **विश्वास टाकून राहिल्यामुळें उद्भवणारें संकट आपल्या समूळ नाशाला कारण होतें. स्वपरराष्ट्रांत हेरांचा संचार ठेवावा व परराष्ट्रांत पाठवावयाचे हेर कपटपटु असून तापस वेषामध्यें असावे, व त्यांनीं उद्यानें, विहारस्थानें, देवालयें, पानगृहें, राजमार्ग, त्रवाट्याच्या जागा, पाणवठे, तीर्थांचीं ठिकाणें, मेळे, इत्यादि जनसंचाराच्या ठिकाणीं फिरून बारीक नजर ठेवावी.** घोर कर्म आचरते वेळीं देखील कटु भाषण न करतां भाषण मृदु ठेवावें. नम्रता, सांत्वपूर्वक प्रियवचन, लीनता, आशा लावणें, इत्यादि गुण अभ्युदयेच्छूनें अवश्य अंगीं ठेविले पाहिजेत. भाषण गोड ठेऊन हृदय मात्र तरवारीच्या धारेप्रमाणें तीक्ष्ण ठेवावें. **नीतितत्त्वाचें पूर्ण ज्ञान असणारा मनुष्य पुष्पसंपन्न पण फलहीन अशा वृक्षासारखा असला पाहिजे. तो फलसंपन्न असेल तर तीं फलें सहज हातीं लागतां कामा नये, व त्यांपैकीं कांहीं कलें अपक्व असलीं तरी तीं पक्वासारखीं भासविण्याची खटपट करावी.** अशा रीतीनें वागणारा कधीं नाश पावत नाहीं. सद्गुण, संपत्ति व सुख ह्या सर्वांचीं इष्टानिष्ट फलें परस्परांत गुंतलीं असतात. इष्टफल प्राप्त करून घेते वेळीं अनिष्ट फल दूर राहील अशी खबरदारी घेतली पाहिजे. नेहमीं धर्माच्या मार्गे लागल्यानें अर्थ व काम यांचा उपभोग होत नाहीं व त्यामुळें कष्ट सोसावे लागतात. अर्थार्जनाच्या मार्गे लागलेल्यांना बाकीच्या दोहींकडे हयगय होत असल्यामुळें दुःख होतें, व कामाच्या मार्गे लागलेल्यांना धर्मार्थांकडे दुर्लक्ष झाल्यानें दुःख प्राप्त होतें. ह्मणून ज्या योगानें पश्चात्ताप होणार नाहीं अशा रीतीनें ह्या तिहींचें यथान्याय सेवन झालें पाहिजे. एखादें कार्य शेवटास न्यावयाचें असल्यास **द्वेषबुद्धि न दाखवितां नम्रता व आदर दाखवून मनापासून ब्राह्मणांचा सल्ला घ्यावा.** संकटांत पडलें असतां मृदु अथवा तीक्ष्ण, वाटेल त्या उपायानें त्यांतून पार पडण्याचा प्रयत्न करावा, व सुरळीत असेल तेव्हां न्यायानें वागावें. **संकटाला तोंड दिल्यावांचून मनुष्याला चांगले दिवस दृष्टीस पडत नाहींत.** त्याला तोंड देऊन त्यांतून जगून वांचून राहिल्यास मनुष्य चांगले दिवस खात्रीनें पाहतो. **ज्याचें मन शोकानें अस्वस्थ झालें आहे त्याला पुराणकथा सां-**

गून, मूर्खाला पुढची आशा दाखवून व शहाण्याला खरी खरी हकीकत त्याच्यापुढें ठेवून वश करून घ्यावें, जो शत्रूशीं संधि करून आपणाला कृतकृत्य मानून निर्धास्त राहतो तो झाडाच्या शेंड्याला निजलेल्या मनुष्याप्रमाणें सपशेल खालीं पडून नाश पावल्यावांचून रहात नाहीं. मंत्र मोठ्या प्रयत्नानें गुप्त ठेवावा व हेरांचा पाठिंबा असला तरी आपलें **खरें स्वरूप कोणाला कळूं देऊं नये.** एकाद्या अचाट कृत्यानें शत्रूच्या मर्मस्थानीं डाग देऊन त्याचा समूळ नाश केल्याखेरीज धीवराप्रमाणें पुष्कळ संपत्ति कधीं मिळत नाहीं. सायुध अशा शत्रूच्या सैन्याचें बल शेतामधून उगवलेल्या गवताप्रमाणें उपटून अथवा कापून काढावें, किंवा अनेक रोग, अथवा अन्नपानादिकांचें दुर्भिक्ष्य उत्पन्न करून हरण करावें. **निर्धन साधनाकडे कधीं प्रेमभावानें येत नाहीं. कृतार्थ मनुष्य कोणाची पर्वा ठेवीत नाहीं; ह्मणून कोणाचेंही आपल्याकडे असलेलें काम आपल्याला त्याची जरूर आहे तोंपर्यंत पूर्णपणें करून न टाकतां शिल्लक ठेवावें,** जयिष्णु पुरुषानें मोठ्या हुशारीनें आपल्या पक्षाला लोक मिळवून काळजीनें युद्ध करावें व आपल्या सर्व व्यवसायांत दूरदर्शित्व दाखवावें. दूरदर्शी राजानें नेहमीं अशा तऱ्हेनें वागावें कीं, **त्याच्या मित्रांना किंवा शत्रूंना त्याचे हेतु कार्य हातीं घेण्यापूर्वी कधीं कळूं नयेत. संकट आलें नाहीं तोंपर्यंत त्याची भीति बाळगून त्यासंबंधानें हुशारीनें रहावें. पण संकट येऊन गुदरल्यावर धैर्यानें त्याला तोंड देणें हेंच शहाण्याचें काम आहे.** बलानें जिंकलेल्या शत्रूवर जो विश्वास टाकतो तो, खेचरीण ज्याप्रमाणें गर्भधारणेनें आपण होऊन आपल्यावर मरण आणून घेते त्याचप्रमाणें कालाला निमंत्रणपत्रिका पाठवितो. **उद्यां येऊन गुदरणाऱ्या संकटाच्या प्रतिबंधाच्या तजविजीला आज लागावें.** नाहीं तर तें येऊन गुदरल्यावर धांदल उडून जाऊन एखाद्या महत्त्वाच्या मुद्याकडे दुर्लक्ष होण्याचा संभव असतो. मोठेपणाला चढूं इच्छिणारानें देशकालानुरूप उपाय योजले पाहिजेत. व मंत्रतंत्रादि दैविक व यज्ञादि भौतिक उपायांची त्यानें संकट टाळण्यासाठीं योजना केली पाहिजे. देशकालाकडे लक्ष दिल्यानें अनेक प्रसंगीं महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्याचीं उदाहरणें आहेत. यःकश्चित् कसपटानें पेट घेणारी ठिणगी देखील ज्याप्रमाणें मोठमोठ्या ओंडक्यांचा जाळून फडशा उडविते, त्याप्रमाणें क्षुल्लक शत्रु देखील साह्य मिळवून बलाढ्य होऊन आपल्या प्रबल शत्रूचा नाश करूं शकतो. **शत्रूला लावलेली आशा पूर्ण न करतां कांहीं तरी सयुक्तिक कारण सांगून नेहमीं कालावधीवर टाकीत असावें.** शत्रुनाशाला नेहमीं पाजळलेल्या वस्तऱ्याप्रमाणें तयार असावें. तो ज्याप्रमाणें धोकटींत गुपचिप राहून प्रसंगीं बाहेर पडून डोक्याचा व दाढीचा एक देखील केंस ठेवीत नाहीं त्याप्रमाणें आपले उद्देश झांकून ठेवून प्रसंगीं शत्रूवर घाव घालून त्याचा व तत्पक्षीयांचा फडशा उडवावा. हे कुरुकुलवर्धना, पांडवांशीं व इतरांशीं नीतिशास्त्रानुसार असें वर्तन ठेव कीं, त्या योगानें तुला पश्चात्तापाला जागा उरूं नये. तुला कांहीं कमी नसून तुझें घर लक्ष्मीचें माहेर आहे. मात्र पांडवांसंबंधानें खबरदारी बाळग. तुझ्या मुलांपेक्षां ते फारच बलवान आहेत, ह्मणून नीतिबलानें त्यांना नाहींसें करण्याचा कांहीं तरी उपाय कर.'

---

३६. पांडवांना लाक्षागृहांत जाळून टाकण्याची दुर्योधनानें केलेली खटपट.

(१. १४३–१५०)

बळानें सर्वांपेक्षां अधिक भीम व सर्व शस्त्रास्त्रांमध्यें निष्णात अर्जुन ह्यांना पाहून पौरजन त्यांचे गुणानुवाद माऊं लागले, व ज्येष्ठ पुत्र जो धर्मराज याचा राज्यावर हक्क व त्यासंबंधानें त्याची पात्रता यांची भरसभेंत व चव्हाट्यावर एकत्र जमून लोक चर्चा करूं लागले. धर्मराज वृद्धसेवी असून सत्य व दया ह्यांचा सागर होता. त्याला राज्याभिषेक व्हावा अशी सर्वांची इच्छा दिसूं लागली. युधिष्ठिरासंबंधीं प्रेमदर्शक हें पौरांचें कर्णकटु भाषण जेव्हां दुर्योधनाच्या कानीं पडूं लागलें तेव्हां तो संतप्त होऊन बापाला एकांतांत गांठून म्हणाला, 'बाबा,

पौरांची भलतीसलती बडबड माझ्या कानावर येऊं लागली आहे. तुम्हांला राज्यावरून काढून टाकून भीष्मांना आपले नायक करण्याची त्यांची फार इच्छा आहे. भीष्म तर त्यासंबंधानें निरपेक्ष आहेत. पौरजन आम्हांला पाण्यांत पाहतात. पूर्वी पंडूनें वडिलोपार्जित गादीला आपल्या गुणांनीं बळकटी आणिली. आपण अंध असल्यामुळें त्या वेळीं आपला हक्क असून ती आपल्याला मिळाली नाहीं. आतां ही जर परंपराक्रमानें युधिष्ठिराला मिळेल तर पुढेंही त्यापासून त्याच्या मुलाकडेहि खास जाणार व पुढें त्याचे वंशज हिचा उपभोग घेणार. आमचाही प्रत्यक्ष राजवंशांत जन्म झाला असून पुत्रपौत्रांसह-बर्तमान आम्ही मागें पडून नेहमीं परान्नजीवी होणार. तर आम्हांवर हा कष्टमय प्रसंग येणार नाहीं, अशी कांहीं तरी तजवीज करा.' हें मुलाचें भाषण ऐकून ब कणिकाची सल्ला मनांत आणून धृतराष्ट्र मोठ्या विचारांत पडला व काय करावें हें त्याला सुचेना. त्या वेळीं दुर्योधन, कर्ण, शकुनि व दुःशासन ह्यांनीं आपसांत मसलत करून पांडवांना कांहीं सामोपायांनीं वारणावताला राहण्याला पाठवावें, असें ठरबून दुर्योधनाकडून धृतराष्ट्राला लसें कळविलें. तें मुलाचें भाषण ऐकून धृतराष्ट्र म्हणाला, 'नेहमीं धर्मानें वागणाऱ्या पंडूचें आपल्या ज्ञातीशीं व विशेषतः माझ्याशीं सरळ वर्तन असे. माझ्या आज्ञेशिवाय तो घास देखील घेत नसे. हा त्याचा मुलगाही त्याच्यासारखाच धर्मपरायण, गुणवान, लौकिकसंपन्न व लोकप्रिय आहे. ह्यामुळें वडिलोपार्जित राज्यापासून त्याला दूर करणें सोपें काम नाहीं. पंडूनें आमात्यवर्ग, सैन्य, ज्ञाति व सर्व पौरजन ह्यांचें उत्तम प्रकारें पालनपोषण व सत्कार केला आहे. म्हणून प्रसंगीं युधिष्ठिरासाठीं आमच्या बंधुवर्गासह आमचा समूळ नाश करण्यालाही ते तयार होतील.' दुर्योधन म्हणाला, 'हा आमच्यामधला दोष लक्षांत घेऊनच मीं सर्व अमात्यवर्गाला धनमानानें संतुष्ट ठेवून वश करून घेतलें आहे. ते खचित आपल्याला साह्य करतील. विशेषेंकरून आमात्य व कोश हे हल्लीं माझ्या ताब्यांत आहेत. आपण तूर्त पांडवांना सामोपायानें वारणावताला कांहीं दिवस रहाण्यास पाठवूं. राज्यसूत्र पूर्णपणें माझ्या हातीं आलें म्हणजे त्या सर्वांना परत आणण्याला हरकत नाहीं.' हें ऐकून धृतराष्ट्र म्हणाला, 'वत्सा, माझ्याही मनांत हें फार दिवस घोळत आहे. पण हा दुष्ट उद्देश माझ्यानें आजपर्यंत बाहेर काढवला नाहीं. भीष्म, द्रोण, विदुर, व कृप हे पांडवांना बाहेर घालविण्यास कधीं कबूल होणार नाहींत. आम्ही व पांडव त्यांना सारखेच आहों. ते शहाणे असून नेहमीं न्यायमार्गानें जाणारे असल्यामुळें ह्या अन्यायप्रवृत्तीला ते कधीं कबूल होणार नाहींत.' हें ऐकून दुर्योधन म्हणाला, 'भीष्म नेहमीं त्रयस्थ असतात. द्रोणपुत्र माझ्या बाजूला आहे. व जिकडे मुलगा तिकडे द्रोण असणार. व जिकडे हे दोघे तिकडे कृप असणार. विदुर अन्नवस्त्रानें आमचे मिंधे आहेत तरी आंतून त्यांचा पांडवांकडे ओढा आहे हें खरें; पण ते एकटे कोणत्याही रीतीनें आम्हांला अपाय करण्याला समर्थ नाहींत. म्हणून कांहीं मनांत चिंता न बाळगतां आजच्या आज आपण पांडवांना वारणावताला पाठवा व मला झोंप देखील न येऊं देणारें हें माझ्या हृदयांतलें शल्य उपटून काढा.' नंतर दानमानानें वश केलेल्या प्रजेकडून व हुशार मंत्रीमंडळीकडून दुर्योधनानें शंकरप्रीत्यर्थ वारणावत येथें मोठी जत्रा भरणार आहे अशी कंडी पिकविली. त्या नगराचें भव्य वर्णन वारंवार त्यांपासून ऐकून 'आश्रित व भृत्यवर्ग यांसह उत्सव पहाण्याला वारणावताला जा व तेथें ब्राह्मणांना व गायकांना पुष्कळ द्रव्य व रत्नें यांनीं संतुष्ट करून कांहीं काल आनंदांत घालवून हास्तिनापुराला परत या,' असें धृतराष्ट्रानें पांडवांना सांगितलें. धृतराष्ट्राची इच्छा व आपला पाठिंबा मनांत आणून युधिष्ठिर जाण्याला कबूल झाला. निघण्याच्या वेळीं भीष्मद्रोणादि मान्यांना, आमात्यांना, तपस्वी ब्राह्मणांना, पुरोहितांना व गांधारीला युधिष्ठिर दीनवाणें ह्मणाला, 'धृतराष्ट्रांच्या आज्ञेनें आम्ही सेवकजनांसह वारणावताला जात आहों. आपण सर्वांनीं खऱ्या अंतःकरणानें आह्मांला आशीर्वाद द्यावा ह्मणजे आह्मांला कांहीं भीति नाहीं.' नंतर सर्वांनीं त्याप्रमाणें केल्यावर मंगल करून पांडव वारणावताला निघाले असतां 'मार्गांत पिशाचापासून तुमचें रक्षण होवो, तुमच्यावर कांहीं संकट न येवो,' म्हणून ओरडत पौरजन त्या-

च्या मागून चालले. इकडे दुर्योधन आनंदानें पुरोचनसचिवाला एकांतांत बोलावून त्याचा उजवा हात धरून ह्मणाला, 'पुरोचना, ही वसुसंपूर्ण पृथ्वी माझी तशीच तुझी आहे: दोघांनाही तिचें संरक्षण केलें पाहिजे. तुझ्यापेक्षां विश्वासु मित्र मला कोणी मिळणार नाहीं. म्हणून माझें हृदय तुझ्यापाशीं उघडें करतों. मित्रा, हा मंत्र बाहेर पडूं देऊं नको. दायादांच्या कचाटांतून आह्मांला सोडीव. पांडव वारणावताला जात आहेत. एकदम तूं तेथें शीघ्रगामी खेचर जोडलेल्या रथांतून जा. नगराजवळ एकचौकी वाडा मोठ्या गुप्त रीतीनें तयार करवून त्यांत पुष्कळ ज्वालाग्राही द्रव्यें भरून ठेव. ताग, राळ इत्यादि पदार्थांचा त्या ठिकाणीं यथेच्छ संग्रह असूं दे. तूप, तेल, चरबी व लाख मातींत मिसळून त्यांचें भिंतींना जाड लिंपण देवीव. अशा प्रकारचें घर तयार करून त्या ठिकाणीं त्यांना राहण्याला घेऊन जा. त्या ठिकाणीं मौल्यवान बैठकी, उत्तम बिछाने इत्यादि सर्व सुखाचे पदार्थ तयार ठेव. पण आपलें कपट त्यांच्या दृष्टोत्पत्तीला न येण्याची मात्र खबरदारी घे. तुझ्यावर पूर्ण विश्वास बसून निर्भयपणें ते त्या ठिकाणीं राहूं लागल्यावर रात्रीचा समय पाहून ते निजले असतां गृहद्वाराला बत्ती देऊन तूं बाहेर पड. सहज पेटून ते जळले अशी लोकांची समजूत झाली ह्मणजे आपण लोकापवादापासून मुक्त होऊं.' त्या अर्थांकित पुरोचनानें 'बरें' ह्मणून सांगितल्याबरहुकूम सर्व तयारी केली. पांडवांनीं वायुगति घोडे जुंपून रथ तयार केल्यावर निघण्यापूर्वी भीष्मद्रोणादि कुरुवृद्धांचे पाय धरून त्यांना अभिवंदन केलें, व बरोबरीच्यांना आलिंगन दिलें. नंतर लहानांचे नमस्कार घेऊन सर्व मातृवर्गाचा निरोप घेऊन प्रदक्षिणा करून ते वारणावताला निघाले. विदुर, इतर कुरुश्रेष्ठ व पौरजन अश्रु ढाळीत त्यांच्या मागून गेले. ते चालले असतां कांहीं ब्राह्मणांना त्यांची अनाथ स्थिति पाहून फार वाईट वाटून निर्धास्तपणें ते उघड बोलूं लागले कीं, 'ह्या दुरात्म्या धृतराष्ट्राची समदृष्टि गेली. त्याला धर्माची देखील चाड उरली नाहीं. पुण्यशील युधिष्ठिर, बलशाली भीम आणि धनंजय ह्यांच्या मनांत दुष्टबुद्धि कधीं यावयाची नाहीं. व हे मुकाट्यानें राहिले ह्मणजे नकुलसहदेवांचेंही कांहीं चालावयाचें नाहीं ह्मणून ह्यांचे हे खेळ चालले आहेत. पांडवांना ह्या राज्यावर हक्क वडिलोपार्जित मिळाला आहे हें त्यांच्या डोळ्यांत सलत आहे. घर सोडणें जरी मोठें कष्टाचें आहे तरी आह्मी आपलीं घरेंदारें सोडून युधिष्ठिराच्यामागून जाण्याला तयार आहों.' हें ब्राह्मणांचें दुःखकारक भाषण ऐकून युधिष्ठिर ह्मणाला, 'वृद्ध सर्वांना मान्य असून सर्व गुरूंमध्यें ते श्रेष्ठ गुरु समजले आहेत. राजाची आज्ञा मनांत कांहीं किंतु न आणतां आह्मीं पाळली पाहिजे. तुह्मांला आमची कळकळ आहे तर आह्मांला प्रदक्षिणा करून आशीर्वाद देऊन परत जा. कारण पडेल तेव्हां आमचें प्रिय करण्याला तयार असा ह्मणजे झालें.' हें ऐकून त्यांच्या आज्ञेनुरूप पौरजन मागें परतले. तेव्हां सुज्ञ व शहाण्यांचें इंगित तावडतोब ओळखणारे विदुर शहाण्या व सुज्ञोक्ति ताडण्याचें ज्ञान असणाऱ्या युधिष्ठिराला म्हणाले, 'ज्याला नीतिशास्त्रानुसारिणी परबुद्धि ताडण्याची शक्ति आहे त्यानें संकटांतून पार पडतां येईल अशा रीतीनें हुशारीनें वागावें. ज्वालाग्राही स्वरूपमोहक अशा बाह्यात्कारानें झांकून जीं नाशकारक दुष्ट साधनें नाशाला सिद्ध असतात तीं ओळखून जो त्यांच्या प्रतिकाराला समर्थ असतो त्यापुढें शत्रूचें कांहीं चालत नाहीं. आपल्याबरोबर असणाऱ्याला अग्नीच्यां साह्यानें आपल्याला जाळतां येऊं नये म्हणून विवरमार्ग करून जो राहतो तोच बचावतो. आंधळ्यांला कधीं मार्ग दिसत नाहीं, व दिशा कळत नाहींत. मूर्खाला किती शिकाविलें तरी कधीं शहाणपण यावयाचें नाहीं हें पूर्ण लक्ष्यांत ठेव. शत्रूंनीं राहण्यासाठीं ज्वालाग्राही गृह दिलें असतां त्याला असंख्य द्वारें ठेवून आपली सुटका करून घेतां येते. हिंडल्यानें अनेक मार्ग कळतात व नक्षत्रांवरून दिशांचें ज्ञान करून घेतां येतें. मनासह पंचेंद्रियें ज्याच्या स्वाधीन आहेत त्याला शत्रूपासून कधीं बाधा होत नाहीं.' हा विदुराचा उपदेश ऐकून घेऊन त्या विद्वद्वर्याला 'समजलों' असें उत्तर देऊन युधिष्ठिरानें त्याची आज्ञा घेतली. वाटेंत कुंतीनें त्याला विचारिलें, 'सर्वांसमक्ष विदुरांचा व तुझा संवाद चालला असतां विदुरांनीं तुला कांहीं सांगितलें

व तूंही त्यांना 'समजलों' म्हणून उत्तर दिलेंस; पण त्याचा अर्थ आमच्या मुळींच लक्ष्यांत आला नाहीं. आम्हांला कळविण्याजोगें असेल तर ऐकण्याची माझी फार इच्छा आहे.' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'ज्वालाग्राही घरामध्यें अग्नीपासून भीति उत्पन्न होणार, तेव्हां आम्हांला माहीत नाहीं अशा गुप्त विवरमार्गानें निघून जाण्यास सांगितलें व 'तें सर्व मला समजलें,' असें मीं त्यांना उत्तर दिलें.' फाल्गुन शुद्ध अष्टमीला रोहिणीनक्षत्रावर निघून ते वारणावताला येऊन पोहोंचले. त्या वेळीं सर्व पौरजन यथाशास्त्र मंगलसाहित्य घेऊन त्यांना सामोरे आले व जयाशीर्वाद देऊन त्यांच्या भोंवतीं उभे राहिले. पौरांचा सत्कार घेऊन लोकांनीं गजबजलेल्या व शृंगारलेल्या त्या नगरीमध्यें ते शिरले. आंत शिरल्यावर स्वकर्मरत ब्राह्मणांच्या व ग्रामाधिकाऱ्यांच्या त्याचप्रमाणें ठळक ठळक वैश्यशूद्रांच्या घरांत जाऊन त्यांची भेट घेऊन पुरोचनासहवर्तमान त्यांच्यासाठीं तयार केलेल्या शिवनामक त्या अशिव गृहीं गुप्तकानें कैलासामध्यें शिरावें त्याप्रमाणें आपल्या सेवकजनांसह ते शिरले. त्या ठिकाणीं पुरोचनानें त्यांना खाण्यापिण्याची सर्व उत्तम प्रकारें तरतूद करून ठेविली होती. ते त्या ठिकाणीं असतांना पौरजन त्यांच्या सेवेला हजर असत. त्यांत शिरल्यावर तूप, लाख, चरबी, इत्यादि ज्वालाग्राही पदार्थांचा उग्र वास आल्यावरून तें ज्वालाग्राही गृह दुर्योधनाच्या आज्ञेनें विरोचनानें आपल्याला जाळून टाकण्यासाठीं तयार केलें आहे असें युधिष्ठिरानें सुचविलें, व हितेच्छु विदुरांनीं ती बातमी आपल्याला पूर्वीच दिल्याचेही त्याबरोबर कळविलें. नंतर तो म्हणाला, 'बाहेर कढूं न न देतां इष्ट मार्गाच्या शोधांत राहून आपण येथें हुशारीनें रहावें हेंच मला ठीक दिसतें. आमची हालचाल पुरोचनाच्या लक्षांत येईल तर येथें एकदम बलात्कारानें देखील तो आम्हांला जाळून टाकण्याला मागें पुढें पहाणार नाहीं. जनापवाद अगर धर्म ह्याची त्याला मुळींच चाड नाहीं; व आम्हीं जळून भस्म झाल्यावर भीष्म तरी आमच्यासाठीं राग दाखवून कौरवांचें मन व्यर्थ कां दुखवितील ? आम्ही जर अग्नीच्या भीतीनें पळून गेलों तर सुयोधन हेरांच्या द्वारें खचित आमचा नाश करील. सैन्य, मनुष्यबल व खजिना हल्लीं त्याच्या स्वाधीन असल्यानें सैन्यहीन, साहाय्यहीन, व द्रव्यहीन अशा आमचा त्याच्यापुढें निभाव लागणें कठीण. ह्याच ठिकाणीं राहून ह्या दुष्टाला व पापी दुर्योधनाला आपण फसविलें पाहिजे. मृगयेच्या मिषानें हिंडून रानांतल्या सर्व वाटा माहीत करून घेतल्या पाहिजेत. आजच आपल्या मंदिरांतून गुप्तरीतीनें विवरमार्ग तयार करण्याच्या उद्योगाला लागूं. आपले हेतु गुप्त ठेवून ह्याप्रमाणें आम्हीं वर्तन ठेवूं लागलों तर अग्नीपासून आपल्याला अपाय होणार नाहीं.' पांडव लाक्षागृहांत रहात असतां विदुरांनीं त्यांची काळजी मनांत घरून पाठविलेला त्याचा कोणी हुशार खनक या नांवाचा मित्र पांडवांकडे येऊन त्यानें त्यांची एकांतांत गांठ घेतली. त्या शुचिष्मंत, आप्तप्रिय व दृढभक्तिमान मनुष्याला ओळखून युधिष्ठिर ह्मणाला, 'सुज्ञाला कळत नाहीं असें कांहींच नाहीं. विदुरांप्रमाणेंच आपला आम्हांविषयीं सद्भाव आहे. त्यांच्याप्रमाणेंच आपणही आमची काळजी घेतली पाहिजे. ह्या घोर अग्नीपासून आमचें रक्षण करणार आपणच आहां, पुरोचनाला न कळत आम्हांला ह्या संकटांतून सोडवा.' बरें म्हणून त्यानें मोठ्या युक्तीनें एक भुयार जमिनीबरोबर खणून त्यांतून एक विवरमार्ग तयार केला. रात्रीं ते सर्व हत्यारबंद त्या गृहांत रहात व दिवसां मृगयेसाठीं ह्मणून रानांतून हिंडत. विश्वास नसतां पूर्ण विश्वास दाखवून मनांतून जळफळत व वरून संतोष दाखवून ते त्या ठिकाणीं पुरोचनाच्या डोळ्यांत धूळ टाकीत रहात होते. त्यांना तेथें पूर्ण एक वर्ष झाल्यावर त्यांच्या मनांत कांहीं संशय नाहींसा पाहून पुरोचन अगदीं खुलल्यासारखा दिसत होता. ही गोष्ट लक्षांत येऊन युधिष्ठिर आपल्या भावांना ह्मणाला, 'ह्या दुरात्म्याला आम्ही त्यावर पूर्ण विसंबून आहोंसें वाटतें. ह्याला आपण चांगलें फसविलें आहे. आतां घराला आग लावून पळून जावें हें मला बरें दिसतें. आपल्या ठिकाणीं कोणी तरी सहा मनुष्यांना येथें ठेवून गेलों ह्मणजे शंकेला कारण मुळींच रहाणार नाहीं.' नंतर एके द्विवशीं रात्रीं कुंतीनें कांहीं नैमित्तिक करून कांहीं लोकांना जेवावयास बोलाविलें होतें.

त्या ठिकाणीं जमलेल्या स्त्रिया यथेच्छ भोजन करून परत गेल्या. कर्मधर्मसंयोगानें तेथें एक निषादी आपल्या पांच मुलांसह भिक्षेला आली होती. मद्यपानानें अगदीं धुंद होऊन ती त्रेथेंच आपल्या मुलांसह निजली. मध्यरात्रीची वेळ असून भयंकर वारा सुटला होता व दिशा सुंद झाल्या होत्या. लोक जिकडे तिकडे गाढ झोंपीं गेले होते. अशा वेळीं पुरोचन निजला होता त्या ठिकाणीं घर पेटवून देऊन चोहोंकडून ते पेटल्यावर भीम आपल्या सर्व मंडळीला घेऊन भुयारांत शिरला. तें घर पेटलेलें पाहून पौरांना फार दुःख झालें. 'धिक्कार असो त्या मूढमति पुरोचनाला! ज्यानें दुर्योधनाच्या सांगण्यावरून आत्मविनाशासाठीं हें घर तयार करविलें, व त्यानें आपल्याबरोबर त्या नरोत्तमांनाही नाहींसें केलें, बरें तो नराधम ह्यांत जळून गेला एवढी तरी बरी गोष्ट झाली,' असें ते ह्मणूं लागले. इकडे पांडवांनीं विवरमार्गातून कोणाच्या दृष्टीस न पडतां बाहेर पडून वनाचा मार्ग धरला. झोंपमोड झाल्यानें व भीतीनें त्यांचें पाऊल उचलत नव्हतें. बलशाली भीम आईला खांद्यावर, त्या दोन जुळ्या भावांना खांकेंत व दोन वडील भावांना हातांमध्यें धरून उरानें झाडें मोडीत व पायानें रस्ता साफ करून मार्ग काढीत वायुगतीनें चालला होता.

३७. हिडिंबवध व घटोत्कचोत्पत्ति. (१. १५१–१५६)

ह्याच वेळीं धूर्त विदुरांनीं संकेताप्रमाणें शुद्धशील व विश्वसनीय असा एक मनुष्य वनांत पांडवांकडे पाठविला. त्याला ते एके ठिकाणीं नदीचा उतार पहाण्यांत गुंतलेले आढळले. त्यानें मोठ्या वाऱ्याला देखील दाद न देणारी व जीवर यंत्रसाधनें शीडें आहेत अशी विश्वसनीय लोकांकडून तयार करविलेली नदींतून चाललेली एक नाव त्यांना दाखवून दिली व पूर्वी विदुरांनीं निघते वेळीं केलेल्या उपदेशापैकीं कांहीं शब्द खुणेसाठीं उच्चारिले. 'कर्णदुर्योधनादि तुझ्या शत्रूंना तूं निःसंशय जिंकशील,' असा विदुरांचा निरोप युधिष्ठिराला सांगून त्यानें त्यांना नावेंत बसविलें, व 'कोंहीं काळजी करूं नका, तुह्मांला मार्गांत कांहीं संकटें येणार नाहींत,' असा आशीर्वाद देऊन तो परत गेला. नावाडी आपल्या हाताच्या जोरावर नेटानें नाव चालवीत होते. नदीचा प्रवाह जोरानें वहात होता व वारा अनुकूल होता यामुळें हं हं ह्मणतां ते पैलतीराला जाऊन पोहोंचले. तेथें नाव सोडून देऊन रात्रीचा समय असल्यानें नक्षत्रांच्या धोरणानें दिशाचें अनुमान काढीत ते गुप्तपणें पण झपाट्यानें पुढें चालले. अशा प्रकारें चालले असतां वाटेंत एक घोर अरण्य त्यांना लागलें. इकडे पौरांनीं पांडव व पुरोचन अग्नीनें जळून मेल्याची वर्दी धृतराष्ट्राला दिली. ही अनिष्ट बातमी ऐकून दुःख झालेंसें दाखवून राजानें आप्तसुहृदांना ताबडतोब वारणावताला जाऊन त्या नरवीरांचा उत्तरविधि यथोचित करण्यास सांगितलें व त्यांच्या नांवानें अनेक मोठमोठे तलाव, विहिरी, वगैरे कामें करविलीं, व स्वतः ज्ञातिवर्गासह त्यांना पाणी दिलें. 'हे धर्मराज, हे भीमा,' म्हणून प्रत्येकांच्या नांवानें सर्व प्रजा शोक करूं लागली. विदुरांना मात्र आंतील खरी हकीकत माहीत असल्यामुळें त्यांनीं उगीच वरकांतीं दुःख दाखविलें.

भीम आईला व बंधूंना त्या खडतर प्रदेशांतून पाठीवर वाहून नेत असतां त्याच्या मांड्यांच्या वेगानें हालवून सोडलेल्या वृक्षवल्लींसह तें सर्व वन हदरून गेलें होतें. **ज्येष्ठा व आषाढा ह्यांच्या संयोगकालीन महावाताप्रमाणें** त्याच्या मांड्यांचा वारा वहात होता. तिन्ही द्वारांतून मदस्राव होणाऱ्या साठ वर्षाच्या बलाढ्य हत्तीप्रमाणें तो महापराक्रमी मार्गांत येणारीं सर्व लहान मोठीं झाडें मोडीत चालला होता. गरुडाप्रमाणें तो झपाट्यानें चालला असतां ज्यांत फलमूलें व पाणी ह्यांचा अभावच होता ह्मटलें तरी चालेल, अशा क्रूर पशुपक्ष्यांनीं भरलेल्या एका घोर वनप्रदेशाला तो येऊन पोहोंचला. भयाण अशी झुंजुक पहाटेची वेळ झाली असून क्रूर पशुपक्ष्यांच्या शब्दांनीं तें अरण्य जिकडे तिकडे गजबजलें होतें. अकालीन झंझावातानें सर्व दिशा सुंद झाल्या होत्या. अशा समयीं मार्गश्रमानें खिन्न व तृषाकुल झाल्यामुळें पुढें जाण्यास त्यांचें पाऊल उचलेना. इतक्यांत 'तहानेनें माझे प्राण चालले,' असे आईचे दीन शब्द ऐ-

कून भीमाच्या पोटांत भडभडून आलें. तेव्हां एकदम त्यांना दाट छायेच्या एका वडाच्या झाडाखालीं ठेवून जलाजवळ संचार करणाऱ्या सारसादि पक्ष्यांचा मधुर शब्द ऐकूं येत असल्यामुळें मोठा जलाशय येथें कोठें तरी खचित जवळ असावा, असा तर्क बांधून धर्मराजाच्या आज्ञेनें त्या शब्दाच्या अनुरोधानें तो जलाचा शोध करीत चालला. जलाशय सांपडल्यावर धोतराच्या पिळ्यांत पाणी घेऊन तो परतला. भाऊ व आई यांना अनाथांसारखीं जमिनीवर पडलेलीं पाहून, कष्टी होऊन सर्पाप्रमाणें त्यानें दीर्घोच्छ्वास टाकला. 'ज्यांना घरीं मऊ बिछान्यावर देखील झोंप येत नसे, तीं आज जमिनीवर पडलेलीं मी हतभाग्य प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहात आहें. तर ह्याहून कष्टतर दुसरें काय असलें पाहिजे ? ही लक्षावधि शत्रूंना चिरडून टाकणारी वसुदेवाची बहीण, कुंति, राजकन्या, विचित्रवीर्याची सून, पंडूची बायको, जिनें प्रत्यक्ष धर्मेंद्रादिदेवांपासून आह्मां पांच नरसिंहांना जन्म दिला, ती ही सर्व लक्षणसंपन्न व मृदु शय्येवर पडणारी कुंति आज जमिनीवर लोळत आहे. त्रैलोक्याचें राज्य करण्याला समर्थ असे हे धर्मनिष्ठ धर्मराज, त्याचप्रमाणें हा नरवीर अर्जुन, व अश्विनीकुमारांसारखे हे नकुलसहदेव हे सर्व यःकश्चित् सामान्य जनांप्रमाणें जमिनीवर पडले आहेत ! आपल्या वाईटावर असणारे कुलकलंक बांधव ज्याला नाहींत, असा मनुष्य एकट्या उगवलेल्या ग्रामवृक्षाप्रमाणें सुखांत असतो. गांवांत तो एकटाच फलपुष्पसंपन्न असतो. तोच मार्गावर असणारा वृक्ष जातिवंत नसला तरी लोकमान्य असतो. त्याचप्रमाणें ज्यांना पुष्कळ शूर व धर्मनिष्ठ ज्ञाती असतात त्यांवर कांहीं प्रसंग न येतां बल व संपत्ति ह्यांनीं संपन्न होऊन ते मित्रबांधवांना आनंद देत अरण्यांतील वृक्षांप्रमाणें सुखांत राहतात. धृतराष्ट्र व त्याचे मुलगे ह्यांनीं आह्मांला राज्यापासून हुसकून देऊन जाळून टाकण्याचा प्रयत्न केला. आमचें दैव थोर म्हणून आह्मी कसे तरी त्यांतून निभावून निघालों. ह्या एवढ्या मोठ्या संकटांत आह्मांला थारा तरी कोठें मिळणार ? हे दुर्बुद्धे धार्तराष्ट्रा, तुझी तरी इच्छा परिपूर्ण होवो. खरोखर देवाचीच तुजवर कृपा आहे म्हणून तुला मारण्याला आह्मांला युधिष्ठिराची आज्ञा होत नाहीं. नाहीं तर खास तूं जिवंत राहिला नसतास. आज खचित मी तुला तुझे मुलगे अमात्य, कर्ण, सौबल, इत्यादि तुझ्या साथीदारांसह यमसदनाला पाठविण्याला एकटा समर्थ आहें. हे पापिष्ठा, माझ्या हातून काय होणार नाहीं ह्मणून तूं समजला आहेस ? फक्त या धर्मात्म्या धर्मराजाचा क्रोधाग्नि अद्यापि पेट घेत नाहीं !' असें ह्मणून रागानें चवताळून जाऊन हात चोळीत त्यानें फिरून दीर्घोच्छ्वास टाकला व पुन्हां विझविलेल्या अग्नीप्रमाणें थंड पडून दीनासारख्या निजलेल्या आपल्या भावांकडे दृष्टि फेंकून ह्मणाला, 'अरेरे ! जागत राहण्याचें सोडून हे तर घोरत पडले आहेत ! असो. मीच ते उठत तोंपर्यंत पहारा करीत बसतों.' असें ह्मणून तो तेथें जागत बसला. त्या अरण्याच्या जबळच एक क्रूर, नरमांसभक्षक, वर्षाकालांतील मेघाप्रमाणें नीलवर्ण, पिंगाक्ष, अक्राळविक्राळ, मोठ्या जबड्याचा, व ज्याचे नितंब भरून आले होते, असा लंबोदर, ज्याची मान लांब असून ज्याचें नाक पुढें आलेलें व अणकुचीदार होतें असा एक राक्षस रहात होता. तो भुकेनें पीडित असल्यामुळें त्याची दृष्टि सहजच ह्यांवर गेली. तेव्हां एकदम वर हात करून डोकें खाजवीत खाजवीत व राठ केंस पिंजीत, जांभई देऊन त्यानें त्यांना नीट टेहळलें व आतां नरमांस खचित मिळणार ह्या आशेनें हर्षभरित होऊन जिभळी चाटीत तो आपल्या बहिणीला ह्मणाला, 'आज फार दिवसांनीं ह्या अलभ्य खाद्याचा लाभ होणार आहे. माझ्या तोंडाला पाणी सुटलें आहे. भावी सुखाचें हें सूचकच आहे. त्यांच्या लुसलुशीत मांसांत आपल्या आठी दाढा भोंसकून त्यांचे गळे कचाकच चावून सर्व शिरा वेगळ्या करून त्यांचें ताजें, ऊन्ह, ऊन्ह, व फेंसाळ रक्त पितांना किती बरें मजा उडेल ? ते निजलेले कोण आहेत त्यांचा तूं शोध तर करून ये. ह्या नरगंधानें माझ्या नाकाला मोठें समाधान वाटत आहे. ह्यांचें मांस काढून यथेच्छ खाल्यावर आपण दोघें मोठ्या आनंदानें तालावर नाचूं.' याप्रमाणें भावाच्या आज्ञेनें ती गेल्यावर भूमींतून वर आलेला श्यामवृक्षाचा अंकुरच कीं काय अशा त्या दिव्यरूपसंपन्न भीमाला पा-

हून ती मोहित झाली. भ्रातृसौहार्दापेक्षां पतिलालसा विशेष आहे. 'याला मारल्यानें केवळ क्षणिक समाधान मिळणार; पण हा जगल्यानें अनेक वर्षे याच्या समागमांत आनंदानें सुखोपभोग घेत राहतां येईल.' हा विचार मनांत येऊन तिनें भावाची आज्ञा बाजूला ठेविली. बाटेल तें रूप घेण्याचें सामर्थ्य असल्यानें उत्तम नररूप धरून व अंगावर अनेक मूल्यवान वस्त्रालंकार घालून सोळा वर्षांच्या लावण्यसंपन्न स्त्रीप्रमाणें लाजत लाजत त्याच्याजवळ जाऊन ती त्याला हासत हासत म्हणाली, 'हे नरश्रेष्ठा, आपण कोण? कोठून आलांत? हे देवासमान नर येथें कोण निजले आहेत? ही गोंडस शामवर्णा स्त्री कोण आहे? ह्या वनांत राक्षस राहतात, हें तुम्हांला ठाऊक नाहीं काय? ह्या ठिकाणीं पापात्मा हिडिंब नांवाचा राक्षस राहत असतो. तुम्हांला खाण्याच्या उद्देशानें तुमच्या चौकशीसाठीं त्यानें मला इकडे पाठविलें आहे. परंतु आपलें देवासारखें स्वरूप पाहून आपल्याहून दुसऱ्याला पति वरण्याला माझें मन घेत नाहीं. आपण धर्मज्ञ आहा, ही माझी इच्छा जाणून योग्य दिसेल तसें करा. माझ्या भावापासून मी आपलें रक्षण करीन. आपण कोठेंही पर्वतावर किंवा वनांत सुखानें काळ काढूं. मी अंतरिक्षचर आहें. अनेक रम्यस्थळीं माझ्या समागमांत आपल्याला अप्रतिम प्रेम व सुख ह्यांचा उपभोग मिळेल.' हें ऐकून भीम म्हणाला; 'अंगीं सामर्थ्य असून केवळ विषयासक्त झाल्यामुळें आईला व भावांना राक्षसाच्या भक्ष्यस्थानीं सोडून जाणें न्यायाचें होईल काय? राक्षसीनें उत्तर केलें; 'आपण त्यांची काळजी करूं नका. त्यांनासुद्धां ह्या नरभक्षकापासून मी सोडवितें. त्यांना जागे करा.' भीम म्हणाला; 'हे सुखानें निजले असतां त्या तुझ्या दुष्ट भावाच्या भीतीनें त्यांची झोंपमोड मी करणार नाहीं. राक्षस, मनुष्य, गंधर्व, किंवा यक्ष ह्यांपैकीं कोणाचीही माझ्यापुढें उभें राहण्याची छाती नाहीं. जा, रहा, किंवा जाऊन त्याला पाठवून दे. तुला बाटेल तसें कर.' इतक्यांत तिला जाऊन फार वेळ झाला म्हणून हिडिंब झाडावरून खालीं उतरून पांडवांकडे आला. तो विकाल राक्षस आला असें पाहून हिडिंबा धावरून गेली. कामचर असल्यामुळें त्यांना पाठीवर घेऊन आकाशमार्गानें जाण्यास ती सिद्ध झाली. भीम तिला म्हणाला; हे पृथुश्रोणि, भिऊं नकोस; माझ्यापुढें ह्यांचें कांहीं चालणार नाहीं. तुझ्या डोळ्यांदेखत मी ह्याला यमसदनाला पाठवितों पहा. हा एकटा किंवा सर्व राक्षसांना घेऊन जरी माझ्यावर चालून आला तरी त्या सर्वांना मी भारी आहें. सुंदरी, माझा पराक्रम आज तूं पहा तर खरी. मला केवळ मानव म्हणून यःकश्चित समजूं नकोस.' इकडे हिडिंबानें तिचें भाषण, तिच्या बुचड्यांतले गजरे, तिचें पूर्णचंद्रासारखें मुख, तिचा तो नट्टापट्टा, व तिनें नेसलेलें तें क्षिरक्षिरित वस्त्र, ह्या सर्व तिच्या थाटावरून मानवप्राण्यावर तिची इच्छा गेली असावी असा तर्क बांधून तो अगदीं खवळून गेला, व आपले विशाल नेत्र वटारून, 'अगे, परपुरुषाच्या मागें लागणारे प्रतिकुलचारिणि, राक्षसकुलकलंके, तूं हें काय मांडलें आहेस,' अशी तिची पुष्कळ निर्भर्त्सना करून व डोळे लाल करून दांत खात त्या दोघांनाही ठार करण्याच्या उद्देशानें त्यांकडे धांवून गेला. याप्रमाणें त्याला आपल्या बहिणीवर संतापलेला पाहून भीम हासून त्याला म्हणाला, 'हे नराशना, हे माझे भाऊ व आई सुखानें झोंप घेत आहेत. त्यांना जागें करण्यांत तुला कोणता फायदा? तुला काय करणें असेल तें माझ्याशीं होऊं दे. त्याला तोंड देण्याला हा मी तयार आहें. **स्त्रियांना मारणें शास्त्रविरुद्ध आहे.** तिचें माझ्यावर मन गेलें त्यांत तिचा काय दोष? हा सारा अंगभूत अनंगाचा खेळ असून मानव त्यापुढें अगदीं दुबळा आहे. दुराचाऱ्या, ही तुझ्याच आज्ञेनें ह्या ठिकाणीं आली, पुढें माझें रूप पाहून ही मोहित झाली, ह्यांत तिचा काय दोष? दुसऱ्याच्या अपराधावद्दल हिला तूं काय म्हणून दोष देतोस? तुला बाटेल तर माझ्याशीं दोन हात कर. एखाद्या बलाढ्य हत्तीच्या पायांखालीं चिरडल्याप्रमाणें तुला चिरडून टाकतों. तुला माझ्या हातून गति मिळाल्यावर तुझें शरीर कावळे, गिधाडें, व कोल्हीं ह्यांना यथेच्छ भक्ष्य होईल. आजपर्यंत नरवधानें तूं हें वन दूषित करून टाकलें आहेस. पण आज मी ह्यांतील राक्षसरूपी कांटा उपटून टाकून लोकांना येथें निर्धास्त फिरण्याला अड-

चण ठेवीत नाहीं. पर्वतप्राय हत्तीचें देखील ज्याप्रमाणें सिंहापुढें कांहीं चालत नाहीं तसें तुझें कांहीं चालूं न देतां मी आज तुझ्या बहिणीच्या देखत तुझी दुर्दशा उडवितों पहा. हें ऐकून हिडिंबानें उत्तर दिलें ' व्यर्थ गर्जना अथवा व्यर्थ बडबड करण्यांत काय अर्थ आहे ? बोलतोस तसें हातानें करून दाखीव ह्मणजे झालें. ' असें ह्मणून हात सांवरून तो नराशन आवेशानें भीमावर चालून गेला. त्यानें पुढें केलेला हात सांवरून हासत हासतच सिंह ज्याप्रमाणें एखाद्या क्षुद्र मृगाला फरफरां ओढीत नेतो त्याप्रमाणें भीमानें त्याला तेथून दूर ओढून नेलें. त्या राक्षसानें भीमाला मगरमिठी मारून मोठी किंकाळी फोडली. त्या दोघांचें घोर द्वंद्वयुद्ध सुरू झालें. त्यांच्या त्या गर्जनांनीं कुंतीसह पांडव जागे झाले, तों त्यांना पुढें अप्सरेसमान हिडिंबा उभी दिसली. तिला पाहून थक्क होऊन,' ' तूं कोणाची कोण, कोठून व कशाकरितां येथें आली आहेस, तूं ह्या वनाची रक्षणकर्त्री देवता आहेस अगर एखादी अप्सरा आहेस,व येथें कां उभी आहेस? ' इत्यादि प्रश्न त्यांनीं तिला केले. तिनें आपला सर्व वृत्तांत व तेथें येण्याचें कारण त्यांना कळविलें. इतक्यांत बलोत्कट सिंहाप्रमाणें परस्परांवर सरशी करूं इच्छिणारे ते भीमहिडिंब एकमेकांशीं झगडतांना पुढें पाहून पांडव एकदम उठून ह्मणाले, ' हे महाबाहो, वृकोदरा, भिऊं नको, हे पहा आह्मी तुझ्या साह्याला आलों. एका क्षणांत आह्मी राक्षसाला होता नव्हतासा करून टाकतों. ' हें त्यांचें भाषण ऐकून भीम ह्मणाला, ' तुह्मी काय होतें तें स्वस्थ पहात बसा. धावरूं नका. एकदां हा माझ्या तावडींत आला ह्मणजे याची जिवंत सुटण्याची आशा नको. ' अर्जुन ह्मणाला, ' ह्या पापी राक्षसाला फार वेळ जिवंत ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. अजून पुढें पुष्कळ मार्ग क्रमावयाचा असल्यामुळें ह्याकडे आपल्याला फार वेळ खर्चतां येत नाहीं. इतक्यांत पूर्वदिशा फांकून उजाडेल. घोर अशा संध्यासमयीं राक्षसांचें बल वाढतें असें म्हणतात. म्हणून भीमा उगीच काल न दवडतां त्यानें एखादी माया प्रकट केली नाहीं तोंच त्याला आपलें बाहुबल दाखवून नाहींसा कर. ' अर्जुनाचें हें भाषण ऐकून रागानें संतापून जाऊन प्रलयकालच्या वाऱ्याप्रमाणें असह्य होऊन भीमानें त्याला उचलून गरगरां फिरविलें. तो ह्मणाला, ' हे वृथा मांसभक्षका वृथामते, तूं आजपर्यंत वृथा वाढून आतां वृथा मृत्युमुखीं पडून ह्या जगाला वृथा मुकत आहेस. आज ह्या वनाचा कांटा नाहींसा होणार आहे. ' असें ह्मणून जोरानें त्याला जमिनीवर आपटून एखाद्या पशूप्रमाणें त्यानें त्याचा जीव घेतला. मरतेवेळीं पाण्याचा शिंतोडा दिलेल्या एखाद्या नगाऱ्याप्रमाणें बदबद् शब्द करून तें सर्व वन त्या राक्षसानें दणाणून सोडलें. तेथून नगर जवळच असावेंसें वाटून दुर्योधनाच्या नजरेला येण्याच्या भीतीनें हिडिंबेसहवर्तमान ते सर्व पुढें चालले. मोहिनी मायेचा आश्रय करून राक्षस वैर साधतात असें ऐकण्यांत असल्यावरून हिडिंबेलाही तिच्या भावाची वाट दाखवावी असें भीमाला वाटलें. तेव्हां युधिष्ठिर त्याला ह्मणाला, ' रागाच्या झपाट्यांत स्त्रीवध करूं नकोस. **शरीररक्षणापेक्षां धर्मरक्षणाविषयीं विशेष खबरदारी घेतली पाहिजे.** आह्मांला मारण्याचा हेतु धरून आलेल्या त्या बलाढ्य राक्षसाला देखील जो तूं पुरून उरलास, त्या तुझें त्याच्या बहिणीच्या हातून ती कितीही रागावली ह्मणून काय होणार ? ' नंतर कुंतीला व युधिष्ठिराला नमस्कार करून हात जोडून हिडिंबा ह्मणाली, ' आर्ये ह्या जगांत स्त्रियांना जी मदनबाधा होते ती मीं तुला सांगावयाला नको. काळाकडे डोळे लावून मी राहिलें, तो काल आतां आला आहे. माझें सर्व सुखदुःख ह्यावर अवलंबून आहे. मी तर आप्तबांधवांनाच नव्हे, तर स्वधर्माला देखील सोडून ह्या पुरुषव्याघ्रांना वरला आहे. ह्यांनीं व तुह्मीं मला दूर केलें तर मी खचित वांचणार नाहीं. म्हणून आपण मजवर दया केली पाहिजे. मला मूढ समजा, अभिसारिणी समजा, किंवा प्रेमपाशानें बद्ध समजा. ह्यांचा माझा संबंध जुळेल तरच माझी दशा ठीक आहे. यांच्याशीं यथेच्छ विहार करून यांना मी तुमच्याकडे परत आणून सोडीत जाईन. माझ्या खरेपणाची प्रतीति पहा. माझी आठवण केल्याबरोबर मी येऊन तुह्मांला संकटांतून सोडवीन. तुह्मांला कोठेंही लवकर जाणें असेल त्यावेळीं सपाटी-

बरून व उंच सखल प्रदेशांतून मी तुह्मांला आपल्या पाठीवर वाहून नेईन. **संकटप्रसंगीं हरतऱ्हेनें प्राणरक्षण करावें** असें ह्मणतात. तो हेतु साध्य करून घेतेवेळीं योजिलेल्या उपायाच्या युक्तायुक्ततेसंबंधानें विचार करीत बसूं नये. धर्मसंकट आलें असतां जो त्याचें रक्षण करतो तोच उत्तम धर्मवेत्ता समजला पाहिजे. धर्मावर प्रसंग येणें हेंच धार्मिकांना मोठें संकट आहे. पुण्याच्या योगानें प्राणरक्षण होत असून प्राणरक्षण हेंच पुण्य आहे. ह्मणून प्राण, धर्म, व धर्माचरण, ह्यांना साधनीभूत होणारी गोष्ट कधीं निंद्य असावयाची नाहीं.' हें ऐकून युधिष्ठिर ह्मणाला, 'तूं ह्मणतेस तें खरें आहे. सूर्योदयापूर्वी स्नानादि आन्हिक विधि आटोपून मंगलतिलक केल्यावर संध्याकाळपर्यंत सर्व दिवस त्याबरोबर यथेच्छ विहार करून रात्रीं त्याला आमच्याकडे परत आणून सोडीत जा.' हें युधिष्ठिराचें भाषण ऐकून, तुला मजपासून मूल होईपर्यंत मी तुझ्याबरोबर राहीन असा भीमानें तिच्याशीं संकेत केला. तिनें त्याला रुकार दिल्यावर त्याला घेऊन ती वर उडून गेली. सुकुमार रूप धारण करून सर्वालंकारांनीं विभूषित होऊन मृगपक्ष्यांनीं गजबजलेल्या अशा रम्य पर्वताच्या शिखरावर, देवालयांमधून, पुष्पफुलांनीं संपन्न अशा वृक्षांनीं भरलेल्या अरण्यांमधून, आरशाप्रमाणें स्वच्छ पाण्यानें पूर्ण, कमलांनीं शोभायमान अशा सरोवरांवर, वैडूर्यवालुकामय नदीतीरावर, हिमालयावरील अनेक लताकुंजांमधून, गुहांमधून, रत्नमय समुद्रकिनाऱ्यावर, व रम्य अशा विहिरींच्या कांठांनीं, ही विलासिनी भीमाला रमविती झाली. त्याच्याशीं रममाण झाली असतां मोठा बलाढ्य, अकाळविकाळ असा तिला मुलगा झाला. त्याचा जबडा व कान पसरट असून ओंठ लालभडक व दाढा कणखर होत्या. हा मुलगा धिप्पाड, व वीर्यसंपन्न असून अनेक मायांनीं परिपूर्ण होता. त्याचें नाक पुढें आलें होतें. छाती विशाल होती, व पोटऱ्या भरीव व कणखर होत्या. कोणच्याही राक्षसपिशाचांची .तो डाळ शिजूं देणारा नव्हता. त्याचा शब्द मेघगर्जनेला मागें सारणारा होता.तो पोर असूनही एखाद्या महाबलाढ्य योद्ध्याला हटविण्याचें त्याच्या अंगीं सामर्थ्य होतें. तो सर्व अस्त्रविद्येंत मोठा निष्णात झाला. राक्षसींना गर्भधारणा लवकर होत असून त्यांची प्रसूति व बाढ हं हं ह्मणतां होते.त्यांना वाटेल त्यावेळीं वाटेल तें रूप धरण्याचें सामर्थ्य असतें. त्या मुलानें नमून बडिलांचे पाय धरले. घटाच्या आकाराप्रमाणें त्याचें डोकें असून त्यावर केस (कच) नव्हते, म्हणून त्याचें **घटोत्कच** असें नांव पडलें. त्याचें पांडवांवर व पांडवांचें त्यावर फार प्रेम जडलें. एकत्र राहण्याची मुदत संकेताप्रमाणें संपली. तेव्हां कारण पडल्यास माझें स्मरण करा म्हणून सांगून हिडिंबा आपल्या ठिकाणीं निघून गेली. घटोत्कचानेंही पांडवांना नमस्कार करून व आईला निरोप देऊन मी तुमचें काय प्रिय करूं म्हणून त्यांना विचारलें, तेव्हां कुंति त्याला ह्मणाली, 'कुरुकुलांत तुझा जन्म झाला असून साक्षात तूं भीमासारखाच पराक्रमी आहेस. पांचांचाही तूं वडील मुलगा आहेस. प्रसंगीं आमचें साह्य कर.' यावर 'काम पडेल तेव्हां मी वडिलांच्या सेवेला हजर आहें,' असें ह्मणून त्यांचा निरोप घेऊन तो उत्तरदिशेकडे निघून गेला. ह्या अतुल वीर्यधारी घटोत्कचाला कर्णाच्या शक्तीसाठीं इंद्रानें उत्पन्न करून ठेविलें होतें.

३८ बकवध. (१. १५७–१६४)

हिडिंबाला मारल्यानंतर जटावल्कलधारी पांडव तापसवेषानें मत्स्य, त्रिगर्त, पांचाल, कीचक इत्यादि रमणीय प्रदेश ओलांडीत चालले असतां नीतिशास्त्रज्ञ व्यास त्यांकडे आले. त्यांचा पूजादि सत्कार केल्यावर ते त्यांना ह्मणाले, 'हें तुमच्यावर गुदरलेलें संकट अंतर्ज्ञानानें जाणून धृतराष्ट्राच्या मुलांनीं अधर्मानें तुह्मांला घालवून दिल्यामुळें तुमचें हित करण्यासाठीं मी आलों आहे. स्वःस्थितीसंबंधानें मनांत विषाद बाळगूं नका. हें सर्व तुमच्या भावी सुखालाच कारणीभूत होणार आहे. वास्तविक पाहतां ते व तुह्मी मला सारखे आहां. परंतु एखाद्याची **निकृष्टावस्था किंवा बाल्यावस्था पाहून मनुष्याचा त्याच्याकडे विशेष ओढा लागतो.** तुमच्या ह्या अनाथ स्थितीमुळें तुमच्यावर माझें विशेष प्रेम जडलें आहे, व त्यामुळें मी तुमचें

मनापासून कल्याण करूं इच्छितों. हें पहा तुमच्यापुढें रम्य नगर दिसत आहे. त्या ठिकाणीं तुह्मांला कोणापासून पीडा होणार नाहीं. तेथें राहून तुह्मी माझ्या फिरून येण्याची वाट पहात रहा,' असें त्यांना आश्वासन देऊन एकचक्रानगरीस गेल्यावर ते कुंतीला धीर देऊन ह्मणाले, 'हे जीवत्पुत्रे, हा तुह्मा धर्मनिष्ठ धर्म न्यायानें पृथ्वी जिंकून सर्व राजावर स्वामित्व मिळवील; हे तुझे दुसरे मुलगे व हे माद्रीचे मुलगे पृथ्वी जिंकून यज्ञ करून सुख पावतील. राजसूयअश्वमेधादि महायज्ञांकरून त्यांत ब्राह्मणांना पुष्कळ दक्षिणा देतील व सुहृद्वर्गावर अनुग्रह करून पितृपैतामह राज्याचा सुखानें उपभोग घेतील.' असें सांगून त्यांना एका ब्राह्मणाच्या घरीं आपल्या परत येण्याची एक महिनापर्यंत वाट पहात राहण्यास ते सांगून निघून गेले. त्या ठिकाणीं रम्य वनोद्देशांचें सृष्टिवैभव पहात भिक्षेवर उपजीविका करून ते रहात असतां थोडक्याच कालांत आपल्या गुणांनीं त्यांनीं लोकप्रियता संपादन केली. नित्य रात्रीं भिक्षान्न कुंतीच्या स्वाधीन करून तिनें दिलेले निरनिराळे भाग ते सेवन करीत असत. मातेसहवर्तमान इतर चौघे मिळून निम्में अन्न खात, व एकटा भीम निम्में खाई. कोणे ऐके वेळीं त्या ब्राह्मणाच्या घरीं एकाएकीं रडण्याचा मोठा शब्द कानीं पडला. कुंतीचा स्वभाव जात्या कनवाळू व उदार असल्यामुळें तिला तें ऐकवेना; व तिच्या पोटांत भडभडून येऊन मोठ्या काकुळतीनें ती भीमाला ह्मणाली, 'वत्सा, धृतराष्ट्रपुत्रांना न कळतां आह्मी ह्या ब्राह्मणाच्या घरीं मोठ्या सुखांत रहात आहों. तो आमचा सत्कार करीत असतो. **त्याच्या ह्या उपकाराची फेड आपल्या हातून कशानें होईल हा विचार नेहमीं माझ्या मनांत घोळत आहे. वत्सा, ज्यावर केलेला उपकार निष्फळ होत नाहीं. त्यालाच मनुष्य ह्मणावें. लोकांनीं केलेल्या उपकारांची निःशेष फेड करण्यांतच मोठेपणा आहे.** तर ह्या ब्राह्मणावर काय प्रसंग गुदरला आहे त्याचा शोध करून त्यांत त्याला जर आपल्याला उपयोगीं पडतां आलें तर मोठें काम होणार आहे.' नंतर कोणतेंही दुष्कर काम करून त्यांचे उपकार फेडण्यास मी सिद्ध आहें,' असें भीमानें आश्वासन दिल्यावर दांड्याला जखडलेल्या बांसराकडे ज्याप्रमाणें एखादी गाय धांव घेते त्याप्रमाणें कुंति त्या ब्राह्मणाच्या घरांत शिरली, तेव्हां तें कुटुंब तोंड खालीं घालून शोक करीत असतां त्या ब्राह्मणानें आपल्या स्त्रीजवळ काढलेले पुढील उद्गार तिच्या कानावर आले; 'निरर्थक दुःखमूलक ह्या परावलंबी जीविताला धिक्कार असो. आतां जिवंत राहणें मोठ्या दुःखाला व तापाला कारण आहे. जिवंत मनुष्याला दुःखाशीं अगदीं जखडलेलें असतें. धर्मार्थकामांचा उपभोग घेणारा फक्त जीव एकटा असून त्याचा वियोगसुद्धां अनंत दुःखांला कारण होतो. कांहीं लोक मोक्ष सर्वांत श्रेष्ठ ह्मणतात. त्याच्या प्राप्तीचीही ह्या संसारांत आशा मुळीं नाहीं. अर्थप्राप्ति तर नरकाचें द्वार आहे. **धनाशा केवळ दुःखाला कारण आहे. धनप्राप्ति विशेष दुःखाला कारण आहे व तींवर एकदां लोभ जडला ह्मणजे त्याचा नाश तर फारच दुःखाला कारण होतो.** आपल्यावर गुदरलेल्या ह्या प्रसंगांतून पार पडण्याला मला कांहीं मार्ग दिसत नाहीं. तुझ्या त्या अनावर गृहप्रेमामुळें हा गांव सोडण्याचा मीं पूर्वी केलेला प्रयत्न फुकट गेला. तुझे आईबाप स्वर्गवासी झाले असून बांधवही हें जग सोडून गेले. तर अशा प्रकारच्या ह्या नश्वर जगावर शहाण्यांनीं आसक्ति कां ठेवावी? स्वतः जिवंत राहून निष्ठुर होऊन माझ्या कुटुंबांतील कोणाही मनुष्याला मृत्युमुखीं देणें माझ्या हातून होणार नाहीं. तूं माझी धर्मचारिणी असून आईप्रमाणें तूं मला जपत आहेस. दैवानें तुझ्यासारख्या उत्तम मित्राची गांठ घालून दिली असून मला उत्तम गति मिळण्यास तूंच कारण आहेस, तुझ्या आईबापांनीं माझ्या गृहस्थाश्रमाची तुला वांटेकरीण केली आहे. अशा तुला साध्वीला तुझा कांहीं अपराध नसतां मी कसें बरें सोडूं? स्वतःपासून झालेल्या ह्या अर्भकाला तरी माझ्यानें कसें टाकवेल? ही मुलगी अद्यापि कुमारी असून **ती मजपाशीं दुसऱ्याची ठेव ह्मणून आहे. तिच्यापासून मी दौहित्रलोकाची आशा करीत बसलों आहें.** कांहींचें मुलावर विशेष प्रेम असतें, कांहींचें मुलीवर असतें; पण मला

दोघेंही सारखींच वाटतात. जिच्यावर उत्तम लोक, वंशवृद्धि व भावी सुख हीं अवलंबून आहेत, अशा ह्या बिचाऱ्या पोरीला स्वतः जन्म देऊन निर्दयपणें सोडून देणें माझ्या हातून होणार नाहीं. बरें, आत्मत्याग तरी मला परलोकीं तापालाच कारण होणार. कारण माझ्यामागें माझें कुटुंब खचित जिवंत राहणार नाहीं. पण स्वतः होऊन ह्यांचा त्याग करणें निघृरतेचें असून शहाण्यांना ही गोष्ट संमत नाहीं. माझ्या पश्चात माझीं माणसें मेलीं तर त्याबद्दल मी विशेष जबाबदार नाहीं. कोणत्याही दुसऱ्या उपायानें ह्या संकटांतून पार पडण्याला मला मार्ग दिसत नाहीं. अरेरे! ह्या कुटुंबाची काय दशा होणार? सर्वांना एकदम मरण आलें तर तें एकांशीं बरें. आतां प्राण धरून राहणें मात्र शक्य नाहीं.' हें त्याचें शोकाकुल भाषण ऐकून त्याची स्त्री ह्मणाली, 'सामान्य जनाप्रमाणें असा संताप करून घेणें आपल्यासारख्यांना शोभत नाहीं. मरण सर्वांना लागलेंच आहे. तर ह्या अवश्य घडून येणाऱ्या गोष्टीच्या संबंधानें संताप कशाला? बायकापोरें हीं सर्व आत्मसुखासाठीं आहेत. प्राण खर्ची घालून देखील पतीचें प्रिय करावें, हा स्त्रियांचा परंपरागत धर्म आहे. तर ह्या प्रसंगीं मी जें करणार तें आपल्या हिताचें असून मला सुखकर व इहपरलोकीं यशस्कर होणार आहे. लग्न ज्यासाठीं करावयाचें तो हेतु अपत्योत्पादनानें सफल करून आपण मला ऋणांतून मुक्त केलें आहे. मुलांच्या पालनपोषणाला आपण समर्थ आहां. पण सन्मार्गानें जाऊन माझ्या हातून तें होणें शक्य नाहीं. आपल्याशीं संबंध करण्याला अयोग्य व अपात्र अशा गर्विष्ठ लोकांनीं, शूद्रांनीं जशी वेदश्रुति मागावी तशी, ह्या मुलीबद्दल मागणी केली असतां त्या नरपशूपासून हिचें रक्षण माझे हातून कसें व्हावें? यज्ञामध्यें हविर्विघ्नक ज्याप्रमाणें बलात्कारानें हवि उपटून नेतात तसें ते तिला बलात्कारानें पळवितील. **भूमीवर पडलेल्या मांसाच्या तुकड्यावर ज्याप्रमाणें पक्ष्यांची झडप पडते त्याप्रमाणें पतिहीन स्त्रीवर लोकांची दृष्टि असते.** तर ह्या दुर्जनांच्या तडाक्यांतून उन्मार्गामध्यें पाऊल न पडतां सज्जनांनीं स्वीकार केलेल्या सन्मार्गानें मला कसे दिवस कंठतां येतील? ह्या मुलीला कुळाची ओळ लाबून देणें व ह्या मुलाला आपले थोर गुण शिकविणें ह्या गोष्टी माझ्या हातून कशा होतील? अशा अनेक संकटांत सांपडल्यावर जलाबांचून माशाप्रमाणें आह्मी तडफडून मरूं. पतीच्यापूर्वी मरणें हें स्त्रीचें मोठें भाग्यच आहे. यज्ञापेक्षां, तपापेक्षां व अनेक प्रकारच्या नियमांपेक्षां पतिहित स्त्रियांना विशेष श्रेयस्कर आहे. लाडकीं मुलें, पैसा, जिव्हाळ्याचे लोक व आवडती बायको हीं सर्व संकटसमयासाठीं लागतात. **आपत्कालासाठीं संपत्ति जतन करून ठेवावी. संपत्तीला देखील खर्ची घालून बायकोचें रक्षण करावें, व संपत्ति व बायको हीं दोन्ही खर्ची घालून आपलें रक्षण करावें.** बायको, पोर, घर, पैसा हीं व इतर दृष्टादृष्ट फलें प्रसंगासाठीं लागतात. हीं सर्व स्वतःच्या पासंगाला देखील लागणार नाहींत. शास्त्रांत स्त्रिया अवध्य मानल्या आहेत, व राक्षसांनाही धर्म कळतो. कदाचित् तो मला मारणार नाहीं. तुमचें मरण खात्रीचें असून माझ्यासंबंधानें संशय आहे. माझ्या मागें आपल्याला दुसरी बायको करतां येईल, व त्या योगानें फिरून धर्मक्रिया चालूं राहतील. **पुरुषानें पुष्कळ बायका केल्यानें अधर्म** होत नाहीं; पण स्त्रियांनीं एकाहून अधिक पति करणें मोठा अधर्म मानला आहे. हें सर्व व आत्मत्याग बाईट मानला आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन शोक न करतां आपण मला त्या राक्षसाकडे पाठवावें.' हें ऐकून मुलगी ह्मणाली, 'बाबा, असें तुह्मी कष्टी होऊन उगीच शोक कां करतां? माझें ह्मणणें ऐकून घेऊन मग बरें दिसेल तें करा. मुलगी दुसऱ्यासाठीं आहे असें धडधडीत धर्मच सांगतो. तर ह्या देय वस्तूला देऊन माझ्या एकटीच्या वियोगानें सर्वांचें रक्षण तुह्मीं कां करूं नये? **मला तारील अशी आशा धरूनच लोक अपत्य मागतात.** तर ही संधि आली असून नावेप्रमाणें माझें साह्य घेऊन तुह्मी कां तरून जात नाहीं? इहलोकीं तरी दुःखांतून तारावें अगर परलोकीं तरी तारावें. **मुलगा इहपरलोकीं तारतो. ह्मणून त्याला पुत्र अशी संज्ञा आहे.** आपले पूर्वज स्वर्गीं मुलांपासून तरून जाण्याची आशा क-

रीत वसले आहेत ती मी स्वतः जिवंतपणीं तुझ्याला तारतें म्हणजे झालें. ह्या माझ्या लहान भावाची तुमच्या मागें खचित धडगत लागणार नाहीं व त्यामुळें पितरांचे पिंड बंद पडतील. तुम्ही सोडून गेल्यामुळें दुःखपरंपरा माझ्यावर कोसळून मीही मरणार. आपण खुशाल असलां तर माझी आई, भाऊ, वंश, व पिंडदान हीं सर्व शाबूत राहतील. आत्मा हाच पुत्र आहे. भार्या मित्र आहे; पण मुलगी केवळ दुःखाला कारण आहे; म्हणून मला टाकून या व मला आपलें कर्तव्य केल्याचें श्रेय घेऊं द्या. आपल्यामागें मी अनाथ, दीन व पोरकी होऊन माझें पाऊल वांकडें पडण्याचा संभव आहे. पण कुलाच्या रक्षणाकरितां देहत्याग केला तर माझ्या जन्माचें सार्थक्य होणार आहे. तर जी गोष्ट अवश्य झाली पाहिजे तिच्या संबंधानें उगीच कालक्षेप कशाला? आपण स्वर्गवासी झाल्यावर कुत्र्याप्रमाणें दारोदार भीक मागून मला पोट भरावें लागणार. ह्याहून दुसरें वाईट काय असणार? आपण जिवंत असलां म्हणजे स्वतः जिवंत असल्याप्रमाणें मला सुख होणार आहे.' याप्रमाणें सर्व कुटुंब दुःखसागरांत बुडालेलें पाहून तेथें खेळत असलेलें त्या ब्राह्मणाचें मूल हातात एक काडी घेऊन त्यांच्याकडे आलें व 'ह्या कालीनें त्या लाचचाला मालून टाकतों, तुमी कालजी कशाला कलता,' असें म्हणालें. हे त्याचे बोबडे बोल ऐकून एवढ्या दुःखामध्यें देखील त्यांना मोठें कौतुक वाटलें. कुंति हा सर्व विलाप ऐकत होती. पुढें जाण्याला हीच योग्य वेळ आहे, असें मनांत आणून ती त्याकडे धांवत गेली व मृतमनुष्यावर अमृत शिंपडल्याप्रमाणें त्यांना धीर देऊन म्हणाली, 'ह्या तुमच्या दुःखाचें कारण मला कळेल तर माझ्या हातून त्याचें निवारण होण्यासारखें असल्यास मी तुम्हांला मदत करीन.' ब्राह्मण म्हणाला, 'तपोधने, हें तुझें भाषण सज्जनांना शोभणारें आहे. पण आमचें दुःख मनुष्याच्या हातून निवारण होण्याजोगें नाहीं. ह्या जवळच्या पर्वतावर ह्या जनपदाचा तसेंच ह्या नगराचा रक्षणकर्ता बक नांवाचा एक मोठा बलाढ्य राक्षस राहतो. त्याच्यामुळें परचक्रापासून किंवा अन्य प्राण्यांच्या भयापासून आम्ही निर्धास्त आहों. पण प्रत्येक दिवशीं त्याला एक मोठें भाताचें तपेलें, दोन रेडे व तें अन्न घेऊन जाणारा मनुष्य असें वेतन म्हणून खाण्याला द्यावें लागतें. ह्या नगरांतील प्रत्येक घरांतून दररोज हें त्याचें खाद्य पाळीपाळीनें जात असतें. ही घातुकपाळी लोकांवर पुष्कळ वर्षांनीं एकदां येते. ती टाळण्याचा कोणी यत्न केला असतां राक्षस त्याच्या सर्व कुटुंबाचा फडशा उडवितो. ही कुलविनाशक पाळी आज माझ्यावर आली असून द्रव्यानें कोणी मनुष्य विकत घेऊन त्याच्याकडे पाठवावें तर तसें करण्यास मजपाशीं द्रव्य नाहीं. आमचा मंदबुद्धि राजा ज्याच्या योगानें हें जनपद ह्या संकटांतून मुक्त होईल असा एखादा उपाय करण्याविषयीं यत्न देखील करीत नाहीं. आह्मांलाही हेंच शासन योग्य आहे. कारण आह्मी तरी ह्या दुर्बुद्ध व नेभळ्या राजाचा आश्रय करून येथें कां रहावें? ब्राह्मण स्वतंत्र व स्वेच्छाचारी असून ते एका जागेला कधीं चिकटून रहात नाहींत. पक्ष्यांप्रमाणें ते गुण पाहूनच रहातात, प्रथम राजा मिळवून मग स्त्री व पैसा ह्यांच्या मागें लागावें. व ह्या तिहींच्या साधनानें ज्ञाति व कूळ उद्धारावें. पण आमच्या बाबतींत हें सर्व विपरीत झालें आहे. आणि म्हणूनच आतां ही आपत्ति येऊन मला फार ताप होत आहे.' कुंति म्हणाली, 'एवढेंच ना? माझ्या पांच मुलांपैकीं एक तुमच्यासाठीं राक्षसाकडे अन्न घेऊन जाईल. तुम्ही काळजी करूं नका.' असें कुंतीचें धीर देणारें भाषण ऐकून ब्राह्मण म्हणाला, 'आपल्यासाठीं ब्राह्मणाचा–विशेषतः अतिथीचा–बळी देण्याला मी तयार होणार नाहीं. कुलहीन पाखंड्याच्या हातून देखील अशी गोष्ट घडणार नाहीं. ब्राह्मणासाठीं आपला किंवा प्रसंगीं मुलांचा देखील त्याग करणें उचित आहे. प्राणरक्षणाहून खरें कल्याण कशांत आहे हें मला प्रथम पाहिलें पाहिजे. ब्रह्महत्या व आत्महत्या ह्यांमध्यें विचार केला असतां आत्महत्याच मला बरी वाटते. ब्रह्महत्येचें पाप मोठें आहे. त्याचें निरसन कशानेंही होत नाहीं. निरुपायानें होणारी आत्महत्या इच्छेविरुद्ध घडणाऱ्या ब्रह्महत्येपेक्षां बरी. आपण होऊन कांहीं मी आत्म-

हत्या करून घेत नाहीं. निरुपायास्तव हा प्राण या-वा लागत आहे, ह्मणून ह्याचें पाप मला मुळींच लागणार नाहीं. पण समजून उमजून ब्राह्मणाला राक्षसाच्या तोंडीं दिल्यानें मात्र मी पापाला धनी होणार आहे. **अतिथि, त्याचप्रमाणें शरणागत ह्याचा घात करणें, व दीन होऊन दया भाकणाराला मारणें** क्रूरपणाचें असून शहाणे लोक हें कर्म निंद्य समजतात. नंतर कुंतीनें आपल्या मुलाचें आत्मसंरक्षण करण्याचें सामर्थ्य व अति बलाढ्य राक्षसाला देखील मारण्याची त्याची शक्ति त्या ब्राह्मणाला सांगितली, तेव्हां मोठ्या आनंदानें तो तिच्या ह्मणण्याला कबूल झाला. ही गोष्ट बाहेर फोडूं नका ह्मणून मात्र कुंतीनें त्या ब्राह्मणाची प्रार्थना केली. नंतर भीमाकडे येऊन ती सर्व हकीकत तिनें त्याला सांगितली. तेव्हां तो तिच्या आज्ञेनें त्या राक्षसाला मारण्याला तयार झाला. हा वृत्तांत युधिष्ठिराला कळला, तेव्हां त्यानें कुंतीला विचारलें, ' हें मोठें साहस करण्याला भीमाला तूं कशी आज्ञा दिलीस ? ह्याप्रमाणें पुत्रत्याग करणें शाहण्यांच्या मतानें चांगलें नाहीं. दुसऱ्यासाठीं पोटच्या पोराला बळी देण्यास तूं कशी तयार झालीस ? हें तुझें कृत्य लोकविरुद्ध व वेदविरुद्ध आहे. ज्याच्या बाहूच्या आश्रयाखालीं आह्मी सुखानें झोंप घेत आहों, ज्यावर क्षुद्रांनीं हिरावून घेतलेलें राज्य फिरून मिळविण्याची आह्मी आशा धरून बसलों आहों, ज्याच्या शक्तीची नुसती आठवण होऊन दुर्योधनाला व शकुनीला रात्रीं झोंप येत नाहीं, ज्याच्या साह्यानें लाक्षागृहांतून व इतर संकटांतून आह्मी पार पडलों व धार्तराष्ट्रांना जिंकून ही वसुसंपूर्ण पृथ्वी आह्मांला मिळण्यासारखी आह्मी समजत आहों, त्या ह्या वीराला ह्याप्रमाणें मृत्युमुखीं देण्याला तूं कशी तयार झालीस? ' अतिशोकानें तुझी बुद्धि तर चळली नाहीं ना ? हें ऐकून कुंति ह्मणाली, ' भीमासंबंधानें ही तुझी चिंता व्यर्थ आहे. बुद्धि चळल्यामुळें ही गोष्ट माझ्या हातून झाली आहे असें मात्र समजूं नकोस. ह्या ब्राह्मणाच्या घरीं धृतराष्ट्रपुत्रांना न कळतां मोठ्या आदरांत आपण सुखानें दिवस काढले, त्या उपकाराची फेड करण्यासाठीं मी हें करूं इच्छितें. भीमाचा पराक्रम, त्याचें दहा हजार हत्तींचें बळ व जन्मला तेव्हांच त्यानें आपल्या अंगाखालीं दगड चिरडला, ह्या गोष्टी लक्षांत घेऊन मीं हें ब्राह्मणाचें काम बुद्धिपुरःसर हातीं घेतलें आहे. **प्रत्युपकार व धर्म ह्या दोन्ही गोष्टी ह्यापासून साधणार आहेत. ब्राह्मणाला साह्य केल्यानें क्षत्रियाला शुभ लोक मिळतात, क्षत्रियाला केल्यानें कीर्ति मिळते, वैश्याला केल्यानें तो प्रजारंजक होतो, व शूद्राला केल्यानें त्याला उत्तम कुळांत जन्म येतो.** ' ह्याप्रमाणें दुःखपीडित ब्राह्मणावर दयाबुद्धीनें प्रत्युपकार करण्याकरतां तिनें तें कृत्य बुद्धिपुरःसर हातीं घेतलें आहे असें समजल्यावर, 'पौरांपासून तरी ही गोष्ट गुप्त ठेवण्यास त्या ब्राह्मणाला सांग,' ह्मणून त्यानें तिला सांगितलें. पुढें बरीच रात्र झाल्यावर तें अन्न त्या राक्षसाच्या राहण्याच्या ठिकाणीं घेऊन जाऊन भीमानें त्याला लांबून नांव घेऊन हांक मारिली. ती ऐकून भीमाजवळ येऊन पाहतो तों तोच तें अन्न खात असलेला त्याला दिसला. तें पाहून भिवया चढवून दांत चावीत डोळे वटारून मोठी गर्जना करून त्याला मारण्याच्या उद्देशानें तो राक्षस त्याच्या अंगावर धांवला व त्याच्या मागें उभा राहून हातांनीं त्यानें त्याला यथेच्छ मुष्टिमोदक दिले. पण बेगुमानपणें त्या राक्षसाकडे पहात पहात भीमानें तें अन्न सावकाश खाल्लें, व उपस्पर्श करून हासत हासत त्याच्या मणगटाला धरून त्यानें त्याला आपल्याकडे खेचलें. परस्परांचें द्वंद्वयुद्ध जुंपून त्यांत राक्षस अगदीं जेरीस आला. तो दमला आहेसें पाहून त्याला जमिनीवर मांड्याखालीं दाबून डाव्या हातानें त्याचे केस धरून त्याच्या ओरडण्याकडे लक्ष न देतां उजव्या हातानें त्यानें त्याला उभा चिरला. त्याच्या ओरडण्यानें धावरून त्या ठिकाणीं आलेल्या त्याच्या आप्तांकडून व सेवक लोकांकडून, ' यापुढें आह्मी मनुष्य खाणार नाहीं, ' असें वचन घेऊन त्या शवाला वेशीपाशीं टाकून कोणाच्या दृष्टीस न पडतां तो बिऱ्हाडीं परत गेला व झालेला सर्व वृत्तांत त्यानें युधिष्ठिराला सांगितला. नगरवासी लोक सकाळीं उठून नगराबाहेर येतात तों तें रक्तानें भरलेलें राक्षसाचें शव त्यांच्या दृष्टीस पडलें, तें अलौकिक कृत्य पाहून त्यांना मो-

ठा अचंबा वाटून जिकडे तिकडे उत्सव सुरूं झाला. अन्न पाठविण्याची पाळी कोणाची होती याची चौकशी करून त्या ब्राह्मणाकडे ते गेले. 'कोणी मंत्रसिद्ध ब्राह्मण मजसाठीं तें अन्न घेऊन गेला होता, त्याच्या हातून हें अलौकिक लोकहिताचें काम झालें असावें,' असें त्यानें त्यांना कळविलें. तेव्हां त्या ब्राह्मणाच्या नांवानें ठिकठिकाणीं महोत्सव सुरूं झाले.

पांडव त्या ठिकाणीं रहात असतां कोणी एक पांथस्थ ब्राह्मण तेथें आला. त्यांनीं त्याचा यथोचित सत्कार केल्यावर द्रौपदी व धृष्टद्युम्न ह्यांच्या जन्माची पुढील हकीकत त्यानें त्यांना सांगितली. तो ह्मणाला, 'द्रोणांनीं आपला पराभव केला ही आर द्रुपदाच्या मनाला लागून राहिल्यानें सूड घेण्याच्या इच्छेनें त्यांना मारण्यास समर्थ असा मुलगा व्हावा ह्मणून कर्मसिद्ध ब्राह्मणाचा तपास करीत अनेक महान् महान् ब्रह्मवृंदांनीं पूर्ण अशीं स्थळें पहात पहात तो गंगातीरीं कल्माषीपाशीं एका पवित्र ब्राह्मणाकडे आला. त्या गांवीं अस्नातक किंवा कर्मभ्रष्ट असे कोणी नव्हते. तेथें शांत, ब्रह्मचिंतनामध्यें गढलेले व कुमारीला झालेले याज आणि उपयाज या नांवाचे दोन ब्रह्मर्षी त्या भाग्यशाली राजाला भेटले. त्यांचें सामर्थ्य कळल्यावर त्यांपैकीं धाकटे एकांतांत व्रतस्थ असतां त्यांपाशीं राहून त्यांचें मन न दुखवितां त्यांची पादमर्दनादि सेवा करीत असतां एके दिवशीं हळूच मधुर शब्दांनीं तो त्यांना ह्मणाला, 'ब्रह्मन्, ज्याच्या योगानें द्रोणांना मारणारा मुलगा मला होईल असें एकादें कर्म आपण केलें तर मी आपल्याला दहा कोटि गाई अगर दुसरें पाहिजे तें देण्याला तयार आहें.' तें ऐकून उपयाज ह्मणाले, 'माझ्या वडील भावाला एका निर्जन वनांत एकदां एक फळ पडलेलें आढळलें. त्या जागेच्या पवित्रापवित्रतेबद्दल कांहीं मनांत न आणतां त्यानें तें फळ उचलून घेतलें. अपवित्र वस्तु घेण्याच्या संबंधानें त्याच्या मनाला मुळींच किंतु वाटत नाहीं. गुरुगृहीं अध्ययन करीत असतां दुसऱ्यांनीं टाकून दिलेलें उच्छिष्ट भिक्षान्न तो निःशंकपणें घेऊन खात असतो.त्याचें नेहमीं खाण्याकडे लक्ष असून ऐहिक वस्तूंवर त्याची आसक्ति फार आहे; ह्मणून हे राजा, तूं त्याकडे जा. तो तुला कांहीं उपाय सांगेल.' ह्या भाषणानें याजांच्या संबंधानें राजाचें मत बाईट झालें, तरी कार्य साधावयाचें होतें म्हणून त्यांकडे जाऊन त्यांची पूजा करून त्यांना तो म्हणाला, 'हे ब्रह्मन्, मी दहा कोटि गाई देतों. मजकरितां यज्ञ करा. द्रोणांसंबंधाच्या वैराग्नीनें मी होरपळलों आहें. मला शांत करणें आपल्याकडे आहे. ब्रह्मास्त्रांत त्यांच्या तोडीचा कोणी नाहीं. पूर्वस्नेह मी विसरल्यामुळें त्यांनीं माझी खोड मोडली. सांप्रत कौरवांना त्यांचा आधार आहे. जगांत कोणी क्षत्रिय त्यांपेक्षां श्रेष्ठ दिसत नाहीं. त्यांचें **धनुष्य सहा हात** लांबीचें असून फार प्रखर आहे. परशुरामांप्रमाणेंच ते ब्रह्मरूपानें क्षत्रियांचा अंत करण्यासाठीं ह्या भूतलीं अवतरले आहेतसें दिसतें. आहुताग्निप्रमाणें सामर्थ्यानें सर्व क्षत्रियांमध्यें श्रेष्ठ असून त्यांचें ब्रह्मतेज युद्धांत शत्रूला असह्य होतें. ब्रह्मक्षत्रिय तेजांची गांठ पडली असतां ब्रह्मतेजाचीच सरशी होते; ह्मणून माझ्या क्षात्र तेजाचें त्यांच्यापुढें कांहीं चालत नाहीं; यासाठीं मीं ब्रह्मतेजाकडे धांव घेतली आहे. ज्याच्या योगानें द्रोणांचा अंत करणारा मुलगा मला होईल असें कर्म आपण करा. आपणाला मी दहा कोटि गाई देतों.' बरें ह्मणून उपयाजांच्या सूचनेनें पुत्रप्राप्तीसाठीं याजांनीं वेतानकर्म सुरू केलें. वीर्य, तेज व बळ ह्यांनीं संपन्न असा पुत्र होणें हें त्याचें फल होतें. द्रुपदानें कर्मसिद्धीला लागणारी सर्व सामुग्री सिद्ध केली. नंतर याजांनीं अग्नींत आहुति दिली असतां त्यापासून एक मिथुन बाहेर आलें. त्यांपैकीं मुलगा होता तो त्या अग्नीच्या ज्वालेसारखा दैदीप्यमान व किरीटकवचधारी असून त्याच्या हातांत खड्ग व धनुष्यबाण हीं आयुधें होतीं; व मुलगी मोठी लावण्यवती व श्यामवर्ण असून तिचे नेत्र कमलासारखे होते; केस काळेभोर असून मानेवर कुरळे होऊन पडले होते; तिचीं आरक्त नखें पुढें आलीं होतीं. भिवया कमानदार होत्या. स्तन उन्नत होते. मनुष्यरूपानें अप्सराच या भूतलावर अवतरली आहे कीं काय असा ती प्रेक्षकांना भ्रम पाडीत होती. तिच्या देहाचा नीलकमलासारखा सुवास कोस कोस पसरत होता. ती जन्मल्याबरोबर

आकाशवाणी झाली, ' सर्व क्षत्रियांमध्यें श्रेष्ठ अशी ही कृष्णा क्षत्रियांचा अंत करण्यासाठीं अवतरली आहे. प्रसंगीं ही देवांचें कार्य करील. कौरवांना हिच्यापासून मोठी भीति आहे. ' धैर्य, तापटपणा, तेज हे गुण अग्नीपासून उत्पत्ति झाली असल्यामुळें मुलाचें **धृष्टद्युम्न** व कृष्णवर्णा असल्यामुळें मुलीचें **कृष्णा** अशीं ब्राह्मणांनीं नांवें ठेविलीं. **भवितव्यता टाळतां येणें अशक्य आहे,** असा विचार मनांत करून आपला लौकिक संभाळण्यासाठीं हा धृतद्युम्न द्रोणांकडे पुढें अस्त्रविद्या शिकण्यासाठीं गेला असतां त्यांनीं त्याला आपल्या घरीं ठेवून घेऊन सर्व अस्त्रविद्या शिकविली.'

३९. अर्जुनानें केलेला अंगारपर्णाचा पराभव. (१. १६९–७०.)

पांडवांना एकचक्रानगरींत राहण्याचा कंटाळा येऊन सर्वांच्या विचारानें त्यांनीं पांचालाला जाण्याचें ठरविलें. इतक्यांत व्यास त्यांच्याकडे येऊन कुशल प्रश्न करून म्हणाले, ' एका तपोवनांत एक कन्या होती. ती लावण्यवती असून तिला पति मिळेना म्हणून उग्र तप करून तिनें शंकराला प्रसन्न करून घेतलें. 'मला पति द्या,' असें पांचवार तिच्या तोंडांतून निघाल्यावरून अन्यजन्मीं तुला पांच पति मिळतील असा शंकरांनीं तिला वर दिला. तीच देवरूप कन्या सांप्रत द्रुपदाच्या घरीं जन्माला आली असून तुम्हां सर्वांची बायको होणार आहे. पांचाल नगरांत कांहीं काल राहून तिला मिळवून सुखी व्हा. ' असें सांगून व्यास निघून गेल्यावर त्या ब्राह्मणाला अभिवादन करून त्याचा निरोप घेऊन ते पांचालाला निघाले. मार्गांत गंगातीरीं संध्याकाळीं सोमाश्रयण तीर्थाला ते येऊन पोहोंचले. उजेडासाठीं हातांत मशाल पेटवून घेऊन अर्जुन पुढें चालला होता. त्या आल्हाददायक गंगेच्या जलांत गंधर्वराज स्त्रियांसहवर्तमान जलक्रीडा करीत होता. पांडवांनीं नदीकडे येऊन आपल्या क्रीडेला विघ्न करावें हें त्याला इष्ट नव्हतें, म्हणून संतापानें धनुष्याचा टणत्कार करून तो म्हणाला, ' प्रथम रात्रीच्या पूर्वीची ही संध्याकाळची वेळ यक्ष, गंधर्व व राक्षस ह्यांना यथेच्छ विहार करण्यासाठीं असून बाकीच्या वेळीं येथें माणसाला येण्याला मुभा आहे; तर ह्या वेळीं इकडे येऊन आम्हांला विघ्न करणाऱ्या मानवांना, मग ते कोणी का असेनात आम्ही बांधून ठेवतों. म्हणून तुम्ही जवळ येऊं नका. आपल्या बाहुबलावर यथेच्छ विहार करणारा कुबेरमित्र मी अंगारपर्ण नांवाचा गंधर्व आहें. मी गंगातीरीं विहार करीत फिरत असतों. पिशाच, श्वापदें अगर देव देखील माझ्या वाटेस जाण्याला धजत नाहीं.' हें ऐकून अर्जुनानें उत्तर दिलें, ' मूर्खा, **सागरतीर, हिमालयाचा पायथा, व ह्या नदीचें तीर ह्यांवर कोणाचीच विशेष मालकी नसून** सर्वांना हीं सारखीं आहेत. उपाशी किंवा यथेच्छ भोजनानंतर, दिवसां किंवा रात्रीं, वाटेल तेव्हां वाटेल त्याला ह्या नदीतीरीं फिरण्याचा हक्क आहे. तूं गमजा लावशील तर तुझ्याशीं दोन हात करण्याला हा मी तयार आहें. ज्यांच्या मणगटांत जोर नसेल ते तुमच्यापुढें **बांकतील. गंगा, यमुना, सरस्वती, वितस्ता, सरयू, गोमती व गंडकी ह्या सात नद्यांचें जल प्राशन करणारे सर्व पापांपासून मुक्त होतात.** ह्या पवित्र गंगेला स्वर्गामधून वाहतांना अलकनंदा नांव आहे, व पितृलोकांत वैतरणी हें नांव आहे. अशा सर्ववाही गंगेच्या काठानें फिरणाऱ्या आम्हांला प्रतिबंध करणारा तूं कोण ? हें तुझें कृत्य धर्माला धरून नाहीं. म्हणून आम्ही तुझें ऐकणारे नाहीं. ' हें अर्जुनाचें भाषण ऐकून विषारी सर्पाप्रमाणें तीव्र शर त्या गंधर्वानें अर्जुनावर सोडले. अर्जुनानें हातांतील कोलीत व ढाल फिरवून त्यांचा प्रतिकार केला. तो म्हणाला, ' गंधर्वराजा, अशा अस्त्रांचा अस्त्रज्ञांवर प्रयोग केला असतां फेंसाप्रमाणें ते जागच्या जागीं जिरून जातात हें कोठें तुला ठाऊक आहे ? पण माझ्या' अस्त्रांची मात्रा मनुष्य, गंधर्व व ह्याहीपेक्षां श्रेष्ठ प्राण्यांवर चालते. ' असें म्हणून बृहस्पतीपासून भरद्वाजाला, भरद्वाजापासून अग्निवेशाला, अग्निवेशापासून द्रोणांना व द्रोणांपासून ह्याला मिळालेलें आग्नेयास्त्र त्या गंधर्वावर सोडून त्यानें त्याचा रथ जाळून टाकला, व तो विरथ होऊन धाबरून अस्त्रतेजानें निचेष्ट होऊन पडत अ-

सतां गंधर्वाच्या गजरा खोवलेल्या शेंडीला धरून त्यानें त्याला फरफरां ओढलें. पतीच्या रक्षणासाठीं त्या गंधर्वाची कुंभीनसी नांवाची बायको युधिष्ठिराला शरण गेली. **'युद्धांत पाडाव झालेल्या यशोहीन व वीर्यहीन अशा अनाथ स्त्रीच्या नाथाला मारणें उचित नाहीं,'** असें सांगून युधिष्ठिरानें धनंजयाच्या तडाक्यांतून त्या गंधर्वाला जिवंत सोडविलें. गंधर्व ह्मणाला, 'तूं माझा पराभव करून माझा गर्व परिहार केला आहेस. मी आतां हें आपलें मोठें नांव सोडून देतों. **सर्वाश्रमांत ब्रह्मचर्याश्रम वीर्य देणारें आहे,** व त्यांत हल्लीं तूं असल्यामुळें तुझ्या हातून हा माझा पराभव झाला आहे. त्यांतून तुम्ही धर्मनित्य व व्रतस्थ आहां. मी तुम्हांला, गंधर्वांना योग्य व देवांना उपभोग्य असे शंभर घोडे नजर पाठवून देईन.' असें सांगून शेवटीं अभ्युदयेच्छु राजानें योग्य पुरोहित मिळवावा; तो षडंग वेद जाणणारा असून शुचि, सत्यप्रिय व जितेंद्रिय असावा; तसाच न मिळालेलें मिळवून देणारा व जवळचें राखणारा असा तो असावा; असा पुरोहित जो राजा मिळवितो तो कधीं नाश पावत नाहीं,' असा त्यानें उपदेश केला. हें गंधर्वाचें भाषण ऐकून अशा प्रकारचा कोणी पुरोहित तुम्हांला माहीत आहे का ह्मणून अर्जुनाने विचारल्यावरून 'उत्कोचकतीर्थीं देवलाचे धाकटे बंधु धौम्य तपश्चर्या करीत आहेत ते तुमचे पुरोहित होण्याला योग्य आहेत,' असें सांगून गंधर्व त्याला चक्षुषीविद्या देऊं लागला. तेव्हां अर्जुन ह्मणाला, 'तुझे प्राण वांचविल्याबद्दल प्रत्युपकार ह्मणून तूं ही विद्या देत असशील तर ती मी घेणार नाहीं.' हे ऐकून गंधर्व ह्मणाला, 'हे तापत्या, ही मनूपासून सोमाला, सोमापासून विश्वावसूला व त्यापासून मला मिळाली असून वाटेल तें वाटेल तसें हिच्या साहाय्यानें पाहतां येतें. **थोराचा समागम नेहमीं संतोषाला कारण होतो.** मी ही विद्या प्रेमपूर्वक तुला देत आहें.' 'असें ह्मणून त्यानें अर्जुनाला ती विद्या दिली व अर्जुनानें त्याला उलट आग्नेयास्त्र दिलें. नंतर तो गंधर्व प्रेमपूर्वक निरोप घेऊन निघून गेला. पुढें धौम्याच्या आश्रमाला जाऊन पांडवांनीं त्यांना आपले पुरोहित होण्याविषयीं प्रार्थना केली व त्यांनीं ती मान्य केली. त्याबरोबर सनाथ होऊन संपत्ति, राज्य व द्रौपदी आपल्याला मिळाल्याप्रमाणें पांडवांना वाटूं लागलें.

४०. तपतीची कथा—कुरुजन्म.
(१. १७१—७३.)

'तूं मला तापत्य ह्मणून हांक मारलीस हें कसें,' ह्मणून अर्जुनानें विचारल्यावरून अंगारपर्ण ह्मणाला, 'प्रभामंडळानें सर्व आकाश व्यापून टाकणाऱ्या सूर्याची तपांत गढलेली व रूपानें अद्वितीय अशी तपती नांवाची कन्या होती. ही त्रैलोक्यसुंदरी मुलगी आचार, रूप, शील, गुण व विद्या ह्यांनीं संपन्न असल्यामुळें तिला अनुरूप असा कोणी पति सूर्याला सांपडेना. यौवनदशेंत आल्यामुळें आतां ती कोणाला तरी देऊन टाकली पाहिजे असा विचार मनांत येऊन सूर्याला चिंता पडली. ह्याच वेळीं कौरवश्रेष्ठ ऋक्षपुत्र संवरण अहंकार सोडून व व्रतस्थ होऊन सूर्याची आराधना करीत होता. त्याचें थोर व लौकिकसंपन्न कुळ मनांत आणून तो आपल्या कन्येला अनुरूप पति आहे असें सूर्याला वाटलें व तिला त्याला देण्याचा तो विचार करूं लागला. आकाशांतील सूर्याप्रमाणें त्या राजानें आपल्या तेजानें सर्व भूमंडळ व्यापून टाकिलें होतें. चंद्रासमान मोहक असून तेजानें तो सूर्यासारखा दैदीप्यमान होता. मित्र व शत्रू ह्या दोघांवर त्याचा सारखा दाब असे. कोणे एके वेळीं पर्वतपृष्ठावरून मृगया करीत फिरत असतां त्याचा उमदा घोडा ठेंचाळून पडून मरण पावला. तेव्हां तो पायांनींच भटकूं लागला. त्या वेळीं एक अद्वितीय लावण्यवती कन्या त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां बारीक नजर लावून तो तिच्याकडे टकमक पहात उभा राहिला. अग्निशिखेसारखी तेजःपुंज ही सूर्यप्रभाच खालीं आली आहे कीं काय असा भ्रम ती उत्पन्न करीत होती. प्रसन्नतेनें व कांतीनें स्वच्छ अशा चंद्रलेखेसारख्या व सोन्याच्या पुतळीप्रमाणें पीतवर्ण अशा त्या कन्येला त्या ठिकाणीं पाहून राजाला आपल्या डोळ्यांचें पारणें फिटलेंसें वाटूं लागलें. तिच्या गुणपाशानें त्याचें मन व नेत्र अगदीं जखडून टाकिलीं,

एखाद्या पुतळ्याप्रमाणें जाग्यावरून हालण्याची देखील त्याच्या अंगीं शक्ति उरली नाहीं. तो कुलशीलसंपन्न होता, तरी मदनाग्नीनें संतप्त होऊन त्याचें धैर्य गळालें; तथापि अवसान आणून तो त्या अव्याजसुंदरीला ह्मणाला, 'तूं कोण, येथें कां आली आहेस? ह्या निर्जन वनांत अशी एकटी कां भटकतेस? ह्या तुझ्या भूषणांना तूं भूषण देत आहेस. तूं देवस्त्री, असुरस्त्री, यक्षस्त्री, गंधर्वस्त्री अथवा मानवस्त्री असाबीस असें मला वाटत नाहीं, माझ्या पाहण्यांत अगर ऐकण्यांत ज्या ह्मणून लावण्यवती स्त्रिया आल्या आहेत त्यांमध्यें तुझ्यासारखी माझ्या मुळींच पाहण्यांत आली नाहीं. चंद्राला मागें सारणारें हें तुझें कांतिमान मुख पाहिल्याबरोबर मी वेडा झालों आहे.' हें त्याचें भाषण ऐकून ढगामध्यें विजेप्रमाणें ती जागच्याजागीं एकदम गडप झाली. तीं दिसेनाशी झाल्याबरोबर अनेक शत्रूंना तापद असा जरी तो राजा होता तरी अगदीं शोकाकुल होऊन तो खालीं पडला. तें पाहून फिरून दृश्य होऊन ती त्याला ह्मणाली, 'महाराज उठा, तुमचें कल्याण होवो. ह्याप्रमाणें धीर सोडून जमिनीवर लोळणें तुह्मासारख्यांना शोभत नाहीं.' त्यानें उत्तर दिलें, 'हे कल्याणि, तुझे श्याम नेत्र मजवर पहा कसे शरवर्षाव करीत आहेत! फुललेल्या काशवृक्षासारखा हा तुझा वर्ण पाहून पंचशरानें मला जर्जर केलें आहे. तुझें भाषण किन्नराच्या गायनाप्रमाणें किती तरी मधुर आहे! माझे प्राण तुझ्यावर अवलंबून आहेत. ह्मणून माझी कींव करून व उलट मजवर प्रीति दाखवून मला संकटांतून सोडविणें तुझ्या हातांत आहे. तुझ्या दर्शनापासून उत्पन्न झालेल्या प्रेमामुळें माझें मन जाग्यावरून अगदीं उडालें आहे. तुला पहिल्यापासून सृष्टींतील अन्य पदार्थ तुच्छ वाटून मला त्यांकडे पहावेंसें देखील वाटत नाहीं. कामाग्नीचा शरीरांत पेटलेला भडका मन्मथ आपल्या शरांनीं वाढवीत आहे. प्रीतिसंयोगरूपी उदकानें ह्या प्रचंड व अनावर धनुर्धारी मदनाला शांत कर. गांधर्वविवाहानें माझा अंगीकार कर.' हें राजाचें भाषण ऐकून ती ह्मणाली, 'मी पित्याच्या आधीन असल्यामुळें मजवर माझें स्वतःचें स्वामित्व मुळींच नाहीं. आपण ह्मणतां तसें आपलें मजवर खरें प्रेम असेल तर बाबांजवळ मागणी करा. जसें मी आपलें मन हरण केलें आहे असें आपण ह्मणतां त्याचप्रमाणें आपणही माझें मन हरण केलें आहे. पण ह्या देहावर माझी मालकी नसल्यामुळें आपलें ह्मणणें मला मान्य करतां येत नाहीं. स्त्रियांना स्वातंत्र्य नाहीं असें ह्मणतात. कोणत्या मुलीला लोकांमध्यें नांवाजलेला, कुलीन व प्रेमळ असा पति आवडणार नाहीं? आपण बाबांना सांगून त्यांची जर ह्या संबंधाला संमति मिळवाल तर आपली आज्ञांकित दासी होण्याला माझ्याकडून ना नाहीं.' असें ह्मणून ती वर निघून गेली व तो पूर्ववत् भूमीवर निचेष्ट पडला. इतक्यांत त्याचा प्रधान सैन्य व सेवक यांसह त्याचा शोध करीत तेथें आला. राजाला त्या ठिकाणीं तसा पडलेला पाहून त्यांचें मन चर्र झालें व अतिस्नेहामुळें अगदीं भांबावून जाऊन बाप ज्याप्रमाणें आपल्या मुलाकडे धांव घेतो त्याप्रमाणें घाईघाईनें त्याजवळ जाऊन त्यानें त्याला उठविलें. राजा उठून शुद्धीवर येऊन बसल्यामुळें जिवांत जीव येऊन त्यानें त्याच्या मस्तकावर थंड पाणी शिंपडलें व तो चांगला शुद्धीवर आल्यावर त्याला धीर आला. नंतर त्या प्रधानाशिवाय इतर सर्वांना जाण्यास आज्ञा देऊन त्याच पर्वतप्रदेशांत शुचिर्भूत होऊन डोळे आकाशाकडे लावून सूर्याची आराधना करण्यासाठीं वसिष्ठ पुरोहितांचें स्मरण करून तो तपश्चर्येला बसला. याप्रमाणें अहोरात्र बारा दिवस लोटल्यावर तेरावे दिवशीं त्याचें मन तपतीवर गेलेलें ज्ञानचक्षूनें पाहून वसिष्ठ त्या ठिकाणीं आले व त्याला धीर देऊन त्याचें प्रिय करण्याच्या उद्देशानें ते वर सूर्याकडे गेले. 'मी वसिष्ठ आलों आहे,' असें प्रीतिपूर्वक कळवून प्रणिपातादि विधि आटोपल्यावर त्यांनीं त्याची कन्या संवरणासाठीं मागितली. हा राजा मोठा कीर्तिमान, धार्मिक, व उदारधी आहे, असें जाणून वसिष्ठांचा उलट आदर करून सूर्य ह्मणाला, 'संवरण सर्व राजांमध्यें श्रेष्ठ असून आपण सर्व ऋषींचे अग्रणी आहां. स्त्रियांमध्यें तपतीसारखी कोणी नाहीं; म्हणून आतां आपल्या ह्मणण्याला रुकार देण्यापलीकडे कांहींच उरलें नाहीं.' असें म्हणून स्वतः सूर्यानें तिला संवरणासाठीं वसि-

ह्यांच्या पदरांत घातली. त्यांच्याबरोबर ती आकाशांतून खालीं येत असतां आपल्या तेजानें सर्व दिशा प्रकाशित करीत वरून पडणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें दैदीप्यमान दिसत होती. इकडे राजाच्या तपाला पूर्ण बारा दिवस झाले. तेरावे दिवशीं वसिष्ठ तपतीसह त्या पर्वतावर उतरले. वसिष्ठाज्ञेनें राजानें त्या पर्वतावरच तिचें विधिपूर्वक पाणिग्रहण केलें. नंतर सर्व राज्यकारभार सचिवावर टाकून त्याच पर्वतावर बारा वर्षे तो तिच्या समागमामध्यें विहार करीत होता. त्या बारा वर्षांत त्याच्या राज्यांत पाऊस मुळींच पडला नाहीं, व सर्व चराचरांचा संहार सुरू झाला. त्या घोरकालीं पृथ्वीवर दंव देखील पडलें नाहीं. धान्य मुळींच पिकलें नाहीं. लोक अगदीं हवालदील होऊन जाऊन घरेंदारें सोडून दशदिशा भटकूं लागले. अनेक भुकेनें व्याकुळ झाले. कित्येक मुलाबाळांची पर्वा न करतां एकमेकांला खाण्याला तयार झाले. त्या वेळीं अन्नान्नगत झालेल्या, अस्थिपंजर उरलेल्या, व प्रेतकळा आलेल्या लोकांनीं भरलेलें तें राष्ट्र यमपुरीसारखें दिसूं लागलें. तेव्हां वसिष्ठांनीं त्या राजशार्दूलाला तपतीसह आपल्या नगरीला परत बोलाविलें. त्या बेळेपासून त्या ठिकाणीं पूर्वीप्रमाणें पाऊस पडूं लागून जिकडे तिकडे अबादानी झाली. तपतीपासून संवरणाला कुरु नांवाचा मुलगा झाला. '

---

४१ वसिष्ठांची कथा, कल्माषपाद शाप व पराशरांचा इतिहास. (१. १७४–८२)

' ह्या वसिष्ठांचा वृत्तांत आह्मांला सांगा, ' म्हणून अर्जुनानें विचारल्यावरून अंगारपर्ण ह्मणाला ' महर्षी वसिष्ठ हे मानसपुत्र व अरुंधतीचे पति होत. ते मोठे तपस्वी व वशी असून देवांना देखील अजिंक्य अशा कामक्रोधादिकांना त्यांनीं आपल्या तपःप्रभावानें आपले दास बनवून सोडलें होतें. विश्वामित्रांच्या हातून राग येण्यासारखा अपराध घडला असून देखील त्या उदारधीच्या मनांत कुशिककुलाचा समूळ नाश करण्याचें आलें नाहीं. नाथ असून अनाथाप्रमाणें विश्वामित्रांचें वाईट करण्याचें त्यांनीं मनांत देखील आणिलें नाहीं. विश्वामित्रांनीं मारलेल्या आपल्या मुलांना यमापासून परत आणण्याची शक्ति असून महोदधीप्रमाणें त्यांनीं मर्यादेचें उल्लंघन केलें नाहीं. ती कथा अशी आहे.

कान्यकुब्जदेशांत कुशिकापासून झालेला गाधिनांवाचा कोणी विख्यात राजा होऊन गेला. त्याचा श्रीमान, बलशाली व रिपुमर्दन असा विश्वामित्र नांवाचा मुलगा होता. अमात्य व सैन्य ह्यांसहवर्तमान तो एके समयीं निबिड अरण्यांत मृगया करीत श्वापदांमागें लागून फिरत असतां श्रमानें थकून जाऊन तृषाकुल होऊन वसिष्ठांच्या आश्रमाला आला. वसिष्ठांनीं अर्घ्यपाद्यादि पूजासाहित्यानें त्याची पूजा करून त्याचें स्वागत केलें व वन्यफळें भक्षण करण्यास देऊन त्याचें आतिथ्य केलें. वसिष्ठांची एक कामधेनु होती. तिनें अनेक प्रकारचे खाद्यपेयादि पदार्थ व नानाप्रकारचे वस्त्रालंकार मागितल्याबरोबर उत्पन्न केले. त्या आदरातिथ्याचा स्वीकार करून, जिचे सहा भाग बर आले होते, जिच्या बरगड्या व मांड्या भरदार व प्रेक्षणीय दिसत होत्या, पांच अवयव विस्तृत होते, जिचे डोळे बेडकासारखे पुढें आलेले होते, जिचा एकंदर आकार दर्शनीय असून कांस भली मोठी होती, शेंपूट गोंडेदार, कान पसरट, शिंगें कमानदार व तोंड व मान लांब होतीं, अशी ती ऋषींची धष्टपुष्ट गाय पाहून विश्वामित्रराजाच्या मनांत तिच्याविषयीं अभिलाष उत्पन्न होऊन तो वसिष्ठांना ह्मणाला, ' ब्रह्मन्, दहा कोटी गाई अथवा पाहिजे असल्यास सारें राज्य मोबदला घेऊन मला ही गाय द्या व आपण सुखानें राज्याचा उपभोग घ्या. वसिष्ठ ह्मणाले, ' देवता, अतिथि व पितृवर्ग ह्यांना उपयोगीं पडणारी ही गाय राज्य मोबदला घेऊन देखील देतां येणार नाहीं. ' असें वसिष्ठांचें उत्तर ऐकून विश्वामित्र फिरून म्हणाला, 'मी क्षत्रिय आहें. आपण ब्राह्मण असून तप व वेदाध्ययन ह्यांतच काय तें आपलें सामर्थ्य आहे. जितेंद्रिय अशा शांत ब्राह्मणांचे ठिकाणीं वीर्याचा अभावच असणार. दहा कोटी गाई देऊन देखील जर आपण माझ्या प्रार्थनेला मान्य होणार नाहीं तर मी आपला धर्म सोडणार नाहीं. बलात्कारानें सुद्धां मी ही गाय घेऊन जाईन. ' हें ऐकून वसिष्ठ म्हणाले, ' क्षत्रिय बलवान व वीर्यसंपन्न आहेत हें खरें आहे.

तुझ्या मनांत असेल तें तूं केल्याबांचून सोडणार नाहींस. मग या कामाला उशीर किंवा विचार कशाला ?' हें ऐकून विश्वामित्र त्या गाईला सोडून घेऊन चालला. पुष्कळ कोरडे घसूं लागल्यामुळें हंबरडा फोडीत आश्रमाकडे धांव घेऊन विश्वामित्राच्या भयानें कांपत कांपत 'भगवन्, माझी अशी उपेक्षा का करतां,' म्हणून ती गाय केविलबाणें वसिष्ठांना म्हणाली. ह्याप्रमाणें जुलूम होऊन दीनाप्रमाणें हंबरडा फोडीत होती तरी वसिष्ठांना राग मुळींच आला नाहीं व त्यांचें धैर्यही ढळलें नाहीं. तिला त्या स्थितींत पाहून सदय अंतःकरणानें ते म्हणाले 'भद्रे, तुझा हा हंबरडा वारंवार माझ्या कानीं येत असल्यानें मला फार दुःख होत आहे. विश्वामित्र तुला बलात्कारानें घेऊन चालला आहे तेथें माझा उपाय नाहीं. मी क्षमाशील ब्राह्मण आहें. **क्षत्रियाचें बल तेज असून ब्राह्मणाचें बल क्षमा आहे.** म्हणून तुला वाटेल तसें कर.' यावर 'तर मग आपण मला टाकिलें नाहींना, आपण न टाकतां बलत्कारानें मला घेऊन जाण्याला प्रत्यक्ष काळही समर्थ नाही,' असें तिचें भाषण ऐकून वसिष्ठ म्हणाले, 'मीं तुला टाकिलें नाहीं. शक्ति असेल तर रहा. ह्या तुझ्या वत्साला दोरीनें बळकट बांधून बलात्कारानें हा घेऊन चालला आहे पहा.' हें वसिष्ठांचें भाषण ऐकून त्या गाईनें मान उभारिली व रुद्ररूप धारण करून रागानें डोळे लाल केले. मोठ्यानें हंबरडा फोडून विश्वामित्राच्या सैन्याची एकदम दाणादाण उडविली. मध्याह्नकाळच्या सूर्याप्रमाणें लाल होऊन शेंपटापासून चोहोंकडे आग फेकीत शेंपटापासून पल्हव, स्तनांपासून द्राविड व शक, योनिभागापासून यवन, मलमूत्रापासून शबर, पार्श्वभागापासून पौंड्र, किरात, सिंहल, बर्बर, खस चिबुक, पुलिंद, चीन, हूण व केरल, आणि लाळेपासून म्लेंच्छ उत्पन्न करून, ह्या नानाकवचधारी व नानाप्रहरणयुक्त अशा सैन्याच्या साहाय्यानें तिनें विश्वामित्राच्या सैन्याची वाताहत लाविली. ब्रह्मतेजाचें हें मोठें सामर्थ्य पाहून क्षत्रत्वाचा बीट येऊन विश्वामित्र म्हणाला, 'धिक्कार असो त्या क्षात्रबलाला. ब्रह्मतेजाचें बलच खरें बल होय. बलाबलाचा विचार करतां तपोबलासारखें मला दुसरें बल दिसत नाहीं.' असा विचार मनांत येऊन आपलें प्रचंड राज्य व अखंड लक्ष्मी ह्यांचा त्याग करून, सर्व सुखोपभोग बाजूला झुगारून देऊन त्यानें तपांत मन घातलें व तपानें सिद्धि मिळवून आत्मतेजानें सर्व लोक झांकून टाकिले. पुढें त्यानें ब्राह्मणत्वही मिळविलें आणि इंद्राबरोबर बसून सोम पिण्याचा अधिकार संपादन केला.

कल्माषपाद नांवाचा इक्ष्वाकुवंशज कोणी राजा होता. युद्धामध्यें अजिंक्य असा तो राजा मृगया करीत फिरत असतां थकून भुकेनें व तहानेनें व्याकुळ होऊन एका पाऊलवाटेनें चालला असतां त्यानें शक्ति नांवाचा वसिष्ठांचा थोरला मुलगा समोरून येतांना पाहिला. त्याला धमकावून राजा म्हणाला, 'अरे ब्राह्मणा, बाजूला होऊन मला वाट दे.' त्या ऋषिपुत्रानें मधुर शब्दांनीं उत्तर दिलें, '**शास्त्रांत राजानें ब्राह्मणाला वाट दिली पाहिजे,** असें सांगितलें आहे म्हणून तूंच मला वाट दे.' ह्याप्रमाणें त्यांचा वाद कोणीं द्यावी ह्याबद्दल तंटा चालू झाला. धर्म मनांत आणून त्या ऋषिपुत्रानें वाट दिली नाहीं व राजानेंही त्याचा अभिमान पाहून रागावून हार खाल्ली नाहीं. उलट मूर्खपणानें राक्षसवृत्ति धरून राजानें त्याला चाबकानें मारलें. राग अनावर होऊन, 'ज्या अर्थीं माझ्याशीं तुझें राक्षसी वर्तन झालें आहे त्या अर्थीं आजपासून तूं राक्षस होऊन मनुष्यें खात पृथ्वीवर संचार करशील,' असा त्या ऋषिपुत्रानें राजाला शाप दिला. ते दोघे ह्याप्रमाणें भांडत असतां विश्वामित्र तिकडून चालला होता. त्या दोघांपैकीं एक वसिष्ठपुत्र आहे असें पाहून आपला कार्यभाग साधून घेण्यासाठीं त्यांना न दिसतां त्यानें दोघांनाही फसविलें. राजा शक्तीला संतुष्ट करण्याच्या विचारांत आहेसें पाहून किंकर नांवाच्या राक्षसाचा त्यामध्यें प्रवेश करवून त्याकडून त्यानें राजाला फार त्रास देवविला. त्यामुळें आपण काय करतों ह्याचें राजाला कांहींच भान राहिलें नाहीं. ह्या रीतीनें तो फिरत असतां कोणा एका क्षुत्पीडित ब्राह्मणानें त्यापाशीं मांस खाण्यास मागितलें. त्या ब्राह्मणाला तेथेंच कांहीं वेळ वाट पाहण्यास सां-

गून राजवाड्यांत परत येऊन त्या ब्राह्मणासाठीं वनांत मांस घेऊन जाण्यास राजानें आपल्या सेवकांस आज्ञा केली, व बोकडाचें मांस कोठें न मिळाल्यामुळें नरमांसच त्यासाठीं नेण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सेवक नरमांस घेऊन त्याकडे गेला असतां ज्ञानचक्षूनें तें मांस अभक्ष्य आहे असें जाणून 'नरमांस खात तूं फिरशील,' असा शक्ति प्रमाणेंच फिरून त्या विप्रानें राजाला शाप दिला. ह्याप्रमाणें दुहेरी शाप झाल्यानें त्याचा परिणाम विशेष भयंकर झाला व त्याच्या देहांत संचार करणाऱ्या त्या राक्षसाच्या प्रभावानें अगदीं उच्छृंखल व मूर्ख बनून जाऊन शक्तीला एके वेळीं पुढें पाहून बाघ ज्याप्रमाणें एखाद्या पशूला फाडून खातो त्याप्रमाणें त्यानें त्याला फाडून खाल्लें. ह्याप्रमाणें शक्ति मरण पावल्यावर विश्वामित्रानें त्या राक्षसाकडून वसिष्ठांचे दुसरे मुलगे खावविले. हा राजा कोणे एके वेळीं भुकेनें पिडून जाऊन भक्ष्याच्या शोधार्थ श्वापदांनीं संकुल व नाना वृक्षलतांनीं भरलेल्या एका अरण्यामधून फिरत असतां त्या ठिकाणीं एक ब्राह्मणाचें दंपत्य रतिसुखांत गढलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. राक्षसाला पाहून इष्ट हेतु शेवटास न जातां तीं दोघीं भिऊन पळूं लागलीं. पळतां पळतां राक्षसानें ब्राह्मणाला पकडलें. तें पाहून त्याची स्त्री गयावया करून ह्मणाली, 'राजा, सूर्यवंशांत तुझा जन्म असून तूं लौकिकवान आहेस. धर्मरक्षण व गुरुजनशुश्रुषा ह्यासंबंधानें तुझी मोठी ख्याति आहे. केवळ शापानें मूढ झाल्यामुळें हें पापाचरण करणें तुला योग्य नाहीं. ऋतुकाल असल्यामुळें पतीकडे येऊन संतानासाठीं आह्मी येथें एकत्र जुळलों होतों. ह्मणून ह्या माझ्या पतीला तूं सोडून दे.' ह्या तिच्या विनवणीकडे लक्ष न देतां राजानें त्याला खाऊन टाकिलें. तिच्या रागापासून उत्पन्न झालेल्या अग्नीनें तो प्रदेश जाळून भस्म केला. नंतर 'ज्या अर्थी माझा हेतु सफल होण्यापूर्वी तूं माझ्या पतीला खाल्लें आहेस, त्याअर्थी तुलाही ऋतुकालीं स्त्रीशीं संभोग करीत असतां मरण येईल, व ज्या वसिष्ठांचे पुत्र तूं खाल्ले आहेस त्या महात्म्यांपासून तुझ्या स्त्रीला वंशकर पुत्र होईल,' असा शाप देऊन त्याच्या समक्ष अग्नि पेटवून त्यांत तिनें प्रवेश केला.

इकडे विश्वामित्रानें आपले मुलगे मारविले हें ऐकून वसिष्ठ शोकसागरांत बुडून जाऊन आत्महत्या करून घेण्याला तयार झाले. तरी कौशिककुलाचा उच्छेद करण्याचें त्यांच्या मनांत देखील आलें नाहीं. त्यांनीं मेरुपर्वतावरून आपल्याला खालीं लोटून घेतलें, पण एकाद्या कापसाच्या गठ्ठ्याप्रमाणें सुरक्षितपणें तें खालीं दगडावर येऊन पडले. नंतर अग्नि पेटवून त्यांत त्यांनीं उडी घेतली; पण त्या पेटलेल्या अग्नीपासून त्यांना काडीभर देखील अपाय झाला नाहीं. नंतर गळ्यांत मोठा धोंडा बांधून घेऊन त्यांनीं समुद्रांत उडी घेतली; पण समुद्रानें लाटांबरोबर त्यांना जमिनीवर सुरक्षित आणून सोडलें. एका तुफान झालेल्या नदींत आपल्याला बांधून घेऊन त्यांनीं उडी घेतली, तरी तिनेंही त्यांना सुरक्षितपणें तीराला आणून सोडलें. तेव्हांपासून तिचें विपाशा असें नांव पडलें. पुढें निरुपाय होऊन शोक करीत ते पर्वत, नद्या, सरोवरें इत्यादिकांच्या तीरांनीं भटकत असतां क्रूर सुसरींनीं व्याप्त अशी हैमवती नदी पुढें पाहून तींत त्यांनीं उडी घेतली. त्या सरिद्वरेला ते अग्नीसारखे भासल्यामुळें शेंकडों प्रवाहांनीं ती त्यांपासून दूर झाली, म्हणून शतद्रु असें तिचें नांव पडलें. आत्महत्या करून घेणें आतां शक्य नाहींसें वाटून ते आश्रमाकडे फिरले. परत येतांना त्यांची अदृश्यंती नांवाची सून त्यांच्या मागून येत होती. त्या बाजूनें षडंगमंडित वेदाध्ययनाचा ध्वनि स्पष्ट ऐकून 'मागून कोण येत आहे.' म्हणून त्यांनीं विचारलें. 'मी शक्तीची बायको आहें. त्यांच्यापासून माझ्या उदरांत गर्भधारणा झाली आहे. त्याचा हा वेदाध्ययनाचा ध्वनि ऐकूं येत आहे,' असें सुनेचें भाषण ऐकून असल्या वंशवर्धक संतानामुळें मनाला समाधान वाटून ते तिच्यासह आश्रमाकडे निघाले. वाटेंत निर्जन वनांत कल्माषपाद त्यांना भेटला. तो उन्मत्त राक्षसानें झपाटला गेला असल्यामुळें त्यांना खाण्याला धांवून आला. त्यावर तो हल्ला करणार तों 'भिऊं नको,' ह्मणून सुनेला आश्वासन देऊन हुंकारानेंच त्यांनीं त्याला दूर केलें व मंत्रपूत उदक त्यावर शिंपडून पूर्वी झालेल्या दोन्ही शापांपासून त्याला मुक्त केलें. पर्वकालीन सूर्याप्रमाणें हा राजा बारा वर्षे वसिष्ठां-

च्याच तेजानें ग्रासला होता. देहांत संचार करणाऱ्या राक्षसापासून मुक्त झाल्यावर पूर्वस्मृति होऊन लीनपणें हात जोडून पुढें उभा राहून 'काय आज्ञा आहे,' म्हणून तो वसिष्ठांना म्हणाला. 'हें सर्व प्राक्तनानुरूप घडून आलें आहे, आतां राज्यांत परत जाऊन सुखानें राज्य कर, फिरून ब्राह्मणाची कधीं अवहेलना करूं नकोस, असा वसिष्ठांनीं त्याला उपदेश केला. तो ऐकून इक्षवाकुकुलाच्या वृद्धीसाठीं शील, रूप, व गुण ह्यांनीं संपन्न असें अपत्य आपणापासून मला मिळावें अशी त्यानें त्यांना विनंति केली. मग योग्यकाळीं वसिष्ठ अयोध्येला गेले असतां सर्व प्रजा त्यांना सामोरी येऊन नगरांत घेऊन गेली. सूर्यप्रमाणें दैदीप्यमान व शरत्कालीन चंद्राप्रमाणें सौम्य अशा त्या राजानें तें नगर ऊर्जित दशेला आणलें होतें. **वसिष्ठ आले त्या वेळीं रस्ते पाणी शिंपडून झाडून स्वच्छ केले होते. घरोघर निशाणें उभारलीं होतीं.** त्यामुळें रम्य व हृष्टपुष्ट प्रजेनें गजबजलेलें तें नगर इंद्राच्या अमरावतीप्रमाणें शोभायमान दिसत असून मनाला आल्हाद देत होतें. राजाच्या विनंतीवरून राणीशीं संबंध करून वसिष्ठांनीं तिच्या ठिकाणीं गर्भ उत्पन्न केला. नंतर राजानें केलेला सत्कार घेऊन ते आश्रमाकडे गेले. पुढें **बारा वर्षांनीं पोट फोडून राणीनें अश्मक नांवाच्या राजर्षीला जन्म दिला.** पुढें त्याला **पौदन्य** या नांवाचा मुलगा झाला.

इकडे वसिष्ठ आश्रमांत परत आल्यावर शक्तीच्या बायकोनें वंशकर अशा मुलाला जन्म दिला. नातवाचे जातकर्मादि सर्व संस्कार भगवान वसिष्ठांनीं स्वतः केले. वंशक्षयानें शोककुल झालेल्या वसिष्ठांचें अस्तित्व ह्या गर्भाच्या योगानें कायम झाल्यामुळें त्यांनीं मुलाचें **पराशर** असें नांव ठेविलें. समजूं लागल्यापासून वसिष्ठांनाच पिता समजून त्यांच्या ठिकाणीं त्यांचें पितृवत् वर्तन असे. बाबा, म्हणून प्रेमळ व स्पष्ट शब्दानें त्यांना हांक मारतांना ऐकून आईचे डोळे पाण्यानें भरून येऊन ती एके समयीं पराशरांना म्हणाली, 'बाळा आजोबांना अशी हांक काय म्हणून मारतोस ? तुझ्या तातांला अरण्यांत राक्षसानें खाऊन टाकलें आहे.' हें ऐकून दुःखानें व्याकुळ होऊन त्या सत्यवाक् ऋषींनीं सर्व लोकांचा नाश करण्याचें मनांत आणलें. तो त्यांचा निश्चय पाहून कार्तवीर्याची गोष्ट सांगून वसिष्ठांनीं त्यांना त्यापासून परावृत्त केलें. ते म्हणालेः—

'कार्तवीर्य नांवाचा कोणी भृगुशिष्य सर्व राजांमध्यें श्रेष्ठ होता. ह्या राजानें सोमयज्ञ करून त्यांत अनेक ब्रह्मवृंदांना अन्न व द्रव्य देऊन तृप्त केलें. तो राजशार्दूल मरण पावल्यावर त्याच्या वंशजांना पैशाचें काम पडलें. भृगूंच्या संपत्तीची लोकप्रसिद्ध ख्याति ऐकून हे राजे भिक्षुकवेषानें त्यांकडे याचनेला गेले. बलात्कार होण्याच्या भीतीनें भृगुवंशांतील कांहींनीं पैसा जमिनींत पुरून टाकला. कांहींनीं तर हें क्षत्रियापासून आलेलें संकट टाळण्यासाठीं तो ब्राह्मणांना दान करून टाकला व कांहींनीं क्षत्रियांनीं मागितलें तेवढें त्यांना दिलें. पुढें दुसऱ्या कांहीं कारणासाठीं क्षत्रिय सहज भूमि खणीत असतां भृगूंच्या घरीं त्यांना पुष्कळ द्रव्य सांपडलें. तें पाहून सर्व भृगु शरण आले, तरी तिकडे लक्ष न देतां त्या क्षत्रियांनीं प्रखर बाण सोडून त्या सर्वांचा नाश केला व सर्व पृथ्वी धुंडाळून कोणी गर्भस्थ भृगु देखील त्यांनीं राखला नाहीं. ह्याप्रमाणें भृगुकुलाचा उच्छेद चालला असतां भृगुस्त्रिया हिमालयाच्या दुर्गम प्रदेशांत जाऊन लपल्या. त्यांपैकीं एकीनें वंश पुढें चालावा म्हणून एक मोठा तेजस्वी गर्भ मांडीमध्यें दडवून ठेविला. तें एका ब्राह्मणस्त्रीला कळून तिनें भयानें जाऊन ती बातमी क्षत्रियांना दिली. ती दैदीप्यमान स्त्री मांडी कापून गर्भ बाहेर काढण्याच्या उद्देशानें निघालेल्या क्षत्रियांच्या दृष्टीस पडली. इतक्यांत मध्यान्हकालच्या सूर्याप्रमाणें क्षत्रियांचे डोळे दिपवून सोडणारा तो गर्भ मांडी फाडून बाहेर पडला. त्याच्या तेजानें क्षत्रिय अंधळे होऊन त्या दुर्गम प्रदेशांतून भटकूं लागले. नंतर विझलेल्या अग्नीप्रमाणें तेजोहीन झाल्यामुळें कष्टी होऊन त्या ब्राह्मणस्त्रीला शरण जाऊन ते म्हणाले, 'तुझ्याच प्रसादानें आम्हांला आमचे डोळे फिरून मिळून पापाचें निरसन होणार आहे. आमच्यावर प्रसाद केला पाहिजे.' ती म्हणाली, 'बाबांनो, तुमचे डोळे फुटण्याला मी मुळींच कारण नाहीं; माझ्या मांडीपासून निघालेला हा भार्गव फार खवळला आहे. बांधवांच्या नाशाची आठवण होऊन सूड

घेण्यासाठीं त्यानें तुह्मांला अंधळें करून टाकलें. भृगुवंशांतील गर्भावर देखील ज्या वेळीं तुमची गदा आली त्या वेळीं मीं ह्याला शंभर वर्षेपर्यंत मांडींत दडविला होता. भृगुवंशाचे कल्याणासाठीं षडंग वेदांनीं स्वतःच आपण होऊन हा गर्भांत असतांना त्याच्या ठिकाणीं प्रवेश केला आहे. त्याच्या दिव्य तेजानें तुमचे डोळे नाहींसे झाले आहेत. त्याजवळ क्षमा मागाल तर तो कदाचित् तुमच्यावर कृपा करील.' नंतर त्यांनीं त्यांची प्रार्थना केल्यावर त्यानें त्यांवर कृपा केली. तो उरू (मांडी) पासून झाला होता म्हणूनच त्याचें **और्व** हें नांव पडलें. पुढें भृगूंच्या शत्रूंचा सूड उगविण्यासाठीं सर्व लोकांचा नाश करण्याचा निश्चय करून तपानें देव, असुर व मनुष्य ह्यांना त्यानें चिंता उत्पन्न केली. हें पाहून पितर पितृलोकापासून येऊन त्याला म्हणाले, 'लोकांवर कृपा कर, राग आवर, आह्मी असमर्थ होतों ह्मणून त्या वेळीं क्षत्रियांनीं केलेला आमचा अपराध आम्हीं सहन केला असें नाहीं. आमचें आयुष्य फार लांबल्यामुळें आम्हांला ज्या वेळीं त्याचा वीट आला तेव्हां आह्मीं होऊनच मरणाला हें कारण करून घेतलें. क्षत्रियांना चिडविण्यासाठीं कोणीं दुष्टबुद्धीनें आमच्या घरांतून द्रव्य पुरून ठेविलें हें आम्हांला माहीत नाहीं. आम्हांला पैसा घेऊन काय करावयाचें होतें ? जेव्हां आम्हांला मृत्यु येईना तेव्हां **आत्महत्या करणाराला शुभलोकाची प्राप्ति होत नाहीं** म्हणून आम्हींच हा मरण्याचा उपाय शोधून काढला. जें हें तूं आरंभिलें आहेस तें आम्हांला पसंत नाहीं. सर्व लोकांचा नाश करण्याची ही पापबुद्धि दूर कर. तुझ्या, तेजाला दूषण आणणारा क्रोध टाक.' और्व ह्मणाला, 'रागाच्या झपाट्यांत सर्व लोकांचा नाश करण्याची मीं केलेली प्रतिज्ञा खोटी होऊं नये. राग शांत करण्याला साधन मिळालें नाहीं तर तो मलाच जाळून टाकील. कारण **सकारण उत्पन्न झालेला राग देवील ज्याला आवरतां येतो त्याच्या हातून त्रिवर्गांचें रक्षण कधींही होणार नाहीं. दुष्टांचा शास्ता व सुष्टांचा पालक असा हा राग प्रसंगीं न दिसून येईल तर काय उपयोग ?** क्षत्रियाधमांनीं भृगूंचीं पाळेंमुळें खणण्याला सुरुवात केली त्यावेळीं गर्भामध्यें मातृवर्गाचा आक्रोश ऐकून माझें पित्त खवळून गेलें होतें. पूर्णगर्भ झालेल्या माझ्या मातांना व पितरांना कोठें कोणी आधार उरला नव्हता. त्यावेळीं माझ्या मातेनें मला एका मांडींत दडविलें. **लोकांमध्यें पाप करणारांना शास्ता मिळेल तरच पाप होणार नाहीं.** शास्ता जर नसेल तर वाटेल त्याप्रमाणें उच्छृंखल आचरण सुरू होतें. शक्ति असून जाणून बुजून जो पापाचा निषेध करीत नाहीं त्याला त्या पापाचा कांहीं अंश भोगावा लागतो. मला राग आला असून सूड घेण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य आहे. तर तुमची सत्ता या वेळीं काय कामाची ? ह्या अपराधाची उपेक्षा केल्यानें मला देखील लोकांपासून पीडा होण्याची भीति आहे. हा लोकांना जाळूं इच्छिणारा क्रोधाग्नि दाबून ठेवल्यानें मलाच जाळील. आपलें सांगणें सर्व लोकांच्या हितासाठीं आहे हें मी जाणून आहें, म्हणून लोकांचें व माझें कल्याण ज्यानें होईल असा कांहीं उपाय सांगा.' पितर म्हणाले, 'ह्या क्रोधाग्नीला जलांत बुडीव. जल लोकांचें जीवन आहे. जलापासून सर्व रसाची उत्पत्ति आहे. जग हें जलमय आहे. तुझी इच्छा असेल तर ह्याला समुद्रांत सोडून दे; ह्मणजे तुझी प्रतिज्ञा खरी होऊन देव व मानव त्यांचाही बचाव होईल.' हें ऐकून त्यानें क्रोधाग्नि समुद्रांत सोडून दिला. तो वडवामुखानें समुद्राचें पाणी शोषीत अद्यापि समुद्रांत आहे.'

असें सांगून वसिष्ठांनीं पराशरांना आपला राग आवरण्यास सांगितलें व पराशरांनींही त्यांची आज्ञा घेऊन फक्त राक्षससत्र सुरू केलें. त्यावेळीं त्या सत्रांत सर्व लहानथोर राक्षसांचा नाश होऊं लागला. पण ह्यांची ही दुसरी प्रतिज्ञा मोडूं नये, ह्मणून वसिष्ठ त्यांच्या आड आले नाहींत. त्या ठिकाणीं पेटलेल्या तीन अग्नींजवळ असणारे ते चवथ्या अग्नीप्रमाणें भासत होते. त्या वेळीं राक्षसांचें संरक्षण करण्यासाठीं हें भयंकर सत्र बंद पाडण्याच्या उद्देशानें अत्रि, पुलस्त्य, पुलह व क्रतु त्या ठिकाणीं आले. पुलस्त्य ह्मणाले, 'हे तात, कांहीं विघ्न न येतां तुझें कर्म यथास्थित चाललें आहे, हें पाहून मला समाधान वाटतें. अज्ञानानें घडलेल्या अपराधा-

बहुल राक्षसांना मारून माझ्या संततीचा उच्छेद करणें तुझ्यासारख्याला शोभत नाहीं. ब्राह्मणांना, विशेषेंकरून तपस्व्यांना हा धर्म सांगितला नाहीं. शांति हाच श्रेष्ठ धर्म समजला आहे. शक्तीच्या शापानें हा अपराध त्यांच्या हातून घडला आहे.' ह्याप्रमाणें पुलस्त्यांच्या व वसिष्ठांच्या सांगण्यावरून राक्षससत्र संपवून परशरांनीं त्यासाठीं सिद्ध केलेला अग्नि हिमालयाच्या पायथ्याला मोठ्या अरण्यांत सोडून दिला. तो अग्नि अद्यापि तेथें राक्षस, वृक्ष व पाषाण यांचें भक्षण करीत आहे.

---

४२ पांडव व द्रौपदी ह्यांचें पृथ्वीवर अवतरण्याचें कारण व द्रौपदीस्वयंवर. (१. १८३—१९९)

स्वयंवराला तयार झालेल्या पांचालीला पाहण्यासाठीं पांडव एकचक्रानगरीपासून निघाले, तेव्हां वाटेंत नट, भाट, नर्तक, स्तुतिपाठक, मल्ल इत्यादि लोक त्यांना भेटले. त्यांच्याबरोबर अनेक रम्य प्रदेश पहात व वाटेंत मुक्काम करीत ते पांचाळ नगरीला येऊन पोंचले. तें नगर व स्वयंवराकरितां उभारलेला तो भव्य मंडप पाहून त्यांना फार आनंद झाला. ते तेथें एका **कुंभाराच्या सोप्यांत ब्राह्मण करून राहिले** व ब्राह्मण ह्मणून सांगून भिक्षा मागून उदरनिर्वाह करीत होते. ह्या वेषांत त्यांना कोणी ओळखलें नाहीं. द्रुपदाच्या मनांतून द्रौपदी अर्जुनाला देण्याचें फार असल्यामुळें कोणाला बांकवितां न येणारें एक धनुष्य त्यानें सज्ज करून ठेविलें व एक फिरतें यंत्र करून त्याला एक लक्ष्य चिकटवून तें अंतराळीं गरगर फिरतें ठेविलें. धनुष्याजवळ पांच बाण ठेवून ते त्याला योजून त्या यंत्रामधील निशाण जो खालीं पाडील त्याला द्रौपदी द्यावयाची असा संकल्प त्यानें सर्व राजांना कळविला. तें ऐकून दुर्योधनप्रभृति कौरव व दुसरे राजे, तसेच ऋषी व ब्राह्मण स्वयंवर पाहण्यासाठीं नानादेशांहून आले. द्रुपदाचा सत्कार घेऊन राजांनीं स्वयंवरमंडपांत आपापल्या जागा घेतल्या. मंडपाच्या चोहोंबाजूंनीं मंदिरें उठवून दिलीं होतीं. तट व खंदक तयार केले होते. मुख्य मुख्य द्वारांना तोरणें बांधलीं होतीं, चित्रविचित्र छत लावलें होतें. शेंकडों वाजंत्र्याचे ताफे त्या ठिकाणीं उभे केले होते. उत्तम अगरूनें तो मंडप सुवासिक केला होता. चंदन शिंपडलेल्या सुवासिक माला जिकडे तिकडे टांगल्या होत्या, त्यामुळें हंसाप्रमाणें शुभ्र अशी ती सभा कैलासपर्वताप्रमाणें गगनचुंबित व शोभायमान दिसत होती. तिला सोन्याच्या खिडक्या असून त्याची जमीन रत्नांनीं मढविली होती. जमिनीवर उत्तम बैठकी पसरल्या होत्या, व शेंकडों उंच द्वारें ठेविलीं होतीं. अनेक धातूंनीं भरलेल्या हिमालयाच्या शिखरांप्रमाणें नानाप्रकारच्या बिछायतींनीं ती सुशोभित केली असल्यामुळें त्या मंडपाला अवर्णनीय शोभा आली होती. त्या ठिकाणीं नानाप्रकारच्या सातसात मजली हवेल्यांतून अंगाला अगरु लावून एकमेकांकडे ईर्ष्येनें पहात बसलेले मोठे पराक्रमी राजासिंह, त्याचप्रमाणें सुशोभित मंचांतून बसलेले राष्ट्राचे परिपालक, प्रसन्नमुख ब्राह्मण व पौरजन, तसेच पांचालराजाचें वैभव पहात ब्राह्मणसमुदायांत बसलेले पांडव, इत्यादिकांचा मोठा प्रेक्षकसमुदाय जमला होता. तो समाज पूर्ण भरल्यावर सोळाव्या दिवशीं न्हाऊन उत्तम वस्त्रालंकार घालून द्रौपदी सुवर्णमाला हातांत घेऊन धृष्टद्युम्नाबरोबर सभेंत आली. सोमकांच्या मंत्रज्ञ व शुचिर्भूत पुरोहितानें अग्नीमध्यें विधिपूर्वक तुपाची आहुति देऊन त्याला तृप्त करून ब्राह्मणांकडून स्वस्तिवाचन ह्मणविल्यावर वाजंत्री बंद होऊन सभेंत जिकडे तिकडे शांतता झाली. नंतर धृष्टद्युम्न मेघगर्जनेप्रमाणें ओरडून ह्मणाला, 'हे येथें धनुष्य आहे व हे पांच बाण ठेविले आहेत. हें धनुष्य व हे बाण घेऊन ह्या यंत्राच्या भोंकांतून जो हें निशाण पाडील त्याला माझी बहीण माळ घालील.' असें सांगून प्रत्येकाचें नांव, गोत्र व सामर्थ्य ह्यांची माहिती त्यानें आपल्या बहिणीला दिली, व 'ह्यांपैकीं जो हें निशाण पाडील त्याला तूं वर,' म्हणून सांगितलें. कुंडलें व बाहुभूषणादि अलंकार घातलेले ते यौवनसंपन्न राजपुत्र रूप, वीर्य, शील संपत्ति व यौवन ह्यांच्याच मोठ्या तोऱ्यांत असून अस्त्रज्ञान व बल काय तें आपल्याच ठिकाणीं आहे असा त्यांना अभिमान होता. द्रौपदीला पाहतांच वेडे होऊन ते

एकमेकांकडे ईर्ष्येनें पाहूं लागले व द्रौपदी मला वरणार, ' असें म्हणत आसनावरून एकदम उठले. द्रौपदी मिळवूं इच्छिणारे ते राजपुत्र पार्वती मिळवूं इच्छिणाऱ्या देवसमुदायाप्रमाणें शोभत होते. द्रौपदीवर मन गेलें असल्यामुळें रंगावर आल्यावर मित्र होते ते देखील परस्परांचे शत्रू बनले. त्या ठिकाणीं रुद्र, आदित्य, इत्यादि देवगण, दैत्य, मोठमोठे नाग, देवर्षी, गुह्यक, चारण, अप्सरांसह गंधर्व, बळराम, कृष्ण व दुसरे यादववीर प्रेक्षक ह्या नात्यानें हजर होते. त्यांमध्यें भस्मानें झांकलेल्या अग्नीसारख्या पांडवांना पाहून कृष्णानें बळरामाला हळूंच इशारत दिली. सर्व अंतरिक्ष देव,ऋषी,गंधर्व,नाग, असुर, इत्यादिकांनीं गजबजून राहिलें होतें. पुष्पादिकांच्या दिव्य सुवासाचा जिकडे तिकडे घमघमाट सुटला होता. दुंदुभि, वेणु, वीणा मृदंग इत्यादि वाद्यांच्या नादानें सर्व दिशा दणाणून राहिल्या होत्या. इतक्यांत किरीट, कुंडलें, हार, बाहुभूषणें इत्यादि अलंकारांनीं विभूषित असे राजे, राजपुत्र व पौत्र ह्यांनीं एकामागून एक तें धनुष्य सज्ज करण्यासाठीं बाटेल तेवढी खटपट केली; पण ती सर्व व्यर्थ गेली. पुष्कळांवर प्रयत्न करीत असतां तें जड धनुष्य अंगावर येऊन जमिनीवर लोटांगण घालण्याची पाळी आली. त्यांचीं किरीट, कुंडलें, हार इत्यादि भूषणें भूमीवर तुटून पडून धापा टाकीत ते निचेष्ट पडले. अशा प्रकारें फजिती झाल्यामुळें, द्रौपदी मिळण्याविषयीं निराश होऊन तें राजमंडळ दीर्घोच्छ्वास टाकूं लागलें असतां धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ जो कर्ण त्यानें धनुष्य उचलून सज्ज करून त्याला बाण लाविला. त्याला पाहून व त्याचें नामकुलादि ऐकून, ' मी सारथ्याला वरणार नाहीं, ' असें द्रौपदी म्हणाली. तें तिचें भाषण ऐकून कर्णाला फार संताप आला; तो मनांतल्या मनांत दाबून सूर्याकडे दृष्टि देऊन त्यानें धनुष्य खालीं ठेविलें. त्यानंतर धनुष्य उचलण्याची गोष्ट दुसऱ्या कोणाही राजाच्या मनांत येईनाशी झाली. इतक्यांत धनुष्य सज्ज करून त्याला बाण लावण्याच्या उद्देशानें अर्जुन ब्रह्मसमुदायांतून उठला. विजेप्रमाणें लखलखणाऱ्या त्या अर्जुनाला उठून तयार झालेला पाहून ब्राह्मणांनीं आपापलीं चर्मासनें फडकावून आनंद प्रदर्शित केला. कांहींनीं उदासीनवृत्ति धारण केली. कित्येक ' शाबास, शाबास ' असे उत्तेजनपर शब्द उच्चारूं लागले. ' जें धनुष्य कर्णशल्यप्रभृति जगमान्य क्षत्रियवीरांना वांकविता आलें नाहीं तें, ज्याला अस्त्रविद्येचा गंधही नाहीं अशा ब्राह्मणकुमाराच्या हातून कसें वांकविलें जाणार ? अविचारानें हें काम हातीं घेऊन त्यांत यश न येईल तर व्यर्थ सर्व ब्रह्मवृंद क्षत्रियांच्या थट्टेला मात्र पात्र होणार आहे. अहंपणामुळें म्हणा, द्रौपदी मिळविण्याला हपापल्यामुळें म्हणा, किंवा ब्राह्मणांमध्यें विशेष दिसून येणाऱ्या चापल्यामुळें म्हणा, ह्या साहसाला हा जो प्रवृत्त झाला आहे, त्याला आपल्या जागीं बसविणें आपलें काम आहे. व्यर्थ थट्टेला पात्र होऊन फजिती पावण्याची व विनाकारण राजेलोकांच्या द्वेषाला पात्र होण्याची आमची इच्छा नाहीं, ' असें कित्येक बुद्धिजीवी शहाणे म्हणूं लागले. कित्येक म्हणाले, ' हा श्रीमान कुमार नागराजासारखा दिसतो आहे. ह्याचे खांदे व बाहू पहा कसे पुष्ट आहेत. धैर्यानें हा हिमबानासारखा अचून याचें चालणें पहा कसें सिंहासारखें ऐटबाज आहे ! ह्याच्या उत्साहवृत्तीवरून ह्याच्या हातून हें काम खास शेवटास जाईल असें आम्हांला वाटतें. जलपान करून राहोत किंवा वायुभक्षण करून राहोत किंवा फलाहार करून राहोत. शरीरानें किरकोळ असले तरी तेजानें ब्राह्मण कोणाला हार जाणारे नाहींत. कसा म्हाला तरी तो ब्राह्मणबच्चा आहे. त्याला तुच्छ करणें योग्य नाहीं. जमदग्निपुत्र रामानीं युद्धांत क्षत्रियांना जेरजेर करून पृथ्वी निःक्षत्रिय केली. अगस्त्यानीं ब्रह्मतेजानें अगाध समुद्र पिऊन टाकला. ' असें त्यांचें नानाप्रकारचें भाषण चाललें असतां अर्जुनानें धनुष्यापाशीं येऊन त्याला प्रदक्षिणा केली; नंतर वरद जो ईश त्या ईशाला प्रणाम करून व कृष्णाचें ध्यान करून हं हं म्हणतां धनुष्य सज्ज करून बाणांनीं त्यानें तें निशाण खालीं पाडलें ! त्या वेळीं जिकडे तिकडे मोठी चळवळ उडून राहिली. देवांनीं पुष्पवृष्टि केली. ब्राह्मणांनीं वस्त्रें वर फडकाडविलीं. ह्या अप्रतिष्ठेनें राजमंडळांत जिकडे तिकडे हाहाकार उडून राहिला. बाजेवाल्यांनीं नानाप्रकारचे बाजे सुरू केले. द्रुपदाला संतोष होऊन हर्षाने

पडल्यास अर्जुनाचें साह्य करण्याला तो तयार होऊन उभा राहिला. अशा प्रकारें मोठी गडबड उडून राहिली असतां युधिष्ठिर नकुलसहदेवांसहवर्तमान आपल्या बिऱ्हाडाकडे निघून गेला. त्या निशाणाकडे व इंद्रतुल्य अर्जुनाकडे दृष्टि देऊन शुभ्र वस्त्र नेसलेल्या द्रौपदीला आश्चर्य व आनंद होऊन माळ घेऊन ती त्याकडे आली व सर्वांदेखत ती तिनें त्याच्या गळ्यांत घातली. नंतर ब्राह्मणांच्या जयजयकारामध्यें तो तिच्याबरोबर रंगामधून निघाला. द्रुपद आपली कन्या त्या ब्राह्मणाला देत आहे असें पाहून राजे एकमेकांकडे टकमक पाहूं लागले. ते अगदीं खवळून जाऊन ह्मणूं लागले, 'आह्मी ह्या ठिकाणीं जमलों असतां आह्मांला तुच्छ करून हा आपली वरवर्णिनी द्रौपदी ब्राह्मणाला देऊं इच्छित आहे. झाड लावून फलाच्या वेळीं हा आमची निराशा करीत आहे. ह्या दुरात्म्याला ठार करून हिचें हरण करूं या. हा आपल्या वर्तनानें वृद्धांना उचित अशा सन्मानाला पात्र नाहीं. हा वेळपर्यंत आमचा चांगला मानमरातब ठेवून आतां हा आम्हांला तुच्छ करीत आहे. ह्या देवतुल्य राजसमाजामध्यें ह्याला कोणीच तिला अनुरूप असा पति दिसला नाहीं कीं काय ? ब्राह्मणाला स्वयंवराचा अधिकार नाहीं. तो क्षत्रियांनाच असल्याबद्दल श्रुति साक्ष देत आहे. कोणाही राजाला वरण्याची जर हिची इच्छा नसेल तर हिला अग्नींत फेकून देऊन आपण आपापल्या राष्ट्राला चालते होऊं या. ह्या ब्राह्मणाच्या हातून हें कृत्य अविचारानें किंवा लोभानें झालें आहे, म्हणून त्याला मारण्यांत देखील मोठेंसें पाप होणार नाहीं. आपली अप्रतिष्ठा होऊं नये म्हणून स्वधर्मरक्षणासाठीं व पुढें एखाद्या स्वयंवरांत अशी हेळसांड होऊं नये म्हणून ह्याला मारणेंच इष्ट आहे.' असें म्हणून आयुधें घेऊन ते द्रुपदावर धांवले. सांखळदंड तोडून सुटलेल्या हत्तीप्रमाणें ते आवेशानें धांवून येत असतां भीमार्जुन हे त्यांना तोंड देण्याला तयार झाले. अचाट कृत्य करणारा नरवीर भीम आजूबाजूचे वृक्ष हातांनीं उपटून त्यांनीं त्यांना शोधीत सुटला. दंड घेऊन उभा असणाऱ्या यमधर्मप्रमाणें झाड हातांत घेऊन तो अर्जुनाच्या साह्याला तयार होऊन राहिला. अर्जुनालाही त्या त्याच्या अमानुष कृत्यानें त्वेष चढून तो आपलें धनुष्य सज्ज करून तयार झाला. कृष्णाजिनें व कमंडलू वर उडवीत 'आह्मी तुमच्या मागें आहोंत, भीऊं नका,' असें ह्मणून ब्राह्मण त्यांना धीर देत होते. 'आपण मुकाट्यानें काय होतें तें पहात बसा ह्मणजे झालें,' असें हासत हासत त्यांना सांगून स्वयंवरांत मिळालेलें धनुष्य घेऊन अर्जुनानें कर्णशल्यादि वीरमुख्यांशीं तुंबळ युद्ध केलें. ब्रह्मतेजापुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं असें समजून कर्ण मागें हटला. भीमानें शल्याला उचलून खालीं आपटलें. तें पाहून ब्राह्मण खदखदां हासूं लागले. ह्याप्रमाणें कर्णशल्यांची उडालेली दुर्दशा पाहून परशुराम, द्रोण, अर्जुन, कृष्ण किंवा रूप ह्यांखेरीज दुसरा कोणी कर्णाची, व बलराम, भीम किंवा दुर्योधन ह्यांखेरीज दुसरा कोणी शल्याची खोड मोडण्याला समर्थ नाहीं अशी मनाची खात्री असल्यामुळें 'ब्राह्मण अपराधी असले तरी त्यांचें रक्षण करणें आमचें कर्तव्य आहे, त्यांवर शस्त्र उचलणें आह्मांला उचित नाहीं, म्हणून तूर्त युद्ध बंद ठेवा,' असें मिष करून सर्व राजे थक्क होऊन जागचे जागीं उभे राहिले. इकडे कृष्णाला ते पांडव असावे असें वाटून 'ह्यानें द्रौपदी न्यायानें मिळविली आहे, ह्याबरोबर वृथा वैर करूं नका,' असें सांगून सर्व राजांची समजूत घालून त्यानें त्यांना आपापल्या नगरांकडे पाठविलें. इकडे भीमार्जुन चालले असतां त्यांचे वैरी बनलेले राजे त्यांकडे मत्सरदृष्टीनें पहात होते. पौर्णिमेच्या दिवशीं एकाच वेळीं दृश्यमान होणाऱ्या सूर्यचंद्रांप्रमाणें शोभा देणारी द्रौपदी त्यांच्या मागून चालली होती. भिक्षेची वेळ टळून गेली तरी हे दोघे परत आले नाहींत असें पाहून कुंतीच्या मनांत नानाप्रकारचे तर्क येऊं लागले. तिसऱ्या प्रहरच्या सुमारास जिकडे तिकडे सामसूम असून ढगांनीं भरलेल्या आकाशांतील मेघमंडळांनीं झांकलेल्या सूर्याप्रमाणें ब्रह्मवृंदांनीं परिवेष्टलेले भीमार्जुन बिऱ्हाडीं आल्यावर 'आई ही पहा भिक्षा आणिली आहे,' असें अर्जुन कुंतीला म्हणाला. न पाहतां आंतूनच 'सर्वजण ती वांटून घ्या,' असें तिनें उत्तर दिलें. नंतर द्रौपदीला पाहून तोंडांतून चुकून

भलतेंच निघून गेल्यामुळें असत्य भाषणाचा दोष येऊं नये म्हणून त्या शुचिर्भूत याज्ञसेनीला हातांत धरून कुंति युधिष्ठिराकडे जाऊन ह्मणाली. 'ह्या द्रुपकन्येला तुझ्या धाकट्या भावानें भिक्षा म्हणून मजकडे आणिली असतां न पाहतां चुकीनें ती सर्वजण वांटून घ्या म्हणून माझ्या तोंडांतून निघून गेलें. खोटें बोलण्याचें पाप माझ्या माथीं न लागतां हिचेंही अधर्मापासून रक्षण होईल अशी कांहीं तरी तोड निघाली पाहिजे.' हें कुंतीचें भाषण ऐकून क्षणभर विचार करून युधिष्ठिर अर्जुनाला ह्मणाला, 'हिला तूं मिळविली असल्यामुळें तूंच हिला योग्य वर आहेस. म्हणून अग्नीच्या समक्ष विधिपूर्वक तूं हिचें पाणिग्रहण कर.' हें ऐकून अर्जुन ह्मणाला, 'महाराज, असा उपदेश करून आपण मला धर्मभ्रष्ट करूं नये. आपण ह्मणतां तसें करणें धर्माला अनुसरून नाहीं. प्रथम आपला विवाह होऊन नंतर भीमाचा झाल्यावर मग मी विवाहाला पात्र होणार. आम्हां बंधुवर्गांचा, त्याचप्रमाणें हिचा विवाह करून देणें आपल्याकडे आहे. हें लक्षांत घेऊन जें उचित, धर्माला अनुसरून व कीर्तिकर दिसेल तें आपण करा, व त्यांत पांचाल राजाचेंही हित आपण लक्षांत ठेवा. आह्मी सर्व आपल्या आज्ञेंत आहों.' सर्वांचें मन पांचालीकडे लागून राहिलें असल्यामुळें ते एकमेकांकडे टकमक पहात उभे होते. विधात्यानें आधींच मोहक केलेलें तिचें रूप हल्लींच्या प्रसंगीं विशेषच खुलून दिसत असल्यामुळें त्यांच्या मनाची विलक्षण चलबिचल उडाली होती. तें त्यांचें हृद्गत ओळखून व व्यासांची पूर्वसूचना मनांत आणून आपसांत कलह होऊन फूट होऊं नये म्हणून हें अर्जुनाचें प्रेमभरित भाषण ऐकून, 'तर मग आपण सर्वच हिच्याशीं लग्न लावूं,' असें युधिष्ठिरानें सुचविलें. वडील भावाचें भाषण ऐकून सर्वांच्या मनांत तेंच असल्यानें सर्वांना संतोष झाला. इतक्यांत बलरामासह कृष्ण त्या ठिकाणीं येऊन ह्या भाग्योदयाबद्दल त्यांनीं पांडवांचें अभिनंदन केलें व स्वागतपूर्वक कुशलप्रश्नादि व्यवहार आटोपल्यावर 'आह्मी येथें अज्ञातवासांत आहों हें तुम्हांला कसें कळलें,' म्हणून युधिष्ठिरानें विचारलें, तेव्हां कृष्ण हासून म्हणाला, 'राजा, अग्नि झांकून ठेवला तरी त्याचें तेज बाहेर पडल्याखेरीज रहात नाहीं. सभेमध्यें आज दिसून आलेला पराक्रम मानवांमध्यें पांडवेतरांच्या हातून कधीं होणार नाहीं. त्या घोर अग्नीपासून निभावून तुह्मी सुरक्षित बाहेर निघालां ही फार चांगली गोष्ट झाली. धृतराष्ट्र, त्याचे मुलगे व सुहृद ह्यांचा मात्र हिरमोड झाला, त्याला उपाय नाहीं. वृद्धिंगत होणाऱ्या अग्नीप्रमाणें तुमचा दिवसानुदिवस उत्कर्ष होवो.' असें म्हणून ते आपल्या डेऱ्याकडे निघून गेले.

भीमार्जुन कुलालगृहीं आपल्या बिऱ्हाडाकडे आले त्या वेळीं ते कोण, काय करतात, वगैरे तपास काढण्यासाठीं धृष्टद्युम्न त्यांच्या मागून येऊन त्या घरीं लपून राहिला. त्या दोघां महानुभाव भावांनीं भिक्षा मागून आणून कुंतीच्या हवालीं केली. त्या वीरमातेनें ती द्रौपदीच्या हवालीं करून, बली वगैरे दिल्यानंतर ब्राह्मणाला भिक्षा घालून व अश्रितांना तृप्त करून राहिलेल्या अन्नाचे सारखे सहा भाग कर म्हणून तिला आज्ञा केली. त्या साध्वी द्रौपदीनेंही संतोषानें सांगितल्याप्रमाणें केलें. पुढें त्या सर्वांनीं तें अन्न भक्षण करून जमिनीवर दर्भ पसरून त्यांवर आपापलीं आसनें टाकून दक्षिणेकडे उसें करून निजले. उशाकडे कुंति निजली व द्रौपदी पायगतीं त्यांच्या पायांला देंकण्याला लोड होऊन निजली. दुःख हें त्या वेळीं द्रौपदीच्या स्वप्नीं देखील नसून ह्या कुरुपुंगवांविषयीं तिच्या मनांत विशेष आदरच उत्पन्न झाला. युद्धाच्या गोष्टी बोलत ते सर्व झोंपीं गेले. त्यांचा तो सर्व व्यवसाय पाहून व त्या त्यांच्या गोष्टी ऐकून धृष्टद्युम्न घरीं परत आला. द्रुपदराजा द्रौपदीच्यासंबंधानें चिंता करीत असतां त्याला त्यानें तो सर्व वृत्तांत कळविला. तो ऐकून ते खचित क्षत्रियपुंगव पांडव असावे अशी खात्री होऊन त्यानें आपल्या पुरोहिताला त्यांकडे पाठविलें. आज्ञेप्रमाणें त्यांकडे जाऊन त्यांच्या शौर्याची प्रशंसा करून पुरोहितानें राजाचा निरोप सविस्तर त्यांना कळविला. तो ह्मणाला, 'बराह अशा तुह्मांवर द्रुपदराज कृपा करण्याला तयार आहे. फक्त तुमचें नांव, गांव, व गोत्र कळावें एवढी त्याची इच्छा आहे. ह्या लक्ष्यभेद करणाऱ्या नरपुंगवाला पा-

हून सांगतां पुरवत नाहीं इतका त्याला आनंद झाला आहे. तुमची जात, कुळ वगैरे कळवून शत्रूच्या मस्तकावर पाय देऊन पांचालराजाला आनंद देणें तुमच्याकडे आहे. पंडु हा द्रुपद्राजाचा प्रियसखा असून तो ह्यांना प्राणाप्रमाणें लेखीत असे. आपल्या मुलीला कुरुवंशज वीराची पत्नी करण्याचें आमच्या राजाच्या मनांत फार आहे. तिला धर्मानें मिळविणारा जर अर्जुनच असेल तर त्याचे मनोरथ पूर्ण झालेच व त्या योगानें यश, धर्म, व प्रिय ह्या सर्वांचेंच साधन झाल्यासारखें होणार आहे.' हें पुरोहिताचें भाषण ऐकून आसनादि सत्कार करून युधिष्ठिर ह्मणाला, 'राजानें ज्या अर्थी कामेच्छा न धरतां केवळ धर्मबुद्धीनें हिला जन्म दिला आहे, त्या अर्थी त्याचे मनोरथ कधीं विफळ होणार नाहींत. ठरविलेला पण जिंकून आह्मीं हिला मिळविली आहे. राजानें वर्ण, शील, किंवा कुळ ह्यांची परवा न करतां पण लावून हिला देण्याचा निश्चय केला व आह्मीं पण जिंकून ही मिळविली. आतां राजानें कुलशीलाची उगीच चौकशी कां करावी? तथापि त्यासंबंधी त्याचा हेतुही पूर्ण होईल. तें धनुष्य एखाद्या यःकश्चित् मनुष्याच्या हातून वांकविलें जाण्याजोगें नाहीं.' याप्रमाणें त्यांचें भाषण चाललें आहे तों पांचाळराजाकडून एक दूत अन्न तयार करून घेऊन आला आणि ह्मणाला, 'तुह्मी कृतार्थ आहां. द्रौपदीसह हें अन्न महाराजांनीं तुह्मांला दिलें आहे त्याचा स्वीकार करा.. ह्या सुवर्णरथांत बसून महाराजांनीं राजवाड्याकडे तुह्मांला बोलाविलें आहे.' हें ऐकून रथांत बसून ते निघाले. नंतर पुरोहिताच्या तोंडून युधिष्ठिराचें सर्व भाषण ऐकून त्यांची परीक्षा पहाण्याच्या उद्देशानें द्रुपदानें चारी वर्णांला अनुरूप अशीं त्यांना राहण्यासाठीं चार मंदिरें तयार केलीं होतीं. त्यांपैकीं एकांत ब्राह्मणाला अवश्य लागणारे सर्व पदार्थ ठेविले होते. दुसऱ्यांत क्षत्रियांना लागणारे धनुष्य, बाण खड्ग, प्रास, तोमर, शक्ति, इत्यादि आयुधें, व हत्ती, घोडे, रथ, इत्यादि वाहनें ठेविलीं होतीं. एकांत कृषिकर्माला लागणारे नांगर, दोर, बैल, बीं, वगैरे पदार्थ ठेविले होते. कुंति द्रौपदीसह द्रुपद्राजाच्या अंतःपुरांत आली. त्या सिंहगति कुरुवीरांना पाहून आप्तसुहृद्वर्गासह राजाला फार आनंद झाला. त्या ठिकाणीं पाद्पीठ युक्त मौल्यवान आसनावर बिनदिक्कत बसून उत्तम वस्त्रालंकार केलेल्या दासदासींनीं सोन्याच्या ताटांतून आणलेले उत्तम उत्तम राजोपभोग्य पदार्थ सेवन करून त्यांना राहण्यासाठीं तयार केलेल्या चार गृहांपैकीं त्यांना योग्य अशा राजमंदिरांत ते शिरले. तेव्हां ते पांडवच असावे अशी मनाची खात्री होऊन राजाला व त्याच्या सुहृद्वर्गाला आनंद झाला. नंतर पांचालानें ब्राह्मणांना उचित असें त्यांचें आदरातिथ्य करून त्यांना प्रश्न केला, 'आपण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, किंवा ह्या भूतलावर अवतरलेले देव आहां हें मला कळत नाहीं, ह्मणून तुह्मी कोण हें मला सत्य सांगा. मला मोठा संशय पडला आहे. ह्या सर्व खटाटोपाचा शेवट गोड होईल काय? एवढें माझें भाग्य आहे काय? सत्य असेल तें सांगा. सत्य हेंच सज्जनांना शोभतें. इष्ट हेतु साधण्याकरितां देखील असत्य भाषण करणें उचित नाहीं. विवाहाची सर्व तयारी तुमच्या उत्तरावर अवलंबून आहे.' युधिष्ठिरानें उत्तर केलें, आह्मी पंडुपुत्र पांडवच आहों याबद्दल मनांतील शंका दूर करा.' पद्मिणीप्रमाणें ही आपली मुलगी भलत्याच ठिकाणीं पडली नाहीं. ती एका सरोवरापासून दुसऱ्यामध्यें गेली आहे.' हें भाषण ऐकून डोळे हर्षानें प्रफुल्लित होऊन सद्गदित झाल्यामुळें द्रुपद्राच्या तोंडांतून शब्द निघेनात. हा अत्यानंद किंचित् आवरून धरून हास्तिनापुर सोडल्यापासून इत्यंभूत हकीकत त्यानें युधिष्ठिरापासून ऐकून घेतली. ती ऐकून धृतराष्ट्राची निंदा करून त्यांना धीर देऊन त्यांचें राज्य त्यांना परत देवविण्याचें त्यानें त्यांना अभिवचन दिलें. नंतर त्यांचा मोठा बडेजाव करून 'सुमुहूर्तावर अर्जुनाचें माझ्या मुलीशीं लग्न लावून देऊं,' असें तो म्हणाला. हें त्याचें भाषण ऐकून युधिष्ठिर म्हणाला, 'आह्मीही अविवाहित आहों हें लक्षांत घेऊन आपल्याला वाटेल तसें करा.' यावर 'तुह्मांपैकीं कोणालाही ती मी देण्याला तयार आहें,' असें द्रुपदाचें भाषण ऐकून युधिष्ठिर म्हणाला, 'आह्मी सर्वजणच हिच्याशीं लग्न लावूं इच्छितों. मातेच्या तोंडांतून असेंच निघून गेलें आहे; व तिचें भाषण आह्मी खोटें पाडूं इच्छित नाहीं;

ही आपली रत्नभूत कन्या अर्जुनानें पण जिंकून मिळविली खरी; तरी ह्या रत्नाचा सर्वांनीं मिळून उपभोग घ्यावा, अशी आईची आज्ञा आहे, ती आम्ही मोडूं इच्छित नाहीं. म्हणून यथाक्रमानें सर्वांनाच हिचें पाणिग्रहण अशीच्या समोर करूं या. ' द्रुपद म्हणाला, ' **एका पुरुषाला अनेक स्त्रिया करतां येतात, पण एका स्त्रीनें अनेक पति करणें शास्त्रविरुद्ध आहे.** तेव्हां हें धर्म व प्रचार ह्यांना विरुद्ध असें आचरण कसें करावें ? ' हें द्रुपदाचें भाषण ऐकून युधिष्ठिर ह्मणाला, ' महाराज, हा सूक्ष्म धर्म असून त्याची गति कोणाला कळणें शक्य वाहीं. माझ्या तोंडांतून कधीं असत्य भाषण निघालें नसून माझी बुद्धिही कधीं अधर्माकडे वळली नाहीं. मातेची तशी इच्छा असून माझेंही मन तसेंच सांगतें. तेव्हां खचित यांत कांहीं अधर्म नसला पाहिजे. मनांत कांहीं शंका न आणितां आपण हें कबूल करा. ' हें ऐकून ' कुंति व धृष्टद्युम्न ह्यांच्या विचारानें काय करावयाचें तें ठरवून मला कळवा ह्मणजे तसें करूं,' असें द्रुपद ह्मणाला. इतक्यांत व्यास सहजगत्या त्या ठिकाणीं आले. द्रुपदानें उठून त्यांना अभिवंदन केलें, व कुशल प्रश्न होऊन ते आसनावर बसल्यानंतर, ' अधर्माला कारण न होतां द्रौपदीला सर्व पांडवांची धर्मपत्नी होतां येईल काय, ' म्हणून त्यानें त्यांना प्रश्न केला. तेव्हां व्यास ह्मणाले, ' ह्या लोकविरुद्ध व वेदविरुद्ध दिसणाऱ्या भ्रममुलक धर्मासंबंधानें मला आधीं तुमचें सर्वांचें मत कळूं या. ' हें ऐकून द्रुपद ह्मणाला, ' माझ्या मतानें हा अधर्म असून लोक व वेद ह्या दोहींच्या विरुद्ध आहे. अनेकांची एक बायको झालेली कधीं कोणीं ऐकिली नाहीं. हा वादमूलक प्रश्न आहे. ' धृष्टद्युम्न ह्मणाला, धाकट्या भावाच्या बायकोशीं वडील भावाला अधर्म न होतां संबंध कसा ठेवतां येईल ? धर्म फार सूक्ष्म असल्यामुळें त्याची गति आह्मांला कळत नाहीं हें खरें; तरी अधर्माला धर्म समजून व्यवहार करणें चांगलें नाहीं. ' युधिष्ठिर ह्मणाला, , माझ्या तोंडांतून खोटें कधीं निघालें नसून अधर्माकडे माझी प्रवृत्ति कधीं होणार नाहीं, व ज्या अर्थी माझ्या मनाची प्रवृत्ति अशीच होत आहे त्या अर्थी हा अधर्म नसला पाहिजे. जटिलानामक गौतमकुलांतल्या स्त्रीनें, ती धार्मिक स्त्रियांमध्यें श्रेष्ठ असून, सप्त ऋषींबरोबर लग्न लाविलें अशी कथा पुराणांत आहे. त्याचप्रमाणें ध्वार्शानामक मुनिकन्येनें एकाच नांवाच्या प्रचेता भावांबरोबर लग्न लाविलें. शिवाय गुरु आज्ञा, हाच श्रेष्ठ धर्म असून सर्व गुरुमध्यें माता श्रेष्ठ समजली गेली आहे. भिक्षा सर्वांनीं वाटून घेऊन सर्वांनीं तिचा उपभोग घ्यावा, असें तिच्या तोंडांतून निघालें आहे. तेव्हां तसें करणें हें माझ्या मतानें धर्माला अनुसरूनच आहे. ' कुंति ह्मणाली, ' धर्मराजाप्रमाणचें माझेंही मत आहे. मला सत्यभंगाची मोठी भीति पडली आहे. ' व्यास ह्मणाले, ' भद्रे, तुझें भाषण कधीं असत्य होणार नाहीं. हा सनातन धर्म आहे. ' असें म्हणून राजाचा हात धरून व्यास आंत गेले. इतर सर्व तेथेंच त्यांची वाट पहात बसले. एकांतांत व्यासांनीं राजाला द्रौपदीची पूर्व जन्मकथा सांगून ती अनेकांची बायको कां होत आहे ह्या संबंधानें त्याची खात्री करून दिली. ते ह्मणाले, ' पूर्वी नैमिष्यारण्यांत देवांनीं सत्र सुरू केलें. त्या ठिकाणीं वैवस्वतानें यज्ञ केला, तेथें तो यज्ञदीक्षा घेऊन बसला असल्यामुळें प्रजेच्या संहाराचें काम बंद पडलें. अर्थातच कोणाला मरण न आल्यामुळें प्रजा वाढत चालली. त्या वेळीं मर्त्यामध्यें व आपल्यामध्यें भेद न उरल्यामुळें चिंता उत्पन्न होऊन सर्व देव प्रजापतीला शरण गेले. तेव्हां ते भगवान ह्मणाले, ' वैवस्वत सत्रांत गुंतला असल्यामुळें प्रजेचा संहार बंद पडला आहे. त्याचें सत्र संपल्यावर पूर्वीप्रमाणें सर्व क्रम सुरू होऊन कोट्यावधि प्रजेचा हं हं ह्मणतां संहार होईल. ' हें ऐकून देव यज्ञस्थानीं गेले. तेथें भागीरथीमध्यें एक अद्भुत कमल पाहून तें कोठून आलें ह्याचा शोध करीत इंद्र भागीरथीच्या उगमाकडे गेला. त्या ठिकाणीं अग्निशिखेसारखी दैदीप्यमान एक स्त्री त्याच्या दृष्टीस पडली. ती त्या ठिकाणीं स्नानासाठीं आली असून वस्त्रें धूत असतां तिच्या डोळ्यांतून टपटप अश्रुबिंदु गळत होते. ते जलांत पंडून त्यांपासून सुवर्णकमलें तयार होत होतीं. तें पाहून ' भद्रे तूं कोण, कोठून आलीस, येथें रडत कां बसली आहेस, ' म्हणून इंद्रानें तिला

विचारलें. तिनें उत्तर दिलें, ' मंदभाग्या, मी कोण आहें व कशासाठीं रडत आहे, हें तुला ह्या ठिकाणीं कळणार नाहीं. माझ्याबरोबर चल ह्मणजे माझ्या रडण्याचें कारण तुला कळेल. ' तें ऐकून इंद्र तिच्या मागून पर्वतशिखरावर गेला. तेथें एक तरुण एका तरुणीसह सिद्धासनावर बसून फांसे खेळतांना त्याच्या दृष्टीस पडला. त्याला फाशांत अगदीं गर्क झालेला पाहून इंद्राला राग येऊन तो ह्मणाला, ' भल्या गृहस्था, ह्या सर्व भुवनाचा मी स्वामी आहें हें लक्षांत ठेव. ' इंद्राला रागावलेला पाहून शिवांना हांसूं आलें. हळूच त्यांनीं त्याकडे दृष्टि फेंकिली, त्याबरोबर इंद्राला जाग्यावरून हालतां येईना. नंतर सोंगट्यांचा डाव आटोपल्यावर त्या अश्रुनयनेकडे पाहून शंकरांनीं इंद्राला आपल्याकडे आणण्यास तिला सांगितलें. व ' फिरून याला मीपणाचें पिसें लागणार नाहीं अशी तजवीज कर, ' अशी तिला आज्ञा केली. तिचा स्पर्श होतां क्षणीं इंद्र जागच्या जागीं पडला. त्याला भगवान शंकर म्हणाले, ' इंद्रा, अहंपणा सोडून दे. तो मोठा धोंडा उचल व त्याच्या खालच्या गुहेंत शिर. तेथें तुझ्यासारखेच सूर्यप्रमाणें तेजःपुंज असे चौघेजण आहेत. ' तो धोंडा बाजूला करून आंत सांगितल्याप्रमाणें चौघे असामी पाहून आपलीही दशा ह्यांच्यासारखीच होणार अशी इंद्राला भीति पडली. रुद्र म्हणाले, ' इंद्रा, ज्या अर्थीं तूं प्रत्यक्ष माझा अवमान केला आहेस त्या अर्थीं ह्या गुहेंत शिर. ' हें शंकरांचें रागाचें भाषण ऐकून दुःखानें व्याकूळ होऊन वाऱ्यानें हालणाऱ्या पिंपळाच्या पानाप्रमाणें तो कांपूं लागला. तो म्हणाला, ' महाराज, ह्या सर्व जगाचे स्वामी आपण आहां. ' शंकर हासून म्हणाले, ' तुझ्यासारख्या अभिमान्यावर माझी कृपा कधीं व्हावयाची नाहीं. आंत असणारांचेंही पूर्वी एकदां तुझ्यासारखेंच उद्धट वर्तन झालें होतें. तुह्मी सर्वांना मृत्युलोकीं जन्म घ्यावा लागेल. त्या ठिकाणीं महत्कृत्यें करून अनेक दुष्टांचा संहार करून आपापल्या पुण्यकर्मांनीं तुह्मी फिरून इंद्रपदाला प्राप्त व्हाल. ' इंद्र म्हणाला, ' ज्या ठिकाणीं मुक्ति मिळणें दुर्घट आहे अशा मृत्युलोकीं आह्मी आपल्या आज्ञेनें जातों, पण आम्हांला जन्मदाते धर्म, वायु, इंद्र व अश्विनीकुमार असावे. मी आत्मवीर्याच्या अंशानें ह्यांच्यामध्यें पांचवा अवतार घेऊन आपण सांगतां ती सर्व कामगिरी बजावतों. ' असें सांगून त्यानें प्रत्यक्ष श्रीला भूतलावर सामान्य बायको होण्यास सांगितलें. शिवांनीं त्या इंद्रासह नारायणाकडे जाऊन आपला उद्देश त्याला कळविला व नारायणानें आपलीं दोन शुक्ल व कृष्ण वीर्यें यदुकुलोद्भव स्त्रियांचे ठिकाणीं ठेवून त्या अंशभूत इंद्रासह भूतलावरें भूभार हरण करण्यासाठीं तो अवतरला. ह्याप्रमाणें त्या सर्वांचा पृथ्वीवर अवतार झाला आहे. विष्णूनें आपलें श्वेत व कृष्ण वीर्य देवकी व रोहिणी ह्यांच्या ठिकाणीं ठेविलें. श्वेत वीर्यापासून बलराम व कृष्ण वीर्यापासून कृष्ण उत्पन्न झाले, व त्या गुहेंत असलेले इंद्र पांडवरूपानें जन्माला आले आहेत. अर्जुन हा इंद्राचा अंश असून इतर सर्व पूर्व इंद्राचे अंशभूत आहेत. पूर्वीच ह्यांची ठरलेली बायको लक्ष्मी ही द्रौपदीच्या रूपानें अवतरली आहे. असें नसतें तर केवळ तुझ्या कर्मापासून अशी स्त्री ह्या भूतलावर अवतरणें शक्य आहे काय ? तपोवनांत कोणा एका कन्येनें रूपवती असूनही पति न मिळाल्यामुळें तप करून शंकरांना संतुष्ट केलें. शंकर प्रसन्न झाल्यावर पति दा म्हणून पांच वेळां तिच्या तोंडांतून निघाल्यावरून ' तुला पांच पति मिळतील, ' असें शंकर तिला म्हणाले. तेव्हां ' मला एकच पति पाहिजे, ' असें तिचें भाषण ऐकून ' पुढील जन्मीं ह्या माझ्या वराचें फळ तुला मिळेल, ' असें सांगून शंकर अंतर्धान पावले. तीच ही ह्या जन्मीं द्रौपदीच्या रूपानें अवतरली असून हिच्या ठिकाणीं लक्ष्मीचा अंश आहे. ' असें सांगून व्यासांनीं राजाला दिव्य चक्षु दिले. त्यांच्या योगानें ह्या सर्वांनाच त्यांच्या पूर्वदेहामध्यें पाहून त्यांचें रूप, तेज व यश ह्यांनीं थक्क होऊन राजानें व्यासांचे घट्ट पाय धरले. तो म्हणाला, ' पूर्वीच असें करण्यास माझें मन मला सांगत होतें. दैवलिखित चुकविणें शक्य नाहीं. ब्रह्मग्रंथि तोडण्याला कोण समर्थ आहे ? ह्या बाबतींत कांहीं एक सहज घडून आलें नसून हा सर्व वराचा महिमा आहे. हें सर्व पूर्वसंकेताप्रमाणेंच घडून येत आहे. शंकराचाच ज्याअर्थी हा वर आहे त्या अर्थी ह्या गोष्टींत धर्माधर्मविचार त्यांनाच चांगला माहीत

आहे. मजकडे कांहींच कर्तृत्व येत नाहीं, म्हणून मी दोषालाही पात्र होत नाहीं. ह्या सर्वांच्या उपभोगासाठीं ही कन्या निर्माण झाली आहे त्या अर्थी सर्वांशीं हिचें विधिपूर्वक पाणिग्रहण होऊं द्या.' मग 'आजच चंद्र पुष्यनक्षत्राला जात असल्यामुळें चांगला दिवस आहे,' असें व्यासांनीं सांगितल्यावरून द्रुपदानें लग्नाची सर्व सिद्धता करून अनेक मौल्यवान वस्त्रालंकारादि पदार्थ पांडवांना दिले. मुलीला न्हाऊं घालून अलंकारांनीं विभूषित करून लग्नमंडपांत आणविली. विवाह पाहण्याला सर्व सुहृद, मंत्री, ब्राह्मण व पौरजन जमले असून त्यांच्या तोंडावर आनंदाचीं चिन्हें दिसत होतीं. त्या ठिकाणीं उत्तम वस्त्रालंकार घातलेले आश्रितादि जन व राजवैभव दाखविणारे हत्ती, घोडे इत्यादि विस्तीर्ण चौकांत उभे होते. अनेक शोभायमान रत्नांनीं तो चौक तारांकित आकाशाप्रमाणें लखलखत होता. पांडव मंगलस्नानें करून उत्तम वस्त्रें नेसून कुंडलादि भूषणें घालून मांडवांत आले. नंतर धौम्यांसहवर्तमान राजपुरोहितानें अग्नींत होम दिल्यावर युधिष्ठिरादि पांडवांनीं क्रमानें अग्नीला प्रदक्षिणा करून त्याच्या साक्षीनें द्रौपदीचें पाणिग्रहण केलें. विवाहविधि आटोपल्यावर द्रुपदानें विपुल संपत्ति व उत्तम वस्त्रें यांचे त्या महारथ्यांना अहेर केले. पुष्कळ हत्ती, घोडे, दास दासी व अनेक रत्नालंकार त्यांना दिले. पांडव पांचाल नगरींत कांहीं काल सुखानें राहिले. त्यांच्याशीं संबंध जुळल्यानें द्रुपदाला देवांपासून देखील भय उरलें नाहीं. राजस्त्रियांनीं कुंतीकडे येऊन आपापलीं नांवें सांगून तिला नमस्कार केले. मंगलवस्त्र नेसून मंगलालंकार घातलेल्या द्रौपदीनें येऊन सासूच्या पायांवर डोकें ठेविलें; व हात जोडून ती तिच्यापुढें उभी राहिली. रूप, लक्षण, शील, व आचार ह्यांची खाण अशा त्या सुनेला कुंतीनें आशीर्वाद दिला. ती म्हणाली, 'ज्याप्रमाणें इंद्राणी इंद्राला, स्वाहा अग्नीला, रोहिणी चंद्राला, दमयंती नलाला, भद्रा कुबेराला, अरुंधती वसिष्ठाला व लक्ष्मी नारायणाला, त्याप्रमाणें तूं आपल्या पतींना हो. तुझे मुलगे दीर्घायु होऊन यापासून तुला वीरसू हें नांव मिळेल व तुला पुष्कळ सुख मिळून पतींबरोबर तूं यज्ञभागिनी होशील. पतिव्रतांमध्यें श्रेष्ठ होऊन दैवशाली होशील. आलेल्या अतिथींचा, साधूंचा, वृद्धांचा, लहानमोठ्यांचा यथान्याय सन्मान ठेवून तूं सुखांत राहशील. धर्मावर श्रद्धा राहून कुरुजांगलादि मुख्य मुख्य राष्ट्रांतून राजांना तुझ्या हातून राज्याभिषेक होतील. तुझ्या पतींनीं पराक्रमानें जिंकलेली पृथ्वी अश्वमेधयज्ञांत ब्राह्मणांना तूं देऊन टाकशील. पृथ्वीवरील अमौलिक रत्नांचा उपभोग घेशील. शंभर वर्षें तूं सुखानें राहशील. तुला पुत्र झाल्यानंतर आतांप्रमाणेंच फिरून तुम्हीं अभिनंदन करण्याचा मला प्रसंग येवो.' इकडे विवाहविधि उरकल्यावर कृष्णानें पांडवांना हिरे, जवाहीर, मौल्यवान अलंकार, वस्त्रें, मऊ कांबळीं, बिछायती, आसनें, नानाविध पात्रें, नाना देशच्या शाली, तरुण दासी, हत्ती, रथ घोडे यांचे अहेर दिले.

---

४३. पांडवांविषयीं कौरवांची दुष्ट मसलत व भीष्मादिकांची त्यांना योग्य सल्ला. (१, २००—२०६)

विवाहाचा मंगलविधि उरकून पांडव द्रुपदाच्या घरीं रहात असतां, ज्यानें लक्ष्यवेध केला तो अर्जुन, व ज्यानें शल्याला जेरीस आणिलें तो भीम ही बातमी हां हां म्हणतां सर्व राजांमध्यें पसरून त्यांनीं धृतराष्ट्राचा व त्याच्या मुलांचा, पांडवांविषयींच्या त्यांच्या दुष्टबुद्धीसंबंधानें धिक्कार केला. कर्ण, शकुनि, अश्वत्थामा, दुर्योधन व त्याचे बंधु हे सर्व खजील झाले असतां दुःशासन ह्मणाला, 'अर्जुन ब्राह्मणवेषांत नसता तर त्याला द्रौपदी कधीं मिळाली नसती. ह्या गोष्टी पुष्कळ अंशीं दैवाधीन असून पौरुषाचें तेथें कांहीं चालत नाहीं. आमच्या तडाक्यांतून पांडव अद्यापि जिवंत आहेत, तेव्हां आमच्या पौरुषाला धिक्कारच नव्हे काय? द्रुपदाशीं संबंध जुळल्यानें सर्व अस्त्रांमध्यें विशारद द्रुपदपुत्र पांडवांचें साह्य करणार हा विचार मनांत येऊन धार्तराष्ट्रांना चैन पडेनासें होऊन काय करावें हें सुचेना. विदुरांना मात्र ही बातमी ऐकून संतोष झाला. 'कुरुराजपुत्र भाग्याला चढत आहेत ही चांगली गोष्ट आहे,' असे त्यांच्या तोंडांतून उद्गार निघाले. ते ऐकून धृतराष्ट्राला आपल्या बडील मुलाला द्रौप-

दोनें वरलें असें वाटून आनंद झाला. पण मागून कुरुराजपुत्र झणजे पांडव असें कळल्यावर आपला दुष्टभाव झाकून ठेवण्यासाठीं तो झणाला, 'त्यांना द्रौपदी मिळाली ही गोष्ट चांगलीच झाली. पांडव मला माझ्या मुलांपेक्षां अधिक प्रिय आहेत. ते खुशाल असून त्यांनीं आप्त जोडले ही कांहीं वाईट गोष्ट झाली नाहीं. द्रुपदाशीं स्नेह जुळल्यावर कोणत्या गतवैभव राजाला आपलें वैभव फिरून मिळणार नाहीं?' नंतर विदुर निघून गेल्यावर दुर्योधन धृतराष्ट्राला झणाला, 'विदुरापुढें पांडवांविरुद्ध आह्मांला कांहीं बोलतां येईना. आतां प्रतिपक्षांकडील कोणी येथें नाहीं म्हणून बोलतों. हा आपला विचार मला पसंत नाहीं. वैऱ्याची बुद्धि आपणाला हिताची वाटते. विदुरापुढें पांडवांची आपण प्रशंसा करतां. आपण कर्तव्य विसरतां! पांडवांचा नेहमीं आपण उत्साहभंग केला पाहिजे. आतां वेळ येऊन ठेपल्यामुळें काय केलें पाहिजे तें मी आपल्याला स्पष्ट सांगतों ऐका.' धृतराष्ट्र म्हणाला, 'मी तुमच्याबाहेर नाहीं. पण विदुरापुढें खरें स्वरूप प्रकट करण्याला मला भीति वाटते. शिवाय माझ्या इंगितावरून माझा अभिप्राय त्यांच्या लक्षांत येऊं नये म्हणून त्यांपुढें मी पांडवांचे गुणानुवाद गातों. तुम्हांला काय कर्तव्य वाटतें तें बोला.' दुर्योधन म्हणाला, 'गुप्त व आमचे हितचिंतक असे कुशल ब्राह्मण पाठवून कुंतीपुत्र व माद्रीपुत्र ह्यांमध्यें फूट पाडवावी, द्रुपद किंवा त्याचा मुलगा ह्याला पुष्कळ द्रव्य देऊन वश करून घ्यावें; तुमचें इकडे येणें तुमच्या हिताचें नाहीं, असें निरनिराळ्या लोकांकडून पांडवांच्या मनांत भरवून देऊन ते तेथेंच राहतील अशी कांहीं तरी खटपट करावी; कांहीं धूर्त लोकांकडून त्यांच्यामध्येंच फूट पाडावी; अथवा द्रौपदीला फोडावी. पांचांजणांची ती बायको असल्यामुळें हें काम फार सोपें आहे; अथवा धूर्त लोकांकडून भीमाला मारून टाकवावें. तोच त्याच्यामध्यें बलानें अधिक आहे म्हणून त्या सर्वांची त्यावरच सर्व भिस्त आहे. त्याचा आधार आहे म्हणूनच अर्जुन आह्मांला तुच्छ करीत आहे.' भीम मेल्यावर बलहीन व उत्साहहीन होऊन ते राज्याकरितां मुळींच यत्न करणार नाहींत. वृकोदर पाठीवर आहे तोंपर्यंतच अर्जुन जिंकण्याला कठीण; नाहीं तर तो कर्णाच्या चतुर्थांशही पराक्रमी नाहीं. भीम मेल्यावर ते निमुटपणें आमच्या आज्ञेंत वागूं लागून आमच्या मुठींत येतील. मग त्यांच्या नाशाची एखादी युक्ति शोधून काढणें फार सोपें काम आहे; अथवा लावण्यवती स्त्रिया पाठवून त्यांच्याकडून त्यांना मोह पाडून द्रौपदीच्या मनांत त्यांच्या संबंधानें वीट उत्पन्न करवावा. द्रुपदाचें व त्यांचें जोंपर्यंत ऐक्य झालें नाहीं तोंपर्यंतच त्यांना जिंकतां येणार आहे.' हें भाषण ऐकून कर्ण म्हणाला, 'दुर्योधना, तुझा विचार मला पसंत नाहीं. ह्या पूर्वीच आपण अनेक धूर्त उपायांनीं त्यांचा नाश करण्याची खटपट केली असून ती सर्व व्यर्थ गेली आहे. ह्या ठिकाणीं लहानपणीं बुड्याबरोबर असून त्यांना, कोणाचें साह्य नसतां तुझ्या हातून त्यांचें कांहीं वांकडें झालें नाहीं. आतां तर ते मोठे बलाढ्य आहेत, तुह्मांपासून दूर आहेत व त्यांना आतां साह्यही मिळालें आहे. मानवी किंवा दैविक संकटाला ते आतां दाद देतीलसें वाटत नाहीं. जे एका स्त्रीशीं रत असतात त्यांमध्यें फूट पाडणें सोपें काम नाहीं, व द्रौपदीच्याही मनांत त्यांच्या संबंधानें वीट उत्पन्न करणें शक्य नाहीं. कष्टदशेंत त्यांचे गुण पाहून ज्या अर्थी तिनें त्यांना वरलें आहे त्या अर्थी त्यांत खऱ्या प्रेमाचाच भाग पुष्कळ आहे. स्त्रियांना अनेक पति स्वभावतः आवडतात. सद्वर्तनानें चालणारा पांचालराजा धनलोभी नाहीं. राज्याकरितां सुद्धां तो पांडवांना अंतर देणार नाहीं. त्याचप्रमाणें त्याचा गुणवान पुत्र गुणलुब्ध असल्यामुळें पांडवांकडेच त्याचा ओढा कायम राहणार. ह्या सर्व कारणांवरून पांडव मला उपायसाध्य दिसत नाहींत. आज आपल्याला एवढें मात्र करतां येण्याजोगें आहे कीं, जोंपर्यंत त्यांचा पक्ष जोरावला नाहीं, द्रुपदानें आपल्या पुत्रपौत्रांसहवर्तमान त्यांना साह्य देण्याचा निश्चय केला नाहीं, कृष्ण आपल्या सर्व सैन्यासहवर्तमान त्यांच्या मदतीला येऊन मिळाला नाहीं, व आपला पक्ष जोरावर आहे, तोंपर्यंत घाव दिला तर लागूं पडणार आहे. भरतानें पराक्रमानेंच तीन लोकांचा स्वामी झाला. पराक्रम हाच क्षत्रियांना कीर्तिकर अ-

खन तो शूरांचा स्वधर्म आहे. ह्मणून आपण आपल्या चतुरंग सैन्यानिशीं द्रुपदाला जर्जर करून पांडवांना जिंकूं. सामदानभेदांचा ह्या ठिकाणीं उपभोग होईल असें मला वाटत नाहीं. ह्मणून दंडानेंच त्यांना जिंकून तूं राज्याचा उपभोग घे.' नंतर भीष्म, द्रोण, व विदूर ह्यांना बोलावून 'आमच्या हिताचा मार्ग कोणता असेल तो ठरवा,' असें धृतराष्ट्रानेंच त्यांस सांगितलें. भीष्म ह्मणाले, 'पांडवांबरोबर भांडण करणें मला पसंत नाहीं. मला दोघेही सारखे आहां. मला ज्याप्रमाणें त्यांची काळजी घेतली पाहिजे त्याचप्रमाणें धृतराष्ट्रा, तुलाही घेतली पाहिजे. असें असल्यामुळें त्यांच्याबरोबर स्नेह राखून अर्धराज्य दे. दुर्योधना, ज्याप्रमाणें तुला हें राज्य तुझें वडिलोपार्जित वाटत आहे तसेंच त्यांनाही वाटत आहे. त्यांना जर हें मिळणार नाहीं तर तुला किंवा दुसऱ्या कोणाही भरताला तें कां मिळावें? धृतराष्ट्रा, हें राज्य तूं अन्यायानें बळकाविलें आहेस, पण तुझ्या पूर्वीच न्यायानें त्यांना ह्याचा हक्क मिळाला आहे. सलोख्यानें राहून अर्धराज्य त्यांना देणें हें तुह्मांला व सर्व जनांना हितावह होणार आहे. ह्याच्या उलट वागाल तर तुमचें हित होणार नाहीं. त्यांत तुझी केवळ अपकीर्ति मात्र होणार आहे. कीर्तीचें रक्षण कर. **कीर्ति हें मोठें बल आहे. नष्टकीर्ति मनुष्य जगून मेल्यासारखा आहे.** कीर्तीचा नाश झाला नाहीं तोंपर्यंतच मनुष्य जिवंत आहे असें समजलें पाहिजे. ह्मणून कुरुकुलाला उचित व पूर्वजांच्या नांवाला साजेलसें हें जें मी तुला सांगतों त्याप्रमाणें करून टाक. पार्थ व कुंति जिवंत आहेत ही सुदैवाचीच गोष्ट ह्मणावयाची. कुंतीच्या मुलांना जाळल्याची बातमी ऐकल्यापासून राजा मला तुझ्याकडे पहावत देखील नव्हतें. कुंतीला व तिच्या मुलांना जाळल्याबद्दल लोक तुला ज्याप्रमाणें दोष देतील त्याप्रमाणें ते पुरोचनाला दोषी धरणार नाहींत. ह्मणून ते आतां सुरक्षित येऊन भेटले ह्मणजे राजा, तुझ्यावरचा मोठा आळ जाणार आहे. ते वीर जिवंत असून त्यांच्या अंशाचा अपहार करण्याची प्रत्यक्ष इंद्राची छाती नाहीं! त्या सर्वांचें धर्मानें वर्तन असून ते एकमतानें आहेत. राज्यावर दोघांचा सारखा हक्क असून अन्यायानें त्यांना तूं त्यापासून दूर करूं इच्छित आहेस. जर तुला सरळ मार्गानें जाणें असेल, माझें प्रिय करणें असेल, व सर्व जनांचें कल्याण करणें असेल तर त्यांना अर्धें राज्य दे.' हें ऐकून द्रोण ह्मणाले, 'धृतराष्ट्रा, सल्ला घेण्याकरितां ह्मणून बोलाविलें असतां हितचिंतकांनीं योग्य, हितावह व कीर्तिकर असाच सल्ला दिला पाहिजे. ह्या थोर भीष्मांनीं दिलेल्या सल्ल्याप्रमाणेंच माझाही सल्ला आहे. पांडवांना त्यांचा अंश देणें न्यायाचें आहे; व हीच पूर्वापार चालत आलेली चाल आहे. ह्मणून पुष्कळ संपत्ति देऊन जासुदाला द्रुपदाकडे पाठीव. तेथें जाऊन त्यानें 'तुमचा संबंध झाल्यानें दुर्योधनप्रभृतींना फार आनंद झाला आहे,' ह्मणून सांगावें, व या योग्य संबंधाविषयीं प्रशंसापूर्वकही चार शब्द बोलावे. पांडवांचें अनेक प्रकारें समाधान करून त्यांना व द्रौपदीला मौल्यवान वस्त्रालंकार व रत्नें देऊन इकडे बोलाविलें आहे ह्मणून सांगावें. द्रुपदाची आज्ञा घेऊन ते इकडे येण्यास निघाले असें कळल्यावर त्यांना आणण्याकरितां उत्तम सैन्य पाठीव. तूंही त्यांकडे योग्य लक्ष दाखवून वडिलोपार्जित राज्याचा त्यांना उपभोग मिळेल अशी तजवीज कर. हाच तुझ्या मुलांच्या व त्यांच्या हिताचा सल्ला आहे.' हें ऐकून कर्ण ह्मणाला, 'राजा, दानमानाचा वर्षाव करून प्रत्येक सल्लामसलतींत तूं ह्यांना आपले अंतरंग मित्र समजून त्यांचा विचार घेत आला आहेस. असें असून ह्यांनीं तुला तुझ्या हिताचा सल्ला देऊं नये ह्याहून नवल दुसरें काय असलें पाहिजे? आपला दुष्ट हेतु झाकून ठेवावयाची खबरदारी घेऊन जो पापबुद्धि अहिताचा सल्ला देतो तो शहाण्याला कसा मान्य होईल? संकटसमयीं मित्राच्या हातून आपलें इष्टानिष्ट होणें शक्य नाहीं; कारण सुख किंवा दुःख ज्याला त्याला त्याच्या प्राक्तनानुसार मिळत असतें. पूर्वी राजगृहांत कोणी अंबुबीच नांवाचा राजा होता. तो विकलेंद्रिय झाला असल्यामुळें त्यानें सर्व राज्यभार आपल्या प्रधानावर सोंपविला. तो प्रधान स्वतःलाच यजमान समजूं लागून अधिकारबलावर राजाचा अवमान करूं लागला. तो मूर्ख राजाच्या सर्व उपभोग्य वस्तूंचा आपणच उपभोग घेऊं लागला. पुढें त्याचा लोभ

अधिकाधिकच वाढत जाऊन राजाला सर्वस्वीं नागविल्यावर त्याची गादीसुद्धां बळकाविण्याचें त्याच्या मनांत येऊं लागलें. त्यानें पुष्कळ खटपट केली तरी अशा विपन्नदशेंत आलेल्या राजाचें त्याच्या हातून कांहीं वांकडें झालें नाहीं. तुझ्याच नशिबीं जर हें राज्य लिहिलें असेल तर तें खचित तुझ्याजवळ राहील. तसें जर नसेल तर तूं कितीही झटपटलास तरी तुझी सर्व खटपट व्यर्थ जाईल. हें पक्कें लक्षांत ठेवून मग मंत्र्यांच्या सल्लामसलतीसंबंधानें विचार कर. सुष्टांचें म्हणणें ऐकून घ्यावें, दुष्टांचेंही ऐकून घ्यावें व पुढें आपल्याला जें करणें योग्य वाटेल तें करावें. मला सांगावयाचें होतें तें मीं सांगितलें. आतां तुझ्या हिताची गोष्ट सांगणारा कोण व अहिताची सांगणारा कोण ह्याचा विचार तुझा तूंच कर.' हें ऐकून द्रोण म्हणाले, 'तूं स्वतः दुष्ट असल्यानें तुला सर्व लोक दुष्ट दिसतात व पांडवांचा नाश करण्याच्या बुद्धीनें तूं असें म्हणत आहेस. तुझा भाव मी समजून आहें. परंतु कर्णा, मी तुमच्या व कुरुकुलाच्या हिताची गोष्ट सांगत आहें हें लक्षांत ठेव. ह्याच्या उलट वर्तन केल्यानें सर्व कौरवांचा खचित लवकर फडशा उडेल.' नंतर विदुर म्हणाले, 'राजा, तुझे सुहृद निःसंशयच तुझ्या हिताची गोष्ट तुला सांगतात. पण त्यांचें सांगणें तुला कडू वाटत असल्यानें तें तुझ्या कानांत शिरत नाहीं. भीष्मद्रोणांनीं तुला फार चांगला सल्ला दिला आहे. विचारांतीं कर्ण तुझा हितोपदेशक असावा असें मला वाटत नाहीं. ह्या दोन पुरुषसिंहांना बुद्धीमध्यें मागें सारणारा मला कोणी दिसत नाहीं. हे वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध असून तुझ्या व पांडवांच्या ठिकाणीं ह्यांची समबुद्धि आहे. सचोटीमध्यें ते रामापेक्षां किंवा गयापेक्षां कमी नाहींत. त्यांनीं आजपर्यंत तुला कधीं वाईट सल्ला दिला नाहीं, व तुझ्या हातूनही त्यांचें कांहीं वांकडें झाल्याचें दिसत नाहीं. असें असून हे दोघे सत्यप्रिय नरव्याघ्र तुला वाईट सल्ला कां बरें देतील ? हे सत्यवक्ते व शहाणे असून धर्मज्ञ आहेत. धनलोभानें त्यांच्या हातून कधीं वांकडें पाऊल पडणार नाहीं. मलाही जी तुझ्या हिताची गोष्ट वाटत आहे तीच मी तुला सांगतों. हे धृतराष्ट्रा, दुर्योधनादि तुझ्या मुलांसारखेच तुला पांडव असल्यामुळें त्यांचें वाईट करण्याविषयीं तुला जे सल्ला देतील ते तुझे शत्रू आहेत असें समज. ज्यांच्या बाजूला बळराम व सात्यकि आहेत, ज्यांना सल्लामसलत देणारा प्रत्यक्ष भगवान वासुदेव आहे, ज्यांचा सासरा द्रुपद, व मेहुणे धृष्टद्युम्नप्रभृति वीर आहेत, त्यांना युद्धांत काय अजिंक्य आहे ? म्हणून पांडवांना त्यांचा राज्यांश देणें न्यायाचें आहे, हें लक्षांत घेऊन त्यांच्याशीं सरळ मार्गानें वाग. पुरोचनाच्या कृत्यानें तुला लागलेला कलंक त्यांवर अनुग्रह करून धुऊन काढ. हा तुझा त्यांवरचा अनुग्रह कुलवृद्धीला व कल्याणाला कारणीभूत होणार आहे. द्रुपद मोठा पराक्रमी असून आमच्याशीं त्याचें पूर्वीपासून वैर आहे. त्याला आपलासा करून घेतल्यानें आपलें मोठें कार्य होणार आहे. दाशार्हांचे बलाढ्य लोक कृष्णाच्या बाजूलाच असणार व जयश्रीही कृष्णाच्या पक्षालाच वरणार. जें काम गोडीनें साधण्याजोगें आहे तें कोणता अभागी मनुष्य भांडनानें तडीस नेण्यास इच्छील ? पार्थ जिवंत आहेत ही बातमी ऐकल्यापासून सर्वजण त्यांच्या दर्शनासाठीं फार आतुर झाले आहेत, त्यांचेंही प्रिय कर. दुर्योधनादिकांच्या बुद्धि दुष्ट असून अल्पडपणामुळें अधर्माकडे त्यांची प्रवृत्ति आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें वागूं नकोस. त्यांच्या अपराधामुळें सर्व प्रजेचा समूळ नाश करण्याला प्रवृत्त होऊं नकोस.' हें विदुरांचें भाषण ऐकून धृतराष्ट्रानें पांडवांना आणविण्यासाठीं त्यांनाच जाण्याला सांगितलें. विदुरांनीं त्याच्या सांगण्याप्रमाणें द्रुपदाकडे जाऊन विपुल वस्त्रालंकारांनीं सर्वांचा सत्कार करून स्नेहपूर्वक त्याला धृतराष्ट्राचा निरोप कळविला. ते म्हणाले, 'धृतराष्ट्रानें संतोषपूर्वक तुमचें कुशल विचारलें आहे. तो व इतर कौरव तुमच्या ह्यासंबंधानें आपणाला कृतार्थ समजत आहेत. राज्य देखील यापेक्षां त्यांना अधिक प्रिय वाटत नाहीं. पांडवांना पाहून फार दिवस झाल्यामुळें त्यांच्या भेटीची त्यांना फार उत्कंठा झाली आहे; म्हणून द्रौपदीसह त्यांना मजबरोबर पाठवून दे. तुझी आज्ञा होत असेल तर पुढें जासूद पाठवितों; म्हणजे सर्व कौरव सैन्यासहवर्तमान त्यांना सामोरे येतील.' द्रुपद म्ह-

णाला, 'त्यांनीं आपल्या घराला जावें हें ठीकच आहे. मीं आतां बोलून दाखविलें पाहिजे असें नाहीं. पण पांडवांनीं आतां हें आपलें घर समजलें पाहिजे.' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'प्रेमपाशानें बांधून आपण आम्हांला अगदीं परतंत्र केलें आहे. आपली कोणतीही आज्ञा आम्हांला मोडतां येणार नाहीं.' असें म्हणून निरोप घेऊन द्रौपदी व कुंति यांसह मजल दरमजल करीत ते हास्तिनापुराला येऊन दाखल झाले. त्यांना सामोरे जाऊन आणण्याकरितां धृतराष्ट्रानें कौरवांना पाठविलें. त्या समयीं पौरजनांचे पुढील उद्गार कांनीं पडत होते. 'धर्मज्ञ धर्मराज येत आहे. तो आमचें आपल्या आप्तांप्रमाणें पालन करील. आमच्याच कल्याणासाठीं पंडूनें फिरून जन्म घेतला आहे, ह्यांत संशय नाहीं. आज हे पंडुपुत्र फिरून आपल्या नगराला आले त्यापेक्षां आणखी काय आह्मांला पाहिजे ? आमच्या हातून जर कांहीं पुण्यकर्म झालें असेल तर त्याच्या योगानें पांडव शतायु होऊन ह्या आपल्या नगरांत राहून आमचें पालन करोत.' ह्याप्रमाणें पौरांचे आनंदाचे उद्गार ऐकत ते नगरांत शिरले. नंतर भीष्मादि गुरुजनांना अभिवादन करून धृतराष्ट्रानें दाखवून दिलेल्या राजवाड्यांत ते जाऊन राहिले. पुढें पांचालीला पांचा पांडवांपासून पांच पर्वतासारखे मुलगे एकएक वर्षाच्या अंतरानें झाले. त्यांचें जातकर्म व चूडोपनयनादि संस्कार धौम्यांनीं विधिपूर्वक केले. पुण्यशील व कर्मठ अशा धर्मराजाच्या आश्रयानें सर्व लोक सुखांत होते. तो धर्मार्थकामांचा यथाविभागानें उपभोग घेत असे; त्यामुळें राजांची लक्ष्मी स्थिर झाली, बुद्धि आत्मविचाराकडे लागली, व धर्म वृद्धिंगत झाला. चौघां भावांमध्यें धर्मराज महायज्ञांत ह्मटल्या जाणाऱ्या चार वेदांच्या मध्यगत महाध्वराप्रमाणें शोभत होता. बृहस्पतींसारखी धौम्यादि मंडळी कधीं त्यांना सोडून नसत. पौर्णिमेच्या निर्मल चंद्राप्रमाणें धर्मराजाच्या ठिकाणीं लोकांचे डोळे व अंतःकरण सप्रेम लागून राहिलीं होतीं. केवळ दैवानें दिला ह्मणूनच नव्हे तर भक्तिपूर्वक प्रजा त्याच्या ठिकाणीं अनुरक्त होती. कारण लोकांचा भाव समजून घेऊन त्याप्रमाणें त्याचें वर्तन असे. त्याच्या तोंडांतून अभद्र, असत्य, निष्ठुर किंवा कठोर भाषण कधीं निघत नसे. आत्महिताप्रमाणेंच तो परहिताकरितां झटत असे.

---

४४ धृतराष्ट्रानें पांडवांना अर्धराज्य देऊन इंद्रप्रस्थाला पाठविलें. त्या ठिकाणीं युधिष्ठिराची राज्यनीति व सुंदोपसुंदांची कथा. (१. '२०७–२१२)

पांचालाहून परत येऊन हास्तिनापुरांत पांडव कांहीं दिवस राहिल्यावर भीमाममक्ष धृतराष्ट्र त्यांना हांक मारून ह्मणाला, 'युधिष्ठिरा, तुह्मां भावांमध्यें भांडण होऊं नये ह्मणून अर्धराज्य घेऊन तूं आपल्या भावांसह खांडवप्रस्थाला जाऊन तेथें राज्य कर.' ही गोष्ट मान्य करून सर्व पांडव द्रौपदीसह त्या घोर खांडवप्रस्थाला आपल्या अर्धराज्याचा उपभोग घेण्यासाठीं गेले व तेथें जाऊन त्या वनाला त्यांनीं स्वर्गाची शोभा आणिली. त्या पवित्र जागेची शांति करून द्वैपायनप्रभृतींनीं नगरासाठीं त्यांना जागा मापून दिली. समुद्रासारखा खोल खंदक खणून व आकाशाला जाऊन भिडलेले तट बांधून ते त्या ठिकाणीं राहूं लागल्यानें नागांच्या योगानें भोगावती जशी शोभते तसें तें नगर त्यांच्या योगानें शोभायमान दिसूं लागलें. दोन पक्षांनीं युक्त गरुडासारख्या उंचउंच वेशींनीं, मोठमोठ्या गगनचुंबित हवेल्यांनीं व अनेक आयुधागारांनीं त्या नगराला विलक्षण शोभा आली असून श्याममर्ण गोपुरांनीं त्याचें रक्षण केलें असल्यामुळें द्विजिव्ह सर्पांनीं वेष्टिल्याप्रमाणें तें दिसत होतें. त्याचप्रमाणें अनेक वीरांनीं रक्षण केलेल्या त्या नगराला सहस्रावधि सूर्यकिरणांना दाद लागूं न देणाऱ्या जलयंत्रांनीं फारच शोभा आली होती. त्यामध्यें सुशोभित व रुंद असे मोठमोठे रस्ते केले असून ठिकठिकाणीं कैलासाला तुच्छ करणारे असे क्रीडापर्वत केले असल्यामुळें त्याला स्वर्गाची शोभा आली होती. युधिष्ठिराचें राहण्याचें जलमंदिर कुबेरभुवनाला मागें सारणारें होतें. सर्व वेदपारंगत ब्राह्मण, धनार्थी वैश्य, सर्व कलेंत निष्णात असे शिल्पकार, नानादेशांतून येऊन तेथें मोठ्या आनंदानें राहिले होते. त्या नग-

राच्या आसमंतात् भागीं मनोहर व सुवासिक पुष्पांचीं रम्य उद्यानें असून त्यांत फलभारानीं वांकलेले आंबे, फणस, दाळिंब, कळंब, केवडा, लिंब इत्यादि अनेक जातींचे वृक्ष लाविले होते. त्यांवर मत्तमयूर, कोकिल, हंस, कारंडव इत्यादि नानाविध पक्षी विहार करीत. तेथें आरशांसारख्या स्वच्छ पाण्याच्या पुष्करण्या, तळीं व विहिरी इत्यादि रम्य जलाशय असून प्रफुल्लित कमलांनीं त्यांना फारच शोभा आली होती. पुण्यशील जनांनीं परिपूर्ण अशा त्या नगरांत शिरतांना पांडवांचें मन फारच सुप्रसन्न झालें. त्यांची तेथें सर्व प्रकारची सोय करून देऊन कृष्ण बलरामासहवर्तमान द्वारावतीला गेला. शत्रूंना ताप देणारे पांडव मिळालेल्या राज्यांत संतोष मानून त्या ठिकाणीं आनंदांत राहिले. सत्यसंध युधिष्ठिर बंधूंसहवर्तमान धर्मानें प्रजेचें पालन करूं लागला. सर्व पौरकार्यांत दक्ष राहून दुसऱ्या राजांवर बजन बसवून त्यानें राज्याचा पाया भक्कम केला. इतक्यांत कोणे एके समयीं नारद सहज तेथें आले. युधिष्ठिरानें त्यांना आसन व अर्घ्यादि देऊन राज्य त्यांच्या पायावर अर्पण केलें. द्रौपदी येऊन नारदांना अभिवादन करून आशीर्वाद घेऊन त्यांच्या आज्ञेनें अंतःपुरांत परत गेली. नंतर नारद पांडवांना म्हणाले, 'पांचाली तुमची पांचांची धर्मपत्नी असल्यानें सुंदोपसुंदांप्रमाणें तिच्यासाठीं तुमचा आपसांत तंटा लागणार नाहीं अशी नीति ठेवा. सुंदोपसुंदांची गोष्ट मी तुह्मांला सांगतों ती लक्षपूर्वक ऐका. '

'हिरण्यकशिपुनांवाच्या कोणी मोठ्या असुराच्या वंशांत पूर्वी निकुंभनामक असुर उत्पन्न झाला. त्याला दुष्ट बुद्धीचे दोन क्रूर व महापराक्रमी सुंद आणि उपसुंद या नांवांचे मुलगे झाले. त्या दोघांची नेहमीं एक जूट असून कोणतीही गोष्ट ते दोघे एक विचारानें करीत असत. कोणत्याही सुखदुःखामध्यें ते परस्परांचे वांटेकरी होत असून निजणें, बसणें, उठणें इत्यादि त्यांच्या सर्व क्रिया एकमतानें होत असत. शील व वर्तन ह्यांत देखील दोघांचा अगदीं सारखेपणा असल्यामुळें एकाच व्यक्तीचे दोन भाग झाल्याप्रमाणें ते लोकांना भासत. त्रैलोक्य जिंकण्याचा मनांत निश्चय करून विंध्यपर्वतावर जाऊन तपाची दीक्षा घेऊन ते उग्र तप करूं लागले. भूकतहानेला न जुमानतां जटा वाढवून व वल्कलें धारण करून अंगांवर धुळीचा लेप बसलेले ते वायु भक्षण करीत तपांत अगदीं गढून गेले. वर सूर्याकडे हात करून अंगठ्यावर उभे राहून डोळे उघडे ठेवून आपल्या अंगांचें मांस काढून ते अग्नीला आहुति देत असत. त्यांचा तपोभंग करण्यासाठीं देवांनीं अनेक उपाय केले, पण ते सर्व व्यर्थ गेले. त्यांच्या उग्र तपानें ब्रह्मदेव संतुष्ट होऊन त्यांना वर देण्यास तयार झाले असतां त्या दैत्यांनीं अमरत्व मागितलें. 'अमरत्व कोणासच नसल्यामुळें त्याशिवाय दुसरा वांटेल तो वर मागण्यास ब्रह्मदेवांनीं सांगितलें. तेव्हां 'परस्परांखेरीज दुसऱ्या कोणत्याही स्थावरजंगमापासून आह्मांला मरण नसावें, ' असा त्यांनीं वर मागितला. तो वर देऊन ब्रह्मदेव ब्रह्मलोकाला निघून गेले व तेही सर्व लोकांना अवध्य होऊन घराकडे परतले. नंतर जटा आदिकरून तापस वेष दूर करून किरीटकुंडलादि दैदीप्यमान भूषणें घालून पांढरें शुभ्र वस्त्र नेसून त्यांनीं जिकडे तिकडे कायमचें चांदणें करून सोडलें. खा, प्या, ऐषआराम करा, इत्यादि उद्गाराखेरीज दुसरे शब्दच त्यांच्या राष्ट्रांत कोठें कानीं पडेनातसे झाले. ऐषआरामांत त्यांचीं वर्षे-च्या वर्षे एका दिवसाप्रमाणें लोटलीं. पुढें त्रैलोक्य जिंकण्याची हाव उत्पन्न झाल्यामुळें सैन्य पुढें पाठवून देऊन दैत्य वृद्ध व मंत्री ह्यांची आज्ञा घेऊन रात्रीं मघा नक्षत्रावर प्रस्थान ठेवून गडा, पट्टिश, शूल, मुद्गर वगैरे आयुधें घेऊन व अंगांत चिलखतें चढवून भाटांचे मंगल स्तुतिपाठ ऐकत मोठ्या उल्हासानें अंतरिक्षांत उडून त्यांनीं स्वर्गाकडे मोर्चा फिरविला. त्यांचा उद्देश व वरानें आलेलें सामर्थ्य जाणून देव ब्रह्मलोकाला गेले. त्यांनीं इंद्रलोक जिंकून नंतर अनेक यक्षराक्षसांचा नाश केला. त्याचप्रमाणें पातालवासी नागांना व समुद्रवासी म्लेच्छांना त्यांनीं जिंकलें. नंतर सर्व पृथ्वी जिंकण्याच्या उद्देशानें सैन्याला जवळ बोलावून ते ह्मणाले, 'राजर्षी मोठ्या यज्ञांनीं व ब्राह्मण हव्यकव्यांनीं देवांचें तेज, बल व संपत्ति वाढवितात ह्मणून एका जुटीनें प्रथम ह्या सर्वांना मारून टाक-

लें पाहिजे. ह्याप्रमाणें महोदधीच्या पूर्व तीरावर सर्वांना आज्ञा देऊन मनांत हा क्रूर हेतु धरून ते चोहोंकडे ब्राह्मणांना मारीत सुटले. आश्रमांत शिरून निःशंकपणें मुनींचें अग्निहोत्र भ्रष्ट करून पाण्यांत फेंकून देऊं लागले. संतापून गेलेल्या तपोधन ब्राह्मणांचे शाप दगडावर सोडलेल्या बाणाप्रमाणें वरप्रभावानें निष्फळ होऊं लागले. तेव्हां सर्प ज्याप्रमाणें गरुडाच्या भीतीनें गर्भगळित होतात त्याप्रमाणें घाबरून जाऊन सर्व ब्राह्मण तपनियमादि सोडून दशदिशां पळाले. त्या असुरांनीं आश्रमांतील यज्ञपात्रें मोडून तोडून चोहोंकडे फेंकून दिलीं. कालाची गदा आल्याप्रमाणें सर्व जग शून्य भासूं लागलें. गिरिगव्हरांत छपून राहिलेल्या ऋषींना देखील हत्ती व सिंह इत्यादि श्वापदांचीं रूपें घेऊन त्या दुष्टांनीं यमसदनाला पाठविलें. यज्ञ व वेदाध्ययन बंद पडलें. राजे व ब्राह्मण ह्यांचा समूळ उच्छेद झाला. सर्व जग उत्सवशून्य होऊन कृषिकर्म, गोरक्षण, इत्यादि व्यवसाय बंद पडले. नगरें व आश्रम उध्वस्त पडले. अस्थिपंजरांनीं सर्व भूमि भरून गेली. पितृकार्यें व वषट्कारादि मंगलक्रिया बंद पडल्या, व पृथ्वी जिकडे तिकडे भयाण दिसूं लागून चोहोंकडे एकच हाहाकार उठून राहिला. चंद्रसूर्यादि ग्रह, तारे व देव हा सर्व प्रकार पाहून घाबरून जाऊन ब्रह्मदेवांकडे गेले व त्यांनीं सुंद व उपसुंद ह्यांची हकीकत त्यांना कळविली. तेव्हां विचार करून ब्रह्मदेवांनीं विश्वकर्म्याला बोलाविलें व त्याला एक अप्रतिम लावण्याची केवळ खाण अशी स्त्री निर्माण करण्यास आज्ञा केली. ती मान्य करून विश्वकर्म्यानें आपलें सर्व बुद्धिकौशल्य खर्चून त्रैलोक्यांत ज्या ज्या म्हणून कांहीं दर्शनीय स्थावर व जंगम वस्तू होत्या त्या सर्व मनांत आणून एक सुंदर स्त्री निर्माण केली व तिच्या अंगावर अनेक रत्नालंकार घालून तिला सजविली. तिच्या अवयवांचा असा एकही भाग नव्हता कीं ज्याकडे पाहून प्रेक्षकांचे डोळे वेधले जाणार नाहींत. प्रत्येक वर्णनीय वस्तूपैकीं तिळतिळ घेऊन तिला निर्माण केली ह्मणून तिला तिलोत्तमा असें नांव दिलें. ब्रह्मदेवांना नमस्कार करून हात जोडून ती उभी राहिली. तेव्हां 'तूं जाऊन तुझ्या ह्या मोहक सौंदर्यानें सुंदोपसुंदांना मोह पाड व त्यांच्यामध्यें कलह उत्पन्न कर,' अशी त्यांनीं तिला आज्ञा केली. 'बरें' ह्मणून त्यांना नमस्कार करून ती देवांना प्रदक्षिणा करूं लागली असतां ती त्यांच्या पृष्ठभागाला गेली, तेव्हां तिला पाहण्याच्या उत्कट इच्छेनें शिवांच्या पृष्ठभागाला दक्षिणेकडे एक मुख उत्पन्न झालें. तेथून ती थोडीशी सरकतांच पश्चिमभागाला एक तोंड बाहेर पडलें व उजवीकडे उत्तरेला फिरत असतां उत्तरेला एक तोंड बाहेर पडलें. इंद्राच्याही सर्वांगावर सहस्रावधि डोळे फुटले. ह्याप्रमाणें त्या वेळीं शंकर चतुर्मुख झाले व इंद्र सहस्राक्ष झाला. ती निघाल्याबरोबर देव व ऋषी ह्यांना कार्यसिद्धि झाल्याप्रमाणें वाटूं लागलें. कोणे एके समयीं सर्व कामना पूर्ण झालेले ते दैत्य विंध्यपर्वताच्या शिखरावरील सपाटीवर विहार करीत होते. त्यावेळीं अनेक वाद्यें सुरूं असून भाटलोक त्यांचा स्तुतिपाठ गात होते. स्त्रिया जवळच नृत्यगायन करीत होत्या. अशा समयीं क्षीरक्षिरीत रक्तवस्त्र नेसून अनेक रत्नालंकारांनीं विभूषित तिलोत्तमा जवळच नदीतीरीं उगवलेलीं कर्णिकाराचीं फुलें तोडतांना त्यांच्या दृष्टीस पडली. तिला पाहतांक्षणीं कामविकार उत्पन्न होऊन ते तिच्याजवळ गेले. एकानें तिचा उजवा हात व दुसऱ्यानें डावा हात धरला. स्वाभाविक व वरप्रभावानें आलेल्या अशा दुहेरी उद्दामपणानें व संपत्तीच्या व दारूच्या मदानें एकमेकांकडे कपाळाला आंठ्या चढवून पाहून मद व काम ह्यांच्या धुंदींत ते परस्परांना टाकून बोलूं लागले. सुंद ह्मणाला, 'ही माझी बायको तुझी गुरुपत्नी आहे.' उपसुंद ह्मणाला, 'ही माझी बायको तुझी सून आहे.' 'ही तुझी नव्हे माझी आहे,' ह्याप्रमाणें दोघांचा तंटा जुंपला. मोठ्या गदा घेऊन एकमेकांनीं एकमेकांवर हणल्या. त्यामुळें दोघांचेंही अंग रक्तानें भरून दोघेही मरून खालीं पडले. या कामगिरीबद्दल ब्रह्मदेवांनीं येऊन 'जिकडे जिकडे ह्मणून सूर्याचा संचार आहे त्या त्या सर्व ठिकाणीं तुझी गति राहील,' असा वर देऊन तिलोत्तमेला संतुष्ट केलें. तर असा तंटा बुमच्यामध्यें न होऊं देण्याविषयीं तुह्मी खबरदारी घ्या.'

हा त्या महात्म्यांचा उपदेश ऐकून त्यांच्या समक्ष त्यांनीं प्रतिज्ञा केली कीं, आह्मांपैकीं एकावरोबर

द्रौपदी एकांतांत असतां दुसरा जो कोणी त्यांना पाहील त्यानें बारा वर्षें ब्रह्मचर्य पतकरून वनवास करावा.' ही त्यांची प्रतिज्ञा ऐकून नारद संतुष्ट होऊन निघून गेले. पांडवही ह्या संकेतानुरूप एकजुटीनें वागूं लागले.

४५. अर्जुनाच्या वनवासाचें कारण. (१. २१३)

द्रौपदी एकांतांत एकाबरोबर असतांना दुसऱ्यानें तिकडे जावयाचें नाहीं ह्याप्रमाणें ठराव करून शस्त्रबलानें सर्व राजांना आपल्या ताब्यांत आणून पांडव सुखानें रहात होते. द्रौपदी त्या सर्वांच्या आज्ञेंत असून ते परस्परांशीं मोठ्या प्रेमभावानें वागत असत. ह्याप्रमाणें पांडव राज्यशकट धर्मानें हाकीत असतां कोठें अन्याय न होतां प्रजा सुखी होती. इतक्यांत एके दिवशीं कांहीं चोरांनीं एका ब्राह्मणाची गाय चोरून नेली. त्यामुळें संतापून तो ब्राह्मण इंद्रप्रस्थाला आला व पांडवांना हांक मारून ह्मणाला, 'राजा, हे अधम चांडाळ माझें गोधन बलात्कारानें उपटून नेत आहेत. सिंह आपल्या गुहेंत नाहींसा पाहून नीच कोल्हा झडप घालीत आहे. **षष्ठांश कर घेऊन जो राजा प्रजेचें रक्षण करीत नाहीं त्याचे माथीं प्रजेचें सर्व पाप बसतें.** ब्रह्मस्व चोर हरण करून नेत आहेत. धर्म सर्वस्वीं बुडत चालला आहे. जो हा मी येथें शंख करीत बसलों आहे त्या भला कोणी हात या.' अर्जुनानें हे करुणापर शब्द ऐकून, भिऊं नको ह्मणून त्याला आश्वासन दिलें. परंतु आयुधागारांत धर्मराज, द्रौपदीसहवर्तमान असल्यामुळें तेथें त्याला जातां येईना. इकडे त्या ब्राह्मणाचा आक्रोश ऐकून त्याचें मन फाटून चाललें. त्यानें विचार केला, 'ब्राह्मणाची गाय चोर घेऊन चालले असतां त्याला संकटांतून न सोडविलें तर क्षात्रधर्माला बट्टा लागेल. राजाकडून अशी हयगय होणें ह्यासारखें दुसरें पातक नाहीं. शरणागताचें रक्षण न केल्यानें प्रजेकडे दुर्लक्ष केल्याचा दोष आह्मां सर्वांनाच लागणार आहे; व आमच्या हातून धर्मरक्षण होत नाहीं, असा डंका सर्व जगभर बाजणार. बरें, अजातशत्रु युधिष्ठिर एकांतांत असतां मी आंत गेलों तर मलाच फक्त वनवास काढावा लागेल; पण दुसरीं सर्व अरिष्टें तरी टळतील; ह्मणून महाराजांना लागणाऱ्या यत्किंचित् कालिमेपेक्षां वनामध्यें मरण आलें तर तें मी श्रेयस्कर समजेन. धर्मरक्षणासाठीं हा देह खचीं पडला तर तो अनाठायीं जाणार नाहीं.' ह्याप्रमाणें मनांत विचार करून तो अंतःपुरांत शिरला व धनुष्यबाण घेऊन धर्मराजाचा निरोप घेऊन ब्राह्मणाच्या मागून गेला व त्यानें त्याची गाय चोरांपासून सोडवून त्याला परत दिली. ह्याप्रमाणें यश संपादन करून तो आपल्या नगराला परत आला.

४६. अर्जुनाचा वनवास व सुभद्राप्राप्ति. (१. २१४–२२०)

ब्राह्मणाची गाय त्याला परत मिळवून देऊन आपल्या नगराला परत आल्यावर अर्जुन युधिष्ठिराला म्हणाला, 'प्रभो, मी संकेत मोडल्यामुळें ठरल्याप्रमाणें वनवासाला जाणार. मला कांहीं नियम सांगा.' हें ऐकून कर्तव्यापासून कधीं न ढळणारा युधिष्ठिर अर्जुनाला दीनवाणीनें म्हणाला, 'माझें वचन तुला प्रमाण असेल तर ऐक. ह्या तुझ्या अपराधाबद्दल मी तुला बिलकुल दोष देत नाहीं. वडील एकांतांत असतां धाकट्याला आंत येण्याला मुळींच हरकत नाहीं. पण धाकटा एकांतांत असतांना वडिलांनीं तेथें जाणें हें मात्र दोषार्ह आहे. ह्मणून ही तुझ्या मनांतील शंका अगदीं बाजूला ठेव. तुझ्याकडून धर्मलोप झाला नाहीं अगर माझी अप्रतिष्ठाही झाली नाहीं.' अर्जुन ह्मणाला, धर्माचरणामध्यें छल नसावा असें आपल्याच तोंडानें मीं अनेकवार ऐकिलें आहे. सत्यापासून मी कधीं ढळणार नाहीं. सत्यानें हें शस्त्र मीं हातांत धरलें आहे.' असें ह्मणून राजाची आज्ञा घेऊन बारा वर्षें वनवासाची दीक्षा धारण करून वनांत राहण्यासाठीं तो निघाला. वेदवेदांग जाणणारे आत्मचिंतक ब्राह्मण, भिक्षेवर उपजीविका करणारे भगवद्भक्त, भाट, पौराणिक व ऐतिहासिक कथांत निष्णात असे संन्यासी, जोगी व दुसरे नानाविध जन त्यांच्या बरोबर होते. रम्य वनें, सरोवरें, देश व अनेक पुण्यतीर्थें पहात पहात गंगाद्वाराला येऊन तेथें त्यानें मुक्काम केला. विद्वान, नियमिष्ठ व सन्मार्गानें

जाण्याच्या महात्म्याचा तेथें वास झाल्यामुळें त्या स्थलाला फार शोभा आली. तेथें अर्जुन गंगेंत उतरून स्नान करून व पितरांचें तर्पण करून अग्निकार्य करण्यासाठीं वर येत असतां उलूपी नांवाच्या नागकन्येनें त्याला पाण्यांत ओढून नागलोकीं नेलें. ह्या नव्या ठिकाणीं आल्यामुळें अगदीं न घाबरतां तेथें पेटलेल्या अग्नीला प्रथम आहुति देऊन नंतर 'हें नगर कोणाचें, तूंकोणाची,' ह्मणून हासत हासत त्यानें तिला विचारलें. 'मी उलूपीनामक नागकन्या आहें. आपण स्नानाकरितां नदींत उतरलां असतां आपल्याला पाहून आपल्यावर माझें मन गेलें आणि म्हणून निरुपायानें मला आपल्याला इकडे आणावें लागलें. आतां मला पदरीं घेऊन माझें प्रिय करणें सर्वस्वीं आपल्याकडे आहे,' असें ती ह्मणाली हें तिचें भाषण ऐकून 'धर्माज्ञेनें मीं बारा वर्षें ब्रह्मचर्य घेऊन अरण्यवास घेतला असल्यामुळें माझ्यावर माझी स्वतःची मालकी उरली नाहीं,' असें अर्जुनाचें भाषण ऐकून उलूपी फिरून ह्मणाली, 'आपण हें व्रत घेऊन पृथ्वीवर कां हिंडतां हें मला माहीत आहे. द्रौपदीच्या पायीं आपण हें व्रत धरलें आहे; म्हणून माझा अंगीकार केल्यानें धर्माला बाध मुळींच येणार नाहीं. शिवाय आर्ताचें रक्षण करणें हें थोरांचें कर्तव्य आहे. त्यांतून सूक्ष्मधर्मभंगाची देखील जर आपणाला भीति वाटत असेल तर त्या पापाचें निरसन मला प्राणदाण दिल्यानें होणार आहे. माझे प्राण आपणावर अवलंबून आहेत. आपण मला सोडाल तर मी मेलें असें समजा. कौंतेय, दीन अनाथांचें आपण नेहमीं रक्षण करतां असा आपला लौकिक आहे. मी आपल्याला शरण येऊन करुणा भाकीत आहें. माझें प्रिय करा.' त्या नागकन्येचें हें भाषण ऐकून केवळ धर्मरक्षणासाठीं अर्जुन तिच्या ह्मणण्याला कबूल झाला, व रात्रीं तेथें तिच्या समागमांत राहून तिच्यासह फिरून गंगाद्वाराला परत आला. 'जलांत आपणाला कोणी जिंकण्याला समर्थ होणार नाहीं व सर्व जलचर आपल्या आज्ञेंत राहतील,' असा त्याला वर देऊन ती साध्वी नागलोकाला परत गेली. नंतर अर्जुनानें अगस्त्यवट व वसिष्ठपर्वत यांचें व शेवटीं भृगुतुंगाचें दर्शन घेऊन आपल्याला पवित्र केलें. तेथें सहस्रावधि गाई व विपुल द्रव्य ब्राह्मणांना देऊन पुढें हिरण्यबिंदुतीर्थीं स्नान करून देवालयें व तीर्थें पहात पहात तो पश्चिमदिशेला गेला. तिकडे नैमिषारण्यांत रम्य व कमलसंपन्न अशा नंदा, अपरनंदा, कौशिकी, गया व गंगा इत्यादि नद्या व अनेक पुण्याश्रम पहात पहात कलिंग देशांतील सर्व तीर्थें पाहून ब्राह्मणांना पुष्कळ दानधर्म करीत तो पुढें चालला. कलिंगाच्या सीमेवरून त्याचे अनुयायी त्याच्या आज्ञेनें परतले. नंतर थोड्या लोकांसहवर्तमान तापसांनीं शोभायमान असा महेंद्रपर्वत पाहून समुद्रतीरानें तो मणिपुराला गेला. त्याठिकाणीं चित्रांगदेला पाहून तिच्यावर त्याचें मन गेलें व तिच्याबद्दल तिच्या बापाजवळ त्यानें तिच्याकरितां मागणी घातली. तो अर्जुन आहे असें कळून चित्रांगद प्रेमपूर्वक ह्मणाला, 'प्रभंजन नामक एक आमच्यामध्यें राजा होऊन गेला. त्याला मूल नसल्यामुळें त्यानें शंकरांना प्रसन्न करून घेतलें. त्यांनीं ह्या कुलांत एक एकच संतति होत जाईल ह्मणून वर दिला. आजपर्यंत सर्वांना मुलगे झाले; पण मला ही मुलगी झाली आहे. ह्मणून हिच्या ठिकाणीं माझा पुत्रभाव आहे. ह्याकरितां हिच्यापासून होणारा एक मुलगा मला कन्याधन ह्मणून देण्याचें कबूल करशील तर मी ही तुला देण्याला तयार आहें.' ह्या अटीला मान्य होऊन अर्जुन तीन वर्षें त्या ठिकाणीं तिच्या समागमांत सुखांत राहिला. तिला त्यापासून मुलगा झाल्यावर चित्रांगदाचा निरोप घेऊन तो फिरून यात्रा करीत निघाला. दक्षिणसमुद्रावरील पवित्र व रम्य तीर्थें पहात हिंडत असतां तापसांनीं वर्ज्य अशीं पांच तीर्थें त्याच्या पहाण्यांत आलीं. त्यांमध्यें असणाऱ्या पांच सुसरी, तापस त्यांत स्नानाला उतरले असतां त्यांना आंत ओढून घेत असत; ह्मणून तिकडे कोणी जात नसे. हा वृत्तांत तापसांकडून त्याला कळल्यावर, ते नको नको ह्मणत असतां त्यानें जाऊन सौभद्रतीर्थांत स्नान केलें, व सुसरीनें आंत ओढलें असतां तिच्यासह तो वर आला. त्याबरोबर ती सुसर सुंदर अप्सरेच्या रूपानें त्याच्यापुढें हात जोडून उभी राहून ह्मणाली, 'मी देवारण्यामध्यें यथेच्छ संचार करणारी वर्णा नांवाची अप्सरा असून कुबेराच्या

मर्जीतली आहें. मीं आपल्या चार सख्यांसह विहार करीत वनांतून फिरत असतां एक तेजःपुंज तपस्वी आमच्या दृष्टीस पडले. त्यांच्या तपांत विघ्न करण्याच्या बुद्धीनें त्यांना मोह पाडण्याचा आह्मीं प्रयत्न केला; तो व्यर्थ जाऊन तुह्मी शंभर वर्षे जलांत सुसरीच्या रूपानें रहाल, असा त्यांनीं आह्मांला शाप दिला. कष्टी होऊन आह्मी त्यांना शरण गेलों व त्यांना ह्मणालों, आपल्याला मोह पाडण्याचा आमचा प्रयत्न निष्फळ झाला हेंच आह्मांला मरणापेक्षां अधिक शासन आहे. स्त्रिया अवध्य आहेत असें शास्त्र सांगतें. म्हणून आपण धर्म पाळून यश मिळवा. साधूंची सर्व भूतांवर समदृष्टि असते असें ऐकण्यांत आहे, त्याची सत्यता दाखवा. आपल्याला आह्मी शरण आलों आहों, तर आमचा अपराध पोटांत घालणें आपल्यासारख्यांस उचित आहे.' ह्या आमच्या भाषणानें प्रसन्न व दयार्द्र होऊन ते ह्मणाले, 'शंभर, हजार इत्यादि सर्व संख्या नियमित तसेंच असंख्य कालदर्शक असतात. मीं उच्चारिलेलीं हीं शंभर वर्षे मात्र नियमित कालदर्शक अघून तेवढ्या कालानंतर, तुमचा लोकांना जलांत ओढण्याचा क्रम सुरू असतां एक थोर पुरुष तुम्हांला वर ओढील त्यावेळीं तुम्हांला फिरून पूर्व स्वरूप प्राप्त होईल.' ह्याप्रमाणें त्यांचा उच्छाप झाल्यावर, 'तुह्मी ह्या ठिकाणीं रहा ह्मणजे नरवीर अर्जुनापासून तुमची लवकर मुक्तता होईल,' असें नारदवाक्य ऐकून त्या वेळेपासून आम्ही येथें ह्या पांच तीर्थांत राहिलों आहों. आज माझी आपल्याकडून सुटका झाली आहे. जवळच आणखी चार तीर्थांमध्यें माझ्या सख्या आहेत त्यांचीही आपण कृपा करून सुटका करावी.' हें त्या स्त्रीचें दिनवाणें भाषण ऐकून बाकीच्या चौघींनाही त्यानें त्याप्रमाणेंच शापमुक्त केलें. नंतर मणिपुराला येऊन 'येथेंच तूं पुत्र बभ्रुवाहन याचें पालन पोषण करीत रहा, युधिष्ठिर पृथ्वी जिंकून राजसूय यज्ञ करतील त्या वेळीं तूं आपल्या पित्यासहवर्तमान तिकडे येऊन पुष्कळ वर्षे माझ्याबरोबर सुखांत राहशील, वियोगामुळें मनाला दुःख होऊं देंऊं नको,' असें चित्रांगदेला सांगून तिला दृढालिंगन देऊन तिच्या बापाची त्यानें आज्ञा घेतली व तो फिरून देशपर्यटनाला निघाला. पशुपतीचें मुख्य स्थान जें गोकर्णक्षेत्र तेथें जाऊन पश्चिमेकडील तीर्थे पहात पहात तो प्रभासाला येऊन पोहोंचला. तेथें तो आल्याची बातमी श्रीकृष्णाला कळून तो त्याच्या भेटीला आला. एकमेकांला आलिंगन देऊन कुशलप्रश्न झाल्यावर ते तेथेंच कांहीं दिवस आनंदांत राहिले. त्या वेळीं भगवान श्रीकृष्णानें त्या वेषांत फिरण्याचें कारण विचारल्यावरून अर्जुनानें त्याला सर्व इत्थंभूत हकीकत सांगितली. तेथें कांहीं दिवस सुखांत काल घालवून ते रैवतकपर्वताला गेले. तेथ जाण्यापूर्वीच तो पर्वत कृष्णाच्या आज्ञेनें सुशोभित केला होता. श्रीकृष्ण त्याला पाहुणचार देण्यासाठीं पूर्णपणें शृंगारलेल्या द्वारकेला घेऊन गेला. त्या ठिकाणीं वृष्णि, अंधक व भोज ह्या कुलांतील थोर पुरुषांना अभिवादन करून, बरोबरीच्यांना आलिंगन देऊन व लहानांचें अभिनंदन करून सर्वांचा सत्कार घेत पेयभोज्यादि उपभोग वस्तूंनीं परिपूर्ण अशा कृष्णाच्या मंदिरांत अर्जुन जाऊन राहिला. पुढें थोडक्याच दिवसांनीं त्या पर्वतावर एक मोठा उत्सव झाला त्या वेळीं जिकडे तिकडे रत्नांनीं चित्रविचित्र अशा हवेल्या उभारल्या असल्यामुळें तो सर्व प्रदेश लखलखीत होता. वाजंत्री लोक वाद्यें वाजवीत होते. जिकडे तिकडे नृत्यगायन सुरू होतें. त्या ठिकाणीं लोकांचे थवेच्याथवे मौज पहाण्यासाठीं चालले होते. कांहीं रथांतून कांहीं हत्तींवरून, कांहीं घोड्यांवरून व कांहीं पायांनीं चालले होते. मद्यपानानें धुंद झालेले बळराम, रेवतीसह व इतर वृष्ण्यंधक आपापल्या स्त्रियांसह देवांप्रमाणें यथेच्छ विहार करीत उत्सव पहात फिरत होते. ह्याप्रमाणें लोक फिरत असतां त्यांमध्यें रत्नालंकार घालून सुभद्रा आपल्या सख्यांसह फिरतांना कृष्णार्जुनांच्या दृष्टीस पडली. तिला पाहतांच अर्जुन मोहित झाला. त्याचें सर्वलक्ष तिच्याकडे लागून राहिलेलें पाहून 'यात्रेकरूच्या मनाची अशी चलबिचल का,' ह्मणून कृष्णानें हासत हासत त्याला विचारलें. तो ह्मणाला, 'ही माझी बहीण आहे. तुला हवी असेल तर मी स्वतः दादांना सांगून ती तुला देवविण्याची तजवीज करतों.' अर्जुन ह्मणाला, 'कृष्णा, ही तुझी लावण्यसंपन्न बहीण कोणाला करें वेड

लावणार नाहीं ? ही माझी प्रिया होईल अशी कांहीं तजवीज करशील तर मजवर तुझे मोठे उपकार होतील. उपाय सांग. मग तो कसाही दुर्घट असला तरी शेवटास नेण्याला मी मागेंपुढें पहाणार नाहीं. ' श्रीकृष्ण ह्मणाला, 'क्षत्रियांना स्वयंवर श्रेष्ठ सांगितला आहे. पण भिन्न भिन्न लोकांचे भिन्न भिन्न स्वभाव असल्यामुळें त्यावर अवलंबून रहातां येत नाहीं. कन्याहरण करणें हाही एक विवाहविधि क्षत्रियांना सांगितला आहे. त्याचें अवलंबन करण्याला मात्र मला ह्या ठिकाणीं हरकत दिसत नाहीं. ह्याप्रमाणें अपसांत ठरवून धर्मराजाची संमति मिळविण्यासाठीं त्यांनीं जासूद इन्द्रप्रस्थास पाठविला. उलट निरोपानें त्यांची संमति मिळल्यावर श्रीकृष्णाच्या विचारानें सुभद्रा रैवतकावर गेली असतां.तिची पाळत ठेवून कवच, हस्तत्राण वगैरे घालून व हातांत तरवार घेऊन सर्व आयुधांसह तो एका दैदीप्यमान रथांत बसला, व मृगयेच्या मिषानें बाहेर पडून, त्या पर्वताची पूजा करून, व ब्राह्मणांचें स्वस्तिवाचन घेऊन, त्या पर्वताला प्रदक्षिणा करून द्वारकेला परत निघालेल्या सुभद्रेला त्यानें एकदम जाऊन धरलें व तिला आपल्या रथांत घेऊन तिच्यासह तो इन्द्रप्रस्थाकडे निघाला. तिला ह्याप्रमाणें पळविल्यावर सैनिकांची धांदल उडून जाऊन द्वारकेला येऊन भरसभेमध्यें त्यांनीं अर्जुनाचा सर्व पराक्रम बलरामाला सांगितला. तो ऐकून बलरामानें सोन्यानें मढविलेला मोठा नाद करणारा नगारा वाजविण्यास हुकूम केला. तो शब्द ऐकून सर्व वीर घाबरून सर्व कामें बाजूला ठेवून, बलरामाभोंवतीं जमले, व त्याच्या तोंडून पार्थाचें सर्व कृत्य ऐकून रागानें डोळे लाल करून युद्धाला तयार झाले. कोणी रथ आणा ह्मणतो, कोणी तरवार आणा ह्मणतो, कोणी धनुष्यबाण आणण्यास हुकूम सोडतो, कोणी चिलखत मागवितो, अशी एकच धांदल उडून गेली. कांहीं तर स्वतःच रथाला घोडे जोडूं लागले. त्या वेळीं नीलवस्त्र नेसलेला कैलासशिखराप्रमाणें उंच व सुरेनें डोळे धुंद झालेला बळराम सैनिकांना ह्मणाला, ' श्रीकृष्ण कांहीं बोलत नाहीं. त्याचा विचार न घेतां बेड्यासारखें तुह्मी कांहीं करूं नका. त्याच्या मनांत काय आहे तें समजून घेऊन तो सांगेल तसें करा. ' असें त्यांना सांगून तो कृष्णाला ह्मणाला, ' तूं प्रेक्षकाप्रमाणें तटस्थ आहेस. ह्या नीचाचा आह्मीं तुझ्यासाठीं आदरसत्कार केला. या उपकाराची यानें फार चांगली फेड केली ! खाल्ल्या घरचे वासे मोजणें अधमाचें काम आहे. अभ्युदयाची इच्छा करणारा कोणता मनुष्य केवळ आपल्या कुलाच्या थोरवीच्या घमेंडीवर आमच्या संबंधाची हांव धरून हें साहस करण्याला निघेल ? आह्मांला तुच्छ करून तुझीही पर्वा न करतां सुभद्रेला उपटून नेण्यांत त्यानें मृत्यूलाच आमंत्रण दिलें आहे. सर्पाप्रमाणें आज माझ्या मस्तकावर हा त्यानें पाय दिला आहे हें मला कसें बरें सहन होईल ? आज मी एकटा सर्व कौरवांचा फडशा उडविण्याला समर्थ आहें. ' हें बळरामाचें भाषण ऐकून भगवान श्रीकृष्ण न्यायाला अनुसरून ह्मणाला, ' आह्मांला तुच्छ करण्याचा अर्जुनाचा मुळींच उद्देश नाहीं. नेहमींचा तुमचा पैशाकडचा ओढा पाहून त्याला तुमचा भरंवसा येईना. स्वयंवरावर त्याला अवलंबून राहतां येईना. ह्या सर्व गोष्टी मनांत आणून त्यानें तिचें हरण केलें आहे. हा संबंध उभयपक्षीं ठीक आहे. कुंतीच्या मुलांशींसंबंध कोणाला आवडणार नाहीं ? रणांगणांत एका विरूपाक्ष शंकराखेरीज दुसरा कोणीही त्याला जिंकण्याला समर्थ नाहीं. तर तुह्मी जाऊन त्याला सामोपचारानें परत आणावें व त्याचें सुभद्रेशीं लग्न लावून यावें असें माझें मत आहे. त्याच्याशीं युद्ध करून त्यांत त्यानें तुह्मांला जिंकलें तर त्या योगानें तुमचें नांव जाणार आहे. मुकाट्यानें झाल्या गोष्टीला अनुमोदन देण्यांत कांहीं कमीपणा नाहीं. ' हा कृष्णाचा हेतु पाहून बलरामानें पार्थाला सामोपचारानें परत आणून आपल्या बहिणीचें त्याच्याशीं लग्न लाविलें. द्वारकेंत यथेच्छ सुखांत एक वर्षभर राहिल्यावर उरलेले दिवस पुष्करतीर्थीं काढून बारा वर्षें संपल्यावर सुभद्रेसहवर्तमान अर्जुन इन्द्रप्रस्थाला आला. त्याला सुभद्रेसह पाहून द्रौपदीला मत्सर वाटून ती ह्मणाली, ' आतां इकडे येण्याचें कांहीं विशेष कारण उरलें नाहीं. भारा किती जरी घट्ट बांधला तरी त्याचा पहिला आला ढिला पडावयाचाच.' अर्जुनानें तिचें स-

माधान केलें, व गोपीवेषांत असलेल्या सुभद्रेनें ' मी तुमची दासी आहें, ' असें म्हणून तिला नमस्कार केला. तेव्हां तिला दृढालिंगन देऊन द्रौपदी म्हणाली, ' प्रियाच्या मनांत सापत्नभाव येऊं देऊं नकोस म्हणजे झालें. ' नंतर बळराम व कृष्ण अहेराद्वारा नानाप्रकारच्या मूल्यवान वस्तू घेऊन धर्मराजाकडे आले. धर्मानें त्या सर्वांचा आदरपूर्वक स्वीकार केला. कृष्णानें बहिणीसाठीं मौल्यवान वस्त्रालंकार आणिले होते ते तिला दिले. हा संबंध जुळल्याबद्दल आनंद दाखवून उत्तम सारथी व घोडे यांसह हजारों रथ, मथुरेच्या दुभत्या गाई, पांढरे शुभ्र बैल, खेंचरें, सेवेसाठीं सहस्रावधि दासी व पुष्कळ हिरेमाणकें अर्जुनाला देऊन बरेच दिवस तेथें पांडवांच्या समागमांत काढल्यावर बळराम आपल्या सर्व अनुयायांसह परत द्वारकेला गेला. श्रीकृष्ण पार्थासह यमुनातीरीं मृगयादि विहार करीत तेथेंच राहिला. पुढें योग्यकालीं सुभद्रेला महापराक्रमी मुलगा झाला. त्याचें नांव अभिमन्यु असें ठेविलें. तो सर्व पांडवांचा व श्रीकृष्णाचा फार लाडका होता. त्याचे सर्व मंगलसंस्कार भगवान कृष्णानें स्वतः करविले. तो शुक्लपक्षाच्या चंद्राप्रमाणें वाढत गेला. अर्जुनानें त्याला सर्व शस्त्रास्त्रविद्या मोठ्या काळजीनें स्वतः शिकवून आपल्या तोडीचा योद्धा केला.

---

४७. कृष्णार्जुनांनीं अग्नीला खाण्यासाठीं खांडववन दिलें, ती कथा. (१, २२१–२८, २३४)

श्वेतकि नांवाचा कोणी बलाढ्य राजा होता. हा याजक व दानशूर असून त्यानें मोठमोठ्या यज्ञांमध्यें पुष्कळ दानधर्म केला. धुरानें डोळे अगदीं पिडल्यामुळें त्याच्या ऋत्विजांनीं त्याला सोडलें. त्यांची त्यानें नानाप्रकारें प्रार्थना केली, तरी त्याचें ऋत्विज्य पतकरण्याला कोणी कबूल होईना; म्हणून त्यानें कडक तप करून शंकरांना संतुष्ट केलें. त्यांनीं प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगितल्यावरून, 'आपण माझें ऋत्विज्य करावें, ' असा त्यानें वर मागितला. ' मला तो अधिकार नाहीं; पण बारा वर्षें ब्रह्मचार्यानें राहून अग्नीवर तुपाची संतत धार धरशील तर पृथ्वीवर माझे अंशभूत दुर्वासऋषी आहेत त्यांकडून मी तुझे यज्ञ करवीन,' असें शंकरांनीं त्याला सांगितलें. त्याप्रमाणें झालें असतां यथेच्छ तूप पिऊन अग्नीला अजीर्ण झाल्यामुळें तो पांढरा फटफटीत पडला. तोंडांत कांहीं घेण्याची त्याला इच्छा उरली नाहीं. ह्याप्रमाणें तेजोहीन होऊन अग्नि ब्रह्मदेवांकडे गेला, व आपली हकीकत कळवून आपली कृपा होईल तर पूर्वस्थिति मला प्राप्त होईल, ' असें त्यानें त्यांना सांगितलें. ब्रह्मदेव म्हणाले, ' खाण्डवारण्यांत पुष्कळ प्राणी राहतात त्यांची चरबी खाण्यास मिळाली तर तुला तुझी पूर्वस्थिति येईल, म्हणून तूं जाऊन तें वन खाऊन टाक. ' त्यांच्या आज्ञेनें खांडववनांत येऊन अग्नीनें तें जाळून टाकण्याला सुरवात केली; पण तेथील गजव्याघ्रादि मोठमोठ्या प्राण्यांनीं पाणी शिंपडून तो सात वेळ विझाविला. निरुपाय होऊन अग्नि फिरून ब्रह्मदेवांकडे गेला व घडलेला वृत्तांत त्यानें त्यांना सांगितला. तेव्हां ते म्हणाले, ' लवकरच नरनारायण भूमीवर अवतरणार आहेत. त्यांच्या साह्यानें तूं तें जाळण्याला समर्थ होशील. असें त्यांचें आश्वासन मिळाल्यावर त्यांची मार्गप्रतीक्षा करीत तो राहिला असतां कृष्णार्जुनरूपानें ते पृथ्वीवर अवतरल्याची बातमी त्याला लागली. कृष्ण सुभद्रेच्या विवाहानंतर पाण्डवांना भेटण्यासाठीं इंद्रप्रस्थाला येऊन त्यांस सहवर्तमान तेथें रहात असतां एके समयीं कृष्णार्जुन यमुनेच्या कांठीं मृगया करण्यासाठीं सेवकजनांसह जाऊन तेथें विहार करीत राहिले. ती संधि गांठून ब्राह्मणवेषानें अग्नि त्यांकडे आला व 'मी पुष्कळ खाणारा असून मला फार भूक लागली आहे, मला भिक्षा घाला, ' म्हणून त्यानें त्यांपाशीं भिक्षा मागितली. 'आपली तृप्ति कशानें होईल त समजलें म्हणजे तशी तजवीज करूं,' असें कृष्णार्जुनांचें भाषण ऐकून तो म्हणाला, 'मला नेहमींचें अन्न नको. मी अग्नि आहें. माझ्या योग्यतेप्रमाणें मला तुम्ही भक्ष्य द्या. हें खांडववन खाऊन टाकण्याचा माझा उद्देश असून इंद्र त्याचें रक्षण करीत असल्यामुळें तें मला जाळतां येत नाहीं. मी पेटलों कीं, पाऊस पाडून तो मला विझावितो. तुम्ही अस्त्रज्ञ असल्यामुळें तुमच्या

साह्यानें तें जाळण्याला मी समर्थ होईन.' अर्जुन ह्मणाला, 'मला अनेक दिव्यास्त्रें माहीत आहेत. इंद्रानें मुसळधार पाऊस पाडला तरी त्यांचें कांहीं चालूं नये अशी मी तजवीज ठेवीन; पण माझ्या बाहुवीर्याच्या तोडीचें धनुष्य, असंख्य बाण व उत्तम रथ एवढ्यांचीच काय ती मला उणीव आहे. पौरुषानें जें कांहीं शक्य तें सारें करण्याला मी तयार आहें. पण हीं साधनें तूं मिळवून देशील तर मी तुझें काम करीन.' हें ऐकून अग्नीनें लोकपाल वरुणाचें ध्यान केलें. त्याबरोबर तो प्रगट झाला. त्याला अग्नि ह्मणाला, 'चंद्राकडून मिळालेले धनुष्य, भाता व कपिध्वजरथ कांहीं महत्त्वाच्या कामासाठीं तूं मला कांहीं कालपर्यंत दे.' तें ऐकून कोणत्याही शस्त्राला दाद न देणारें, सर्व आयुधांना पुरून उरणारें, देवदानवगंधर्वांना पूज्य व विजयी असें अलौकिक धनुरत्न व कधीं तूट न पडणाऱ्या बाणांनीं भरलेला भाता, तसाच दिव्य घोडे जुंपलेला असा कपिध्वज रथ ही सामुग्री वरुणानें त्याला दिली. चित्रविचित्र ध्वजांनीं शोभायमान असा तो अप्रतिम रथ पाहतांच अर्जुनानें त्याला प्रदक्षिणा करून नमस्कार केला व कवच चढवून शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन तो त्यावर चढला. तें पूर्वी ब्रह्मदेवांनीं निर्माण केलेलें धनुरत्न गाण्डिव हातांत घेऊन प्रत्यंचा चढवून त्यानें तें मज्ज केलें. त्याचा टणत्कार ऐकून शत्रू गर्भगळित होत होते. ह्याच समयीं अग्नीनें कृष्णाला वज्रनाभ नांवाचें चक्र देऊन हें शत्रूवर सोडलें असतां इष्ट हेतु शेवटास नेऊन तें परत हातांत येईल असें सांगितलें. दैत्यांचा अंत करणारी कौमोदकी गदाही वरुणानें त्याला दिली. नंतर कृष्णार्जुन अग्नीला ह्मणाले, 'आह्मी आतां आयुधानिशीं तयार आहों. आतां कोणाचें आमच्यापुढें कांहीं चालणार नाहीं.' नंतर अग्नीनें विक्राळ स्वरूप धरून अरण्य जाळून फडशा उडविण्यास सुरवात केली. मेघगर्जनेप्रमाणें त्याचा गंभीर शब्द ऐकून तेथील प्राणी गर्भगळित झाले. ते दोघे नरश्रेष्ठ कृष्णार्जुन अग्नीच्या दोन्ही बाजूंला उभे राहून दृष्टीपुढें येणाऱ्या सर्व श्वापदांना यमसदनाला पाठवीत होते. खांडवामध्यें जिकडे तिकडे अग्नीचा भडका उडाला. तेथील श्वापदांचे आर्तरव कानीं पडूं लागले. कांहींचें अंग होरपळलें, कांहींचें डोळे फुटून बाहेर पडले; अशा प्रकारें सर्वांची बाहेर पळण्याची एकच धांदल उडून गेली. पुष्कळ आपल्या मुलाबाळांना व आप्तमित्रांना कडकडून भेटून अति स्नेहामुळें परस्परांचा वियोग असह्य वाटून जागच्या जागीं मरून पडले. अग्नीच्या धगीनें जलशयांतील पाण्याला देखील उकळी फुटली असल्यामुळें मासे, कांसव, इत्यादि जलचर बाहेर येऊन मरून पडले. हा भयंकर संहार चालला असतां पार्थाच्या शरांनीं मृतप्राय झालेल्या वनवासी प्राण्यांचा आर्तरव जिकडे तिकडे ऐकूं येऊं लागला. तेव्हां इंद्र स्वतः खांडवाच्या संरक्षणाला आला. नानारूपधर अनेक मोठमोठे मेघ उत्पन्न करून त्यानें त्या ठिकाणीं मुसळधार पाऊस पाडला; पण त्या प्रलयाग्नीपुढें व अर्जुनाच्या बाणवृष्टीपुढें त्याचें कांहीं चालेना. अर्जुनानें आपल्या बाणांनीं ते सर्व वन झांकून टाकलें. कोणाही प्राण्याला त्यांतून जिवंत बाहेर पडतां येईना. पार्थाच्या बाणांनीं सर्व वन झांकून गेलें असतां तेथें राहणारा तक्षक मात्र पूर्वीच कुरुक्षेत्राला निघून गेला. त्याच्या अश्वसेन नांवाच्या मुलाचे अग्नीपासून आपली सुटका करून घेण्याचे सर्व प्रयत्न निष्फल झाले. अर्जुनाच्या बाणांनीं जर्जर झाल्यामुळें त्याला बाहेर पडतां येईना. त्याची सुटका करण्याच्या इच्छेनें त्याची आई त्याला तोंडाकडून गिळून आकाशांत उडाली असतां अर्जुनाची दृष्टि तिच्याकडे जाऊन त्यानें तिचें डोकें उडविलें. क्षणांत झंझावात उत्पन्न करून इंद्रानें अर्जुनाला मोह पाडून अश्वसेनाची सुटका केली. ह्याप्रमाणें नागानें आपल्याला फसविलेंसें पाहून वर उडालेल्या सर्व प्राण्यांचीं अर्जुनानें दोन दोन तीन तीन शकलें करून टाकलीं. नंतर हें सर्व इंद्राचें कृत्य आहे असें समजून सर्व आकाश बाणांनीं भरून काढून प्रत्यक्ष इंद्राबरोबर तो युद्ध करण्याला दण्ड थोपटून तयार झाला. ह्याप्रमाणें त्याला पाहून खवळलेल्या इंद्रानेंही आपलीं अमोघ अस्त्रें प्रकट केलीं व त्यांनीं सर्व आकाश झांकून टाकिलें. उपायनिपुण अर्जुनानेंही त्याच्या निवारणार्थ दिव्य वायव्यास्त्र सोडलें. त्यानें इंद्राचें सुरू केलेल्या जलधारांची क्षणांत वाताहत करून टाकिली. विजा नाहींशा केल्या. क्षणांत आ-

काश निरभ्र होऊन मंद व सुखावह वारा सुटला. व सूर्यमंडल पूर्वीप्रमाणें स्वच्छ झालें. प्राण्यांच्या शरीरांतून निघणाऱ्या चरबीच्या लोटानें अग्नि अधिकाधिकच भडकूं लागला व त्यानें आपल्या शब्दानें सर्व प्रदेश दणाणून सोडला. कृष्णार्जुनांचें त्याला साहाय्य मिळालेलें पाहून गरुडादि पक्षी घाबरून आकाशांत उडाले. अर्जुनाचा पराक्रम पाहून वज्र घेऊन इंद्र त्या ठिकाणीं आला. देवेंद्राला त्याप्रमाणें सायुध पाहून देवही आपापलीं आयुधें घेऊन सज्ज झाले. कृष्णार्जुनांनीं धनुर्ध्यें सज्ज करून देवांना अगदीं जर्जर करून सोडलें. ह्याप्रमाणें आपल्या मुलाचा पराक्रम पाहून इंद्राला संतोष झाला. युद्धांत कृष्णार्जुनांना जिंकणारा कोणीच उरला नाहीं. त्यांच्यापुढें आपलें कांहींच चालत नाहींसें पाहून देव मागें हटले. इंद्रानें कृष्णार्जुनांची फार वाहवा केली. इतक्यांत आपला सखा तक्षक येथें नसून खांडववन जळूं लागलें त्या वेळीं तो कुरुक्षेत्राला निघून गेला, असें त्यास समजलें. 'कृष्णार्जुन हे पुराण ऋषी नरनारायण असून सुर, यक्ष, राक्षस व गन्धर्व ह्या सर्वांना पूज्य आहेत, व ते कोणाला हार जाणारे नाहींत,' अशी आकाशवाणीही झाली. ती ऐकून देवांसहवर्तमान इन्द्र तेथून स्वर्गाला निघून गेला. तो गेल्यावर कृष्णार्जुनांनीं स्वस्थपणें अग्नीला तें वन भक्षण करण्यास सांगितलें. त्या वनांतील मोठमोठ्या प्राण्यांची अर्जुनाच्या अमोघ अस्त्रांपुढें कांहीं मात्रा चालेना. त्यांच्यानें त्याकडे पाहवेना. मग युद्ध करण्याची गोष्ट कोठली? सर्व प्राणी साक्षात कालाचा घाव बसल्याप्रमाणें निराश्रित होऊन आगींत पडून पटापट मरूं लागले. नदीतीरीं अगर बिकट जाग्यांत कोठेंच त्यांना आश्रय मिळेना. पितृलोकांत व देवलोकांत हाहाकार उडून गेला. सर्व प्राणी दीन होऊन दया भाकूं लागले. हत्ती, तरस, आदिकरून श्वापदांचा व गंगेच्या पाण्यांत असलेल्या मच्छादि प्राण्यांचा आक्रोश कानीं पडूं लागला. विपुल मांस व रक्ताचे लोट यांनीं जोरानें पेटलेल्या अग्नीचा भडका आकाशाला जाऊन भिडला. चोहोंकडून पेटलेला अग्नि कृष्णार्जुनांनीं दिलेल्या अमृतानें तृप्त होऊन संतुष्ट झाला. त्या वेळीं कोणी मय नांवाचा असुर तक्षकाच्या घरांतून बाहेर पडून पळतांना अग्नीच्या दृष्टीस पडला व शिल्पशास्त्रनिपुण त्या दानवेंद्राला जाळून भस्म करण्याची त्याची इच्छा पाहून भगवान चक्र उगारून त्याच्या साह्याला तयार झाले. इतक्यांत 'अर्जुना, धांव, माझें रक्षण कर,' असा त्याचा आर्तरव ऐकून 'भिऊं नकोस,' म्हणून अर्जुनानें त्याला अभय दिलें. त्यामुळें कृष्णापासून व अग्नीपासून त्याचा बचाव झाला. अग्नि पंधरा दिवसपर्यंत तें वन जाळीत होता. अश्वसेन, मय व चार शार्ङ्गक पक्षी ह्यांखेरीज इतर सर्वांचा त्या ठिकाणीं अग्नीनें फडशा उडविला. ह्या वेळीं इंद्र अंतरिक्षांतून 'तुमच्या ह्या अमानुष कृत्यानें मी संतुष्ट झालों आहे, वर मागा,' असें कृष्णार्जुनांला ह्मणाला. 'तुम्ही सर्व अस्त्रविद्या मला दे,' असें अर्जुनानें मागितलें. 'तीव्र तपानें शंकरांला तुष्ट करून त्यांपासून पाशुपतास्त्र मिळाविशील त्या वेळीं मी तुला आपली सर्व अस्त्रविद्या देईन,' असें त्याला वचन देऊन व कृष्णालाही वर देऊन इंद्र स्वर्गास गेला. अग्नीही यथेच्छ मांस भक्षण करून व चरबी व रक्त प्राशन करून तृप्त झाल्यावर कृष्णार्जुनांची आज्ञा घेऊन इष्ट देशाला निघून गेला, व तेही इंद्रप्रस्थाला परत गेले.'

४८ शार्ङ्गकांची कथा. (१. १३९–४३)

'खांडववन जाळतेवेळीं अग्नीनें शार्ङ्गकांना कां जाळलें नाहीं,' म्हणून जनमेजयानें विचारल्यावरून वैशंपायन ह्मणाले, 'मन्दपाल या नांवाचे धर्मज्ञांमध्यें श्रेष्ठ कोणी ऋषी होते. ऋषिमार्गानें तप आचरून शेवटीं ते देह ठेवून पितृलोकाला गेले. तेथें त्यांना अटकाव झालेला पाहून त्यांनीं यमधर्माला त्याचें कारण विचारलें. यमधर्म ह्मणाला, 'मानव चार प्रकारच्या ऋणांचा बोजा शिरावर घेऊन जन्माला येतात. त्यांची फेड क्रियेनें व ब्रह्मचर्यानें होते. हीं ऋणें तपानें, यज्ञानें, वेदाध्ययनानें व प्रजोत्पादनानें फिटतात. तुम्ही वेद पढलां असून यज्ञ व तप तुमच्या हातून झालें आहे; पण तुम्हांला अपत्य नाहीं. तें उत्पन्न केल्यावांचून तुम्हांला ह्या लोकांचा उपभोग घेण्याचा अधिकार नाहीं.' मग ल-

बकर मुलें कोणाला होतात याचा तपास करून ते शार्ङ्गकाच्या जन्माला गेले व जरिता नांवाची बायको करून तिच्या ठिकाणीं चार ब्रह्मवेत्ते मुलगे उत्पन्न करून ते तिला सोडून लपिता नांवाच्या दुसऱ्या एका स्त्रीशीं रत होण्यास निघून गेले. जरिता पुत्रस्नेहानें स्वतःच्या श्रमानें अन्न मिळवून आणून त्या मुलांचें पोषण करीत असे. लपितेशीं रमले असतां मन्दपालांना हा अग्नीचा खांडववन जाळण्याचा निश्चय कळून आपलीं मुलें लहान असल्यामुळें आपल्या संरक्षणाला असमर्थ आहेत असें पाहून त्यांनीं अग्नीची स्तुति केली, 'हे अग्ने, हविर्भाग देवांना तुझ्याकडून पोहोंचतात. तूंच सर्वांचा आदि व अंत आहेस. तुझी गति कोणाला समजणें शक्य नाहीं विद्वान तुझी एकभावानें व अनेक भावांनीं आराधना करतात. अष्टरूपांनीं तूं देवांना ज्यांचा त्यांला यज्ञभाग पोहोंचवितोस असा समज आहे. तूंच हें सर्व विश्व उत्पन्न केलें आहेस व तुझ्यावांचून क्षणांत ह्याचा नाश होईल. तुझ्याच भक्तीनें ब्राह्मण स्वकर्मार्जित गति मिळवितात. नभोमंडलांतील मेघ तुझ्यावांचून अस्तित्व पावत नाहींत. तूंच प्रथम पाणी उत्पन्न केलें आहेस. सर्व हव्यरूपें तुझ्याचमुळें शेवटाला जातात. तूंच सर्व देवमय आहेस.' ह्या स्तुतीनें तुष्ट होऊन 'तुझें मी काय प्रिय करूं,' म्हणून अग्नीनें मंदपालांना विचारलें असतां खाण्डववन जाळतांना माझ्या मुलांना तूं जाळूं नकोस अशी त्यांनीं अग्नीची प्रार्थना केली. अग्नीनें बरें म्हणून त्यांना अभिवचन दिलें.

अग्नि खाण्डववन जाळूं लागला त्या वेळीं मन्दपालांचीं मुलें फार खिन्न झालीं. त्यांना कोठें थारा दिसेना. बिचाऱ्या जरितेला तर तीं लहान आहेत असें पाहून मोठी चिंता पडली. सारें वन जाळण्यास निघालेला भयंकर अग्नि आपणाकडेसच येत आहेसें पाहून व आपल्या पोरांना पंख व पाय फुटले नसल्यामुळें ते आत्मसंरक्षणाला असमर्थ आहेत असें जाणून तिला त्यांचा मोहपाश तोडवेना. अग्नि तर सर्व लहानमोठ्या झाडांचा फन्ना उडवीत आपल्याकडेसच येत आहे हें पाहून ती फारच घाबरली. मुलांसहवर्तमान स्वतःचें रक्षण करण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं नव्हतें व त्यांना तेथें टाकून तिला एकटीला कोठें जाववेना. बरोबर कोणाला घ्यावें, कोणाला टाकावें, काय केलें असतां कर्तव्य बजावल्यासारखें होईल, अशा चिंतेंत मग्न होऊन ती मुलांना ह्मणाली, 'बाळांनो, तुमचें काय ह्मणणें आहे?' शार्ङ्गकांनीं उत्तर दिलें, 'आई, स्नेह बाजूला ठेवून अग्नि नसेल अशा प्रदेशाला तूं उडून जा आणि आपला बचाव करून घे. आह्मी मेलों तरी चिंता नाहीं. तुला, आणखी मुलें होतील. पण तुझ्या व आमच्या मरणानें मात्र हा वंश खुंटणार आहे. हें नीट लक्षांत घेऊन कुलाचें ज्यांत हित आहे तोच मार्ग त्या वेळीं घे. उगीच अपत्यस्नेहानें सर्वस्वी नाश करून घेण्याला तयार होऊं नकोस.' हें ऐकून 'तुह्मी ह्या जवळच्या बिळांत शिरून आपला बचाव करून घ्या; त्यांतला उंदीर घारीनें नेला आहे; मग मी उडून जाईन,' असें आईचें भाषण ऐकून ते ह्मणाले, 'त्यांत दुसरा एखादा उंदीर नसेल कशावरून? **उंदरासारख्या हलक्याच्या हातून मरणें कमीपणाचें आहे. अग्नीसारख्या थोराच्या हातून मरण आलें तरी त्यांत कांहीं वावगें नाहीं.** त्याची मजल कदाचित येथपर्यंत येणार नाहीं. कदाचित वाऱ्यानें त्याची दिशा बदलेल. बिळांत शिरून आह्मी खात्रीनें मरूं व येथेंच राहिल्यानें कदाचित वांचण्याचा संभव आहे. खात्रीच्या मरणापेक्षां संशयाचें मरण बरें. तूं मात्र आकाशांत वाटेल तिकडे उडून जाऊन आपला बचाव करून घे. तुला चांगलीं मुलें होऊन वेरा पुढें चालेल. आह्मांला बिळांत शिरण्याचा आग्रह करून ह्यांनाही मीं संकटांतून सोडविलें अशी उगीच मनाची समाधानी करून घेऊं नकोस. ज्या ठिकाणीं खरें निश्चयानें कळण्याला मार्ग नसतो त्या ठिकाणीं आह्मी ह्मणतों असेंच वागणें शहाणपणाचें होणार आहे. आमचा तुझ्यावर कांहीं उपकार झाला नसून व आह्मी कोण हेंही तुला ठाऊक नसून जी तूं आमच्याविषयीं उगीच प्रेमपाशांत गुंतली आहेस व इतका त्रास सोसून आमचें पोषण करीत आहेस, त्या तुझा व आमचा पूर्वसंबंध काय हें तुला माहीत आहे काय? तुझें ध्येय अद्यापि गेलें नाहीं. एखादा पति पाहून त्यापासून मुलें करून घे.' हें त्यांचें भाषण ऐकून

त्यांना सोडून अग्नि नसणाऱ्या देशाला शार्ङ्गी निघून गेली. इकडे अग्नीची मजल तीं मंदपालांचीं मुलें होतीं तेथपर्यंत आली. तो भडकलेला अग्नि पाहून चौघां मुलांपैकीं जरितारि ह्मणाला, '**शहाणा मनुष्य पुढें येणारें संकट लक्षांत घेऊन त्यासंबंधानें पूर्वीच सावध राहतो. संकट आल्यावर वृथा शोक करीत बसत नाहीं.** पण ज्या मूर्खाला आपणावर येणारें संकटच कळून येत नाहीं तो तें आलें असतां गोंधळून जाऊन सुखाला अजीबात मुकतो.' दुसरा सरिसृक ह्मणाला, 'तूं बुद्धिमान व शहाणा आहेस. हें प्राणांतक संकट आमच्यावर आलें आहे. शहाणा असा पुष्कळांमध्यें एखादाच निपजतो. यांतून सोडविणारा तूंच आहेस.' सांबमित्र ह्मणाला, 'वडील भाऊ पित्यासमान असून संकटसमयीं त्राता तोच आहे. तोच जर ह्या ठिकाणीं गांगरून गेला तर आमचा धाकट्यांचा निभाव कसा लागणार? द्रोण ह्मणाला, 'हे अग्निनारायणा, आह्मांला एकदम जाळून कां टाकीत नाहींस? हा आपल्या सप्तमुखांनीं व सात जिभांनीं हळू हळू सर्व पदार्थांची चव घेत घेत तूं आमच्याकडे येत आहेस.' ह्याप्रमाणें एकमेकांत बोलून मनोभावानें त्यांनीं अग्नीची स्तुति केली. ते ह्मणाले, 'आह्मांला आई किंवा बाप कोणीच नाहीं. हे अग्निनारायणा, तूं आपल्या ह्या पवित्र सप्तार्चीनीं आह्मां बालांचें रक्षण कर. आह्मीं तुला शरण आलों आहों. तुझ्याशिवाय आह्मांला दुसरा कोणी त्राता उरला नाहीं. ज्याचा त्याला हविर्भाग पोहोंचविणारा तूंच असून तूंच प्रत्यक्ष हवि आहेस. विद्वान लोक तुझ्या ठिकाणीं अनेक भाव व एक भाव कल्पून तुला भजतात, सर्व भुवनांचा आदि व आधारभूत तूंच आहेस. प्राण्यांनीं खालेलें अन्न तूंच त्यांच्या हृदयांत राहून पचवितोस. सूर्यरूपानें तूंच आपल्या किरणांनीं पृथ्वीवरचें पाणी शोषून घेऊन फिरून योग्य कालीं पर्जन्यरूपानें खालीं पाडतोस. हे अग्ने, झाडें, वेली, कमळें व वनस्पती हीं उगवून हिरवींचार होण्याला तूंच कारण आहेस. सूर्याचें वसतिस्थान व वरुणाला आधारभूत तूंच आहेस. आमची प्रार्थना ऐकून तूं आह्मांला तार. असा आमचा नाश करण्याला तयार होऊं नकोस. हे रक्तकण्ठ व ताम्रनेत्रधारी अग्ने, ज्या तुझा मार्ग कृष्णवर्णानें अंकित आहे तो तूं याउपर आलीकडे न येतां सागर ज्याप्रमाणें त्याच्या किनाऱ्यावर असलेल्या गृहांचा नाश करीत नाहीं त्याप्रमाणें तूं आमचा नाश करूं नकोस.' ही त्यांची स्तुति ऐकून अग्नि संतुष्ट झाला व मंदपालांना दिलेल्या वचनाची आठवण होऊन तो द्रोणाला ह्मणाला, 'द्रोणा, तूं महान् ऋषि आहेस. हें तूं केलेलें ब्रह्मवर्णन आहे. तुझ्या इच्छेनुरूप सर्व होईल. तुह्मांला मजपासून भीति मुळींच नाहीं. माझा हें वन जाळण्याचा उद्देश जाणून तुह्मांला न जाळण्याविषयीं तुमच्या वडिलांनीं मला पूर्वीच आज्ञा केली आहे. त्यांची ती आज्ञा व तुमची विनंति ह्या दोहींमुळें मला तुमचें रक्षण कर्तव्य आहे. मी तुमच्यावर संतुष्ट झालों आहें. मी तुमचें काय प्रिय करूं तें सांगा.' तेव्हां 'आह्मांला ताप देणाऱ्या मार्जारांचा समूळ नाश कर,' अशी त्यांनीं अग्नीला विनंति केली व अग्नीनें त्याप्रमाणें केलें. इतक्यांत मुलांसंबंधानें काळजी लागून राहिलेला मन्दपाल त्यांची काय स्थिति आहे हें पाहण्यासाठीं निघाला. तेव्हां लपिता अस्वस्थापूर्वक घालून पाडून बोलूं लागली तें ऐकून तो ह्मणाला, 'मी अपत्यांसाठीं पृथ्वीवर हिंडत असून माझीं अपत्यें संकटांत सांपडलीं आहेत. **भावी आशेवर हातचें सोडणारा मूर्ख समजला पाहिजे.** लोक त्याला धिक्कारतात. तुला बरें वाटेल तसें कर.' असें ह्मणून जरिता व तिचीं मुलें होतीं त्या ठिकाणीं तो आला. मुलांना सुरक्षित पाहून त्याला संतोष झाला. कांहीं न बोलतां तो कांहीं वेळ स्वस्थ उभा होता. पुढें वडील मुलगा कोणता, धाकटा कोणता वगैरे प्रश्न त्यानें विचारल्यावरून जरिता ह्मणाली, 'कोण वडील, कोण धाकटा हें समजून आपल्याला कार्य करावयाचें आहे, व माझ्याशीं तरी आपलें काय काम उरलें आहे? पूर्वी जिच्यासाठीं आपण मला ह्या अर्भकांसह एकटी व निराश्रित सोडून गेलां तिच्याकडे जा ह्मणजे झालें.' यावर मंदपाल ह्मणाले, '**परपुरुष व सापत्नमत्सर ह्या व्यतिरिक्त स्त्रियांना इहलोकीं व परलोकीं अर्थविनाशक व वैराग्निदीपक**

दुःख दुसरें कांहीं नाहीं. सुशील अशा अरुन्धतीलाही आचारसंपन्न महात्मा वसिष्ठांचा संशय येऊन सप्तर्षींच्या देखत त्यांचा तिनें अवमान केला, आणि त्याचें प्रायश्चित्त ह्मणून नभोमंडलांत तारागणामध्यें धूम्राच्छादित अग्नीप्रमाणें मधून मधून चमकत कांहींच शुभाशुभ न सुचविणाऱ्या क्षुद्रपदार्थाप्रमाणें तिला रहावें लागत आहे. अपत्यस्नेहानें इकडे आलों असतां मलाही तूं त्याप्रमाणेंच लेखितेस. तिचेंही आज मजबरोबर अशाच प्रकारचें वर्तन आहे. **पुरुषांनीं स्वतःची स्त्री झाली तरी तिच्याविषयीं कधीं फार आशाळू राहूं नये.** बायकांना मूल झालें ह्मणजे त्यांना नवऱ्याची गरज रहात नाहीं.' नंतर जरिता व तिचीं मुलें ह्यांनीं क्षमा मागून त्यांचा योग्य सन्मान केला व त्यांनींही त्यांचें शांतवन केलें.'

२ सभापर्व.

४९ मयसभा. (२. १-४)

खाण्डववन जाळण्याच्या बेळीं खवळलेल्या कृष्णापासून व जाळून भस्म करूं इच्छिणाऱ्या अग्नीपासून आपलें रक्षण केल्याबद्दल प्रत्युपकार करण्याच्या हेतूनें मयानें नीतिपूर्वक हात जोडून आपलें मी काय प्रिय करूं,' ह्मणून अर्जुनाला विचारलें. अर्जुनानें उत्तर दिलें, 'मीं तुला संकटांतून सोडविलें हें तूं जाणतो आहेस इतकें पुरे आहे. तुझ्याकडून **कांहीं प्रत्युपकार करून घेण्याची माझी** इच्छा नाहीं. तरी तुझी इच्छा विफल होऊं नये ह्मणून कृष्ण सांगेल तें तूं कर ह्मणजे माझ्या उपकाराची फेड झाली असें मी समजेन.' नंतर 'आपली काय आज्ञा आहे,' ह्मणून मयानें विचारल्याबरून क्षणभर विचार करून, 'ह्या भूतलावर कोणालाही ज्याचें अनुकरण करितां येणार नाहीं अशा प्रकारची उत्तम सभा धर्मराजासाठीं निर्माण कर,' अशी श्रीकृष्णानें त्याला आज्ञा केली; व कृष्णार्जुनांनीं मयाला युधिष्ठिराला भेटवून त्यांची ओळख करून दिली. युधिष्ठिरानें त्याचा यथायोग्य सन्मान केला. पुढें कृष्ण खाण्डवमस्थामध्यें आठ दिवस सुखानें राहिल्यावर पितृदर्शनाच्या लालसेनें धर्मराज व कुंती यांचा निरोप घेऊन व त्यांचें समाधान करून द्वारकेला जाण्याला निघाला. कुंतीनें त्याचें मस्तक हुंगून त्याला आलिंगन दिलें. नंतर श्रीकृष्ण प्रीतिपूर्वक अश्रुपूर्ण नेत्रांनीं आपल्या बहिणीकडे आला व थोडक्यांत तिचें समाधान करून नंतर आप्तवर्गांना तिचे निरोप घेऊन तिनें नमस्कार केल्यावर धौम्यऋषींना त्यानें नमस्कार केला. देवांमधील इंद्राप्रमाणें पांच भावांमध्यें शोभणारा श्रीकृष्ण प्रयाणकालाला योग्य असे मंगलविधि करण्यासाठीं स्नान करून शुचिर्भूत झाला व गंधमाल्यनमस्कारादिकांनीं देव व ब्राह्मण यांची पूजा करून त्यानें आपलीं सर्व मंगलकार्यें आटोपलीं. नंतर चौकांतून बाहेर पडून स्वस्तिवाचन झाल्यावर दधिपात्र, फळें व अक्षता घेऊन उभे असलेल्या सत्पात्र ब्राह्मणांना द्रव्य देऊन प्रदक्षिणा केल्यावर गरुडचिन्हांकित शीघ्रगामी व गदा, चक्र, शंख इत्यादि आयुधांनीं युक्त अशा सुवर्णरथांत बसून सुमुहूर्तावर तो द्वारकेला निघाला. युधिष्ठिरही प्रेमपूर्वक त्याच्या मागून रथांत बसला व दारुकाच्या हातांतून लगाम आपल्या हातांत घेऊन स्वतः रथ हांकूं लागला. अर्जुन त्यांच्या मागून रथांत बसून रुप्याची दांडी लाविलेली पांढरीशुभ्र चवरी त्यांच्यावर वारीत होता. नकुल सहदेव व भीमसेन हेही पौरजनांसहवर्तमान कृष्णाच्या मागून चालले होते. एखाद्या गुरूच्या मागून चाललेल्या प्रिय शिष्यांप्रमाणें पांडव

कृष्णामागून चालले असतां दोन कोस गेल्यावर युधिष्ठिराचे पाय धरून व बाकीच्या पांडवांना आलिंगन देऊन 'कृष्णानें त्यांना परत जाण्याविषयीं सांगितलें. धर्मार्जुन रथाखालीं उतरले, तरी पण त्यांचें सर्व मन कृष्णाकडे लागलें असल्यामुळें तो दिसत होता तोंपर्यंत त्याच्याकडे सर्वांचे डोळे लागले होते व तो दिसेनासा झाल्यावरही त्यांचें सर्व लक्ष त्याकडे होतें. केशव दर्शनानें त्यांची तृप्ति झाली नाहीं. सर्व मन कृष्णाकडे लागून शरीरांनीं मात्र ते आपल्या नगराला परत आले व श्रीकृष्ण द्वारकेला गेला. नंतर युधिष्ठिराला वृषपर्व्याच्या सभेचें वर्णन देऊन मय म्हणाला, 'कैलासाच्या उत्तरेच्या बाजूला मैनाकपर्वताजवळ बिंदुसरापाशीं त्या वृषपर्व्याच्या सभेमध्यें पूर्वी दानव यज्ञ करीत असतां मीं एक अद्भुत कांचेचें भांडें ठेविलें आहे. त्याचप्रमाणें बिंदुसरोवरामध्यें हजारों प्रचंड गदांच्या तोडीची भीमाला उपयोगीं पडेल अशी एक गदा, तसाच वरुणापासून मिळविलेला मोठा शब्द करणारा देवदत्त नांवाचा शंख, ह्या वस्तु मीं तेथें ठेविल्या आहेत. त्या सर्व घेऊन येऊन मग मनाला आल्हाद देणारी व यशस्कर अशी अद्भुत सभा मी तुमच्यासाठीं निर्माण करीन.' असें म्हणून युधिष्ठिराचा निरोप घेऊन मय उत्तर दिशेला मैनाक पर्वताकडे गेला, आणि ज्या ठिकाणीं गंगेचें दर्शन होण्यासाठीं भगीरथानें पुष्कळ वर्षें तप केलें होतें, ज्या ठिकाणीं प्रजापतींनीं शंभर श्रेष्ठ यज्ञ केले होते, ज्या ठिकाणीं रत्नखचित रुप्याचीं व सोन्याचीं स्थंडिलें शास्त्राला अनुसरून केवळ शोभेकरितां करून ठेविलीं होतीं, ज्या ठिकाणीं इंद्रानें यज्ञ करून सिद्धि मिळविली, जेथें शंकरांनीं आपलें कायमचें राहण्याचें ठिकाण केलें असून जेथें सर्व भूतें त्यांची उपासना करीत आहेत व ज्या ठिकाणीं नरनारायण, ब्रह्मदेव आदिकरून देवांनीं हजार युगेंपर्यंत चालणारें सत्र आरंभिलें होतें, अशा त्या रम्य बिंदुसराला जाऊन राक्षस व किंकर यांच्या पहाऱ्यामध्यें असलेलीं सर्व सभाद्रव्यें व शंखगदादि आयुधें घेऊन मय पुन्हां खांडवप्रस्थाला परत आला. परत आल्यावर त्यानें गदा भीमाला दिली, शंख अर्जुनाला दिला व तिन्ही लोकांमध्यें नांवाजलेली दिव्य व अप्रतिम स्फटिकाची दहा हजार हात लांब-रुंद अशी विस्तीर्ण सभा निर्माण केली. ती सभा कांतीनें सूर्याच्या प्रभेला मागें सारीत होती. दिव्य तेजानें तेजःपुंज, नवमेघाप्रमाणें चकचकित, आकाशाला जाऊन भिडलेली, लांब, रुंद, रम्य, उत्तम द्रव्यांनीं संपन्न, रत्नमयभूमि व तोरणें इत्यादिकांनीं शोभायमान, अनेक चित्रें व संपत्ति यांनीं भरलेली, अशी ती सभा दशार्हाच्या, यमधर्माच्या, ब्रह्मदेवांच्या, सूर्याच्या, चंद्राच्या, अगर अग्नीच्या सभेला देखील मागें सारीत होती. आठ हजार किंकर नामक राक्षस मयाच्या आज्ञेनें तिचें रक्षण करीत असून वाटेल तेव्हां वाटेल तिकडे तिला नेण्यास ते तयार होते. मयानें त्या ठिकाणीं एक अपूर्व सरोवर निर्माण करून त्यामध्यें मणिमय नालांनीं युक्त व वैदूर्याच्या पाकळ्या असलेलीं अशीं अनेक सुवासिक कमलें व त्याच्या बाजूला नानाप्रकारचे पक्षी निर्माण केले होते. त्या सरोवराला चित्रविचित्र स्फटिकाच्या पायऱ्या होत्या. त्यांतील पाण्यामध्यें यत्किंचित माती नसून मंद वाऱ्यानें तें हालत असल्यामुळें मोत्याप्रमाणें चकाकत होतें. त्या ठिकाणीं राजे गेले असतां त्यांना तें सरोवर आहे असें न कळतां चुकून ते त्यामध्यें पडत. त्याचप्रमाणें अनेक हंसकारंडवादि पक्ष्यांनीं गजबजलेले गगनचुंबित वृक्ष त्या ठिकाणीं त्यानें निर्माण केले होते. सुगंधवाही वायु वहात असून तो त्या ठिकाणीं पांडवांची सेवा करीत होता. चौदा महिन्यांत मयानें धर्मराजाला अशा प्रकारची अप्रतिम सभा तयार करून दिली. धर्मराजानें त्या ठिकाणीं आज्य, पायस, फलमुळें व डुकराचें व हरणाचें मांस, खाद्य, पेय व नानाप्रकारचे चोष्य पदार्थ व वस्त्रालंकार इत्यादिकांच्या देणग्यांनीं नानादेशांहून आलेल्या हजारों ब्राह्मणांना तृप्त करून पुण्याहवाचनाचा मोठा घोष श्रवण करीत त्या सभेंत प्रवेश केला, व त्या ठिकाणीं दिव्य गंधमाल्यानें देवतांची पूजा केली. तेव्हां तेथें अनेक वाद्यें सुरू होतीं. मल्ल, नट, नर्तक इत्यादिकांचे खेळ सुरू होते. भाट स्तुतिपाठ गात होते. अशा त्या सभेमध्यें बसलेला धर्मराज देवसभेंत बसलेल्या इंद्राप्रमाणें शोभत होता. धर्मतत्ववेत्ते व जितेंद्रिय असे पुष्कळ ऋषी व राजे ना-

नादेशांतून त्या ठिकाणीं येऊन पांडवांच्या समागमांत राहूं लागले. सर्व देव, नारद, तुंबरू व चित्रसेन-गंधर्व अप्सरांसहवर्तमान युधिष्ठिराच्या सेवेला हजर होते.

५० नारदांनीं युधिष्ठिराला सांगितलेली राजनीति. (२. ५– १३)

कोणे एके वेळीं मयानें निर्माण केलेल्या सभेमध्यें महात्मे पांडव बसले असतां कर्मकांड व ज्ञानकांड जाणणारे, देवांना देखील पूज्य, व इतिहास, पुराण, पुराकल्प[1] व विषयें जाणणारे, न्याय व धर्म ह्यांमध्यें निष्णात, षडंगांमध्यें निपुण, एकवाक्यता (परस्पर विरोधी वचनांचें ऐक्य दाखविणें), सामान्य संयोगपृथकत्व (यांचे नियम विशेष ठिकाणीं लावणें) व समवाय (एकाच कर्मामध्यें अनेक धर्मांचा समावेश होणें) इत्यादि शास्त्रांत निपुण, मोठे वक्ते, धीट, उपापोह करण्यांत कुशल, स्मृतीमध्यें प्रवीण, नय जाणणारे, ज्ञानकांड व कर्मकांड यांची व्यवस्था जाणणारे, प्रमाणावरून निश्चय ठरविण्यांत हुषार, (प्रतिज्ञा, हेतु, दृष्टांत, उपनय व निगमन ह्या पंचावयवी वाक्यांचे गुणदोष जाणणारे), बृहस्पतीपेक्षां देखील उत्तम वक्ते, धर्म, अर्थ, काम व मोक्ष याच्यासंबंधानें ज्यांचीं मतें ठाम ठरलीं आहेत व हें संपूर्ण ब्रह्मांड ज्यांच्या डोळ्यांपुढें प्रत्यक्ष उभें आहे, ह्या लोकांच्या वर, पृष्ठभागीं व खालीं जें कांहीं आहे तें प्रत्यक्ष पहाणारे, कर्मसंन्यास व कर्मानुष्ठान ह्यांची व्यवस्था जाणणारे, सुरासुरांमधील कलह नाहींसा करूं इच्छिणारे, संधिविग्रहादि नीतितत्त्वें जाणणारे, अनुमानविभाग जाणणारे, संधिविग्रहादि षाड्गुण्य विधींनीं युक्त सर्व शास्त्रांमध्यें पारंगत, युद्धकलेची व त्याचप्रमाणें गायनादि गांधर्वकलेची आवड असलेले, ज्यांना कोठें प्रतिबंध नाहीं, असे सर्वप्रकारच्या गुणांनीं युक्त महातेजस्वी नारद ऋषिवर्यांसह अनेक लोक फिरत फिरत पांडवांची भेट घेण्याच्या हेतूनें त्या सभेमध्यें येऊन त्यांनीं धर्मराजाला जयाशीर्वाद दिला. त्यांना पाहून धर्मराजानें भावांसहवर्तमान उठून अभिवादन केलें व प्रीतिपूर्वक विनयानें वांकून त्यांना उचित असें आसन देऊन मधुपर्कादि पूजार्ह वस्तूंनीं त्यांची पूजा केली. नारदांनीं संतुष्ट होऊन धर्मार्थकामांना धरून धर्मराजाला याप्रमाणें प्रश्न केले. ते ह्मणाले, 'द्रव्याची तुजपाशीं बळकटी असून धर्मामध्यें तुझें मन रमतें ना ? ऐहिक सुखांचा धर्मविरोधानें यथायोग्य उपभोग घेत असून त्यांचा आपल्या मनावर काहीं परिणाम घडूं देत नाहींसना? तुझ्या पूर्वजांप्रमाणें तिन्ही ठिकाणीं धर्मार्थयुक्त उदारवृत्ति[2] तूं ठेविली आहेसना ? पैशासाठीं धर्माच्या अगर धर्मासाठीं पैशाच्या किंवा मोह पाडणाऱ्या ऐहिक सुखासाठीं दोहींना सोडून वागत नाहींसना? हे वीरा, धर्म, अर्थ आणि काम ह्यांचें तुझ्याकडून यथाकालीं यथान्याय सेवन होतेंना ? राजांना लागणाऱ्या **सहा गुणांनीं** युक्त असून **सात उपाय**, बलाबल आणि **चौदा अधिकारी** ह्यांकडे तुझें पूर्ण लक्ष आहेना ? आपलें व शत्रूचें बलाबल पाहून **कृषिकर्मादि आठे कृत्यांकडे** तूं पूर्ण लक्ष देतोसना ? **तुझे सात मुख्य कामगार धनसंपन्न, निर्व्यसनी व लालुचलेले नसून नेहमीं त्यांचें तुझ्याचर पूर्ण प्रेम असतेंना ?** तुझ्या मनांत संशय नाहीं अशा तुझ्या विश्वासघातकी दूतांकडून अथवा तुझ्या मंत्रीवर्गाकडून अथवा तुझ्या स्वतःच्या हातून **मंत्रभेद होत नाहींना ?** तुझे मित्र व शत्रू, तसेच उदासीन वृत्तीचे ह्यांच्या हालचालीकडे तुझे असावें तसें लक्ष आहेना ? व त्यांच्याशीं तुझें वर्तन सावधगिरीचें आहेना ? संधिविग्रहादि उपायांची योजना योग्य प्रसंगीं होतेना ? शुद्ध, कुलीन, तुझ्यावर अनुरक्त व तुला सल्लामसलत देण्याला योग्य असे मंत्री तूं वश करून ठेविले

१ पुराकल्प—वेदांमध्यें भूतकालचें सांगितलेलें अनेककर्तृक आख्यान, विषय—एककर्तृक पुराकल्प.

१ ऋत्विजादिकांचे ठिकाणीं धर्मवृत्ति, दंड व द्वेष यांना पात्र अशांच्या ठिकाणीं अर्थवृत्ति, पालन व षष्ठांशग्रहण ह्यांच्या योगानें प्रजेच्या ठिकाणीं धर्मार्थवृत्ति.

२ शेतकी, व्यापार, किल्ले, सरहद्द, कुंजरबंधन [गांवच्या वकुबीप्रमाणें त्या त्या गांवावर पोषणाकरितां हत्ती ठेवणें) खाणी, कर घेणें, उणीव भरून काढणें.

आहेसना ? कारण राजाच्या जयाला मंत्र हें मूळ कारण आहे. तुझ्या शास्त्रज्ञ व मसलत गुप्त ठेवणाऱ्या अमात्यांनीं तुझें राष्ट्र सुरक्षित असून त्याला शत्रूपासून बाधा होत नाहींना ? . तूं शहाणाच आहेस. निद्रावश न होतां वेळेवर उठून अपराह्णीच्या वेळीं उर्वा काय करावयाचें ह्यासंबंधानें विचार करून ठेवीत असशीलच. एकट्याच्याच विचारानें अगर पुष्कळांचा विचार घेऊन कांहीं मसलत ठरवीत नाहींसना ? तुमची मसलत फुटून सर्व राष्ट्रभर पसरत नाहींना ? सुलभ व महाफलदायक अशीं कामें ठरवून लागलींच तीं हातीं घेतोसना ? त्यासंबंधानें तुझ्याकडून दिरंगाई होत नाहींना ? तुझे सर्व कामगार गैरमाहिती, अविश्वासु, अथवा एकवार काढून पुन्हां कामावर ठेवलेले असे नाहींतना ? कारण पुष्कळ दिवसांच्या पारखीचे विश्वासु कामगार अभ्युदयाला कारण होतात. निर्लोभी, परंपरागत व आप्त अशा लोकांकडून तुझे व्यवहार होत असतातना ? तुझीं **कामें शेवटास गेल्यावर** अगर **शेवटास गेल्याप्रमाणें झाल्यावर त्यांच्या कानावर येतातना? तीं फसलीं असतां त्यांना तें कळत नाहींना?** धर्मतत्त्व जाणणारे व शास्त्रज्ञ अशा **गुरुकुमारांना** शिक्षण देऊन मोठे **योद्धे तयार करीत** आहेसना ? **हजारों मूर्खांबद्दल एका शाहण्याला जवळ करतोसना ?** कारण संकटसमयीं त्याचाच फार उपयोग होतो. तुझे किल्ले, धन धान्य, आयुधें, यंत्रें, शिल्पकार व तिरंदाज लोक ह्यांनीं पूर्ण आहेतना ? बुद्धिमान, शूर, जितेंद्रिय, व हुषार असा एक अमात्य असला तरी तो राजाला मोठ्या वैभवाला चढवितो. परस्परांना न ओळखणाऱ्या तीन तीन गुप्त हेरांकडून शत्रूच्या अठरा व आपल्या पंधरा अधिकाऱ्यांची देहळणी करतोसना ? शत्रूला न कळूं देतां त्याच्या हालचालीवर लक्ष ठेवतोसना ? ज्या पुरोहिताला तूं मान देतोस तो विनयसंपन्न, कुलशीलवान, विद्वान, निर्मत्सर, व दानशील असा आहेना ? अग्निशाळेकडे नेमलेला तुझा याजक विधिज्ञ, विवेकी व सरळ वर्तनाचा असून होम दिल्याची व देण्याची वर्दी तुला वेळेवर देतोना ? तुझ्या पदरीं असणारा जोशी ज्योतिषशास्त्रांत निष्णात असून दैवज्ञ आहेना ? महत्त्वाच्या कामीं श्रेष्ठ, साधारण कामांत मध्यम, व किरकोळ कामांत कनिष्ठ, अशा लोकांची तुझ्या हातून योजना होतेना? निष्कपट व पिढीजाद अशा शुद्धभाव प्रधानावर तूं महत्त्वाचीं कामें सोंपवितोसना ? कडक शिक्षेनें प्रजाजनांचीं मनें खवळवीत नाहींसना ? तुझे मंत्री तुझ्या आज्ञेनें राज्य सुयंत्रित चालवितातना ? स्त्रिया ज्याप्रमाणें जारकर्मरत पतीचा अवमान करतात त्याप्रमाणें तूं प्रजेपासून घोर कर्मानें पैसे ओढणारा आहेस असें समजून याजक त्या पतितासारखा तुझा अवमान करीत नाहींतना ? तुझा सेनापति धैर्यवान, शूर, शहाणा, शुद्ध, व कुलीन असून तुझ्यावर अनुरक्त व तुझ्या कामांत दक्ष असा आहेना ? तुझ्या सैन्याचे मुख्य अधिकारी सर्व प्रकारच्या युद्धांमध्यें कुशल, धैर्यवान, नीतिमान व पराक्रमशाली असून त्यांचा सत्कार करून त्यांना तूं मान देतोसना ? सैन्याला यथोचित अन्न व मुशाहिरा तुझ्याकडून वेळेवर पोहोंचतोना ? तो तूं विनाकारण कमी करीत नाहींसना ? अन्न व मुशाहिरा वेळेवर न दिल्यानें ते लोक हलाखींत येतात व त्यामुळें त्यांकडून स्वामीचें जें नुकसान होतें तें फार मोठें व अपरिहार्य असतें. सर्व प्रधानपुरुष, कुलीन व तुझ्यावर प्रेम करणारे असून लढाईत तुझ्याकरितां प्राणही देण्यास तयार आहेतना ? विषयासक्त अशा एकट्याच्या हातीं सैन्याचें सर्व सूत्र ठेवीत नाहींसना ? पराक्रमानें एकादें महत्कृत्य करणाराला अधिक मान अगर अधिक वेतन तुझ्याकडून मिळतेंना ? विद्याविनीत व ज्ञानसंपन्न अशा लोकांच्या गुणांची पारख करून त्यांना त्याबद्दल योग्य बक्षीस देऊन त्यांचा ठेवावा तसा मान ठेवतोसना ? तुझ्याकरितां संकटांत अगर मृत्युमुखीं पडलेल्या मनुष्यांच्या बायकांचा योग्य सांभाळ तुझ्या हातून होतो-

१ मंत्री, पुरोहित, युवराज, सेनापति, द्वारपाल, अंतःपुराधिकारी, कारागृहाधिकारी, जमाबंदी करणारा, द्रव्याचा विनियोग करणारा, उपदेशक, नगराध्यक्ष, कार्य निर्माणकर्ता, धर्माध्यक्ष, सभाध्यक्ष; पहारेकरी, किल्लेदार, सरहद्दीचें रक्षण करणारी, व वनपाल हे शत्रूकडील अठरा व मंत्री, पुरोहित व युवराज, हे वर्ज करून आपल्याकडील पंधरा.

ना? एखादा अनाथ शत्रूला भिऊन तुला शरण आला असतां किंवा लढाईत तुझ्या हातीं लागला असतां मुलाप्रमाणें त्याचें पालन करतोसना? तुझें सर्व लोकांशीं वर्तन सारखें असून तुझ्यावर आईबापांप्रमाणें लोकांचा भरंवसा आहेना? शत्रु संकटामध्यें आहे अशी बातमी लागतांच प्रभाव, उत्साह व मंत्र या आपल्या तिन्ही शक्तींचा विचार करून एकदम त्याच्यावर स्वारी करतोसना? पार्ष्णिमूल (पृष्ठरक्षक ज्यांत प्रथम आहे असें मंडळ) कृतनिश्चय व पराजयमूलक व्यसनें त्यांचा विचार करून योग्यकालीं सुमुहूर्तावर शत्रूवर चालून जातोसना? सैन्याला मुशाहिरा प्रथम देऊन परराष्ट्रांतील साहाय्यकारी सेनापतींना लुटीत मिळविलेलीं उत्तम उत्तम रत्नें त्यांच्या योग्यतेनुरूप बक्षीस देतोसना? इंद्रियनिग्रहानें प्रथम स्वतःला जिंकून मग अजितेंद्रिय व उद्दाम अशा शत्रूंना जिंकण्याला निघतोसना? शत्रूंवर स्वारी करण्यापूर्वी त्यांच्याशीं व्यवहार करण्यांत साम, दान, भेद, दंड यांचा यथाक्रम उपयोग करतोसना? आपल्या राज्याची बळकटी करून मग परराष्ट्र जिंकण्याला निघतोसना! व तें जिंकल्यावर त्याचें यथायोग्य रक्षण करतोसना? अश्व, गज, रथ, वीर, पायदळ, मजूर, हेर व वाटाडे अशा अष्टांगयुक्त तुझ्या चतुरंग सैन्याला त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून योग्य शिक्षण मिळून शत्रूचा फडशा उडविण्याला तें समर्थ आहेना? सुकाळ अथवा दुकाळ याची संधि साधून तूं शत्रूंचा नाश करतोसना? तुझ्या राष्ट्रांतील व परराष्ट्रांतील अधिकारी आपापली कामगिरी उत्तम प्रकारें बजावीत असून परस्परांचें रक्षण करतातना? तुझे खाण्याचे पदार्थ, वस्त्रें व सुगंधी द्रव्यें त्यांचें रक्षण नोकरांकडून नीट होतेंना? खजिना, कोठार, अश्वगजादिकांच्या शाला, आयुधागार व जमाबंदी यांवरच्या अधिकाऱ्यांचीं तुझ्यावर भक्ति असून तुझ्या हातून त्यांचें कल्याण होत असल्यामुळें ते विश्वासूपणानें वागतातना? तुझ्या घरगुती व बाहेरच्या नोकरांपासून तूं आपलें रक्षण योग्य रीतीनें करून घेत असून त्यांना तुझ्या आप्तवर्गापासून अगर परस्परांपासून त्रास न होण्याविषयीं खबरदारी घेतोसना? मद्यपान, द्यूत, क्रीडा व स्त्रिया यांच्या नादानें होणाऱ्या तुझ्या खर्चाचा हिशेब तुझे नोकर तुला सकाळींच तूं दरबारांत असतांना येऊन देत नाहींतना? आयाच्या एक चतुर्थांशानें, अर्ध्यानें अगर तीन चतुर्थांशानें, तूं आपला खर्च ठेवतोसना? तुझ्या आश्रयाला असलेल्या ज्ञातींचा, वृद्धांचा, वाणी लोकांचा, शिल्पकारांचा व इतर आश्रितांचा प्रसंगीं धनधान्य देऊन तूं समाचार घेतोसना? तुझ्या जमाखर्चावर नेमलेले अधिकारी नेहमीं हिशोब बरोबर ठेवून जमेच्या व खर्चाच्या संबंधानें तुला पहिल्या प्रहरीं वर्दी देतातना? कार्यनिपुण, लोकप्रिय, व तुझ्या हिताकरितां झटणारे अशा नोकरांना अपराधाशिवाय तूं कामावरून दूर करीत नाहींसना? उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा लोकांची पारख करून त्यांच्या योग्यतेनुरूप तूं त्यांना कामें सांगतोसना? लुब्ध, चोरटे, तुझ्याशीं वैरभावानें वागणारे, बाल किंवा स्त्रिया यांच्यामुळें राष्ट्राला पीडा होत नाहींना? **शेतकरी लोक तुझ्या राष्ट्रांत संतुष्ट आहेतना? तुझ्या राष्ट्रांत जिकडे तिकडे योग्य अंतरावर मोठमोठे तलाव व सरोवरें खणलीं असून पिकें केवळ पावसावरच अवलंबून नाहींतना?** शेतकरी लोकांना अन्नाची व बियाण्याची ददात पडत नसून त्यांना **दरमहा दरशेंकडा एकच आण्याच्या व्याजानें** दयाळूपणानें कर्ज देतोसना? शेतकी, व्यापार, सावकारी इत्यादि धंदे तुझ्या राष्ट्रांत प्रामाणिक लोकांच्या हातीं असून बराबर चालले आहेतना? कारण त्यांवर सर्व लोकांचें सुख अवलंबून आहे. नगरें, किल्ले, व्यापारी, शेतकरी व अपराधी लोक ह्या पांचांवर नेमलेले तुझे पांच अधिकारी शूर व शहाणे असून ते एकमेकांच्या विचारानें काम पाहून राष्ट्राच्या कल्याणामध्यें दक्ष आहेतना? नगराच्या रक्षणाकरितां गांवें नगराप्रमाणें व प्रांतांतील खेडींपाडीं गांवाप्रमाणें संपन्न करून तीं आपल्या ताब्यांत ठेविलीं आहेसना? गैरबंदोबस्ताच्या व बंदोबस्ताच्या शहरांवर हल्ला करणाऱ्या चोरांच्या पाळतीवर तुझें सैन्य आहेना? स्त्रियांचें शांतवन करून त्यांचें चांगलें संरक्षण करतोसना? पण त्यांच्यावर विश्वास टाकून एखादी गुह्य गोष्ट त्यांच्यापाशीं बोलत नाहींसना? एखाद्या जरूरीच्या

कामाची खबर लागल्याबरोबर त्या संबंधानें विचार न करतां अंतःपुरामध्यें सुखोपभोग घेत पडत नाहींसना ? रात्रीच्या पहिल्या प्रहरीं भोजन वगैरे आटोपून पुढच्या दोन प्रहरीं झोंप घेऊन मग जागा होऊन चवथ्या प्रहरीं धर्मार्थचिंतन करतोसना ? नित्य वेळेवर उठून उत्तम, पोषाख करून कालज्ञ अशा मंत्र्यांसह प्रजेची गांठ घेण्याला बाट पहात बसतोसना ? **रक्तवस्त्र परिधान केलेले असे पुरुष तुझ्या शरीराचें रक्षण करण्यासाठीं तुझ्या भोंवतीं नेहमीं तयार असतातना ?** दंड्य व पूज्य, तसेच प्रिय व अप्रिय ह्यांच्या ठिकाणीं यमधर्माप्रमाणें तूं योग्य वर्तन ठेवितोसना ? शारीरिक उपाधि औषधांनीं व खाण्याविण्याचा नियम ठेवून, त्याप्रमाणेंच मानसिक उपाधि बुद्धांच्या सेवेनें दूर करण्याचा तू प्रयत्न करतोसना ? काय, बाल, ग्रह, ऊर्ध्वांग, शल्य, दंष्ट्रा, जरा व बाजीकरण असे अष्टांग जाणणारे चिकित्सेमध्यें निष्णात वैद्य तुझ्या ठिकाणीं स्नेहानें अनुरक्त असून तुझ्या शरीराविषयीं काळजी बाळगतातना ? वादीप्रतिवादी तुझ्याकडे आले असतां लोभ, मोह अगर गर्व यांच्या योगानें त्यांची दाद घेत नाहींस असें होत नाहींना ? लोभानें, मोहानें, विश्वासानें किंवा थट्टेनें तुझा आश्रय करून राहिलेल्या लोकांची वृत्ति तूं बंद करीत नाहींसना ? तुझे पौरजन अथवा राष्ट्रांतील लोक शत्रूंनीं लांच दिल्यामुळें एकत्र होऊन तुझ्यावर उठत नाहींतना ? पूर्वी डवचून ठेवलेला तुझा एखादा दुर्बल शत्रु बलानें व मंत्रानें अगर या दोहोंनीं शिरजोर झाला नाहींना ? मुख्यतः तूं आपल्या ताब्यांत आणलेले सर्व राजे तुझ्याविषयीं भक्तिमान असून तुझ्याकरितां प्राण देण्याला तयार आहेतना ? विद्वानांची त्यांच्या गुणांच्या मानानें परिणामीं कल्याणप्रद शुभावह अशी पूजा तुझ्या हातून घडतेना ? स्वर्गप्रद व मोक्षदायक दक्षिणा त्यांना तूं देत असतोसना ? तुझ्या पूर्वजांनीं आचरण केलेल्या वेदमूलक धर्मामध्यें तुझें त्यांच्यासारखेंच वर्तन होत असतेंना ? तुझ्या गृहीं गुणवान ब्राह्मणांना मिष्ट व हितकर अन्न तूं आपल्या समक्ष जेवूं घालतोसना ? लक्ष मैलतीकडे जाऊं न देतां चित्त स्वाधीन ठेवून बाजपेय, पुंडरिक, इत्यादि यज्ञ यथासांग करण्याविषयीं तूं झटतोसना ? गुरुजन, वृद्धजन, देवता, तापस, पार बांधलेले पवित्र वृक्ष, ब्राह्मण व ज्ञाती यांच्यापुढें नम्र होतोसना ? तुझ्यापासून कोणाला दुःख होत नसून तूं कोणाला राग आणीत नाहींसना ? मंगल वस्तू हातांत घेऊन ब्राह्मण नेहमीं तुझें स्वस्तिवाचन करीत असतातना ? हे राजा, धर्म, अर्थ व काम ह्यांकडे लक्ष पुरविणारी तुझी बुद्धि व वृत्ति हल्लींप्रमाणेंच नेहमीं असतेना ? त्यापासून आयुष्यवृद्धि होऊन कीर्ति वाढते. अशा बुद्धीनें वागणाराचें राज्य कधीं लयास जात नाहीं. व तो पृथ्वी जिंकून सुखोपभोग घेतो. एखाद्या शुद्धांतःकरणाच्या मनुष्यावर चोरीचा आळ येऊन तो व्यवहारशास्त्रज्ञ अधिकाऱ्याच्या दृष्टोत्पत्तीस न येतां राजसेवकाच्या फाजीलपणामुळें त्याच्या प्राणावर गदा येत नाहींना ? त्याचप्रमाणें एखादा खरा चोर मुद्यासह सांपडला असून द्रव्यलोभानें तुझे अधिकारी त्याला सोडून देत नाहींतना ? हे राजा, तुझे अमात्य एखादा गरीब मनुष्य अल्पकाळांत खऱ्या मार्गानें धनाढ्य झाला असतां त्यानें तें धन अन्यायानें मिळविलें आहे असें समजून त्याला लुबाडीत नाहींतना ? नास्तिक्य, अनृतभाषण, क्रोध, दुर्लक्ष, दीर्घसूत्रता, शहाण्याची भेट न घेणें, आळस, विषयासक्ति, एकट्यानेंच राज्यासंबंधाचा विचार करणें, अर्थशास्त्र न जाणणारांचा सल्ला घेणें, निश्चित गोष्टीचा आरंभ न करणें, मंत्र गुप्त न ठेवणें, उत्सवादि न करणें, व एकदम चोहोंकडे स्वारी करणें हे चौदा राजदोष टाळतोसना ? राज्य कितीही बळकट असलें तरी ह्यांच्या योगानें त्याचा नाश होतो. वेदाध्ययन, द्रव्यार्जन, लग्न करणें, व श्रुतीचें परिशीलन यांचा हेतु तुझ्या ठिकाणीं सफल आहेना ! ' यावर युधिष्ठिरानें विचारलें, ' हे महामुने, वेदाध्ययनादिकांचें साफल्य कशानें झालें म्हणून समजावें ? ' नारदांनीं उत्तर दिलें, ' वेदाध्ययनाचें साफल्य अग्निहोत्र आहे; दान व उपभोग हें द्रव्यार्जनाचें साफल्य होय; रतिसुख व पुत्रप्राप्ति हें लग्नाचें फल आहे; व शील व वर्तन यांची सुधारणा हें श्रुतीचें फल आहे. ' असें सांगून नारदांनीं फिरून विचारलें, ' अर्थप्राप्तीसाठीं दूरदूरच्या देशांहून येणाऱ्या

व्यापाऱ्यांकडून, करांतूनच ज्यांना पगार मिळतो असे तुझे कामगार, नियमित कर घेतातना ? राजा, तुझ्या राजधानींतील व राष्ट्रांतील प्रतिष्ठित व्यापाऱ्यांना मालखरेदींत कोणी न फसवितां ते आपला माल खरेदी करून आणतातना ? धर्मार्थदर्शी विद्वानांचा धर्मार्थाला धरून असणारा सल्ला तूं नेहमीं ऐकतोसना ? कृषिकर्मानें उत्पन्न होणारीं धान्यें व गाईंपासून उत्पन्न होणारें दूध, तूप, ह्यांपैकीं योग्य भाग ब्राह्मणांना धर्मार्थ देत असतोसना ? तूं कामाला लावलेल्या शिल्पकारांना त्यांच्या कामाला लागणारी सामुग्री व चार महिने पुरेल इतका मुशाहिरा नियमानें देतोसना ? एखाद्यानें केलेलें उत्तम काम लक्षांत ठेवून शहाण्या लोकांपुढें त्यांची वहावा करून त्यांचा योग्य सत्कार करतोसना ? हत्ती, घोडे व रथ यांसंबंधीं विद्येंत त्याचप्रमाणें धनुर्वेद व नागरिकांना हितावह असें यंत्रशास्त्र यांचा अभ्यास तुझ्या वाङ्मयामध्यें चालतोना ? सर्व शस्त्रास्त्रविद्या तशीच शत्रुघातक विषविद्या तूं जाणतोसना ? सर्पादि प्राणनाशक विषारी प्राणी, अग्नी, रोग व राक्षस यांपासून तूं आपल्या राष्ट्राचें रक्षण करतोसना ? आंधळे, मुके, पांगळे, विकलांग, अनाथ व घरदार सोडून भटकणारे यांचें पित्याप्रमाणें तूं पालन करतोसना ? निद्रा, आळस, भय, क्रोध, अस्थानीं मार्दव व दीर्घसूत्रता हे सहा अनर्थ तूं आपल्यापासून दूर केले आहेसना ? जो राजा ह्या जगांत चार वर्णांचें रक्षण करतो तो इहलोकीं सुखी राहून इंद्रलोकाचा वांटेकरी होतो. '

ही नारदांची राजनीति ऐकल्यावर त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून अभिवादन करून धर्मराज त्यांना ह्मणाला, ' भगवन्, आपण बोललां तें यथान्याय व शालोक्त आहे. आपल्या उपदेशाप्रमाणें मी यथाशक्ति वर्तन ठेवीत असतों. पूर्वींचे राजे यथान्यायानें वागत होते व त्याबद्दल त्यांना योग्य फलही मिळत होतें. आतां माझ्या मनांतून त्या सन्मार्गाचें अनुकरण करण्याची फार इच्छा आहे; परंतु त्या थोरांच्या मार्गाचें हुबेहूब अनुकरण करणें माझ्याकडून कितपत होईल हें मला सांगतां येत नाहीं. ' नंतर त्रैलोक्यसंचारी त्या मुनिवर्यास युधिष्ठिरानें विचारलें, ' भगवन्, आपला नेहमीं अनेक लोकांमध्यें संचार असतो. ह्या आमच्या सभेप्रमाणें अगर हिच्याहून श्रेष्ठ अशी सभा आपल्या कोठें पाहण्यांत आली आहे काय ? ' नारदांनीं उत्तर दिलें, ' राजा, मनुष्यलोकीं ह्या तुझ्या सभेसारखी मणिमय सभा माझ्या कोठेंही पहाण्यांत आली नाहीं खरी; परंतु यमधर्म, वरुण, इंद्र व कुबेर यांच्या दिव्य सभांची तुला थोडीशी माहिती देतों. ' असें ह्मणून त्या अप्रतिम सभांची व तेथील सभासदांची माहिती नारदांनीं धर्मराजाला संक्षेपानें दिली. त्या वेळीं इंद्रसभेमध्यें एकट्या हरिश्चंद्राचेंच सभासदांमध्यें नांव ऐकून ' अशा कोणत्या महत्पुण्यानें हा कीर्तिमान राजा इंद्राशीं स्पर्धा करीत त्या ठिकाणीं आहे व आपण पितृलोकीं गेला होतां तेव्हां आमचे वडील पंडू ह्यांनीं आपल्यापाशीं आह्मांला सांगण्यासाठीं कांहीं निरोप सांगितला आहे काय, ' ह्मणून युधिष्ठिरानें नारदांना विचारलें; तेव्हां नारद ह्मणाले, ' सर्व राजामध्यें श्रेष्ठ राजा हरिश्चंद्र यानें विजयी रथांत बसून सर्व राजांना आज्ञांकित करून सोडलें व शस्त्रप्रतापानें सप्तद्वीपें जिंकून राजसूय यज्ञ केला. त्या यज्ञामध्यें सर्व राजांनीं त्याला करभार आणून दिला व याजकांना साह्य केलें. त्यानें त्या यज्ञांत शास्त्रांत सांगितल्याहून पांचपट अधिक द्रव्य याजकांना दिलें. यज्ञ आटोपून परत जाण्याची वेळ आली तेव्हां नाना देशांहून आलेल्या ब्राह्मणांना यथेच्छ भोजन घालून वस्त्रालंकारांनीं संतुष्ट केलें; ह्मणून तो आतां स्वर्गीं इंद्रासह सुख भोगीत आहे. जे राजसूय यज्ञ करतात, अगर युद्धामध्यें पाठ न दाखवितां मरण पावतात अगर तीव्र तप आचरण करून देह ठेवतात, त्यांना इंद्रलोक प्राप्त होऊन त्या ठिकाणीं ते सुखांत राहतात. हरिश्चंद्राचें वैभव लक्षांत घेऊन व मी ह्या मृत्युलोकाला येत आहे असें जाणून तुझ्या पित्यानें तुला ' पृथ्वी जिंकण्याला तूं समर्थ आहेस, तुझे बंधु तुझ्या आज्ञेंत आहेत ह्मणून तूं तो सर्वश्रेष्ठ राजसूय यज्ञ कर, ' असा निरोप सांगितला आहे. हा पित्याचा हेतु तूं शेवटास ने. पूर्वजांसह तुला इंद्रलोक प्राप्त होईल. ह्या यज्ञामध्यें अनेक विघ्नें येतात. यज्ञविघाती लोक यांत छिद्र सांपडण्याची वाट पहात असतात. युद्ध हें दुष्टांचा नाश होऊन भूभार हरण्याचें साधन

आहे; पण तें करण्याला कांहीं तरी निमित्त लागतें. या सर्व गोष्टींचा विचार करून चातुर्वर्णाच्या रक्षणाकडे नेहमीं योग्य लक्ष दे. यज्ञ करून सुखांत रहा व द्रव्य देऊन द्विजांना संतुष्ट ठेव.' असें ह्मणून नारद दाशार्ह नगरीला निघून गेले.

५१ युधिष्ठिराचा राजसूययज्ञ करण्याचा विचार. (२. १३–१६)

राजसूययज्ञ करण्याविषयीं पित्याची आज्ञा नारदांपासून ऐकून व त्या पुण्यकर्मानें उत्तम लोकाची प्राप्ति होते असें जाणून सभ्यांच्या अनुमतानें युधिष्ठिरानें तो यज्ञ करण्याचा निश्चय ठरविला. इतक्यांत त्या धर्मात्म्याचे मनांत धर्मविचार येऊन त्या यज्ञानें प्रजेचें खरें हित होईल किंवा नाहीं याविषयीं त्याच्या मनांत संशय उत्पन्न झाला. कारण कोप, स्वहित व मद बाजूला ठेवून तो लोकहितांत नेहमीं दक्ष असे; व या गुणाच्या संबंधानें जिकडे तिकडे त्याच्याविषयीं धन्यवाद ऐकूं येत असे. पित्याप्रमाणें लोकांचा त्याच्यावर भरंवसा असून कोणी त्याचा द्वेष्टा उरला नव्हता. ह्मणून त्याला अजातशत्रु असें नांव मिळालें होतें. ह्या राजाच्या कृपादृष्टीनें, व भीम परिपालनामध्यें, अर्जुन शत्रूंचा फडशा उडविण्यामध्यें, व सहदेव न्याय देण्यामध्यें, दक्ष असून नकुलाचें सर्वांशीं चांगलें वर्तन असल्यामुळें लोकांमध्यें कलहाचें मूळच उरलें नाहीं. निर्धास्तपणें ते आपापल्या कामांत गढून होते. पाऊस यथाकाळीं यथेष्ट पडत असल्यामुळें प्रजा आनंदांत असून राज्याची भरभराटी होत चालली होती. राजाच्या सद्गुणांमुळें कृषिकर्मांचीं आउतें, गुरेंढोरें व व्यापार ह्यांची अभिवृद्धि होऊन गोरगरीब ऊर्जित दशेस येत चालले होते. ह्या सत्यरत धर्मराजाचे कारकीर्दींत कोणावरें जुलूम होत नसून कराचा वसूल प्रजेच्या सोईप्रमाणें घेतला जात असे. रोगराई, अग्नि, विष व मंत्रप्रयोग यांपासून लोकांना पीडा होत नसे. चोर, भामटे व राजाच्या मर्जीतले लोक ह्यांपासून लोकांना त्रास होत नसे. ह्या राजाचें प्रिय करण्यासाठीं आणि त्याला मान देण्यासाठीं सहा उपायांनीं जिंकलेले राजे करभार घेऊन त्याच्यापुढें हजर असत. संसारसुखांत गढलेल्या प्रजांनीं त्याचें राज्य गजबजून गेलें होतें. त्याचा अम्मल सर्व पृथ्वीभर पसरला होता. तो प्रत्येक राजगुणानें संपन्न असून कोणतीही गोष्ट मोठ्या शांतपणें विचारानें करीत असे. आणि कोणताही देश त्यानें आपल्या ताब्यांत आणल्यावर ब्राह्मणापासून तों शूद्रापर्यंत सर्व लोक पित्यापेक्षां त्याच्यावर अधिक प्रेम करीत. मंत्री व आप्तवर्ग यांना बोलावून यज्ञाविषयीं त्यानें त्यांचा सल्ला घेतला. यज्ञ करण्याची त्याची इच्छा विशेष पाहून ते म्हणाले, ' कोणताही अभिषिक्त राजा ह्या यज्ञाच्या योगानें सार्वभौमत्व पावून वरुणाचे सर्व गुण त्याच्या अंगीं येतात. हे कुरुवंशभूषणा, तूं सार्वभौम होण्याला पात्र आहेस. ज्या यज्ञामध्यें ऋषिप्रणित मंत्रांनीं षडग्नींची स्थापना केली जाते, असा हा यज्ञ करण्याची योग्यता सर्व क्षात्र गुणसंपन्न अशा तुझ्या अंगीं खास आहे. ह्या यज्ञाच्या शेवटीं यजमानाला अभिषेक झाला ह्मणजे त्याला सार्वभौमत्व येऊन अग्निहोत्रादि सर्व यज्ञांचें त्याला फळ मिळतें. हे महाबाहो, तूं स्वतः समर्थ असून आह्मी सर्व तुझ्या आहेंत वागत आहों. तुझा हा यज्ञ शेवटास जाण्यास हरकत कांहींच नाहीं. ह्मणून कांहीं विचार न करतां एकदम तूं हा यज्ञ करण्याला आरंभ कर.' हें त्याचें भाषण युधिष्ठिराच्या मनांत चांगलें बिंबल्यामुळें आपलें सामर्थ्य लक्षांत घेऊन त्यानें तो यज्ञ करण्याचा निश्चय केला व त्या संबंधाचा पुढचा विचार आपले बंधु, धौम्यऋषी व व्यास ह्यांसह करूं लागला. त्या सर्वांनीं अभिनंदन करून त्याला आपलें अनुमोदन दिलें. तरी ह्या महात्म्या,वशी युधिष्ठिरानें लोकहितबुद्धि मनांत धरून आपलें सामर्थ्य, मित्रसाह्य, देशकाल व कर्तव्याकर्तव्य यांचा पूर्ण विचार करून एकादें काम शहाण्यानें हातीं घेतलें घेतलें असतां त्याला त्यांत संकट येत नाहीं, ह्मणून ह्या महत्कृत्याचा आरंभ केवळ आपल्याच जबाबदारीवर न ठेवतां श्रेष्ठ अशा भगवान श्रीकृष्णाचा सल्ला घेण्यासाठीं त्यानें त्याचें स्मरण करून त्याकडे दूत पाठविला. दूत मुखांतून तो निरोप ऐकून व स्वतःला युधिष्ठिराच्या दर्शनाची उत्कट इच्छा झाली असल्यामुळें भगवान अच्युत इंद्रप्रस्था-

ला येऊन दाखल झाला व पांडवांनीं त्याचा यथायोग्य सत्कार केल्यावर स्नेहपूर्वक आतेची भेट घेऊन शुभासनारूढ झाला. नंतर धर्मराज त्याला ह्मणाला, 'सुहृद्वांधव मला राजसूययज्ञ करण्यास सांगत आहेत; पण तो केवळ इच्छासाध्य नसून त्याला काय लागतें हें तुला माहित आहेच. ज्याच्या अंगीं कर्तुमकर्तुम् शक्ति आहे व ज्याला सर्वत्र मान मिळत असून ज्याच्याकडे सर्वेश्वरत्व आहे अशा राजाच्या हातून हा यज्ञ होणें शक्य आहे. माझे सुहृद् तर मला तो करण्याविषयीं आग्रह करीत आहेत. तर ह्या बाबतींत मला तुझी सल्ला पाहिजे. कित्येकांना सौहृदामुळें दोष दिसत नाहींत. कित्येक स्वार्थबुद्धीनें नेहमीं प्रियच भाषण करतात. काहींना ज्यांत स्वतःचा फायदा तेंच इष्ट दिसतें. ह्याप्रमाणें प्राकृतजनांचा सल्ला बहुतकरून हेतुमूलक असतो. तूं सर्व हेतु बाजूला ठेवून कामक्रोधादि विकारांना वश न होतां जें कांहीं माझ्या हातून होण्यासारखें असेल तेंच करण्याविषयीं मला सल्ला दे.' कृष्णानें उत्तर दिलें, धर्मराजा, तूं सर्व गुणांनीं संपन्न असून राजसूयाला पात्र आहेस. तूं सर्वज्ञ आहेस. तरी मी सांगतों तें ऐक. ह्या भूतलावरील सर्व क्षत्रियांचें परशुरामांनीं निर्मूलन करून अवशिष्ट राहिलेले क्षत्रिय गौण आहेत. ह्यांचा आपसांतील संकेतही तुला ठाऊक आहे. ते सर्व आपल्याला ऐल व इक्ष्वाकु कुलांतले समजतात. ह्या दोन्ही कुलांमध्यें शंभर शंभर सार्वभौम कुलें आहेत. ययाति कुलांचा गुणहक्का विस्तार मोठा आहे. त्याचें वैभवही मोठें आहे व तें प्राप्त होण्याची सर्व राजांची खटपट चालली असते. हल्लीं जरासंध राजानें त्यांचें वैभव हरण करून त्यांना जिंकून स्वतः सार्वभौमत्व मिळविलें आहे. तो मध्यप्रदेशांत राज्य करीत असून आमच्यामध्यें दुही माजविण्याची त्याची खटपट चालली आहे. करुषाधिपति, भायायुद्धामध्यें प्रवीण जो वक्र शिशुपाल तो त्याच्या आश्रयानें असून त्याचा सेनापति आहे व तो त्याचा बंदा गुलाम बनला आहे. दुसरे दोघे महापराक्रमी हंस व डिंभक हे त्याच्याच आश्रयानें आहेत. त्याचप्रमाणें वक्रदंत, करुष, करभ व ज्याला अक्षतमणि ह्मणतात तें दिव्यरत्न धारण करणारा मेघवाहन, आदिकरून महावीर त्याच्या बाजूला आहेत. आतां ज्यानें मरु व नरक यांना जिंकलें आहे, ज्याची शक्ति अप्रमेय आहे व जो वरुणाप्रमाणें पश्चिमदिशेला राज्य करीत आहे त्या भगदत्तनामक यवनाधिपतीनें वरकांतीं जरी आपलें मस्तक त्याला वांकविलें आहे तरी मनांतून तुझ्या पित्याप्रमाणें तुझ्या ठिकाणींच त्याचा स्नेहभाव व भक्ति आहे. दाक्षिणेला व पश्चिमेला राज्य करणारा पुरुजित् नांवाचा तुझा मामाही तुझ्या ठिकाणीं स्नेहभावानें आहे. 'जो दुष्ट चेदीभूभुज आपल्याला देव मानून मूर्खपणानें माझीं चिन्हें धारण करून स्वराष्ट्रांत आपल्याला पुरुषोत्तम ह्मणवून घेत आहे तो व ज्याची पूर्वी अनेकवार मीं गय केली व जो वंग, पुंड्र व किरात या देशांवर राज्य करीत आहे, तो पौंड्रक हेही जरासंधालाच मिळाले आहेत. पराक्रमी भोजांचा राजा भीष्मक जो इंद्रसखा असून ज्याचा अम्मल पृथ्वीच्या एकचतुर्थांश भागावर आहे व ज्यानें आपल्या विर्येनें पांड्य व क्रथकौशिक यांना वशवर्ती केले आहेत व ज्याचा भाऊ परशुरामाप्रमाणें शूर आहे, तो भीष्मक राजा देखील त्याचा दास बनला आहे. आम्ही स्वतः त्या भीष्मकाचे आप्त असल्यामुळें नेहमीं त्याचें प्रिय करूं इच्छितों, तरी तो आम्हांला मानीत नाहीं व आमचें अप्रिय करण्याकडे त्याचें नेहमीं लक्ष असतें. आपली शक्ति व आपल्या कुलाचा थोरपणा मनांत न आणतां केवळ जरासंधाच्या दैदीप्यमान वैभवाला भुलून तो त्याच्या आश्रयानें राहिला आहे. भोजांच्या अठरा जाती जरासंधाच्या भीतीनें पश्चिमदिशेकडे पळाल्या आहेत. कांहीं कालापूर्वी कंसानें मूर्खपणानें यादवांचा छळ करून अस्ति व प्राप्ति नांवाच्या जरासंधाच्या दोन मुलींशीं लग्नें केलीं. ह्यासंबंधानें त्याच्या बाजूला बळकटी येऊन त्यानें आपल्या ज्ञातिवर्गाचा छल मांडला व त्या सर्वांवर स्वामित्व मिळविलें. पण ह्या वर्तनानें त्याची अपकीर्ति मात्र झाली. त्यानें ज्या वेळीं भोजांच्या विरुद्ध राजांचा छळ सुरू केला त्या वेळीं ज्ञातिंच्या रक्षणासाठीं त्यानें आमचें साहाय्य मागितलें. आहुकाची सुंदर मुलगी अंकूराला दिली. व बलरामाच्या साह्यानें मीं आपल्या आप्तवर्गाचें एक मोठें काम केलें. कारण रामसाह्यानें मीं कंसाला ठार मारलें; पण ह्या वधानें

त्याचा सासरा जो जरासंध यानें सर्वांस जाऊन आमच्या विरुद्ध हत्यार उचललें. ह्या जरासंधाचे हंस व डिंभक हे दोन मित्र व तो स्वतः असे हे तिघे मिळून तिन्ही लोकांला भारी होते. त्या हंसाला रामानीं युद्धांत मारलें. हंस मेला ही बातमी ऐकून त्यांचून जीवित व्यर्थ आहे असें वाटून डिंभकानें यमुनेमध्यें उडी घेऊन प्राण दिला. याप्रमाणें दोघे मेल्याची बातमी ऐकून जरासंध खिन्नमनानें आपल्या नगरीला गेला व आम्ही मथुरेला आलों. परंतु कंसाची बायको पतिमरणानें शोकाकुल होऊन आपल्या पतिघाती दुष्टाचा नाश करण्याविषयीं तिनें आपल्या पित्याकडे जाऊन त्याची आग्रहपूर्वक प्रार्थना केली. त्या वेळीं त्यानें माझा व माझ्या कुलाचा नाश करण्याची प्रतिज्ञा केली. ती ऐकून मथुरा सोडून आपली सर्व संपत्ति बरोबर घेऊन ज्ञातिवर्गासह पश्चिमेला जाऊन रेवतकपर्वतानें सुशोभित देवांना देखील दुरासद, असा रम्य द्वारावती नांवाचा एक उत्तम भुईकोट किल्ला बांधून आम्ही राहिलों. आमच्या कुलामध्यें अठरा पोटभेद असून आम्ही सर्व वज्रादि आयुधें बाळगून आपल्या संरक्षणांत नेहमीं दक्ष असतों. तर असा जो महापराक्रमी जरासंध तो जिवंत आहे तोंपर्यंत राजसूययज्ञ तुझ्या हातून निर्विघ्नपणें पार पडेल असें मला वाटत नाहीं. ज्याप्रमाणें सिंहानें महान् महान गजांना धरून गिरिकंदरांमध्यें जखडून टाकावें त्याप्रमाणें त्यानें सर्व राजांची स्थिति केली आहे. आम्ही देखील त्याच्या भीतीनें मथुरा सोडून द्वारवतीला गेलों आहों ! हा यज्ञ करण्याचा जर खरोखर तुझा विचार असेल तर त्यासाठीं व बंदिस्थ राजांची सुटका करण्यासाठीं जरासंधाला मारण्याचा अगोदर यत्न कर.' युधिष्ठिर म्हणाला, 'तूं विचारपूर्वक सल्ला दिलास हें योग्यच आहे. तुझ्याशिवाय माझा संशय फेडणारा दुसरा कोणी नाहीं. आपल्या हितामध्यें दक्ष असे सार्वभौम शेंकडों आहेत; परंतु खऱ्या सार्वभौमशब्दाचा उपभोग घेणारा या भूतलावर विरळाच सांपडेल. सार्वभौमत्व मिळविणें सोपें नाहीं. ज्याला दुसऱ्याच्या वीर्याचा व शौर्याचा अनुभव आहे तो आत्मस्तुति कधीं करीत नाहीं. शत्रु देखील ज्यासंबंधानें माना डोलवतात तोच प्रशंसनीय समजला पाहिजे. ही पृथ्वी अफाट असून अनेक रत्नांनीं संपन्न आहे. तिजवर दूर दूर प्रवास केल्याशिवाय मनुष्य सुखाचा बांदेकरी होत नाहीं. सामान्य वासनेपेक्षां शंसनीय गुणाला अनुसरून एखादी अलौकिक कृति केल्याशिवाय मनुष्य नांवलौकिकाला येत नाहीं हें खरें; पण मला या जगामध्यें श्रमच श्रेष्ठ वाटतो, व त्यांतच माझें कल्याण आहे असें मला वाटतें. जरी हा यज्ञ मला करावासा वाटत आहे, तरी त्याचें श्रेष्ठ फल मिळण्याची मला आशा नाहीं. आमच्या कुलामध्यें कोणी तरी श्रेष्ठ व अजिंक्य निघेल असें आमच्या मंत्रीवर्गांना वाटत आहे. परंतु आह्मांला देखील जरासंधाची व त्याच्या दुष्टपणाची भीति वाटत आहे. आम्ही सर्व तुझ्या बाहुवीर्यावर अवलंबून आहों; पण तुला देखील ज्या अर्थीं त्याची भीति वाटते त्या अर्थीं त्याच्याशीं ताडून पहातां मी श्रेष्ठ आहें असें मला कसें बरें वाटावें तूंच सांग. तुझ्या हातून, रामाच्या हातून, भीमसेनाच्या हातून किंवा अतुलवीर्यशाली अर्जुनाच्या हातून त्याचा नाश होईल किंवा नाहीं ह्याचा पुन्हां पुन्हां विचार करतों आहें तरी मला संशय उत्पन्न होत आहे. परंतु आमच्या सर्व कृत्यांमध्यें तूंच आम्हांला प्रमाणभूत आहेस.' हें ऐकून भीम म्हणाला, 'जो राजा कोणतेंही कृत्य कधींच हातीं घेत नाहीं, तो वारुळाप्रमाणें हळू हळू नाश पावतो. एखादा दुर्बल राजा देखील नीतीनें व हुशारीनें समयीं योग्य उपायांचा उपयोग करून बलवान् शत्रूशीं टक्कर देऊन त्याचा मोड करतो व आपलें हित साधण्यास समर्थ होतो. कृष्णाच्या ठिकाणीं नीति, माझ्या ठिकाणीं बल व अर्जुनाच्या ठिकाणीं विजय ह्या तिहींच्या योगानें तीन अग्नींच्या योगानें ज्याप्रमाणें इष्टि शेवटाला जाते, त्याप्रमाणें जरासंधाला आम्ही शेवटास पोहोंचवूं.' श्रीकृष्ण म्हणाला, 'एखादें अज्ञान बालक परिणामाकडे लक्ष न देतां एखादें कृत्य हातीं घेतें. ह्मणून अर्थपरायण अशा त्या अज्ञान बालाला शत्रू क्षमा करतात अशी कधीं गोष्ट नाहीं. कृतयुगांत घडलेल्या अशा पुष्कळ गोष्टी आम्हीं ऐकिल्या आहेत कीं यौवनाश्वानें जिंकण्याला योग्य अशा अनेक

शत्रूंना जिंकून, भगीरथानें पालनाच्या योगानें, कार्तवीर्यानें तप व वीर्य ह्यांच्या जोरावर, भरतानें बाहुबलावर, त्याचप्रमाणें मरुतानें सर्व भूतमात्रांवर समबुद्धि ठेवून, जगामध्यें सार्वभौमत्व मिळविलें. परंतु हे युधिष्ठिरा, सार्वभौमपदाभिलाषी अशा तुझ्या ठायीं हे पांचही गुण कसे पूर्ण वसत आहेत ! ह्या भूतलावरील सर्व राजे जरासंधाशीं टक्कर न मारतां अनेक रत्नें घेऊन त्याच्या पुढें हात जोडून उभे रहातात तरी तो **मूर्खपणानें अनीतीचें अवलंबन करून संतुष्ट होत नाहीं.** आपणाला सर्वांचा स्वामी समजून अभिषिक्त अशा अनेक राजांवर अन्यायानें तो स्वाऱ्या करतो. ज्याच्यापासून त्याला करभार येत नाहीं असा एकही राजा नाहीं. कोणताही राजा त्याच्यावर चालून जाईल असें कधीं घडावयाचें नाहीं. शिवालयामध्यें त्यांना पशूप्रमाणें ठेविलें असल्यामुळें त्यांना मानहानि वाटत नसेल काय ? क्षत्रियाला धारातीर्थीं मरण येणें हेंच भूषणावह व पुण्यप्रद आहे; म्हणून त्यावर चालून जाऊन त्याच्याशीं युद्ध करणें हेंच आह्मांला श्रेयस्कर होणार आहे. त्यानें आजपर्यंत शायशीं राजे देवालयांत कोंडले आहेत व शंभर पुरे होण्याला चवदाच कायते कमी आहेत. तेवढे मिळाले ह्मणजे त्याचा क्रूर नृपमेध सुरू होणार आहे. त्याच्या ह्या कृत्याला जो विघ्न आणील तो खात्रीनें मोठें यश मिळवील व त्याला जो जिंकील त्याला सार्वभौमपद मिळेल याची मुळींच शंका नाहीं.' युधिष्ठिर म्हणाला, सार्वभौमपद मिळविण्याच्या केवळ स्वार्थबुद्धीनें मी तुह्मांला हें साहस कृत्य करण्याला कसें पाठवूं ? **भीम व अर्जुन हे माझे दोन डोळे असून श्रीकृष्ण, तूं माझें मन आहेस.** मन व डोळे यांनीं हीन अशा मनुष्याचें अस्तित्व तरी कसें शक्य असणार? जरासंधाच्या मोठ्या सैन्याशीं युद्ध करून यमाला देखील जय येणें शक्य नाहीं, मग त्या ठिकाणीं तुमच्या प्रयत्नाचा काय उपयोग होणार ? हें भलतेंच काम हातीं घेऊन एखादा अनर्थ मात्र आपल्यावर ओढवण्याचा संभव आहे. ह्मणून ह्या भानगडींत न पडतां स्वस्थ रहाणें हेंच मला बरें दिसतें. माझें मन मला खात आहे. हा राजसूय यज्ञ शेवटास जाणें मला दुरापास्त वाटत आहे.' इतक्यांत अर्जुन युधिष्ठिराला ह्मणाला, 'धर्मराज, मीं धनुष्य, बाण, शस्त्र, वीर्य, अनुयायी, भूमि, यश, इत्यादि अनेक गोष्टी दुःष्प्राप्य असूनही प्राप्त करून घेतल्या आहेत. **उत्तम कुलांत जन्म झाला असतां सुज्ञ त्याची मशंसा करतात. बलासारखें तर या जगांत दुसरें कांहींच नाहीं; व वीर्याहून मला दुसरें कांहीं प्रिय वाटत नाहीं.** प्रसिद्ध कुलांत जन्म झाला असूनही निर्वीर्य मनुष्याच्या हातून कांहीं होणार नाहीं. वीर्यवान मनुष्य निर्वीर्य कुलामध्यें जन्मला असला तरी तो श्रेष्ठ समजला पाहिजे. **ज्याचा सर्व व्यवसाय शत्रूला जिंकण्याचा आहे** तोच खरा क्षत्रिय. अंगीं कांहीं गुण नसला तरी वीर्यवान मनुष्य शत्रूला जिंकण्याला समर्थ असतो. पण सर्व गुणांनीं संपन्न अशा निर्वीर्य मनुष्यांच्या हातून कांहींच होणार नाहीं. सर्व गुण पराक्रमामध्यें एकवटलेले आढळतात. **एकाग्रता, व्यवसाय व दैव हीं तीन विजयाला मुख्य साधनें आहेत. सामर्थ्य असून निःकाळजी राहिल्यानें यश न येतां उलट पराभव होतो.** दैन्याच्या योगानें ज्याप्रमाणें दुर्बलाचा नाश होतो त्याप्रमाणेंच मूर्खपणानें बलवानाचा नाश होतो. ह्मणून दैन्य व मौर्ख्य हीं दोन्ही जयप्राप्तीची इच्छा करणाऱ्या राजानें आपणापासून दूर केलीं पाहिजेत. जरासंधाचा नाश व राजांचें रक्षण ह्या दोन्ही गोष्टी यज्ञसिद्धीसाठीं हातीं घेणें इष्ट होणार आहे; तर ह्याहून विशेष फायदा तो कोणता पाहिजे ? हें काम हातीं न घेतल्यानें आह्मी ह्या कृत्याला असमर्थ आहों असा जगाचा समज होणार आहे. आह्मी समर्थ असतां तुह्मांला आमच्या संबंधानें असा संशय कां येतो ? शम इच्छिणाऱ्या आपल्याला मुनीचें व्रत धारण केल्यावर काषायवस्त्र मिळणें सोपें काम आहे. साम्राज्यच मिळणें अवघड आहे. शत्रु कितीही बलाढ्य असला तरी त्याच्याबरोबर लढण्याला आह्मी तयार आहों.' वासुदेव ह्मणाला, 'भरतकुलामध्यें उत्पन्न झालेल्या कुंतीपुत्राला अनुरूप हें अर्जुनाचें भाषण आहे. मृत्यु केव्हां येणार हें मुळींच कळत नाहीं व युद्ध न केल्यानें कोणी आजपर्यंत अमर झाल्याचेंही आमच्या ऐकण्यांत नाहीं. न्याया-

नें व दैवसाह्यानें शत्रूला पादाक्रांत करून आत्म्याला संतुष्ट करणें हेंच प्रत्येक वीराचें कर्तव्य आहे. **सुविचारानें एकादें काम हातीं घेऊन दैवाचें त्याला पाठबळ मिळालें तर ही जोडगोळी च सिद्धीला कारणीभूत होते.** आतां दोन्ही पक्ष अशा तत्त्वावर युद्धाला सज्ज होतील तर त्यांपैकीं एकालाच जय येणार हें खरें. कारण दोघांना जय किंवा दोघांना अपजय येणें कधीं शक्य नाहीं. तथापि अविचारानें व कौशल्याशिवाय जर आपण युद्धाला गेलों तर मात्र आपण खचित अपयशाचे वांटेकरी होणार. अशी जर स्थिति आहे तर सुनीतीचें अवलंबन करून शत्रूवर चालून जाऊन ज्याप्रमाणें नदी आपल्या वेगानें झाडाचीं पाळेंमुळें खणून काढते त्याचप्रमाणें त्याचा आपण नाश कां करूं नये ? आपले दोष दूर करून छिद्रान्वेषणानें जर शत्रूवर आपण घाव घातला तर आपणाला यश हें खास येणार. शहाण्या लोकांची ही नीतिच आहे कीं, शत्रु बलवान असून त्याचें सैन्य व्यवस्थित असलें तर त्याच्याबरोबर ते युद्ध करीत नाहींत. **शत्रूच्या घरीं गुप्त प्रवेश मिळवून आपण आपला कार्यभाग कपटानें साधून घेतला तर त्यांत आपला दुर्लौकिक मुळींच नाहीं.** सर्व भूतांच्या अंतरात्म्याप्रमाणें हा जरासंध एकटाच अखंड कीर्तीचा उपभोग घेत आहे; परंतु त्याचा विनाशकाल जवळ आला आहे ह्यांत संशय नाहीं. **बांधवांच्या रक्षणासाठीं आह्मी त्याला युद्धामध्यें एक मारूं तरी, अगर त्यानें आह्मांला मारल्यास आह्मी स्वर्गसुख तरी घेऊं.** ' ह्याप्रमाणें भवति न भवति झाल्यावर जरासंधाला मारून दिग्विजय करून राजसूय यज्ञ करावा असें सर्वानुमतें ठरलें.

---

५२. जरासंध वध. (२. १६–२४)

बृहद्रथनामक मगधाधिपति मोठा पराक्रमी असून तीन अक्षौहिणींचा स्वामी होता. त्याच्या अंगीं पराक्रम फार असल्यामुळें युद्धकौशल्याविषयीं त्याला मोठा गर्व होता. इंद्राप्रमाणें त्याचें शरीर यज्ञदीक्षांकित होतें. तो सूर्याप्रमाणें तेजस्वी, पृथ्वीप्रमाणें क्षमाशील, यमाप्रमाणें तामसी व कुबेराप्रमाणें ऐश्वर्यसंपन्न होता. त्याचें थोर कुल व मोहक गुण ह्यांनीं सूर्यकिरणाप्रमाणें सर्व पृथ्वी व्यापिली होती. त्यानें काशीराजाच्या रूपयौवनसंपन्न अशा जुळ्या मुलींशीं लग्न लाविलें. दोन हत्तिणींमध्यें असणाऱ्या गजराजाप्रमाणें त्या दोन रूपवती स्त्रियांमध्यें तो शोभत होता. विषयासक्तींत त्याचें यौवन निघून गेलें व त्यानें अनेक पुत्रकामादि शुभदायक यज्ञ केले, तरी कुलवर्धन मुलगा त्याला झाला नाहीं. कोणे एके वेळीं गौतमकुलोत्पन्न काक्षीवताचे पुत्र थोर चंड कौशिक, ज्यांनीं तपामध्यें आपला देह झिजविला होता, ते फिरत फिरत त्याच्या नगराबाहेर एका झाडाखालीं येऊन उतरले. ती वार्ता राजाला कळून अनेक रत्नें घेऊन तो त्यांच्या भेटीला गेला व त्यांना संतुष्ट करून ते प्रसन्न झाले असतां पुत्रदर्शनाची लालसा अद्यापि तृप्त झाली नसल्यामुळें गद्गद वाणीनें तो त्यांना ह्मणाला, 'भगवन्, राज्य सोडून संन्यासी बनून मी मंदभाग्य तपोवनाला निघालों आहें. आतां मला बराची काय गरज उरली आहे अगर राज्य घेऊन तरी काय करावयाचें आहे ?' हें राजाचें दीन भाषण ऐकून त्या मुनींना वाईट वाटून ते ध्यानस्थ झाले. ते ह्याप्रमाणें ध्यानस्थ बसले असतां राघु वगैरे पक्ष्यांच्या चोंचीचा ज्याला स्पर्श झाला नाहीं असें एक आम्रफल त्यांच्या मांडीवर पडलें. तें घेऊन मंत्रानें त्यावर अभिमंत्रण करून तें त्यांनीं राजाच्या हातीं दिलें; आणि ते ह्मणाले, ' राजा, तूं कृतार्थ आहेस. आपल्या राजधानीला आतां परत जा, व आपल्या स्त्रियांना ऋतुकालीं हें भक्षण करावयाला दे. ' तें ऐकून मुनींच्या पायांवर मस्तक ठेवून राजा आपल्या गृहाला परत गेला; व योग्य समय आला असतां आपल्या दोन स्त्रियांना तें फल त्यानें खाण्याला दिलें. त्यांनीं त्याचे तुकडे करून प्रत्येकीनें एक एक तुकडा खाल्ला. भवितव्यता अपरिहार्य असल्यामुळें व मुनींच्या भाषणाला सत्यता यावयाची असल्यामुळें त्या दोघींनाही तें फल खाल्लयावर गर्भधारणा झाली; व कालेंकरून एक डोळा, एक हात, एक पाय, अर्धें पोट, अर्धें तोंड, व अर्धी कंबर, अशा प्रकारचीं दोन शरीरशकलें प्रत्येकीला झालीं. तीं

पाहून त्या स्त्रिया घाबरल्या व विचाऱ्या खिन्न होऊन आपसांत विचार करून मोठ्या कष्टानें तीं शकलें सजीव होतीं तरी त्यांनीं तीं नेऊन बाहेर टाकण्यास आपल्या दासींना सांगितलें. त्यांनीं तीं चांगलीं झाकून घेऊन नगराबाहेर नेऊन फेकून दिलीं. तीं जरा नांवाच्या राक्षसीच्या हातीं लागलीं व दैवगति विलक्षण असल्यामुळेंच अनायासानें नेतां यावीं ह्मणून तीं जोडण्याचें तिच्या मनांत आलें. त्याप्रमाणें तिनें केलें तों तीं दोन्ही शकलें एकत्र जुळून त्यांपासून एक मूर्तिमान वीर कुमार झाला. तें पाहून विस्मयानें तिचे डोळे प्रफुल्लित झाले. वज्रासारखा तो कणखर मुलगा तिला उचलतां देखील येईना. त्या मुलानें आपल्या रक्तोत्पलाप्रमाणें लाल हाताची मूठ वळून तोंडांत घातली व पाण्यानें ओथंबलेल्या मेघापमाणें मोठ्यानें गर्जना केली. त्या शब्दानें अंतःपुरांतल्या स्त्रिया घाबरून जाऊन राजाला बरोबर घेऊन नगराबाहेर आल्या. पुत्रप्राप्तीसंबंधानें निराश झालेल्या त्या राजस्त्रियांचीं तोंडें अगदीं उतरून गेलीं होतीं, तरी त्यांच्या स्तनांला पाझर फुटला. पुत्रप्राप्तीसाठीं आतुर झालेला राजा व तो बलशाली कुमार या दोघांना पाहून पुत्रप्राप्तीसाठीं आतुर झालेल्या राजाच्या राज्यांत आपण सुखानें रहात असल्यामुळें ह्या मुलाला मारणें उचित नाहीं, असें त्या राक्षसीच्या मनांत आलें; तेव्हां विद्युल्लतेप्रमाणें तेजःपुंज असें मनुष्यरूप धरून त्या मुलासहवर्तमान राजाजवळ येऊन ती त्याला ह्मणाली, 'हे राजा, ब्राह्मणाच्या वरप्रभावानें ह्या तुझ्या दोन स्त्रियांना झालेला हा तुझा मुलगा मी तुला परत देतें. हा घे. ह्याच्या दायांनीं ह्याला ह्या ठिकाणीं टाकून दिल्यावर मीं ह्याचें रक्षण केलें.' हें भाषण ऐकल्याबरोबर त्या काशीराजकन्यांच्या स्तनांतून दुधाच्या चिळकांड्या उडूं लागल्या. एकदम त्या मुलाकडे धांवून जाऊन त्यांनीं त्याला दुधानें न्हवडाविलें. राजालाही पुत्रमुख पाहून फार आनंद झाला. 'मला पुत्र देणारी तूं कोण,' ह्मणून त्यानें त्या राक्षसीला विचारलें. ती ह्मणाली, 'मी जरानांवाची राक्षसी तुझ्या घरीं सत्कार घेत आजपर्यंत सुखांत राहिलें. पूर्वी दानवांच्या विनाशासाठीं ब्रह्मदेवांनीं गृहदेवी ह्मणून मला निर्माण केली. तेव्हांपासून प्रत्येक मनुष्याच्या घरीं नित्य माझें राहणें आहे. सपुत्र व यौवनसंपन्न असें माझें चित्र जो भिंतीवर भक्तिपुरःसर काढील त्याच्या गृहीं धनधान्याची वृद्धि होईल. गंध, पुष्प, धूप, भक्ष्य, भोज्य यांच्या योगानें तुझ्या घरीं आजपर्यंत मला यथेच्छ मान मिळाला आहे व तो प्रत्युपकार कसा फेडावा या चिंतेंत मी रात्रंदिवस होतें. आज हीं दोन शकलें माझ्या दृष्टीस पडलीं व मीं एकत्र जोडल्याबरोबर तुझें भाग्य चांगलें आल्यामुळें हा कुमार बनला. ह्या ठिकाणीं मी केवळ हेतुभूत आहें. मेरुपर्वताला देखील गिळून टाकण्याचें माझें सामर्थ्य आहे. परंतु तुझ्या घरीं मिळालेल्या सन्मानानें तुष्ट होऊन हा मुलगा मी परत देतें.' असें ह्मणून ती त्याच ठिकाणीं गुप्त झाली. राजानें त्या बालकाला घरीं नेऊन त्याचे सर्व बालपणचे संस्कार केले; व त्या राक्षसीबद्दल राष्ट्रांत जिकडे तिकडे महोत्सव करण्याविषयीं आज्ञा केली. जरेनें तीं शकलें जोडलीं ह्मणून त्यांपासून बनलेल्या त्याचें **जरासंध** असें नांव ठेविलें. आहुति दिलेल्या अग्नीप्रमाणें तो बाल दिवसानुदिवस वाढत चालला.

इकडे कांहीं दिवस गेल्यावर भगवान चंडकौशिक ऋषी फिरून मगध देशाला आले. त्यांच्या आगमनानें संतुष्ट होऊन बायको व मुलगा यांसहवर्तमान नगराबाहेर जाऊन पूजासाहित्यानें राजानें त्यांची पूजा केली व राज्यासहित मुलाला त्यांच्या पायांवर ठेविलें. ऋषी त्या योगानें संतुष्ट होऊन ह्मणाले, 'हे राजा, ह्या तुझ्या मुलाचें रूप, बल व सामर्थ्य अतुल आहे व हा श्रीसहवर्तमान जन्माला आला आहे. वीर्यानें याच्या तोडीला कोणीही राजा लागणार नाहीं. वर उडणाऱ्या गरुडाच्या गतीला अटकाव करणें ज्याप्रमाणें दुसऱ्या पक्ष्यांना शक्य नाहीं त्याप्रमाणें याच्या शक्तीला अटकाव करणारे राजे खचित मृत्युमुखीं पडतील. नदीच्या वेगानें ज्याप्रमाणें पर्वताला कांहीं अपाय होत नाहीं त्याप्रमाणें देवनिर्मित शस्त्रापासून देखील याला कांहीं अपाय होणार नाहीं. ज्योतिश्चक्रांमधील सूर्याप्रमाणें सर्व अभिषिक्त राजांचें तेज हरण करून हा त्यांच्याहून श्रेष्ठ राहील. वर्षाकालीं तुफान झालेल्या नद्यांना

ज्याप्रमाणें समुद्र आपल्या पोटांत घेतो त्याप्रमाणें हा सर्व राजांची अतुल संपत्ति आपल्या पोटांत घेईल. ज्याप्रमाणें सर्व धान्यांनीं संपन्न अशी ही विस्तीर्ण पृथ्वी चांगल्याचा व वाईटाचा आपल्या पोटांत समावेश करून घेते त्याप्रमाणें हा चातुर्वर्ण्य प्रजांचें पालन करील. सर्व भूतांचा आत्मभूत जो शरीरस्थ वायु त्याच्याप्रमाणें सर्व राजे याच्या आज्ञेमध्यें राहतील. त्रिपुराचा अंत करणारा रुद्र ह्याला साक्षात् दर्शन देईल.' असें सांगून आत्मकार्याचा विचार मनांत आणून त्या मुनींनीं त्या राजाचा निरोप घेतला. पुढें जरासंधाला राज्याभिषेक करून आपल्याला कृतकृत्य मानून राजानें दोन्ही बायकांसहवर्तमान अरण्यवास स्वीकारला. इकडे जरासंधाला कौशिकांचें वरप्रदान झाल्यावर त्यांच्या आज्ञेनुरूप त्यानें राज्य केलें. कृष्णानें कंसाला मारल्याबर त्याच्याशीं जरासंधाचें वैर पडलें. त्या वेळीं त्या बलाढ्य मगधाधिपानें गिरिव्रजापासून आपली गदा नव्याण्णव वेळां फिरवून मथुरेकडे कृष्ण रहात होता तेथें फेंकली. ती गदा मथुरेपासून नव्याण्णव योजनांवर येऊन पडलेली पाहून मथुरावासी लोकांनीं कृष्णाला येऊन कळविलें. मंत्रशास्त्र व नीतिशास्त्र यांमध्यें निष्णात असे जरासंधाचे दोन हंस व डिंभक या नांवाचे श्रेष्ठ मंत्री होते त्यांना शस्त्रापासून मरण नसल्यामुळें त्यांच्या साह्यानें तो त्या वेळीं त्रैलोक्याला पुरून उरण्यासारखा होता, व हा नीतिविचार मनांत आणूनच श्रीकृष्णही त्या वेळीं स्वस्थ बसला. पण हल्लीं हंस व डिंभक मेले असून अनुयायांसहवर्तमान कंसाचाही नाश झाला होता. ह्मणून आतां जरासंधवधाची वेळ भरली आहे असें जाणून तो युद्धामध्यें देवासुरांना देखील अजिंक्य असल्यामुळें मल्लयुद्धामध्यें त्याला जिंकण्याचा कृष्णानें विचार केला. त्याला बाहुवीर्याचा मोठा गर्व असल्यामुळें एकांतांत त्याला गांठलें असतां भीमाबरोबर युद्ध करण्याला तो खचित तयार होईल व सर्व लोकांच्या नाशाला ज्याप्रमाणें एकटा काल पुरे आहे त्याप्रमाणें महाबाहु भीम त्याचा नाश करील. असा विचार करून कृष्णानें भीमार्जुनांना आपल्या स्वाधीन करण्यास युधिष्ठिरास सांगितलें. भीमार्जुनही मोठ्या हर्षानें कृष्णाबरोबर जाण्याला तयार होऊन उभे राहिले, तें पाहून युधिष्ठिर ह्मणाला, 'हे अच्युता, पांडवांचा नाथ तूंच आहेस. आह्मी सर्व तुझ्या आश्रयानें आहों. तूं जें ह्मणशील तें घडून आल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. लक्ष्मीचा ज्यावर राग झाला आहे त्याची बाजू तूं कधीं घेणार नाहींस. तुझ्या साह्यानें जरासंध मरून सर्व राजांची सुटका झाल्यासारखें मी समजतों व तुझ्या कृपेनें या तुझ्या आज्ञांकित दासाचा राजसूय यज्ञही शेवटास गेल्याप्रमाणें आहे. हें कार्य जेणेंकरून वेळ न लागतां शेवटास जाईल तसें मोठ्या सावधगिरीनें कर. एखाद्या रोगग्रस्त मनुष्याचें जीवित ज्याप्रमाणें धर्मार्थकामाशिवाय शक्य नाहीं, त्याप्रमाणें तुह्मां तिघांखेरीज मला माझें जीवित असह्य होणार आहे. शौरीला सोडून पार्थ नाहीं व पार्थाला सोडून शौरी नाहीं. केवढाही बलाढ्य शत्रू असला तरी त्याला जिंकण्याचें तुह्मां दोघांना कांहींच कठीण नाहीं असें मला वाटतें. हा बलशाली बंधुवर तुमचें साह्य असल्यावर काय करणार नाहीं? सैन्याला योग्य मार्गानें नेणारा नायक असल्यावर त्याच्या हातून उत्तम कामगिरी बजाविली जाते. ज्या सैन्याला अनुभवशील सेनानायक नाहीं त्याला शहाणे अंध व निरुपयोगी समजतात. ह्मणून शहाण्याकडे सेनानायकत्व असावें. शहाणे लोक सखल प्रदेशांतूनच पाण्याचा ओघ काढून लावतात व धीबर लोक देखील छिद्र पाहूनच पाणी काढून लावतात. ह्मणून नीतिशास्त्रनिपुण अशा गोविंदाचा आश्रय करूनच आह्मी कार्यसिद्धीसाठीं यत्न करतों. ह्याप्रमाणें प्रज्ञा व नीति हेंच ज्याचें बल आहे व कोणतेंही कृत्य करण्याला उपाय ज्याच्या अगदीं तोंडांत आहे, अशा कृष्णाला सर्व कार्यांमध्यें सिद्धि येण्यासाठीं पुढें करणें श्रेयस्कर आहे. विशेषेंकरून शौर्याची ज्या ठिकाणीं अवश्यकता आहे अशा ठिकाणीं नीति, जय व बल ही त्रयीच सिद्धीला कारण होते.' असें युधिष्ठिराचें भाषण ऐकून भीमार्जुन व कृष्ण हे तिघे स्नातकवेष धरून सुहृदांनीं त्यांचें अभीष्ट चिंतन केल्याबर मगधदेशाला जाण्याला निघाले. ज्ञातीसाठीं सूड घेण्याच्या इच्छेनें संतप्त झालेल्या अशा सूर्य, चंद्र व अग्नि या तिघां-

प्रमाणें दैदीप्यमान वपु धारण केलेल्या त्या तिघांचें तेज त्या वेळीं असह्य भासत होतें. भीमासह ते दोघे कृष्णार्जुन धर्मार्थकामाचे व इतर कार्यांचे प्रवर्तक एकाच कार्यासाठीं निघालेले पाहून जरासंध स्वाभीनें मेला, असें युधिष्ठिराला वाटूं लागलें. इंद्रप्रस्थाहून निघून कुरुजांगल देश ओलांडून पद्मसर नांवाच्या रम्य सरोवराला ते येऊन पोहोंचले. पुढें कालकूट ओलांडून सदानीरा, गंडकी, शोण, व रम्य सरयु, ह्या एकाच पर्वतांतून निघणाऱ्या नद्या ओलांडून पूर्वकोसलावरून जाऊन मिथिला ओलांडून चर्मण्वतीला ते येऊन दाखल झाले. नंतर गंगा व शोण ह्या नद्या ओलांडून ते पूर्वदिशेकडे वळले व कौशांब प्रांताच्या मध्यभागीं धनधान्य, पशु, जल व वृक्ष यांनीं संपन्न असल्यामुळें रम्य अशा मगध देशाला येऊन पोहोंचले. तेथून गोवर्धन पर्वताला येऊन दाखल झाल्यावर पुढें दिसणारी मगधपुरी दोघां पांडवांना दाखवून श्रीकृष्ण म्हणाला, 'पार्था, ही पहा पुढें पशु व धनधान्य ह्यांनीं संपन्न अशी मगधपुरी दिसत आहे. हिला कोणापासून उपद्रव नसून रम्य अशा धनिकांच्या उंच उंच हवेल्या पहा हिला कशी शोभा देत आहेत. वैहार, वराह, वृषभ, ऋषिगिरि आणि चैत्य असे पांच नगराभोंवतीं असलेले पर्वत शीतच्छायायुक्त महान महान वृक्षांनीं संपन्न अशा आपल्या उंच शिखरांच्या योगानें तटाप्रमाणें ह्या गौरीवज नगरचिें संरक्षण करीत आहेत. ह्या पर्वतावर कामीजनांना प्रिय अशा रम्य, गंधयुक्त व पुष्पित अशा लोध्र वृक्षांचीं वनेंच्या वनें लागून राहिलीं आहेत. ह्याच ठिकाणीं महातपस्वी गौतम ह्यांनीं शूद्र स्त्री उशीनगकन्येच्या ठिकाणीं काक्षीवत व दुसरे विख्यात पुत्र उत्पन्न केले. ही गौतमांपासून झालेली संतति ह्या साधारण मानवाच्या अमलाखालीं रहाते ह्याचें कारण ह्या राजावरची गौतमांची दया हेंच होय. ह्याच ठिकाणीं अंगवंगादि देशाचे राजे गौतमांकडे येऊन पूर्वी आनंदांत व सुखांत दिवस घालवीत असत. ह्या गौतमाश्रमाच्या भोंवतीं असणाऱ्या रम्य पिंपळ व लोध्र यांच्या बनाकडे दृष्टि फेंक. ह्याच ठिकाणीं शत्रुतापन अर्बुद व चक्रवापी नाग, त्याचप्रमाणें स्वस्तिक व मणिनाग, यांची रम्य वसातिस्थानें दिसत आहेत. मनुनामक नागानें अनावर्षामुळें मगधदेशांत दुष्काळ कधीं पडणार नाहीं असा जरासंधाला वर दिला आहे. व कौशिक व मणिनाग ह्यांचाही या देशावर पूर्ण अनुग्रह आहे. ह्याप्रमाणें हें रम्य व दुर्धर्ष्य नगर प्राप्त झाल्यानें जरासंध नेहमीं आपल्या मनांतील दुर्धट विचार शेवटास नेण्यास झटत असतो. म्हणून त्या गर्विष्ठाला आज आपण ठार करून त्याचा गर्व परिहार केला पाहिजे.' असें म्हणून ते हृष्टपुष्ट अशा चारी वर्णांच्या जनांनीं गजबजलेल्या व जिकडे तिकडे उत्सव सुरू असलेल्या त्या दुरासद गिरिव्रजाच्या वेशीजवळ येऊन दाखल झाले. त्या ठिकाणीं बृहद्रथानें जयप्रदर्शक नौबती ठेविल्या होत्या. त्या अशा होत्या कीं, एकदां ताडन केल्यावर तीन महिने त्यांचा नाद घुमत रहात असे. त्या वेशींचा विध्वंस करून जणूं काय जरासंधाच्या मस्तकावरच पाय ठेवताहेत अशा रीतीनें ते नगरांत शिरले. ह्याच सुमारास नगरस्थ वेदपारग ब्राह्मणांना कांहीं दुश्चिन्हें होऊन त्यांनीं जाऊन तीं जरासंधाला कळविलीं व उपाध्यायांनीं त्याला हत्तीवर बसवून त्यावरून दिवट्या ओंवाळविल्या. बलाढ्य जरासंधानेंही भावी संकट टाळण्यासाठीं नियमस्थ राहून उपवास करून होमादि कर्में केलीं. इकडे कृष्णार्जुन व भीम स्नातकवेषानें हातांत आयुधें वगैरे कांहीं न घेतां जरासंधाबरोबर युद्ध करण्यांत हाताचाच आयुधांच्या ठिकाणीं उपयोग करण्याच्या उद्देशानें पुष्पमाल्यादि सौगंधिक पदार्थांनीं, अनेक प्रकारच्या रत्नांनीं, मेवामिठाईनीं व इतर पदार्थांनीं गच्च भरलेल्या सुशोभित दुकानांची दुतर्फा शोभा पहात राजमार्गानें नगरांतून चालले. जातां जातां माळ्यापासून माळा बलात्कारानें घेऊन त्यांनीं त्या गळ्यांत अडकविल्या व चित्रविचित्र वस्त्रांमध्यें ते तिघे वीर ज्याप्रमाणें हिमाचल पर्वतावर राहणारे सिंह गोठ्यामध्यें शिरावे त्याप्रमाणें राजवाड्यांत शिरले. अंगाला चंदन फासून ते चालले असतां शाल वृक्षाच्या बुंध्याप्रमाणें त्यांच्या पसरट छात्या पाहून प्रेक्षकांना मोठा विस्मय वाटला. ते तिघे नरऋषभ तीन राजद्वारें ओलांडून आंत शिरून गर्वानें बिनदि-

कत राजापुढें जाऊन उभे राहिले. त्यांना सामोरे जाऊन पाद्यमधुपर्कादि पूजासाहित्यांनीं त्यांची यथाविधि पूजा करून राजानें त्यांचें स्वागत केलें. ह्या वेळीं भीमार्जुनांनीं मौन धारण केलें होतें. बुद्धिमान कृष्ण राजाला ह्मणाला, 'राजा, हे दोघे नियमस्थ आहेत. मध्यरात्रपर्यंत हे कोणाशीं बोलणार नाहींत. पुढें ते तुझ्याशीं बोलतील.' राजानें त्यांना आपल्या होमशाळेमध्यें जागा दिली व मध्यरात्र झाल्यावर त्या स्नातक वेषधारी अतिथींकडे तो भेटण्याला आला. कारण स्नातक आपल्या वाड्यांत केव्हांही आला तरी त्याची भेट घेऊन त्याची इच्छा परिपूर्ण करावयाची असा त्या बलशाली राजाचा नेम होता. त्यांना ह्या अपूर्व वेषांमध्यें पाहून राजाला विस्मय वाटला. तरी त्यानें आदरपूर्वक त्यांचा सत्कार केला. ते त्याला ह्मणाले, 'राजा, तुला अनायासानें शाश्वतसुख मिळो.' असें ह्मणून ते परस्परांकडे पहात उभे राहिले. त्यांना जरासंधानें आसन घेण्याविषयीं प्रार्थना केल्यावरून ते तिघे यज्ञामधील तीन दैदीप्यमान अग्नीप्रमाणें आसनारूढ झाले. नंतर सत्यसंघ जरासंध त्यांचा हा विलक्षण वेष पाहून निर्भर्त्सनापूर्वक त्यांना ह्मणाला, 'स्नातकवेषधारी ब्राह्मण अकालीं माला धारण करीत नाहींत व गंधानुलेपन करीत नाहींत. तुमच्या हातांवर धनुष्याचें चिन्ह असून तुह्मी पुष्पधारी, दिसण्यांत क्षत्रियासारखे ब्राह्मण वेषधारी आहां. तुह्मी कोण आहां तें मला खरें सांगा. सत्य हेंच राजांचें भूषण आहे. माझी जेत्यवेश फोडून मनांत कांहीं दिक्कत न बाळगतां भलत्याच मार्गानें तुह्मी नगरांत कां शिरला? हें तुमचें कृत्य ब्राह्मणांच्या हातून होणारें नाहीं. **ब्राह्मणाचें सर्व सामर्थ्य तोंडांत आहे.** तर तुमचा उद्देश काय आहे तें मला स्पष्ट सांगा. मी दिलेला पूजादि सत्कार तुह्मी कां घेत नाहीं?' हें ऐकून वाक्यविशारद कृष्णानें मोठ्या शांतपणें व गंभीर वाणीनें उत्तर दिलें, 'हे राजा, आह्मी खरोखरच स्नातक आहों. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तिन्ही वर्णांना स्नातक व्रताचा अधिकार आहे. यांत पुष्कळ सामान्य व विशेष नियम आहेत. विशेष नियमानें हें व्रत पाळणाऱ्याला क्षत्रियांचें वैभव प्राप्त होतें. पुष्पधारी पुरुष अभ्युदयाला येतात. ह्मणून आह्मीं पुष्पें धारण केलीं आहेत. क्षत्रिय आपली शक्ति बाहुवीर्यानें दाखवितात, तोंडानें बडबड करीत नाहींत. ही पाहण्याची तुझी इच्छा असेल तर तो तुला लवकरच दिसून येईल. शहाणे शत्रूच्या घरीं आड मार्गानें व मित्राच्या घरीं सरळ मार्गानें शिरतात. कांहीं हेतू मनांत धरून आह्मी शत्रूच्या घरीं आलों असल्यामुळें आह्मी त्याची पूजा घेत नाहीं.' जरासंध ह्मणाला, 'तुमचें कधीं काहीं वांकडें केलेलें मला स्मरत नसून मी निरपराधी असतां तुह्मी मला शत्रु ह्मणतां हा मोठा चमत्कार आहे. आतां तुमच्या धर्माला कांहीं अडथळा आल्यामुळें संतापून जर तुह्मी असें ह्मणत असाल ऐका. जो क्षत्रिय धर्मज्ञ असून निरपराधी मनुष्याला पीडा देण्याला प्रवृत्त होतो तो मोठा पराक्रमी व नीतिज्ञ असला तरी पापाचा वांटेकरी होतो. त्रैलोक्यामध्यें क्षात्रधर्म सर्वांत श्रेष्ठ आहे. नीतिविशारद क्षत्रियांचाच आचार पसंत करतात. त्या ह्या क्षत्रिय धर्मांत स्थिर मनानें मी आपलें कर्तव्य करीत असून कोणाचें कांहीं वांकडें केलें नाहीं. तुह्मी मला आपला शत्रु ह्मणतां हा तुमचा मजवर वेडेपणाचा आरोप आहे.' कृष्ण ह्मणाला, 'तूं मोठा अपराध केला आहेस. कोणता तो ऐक. एका श्रेष्ठ राजवंशामध्यें कोणी एक राजा आहे. त्यानें आपल्या वंशाचें नांव राखलें आहे. त्याच्या आज्ञेनें आह्मी तुझ्याकडे आलों आहों. अनेक राजांना बंदिवान करून आणून त्यांना तूं पशूंप्रमाणें बळी देऊं इच्छित आहेस. राजांचा अपमान राजांनीं करणें उचित आहे काय? हा एवढा थोरला अपराध करून आपल्याला निरपराधी कसा ह्मणावितोस? धर्मरक्षण करण्याला समर्थ असून हा अपराध करणाराला आह्मीं जर आळा घातला नाहीं तर तें पाप आमच्या माथीं बसेल. नरबळी आजपर्यंत कधीं कोणीं ऐकिला नाहीं. तूं तर तुझ्यासारख्या राजांनाच पशू करून सोडलें आहेस. ज्या ज्या स्थितींत मनुष्य जें जें कर्म करतो त्याचें त्याला त्या त्या स्थितींत फल मिळावें हें योग्य आहे. ह्मणून आह्मी आपल्या जातीच्या अभ्युदयासाठीं तुला मारून त्या संकटांत पडलेल्या राजांना सोडविण्याकरितां येथें आलों आ-

हों. क्षत्रियांमध्यें माझ्यासारखा कोणी नाहीं, असें जें तुला वाटत आहे तीच बुद्धी मोठी चूक आहे. कोणता क्षत्रिय आपलें कुल ओळखून रण करून अक्षय्य स्वर्गसुख मिळविण्यास तयार होणार नाहीं? रणयज्ञाची दीक्षा घेतलेले क्षत्रिय स्वर्ग मिळवून आणखीही अनेक श्रेष्ठ लोक मिळवितात, ब्रह्मज्ञान, कीर्ति, तप आणि धारातीर्थी मरण ह्या चार गोष्टी स्वर्गप्राप्तीला सारख्याच साधनीभूत आहेत. पण पहिल्या तिहींपासून स्वर्ग अनिश्चित आहे व चौथीपासून तो खात्रीनें मिळतो. धारातीर्थी मरण हा आपला जयध्वज असून अनेक गुणांनीं तो विभूषित आहे. इंद्राला त्याचें थोर पद यामुळेंच मिळालें आहे व, असुरांना जिंकून सर्व लोकांवर त्याचा अधिकार याच्याच योगानें चालला आहे. तुझ्याशिवाय इतर कोणाशीं वैर बांधल्यानें हा स्वर्गमार्ग इतका सुलभ व खात्रीचा करून घेतां येणार आहे? तूं ह्या मगधराज्याचा मोठा दिमाख बाळगून इतरांना उगीच तुच्छ करूं नकोस. शक्ति सर्वांच्याच ठिकाणीं कमीअधिक वसत असते. तुझ्या तोडीचे अगर तुझ्याहून श्रेष्ठ अनेक वीर निघतील. जोंपर्यंत ते बाहेर पडले नाहींत तोंपर्यंतच ह्या तुझ्या बल्गना. तुझ्याशीं जे समान आहेत त्यांच्याशीं तूं अहंपणा सोडून दे. पूत्र, बंधु, अमात्य, ज्ञातिवर्ग व सैन्य ह्यांसह यमसदनाची वाट धरूं नकोस. तुझ्याशीं युद्ध करूं इच्छिणारे आह्मी ब्राह्मण आहों असें समजूं नको. मी तुझा शत्रु शौरी व हे दोघे नरवीर पांडव आहेत. आम्ही तुला युद्धाला बोलावीत आहों. आम्हांपुढें उभा राहून युद्ध कर अगर बंदीवान केलेल्या सर्व राजांना सोडून दे, किंवा यमसदनाची वाट धर.' जरासंध म्हणाला, 'कोणालाही न जिंकतां मीं बंदीवान केलें नाहीं. जिंकून गुलाम करणें हा क्षत्रियांचा धर्म असून तो प्रत्येकानें पाळला पाहिजे. बळी देण्याच्या उद्देशानें त्यांना येथें आणून आतां केवळ भीतीनें क्षात्रधर्म बाजूला ठेवून त्यांना मी सोडून देईन असें तुला वाटतें काय? सैन्यासह अगर एकएकटे अगर दोघे दोघे अगर तिघे तिघे एकदम अथवा निरनिराळे, तुमची मर्जी असेल त्याप्रमाणें युद्ध करण्याला मी सिद्ध आहें.' हें जरासंधाचें भाषण ऐकून तो दुसऱ्याचा भाग असून मधूना तो युद्धामध्यें अवध्य आहे हें ब्रह्मलिखित लक्षांत आणून आपण स्वतः जरासंधाला मारण्याचा विचार बाजूला ठेवून 'आम्हां तिघांपैकीं कोणाशीं युद्ध करण्याची तुझी इच्छा आहे,' असें कृष्णानें त्याला विचारलें. हें कृष्णाचें भाषण ऐकून जरासंधानें भीमाशीं युद्ध करण्याची आपली इच्छा दर्शविली. नंतर पुरोहित गोरोचन, माला व दुसरे मंगलपदार्थ तशींच दुःखनिवारणार्थ औषधें घेऊन त्या ठिकाणीं येऊन उभा राहिला. ब्राह्मणांनीं स्वस्त्ययन केल्यावर जरासंध क्षात्रधर्माला अनुसरून युद्धाला सिद्ध झाला. किरीट काढून ठेवून केस चांगले बांधून मर्यादा उल्लंघन केलेल्या सागराप्रमाणें तो भीमाकडे सरसावून म्हणाला, 'भीमा, मी तुझ्याबरोबर युद्ध करणार; आपल्यापेक्षां श्रेष्ठानें आपल्याला जिंकलें तरी त्यांत मानहानि नाहीं.' असें म्हणून शत्रूवर जाणाऱ्या बलासुराप्रमाणें तो भीमावर चालून गेला. इकडे श्रीकृष्णानें भीमाचें स्वस्त्ययन केल्यावर भीमही त्यांची आज्ञा घेऊन युद्ध करण्याच्या उत्कट इच्छेनें जरासंधावर चालून गेला. ते दोघे ईर्षेला पेटून जय मिळविण्याच्या इच्छेनें हातांत हात घालून सलामी ठोकून युद्धाला तयार झाले. दस्ती ओढून त्यांनीं काचा धरण्याचा प्रयत्न केला व थाप देऊन भूमि हादरून सोडली. त्यांनीं आवळा, लुकण वगैरे मानेवरचे पेच करण्याचा प्रयत्न केला. एकमेकांवर मुष्टिप्रहार केले. एकमेकांशीं भिडून चिन्नहस्तादिक करून ते एकमेकांच्या कमरेला मिठी मारीत होते. पवित्र्यावर उभे राहून पेच साधण्याकरितां अनेक प्रकारचे नानाविध हस्तविक्षेप चालले होते. मानेवर मान खसटत असतां व टकरा होत असतां घर्षणापासून ठिणग्या पडत होत्या. जोरानें एकमेकांच्या मर्मस्थळावर ठोसे मारून खालीं चाटा मारीत होते. हातांचा आयुधांच्या ऐवजीं उपयोग करून दोन मत्तगज ज्याप्रमाणें एकमेकांना सोंडेनें प्रहार करतात त्याप्रमाणें ते एकमेकांना प्रहार करून गर्जत होते. दोन खवळलेल्या सिंहांप्रमाणें खवळून जाऊन एकमेकांना मोठ्या त्वेषानें एक दस्ती करून दुसऱ्यानें तोड केल्यामुळें ते जोरानें एकमेकांपासून दूर होत होते. ह्याप्रमाणें त्या

दोघां मल्लयुद्धपटूंनीं मल्लयुद्धकलेंतील पृष्ठभंग, संपूर्ण मूर्च्छा, पूर्णकुंभ, रणपीर, पूर्णयोग, इत्यादि उत्तम उत्तम पकडी केल्या. मधून मधून एकमेकांचे हात व दुसरे अवयव जणूं काय अंबाडीची दोरीच वळताहेत अशा रीतीनें ते पिळीत होते. त्यांचें तें युद्ध पहाण्याला आलेल्या लोकांनीं प्रेक्षागृह गच्च भरून गेलें होतें. ते दोघे वीर दंड थोपटतांना, एकमेकांच्या मानगुटी धरून एकमेकांचे पट काढल्यानें पर्वतावर वज्रपातानें जसा भयंकर शब्द निघतो त्याप्रमाणें शब्द होत होता. दोघेही बलाढ्य असून दोघांनाही ह्या प्रसंगामध्यें त्वेष चढत होता. ते एकमेकांना पाडण्याची संधि पहात होते. हें घनचक्कर युद्ध चाललें असतां ते आपल्या ढोपरांनींच प्रेक्षकांची गर्दी मागें हटवीत होते. हें त्यांचें युद्ध वृत्रवासवांच्या युद्धाप्रमाणें मोठें तुंबळ चाललें असतां ते एकमेकांना एकमेकांकडे ओढीत, तोंडानें एकमेकांची निर्भर्त्सना करीत, लोखंडी कांबीप्रमाणें कणखर अशा बाहूंचा एकमेकांवर प्रहार करीत मोठ्या निकरानें लढत होते. कार्तिकी प्रतिपदेला त्यांचें युद्ध सुरू होऊन कांहीं अन्नपाणी अगर विश्रांति न घेतां रात्रंदिवस त्रयोदशीपर्यंत ते झुंजत होते. चतुर्दशीच्या दिवशीं रात्रीं जरासंध दमून मागें हटला. त्या वेळीं भीमाला अप्रत्यक्ष रीतीनें सूचना देण्यासाठीं श्रीकृष्ण म्हणाला, 'भीमा, रणामध्यें शत्रु जेरीस आला असतां त्याला त्रास देणें योग्य नाहीं. त्रास दिला असतां कदाचित् तो प्राणाला मुकण्याचा संभव असतो; म्हणून त्याला आतां अधिक त्रास देऊं नकोस. बाहुयुद्धच चालवून तुझ्या पित्यापासून तुला मिळालेलें सामर्थ्य त्याला दाखीव; हें भाषण ऐकून जरासंधाकडे दृष्टि लावून त्याला ठार करण्याची हीच वेळ असें जाणून भीमानें आपली अचाट शक्ति प्रकट केली. शेंकडों वेळां त्याच्या चड्डीला धरून त्याला गरगरां फिरवूनं वर फेंकून त्याची गठडी वळून त्यानें त्याला पायांखालीं तुडविलें व त्याच्या पाठीचें हाडनहाड चिरडून टाकलें आणि त्याला उभा चिरून मोठ्यानें गर्जना केली. यामाणें जरासंध मरतांच सर्व मगधदेशचे लोक घाबरून गेले. स्त्रियांचे गर्भपात झाले. हिमाचल फाटला किंवा पृथ्वी दुभंगली कीं काय अशी त्यांना शंका आली. नंतर राजद्वारीं त्या शवाला एका या निजलेल्या मनुष्याप्रमाणें टाकून देऊन सर्व कैदिवान राजांना मोकळे करून ते तिघे जरासंधाचा मोठा रथ जुंपून गिरिव्रजाकडे जाण्याला निघाले. हा रथ पुढें कृष्णापासून वसूला व त्यापासून बृहद्रथाला मिळाला. नगराबाहेर पडल्यावर बंधनांतून सोडविलेले राजे व ब्राह्मण त्यांना भेटण्याला आले. ते कृष्णाला ह्मणाले, 'भीमार्जुनांच्या साह्यानें त्वां देवकीनंदनानें धर्माचें रक्षण केलें ह्यांत आह्मांला कांही नवल वाटत नाहीं. घोर पंकमय अशा जरासंरूपी तलावांत आह्मी दुःखांत बुडत असतां तुह्मीं आह्मांला त्यांतून काढलें हें तुह्मांला उचितच आहे.' असा त्यांचा स्तुतिपाठ गात त्यांनीं त्या तिघांचा सत्कार केला. ते ह्मणाले, 'प्रेमानें आह्मांला तुह्मीं जखडून टाकलें आहे. आह्मी तुमच्या सेवेला हजर आहों. तुह्मीं एखादें दुष्कर काम सांगितलें तरी तें आह्मी करण्यास सिद्ध आहों.' हें ऐकून श्रीकृष्ण ह्मणाला, 'राजा युधिष्ठिर राजसूययज्ञ करूं इच्छित आहे. धर्मानें सर्व राजांवर श्रेष्ठत्व मिळवूं इच्छिणाऱ्या त्या राजाचें तुह्मी साह्य करा.' त्यांनीं 'बरें' ह्मणून यज्ञाला आपली अनुमति दिली. नंतर कृष्ण पुष्कळ संपत्ति घेऊन भीमार्जुनांसह इंद्रप्रस्थाला आला व तें द्रव्य युधिष्ठिराच्या पायांवर ठेवून झालेला सर्व वृत्तांत त्यानें त्याला कळविला.

५३ पांडवांनीं केलेला दिग्विजय व राजसूययज्ञ. (२. २९—३५)

जरासंधवधानंतर पार्थ तें उत्तम धनुष्य व अक्षय्य बाणांनीं भरलेला भाता घेऊन सभेमध्यें आला. व दिग्विजय करून राजसूययज्ञासाठीं विपुल द्रव्य करभाररूपानें घेऊन येण्याविषयीं युधिष्ठिराची त्यानें आज्ञा मागितली. युधिष्ठिरानें स्वस्तिवाचन करण्याला योग्य अशा ब्राह्मणांकडून त्याचें अभिनंदन करून, 'जाऊन शत्रूंना ताप देऊन मित्रांना आनंद दे,' अशी आज्ञा दिल्यावर मोठें सैन्य घेऊन अर्जुन कुबेर दिशेकडे निघाला. भीम, नकुल व सहदेव क्रमानें पूर्व, दक्षिण व पश्चिम दिशा

जिंकण्यासाठीं त्याच वेळीं सैन्यासहवर्तमान बाहेर पडले. पार्थानें प्रथम कलिंग देशाला जाऊन तेथील राजांना आपल्या ताब्यांत आणून विशेष आयास न पडतां आनर्त, कालकूट, कुलिंद इत्यादि देशांतील लोकांना ताब्यांत आणलें, व सुमंडल जिंकून शाकल व प्रतिविंध्य ह्या द्वीपांच्या राजांना आपल्या ताब्यांत आणिलें. पुढें प्राग्ज्योतिषाकडे आपला मोर्चा फिरवून त्या ठिकाणीं किरात, चीन व दुसऱ्या सागरवासी वीरांसहवर्तमान तेथील राजाला जिंकल्यावर त्या राजानें प्रीतिभावानें धर्मराजाची मांडलिकता स्वीकारून अर्जुनाबरोबर सख्य केलें व पुष्कळ द्रव्य देऊन त्याची पुढें उत्तरदिशेला रवानगी करून दिली. पार्थानें अनेक पर्वत व त्यांवर असणारे एकूण एक किल्ले व तेथील लोक ह्यांना जिंकून आपल्या ताब्यांत घेतलें व त्यांपासून गोडीगुलाबीनें पुष्कळ द्रव्य घेऊन त्यांसह उलूक देशाकडे तो गेला. तेथील राजा बृहत याला घोर युद्धांत जिंकून त्याच्यासहित सेनाबिंदूवर स्वारी करून नंतर मोदापूर, वामदेव, सुदामान, सुसंकुल, उत्तरउलूक इत्यादि देश त्यानें जिंकले. नंतर सैन्य पाठवून त्यानें पंचगण जिंकून तेथील राजांना सेनाबिंदूकडेच आणविलें. व त्यांच्या साह्यानें पर्वतवासी वीरांना जिंकून विष्वगश्व राजाला आपल्या ताब्यांत आणिले. नंतर दहा मांडलिक राजांसहवर्तमान काश्मीरच्या क्षत्रियांना त्यानें जिंकलें. पुढें त्रिगर्त, दार्व, कोकनद इत्यादि देशांच्या क्षत्रियांना आपल्या ताब्यांत आणून अभिसारी या नांवाची रम्य नगरी त्यानें जिंकली. नंतर उरगवासी रोचमानाला जिंकून अनेक प्रकारच्या आयुधांनीं सुसंरक्षित असें सिंहपूर उडवून देऊन त्यानें उध्वस्त केलें. नंतर सुह्म, चोल, बाल्हीक, कांबोज व दरद यांना निवडक सैन्यानिशीं जाऊन जिंकून पर्वतवासी चोरांना देखील त्यानें आपल्या ताब्यांत आणिलें. लोम, परमकांबोज आणि ऋषिक यांना जिंकून तेथून राघूच्या पोटासारख्या रंगाचे आठ घोडे करादाखल आणिले. नंतर निष्कूट, हिमवंत व श्वेतपर्वत पादाक्रांत करून द्रुमपुत्रानें रक्षित किंपुरुषवास नामक देश क्षत्रियांतकर असें घोर रण करून त्यानें जिंकला; व तेथील राजापासून करभार घेऊन गुह्यकानें रक्षित हाटक देशाला तो आला. तेथील लोकांना सामानेंच जिंकून मानसाला जाऊन गंधर्वरक्षित देश त्यानें जिंकले; व त्या ठिकाणीं तित्तिर, कल्माष व मंडूक या जातींचे उत्तम घोडे मिळवून पुढें उत्तरेकडे हरिवर्षाला जाऊन तो देश जिंकण्याचा त्यानें विचार केला. इतक्यांत तेथील द्वारपाल संतुष्ट होऊन त्याला ह्मणाले, 'पार्था, कोणाही मानवाचा या ठिकाणीं प्रवेश नाहीं. ह्मणून हें नगर तुला जिंकतां येणार नाहीं. तूं येथून परत फीर. झालेला दिग्विजय पुरे आहे. हा उत्तरकुरु आहे. ह्या ठिकाणीं कधीं युद्ध होत नाहीं. आह्मी तुझें शौर्य पाहून फार संतुष्ट झालों आहों.' हें त्यांचें भाषण ऐकून अर्जुन म्हणाला, 'जर ह्यांपुढें जाण्याला मानवांना प्रतिबंध असेल तर तुमच्या नगरांत शिरण्याची माझी इच्छा नाहीं. धर्मराजांना कांहीं तरी करभार या ह्मणजे झालें.' हें त्याचें भाषण ऐकून त्यांनीं रेशमी व लोंकरीचीं उत्तम उत्तम वस्त्रें व अनेक मौल्यवान अलंकार त्याला करभार ह्मणून दिलीं याप्रकारें उत्तरदिशेतील सर्व राजांपासून करभार घेऊन शक्रप्रस्थाला परत येऊन सर्व वस्त्रालंकार व वाहनें अर्जुनानें युधिष्ठिराच्या पायांवर ठेविलीं.

इकडे भीम परराष्ट्राचा फन्ना उढाविणारें मोठें सैन्य घेऊन पूर्वदिशेला गेला होता. त्यानें अनेक उपायांनीं पांचालांना आपलेसे करून दंडक व विदेह हे देश जिंकून अल्प काळांतच दशार्ण देश जिंकला त्या ठिकाणीं तेथील राजाचें युद्धकौशल्य पाहून भीमानें त्याला आपला मुख्य सेनापति केला. नंतर अश्वमेध देशाचा स्वामी रोचमान याला जिंकून दक्षिणेकडे पुलिंद नगराला येऊन सुकुमार व सुमित्र या दोन राजांना त्यानें आपल्या ताब्यांत आणिलें. व धर्मराजाच्या आज्ञेनें शिशुपालाकडे जाऊन धर्मराजाची मनीषा त्याला कळविली. शिशुपालानें स्नेहभावानें भीमाचें स्वागत केलें. त्या ठिकाणीं तेरा रात्रीं राहून शिशुपालाचा सत्कार घेऊन तो पुढें निघाला. नंतर कुमारदेशचा श्रेणिमान व कौसल देशचा बृहद्बल या राजांना जिंकून पुढें आयोध्येला जाऊन तेथील धार्मिक व बलाढ्य राजा जो दीर्घयज्ञ त्याला यानें आपल्या ताब्यांत आणिलें. पुढें गोपालकक्ष व उत्तरकोसल हे देश जिंकून नंतर हि-

मवानाच्या पार्श्व भागाला असणारा जलोद्भव देश त्यानें लवकरच जिंकून टाकला. याप्रकारें पुष्कळ देश जिंकून मल्लाट व शुक्तिमंत हे पर्वत त्यानें ताब्यांत घेतले. नंतर त्यानें युद्धांत कधीं परत न फिरणारा सबाहु व सुपार्श्व देशाचा राजा क्रथ यांना जिंकून मत्स्य व मलद ह्या लोकांना आपले वशवर्ती करून ज्या ठिकाणीं पाप व भय माहीत नाहीं अशी पशुभूमि जिंकली. नंतर मदधार पर्वताकडे जाऊन सोमधेयांना जिंकून तो उत्तरेकडे वळला. त्या ठिकाणीं वत्सभूमि ओलांडून भर्गाधिपति त्याचप्रमाणें निषादाधिपति व मणिमत प्रमुख राजे यांना त्यानें जिंकलें. पुढें दक्षिणमल्ल व भोगवान हे पर्वत आपल्या स्वाधीन करून घेऊन शर्मक व वर्मक यांना सामानेंच जिंकून विदेह देशचा राजा जनक याला त्यानें जिंकलें. नंतर शक व बर्बर यांना कपटानें जिंकून विदेह देशांतच राहून इंद्रपर्वताच्या आसपासचे सात किराताधिपति त्यानें जिंकले. नंतर मोठे बलाढ्य, सुह्म व प्रसुह्म यांना जिंकून मगधदेशाला जाऊन दंड व दंडधर यांना जिंकून तो गिरिव्रजाला गेला व तेथें जरासंधाच्या मुलाला सामानें वश करून घेऊन त्याच्यापासून करभार घेतला. पुढें कर्णाकडे जाऊन त्याला आपल्या ताब्यांत आणून नंतर पर्वतवासी राजे यानें जिंकले. मोदागिरी पर्वतावर तेथील बलाढ्य राजाला घोर संग्रहामध्यें ठार करून कौशिककच्छ यांमध्यें राहणारे पौंड्राधिप, महौजस, वंगदेशाचे समुद्रसेन व चंद्रसेन त्याचप्रमाणें कर्वटाधिपति, ताम्रलिप्त व सागरवासी म्लेंछ यांना त्यानें पूर्णपणें जिंकलें. ह्याप्रमाणें शेंकडों देश जिंकून तेथील राजांपासून द्रव्य, विविधरत्नें, अगरू, उत्तम उत्तम वस्त्रें, मोतीं, लोंकरींचीं वस्त्रें, सोनें, रुपें व माणकें, अशी विपुल संपत्ति करभार म्हणून घेऊन तो इंद्रप्रस्थाला परत आला व ती सर्व संपत्ति धर्मराजाच्या पायांवर त्यानें अर्पण केली.

इकडे सहदेव मोठें सैन्य घेऊन दक्षिण दिशेला गेला, व शूरसेनाला त्यानें प्रथम पूर्णपणें जिंकलें. पुढें मत्स्य राजाला जिंकून सर्व राजांमध्यें श्रेष्ठ दंतवक्र याला मांडलिक करून त्याच्या राज्यावर त्याला फिरून ठेविलें. त्याचप्रमाणें सुकुमार, सुमित्र; अपरमत्स्य व पाटचर यांना जिंकून गोशृंग या नांवाच्या निषाद भूमीला येऊन श्रोणिमंत व नवराष्ट्र यांना जिंकून तो कुंतिभोजाकडे गेला. ह्या राजानें प्रीतिपूर्वक युधिष्ठिराचें वर्चस्व शिरसा मान्य केलें. नंतर चर्मण्वतीच्या तीरावर कृष्णानें शिल्लक राखलेला पूर्व वैरी जंभकपुत्र याला जिंकून तो दक्षिणेकडे चालला. व सेक, अपरसेक यांना मांडलिक करून नर्मदेकडे गेला. त्या ठिकाणीं अवंतिपति विंद व अनुविंद यांना जिंकून त्यांपासून पुष्कळ रत्नें घेऊन भोजकट पुराला तो गेला. त्या ठिकाणीं दोन दिवसपर्यंत सतत युद्ध झालें. त्या ठिकाणीं कोणाला हार न जाणारे भीष्मक, कोशलाधिपति व वेण्यतटाधिपति त्याचप्रमाणें कांतारक, प्राक्कोशल, नाटकेय, हेरंबक, इत्यादि लोक व मारुध देश जिंकून मुग्धग्राम, नीच व आनर्तक देश त्यानें ताब्यांत आणले. नंतर त्या प्रदेशांतील अरण्यवासी लोकांना आपल्या ताब्यांत आणून मगवाताधिप व कुलिंददेशचे लोक यांना रणांत जिंकून तो पुढें दक्षिणेकडे चालला व पांड्य राजाबरोबर एक दिवस युद्ध करून लोकविख्यात जी किष्किंधा गुहा तिला तो गेला. त्या ठिकाणीं द्विविद ह्या वानरराजाबरोबर सात दिवस त्यानें युद्ध केलें; पण तो राजा हार गेला नाहीं. पुढें त्यानें आपण होऊनच यज्ञाला विघ्न आणूं नये ह्मणून विपुल द्रव्य देऊन त्याची रवानगी केली. माहिष्मती नगरीला येऊन नीलाबरोबर त्यानें घोर व निकराचा संग्राम केला. त्या ठिकाणीं प्रत्यक्ष अग्नि नीलाचें साह्य करीत होता, यामुळें सहदेवाचे सैन्यांत जिकडे तिकडे अग्निमय होऊन राहिलें. तें पाहून; त्याला फार चिंता उत्पन्न झाली. दंतकथा अशी होती कीं, त्या नगरीमध्यें अग्नि व्यभिचार व्रत घेऊन राहिला होता. नीलाची एक रूपवती कन्या होती. ती नेहमीं पित्याच्या अग्निहोत्राजवळ अग्नि पेटविण्यासाठीं उभी असे. त्या ठिकाणीं असें घडून येत असे कीं, पंख्यानें वारा घातला असतां देखील पेट न घेतां तिच्या ओष्ठपुटानें फुंकल्याबरोबर तो पेटत असे. अंतःपुरजन असें ह्मणत कीं तिच्यावर अग्नीचें प्रेम जडलें आहे. त्या मुलीनेंही ती गोष्ट कबूल केली.

पुढें एकदां ब्राह्मणरूपानें तो तिच्याशीं रत झालेला पाहून त्या धर्मनिष्ठ राजानें न्यायाप्रमाणें त्याला शासन केलें. पुढें अग्निहोत्राचा अग्नि रागानें पेट घेईना. तें पाहून राजा विस्मित झाला व त्यानें त्याला साष्टांग नमस्कार केला व आपल्या मुलीवर तो आसक्त झालेला पाहून त्यानें त्या विप्ररूपी अग्नीला ती अर्पण केली. अग्निनारायणानें संतुष्ट होऊन राजावर प्रसाद करून त्याला वर दिला. त्या दिवसापासून त्या नगराचें शत्रूपासून अग्नि स्वतः संरक्षण करीत असे. त्या दिवसापासून तेथील स्त्रिया दुसऱ्याला वरण्याला अयोग्य व स्वैरिणी झाल्या. सहदेव अग्निची स्तुति करून ह्मणाला, 'हे कृष्णवर्त्मन् हा आमचा प्रयत्न तुझ्यासाठीं आहे. तुला मी नमस्कार करतों. तूं देवांचें मुख असून तूंच प्रत्यक्ष यज्ञ आहेस. प्रत्येक वस्तु तूं पावन करतोस, ह्मणून तुला पावन हें नांव मिळालें आहे. व तुझ्या ठिकाणीं आहुति दिलेल्या द्रव्याचा भाग तूं ज्याचा त्याला पोहोंचवितोस ह्मणून तुला हव्यवाहन ह्मणतात. तुझ्याकरितां वेद उत्पन्न झाले, ह्मणून तुला जातवेदस असें नांव मिळालें आहे. तूं चित्रभानू आहेस, सुरेश आहेस, अनल आहेस, विभावसु आहेस, हुताश आहेस, ज्वलन आहेस, शिखी आहेस, स्वर्गद्वाराला स्पर्श करणारा आहेस, वैश्वानर आहेस, प्लवंग आहेस, तुझें तेज मोठें अतुल आहे. भगवान रुद्राचें दैदीप्यमान वीर्य धारण करून कुमाराला जन्म देणारा तूंच आहेस, हिरण्यकृत नांव तुलाच आहे. हे अग्ने, तूं मला तेज दे. वायु मला प्राण देवो, पृथ्वी मला बल देवो व जल माझें कल्याण करो. हे शक्तिमान अग्ने, तूंच पाण्याचा आदिहेतु आहेस. तूं मला सत्यानें पावन कर.' ऋषी, ब्राह्मण, देव व असुर नित्य यज्ञामध्यें तुला आहुति देतात. प्राण्यांच्या अंतर्यामीं तुझें नित्य वास्तव्य आहे. असा सर्वव्यापी व सर्व शक्तिमान तूं मला पावन कर.' ह्याप्रमाणें स्तुति ऐकून संतुष्ट होऊन अग्नीनें त्याची इच्छा पूर्ण केली. नंतर त्याच्या आज्ञेनें नीलानें येऊन सहदेवाचा सत्कार करून त्याला करभार दिला. पुढें त्रैपुर जिंकून पौरवेश्वर, आकृति व कौशिकाचार्य ह्यांना मोठ्या प्रयासानें जिंकून सुराष्ट्रामध्यें तळ देऊन तेथून प्रत्यक्ष इंद्रसखा जो भीष्मक त्यावर त्यानें सैन्य पाठविलें. त्यानें कृष्णाकडे नजर देऊन ह्याची आज्ञा प्रीतिपूर्वक मस्तकावर घेतली. नंतर शूर्पारक, तालाटक, दंडका, सागरतीरचीं द्वीपें त्याचप्रमाणें म्लेछ, नरभकक्ष लोक, निषाद, कर्ण, प्रावरण, राक्षस व कालमुख इत्यादि लोकांना आपल्या ताब्यांत आणून कोलगिरी, सुरभीपट्टण, ताम्राव्हय द्वीप, गमक पर्वत इत्यादि प्रदेश जिंकून एकपाद, केरल, संजयंती, पाषंड व करहाटक ह्या देशांतील राजांवर सैन्य पाठवून त्यानें त्यांना आपलें मांडलिक केलें. नंतर पांड्य, द्राविड, आंध्र, तालवन, कलिंग, उष्ट्रकर्णिक व यवन तशीच वनचरांची रम्य नगरीं हीं सर्व जिंकून दक्षिण तीराला येऊन पोहोंचल्यावर बिभीषणाकडे प्रीतिपूर्वक त्यानें दूत पाठविला. बिभीषणानें नानाप्रकारचीं रत्नें, चंदन, अगरु, इत्यादि सुवासिक काष्ठें, व उत्तम उत्तम वस्त्रालंकार सहदेवाकडे पाठवून दिले. ह्या सर्व वस्तू घेऊन इंद्रप्रस्थाला येऊन त्या त्यानें युधिष्ठिराच्या पायांवर ठेविल्या.

नकुलही श्रीकृष्णानें जिंकलेल्या पश्चिम दिशेला जाऊन प्रथम रोहितकाकडे वळला व तेथील मत्तमयूरकाशीं घोर युद्ध करून पुढें मरुभूमि, शैरीषक, महेत्थ इत्यादि प्रांत त्यानें ओलांडिले. नंतर महाद्युति व आक्रोश ह्यांना आपल्या ताब्यांत आणून शिबि, त्रिगर्त, अंबष्ठ, मालव, कर्पट, मध्यमकेय, वाटधान, उत्सवसंकेत इत्यादि लोकांना जिंकून पुष्करारण्यवासी ब्राह्मणांचें त्यानें दर्शन घेतलें. पुढें सिंधूच्या तीराचा आश्रय करून राहिलेले बलाढ्य ग्रामणीय सरस्वतीच्या आश्रयानें राहिलेले शूद्राभीर, त्याचप्रमाणें मत्स्योपजीवी व पर्वतवासी ह्यांना आपल्या ताब्यांत आणून पांच नद्यांमधला सर्व प्रदेश त्याचप्रमाणें अमरपर्वत, उत्तरज्योतिष, दिव्यकूटपूर हीं स्थलें जिंकून, रामठ, हारहुण इत्यादि पश्चिमेला असणाऱ्या राजांना जिंकून मद्राच्या शाकल राजधानीला तो गेला. पांडवांचा मातुल जो मद्राधिपति शल्य त्याकडे जातांच त्यानें प्रीतिपूर्वक धर्मराजाचें मांडलिकत्व स्वीकारलें. त्याचा सत्कार घेऊन नकुल पुढें निघाला, व समुद्रकिनाऱ्याला राहणारे म्लेंच्छ, पल्हव, बर्बर, किरात, यवन, शक, इत्यादि जातींना आपल्या ताब्यांत आणून तो माघारा वळला. त्याचा खजिना बाहून नेण्याला ह-

जारों उंट त्याबरोबर होते. इंद्रप्रस्थाला परत येऊन त्यानें मिळविलेली सर्व संपति युधिष्ठिराच्या पायांवर अर्पण केली.

याप्रमाणें शत्रूंचें निर्मूलन करून धर्मराजासारखा सत्यप्रिय राजा प्रजेचें संरक्षण करीत असल्यामुळें प्रजा आपापल्या कामांत दक्ष होती. **प्रजेपासून यथान्याय कर घेऊन** राज्य नीतीनें चालविलें जात असल्यामुळें अतिवृष्टि, अनावृष्टि, इत्यादि संकटें न येतां राष्ट्रामध्यें जिकडे तिकडे धनधान्याची समृद्धि झाली. धनार्जन न्यायानें केलें जात असल्यामुळें खजिना दिवसानुदिवस वाढतच जाऊन शंभर वर्षांनींही त्याला तूट पडणें शक्य नव्हतें. धान्याचीं कोठारें व खजिना पूर्ण आहेसें पाहून यज्ञ करण्याचा आतां समय आला असें सर्व सुहृद युधिष्ठिराला निरनिराळे व मिळून सांगूं लागले. ह्याप्रमाणें सुहृदांचा युधिष्ठिराला आग्रह पडल्यावर शाश्वतांमध्यें श्रेष्ठ, अव्यय, भूतवर्तमानभविष्यांचा नाथ, वृष्णींचा आधारभूत, आपत्कालीं अभय देणारा, पुराण ऋषि, वेदांचा अंतरात्मा व ज्ञान्यांनाही अदृश्य, असा भगवान श्रीकृष्ण सैन्याची सर्व व्यवस्था वसुदेवावर सोंपवून मोठ्या सैन्यानिशीं पुष्कळ संपत्ति घेऊन इंद्रप्रस्थाला आला. त्याचा सत्कार करून युधिष्ठिरानें सुहृदांचें ह्मणणें त्याला कळविल्यावर त्याची प्रशंसा करून कृष्ण म्हणाला, 'हे राजशार्दूला, सार्वभौमपदाला व हा महायज्ञ करण्याला तूंच योग्य आहेस. तुझ्या हातून हा झाला ह्मणजे आह्मी कृतकृत्य झालों.' यावर 'माझा संकल्प सफल झाला व सिद्धिही मला निश्चयानें मिळणार; कारण मीं मनांत योजल्याबरोबर मला तुझें दर्शन झालें आहे,' असें कृष्णाला ह्मणून युधिष्ठिर भावांसहवर्तमान राजसूयाच्या तयारीला लागला. व वीरश्रेष्ठ सहदेवाला व मंत्रिवर्गाला त्या यज्ञासाठीं ब्राह्मण व धौम्य सांगतील तीं सर्व यज्ञसाधनें व मंगल उपकरणें यथायोग्य व यथाक्रम सिद्ध ठेवण्यास त्यानें आज्ञा दिली. इंद्रसेन, विशोक व पूर ह्यांच्याकडे अन्नाचा पुरवठा करण्याचें काम सोंपविल्यावरून त्यांनीं ब्राह्मणांना संतोष होण्यासारखे स्वादिष्ट व सुवासिक पदार्थ तयार करविले. द्वैपायनांनीं ऋत्विजस्थानीं बसण्याकरितां प्रत्यक्ष वेदमूर्ति असे ब्राह्मण मिळविले, व स्वतः ब्रह्मत्व पतकरलें. धनंजयकुलांतील सुमामन हे सामवेद ह्मणण्याला होते. याज्ञवल्क्य अध्वर्यु होते. पैल व धौम्य हे दोघे होते. ह्यांचें पुत्रवर्ग व शिष्यवर्ग होतेच होते. पुण्याहवाचन म्हटल्यावर त्या विधीचा उद्देश बोलून दाखवून शास्त्रोक्त विधीनें त्यांनीं त्या भव्य यज्ञमंडपाची पूजा केली. नंतर गवंडी, सुतार इत्यादि शिल्पकारांनीं आज्ञा मिळविल्यावर स्वर्गांतील अमतिम भुवनासमान भव्य व जिकडे तिकडे सुगंध सुटला आहे अशा प्रकारची उत्तम होमशाळा व दुसरीं गृहें त्या ठिकाणीं तयार केलीं. नंतर ब्राह्मण, राजे, वैश्य व मान्य असे शूद्र ह्यांना निमंत्रण देण्यासाठीं सहदेवानें दूत पाठविले; व योग्य काल प्राप्त झाल्यावर ब्राह्मणांनीं युधिष्ठिराला राजसूययज्ञाची दीक्षा दिली. तो धर्मात्मा यज्ञदीक्षा घेऊन यज्ञगृहांत शिरला. त्या ठिकाणीं सकळ विद्यासंपन्न ब्राह्मण, राजे, वैश्य व शूद्र नाना देशांहून आले होते. कारागिरांनीं धर्मराजाच्या सांगण्यावरून त्यांच्यासाठीं अन्नवस्त्रांनीं पूर्ण व सर्व ऋतूंतील गुणांनीं संपन्न अशीं राहण्यासाठीं घरें तयार केलीं होतीं. त्यांमध्यें अनेक प्रकारच्या मनोहर गोष्टी सांगत व खेळ व नाच पहात ते सुखानें राहिले. 'या, खा,' अशाच प्रकारचे शब्द जिकडे तिकडे नित्य ऐकूं येत असत. शेकडों, हजारों, शय्या व स्त्रिया धर्मराजानें ब्राह्मणांना दिल्या. नंतर देवलोकस्थ इंद्राच्या यज्ञाप्रमाणें पृथ्वीवरील त्या अनन्यवीर युधिष्ठिराचा यज्ञ सुरू झाला. पुढें युधिष्ठिरानें भीष्म, द्रोण, धृतराष्ट्र, विदुर व आपले प्रिय बंधुवर्ग ह्यांना निमंत्रण देण्यासाठीं हास्तिनापुराला नकुलाला पाठविलें. ते सर्व, शकुनि, कर्ण, इत्यादि आप्तबांधवांसहवर्तमान नानाप्रकारचीं मौल्यवान रत्नें घेऊन यज्ञ पाहण्यासाठीं आले. त्याचप्रमाणें दुसरेही अनेक राजे व राजपुत्र यज्ञ व ती अप्रतिम सभा पाहण्याच्या इच्छेनें इंद्रप्रस्थाला आले. धर्मराजानें त्या सर्वांचा सत्कार केल्यावर त्यांकरितां तयार करविलेल्या निरनिराळ्या कैलासशिखराप्रमाणें उंच उंच हवेल्यांत ते जाऊन राहिले. ह्या हवेल्या सोनें, रुपें, हिरे, माणकें, इत्यादि मौल्यवान द्रव्यांनीं मढवून काढल्या होत्या. त्यांच्या भोंवतालीं उंच उंच तट

होते. ह्यांच्या जाळ्या सोन्यानें मढविल्या असून जमिनीवर स्फटिकाची फरसबंदी केली होती. चढाबवाचे जिने फार सोपे होते. निरनिराळ्या दिवाणखान्यांतून मौल्यवान बिछायती पसरल्या होत्या. जिकडे तिकडे फुलें पसरलीं असून चंदन व अगरु यांचा घमघमाट चालला होता. हंस व चंद्र ह्याप्रमाणें पांढऱ्या शुभ्र त्या हवेल्या अनेक योजनें लांब पसरल्या असून फार शोभायमान दिसत होत्या. त्या सुखकर असून त्यांचीं दारें एकसारखीं रांगेनें लागून राहिलीं होतीं. ब्राह्मण व राजमंडळ ह्यांनीं गजबजलेल्या त्या यज्ञमंडपाला स्वर्गाची शोभा दिसत होती. यज्ञारंभीं युधिष्ठिर, भीष्म व गुरुजन ह्यांकडे जाऊन अभिवादन करून म्हणाला, 'आपला सर्वांचा मजवर अनुग्रह व्हावा. माझी ही सर्व संपत्ति आपली आहे. आपणा सर्वांची आज्ञा मला शिरसा मान्य आहे.' असें ह्मणून त्या सर्वांना त्यांच्या योग्यतेनुरूप कामें त्यानें नेमून दिलीं. खाण्यापिण्याच्या व्यवस्थेकडे दुःशासनाची योजना केली. ब्राह्मणांचा सत्कार करण्याचें काम अश्वत्थाम्याकडे सोंपविलें. राजांचा मानमतराब राखण्यासाठीं संजयाची योजना केली. कताकत पाहण्याकडे लक्ष ठेवण्याचें काम भीष्मद्रोणांचें होतें. हिरे, माणकें, सोनें व मोतीं कृपाचार्यांच्या ताब्यांत केलीं असून तीं ब्राह्मणांना वांटण्याची कामगिरी त्यांच्याचकडे होती. खर्चाचें काम विदुराकडे असून लोकांचे नजराणे घेण्याचें काम दुर्योधनाकडे होतें. यज्ञापैकीं उत्तम फल आपल्याला मिळावें ह्मणून ब्राह्मणांचे पाय धुण्याचें काम श्रीकृष्णानें आपण होऊन आपल्याकडे घेतलें होतें. 'मीं दिलेलें द्रव्य युधिष्ठिराला आपला यज्ञ शेवटास नेण्यास उपयोगीं पडावें,' असें राजांना वाटून ते चढाओढीनें त्याला द्रव्य अर्पण देत होते. आपल्या संपत्तीच्या योगानें वरुणाशीं स्पर्धा करणाऱ्या युधिष्ठिरानें विपुल द्रव्य वेंचून षडग्नियुक्त यज्ञ केला. त्या ठिकाणीं जमलेल्या सर्व जनांची इच्छा पूर्ण करून सर्वांना त्यानें संतुष्ट केलें. अन्न, द्रव्य, व रत्नें यथेच्छ वाटलीं गेल्यागुळें त्या ठिकाणीं कोणाची कांहीं इच्छा अपुरी राहिली नाहीं. श्रुति, मंत्र व शिक्षा ह्यांमध्यें निष्णात अशा ब्राह्मणांनीं दिलेल्या घृतादिकांच्या आहुतींनीं देव तृप्त झाले. विपुल दक्षिणेच्या योगानें ब्राह्मणांची तृप्ति झाली. सारांश सर्व वर्णांच्या लोकांनीं त्या ठिकाणीं मोठ्या आनंदांत काल घालविला.

५४ शिशुपालवध. (२. ३६–४५)

राजसूययज्ञ संपण्याच्या दिवशीं धर्मराजावर यज्ञाचें पवित्र तीर्थ शिंपडण्यासाठीं नारदप्रभृति महान महान ऋषी व राजे आंतील वेदींत शिरले. कर्म चाललें असतां फुरसतीच्या वेळीं 'हें असेंच असलें पाहिजे, हें तसें असणें शक्य नाहीं,' इत्यादि त्यांचे वितंडवाद सुरू होते. त्यामध्यें कांहीं वादांत निष्णात होते ते आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर न्यूनपक्ष सप्रमाण सिद्ध करून दाखवीत होते, व कित्येक सप्रमाण गोष्टींत न्यूनता दाखवित होते. वेदसंपन्न ब्राह्मण, देव व महान महान ऋषी ह्यांनीं भरलेल्या त्या वेदीला तर नक्षत्रानें भरलेल्या आकाशाची शोभा आली होती. त्या ठिकाणीं कोणी शूद्र अगर व्रतहीन दिसून येत नव्हता. युधिष्ठिराची ती यज्ञसंपत्ति व तेथें जमलेला तो राजसमूह पाहून साक्षात् नारायण देवांसहवर्तमान भूमीवर यदुकुलामध्यें जन्माला येईल ह्मणून ब्रह्मदेवांशीं पूर्वी अंशावतरणाच्या वेळीं झालेल्या भाषणाची नारदांना आठवण झाली. प्रत्यक्ष नारायण मनुष्यरूपानें वृष्ण्यंधक कुलामध्यें जन्माला आला असल्यामुळें तारागणामधील चंद्राप्रमाणें तें कुल शोभत होतें. नंतर भीष्म ह्मणाले, 'आचार्य, ऋत्विज, बांधव, स्नातक, मित्र व राजा हे सहाजण सत्कारार्ह आहेत. हे सर्व आमच्या येथें फार दिवस राहिले आहेत. ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें निरनिराळ्या रीतीनें सत्कार करून मग त्यांना निरोप द्यावा.' हें भीष्मांचें भाषण ऐकून 'प्रथम सत्कार कोणाचा करावा,' ह्मणून युधिष्ठिरानें विचारलें. तेव्हां ग्रहांमधील सूर्याप्रमाणें ह्या भूतलावर कृष्णच प्रथम सत्काराला योग्य आहेत असें भीष्मांना वाटून ते ह्मणाले, 'तमोमय प्रदेश सूर्याच्या योगानें व निर्वात प्रदेश वाऱ्याच्या योगानें ज्याप्रमाणें सुखकारक होतो त्याप्रमाणें हा आमचा यज्ञमंडप कृष्णाच्या योगानें पवित्र झाला आहे, ह्मणून त्याचाच सत्कार प्रथम करावा.' ह्याप्रमाणें भीष्मांची आज्ञा होतांच सहदेवानें उत्तम

आहेर आणून कृष्णापुढें ठेविला. कृष्णानें आदरपूर्वक त्याचा स्वीकार केला. हा कृष्णाचा सत्कार शिशुपालाला सहन न होतां भर सभेमध्यें भीष्म व धर्मराज ह्यांना टाकून बोलून कृष्णाची त्यानें निंदा केली. तो ह्मणाला, 'ह्या ठिकाणीं मोठमोठे राजे हजर असतां ज्याला राज्य नाहीं असा हा वार्ष्णिकुलोत्पन्न कृष्ण ह्या सत्काराला पात्र कसा होतो? पांडवांनीं स्वार्थबुद्धीनें हा त्याचा सत्कार केला आहे; हें त्यांना शोभत नाहीं. हा कोत्या दृष्टीचा गर्गिय स्मृति बाजूला ठेवून स्वार्थबुद्धीनें अधर्म करण्याला निघाल्यामुळें लोकांमध्यें शहाण्याच्या दृष्टीनें फार गर्हणीय होणार आहे. वसुदेवादि वृद्ध, द्रुपदादि कुलीन राजे, द्रोणादि पूजार्ह, व्यासादि ऋत्विज, अश्वत्थामादि वीरश्रेष्ठ, दुर्योधन, कर्ण, शल्य इत्यादि विख्यात योद्धे, असे थोर थोर लोक ह्या ठिकाणीं असतां त्यांना सोडून कृष्णाचाच सत्कार प्रथम करण्यांत स्वार्थाशिवाय दुसरा कांहीं ह्यांत मला हेतु दिसत नाहीं. जर पांडवांना हा इतका पूज्य होता तर उगीच अपमान करण्यासाठीं राजांना ह्या ठिकाणीं बोलावून आणण्याचें तरी काय कारण होतें? ह्या महात्म्या युधिष्ठिराला भयानें, लोभानें किंवा त्याच्या गोड शब्दाला भुलून जाऊन आह्मीं कारभार दिला असें नाहीं. हा धर्मकृत्याला प्रवृत्त झाला असल्यामुळें त्याच्या इच्छेच्या आड जाऊं नये ह्मणून ह्याचें मांडलिकत्व आह्मीं पतकरलें. तो हा आह्मांला तुच्छ करीत आहे. धर्मात्मा ह्मणून आजपर्यंत त्यानें संपादन केलेलें यश आज एका क्षणांत त्यानें घालविलें आहे. जो वृष्णिकुलांत जन्मला असून ज्यानें आपल्या आप्त जरासंधाला मारलें त्या ह्या धर्मभ्रष्ट कृष्णाचा हा असा सत्कार पांडवांशिवाय दुसरे कोण करणार? युधिष्ठिराला आज ही दुर्बुद्धि झाली ही गोष्ट बाजूला राहूं या; पण कृष्णा, तूं ह्या सत्काराला पात्र नसून त्यांनीं केवळ स्वार्थबुद्धीनें तो केला असतां दैवगत्या मिळालेला हविर्भाग घेऊन निर्जन प्रदेशांत स्वस्थपणें खात बसणाऱ्या कुत्र्याप्रमाणें तुला तरी त्याचें इतकें महत्त्व कां वाटलें? हा राजांचा अपमान नव्हे तर कौरवांनीं ही तुझीच थट्टा मांडली आहे हें अगदीं उघड दिसतें. षंढाला ज्याप्रमाणें स्त्री, आंधळ्याला ज्याप्रमाणें रूप, त्याप्रमाणेंच राजा नसून राजाप्रमाणें केलेला हा तुझा सत्कार आहे. आज युधिष्ठिर व भीष्म यांची परीक्षा झाली; व तूं कसा आहेस हेंही कळून चुकलें. हें सर्व जसें असावें तसेंच आहे.' असें ह्मणून राजांसहवर्तमान शिशुपाल यज्ञमंडपांतून बाहेर पडला. युधिष्ठिर झटकन् त्याच्या मागून जाऊन त्याचें शांतवन करून ह्मणाला, 'राजा, असें भाषण करणें तुला उचित नाहीं. हा मोठा अधर्म असून हें तुझें वाक्पारुष्य अनर्थकारक आहे. भीष्मांना सूक्ष्म धर्म कळत नाहीं अशी गोष्ट कशी होईल? त्यांना अशाप्रकारें धिक्कारूं नको. तुझ्यापेक्षां वृद्ध अशा अनेक राजांनीं हा कृष्णाला दिलेला मान निमुटपणें सहन केला आहे त्यांकडे तरी पहा. भीष्म जसें कृष्णाला ओळखतात तसें तूं त्याला ओळखत नाहींस.' हें ऐकून भीष्म ह्मणाले, 'धर्मा, ह्याची उगीच समजूत कशाला करतोस? कांहीं केलेंस तरी त्याची समजूत पडावयाची नाहीं. कारण सर्व लोकांना वंद्य अशा कृष्णाला दिलेला मान याला सहन झाला नाहीं! क्षत्रियानें रणामध्यें क्षत्रियाला जिंकून आपल्या ताब्यांत आणलें असतां तो त्याचा गुरु होतो. ह्या राजसमूहामध्यें असा एकही राजा मला दिसत नाहीं कीं, ज्याला कृष्णानें आपल्या तेजानें जिंकलें नाहीं. हा अच्युत केवळ आह्मांलाच पूज्य नसून तिन्ही लोकांना पूज्य आहे. सर्व जगाचा ह्याच्या हृदयामध्यें समावेश झाला आहे. मीं ज्यांची ज्यांची ह्मणून शुश्रूषा केली आहे, अशा पुष्कळ ज्ञानवृद्धांच्या तोंडून मीं कृष्णाची स्तुति ऐकली आहे. हे शिशुपाला, आह्मी केवळ स्वार्थबुद्धीनें किंवा आप्तसंबंध लक्षांत घेऊन अथवा केलेल्या उपकाराची फेड करण्यासाठीं भल्यांना मान्य व भूतसुखावह अशा ह्या जनार्दनाचा सत्कार करीत नाहीं. त्याची कीर्ति, पराक्रम, सामर्थ्य व यश ह्या गोष्टी लक्षांत आणून आह्मी त्याला मान देतों. उगीच अविचारानें तो आह्मांला मान्य वाटला नाहीं. **ब्राह्मणांमध्यें जो ज्ञानानें वृद्ध असेल तो, क्षत्रियांमध्यें जो बलानें अधिक असेल तो, व शूद्रांमध्यें जो वयोवृद्ध असेल तोच सन्मान्य होतो.** कृष्णाच्या ठिकाणीं मान देण्याला ज्ञान व बल हीं दोन्ही कारणें दिसून येत आहेत.

दान, हुशारी, श्रुतीचें ज्ञान, शौर्य, विनय, कीर्ति, सद्बुद्धि, रूप, धैर्य, समाधानवृत्ति व संपत्ति हे सर्व गुण कृष्णामध्यें आहेत. अशा सकललोकगुरूला आम्ही मान देत आहों. तर त्याबद्दल कोणाला वाईट वाटूं नये. सर्व लोकांच्या उत्पत्तीला कारण हाच असून ही सर्व चराचर सृष्टि त्याघर अवलंबून आहे. अव्यक्त प्रकृति ह्याच्याशिवाय दुसरा कोणीही नसून हाच ह्या सर्व जगताचा सनातन कर्ता आहे. हा सर्व भूतांच्या पलीकडे आहे. बुद्धि, मन, तेज, वायु, जल, आकाश, पृथ्वी व चतुर्विध सृष्टि, ह्यांचा याच्या ठिकाणीं समावेश झाला आहे. वेदांमध्यें अग्निहोत्र, छंदांमध्यें गायत्री, मनुष्यांमध्यें राजा व जलाशयांमध्यें सागर प्रमुख आहे. नक्षत्रांचा चंद्र व तेजाचा सूर्य स्वामी आहे. पर्वतांमध्यें श्रेष्ठ मेरु आहे व पक्ष्यांमध्यें गरुड श्रेष्ठ आहे. याप्रमाणें जोंपर्यंत ह्या चराचर सृष्टीचा क्रम सुरू राहणार तोंपर्यंत सर्व लोकांचा स्वामी केशवच राहणार. शिशुपाल हा केवळ अप्रबुद्ध असल्यामुळें सर्वत्र व सर्वकाळीं असणाऱ्या कृष्णाला हा ओळखत नाहीं, ह्मणून हा याप्रमाणें बरळत आहे. सर्व आबालवृद्ध राजांमध्यें कृष्णाला तुच्छ करणारे फार थोडे सांपडतील. त्याला दिलेला हा मान शिशुपालाला जर अनुचित वाटत असेल तर ह्याबद्दल वाटेल तसें करण्याला त्याला मुभा आहे.' असें ह्मणून भीष्म गप्प बसले. नंतर सहदेव म्हणाला 'केशी दानवाला मारणाऱ्या ह्या अप्रमेय विक्रमशाली कृष्णाला आम्हीं दिलेला हा मान ज्यांना सहन होत नसेल त्या सर्वांच्या डोक्यांवर मी हा पाय देतों. खचित त्या सर्वांना मी यमसदनाला पाठवीन.' असें ह्मणून सहदेवानें पाय वर उचलला. त्याचा तो आवेश पाहून त्या मानी व बलशाली राजांमध्यें कोणीही एक चकार शब्द काढला नाहीं. त्या वेळीं भूतभविष्य जाणणारे व सर्व संशय दूर करणारे नारद ह्मणाले, 'कृष्णाला टाकून बोलून जे त्याला भजत नाहींत ते जिवंत असून मेल्यासारखे समजले पाहिजेत.' नंतर सहदेवानें सर्वांचा यथाक्रमानें सत्कार करून तो विधि शेवटास नेला. तेव्हां शिशुपाल डोळे लाल करून रागानें राजांना म्हणाला, 'मी हा तुमचा सेनापति तयार उभा आहें. वृष्णि व पांडव ह्यांबरोबर युद्ध करण्याला आपणाला तयार झालें पाहिजे.' असें सर्वांना प्रोत्साहन देऊन तो यज्ञामध्यें विघ्न आणण्याचा विचार करूं लागला. त्या ठिकाणीं बोलावलेले सर्व राजे रागानें लाल झालेले दिसत होते. आणि युधिष्ठिराला होणारा अभिषेक व कृष्णाची अर्हणा यांना विघ्न आणण्याचा त्यांचा निश्चय ठरल्यासारखा दिसूं लागला. त्यांचे आप्त त्यांना ह्या अनुचित कृत्यापासून वारीत असतां आमिषापासून हुसकून दिलेल्या गरजणाऱ्या सिंहाप्रमाणें त्यांचें रूप उग्र व भयंकर दिसूं लागलें. तो राजसमूह युद्धाचा विचार करीत आहे हें कृष्णाच्या लक्षांत येऊन चुकलें. त्या खवळलेल्या राजमंडळापासून यज्ञाला विघ्न होऊं नये व प्रजेचें हित व्हावें ह्मणून त्या ठिकाणीं काय उपाय करावा याबद्दल युधिष्ठिरानें वृद्ध व मतिमतांमध्यें श्रेष्ठ अशा भीष्मांना सल्ला विचारला. भीष्म त्याला धीर देऊन ह्मणाले, 'कुत्र्यांच्या हातून सिंहाचें कांहीं वांकडें होणार नाहीं. ह्या प्रसंगीं जो योग्य व कल्याणप्रद मार्ग होता तो मीं पूर्वीच पतकरला आहे. सिंह जोंपर्यंत निद्रिस्थ आहे तोंपर्यंत कुत्रे भुंकतील. निजलेल्या सिंहासारखा अच्युत जोंपर्यंत जागा होत नाहीं तोंपर्यंतच ह्या चेदीराजाची गर्जना चालूं राहणार. ह्या शिशुपालामध्यें असलेलें आपलें तेज अधोक्षजाच्या मनांतून काढून घेण्याचें आज खचित आलें आहे. ह्मणूनच त्यानें त्याच्या बुद्धीला अशा प्रकारें मोह पाडला आहे. तिन्ही लोकांमध्यें पंचमहाभूतांचा उत्पादक व नाश करणारा माधवच आहे.' हें भीष्मांचें भाषण ऐकून निष्ठुर शब्दांनीं निर्भर्त्सना करून शिशुपाल भीष्माला ह्मणाला, 'अरे कुलकलंकया थेरड्या, तुझे केस पिकले असून तुला अशा ह्या भेवडावण्याच्या भाषणांनीं सर्व राजांना बागुलबुवा दाखविण्याला लाज कशी वाटत नाहीं? तृतीयप्रकृतीमध्यें राहणाऱ्या त्वां हें धर्मविरुद्ध भाषण करावें हें युक्तच आहे.' तुझ्यासारखा नेता मिळाल्यानें नावेला बांधलेल्या नावेप्रमाणें किंवा आंधळ्याच्या मागून जाणाऱ्या आंधळ्याप्रमाणें ह्या कौरवांची स्थिति झाली आहे. याच्या पूर्वकृत्यांचें वर्णन करून त्यांची आठवण दिल्यामुळें आमचें मन तूं अधिकच खवळून सोडलें आहेस. गर्विष्ठ व

मूर्ख अशा तुझ्या जिभेचे कृष्णाची स्तुति करतांना शेंकडों तुकडे कां झाले नाहींत? ज्याची पोरांशिवाय इतर लोक खात्रीनें निंदा करतील अशा ह्या गवळ्याच्या पोराची तूं ज्ञानवृद्ध असून स्तुति करीत आहेस. ह्यानें बाल्यावस्थेंत शकुनि, अश्व व वृषभ हे राक्षस मारले; चेतनाशून्य असा काष्ठशकट लाथेनें पाडला; वारुळासारखा अचल गोवर्धन सात दिवसपर्यंत डोक्यावर धरला, पर्वतावर खेळत असतांना पुष्कळ अन्न गट्ट केलें; व ज्याचें अन्न खाल्लें त्या कंसाला ठार मारलें; ह्या सर्व गोष्टींत ह्याचें अलौकिकत्व मला कांहींच दिसून येत नाहीं. **स्त्रीवर, गाईवर, ब्राह्मणावर, ज्याचें अन्न खावें त्यावर, व ज्याचा आश्रय केला त्यावर शस्त्र धरूं नये असें सज्जन सज्जनाला पढवितात.** तुझ्या ठिकाणीं ह्या सर्वांचा कांहींच परिणाम झालेला दिसत नाहीं. केशव ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध आहे असें तूं मला सांगत आहेस, जणूं काय मला कांहीं ठाऊकच नाहीं. गोहत्या करणारा, व स्त्रीहत्या करणारा, जर तुझ्या सांगण्यावरून पूजार्ह समजावयाचा तर तुझें हें नीतितत्त्व अजबच असलें पाहिजे. अशा प्रकारचा मनुष्य स्तुतीला कसा पात्र होतो हेंच मला कळत नाहीं. 'हा शहाण्यांमध्यें श्रेष्ठ आहे, हा जगताचा प्रभु आहे,' असें तूं याला चढबून देतोस व हाही तें सर्व खरें समजतो. परंतु ह्यांत मला सत्यता मुळींच दिसत नाहीं. एखाद्यानें किती जरी पोकळ ब्रह्मज्ञान सांगितलें तरी सांगणारावर त्याचा कांहीं परिणाम घडत नाहीं. दुसऱ्यांना साहस करूं नये ह्मणून उपदेश करून स्वतः सिंहाच्या तोंडांतील मांस खाणाऱ्या भूलिंग पक्ष्याप्रमाणें प्राणी आपापल्या जातीवर जायचेच. खचित तुझा स्वभाव नीच आहे व ज्या पांडवांचा मार्गदर्शक तूं असल्यामुळें कृष्ण त्यांना पूज्य वाटूं लागला आहे, त्याच्याही बुद्धीला भ्रंश होत चालला आहे. तुला धर्म कांहीं माहीत नसून वृथा तूं आपल्याला धर्मज्ञ ह्मणवून घेत आहेस. शहाण्यांनीं घालून दिलेल्या मार्गापासून तूं भ्रष्ट होत चालला आहेस. आपणाला धर्मज्ञ समजणारा कोणता पुरुष धर्मज्ञतेची शेखी मिरविणाऱ्या तुझ्याप्रमाणें कृत्य करण्याला तयार होईल? तुला धर्म कळत असून तुझ्या अंगीं शहाणपणा असता तर दुसऱ्याला वरण्याची इच्छा करणाऱ्या धर्मज्ञ अंबानामक कुमारिकेचें तूं हरण कां केलें असतेंस? सन्मार्गानें जाणाऱ्या तुझ्या भावानें तिची मोठीशी अपेक्षा ठेवली नव्हती. तसेंच तूं आपल्याला इतका शहाणा समजत असून तुझ्या भावाच्या बायकोचे ठिकाणीं कांहीं तरी मिषानें दुसऱ्यापासून प्रजोत्पादन करविलेंस! तुझा कसला धर्म आहे परमेश्वराला ठाऊक! हें ब्रह्मचर्य तूं फुकट पंढत्वामुळें पाळीत असला पाहिजेस. तूं जो हा धर्माचा डौल मिरवीत आहेस त्याचें फल मला कोठें दिसत नाहीं. यज्ञ, दान, अध्ययन, व अनेक व्रतोपवास हीं सर्व अपत्याच्या षोडशांशा इतकीं देखील फलप्रद नाहींत, असें असून अनपत्य असा तूं पोकळ धर्माचा मोठा आव घालणारा हंसाप्रमाणें ज्ञातीकडून मात्र मारला जाशील. ती गोष्ट तर कशी मजेदार आहे ऐक.

पूर्वी सागरतीरीं आपल्याला धर्मज्ञ ह्मणविणारा कोणी एक ह्मातारा हंस पक्ष्यांना 'धर्माचरण करा, अधर्मानें वागूं नका,' असा उपदेश करीत असे. त्याचा तो उपदेश ऐकून सर्व समुद्रचर पक्षी त्याला खावयाला आणून देत व आपलीं अंडीं त्याच्याजवळ जतन करण्यास ठेवून समुद्रामध्यें शिरत. इकडे हंस त्या सर्वांचीं तीं अंडीं न चुकतां खाऊन टाकीत असे. एका पक्ष्याला ह्या त्याच्या पापकर्माचा संशय येऊन आपली प्रत्यक्ष खातरी करून घेऊन त्यानें तें इतर पक्ष्यांना कळविलें व त्या सर्व पक्ष्यांनीं मिळून त्या मिथ्याचार हंसाला ठार मारलें

आतां जरासंधाला मारण्यांत कृष्णानें जें कृत्य केलें तें तरी चांगलें असें कोण समजेल? त्या वेळीं जरासंधानें अन्न पुढें करून खाण्याला सांगितलें असतां कृष्णानें तें नाकारलें. ह्या मूर्खाच्या ह्मणण्याप्रमाणें जर हा जगाचा कर्ता असेल तर तो ब्राह्मण कां बरें होत नाहीं. ह्या थोर पांडवांना देखील तूं सन्मार्गापासून भ्रष्ट केल्यामुळें त्यांनाही हें तुझें ह्मणणें खरें वाटत आहे, हें मोठें आश्चर्य आहे. अथवा ह्यांत आश्चर्य तरी कसलें? कारण त्यांना मार्ग दाखवून देणार तूंच अहेस कीं नाहींस? हें त्याचें निष्ठुर भाषण ऐकून तीन शिखरांपासून

तीन प्रवाहांनीं वहात येणाऱ्या गंगेप्रमाणें कपाळाला तीन आंठ्या घालून दांतओठ खात भीम त्यावर तुटून पडणार होता, इतक्यांत भीष्मांनीं त्याला धरून समाधानीच्या शब्दांनीं त्याचा राग शांत केला. व वर्षाकालीं तुफान फुगला असतांही महोदधि ज्याप्रमाणें आपली मर्यादा सोडीत नाहीं त्याप्रमाणें भीमानेंही तें भीष्मवाक्य मोडलें नाहीं. शिशुपालाला तो केवळ मृगाप्रमाणें वाटून तो भीष्मांना ह्मणाला, 'अरे, सोडव ह्याला. अग्नीमध्यें पडणाऱ्या पतंगाप्रमाणें माझ्या तेजानें ह्याची कशी राखरांगोळी उडून जाईल पहा.' हें त्याचें उद्धटपणाचें भाषण ऐकून भीष्मांनीं त्याची जन्मकथा भीमाला सांगून त्याला थांबविलें. ते ह्मणाले, 'चेदिराज कुलामध्यें त्रिनेत्र व चतुर्भुज असा हा जन्मला. जन्मल्याबरोबर गाढवाप्रमाणें यानें शब्द केला. त्यामुळें घाबरून जाऊन आईबापांचा याला टाकून देण्याचा विचार ठरला. इतक्यांत अशी आकाशवाणी झाली कीं, 'राजा, ह्या तुझ्या बलाढ्य व श्रीमान मुलापासून तुला भिण्याचें कारण नाहीं. ह्याच्या मरणाची वेळ अद्यापि आली नाहीं. ह्याला मारणारा उत्पन्न झाला आहे.' हें ऐकून 'ह्याला मारणारा कोण,' ह्मणून पुत्रस्नेहानें सचिंत झालेल्या मातेनें विचारलें. तेव्हां फिरून आकाशवाणी झाली कीं, 'ज्याच्या मांडीवर ह्याला ठेवला असतां ह्याचे फाजील बाहु गळून पडून याच्या कपाळावर असलेला तिसरा डोळा आंतल्या आंत जिरून जाईल तो ह्याला मारील.' नंतर त्या ठिकाणीं ह्या मुलाचें विद्रुप रूप पाहण्यासाठीं आलेल्या सहस्रावधि राजांच्या मांडीवर त्याला ठेविलें तरी आकाशवाणीचा दाखला आला नाहीं. त्या ठिकाणीं आतेला भेटण्यासाठीं गेलेल्या कृष्णाच्या मांडीवर ठेवल्याबरोबर याचे दोन बाहु गळून पडले; तसाच तिसरा डोळा आंतल्याआंत जिरला. यामुळें घाबरून जाऊन आर्तांना धीर देणाऱ्या व भीतांना अभय देणाऱ्या कृष्णाजवळ तिनें वर मागितला. कृष्ण ह्मणाला, 'भिऊं नकोस. माझ्यापासून तुझ्या मुलाला कांहीं भीति नाहीं. तूं सांगशील तें करण्याला मी तयार आहें.' हें त्याचें भाषण ऐकून 'माझ्या मुलाचे अपराध पोटांत घाल,' ह्मणून तिनें वर मागितला. 'मी याचे शंभर घोर अपराध पोटांत घालीन, तूं चिंता करूं नकोस,' असें कृष्णानें तिला अभय दिलें.

असें सांगून भीष्म ह्मणाले, 'ह्या प्रकारें गोविंदाच्या वरानें उन्मत्त होऊन तो तुला युद्धाला बोलावीत आहे. खचित जिच्या योगानें हा अच्युताला धमकी देत आहे ती त्याची स्वतःची बुद्धि नव्हे. खात्रीनें जगताचें भरण करणाऱ्या कृष्णाचाच हा संकेत आहे. नाहीं तर कृष्णाला तुच्छ करून कोण कालाला निमंत्रण देईल? ह्याचे ठिकाणीं असलेला आपल्या तेजाचा अंश हरण करून घेण्याचें श्रीकृष्णाच्याच मनांत आज खास आलें आहे यांत संशय नाहीं. यामुळेंच ह्याची अशी गर्जना चालली आहे.' हें भीष्मवाक्य सहन न होऊन खवळून जाऊन शिशुपालानें त्याला उत्तर दिलें, 'ज्या कृष्णाचा भाटाप्रमाणें स्तुतिपाठ गाण्याचा तूं मक्ता उचलला आहेस त्या केशवाच्या ह्या वैभवाचा वैऱ्यालाच लखलाभ होवो. तुझ्या मनानें दुसऱ्याचा स्तुतिपाठ गाण्याचेंच जर घेतलें आहे तर द्रोण, अश्वत्थामा इत्यादि वीरश्रेष्ठ, त्याचप्रमाणें कर्ण, दुर्योधन, शल्य इत्यादि राजेंद्र यांचा स्तुतिपाठ तूं कां गात नाहींस? आत्मनिंदा किंवा आत्मस्तुति, त्याचप्रमाणें परनिंदा किंवा परस्तुति भले लोक करीत नाहींत, असें आमच्या ऐकण्यांत आहे. तूं तर स्तुतीला अपात्र अशा ह्या कृष्णाची हेतुपूर्वक अनेकवार मोठ्या भक्तीनें स्तुति करीत आहेस व ह्या दुरात्म्याच्या ठिकाणीं सर्व जगाचा समावेश करून सोडीत आहेस. ही तुझी बुद्धि भूलिंगपक्ष्याप्रमाणें विरुद्धार्थदर्शक असली पाहिजे. हिमाचलाच्या पलीकडल्या बाजूला भूलिंगनांवाचा पक्षी रहात असे. तो स्वतः सिंहाच्या तोंडांतून त्याच्या दांतांत अडकलेलें मांस काढून खात असून साहस करूं नका ह्मणून तोंडानें दुसऱ्याला उपदेश करीत असे. त्याचें जीवित ज्याप्रमाणें सिंहाच्या इच्छेवर अवलंबून होतें त्याप्रमाणेंच लोकांना पीडा देऊं नये अशी जोंपर्यंत भूमिपालांची इच्छा आहे तोंपर्यंतच तूं जिवंत राहणार आहेस.' हें त्याचें निष्ठुर भाषण ऐकून भीष्म ह्मणाले, 'माझें जीवित ह्याच्या इच्छेवर अवलंबून बिलकुल नाहीं. मी ह्यांना कस्पटाप्रमाणें मानतों.' हें त्यांचें भाषण ऐकून कांहीं राजांना बरें वाटलें. कांहींना

संताप येऊन त्यांनीं त्यांची निंदा केली. कांहीं ह्मणाले, 'ह्या दुष्टाला मोठा गर्व झाला आहे. हा आतां क्षमेला पात्र नाहीं. पशूप्रमाणें ह्याला मारून गंजीवर जाळून टाका. भीष्म ह्मणाले, 'उत्तर प्रत्युत्तर करीत बसलें तर त्याचा शेवट कधींच व्हावयाचा नाहीं. मी ह्मणतों एवढें ऐका. तुमची छाती असेल तर मला पशूप्रमाणें मारा, व गंजीवर जाळून टाका. हा मीं तुमच्या डोक्यावर पाय दिला आहे पहा. आम्हीं कृष्णाला मान तर दिला आहे. ज्याचा काळ ओढवला असेल त्यानें त्याच्याबरोबर युद्ध करून त्याच्या हातून मरून त्याच्या देहांत शिरण्याला तयार व्हावें.' हें ऐकून शिशुपालानें उत्तर केलें, ' मी तुला युद्धाला बोलावीत आहें. माझ्याबरोबर युद्धाला तयार हो. तूं गुलाम असून, तुला राज्य नाहीं. असें असून ह्या पांडवांनीं स्वार्थबुद्धीनें तुला प्रथम सन्मान दिल्याबद्दल त्यांनाही तुझ्याचबरोबर यमसदनाला पाठवितों.' श्रीकृष्ण ह्मणाला, ' हा आमचा सात्वतांचा हाडवैरी आहे. पूर्वी ऐके वेळीं आम्ही प्राग्ज्योतिषाला गेलों होतों तेव्हां ती पाळद ठेवून हा आमचा आतेभाऊ असूनही दुष्टाप्रमाणें ह्यानें द्वारका जाळून टाकली. रैवतक पर्वतावर भोजराज क्रीडा करीत असतां त्याचे सर्व आप्त व सैनिक ह्यांना ठार मारून हा आपल्या नगराला परत गेला. अश्वमेधाच्या वेळीं पुष्कळ रक्षण करणारे वीर बरोबर देऊन माझ्या पित्यानें सोडलेला यज्ञिय अश्व यानें यज्ञामध्यें विघ्न करण्याच्या उद्देशानें अडविला. तपस्वी बभ्रूच्या बायकोला, सौवीरापासून ती परत येत असतां तिच्या मनाविरुद्ध यानें हरण केली. मायेनें कारुषाधिपाचा वेष धरून आपला मामा जो विशालदेशचा राजा त्याच्या भद्रानांवाच्या बिचाऱ्या मुलीवर यानें जुलूम केला. ह्यापकारें ह्याचे अनेक अपराध मीं आपल्या आतेकरितां आजपर्यंत सहन केले आहेत. सुदैवानें आज सर्व राजांच्या समक्ष यानें माझा हा अपमान केला आहे. ह्यानें रुक्मिणीवरही डोळा ठेविला होता. परंतु शूद्राच्या जसे वेद हातीं येत नाहींत तशी ती या अधमाला मिळाली नाहीं.' हें भाषण ऐकून शिशुपाल हासून ह्मणाला, ' माझी ह्मणून ठरलेल्या रुक्मिणीसंबंधानें राजमंडळामध्यें अशा प्रकारें बडबड करण्याला तुला शरम कशी वाटत नाहीं. दुसऱ्याची ह्मणून ठरलेली स्त्री चोराप्रमाणें हरण करून त्याची भल्या लोकांपुढें फुशारकी तुझ्याशिवाय दुसरा कोण मारील ? तूं मला क्षमा कर किंवा न कर. तूं रागावलास किंवा मोठा प्रसन्न झालास तरी त्या दोन्हींपासून माझें बरें वाईट कांहींच होणार नाहीं.' हें त्याचें भाषण ऐकून कृष्ण हातांत चक्र घेऊन ह्मणाला, ' राजांनो, तुम्ही ऐका. त्याच्याच आईच्या सांगण्यावरून ह्याचे मीं शंभर अपराध पोटांत घातले. आज तुमच्या समक्ष ह्याला मी या जगांतून नाहींसा करतों.' असें ह्मणून चक्रानें त्यानें शिशुपालाचें डोकें उडविलें. त्यावेळीं त्याच्या देहांतून तेज बाहेर पडून तें कृष्णाला नमस्कार करून त्याच्या देहामध्यें शिरलें. कृष्णानें शिशुपालाला मारलें तेव्हां ढग वगैरे कांहीं नसून आकाशांतून मोठा पाऊस पडला व पृथ्वी डळमळूं लागली. सर्व राजे गप्प झाले. कांहीं संतापून जाऊन हात चोळीत दांतओंठ खात होते. ह्याप्रमाणें युधिष्ठिराचा यज्ञ श्रीकृष्णाच्या साह्यानें निर्विघ्नपणें शेवटास गेला. ब्राह्मण व राजे युधिष्ठिराला आशीर्वाद देऊन व त्याचें अभिनंदन करून त्याचा सत्कार घेऊन आपापल्या देशाला निघून गेले. कृष्णही पांडवांचा निरोप घेऊन द्रौपदी व सुभद्रा ह्यांना विचारून द्वारकेला गेला.

---

५५ राजसूययज्ञ पाहून दुर्योधनाचा संताप व त्याचे कपट बेत. (२. ४६–५७)

राजसूययज्ञ संपल्यावर शिष्यांसहवर्तमान निरोप घेण्यासाठीं येऊन ' दुर्लभ साम्राज्य मिळवून तूं उन्नतीला चढलास ही फार चांगली गोष्ट झाली, सर्व कौरवांना तूं आपल्याबरोबर वैभवाच्या शिखराला चढविलें आहेस,' असें व्यास युधिष्ठिराला ह्मणाले. तेव्हां युधिष्ठिर अभिनंदन करून त्यांना ह्मणाला, ' मुनिश्रेष्ठ, मला एक मोठा संशय उत्पन्न झाला आहे. त्याचें आपल्याशिवाय दुसऱ्याच्या हातून निवारण होणें शक्य नाहीं. भगवान नारदांनीं दैविक, आंतरिक्ष व भौतिक असें तीन प्रकारचे अपशकुन आहेत ह्मणून सांगितले. ह्या शिशुपालाचें मरण ए-

खादा भौतिक अपशकून आहे किंवा काय ? ' व्यासांनीं उत्तर दिलें, ' राजा, तेरा वर्षेपर्यंत ह्या दुष्ट शकुनाचा मोठा भयंकर परिणाम होऊन सर्व क्षत्रियांच्या नाशाबरोबर त्याचाही अंत होईल. दुर्योधनाच्या अपराधामुळें भीमार्जुनाच्या बलानें काल तुला केवळ कारण करून सर्व क्षत्रियांना लयाला नेईल ? आज पहाटेच्या वेळीं स्वप्नामध्यें रुक्मिवास शंकर दक्षिणदिशेकडे मुख केलेले तुझ्या दृष्टीस पडतील. त्यासंबंधानें भिऊं नकोस. कालाचा हात कोणाच्यानें धरवणार नाहीं. कांहीं झालें तरी तुझें कल्याण होईल. मी कैलासाला चाललों आहे. हुशारीनें राहून पृथ्वीचें पालन कर. ' असें सांगून शिष्यांसहवर्तमान व्यास निघून गेल्यावर चिंता व शोक ह्यांनीं व्याकूळ होऊन दीर्घ उच्छ्वास टाकून व्यासवचन वरचेवर मनांत घोळवीत भवितव्यता खात्रीनें सत्य होणार, पुरुषप्रयत्नानें दैवाला मागें टाकतां येणें शक्य नाहीं असें वाटून युधिष्ठिर भावांना ह्मणाला, ' व्यास काय ह्मणाले तें तुह्मीं ऐकलेंच आहे. त्या वेळेपासून प्राणत्याग करण्याचा मीं निश्चय केला आहे. सर्व क्षत्रियांच्या नाशाला जर मला एकट्याला काल निमित्त करणार आहे तर अशा हतजीविताला मला जगून तरी काय करावयाचें आहे? ' अर्जुनानें उत्तर दिलें, ' राजन, बुद्धिविनाशक घोर विचार मनांत आणूं नका. सर्व गोष्टींचा नीट विचार करून जें उचित दिसेल तेंच करा. ' युधिष्ठिर ह्मणाला, ' तुमचें सर्वांचें कल्याण असो. आजपासून माझी ही प्रतिज्ञा ऐका. माझें जीवित व्यर्थ असल्यामुळें आजपासून तेरा वर्षं मी कोणाला लावून बोलणार नाहीं व आपल्या ज्ञातीच्या सांगण्याप्रमाणें निमूटपणें वर्तन ठेवीन. असें बागल्यानें कोणाचें मन दुखवलें जाणार नाहीं. मन दुखविणें हें भांडणाला कारण होतें. ह्यासाठीं कलह होईल तितका टाळून लोकांचें नेहमीं प्रियच करीत राहिल्यानें लोकनिंदेला मी पात्र होणार नाहीं. ' हें वडील भावाचें भाषण ऐकून त्याच्या हिताविषयीं नेहमीं दक्ष असलेले त्याचे भाऊ त्याच्या ह्मणण्याप्रमाणें वर्तन करीत राहिले.

इकडे ती अदृष्टपूर्व सभा व त्या ठिकाणचें स्वार्गिक वैभव पहात दुर्योधन शकुनीसह फिरत एका स्फटिकमय प्रदेशाकडे आला. तेथें त्याला जलाशयाचा भास होऊन त्यानें आपलीं वस्त्रें न भिजावीं ह्मणून वर केलीं व जमिनीवर आपटून तो खजील झाला. त्याचप्रमाणें एके ठिकाणीं स्फटिकाची जमीन आहे असें वाटून तीवर पाय ठेवतांच पाण्यांत पडून त्याचीं सर्व वस्त्रें भिजलीं. अशी त्याची फजिती पाहून भीम व त्याचे नोकर त्याला हासले. तें त्या तामसी दुर्योधनाला अर्थातच सहन झालें नाहीं. तथापि आपले मनोविकार झाकून ठेवून त्यानें भीमाकडे वक्र दृष्टीनें पाहिलें. त्याचप्रमाणें एके ठिकाणीं उघडें दार आहे असें समजून आंत शिरतो तों भिंतीला डोकें आपटून झीट येऊन तो खालीं पडला, व लावलेल्या दाराकडे जाऊन तें उघडण्यासाठीं त्यावर जोरानें धक्का मारीत असतां पुढें तोल जाऊन तो सपशेल जमिनीवर पडला. ह्याप्रमाणें पुष्कळ फजिती होऊन तो आपल्या नगराला परतला. पांडवांची ती अद्भुत संपत्ति पाहून त्याच्या मनांत मत्सरभाव उत्पन्न झाला व त्याच्या अंगाची तळमळ होऊन त्याच्या मनांत रात्रंदिवस तोच विचार घोळत राहिला. सर्व राजे पांडवांचे आज्ञांकित आहेत, असें पाहून त्याच्या मनांत पाप आलें. ' तुझ्या चिंतेचें कारण काय, ' ह्मणून शकुनीनें अनेकवार त्याला विचारलें; तेव्हां एकांतांत दुर्योधन त्याला ह्मणाला, ' ही सर्व पृथ्वी युधिष्ठिराच्या ताब्यांत गेली आहे ' हें व त्याचा तो भव्य यज्ञ पाहून उष्णकाळांतील डबक्याप्रमाणें संतापानें मी रात्रंदिवस सुकत चाललों आहें. पहा, त्या काळ्यानें पहातां पहातां शिशुपालाला नाहींसें केलें तरी कोणाची तेथें त्याच्या तर्फेनें ब्र काढण्याची छाती झाली नाहीं. पांडवांनीं आपल्या कृतीनें चेतविलेल्या अग्नीनें सर्व राजे मनांतल्या मनांत जळफडत होते तरी त्यांनीं निमुटपणें तें कृत्य सहन केलें. ह्या वासुदेवाच्या अनुचित कृत्यावर पांडवांच्या प्रतापामुळें झाकण पडलें. करभार देणारे राजे नानाविध रत्नें घेऊन वेश्यांप्रमाणें युधिष्ठिरापुढें हात जोडून उभे होते. पांडवांचें तें झगझगीत वैभव पाहून माझ्या अंगाचा तिळपापड उडाला आहे. मी आगींत किंवा पाण्यांत उडी घेणार. आतां जिवंत राहतां येणें शक्य नाहीं. ह्या जगांत कोणत्या पा-

णीदार पुरुषाच्या मनाची सापत्नांचें वैभव व आपली फजिती पाहून तळमळ उडणार नाहीं ? भीमाला मारण्यासाठीं पूर्वी मीं अनेक उपाय केले. पण त्यांतून तो पाण्यामध्यें जसें कमल अधिक जोमदार वाढून अधिक तेजस्वी व्हावें त्याप्रमाणें अधिक बलाढ्यच होऊन बाहेर पडला. तो प्रकार पाहून दैवच श्रेष्ठ आहे असें मला वाटूं लागलें आहे. पुरुषार्थाचा ह्या जगामध्यें कांहीं उपयोग नाहीं. ' शकुनि ह्मणाला, ' दुर्योधना, युधिष्ठिरावर रागावण्याचें तुला कारण नाहीं. पांडवांना त्यांच्या दैवाप्रमाणें सुख मिळत आहे. आपण अनेक उपाय केले तरी त्यांचें दैव त्या सर्वांना मागें सारीत आहे. ते आपल्या तेजानें उद्याला आले आहेत. ह्यांत वाईट वाटून घेण्याला मुळीं कारण नाहीं. तुला वाटतें मी एकटा आहें.' मला कोणाचें साह्य नाहीं. पण ही तुझी समजूत चुकीची आहे. द्रोण, त्यांचा पुत्र अश्वत्थामा, महारथी कर्ण, तुझे सर्व भाऊ व मी, हे आह्मी सर्व तूं ह्मणशील तें करण्याला सिद्ध आहों. आमच्या साह्यानें वाटेल तर तुला सर्व पृथ्वी जिंकतां येईल. ' दुर्योधन ह्मणाला, ' तुमचें साह्य असेल तर ह्यांनाच मी जिंकतों ह्मणजे अर्थात सर्व पृथ्वी जिंकल्याप्रमाणें झालें. ' शकुनि फिरून ह्मणाला, ' ते अस्त्रविद्येंत निष्णात असून युद्धामध्यें देवांना देखील अजिंक्य आहेत. पण युधिष्ठिराला द्यूत आवडत असून तो त्यांत कच्चा आहे. द्यूत खेळण्याला बोलाविलें असतां तो तें कधीं नाकारणार नाहीं. व द्यूतामध्यें माझ्यासारखा पटाईत ह्या त्रिभुवनांत कोणी नाहीं. तुझ्या पित्याची आज्ञा मिळेल तर द्यूतामध्यें त्यांचें राज्य व सर्व संपत्ति मी तुझ्यासाठीं त्यांपासून हरण करतों. ' दुर्योधन ह्मणाला, ' ताताला माझ्यानें ही गोष्ट सांगवणार नाहीं. तूंच जाऊन इत्थंभूत हकीकत त्यांच्या कानावर घाल. ' असें दुर्योधनाचें भाषण ऐकून शकुनीनें धृतराष्ट्राजवळ जाऊन दुर्योधन फार चिंतातुर झाल्याची हकीकत कळविली. ती ऐकून धृतराष्ट्र दुर्योधनाला ह्मणाला, ' वत्सा, तूं फार कष्टी दिसतोस याचें कारण काय ? तुझ्या तोंडावरचें पाणी उडून जाऊन अगदीं फिका पडून तूं सुकत चाललां आहेस. तुझें ऐश्वर्य मोठें आहे, तुझे भाऊ व आप्तजन हे कधीं तुझ्या इच्छेविरुद्ध जात नाहींत, उत्तम वस्त्रप्रावरणें तुला नेसायाला मिळतात, व गोड गोड मांस व अन्न तुला खावयाला मिळतें. बसावयाला उत्तम घोडे आहेत. मृदु व मौल्यवान शय्या आहे. चांगल्या बायका आहेत.तुझीं विहारस्थान मनोहर आहेत. देवाप्रमाणें तोंडांतून निघण्याचाच अवकाश कीं तुला वाटेल तें मिळतें. कोणाची तुझ्या वाटेला जाण्याची छाती नाहीं.मग हें दुःख कशासाठीं.' दुर्योधनानें उत्तर केलें, ' माझें हें सर्व वैभव एखाद्या तिरस्कार्य पुरुषाच्या वैभवासारखें आहे. मी तीव्र संतापानें जळत कसा तरी काळ काढीत आहें. मी आतां पूर्वीचा दुर्योधन उरलों नाहीं. दुसऱ्याला जो संकटांतून सोडवितो तोच खरा पुरुष. संतोष, दुःख व भीति हीं संपत्ति व अभिमान ह्यांना घातक आहेत. मनुष्य ह्यांच्या तावडींत सांपडला ह्मणजे तो कधीं वैभवाला चढावयाचा नाहीं. मला तोंड खालीं करायला लावणारी युधिष्ठिराची झगझगीत संपत्ति पाहून माझें वैभव मला संतोष देत नाहीं. ऐशी हजार स्नातक त्याच्या घरीं असून प्रत्येकाच्या सेवेला तीस तीस दासी आहेत. शिवाय आणखी दहा हजार ब्राह्मण त्या ठिकाणीं सोन्याच्या ताटांत नित्यें उत्तम अन्न खात राहिले आहेत. कंबोज देशाच्या राजानें काळीं, निळीं व तांबडीं हरणाचीं कातडीं व मौल्यवान कांबळीं त्याला नजर पाठविलीं आहेत. हजारों हत्ती, घोडे, सांडणी व नानाविध रत्नें घेऊन अनेक राजे त्या ठिकाणीं दासाप्रमाणें त्याच्या पुढें उभे असतात. त्या ठिकाणीं पाहिलेल्या संपत्ती एवढी संपत्ती आजपर्यंत कोठें माझ्या पाहण्यांत आली नाहीं. वारंवार हा विचार माझ्या मनांत घोळत असल्यानें माझ्या मनाला चैन नाहीं. त्यानें तोडून दिलेल्या भूमीवर हजारों गाई बाळगून सुखानें राहिलेले ब्राह्मण तीन खर्व गाई व सोन्याचे कमंडलु घेऊन दारापर्यंत आले असून प्रवेश न मिळाल्यामुळें दारांतच उभे होते. देवस्त्रिया ज्याप्रमाणें इंद्रावर सुवर्णकलशांतून अभिषेक करतात त्याप्रमाणें लावण्यवती युवतींनीं चार समुद्रांतून भरून आणलेले सुवर्णकलश त्याच्यावर धरले होते, व वासुदेवानें आपल्या श्रेष्ठ शंखांतून त्याच्या मस्तकावर धार धरली होती. ज्या ठिकाणीं पक्ष्यांशिवाय

कोणाची गति नाहीं त्या उत्तर दिशेला जाऊन पार्थानें अपरिमित संपत्ति मिळवून आणिली. त्या ठिकाणीं जेवणाऱ्या ब्राह्मणांची एक लक्ष संख्या झाली असतां खूण म्हणून वाजविला जाणाऱ्या शंखाचा नाद तर सतत माझ्या कानीं गुंगून राहून माझ्या अंगावर रोमांच उभे करीत होता. पहाण्यासाठीं आलेल्या अनेक राजांनीं भरलेल्या त्या सभामंडपाला नक्षत्रसंपन्न अशा स्वच्छ आकाशाची शोभा आली होती. यम, वरुण, इंद्र व कुबेर यांच्या संपत्तीला मागें सारणारी ती संपत्ति पाहून माझ्या मनामध्यें वणवा ठेवून राहिल्यामुळें त्याला शांति कशी ती नाहीं. ह्या फाशांमध्यें निपुण शकुनीला द्यूतामध्यें त्याची ती अगणित संपत्ति हरण करण्याची उमेद आहे. आपल्या आज्ञेचीच तो वाट पहात आहे.' धृतराष्ट्र म्हणाला 'मोठा प्राज्ञ मंत्री जो विदुर त्याच्या मी आज्ञेंत आहें. त्याची गांठ घेऊन काय करावयाचें तें ठरवीन. तो दूरदर्शी असून न्यायानें तुह्मां दोघांचें ज्यांत हित असेल अशाच प्रकारचा सल्ला देईल.' दुर्योधन म्हणाला, 'जर विदुर इकडे येईल तर पांडवांच्या हिताकडे त्याचें लक्ष असल्यामुळें तुमचें मन खचित तो ह्या गोष्टीपासून फिरवील, व तसें झालें म्हणजे मी कांहीं आपले प्राण ठेवणार नाहीं. माझ्यामागें खुशाल आपण सर्व पृथ्वीचा उपभोग घेत रहा. माझ्यापासून आपल्याला काय फायदा आहे.' हें त्याचें निकराचें भाषण ऐकून द्यूतामधील दोष दिसत असून देखील पुत्रस्नेहामुळें दुर्योधनाच्या म्हणण्याला रुकार देण्याचा धृतराष्ट्राचा विचार ठरला. त्यानें विदुरांकडे दूत पाठविला. कारण त्यांला विचारल्याशिवाय कोणतीही गोष्ट तो करीत नसे. शहाणे विदुरही बिनाशाला कारण असें भांडणाचें मूळ उखलें आहे असें कळल्याबरोबर एकदम राजाकडे येऊन त्याच्या पायांवर डोकें ठेवून म्हणाले, 'राजा हें तुझें कृत्य मला पसंत नाहीं. द्यूतामुळें कुलांमध्यें फूट होणार नाहीं अशी कांहीं तरी तजवीज कर,' विदुरांच्या पोक्त विचारासंबंधानें धृतराष्ट्राची पूर्ण खात्री असल्यामुळें तो दुर्योधनाला फिरून एकांतांत गांठून म्हणाला, 'दुर्योधना, द्यूताचा विचार सोडून दे. विदुराला ही गोष्ट पसंत नाहीं. तो मोठा बुद्धिमान आहे. आमच्यां अहिताची गोष्ट तो आह्मांला कधींच सांगणार नाहीं. त्याचें म्हणणें मोठें हितकर आहे असें मला वाटतें. तो म्हणतो त्याप्रमाणें कर. बृहस्पतीनी इंद्राला जी नीति सांगितली ती सर्व ह्याला अवगत आहे; म्हणून बाळा, द्यूताचा विचार बाजूला ठेव. **द्यूतामुळें तुह्मांमध्यें फूट पडण्याचा संभव आहे. व फुटीच्या योगानें राज्याला धक्का बसेल.** वडिलांनीं मुलांसाठीं जें करणें शक्य आहे, तें सर्व आम्हीं तुझ्यासाठीं केलें आहे. वडिलोपार्जित ही गादी तुला मिळवून दिली आहे. सर्व शास्त्रांमध्यें तुला निष्णात केलें आहे. तूं नशीबवान आहेस. घरीं तुझ्या तोंडची थुंकी सर्व झेलतात. सामान्य लोकांना मिळण्याला कठीण असें अन्नवस्त्र तुला मिळत आहे. मग हा वृथा संताप कशाला ?' दुर्योधन म्हणाला, 'मला अन्नवस्त्र मिळतें हा विचार मनांत आणून जो नराधम समाधान मानून राहतो तो अगदीं नीच समजला पाहिजे. माझ्या एवढी किंबहुना माझ्याहून अधिक सापत्नसंपत्ति पाहून माझ्या जिवाला कसें बरें बरें वाटेल ? हरिश्चंद्रासारखें त्यांचें तें वैभव पाहून माझें जीवित धन्य आहे असें आपल्याला कसें बरें वाटतें ? आंधळ्यानें बांधलेलें जूं खात्रीनें कधीं तरी सुटणार. धाकटे भाऊ भरभराटीला चढत चालले आहेत व वडील भावाचा ऱ्हास होत चालला आहे !' धृतराष्ट्रानें उत्तर केलें, 'तूं वडील बायकोपासून झालेला वडील मुलगा आहेस खरा; पण पांडवांचा वृथा द्वेष करूं नकोस. **ज्याचा मत्सरी स्वभाव आहे त्याला कधीं सुख न होतां विनाकारण त्रास मात्र होऊन शेवटीं त्याचा सपशेल नाश होतो.** ज्याला कपट म्हणून माहीत नाहीं, ज्याची संपत्ती तुझ्या एवढीच आहे, त्याचे व तुझे मित्र एकच आहेत, अशा सर्वांशीं गोडीनें वागणाऱ्या युधिष्ठिराचा तुझ्या सारख्यांनीं द्वेष करावा ही मोठी लांछनास्पद गोष्ट आहे. त्याचें व तुझें कुल व सामर्थ्य सारखीं असून वृथा मूर्खपणानें तूं त्याच्या संपत्तीचा अभिलाष करीत आहेस. असें करूं नकोस. शांत हो. विनाकारण मनाला संताप करून घेऊं नकोस. आतां तें यज्ञवैभव जर तुला पाहिजे असेल तर क-

त्विज तुझ्यासाठीं सप्ततंतु नामक महायज्ञ करतील व त्यामध्यें राजे लोक प्रेमानें व बहुमानपूर्वक बुला पुष्कळ संपत्ति करभाररूपानें आणून देतील. **दुसऱ्याच्या द्रव्यावर डोळा ठेवणें हें थोराचें काम नाहीं. आपल्या जवळ आहे तेवढ्यामध्यें संतुष्ट राहून जो स्वधर्मानें राहतो त्याला सुख मिळतें. दुसऱ्याच्या भानगडींत न पडतां आपल्या कामामध्यें दक्ष राहून स्वार्जित वित्ताचें रक्षण करणें हेंच वैभवाचें लक्षण आहे.** विपत्तीमध्यें न डगमगतां हुषारीनें राहून नेहमीं जो आपल्या उद्योगामध्यें दक्ष असतो व नम्रतेनें राहून हालगेजीपणा ज्याच्या हातून घडत नाहीं, तोच सुखाचा वांटेकरी होतो. तुझ्या भावांचा त्या संपत्तीसाठीं मित्रद्रोह करूं नकोस. **मित्रद्रोहापासून अनेक मोठे अनर्थ ओढवतात.**' दुर्योधन ह्मणाला, 'ज्याला स्वतःला अकल नसून जो केवळ बहुश्रुत आहे त्याला पळीमधील पाकरसाची गोडी जशी त्या पळीला कळत नाहीं, त्याप्रमाणें शास्त्राचें खरें तत्त्व मुळींच समजत नाहीं. नावेला जखडलेल्या नावेप्रमाणें, आपण पारतंत्र्यामुळें कळत असूनही उगीच मोहामध्यें पडलों आहों व आह्मांलाही त्यांत टाकीत आहों. यावरून पार्थाकडे आपलें विशेष लक्ष असलें पाहिजे हें उघड आहे. आपण खचित माझा द्वेष करीत असलां पाहिजे. ह्या धार्तराष्ट्रांना आपल्या सारखे उपदेष्टे मिळाल्यावर त्यांचा नाश होण्याला वेळ मुळीं लागणार नाहीं. जें आतां केलें पाहिजे तें पुढें कालांतरानें आपोआप घडून येईल असें आपलें नेहमीं ह्मणणें असतें. **ज्यांचा पुढारी परप्रकाश असतो तो स्वतः भलत्या मार्गाला लागून आपल्या अनुयायांनाही आपल्या बरोबर खड्ड्यांत पाडतो;** ह्मणून त्यांनीं त्याच्या मागून कसें जावें? वृद्धांच्या शुश्रूषेमुळें आपण अनुभवशीर झालों असून आह्मीं आपलें कर्तव्य करण्याला निघालों असतां आह्मांला उगीच असें मोहांत कां पाडतां? **लोकवृत्ताहून राजवृत्त अगदीं निराळें आहे,** असें प्रत्यक्ष बृहस्पतीचें ह्मणणें आहे. म्हणून राजानें नेहमीं दक्षतेनें स्वार्थाचा विचार करावा. जय संपादन करणें हेंच क्षत्रियांचें पहिलें कर्तव्य आहे. मग तो धर्मानें होवो वा अधर्मानें होवो. मग स्ववृत्तिसंबंधानें विचार तो कसला करावयाचा? सारथी ज्याप्रमाणें चाबकानें घोड्यांना जेरीला आणतो त्याप्रमाणें शत्रूची दैदीप्यमान संपत्ति हरण करूं इच्छिणाऱ्यानें दशदिशा आपल्या ताब्यांत आणून सोडल्या पाहिजेत. गूढ किंवा उघड ज्या कोंहीं उपायाची शत्रूवर मात्रा चालते तोच उपाय शास्त्रज्ञांचें शस्त्र होय. शत्रूला कापून काढणाऱ्या शस्त्रालाच शस्त्र ही संज्ञा नाहीं; शत्रू व मित्र ह्यांच्या संबंधानें गुणावगुण किंवा लहानथोरपणा मनांत आणतां कामा नये. कोणी कोणाचा जात्या शत्रु नसतो. **ज्या दोघांची समान वृत्ति असून जो ज्याला ताप देतो तोच त्याचा शत्रु समजला जातो. असंतोष हाच संतापाचें मूळ आहे.** अभ्युदयासाठीं जो झटतो तोच मोठा नीतिमान समजला पाहिजे. पूर्वसंचित दुसऱ्याकडून हरण होण्याची भीति आहे. इंद्रानें द्रोह करावयाचा नाहीं असा पूर्वसंकेत कधीं नमुचीचें डोकें उडविलें व ही त्याची रिपूला तापदायक वृत्ति शहाण्यांना पसंत पडली. **द्रोह न करणारा राजा व भवास न करणारा ब्राह्मण ह्या दोघांना बिळांत राहून झोंप घेणाऱ्या प्राण्यांना ज्याप्रमाणें सर्प गिळून टाकतो तद्वत भूमि गिळून टाकते.** शत्रुपक्षाची भरभराट होत असतांना जो मूर्खपणानें तिकडे दुर्लक्ष करतो, त्याचीं पाळेंमुळें तो शत्रु जतन केलेल्या रोगाप्रमाणें खणून काढतो. शत्रु फार लहान असूनही आपल्या पराक्रमानें वाढूं लागला असतां झाडाच्या मुळाशीं वाढणाऱ्या वारुळाप्रमाणें तो आपल्या प्रतिपक्षाला गिळून टाकतो. **ज्यांना अभिमान आहे अशा पुरुषांच्या मस्तकार शत्रूच्या लक्ष्मीरूप माराचें ओझें नेहमीं असतें.** आपल्या वाढीबरोबर जो संपत्तीची वाढ करण्याला झटतो त्यालाच ज्ञातीमध्यें मान मिळतो, व पराक्रम हेंच वृद्धीला साधन आहे. मी पांडवांची संपत्ति हरण तरी करीन किंवा युद्धांत त्यांच्या हातून मरून तरी भूतलावर पडेन. ह्या शकुनीला फांशांनीं पांडवांना जिंकण्याची उमेद आहे. ज्याला पण हा धनुष्याप्रमाणें असून फांसे हे बाणांच्या जागीं आहेत व त्यांचें ज्ञान हें त्याला रथाच्या ठिकाणीं आहे. नेहमीं

मीं पांडवांचें हित करण्याला टपलेला हा विदुर आपल्या बुद्धीला भ्रम पाडीत आहे. **पुरुषानें आपल्या कार्यासाठीं दुसऱ्याच्या सामर्थ्यावर अवलंबून राहूं नये.** एकाच कार्यासंबंधानें दोघांची बुद्धि कधीं सारखी असावयाची नाहीं. **ज्यामध्यें भय आहे असे प्रसंग जो नेहमीं टाळीत असतो तो पावसाळ्यांतील किड्यांप्रमाणें झिजून झिजून नाश पावतो.** भरभराटीमध्येंही व्याधि, यम, किंवा काल आपल्याला सोडीत नाहीं म्हणून संधि आहे तोंपर्यंतच हित साधून घेतलें पाहिजे.' धृतराष्ट्र म्हणाला, '**बलवानाबरोबर भांडणें मला पसंत नाहीं.** वैरापासून वैमनस्य उत्पन्न होऊन तेंच अनायासें शस्त्राच्या जागीं उपयोगीं पडतें. ही अनर्थमूलक गोष्ट फायद्याची समजून कलहाला तूं मूळ करून ठेवीत आहेस, त्यापासून पुढें घोर प्रसंग ओढवण्याचा संभव आहे.' दुर्योधन म्हणाला, '**द्यूत हा पूर्वापार चालत आलेला खेळ असून** त्यामध्यें नाश होण्याचा मुळींच संभव नाहीं. द्यूतानें स्वर्गद्वार उघडें होतें व द्यूतकारांना तें मिळावें हेंही उचितच आहे. म्हणून द्यूताची तयारी करतों.' धृतराष्ट्रानें उत्तर दिलें, 'तुझें भाषण मला अगदीं पसंत नाहीं. तुला वाटेल तसें कर. पुढें मात्र आतांच्या माझ्या म्हणण्याची आठवण होऊन तुला पश्चात्ताप होईल. हें तुझें वर्तन न्यायाचें नसून यापासून सर्व क्षत्रियांवर प्राणांतक असें मोठें संकट येऊन गुदरणार आहे.' इतकें सांगितलें तरी दुर्योधन आपला हेका सोडीना. तेव्हां दैवाची गति अलंघ्य आहे असें समजून तो पुत्रस्नेहाच्या तावडींत गेला आणि दुर्योधनाच्या सांगण्याप्रमाणें ज्याला हजार खांब आहेत अशी सुवर्ण व वैडूर्य ह्यांनीं चित्रविचित्र केलेली शंभर द्वारांनीं युक्त व एक कोस लांबरुंद अशी स्फटिकमय उत्तम सभा तयार करवून युधिष्ठिराला आणविण्याकरितां त्यानें विदुरांना पाठविलें. विदुरांना ती गोष्ट पसंत नसून 'असें करूं नकोस, ह्यापासून कुलाचा नाश होईल ह्याचा विचार कर,' असा फिरून त्यांनीं धृतराष्ट्राला उपदेश केला. धृतराष्ट्र म्हणाला, 'दैव प्रतिकुल नसेल तर ह्यापासून मला ताप होणार नाहीं. विधात्याच्या इच्छेनें व दैवाच्या आज्ञेनुरूप हें जग चाललें आहे. तूं युधिष्ठिराला आणण्याचें तेवढें काम कर म्हणजे झालें.' हें ऐकून विदुर युधिष्ठिराला आणण्याकरितां निघून गेले.

---

५६ द्यूतांत युधिष्ठिराचें सर्वस्व हरण. (२.५८–६५.)

विदुर इंद्रप्रस्थाला पोहोंचून कुबेरभुवनानाप्रमाणें असणाऱ्या तेथील राजगृहामध्यें गेले. स्वागत, कुशल प्रश्न इत्यादि झाल्यावर त्यांनीं धृतराष्ट्राचा निरोप युधिष्ठिराला कळविला. तो ऐकून युधिष्ठिर म्हणाला, 'द्यूतापासून कलह उत्पन्न होतो. कोणता शहाणा मनुष्य द्यूतामध्यें मन घालील? आपल्याला असें करणें उचित वाटतें काय? आम्ही सर्व आपल्या आज्ञेमध्यें आहों.' विदुर म्हणाले, 'द्यूत हें अनर्थाला मूळ आहे हें जाणून धृतराष्ट्राचें. मन त्यापासून फिरविण्यास माझ्या हातून झाला तेवढा यत्न मीं केला. राजानें मला तुझ्याकडे पाठविलें आहे. त्या ठिकाणीं वाटेल तो पण लावून द्यूत खेळणारा, द्यूतामध्यें पटाईत, व ज्याचे फांसे अगदीं हुकमी आहेत असा शकुनि व दुसरे पुष्कळ द्यूतपटु भामटे हजर आहेत. हें जाणून तुला जें उचित वाटेल तें कर?, युधिष्ठिरानें उत्तर केलें, 'आपण म्हणतां कीं भयंकर कपटामध्यें प्रवीण असे मायावी द्यूतकार त्या ठिकाणीं पुष्कळ जमले आहेत. केवळ धृतराष्ट्राच्या सांगण्यावरून द्यूत खेळण्याची माझी इच्छा नाहीं. बडिलांच्या हृदयांत पुत्रांचें हित व्हावें ही इच्छा नेहमीं असणारच. तेव्हां आपण सांगाल त्याप्रमाणें मी करणार. शकुनि मजबरोबर द्यूत खेळे, असें म्हणाल्यावांचून मी त्याबरोबर द्यूत कधीं खेळणार नाहीं. पण त्यानें बोलाविलें असतां मग मात्र मागें घेणें माझ्या हातून होणार नाहीं. कारण असा माझा नियमच आहे.' असें म्हणून भाऊ, द्रौपदी, इतर स्त्रिया व नोकर लोक यांना घेऊन दुसऱ्या दिवशीं निघण्याची त्यानें तयारी केली. दैव हें मनुष्याच्या बुद्धीला भ्रम पाडून डोळ्याला दिपवून टाकणाऱ्या तेजाप्रमाणें एखाद्या मनुष्याला मुसक्या बांधून सृष्टिकर्त्याच्या तावडींत नेतें. म्हणूनच धृतराष्ट्राच्या बोलावण्याला मान देऊन भवितव्यता

अपरिहार्य आहे असें पक्कें जाणूनच तो त्याकडे गेला. द्रोणादिकांची त्यानें प्रथम भेट घेतली. नतर तारांगणामध्यें शोभणाऱ्या रोहिणीप्रमाणें सुनांमध्यें असणारी पतिव्रता देवी गांधारी च वृद्ध प्रज्ञाचक्षु धृतराष्ट्र यांची त्यानें भेट घेतली. राजानें त्याचें मस्तक हुंगून अभिनंदन केल्यावर त्यांसाठीं तयार केलेल्या रत्नखचित मंदिरामध्यें तो आपल्या अनुयायांसहवर्तमान रहावयास गेला. द्रौपदीचें तें अप्रतिम वैभव पाहून धृतराष्ट्राच्या सुनांना बरें वाटलें नाहीं. पांडवांनीं सर्व राजस्त्रियांबरोबर कुशल संभाषण करून व्यायामादि आपलें आन्हिक आटोपून मंगलस्नान केलें, व ब्राह्मणांनीं स्वातिवाचन झटल्यावर सुग्रास जेवून विश्रांति घेतली. त्या ठिकाणीं दासीजनांनीं तांबुलादि पदार्थ त्यांना देऊन सुस्वर गायनानें त्यांचें मनोरंजन केलें. सुस्वर गायनानें गुंगी येऊन त्यांना गाढ झोंप लागली. सकाळीं भाटांच्या स्तुतिपाठानें जागें होऊन त्यांच्या श्रमाचा परिहार झाला. सर्व प्रातर्विधि आटोपल्यावर ते सभेमध्यें आले. त्या ठिकाणीं मनाला आल्हाद देणाऱ्या चित्रविचित्र बैठकीवर यथाक्रमानें ते बसल्यावर शकुनि युधिष्ठिराला ह्मणाला, ' मंडळी सर्व जमून तुझी वाट पहात आहे. पण लावून फांसे टाकण्याला सुरवात कर. ' युधिष्ठिर म्हणाला, ' कपटप्रचुर असें हें द्यूत निंद्य मानले आहें; ह्यामध्यें क्षात्र पराक्रमाचा किंवा नीतीचा लवलेशही नाहीं. उगीच द्यूताची प्रशंसा कशाला करतोस ? द्यूतनैपुण्याबद्दल शहाणे लोक कोणालाही मान देत नाहींत. मग उगीच ह्या वांकड्या मार्गानें आह्मांला एकाद्या नीच मनुष्याप्रमाणें जिंकण्याची खटपट कां करतोस ? ' शकुनि ह्मणाला, ' ज्याला जिंकण्याच्या किंवा हरण्याच्या खुब्या माहीत आहेत, आपल्या प्रतिपक्षाच्या सर्व लुच्चेगिरीच्या युक्त्यांना जो दाद देत नाहीं, व फांशांचें सर्व इंगित ज्याला कळतें त्याला तरी प्रसंगानेंच ह्या सर्वांचा अनुभव येतो. द्यूतकारांनीं एकमेकांना जिंकलें असतां त्यांत दोष मुळींच नाहीं. म्हणून मनांत कांहीं किंतु धरूं नकोस. पण लावून चालूदे. उगीच उशीर करूं नकोस. ' युधिष्ठिर म्हणाला, ' आर्यांना म्लेंच्छकर्म किंवा कपट माहीत नसून सरळ मार्गानें युद्ध करणें ते आपलें कर्तव्य समजतात. आह्मी ब्राह्मणांच्या हितासाठीं संपत्ति मिळविण्याला झटतों; ही आमची संपत्ति द्यूतानें कां हरण करूं इच्छितोस ? कपटानें सुख किंवा संपत्ति प्राप्त करून घेण्याची माझी इच्छा नाहीं. द्यूतपटु सोयांची ही कृति जनमान्य नाहीं. ' शकुनि म्हणाला, ' श्रोत्रियाचा अश्रोत्रियाशीं, विद्वानाचा मूर्खाशीं, शस्त्रास्त्रज्ञाचा ज्याला शस्त्रास्त्रांची कांहीं माहिती नाहीं अशाशीं, व बलवानाचा दुर्बलाशीं, कपटानें त्याला जिंकण्याच्या हेतूनेंच संबंध जुळत असतो; व लोकही त्याला कपट हें नांव देत नाहींत. द्यूत तुला वाईट आहे असें जर वाटत असेल तर तूं त्याचा अगदींच नाद सोडून दे. ' युधिष्ठिर म्हणाला, ' द्यूताचें बोलावणें आलें असतां नाहीं म्हणावयाचें नाहीं असें माझें व्रत आहे. अशा गोष्टींत दैवच मी बलवत्तर समजतों. सर्व दैवाधीन आहे. असो. येथें जमलेल्या मंडळींपैकीं कोणाबरोबर द्यूत सुरू करावयाचें, पण लावणारा माझा प्रतिपक्षी कोण, हें मला कळूं दे. ' दुर्योधन म्हणाला, ' द्रव्य पुरविणारा मी असून माझ्याकरितां हा शकुनि द्यूत खेळण्याला तयार आहे. ' युधिष्ठिर म्हणाला, ' दुसऱ्याच्या पेशानें तिसऱ्यानें त्याच्यासाठीं द्यूत खेळावें हें मला पसंत नाहीं, हें लक्षांत घेऊन, योग्य वाटेल तसें चालूं दे. ' ह्याप्रमाणें युधिष्ठिराचें भाषण झाल्यावर सर्व आपापल्या ठिकाणीं बसले. भीष्मद्रोणादिकही त्याठिकाणीं हजर होते. परंतु त्यांना कांहीं तें बरें वाटत नव्हतें. नंतर द्यूताला सुरवात झाली. ' हा समुद्रमंथनापासून निघालेला रत्नांचा हार मी पणाला लावतो. तूं काय लावतोस, ' म्हणून युधिष्ठिरानें विचारलें असतां दुर्योधन ह्मणाला, ' मजजवळ पुष्कळ रत्नें आहेत. द्रव्याचा मला लोभ बिलकुल नाहीं. तूं खुशाल माझें सर्वस्व हरण कर. ' नंतर शकुनि फांसे टाकून ' जिंकलें ' असें ह्मणाला. युधिष्ठिर ह्मणाला, ' तूं कपट करून मला जिंकलें आहेस. असो चालूं दे. फिरून सुरवात करूं या. मी हे सोन्यानें भरलेले शंभर हंडे पणाला लावतों. ' फांसे हातांत घेऊन तयार असलेल्या शकुनीनें त्यांतही त्याला जिंकलें. ह्याप्रमाणें व्याघ्रचर्मानें आच्छादित विजयी रथ, वस्त्रालंकारांनीं विभूषित व

मौल्यवान माळा व अलंकार घातलेल्या सैन्याबरोबर असणाऱ्या नृत्यगायनामध्यें कुशल अशा हजारों दासी, उंत्तम वस्त्रें नेसलेले नम्र, हुशार, तरुण, हातांमध्यें भोजनपात्रें घेऊन रात्रंदिवस अतिथींना भोजन घालण्यामध्यें तत्पर असे सहस्रावधि दासजन, त्याचप्रमाणें गळ्यांत सुवर्णाचे कंठे असलेले युद्धांतले शब्द जाणणारे, गांवच्यागांव पाडून उध्वस्त करण्याला समर्थ असे माहुतासहवर्तमान हत्ती व रथ त्याचप्रमाणें चित्ररथ गंधर्वानें अर्जुनाला दिलेले तित्तिरकल्माष जातीचे घोडे, इत्यादि पांडवांची सर्व संपत्ति शकुनीनें हरण केली. ह्याप्रमाणें सर्वस्व अपहारक हें घोर यूत चालूं असतां विदुर ह्मणाले, 'राजा, डोळे उघड. मरावयाला टेकलेल्या मनुष्याला ज्याप्रमाणें औषध गोड लागत नाहीं, त्याप्रमाणें माझें हितवाक्य तुला गोड वाटत नाहीं; तरी पण मी सांगतों ऐक. ह्या दुष्ट दुर्योधनानें जन्मल्याबरोबर कोल्ह्याप्रमाणें शब्द केला होता, हें तुला ठाऊक आहेच. तो हा अशुभसूचक, कुलविनाशी व काळरूपी मुलगा तुमच्या मुळावर आला आहे. दुर्योधनरूपानें घरांत शिरलेल्या ह्या कोल्ह्याला तूं अज्ञानामुळें ओळखत नाहींस. मध गोळा करणारा जसा पुढचा परिणाम न पाहतां मधाच्या आशेनें झाडावर चढून खालीं पडून सवस्वीं नाश पावतो त्याप्रमाणें ह्याचे अक्षयूतानें डोळे धुंद होऊन ह्या महारथ पांडवांबरोबर हा वैर जोडीत आहे. यानें त्याचा सर्वस्वीं नाश खास होणार हें याला कळत नाहीं. भोज देशामध्यें दुष्ट कंस जन्मला. त्याला नागरिकांच्या कल्याणाकरितां ज्ञातींच्या सांगण्यावरून कृष्णानें ठार मारलें हें तुला ठाऊकच आहे. ह्याप्रमाणें तुझ्या सांगण्यावरून अर्जुनानें दुर्योधनाची खोड मोडली तर तुझें बांधव शंभर वर्षें सुखानें रहातील. एका कावळ्याचा मोबदला करून मोर किंवा एका कोल्ह्याला देऊन वाघ घेण्याप्रमाणें ह्या एका दुष्टाला खर्ची घालून पांडवांना विकत घे. शोकसागरामध्यें वृथा बुडूं नकोस. **कुलासाठीं एका पुरुषाचा त्याग करावा, गांवासाठीं एका कुलाला सोडावें, जनपदांसाठीं एका गांवावर पाणी सोडावें, व आपल्यासाठीं तर सर्व पृथ्वीवर पाणी द्यावें.** हा उपदेश जंभाला सोडून देण्याच्या वेळीं शुक्राचार्यांनीं असुरांना केला होता. कोणी एक राजा सोन्याच्या लोभानें तोंडांतून सुवर्ण टाकणाऱ्या बनवासी कांहीं पक्ष्यांना धरीं घेऊन आला व अति लोभानें त्यानें त्यांना ठार मारलें. त्यामुळें पळता त्याच्या हातीं लागला नाहीं तो नाहीं, पण तो हातच्यालाही मुकला. त्याप्रमाणें द्रव्यलोभानें तूं पांडवांचा द्वेष केलास तर तुझा सर्वस्वीं नाश होईल. मागून त्या पक्षिघाती राजाप्रमाणें तुला पश्चात्ताप न होवो ह्मणजे झालें. पांडवांशीं स्नेह करून माळी ज्याप्रमाणें बहाराच्या वेळीं बहार येईल तसतशीं फुलें तोडतो त्याप्रमाणें त्यांच्या अभ्युदयापासून तूं आपला फायदा करून घे. झाडांच्या मुळाशीं आग लावून त्यांना जाळून टाकणाऱ्याप्रमाणें पांडवांचा समूळ नाश करून टाकण्याची खटपट करून आपले मुलगे, अमात्य, व सैन्य यांसहवर्तमान यमसदनाची वाट धरूं नकोस. त्या पार्थाबरोबर युद्ध करण्याला कोण समर्थ आहे? भांडणाला मूळ अशा यूतापासून परस्परांमध्यें वैमनस्य उत्पन्न होऊन मोठें अनर्थ ओढवतील. दुर्योधन तर यूताच्या नादीं लागून भयंकर वैर जोडून घेत आहे. त्याच्या अपराधामुळें त्याचे अनुयायी देखील संकटांत पडणार आहेत. ज्याप्रमाणें पोळ मस्तींत आला असतां आपल्याच शिंगांना इजा करून घेतो त्याप्रमाणें हा मस्तीनें आपल्या राष्ट्रावर व आपल्या सुखावर पाणी सोडून घेण्याला निघाला आहे. प्रत्यक्ष दिसणाऱ्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून जो दुसऱ्याच्या मतानें वागतो तो समुद्रामध्यें पोरानें हांकलेल्या नावेप्रमाणें संकटांत पडतो. यूतामध्यें ह्याला जय येत आहे ह्मणून तुला बरें वाटत आहे. पण प्रसंगविशेषीं दिलेला सूक्ष्म घाव देखील मनुष्याच्या समूळ नाशाला कारण होतो ही गोष्ट तुझ्या लक्षांत येत नाहीं. हा इंद्रजाल तूं मोठ्या हुशारीनें जरी रचला आहेस, तरी तो तुला खात्रीनेंच नाशाकडे ओढीत आहे. उगीच तूं ह्या डोंगर उचलण्याच्या खटपटीला लागला आहेस. ह्या अप्रबुद्धाच्या नादीं लागून आगींत उडी घेणें तुला उचित नाहीं. हा यूतमदाचा अंमल उतरल्यावर पांडव ज्या वेळीं खवळतील तेव्हां त्या विकट प्रसंगीं तुझ्याला कोणाचा आधार मिळणार? यूत न खेळतां तुजपा-

शीं जी विपुल संपत्ति आहे, तिच्यापेक्षां अधिक पांडवांपासून मिळविण्याची हाव कशाला पाहिजे ? पांडवरूपी धनच मिळविण्याला झट. हा डोंगरी शकुनि कपटद्यूतांत फार निष्णात आहे हें आह्मांला ठाऊक आहे. ह्या राजगृहांत शिरलेल्या कवड्याला आला तसा परत हाकलून दे. पांडवांबरोबर द्वेष करण्याची वृथा हाव धरूं नको. ' दुर्योधन विदुरांना म्हणाला, आपण सदा धार्तराष्ट्रांची निंदा करून शत्रूच्या गुणांचे पोवाडे गात असतां. आपला ओढा कोणीकडे आहे हें मी जाणतों. तुमच्या ह्या स्तुतिपर व निंदापर भाषणावरून हें सहज लक्षांत येऊन चुकतें. आह्मांला पोर समजून नेहमीं आपण तुच्छ करतां. आपली जीभच आपलें हृदय उघडें करून दाखवीत आहे. सर्पाप्रमाणें उगीच आह्मी आपल्याला दूध पाजून मांडीवर थोपटीत आहों. मांजराप्रमाणें पोषणकर्त्यालाच आपण मारूं इच्छितां. आपल्या दुष्टपणाचा तर संशयच उरला नाहीं. लोकांनीं स्वामिघातक ह्मणूं नये, एवढ्याची तरी लाज बाळगा. शत्रूंना जिंकून महत्फल मिळवूं इच्छिणाऱ्या आह्मांला उगीच बाग्बाणानें कां ताडन करतां? शत्रूला हिताच्या गोष्टी सांगण्याकडे नेहमीं आपलें लक्ष असल्यामुळें आमचे विचार व आमचीं कृत्यें आपल्याला नेहमीं वाईट वाटतात. लाबून बोलणारा मनुष्य आपल्याला द्वेषार्ह मात्र करून घेतो. मनुष्यानें शत्रूची कितीही स्तुति केली तरी त्यामध्यें स्वपक्षाची निंदा नसावी. आपण तर निर्लज्जपणें मनःपूत आह्मांला टाकून बोलून दुखवितां. राजश्री असे आह्मांला तुच्छ करूं नका. आह्मी तुह्मांला पुरे ओळखून आहों. वृद्धापाशीं राहून थोडीशी अक्कल शिका. आजपर्यंत मिळविलेलें नांव राखा. दुसऱ्याच्या कामांत उगीच ढवळाढवळ करूं नका. मीच काय तो कर्ता व शहाणा असा वृथाभिमान सोडून द्या. आमचें हित आह्मी आपल्याला विचारावयाला आलों नाहीं. आह्मी मुकाट्यानें सहन करतों ह्मणून बाटेल तसें आह्मांला टाकून बोलूं नका. जो मर्मामध्येंच प्राण्याला उपदेश देऊन ठेवतो त्या एका उपदेशकाला मात्र मी ओळखतों. दुसऱ्या कोणाला ओळखीत नाहीं. प्राण्याचा ओढा ज्याप्रमाणें स्वाभाविकपणें सखल प्रदेशांतून वाहतो त्याप्रमाणें तो बुद्धि देईल त्याप्रमाणें मी वागणार. एखाद्या मनुष्यानें दगडावर आपलें डोकें आपटून घेतलें किंवा सापाला खाऊं घातलें तर अशा गोष्टींत कर्मानुसार त्याला बुद्धि होते असेंच ह्मटलें पाहिजे. न विचारितां जो उपदेश करतो तो उगीच द्वेष मात्र आपल्या पदरीं बांधून घेतो. फक्त मित्रभावानें केलेला उपदेश शहाण्यांना सहन होतो. पेटलेला अग्नि विशेष चेतवून तो विझविण्याच्या नादाला जो एकदम लागणार नाहीं त्याच्या हातांत पुढें मुठभर राख देखील लागत नसते. आपला द्वेष करून आपलें अहित करूं पाहणाऱ्या शत्रुपक्षाकडील मनुष्याला आपल्या जवळ कधीं आश्रय देऊं नये. जारिणी स्त्रीला कितीही गोंजारलें तरी ती लांबलांबच पळणार. ' विदुर ह्मणाले, ' एवढ्याशा निष्ठुर भाषणानें जे आप्तीयांना सोडून जातात त्यांचा स्नेह अळवावरच्या पाण्याप्रमाणें समजला पाहिजे. ते राजांच्या आधींच गोंधळलेल्या मनाला खोटी समाधानी देऊन मुसळांनीं त्यांचा नाश करतात. मंदबुद्धि दुर्योधना, स्वतःला शहाणा समजून मला तूं पोर समजतोस अं ? जो प्रथम एखाद्याशीं सख्य करून मागून त्याला दूषण देतो, त्यालाच पोर समजलें पाहिजे. श्रोत्रियाच्या घरीं असणाऱ्या विधवलेल्या स्त्रीप्रमाणें दुर्बुद्धीचा कधीं चांगला परिणाम व्हावयाचा नाहीं. एखाद्या कुमारीला ज्याप्रमाणें साठ वर्षांचा नवरा आवडत नाहीं त्याप्रमाणें माझा उपदेश तुला मूढाला रुचत नाहीं ! सर्व हिताहिताच्या गोष्टींत **तुझ्या मनासारखाच तुला सल्ला मिळावा असें जर तुला वाटत असेल तर एखाद्या स्त्रीला, अप्रबुद्धाला, पंगूला किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणाला तूं सल्ला विचारीत जा. दुसऱ्याची मनधरणी करणाऱ्या अधमांची जगांत कांहीं उणीव नाहीं. कडू असला तरी परिणामीं हितकारक असा सल्ला देणारा मात्र विरळा व ऐकणाराही विरळाच सांपडावयाचा. धन्याला काय रुचतें काय नाहीं ह्याचा विचार न करितां त्याला कडु वाटण्यासारखें असलें तरी त्याच्या हिताचाच सल्ला जो नेहमीं सरळपणें देतो तोच त्याचा खरा हितकर्ता समजला**

पाहिजे. बाईट लोकांना सदैव असेव्य व साधूना सदैव सेव्य असें हें रोगाला जवळ उभें करूं न देणारें कडू, तिखट, प्रखर, उग्रट, व यशहरण करणारें कीधरूप औषध कितीही कमीपणा आला तरी गिळून टाक. शांत हो. विचित्रवीर्याचें व त्याच्या पुत्रपौत्रांचें यश व संपत्ति कायम रहावी अशी माझी इच्छा आहे, ती ज्याच्या योगानें सफल होईल अशा प्रकारें वाग. मी आतां तुझा निरोप घेतों. मलाही ब्राह्मण चांगली दिशा दाखवोत. आशीविषांना व नेत्रविषांना भल्यानें कधीं खवळवूं नये.'

इकडे 'अद्यापि जिंकली नाहीं अशी तुझी कांहीं संपत्ति उरली आहे काय,' ह्मणून शकुनीनें युधिष्ठिरास विचारलें तेव्हां तो ह्मणाला,' माझी अगणित संपत्ति आहे. माझ्या संपत्तीची चौकशी तुला कशाला पाहिजे? माझें जें कांहीं अरांख्य धन आहे तें मी पणाला लावतों. चालूं दे.' कपटपटु शकुनि फांसे हातांत घेऊन तयारच होता. 'हं, तेंही जिंकलें,' असें तो ह्मणाला. ह्याप्रमाणें सर्वस्व हरण झाल्यावर नकुल, सहदेव, अर्जुन, व भीम ह्यांनाही पणामध्यें हरून शेवटीं युधिष्ठिर स्वतः हरला. तेव्हां शकुनि त्याला ह्मणाला, 'तुझी लाडकी द्रौपदी अद्यापि शिल्लक आहे. तिला पणाला लावून त्यांत मला जिंकून स्वतःला सोडवून घे.' युधिष्ठिर ह्मणाला, 'बरें, जी फार ठेंगणी नसून फार उंचही नाहीं, फार कृश नाहीं; किंवा फार लठ्ठही नाहीं; जिचे काळे भोर असे कुंतल केश आहेत व जिचे नेत्र शरत्कालच्या कमलाप्रमाणें आहेत; जिच्या अंगाचा सुगंधही तसाच आहे; जी रूपानें लक्ष्मीसारखी असून शीलसंपन्न, मधुरभाषिणी धर्मार्थकामांचें साधन करून देणारी सर्वांच्या मागून निजून सर्वांच्या आधीं उठणारी आहे, गवळ्यापासून तहत धनगरापर्यंत सर्वांच्या कामांत जी स्वतः लक्ष पुरविते, अशी नवमल्लिके समानें वेदीपासून उत्पन्न झालेली प्रिया द्रौपदी तिला मी पणाला लावतों.' हे शब्द धर्मराजाच्या तोंडांतून निघतांच सभेमधील वृद्धांच्या व संभावितांच्या तोंडांतून एकदम 'धिक्! धिक्! 'धिक्कार असो, धिक्कार असो.' असे उद्गार निघाले व जिकडे तिकडे चळवळ उडून राहिली. राजांना बाईट वाटलें. भीष्म, द्रोण, कृपादिकांच्या अंगांतून दरदरून घाम आला. विदुरांनीं तर मेल्यासारखें होऊन डोकें हातावर टेकलें, व सापाप्रमाणें दीर्घोच्छ्वास सोडून खालीं तोंड घालून ते विचारांत मग्न झाले. धृतराष्ट्राच्यानें मात्र हर्ष झांकून ठेववेना. 'काय जिंकलें! काय जिंकलें!' ह्मणून तो फिरून फिरून विचारूं लागला. दुःशासनादिकांना व कर्णाला अत्यानंद झाला. सभेमधील संभावितांच्या डोळ्यांतून टपटप अश्रुबिंदु गळूं लागले. मदानें भरलेल्या शकुनीनें जयानें चढून जाऊन 'सर्व जिंकलें!' असें ह्मणून फिरून हातांत फांसे घेतले.

५७ द्यूतनिर्जित द्रौपदीची भरसभेंत विडंबना. (२. ६६–७३)

द्रौपदीला पणांत जिंकल्यावर दुर्योधन विदुराना ह्मणाला, 'अहो क्षत्ते, पांडवांच्या लाडक्या बायकोला सभेंत आणा! गरीब बिचाऱ्या अभागिनीला आमच्या घरीं झाडलोट करून आमच्या दासीजनांमध्यें राहूं द्या.' विदुरांनीं उत्तर दिलें, 'अशा दुर्भाषणानें तूं आपल्याला वैररूप पाशांनीं अधिकच जखडून घेत आहेस हें तुला कसें कळत नाहीं? कड्याच्या टोंकावर गेलेल्या हरणाप्रमाणें तूं बाघांना विनाकारण पुन्हां पुन्हां खिजवीत आहेस. खालीं दरींत सबशेल पडून तूं फुकट मरणार आहेस हें अद्यापि तुला उमगत नाहीं. महान् विषारी सर्प तुझ्या मस्तकावर पडणार आहेत, हें तुला अद्यापि कोठें कळलें आहे? उगीच त्यांना खिजवून यमसदनाची वाट सुधारूं नकोस. द्रौपदी तुझी दासी होण्याला पात्र नाहीं. निरुपायानें राजानें हिला पणाला लाविली असा माझा समज आहे. कळक ज्याप्रमाणें वठतां वठतां फलपुष्पांनीं संपन्न होतो त्याप्रमाणें तुला विनाशकाळींच हें वैभव येत आहे. द्यूत हें वैराला व मोठ्या दुःखाला कारणीभूत असून तूं मदोन्मत्त झाल्यानें तुला आपला अंतकाल दिसेनासा झाला आहे. **हृदयभेदक शब्दांनीं दुसऱ्याच्या काळजाला घरें पाडूं नये व निंद्य उपायांनीं परवित्त हरण करूं नये. ज्याच्या योगानें दुसऱ्याच्या अंगावर कांटे उभे राहतात असे निष्ठुर शब्द कधीं उच्चारूं नयेत. एक कठो-**

र शब्द तोंडांतून सहज निघून जातो, पण दुसऱ्यावर त्याचा विलक्षण परिणाम होऊन तो रात्रंदिवस अश्रू ढाळीत राहतो. तो नेमका दुसऱ्याच्या मर्मस्थळाला जाऊन लागतो म्हणून शहाण्यानें निष्ठुर भाषण कधीं उच्चारूं नये. एकदां एका बकऱ्यानें सुरी गिळली होती. त्याची मान भूमीवर ठेवून ती काढतांना त्याचा गळाच कापून निघाला. पंडुपुत्रांशीं हें वृथा वैर माजवूं नकोस. स्ववृत्ति लोक मात्र या प्रकारें दुसऱ्यांवर तोंड टाकतात, मग ते वनांत राहणारे असोत वा गृहस्थ असोत, तपस्वी असोत किंवा विद्वान असोत; त्यांकडे कांहीं ते पहात नाहींत. कपट हें नरकाच्या घोर द्वारांपैकीं एक आहे, ह्याकडे ते लक्ष देत नाहींत. प्रसंगविशेषीं भोंपळे पाण्यांत बुडतात, दगड तरंगतात, नावा डगमगतात, त्याप्रमाणें तुझी कास धरणारे दुःशासनादिक खचित बुडणार. मूर्खा, तूं माझें हितकर वचन ऐकत नाहींस यावरून खचितच कुरूंचा समूळ नाश होण्याचा काल जवळ आला आहे.' हें भाषण ऐकून 'हा क्षत्ता नेहमीं आमच्या बाईटावर असल्यामुळें कांहीं तरी बरळत आहे. तें जाऊन द्रौपदीला घेऊन ये, अशी सर्वांसमक्ष प्रातिकामीला दुर्योधनानें आज्ञा केली. त्यावरून एखादा कुत्रा ज्याप्रमाणें सिंहाच्या गुहेंत शिरावा त्याप्रमाणें तो पांडवांच्या पट्टराणीकडे जाऊन म्हणाला, 'द्यूतांत अंध झालेल्या युधिष्ठिरापासून दुर्योधनानें तुला जिंकिलें आहे; म्हणून धृतराष्ट्राच्या बाड्यांत घरकाम करण्याकरितां तुला नेण्यासाठीं मी आलों आहें. भावांसह स्वतः द्यूतांत हरल्यावर जेव्हां पणाला लावण्याला कांहीं उरलें नाहीं तेव्हां त्यानें तुला पणाला लाविलें.' हें भाषण ऐकून 'पूर्वी स्वतः हरले कां मला हें त्या द्यूतकारांला विचारून ये, मग मला घेऊन जा,' असें द्रौपदी म्हणाली. तेव्हां परत जाऊन त्यानें तिचा निरोप सभेंत कळविला. 'इकडे येऊन तिला तो प्रश्न विचारूं दे,' असें दुर्योधन म्हणाला. तेव्हां तो फिरून द्रौपदीकडे जाऊन मोठ्या कष्टानें तिला म्हणाला, 'दुर्योधन तुलाच त्या ठिकाणीं येऊन तो प्रश्न विचारण्यास सांगत आहे. कौरवांचा विनाशकाल जवळ आला असून ज्या ह्या अप्रबुद्ध दुर्योधनाच्या मनानें तुला सभेमध्यें ओढण्याचें घेतलें आहे तो फार दिवस ह्या संपत्तीचा उपभोग घेईल असें मला वाटत नाहीं.' द्रौपदी म्हणाली, 'सुखदुःखांनीं शहाण्याला किंवा मूर्खाला कधीं सोडलें आहे असें नाहीं. ह्या जगांत धर्म हाच काय तो श्रेष्ठ आहे. तो यथान्याय पाळला तरच खरें हित साधलें म्हणावयाचें. ह्यासाठींच धर्माला कौरवांनीं झुगारून देऊं नये. फिरून सभेंत जाऊन तेथें असणाऱ्या थोरांना विचार. ते जसें सांगतील तसें करण्याला मी तयार आहें. त्या ठिकाणीं अनेक थोर व नीतिमान धर्मात्मे आहेत.' परत येऊन त्यानें तो द्रौपदीचा निरोप सभासदांना कळविला. त्यावेळीं दुर्योधनाचा आग्रह पाहून सर्व आपलीं तोंडें खालीं घालून गप्प झाले. दुर्योधनाचा निश्चय पाहून युधिष्ठिरानें द्रौपदीच्या तैनातींतला सेवक तिच्याकडे पाठवून 'रजस्वला असल्यामुळें वेणीखालीं नेसलेल्या एकवस्त्रानिशीं येऊन वडिलांच्या पुढें उभी रहा,' असा निरोप त्यानें त्याबरोबर तिला पाठविला. त्यानें जाऊन तो निरोप तिला कळविला. इकडे तिला सभेमध्यें घेऊन ये,' म्हणून दुर्योधनानें प्रातिकामीला फिरून आज्ञा केली असतां, द्रौपदीच्या रागाला भिऊन तो कचरूं लागला; तेव्हां तिला सभेंत आणण्याविषयीं दुर्योधनानें दुःशासनाला आज्ञा केली. तेव्हां लाल डोळे करून त्या महारथांच्या मंदिरांत शिरून तो द्रौपदीला म्हणाला, 'चल, द्रौपदि, दुर्योधनानें तुला न्यायानें जिंकलें आहे. आतां लाज बाजूला ठेवून त्याला भजणेंच तुला श्रेयस्कर आहे.' असें म्हणून अंतःपुरांतील पोक्त स्त्रियांकडे ती धांव घेत असतां त्या नराधमानें धांवून जाऊन तिच्या लांबसडक व काळ्याभोर केसांना धरून एखाद्या हल्लक झालेल्या केळीला ज्याप्रमाणें वाऱ्यानें हालवावें त्याप्रमाणें नाथ असून अनाथ झालेल्या त्या बिचारीला त्यानें भरसभेमध्यें फरफरां ओढीत आणिलें. 'मी रजस्वला आहें. एका वस्त्रानिशीं मला अशी सभेमध्यें ओढीत नेऊं नकोस,' म्हणून ती दया भाकीत असतां, 'संकटांतून सोडविण्यासाठीं कृष्णाचा धांवा कर,' असें हासत म्हणून तो तिला म्हणाला, 'तूं रजस्वला ऐस, तुझ्या अंगावर एकच वस्त्र असूं दे, किंवा मुळींच

नसूं दे. तूं द्यूतांत जिंकलेली दासी आहेस; ह्मणून आमच्या दासीवर्गांमध्यें तुला राहिलें पाहिजे.' केस विस्कळित होऊन नेसलेलें अर्ध वस्त्र जिचें सुटलें आहे अशा त्या द्रौपदीला तो नराधम फरफरां ओढीत असतां लज्जेनें व रागानें ती संतापून जाऊन ह्मणाली, 'असें करणें आर्यांना उचित नाहीं. अशा प्रकारचें दुष्ट व निंद्य कर्म करण्याला निघालेल्या हे नराधमा, माझें वस्त्र फेडूं नकोस, मला अशी फरफरां ओढूं नकोस, इंद्रासह सर्व देव जरी तुझ्या साहाय्याला आले तरी हें तुझें कृत्य येथें जमलेले राजे सहन करणार नाहींत. इतके कौरव वीर जमले असून ह्या अनुचित कृत्याबद्दल कोणालाच कां कांहीं त्वेष येत नाहीं? ह्यावरून ह्या सर्वांना हें तुझें कृत्य मान्य आहेसें दिसतें. धिक्कार असो यांना! भरतांच्या धर्माला व चालीला आज हरताळ लागलासें वाटतें. भर सभेमध्यें आर्यधर्माची पायमल्ली होत असतां हे मुकाट्यानें पहात बसले आहेत अं! भीष्म द्रोणादिक कुरुवृद्धांचें देखील तेज कोठें दडलें तें मला कळत नाहीं,' ह्याप्रमाणें करुणा भाकीत दीन मुद्रेनें पांडवांकडे पहात तिनें आपल्या कटाक्षांनीं अगोदरच रागानें खवळून गेलेल्या पांडवांचा क्रोधाग्नि अधिकच जोरानें पेटविला. ह्याप्रमाणें दीन झालेल्या पतींकडे केविलवाण्या मुद्रेनें पाहणाऱ्या द्रौपदीला तो नराधम अधिकच जोरानें ओढीत असतां तिला मूर्छा आलेली पाहून दासी ह्मणून हाक मारून तो हासला. कर्णाला हा दुःशासनाचा शब्द पसंत पडून खदखदां हासून त्यानेंही त्याला आपली संमति दाखविली. शकुनीलाही मोठा आनंद झाला. हे दोघे व दुर्योधन ह्या तिघांखेरीज इतरांना मात्र फार वाईट वाटलें. भीष्म ह्मणाले, 'हे दैवशालिनि, धर्मविचार फार सूक्ष्म असल्यामुळें ह्या तुझ्या प्रश्नाला आमच्याकडून उत्तर देववत नाहीं. परस्वावर कोणाही मनुष्याची सत्ता नसून तें त्याला पणाला लावतां येत नाहीं हें सत्य आहे. पण स्त्रियांवर पतीचें पूर्ण स्वामित्व आहे असें शास्त्रच सांगत आहे. हा युधिष्ठिर ह्या वसुसंपूर्ण पृथ्वीचा प्रसंगीं त्याग करील पण सत्य कधीं सोडणार नाहीं. 'हरलों' हीं अक्षरें त्याच्या तोंडांतून निघालीं आहेत. ह्मणून येथें आह्मांला न्यायान्याय सांगतां येत नाहीं. युधिष्ठिरानें आपखुषीनें द्यूत सुरू करून त्यांत शकुनीनें ह्याला कपटानें जिंकलें असतांही त्याला तें कपट वाटत नाहीं.' द्रौपदी ह्मणाली, 'अनार्य व द्यूतप्रिय अशा कपटपटु धूर्तांनीं दुष्ट हेतु धरून सभेमध्यें बोलावून आणिलें असतां आपखुषीनें ते द्यूताला तयार झाले असें कसें ह्मणतां येईल? कपटपटु असे धूर्त एकत्र जमून त्यांनीं ह्यांना जिंकलें, हें कपट त्यांना न कळतां त्यांनीं पण लाविला. ह्या सभेमध्यें आपल्या मुलांवर व सुनांवर स्वामित्व असणारे कुरुवृद्ध पुष्कळ आहेत. त्यांनीं विचार करून ह्या माझ्या प्रश्नाचा उलगडा करावा.' ह्याप्रमाणें करुणास्वरानें बोलत असतां दुःशासन वस्त्र फेडीत असल्यामुळें जिचा संतापाग्नि भडकून राहिला होता त्या द्रौपदीकडे व युधिष्ठिराकडे पाहून भीम संतापून जाऊन ह्मणाला, 'द्यूतकारांच्या घरीं ठेवलेल्या बटिकी असतात त्यांना देखील त्यावर दया करून ते पणाला लावीत नाहींत. शत्रूंनीं कपटानें आमचें सर्वस्व हरण करून अखेरीस आह्मांलाही जिंकलें त्याचा मला इतका संताप आला नाहीं. आह्मां सर्वांवर आपलें स्वामित्व आहे हे आह्मीं कबूल करतों. पण द्रौपदीला पणाला लावण्यांत मात्र आपण मर्यादा सोडली आहे. पांडवांना वरून ह्या अबलेला आपल्यामुळें अशा अधमाकडून हे क्लेश सोसावे लागत आहेत. धर्मराज, हिच्यासाठीं मला आपला संताप आला आहे. आपले हात अग्नीमध्यें जाळून टाकतों.' अर्जुन ह्मणाला, 'भीमा, आजपर्यंत असे मर्यादेचे शब्द तुझ्या तोंडांतून कधीं निघाले नाहींत. दुष्ट शत्रूंनीं तुझी धर्माभिरुचिसुद्धां नाहींशी केल्यासारखी दिसते. अशा वर्तनानें शत्रूंचे मनोरथ सफल करूं नकोस. श्रेष्ठ धर्म असेल तोच आचरला पाहिजे. धर्मनिष्ठ अशा वडील भावाला ह्याप्रकारें टाकून बोलणें उचित नाहीं. शत्रूंनीं बोलावल्यावरून क्षात्रधर्माला अनुसरून दुसऱ्याच्या इच्छेनें ते ह्या द्यूताला प्रवृत्त झाले. ह्मणून हें आपल्याला अलौकिककर नसून उलट कीर्तिकरच आहे.' द्रौपदीला अशी दीन पाहून विकर्ण ह्मणाला, 'अहो राजांनो, द्रौपदीच्या प्रश्नाचें उत्तर द्या. ह्या प्रश्नाचें उत्तर न दिल्यानें आपणा सर्वांनाच नरकप्राप्ति होईल.' ह्याप्रमाणें अनेकवार तो ह्मणाला असतां-

ही कोणी बोलत नाहींसें पाहून हात चोळीत तो ह्मणाला, 'मी तुह्मां सर्वांस ह्याप्रकारें विनंती करीत असून तुह्मी मुकाट्यानें बसलां आहां हें चांगलें नव्हे. आतां मला जें न्यायाचें दिसतें तें मी सांगतों. **मृगया, मद्यपान, द्यूतकर्म व विषयासक्ति हीं चार राजामध्यें व्यसनें गणलीं जातात.** मनुष्य ह्यांच्या नादीं लागला कीं, धर्माला सोडून त्याचें पाऊल वांकडें पडूं लागतें. व्यसनाधीन झालेल्या मनुष्याच्या हातून घडलेलीं कृत्यें लोकांना मान्य नसतात. ह्मणून व्यासनाधीन झालेल्या ह्या पांडुपुत्राला द्यूतकारांनीं बोलावून आणून द्रौपदीला पणाला लावण्यास लाविलें. शिवाय सर्व पांडवांची ही बायको असून **द्यूतांत प्रथम स्वतः हरलेल्या ह्या युधिष्ठिरानें तिला शकुनीच्या सूचनेवरून मागून पणाला लाविलें.** ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणतां हिला पणांत लावण्याचा अधिकारच युधिष्ठिराला नव्हता, ह्मणून ती कांहीं जिंकली गेली नाहीं असें माझें मत आहे ?' हें ऐकून विकर्णाची प्रशंसा व शकुनीची निंदा यांचा त्या सभेमध्यें एकच गजर होऊन राहिला. कर्ण मात्र संतापून जाऊन विकर्णाच्या दंडाला धरून ह्मणाला, 'द्रौपदीनें अनेकवार प्रश्न केला असतांही सभ्यजन मौन धरून बसले आहेत; यावरून तिला न्यायानें जिंकलें ह्या गोष्टीला त्यांची पूर्ण संमति आहे, असें उघड होतें. असें असून तूं मात्र पोरस्वभावामुळें मोठ्या डौलानें बोलत आहेस. तुला धर्माधर्मविचार कांहींच समजत नसल्यामुळें हिला जिंकलें असून जिंकलें नाहीं ह्मणून तूं प्रतिपादन करतोस. जेव्हां युधिष्ठिरानें आपलें सर्वस्व पणाला लाविलें तेव्हां तिलाच तेवढें जिंकलें नाहीं असें ह्मणण्याला तुला काय आधार आहे ? शकुनीनें जरी हिचें नांव सूचवून दिलें तरी पणाला लावणें न लावणें युधिष्ठिराकडेसच होतें कीं नाहीं ? आतां एक वस्त्रानिशीं तिला सभेंत आणण्यांत तरी काय मोठें पाप झालें आहे ? कारण **स्त्रियांना शास्त्रामध्यें एकच पति सांगितला असून** ही अनेकांची बायको असल्यामुळें वेश्येसारखीच समजली पाहिजे. ह्मणून तिला एका वस्त्रानें अगर नग्न अशी सभेमध्यें आणण्यांत विलक्षण असें कांहींच नाहीं. शकुनीनें पांडवांचें सर्वस्व हरण केलें आहे हें लक्षांत असूं दे.' नंतर तो, दुःशासनाला ह्मणाला, 'हा पोर विकर्ण शहाणपणाच्या घमेंडींत कांहीं तरी बरळत आहे. पांडवांचीं व द्रौपदीचीं सर्व वस्त्रें हरण करून घे.' हें त्याचें भाषण ऐकून सर्व पांडवांनीं आपलीं नेसलेलीं व अंगावरचीं वस्त्रें काढून सभेमध्यें ठेविलीं. भर सभेमध्यें दुःशासन द्रौपदीचें वस्त्र बलत्कारानें फेडूं लागला असतां तिनें अंतःकरणपूर्वक श्रीकृष्णाचा धांवा केला. त्याबरोबर करुणार्द्र होऊन श्रीकृष्ण शय्या सोडून पायांनींच त्या ठिकाणीं आला व त्यानें अनेक मौल्यवान उंची वस्त्रांनीं तिला झांकून काढलें. जसें जसें दुःशासन तिचें वस्त्र फेडूं लागला तसें तसें तशाच प्रकारचें दुसरें वस्त्र तिच्या अंगावर दिसूं लागलें. तो चमत्कार पाहून सभ्यांनीं दुःशासनाची निर्भर्त्सना करून द्रौपदीची प्रशंसा केली. हा सर्व प्रकार चालला असतां संतापानें ओंठ थरथरां कांपत भीम हात चोळूं लागला. मोठ्यानें ओरडून तेथें जमलेल्या सर्व राजांसमक्ष त्यानें अशी प्रतिज्ञा केली, 'हे क्षत्रिय हो, आजपर्यंत कधीं कोणीं केली नाहीं व पुढें कोणी करणार नाहीं अशी माझी ही घोर प्रतिज्ञा ऐका. ह्या दुर्बुद्ध पापी भरतकुलाला कलंक लावणाऱ्या अधमाचें युद्धांत ऊर फोडून मी जर रक्त प्यालों नाहीं तर माझ्या पूर्वजांना मिळालेल्या गतीला मी कधीं जाणार नाहीं !' सभेमध्यें वस्त्रांचा ढीग पडला तरी द्रौपदी नग्न झाली नाहीं हें पाहून दुःशासनाचा हिरमोड झाला व थकल्यामुळें वस्त्रें फेडण्याचें काम त्यानें बंद केलें. त्या वेळीं विदुर हात वर करून सर्व सभ्यांना गप्प करून म्हणाले, 'द्रौपदी तुह्मांला प्रश्न करून गाईप्रमाणें रुदन करीत आहे. तुह्मी तर त्याचें कांहीं उत्तर देत नाहीं. धर्म व नीति यांचा हा छल चालला आहे. ज्या वेळीं एखादा संकटांत पडलेला पेटलेल्या अग्नीप्रमाणें संतप्त होऊन सभेमध्यें येतो तेव्हां न्याय देऊन सभ्य त्याला शांत करतात. **सभ्यांनीं आपल्यावर काम, क्रोध व बल ह्यांचा पगडा बसूं न देतां सत्य असेल तेंच सांगितलें पाहिजे.** सभेमध्यें आलेला धर्मज्ञ प्रश्नाचें उत्तर न देईल तर खोटें बोलल्याच्या पापाचें अर्धें पाप त्या-

च्या माथीं बसतें. व जो सभेमध्यें येऊन खोटें बोलतो त्याला तें सबंध पाप लागतें. अंगिरा व प्रल्हाद ह्यांचें संभाषण जुन्या इतिहासांत ह्याला उदाहरण आहे. ती कथा अशी आहे कीं, दैत्येंद्र जो प्रल्हाद त्याच्या विरोचन नांवाच्या मुलानें मुलीच्या संबंधानें अंगिराचा मुलगा जो सुधन्वा त्याच्याबरोबर तंटा केला. कन्याप्राप्तीसाठीं 'मी श्रेष्ठ, मी श्रेष्ठ,' ह्मणून त्या दोघांनीं आपल्या प्राणांची पैज लाविली. वाद सुरू झाला असतां त्या दोघांनीं प्रल्हादाला त्याचा निकाल विचारला. प्रल्हादाला साक्षात ब्रह्मदंडरूप सुधन्याकडे पाहून भीति वाटली व तो पिंपळाच्या पानाप्रमाणें लटलटां कांपूं लागला. जो प्रश्नाचें उत्तर देणार नाहीं अगर खोटें सांगेल त्याला कोणते लोक प्राप्त होतात ह्मणून त्यानें कश्यपांला जाऊन विचारलें. कश्यप ह्मणाले, 'प्रश्न केला असतां योग्य जबाब देणें कळत असून जो कामानें, क्रोधानें अगर भयानें खोटें बोलेल अगर कांहींच बोलणार नाहीं व जो ऐकीव अगर तोंडी माहितीच्या साक्षीसाठीं बोलावला असून उडवाउडवीचें उत्तर देईल तो वरुणाचे हजार पाश आपल्या भोंवतीं गुंडाळून घेतो, व प्रत्येक वर्षी त्याचा एक एक पाश मोकळा होतो. अधर्मरूपी बाण लागून धर्म घायाळ होऊन सभेमध्यें आला असतां त्याचें शल्य उपटून काढणें प्रत्येक सभासदाचें कर्तव्य आहे. तसें न होईल तर सभासदांनाच ते बाण लागतात. निंदेला पात्र अशा मनुष्याची सभेमध्यें निंदा न झाल्यानें त्या पातकापैकीं अर्धें पाप सभेमधील अध्यक्षाला लागतें. चतुर्थांश तें निंद्यकर्म करणाराला लागतें व सभासद बाकीच्या चतुर्थांशाचें वांटेकरी होतात. खरा न्याय मागितला असतां. जो खोटें सांगतो तो मागच्या सात व पुढच्या सात अशा चौदा कुळांना नरकाला पाठवितो. ज्याचें सर्वस्व हरण झालें आहे, ज्याचा मुलगा मेला आहे, जो कर्जबाजारी आहे, जो स्वार्थापासून भ्रष्ट झाला आहे, जी स्त्री विधवा झाली आहे, राजानें ज्याला फासून टाकलें आहे, जो वाघाच्या तावडींत सांपडला आहे, व जिला सवत आहे, अशा सर्वांना जें दुःख सहन करावें लागतें तें दुःख जो साक्षीदार साक्षीला बोलावलें असून खोटें सांगतो त्याला भोगावें लागतें. कोणताही मनुष्य एखादी गोष्ट प्रत्यक्ष पाहिल्यानें, ऐकल्यानें किंवा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें त्याच्या ती कानीं आल्यानें तिचा तो साक्षी समजला जातो. खरें सांगणारा साक्षी धर्मार्थाला मुकत नाहीं.' हें कश्यपांचें भाषण ऐकून तुझ्यापेक्षां सुधन्वाच श्रेष्ठ' असें प्रल्हादानें विरोचनाला सांगितलें. तो निकाल ऐकून 'पुत्रस्नेह बाजूला ठेवून ज्या अर्थी तूं खरा निकाल दिला आहेस, त्या अर्थी हा तुझा मुलगा शंभर वर्षं जगेल,' असें सुधन्वा ह्मणाला.

ह्या श्रेष्ठ धर्माचा व द्रौपदीच्या प्रश्नाचा विचार करून कोणाच्याच तोंडांतून एकही अक्षर निघेना. तेव्हां कर्णानें तिला हिसडा देऊन 'ह्या द्रौपदीदासीला बाज्यांत घेऊन जा,' ह्मणून दुःशासनाला सांगितलें. दुःखानें कष्टी होऊन द्रौपदी रडूं लागली. 'स्वयंवर झाल्यापासून आजपर्यंत जी मी कोणाच्या दृष्टीस देखील पडलें नाहीं, त्या माझी भर सभेमध्यें अशी विडंबना व्हावी हें केवढें दुर्दैव! ज्या पांडवांना मला पूर्वी घरामध्यें देखील वाऱ्याचा स्पर्श झालेला सहन होत नसे ते आज हे दुरात्मे माझी अशी भरसभेंत विडंबना करीत आहेत तरी ते निमुटपणें पहात उभे आहेत. इतर कुरुवृद्धांनाही याचें कांहीं वाटत नाहीं. कालच फिरला त्याला ते तरी काय करतील? आज ह्या राजांचा धर्म तरी कोठें दडला कोणाला ठाऊक? धर्मपत्नीला असें वागविल्याचें आजपर्यंत कोठें ऐकण्यांत नाहीं. तो पुरातन धर्म कौरवांपासून नाहींसा झालेला दिसतो. मी पांडवांची धर्मस्त्री व कृष्णाची बहीण आहें, येवढें मला ठाऊक आहे; आतां मी दासी आहें कां कोण आहे हें मला कळूंदे ह्मणजे तसें वागण्याला बरें पडेल. कौरवांचें यश मातीला मिळविण्याला उभा राहिलेला हा नराधम मला फार पीडा देत आहे. माझ्यानें हे हाल आतां सोसवत नाहींत? भीष्म ह्मणाले, 'कल्याणि, धर्माची गति फार गहन असून शहाण्यांना देखील ती कळत नाहीं. ह्या जगांत बलाढ्य मनुष्य ज्याला धर्म ह्मणतो तो अधर्म असला तरी धर्म ठरतो व दुबळ्या मनुष्यानें सांगितलेल्या धर्माला तो खरा धर्म

असला तरी कोणी विचारीत नाहीं. हा तुझा प्रश्न फार सूक्ष्म व बिकट असल्यामुळें व कार्यगौरव मनांत आणून त्याचा योग्य निवाडा आह्मांला देतां येत नाहीं. एकंदरीनें ह्या कुरुकुलाचा अंतकाल अगदीं जवळ आला आहे. हें मात्र खचित. ह्मणूनच सर्व कौरव लोभ व मोह ह्यांनीं अंध होऊन थोर कुलांत जन्मले असून अशीं अनन्वित कृत्यें करण्याला निघाले आहेत. अशा प्रसंगीं देखील धर्माधर्माचा विचार तूं मनांत आणतेस हें बुद्धें वर्तन तुझ्यासारख्या कुलीन स्त्रीला शोभेसेंच आहे. ह्या धर्मज्ञ द्रोणादिकांच्या कुडींतून प्राण निघून गेल्यासारखें झालें आहे. फक्त शरीरानें ते ह्या ठिकाणीं बसले आहेत; म्हणून ह्या तुझ्या प्रश्नाला युधिष्ठिरच जें काय उत्तर देईल तेंच प्रमाण. मृगीप्रमाणें दीन झालेल्या द्रौपदीला रडतांना पाहून दुर्योधन हासून ह्मणाला, 'ह्या तुझ्या प्रश्नाचें उत्तर युधिष्ठिर किंवा दुसरा एखादा पांडवच देऊं दे ह्मणजे झालें. त्यावरूनच ह्या गोष्टीचा निकाल लावतां येईल ? सर्व राजांनीं आपल्या अंगवस्त्राचीं शेवटें वर फडकावून ह्या त्याच्या भाषणाला आपली संमति दर्शविली व आतां युधिष्ठिर काय ह्मणतो तें ऐकण्यासाठीं त्यांचे डोळे त्याकडे लागले. इकडे भीम उठून युधिष्ठिराचा चंदनचर्चित हात धरून ह्मणाला, 'जर हे उदारधी धर्मराज आमच्या कुलाचे गुरु व स्वामी नसते तर आह्मीं ही विडंबना कधीं सहन केली नसती. आमच्या सर्व पुण्यावर व आमच्या प्राणांवर देखील त्यांचें स्वामित्व आहे. द्रौपदीला पणाला लावण्यापूर्वी त्यांना जिंकलें नव्हतें असें जर त्यांना वाटत असेल तर आह्मी हरलों आहोंतच. तसें नसेल तर ह्या भूतलावर संचार करणारा असा कोणता मानव प्राणी आहे कीं जो द्रौपदीच्या केंसांला स्पर्श करून माझ्या ह्या कांबीसारख्या बाहूंच्या तडाक्यांतून जिवंत सुटेल, मग तो प्रत्यक्ष इंद्र असला ह्मणून काय झालें? धर्मपाशानें आह्मी जखडलों गेलों असून वडील भावाच्या ठिकाणीं असणारा आमचा पूज्यभाव जर आज आमच्या पराक्रमाच्या आड आला नसता, तर आजचा प्रसंग कशा प्रकारचा झाला असता हें ह्या नराधमांना मीं दाखविलें असतें. धर्मराज जर मोकळीक देतील तर तरवारीच्या ऐवजीं तळहाताचाच उपयोग करून ह्या नीचांना क्षुद्र मृगांप्रमाणें पहा कसें चिरडून टाकितों! ' कर्ण ह्मणाला, ' ह्या जगांत **दास, पुत्र, व परतंत्र स्त्री ह्या तिघांची आपल्या ऐश्वर्यावर मालकी नसते.** दासाच्या बायकोवरही त्याची मालकी नाहीं. ह्मणून ह्मणतो, हे द्रौपदि, दुर्योधनाच्या अंतःपुरांत जाऊन त्याच्या परिवाराची सेवा करणेंच तुला आतां रास्त आहे. मात्र तुला तुझ्या योग्यतेनुरूप काम मिळेल. आतां तुझे यजमान पांडव नसून कौरव झाले आहेत. ज्यामुळें द्यूतांत हरून दुसऱ्याचें दास्य पतकरावें लागणार नाहीं असा दुसरा एखादा नवरा बघ. ज्या दासी झाल्या आहेत त्यांना फिरून स्वेच्छेनें वाटेल तो दुसरा नवरा करण्याला धर्माची मोकळीक आहे. हे पांडव स्वतः द्यूतांत दास बनले आहेत तेव्हां त्यांचें तुझ्यावर पतित्व आतां कसचें उरलें? त्यांचे जे स्वामी तेच आतां तुझे स्वामी. तुला भरसभेमध्यें पणाला लाविलें त्यावेळीं जन्मसाफल्य, पराक्रम व पौरुष हे सर्व थोर विचार त्यांच्या मनांतून कोठें गेले होते? ' हें कर्णाचें हृदयभेदक भाषण ऐकून धर्मानें जखडून गेला असल्यामुळें संतप्त होऊन भीम रागानें डोळे लाल करून ह्मणाला, ' ह्या सूतपुत्राच्या भाषणाचा मला मुळींच राग येत नाहीं. ह्यानें सांगितलेला हा खराच दासांचा धर्म आहे. धर्मराज, आपण जर हिला पणाला लाविली नसती तर आपल्या वैऱ्यांना असें भाषण करण्याला सवड कां मिळती? ' इतक्यांत ऐश्वर्यमदानें उन्मत्त झालेल्या दुर्योधनानें आपलें नेसलेलें वस्त्र बाजूला करून हासत हासत द्रौपदीकडे व कर्णाकडे पहात आपली केळीच्या सोंटासारखी मांडी भीमाला दाखविली. ती पाहतांच संतापून जाऊन व आपले लाल डोळे वटारून तो ह्मणाला, ' अधमा, युद्धामध्यें ही तुझी मांडी मीं जर फोडली नाहीं तर माझ्या पूर्वजांना मिळालेली गति मला खास मिळणार नाहीं. ' यावर ' हा द्यूताचा कळस, भरसभेमध्यें झालेली स्त्रीची ही विडंबना व पांडवांशीं अशा प्रकारचें हें अन्यायाचें वर्तन ह्या सर्वामुळें कौरवांवर मोठें भयंकर संकट येणार आहे, ' असें विदुरानीं भाकीत सांगितलें.

'युधिष्ठिर सांगेल तर द्रौपदीला दास्यापासून मुक्त करतों,' असें दुर्योधनाचें अनेकवार भाषण ऐकून अर्जुन ह्मणाला, 'द्यूताला आरंभ करण्यापूर्वी महाराज युधिष्ठिरांचें आमच्यावर प्रभुत्व होतें. स्वतःच पणामध्यें हरल्यावर त्यांचें कोणावरच प्रभुत्व उरलें नाहीं.' असें तो ह्मणतो आहे इतक्यांत धृतराष्ट्राच्या होमशाळेंत कोल्ह्यांचा शब्द होऊन गाढवांनीं त्याला प्रतिशब्द केला. हें दुश्चिन्ह पाहून धृतराष्ट्र घाबरून ह्मणाला, 'हे अन्याय करण्याला प्रवृत्त झालेल्या मंदबुद्धे दुर्योधना, स्त्रीला विशेषतः द्रौपदीसारख्या पतिव्रतेला भर सभेमध्यें टाकून बोलून तूं आपला सर्वस्वीं घात मात्र करून घेत आहेस.' असें ह्मणून बांधवांविषयीं हितबुद्धीनें 'मी तुझ्यावर संतुष्ट आहें, वर माग,' असें तो द्रौपदीला ह्मणाला. 'आपण मला देत असाल तर श्रीमान् युधिष्ठिर दास्यापासून मुक्त होऊं द्यात,' असा तिनें वर मागितला. 'दुसरा वर माग' ह्मणून तो ह्मणाला असतां, 'माझे दुसरे' पति दास्यापासून मुक्त होऊं द्यात,' ह्मणून तिनें मागितलें. 'माझ्या सर्व सुनांमध्यें तूं श्रेष्ठ आहेस, तिसरा वर माग' ह्मणून धृतराष्ट्र ह्मणाला असतां ती ह्मणाली, 'लोभ हा धर्मनाशाला कारण होतो, ह्मणून तिसरा वर मागण्याला मी अपात्र आहें. **वैश्य एका वराला अधिकारी असून क्षत्रिय दोहोंला आहे, व राजाला तीन वरांचा व ब्राह्मणाला शंभर वरांचा अधिकार आहे.** आपत्तींत बुडालेले हे माझे पति दास्यापासून मुक्त झाल्यावर ते आपल्या पुण्यकर्मांनींच चांगले दिवस पाहण्याला समर्थ होतील. आतां आणखी वराची अपेक्षा उरली नाहीं.' कर्ण ह्मणाला, 'नाव नसल्यानें निराधार होऊन दुःखसागरांत बुडणाऱ्या पांडुपुत्रांना पैलपार नेण्याला ही स्त्री नावेच्या ठिकाणीं झाली.' हें त्याचें टोंचून बोलणें ऐकून भीम ह्मणाला, '**आपत्य, कर्म व विद्या ह्या तीन ज्योतींनीं पुरुष बनतो असें देवलांचें मत आहे.** कारण हीं तीनच सर्व सृष्टीच्या उत्पत्तीला कारण आहेत. कुडींतून प्राण निघून जाऊन ह्या अपवित्र देहाला ज्ञातींनीं सोडलें असतां हीं तीनच मनुष्याच्या उपयोगीं पडतात. आमच्या धर्मपत्नीची ह्याप्रमाणें, आमच्या समक्ष विडंबना झाल्यानें ती आमच्या मधली ज्योती नाहींशी झाली आहे. अर्जुना, अशा प्रकारें तेजोहीनांपासून होणारा मुलगा तरी आपल्याला काय उपयोगी पडणार?' अर्जुन ह्मणाला, '**नीचांची दुरुक्ति थोर मुळींच मनावर घेत नाहींत.** भल्यांना लोक मान देतात व सूड घेण्याचें सामर्थ्य असलें तरी ते दुसऱ्यांनीं केलेलें चांगलें तेवढें मनांत ठेवून वाईटाकडे मुळींच लक्ष देत नाहींत. धर्मराजांची आज्ञा होत असेल तर ह्या ठिकाणीं जमलेल्या सर्व शत्रूंना समूळ नाहींसे करण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य आहे. वृथा वादविवादांत काय अर्थ आहे?' असें ह्मणून तो वारंवार भीमाचें मृदु शब्दांनीं शांतवन करीत होता; तरी मृगांमध्यें असणाऱ्या सिंहाप्रमाणें डोळे वटारून वर पहातच होता. संतापानें तो अगदीं पेटला असून त्याच्या क्रोधाग्नीच्या सधूम ज्वाळा कर्णादि इंद्रियांच्या द्वारें बाहेर पडत होत्या. त्याच्या त्या भिवया चढविलेल्या मुखाकडे कोणाची पहाण्याची छाती होईना. 'शांत हो,' ह्मणून त्याला गप्प करून युधिष्ठिर धृतराष्ट्राकडे जाऊन ह्मणाला, 'आह्मांला काय आज्ञा आहे? आपला आमच्यावर ताबा असून नेहमीं आपल्या आज्ञेंत राहण्याची आमची इच्छा आहे.' धृतराष्ट्र ह्मणाला, 'अजातशत्रो, तुझें कल्याण असो. कांहीं काळजी न करतां खुशाल बुद्धी आपल्या नगराला परत जा व माझ्या आज्ञेनें आपल्या संपत्तीचा यथेच्छ उपभोग घेत रहा. मी सांगतों एवढें मात्र लक्षांत ठेव. माझें भाषण श्रेयस्कर व हिताचें आहे. धर्माची सूक्ष्म गति तुला माहीत आहेच. तूं विनीत असून वृद्धांची शुश्रूषा केली आहेस. **ज्या ठिकाणीं बुद्धि आहे त्याच ठिकाणीं शांति असणार.** शांत हो, भलत्याच ठिकाणीं शस्त्र फेंकणें उचित नाहीं. **ज्यांना वैर कधीं ठाऊक नसून जे दुसऱ्यांचे गुण तेवढे घेऊन त्यांच्या दुर्गुणाकडे दुर्लक्ष करतात तेच उत्तम पुरुष समजले पाहिजेत. सज्जनांची सर्व खटपट दुसऱ्याच्या हितासाठीं असून प्रत्युपकाराची ते परवा ठेवीत नाहींत.** जे अधम असतात ते मात्र भाषणांत कटु शब्दांचा उपयोग करतात. मध्यम पुरुषांना कोणीं खिजविलें असतां मा-

त्र ते निष्ठुर उत्तर करतात. पण जे उत्तम पुरुष असतात त्यांना कोणी कसेंही चिडविलें तरी त्यांच्या तोंडांतून निष्ठुर शब्द कधीं निघत नाहीं. ते आपल्यावरून जगाची पारख करून थोरांनीं घालून दिलेली मर्यादा न ओलांडतां सर्वांशीं गोड असतात. ह्या सभेमध्यें तुझें वर्तन असेंच थोरपणाचें झालें आहे. वत्सा, दुर्योधनाचें दुर्भाषण मनावर घेऊं नकोस, मी तुला तुझ्या वृद्ध पित्याच्या ठिकाणीं आहें. मी व गांधारी कधीं तुझ्याकडे आलों असतां आमच्यांशीं स्नेहानें बाग.सहज तुमची भेट होईल ह्या उद्देशानें मीं ह्या द्यूताकडे दुर्लक्ष केलें. ज्या कौरवांचा मार्गदर्शक तूं आहेस, व ज्यांना विदुरासारखा शहाणा मंत्री आहे, त्यांच्या संबंधानें काळजी करण्याची आवश्यकता नाहीं. तूं प्रत्यक्ष धर्माची मूर्ति असून अर्जुनाच्या ठिकाणीं धैर्य, व भीमाच्या ठिकाणीं पराक्रम वसत आहे. तशीच पुरुषश्रेष्ठ जे नकुल सहदेव त्यांच्या ठिकाणीं शुद्ध गुरुशुश्रूषा दिसून येते. तुझें कल्याण असो. तूं सुखानें खांडवप्रस्थाला जा. भावांसंबंधानें तुझें प्रेम वाढत राहो व धर्मापासून तुझें मन कधीं न ढळो.' ह्याप्रमाणें युधिष्ठिराला उपदेश करून धृतराष्ट्रानें पांडवांना इंद्रप्रस्थाला पाठवून दिलें.

---

५८ अनुद्यूत व पांडवांचा वनवास. (२. ७४–८१)

पांडवांचें द्रव्य त्यांना देऊन धृतराष्ट्रानें त्यांना जाण्यास सांगितलें असतां ते निघून गेल्यावर कर्ण, शकुनि, दुर्योधन व दुःशासन ही चांडाळ चौकडी आपसांत विचार करूं लागली. दुर्योधन ह्मणाला, 'युद्धांत किंवा बलांत आपल्यापेक्षां वरचढ असणाऱ्या शत्रूचा हर उपयानें घात करावा अशी प्रत्यक्ष बृहस्पतीनीं इंद्राला नीति सांगितली आहे. मग आह्मी पांडवांची संपत्ति हरण करून तिनें सर्व राजांना संतुष्ट करून त्यांच्या साहाय्यानें पांडवांबरोबर युद्ध केलें असतां त्याला काय बाध आहे? **देश करण्याच्या उद्देशानें खबळून आलेल्या विषारी सापांना डंवचून मग सोडून देणें कधीं शहाणपणाचें होणार नाहीं. खवळलेले पांडव** एकदां शस्त्र घेऊन रथारूढ झाले ह्मणजे मग आह्मांला नामशेष करण्याला त्यांना मुळींच वेळ लागणार नाहीं. ते सर्व आकारावरून आपला उद्देश प्रकट करीत सैन्य जमविण्यासाठीं येथून निघून गेले आहेत. द्रौपदीची आह्मीं केलेली विडंबना त्यांपैकीं कोणालाही सहन होणार नाहीं. त्याबद्दल ते खचित सूड घेणार. यासाठीं पुन्हां त्यांबरोबर द्यूत खेळून त्यांना बारा वर्षं वनवासाला व एक वर्ष कोणत्या तरी नगरामध्यें अज्ञातवासाला पाठविणेंच श्रेयस्कर होणार आहे.' ह्याप्रमाणें विचार करून अर्ध्या वाटेवरूनच पांडवांना परत आणविण्यासाठीं दुर्योधनानें धृतराष्ट्राला सांगितलें. भीष्मद्रोणादिकांना ह्याचा परिणाम पूर्णपणें माहीत असल्यानें त्यांची त्याला संमति नव्हती. तरी धृतराष्ट्रानें पुत्रवात्सल्यामुळें पांडवांना परत बोलाविलें. इकडे धर्मशील गांधारीला ही गोष्ट ऐकून फार वाईट वाटलें व दुर्योधनाच्या जन्माच्यावेळीं झालेलीं दुश्चिन्हें व विदुराचें भाषण मनांत आणून ती धृतराष्ट्राला ह्मणाली, खचित हा कुलांगार ह्या आपल्या कुलाचें वाटोळें करण्याला उपजला आहे. हा मेला तर त्यांतच आपलें कल्याण आहे. आपल्या चुकीनें डोहांत गटंगळ्या खाऊं नका. निंद्य पोरबुद्धीचा आदर करून कुलाच्या घोर नाशाला आपण कारण होऊं नका. **कोणता शहाणा मनुष्य बांधलेला सेतू मोडून टाकण्याला तयार होईल किंवा विझलेला अग्नि फिरून चेतवील?** हिताहिताच्या संबंधानें अप्रबुद्धावर शास्त्राचा कधीं कांहीं परिणाम घडावयाचा नाहीं. त्याला शहाण्याची सर कधीं यावयाची नाहीं. मुलांनीं आपल्या आज्ञेंत असावें हेंच ठीक. आपलें न ऐकतां मागून त्यांनीं आपल्याला हासावें ह्यांत काय शोभा? शांति, धर्म व नीति, ह्यांना झुगारून देऊन आपल्याकडून असा प्रमाद घडावा हें आपल्या बुद्धीचा कोतेपणा दाखवितें. **क्रूर उपायांनीं व अन्यायानें मिळविलेली संपत्ति कधीं फार दिवस टिकत नाहीं. तीच सौम्य उपायांनीं व न्यायानें मिळविली असेल तर पुत्रपौत्रांना तिचा उपभोग मिळतो.**' हें तिचें धर्मप्रचुर भाषण ऐकून धृतराष्ट्र ह्मणाला, 'तूं ह्मणतेस तें

खरें आहे; पण माझ्या हातांत आतां कांहीं उरलें नाहीं. त्यांच्या इच्छेप्रमाणेंच कां होईना.' प्रातिकामी धृतराष्ट्राच्या आज्ञेनें युधिष्ठिराकडे जाऊन ह्मणाला, 'सर्व प्राणिमात्रांना विधात्याच्या नियमानुसार शुभाशुभ फल मिळतें. तें टाळणें मनुष्याच्या हातांमध्यें नाहीं. द्यूताला बोलावणें ह्मणजे कुलक्षयाला बोलावणें आहे हें पक्कें कळत असून वृद्धाच्या आज्ञेनें तें मला करावें लागत आहे.' सुवर्णमृगाचें अस्तित्व संभवनीय नाहीं हें माहीत असून रामाला देखील तशा प्रकारच्या मृगाचा लोभ उत्पन्न झाला. **बहुतकरून विनाशकाल जवळ आला असतां मनुष्याला विपरीत बुद्धि होते.** ह्मणूनच शकुनीचें द्यूतकापट्य माहीत असून युधिष्ठिर परत येऊन द्यूत खेळावयाला तयार झाला. सर्वलोकक्षयकर द्यूत फिरून सुरू झालें. पांडव परत येऊन आपापल्या जागेवर बसल्यानंतर शकुनि ह्मणाला, 'धृतराष्ट्रांनीं जें तुमचें द्रव्य तुम्हांला परत दिलें तें आम्हांला कबूल आहे. तें आतां पणामध्यें हरण करण्याची आमची इच्छा नाहीं. आतां मी पण लावतों तो ऐका. आपल्यापैकीं जो हरेल त्यानें मृगाजिन अंगावर घेऊन बारा वर्षे वनवास व एक वर्ष कोणत्या तरी नगरांत अज्ञातवास करून परत आल्यावर आपल्या संपत्तीचा उपभोग घ्यावा. अज्ञातवासांत उघाडकीस आल्यास फिरून बारा वर्षे वनवास करावा व तेरावें वर्ष पूर्वीप्रमाणें अज्ञातवासांत घालवून मग राज्याचा उपभोग घ्यावा.' ह्याप्रकारें पण करून त्यापासून पुढें ओढवणाऱ्या मोठ्या संकटाकडे लक्ष न देतां त्यानीं द्यूताला फिरून सुरवात केली. लोकांचें धिक्कारयुक्त भाषण कानीं पडत असतांही अपकीर्ति व धर्म ह्या दोन गोष्टींचा बिचार करून युधिष्ठिर द्यूत खेळूं लागला. फांसे टाकल्याबरोबर 'जिंकलें!' असे शब्द शकुनीच्या तोंडून निघाले. ह्याप्रमाणें पराभव झाल्यावर कातडीं नेसून पांडव वनवासाला जाण्याला तयार झाले. ते निघाले तेव्हां दुःशासन त्यांना टोंचून बोलून त्यांकडे पाहून हासत होता. तामसी भीमाला तें सहन न होऊन हिमाचलावर राहणाऱ्या सिंहानें ज्याप्रमाणें एखाद्या कोल्ह्यावर तुटून पडावें त्याप्रमाणें त्यावर तुटून पडून तो त्याला ह्मणाला, 'गांधाराच्या कपटविद्येनें चढून जाऊन तूं ह्याप्रमाणें वाक्शरांनीं आमच्या मर्मस्थळांना घरें पाडीत आहेस; पण ध्यानांत ठेव समरांमध्यें प्रत्यक्ष शरांनीं तुला घायाळ करून मग मी ह्या तुझ्या शब्दांची तुला आठवण देईन. तुझे अनुयायी, तुझी पाठ राखणारे व तुझे बांधव ह्या सर्वांसहवर्तमान मी तुला यमसदनाला पाठवीन.' धर्मामुळें पांडवांचें हातपाय जखडून गेलेले पाहून हें भीमाचें भाषण ऐकून भरसभेमध्यें 'गाय रे गाय' असें ह्मणत तो नीच आनंदानें नाचला. 'दुष्टा, असें निष्ठुर भाषण करण्याला तुझें तोंड तरी कसें पुढें सरसावलें? कपटानें द्रव्य मिळवून फुशारकी मारणें कोणाला शोभतें? रणामध्यें तुझें ऊर फोडून जर रक्त पिणार नाहीं तर ह्या वृकोदराला उत्तम लोक कधीं मिळावयाचे नाहींत. लवकरच सर्व कौरवांचा रणांत फडशा पाडीन तेव्हांच मी शांत होईन, तूं काय समजला आहेस?' असें बोलून सिंहगर्तानें तो चालला असतां दुर्योधनानें त्याचें अनुकरण करून त्याला वेडावून दाखविलें. भीम मागें वळून ह्मणाला, 'एवढ्यानेंच शेफारून जाऊन कृतार्थ झालास असें समजूं नकोस. लवकरच तुझ्या भावांसह तुला ठार करून मग कृतकर्माची आठवण मी तुला देईन. मी तुला आणि दुःशासनाला मारणार. धनंजय कर्णाला मारील. अक्षपटु शकुनीला सहदेव मारील. हें मी ह्या भरसभेमध्यें सांगत आहें. आतां हें खरें करणें देवाकडे आहे. दुष्टा, अधमा, युद्धांत तुला गदेनें मारीन व ह्या वाकशूर दुरात्म्या दुःशासनाचें रक्त सिंहाप्रमाणें गटगटां पिईन.' अर्जुन ह्मणाला, 'भीमा, **शहाणे लोक तोंडानें उगीच बडबड करीत नाहींत.** आजपासून चवदाव्या वर्षीं जें काय होईल तें पाहून घेऊं. भीमा, तुझ्या आज्ञेनें आमची असूया व व आमचा द्वेष करणाऱ्या या वृथा बडबड करणाऱ्या कर्णाला मीच युद्धांत मारीन, हें हा अर्जुन भीमाचें प्रिय करण्यासाठीं वचन देत आहें पहा. कर्ण व त्याचे जे अनुयायी युद्धांत माझ्या समोर उभे राहतील त्या सर्वांना मी यमसदनाला पाठवीन. हिमाचल आपल्या स्थानापासून भ्रष्ट होईल, सूर्यप्रभा हीन होईल, चंद्रामधलें शैत्य नष्ट होईल, पण हें

माझें भाषण कधीं खोटें होणार नाहीं.' सहदेवही दंड थोपटून शकुनीला मारण्यासंबंधानें प्रतिज्ञा करून म्हणाला, 'कपटद्यूत खेळणाऱ्या मूढा, जे हे तुला आज फांसे दिसत आहेत ते फांसे नसून तीक्ष्ण बाण आमच्या हृदयांत तूं मारले आहेस. संग्रामामध्यें क्षात्रधर्मानें जर तूं उभा राहशील तर भीम जें म्हणाला तें मी खचित खरें केल्यावांचून सोडणार नाहीं.' नकुल म्हणाला, 'द्यूताममध्यें दुर्योधनाचें प्रिय करण्यासाठीं जे जे म्हणून द्रौपदीला टाकून बोलले आहेत, त्या सर्वांना तिची विडंबना केल्याबद्दल महाराजांच्या आज्ञेनें मी यमसदनाला पाठवीन, अशी मी प्रतिज्ञा करतों.' ह्याप्रमाणें प्रत्येकानें प्रतिज्ञा करून त्यांनीं भीष्मादिक वृद्धांचा निरोप घेतला. लज्जेमुळें भीष्मादिकांच्या तोंडांतून एकही शब्द निघेना. त्यांनीं मनांनींच त्यांचें कल्याण चिंतन केलें. विदुर म्हणाले, 'ही थोर राजपुत्री कुंती आजपर्यंत सुखांत असून हिला दुःखाचें वारें कधीं माहीत नसल्यानें हिच्यानें अरण्यवास कंठवणार नाहीं. ह्या कल्याणीला आदरानें मी अपल्याजवळ ठेवून घेतों.' पांडवांनीं या गोष्टीला आपली संमति दिली. ते म्हणाले, 'आपण आमचे चुलते आह्मांला आमच्या वडीलांच्याजागीं आहां. आह्मांला आतां आधार कायतो आपलाच आहे व आमचे गुरूही आपणच आहां; आणखी जी काय आज्ञा असेल ती करा.' विदुर म्हणाले, 'युधिष्ठिरा, माझें म्हणणें ऐक. अधर्मानें पराभव झाला असतां त्याबद्दल कोणी वाईट वाटून घेत नाहीं. तुला सर्व धर्म माहीत आहे. युद्धामध्यें जय अर्जुनाकडे आहे. भीमसेन शत्रूंना मारण्याला समर्थ आहे. अर्थसंग्रह करण्यांत नकुल कुशल आहे, व राज्यव्यवस्था नीट ठेवण्याचें सामर्थ्य सहदेवाच्या अंगीं आहे. धौम्यांसारखे ब्रह्मवेत्ते तुला पुरोहित मिळाले आहेत; व धर्मार्थ जाणणारी द्रौपदी तुझी धर्मचारिणी आहे. **इतक्या गोष्टी अनुकूल आहेत म्हणून तुमचा हेवा करणारे ह्या जगांत पुष्कळ लोक निघतील यासाठीं तुह्मी एकमेकांशीं प्रेमानें वागून एकजुटीनें रहा.** तुझ्या कल्याणप्रद ऐहिकसुखासंबंधाच्या निरपेक्ष बुद्धीचा तुला मोठा उपयोग होईल. प्रत्यक्ष इंद्रासारख्या शत्रूला देखील तुह्मांला जिंकणें कठीण जाणार आहे. पूर्वी बारणावतींत व्यासांनीं, हिमाचलावर मेरुसावर्णींनीं, भृगुतुंगीं परशुरामांनीं, व दृषद्वतीमध्यें प्रत्यक्ष शंकरांनीं तुला उपदेश केलाच आहे. कल्माषी नदीच्या तीरावर असणाऱ्या भृगूंचाही तूं शिष्य आहेस. वारंवार नारद तुला दर्शन देत आहेतच. हे धौम्य तुझे पुरोहित आहेत. ऋषींना मान्य अशी आजपर्यंत धरलेली बुद्धि ह्या कठीण प्रसंगीं कायम ठेव म्हणजे झालें. इलापुत्र पुरूरव्याला बुद्धीमध्यें, दुसऱ्या राजांना शक्तीमध्यें व ऋषींना धर्माचरणामध्यें तूं मागें टाकशील. म्हणून इंद्राची विजयश्री, यमाची निग्रहशक्ति, कुबेराचा धनविसर्जन करण्याचा गुण, व वरुणाची आत्मसंयमनाची शक्ति संपादन करून घेण्याकडे लक्ष देऊन, जलापासून सर्व सहनशीलता, पृथ्वीपासून क्षमाशीलता, सूर्यमंडळापासून तेजस्विता, वायूपासून बल व अन्य भूतांपासून त्यांचे त्यांचे गुण तूं मिळीव. तुमचें कल्याण असो. आतां परत आल्यावर फिरून आपली भेट होईल. **संकटप्रसंगीं जशी वेळ येईल तसें वागून त्याला धैर्यानें डोकें द्या.** आजपर्यंत तुमचें कधीं वांकडें पाऊल पडलें नाहीं हें जरी खरें आहे तरी **संकटकालींच मनुष्याची खरी परीक्षा होत असते.** ' हा विदुरांचा उपदेश ऐकून घेऊन व भीष्मद्रोणांना नमस्कार करून पांडव निघाले. द्रौपदी त्यांच्या बरोबर जाण्यास तयार होऊन अंतःपुरांतील स्त्रियांना वंदन करून व आलिंगन देऊन कुंतीकडे निरोप घेण्यासाठीं आली. ती निघालेली पाहून कष्टी झाल्यामुळें गळा दाटून येऊन कुंति म्हणाली, 'मुली, संकटप्रसंगीं मन डगमगूं देऊं नकोस. स्त्रीधर्म तुला पूर्ण माहीत आहेच. तशांत तूं सुशील व आचारसंपन्न आहेस. पतींशीं कसें वागावें हें मी तुला शिकवावयाला नको. गुणसंपन्न अशा तुझ्यासारख्या साध्वीमुळें दोन्ही कुलांना शोभा आली आहे. तुझ्या रागानें हे कौरव जळून भस्म झाले नाहींत हें त्यांचें दैवच मी समजतें. मी तुमचें कल्याण चिंतीत बसतें. तुमच्यावर कांहीं अरिष्ट येणार नाहीं. होणाऱ्या गोष्टी अपरिहार्य जाणून **साध्वी स्त्रिया आपल्या मनाचा कधीं चलाबिचल होऊं देत**

नाहींत. सर्वश्रेष्ठ जो धर्म त्याचा तुला पाठिंबा असल्यामुळें लवकरच तूं चांगले दिवस पाहशील. महामती सहदेवाच्या मनाला वनवासांत ह्या प्रसंगामुळें दुःख होणार नाहीं अशी व्यवस्था ठेव.' 'बरें' ह्मणून द्रौपदीनें कुंतीला नमस्कार केला, व रजस्विन अशा एका वस्त्रानिशीं ती बाहेर पडली. तिच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या असल्यामुळें तिचें तोंड मळीण झालें होतें. तिचे केस मोकळे पाठीवर पडले होते. नंतर वस्त्राभरणें हरण करून घेऊन ज्यांना कातडीं नेसावयासाठीं दिलीं आहेत, ज्यांनीं लाजेनें आपलीं तोंडें खालीं घातलीं असून आनंदित झालेल्या शत्रूंचा घोळका ज्यांच्या भोवतीं जमला आहे, व ज्यांच्या मित्रांना त्यासंबंधानें वाईट वाटत आहे, अशा आपल्या मुलांजवळ येऊन त्यांना आलिंगन देऊन कुंति शोकाकुल होऊन ह्मणाली, 'मुलांनो, तुह्मी सद्धर्मानें चालत असून तुमचें वर्तन बिघडलें नाहीं. तुमचें आचरण व तुमचा संभावितपणा तुह्मांला भूषणप्रद आहे. तुमच्या अंगांत अधमपणा अथवा क्षुद्रबुद्धि मुळीं नसून निंद्यकृत्य तुमच्या हातून कधीं घडत नाहीं. सर्वांवर तुमचें प्रेम आहे व देवांवर श्रद्धा आहे. असें असून हें संकट तुमच्यावर कसें ओढविलें तें एका जगन्नियंत्याला ठाऊक. काय हा दैवाचा विचित्र खेळ! कोणत्या पापाचें हें फल असावें ह्मणून मी मनांत पुष्कळ विचार करतें, पण त्याचा मला उलगडा होत नाहीं. ज्या मीं तुह्मांला जन्म दिला त्या ह्या अभागिणीच्या पूर्वजन्मींच्या पातकाचें तर हें फळ नसेलना? इंद्रियज्ञानांच्या पलीकडच्या श्रेष्ठ गतीला जाऊन पोहोंचलेले तुमचे वडील व माद्री यांना मी धन्य समजतें. कारण मुलांचे हे हाल पहाण्याचें तरी त्यांच्या कपाळीं आलें नाहीं. माद्रीनें तर रतिसुखांत, अकलेंत, व उत्तम गति प्राप्त करून घेण्यांत, सर्वांतच मला फसविलें आहे. प्राणिमात्रांच्या कपाळीं ह्या नाशवंत जगांत नाश आहेच. माझ्या संबंधानें मात्र ब्रह्मदेव चुकून माझा नाश लिहून ठेवण्यास विसरला वाटतें; ह्मणून हा प्राण ह्या कुडीला अजून सोडीत नाहीं. हे द्वारकावासिन् कृष्णा, हे संकर्षणानुजा, तूं ह्या वेळीं कोठें दडला आहेस? मला व ह्या नरश्रेष्ठांना दुःखांतून तूं कां सोडवीत नाहींस? तुला स्वतःला आदि किंवा अंत नसून जे तुझ्याकडे अनन्यभावानें धांव घेतात त्यांना तूं संकटांतून सोडवितोस अशी आजपर्यंत मी ऐकत आलेली आख्यायिका व्यर्थ आहे असें आतां मला वाटूं लागलें आहे. ह्या सद्धर्मानें वागणाऱ्या थोर, कीर्तिमान व वीर्यवान पांडवांवर असें संकट कां आणिलेंस? ह्यांवर दया कर. नीतिज्ञ, शहाण्या, भीष्मद्रोणादिकांचा ह्या कुलाला पाठिंबा असून आह्मांला अशी विपत्ति कशी आली?' ह्याप्रमाणें शोक करणाऱ्या कुंतीचें बुद्धिवादानें शांतवन करून स्वतः तिच्यापेक्षां अधिक कष्टी झालेले विदुर तिच्यासह स्वगृहाकडे गेले. आकार व चिन्हें ह्यांनीं मनोभाव व उद्देश प्रगट करीत पांडव निघून गेल्यावर 'पांडवांच्या मागें आह्मी सर्व अनाथ झालों आहों, दुष्ट व लोभी कौरव आह्मांला कशाला पाहिजे आहेत,' ह्याप्रमाणें सर्व प्रजा शोक करूं लागली व हास्तिनापुरांत मोठमोठीं दुश्चिन्हें होऊं लागलीं. स्वच्छ आकाशांत विजा चमकूं लागल्या. धरणीकंप होऊं लागले. ग्रहणकालाप्रमाणें राहू सूर्याला ग्रासूं लागला. नगराच्या डाव्या भागांत उल्का पडूं लागल्या. मांसाहारी प्राणी देवालयांच्या शिखरांवर, ग्रामवृक्षांवर, वेशींवर, व राजवाड्यावर बसून अशुभ शब्द करूं लागले. इतक्यांत नारदांनीं येऊन सभेमध्यें 'आजपासून चवदावे वर्षीं दुर्योधनाच्या अपराधामुळें भीमाच्या बलानें सर्व कौरवांचा नाश होईल,' अशी घोर वाणी उच्चारिली. ती ऐकून धृतराष्ट्राच्या मनाला चैन पडेनासें होऊन विदुरांचा उपदेश आपण ऐकला नाहीं ही मोठी चूक केली असें त्याला वाटूं लागलें. **द्रोणाचें साहाय्य असल्यावर आपल्याला कांहीं भीति नाहीं असें दुर्योधनाला वाटून त्यानें त्यांना एक पृथक् राज्य तोडून दिलें;** तेव्हां द्रोण आपल्याशीं ह्मणाले, 'देवपुत्र पांडव अवध्य आहेत असें ब्राह्मणांनीं सांगितलें आहे. मी तर शरण आलेल्या धृतराष्ट्रांना माझ्यानें होईल तेवढें पाठबळ देणार. भरतकुलाचा नाश ठरला आहे तरी त्याला माझ्याच्यानें सोडवत नाहीं. द्रुपदानें माझ्याशीं वैरबुद्धि धरून याज व उपयाजयांच्या **तपाच्या** सामर्थ्यानें माझा अंत करणारा पुत्र उत्पन्न करून ठेवलाच आहे. माझा अंत करणारा धृष्टद्युम्न आहे, ही गो-

ष्ट जगजाहिर आहे. तो उत्तम काल आतां समीप आला आहे. हें **सुख शरदृतूंतील ताडाच्या सावलीप्रमाणें अल्प काल टिकणारें आहे.** सांपडेल तोंपर्यंत मोठमोठे यज्ञ करून भोग भोगून तर घ्या.' एकांतांत धृतराष्ट्राला चिंतातुर पाहून संजय म्हणाला, 'पांडवांना वनाला पाठवून ही वसुसंपूर्ण वसुधा मिळाली. आतां शोक करण्याला काय कारण उरलें ? पूर्वी पोरबुद्धीला लागून शहाणे असून विद्वानांच्या उपदेशाकडे दुर्लक्ष केलें. **ज्याला विपत्तींत पाडण्याचें देवांच्या मनांत येतें त्याची ते प्रथम बुद्धि हरण करतात; व त्याला मग सर्व विपरीत भासूं लागतें.** बुद्धिनाश होऊन विनाशकाल आल्यावर अन्यायच त्याला न्याय भासूं लागून तो घट्ट कवटाळून बसतो. हानिकारक गोष्टी हितकारक व हिताच्या गोष्टी अहितकारक दिसूं लागून त्या त्याच्या नाशासाठीं त्याच्या पुढें हजर होतात. व त्याला त्याच आवडूं लागतात. **प्रत्यक्ष दंड घेऊन काल कधीं कोणाच्या नाशाला उभा रहात नाहीं. बरें तें वाईट, व वाईट तें बरें, दाखविणें एवढेंच कालाचें काम** आहे. आतां विनाकारण शोक कशाला पाहिजे ? '

३ वनपर्व.

५९ सूर्यापासून पांडवांना स्थालीची प्राप्ति. (३. १–३)

कौरवांनीं द्यूतामध्यें जिंकल्यावर पांडव द्रौपदीसहवर्तमान शस्त्रयुक्त होऊन इंद्रसेनादि सुमारें चौदा सेवक बरोबर घेऊन हास्तिनापुरांतून उत्तराभिमुख बाहेर पडले. दुष्ट लोकांनीं वेष्टित, गुरुद्वेषी, आचारविचारहीन, धनलुब्ध, अभिमानी, नीच व जात्या निष्ठुर अशा दुष्ट दुर्योधनाच्या राज्यामध्यें आपल्या जवळ आहे नाहीं त्या सर्वांचा नाश होऊन धर्म व सुख याला आपण मुकणार असें वाटून पौरजन, इंद्रियें व शत्रू यांना ज्यांनीं जिंकलें आहे, अशा दयाळू पांडवांच्या मागून जाण्याच्या हेतूनें त्यांकडे येऊन हात जोडून म्हणाले, 'न्यायाला झुगारून देऊन शत्रूंनीं अधर्मानें तुम्हांला जिंकलें हें पाहून आम्हांला फार वाईट वाटत आहे. तुमच्याविषयीं आमच्या अंतःकरणांत मोठी भक्ति आहे. म्हणून तुमच्यावर अनुरक्त अशा आम्हांला येथें सोडून जाणें तुम्हांला उचित नाहीं. अधर्मी राजाच्या राज्यांत राहिल्यानें आमचा सर्वस्वी नाश होईल; म्हणून आम्हांला येथें सोडून जाऊं नका. **बऱ्यावाइटाच्या सहवासानुरूप मनुष्याच्या अंगीं गुणदोष उत्पन्न होतात.** पुष्पाचा आश्रय करून राहणाराला त्याचा वास लागतो व दुष्टाच्या संगतीनें मन दुष्ट होतें, अशी संसर्गाची गोष्ट आहे. **दुष्टांचा समागम अनेक संकटांना व साधूंचा समागम जितका जितका व्हावा तितका तितका धर्माला कारणीभूत होतो.** म्हणून शहाण्यांनीं सुस्वभावाचे, शांत व वृद्ध अशा भल्या लोकांचा समागम करावा. ज्यांची विद्या, प्राकृत व कृति हीं तिन्ही शुद्ध आहेत, त्यांचा सहवास हिताला कारणीभूत होतो. त्यांचा समागम शास्त्रांहून विशेष फलद्रूप आहे. दुष्टाचा समागम केल्यानें दुष्टपणाच जडतो. **वाइटांच्या दर्शनानें, संबंधानें त्यांच्याशीं संभाषण केल्यानें व त्यांच्याबरोबर एकत्र राहिल्यानें धर्माचार नष्ट होतात व मनुष्य उन्नतीला चढत नाहीं. नीच समागम बुद्धीच्या ऱ्हासाला कारण होतो. साधारण मनुष्याच्या समागमापासून ती कायम राहते व थोरांच्या समागमापासून तिला उच्चत्व येतें.** विषयपराङ्मुख व विशेषेंकरून

धर्मिष्ठ असे भले लोक जे गुण धर्मार्थकामाला उपयोगी पडणारे म्हणून सांगतात ते लोकमान्य व वेदोक्त सद्गुण तुमच्या ठिकाणीं एकवटलेले दिसून येत आहेत. कल्याणाची इच्छा असल्यामुळें आह्मी गुणी लोकांमध्यें राहूं इच्छितों.' ह्याप्रमाणें स्नेह व करुणायुक्त त्यांचें भाषण ऐकून धर्मराजानें आपल्याला धन्य मानून घेतलें. तो त्यांना म्हणाला, 'हास्तिनापुराला परत जाऊन भीष्मप्रभृति बांधवांचा काळजीपूर्वक समाचार घ्या ह्मणजे आमचें हित केल्यासारखें होणार आहे. ही विनंतिरूप माझी ठेव मी तुमच्या स्वाधीन करीत आहें, हिचें आस्थापूर्वक जतन करा. ह्या संबंधानें माझ्या मनांत मोठी काळजी आहे व तुह्मीं हें माझें सांगणें मान्य केल्यानें मला संतोष होऊन तुह्मीं माझा मोठा बहुमान केल्यासारखें होणार आहे.' हें त्यांचें भाषण ऐकून 'महाराज' ह्मणून दीन स्वर काढीत व पांडवांचे गुणानुवाद गात पौरजन फार कष्टी होऊन मोठ्या नाखुशीनें माघारे परतले. ते परतल्यावर गंगेच्या कांठीं एका मोठ्या वडाच्या झाडाखालीं दिवस गेल्यामुळें मुक्काम करून पांडवांनीं पाणी पिऊनच ती रात्र काढली. त्या ठिकाणीं कांहीं ब्राह्मण आपल्या अग्निहोत्राच्या अग्नीसहवर्तमान व शिष्य व बांधववर्गांसह त्यांकडे आले. त्या घोर संध्यासमयीं अग्नि प्रज्वलित केल्यावर वेदपठणानंतर त्यांचें संभाषण सुरू झालें. त्या ब्रह्मवृंदांनीं त्यांना धीर देऊन मधुर भाषणांनीं सर्व रात्र त्यांची करमणूक केली. उजेडल्यावर आपल्याबरोबर वनाला येण्याचा आग्रह धरून आपल्यापुढें उभे राहिलेल्या ब्राह्मणांना युधिष्ठिर ह्मणाला, 'आमचें सर्वस्व हरण होऊन आह्मीं कंदमूळांवर व मांसावर आपला उदरनिर्वाह करून अनेक प्रकारच्या भयांनीं भरलेल्या वनांत राहणार. त्या ठिकाणीं आमच्या सहवासांत खात्रीनें तुह्मांला कष्ट होणार; म्हणून कृपा करून आलां तसें परत जा.' ब्राह्मण ह्मणाले, 'तुमची जी वाट ती आमची होईल, भक्तियुक्त अंतःकरणानें आह्मी तुमच्या मागून येत असतां आह्मांला सोडून जाणें तुह्मांला उचित नाहीं. देवता देखील भक्तांवर दया करतात. आमच्या पोषणाची तुह्मी यत्किंचित् काळजी करूं नका. आह्मी स्वतः आपलें अन्न मिळवूं. आराधना व जपजाप्य ह्यांच्या योगानें तुमचें कल्याण चिंतीत मनोरंजक गोष्टींनीं आह्मी तुमची करमणूक करूं,' यावर 'तुमचें ह्मणणें ठीक आहे. पण सध्यां आह्मांला काळ प्रतिकूळ असल्यामुळें तुमच्या ह्मणण्याला माझ्यानें रुकार कसा देववत नाहीं. केवळ मजबरील भक्तीमुळें तुह्मीं कष्ट सोसावे हें मला योग्य वाटत नाहीं,' असें धर्मराजाचें भाषण ऐकून योग व सांख्य यांमध्यें प्रवीण शौनक नामक ब्राह्मण म्हणाले, '**शोकाला हजारों व भयाला शेंकडों कारणें हरघडीं मूर्खाला उद्भवतात. शहाण्याला उद्भवत नाहींत.** ज्ञानाच्या आड येणाऱ्या पुष्कळ दोषांनीं युक्त व कल्याणाला हानिकारक अशा कर्मामध्यें तुजसारखे शहाणे कधीं गढत नाहींत. हे राजा, अनेक दुःखांचा नाश करणारी श्रुति व स्मृति यांना जुळून असणारी अष्टांगांसह बुद्धि तुझ्या ठिकाणीं वास करीत आहे. पैशाच्या पेंचामुळें, संकटामुळें, स्वजनांवर येऊन पडलेल्या घोर प्रसंगामुळें व शारीरिक व मानसिक दुःखांमुळें तुझ्यासारखे लोक खचत नाहींत. या दोन्ही प्रकारच्या दुःखांनीं जग भरलें आहे. त्यांच्या निवारणाचा उपाय थोडक्यांत सांगतों ऐक. **आधि, व्याधि, अनिष्ट लाभ व इष्ट वस्तूचा वियोग हीं चार या दोनप्रकारच्या दुःखांचीं कारणें आहेत.** उपायांनीं अगर त्यांविषयीं विचार न करतां यांचें निवारण शाहणे व चिकित्सक करितात. विस्तवांत लाल केलेल्या लोखंडी गोळ्यानें ज्याप्रमाणें भांड्यांतल्या पाण्याला कढ येतो त्याप्रमाणें मानसिक दुःखानें शरीराची स्थिति होते. ह्मणून ज्याप्रमाणें जलानें अग्नीचें शमन करावें लागतें त्याप्रमाणें **मानसिक दुःखाचें शमन ज्ञानानेंच केलें पाहिजे. मानसिक दुःखाला मूळ स्नेह आहे.** स्नेहापासून आसक्ति उत्पन्न होऊन मनुष्य दुःख भोगतो. शोक, भय, हर्ष इत्यादि विकारांना स्नेह हेंच कारण आहे. ज्याप्रमाणें झाडाच्या पोटांतला अग्नि लहान असला तरी झाडाला निःशेष जाळून टाकण्याला समर्थ असतो त्याप्रमाणें हे विकार कितीही सूक्ष्म असले तरी धर्मार्थांचा नाश करूं शकतात. **एखाद्या वस्तूपासून दूर राहि-**

ल्यानें मनुष्य त्यागी होत नाहीं. परंतु जो तिच्याशीं संबंध ठेवूनही तिच्या अंगचे दोष जाणून त्यासंबंधानें विरक्त राहतो त्यालाच त्यागी हें नांव शोभतें. ह्मणून मित्र अगर धनसंचय ह्यांवर आसक्ति ठेवूं नये, व जर कदाचित् विकारांचा शरीरामध्यें प्रादुर्भाव झाला तर ज्ञानानें त्यांची पिच्छेहाट करावी .कमलावर ज्याप्रमाणें पाणी टिकत नाहीं त्याप्रमाणें ज्ञानी लोकांच्या मनावर स्नेहाचा पगडा बसत नाहीं. मनोविकारांच्या तावडींत सांपडलेल्या मनुष्याला वासना वाटेल तिकडे ओढते. वासनेपासून लोभ उत्पन्न होतो. दुष्ट, नेहमीं अस्वस्थता उत्पन्न करणारा व अनेक पापांला मूळ असा हा लोभ पापपरंपरेला ,कारणीभूत होतो. जो शहाण्या लोकांना त्याज्य, ह्यातारपणीं देखील आपणाला न सोडणारा व प्राणांचा शेवट लावणारा रोग आहे त्या ह्या लोभापासून दूर असण्यांतच सुख आहे. ज्याला मुळ किंवा शेवट नाहीं असा हा मनुष्याच्या देहामध्यें शिरलेला लोभ आपोआप उत्पन्न होणाऱ्या अग्नीप्रमाणें सर्व प्राणिमात्रांचा नाश करतो. ज्याप्रमाणें अरणीपासून उत्पन्न झालेला अग्निच अरणीचा नाश करतो, त्याप्रमाणें विकारवश मनुष्याच्याबरोबर उत्पन्न झालेला लोभ त्याच्या नाशाला कारण होतो. ज्याप्रमाणें मनुष्याला मृत्यूपासून त्याप्रमाणें श्रीमंताला राजापासून, पाण्यापासून, अग्नीपासून, चोरापासून व प्रसंगीं स्वजनांपासून देखील भय असतें. ज्याप्रमाणें मांसाला आकाशांत पक्षी, पृथ्वीवर श्वापदें, पाण्यांत जलचर तोडतात त्याप्रमाणें श्रीमान् मनुष्याला सर्वत्र बाद्रेल तो तोडतो. पैसाच कांहीं लोकांच्या अनर्थाला कारण होतो. पैशाच्या मागें लागलेल्या मनुष्याला कल्याणप्राप्ति कधीं होत नाहीं. ह्मणून मनाला भुरळ पाडणारी ही अर्थप्राप्ति कृपणपणा, अहंकार भय व त्रास ह्यांनाच कारणीभूत आहे असें समजलें पाहिजे. मनुष्याला पैसा सर्वतोपरी दुःखाला कारण आहे. तो मिळविण्यांत व राखण्यांत दुःख अनून तो गेल्यानेंही मोठें दुःखच होतें. तो टाकवतही नाहीं व जवळ असला ह्मणजे शत्रूप्रमाणें आहे. तो मिळविण्यालाही मोठे श्रम पडतात. ह्मणून हा पैसा मिळविण्याची हांव कधीं धरूं नये. मूर्ख लोक असंतोषी असतात. शहाणे नेहमी संतुष्ट असतात. आशेला अंत नाहीं. संतोषांतच मोठें सुख आहे. यौवन, रूप, जीवित, धनसंजय. ऐश्वर्य व इष्टजनसहवास हीं सर्व नश्वर आहेत. शहाण्यांनीं त्यांचें ठिकाणीं फार आसक्ति ठेवूं नये. व अति संचयाची हांव न धरतां येऊन पडणारीं संकटें मुकाट्यानें सोसावीं. कोणी श्रीमान् मनुष्य संकटापासून मुक्त आहे असें दिसत नाहीं; ह्मणून धार्मिकांनीं पैशासंबंधानें निरपेक्ष असावें. धर्मार्थ खर्च करण्याकरतां ज्याची पैसा मिळविण्याची इच्छा असते त्यानें इच्छेपासून दूर असावें हेंच चांगलें. पायावर चिखल उडवून घेऊन मग तो धूत बसण्याच्या खटपटींत पडण्यापेक्षां त्याला स्पर्शच न करतां त्यापासून दूर असणें हें अधिक इष्ट आहे. ' हें भाषण ऐकून धर्मराज ह्मणाला, 'पैशाच्या उपभोगासाठीं ही मी अर्थप्राप्तीची इच्छा करीत नाहीं. ब्राह्मणांचें पोषण करण्यासाठीं ही इच्छा मी करीत असून त्यांत लोभाचा अंश मुळींच नाहीं. हे ब्रह्मन् गृहस्थाश्रमामध्यें राहून आमच्या सारख्यांनीं आमच्यामागून येणाऱ्यांचें पालनपोषण न करतां कसें रहावें ? आमच्या मिळकतींत सर्वांची वांटणी दिसून येते. त्याच प्रमाणें जे अन्न शिजवीत नाहींत त्यांचें पोषण गृहस्थानें केलें पाहिजे. तृण, भूमि, उदक व गोड भाषण यांची तरी उणीव चांगल्या लोकांच्या घरीं नसावी. श्रमलेल्याला आंथरूण, उभा राहून थकलेल्याला बसावयास आसन, तान्हेल्याला पाणी व भुकेल्याला अन्न देणें गृहस्थाचें कर्तव्य आहे. नजरेनें, प्रेमानें, गोड शब्दानें व उठून आसन देऊन अतिथीचा आदर केल्यानें गृहस्थानें कर्तव्य बजावल्यासारखें होतें. उठून सामोरें जाऊन यथान्यायानें अतिथीचा सत्कार करावा, हा पंचविधयज्ञच आहे. अग्निहोत्र, पशु, ज्ञाति, अतिथि, बांधव, मुलगा, बायको, व नौकर यांची योग्य विचारपूस न होईल तर ते जा-

ळून भस्म करतात. स्वतःकरितां कधीं अन्न शिजवूं नये व पशूचा निरर्थक वध करूं नये. ज्या अन्नांतून विधिपूर्वक बलि दिला जात नाहीं अशा प्रकारचें अन्न खाऊं नये. **कुत्र्यांना, चांडाळांना, पक्ष्यांना सकाळसंध्याकाळ जमिनीवर अन्न टाकावें. ह्यालाच वैश्वदेव** ही संज्ञा आहे. भुक्तशेष अन्न अपवित्र असून यज्ञशेष अमृततुल्य समजलें आहे. जो गृहस्थाश्रमीं मनुष्य थकून आलेल्या अनोळखी मनुष्याला देखील उत्तम अन्न जेवूं घालतो त्याला मोठें पुण्य लागतें. अशा मार्गानें जाणारा गृहस्थ महत्पुण्यसंचय करतो. ' शौनक म्हणाले, ' काय हा चमत्कार ! ही केवढी दुःखाची गोष्ट आहे. हें जग फार विपरीत आहे. ज्या गोष्टीची साधूला लाज वाटते तींतच दुष्ट मनुष्य फुशारकी मिरवितो. ह्या श्रोद्रांसाठीं शाहणा देखील महत्पाप करण्याला प्रवृत्त होतो. मोहरागादि विकारांच्या तावडींत सांपडून इंद्रियोपभोग्य वस्तूंचा समजून उमजून बंदा गुलाम बनतो व आड मार्गाला नेणाऱ्या इंद्रियांच्या योगानें अकलशून्य होऊन उधळलेले घोडे ज्याप्रमाणें सारथ्याला भलतीकडे नेतात त्याप्रमाणें हा भलत्या मार्गाकडे वळतो. जेव्हां ह्या सहा इंद्रियांची एखाद्या विषयाशीं गांठ पडते तेव्हां संकल्पजन्य इच्छेचा प्रादुर्भाव होतो व त्यामुळें त्याच्या ठिकाणीं विषयासक्ति उत्पन्न होऊन तो ती गोष्ट करण्यास प्रवृत्त होतो. संकल्पजन्य इच्छा उत्पन्न झाली ह्मणजे विषयरूपी बाणांच्या तडाक्यांनीं जर्जर होऊन ज्याप्रमाणें पतंग ज्योतीवर झडप घालतो त्याप्रमाणें हा प्राणी लोभाग्नीमध्यें जाऊन उडी घेतो. नंतर आहारविहारादि भुरळ पाडणाऱ्या सुखांत दंग होऊन जाऊन आत्म्याची ओळख तो विसरतो. ह्याप्रमाणें अविद्या, कर्म व तृष्णा यांच्या योगानें चक्राप्रमाणें गरगर फिरत राहणारा प्राणी निरनिराळ्या योनींत जन्म घेतो. ब्राह्मणापासून तों तृणापर्यंत जलामध्यें, पृथ्वीवर व आकाशांत सर्वत्र जन्ममरणाच्या फेऱ्यांत तो सांपडतो. ही अज्ञान्याची गोष्ट झाली. आतां धर्म, स्वतःचें कल्याण व मोक्षमार्ग ह्यांत गढून गेलेल्या शहाण्या लोकांच्या स्थितीसंबंधानें ऐक. ' **कर्म कर, फलाची इच्छा धरूं नकोस.** ' ह्या वेदवचनाला ते बळकट धरतात. ह्मणून कोणताही धर्म दंभावांचून आचराबा. यज्ञ, वेदपठण, दान, तप, सत्य, क्षमा, दम आणि निर्लोभता हे धर्माचे आठ प्रकारचे मार्ग आहेत. त्यांतील पहिले चार पितृलोकाची प्राप्ति करून देणारे असल्यामुळें ते अवश्यमेव दंभावांचून स्वीकारले पाहिजेत. दुसरे चार देवलोकाची प्राप्ति करून देणारे असल्यामुळें श्रेष्ठ लोकच नेहमीं ते स्वीकारतात. हा संसार जिंकूं इच्छिणारे संकल्पाशीं जितक्यास तितकाच संबंध ठेवून, योग्य रीतीनें इंद्रियनिग्रह करून शास्त्रोक्त व्रतें व गुरुसेवा करून, मिताहारानें, वेदाध्ययनीं दक्ष राहून कर्मफलप्राप्तीची आशा न करितां व मन चांगल्या रीतीनें स्वाधीन ठेवून कर्मे करतात. देवता देखील रागद्वेषादि दुष्ट विकारांपासून दूर राहून योगैश्वर्यानें संपन्न होऊन ह्या जगावर स्वामित्व मिरवितात. त्याप्रमाणें तूं देखील शांति धरून ब्राह्मणांच्या पोषणासाठीं तपानें योगसिद्धि मिळीव. ' हें शौनकांचें भाषण ऐकून युधिष्ठिरानें पुरोहिताकडे वळून पुढें काय करावें ह्मणून विचारलें. ध्यानानें उपायांची योजना करून धौम्य ह्मणाले, ' पूर्वी निर्माण झालेले सर्व प्राणी भुकेनें फार व्याकूळ झालेले पाहून **सूर्य पित्याप्रमाणें त्यांच्या दयेनें उत्तरायणांत गमन करून आपल्या किरणांनीं शक्तिमान रस शोषून घेतो व दक्षिणायनामध्यें घेऊन तें वीर्य पृथ्वीशीं संयुक्त करतो. नंतर चंद्र तें वीर्य मेघमय अतरिक्षांतील सूर्यतेजासह आकर्षून घेऊन उदकरूपानें पृथ्वीवर शिंपडून षड्रस औषधी उत्पन्न करतो. ह्याप्रमाणें बीजामधून अंकुरादिरूपानें चंद्रकिरणांनीं संयुक्त सूर्यच षड्रसयुक्त अन्न प्राण्यासाठीं बनवून सर्व भूतांच्या प्राणधारणेला कारण होतो.** ह्मणून तो सर्व भूतांच्या पित्याप्रमाणें पूज्य आहे. त्याला शरण जा, व कर्मानें आत्मशुद्धि करून घेऊन तपोबलानें व धर्मानें ब्राह्मणांचें भरण कर. ' हें ऐकून, गभस्तिमान, अज, प्रभा देणारा, काळ व प्रजा यांचा स्वामी, विश्व उत्पन्न करणारा, अंधकार दूर करणारा, भूतांचा आश्रयभूत, स्वर्ग व मोक्ष यांचें द्वार, चराचरांचा आत्मा, देव, पितर व यक्ष यांना पूज्य, अ-'

सुर, राक्षस व सिद्ध हे ज्याच्या पायां पडतात, सुवर्णमय कांतिमान, सर्व भूतांचें उत्पत्तिस्थान, क्रिया करणारांचा आधारभूत, सांख्य व योग या दोन्ही मार्गांनीं जाणाऱ्यांना गति देणारा, मोक्षेच्छु लोकांना अप्रहित द्वारभूत, वेदपारग ब्राह्मणांनीं वेदोक्त मंत्रांनीं वेळोवेळीं आराधना केलेला, तिन्ही लोकांच्या हिताकरितां झीज सोसणारा, सहस्र युगांनीं मोजला जाणारा जो ब्रह्मदेवाचा दिवस त्याचा मूलभूत, मनु व मनुपुत्र तशींच सर्व मन्वंतरें ह्यांचा स्वामी, प्रलयकालच्या संवर्तक अग्नीचा, त्याचप्रमाणें नानावर्णांचे जे मोठमोठे प्रलयकालीन मेघ यांचा उत्पादक, बारा आदित्यांमध्यें बारा प्रकारांनीं आपलें रूप ठेवून आपल्या किरणांनीं सर्व सागराला शोषून टाकणारा असा जो लोकांच्या अस्तित्वाला कारणीभूत सूर्य त्याची युधिष्ठिरानें अनन्यभावानें स्तुति केली. सूर्य संतुष्ट होऊन युधिष्ठिरापुढें प्रगट होऊन ह्मणाला, 'तुझी सर्व इच्छा परिपूर्ण होईल. मी तुला बारा वर्षेपर्यंत अन्न पुरवीन. ही स्थाली मी तुला देतों, ही घे. ह्या पात्रामध्यें शिजविलेलें फलमूलमांसादि चतुर्विध अन्न रोजच्यारोज पांचालीचें जेवण होईपर्यंत संपणार नाहीं. आजपासून चौदाव्या वर्षीं फिरून तुला राज्यप्राप्ति होईल.' असें ह्मणून भगवान सूर्यनारायण त्या ठिकाणीं अंतर्धान पावले. युधिष्ठिर त्या स्थालीपासून उत्पन्न होणाऱ्या अक्षय्य अन्नानें ब्राह्मण व आपले अनुयायी यांना जेवूं घातल्यानंतर अवशिष्ट अन्न स्वतः खाऊन असे. द्रौपदीचें जेवण झालें ह्मणजे त्या भांड्यांतलें अन्न संपत असे.

६० दुर्योधनाला झालेला मैत्रेयशाप. (३. ४–१०).

पांडव वनाला गेल्यावर कोणे एके वेळीं कौरवांचें हित कशानें होईल, पौरांची भक्ति त्यांच्यावर कशानें बसेल व पांडव त्यांच्या समूळ नाशाला कशानें कारणीभूत होणार नाहींत इत्यादि मश्न धृतराष्ट्रानें विचारले असतां विदुर ह्मणाले, 'राजा, अर्थ, काम, मोक्ष व राज्य त्यांच्या मुळांशीं धर्म आहे. धर्मानें राहून पांडवांचें रक्षण कर, त्यांना परत बोलाव. तुझ्या मुलानें युधिष्ठिराला द्यूतांत जिंकलें हें घोर पाप धुवून काढण्याला मला एवढाच उपाय दिसतो कीं, जें तूं पूर्वी पांडवांना दिलें होतेंस तें त्यांचें त्यांना परत देऊन टाक. राजानें जवळच्या संपत्तींत तृप्त असावें. परस्वाचा लोभ धरूं नये. असें केलें असतां यश कायम राहून ज्ञाती-मध्यें फूट होत नाहीं व अधर्मही घडत नाहीं. असें न करशील तर मात्र खात्रीनें कौरव नामशेष होतील. भीमसेन व अर्जुन एकदां कां खवळले तर ते शत्रूंचा शेष राहूं देणार नाहींत. ह्या कुलाला राहुरूपी जो हा तुझा कुलांगार मुलगा उत्पन्न झाला आहे त्याला टाक; नाहींतर तुला मग पश्चात्ताप होईल. हा तुझा मुलगा जर आपण होऊन माझ्या सांगण्याला प्रेमपूर्वक कबूल होईल तर त्यापासून तुझें कल्याण होईल. नाहींपेक्षां ह्याला अटकेंत ठेवून पांडुपुत्र युधिष्ठिराला राज्य दे. असें केलें असतां राजे लोक वेश्यांप्रमाणें आमच्यापुढें हात जोडून उभे राहतील. दुःशासनाला भीमाची व द्रौपदीची क्षमा मागूं दे. एवढें केल्यानें तूं कृत्यकृत्य होशील.' धृतराष्ट्र ह्मणाला, 'मी तुला उगीच फाजील मान देतों. तूं नेहमीं पांडवांच्या हितांत दक्ष असून आह्मांला तुच्छ करतोस. मर्जी असेल तर रहा नाहींतर चालता हो. छिनाल स्त्रीला कितीही गोंजारली तरी ती आपल्यापासून दूरदूरच पळणार.' ह्याप्रमाणें धृतराष्ट्राचें धिःकारयुक्त भाषण ऐकून आधींच पांडवांच्या दर्शनाविषयीं आतुर झालेले विदुर पांडवांबरोबर वनांत राहण्याच्या उद्देशानें गंगातीराला निघून गेले. तेथून कुरुक्षेत्रीं जाऊन तेथून सरस्वती, दृषद्वती व यमुना यांच्या कांठीं रहात रहात पश्चिम दिशेकडे चाललेल्या पांडवांना काम्यकवनांत येऊन त्यांनीं गांठलें. त्यांना पाहून, 'पुन्हां द्यूतामध्यें आमचीं आयुधें हिरावून घेण्याकरितां शकुनीनें आह्मांला बोलावण्याकरितां ह्यांना पाठविलें असावें काय, आणि बोलाविलें असतां नाहीं कसें ह्मणतां येईल. गांडिव धनुष्य जाण्याचा प्रसंग आला तर फिरून राज्यप्राप्तीची देखील आशा करावयास नको,' इत्यादि अनेक वितर्क युधिष्ठिराच्या मनांत आले. तथापि उठून सामोरा जाऊन कुशलप्रश्नानंतर त्यानें त्यांना आगमनाचें कारण विचारलें. वि-

दुर झणाले, 'धृतराष्ट्रानें मला एकांतांत बोलावून हिताची गोष्ट विचारली असतां मीं त्याचें खरें हित ज्यांत आहे तें त्याला सांगितलें; परंतु रोग्याला ज्याप्रमाणें पथ्यकर अन्न आवडत नाहीं त्याप्रमाणें मीं सांगितलेला तुह्मांला व कौरवांना असा दोघांनाही हितकर असा सल्ला त्याला पसंत पडला नाहीं. ज्याप्रमाणें अग्निहोत्र्याच्या घरीं एखादी बिघडलेली स्त्री असली तर ती कल्याणाला कारण होत नाहीं, व ज्याप्रमाणें एखाद्या कुमारिकेला साठ वर्षांचा पति आवडत नाहीं, तसा माझा उपदेश त्याला रुचला नाहीं. कमलपत्रावर ज्याप्रमाणें जलबिंदु टिकत नाहीं त्याप्रमाणें माझें हितकर भाषण त्याच्या ठिकाणीं रुजलें नाहीं. त्यानें मला हांकून दिल्यामुळें तुला उपदेश करण्याकरितां मी येथें आलों आहे. मीं पूर्वी सभेमध्यें सांगितलेलें व आतां सांगणार आहें हें पक्केपणीं ध्यानांत घे. **दायादांपासून असह्य क्लेश झाले असतां जो क्रोधाग्नीच्या ठिणगीला सावकाश वाढूं देऊन आपला हेतु सिद्धीला नेतो तोच ह्या पृथ्वीचा उपभोग घेतो. एखाद्याच्या संपत्तीचा उपभोग त्याच्या बरोबर त्याच्या ज्या साहाय्य करणारांना मिळतो ते संकटसमयीं देखील त्याच्या दुःखाचें वांटेकरी होतात.** साहाय्यकारी मिळविण्याला हाच उपाय असून ते मिळाले झणजे पृथ्वी ताब्यांत आलीच समजावें. **आपल्या साहाय्यकाऱ्यांबरोबर सत्य व मधुर भाषण करून आपण खातों तेंच अन्न त्यांना द्यावें. त्यांच्या अगोदर आपल्या सुखाकडे लक्ष देऊं नये.** ह्याप्रमाणें वागणारा राजा उदयाला येतो.' आपण सांगितल्याप्रमाणें मी वागेन असें युधिष्ठिर झणाला. नंतर विदुर तेथें सुखांत राहिले. इकडे ते गेल्यावर त्यांच्या प्रभावानें व त्यांच्या संधिविग्रहादि जुळवून आणण्याच्या सामर्थ्यानें पांडवांचें बल अधिकच वाढेल असें वाटून त्यांजबद्दल बाह्यात्कारी फार कळकळ दाखवून धृतराष्ट्रानें त्यांना आणण्याकरितां संजयाला पाठविलें. संजयापासून धृतराष्ट्राकडची सर्व हकीकत ऐकून घेतल्यावर स्वजनावरच्या नैसर्गिक प्रेमामुळें विदुर युधिष्ठिराच्या अनुमतीनें हास्तिनापुराला परत आले. ते आल्यावर धृतराष्ट्रानें त्यांना जवळ घेऊन मस्तक हुंगून त्यांना टाकून बोलल्याबद्दल क्षमा मागितली. विदुर झणाले, 'तूं मला बडिलांच्या ठिकाणीं आहेस. धर्मबुद्धीच्या लोकांना दीनाची कींव येते झणून आज माझा ओढा पांडवांकडे आहे.' या प्रकारें त्यांनीं एकमेकांचें समाधान केलें. विदुर परत येऊन धृतराष्ट्राचें व त्यांचें ऐक्य झालें हें ऐकून दुर्योधनाला मोठी चिंता पडली. शकुनि त्याला झणाला, 'राजा, अशी पोरबुद्धि कां धरतोस? सत्यप्रतिज्ञ पांडव प्रतिज्ञा करून गेले आहेत, ते मुदत संपल्याखेरीज परत येणार नाहींत. कदाचित प्रतिज्ञा मोडून येतील तर फिरून द्यूतामध्यें पण लावून त्यांना जिंकून टाकूं.' ह्या भाषणानें दुर्योधनाला विशेष संतोष झाला नाहींसें पाहून कर्ण झणाला, 'आह्मी राजाचे आज्ञांकित आहों, आपण सर्व मिळून त्याचें प्रिय करूं या. चिलखतें चढवून शस्त्रास्त्रें घेऊन वनांत जाऊन आपण पांडवांना अज्ञातगतीला पाठवूं झणजे दुर्योधन व आपण निश्चित होऊं. जोंपर्यंत ते संकटांत असून शोकसागरांत बुडाले आहेत व मित्रबांधव कोणी त्यांना साहाय्याला नाहींत तोंपर्यंतच त्यांना जिंकतां येईल असें माझें मत आहे.' ह्याप्रमाणें मसलत करून पांडवांना मारण्याकरितां कर्ण आदिकरून मंडळी निघणार तों व्यासांनीं येऊन त्यांना निवारिलें. ते धृतराष्ट्राला झणाले, 'पांडवांना फसवून द्यूतांत जिंकून त्यांना वनांत पाठविलें ही गोष्ट मला पसंत नाहीं. ह्या अपकाराची आठवण ठेवून तेरा वर्षें संपल्यावर कौरवांवर ते भयंकर विषाचा वर्षाव खात्रीनें करतील. हा मूर्ख दुर्योधन राज्यलोभानें त्यांना मारूं इच्छीत आहे, त्याचें निवारण कर. **स्वजनांशीं भांडणें वाईट आहे.** ह्या त्याच्या पांडवांसंबंधाच्या विचारपूर्वक बनलेल्या बुद्धीला आळा घातला नाहीं तर मोठा अनर्थ ओढवणार आहे. ह्या तुझ्या मुलाला पांडवांबरोबर एकटा वनांत पाठीव झणजे सहवासापासून त्यांच्याविषयीं ह्याचे ठिकाणीं स्नेहबुद्धि जर उत्पन्न झाली तर तुझें कामच झालें. **पण जन्माला येणारा प्राणी जें शील बरोबर घेऊन येतो तें तो मेल्याशिवाय सोडीत नाहीं. असें झणतात.**' ह्यावर धृतराष्ट्र झणाला, 'मी,

गांधारी, भीष्म व विदुर ह्यांपैकीं कोणालाच द्यूत पसंत नव्हतें. परंतु जाणूनबुजून देखील पुत्रस्नेहामुळें मूर्ख दुर्योधनाच्या इच्छेविरुद्ध माझ्यानें जावयलें नाहीं. ' व्यास ह्मणाले, ' तूं ह्मणतोस हें खरें आहे. प्राणापेक्षां देखील पुत्रस्नेह अधिक आहे. ह्मणूनच वाईट दशेला आलेल्या पांडवांविषयीं मला विशेष कींव वाटते. ते दीन झाल्यामुळें मला फार वाईट वाटत आहे. दुर्योधनाला पांडवांच्या संबंधाचा द्वेषभाव टाकूं दे. ' ह्यानंतर ' आपली मजवर कृपा असेल व कौरवांवर कांहीं दया असेल तर आपणच चार गोष्टी त्याला सांगा, ' असें धृतराष्ट्राचें भाषण ऐकून 'तुह्मांला भेटण्याकरितां हे मैत्रेय येत आहेत ते तुझ्या मुलांमध्यें व पांडवांमध्यें भांडण न होईल असा दुर्योधनाला उपदेश करतील,' असें सांगून व्यास निघून गेले. नंतर त्या ठिकाणीं आलेल्या मैत्रेयांचा पूजादि सत्कार झाल्यावर आगमनाचें कारण विचारल्यावरून ते ह्मणाले, ' तीर्थयात्रा करीत फिरत असतां जटा व वल्कलें धारण केलेल्या युधिष्ठिराला भेटण्याकरितां कुरुजांगलाला मी आलों. त्याठिकाणीं तुझ्या मुलांचा अन्याय व द्यूतामुळें उत्पन्न झालेलें हें मोठें संकट ऐकून तुजवरच्या माझ्या स्नेहामुळें व कौरवांबद्दल मनांत काळजी वाटून मी तुझ्याकडे आलों. तूं व भीष्म जिवंत असतां तुझीं मुलें पांडवांबरोबर भांडतात हें चांगलें नव्हे. त्यांना योग्य शासन करून दाबांत ठेव. प्रत्यक्ष तूं जिवंत असतांना ह्या अनन्वित अन्यायाकडे दुर्लक्ष करून उगीच पहात कां बसला आहेस. सभेमध्यें घडलेल्या ह्या चौर्यकर्मानें तुला काळिमा लागला आहे. ' असें ह्मणून दुर्योधनाकडे वळून, ' पांडवांचा हेवा करण्याचें सोडून दे व त्यांचें अतुल वीर्य व बल लक्षांत घेऊन त्यांच्याशीं सलोख्यानें वाग, ' असा त्यांनीं त्याला उपदेश केला. दुर्बुद्धि दुर्योधन तें ऐकून हासला व पायाच्या बोटानें जमिनीवर रेघोट्या काढीत कांहीं न बोलतां गप्प राहिला. त्यानें सोंटासारख्या आपल्या मांडीवर हातानें थाप मारली. तें मैत्रेयांना न खपून रागाच्या झपाट्यांत दैवानेंच प्रेरणा केल्यामुळें कीं काय त्यांनीं ' ही तुझी द्वेषबुद्धि घोर युद्धाला कारणीभूत होऊन त्यामध्यें भीम गदेचा तडाखा देऊन ही तुझी मांडी फोडील, ' असा त्याला शाप दिला. धृतराष्ट्रानें त्यांना प्रसन्न करून उच्छाप मागितला; तेव्हां ते ह्मणाले, ' तुझा मुलगा जर पांडवांविषयींचा द्वेषभाव सोडील तर हा माझा शाप लागणार नाहीं, नाहींपेक्षां तो कधीं खोटा होणार नाहीं. असें ह्मणून ते निघून गेले.

६१ किर्मीर राक्षसाचा वध. (३. ११)

द्यूतनिर्जित पांडव तीन दिवस अहोरात्र चालून राक्षससंचारामुळें तापसी व गुराखी ह्यांनीं सोडलेल्या काम्यकवनाला भयाण अशा मध्यान्हींच्या वेळीं येऊन पोहोंचले. त्या वनांत शिरतांना मार्गांत एक धिप्पाड राक्षस आपले विशाळ बाहू व विक्राळ तोंड पसरून त्यांच्यापुढें आला. सूर्यकिरण व विद्युन्माला त्यांच्या सहवर्तमान असणाऱ्या प्रभातकाळच्या सूर्याबरोबर दिसणाऱ्या मेघाप्रमाणें त्याच्या आठ विक्राळ दाढा स्पष्ट दिसत होत्या. त्याचे डोळे लाल असून चमक मारीत होते. डोक्यावरचे केंस ताठ उभे होते. जलपूर्ण मेघाप्रमाणें मोठी गर्जना करून तिच्या योगानें त्यानें स्थलचर व जलचर प्राण्यांना भीतीनें चारी दिशांना पळवून लाविलें. त्याच्या जोरानें धांवण्यामुळें उत्पन्न होणाऱ्या वाऱ्याच्या सपाट्यानें हालूं लागलेल्या कोमल पल्लवयुक्त लता जवळच्याच झाडांना चिकटूं लागल्या. पंचेंद्रियांना ज्याप्रमाणें शोक तापद् होतो, त्याचप्रमाणें पांच पंडुपुत्रांना हा मोठा प्रबल शत्रु उत्पन्न झालेला पाहून घाबरून जाऊन द्रौपदीनें डोळे मिटले. दुःशासनानें सोडलेल्या तिच्या वेणीचे केंस अस्ताव्यस्त झाले असून पांच पर्वतांमध्यें गुरफटलेल्या नदीप्रमाणें ती अस्वस्थ झाली. विषयांध झालेल्या इंद्रियांप्रमाणें तिला वरचेवर बेशुद्ध होतांना पाहून पांडवांनीं तिला धीर दिला. धौम्यांनीं मोहविनाशक अनेक मंत्रांच्या योग्य प्रयोगानें त्या राक्षसानें उत्पन्न केलेली माया दूर केल्यावर ' तूं कोण, कोणाचा, आमच्याकडे तुझें काय काम आहे, ' ह्मणून युधिष्ठिरानें विचारलें असतां त्या राक्षसानें उत्तर दिलें, ' मी किर्मीर या नांवाचा बकाचा भाऊ ह्या वनांत फिरून, तावडींत सांपडलेल्या लोकांवर आपला उदरनिर्वाह करून ह्या वनांत फिरत असतों. माझ्या भक्ष्यस्थानीं आलेले तुह्मी कोण? ' यावर आह्मी पां-

डव वनांत राहण्याच्या इरायानें ह्या अरण्यांत आलों आहों,' असें युधिष्ठिरानें त्याला कळविलें. तेव्हां तो राक्षस ह्मणाला, 'बरें झालें. आज बरेच दिवसांनीं माझी इच्छा पूर्ण झाली. भावाला मारणाऱ्या भीमावर सूड घेण्याकरितां मी आज पुष्कळ दिवस सशस्त्र होऊन ही सर्व पृथ्वी धुंडाळीत आहें. पण आजपर्यंत तो माझ्या तावडींत आला नाहीं. माझा मित्र जो हिडिंब त्यालाही यानेंच मारलें आहे. आज ह्या फार दिवसांपासून पेटलेल्या वैराग्नीला शांत करण्याची संधि आली आहे. ह्याच्या रक्तानें त्या दोघांचें तर्पण करून त्यांच्या ऋणांतून मी आज सुटेन. ह्या बलाची घमेंड असणाऱ्या भीमाला एकदम खाऊन ढेकर देतों पहा.' हें त्याचें उद्दामपणाचें भाषण ऐकून 'ह्या तुझ्या वल्गना फुकट आहेत,' असें ह्मणून युधिष्ठिरानें त्याची निर्भर्त्सना केली. नंतर भीमानें एक मोठें झाड जोरानें उपटलें व त्याचीं पानें झोडपून टाकून त्या राक्षसावर धांवून जाऊन इंद्राच्या वज्राप्रमाणें तें त्यानें त्यावर फेंकलें. किर्मीरही न डगमगतां एकदम एक झाड उपटून भीमावर चालून गेला. झाडांना काळरूपी तें त्यांचें युद्ध स्वीकरितां भांडणाऱ्या वालिसुग्रीवांच्या युद्धाप्रमाणें तुंबळ झालें. एकमेकांवर चाल करून एकमेकांला आपल्याकडे खेंचत असतांना ते खवळलेल्या बैलांप्रमाणें दिसत होते. त्यांच्या ह्या घोर युद्धामध्यें एका मत्त हत्तीनें ज्याप्रमाणें दुसऱ्या हत्तीचें गंडस्थळ फोडून त्याला जेरीस आणावें त्याप्रमाणें दुर्योधनानें केलेल्या अपमानाच्या योगानें व बाहुबळाच्या अभिमानाच्या योगानें भीमानें त्या राक्षसाला धरून एखाद्या झाडाप्रमाणें गदगदां हालविलें व गरगरां फिरवून एखाद्या पशूप्रमाणें त्याला जमिनीवर आपटून तो ह्मणाला, 'यमलोकीं जाऊन हिडिंब व बक यांचें दुःख कमी करण्याची गोष्ट तर तुझ्या हातून होणार नाहीं; उलट त्यांच्याबरोबर रडत बस, असें ह्मणून त्यानें त्याला जमिनीवर आपटून मारून टाकलें. याप्रकारें वनांतील कांटा उपटून टाकून त्या ठिकाणीं पांडव सुखांत राहिले.

६२ सोमनाशाची हकीकत.

(३. १२–२२)

पांडवांना वनवासाला पाठविलेली बातमी ऐकून त्यांना भेटण्याकरितां वृष्णि, अंधक, पांचाळ वगैरे मंडळी कृष्णाच्या बरोबर वनांत त्यांकडे येण्यास निघाली. पांडवांकडे येऊन त्यांनीं कौरवांना पुष्कळ दोष दिले. ते धर्मराजाच्या भोंवतीं जमून बसल्यावर कृष्ण खिन्न मुद्रेनें ह्मणाला, 'दुर्योधन, शकुनि, कर्ण व दुरात्मा दुःशासन यांचें रक्त ही भूमि लवकरच प्राशन करील. त्यांच्या अनुयायांसह त्यांना यमसदनाला पाठवून आह्मी युधिष्ठिराला खात्रीनें राज्याभिषेक करूं. कपटानें वागणाऱ्यांना ठार करणें हा सनातन धर्मच आहे.' पांडवांवर गुदरलेल्या संकटानें संतापून गेलेल्या कृष्णाचें, त्याच्या पूर्वजन्मींच्या कृत्यांची आठवण देऊन अर्जुनानें शांतवन केलें. तो म्हणाला, 'कृष्णा, तूं पूर्वी दहा हजार वर्षें जेथें संध्याकाळ होईल तेथें मुक्काम करण्याच्या व्रतानें गंधमादन वनांत काढिलींस; अकरा हजार वर्षें पुष्करतीर्थीं केवळ पाणी पिऊन राहिलास; त्याचप्रमाणें शंभर वर्षें वर हात करून एका पायावर बदरिकाश्रमामध्यें राहिलास. अंगाचा सांपळा करून दिगंबर वेषानें सरस्वतीच्या कांठीं झालेल्या द्वादशवार्षिक सत्रामध्यें तूंच पुढारी होतास; देव व पुण्यवान लोक ह्यांना राहण्यास योग्य अशा प्रभासतीर्थीं तूं हजार वर्षें नियमानें राहिलास; तूं सर्व प्राणिमात्रांचा आत्मा व उत्पत्तिलयांला कारणभूत आहेस. तूं तपाचें भांडार असून यज्ञही तूंच आहेस. क्रूर नरकासुराला मारून त्याच्यापासून मणि व कुंडलें तूंच हरण केलीस, व सर्व दैत्यांना रणामध्यें मारून इंद्राला देवलोकचें स्वामित्व देणारा तूंच आहेस. मनुष्यरूपानें सज्जनांच्या पालनाकरितां तूं या लोकीं प्रगट झाला आहेस. ब्रह्मदेव तूंच आहेस, चंद्र तूंच आहेस, सूर्य तूंच आहेस, धर्म तूंच आहेस, यम तूंच आहेस, अग्नि, वायु, कुबेर, रुद्र, काल, पृथ्वी, आकाश व दिशा तूंच आहेस. तुला जन्म नसून चरचरांचा तूं गुरु आहेस. चैत्ररथामध्यें तूं कोटि वर्षें यज्ञ केलास. बालरूप धरून

तीन विक्रमशाली पावलांनीं स्वर्ग, आकाश व पृथ्वी व्यापून टाकणारा अदितीचा पुत्र तूंच होस. स्वर्ग व आकाश यांना व्यापून सूर्याला तूं आपल्या तेजानें निस्तेज करतोस. अधर्माचरण करणारे हजारों राक्षस तूं निरनिराळ्या वेषानें मारले आहेस. मौरव, पाश, निसुंध, नरक इत्यादिकांना मारून प्राग्ज्योतिषांचा मार्ग फिरून तूंच सुरक्षित केला आहेस. त्याचप्रमाणें शिशुपाळ, जरासंध यांना तूं मारलें आहेस. रणामध्यें रुक्मीचा पराभव करून रुक्मिणीचें तूं हरण केलेंस. त्याचप्रमाणें इंद्रद्युम्नादिकांना तूं मारलेंस. द्वारका आपलीशी करून तिला पुढें समुद्रांत गडप करणारा तूंच आहेस. तुला राग नाहीं, मत्सर नाहीं, तुझ्या ठिकाणीं खोटें नाहीं, क्रौर्य नाहीं व कुटिलपणा नाहीं. युगाच्या शेवटीं सर्व भूतांचा संहार करून, सर्व जग आपल्या पोटांत घेऊन तूं राहतोस. युगाच्या आरंभीं तुझ्या नाभिकमलापासून चराचरगुरु ब्रह्मदेव उत्पन्न झाले. त्यांच्यापासून हें सर्व जग निर्माण झालें. त्यांना मारण्याला निघालेल्या मधुकैटभांचें वांकडें पाऊल पाहून तुला फार राग आला व तुझ्या कपाळापासून शूलपाणि शंकर उत्पन्न झाले, ह्याप्रमाणें ते दोघे देव तुझ्यापासूनच उत्पन्न झाले आहेत. जीं कर्में तूं बलरामांच्या साह्यानें लहानपणींच केलींस तीं दुसऱ्याच्या हातून झालीं नाहींत व होणारही नाहींत.' असें ह्मणून तो स्तब्ध बसला. नंतर त्या आत्मस्वरूप जाणणाऱ्या अर्जुनाला श्रीकृष्ण ह्मणाला, 'बा अर्जुना, माझा तूं व तुझा मी असा आपला अद्वैतसंबंध आहे. जो तुझा द्वेष करतो तो माझा द्वेष करतो, जो तुला अनुकूल आहे तो मला अनुकूल आहे. कोणाचें कांहीं चालूं न देणारा असा तूं नर आहेस, व मी हरि नारायण आहें. आमचें हृदय कोणाला कळावयाचें नाहीं.' ह्याप्रमाणें कृष्णाचें भाषण ऐकून द्रौपदी अगदीं संतापून ह्मणाली, 'कृष्णा, सर्व भूतांचें मरण व देवांचें अमरत्व इत्यादि सर्व लोककार्यें तुझ्यावर अवलंबून आहेत, अशा तुझ्यापुढें स्नेहभावानें आपल्या दुःखाचें रडगाणें मी गात आहें. मी पांडवांची बायको, तुझी सखी व धृष्टद्युम्नाची बहीण स्त्रीधर्मानें वागत असून मी रजस्वला व एका वस्त्रानिशीं असतां मला त्या दुष्टांनीं सभेमध्यें ओढून आणावें ना? मला त्या स्थितींत पाहून पापवासनेनें ते दुष्ट हासले व मला आपली दासी करण्याचा त्यांनीं मनांत हेतु धरला. हे एकापेक्षां एक महावीर माझे पति जिवंत असून व भीष्मादिकांची मी सून असून त्यांनीं बलात्कारानें मला सभेंत आणली व माझी दुर्दशा केली आणि तें सारें हे निमुटपणें पहात होते, म्हणून मी याबद्दल यांनाच दोष देतें. क्षुद्रांनीं केलेले माझे हाल यांनीं निमुटपणें सहन केले तरी कसे? दुबळा असला तरी नवऱ्यानें बायकोचें रक्षण करावें हा भल्यांनीं स्वीकारलेला फार दिवसांचा धर्म आहे. कुलस्त्रीचें रक्षण केल्यानें प्रजेचें रक्षण होतें व प्रजेच्या रक्षणापासून आपलें रक्षण केल्यासारखें आहे; कारण आपला स्वतःचाच जन्म बायकोच्या ठिकाणीं होत असल्यामुळें तिला जाया हें नांव मिळालें आहे. जे हे शरण आलेल्यांना सोडीत नाहींत त्यांनीं मी दीन झालें असून माझ्याकडे पाहिलें देखील नाहीं! कौरवांनीं आमचें राज्य अधर्मानें उपटून आह्मां सर्वांना दास बनविलें आहे. त्याचप्रमाणें मी रजस्वला व एका वस्त्रानिशीं असून मला भरसभेमध्यें फरफरां ओढीत नेलें व तें कृत्य यांनीं निमुटपणें पाहिलें; तस्मात शक्तीचा फुकट अभिमान बाळगणाऱ्या या भीममहाराजांना व या गांडीवधारी अर्जुनराजांना धिक्कार असो. कौरवांच्या या अनन्वित कृत्यांपासून अनेक दुःखें सहन करीत मी फार दिवस जळफडत आहें. पूर्वपुण्याईनें माझा मोठ्या कुलांत जन्म झाला आहे. पांडवांची मी आवडती धर्मपत्नी आहें व पंडूची सून आहें. अशा वीरपत्नीची त्या अधमांनीं वेणी धरून ओढावी यापेक्षां अधिक दुःखकारक विडंबना आणखी काय असावी?' असें ह्मणून तोंडावर हात ठेवून ती ढळढळां रडूं लागली. तिच्या दुःखाश्रूंनीं तिचा सर्व स्तनप्रदेश भिजून चिंब झाला. नंतर डोळे पुसून व वरचेवर येत असलेले हुंदके दाबून गळा दाटून येऊन ती ह्मणाली, 'मला पति नाहींत, मुलगे नाहींत, बंधु नाहींत, बाप नाहीं, आई नाहीं, त्याचप्रमाणें कृष्णा तूंसुद्धां नाहींस. त्या अधमांनीं माझी दैना मांडली असतां तुमच्या मनाला कांहीं वाईट न वाटतां तुह्मीं खुशाल माझे हाल पहात राहिला, तेव्हां तुह्मां सर्वांना

धिक्कार असो. कर्णानें माझी थट्टा केल्याबद्दल मला होत असलेलें दुःख मी कधींही विसरणार नाहीं. आप्तसंबंध, स्नेहसंबंध, अभिमान व सेव्यभाव या चार कारणांनीं कृष्णा, तुला माझें नेहमीं रक्षण करणें उचित आहे.' वासुदेव म्हणाला, 'द्रौपदी ज्यांबर तूं इतकी संतापलीस आहेस त्यांच्या स्त्रियाही ह्याचप्रमाणें रडत बसतील. अर्जुनाच्या बाणांनीं शत्रु घायाळ होऊन या भूतलावर मरून पडतील. तुला लवकरच देवीपद मिळेल. आकाश कोसळेल, हिमाचल फाटेल, पृथ्वीचे तुकडे तुकडे होतील, समुद्र आटून जाईल, पण ही माझी वाणी कधीं खोटी होणार नाहीं.' हें कृष्णाचें भाषण ऐकून द्रौपदीनें अर्जुनाकडे वांकड्या दृष्टीनें पाहिलें. तेव्हां तोही म्हणाला, 'पांचालि, रडूं नकोस. कृष्णाचें भाषण कधीं खोटें होणार नाहीं.' याप्रमाणें त्यानें तिचें शांतवन केल्यावर धृष्टद्युम्न म्हणाला, 'ताई, तूं कांहीं काळजी करूं नकोस. मी द्रोणांना मारीन, शिखंडी भीष्मांना मारील. भीमसेन दुर्योधनाला मारील, व अर्जुन कर्णाला मारील. रामकृष्णाचा आश्रय केल्यामुळें रणामध्यें आम्हांला जिंकणारा कोणीही वीर समर्थ होणार नाहीं.' कृष्ण म्हणाला, 'मी त्यावेळीं द्वारकेंत असतों तर तुमच्यावर हा प्रसंगच ओढवला नसता. न बोलावतां देखील द्यूताच्या ठिकाणीं हजर राहून ज्यामुळें तुम्हीं ठकविले गेलां त्या द्यूतांतील अनेक दोष व अतर्कित नाश मीं स्पष्ट करून सांगितले असते. **स्त्रीलंपटता, द्यूत, मृगया, मद्यपान ह्या चार गोष्टी आसक्तिपूर्वक केल्या असतां दुःखाला कारण होतात व मनुष्य त्यांच्या पायीं संपत्तीपासून भ्रष्ट होतो.** शास्त्रज्ञ लोक ह्या चार गोष्टींत—**विशेषेंकरून द्यूतांत—अनेक दोष सांगतात.** ह्यामध्यें एका दिवसांत सर्व संपत्तीचा उपभोग घेतल्याशिवाय नाश होऊन तंट्याचा प्रसंग येतो. ह्या व ह्यासारखा दुसऱ्या प्रथम कडु पण परिणामीं गोड अशा गोष्टी मीं सांगितल्या असत्या. पण काय करावें. त्यावेळेस मी जवळ नसून अनर्ताला गेलों असल्यामुळें हा प्रसंग तुमच्यावर ओढवला. द्वारकेस आल्यावर तुमच्यावर गुदरलेल्या प्रसंगाची मला बातमी लागली, तेव्हां घाबरून जाऊन एकदम मी तुम्हांला भेटण्याकरितां आलों.' यावर 'तूं तेथें काय कामाकरितां गेला होतास,' म्हणून धर्मराजानें विचारल्यावरून कृष्णानें, 'मी सौभ व सौभपति ह्यांचा नाश करण्याकरितां गेलों होतों' असें सांगून ती हकीकत सविस्तर धर्मराजाला सांगितली. तो म्हणाला, 'मीं शिशुपालाला मारलें ही वार्ता ऐकून शाल्वानें द्वारकेवर स्वारी करून तिला चोहोंकडून वेढा दिला. तेव्हां आमच्या निवडक सैन्यानें त्याच्याशीं युद्ध केलें. हल्ला मागें हटविण्याच्या कामांत समर्थ व लढाईमध्यें ज्याचा पराक्रम दिसून आला आहे, अशा कसोटीला लाविलेल्या योध्यांनीं त्या नगरीचें चांगलें रक्षण केलें. **दारूच्या मदानें गुंग झाल्यानें कांहीं तरी प्रमाद होईल, तो न होऊं देण्यासाठीं कोणी दारू पिऊं नये असा दांडोरा सर्व शहरांतून पिटविला.** खजिन्याचें रक्षण करणाऱ्या वीरांनीं आनर्ताच्या लोकांस हां हां म्हणतां मार्ग हटविले. सर्व मार्ग व होड्या बंद केल्या; आसपास दोन मैलपर्यंत भूमि विषम करून टाकिली. स्वाभाविक रीतीनें सुरक्षित असलेल्या त्या किल्ल्यांत सर्व आयुधें व युद्धसामुग्री भरपूर सांठविली. यावेळीं **खुणेची मुद्रा असल्याशिवाय कोणाला आंत किंवा बाहेर जाण्यास परवानगी नव्हती.** हत्ती, घोडे इत्यादि चतुरंग सैन्यांनीं सर्व चौक व रस्ते गजबजले होते. सैन्याला योग्य वेतन व अन्न, तशींच युद्धोपयोगी हत्यारें पुरविलीं होतीं. वेतन न दिल्यामुळें अगर वेतनाची वेळ चुकून गेली असल्यामुळें सैन्यांत कोणी नाखुष नव्हता, व त्यांत अगदीं नवखा असाही कोणी नव्हता. याप्रमाणें आहुकानें द्वारकेचा बचाव केला. इकडे शाल्व पुष्कळ सैन्य, हत्ती व घोडे वगैरे घेऊन नगरांत शिरण्याची खटपट करीत होता. हें त्यांचें सैन्य जलाश्रयानें, पटांगणांत, देवालयांमधून व नगराबाहेरील झाडींतून तळ देऊन राहिलें होतें. सैन्याच्या निरनिराळ्या टोळ्यांनीं सर्व रस्ते भरून गेले होते. सर्व आयुधांनीं युक्त, सर्व शस्त्रांमध्यें निष्णात व अश्वगजरथांनीं पूर्ण अशा आनंदी व पुष्ट लोकांनीं भरलेल्या ह्या सैन्यांत प्रत्येकाच्या तोंडावर विरश्रीचीं चिन्हें दिसत होतीं. असें शाल्वराजाचें सैन्य चाल

करून येत असतां वृष्णिकुलांतील तरुणांनीं नगराबाहेर येऊन त्यांच्याशीं सामना दिला. उभयपक्षांचें तुमुल युद्ध चाललें असतां शाल्वराजाचा सेनापति वेगवान् नांवाचा असुर माझा मुलगा सांब यावर धांवून आला. सांबानें त्याला तोंड देऊन मोठी गदा त्याच्यावर फेंकून वाऱ्यानें उपटून जमिनीवर पडलेल्या एखाद्या सोंटाप्रमाणें त्याला जमिनीवर पाडिलें. याप्रमाणें सांबानें आपल्या सैन्याला अगदीं जर्जर करून टाकिलें आहे असें पाहून शाल्व मोठ्या निकारानें त्यावर चालून गेला. हें पाहून आमच्याकडील सैन्याला मोठी चिंता पडली. इतक्यांत प्रद्युम्नानें मोठ्या धैर्यानें बाहेर येऊन 'हा पहा मी आतां शाल्वाला मागें हटवितों, व ह्या गदेनें सौभपतीच्या सर्व सैन्याचा चुराडा करून टाकितों,' असें ह्मणून त्यानें आपल्या सैन्याला धीर दिला. **याप्रमाणें धीर देणारा पुढारी मिळाल्यानें तें सैन्य मोठ्या नेटानें लढलें.** प्रद्युम्नानें पाठीशीं भाता व हातांत तरवार घेऊन हाताला पंजे बांधून धनुष्य विजेप्रमाणें फिरवीत सौभसैन्यावर चाल करून त्यांना जर्जर करून सोडलें. तो धनुष्याला बाण जोडतो केव्हां, ते शत्रूवर सोडतो केव्हां याची कोणाला कल्पना देखील होईना. त्याच्या तोंडावर यत्किंचित्ही बदल न दिसतां तो अगदीं शांतपणानें लढत होता. बलि व इंद्र यांप्रमाणें या दोघांचें तें तुंबळ युद्ध चाललें होतें. शाल्वानें प्रद्युम्नावर अग्नीप्रमाणें तीक्ष्ण बाण सोडिले, ते माझ्या मुलानें मध्येंच कापून काढिले. नंतर शाल्वानें दुसरे बाण सोडले; त्यांनीं तो जखमी झाला तरी न घाबरतां त्यानें मर्मभेद करणारे बाण शाल्वावर सोडिले; त्यांनीं त्याच्या हृदयाचा भेद केल्यामुळें तो जमिनीवर निश्चेष्ट होऊन पडला. तेव्हां त्याच्या सैन्यांत जिकडे तिकडे हाहाकार उडाला. इतक्यांत फिरून शुद्धीवर येऊन शाल्वानें प्रद्युम्नावर बाण सोडले. त्यांच्या योगानें घायाळ होऊन तो रथांतच बेशुद्ध होऊन पडला. तेव्हां त्याच्या अनुभविक सारथ्यानें झटकन् घोडे भरधांव सोडून त्याला रणांतून मागें घेतलें. रथ माघारा फार लांब गेला नाहीं तोंच प्रद्युम्न शुद्धीवर येऊन धनुष्य घेऊन सारथ्याला ह्मणाला, 'सौते, हें तूं काय आरंभिलें आहेस? **शत्रूला पाठ दाखवून परत कां चाललास?** वृष्णिवीरांचा हा संग्रामधर्म नव्हे. ह्या घोर रणामध्यें शाल्वाला पाहून तुझ्या बुद्धीस भ्रंश तर झाला नाहींना?' सौति ह्मणाला, 'जनार्दने, बुद्धिभ्रंशानें अगर भयानें मीं रथ माघारा फिरविला असें नाहीं. शाल्व तुला भारी आहे असें मला वाटलें. **रणामध्यें रथी बेशुद्ध झाला असतां सारथ्यानें त्याचें रक्षण केलें पाहिजे.** ह्मणून मीं रथ माघारा घेतला. हें ऐकून फिरून रथ रणाकडे फिरविण्यास सांगून प्रद्युम्न त्याला ह्मणाला, 'दारुकपुत्रा, माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत असें रणांतून माघारें फिरण्याचें काम तूं करूं नकोस. **जो रण सोडून जातो, किंवा पराभव पावलेल्या, वश झालेल्या अथवा विरथ झालेल्या किंवा शस्त्रहीन झालेल्या शत्रूला, स्त्रीला, मुलाला किंवा ह्याताऱ्याला मारतो तो वृष्णिकुलांतलाच नव्हे.** तूं तर सारथिकुलांत जन्माला आला आहेस, विनीत आहेस व युद्धामध्यें वृष्णीचा धर्म तूं जाणतोस. ह्मणून यापुढें युद्धांत याप्रकारें तोंड कधीं मागें घेऊं नकोस. युद्धांत शत्रूला पाठ दाखवून पळाल्यावर अरिमर्दन श्रीकृष्ण मला काय ह्मणेल? वृष्णिकुळांतील सर्व स्त्रीपुरुष मला 'हा प्रद्युम्न रण सोडून भिऊन परत येत आहे, याला धिक्कार असो,' असेंच ह्मणतील कीं नाहीं? **धिक्कारयुक्त माझी निंदा मला किंवा माझ्या सारख्यांना मरणाहून अधिक आहे.** भगवान् श्रीकृष्ण माझ्यावर सर्व भार टाकून धर्मराजाच्या यज्ञाला गेला आहे ह्मणून आज हयगय उपयोगाची नाहीं. मी युद्ध करण्याविषयीं आतुर आहें. फिरून तूं रणाकडे रथ फिरीव.' हें ऐकून सारथ्यानें घोड्यांना चाबूक मारून लगाम ओढून रथ माघारा फिरविला. घोड्यांना चाबूक बसून त्यांचा लगाम ओढला गेल्याबरोबर जणूं काय आकाशांत उडताहेत कीं काय अशा तऱ्हेनें ते मोठ्या वेगानें टापा टाकीत भरधांव निघाले, व सारथ्याच्या हाताकडे नजर देऊन जणूं काय संतप्त झाले आहेत कीं काय अशा तऱ्हेनें त्यांचे पाय जमिनीला लागत नव्हतेसें दिसत होतें. नंतर सौभराजानें आसुरी माया धरून नानाप्रकारचे अमोघ शर प्रद्युम्नावर सोडले. प्रद्युम्नानें ब्रह्मास्त्राच्या योगानें ते सर्व

मध्येंच कापून काढले व कांहीं बाण सोडून त्यांच्या योगानें शाल्वाचें डोकें व ऊर फोडून त्याला बेशुद्ध करून जमिनीवर पाडलें. नंतर त्याला ठार करण्याच्या इराद्यानें त्यानें एक अमोघ बाण काढला; तेव्हां आकाशांत हाहाकार झाला. देवांनीं नारद व अश्वसेन यांना प्रद्युम्नाकडे पाठविलें. ते येऊन ह्मणाले, 'वीरा, याचें मरण तुझ्या हातून नाहीं. हा बाण तर असा आहे कीं, त्याच्या योगानें मरणार नाहीं असा कोणीच नाहीं. कृष्णाच्या हातून याचें मरण आहे ह्मणून तूं हा बाण सोडूं नकोस.' हें ऐकून प्रद्युम्नानें तो बाण भात्यांत परत टाकला. इकडे प्रद्युम्नाच्या बाणांनीं जर्जर झालेला शाल्व द्वारका सोडून सौभांत बसून आकाशांत निघून गेला. तुझा राजसूय यज्ञ संपल्यावर फिरून द्वारकेला गेल्यावर ती निस्तेज व वेदाध्ययन आणि वषट्कार बंद पडलेली अशी ती पाहून त्याचें कारण समजल्यावर नगरवासी लोकांना आश्वासन देऊन शाल्वाचा नाश करण्याचा मीं निश्चय केला. नंतर आहुक, आनकदुंदुभि आदिकरून सर्वांना मी येईपर्यंत मोठ्या हुशारीनें रहाण्यास सांगून त्यांचा व थोर ब्राह्मणांचा आशीर्वाद घेऊन **शंकरांच्या पायांवर मस्तक ठेवून** माझा उत्तम शंख जो पांचजन्य तो वाजवून चतुरंग सैन्यानिशीं अनेक देश, पर्वत व सरोवरें ओलांडून मी आर्तिकावताला येऊन पोहोंचलों. त्या ठिकाणीं सौभाला पोंचल्यावर शाल्व समुद्राकडे गेला आहे अशी बातमी ऐकून मी त्याच्यामागून तेथें गेलों. त्या ठिकाणीं दुरात्म्यानें समुद्राच्या पोटांतूनच वारंवार मला युद्धास बोलाविलें. त्या असुराच्या मर्मभेदी बाणांनीं माझे घोडे, रथ, सारथि व मी अगदीं झांकून गेल्यामुळें कोणी कोणास दिसेना. नंतर मीही अभिमंत्रित बाण धनुष्याला लावून ते त्यावर सोडले. माझ्या सैन्याचें त्या ठिकाणीं कांहीं चालेना. पटांगणांत उभे राहिलेल्या प्रेक्षकांप्रमाणें ते मोठ्यानें ओरडून फक्त मला उत्तेजन देत होते. त्यावेळीं मीं सोडलेले प्रखर बाण दानवांच्या नगरींत टोळधाडीप्रमाणें शिरले; व सौभामध्यें जिकडे तिकडे हाहाकार उडाला. कांहींचे हात तुटले, कांहींचे पाय मोडले, कांहींचीं डोकीं उडालीं, अशा तऱ्हेनें सर्व दानव आर्तस्वर काढीत जमिनीवर पडले. त्यांना पडलेले पहातांच शाल्वानें मोठी माया उत्पन्न करून माझ्याशीं लढण्याला सुरवात केली. त्यावेळीं गदा, प्रास, शूल, शक्ति आदिकरून अनेक शस्त्रांचा मजवर वरचेवर वर्षाव होऊं लागला. मीही मायेचें अवलंबन करून त्याच्या मायेचा प्रतिकार केला. नंतर त्यानें पर्वत उचलून मजवर फेंकले. ह्यावेळीं मधून मधून अंधार, मधून मधून उजेड पडत होता. विस्तवाप्रमाणें तीक्ष्ण शस्त्रांचा वर्षाव माझ्यावर होऊं लागला, त्या सर्वांचा मीं यथाकालीं योग्य प्रतिकार केला. शेंकडों चंद्र, सूर्य व हजारों तारे यांनीं आकाश भरल्याप्रमाणें दिसूं लागलें; रात्र, दिवस अगर दिशा यांजमधील भेद मुळींच कळून येईनासा झाला. नंतर प्रज्ञास्त्राचा प्रयोग करून पदार्थ दृग्गोचर होऊं लागल्यावर फिरून मीं शत्रूशीं लढण्यास सुरवात केली. इतक्यांत बाण लागून घायाळ झालेल्या माझ्या सारथ्याचा करुणारव ऐकून त्याकडे पहातों तों त्याचें शरीर बाणमय होऊन धातुमान गैरिकपर्वताप्रमाणें त्याच्यांतून उष्ण रक्त बाहेर येत आहे असें मीं पाहिलें. इतक्यांत कोणी पुरुष द्वारकेंतून गडबडीनें मजकडे येऊन स्नेहपूर्ण वाणीनें आहुकाचा निरोप मला सांगूं लागला कीं, माझ्यामागें जर्जर करून सोडलेल्या द्वारकेचें आपण रक्षण केलें ह्मणजे बस्स आहे. हें त्यांचें भाषण ऐकून काय करावें, काय न करावें या संबंधानें माझ्या मनांत निश्चय ठरेना. द्वारकेंतील सुहृद बांधवांचा नाश वरचेवर डोळ्यांपुढें उभा राहून अगदीं चिंतातुर होऊन मी शाल्वाशीं लढत होतों. इतक्यांत क्षीणपुण्य ययाति अथवा एखादा तारा ज्याप्रमाणें आकाशांतून खालीं यावा त्याप्रमाणें माझ्या शूर मुलाला खालीं येतांना पाहून माझें देहभान सुटलें आणि बेशुद्ध होऊन मी रथांत पडलों. मला रथांत पडलेला पाहून माझें सैन्य मृतप्राय झालें. त्या खालीं येत असलेल्या माझ्या मुलाला शूल, पट्टिश आदिकरून आयुधांनीं शत्रु प्रहार करीत आहेत असें पाहून मीझें हृदय फाटलें. इतक्यांत फिरून शुद्धीवर येऊन पहातों तों तेथें कांहींच दिसेना. तेव्हां ती सर्व माया असावी असें वाटून फिरून धनुष्य हातांत घेऊन मीं शत्रूवर बाणवर्षाव करण्यास सुरवा-

त केली. त्यावेळीं माझे बांधव मला उत्तेजन देऊन ह्मणूं लागले, 'कृष्णा, ह्याची आतां उपेक्षा करूं नकोस. जरा कटून युद्ध कर. शाल्वाच्या संबंधानें मऊपणा व स्नेह सोडून दे. याला मार. जिवंत ठेवूं नकोस. या प्रसंगीं सर्व शक्तींचा उपयोग करून शत्रूला मारणें उचित आहे. बलवानानें देखील शत्रु दुर्बल आहे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करूं नये.' अशा प्रकारचें त्यांचें भाषण ऐकून आणि तें खरें आहे असें वाटून माझें आवडतें व दानवांचा अंत करणारें आग्नेय अस्त्र शाल्वाला मारण्याकरितां व सौभाच्या नाशाकरितां मीं धनुष्याला जोडलें. त्यावेळीं आकाशांत गेलेल्या माझ्या सुदर्शनाचें रूप युगाच्या शेवटीं दृश्यमान होणाऱ्या प्रतिसूर्याच्या रूपाप्रमाणें दिसत होतें. त्या अस्त्रानें निस्तेज झालेलें सौभनगर करवतीनें कापलेल्या एखाद्या ओंड्याप्रमाणें मधोमध फाडलें, आणि त्यानें शाल्वाला भूमीवर आणिलें. याप्रमाणें शाल्वाचा संहार करून मी द्वारकेला परत आलों. ह्या कारणामुळें मला द्यूताच्या वेळीं हास्तिनापुराला येतां आलें नाहीं. पडलेल्या पुलाचें ज्याप्रमाणें पाण्यापुढें कांहीं चालत नाहीं, त्याप्रमाणें आतां मी काय करणार?' असें ह्मणून पांडवांचा निरोप घेऊन सुभद्रा व अभिमन्यु यांसहवर्तमान कृष्ण द्वारकेला निघून गेला. धृष्टद्युम्नादि मंडळीही आपापल्या नगराला परत गेली. त्या प्रदेशांत रहाणाऱ्या ब्राह्मणांनीं मात्र जा जा ह्मणत असतां पांडवांना सोडलें नाहीं. काम्यकवनांत त्यांचा जमाव नेत्रांला मोठा सुखदायक होता.

६३ युधिष्ठिरांचा राग उद्दीपित करण्याविषयीचा द्रौपदीचा प्रयत्न व त्यानें तिचें केलेलें समाधान. (३. २३–३२.)

काम्यकवनांत कांहीं दिवस राहिल्यानंतर एके दिवशीं धर्मराज अर्जुनास म्हणाला कीं, 'आपणास बारा वर्षे वनवास करावयाचा आहे ह्मणून पुष्कळ पशुपक्ष्यांनीं गजबजलेलें, फळपुष्पांनीं युक्त व जेथें पुण्यजनांची वस्ती आहे असें एखादें रमणीय स्थल पहा. तर्‍हीं अर्जुन आदरपूर्वक ह्मणाला, 'महाराज, देवगुरु बृहस्पतीप्रमाणें आपण मनुष्यांचे गुरु आहां. तेव्हां आपल्याला माहित नाहीं अशी कोणतीच गोष्ट नाहीं. आपण नित्य वशी असून लोकांचे अनुभव व प्रभाव जाणणारे आहां. कोणतीही कल्याणप्रद गोष्ट आपल्यालाच ठाऊक असणार. आपल्याला वाटेल त्या ठिकाणीं आपल्याबरोबर राहण्यास आह्मी तयार आहों. हें जवळच पुण्यजनांनीं पूर्ण व नानापक्ष्यांनीं गजबजलेलें असें द्वैतवन नांवाचें रम्य सरोवर आहे; त्याच्या तीरावर आपल्याला योग्य वाटेल तर बारा वर्षे आपण सुखांत घालवूं. आपल्याला कसें वाटतें?' यावर 'माझेंही असेंच मत आहे,' असें युधिष्ठिर ह्मणतांच काम्यकवासी पुष्कळ ब्राह्मण पांडवांकडे येऊन धर्मराजाला ह्मणाले, 'आह्मां लेकरांना टाकून आपण कोणीकडे चालला?' युधिष्ठिरानें चार समजुतीच्या गोष्टी सांगून त्यांचें शांतवन केल्यावर बंधूसहवर्तमान कित्येक वेदाध्ययनी ब्राह्मण बरोबर घेऊन त्यानें द्वैतवनांत प्रवेश केला. त्या ठिकाणीं देखील तपाची सिद्धि झालेले पुष्कळ महात्मे पांडवांभोवतीं गोळा झाले. त्या रम्य वनांतून जात असतां आम्र, नीप, कदंब, अर्जुन, कर्णिकार आदिकरून अनेक प्रफुल्लित वृक्ष त्याप्रमाणें मधुर स्वरानें मनाला आल्हाद देणारे असे मोर, अंधकावळे, चक्रवाक, कोकिळ इत्यादि पक्षी, तसेंच हत्तिणींसह पर्वतासारख्या धिप्पाड माजलेल्या हत्तींच्या झुंडीच्या झुंडी व भगवतीनदीच्या तीरावर आश्रम करून राहिलेले धार्मिक ऋषी यांस अवलोकन करून धर्मराजास मोठा आनंद झाला. नंतर रथांतून खालीं उतरून ते पुण्यशील व धर्मपरायण पांडव तपस्वीजनांचा सन्मान घेऊन एका मोठ्या पुष्पित वृक्षाखालीं विश्रांतीला बसले. हत्तींच्या कळपानें ज्याप्रमाणें एखादा मोठा पर्वत शोभतो याप्रमाणें पांडवांनीं आश्रय केल्यामुळें त्या विस्तीर्ण वृक्षास मोठी शोभा आली. नेहमीं सुखोपभोगांत काळ घालविणारे हे राजपुत्र ह्या संकटसमयीं देखील सरस्वतीच्या पुण्यजलामध्यें स्नानें करून शालवनामधून चालले असतां इंद्रासारखे सुखी दिसत. ते त्या ठिकाणीं रहात असतां एके दिवशीं तेजःपुंज व वयोवृद्ध मार्कंडेयऋषी त्यांच्या भेटीला आले. त्यांचें यथाविधि आदरातिथ्य केल्यानंतर ते ऋषिश्रेष्ठ तपस्वीसमुदा-

यामध्यें आपणाकडे पाहून हासताहेतसें पाहून किंचित् खिन्न होऊन 'तपस्व्यांच्या देखत आपण आमची स्थिति पाहून हर्ष झाल्यासारखे हासतां कां,' ह्मणून धर्मराजानें त्यांना विचारलें. तेव्हां ते ह्मणाले, 'धर्मराजा, मला हर्ष झाला नाहीं व मी तशा भावानें हासलों नाहीं. हर्षापासून उत्पन्न होणारा मद मजपाशीं नाहीं. राजा, काय सांगूं, आज तुझी विपत्ति पाहून पित्याच्या आज्ञेनें लक्ष्मणासहवर्तमान ज्यानें वनवास स्वीकारला त्या सत्यप्रिय रामचंद्राची मला आठवण झाली! वाटेल तें करण्याचें सामर्थ्य अंगांत असतांही सर्व सुखोपभोग सोडून केवळ सत्यसंरक्षणार्थ पित्याच्या आज्ञेनें त्यानें वनवास स्वीकारला. त्याप्रमाणेंच भगीरथ आदिकरून दुसरे सत्वशील पुरुष यांनीं देखील सत्याच्याच योगानें उत्तम लोक मिळविले. **शक्तीच्या जोरावर अधर्माचरण करूं नयें.** पर्वतशिखरप्राय मोठे शक्तिमान् हत्ती देखील सृष्टिकर्त्याच्या आज्ञेनेंच वागत असतात. सर्व प्राणिमात्र आपापल्या नशिबीं विधात्यानें लिहून ठेवल्याप्रमाणें कर्म करतात. सत्यानें, धर्मानें व योग्य वर्तनानें सर्व प्राणिमात्रांत श्रेष्ठत्व पावून प्रतिज्ञा केल्याप्रमाणें कष्टमय वनवास कंठल्यावर द्यूतांत गमाविलेली संपत्ति तूं आपल्या तेजानें कौरवांपासून परत मिळविशील.' असें ह्मणून ते महर्षी उत्तरदिशेकडे निघून गेले. पांडव द्वैतवनांत रहात असतां यज्ञ:—सामादि वेदांच्या आल्हादजनक घोषांनीं तसेंच त्यांच्या धनुष्यांच्या टणत्कारांनीं **ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचें संमिश्रण झालेल्या त्या वनाला फारच शोभा आली होती.** एके दिवशीं संध्याकाळचे वेळीं ऋषिसमुदायांत बसलेल्या युधिष्ठिराला वृकदाल्भ नांवाचा ब्राह्मण म्हणाला, 'राजा, सर्व जगामध्यें श्रेष्ठ असे ब्राह्मण या स्थळीं तुला मिळाले आहेत. **अग्नि व वायु यांच्या संयोगानें ज्याप्रमाणें वनाचा फडशा पडतो त्याप्रमाणें ब्राह्मण व क्षत्रिय यांचा संयोग शत्रूंना जाळून टाकतो.** इहलोक व परलोक जिंकूं इच्छिणारानें ब्राह्मणांची अवहेलना कधीं करूं नये. गतमोह व धर्मार्थापासून विरक्त अशा ब्राह्मणांचा लाभ झाल्यानें राजा आपल्या सपत्नांचा नाश करूं शकतो. प्रजापालनरूप श्रेयस्कर धर्माचें आचरण करणाऱ्या बलीला देखील विपत्तिकालीं ब्राह्मणाखेरीज कोठें आधार मिळाला नाहीं. ज्या विनीत राजाला ब्राह्मण नीतिशिक्षण देतो त्याच्या पुढें समुद्राच्या लाटा देखील वांकतात. गजयुद्धामध्यें ज्याप्रमाणें अंकुश नसेल तर जय मिळत नाहीं त्याप्रमाणें ब्राह्मणांवांचून क्षत्रियांचें बल व्यर्थ आहे. **अनुपमेय दूरदर्शित्व ब्राह्मणांत आहे व अनुपमेय बल क्षत्रियांमध्यें आहे. हे दोघे ज्यावेळीं मिळून असतात त्यावेळीं लोकांना सुख होतें.** न मिळालेलें मिळविण्याकरितां शहाण्यानें ब्राह्मणांचाच विचार घ्यावा. ब्राह्मणांशीं तुझें उत्तम वर्तन असल्यामुळें तुझें दैदीप्यमान यश सर्व लोकांत पसरलें आहे. याप्रमाणें पुष्कळ तपोनिष्ठ ब्राह्मण इंद्राप्रमाणें युधिष्ठिराचा मान राखीत त्याठिकाणीं होते. कोणे एके वेळीं धर्मराज सुखानें बसला असतां द्रौपदी त्याला ह्मणाली, 'खरोखर त्या दुष्ट दुर्योधनाला आमच्या संबंधानें अगदीं वाईट वाटत नाहीं. कारण आपल्याला वल्कलें नेसावयाला लावून माझ्यासुद्धां वनांत पाठविल्याबद्दल त्याच्या मनाला एवढें देखील वाईट वाटत नाहीं. खरोखर त्याचें हृदय पोलादी असलें पाहिजे. आपण वनाला निघालों असतां त्या चौघा पाण्यांच्या डोळ्यांतून एक तरी टिपूस निघावयाचें होतें! पण नाहीं. किती झालें तरी दुष्टच ते! आपल्याला अशा दुःखाची संभव नसल्यामुळें आपण आपल्या बंधूंसहवर्तमान वनवासी झालों हें पाहून मला फार दुःख होत आहे, व पूर्वी घरांत घडत असलेल्या हजारों गोष्टी आतां घडत नसल्यामुळें माझ्या मनाचा तिळपापड होत आहे. ह्या आपल्या बंधूंना वनवासी पाहून आपल्याला राग कसा येत नाहीं? रणामध्यें सर्व कौरवांचा नाश करण्याचें अंगीं सामर्थ असतांही आपल्या वचनामुळें हे निमुटपणें दुःख सहन करीत आहेत. मला अशा स्थितींत पाहून आपण त्या दुष्टांची काय ह्मणून उपेक्षा करतां? मला व आपल्या भावांना ह्या स्थितींत पाहून आपल्या मनाला यत्किंचितही वाईट वाटत नाहींना? ह्यावरून राग हा मनोविकार आपल्या ठिकाणीं जागा आहे की नाहीं हेंच मला कळत नाहीं. ज्याला राग नाहीं

तो क्षत्रिय नव्हे अशी जी म्हण आहे तिच्या अगदीं उलट आपली स्थिति आज मी पहातें आहे. जो क्षत्रिय वेळ आली असतां आपलें तेज प्रगट करीत नाहीं, त्याचा सर्व प्राणिमात्र नेहमीं पराभव करतात. ह्यासंबंधानें बलि व प्रल्हाद यांचा पुरातन संवाद मी आपल्याला सांगतें तो ऐका ? क्षमा चांगली किंवा तेज चांगलें म्हणून बलीनें प्रल्हादाला विचारलें असतां प्रल्हादानें उत्तर दिलें, **'क्षमा नेहमीं चांगली नाहीं व तेजही नेहमीं चांगलें नाहीं.** जो नेहमीं क्षमा करतो त्याचें पुष्कळ नुकसान होतें. सेवकजन, तसेंच तटस्थ असलेले शत्रू त्याला जुमानीत नाहींत. कोणीही त्याच्या पुढें वांकत नाहीं. त्याचे नोकर त्याला सर्वस्वीं लुबाडण्याला टपलेले असतात. यजमानाला उचित असा मान ते त्याला देत नाहींत. **अपमान हा या जगांत मरणाहून वाईट आहे.** क्षमाशील मनुष्याशीं लोक नेहमीं कडू बोलण्याला सुद्धां भीत नाहींत. त्याची बायको देखील बाटेल तसें वागण्यास निघते. नोकरांना नेहमीं चैनींत रहावयास सांपडून शिक्षेची भीति नसल्यामुळें ते बिघडतात व अपाय करण्यास चुकत नाहींत. क्षमेपासून अशा प्रकारचे अनेक तोटे होतात. आतां तेजाविषयीं विचार केला तर तापटपणा धरून आपल्या तेजाच्यायोगानें बाटेल तशी शिक्षा करीत सुटल्यानें मित्राशीं विरोध उत्पन्न होतो, व लोक व स्वजन आपला द्वेष करूं लागतात, व त्यापासून पैशाचा तोटा, थट्टा, अनादर, संताप, द्वेष, बुद्धिभ्रंश व शत्रू इत्यादि उद्भवतात. रागाच्या झपाट्यांत मनुष्य अन्यायानें दुसऱ्याला शिक्षा करून लवकरच ऐश्वर्य, प्राण व कधीं कधीं स्वजन यांना देखील मुकतो. **जो अपकार करणाऱ्याचा व आपला नाश करूं इच्छिणाऱ्यांचा बळाच्या जोरावर समाचार घेतो त्याला घरांत शिरलेल्या सापाप्रमाणें लोक कांपत असतात.** लोक ज्याला कांपतात त्याचें या जगांत अस्तित्व कसें शक्य असणार ? त्याचें कांहीं उणें दिसल्याबरोबर लोक त्याचा नाश कराव्यायला तयार असतात. म्हणून नेहमीं रागही उपयोगी नाहीं व नेहमीं क्षमाही उपयोगी नाहीं. **जो प्रसंगीं मृदु व प्रसंगीं निष्ठुर असतो त्यालाच इहलोकीं सुख मिळतें.** पूर्वी एखाद्यानें आपल्यावर उपकार केला असला तर तो स्मरून त्यानें मोठा अपराध केला असला तरी त्याची क्षमा करावी. त्याचप्रमाणें मूर्ख सेवकांचे अपराध सहन करावे. जर कोणी मुद्दाम अपराध करून तो माझ्या हातून चुकून झाला असें म्हणेल तर त्या कुटिल मनुष्याला लहानशा अपराधानद्दल देखील शासन करावें. सर्वांचा एकेक अपराध सोसावा. दुसरा झाल्याबरोबर योग्य विचारपूस करून क्षमा करावी. **मऊपणानें तीक्ष्ण व मृदु या दोघांचाही नाश होतो. त्याला असाध्य कोणचीच वस्तु नाहीं. म्हणून मार्दव हें तीक्ष्णाहून तीक्ष्ण आहे.** द्वेष, काम, बलाबल व लोकभीति हीं मनांत आणून प्रसंगीं अपराधाची क्षमा करावी. याहून अन्यप्रसंगीं शौर्य दाखविणेंच उचित आहे. म्हणून लोभी व नेहमीं आपणास अपकार करणारा जो दुर्योधन त्या संबंधानें शौर्य दाखवावयाची ही वेळ आहे असें मला वाटतें. त्याच्या संबंधानें आतां क्षमेचा काळ उरला नाहीं. मृदु केव्हां असावें, कठोर केव्हां व्हावें हें जो जाणतो त्यालाच भूपति ही पदवी शोभते. ' हें द्रौपदीचें भाषण ऐकून युधिष्ठिर म्हणाला, ' मनुष्याच्या नाशाला व अस्तित्वाला राग हाच कारण आहे. ज्याला आपला राग आवरतां येतो तोच ह्या जगांत दिवस काढूं शकतो. राग आवरतां आला नाहीं तर तो वाढतच रहातो. **ह्या जगांत लोकांच्या नाशाला राग हाच कारण होतो;** म्हणून लोकनाशाला कारणीभूत असा जो राग तो माझ्यासारख्यानें कसा दाखवावा ? **मनुष्य रागाच्या झपाट्यांत बाटेल तें पाप करतो.** प्रसंगीं गुरूला देखील मारतो. आपल्या निष्ठुर भाषणानें कल्याणाला लाथाळतो. काय बोलावें, काय न बोलावें, काय करावें, काय न करावें, हें त्याला कळत नाहीं. प्रसंगीं स्वतःचा देखील तो नाश करून घेतो. या प्रकारचे अनेक दोष दिसत असल्यामुळें शहाण्यांनीं दूर केलेल्या रागाला मजसारख्यांनीं कसें जवळ करावें ? हे विचार मनांत येऊन माझा राग वाढत नाहीं. रागावलेल्यावर उलट न रागावणारा मनुष्य आपल्याला व दुसऱ्यांला मोठ्या संकटांतून सोडवितो. तो दोषांचा चि-

किंसकच बनतो. दुर्बळ व मूर्ख आपल्याला शक्तिमान मनुष्यांनीं त्रास दिल्याबरून रागावेल तर त्याच्या योगानें तो आपलाच नाश करून घेईल. ह्मणून राग आवरणें चांगलें. शहाणा मनुष्य शक्तिमान असून जरी त्याला दुसऱ्यानें राग आणिला तरी न रागावतां व राग आणणाऱ्याचें नुकसान न करतां तो परलोकांत सुखानें रहातो. म्हणून मनुष्य बलवान असो वा दुर्बळ असो त्यानें सदोदित क्षमा धरावी. **असत्याहून सत्य चांगलें, निष्ठुरतेहून दया चांगली.** दूरदर्शी शहाणे लोक ज्याला तेजस्वी ह्मणातात त्याच्या पोटांत राग नसतो. जो आलेला राग विचारानें आवरतो त्यालाच शहाणे तेजस्वी समजतात. रागावलेल्या मनुष्याला प्रसंग व वेळ कळत नाहीं; म्हणून पराक्रमी मनुष्यानें राग दूर ठेवावा. **सभ्यपणा, सूड घेण्याची शक्ति, शौर्य व हुशारी हे तेजाचे गुण रागानें झपाटलेल्या मनुष्याच्या अंगीं असूं शकत नाहींत. राग ठाकल्यानेंच खरें तेज अंगीं येतें. तमोगुण मनुष्यामध्यें त्याच्या नाशाकरितां उत्पन्न केला आहे.** रागीट मनुष्याहून स्वधर्मपराङ्मुख मनुष्य देखील बरा. जर पृथ्वीसारखे क्षमाशील लोक मनुष्यांमध्यें नसते तर त्याच्यांमध्यें शांतताच राहिली नसती. **तंट्याला कारण राग आहे.** त्याच्या झपाट्यांत कोणी आपल्या अंगावर तुटून पडला असतां आपण त्याच्या अंगावर तुटून पडतों, **मारलें असतां** उलट मारतों, आपल्या नांवानें कोणीं **ओरड** केली असतां उलट आपण त्याच्या नांवानें ओरड करतों. बाप मुलाला मारतो, मुलगा बापाला मारतो. याप्रमाणें अधर्माच्या योगानें सर्व प्राणिमात्रांचा नाश होतो. कोणी आपल्या नांवानें खडे फोडले असतां, किंवा आपणास मारलें असतां राग आला असूनही जो क्षमा धरतो तोच उत्तम पुरुष समजावा. क्षमा हाच धर्म आहे, क्षमा यज्ञ आहे, क्षमा वेद आहे, क्षमा सत्य आहे, क्षमा ब्रह्म आहे. यज्ञ करणाऱ्या लोकांना किंवा ब्रह्म जाणणाऱ्या लोकांना जे लोक मिळत नाहींत ते क्षमावान लोकांना मिळतात. त्याला या जगांत सन्मान मिळून परलोकीं उत्तम गति मिळते. भीष्मादि वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध महात्मे शमाचींच प्रशंसा करतात. भरताच्या पुढें होणाऱ्या समूळ नाशाचा हा भयंकर काळ आला आहे असें मला वाटतें. सुयोधन क्षमेला पात्र नसल्यामुळें ती त्याकडे जात नाहीं, व मी पात्र आहे असें समजूनच ती मजकडे धांव घेते. ' द्रौपदी ह्मणाली, ' ज्या धात्याविधात्यांनीं आपल्या मनाला अशी भूरळ पाडिली आहे, त्यांना नमस्कार असो. क्षमाशीलतेच्या संबंधानें आपल्या बाडवडिलांच्या आचरणाहून आपलें आचरण निराळें आहे. **कर्माच्या योगानें मनुष्य निरनिराळ्या गतींला जातो. ह्मणून कर्में टाळतां येत नाहींत.** मनुष्य तीं टाकण्याला उगीच झटत असतो. **या जगांत धर्मानें, द्येनें, क्षमेनें किंवा सरळपणानें मनुष्याला संपत्ति मिळत नाहीं,** असें मला वाटतें; कारण आपण दुःखाला पात्र नसून आपल्यावर हें दुःसह संकट आलें आहे व आपल्याला तर, प्राणाहून प्रियतर असा जो धर्म त्याहून अधिक दुसरी कोणचीच गोष्ट दिसत नाहीं. आपलें राज्य व जीवित हीं केवळ धर्मासाठीं आहेत. आपण आपल्या भावांना व प्रसंगीं मलाही सोडाल; परंतु धर्माला कधींही सोडणार नाहीं. धर्मरक्षण करणाऱ्या राजाची काळजी धर्म बाळगतो, असे थोर लोकांचें ह्मणणें मीं ऐकिलें आहे; परंतु तो ती आपली घेत आहे असें मला मुळींच दिसत नाहीं. छायेप्रमाणें मनुष्याची बुद्धि नेहमीं त्याच्याबरोबर रहाते. आपल्या बरोबरीच्यांचा देखील आपण कधीं अपमान केला नाहीं. मग आपल्याहून थोरांचा अपमान आपल्या हातून कोठून होणार ? ही सर्व पृथ्वी मिळाल्यानेंही आपल्याला गर्व झाला नाहीं. देव, पितर व ब्राह्मण यांच्या सर्व कामना योग्य रीतीनें आपण परिपूर्ण केल्या. आपल्या घरीं ब्राह्मणाला अदेय ह्मणून कांहींच नाहीं. **शांतीकरितां केलेल्या वैश्वदेवामध्यें अतिथींना व इतर भूतांना अन्न दिल्यावर** बाकीच्यावर आपण रहातों. इष्टि, पशुबंध, नैमित्तिक कर्में व पाकयज्ञ चोरांनीं भरलेल्या या अरण्यांत देखील आपण करीत आहों. अश्वमेधादिकांमध्यें आपण मोठमोठाल्या दक्षिणा दिल्या आहेत. याप्रमाणें सरळ, कोमल, दानशूर, सत्यवादी असे आपण असतांना द्यूताकडे आपली बुद्धि कशी

बळली हेंच मला कळत नाहीं. ही आपली आपदा पाहून माझें मन अगदीं वेडें होऊन गेलें आहे. **सृष्टिकर्ता ईश्वर प्राणिमात्रांच्या सुखासुखासंबंधानें व मियामियासंबंधानें पूर्वीच बीं पेरून ठेवीत असतो. ज्याप्रमाणें कळसूत्री बाहुल्या सूत्रधाराच्या अनुरोधानें अंगविक्षेप करतात त्याचप्रमाणें या प्रजा ईश्वरसंकल्पित कर्मे करतात.** जसा आकाशांत तसा सर्व भूतांच्या अंतरीं राहून तो त्यांच्या कल्याणाकल्याणाला कारणीभूत होत असतो.दोऱ्याला बांधलेल्या पक्ष्याप्रमाणें, धाग्यांत ओवलेल्या मण्याप्रमाणें, वेसण घातलेल्या बैलाप्रमाणें, अगर प्रवाहांत सांपडलेल्या मोठ्या झाडाप्रमाणें हें जग केवळ ईश्वराधीन आहे. मनुष्याचा त्यावर बिलकूल ताबा नाहीं. स्वतंत्र रीतीनें तो कांहींच करूं शकत नाहीं.ईश्वराज्ञेनेंच तो स्वर्गास किंवा नरकास जातो.बऱ्या अथवा वाईट कामाला सर्व प्राणीमात्रांला लावणारा ईश्वर सर्वव्यापक असून तो हा असें मात्र कोणाला दाखवितां येत नाहीं. ज्याला क्षेत्र ही संज्ञा आहे,असें हें शरीर केवळ विधात्याचें हेतुभूत आहे. त्याच्या साधनानें तो आपणाकडून शुभाशुभ कर्म करावितो. ही ईश्वरानें करून ठेविलेली मोठी माया होय. तो आपल्या मायेनें सर्वांना मोहून टाकून प्राण्यांकडूनच प्राण्यांचा नाश करावितों. **सूर्यकिरणाप्रमाणें तत्त्वदर्शी शहाणे लोक ही सृष्टि आहे याहून भिन्न दृष्टीनें पाहतात.** एका लांकडानें ज्याप्रमाणें दुसऱ्या लांकडाचा, एका धोंड्यानें ज्याप्रमाणें दुसऱ्या धोंड्याचा व एका लोखंडी तुकड्यानें ज्याप्रमाणें दुसऱ्या लोखंडी तुकड्याचा आपण नाश करतों त्याचप्रमाणें ईश्वरानें प्राणिमात्रांशीं संयोगवियोगरूपानें, एखादें खेळाडू मूल ज्याप्रमाणें चेंडूशीं खेळत असतें, त्याप्रमाणें खेळ चालविला आहे. त्याचें प्राणिमात्रांच्या ठिकाणीं आईबापांप्रमाणें वर्तन दिसत नाहीं; परंतु यमधर्माप्रमाणें निष्ठुरतेचें वर्तन दिसत आहे. थोर, श्रीमान, लज्जासंपन्न अशा लोकांना त्यांच्या वृत्तीला मुकलेले, त्याचप्रमाणें वाईट लोकांना सुखी व द्रव्यार्जनांत नेहमीं गर्क झालेले पाहून त्याबद्दल ईश्वरालाच दोष देणें मला योग्य वाटतें. थोरांनीं घालून दिलेला शास्त्रमार्ग उल्लंघन करणाऱ्या क्रूर, धनलोभी, धर्मभ्रष्ट अशा दुर्योधनाला संपत्ति देऊन विधात्याला काय मिळालें हें त्याचें त्यालाच माहीत ! **कृतकर्माचें प्रायश्चित्त जर कर्त्याला भोगावें लागत असेल तर प्रत्येक कर्माबद्दल जबाबदार ईश्वरच आहे. भोगावें लागत नसेल तर बळ हेंच सुखाला कारण आहे असें म्हणावें लागतें व म्हणूनच दुर्बळाबद्दल मला कींव येते.** ' यावर युधिष्ठिर म्हणाला, ' द्रौपदि, गोड, मृदु व सुंदर अशा ह्या तुझ्या भाषणांत नास्तिकपणाची झाक दिसून येत आहे. **श्रुतीच्या बाहेर न जातां व थोर कसे चालत आले याकडे दृष्टि देऊन कर्मफलाची अपेक्षा न करतां मी कर्म करीत असतों. यावयाचें** म्हणून देतों, यज्ञ करावयाचा म्हणून करतों. स्वभावानेंच मीं आपलें मन धर्माकडे लाविलें आहे. **धर्मफळाची इच्छा करणारा अगर धर्माचरण करून त्याबद्दल शंका घेणारा मनुष्य धर्मामध्यें व्यापार करणारा होय.**अशा अधमाला धर्मफळ मिळत नाहीं. **ज्याच्या मनांत धर्म अगर श्रुति यांबद्दल शंका येते, तो वेदापासून शूद्रप्रमाणें अजरामर लोकांपासून भ्रष्ट होतो.** वेदाध्ययन करणारा, धर्मपरायण व चांगल्या कुलांत जन्मलेला ह्याची वृद्धांमध्यें गणना होण्याला हरकत नाहीं. शास्त्रभ्रष्ट झालेला मंदबुद्धि शूद्राहून अगर चोराहूनही नीच समजावा. धर्मानें चिरंजीव झालेले मार्कंडेय ऋषी तूं प्रत्यक्ष पाहिले आहेस. त्याचप्रमाणें व्यास, वसिष्ठ, शुक, नारद इत्यादिकांस धर्मानेंच दिव्यशक्ति मिळाली आहे. ते शाप देण्याला किंवा अनुग्रह करण्याला समर्थ असून देवांहूनही थोर आहेत हें तुला प्रत्यक्ष दिसत आहे. धर्माविषयीं शंका घेणारा अधोगतीला जातो. म्हणून धर्म व ईश्वर यांना उगीच मूर्खपणानें धिक्कारूं नकोस. **मूर्खाला सर्व शहाणे मूर्ख दिसतात,** धर्माविषयीं संशय घेणाराची कशानेंही खात्री होत नाहीं. तो आपलें मतच खरें असें समजून अनेक वेळां कल्याणाला लाथाळतो, व लहान मुलाप्रमाणें जेवढें इंद्रियगोचर तेवढेंच खरें मानून बाकीच्या संबंधानें मूढ रहातो. धर्माविषयीं शंका घेणाऱ्याला प्रायश्चित्त नसून त्याला श्रेष्ठ लोक मिळत नाहींत. त्याला नरकप्राप्तीच होते. धर्मावर

धडा ठेवणारा इहपरलोकीं सुख मिळवितो. स्वर्गाला जाण्याचा धर्म हाच सोपान आहे. सागर तरून जाणाऱ्यांना जशी लांकडी नाव, तशी हा भवसागर तरूं इच्छिणाऱ्यास धर्म ही नाव आहे. धर्मानें वागणाऱ्यांनीं आचरलेला धर्म जर विफल असतां तर आज हें जग अंधकारांत बुडून गेलें असतें. लोकांना मोक्षसुख न मिळतां ते पशुवत राहिले असते. विधेला व अर्थाला ते मुकले असते. तप, ब्रह्मचर्य, यज्ञ, वेदाध्ययन, दान, सरळपणा इत्यादिकांचें जर कांहीं फळ नसेल तर देव, ऋषी व दुसरे थोर लोक कां बरें आदरानें या गोष्टी आचरतात? किंवा विफल असेल तर मग ते अगदीं फसले समजावयाचें. कल्याणरूपी फलांच्या प्राप्तीसाठींच परमेश्वरानें धर्मरूप साधन निर्माण केलें आहे. ह्मणून धर्माला विफल ह्मणतां येत नाहीं, किंवा अधर्माला सफल ह्मणतां येत नाहीं. तूं आपल्याच जन्माचा विचार कर ह्मणजे मी ह्मणतों यांतील रहस्य तुला कळून येईल. **शहाण्याला कर्माचें फळ मिळतें व थोड्यानें देखील त्याची तुष्टि होते. मूढांना पुष्कळ मिळूनही संतोष होत नाहीं.** पापपुण्यकर्माचें कारण, शेवट व फल हीं आपल्याला कळण्याजोगतीं नाहींत. प्राणिमात्रांला या ठिकाणीं मोह पडतो. हीं देवरहस्यें आहेत. आशा बाजूला ठेवून नेहमीं व्रतस्थ राहणाऱ्या व तपानें सगळें पाप धुऊन टाकून नेहमीं प्रसन्न मनानें असणाऱ्या ब्राह्मणांना ह्या साऱ्या गोष्टी समजतात. म्हणून **धर्म किंवा देव यांविषयीं शंका घेऊं नये.** कर्माचें फळ मिळालेंच पाहिजे हें पक्कें समजून तूं आपला संशय दूर कर. सर्व आहे असें समजून नास्तिकपणा बाजूला ठेव. ईश्वराला दोष देऊं नकोस. त्याला नमस्कार कर. ईश्वर तुला अशी कुबुद्धि न देवो. त्याच्याच प्रसादानें अभक्तिमान प्राणीही अमर होतो.' द्रौपदी म्हणाली, 'मी धर्म अगर ईश्वर यांचा अपमान करीत नाहीं, व निंदाही करीत नाहीं. दुःखपीडित झाल्यानें मी कांहींतरी हें बरळत आहें असें आपण समजा. ज्यांना म्हणून कळतें ते सर्व या जगांत कर्में करतात. केवळ स्थावर मात्र कर्म केल्यावांचून आहेत. जन्मल्यापासून तों कायमच्या विश्रांतीपर्यंत प्राणी कर्माचीं फळें अनुभवीत असतात. **प्राक्तनसंस्कारानुरूप या ठिकाणीं प्रत्येक फळ मिळतें.** ब्रह्मदेवांना सुद्धां तें चुकत नाहीं; ह्मणून प्राक्तनानुरूप प्रत्येकानें कर्म करीत असावें. यासाठीं मी सांगतें, आपण कर्म करा. औदासिन्य धरूं नका. कर्मरूपी चिलखतानें आपल्याला झांकून घ्या. आपलें कर्तव्य जाणणारा या जगांत हजारांत एखादा असेल किंवा नसेल, जर कोणी कर्म करणार नाहीं तर आज या सर्व प्रजा लयाला जातील. कर्म विफल असेल तर त्याची वाढ खुंटेल. आपण कर्म करणाराचें जन्माजन्मफळ प्रत्यक्ष पहातों. नाहीं तर लोक या फेऱ्यांत पडलेच नसते. जे दैववादी अथवा यदृच्छालाभवादी आहेत त्या दोघांच्याही भाषणांत कांहीं अर्थ नाहीं. कर्मबुद्धिच प्रशस्य आहे. दैवावर विसंबून जो कांहीं न करतां स्वस्थ झोंप घेतो, तो पाण्यांत टाकलेल्या मातीच्या कच्च्या घड्याप्रमाणें नाश पावतो. त्याप्रमाणें कर्म करण्याचें सामर्थ्य असून यदृच्छालाभबुद्धीनें कर्म न करतां स्वस्थ असतो तोही फार दिवस टिकत नाहीं. या जगांत आकस्मिक जी अर्थप्राप्ति होते तिला यदृच्छालाभ समजतात. त्याला कोणाचा यत्न लागत नाहीं. दैविक उपायांनीं जें कांहीं मनुष्य मिळवितो त्याला दैवदत्त ह्मणतात. स्वतः कर्म करून त्याचें फळ मनुष्याला मिळालें ह्मणजे त्याला पौरुष ह्मणतात. स्वाभाविक रीतीनें एखाद्या कृत्यांत प्रवृत्ति होऊन कारणाशिवाय जी अर्थप्राप्ति होते तिला स्वाभाविक ही संज्ञा आहे. ह्याप्रमाणें दैवानें, यदृच्छेनें व स्वभावतः अशा तीन उपायांनीं पुरुष आपल्या कर्माचें फल मिळवितो. ब्रह्मदेव देखील प्राक्तनानुरूप निरनिराळ्या हेतूंनीं मनुष्याला पूर्व कर्माचें फल बाटून देतो. ह्या जगांत मनुष्य जें कांहीं बरें वाईट करतो तें विधिनिर्मित त्याच्या पूर्वकर्माचें फळ होय. कर्म करणारा हा देह ब्रह्मदेवांचें साधन आहे. तो ज्याप्रमाणें ह्याच्याकडून कर्म करवितो त्याप्रमाणें पराधीन होऊन हा तें करीत असतो. मनानें कोणतीही गोष्ट आधीं ठरवून प्राणी आपल्या बुद्धिबलानें कर्म करून तें शेवटास नेतो. या ठिकाणीं पुरुष हा स्वतः कारणीभूत होतो. कर्में असंख्य आहेत. घरें, नगरें इत्यादि गोष्टींमध्यें यश मिळणें ह्याला पुरुष हा हेतुभूत असतो. तिळांत तेल असतें, गाईच्या सैं-

नांत दूध असतें व लांकडांत अग्नि असतो, हें जाणून आपल्या बुद्धिबलानें मनुष्य उपायाची योजना करून त्याच्या सिद्धीकडे लागतो, आणि ह्या आत्मकर्तृत्वाच्या सिद्धीवरच लोक राहतात. हुशार कारागिरानें केलेलें काम चांगलें वठतें. एखादें कृत्य बरें अगर वाईट झालें आहे हें फलावरून कळतें. कर्तृत्वशक्तीमुळेंच कर्मसिद्धि झाल्यानें मनुष्याची प्रशंसा होते. सिद्धि न होईल तर निंदा होते. सर्वच गोष्टी यदृच्छेनें घडतात असें कित्येकांचें ह्मणणें आहे, दैवानें घडतात असेंही कित्येक ह्मणतात, व कांहींचें ह्मणणें त्या प्रयत्नानें सिद्ध होतात असें आहे. **परंतु कांहीं दैवानें, कांहीं यदृच्छेनें व कांहीं प्रयत्नानें पुरुषाला फळ मिळतें.** याहून चवथें कांहीं कारण नसतें. **जर ब्रह्मदेव इष्टानिष्ट फळ देणारा नसेल तर कोणीच दुःखी झाला नसता. शक्तन जर नसेल तर मनुष्यानें आपल्या इच्छेनुरूप कर्म करून फलप्राप्ति करून घेतली असती.** जे लोक अर्थानर्थप्राप्तीला वरील तीन कारणें कारणीभूत आहेत असें समजत नाहींत, त्यांना या देहाप्रमाणेंच जड समजलें पाहिजे. **कर्म तर केलेंच पाहिजे. यदृच्छालाभवादी कधीं उन्नतीला चढत नाहीं. कर्म करणाऱ्यालाच फलसिद्धि मिळते. परंतु कर्मफलाविषयीं निःसंदेह असे विचारी व कर्मनिष्ठ पुरुष क्वचित आढळतात.** कर्म केल्यानें मनुष्य ऋणमुक्त होतो. झोंप घेणारा आळशी मनुष्य आकाबाईच्या फेऱ्यांत सांपडतो. संशयबुद्धि अनर्थाला कारण आहे. संशय दूर झाल्यानें सिद्धि मिळते. शहाणे लोक कर्मामध्यें गढून जाऊन संशयापासून दूर असतात. हा जो आमच्यावर मोठा अनर्थ ओढवला आहे तो आपण हातपाय हालविण्याचें मनांत आणलें तर खात्रीनें दूर होईल. ,बरें कदाचित् यश न आलें तर आपल्या भावांचा आपल्यावर बोल रहाणार नाहीं. दुसऱ्यांना ज्याप्रमाणें आपल्या कर्माचें फळ मिळतें, त्याप्रमाणें आह्मांला कां मिळूं नये ? **कर्म करणाराला आज नाहीं उद्यां फल मिळेलच. शेतकरी जमीन नांगरून बीं पेरून मग स्वस्थ रहातो. कारण पुढें सिद्धीला कारण पाऊस आहे. मातीं पाऊसच जर न पडेल तर त्यांत शेतकऱ्याचा कांहीं दोष नाहीं. दुसऱ्याला कर्म केलें असतां जसें यश येतें तसेंच आपण करून आपल्याला जर यश न येईल तर शहाण्यानें त्यांत आपला दोष मानूं नये, व झटूनही मला फळ मिळालें नाहीं ह्मणून खेदही मानूं नये. सिद्धि न मिळण्याला याठिकाणीं दुसरीं दोन कारणें आहेत. सिद्धि मिळो वा न मिळो, आपण प्रयत्न केल्यानें लोकापवादापासून मुक्त होतों.** परंतु प्रयत्न न करणें ह्मणजे मात्र तसें नाहीं. कर्मसिद्धीला अनेक कारणें लागतात. अंगीं कुशलता नसेल तर कमी फळ मिळतें; परंतु कोणतेंही काम हातीं न घेतल्यानें फळही मिळत नाहीं, व कुशलताही दिसून येत नाहीं. शहाण्यानें कल्याणप्राप्तीकरितां देशकालादि उपायांची यथाशक्ति बुद्धीशीं जोड लावून दिली पाहिजे. हुषारी ठेविली पाहिजे. मग पराक्रम काय करावयाचा तें त्याला सहजच कळतें.ज्याठिकाणीं शहाण्या मनुष्याला आपला शत्रु आपल्यापेक्षां अनेक गुणांनीं श्रेष्ठ दिसून येतो त्याठिकाणीं वाटेल तर त्यानें सामानेंच आपला हेतु साधून घ्यावा,किंवा त्याला संकटांत पाडण्याचे अथवा त्याला हद्दपार करणाराचे कांहीं उपाय योजावे. शत्रूचें छिद्र नेहमीं पहात बसणारा यशस्वी होऊन आपल्या व शत्रूच्या ऋणांतून लवकरच मुक्त होतो. मनुष्यानें स्वतःची अवहेलना कधीं करूं नये. असा मनुष्य कधीं उद्ध्वाला येत नाहीं. अशी ही जगाची रहाटी आहे. **यश हें काळ व स्थिति यांवर अवलंबून आहे.**'

---

६४ व्यासांपासून प्रतिस्मृति नामक विद्येची प्राप्ति. (३. ३३–३६)

याप्रमाणें द्रौपदी बोलल्यानंतर सूड घेण्याला आतुर झालेला भीम धर्मराजाला ह्मणाला, ' भल्या लोकांना शोभणारा असा राज्यासंबंधीं मार्ग स्वीकारा, धर्मार्थकामांला मुकून तपोवनांत राहण्यांत आह्मांला काय फायदा आहे ? दुर्योधनानें आमचें राज्य कपटद्यूत खेळून एखाद्या बलिष्ठ सिंहाची शिकार दुष्ट, दुर्बल अशा कोल्ह्यानें उपटावी त्याप्रमाणें

अधर्मानें व कपटानें उपटलें आहे. आमच्याशीं दोन हात करून कांहीं उपटलें नाहीं. उगीच धर्म धर्म ह्मणून वाटी लागून धर्मकामाला उपयोगीं पडणाऱ्या अर्थाला मुकून विनाकारण आपल्याला क्लेश का करून घेतां? आपल्या चुकीमुळें अर्जुनानें रक्षण केलेलें व इंद्राला देखील घेतां न येणारें असें आमचें राज्य, एखाद्या थोंट्याची कुबडी अथवा पंगूच्या गाई ज्याप्रमाणें हरण कराव्या त्याप्रमाणें दुर्योधनानें हरण केलें आहे. आपलें मन न दुखवावें एवढ्याचसाठीं ही मानहानि आह्मी सोशीत आहों, व आपली आज्ञा पाळण्यासाठीं आह्मी स्वकीयांच्या दुःखाला व परकीयांच्या आनंदाला कारण झालों आहों. त्याचवेळीं आह्मीं दुर्योधनाला चिरून टाकलें नाहीं ही आमच्या हातून फार वाईट गोष्ट झाली. ती माझ्या मनाला फार खात आहे. आमच्या अंगांत शक्ति असून देखील दुबळे लोकांनीं स्वीकारण्याचा पशुतुल्य मार्ग आह्मीं स्वीकारला आहे. आपण धर्ममूर्ति असल्यामुळें व दुःख सोसण्याची आपणाला नेहमीं संवय असल्यामुळें निराश होऊन घंढाला उचित असें हें आयुष्यक्रमण आपण स्वीकारलें आहे असें ह्मणणें भाग पडतें. गतवैभव परत मिळविण्याला असमर्थ असे नेभळे लोक मात्र स्वार्थाच्या आड येणाऱ्या कुचकामी निराशेला आपल्या पोटाशीं कवटाळतात. आपण तर समर्थ असून आपल्याला डोळे आहेत. आमच्यामधील पराक्रम आपल्याला दिसत आहे; असें असून ही अनर्थपरंपरा आपण कां व्यर्थ ओढवून घेत आहां? **ह्या धृतराष्ट्रपुत्रांना आह्मी समर्थ असून असमर्थ वाटत आहों याचें मला फार वाईट वाटतें. लढाईत मेल्याचें इतकें वाईट वाटणार नाहीं. न्यायानें लढून लढाईतून आह्मी मागें फिरलों नाहीं ह्मणजे आह्मांला मरण देखील श्रेयस्कर असून** त्यापासूनसुद्धां उत्तम लोकांची प्राप्ति होणार आहे. बरें, जर त्या सपत्नांना मारून सर्व पृथ्वीचें राज्य आह्मीं मिळविलें तरी आपलें कल्याणच आहे. **ज्या धर्माच्या योगानें मित्रांना व आपल्याला पीडा होते त्याला धर्म ह्मणण्यापेक्षां व्यसन हें नांव अधिक शोभतें.** ज्याप्रमाणें एखाद्या प्रेताला सुखदुःखें सोडतात त्याप्रमाणें नेहमीं धर्माची जपमाळ धरणाऱ्या पुरुषाला धर्म व अर्थ हे दोन्ही सोडतात. केवळ धर्म ह्मणूनच जो धर्माचरण करतो तो क्लेशाचा वाटेकरी होतो. त्याला शहाणा ह्मणतां येत नाहीं. अंधळ्याला ज्याप्रमाणें सूर्याचें तेज दिसत नाहीं त्याप्रमाणें धर्माचें खरें इंगित त्याला कळत नाहीं; आणि ज्याच्या संपत्तीचा उपभोग स्वहितापलीकडे होत नाहीं त्याला तिचा खरा उपयोग कळत नाहीं. जो केवळ आपल्या वैभवांत गर्क होऊन धर्मकामाकडे लक्ष देत नाहीं त्या मनुष्याला ब्रह्मघाती ह्मणण्याला हरकत नसून वाटेल त्यानें त्याला ठार करावा. आणि जो धर्मार्थांकडे दुर्लक्ष करून नेहमीं कामामध्यें रत असतो तो देखील पाणी आटल्यावर ज्याप्रमाणें मासे नाश पावतात त्याप्रमाणें यथेच्छ कामोपभोग घेतल्यानंतर नाश पावतो. ह्मणून शहाणे लोक धर्मार्थसंबंधानें नेहमीं सावध राहतात. अग्नीचा उत्पादक ज्याप्रमाणें अरणि आहे त्याप्रमाणें ते कामाचे प्रकृतिभूत आहेत. अर्थाला मूळ धर्म असून धर्म अर्थावर अवलंबून आहे. **मेघ व सागर याप्रमाणें हे एकमेकांचे जनक होत. अर्थाच्या इच्छेमुळें जी एक त्यावर प्रीति उत्पन्न होते तिलाच अनंग, मनोभव अथवा काम ह्या संज्ञा आहेत.** अर्थार्थी पुरुष श्रेष्ठ धर्माची इच्छा करीत असून कामार्थी अर्थाची इच्छा करीत असतो; पण कामापासून मात्र कांहीं लभ्य नाहीं; एवढेंच नाहीं, तर कामापासून दुसऱ्या कामाचेंहीं साधन होत नाहीं. कारण काम हेंच फल असल्यानें फलापासून फलाची प्राप्ति शक्य नाहीं. काष्ठापासून भस्मरूप फल प्राप्त झाल्यावर त्यापासून जसें दुसरें भस्म प्राप्त होत नाहीं; त्याप्रमाणें अर्थापासून कामफल मिळाल्यावर त्यापासून अन्य कामसिद्धि होणें शक्य नाहीं. कामानें व लोभानें ज्याला भ्रमाचें स्वरूप दिसत नाहीं तो सर्वांना सर्वकालीं व सर्वत्र वध्य आहे. पैसा मिळविण्याला देखील पैशाचेंच साधन लागतें. हें व याची उत्पत्ति व लय आपल्याला माहीत नाहींतशीं दिसतात. **जरेनें अथवा मरणानें अर्थाचा नाश झाला ह्मणजे त्याला अनर्थ समजतात** व तो हा हल्लीं आमच्यावर ओढवला आहे. **पांच इंद्रियें, मन व बुद्धि हीं शब्दादि विषयांच्या ठिकाणीं प्रवृत्त**

झालीं असतां उत्पन्न होणाऱ्या भीतीलाच काम ही संज्ञा आहे. व तेंच आपल्या कर्मांचें उत्तम फल होय. **ह्याप्रमाणें ह्या सर्वांचा बारीक विचार करून यांपैकीं कोणावरच अत्यासक्ति नसावी.** हें सर्व प्रसंगानुसार थोडेथोडे सेवावे. धर्मसेवनाचा काल दिवसाचा पूर्व प्रहर, अर्थ मिळविण्याचा माध्यान्ह, व अपराण्हकाळीं कामाचें सेवन करावें. त्याचप्रमाणें पूर्ववयांत काम, मध्यवयांत अर्थ व उत्तरवयांत धर्म यांचें आचरण करावें. सुखेच्छु पुरुषांनीं मोक्षरूप उत्तम फल तरी मिळवून ध्यावें अगर वैभव तरी मिळवावें. दोहोंपैकीं एकाचाही आधार नसून मध्येंच लोंबत अमलेल्या पुरुषाचें जीवित व्याधिग्रस्त मनुष्याप्रमाणें दुःखावह आहे. आपण नेहमीं धर्ममध्येंच रत आहों असें पाहून आपले सुहृद् आपल्याला कर्म करण्यास सांगत आहेत. दान, यज्ञ, साधूंची पूजा इत्यादि गोष्टी द्रव्याशिवाय होणें शक्य नाहींत. द्रव्याशिवाय इतर गुण व्यर्थ आहेत. **ह्या जगाला मूळ धर्म असून धर्माला मूळ अर्थ आहे. पैसा हा नेहमीं केवळ धर्मबुद्धि धारण करून भिक्षावृत्तीनें मिळणें शक्य नाहीं.** जी ब्राह्मणालाच उचित अशी याचना अगर वैश्य किंवा शूद्र ज्या रीतीनें आपला उदरनिर्वाह करतात तो मार्ग आह्मां क्षत्रियांना बंद आहे. पराक्रम करून द्रव्यसंपादन करणें हाच आमचा शास्त्रविहित मार्ग होय.आमच्या अंगचें बळ हाच आमचा धर्म आहे. तर तो धर्म स्वीकारून धार्तराष्ट्रवनाचा नाश माझ्या हातून करवावा. अशा स्वधर्मालाच शहाणे लोक धर्म समजतात. तो मिळवा. अन्यधर्म स्वीकारणें हें आपल्यासारख्यांना उचित नाहीं. ज्याला पाहून शत्रू थरथर कांपतात अशा क्रूर कर्म करणारांच्या कुळांत आमचा जन्म झाला आहे. प्रजापालनापासून मिळणारें फल मोठें आहे. तें न मिळविलें असतां लोकांमध्यें आपलें हासें होणार आहे. स्वधर्मापासून भ्रष्ट होणें हें मनुष्याला योग्य नाहीं. ह्मणून मनाचा हा कोमलपणा सोडून देऊन क्षात्रतेज धारण करा आणि शौर्यानें धुरीणाप्रमाणें आमचे पुढारी व्हा. **केवळ धर्माची जपमाळ घेऊन आजपर्यंत कोणत्याही राजानें पृथ्वी, मोठेपणा अथवा संपत्ति मिळविली नाहीं. पारधी ज्याप्रमाणें आमिष दाखवून पुष्कळ क्षुद्र प्राण्यांना जाळ्यांत पकडतो त्याप्रमाणें दुर्बुद्ध अशा मूर्खांचें राज्य गोड भाषणानें व कपटानें मिळतें.** असुर मोठे समृद्धिमान असूनही त्यांना देवांनी कपटानेंच जिंकलें. याप्रमाणें शक्तिमानालाच सर्व मिळतें हें लक्षांत ठेवून मोठी कपटयुक्ति लढवून शत्रूला जिंका. अर्जुनासारखा धनुर्धर या पृथ्वीवर कोणीही नाहीं व माझ्यासारखा गदायुद्धांत प्रवीण दुसरा कोणी नाहीं. बळवान मनुष्य असला तरी आपलें सामर्थ्य व आपले साहाय्यकारी यांचा विचार करून तो युद्धाला उठतो. **संपत्तीचें मूळ शक्तीच आहे.** असें नसेल तर हिवाळ्याच्या सावलीप्रमाणें ती टिकत नाहीं. विशेष श्रेयस्कर अशा अर्थाची इच्छा करणारानें बीं पेरण्याप्रमाणें आधीं पैसा खर्चला पाहिजे. खर्चलेल्या पैशाच्या मानानें ज्या ठिकाणीं अर्थप्राप्ति मुळींच नसून अनर्थप्राप्ति मात्र होते अशा ठिकाणीं भांडवल घालूं नये. तें गाढवाला खाजविल्याप्रमाणें अनर्थोत्पादक होतें. ह्याचप्रमाणें विपुल धर्मप्राप्तीकरितां अल्पधर्माचा त्याग करणें इष्ट आहे. मित्रसाहाय्य असणाऱ्या शत्रूला त्याच्या मित्रांपासून वेगळा करून मग शहाणे त्याला आपल्या ताब्यांत आणतात. **एकवटलेले दुर्बल लोकही बलवानाला, मधमाशा ज्याप्रमाणें मध काढणाराला अपाय करूं शकतात, त्याप्रमाणें अपाय करण्यास समर्थ होतात. ज्याप्रमाणें सूर्य आपल्या किरणांनीं रस शोषून घेतो व त्याच किरणांनीं पाऊस पाडून प्रजेचें रक्षण करतो,** त्याप्रमाणें आपण सूर्यासारखे व्हा. भूमीचें वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें पालन करणें हेंच क्षत्रियांचें मोठें तप आहे. युद्धामध्यें जय अथवा अपजय मिळवून क्षत्रिय जसा उत्तम गतीला पोहोंचतो तसा तपानेंही तो उन्नतावस्थेला पोहोंचत नाहीं. शहाणे लोक समाजांत अथवा एकांतीं आपली स्तुति करतात व दुर्योधनाची निंदा करतात. कौरव देखील मोठ्या आनंदानें आपल्या निष्ठेचें वर्णन करतात; आणि कामलोभादि विकारांच्या स्वाधीन होऊन देखील आपण कधीं यत्किंचित् असत्य भाषण करीत नाहीं असें ह्मणतात.

सूर्य आपली प्रभा सोडील अगर चंद्र आपली शोभा सोडील; पण आपण सत्य सोडणार नाहीं असें त्यांचें मत आहे. भूमि मिळविण्यासाठीं मनुष्य जें कांहीं थोडेंसें पातक करतो त्याचें अनेक यज्ञ करून त्यांत पुष्कळ दक्षिणा देऊन क्षालन होतें. सर्व देशांतील आबालवृद्ध आपली स्तुति करतात. कुत्र्याच्या कातड्याच्या पखालींत ठेविलेल्या दुधाप्रमाणें, शूद्राच्या तोंडीं असलेल्या वेदमंत्राप्रमाणें, चोराच्या ठिकाणीं असलेल्या सत्यतेप्रमाणें अगर स्त्रीच्या ठिकाणीं असलेल्या बळाप्रमाणें, हें दुर्योधनानें मिळविलेलें राज्य आहे, अशी लोकांत ह्मण पडली असून वायकामुळें तर वेदाप्रमाणें त्याची घोकणी करीत आहेत. अशी स्थिति असतां आपण ह्या संकटांत पडलों आहों व आपल्याबरोबर आह्मीही हताशांसारखे झालों आहों; ह्मणून सर्व उपकरणांनीं युक्त अशा रथांत बसून अस्त्रज्ञ व धनुर्विद्येंत प्रवीण अशा बंधूंसहवर्तमान ब्राह्मणांचा अशीर्वाद घेऊन आजच हास्तिनापुराला चला व शत्रूंना आपल्या पराक्रमानें चिरडून टाकून गमाविलेलें वैभव धृतराष्ट्रापासून परत घ्या. अर्जुनाच्या गांडीव धनुष्यास लाविलेल्या गृध्रपंखयुक्त बाणांपासून कोणता मानव प्राणी सुटणार आहे?' याप्रमाणें भीमसेनाचें अत्यंत आवेशयुक्त भाषण ऐकून सत्यप्रतिज्ञ युधिष्ठिर किंचिद्दही न डगमगतां ह्मणाला, 'भीमा, वाग्बाणानें माझ्या मनाला घरें पाडण्यासारखें जें तूं भाषण करीत आहेस तें अक्षरशः खरें आहे. त्याबद्दल मी तुला यत्किंचित्ही दोष देत नाहीं. माझ्याच अपराधामुळें तुह्मी मोठ्या संकटांत पडलां आहां. फांसे खेळण्यास सुरवात करतांना धृतराष्ट्राची संपत्ति मला मिळेलसें वाटत होतें; पण माझ्यापाशीं कपट वगैरे कांहीं नसल्यामुळें त्या कपटपटु शकुनीनेंच मला जिंकून पेंचांत आणिलें. शकुनीचे हुकमी फांसे त्याच्या ह्मणण्याप्रमाणें पडतांना पाहून मीं सावध व्हावयाला पाहिजे होतें, पण **राग हा मनुष्याची अक्कल नाहींशी करतो. बल, मान व वीर्य यांच्या अहंतेमुळें स्वतःवर त्याचा दाब रहात नाहीं.** राज्यप्राप्तीची इच्छा करणाऱ्या दुर्योधनानें आह्मांला मोठ्या संकटांत पाडून ज्यावेळीं हीनत्व आणिलें त्यावेळीं द्रौपदी आमच्या सुटकेला कारण झाली. नंतर फिरून त्यानें मला बोलावून द्यूतामध्यें जिंकलें. तेव्हां तुह्मांसहवर्तमान बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास करावा व त्या अज्ञातवासांत उघाडकीस आलों असतां फिरून बारा वर्षें वनवास भोगावा, असा दुर्योधनानें सर्व कौरवांदेखत पण लाविला. मीं मूर्खानें बरें ह्मणून त्याला आपलें अनुमोदन दिलें. तर भल्याच्या समक्ष अशी प्रतिज्ञा करून राज्यलोभाकरितां ती मीं कशीं बरें मोडावी? **धर्माचें उल्लंघन करून पृथ्वीचें राज्य करणें हें आर्याला मरणाहून अधिक आहे.** द्यूतामध्यें माझे हात जाळून टाकण्याला तूं तयार झाला होतास तेव्हां अर्जुनानें तुला तसें करूं दिलें नाहीं; पण त्याचवेळीं तूं तसें केलें असतेंस तर त्यांत काय मोठें पाप झालें असतें? शक्तीचा तुला एवढा अभिमान होता तर पण लावण्याच्यापूर्वीच तूं तसें कां सांगितलें नाहींस? त्यावेळीं प्रसंगाला डोकें देऊन आतां वेळ निघून गेल्यावर मला व्यर्थ का टोंचीत आहेस? याज्ञसेनीला त्यावेळीं कष्टी पाहून आपण मुकाट्यानें बसलों, ही गोष्ट विषप्राशन केल्याप्रमाणें मला अत्यंत पीडा देत आहे. बीं पेरणारा ज्याप्रमाणें फलाची वाट पहात बसतो त्याप्रमाणें अभ्युदयकाळाची आतां वाट पहात बसलें पाहिजे. **आपण कपटानें फसले गेलों आहों ह्मणून त्या फसविणाराचा सूड योग्य वेळीं आपल्या सामर्थ्यानें पूर्णपणें उगविला असतां त्यांत विशेष गोडी आहे.** अशा पुरुषालाच या जगामध्यें संपत्तीचा लाभ होतो, शत्रु त्याच्यापुढें डोकीं टेंकतात, त्यांचे मित्र लवकरच त्यांचे भोंवतीं गोळा होतात. तर मग आतां माझी प्रतिज्ञा ऐक. **अमृताहून किंवा प्राणांहून मला सत्य अधिक प्रिय आहे.** राज्य, पुत्र, कीर्ति व संपत्ति हीं सर्व एकत्र केलीं असतांही तीं सत्याच्या यत्किंचित् तोडीला लागणार नाहीं.' भीमानें उत्तर केलें; 'काळाशीं सख्य करून बुडबुड्यामार्णे अशाश्वत व फलाप्रमाणें नाशवंत असा मानवजन्म घेऊन हा असा आपला कालावधीचा करार करण्यांत काय अर्थ आहे? काल कसा आहे ह्मणाल तर ऐका. तो अनंत आहे, मोजतां येत नाहीं व तो बाणाप्रमाणें किंवा जलप्रवाहाप्रमाणें सर्वांना

आपल्या बरोबर घेऊन सपाट्यानें चालला आहे. सळईला लागून लागून प्रतिक्षणीं कमी कमी होत जाणाऱ्या सुरम्याप्रमाणें ज्याचें आयुष्य प्रत्येक क्षणाला कमी होत चाललें आहे त्यानें काळाची वाट कशी पहावी ? ज्याचें आयुष्य पुष्कळ असून तें किती आहे हें ज्याला कळतें त्यानें वाट पाहिली तर चालेल. आम्ही तेरा वर्षं वाट पहात राहिलों तर तेवढ्या अवधींत काल आमच्या आयुष्याची पुंजी नाहींशी करून आम्हांवर हें जग सोडण्याची पाळी आणणार नाहीं कशावरून ? मृत्यु हा मनुष्याच्या शरीरामध्यें कायमचें बिऱ्हाड करून बसला आहेच. **जो राजा सूड उगवून कीर्ति संपादन करून लोकांमध्यें नांवलौकिकाला येत नाहीं त्यांचें जीवित पशुतुल्य होऊन तो नाश पावतो.** अशा क्षुल्लक मनुष्याचा जन्म व्यर्थ आहे असें मला वाटतें. **अपकार करणाऱ्याचा सूड घेऊन मनुष्य जरी तात्काळ नरकाला गेला तरी तो नरक त्याला स्वर्गाप्रमाणें सुखकारक वाटतो.** सुड घेण्याच्या बुद्धीनें उत्पन्न होणारा संताप अग्नीहून अधिक प्रखर आहे. ज्याप्रमाणें सिंह गुहेमध्यें स्वस्थ बसतात त्याप्रमाणें रात्रंदिवस आमच्या अंगाची आग होत असूनही आपल्याला न दुखवावें म्हणून वृक्षपाषाणादि स्थावरांप्रमाणें आम्ही स्वस्थ बसलों आहों. माझें म्हणणें आपल्याखेरीज संकटांत पडलेल्या व युद्धाविषयीं अगदीं आतुर झालेल्या इतर सर्वांना पटणारें आहे. क्षुद्र, दुर्बळ अशा अधर्मानीं आमचें राज्य हिसकावून घेऊन त्याचा उपभोग घ्यावा आणि घंढाप्रमाणें आम्हीं तें पहात बसावें याहून अधिक लज्जास्पद व दुःखकारक असा दुसरा प्रसंग आमच्यावर कोणता येऊन पडला पाहिजे ? आपल्या सहनशीलतेनें व आपल्या दयाबुद्धीनें दुसऱ्याला अपाय न करण्याचा आपला निश्चय आहे म्हणूनच आपण हे क्लेश सहन करीत आहां. हें आपलें वर्तन आम्हांला व दुसऱ्या कोणालाही पसंत नाहीं. खरें हित आपल्याला कळत नाहीं असें म्हणावें लागतें. आपण इतके दयाबान होतां तर क्षत्रियकुलामध्यें कशाला जन्माला आलां ? ब्राह्मणकुलांत जन्म घ्यावयाचा होता. क्षत्रियजातींत बहुतेक लोक क्रूर बुद्धीचे उत्पन्न होतात. श्रुतींत सांगितल्याप्रमाणें राजधर्म आपल्याला माहित असून क्रूर, कपटपटू व शमबुद्धिहीन अशा धार्तराष्ट्रांना आपण क्षमा कां करतां ? अहो पुरुषश्रेष्ठ, हातपाय हालविण्याची वेळ असून करंडींत ठेविलेल्या सापाप्रमाणें स्वस्थ कां बसला आहां ? बुद्धि, पराक्रम, ज्ञान व कुल यांनीं संपन्न असून मूठभर गवतानें ज्याप्रमाणें हिमाचल झांकण्याचा प्रयत्न करावा त्याप्रमाणें आम्हांला झांकून ठेवण्याची ही आपली इच्छा दिसते. नभोमंडळांत ज्याप्रमाणें सूर्य, त्याप्रमाणें सर्व पृथ्वीवर प्रख्यात असलेल्या आपणाला आज्ञातवास काढतां येणें शक्य नाहीं. आमच्या आज्ञातवासाविषयीं म्हणाल तर तो मेरूपर्वताला झांकून ठेवण्याप्रमाणें आहे. त्याचप्रमाणें आम्हीं पुष्कळ राजांना जिंकलें असल्यामुळें आमचा सूड उगविण्याच्या इच्छेनें ते दुर्योधनाला जाऊन मिळून त्याचें प्रिय करण्यासाठीं हेर पाठवून आमचा शोध लावतील. म्हणून आम्हीं काढलेले हे तेरा महिने तेरा वर्षं समजा. **सोमाच्या ऐवजीं ज्याप्रमाणें कांटेकरंजाचा उपयोग करतात, त्याप्रमाणें मास हा वर्षाचा प्रतिनिधि मानलेला आहे.** याच्या योगानेंही आपलें जर समाधान होत नसेल तर कांहीं पशु वगैरे दान देऊन ह्या पापाचें प्रक्षालन करतां येईल; पण कसेंही करून शत्रूंला ठार करण्यासंबंधानें मनाचा निश्चय लवकरच ठरवा. युद्धाहून क्षत्रियाला दुसरा धर्म नाहीं.' हें भाषण ऐकून धर्मराज मनांत म्हणाला, 'सध्यांच्या व पुढच्या कालासंबंधानें जो योग्य विचार करतो तोच शहाणा. धर्माची गति गहन आहे हें कळत असून मेरूला तुडविण्याप्रमाणें मीं आज धर्माची कशी पायमल्ली करावी ?' नंतर तो भीमसेनास म्हणाला, 'हे बाहुशालिन् भीमा, तूं म्हणतोस तें सर्व खरें आहे. पण हें माझें दुसरें आणखी भाषण अगोदर ऐकून घे. **आपण केवळ साहसानें जीं मोठीं पापकर्मे आरंभतों, तीं पुढें आपल्यालाच पश्चात्तापाला कारण होतात. योग्य सल्ल्यानें बळाचा पूर्ण विचार करून कोणचीही गोष्ट हातीं घेतली म्हणजे तींत यश येतें, आणि दैवही तिला अनुकूल होतें. केवळ अहंकारानें व अविचारानें कोणतीही गोष्ट आरंभूं**

नये. भीष्मद्रोणादि सर्व योद्धे अस्त्रविद्येंत प्रवीण असून प्राण जाई तोंपर्यंत मागें हटणारे नाहींत. त्याचप्रमाणें आमच्यापासून त्रास झालेल्या दुसऱ्या राजांना देखील दुर्योधनानें मानपानादि सत्कारानें वश करून घेतले आहेत. असे हे धनसंपन्न राजे दुर्योधनाच्या हिताकरितां रणामध्यें प्राण सोडण्याला मागेंपुढें पहाणार नाहींत. देवांना देखील अजिंक्य अशा भीष्मद्रोणादि योद्धयांना जरी आह्मी व कौरव सारखेंच आहों तरी राजपिंड त्यांनीं खाल्ला आहे, त्याची ते फेड केल्याशिवाय राहणार नाहींत असें मला वाटतें. आणि दुसऱ्या कोणाच्या साहाय्याखेरीज त्यांना युद्धांत जिंकून दुर्योधनाचा नाश तुला करतां येईल असें मला वाटत नाहीं. सर्व धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ असे कर्णादि इतर योद्धे त्यांच्या पक्षाला आहेत. त्यांच्या संबंधानें विचार मनांत येऊन मला रात्रीं झोंप देखील येत नाहीं.' हें ऐकून त्वेष आला होता तरी भीम खिन्न होऊन कांहीं न बोलतां स्वस्थ बसला. इतक्यांत धर्मराजाच्या पोटांतली चिंता जाणून व्यासमुनी त्याकडे आले व प्रत्यक्ष सिद्धिरूपिणी प्रतिस्मृति या नांवाची विद्या त्याला देऊन ह्मणाले, 'राजा, हिच्या साहाय्यानें अर्जुन सर्व कांहीं शेवटास नेईल. अस्त्रप्राप्तीकरितां शंकरांकडे व इंद्राकडे त्याला पाठीव. त्यांच्यापासून अस्त्रप्राप्ति झाल्यावर त्याच्या हातून महत्कर्म होणार आहे. ह्या वनांतून दुसऱ्या वनांत रहावयाला जा. तुझ्या अभ्युदयाचा काळ जवळच आला आहे.' असें म्हणून पांडवांचा निरोप घेऊन ते त्या ठिकाणींच अंतर्धान पावले. नंतर युधिष्ठिर काम्यक नांवाच्या वनांत जाऊन त्या ठिकाणींच सरस्वतीतीरावर व्यासांनीं दिलेल्या ब्रह्मविद्येचें ध्यान करीत राहिला.

---

६९ अर्जुनाला शंकरापासून पाशुपतास्त्राची प्राप्ति व लोकपालांपासून इतर अस्त्रांची प्राप्ति. (३. ३७–४१.)

पुढें कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं युधिष्ठिर अर्जुनाला एकांतांत गांठून त्याच्या अंगावरून हात फिरवून हांसत गोड शब्दांनीं त्याला ह्मणाला, 'बा पार्था, भीष्म, द्रोण, कृप, कर्ण व अश्वत्थामा यांच्या ठिकाणीं धनुर्विद्या पूर्ण वसत आहे. दैविक, मानुष व ब्राह्म इत्यादि सर्व अस्त्रांचे प्रयोग ते पूर्ण जाणत आहेत. त्यांना दुर्योधनानें दानमानांच्या योगानें बळकून आपल्या बाजूला करून ठेविलें आहे. ते प्रसंगीं कोणाला हार जाणार नाहींत. आज ही सर्व पृथ्वी त्याच्या ताब्यांत आहे. आमचें प्रिय करणारा तूंच असून आमचा सर्व भार तुझ्यावर आहे. व्यासांनीं मला दिलेली ब्रह्मविद्या मी तुला देतों, ती घेऊन उग्र तपानें देवांचा प्रसाद मिळीव. सशस्त्र होऊन उत्तरदिशेला जा व वृत्रासुराच्या भीतीनें देवांनीं इंद्राजवळ सर्व अस्त्रें ठेविलीं आहेत, तीं त्यापासून मिळीव.' असें म्हणून त्यानें त्याला ती विद्या देऊन उत्तरदिशेकडे पाठविलें. धर्मराजाच्या आज्ञेनें इंद्राची भेट घेण्याच्या हेतूनें कवच, खड्ग व हस्तत्राण इत्यादि आयुधें, तसेंच गांडीव धनुष्य व कधींही रिकामा न पडणारा असा बाणांचा भाता घेऊन तो तयार झाला. प्रथम त्यानें अग्नीला आहुति दिली. नंतर, ब्राह्मणांना सुवर्णदक्षिणा देऊन त्यांचा 'विजयी हो' असा आशीर्वाद घेऊन कौरव केव्हां मरणार ह्मणून चिंतेनें वर पाहून दीर्घ उसासा टाकून तो निघाला. त्यावेळीं सर्वांच्या मनांतील हेतु जाणूनच कीं काय द्रौपदी त्याला ह्मणाली, 'अहो महाबाहो, आपल्या जन्मकालीं कुंति सासुबाईंनीं जी इच्छा प्रगट केली व आपली जी सध्यां इच्छा आहे ती सर्व परिपूर्ण होवो. आमच्यापैकीं कोणाचाही पुन्हां क्षत्रियकुळांत जन्म न होवो. जे ब्राह्मण भिक्षेवर आपली उपजीविका करतात ते मी धन्य समजतें. तो दुष्ट चांडाळ मला भरसभेंत 'गाय रे गाय' ह्मणून हासला, त्या दुःखाहून हा आपला वियोग मला अधिक दुःखद होणार आहे. आपले भाऊ जागृतावस्थेंत आपलें शौर्य आठवून आपला वेळ कसा तरी घालवितील; परंतु आपण फार दिवस मला अंतरलां तर उपभोग्य वस्तूंपासून, पैशापासून अथवा प्रत्यक्ष प्राणापासूनसुद्धां मला सुख होणार नाहीं. आमचीं रात्रींचीं सुखदुःखें जीवित व मरण हीं आपल्यावर अवलंबून आहेत. मी आपलें कल्याण चिंतीत बसतें. बलिष्ठांशीं देखील सामना देऊन आपण जय

मिळविण्याला समर्थ आहां. श्री, कीर्ति, तेज, उमा, लक्ष्मी, सरस्वती इत्यादि देवता मार्गांत आपली पाठ राखोत. **आकाशचर प्राणी, तसेच राजे, भूतपिशाच्च व दुसरे जे कोणी आपल्या आड येतील त्यांच्याकडून आपल्याला कांहीं अपाय न होवो.** ' याप्रमाणें तिचें कल्याणचिंतक वचन ऐकून बंधुवर्गांना व धौम्यमुनींना प्रदक्षिणा करून अर्जुन निघाला. एका दिवसांतच हिमालय व गंधमादन हे पर्वत ओलांडून रात्रंदिवस चालून तो इंद्रकीलाला येऊन पोहोंचला. त्याठिकाणीं, ' थांब, पुढें जाऊं नकोस, ' असे शब्द ऐकून त्यानें चहूंकडे दृष्टि फेंकिली. तेव्हां एका झाडाखालीं ब्रह्मतेजानें देदीप्यमान, पिंगट, जटाधारी, कृश असा एक तपस्वी त्याच्या दृष्टीस पडला. व त्यानें ' याठिकाणीं शस्त्राचें कांहीं काम नाहीं, शमपरायण अशा साधूंच्या रहाण्याच्या ठिकाणाला तूं आला आहेस, तुला आतां उत्तम गति मिळाली आहे, ' इत्यादि भाषणांनीं त्याला त्याच्या निश्चयापासून ढळविण्याचा प्रयत्न केला; पण तो निष्फळ झालेला पाहून तो संतुष्ट होऊन पुन्हां म्हणाला, ' मी इंद्र आहें. वर माग. ' अर्जुन म्हणाला, ' मला उत्तम गतीची अपेक्षा नाहीं. लोभानें किंवा कामानें देवत्व अगर सर्व देवांचें ऐश्वर्य यांपैकीं एकाचीही मी इच्छा करीत नाहीं. भावांना निर्जन वनांत टाकून शत्रूचा सूड घेण्याचें साधन मिळवावें म्हणून मी येथें आलों आहें. तें कार्य माझ्या हातून न झालें तर सर्व लोकांमध्यें माझी कायमची अपकीर्ति होईल. आपल्यापासून सर्व अस्त्रविद्या शिकण्याकरितां मी आलों आहें. ' हें ऐकून इंद्र म्हणाला, शंकरांला तोषवून त्यांपासून दिव्यास्त्र मिळवून घे. त्यांच्या दर्शनानें धन्य होऊन पुढें तूं स्वर्गलोकीं येशील. त्या वेळीं मी आपलीं अस्त्रें तुला देईन. ' असें म्हणून तो अदृश्य झाला. इकडे अर्जुनानें तप करण्याच्या निश्चयानें कांट्यांनीं भरलेलें, नाना फलपुष्पांनीं युक्त, नाना पशुपक्ष्यांनीं गजबजलेलें, सिद्धचारणांनीं सेवित असें घोर व निर्जन वन तपाकरितां शोधून काढलें. हें वन हिमाचलाच्या माथ्यावर असून पक्ष्यांच्या किलबिल शब्दांनीं नादित झालें होतें. त्याठिकाणीं पुष्पफलांनीं संपन्न असे अनेक वृक्ष असून त्यांमधून स्वच्छ पाण्याचे झरे वहात होते. आजूबाजूला रम्य तपोवनें असून त्यांतून नद्या वहात होत्या. हा रम्य प्रदेश पाहून अर्जुनाच्या मनाला समाधान वाटलें. तपाचरणाला हेंच ठिकाण योग्य आहे असें वाटून त्यानें त्याठिकाणीं कुशासन टाकलें व अजिन परिधान करून व दंड धारण करून उग्र तपामध्यें तो गढून गेला. त्याठिकाणीं झाडावरून खालीं गळून पडलेल्या पिकल्या फळांवर तो आपला उदरनिर्वाह करीत राहिला. एक महिनापर्यंत तीन दिवस पूर्ण झाल्यावर एकवार फलाहार करावा, दुसरा महिना सहा दिवसांनीं एकवार व मग पंधरा दिवसांनीं एकवार याप्रमाणें त्यानें फलें भक्षण करून दिवस काढले. चवथा महिना आला तेव्हां वर हात करून अधांतरीं फक्त पायाचा आंगठा टेकून वायु भक्षण करून तो राहिला. अशा प्रकारचे त्याचें उग्र तप पाहून सर्व महर्षी घाबऱ्या घाबऱ्या शंकरांकडे जाऊन त्यांना त्यांनीं तें वर्तमान कळविलें. तेव्हां शंकर म्हणाले, ' तुम्ही कांहीं काळजी करूं नका. त्याच्या मनांतील उद्देश मी जाणतों व त्याची इच्छा मी आजच परिपूर्ण करणार आहें. ' असें सांगून त्यांना परत पाठविल्यावर मेरूप्रमाणें देदीप्यमान असे भगवान शंकर सुवर्णवृक्षाप्रमाणें देदीप्यमान असा किरातवेष धरून यशस्वी धनुष्य व प्रखर बाण घेऊन मूर्तिमान अग्नीप्रमाणें अर्जुन तप करीत होता त्या ठिकाणीं आले. किरातस्त्रीचा वेष घेतलेली पार्वती व नानाप्रकारचे वेष धरलेले प्रमथादि गण यांनाही त्यांनीं आपल्याबरोबर घेतलें. ते येतांक्षणींच त्याठिकाणीं नद्यांचा व पक्ष्यांचा शब्द बंद होऊन जिकडे तिकडे शांतता भासूं लागली. लागलाच असा चमत्कार झाला कीं, त्या अर्जुनाच्या अंगावर मूक नांवाचा एक दनूचा पुत्र वराहरूप धरून धांवून आला व त्याला खाऊं लागला. तेव्हां त्या वराहाला मारण्याला तयार झालेल्या अर्जुनाला किरातरूपी शंकर म्हणाले, ' ही शिकार मीं प्रथम देहळली आहे, म्हणून ती माझी आहे. ' अर्जुनानें या बोलण्याकडे दुर्लक्ष करून त्या डुकरावर बाण सोडला. किरातानेंही त्याच वेळीं अग्नीप्रमाणें तीक्ष्ण असा बाण त्यावर सोडला. हे त्या दोघांनीं सोडलेले दोन बाण

मूकाच्या शरीरावर एकदम येऊन पडले व त्या बाणांनीं जखमी होऊन तो मरून पडला. अर्जुन म्हणाला, 'माझ्या तावडींत सांपडलेली ही शिकार मीं मारली. लोभानें अथवा मला तुच्छ करण्याच्या इराद्यानें तूं आला असशील तर माझ्या हातून जिवंत सुटणार नाहींस. हें तुझें मजशीं झालेलें वर्तन मृगयाधर्माला सोडून आहे.' हें अर्जुनाचें भाषण ऐकून किरातानें गोड शब्दांनीं त्याला उत्तर दिलें, 'मीं आधीं सोडलेल्या बाणानें हा मरून पडला आहे. प्रथम तो मला दिसला असल्यानें तो माझी शिकार होय. केवळ शक्तीच्या घमेंडीवर आपल्या दोषाबद्दल दुसऱ्याला दोष देणें हें तुला शोभत नाहीं. तूं मोठा गर्विष्ठ दिसतोस. आतां माझ्या हातून जिवंत कसा सुटतोस हें पहातों. चल, माझ्यापुढें उभा रहा. वज्रासारखे तीक्ष्ण बाण तुझ्यावर सोडतों. तुझ्या अंगीं काय सामर्थ्य आहे तें मला दाखीव.' हें ऐकून रागानें खवळून जाऊन अर्जुनानें त्यावर बाण सोडले. इकडे किरातानें सप्रेमभावानें त्या बाणांचा स्वीकार करून अर्जुनावर बाण सोडले. याप्रमाणें दोघे परस्परांवर बाणवृष्टि करीत असतां यकिंचितही खेद न दाखवितां शंकर पर्वताप्रमाणें उभे होते. इकडे अर्जुन आपले सर्व बाण व्यर्थ गेलेले पाहून आपण सोडलेले बाण सहन करण्याची शक्ति शंकरांखेरीज दुसऱ्याला नाहीं हें माहित असल्यानें विस्मयचकित झाला व भात्यांतले बाण सरलेले पाहून तो किंचित् कचरला. पूर्वी खांडववनांत अग्नीनें आपल्याला, ज्यांतील बाण कधींही सरणार नाहींत असे दोन भाते दिले होते त्याची त्याला आठवण झाली. त्यांतही बाण नाहींतसे झाल्यावर धनुष्याच्या टोकानें किराताला खेंचून वज्रासारख्या कठिण मुष्टीचा त्यावर त्यानें प्रहार केला. किरातानें अगदीं न डगमगतां त्याचा स्वीकार केला, व अर्जुनावर त्यानें उलट मुष्टिप्रहार केले. याप्रमाणें त्यांचें तुमुल द्वंद्वयुद्ध झालें. त्यांचे बाहूला बाहू व उराला ऊर घसटत असल्यामुळें त्यांच्या अंगांतून ठिणग्या बाहेर पडत होत्या. इतक्यांत शंकरांनीं त्याला बराच जेरीला आणून अगदीं मोहित करून सोडलें. त्यामुळें दम कोंडून जाऊन हालचाल न करतां तो जमिनीवर निचेष्ट पडला. क्षणभर तसा पडल्यावर पुन्हां शुद्धीवर येऊन सर्वांग रक्तबंबाळ झालेलें पाहून तो घाबरला व शरण्य अशा शंकरांना शरण जाऊन त्यानें मातीचें पार्थिवलिंग केलें व त्याच्यावर फुलें वाहून त्याची पूजा केली. तीं वाहिलेलीं फुलें किराताच्या डोक्यावर पाहून आनंदभरित होऊन त्यानें त्याच्या पायांवर डोकें ठेविलें. क्लेश पावलेल्या अर्जुनाकडे सविस्मय पाहून शंकर प्रेमळ शब्दांनीं म्हणाले, 'बा अर्जुना, तुझ्या ह्या अलौकिक कृत्यानें मी फार संतुष्ट झालों आहें. तुझ्यासारखा पराक्रमशाली व धैर्यशाली दुसरा क्षत्रिय सांपडणार नाहीं.' याप्रमाणें बोलून आत्मदर्शनाकरितां शंकरांनीं त्याला दिव्य चक्षु दिले. तेव्हां त्या ठिकाणीं पार्वतीसहवर्तमान शूलपाणीला पाहून गुडघे टेकून त्यांना नमस्कार केला. अर्जुन म्हणाला, 'भगवन् माझ्या ह्या अपराधाबद्दल मला क्षमा असावी. आपल्या दर्शनाच्या इच्छेनें मी या मोठ्या पर्वतावर आलों आहें.' ह्याप्रमाणें अर्जुनाचें भाषण ऐकल्यावर त्याचे रुचिर हात धरून हासून वृषभध्वज शंकर म्हणाले, 'हे अर्जुना, तुझी भक्ति पाहून मी संतुष्ट झालों आहें व तुला क्षमा केली आहे. तुला जो पाहिजे असेल तो वर माग.' हें ऐकून, प्रलयकालीं सर्व जगाचा संहार करणारें ब्रह्मशिर नामक आपलें दिव्य अस्त्र मला पाहिजे,' अशी अर्जुनानें शंकरांना विनंति केली. तेव्हां शंकर म्हणाले; 'पार्था, माझें आवडतें पाशुपतास्त्र मी तुला देतों. तूंच हें धारण करण्याला, सोडण्याला व आकर्षण करण्याला समर्थ आहेस. कोणा देवाला देखील हें ठाऊक नाहीं, मग मानवाची गोष्ट कशाला? परंतु अविचारानें हें अस्त्र वापरेल त्यावर मात्र सोडूं नकोस. क्षुद्र प्राण्यावर हें सोडलें असतां त्याच्या योगानें सर्व जगाचा नाश होईल. चराचर अशा तिन्ही लोकांत याला अवध्य असें कांहींच नाहीं.' असें म्हणून पाशुपतास्त्राच्या रहस्यासहवर्तमान तें अस्त्र शंकरांनीं त्याला शिकविलें. त्यावेळीं पर्वत, वनें, वृक्षांसहवर्तमान पृथ्वी कंपायमान झाली. प्रचंड वावटळ सुटली. त्यानंतर उमेसहवर्तमान शंकर अर्जुनाच्या दृष्टीसमोर आकाशांत निघून गेले. याप्रमाणें शंकरांचें दर्शन होऊन पाशुपतास्त्राची प्राप्ति

झाल्यामुळें अर्जुनानें कृतकृत्य होऊन आपणास धन्य मानलें. इतक्यांत इंद्र, वरुणादि सर्व लोकपालांसह त्याच्या भेटीला आला व त्यापासून त्यांच्या त्यांच्या अस्त्राची प्राप्ति अर्जुनानें करून घेतली. इंद्र म्हणाला, 'हे अर्जुना, मातली तुझ्याकरितां रथ घेऊन येईल, त्यांत बसून देवकार्याकरितां तूं स्वर्गाला ये, त्या ठिकाणीं मी आपलीं सर्व दिव्यास्त्रें तुला देईन.' असें सांगून अर्जुनानें **फळपुष्पें व मधुर भाषण यांनीं केलेला सत्कार** स्वीकारून इंद्र लोकपालांसहवर्तमान त्याचा निरोप घेऊन निघून गेला.

६६ अर्जुनाला उर्वशीचा शाप. (३. ४१–५१)

इंद्र लोकपालांसह निघून गेल्यावर अर्जुन त्याच्या रथाची वाट पहात राहिला असतां कांहीं कालानें मातली तो रथ घेऊन मेघमंडळांतून खालीं उतरला. तो येत असतां मार्गांतील सर्व अंधकार त्याच्या तेजानें दूर होत होता, व त्याच्या चाकाच्या शब्दांनीं तो अंधकाराला जणूं काय फाडीतच येतो आहे असें वाटत होतें. डोळ्यांना दिपवून टाकणाऱ्या त्या दिव्य रथाला वेगवान असे दहा हजार घोडे जुंपले होते. त्यावर सुवर्णभूषित इंदीवराप्रमाणें श्याम अशी वैजयंत नांवाची पताका फडकत होती. त्यावर नखाशिखांत सोन्यानें शृंगारून निघालेल्या मातलीला बसलेला पाहून अर्जुनाला तो देवच असावा असें वाटलें. तेव्हां महेंद्राला आपल्या दर्शनाची उत्कट इच्छा झाली असून त्यानें आपल्याला बोलाविलें आहे असा मातलीनें अर्जुनाला निरोप सांगून रथावर बसण्यास विनंति केली. घोडे थांबवून मातली वर चढल्यावर ह्या अलभ्य लाभामुळें अर्जुनाला मोठा संतोष होऊन रथावर चढण्यापूर्वी त्यानें गंगेत स्नान केलें व शुद्धदेह होऊन कांहीं जपजाप्य करून पुण्यशील व पुण्यकर्म अशा स्वर्गाची इच्छा करणाऱ्या साधूंचा आश्रयभूत अशा त्या पर्वताचा त्यानें निरोप घेतला. तो म्हणाला, 'हे पर्वतराज, तुझ्या ठिकाणीं सुखानें राहून तुझीं शिखरें, गुहा, नद्या, झरे व अनेक पुण्यतीर्थें ह्यांचें मला दर्शन झालें व तुझ्यावरील वृक्षांच्या अमृततुल्य रुचिकर फलांचा मी आस्वाद घेऊन व तुझ्या झऱ्यांचें मधुर उदक प्राशन करून मूल ज्याप्रमाणें बापाच्या मांडीवर सुखाने रहातें त्याप्रमाणें अप्सराजनांनीं गजबजलेल्या तुझ्या पृष्ठावर मीं आनंदांत दिवस काढले. आतां मला येथून जाण्याविषयीं आज्ञा दे.' ह्याप्रमाणें प्रार्थनापूर्वक त्या पर्वताचा निरोप घेऊन सुकृति ज्याप्रमाणें सत्पथाला चढतो, त्याप्रमाणें मालतीच्या पाठीमागें त्या रथांत बसून तो इंद्रलोकीं जाण्याला निघाला. जातां जातां पुण्यवान मनुष्यांच्या दृष्टीच्या आड गेल्यावर अनेक चमत्कारिक विमानें त्याच्या दृष्टीस पडलीं. **त्या ठिकाणीं प्रकाशाकरितां सूर्य, चंद्र किंवा अग्नि ह्यांची आवश्यकता नव्हती. त्या ठिकाणीं चकचकणाऱ्या ताऱ्यांच्या रूपानें दूर असल्यामुळें जे दीपाप्रमाणें भासतात ते महान महान पुण्यवान लोकांचे देह आहेत. त्या ठिकाणीं अनेक राजर्षी, सिद्ध, युद्धांत मरण पावलेले योद्धे स्वपुण्यार्जित आपआपल्या तेजानें प्रकाशमान होऊन राहिले आहेत.** पुढें जातां जातां सूर्याप्रमाणें तेजःपुंज गंधर्व गुह्यकादिकांचे स्वयंप्रकाश लोक पाहून तो फार आश्चर्यचकित झाला. पुढें जाऊन कैलासाप्रमाणें शुभ्र व चतुर्दंत ऐरावत त्यानें पाहिला. पुण्यश्लोक राजर्षींचे लोक ओलांडून मांधात्याप्रमाणें शोभणारा अर्जुन अमरावतीला येऊन पोहोंचला. सिद्धचारणांनीं सेवित व सर्व ऋतूंतील पुष्पवृक्षांनीं शोभायमान, दिव्य सुमनांनीं मन ओढून घेणारें व अप्सरांनीं सेवित असें नंदनवन पहात पहात व फुलांचा घमघमाट ज्यांतून येत होता असा वायु सेवन करीत सुरवीथि या नांवानें प्रसिद्ध अशा रुंद नक्षत्रमार्गावरून दुंदुभिध्वनि श्रवण करीत तो चालला असतां गंधर्व त्याचे स्तुतिपाठ गात होते, अप्सरा त्याला गार वारा घालीत होत्या, व देव, ऋषी, गंधर्व त्याचा सत्कार करीत होते. इंद्राज्ञेनें या मार्गांत कितर असतां साध्य, आदित्य इत्यादि देव, दिलीपादि राजर्षी, व तुंबरु आदिकरून ऋषी त्याला भेटले. तेव्हां रथांतून खालीं उतरून त्या सर्वांचा त्यानें यथायोग्य सन्मान केला. नंतर सर्व लोकपालांचा व देवांचा राजा जो इंद्र

त्याच्याजवळ जाऊन त्याच्या चरणांवर त्यानें मस्तक ठेविलें. त्यासमयीं अप्सरागण त्या देवराजाला सुवर्णाच्या दांड्यांच्या चवऱ्यांनीं वारा घालीत होता, व विश्वावसुप्रभृति स्तुतिपाठक त्याचा स्तुतिपाठ करीत होते. अर्जुनाला पहातांच इंद्रानें त्याच्या दंडाला धरून देवऋषींना उचित अशा पुण्यासनावर आपल्या शेजारीं बसवून घेतलें, व त्याचें मस्तक हुंगून त्याला मांडीवर बसविलें. अर्जुनानें लज्जेनें तोंड खालीं घातलेलें पाहून इंद्रानें प्रेमपूर्वक त्याचें शांतवन करण्यासाठीं त्या त्याच्या तोंडाला हात लावून प्रेमानें त्याला कुरवाळिलें. तेवेळीं इंद्राचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून येऊन हासत हासत तो त्याच्याकडे बहुत वेळ पहात राहिला, तरी त्याचें समाधान होईना. एकासनावर बसलेले ते चतुर्दशीला उगवलेल्या सूर्यचंद्राप्रमाणें शोभत होते. गंधर्व त्या ठिकाणीं मधुर सामगायन करीत होते, व चित्तप्रसादन करण्याच्या कामीं कुशल अशा घृताची, मेनका, उर्वशी आदिकरून अप्सरा नृत्य करीत होत्या. नंतर देवांनीं इंद्राचें हद्गत जाणून पाद्य आचमनीयादि पूजासामग्रीनें त्याचा सत्कार करून त्याला इंद्रमंदिरांत पोहोंचविलें. त्या ठिकाणीं तो मोक्षसंहारासहित सर्व मोठमोठ्या अस्त्रांचें ज्ञान संपादन करीत पांच वर्षें राहिला. ह्याप्रमाणें अस्त्रविद्येमध्यें पूर्णपणें निष्णात झाल्यावर इंद्रानें मृत्युलोकीं न मिळणाऱ्या वाद्य, गायन, नृत्य इत्यादि कला चित्रसेनापासून त्याला शिकण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो त्या कलाही चित्रसेनापासून शिकला. एके वेळीं त्याची दृष्टि उर्वशीवर गेलेली पाहून तिची व त्याची एकांतांत गांठ घालून देण्यास इंद्रानें चित्रसेनाला सांगितलें. त्यानें तिच्याजवळ ती गोष्ट काढतांच ती इंद्राची आज्ञा तिनें प्रेमपूर्वक मान्य केली. अर्जुनाच्या अनेक गुणांचा लौकिक पूर्वी ऐकला असल्यामुळें व आतां त्याचें प्रत्यक्ष दर्शन झाल्यामुळें ती उत्सुक होती. तेव्हां आपल्यावर हा प्रसादच झाला असें वाटून तिनें त्याला झटकन् रुकार दिला. पुढें अर्जुनप्राप्तीकरितां फार उत्कंठित झाली असल्यामुळें एके दिवशीं संध्याकाळीं चांदणें पडल्यावर तिनें स्नान केलें, व अलंकारादि भूषणें व गंधमाल्यादि सुवासिक पदार्थ अंगावर घालून ती त्याच्याकडे जाण्यास निघाली. त्या पृथुश्रोणीचे तुळतुळीत असे कुरळे केस मानेवर पडले असून लांब सडक केस पाठीवर पडले होते. तिचे नेत्रकटाक्ष, अंगकांति व मोहक स्वरूप हीं पहाणाऱ्याच्या मनाला तात्काल मोह पाडणारीं होतीं. अर्जुनाकडे निघाली असतां आपल्या मुखचंद्रानें ती चंद्राशीं स्पर्धाच करीत आहे कीं काय अशी दिसत होती. तिच्या पोटाला तीन वळ्या पडल्या असून स्तनभारामुळें ती पावलोंपावलीं वांकत चालली होती. अंगाला तिनें चंदनाची उटी लावली होती. तिचे स्तन चंदनानें चर्चिलेले असून त्यांवर सुवासिक पुष्पांचा हार लोंबत होता. दिव्य ऋषींच्या देखील मनाला मोह पाडणाऱ्या त्या अप्सरेच्या मांड्या झिरझिरीत वस्त्रांनीं आच्छादित असल्यामुळें पहाणाराचें मन ओढून घेत होत्या. तिच्या पायांचीं बोटें सरळ व लाल होतीं व नितंबभाग कांसवाच्या पाठीप्रमाणें वर आला होता. तिच्या घोंट्यावरील पैंजणांचा मंजुळ शब्द ऐकणारांना वेडा करून सोडीत होता. तिच्या उल्हासवृत्तीमुळें तिचे अनेक विलास खुलून दिसत होते. मेघाप्रमाणें तकाकीचा बारीक शालु अंगावर असल्यामुळें आकाशांतून प्रवास करणाऱ्या मेघाच्छादित चंद्राप्रमाणें तिचा चेहरा मोहक दिसत होता. मनोजवालासुद्धां मागें सारणाऱ्या वेगानें ती अर्जुनाच्या बिऱ्हाडाला आली; व तेथें रखवालदारानें आंत वर्दी पोहोंचविल्यावर आंत शिरली. साशंक मनानें अर्जुन तिला सामोरा आला व लज्जेनें तोंड खालीं घालून तिला अभिवादन करून गुरुजनाला उचित असा तिचा त्यानें सत्कार केला. तिच्या येण्याचा अभिप्राय समजून घेतल्यावर कानांवर हात ठेवून तो ह्मणाला, 'सुभगे, अशी गोष्ट तूं माझ्यापाशीं काढूं नकोस. मला तूं गुरुभायच्या ठिकाणीं आहेस. ह्या ठिकाणीं अन्य कोणताही विचार मनांत आणणें योग्य होणार नाहीं. सभेमध्यें अभिलाषपूर्वक मीं तुझ्याकडे पाहिलें यांचें कारण एवढेंच कीं, तूं पुरुवंशाची जननी आहेस, हा विचार माझ्या मनांत येऊन त्यावेळीं माझे डोळे आनंदानें भरून येऊन तुझ्याकडे लागले. भलतांच विचार तूं मनांत आणूं नकोस. माझ्या वंशवृक्षाला वाढ देणारी तूं माझ्या गुरूहून मला श्रेष्ठ

आहेस.' उर्वशीनें उत्तर दिलें, 'हे इंद्राला तोषविणारे अर्जुनराज, आम्ही सर्व अनावृत असून पुरुवंशाचे जे कोणी पुरुष आजपर्यंत तपाच्या सामर्थ्यानें येथें आले आहेत त्या सर्वांना सारख्याच उपभोग्य झालों आहों. माझ्याशीं रममाण झाल्यानें कोणच्याही प्रकारें आपण नीतीपासून भ्रष्ट होणार नाहीं. ह्मणून माझा आपण स्वीकार करा.' अर्जुन ह्मणाला, 'हे अनिंदिते, माझें ह्मणणें ऐक. माझ्या माता कुंति व माद्रि यांच्यापेक्षांही तूं मला पूज्य आहेस. मी तुझ्या पायांवर डोकें ठेवितों. तूं येथून जा.' हें त्याचें भाषण ऐकतांच रागानें अगदीं वेडी होऊन उर्वशी भिंवया चढवून कांपत कांपत त्याला ह्मणाली, 'तूं माझें ऐकत नाहींस तर स्त्रियांमध्यें मान न मिळतां षंढाप्रमाणें तूं रहाशील.' असा त्याला शाप देऊन ओंठ खात दीर्घोच्छवास टाकीत ती परत आपल्या गृहाकडे निघून गेली. इंद्राला ती बातमी कळल्यावर गोड शब्दांनीं त्याचें शांतवन करून हासत तो त्याला ह्मणाला, 'तुझ्या योगानें पृथा आज धन्य आहे. निश्चयामध्यें तूं आज ऋषींना देखील मागें सारलें आहेस. वत्सा, उर्वशीचा शाप देखील तुला फायद्याचाच होईल. तो असा कीं, तेराव्या वर्षीं तुह्मांला पृथ्वीवर अज्ञातवास काढावयाचा आहे, त्या वेळेस षंढत्वानें एक वर्ष राहिल्यावर पुन्हां तुला पुरुषत्व येईल.' हें इंद्राचें भाषण ऐकून शापाची पर्वा न करतां चित्रसेनासहवर्तमान मोठ्या आनंदानें तो तेथें कालक्रमण करीत राहिला. इतक्यांत कोणे एके वेळीं लोमश ऋषी तेथें आले, अर्जुनाला इंद्राच्या अर्धासनावर बसलेला पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. तें पाहून इंद्र त्यांना ह्मणाला, 'हे ऋषिवर्य, ह्याला केवळ सामान्य मर्त्य समजूं नका. हा प्रत्यक्ष माझ्या प्रसादानें कुंतीला झालेला माझा मुलगा आहे. पुराणऋषि जो नर तोच हा समजा. तिन्ही लोकांमध्यें नरनारायण या नांवानें प्रसिद्धीस आलेले ऋषी व देव यांच्या कार्यासाठीं पुण्यार्जन करण्याचें ठिकाण जी पृथ्वी तेथें केशवधनंजयरूपानीं हे अवतरले आहेत. हे दोघे महावीर्यवान, वरदानानें मदोन्मत्त होऊन मार्गभ्रष्ट झालेल्या निवातकवचादि असुरांना मारून फिरून स्वस्थानाला जातील. हा कांहीं कार्यासाठीं अस्त्रप्राप्ति करून घेण्याकरितां येथें आला आहे. आपण माझ्या विनंतीवरून पृथ्वीवर जाऊन काम्यक वनामध्यें युधिष्ठिराची गांठ घेऊन 'अर्जुनासंबंधानें काळजी करूं नकोस, अस्त्रप्राप्ति झाल्यावर हा लवकर भूलोकीं परत आल्यावर भीष्मद्रोणादिकांचा देखील त्याच्यापुढें युद्धांत टिकाव लागणार नाहीं,' असा माझा निरोप त्याला सांगा.' बरें आहे ह्मणून ते मुनी तेथून निघून गेल्यावर, अर्जुनानें शंकरांपासून पाशुपतास्त्रप्राप्ति व इंद्रापासून सर्व अस्त्रांची प्राप्ति करून घेतली. ही बातमी धृतराष्ट्राला व्यासांपासून जेव्हां कळली तेव्हां ऐहिक गोष्टींमध्यें रत झालेल्या आपल्या मुलांच्या दुर्बुद्धीसंबंधानें त्याला फार वाईट वाटून मोठी काळजी पडली. तेव्हां तो संजयाला ह्मणाला, 'युधिष्ठिराला थेट्ट देखील असत्य भाषण माहित नाहीं. त्याच्या बाजूनें लढण्याला अर्जुन आहे, तेव्हां त्याला त्रैलोक्याचेंही राज्य मिळणें दुर्घट नाहीं. जरा व मरण यांच्या तावडींतून सुटलेला प्रत्यक्ष मृत्यु देखील पार्थाचे वज्राप्रमाणें तीक्ष्ण बाण त्याच्यापुढें उभें राहून सहन करण्यास समर्थ होणार नाहीं, मग इतरांची कथा काय? माझे मुलगे दुष्ट असून त्यांचे दिवस भरले आहेत असें मला वाटतें; ह्मणूनच त्यांनीं हें पांडवांबरोबर कपटवर्तन चालविलें आहे. भीष्म, द्रोण, कर्ण इत्यादि महायोद्धे देखील युद्धामध्यें त्यांना मागें हटविण्याला समर्थ नाहींत. त्यांच्याशीं तुंबळ युद्ध सुरू झालें असतां मोठा अनर्थ गुदरेल. त्यामध्यें जयाची मला कांहीं आशा दिसत नाहीं, ते सर्व मेल्याखेरीज अथवा निदान अर्जुन तरी मेल्याखेरीज लढाई कधीं टळावयाची नाहीं हें खचित. अर्जुनाला मारणारा तर मला कोणी दिसत नाहीं. त्या खवळलेल्या महावीराचा राग कशानें शांत होणार? त्या इंद्रतुल्य महावीरानें खांडव वनामध्यें अग्नीला संतुष्ट केलें, व राजसूययज्ञामध्यें सर्व राजांना जिंकलें. वज्राघातानें पर्वताची सुद्धां कांहीं बाकी राहील, पण अर्जुनाच्या बाणांपासून कांहीं शेष रहाण्याची बिलकुल आशा नाहीं. सूर्याचे किरण ज्याप्रमाणें चराचराला ताप देतात, त्याप्रमाणें अर्जुनानें सोडलेले बाण माझ्या मुलांना तापद होतील. ज्यानें अष्टमूर्ति महेश्वराची सुद्धां युद्धांत डाळ शिजू

दिली नाहीं त्याला जिंकण्याला कोण समर्थ होणार आहे? द्रौपदीचा छळ असह्य होऊन त्वेषानें संतापलेले सर्व पांडव युद्धामध्यें खात्रीनें माझ्या मुलांचा अंत करतील. तिला दिलेल्या त्या दुःखाबद्दल ते कधींही क्षमा करणार नाहींत. सत्यप्रतिज्ञ कृष्णाचा पाठिंबा असलेले वृष्णिपांचालादिवीर युद्धामध्यें माझ्या मुलांचें सैन्य जाळून भस्म करतील. भीमाच्या गदेपुढें आमच्या बाजूच्या राजांचें कांहीं चालणार नाहीं. आणि अशी वेळ आली असतां हल्लीं दुर्योधनाच्या ह्मणण्याप्रमाणें चालणारा जो मी त्या मला माझ्या सुहृदांनीं केलेल्या उपदेशाची आठवण होईल व त्याप्रमाणें न वागल्याबद्दल मला पश्चात्ताप होईल. कर्णानें तरी टाकून बोलून काय मिळविलें! द्रौपदीला सभेंत ओढून आणिल्यानें मोठें वैर मात्र बांधून घेतलें. ज्यांचा वडील भाऊ अन्यायानें वागत आहे असे माझे दुसरे मुलगे तरी वांचण्याचा थोडाच संभव आहे. मी अंध असल्यानें तेही माझें ऐकत नाहींत. कर्णसौबलादि वाईट सल्लागार तर पांडवांचे अपराध वाढवीत आहेत. पार्थाच्या हातून सहज सुटलेल्या बाणापासून देखील शत्रु भस्म होतील. मग संतापून सोडलेल्यापासून काय अनर्थ होतील याची कल्पनाच करवत नाहीं. त्यांचा रक्षण करणारा व सल्लामत देणारा मित्र त्रैलोक्याचा स्वामी साक्षात् श्रीकृष्ण परमात्मा आहे, तेव्हां त्रैलोक्यही जिंकावयास त्यांना काय कठीण आहे? अर्जुन, भीम व वासुदेव हे रागावले ह्मणजे माझे मुलगे खचित नाश पावतील.' ह्याप्रमाणें धृतराष्ट्र अत्यंत शोकाकुल होऊन मोठ्या काळजींत पडला.

इकडे पांडव अरण्यांतील हरिणादि अनेक श्वापदें मारून प्रथम तीं ब्राह्मणांला अर्पण करून नंतर दीन, दुबळे व भयभीत अशा अरण्यवासी जनांचें मुलाप्रमाणें पालन करीत असत. अर्जुन केव्हां परत येईल असें त्यांस होऊन ते मोठ्या उत्सुकतेनें त्याची वाट पहात वनवासाचे दिवस कंठीत होते. त्यांचें अमानुष चरित्र ऐकून धृतराष्ट्राला फार चिंता उत्पन्न झाली. द्यूतांत केलेले अन्याचार, तसेंच पांडवांचें शौर्य व धैर्य व धार्तराष्ट्रांना रणामध्यें मारून युधिष्ठिराला फिरून राज्य देण्याची कृष्णानें केलेली प्रतिज्ञा, इत्यादि गोष्टींचा विचार मनांत घोळत असून रात्रंदिवस त्याच्या मनाची तळमळ होऊं लागली व कौरवांचा भयंकर अंतकाळ जवळ आला असें समजून पुढें होणाऱ्या युद्धांत रक्ताचे मोठमोठे पूर वहातील ह्मणून द्यूताच्या वेळीं जें विदुर बोलले होते तें खरें होण्याची वेळ जवळ आली आहे असें त्याला वाटूं लागलें.

---

६७ नलोपाख्यान. (३. ५२–७९)

अर्जुन अस्त्रप्राप्तीकरितां इंद्रलोकाला गेला असतां पांडव त्याच्या वियोगानें फार कष्टी होऊन द्रौपदीसहवर्तमान ज्या ठिकाणीं हिरवट कोंवळें गवत उगवलें आहे अशा निर्जन ठिकाणीं राहून त्यासंबंधानें दुःख करीत असतां भीम युधिष्ठिराला ह्मणाला, 'आपल्या आज्ञेनें अर्जुन गेला आहे खरा; पण जर त्याच्यावर एखादें संकट गुदरलें तर आह्मां सर्वांचा नाश झाला समजा. मनगटांत जोर असून बरचेवर उचंबळणारा राग आपल्यासाठीं आह्मी निमुटपणें दाबून ठेवीत आहों. आह्मी इतके बलवान असून तुमच्या द्यूतकर्मजन्य दोषानें दुःखसागरांत बुडत चाललों आहों. वनांत रहाणें हा क्षत्रियांचा मुख्य धर्म नव्हे. राज्य करणें हाच क्षत्रियांचा मुख्य धर्म होय. कृष्णाच्या साहाय्यानें बारा वर्षें होण्यापूर्वीच वनवास संपवून आह्मी धार्तराष्ट्रांना मारतों, मग अनेक प्रकारच्या यज्ञांनीं त्या पापाचें क्षालन करून स्वर्गास जातां येईल. कपट्यांचा घात कपटानेंच करण्यांत पाप मुळीं नाहीं. **भारत धर्मामध्यें अहोरात्राला संवत्सराची संज्ञा आहे, शिवाय कष्ट अनुभवल्यानें दिवस संवत्सराप्रमाणें होतो** असेंही वचन आहे. जर आपल्याला हें वेदवाक्य प्रमाण असेल तर आह्मीं तेरा वर्षें घालविलीं असें समजा. सर्व पृथ्वी दुर्योधन पूर्णपणें आपल्या ताब्यांत आणण्यापूर्वीच त्याला त्याच्या साहाय्यकाऱ्यांसह मारतां येईल. आह्मी कोठेंही व कितीही गुप्तपणानें राहिलों तरी त्याच्या हेरांना ती बातमी समजल्यावांचून राहणार नाहीं आणि मग पुन्हां आपणास बारा वर्षें वनवास काढावा लागेल. बरें, कदाचित् आह्मी अज्ञात-

वासांतून पार पडलों तर फिरून तो आपल्याला द्यूताला बोलाबील, व बोलावलें असतां आपण मागें घेणार नाहीं. एवंच आम्ही जन्मभर दीन होऊन वनवासांत रहाणार. ह्मणून आतां स्वस्थ बसणें ठीक नाहीं. आपल्या आज्ञेचाच अवकाश आहे. आज्ञा होतांच त्यांना मारून टाकतों.' हें भीमाचें भाषण ऐकून धर्मराज ह्मणाला, 'अद्यापि काल आला नाहीं. मी कधीं खोटें वर्तन ठेवणार नाहीं. तेरा वर्षांनंतर अर्जुनाच्या साहाय्यानें उघडपणें तूं खात्रीनें दुर्योधन व त्याचे अनुयायी यांना मारशील.' याप्रमाणें धर्मराज बोलत आहे इतक्यांत त्या ठिकाणीं बृहदश्व नांवाचे महर्षी आले. त्यांची पूजा करून धर्मराजानें त्यांस प्रश्न केला कीं हे महर्षे, ज्याला द्यूतकारांनीं फसवून वनाला पाठविलें आहे व त्यामुळें ज्याला आपल्या सुहृदांचे वाग्बाण रात्रंदिवस सोसावे लागत आहेत, असा माझ्यासारखा हतभाग्य दुसरा कोणी असेल काय? बृहदश्व ह्मणाले, 'राजा, निषेधदेशचा राजा नल तुझ्याहून अधिक दुःखी होता. त्याची कथा तुला सांगतों ऐक.

वीरसेनराजाचा पुत्र राजा नल होऊन गेला. तो बलवान, सर्व गुणांनीं संपन्न, रूपवान व अश्वपरीक्षेंत निष्णात असून इंद्राप्रमाणें पराक्रमी व सर्व राजांमध्यें श्रेष्ठ होता. कोणत्याही स्त्रीला आवडेल असा तो रूपवान व सद्गुणी होता. त्याचप्रमाणें विदर्भ देशांत भीमक या नांवाचा एक शूर राजा राज्य करीत होता. दमनऋषींनीं संतुष्ट होऊन दिलेल्या वरानें त्याला तीन मुलगे व एक मुलगी अशीं चार अपत्यें झालीं. मुलीचें नांव दमयंती असून ती रूपानें, तेजानें, कीर्तीनें, श्रीनें व सौभाग्यानें सर्व लोकांत पुढें आली. देव किंवा यक्ष यांमध्यें देखील तशा प्रकारची रूपवती स्त्री नव्हती. नल हा या पृथ्वीवर मूर्तिमान मदन असून दमयंती ही रतिरूपानेंच त्याच्याकरितां अवतरली असावी असें सर्वांस वाटत होतें. एकमेकांच्या गुणांसंबंधानें नेहमीं लोकांपासून वर्णन ऐकून त्यांचें एकमेकांवरील प्रेम वाढत चाललें. कोणे एके समयीं कामानें फार पीडित होऊन नलराजा नगराजवळच्या उपवनांत राहण्याकरितां गेला असतां त्या ठिकाणीं त्यानें कांहीं सुवर्णविभूषित हंस पाहिले, व त्यांपैकीं एकाला त्यानें पकडलें. तेव्हां तो हंस काकुळतीला येऊन ह्मणाला, 'राजा तूं जर मला सोडशील तर दमयंतीकडे जाऊन तिला तुझी हकीकत सांगून मी तुझें प्रिय करीन.' हें हंसाचें भाषण ऐकून नलानें त्याला सोडून दिलें. नंतर तो हंस दमयंतीकडे गेला व मनुष्यवाणी धारण करून त्यानें नलाचें यथोचित वर्णन केल्यावर, 'चांगल्या वस्तूचा चांगल्या वस्तूशीं समानम झाल्यानें परिणाम फारच चांगला होणार आहे,' असें तो ह्मणाला. तेव्हां 'तूंच जाऊन नलाला असें सांग,' असें दमयंती त्या पक्ष्याला ह्मणाली. तेव्हां तिचें भाषण हंसानें परत येऊन नलाला कळविलें.

त्या दिवसापासून दमयंतीला नलाविषयीं निदिध्यास लागून ती झुरणीला लागून पांढरी फटफटीत पडत चालली व नलाचें दर्शन केव्हां होईल असें तिला झालें. ती तिची अवस्था पाहून ती यौवनदशेला आली आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन तिचें स्वयंवर करावें असें भीमकराजाला वाटूं लागलें. नंतर स्वयंवराचा निश्चय करून त्यानें सर्व राजांना निमंत्रणपत्रिका पाठविल्या. त्यावरून सर्व राजे त्या ठिकाणीं जमले. या सुमारास नारद व पर्वत हे दोन ऋषी स्वर्गलोकीं गेले होते, त्यांच्या तोंडून दमयंतीचें अप्रतिम सौंदर्य व तिचें ठरलेलें स्वयंवर यांची हकीकत अग्नि, वरुण, यम व इंद्र यांनीं ऐकली. तेव्हां अशी रूपवती स्त्री आपल्याला मिळावी ह्मणून ते चारी देव स्वयंवराकरितां विदर्भ देशाला जाण्याचा निश्चय करून निघाले. वाटेंत स्वरूपानें मदनाला मागें सारणारा नल यांना भेटला. तेव्हां आपले मनोरथ निष्फळ होणार असें वाटून विमान अंतरिक्षांतच थांबवून ते पृथ्वीवर उतरले व इष्ट कामांत आमचे साहाय्य कर अशी त्यांनीं नलाची प्रार्थना केली. नलानें बरें आहे ह्मणून अभिवचन दिल्यावर आपण कोण हें त्यांनीं त्याला कळविलें व आमच्यासाठीं दमयंतीकडे जाऊन तिला मागणी घाल ह्मणून त्यांनीं त्याला सांगितलें. तेव्हां नल ह्मणाला, 'मीही त्याच उद्देशानें निघालों असल्यामुळें या कामीं तुमचें दूतत्व करणें माझ्या हातून होणार नाहीं. एखाद्या पुरुषाच्या मनांत एखाद्या स्त्रीच्यासंबंधानें प्रेम उत्पन्न झालें असतां त्याला तिचा नाद

कसा सोडतां येईल, याचा आपणच बिचार करा.' हें त्याचें भाषण ऐकून इंद्रादिकांनीं त्याला वचनभंगाची आठवण दिली. तेव्हां निरुपाय होऊन नल म्हणाला, 'माझा अंतःपुरांत प्रवेश कसा होईल?' तेव्हां 'आमच्या शक्तिबलानें तूं कोणाच्या दृष्टीस न पडतां तुझा आंत प्रवेश होईल,' असें इंद्राचें भाषण ऐकून, 'बरें आहे,' असें ह्मणून नल विदर्भ देशाला गेला व कोणाच्या दृष्टीस न पडतां दमयंतीच्या अंतःपुरांत शिरला. त्या चारुहासिनीला पाहतांक्षणींच त्याचें मन अस्वस्थ झालें. परंतु दिलेल्या वचनाची आठवण ठेवून त्यानें मन आवरून धरलें. तीही त्याला पाहून गोंधळून गेली व जाग्यावरून उठून विस्मयचकित होऊन 'आपण कोण, कोठले,' ह्मणून त्याला विचारूं लागली, त्याच्या आगमनाचा हेतु कळल्यावर देवांना नमस्कार करून ती ह्मणाली, 'आपल्यावर माझी पूर्ण भक्ति आहे. आपण माझा अंगीकार करा. मीं आपलें सर्वस्व आपल्याला अर्पण केलें आहे. हंसाचें भाषण ऐकल्यापासून आपल्यावर माझें पूर्ण मन बसलें असून आपली प्राप्ति व्हावी ह्मणूनच मीं हे राजे जमविले आहेत. आपल्यावर माझी इतकी भक्ति असून आपण जर माझा अंगीकार करणार नाहीं तर विष पिऊन किंवा आगींत किंवा जलांत उडी घेऊन किंवा गळ्यास फांस लावून घेऊन मी जीव देईन.' हा तिचा निर्धार पाहून नल ह्मणाला, 'हे सुभगे, ज्यांच्या पायांच्या धुळीचीही मला सर नाहीं ते इंद्रादि लोकपाल तुला मागत असतां तूं माझी मानवाची इच्छा कां बरें करतेस? विशेषेंकरून देवांना वचन देऊन त्यांचें काम हातीं धरलें असतां मी स्वार्थ कसा साधून घेऊं? कर्तव्यपराङ्मुखतेचा दोष मजवर न येतां माझा स्वार्थ व तुझा हेतु ज्या रीतीनें साधेल असा कांहीं उपाय पाहिजे तर योज.' हें नलाचें भाषण ऐकून ती ह्मणाली, 'माझ्या स्वयंवराच्या ठिकाणीं त्या लोकपालांना बरोबर घेऊन आपण या त्यांच्या देखतच मी आपल्याला वरीन ह्मणजे आपल्यावर कांहीं दोष रहाणार नाहीं.' हें तिचें भाषण ऐकून नल देवांकडे जाऊन घडलेली सर्व हकीकत इत्थंभूत त्यानें त्यांना सांगितली. स्वयंवरकालीं सुंदर पोषाख केलेले रूपवान असे अनेक राजे आसनावर बसले असतां दमयंती सभामंडपांत शिरली. शिरतांच तिनें आपल्या सौंदर्यानें राजांचे डोळे दिपवून त्यांचीं मनें हरण करून घेतलीं. तिच्याकडे लागलेले त्यांचे डोळे जागच्याजागीं अगदीं तटस्थ राहिले. त्या वेळीं पुरोहित राजांची नामावळी सांगत असतां नलासारखे आणखी चार पुरुष दमयंतीच्या दृष्टीस पडले. त्यामध्यें कांहींच फरक दिसत नसल्यामुळें संशयानें तिला खरा नल ओळखतां येईना. बिचारीतीं त्यांपैकीं चार देव असावे असा तर्क करून वडिलांपासून ऐकलेलीं देवांचीं चिन्हें त्यांच्या ठिकाणीं दिसत नसल्यामुळें त्यांना शरण गेल्याशिवाय दुसरा उपाय नाहीं असें तिला वाटूं लागलें. तिचे करुणापर शब्द ऐकून नलासंबंधीं तिचें प्रेम, भक्ति व दृढनिश्चय जाणून तिचें मन आपणावर बसणें शक्य नाहीं, अशी त्यांची खात्री झाली. तेव्हां इच्छेस येईल तें रूप धारण करण्याचें सामर्थ्य असणाऱ्या त्या देवांनीं आपलीं पूर्व रूपें प्रकट केलीं. नंतर 'त्यांचीं स्वेदरहित शरीरें, त्यांचे ते तटस्थ डोळे व त्यांच्या गळ्यांतील ताज्या टवटवीत माळा या लक्षणांवरून व ते जमिनीपासून अधांतरीं उभे होते यावरून ते देव आहेत असें ओळखून, छायायुक्त, कोमेजलेली माळ घातलेला, स्वेदयुक्त व्रजमिनीवर उभा असलेला पांचवा पुरुष खचित नल आहे असें समजून त्याला तिनें धर्मानें वरलें व त्याच्या गळ्यांत शोभिवंत पुष्पांची माळ घातली. नंतर तें परस्परांविषयीं प्रेमळ दंपत्य देवांना शरण गेलें. त्यावेळीं संतुष्ट होऊन इंद्रानें नलाला प्रत्यक्ष दर्शन व उत्तम गति, अग्नीनें वाटेल त्यावेळीं आत्मदर्शन व आपल्यासारखी तेजस्विता, यमानें धर्मनिष्ठा व उत्तम पाकनिष्पत्तीची कला व वरुणानें वाटेल त्यावेळीं व वाटेल तेथें उदकप्राप्ति व सुवासिक पुष्पमाला, याप्रमाणे चौघांनीं आठ वर देऊन ते स्वर्गाला निघून गेले. विवाहविधि उरकल्यावर त्या ठिकाणीं कांहीं दिवस राहून भीमकराजाच्या परवानगीनें नलराजा आपल्या नगराला गेला, व हें स्त्रीरत्न मिळाल्यामुळें विशेषच शोभणारा असा तो तिच्या समागमानें आनंदांत काळ क्रमीत तिला संतुष्ट ठेवून धर्मानें प्रजापालन करीत होता. ययातिराजा-

प्रमाणें त्यानें अनेक अश्वमेधादि यज्ञ केले. त्याच्यापासून दमयंतीला एक मुलगा एक मुलगी अशीं दोन अपत्यें झालीं.

इकडे स्वयंवरापासून ते इंद्रादि लोकपाल परत येत असतां कलिसहवर्तमान द्वापार स्वयंवराकरितां निघालेला त्यांच्या दृष्टीस पडला. देवांना सोडून दमयंतीनें मनुष्य वरला हें त्यांच्या तोंडून ऐकतांच ती घोर दंडाला पात्र आहे असें कलीला वाटून तो तिला शाप देण्याला निघाला. त्यावेळीं देव त्याला ह्मणाले, 'आमच्या आज्ञेवरूनच तिनें नलाला वरलें आहे. सर्व गुणांनीं संपन्न असा नल कोणाला हवासा वाटणार नाहीं? तो सर्व वेदपारंगत असून त्याचें वर्तन असावें तसें आहे. त्याच्या घरीं यज्ञांत देव तृप्त होताहेत. तो हिंसापराङ्मुख असून सत्यवादी आहे. लोकपालासारखे ह्या राजाच्या ठिकाणीं सभ्यपणा, धैर्य, ज्ञान, तप, पवित्रता व दमशमादि गुण पूर्ण वसत आहेत. अशा नलाला शाप देण्याला जो मूर्ख तयार होईल त्यालाच तो शाप फलद्रूप होऊन तो घोर नरकांत बुचकळ्या घेत राहील.' असें ह्मणून देव निघून गेले. कलीला या भाषणानें आलेला राग अनावर होऊन तो द्वापाराला ह्मणाला, 'मी नलाच्या शरीरांत राहून त्याला राज्यापासून भ्रष्ट करीन. दमयंतीबरोबर त्याला कधींही सुखानें नांदूं देणार नाहीं. तूंही फांशांत शिरून मला साहाय्य कर.' याप्रमाणें द्वापाराबरोबर संकेत करून नलाजवळ येऊन त्याच्या शरीरांत शिरण्याला त्याच्या हातून कांहीं तरी पाप घडेल अशी वाट पहात तो राहिला. असें असतां एके वेळीं नैषधानें **लघुशंका करून पाय न धुतां फक्त तोंडच धुवून संध्या केली.** हें छिद्र मिळाल्याबरोबर कलीनें आपलें बिऱ्हाड त्याच्या शरीरांत ठेविलें. व त्याचा भाऊ पुष्कर याजकडे जाऊन 'फांशांमध्यें नलाला जिंकून त्यापासून गज्य हरण करून घे,' असें त्यानें त्याला चिथविलें. पुष्करानें द्यूताचें निमंत्रण केलें तेव्हां तें न स्वीकारलें तर मानहानि होईल ह्मणून नल त्याबरोबर द्यूत खेळूं लागला. धर्मभ्रष्ट होऊन नलाचें सर्वस्व हरण होत चाललें आहे असें पाहून त्याच्या मंत्रीमंडळाला मोठी चिंता पडली. दमयंतीला देखील त्याचें मन द्यूतापासून फिरवितां येईना; ह्मणून फार कष्टी होऊन नलसारथि वार्ष्णेयाला तिनें हाक मारली व गोड शब्दांनीं ती त्याला ह्मणाली, 'वार्ष्णेया, आजपर्यंत महाराजांचें तुझ्याशीं कसें वर्तन होतें हें तूं जाणतोसच, तर ह्यावेळीं यांना संकटांत साहाय्य करणें तुझें कर्तव्य आहे. जसजसे यांना पुष्कर द्यूतांत जिंकित आहे तसतसी द्यूतासंबंधी त्यांची इच्छा अधिकाधिकच वाढत चालली आहे. पुष्कराचे फांसे हुकमी असून यांचे अगदीं उलट पडतात. सुहृदांचें व स्वजनांचें सांगणें ते ऐकेनासे झाले आहेत. माझें भाषण सुद्धां यांना हिताचें वाटत नाहीं. येथें यांचाही मला दोष दिसत नाहीं. माझें मन मला भलतेंच सांगत आहे. कदाचित् यांचा पूर्ण नाश होण्याचा संभव आहे. ह्मणून मी सांगतें तसें कर. महाराजांचे वेगवान घोडे रथाला जुंपून त्यांत या दोन मुलांना बसवून यांना कुंडिनपुराला घेऊन जा. हीं मुलें व हा रथ बाबांच्या हवालीं करून तुला वाटेल तर त्या ठिकाणीं रहा अगर वाटेल त्या ठिकाणीं जा.' हें तिचें भाषण ऐकून अमात्यांच्या विचारानें वार्ष्णेय, इंद्रसेन व इंद्रसेना या दोन मुलांना भीमकराजाकडे घेऊन गेला व तीं त्याच्या स्वाधीन करून स्वतः अयोध्येला जाऊन त्या ठिकाणीं त्यानें ऋतुपर्णाचें सारथ्य स्वीकारलें. इकडे नलाचें सर्वस्व हरण झाल्यावर, 'अद्यापि दमयंती शिल्लक आहे, द्यूत चालूं दे,' असें पुष्कराचें भाषण ऐकून नलाला संताप आला. अंगावरील सर्व भूषणें काढून फेंकून देऊन एक वस्त्रासह सर्व संपत्तीवर लाथ मारून तो बाहेर पडला. त्याला पाहून त्याच्या सुहृद्वर्गाला फार दुःख झालें. दमयंतीही एका वस्त्रानिशीं त्याच्या मागून गेली. तो तिच्यासहवर्तमान नगराच्या बाहेर तीन रात्र राहिला, पण 'जो नलाचा समाचार घेईल त्याला मी ठार करीन,' ह्मणून पुष्करानें दांडोरा पिटविला असल्यामुळें त्याला भिऊन सत्काराला योग्य असतां कोणी पौरजनांनीं त्याकडे ढुंकून देखील पाहिलें नाहीं. तेथें त्रिरात्र नुसत्या पाण्यावर राहून भुकेनें अगदीं व्याकुळ झाल्यामुळें फलमूलांचा शोध करीत तो पुढें चालला. जातां जातां वाटेंत सुवर्णशरीराचे कांहीं पक्षी पाहून त्यांना पक-

ड्ण्याच्या हेतूनें त्यानें त्यांच्यावर आपलें वस्त्र टाकलें. तें वस्त्र घेऊन पक्षी आकाशांत उडून गेले व तथून त्याला दीन असा पाहून ह्मणाले, 'हे मूढ राजा, आह्मी फांसे असून तुझें वस्त्र हरण करण्याच्या उद्देशानें येथें आलों होतो. तूं वस्त्रानिशीं जावेंस हें आह्मांला बरें वाटलें नाहीं.' हें ऐकून खिन्न होऊन उदरनिर्वाहापुरतें देखील मिळवायाला आपण असमर्थ आहों, असें पाहून नलानें आपल्या प्रियेला विदर्भाला जाणारा मार्ग दाखवून भीमकराजाकडे जाण्यास सांगितलें.तें ऐकून डोळ्यांस पाणी आणून ती ह्मणाली,' महाराज,आपलें सांगणें मनांत आणून माझें हृदय फाटत आहे, व माझीं गात्रें गळून चाललीं आहेत. राज्य व संपत्ति नाहींशीं होऊन राहिलेल्या एका वस्त्राला देखील आपण मुकलां असतां भुकेनें व श्रमानें पीडित अशा आपणा नरवरांना या निर्जन वनांत सोडून माझ्यानें कसें जावबेल? भुकेनें व श्रमानें आपल्याला त्रास होऊं लागला ह्मणजे मी आपल्यापाशीं असलें तर गोड शब्दांनीं तरी मी त्याचा विसर पाडीन. दुखणायिताला जसें औषध तसें विपत्तींत पडलेल्या पुरुषाला बायकोप्रमाणें दुसरें औषध नाहीं असें शहाण्यांचें मत आहे. मी आपल्या ज्ञातिमध्यें जाऊन पडावें अशी जर आपली इच्छा असेल तर आपण दोघे बरोबर जाऊं.' हें ऐकून नलानें उत्तर दिलें, 'तुझ्या पित्याचें राज्य तुला व मला सारखें आहे तरी या विपत्कालीं माझ्यानें तिकडे येववत नाहीं.' नंतर भुकेनें व तहानेनें पीडिलेलीं तीं उभयतां अरण्यांतून भटकत असतां त्यांना पुढें एक सभा दिसली.तेथें आल्यावर वस्त्रहीन व अंगावर धूळ चढून मलीन झालेला नलराजा फार दमल्यामुळें जमिनीवर पडून झोंपीं गेला. दमयंतीवरही हें आकस्मिक दुःख कोसळलें असल्यामुळें झोंपेनें घेरली जाऊन ती निद्रावश झाली. तिचा डोळा लागल्यावर शोकानें मन फार अस्वस्थ झालें असल्यामुळें फार वेळ झोंप न येतां नलराजा उठला; व आपण राज्याला मुकलों आहों, मित्रांनीं आपल्याला सोडलें आहे व अरण्यवास भोगावा लागत आहे, इत्यादि विचारांनीं चिंतातुर होऊन तो आपल्याशीं ह्मणाला, 'ह्या वेळीं एक आपण तर प्राणत्याग करावा अगर दमयंतीला तरी सोडून जावें. माझ्यावरच्या हिच्या प्रेमामुळें ही उगीच माझ्यासाठीं दुःख भोगीत आहे. मी हिला सोडून गेल्यावर कदाचित ही बंधुवर्गाकडे जाईल.सोडून जाण्यांत जरी थोडा धोका असला तरी त्यांत हिला सुख मिळण्याचा संभव आहे.' अशा प्रकारें विचार करीत असतां त्याची बुद्धि दमयंतीसंबंधानें पालटून पूर्ण विचारांतीं तिला सोडून निघून जावें हेंच त्याला बरें वाटूं लागलें. मग तेथें पडलेल्या एका नागव्या तरवारीनें तिनें नेसलेलें वस्त्र अर्धें फाडून तें तो स्वतः नेसला व तिला अनाथाप्रमाणें निजलेली लोकपालांच्या स्वाधीन करून मोठ्या कष्टानें तो तेथून जाण्यास तयार झाला; पण त्याचा सदसद्विचार क्षणमात्र जागृत होऊन त्याचें मन द्विधा होऊं लागलें; तरी शेवटीं त्याच्या शरीरांत संचारलेल्या कलीचा पगडा त्यावर बसून तो तिला सोडून चालता झाला. तो निघून गेल्यावर थोड्या वेळानें दमयंती जागीं झाली व पति कोठें दिसत नाहींसें पाहून घाबरून जाऊन मोठ्यानें रडूं लागली. 'अहो महाराज, आपण धर्मज्ञ आणि सत्यवादी आहां. माझा कधीं त्याग करणार नाहीं असें लग्नाच्या वेळीं मला वचन देऊन या निर्जनवनांत मला एकटीला निजलेली सोडून कसे गेला? अहो नरेंद्र, लोकपालांच्या देखत पूर्वीं जे शब्द आपण बोललां होतां तें खरें करणें आपलें कर्तव्य आहे. मनुष्याला त्याची वेळ भरल्याशिवाय मरण येत नाहीं, ह्मणूनच मी आपण सोडून गेलां तरी क्षणभर कां होईना जिवंत आहें. हा वेळपावेतों केलेली ही थट्टा आतां पुरें करा. मी घाबरून गेलें आहें. मला दर्शन या. महाराज, असे पहातां पहातां कसे हो दिसेनासे झालां? मी इतकी घाबरलें असतां आपण येऊन मला धीर देत नाहीं हें खरोखर आपलें निष्ठुरतेचें वर्तन आहे. मला स्वतःसंबंधानें किंवा दुसऱ्या एखाद्या गोष्टीच्या संबंधानें वाईट वाटत नाहीं. आपण एकटे वनांतून फिरत असतां आपली काय दशा होईल हीच मला काळजी पडली आहे. भुकेनें, तहानेनें व श्रमानें व्याकूळ होऊन संध्याकाळच्या वेळेला झाडाखालीं बसलां असतां मी पुढें न दिसलें ह्मणजे आपली काय दशा होईल?' ह्याप्रमाणें विलाप करीत इकडून तिकडे फिरत असतां बिचारी वरचेवर ठेचळून

पडत होती. मधून मधून भिऊन झाडाआड लपत असे; मधून मधून मोठ्यानें रडत असे. याप्रमाणें श्वापदांनीं भरलेल्या अरण्यांतून पतीचा शोध करीत ती वेड्याप्रमाणें भटकत असतां एका बुभुक्षित अजगरानें तिला धरलें. तो तिला गिळीत असतां, 'हे नाथा, मला अनाथाला हा अजगर गिळीत असतां सोडविण्याला कां धांवून येत नाहीं, माझ्यामागें माझी आठवण होऊन आपली काय दशा होईल, या कलीच्या फेऱ्यांतून सुटून पुन्हां पूर्वस्थितीवर येऊन जेव्हां संपत्ति व राज्य ह्यांचा आपण उपभोग घेऊं लागाल त्यावेळीं मजदांचून आपल्या श्रमांचा परिहार कोण करील,' याप्रमाणें विलाप करीत ती मोठ्यानें रडूं लागली. त्याच ठिकाणीं कोणी एक पारधी हिंडत होता. त्यानें तिचा विलाप ऐकून झटकन् येऊन तीक्ष्ण शस्त्रानें त्या अजगराचें तोंड फाडलें व तिला त्या संकटांतून सोडविलें. तूं कोण, कोणाची, वगैरे प्रश्न त्यानें विचारल्यावरून तिनें सर्व आपला वृत्तांत त्याला सांगितला. अर्धवस्त्र नेसलेला त्या प्रियभाषिणीचे मधुर शब्द ऐकून तो पारधी अगदीं कामांध झाला. दमयंतीनें त्याचा दुष्ट भाव जाणून रागानें, 'जर नलसंबंधीं माझा दृढभाव असेल तर हा दुष्ट एथल्या एथें मरून पडेल,' असा त्याला शाप दिला. त्याबरोबर अग्नीनें जळून भस्म होणाऱ्या झाडाप्रमाणें तो मरून खालीं पडला. ती पुढें अनेक नद्या,वनें,सरोवरें ओलांडून नलाचा शोध करीत फिरत असतां भर्तृवियोगानें पीडित होऊन एका दगडावर बसून शोक करीत होती. इतक्यांत तिच्या समोर एक सिंह आला. त्याला पाहून ती ह्मणाली, 'तूं मृगांचा स्वामी असून ह्या अरण्याचा राजा आहेस. मी विदर्भराजाची कन्या व निषिधराजाची बायको आपल्या पतीचा शोध करीत एकटी दीनासारखी या अरण्यांतून भटकत आहें. तर माझ्या पतीची खबर मला देऊन तूं मला धीर दे. त्याला तूं पाहिलें नसशील किंवा त्याची बातमी सांगण्याची तुझी इच्छा नसेल तर मला खाऊन टाकून ह्या दुःखांतून तरी सोडीव.' ह्याप्रमाणें एखाद्या वेड लागलेल्या मनुष्याप्रमाणें नदी, पर्वत वृक्ष इत्यादि जे जे जड पदार्थ वाटेंत तिला भेटले त्या सर्वांना विचारीत विचारीत ती उत्तरदिशेकडे तीन दिवसपर्यंत अहोरात्र चालली. चवथे दिवशीं सुंदर अरण्यानें शोभिवंत असें एक तापसवन तिच्या दृष्टीस पडलें. तेथील तपोवृद्धांना नमस्कार केल्यानंतर त्यांनीं तिचें यथोचित स्वागत केलें. नंतर तिनें आपला वृत्तांत त्यांना सांगून नलाची माहिती विचारली. तिचें तें दिव्य स्वरूप पाहून आश्चर्यचकित झालेल्या ऋषींना तिच्या करुणायुक्त विलापानें दया आली व ते तिला ह्मणाले, 'हे कल्याणि, तुझा भाग्योदयकाल जवळच आला आहे. सर्व संकटांतून मुक्त झालेल्या नलाला फिरून आपल्या श्रेष्ठ नगरीचें राज्य करतांना तूं लवकर पाहशील.' असें ह्मणून त्याच ठिकाणीं ते अदृश्य झाले. तो अद्भूत चमत्कार पाहून ती विस्मित झाली. पुढें तशीच घोर अरण्यांतून चालली असतां तुफान फुगलेली, क्रौंच, चकोरादि पक्ष्यांच्या कूजितांनीं रमणीय व मत्स्यादि अनेक जलचर प्राण्यांनीं भरलेली अशी नदी ओलांडणारा एक मोठा तांडा तिच्या दृष्टीस पडला. त्याला पाहिल्याबरोबर ती त्यांच्यांत जाऊन मिसळली. अर्धवस्त्र नेसलेली, म्लान वदन, धुळीनें केस अस्ताव्यस्त झालेली व भ्रमिष्टासारखी दिसणारी अशी तिला पाहून कांहींना भीति वाटूं लागली, कांहीं हासूं लागले, कांहींना चिंता उत्पन्न झाली व कांहीं तिची असूया करूं लागले. त्या तांड्याच्या नायकानें, 'तूं कोण, कोणाची,' ह्मणून प्रश्न केल्यावर तिनें आपली सर्व हकीकत त्याला सांगितली. नंतर त्याच्या तोंडानें तो चेदीराष्ट्रांतील वणिकसमुदाय असून चेदीनगरालाच जात आहे असें तिला समजलें. तेव्हां त्याबरोबर ती त्यांच्या मागून चालली. चालतां चालतां दमल्यामुळें संध्याकाळच्या समयीं मार्गांत एका ठिकाणीं, कमलाचा ज्यामध्यें घमघमाट सुटलेला आहे व निर्मल उदकानें जें परिपूर्ण आहे असें एक सरोवर पाहून त्याच्या कांठीं त्यांनीं मुक्काम केला. मध्यरात्रीच्या सुमारास जिकडे तिकडे सामसूम असून ते वणिग्जन थकल्यामुळें गाढ झोंपीं गेले असतां एक हत्तीचा मोठा कळप त्या ठिकाणीं पाणी पिण्याकरितां आला, व त्या ठिकाणीं असलेल्या ग्राम्य गजांना पाहून मदानें उन्मत्त झालेले त्यांतील हत्ती त्यांना मारण्याकरितां त्यांच्यावर धांवून गेले.

जमिनीवर घोरत पडलेल्या वणिग्जनांना त्यांनीं तुडवून टाकलें. त्यांतील कित्येकांनीं झोंपेंतून डोळे चोळीत उठून मोठ्या धांदलीनें आश्रयासाठीं झाडांकडे धांव घेतली. त्या हत्तींनीं कांहींना दांतांनीं, कांहींना सोंडांनीं व कांहींना पायांनीं चिरडून टाकलें. याप्रमाणें भयंकर नाश सुरू असतां दमयंती जागी होऊन भयानें गर्भगळित झाली. त्या लोकांपैकीं कित्येकजण तिला पाहून, ह्या सर्व संकटाला कारण ती आहे असें समजून तिला मारण्याला निघाले. त्यांचा हेतु जाणून किर्र झाडीकडे तिनें धांव घेतली व खडतर नशीबानें आपली पाठ पुरविलेली पाहून ती मोठ्यानें रडूं लागली. 'केवढा तरी नशीबाचा हा मजवर भयंकर कोप! माझ्या एवढ्याशा सुखाच्या देखील तें आड येत आहे अं! देवा, मीं असें काय पाप केलें आहे कीं, त्याचें हें मला फल मिळत आहे? हातानें, मनानें किंवा तोंडानें कोणाचें कांहीं वाईट केल्याचें मला आठवत नाहीं. खरोखर हें माझ्या पूर्वजन्मींच्या पापाचेंच फल असलें पाहिजे. प्राण्यांना अकालीं मरण येत नाहीं ह्मणून वृद्धांच्या तोंडून मीं जें ऐकलें आहे त्याची सत्यता आज पूर्णपणें अनुभवाला येत आहे. एवढ्या थोरल्या हत्तींच्या कळपाच्या तावडींतून मी कशी सुटलें? नशीबांत जें लिहून ठेवलें असेल त्याहून अधिक मनुष्याला कांहीं मिळावयाचें नाहीं. अज्ञानदशेंत देखील कांहीं पाप माझ्या हातून घडल्याचें मला आठवत नाहीं. स्वयंवरकालीं नलराजासाठीं देवतांचा मीं धिक्कार केला त्याचें हें फळ असलें तर न कळें.' ह्याप्रमाणें शोक करीत चालली असतां जिवत राहिलेल्या वणिग्जनांसहवर्तमान संध्याकाळच्या वेळीं ती चेदीराजाच्या नगराला येऊन पोहोंचली. ती त्या वेषामध्यें गांवांतून चालली असतां तिला पाहून गांवच्या पोरांना मौज वाटून तीं तिच्याभोवतीं जमलीं. लोकांच्या घोळक्यामधून तिला तशी चाललेली पाहून राजमातेनें आपल्या दासीला पाठवून तिला वाड्यांत आणविलें, व तिच्यापासून सर्व हकीकत ऐकून घेतली. ती सांगत असतां तिचे डोळे पाण्यानें भरून आलेले पाहून राजमाता तिला ह्मणाली, 'मुली, तूं मजपाशीं खुशाल रहा. माझें तुझ्यावर पूर्ण प्रेम आहे. माझे लोक तुझ्या पतीचा शोध करतील व कदाचित् भटकतां भटकतां जर तो इकडे आला तर येथेंच तो तुला भेटेल.' दमयंतीनें उत्तर दिलें, 'मी येथें राहीन; पण माझे कांहीं नियम आहेत ते मला पाळतां आले पाहिजेत. मी कोणाचें उष्टें खाणार नाहीं, कोणाचे पाय रगडणार नाहीं व परपुरुषाशीं भाषण करणार नाहीं. माझ्यावर जर कोणी डोळा ठेवील तर लागलेंच आपण त्याला योग्य शासन केलें पाहिजे. ह्या अटी जर आपल्याला कबूल असतील तर आपल्याजवळ रहाण्याला माझी हरकत नाहीं. पतीचा शोध करण्याकरितां ब्राह्मणांची मात्र मी गांठ घेत जाईन.' मोठ्या संतोषानें तिचें सर्व ह्मणणें कबूल करून राजमातेनें आपली मुलगी सुनंदा हिला बोलावून आणिलें व सखी ह्मणून तिनें दमयंतीला तिच्या हवालीं केलें. दमयंती पूर्णमनोरथ होऊन सुखांत सुनंदेच्याजवळ राहिली.

इकडे नलराजा दमयंतीला सोडून गेल्यावर तो घोर अरण्यांतून चालला असतां एक मोठा वणवा त्याच्या दृष्टीस पडला. 'हे पुण्यश्लोक नलराजा धांवून येऊन माझी सुटका कर,' असा वरचेवर निघणारा शब्द त्याच्या कानीं आला. 'भिऊं नकोस, असें ह्मणून अग्नींत शिरून पहातो तों वेटोळा घालून पडलेला एक मोठा नाग त्याच्या दृष्टीस पडला. तो हात जोडून कांपत कांपत नलाला ह्मणाला, 'राजा मी कर्कोटक नाग आहें. मीं नारदांना फसविल्यावरून नल येऊन ह्या ठिकाणाहून तुला दुसरीकडे नेईतोंपर्यंत तूं हालचाल न करतां येथेंच पडून रहा असा रागाच्या झपाट्यांत त्यांनीं मला शाप दिला. त्यांच्या शापाच्या प्रभावानें एक पाऊल देखील उचलण्याची मला शक्ति नाहीं. माझें रक्षण केलेंस तर तुझ्या हिताची गोष्ट मी तुला सांगेन. मी तुझा सखा होईन. माझ्यासारखा बलवान दुसरा नाग नाहीं.' हें नागाचें भाषण ऐकून अंगठ्याएवढा लहान झालेल्या त्या नागाला नलराजा आकाशमार्गानें अग्नीचें भय जेथें नव्हतें अशा प्रदेशाला घेऊन गेला. त्याला खालीं ठेवणार तों 'मला घेऊन कांहीं पावलें मोजून टाक ह्मणजे मी तुझें मोठें प्रिय करीन,' असें नाग त्याला ह्मणाला. तें ऐकून तो पावलें मोजूं लागला असतां दहाव्या पावलाच्या

वेळीं त्या नागानें त्याला चावून त्याचें मूळचें रूप बदलून टाकलें. आपल्याला कुरूप केलेलें पाहून नलराजा आश्चर्यचकित झाला. नंतर कर्कोटक त्याला झणाला, 'राजा, लोकांनीं तुला ओळखूं नये झणून मीं तुझें रूप बदलून टाकलें आहे. ज्यानें तुला पीडा दिली आहे तो जोंपर्यंत तुला सोडणार नाहीं तोंपर्यंत तुझ्या विषमय शरीरांत त्याला मोठ्या दुःखानें रहावें लागेल. तूं निरपराधी असून ज्याअर्थीं त्यानें तुला पीडा दिली, त्याअर्थीं रागानें त्याचा सूड घेऊन मीं तुझें रक्षण केलें आहे. माझ्या प्रसादानें तुला सर्पापासून, शत्रूपासून किंवा ब्रह्मवेत्त्यापासून मुळींच भीति उत्पन्न होणार नाहीं. विषापासून तुला मुळींच पीडा होणार नाहीं. युद्धांत नेहमीं तुला जय मिळेल. तूं अयोध्येचा राजा ऋतुपर्ण याजकडे जाऊन 'मी बाहुक नांवाचा सूत आहें,' झणून त्याला सांग. तो अक्षविद्येंत निष्णात आहे. तो तुझ्यापासून अश्वविद्या शिकून त्याच्या मोबदला तुला अक्षविद्या देईल, व तो तुझा मित्र होईल. तूं अक्षविद्येंत निष्णात झालास झणजे तुझें कल्याण होऊन फिरून तुझी व तुझ्या बायकोची गांठ पडेल. व्यर्थ कष्टी होऊं नकोस. ज्यावेळीं तुला आपलें रूप हावेसें वाटेल त्यावेळीं हे वस्त्र नेसून माझें स्मरण कर, झणजे तुझें रूप तुला फिरून प्राप्त होईल.' असें झणून त्याला दोन वस्त्रें देऊन तो नागराज अंतर्धान पावला. सांगितल्याप्रमाणें नलराजाही बाहुक हें नांव घेऊन ऋतुपर्णाकडे जाऊन त्याचा सारथी झाला व दमयंतीची आठवण करीत तेथें राहिला.

इकडे भीमकराजानें नलराजाचें सर्वस्व हरण होऊन भार्यासहवर्तमान तो अरण्यांत निघून गेला अशी बातमी ऐकून त्याच्या शोधार्थ दूत पाठविले; आणि हें काम तुम्ही फत्ते करून आलां झणजे तुम्हांला हजारों गाई, अग्रहार व गांवें इनाम देईन झणून त्यानें त्यांना वचन दिलें. ह्याप्रमाणें पाठविलेले ब्राह्मण त्याचा शोध करीत अनेक राष्ट्रांतून हिंडत असतां सुदेव नांवाचा ब्राह्मण चेदिपुराला आला व त्या ठिकाणीं राजवाड्यांत राजाच्या पुण्याहवनाच्या ठिकाणीं दमयंती सुनंदेवरोबर असलेली त्याच्या दृष्टीस पडली.अंग मळकटून गेलें असल्यामुळें चांगली ओळखूं येत नसून धुरांत झांकलेल्या अग्निशिखेप्रमाणें ती दिसत होती;तरी तिला पाहून पूर्ण चंद्राप्रमाणें लोकांचें मन मोहून टाकणारी ही साक्षात् लक्ष्मीच आहे कीं काय, असें वाटत होतें. तिच्या अंगाची ती श्यामवर्ण कांति त्या ठिकाणचा अंधकार दूर करीत होती. तिचे ते मनोरम कमळासारखे विशाळ नेत्र पाहून साक्षात् रतीच त्या ठिकाणीं बसली आहे काय असें वाटत होतें. विदर्भरूपी सरोवरापासून दुर्दैवानें उपटून काढलेली; पंकयुक्त मृणालीच कीं काय असें ती प्रेक्षकांना भासवीत होती. राहुग्रस्त पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें ती दिसत होती. आटून गेलेल्या एखाद्या नदीप्रमाणें पतिवियोगजन्य दुःखानलानें तिच्या नेत्रांतील अश्रु अगदीं आटून गेले होते. हत्तीनें उपटून टाकलेल्या एखाद्या कमलिनीप्रमाणें, रत्नखचित मंदिरांत रहाण्याला योग्य, रूप, यौवन, औदार्य इत्यादि गुणांनीं मंडित मंडनार्ह असून अनाथाप्रमाणें अलंकारहीन झालेली व आकाशामधील नीलमेघानें आच्छादित चंद्रलेखेप्रमाणें कृश अशी ती दमयंती केवळ भर्तृदर्शनलालसेनेंच केवळ प्राण धरून राहिली असावी असें पाहून सुदेवाला वाटलें. 'स्त्रियांना इतर अलंकार नसले तरी पति हा सर्वांत श्रेष्ठ अलंकार आहे. तो नसला झणजे तीं अलंकारांनीं भूषित असली तरी विद्रुप दिसते.' हिच्या पतीची व हिची गांठ पडून ही दुःखमुक्त होईल काय? राज्यापासून भ्रष्ट झालेल्या नैषधाला फिरून राज्यप्राप्ति झाल्यावर हिच्या समागमानें खरोखर विशेष सुख होईल. तोच हिला योग्य पति आहे, व हीच त्याला योग्य बायको आहे. याप्रमाणें विचार मनांत येऊन तिच्याजवळ जाऊन तिला धीर देऊन सुदेवानें वैदर्भसंबंधीं कुशल समाचार तिला कळविला.आपल्या पतीच्या कपेंतल्या सुदेवाला पाहून दमयंतीला रडें कोसळलें. राजमातेला जेव्हां सुदेवापासून दमयंतीची खरी हकीकत कळली तेव्हां ती आपल्या बहिणीची मुलगी आहे असें कळून तिलाही रडूं आलें. तिनें तिला पोटाशीं कवटाळिलें व क्षणभर अश्रु ढाळून ती झणाली, 'बाळे, हें माझें घर तूं आपल्या बापाच्या घराप्रमाणेंच समज. ह्या संपत्तीवर माझ्याप्रमाणेंच तुझी मालकी आहे.' हें ऐकून दमयंती मोठ्या आनंदानें झणाली,

'मी कोण आहें हें कळलें नसून देखील माझ्या सर्व इच्छा परिपूर्ण करून आपण आपल्या छायेखालीं मला सुखांत ठेवून घेतलें. आतां तर हा वास पहिल्यापेक्षां सुखकर होईल यांत शंकाच नाहीं; परंतु आईबापांपासून फार दिवसपर्यंत दूर राहिलेल्या माझ्या मुलांना पाहण्याची मला फार हुरहुर लागली आहे. त्याचप्रमाणें घर सोडूनही मला फार दिवस झाले आहेत. तर मला एखादें शीघ्रगामी वाहन देऊन विदर्भाला पाठवाल तर आपले मजवर मोठे उपकार होतील. हें ऐकून राजमातेनें उत्तम उत्तम अन्नवस्त्र बरोबर देऊन दमयंतीची मोठे वेगवान घोडे जुंपलेल्या रथांतून पाठवणूक केली. दमयंतीही लवकरच विदर्भाला जाऊन आपले बंधुवर्ग, मातापिता व सखीजन यांना मिळाली. बापाच्या घरीं देवब्राह्मणांचा यथाविधि सत्कार करून रहात असतां एके दिवशीं लाज बाजूला ठेवून ती आईला ह्मणाली, 'आई, जर मीं जगावें अशी तुझी इच्छा असेल तर माझ्या पतीचा शोध लावण्याचा यत्न कर,' तें ऐकून राणीनें राजाला दमयंतीची ती दीनवाणी प्रार्थना कळवून नळाच्या शोधार्थ दूत पाठविण्याची त्याकडून तजवीज करविली. राजाज्ञेनें निघालेल्या दूतांना दमयंती ह्मणाली, 'तुह्मी जेथें जेथें जाल तेथें तेथें असें बोलत जा; 'नाथ, अर्धवस्त्र फाडून घेऊन प्रियपत्नीला घोर अरण्यांत निजलेली सोडून कोठें गेला? आपण जातांना ज्या स्थितींत तिला पाहिलें त्याच स्थितींत दुःखानलानें पोळत चाललेली ती आपल्याकडे डोळे लावून बसली आहे. तिच्यावर कृपा करा. तिची भेट घ्या. पतीनें बायकोचे नेहमीं पालन पोषण केलें पाहिजे. आपण धर्मज्ञ असून या गोष्टींचा आपल्याला कसा विसर पडला? कीर्तिमान, शहाणे, कुलीन व नेहमीं दुसऱ्यावर दया करणारे असे आपण असून माझ्या संबंधानेंच इतके निष्ठुर कसे झालां? दया हा सर्वांत श्रेष्ठ गुण आहे असें मीं आपल्यापासून ऐकिलें आहे.' साराश, ज्याच्या योगानें मजवर कृपा करण्याची त्यांना बुद्धि होईल, असे सबाल टाकीत तुह्मी ठिकठिकाणीं हिंडा व तुमच्या या सबालाला जर कोणीं प्रत्युत्तर दिलें तर ते कोण, कुठले, इत्यादि त्यांच्या संबंधाची खडान्खडा माहिती घेऊन या. तुह्मी हें माझ्या सांगण्यावरून बोलत असून त्यांचा निरोप घेऊन परत मजकडे येणार असें मात्र त्यांना न कळण्याविषयीं होईल तेवढी खबरदारी घ्या. ते चांगल्या अवस्थेंत आहेत अगर दीन स्थितींत आहेत, त्यांचा पुढें विचार काय आहे इत्यादि सर्व गोष्टी नीट समजून घेऊन या.' हें तिचें भाषण ऐकून तिच्या सांगण्याप्रमाणें बोलत ब्राह्मण देशोदेशीं नळाचा शोध करीत निघाले. बराच काळ त्यांचा शोध चालला असतां पर्णाद नांवाचा ब्राह्मण अयोध्येला येऊन ऋतुपर्णाच्या पुढें त्यानें दमयंतीचे शब्द उच्चारले. ते ऐकून राजाला अगर त्याच्या सभेंतील इतर मंडळींना त्याचें कांहीं विशेष वाटलें नाहीं; परंतु राजाचा निरोप घेऊन तो राजवाड्याबाहेर पडल्यावर बाहुक नांवाचा कोणी एक सारथि दीर्घ उच्छ्वास टाकून त्याला ह्मणाला, 'कुलीन स्त्रियांवर कसाही विकट प्रसंग आला तरी त्या स्वसामर्थ्यानें आपलें रक्षण करून यश व स्वर्गप्राप्ति करून घेतात. पतीनें सोडल्याबद्दल पतीवर राग न करतां आपलें आचरण कायम ठेवून प्राण धरून रहातात. संकटांत पडून, सर्व सुखांला मुकून अन्नान्नदशा झाल्यामुळें त्यानें तिला सोडलें, अथवा राज्याला व संपत्तीला मुकून क्षुत्पिपासेनें पीडित झाल्यामुळें व पक्ष्यांनीं त्याचें वस्त्र देखील हरण केल्यामुळें हृदोगानें वेडा बनून त्यानें तिला सोडलें, तर त्यांत त्यानें तिच्या संबंधानें प्रेमच दाखविलें, निष्ठुरता दाखविली नाहीं असेंच ह्मटलें पाहिजे. यामुळें तो तिच्या रागाला कधीं पात्र व्हावयाचा नाहीं.' हें त्याचें भाषण ऐकून पर्णाद त्वरेनें दमयंतीकडे आला व त्यानें तें त्याचें भाषण शब्दशः तिच्या कानावर घातलें. नंतर तिनें पित्याचा व आईचा विचार घेऊन सुदेवाला अयोध्येला पाठविण्याचें ठरविलें. तो निघाला तेव्हां ती त्याला ह्मणाली, 'वायुगतीनें ऋतुपर्णाकडे जाऊन त्याला सांग कीं, दमयंती पुन्हां स्वयंवर करणार आहे. त्यासाठीं अनेक राजे व राजपुत्र विदर्भाला चालले आहेत. स्वयंवर उद्यांच होण्याचें ठरलें आहे. आपली इच्छा असेल तर उद्यांपर्यंत आपल्याला तेथें पोहोंचलें पाहिजे.

उद्यां सूर्योदयाच्या पूर्वी ती दुसरा पति वरणार आहे. तिचा पहिला पति नळराजा जिवंत आहे किंवा नाहीं ह्याचा कांहीं शोध लागत नाहीं.' त्याप्रमाणें त्यानें जाऊन सांगितलें असतां ऋतुपर्ण मधुर शब्दांनीं बाहुकाला ह्मणाला, 'एका दिवसांत विदर्भाला जाणें तुला शक्य वाटत असेल तर मी दमयंतीच्या स्वयंवराला जाऊं इच्छितों.' हें ऐकून हृदय फाटून जाऊन नळ मनांत विचार करूं लागला, 'माझ्या वियोगानें दुःखी झाल्यानें वेडी होऊन दमयंतीनें खरोखरच असा निश्चय ठरविला असावा अगर माझ्या शोधासाठीं ही तिनें अचाट युक्ति योजिली असावी? मीं अधमानें तिचा अपराध केला आहे, तेव्हां अनाथ झाल्यामुळें पूर्वस्नेहाचा विसर पडून तर असें करण्याचा तिचा विचार ठरला नसेलना? **जगांत स्त्रीस्वभाव चंचल आहे खरा**; पण ह्या ठिकाणीं माझा दोषही फार मोठा आहे. ह्मणून या संबंधानें खऱ्याखोट्याचा निर्णय करण्याकरितां आत्महितासाठीं ऋतुपर्णाच्या ह्मणण्याला रुकार देणें हेंच माझ्या फायद्याचें आहे.' असा विचार करून, 'मी एका दिवसांत रथ नेईन,' असें ऋतुपर्णाला सांगून अश्वशाळेंतून उत्तम घोडे निवडून घेऊन ते त्यानें रथाला जुंपले व ऋतुपर्ण व वार्ष्णेय यांना रथांत बसवून त्यानें तो रथ हांकला. बाहुक घोड्यांना हाणीत असतां तो रथ आकाशांतून विमानाप्रमाणें चालला होता. त्या घोड्यांचा तो वायुवेग पाहून ऋतुपर्णाला मोठा अचंबा वाटला. बाहुकाची रथ हांकण्याची शैली पाहून वार्ष्णेयाला हा मातली, शालिहोत्र अगर नळराजा असावा अशी शंका आली. याप्रमाणें वायुगतीनें तो रथ चालला असतां ऋतुपर्णाचें अंगवस्त्र खालीं पडलें. तें घेण्याकरितां रथ उभा करण्यास त्यानें बाहुकाला सांगितलें. तेव्हां तो ह्मणाला, 'महाराज, आपलें वस्त्र फार मागें राहिलें. त्याच्यापुढें हजारों कोस आम्ही निघून आलों आहों.' इतक्यांत जवळ एक फलसंपन्न वृक्ष पाहून राजा बाहुकाला ह्मणाला, 'सूता, माझें गणनीचातुर्यही तूं पहा. सर्वज्ञता एकाच्याच ठिकाणीं बसत नसते. या वृक्षाबरील फळें व पानें, त्याचप्रमाणें खालीं पडलेलीं पानें हीं तुला मी एकदम किती आहेत तीं सांगतों. या दोन फांद्यांनाच पांच कोटी पानें आहेत. ह्याची पाहिजे तर तूं प्रचीति घे.' हें ऐकून रथ उभा करून बाहुकानें तें झाड तोडलें. व राजानें सांगितल्याप्रमाणें त्या दोन फांद्यांना पांच कोटी पानें पाहून राज्याच्या ह्या अद्भुत सामर्थ्याविषयीं त्याला मोठें आश्चर्य वाटलें. नंतर राजा त्याला ह्मणाला, 'बाहुका, मला अक्षहृदय माहीत असून गणनाशक्ति माझी विलक्षण आहे. तुझ्यापासून अश्वहृदय घेऊन मी तुला अक्षहृदय देईन.' असें ह्मणून त्यानें त्याला अक्षविद्या शिकविली व 'अश्वहृदय तुझ्यापाशीं माझी ठेव असूंदे,' असें ह्मणून त्यापाशींच ती राहूं दिली. बाहुकाला अक्षविद्या प्राप्त झाल्याबरोबर त्याच्या शरीरांतून कलि बाहेर पडला, व त्यानें आपल्या मुखांतून कर्कोटकविष बाहेर टाकलें. बाहुक त्याला शाप देण्याला तयार झाला असतां कलि भीत भीत थराथरां कांपत त्याला ह्मणाला, 'राजा राग आंवर. तुला मी शरण आलों आहें. मला शरणागताला जर तूं शाप देणार नाहींस तर सर्व लोक चिरकाल तुझी कीर्ति गातील; व त्यांना देखील माझ्यापासून उपद्रव होणार नाहीं.' असें ह्मणून कलि बिभीतक वृक्षामध्यें शिरला. नंतर नळराजा सर्व पीडेपासून मुक्त होऊन व पूर्वीचें तेज त्याच्या अंगांत येऊन मोठ्या संतोषानें पुन्हां रथावर चढला. आतां फक्त त्याचें रूपच बदललें होतें. पुढें संध्याकाळीं ऋतुपर्ण विदर्भाला येऊन पोहोंचला व राजपुरुषांनीं तो आल्याची वर्दी राजाला दिली. तो नगरांत शिरत असतां नळानें हांकलेल्या रथाच्या शब्दासारखा शब्द ऐकून दमयंती मनांत ह्मणाली, 'हा भूमि दणाणून सोडणारा व माझ्या मनाला आनंद देणारा रथाच्या चाकाचा शब्द खात्रीनें नळराजाच्या रथाचाच असला पाहिजे. जर आज त्यांचें चंद्रासारखें मनोहर मुख दृष्टीस पडून त्यांचें गाढालिंगन मला मिळालें नाहीं तर मी खचित अग्नीमध्यें उडी घेईन. रात्रंदिवस त्यांचे गुणानुवादच गात त्यांच्याकडे डोळे लावून बसलें असल्यामुळें शोकानें माझें हृदय फाटत चाललें आहे.' नंतर नळाला पाहण्याच्या उत्कंठेनें गच्चीवर चढून मधल्या चौकांत आलेल्या रथाकडे तिनें न-

जर लाविली. त्यांत तिला वार्ष्णेय, बाहुक व ऋतुपर्ण हे तिघे दिसले. इकडे ऋतुपर्णाला स्वयंवराचें त्या ठिकाणीं कांहींच चिन्ह न दिसल्यामुळें तो मनांत खजिल झाला व भीमकानें त्याला येण्याचें कारण विचारलें असतां, 'आपल्या भेटीकरितां आलों,' असें म्हणाला. नंतर बाहुक तो रथ घेऊन रथशाळेंत गेला. नळाच्या रथासारखा रथाचा ध्वनि तर ऐकूं आला; पण नळ कोठें दिसला नाहीं; म्हणून खरें काढून घेण्याकरितां हा बाहुक कोण आहे, याच्या चवकशीसाठीं दमयंतीनें आपल्या केशिनीसखीला त्याकडे पाठविलें. पूर्वी सुदेवाला मिळालें होतें तसेंच उत्तर तिला मिळाल्यावर ती परत आली. मनांत शंका उत्पन्न होऊन त्याची पूर्ण परीक्षा करण्यामाठीं केशिनीला फिरून तिनें त्याच्याकडे पाठविलें. ती पुन्हां परत येऊन म्हणाली, 'त्याचा आचार फार शुद्ध आहे. अशा प्रकारचा मनुष्य मीं पूर्वी कधीं पाहिला नाहीं किंवा ऐकला नाहीं. यत्किंचित मार्ग मिळाला तरी देखील त्यांतून अनायासानें तो बाहेर पडतो व विवर आंत सूक्ष्म असलें तरी तें त्यांच्या स्पर्शानें मोठें होतें. ऋतुपर्णाकरितां नानाविध पदार्थ व एक पाण्याला भांडें महाराजांनीं पाठविलें होतें, त्या भांड्याकडे त्यानें नजर फेकल्याबरोबर तें गच्च भरलें, नंतर पाय धुवून स्वयंपाकाची सर्व तयारी जुळवून मुठभर गवत त्यानें उन्हांत धरल्याबरोबर तें पटून विस्तव तयार झाला. त्याला हात लावून देखील त्याला त्यापासून कांहीं अपाय झाला नाहीं. त्यानें हातानें फुलें चुरगळलीं तरी तीं पूर्वीप्रमाणेंच टवटवीत व सुगंधी दिसत होतीं. ह्याप्रकारचीं त्याचीं अद्भुत कृत्यें सखीमुखांतून ऐकल्यावर त्यानें शिजविलेल्या मांसापैकीं कांहीं घेऊन ये म्हणून सांगून तिनें फिरून तिला त्याकडे पाठविलें. सखीनें आणलेलें मांस भक्षण केल्यावर हा सूत नळराजाच असला पाहिजे अशी तिची खात्री झाली. मग तिनें आपल्या दोन मुलांना त्या सखीबरोबरच त्याच्याकडे पाठविलें. त्यांना पाहिल्याबरोबर डोळ्यांत पाणी येऊन त्यानें त्यांना घट्ट आलिंगन दिलें. लागलेंच त्यांना दूर करून तो त्या दासीला म्हणाला, 'बाई, हीं मुलें हुबहुब माझ्या मुलांप्रमाणें दिसत आहेत; म्हणून माझ्या डोळ्यांतून अश्रू निघाले.' केशिनीनें हे सर्व त्यांचे विकार दमयंतीला जाऊन कळविले. नंतर दमयंतीनें मातापितरांचा विचार घेऊन त्याला आपल्या खोलींत आणाविलें. तिची त्याची नजरानजर झाल्याबरोबर त्याचे डोळे पाण्यानें भरून आले व तिचा गळा दुःखानें दाटून येऊन ती त्याला म्हणाली, 'हे बाहुका, असा कोणी धर्मज्ञ तूं पाहिला आहेस काय कीं, ज्यानें आपल्या निरपराधी व आवडत्या बायकोला श्रमामुळें थकून गाढ झोंपीं गेलेली पाहून घोर अरण्यांत सोडलें? पुण्यश्लोक नळराजांखेरीज अशी अलौकिक गोष्ट कोणाच्या हातून होणार? अमा त्यांचा कोणता अपराध माझ्या हातून घडला हें त्यांनाच ठाऊक. प्रत्यक्ष देवांना सुद्धां टाकून मीं त्यांना वरलें; अशा पुत्रवती पतिव्रतेला सोडण्याचा त्यांना धीर तरी कसा झाला? देवांच्या व अग्नीच्या समोर माझें पाणिग्रहण करून मी तुझ्याशीं न्यायानें वागेन असें मला दिलेलें वचन ते विसरले वाटतें? असें म्हणत असतां तिच्या डोळ्यांतून ढळढळां अश्रू वाहूं लागले. तिची ती स्थिति पाहून नळाला अत्यंत दुःख झालें व हा सर्व कलीचा खेळ आहे असें सांगून आपला त्या ठिकाणीं येण्याचा हेतूही त्यानें तिला कळविला. नंतर नागराजाचें स्मरण करून त्यानें दिलेलीं वस्त्रें अंगावर घेतांच त्याचें पूर्वरूप त्याला प्राप्त झालें. त्या रूपामध्यें नळाला दृढालिंगन देऊन त्याचें तोंड आपल्या उरःस्थलावर ठेवून दमयंती गळा काढून रडूं लागली. भीमक राजाला आपल्या बायकोपासून हा सर्व वृत्तांत कळून वृद्धपणीं त्याला मोठें सुख झालें.

इकडे ऋतुपर्णाला नळासारखा स्नेही मिळाल्यामुळें त्याला संतोष होऊन तो आपल्या नगराला परत गेला. नळराजाही त्या ठिकाणीं एक महिनाभर राहून थोड्याशा परिवारासह निषध देशाला गेला. तेथें पुष्कराला द्यूतामध्यें जिंकून त्याच्यापासून यानें आपलें राज्य परत मिळविलें. तो त्याला म्हणाला, 'कलीनें मला घेरलें असल्यामुळें तूं मला पूर्वी जिंकलेंस. तुझें स्वतःचें कौशल्य त्यांत कांहीं नव्हतें. दुसऱ्याच्या दोषाबद्दल मी तुला दोषी धरीत नाहीं. तुझा अंश मी तुला खुषीनें परत देतों. तुझ्यासंबंधाचा माझा स्नेहभाववही कमी होणार नाहीं.

तूं माझा भाऊ आहेस. शतायु हो.' या प्रकारें भावाचें शांतवन करून त्याला आपल्या नगरीला परत पाठवून नळराजा बायकोसह आपल्या प्रजेला सुख देत मोठ्या आनंदानें राज्य करीत राहिला.'

हा नळराजाचा इतिहास सांगून बृहदश्व धर्मराजाला ह्मणाले, 'राजा, तूंही ह्याचप्रमाणें तुझे बंधु व द्रौपदी यांसहवर्तमान वनवास संपल्यावर सुखोपभोग घेशील. हा इतिहास ऐकून तुझ्यासारख्याच्या मनाला धीर आला पाहिजे. **मानवी स्थितीचें चंचलत्व लक्षांत घेऊन मनुष्यानें उदयकाळीं चढून जाऊं नये अथवा संकटसमयीं धीर खचूं देऊं नये. दैव प्रतिकूळ होऊन पौरुषाचें कांहीं चालत नाहीं असें दिसून आलें असतां स्वतःच्या सामर्थ्यावर अवलंबून रहाणारे लोक विनाकारण स्वतःला वाईट वाटून घेत नाहींत.**' असें सांगून युधिष्ठिरानें इच्छा दर्शविल्यावरून त्याला त्या ऋषींनीं अक्षविद्या शिकवून ते आपल्या नित्यकर्माला निघून गेले.

---

६८ युधिष्ठिराची तीर्थयात्रा.

(३. ८०–९५.)

काम्यक वनांतून अस्त्रप्राप्तीकरितां अर्जुन स्वर्गलोकाला गेला असतां पांडवांना चुकल्याचुकल्यासारखें होऊन ते फार कष्टी झाले होते. इतक्यांत त्या ठिकाणीं नारदमुनी आले. त्यांची विधिपूर्वक पूजा करून युधिष्ठिरानें त्यांना प्रश्न केला, 'अहो सूक्ष्मदर्शी मुने, आपल्या प्रसादानें मी आज कृतार्थ आहें. बंधूंसहवर्तमान मी आपल्या अनुग्रहाला पात्र आहें असें आपणास वाटत असेल तर कृपा करून माझ्या एवढ्या प्रश्नाचें उत्तर द्या. तीर्थयात्रा करीत जो प्राणी पृथ्वीप्रदक्षिणा करतो त्याला कोणतें फळ प्राप्त होतें?' यावर गंगाद्वारीं भीष्म रहात असतांना पौलस्त्यांनीं त्यांना जें **पृथ्वीप्रदक्षिणेचें फळ** सांगितलें तेंच त्यांनीं युधिष्ठिराला सांगितले. ते ह्मणाले, 'राजा, ज्याचे हातपाय, मन, तप आणि क्रिया हीं नेहमीं नियमित असतात, जो अहंकारापासून सुटला आहे, जो दान घेत नाहीं, जें कांहीं मिळेल त्यावर संतुष्ट राहून मिताहार ठेवतो, ज्याला पाप ह्मणून ठाऊक नसतें, जो रागापासून निवृत्त राहून सत्यशील व व्रतस्थ असतो, सर्व प्राण्यांच्या ठिकाणीं आत्मभाव धरतो व जो यज्ञयाग करतो, त्याला तीर्थयात्रा केल्याचें फळ मिळतें. परंतु नानाविध आयासांनीं युक्त असा यज्ञ, राजे व समृद्धिमान लोक यांच्या हातूनच होणें शक्य आहे. साहाय्यहीन अशा गरिबांच्या हातून तो होणें शक्य नाहीं. ह्मणून यज्ञफलासमान तीर्थयात्रा हीच त्याला सुलभ आहे. यज्ञाहून तीर्थयात्रेचें फल विशेष आहे. **त्रिरात्र उपवास करून तीर्थें पहात हिंडलें नाहीं किंवा सुवर्ण व गाई यांचें दान दिलें नाहीं तर मनुष्य दरिद्र्याच्या पोटीं जन्माला येतो.**' ह्याप्रमाणें सांगून त्यांनीं पुष्कर, रामह्रद, ब्रह्मावर्त, सोमतीर्थ, इत्यादि अनेक तीर्थांचे माहात्म्य युधिष्ठिराला सविस्तर सांगून त्याच्या मनांत तीर्थयात्रेची इच्छा उत्पन्न करून देऊन ते अंतर्धान पावले. नंतर ब्रह्मदेवतुल्य अशा धौम्यांची गांठ घेऊन युधिष्ठिर त्यांना ह्मणाला, 'महामुने, सत्यपराक्रम अशा अर्जुनाला मीं अस्त्रप्राप्तीकरितां स्वर्गलोकीं पाठविलें आहे. तो व भगवान वासुदेव हे नरनारायण आहेत हें मी जाणतों. धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनानें भीष्म, द्रोण, कर्णादि महायोद्ध्यांना आपलेसें करून ठेविलें आहे. त्यांच्या पुढें उभे राहण्यास हा समर्थ नाहीं, असें जाणूनच इंद्राला भेटून त्याकडून दिव्यास्त्रांची प्राप्ति करून घेण्यासाठीं मी त्याला त्याकडे पाठविलें आहे. तो दिव्यास्त्रज्ञ कर्णरूपी अग्नि अस्त्रसामर्थ्यरूपी वायूच्या साहाय्यानें माझें सैन्यरूपी अरण्य खात्रीनें जाळून टाकण्याम समर्थ आहे. अशा पेटलेल्या कर्णपावकाला कृष्णानिल साहाय्य घेऊन दिव्यास्त्रविद्युल्लतेनें युक्त असा मेघरूपी अर्जुनच बाणवृष्टीनीं शमविण्याला समर्थ होणार आहे. त्याला सर्व अस्त्रांची प्राप्ति झाल्यावर तो सर्वांना पुरून उरेल अशी माझी खात्री आहे. नाहींतर या महान योध्यांच्यापुढें रणामध्यें उभें राहणें परम दुर्घट काम आहे. अर्जुन अस्त्रप्राप्ति करून घेऊन आल्यावर निःसंशय आमचा हा वनवासरूपी कष्टभार तेव्हांच उतरेल; पण हल्लीं या अरण्यामध्यें आह्मांला त्यासेरीज चैन पडत नाहीं. ह्मणून पुष्कळ फल-

मूलांनीं पूर्ण; तपस्वी लोकांचें आश्रयस्थान अशा दुसऱ्या एखाद्या अरण्याला जाऊन त्याठिकाणीं **शेतकरी ज्याप्रमाणें पावसाची वाट पहात रहातात** त्याप्रमाणें आह्मी अर्जुनाची मार्गप्रतीक्षा करीत राहूं. हें युधिष्ठिराचें भाषण ऐकून पांडव अर्जुनाच्या भेटीविषयीं फार उत्सुक झाले आहेत असें पाहून त्यांना धीर देण्यासाठीं पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर ह्या चारी दिशांला असणाऱ्या अनेक तीर्थांचे यथान्याय सविस्तर माहात्म्य त्यांनीं वर्णन करून नारदांनीं उत्पन्न केलेली तीर्थयात्रेची इच्छा वृद्धिंगत केली.

इतक्यांत इंद्रानें पाठविलेले लोमश ऋषी त्या ठिकाणीं येऊन अर्जुनासंबंधी कुशल वृत्तांत सांगून ह्मणाले, 'अस्त्रप्राप्ति करून घेऊन अर्जुन लवकरच परत येईल, त्याविषयीं तुह्मी कांहीं काळजी करूं नका. तो येईपर्यंत तुह्मी आनंदानें तीर्थयात्रा करीत रहा.' हा इंद्राचा निरोप ऐकून युधिष्ठिराचा तीर्थयात्रा करण्याचा निश्चय कायमचा ठरला. इतक्यांत व्यास व पर्वत हे ऋषी त्या ठिकाणीं येऊन त्यांनीं युधिष्ठिराला उपदेश केला ते ह्मणाले, **'बुद्धी शुद्ध मनानें तीर्थयात्रेला निघा. शरीरशुद्धि हें मानुषव्रत असून मनःशुद्धि देवव्रत आहे. अकलुषित मन असणें एवढी गोष्ट शुद्धतेला पुरी आहे.** सर्वांविषयीं मित्रभाव धरून तुह्मी तीर्थयात्रा करा.' असें सांगून ते निघून गेल्यावर धौम्य, लोमश इत्यादि थोड्याशा ऋषिवर्गासह मार्गशीर्ष पौर्णिमेनंतर पुष्य नक्षत्रावर ते तीर्थयात्रेकरितां उत्तरेकडे निघाले. जातां जातां मार्गांत **'धर्मनिष्ठ लोकांना दुःख कशासाठीं भोगावें, लागतें व अधर्मी लोक वैभव कां भोगतात,** ह्मणून युधिष्ठिराचा प्रश्न ऐकून लोमश ह्मणाले, 'राजा, अधर्मानें वागणारे लोक कांहीं काल उदयाला येतात ह्मणून वाईट वाटून घेण्याचें कारण नाहीं; कारण **अधर्मानें जरी मनुष्य उदयला येतो, सुखांचा उपभोग घेतो व सपत्नांवर जय मिळवितो, तरी ह्या सर्वांचा शेवट त्याच्या समूळ नाशामध्यें होतो हें लक्षांत ठेव.** दानवांची अधर्मानें भरभराट होऊन पुढें त्यांची काय दशा झाली हें तुला माहितच आहे. पूर्वी देवयुगामध्यें देवांनीं धर्ममार्ग व असुरांनीं अधर्ममार्ग स्वीकारला. देवांनीं अनेक तीर्थं केलीं व असुरांनीं त्यांकडे ढुंकून देखील पाहिलें नाहीं. अधर्ममूलक अहंकाराच्या ते आधीन झाल्यामुळें ते मोठे गर्विष्ट झाले, व गर्वापासून ते विकारवश झाले. त्यामुळें **भीड व मुरवत त्यांना नाहींशी झाली व त्यांचें वर्तन बिघडलें. त्यांना असे झालेले पाहून क्षमा, लक्ष्मी व स्वधर्म यांनीं त्यांना लवकरच सोडलें.** लक्ष्मीनें देवांचा आश्रय केला व आकाबाईनें असुरांची कास धरली. नंतर कलीनेंही त्यांच्यांत लवकर प्रवेश केला, व अखेरीस दुर्दशा होऊन कीर्तीला मुकून त्यांचा समूळ नाश झाला. इकडे देवांनीं धर्मशील राहून तपादि सत्कृत्यें आचरलीं व सर्व पापांपासून अलिप्त राहून सुख मिळविलें. तूंही शिबी, भगीरथ, पुरूरवा इत्यादि अनेक कीर्तिमान राजांप्रमाणें तीर्थयात्रा करून महात्म्यांचें दर्शन घे ह्मणजे विपुल संपत्ति व कीर्ति तुला प्राप्त होईल. असें सांगितल्यावर पांडव तीर्थयात्रा करीत करीत प्रयागाला आले व तेथें गंगायमुनेच्या संगमामध्यें स्नान करून पापापासून मुक्त होऊन ते वेदीला गेले. त्या ठिकाणीं देव, ऋषी व ब्राह्मण यांना संतुष्ट करून ते राजर्षि गय यानें पवित्र केलेल्या गयोशिर नांवाच्या पर्वताला गेले. त्या ठिकाणीं अगस्त्य ऋषींचा आश्रम असून वेतानें भरलेली अशी एक शोभिवंत व रमणीय महानदी वहात होती ती त्यांच्या दृष्टीस पडली. त्याच ठिकाणीं अक्षय्यवट नांवाचा एक मोठा वड आहे. तेथें शंकरांचें नेहमीं सांनिध्य आहे व त्याठिकाणीं देवांची भक्तिपूर्वक पूजा केली असतां अक्षय्य फळ मिळतें. ह्याठिकाणीं आमूर्तरयाचा मुलगा जो गयराजा यानें यज्ञामध्यें अग्नीला इतकें तृप्त केलें कीं, त्यानंतर बरेच दिवस त्याला लोकांनीं दिलेला हविर्भाग देवांना पोहोंचविण्याची शक्ति राहिली नाहीं. बराच कालपर्यंत त्या ठिकाणीं अन्नाच्या पर्वतप्राय राशी पडल्या होत्या, अशी आख्यायिका सांगतात.

६९ अगस्त्य ऋषीची व वातापीची कथा. (३. ९६–१०५)

पुढें अगस्त्याश्रमाला आल्यावर लोमशांनीं युधिष्ठिराला अगस्त्यांचा इतिहास सांगितला. ते ह्मणाले, 'पूर्वी मणिमती नगरींत इल्वलनामक कोणी दैत्य रहात होता. त्याचा वातापि नांवाचा भाऊ होता. ह्या इल्वलानें कोणे एके समयीं एका तपस्वी ब्रह्माला इंद्रासारखा मला मुलगा दे ह्मणून मागितलें. ब्राह्मणानें त्याला मुलगा दिला नाहीं ह्मणून राग येऊन तो असुर आपल्या भावाला मेषरूपानें शिजवून ब्राह्मणांला खावयाला घाली व पोटांत गेल्यावर इल्वलानें हांक मारल्याबरोबर त्यांचें पोट फाडून तो बाहेर पडे. ह्याप्रमाणें त्यानें अनेक ब्राह्मणांना मारलें.

इकडे अगस्त्यांनीं एके वेळीं आपल्या पितरांना अधोमुख लोंबतांना पाहिलें व ते संतानकांक्षी आहेत असें त्यांच्याकडून समजल्यावर संतान उत्पन्न करण्यासाठीं त्यांच्यासमान कोणी स्त्री न मिळाल्यामुळें ज्या ज्या सत्वाचें जें जें अंग पाहिजे त्या त्या सत्वानें तें तें अंग बनवून एक उत्तम स्त्री त्यांनीं निर्माण केली, व संतानप्राप्तीसाठीं झुरणाऱ्या विदर्भराजाला ती कन्या ह्मणून अर्पण केली. ती त्या ठिकाणीं अग्निशिखेप्रमाणें वाढली. ब्राह्मणांनीं तिचें लोपामुद्रा ह्मणून नामाभिधान केलें. ती यौवनदशेंत येऊन शील, आचार इत्यादि गुणांनीं संपन्न होती; तरी अगस्त्यांच्या भीतीनें कोणी तिला मागणी घालीना. ती रूपानें अप्सरांना मागें टाकणारी असून शीलानें मातापितरांना व स्वजनांना संतोष देत होती. तिला यौवनदशेंत आलेली पाहून ती कोणाला यावी अशी राजाला चिंता पडली. इतक्यांत गृहस्थाश्रमाला योग्य अशी ती झालेली आहे, असा विचार करून लग्न करण्याच्या विचारानें अगस्त्यऋषी राजाकडे आले, व पुत्रप्राप्तीकरितां तूं ती मला दे अशी त्यांनीं त्याच्यापाशीं मागणी घातली. ती त्यांना देण्याची राजाची इच्छा नव्हती; पण नाहीं ह्मटलें असतां ते शाप देऊन जाळून टाकतील ह्मणून आतां काय करावें अशा विवंचनेंत तो पडला; तेव्हां लोपामुद्रा आपण होऊनच राजाजवळ येऊन ह्मणाली, 'बाबा, माझ्याकरितां तुह्मी संकटांत पडूं नका. या ऋषींना मला देऊन त्यांच्या कोपापासून आपलें संरक्षण करून घ्या.' तें तिचें भाषण ऐकून त्यानें तिचें अगस्त्यांशीं विधिपूर्वक लग्न लावून दिलें. लग्न झाल्यावर पतीच्या सांगण्यावरून मोठे मोठे मौल्यवान अलंकार व वस्त्रें टाकून वल्कलें धारण करून पतीप्रमाणेंच व्रतस्थ राहून त्यांच्याबरोबर ती गंगाद्वाराला आली. त्या ठिकाणीं अगस्त्यऋषी त्या अनुकूल स्त्रीसहवर्तमान उग्र तप आचरीत राहिले. ती मोठ्या आनंदानें आदरपूर्वक पतीची सेवा करीत होती ह्मणून त्यांचेंही तिच्यावर प्रेम जडलें. याप्रमाणें बरेच दिवस लोटल्यावर तपानें देदीप्यमान व न्हाऊन शुद्ध झालेली अशा तिला पाहून व तिच्या सेवेनें, शौचादि गुणांनीं, कांतीनें व रूपानें मोहित होऊन त्या ऋषींनीं तिला रतिसुखासाठीं जवळ बोलाविलें. तेव्हां लाजत लाजत हात जोडून प्रेमानें ती त्यांना ह्मणाली, 'भगवन, आपण संततीसाठीं माझ्याबरोबर लग्न केलें आहे, हें मी जाणतें; परंतु माझे मनोरथ आपण पूर्ण कराल अशी मला आशा आहे. माझ्या पित्याच्या घरीं ज्या प्रकारची शय्या आहे तशा प्रकारच्या शय्येवर आपण अनेक प्रकारचे अलंकार व पुष्पमाळा घालून यावें व मीही उत्तम अलंकार घालून त्या ठिकाणीं आपल्याला यथेच्छ रतिसुख यावें अशी माझी इच्छा आहे. अशा काषायवस्त्रानें आपल्याकडे येणें मला बरें वाटत नाहीं. अलंकार कांहीं अपवित्र मानलेले नाहींत.' हें तिचें भाषण ऐकून, 'तुझ्या पित्याप्रमाणें मजपाशीं संपत्ति नाहीं, तेव्हां हें सर्व कसें साधावें,' असें त्यांनीं उत्तर दिलें. हें पतीचें भाषण ऐकून ती ह्मणाली, 'हं हं ह्मणतां सर्व पृथ्वीवरची संपत्ति मिळविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आहे हें मी ओळखतें.' अगस्त्यांनीं उत्तर दिलें, 'तूं ह्मणतेस तें खरें आहे, पण तसें करण्याला माझें तप खर्ची घातलें पाहिजे. ज्याच्या योगानें माझ्या तपाचा व्यय होणार नाहीं अशी एखादी गोष्ट तूं मला सांग.' तें ऐकून लोपामुद्रा ह्मणाली, 'माझा ऋतुकाळ फार थोडा राहिला आहे, आपण माझ्या ह्मणण्याप्रमाणें करणार नाहीं तर मीं आपले मनोरथ पुरवूं इच्छीत नाहीं.' असा तिचा आग्रह

पाहून अगस्त्यऋषी श्रुतर्वा राजाकडे याचना करण्याकरितां गेले. कुंभयोनि अगस्त्य आले आहेत हें ऐकून आपल्या राज्याच्या हद्दीपर्यंत त्यांना सामोरें जाऊन त्यानें त्यांचा आदरपूर्वक सत्कार केला व त्यांच्या येण्याचा हेतु कळल्यावर जामदारखाना व जमाखर्च दाखवून त्यांतून आपणाला योग्य वाटेल तितकें द्रव्य आपण खुशाल घ्या अशी त्यानें त्यांची प्रार्थना केली. नंतर त्याचा तो जमाखर्च सारखा पाहून आपण त्यांतला पैसा घेतल्यानें प्रजेला विनाकारण पीडा होणार आहे, असा विचार करून त्याच्यापासून द्रव्य न घेतां त्याच्या सहवर्तमान ते बघनश्व राजाकडे गेले. तिकडेही खजिन्याची तशीच स्थिति असल्यामुळें त्यालाही बरोबर घेऊन ते इल्वलाकडे गेले. इल्वलानें त्यांचा सत्कार करून मेषरूपी भावाचें शिजविलेलें मांस त्यांच्यापुढें आणून ठेविलें. तें पाहून अगस्त्यांबरोबर आलेले राजे खट्टू झालें. अगस्त्य त्यांना ह्मणाले, 'तुह्मांला वाईट वाटण्याचें कारण नाहीं. मी याला खाऊन पचवून टाकतों.' असें ह्मणून त्या मेषरूपी वातापीला त्यांनीं खाऊन टाकलें. नंतर इल्वलानें त्याला नेहमींप्रमाणें हांक मारली. त्यावेळीं अगस्त्यऋषींनीं गुदद्वारानें वायु सोडला व ते हासत हासत ह्मणाले, 'मीं त्याला खाऊन पचविलें आहे. आतां तो कोठचा येतो?' हा अद्भुत चमत्कार पाहून इल्वलानें त्यांना विपुल संपत्ति देऊन त्यांची पाठवणूक केली. ती संपत्ति घेऊन घरीं येऊन अगस्त्यऋषींनीं लोपामुद्रेचे सर्व मनोरथ परिपूर्ण केले. त्यावेळीं मला वीर्यवान पुत्र पाहिजे असें तिनें मागितल्यावरून त्यांनीं विचारलें, 'तुला हजार पुत्र पाहिजेत कां दहा दहाच्या तोडीचा एकच असे शंभर पाहिजेत, कां हजारांच्या तोडीचा एक पाहिजे?' हें ऐकून, 'हजारांच्या तोडीचा मला एकच द्या,' असें ती ह्मणाली; '**अनेक दुर्गुणी मुलांपेक्षां एक सद्गुणी मुलगा बरा,**' असा तिचा अभिप्राय जाणून उत्तम वेळेवर, आपल्याशीं समानशील अशा त्या लोपामुद्रेशीं त्यांनीं संभोग करून तिच्या ठिकाणीं अपेक्षित गर्भोत्पादन करून ते फिरून वनाला निघून गेले. तो **गर्भ पूर्ण सात वर्षांनीं** मातेच्या उदरांतून बाहेर पडला.

ह्या समयीं कृतयुगामध्यें क्रूर व युद्धांत कोणाला हार न जाणारे असे कालेय नांवाचे दानव, अनेक शस्त्रास्त्रांमध्यें प्रवीण अशा वृत्राचा पाठिंबा घेऊन देव व ऋषी यांना फार पीडा देऊं लागले होते. त्यावेळीं वृत्रवधाकरितां झटणारे देव इंद्रासहवर्तमान ब्रह्मदेवांकडे जाऊन हात जोडून त्यांनीं आपला हेतु त्यांना कळविला. तेव्हां ब्रह्मदेव ह्मणाले, 'दधीचऋषींकडे जाऊन त्रैलोक्याच्या हितासाठीं त्यांच्या अस्थि मागून घ्या. ते आपल्या देहाचें विसर्जन करून तुह्मांला आपल्या अस्थि देतील. त्या अस्थींचें घोर वज्र करून त्याच्या साहाय्यानें इंद्र वृत्राला मारील.' असें ब्रह्मदेवांचें भाषण ऐकून देव, दधीचऋषींच्या आल्हादकारक आश्रमाला आले व त्यांनीं त्यांच्या अस्थि मागितल्या. त्यांची प्रार्थना मान्य करून त्या ऋषिश्रेष्ठांनीं लोकहितासाठीं देह ठेविला. देवांनीं त्यांच्या अस्थि घेऊन त्यांचें उग्र वज्र त्वष्ट्याकडून करविलें, व तें वज्र इंद्राला देऊन त्यानें वृत्राला मारण्यास सांगितलें. नंतर देवदानवांचें तुंबळ युद्ध माजलें. त्यांत वणव्यानें पेटलेल्या पर्वताप्रमाणें दानव देवांवर तुटून पडत होते. अहंकारानें तुटून पडणाऱ्या दानवांचा वेग देवांना सहन होईना. त्यामुळें त्यांची दाणादाण होऊन ते चारी दिशांना पळूं लागले. त्यांना पळतांना पाहून व वृत्राचें बल वाढत चाललेलें पाहून इंद्र फार खिन्न झाला. तें पाहून इंद्राचें बल वांढविण्याकरितां भगवान विष्णूनें आपलें तेज त्याला दिलें व सर्व देव व ब्रह्मर्षी यांनींही आपापलें तेज त्याला दिलें. याप्रमाणें सर्वांच्या तेजाच्या योगानें अजय्य होऊन तें मोठें वज्र त्यानें वृत्राला मारण्याकरतां सोडलें. त्याच्या योगानें वृत्र मरून जमिनीवर पडला व दानवांना देवांपासून फार त्रास होऊं लागल्यामुळें ते समुद्रांत शिरले. त्या ठिकाणीं राहून त्यांनीं जुटीनें त्रैलोक्याच्या नाशाचा विचार सुरू केला. त्यांमध्यें अनेक दानव आपल्याला शहाणे ह्मणविणारे निरनिराळे उपाय सुचवूं लागले, व त्यांचें दैव फिरल्यामुळें घोर कृत्य करण्याची त्यांना बुद्धि झाली. सर्व लोकांच्या अस्तित्वाला तप हें कारण आहे असें जाणून धर्मज्ञ तपस्व्यांचा एकदम फडशा उडवावा असा त्यांचा निश्चय ठरला. हा निश्चय ठरल्यावर मोठ्या त्वेषानें रात्रीच्या

समयीं पुण्याश्रमांमधून व देवालयांमधून मुनींचा संहार करून दिवसां ते समुद्रांत लपून राहूं लागले. सकाळीं भूमीवर पडलेलीं तपानें कृश झालेल्या ऋषींचीं शवें पाहून हें कोणाचें काम असावें हें लोकांना उमगेना. स्वाध्याय, वषट्कार, यज्ञ, उत्सव इत्यादि सर्व क्रिया बंद पडून कालेयांच्या भीतीनें सर्व जग निरुत्साह झालें. याप्रमाणें जगाचा संहार चालला असतां देवांना मोठी काळजी पडली. नंतर ते जगाच्या सृष्टिस्थितिलयकर्त्या परमेश्वराला शरण जाऊन म्हणाले, 'हे कमलनयन भगवन्, पूर्वी समुद्रांत बुडालेली पृथ्वी आपण वर काढली, आदिदैत्य जो हिरण्यकशिपु त्याचा नरसिंहरूप धरून संहार केला, कोणालाही मारतां न येणाऱ्या बळीला बटुवेष धरून त्रैलोक्यापासून भ्रष्ट केलें. यशाला, आड येणारा जंभ नांवाचा असुर तुम्हींच मारला. अशा प्रकारचीं आपलीं कृत्यें अगण्य आहेत. आम्ही संकटांत पडलों असतां आपले पायच त्यांतून आम्हांला सोडविणार. चतुर्विध प्रजांना आपल्या प्रसादानेंच सुख होत असतें. तर मग त्यांचें रक्षण करणें हें आपलें कर्तव्य आहे.' अशी त्यांची स्तुति ऐकून भगवान संतुष्ट होऊन म्हणाला, 'वृत्राला मारल्यानंतर आपला जीव बचावण्याकरितां कालेय समुद्रांत शिरले व समुद्राचा आश्रय घेऊन लोकांचा समूळ नाश करण्यासाठीं तेथूनच ते रात्रीं बाहेर पडून ऋषींचा संहार करीत आहेत. जोंपर्यंत ते तेथें आहेत तोंपर्यंत तुमच्यानें त्यांचा नाश करवणार नाहीं. समुद्र आटवून टाकण्याच्या विचाराला तुम्ही लागा. हें काम अगस्त्यऋषींखेरीज दुसऱ्या कोणाच्या हातून होण्यासारखें नाहीं.' हें विष्णूचें भाषण ऐकून देव अगस्त्यऋषींकडे आले व त्यांची स्तुति करून आपल्या आगमनाचा हेतु त्यांनीं त्यांना कळविला व समुद्र प्राशन करण्याविषयीं त्यांना विनंति केली. त्या महात्म्यांनीं लोकहितासाठीं समुद्राकडे येऊन तो पिण्याला सुरुवात केली. ते समुद्र पिऊन टाकीत असतां देवांना अति विस्मय होऊन त्यांनीं त्यांची स्तुति चालविली होती व आकाशांतून त्यांच्यावर पुष्पवृष्टि होत होती. त्यांनीं समुद्र निःशेष पिऊन टाकल्यावर उघडे पडलेल्या कालेयांना देवांनीं ठार मारून टाकलें. नंतर लोकस्थिति कायम ठेवण्यासाठीं फिरून समुद्रांत पाणी सोडून देण्याविषयीं देवांनीं अगस्त्यऋषींची प्रार्थना केली. ती ऐकून अगस्त्य म्हणाले, '**मीं तें सर्व पाणी जिरवून टाकलें आहे. समुद्र भरण्याचा आतां दुसरा एखादा उपाय पहा.**' हें ऐकून आश्चर्ययुक्त होऊन देव समुद्र भरण्याचा कांहीं उपाय योजण्यासाठीं ब्रह्मदेवांकडे गेले. ज्ञातीसाठीं महाराज भगीरथ मोठ्या प्रयासानें **गंगेला खालीं आणील त्या वेळीं समुद्र पूर्ववत् भरेल** असें सांगून ब्रह्मदेवांनीं देवांना आपापल्या ठिकाणीं जाण्यास सांगितलें.

कोणे एके वेळीं सूर्याला कनकपर्वत जो मेरु त्याच्या भोंवतीं प्रदक्षिणा करतांना पाहून विंध्यपर्वतानें अहंकारपूर्वक त्याला आपल्या भोंवतीं प्रदक्षिणा करण्यास सांगितलें; त्याला सूर्यानें उत्तर दिलें, 'तुझ्या सांगण्यावरून मी तुला प्रदक्षिणा घालणार नाहीं; कारण जगत्कर्त्यानें हा मार्ग मला ठरवून दिला आहे.' तें ऐकून विंध्यपर्वताला राग आला व सूर्याचा मार्ग अडविण्यासाठीं तो उंच वाढूं लागला. देवांनीं त्याची पुष्कळ समजूत घातली; परंतु तो त्यांचें म्हणणें ऐकेना. त्या वेळीं देव अद्भुत सामर्थ्यवान अशा अगस्त्यऋषींना शरण गेले. ते भार्यासहवर्तमान विंध्यपर्वताकडे येऊन म्हणाले, 'कांहीं कारणासाठीं मी दक्षिणेकडे चाललों आहें, मला तूं मार्ग दे, व मी परत येईपर्यंत माझी वाट पहात रहा. मी परत येऊन आपल्या ठिकाणाला गेल्यावर तुला वाटेल तेवढा तूं वाढ.' **ह्याप्रमाणें विंध्यपर्वताबरोबर संकेत करून अगस्त्यऋषी दक्षिण दिशेला गेले, ते अद्यापि परत आले नाहींत.**

७० परशुरामांचें तेजोहरण. (३. ९९)

भगवान विष्णु स्वतः रावणाला मारण्याकरितां दशरथाच्या पोटीं पुत्ररूपानें जन्माला आला आहे ही बातमी ऐकून रेणुकासुत परशुराम त्याच्या अद्भुत वीर्याची परीक्षा पाहण्याकरितां क्षत्रियांचा नाश करणारें धनुष्य बरोबर घेऊन मोठ्या कौतुकानें अयोध्येला आले. ते आपल्या राज्याच्या हद्दींत आले आहेत अशी बातमी ऐकून दशरथानें आपल्या मुलाला त्यांचा सत्कार करण्याकरितां सामोरें

पाठविलें. त्याला रेणुकासुत रामांनीं मोठ्या गर्वानें आपल्या धनुष्याला बाण लावण्यास सांगितलें. तें ऐकून दाशरथी राम ह्मणाला, 'भगवन्, मला ह्याप्रमाणें तुच्छ करणें आपल्याला शोभत नाहीं. माझा क्षत्रकुलांत जन्म आहे. मी क्षत्रियांना कलंक लावणारांपैकीं नव्हे. विशेषेंकरून इक्ष्वाकुकुळांतले राजे आपल्या बाहुवीर्यानें आपला मोठेपणा प्रदर्शित करतात.' हें ऐकून, 'हा लपंडाव पुरे आहे, धनुष्याला बाण लाव,' असें भार्गवांचें निक्षून सांगणें ऐकून दाशरथी रामानें तें दिव्य धनुष्य त्यांच्या हातांतून घेऊन सहज लीलेनें त्याला बाण लाविला व हासत हासत प्रत्यंचेचा ठणत्कार केला. नंतर पुढें काय करूं ह्मणून त्यानें विचारलें. तेव्हां बाण आकर्ण ओढ असें परशुराम ह्मणाले. तें ऐकून रागानें लाल होऊन जाऊन श्रीराम ह्मणाला, 'आपण गर्वानें भरला आहां असें लोकांमध्यें आजपर्यंत मी नुसतें ऐकत होतों तें कांहीं खोटें नाहीं. ब्रह्मदेवाच्या प्रसादानें व विशेषेंकरून क्षत्रियांपासून आपल्याला हें तेज मिळालें आहे ह्मणून आपण माझा धिक्कार करितां; पण माझें स्वरूप पाहण्याला मी आपल्याला दिव्य चक्षू देतों. नंतर रामाने दिलेल्या दिव्य चक्षूंनीं भार्गव त्याच्या शरीरामध्यें सर्व विश्व भरलेलें पाहून मोहित झाले. रामानें त्यांनीं सांगितल्याप्रमाणें तो बाण सोडला. त्याच्या योगानें महान उल्कापात होऊन जिकडे तिकडे आकाश धूलिमय होऊन सोसाट्याचा पाऊस पडूं लागला व भूमि कंपायमान झाली. नंतर त्यानें भार्गवांना मोहित करून त्यांचें तेज हरण केलें. पुढें भार्गव शुद्धीवर येऊन त्याची परवानगी घेऊन महेन्द्र पर्वतावर गेले. त्या ठिकाणीं एक वर्ष लोटल्यावर तेजोहीन व गाईसारखे दीन बनून गेलेल्या अशा त्यांना पाहून त्यांचे पितर ह्मणाले, 'मुला, भगवान विष्णूशीं तुझें वर्तन योग्य झालें नाहीं. तो तिन्ही लोकांमध्यें पूज्य व मान्य आहे. आतां तूं वधूसर नांवाची एक नदी आहे तेथें जा. तेथें तुझ्या पित्यानें ज्या ठिकाणीं उग्र तप आचरण केलें होतें, त्या दीतोद नामक तीर्थामध्यें स्नान कर ह्मणजे तुझें पूर्वतेज तुला प्राप्त होईल.' परशुरामांनीं त्याप्रमाणें केल्यावर त्यांचें तेज पुन्हां त्यांना मिळालें.'

७१ सगरवंशवर्णन व भगीरथानें गंगा आणिल्याचा इतिहास.

(३. १०६-१०९)

ज्ञातीसाठीं केलेल्या भगीरथाच्या प्रयत्नानें समुद्र पूर्ववत् कसा भरला ह्मणून युधिष्ठिरानें विचारलें असतां लोमश ह्मणाले, 'इक्ष्वाकुकुलामध्यें रूप, सत्व व बल यांनीं युक्त असा सगर नामें एक राजा होऊन गेला. हैहय, ताल, जंघ इत्यादि दुष्टांचा समूळ नाश करून व इतर राजांना आपल्या ताब्यांत आणून तो आपलें राज्य न्यायानें चालवीत असे. त्याला वैदर्भी व शैब्या या नांवाच्या रूपयौवनसंपन्न दोन बायका होत्या. त्याला मुलगा नसल्यामुळें बायकांसहवर्तमान कैलासपर्वतावर जाऊन तेथें त्यानें घोर तप केलें. त्या तपानें तुष्ट होऊन शंकर ह्मणाले, 'तुझ्या एका बायकोला साठ हजार शूर मुलगे होतील; पण ते सर्व एकदम नाश पावतील. दुसरीला वंशाला आधारभूत असा एकच शूर मुलगा होईल.' असें ह्मणून शंकर तेथेंच अंतर्धान पावले; व राजा आपल्या बायकांसहवर्तमान गृहाला परत आला. पुढें त्याच्या त्या दोन बायका गर्भिणी झाल्या. वैदर्भीच्या पोटांतून एक गोळा बाहेर पडला व शैब्येला देवासारखा रूपवान असा एक मुलगा झाला. तो गोळा टाकून द्यावा असा विचार राजा करीत आहे इतक्यांत त्यानें आकाशवाणी ऐकली, 'राजा, अविचार करूं नकोस. गोळ्यांत मुलांचें बीज आहे,त्याचा नाश करूं नकोस. तें बीज काढून काळजीपूर्वक उबदार भांड्यांत त्याचें रक्षण कर. ह्मणजे त्यापासून शंकरांच्या सांगण्याप्रमाणें तुला साठ हजार मुलगे होतील. भलता विचार मनांत आणूं नकोस.' ही देववाणी ऐकून राजानें निरानिराळ्या भांड्यांत त्या बीजाचे कण ठेवून प्रत्येकाच्या रक्षणाकरितां एकेक दाई ठेविली. पुढें बऱ्याच काळानें साठ हजार तेजःपुंज मुलगे त्यांतून बाहेर पडले. त्या मंदबुद्धि मुलांनीं लोकांचा नाश करण्याला सुरवात केली, तेव्हां देव ब्रह्मदेवाला शरण गेले. 'तुह्मी काळजी करूं नका. लवकरच ते स्वकर्मानेंच क्षय पावतील,' असें ह्मणून ब्रह्मदेवांनीं त्यांना निरोप दिला. इकडे कांहीं काळ लो-

टल्यावर सगरानें अश्वमेध यज्ञ सुरू केला व आपल्या मुलांना बरोबर देऊन त्या यज्ञियाश्वाला पृथ्वीपर्यटनाकरितां सोडलें. ते काळजीपूर्वक त्या घोड्याचें रक्षण करीत असतां तो एका अफाट समुद्रापाशीं येऊन एकाएकीं अदृश्य झाला. त्यांनीं सर्व पृथ्वी धुंडाळल्यावर पित्याकडे जाऊन घोडा सांपडत नाहीं म्हणून सांगितलें. तें ऐकून संतापून जाऊन दैवानेंच त्याला बुद्धि दिल्यामुळें 'घोडा घेऊन आल्याशिवाय मला तोंड दाखवूं नका,' म्हणून त्यानें त्यांचा धिक्कार केला. त्यानंतर फिरून घोड्याच्या शोधार्थ पृथ्वी हिंडतां हिंडतां ते एका विवरापाशीं आले व कुदळींनीं व खोऱ्यांनीं मोठ्या यत्नानें तें खणण्यास त्यांनीं सुरवात केली. याप्रमाणें समुद्राच्या ईशान्य दिशेला जमीन पोखरून आंत पाताळांत ते शिरले. तेथें कपिल ऋषींना व त्यांच्याजवळच घोड्याला चरतांना पाहून त्यांना आनंद झाला. विनाशकाल आल्यामुळें विपरीत बुद्धि होऊन त्यांचा सत्कार न करतां घोड्याला धरण्याकरितां ते धांवले. कपिलांना राग येऊन त्यांनीं डोळे वटारले व त्यांतून निघालेल्या अग्नीनें त्यांना जाळून भस्म केलें. नारदांनीं ती बातमी सगराला येऊन सांगितली. ती ऐकून राजा क्षणभर खिन्न झाला. पण लागलीच शंकरांच्या वराची आठवण होऊन तो शांत झाला.

कोणे एके वेळीं शैब्येपासून झालेला मुलगा असमंजा यानें गांवांतील मुलांना मारेला धरून नदींत फेंकून दिलें होतें. त्या योगानें पौरजन घाबरून राजाकडे जाऊन त्या अपराधाबद्दल त्याला हद्दपार करण्याविषयीं त्यांनीं राजाची प्रार्थना केली होती, व **राजानेंही पौरजनांचें प्रिय करण्याकरितां त्याला हद्दपार केलें होतें.** या कारणानें तो मुलगा ह्या वेळीं राष्ट्रांत नव्हता. ह्मणून त्याचा मुलगा व आपला नातू जो अंशुमान याला हांक मारून सगर ह्मणाला, 'माझे साठ हजार मुलगे कपिल ऋषींच्या रागानें माझ्यासाठी मृत्युमुखीं पडले आहेत. धर्म रक्षण करण्याकरितां व माझ्या प्रजेला तुष्ट ठेवण्याकरितां मीं तुझ्या पित्याचाही त्याग केला. आतां घोडा कसा परत मिळणार याविषयीं मला मोठी काळजी पडली आहे. ह्मणून घोडा

घेऊन येऊन यज्ञामध्यें आलेलें विघ्न, तसेंच यज्ञभंगाच्या भीतीनें जें मला दुःख झालें आहे तें दूर कर.' तें अजोबाचें भाषण ऐकून घोड्याचा शोध करीत करीत अंशुमान त्या बिवरमार्गानें पाताळाला गेला. व त्या ठिकाणीं कपिल ऋषी व घोडा यांना पाहून ऋषींच्या पायांवर डोकें ठेवून आपलें कार्य त्यानें त्यांना सांगितलें, व 'यज्ञासाठीं घोडा परत द्या व ह्या माझ्या पितरांचा उद्धार करा,' अशी त्यांची प्रार्थना केली. कपिल ऋषी ह्मणाले,' निष्पापा,तुझी प्रार्थना मला मान्य आहे. तूं साक्षात् क्षमेची, धर्माची व सत्याची मूर्ति आहेस. तुझ्या योगानें आज सगर कृतार्थ झाला आहे. तुझ्या बापाला पुत्रवान हें नांव तुझ्याच योगानें शोभतें. तुझ्याच प्रभावानें सागर स्वर्गाला जातील. तुझा नातू त्यांना उद्धरण्याकरितां शंकरांना तोषवून आकाशांतून गंगा घेऊन येईल व त्यांचा उद्धार करील. हा घोडा घेऊन जा व सगराचा यज्ञ शेवटाला ने.' हें त्यांचें भाषण ऐकून अंशुमान घोडा घेऊन यज्ञमंडपांत आला व त्या ठिकाणीं झालेली सर्व हकीकत त्यानें सगराला सांगितली. ती ऐकून सगरानें पुत्रशोक टाकला व अंशुमानाची वाहवा करून तो यज्ञ शेवटास नेला. त्यानें समुद्राला मुलाप्रमाणें मानलें व राज्यभार नातवावर टाकून तो स्वर्गाला गेला. अंशुमानानेंही धर्मानें पृथ्वीपालन करून आपला मुलगा जो दिलीप त्याला राज्य देऊन देह ठेविला, आपल्या पूर्वजांच्या घोर मरणाचा वृत्तांत ऐकून त्यांना गति मिळावी ह्मणून गंगा आणण्यासाठीं दिलीपानें मोठी खटपट सुरू केली; परंतु तो त्याचा यत्न सफल झाला नाहीं. सर्व लोकांच्या मनाला व नयनांना आनंद देणारा भगीरथ नांवाचा त्याला मुलगा होता. तोही राज्यभार सचिवांवर टाकून मनाला आर लागून राहिली असल्यामुळें तपाचरण करण्याकरितां हिमाचलावर गेला. त्या ठिकाणीं तपानें सर्व पाप धुऊन टाकून फलमूलांवर हजार वर्षे तो गंगेची आराधना करीत राहिला. त्या वेळीं गंगा प्रत्यक्ष दर्शन देऊन, 'तुझी काय इच्छा आहे सांग, ती परिपूर्ण करण्याला मी तयार आहें,' असें त्याला ह्मणाली. नंतर कपिलांच्या रागानें आपल्या पूर्वजांचा नाश झाल्याचा वृत्तांत तिला सांगून त्यांच्या

उद्धाराकरितां तूं मजबरोबर पाताळाला चल ह्मणून भगीरथानें तिची प्रार्थना केली. तेव्हां गंगा ह्मणाली, 'हे राजा, तुझ्या प्रार्थनेला मी कबूल आहें; परंतु आकाशांतून भूमीवर पडतांना माझा वेग सहन करणारा या त्रिजगतामध्यें शंकरांशिवाय दुसरा कोणी नाहीं; तर तूं आपल्या तपानें शंकरांला तोषवून मी खालीं पडतांना आपल्या मस्तकावर मला धारण करण्याचें त्यांच्याकडून वचन घेशील तर मी येण्याला सिद्ध आहें.' नंतर भगीरथानें कैलासाला जाऊन शंकरांला तोषवून गंगेला आपल्या मस्तकावर धारण करण्याचा वर त्यांपासून मागून घेतला. नंतर शुद्ध व नम्र होऊन त्यानें गंगेचा धांवा केला. शंकर देवांच्या हितासाठीं आपल्याला मस्तकावर धारण करण्यास तयार आहेत असें जाणून गंगा एकदम आकाशांतून खालीं पडली. तिच्या उदकांत महान महान भोंवरे उठून मासे, सुसरी इत्यादि जलचरांनीं ती भरली होती. आकाशाचा जणू कमरपट्टाच कीं काय अशी ती भासत होती. अशा गंगेला आकाशांतून पडतांना एकाद्या मोत्याच्या हाराप्रमाणें शंकरांनीं आपल्या मस्तकावर धारण केली. हंसपंक्तिप्रमाणें मधून मधून फेसानें युक्त, मधून मधून वक्रगतीनें जाणारी, मधून मधून खडकावर आपटून उसळणारी; घों घों आवाज करीत फेनरूप वस्त्र परिधान करून एखाद्या उन्मत्त स्त्रीप्रमाणें ती पाताळाकडे चालली. जातां जातां, 'मी तुझ्याकरितां खालीं आलें आहे, पुढें होऊन मला मार्ग दाखीव,' असें भगीरथाला ती ह्मणाली. भगीरथ तिच्यासहवर्तमान समुद्रापर्यंत आला. तेथें ती समुद्रांत शिरतांच मोठ्या जोरानें तो समुद्र एकदम भरला. याप्रमाणें भगीरथाचे मनोरथ पूर्ण होऊन त्यानें पितरांना त्या ठिकाणीं उदक दिलें व गंगेला आपली कन्या मानिली.'

---

७२ ऋष्यशृंगांचा इतिहास.

(३. ११०—११३)

पांडव तीर्थयात्रा करीत हेमकूटपर्वताला पोहोंचल्यावर लोमश ह्मणाले, 'ह्या पर्वतावर ऋषभ नामक महातापसी तपस्वी रहात होते. त्यांना शेंकडों वर्षें आयुष्य होतें एकेसमयीं ह्या पर्वतावर जनांच्या भाषणानें मोठा गडबड झाली असतां ते पर्वताला ह्मणाले, 'ह्या ठिकाणीं ह्यापुढें जो कोणी भाषण करील त्याचें वाऱ्यानें व दगडानें तूं निवारण कर.' ह्मणून त्या वेळेपासून पर्वतावर मोठा वारा सुटत असतो व दगडही येथें पुष्कळ आहेत. येथें नित्य पाऊस पडत असतो, वेदघोष ऐकूं येतो, पण मनुष्य दृष्टीस पडत नाहीं. येथें लोकांना येण्याला त्यांनीं कांहीं अटकाव करून ठेविला आहे. ह्या ठिकाणीं राहणाऱ्या इंद्रादि देवांनीं दर्शन टाळण्यासाठीं कोणाला येतां येऊं नये असा हा मजबूत किल्लाच करून ठेविला आहे. तेव्हांपासून हा प्रदेश लोकांना पाहण्याला देखील दुर्लभ झाला आहे, मग चढण्याची गोष्ट राहिली बाजूला. तपानें देशशुद्धि झाल्याखेरीज ह्याकडे पाहणें किंवा ह्यावर चढणें अशक्य आहे; ह्मणून हे युधिष्ठिरा, तूं ह्या ठिकाणीं आपलें तोंड स्वाधीन ठेव. ह्याच ठिकाणीं देवांनीं मोठमोठे यज्ञ केले आहेत. त्यांची ही कुश व दुर्वा यांनीं भरलेली भूमि व यूपासारखे वृक्ष इत्यादि साक्ष देत आहेत. येथें सकाळ संध्याकाळ होमाग्नि दिसतो. ह्या ठिकाणीं नंदेमध्यें स्नान करणारांचें पातक तावडतोब नाहींसें होतें; ह्मणून येथें कौशिकींत स्नान करून ह्याच ठिकाणीं विश्वामित्रांनीं उग्र तप केलें व ह्याच ठिकाणीं विभांडक ऋषींचे पुण्याश्रम विराजमान आहेत. त्यांच्या इंद्रियनिग्रही व तपस्वी मुलानें लोमपाद राजाच्या राज्यांत अवर्षण पडलें असतां पाऊस पाडून पीकपाण्याची सुबत्ता केली. त्यामुळें त्या राजानें आपली मुलगी शांता त्यांना दिली. ती हकीकत पुढें दिल्याप्रमाणें आहे.

काश्यपकुलांत झालेले देवतुल्य कोणी विभांडक नामक ऋषी मोठे तपस्वी होते. त्यांचें अमोघ वीर्य एकेवेळीं उर्वशीला पाहून स्खलन झालें. ते ऋषी स्नान करण्यासाठीं जलांत शिरले असतां त्या ठिकाणीं ब्रह्मदेवांच्या शापानें मृगी झालेली एक देवकन्या तृषार्त होऊन पाणी पिण्यासाठीं आली. 'तूं मृगी होशील व एका मुनीला जन्म देऊन फिरून आपल्या स्वरूपाला मिळशील,' असा तिला ब्रह्मदेवांचा शाप होता. दैवलिखिताप्रमाणें शापाची

सत्यता होण्यासाठीं तें वीर्य धारण करण्याची तिला बुद्धि होऊन तिनें तें प्राशन केलें व त्यापासून ती गर्भिणी झाली. तिच्या उदरीं महामुनी ऋष्यशृंग जन्मले. त्यांच्या मस्तकावर एक शृंग होतें म्हणून त्यांना ऋष्यशृंग असें नांव पडलें. पित्याशिवाय अन्य मनुष्य त्यांनीं कधीं पाहिलें नव्हतें. ह्याच वेळीं दशरथाचा मित्र अंगदेशाचा राजा कोणी लोमपाद नांवाचा होता. त्यानें ब्राह्मणांला दुखविल्यामुळें ब्राह्मणांनीं त्याला सोडलें होतें, व त्याच्या यज्ञयागादिक क्रिया करण्यास पुरोहित न मिळाल्यामुळें त्याच्या राष्ट्रांत पाऊस पडेनासा होऊन प्रजेला फार त्रास झाला. त्यानें अनेक तपोनिष्ठ ब्राह्मणांना त्यांची क्षमा मागून उपाय विचारले. त्यांनीं 'ऋष्यशृंगांला आणून आपल्या राष्ट्रांत फिरीव म्हणजे ताबडतोब पाऊस पडेल,' म्हणून सांगितलें. नंतर त्यानें नीतिशास्त्रांत निपुण अशा कार्यसाधनपटु मंत्र्यांबरोबर त्या ऋषींस आणण्यासाठीं काय उपाय योजावा म्हणून मसलत करून विचारांतीं चोहोंकडून हुशार कलावंतिणींना आणवून युक्तिप्रयुक्तीनें त्या ऋषींना आपल्या राष्ट्रांत आणवावें असें ठरविलें. व एका हुशार म्हातारीच्या कलावंतिणीला दुसऱ्या कित्येक रूपसंपन्न तरुणींसह त्यांना मोह पाडण्यासाठीं त्यांकडे पाठविलें. तिनें राजाज्ञेनें व बुद्धीनें राजकार्य शेवटास नेण्यासाठीं एक रम्य आश्रम नावेमध्यें तयार करून ती नांव काश्यपांच्या आश्रमाजवळच बांधून ठेवून त्या मुनींच्या विहारभूमीमध्यें त्या तरुणींना फिरत ठेविलें. एके वेळीं काश्यप आश्रमांत नाहींत अशी संधि पाहून आपला हेतु शेवटास नेण्यासाठीं तिनें आपल्या मुलीला ऋष्यशृंगाकडे पाठविलें. ती हुशार मुलगी त्या तपोनिष्ठ ऋषींकडे जाऊन कुशलप्रश्नानंतर 'आपल्या दर्शनासाठीं मी आलें आहें,' असें म्हणाली. भूषणांच्या योगानें नक्षत्राप्रमाणें चमकणारी ती नमस्काराला पात्र आहे असें समजून धर्माला अनुसरून तिला पाद्य व फलमूलें देण्याच्या उद्देशानें कृष्णाजिन टाकलेल्या मऊ कुशासनावर त्यांनीं तिला बसावयास सांगितलें व 'आपला आश्रम कोणता, हें कोणतें ब्रह्मव्रत आपण पाळीत आहां,' वगैरे प्रश्न केले. तिनें उत्तर दिलें, 'तीन योजनेंपर्यंत पसरलेल्या त्या पलीकडच्या पर्वताच्या बाजूला माझा रम्य आश्रम आहे. अभिवादन, उदक अर्घ्यपाद्यादि उपचार घेणें आमचा धर्म नाहीं. आपल्यासारख्यांना आम्हीं नमस्कार करावा व आलिंगन द्यावें असें आमचें व्रत आहे.' असें म्हणून भिलावे, आवळे आदिकरून ऋषिपुत्रांनीं दिलेलीं वन्यफळें बाजूला ठेवून फार मधुर असे उत्तम उत्तम खाण्याचे व पिण्याचे पदार्थ, त्याचप्रमाणें सुवासिक माळा व नानाप्रकारचीं चित्रविचित्र वस्त्रें तिनें त्यांना दिलीं. ते पदार्थ पाहून त्या मुनींना संतोष झाला व हास्यवदन करून त्यांनीं तिच्यासहवर्तमान यथेच्छ क्रीडा केली. त्यांच्यापुढें कंदुकानें खेळत असतां ती एखाद्या दुभंगलेल्या लतेप्रमाणें दिसत होती. त्यांच्या अंगाला अंग लावून वारंवार तिनें त्यांना आलिंगन दिलें. सर्ज, तिलक, अशोक इत्यादि झाडांच्या फुललेल्या फांद्या वांकवून सहज लीलेने ती मोडून टाकीत होती. याप्रमाणें ती त्या ऋषींना मोह पाडीत होती. त्यांना विकारवश करून सोडून वरचेवर दृढ आलिंगन दिल्यावर ती अग्निहोत्राच्या मिषानें निघून गेली. ती गेल्यावर वेडे होऊन त्यांचें सर्व मन तिच्याकडे लागलें. तिच्या वियोगानें त्यांना तो आश्रम शून्य भासूं लागला व दीर्घोच्छ्वास टाकीत ते तिच्या भेटीला आतुर झाले. विभांडक ऋषी आश्रमाला परत आले त्यावेळीं मुलाचें मन नेहमींप्रमाणें जाग्यावर नसून तो उदासीनतेनें वर आकाशाकडे डोळे लावून विचारांत निमग्न आहे. असें पाहून ते त्याला म्हणाले, 'वत्सा, अद्यापि समिधा तोडून अग्नीला आहुति कां दिली नाहींस ? स्रुक व स्रुव घासून तयार कां ठेविले नाहींस? तसेंच होमधेनूचें वासरूं अद्यापि कां सोडलें नाहींस?' हे पित्याचें भाषण ऐकून ऋष्यशृंगांनीं उत्तर दिलें, 'ह्या ठिकाणीं फार उंच ना फार ठेंगणें असे एक जटाधारी ऋषी आले होते. त्यांचा वर्ण सुवर्णाप्रमाणें कांतिमान असून कमलासारखे त्यांचे डोळे फार मोहक होते. देवांप्रमाणें वैभवानें ते झळकत असून सूर्यासारखे दैदीप्यमान दिसत होते. त्यांचे केस काळे भोर, तुळतुळीत, सुवासिक व लांब सडक असून सोन्याच्या दोऱ्यानें बांधले होते. त्यांच्या गळ्यांती-

ल माळ आकाशांतील विद्युल्लतेप्रमाणें चमकत होती. गळ्याच्या खालच्या बाजूला रोमांच दृग्गोचर होणारे दोहों बाजूंस दोन मनोहर गोळे होते. त्यांचा कटिप्रदेश फार सूक्ष्म असून नाभिप्रदेशाची ठेवण फारच मोहक होती. त्यांची कंबर बारीक असून तिच्या भोंवतीं माझ्या सारखीच मेखला वस्त्रांतून चमकत होती. विशेष गोष्ट ही कीं, माझ्या रुद्राक्षमालांसारख्याच माला त्यांच्या पायांत व हातांत असून ते फिरतांना सरोवराच्या तीरावरील मत्त-हंसाप्रमाणें त्यांचा नाद निघत असे. त्यांचीं वस्त्रेंही अप्रतिम होतीं. तीं माझ्यासारखीं जाडींभरडीं नव्हतीं. त्यांचें भाषण कोकिलेप्रमाणें मनाला आल्हाद-दायक होतें. वैशाखमासीं वारा सुटला असतां ज्याप्रमाणें वनाला विशेष रम्यता येते तसा त्यांच्या अंगावरून वहात येणारा वारा मनाला विशेष आल्हाद देई. त्याचप्रमाणें त्यांच्या उजव्या हातांत एक चमत्कारिक फळ असून तें वरचेवर ते वर उडवीत असत. त्याला हातानें वर उडवून वाऱ्यानें हाणणाऱ्या वृक्षाप्रमाणें ते गरगर त्याच्या भोंवतीं फिरत. माझ्या अंगाला अंग घट्ट चिकटून ते माझ्या जटा धरून माझें तोंड खालीं वांकवीत, व माझ्या तोंडाला आपलें तोंड लावून एक प्रकारचा शब्द करीत. तो शब्द मला फार आनंद देत असे. मीं दिलेल्या फलमूलादिकांचें त्यांना कांहींच महत्त्व वाटलें नाहीं. त्यांनीं आपलें व्रत मला सांगून आपण आणलेलीं फळें मला दिलीं. तीं मी नेहमीं खातों त्यांपेक्षां फारच स्वादिष्ट होतीं. त्यांचीं पेयें देखील फार रुचकर होतीं. तीं प्याल्याबरोबर माझी वृत्ति उल्हासमय होऊन भूमि फिरते आहे कीं काय असें मला वाटूं लागलें. रेशमी दोऱ्यांत ओवलेल्या त्यांच्या माळा येथें पसरून टाकून ते निघून गेले. ते गेल्यापासून माझें मन जाग्यावरून उडालें आहे. लवकर त्यांच्याकडे तरी जावें किंवा त्यांनीं तरी नेहमीं इकडे येऊन आजच्यासारखें माझें मन रमवावें असें मला वाटतें. बाबा, त्यांचा तो कशा प्रकारचा ब्रह्मचर्याश्रम आहेहो ? त्यांबरोबर राहून तशा प्रकारचें ब्रह्मचर्य घ्यावें असें मला वाटतें. ' विभांडक ह्मणाले, ' मुला, ते अद्भुतरूपधारी राक्षस असून मोठा मोह पाडून मुनींच्या तपामध्यें विघ्न करावें व त्यांना सुखदायक लोक मिळूं देऊं नये एवढाच वनांमधून फिरण्यांत त्यांचा उद्देश असतो. तापसांना तपांत विघ्न केल्यानें त्यांना संतोष होतो; ह्मणून तापसांनीं कधीं त्यांकडे ढुंकून देखील पाहूं नये. त्यांनीं दिलेली मिष्ट पेयें भल्या लोकांना पिण्याला योग्य नसून त्यांनीं दिलेल्या सुवासिक माळा भल्यांना घालण्याच्या उपयोगी नाहींत. ' ह्याप्रमाणें त्यांनीं मुलांची समजूत घातली. पुन्हां कोणे एके समयीं विभांडक ऋषी फळें आणण्यासाठीं वनांत गेले असतां तीच वेश्या पुन्हां ह्या ऋष्यशृंगांना मोह पाडण्यासाठीं त्या ठिकाणीं आली. दोघांचा पूर्वीप्रमाणें क्रम सुरू असतां 'बाबा येण्याच्यापूर्वी तूं मला आपल्या आश्रमाकडे घेऊन चल,' म्हणून ऋष्यशृंग तिला आग्रह करूं लागले. तेव्हां ती त्यांना नावेकडे घेऊन आली व त्यांना त्यांत बसवून नाव सोडून अनेक प्रकारें त्यांचें मनरंजन करीत त्यांना लोमपाद राजाकडे घेऊन आली. राजानें कश्यपऋषींच्या त्या एकुलत्याएक मुलाला अंतःपुरामध्यें ठेविलें. इतक्यांत जिकडे तिकडे पुष्कळ पाऊस पडून राजाची इच्छा परिपूर्ण झाली व त्यानें आपली मुलगी शांता त्या ऋषिपुत्रांना दिली. विभांडकऋषी यांचा शोध करीत येतील असा अंदाज करून त्यांचा राग शांत करण्यासाठीं त्यांच्या मार्गावर ठिकठिकाणीं हजारों गाई, शेतकीचें सामान, गुरें व गुरासी ठेवून ऋषींनीं विचारलें असतां ' हें सर्व वैभव आपल्या मुलाचें असून आह्मी आपले दास आहों, आपली काय आज्ञा आहे, ' असें तुह्मी त्यांना ह्मणा ह्मणून राजानें आपल्या सेवकांना शिकवून ठेविलें होतें. इकडे आश्रमामधून मुलगा नाहींसा झालेला पाहून हें राजाचेंच कृत्य असलें पाहिजे असा संशय येऊन अगदीं संतापून जाऊन ते मुलाचा शोध करीत चंपानगरीकडे निघाले. वाटेंत वर सांगितल्याप्रमाणें लोकांच्या तोंडचे शब्द कानीं पडत जाऊन ठिकठिकाणीं मान मिळत गेल्यामुळें त्यांचा राग शांत झाला व राजाकडे आल्यावर चमकणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें आपली सून त्या ठिकाणीं पाहून तर राजावर प्रसादच करण्याची त्यांना बुद्धि उत्पन्न झाली. सूर्यासारख्या आपल्या मुलाला ' तुला मुलगा झाल्यावर तूं वनाला निघून ये, ' असें सां-

मून तेथें ठेवून राजाचे सर्व मनोरथ पूर्ण करून ते आपल्या आश्रमाला निघून गेले. ऋष्यशृंगही पित्याच्या आज्ञेप्रमाणें पुत्र झाल्यावर स्त्रीसहवर्तमान पित्याच्या आश्रमाला निघून गेले. तेथें रोहिणी ज्याप्रमाणें चंद्राला, अरुंधती वसिष्ठाला, लोपामुद्रा अगस्त्याला, दमयंती नलाला अगर शची इंद्राला त्याप्रमाणें ही आपल्या पतीशीं अनुकूल वागून त्यांच्या सेवेमध्यें तत्पर राहिली. '

७३ रामाची कथा. (३. ११४-१७)

नंतर युधिष्ठिर सागरतीराला पोहोंचल्यावर तेथून गंगेच्या व समुद्राच्या संगमामध्यें स्नान करून कलिंग देशाला गेला. त्या ठिकाणीं वैतरणी नदी व तिच्या तीरचा धर्मानीं देवांना शरण जाऊन यज्ञ केलेला प्रदेश व नित्य ज्या ठिकाणीं ब्राह्मणांचा वास आहे असें तिचें उत्तरतीर हे देश युधिष्ठिराला दाखवून लोमश ह्मणाले, ' स्वर्गेच्छु जनांना हा देवयानासारखा सुलभ मार्ग आहे. पूर्वी अनेक ऋषींनीं ह्या ठिकाणीं पुष्कळ यज्ञ केले आहेत. ह्याच ठिकाणीं रुद्र ' हा माझा भाग आहे, ' ह्मणून यज्ञिय पशूला सबंध घेऊन चालले असतां आपल्या सारख्या धर्मज्ञांनीं परस्वाचा अभिलाष करूं नये म्हणून देवांनीं विनंति केल्यावरून तो पशु टाकून विमानांत बसून ते निघून गेले. त्या वेळेपासून सर्व देव भीतीनें रुद्रासाठीं उत्तम भाग काढून ठेवूं लागले. ' पुढें वैतरणी ओलांडून तेथें पितरांना तर्पण दिल्यावर तींत उपस्पर्शा करून ज्या ठिकाणीं मनुष्यसंचार नाहीं अशा प्रदेशाला ते सर्व जाऊन पोहोंचले; तेव्हां ब्रह्मचर्यव्रतानें तप आचरण करणाऱ्या तपोबल ऋषींचा मोठा शब्द युधिष्ठिराच्या कानीं आला. ' हा शब्द जेथून ऐकूं येत आहे तो प्रदेश येथून तीस हजार योजनें आहे. ' हें स्वयंभूचें दिव्य धनु असून ह्या ठिकाणीं प्रतापी विश्वकर्म्यानें पूर्वी यज्ञ केला होता, व त्या यज्ञांत स्वयंभूनीं पर्वतवनादिकांसह ही पृथ्वी काश्यपांना दिली; आपल्याला ह्याप्रमाणें मर्त्याच्या स्वाधीन केलेंसें पाहून खिन्न होऊन ती रसातळाला चालली असतां काश्यपांनीं तिला संतुष्ट केले. तेव्हां त्यांच्या तपानें प्रसन्न होऊन ती समुद्रांतून वर येऊन वेदीरूपानें प्रकट झाली. ही ही वेदी पुढें दिसत आहे. हिच्यावर चढलास तर तूं वीर्यशाली होशील. मग तूं एकटाच समुद्र तरून जा. तूं जाऊं लागलास ह्मणजे मी तुजसाठीं स्वस्त्ययन ह्मणेन. ' ' ओम्, विश्वरक्षकाला नमस्कार असो. विश्वाच्या पलीकडे असणाऱ्याला नमस्कार असो. हे देवदेवेशा, लवणसागरांत तूं माझें संरक्षण कर. तूंच अग्नि, सूर्य, जल, विष्णूचें वसतिस्थान व अमृताची योनि आहेस, ' असें ह्मणून विलंब न लावतां तूं ह्या वेदीवर चढ. ' अग्नि तुझी योनि असून पृथ्वी तुझें शरीर आहे. विष्णूच्या रेतापासून तुझी उत्पत्ति असून तूं अमृताची योनि आहेस, ' असा जप करीत समुद्रामध्यें प्रवेश कर. असें न ह्मणतां उदकाचा जनक व स्वामी जो समुद्र ह्याला कुशाग्रानें देखील स्पर्श करूं नकोस. ' याप्रमाणें आशीर्वादपूर्वक युधिष्ठिराला सांगितल्यावर युधिष्ठिर समुद्रांतून महेंद्रपर्वताला जाऊन पोहोंचला. त्या ठिकाणीं ऋषींना अभिवादन केल्यावर रामांचा शिष्य जो अकृतव्रण त्याला, ' ह्या ठिकाणीं रामांचें दर्शन केव्हां होतें ' ह्मणून त्यानें विचारलें. ' चतुर्दशीला ह्या ठिकाणीं तापसांना रामांचें दर्शन होतें, ' असें सांगून परशुरामांचा इतिहास अकृतव्रणानें युधिष्ठिराला सांगितला. तो म्हणाला, ' ज्या वेळीं हैहयाधिपति सहस्रार्जुन देव, ऋषी, गंधर्व व मनुष्य ह्यांना चिरडून टाकूं लागला त्यावेळीं देव विष्णूला शरण गेले. तेव्हां ' कार्तवीर्याला मी मारतों, ' असें त्यांना वचन देऊन विष्णु आपल्या रम्य बदर्याश्रमाकडे गेला. ह्याच वेळीं कान्यकुब्ज देशांत गाधि नांवाचा कोणी विख्यात राजा होता. तो वनांत राहण्यासाठीं गेल्यावर त्याला अप्सरेच्या तोडीची एक मुलगी झाली. ऋचीक ऋषींनीं तिच्याबद्दल मागणी घातली. तेव्हां गाधि ह्मणाला, **' आमच्या पूर्वजांनीं कांहीं चाल पाडून ठेविली आहे, ती पाळली पाहिजे.** शामकर्ण, पांढरे व मोठे वेगवान असे हजार घोडे हिचें **कन्याधन आहे.** आपल्यापाशीं हें मागतां येत नाहीं. माझ्या मुलीला आपल्यासारखेंच स्थळ योग्य आहे. ' हें ऐकून ऋचीक ह्मणाले, ' हें कन्याधन देऊन मी तुझ्या मुलीला वरतों. ' असें ह्मणून वरुणाकडे जाऊन वर सांगितल्याप्रमाणें हजार घोडे त्यांनीं वरुणाजवळ मागि-

तले. वरुणानें त्यांना ते दिल्यावर ते गाधीला आणून देऊन त्याच्या मुलीशीं ऋचीकांनीं लग्न लावलें. ज्या ठिकाणाहून ते घोडे वर निघाले तें हें अश्वतीर्थ या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्याप्रमाणें धर्मानें ती कन्या मिळवून ऋचीक तिच्याबरोबर यथेच्छ रममाण झाले. विवाह झाल्यावर एके दिवशीं भृगुऋषी त्यांना भेटावयाला आले. त्यांची पूजा करून तें दंपत्य त्यांच्यापुढें हात जोडून उभें राहिलें. भृगुऋषी संतुष्ट होऊन सुनेला 'वर माग' असें ह्मणाले. आपल्याला व आपल्या आईला मुलगा व्हावा ह्मणून तिनें वर मागितला. तेव्हां भृगु ह्मणाले, 'ऋतुकालीं न्हाऊन पुंसवनकालीं तूं अश्वत्थाला आलिंगन दे व तुझ्या मातेला उदुंबराला आलिंगन देऊं दे. हे दोन **चरु मोठ्या काळजीनें सिद्ध केले** आहेत हे तुह्मी दोघीजणी खा ह्मणजे तुह्मांला कुलभूषण मुलगे होतील.' वृक्षाला आलिंगन देण्यांत व चरु भक्षण करण्यांत त्या दोन स्त्रियांनीं चूक केली. भृगुऋषींना दिव्य चक्षूंनीं तें कळून फिरून सुनेकडे येऊन ते ह्मणाले, 'तुझ्या आईच्या चुकीनें तुह्मीं दोघींनींही वृक्षाला आलिंगन देण्यांत व चरु भक्षण करण्यांत चुका केल्या आहेत. ह्मणून तुला क्षात्रवृत्ति ब्राह्मण मुलगा होईल व ब्राह्मणाचारसंपन्न असा साधु क्षत्रिय मुलगा तुझ्या आईला होईल. त्यावेळीं त्यांना संतुष्ट करून मला असा मुलगा न होतां नातू होऊं या म्हणून तिनें विनंति केली. ऋषी बरें म्हणून अंतर्धान पावले. तिला तेजस्वी व वीर्यवान जमदग्नि झाले. सर्व धनुर्वेद यांना जन्मतःच येऊं लागले. यांनीं प्रसेनजित राजाकडे जाऊन रेणुकेसाठीं मागणी घातली, व त्या राजानें ती त्यांना दिली. त्या अनुकूल बायकोसह भार्गवांनीं तपाचरण केलें. तिला चार मुलगे झाल्यावर पांचवे परशुराम झाले. ते सर्व कोणे एके वेळीं फळें आणण्यासाठीं वनाला गेले असतां रेणुका अंग धुण्यास गेली. त्या ठिकाणीं मृतिकावताचा चित्ररथ राजा स्त्रीसह जलक्रीडा करतांना पाहून तिचें त्यावर मन गेलें. ही पापवासना तिला आवरतां आली नाहीं व जलांत रेतस्खलन होऊन दूषित झालेली ती घाबऱ्या घाबऱ्या आश्रमाकडे परत आली. ह्याप्रमाणें तिचें धैर्य गळालेलें पाहून जमदग्नींनीं धिक्कार करून तिची निर्भर्त्सना केली व आश्रमांत मुलगे परत आल्यावर त्यांपैकीं प्रत्येकाला तिला ठार मारण्यास सांगितलें. सर्वांत धाकट्या परशुरामांखेरीज दुसऱ्या कोणाच्या हातून ती गोष्ट झाली नाहीं. पण परशुरामांनीं मात्र परशु घेऊन तिचा शिरच्छेद केला. बाकीच्या मुलांना तुह्मी पशुपक्ष्यांप्रमाणें व्हाल असा शाप देऊन जमदग्नींनीं त्यांची बुद्धि हरण केली व परशुरामांच्या कृत्यानें संतुष्ट होऊन, 'मुला वर माग,' ह्मणून ते त्यांना ह्मणाले. 'माझी आई जिवंत होऊन मीं तिला मारल्याची तिला आठवण न रहावी, मला ह्या कृत्याबद्दल पाप लागूंनये, माझे भाऊ पूर्ववत व्हावेत, युद्धामध्ये माझ्या तोडीचा कोणी नसावा व मीं दीर्घायु व्हावें,' असा परशुरामांनीं वर मागितला. जमदग्नींनीं ते सर्व वर त्यांना दिले. पुढें कोणे एकेवेळीं अनूपाधिपति कार्तवीर्य आश्रमाला आला. तो ऋषिपत्नीनें केलेला सत्कार तुच्छ करून होमधेनु हंबरडा फोडीत असतां तिचें वांसरूं सोडून घेऊन चालला व आश्रमामध्ये असणारीं मोठमोठीं झाडें त्यानें उपटून टाकलीं. परशुराम आश्रमाला परत आल्यावर पित्यापासून तो सर्व वृत्तांत ऐकून व गाईला हंबरडा फोडतांना पाहून फार रागावले; काळाच्या तावडींत सांपडलेल्या कार्तवीर्यावर ते चालून गेले व कांबीसारखे त्याचे सहस्रबाहू त्यांनीं तीक्ष्ण बाणांनीं कापून काढले. या कृत्याचा सूड घेण्यासाठीं सहस्रार्जुन कार्तवीर्याचे मुलगे राम आश्रमांत नाहींत अशी संधि पाहून जमदग्नींवर चालून गेले व त्यांच्या बरोबर युद्ध करून 'राम, राम' ह्मणून ते दीनस्वर काढीत असतां अनाथाप्रमाणें त्यांना ठार मारून, आले तसे ते परत गेले. ते निघून गेल्यावर राम समिधा घेऊन आश्रमाला परत आले व पित्याची ती स्थिति पाहून फार कष्टी होऊन 'तात, माझ्या अपराधामुळें क्षुद्रांनीं नित्य रीतीनें वनांत ज्याप्रमाणें एखाद्या अनाथ मृगाला मारावें त्याप्रमाणें आपल्याला मारलें! तात, आपण धर्मज्ञ व सन्मार्गानें वर्तणारे असून कोणाचा कधीं अपराध केलेला मला आठवत नाहीं असें असतां आपल्याला अशा प्रकारचें मरण कसें आलें? वृद्धावस्थेंत आपण तपांत मग्न असून

युद्ध करीत नाहीं हें माहीत असतां ज्यांनीं आपल्याला तीक्ष्ण शरांनीं मारलें त्यांनीं आणखी तें पाप कोणतें करावयाला पाहिजे ? अशा प्रकारें आपल्याला मारून सचिव व सुहृद ह्यांना जाऊन निर्लज्जपणानें ते काय सांगतील ? ' ह्याप्रमाणें करुणायुक्त पुष्कळ विलाप केल्यावर पित्याची सर्व प्रेतक्रिया करून त्यांनीं त्यांना अग्नि दिला, व लागलीच सर्व क्षात्रियांना मारण्याची प्रतिज्ञा करून कार्तवीर्याच्या मुलांना त्यांच्या अनुयायांसह त्यांनीं ठार केलें. एक वीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करून **समंतपंचकामध्यें पांच रक्ताचे तलाव निर्माण करून** त्यांनीं भृगूंना तृप्त केलें. नंतर यज्ञानें देवांना तृप्त करून ऋत्विजांना त्यांनीं ही पृथ्वी दिली व सुवर्णवेदी कश्यपांना दिली. तिचे त्यांनीं काश्यपांच्या विचारानें हजारों भाग करून वांटून घेतले ह्मणून खांडवायन या नांवानें ते प्रसिद्ध झाले. ह्याप्रमाणें पृथ्वी काश्यपांला देऊन टाकून ह्या ठिकाणीं महेंद्र पर्वतावर ते रहात आहेत.'

---

७४ प्रभासतीर्थी पांडवांना रामकृष्ण-दर्शन (३. ११८–२०)

सद्वर्तनशील महात्मा युधिष्ठिर भावांसह पुढें चालला असतां वाटेंत ब्राह्मणांच्या वस्तीनें शोभायमान झालेलीं अनेक पुण्य व रम्य तीर्थें त्याच्या पाहण्यांत आलीं. गोदावरीमध्यें स्नान करून ब्राह्मणांना द्रव्य देऊन द्रविड देशांत मोठें पवित्र अगस्त्य तीर्थ आहे तेथें तो गेला. तेथून सर्व नारी तीर्थें पहात पहात चालले असतां धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ जो अर्जुन त्याचें अलौकिक कृत्य त्यांच्या कानीं आलें तें ऐकून त्यांना मोठा संतोष झाला. पुढें शूर्पारकाला जाऊन समुद्रकिनाऱ्यावरील एक प्रदेश ओलांडल्यावर एका वनाला ते येऊन पोहोंचले. त्या ठिकाणीं ऋचीकपुत्रांच्या व दुसऱ्या ऋषींच्या वेदींचें दर्शन घेऊन अनेक तीर्थांमध्यें स्नानें करून जगविख्यात प्रभासतीर्थाला ते येऊन पोहोंचले. त्या ठिकाणीं सकाळ संध्याकाळ तीर्थांत स्नान करीत बारा व पाणी ह्यांवर राहून आपल्या भोंवतालीं अग्नि पेटवून युधिष्ठिरानें बारा दिवस उग्रतप केलें. येथें वृष्णिश्रेष्ठ रामकृष्ण आपले बांधव व सैन्य ह्यांसहवर्तमान पांडवांना भेटावयाला आले व ज्यांना दुःख ह्मणून स्वप्नीं ठाऊक नाहीं अशा पांडवांना अशा प्रसंगांत पाहून त्यांना फार वाईट वाटलें. तेव्हां बळराम कृष्णाला ह्मणाला, ' कृष्णा, ह्या जगांत धर्माचरणापासून सुख व अधर्माचरणापासून दुःख प्राप्त होतें असें निश्चयानें ह्मणतां येत नाहीं. कारण युधिष्ठिर धर्मापासून कधीं यत्किंचित् ढळला नसून त्याला हे क्लेश सोसावे लागत आहेत व दुर्योधनाला धर्म कधीं स्वप्नीं देखील ठाऊक नसून तो मोठ्या वैभवाच्या शिखराला चढून पृथ्वीचें राज्य करीत आहे. ही पृथ्वी दुर्भंगून ती त्याला आपल्या पोटांत कशी घेत नाहीं ? या अनुभवावरून धर्मापेक्षां अधर्मच चांगला असा कोत्या बुद्धीच्या लोकांचा समज होण्याचा संभव आहे. दुर्योधनाचें वैभव व युधिष्ठिराचे क्लेश पाहून कसें वागलें असतां कल्याण होईल ह्यासंबंधानें लोक बुचकळ्यांत पडतील. धर्मानें वागणाऱ्यावर प्रसंगविशेषीं संकट येणें शक्य आहे; पण धर्म ज्यानें झुगारून दिला आहे असा मनुष्य वैभवाला कां चढावा ? पार्थांना वनवासाला पाठविण्यांत भीष्मद्रोणादिकांच्याही मनाला कांहीं किंतु वाटला नाहीं हें मोठें आश्चर्य आहे. कुलवृद्ध असा हा सर्व पृथ्वीचा स्वामी पापी धृतराष्ट्र वर गेल्यावर पितरांना काय सांगेल ? बिचाऱ्या निरपराधी मुलांशीं सरळ वर्तन न ठेवितां त्यांना राज्यांतून घालवून दिलें असेंच सांगेल कीं नाहीं ! पूर्वी कोणतें पाप करून ह्या जन्मीं आंधळा झाला आहे तरी ह्या अनन्वित कृत्यानें पुढील जन्मीं माझी काय दशा होईल हें त्या मूढाच्या मनांत देखील कसें येत नाहीं ! खचित स्मशानभूमीवर दैदीप्यमान सुवर्णवृक्ष त्याच्या दृष्टीस पडून त्याला भुलून त्याच्या हातून हें दुष्ट काम घडत आहे. हे पांडव धार्तराष्ट्रवनाचा उच्छेद करण्याला समर्थ असून केवळ युधिष्ठिरासाठीं त्यांचे सर्व अपराध निमुटपणें सहन करीत आहेत. धार्तराष्ट्रांचा समूळ नाश करण्याला भीमार्जुनांना ह्या वनवासाची फक्त आठण पुरे आहे. वेदीसंभवा ह्या पांचालीला आजपर्यंत कष्ट सोसण्याचें कधीं माहीत नसून ती हा दुःसह

वनवास सोशीत आहे!' हें ऐकून सात्यकि ह्मणाला, 'युधिष्ठिर स्वस्थ बसला आहे तरी आपल्याला उचित वाटतें तें आपण आतां केलें पाहिजे. ह्या जगांत जे दुसऱ्यावर विसंबून असतात ते संकटांत पडले असतां स्वतः कधीं त्या संबंधानें काळजी करीत नाहींत ते ज्यावर विसंबून असतात त्यांनाच त्यांची सर्व काळजी वहावी लागते. ज्यांना बळकट पाठिंबा आहे ते अनाथाप्रमाणें फार दिवस कधीं संकटांत कुचंबत नाहींत. आज मी सर्पविषाप्रमाणें तीक्ष्ण बाण सोडून कौरवांचीं शिरें धडापासून वेगळीं करून टाकतों. प्रलयकालीं महारण्य जाळून टाकणाऱ्या अग्नीप्रमाणें हातांत शस्त्र घेऊन सर्व प्रमुख कौरवयोद्धयांना मी ठार करून सार्वभौम कुलांतील मंडळींना आनंद देतों. भीष्म, द्रोण, विकर्ण, कर्ण, इत्यादि महान महान योद्धे देखील प्रद्युम्नाच्या तीक्ष्ण बाणापुढें लटपटून जातील. अर्जुनपुत्राचें वीर्यही कमी नाहीं. तो रणामध्यें प्रद्युम्नालाही कांकणभर जास्त आहे. अतुलपराक्रमी रणशूर सांबाला तर रणामध्यें कांहींच दुर्घट नाहीं. आयुर्मर्यादा संपलेला मनुष्य ज्याप्रमाणें काळाच्या तावडींतून जिवंत सुटत नाहीं त्याप्रमाणें युद्धामध्यें याच्या तावडींत आलेल्या कोणाही मनुष्याला जिवंत सुटण्याची आशा नको ह्मणून आपण येथें जमलेले वृष्णी, भोज व अंधक कुलांतील मिळून धृतराष्ट्राच्या मुलांना मारून जगामध्यें निर्मलयशाचा झेंडा उभारूं. मग कौरवकर्णरूपी कांटा उपटून टाकलेल्या ह्या पृथ्वीचा धर्मराजाला खुशाल उपभोग घेत राहूं दे. हेंच आह्मांला यशस्कर कर्तव्य दिसतें.' श्रीकृष्ण ह्मणाला, 'तुह्मी ह्मणतां हें खरें आहे व मला तुमचें ह्मणणें मान्य आहे; पण हा कुरुश्रेष्ठ युधिष्ठिर स्वतःच्या बाहुबलानें जिंकली नाहीं अशा भूमीचा उपभोग घेऊं इच्छीत नाहीं. कामानें, लोभानें, किंवा भयानें स्वधर्म सोडण्याला तो कधीं तयार होणार नाहीं. ज्यांच्या तोडीचे ह्या जगांत पराक्रमी कोणी नाहींत असे हे भाऊ त्याला साह्याला असतां सर्व पृथ्वीचें राज्य मिळविणें त्याला दुर्घट आहे कीं काय? वेळ येईल तेव्हां पांचालपति, चेदीपति व आह्मी सर्व रणामध्यें आपापलें शौर्य दाखवून शत्रूंना मारूंच मारूं.' हें ऐकून युधिष्ठिर ह्मणाला, 'सात्यके, तूं ह्मणतोस ही गोष्ट घडून येणें अशक्य नाहीं; परंतु **राज्यापेक्षां सत्याचें** मला विशेष काळजीपूर्वक जतन केलें पाहिजे. शौर्य दाखविण्याची वेळ आली असतां तूं ह्मणतोस या सर्व गोष्टी घडून येतील. माझ्या सुदैवानें आज सर्व जगाच्या नाथाचें मला दर्शन झालें आहे.' असें ह्मणून त्यांना निरोप देऊन तीर्थें पहात युधिष्ठिर पुढें चालला व पयोष्णीवर येऊन त्या पवित्र नदीच्या तीरावर कांहीं दिवस सुखानें राहिला.

७५ सुकन्येची कथा. (३. १२१–२५)

पयोष्णी नदीच्या तीरीं कांहीं दिवस सुखानें राहिल्यावर नर्मदेच्या कांठीं वैदूर्य पर्वत आहे, तेथें ते येऊन पोहोंचले. त्या ठिकाणीं लोमशांनीं युधिष्ठिराला शर्यातीच्या यज्ञाची पुढील हकीकत सांगितली. ते ह्मणाले, 'महातेजस्वी भृगुपुत्र स्थाणूप्रमाणें अचल राहून वीरासन घालून वैदूर्य सरोवराच्या तीरीं उग्र तप करीत होते. एकाच ठिकाणीं फार काल बसून राहिल्यानें त्यांच्या अंगावर वारूळ वाढून त्यावर वेली उगवल्या. कोणे एके समयीं शर्याती नांवाचा राजा त्या रम्य सरोवरावर आपल्या स्त्रियांसह क्रीडा करण्यासाठीं आला. त्याला पुष्कळ बायका असून त्या सर्वांमध्यें एकीलाच सुकन्या नांवाची एक मुलगी होती. उत्तम वस्त्रालंकार केलेली ती मुलगी फिरत फिरत भार्गवांच्या वारुळाजवळ आली; व रूप, यौवन व मदन यानें धुंद झाली असल्यामुळें तेथील झाडांच्या फुलांनीं भरलेल्या फांद्या ती मोडून खालीं टाकीत होती. तिला एकटीला सुंदर वस्त्रालंकारांनीं भूषित त्या निर्जन प्रदेशीं पाहून त्या ऋषींचें तिच्यावर मन गेलें, व खोल स्वरानें ते, कांहीं बोलले तें तिला ऐकूं आलें नाहीं. इतक्यांत त्या वारुळामधून त्या ऋषींचे डोळे दिसत होते ते पाहून बेडेपणामुळें ह्मणा अगर उगीच मजेनें ह्मणा त्यांत तिनें काटूक भोसकलें. त्यामुळें रागावून त्या मुनींनीं शर्यातीचे सैन्यांत मलमूत्रच करून टाकलें. असें होण्याचें कारण हुडकून काढण्यासाठीं राजानें पुष्कळ चौकशी केली. त्यावेळीं बापावर येऊन गुदरलेलें तें संकट व त्याला झालेलें तें दुःख पाहून सुकन्येनें घडलेली

सर्व खरी हकीकत त्याला कळविली. ती ऐकून राजा एकदम त्या बारुळाकडे गेला, व 'पोरस्वभावामुळें न कळतां ही गोष्ट माझ्या मुलीच्या हातून घडून आली, त्याची आपण क्षमा केली पाहिजे,' अशी त्यानें त्या ऋषींची प्रार्थना केली. ती ऐकून ऋषी ह्मणाले, 'ती मुलगी तूं मला देशील तर मी क्षमा करीन.' हें ऋषींचें भाषण ऐकून राजानें कांहीं विचार न करतां आपली मुलगी त्यांना दिली, व त्यांचा प्रसाद झाल्यावर सैन्यासहवर्तमान सुखानें तो आपल्या नगरीला परत गेला. इकडे सुकन्येनें तपस्वी पति मिळाल्यामुळें नेहमीं प्रीतीनें त्याची सेवा करीत अग्नि व अतिथी यांच्या सेवेमध्यें दक्ष राहून लवकरच पतीला प्रसन्न करून घेतलें.

पुढें कांहीं कालानें अश्विनीकुमार त्या नदींत स्नान करीत असतां मी मुलगीही तेथें स्नान करीत होती. तिला पाहून तिच्याकडे जाऊन त्यांनीं तिला 'तूं कोणाची कोण, या वनामध्यें काय करतेस,' म्हणून विचारलें. ती शर्यातीची मुलगी, व च्यवनांची बायको आहे असें कळल्यावर ते तिला म्हणाले, 'मरणोन्मुख झालेल्या ह्या जरठाला तुझ्या पित्यानें तुला कशी दिली? ह्या वनामध्यें तूं विद्युल्लतेप्रमाणें चमकत आहेस. देवस्त्रियांमध्यें देखील तुझ्या तोडीची रूपवती स्त्री सांपडणें कठीण. आपल्या अलंकारांनीं व उत्तम वस्त्रांनीं तूं ह्या वनाला विशेष शोभा देत आहेस. अशी असून तुझें पालनपोषण करण्याला असमर्थ अशा ह्या वृद्ध पतीला तूं कां भजतेस? ह्याला सोडून आमच्यापैकीं एकाला वर.' हें त्यांचें भाषण ऐकून, 'माझे माझ्या पतीवर पूर्ण प्रेम आहे, तुम्ही माझ्यासंबंधानें असा दुष्ट विचार मनांत आणूं नका,' असें तिनें उत्तर दिलें. तें ऐकून 'तुझ्या पतीला आम्ही तरुण व रूपसंपन्न करतों मग तो व आम्ही यांपैकीं वाटेल तो तूं पसंत कर.' असें तिला सांगून च्यवनासहवर्तमान ते त्या सरोवरामध्यें शिरले व एका क्षणांत दिव्य रूपधारी तरुण, समानवेषधारी व मनाला प्रीति उत्पन्न करणारे असे ते तिघे त्या सरोवरांतून बाहेर पडले. नंतर 'आमच्यापैकीं एकाला वर,' असें त्यांचें भाषण ऐकून व त्या सर्वांना सारखे पाहून मनानें व बुद्धीनें निश्चय करून तिनें आपला खऱ्या पतीलाच वरलें. आपली बायको आपल्याला मिळून शिवाय अपेक्षित यौवन व रूप मिळाल्यामुळें संतुष्ट होऊन इंद्राबरोबर मी तुह्मांस सोम देईन असें त्या ऋषींनीं त्यांना अभिवचन दिलें. इकडे शर्यातीला च्यवन वयोरूपसंपन्न झाल्याची बातमी कळून तो सैन्यासहवर्तमान भार्गवऋषींच्या आश्रमाला आला. च्यवनऋषी त्याला संतुष्ट करून ह्मणाले, 'मी तुझ्यासाठीं यज्ञ करतों. सर्व तयारी कर. नंतर शर्यातीकडून करविलेल्या यज्ञामध्यें च्यवनांनीं अश्विनीकुमारांना देण्याकरितां सोम काढला तेव्हां 'ह्यांना यज्ञामध्यें अंश नाहीं,' असें ह्मणून इंद्रानें त्याला अडथळा आणला. परंतु उपकार फेडण्यासाठीं त्याला न जुमानतां च्यवनांनीं त्यांना सोम दिला. तेव्हां इंद्र घोर वज्रानें त्यांना मारण्याला निघाला. च्यवनांनीं त्याचा हात जागच्या जागीं थांबवून मंत्रानें अग्नीला आहुती देऊन इंद्राला ते मारण्याला निघाले. त्या अग्नीपासून मोठा अकाळविकाळ व बलवान मद नांवाचा असुर बाहेर पडला. त्याचे दांत सुळ्यासारखे असून तोंड विकाळ होतें. त्याची एक हनुवटी जमिनीला लागली असून दुसरी आकाशाला जाऊन भिडली होती. त्याच्या चार दाढा शंभर योजनें लांब असून बाकीचे दांत दहा योजनें लांब होते. त्याचे बाहू पर्वताप्रमाणें व नेत्र चंद्रसूर्यांप्रमाणें होते. त्याचें तोंड प्रळयकाळच्या अग्नीप्रमाणें दिसत होतें. तो विजेप्रमाणें आपल्या चंचल जिभेनें जिभळ्या चाटीत जबडा पसरून डोळे वटारून पृथ्वीस गिळून टाकतो आहे कीं काय अशा रीतीनें मोठा शब्द करून इंद्राकडे धांवला. त्याला येतांना पाहून इंद्र घाबरून गेला व 'आजपासून अश्विनीकुमारांना यज्ञांत सोमाचा भाग आहे, माझ्यावर आपण दया करा,' ह्मणून त्यानें च्यवनांची माफी मागितली. त्याच्या योगानें च्यवनांचा राग शांत झाला. **त्यांनीं मदाला दारू, बायका, फांसे व मृगया यांमध्यें राहण्यास सांगितलें.** ह्याप्रमाणें आपलें सामर्थ्य सर्व जगाला दाखवून च्यवन सुकन्येसहवर्तमान त्या वनांत सुखानें राहिले.'

ही कथा ऐकल्यावर पांडव पुढें सैंधवारण्याला गेले, व त्या ठिकाणीं अनेक लहान लहान नद्यांचें

दर्शन घेऊन तेथून नेहमीं ज्या ठिकाणीं झरे वहात आहेत व जो सदा फलपुष्पांनीं संपन्न आहे अशा अर्चिक पर्वताला गेले. ह्याच अर्चिक पर्वताबर शंतनु, शुनक व नरनारायण ह्यांना सनातन पद मिळालें व मोठा धनुर्धारी मांधाता व साहदेवि व सोमक ह्यांनीं यज्ञ केले.

७६ मांधात्याची कथा. (३. १२६)

युवनाश्वपुत्र मांधाता व सोमक यांची कथा लोमशांनीं येथें युधिष्ठिराला सांगितली. ते ह्मणाले, 'इश्वाकुकुलामध्यें युवनाश्व नांवाचा कोणी राजा होता.त्यानें अनेक मोठमोठे यज्ञ करून त्यांत ब्राह्मणांना पुष्कळ दक्षिणा दिली तरी त्याला मूल झालें नाहीं. ह्मणून सचिवांवर सर्व राज्यकारभार सोंपवून वनाला जाऊन तेथें तो वतस्थ फिरूं लागला. तेव्हां क्षुत्तृषेनें व्याकूळ होऊन रात्रीचे वेळीं तो भृगुऋषींच्या आश्रमांत शिरला. त्याच रात्रीं त्या ऋषींनीं त्यालाच मुलगा व्हावा ह्मणून इष्टि केली होती व अभिमंत्रण करून त्या ठिकाणीं पाण्यानें भरलेली एक कळशी ठेवली होती. तें पाणी प्याल्यानें त्या राजाच्या बायकोला इंद्रासारखा मुलगा व्हावा अमें त्याचें सामर्थ्य होतें. ती कळशी वेदीमध्यें ठेवून सर्व ऋषी निद्रिस्त झाले होते; अशा वेळीं तान्हेनें घसा कोरडा पडून, पाणी मिळेल ह्या आशेनें आश्रमांत शिरून त्यानें पाणी मागितलें. घसा कोरडा पडला असल्यामुळें त्याचा शब्द कोणाला ऐकूं गेला नाहीं. इतक्यांत पाण्यानें भरलेली ती कळशी त्याच्या दृष्टीस पडली. झटकन् त्याकडे धांवून जाऊन तें गार पाणी पिऊन तो समाधान पावला. तपोधनऋषी जागे झाल्यावर त्या कळशींतलें पाणी नाहींसें झालेलें पाहून ह्यांतील पाणी कोण प्यालें ह्मणून त्यांनीं चौकशी केली. मी प्यालों ह्मणून युवनाश्वानें खरें सांगितलें. तें ऐकून भार्गव ह्मणाले, 'तूं हें चांगलें केलें नाहींस. तुलाच मुलगा व्हावा ह्मणून उग्रतप करून मीं यांत पाणी मंत्रानें पवित्र करून ठेविलें होतें. ज्यानें इंद्राला देखील जिंकणारा असा मुलगा होईल अशा विधीनें मीं हें. तयार केलें होतें. असो, झाली गोष्ट परत येत नाहीं.तूं या ठिकाणीं तान्हेला येऊन हें विधिपूर्वक अभिमंत्रण केलेलें पाणी प्यावेंस हें मी खचित दैवघटीतच समजतों. **तुला वर सांगितल्याप्रमाणें इंद्राच्या तोडीचा मुलगा होईल** व आह्मी तुझ्यासाठीं अशा प्रकारची इष्टि करतों कीं, त्याच्या योगानें **गर्भधारणेच्या क्लेशाशिवाय** तुला असा मुलगा व्हावा.' नंतर शंभर वर्षें लोटल्यावर त्या राजाची डावी मांडी फाडून सूर्याप्रमाणें तेजस्वी मुलगा बाहेर पडला. व युवनाश्वही त्यायोगानें मेला नाहीं, हा अद्भुत चमत्कार पाहण्यासाठीं त्या ठिकाणीं इंद्र व देव आले असतां हा कशावर राहील ह्मणून देवांनीं इंद्राला विचारलें. त्यावेळीं इंद्रानें आपला अंगठा त्याच्या तोंडांत देऊन मला हा पिईल असें उत्तर दिलें ह्मणून देवांनीं त्याचें मांधाता असें नांव ठेविलें. तो मुलगा इंद्रानें दिलेला अंगठा चोखून मोठा तेजस्वी होऊन एकदम तेरा हात वाढला. सर्व वेद, धनुर्वेद व दिव्यास्त्रें स्मरण केल्याबरोबर त्याला येऊं लागलीं. आजगव नामक धनुष्य व शिंगाचे बनलेलें कठीण शर व अभेद्य कवच हीं स्वयंसिद्ध त्याला प्राप्त झालीं. इंद्रानें स्वतः त्याला अभिषेक केल्यामुळें विष्णूसारख्या पराक्रमशाली या राजानें धर्मानें तिन्ही लोक जिंकले व त्याला प्रतिकार करणारा कोणी उरला नाहीं. सर्व रत्नें आपण होऊनच त्याच्या सेवेला हजर राहिलीं, त्यानें पुष्कळ दक्षिणा देऊन अनेक यज्ञ करून यज्ञस्तंभ उभारले व अनेक धर्मकृत्यें करून इंद्राचें अर्धासन मिळविलें. या धर्मिष्ठ राजाच्या केवळ आज्ञेनें सर्व रत्नसंपन्न पृथ्वी एका दिवसांत त्याच्या स्वाधीन झाली. त्यानें केलेल्या यज्ञाच्या यज्ञस्तंभांनीं चतुरंत पृथ्वी भरून गेली होती. त्याच्या राज्यांत बारा वर्षांचा दुष्काळ पडला असतां धान्यवृद्धीसाठीं स्वतः त्यानें पाऊस पाडला. सोमकुलामध्यें उत्पन्न झालेला गांधार व दुसरे अनेक राजे यांना चिरडून चतुर्विध प्रजा त्यानें दुःखांतून सोडविली. त्यानें आपल्या तपप्रभावानें सर्व लोकांना घाबरून सोडलें.

७७ सोमकाची कथा. (३. १२७–२८)

सोमक नांवाचा कोणी धार्मिक राजा होता. त्याला शंभर बायका असूनही त्यांमध्यें एकही मुलगा नव्हता. अनेक कालाच्या प्रयत्नांतीं त्या शंभर

स्त्रियांमध्यें जतु नांवाचा एक मुलगा झाला. त्या सर्व स्त्रिया सुखोपभोगाची परवा न करतां त्या मुलाकडे दृष्टि लावून होत्या. एके वेळीं असें घडून आलें कीं, एक मुंगी जतूच्या कुल्याला चावली त्यानें तो ओरडला. तें ऐकून सर्व स्त्रिया त्याच्या भोंवतीं गोळा होऊन रडूं लागल्या. तें पाहून एक पुत्र असल्यामुळें नेहमीं चिंतेंत रहाण्यापेक्षां मुळींच मुलगा नसणें हें त्या राजाला बरें वाटलें व आपल्या स्त्रियांचे व आपले सर्व प्राण त्या एकुलत्या एका मुलाकडे लागलेले पाहून शंभर मुलगे होण्यासाठीं यज्ञ करण्यास त्यानें ऋत्विजास सांगितलें. ऋत्विज ह्मणाला, 'मी करणाऱ्या यज्ञामध्यें तूं जर जतूची आहुती देशील तर तुला शंभर श्रीमान मुलगे होतील. त्याची चरबी जळत असतांना त्यापासून निघणारा धूर घेऊन त्याच्या आयांना मुलगे होतील आणि जतुही फिरून आपल्या पूर्वीच्या आईच्या पोटीं जन्माला येईल आणि त्याच्या पाठीवर वरच्या बाजूला सुवर्णचिन्ह राहील.' राजा ह्याला कबूल झाल्यावर ऋत्विजानें यज्ञ सुरू करून जतूची आहुति देऊं लागला. शोकानें फार व्याकूल होऊन त्या स्त्रिया त्या मुलाला दयेनें आलीकडे ओढूं लागल्या. मृगीप्रमाणें ओरडणाऱ्या त्या स्त्रियांकडे लक्ष न देतां त्यांच्या हातांतून त्याला ओढून घेऊन ऋत्विजांनीं त्याला अग्नीमध्यें टाकलें. नंतर त्या स्त्रियांनीं तो धूर घेतल्यावर त्यांना शंभर मुलगे झाले. नंतर कालानें सोमकाचा ऋत्विज परलोकवासी झाला, व सोमकही पुढें लवकरच मेला. तेव्हां आपला ऋत्विज घोर नरकांत अग्नीमध्यें कुचंबत पडलेला पाहून आपल्यासाठीं यज्ञ करून त्याला हें प्रायश्चित्त भोगावें लागत आहेसें पाहून तो यमधर्माला म्हणाला, 'मी ह्यांचें दुःख भोगतों व ह्यांना आपण मुक्त करा. माझ्यासाठीं ह्या महात्म्यांना नरककुंडांत होरपळावें लागत आहे.' यमधर्मानें उत्तर केलें. '**एकाच्या कर्मांचें फळ दुसऱ्याला कधीं मिळावयाचें नाहीं. तुझ्या कर्मांचीं फळें हीं तुझ्या पुढें आहेत.** त्यांचा तूं उपभोग घे.' असें म्हणून उत्तम लोक त्यानें राजाला दाखविले. 'ह्या ब्राह्मणश्रेष्ठाला सोडून मी ह्या लोकांचा उपभोग घेऊं इच्छीत नाहीं. ह्यांच्या बरोबर देवलोक अगर नरक कांहीं मिळालें तरी तें मला मान्य आहे. ह्या पुण्यापुण्याचें फळ आह्मां उभयतांना सारखेंच मिळालें पाहिजे.' असें राजाचें निश्चयात्मक भाषण ऐकून 'असें असेल तर ह्याच्या इतके दिवस नरकांत काढ, ह्मणजे तुह्मां उभयतांना सद्गति मिळेल,' असें यमधर्म म्हणाला. तेव्हां राजानें त्याबरोबर नरकवास काढला व पुढें त्या ऋत्विजासहवर्तमान उत्तमलोकांचा उपभोग घेता झाला.

---

७८ उशीनराची कथा.
(३. १२९–१३१)

ज्या ठिकाणीं पूर्वी प्रजापतींनीं सहस्रवार्षिक इष्टिरूप नांवाचा यज्ञ केला होता व ज्या ठिकाणीं नाभागपुत्र अंबरीषानीं यमुनेच्या कांठीं यज्ञ करून दहा पद्मे सदस्यांना दक्षिणा दिली होती त्या ह्या सोमकाश्रमांत सहा रात्री काढून पांडव इंद्राबरोबर स्पर्धा करणारा नहुष त्याचा मुलगा जो ययाती याच्या यज्ञभूमीला गेले. पुढें ज्याला एकच पान होतें असें शमीचें झाड, रामसरोवरें व नारायणाश्रम पाहून रौप्यनदीच्या कांठीं योगसाधन करून योगसामर्थ्यानें पृथ्वीवर संचार करणाऱ्या ऋचीकपुत्राच्या मार्गाचें त्यांनीं दर्शन घेतलें. येथें लोमश ह्मणाले. 'वंशपरंपरागत आख्यानाचा श्लोक ह्मणत ह्या ठिकाणीं असतांना उखळासारखे दाढीने घातलेल्या पिशाचीचें (एका ब्राह्मणस्त्रीबरोबर) मीं पुढील भाषण ऐकलें, 'युगंधरामध्यें दधि प्राशन करून अच्युतलयामध्यें राहून व भूतलयामध्यें स्नान करून तूं सपुत्र या ठिकाणीं राहण्याला योग्य होशील. त्याचप्रमाणें ह्या स्थलीं एक रात्र राहून दुसऱ्या दिवशीं जर येथें राहशील तर दिवसां वस्त्रपात्रादि हरण होऊन रात्रीं तर त्याहून चमत्कारिक गोष्ट घडून येईल.' ह्या तीर्थीं एक रात्र राहून पुढें ते कुरुक्षेत्र व स्वर्ग यांचें द्वार जें यमुनेच्या कांठीं असलेलें प्लक्षावत नामक तीर्थ त्याला गेले. ह्याच ठिकाणीं भरतानें अश्वमेध यज्ञ केला. ह्या ठिकाणीं स्नान केल्यावर त्याच्या प्रभावानें युधिष्ठिराला सर्व लोक दिसूं लागून श्वेतवाहन अर्जु-

नहीं दिसूं लागला. नंतर पुण्यवान लोकांची आधारभूत जी सरस्वती तिला ते येऊन पोहोंचले. त्यांत त्यांनीं स्नान केलें. ह्याच नदीच्या कांठीं ऋषींनीं सारस्वत यज्ञ केला होता व हिच्याच भोंवतालीं पांच योजनें प्रजापतीची वेदी आहे. **ह्या ठिकाणीं देह ठेवला असतां मनुष्यांना स्वर्गप्राप्ति होते.** पुढें ते सरस्वतीचे निषादराष्ट्रांत शिरतांबेळचें द्वार जें **विनशन** नांवाचें तीर्थ त्याला ते आले. ह्या ठिकाणीं ही नदी निषादांच्या दोषांमुळें भूमींत शिरून पुढें निषादराष्ट्रापलीकडे **उद्भेद** नांवाच्या तीर्थीं फिरून प्रकट झाली आहे. पुढें ज्या ठिकाणीं लोपामुद्रेनें अगस्त्यांना वरलें तें सिंधूच्या कांठचें मोठें तीर्थ त्याचप्रमाणें पापनाशन व इंद्राचें आवडतें तीर्थ प्रभास, विष्णुपद व सर्वांना पावन करणारी विपाशा नदी ह्यांचें दर्शन घेऊन ते पुढें चालले. ह्याच विपाशेमध्यें पुत्रशोकानें पीडलेल्या वसिष्ठांनीं आपल्याला बांधून घेऊन बुडविलें असतां त्यांचे सर्व पाश मोकळे होऊन ते पूर्ववत् बाहेर पडले. नंतर महान महान ऋषींचें राहण्याचें स्थान काश्मीरमंडल व मानसवर्ष ह्यांना ते गेले. व या पर्वतावर श्रीमान रामांनीं पाडलेल्या द्वाराचें दर्शन घेऊन पुढें त्यांनींच वसविलेल्या प्रसिद्ध वार्तिकषंड प्रदेशाला ते गेले. ह्याठिकाणीं कामरूपी शंकरांचें उमेसहवर्तमान व त्यांच्या गणांसहवर्तमान कलियुगामध्यें दर्शन होतें. ह्या ठिकाणीं असलेल्या सरोवरावर चैत्र महिन्यांत याजक शंकरांप्रीत्यर्थ यज्ञ करतात. पुढें ते उज्जानक देशाला गेले. याच ठिकाणीं अग्नीला व अरुंधतीसह भगवान वसिष्ठांना शांति मिळाली. पुढें भृगुतुंग, पापनाशिनी इत्यादि तीर्थ पहात पहात उशीनरतीर्थाला येऊन पोहोंचले असतां लोमशांनीं युधिष्ठिराला उशीनराची कथा सांगितली. ते ह्मणालेः-

'उशीनर नांवाचा कोणी राजा होऊन गेला. त्यानें अनेक यज्ञ करून इंद्रालाही मागें टाकलें. इंद्र व अग्नि या राजाची परीक्षा पाहण्यासाठीं गृध्र व कपोत या रूपानें त्याकडे येऊन शरणार्थी कपोत गृध्राच्या भीतीनें राजाच्या मांडींत घुसला. तेव्हां तो गृध्र राजाला ह्मणाला, 'हे राजा, तूं धर्मात्मा ह्मणवीत असून हें धर्मविरुद्ध कृत्य करण्याला कसा प्रवृत्त झालास? मी भुकेनें व्याकूळ झालों आहें व देवानेंच ह्याला माझें भक्ष्य निर्मिलें आहे. असें असून धर्माच्या नांवाखालीं तूं ह्याचें रक्षण करण्यास कसा तयार होतोस?' राजानें उत्तर दिलें, 'तुझ्या भीतीनें घाबरून जाऊन तो प्राण वांचविण्यासाठीं मजकडे आला आहे. तर ह्या प्राणेच्छुला अशा स्थितींत तुझ्या स्वाधीन मी कसें करूं. अशा प्रसंगीं ह्याला टाकणें निंद्य आहे. ब्रह्महा, गोघ्न व शरणांगताला टाकणारा ह्या तिघांचें पातक सारखें आहे.' गृध्र ह्मणाला, 'सर्व प्राणिमात्र आहाराच्या योगानें उत्पन्न होऊन वाढतात. अगदीं प्रिय वस्तु टाकूनही बराच काल जगतां येईल परंतु अन्नाशिवाय फार दिवस जिवंत राहतां येणार नाहीं. माझें भक्ष्य माझ्यापासून हिरावून घेतल्यानें माझा प्राण ह्या देहाला सोडून जाईल. मी मेल्यावर माझीं बायकामुलेंही खचित मरतील. एकट्या कपोताचें रक्षण करण्यासाठीं तूं इतक्या प्राण्यांना वाऱ्यावर सोडीत आहेस. **धर्माच्या आड येणाऱ्या धर्माला धर्म कसें ह्मणावें.** त्याला अधर्म हेंच नांव शोभतें. विरोधहीन असेल अशा धर्माला च धर्म हें नांव शोभतें. आतां परस्परविरोधी धर्मांमध्यें सारासार विचार करून ज्यांत कमी दोष आहेत तोच धर्म स्वीकारणें चांगलें.' राजानें उत्तर दिलें, 'हे विहगोत्तमा, तुझें हें भाषण धर्मयुक्त असून त्यांत तुझें वाक्चातुर्य व सर्वज्ञता दिसून येत. परंतु तूं सांगितलेल्या ह्या धर्मासंबंधानें मात्र मला संशय वाटत आहे. आश्रयासाठीं आलेल्याला सोडून देणें ह्याला तूं श्रेष्ठधर्म कसा ह्मणतोस? आतां हा सर्व तुझा वाग्जाल भक्ष्य मिळविण्यासाठीं आहे. तर तुला पाहिजे त्याहून अधिक भक्ष्य देऊन तुझी इच्छा मी पूर्ण करतों.' गृध्र ह्मणाला, 'मला दुसरें भक्ष्य नको. माझें हें दैवनिर्मित भक्ष्य माझ्या स्वाधीन कर. केळीचें सामर्थ्य न ओळखतां कोण शहाणा त्याचा आश्रय घेईल?' हें ऐकून राजानें उत्तर दिलें, 'ह्या शरणार्थी कपोताला टाकण्याशिवाय वाटेल ती तुझी दुसरी इच्छा पूर्ण करण्याला मी तयार आहें.' हें राजाचें भाषण ऐकून गृध्र ह्मणाला, 'कपोतावर जर तूं इतका आसक्त झाला असशील तर त्याच्या वजनाइतकें आपलें मांस म-

ला काढून दे ह्मणजे झालें.' हें त्याचें भाषण ऐकून राजा स्वतःचें मांस स्वतः काढून वजन करूं लागला. कितीही मांस ताजव्यांत टाकलें तरी कपोताच्या इतकें जेव्हां तें भरेना तेव्हां राजा स्वतःच आंत बसला. हें पाहून इंद्र व अग्नि संतुष्ट झाले; व त्याला प्रत्यक्ष दर्शन देऊन ही तुझी कीर्ति सर्व लोकांना दिपवून टाकील असा वर देऊन स्वर्गाला निघून गेले. उशीनरही दैदिप्यमानदेहानें स्वर्गाला गेला.'

---

७९ अष्टावक्रांची कथा.

(३. १३२-३४)

ऋषीगणासहवर्तमान पांडव श्वेतकेतूच्या आश्रमाला आले असतां त्या ठिकाणीं 'अष्टावक्रांचा वृत्तांत विस्तारानें सांगा,' ह्मणून युधिष्ठिरानें प्रार्थना केल्यावरून लोमशांनीं ती कथा सांगितली. ते ह्मणाले, 'उद्दालक ऋषींचे कहोडनामक लोकविख्यात कोणी शिष्य होते. त्यांची विद्या पूर्ण झाली असतां गुरुशुश्रूषेत ते राहिलेले पाहून उद्दालकऋषींनीं त्यांना आपली मुलगी दिली. त्यापासून तिला अग्नीसारखा तेजस्वी गर्भ राहिला. पित्याला सर्व रात्रभर अध्ययन करीत असतांना पाहून 'आपली वाणी स्पष्ट निघत नाहीं,' ह्मणून ते शिष्यवर्गामध्यें असतांना तो त्यांना गर्भातूनच ह्मणाला. तो अपमान सहन न होऊन रागानें पोटातूनच ज्याअर्थी तूं ह्याप्रमाणें मला तुच्छ करीत आहेस त्याअर्थी तूं अष्टावक्र होशील ह्मणून त्यांनीं त्याला शाप दिला. इकडे पोटामध्यें तो गर्भ जसजसा वाढत चालला तसतशी त्या ऋषिपत्नीला दिवसानुदिवस अधिक काळजी पडत चालली. कांणे एके समयीं एकांतामध्यें ती पतीला ह्मणाली, 'महर्षे, मला दहावा महिना लागला आहे. जवळ कांहीं पैसा नसल्यानें आतां पुढें कसें होणार?' तें स्त्रीचें भाषण ऐकून कहोड पैशासाठीं जनकराजाकडे गेले. त्याठिकाणीं बंदीनें त्यांना वादांत जिंकून पाण्यांत बुडबून टाकलें. ते ऐकून अष्टावक्राला 'ही गोष्ट कळवूं नकोस,' ह्मणून आपल्या मुलीला सांगून उद्दालकांनीं तिचें व तिच्या मुलाचें बापाप्रमाणें पालनपोषण केलें. अष्टावक्रही त्यांना बापच समजून आपल्या समवयस्क त्यांच्या श्वेतकेतु नांवाच्या मुलाला भावाप्रमाणें समजत. ह्याप्रमाणें बारा वर्षें लोटलीं. कोणे एकेसमयीं अष्टावक्र आपल्या आजोबाच्या मांडीवर बसले असतां त्यांना श्वेतकेतूनें 'ही तुझ्या बापाची मांडी नाहीं,' असें ह्मणून धरून ओढलें. पुढें अष्टावक्रांनीं जाऊन आईला खरी हकीकत विचारली. तेव्हां शापभयानें तिनें आपल्या पतीच्या मरणाची खरी हकीकत त्यांना सांगितली. पुढें जनकाच्या सत्राला जाऊन बंदीला त्याठिकाणीं वादामध्यें जिंकण्याच्या निश्चयानें अष्टावक्र निघाले. श्वेतकेतुसहवर्तमान ते जात असतां वाटेंत पायरस्त्यावर जनकाची गांठ पडून त्यानें त्यांना वाट सोडण्यास सांगितलें. तेव्हां अष्टावक्र ह्मणाले, '**ब्राह्मण रस्त्यावर नसेल त्यावेळीं आंधळे, बहिरे, स्त्रिया, ओझीं वाहणारे व राजा यांचा तो होय. परंतु ब्राह्मण त्यावर असेल तेव्हां सर्वांनीं त्याला वाट दिली पाहिजे.** हें ऐकून राजानें वाट सोडल्यावर ते राजद्वारीं आले. त्या ठिकाणीं अल्पवयस्कांना प्रवेश नसून फक्त वयासंपन्न वृद्धांचाच तेथें प्रवेश असल्यानें द्वारपालानें त्यांना अटकाविलें. तेव्हां अष्टावक्र ह्मणाले, 'वृद्धांना आंत प्रवेश आहे असें ह्मणतांस तर आह्मांला त्या न्यायानें प्रवेश मिळालाच पाहिजे. मीं वृद्ध, व्रतशील व वेदप्रभावानें सामर्थ्यवान असून गुरुशुश्रूषा केली आहे व त्यांपासून पूर्णज्ञान संपादन केलें आहे. केवळ वयानें लहान ह्मणून मला अटकावणें बाजवी होणार नाहीं. अग्नीची ठिणगीही स्पर्श करणाराला पोळल्याशिवाय सोडीत नाहीं.' हें ऐकून द्वारपाळ म्हणाला, 'वेदांना पूज्य, एकाक्षरयुक्त, बहुरूपसंपन्न व रजोगुणहीन असें ब्रह्मस्वरूपी ज्ञान मला सांग. स्वतःकडे पहा तरी? वयाकडे न पहातां विनाकारण वल्गना कशाला चालविली आहेस. विद्वान फार दुर्लभ आहेत.' अष्टावक्रांनीं उत्तर दिलें, शाल्मलीवृक्षाच्या वाढलेल्या गांठीप्रमाणें केवळ देहाच्या वाढीनेंच वृद्धपणा येत नाहीं. ठेंगणा असून आकार लहान असला तरी ज्ञानवान असला ह्मणजे त्याला वृद्धत्व येतें.' यावर 'वृद्धांपासूनच ज्ञान-

संपादून करून बाल वृद्ध होतात व ज्ञान अल्पकालानें मिळणें शक्य नाहीं,' असें द्वारपाल ह्मणाला. तें ऐकून अष्टावक्र फिरून ह्मणाले, ' कालपरत्वें केस पिकले ह्मणजे वृद्धत्व येत नाहीं. बाल असून देखील ज्याला विशेष ज्ञान आहे त्यालाच देव वृद्ध समजतात. कालानें,पांढऱ्या केसांनीं,पैशानें अथवा बंधुवर्गाच्या योगानें वृद्ध समजावयाचा असा ऋषींनीं कोठें नियम करून ठेविला नानीं. ज्यानें वेदाध्ययन केलें आहे तोच आह्मांला मोठा. मी बंदीची गांठ घेण्याकरितां आलों आहें, अशी कमलमालाधारी राजाला तूं जाऊन वर्दी दे. ' हें त्यांचें भाषण ऐकून विद्वानानाच ज्या ठिकाणीं प्रवेश आहे अशा ह्या यज्ञांत ह्या दशवर्षीय मुलाला कसें शिरूं यानें ह्मणून मनांत संशय उत्पन्न होऊन द्वारपाल ह्मणाला, ' मी यत्न करून पहातों. आपणही आपल्या हातून होईल तेवढा यत्न करा. ' तेव्हां अष्टावक्र राजाला हाक मारून ह्मणाले, ' हे राजन्, तूं सम्राट असून सर्व यज्ञांचा कर्ता आहेस. तूं ऋद्धिसिद्धिसंपन्न आहेस. ज्ञानवृद्धांना वादामध्यें जिंकून बंदी जलामध्यें बुडवीत असतो असें ऐकून ब्रह्मद्वैत स्पष्ट करून सूर्य ज्याप्रमाणें नक्षत्रांचा नाश करतो त्याप्रमाणें याचा नाश करण्याकरितां मी येथें आलों आहे.' हें ऐकून राजा ह्मणाला, 'बंदीचें सामर्थ्य न जाणतां तूं त्यावर जय मिळविण्याची वृथा उमेद बाळगीत आहेस. त्याला जिंकण्याच्या हेतूनें अनेक ह्या ठिकाणीं येऊन पराभव पावून परत गेले आहेत.' हें राजाचें भाषण ऐकून अष्टावक्र फिरून ह्मणाले, 'माझ्या सारख्याशीं वादविवाद करण्याचा प्रसंग न आल्यामुळें हा उगीच निर्भयपणें सिंहासारखी गर्जना करीत आहे. माझ्याशीं गांठ पडल्यावर वाटेंत कणा मोडून पडलेल्या रथाप्रमाणें मोड होऊन याला जमिनीला मिळावें लागेल.' राजानें उगीच प्रश्न केला, 'ज्याला तीस तीस अंश असे बारा भाग, चोवीस सांधे व तीनशें साठ आरा आहेत अशा वस्तूचा खरा अर्थ ज्याच्या लक्षांत येईल तोच विद्वान.' हें ऐकून अष्टवक्रांनीं उत्तर केलें, 'ज्याला चोवीस सांधे आहेत, सहा नाभी आहेत व ज्याला बारा दांड्या आहेत व तीनशें साठ आरा आहेत तें सतत फिरणारें चक्र (कालचक्र) तुझें रक्षण करो.' नंतर फिरून राजानें प्रश्न केला, 'जे दोघे रथाला जुंपलेल्या दोन घोड्याप्रमाणें एकत्र आहेत, व जे श्येनाप्रमाणें अकस्मात् झडप घालतात अशा त्या दोघांच्या देवता कोणत्या व त्यांना जन्मदाता कोण व त्यापासून कोण उत्पन्न झाला?' अष्टवक्रांनीं उत्तर दिलें, 'ईश्वर, तुझ्या घरीं एवढेंच नाहीं पण तुझ्या शत्रूंच्या घरीं देखील या दोघांचें वास्तव्य न ठेवो. यांचा उत्पन्नकर्ता वातसारथी असून हेंही त्याचें उत्पादक आहे.' राजानें फिरून प्रश्न केला, 'झोंपेंत सुद्धां उघडे डोळे कोणाचे असतात? जन्मते वेळीं सुद्धां कोण हालचाल करीत नाहीं? हृदय कोणाला नाहीं व अतिवेगानें काय वाढतें?' अष्टावक्रांनीं उत्तर केलें; 'झोंपेंतसुद्धां डोळे न मिटणारा मासा. जन्मतेसमयीं हालचाल न करणारें अंडें. दगडाला हृदय नाहीं व अतिवेगानें वाढणारी नदी होय.' ह्या प्रश्नोत्तरावरून तो अमानुष आहे व बोलण्यामध्यें कोणाला हटणारा नाहीं असें वाटून राजानें त्याला आंत घेऊन बंदी दाखवून दिला. त्यावेळीं अष्टावक्र बंदीला ह्मणाले, 'हे बंदिन्, वादामध्यें माझ्यासारखा कोणी नाहीं असा तुला अभिमान आहे. पण करून आज माझ्याशीं वाद् कर. निजलेल्या वाघाला उगीच डवचूं नकोस. जिभळ्या चाटणाऱ्या विषारी सर्पाच्या मस्तकावर पाय देऊन कांहीं अपाय न होतां सुटशील असें समजूं नकोस.' जो मनुष्य दुर्बल असून केवळ शक्तीच्या वृथाभिमानानें पर्वतावर प्रहार करतो त्याचेच हात व नखें छिन्नभिन्न होतात. पर्वताला त्यापासून कांहीं इजा होत नाहीं,' याप्रकारें अष्टावक्रांची सभेमध्यें गर्जना ऐकून बंदीनें प्रश्नोत्तरपूर्वक त्याच्याबरोबर वादविवाद सुरू केला. तो ह्मणाला, 'एकच अग्नि पुष्कळ प्रकारानें पेट घेतो. एकच सूर्य सर्व प्रकाशित करतो. वीर इंद्र एकटाच शत्रूंचा नाश करतो, आणि सर्व पितरांचा स्वामी एकटा यमच आहे.'

---

१ मेघगर्जना व बीज किंवा सुख आणि दुःख. २ मेघ किंवा मन. ३ पुरुष नेहमीं जागृत आहे. ४ ब्रह्मांड. ५ देहाशीं संबंध सोडलेला आत्मा. ६ योग्याचें हृदय.

अष्टावक्रांनीं उत्तर दिलें[1]. 'इंद्र[2] व अग्नि हे दोघे मित्र नेहमीं जोडीनें फिरतात. नारद व पर्वत हे दोघे देवऋषी आहेत. अश्विनीकुमार दोघे आहेत. रथचक्रें[3] दोन असतात व ब्रह्मदेवानें ठरवून ठेवल्याप्रमाणें स्त्रीपुरुष हें जोडपें आहे.' बंदी म्हणाला, 'कर्मानें[4] तीन प्रकारचे लोक जन्माला येतात. तीन वेदांनीं वाजपेय होतो. तीन निराळ्या वेळीं अध्वर्यु हवन करतात आणि लोकांची संख्याही तीनच आहे व व ज्योतीही तीनच आहेत असें म्हणतात.' अष्टावक्रांनीं उत्तर दिलें, 'ब्राह्मणाचे चार आश्रम आहेत, चार वर्णांनाच यज्ञाचा अधिकार आहे. दिशा चार आहेत. वर्ण चार आहेत व गाईला पायही चारच आहेत.' बंदी म्हणाला, 'अग्नि[5] पांच आहेत, पंक्ति नामक छंदाला पाद पांच आहेत, यज्ञ पांच आहेत, वेदांमध्यें असें सांगितलें आहे कीं, अप्सरांच्या डोक्यावर पांच केशपाश (चैतन्य) आहेत व पांच पवित्र नद्या (विषय) जगामध्यें माहीत आहेत.' अष्टावक्र म्हणाले, 'अग्नि स्थापन करण्याच्या वेळीं सहा गाई दान देतात. कालचक्राचे सहा ऋतु आहेत. सहा इंद्रियें आहेत. सहा तारे मिळून कृत्तिका नक्षत्र बनलें आहे. सायस्क यज्ञाची संख्याही वेदामध्यें सहा सांगितली आहे.' बंदी म्हणाला, 'ग्राम्य पशूंची संख्या सात आहे, त्याचप्रमाणें वन्य पशूंचीही संख्या सातच आहे.सात छंदास एक यज्ञ शेवटाला नेतात. ऋषी सात आहेत. आदर दाखविण्याचे मार्ग सात आहेत आणि विण्याला ताराही सात आहेत.' अष्टावक्रांनीं उत्तर दिलें, 'सणाच्या[6] गोण्यांत शतांचा (पुष्कळांचा) समावेश होतो, सिंहाला मारणाऱ्या शरभाला आठच पाय आहेत, देवांमध्यें वसू आठच आहेत, व सर्व यज्ञांमध्यें आठच यूप असतात.' बंदी म्हणाला, 'पितृयज्ञांमध्यें अग्नि प्रदीप्त करतांना म्हणण्याचे मंत्र नऊ आहेत, सृष्टीच्या उत्पत्तीचे नऊ प्रकार आहेत. बृहती छंदाच्या एका पादामध्यें नऊ अक्षरें असतात व नऊ अंकांनींच वाटेल ती संख्या मोजतां येते.' अष्टावक्रांनीं उत्तर दिलें, 'दिशा[7] दहा आहेत. शंभराच्या दसपटीनें हजार संख्या होते, स्त्रियांचा गर्भधारणकाल **दशमासिकच** असतो, खरें ज्ञान शिकविणारे शिक्षक दहाच आहेत, त्यांचे द्वेष्टे दहाच आहेत, व ते शिकणारेही दहाच आहेत.' बंदी म्हणाला, 'प्राण्यांनां[8] उपभोग्य वस्तू अकराच आहेत, यूपांची संख्या अकराच आहे. प्राणिमात्रांच्या स्वभावस्थितीचे विकार अकराच आहेत व स्वर्गलोकीं देवांमध्यें रुद्र

---

१ अष्टावक्र जनकाच्या यज्ञामध्यें ब्रह्मद्वैत दाखविण्यासाठीं आला असून एकच अग्नि इत्यादि वाक्यांनीं बंदीच्या तोंडून बौद्धमत प्रगट करवितो. ज्याप्रमाणें वरील सर्व एकच आहेत त्याप्रमाणें सर्व इंद्रियांला मार्ग दाखविणारी बुद्धि एकटीच आहे असें म्हणून बंदी वाद सुरू करतो. २ अष्टवक्राच्या म्हणण्याचा हेतु एवढाच कीं बुद्धि एकटी नसून बुद्धि व ज्ञान हे दोघे जोडीनें सर्व इंद्रियांना मार्ग दाखविणारे आहेत. असें नसतें तर निद्रावस्थेचें ज्ञान मुळींच झालें नसतें. ३ ज्याअर्थी तीन प्रकारची प्रजा कर्मानें उत्पन्न होते त्याअर्थी बुद्धि व ज्ञान यांना देखील कर्माधीन समजले पाहिजेत. ४ आत्म्याला पुरुषाचें ज्ञान झाल्यावर कर्माची अपेक्षा उरत नाहीं. ५ पंचेंद्रियें आपआपल्या विषयांचें ज्ञान जाणण्यास समर्थ आहेत. ६ पांचांशिवाय मन हें सहावें आहे, ७ पंचेंद्रियें, मन व बुद्धि यांच्याकडून आत्म्याला सुखदुःखाचा अनुभव मिळतो.

१ ह्या सातांमध्यें कर्तृत्वादि धर्म अंगीं असणाऱ्या अहंकाराला सामील केलें पाहिजे. २ ज्याप्रमाणें नऊ अंक क्रमभेदानें ठेविले असतां वाटेल ती संख्या दर्शक होतात त्याचप्रमाणें प्रकृतीचे मूळचे तीन गुण प्रधानाच्या त्या त्याच तीन गुणांमध्यें निरनिराळ्या प्रमाणामध्यें मिसळून सर्व जगाची व्यवस्था सिद्ध होते. ह्यावरून प्रधानाच्या नित्यतेच्या अवश्यकतेमुळें द्वैत ठरतेंच. ३ प्रकृतीचें निराळें अस्तित्व नाहीं. पुरुषच मायेचा आश्रय करून दशेंद्रियांशीं संबंध आल्यावर सर्व जग प्रगट करतो. म्हणून आत्म्याच्या खऱ्या तत्त्वामध्येंच प्रकृतीच्या अस्तित्वाचा भास आहे. ४ यूपाचा अर्थ या ठिकाणीं मनुष्याला ह्या जगाशीं जखडून टाकणाऱ्या अकरा भावना होत. बंदीचा म्हणण्याचा हेतु एवढाच कीं आत्मा हा अकरा इंद्रियांपासून उत्पन्न होणाऱ्या सुखदुःखांच्या बंधनापासून अगदींच मुक्त म्हणतां येणार नाहीं.

अकराच आहेत.' अष्टावक्रांनीं उत्तर दिलें. 'वर्षाचे महिने बारा आहेत. जयतीछंदाच्या पदांचीं अक्षरें बाराच आहेत, व आदित्यही बाराच आहेत.' बंदी ह्मणाला, 'त्रयोदशी तीथ प्रशस्त मानली आहे व पृथ्वीही तेराच द्वीपांनीं युक्त आहे. असें अर्धेंच वाक्य ह्मणून बंदी थांबल्यावर अष्टावक्रांनीं त्याची परिपूर्ति अशी केली. केशीनें तेरा दिवस यज्ञ केला आणि अतिच्छंदामध्यें तेरा अक्षरें आहेत.'

ह्याप्रमाणें सूतपुत्राचा वादामध्यें पाडाव झालेला पाहून जिकडे तिकडे गडबड उडून गेली. सर्व ब्राह्मणांनीं अष्टावक्रांची पूजा केली. अष्टावक्र राजाला म्हणाले, 'ह्याच प्रकारें ह्यानें आजपर्यंत ब्राह्मणांना जिंकून जलांत बुडाविलें आहे, अमें मी ऐकतों तर त्याच न्यायानें ह्यानेंही आज जलसमाधि घेतली पाहिजे.' हें ऐकून बंदी म्हणाला, 'मी वरुणपुत्र आहें. मला जलामध्यें मुळींच भीति नाहीं. परंतु ह्यासारखेच द्वादशवार्षिक सत्र त्या ठिकाणीं सुरू आहे. तें सत्र पहाण्याला मीं ब्राह्मणांना पाठविलें आहे. वरुणाचा सत्कार घेऊन ते लवकरच परत येतील. हा पूज्य अष्टावक्रही मला फार मान्य आहे. कारण माझी व पित्याची गांठ पाडण्याला हा कारण झाला आहे!' हें त्यांचें भाषण संपताहे तोंच त्यानें जलांत बुडविलेले सर्व ब्राह्मण वरुणाचा सत्कार घेऊन वर आले. आपल्या मुलाला पाहून कहोड ह्मणाले, 'लोक एवढ्याचसाठीं मुलगा मागतात. माझ्या हातून घडली नाहीं ती गोष्ट ह्या माझ्या मुलानें केली आहे. प्रसंगविशेषानें अल्पबलाला बलवान व अविद्वानाला विद्वान मुलगा होतो. अष्टावक्रही बापाचा सत्कार करून व ब्राह्मणांचा सत्कार घेऊन मामासहवर्तमान आपल्या आश्रमाला परत गेले.'

---

१ आत्मा हा खचित सुखदुःखांपासून अलिप्त असा आहे. पण तशा प्रकारचें त्यांचें अस्तित्व सिद्ध करतां येणार नाहीं व अज्ञान्यांना दिसणें शक्य नाहीं. धर्म, सत्य, आत्मसंयमन, तप, सदिच्छा, विनय, क्षमा, निर्मात्सर्य, यज्ञ, दान, योग आणि इंद्रियनियमन ह्या बारा साधनांच्या योगानें, मनुष्याला ती स्थिति प्राप्त होणें शक्य आहे. २ कांहींच्या मतानें मोक्षप्राप्तीची खटपट ह्या जगांत साध्य न होतां ब्रह्मलोकींच ती साध्य होण्याजोगी आहे. असें असून विशेष योगाची ह्याला आवश्यकता आहे असें कांहींचें मत आहे. बंदीचा ह्मणण्याचा भाव एवढाच कीं मोक्षप्राप्तीसाठीं वरील बाराच साधनें पुरीं नसून देशकालाचीही अपेक्षा आहे. ३ अधिकारी आत्मा दशेंद्रिय, बुद्धि, मन व अहंकार यांच्या योगानें सुखदुःखांचा वांटेकरी होतो. पण ज्यांचें अज्ञानतम दूर झालें आहे ते वरील बारांच्या योगानें तेरांचा नाश करतात व त्यालाच मोक्ष ही संज्ञा आहे.

८० रैभ्य व यवक्री यांचा वृत्तांत.
(इ. १३५–१३८)

लोमशासहवर्तमान पांडव श्वेतकेतूचा आश्रम ओलांडून ज्याठिकाणीं वृत्राला मारल्यानंतर इंद्रानें आपल्याला पावन करून घेतलें ती समगा नदी, त्याचप्रमाणें भरताचें अभिषेकाचें स्थान कर्दमिल व मैनाकाच्या पोटांत असलेलें विनशन–ज्याठिकाणीं अदितीनें पूर्वी मुलासाठीं पाकसिद्धि केली–आणि कनखल टेंकड्या व स्थूलशिरस ऋषींचे रम्य आश्रम पहात पहात रैभ्यांच्या आश्रमाला येऊन पोहोंचले. त्याठिकाणीं लोमशांनीं भरद्वाज पुत्र यवक्री व रैभ्य यांचा पुढील वृत्तांत युधिष्ठिराला सांगितला. ते ह्मणालेः—

'भरद्वाज व रैभ्य हे दोघे ऋषी परस्परांचे मित्र होते. रैभ्यांना अर्वावसू व परावसू नांवाचे दोन पुत्र होते व भरद्वाजांना यवक्री नांवाचे एकच होते. रैभ्य व त्याचे पुत्र विद्वान असून भरद्वाज केवळ तपस्वी होते. त्यामुळें रैभ्याची चोहोंकडे फार कीर्ति होऊन आपल्या पित्याला ब्राह्मणांकडून मिळावा तसा मान मिळत नाहींसें पाहून यवक्रीला राग येऊन एकदम सर्व वेदांचें परिपूर्ण ज्ञान होण्यासाठीं त्यांनीं घोर तप आरंभिलें, व अग्नि पेटवून त्यांत स्वतःला जाळून घेण्यास ते तयार झाले. त्यामुळें इंद्राला भीति पडून तो यवक्रीकडे आला. तेव्हां गुरुमुखापासून वेदाची प्राप्ति करून घेण्याला पुष्कळ काळ लागत असल्यानें तपानेंच सर्व ज्ञान मि-

ळविण्याचा त्याचा निश्चय पाहून इंद्र ह्मणाला, 'विप्रर्षे, ज्यी मार्गानें आपण जाऊं इच्छितां तो सरळ मार्ग नव्हे. गुरुमुखापासून ज्ञानसंपादन करून वेणें इष्ट आहे.' असें पुष्कळ सांगितलें तरी त्याचा निश्चय ढळत नाहींसा पाहून युक्तीनें त्याला त्या मार्गापासून फिरविण्याच्या हेतूनें इंद्रानें वृद्धब्राह्मणाचें रूप घेऊन भागीरथीच्या काठीं आत्मशुध्यर्थ यवक्रीची नेहमींची जी स्नानाची जागा असे तेथें जाऊन त्याच्या नजरेस येईल अशा रीतीनें मूठ मूठ वाळू घेऊन त्यानें नदीवर त्या ठिकाणीं बांध घालण्याचें काम सुरू केलें. 'ब्राह्मणा, हें तूं काय आरंभिलें आहेस,' असें यवक्रीनीं हासून विचारलें; तेव्हां तो ह्मणाला, 'नदी ओलांडून जाण्याला लोकांना फार त्रास होतो ह्मणून बांध घालून गंगेला अडवितों.' तें ऐकून यवक्री ह्मणाले, 'हें कृत्य तुझ्या ह्या उद्योगानें कसें शेवटाला जाईल? हें अशक्य काम उगीच हातीं कां घेतोस? शक्य असेल तेंच काम हातीं घ्यावें.' हें त्याचे भाषण ऐकून तो ह्मातारा गृहस्थ ह्मणाला, 'ज्याप्रमाणें तुं तपानें सर्व वदांचें ज्ञान करून घेण्याचा यत्न करीत आहेस तसाच हा माझा प्रयत्न आहे.' हें ऐकून हा ब्राह्मण इंद्राखेरीज दुसरा कोणी नसावा असे वाटून यवक्री त्याला ह्मणाले, 'तर मग मीं काय करावें सांग. इतरापेक्षां ज्या योगानें मी श्रेष्ठ होईन असा मला वर दे.' हें ऐकून तुला व तुझ्या पित्याला इच्छेनुरूप सर्व वेदांचें ज्ञान होईल याप्रमाणें त्याला इंद्रानें वर दिला. नंतर यवक्री पित्याकडे जाऊन घडलेला सर्व वृत्तांत त्यानें त्यांना सांगितला. तो ऐकून भरद्वाज ह्मणाले, 'मुला, आपली इच्छा सफल झाल्यानें मनुष्याला गर्व उत्पन्न होतो. तूं जर तसा गर्वाच्या आधीन होशील तर तुझा नाश होण्याला कांहीं वेळ लागणार नाहीं. पूर्वी वालधी नामक कोणी महान सामर्थ्यवान मुनी होते. त्यांनीं पुत्रप्राप्तीसाठीं दुष्कर तप केलें. त्यानें संतुष्ट होऊन तुला पुत्र होऊन पर्वत आहे तोंपर्यंत तो मरणार नाहीं असा वर मिळून त्याच्या आयुष्याची मर्यादा ठरली. पुढें त्यांना मुलगा होऊन त्याला ही वराची वार्ता समजल्यावर तो सर्व ऋषींचा अवमान करीत व त्यांना दुखवीत सर्व पृथ्वीभर हिंडूं लागला. कोणे एके वेळीं धनुषाक्षांची व त्याची गांठ पडून त्यानें त्यांना पीडा दिली व धनुषाक्षांनीं तूं भस्म होऊन जा ह्मणून शाप दिला. परंतु त्या शापानें त्याला कांहीं अपाय झाला नाहीं असें पाहून त्याच्या मरणाला निमित्तभूत जे पर्वत ते त्यांनीं रेड्याकडून फोडून टाकविले. निमित्ताचा नाश झाल्याबरोबर तो मरण पावला. नशीबीं लिहिलेलें मनुष्याच्यानें कधीं टाळवत नाहीं. तपस्व्यांना अल्पवय असतांनाच वर मिळाला असतां ते अहंकारयुक्त होतात व त्यांचा लवकर नाश होतो. असें कांहीं घडूं नये ह्मणून खबरदारी घे. रैभ्य व त्याचे मुलगे यांच्या वाटेला जाऊं नकोस.' 'बाबा, आपण ह्मणतां तसें करीन. मजसंबंधी आपण मुळीं काळजी करूं नका,' असें यवक्री बापाला ह्मणाले तरी यापुढें कोठेंच भय न उरल्यामुळें त्यांना वाटेल त्या ब्राह्मणावर तोंड टाकण्यांत मौज वाटूं लागली. कोणे एके वेळीं ते फिरत असतां वैशाखमासीं झाडें जिकडे तिकडे फुललेलीं होतीं. अशा रम्यसमयीं ते रैभ्यांच्या आश्रमाकडे आले. त्या ठिकाणीं त्यांची किन्नरीसारखी सून फिरतांना त्याच्या दृष्टीस पडली. कामपीडित झाल्यामुळें निर्लज्ज होऊन त्या लज्जावतीला त्यांनीं आपल्याकडे बोलाविली. त्याचें शील व तपोबल, त्याचप्रमाणें रैभ्यांचें सामर्थ्य मनांत आणून शाप देईल ह्या भीतीनें बरें ह्मणून ती त्यांच्याशीं एकांतांत रत झाली. ह्याप्रमाणें त्यांनीं तिला शोकसागरांत बुडाविलें. रैभ्य आश्रमाला परत आल्यावर यवक्रीचा सर्व वृत्तांत तिच्यापासून ऐकून रैभ्यांचा राग अनावार होऊन त्या आवेशांत एक केस उपटून त्यांनीं अग्नीमध्यें टाकला. त्यासरशी तिच्यासारखी रूपवती एक स्त्री अग्नींतून बाहेर पडली. नंतर त्यांनीं दुसरा एक केस अग्नींमध्यें टाकला. त्याबरोबर एक अकाळविकाळ राक्षस त्यांतून बाहेर पडला. काय आज्ञा आहे ह्मणून त्या दोघांनीं विचारलें असतां यवक्रीला मारून टाका ह्मणून रैभ्यांनीं त्यांना आज्ञा केली. बरें ह्मणून ते यवक्रीना मारण्याच्या उद्देशानें निघाले. नंतर त्या महात्म्यांनीं उत्पन्न केलेल्या त्या कृत्येनें यवक्रीकडे जाऊन त्यांना पाहून त्याचा कमंडलू हरण केला. ह्यामा-

णें कमंडलू जाऊन अपवित्र झाल्यावर तो राक्षस शूल उगारून त्यांला मारण्यासाठीं त्यांवर धांवला. त्याला आपल्याकडे येतांना पाहून यवक्री इकडे तिकडे धांवूं लागले. पण कोठेंच आश्रय न-मिळाल्यानें व तो घोर राक्षस पाठीमागें लागला असल्यामुळें घाबरून जाऊन ते पित्याच्या होमशाळेंमध्यें शिरूं लागले. तेथें रक्षणाला ठेवलेल्या एका अंध शूद्रानें त्यांना अडविलें व त्या राक्षसानें त्यांना शूलानें मारून खालीं पाडलें

इकडे भरद्वाज वेदाध्ययनादि आन्हिक आटोपून समिधांचा भारा घेऊन आश्रमाकडे परत आले. यापूर्वी त्यांना पाहून सर्व अग्नि उठून उभे रहात. पण आज त्यांचा मुलगा मेला असल्यामुळें त्यांनीं त्यांना पूर्ववत् उत्थापन दिलें नाहीं. तें पाहून त्यांनीं त्या शूद्राला विचारलें, ' आज हे अग्नि माझ्या आगमनानें आनंद कां दाखवीत नाहींत? मला हें कांहीं सुचिन्ह दिसत नाहीं. काय हकीकत असेल ती मला सांग.' नंतर शूद्रानें सर्व घडलेली हकीकत सांगितल्यावर मेलेल्या मुलाला पुढें पाहून दुःखानें विव्हळ होऊन रैभ्य त्यांचा मित्र होता तरी ' तुझा वडील मुलगा तुला मारील, ' असा त्यांना शाप देऊन मुलाला जाळून स्वतः त्यांनीं अग्नीमध्यें प्रवेश केला.

ह्याच सुमारास रैभ्याकडून यज्ञ करविणाऱ्या बृहद्युम्नराजानें मोठें सत्र आरंभिलें. त्या ठिकाणीं त्याच्या साह्यासाठीं ह्यांचे दोघेही मुलगे गेले होते. तेथें बराच काळ राहिल्यानें बायकोला भेटण्याची इच्छा होऊन परावसू एकटेच आश्रमाला येत होते. वाटेंत अंधाऱ्या रात्रीच्या योगानें काळ्याकुट्ट अशा अंधारामध्यें डोळ्यांवर झोंपेचीही गुंगी आली असल्यामुळें वनांत कृष्णाजिन पांघरून बसलेल्या आपल्या बापाला पाहून तो मृग असावा अमें वाटून साण्यासाठीं त्यानें त्यांना मारलें. पुढें जवळ जाऊन पहातात तों तो बाप, तेव्हां त्यांचे प्रेतसंस्कार करून सत्राकडे जाऊन तो आपल्या भावाला ह्मणाला, ' तुझ्या एकट्याच्यानें हें सत्र पार पडणें शक्य नाहीं. मी एकटा तें पार पाडण्याला समर्थ आहें. परंतु माझ्या हातून मृग समजून पितृहत्या झाली आहे. माझ्यासाठीं तूं वनांत जाऊन ब्रह्महत्येचें निरसन करणारें व्रत आचरण कर.' अर्वावसू बरें ह्मणून वनांत जाऊन व्रताचरण करून परत आले. त्यांना पाहून परावसू राजाला ह्मणाले, 'ह्या ब्रह्मघ्नाला यज्ञामध्यें शिरूं देऊं नकोस. याच्या केवळ दर्शनानें देखील तुला पीडा होईल. नंतर राजाज्ञेनें अर्वावसूला द्वारपालांनीं प्रतिबंध केल्यामुळें ते मुकाट्यानें अरण्यांत जाऊन सूर्याची आराधना करून उग्र तप आचरीत राहिले. अग्नीनें त्यांना प्रत्यक्ष दर्शन दिलें. देवांनीं संतुष्ट होऊन त्यांना वर मागण्यास सांगितलें व परावसूंला यज्ञांतून घालवून दिलें. अर्वावसूंनीं आपला पिता, भरद्वाज व यवक्री हे जिवंत होऊन पूर्ववत वेद यांच्या ठिकाणीं कायम रहावेत असा वर मागितला व देवांनीं तो त्यांना दिला. जिवंत होऊन उठल्यावर ज्या मीं व्रताचरण करून ब्रह्म संपादन केलें आहे, त्या मला रैभ्यशाप कसा फळला ह्मणून यवक्रींनीं विचारलें. तेव्हां देव ह्मणाले, ' तुला वेद गुरुमुखाशिवाय अनायासें प्राप्त झाले व ह्यानें पुष्कळ काळ कष्टानें गुरुशुश्रूषेनें त्यांना तोषवून ते प्राप्त करून घेतले त्याचें हें फळ. फिरून असा गर्व करूं नकोस. ' सांगून ते स्वर्गाला निघून गेले.

८१ वराहरूपी विष्णूचें पृथ्वीला समुद्रांतून वर काढणें. पांडवांचा गंधमादनामध्यें प्रवेश.

(३. १३९-४३)

पुढें उशीरबीज, मैनाक, श्वेतपर्वत व कालशैल ओलांडून ज्या ठिकाणीं गंगा सप्तप्रवाहांनीं वाहते व ज्या ठिकाणीं अग्नि नेहमीं प्रज्वलित असतो त्या पवित्र स्थानाला पांडव येऊन पोहोंचले. नंतर अनेक रूपधारी नाना आयुधें हातांत घेतलेले यक्षगंधर्व, किन्नर व यातुधान ह्यांनीं संरक्षित, जेथें यक्षेंद्र माणिभद्राची उपासना करीत आहेत तो मंदार व सहा योजनें उंच असलेला कैलास ह्या ठिकाणीं ते येऊन पोहोंचले. तेथें आल्यावर तो प्रदेश दुर्गम व अनेक क्रूर श्वापदांनीं व नानाप्रकारच्या जनांनीं संकीर्ण असल्यामुळें लोमशांनीं युधिष्ठिराला कडक व्रतानें रहाण्यास सांगितलें, व आपणही देवतांची प्रार्थना

करूं लागले. त्यावेळीं त्यांची उडून गेलेली धांदल पाहून युधिष्ठिर अश्रुपूर्ण नेत्रांनीं भीमाला ह्मणाला, 'लोमशानांनासुद्धां ह्या प्रदेशासंबंधानें भीति वाटत आहे ह्मणून द्रौपदीचें मोठ्या काळजीपूर्वक रक्षण करा. भीमा, अर्जुनाच्या मागें अगर तो असतांनादेखील संकटसमयीं नेहमीं तिचे डोळे तुझ्याकडे लागले असतात. कैलाससंबंधानें ऋषींचें ह्मणणें तूं ऐकलेंच आहेस. तर येथें हिला कसें जातां येणार याचा तूंच विचार कर. हिला, सहदेवाला व धौम्यऋषींना बरोबर घेऊन लवाजम्यासह गंगाद्वारीं मीं येईपर्यंत तुह्मी माझी वाट पहात रहावें हें मला बरें दिसतें.' भीमानें उत्तर केलें, 'ही राजपुत्री श्रमली असून अर्जुनदर्शनाच्या ओढीनें कशी तरी चालली आहे हें खरें आहे. पण एकटा अर्जुन नसल्यानेंच आपलें मन इतकें अस्वस्थ झालें आहे तर मग आमच्यामागें तें किती होईल? सर्व सेवकांसहवर्तमान ब्राह्मण पाहिजे तर परत जाऊं देत. आह्मी कांहीं आपल्याला सोडून गहणार नाहीं. पांचाली अथवा नकुलसहदेव यांना जेथें जेथें ह्मणून मार्ग दुर्गम वाटेल तेथें तेथें मी त्यांना वाहून नेईन.' हें भीमाचें भाषण ऐकून सूर्य स्वच्छ प्रकाशूं लागल्यावर ते पायांनींच हिमाचलाकडे निघाले असतां वाटेंत युधिष्ठिर ह्मणाला, 'कृतकर्माचें फळ कधीं मिळाल्याशिवाय रहात नाहीं. समर्थ असूनही आह्मांला कसें वनामध्यें असमर्थाप्रमाणें भटकावें लागत आहे पहा? अर्जुनाची गांठ न पडणें व द्रौपदीची पूर्वी झालेली अप्रतिष्ठा ह्या गोष्टी अग्नि ज्याप्रमाणें कापसाच्या राशी जाळून टाकतो त्याप्रमाणें मला निःशेष जाळून टाकीत आहे. तो भेटेल ह्या आशेवर आज पांच वर्षें तुमच्याबरोबर अनेक तीर्थें मी भटकत आहें; तरी त्याची गांठ पडण्याचें कांहीं चिन्हें दिसत नाहीं. यामुळें मला फार चिंता वाटत आहे. तो श्यामवर्ण सिंहगति सर्व शस्त्रास्त्रांमध्यें निष्णात, अप्रतिम धनुर्धर ज्याच्या तोडीचा ह्या भूतलावर दुसरा कोणी नाहीं, ज्याचे बेत कधीं कोणाला कळावयाचे नाहींत व जो शत्रुमंडळामध्यें फिरूं लागला ह्मणजे अंतकाप्रमाणें भासतो, असा माझा पार्थ मला केव्हां भेटेल? क्षुद्रांनीं त्याचा अवमान केला असतांही तो नेहमी त्यांना क्षमाच करी. सरळ मार्गानें जाणारांना त्याच्यापासून कधीं भय नसून त्यांचें त्यानें कल्याण केलें आहे. परंतु आड मार्गाला जाऊन कपटानें नाश करूं इच्छिणारा मग तो प्रत्यक्ष इंद्र असला तरी त्याला तो कालविषाप्रमाणें असह्य होत असे. शरणार्थ्याला त्याचें नेहमीं अभय असे. आह्मां सर्वांना तोच आश्रय असे. रणामध्यें शत्रूंना तर हं हं ह्मणतां तो चिरडून टाकीत असे. पूर्वी त्याच्याच पराक्रमानें थोर वैभव मला मिळालें. बाहुबलामध्यें तो इंद्राच्या तोडीचा आहे. तो वायुगति असून त्याचें मुख चंद्रासारखें आल्हाद देणारें आहे. तरी राग आला असतां तो काळाला देखील जुमानणारा नाहीं. अशा त्या माझ्या पार्थाची कदाचित गांठ पडेल ह्मणून आपण गंधमादनावर फिरत राहूं या. ह्याच ठिकाणीं नरनारायणांचा विस्तीर्ण बदरी आश्रम आहे. हा प्रदेश क्रूर जनांनीं व पशूंनीं गजबजला असल्यामुळें मित आहार ठेवून कंबरा बांधून शस्त्रास्त्रें घेऊन सज्ज राहून येथें फिरलें पाहिजे.' या ठिकाणीं अनेक पर्वत, तीर्थें व पुण्यकर्मांमध्यें गढलेल्या ऋषींचे आश्रम पहात पहात ज्या ठिकाणीं शंकरांनीं वरून पडणाऱ्या गंगेला आपल्या मस्तकावर धारण केलें, ज्या ठिकाणीं देव जपजाप्यादि आपलें आन्हिक आचरतात, व ज्या ठिकाणीं सूर्य व ग्रह ह्यांसहवर्तमान चंद्र व ज्योतिश्चक्र अहोरात्र फिरत आहेत, त्या प्रदेशाला ते येऊन पोहोंचले. तेथें नरकासुराच्या पर्वतप्राय पडलेल्या अस्थि दाखवून लोमश ह्मणाले, 'पूर्वी नरकासुर नांवाच्या दैत्यानें तपाच्या सामर्थ्यानें व बाहुबलानें इंद्रपदावर डोळा ठेविला. तो नेहमीं इंद्राला त्रास देत असून इंद्राला त्याला जिंकतां येईना. त्याचें बल व तपश्चर्या पाहून इंद्राला चिंता उत्पन्न झाली व तो विष्णूला शरण गेला. इंद्राच्या भयाचें कारण जाणून नरकासुरानें तपःसिद्धि मिळविली आहे, तरी त्याला मी मारतों असें इंद्राला अभिवचन देऊन नरकासुराची प्रज्ञा विष्णूनें हरण केली व नरकासुर पर्वतप्राय भूमीवर पडला. ह्याच ठिकाणीं पूर्वी पातालांत चाललेली पृथ्वी त्यानें वराहरूपानें आपल्या एका शिंगानें वर काढली. कारण पूर्वी भयंकर कृतयुग चालू असतांना आदिदेवानें यमाची कामगिरी आपल्याकडे घेतली. त्या वे-

ळीं कोणी मरेनासें होऊन प्राण्यांची वाढ मोठ्या झपाट्यानें सुरू झाली. हा प्रकार चालला असतां पृथ्वीला भार सहन न होतां ती खालीं चालली. तेव्हां पृथ्वी विष्णूला शरण गेली. तेवेळीं तो तिला ह्मणाला, 'वसुंधरे, तूं भिऊं नकोस, मी तुझा भार कमी करतों.' असें सांगून तिला पाठवून दिल्यावर एक शृंगवराहाचें रूप घेऊन त्यानें आपल्या दैदीप्यमान शिंगानें पृथ्वीला धरून शंभर योजनें वर उचललें. ह्या वेळीं जिकडेतिकडे मोठी गडबड उडून हाहाकार झाला.सर्व देव व ऋषी घाबरून जाऊन तेजानें दैदीप्यमान अशा ब्रह्मदेवांकडे गेले. ब्रह्मदेव ह्मणाले, 'तुह्मांला भिण्याचें कारण नाहीं. सर्वव्यापी, श्रीमान, अविनाशी, परमात्मा, पाताळांत चाललेली पृथ्वी वर उचलून काढीत आहे, त्याचा हा सर्व परिणाम आहे.' असें ह्मणून देवांसहवर्तमान त्या श्रीवत्सलांछित महात्म्यांना भेटण्यासाठीं ते नंदनवनाकडे गेले.'

---

८२ पांडवांचें बदऱ्याश्रमाला आगमन.

(३०. ४३–४५

पराक्रमी पांडव हातांत धनुष्य घेऊन बाणांनीं भरलेले भाते खांद्यावर लटकावून हस्तत्राण व तरवारी यांनीं सज्ज होऊन गंधमादनाला येऊन पोहोंचले. त्या ठिकाणीं गिरिशिखरावर अनेक सरोवरें, नद्या व सदा पुष्पफलांनीं संपन्न असे नाना वृक्ष व रम्य प्रदेश त्यांच्या पाहण्यांत आले. कडकडीत नियम पाळीत फलमूलांवर राहून नानाप्रकारच्या मृगजाती पहात अनेक खडतर प्रदेशांतून ते फिरत होते. ऋषी, सिद्ध, देव, गंधर्व त्याचप्रमाणें अप्सरा ह्यांना प्रिय अशा गंधमादनामध्यें ते शिरत असतां मोठा पाऊस पाडणारा भयंकर वारा सुटला. त्यापासून उठलेल्या धुळीच्या योगानें सर्व आकाश भरून गेलें व कांहीं दिसेनासें झालें. एकमेकांना एकमेक सुद्धां दृष्टीस पडेनासे झाले. उमळून पडणाऱ्या वृक्षांचा महाशब्द कानीं येत होता. या वावटळाच्या योगानें भांबावून जाऊन आकाश खालीं कोसळतें आहे कीं काय, पृथ्वी फाटते आहे कीं काय, पर्वत उमळून निघताहेत कीं काय, इत्यादि वितर्क त्यांच्या मनांत येऊं लागले. ते चाचपडत कसे तरी चालले असतां मध्येंच या भयंकर वावटळाला भिऊन वाटेंत हाताला लागलेल्या झाडांच्या, वारुळाच्या अगर खडकाच्या आधारानें ते उभे रहात. भीमसेन द्रौपदीला धरून चालला होता व सहदेवाच्या **हातांत अग्निहोत्राचा अग्नि होता.** वारा फार भयंकर सुटला तेव्हां घाबरून जाऊन ते सर्व एका झाडाच्या आश्रयानें उभे राहिले. वारा बंद पडून सर्व धूळ बसल्यावर मुसळधार पाऊस सुरू झाला व वरून येऊन आदळणाऱ्या वज्राप्रमाणें चटचट आवाज कानीं पडूं लागला. ढगांमधून मधून मधून विजा चमकत होत्या व सोसाट्याच्या वाऱ्याच्या मागून मोठा गारांचा पाऊस सुरू झाला.नद्यांचें पाणी रेंदट व फेंसाळ झालें. व त्यांचा प्रवाह इतक्या जोरानें सुरू झाला कीं, अनेक मोठमोठीं झाडें उमळून त्याबरोबर वहात चाललीं. गारांचा आवाज व वारा बंद पडल्यावर नद्यांचें पाणीही एकदम उतरलें व आकाशांत सूर्य दिसूं लागला. तेव्हां ते सर्व नरवीर फिरून एकत्र होऊन गंधमादनाकडे चालले. ते एक कोसभर गेले नाहींत तोंच चालण्याची कधीं संवय नसल्यामुळें आणि वारा व पाऊस ह्यांनीं अगदीं झोडून काढल्यामुळें द्रौपदीला घेरी येऊन ती लटलटां कांपूं लागली, व केळीसारख्या वाटोळ्या गिरगिरींत मांड्याला हात टेकून धाडकन् जमिनीवर पडली. मोडून पडणाऱ्या लतेप्रमाणें तिला अशी खालीं पडतांना पाहून नकुलानें धांवत जाऊन तिला हात दिला. तिला त्या स्थितींत पाहून 'पांडवांपासून हिला सुख मिळेल ह्मणून द्रुपदराजानें ही आह्मांला दिली व माझ्या दुष्कृत्यानें ती सर्व आशा निष्फळ होऊन हिच्यावर आज असा प्रसंग आला,' ह्मणून युधिष्ठिराला फार वाईट वाटलें. इतक्यांत धौम्यप्रभृति ब्राह्मण त्या ठिकाणीं येऊन त्यांनीं त्यांना धीर देऊन **राक्षसविनाशक मंत्र ह्मणून कांहीं उपचार केले.** ह्याप्रमाणें इकडे शांत्यर्थ ब्राह्मणांचा मंत्र चालला असून पांडव तिच्यावरून हात फिरवीत होते, व जलकणांनीं आर्द्र असा गार वाराही तिच्या अंगाला लागत होता. त्या योगानें ती लवकरच शुद्धीवर आली. ह्या वेळीं, युधिष्ठिर चिंतेत पडला असतां माझ्या सारखाच बलशाली घटोत्कच आपणां

सर्वांना वाहून नेण्याला समर्थ असतां आपण उगीच चिंता कां करतां असें ह्मणून भीमानें घटोत्कचाचें स्मरण केलें. त्याबरोबर तो हात जोडून पुढें येऊन उभा राहिला. त्याला घट्ट आलिंगन देऊन त्याचें कशाकरितां स्मरण केलें हें भीमानें त्याला सांगितलें. तेव्हां मी एकटा या सर्वांना वाहून नेईन, मग आपलें साहाय्य असल्यावर काळजी कशाला, ' असें ह्मणून घटोत्कच द्रौपदीला खांद्यावर घेऊन चालला. भीमानें इतर पांडवांना घेतलें व अतुल तेजशाली लोमश सिद्ध मार्गानें चालले. इतरांना त्या राक्षसेंद्राच्या सांगण्यावरून त्याचे जोडीदार घेऊन निघाले. ह्याप्रमाणें तो मार्ग कंटाळवाणा होता तरी हं हं ह्मणतां त्यांनीं ओलांडला. ह्याप्रमाणें म्लेंच्छांनीं भरलेला व अनेक रत्नें व धातू यांच्या खाणींनीं पूर्ण असा तो प्रदेश त्याचप्रमाणें विद्याधर, किन्नर, किंपुरुष, गंधर्व, व वानर मोर, हरिण, डुक्कर, गवय, ह्मशी, रेडे, त्याचप्रमाणें नानाविध माजांत आलेले पशुपक्षी यांनीं गजबजलेले व फलपुष्पसंपन्न अशा वृक्षांनी शोभायमान असे पर्वतप्रांत व उत्तरकुरू ओलांडून ज्या ठिकाणीं अनेक विलक्षण प्रकार दृष्टीस पडतात अशा कैलासाला ते येऊन पोहोंचले. तेथें पोहोंचल्यावर राक्षसांच्या खांद्यांवरून सर्व खालीं उतरले. तेव्हां सूर्यकिरणांनीं नेहमीं प्रकाशित असल्यानें अंधकार ज्या ठिकाणीं कधीं माहीत नाहीं व भूक, तहान, थंडी, वारा व शोक यांची बाधा ज्या ठिकाणीं ठाऊक नाहीं असा तो नरनारायणांचा श्रमपरिहारी आश्रम त्यांच्या दृष्टीस पडला. महान महान तपस्वी त्या ठिकाणीं पुष्कळ असल्यामुळें तो ब्रह्मतेजानें झळकत होता. धर्मलंड लोकांना ह्या ठिकाणीं प्रवेश मुळीं नव्हता. बली, होम, उत्तम उत्तम फलपुष्पें यांनीं त्याला शोभा आली होती. तेथें मोठमोठ्या अग्निशाला असून त्यांमध्यें यज्ञीय पात्रें पसरून पडलीं होतीं. त्याचप्रमाणें मोठमोठे कलश पाण्यानें भरून ठेवले होते; त्यामुळें तो फारच रम्य दिसत होता. तेथें सतत वेदघोष कानीं पडत असल्यानें वाटसरांचे श्रम परिहार होऊन मनाला आल्हाद वाटत होता. देवांना देखील राहण्याला योग्य असा हा रम्य आश्रम अनेक गुणांनीं संपन्न होता. या ठिकाणीं उत्तम कृष्णाजिनें परिधान केलेले सूर्य व अग्नियांप्रमाणें तेजस्वी व निग्रही अशा आत्मशुद्धि करून मोक्षाकडे दृष्टी लावून बसलेल्या ब्रह्मभूत महाभागांचें कायमचें वास्तव्य आहे. असा हा रम्य आश्रम पाहून ते त्यांत शिरले. ज्ञानचक्षूंनीं युधिष्ठिर आला आहे असें जाणून तेथील ऋषी त्याला सामोरे गेले व आशीर्वाद देऊन प्रेमपूर्वक त्यांनीं यथाविधि त्याचा सत्कार केला. इंद्रभुवनाप्रमाणें सुगंधित अशा त्या आश्रमामध्यें कांहीं दिवस राहून बिंदुसर, मैनाक व आजुबाजूंचीं दुसरीं रम्यस्थलें पहात जेथें देव व ऋषी ह्यांचाच संचार आहे अशा त्या दुर्गम प्रदेशांत भागीरथीच्या पुण्यजलामध्यें देव व ऋषी ह्यांना तर्पण करून जप करीत व द्रौपदीशीं नानाविध विहार करीत ते कांहीं दिवस सुखांत राहिले.

८३ मारुतीची गांठ, विश्वरूपदर्शन व सौगंधिका नयन (३. १४६–५६)

अर्जुनाची गांठ पडेल या आशेनें पांडव बदरी आश्रमांत सहा दिवस राहिले. तेथें ते रहात असतां कोणे एके वेळीं सूर्याप्रमाणें दैदीप्यमान सहस्रदल एक सुंदर कमल ईशान्येकडून वाहणाऱ्या वाऱ्यानें वहात येतांना द्रौपदीच्या दृष्टीस पडलें. तें पाहून आनंदानें ' मी हें माझ्या मनाला आल्हाद देणारें सुवासिक कमल धर्मराजांना देईन, आपल्या आश्रमाला घेऊन जाण्यासाठीं अशा प्रकारचीं आणखी कमलें माझ्यावर आपलें प्रेम असेल तर मला आणून द्या, ' ह्मणून द्रौपदीनें भीमापाशीं आग्रह धरला. तिचा तो आग्रह पाहून प्रियेचे मनोरथ परिपूर्ण करण्यासाठीं तें कलम ज्या दिशेनें वहात आलें होतें त्या दिशेला समोरच्या वाऱ्याला तोंड देऊन आपलें रुपेरी धनुष्य व आशीविषाप्रमाणें तीक्ष्ण बाण बरोबर घेऊन खवळलेल्या सिंहाप्रमाणें भीम निघाला. द्रौपदीचें प्रिय करण्याकडे सर्व लक्ष लागलें असल्यामुळें व आपल्या मनगटाच्या जोराची पूर्ण खात्री असल्यामुळें भीति अगर श्रम यांची दिकत न करतां, न डगमगतां तो इष्ट हेतु मनापुढें ठेवून झाडें, वेली व झुडपें यांनीं किर्र व किरात. गंधर्वादि नाना जातींच्या प्राण्यांचा संचार असले-

ला, अनेक धातू, वृक्ष, व पशुपक्षी यांनीं चित्रविचित्रित, असा तो पृथ्वीचा सर्व भूषणांनीं युक्त असा वर केलेला जणूं हातच कीं काय अशा दिसणाऱ्या त्या पर्वतामधून कोकिलांचा मंजुळ शब्द ऐकत व त्या प्रदेशांतील निरनिराळीं रम्य शिखरें पहात तो चालला. आपले कान, मन व डोळे सर्व ह्या रम्य प्रदेशीं लावून सर्व ऋतूंतील पुष्पांचा सुवास घेत, मत्तगजाप्रमाणें मोठ्या ऐटीनें तो चालला असतां थंड व नानाप्रकारच्या पुष्पांचा सुवास ज्याला लागला आहे असा वारा त्याच्या अंगावरून जात असल्यामुळें त्याचे सर्व श्रम परिहार होत होते. चालला असतां तो आपल्या वेगानें अनेक वृक्ष व लता ह्यांना हलवून सोडीत होता. भय म्हणून ज्यांना माहीत नाहीं असे त्याच्या जवळून चाललेले मृग मोठ्या कौतुकानें त्याकडे पहात होते. तांबडे, काळे व पांढरे धातू ज्याला लागले आहेत, अशीं समच्छदाचीं पानें ह्या पर्वताला खरचटत असल्यामुळें बोटांनीं त्याला गालबोट लाविले आहेत कीं काय असें वाटत होतें, व त्याच्या तटाला बिलगलेल्या ढगांच्या योगानें तो आपलीं **पिसें पसरून** नृत्यच करीत आहे कीं काय असें वाटत होतें. त्याच्या अनेक झऱ्यांमधून झिरपणाऱ्या जलप्रवाहाच्या योगानें त्याच्या गळ्यांत मोत्याचे हारच घातले आहेत कीं काय असें वाटत होतें. त्यामध्यें अनेक मनाला आल्हाददायक गुहा, राया, झरे, असून अप्सरांच्या नूपुरांच्या ध्वनीच्या अनुरोधानें मनोहर मोर तेथें नृत्य करीत होते. दिग्गजांच्या दांतांनीं खरचटून खरचटून त्याचे खडक अगदीं झिजून गेले असून त्यांतून निघणाऱ्या नद्यांचे प्रवाह खालीं पडतांना पाहून तर त्याच्या अंगावरचें वस्त्रच गळून पडतें आहे कीं काय असा भास होत होता. अशा ह्या रम्य पर्वतांतून प्रियेची इच्छा पूर्ण करण्याच्या उत्कट इच्छेनें मत्तगजाप्रमाणें विक्रमशाली व मत्त गजाचीसुद्धां डाळ न शिजूं देणारा तो सिंहगतीनें चालला असतां आपल्या, पतीच्याजवळ बसलेल्या यक्षगंधर्वादिकांच्या स्त्रियांचें सर्व लक्ष ह्या अपूर्व रूपाकडे वेधलें जात होतें. तो चालला असतां पुढील विचार त्याच्या मनांत घोळत होते. 'अर्जुन स्वर्गी आहे व मी पुण्याकरितां येथें आलों आहे. अतिस्नेहामुळें नरश्रेष्ठ युधिष्ठिर खात्रीनें नकुलसहदेवांना माझ्या शोधाला पाठवितील. पुढें त्या एकट्याची काय वाट होईल?' असा विचार मनांत आल्यानें आपला वेग दुप्पट करून त्यामुळें पायानें जमीन दरदरून सोडीत तो चालला असतां कित्येक सिंह, वाघ व हरिण त्याच्या पायाखालीं चिरडून जात होते. त्याच्या आड येणारीं मोठमोठीं झाडें व वेली तर सहज उपटून टाकीत तो पुढें चालला होता. हात्तीचे कळप त्याला पाहून अगदीं घाबरून गेले होते. ह्याच्या महाशब्दांनीं जागे झालेल्या वाघांनीं आपल्या गुहा सोडल्या. सर्व वनवासी श्वापदें लपण्यासाठीं चोहोंकडे सैरावैरा धांवूं लागलीं. पक्षी घाबरे होऊन आकाशांत उडाले. हरणें इकडे तिकडे पळूं लागलीं. अस्वलांनीं झाडें सोडलीं. सिंहांनीं आपल्या गुहा सोडल्या. मोठमोठे रेडे वर पाहूं लागले. वाघ, डुक्कर, कोल्हा इत्यादि श्वापदांचे थवेच्याथवे, त्याचप्रमाणें चक्रवाक, अंधकाक, हंस, कारंडव, पाणकोंबडीं, राघू इत्यादि पक्ष्यांचे थवे वेडे होऊन काय करावें हें न सुचतां मलमूत्र टाकीत आ पसरून किलकिल करीत दशादिशांला पळूं लागले. ह्याप्रमाणें तो चालला असतां पुष्कळ योजनेंपर्यंत पसरलेलें एक मोठें केळीचें वन त्याला लागलें. तेव्हां ताडाप्रमाणें उंच उंच असलेल्या अनेक केळी उपटून बाजला फेकीत तो पुढें चालला. इतक्यांत पाण्यानें ज्यांचीं पिसें थबथबलेलीं आहेत असे जलाचा आश्रय करून रहाणारे हजारों भयभीत झालेले पक्षी आकाशांत उडतांना त्याच्या दृष्टीस पडले. त्यांच्या अनुरोधानें तो चालला असतां एक रम्य सरोवर त्याच्या दृष्टीस पडलें. त्यामध्यें मत्त गजाप्रमाणें यथेच्छ क्रीडा केल्यावर पुढें दिसणाऱ्या निबिड वनामध्यें शिरून अंगांतील सर्व शक्ति खर्चून त्यानें शंख फुंकला. पुढें गेला असतां ह्याला कोणाचा शाप होईल किंवा कोणाशीं ह्याची चकमक उडेल या भीतीनें त्याचा भाऊ जो मारुती त्यानें ह्याचा पुढें जाण्याचा मार्ग अडविला. त्या केळीच्या वनांत उभा राहून जांभई देत इंद्राच्या ध्वजाप्रमाणें उभारलेली आपली शेपटी त्यानें जमिनीवर आपटली. इंद्रधनुष्याप्रमाणें त्याचा भयंकर शब्द होऊन त्याच्या योगानें तो पर्वत दरदरून चोहोंकडे फाट-

ला. त्या शब्दानें आनंदभरित होऊन भीमाच्या अंगावर हर्षरोमांच उभे राहिले व त्याच्या अनुरोधानें तो चालला. त्यावेळीं विजेच्या लकाकीप्रमाणें ज्यावर नजर ठरत नव्हती व ज्याचा वर्ण तशाच प्रकारचा पिंगट असून ज्याचा शब्द मोठा गंभीर होता व जो फार चंचळ दिसत होता असा दीर्घबाहु मारुती भीमाच्या दृष्टीस पडला. त्यानें आपली भरलेली मान स्वस्तिकाकार हातावर ठेविली होती. त्याचे खांदे भरून आले असल्यामुळें कटिप्रदेश व कंबर अगदीं बारीक दिसत होती; त्याचें शेवटाला किंचित दुमटलेलें, केसाळ व उभारलेलें शेपूट उभारलेल्या ध्वजाप्रमाणें शोभत होतें. त्याचे ओठ बारीक असून जीभ व तोंड लालभडक होतीं; त्याच्या दाढा व दांत पुढें आले असून अणकुचीदार होते; त्याच्या अंगावरील दाट केस अशोकाच्या अंकुराप्रमाणें शोभत होते. हिरण्मय केळीच्या वनांत पडलेल्या त्याच्या दैदीप्यमान शरीराची कांति अग्नीप्रमाणें दिसत होती. जणूं मद्य प्राशन केल्याप्रमाणें आपले लाल डोळे त्यानें भीमाकडे लावले होते. भीमाचा स्वर्गमार्ग आडवून पडला असल्यामुळें तो साक्षात् हिमाचलाप्रमाणें दिसत होता. ह्या धिप्पाड व बलशाली वानराला पाहून मुळीं न कचरतां त्याजवळ जाऊन भीमानें सिंहनाद केला. किंचित् डोळे उघडून त्याकडे पाहून हासून मारुती ह्मणाला, 'श्रमामुळें मला मुळीं झोंप नाहीं. त्या मला आतां कोठें थोडी झोंप लागते तों तूं कां जागें केलेंस? तुला ज्ञान आहे. तुझ्यासारख्यांनीं भूतांना पीडा देऊं नये. क्षुद्र योनीमध्यें जन्म झाला असल्यामुळें आह्मांला धर्म कळत नाहीं. परंतु शरीर, वाणी व मन यांना भूषणास्पद अशा तुझ्यासारख्यांनीं धर्मविरोधी क्रूर कर्मांमध्यें मन कां घालावें? शहाण्यांचा सहवास असून त्यापासून तूं अद्यापि धर्म शिकला नाहींसें वाटतें. ह्मणूनच ह्याप्रमाणें पशुपक्षांक्ष्यांना पीडा देत फिरत आहेस. तूं कोण आहेस? जेथें मनुष्याचें वास्तव्य नाहीं अशा ह्या वनामध्यें कां आला आहेस? तूं कोठें निघाला आहेस? ह्यापुढें ह्या पर्वतावर जातां येणें शक्य नाहीं. हा देवलोकांचा मार्ग असून सिद्धांशिवाय ह्या मार्गानें कोणाला जातां यावयाचें नाहीं. तुझी दया येऊन मी तुला पुढें जाऊं नकोस ह्मणून सांगतों. हीं अमृततुल्य फळें मजपाशीं आहेत तीं खाऊन तूं परत जा. विनाकारण कालाच्या तोंडांत पडूं नकोस.' हें ऐकून भीमानें आपली हकीकत व येण्याचा हेतु सांगून 'तूं कोण,' ह्मणून विचारलें. मारुती ह्मणाला, 'मी वानर आहें. मी तुला वाट देणार नाहीं. परत फीर. उगीच मृत्युमुखीं पडून स्वतःचा नाश करून घेऊं नकोस.' यावर 'तें कांहीं असो, तें मी तुला विचारीत नाहीं. मुकाट्यानें माझी वाट सोड. उगीच आडमोठपणा करून माझ्यापासून स्वतःला दुखापत करून घेऊं नकोस,' असें भीमाचें हट्टाचें भाषण ऐकून मारुती ह्मणाला, 'मी व्याधिग्रस्त आहें. माझ्यानें हालवत नाहीं. तुला जाणेंच असेल तर मला ओलांडून जा.' भीमानें उत्तर केलें, 'निर्गुण परमात्मा सर्वांचा देह व्यापून आहे हें माहीत असून माझ्या हातून त्याचा अवमान होणार नाहीं. **वेदाध्ययनानें** ह्या भूतभावनाला मीं ओळखलें नसतें तर मारुतीनें ज्याप्रमाणें समुद्र ओलांडला त्याप्रमाणें तुलाच काय पण हा पर्वत देखील ओलांडण्याला मी समर्थ आहें.' यावर 'तूं जें हें मारुतचिें नांव घेतलेंस तो मारुती कोण,' ह्मणून मारुतीनें बळेंच त्याला विचारलें. तेव्हां भीम ह्मणाला, 'हा बुद्धिशाली वीर्यवान व सर्वगुणसंपन्न वानरश्रेष्ठ माझा भाऊ होय. रामायणामध्यें हा फार प्रसिद्ध आहे. ह्यानें रामाच्या बायकोसाठीं शंभर योजनेंपर्यंत विस्तीर्ण समुद्र एका उडीसरशी ओलांडला. माझें तेज त्याच्यासारखेंच असून तुला दंड करण्याला मी समर्थ आहें. ऊठ मला वाट दे. नाहींतर मी तुला यमसदनाला पाठवीन.' ह्याप्रमाणें भीमाच्या ठिकाणीं बलाचा व बाहुवीर्याचा दर्प पाहून मनांतल्यामनांत मारुती हासून ह्मणाला, 'कृपा कर, ह्मातारपणामुळें मी उठवणीला आलों आहें. माझ्यावर दया करून ही माझी शेपटी एका बाजूला सारून तूं जा? भीमाला हें त्याचें भाषण खरेंच वाटून हासत हासत त्यानें आपल्या डाव्या हातानें त्याची शेपटी सहज धरली, परंतु पुष्कळ झटापट खाल्ली तरी त्याला ती उचलता गेईना. त्याचें सर्व अंग घामानें डबडबून गेलें. तेव्हां लाजेनें तोंड खालीं घालून त्या वानरापुढें हात जो-

डून उभा राहून भीम ह्मणाला, ' कपिश्रेष्ठा, प्रसन्न हो. माझ्या दुर्भाषणाबद्दल मला क्षमा कर. तूं कोण सिद्ध, देव, गंधर्व किंवा गुह्यक आहेस, हें जर गुह्य नसेल तर मला सांगण्याची कृपा कर. हा मी तुझा शिष्य तुझ्यापुढें हात जोडून उभा आहें. ' मारुती ह्मणाला,'जगताच्या प्राणभूत वायूनें केसरी नांवाच्या वानरस्त्रीपासून मला जन्म दिला.माझें नांव हनुमान. सर्व वानरांनीं सूर्यपुत्र सुग्रीव व इंद्रपुत्र वाली ह्यांची सेवा पतकरली. त्या कालीं अग्नि व वायु ह्यांचें ज्याप्रमाणें परस्परांशीं सख्य जुळतें त्याप्रमाणें सुग्रीवाशीं माझें सख्य जुळलें. पुढें भावानें त्याला कांहीं कारणांनीं दुखविल्यामुळें ऋष्यमूक पर्वतावर तो मजबरोबर बरेच दिवस राहिला. इतक्यांत दाशरथी राम, साक्षात् मनुष्यरूपानें अवतरलेला भगवान विष्णु, पित्याचें प्रिय करण्यासाठीं बायको व भाऊ ह्यांसहवर्तमान अरण्यांतून फिरत दंडकारण्यामध्यें येऊन राहिला. जनस्थानांत असतां सुवर्ण व रत्न ह्यांनीं चित्रविचित्रित अशा मृगरूपधारी राक्षसाकडून सीतामातेला मोह पाडून दुरात्म्या रावणानें तिला बलात्कारानें उपटली. बायकोचा शोध करीत फिरतां फिरतां त्या पर्वतशिखरावर त्याची व सुग्रीवाची गांठ पडून त्यांचें सख्य जुळलें. नंतर रामानें वालीला मारून सुग्रीवाला राज्य दिलें. राज्य मिळाल्यावर सुग्रीवानें सीतामातेच्या शोधासाठीं वानर पाठविले. आह्मीं कोट्यावधी वानर तिचा शोध करीत दक्षिण दिशेकडे चाललों. त्यावेळीं महात्मा संपाति नामक गृध्रानें सीतामातेला रावणानें हरण केल्याबद्दलची बातमी आह्मांला दिली. तेव्हां रामकार्य शेवटास नेण्यासाठीं तो अफाट व भयंकर जलचरांनीं भरलेला समुद्र ओलांडून सीता देवीची गांठ घेऊन उंच उंच बुरूज, तट व वेशी यांनीं शोभायमान अशी ती लंका जाळून फस्त करून माझें नांव त्याठिकाणीं कळवून मी परत आलों. माझ्याकडून सीता मातेची खबर मिळाल्यावर त्या मोठ्या समुद्राला सेतु बांधून कोट्यावधि वानरांसहवर्तमान रामचंद्र लंकेला गेला व त्यानें सर्व राक्षसांसहवर्तमान लोकांना पीडा देणाऱ्या रावणाला ठार मारलें व धर्मनिष्ठ व भक्तिमान बिभीषणाला लंकेच्या राज्यावर अभिषेक करून नष्ट झालेल्या वेदाप्रमाणें सीतामातेला परत मिळवून अयोध्येला परत आला, त्यावेळीं ही रामकथा लोकांमध्यें कायम राहीतोंपर्यंत मी जगावा, असा मीं वर मागितला व त्यानें तो मला दिला. सीतामातेच्या प्रसादानें ह्या ठिकाणीं मला सर्व उपभोग्य वस्तू इच्छिल्याबरोबर मिळतात. राम अकरा हजार वर्षं राज्य करून निजधामाला गेला. ' यावर ' आपण एवढे शक्तिमान असून स्वतः रावणाला कां मारलें नाहीं, ' ह्मणून भीमानें त्याला विचारलें. तेव्हां मारुती ह्मणाला, ' जगामध्यें रामचंद्राची अखंड कीर्ति व्हावी एवढ्याच उद्देशानें समर्थ असतां मीं रावणाला मारलें नाहीं. हा पुढें दिसणारा देवांचा मार्ग असून त्या ठिकाणीं मनुष्यसंचार नाहीं. तूं पुढें गेलास तर कोणाबरोबर तुझी चकमक उडेल किंवा कोणी तुला शाप देईल, एवढ्याचसाठीं हा तुझा मार्ग मीं अडविला. ' भीमाला हें ऐकून फार संतोष झाला. मधुर शब्दांनीं तो ह्मणाला, ' मला आज आपल्यासारख्या थोरांचें दर्शन झालें आहे, तेव्हां मी आपल्याला मोठा धन्य समजतों. माझ्यावर हा आपला मोठा अनुग्रहच मी समजतों. समुद्र ओलांडतेवेळीं आपण जें अलौकिक स्वरूप धारण केलें होतें तें आपलें स्वरूप पाहण्याची मला फार इच्छा झाली आहे. ' मारुती ह्मणाला, ' तुला अगर दुसऱ्या कोणालाही तें रूप पाहतां येणें शक्य नाहीं. त्यावेळचा काळ निराळा होता व हल्लींचा काळ निराळा आहे. कृतयुगाची गोष्ट वेगळी, त्रेतायुगाची वेगळी, द्वापाराची वेगळी. हा सर्वांतकाळ कलि आहे. व आज तें माझें तेजही उरलें नाहीं. **युगायुगांत सर्व चराचर कालानुरूप शक्तिमान असतात.** शक्ति, शरीर व सामर्थ्य हीं कालाकालानें कमी होत जातात. मीही कालधर्माला अनुसरत आहें. काल हा दुर्लंघ्य आहे. कृतयुगांत सनातन धर्म प्रचलित असून प्रत्येकामध्यें त्या कालीं धर्माची पूर्णता असल्यामुळें कर्तव्य ह्मणून त्या कालीं कांहींच उरत नसे. त्या कालीं धर्माचा ऱ्हास होत नसून प्रजेचा क्षय होत नसे. ह्मणूनच ह्याला कृतयुग हें नांव आहे. पण कालानें ह्याला गौणत्व आलें आहे. त्या कालीं देव, दानव, यक्ष, राक्षस, गंधर्व, पन्नग वगैरे कोणी न-

व्हते. क्रयविक्रय कोणाला माहीत नव्हता. साम, ऋक् व यजु यांपासून उत्पन्न होणाऱ्या क्रिया त्यावेळीं नसून सर्व फलप्राप्ति संकल्पसिद्ध असे. संन्यास (सर्वत्याग) हाच काय तो त्यावेळीं धर्म होता. त्या कालीं व्याधि किंवा इंद्रियक्लेश मुळींच माहीत नव्हते. असूया, दुःख, अहंपणा, दुसऱ्याला पीडा देणें, कलह, आळस, तंद्री, द्वेष, दुष्टपणा, भीति, संताप, ईर्षा किंवा मत्सर इत्यादि दुष्ट विकार त्या वेळीं मुळींच दिसून येत नसत. त्या कालीं ब्रह्म काय तें श्रेष्ठ मानलें जात असून योग्यांना तीच कायती श्रेष्ठ गति असे. **त्या कालीं शुक्लवर्णधारी नारायण** सर्व भूतांच्या ठिकाणीं वास्तव्य करीत असे, **ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र ह्यांचीं जातिभेददर्शक लक्षणें नैसर्गिक त्यांचे ठिकाणीं दिसून येत,** व सर्व प्रजा आपापल्या कर्मांत दक्ष असे. ब्रह्माश्रय करून असणारा व ब्रह्मप्राप्ति करून देणारा धर्म सर्व प्राणिमात्र आचरण करीत. ज्ञानप्राप्तीचा मार्गही सामान्य लोक अवलंबन करीत. पण सर्व वर्णांच्या अनेक क्रियांचें पर्यवसान एका ब्रह्मप्राप्तीकडेच असल्यामुळें सर्वांच्या हातून धर्मच साहजिक घडत असे. **एकाच प्रणवानें व एकाच विधीनें सर्व एकाच आराध्यदेवतेचें ध्यान करीत, व निरनिराळ्या वर्णांना देखील एकच वेद होता.** नियमानें राहून कालानुसार चार आश्रमांत सांगितलेल्या कर्मानें एकाच श्रेष्ठ धर्माकडे लक्ष देऊन ते उत्तम गति मिळवीत. धर्म हातून पूर्ण घडला जाऊन कांहींच त्या कालीं करावयाचें उरत नसे. कृतयुगांतील योगाख्य धर्म ब्रह्माशीं ऐक्य करून देणारा असून तो चतुष्पाद आहे असें चारी वर्णाचे लोक समजतात. **त्रेतायुगांत यज्ञक्रिया सुरू होऊन धर्माचा एक पाय कमी झाला. अच्युत रक्तवर्ण झाला.** लोक सत्यानें वागत. सर्व क्रिया धर्ममूलक असत. पण ह्या कालीं क्रिया सहेतुक घडूं लागून त्यांचीं फलेंही कर्त्याला मिळूं लागलीं. यज्ञादि निरनिराळ्या क्रिया सुरू झाल्या. लोक तप व दान ह्यांत गढले असून धर्मभ्रष्ट होत नसत. **द्वापारामध्यें धर्माचे दोन पाय कमी झाले. विष्णु पीतवर्ण झाला. वेद चार प्रकारचे झाले.** वेदाचे चार भाग होऊन कांहींनीं चारी स्वीकारले, कांहींनीं तीन स्वीकारले, कांहींनीं दोन व कांहींनीं एकच स्वीकारला; व कांहींनीं ऋचांची सुद्धां परवा केली नाहीं. ह्याप्रमाणें शास्त्रांत अनेक भेद झाल्यामुळें क्रियाही अनेकविध झाल्या. प्रजा तपश्चर्या व दान ह्यांकडे लागून रजोगुणी दिसूं लागली. एक वेदाच्या अज्ञानामुळें अनेक वेद उत्पन्न झाले. सत्व गुण नाहींसा झाल्यामुळें सत्यानें वागणारे विरळा निपजूं लागले, व प्रजा सत्यापासून ढळूं लागल्यामुळें अनेक प्रकारच्या व्याधि उत्पन्न झाल्या; व काम व दैविक संकटें मी मी ह्मणून येऊं लागल्यामुळें लोकांना फार पीडा होऊं लागली. कांहीं तरी ऐहिक मनकामना किंवा स्वर्गप्राप्ति ह्यांसाठीं यज्ञ होऊं लागले. व अधर्मामुळें प्रजेचा क्षय होऊं लागला. **कलियुगामध्यें तर धर्म एक पादानें शिल्लक राहिला आहे.** केशव रूष्णवर्ण झाला आहे. ह्या तमोगुणयुक्त युगांत धर्म, यज्ञ, इत्यादि क्रियांचा ऱ्हास होईल. अतिवृष्टि अनावृष्टि इत्यादि राष्ट्रावर येऊन गुदरणारीं संकटें, व आधिव्याधि, भय, राग, आलस्य इत्यादि दोष उत्पन्न होतील. जसजसा युग बदलतों तसतसा त्याबरोबर धर्म बदलून धर्माबरोबर लोकही बदलतात. लोकांच्या ऱ्हासाबरोबर त्यांना प्रवर्तक ज्या धर्मादि क्रिया त्यांचाही ऱ्हास होतो. त्यामुळें एक केल्याचें भलतेंच फळ मिळतें. आतां लवकरच कलियुग सुरू होईल. चिरंजिव्यांमध्यें देखील कालानुरूप बदल होतो. ह्मणून आतां माझें पूर्वीचें रूप उरलें नाहीं. शिवाय माझें रूप पहाण्याची जी ही तुला इतकी अनावर इच्छा उत्पन्न झाली आहे, त्याबद्दल मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, शहाण्यानें अशी भलती इच्छा कधीं धरूं नये. ' हें मारुतीचें भाषण ऐकूनही आपलें तें पूर्वीचें रूप पाहिल्याशिवाय मी जाणार नाहीं असा भीमानें आग्रह धरला. तेव्हां मारुती हासला व भावाचें कोड पुरविण्यासाठीं त्यानें समुद्र ओलांडण्याच्या वेळचें आपलें उग्र स्वरूप त्याला दाखविलें. त्यावेळीं त्याचा आकार इतका मोठा झाला कीं, केळींच्या वनांनीं किर्र असा तो पर्वत त्यानें अगदीं झांकून जाऊन त्याचे ते रक्तनेत्र, अकाळविकाळ दाढा, भल्यामोठ्या भिवया, मोठा जबडा व लांब

शेपूट यांनीं पुढें कांहीं दिसेनासें झालें. हें आपलें रूप पाहून चकित झालेल्या भीमाला तो म्हणाला, 'वत्सा, माझें रूप एवढेंच पहाण्याला तूं समर्थ आहेस. वाटेल तितका मोठा होण्याची मला शक्ति आहे व शत्रु भेटला म्हणजे तर मी वाटेल तेवढा वाढूं शकतों.' नंतर आपलें रूप पाहून भीमाचे डोळे दीपून गेले आहेतसें पाहून त्यानें शरीर पूर्ववत् संकुचित केलें, व भीमाला सौगंधिक वनाचा मार्ग दाखवून देऊन तो म्हणाला, 'कुरुश्रेष्ठा, ह्या मार्गानें तूं यक्षराक्षसांनीं रक्षित अशा कुबेराच्या सौगंधिक वनाला जाऊन पोहोंचशील. त्या ठिकाणीं कांहीं अविचार करूं नकोस. मानवांनीं बली, होम, नमस्कार व मंत्र ह्या योगानें देवांना मान देणें उचित आहे. भक्तीच्या योगानेंच ते प्रसादोन्मुख होतात. कांहीं अविचार न करतां स्वधर्म संभाळ. स्वधर्मानें वागून कार्याकार्याचा योग्य विचार करून तसें वाग. धर्माला न ओळखतां व वृद्धांची सेवा न करतां धर्मार्थांची प्राप्ति बृहस्पतीसारख्यांनाही होणें शक्य नाहीं. ज्या ठिकाणीं अधर्म धर्मा-प्रमाणें दिसतो व धर्म अधर्माप्रमाणें दिसतो अशा ठिकाणीं मोठ्या हुषारीनें विचारानें वर्तन ठेवलें पाहिजे. मूर्ख लोकांना ह्या ठिकाणीं भ्रम उत्पन्न होतो. शुचिभूतादिक आचारापासून धर्माची उत्पत्ति असून वेद धर्मावर अवलंबून आहेत. वेदांपासून यज्ञ व यज्ञापासून देवांचें अस्तित्व आहे. **वेद व आचार ह्यांत सांगितलेल्या विधींनें केलेल्या यज्ञावर देव अवलंबून आहेत.** बृहस्पती व उशना यांनीं सांगितलेल्या नीतीवर मनुष्य अवलंबून आहेत. **वेतन घेऊन सेवा करणें, कर घेणें, व्यापार करणें, शेती करणें, गाई व मेंढ्या पाळणें हे त्यांच्या उदरनिर्वाहाला साधनीभूत धर्म आहेत.** यांवर ब्राह्मणांना उदरनिर्वाह करतां येतो. सारांश वेदाध्ययन, व्यापार व राजनीति ह्या लोकांना उपजीविकेला साधनीभूत सांगितल्या असून ह्यांचा योग्य उपयोग होण्यावर ही लोकयात्रा पार पडते. पण हाच उपजीविकेचा मार्ग सोडून दिल्यानें सर्व जगाची मर्यादा सुटेल. ह्या शास्त्रोक्त धर्मानें जे चालत नाहींत त्यांचा नाश होतो, परंतु वर निर्दिष्ट उपाय योग्य उपयोगांत आले असतां कल्याण होऊन धर्मवृद्धि होते. **यज्ञ, अध्ययन व दान हे तीन सर्व वर्णांला सामान्य आहेत. यज्ञ करविणें, पढविणें व प्रतिग्रह घेणें हा ब्राह्मणाचा धर्म आहे. प्रजेचें पालन करणें हा क्षत्रियाचा धर्म आहे. त्याचप्रमाणें शेतकी, गोरक्षण व व्यापार हा वैश्याचा धर्म आहे. भिक्षा न मागतां व होम व व्रत न करतां स्वामिगृहीं राहून ब्राह्मणांची शुश्रुषा करणें हा शूद्राचा धर्म आहे.** विनयसंपन्न राहून दुसऱ्यांचें रक्षण करणें हा जो तुझा धर्म त्याचें तूं पालन कर. जो राजा सन्मार्गानें जाऊन वृद्ध, शहाणे, बुद्धिमान, व विद्वान अशा लोकांच्या सल्ल्यानें वागतो त्याचें राज्यशकट सुरळीत चालतें. ह्याविपरीत वागणाऱ्या राजाचा केव्हां नाश होईल ह्याचा नेम नाहीं. **निग्रहानुग्रहांमध्यें ज्यावेळीं राजा योग्यायोग्य विचार करतो त्याचवेळीं लोकमर्यादा कायम राहते.** म्हणूनच शत्रूचा राष्ट्रविस्तार किती आहे, त्याचा किल्ला कसा आहे, त्याच्या बाजूला मित्र किती आहेत, मंत्रगुप्ति कशी आहे, त्याची भरभराट आहे किंवा पडता काळ आहे इत्यादि गोष्टींसंबंधानें **हेराकडून नेहमीं खबर मिळवीत असावी.** गुप्त हेर, बुद्धि, मसलत, पराक्रम, युक्ति, शिक्षा व दक्षता हेच राजाला कार्यसिद्धीला उपयोगीं पडतात. साम, दाम, दंड भेद, व उपेक्षा ह्यांना एकाच वेळीं किंवा भिन्न भिन्न वेळीं कामीं लावून आपला कार्यभाग साधून घ्यावा. चांगल्या सल्ल्यानें कार्यसिद्धि होते, म्हणून नेहमीं ब्राह्मणाचा सल्ला घेत जावा. **स्त्री, मूल, मूर्ख, लोभी, हलकट व ज्यामध्यें वेडाचीं चिन्हें दिसत आहेत अशांशीं आपल्या गुप्त गोष्टींचा विचार कधीं करूं नये.** समर्थ असतील त्यांकडून आपले कार्यभाग साधून घ्यावे व आपल्याशीं स्नेहभावानें असतील त्यांच्याकडूनच कारस्थानें चालवावीं. मूर्खांना ह्या सर्व गोष्टींत वगळावें. धर्मकृत्यामध्यें धार्मिकांची योजना करावी; अंतःपुराकडे षंढांची योजना करावी; अर्थप्राप्तीसाठीं शहाण्यांची योजना करावी व क्रूर कृत्यें करण्याकडे क्रूरांची योजना करावी. मूर्खांना कोणत्याही कामांत घेऊं नये. आपल्या वशशत्रूच्या लोकांकडून शत्रू काय करतो आहे, काय नाहीं,

त्याचें बलाबल किती आहे इत्यादि गोष्टी नेहमीं काढून घेत जाव्या. आपण होऊन शरण आलेल्या भल्या गृहस्थांवर अनुग्रह करावा व जे असभ्य उच्छृंखल असतील त्यांना योग्य शासन करवावें. भीमा, हा मी तुला दुर्घट एवढेंच नव्हे, तर समजण्याला देखील कठीण असा धर्म सांगितला आहे. विनयपूर्वक राहून तुझ्या वर्णाला सांगितलेल्या धर्माचें तूं अवलंबन कर. तप, धर्म, दम व यज्ञ ह्यांनीं ज्याप्रमाणें ब्राह्मणाला व दान व आतिथ्य ह्यांनीं ज्याप्रमाणें वैश्याला सद्गति मिळते त्याचप्रमाणें राग, लोभ, काम व दोष हीं सांडून शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें योग्य शासन करणाऱ्या क्षत्रियालाही, निग्रहानुग्रहानें उत्तम गति मिळते.' असा उपदेश करून भीमाला त्यानें घट्ट आलिंगन दिलें. स्नेहामुळें डोळे अगदीं पाण्यानें भरून येऊन व गळा दाटून येऊन तो ह्मणाला, 'वीरा जा. गोष्टींच्या प्रसंगीं माझी आठवण ठेव. मी येथे आहें हें कोणाला कळवूं नकोस. कुबेराकडून निघालेल्या देवगंधर्वस्त्रियांची इकडे येण्याची वेळ झाली आहे. जा. माझ्या डोळ्यांचें आज पारणें फिटलें. तुझ्या मानवी गात्रांचा आज मला स्पर्श झाल्यानें सर्व जगताच्या हृदयाला आनंद देणारा, सीतेच्या मुखारविंदाला उमलविणारा व रावणरूपी अंधकार नाहींसा करणारा सूर्यनारायण जो रामचंद्र त्याची मला आठवण होत आहे. भीमा, ही आपली भेट फुकट न जावी अशी माझी इच्छा आहे. मी तुझा वडील भाऊ आहें हें लक्षांत घेऊन वर माग. हास्तिनापुराला जाऊन क्षुद्र धार्तराष्ट्रांना ठार मारूं कां एखादा मोठा धोंडा लोटून देऊन तें नगरच जमीनदोस्त करून टाकूं किंवा दुर्योधनालाच आज बांधून तुझ्यापाशीं आणूं; काय करूं तें सांग.' हर्षभरित होऊन भीम ह्मणाला, 'कपिश्रेष्ठ, ह्या सर्व गोष्टी झाल्यासारख्या समजून आपण खुशाल असा. आपण आमच्या बाजूला मिळाल्यानें आह्मी सनाथ झालों आहों. आपल्या केवळ तेजानें आह्मी शत्रूंना जिंकावें एवढें आपल्यापाशीं मागणें आहे' मारुतीनें उत्तर दिलें, 'भावाच्या नात्यानें व स्नेहभावामुळें तूं ह्मणतोस तें सर्व मी करीन. शत्रुसैन्यांत शिरून त्यांची दाणादाण उडवून ज्या वेळीं तूं मोठा सिंहनाद करशील त्या वेळीं अर्जुनाच्या ध्वजावर बसून त्या शब्दाला मी भर पाडीन व शत्रूंचे प्राणहारक मोठ्या आरोळ्या देऊन त्यांना मारण्याचें काम तुह्मांला सोपें करून देईन.' असें ह्मणून मारुती त्या ठिकाणीं गुप्त झाला. द्रौपदीची आज्ञा होंच वाटेला बरोबर शिदोरी घेऊन श्रम वगैरे न जुमानतां मारुतीनें दाखवून दिलेल्या मार्गानें भीम अनेक प्रफुल्लित वनें जलानें थबथबलेले मेघ, व अनेक हरणांचे कळप पहात पहात चालला असतां संध्याकाळचे वेळीं जिच्या तीरावर जिकडे तिकडे हरीण हिंडताहेत अशी स्वच्छ व सुवर्णकमलांनीं भरलेली नदी त्याच्या दृष्टीस पडली. त्या ठिकाणीं सोन्याच्या सौगंधिक कमलांचें बनच्या बन लागून गेलें असल्यामुळें राक्षसांचा त्यावर पहारा होता, व तिच्या तीराला किर्र झाडी लागून राहिली असल्यामुळें चोहोंकडून दाट छाया पसरली होती. अशा प्रकारचें हें गंधर्वराजाचें क्रीडास्थान पाहून भीमाच्या मनाला आराम वाटला. त्याला पाहून राक्षस खबळून गेले व 'तूं येथें कां आलास,' ह्मणून त्यांनीं त्याला विचारलें. भीम ह्मणाला, 'ह्या ठिकाणीं असलेल्या सौगंधिक कमलांपैकीं एक वाऱ्यानें उडून आमच्या आश्रमाकडे आलें तें पाहून तशा प्रकारचीं पुष्कळ आपल्याला हवीं अशी इच्छा माझ्या धर्मपत्नीला झाल्यामुळें ती तिची इच्छा पूर्ण करण्यासाठीं मी भीम येथें आलों आहे.' हें त्याचें भाषण ऐकून राक्षस ह्मणाले, 'हें राक्षसेंद्र कुबेरमहाराजांचें आवडीचें विहारस्थान आहे. येथें मर्त्य धर्माला अनुसरणाऱ्या मानवाला येण्याला बंदी आहे. गंधर्व व अप्सरा देखील येथें यक्षराजांची परवानगी घेऊन मगच पानादि विहार करतात. ह्मणून त्यांची परवानगी आणून मग तूं यथेच्छ विहार कर व वाटेल तितकीं कमलें तोडून घे.' भीम ह्मणाला, 'हे राक्षस हो, धनेश या ठिकाणीं कोठें मला दिसत नाहीं व तो दिसला तरी दुसऱ्याला तोंड पसरण्याचें काम माझ्या हातून कधीं होणार नाहीं. याचना हा राजांचा परंपरागत धर्म नव्हे व माझ्या हातून क्षात्रधर्माचें उल्लंघन कधीं होणार नाहीं. पर्वतांतून ओझरणाऱ्या प्रवाहांच्या जलानें बनलेल्या ह्या नदीवर इतरांनाही कुबेराइतकाच हक्क आहे. तर अशा या

सर्वसामान्य वस्तूबद्दल कोणीं कोणापाशीं तोंड पसरावें?' असें ह्मणून त्यांच्या अटकावाला न जुमानतां तो आंत शिरला. 'धरा, बांधा, कापा, ह्याला शिजवून खाऊं या,' असें ह्मणत डोळे वटारून हत्यारबंद होऊन ते त्यावर धांवले. भीमही आपली यमदंडाच्या तोडीची प्रचंड गदा उगारून त्यांवर धांवला. सरळपणानें व न्यायानें त्या सर्व राक्षसांना जिंकून त्या सरोवरांत मनमुराद् विहार केल्यावर त्यानें आपल्या प्रियेसाठीं कमलें तोडून घेतलीं. त्यानें जखमी करून जेरीला आणलेले राक्षस कैलासाकडे धांवत गेले व त्यांनीं भीमाचें सामर्थ्य व त्याचें युद्धकौशिल्य कुबेराला कळविले.तें ऐकून हास्यून 'द्रौपदीसाठीं तो कमलें नेत आहे हें मला कळलें, त्याला तीं वाटेल तितकीं नेऊं द्या,' असें कुबेर ह्मणाला. तें ऐकून राग शांत होऊन ते परत आले. इकडे भीम यथेच्छ क्रीडा करतांना त्यांच्या दृष्टीस पडला.

इतक्यामध्यें संग्रामसूचक आपल्याबरोबर दगडांना वाहून नेणारा मोठा वारा सुटला. उल्कापात होऊं लागले, व भयंकर मेघगर्जना होऊं लागल्या, सूर्यकिरणें मेघांनीं झांकलीं जाऊन सूर्य दिसेनासा झाला व त्याची प्रभा निस्तेज पडली. पृथ्वी दरदर हलूं लागली व आकाश धूळीनें भरून निघालें. दिशा लाल झाल्या. हीं सर्व भयसूचक चिन्हें पाहून व भीम कोठें दृष्टी न पडल्यामुळे 'भीम कोठें आहे' ह्मणून युधिष्ठिरानें द्रौपदीला विचारलें. तिच्या सांगण्यावरून तो सौगंधिक आणावयाला गेला आहे असें कळल्यावर तो ह्मणाला, 'त्याला जाऊन बराच वेळ झाला. तो वायूसारखा वेगवान असून जमीन तोडण्यांत तो गरुडाच्या तोडीचा आहे. असें असून त्याला इतका उशीर कां लागावा? तत्ववेत्त्या सिद्धांचा त्याच्या हातून एखादा अपराध घडण्यापूर्वी जाऊन त्याचा शोध केला पाहिजे. हे घटोत्कचा, तुझ्या साह्यानेंच यांतून पार पडणें शक्य आहे.' हें युधिष्ठिराचें भाषण ऐकून घटोत्कचादि राक्षस लागलींच त्या सर्वांना सौगंधिकवनाकडे घेऊन निघाले. तेथें पोहोंचल्यावर त्या सरोवराच्या,तीरावर भीमसेन व मरून पडलेले राक्षस त्यांच्या दृष्टीस पडले. 'असा अविचार फिरून करूं नकोस,' ह्मणून मधुर शब्दांनीं भीमाला उपदेश करून त्या ठिकाणीं विकलांग पडलेल्या रक्षकांची समाधानी करून कुबेराच्या विचारानें ते त्याच ठिकाणीं अर्जुनाची वाट पहात कांहीं काल राहिले. ह्या ठिकाणीं अनेक तीर्थांतील स्नानानें पवित्र होऊन 'आह्मी व्रतस्थ आहों तरी कुबेराच्या पुण्यनगरीला आह्मांला कां जातां येऊं नये,' अमा विचार धर्मराजाच्या मनांत येऊं लागला. इतक्यांत 'येथून कुबेर नगरीला जातां येणें शक्य नाहीं, बदरी आश्रमाला परत जाऊन तेथून वृषपर्व्याच्या मनोरम आश्रमाला जा, पुढें आर्ष्टिषेणाच्या आश्रमाला गेल्यावर तेथून तुह्मांला अलकेला जातां येईल,' अशी आकाशवाणी झाली, व ह्याचवेळीं सुगंधित, सुखकारक व आल्हादजनक वारा सुटून पुष्पवृष्टि झाली. त्या वाणीला मान देऊन युधिष्ठिर परत बदऱ्याश्रमाला येऊन तेथें सुखांत राहिला.

८४ जटासुरवध. (इ. १५७)

पांडव बदरी आश्रमांत रहात असतां कोणी जटासुर नांवाचा दुरात्मा राक्षस मंत्रकुशल व सर्व शास्त्रांत निष्णात अशा ब्राह्मणाच्या वेषानें येऊन पांडवांच्या आश्रयाला राहिला, व त्यांच्या सर्व शस्त्रास्त्रविद्येवर बारीक नजर देत राहून द्रौपदीला हरण करण्याला संधि मिळण्याची वाट पहात होता. त्याला न ओळखतां इतर ब्राह्मणांप्रमाणें युधिष्ठिर त्याचीही बरदास्त ठेवी. कोणे एके वेळीं भीम मृगयेला म्हणून बाहेर गेला असून घटोत्कचही त्याच्या साथीदारांसह बाहेर गेला होता, व लोमशादि महर्षी स्नानाला गेले होते. ही संधि साधून त्या पापबुद्धि राक्षसानें आपलें विकाळ स्वरूप प्रगट केलें, व सर्व पांडवांचीं हत्यारें, द्रौपदी व तिन्ही पांडव यांना घेऊन तो निघाला. सहदेवानें आपल्या सर्व शक्तीचा उपयोग करून त्याच्या कचाट्यांतून आपल्याला सोडवून घेतलें, व भीमाला मोठ्यानें आरोळी दिली. धर्मराज त्या राक्षसाला म्हणाला, 'मूढा, ह्या तुझ्या वर्तनानें तुझ्या धर्माला कलंक लागत आहे इकडे लक्ष दे. विशेषेंकरून राक्षसांची धर्मानें वागण्यासंबंधानें ख्याति आहे; म्हणून तूं न्यायमार्गानें जावेंस हें बरें. सर्व प्राणिमात्र मनुष्यावर अवलंबून

आहेत. ह्या जगाचा उत्कर्ष असेल तर तुमचा उत्कर्ष असणार. ह्या जगावर संकट पडलें असतां देवांना देखील त्यापासून पीडा होते. यथाविधि हव्यकव्य मिळेल तरच त्यांचें यथास्थित चालणार. आह्मी राष्ट्ररक्षक आहों. राष्ट्राचेंच जर रक्षण न होईल तर भूमि कुठली व सुख कुठलें! बिन अपराधानें राक्षसांनीं राजांचा अवमान करावा हें ठीक नाहीं. आमच्या हातून तुझें काडीभर देखील वांकडें झालें नाहीं. **आपला मित्र, आपल्यावर विसंबून राहणारा, ज्याचें आपण अन्न खालें आहे तो व ज्यांच्या आपण आश्रयाला राहिलों ते, इतक्यांना अपाय करणें महत्पाप आहे.** तूं आमच्या आश्रयानें सुखांत राहिलास व आमचें अन्न खालें आहेस, असें असून मूर्खाप्रमाणें आह्मांला पळविण्याची ही कुबुद्धि तुला कशी आठवली? तुझा आचार व तुझी बुद्धि व्यर्थ असून मरणही तुला तदनुरूप व्यर्थ येणार आहे. ह्या पांचालीवर हात टाकल्यानें विषाचा पेला तळापासून हालवून तूं गट्ट करीत आहेस.' असें ह्मणून स्वतः जड होऊन त्यानें त्या राक्षसाची गति कमी केली. ह्याप्रमाणें त्याची गति कमी झालेली पाहून सहदेव त्याला म्हणाला, 'युद्धाला उभें राहून शत्रूला मारणें किंवा स्वतः मरणें ह्याहून श्रेयस्कर क्षत्रियाला दुसरें काय आहे? क्षात्रतेज दाखविण्याला हीच योग्य वेळ आहे. जय मिळून अगर मरून आह्मांला सद्गतिच मिळणार. आज हा राक्षस जिवंत राहून जर सूर्य अस्ताला जाईल तर मी जातीचा क्षत्रियच नव्हें.' असें म्हणून तो त्यावर तुटून पडणार तों हातांत वज्र घेऊन धांवणाऱ्या इंद्राप्रमाणें गदाधारी भीम त्या ठिकाणीं येऊन दाखल झाला, व द्रौपदीला व पांडवांना राक्षस उपटून नेत आहेसें पाहून अनावर त्वेष चढून तो त्याला म्हणाला, 'तूं आमच्या शस्त्रास्त्रांची टेहळणी करीत होतास तेव्हांच मीं तुला जाणलें. तुझ्यासंबंधानें मला मुळीं खातर वाटत नसल्यामुळें मीं त्यावेळीं तुझ्याकडे लक्ष दिलें नाहीं. शिवाय त्यावेळीं तूं ब्राह्मणवेषांत असून आमचा कांहीं अपराध केला नव्हतास. अपराध न करणाऱ्या ब्राह्मणरूपी अतिथाला कोणत्याही कारणास्तव मारणें रास्त नाहीं. अतिथि राक्षस असला तरी त्याला मारल्यानें नरकप्राप्ति आहे. शिवाय एखाद्याचे दिवस भरल्याशिवाय त्याला कधीं मरण यावयाचें नाहीं. आज खरोखर तुझे पूर्ण दिवस भरले आहेत ह्मणूनच तुला अशी ही बुद्धि झाली. कालसूत्राला अडकविलेला हा गळच तूं गिळला आहेस. तर तोंडांत गळ अडकलेल्या माशाप्रमाणें आज कांहीं तूं वांचत नाहींस. बक व हिडिंब ह्यांचीच वाट आज मी तुला दाखवितों.' असें ह्मणून ओठ चावून आवेशानें द्वंद्वयुद्ध करण्याच्या हेतूनें साक्षात् कालाप्रमाणें तो त्यावर तुटून पडला. त्यांचें घोर युद्ध चाललें असतां मदतीसाठीं धांवून येणाऱ्या नकुलसहदेवांचें निवारण करून भीम एकटाच त्याबरोबर लढला. अनेक झाडें उपटून ते एकमेकांवर फेकीत होते. त्यांचें ह्याप्रमाणें झाडांनीं युद्ध करणें झाडांच्या मुळावरच आलें होतें ह्मणण्यास हरकत नाहीं. परस्परांवर जय मिळविण्याच्या चढाओढीनें हजारों झाडें त्यांनीं दोरखंडाप्रमाणें पिरगळून उपटलीं. पुढें ते मोठमोठे धोंडे घेऊन युद्ध करूं लागले. एकमेकांवर धांवून जाऊन मदोन्मत्त हत्तीप्रमाणें ते एकमेकांला आपणाकडे ओढीत होते व एकमेकांला गुद्दे देत होते. इतक्यांत राक्षसाला अगदीं दमून गेलेला पाहून भीमानें त्याला उचलून चुरगुळून त्याचीं सर्व गात्रें ढिलीं करून सोडलीं. व एका गुद्यासरशीं त्याचें शीर धडापासून वेगळें केलें. दांत-ओठ खाणारें, डोळे वटारलेलें व रक्तानें भरलेलें तें जटासुराचें शीर झाडापासून गळून पडणाऱ्या वाळक्या फळाप्रमाणें खालीं आलें.

८९ वृषपर्वा व आर्ष्टिषेण ह्या ऋषींचें दर्शन व यक्षांबरोबर युद्ध. (३. १५८-६२)

अस्त्रविद्या शिकण्यासाठीं पांच वर्षे बाहेर राहून प्रथम श्वेत नामक शिखरश्रेष्ठावर उतरेन असा संकेत करून अर्जुन गेला होता. त्याला पांच वर्षे होत आलीं असल्यामुळें अर्जुनाची त्या ठिकाणीं भेट घ्यावी या उद्देशानें युधिष्ठिर तिकडे निघाला. कांहीं वाट ते पायीं गेले व कांहीं राक्षसांनीं त्यांना वाहून नेलें. ते उत्तरेकडे चाललें असतां अनेक

दुष्ट विचार युधिष्ठिराच्या मनांत येत. कैलास, मैनाक, गंधमादनाच्या पायथ्याचे प्रदेश, उंच असा श्वेतशिखर ओलांडून वरवर चढून पुष्कळ पवित्र नद्यांचें दर्शन घेत सातवे दिवशीं ते हिमालयाच्या माथ्याला जाऊन पोहोंचले. जवळच गंधमादन व अनेक झऱ्यांनीं व पुष्पित अशा वृक्षांनीं शोभायमान असा वृषपर्व्याचा आश्रम त्यांच्या दृष्टीस पडला. तो पाहिल्याबरोबर त्यांचे श्रम परिहार झाले. ऋषींपुढें जाऊन त्यांनीं त्यांना अभिवादन केलें. व त्यांनीं मुलाप्रमाणें त्यांचें अभिनंदन केल्यावर सात रात्रीं त्या ठिकाणीं काढून आठवे दिवशीं त्यांचा निरोप घेऊन ब्राह्मण, सेवकजन आयुधें, यज्ञपात्रें वगैरे सर्व त्या ठिकाणीं ठेवून लोमश, धौम्य इत्यादि थोड्या ब्राह्मणांसहवर्तमान ते पुढें निघाले. वृषपर्वे कांहीं पाऊलें त्यांना पोहोंचविण्याला गेले व ब्राह्मणांना पांडवांची काळजी घेण्यास सांगून त्यांना उपदेश करून त्यांनीं त्यांना आशीर्वाद दिला व पुढचा मार्ग दाखवून देऊन ते माघारे परतले. अनेक झाडांच्या दाट छायेखालीं मुक्काम करीत वृषपर्व्यानीं दाखवून दिलेल्या मार्गानें दाट मेघांप्रमाणें दिसणाऱ्या त्या पर्वतांचीं अनेक शिखरें पहात पहात ते पर्वतशिखराला जाऊन पोहोंचले. तेथें मनाला आल्हाद देणारे रम्य झरे जिकडे तिकडे वहात होते. पुढें ज्या ठिकाणीं पवित्र कमलांनीं भरलेलीं सरोवरें होतीं असा पुष्पसंपन्न, किंनर, गंधर्व, वियाधर व अप्सरा ह्यांचें संचारस्थान, व वाघ, सिंह, हत्ती, शरभ इत्यादि वन्य पशूंच्या झुंडींच्या योगानें व नाना मृगांनीं गजबजलेला नंदनवनाप्रमाणें मनाला आल्हाददायक गंधमादन त्यांच्या दृष्टीस पडला. तेथून प्रीतिजनक, मधुर व अस्पष्ट असे पक्ष्यांचे श्रुतिमनोहर शब्द ऐकत, त्याचप्रमाणें फलभारानें नम्र व श्रुतिमनोहर शब्द करणाऱ्या नानाप्रकारच्या पक्ष्यांनीं गजबजलेले असे नाना जातीचे वृक्ष व रम्य सरोवरें पहात ते त्या पावन अशा वनांतून चालले. त्या ठिकाणीं कमलवनांमधून त्याचप्रमाणें लतागृहांमधून लांडोरीसहवर्तमान मेघध्वनि ऐकून कामातुर होऊन कांहीं मोर पिसें पसरून मधुर गायनयुक्त मदालसानें सविलास नृत्य करतांना त्यांच्या दृष्टीस पडले. कांहीं मोर दाट वेलींतून व कुड्यांच्या दाट गर्दीतून आपापल्या प्रियेशीं क्रीडा करतांना त्यांना दिसले. कांहीं कुड्यांच्या फांद्यांवरून आपलीं पिसें पसरून बसले असल्यामुळें त्या झाडांनीं मुकुटच घातले आहेत कीं काय असें वाटत होतें. तसेंच कामशराप्रमाणें दिसणारीं, सिंधुवार, कुरबक इत्यादिकांचीं फुलें व कर्णभूषणासारखीं शोभायमान दिसणारीं कर्णिकारांचीं फुलें तर पहातांना मोहच पाडीत होतीं; व तिलकपुष्पांनीं तर वनराजीनें तिलकक्रियाच केली आहे कीं काय असें वाटत होतें. याप्रमाणें भ्रमरांच्या कूजितांनींही मनोहर नानावर्णांचीं फुलें व फळें पहात व सुखस्पर्श असा थंडगार वारा घेत ते आर्ष्टिषेण ऋषींच्या रम्य आश्रममाला येऊन दाखल झाले. सर्व धर्म ज्यांच्या मुखोद्गत आहे अशा त्या तपानें सर्व पापाचें क्षालन केलेल्या तपोनिष्ठ मुनींना पाहून त्यांजवळ जाऊन त्यांना आपलीं नांवें सांगून त्यांनीं अभिवादन केलें. त्यांना बसण्यास सांगून कुशल प्रश्नानंतर त्यांनीं युधिष्ठिराला विचारलें, 'भलत्या सलत्या पापकर्माकडे तूं आपलें लक्ष पोहोंचवीत नाहींस ना? वाडवडिलांच्या मार्गानें चालून गुरु, वृद्ध व वेदपारंगत ह्यांचा योग्य मान ठेवतोस ना? नेहमीं सत्कृत्याकडे लक्ष देऊन दुष्कृत्यांत मन घालूं नये. वृथा गर्व न धरतां साधूंचा यथायोग्य मान ठेवून त्यांना संतुष्ट ठेवतोस ना? वनवासांतही तुझी धर्माकडे प्रवृत्ति आहे ना? तुझा आचार, दान, धर्म, तप, शुचिर्भूतता, सरलता व क्षमाशीलपणा ह्यांमध्यें व्यंग पाहून त्यामुळें धौम्यांना ताप होत नाहीं ना? कुलामध्यें पुत्र किंवा पौत्र झाला असतां त्याच्या पापकृत्यांचें कांहीं प्रायश्चित्त आपणाला भोगावें लागेल कीं काय ह्मणून पितरांना काळजी पडते व त्यांच्या सत्कृत्यांनीं आपलें काय काय हित होणार ह्या आशेनें आनंद होतो. माता, पिता, अग्नि, गुरु व आत्मा ह्या पांचांचा जो यथोचित मान ठेवतो तोच दोन्ही लोक मिळवितो.' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'भगवन्, आपण हा फार श्रेष्ठ धर्म सांगितला आहे. यथाशक्ति यथाविधि हा मी पाळीत असतों.' आर्ष्टिषेण ह्मणाले, 'अष्टमी, चतुर्दशी व पौर्णिमेला ह्या शिखराबर जलप्राशन करून व वायुभक्षण करून

राहणारे आकाशचारी ऋषी व माल्यधारी गंधर्व, अप्सरा, विद्याधर व किंनर तसाच देव व यक्ष ह्यांचा समुदाय दृष्टीस पडतो. भेरी, शंख मृदंगादि वाद्यांचे शब्दही येथून ऐकूं येतात. ह्यापुढें आतां मानवांला जातां येणार नाहीं. ह्यापुढील प्रदेश देवांची विहारभूमि आहे. येथें मानवांच्या हातून एखादा क्षुल्लक अविचार घडला असतां हीं सर्व महाभूतें त्यांचा द्वेष करूं लागून त्यांना शासन करतात. उगीच अविचारानें ह्यापुढें जाणारांना राक्षस शासन करतात. येथूनच वर आलेल्या सूर्याप्रमाणें शिखरारूढ झालेला कुबेर प्राणिमात्रांच्या दृष्टीस पडतो. ह्मणून मुनिजनांना उचित अशा मधुर फलांवर उपजीविका करीत अर्जुनाची गांठ पडेपर्यंत तूं येथेंच रहा.' मुनिआज्ञेनें ते त्या ठिकाणीं रहात असतां ठरलेलीं पांच वर्षें संपलीं. काम पडेल तेव्हां आमची आठवण करा ह्मणजे आह्मी हजर होऊं असें सांगून घटोत्कचादि राक्षस पूर्वीच निघून गेले होते. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर एके दिवशीं गरुडानें एका नागावर झडप घालून त्यासह तो आकाशांत उडाला. त्यावेळीं तो पर्वत कांपूं लागला. वृक्ष उमळून पडले. वाऱ्यानें सुवासिक पुष्पें पांडवांकडे उडून आली. द्रौपदी भीमासह निर्जन प्रदेशीं बसली असतां कांहीं पंचरंगी फुलें त्यांकडे उडून आलीं. तीं पाहून द्रौपदी भीमाला ह्मणाली. 'खांडववनांत आपल्या बंधूंनीं गंधर्व, राक्षस व नाग ह्यांना मारून इंद्राला देखील जर्जर करून गांडीव धनुष्य मिळविलें. आपलें तेज व बल हीं त्यांच्यापेक्षां कमी नाहींत. ह्या पर्वताबरील सर्व यक्ष, गंधर्व व नाग यांचा पराभव करून हा प्रदेश आपण आपल्या लोकांसाठीं निर्भय करून टाका.' हें द्रौपदी टोचून बोलते आहेसें वाटून त्या मानी पुरुषसिंहाला तें सहन झालें नाहीं. नेत्र लाल करून सुवर्णधनुष्यबाणांनीं पूर्ण असा भाता, तरवार व गदा घेऊन तो तिचा आनंद वाढवीत निर्भयपणें त्या शैलशिखराकडे चाललाः श्रम किंवा भय स्वप्नींही न आणतां एकालाच जातां येईल अशा अरुंद व अडचणीच्या वाटेनें टेकाड चढून तो वर शिखरावर जाऊन पोहोंचला. तेव्हां स्फटिकमय सुवर्णमंदिरांनीं देदीप्यमान अशी कुबेरनगरी त्याला पुढें दिसली. त्या नगराला भोंवतालीं सुवर्णप्राकार असून अनेक रत्नांच्या तेजानें तें डोळे दिपवून सोडीत होतें. त्याच्यासभोंवार रम्य उद्यानें होतीं. हा प्रकार त्या पर्वताच्या सर्व शिखरांपेक्षां उंच असून अनेक उंच उंच बुरजांनीं त्याला फार शोभा आली होती. त्याला अनेक मनोहर वेशी असून त्या वेशींना तोरणें लावून त्यावर निशाणें फडकत असल्यामुळें तें नगर फारच सुंदर दिसत होतें. मंद वायूनें सविलास डुलणारीं तीं निशाणें जणूं काय नृत्य करताहेतसें वाटत होतें. अशी ती कुबेरनगरी धनुष्यकोटीवर हात टेकून भीम पहात असतां तेथील सर्व प्राण्यांना त्याला पाहून मोठा अचंबा वाटला. तेथें सुगंधित असा मंद वायु अंगाला फार सुख देत होता. ती रत्नखचित व चित्रविचित्र फुलांनीं विभूषित कुबेरनगरी निर्भयपणें पहात एखाद्या अचल पर्वताप्रमाणें तेथें उभा राहून त्यानें शत्रूच्या अंगावर रोमांच उभा करणारा आपला शंख फुंकला. त्या शंखाचा ध्वनि ऐकून यक्ष, राक्षस, गंधर्व आपआपल्या आयुधांनिशीं त्या शब्दाच्या अनुरोधानें चालले. पुढें त्यांचें व त्याचें युद्ध जुंपलें. भीमानें आपल्या तीक्ष्ण बाणांनीं अंतरिक्षांत व जमिनीवर असणाऱ्या आपल्या शत्रूंचीं गात्रें विगलित करून तेथें रक्ताचा पूर वाहाविला. मेघांनीं झांकून टाकलेल्या सूर्याप्रमाणें राक्षसांनीं भीमाला अगदीं झांकून टाकलें व ज्याप्रमाणें आपल्या किरणांनीं सूर्य सर्व विश्व व्यापून टाकतो त्याप्रमाणें भीमानेंही आपल्या बाणांनीं सर्वांना झांकून टाकलें. त्याच्या बाणांनीं छिन्नभिन्न होऊन भयभीत झालेल्या यक्षांचीं आयुधें हातांतून पटापट गळून पडलीं व ते दीनशब्द करीत दक्षिण दिशेकडे पळूं लागले. त्यांमध्यें कोणी मणिमान नांवाचा राक्षस कुबेराचा मित्र होता. त्यानें ह्यांना पळतांना पाहून हासून, 'एकट्या मानवानें तुह्मां सर्वांना युद्धांत जिंकून टाकलें, आतां तुह्मी कुबेराला जाऊन काय सांगणार,' ह्मणून हिणवून परतवून त्यांसहित भीमावर चाल केली. त्याला आपल्या अंगावर चालून येतांना पाहून भीमानें तीन बाण सोडून त्याला जेरीला आणिलें. मणिमानानेंही खवळून जाऊन भीमावर गदा फेकली. पण तोही गदायुद्धांत प्रवीण असल्यामुळें त्यानें त्याची डाळ शिजूं दिली नाहीं. इतक्यांत रा-

क्षसानें सोन्याच्या मुठीची व लोखंडाची अणी असलेली शक्ति सोडली. ती भीमाच्या उजव्या बाहूमधून अग्निशिखेप्रमाणें बाहेर पडली. ह्याप्रमाणें जखम झाल्यानें त्या वीराचे डोळे रागानें लाल होऊन शत्रूला गर्भगळीत करून सोडणारी आपली गदा घेऊन गरुड ज्याप्रमाणें सापावर झडप घालतो त्याप्रमाणें तो मणिमानावर धांवून गेला व त्यावर ती फेकून त्यानें त्याला ठार केलें. त्याबरोबर बाकीचे राक्षस कुबेराकडे जाऊन त्यांनीं भीमाचा पराक्रम त्याला कळविला. इकडे भीम कोठें आहे म्हणून युधिष्ठिरानें द्रौपदीला विचारलें असतां तिनें घडलेली सर्व हकीकत त्याला सांगितली. ती ऐकून युधिष्ठिर सर्वांना घेऊन भीम होता त्या ठिकाणीं आला व त्याचें तें साहस पाहून तो त्याला म्हणाला, 'बत्सा, तूं मुनिवेषांत आहेस. तुला असें करणें उचित नाहीं. कोणाला दुखवूं नये असें असून तूं तर हा प्रत्यक्ष देवांचा अपराध केला आहेस. धर्मार्थांना न जुमानतां जो पापकर्माकडे प्रवृत्ति ठेवतो त्याला त्याच्या कर्माचें फल खात्रीनें मिळतें. मला दुखवावयाचें जर तुझ्या मनांत नसेल तर फिरून तूं असें करूं नकोस.' इकडे हा भीमाचा दुसरा अपराध ऐकतांच कुबेर लाल झाला, व आपला रथ तयार करण्यास सांगून डोळे लाल झालेले असे बलशाली हत्यारबंद दहा हजार यक्ष बरोबर घेऊन आकाशमार्गानें तो गंधमादनाकडे निघाला. त्या ठिकाणीं धनुष्यबाण घेऊन पांडुपुत्रांना सज्ज पाहुन, देवकार्याची आठवण होऊन कुबेराला मोठा संतोष झाला. इकडे पांडवांना आपण कुबेराचा मोठा अपराध केला आहेसें वाटून कुबेरापुढें ते हात जोडून उभे राहिले. खड्गधारी भीमानें कुबेराकडे आपली दृष्टि लावली होती. त्याच्या मनाला मुळींच भीति वाटत नसून जणूंकाय युद्ध करण्याच्याच तयारीनें त्याच्यापुढें तो उभा आहेसें दिसलें. त्याला पाहून कुबेर युधिष्ठिराला म्हणाला, 'पार्था, सर्व भूतांच्या हिताला तूं नेहमीं जागतोस. तूं ज्ञाता आहेस. भीमावर राग मुळीं करूं नकोस. हे यक्षराक्षस पूर्वीच कालहत असल्यामुळें तुझा भाऊ केवळ निमित्तमात्र झाला. यावर माझा मुळींच राग नाहीं. उलट याचा जोम पाहून मला संतोष होत आहे. पूर्वी कुशंवेतीमध्यें विचार करण्यासाठीं देव जमले होते. त्या ठिकाणीं मी आपल्या सायुध अशा तीनशें पद्मे यक्षराक्षसांसह चाललों होतों. जातांना मार्गांत ऋषिसत्तम अगस्त्य आमच्या दृष्टीस पडले. वर हात करून सूर्याकडे पहात ते बसले असतां माझा प्रिय सखा जो राक्षसाधिपति मणिमान हा मूर्खपणानें, अज्ञानानें, गर्वानें अगर त्यांचा प्रभाव न कळल्यामुळें त्यांच्या मस्तकावर थुंकला. त्यामुळें कोपानें अगदीं लाल होऊन ऋषी मला ह्मणाले, 'ज्याअर्थी ह्या दुरात्म्यानें तुझ्यादेखत माझी अप्रतिष्ठा केली आहे, त्याअर्थी सर्व सैन्यानिशीं हा मानवाच्या हातून मरण पावेल. तुझ्यावरही संकट येऊन नरश्रेष्ठ भीमाच्या दर्शनानें तूं दुःखमुक्त होशील. ह्याप्रमाणें झालेल्या मुनिशापापासून तुझ्या भावानें आज मला मुक्त केलें आहे. युधिष्ठिरा, धैर्य, दक्षता, काळ, वेळ व पराक्रम हे पांच ह्या जगांत सिद्धीला हेतुभूत आहेत. कृतयुगांत धैर्यशाली, स्वकर्मांत दक्ष व पराक्रमी असे पुरुष होऊन गेले, धैर्यशाली, देशकाल व कर्तव्याकर्तव्य जाणणारा क्षत्रिय चिरकाल ह्या पृथ्वीचा उपभोग घेतो. जो सर्व कामांत अशी दक्षता ठेवतो तो ह्या ठिकाणीं कीर्ति संपादन करून परलोकीं सद्गति मिळवितो. जो केवळ विकारवश होऊन संकटाकडे लक्ष देत नाहीं, जो नेहमीं दुष्ट कृत्यांतच गढला असतो, ज्याला हिताहित व देशकाल कळत नाहींत व जो रागाच्या झपाट्यांत वाटेल तें करण्याला तयार होतो त्याचें इहपरलोकीं अकल्याणच होतें. **दुष्ट व कपटभाव धरून नेहमीं साहसानें सर्व शक्ति आपल्या हातांत घेण्याची ज्यांची इच्छा असते त्यांच्या हातून सदैव पापच घडत असतें.** हा भीम गर्विष्ठ, अल्लड व तापट असून ह्याला न्यायान्याय कळत, नाहीं. 'तूं त्याला तें शिकीव. आर्ष्टिषेणांच्या आश्रमाला परत जाऊन खेद किंवा चिंता सोडून देऊन कृष्णपंधरवडा त्या ठिकाणीं काढ. ह्यापुढें ह्या वनांत असलेले यक्षराक्षस तुमच्या सेवेला हजर राहून तुमचें रक्षण करतील. याचप्रमाणें माझे सेवक तुमच्यासाठीं मिष्टान्न घेऊन येत जातील. इंद्राला जसा अर्जुन, वायूला जसा भीम, धर्माला जसा तूं व अश्विनीकुमारांना जसे हे दोघे नकुलसहदेव

त्याचप्रमाणें तुझी सर्व मला असल्यामुळें तुमचें रक्षण करणें माझें कर्तव्य आहे. अर्थतत्त्वामध्यें कुशल व सर्व धर्मतत्त्व जाणणारा तुझा अर्जुन स्वर्गामध्यें सर्व स्वर्गोपभोग्य वस्तूंचा उपभोग घेत खुशाल आहे. आत्मनिग्रह, दानशीलता, बल, नम्रता, धैर्य व तेज हीं त्याचे ठिकाणीं पूर्ण वसत आहेत. अविचारानें निंद्य गोष्ट त्याच्या हातून कधीं घडणें शक्य नाहीं. तो कधीं असत्य भाषण करतांना कोणाला माहीत नाहीं. पितर व गंधर्व ह्यांकडून त्याला मान मिळून तो तेथें अस्त्रविद्या शिकत आहे. ज्या शंतनूनें न्यायानें सर्व राजांना आपल्या ताब्यांत आणिलें, तो त्यावर तुष्ट आहे व लवकरच परत येऊन तो तुला भेटेल.' असें सांगून कुबेर पर्वतशिखरावर निघून गेला व पांडव उत्तम मंदिरामध्यें कुबेराच्या सेवकांनीं आणून दिलेल्या उत्तम उत्तम वस्तूंचा उपभोग घेत अर्जुनाची वाट पहात सुखानें काल काढीत राहिले.

८६ अर्जुनाची भेट. (३. १६३–६६)

एके दिवशीं सकाळचे वेळीं प्रातर्विधी आटोपून धौम्य व आर्ष्टिषेण पांडवांकडे आले असतां पांडव त्यांचे पायांवर मस्तक ठेवून त्यांच्याभोंवतीं बसले. धौम्य युधिष्ठिराच्या उजव्या हाताला धरून पूर्वेकडून दृष्टी देऊन ह्मणाले, 'हा पुढें समुद्राला जाऊन भिडलेला मंदारपर्वत दिसत आहे. इंद्र व कुबेर हे दोघे ह्या दिशेचे रक्षक आहेत. सर्वधर्मज्ञ अशा विद्वान ऋषींचें हें राहण्याचें ठिकाण आहे. ह्मणूनच ह्या दिशेला उदय पावणाऱ्या सूर्याला सर्व प्राणिमात्र भजतात. सर्व प्राण्यांचा स्वामी यम ह्या दक्षिण दिशेला रहात असून मेल्यावर सर्वांना त्याकडे हजिरी द्यावी लागते. हें पुढें यमधर्माचें वैभवसंपन्न सुंदर संयमन नांवाचें मंदिर दिसत आहे. त्या ठिकाणीं पोहोंचतांच सूर्य नेहमीं सत्याचें अवलंबन करतो. ह्याला अस्ताचल असें नांव आहे. ह्या पर्वतावर व महोदधीमध्यें राहून वरुण सर्व भूतांचें रक्षण करतो. हा महामेरु उत्तर दिशेला प्रकाशित करणारा ब्रह्मवेत्त्यांची गति आहे. ह्याच ठिकाणीं ब्रह्मदेवांची सभा असून तेथून सर्वभूतात्मा प्रजापति सर्व चराचर वस्तू उत्पन्न करतो. ब्रह्मदेवांच्या सात मानसपुत्र दक्षांचें हेंच निर्बाध वसतिस्थान आहे. वसिष्ठादि सप्तर्षी येथेंच राहतात. हें प्रकाशमान मेरुशिखर पहा. सर्व देव व ब्रह्मदेव येथेंच असतात. ब्रह्मदेवांच्या स्थानापलीकडे सर्व भूतांच्या प्रकृतीचा मूलभूत, अनाद्यनंत, सर्वांच्या पलीकडचा जो नारायण त्याचें तें स्थान प्रकाशत आहे. ह्या तेजोमय पवित्र स्थानावर प्रत्यक्ष देवांची देखील नजर ठरत नाहीं. सूर्यप्रकाशाचें त्याला कांहीं प्रयोजन नाहीं. तें स्वयंप्रकाशानेंच दुष्प्रेक्ष्य आहे. मेरूच्या पूर्वेकडील ह्या नारायणाच्या स्थानामध्यें सर्व भूतांचा स्वामी, सर्वांचा प्रकृतिभूत आत्मभू नारायण आपल्या तेजानें सर्व भूतांना प्रकाशमान करीत राहिला आहे. ब्रह्मऋषींची देखील त्या ठिकाणीं गति नाहीं. मग इतरांची काय कथा ? सर्व ग्रहांचें तेज या ठिकाणीं फिकें पडतें. शुभ कर्मांनीं आत्मशुद्धि करून तीव्र तपानें योगासिद्धि मिळवून अज्ञानाच्या पलीकडे जाऊन पोहोंचलेल्या यतींना मात्र त्यांच्या निष्ठेच्या योगानें हें स्थान प्राप्त होतें, व एकवार ते त्या ठिकाणीं गेल्यावर फिरून ह्या लोकाला परत येत नाहींत. **ह्या अक्षय्य व अविनाशी स्थानाभोंवतीं सूर्यचंद्र भिन्न दिशेनें सर्व ज्योतिश्चक्रासह प्रदक्षिणा करीत राहिले आहेत.** हा सूर्यनारायण संध्याकाळीं अस्ताला गेल्यावर प्रातःकाळीं उत्तरेचा आश्रय करतो व फिरून मेरूचा आश्रय करून सर्व भूतांच्या कल्याणामध्यें लक्ष देऊन हा पूर्वेकडे वळतो. ह्याप्रमाणें विसावा न घेतां पर्वणीपर्वणीला चांद्रमानानें मासांचे विभाग करीत चंद्रनक्षत्रांसहवर्तमान सर्व प्राणिमात्रांचें क्षेम पहात मेरूला प्रदक्षिणा करून फिरून हा मंदराकडे वळतो. अंधकार दूर करणारा सूर्य आपला अकुंठित मार्ग आक्रमीत असतां थंडी पाडण्याच्या हेतूनें दक्षिण दिशेकडे वळतो व त्यावेळीं हिंवाळा येतो. फिरून तो उत्तरेकडे वळतो व उत्तरेकडे चालला असतां आपल्या तेजानें सर्व स्थावरजंगमांचें तेज आपल्या ठिकाणीं घेतो. त्यामुळें मनुष्यांना घाम, आळस, झोंप व शीण इत्यादि प्राप्त होतात. नेहमीं ते झोंपेच्या गुंगींत असतात. ह्याप्रमाणें तो अंतरिक्षमार्गातून चालला असतां पाऊस पाडतो. पाऊस, थंडी व ऊन्ह ह्या तीनही सुखद वस्तूंनीं चराचरांना पुष्टि देत सूर्य ह्या कालचक्रां-

तून नेहमीं फिरत असून ह्याला विसावा ह्मणून मुळीं माहीत नाहीं. हाच सर्व भूतांच्या आयुष्याचे व कर्मांचे भाग पाडून दिवस, रात्र, कला व काष्ठा उत्पन्न करतो. ह्याला नमस्कार कर. ह्या पर्वताच्या स्वयंप्रकाशानें व येथें असणाऱ्या वनस्पतींच्या तेजानें ह्या ठिकाणीं मात्र दिवस व रात्र हे विभाग माहीत नाहींत.' ह्याप्रमाणें ह्या नगोत्तमावर सूर्याचा उदयास्त पहात, व शुचिर्भूत होऊन वेदाध्ययनादि क्रिया करीत सत्यव्रत महारथी पांडवांनीं अर्जुनाची वाट पहात एक एक दिवस युगाप्रमाणें काढीत सरासरी एक महिना काढिला तोंच पांच वर्षें राहून इंद्रापासून सर्व दिव्य अस्त्रें शिकून विद्युल्लतेप्रमाणें कांतिमान अशा इंद्राच्या रथांत बसून सुवासिक माळा व भूषणें घातलेला अर्जुन आपल्या कांतीनें लोकांना दिपवून सोडीत गंधमादनपर्वताबर उतरला. शक्रानें दिलेलीं उत्तमोत्तम भूषणें व अमोलिक वस्तु त्यानें द्रौपदीला दिल्या, व सर्वांमध्यें बसून इंद्रलोकीं घडलेला इत्थंभूत वृत्तांत त्यानें थोडक्यांत त्यांना कळविला. पुढें रात्रीं विश्रांति घेऊन सकाळीं सर्व युधिष्ठिराला वंदन करून त्याभोंवतीं बसले असतां गंधर्व व अप्सरा ह्यांसहवर्तमान इंद्र त्यांकडे आला. युधिष्ठिरानें त्याचा योग्य सत्कार केला व अर्जुन सेवकाप्रमाणें नम्र होऊन त्याच्या बाजूला उभा राहिला. इंद्र संतुष्ट होऊन युधिष्ठिराला ह्मणाला, 'तूं या संपूर्ण पृथ्वीचें राज्य करशील. काम्यकाश्रमाला परत जा. ह्या अर्जुनाला जिंकणारा त्रैलोक्यांत कोणी उरला नाहीं.' असें सांगून तो देवलोकाला निघून गेला.

८७ निवातकवचांचा इतिहास.

(इ. १६७–१७५)

कोणे एके वेळीं सर्व पांडव एकत्र गोष्टी बोलत बसले असतां 'स्वर्गीं तुझा वेळ कसा गेला, तुला सर्व अस्त्रें कशीं मिळालीं, तूं शंकर व इंद्र ह्यांना कसें संतुष्ट केलेंस, हें सर्व सविस्तर मला सांग पाहूं,' असें युधिष्ठिर त्याला ह्मणाला असतां काम्यकवन सोडल्यापासून अस्त्रप्राप्ति होईपर्यंतचा सर्व वृत्तांत त्याला सांगून अर्जुन ह्मणाला, 'त्या अमरावतीमध्यें सूर्याचा ताप, थंडी, ऊन्ह किंवा वारा, यांपासून ताप मुळीं होत नाहीं. तेथें लोकांना शीण ह्मणून माहीत नाहीं. जरा, शोक, दैन्य, दौर्बल्य इत्यादि उपसर्ग मुळीं माहीत नाहींत; तसेंच राग, लोभ इत्यादि विकार ठाऊक नाहींत; तेथें नेहमीं लोक संतुष्ट असतात. वृक्ष सदोदित फलपुष्पांनीं संपन्न असतात, व अनेक कमलांनीं भरलेल्या सरोवरांतून नेहमीं सुगंध सुटला असतो. सुगंध व शीतल असा वारा तेथें मंदमंद वहात असतो; व भूमीवर रत्नांचा व पुष्पांचा गालिचाच पसरला आहे कीं काय असा भास होतो. अनेक पक्षी तेथें श्रुतिमनोहर असे मधुर शब्द करीत असतात. अशा त्या अमरावतीमध्यें सर्व अस्त्रांचा प्रयोग, संहार, आवृत्ति पुन्हां प्रयोग, प्रायश्चित्त (अस्त्रतेजानें दग्ध झालेल्या निरपराध्यांचें पुनरुज्जीवन) व प्रतिघात (दुसऱ्यानें सोडलेल्या अस्त्रांचें निवारण) शिकल्यावर एके समयीं इंद्र मला ह्मणाला, 'हे शत्रुतापना, गुरुदक्षिणेची वेळ आली आहे. मी सांगेन तें केलें पाहिजे. आज त्रैलोक्यांत तुला दुर्घट कांहींच नाहीं. निवातकवच नांवाचे दानव माझे शत्रू समुद्राच्या पोटांत कोट करून राहिले आहेत. बलानें व सामर्थ्यानें एकासारखे एक असे ते तीन कोटी आहेत. त्यांना जिंकून माझ्या गुरुदक्षिणेची भरपाई कर.' असें तो ह्मणाल्याबरोबर मातलीनें मोरासारखे शुभ्रवर्णाचे घोडे जोडून रथ तयार केला. इंद्रानें आपल्या हातानें हा किरीट माझ्या डोक्यावर ठेवून स्वतःच्याच तोडीचीं अंगभूषणें त्यानें मजवर चढविलीं, व एक अभेद्य कवच मला घालून कधीं न तुटणारी ही प्रत्यंचा त्यानें माझ्या गांडीवाला बांधिली. देवांनीं प्रसंन्न होऊन 'विजयी हो,' ह्मणून मला आशीर्वाद दिला. समुद्रांतून निघालेला हा देवदत्त शंख व हें धनुष्य घेऊन युद्धाविषयीं मोठा आतुर होऊन मी दानवांच्या वसतिस्थानाकडे निघालों. वाटेंत महर्षींचा स्तुतिपाठ ऐकत व आशीर्वाद घेत मी त्या अक्षोभ्य भयंकर महोदधीजवळ जाऊन पोहोंचलों. त्यांत पर्वतप्राय अशा फेसाळ लाटा जिकडे तिकडे उसळत होत्या. सहस्रावधि रत्नांनीं भरलेलीं जहाजें त्यावर तरंगत होतीं. महान महान तिमिंगल, कासव, सुसरी इत्यादि जलचर प्रा-

णी पाण्यांत बुडलेले पर्वतच आहेत कीं काय असा भास उत्पन्न करीत होते. जिकडे तिकडे पाण्यावर तरंगणारे सहस्रावधि शंख विस्कळित झालेल्या ढगामध्यें चमकणाऱ्या ताऱ्याप्रमाणें दिसत होते. त्याचप्रमाणें सहस्रावधि रत्नेंही त्यावर तरंगत होतीं. वारा मोठ्या जोरानें वहात होता. तेथेंच दानवांनीं गजबजलेलें दैत्यपूर माझ्या दृष्टीस पडलें. मातलीनें रथही तेथेंच पृथ्वीवर उतरला. व तो उत्तम सारथि असल्यानें त्यानें रथाच्या घडघजडानें दैत्यांना त्राहि त्राहि करून सोडलें. आकाशांत होणाऱ्या मेघगर्जनेसारखा तो रथाचा शब्द ऐकून मला इंद्र समजून सर्व दैत्य धावरले. माझ्या देवदत्त शंखाचा शब्द ऐकल्याबरोबर त्या सर्व निवातकवच दैत्यांचें मन जाग्यावरून उडालें व धनुष्य, बाण, खड्ग, परशु, गदा इत्यादि आयुधांनिशीं वेशी मजबूत बंद करून अंगांत चिलखतें चढवून ते मजबरोबर युद्ध करण्याला नगराबाहेर पडले. त्यांनीं अनेक रणवाद्यें सुरू केलीं. त्यांचा तो शब्द ऐकून सहस्रावधि मासे धापा टाकीत पाण्यावर तरंगूं लागले. नंतर माझ्यावर तुटून पडून हजारों प्रखर बाण त्यांनीं माझ्यावर सोडले. त्यांच्या माझ्यामध्यें मोठें तुंबळ युद्ध सुरू झालें. माझ्या रथाचा मार्ग आडवून मोठ्यानें शब्द करीत मला घेरून माझ्यावर ते बाणांचा वर्षाव करूं लागले. कांहीं शस्त्रास्त्रहीन झाल्यामुळें चवताळून जाऊन माझ्यावर मुष्टिप्रहार करूं लागले. पण मीं माझ्या गांडीवापासून बिनचूक बाण सोडून त्या सर्वांना मार्गे हटविलें. ह्याप्रमाणें जेरीस आल्यावर खवळून जाऊन एकदम त्यांनीं शक्ति, शूल इत्यादि शस्त्रांचा प्रहार करून मला घाबरवून सोडलें. त्या वेळीं मींही दैदीप्यमान अशा जाज्वल्य अस्त्रांनीं त्यांच्या त्या प्रहारांचें कांहीं चालू दिलें नाहीं, व त्वेष चढून तीक्ष्ण बाण सोडून त्यांना घायाळ केलें. त्यांच्या छिन्नभिन्न झालेल्या गालांतून रक्ताचे पूर वाहूं लागून शरत्कालीन पावसानें भिजून चिंब झालेल्या पर्वतशिखराप्रमाणें ते दिसत होते. ह्याप्रमाणें शरीराला हजारों ठिकाणीं जखमा लागून प्रहार करण्याची देखील शक्ति न उरल्यामुळें त्यांनीं मजबरोबर मायायुद्ध सुरू केलें. मोठमोठ्या पर्वतप्राय धोंड्यांची वृष्टि सुरू केली. त्या सर्वांचा मीं महेंद्रास्त्राचा प्रयोग केलेल्या बाणांनीं चुराडा उडविला. इतक्यांत अग्नीचा वर्षाव सुरू झाला, व जिकडून तिकडून माझ्या अंगावर ठिणग्या येऊन पडूं लागल्या. जोराचा पाऊस, सोसाट्याचा वारा व दैत्यांची गर्जना ह्यांमध्यें कांहींच उमगेना. त्यामुळें मला किंचित् मूर्च्छा आली. त्यावेळीं इंद्रानें दिलेलें विशोषणास्त्र सोडून मीं सर्व जल शोषून घेतलें. ह्याप्रमाणें अनेक प्रकारची माया उत्पन्न करून त्यांनीं मला फार बेजार केलें. पण मीं अनेक अस्त्रें सोडून त्यांच्या मायेचा प्रतिकार केला. पुढें माया टाकून देऊन फिरून त्यांनीं मजवर चाल केली असतां मोठ्या हुशारीनें मीं सर्वांना यमसदनाला पाठविलें व ज्या कांहींनीं अद्यापि अदृश्य राहून मायेनें युद्ध चालविलें होतें, त्यांवर अदृश्य अस्त्रांचाच प्रयोग करून त्यांचे मीं प्राण घेतले. योग्य अस्त्रांचा प्रयोग करून गांडीवापासून सोडलेले माझे बाण ज्या ज्या ह्मणून दानवांवर जाऊन पडले, त्यांचीं त्यांचीं डोकीं त्यांनीं तेथच्या तेथें धडापासून वेगळीं केलीं. तेथें रथाच्या घोड्यांना पाऊल टाकण्याला देखील जागा उरली नव्हती. पर्वतप्राय अशा त्या निवातकवचांच्या शरीरांनीं भूमि जिकडे तिकडे झांकून निघाली होती. त्यांच्या मरणानें शरत्कालीन सारसाप्रमाणें त्यांस्त्रिया आक्रोश करीत होत्या. नंतर मातलीसहवर्तमान त्या नगरांत शिरून इंद्रभुवनाला मार्गे सारणाऱ्या तिला पाहून 'येथें देव येऊन का रहात नाहींत,' ह्मणून मातलीला मीं विचारलें. तेव्हां मातली ह्मणाला, 'पूर्वी देव येथेंच रहात होते. पुढें निवातकवचांनीं घोर तप करून राहण्यासाठीं हें नगर व देवांपासून अभय असे दोन वर ब्रह्मदेवांपासून मागून घेतले. तेव्हां 'आपण जें करतां तें विचारपूर्वकच करीत असलां पाहिजे,' असें इंद्र ह्मणाला असतां ब्रह्मदेव त्याला ह्मणाले, 'अन्य देहानें तूंच ह्यांना मारणारा होणार आहेस; आणि ह्मणूनच ह्यांना मारण्यासाठीं इंद्रानें तुला आपलीं सर्व अस्त्रें शिकविलीं. ज्या ह्यांना तूं मारलें आहेस ते देवांना अजिंक्य होते. त्यांची वेळ भरली तेव्हां त्यांचा तुझ्या हातून अंत झाला आहे.' ह्याप्रमाणें तें नगर ताब्यांत आणून आम्ही फिरून स्वर्गाला जाण्याकरितां निघालों असतां मार्गांत पौलोम व कालकंज नांवाच्या दैत्यांचें राहण्याचें ठिकाण

हिरण्यपुर नांवाचें नगर अंतरिक्षामध्यें मला दिसलें. अनेक गोपुरें, बुरुज, रत्नखचित हवेल्या, ह्यांनीं व अनेक पक्षिगणांनीं संकुल अशा फलपुष्पसंपन्न वृक्षांनीं ती नगरी फारच शोभायमान दिसत होती. त्याचे तट इतके मजबूत होते कीं, शत्रूची त्या ठिकाणीं कांहीं डाळ शिजण्यासारखी नव्हती. ते अद्भुत नगर पाहून 'हें पुढें काय दिसत आहे,' ह्मणून मीं मातलीला विचारलें. तो म्हणाला, पुलोमा व कालका नांवाच्या दोघां असुरस्त्रियांनीं हजार वर्षं तप करून आपल्या संततींना कोणापासून त्रास पोहोंचूं नये अगर देव, राक्षस किंवा पंन्नग यांपैकीं कोणापासून त्यांना मरण नसावें व राहण्याला अंतरिक्षामध्यें शत्रूला दाद न देणारें असें निर्भय व आल्हाददायक स्थान असावें ह्मणून ब्रह्मदेवांपासून वर मागून घेतला. तें हें हिरण्यपुर नांवाचें नगर आहे. येथील दानवांचेंही मरण मानवांच्या हातून आहे ह्मणून ह्यांचाही वज्रास्त्र सोडून तूं नाश कर.' असें मातलीनें सांगितल्यावरून त्यांच्याबरोबर माझें युद्ध सुरू झालें. माझ्या बिनचूक जाऊन लागणाऱ्या बाणांनीं छिन्नभिन्न होऊन तें पूर खालीं पृथ्वीवर येऊन पडलें. गृध्रपिच्छयुक्त माझे लोहमय बाण त्या असुरांवर सोडून त्यांना मीं घायाळ केलें. नानाप्रकारचे मुगुट व कवच घातलेले व अनेक भूषणांनीं मंडित, अशा त्यांनींही माझ्यासमोर उभे राहून माझ्या मनाला आनंद देत मला जर्जर करण्याला आपली शिकस्त केली. त्यानें किंचित् अस्वस्थ होऊन रौद्रास्त्र गांडीवाला जोडून त्रिनेत्राचें ध्यान करून त्यांना मारण्यासाठीं मीं तें त्यांवर सोडलें. मायेनें नानाविध श्वापदांचीं रूपें घेऊन मजबरोबर लढणाऱ्या त्या सर्वांचा त्यानें फडशा उडाला. तें माझें अमानुष कृत्य पाहून मातलीला फार समाधान वाटलें. आलेलें काम शेवटास नेल्यावर मला फिरून देवेंद्राकडे घेऊन जाऊन मातलीनें माझें कृत्य इत्थंभूत देवेंद्राला कळविलें. तें ऐकून इंद्रानें शाबास ह्मणून माझें अभिनंदन केलें. व देवांनींही माझी वाहवा केली. हजारों बाणांचे वण माझ्या अंगावर पाहून आनंदित होऊन देवेंद्र एकांतांत मला ह्मणाला, 'भारता, सर्व दिव्यास्त्रांचें तुला पूर्ण ज्ञान झालें आहे. भूतलावर कोणी मानव तुझा पराभव करण्यास समर्थ नाहीं. भीष्म, द्रोण, कृप, कर्ण इत्यादि योद्धे युद्धामध्यें तुझ्या पासंगाला देखील पुरणार नाहींत. तुझे भाऊ तुझी फार आठवण काढीत आहेत, ह्मणून त्यांकडे आतां तूं परत जा,' असें ह्मणून सत्कारपूर्वक त्यानें मला निरोप दिला. युधिष्ठिर ह्मणाला, 'धनंजया, शंकर व इंद्र ह्यांना तूं तोषविलेंस हें मोठें भाग्यच समजावयाचें! सर्व दिव्यास्त्रें तुला मिळालीं हें कांहीं कमी नाहीं. लोकपालांची गांठ पडून त्यांनीं तुजवर कृपा केली ही काय लहान सामान्य गोष्ट! तसेंच परत येऊन आह्मांला भेटलास हें आमचें केवढें बरें भाग्य! बरें, तुझें तें अलौकिक अस्त्रज्ञान आह्मांला दाखविशील काय?' धर्मराजाची अस्त्रप्रयोग पहाण्याची इच्छा पाहून अर्जुन तो दाखविणार इतक्यांत नारद येऊन ह्मणाले, 'कांहीं लक्ष्य नसून फुकट अंतरिक्षांत हीं दिव्यास्त्रें सोडलीं असतां त्यांपासून फार भयंकर परिणाम घडतील. ह्यांचें यथायोग्य जतन केलें असतां तीं आपल्या हातीं भयंकर साधनें असतात, पण व्हावें तसें त्यांचें जतन न होईल तर त्रैलोक्याचा तीं फडशा उडवितील. फिरून असा अविचार करूं नकोस. युधिष्ठिरा, पुढें होणाऱ्या घोर संग्रामामध्यें तुला ह्या सर्वांचा प्रयोग दृष्टीस पडणारच आहे!' असें ह्मणून नारद निघून गेले व द्रौपदीसह पांडव तेथें सुखांत राहिले.

८८ अजगराची व पांडवांची गांठ. (इ. १७६–८१)

अर्जुनाची गांठ पडल्यावर पांडवांचीं चार वर्षे एका रात्रीप्रमाणें त्या ठिकाणीं निघून गेलीं व पूर्वीचीं सहा मिळून त्यांचीं वनवासाचीं दहा वर्षं संपून अकराव्याला सुरवात झाली. एके दिवशीं भीमार्जुन युधिष्ठिराजवळ बसले असतां ह्मणाले, 'त्या बुद्धिहीन, शीलाचें गंधही ज्याला नाहीं अशा नराधमाला न कळत जवळच कोठें तरी राहून एक वर्ष अज्ञातवास आह्मी सुखानें काढूं. आह्मी दूर गेलों आहों असा त्यांचा समज झाला असल्यानें आह्मी आसपास कोठें तरी राहिलों तरी त्याला कळून येणार नाहीं. व ह्याप्रमाणें एक वर्ष काढून मग

त्या नराधमाला कांहीं वेळ न लागतां नाहींसा करून टाकूं. फलपुष्पसंपन्न असा गोड सूड घेतल्यावर आपण खुशाल पृथ्वीचें राज्य करा. राज्यावांचून ह्या स्वर्गतुल्य प्रदेशांत राहूनच आपण आपल्या दुःखाचा बिसर पाडण्याला समर्थ आहां हें खरें; पण ह्यानें सर्व जगभर पसरलेली आपली कीर्ति नाहींशी होणार आहे. कौरवांपासून राज्य मिळवून मग यज्ञयागादि मोठ्या क्रिया करून कृतपापाचें क्षालन पाहिजे तर करतां येईल. ज्यांनीं आपला अपराध केला आहे त्या आपल्या शत्रूंवर सूड उगविण्याचा विचार मनांत धरा. प्रत्यक्ष इंद्र जरी आपल्यापुढें उभा राहिला तरी आपल्या उग्र तेजापुढें त्याचें कांहीं चालावयाचें नाहीं. भगवान श्रीकृष्णाच्या साह्यानें आपलें काम फत्ते करण्याला आम्ही तयार आहों. ' हें त्यांचें भाषण ऐकून धर्मार्थज्ञ महात्म्या युधिष्ठिरानें कुबेरभुवनाला प्रदक्षिणा करून तेथील सर्वांचा निरोप घेतला व आलेल्या मार्गानें तो परत निघाला. निघतेवेळीं तो पर्वताला ह्मणाला, ' सपत्नांना जिंकून राज्य मिळवून इष्ट हेतु सफळ झाल्यावर हे शैलेंद्रा, जितात्मा होऊन फिरून तप करण्यासाठीं मी येथें येईन. ' ते निघाले तेव्हां पित्याप्रमाणें त्यांना सप्रेम अंतःकरणानें सदुपदेश करून लोमश देवांच्या पुण्यभूमीला निघून गेले. आर्ष्टिषेणांनींही त्यांना चार हिताच्या गोष्टी सांगितल्यानंतर ते नरवर रम्य तपोवनें पहात पहात परतले. वृषपर्व्याच्या आश्रमाला परत आले तेव्हां त्या महात्म्यांनीं त्यांचा सत्कार केला. तो घेऊन बदरी आश्रमांत एक रात्र काढून किरातांचा स्वामी जो सुबाहु त्याच्या राज्यामध्यें ते येऊन पोंचले. पुढें चीन, तुषार, दरद, कुलिंद इत्यादि प्रदेश ओलांडून हिमाचलाच्या अगदीं बिकट प्रदेशीं असणाऱ्या सुबाहूच्या नगरीला ते येऊन पोहोंचले. ते आल्याची बातमी कळतांच पुत्र व सेवकजन यांसहवर्तमान सुबाहु त्यांना सामोरा गेला. युधिष्ठिरानें त्याचें अभिनंदन केलें. त्या ठिकाणीं एक रात्र राहून त्यांनीं घटोत्कचाला त्याच्या अनुयायांसह जाण्याला निरोप दिला. व रथांत बसून ते पुढें निघाले व त्या पर्वताच्या यमुनाकांठच्या प्रदेशाला येऊन त्यांनीं मुक्काम केला. तेथें ते रहात असतां धनुष्यबाण घेऊन तेथील सुगम व दुर्गम अशा प्रदेशांतून यथेच्छ मृगया करीत वाटेंत मोठमोठ्या झाडांना हातांनीं उपटून टाकीत, तोंडानें शीट घालीत, मोठ्या दिमाखानें भीम अरण्यांतून फिरत असतां तेथील सर्व वनवासी श्वापदें त्याच्या भयानें तें अरण्य सोडू लागलीं. ह्याप्रमाणें तो हिंडत असतां एक धिप्पाड पहाताक्षणीं अंगावर शहारे उत्पन्न करणारा, पर्वताच्या बेचक्यांतील एक मोठी दरी अडवून पडलेला पर्वतप्राय अजगर त्याच्या दृष्टीस पडला. अंगावरच्या चित्रविचित्र रंगानें त्याचा वर्ण हळदीप्रमाणें पिंवळा दिसत होता. मोठ्या गुहेसारख्या चार विक्राळ दाढांनीं व आरक्त नेत्रांनीं त्याचें तोंड एक प्रकारानें भव्य दिसत होतें. आपल्या जिभेनें ओठ चाटीत सर्व भूतांना कालरूपी असा तो आपल्या श्वासोच्छ्वासानें व फूत्कारानें त्या ठिकाणीं येणारांना जणूंकाय तुच्छच करीत आहेसें दिसत होतें. त्या अजगरानें भीमावर झडप घालून त्याचे दोन्ही बाहू घट्ट धरले. वरप्रभावाच्या योगानें त्याचा स्पर्श होतांच भीम त्यापुढें दुबळा पडला, त्यानें पुष्कळ झटापट खाल्ली तरी यत्किंचित्ही त्याला स्वतःला सोडवून घेतां येईना. त्या अजगरानें आपल्या अजस्र अंगानें त्याला वेटाळून टाकलें. त्या अजगराचें तें विलक्षण सामर्थ्य पाहून भीमाला वाटलें, ' ही एखाद्या विद्येची शक्ति किंवा वराचा प्रभाव असावा ? कारण मी आपली शिकस्त करीत आहें, तरी अधिक अधिकच त्याच्या कचाट्यांत सांपडत आहें. पराक्रमाचा गर्व बाळगणें व्यर्थ आहे. सुखदुःखें ओढवून घेणें अगर तीं टाळण्याला समर्थ होणें ह्या गोष्टी मानवी शक्तीच्या बाहेर आहेत. ह्मणून त्यांसंबंधानें मनुष्यानें कधीं बाईट वाटून घेऊं नये. **मानवी यत्नानें दैवाला झुकांडी देतां येणें शक्य नाहीं. दैव सर्वांला पुरून उरलें आहे.** पुरुषार्थाची त्या ठिकाणीं डाळ शिजत नाहीं. आपल्या बाहुबलावर बाटेल तें करीन असा गर्व बाळगणाऱ्या मला दैव प्रतिकूल होतांच विनाकारण आज ही दशा ओढवली. आतां स्वतःसंबंधानें मला इतकें बाईट वाटत नाहीं. परंतु राज्यभ्रष्ट झालेल्या त्या धर्मराजांची मला मोठी चिंता पडली आहे. मी मेलों हें कळल्यावरोबर ते सर्व

यत्न सोडून देतील. ते सर्व साधू आहेत. माझ्याच एकट्या राज्यलोभ्याची त्यांना नेहमीं कटकट असे.' ह्याप्रमाणें खेद करीत तो त्या ठिकाणीं त्या अजगराच्या तावडींत सांपडून राहिला.

इकडे युधिष्ठिराला अनेक दुष्ट शकून होऊं लागल्यामुळें त्याचें मन अस्वस्थ झालें. त्या आश्रमाच्या दक्षिणेस प्रदीप्त अशा दक्षिण दिशेला अशुभसूचक कोल्हेकुई ऐकूं येऊं लागली. एक पंख, एक पाय व एक डोळा असलेली एक विद्रूप चेटकी सूर्याकडे तोंड करून रक्त ओकतांना त्याला दिसली? रुक्ष व पाषाणकण आपल्याबरोबर वाहून नेणारा वारा जोरानें वाहूं लागला. पण सर्व मृगपक्षी उजवीकडे शब्द करीत होते. मागून काळा कुळकुळीत कावळा 'जा, जा,' ह्मणून शब्द करीत होता. धर्मराजाचा उजवा बाहू स्फुरण पावत होता. मन जाग्यावरून उडून जाऊन डावा पाय खाजवत होता; व उजवा डोळा लवत होता. ह्या शकुनांचें शुभाशुभ फल त्याला कळत असल्यानें त्याला ह्यापासून मोठी चिंता उत्पन्न झाली व कांहीं तरी संकट गुदरलें असलें पाहिजे असें वाटून एकदम 'भीम कोठें आहे,' ह्मणून त्यानें द्रौपदीला विचारलें. 'त्यांना बाहेर जाऊन बराच वेळ झाला,' असें तिचें उत्तर ऐकून धौम्यांसहवर्तमान त्याच्या पाऊलाच्या खुणेवरून त्याचा शोध करीत तो पूर्वदिशेकडे चालला असतां ज्या ठिकाणीं अंगाला झोंबणारा असा रुक्ष वारा वहात असून जिकडे तिकडे पर्णहीन अशा कांटेरी झाडांची गर्दी होऊन राहिली होती अशा गडद, झाडांचे खोड व झुडपें ह्यांनीं गच्च भरलेल्या एका बिकट दरीमध्यें एका मोठ्या अजगरानें धरल्यामुळें निचेष्ट झालेला भीम त्याच्या दृष्टीस पडला. जवळ जाऊन 'वत्सा, हें संकट तुझ्यावर कसें ओढवलें,' असें ह्मणून त्यानें लगेच त्या अजगराची आपल्या अतुल पराक्रमी भावाला सोडण्याविषयीं विनंति केली. अजगर ह्मणाला, 'आल्या वाटेनें परत जा. नाहींपेक्षां उद्यां तुझीही हीच वाट लागेल. ह्या प्रदेशीं जो येईल त्याला खाऊन टाकण्याचा माझा संकल्प आहे. मी जे प्रश्न तुला विचारीन त्यांचें उत्तर देशील तर मी तुझ्या भावाला सोडीन.' युधिष्ठिर म्हणाला, बेशक विचार. माझ्या हातून होईल तितक्या समाधानपूर्वक मी तुला तुझ्या प्रश्नांचें उत्तर देतों. **ब्राह्मणाला** जेवढें ह्मणून कळावें तेवढें सर्व मी तुला सांगावयाला पाहिजे असें नाहीं.' सर्प ह्मणाला, 'हे राजा, ब्राह्मण कोणाला ह्मणावें, ह्या जगांत ज्ञान करून घेण्याला योग्य अशी वस्तु कोणती आहे व श्राद्ध व दानकाल कोणता? तुझ्या भाषणावरून तूं मोठा ज्ञाता असावास असें वाटतें.' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, '**सत्य, दान, क्षमा, शील, सद्भाव, तप व दया हीं ज्याच्या ठिकाणीं दिसून येतात त्याला ब्राह्मण ह्मणावें**, प्राणिहित हें सत्य असून मनोनिग्रह हाच दम होय, स्वधर्मानें वागणें हें तप, संकरापासून अलिप्त राहणें हें शौच, विषयांचा त्याग हा संतोष, अकार्यापासून निवृत्ति ही क्षमा, शीतोष्णादि द्वंद्वें सहन करणें ही क्षमा, मनाची समता ठेवणें हें आर्जव, तत्त्व कळणें हें ज्ञान, चित्तशांति हा शम, प्राणिमात्रांचें हित मनांत आणणें ही दया व मनाला विषयांपासून काढणें हें ध्यान होय. **काम हा दुर्जय शत्रु असून लोभ हा** चिरकाल राहणारा व्याधि आहे. प्राण्यावर दया करणारा तो साधु व निर्दय तो असाधु. धर्माचें अज्ञान हा मोह व अहंपणा हा मान होय. धर्माचरण न करणें हा आळस असून अज्ञान हा शोक होय. स्वधर्मामध्यें ठाम राहणें हें स्थैर्य, इंद्रियनिग्रह हें धैर्य, **मन निर्मल करणें हें स्नान** व अभय देणें हेंच दान होय. धर्मात्मा हा पंडित असून नास्तिक हाच मूर्ख होय. ह्या संसाराला कारण वासना असून मत्सर हा अंतःकरणाला अत्यंत ताप देणारा आहे. अज्ञानयुक्त ज्ञान हा अहंकार व धर्माचें अवडंबर माजविणें हा दंभ होय. धर्मद्वेष ही असूया असून दुसऱ्याला दोष देत सुटणें हें पैशुन्य होय. धर्मार्थकाम हे त्रिवर्ग जरी परस्परविरोधी आहेत तरी ज्या कुलांत स्त्रीपुरुष परस्परांशीं संतोष वृत्तीनें असतात तेथें ह्यांची भरभराट दिसून येते. **सुखदुःखांची ज्या ठिकाणीं** कशाही प्रकारची **बाधा नाहीं व ज्या ठिकाणीं गेल्यावर प्राणी सर्व सुखदुःखांपासून मुक्त होतात, अशा परब्रह्माचें ज्ञानच करून घेण्याला लायक असें ज्ञान आहे.**' अजगर ह्मणाला, 'तूं सांगतोस हे धर्म चारी व-

र्णांना समान आहेत. शूद्रामध्यें देखील हे गुण दिसून येतात, व सुखदुःखहीन असें जें कांहीं तूं ह्मणतोस त्या सुखदुःखांखेरीज तर ह्या जगांत एकही वस्तु दिसत नाहीं.' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, **'जर मीं सांगितलेलें लक्षण शूद्रामध्यें असेल व ब्राह्मणामध्यें नसेल तर त्या शूद्राला शूद्र ह्मणतां येणार नाहीं व ब्राह्मणाला ब्राह्मणही ह्मणतां येणार नाहीं. मीं सांगितल्याप्रमाणें ज्याचें वर्तन दिसून येईल तोच ब्राह्मण समजला पाहिजे** व ज्याच्या ठिकाणीं हें दिसून येणार नाहीं त्याला शूद्रच ह्मटलें पाहिजे. **जाति, धर्म, आचार, स्वाध्याय व बहुश्रुतपणा यांमध्यें आचारच ब्राह्मणत्वाचें मुख्य लक्षण आहे.** कारण पुष्कळ तिर्यग्योनींतील प्राणी देखील त्यांच्या चोख अशा आचारानें स्वर्गाला गेल्याचीं उदाहरणें आहेत. एखाद्या दुर्वृत्त नटाप्रमाणें वेदाची कितीही जरी घोकंपट्टी केली तरी त्यांत कांहीं अर्थ नाहीं. धर्माचारानें वागणाराचेंच अध्ययन व बहुश्रुतपणा सफल समजलीं पाहिजेत. धर्मरक्षण काळजीपूर्वक केलें पाहिजे. निर्धन झाल्यामुळें मनुष्याला कमीपणा येत नाहीं. परंतु तो धर्म सोडील तर मात्र त्याचा घात झालाच. एखाद्या दुष्टानें आपल्या थोर कुलाची शेखी मिरविण्यांत कांहीं हांशील नाहीं. पुष्कळ सुवासिक फुलांना काय किडे थोडे चिकटले असतात? ह्मणून आचारच ब्राह्मणाचें मुख्य लक्षण असून दुराचारी पुरुष जरी चारी वेद पढला असला तरी त्याला शूद्रापेक्षां नीच समजलें पाहिजे. अग्निहोत्रामध्यें दक्ष, जितेंद्रिय, सदा संतुष्ट, शुचि, स्वाध्यायपर, सुखदुःखादि द्वंद्वें सहन करणारा, सर्व संग टाकलेला, प्राणिमात्रांच्या हितामध्यें तत्पर, सर्वांशीं स्नेहानें वागणारा, लोकांचे गुण तेवढे घेऊन दोष मुळीं न दाखविणारा, दीनाची कींव करणारा, सज्जनावर प्रेम करणारा व स्वस्त्रीच्या ठिकाणीं रत असणारा त्यालाच देव ब्राह्मण समजतात. ज्ञान करून घेण्याला योग्य अशा मीं सांगितलेल्या वस्तूचा ह्या जगीं अभावच आहे. कारण सुखदुःखांव्यतिरिक्त एकही वस्तू नाहीं ह्मणून जें तूं ह्मणालास तें अक्षरशः खरें आहे. ज्याप्रमाणें शीत व उष्ण ह्यांच्यामधल्या स्थितींत उष्णताही नसते व शीतताही नसते, त्याप्रमाणें ह्या दोहोंपासून अलिप्त अशी एखादी स्थिति असणें शक्य नाहीं काय?' सर्पानें विचारलें; 'राजा, जर तूं वर्तनावरून ब्राह्मण ठरवितोस तर जोंपर्यंत कृत्य होत नाहीं, तोंपर्यंत जातिभेदही नाहींच ह्मटला पाहिजे.' युधिष्ठिर ह्मणाला, 'ह्या मानवसमाजांत सर्व वर्णांचा संकर होत असल्यामुळें जाति ओळखून काढणें कठीण आहे. वाणी, मैथून, जन्म व मरण हीं सर्वांना समान आहेत. माझ्या ह्मणण्याला ऋषिवचन देखील प्रमाण आहे. **'ब्राह्मण अगर अन्य जे कोणी आह्मी आहों ते आह्मी यज्ञ करतों,'** असें ते यज्ञाचे पूर्वी ह्मणत असतात. ह्मणून तत्त्वदृष्ट्या शील हेंच प्रधान गणलें आहे. **नाभिवर्धनापूर्वी (नाळ कापण्यापूर्वी) मनुष्याच्या जातकर्माच्या वेळीं आईला सावित्रीच्या ठिकाणीं व बापाला आचार्याच्या ठिकाणीं समजतात. वेद पढवीतोंपर्यंत तो शूद्रच समजला जातो.** ह्या दोन प्रकारच्या मतांसंबंधानें संशय उत्पन्न होऊं लागल्यानें वैदिक संस्कारहीन पुरुष शूद्रतुल्यच आहे असें प्रत्यक्ष स्वायंभुव मनूनीं ह्मटलें आहे. जातीमध्यें संकर फार दिसून येत असल्यानें ज्याच्या ठिकाणीं संस्कारसिद्ध आचार चोख आहे त्यालाच मी ब्राह्मण समजतों. आतां श्राद्धकाल व दानकाल कोणता ह्मणून विचारलेंस त्याचें उत्तर ऐक. श्रोत्रिय व ध्याननिष्ठ ब्राह्मण दृष्टीस पडेल तोच श्राद्ध व दान यांना उत्तम काल समजला आहे.' असें सांगून 'तूं इतका विद्वान दिसत असून तुला ही स्थिति कशी प्राप्त झाली? कोणत्या कर्मानें उत्तम गति मिळते ह्मणून युधिष्ठिरानें विचारिल्यावरून सर्प ह्मणाला, 'सोमापासून पांचवा, आयूचा पुत्र, तुमचा पूर्वज जो प्रसिद्ध नहुष राजा तोच मी. यज्ञ, तप, वेदाध्ययन, इंद्रियनिग्रह व पराक्रम ह्यांच्या योगानें त्रैलोक्यामधलें ऐश्वर्य मला मिळालें. व त्या ऐश्वर्याबरोबरच माझ्यामध्यें अहंकार शिरला. हजार ब्राह्मण माझा रथ ओढण्याला असत. भल्या **शहाण्याच्या व वीराच्या देखील डोळ्यावर लक्ष्मीचा धूर येतो. सुखांत मनुष्य स्वतःला विसरतो.** मी दिव्य विमानांतून संचार करीत असें ते वेळीं अहंकारानें

जो जो ह्मणून माझ्यासमोर येई त्याचें त्याचें तेज मी हरण करीत असें. कोणे एके वेळीं अगस्त्य ऋषी मला बाहून नेत असतां माझा पाय त्यांना लागला. 'दूर हो सर्पा,' असें ते ह्मणाल्याबरोबर मी आपल्या वैभवाला मुकून सर्प होऊन खालीं पडलों. 'चुकीनें मज मूढाच्या हातून हा अपराध घडला, त्याबद्दल क्षमा असावी,' ह्मणून मीं त्यांना हात जोडले. त्यावेळीं दयार्द्र होऊन ते ह्मणाले, 'युधिष्ठिर तुला शापमुक्त करून अहंकाररूपी घोर पापाचें फल अनुभवल्यावर फिरून तूं पुण्यफलाचा अनुभव घेशील.' तेव्हां तो त्यांचा तपाचा प्रभाव पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. ह्मणून ब्राह्मण व ब्रह्म ह्यांसंबंधानें मीं तुला प्रश्न केला. खरोखरच सत्य, तप, अहिंसा, दान व धर्म हींच मनुष्याला ब्रह्मसाधन करून देणारीं साधनें आहेत. जाति किंवा कुल व्यर्थ आहे. मी अधोगतीला प्राप्त झालों असून तुझ्यामुळें मला पूर्वस्थिति मिळाली आहे. तूं हे मजवर मोठे उपकार केले आहेस. सत्पात्रीं दान करून, गोड व सत्य भाषण ठेवून, व अहिंसा हाच श्रेष्ठ धर्म पाळून मनुष्याला स्वर्गप्राप्ति होईल असा माझा समज आहे.' नंतर युधिष्ठिरानें दान व सत्य तसेंच अहिंसा व प्रियभाषण ह्यांमध्यें कमी अधिक कोणतें ह्मणून विचारल्याबरून सर्पानें उत्तर केलें, 'कार्यगौरवानुरूप ह्यांचा कमीअधिकपणा दिसून येतो. कांहीं दानापेक्षां सत्य श्रेष्ठ आहे व कांहीं प्रसंगीं सत्य भाषणापेक्षां दानाला विशेष महत्त्व आहे. अहिंसा व प्रियभाषण ह्यांसंबंधानेंही हाच नियम लागू पडतो. ह्याप्रमाणें ह्यांचा कमीअधिकपणा परिणामावर अवलंबून असतो.' 'अशरीऱ्याला स्वर्गसुख, अगर त्याच्या कर्मांचीं निश्चित फलें अगर त्यांचा उपभोग यांचा अनुभव कसा येतो,' ह्मणून युधिष्ठिरानें प्रश्न केला तेव्हां सर्पानें उत्तर दिलें, 'राजा, मनुष्यत्व, स्वर्गवास व तिर्यगयोनि अशा तीन गती मनुष्याला आपल्या कर्मांनीं प्राप्त होतात. ह्या तिन्हींमध्यें उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा तीन गती आहेत. काळजीपूर्वक दानादिक्रिया केल्यानें व अहिंसादिनियम पाळिल्यानें स्वर्गप्राप्ति होते. पापपुण्यमिश्र कर्मानें मनुष्ययोनि येते. कामक्रोधांच्या तावडींत सांपडून लोभानें प्राणी ज्यावेळीं हिंसा करूं लागतो, त्यावेळीं तो मनुष्यत्वापासून भ्रष्ट होऊन तिर्यग्योनीमध्यें जन्माला जातो. तिर्यग्योनींतूनही फिरून मनुष्यजन्म येतो. गाई व घोडे ह्यांना देवत्व आलेलें देखील दाखले आपल्यापुढें आहेत. ह्मणून प्राणी कर्मानुसार ह्या तीन गतींमधून फिरत असतो. ज्ञानी नित्य ब्रह्माशीं आपलें ऐक्य करण्यास झटतो. कारण कर्माधीन हा देहाभिमानी जीव सुखेच्छेनें जन्माच्या फेऱ्यांत सांपडून देहजन्य फलाचा उपभोग घेत राहतो. परंतु निरिच्छ होऊन कर्म करणारा ह्या जगताचें सत्यस्वरूप ओळखतो.' युधिष्ठिरानें विचारलें, 'शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या विषयांचा उपभोग घेण्याचे वेळीं प्राण्याचें अधिष्ठान काय असतें! ह्या सर्व विषयांचा उपभोग प्राण्याला एकदम कां घेतां येत नाहीं?' सर्प ह्मणाला, 'जीवतत्त्वच देहरूप उपाधीचें अवलंबन केल्यावर बुद्धिप्रभृति इंद्रियाधीन होऊन कर्मानुसार भोगोपभोग घेत राहतें. इंद्रियें, बुद्धि व मन हीं उपभोगाचीं साधनें होत. इंद्रियांशीं तल्लीन झालेल्या मनाच्या द्वारें हा जीवात्मा आपलें स्थान सोडून रूपादि विषयांचा उपभोग घेतो; व त्यालाही बुद्धीकडून प्रेरणा व्हावी लागते. आणि ह्मणूनच एकाच वेळीं त्याला अनेक विषय घेतां येत नाहींत. दोन भिवयांच्यामध्यें राहणारा हा जीवात्मा अनेक वस्तूंकडे बुद्धीची बरीवाईट प्रेरणा करीत असतो. व विषयांकडे बुद्धीची प्रवृत्ति झाल्यावरच प्राण्यांना सुखदुःखांचा अनुभव येतो व तोच सुखदुःखांचा साक्षात्कार.' युधिष्ठिरानें प्रश्न केला, 'मन व बुद्धि ओळखण्याचें मुख्य लक्षण काय? कारण अध्यात्मवेत्त्यांचें हेंच आदिकर्तव्य आहे.' सर्पानें उत्तर दिलें, 'बुद्धि ही जन्मतःच आत्म्याशीं अगदीं मिळून असल्यामुळें ती आत्म्याच्या आश्रयानें असून उत्क्रमणादि क्रियेनें आत्मज्ञानाला कारणीभूत आहे. बुद्धीची उत्पत्ति कार्यापासून असून मनाची उत्पत्ति मुळचीच आहे. बुद्धि सुखादि विकार धारण करूं लागली असतां मनावरही त्याचा परिणाम होतो. (बुद्धीला चेतनाशक्ति नसून मनाला ती आहे.)' ह्याप्रमाणें बोलून युधिष्ठिराला व भीमाला आशीर्वाद देऊन नहुष सर्परूप टाकून स्वर्गाला गेला व

युधिष्ठिर भीमासहवर्तमान आपल्या आश्रमाला परत आला.

८९ कर्मफल (३. १८२-८३)

पांडव त्या ठिकाणीं रहात असतां उन्हाळा संपून सर्व भूतांना आल्हाददायक पावसाळा आला. आकाश व सर्व दिशा काळ्या कभिन्न ढगांनीं आच्छादित होऊन मोठ्या मेघगर्जना सुरू झाल्या. नभोमंडळावर सूर्यकिरणांना मज्जाव करण्यासाठीं जणूं हें मेघरूपी छतच पसरलें आहेसें वाटत होतें. ह्या मेघमंडळांतून मधून मधून विजा चमकत होत्या. रात्रंदिवस खळ न पडतां पावसाची संततधार सुरू होती. जिकडे तिकडे हिरवेंचार गवत वाढलें असून विषारी सापांनीं भूमि झांकून निघाली होती. जिकडे तिकडे जलमय झालें असल्यामुळें जमिनीचे उंच सखल भाग उमगूं येत नव्हते. तुफान नद्या सर्पांप्रमाणें सों सों करीत जोरानें अरण्यामधून वहात असून त्यामुळें सर्व अरण्याला एक प्रकारची भव्य शोभा आली होती. भिजून चिंब झालेले पशुपक्षी व बेडूक इत्यादि जलचर प्राणी मोठ्या आनंदानें इकडे तिकडे फिरत होते. अशा प्रकारचा रमणीय पावसाळाही सरून लवकरच हिंवाळा लागला. जिकडे तिकडे क्रौंच, हंस इत्यादि पक्षी आनंदानें उडतांना दृष्टीस पडूं लागले. गवत सर्व वाळून जाऊन जमीन जिकडे तिकडे साफ दिसूं लागली. नद्यांचें पाणी आरशाप्रमाणें स्वच्छ झालें व आकाश अगदीं निरभ्र झालें असून त्यामध्यें ग्रह व तारे चमकूं लागले. नद्यांतून अनेक प्रकारचीं कमलें उगवलीं असल्यामुळें त्यांना एक प्रकारची विशेष रमणीयता आली होती. वेतसयुक्त अशा पावन सरस्वतीच्या तीरानें तिचे गगनचुंबित तट पहात पहात फिरतांना पांडवांच्या मनाला फार आनंद होऊं लागला. त्या ठिकाणीं रहात असतां **पुण्यकारक कार्तिकी पौर्णिमेची रात्र** त्यांना तेथें पडली. सर्व ऋषिवर्गासह तो **मोठा योग** त्या ठिकाणीं साधून ते काम्यकाला परतले. ह्या ठिकाणीं पोहोंचल्याबरोबर त्यांच्या दर्शनाविषयीं नेहमीं फार आतुर व त्यांच्या कल्याणामध्यें दक्ष असा श्रीकृष्ण परमात्मा सत्यभामेसह त्या ठिकाणीं त्यांना भेटण्याला आला. नमस्कार, आलिंगन, कुशल प्रश्न, इत्यादि उपचार आटोपल्यावर मोठ्या गौरवानें तो युधिष्ठिराला ह्मणाला, 'युधिष्ठिरा, राज्यलाभापेक्षां धर्मरक्षण श्रेष्ठ आहे. तप हें त्याचसाठीं सांगितलें आहे. स्वधर्मामध्यें राहून सत्य व सरल वर्तन ह्यांच्या योगानें तूं इहलोक व परलोक मिळविले आहेस.वेदाध्ययन त्याचप्रमाणें व्रताचरण तुझ्याकडून झालें आहे. सर्व धनुर्विद्या प्राप्त करून घेऊन क्षात्रधर्मानें संपत्ति मिळवून मोठमोठीं यज्ञकर्में तूं केलीं आहेस. ऐहिक विषयांवर तुझी आसक्ति नसून कोणतेंही कर्म तूं सकाम करीत नाहींस. अर्थलोभानें धर्माची तुझ्या हातून हेळसांड होत नाहीं. ह्मणूनच तुला धर्मराज हें नांव मिळालें आहे. अनेक राष्ट्रें,संपत्ति व उपभोग्य वस्तू तुझ्या स्वाधीन असतांही सत्य, दान, तप, ज्ञान, श्रद्धा, क्षमा व सहनशीलता ह्यांवरची तुझी निष्ठा कायम आहे. ज्या वेळीं सर्व कौरवांसमक्ष द्रौपदीला अनाथाप्रमाणें सभेमध्यें फरफरां ओढीत आणिलें त्या वेळीं **धर्म व लौकिक ह्यांच्याविरुद्ध असें तें कृत्य तुझ्या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणींही निपुटपणें सहन केलें नसतें.** खचित तुझी सर्व कामना पूर्ण होऊन लवकरच तूं प्रजेचें यथायोग्य पालन करशील. तुझी प्रतिज्ञा जर पुरी झाली असेल तर हे आह्मी कौरवांना त्यांच्या कर्मानुसार प्रायश्चित्त देण्याला तयार आहों.' असें ह्मणून द्रौपदीकडे पाहून तो ह्मणाला, 'अर्जुनाची फिरून गांठ पडली हेंही ठीकच झालें.? द्रौपदि,तुझें मुलगे सद्वर्तनानें वागत असून केवळ धनुर्विद्येकडे लक्ष देऊन आपल्या भल्या आशांचा ते कित्ता गिरवीत आहेत. तुझा पिता व भाऊ राज्यलोभ दाखवून त्यांना बोलवतात तरी ते तिकडे जात नाहींत. तूं **अगर कुंतीनें त्यांना जसें वळण लावून दिलें असतें,हुबेहुब तसें वळण सुभद्रा त्यांना लावीत आहे.** माझ्या रुक्मिणीचा मुलगा ज्याप्रमाणें अनिरुद्ध, अभिमन्यु व सुनीथ ह्यांची काळजी घेतो, त्याचप्रमाणें तो त्यांची काळजी घेत आहे. दांडपट्टा करणें, ढाल धरणें इत्यादि व सर्व अस्त्रविद्या, रथ हांकणें, घोड्यावर बसणें इत्यादि गोष्टींत तो त्यांना योग्य शिक्षण देत आहे. तुझ्या मुलांचा व अभिमन्यूचा पराक्रम पाहून त्याला मोठें कौतुक वाटतें. ? ह्मण-

मार्गे तिला मुलांचें कुशल सांगून तो फिरून युधिष्ठिराला म्हणाला, 'दाशार्ह, कुकुर, अंधक इत्यादि योद्धे फक्त तुझ्या आज्ञेची वाट पहात आहेत. पाप्यांचा शिरोमणी दुर्योधन त्याच्या अनुयायांसहवर्तमान नरकासुर व शिशुपाल ह्यांची वाट केव्हां धरतो असें त्यांना झालें आहे. तूं पाहिजे तर आपला संकेत पाळ, पण दाशार्ह योद्ध्यांना शत्रुपक्षांकडील वीरांना ठार करून तुझ्या स्वागतासाठीं हास्तिनापूर तयार करून ठेवण्याला काय हरकत आहे? क्रोधाग्नि शांत होऊन प्रतिज्ञा पुरी होईपर्यंत तूं पाहिजे तर वाटेल तेथें हिंड व मनाची हुरहुर दूर झाल्यावर मग आपल्या राष्ट्रांत पाऊल टाक.' श्रीकृष्णाचा हा विचार ऐकून युधिष्ठिर त्याकडे दृष्टि लावून प्रशंसा करून म्हणाला, 'कृष्णा, पांडवांना निःसंशय तूंच गति आहेस. त्यांना आधार काय तो तुझाच आहे. वेळ येईल तेव्हां एवढें काय पण ह्यापेक्षांही महत्कृत्य तुझ्या हातून खात्रीनें होणार आहे. प्रतिज्ञा केल्याप्रमाणें बारा वर्षे तर निर्जन अरण्यांत घालविलीं. आतां अज्ञातवास पुरा झाल्यावर पांडव तुझ्याच स्वाधीन आहेत.आमच्या संबंधानें तुझी बुद्धि नेहमीं अशीच राहो म्हणजे झालें. कृष्णा, **सत्यापासून ढळणें पांडवांच्या हातून कधीं घडावयाचें नाहीं.**' ह्याप्रमाणें धर्मराज बोलत असतां तपोवृद्ध, पुरातन, अजगमर, तेजस्वी व सकल गुणसंपन्न असे मुनिवर्य मार्कंडेय व नारद पांडवांना भेटण्याला आले. यथायोग्य सत्कार घेऊन आसनावर बसल्यावर सर्वश्रुत मार्कंडेयांच्या तोंडून पुण्यप्रद अशा पुराणकथा व सनातन धर्म ऐकण्याच्या उद्देशानें 'महर्षे, आह्मांला आपल्याला जो कांहीं उपदेश करावयाचा असेल तो करावा,' असें म्हणून उपोद्घातरूपानें धर्मराजानें त्यांना प्रश्न केला, 'भगवन्, मी न्यायानें चालणारा सुखाला मुकलों आहे व धार्तराष्ट्र अन्यायानें चालत असून ऐश्वर्योपभोग घेत आहेत, यावरून मनुष्याला त्याच्या शुभाशुभ कर्माचेंच फळ मिळतें असें मला वाटत नाहीं. मनुष्य आपल्या मनगटाच्या जोरावर जर सुख प्राप्त करून घेऊं शकतो, तर मग ईश्वराकडे कर्तृत्व कसें येतें, हें मला कळत नाहीं! मनुष्य आत्मकृत्याचें सुखदुःखरूपी फल केव्हां व कोठें भोगतो? इहलोकीं किंवा परलोकीं? जीवानें देह सोडल्यावर त्याचीं शुभाशुभ कृत्यें कोठें असतात व त्याला तीं कोठें गांठतात?' मार्कंडेयांनीं उत्तर दिलें, 'प्रथम उत्पन्न झालेल्या प्रजापतीनें प्राण्यांचे शुद्ध धर्मतंत्रानें असणारे देह उत्पन्न केले. इच्छेनुरूप फल मिळविण्याचें सामर्थ्य असणाऱ्या पूर्वीच्या व्रतशील व सत्यवक्त्या लोकांना ब्रह्मज्ञान पूर्ण असून देवांसह अंतरिक्षांत इच्छेनुरूप संचार करून फिरून भूतलावर येण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य होतें. ते निर्बाध व निश्चिंत असून त्यांचे कोणतेही मनोरथ अपुरे रहात नसत. ते इच्छामरणी असून सर्व धर्म त्यांच्या डोळ्यांपुढें असत. त्यांचीं इंद्रियें त्यांच्या स्वाधीन असून मत्सर म्हणून त्यांना माहीत नसे. पुढें कालांतरानें भूतलापलीकडे संचार करण्याचें मनुष्याचें सामर्थ्य नाहींसें होऊन काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादि विकारांच्या ते तावडींत गेले. त्यांच्या व्यवहारांत कपट दिसूं लागलें; व देहावसानानंतर आपल्या दुष्कृत्यांचें प्रायश्चित्त भोगण्यास नरकाला जाऊं लागले व ह्या विचित्र संसारामध्यें फिरून फिरून होरपळून निघूं लागले. त्यांच्या इच्छा व मनोरथ कधीं सफल होईनातसे झाले व त्यांचें ज्ञान व इंद्रियें निरर्थक झालीं. प्रत्येक गोष्टीपासून त्यांना ताप होऊं लागला. त्यांचा नीच कुलांत जन्म होऊं लागला. अनेक रोग मी मी म्हणून त्यांच्यामागें लागले. त्यांची बुद्धि भ्रष्ट होऊं लागून लोकांना ते अत्यंतच भयप्रद होऊं लागले. ते अल्पायुषी व पापकर्मरत होऊन आपल्या घोर कर्मांचीं फलें अनुभवूं लागले. ज्या त्या गोष्टीची त्यांना हाव सुटून ते नास्तिक व बेपर्वा होत चालले. मेलेल्या प्राण्यांची गति त्याच्या इहलोकींच्या कर्मावरून ठरते. बऱ्यावाईट कर्मांचा संचय कोठें असतो व प्राणी आपल्या सुकृतांचें किंवा दुष्कृतांचें फल कोठें अनुभवतो, म्हणून तूं मला विचारलेंस त्याचें उत्तर ऐक. हा मानव देवानें प्रथमनिर्माण केलेल्या आपल्या मुळच्या शुद्ध शरीरानें शुभाशुभ कर्मांचा मोठा संचय करतो. आयुष्य सरल्यावर हें क्षीण झालेलें स्थूल शरीर टाकून लागलींच अन्य योनीमध्यें पुन्हां जन्म घेतो व उत्पन्न होतांच त्याला दोन्ही देहांचें अवलंबन करावें ला-

गत असल्यानें एक क्षणभर देखील संसारापासून कशी ती त्याची मुक्तता होत नाहीं. त्या ठिकाणीं त्याचें पूर्व कर्म छायेप्रमाणें त्याच्या मागून जातें व तदनुसार सुखाला किंवा दुःखाला जसा तो पात्र असेल तसें तें त्याला मिळतें. प्राणी कृतांतानें नशीबाशीं जखडून टाकलेला असून आत्मकृत्यांचें फल टाळण्यास असमर्थ आहे हें ज्ञान्यांनाच तेवढें त्यांच्या ज्ञानचक्षूंनीं कळतें. ही बुद्धिहीनाची गति झाली. आतां ज्ञान्यांची काय गति होते ती सांगतों ऐक. ते कडकडीत तप आचरण करतात. सर्व वेदांचें परिशीलन करतात. व्रतांमध्यें दृढ राहून सत्याची ते फार काळजी घेतात. गुरुशुश्रूषेमध्यें मोठे दक्ष असतात. शील संभाळतात. योगाभ्यासानें क्षमाशील व संयतेंद्रिय राहून शुद्धयोनीमध्यें जन्माला येतात. बहुतकरून ते शुभलक्षणयुक्त असतात, व जितेंद्रिय असल्यामुळें स्वतंत्र असतात व शुद्ध असल्यामुळें रोगाची त्यांना बाधा होत नाहीं. त्यांना कशापासून पीडा होत नसल्यामुळें उपद्रवही होत नाहीं.प्राणी देहापासून निराळा कसा होतो,जन्माला कसा येतो व गर्भामध्यें कसा असतो हें सर्व स्वतःसंबंधानें व दुसऱ्यासंबंधानें ज्ञानदृष्टीनें ते जाणत असतात. हें प्रत्यक्ष ज्ञान असणारे महात्मे ह्या कर्मभूमीवर जन्माला येऊन फिरून स्वर्ग मिळवितात. मनुष्यांना ह्या जगीं जें कांहीं भोगावें लागतें तें अंशतः प्राक्तनाचें, अंशतः दैवाचें व अंशतः स्वकर्माचें फल असतें हें तूं पक्कें समज. ह्या जगीं जें श्रेयस्कर मानलें जातें तेंच मी उत्कृष्ट समजतों. कांहींना इहलोकीं उत्कृष्ट सुख मिळून परलोकीं तें मिळत नाहीं. कांहींना परलोकीं मिळून इहलोकीं मिळत नाहीं.कांहींना दोन्ही ठिकाणीं मिळत नाहीं. कांहींना दोन्ही ठिकाणीं मिळतें. ज्यापाशीं विपुल संपत्ति असून जे नित्य देह उत्तम प्रकारें विभूषित करतात त्यांना इहलोकींचें सुख मिळतें. ह्या शरीरसुखांत गढलेल्यांना परलोकसुख मिळत नाहीं. जे योगाभ्यास करून तपांत व वेदाध्ययनांत गढून आपला देह झिजवितात त्या जितेंद्रिय व अहिंसापर लोकांना परलोकीं सुख मिळतें. ते इहलोकच्या सुखाला मुकतात. प्रथमापासून धर्मानें वागून न्यायानें द्रव्यार्जन करून श्री संपादन करून जे यज्ञयाग करतात त्यांना इह व पर अशा दोन्ही लोकीं सुख मिळतें; व जे विद्यार्जन करीत नाहींत, तप करीत नाहींत, दान करीत नाहींत, व मूर्खपणानें अपत्योत्पादनाची देखील पर्वा करीत नाहींत व जे ऐहिक सुखोपभोगांपासून देखील परावृत्त असतात ते इह व पर अशा दोन्ही लोकांच्या सुखाला मुकतात.'

९० ब्राह्मणमाहात्म्य. (३. १८४–८३)

नंतर ब्राह्मणमाहात्म्य सांगण्याची युधिष्ठिरानें विनंती केल्यावरून मार्कंडेय ह्मणालेः—

' कोणी हैहयवंशीय राजपुत्र तृणलतांनीं संकुल अशा अरण्यामधून मृगया करीत असतां त्यानें मृगचर्म पांघरून बसलेल्या एका मुनीला हरीण समजून बाणानें मारलें. पुढें खरा वृत्तांत कळल्यावर पश्चात्ताप पावून आपल्या कुलांतील वृद्धांकडे जाऊन घडलेली हकीकत त्यानें त्यांच्या कानावर घातली. फलमूलांवर राहणाऱ्या मुनींची हत्या त्याच्या हातून झालेली ऐकून तेही घाबरून जाऊन हे कोणाचे कोण याचा शोध करीत ते तार्क्ष्य ऋषींच्या आश्रमाला आले व ऋषींना अभिवादन करून त्यांपुढे उभे राहिले. ऋषी त्यांचा अतिथिसत्कार करूं लागले असतां ' ब्रह्महत्या केलेले आह्मी आपल्या सत्काराला पात्र नाहीं, ' असें ह्मणून घडलेली हकीकत त्यांनीं त्यांच्या कानावर घातली. 'ज्या ब्राह्मणाची तुमच्या हातून हत्या घडली त्याला हुडकून काढा, ' असें ते ऋषी ह्मणाले. तेव्हां पुष्कळ शोध केला तरी स्वप्नांत घडलेल्या गोष्टीप्रमाणें त्यांना ते सांपडले नाहींत. नंतर ' तुह्मी मारलेले ब्राह्मण हे का,' ह्मणून त्यांनीं आपला मुलगा त्यांना दाखविला. तेव्हां ते मेलेले फिरून जिवंत झालेले पाहून त्यांना मोठें आश्चर्य वाटलें, व ' हे फिरून जिवंत कसे झाले,' ह्मणून त्यांनीं ऋषींना विचारलें. ऋषींनीं उत्तर दिलें,'आमच्यावर मृत्यूची मात्रा चालत नाहीं. आह्मांला सत्य काय तें ठाऊक असून असत्यांत आह्मी मन घालीत नाहीं. स्वधर्मानें वागतों. ब्राह्मणांचें हित असेल तें त्यांना सांगून त्यांच्या संबंधानें कधीं वाईट बोलत नाहीं. शेंकडों अतिथी व सेवकजन ह्यांना खाण्यापिण्याला देऊन अवशिष्ट राहील तें आह्मी खातों. इंद्रियनिग्रह करून क्षमाशील राहू-

न अनेक तीर्थें करीत धर्म पाळून पुण्यप्रदेशांत राहतों. यामुळें मृत्युचें आह्मांला मूळीं भय नाहीं. तुह्मी निःशंक परत जा. ब्रह्महत्येची भीति मनांत देखील आणूं नका.' हें ऐकून ते सर्व हैहयराजे आपल्या नगरीला परत गेले.' आणखी ह्यासंबंधानें तुला कथा सांगतों ऐक.

'वैन्य नामक कोणा राजर्षीनें अश्वमेधदीक्षा घेतली होती, तेव्हां अत्रिऋषींच्या मनांत त्याकडे जाऊन पुष्कळ द्रव्य आणावें असें आलें. परंतु फिरून तो विचार बदलून धर्मविचार मनांत आणून द्रव्येच्छा त्यांनीं बाजूला ठेविली व अविनाशी व निर्बाध असें उत्तम फल प्राप्त करून घेण्यामाठीं वनांत जाऊन तपाचरण करून रहावें असें मनांत आणलें. त्यांनीं तो विचार स्त्रीला कळविला, तेव्हां ती ह्मणाली, 'वैन्याकडे जाऊन यथेच्छ द्रव्य मागून आणा व त्यानें पुत्र व सेवक ह्यांना तृप्त करून मग वाटेल तिकडे जा.' हें तिचें भाषण ऐकून ते वैन्याकडे गेले व अशीर्वादपूर्वक त्याची स्तुति करून त्याला ह्मणाले, 'राजा तूं धन्य आहेस. तूं सर्वांचा स्वामी आहेस. ह्या भूतलावर तुझ्यासारखा दुसरा कोणी राजा नाहीं. तुझ्यासारखा धर्मज्ञही दुसरा कोणी नाहीं.' ही स्तुति ऐकून गौतमांना राग येऊन ते ह्मणाले, 'अत्रे, आपली बुद्धि चळली वाटतें. सर्वांचा मुख्य स्वामी इंद्र आहे, राजा नव्हे.' अत्रि ह्मणाले, 'इंद्राप्रमाणेंच ह्या राजाच्या ठिकाणीं सर्व कर्तृत्व आहे. आपलीच बुद्धि नष्ट झाली आहे.' गौतम ह्मणाले, 'माझी बुद्धि नष्ट झाली नाहीं. आपणच यापासून स्वार्थ साधून घेण्यासाठीं त्याला चढवीत आहां.' ह्याप्रमाणें वादविवाद करीत ऋषिमंडळ बसलें होतें त्या ठिकाणीं ते आले. गौतमांनीं वादाचा प्रश्न त्यापुढें मांडला. तेव्हां ते सर्व त्याचा निकाल लावण्यासाठीं सनत्कुमारांकडे गेले व त्यांना त्यांनीं तो प्रश्न केला. तो प्रश्न ऐकून सनत्कुमारांनीं धर्मार्थयुक्त उत्तर दिलें, ते ह्मणाले, 'वायु व अग्नि ह्यांचा संयोग झाला असतां ज्याप्रमाणें अरण्य जळून जाण्याला वेळ लागत नाहीं, तद्वत् ब्रह्मतेज क्षत्रियाशीं किंवा क्षात्रतेज ब्राह्मणाशीं मिळाल्यावर शत्रूचा फडशा पडण्यास एक क्षण लागत नाहीं. राजा हा प्रजेचा आधिपति व धर्मसंस्थापक आहे हें सर्वश्रुतच आहे. रक्षणकर्ता इंद्र व नीतिवेत्ता शुक्र तोच असल्यामुळें वस्तुतः उत्पादक तोच आहे. तसेंच बृहस्पति व प्रजापति तोच आहे. ह्मणूनच त्याला विराट्, सम्राट्, इत्यादि नांवें आहेत. समाजस्थितीला तो हेतुभूत असून रक्षण करणारा व स्वर्गाची वाट दाखविणारा तोच आहे. सत्याला कारण व सत्यप्रवर्तक तोच आहे. पूर्वी ऋषींना अधर्माची भीति पडून त्यांनीं क्षत्रियांचे ठिकाणीं बल ठेविलें. ज्याप्रमाणें आकाशांतील सूर्य आपल्या तेजानें अंधकार नाहींसा करतो त्याप्रमाणें भूमीवर राजा अधर्म राहूं देत नाहीं. म्हणून राजा हा शास्त्रानें श्रेष्ठ मानला आहे.' हें ऐकून अत्रींवर संतुष्ट होऊन राजानें त्याला विपुल धन देऊन घराला परत पाठविलें.' ह्यासंबंधानें आणखी एक गोष्ट सांगतों ऐक.

'पूर्वी तार्क्ष्य मुनींनीं 'ह्या जगांत मनुष्याला श्रेयस्कर काय आहे, काय केलें असतां तो धर्मापासून भ्रष्ट होत नाहीं, अग्नीला केव्हां व कशी आहुति द्यावी,' ह्मणून प्रत्यक्ष सरस्वतीला प्रश्न केला असतां ती ह्मणाली, 'जो शुचिर्भूतपणानें, वेदाध्ययनामध्यें रत राहून स्वतःला न विसरतां ब्रह्माला यथायोग्य ओळखतो त्याला देवलोक प्राप्त होऊन देवांच्या समागमांत तो सुखानें राहतो. गोदान करणारांना उत्तम लोक मिळतो. बैल दान दिला असतां सूर्यलोक मिळतो. वस्त्रदानानें चंद्रलोकांला मनुष्य अधिकारी होतो. सुवर्णदानानें मनुष्य देवांच्या सारूप्यतेला पावतो. सवत्स अशी चांगली दुभती व खोड वैगेरे नसणारी गाय दान दिल्यानें तिच्या अंगावर जितके रोमांच असतात तितकीं वर्षं तो देवलोकाचा अधिकारी होतो. नांगर ओढण्याला लायख, धष्टपुष्ट, जुवाला लावण्यास योग्य असा, बैल दान केल्यानें दहा गोदान करणाराला जे लोक मिळतात त्यांना मनुष्य अधिकारी होतो. जो वस्त्र व कांस्यपात्रें धारेचें भांडें यांसह एकाच रंगाची गाय देऊन त्याबरोबर द्रव्य देतो ती गायच आपल्या गुणांनीं त्याची सर्व इच्छा परिपूर्ण करणारी होते. गोदानानें पुत्र, पौत्र व सात पिढ्यांपर्यंत कुल उद्धरतें. तिळाची गाय करून दक्षिणेसह तिचें दान केलें असतां अष्टवसूंचे

लोक मिळतात. स्वकर्मानें घोर तमोमय नरकांत बुडणाऱ्याला, महासागरांत बुडणाऱ्याला जशी नाव त्याप्रमाणें गोदान तारक होतें. जो ब्राह्मविधीनें कन्यादान करून त्याबरोबर भूदान करतो त्याला इंद्रलोक मिळतो. जो नियमानें सात वर्षं अग्नीमध्यें आहुति देतो तो स्वकर्मांनीं पूर्वीचीं सात व पुढचीं सात अशीं चौदा कुळें उद्धरतो.' नंतर 'अग्निहोत्र पूर्वी कसें करीत आले,' ह्मणून त्यांनीं विचारलें असतां ती ह्मणाली, 'अशुचि, ज्याचे विचार ठाम नाहींत, ज्याला ब्रह्मज्ञान झालें नाहीं व ज्याला विद्या नाहीं, अशाला होम करण्याला अधिकार नाहीं. मन शुद्ध ठेषूं इच्छिणारे देव श्रद्धाहीन मनुष्यानें दिलेला हवी घेत नाहींत. त्याचप्रमाणें अश्रोत्रियानें हवी कधीं देऊं नये. कारण त्यानें दिलेला हवी निरर्थक होतो. जो श्रोत्रिय नाहीं त्याला वेदानं हवी देण्याला अधिकार पोहोंचत नाहीं. ज्यांनीं तपानें देह झिजविला आहे, ज्यांची श्रद्धा आहे, जे सत्यव्रत आहेत व जे हुतशेष भक्षण करून राहतात, त्यांनीं आहुति दिली असतां गोदानानें मिळणारे लोक त्यांना प्राप्त होतात, व सर्वांत श्रेष्ठ व सत्यस्वरूप परब्रह्माचाही त्यांना साक्षात्कार होतो.' 'ज्ञानकांड व ब्रह्मकांड जाणणारी, बुद्धिस्वरूप, मूर्तिमंत प्रज्ञा, स्वयंप्रकाश, परमात्मस्वरूप, प्रत्यक्ष लक्ष्मीप्रमाणें तेजोमय अशी तूं कोण आहेस,' ह्मणून तार्क्ष्यानीं तिला विचारलें असतां सरस्वती ह्मणाली, 'विप्रश्रेष्ठांचा संशय दूर करण्यासाठीं मी अग्निहोत्रामधून उत्पन्न झालें असून हें परमात्मगूढ तुझ्याबरोबर संभाषणरूपानें मीं लोकांना कळविलें आहे. यज्ञामध्यें जे उत्तम उत्तम पदार्थ आहुति देतात त्यांच्यायोगानें त्याचप्रमाणें वृक्षसंबंधी, धातुसंबंधी, पृथ्वीसंबंधी पदार्थांनीं मी वाढून पुष्ट व रूपसंपन्न होतें व माझ्या दिव्यरूपानें व बुद्धीनें सिद्धि देतें.' 'ज्ञानी व कर्मी पुरुषांना विश्वासानें इंद्रियनिग्रहानें शोकरहित अशा उत्कृष्ट मोक्षाचें जें ज्ञान होतें तें मला नाहीं, तें तूं मला सांग,' ह्मणून फिरून तार्क्ष्य ह्मणाले असतां सरस्वती ह्मणाली, 'अहिंसादि व्रतें, जपतपादि पुण्यकर्में, चित्तवृत्तिनिरोधनरूप योग, इत्यादि साधनांनीं संसारांतून मुक्त होऊन स्वधर्माचरण व वेदाध्ययन करून, जे वेदज्ञ शोकरहित होतात तेच पुरातन, सच्चिदानंद, सर्वग, विराटप्रभृति सोपाधिक ब्रह्माहून पर अशा परमात्म्याशीं जाऊन मिळतात. त्या चिदात्म्याचे ठिकाणीं ब्रह्मांडरूप वेतसवृक्ष असून गंधादि विषय हाच त्याचा सुगंध आहे. असंख्य भोगस्थानें हाच त्याच्या असंख्य शाखा आहेत. तो अमर्यादित भासत असून त्याच्या अविद्यारूप मुळापासून भोगवासनारूप नद्या वहात आहेत, भोगजन्य सुखरूप मधुरजलानें त्या भरल्या आहेत. वासनारूप महानद्या वाळूच्या कणाप्रमाणें एकमेकांशीं मिळगलेल्या पुत्रादिकांच्या आश्रयानें राहून आपल्या प्रवाहांत सांपडलेल्या पुरुषाला त्या त्या भोगस्थानाकडे नेऊन पोहोंचवितात. त्यांतील विषयसुखरूप जल विजातीय कार्य उत्पन्न करीत असल्यानें व अनारशाप्रमाणें अनेक छिद्रांनीं युक्त असल्यानें ह्या धाना व अपूप ह्यांप्रमाणें असून ह्यांतील विषयसुखरूप जल मांसासारखें हिंसालभ्य आहे व भाजीपाल्याप्रमाणें त्यांत सार कमी आहे. तसेंच त्यांतील तें जल सकृद्दर्शनीं मधुर पण पचनाला जड व कर्दमाप्रमाणें चित्तरूपी वस्त्राला मलीन करणारें असल्यामुळें त्याला पायस व कर्दम ह्याचीच उपमा योग्य आहे. ज्याच्या प्राप्त्यर्थ मरुद्गणांसहवर्तमान इंद्रानें अनेक यज्ञ केले आहेत तेच मज विद्यारूप सरस्वतीचें मुख्य स्थान होय.'

९१ वैवस्वतमनूचा वृत्तांत. (३–१८७)

युधिष्ठिरानें वैवस्वत मनूचा वृत्तांत सांगण्यास सांगितल्यावरून मार्कंडेय ह्मणाले:—

'विवस्वताचा प्रतापी, ब्रह्मदेवासारखा तेजस्वी व तपस्वी मनुनामक पुत्र होता. बल, तेज, श्री व तप ह्या सर्वांमध्यें त्यानीं आपल्या पित्याला मागें सारलें. भव्य अशा बदरी आश्रमामध्यें हात वर करून एका पायावर हजारों वर्षं उग्र तप करीत असतां कोणे एके समयीं चीरिणी नदीतून ओलेत्यानें ते बाहेर पडले असतां कोणी एक मासा त्यांकडे येऊन ह्मणाला; 'भगवन्, मी लहान असल्यामुळें मोठ्या माशापासून मला फार त्रास होतो. बलवान् नेहमीं दुर्बलांना पीडा देतात. ह्यामुळें मी

फार कष्ट सोशीत आहें. आपल्यावांचून मला तारणारा कोणी नाहीं. मी आपले उपकार ठेवणार नाहीं' हें त्या माशाचें भाषण ऐकून ऋषींनीं त्याला हातानें वर काढून चंद्रकिरणाप्रमाणें निर्मल पाण्यानें भरलेल्या माठांत ठेविलें, व पुत्राप्रमाणें त्याची काळजी घेतली. त्यामुळें लवकरच तो इतका वाढला कीं, त्यांत त्याला हालचाल करतां येईना. तेव्हां ऋषींनीं त्याला त्याच्या सांगण्यावरून दोन योजनें लांब व एक योजन रुंद अशा विहिरींत सोडलें. तेथेंही कालांतरानें त्याला हालचाल करतां येईना; तेव्हां ऋषींनीं त्याला नेऊन गंगेमध्यें सोडलें. कांहीं कालानें तेथें तो इतका वाढला कीं, त्याला तेथेंही हालचाल करतां येईना. तेव्हां मनूंनीं त्याला स्वतः नेऊन समुद्रांत सोडलें. तेव्हां तो मासा हासत हासत त्यांना ह्मणाला, 'भगवन्, आपण माझें रक्षण केलें आहे. हल्लीच्या प्रसंगानुसार आपल्याला काय केलें पाहिजे तें सांगतों ऐका. सर्व विश्व बुडण्याचा काल समीप आला असून सर्व चराचरांचा नाश होणार आहे. एक खंबीर होडगें तयार करवून त्याला दोर लावून आजपर्यंत ब्राह्मणांना ठाऊक असलेलें निरनिराळ्या प्रकारचें सर्व बीं काळजीपूर्वक बरोबर घेऊन सप्तऋषींसहवर्तमान आपण त्यांत बसून माझी आठवण करा. शृंगधारी असा मी प्रगट होऊन आपल्याला संकटांतून सोडवीन.' असें ह्मणून तो मासा निघून गेल्यावर मनूंनीं सांगितल्याप्रमाणें सर्व प्रकारचें बीं मिळवून एक चांगलें होडगें तयार केलें व त्यांत बसून सप्तऋषींसह समुद्रांत शिरून त्या माशाची त्यांनीं आठवण केली. त्याबरोबर पर्वतप्राय शिंगधारण केलेला तो मासा त्या ठिकाणीं प्रगट झाला. तो दृष्टीस पडतांच मनूंनीं तो दोर त्याच्या शिंगाला अडकविला. त्या दोरानें जखडला जाऊन मोठमोठ्या लाटांवरून जणूं काय नाचतोच आहे व पाण्याच्या खळखळ शब्दांनीं जणूं काय गरजतोच आहे असा तो त्या लवणसागरामधून मोठ्या झपाट्यानें ती नाव ओढून घेऊन चालला. त्या महासागरांत जोराच्या वाऱ्यानें कलणारी ती नाव एखाद्या मदांध झालेल्या विलासिनीप्रमाणें डुलत होती. भूमीचा अगर दिशेचा पत्ता नसून जिकडे तिकडे पाणी व आकाश ह्यांखेरीज कांहीं दिसत नव्हतें. अशा स्थितींत त्या माशानें तें होडगें वाहून नेऊन हिमाचलाच्या एका उंच शिखराजवळ सोडलें, व त्याला ती नाव त्या दोरानें घट्ट जखडून ठेवण्यास सांगितलें. मनूंनीं त्याप्रमाणें केलें. त्यावरून त्या शिखराला अद्यापि **नौबंधन** हें नांव पडलें आहे. नंतर तो मासा मनूंला ह्मणाला, 'मी प्रजापति ब्रह्मा असून माझ्या पलीकडे कांहीं नाहीं. मत्स्यरूप धारण करून मीं तुह्मांला संकटांतून सोडविलें आहे. आतां हे मनो, देव, असुर, मनुष्य इत्यादि सर्व चराचरसृष्टि तूं उत्पन्न कर. सृष्टि उत्पन्न करतांना माझ्या कृपेनें मायेचा पगडा तुझ्यावर बसणार नाहीं.' असें ह्मणून तो मासा अदृश्य झाला व मनूंनीं कडकडीत तपामध्यें राहून सर्व प्रजा उत्पन्न करण्याला सुरवात केली.'

९२ विश्वरूपवर्णन व युगमाहात्म्य. (३. १८८–१९१)

'आपण चिरायु असल्यामुळें हजारों युगें आपल्या नजरेखालून गेलीं आहेत, तर आपणापासून सर्वांना हेतुभूत ब्रह्मसृष्टिसंबंधानें वृत्तांत श्रवण करूं इच्छितों,' असें युधिष्ठिराचें भाषण ऐकून अव्यक्त, सूक्ष्म, निर्गुण असून सगुण अशा पुराण स्वयंभू पुरुषाला नमस्कार करून मार्कंडेय ह्मणाले, 'संपूर्ण जगाचा नाश झाल्यावर प्रथम चार हजार वर्षें कृतयुगाचीं झालीं व त्याचा संधिकाल चारशें वर्षांचा होता. पुढें त्रेतायुगाचीं तीन हजार वर्षें व तीन तीनशें संधि कालचीं वर्षें झालीं. पुढें द्वापाराचीं दोन हजार वर्षें व दोन दोनशें संधिकालाचीं वर्षें, पुढें कलियुगाचीं एक हजार वर्षें व एकशें पहिला संधिकाल व एकशें मागचा संधिकाल, ह्याप्रमाणें युगसंख्या बारा हजार वर्षांची असून कलियुगानंतर फिरून कृतयुगाला आरंभ होतो. अशी चतुर्युगसंख्या हजार वेळां झाली ह्मणजे ब्रह्मदेवांचा एक दिवस होतो. हें सर्व विश्व ब्रह्मभुवनांत आंतल्या आंत फिरत असतें, त्यालाच शहाणे प्रलय ह्मणतात. ह्या सहस्रपरिणाम कलियुगाचा थोडा शेष राहतो त्यावेळीं लोक बहुतकरून असत्य भाषण करणारे निपजतात. यज्ञदान-

व्रतादि क्रिया प्रतिनिधीच्या द्वारें सुरू होतात. ब्राह्मण शूद्रांचीं कामें करूं लागून द्रव्यार्जनांत गढून जातात. ब्राह्मण किंवा क्षत्रिय धंदा करून पोट भरूं लागतात. वेदाध्ययन, यज्ञ, दंड व मृगासन एकीकडे ठेवून ब्राह्मण वाटेल तें खाऊं लागतात व अपजाप्य सोडून देतात. ब्राह्मणांचें काम शूद्राकडे जातें. ह्याप्रमाणें विपरीत गोष्टी घडूं लागल्या ह्मणजे तीं क्षयाचीं पूर्व चिन्हें समजावीं. मिथ्या तत्त्वावर राज्य करणारें असत्यवादी व पापकर्मरत असे अनेक म्लेच्छ राजे उत्पन्न होतात. चतुर्वर्णांचे लोक आपापल्या धर्मानें रहात नाहींत. प्रजा अल्पायुषी, निःशक्त, हतवीर्य, पराक्रमशून्य, खुजी, क्वचित् सत्य बोलणारी अशी निपजते. देशांत लोक विरळ होऊन सर्पादि क्रूर श्वापदांनीं सर्व भूमि व्यापून जाते. वृथा ब्रह्मवादी ह्मणवून घेणारे ब्राह्मण निपजतात.शूद्राला ' आर्य ' ह्मणून हांक मारूं लागतात व शूद्रांच्या भाषणांत गर्वोक्ति दिसूं लागते. स्त्रिया खुज्या,आचारहीन व कुशील निपजतात.पोरांची त्यांना घेंडुळी लागून त्यांचीं मुखेंच इंद्रियाचें काम करूं लागतात त्यांना लाजलज्जा मुळीं नाहींशी होते. प्रांतांत जिकडे तिकडे दुर्भिक्ष भासूं लागतो. जारकर्मरत स्त्रिया रस्त्यांतून हिंडूं लागतात. गाईचें दूध कमी होतें. झाडांना फलपुष्पांचा बहार कमी होऊन त्याधर यथेच्छ कावळे बसूं लागतात. प्राण्यांना वास व चव विशेष रहात नाहीं. ब्राह्मण ब्रह्महत्या करूं लागून वृथा फुशारक्या मारून राजापासून प्रतिग्रह घेऊं लागतात. लोभ व मोह ह्यांना बळी पडलेले असे केवळ ब्राह्मणांचें चिन्ह धारण करणारे ब्राह्मण दशदिशा भिक्षेसाठीं हिंडूं लागतात. व कराच्या ओझ्यानें ते अगदीं खचून जातात. उगीच नखें व केंस वाढवून साधूच्या वेषांत ते आपलीं वाईट कृत्यें झांकून ठेवतात. उदिमीबरही ते उपजीविका करूं लागतात. त्याचप्रमाणें ब्रह्मचारी ढोंगी बनून सुरापी व आपल्या गुरुपत्नीशीं संबंध ठेवणारे निपजतात. ह्याचप्रमाणें केवळ मांस व रक्त वाढविणाऱ्या ऐहिक सुखाकडे त्यांचें लक्ष राहतें. पाखंडी व परान्नस्तुतिपाठक अशा लोकांनीं आश्रम भरतात. पाऊस वेळेवर न पडून पिकें बराबर उगवत नाहींत. भ्रष्ट लोकांना हिंसा करण्यांत मजा वाटूं लागून अनन्वित पाप सुरू होतें. ह्या धर्मक्षयाचे काळीं उदमी लोक कपटांत तरबेज होऊन बहुतेक माल खोट्या मापानें विकूं लागतात. धर्मिष्ट लोक कमी होऊन पापी लोकांचा सुळसुळाट होतो व धर्माची शक्ति कमी होऊन अधर्म जोरावतो. धर्मिष्ठ लोक अल्पायुषी व दरिद्री होऊन धर्मलंड लोकांचें आयुष्य वाढून धनधान्यसंपन्न होतात. बिहारभूमीमधून दुष्ट लोकांचा संचार दिसूं लागतो. थोड्याशा पैशानें फुगून जाऊन लोक मदोन्मत्त होतात. त्याचप्रमाणें कोणापाशीं ठेव ठेविली तरी 'तूं मजपाशीं केव्हां ठेविलीस,' असें म्हणून निर्लज्जपणे लोक त्याचा अपहार करण्याची खटपट करतात. मनुष्य खाणारे प्राणी विहारभूमींतून व ग्रामवृक्षावर आपलें ठाणें बसवितात. सात आठ वर्षाच्या मुलींना गर्भ राहूं लागून बारा वर्षांच्या स्त्रिया आया बनतात व सोळाव्या वर्षीं केस पिकूं लागतात. मनुष्यांची आयुर्मर्यादा फार कमी होते. व क्षीणायु तरुणांमध्येंच ह्यातान्यांचीं सर्व लक्षणें दिसूं लागतात. स्त्रिया आचार सोडून आपल्या भल्या नवऱ्यांना फसवून शील सर्व बाजूला ठेवून दासाशीं व पशूंशीं व्यवहार ठेवूं लागतात, भयंकर दुष्काळ पडून लोक निःसत्व होऊन अन्न अन्न करून मरण पावतात. त्या समयीं सात जाज्वल्य व कांतिमान सूर्य प्रगट होऊन समुद्र व नद्या ह्यांचें पाणी शोषून घेतात व सर्व सुकलेल्या झाडझुडपांना जाळून खाक करतात. अशा समयीं भयंकर बारा सुटतो व प्रलयकालीन अग्नि प्रगट होऊन त्या सात सूर्यांनीं जाळून अवशिष्ट राहिलेल्या सर्वांचा फडशा उडवितो व भूमि फाडून पाताळांत शिरून सर्व भूतांना घाबरवून सोडून त्यांचा नाश करतो. त्यासमयीं कांहीं कृष्णकमलाप्रमाणें काळे कांहीं नीलकमलाप्रमाणें निळे, कांहीं कमलकेसरासारखे,कांहीं हळदीप्रमाणें पिंवळे, कांहीं कावळ्याच्या अंड्याच्या वर्णाचे, कांहीं हिंगुळासारखे, कांहीं मोठमोठ्या नगराच्या आकाराचे, कांहीं हत्ती एवढे, अशा नाना वर्णांचे व नाना आकारांचे, विजांनीं युक्त भयंकर गर्जना करणाऱ्या मेघांनीं आकाश भरून जाऊन सृष्टिकर्त्याच्या आज्ञेनें ते बारा

वर्षपर्यंत मुसळधारा पाऊस पाडून पृथ्वीवर जिकडे तिकडे पाणीच पाणी करून सोडतात; व समुद्र आपली मर्यादा उल्लंघन करून पर्वतांचा चुराडा उडवितो. ह्याप्रकारें सर्व चराचरांचा नाश झाल्यावर तो स्वयंभू आदिदेव त्या घोर वायूला गट्ट करून परमात्म्याचे ठिकाणीं लीन होऊन महासागरावर गाढ झोंप घेतो. ह्याप्रकारें निर्मानुष होऊन श्वापद, वृक्ष इत्यादि चराचर देखील न उरतां जिकडे तिकडे जलमय झालें असतां मी एकटा ह्या लोकांत चिटपांखरूं माझ्या दृष्टीस न पडल्यामुळें मनाला उद्विग्नता येऊन निराधार भटकत असतां एका मोठ्या वटवृक्षाच्या एका अफाट खांदीवर मऊ बिछाना घातलेल्या पर्यंकावर बसलेला एक बाल माझ्या दृष्टीस पडतो. त्याचें कमलमुख चंद्राशीं स्पर्धा करणारें असून नेत्रांना पाहून तर विकसित कमलाची आठवण बुजते. ती भूतवर्तमानभविष्य अशा सर्व कालीं शाश्वत असणारी मूर्ति पूर्ण ओळखीची वाटत असून पुष्कळ विचार केला असतांही त्याची ओळख पटत नाहीं व सर्व चराचराचा नाश झाला असून त्या बालाला ह्या ठिकाणीं स्वस्थ निजलेला पाहून मला विस्मय होतो. ह्याचा वर्ण जवसाच्या पुष्पाप्रमाणें असून त्यानें श्रीवत्सभूषण धारण केलें असल्यामुळें हा साक्षात् लक्ष्मीचें निवासस्थानच कीं काय असा मला भास होतो. मला पाहून तो बालक कर्णमधुर अशा शब्दांनीं मला ह्मणतो, 'मार्कंडेया, तूं श्रमलाससा दिसत असून तुला विश्रांति हवीशी वाटते. तुला वाटेल तितके दिवस ह्या माझ्या उदरांत तूं रहा.' त्याचें तें भाषण ऐकून माझ्या कंटाळवाण्या लांबलचक मानवदेहाचा मला वीट आला असल्यानें त्यानें उघडलेल्या त्याच्या मुखांत मी दैववशें अगदीं पराधीन होऊन शिरतों. आंत शिरल्यावर अनेक राष्ट्रांनीं व नगरांनीं पूर्ण ही पृथ्वी त्या ठिकाणीं माझ्या दृष्टीस पडते. गंगा, यमुना, शोण, कावेरी इत्यादि महानद्या, हिमालय, हेमकूट, गंधमादन, मेरु, मंदर इत्यादि मोठमोठे पर्वत, सिंहव्याघ्रादि सर्व क्रूर श्वापदें, इंद्र, देवगण, रुद्र, आदित्य, साध्य, गुह्यक, पितर, नाग, वसु, दैत्य, इत्यादि सकल प्राणिमात्र, त्याचप्रमाणें सर्व स्थावरजंगम पदार्थ जे याभूतलावर माझ्या पाहण्यांत आले होते ते सर्व मी त्याच्या उदरांत पाहतों. ह्याप्रमाणें चमत्कार पहात शेंकडों वर्षे मी त्याच्या उदरांत फिरत राहतों तरी मला त्याचा अंत लागत नाहीं. तेव्हां त्या सर्वश्रेष्ठ प्रसादोन्मुख ईशाला मनानें शरण जातों, तेव्हां तो फिरून आपलें मुख उघडतो, व त्यांतून मी बाहेर पडतो तेव्हां पूर्ववत् त्याला मीं वटवृक्षाच्या शाखेवर निजलेला पाहतों. माझ्यावर प्रसन्न होऊन हास्यमुखानें तो मला ह्मणतो, 'कांहीं दिवस माझ्या शरीरांमध्यें वास करून देखील तुला कंटाळा आल्यासारखें दिसतें.' हें तो ह्मणतो आहे तोंच माझ्या दृष्टीला पालट पडून माझा मोह दूर होऊन मला दिव्यदृष्टि प्राप्त होऊन मी स्वतःला ओळखूं लागलों. कोमल व आरक्त अंगुलींनीं विराजमान असे त्याचे गोजिरवाणे व पूज्य चरण मोठ्या सायासानें उचलून मी मस्तकीं धरून त्या अमेय शक्तिमानाचा अतुल प्रभाव पाहून सविनय हात जोडून मीं त्याला ह्मणतों, 'परमात्मन, तुझें व ह्या तुझ्या विलक्षण मायेचें खरें ज्ञान मी करून घेऊं इच्छितों. तुझ्या मुखांत शिरलों असतां माझ्या मनाविरुद्ध तुझ्या इच्छेनें पुन्हां बाहेर पडलों. तूं ह्याप्रमाणें अखिल विश्व उदरांत घेऊन कां राहिला आहेस ? व तेथें किती दिवस तें असें घेऊन राहणार ?' त्यानें उत्तर दिलें, 'हे ब्राह्मणा, देवांना देखील माझ्या सत्य स्वरूपाचें ज्ञान नाहीं. तुझ्या कडकडीत ब्रह्मचर्यानें संतुष्ट झाल्यानें ही सृष्टि मी कशी निर्माण करतों तें मी तुला सांगतों. **पूर्वी जलाला नारा ही संज्ञा मीं दिली होती व तें माझें शाश्वत अयन (राहण्याचें ठिकाण) झाल्यामुळें मला नारायण नांव पडलें.** तो मी ह्या सर्व विश्वाचा उत्पादक व संहारक आहें. विष्णु, ब्रह्मा, इंद्र, कुबेर, यम, रुद्र, सोम, कश्यप, धाता, विधाता, व यज्ञ हे सर्व मीच आहें. अग्नि हा माझें मुख, पृथ्वी ही पाय, सूर्य चंद्र हे नेत्र, स्वर्ग हें माझें मस्तक, आकाश व दिशा हे माझे कान, उदक हा घाम, व दिशांनीं वेष्टित अंतरिक्ष हें माझें शरीर आहे. वायु हा माझें मन आहे. विपुल दक्षिणांनीं युक्त शेंकडों यज्ञ माझ्या हातून झाले आहेत. ह्या पृथ्वीवर चारी वर्णांचे लोक स्वर्गप्राप्तीसाठीं देवयज्ञांत नेहमीं स्थि-

त असणाऱ्या माझेंच यजन करतात. चार समुद्रांनीं मर्यादित ही मेरुमंदारांनीं शोभायमान पृथ्वी मीच शेषरूपानें मस्तकावर धरतों.ही बुडूं लागली असतां पूर्वी मींच हिला वर ओढून काढली. मीच वडव्याचें मुख धारण करणारा अग्नि होऊन उदक शोषून घेऊन पुन्हां पर्जन्यरूपानें खालीं पाडतों. ब्राह्मण माझें मुख असून क्षत्रिय माझे बाहू आहेत; व वैश्य माझ्या मांड्या असून सामर्थ्यानें व अनुक्रमानें शूद्र माझे पाय आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, व अथर्वणवेद, माझ्यापासूनच उत्पन्न होऊन माझ्यामध्येंच फिरून लय पावतात. शमपर, जितेंद्रिय, ज्ञानेच्छु, कामक्रोधद्वेषादि विकारांपासून अलिप्त, ऐहिक विषयांपासून निवृत्त, धूतपाप, सत्वगुणानें संपन्न, अहंकारवर्ज्य, अध्यात्मज्ञानी असे यति माझेंच चिंतन करतात. प्रलयकालीन अग्नि, वायु व सूर्य मीच आहें. आकाशामध्यें जे हे तारे दिसत आहेत तीं सारीं माझीं रोमरंध्रें आहेत. अखिल रत्नसंपन्न सागर माझें वासस्थान व शयनस्थान आहे. मींच देवकार्यासाठीं समुद्र चांगल्या रीतीनें विभागिले आहेत. काम, क्रोध, हर्ष, भय, मोह इत्यादि विकार माझे रोम आहेत. प्राण्यांना मिळणारें सत्कर्मफल मीच असून सत्य, दान, तप, अहिंसा इत्यादि माझींच स्वरूपें आहेत. मींच लोकांची ज्ञानशक्ति काढून घेऊन मायाजाल त्यांवर पसरल्यामुळें माझ्याच आज्ञेनें त्यांचा माझ्या शरीरांत संचार होत असून त्यांच्या इच्छेचें त्यांत कांहीं अंग नाहीं. यथास्थित वेदाध्ययन करून जितक्रोधांना अनेक यज्ञ करून शमानें पूत झाले असतां जें महाफल मिळतें तें दुष्कर्म करणाऱ्या लोभी, कृपण, दुष्ट व अजितेंद्रिय अशांना मिळणें शक्य नाहीं. ज्या ज्या वेळीं ह्मणून धर्माची ग्लानि होऊन अधर्म वाढूं लागतो व हिंसाप्रिय असे देवांना देखील अजिंक्य राक्षस ह्या भूतलावर उत्पन्न होतात त्या त्या वेळीं एखाद्या शुभकर्म करणाऱ्याच्या घरीं मी जन्म घेतों; व मानवदेहांत प्रवेश करून जिकडे तिकडे शांतता आणतों. मी आपल्या मायेनें सर्व स्थावर जंगम उत्पन्न करून त्यांचा संहार करतों. क्रियाकालीं जगांतील व्यवहारांना आळा घालण्यासाठीं मानवदेहांत शिरून फिरून मी अचिंत्यरूप धारण करतों. कृतयुगीं माझा वर्ण श्वेत असून त्रेतायुगांत तो पीत असतो व द्वापारांत रक्त असून कलियुगांत कृष्ण असतो. ह्या कालीं अधर्माचें प्राबल्य तीनचतुर्थांशानें वाढून फक्त एक चतुर्थांश धर्म पृथ्वीवर राहतो. प्रलयकाल आला असतां मीच उग्र कालरूप धारण करून त्रैलोक्याचा संहार करतों. मी तीन मार्गांनीं युक्त सर्वव्यापी जगदात्मा, सर्व विश्वाचा आत्मा, सर्वत्रग व सर्वसुखावह असून अनंत आहें. मी मोठा विक्रमशाली असून सर्व भूतांचें संहारक व त्यांना व्यवसायाला लावणारें रूपरहित हें कालचक्र मीच फिरवितों. ह्याप्रमाणें मी सर्वभूतगामी असून मला कोणी ओळखावें तसें ओळखत नाहींत. लोकांत भक्त मलाच भजतात. जें कांहीं चराचर ब्रह्मांडामध्यें तुझ्या पाहण्यांत आलें आहे तें सर्व माझाच प्राणिभाव धारण करणारा आत्मा आहे. सर्व लोकांचा जनक ब्रह्मा माझें अर्धे शरीर असून मीच शंखचक्रगदाधारी नारायण आहें. सर्वांना मोह पाडणारा मी चार युगांच्या हजारदां फेऱ्या होईपर्यंत झोंप घेतों. ह्याप्रमाणें ब्रह्मा जागा होईपर्यंत सर्वकाल वृद्ध असून बालरूपानें मी ह्या ठिकाणीं असतों. सर्वांचा नाश झाल्यानें तुला कष्टी पाहून मीं तुला हें विश्व दाखविलें आहे. व सुरासुरांना देखील ठाऊक नसलेलें आत्मरूप सांगितलें आहे. तो महातपस्वी ब्रह्मा जागा झाला नाहीं तोंपर्यंत तूं येथें खुशाल सुखानें संचार कर. तो जागा झाल्यावर आह्मी दोघे मिळून फिरून विश्व उत्पन्न करूं.' असें सांगून मार्कंडेय ह्मणाले, 'तोच हा परमात्मा कृष्णरूपानें येथें तुमच्यापाशीं आहे. ह्या सर्व भूतांच्या आधारभूत परमात्म्याला तूं शरण जा.'

'पुढें युगाच्या आदिअंताचा वृत्तांत विस्तारानें सांगा,' ह्मणून युधिष्ठिर ह्मणाला असतां मार्कंडेय ह्मणाले, 'कृतयुगांत धर्म बैलाप्रमाणें चार पायांवर पूर्ण असून कपट किंवा उपाधि त्या कालीं माहीत नसते. त्रेतायुगांत त्याचा एक पाय लंगडा होऊन तो तीन पायांवर राहूं लागतो व द्वापारांत धर्माधर्म बरोबर अर्धे अर्धे होतात. कलियुगामध्यें तर तीन भागांनीं अधर्म सुरू होऊन एका भागानेंच धर्म बाकी राहतो. मनुष्यांचें आयुष्य,वीर्य,बल व तेज युगायुगाला कमी होत जातें. कलियुगामध्यें सर्व लोक धर्माचें ढोंग माज-

वून कपटानें धर्माचरण करूं लागतात. पडितंमन्य लोक सत्याला गुंडाळून ठेवतात. त्यामुळें त्यांचें आयुष्य कमी होतें. विद्यार्जनालाही मिळावा तितका काल मिळत नाहीं व विद्याहीन व ज्ञानहीन झाल्यामुळें काम, क्रोध, लोभ इत्यादि दुष्ट विकारांचा त्यांवर पगडा बसून लोक एकमेकांला खाण्याला टपून परस्परांशीं वैर करूं लागतात. वर्णसंकर होऊन तप, सत्य इत्यादि आचारहीन होऊन लोक शूद्राच्या जोडीला जातात. चांडाल क्षत्रियादिकांचें व क्षत्रियादिक चांडालाचें काम करूं लागतात. वस्त्रामध्यें तागाचें वस्त्र व धान्यामध्यें कडु उच्च गणले जातात. बायकोच काय ती परम मित्र होऊन राहते. मत्स्यमांसावर लोक राहूं लागतात, व गाई नाहींशा झाल्यामुळें बकऱ्यामेंढ्यांचें दूध लोक उपयोगांत आणूं लागतात. जपजाप्य सोडून देऊन लोक नास्तिक बनून दुसऱ्याचे अपहार करण्याची बुद्धि त्यांच्या ठिकाणीं प्रबल होते. ते एकमेकांला मारूं लागतात. नदीतीरावर कुदळीनें खणून धान्य पेरूं लागतात. पण तेथेंही धान्य बराबर उगवत नाहीं. नेहमीं धार्मिक असणारे देखील लोभी बनून दुसऱ्यांचा अपहार करूं लागतात. बाप मुलाचा व मुलगा बापाचा अपहार करूं लागतो. भक्ष्याभक्ष्याचा बिचार रहात नाहीं. ब्राह्मण हेतुवादानें मोहांत पडून वेदनिंदक होऊन नियम व यज्ञयागादिक कर्में सोडून देतात. चिंचोळ्या भागांतून देखील लागवड होऊं लागून गाई व एक एक वर्षाचीं वांसरें लोक औताला जुंपूं लागतात. मुलानें बापाला व बापानें मुलाला बेफिकीर मारलें असतांही त्याबद्दल तो लोकनिंदेला पात्र होत नाहीं. उलट लोक त्याची वाहवा करतात. सर्व जग म्लेंछमय होऊन यज्ञयागादि क्रिया बंद पडतात. आनंद किंवा उत्साह कोठें दृष्टीस पडत नाहीं. लोक कृपणांचें, ज्यांना कोणाचा आधार नाहीं अशांचें, व प्रसंगीं विधवांचेंही द्रव्य हरण करतात. वीर्यहीन, बलहीन, ज्ञानहीन व लोभी बनून बाईट लोकांनीं तुच्छ करून जरी परिग्रह दिला तरी लोक तो त्यांपासून निःशंकपणें घेतात. बाहेरून स्वच्छ आचार दाखविणारे उद्धट व एकमेकांला मारण्याला टपलेले पापबुद्धि असे लोककंटकरूपी अधम क्षत्रिय आपणाला मोठे शहाणे समजून प्रजेचें रक्षण न करतां लोभ व अहंकार यांनीं ताठून केवळ दुसऱ्यांना शिक्षा करण्याकडे त्यांची प्रवृत्ति राहते, व दुसऱ्यासंबंधानें त्यांच्या हृदयांत दयेचा लेश न उरतां चांगल्याच्या बायका व संपत्ति ह्यांचा अपहार करून त्यांचा स्वतः उपभोग घेतात. मुलीला मागणी घालणें अगर कन्यादान करणें हे विधि नाहींसे होऊन मुली आपण होऊनच नवरे पाहूं लागतात. वृद्धांना पोरबुद्धि येऊन लहानांना ह्यातारचळ लागतो. भित्र्यांची शूरांत गणना होऊं लागून शूर आपल्या जागीं खिन्न होऊन राहतात. कोणाचा कोणावर विश्वास रहात नाहीं. सर्वांचा एक आहार होऊन जिकडे तिकडे लोभ व मोह यांचा पगडा बसतो. अधर्म वाढत जाऊन धर्म खालीं खालीं जात जातो. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हा भेद न उरतां वर्णसंकर होतो. हात हाताला फसवूं पाहूं लागल्याप्रमाणें बाप मुलाला किंवा मुलगा बापाला बुचाडतो व क्षमा करीत नाहीं. बायको नवऱ्याची शुश्रूषा करीत नाहीं. जव व गहूं ज्या प्रांतांत पुष्कळ पिकतात अशा देशाचा लोक आश्रय करूं लागतात. पुरुष व स्त्रिया स्वछंदानें वागूं लागून परस्परांना सलूं लागतात. श्राद्धें करून लोक देवांना तृप्त करीत नाहींत. कोणी कोणाचें ऐकत नाहीं व कोणी कोणाचा गुरु उरत नाहीं. जग सर्व पापानें ग्रासलें जातें. आयुर्मर्यादा सोळा वर्षांची होऊन पांच सहा वर्षांच्या मुलींना व सात आठ वर्षांच्या मुलांना मुलें होऊं लागतात. नवऱ्यापासून बायकोला किंवा बायकोपासून नवऱ्याला संतोष होत नाहीं. लोकांजवळ पैशांची ऊब कमी होऊन धर्म फक्त नांवाचा राहून कोणी दाता उरत नाहीं. देशांत जिकडे तिकडे दुष्काळ पडून चवाळ्याच्या जागा बदमाषांनीं भरून जातात; व स्त्रिया आपल्या पतींचा तिरस्कार करूं लागतात. द्रव्यलोभानें क्रयविक्रयामध्यें वंचना सुरूं होते. खरें तत्त्व न कळतां लोक क्रिया करूं लागून स्वछंदानें वागूं लागतात. लोकांची स्वभावतः क्रूर कर्माकडे प्रवृत्ति होऊन एकमेकांला ते टाकून बोलूं लागतात; व विहारांच्या जागा व वृक्ष ह्यांची बिनदिक्कत नासधूस करतात. जीविताचा देखील कोणीला सुरक्षितपणा वाटत नाहीं. ब्रह्महत्या करून त्यांच्या धनदौलतीचा लोक यथेच्छ उपभोग घेऊं

लागतात. दुष्ट लोकांनीं पीडले जाऊन कोणी त्राता न उरल्यामुळें ब्राह्मण सर्व पृथ्वीभर दीन होऊन भटकूं लागतात व अरण्यांत देखील चोरांचा त्रास होऊन नद्या, पर्वत व बिकट प्रदेश यांचा त्यांना आश्रय करावा लागतो. जुलमी राजांनीं नेहमीं कर वाढवून ब्राह्मिब्राह्मि करून सोडल्यामुळें लोक शूद्राची देखील नोकरी पतकरून वाटेल तें कृत्य करण्याला तयार होतात. शूद्र ब्राह्मणसेवा न करतां धर्म सांगूं लागतात व ब्राह्मण निमुटपणें त्याप्रमाणें वागूं लागतात. ह्याप्रमाणें जगांत सर्व विपरीत घडूं लागतें. देवांना सोडून लोक थडग्याला भजूं लागतात. थोर थोर ऋषींच्या आश्रमांमधून, ब्राह्मणांच्या घरांतून, देवालयांमधून, ग्रामवृक्षाखालीं, व लोकांच्या गृहांतून हडकें सांपडूं लागतात. पृथ्वीवर देवालयें इत्यादिकांचा कोठें मागमूस उरत नाहीं. लोक क्रूर, धर्महीन, मांसभक्षक व मद्यपी होतात. पुष्पावर पुष्प व फलावर फल येऊं लागतें. पाऊस अकालीं पडतो. क्रिया यथास्थित होत नाहींत. शूद्र ब्राह्मणांबरोबर विरोध करतात. सर्व पृथ्वी म्लेंछमय होऊन जाऊन लोक कराच्या ओझ्याखालीं दडपून जाऊन वनवास पतकरून फलमूलांवर राहूं लागतात. ह्याप्रकारें जगांत बेबंदशाई होऊन मर्यादा म्हणून कांहीं उरत नाहीं. मित्र, आप्त व बांधव हे सर्व पैशावर नजर देऊं लागतात. ह्याप्रकारें सर्व लोकांचा क्षय होतो. दिशा भडकून राहतात. नक्षत्रें निस्तेज होतात. ग्रह प्रतिकूल होतात व वारा देखील उलट वाहूं लागतो. महाभयसूचक उल्कापात होऊं लागतात. व भयंकर अशा आणखी सहा सूर्यांसह सूर्य आपलें प्रखर तेज पूर्ण प्रगट करतो. जिकडे तिकडे हाहाकार उडून सर्व अग्निमय दिसूं लागतें. उदयास्तसमयीं प्रत्यहीं सूर्याला राहु गिळतो. कजाग स्त्रिया नेहमीं टाकून बोलतात व रडारडी चालवितात. त्या पतीच्या आज्ञेत रहात नाहींत. मुलें वडिलांवर हात टाकूं लागतात. स्त्रिया स्वतंत्र होऊन आपल्या नवऱ्यांना व मुलांना मारतात. वाटसरांना वाटेंत अन्नपाणी न मिळतां रस्त्यावर पडण्याची वेळ येते. प्रलयकालीं दृष्टी पडणारे कावळे, साप इत्यादि क्रूर प्राणी भयंकर व कर्णकटु शब्द करतात. लोक मित्र, बांधव व सेवक ह्यांना सोडतात. अशी स्थिति झाल्यावर फिरून नवें युग सुरू होण्याच्या वेळीं दैव अनुकूल होतें. ब्राह्मणादि चतुर्वर्णांचे लोक फिरून उत्पन्न होतात. **सूर्य, चंद्र, बृहस्पती एका राशीला येऊन एका नक्षत्राला येतात.** तेव्हां फिरून कृतयुग सुरू होतें. पाऊस वेळेवर पडूं लागतो व नक्षत्रें शुभसूचक होतात व ग्रहही आपल्या गमनमार्गांमधून उजू जाऊं लागतात. दुर्भिक्ष व रोगराई नाहींशी होऊन जिकडे तिकडे स्वास्थ्य भासूं लागतें. अशा वेळीं संभलग्रामी ब्राह्मणाच्या गृहीं विष्णुयशा नांवाचा ब्राह्मण मोठा वीर्यवान, बुद्धिमान व पराक्रमी कल्कीरूपानें अवतरतो. त्यानें मनांत आणल्याबरोबर सर्व वाहनें आयुधें, योद्धे, शस्त्रें व कवचें त्यापुढें हजर राहतात. हा युगपरिवर्तक धर्मानें विजय मिळवून चक्रवर्ती होतो व सर्व म्लेंच्छांना उखळून काढून पृथ्वीवर जिकडे तिकडे शांतता आणतो व सर्व चोर नाहींसे करून अश्वमेध नामक महायज्ञामध्यें ही पृथ्वी ब्राह्मणाला देऊन टाकून ब्रह्मदेवांनीं ठरविलेली मर्यादा लोकांना घालून देतो व सत्कृत्यानें चांगली कीर्ति संपादन करून वनाला जातो. चोरांचा नाश होऊन जिकडे तिकडे स्वस्थता होते. ह्याप्रमाणें कृतयुगांत अधर्माचा समूळ नाश होऊन धर्मवृद्धि होते. लोक क्रियावान होतात. उद्यानें, तलाव, सरोवरें, मठ, देवालयें, हीं चोहोंकडे दिसूं लागून नानाप्रकारच्या यज्ञक्रिया चालू होतात. ब्राह्मण साधुवृत्तमुनी बनून तपांत गढले राहतात. तो वेळ पावेतों पाखंडी लोकांनीं भरलेल्या आश्रमांत मनाला आल्हाद देणारे सत्यप्रिय लोक दिसूं लागतात. धान्य पेरल्याबरोबर जोरानें उगवूं लागतें व सर्व ऋतूंमध्यें सर्व प्रकारचें धान्य होऊं लागतें. लोक धार्मिक, दानव्रत, जपजाप्य, यज्ञ ह्यांमध्यें गढून नेहमीं धर्माकडे लक्ष देऊन आनंदांत राहतात. राजे पृथ्वीचें पालन धर्मानें करूं लागतात. वैश्य आपल्या उदीम व्यापारांत मग्न राहतात. व शूद्र तीन वर्णांच्या सेवेमध्यें तत्पर राहतात. कृत, त्रेता, व द्वापर ह्या तीन युगांमध्यें धर्म असा राहतो. वायुपुराणांत वायूनें सांगितलेला हा युगधर्म मीं तुला सांगितला. धर्मामध्यें तूं नेहमीं दक्षता ठेव. धर्मानें वागणारा इहपरलोकीं सुखाचा उपभोग घेतो. ब्राह्मणाचा अवमान कधीं करूं नकोस

कारण ते रागावले तर सर्व लोकांचा नाश करण्याला ते निःसंशय समर्थ आहेत. ' पुढें ' कसें राहून मीं प्रजापालन करावें, ' ह्मणून युधिष्ठिरानें विचारल्यावरून मार्कंडेय ह्मणाले, ' सर्व भूतांवर दया व प्रेम ठेवून त्यांच्या हितासाठीं झटत जा. सर्वांशीं निर्मत्सर आस. सत्य व मृदु भाषण करीत जा. प्रजेच्या रक्षणांत दक्षता ठेव. धर्मानें वाग. अधर्माकडे प्रवृत्ति ठेवूं नकोस. पितर व देव ह्यांना भज. आपल्या हातून घडलेली चूक दानानें भरून काढ. अहंकार सोडून दे. नेहमीं सर्वांशीं लीन आस. ह्याप्रमाणें वर्तन ठेवशील तर सर्व पृथ्वी जिंकून तूं सुखी होशील. सांप्रतच्या निकृष्ट दशेबद्दल मनाला वाईट वाटून घेऊं नकोस. कालाची वक्रदृष्टि झाली असतां शहाणे धैर्य सोडीत नाहींत. ह्या कालानें देवांना सुद्धां सोडलें नाहीं. लोकविश्रुत अशा थोर कौरवकुलांत तुझा जन्म झाला आहे. हातानें, क्रियेनें व मनानें मीं सांगितल्याप्रमाणें वर्तन ठेव.'

९३ परीक्षिताचा वृत्तांत. (३. १९२)

' आणखी मी तुला ब्राह्मणाच्या महत्त्वासंबंधानें कथा सांगतों ऐक. अयोध्येमध्यें इक्ष्वाकुकुलांत परीक्षित् नामक राजा होऊन गेला. तो एकदां मृगाच्या मागें चालला असतां वाटेंत दमून एका रम्य सरोवराच्या तीरावर विश्रांतीसाठीं पडला. तो निजला असतां त्या निर्जन प्रदेशीं सुस्वर गायन त्याच्या कानीं पडलें. तें ऐकून इकडे तिकडे पाहतो तों एक रूपवती स्त्री तोंडानें गात फुलें वेंचतांना त्याच्या दृष्टीस पडली. तिला पाहून तिच्यावर त्याचें मन गेलें. तिच्या जवळ जाऊन ' तूं कोण, कोणाची, मला वरतेस का, ' ह्मणून त्यानें तिला विचारलें. तेव्हां ' पाणी माझ्या दृष्टीस पडतां कामा नये ही अट कबूल असल्यास मी आपल्याला वरतें, ' असें तिनें उत्तर दिलें. बरें ह्मणून त्यानें तिच्याशीं लग्न लाविलें. इतर सर्व व्यवसायांपासून पराङ्मुख होऊन तिच्या समागमांत त्याला गढून गेलेला पाहून त्याच्या अमात्यानें त्याजवळ असणाऱ्या दासींपाशीं चौकशी केली व त्यांपासून सर्व गूढ काढून घेऊन त्यानें फलपुष्पांनीं संपन्न व अनेक वृक्षांनीं शोभायमान असें एक रम्य उपवन तयार करून त्यांत स्वच्छ उदकानें भरलेला असा एक तलाव तयार करविला, व ' ह्या निर्जल अशा रम्य उपवनांत आपण यथेष्ट क्रीडा करा, ' ह्मणून त्यानें राजाला विनंति केली. तेथें विहार करीत असतां एकेसमयीं राजा सहज त्या तलावाकडे गेला व तें मोत्यासारखें स्वच्छ उदक पाहून पूर्वसंकेत विसरून जाऊन त्यानें आपल्या प्रियेला त्यांत विहार करण्यास बोलाविलें. बरें ह्मणून तिनें आंत उडी घेतली व फिरून कांहीं ती बाहेर आली नाहीं. तिला हुडकण्यासाठीं राजानें त्या तलावाचें पाणी काढून लावून आंत चोहोंकडे तपास करविला. पण ती कांहीं सांपडली नाहीं. फक्त एका बेडूक एका बिळाच्या तोंडाला त्याच्या दृष्टीस पडला. त्या वेळीं राजानें सर्व बेडकांना मारून टाकण्याला हुकूम केला. तेव्हां बेडकांचा राजा साधूच्या वेषानें त्यापुढें येऊन ह्मणाला, ' राजा, ह्याप्रमाणें रागाच्या तावडींत जाऊं नकोस. दयाबुद्धि धर. असा अधर्म करूं नकोस. बेडकांना मारून तुला काय मिळणार? ' तेव्हां राजानें त्याला बेडकांना मारण्याचें कारण सांगितलें. तें ऐकून तो ह्मणाला, ' ही माझीच मुलगी आहे. हिनें आपल्या दुष्ट शीलानें आजपर्यंत अनेक राजांना असें फसविलें आहे. तुझा आग्रहच असेल तर हिला मी फिरून तुझ्या स्वाधीन करतों. ' असें ह्मणून त्यानें ती त्याला दिली व ' तुझ्या ह्या दुर्वर्तनामुळें तुला दुष्ट मुलें होतील, ' ह्मणून तिला शाप दिला. पुढें कांहीं दिवसांनीं त्या राजापासून तिला शल, दल व बल नांवाचे तीन मुलगे झाले. योग्य समय आला असतां त्यांपैकीं वडील जो शल त्याला राज्याभिषेक करून तपाची इच्छा धरून परीक्षित बनाला गेला. कोणे एके वेळीं शल मृगया करीत फिरत असतां आपला बाण लागून पळणाऱ्या मृगामागून चालला असतां रथ मोठ्या वेगानें हांकण्यास त्यानें सारथ्याला आज्ञा केली. तेव्हां ' वामी घोडे जरी रथाला जुंपले तरी तो मृग आपल्या हातीं लागणार नाहीं, ' असें त्यानें उत्तर दिलें. तेव्हां ' हे वामी घोडे कोठें आहेत, ' ह्मणून राजानें त्याला विचारलें. त्यावेळीं तो सारथि ह्मणाला, ' वामदेव ऋषींपाशीं वामी नांवाचे ठोन वेगवान घोडे

असून ते वेगामध्ये मनाला देखील मागें सारणारे आहेत.' तें त्याचें भाषण ऐकून वामदेवांच्या आश्रमाकडे त्यानें रथ हांकण्यास सांगितलें. व ऋषीजवळ जाऊन 'माझा बाण लागून पळालेल्या मृगाला धरण्यासाठीं आपले वामी घोडे मला कांहीं काल द्या,' म्हणून त्यानें त्यांची प्रार्थना केली. 'काम झाल्यावर ते परत कर,' म्हणून सांगून ऋषींनीं त्याला आपले घोडे दिले. पुढें त्यांच्या साहाय्यानें हरणाला पकडून आपल्या नगराला परत आल्यावर ह्या अश्वरत्नांचा ऋषींना काय उपयोग असा विचार मनांत येऊन त्यानें त्यांना अंतःपुरामध्ये नेऊन दडवून ठेविलें. बराच काल झाला तरी राजानें घोडे परत केले नाहींत असें पाहून वामदेवांनीं आपल्या शिष्याला त्याकडे पाठविलें. शिष्यानें जाऊन राजाला घोडे मागितले असतां 'अशा प्रकारच्या वस्तू ब्राह्मणांना उपभोग्य नाहींत, तुझ्या गुरूंना हे घोडे घेऊन काय करावयाचे आहेत,' म्हणून राजानें त्याला तुच्छ केलें. शिष्यानें जाऊन घडलेली हकीकत वामदेवांच्या कानावर घातली. तेव्हां मोठ्या रागानें त्यांनीं स्वतः जाऊन राजाला घोडे मागितले. राजा म्हणाला, 'प्रत्यक्ष वेद आपल्याला वाहून नेतात मग आपल्याला हे घोडे घेऊन काय करावयाचे आहेत. ब्राह्मणांचें वाहन म्हटलें म्हणजे बैल. म्हणून पाहिजे असल्यास दोन जातिवंत बैल अगर चार गाढवें किंवा खेंचरें व हेंही पसंत नसल्यास दुसरे वेगवान घोडे घेऊन चला. पण हे घोडे मात्र आपल्याला मिळणार नाहींत.' वामदेव म्हणाले, 'वेद आमच्या सारख्यांना परलोकाला वाहून नेतात. ते इहलोकचे वाहक नव्हत. परत करीन म्हणून घेऊन गेलेले माझे घोडे तूं परत करणार नाहींस तर चार त्रिकाळ राक्षस माझ्या आज्ञेनें तीक्ष्ण शूलानें तुझे चार तुकडे करतील.' असें ऋषी म्हणाले तरी जेव्हां राजा ते घोडे परत करीना तेव्हां चार राक्षस हातांत शूल घेऊन प्रगट झाले. व त्यांनीं राजाला ठार मारलें. शल मेल्याची बातमी इक्ष्वाकु वंशजांना कळल्यावर त्यांनीं दलाला राज्याभिषेक केला. वामदेवांनीं त्याला घोडे मागितले. राजानें ह्यांना मारण्यासाठीं धनुष्याला बाण लावला तें पाहून 'ह्या बाणानें तुझा मुलगाच मरण पावेल,' असा ऋषींनीं त्याला शाप दिला. त्याबरोबर तो बाण जाऊन त्याच्या मुलाला लागला व त्यानें तो मरण पावला. राजानें त्यांवर सोडण्यासाठीं दुसरा बाण काढला असतां 'बाण लावून सोडण्याला तुझा हातच चालणार नाहीं,' असें ते म्हणाले. पुढें त्याप्रमाणें होऊन राजा पश्चात्तापयुक्त झाला असतां ते म्हणाले, 'ह्या बाणानें तूं आपल्या स्त्रीला स्पर्श करशील तेव्हां तूं ह्या पापापासून मुक्त होशील.' असा जेव्हां ऋषींनी उश्शाप दिला तेव्हां त्या ऋषींच्या त्या अद्भुत प्रभावानें थक्क होऊन त्यानें त्यांच्या आज्ञेप्रमाणें केलें. तेव्हां राणी म्हणाली, 'ह्या पापबुद्धीना ताळ्यावर आणून व ब्राह्मणांचें हित करून ज्याच्या योगानें मला पुण्यलोक मिळेल असा आपण मजवर अनुग्रह करावा.' बरें म्हणून ऋषींनीं तिला वर दिला व राजानें त्यांचे घोडे त्यांना परत केले.'

---

९४ बकदाल्भ्यांचा इंद्राशीं संवाद. (३. १९३.)

'बकदाल्भ्य दीर्घायु कशानें झाले,' म्हणून धर्मराजानें विचारलें असतां मार्कंडेय म्हणालेः—

'देव व असुर यांचें अंगावर रोमांच उभे करण्यासारखें घोर युद्ध होऊन इंद्र त्रैलोक्याचा स्वामी झाला. तेव्हां पाऊस वेळच्या वेळीं पडून जिकडे तिकडे अबादानी झाली व प्रजा निर्बाधपणें आनंदांत आपापल्या धर्मानें राहूं लागली. यामुळें संतुष्ट होऊन देवेंद्र कोणे ऐके वेळीं ऐरावतावर बसून अनेक रम्य आश्रम, ऋद्धिमान नगरें, ग्राम व प्रांत तसेच प्रजापालनदक्ष असे धार्मिक राजे, पाणवठे, कुवे, तलाव व रम्य सरोवरें व ब्रह्मविचारांत गढून गेलेल्या ब्राह्मणांनीं गजबजलेलीं अनेक तीर्थें पहात पूर्व दिशेला सागरतीरीं असणाऱ्या रम्य अशा बकांच्या आश्रमाकडे आला. आसन, पाद्य, अर्घ्य, फलमूलें इत्यादिकांच्या सत्कारानें मनाला मोठें समाधान वाटून आसनावर सुखासीन झाल्यावर 'चिरंजीवींना ह्या जगांत काय दुःख आहे व काय सुख आहे,' म्हणून त्यानें ऋषींना प्रश्न केला. बक म्हणाले, 'अप्रियसंवास, प्रियावियोग, दुष्टांशीं संबंध, पुत्र, स्त्री,

आप्त व सुहृद् ह्यांचा नाश, परावलंबन, संकट, धनहीनांची दुस-याकडून होणारी विडंबना, अकुलीनांचें कुलीन बनून पुढें येणें व कुलीनांचें नामशेष होणें, अकुलीनांचें वैभवाला चढणें, कुलीनांना विपत्ति भोगावी लागणें इत्यादि गोष्टी, तसेंच मूर्खाची अडेलता, शहाण्याचे क्लेश, इत्यादि दुःखें पाहण्याचें चिरंजीवींचें कपाळीं येतें. **दुष्टांशीं संबंध करण्याची पाळी न येतां आठ आठ अगर बारा बारा दिवसांनीं सुद्धां एकदां आपल्या घरीं जें कांहीं भाजीपाला मिळेल तेवढ्यावर राहण्याहून आणखी सुख तें काय पाहिजे ?** अशा प्रकारें भाजीपाला उकडून खाणारा सुखी. कारण त्याला कोणी खादाड ह्मणणारा नसून दिवसांचीही खिसगणती त्याला नसते. **कोणावर अवलंबून न राहतां व कोणापुढें तोंड न पसरतां स्वकष्टार्जित फलमूलें खाऊन राहणें फार चांगलें. मानहानि सोसून दुस-याचे घरीं मिष्टान्न मिळालें तरी तें बरें नव्हे. दैन्यतेनें कुत्र्याप्रमाणें खळी भरणारा रक्तपी समजावा.** जो अभ्यागतांना व पितरांना देऊन राहिलेलें अन्न भक्षण करतो तेंच अन्न श्रेयस्कर असून मिष्ट व शुद्ध आहे. त्याहून ह्या जगांत दुसरें कांहीं शुद्ध नाहीं. ब्राह्मण जितके घास घेतो तितके हजार गोदान दिल्याचें फल जेऊं घालणाराला मिळतें. यौवनांत केलेलीं सर्व पापें यानें धुवून जातात. जेऊं घालून दक्षिणा दिलेल्या ब्राह्मणाच्या हातांमधलें उदक आपल्या अंगावर सिंचन झालें असतां आपलें पातक तत्क्षणीं नाहींसें होतें; अशा प्रकारच्या अनेक शुभ कथा बकमुनींबरोबर करून इंद्र स्वर्गाला निघून गेला.'

९९ क्षत्रियमाहात्म्य. (३. १९४–१९८)

ब्राह्मणांचें माहात्म्य ऐकल्यानंतर युधिष्ठिराची क्षत्रियांचें माहात्म्य ऐकण्याची इच्छा पाहून मार्कंडेय ह्मणालेः—

'एके समयीं कुरुकुलोत्पन्न सुहोत्र, ऋषींचें दर्शन घेऊन परत जात असतां वाटेंत त्याची व शिबी राजाची गांठ पडली. दोघेही योग्यतेनें सारखेच असल्यामुळें कोणी कोणाला वाट देईना. तेव्हां नारदमुनींनी येऊन 'तुह्मी अशी एकमेकांची वाट धरून कां बसलां,' ह्मणून विचारलें असतां 'आपणापेक्षां श्रेष्ठ असेल त्यालाच आजपर्यंत क्षत्रियांनीं वाट दिली आहे, आह्मी दोघेही समानगुण असून परस्परांशीं सरस्यानें आहों; तेव्हां कोणी कोणाला वाट द्यावी हें आह्मांस कळत नाहीं,' असें ते ह्मणाले. ते ऐकून नारद ह्मणाले, 'सौम्याशीं क्रूरपणें व क्रूराशीं सौम्यपणें वागणें प्रशस्त नाहीं. परंतु मनुष्यानें सज्जन व दुर्जन या दोघांबरोबर चांगुलपणानें कां वागूं नये? कोणाचा आपल्यावर उपकार झाला असतां त्याची शतपटींनें फेड करावी. कृपणाला पैशानें, खोटें बोलणाराला खरें बोलून, क्रूराबर क्षमा दाखवून व दुष्टाला त्याच्याबरोबर चांगल्या रीतीनें वागून वश करून घ्यावें. हा शिबी श्रेष्ठ व शीलवान आहे. तुह्मी दोघेही थोर आहां?' हें नारदाचें भाषण ऐकून सुहोत्रानें शिबीला प्रदक्षिणा करून वाट दिली.

कोणे एके समयीं ययाति राजा आपल्या प्रजाजनांमध्यें बसला असतां कोणी ब्राह्मण गुरुदक्षिणेसाठीं त्याकडे येऊन ह्मणाला, 'राजा, गुरुदक्षिणेसाठीं मी तुझ्याकडे याचनेला आलों आहे. **याचकांचा यजमानांकडून बहुतकरून तिरस्कार** होत असतो. ह्मणून तूं माझें प्रिय कशाप्रकारें करणार हें मला आधीं कळलें पाहिजे.' तें ऐकून राजा ह्मणाला, 'दान दिल्यावर त्याचा मी उल्लेख करीत नाहीं. देण्यासारखें नसेल तें देण्याचें मी कधीं कोणाला वचन देत नाहीं व एखादी वस्तु एकदां देतों ह्मटल्यावर ती दिल्यावांचून रहात नाहीं व तें दिल्याबद्दल मला वाईट न वाटतां उलट संतोष होतो. याचक मला फार आवडतात. त्यांचा मला कधीं राग येत नाहीं.' असें ह्मणून त्यानें त्या ब्राह्मणाला हजार गाई दिल्या.

वृषदर्भ व सेदुक नांवाचे नीतीनें चालणारे सर्व अस्त्रांमध्यें प्रवीणता मिळविलेले दोन राजे होते. ब्राह्मणांना सोन्यारुप्याखेरीज कांहीं दान करावयाचें नाहीं असा वृषदर्भाचा गुप्त नियम सेदुकाला ठाऊक होता. कोणी अध्ययनसंपन्न ब्राह्मण सेदुकाकडे येऊन त्यानें आशीर्वादपूर्वक गुरुदक्षिणेसाठीं हजार घोडे त्यापाशीं मागितले. 'आपले मनोरथ मला परिपूर्ण करतां येत नाहींत, आपण वृषदर्भाकडे जाल तर आपली इच्छा पूर्ण होईल.' असे सेदुक ह्मणा-

ला. तेव्हां वृषदर्भाकडे जाऊन त्यानें त्याला शंभर घोडे मागितले. तेव्हां त्या राजानें त्याला कोरडे ओढले. निरपराधी असतां ह्याप्रमाणें राजानें आपली पूजा केलेली पाहून संतापून जाऊन तो ब्राह्मण त्याला शाप देण्याला निघाला. तेव्हां राजा त्याला ह्मणाला, 'याचनेला जाऊन जो आपल्याला देणार नाहीं त्याला शाप देणें हा ब्राह्मणधर्म वाटतें?' ब्राह्मणानें उत्तर दिलें, 'सेवुकानें मला तुझ्याकडे पाठविलें ह्मणून मी तुझ्यापाशीं मागण्याला आलों. पण तूं पहावें तों मला कोरडें ओढलेस!' तेव्हा राजानें त्या दिवशीं दुपारपर्यंत येणारा सर्व वसूल त्याला देण्याचें कबूल करून त्याचें शांतवन केलें व त्या ब्राह्मणालाही हजार घोड्यांच्या शतपट मोबदला मिळाला.

विश्वामित्रकुलोत्पन्न अष्टक याने मोठा अश्वमेध यज्ञ केला. त्यावेळीं प्रतर्दन, वसुमना व शिबी हे तिघे त्याचे भाऊ तो पहाण्यासाठीं गेले होते. यज्ञ आटोपल्यावर ते चौघे रथांत बसून चालले असतां त्यांना नारद भेटले. त्यांना रथांत घेऊन 'स्वर्गलोकाचा उपभोग घेऊन आह्मी कोणत्या क्रमानें फिरून खालीं येऊं,' ह्मणून त्यांनीं त्यांना प्रश्न केला. तेव्हां नारद ह्मणाले, 'हा अष्टक प्रथम खालीं येईल. कारण पूर्वी एके वेळीं मी ह्याच्या घरीं रहात असतां आह्मी रथांत बसून चाललों होतों. तेव्हां हजारों भिन्न भिन्न वर्णांच्या गाई आमच्या दृष्टीस पडल्या. त्यांना पाहून ह्या कोणाच्या ह्मणून मीं ह्याला प्रश्न केला. तेव्हां मीं ह्या ब्राह्मणांला दान केल्या आहेत ह्मणून मोठ्या फुशारकीनें ह्याने मला उत्तर दिले. त्याच्या मागून हा प्रतर्दन खालीं येईल. कारण पूर्वी एकदां मी ह्याकडे गेलों असतां आह्मी रथांतून फिरावयाला गेलों होतों. तेव्हां एका ब्राह्मणानें ह्याला रथाला जुंपलेला एक घोडा मागितला. घरीं परत गेल्यावर देतों ह्मणून प्रथम सांगून ब्राह्मणाचा विशेष आग्रह पडल्यावरून त्यानें तो घोडा सोडून दिला. ह्याप्रमाणें चार ब्राह्मण त्याकडे मागावयाला आले होते त्या चौघांनाही त्यानें प्रथम घरीं परत गेल्याबर देतों म्हणून सांगून मागून ते रथाचे घोडे सोडून दिले, व चारी घोडे याप्रमाणें जुंपून टाकल्याबर स्वतः रथ ओढूं लागला. पुढें एकानें यापाशीं याचना केली असतां 'आतां मजपाशीं देण्याला कांहीं नाहीं,' असें हा ह्मणाला. याचेमागून हा वसुमना खालीं येईल, कारण ह्या पुण्यरथासाठीं ब्राह्मणांनीं स्वस्तिवाचन ह्मणून तो उत्पन्न केल्यावर मीं त्या ठिकाणीं जाऊन त्याची प्रशंसा केली. तेव्हां हा आपलाच आहे असें तो तोंडानें मात्र ह्मणाला. ह्याप्रमाणें दोनतीन वेळां होऊन चवथ्यावेळीं मीं जेव्हां ह्याची फार प्रशंसा केली तेव्हां 'आपण स्वस्तिवाचन चांगलें केलें,' एवढेंच ह्मणून तो मला देऊन टाकण्याचें त्याच्या हातून झालें नाहीं. ह्यामुळें तो खालीं येईल. पण हा शिबी मात्र कधींच खालीं येणार नाहीं. कारण कोणे एके वेळीं एक ब्राह्मण येऊन त्यानें ह्याच्या मुलाचें मांस शिजवून खाण्यासाठीं मागितलें. त्यावेळीं विचार न करतां लागलींच जाऊन त्यानें मुलाचें मांस कुटून शिजवून तयार केलें व तें एका पात्रांत घालून ब्राह्मणांचा शोध करीत निघाला. तेव्हां त्याला कोणीं 'तो ब्राह्मण तुझ्या वाड्याला आग लावीत आहे,' ह्मणून सांगितलें. तरी त्याच्या तोंडावर कांहीं विकार न दिसून येतां तो त्या ब्राह्मणाकडे जाऊन 'हें मांस तयार आहे,' ह्मणून ह्मणाला. ब्राह्मणानें त्यालाच तें खाण्यास सांगितलें. तेव्हां मनाची यत्किंचित् चलबिचल उडूं न देतां त्या ब्राह्मणाची पूजा करून तो तें खाण्याला तयार झाला. तों तो ब्राह्मण त्याचा हात धरून ह्मणाला, 'ह्या जगांत जितकोध तूंच आहेस. ब्राह्मणानें एखादी वस्तु तुझ्यापाशीं मागितली असतां ती तुझ्या हातून त्याला मिळणार नाहीं अशी गोष्टच नाहीं. अशी त्याची प्रशंसा करून तो गुप्त झाला व त्याचा मुलगा जिवंत त्यापुढें उभा राहिला. प्रत्यक्ष ब्रह्मदेव त्याची परीक्षा पहाण्यासाठीं ब्राह्मणरूपानें आले होते. 'ह्याप्रमाणें मुलाला कुटून ब्राह्मणाला देण्यांत आपला काय हेतु होता,' ह्मणून प्रधानांनीं विचारलें. तेव्हां तो ह्मणाला; **'यश किंवा दुसरा एखादा हेतु मनांत धरून किंवा सुख मिळावें ह्मणून मी कधीं दान करीत नाहीं. हा पाप्यांचा मार्ग नव्हे, एवढें जाणून मी याचें अवलंबन करतों. हा साधूंनीं घेतलेला मार्ग असल्यामुळें**

चांगला असला पाहिजे असें माझ्या मनानें घेतलें आहे.'

९६. इंद्रद्युम्नाची कथा. (३. १९९)

'आपल्यापेक्षां कोणी वडील आहे काय,' ह्मणून युधिष्ठिरानें विचारल्यावरून मार्कंडेय ह्मणालेः—

'कोणी इंद्रद्युम्न नांवाचा राजा कीर्तिहीन झाल्यामुळें क्षीणपुण्य होऊन स्वर्गातून खालीं मजकडे येऊन 'आपण मला ओळखतां का,' ह्मणून ह्मणाला. तेव्हां 'आह्मी आपल्या उद्योगांत गर्क राहून एका गांवांत एकापेक्षां अधिक रात्र न राहतां व तेंही कोठें तरी सार्वजनिक जागेंत राहून शरीर कष्टवून काल काढीत असल्यामुळें आमची आह्मांला ओळख राहण्याची मारामार. हिमाचलाच्या पायथ्याला मावारकर्ण नांवाचा गृध्र रहात असतो. तो माझ्याहून वृद्ध असल्यामुळें कदाचित् तुला ओळखीत असेल,' असें मी ह्मणालों. तें ऐकून अश्वरूप धारण करून त्यानें मला त्याकडे नेलें व 'तुझ्यापेक्षां वृद्ध कोणी आहे काय,' ह्मणून त्यानें त्याला विचारलें. तो गृध्र ह्मणाला, 'इंद्रद्युम्न नांवाचें सरोवर आहे. तेथें नाडिंधम नामाचा बक आहे. तो माझ्यापेक्षां वृद्ध आहे.' हें ऐकून त्यासह आह्मी त्या बकाकडे गेलों. तोही त्या राजाला ओळखीत नसल्यामुळें 'तुझ्याहून कोणी वृद्ध आहे काय,' ह्मणून त्या राजानें त्याला विचारलें.तो ह्मणाला,' ह्याच सरोवरामध्यें एक कांसव रहात असतो. तो माझ्यापेक्षां वृद्ध आहे.' तें ऐकून आह्मी सर्व त्या कांसवाकडे गेलों. त्याला राजानें तूं इंद्रद्युम्न राजाला ओळखतोस काय ह्मणून विचारलें. क्षणभर विचार करून डोळे पाण्यांनीं भरून येऊन अगदीं सद्गदित होऊन कष्टानें कांपत कांपत तो ह्मणाला, ' त्याला मी कसा ओळखणार नाहीं ? कारण त्यानें उभारलेले हजारों यज्ञस्तंभ त्यानें केलेल्या यज्ञाची अद्यापि साक्ष देत आहेत. त्यानें ब्राह्मणांना दक्षिणा ह्मणून दिलेल्या हजारों गाईंच्या पावलांनीं हें त्याच्या नांवाचें सरोवर तयार झालें आहे. कांसव ही त्याची कीर्ति गात असतां स्वर्गातून त्याला नेण्याला रथ आला. **कारण जोंपर्यंत एखाद्याच्या पुण्यकर्माचा डंका सर्व जगभर गाजून राहतो तोंपर्यंतच त्याला पुरुष हें नांव असून तो स्वर्गसुख घेतो. ज्या मनुष्याची अपकीर्ति ह्या जगांत गाइली जाते तो जोंपर्यंत ती ह्या जगांत कायम आहे तोंपर्यंत नरकवास भोगतो. ह्मणून मनुष्यानें नेहमीं सद्वर्तन ठेवून पापापासून अलिप्त रहावें व धर्माकडे लक्ष लावून कीर्ति संपादन करावी.'**

९७ दानमाहात्म्य. (३. २००-२०१)

' कोणकोणत्या स्थितींत कसकशा प्रकारचें दान केलें असतां तें सफल होतें, ' ह्मणून युधिष्ठिरानें विचारलें असतां मार्कंडेय ह्मणालेः—

' निपुत्रिक, धर्मबहिष्कृत, परान्नभोजी, व केवळ स्वतःसाठीं अन्न शिजवून खाणारा ह्या चौघांचा जन्म व्यर्थ आहे. आरूढपतिताला (ब्रह्मचर्यादि पुढचे आश्रम घेऊन पूर्वाश्रमाला येणाऱ्यास) दिलेलें, दुसऱ्याला बुचाडून त्यानें केलेलें दान, पतित ब्राह्मणाला, चोरी करणाऱ्या ब्राह्मणाला, गुरूला, खोटें बोलणाराला, पापी मनुष्याला, कृतघ्नाला, गांवासाठीं यज्ञ करणाराला, वेदविक्रय करणाराला, शूद्रासाठीं यज्ञ करणाराला, ज्याला ब्राह्मणत्वाचा नुसता बट्टा लागून जो वर्णाश्रमाप्रमाणें रहात नाहीं त्याला, **रजस्वला कुमारिकेशीं लग्न लावणाऱ्याला,** स्त्रियांना, मंत्र्यांना, व सेवकांना दिलेलें दान, अशा सोळा प्रकारचें दान व्यर्थ आहे. अज्ञानांधकारांत चाचपडणारा भयानें किंवा कोपानें जें दान करतो त्याचें त्याला गर्भावस्थेंतच फल मिळून जातें. परंतु सत्पात्रीं अन्यप्रकारें केलेल्या दानाचें फल मनुष्याला वृद्धापकाळीं मिळतें. ह्मणून स्वर्गप्राप्त्यर्थ कोणत्याही अवस्थेंत कोणतेंही दान द्विजांना द्यावें. चारी वर्णांचा प्रतिग्रह घेणारे ब्राह्मण जप, मंत्र, होम व वेदाध्ययन यांच्या योगानें वेदनौकेनें दान देणाराला तारतात व स्वतःही तरून जातात. मनुष्य कफादिकांनीं पीडून मरणोन्मुख झाल्यावरही पितर व देवता ह्यांच्या पूजेनें व ब्राह्मणांचा सत्कार केल्यानें पुण्य लोक मिळवितो. पंडुरोगी किंवा काळेढोण अशांना त्याचप्रमाणें नख गेलेले किंवा कुष्ट भरलेले, फसवे, जारपुत्र (कुंड), बिधेपासून झालेले (गोलक) व शस्त्रधारी ह्यांना श्राद्धामध्यें काळजीपूर्वक वर्ज करून नावें ठेवण्यास

जागा नाहीं अशा श्राद्धांत जेऊं घालावें. सरपणाप्रमाणें अग्नि सदोष श्राद्ध करणाराचा फडशा उडवितो. मुके, आंधळे, बहिरे इत्यादिकांचा जर श्राद्धब्राह्मणांत समावेश झाला असेल तर त्यांच्या जोडीला चांगले वेदपारग ब्राह्मण सांगावे. दात्याला व स्वतःला तारण्याला जो समर्थ आहे अशाला दान देणें कल्याणप्रद आहे. अतिथीला जेवूं घातल्यानें जशी अग्नीची तृप्ति होते तशी त्याला हवि दिल्यानें किंवा गंधफुलें वाहिल्यानें देखील होत नाहीं. ह्मणून जे अतिथीला पाय धुण्याला पाणी, पायाला चोळण्याला तूप, अन्न किंवा राहण्याला जागा देतात त्यांना यमलोक पाहण्याची पाळी येत नाहीं. देवांचे निर्माल्य काढणें, ब्राह्मणांचें उष्टें काढणें, त्यांच्या अंगाला चंदन फासणे व त्यांचें अंग रगडणें, ह्या प्रत्येकांचें फल गोदानाहून अधिक आहे. जो ब्राह्मण गृहस्थ व वेद पढलेला अग्निहोत्री आहे तो गरीब, बायकोपोरांनीं गांजलेला असेल तर त्याला दान अवश्य द्यावें. तसेंच ज्याचे आपल्यावर मुळीं उपकार नाहींत अशाला दान द्यावें. श्रीमंताला कधीं दान देऊं नये. श्रीमंताला दान दिल्यांत फायदा मुळीं नाहीं. एक गाय एकालांच द्यावी. तीच तीच फिरून फिरून अनेकाला देऊं नये. कारण दान केलेली गाय जर विकली जाईल तर त्यापासून दात्याच्या तीन पिढ्यांना अधोगति मिळते. जो ऐशी रतिभार (एक तोळा) शुद्ध सोनें दान करतो त्याला शंभर तोळे दान केल्याचे अक्षय्य फल मिळतें. जो औताच्या उपयोगाचा धष्टपुष्ट बैल दान करतो तो सर्व संकटांतून मुक्त होऊन स्वर्ग मिळवितो. जो विद्वान ब्राह्मणाला भूमि दान करतो त्याचे इष्ट हेतु सफल होतात. मार्ग चालून थकून पायावर धूळ चढलेल्यास जो अमुक ठिकाणीं अन्न, मिळेल ह्मणून बातमी देतो त्याला अन्नदानाचें फल मिळतें. अन्नदान सर्वांत श्रेष्ठ गणलें आहे. चांगलें तयार केलेलें अन्न जो यथाशक्ति दुसऱ्याला देतो त्याला ब्रह्मलोक मिळतो. अन्नच प्रजापति असून प्रजापति संवत्सर आहे, संवत्सर यज्ञ असल्यानें यज्ञामध्यें सर्वांचा समावेश होतो. ज्यांनीं पुष्कळ पाण्यांनीं भरलेल्या विहिरी, बावड्या, कुवे, धर्मशाळा बांधून लोकांना आश्रय देऊन अन्नदान दिलें आहे व जे नेहमीं गोड बोलतात, त्यांचें यम नांवही काढींत नाहीं. जो स्वकष्टार्जित धनधान्यसंचय सुशील ब्राह्मणाला दान करतो त्यावर पृथ्वी संतुष्ट राहून त्यासाठीं ती पैशाचा पाऊस पाडते. अन्नदान करणारे प्रथम स्वर्गाला जातात. सत्य भाषण करणारे त्यांमागून जातात व न मागतां दान करणारे त्यांमागून जातात, पण हें सर्व एकाच ठिकाणीं जातात. येथून यमलोक शेंशी हजार योजनें असून त्याला आकाशांतून जावें लागतें. वाटेंत पाणी मुळीं नसून तो रस्ताही फार भयाण आहे. प्रत्येक जीवाला यमाच्या आज्ञेने यमदूत बलात्कारें ह्या मार्गानें नेत असतां वाट चालून थकलेल्या ह्या जीवाला श्रमपरिहारासाठीं झाडाची सावली, पाणी किंवा राहण्याला ठिकाण कांहींच ह्या रस्त्यांत मिळत नाहीं. निरनिराळ्या प्रकारानें केलेलीं दानेंच कायतीं त्याला ह्या ठिकाणीं उपयोगीं पडतात. ज्यानें छत्री दान केली असेल त्या पुण्यानें त्याला मार्गांत उन्हाचा ताप होत नाहीं. अन्नदान करणारांना भुकेची बाधा होत नाहीं. वस्त्रदान करणाराला थंडीची बाधा होत नाहीं. जो वस्त्रदान करीत नाहीं त्याला उघडें जाण्याची पाळी येते. भूमिदान करणारे सर्व इच्छा परिपूर्ण होऊन हा मार्ग सुखानें क्रमतात. धान्य देणारांना येथें कांहीं क्लेश होत नाहींत. घर दान देणारे येथून सुखानें विमानांत बसून जातात. उदक दान करणारांना येथें तान्हेपासून बाधा होत नाहीं. दीपदान देणारांना ह्या मार्गावर उजेड मिळतो. गोदान करणारे सर्प पापांपासून मुक्त होऊन सुखानें ह्या मार्गावरून जातात. महिनाभर उपवास करणारे हंस जोडलेल्या विमानांतून ह्या मार्गानें प्रवास करतात. आठ दिवस उपवास करणारे मोर जोडलेल्या विमानांतून जातात. जो तीन रात्रीं एकभुक्त काढतो त्याला निर्बाध असे सुखकारक लोक मिळतात. जे पाणपोया ठेवतात त्यासाठीं ह्या ठिकाणीं पुष्पोदका नांवाची नदी तयार असून तिचें अमृततुल्य गार पाणी त्यांना प्यावयाला मिळतें. जे नेहमी दुष्ट कर्मांत गढले असतात त्यांसाठीं पाण्याच्या ऐवजीं पू तयार असतो. कपिला गाईचें दान विशेषतः ज्येष्ठ पुष्करतीर्थीं करणें फार पुण्यकारक सांगितलें आहे. विप्राचे पाय धुतल्यानें जोंपर्यंत त्यां-

च्या ओल्या पावलानें भूमि भिजली असते तोंपर्यंत पितर कमलपत्रांतून पाणी पीत असतात. अतिथींचें स्वागत केल्यानें अग्नि, त्यांना आसन दिल्यानें इंद्र, त्यांचे पाय धुतल्यानें पितर, व अन्न दिल्यानें प्रजापति तृप्त होतात. वासराचे पाय व डोकें बाहेर पडत असतांना ती गाय शुद्ध मनानें ब्राह्मणाला द्यावी. कारण ती गाय अशा वेळीं पृथ्वीसमान आहे. ह्मणून अशा प्रकारची गाय दान केल्यानें तिच्या व तिच्या वासराच्या अंगावर जितके केस असतात तितकीं हजार वर्षे मनुष्य स्वर्ग लोकाचा उपभोग घेतो. कृष्णवर्णाची गाय खुरांसह सोन्याचें नाक करून सर्व रत्नांनीं विभूषित करून तिळांनीं झांकून दान करावी. अशा प्रकारची गाय दान घेऊन जो मनुष्य सत्पात्र पाहून फिरून ती दान करतो त्याला सागरांत ह्या संपूर्ण पृथ्वीचें दान केल्याचें फळ मिळतें. गुडघ्यांतून दोन्ही हात घेऊन डाव्या हातानें पात्रस्पर्श करून न बोलतां जो जेवतो, जो मद्यप्राशन करीत नसून ज्याला दोष देण्याला तिळमात्र जागा नाहीं व जो वेदाध्ययन करतो, अशांना नेहमीं दुसऱ्याला तारण्याचें सामर्थ्य असतें. सर्व हव्यकव्यांला श्रोत्रिय ब्राह्मण पात्र आहे. प्रदीप्त अग्नीप्रमाणें त्याला दिलेलें दान कधीं व्यर्थ होत नाहीं. कोप हेंच विप्राचें शस्त्र असून त्यांना लढण्याला खऱ्या शस्त्राची कधीं जरूर पडत नाहीं. *करिच्छायेखालीं त्याच्या कर्णाच्या वाऱ्यामध्यें श्राद्ध केलें असतां एक लक्ष कल्पांपर्यंत त्याचें पुण्य नाहींसें होत नाहीं. जो जीवनसाधन न मिळाल्यामुळें पीडलेल्यास द्रव्य देतो किंवा धर्मशाळा बांधून त्यावर मनुष्य नेमून त्याकडून त्याचा योग्य बंदोबस्त ठेवितो त्याला सर्वत्यागाचें फळ मिळतें. ज्या ठिकाणीं **नदीचा ओघ फिरला आहे**, अशा तीर्थीं दिलेलें अश्वदान त्याचप्रमाणें अतिथीरूपी इंद्राला दिलेलें अन्नदान हीं महासागरांतील नौकेप्रमाणें मनुष्याला मोठमोठ्या पापांपासून तारतात. ग्रहणाचे वेळीं ब्राह्मणाला दिलेलीं दानें, विशेषतः द्यावरची साय, यापासून अक्षय्य फल मिळतें. पर्वकाळीं केलेल्या दानाचें फल दुप्पट असून ऋतूच्या आरंभाला केलेल्या दानाचें फल दसपट आहे. अयनादिकांच्या आरंभीं दिलेल्याचें शंभरपट, ग्रहणादिवशीं दिलेल्याचें हजारपट व अयनसंक्रांत (कर्क मकरयोग), विषुव संक्रांत [मेषतूळयोग] किंवा षडशीति मुख [मिथुन कन्या व मीन यांचा योग] अशा चंद्रसूर्यग्रहणयुक्त पर्वाला दिलेल्या दानाचें अक्षय्य फल आहे. जो जो हेतु धरून मनुष्य दान करतो तें तें फल अन्य जन्मीं त्याला मिळतें. सुवर्णाची अग्नीपासून, भूमींची विष्णूपासून व गाईची सूर्यापासून उत्पत्ति असल्यामुळें जो सुवर्ण, भूमि व गाई दान करतो त्याला अग्नि, विष्णु व सूर्य ह्यांचे सर्व लोक उपभोग भोगावयाला मिळतात,'

---

९८ शुद्धतेविषयीं.

(३. २००-८१-१२०.)

' ज्यानें विप्राला सदा शुद्धता येते त्या शौचासंबंधानें कांहीं सांगा, ' ह्मणून युधिष्ठिरानें विनंति केल्यावरून मार्कंडेय ह्मणाले, ' मनुष्याचे ठिकाणीं वाक्शौच, कर्मशौच व जलशौच अशा तीन प्रकारची शुद्धता असली ह्मणजे तो स्वर्गाला अधिकारी होतो. जो सकाळसंध्याकाळ नियमानें संध्यावंदन करून पावन करणाऱ्या देवमाता गायत्रीचा जप करतो त्यानें सागरांत भूमिदान घेतलें तरी त्या पापापासून तो मुक्त असतो, व जे सूर्यादि ग्रह त्याला अनिष्ट असतील ते सौम्य व कल्याणप्रद होतात. घोर मांसभक्षक राक्षसादिकांची ह्याच्यापुढें मात्रा चालत नाहीं. वेद पढविणें, दुसऱ्यासाठीं यज्ञ करणें किंवा एखादा प्रतिग्रह घेणें इत्यादिकांचा दोष याला मुळींच लागत नाहीं. तो वेद पढला असो वा नसो, तो प्राकृत असो किंवा संस्कृत असो, भस्माच्छादित अग्नीसारख्या ब्राह्मणांचा अवमान कधीं करूं नये. ज्याप्रमाणें स्मशानांत जळणाऱ्या अग्नीला गौणता येत नाहीं त्याप्रमाणें ब्राह्मण विद्वान असो वा नसो तें श्रेष्ठ दैवत समजलें पाहिजे. मोठमोठे [illegible]कार, वेशी व नानाप्र-

---

* गुरुवार व अमावास्या असा योग आला असतां अश्वत्थछायेला करिछाया ह्मणतात व त्याच्या पर्णांना कर्ण ही संज्ञा असते.

कारच्या उंच उंच हवेल्या ह्यांनीं नगरें किती जरी शोभायमान असलीं तरी त्यांत श्रेष्ठ ब्राह्मण नसतील तर इतर सर्व शोभा व्यर्थ आहे. वेदसंपन्न व सद्वर्तनशील असे ज्ञानी व तपस्वी ब्राह्मण ज्या ठिकाणीं असतात त्यालाच नगर हें नांव शोभतें व खरें तीर्थही तेंच आहे. **पालन करणारा राजा व तपस्वी ब्राह्मण ही सांगड तात्काल मुक्तिदायक आहे.** पुण्यतीर्थामध्यें स्नान करणें, पुण्यवान लोकांचें नांव घेणें व साधूंशीं संभाषण ठेवणें, ह्या गोष्टी शहाण्यांना पसंत आहेत. साधुसमागमानें पवित्र अशा वाक्सुभाषितरूपी जलानें भले नेहमीं स्वतःला पावन करून घेतात. भाव शुद्ध नसतां त्रिदंडधारण, मौन, जटा वाढविणें, मुंडन, वल्कलें व अजिन धारण करणें, व्रत, स्नान, अग्निहोत्र, वनवास व उपवासादिक शरीरनियम, इत्यादि बाह्य संस्कार व्यर्थ आहेत. चक्षुरादि सहा इंद्रियांची शुद्धि झाल्याखेरीज विषयोपभोगापासून अलिप्त राहतां येणे कठिण आहे. विषयोपभोगांना मात्र यांच्या शुद्धीची जरूर नाहीं. व त्यांमध्येंही तात्काल विकार पावणाऱ्या चंचल मनाची शुद्धि होणें फारच कठिण आहे. **ज्यांच्या हातून कायावाचामनेंकरून पाप घडत नाहीं तेंच महात्मे वास्तविक तप करीत असतात. वृथा शरीरत शोषण करून तपाचरण करणें खरें तप नव्हें.** कुटुंबवात्सल्य नसून शुक्लवृत्तीवर राहणारा निष्पाप असला तरी त्याला तें तप हिंसेप्रमाणें आहे. शुचिभूत मनुष्य दयाभूत असून तो घरीं रहात असला तरी तो खरा तपस्वी सर्व पापांपासून मुक्त समजला पाहिजे. उपासादि बाह्योपराचांनीं पापकर्माचें क्षालन न होतां त्यापासून केवळ रक्तमांस मात्र कमी होतें. शास्त्रांज्ञेचा विचार न करतां आपल्या मनाला वाटेल तशीं कर्में केल्यानें मनुष्याला क्लेश मात्र होतो; दुसरा कांहीं फायदा होत नाहीं. हा ज्या अग्नीची पूजा करतो तो अग्नी ह्याचीं पातकें नाहींशीं करीत नाहीं. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें कर्में करूनच आत्मशुद्धि होऊन उत्तम गति मिळते व उपवासादिक व्रतें फलप्रद होतात. केवळ फलमूल भक्षण केल्यानें, मौन धारण केल्यानें, वायु भक्षण केल्यानें, डोकें मुंडल्यानें, घर सोडल्यानें, जटा वाढविल्यानें, पर्णकुटिकेंत पडल्यानें, उपास काढल्यानें, अग्नीची पूजा केल्यानें, तीर्थामध्यें स्नान केल्यानें, किंवा जमिनीवर पडल्यानें ही गति कधीं मिळणें शक्य नाहीं. **तत्व कळून कर्में केल्यापासूनच जरामरणव्याधींपासून मुक्त होऊन मनुष्याला सद्गति मिळते.** अग्नींत भाजून निघालेल्या बिया जशा उगवत नाहींत त्याप्रमाणें ज्ञानानें कर्में जळून भस्म झालीं ह्मणजे आत्म्याला फिरून जन्म येण्याची भीति उरत नाहीं व आत्म्याखेरीज लांकूड अगर कूड यांसारखें हें शरीर समुद्रावरील फेंसाप्रमाणें नाहींसें होतें. एका श्लोकानें ह्मणा किंवा अर्ध्या श्लोकानें ह्मणा ज्याला अंतर्यामीं आत्म्याची ओळख पटली त्याला कर्तव्य ह्मणून कांहींच उरत नाहीं. कांहीं (**तत्वं** ह्या) दोनच अक्षरांनीं तर कांहीं शंकडों हजारों श्लोकांनीं आत्मज्ञान संपादून मोक्ष मिळवितात. ह्या संबंधानें संशय धरणारे लोक इहपर लोकांला त्याचप्रमाणें सुखाला मुकतात. मी ब्रह्म आहें ही भावनाच मुक्तीला कारणीभूत होते. ज्याप्रमाणें प्राणी भीतीपासून दूर असतो तद्वत ज्ञानवानानें वेदोक्त कर्मापासून अलग रहावें.

शुष्क तर्क सोडून देऊन श्रुति व स्मृतीला चिकटून राहून बुद्धिबलानें एकाक्षरसंपन्न सर्वव्यापि तत्त्व ओळखण्याचा यत्न करावा. साधनांचा अभाव असेल तर एकट्या बुद्धीनें तत्त्वज्ञान होणें शक्य नाहीं. ह्मणून वेदाच्या साहाय्यानें तें करून घेण्याचा यत्न करावा. मनुष्याचा आत्मा हाच वेद असून वेद त्याचें शरीर आहे व वेदाचाही ज्या ठिकाणीं लय होतो त्या आत्म्याच्या प्राप्तीला मुख्य साधन वेदच आहेत. हा स्वयंप्रकाशक आत्मा शुद्ध मनानेंच ज्ञेय आहे, देवांचें आयुष्य, कर्मांचीं फलें व प्राण्यांचें प्रभाव हे सर्व वेदांत सांगितल्याप्रमाणें प्रत्येक युगीं दृष्टोत्पत्तीस येतात. ज्या अर्थी इंद्रियशुद्धीवांचून मुक्ति नाहीं त्या अर्थी अनशनानें विषयोपभोग सोडावे. वास्तविक हा त्याग इंद्रियनिग्रहानेंच होतो. तपानें स्वर्गप्राप्ति होऊन, दानानें सुखोपभोग मिळतात. ज्ञानानें मोक्षप्राप्ति होते व तीर्थस्नानापासून पापांचें क्षालन होतें. '

९९ कुवलाश्वाची कथा. (३. २०१–२०४.)

'इक्ष्वाकुकुलांतील प्रसिद्ध कुवलाश्वराजाला धुंधुमार हें नांव कसें मिळालें,' ह्मणून युधिष्ठिरानें विचारल्यावरून मार्कंडेय ह्मणालेः—

'जगांतील सर्व चराचर वस्तूंचा नाश होऊन जिकडे तिकडे जलमय झालें असतां जलावर पडलेल्या जगत्कर्त्या विष्णूच्या नाभिकमलापासून सूर्याप्रमाणें तेजस्वी कमल बाहेर पडलें व त्यांतून साक्षात् चतुर्वेदरूपी चतुर्मुख सृष्टिकर्ते ब्रह्मदेव उत्पन्न झाले. पुढें कालांतरानें मधु व कैटभ नांवांच्या दोन मोठ्या बलाढ्य दैत्यांनीं अनेक योजनेंपर्यंत पसरलेल्या नागाच्या फण्यावर शयन केलेल्या किरीटकौस्तुभधारी, पीतांबर, श्रीनें दैदीप्यमान व सहस्र सूर्याप्रमाणें कांतिमान अशा जगत्प्रभु विष्णूला पद्मासनस्थ ब्रह्मदेवांसह पाहून ब्रह्मदेवांना त्यांनीं पीडा देण्याला प्रारंभ केला. त्यामुळें घाबरून जाऊन ब्रह्मदेव कमलनालासह थरथर कांपूं लागले. त्यानें जागे होऊन पाहतो तों भगवान विष्णूला ते दोन दैत्य पुढें दिसले. त्यांना पाहून तो त्यांना वर देण्याला तयार झाला. तेव्हां बलाचा मोठा गर्व झाला असल्यानें त्यांनीं हासत हासत विष्णूलाच उलट वर मागण्यास सांगितलें. तेव्हां विष्णु ह्मणाला, 'तुह्मी वीर्यवान व मोठे पराक्रमी असून सत्यप्रिय आहां. माझ्या हातून तुह्मांला मरण असावें एवढेंच मी मागतों. हें विष्णूचें भाषण ऐकून ते ह्मणाले; 'आह्मी आजपर्यंत स्वप्नींही खोटें बोललों नाहीं. सत्य व धर्म हीं आह्मीं कधीं सोडलीं नाहींत. हल्लीं आह्मी मोठ्या संकटांत आहों. हे केशवा, वर मागितल्याप्रमाणें लवकर काम उरकून घे. काळाचा हात कोणाच्यानें धरवणार नाहीं. वर आकाश नाहीं अशा ठिकाणीं मरण व मरणानंतर तुझ्या पोटीं जन्म हे दोन उलट वर तूं आह्मांला दे.' 'बरें' ह्मणून विष्णूनें आपल्या मांडीवर आपल्या तीक्ष्ण चक्रानें त्यांचीं डोकीं उडविलीं. त्यांचा धुंधु नांवाचा मोठा वीर्यशाली मुलगा होता. तो एका पायावर उभा राहून कडक तप करतां करतां अगदीं कृश होऊन त्याच्या शरीराचा नुसता पिंजरा उरला; तेव्हां ब्रह्मदेव त्याच्या तपानें संतुष्ट होऊन 'देव, दानव, यक्ष, राक्षस, सर्प किंवा गंधर्व ह्यांपैकीं कोणाच्याही हातून तुला मरण येणार नाहीं,' ह्मणून त्यांनीं त्याला वर दिला. ह्याप्रमाणें वर मिळाल्यावर पित्याच्या मरणाचें स्मरण होऊन त्याचा सूड घेण्यासाठीं विष्णूसह सर्व देवांना तो पीडा देऊं लागला. उत्तंक ऋषींच्या आश्रमाजवळ वाळवंटांत छपून राहून तपाच्या प्रभावानें श्वासाबरोबर तोंडांतून ज्वाला सोडून तेथील आश्रमवासी जनांना तो ताप देऊं लागला. इकडे उत्तंकांनीं आकाश हेंच ज्याचें मस्तक, सूर्यचंद्र ज्याचे नेत्र, वायु ज्याचा निःश्वास, अग्नि ज्याचें तेज, दिशा ज्याच्या बाहू, महार्णव ज्याचें उदर, पर्वत ज्याच्या मांड्या, अंतरिक्ष ज्याच्या पोटऱ्या, पृथ्वी ज्याचे पाय, ओषधी ज्याचे रोमांच, असा जो सर्वव्यापी परमेश्वर, ज्यापुढें इद्रचंद्रादि देव हात जोडून सेवेला उभे असतात, त्या परमात्म्याचा धांवा केला. भगवान संतुष्ट होऊन वर देण्याला सिद्ध झाले; तेव्हां जितेंद्रिय होऊन धर्म व सत्य यांकडे प्रवृत्ति राहून मन भक्तिपूर्वक तुझ्याकडे लागो,' असा उत्तंकांनीं वर मागितला. 'माझ्या प्रसादानें ह्या सर्व गोष्टी घडून येतील, व जो हा धुंधु लोकांचा समूळ उच्छेद करण्याचा हेतु धरून उग्र तप करीत आहे, ह्या अजिंक्य दैत्याला इक्ष्वाकु कुलांतील कुवलाश्व नांवाचा विख्यात राजा माझ्या योगबलाच्या साहाय्यानें तुझ्या आज्ञेनें मारील,' असें सांगून विष्णु अंतर्धान पावला.

इकडे इक्ष्वाकु कुलांतील दहावा पुरुष बृहदश्व नामक मोठा बलाढ्य राजा होता. त्याच्याच तोडीचा त्याचा कुवलाश्व नांवाचा मुलगा होता. ह्या कुवलाश्वाला मोठे बलवान, कोणाला हार न जाणारे असे एकवीस हजार मुलगे होते. हा गुणांनीं बापापेक्षां वरचढ होता. योग्य समय आल्यावर मुलाला राज्याभिषेक करून बृहदश्व तप करण्याच्या हेतूनें वनाला जाण्याला निघाला. त्यावेळीं उत्तंक त्याकडे येऊन त्याला ह्मणाले; 'क्षत्रियांना प्रजापालनानें जसें धर्मसाधन होतें तसें अरण्यवासांत तप केल्यानें होत नाहीं. प्रजापालन करण्याला तूंच समर्थ आहेस. माझें तप निर्बाध व सुरळीत चालत नाहीं. माझ्या आश्रमाजवळच धुंधु नांवाचा असुर सर्व

जगताचा नाश करण्याचा हेतु मनांत धरून घोर तप करीत पडला आहे. त्याला मारून शाश्वत कीर्ति मिळीव. तो सतत झोंपेंत असून एका वर्षानें एकदां श्वास सोडतो त्यावेळीं ही पृथ्वी कांपूं लागते. जिकडे तिकडे धूळच धूळ होऊन तिनें सूर्य झांकून जातो. सात दिवसपर्यंत चोहोंकडे धूर व ज्वाला पसरल्या राहून त्यांतून ठिणग्या बाहेर पडत असतात. त्यामुळें आश्रमांत राहणें मला फार कठिण होतें.' हें त्याचें भाषण ऐकून राजा ह्मणाला, 'ब्रह्मन्, आपलें आगमन निरर्थक होणार नाहीं. हा माझा वीर्यशाली मुलगा आपल्या आज्ञेप्रमाणें सर्व कांहीं करील. शस्त्र खालीं ठेवून मी आतां अरण्याला निघालों आहे; ह्याच्या मात्र आपण आड येऊं नका.' असें ह्मणून बृहदश्व निघून गेल्यावर कुवलाश्व आपल्या मुलांसह उत्तंकाबरोबर त्यांच्या आश्रमाकडे निघाला. त्यावेळीं विष्णूनें आपलें तेज त्याला दिलें. आकाशांत दुंदुभि वाजूं लागून मोठा शब्द होऊं लागला. वारा गार सुटला. जोराचा पाऊस पडून धूळ सगळी खालीं बसली. अंतरिक्षामध्यें विमानांच्या रांगा दिसूं लागल्या. उज्जालकाला येऊन पोहोंचल्यावर मुलांकडून कुवलाश्वानें तें वाळवंट उकरविलें. सात दिवसपर्यंत खोदल्यावर तो राक्षस त्यांच्या दृष्टीस पडला. त्यावर त्यांनीं तीक्ष्ण बाण सोडून गदा, मुसल, इत्यादि आयुधांचा मारा सुरू करून त्याला जर्जर केलें. इतक्यांत धुंधु जागा होऊन त्यानें त्यांचीं सर्व आयुधें गिळून टाकलीं व तोंडांतून प्रलयकालीन अग्नि बाहेर सोडून कपिलांनीं ज्याप्रमाणें सगराच्या मुलांना जाळून टाकलें होतें त्याप्रमाणें त्या सर्वांना त्यानें जाळून भस्म केलें. ह्याप्रमाणें प्रति कुंभकर्णरूपी त्या दैत्याने क्रोधाग्नीनें आपल्या मुलांना जाळून टाकल्यावर कुवलाश्व त्यावर चालून गेला व योगसामर्थ्यानें पाणी उत्पन्न करून त्यानें तो अग्नि शांत केला व ब्रह्मास्त्रानें त्या दैत्याला जाळून टाकलें. धुंधूला त्यानें मारल्यामुळें त्याचें **धुंधुमार** असें नांव पडलें. ह्या त्याच्या कृत्यानें संतुष्ट होऊन देवांनीं त्याला वर मागण्यास सांगितलें, तेव्हां 'ब्रह्मवर्चा मजकडून विपुल द्रव्य पोहोंचावें, शत्रूवर नेहमीं मला जय मिळावा व विष्णूच्याठिकाणीं भक्ति व धर्मावर निष्ठा राहून मला शाश्वत स्वर्गवास मिळावा,' असा त्यानें वर मागितला. त्याला दृढाश्व, कपिलाश्व व चंद्राश्व नांवाजे तीन मुलगे होते. त्यांनीं इक्ष्वाकुवंश पुढें चालविला.'

---

१०० पतिव्रतामाहात्म्य.
(३. २०५-२०६.)

नंतर 'पतिव्रतांचें माहात्म्य सांगा,' ह्मणून युधिष्ठिरानें विनंति केल्यावरून मार्कंडेय ह्मणालेः—

'कोणी धर्मशील व वेदाध्ययन करीत उग्र तपांत गढलेले कौशिक नांवाचे तपस्वी होते. कोणे एके वेळीं ते एका झाडाखालीं वेदाध्ययन करीत बसले असतां वरून एका बगळ्यानें त्यांच्या अंगावर मलोत्सर्जन केलें. दुष्टाचा नाश करण्याच्या बुद्धीनें त्यांनीं रागानें त्याकडे दृष्टि फेकल्याबरोबर तो मरून खालीं पडला. तेव्हां त्या ब्राह्मणाचें अंतःकरण करुणार्द्र होऊन आपल्या कृत्याबद्दल त्यांना पश्चात्ताप झाला. पुढें एकदां हे शुचिर्भूत कुटुंबानीं भरलेल्या एका गांवांतून भिक्षेसाठीं फिरत असतां एका घरांत शिरून त्यांनीं भिक्षा मागितली. तेव्हां त्या घरांतील स्त्रीनें त्यांना थांबण्यास सांगितलें. कारण तिचा पति दमून भुकेनें व्याकुळ होऊन बाहेरून घरीं आला होता. त्याला पाय धुवून आचमन करण्याला पाणी व बसावयाला आसन देऊन मधुर खायपेयाची तयारी करून देण्यांत ती साध्वी गुंतली होती. पतीचें भोजन झाल्यावर त्याचें उच्छिष्ट आपण खावयाचें असा तिचा नित्य क्रम होता. ती नेहमीं पतीच्या मनाप्रमाणें वागत असून त्यालाच आपलें दैवत समजत असे. कायावाचामनानें सुद्धां परपुरुषासंबंधी विचार ती कधीं करीत नसून एकानिष्ठेनें पतिसेवेमध्यें गढली असे. आचार चोख ठेऊन शुचिर्भूततेनें सर्व कुटुंबाच्या हितांत दक्षता ठेवी. व देवता, अतिथी, सेवकजन व सासुसासरे ह्यांचा योग्य परामर्श घेई. ह्मणून पतीचें काम आटोपल्यावर भिक्षा घेऊन ती त्या ब्राह्मणाकडे आली. तिष्ठत ठेविल्यानें त्याला संतापलेला पाहून ती ह्मणाली, 'महाराज क्षमा करा. पतींना मी सर्वांत श्रेष्ठ दैवत समजतें, ते थकून भागून आले अस-

ल्यामुळें त्यांचा सामाचार आधीं घेऊन मीं ही भिक्षा आणिली आहे.' ब्राह्मण ह्मणाला, 'तुला ब्राह्मण श्रेष्ठ नसून पतीला तूं ब्राह्मणाहून श्रेष्ठ समजतेस अं! गृहस्थाश्रमांत असून ब्राह्मणांचा तूं ह्याप्रमाणें अवमान करतेस? ब्राह्मणापुढें इंद्रासारखे देखील वांकतात. अग्नितुल्य ब्राह्मणाच्या अंगीं ही संपूर्ण पृथ्वी जाळून भस्म करण्याची शक्ति आहे, हें अहंपणामुळें तूं जाणीत नाहीं!' स्त्री ह्मणाली, 'महाराज, मी कांहीं ती बगळी नव्हे. उगीच राग कशाला करतां. ह्याप्रमाणें किती जरी आपण संतापला तरी आपल्या हातून माझें यत्किंचितही वांकडें होणार नाहीं. देवासारख्या ब्राह्मणांचा मी कधीं अवमान करीत नाहीं. त्यांचें तेज व प्रभाव मी ओळखतें. कोणाला पितां न येणारा एवढा थोरला समुद्र गट्ट करून त्याचें सर्व पाणी त्यांनीं खारें करून टाकलें आहे हें मी जाणतें. दंडकारण्यामध्यें पेटलेला ज्यांचा क्रोधाग्नि अजून शांत होत नाहीं व ज्यांना तुच्छ केल्यानें वातापी अगस्त्यांच्या तडाक्यांत सांपडून फस्त झाला, त्या ब्राह्मणांचा प्रभाव लहानसान नाहीं.त्यांचा रागही कठिण व त्यांचा प्रसादही तसाच मोठा आहे. ह्या माझ्या चुकीबद्दल मी क्षमा मागतें. पण पतीची सेवा करून जेवढा धर्म पदरीं पडेल तेवढाच मला पुरें आहे व तेवढा धर्म मी कडकडीत पाळीत असतें व त्याचें फलही आपल्याला दिसून आलेंच आहे. माझ्या मागें आपण रागाच्या झपाट्यांत बगळी मारली तें मला अंतर्ज्ञानानें समजलें. राग हा मनुष्याच्या शरीरामध्यें वास करणारा शत्रू आहे. जो कामक्रोधमोहांना जिंकतो, सत्य ओळखतो, गुरूंना तोषवितो, दुसऱ्यांनीं पीडा दिली असतांही उलट त्याला पीडा देत नाहीं व जो इंद्रियें स्वाधीन ठेवून धर्मामध्यें लक्ष ठेवून सर्वांवर समदृष्टि ठेवतो, जो स्वतः वेद पढून दुसऱ्याला पढवितो व स्वतः यज्ञ करतो व तो दुसऱ्याकडून करवितो, यथाशक्ति दान देतो व मोठ्या हुशारीनें ब्रह्मचर्यव्रत पाळतो तोच ब्राह्मण. सत्य व सरळपणा हे सर्वांत धर्म श्रेष्ठ आहेत. अद्यापि ज्याचें कोणाला खरें ज्ञान झालें नाहीं अशा शाश्वत धर्माची सर्व मदार सत्यावर आहे. धर्माला प्रमाण श्रुति आहे असें वृद्धांचें सांगणें आहे. अनेक प्रकारचे सूक्ष्म धर्म आहेत ते आपल्याला माहीत नाहींतसे दिसतात. मिथिलापुरींत धर्मव्याध रहात आहे त्याकडे जा ह्मणजे तो आपल्याला त्याचे बारीक सारीक भेद सांगेल. कमी अधिक बोलल्याची क्षमा असूं द्या.' असें ह्मणून तिनें त्यांना निरोप दिला.'

१०१ धर्मव्याधाची कथा, (३, २०७–२१६)

'वरील साध्वीचें भाषण ऐकून आपला अपराध उमगून स्वतःचीच निर्भर्त्सना करून घेत ते कौशिक ब्राह्मण तिच्या सांगण्याप्रमाणें मिथिलेला निघाले. जिकडे तिकडे धर्मपताका उभारल्या आहेत. व यज्ञ चासले आहेत अशा गोपुरांनीं शोभायमान त्या जनक राजानें रक्षण केलेल्या रम्य मिथिला मगरीला येऊन पोंहोंचल्यावर दुतर्फा सात सात प्रजली हवेल्या व दुकानें लागून राहिलेल्या त्या नित्य उत्सव दिसून येणाऱ्या नगराच्या रुंद राजमार्गानें हत्ती, घोडे, रथ व हृष्टपुष्ट लोक ह्यांची गर्दी पहात पहात ते धर्मव्याधाचा शोध करीत चालले. मासळी बाजाराजवळ आल्यावर त्या व्याधाला त्याठिकाणीं हरीण, रेडे, इत्यादिकांचें मांस विकित बसलेला पाहून त्याच्यापुढें गिऱ्हाइकांची गर्दी बरीच झाली असल्यामुळें ते एका बाजूला उभे राहिले. व्याधानें अंतर्ज्ञानानें ते आपल्याकडे आले आहेत. हें जाणलें व एकदम उठून तो त्यांकडे गेला. व स्वागतपूर्वक त्यांना ह्मणाला, 'त्या साध्वीच्यां सांगण्यावरून आपण येथें काय हेतु धरून आलां आहां हें मीं जाणलें. बोलण्याला ही चवाठ्याची जागा बरी नाहीं. माझ्या घराकडे चला!' असें ह्मणून तो त्यांना घराकडे घेऊन गेला. घरीं नेऊन त्यांना सुखासनावर बसाविल्यावर ते ब्राह्मण ह्मणाले, 'तुझ्यासारख्या धर्मनिष्ठाला हें क्रूर व निंद्य कर्म चांगलें नाहीं.' व्याधानें उत्तर दिलें, 'हा मी आपल्या कुलाचा स्वधर्म पाळीत आहें. याबद्दल आपल्याला वाईट वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. ब्रह्मदेवानें मला आखून दिलेला हा धंदा करून, राहिल्यावेळीं माझ्या वृद्ध मातापितरांची मी मोठ्या दक्षतेनें सेवा करतों. नेहमीं खरें बोलून कधीं

कोणाचा हेवा करीत नाहीं. यथाशक्ति दान करतों. देवता, अतिथी व सेवक ह्यांना जेऊं घालून राहिलेल्या अन्नावर मी आपला उदरनिर्वाह करतों. मी कधीं कोणाला तुच्छ करीत नाहीं अगर टाकून बोलत नाहीं. पूर्वजन्मीं केलेलें कर्म मनुष्याबरोबर येतं. शेतकी, गोरक्षण व व्यापार ह्यांवर लोकांचें जीवन अवलंबून आहे व वैदिक धर्म व दंडनीति ह्यांवर जगाचें अस्तित्व आहे. **सेवाधर्म शूद्राचा असून शेतकी वैश्याकडे सोंपवली आहे. त्याचप्रमाणें युद्ध करणें हा क्षत्रियाचा धर्म असून ब्रह्मचर्यव्रतानें तप आचरण करून मंत्रसाधन करणें व सचोटीनें राहणें हा ब्राह्मणाचा धर्म आहे.** आपापल्या कर्मामध्यें गढलेल्या प्रजेचें पालन करून स्वधर्म सोडून आड मार्गाला जाणाऱ्यांना ताळ्यावर आणण्याचें काम राजांचें आहे. ह्मणून राजांना नेहमीं भिऊन असलें पाहिजे. ह्या जनकाच्या राज्यांत कुमार्गानें जाणारा एकही प्राणी सांपडावयाचा नाहीं, अशा प्रकारचा मनुष्य मग तो स्वतःचा मुलगा असला तरी त्याला हा राजा दंड केल्यावांचून रहात नाहीं. दंडाला पात्र अशांना दंड करून धार्मिकांना हा कधीं पीडा देत नाहीं. राजे देखील जेव्हां स्वधर्मानें वागतात तेव्हांच मोठ्या वैभवाला चढतात. मी दुसऱ्यांनीं मारलेले डुकर व ह्मशी घेऊन विकतों. स्वतः त्यांना कधीं मारीत नाहीं व स्वतः मांस खात नाहीं. फक्त ऋतुकालीं स्त्रीशीं संबंध ठेवतों. त्याचप्रमाणें दिवसभर उपवास करून रात्रीं एकवेळ अन्न घेतों. ह्याप्रमाणें वर्तन ठेवणारा मनुष्य दुसऱ्याला शीलहीन भासला तरी तो सुशील असण्याचा संभव आहे व प्राण्यांच्या हिंसेमध्यें तो गढला असला तरी तो धार्मिक असणें शक्य आहे. जे माझी निंदा करतात अगर जे स्तुति करतात त्या सर्वांना मी आपल्यां सत्कृत्यानें तोषवितों. यथाशक्ति अन्न दान करणें, सहनशीलता ठेवणें, धर्मानें वर्तन ठेवणें, सर्वांची यथायोग्य मानमान्यता ठेवणें हे गुण ऐहिक निरपेक्षतेवांचून मनुष्याचें अंगीं यावयाचे नाहींत व यांच्या शेवट वैराग्यामध्यें होतो. असत्य भाषण सोडून दुसऱ्यांनीं सांगितल्यावांचून त्यांचें चांगलें करीत असावें. कामानें क्रोधानें अगर द्वेषबुद्धीनें धर्म कधीं सोडूं नये. इष्टलाभानें अति संतोष मानून घेऊं नये व एखादा अनिष्ट प्रसंग गुदरल्यानें मनाला वाईट वाटून घेऊं नये. आपत्ति आली असतां गोंधळून जाऊन धर्म सोडूं नये. आपल्या हातून एखादें अनुचित कृत्य घडलें असतां फिरून तसें घडूं न देण्याविषयीं खबरदारी घ्यावी. सत्कृत्याकडे नेहमीं लक्ष द्यावें. दुसऱ्यानें आपलें वाईट केलें ह्मणून आपण उलट त्याचें वाईट करूं नये. दुष्टकृत्य करणारा त्याच्या त्या दुष्ट कृत्यानेंच नाश पावतो. धर्मांत काय आहे ह्मणून सदाचारसंपन्न लोकांची जे टर उडवितात तें त्या पापी लोकांचें कृत्य अगदीं अप्रशस्त आहे; व व अशा श्रद्धाहीन मनुष्याचा कांहीं वेळ न लागतां सपशेल नाश होतो. भरलेल्या भात्याप्रमाणें हा व्यर्थ फुगला असून ह्या मूर्खाच्या विचारांत कांहीं अर्थ नसतो. सूर्य ज्याप्रमाणें दिवसां एखाद्या वस्तूचें स्वरूप दाखवितो त्याप्रमाणें ह्याचा अंतरात्माच इतरांना त्याचें स्वरूप उघड करतो. **केवळ आत्मप्रशंसेनें जगांत मूर्खाला पुढें येतां येणें शक्य नाहीं. तोच एखादा विद्वान कुरूप असला तरी दुसऱ्याची निंदा अगर आत्मस्तुति न करतां लोकमान्य होतो.** दुसऱ्याची निंदा अगर आपली बढाई केल्यावांचून मनुष्य मोठेपणाला चढत नाहीं, हें केवळ मूर्खांचें पोकळ ह्मणणें आहे. पापकर्म करणाराला खरा पश्चात्ताप होऊन त्यानें श्रुतींत सांगितलेलें प्रायश्चित्त घेतलें असतां तो त्या पापापासून मुक्त होतो. धर्मशील मनुष्याच्या हातून चुकून घडलेल्या पातकांचें क्षालन त्याच्या धर्माचरणानेंच होतें. पण पाप करून मला कोणीं पाहिलें नाहीं अशा घमेंडींत जर कोणी असेल तर त्याच्या हृदयामध्यें वास्तव्य करणारा पुरुष त्याच्या प्रत्येक कृत्याला साक्षीभूत आहे हें त्यानें पक्कें समजलें पाहिजे. आपल्या नेसलेल्या वस्त्राच्या छिद्राप्रमाणें साधूंचे दोष जो झांकतो तो श्रद्धालु पुरुष त्या योगानें स्वतःचेंच कल्याण करून घेतो. पापी मनुष्य जर आपलीं पापकर्में पुण्यकर्मांनीं धुवून काढील तर तो त्यायोगानें ढगांतून बाहेर पडलेल्या चंद्राप्रमाणें निर्मल होतो. सर्व पापांना लोभ हा मूल आहे. गवतानें झांकलेल्या कुंड्याप्रमाणें लोभानें मूर्ख बनलेले लोक आपल्या सर्व पापकृ-

त्यांना चांगलें स्वरूप देतात. ह्मणून शिष्टाचाराप्रमाणें वागणें फार कठिण आहे. आतां शिष्टाचार कशाला ह्मणावें व तो कसा ओळखावा हें सांगतों ऐका. यज्ञ, दान, तप, वेदाध्ययन व खरेपणानें वागणें ह्या पांच शुद्ध गोष्टी शिष्टाचारांत गणल्या जातात. काम, क्रोध, दंभ, लोभ व कुटिलता ह्यांना आपल्या आहारीं ठेवून केवळ धर्मासाठीं ह्मणूनच धर्माचरणांमध्यें अशा प्रकारचें लोक संतुष्ट असतात. नेहमीं यज्ञ व वेदाध्ययन ह्यांत गढले राहतात व स्वेच्छाचार त्यांना मुळींच माहीत नसतो. कुलाचार पाळणें, हें एक शिष्टाचाराचें लक्षण आहे. त्याचप्रमाणें गुरुसेवा, सत्यभाषण, शांति व दान ह्यांचीही गणना शिष्टाचारांत होते. वेदाचें रहस्य सत्य, सत्याचें रहस्य, इंद्रियदमन व इंद्रियदमनाचें रहस्य वैराग्य होय. हीं सर्व शिष्टाचारामध्यें अवश्य आहेत, जे मूर्खपणानें धर्माची टर उडाबितात अशा कुमार्गगाम्यांच्या मागून जाणारांना देखील त्यांबरोबर दुःख सोसावें लागतें. जे शिष्टाचाराला धरून नियमशील असे श्रुतीकडे लक्ष देतात व नेकीनें वैराग्य धरून धर्मामध्यें गढले असतात व गुर्वाज्ञा पाळून सन्मार्ग सोडून भटकणाऱ्या निष्ठुर पापी नास्तिकांच्या वाटेला देखील जात नाहींत व अशा प्रकारें सत्याचा आश्रय करून धर्मनिष्ठांची सेवा करतात ते पंचेंद्रियरूपी जलानें पूर्ण व कामलोभादि ग्रहांनीं भरलेली ही संसाररूपी दुस्तर नदी धैर्यरूपी नावेनें तरून जातात. लक्षपूर्वक हळूहळू संचय केलेला धर्म पांढऱ्या शुभ्र कपड्यावर ज्याप्रमाणें रंग खुलून दिसतो त्याप्रमाणें शिष्टाचारयुक्त असेल तर फारच खुलून दिसतो. अहिंसा हा जो श्रेष्ठ धर्म आहे त्याची सर्व मदार सत्यावर आहे. सर्व लोकांची धर्मप्रवृत्ति सत्याला धरूनच सुरू होते. आचार चोख ठेवणें हाच भल्यांचा धर्म आहे व साधूची खूणही हीच आहे. प्राणी आपल्या प्रकृतीच्या वळणावर जातो. पापशीलाचें लक्ष कामक्रोधादि दुष्ट विकारांकडे जातें. कशाही प्रकारचें सद्वर्तन ठेवणें ह्यालाच धर्म संज्ञा आहे व असद्वर्तनाला अधर्म ही संज्ञा आहे. क्रोध, असहिष्णुता, अहंकार, मत्सर इत्यादि दुष्ट विकारांना थारा न देतां मनोनिग्रहानें सरळ वर्तन ठेवून जे तीन वेद पढले आहेत व जे शुचिर्भूत राहून सद्वर्तनानें गुरुसेवेमध्यें दक्ष असतात ते शिष्टाचारसंपन्न होत. असले धैर्यशाली पुरुष दुष्कर शिष्टाचार पाळण्याचें दुर्घट कर्म करीत असल्यामुळें ते स्वकर्मानीं आपलें पाप नाहींसें करण्यास समर्थ असतात. अहंपणा सोडून आस्तिकबुद्धीनें ब्राह्मणांच्या पूजेमध्यें दक्ष राहून श्रुतिप्रणीत धर्म ते पाळीत असतात, तेंच त्यांना स्वर्गप्राप्तीला कारण होतें. वेदप्रणीत हा मुख्य धर्म असून धर्मशास्त्र दुसरा व शिष्टाचार तिसरा आहे. हा त्रिविध धर्म भल्यांच्या ठिकाणींच दिसून येतो. विद्यार्जन, तीर्थस्नान, क्षमा, सत्य, सरळपणा, शुचिर्भूतता, सर्व भूतांवर दया, व अहिंसा (कोणाचें मन न दुखविणें) हे गुण सदाचाराचे द्योतक आहेत. भले लोक कधीं कटु भाषण करीत नाहींत व शुभाशुभ कर्मांचें फलसंचय करतांना परिणामाकडे लक्ष पोहोंचावितात. ह्याचप्रमाणें न्यायानें वर्तन ठेवणारे व दीनावर कृपा करणारे सर्वमान्य शिष्ट येथें वैभवाला चढून मेल्यावर स्वर्गसुख मिळवितात. सर्व भूतांवर दया करणारे, कामद्वेषविरहित व सर्व लोकांचे साक्षीभूत जे साधू ह्यांचें, कोणाचा द्वेष करावयाचा नाहीं, शक्त्यनुसार दुसऱ्याच्या उपयोगीं पडावयाचें व सदा सरळ वर्तन ठेवावयाचें हेंच बीद असतें. कोणाची असूया न करतां क्षमा, शांति व संतोषवृत्ति धरून सर्वांशीं गोड असणें व कामक्रोध सोडून देणें ह्यांचीही शिष्टाचारामध्येंच गणना आहे. श्रुतींत सांगितल्याप्रमाणें कर्म करून शिष्टमार्गाचें अवलंबन करणें व सद्वर्तन ठेवणें ह्या गोष्टी धर्मनिष्ठ लोक कधीं विसरत नाहींत. आतां हा माझा धंदा क्रूरतेचा आहे खरा; पण प्रालब्ध मोठें बलवत्तर आहे. संचित टाळतां येणें शक्य नाहीं. पूर्वजन्मीं केलेल्या पापकर्माचें हें फळ आहे. ब्रह्मदेवानें आधींच मारून ठेवलेल्या प्राण्यांना मारण्यांत ज्याप्रमाणें मारणारा केवळ निमित्तमात्र होतो, तसेंच हल्लीं आपण करणाऱ्या कर्मांना आपण केवळ निमित्त असतों. ज्या मेलेल्या प्राण्यांचें मांस मी विकतों त्याचा देव, ब्राह्मण, पितर यांच्या सत्कार्याकडे व्यय होत असल्यानें त्यांच्याही वांट्याला कांहीं धर्मांश येतोच. औषधी, वनस्पति व पशुपक्षी हे प्राण्यांचे भक्ष्यभूत आहेत. शिबीनें आपलें स्वतःचें मांस

काढून ब्राह्मणाला दिल्यानें दुर्लभ स्वर्ग मिळविला अशी कथा आहे. त्याचप्रमाणें रंतिदेव राजाच्या पाकशाळेंत नित्य दोन हजार पशूंचा वध होत असून मांसदानानेंच त्यानें अतुल कीर्ति मिळविली. चातुर्मास्ययागांत व इतर यज्ञांतूनही पशुवध सांगितला आहे. अग्नि देखील मांसप्रिय आहे असें प्रत्यक्ष वेदांत सांगितलें आहे, व ह्या मंत्रपूत पशूंना देखील स्वर्गप्राप्ति सांगितली आहे. असें आहे तरी मांसभक्षणांत देखील मुनींनीं विधि सांगितला आहे. जे यथाविधि श्रद्धापूर्वक देवता व पितर ह्यांना प्रथम अर्पण करून मग स्वतः तें खातात अशा प्रकारच्या मांसभक्षणांत दोष नसून ज्याप्रमाणें ऋतुकालीं स्त्रीशीं संबंध ठेवणारा ब्रह्मचारी समजला जातो त्याचप्रमाणें याची मांस न खाणारांमध्यें गणना होते. यांतही सारासारविचार लक्षांत घेतला पाहिजे. सौदासराजाला शाप झाला असतां राक्षसरूपामध्यें असतांना त्यानें पुष्कळ लोक खाल्ले ह्मणून त्याची काय पापांत गणना करतां येईल? **केवळ स्वधर्म ह्मणून हें मला टाकतां येत नाहीं.** पूर्व संचिताचे फल समजून ह्या वृत्तीवर मी आपला उदरनिर्वाह करीत आहें. स्वधर्म सोडावा असें कोठें धर्मांत सांगितलें नाहीं. तें नित्य असले तरी त्यांतच राहून शुभकर्मानें पुण्यार्जन करून पापापासून मुक्त होण्याला झटलें पाहिजे. कारण पापकर्माचें निरसन अनेक प्रकारें करतां येतें. दान, सत्य, गुरुसेवा, ब्राह्मणांचा सत्कार करणें व स्वधर्म यांत मी नेहमी दक्षता ठेवतों. अभिमान व कलह यांपासून अलग असतों. लोक शेती चांगली समजतात, त्यांत कोठें हिंसा होत नाहीं? जमिनींतून नांगर फिरत असतांना तिच्यामध्यें असणाऱ्या अनेक जंतूंची मनुष्याच्या हातून हिंसा होते. अनेक धान्यें, फलपुष्पे ह्या सर्वांमध्यें जीव असून ह्यांची नित्य आपल्या हातून किती तरी हिंसा होत असते? त्याचप्रमाणें पाण्यांत तरी किती जंतू आहेत? महाराज, प्राण्यांवर उपजीविका करणाऱ्या प्राण्यांनीं हें सर्व जग भरलें आहे. मासे माशांना खातात. एक प्राणी दुसऱ्याला खातो. मोठमोठ्या झाड्यांच्या हातून देखील उठतां, बसतां, चालतां दररोज किती हिंसा होत असते ह्याची गणति नाहीं. 'अहिंसा अहिंसा,' ह्मणून पूर्वीच्या लोकांनीं जें थोतांड माजविलें आहे त्यांत कितीसें तथ्य आहे? ह्या जगीं प्राण्याची हिंसा न करणारे किती बरें सांपडतील? अहिंसेचें व्रीद धारण करणाऱ्या यतींच्या हातून देखील हरघडी हिंसा घडते. आतां तो न करण्याविषयीं त्यांचा सतत प्रयत्न चालू असल्यानें त्यांच्या हातून कमी हिंसा होत असेल यांत शंका नाहीं. कुलीन व गुणसंपन्न लोकांना देखील क्रूर कर्में करण्याला कांहीं लाज वाटत नाहीं. मित्र मित्रांना व दुष्ट दुष्टांना चांगलें पहात नाहींत. बांधवांना आपले बांधव खाऊन पिऊन सुखी असलेले पहावत नाहीं. पंडितंमन्य पढतमूर्ख प्रत्यक्ष गुरूची निंदा करतात. ह्याप्रमाणें लोकांमध्यें धर्माखाली झांकून जाणारा अधर्म किती तरी आढळेल? धर्माधर्मासंबंधानें आणखीही पुष्कळ सांगतां येईल. जो स्वकर्मामध्यें गढला असतो तोच मोठी कीर्ति मिळवितो. ह्या श्रुतिप्रमाण धर्माचे देखील अनंत निरनिराळे सूक्ष्म भेद आहेत. प्राणावर प्रसंग आला असतां किंवा लग्नाच्या संबंधानें खोटें बोलण्याला हरकत नाहीं. कांहीं प्रसंगीं खोट्यालाच खऱ्याहून मातब्बरी असून खरेंच निंद्य गणलें जातें. **ज्याच्या योगानें एखाद्याचें मोठें हित होतें तेंच उत्तम सत्य समजावें.** मनुष्याला शुभाशुभकर्माचें फल मिळून त्याचें प्रायश्चित्त भोगण्यासाठीं तो संकटांत पडला ह्मणजे आपला अपराध न उमगून वृथा तो दैवाला दोष देतो. मूर्ख, कपटी व अविचारी अशा मनुष्याला नेहमीं सुखावह समजल्या जाणाऱ्या गोष्टी देखील दुःखावह होतात. अशा विपरीत गोष्टींचा जगांत अनुभव येतो, व बुद्धि, गुरुशिक्षा किंवा प्रयत्न ह्यांपैकीं कशाचा त्याला त्यांतून तारण्यास उपयोग होत नाहीं. अशाल्या प्रयत्नाचें फल जर दुसऱ्या कोणत्याही गोष्टीवर अवलंबून नसून तें केवळ स्वतंत्र असतें तर ज्या ज्या ह्मणून इच्छेनें मनुष्य प्रयत्न करील ती ती त्याची इच्छा सफल झालीच पाहिजे. परंतु एखाद्या मनोनिग्रही हुशार शहाण्या मनुष्याचे देखील प्रयत्न निष्फळ होऊन त्याच्या इच्छा शेवटास जात नाहींत व एखादा हिंसेमध्यें व दुसऱ्याला फसविण्यांत नेहमीं गढला असून सुखानें नांदतो. एखादा कांहीं खटपट न करतां बसून राहून ऐश्वर्यवान हो-

तो व एखादा वाटेल तेवढी खटपट करतो तरी तिचें फल त्याला मिळत नाहीं कांहीं मुलासाठीं दीन होऊन हपापून मोठ्या भक्तीनें देवाचें भजनपूजन व तपश्चर्या करून दहा दहा महिनेपर्यंत गर्भ वागवितात तरी त्यापासून त्यांना कुलकलंक संतति होते व दुसरे अगदीं अशाच स्थितींत जन्माला येऊन बडिलोपार्जित संपत्तीचा सुखानें उपभोग घेतात. मनुष्यांना जडणारे रोग देखील त्यांच्या कर्मांचींच फळें आहेत. कांहीं रोगांचें सहज निवारण होतें व कांहींपुढें अगदीं चांगल्या चांगल्या वैद्यांना सुद्धां हात टेकावे लागतात. कांहींजवळ सुखोपभोगाचीं साधनें असून अनेक रोगांनीं ते नेहमीं पीडले राहून त्यांचा उपभोग त्यांना मिळत नाहीं व कांहीं धणधकट असून खाण्याला नसल्यामुळें त्यांना क्लेश सोसावे लागतात. म्हणून जोरानें वाहणाऱ्या ह्या कर्मप्रवाहाचे धक्के खात अनाथासारखा त्याबरोबर वाहून चाललेल्या ह्या मनुष्याकडे दृष्टि या म्हणजे झालें. यावरून ह्या गोष्टी दुसऱ्यावर अवलंबून नसून केवळ आपल्या स्वाधीन असत्या तर मरण किंवा पुनर्जन्म हीं कोणालाच माहीत पडलीं नसतीं. सर्वांची बरवरच्या पायरीला चढण्याची इच्छा असून प्रत्येक आपापल्या शक्त्यनुसार त्यासाठीं यत्न करीत आहे. तरी मग तसें कां घडून येत नाहीं ? पुष्कळ लोकांचा सारख्याच ग्रहनक्षत्रांबर जन्म झाला असून त्यांना जें यश किंवा अपयश येतें त्यांत इतकी भिन्नता कां दिसून यावी ? ह्या पृथ्वीबर कोणीही मनुष्य आपल्या इच्छेनुरूप फल प्राप्त करून घेण्यास समर्थ नाहीं. केवळ पूर्वजन्मीं केलेल्या कर्मांचें फल इहजन्मीं मिळतांना दिसून येतें. हा जीव अविनाशी असून मरणानें केवळ शरीराचा मात्र नाश होतो. जीवाची कर्मांशीं सांगड लागून तो त्यांसह दुसऱ्या देहांत शिरतो. तो नाश पावतो हा केवळ मूर्खांचा समज आहे. भिन्नदेहप्राप्ति एवढाच काय तो त्यामध्यें बदल होतो. मनुष्यानें केलेल्या कर्मांचीं फलें भोगणारा दुसरा कोणी नसून त्याचीं तीं त्यालाच भोगावीं लागतात. कृतकर्मांचा कधीं नाश होत नसून करणाराला तीं भोगल्याशिवांचून सुटका नाहीं. पुण्यकर्म करणारे अन्यजन्मीं पुण्यशील होतात व पाप्यांची पापकर्माकडे प्रवृत्ति राहते. आपलें कर्माचें गांठोडें बरोबर घेऊनच मनुष्य जन्माला येतो. व त्याचें तें संचित ज्या मानानें बरें वाईट असेल त्या मानानें तो बऱ्या वाईट योनीमध्यें जन्माला जातो. त्याच्या हातून आजन्म पुण्यकर्मेंच झालीं असलीं तर तो देवाच्या जन्माला जातो. पापपुण्यांची मिसळ असेल तर त्याला मनुष्यजन्म येतो व भुरळ पाडणारीं पाप कर्मेंच सदोदित त्याच्या हातून झालीं असलीं तर नीच योनींत तो पापी प्राणी जन्माला जाऊन खालीं खालीं जात राहतो, व जन्म, मरण, जरा, संकटें, इत्यादि त्याला भोगावीं लागतात, व व्याधिग्रस्त मनुष्याला ज्याप्रमाणें अपथ्यकर वस्तूंवर गोडी असते तद्वत् पुन्हां पुन्हां पापकर्में करीत राहण्यांतच त्याला गोडी वाटून तो त्यांचे भयंकर परिणाम भोगीत राहतो; ह्याप्रमाणें नेहमीं दुःखामध्यें बुडला राहून पापाचा साठा कमी न होतां दिवसानुदिवस वाढत राहतो व त्यामुळें ह्या संसारचक्रांतच त्याला भ्रमण करीत राहवें लागतें. परंतु जर नित्य पुण्यकर्में करून तपाकडे आपलें मन लावून त्यानें हा बंध तोडून टाकला तर त्याच्या योगानें तो उत्तम लोक मिळवितो. एकवार पापकर्मांमध्यें प्रवृत्ति झाली ह्मणजे तिचा शेवट होणें कठिण आहे, ह्मणून नेहमीं पुण्यकर्माकडे मन लावावें. कोणाची असूया न करतां उपकार जाणून पुण्यकर्मांमध्यें गढून असावें. क्षमाशील राहून शुभकर्म करणाऱ्या शहाण्याला इहपरलोकीं सुख मिळतें. शहाणे ज्या मार्गानें जातात तो मार्ग धरावा व पोट भरण्यासाठीं कोणाला पीडा देऊं नये. स्वधर्मांत सांगितल्याप्रमाणें क्रिया करून राहणें हेंच कर्म संकर न होण्याला कारण आहे. शहाण्याला स्वधर्मानें वागण्यांतच सुख वाटून स्वधर्मानेंच तो उदरनिर्वाह चालवितो. व धर्मार्जित द्रव्यानेंच धर्मवृक्षाच्या मुळाशीं पाणी घालून त्यापासून उत्तम फल मिळवितो. ह्याप्रमाणें त्याचें मन नेहमीं प्रसन्न राहून त्याला मित्र मिळतात. व शब्द, स्पर्श, रूप रस गंध इत्यादि अनेक सुखांचा उपभोग घेत राहून सर्वांवर स्वामित्व मिळवितो व इहपरलोकीं तो मोठ्या सुखांत असतो, आतां ज्ञान्यासंबंधानें विचार केला असतां त्याला ह्या सर्व ऐहिक विषयांचा बीट आ-

ला असल्यामुळें त्याला ह्यापासून मुळींच संतोष होत नाहीं व कोणत्याही विषयासंबंधानें तो विरक्त असतो. तरी त्याच्या हातून पापाचरण होत नाहीं. हें सर्व जग त्याला विनाशी दिसत असून सर्वत्यागाकडे त्याची प्रवृत्ति असते; व त्यामध्यें त्याला यश येऊन अखेरीस तो मोक्ष मिळवितो. तप हें मनुष्याच्या कल्याणाला कारण असून शांति व इंद्रियनिग्रह हे त्याच्या मुळाशीं आहेत. इंद्रियनिग्रहानें, सत्यानें व नियमानें मनुष्य ब्रह्मस्वरूपी श्रेष्ठ पदाला जाऊन मिळतो. '

पुढें 'इंद्रियें कोणतीं, त्यांचा निग्रह कसा करावा व त्यापासून फलप्राप्ति काय, ' ह्मणून ब्राह्मणाचा प्रश्न ऐकून व्याध ह्मणालाः—

' मनुष्याचें मन प्रथम पदार्थज्ञानाकडे वळतें. तेथून तें कामक्रोधांकडे वळून इष्टवस्तु मिळविण्यासाठीं त्याची मोठी धडपड सुरू होते व इष्ट जे रूपगंधादि विषय त्यांना सेवूं लागतें. पुढें त्यांसंबंधानें राग, द्वेष, लोभ, मोह इत्यादि भाव उत्पन्न होऊं लागतात. ह्याप्रमाणें लोभमोहादि विकारांचें बुद्धीवर दडपण बसल्यावर तिची धर्माकडे प्रवृत्ति होत नाहीं व प्राणी कपटानें धर्म आचरूं लागतो, व कपटानें अर्थप्राप्ति करून घेण्याकडे त्याची प्रवृत्ति होते. कपटानें पैसा मिळूं लागला ह्मणजे बुद्धि त्यांतच रमते व मनुष्याला पाप करावेंसें वाटूं लागतें. त्याचे मित्र व शहाणे लोक त्यांपासून त्याला वारूं लागले असतां कांहीं तरी असंबद्ध श्रुतिवचन उत्तरादाखल त्याचें तयार असतेंच. रागापासून उद्भवणाऱ्या मनोवाक्कर्मज त्रिविध अधर्माकडे त्याची प्रवृत्ति होऊन त्याच्यामधील सद्गुण सारे नाहींसे होतात. समानशीलाबरोबर त्याचें सख्य जुळून अखेरीस तो विपत्तींत पडतो. बुद्धीच्या योगानें हे दोष प्रथमच लक्षांत, आणून सुखदुःखांसंबंधानें हुशार राहून जो साधूंची सुश्रूषा करतो त्याच्या हातून चांगलीं कृत्यें घडून धर्माकडे त्याची प्रवृत्ति राहते. पितरांप्रमाणेंच ब्राह्मण सदा पूज्य आहेत. मनोभावानें त्यांचें प्रिय करण्याकरितां झटावें. आतां ब्रह्मतत्त्व सांगतों ऐका. हें सर्व अजिंक्य पंचमहाभूतांनीं भरलेलें विश्व ब्रह्मस्वरूपी आहे. आकाश, वायु, अग्नि, जल व भूमि हीं पांच महाभूतें असून शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे क्रमानें त्यांचे धर्म आहेत ह्यांचेही निरनिराळे धर्म असून त्यांचा परस्पर संबंध आहे व (सत्त्व, रज व तम ह्या) तीन गुणांमध्यें अनुक्रमानें ह्यांचे धर्म दृश्य आहेत. सहावी चेतनाशक्ति असून त्याला मन ही संज्ञा आहे. सातवी बुद्धि व पुढें अहंकार, व पंचेंद्रियें, जीव व सत्व, रज व तम हे तीन गुण मिळून ह्या सतरांना माया ही संज्ञा आहे. मन, बुद्धि व पांच ज्ञानेंद्रियें आणि ह्यांचे बुद्धिरूप गुहेंत लीन झालेले व्यक्ताव्यक्त सात विषय, पंचमहाभूतें, आत्मा, अहंकार, आणि सत्व, रज व तम हा चोवीस व्यक्ताव्यक्त तत्त्वांचा समुदाय होय. आकाशादि पंचमहाभूतांचे धर्म या सर्वांत अतिव्याप्तीनें आहेत. भूमीचे ठिकाणीं रूपरसादि पांचही धर्म असून, जलाच्या ठिकाणीं गंधाशिवाय बाकीचे चार धर्म आहेत. शब्द, स्पर्श व रूप हे तीन धर्म तेजामध्यें असून, शब्द व स्पर्श हे दोन वायूच्या ठिकाणीं व शब्द हा एकच आकाशाच्या ठिकाणीं धर्म आहे. पंचभूतात्मक सर्व भूतांच्या ठिकाणीं हे पंधरा गुण एकमेकांचा अतिक्रम न करतां योग्य प्रमाणांत दिसून येतात. सर्व चराचर भवचक्रांत गोंते खात असतां देह्याची वेळ भरली ह्मणजे तो एक देह सोडून दुसऱ्यामध्यें शिरतो व क्रमानें जन्ममरणाच्या भोंवऱ्यांत सांपडतो. हें सर्व स्थावरजंगम पंचमहाभौतिकांनें व्यापलें आहे. इंद्रियांशीं ज्याचा ज्याचा ह्मणून संबंध जुळतो त्याला व्यक्त ही संज्ञा असून इंद्रियांचें जेथें कांहीं न चालतां प्रकाशादि चिन्हांनीं ज्याचें अनुमान होतें, त्याला अव्यक्त ही संज्ञा आहे. ह्या शब्दस्पर्शादि गुणांमध्यें स्वेच्छाचारानें रमलेलीं इंद्रियें आवरण्याला ज्यावेळीं मनुष्य यत्न करतो त्यावेळीं मनुष्याला आत्मा सर्व जगामध्यें व्यापून राहिलेला व सर्व लोक आत्म्याच्या ठिकाणीं लीन झालेले दिसूं लागतात. ब्रह्म व माया ह्यांचें खरें ज्ञान होऊन केवळ पूर्वकर्मानें संसारांत पडलेला सर्व भूतांना सर्व अवस्थांमध्यें आपल्या ठिकाणीं पाहूं लागतो व तो ब्रह्ममय झाला असल्यामुळें पापापासून अलिप्त असतो. अज्ञानमूलक क्लेशांतून मुक्त झाल्यावर लोकवृत्तिप्रकाशक ज्ञानमार्गानें तो मुक्त होतो. जीव अजर, अमर अक्षय्य व अननुमेय असून परमात्मा त्याचें मूळ

आहे व अमूर्त आहे असें बुद्धिनियामक भगवानानें झटलें आहे. ह्या सर्वांला तप हें कारण असून इंद्रियनिग्रहानेंच तप साधणें शक्य आहे. इंद्रियें स्वर्गाला किंवा नरकाला कारणीभूत होतात. त्यांचा निग्रह स्वर्गाला कारणीभूत होत असून त्यांना मोकळीं सोडणें नरकाचा मार्ग सुधारणें आहे. त्यांच्यार्शी लगट ठेवल्यानें पापाकडे प्रवृत्ति होते व त्यांना ताब्यांत ठेवल्यानें मोक्ष मिळतो. आपल्यामध्यें नेहमीं बिन्हाड ठेवलेल्या षडिंद्रियांवर मनोनिग्रहानें जो स्वामित्व मिळवितो, त्याला अनर्थमूलक पाप कधीं चिकटत नाहीं. मनुष्याचें शरीर हाच रथ असून आत्मा हा सारथि व इंद्रियें घोडे आहेत. हे घोडे जर न उधळतां सरळ जातील तरच रथस्थाला कांहीं अपाय न होतां सुखानें मार्ग क्रमितां येईल. ह्या घोड्यांचा लगाम आवरण्याला जो समर्थ असतो त्यालाच चांगला सारथी झणतां येईल. मार्गामध्यें उधळलेल्या घोड्याप्रमाणें ह्या इंद्रियांना धैर्यानेंच ताळ्यावर आणलें पाहिजे. भटकलेल्या इंद्रियांच्या मागूनच जो आपल्या मनाला जाऊं देतो तो पाण्यावर वाऱ्याच्या लहरीनें बहात जाणाऱ्या नावेप्रमाणें ह्या भवसागरांत बहात जातो. अज्ञानी लोक ह्या षडिंद्रियांच्या मागें लागून त्याच्या फलप्राप्तीसाठीं झटत असतां ज्ञानी प्रेक्षकांप्रमाणें ह्याकडे पहात राहून ध्यानगम्य जें मोक्षफल तें मिळवितात. तम मोहात्मक असून त्याचा प्रवर्तक रज आहे; व सत्व प्रकाशमय असल्यानें तें सर्वांत श्रेष्ठ गणलें आहे. ज्याच्या ठिकाणीं अविद्यारूपी अंधकार भरला आहे, जो निद्रालू, अविवेकी, विकलेंद्रिय, अज्ञानी, रागीट व आळशी आहे तो तमोगुणयुक्त समजावा. ज्याचें भाषण मधुर असून, जो धीमान, मानी व विचारी नरश्रेष्ठ कोणाची असूया न करतां फलप्राप्तीच्या इच्छेनें उद्योगांत गढलेला असतो तो रजोगुणात्मक समजावा. व ज्याच्या ठिकाणीं ज्ञानमय प्रकाश पूर्ण पडला असून जो फलेच्छेनें कोणतेंही काम हातीं घेत नाहीं व शांत असून कोणाचा हेवा करीत नाहीं, रागापासून मुक्त व क्षमाशील असतो तो सत्त्वगुणी समजावा. सत्त्वगुणी मनुष्य याप्रमाणें ज्ञानी झाल्यावर लोकवृत्त पाहून त्याला वाईट वाटतें, कारण खरें ज्ञान त्याला झाल्यामुळें लोकवृत्त त्याला निंद्य वाटूं लागतें. पुरुष विरक्त होऊं लागला असतां त्याचें चिन्ह प्रथमपासूनच दृष्टीस पडूं लागतें. अहंकार कमी होत जाऊन सरळपणा वाढूं लागतो व मानापमानादि द्वंद्वांचाही अभाव दृष्टीस पडूं लागतो. संशय झणून ह्याला उरत नाहीं. शूद्रयोनीमध्यें जन्म झाला असला तरी सन्मार्गानें जाणाऱ्याला क्रमानें वैश्य, क्षत्रिय व ब्राह्मण जन्म येतात.

आतां ह्या प्राणधारक अग्नीचें भौतिक धातूंशीं संयोग होऊन शरीरामध्यें वास्तव्य कसें होतें व हा प्राणवायु शरीरामध्यें निरानिराळ्या ठिकाणीं राहून ह्या शरीराचें चलनवलन कसें चालवितो हें मी आपल्याला सांगतों. ह्या प्राणाग्नीचें नेहमीं टाळूमध्यें वास्तव्य असून प्राणाचें ह्यामध्यें अस्तित्व आहे व तेथून तो सर्व शरीरामध्यें चेतना उत्पन्न करतो. भूत, वर्तमान व भविष्य सर्व प्राणाशीं जखडलें आहे. भूतांमध्यें तोच श्रेष्ठ असून ह्याच ब्रह्मतत्त्वाला आह्मी भजतों. तो सर्वांचा आत्मा असून अगदीं सनातन पुरुष आहे. श्रेष्ठ बुद्धि व अहंकार तोच असून सर्व पंचमहाभूतांचा मूलविषय तोच आहे. सर्व प्रकारें प्राणाकडूनच प्राण्यांचें रक्षण होतें. जीवत्वप्राप्तीनंतर तोच दुसऱ्या समाननामक वायूच्या योगानें वेगवेगळ्या वृत्तीचें अवलंबन करीत असतो. हाच समानवायु जठराग्नीचा आश्रय करून अपानरूपानें मलमूत्र निरानिराळ्या आंतड्यांतून व गुदद्वारांतून वाहून नेत फिरतो. हाच प्रयत्न, कर्म व बल ह्यांच्यामध्ये दिसूं लागला असतां त्याला अध्यात्मवेत्ते उदान ही संज्ञा देतात व मनुष्यांच्या शरीरांत संधिसंधीनें हा संचार करीत असतां त्याला व्यान हें नांव मिळतें. आपल्या शरीरांतील अग्नि सर्व धातूंशीं मिसळून ह्या वायूच्या साहाय्यानें सर्व धातूचा व दोष यांचा रस बनवीत शरीरांतून संचार करतो. प्राण वायूंच्या एकमेकांशीं मिश्रणानें संनिपात (प्रतिक्रिया) सुरू होऊन त्यापासून उष्माग्नि उत्पन्न होऊन तो मनुष्यांच्या देहामधल्या अन्नाचें पचन करतो. समान व उदान ह्यांच्यामध्यें प्राण व अपान वायू असून त्यांच्या मिश्रणापासून उत्पन्न होणाऱ्या अग्नीनें शरीराचें योग्य पोषण होतें. व पायेंद्रियापर्यंत गुदप्रदेशीं ह्यांचा संचार असतां ह्याला

मुद् संज्ञित अपान नांव आहे; व त्यापासून ह्या सर्व प्राण्यांमध्यें रक्तवाहिन्या उत्पन्न होतात. शरीरांतील अग्नीच्या वेगानें प्राण वायु गुदाच्या शेवटाला अपानावर आदळतो व तेथें अडथळा होऊन फिरून वर येऊन अग्नीलाही वर उडवितो. नाभीच्या खालीं पक्वाशय असून त्याच्या वरच्या बाजूला आमाशय आहे. आणि मध्यभागीं सर्व प्राण वायू लीन होऊन राहिले आहेत. सर्व नाड्या हृदयापासून निघून शरीरांतून वर खालीं पसरून दशप्राणांची त्यांवर क्रिया घडून अन्नरस चोहोंकडे घेऊन जातात. योगी लोकांचा हा मार्ग असून ह्याच मार्गानें ते जितश्रम होऊन शांतीनें व समदृष्टीनें मस्तकामध्यें असलेल्या सहस्रदलकमलामध्यें सुषुम्ना नाडीनें प्राणाला नेऊन ठेवतात व याच्या योगानें ब्रह्मपदाला जाऊन मिळतात. ह्याप्रमाणें प्राण व अपान हे दोन वायू सर्व प्राण्यांच्या शरीरांत संचार करीत आहेत. प्राण्यांच्या शरीरांमध्यें अकरा विकारांनीं युक्त व सोळा कलांनीं मिश्रित असा आत्मा वस्तुतः अमूर्त असून, कलारूप उपाधीनें मूर्त झाला आहे. हा नित्य असून त्याचें ज्ञान चित्तवृत्तीचा निरोध केल्यानें होतें. स्थालीमध्यें ठेवलेल्या अग्नीप्रमाणें ह्या कलासमूहांमध्यें राहिलेला तो जीवात्मा व कमलपत्रावरील जलबिंदुप्रमाणें आलिप्त असा जीवात्म्यामध्यें असणारा तोच क्षेत्रज्ञ संज्ञक आत्मा होय. सत्व, रज व तम ह्या जीवाच्या उपाधी असून आत्मा जीवाचा नियामक आहे. हा आत्मा स्वतः निर्गुण आहे. ज्याच्या हालचालीला चैतन्याची अपेक्षा आहे तें जड शरीरादिक जीवाचें भोग्य आहे व जीवात्मा स्वतः हालचाल करीत असून सर्व जडाच्या हालचालीला तो कारणीभूत आहे. ज्यानें भूरादि सप्तलोक उत्पन्न केले तो सर्वश्रेष्ठ परमात्मा असें तत्त्ववेत्ते समजतात.

ह्याप्रमाणें भूतात्मा सर्व भूतांच्या ठिकाणीं प्रकाशमान आहे व तो ज्ञान्यांनाच त्यांच्या सूक्ष्म बुद्धीनें दिसतो. ज्ञानी चित्तशुद्धतेनें आपल्या कर्माचें शुभाशुभ फल नाहींसें करून प्रसन्न झाल्यानें त्याच्या हृदयांत प्रकाश पडून तो मुक्त होतो. संतोषवृत्तीचा मनुष्य ज्याप्रमाणें सुखानें झोंप घेतो अगर हुशार मनुष्यानें लाविलेला दिवा ज्याप्रमाणें निवाऱ्याच्या ठिकाणीं शांत जळतो, तशा प्रकारची मनाची स्थिति झाली ह्मणजे त्याला प्रसन्नास्थिति अशी संज्ञा आहे. पहिल्या तसेंच उत्तर रात्रीला नेहमीं एकाग्रता ठेवून, आहार अल्प ठेवून, शुद्ध अंतःकरणानें इतर वस्तूंप्रमाणेंच आत्म्याला आपल्या ठिकाणीं जळणाऱ्या दिव्याप्रमाणें मनरूपी दिव्यानें पाहूं लागणारा प्राणी आत्मज्ञान होऊन मुक्त होतो. होईल तेवढी खटपट करून राग व लोभ ताब्यांत आणण्याला यत्न केला पाहिजे. हेंच सर्वश्रेष्ठ तप असून मोक्षाला जाण्याची ही शिडी आहे. रागापासून तपाचें, मत्सरापासून धर्माचें, मानापमानापासून विद्येचें, तरुणीजनांपासून स्वतःचें, नित्य रक्षण केलें पाहिजे. मार्दव हा सर्वांत श्रेष्ठ धर्म आहे. क्षमा सर्वांत श्रेष्ठ बल आहे. आत्मज्ञान हेंच उत्तम ज्ञान असून सत्य सर्वश्रेष्ठ व्रत आहे. **सत्यवचन हितावह असून सत्याचें ज्ञानही फार हितावह आहे. पण जें ह्मणून कांहीं सर्व भूतांच्या अत्यंत हिताचें त्याला सर्वश्रेष्ठ सत्य समजलें पाहिजे.** जो कोणतेंही काम सुखाच्या किंवा फलाच्या इच्छेनें हातीं घेत नाहीं व हे विषय सोडण्यासाठीं जो वाटेल तें सोडण्याला तयार असतो तोच त्यागी समजला पाहिजे. ज्याअर्थी गुरूला देखील ब्रह्माकडे आपल्याला पोहोंचावितां येत नाहीं, पण फक्त ते आपल्याला त्याचा मार्ग दाखवून देतात,त्याअर्थी योगसंज्ञित त्याग हेंच ब्रह्मप्राप्तीचें मुख्य साधन आहे. कोणाही प्राण्याची हिंसा न करतां सर्वांशीं मरण्यानें वागावें. जाव आहे तोंपर्यंत कोणाबरोबर वैर करूं नये. अकिंचनता, संतोषवृत्ति, शांति, अनासक्ति व समता हेंच उत्तम ज्ञान असून आत्मज्ञानाला साधनीभूत आहे. परिग्रह न घेतां नियमस्थ व शोकरहित राहून निवांत अशा जागेंत नित्य तपामध्यें व दानामध्यें गढलें रहावें. इंद्रियें स्वाधीन ठेवून, विषयांसंबंधानें विरक्ति धरून त्या दुर्लभ वस्तूच्या प्राप्तीचा यत्न करावा. गुणांसंबंधानें अगुणभाव उत्पन्न होणें, ऐहिक वस्तूंवरचा पाश तुटणें, ब्रह्मज्ञानरूपी एका कार्याकडे लक्ष लागणें, हेंच ब्रह्मप्राप्तीचें सुखकर असें श्रेष्ठ व्रत आहे. जो सुखाची अगर दुःखाची परवा करीत नाहीं, त्यालाच ब्रह्मपद मिळतें.'

ह्याप्रमाणें सर्व मोक्षधर्म त्या ब्राह्मणाला सांगून ज्याच्या योगानें त्याला ही सिद्धि मिळाली होती तो तो स्वतः आचरण करीत असलेला धर्म त्याला प्रत्यक्ष दाखविण्यासाठीं व्याध त्याला आंत घेऊन गेला. त्याठिकाणीं आल्हाददायक अशा मनोरम चौकांत पांढरीं शुभ्र वस्त्रें नेसून बसलेल्या आपल्या मातापितरांची व्याधानें देवाप्रमाणें व्यवस्था ठेविली होती असें त्याच्या दृष्टीस पडलें. आंत गेल्याबरोबर व्याधानें त्यांच्या पायांवर डोकें ठेविलें. नित्य वेळेच्यावेळीं तो त्यांची पूजा करीत असून त्यांपेक्षां श्रेष्ठ दैवतच तो ओळखीत नसे. ह्या त्याच्या शुश्रूषेनें सर्व पितर त्यावर संतुष्ट होते. कायावाचामनानें तो कधीं त्यांच्या सेवेंत कमी पडूं देत नसे व त्यांखेरीज दुसऱ्या ठिकाणीं त्याचें लक्ष मुळींच नसे. जामदग्न्य रामाप्रमाणें तो आपल्या वृद्ध मातापितरांची शुश्रूषा आस्थेनें करीत असे. त्यांना दाखवून व्याध त्या ब्राह्मणाला ह्मणाला, 'ब्रह्मन्, वडील हेच माझें श्रेष्ठ दैवत आहे. देवांसंबंधानें जें कर्तव्य तें मी ह्यांच्या ठिकाणीं पाळतों. पुष्प, फल, रत्न इत्यादि पूजासामुग्रीनें मी ह्यांना नेहमीं संतुष्ट ठेवतों. हेच माझे अग्नि असून, हेच मला यज्ञ व चार वेद आहेत. माझी बायको, पुत्र, व माझे प्राण हे सर्व ह्यांसाठीं आहेत. मी स्वतः ह्यांना स्नान घालून ह्यांचे पाय रगडतों व लक्षपूर्वक ह्यांची शुश्रूषा करतों. नेहमीं त्यांच्याशीं अनुकूल भाषण करून अप्रिय भाषण कधीं बोलत नाहीं. धर्माधर्मविचार न करतां हे सांगतील तें करण्याला तयार असतों. वैभव इच्छिणाऱ्या पुरुषानें पिता, माता, अग्नि, आत्मा व गुरु ह्या पांचांना पूर्ण मान दिला पाहिजे. ह्यांच्याशीं योग्य वर्तन ठेविल्यानें सतत अग्नि ठेविल्याचें श्रेय येतें. गृहस्थाश्रमामध्यें राहाणाराचा हा सनातन धर्म आहे. ह्याच शुश्रूषेच्या फलानें मला ज्ञानचक्षु मिळून त्या साध्वीचें तुमच्याबरोबर झालेलें भाषण कोणीं न सांगतां कळलें. आपल्यावर कृपा करण्याच्या बुद्धीनें मी सांगतों हें लक्षपूर्वक ऐका. आपण आपल्या वडिलांना दुखविलें आहे व वेदाध्ययनासाठीं त्यांनीं आज्ञा न देतां बाहेर पडलां. ते बिचारे वृद्ध आपल्या शोकानें अंध झाले आहेत. आपण धीर, तपस्वी व धर्मनिष्ठ आहां खरे, पण हें सर्व आपलें तप निष्फळ झालें आहे. ह्मणून लवकर जाऊन त्यांचें समाधान करा.' हें ऐकून ब्राह्मण ह्मणाला, 'तुझ्यासारख्या महात्म्याची गांठ पडली हें माझें भाग्यच समजलें पाहिजे. अशा प्रकारचे धर्म सांगणारे लोकांत थोडेच सांपडतील. हजारांमध्यें एकाला धर्म कळत असेल किंवा नाहीं. मी नरकांत चाललों होतों, त्या मला तूं वर काढिलें आहेस. ययाति राजा खालीं येत असतां त्याच्या नातवांनीं त्याला तारलें, त्याप्रमाणें आज तूं मला तारलें आहेस. तुझ्या आज्ञेवरून मी मातापित्यांची शुश्रूषा करीन. **ज्याचें हृदय शुद्ध झालें नाहीं अशाला धर्माधर्मनिर्णय होणें शक्य नाहीं. ह्मणून मी तुला शूद्र समजत नाहीं.** कोणत्या कर्मानें ही शूद्रयोनि तुला आली तें जाणण्याची मला फार इच्छा आहे.' व्याध ह्मणाला, 'मी पूर्वजन्मीं वेदपारग असा वेदाध्ययन करणारा ब्राह्मण होतों. धनुर्विद्येमध्यें निष्णात कोणी राजा माझा मित्र होता. त्याच्या सहवासानें मीही धनुर्विद्येंत निष्णात झालों. कोणे एकेवेळीं मी त्याबरोबर मृगयेला गेलों होतों. तेथें मीं सोडलेल्या तीक्ष्ण बाणांनीं एक ऋषी मरून पडले. मी घाबरून त्यांकडे गेलों. त्यांना पाहून हातून हें भलतेंच कृत्य घडल्यामुळें माझ्या मनाला फार वाईट वाटलें; व 'माझ्या हातून हें चुकून घडलें, क्षमा करणार आपणच आहां,' अशी त्यांची प्रार्थना केली. 'शूद्रयोनीमध्यें तूं व्याधाच्या जन्माला जाशील तरी त्या जन्मांत देखील धर्मज्ञान तुला पूर्ण राहील व मातापितरांची शुश्रूषा करून तुला मोठी सिद्धि मिळेल व पूर्वजातीची आठवण राहून शापक्षय झाल्यावर फिरून ब्राह्मण जन्माला येऊन स्वर्गाला जाशील,' असा त्यांनीं मला उच्छाप दिला. बुद्धिबलानें मानसिक दुःखाचें निवारण करावें व शारीरिक दुःखाचें निवारण औषधानें करावें, हेंच ज्ञानाचें फल आहे. शाहण्यांनीं मुलांच्या जोडीला कधीं जाऊं नये. अनिष्ट प्रसंग येऊन गुदरल्यानें वृ इष्टाला मुकल्यानें कोत्या बुद्धीच्या लोकांच्या मनाला दुःख होतें. अनिष्ट आपल्या पाठीला लागलेंच आहे हें लक्षांत धरून शहाणे त्याची फारशी पर्वा करीत नाहींत व आरंभींच तें त्यां-

ना कलून येईल तर त्याला तोंड देण्याला ते तयार होतात. वृथा शोक करण्यापासून कांहीं लाभ नसून त्यामुळें वृथा ताप मात्र होतो. जे सुखाची किंवा दुःखाची पर्वा करीत नाहींत, त्यांस ज्ञानाच्या योगानें समाधानी मिळून सुख मिळतें. मूर्ख नेहमीं असंतोषी असतात. असंतोषाचा कोठेंच शेवट होत नाहीं. संतोषामध्यें मोठें समाधान आहे. ज्ञानमार्गाला लागलेल्या ज्ञान्यांना पुढें उत्तम गति दिसत असल्यामुळें कशापासून शोक होत नाहीं. मनाला कधीं विषाद वाटून घेऊं नये. विषाद हें जालीम विष असून सर्प ज्याप्रमाणें मुलाचा प्राण कांहीं वेळ न लागतां घेतात त्याप्रमाणें तो अज्ञान्याचा नाश तात्काळ करतो. कर्तव्य बजावण्याच्या प्रसंगीं जो विषादानें घेरला जातो तो निस्तेज होऊन त्याच्या हातून कांहीं पुरुषार्थ होत नाहीं. आपल्या हातून अवश्य घडणाऱ्या क्रियेचीं फलेंही आपल्याला स्पष्ट दिसतात. दुःखापासून कांहीं चांगलें फल मिळत नाहीं. प्रसंगीं न डगमगतां उपाय योजल्यानें मुक्ति मिळते. ज्यांना ज्ञान झालें आहे ते उत्तम गति डोळ्यांपुढें ठेवून कशापासून वाईट वाटून घेत नाहींत.' असें ह्मणून व्याधानें त्या ब्राह्मणाला घरीं जाऊन मातापितरांची शुश्रूषा करण्यास सांगितलें. '

---

१०२ निरनिराळ्या अग्नींची उत्पत्ति. (अ. २१७-२२२)

अंगिरामुनींची तेजस्विता, अग्नींचें अनेकत्व व कुमाराची उत्पत्ति यांसंबंधी हकीकत युधिष्ठिरानें विचारल्यावरून मार्कंडेय ह्मणाले, ' पूर्वी महाभाग्यशाली अंगिरामुनी आश्रमामध्यें तपश्चर्या करीत असतां त्यांनीं आपल्या तेजानें अग्नीला मागें सारलें व आत्मतेजानें सर्व जग प्रकाशित केलें; यानें अग्नि घाबरून जाऊन म्लान झाला व अंगिरामुनींना पाहून तो भीतीनें मागें सरूं लागला; तेव्हां अंधकार दूर करून लोक प्रकाशित करण्याचें आपलें काम फिरून हातीं घेण्याबद्दल अंगिरामुनींनीं त्याला सांगितलें. तेव्हां ' मी आपलें अग्नित्व सोडून देतों, आपणच अग्नि होऊन ही कामगिरी हातीं घ्या, कारण मी नष्टकीर्ति झालों असून जगतामध्यें आपलीच कीर्ति फार वाढली आहे. ' असें अग्नि ह्मणाला. हें अग्नीचें भाषण ऐकून अंगिरा ह्मणाले, 'हव्य नेण्याचें काम, त्याचप्रमाणें अंधकार दूर करण्याचें काम तूं कर व मला एक तेजस्वी पुत्र दे ह्मणजे झालें. ' तेव्हां अग्नीनें अंगिरामुनींना बृहस्पति नामक पुत्र दिला. ब्रह्मदेवांचा तिसरा पुत्र जो अंगिरा त्याची सुभा नांवाची बायको होती. त्यांना तिच्यापासून बृहत्कीर्ति, बृहज्ज्योती, बृहद्ब्रह्मा, बृहन्मना, बृहन्मंत्र, बृहद्भास, आणि बृहस्पति ही संतती झाली. अंगिरामुनींच्या संततींमध्यें त्यांची ज्येष्ठ कन्या भानुमती रूपानें अप्रतिम होती. त्यांची दुसरी कन्या रागा हिच्या ठिकाणीं सर्व प्राणिमात्रांचें प्रेम होतें. त्यांची तिसरी कन्या अति सूक्ष्म सिनीवाली कधीं दृश्य व कधीं अदृश्य असते; व हिला रुद्रकन्या असेंही ह्मणतात. त्यांची चवथी कन्या अर्चिष्मती. हिच्या योगानें लोकांना रात्रींतून पदार्थ दिसतात. पांचवी हविष्मती, जिच्या साधनानें लोक देवांना उद्देशून यज्ञ करतात. यांची सहावी कन्या महिष्मती व सातवी महामती होय. बृहस्पतींची जी यशस्विनी चांद्रमती भार्या तिला सहा अग्नी व एक कन्या अशीं अपत्यें झालीं. दर्शपूर्णमासयागांत मुख्य आहुती ज्याला सांगितली आहे तो महातपस्वी शंयु नामक बृहस्पतिपुत्र होय. चातुर्मास्यामध्यें वैश्वदेव, वरुणप्रघास, साकमेध, व शुनासिरीय, या चारी पर्वांत ज्याला उद्देशून हवी देतात व अश्वमेध यागांतही इष्टीमध्यें ज्याला पहिला पशु देतात तोही हाच. या शंयूची भार्या सत्यासत्या नामक धर्मकन्या होय. ह्या शंयुला अग्नि नामक एक पुत्र व तीन पतिव्रता कन्या झाल्या. आज्यभागानें यज्ञामध्यें ज्याला प्रथम सन्मान मिळतो तो या शंयूचा भारद्वाज नामक प्रथम पुत्र होय. व पौर्णमासप्रभृति यज्ञामध्यें ज्याला उद्देशून प्रथम आधार असतो तो याचा दुसरा पुत्र भरत होय. या भरतालाही भरत व भरती अशीं अपत्यें झालीं. ह्या पोषक भरत अग्नीचा पावक हा पुत्र होय. याची योग्यता मोठी असून हा महाफल देणारा आहे. भरद्वाजाच्या वीरा नामक भार्येला वीर नांवाचा मुलगा झाला. सोमाचें यजन जसें मंत्रानें हळू

हळू होतें तसेंच आज्यानें याचें यजन हळू हळू मंद्र ह्मणून करावें असें ब्राह्मणाचें ह्मणणें आहे. आणि यालाच रथ, प्रभू, रय, अध्वान, व कुंभरेता अशीं नांवें आहेत. या वीरापासून शरयूच्या ठिकाणीं सिद्धि नांवाचा मुलगा झाला. त्यानें स्वप्रकाशानें सूर्याला देखील झांकून टाकलें. अग्निदैवत्ययज्ञ चालला असतां अग्नीला बोलावतेवेळीं याची स्तुति होत असते. यश, तेज व श्री हीं ज्याच्यापासून कधींही नाहींशीं होत नाहींत तो निश्चवन नामक अग्नि बृहस्पतीचा दुसरा पुत्र होय आणि तीच वागिंद्रियाभिमानिनी देवता होय. या निश्चवनाचा पुत्र सत्य होय. तो पापरहित, दुराचारापासून मुक्त, शुद्ध, उज्वल आणि वाच्य व वाचक यांचा संबंध जुळविणारा विपाक नामक अग्नि होय. तो प्राणी आक्रोश करूं लागले असतां त्यांना दुःखांतून मुक्त करतो; ह्मणून त्याला निष्कृति असेंही नांव आहे. ज्याच्या योगानें प्राणी दुःखी होऊन रडत असतात तो बृहस्पतीचा चवथा पुत्र स्वन होय. सर्व जगाच्या बुद्धीमध्यें जो भरून राहिला आहे त्याला अध्यात्मवेत्ते विश्वजित् अग्नि ह्मणतात व हा बृहस्पतीचा सहावा पुत्र. ज्याला अंतराग्नि असें ह्मणतात व प्राण्यांनीं भक्षण केलेलें जो पचवितो तो विश्वभुक् अग्नि होय. हा ब्रम्हचारी, जितेंद्रिय व नित्य फार वेळ तपश्चर्या करणारा असा असून स्मार्तकर्मामध्यें ब्राह्मण याचीच पूजा करतात. गोमती नदी याला प्रिय झाली आहे व धर्मनिष्ठ लोक आपलीं सर्व कर्में याच्याच आश्रयानें करतात. जो भयंकर वडवाग्नि उदकपान करीत असतो तो शरीरांतील उदान होय. व त्यालाच ऊर्ध्वभाक असें नांव असून प्राणवायूची अभिमानी देवताही तोच ज्ञानसंपन्न अग्नि आहे. यालाच उद्देशून कर्मामध्यें नित्य उत्तरेच्या बाजूला हवी देतात आणि याच्याच योगानें आज्यहोम सफल होतो ह्मणून याला उत्तम फल देणारा ह्मणतात. शांत प्राण्याच्या ठिकाणीं जो अग्नि क्रोधरूपानें असतो आणि हा क्रोध प्रकट झाला असतां शरीरांतून निघणाऱ्या घामापासून जी उत्पन्न होते ती स्वेदा नामक बृहस्पतिकन्या. ही क्रूर व भयंकर कन्या सर्व प्राणिमात्रांचे ठिकाणीं रहात असते. स्वर्गामध्यें ज्याची बरोबरी करणारा कोणी नाहीं व जो अनुपम असल्यामुळें देवांनीं त्याचें नांव काम असें ठेवलें आहे, हा स्वाहेचा पहिला पुत्र. क्रुद्ध, धनुर्धर, व पुष्पमाला धारण करणारा अमोघ नामक अग्नि तिचा दुसरा पुत्र होय. हा रणामध्यें मोठ्या उत्साहानें शत्रूचा नाश करीत असतो. उक्थ हा तिचा तिसरा पुत्र होय. तो शरीर, प्राण आणि परमात्मा या तीन रूपांनीं आहे. वाणीच्यां उत्पत्तीला तोच कारण आहे. आणि अग्नीची उपासना करणारांना मोक्ष देणाराही तोच आहे. कीर्तीनें ब्रह्मदेवाची बरोबरी करणारा असा धर्मनिष्ठ पुत्र मला व्हावा ह्मणून ह्या उक्थानें अनेक वर्षे उग्र तप केलें. कश्यप, वासिष्ठ, प्राणपुत्र, प्राण, च्यवन, व अंगिरा ह्मणून प्रसिद्ध असलेला अग्नि व शरीर, प्राण व परमात्मा ह्या तिन्ही रूपांनीं स्थित असलेला उक्थ ह्या पांचांनीं महाव्याहृतींच्या योगानें ब्रह्मदेवाचें ध्यान केलें. तेव्हां महाज्वालांनीं युक्त, अग्नीप्रमाणें तेजस्वी असा पंचवर्ण होऊन जगत्स्रष्टा पुत्ररूपानें प्रगट झाला. त्याचें मस्तक अग्नीसारखें होतें, बाहू सूर्यासारखे होते. नेत्र सुवर्णासारखे होते व पोटऱ्या काळ्या होत्या. कश्यपप्रभृति पांचांनीं तपानें उत्पन्न केल्यामुळें, त्याला, पांचजन्य, पंचवंशकर, अशीं नांवें आहेत. या तेजस्वी अग्नीनें दहा हजार वर्षे तपश्चर्या करून पितरांचा उग्र (दक्षिण) अग्नि उत्पन्न केला. व मस्तकापासून बृहत् व मुखापासून रथंतर या दोन रात्रंदिवस प्राण्यांचें आयुष्य वेगानें हरण करणाऱ्या देवता त्यानें उत्पन्न केल्या. त्याचप्रमाणें नाभीपासून रुद्र, बलापासून इंद्र आणि प्राणापासून वायु व अग्नि, बाहुपासून प्राकृत अनुदात्त व वैकृत अनुदात्त हे स्वर, मनासहवर्तमान इंद्रियें, त्यांच्या देवता आणि पंचमहाभूतें यांना उत्पन्न करून पितराचे पांच पुत्र उत्पन्न केले. बृहद्रथाचा प्रणिधि, कश्यपाचा महत्तर, आंगिरांचा ज्ञानवान भानू, वर्चाचा सौरभ, आणि प्राणाचा अनुदात्त हे पांचांचे पांच पुत्र होत. या सर्वांची एकंदर संख्या पंचवीस होते. नंतर यांहून भिन्न असे यज्ञापहार करणारे देव त्यानें उत्पन्न केले. त्या तपर्संज्ञक पांचजन्यानें प्रथम, सुभीम, अतिभीम, भीम, भीमबल, आणि अबल हे पांच यज्ञापहारी

देव उत्पन्न केले. नंतर सुमित्रादि एकंदर पंधरा उत्पन्न केले. हे पंधरा स्वर्गेच्छेनें यज्ञ करणाऱ्यांच्या यज्ञामध्यें अडथळा आणून त्यांच्या हविर्द्रव्याचाही नाश करीत. असें होऊं लागलें तेव्हां यज्ञविशारद ऋषी यज्ञवेदीच्या बाहेर यांना हविर्भाग देऊं लागले. त्यामुळें वेदीमधील अग्नीला ते अडथळा आणीनातसे झाले. बृहदुक्त हा पांचजन्याचाच पुत्र असून तो भूमीच्या आश्रयानें राहिला आहे. त्यामुळें भले लोक पृथ्वीवर अग्निहोत्र होम देऊं लागले असतां याला हवी देतात तपपुत्र रथंतराला मित्रंविद असेंही म्हणतात; व याला अध्वर्यु हवीही देतात. शंभूचा पुत्र भरत याला पुष्टि असेंही नांव आहे. कारण तो संतुष्ट झाला असतां पुष्टि देतो. पांचजन्याचा पुत्र शिव चिच्छक्ति पूजनाविषयीं दक्ष असून दुःखपीडितांचें कल्याण करतो म्हणून त्याला शिव असें नांव आहे. तपाला पुरंदर नामक एक पुत्र झाला; व उष्मा हाही त्याचाच पुत्र असून सर्व प्राणिमात्रांचे ठिकाणीं तो दिसून येतो. मनु नामक अग्नीनें स्वतः तपाचें पितृत्व स्वीकारिलें. तपाच्या चवथ्या पुत्राला शंभू हें नांव आहे, व अवसत्थ्य हा त्याचा पांचवा पुत्र होय. तपाला सुवर्णाप्रमाणें कांतिमान व सोमहविर्भागाला पात्र असे पांच पुत्र झाले. अस्तकालीं श्रमून घोर व मर्त्य अशा असुरांना उत्पन्न करणारा सूर्यरूपी अग्नि तपाचाच पुत्र होय. तपाचा पुत्र मनु व भानु हे अंगिरा मुनींपासून झाले आहेत व या भानूलाच ब्राह्मण बृहद्भानु ह्मणतात. सुप्रजा व सूर्यकन्या बृहद्भासा ह्या भानूच्या स्त्रिया होत; यांना सहा पुत्र झाले. दुर्बलांना बल देणाऱ्या या भानूच्या प्रथम पुत्राला बलद असें नांव आहे. प्राणी शांत झाले असतां जो भयंकर मन्यू उठतो तो मन्यू नामक भानूचा दुसरा पुत्र होय. दर्श व पौर्णिमास या इष्टींमध्यें ज्याला हविर्भाग देतात तो विष्णु नामक अग्नि होय. आणि यालाच धृतिमान अंगिरा असेंही नांव आहे. इंद्राबरोबर ज्याला आश्रयणहवी मिळतो, तो आश्रयण नामक भानूचा पुत्र होय. चातुर्मास्यामध्यें हवीचें उत्पत्तिस्थान जो विश्वदेव नांवाचा अग्नि तो चार पुत्रांसह व स्तुभ हेही भानूचेच पुत्र होत. निशा ह्मणून असणाऱ्या मनूच्या तिसऱ्या स्त्रीला रोहिणी नामक कन्या व अग्नि आणि सोम असे दोन पुत्र आणि इतर पांच अग्नि अशीं आठ आपत्यें झालीं. चातुर्मास्ययज्ञामध्यें पर्जन्यासहवर्तमान मुख्य हवी ज्याला मिळतो तो वैश्वानर अग्नि होय. ज्याच्या योगानें सर्व प्राण्यांचें अन्नपचन होतें असा सर्व लोकांचा प्रभू विश्वपति नामक अग्नि मनूचा दुसरा पुत्र होय. ज्याच्या योगानें यथाविधि आज्यहोम होतो, तो परमसुहुत ह्मणून मनूचा पुत्र आहे. परंतु तीच हिरण्यकशपूची कन्या झाली. प्राण्यांचा आश्रय करून जो प्राण्यांचा देह कायम ठेवतो. तो त्या मनूचा संविहित नामक तिसरा पुत्र होय. याच्या योगानें प्राण्यांना शब्दज्ञान होतें. ज्याची उपासना केली असतां प्राण्यांना शुक्ल व कृष्ण गती मिळतात, जो स्वतः शुद्ध असून ज्याच्या योगानें काम्यकर्में होतात, क्रोध हा ज्याचा आश्रय आहे आणि ज्याला नेहमीं मुनी कपिलमहर्षी ह्मणतात तो सांख्ययोगप्रवर्तक कपिल नामक अग्नि होय. प्राण्यांना उद्देशून ज्याला कर्मामध्यें प्राणी अग्रभाग देतात त्याला अग्रणी म्हणतात. अग्निहोत्र दूषित झालें असतां त्याच्या प्रायश्चित्तार्थ हे व असे दुसरे प्रचंड अग्नि मनूनें उत्पन्न केले आहेत. वायूनें अग्नी एकमेकांशीं मिसळले असतां अष्टकपाल पुरोडाशानें शुची अग्नीला उद्देशून इष्टी करावी, दक्षिणाग्नि जेव्हां इतर दोहोंशीं मिसळतो तेव्हां अष्टकपाल पुरोडाशानें नीतिसंज्ञक अग्नीला उद्देशून इष्टी करावी. अग्नी स्वस्थानीं असतां त्यांना जर दावाग्नीचा स्पर्श झाला तर शुची अग्नीला उद्देशून अष्टकपाल पुरोडाशानें इष्टी करावी. अग्निहोत्रासंबंधीं अग्नीला रजस्वला स्त्रीचा स्पर्श झाला असतां अष्टकपाल पुरोडाशानें सुभान अग्नीला उद्देशून इष्टी करावी. आपला कोणी संबंधी मेल्याचें कानीं पडलें असतां अथवा पशू मरूं लागले असतां सुराभिमान अग्नीला उद्देशून अष्टकपाल पुरोडाशानें इष्टी करावी. दुःखानें ज्याच्या हातून त्रिरात्र होम होत नाहीं त्यानें उत्तराग्नीला उद्देशून अष्टकपाल पुरोडाशानें इष्टी करावी. दर्शेष्टी अथवा पौर्णिमासेष्टी ज्याची अंतरेल त्यानें पथिकृत अग्नीला उद्देशून अष्टकपाल पुरोडाशानें इष्टी करावी. सूतिकाग्नीचा स्पर्श अग्निहोत्राग्नीला झाला असतां अग्निमना

अग्नीला उद्देशून अष्टकपाल पुरोडाशानें इष्टी करावी. उदकामध्यें असणाऱ्या सह नामक अग्नीनें आपली स्त्री मुदिता हिच्यापासून अद्भुत नामक पुत्र उत्पन्न केला. याला सर्व भूतांचा अधिपति व आत्मा समजतात आणि तो जगामध्यें नेहमीं संचार करीत आहे. यज्ञामध्यें ग्रहपति नामक असणारा अग्नि जो नित्य पूज्य असतो व जो यज्ञांत दिलेले हवी देवांना पोंचवितो तो हाच. मृतांना जाळणारा भरत नामक अग्नि अद्भुताचा पुत्र होय. देव ज्याची नेहमीं इच्छा करतात असा तो सह नामक अग्नि आपला नियत नामक पौत्र येतांना पाहून भीतीनें समुद्रामध्यें शिरला. तेव्हां देव व ऋषी त्याला शोधीत तिकडे गेले. व देवांना हवी पोंचविण्याचें आपलें काम करण्यास त्यांनीं त्याला सांगितलें. तेव्हां या अग्नीनें आपण दुर्बल झाल्यामुळें अंगिरांना ती कामगिरी सांगितली व मत्स्यांनीं तो तेथें असल्याची बातमी देवांना सांगितली ह्मणून तुह्मी अनेक प्राण्यांच्या भक्ष्यस्थानीं पडाल असा शाप देऊन तो दुसरीकडे निघून गेला. व त्या स्थूल शरीरामध्यें राहणें फार दुरापास्त वाटल्यामुळें तो टाकून तो पृथ्वीमध्यें शिरला. व भूमीच्या आश्रयानें त्यानें अनेक निरनिराळे धातू उत्पन्न केले. पुवापासून गंध व तेज, अस्थीपासून देवदारू, कफापासून स्फटिक, पित्तापासून पाच, यकृतापासून लोखंड, नखापासून अभ्रक, शिरोजालापासून पोंवळें, इत्यादि नानाप्रकारचे धातू त्यानें आपल्या शरीरापासून उत्पन्न केले आणि याप्रमाणें सूक्ष्म शरीरांत तपश्चर्या करीत राहिला. तेव्हां भृगु, अंगिरा, इत्यादि मुनींनीं त्याचा तपोभंग केला. परंतु अंगिरांना पाहून भिऊन तो फिरून समुद्रांत शिरला. तेव्हां अंगिरा मुनींनीं सागरमंथन करून त्याचा शोध लावून लोक उत्पन्न केले. पुढें अग्नि देवांचे हवी देवांना पोंचवूं लागला. या रीतीनें वर सांगितल्याप्रमाणें निरनिराळ्या अग्नींची उत्पत्ति झाली. सिंधु इत्यादि अनेक नद्या ह्या अग्नीच्या माता होत. अत्रि ऋषींना प्रजोत्पादनाची इच्छा झाली असतांना वर सांगितलेले निरनिराळे अग्नीच त्यांनीं मनांत आणले व ते त्यांच्या ठिकाणीं प्रजारूपानें प्रगट झाले.

१०३ कुमाराची कथा.
(३. २२३–२३२)

देव व असुर ह्यांमध्यें पूर्वी युद्ध सुरू असून क्रूर दैत्य त्यांमध्यें देवांना जिंकीत. आपल्या सैन्याचा फडशा उडत आहेसें पाहून आपल्याला असा सेनानायक कोण मिळेल ह्मणून इंद्राला मोठी काळजी पडली. हा विचार मनांत धरून तो मानस पर्वताकडे गेला असतां मला कोणी त्राता पुरुष नाहीं तरी कोणी धांवून येऊन मला पति पाहून द्यावा, अगर स्वतः तरी पति व्हावें असा एका स्त्रीचा आर्त स्वर त्याच्या कानीं पडला. तिला 'भिऊं नकोस,' असें इंद्रानें आश्वासन दिलें व पुढें पाहतो तों किरीटधारी व गदापाणी असा केशी राक्षस त्याच्या दृष्टीस पडला. त्या कन्येच्या हाताला धरून इंद्र त्याला ह्मणाला, 'हें ह्या कन्येला हरण करण्याचें अप्रशस्त काम तूं कां करीत आहेस? मी इंद्र आहें हें लक्षांत घे, आणि हिला त्रास देऊं नकोस.' केशी ह्मणाला, 'मींच हिला प्रथम हेरली आहे. तेव्हां तूं हिला सोडून दे; तरच तूं आपल्या नगराला जिवंत परत जाशील.' असें ह्मणून इंद्राला ठार करण्याकरितां त्यानें आपली गदा त्यावर फेकली. परंतु इंद्रानें ती आपल्या वज्रानें कापून काढली. तेव्हां त्या कन्येला सोडून केशी घाबरून पळून गेला. तो गेल्यावर 'तूं कोण, कोणाची, येथें काय करतेस,' ह्मणून इंद्रानें तिला विचारलें. ती ह्मणाली, 'मी ब्रह्मदेवाची देवसेना नांवाची कन्या आहें. माझी बहीण दैत्यसेना ह्या केशी राक्षसानें पूर्वीच हरण केली आहे. हा ह्या मानस सरोवराबर येऊन नेहमीं आह्मांला मागणी घाली. दैत्यसेनेला तो हवा आहे. आपण आज मला त्याच्यापासून सोडविलें आहे तेव्हां आपण मला एक पति पाहून द्या.' हें ऐकून इंद्र ह्मणाला, 'माझी माता वाक्षायणी आहे. तेव्हां तूं माझी मावस बहीण आहेस. तुझें बल काय आहे तें मला सांग.' ती ह्मणाली, 'मी तर अबलाच आहें. परंतु माझ्या पित्याच्या वरदानानें मला देव व असुर यांना पूज्य असा पति मिळावयाचा आहे.' इंद्रानें विचारलें, 'तुझ्या पतीचें बल कशा प्रकारचें असणार आहें?' मुलीनें उत्तर दिलें, 'सर्वदेवदानवयक्षादिकांना जिंकणारा

असा वीर्यशाली तो असून सर्व प्राणिमात्रांना व आपल्याला देखील जिंकील असा तो असणार आहे.' हें तिचें भाषण ऐकून इंद्रानें सचिंत होऊन आपल्या मनांत विचार केला कीं, ही म्हणते अशा प्रकारचा तर सध्यां कोणी पति दिसत नाहीं. इतक्यांत उदयकालीं प्रकाशमान होणारा सूर्य व त्यामध्यें प्रवेश करीत असलेला चंद्र त्याच्या दृष्टीस पडला. व अमावास्या लागली असतांना त्या रौद्र मुहुर्तावर देवदैत्यांचें युद्ध त्या उदयाचलावर त्यांनीं पाहिलें. तो संध्यासमय आरक्त झाला असून समुद्राच्या उदकावरही लाली दिसून येत होती. ह्याचवेळीं भृगू व अंगिरा ह्यांनीं दिलेले हवी घेऊन अग्नि सूर्यामध्यें प्रवेश करीत होता. अशा भयंकर समयीं चंद्र, सूर्य व इतर ग्रह यांचें भयंकर संमेलन त्याचप्रमाणें सूर्याभोंवतीं पडलेलें भयंकर खळें पाहून इंद्राला वाटलें या समागमापासून अग्निदेवतेपासून जो पुत्र उत्पन्न होईल तो हिला योग्य पति होईल. असा विचार करून तो ब्रह्मलोकीं गेला व त्यानें आपला मनोदय ब्रह्मदेवांला कळविला. तेव्हां ब्रह्मदेव म्हणाले, 'तुझ्या इच्छेप्रमाणें महापराक्रमी गर्भ उत्पन्न होऊन तो तुझ्या सहवर्तमान सेनापति होईल व हिलाही तो अनुरूप पति होईल.' पुढें इंद्र वसिष्ठप्रभृति जिकडे यज्ञ करीत होते तिकडे सोमपान करण्याकरितां गेला. विधिपूर्वक इष्टि होऊन अग्नि प्रज्वलित झाल्यावर त्या महात्या ऋषींनीं देवांना उद्देशून अग्नीमध्यें हवी देऊन त्याला पाचारलें. तेव्हां अग्नीनें येऊन नानाप्रकारचे हवी घेतले. तेवेळीं तेथें सुवर्णवेदीप्रमाणें कांतिमान व चंद्रकलेप्रमाणें निर्मळ ऋषिस्त्रिया त्याच्या दृष्टीस पडल्या. त्यांना पाहून त्याच्या मनाची चलबिचल उडाली. परंतु ऋषिपत्न्या पतिव्रता असल्यामुळें अन्य पुरुषांकडे त्यांचें मन जाणें शक्य नाहीं म्हणून त्यांची इच्छा करणें योग्य नाहीं, असें वाटून गार्हपत्यामध्यें शिरून तो त्यांकडे नुसता पहात राहिला. पुढें त्या न मिळाल्यामुळें कामपीडित होऊन देह ठेवून तो वनाला निघून गेला. दक्षप्रजापतीची कन्या जी स्वाहा तिचें पुष्कळ दिवसांपासून ह्या अग्नीवर मन बसलें असून ह्याची गांठ घेण्याची संधि तिला सांपडेना. तिला ह्यावेळीं यांचें मन सप्तर्षींच्या स्त्रियांवर गेलें आहे असें समजल्यावरून तिनें वसिष्ठाखेरीज इतर ऋषिस्त्रियांचीं रूपें धारण करून वनामध्यें जाऊन आपली विषयवासना तृप्त करून घेतली. अरुंधतीच्या तपसामर्थ्यामुळें व तिच्या हातून घडत असलेल्या पतिशुश्रूषेमुळें तिचें रूप मात्र तिला घेतां येईना. अरण्यामध्यें अग्नीचें वीर्य हातामध्यें घेतलें असतां आपल्याला पाहणारे, ब्राह्मणस्त्रिया अग्नीशीं व्यभिचार करतात असें म्हणूं लागतील या भीतीनें तिनें गरुड पक्षिणीचें रूप घेऊन त्या वीर्याचें जतन केलें. याप्रमाणें गरुडपक्षिणीचें रूप घेऊन त्या महावनांतून ती निघाली असतां शरवनांनीं भरलेला असा श्वेतपर्वत तिच्या दृष्टीस पडला. सात फण्यांचा नाग त्याचें रक्षण करीत होता. व तो राक्षसपिशाचादि क्रूर प्राण्यांनीं भरला होता. या दुर्गम प्रदेशीं एका सुवर्णकुंडामध्यें तें सहादां अग्नीपासून मिळविलेलें वीर्य टाकून ती निघून गेली. तेव्हां त्या कुंडामध्यें त्या रेतापासून एक मुलगा उत्पन्न झाला. त्याला ऋषींनीं बहुमान दिल्यामुळें स्कंदत्व आलें. सहा डोकीं, बारा कान, बारा डोळे, बारा हात, एक मान, व एक पोट असा तो वीर्यवान कुमार उत्पन्न झाला. द्वितीयेच्या दिवशीं तो दृष्टीस पडून तृतीयेच्या दिवशीं तो बाल बनला आणि चतुर्थीचे दिवशीं सर्व मुख्य व गौण अवयवांनीं युक्त होऊन आरक्तवर्ण असा तो प्रचंड मेघ व विद्युल्लता यांनीं झांकला गेला. तेवेळीं तो उदय पावणाऱ्या सूर्याप्रमाणें झळकत होता. त्रिपुरनाशक शंकरांनीं तेथें ठेवलेलें शत्रुनाशक प्रचंड धनुष्य हातीं घेऊन त्रैलोक्याला मोहित करून टाकण्यासारखी त्यानें मोठी गर्जना केली. त्या गर्जनेबरोबर चित्र व ऐरावत हे दोन हत्ती त्यावर धांवून आले. तेव्हां दोन हातांत त्यांना, एका हातांत शक्ति, एका हातांत मोर आणि एका हातांत तेथें जवळ असलेला धिप्पाड कुक्कुट घेऊन मोठ्यानें गर्जना करीत त्यानें क्रीडा सुरू केली. याप्रमाणें तो तेथें क्रीडा करीत असतां आपल्या तोंडानें तो त्रैलोक्य गिळून टाकीत आहे कीं काय असें वाटलें. ती त्याची गर्जना ऐकून लोक खिन्न होऊन भयभीत झाले, व नानाप्रकारांनीं त्यांचा फडशा सुरू झाला. तेव्हां अखेरीस ते त्याला शरण गेले. तेव्हां कुमार आसनावरून उठून त्यानें त्यांचें शांतवन केलें, व धनुष्य

ओढून श्वेतपर्वतावर बाण सोडूं लागला. त्याच्या योगानें त्यानें हिमवत्पुत्र जो क्रौंच त्याला फांडलें. तेव्हां तेथील गरुड व हंस पक्षी मेरूपर्वताकडे निघून गेले व तो पर्वत आक्रोश करीत खालीं पडला. त्या पर्वताचा आक्रोश ऐकून यत्किंचितही न डगमगतां आपली शक्ति श्वेतपर्वतावर फेकून त्याचें एक शिखर त्यानें फोडून टाकलें. याप्रमाणें त्या पर्वताची दैना उडाली असतां क्रौंच व इतर पर्वत भयभीत होऊन आकाशांत उडून गेले. व भूमि शोकाकुल होऊन सर्व बाजूंनीं दुभंगली. परंतु स्कंदाच्या आश्रयानें ती फिरून शक्तिमान झाली व पर्वतही फिरून त्याच्याच आश्वासनानें पृथ्वीवर आले. हा महाबलाढ्य महासेन उत्पन्न झाला असतां स्त्री-पुरुषांमध्यें कलह शीतोष्णादिकांचे विपरीत परिणाम, इत्यादि भयंकर दुश्चिन्हें होऊं लागलीं. ग्रह, दिशा व आकाश यांनीं पेट घेऊन पृथ्वी मोठा शब्द करूं लागली. ऋषिवर्गांनीं या उत्पाताबद्दल चोहोंकडे शांति सुरू केली. कोणी सप्तर्षींच्या स्त्रियांना, व कोणी गरुड पक्षिणीला याबद्दल दोष लावूं लागले. वसिष्ठांखेरीज इतर सहा ऋषींनीं तर हा लोकापवाद ऐकून आपापल्या बायका सोडून दिल्या. विश्वामित्र ऋषींनीं अग्नीच्या मागोमाग त्याच्या दृष्टीस न पडतां जाऊन हा सर्व प्रकार जाणून घेतला. तेव्हां कुमाराला शरण जाऊन त्याची त्यांनीं स्तुति केली व त्याचे मंगलावह **जातकर्मादि तेरा संस्कार** करून कौंबडा, शक्ति, देवी, व पार्षदगण, त्याला मिळवून दिले. ही स्कंदाच्या उत्पत्तीची वार्ता ऐकून त्या अतुल पराक्रमी स्कंदाला मारण्याकरितां देवांनीं इंद्राला आज्ञा केली. परंतु इंद्र तें करण्याला धजेना. तेव्हां त्यांनीं लोकमातांकडे ती कामगिरी सोंपविली. वरें म्हणून त्या स्कंदाकडे आल्या, पण त्याची शक्ति अचाट असून त्याला मारतां येणें अशक्य असल्यामुळें त्या त्याला शरण गेल्या व त्याला आपला पुत्र होण्याविषयीं त्यांनीं विनंति केली. महासेनानें त्यांचे मनोरथ परिपूर्ण केले. अग्नि व शिव हेही त्याठिकाणीं येऊन त्याचें संरक्षण करीत राहिले. लोकमातांच्या क्रोधापासून उत्पन्न झालेली स्त्री त्याची दाई बनली. याप्रमाणें स्कंद त्याठिकाणीं असतांना विजयेच्छु इंद्र हातांमध्यें वज्र घेऊन ऐरावतावर बसून त्याला मारण्याकरितां आला. इकडे महासेनही त्याच्यावरोबर युद्ध करण्याला तयार झाला. देव आपल्याला मारण्याकरितां आले आहेत असें पाहून स्कंदानें आपल्या तोंडातून मोठमोठाल्या ज्वाळा बाहेर सोडल्या; व भूतलावर लटलट कांपत असलेल्या देवसेना जाळून टाकल्या. ते भूतलावर पडलेले देवसैनिक त्यांचे केस, वाहनें वस्त्रें इत्यादिकांनीं पेट घेतल्यामुळें आकाशांतून खालीं पडलेल्या तारांप्रमाणें दिसूं लायले. त्यांची तशी दशा उडालेली पाहून सर्व देव स्कंदाला शरण आले. तेव्हां इंद्रानें मोठ्या त्वेषानें त्यावर वज्र फेकलें. त्यानें स्कंदाची उजवी कूस फोडली. तेथून एक महाशक्तिमान, दिव्य, कुंडलधारी, विशाख नांवाचा पुरुष बाहेर पडला. तें पाहून इंद्रही भयभीत होऊन त्याला शरण आला. स्कंदाला जेथें वज्र लागलें तेथून अनेक कुमार व महाबलाढ्य कन्या उत्पन्न झाल्या. त्यांनीं विशाखाला आपला पिता मानिलें. हा विशाख बोकडाचें मुख धारण करून आपल्या परिवारांसह युद्धामध्यें स्कंदाचें रक्षण करण्याकरितां गेला; तेव्हां त्याला पाहणाऱ्या मातृगणांमध्यें तो भद्रशाख व कोसल या नांवानें प्रसिद्ध झाला. तेव्हांपासून लोक स्कंदाला विशाखप्रभृति कुमारांचा पिता समजूं लागले.रुद्राला स्कंदाचा पिता, व उमेला त्याची माता असें समजून अग्नि व स्वाहा हेही त्याचे मातापितर समजूं लागले. पुत्रेच्छु व पुत्रवान लोक ज्यांना उद्देशून नेहमीं यज्ञ करतात त्या कन्या या स्कंदापाशीं आल्या असतां 'मी काय करूं,' म्हणून त्यानें त्यांना विचारलें. 'तुझ्या प्रसादामुळें आह्मी जगताच्या उत्कृष्ट व पूज्य माता व्हावें,' असा त्यांनीं त्याला वर मागितला. 'ठीक आहे,' म्हणून त्यानें त्याला शिवा व अशिवा अशा भिन्न प्रकारच्या दोन जातींच्या स्त्रिया होण्यास सांगितलें. त्या काकी, हालिमा, इत्यादि स्कंदाच्या सात माता झाल्या. यांना त्याच्या कृपेमुळें शिशु नांवाचा एक मुलगा झाला. हें स्कंदापासून उत्पन्न झालेलें **वीराष्टक. हें वीराष्टक व छागवक्त्र यांना वीरनवक** असेंही म्हणतात. स्कंदाचें एक बोकडासारखें सहावें तोंड होतें तें सहाही तोंडांमध्यें श्रेष्ठ होतें. त्यापासूनच भद्रशाख नामक दिव्य शक्ति त्यानें

उत्पन्न केली. सुवर्णकवच, सुवर्णमाला, सोन्याचा तुरा व मुकूट घातलेला शूर, तरुण व अभीष्टद असा स्कंद बसला असतां कमलाप्रमाणें रूपानें आल्हादजनक अशा प्रत्यक्ष लक्ष्मीनें त्याचा आश्रय केला. तेव्हां तो पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें शोभूं लागला. याप्रमाणें ह्या लोककल्याणकर्त्या स्कंदानें जन्माला येतांच सर्व लोक आपल्या ताब्यांत आणलेले पाहून ऋषींनीं, त्याला आपला इंद्र होण्यास विनंति केली. तेव्हां इंद्राची कामगिरी तरी काय म्हणून त्यानें त्यांना प्रश्न केला. 'प्राण्यांच्या ठिकाणीं बल, तेज, प्रजा, व सुख देऊन त्यांचे मनोरथ परिपूर्ण करणें, दुर्जनांचा नाश करून धर्मानें वागणाऱ्यांना उत्तम फल देणें, सूर्यरहित प्रदेशामध्यें सूर्य होऊन प्रकाश पाडणें, चंद्ररहित प्रदेशामध्यें चंद्र होणें व प्रसंगविशेषीं अग्नि, वायु, पृथ्वी व उदक हींही होणें हें इंद्राचें काम आहे,' असें ऋषी म्हणाले. व इंद्रानेंही त्याला इंद्र होण्याविषयीं आग्रह केला. इंद्र म्हणाला, 'तुझ्या वीर्यानें विस्मित झालेले लोक बलहीन व पराजित अशा माझी, मी इंद्रपदावर राहिलों असतां अवज्ञा करतील व **दोघांत फूट पाडण्याविषयीं ते नेहमीं प्रयत्न करतील.** व आपणांमध्यें फूट झाली असतां लोकही दोन्ही बाजूला मिळतील. आपल्यामध्यें युद्ध होऊन त्यांत तूं माझा निश्चयानें पराजय करशील.' परंतु याला जेव्हां स्कंदाचा रुकार पडला नाहीं, तेव्हां इंद्रानें त्याला देवांचा सेनापती होण्यास विनंति केली. व देवांचे मनोरथ सिद्धीस जाऊन दानवांचा नाश होण्याकरितां गोब्राह्मणांचें हित मनांत आणून स्कंदानें तें कबूल केलें. सर्व देवगणांसहवर्तमान इंद्रानें स्कंदाला सेनापत्याचा अभिषेक केला व महर्षींनींही त्याचा सत्कार केला. चांगल्या प्रज्वलित झालेल्या अग्निमंडळाप्रमाणें सुवर्णछत्र त्याच्या मस्तकावर झळकूं लागलें व प्रत्यक्ष विश्वकर्म्यानें तयार केलेली सुवर्णमाला त्याच्या गळ्यांत पडली. अग्नीला रुद्र ह्मणतात, रुद्राच्या वीर्यानें श्वेतपर्वत बनला व त्यावर ह्याची उत्पत्ती झाली. रुद्र त्याचा आदर करूं लागले. अग्नीमध्यें रुद्रांनीं प्रवेश केल्यामुळें हा उत्पन्न झाला, इत्यादि अनेक कारणांनीं त्याला रुद्रपुत्र ह्मणतात. त्याच्या रथावर उभारलेल्या आरक्तवर्ण व प्रलयकालच्या अग्निप्रमाणें भासणाऱ्या ध्वजाला अग्नीनें त्याला दिलेला कोंबडा शोभा देत होता. सर्व प्राण्यांचे ठिकाणीं असलेली चलनवलनशक्ति तेज, शांति, आणि बल हीं त्याची देवांना जय मिळवून देणारी शक्ति बनली. त्याच्याबरोबरच त्याला अंगचें कवच उत्पन्न झालें असून तो युद्ध करूं लागला असतां तें प्रगट होत असे. शक्ति, धर्म, बल, तेज, सौंदर्य, सत्य, उन्नति, ब्राह्मणभक्तता, विमोहता, भक्तपरिपालन, शत्रुनाशन, आणि लोकसंरक्षण हे त्याच्या ठिकाणीं उपजतगुण होते. याप्रमाणें ह्याला अभिषेक झाला असतां देवसेना चोहोंकडून येऊन तूं आमचा स्वामी आहेस ह्मणून त्याच्या भोंवतीं गोळा होऊं लागल्या. स्कंदाला सेनापत्याचा अभिषेक केल्यावर इंद्राला पूर्वीच्या त्या दक्षकन्येची आठवण झाली व तिचें याच्याशीं लग्न लावून देण्याकरितां त्यानें तिला अलंकृत करून आणविली. व तिचें पाणिग्रहण करण्याविषयीं त्यानें स्कंदाला सांगितलें. याप्रमाणें देवसेना स्कंदाची बायको झाली. हिलाच लक्ष्मी, सिनीवाली, अपराजिता, इत्यादि दुसरीं नांवें आहेत. पंचमीचे दिवशीं स्कंद श्रीनें युक्त झाला ह्मणून पंचमीला श्री असें ह्मणतात. व षष्ठीच्या दिवशीं तो धन्य झाला ह्मणून षष्ठीला **महातिथि अशी संज्ञा** आहे. श्रीनें स्कंदाचा आश्रय केल्यावर सहा ऋषिपत्न्या त्याच्या जवळ येऊन आह्मी पतिव्रता असतांही आह्मांला ऋषींनीं सोडल्यामुळें आह्मी उत्तम पदाला मुकलों आहों. तेव्हां तूं आमचा पुत्र होऊन आह्मांला उत्तम पद दे. ह्मणून त्यांनीं स्कंदाची प्रार्थना केली व त्यानेंही 'तुमचे मनोरथ परिपूर्ण होतील,' ह्मणून त्यांना वर दिला. इतक्यांत इंद्र त्याच्याकडे येऊन ह्मणाला, 'रोहिणीची धाकटी बहीण अभिजित तिच्याशीं स्पर्धा करीत असे व असें होतां होतां आपल्याला श्रेष्ठत्व मिळावें ह्मणून ती वनामध्यें तपश्चर्येला निघून गेली. अभिजित नक्षत्र आकाशांतून खालीं गेल्यामुळें मला कांहीं सुचेनासें झालें आहे. पूर्वी युगादि नक्षत्र रोहिणी असून कालमान बरोबर जुळत होतें. परंतु अभिजित खालीं गेल्यापासून युगादिकाला धनिष्ठेपासून आरंभ झा-

वा असें ब्रह्मदेवांनीं ठरविलें.' याप्रमाणें इंद्रानें सांगितलें असतां कृत्तिकानक्षत्र स्वर्गामध्यें जाऊन आपल्या सात मस्तकांनीं झळकूं लागलें. विनतादि स्कंदाच्या सर्व माता स्कंदाला ह्मणाल्या, 'ह्या जगाच्या ज्या ब्राह्मी, माहेश्वरी इत्यादि पूर्वी माता ठरल्या आहेत त्यांचें पद आह्मांला मिळून त्यांच्या जागीं आमची पूजा व्हावी; व त्यांनीं आमच्या प्रजा तुह्याकरितां हरण केल्या आहेत त्या आमच्या आह्मांला परत मिळाव्या. तेव्हां स्कंद ह्मणाला, 'त्या त्यांना दिलेल्या प्रजा तुह्मांला आतां परत मिळणार नाहींत. दुसऱ्या एकाद्या प्रजा तुह्मांला पाहिजे असतील तर मागा.' माता ह्मणाल्या, 'त्यांच्या ज्या प्रजा त्यांचें आधिपत्य तूं आह्मांला दे.' हें ऐकून स्कंद ह्मणाला, 'सोळा वर्षे-ह्मणजे मनुष्याच्या प्रजा तरुण होई तोंपर्यंत-नानाप्रकारच्या रूपांनीं तुह्मीं त्यांना पीडा करीत जा. मी आपला अत्युग्र व अक्षय्य अंश तुह्मांला देतों. त्यानें मानमान्यतापूर्वक तुह्मी सुखानें रहा. नंतर स्कंदाच्या शरीरापासून मनुष्यप्रजा भक्षण करण्याकरितां महातेजस्वी पुरुष बाहेर पडला. तो भुकेनें व्याकुळ होऊन भूमीवर मूर्छित होऊन पडला. स्कंदाच्या आज्ञेनें तो उग्र ग्रह बनला. याला **स्कंदापस्मार** ह्मणतात. महाक्रूर विनतेला **शकुनिग्रह** ह्मणतात. पूतना ह्मणून एक राक्षसी आहे तिला **पूतनाग्रह** ह्मणतात. भयंकर आकृतीची दुसरी एक निशाचरी पिशाची आहे तिला **शीतपूतना** ह्मणतात. ही मनुष्यस्त्रियांचे गर्भ हरण करते. अदितीला रेवती ह्मणतात. रेवत हा तिचा ग्रह होय. हा ग्रह बालकांना पीडा देत असतो. दैत्यमाता दिती हिला **मुखमंडिका** म्हणतात. ती मुलाच्या मांसानें फार आनंदित होते. स्कंदापासून उत्पन्न झालेले सर्व कुमार व कुमारी महाक्रूर असून मांसभक्षक आहेत. गोमाता जी सुरभि हिच्यावर बसून शकुनिग्रह पृथ्वीवरील मुलें भक्षण करीत असतो, श्वमाता सरमा हीही मनुष्यस्त्रियांचे गर्भ हरण करीत असते. वृक्षमाता करंजनिलया ही मात्र सौम्य व प्राण्यांवर दया करणारी असून त्यांचे मनोरथ पूर्ण करणारी आहे. ह्मणून पुत्रार्थी लोक ह्या वृक्षावर हिला नमस्कार करीत असतात. हे व इतर आठरा मद्यमांस आवडणारे ग्रह दहा दिवसपर्यंत बाळंतिणीच्या खोलींत असतात. कद्रू सूक्ष्मरूप धारण करून गर्भिणीच्या उदरांतून गर्भ घेऊन जाते व तिला त्यापासून सर्प होतात. गंधर्वमाता (रिष्टा) हिनें गर्भिणीचा गर्भ हरण केला असतां गर्भ पोटांतल्या पोटांत जिरला असें ह्मणतात. अप्सरांची माता (मुनी) ही मात्र गर्भ घेऊन तेथेंच राहते; आणि असें झालें असतां गर्भ कायम होतो. लोहित समुद्राची कन्या स्कंदाची दाई होय व कदंब वृक्षावर लोहिताहिनी ह्मणून लोक तिची पूजा करतात. हें महाग्रह सोळा वर्षेपर्यंत मुलांना पीडा देत असतात. त्यांच्या शमनार्थ स्नान, धूप, अंजन, पूजन, बलिदान इत्यादिकांनीं स्कंदाची पूजा करावी. ह्मणजे हे ग्रह मनुष्यांना शुभफल, आयुष्य आणि वीर्य देतात. सोळा वर्षांनंतर पुढील ग्रहपीडा देतात. जागें अथवा निद्रिस्त असतांना देव दृष्टीस पडून जेव्हां मनुष्य उन्मत्त होतो त्याला देवग्रहपीडा ह्मणतात. बसला अथवा निजला असतांना पितरांना पाहून जेव्हां मनुष्य उन्मत्त होतो त्याला पितृग्रहपीडा ह्मणतात. सिद्धांचा अवमान केल्यानें त्यांचा शाप होऊन जेव्हां मनुष्य उन्मत्त होतो, तेव्हां त्याला सिद्धग्रहपीडा ह्मणतात. नानाप्रकारचे गंध व रस सेवन केल्यानें माद येणें याला गंधर्वपीडा ह्मणतात. दिव्यगंधर्व मनुष्यांना झपाटतात त्यामुळें मनुष्याला माद येतो, त्याला गांधर्वग्रहपीडा ह्मणतात. पिशाच बोकांडीं बसून माद येणें हें पैशाचग्रहपीडेचें लक्षण होय. नियमितकाळीं शरीरामध्यें यक्षांचा संचार होऊन माद येणें याला यक्षग्रहपीडा ह्मणतात. वातपित्तादि दोषांचा प्रकोप झाल्यामुळें जो माद येतो त्या रोगाची चिकित्सा वैद्यशास्त्रानें साध्य आहे. गोंधळून जाणें, भीति वाटणें, भयंकर प्रकार पाहणें इत्यादिकानें माद आला असतां समाधान करणें हाच त्याला उपाय आहे. कोणी गमतीखातर, कोणी उपभोगासाठीं, व कोणी घेऊन जाण्यासाठीं अशा तीन कारणांनीं हे ग्रह सत्तर वर्षेपर्यंत मनुष्याला पीडा देतात. व पुढें ज्वर हाच पीडादायक ग्रह होऊन बसतो. जितेंद्रिय, मनोनिग्रही, शुची, दक्ष, आस्तिक व श्रद्धालु यांना ग्रहांची पीडा होत नाहीं.

स्कंदानें ऋषिमातांचे मनोरथ पूर्ण केल्यावर स्वाहा त्याच्याजवळ येऊन ह्मणाली, 'माझें अग्नीवर पूर्ण प्रेम असून तो अद्यापि मला बरोबर ओळखत नाहीं; तेव्हां त्याचें खरें प्रेमसुख मला मिळावें असें तूं कर. कारण तूं माझा औरस पुत्र आहेस.' हें तिचें भाषण ऐकून स्कंद ह्मणाला, 'सदाचारसंपन्न व सन्मार्गगामी ब्राह्मण पितरांना उद्देशून अग्नीमध्यें हवन करीत असतां प्रथम स्वाहा ह्मणून ते अग्नीला हवी देतील; व याप्रमाणें तुझें अग्नीबरोबर नेहमीं वास्तव्य असेल. इकडे ब्रह्मदेव येऊन महासेनाला ह्मणाले, 'तूं त्रिपुरनाशक जो तुझा पिता त्याकडे जा. सर्व लोकांच्या हिताकरितां रुद्रानें अग्नीच्या ठिकाणीं व उमेनें स्वाहेच्या ठिकाणीं प्रवेश केल्यानें तूं अजिंक्य पुत्र झाला आहेस. महात्म्या रुद्रांनीं उमेच्या ठिकाणीं सिंचन केलेलें वीर्य ह्या पर्वतावर पडलें व त्यामुळें मिंजिकामिंजिक नामक स्त्रीपुरुष उत्पन्न झाले. या विपुल वीर्याचा कांहीं राहिलेला भाग लोहितसमुद्रांत पडला, कांहीं सूर्यकिरणांत गेला, कांहीं पृथ्वीवर पडला व कांहीं झाडांवर अडकून राहिला. याप्रमाणें तें वीर्य पांच प्रकारांनीं ज्या ज्या ठिकाणीं पडलें त्या त्या ठिकाणीं नाना रूपधारी गण उत्पन्न झाले. तेच घोर पारिषद् गण होत.' हें ब्रह्मदेवांचें भाषण ऐकून महासेनानें शंकरांचें पूजन केलें. मनुष्यानें धनप्राप्त्यर्थ व रोगशमनासाठीं रुईच्या पुष्पांनीं या पांच गणांचें पूजन करावें. व या मिंजिकामिंजिक दंपत्याला बालाचें हित इच्छिणारांनीं नमस्कार करावा. झाडाच्या ठिकाणीं राहिलेल्या वीर्यापासून प्रसिद्ध बृद्धिका नांवाच्या मनुष्यभक्षक स्त्रिया उत्पन्न झाल्या. त्यांनाही संतानेच्छूंनीं नमस्कार करावा. वैजयंती ह्मणून इंद्राच्या दोन घंटा होत्या, त्या इंद्रानें स्वतः कार्तिकेयाला दिल्या. त्यांपैकीं एक स्कंदाची वैजयंती पताका झाली; विशाखेला दुसरी दिली ती लोहिता पताका झाली. प्रफुल्लित अशा संतानवृक्षांच्या वनांनीं, त्याचप्रमाणें रेवती, पारिजात, जास्वंद, अशोक, कदंब, इत्यादिकांच्या वनांनीं व मृगपक्ष्यांच्या समुदायांनीं शोभायमान असा हा श्वेतपर्वत सर्व देवर्षिगणांचा वायघोष सुरू होऊन क्षुब्ध झालेल्या समुद्राप्रमाणें जिकडे तिकडे गजबजून राहिला होता. गंधर्वाप्सराढिकांचें नृत्यगायन तर तेथें सुरूच होतें. ह्याप्रमाणें आनंदांत सर्व लोक तेथें दिवस काढीत असतांना स्कंदाला सेनापत्याचा अभिषेक झालेला ऐकून भगवान शंकर आनंदित होऊन पार्वतीसह सूर्यवर्ण रथामध्यें बसून भद्रपटाकडे निघाले. यांच्या रथाला मनोहर आयाळांनीं युक्त असे शुभ्रवर्ण हजार सिंह जोडले होते व ते आकाशांतून उड्डाण करीत असतांना आकाश गिळून टाकीत आहेत कीं काय असें वाटत होतें. पार्वतीसह भगवान शंकर इंद्रधनुष्यासहवर्तमान असलेल्या मेघावर विद्युल्लतेसह बसलेल्या सूर्याप्रमाणें शोभत होते. नरवाहन कुबेर पुष्पकविमानामध्यें बसून गुह्यकासहवर्तमान त्यांच्याबरोबर चालला होता. त्याचप्रमाणें इंद्र, यम हे आपापल्या परिवारांसह, तसेंच जृंभक, यक्ष, राक्षस, अष्टवसू, अकरा रुद्र व वरुण, ही सर्व मंडळी त्यांच्याबरोबर होती. त्याचप्रमाणें महर्षिगण, तसाच अप्सरागण, नक्षत्रें, ग्रह व नाना भूषणांनीं विभूषित स्त्रियाही त्यांच्यामागून चालल्या होत्या. अग्नि व वायु यांनीं चवऱ्या धरल्या होत्या व इंद्र त्यांचा स्तुतिपाठ गात होता. गौरी, विद्या, गांधारी इत्यादि स्त्रीगण पार्वतीच्यामागून चालला होता. स्मशानाधिपति पिंगल पताका घेऊन त्यांच्यापुढें होता. देवसेना बरोबर घेऊन स्कंदही त्यांच्याबरोबर चालला असतां, 'सातव्या वायु-स्कंदाचें तूं नेहमीं दक्षतेनें रक्षण करीत जा व प्रसंगीं माझी भेट घेत जा, ह्मणजे उपस्थित कार्यासंबंधानें तुझें कर्तव्य तुला मी सांगत जाईन व त्याच्यायोगानें तुझें कल्याण होईल,' असें शंकर स्कंदाला बोलताहेत तोंच मोठमोठे उत्पात होऊन नभोमंडळानें पेट घेतली व सर्व जग मूर्च्छित झालें. पृथ्वी चळूं लागून जग सर्व अंधारानें भरून गेलें. हें पाहून सर्व घाबरून गेले. देवांना कांहीं सुचेनासें झालें. नाना शस्त्रधारी घोर सैन्य भयंकर गर्जना करीत त्यांच्यावर तुटून पडले व त्यांनीं बाण, पर्वत, प्रास, गदा इत्यादि आयुधें देवांवर फेंकलीं. त्याच्यायोगानें देवसैन्याचा मोड होऊन तें चोहोंकडे पळूं लागलें. कोणाचें डोकें तुटलें तर कोणाचे हातपाय तुटले. याप्रमाणें छिन्नभिन्न होऊन निराश्रित असें तें देवसैन्य पळत असतां इंद्र

त्याला धीर देऊन म्हणाला, 'शूरहो, भीति सोडा. पराक्रम करण्याच्या निश्चयानें हातांत शस्त्रें घ्या व ह्या दुराचारी व क्रूर दैत्यसेनेला जिंका.' याप्रमाणें इंद्रानें धीर दिल्याबर त्याचा आश्रय करून देवसैन्य पुन्हां युद्धाला तयार झालें, व त्यांनीं दैत्यसेनेवर सोडलेल्या आयुधांनीं दैत्याच्या शरीरांतील पुष्कळ रक्त प्राशन केलें. त्यांचें शरीर भेदून बाहेर निघणारे देवांचे बाण झाडांतून बाहेर पडणाऱ्या सापाप्रमाणें दिसत होते. बाणानें छिन्नभिन्न झालेलीं दैत्यांचीं शरीरें बाऱ्यानें विसकळलेल्या मेघाप्रमाणें पसरून जमिनीवर पडलीं. याप्रमाणें दानवसैन्याची दाणादाण उडून देव आनंदित होत आहेत तोंच दैत्यसैन्यांतून एक प्रचंड महिष नांवाचा दानव हातांत पर्वत घेऊन बाहेर पडला. त्याला पर्वत उगारून आपल्याकडे येतांना पाहून देवांनीं पळ काढला. महिषानें त्यांचा पाठलाग केला. क्षुद्र मृगाच्या मागें लागलेल्या सिंहाप्रमाणें तो त्यांच्यामागें लागला असतां त्याचा वध करण्यासाठीं भगवानांनीं स्कंदाला आज्ञा केली. त्याबरोबर रक्तवस्त्रें नेसलेला व रक्तमालाधारी आजानुबाहु स्कंद सुवर्णासारख्या दैदीप्यमान रथावर बसून महिषासुरावर धांवून गेला, व त्यानें त्यावर शक्ति सोडली. तिनें त्याचें मस्तक उडालें. व महिषासुर गतप्राण होऊन भूमीवर पडला. त्या पर्वतप्राय मस्तकानें पडतां पडतां कुरुदेशाचा मार्ग चौसष्ट कोसपर्यंत बंद करून टाकला. स्कंदाची शक्ति शत्रूचा नाश करून पुन्हां त्याचे हातांत येत असून पुन्हां त्यानें ती शत्रूवर फेंकली असतां त्यांचा नाश करून फिरून ती त्याच्या हातांत येई. याप्रमाणें तिनें हजारों दानवांचा फडशा उडविला. फार आनंदित झालेल्या स्कंदपारिषदांनीं दैत्यांना खाऊन व त्यांचें रक्त पिऊन एका क्षणामध्यें रणभूमि दानवशून्य करून टाकली. ज्याप्रमाणें सूर्य अंधकाराचा, अग्नि वृक्षांचा व वायु मेघाचा नाश करितो, त्याप्रमाणें कीर्तिमान स्कंदानें स्वपराक्रमानें शत्रूचा नाश केला. याप्रमाणें महिषासुराला मारून स्कंद शंकरांकडे गेला असतां आनंदानें आलिंगन देऊन ते त्याला म्हणाले, 'इंद्रानें वर दिल्यामुळें या महिषासुराला देव कसपटाप्रमाणें वाटत होते, त्याला देवकंटकाला उपटून टाकून तूं आज देवकार्य केलें आहेस. तूं शत्रूंना अजिंक्य आहेस व तुझ्या ह्या पहिल्या पराक्रमानेंच त्रैलोक्यामध्यें तुझी कीर्ति अक्षय्य राहील व देवही तुझी आज्ञा मानितील. पुढें स्कंदानेंही त्रैलोक्य जिंकलें. याला आग्नेय, स्कंद, दीप्तकीर्ति, अनामय, मयूरकेतु, अशीं अनेक नांवें आहेत.

---

१०४ द्रौपदीसत्यभामासंवाद–पतिव्रताधर्म. (३. २३३–२३९.)

कोणे एकेवेळीं विप्रांसहवर्तमान पांडव सभेंत बसले असतां द्रौपदी व सत्यभामाही तेथें येऊन त्यांच्यामध्यें बसल्या होत्या. तेव्हां सत्यभामा द्रौपदीला म्हणाली, 'द्रौपदि, एक जुटीनें राहणाऱ्या लोकपालासारख्या ह्या पांडवांना तूं आपल्या मुठींत कसें ठेविलें आहेस! ते कधीं तुझ्यावर रागावत नाहींत. एकादें व्रत, तप, स्नान, मंत्र, औषध, विद्येचा अथवा मुळीचा प्रभाव किंवा एखाद्या कल्याणप्रद देवतेची उपासना असेल तर मला सांग म्हणजे मीही त्यानें कृष्णाला आपल्या मुठींत ठेवीन.' हें ऐकून भाग्यशाली द्रौपदीनें उत्तर दिलें, 'सत्यभामे, पर्यायानें तूं मला कजाग स्त्रिया कशा असतात हें विचारतेस. ती बाटच मला माहीत नसल्यानें तें मला कसें सांगतां येणार. कृष्णाच्या तुझ्यासारख्या बुद्धिमान लाडक्या बायकोला हें विचारणें शोभत नाहीं. पतीला आपली स्त्री मंत्रतंत्रांत गढली आहे असें कळल्यावर घरांत शिरलेल्या सापाप्रमाणें तो तिला पाहून कचरत असतो आणि अशा प्रकारें मन उडालें म्हणजे त्याच्या मनाला शांति कोठून मिळणार व शांति नसेल तर सुख तरी कोठून मिळणार? पति कधीं मंत्रतंत्रानें स्वाधीन होत नसतात. स्त्री एकवार या नादीं लागली म्हणजे तिच्या पतीच्या बाइटावर असणाऱ्यांना मुळ्यांमधून जिव्हेनें अथवा त्वचेनें भोग्य द्रव्यांतून विष देऊन रोग उत्पन्न करून त्यांना मारण्याची उत्तम सोय होते. जलोदर, कुष्ठ, जरा, नपुंसकत्व, जडता, अंधत्व, बधिरत्व, इत्यादि किती रोग अशाप्रकारीं मनुष्यांच्या पाठीं लागून पापी स्त्रियांनीं आपल्या पतींला जडविले आहेत? स्त्रियांनीं पतीच्या इच्छेविरुद्ध

कधीं बागूं नये. मी आपल्या महात्म्या पतींशीं कशी वागतें तें नीट ऐक. मीपणा, राग, लोभ इत्यादि टाकून देऊन काळजीपूर्वक **सवती असतांही** त्यांची मी शुश्रूषा करतें. मत्सरभाव बाजूला ठेवून सवतींचीं देखील मुकाट्यानें मी कामें करून पतीची मनधरणी करतें. भलतें बोलणें, भलत्या ठिकाणीं बसणें, भलत्याकडे बघणें, भलतीकडे जाणें, यांबद्दल नेहमीं खबरदारी घेतें. परपुरुष माझ्या मनामध्यें देखील कधीं येत नाहीं; मग तो देव असो, गंधर्व असो, तरुण असो, अलंकारांनीं विभूषित असो, किंवा श्रीमान असो. माझ्या पतींचें जेवण झाल्याखेरीज मी अन्न घेत नाहीं; त्यांचें स्नान झाल्याखेरीज अंग धूत नाहीं; ते निजल्याखेरीज मी निजत नाहीं. **शेतांतून, वनांतून अगर गांवांतून** श्रम पति घरीं आले असतां उठून उभी राहून त्यांना पाय धुवावयाला पाणी व बसावयाला आसन देऊन त्यांचा मी सत्कार करतें. उत्तम जेवण तयार करून वेळच्यावेळीं मी जेवण्याची तयारी ठेवतें व भांडीं स्वतः घासतें. व व्यवस्थितचित्त राहून घरांतील दाण्यादुण्याची काळजी घेऊन झाडलोट करून घर स्वच्छ ठेवीत असतें. वाईट भाषण बोलत नाहीं व वाईट स्त्रियांच्या सावलीला सुद्धां उभी रहात नाहीं. नित्य त्यांना अनुकूल असें वागून आळसाला जवळ हुंकूं देत नाहीं. **थट्टेशिवाय हासणें, दारांत वरचेवर उभें राहणें, परड्यांत अथवा बागेंत फार वेळ रमणें,** इत्यादि गोष्टी मी टाळतें. फार हासणें अगर फार रागावणें मला ठाऊक नाहीं. कामाकरितां पती परगांवाला गेले असतां पुष्पादिकांचा शृंगार न करतां व उटी न लावतां मी व्रतस्थ राहतें. पती जें खातपात नाहींत किंवा घेत नाहींत, त्याला मी शिवत नाहीं. पतींच्या सांगण्याप्रमाणें शुद्ध रीतीनें वागून पर्वकालीं **भिक्षा, बली, श्राद्ध, स्थालीपाक, मान्यांचा सत्कार इत्यादि विधी जे घरीं सासूबाईंनीं मला सांगितले आहेत व जे मला माहीत आहेत,** ते मी अहोरात्र आळस बाजूला ठेवून पाळीत असतें. सौम्य, भले, सत्यशील, सत्यधर्माचें रक्षण करणारे असे असून रागावले असतां सर्पासारख्या क्रूर अशा माझ्या पतींची यथामाणें मी सेवा करतें. माझा सर्व धर्म पतींना धरून आहे. स्त्रियांचा हा सनातनधर्म आहे. पती हाच त्यांचें दैवत असून त्यांना गतिही तोच आहे. वीरसू व सत्यवाक् कुंति सासूची खाण्यापिण्याची व कपड्यालत्यांची व्यवस्था करून मी स्वतः त्यांची शुश्रूषा करीत असतें. अन्नवस्त्र व अलंकार त्यांच्यापेक्षां चांगले मीं कधीं वापरीत नाहीं. व भूमातेसारख्या गंभीर व शांत अशा त्यांना मी कधीं टाकून बोलत नाहीं. पूर्वी महाराजांच्या घरीं सुवर्णपात्रांतून भोजन करणाऱ्या सर्व वेदपारग ब्राह्मणांची खाण्यापिण्याची व कपड्यालत्यांची योग्य व्यवस्था मी स्वतः लावीत असें. उत्तम वस्त्रालंकार केलेल्या, चंदनाची उटी लावलेल्या, नृत्यगायनामध्यें निष्णात, अशा हजारों दासी महाराजांकडे असत; त्यांचीं नांवें, स्वरूप, त्या काय खातात, काय पितात, काय नेसतात, त्यांनीं आपलीं कामें केलीं किंवा नाहीं, ह्या सर्वांची मी चौकशी ठेवीं. त्याबेळीं महाराजांच्या स्वारीबरोबर एक लक्ष घोडे व एक लक्ष हत्ती निघत असत, त्यांचीही सर्व देखरेख मजकडे असे. अंतःपुरांतील सर्व नोकर लोक, गुराखी, मेंढपाळ, यांनीं आपापलीं कामें केलीं किंवा नाहींत याची मला माहिती असे. महाराजांची आदा व खर्च यांची सुद्धां पूर्ण माहिती एकट्या मला असे. घरकारभार सर्व माझ्यावर सोंपवून ते सर्व आपापल्या उद्योगांत गढले असत. मीही सर्व सुखाला बाजूला ठेवून सामान्य लोकांना न झेपणारा माझ्यावर टाकलेला तो भार रात्रंदिवस काळजीपूर्वक वहात असें. वरुणाच्या रत्नपूर्ण उदधीप्रमाणें पतींचा सर्व खजिना काय तो मला एकटीला माहीत असे. दिवस असो, रात्र असो, त्यांना भूकतहान लागली असतां त्यांच्या शुश्रूषेला मी तत्पर असल्यामुळें मला रात्र आणि दिवस सारखेच वाटतात. मी त्यांच्या अगोदर उठून त्यांच्या मागून निजावयाला जातें. सत्यभामे, मजपाशीं मंत्रतंत्र काय तो ऐवढाच आहे. याहून विशेष मंत्रमंत्र मला माहीत नाहीं. वाईट स्त्रियांचा कित्ता मी कधीं वळवीत नाहीं व तो वळविण्याची माझी इच्छाही पण नाहीं. पतीचें मन आपल्याकडे ओढून घेण्याला हा खात्रीचा मार्ग मीं तुला सांगितला

आहे. या मार्गानें जाशील तर खाचींनें तूं दुसऱ्या स्त्रियांपासून पतीचें मन आपल्याकडे ओढून घेशील. लोकांमध्यें अगर देवांमध्यें पती सारखें दुसरें दैवत नाहीं. त्याच्या प्रसादानें सर्व इच्छा परिपूर्ण होतील व त्याच्या रागानें आपला नाश होईल. अपत्य, नानाप्रकारचे भोग, उत्तम वस्त्रालंकार, स्वर्ग व थोर कीर्ति हीं त्यापासूनच मिळतात. सुखापासून सुखाची प्राप्ति कधीं होत नाहीं. कष्ट सोसले तरच पुढें सुख मिळतें. ह्मणून प्रेमळ अंतःकरणानें तूं कृष्णाची आराधना कर. दासीला कोठें बाहेर पाठविलें असशील तर तिचें सर्व काम तूं स्वतः कर. पूर्ण भावानें ही मला भजत आहे, असा तुझा भाव कृष्णाला कळूंदे. पतीनें तुझ्यापाशीं एखादी गोष्ट सांगितली असतां ती फोडण्याजोगी असली तरी बाहेर सांगत बसूं नकोस. कारण कोणा सबत तीच गोष्ट फिरून श्रीकृष्णाला जाऊन सांगेल व त्याच्या योगानें त्याचें तुझ्यावरचें प्रेम उडेल. तुझ्या पतीला कोणी प्रिय असून त्यांवर प्रेम करणारे व त्याचें हित पहाणारे कोणी असतील त्यांना हरतऱ्हेनें संतुष्ट ठेव. तो ज्यांचा द्वेष करीत असेल, ज्यांकडे त्याचें दुर्लक्ष असेल व जे त्याच्याशीं वांकडे व कपटानें वागत असतील त्यांपासून तुटून रहा. दुसऱ्यांशीं वागण्याचा प्रसंग आला असतां गर्व व हलगर्जीपणा टाकून मौन धरून आपला भाव तूं उघड करूं नकोस. प्रद्युम्न व सांब ह्या तुझ्या मुलांबरोबर देखील फार गोष्टी सांगत बसूं नकोस. मोठ्या, कुलीन व निष्पाप अशा साध्वी स्त्रियांशीं तुझें सख्य असूं दे. कजाग, माजलेल्या, खादाड, चोरट्या, अशा दुष्ट बायकांशीं संबंध ठेवूं नकोस. हें मीं सांगितलेलें वशीकरणसाधन यशस्कर, भाग्य उदयाला आणणारें व वैऱ्याचा बीमोड करणारें आहे.'

याप्रमाणें त्यांचें संभाषण होत आहे तोंच कृष्णानें पांडवांशीं मसलत करावयाची ती होऊन सत्यभामेला रथांत बसण्याकरितां हाक मारली. तेव्हां सत्यभामा द्रौपदीला आलिंगन देऊन प्रेमयुक्त शब्दांनीं ह्मणाली, 'तूं कशाचीही काळजी करूं नकोस व जागून मनस्ताप करून घेऊं नकोस. देवांसारखे तुझे पती ही पृथ्वी लवकरच जिंकून तिचा तुला उपभोग देतील. तुझ्यासारख्या शीलसंपन्न व सुलक्षणी स्त्रियांना फार दिवस दुःख सोसावें लागणार नाहीं. धार्तराष्ट्रांचा नाश करून वैर उमवून पतीसह निष्कंटक पृथ्वीचा लवकरच तूं खास उपभोग घेशील. तूं वनांत जात असतांना गर्वानें फुगून जाऊन ज्या तुला हासल्या त्यांचीं तोंडें लवकरच खालीं होतील, व तुला संकटांत पाहून तुझ्याशीं दुर्वर्तन करणारे लवकरच यमपुरीची वाट धरतील. जे कौरवांच्या पक्षाला मिळाले आहेत, त्या राजांची घडी भरली असें तूं समज. तुझे मुलगे द्वारावतींत खुशाल आहेत. सुभद्रा त्यांवर मनापासून प्रेम करते. त्यांना एवढें दुःख झालें कीं तिला दुःख होतें, व त्यांना सुखी पाहून तिला समाधान वाटतें. श्रीकृष्णांचें त्यांच्यावर आपल्या मुलांपेक्षां अधिक प्रेम आहे. मामंजी नेहमीं स्वतः त्यांच्या खाण्यापिण्याकडे लक्ष देतात. भावोजी आणि दुसरी मंडळी यांचें प्रद्युम्नावर व त्यांवर सारखें प्रेम आहे.' ह्याप्रमाणें समाधान करून द्रौपदीचा निरोप घेऊन सत्यभामा तिला प्रदक्षिणा करून रथांत बसली. नंतर द्रौपदीचें शांतवन करून तिला माघारी परतवून श्रीकृष्ण आपल्या नगराला गेला.

---

१०९. दुर्योधनाची फजिती.

(३. २३६–२४६)

याप्रमाणें वनामध्यें ते नरश्रेष्ठ थंडी, वारा, ऊन्ह इत्यादि सहन करून रहात असतां पुष्कळ वेदवेत्ते ब्राह्मण त्यांकडे येत व त्यांचा त्यांकडून सत्कारही यथायोग्य होत असे. कोणे एके वेळीं एक ब्राह्मण यांचा सत्कार घेऊन सहजगत्या धृतराष्ट्राकडे गेला असतां कथाप्रसंगानें अनाथासारखे वनांत कष्ट सोसीत राहणाऱ्या पांडवांची हकीकत त्यानें राजाला कळविली. ती ऐकून उद्विग्नमन होऊन धृतराष्ट्रानें त्यांची दया येऊन सुस्करा टाकला व त्यांवर हें संकट आपल्यामुळेंच ओढवलें आहे असें समजून त्यानें पुढील उद्गार काढले, 'हे पांडव वीर पूर्वी राजवैभवामध्यें लोळणारे आज अरण्यामध्यें भूमीवर कसे पडत असतील? वायुसारखा बलशाली वायुपुत्र वडील भावाच्या आज्ञारूपी धर्मपाशानें जखड-

ला असल्यानें स्त्रीनें दीर्घ उछ्वास टाकीत आपला राग आवरून धरीत असला पाहिजे ! रणामध्यें कोणाला हार न जाणारा असा जरी तो आहे, तरी सत्यानें व धर्मानें त्याला आवरलें असल्यामुळें माझ्या मुलांना मारण्याची वाट पहात तो जमिनीवर लोळत काळ घालवीत असला पाहिजे. धर्मराजाला कपटानें जिंकलें असतां दुःशासन जें टाकून बोलला तें भाषण गवतामध्यें शिरलेल्या अग्नीप्रमाणें भीमसेनाच्या हृदयांत शिरून त्याला जाळीत असलें पाहिजे. धर्मराजाच्या मनांत कधीं पाप यावयाचें नाहीं व अर्जुनही कधीं त्याच्या आज्ञेबाहेर जावयाचा नाहीं. परंतु अरण्यवासानें भीमसेनाचा राग मात्र वाऱ्यानें पेट घेतलेल्या अग्नीप्रमाणें वाढत असला पाहिजे. त्या कोपानें जळफडत तो हात चोळीत माझ्या पुत्रपौत्रांना जणूं काय जाळूनच टाकणारा उष्ण श्वासोच्छ्वास टाकीत असला पाहिजे. मृत्यु व काळ यांसारखे खवळलेले भीमार्जुन युद्धामध्यें वज्रासमान बाण सोडूं लागले असतां शत्रुसैन्याचा थोडा देखील शेष उरूं देणार नाहींत. मूढमति दुर्योधन, शकुनि व दुःशासन यांना मंध दिसत आहे पण कडा दिसत नाहीं. मनुष्य वरें वाईट कर्म करून त्याच्या फलाची वाट पहात असतो, आणि त्या फलाच्या पूर्ण तावडींत जाऊन त्यापासून सुटका होण्याची आशा उरत नाहीं. उत्तम रीतीनें नांगरून बीं पेरलेल्या शेतांत देखील योग्य वेळीं पाऊस पडून धान्य उगवत नाहीं हें सुप्रसिद्धच आहे. तर या ठिकाणीं दैवाशिवाय दुसरें कांहीं कारण देतां येत नाहीं. अक्षपटु शकुनीनें अन्याय केला असतांही युधिष्ठिराकडून गैरवर्तन घडलें नाहीं. पण दुष्ट मुलाच्या नादीं लागून माझ्या हातून मात्र गैरवर्तन घडलें आहे. ह्मणून कौरवांचा अंतकाल खास जवळ आला आहे, असें मला वाटतें. कोणी वाहण्याला न सांगतां वारा वहात असतो. स्त्री गर्भिणी झाली असतां प्रसूत व्हावयाचीच. दिवस उगवला ह्मणजे रात्रीचा नाश व रात्र पडली ह्मणजे दिवसाचा नाश हा व्हावयाचाच. त्याप्रमाणें आमचा नाश आतां ठरलेला आहे. पण मनुष्याला विवेक नसल्यामुळें आह्मी व आमच्यासारखे दुसरे द्रव्यार्जनाच्या पाठीं लागतों व मिळविलेलें दुसऱ्यांना देण्याची बुद्धि होत नाहीं. पैशाची गरज लागली असतां तो नसल्यानें अनेक अनर्थ ओढवतात. मग तो मिळवावा ह्मटलें असतां कोठून मिळणार ? ह्मणूनच ज्यांत पैसा ठेविलेला आहे तें भांडें फुटेल अथवा त्यांतून तो ओझरून अथवा वाहून बाहेर न पडेल अशा रीतीनें त्याचें जतन केलें पाहिजे. द्रव्याचें योग्य रक्षण केलें नाहीं तर हजारों वाटांनीं तें नाहींसें होतें. आतां कृतकर्माचें फळ मनुष्याला मिळावयाचेंच.तें कधीं चुकत नाहीं. अरण्यांतून देखील स्वर्गलोकाला जाऊन चारी प्रकारच्या दिव्यास्त्रांचें ज्ञान संपादन करून अर्जुन फिरून ह्या लोकाला परत आला. कालग्रस्त होऊन मरण्याची वाट पहात बसलेल्या कौरवांची वाट पहाणाऱ्या अर्जुनाशिवाय दुसरा कोण मानव स्वर्गातून सशरीर खालीं परत येईल ! धनुर्धारी अर्जुन, त्याचें तें उग्र गांडीव धनुष्य व तीं दिव्य अस्त्रें या त्रयींचें तेज कोण सहन करूं शकणार ? ' वरील उद्गारांपैकीं संपत्तीसंबंधाच्या धृतराष्ट्राच्या उद्गारांचाच तेवढा विपरीतार्थ घेऊन दुर्योधनादि चौकडी गोष्टी बोलत बसली असतां शकुनि ह्मणाला, ' बा दुर्योधना, पांडव वननासी झाले आहेत. चोहोंकडचे राजे तुला करभार देऊं लागले आहेत. जी दैदीप्यमान संपत्ति पूर्वी पांडवांना धरून होती ती आज तुझी झाली आहे. इंद्रप्रस्थीं युधिष्ठिराचें जें राज्यवैभव होतें तें आज तुला मिळालें आहे. तुझे शत्रू शोकसागरांत बुडाले असल्यामुळें ते फार दिवस टिकतील ही आशा नाहीं. त्याचप्रमाणें सर्व राजे 'जी महाराज,' ह्मणून तुझा हुकूम मानण्याला एका पायावर तयार आहेत. ही सर्व सागरांत पृथ्वी आज तुझी आहे. स्वपराक्रमानें तूं देवांमधील सूर्याप्रमाणें झळकत आहेस. तुझी आज्ञा न पाळणारे पांडव श्रीहीन होऊन वनवासी झाले आहेत. व वनवासी ब्राह्मणांसहवर्तमान द्वैतवन सरोवराबर रहात आहेत असें मी ऐकतों. तरी महावैभवशाली, राज्यलक्ष्मीनें युक्त व श्रीमान, असा तूं राज्यभ्रष्ट झालेल्या श्रीहीन अशा पांडवांना आपल्या तेजानें सूर्याप्रमाणें ताप देण्याला तिकडे चल. जें आपलें थोर वैभव मित्र व शत्रू या दोघांना पहाण्याला सांपडतें त्याचाच व्हावा तसा उपयोग झाला ह्मणा-

वयाचा. स्वतः सुखांत असून दुःखांत असलेल्या आपल्या बैऱ्यांना पर्वताबरील मनुष्य ज्याप्रमाणें पृथ्वीवरील मनुष्याला वरून पहातो तद्वत् पहाण्यापलीकडे आणखी तें काय सुख जगामध्यें आहे ? शत्रूची निकृष्टावस्था पाहून होणाऱ्या समाधानीहून विशेष समाधानी पुत्र, धन अथवा राज्य यांच्या प्राप्तींत देखील नाहीं. अर्जुनासारख्याला वल्कलाजिनामध्यें आश्रमामध्यें पाहिल्यानें किती बरें सुख होईल? उत्तम वस्त्रें परिधान केलेल्या तुझ्या स्त्रीला वल्कलें नेसलेल्या त्या द्रौपदीला पाहून तिच्या दुःखाला भर पाडूं दे.' हें भाषण ऐकून आनंदानें दुर्योधन म्हणाला, 'माझ्याही मनांत हीच गोष्ट आली होती. परंतु तातांची याला अनुमति मिळणार नाहीं. ते त्यांच्यासंबंधानें वाईट वाटून घेत असून तपाच्या सामर्थ्यानें ते आमच्याहून श्रेष्ठ आहेत, अशी त्यांची समजूत आहे. तेव्हां आमचा हेतु त्यांना कळला असतां पुढचा परिणाम टाळण्याकरितां ते आम्हांला जाण्याला परवानगी देणार नाहींत. पांडवांना खिजविण्याखेरीज द्वैतवनामध्यें आमचें दुसरें कांहीं काम नाहीं, हें त्यांना माहीत आहे. त्या भीमार्जुनांना व त्या द्रौपदीला अरण्यामध्यें केविलवाणीं पाहून मला जो आनंद होईल तो पृथ्वी मिळाल्यानें सुद्धां होणार नाहीं. त्यांनीं माझें वैभव पाहिलें म्हणजे माझें जीवित सफल झालें असें मी समजेन. पण कोणत्या सबबीवर निघावें हेंच मला कळत नाहीं. तुम्हीच कांहीं तरी उपाय योजा.' तें ऐकून कर्ण दुर्योधनाला हासत हासत म्हणाला, 'मीं एक उपाय योजिला आहे. द्वैतवनामध्यें गोकुळें आहेत, त्यांची तूं फार दिवसांत पाहणी केली नाहींस. तर त्यांची पाहणी करण्याच्या मिषानें आपण जाऊं. यांत कांहीं बावगें नाहीं व राजाचीही ह्या कामाला तुला संमति मिळेल.' याप्रमाणें ठरवून ते सर्व जाऊन धृतराष्ट्राला भेटले. इतक्यांत ठरवून ठेवल्याप्रमाणें सुभंग नांवाचा गुराखी गाई बनांत जवळ असल्याची वर्दी देण्याकरितां आला. तेव्हां कर्ण धृतराष्ट्राला म्हणाला, 'महाराज, गाई तुर्त रमणीय प्रदेशामध्यें आल्या आहेत तरी त्यांचें टिपण करून वासरांनाही खुणा करण्याला ही वेळ बरी आहे. त्याचप्रमाणें मृगया करण्यालाही हे दिवस चांगले आहेत. ह्मणून आपण दुर्योधनाला परवानगी द्या.' धृतराष्ट्रानें उत्तर दिलें, 'बाळांनो, मृगया करणें चांगलेंच आहे; त्याचप्रमाणें गाईचें टिपणही केलेंच पाहिजे. पण कोणा तरी आपल्या खात्रीतल्या गुराख्याला पाठवून तें काम उरकून घ्यावें असें मला वाटतें. ते नरश्रेष्ठ पांडव तेथें जवळच आहेत असें मी ऐकतों. त्यांना तुम्हीं कपटानें जिंकले असून ते वनामध्यें कष्टांत दिवस काढीत आहेत. आतां धर्मराज कधीं रागावणार नाहीं, पण भीमसेन फार तापट आहे व द्रौपदी तर केवळ तेजाची मूर्ति आहे, गर्वानें किंवा मूर्खपणानें तुम्ही त्यांची कांहीं तरी कुरापत काढाल आणि ते तुम्हांला जाळून टाकतील. आम्ही पुष्कळ आहों, या घर्मेंडीवर जर तुम्ही असाल तर पुष्कळांचीही त्यांच्याजवळ डाळ शिजणार नाहीं. देवादिकांपासून अस्त्रविद्या मिळवून घेण्याच्या पूर्वीच अर्जुनानें सर्व पृथ्वी जिंकली आहे. तो आज सर्व दिव्यास्त्रानें संपन्न असल्यामुळें तुमचा फडशा उडविण्याला त्याला उशीर लागणार नाहीं. दीन झालेले पांडव आम्हांला काय करणार या घर्मेंडीवर माझें बोलणें न ऐकतां तुम्ही तेथें जाल तर तुम्ही संकटांत पडाल. ह्मणून विश्वासू लोकांना पाठवून गाईची नोंद करून घ्यावी व तुम्हीं तेथें स्वतः जाऊं नये, हें मला बरें दिसतें.' शकुनि ह्मणाला, 'युधिष्ठिर धर्मज्ञ असून बारा वर्षें वनवास करण्याची प्रतिज्ञा त्यानें भरसभेंत केली आहे. शिवाय मृगया करण्याला आम्ही फार आतुर झालों आहों. गाईंची नोंद करून आम्ही पांडवांची भेट सुद्धां घेणार नाहीं; येवढेंच नव्हे, तर ते राहिले असतील त्या प्रदेशाला सुद्धां आम्ही जाणार नाहीं.' हें शकुनीचें भाषण ऐकून धृतराष्ट्रानें निरुपाय होऊन दुर्योधनाला परवानगी दिली. नंतर दुर्योधन, कर्ण, शकुनि, व दुःशासन, सहस्रावधि राजस्त्रियांसह द्वैतवन पाहण्याकरितां निघाले. पुष्कळ पौरजनही आपापल्या बायकांसहवर्तमान निघाले. आठ हजार रथ, तीन हजार हत्ती, हजारों पायदळ आणि नऊ हजार घोडेस्वार त्यांच्याबरोबर होते. शिवाय ओझ्याच्या गाड्या, बाजे, वेश्या, वाणी, स्तुतिपाठक व शिकारीमंडळी हजारों होती. या सर्वांसहवर्तमान मजल दरमजल मुकाम करीत करीत, गोकुळाजवळ येऊन

त्यांनीं तळ दिला. तो प्रदेश रमणीय, जलांनीं व वृक्षांनीं संपन्न व अनेक प्रकारांनीं सोईस्कर असा होता. तेथें दुर्योधनानें शेंकडों हजारों गाईंची पहाणी केली, व त्यांच्या खुणा तपासल्या. नव्या वांसरांना खुणा केल्या व कामाला लावण्याच्या उपयोगीं असलेल्या वांसरांचीही नोंद केली.अगदीं लहान वांसरें किती आहेत हेंही त्यानें मोजलें. **तीन वर्षांचीं वांसरें किती आहेत** वगैरे सर्व त्यानें टिपलें. नंतर गोपाल व पौरजन यांसहवर्तमान देवाप्रमाणें त्या वनामध्यें ते मजा मारीत राहिले. त्या ठिकाणीं उत्तम नृत्य, वादन व गायन करणारे गोपाल, त्याचप्रमाणें उत्तम अलंकार घातलेल्या मुली दुर्योधनापुढें येऊन हजर झाल्या व राजानें त्यांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें द्रव्य, वस्त्र व अन्न वगैरे दिलें. नंतर त्या गोपालांनीं सर्वांनीं मिळून, तरस, रेडे, हरीण, गवे, अस्वल, डुकर इत्यादि जनावरें उठविलीं, व दुर्योधनानें त्यांना मारून आपल्या सेवकांकडून धरून आणिले. यथेच्छ दूध पीत व उपभोग्य वस्तूंचा उपभोग घेत रम्य वनें व उपवनें पहात पहात क्रमानें ते पुण्य अशा द्वैतवनाला येऊन पोंचले. मत्त अशा भ्रमरांनीं व मयूरवांनीं शब्दायमान, सप्तच्छद, सुपारी, बकुल इत्यादि वृक्षांनीं गच्च, अशा वनामध्यें मोठ्या वैभवामध्यें इंद्राप्रमाणें धर्मराज सुखांत राहिला होता. व या वेळीं राजर्षीला उचित असा सायस्त नांवाचा यज्ञ वनामध्यें ज्या रीतीनें करतां येणें शक्य होतें, त्या रीतीनें त्यानें आरंभिला होता. इकडे दुर्योधनानें आपल्या आज्ञाधारी सेवकांना त्याच्याभोंवतीं क्रीडामंदिरें तयार करण्याकरितां पाठविलें. ते द्वैतवनामध्यें शिरतात तोंच त्या वनाच्या तोंडाशींच गंधर्वांनीं त्यांना अटकाव केला. गंधर्वराज आपल्या गणांसहवर्तमान व अप्सरांसहवर्तमान त्या सरोवरामध्यें क्रीडा करण्याकरितां पूर्वीच आला होता. गंधर्वांनीं तें सर्व वन व्यापलेलें पाहून दुर्योधनाचे लोक दुर्योधनाकडे परत गेले. त्यांची ती हकीकत ऐकून घेऊन युद्धाची खुमखुमी असणाऱ्या आपल्या लोकांना त्यांना घालवून देण्यासाठीं दुर्योधनानें पाठविलें. त्यांचे पुढारी गंधर्वांकडे जाऊन म्हणाले, 'बलशाली दुर्योधन महाराज विहार करण्याकरितां येथें येत आहेत, म्हणून तुम्ही येथून निघून जा.' हें त्यांचें उर्मट भाषण ऐकून गंधर्व त्यांना तुच्छ करून म्हणाले, 'जो आम्हा देवांना आपल्या आज्ञांकितप्रमाणें आज्ञा करीत आहे, त्या मंदबुद्धि दुर्योधनाची बुद्धि गेली आहे. तुम्हांला आपल्या प्राणांची कांहीं पर्वा असेल तर मुकाट्यानें तुमच्या राजाकडे तुम्ही निघून जा; नाहीं तर आजच यमधर्माच्या घराची वाट धरावी लागेल.' हें ऐकून दुर्योधनाचे लोक परतले. गंधर्वांनीं याप्रमाणें आपल्या सैन्याला अटकाव केल्यामुळें संतापून दुर्योधन आपल्या सैन्याला म्हणाला, 'माझ्याशीं दिमाक करणाऱ्या या लोकांना आतांच्या आतां शिक्षा करा. मग तो प्रत्यक्ष इंद्र जरी सर्व देवांसह क्रीडा करीत असला तरी मागेंपुढें पाहूं नका. तेव्हां कौरवसैन्य सिंहनादानें दशदिशा दणाणून टाकून गंधर्वांवर चालून गेलें. प्रथम गंधर्वांनीं गोडीगुलाबीनेंच त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना हट्टाला पेटून आपल्याला न जुमानतां बनांत शिरतांना पाहून त्यांनीं जाऊन ती बातमी चित्रसेनाला दिली. तेव्हां क्षुद्र कौरवांना चांगली शिक्षा करण्याबद्दल चित्रसेनाची आज्ञा होतांच गंधर्व आपापलीं आयुधें घेऊन कौरवांवर तुटून पडले. तेव्हां दुर्योधनाचें सैन्य त्यांच्यापुढें दशदिशेला पळालें. कर्ण मात्र शत्रूला पाठ न दाखवितां शरवर्षाव करून तो येऊन पडणारा मोठा गंधर्वसैन्याचा ओघ थोपवून धरीत होता. त्यांचीं मस्तकें छाटून एका क्षणामध्यें त्यानें चित्रसेनाचें सैन्य नामशेष करण्याची वेळ आणिली. परंतु असा संहार चालला असतांही फिरून हजारों गंधर्वांनीं रणभूमि व्यापून जातांना पाहून कर्णाची पाठ राखण्याकरितां दुर्योधन, दुःशासन प्रभृति मंडळीही मोठ्या निकरानें लढूं लागली. अंगावर शहारे उत्पन्न करण्यासारखें त्यांचें तुंबळ युद्ध होत असतां शरपीडित गंधर्व जरा वठणीला आलेले पाहून चित्रसेनाला तें सहन न होतां तो आपल्या आसनावरून उठला व मायास्त्रांचें अवलंबन करून अनेक प्रकारें तो कौरवांबरोबर लढला. चित्रसेनाच्या त्या मायेनें कौरवसेना गांगरून गेली. एकेक कौरवाच्या सभोंवतीं दहा दहा गंधर्व जमून लढत होते. तेव्हां या विशेष नेटाच्या हल्ल्यानें घाबरून जाऊन ज्यांना ज्यांना

ह्मणून प्राणाची पर्वा होती ते ते रणांतून पळून गेले. एकटा कर्ण त्या ठिकाणीं पर्वताप्रमाणें न डगमगतां उभा होता. मग सर्वच गंधर्व त्याला मारण्याच्या हेतूनें त्याच्यावर तुटून जाऊन तरवार, पट्टे, शूल, गदा, इत्यादिकांचा त्यांनीं त्यावर प्रहार सुरू केला. कोणीं त्याच्या रथाचें जूं मोडलें, कोणीं ध्वज खालीं पाडला, कोणीं रथाचा कणा मोडला, कोणीं घोडे मारून पाडले, कोणीं सारथ्यांना मारलें, कोणीं छत्र, कोणीं रथगुप्ति, कोणीं बंधन तोडून गंधर्वांनीं त्या सर्वांचा फडशा उडविला. तेव्हां ढालतरवारीनिशीं कर्णानें रथांतून खालीं उडी घेतली व विकर्णाच्या रथांत बसून सुटका करून घेण्यासाठीं घोडे पिटाळले. आपल्या सर्व सैन्यानें पळ काढला असतां दुर्योधनानें शत्रूला पाठ न देतां गंधर्वाच्या त्या अफाट सैन्यावर मोठा शरवर्षाव चालूं ठेवला. तेव्हां त्याला ठार मारण्याच्या इराद्यानें गंधर्वांनीं त्याच्या रथाला गराडा घालून कोणीं जूं, कोणीं कणा, कोणीं ध्वज, यांचा अगदीं उच्छेद करून टाकला. दुर्योधन विरथ होऊन खालीं आला असतां महापराक्रमी चित्रसेनानें त्यावर तुटून जाऊन त्याला जिवंत पकडलें. इतरांनींही दुःशासन व इतर मंडळी, त्याचप्रमाणें राजस्त्रिया यांना विमानांत घालून त्यांसह ते निघाले. गंधर्वांनीं दाणादाण करून टाकलेल्या त्या धृतराष्ट्राच्या सैन्यानें पांडवांकडे येऊन 'कौरव व राजस्त्रिया यांना गंधर्व घेऊन चालले आहेत, त्यांना सोडवायाला चला,' ह्मणून दीन वाणीनें धर्मराजाची प्रार्थना केली. तेव्हां भीमसेन दुर्योधनाच्या वृद्ध अमात्यांना ह्मणाला, 'युद्धाची जय्यत तयारी करून मोठ्या कष्टानें जी गोष्ट आह्मांला घडवून आणावयाची होती ती आज अनायासें गंधर्वांनीं घडवून आणिली आहे. आड मार्गानें जाणाराला असेंच फळ मिळत असतें. कपटद्यूत करणाऱ्या दुर्योधनाचें तें कृत्य अगदीं निंद्य होतें. अनाथांचा जो द्वेष करतो त्याचा पाडाव तिसऱ्याकडूनच होत असतो, असें आह्मीं ऐकिलें आहे, तें आज गंधर्वांनीं हें अमानुष कृत्य करून खरें करून दाखविलें. आज या भूतलावर आमचें प्रिय करणारा कोणी तरी आहे हें आमचें भाग्यच. कारण आज आह्मी हातपाय बांधून निमुटपणें बसलों असतां त्यानें आमचा हा भार उतरला आहे. ऊन्ह, थंडी, वारा सोसून तपानें शरीर झिजवीत दुःखांत काळ काढीत असणाऱ्या आह्मांला हा मूढ आपल्या वैभवानें हिणवूं इच्छितो नव्हे काय? या अधर्मचारी दुष्टाप्रमाणें जे वागतात त्यांची खोड अशीच मोडावयाची! पांडव निरुपद्रवी आहेत या धर्मेडीवर ज्यानें हा तुह्मांला उपदेश केला त्यानें ही मोठी चूक केली?' याप्रमाणें मोठ्यानें भीमसेन बोलत असतां युधिष्ठिर ह्मणाला, 'बा भीमा, निष्ठुर भाषण करण्याची ही वेळ नव्हे. भयभीत होऊन आश्रयासाठीं ते आमच्याकडे आले आहेत. अशा संकटांत सांपडलेल्यांना तूं असें लावून बोलूं नयेस. **ज्ञातीमध्यें दुही असते, भांडणें असतात व हाडवैरही असतें. परंतु कुलधर्माचा कधीं लोप होत नाहीं. जेव्हां कोणी ज्ञातीबाहेरचा आपल्या कुलावर उठतो तेव्हां या उपरीनें केलेला हा अपमान भले लोक कधीं सहन करीत नाहींत.** दुर्योधनाला पकडल्यामुळें व स्त्रियांना परपुरुषांचा स्पर्श झाल्यामुळें आपल्या कुलाला बट्टा लागणार आहे. शरण आलेल्यांचें तसेंच कुलाचें संरक्षण करण्याकरितां बाबांनो, उठून तयार व्हा आणि दुर्योधनादिकांची सुटका करा. **जो ह्मणून क्षत्रिय आहे तो आपल्याला शरण आलेल्याचें त्याच्या शत्रूपासून रक्षण करीत असतो.** 'धांवा, धांवा,' ह्मणून तोंड पसरून शरण आलेल्या शत्रूला आधार देणारे फार विरळ असतात. वरदान, राज्यदान आणि पुत्रजन्म ह्या तीन गोष्टी एका बाजूला व संकटापासून शत्रूची मुक्तता करणें ही गोष्ट एका बाजूला ठेवून विचार केला असतां तीं तिन्ही याच्या तोडीला लागणार नाहींत. संकटांत सांपडलेला दुर्योधन तुझ्या बाहुसामर्थ्यानें आपलें जीवित परत मिळविण्याची इच्छा करतो यापेक्षां आणखी काय पाहिजे? मीं जर हा यज्ञ सुरू केला नसता तर मुळीं विचार न करतां धांवून गेलों असतों. सामोपायानेंच प्रथम त्याला सोडविण्याची खटपट करा. सामाचें कांहीं न चालेल तर स्वल्प पराक्रमानें त्याला सोडविण्याला झटा; व त्यांतही यश न येईल तर बाटेल तो उपाय करून त्याला सोडवा. हा यज्ञ सुरू असल्या-

मुळें येवढें सांगण्यापलीकडे माझ्या हातांत कांहीं उरलें नाहीं.' अशी धर्मराजाची आज्ञा होतांच सर्व पांडव दुर्योधनाला सोडविण्यासाठीं दिव्य आयुधांनिशीं निघाले. एका क्षणामध्यें निर्भयपणें ते त्या वनांत शिरले. त्या चार पांडवांना येतांना पाहून सर्व गंधर्वही परतले. धर्मराजाचें भाषण लक्षांत ठेवून प्रथम अर्जुन गोडीनें म्हणाला, 'बाबानों, माझा भाऊ दुर्योधन याला सोडा.' हें ऐकून गंधर्व हासून म्हणाले, 'बाबारे, आम्ही आज्ञा कायती एकाचीच ऐकतों. त्याच्या आज्ञेप्रमाणें आम्ही वागत आहों.' हें त्यांचें भाषण ऐकून अर्जुन फिरून म्हणाला, 'तुमच्या राजाचेंही हें कृत्य निंद्य आहे. परदारांना स्पर्श करणें योग्य नाहीं. तुम्ही यांना बऱ्या गोष्टीनें जर न सोडाल तर आपला पराक्रम दाखवून मी ह्यांना सोडवीन.' असें म्हणून गंधर्वांवर त्यानें तीक्ष्ण बाण सोडण्याला सुरवात केली. दोघांमध्यें तुंबळ युद्ध झालें. त्यावेळीं दिव्यास्त्रसंपन्न गंधर्व लखलखित बाण सोडीत अर्जुनाभोंवतीं जमले. इकडे चार पांडव, इकडे हजारों गंधर्व एकमेकांवर तुटून पडत होते. गंधर्वांवर शरवर्षाव होत असतां पांडवांच्या जवळ येण्याची त्यांची छाती होईना. त्यावेळीं खवळलेल्या अर्जुनानें त्या इरेस पेटलेल्या गंधर्वांवर दिव्यास्त्र सोडण्याला सुरवात करून हजारों गंधर्वांना यमपुरीची वाट दाखविली. भीम व नकुलसहदेव यांनींही इकडे अलौकिक कृत्य चालविलें होतें. दिव्यास्त्रानें याप्रमाणें फडशा उडत चालला असतां धृतराष्ट्रपुत्रांसह गंधर्वांनीं आकाशांत उड्डाण केलें. तेव्हां अर्जुनानें त्यांना बाणांनीं अगदीं घेरून टाकलें. तेव्हां पिंजऱ्यांत कोंडलेल्या पक्ष्यांप्रमाणें रागावलेले ते गंधर्व अर्जुनावर गदा, शक्ती, ऋष्टी इत्यादि आयुधांचा वर्षाव करूं लागले. अर्जुनानेंही भल्लबाण सोडून त्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे केले. डोकीं, हातपाय, इत्यादि वरून खालीं येत असतां दगडांचाच वर्षाव होत आहे कीं काय असें वाटत होतें. भूमीवरून युद्ध करणाऱ्या अर्जुनानें अंतरिक्षस्थ गंधर्वांना याप्रमाणें जर्जर करून सोडलेलें पाहून चित्रसेन अर्जुनावर गदा घेऊन धांवून आला. आपल्यावर तुटून पडणाऱ्या त्या चित्रसेनाच्या लोहमय गदेचे अर्जुनानें आपल्या बाणानें सात तुकडे केले. ह्याप्रमाणें गदेचे तुकडे झालेले पाहून चित्रसेन मायाविद्येनें लढूं लागला. त्यानें सोडलेल्या दिव्यास्त्रांचें अर्जुनानें दिव्यास्त्रानेंच निवारण केलें व शब्दवेधी कलेचा फायदा घेऊन अंतर्धान पावलेल्या चित्रसेनाला मारण्याचें अर्जुनानें मनांत आणिलें. तेव्हां चित्रसेन त्याला म्हणाला, 'मी तुझा सखा चित्रसेन आहें.' हें ऐकून युद्धांत पाडाव झालेल्या त्यावर सोडण्याला काढलेलें अस्त्र अर्जुनानें आवरलें. चित्रसेन, भीम, अर्जुन व नकुलसहदेव एकमेकांचें कुशल विचारून रथामध्यें बसले. तेव्हां अर्जुनानें चित्रसेनाला विचारिलें, 'दुर्योधनाला त्याच्या आप्तकुटुंबांसह कां बरें पकडलेंत.' चित्रसेन म्हणाला, 'मी स्वर्गांत असतां या दुष्टाचा हेतु तेथेंच मला कळला. तुम्ही वनामध्यें अनाथाप्रमाणें कष्ट सोशीत आहां, हें जाणून आपल्या वैभवानें हा तुम्हांला दीनास्थितींत भेटण्याकरितां येथें आला. ही त्याची कुबुद्धि जाणून 'त्याला जाऊन बांधून घेऊन ये,' म्हणून इंद्रानें मला आज्ञा केली, व त्याच्या आज्ञेनें येथें येऊन मी या खलाला बांधून इंद्राकडे घेऊन चाललों आहें. अर्जुन म्हणाला, 'धर्मराजाच्या आज्ञेनें माझ्यासाठीं तुम्ही याला सोडा.' हें ऐकून चित्रसेन म्हणाला, 'नेहमीं धर्मराजाशीं कपटानें वागणारा हा पापी सुटावा हें ठीक नाहीं. धर्मराज अजून याची करणी ओळखीत नाहीं. यापुढें तुझी जशी इच्छा असेल तसें.' नंतर ते सर्व धर्मराजाकडे येऊन एकंदर सर्व हकीकत त्यांनीं त्याला कळविली. धर्मराज दुर्योधनादिकांना सोडवून गंधर्वांची स्तुति करून म्हणाला, 'तुम्ही बलशाली व समर्थ असून या दुराचारी दुर्योधनाचा ज्ञातिबांधवांसह नाश केला नाहीं हें बरें झालें. तुमचा मजवर मोठा उपकार आहे. याला सोडल्यानें माझ्या कुलाला काळिमा लागला नाहीं.' नंतर गंधर्व पांडवांची आज्ञा घेऊन आनंदानें परत गेले; व ज्ञातीला यात्रमाणें दुष्कर कृत्य करून सोडवून पांडवही संतुष्ट झाले. तेव्हां युधिष्ठिर प्रेमपूर्वक दुर्योधनाला म्हणाला, 'बाबा, पुन्हां असें साहस करूं नकोस. साहस करणाऱ्यांना सुख मिळत नाहीं. आतां सर्व बंधूसहवर्तमान खुशाल नगराला परत जा. मनाला वाईट

बाटूनं घेऊं नकोस.' याप्रमाणें धर्मराजानें आज्ञा दिल्यावर त्याला अभिवादन करून एखाद्या विकलेंद्रिय रोग्याप्रमाणें लज्जेनें ज्याचें अंतःकरण फाटत चाललें आहे, असा तो दुर्योधन नगराला निघाला.

१०६. फटफजिती पावलेल्या दुर्योधनाचा आतताईपणा. (३. २४७–५४.)

धर्मराजानें जाण्याची आज्ञा दिल्यावर दुर्योधन कष्टी होऊन लज्जेनें तोंड खालीं घालून आपल्या नगराकडे निघाला असतां वाटेंत गवतपाणी पुष्कळ असलेल्या अशा एका रम्य प्रदेशांत त्यानें तळ दिला. राहूनें ग्रासून टाकलेल्या पहाटेच्या वेळच्या चंद्राप्रमाणें म्लान होऊन तो लखलखीत पलंगावर पडला असतां कर्ण त्याकडे येऊन म्हणाला, 'मित्रा, जिवानिशीं सुटून फिरून आपली गांठ पडली हें मोठें भाग्यच. कामरूपधारी गंधर्वांना तूं जर्जर केलेंस त्याबद्दल मी तुझें अभिनंदन करतों. मीं तर तुझ्या देखतच मागें पाय घेतला. आपल्या फाकलेल्या सैन्याला एकत्र जमवून थोपवून धरणें माझ्या हातून झालें नाहीं. मला बाणाच्या जखमाही पुष्कळ झाल्या. परंतु एकही जखम न होतां निकरानें लढून तुम्ही सुटून आला, हें मोठें अलौकिक कृत्य झालें ! हें कर्णाचें भाषण ऐकून अश्रूंनीं कंठ दाटून येऊन दुर्योधन म्हणाला, 'कर्णा, ढाऊक नसून तूं हें बोललास म्हणून मला या तुझ्या भाषणाचें वाईट वाटत नाहीं. मीं आपल्या तेजानें गंधर्वांना जिंकलें असा तुझा समज आहे. माझ्या बंधूंनीं व मीं पुष्कळ वेळ गंधर्वांशीं निकारानें युद्ध केलें व दोन्ही बाजूंच्या सैन्याचा पुष्कळ नाशही झाला. परंतु मायायुद्धामध्यें गंधर्व विशेष निष्णात असल्यामुळें आकाशांतून जेव्हां ते युद्ध करूं लागले तेव्हां आमचा जोर कमी होऊन आमचा पराभव झाला व शत्रूंनीं आम्हांला बांधलें. आमची बायकामुलें सेवकजन यांसहवर्तमान आकाशमार्गांतून ते आम्हांला घेऊन चालले. तेव्हां आमच्या कोणी सैनिकांनीं पांडवांपुढें जाऊन दांत विचकले. तेव्हां धर्मराजानें आपल्या भावांना गोडीगुलाबीनें सांगून आमच्या सुटकेकरितां पाठविलें. त्यांनीं येऊन चित्रसेनाची गांठ घेतली; तेव्हां अर्जुन जोरांत त्याला म्हणाला, 'आमच्या ह्या भावांना सोडून दे. पांडव जिवंत असतां असा त्यांच्या कुलाला बट्टा लागूं नये.' असें अर्जुन म्हणाला, तेव्हां सुखभ्रष्ट झालेल्या दीन पांडवांना आपण भेटावयाला जाऊं म्हणून बेत करून आपण जे बाहेर पडलों तोच भाव त्यानें त्याला कळविला. तेव्हां लज्जेनें भूमी शिरण्याला एखादें बिबर देईल तर बरें असें मला झालें. मग युधिष्ठिराकडे नेऊन आमचा दुष्ट हेतु त्याला सांगून आम्हांला जखडलेले तसेच त्याच्यापुढें उभे केले. **स्त्रियांच्या समोर अशा दीन स्थितींत मी आपल्या शत्रूंच्या तावडींत सांपडलों, यापेक्षां आणखी मानहानि काय पाहिजे?** ज्यांचा मी नेहमीं द्वेष करतों त्यांनीं मला दुर्बुद्धीला सोडून जीवदान दिलें! त्या रणामध्यें जर मला मरण आलें असतें तर तें अशा प्रकारानें जगण्यापेक्षां पुष्कळ बरें झालें असतें. गंधर्वांनीं मला मारलें असतें तर पृथ्वीवर माझी कीर्ति होऊन मला उत्तम लोक मिळाले असते. आतां पुढचा माझा बेत ऐक. मी प्रायोपवेशन करणार. तुम्ही सर्व नगराला परत जा. शत्रूचा मान कमी करणारा व मित्रांचा वाढविणारा असा असून, मित्रांना शोकद व शत्रूंना तोषद होऊन, शत्रूकडून फटफजिती पावून मी नगराला कधीं परत येणार नाहीं. नगराला येऊन मी तातालाा किंवा दुसऱ्या लोकांना काय सांगूं ? आजपर्यंत शत्रूच्या डोक्यावर व छातीवर पाय देऊन आपल्याच हातून आपल्या पायावर धोंडा मारून घेऊन आतां मी त्यांना तोंड कसें दाखवूं ? स्वभावदुष्ट लोकांना संपत्ति, विद्या व ऐश्वर्य मिळालीं असतांही तीं फार दिवस टिकत नाहींत. असें मीं करावयाचें नव्हतें. मूर्खपणानें मी आपण होऊनच हें अनुचित कृत्य करून संकटांत सांपडलों. म्हणून मी आतां प्रायोपवेशन करणार. जिवंत राहण्याची आतां सोय नाहीं. ज्याला शत्रूंनीं संकटांतून सोडविलें आहे असा कोण मानी पुरुष हतवीर्य होऊन शत्रूचा उपहास सहन करीत जिवंत राहील ? ' याप्रमाणें कष्टी होऊन तो दुःशासनाला म्हणाला, 'मीं तुला अभिषेक केला आहे असें समजून तूं राजा होऊन, कर्णसौबलां-

च्या साहाय्यानें ह्या भव्य पृथ्वीचें राज्य कर. भावांचें पालन कर. ते पूर्ण तुझ्या कह्यांत राहतील. ब्राह्मणांच्या ठिकाणीं दक्षतापूर्वक चांगलें वर्तन ठेव. बंधू व मित्र यांना तूं आधार दे. ज्ञातीकडे तुझें लक्ष असूं दे. गुरूंचें पालन कर, मित्रांना आनंद दे व शत्रूंना तापद हो. ' याप्रमाणें त्याच्या गळ्याला मिठी मारून त्यानें त्याला नगराकडे जाण्यास आज्ञा केली. तें ऐकून दुःशासनानें दीन होऊन घसा दाटून आल्यामुळें खोल स्वरानें ' कृपा कर, ' असें ह्मणून त्याच्या पायांवर डोकें ठेविलें व अश्रूंनीं त्याच्या पायांला न्हवडावून तो ह्मणाला, ' ही सर्व पृथ्वी फाटून जाईल व आकाशाचे तुकडे तुकडे होतील. सूर्य आपलें तेज टाकून देईल, चंद्र आपला शीतगुण सोडील, वायु आपला वेग टाकील, समुद्राचें पाणी आटेल व अग्नीमधील उष्णताही नाहींशी होईल; परंतु तुला सोडून ह्या राज्याचा मीं कधीं उपभोग घेणार नाहीं. आमच्या कुलांत तूंच शंभर वर्षे राज्य करणार. ' असें ह्मणून त्याचे पाय धरून तो मोठ्यानें रडूं लागला. त्यांना याप्रमाणें कष्टी पाहून कर्ण ह्मणाला, ' मूर्खपणानें सामान्य लोकांप्रमाणें असा शोक कां करतां ? शोक करणाराचा शोक कधींही संपणार नाहीं; व तो त्याचें संकटही दूर करीत नाहीं. ह्मणून शोक करण्यांत काय अर्थ आहे ? धैर्य धरा. असा वृथा शोक करून शत्रूला उगीच आनंद देऊं नका. तुम्ही सुटका केली यांत पांडवांनीं आपलें कर्तव्यच बजाविलें. राजाच्या राष्ट्रामध्यें राहणारानें राजाचें नेहमीं प्रिय करावें असेंच आहे. तुझ्याच रक्षणाखालीं ते या ठिकाणीं निर्भय रहात आहेत. असें असतां उगीच शोक करण्यांत काय अर्थ ? तूं प्रायोपवेशन करण्याला निघाल्यामुळें तुझे भाऊ कसे दीन झाले आहेत पहा ! ऊठ, त्यांना धीर दे. हा तुझ्या मनाचा चुबळेपणा आजपर्यंत मला ठाऊक नव्हता. एकाएकी तूं शत्रूच्या तावडींत गेलास, तेव्हां पांडवांनीं तुला सोडविलें, यांत त्यांनीं विशेष तें काय केलें ? सैनिकांनीं त्याचप्रमाणें राज्यांत राहणारांनीं सांगून ह्मणा अगर न सांगतां ह्मणा, राजाचें हित केलेंच पाहिजे. सेनानी युद्धामध्यें बहुतकरून शत्रुसैन्याची धांदल उडवून त्यांना पकडतात. पण क्वचित प्रसंगीं त्या धांदलींत तेही शत्रूच्या तावडींत जातात. तेव्हां त्यांना सोडविणें प्रत्येक राष्ट्रवासी जनाचें काम आहे. जे एखाद्या राजाच्या राष्ट्रांत रहात असतील, त्या सर्वांनीं मिळून राजहिताकरितां झटलें पाहिजे. आतां तूं सैन्यासहवर्तमान निघालास असतां प्रजा या नात्यानें ते तुझ्या मागून आले नाहींत हेंच नवल आहे; ते शूर, बलवान, व युद्धांत पाठ न दाखविणारे जरी असले, तरी ते पूर्वीच तुझे दास बनले असल्यामुळें त्यांनीं आतां तुला साहाय्य केलें आहे. तर त्यांच्या ह्या धैर्याकडे पहा. त्यांच्या सर्व वैभवाचा तूं उपभोग घेत आहेस, पण त्यांनीं कांहीं प्रायोपवेश केला नाहीं. ऊठ, तुझे हे भाऊ खिन्न झाले आहेत त्यांना धीर दे. माझें ऐकून असें जर करणार नाहींस तर मी येथेंच तुझ्या पायाची सेवा करीत राहीन. तुझ्याशिवाय माझ्यानें जिवंत राहवबणार नाहीं. प्रायोपवेशन केलें असतां तूं राजांच्या उपहासाला पात्र होशील. ' हें कर्णाचें भाषण संपल्यावर शकुनि ह्मणाला, ' दुर्योधना, कर्ण अगदीं बरोबर बोलला; आणि तूंही त्याचें हें ह्मणणें ऐकलेंच पाहिजेस. मीं मिळवून दिलेली लखलखीत संपत्ति तूं मूर्खपणानें घालवूं पहात आहेस. तुझी बुद्धि गेल्यामुळें आज तूं आपल्या प्राणावर उठला आहेस. मोठ्यांची गुरुकिल्ली तुला अद्यापि मिळाली नाहींसें दिसतें. होत असलेला आनंद अगर दुःख ज्याला आवरून धरतां येत नाहीं. त्याला वैभव प्राप्त झालें असतां सुद्धां पाण्यामधील कच्च्या मडक्याप्रमाणें त्याचा नाश होतो. फार भित्रा, फार दुबळा, चेंगट, चुका करणारा, व विषयासक्त अशा राजावर प्रजा संतुष्ट नसते. त्यांनीं हा तुझा सत्कार केल्यामुळें तुला हर्ष होण्याऐवजीं तुला शोक व्हावा याचेंच मला आश्चर्य वाटतें ! पार्थानें केलेल्या ह्या सत्कृत्यावर पाणी पाडूं नकोस. असा प्राण सोडू नकोस. खुष होऊन उपकाराची फेड कर **व पांडवांना राज्य देऊन यश व पुण्य मिळीव. हें कृत्य केल्यानें तूं कृतज्ञ ठरशील व वडिलोपार्जित राज्य त्यांना देऊन बंधुप्रेम जोडल्यानें तुला सुख होईल.** ' हें शकुनीचें भाषण ऐकून तोंड लहान करून आपल्या पायांवर पडलेल्या दुःशासनाला दुर्योधनानें उठविलें व बंधुप्रेमानें

त्याला आलिंगन देऊन प्रेमपूर्वक त्याचें मस्तक हुंगलें. परंतु इतक्यांत लज्जेनें फिरून त्याला घेरल्यामुळें कष्टी होऊन तो ह्मणाला, 'धर्माची, संपत्तीची, सुखाची, ऐश्वर्याची किंवा विषयोपभोगाची, कशाची आतां मला पर्वा नाहीं. उगीच माझ्या गळीं पडूं नका. नगराला परत जा.' हे त्याचे शब्द ऐकून ते ह्मणाले, 'तुझी वाट ती आमची. तुला सोडून आह्मीं तरी नगराला कसें जावें ? सुहृद्मंत्र्यांनीं पुष्कळ प्रकारें त्याचें मन वळविलें तरी त्याचा निश्चय ढळेना व दर्भासन पसरून उदकस्पर्श करून, वल्कलधारी असा तो स्वर्गेच्छेनें नियमस्थ होऊन व मौनधारण करून कांहीं हालचाल न करतां स्वस्थ बसला. त्याचा तो निश्चय पाहून स्वपक्षाचा नाश होणार असें पाहून पातालवासी दैत्यांनीं बृहस्पती व शुक्राचार्य यांनीं प्रणीत मंत्रांनीं यज्ञ सुरू केला. अग्नीमध्यें समंत्रक दुधाच्या आहुती देत असतां कर्मसिद्धि होऊन त्यापासून एक कृत्या बाहेर पडली व 'काय आज्ञा आहे,' ह्मणून तिनें विचारलें. तेव्हां दैत्यांना आनंद होऊन 'दुर्योधन प्रायोपवेशन करण्याला बसला आहे त्याला इकडे घेऊन ये,' ह्मणून त्यांनीं तिला आज्ञा केली. 'बरें' ह्मणून एका क्षणांत जाऊन राजाला पाताळीं घेऊन येऊन तिनें दानवांच्या पुढें उभें केलें. तेव्हां दानव अभिमानपूर्वक दुर्योधनाला ह्मणाले, 'अरे भरतकुलाच्या आधारभूत दुर्योधना, नेहमीं शूरांचा व थोरांचा तुला पाठिंबा आहे. तूं अमें साहस काय आरंभिलें आहेस. आत्मघाती अधोगतीला जाऊन यशाला मुकून लोकनिंदेला पात्र होतो. आपल्या हेतूला आड येणाऱ्या, अशा मुळाशीं घाव घालणाऱ्या कृत्यांत तुझ्यासारखे शहाणे पडत नाहींत. धर्म, अर्थ, सुख, यश व पराक्रम या सर्वांचा घात करणारा वे शत्रूचा हर्ष वाढविणारा असा हा विचार सोडून दे. तुझें दिव्य शरीर लक्षांत घेऊन धीर धर. पूर्वी आह्मीं मोठें तप केल्यामुळें शंकरापासून आह्मांला तूं मिळाला आहेस. तुझा वरचा भाग वज्रसमूहानें निर्माण झाला असून अभेद्य अशा शस्त्रास्त्रानें खालचा भाग निर्माण झाला आहे. त्याचप्रमाणें पार्वतीनें पुष्पमय व रूपानें स्त्रियांचें मन हरण करणारें असें तुझें उत्तम रूप बनविलें आहे. याप्रमाणें तूं ऐश्वर्यसंपन्न व दिव्यदेहधारी असून सामान्य मानव नाहींस. भगदत्त आदिकरून दिव्यास्त्र जाणणारे वीर्यशाली क्षत्रिय तुझ्या शत्रूंचा कडशा उडवितील; तर उगीच खिन्न होऊं नकोस. तुला भीति मुळींच नाहीं. तुझ्या साहाय्याकरितां पृथ्वीवर दानव उत्पन्न झाले आहेत. ते भीष्म, द्रोण, कृप इत्यादिकांच्या शरीरांमध्यें प्रवेश करतील. त्यायोगानें तें दयेला बाजूला ठेवून ना पुत्रांना, ना भावांना ना बापांना, ना बंधूंना, ना शिष्यांना, ना ज्ञातींना, ना मुलांना, ना वृद्धांना, युद्धांत शिल्लक ठेवतील. दानवांचा शरीरामध्यें प्रवेश झाल्यामुळें निरुपायानें निःस्नेह बनून ते परस्परांना मारतील. ते पांच पांडवही देवसाहाय्यांनें यांच्याशीं युद्ध करून यांचा नाश करतील. आतां अर्जुनासंबंधानें जी भीति तुला पडली आहे, त्या बाबतींत सुद्धां त्याच्या नाशाचा उपाय आह्मीं करून ठेविला आहे. मेलेल्या नरकासुराचा आत्मा कर्णामध्यें शिरला आहे; तो पूर्व वैर स्मरून कृष्णार्जुनांशीं युद्ध करील, आणि तो विक्रमशाली कर्ण अर्जुनाला रणामध्यें जिंकील. हें जाणून अर्जुनाचें रक्षण करण्याकरितां इंद्र कपटानें कर्णाचीं अंगचीं कवचकुंडलें हरण करील; ह्मणून संसप्तक नांवाचे हजारों राक्षस आह्मीं अर्जुनाच्या वधाकरितां उत्पन्न केले आहेत. निःसपत्न होऊन तूं ह्या पृथ्वीचा उपभोग घेशील. धैर्य खचूं देऊं नकोस. तुझ्यामागें आमची बाजू पडेल ह्मणून मनांत भलतासलता विचार आणूं नकोस. देवांना आधार पांडवांचा तसा आह्मांला काय तो आधार तुझा आहे.' असें ह्मणून त्याला धीर देऊन त्याची बुद्धि त्यांनीं फिरवून त्याला जाण्याला आज्ञा दिली. तेव्हां पूर्वी ज्या ठिकाणीं तो प्रायोपवेशाला बसला होता तेथें त्याला आणून सोडून ती कृत्या तेथच्या तेथें गुप्त झाली. ती गेल्यावर दुर्योधनाला तें सर्व स्वप्नाप्रमाणें भासूं लागलें. आपण पांडवांना जिंकूं व कर्ण आणि संसप्तक हे अर्जुनाला मारतील, असें त्याचे मनानें घेतलें. कर्णामध्येंही नरकासुराचा प्रवेश झाल्यामुळें अर्जुनाच्या वधाविषयीं भयंकर विचार त्याच्या मनांत घोळूं लागले व भीष्मद्रोणादिकांचेंही मन पांडवांविषयीं बदललें. इकडे उजाडतांना कर्ण दुर्योधनाजवळ जाऊन हात जोडून ह्मणाला, 'राजा,

मनुष्य मेल्यावर त्याला शत्रु जिंकतां येत नाहीं. तो जिवंत राहील तरच त्याला सुखाची आशा. शोक करण्याची आज वेळ नाहीं. ऊठ, स्वसामर्थ्यानें शत्रूंना जर्जर करून सोड. अर्जुनाची जर तुला भीति वाटत असेल तर वचन घे कीं मी त्याला रणामध्यें मारीन. पार्थाना तुझें गुलाम करीन. ' हें कर्णाचे भाषण ऐकून व दैत्यांच्या बोलण्याची आठवण होऊन दुर्योधन सर्वांसह हास्तिनापुराला परतला.

१०७ कर्णाचा दिग्विजय. (३.२५३.५९)

दुर्योधनप्रभृति मंडळी हास्तिनापुराला परत आल्यावर एकेवेळीं ते सभेंत बसले असतां भीष्म दुर्योधनाला ह्मणाले, ' दुर्योधना, तूं तपोवनाला जातेवेळींच तुझें जाणें मला पसंत नाहीं ह्मणून मीं तुला सांगितलें होतें. परंतु तुला माझें भाषण रुचलें नाहीं. तेथें सर्व सैन्यासहवर्तमान तूं शत्रूच्या तावडींत सांपडलास, तेव्हां कर्ण रणामधून पळून गेला. स्वतःचा, त्या दुर्मति कर्णाचा, त्याचप्रमाणें त्या महात्म्या पांडवांचा पराक्रम तुला आतां दिसून आलाच आहे. कर्ण धनुर्विद्येंत, शौर्यांत व नीतिमत्तेंत पांडवांच्या चवथ्या हिशानेंही बरोबरीला लागणार नाहीं. ह्मणून ह्या कुलाच्या अभ्युदयार्थ तूं पांडवांशीं सख्य करावेंस हेंच मला योग्य दिसतें. ' हें ऐकून दुर्योधनाला हासतांना पाहून भीष्म वाईट वाटून आपल्या घराकडे निघून गेले. ते गेल्यावर कर्ण दुर्योधनाला ह्मणाला, ' हे भीष्म नेहमीं आपली निंदा करून पांडवांची स्तुति करतात. तुझ्या संबंधाच्या त्यांच्या द्वेषामुळें ते माझाही द्वेष करतात. हे त्यांचे बाग्बाण मला आतां सोसणार नाहींत. मला परवानगी दे, ह्मणजे सैन्य घेऊन जाऊन चार पांडवांनीं मिळून जी पृथ्वी जिंकली ती मी एकटा जिंकून येतों; ह्मणजे दुर्बुद्धि भीष्माना माझें सामर्थ्य दिसून येईल. यशाची तूं काळजी करूं नकोस. ' हें कर्णाचें भाषण ऐकून मोठ्या प्रेमळ अंतःकरणानें दुर्योधन त्याला म्हणाला, ' मी आज धन्य आहें. परमेश्वराची आज मजबर कृपा आहे म्हणूनच तुझ्यासारखा बलशाली आज माझें हित करण्याला एका पायावर तयार आहे. तुला वाटेल तेव्हां तूं दिग्विजयाची तयारी कर. ' याप्रमाणें दुर्योधनानें आज्ञा दिल्यावर कर्णानें स्वारीची तयारी करविली. व शुभ नक्षत्रावर तो दिग्विजयाला निघाला. प्रथम द्रुपद नगराला येऊन त्याला त्यानें वेढा दिला व तुंबळ युद्ध करून सोनें, रुपें व नाना प्रकारचीं रत्नें त्यापासून करभार घेतला. पुढें उत्तर दिशेला जाऊन भगदत्तादि अनेक राजांना जिंकून तो हिमाचल पर्वतावर चढला. तेथील राजांना मांडलिक करून नेपाळामध्यें जे राजे होते त्यांना त्यानें जिंकलें. नंतर पर्वतावरून खालीं येऊन पूर्व दिशेकडील अंग, वंग, कलिंग, शुंडिक इत्यादि राजांना त्यानें जिंकलें. केवळ मृत्तिकेनें संपन्न अशी वत्सभूमी त्यानें जिंकल्यावर मोहन, पत्तन, त्रिपुरी इत्यादि देश हस्तगत करून तो दक्षिण दिशेला आला. तेथें रुक्मिण राजाशीं त्याचें तुंबळ युद्ध झालें. रुक्मिणानें क्षत्रियाला साजेलसें निकराने युद्ध केल्यावर त्याला विघ्न न करतां प्रेमपूर्वक त्यानें त्याला पुष्कळ सोनें करभार ह्मणून दिलें. पुढें पांड्य, शैल, केरल, नील, शिशुपाल पुत्र यांना व त्यांच्या आजूबाजूच्या राजांना जिंकून तो पश्चिम दिशेला गेला. तेथें बर्बर, म्लेंच्छ, आटवीक, इत्यादिकांना जिंकून विपुल संपत्ति घेऊन तो हास्तिनापुराला परत आला. दुर्योधन सामोरा जाऊन त्या रणशाली कर्णाचा जयजयकार करून त्याला ह्मणाला, 'जें काम भीष्मांच्या, द्रोणांच्या, कृपांच्या, अथवा बाह्लिकांच्या हातून झालें नाहीं तें आज तूं केलें आहेस. फार बोलण्यांत काय अर्थ आहे? कर्णा, तुझ्यामुळेंच आज मी सनाथ आहें. पांडव सोळाव्या हिशानें सुद्धां तुझ्या तोडीला लागणार नाहींत. आंत जाऊन तातांची व मातेची भेट घे. याचवेळीं नगरामध्यें सत्कार व धिक्काररयुक्त शब्द कानीं येऊं लागले. कोणी कर्णाची स्तुति तर कोणी निंदा करीत होते, व कोणी कांहींच न करतां स्वस्थ होते. कर्णानें त्या अलोट संपत्तीनिशीं अंतर्गृहांत जाऊन धृतराष्ट्र व गांधारी यांचे पाय पुत्रप्रमाणें घट्ट धरले. धृतराष्ट्रानेंही त्याला आलिंगन दिलें. या वेळपासून दुर्योधनाला व शकुनीला कर्णाच्या हातून पांडवांचा पराभव झाला असें वाटूं लागले.

१०८. दुर्योधनाचा वैष्णव यज्ञ.
(३. २५५-५७)

एकेवेळीं कर्ण दुर्योधनासहवर्तमान बसला असतां 'दुर्योधना, आज ही निःसपत्न पृथ्वी तुझी झाली आहे, आतां इंद्राप्रमाणें तूं हिचें पालन कर,' असें कर्णाचें भाषण ऐकून दुर्योधन ह्मणाला, 'ज्याचा साहाय्यकर्ता तूं असून ज्याच्यावर तुझें निःसीम प्रेम आहे त्याला दुर्लभ कांहींच नाहीं. परंतु पांडवांचा तो मोठा राजसूय यज्ञ करण्याची मला फार उत्कट इच्छा झाली आहे. तेवढें तूं घडवून आणशील तर पहा.' हें ऐकून कर्ण ह्मणाला, 'आज सर्व राजे तुझ्या अंकित आहेत. ब्राह्मणांना बोलावून यज्ञाची सर्व तयारी करीव आणि तो महायज्ञ उरकून घे.' हें कर्णाचें भाषण ऐकून पुरोहिताला बोलावून त्याला त्यांनीं हें कळविलें, तेव्हां तो ह्मणाला, 'युधिष्ठिर जिवंत आहे तोंपर्यंत ह्या कुलांत हा यज्ञ दुसऱ्याला करतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें दीर्घायु तुझे वडीलही जिवंत आहेत. या दृष्टीनेंही हें धर्माविरुद्ध आहे. परंतु राजसूयासारखाच दुसरा एक मोठा यज्ञ आहे. राजांनीं करभार दिलेल्या संपत्तीनें एक नांगर तयार करवून त्यानें यज्ञमंडपाची जागा नांगरून साफ करून घे. नंतर ती पवित्र करून त्यांत यथेच्छ अन्नाचा सांठा कर. मग त्या ठिकाणीं वैष्णव नांवाच्या यज्ञाला सुरवात करतां येईल. पुरातन विष्णुखेरीज हा यज्ञ कोणीं केलेला नाहीं व हा राजसूय यज्ञाच्या तोडीचा आहे. ह्यामध्यें कांहीं विघ्न येणार नाहीं व तुझीही इच्छा सफल होईल.' तेव्हां राजानें कामगार लोकांना सर्व तयारी करण्याम आज्ञा दिली. सर्व तयारी झाल्यावर यज्ञाची सुरवात होऊन त्या ठिकाणीं दुर्योधन यथाशास्त्र व यथाविधि यज्ञदीक्षा घेऊन बसला. राजांना व ब्राह्मणांना निमंत्रणाकरितां शीघ्रगामी दूत चोहोंकडे पाठविले. तेव्हां त्यांपैकीं एकाला दुःशासनानें 'द्वैतवनांत जाऊन दुष्ट पांडवांना निमंत्रण कर,' ह्मणून सांगितलें. त्यानें जाऊन 'स्वबाहुवीर्यार्जित संपत्तीनें दुर्योधन महाराज यज्ञ करताहेत, तुह्मांला बोलावण्यासाठीं मला पाठविलें आहे,' असा निरोप त्यांना सांगितला. तेव्हां युधिष्ठिर ह्मणाला, 'हा श्रेष्ठ यज्ञ करून दुर्योधन पूर्वजांची कीर्ति वाढवीत आहे हें ठीकच आहे. आह्मी सुद्धां आलों असतां परंतु नाइलाज आहे. तेरा वर्षांचा करार मोडतां येत नाहीं.' यावर भीमानें 'तेरा वर्षांनंतर रणसंग्रामध्यें शस्त्रास्त्रांनीं पेटलेल्या अग्नीमध्यें त्याची आहुति देण्याला ते येतील व मीही त्याचवेळीं शांत होईन, असें दुर्योधनास सांग,' ह्मणून सांगितलें. इकडे नाना देशांहून ब्राह्मण व राजे हास्तिनापुराला आले. त्यांचा यथाविधि व यथाक्रम सत्कार होऊन अन्नाच्या योगानें सर्व तृप्त झाले. नंतर सर्व राजांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें आहेर देऊन निरोप दिला; व कौरव नगरामध्यें शिरले. तो नित्यवैभवशाली दुर्योधन नगरांत प्रवेश करीत असतां भाट स्तुतिपाठ गात होते व प्रजाजन लाह्या व चंदनाची बुकणी त्यावर उधळून तो यज्ञ निर्विघ्न शेवटास गेल्याबद्दल आनंद प्रदर्शित करीत होते. कांहीं छिद्रान्वेषी होते ते 'धर्मराजाच्या यज्ञाशीं ताडतां हा त्याच्या सोळाव्या हिशानें सुद्धां बरोबरीला लागणार नाहीं,' असें ह्मणत होते. सुहृद् होते ते 'ह्या यज्ञानें सर्वांवर कडी केली.' असें ह्मणत होते. याप्रमाणें लोकांचे धन्यवाद ऐकत दुर्योधन नगरांत शिरून मुख्य आसनावर जाऊन बसल्यावर कर्ण त्याला ह्मणाला, 'हे भरतश्रेष्ठा, हा यज्ञ तर शेवटास गेला, आतां पांडवांना युद्धांत मारून राजसूय यज्ञ तूं करशील तेव्हां फिरून तुझें अभिनंदन करण्याची मला पाळी येईल.' यावर 'तूं ह्मणतोस तें ठीक आहे, पण आतां ती पाळी केव्हां येणार कोणाला ठाऊक,' असें दुर्योधनाचें चिंतापर भाषण ऐकून कर्ण फिरून ह्मणाला 'माझी प्रतिज्ञा ऐक. अर्जुन मेला नाहीं तोंपर्यंत मी आपले पाय रगडून घेणार नाहीं, मांस भक्षण करणार नाहीं, मद्य प्राशन करणार नाहीं, व कोणीही याचना करण्यास आला असतां त्याला नाहीं ह्मणणार नाहीं.' ही कर्णाची प्रतिज्ञा जेव्हां युधिष्ठिराच्या कानावर गेली तेव्हां त्याचें तें अभेद्य कवच व अलौकिक वीर्य मनांत येऊन त्याच्या मनाला चिंता उत्पन्न झाली.

१०९ मुद्गलकथा. (३. २५८–६१).

याप्रमाणें पांडव द्वैतवनांत रहात असतां एके रात्रीं तेथील मृग येऊन युधिष्ठिराला स्वप्नांत ह्मणाले, 'तुह्मीं पराक्रमाशाली वीरांनीं आमचा मारून फडशा चालविल्यामुळें आह्मी आतां केवळ बीजशेष उरलों आहों. तेव्हां आतां आमच्यावर दया करून आमचा यापुढें नाश करूं नका.' निजून उठल्यावर ह्या मृगवाणीची आठवण होऊन युधिष्ठिर आपल्या बंधुवर्गासह मरुभूमीचें शिरस्थान जें तृणबिंदुसर तिकडे राहण्याकरितां गेला. त्याठिकाणीं ते रहात असतां अकरावें वर्ष संपलें. प्रसंगोपात येऊन पडलेलीं संकटें ते निमूटपणें सहन करीत होते. परंतु युधिष्ठिराला मात्र आपल्या कृतकर्माचें हें फळ आपल्या भावांना मोसावे लागत आहे ह्मणून हृदयांत शल्य ठेवल्याप्रमाणें सुखानें कधीं झोंप येत नव्हती. कपटद्यूताचा दुष्टपणा व कर्णाचें निकराचें भाषण मनांत आणून दीर्घोच्छ्वास टाकीत क्रोधरूपी विषाचें संगोपण करीत तो दिवस काढीत होता. इतर मंडळी त्याकडे नजर देऊन आतां थोडेच दिवस उरले आहेत असें समजून ते असह्य क्लेश सहन करीत होती. अशामध्यें महायोगी व्यास त्यांची भेट घेण्याकरितां आले. वन्यफलाहारावर असणाऱ्या त्यांना कृश झालेले पाहून सद्गदित अंतःकरणानें ते ह्मणाले, 'बा धर्माचरण करणाऱ्यामध्यें श्रेष्ठ युधिष्ठिरा, क्लेश भोगून तपाचरण केल्याशिवाय मनुष्याला कोठेंच सुख मिळत नाहीं. सुखदुःख हीं पुरुषाला आळीपाळीनें मिळतात. सतत सुखच कोणाला मिळत नाहीं. ब्रह्मज्ञानानें शहाणा मनुष्य वैभवकाल व विपत्तिकाल ओळखून आनंदी अगर कष्टी होत नाहीं. मिळणारें सुख तसेंच मिळणारे दुःखही अनुभविलें पाहिजे. बी पेरून बसलेल्या शेतकऱ्याप्रमाणें वेळीं जें हातीं पडेल त्यावर संतुष्ट असावें. तपाहून उत्कृष्ट कांहीं नाहीं; आणि ब्रह्मही तपापासूनच प्राप्त होतें. सत्य, सरलता, कोप नसणें, आत्मस्व दुसऱ्याला वांटून देणें, दम, शम, असूया, अहिंसा, शौच व इंद्रनिग्रह हीं मनुष्याला पावन करणारीं आहेत. अधर्मप्रिय मूर्ख लोकांचा नीच योनि प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न असतो आणि ती दुःखद योनि मिळाली असतां त्यापासून त्यांना कधीं सुख होत नाहीं. येथें केलेल्या कर्माचें फल परलोकीं उपभोगण्यास मिळतें. ह्मणून तप व नियम यांमध्यें शरीर झिजवावें. अतिथींचा आदरसत्कार करून योग्य कालीं संतोषवृत्तीनें यथाशक्ति दान करावें. सत्य बोलणाराला सुखाचें आयुष्य घालवावयाला सांपडतें. ज्याचें मन आपल्या स्वाधीन आहे त्याला आपली संपत्ति दुसऱ्याच्या ताब्यांत गेली असतां दुःख होत नाहीं. जो आपल्या प्राप्तीचा दुसऱ्यांशीं मिळून उपभोग घेतो व जो मोठा दाता आहे त्याला सर्व उपभोग व सुख मिळतात. तो हिंसापराङ्मुख असून त्याला आरोग्यप्राप्ति होते. मानाई लोकांना मान देणारे लोक मोठ्या कुलामध्यें जन्माला येतात आणि जितेंद्रियांवर संकट कधीं पडत नाहीं. चांगल्या गोष्टींकडे ज्याचा कल आहे तो मेला असतांही चांगली बुद्धि घेऊनच पुन्हां जन्माला येतो.' युधिष्ठिर ह्मणाला, 'भगवन्, दान, धर्म व तप यांमध्यें दुष्कर कोणचें व परलोकीं हितावह कोणतें?' व्यासांनीं उत्तर दिलें, 'बा युधिष्ठिरा, दानाहून दुष्कर या जगामध्यें कांहीं नाहीं. मनुष्याला पैशाची हांव फार असते व तो तो मोठ्या कष्टानें मिळतो. पैशाकरितां प्रिय अशा प्राणाचीही पर्वा न करतां लोक समुद्रांत अगर घोर वनांत देखील शिरतात. कोणी शेती करतात, कोणी गाई पाळतात, कोणी बंदे गुलाम होऊन देशोधडीं भटकतात. ह्मणून अशा दुःखानें मिळविलेला पैसा हातांतून सोडणें कठिण असल्यामुळें दानापेक्षां दुष्कर मला कांहीं वाटत नाहीं. आतां त्यांत न्यायानें मिळविलेला पैसा देशकाल पाहून योग्य मनुष्याला दान करावा. अन्यायार्जित द्रव्यानें जो दानधर्म होतो त्यापासून दान करणाराचें महाभयापासून रक्षण होत नाहीं. शुद्ध मनानें योग्य मनुष्याला स्वल्प दान केलें असलें तरी तें परलोकीं अनंत फलदायक होतें. याबद्दल मुद्गलांची गोष्ट मी तुला सांगतों. कुरुक्षेत्रामध्यें सत्यवाक्, कोणाची असूया न करणारे, जितेंद्रिय, धर्मात्मे मुद्गल ऋषी जमिनींवर पडलेले धान्यकण वेंचून त्यावर रहात असत. ते इष्टी करून सर्व कुटुंबासह पंधरा दिवसांनीं एकदां अमावास्येला व पौर्णिमेला देवता व अतिथि यांचें संतर्पण करून अवशिष्ट अन्न खाऊन रहात. प्रत्येक पर्वाला त्यांनीं

दिलेला हविर्भाग इंद्रादि देव प्रत्यक्ष येऊन घेत. निर्मत्सर भावानें याप्रमाणें ते अन्नदान करीत असल्यामुळें त्या अन्नाची वृद्धि होऊन प्रसंगीं शंभर शंभर ब्राह्मण देखील त्यावर जेवीत. दिगंबर दुर्वास ऋषींनीं हा मुद्गल ऋषींचा वृत्तांत ऐकून मुंडन करून उन्मत्त वेष धारण केला व त्यांकडे जाऊन निष्ठुर वाणीनें 'मी भोजनासाठीं आलों आहे,' असें ते ह्मणाले. मुद्गल ऋषींनीं त्यांचें स्वागत करून पाद्यआचमनीयार्घ्यादि सत्कार दिल्यानंतर त्या क्षुधितांना श्रद्धापूर्वक अन्न दिलें. तेव्हां तें मिष्टान्न सर्वच दुर्वासांनीं खाऊन टाकलें. आणि जें कांहीं अवशिष्ट राहिलें तें अंगाला फासून निघून गेले. दुसऱ्या पंधरवड्यालाही त्यांनीं असेंच केलें. बिचारे मुनी कांहीं खावयाला न मिळतां धान्यकण वेंचित, तरी त्यांच्या मनाला राग ह्मणून शिवला नाहीं. राग, मत्सर, अवमानबुद्धि, मनाची चलबिचल इत्यादि विकारांनीं त्यांच्या कुटुंबांतील कोणालाच स्पर्श केला नाहीं. ह्याप्रमाणें दुर्वास ऋषी सहा वेळ आले; परंतु मुद्गलांच्या मनामध्यें विकृति कधींच दिसून आली नाहीं. ह्या शुद्धसत्व मुनींचें मन त्यांना अगदीं निर्मल दिसून आलें. तेव्हां प्रीतियुक्त होऊन ते मुद्गल ऋषींना ह्मणाले, 'मत्सरभाव न धरतां दान करणारा तुझ्यासारखा दाता मीं पाहिला नाहीं. भुकेनें, धर्म, धैर्य, हीं सर्व बाजूला राहतात. जिभेचा ओढा नेहमीं रसाकडे असून तिची त्याकडे धांव असावयाची. प्राण तरी आहारावरच, व हें मन तर निग्रह करण्याला कठीण व चंचल आहे. मनाची व इंद्रियांची पूर्ण एकमता हेंच तप. श्रमानें मिळविलेलें शुद्ध अंतःकरणानें दुसऱ्याला देणें फार कठीण काम आहे. पण तो गुण तुझ्याठिकाणीं आज पूर्ण दिसून येत आहे. मी फार संतुष्ट झालों आहे. इंद्रियावर जय, धैर्य, समविभागशीलता, दम, शम, दया, इत्यादि गुण तुझ्यांत दिसून आले. तूं आत्मकर्मानें सर्व लोक जिंकून उत्तम गति मिळविली आहेस. तूं आपल्या शरीरासह स्वर्गाला जाशील.' असें दुर्वास ऋषी ह्मणताहेत तोंच देवदूत विमान घेऊन येऊन मुद्गलांना ह्मणाले, 'आपण आपल्या कर्मानें हें मिळविलें आहे, यांत बसा. आपण मोठी सिद्धि मिळविली आहे.' तेव्हां मुद्गल ऋषी ह्मणाले, 'स्वर्गामध्यें राहणाऱ्यांना सुख काय आहे, दुःख काय आहे, हें तुह्मी मला सांगा. भल्याबरोबर सात पावलें गेलें असतां मैत्री जुळते असें ह्मणतात. तर त्या मैत्रीच्या नात्यानें मी तुह्मांला विचारतों. ह्या गोष्टीसंबंधानें जें खरें व हितकारक असेल तें मनांत कांहीं किंतु न आणितां मला सांगा. तुमच्या तोंडून तें ऐकल्यावर मला जें करावयाचें तें मी करीन.' देवदूत ह्मणाले, 'महर्षे, आपली बुद्धि फार उदार आहे. स्वर्गसुख पुढें चालून आलें असतां तो अलभ्य लाभ मानावयाचा सोडून त्यासंबंधानें आपण विचक्षणा चालवितां! स्वर्गलोक वर आहे. विमानांतून बसून उत्तम मार्गानें भले लोक त्याठिकाणीं संचार करीत असतात. ज्यांनीं तप केलें नाहीं, अगर मोठमोठे यज्ञ केले नाहींत, किंवा जे असत्यवादी किंवा नास्तिक आहेत, त्यांचा तेथें कधीं प्रवेश होत नाहीं. जितेंद्रिय धर्मात्मे व संग्रामभूमीला शोभा देणारे वीर हेच त्यांच्या सुकृतानें या पुण्यवान लोकाचे वांटेकरी होतात. येथें राहणाऱ्यांचे अनेक निरनिराळे उज्ज्वल लोक आहेत. त्याठिकाणीं तेहतीस हजार योजनें विस्तृत सुवर्णाचा मेरु पर्वत आहे; व अनेक नंदनादि पवित्र विहारस्थानें आहेत. भूक, तहान, ग्लानि, थंडी, ऊन्ह, भीति, इत्यादि विकार त्याठिकाणीं बाधा करीत नाहींत. चोहोंकडे मनोहर व शरीराला सुखावह सुगंध सुटत असतो. त्या ठिकाणीं कर्णमधुर शब्द कानीं पडतात. स्वकर्मानें पुरुषाची गति त्याठिकाणीं कर्मजन्य शरीरानें होऊन तो स्वकर्माच्या फलांचा तेथें अनुभव घेतो. व तेथें राहणाऱ्यांचीं शरीरें तेजोमय असतात. अंगाला घाम किंवा दुर्गंधी सुटत नसून, तेथें मलमूत्राची बाधा नाहीं व वस्त्राला धूळ चिकटत नाहीं. दिव्य गंधयुक्त अंगावर घातलेल्या माळा कधीं सुकत नाहींत. ईर्षा, शोक, श्रम, मोह, जरा यांपासून दूर राहून, स्वर्ग मिळविलेले लोक स्वर्गसुखांत असतात. या स्वर्गलोकाच्या वरही उत्तम गुणांनीं युक्त असे निरनिराळे दिव्य लोक आहेत. त्यांवर तेजोमय व कल्याणप्रद असे ब्रह्मलोक आहेत. ते स्वकर्मानें पुनीत झालेल्या ऋषींना मिळतात. त्याच्यावर ऋभु नामक देवता राहतात. त्याच्याही वर

सर्व मनोरथ परिपूर्ण करणारे दैदीप्यमान लोक आहेत. त्याठिकाणीं स्त्रीविषयक ताप व दुसऱ्याच्या वित्तासंबंधानें मत्सर नसतो. ते आहुतीवरही रहात नाहींत अगर अमृतही प्राशन करीत नाहींत. त्यांना दिव्य शरीरें असून औपाधिक शरीरें नसतात. यांना सुखाची पर्वा नसून कल्पांच्या उलाढालीशीं यांचा कांहीं संबंध नाहीं. जरा, मृत्यु, हर्ष, प्रीति, राग, द्वेष इत्यादि विकार यांना होत नाहींत. देवांनासुद्धां हे लोक मिळविण्याची इच्छा असून ते मिळणें त्यांना दुर्घट असतें; व कामी पुरुषाचा तर या ठिकाणीं शिरकावच होत नाहीं. विधिपूर्वक दान केलें असतांच ह्या उत्तम लोकांची प्राप्ति होते. त्या ह्या दानाच्या उत्तम फलाचा आपण उपभोग घ्या. हे स्वर्गसंबंधी गुण सांगितले. आतां त्यांतले दोषही सांगतों ऐका. कृतकर्माच्याच फलाचा उपभोग त्या ठिकाणीं मिळत असून नवीन क्रिया त्या ठिकाणीं होत नाहींत, व सचित सरेपर्यंत त्याचा उपभोग मिळतो, आणि पुढें खालीं यावें लागतें. हें पतन, असंतोष, व दैदीप्यमान संपत्ति पाहून होणारा ताप हीं फार दुःखद आहेत. स्वर्गापासून भ्रष्ट होणाऱ्याची संज्ञा जाते. अंगाला धूळ चिकटूं लागते व माळा सुकूं लागतात. असें होऊं लागलें कीं पतनाची वेळ आली असें समजावें. तहत ब्रह्मलोकापर्यंत हे दोष आढळून येतात. आतां स्वर्गापासून पडणाऱ्यांना हा फायदा आहे कीं, मनुष्ययोनीमध्येंच त्यांचा जन्म होतो, व त्या ठिकाणीं ते महाभाग सुखाचा उपभोग घेतात. पण त्या ठिकाणीं जर त्यांचे डोळे उघडले नाहींत तर ते अधोगतीला जातात. ही कर्मभूमी असून ह्या ठिकाणीं केलेल्या कर्माचें फल परलोकीं अनुभवावें लागतें. ' हें ऐकून मुद्गल ह्मणाले, ' ह्या लोकासंबंधानें तुम्हीं दोष तर फार सांगितले. निर्दोष असा एखादा लोक असेल तर सांगा. तेव्हां देवदूतांनीं उत्तर केलें, ' ब्रह्मलोकाच्या वर शुद्ध सनातन आणि प्रकाशमान असें विष्णूचें उत्कृष्ट स्थान आहे. त्या ठिकाणीं विषयी लोक कधीं जात नाहींत. मीपणा व अहंकार नाहींसा होऊन जे जितेंद्रिय व निर्द्वंद्व झाले आहेत असेच लोक ध्यान व समाधीनें तें स्थान मिळवितात. ' या देवदूतांच्या भाषणावर विचार करून मुद्गल ह्मणाले, ' तुम्ही जा. अशा अनेक दोषांनीं युक्त असा स्वर्ग मला नको. ज्या ठिकाणीं पीडा नाहीं ज्या ठिकाणाहून पतनाची भीति नाहीं तें हें तुम्हीं सांगितलेलें स्थान मिळविण्याला मी यत्न करीन.' असें ह्मणून देवदूतांना निरोप देऊन ध्यानांत गढले राहून मोक्षरूपी अक्षय्य सिद्धि त्यांनीं मिळविली म्हणून तूं वृथा शोक करूं नकोस. सुखामागून दुःख व दुःखामागून सुख हीं रथचक्राच्या भ्रमणाप्रमाणें येत असतात. तेरा वर्षें झाल्यानंतर तुझें बडिलोपार्जित राज्य तुला मिळेल. ' असें म्हणून व्यास निघून गेले.

११० दुर्वासऋषींचा द्रौपदीचें सत्व घेण्याचा प्रयत्न. (३. २६२–३३)

इकडे पांडव नगरांत असल्याप्रमाणें त्या वनामध्यें दिवस काढीत असतां त्यांची खोड कशा रीतीनें मोडावी ह्मणून दुर्योधनाच्या मनांत विचार चालला होता. इतक्यांत कोणे एके वेळीं दुर्वासऋषी हजार शिष्यांसहवर्तमान त्याकडे आले. त्या क्रोधनशील मुनींचा दुर्योधनानें चांगला सत्कार करून विधिपूर्वक त्यांची पूजा केली व त्यांच्या शापाला भिऊन दासाप्रमाणें त्यांच्या सेवेला रात्रंदिवस यत्किंचितही आळस न करितां तत्पर होता. या ऋषींचा तेथें कांहीं दिवस मुक्काम होता. एखादे वेळीं 'भूक लागली, लवकर अन्न दे, ' असें ह्मणून स्नानाला जावें व उशिरानें परत यावें. एखांदे वेळीं 'आज मी जेवणार नाहीं, मला भूक नाहीं,' असें ह्मणून जावें व एकदम येऊन ' झटपट मला भोजन दे, ' असें ह्मणावें. एखादे वेळेला रात्रींच उठून अन्न तयार करवावें व मग न जेवतां त्याला उगीच शिव्या मात्र द्याव्या. अशा रीतीनें ते तेथें रहात होते, तरी दुर्योधनाला राग म्हणून बिलकुल आला नाहीं. त्यामुळें मुनी संतुष्ट होऊन त्याला वर माग म्हणाले. तेव्हां दुर्योधनाला आपला पुनर्जन्म झालासें वाटलें. मुनी प्रसन्न झाले असतां काय वर मागावा हें त्यानें कर्णादिकांच्या सल्ल्यानें आधींच ठरवून ठेविलें होतें. तो म्हणाला, ' आमच्या कुलामध्यें वडील युधिष्ठिर आहे. तो वनांत रहात आहे. तर आपण आपल्या शिष्यवर्गासह

त्याचे अतिथि होऊन जा. मात्र सर्वांना जेवूं घालून द्रौपदीचें जेवण झाल्यावर आपण त्या ठिकाणीं जा. हा मला वर या.' बरें म्हणून दुर्वासऋषी तेथून निघून गेले व सर्व पांडव जेऊन खाऊन स्वस्थ बसले आहेत अशा वेळीं हजार शिष्यांना घेऊन ते त्यांकडे आले.ते आलेले पाहून सामोरा जाऊन युधिष्ठिर त्यांना घेऊन आला व अतिथिसत्कारपूर्वक त्यांची पूजा केल्यावर 'आन्हिक आटोपून लवकर या,' म्हणून त्यानें त्यांना विनंती केली. हे आतां आम्हांला काय जेवावयाला घालणार असा विचार करीत दुर्वास शिष्यांसह स्नानाला गेले. इकडे द्रौपदीला अन्नासंबंधानें मोठी चिंता पडून तिनें कृष्णाचा धांवा केला. द्रौपदीचें संकट मनांत आणून जगत्पति भगवान् श्रीकृष्ण रुक्मिणीजवळ शयनागारीं असतां, तिला सोडून एकदम द्रौपदीकडे आला. त्याला पाहून हर्षानें नमस्कार करून मुनी आल्याची हकीकत तिनें त्याला कळविली. तेव्हां श्रीकृष्ण म्हणाला, ' मी फार भुकेनें व्याकूळ झालों आहे, मला आधीं जेवूं घाल. मग पुढचा विचार. ' हें ऐकून द्रौपदी खजिल होऊन म्हणाली, ' सूर्यानें दिलेल्या स्थालीमध्यें अन्न माझें जेवण होईपर्यंतच असतें. माझें जेवण झालें आहे, तेव्हां आतां त्यांत अन्न मुळींच नाहीं. ' हें ऐकून भगवान् म्हणाला, ' वाटेच्या श्रमानें भुकेला आहें. ही थेट्ची वेळ नाहीं लवकर जाऊन तीं स्थाली मला आणून दाखीव, याप्रमाणें ती स्थाली आणून तिच्या तोंडाला चिकटून राहिलेलें शाकान्न भगवानानें सेवन केलें; व ' यज्ञभुक् विश्वात्मा यानें तृप्त होवो, ' असें म्हणून सहदेवाला ऋषींना भोजनाला हाक मारण्यास सांगितलें. इकडे दुर्वासप्रभृति ऋषी नदींत उतरून पापनाशक मंत्राचा जप वगैरे करून वर येतात तों पोट भरून सर्वांना ढेकरा आल्या. ते दुर्वासऋषींकडे पाहून म्हणाले, ' राजाला अन्न करावयाला सांगून आम्ही स्नानाला आलों. आमचें तर आकंठ पोट भरलें आहे. आम्ही तेथें काय खाणार ? उगीच अन्न तयार करविलें. ' दुर्वास म्हणाले, ' अन्न फुकट घालविल्यानें आपल्या हातून मोठें पाप होणार आहे. अंबऋषींचा प्रभाव मनांत येऊन हरिभक्तपरायण लोकांची मला फार भीति वाटते. पांडव धर्मपरायण असून भगवान् श्रीकृष्णाकडे त्यांचें पूर्ण लक्ष आहे. ते रागावले असतां अग्नि ज्याप्रमाणें कापसाच्या राशीचा फडशा उडवितो त्याप्रमाणें ते आम्हांला जाळून टाकतील. आतां त्यांचा निरोप न घेतांच तुम्ही येथून पळ काढा. ' हें गुरूचें भाषण ऐकून ब्राह्मण दशादिशेला पळून गेले. इकडे सहदेव त्यांचा त्या ठिकाणीं शोध करीत असतां ते निघून गेल्याची बातमी त्याला लागली; ती त्यानें युधिष्ठिराला येऊन कळविली. कदाचित् अपराध्रीला येऊन ते आपला छळ करतील. तेव्हां ह्या ओढवलेल्या संकटापासून आपण कसें सुटणार म्हणून विचार करीत सर्व पांडव बराच वेळ त्यांची वाट पहात बसले. त्यांना चिंतातुर पाहून भगवान् श्रीकृष्ण त्यांना भेटून म्हणाले' ' तुमचें संकट जाणून त्या तामसी ऋषींपासून रक्षण करण्यासाठीं द्रौपदीनें धांवा केल्यावरून मी आलों.तुम्हांला आतां त्यांची यकिंचित भीति बाळगावयाला नको. तुमच्या तेजानेंच भिऊन त्यांनीं यापूर्वीच पळ काढला आहे. **नित्य धर्मानें वागणारांवर कधीं दुर्घट प्रसंग येत नाहींत.**' असें म्हणून भगवान् निघून गेले.

१११. जयद्रथकृत द्रौपदीहरण.

(३. २६४–२७२)

त्या अरण्यामध्यें देवाप्रमाणें विहार करीत महारथ पांडव राहिले असतां कोणे एके वेळीं ते चौघे एकदम चारी दिशेला ब्राह्मणांसाठीं मांस आणण्याला मृगयेला गेले होते. द्रौपदी आश्रमामध्यें एकटीच होती. अशा वेळीं सिंधु देशाचा राजा महायशस्वी वार्धक्षत्रि लग्न करण्यासाठीं शाल्वदेशाला मोठ्या थाटानें निघाला होता. तो त्या ठिकाणीं आला असतां जिच्या शरीराची कांति डोळे दिपविणारी होती अशी ही अप्रतिम लावण्यवती नीलमेघामध्यें चमकणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें त्या वनप्रदेशाला तेजोमय करणारी द्रौपदी त्या निर्जन वनीं आश्रमद्वारीं उभी त्यांना दिसली. ही कोणी अप्सरा आहे, किंवा देवकन्या आहे, किंवा देवनिर्मित माया आहे, असें वाटून सर्व हात जोडून तिच्याकडे

टकमक पहात उभे राहिले. तेव्हा जयद्रथ कामपीडित होऊन कोटिकास्य राजाला म्हणाला, 'ही कांहीं मला मानवी स्त्री दिसत नाहीं. ही सुंदरी मला मिळेल तर मग हा लग्नाचा खटाटोप करण्याचें कारण नाहीं. हिलाच घेऊन मी आपल्या नगराकडे परत जाईन. ही कोण? कोणाची? ह्या कांत्यांनीं भरलेल्या वनामध्यें कशाकरितां आली? ही तनुमध्यमा सुदती माझा स्वीकार करील किंवा नाहीं? इत्यादि गोष्टींची चौकशी करून या.' हें जयद्रथाचें भाषण ऐकून रथाखालीं उतरून एखाद्या कोल्ह्यानें ज्याप्रमाणें व्याघ्रीकडे जावें तद्वत् तो कोटिकास्य तिच्याकडे जाऊन म्हणाला, 'रात्रीच्या वेळीं वाऱ्यानें कांपणाऱ्या अग्निशिखेप्रमाणें देदीप्यमान कळंबाची फांदी अशी वांकवून उभी असलेली तूं कोण? इतकी लावण्यवती असून ह्या वनामध्यें तूं बिलकुल भीत नाहींस? तूं कोण देवस्त्री आहेस, कां यक्षस्त्री आहेस, कां अप्सरा आहेस, किंवा दैत्यस्त्री आहेस? आमचीही तूं चौकशी करीत नाहींस; तुला येथें संभाळणार कोण आहेत हेंही आह्मांला दिसत नाहीं; मी सुरथराजपुत्र कोटिकास्य आहें व ज्याच्या रथामागून ध्वज घेऊन बारा सौवीरक चालत आहेत, व ज्याच्यामागून सहा हजार रथी, हत्ती, घोडे व पायदळ चालत आहेत; तो हा सौवीरराज जयद्रथ आहे.' हें त्याचें भाषण ऐकून हातांतली फांदी हळूंच सोडून व अंगावरील पैठणी वस्त्र हळूं हळूं सांवरीत द्रौपदी म्हणाली, '**माझ्यासारखीनें आपल्याशीं भाषण करूं नये**, हें मी जाणतें; परंतु आपल्या प्रश्नाचें उत्तर देणारी स्त्री अथवा पुरुष येथें कोणी नाहीं, म्हणून मलाच येथें आपल्याशीं बोलावें लागत आहे. आपण सुरथपुत्र कोटिकास्य आहां हें मला ठाऊक आहे. मी द्रुपदराजकन्या कृष्णा आहें. ज्या पांच पुरुषांना मीं पती वरलें आहे, त्यांना खांडवप्रस्थाला जावें लागलें हें तुह्मांला माहीतच आहे. ते मला या ठिकाणीं ठेवून चारी दिशेला एकेकटे मृगया करण्याकरितां गेले आहेत. त्यांची येण्याची वेळ झाली आहे. घोडे सोडून येथें मुकाम करा व अतिथिसत्कार घेऊन पुढें जा. महाराजांना अतिथींची फार आवड असून तुह्मांला पाहून त्यांना फार संतोष होईल.' असें बोलून द्रौपदी त्यांच्या आतिथ्याची तजवीज करण्याकरितां पर्णशालेंत शिरली.

इकडे जयद्रथ वगैरे राजे बसले होते त्या ठिकाणीं कोटिकास्यानें द्रौपदी जें कांहीं म्हणाली तें सर्व त्याला कळविलें. तेव्हां तिच्या लावण्यानें वेडा बनून तो जयद्रथ लांडग्यानें ज्याप्रमाणें सिंहाच्या गुहेमध्यें शिरावें त्याप्रमाणें त्या पवित्र पर्णकुटिकेंत शिरला; द्रौपदीला त्यानें सर्वांचें कुशल विचारलें. तेव्हां द्रौपदीनेंही त्याच्या राष्ट्रामधील व कौरवाकडील कुशल विचारून पाय व आसन देऊन पन्नास मृग भुकेसाठीं म्हणून दिले. नंतर ती त्याला म्हणाली, 'इतक्यांत महाराज नानाविध मृग मारून आणून तुझें आतिथ्य करतील.' जयद्रथ म्हणाला, 'माझी भूक अगदीं भागली आहे. माझ्या रथांत बसून चल म्हणजे झालें. श्रीहीन राज्यापासून भ्रष्ट झालेले, दीन, व बुद्धि चळलेले अशा वनवासी पांडवांना धरून राहण्यांत काय अर्थ आहे? राज्याला कायमचे मुकलेल्या पांडवांवर भक्ति ठेवून उगीच कष्ट कां सोसतोस? माझी बायको होऊन सर्व सिंधु व सौवीर राष्ट्रांची स्वामिनी हो.' हे जयद्रथाचे हृदयाला घरें पाडणारे शब्द ऐकून कपाळाला आठ्या घालून ती चटकन् मागें सरली; व त्याला तुच्छ करून पती केव्हां येतात असें झालें असल्यामुळें कांहीं तरी बोलत त्याला गुंतवून ठेवावें अशा हेतुनें ती त्याला म्हणाली, 'अरे, कांहीं तरी थोडी लाज धर. ज्यांचें विष मोठें जालीम आहे व जे यक्षराक्षसांनासुद्धां डगमगणार नाहींत, अशा इंद्रतुल्य महारथ्यांना माझ्यापुढें तुच्छ करण्याला तुला लाज कशी वाटत नाहीं? भले लोक वनांत राहोत, गृहस्थ धर्मानें राहोत, तपस्वी असोत, किंवा विद्यासंपन्न असोत, कुत्र्याप्रमाणें तोंड टाकणाऱ्या दुष्टांना त्यांच्या ठिकाणीं चांगलें असें कांहींच दिसत नाहीं. आज तूं जो नरकामध्यें पडत आहेस त्या तुला हाताला धरून वर काढणारा ह्या क्षत्रियमंडळांत तर मला कोणी दिसत नाहीं. हिमाचलाच्या पायथ्याशीं संचार करणाऱ्या पर्वतप्राय मदोत्कट हत्तीला ज्याप्रमाणें केवळ हातांत काठी घेऊन त्याच्या कपाळांतून बाहेर काढण्याचा यत्न करावा, त्याप्रमाणें धर्मराजाला जिंकण्याची ही तुझी हाव आ-

हे. केवळ मूर्खपणाने निद्रिस्त अशा योध्या बलाढ्य सिंहाच्या छातीवर पाय देऊन, त्याचे कल्ले तूं उपटीत आहेस; परंतु खवळलेल्या भीमसेनमहाराजांना पाहिल्यावर तुला पळ काढावा लागणार आहे. खवळलेल्या अर्जुनमहाराजांबरोबर युद्ध करण्याची ही तुझी हाव गिरिकंदरीं निजलेल्या सिंहाला लाथ देण्याप्रमाणें आहे, व दोन कनिष्ठ पंडुवीरांबरोबर युद्ध करण्याची हाव धरणें म्हणजे द्विजिव्ह अशा कृष्णसर्पाच्या शेपटीवर मूर्खपणानें पाय देणें आहे. कळक, केळी, शामाक, यांना फळें आलीं असतां त्यामुळें केवळ त्यांचाच नाश होतो व त्यानें त्यांचे गौरवही वाढत नाहीं; तसा हा तुझा प्रयत्न आहे. खेंकडी ज्याप्रमाणें गर्भ धारण करून स्वतःचा नाश करून घेते, त्याप्रमाणें त्यांचा पाठिंबा असतां तूं मला घेऊन जाऊं इच्छितोस.' जयद्रथ म्हणाला, 'मी सर्व जाणतों. पांडव कसे आहेत हें मला माहीत आहे. अशा प्रकारच्या बुजगावण्यांनीं मी भिणारा नव्हें. आमचा जन्म नीच कुलांत झाला नसून सत्त्वगुणांनीं संपन्न अशा थोरकुलांत झाला आहे; व षड्गुणांनीं अधिक असे आम्ही पांडवांना आमच्यापेक्षां कमी समजतों. पाहिजेल तर रथांत बसून चल, पाहिजेल तर हत्तीवर बसून चल; पण तुसत्या अशा तुझ्या बुजगावण्यानें मी परत मात्र फिरणारा नव्हें. पुढें तुलाच दीन होऊन माझ्या कृपेसाठीं तोंड पसरावें लागेल.' द्रौपदी म्हणाली, 'माझें सामर्थ्य तूं ओळखलें नाहींस. तुझ्या ह्या बलात्कारानें मी तुझ्यापुढें तोंड पसरीन असें समजूं नकोस. कारण माझी खात्री आहे कीं, कृष्णार्जुन माझा शोध करीत आल्याशिवाय कधीं राहणार नाहींत, आणि जिची काळजी वाहणारे हे आहेत, तिला हरण करण्याची प्रत्यक्ष इंद्राची छाती नाहीं. मग दीन अशा मनुष्याची काय कथा ? उष्णकालीं ज्याप्रमाणें वणवा अरण्यामध्यें शिरून त्याचा फडशा उडवितो,त्याप्रमाणें शत्रूंच्या सामर्थ्याचा नायनाट उडवून त्यांच्या मनाला घरें पाडणारे अर्जुनमहाराज मजसाठीं तुझ्या सैन्यामध्यें शिरून त्याचा फडशा उडवितील. मेघगर्जनेप्रमाणें शब्द करणारे त्यांच्या हातून सुटलेले टोळधाडासारखे बाण जेव्हां तुझ्या सैन्यांत शिरतील तेव्हां तुझ्या ह्या दुष्ट बुद्धीबद्दल तुझें तुलाच बाईट वाटूं लागेल. हातांत गदा घेऊन क्रोधविष सोडीत भीमसेनमहाराज तुझ्याकडे धांवून येतांना पाहून तुला पश्चात्ताप होईल.मी आपल्या महाभाग पतींचें मनानें देखील ज्याअर्थी उल्लंघन केलें नाहीं; त्या माझ्या सत्यानें मी तुला सांगतें कीं, पांडव आज तुला फरफर ओढतांना मी पाहीन. तूं दुष्टानें मला किती जरी ओढलेंस तरी मी गांगरून जाईन असें समजूं नकोस. कुरुवीरांशीं माझा फिरून समागम होऊन मी काम्यकाला परत येईन. 'असें म्हणून डोळे वटारून तिला धरीत असतां ' मला शिवूं नकोस, ' म्हणून तिनें त्याची निर्भर्त्सना केली. जयद्रथानें हें कांहीं न जुमानतां तिच्या अंगावरच्या शालूला धरून तिला ओढलें.परंतु तिनें हिसडा दिल्याबरोबर मुळासकट उपटून पडलेल्या झाडाप्रमाणें तो धाडकन खालीं पडला. परंतु फिरून झटकन् उठून त्यानें तिला धरून रथांत बसविलें. तेव्हां धौम्य म्हणाले, 'ही तुला अशी पचणार नाहीं. पुरातन क्षात्रधर्म कसा आहे हें तूं लक्षांत आण. हें निंद्य कृत्य करून याचें तुला खात्रीनें फळ मिळेल.' या बोलण्याकडे लक्ष न देतां तो द्रौपदीला घेऊन चालला असतां धौम्य त्या सैन्यामधून तिच्या मागून चालले. इकडे चारी दिशेला फुटून शिकार करून धनुर्धर पांडव फिरून एकत्र झाले. तेवेळीं मृगसर्पादि प्राण्यांनीं गजबजलेल्या त्या महावनांत पूर्व दिशेकडे वळून श्वापदें घोर शब्द करतांना ऐकून युधिष्ठिर आपल्या भावांना म्हणाला, 'हे पशू महत्संकट सुचवीत आहेत. हें दुश्चिन्ह शत्रुपीडासूचक आहे म्हणून आतां शिकार पुरे. आपण लवकर परत जाऊं. माझ्या मनाला चुटपूट लागून राहिली आहे. बुद्धि जड होऊन दुःख आपला पगडा बसवीत चाललें आहे. ज्यामधून गरुड पक्ष्यानें सर्प उचलून नेले आहेत, अशा सरोवराप्रमाणें अगर वैभव हरण केलेल्या राष्ट्राप्रमाणें अथवा मद्यपींनीं मद्य प्राशन करून रिकामें टाकलेल्या पात्राप्रमाणें हे काम्यकवन आज मला भासत आहे.' असें म्हणून ते वनांत शिरले तों द्रौपदीच्या दासीला रडत समोर येतांना पाहून ते म्हणाले, 'तूं अशी का रडतेस? तुझें तोंड असें का उतरलें आहे? द्रौपदीला कोणी दुष्टानें त्रास दिला असेल तर तो पू-

धीमध्यें शिरला असला किंवा आकाशांत उडाला असला तरी त्याच्या मागून पांडव शोध लावीत जातील. धर्मराजांना कसा संताप होत आहे हें पहात नाहींस काय? कोणा मूढाला शत्रूचा फडशा उडविणाऱ्या पांडवांच्या प्राणासमान असणाऱ्या अमूल्य रत्नाला हरण करतांना ती सनाथ व पांडवांचे शरीराबाहेर संचार करणारें हृदय आहे हें कळलें नाहीं. पांडवांचे तीक्ष्ण शर कोणाचें शरीर भेदून पृथ्वींत शिरणार आहेत कळत नाहीं ! मग भित्रे उगीच कां रडतेस ? आज पांडव सर्वांचा नाश करून तुझ्या यजमानिणीला खात्रीनेंच परत घेऊन येतील.' हें ऐकून दासी म्हणाली,'आपल्याला तुच्छ करून आज जयद्रथानें बाईसाहेबांना बलात्कारानें नेलें आहे. त्याच्या निंदेनें व धमकावण्यानें वेड्या होऊन निरुपायास्तव उत्तम तुपानें भरलेली स्रुचि ज्याप्रमाणें राखेंत पडावी, अगर भातकोंड्यानें पेटविलेल्या अग्नींत ज्याप्रमाणें आहुति पडावी. किंवा उत्तम पुष्पमाला ज्याप्रमाणें स्मशानांत जाऊन पडावी, तसा ह्या अयोग्य मनुष्याला त्यांनीं आपला देह अर्पण करून सोमयज्ञामध्यें ब्राह्मण बेशुद्ध असतां कुत्र्यानें येऊन तेथल्या हवीचा ज्याप्रमाणें उपभोग घ्यावा त्याप्रमाणें तो दुरात्मा बाईसाहेबांच्या प्रसन्नवदनाला स्पर्श करण्याच्या पूर्वी झटकन् जाऊन त्या दूर गेल्या नाहींत तोंच त्यांची सुटका झाली पाहिजे. ' हें ऐकून युधिष्ठिर म्हणाला, ' मुली, उगीच फार बोलूं नकोस. **राजे असोत वा राजपुत्र असोत, बलानें मत्त झाले असतां ते पडतात.** ' असें ह्मणून सर्पाप्रमाणें दीर्घ उच्छ्वास टाकीत व धनुष्याचा टणत्कार करीत ते त्याच्या मागून निघाले. घोड्याच्या टापांनीं उधळलेली धूळ त्यांना पुढें दिसत होती. पायदळामधून ' भीमा धांव, ' ह्मणून आक्रोश करीत धौम्य चालले होते. त्यांना जाऊन गांठून ' आपण खुशाल परत जा, ' असें सांगून ज्याप्रमाणें वहिरीससाणा आमिषावर झडप घालतो, त्याप्रमाणें त्या शत्रुसैन्यावर ते तुटून पडले. जयद्रथाला व त्याच्याच रथामध्यें द्रौपदीला बसलेली पाहून त्यांच्या अंगाची लाही उडाली; व त्यांनीं मोठ्यानें जयद्रथाला हाक मारली; त्या योगानें शत्रूंना दिशा मुंध झाल्या. पांडवांचीं निशाणें पाहून गाळण उडून जाऊन जयद्रथ द्रौपदीला ह्मणाला, ' हे तुझे पांच पती येत आहेतसें वाटतें ते कोणते कोण त्याची माहिती मला देशील काय ? ' हें ऐकून द्रौपदी ह्मणाली, ' मूढा, यांच्या संबंधाची माहिती घेऊन तुला काय करवयाचें आहे ? प्राणाला मुकण्याचें घोर कृत्य केलें आहेस. हे आतां कोणाची बाकी ठेवणार नाहींत. मरूं घातलेला तूं विचारीत आहेस ह्मणून सांगतें ऐक. ज्याच्या ध्वजावर नंदोपनंद नांवाचे मृदंग मधुर आवाज देत आहेत त्या रथांत बसलेले, आपला धर्म कोणता हें निश्चयात्मक जाणून तसें वागणारे महाराज धर्मराज. शरण आलेला शत्रु असला तरी त्याला हे प्राणदान देतात. ह्मणून मूढा, कल्याणाची इच्छा असेल तर शस्त्र खालीं ठेवून त्यांना शरण जा. शाल वृक्षाप्रमाणें उंच भिवया चढवून दांतओठ खाणारे हे माझे पती भीम महाराज. यांची कृति अमानुष असून अपराध्याला पूर्ण शासन केल्यावांचून कधीं हे रहात नाहींत. वैराची आठवण यांना कधीं बुजत नाहीं आणि सूड घेतल्यावर मगच याच्या मनाला समाधान होतें. हे इकडे धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ, शहाणे, यशस्वी, जितेंद्रिय, वडिलांच्या आज्ञेंत वागणारे, माझे पती अर्जुनराज आहेत. लोभानें अगर भयानें धर्मबाह्य दुष्ट कृत्य ह्यांच्या हातून कधीं घडावयाचें नाहीं. हे भयपीडितांचें भय हरण करून शत्रूंचा नायनाट उडविणारे आहेत. ज्यांचें रूप पृथ्वीवर अलौकीक असून सर्व पांडव ज्यांना जिवापलीकडे जपतात असे हे वडिलांसंबंधानें पूज्यभावानें राहणारे माझे पती नकुल महाराज. त्यांचप्रमाणें हे तरवारीचे हात करण्यांत पटाईत असे माझे पती सहदेव महाराज. यांचें अलौकिक कृत्य आज तुझ्या पाहण्यांत येईल. शूर, अस्त्रज्ञ, शहाणे, असे असून हे नेहमीं धर्मराज महाराजांचें प्रिय करण्यांत दक्ष असतात. बुद्धीनें व बोलण्यांत यांचे तोडीचा कोणी नाहीं. रत्नांनीं भरलेली नाव ज्याप्रमाणें सुसरीच्या तडाक्यानें फुटून समुद्रांत नाश पावते त्याप्रमाणें तुझ्या ह्या सर्व सेनेचा त्यांच्या हातून फडशा पडून दाणादाण उडेल. यांच्या हातून जर तूं जिवंत सुटलास तर तुझा पुनर्जन्मच झाला समज.' इकडे पांडव मागून हात

जोडलेल्या पायदळाला सोडून रथसमूहांकडे वळून मोठ्या आवेशानें त्यांवर शरवर्षाव करूं लागले. 'उभे रहा, हाणा, मागें परता,' अशा रीतीनें जयद्रथ आपल्या लोकांना दम देत होता तरी त्याच्या सैन्याचा या नरव्याघ्रांपुढें दम निघेना. सुवर्णांनीं चित्रविचित्र मढविलेली व चोहोंकडून धारेच्या फळांनीं युक्त अशी गदा हातांत घेऊन भीमसेन ज्याला कालानें ही दुर्बुद्धि दिली त्या जयद्रथाकडे धांवला व तोंडाला असणारा हत्ती व त्यावरचा माहुत आणि चौदा पायदळांतील लोक यांना त्यानें गदेनें ठार केलें. त्याचप्रमाणें अर्जुनानें पांचशें डोंगरी योद्धे जयद्रथाच्या साहाय्याला आले, त्यांना ठार करून थेट जयद्रथाकडे मोर्चा फिरविला. धर्मराजानेंही एका निमिषामध्यें शंभर लोक मारले; व खड्गधारी नकुळ रथांतून खालीं उडी घेऊन पायदळांची डोकीं बीजाप्रमाणें जांभेनीवर पेरीत चाललाः सहदेवानेंही गजयोध्यांना झाडावरील पक्ष्याप्रमाणें खालीं आणिलें. इकडे हत्तीवर बसण्यांत पटाईत अशा त्रिगर्ताधिप सुरथानें आपला हत्ती नकुलावर सोडून त्याचा रथ उडवून दिला. परंतु नकुलानें अगदीं न डगमगतां हातांत ढाल व तरवार घेऊन रथाखालीं उडी घेतली आणि एका सुस्थळीं जाऊन पर्वताप्रमाणें अचल उभा राहून जवळ येणाऱ्या त्या हत्तीची सोंड व दांत आपल्या तरवारीनें साफ छाटून टाकलीं. तेव्हां तो किंकिणीविभूषित हत्ती 'चीं चीं' करीत जमिनीवर पडला व त्यानें आपल्याबरोबर वर बसणाऱ्या सुरथालाही खालीं आणिलें. इकडे भीमानें कोटिकास्याच्या सारथ्याचें डोकें उडवून सारथि नसल्यानें रथाचे घोडे उधळले असतां हातांतील तरवारीनें कोटिकास्याचें डोकें मोठ्या शिताफीनें उडवून दिलें. इकडे अर्जुनानेंही पुष्कळ हत्ती व महारथ यांचा फडशा उडविला. त्या सर्व रणभूमीमध्यें शिरावेगळीं धडें व धडावेगळीं शिरें यांनीं भूप्रदेश झांकून गेला. कुत्रे, गिधाडें, कोल्हीं, कावळे इत्यादिकांची त्या ठिकाणीं मोठी चंगाळी उडाली. याप्रमाणें सैन्याचा फडशा उडाला असतां घाबरून जाऊन जयद्रथ द्रौपदीला खालीं सोडून देऊन जीव बचावण्यासाठीं पळूं लागला. द्रौपदीला खालीं पाहून धर्मराजानें नकुलाकडून तिला रथांत घेवविलें. जयद्रथ पळून गेल्यानें त्याच्या सैन्याची दाणादाण उडाली असतां भीमाचा त्याचा फडशा उडविण्याचा सपाटा चाललाच होता. आमिषाशिवाय शिकार व्यर्थ आहे असें जाणून अर्जुनानें त्याचें निवारण केलें; व द्रौपदी, धौम्य व नकुलसहदेव यांसह आश्रमाकडे परत जाऊन धर्मराजास द्रौपदीचें समाधान करण्यास सांगून, जयद्रथ पातालांत गेला असला अगर इंद्राचें जरी त्याला पाठबळ असलें तरी त्याला धरून आणण्याच्या निश्चयानें तो भीमासह निघाला. ते वेळीं द्रौपदी संतापून त्यांना म्हणाली, 'माझें जर तुम्हांला प्रिय करणें असेल तर त्या परस्त्रीवर हात टाकणाऱ्या सैंधवकुलकलंकाला तुम्ही ठार करा. त्यानें जीवदानासाठीं तोंड पसरलें तरी त्याला सोडूं नका.' नंतर युधिष्ठिर प्रभृति मंडळी परतल्यावर भीमार्जुनांनीं कोसभर पुढें गेलेल्या जयद्रथाचा पाठलाग सुरू करून अर्जुनानें कोसावर असलेले जयद्रथाचे घोडे ठार करून प्रेक्षकांना थक्क केलें. दिव्यास्त्रसंपन्न अशा त्या कशाही प्रसंगाला न डगमगणाऱ्या नरवीरांचें तें दुष्कर कर्म पाहून ते जवळ येतांच जयद्रथ अगदीं घाबरून गेला व वाट सांपडेल तिकडे पळूं लागला. याप्रमाणें त्याला पळण्यांत गर्क पाहून अर्जुन म्हणाला, 'मूर्खा अंगामध्यें अशा प्रकारचें शौर्य असून स्त्रियांना बलात्कारानें उपटण्याची हांव धरतोस अं? परत फीर. असें पळणें तुला शोभत नाहीं. आपल्या लोकांना शत्रूच्या तोंडीं देऊन असा कसा पळतोस?' असें अर्जुनानें हिणविलें तरी देखील जयद्रथ परतला नाहीं. तेव्हां त्याकडे त्वेषानें धांवून जाऊन भीमानें त्याची शेंडी धरून त्याला रथाखालीं ओढलें व उचलून जमिनीवर आपटून खूप चेंचलें, व तोंड वर करून श्रीमुखांतही बऱ्याच लगविल्या व थोडा शुद्धीवर येऊन पळण्याच्या बेतांत आहे तोंच त्याच्या ओरडण्याला न जुमानतां त्यानें त्याच्या डोक्यावर खूप लाथा दिल्या; व गुडघे छातीवर रेचून त्याला पुष्कळ कुदललें. याप्रमाणें तो बेशुद्ध झाला असतां आपली बहीण दुश्शला हिच्यासाठीं अर्जुन त्याचें निवारण करूं लागला, तेव्हां भीम म्हणाला, 'हा पापी माझ्या हातून जगूं नये. परंतु त्या दयाशील धर्मराजापुढें व पोर बुद्धीनें तूं माझ्या आड येऊं

लाबलास झालेजे तुझ्यापुढें, माझें कांहीं चालत नाहीं.' असें झणून अर्धचंद्र बाणानें जयद्रथाचे पांच पाट काढून 'मूर्खा, ज्या ज्या मंडळींत किंवा सभामध्यें तूं जाशील तेथें तेथें मी दास आहें असें कबूल करशील तर मी तुला जीवदान देतों,' असें तो त्याला झणाला. जयद्रथानें तें कबूल केल्याबर घुळीनें भरून बेशुद्ध झालेल्या त्याला त्यांनीं रथांत बसवून धर्माराजापुढें आणून उभें केलें.त्याला तशा स्थितींत पाहून धर्मराजानें हासत हासत त्याला सोडण्यास सांगितलें.तेव्हां भीमानें 'याला द्रौपदीची संमति पाहिजे,' असें झटल्यावरून द्रौपदी भीमाकडे व युधिष्ठिराकडे पाहून झणाली, 'हा दास झाला आहे व आपण याचे पांचपाटही काढले आहेत, तेव्हां या झालें सोडून.' पुढें धर्मराजाला नमस्कार करून तो निघाला असतां धर्मराज त्याला झणाला, 'तुला मी दास्यांतून मोकळा करून सोडतों. जा फिरून मात्र असें करूं नकोस. स्त्रियांना उपटण्याची इच्छा धरणें फार वाईट आहे. तूं स्वतः किती हीनबल आहेस व तुला साहाय्य करणारेही किती क्षुद्र आहेत याचा विचार कर. यापुढें धर्मामध्यें विशेष लक्ष ठेवीत जा. अधर्माकडे प्रवृत्ति ठेवूं नकोस.' असें झणून त्यानें त्याला निरोप दिला. हें धर्मराजाचें भाषण ऐकून लज्जेनें तोंड खालीं घालून दुःखाकुल होऊन जयद्रथ हरिद्वाराकडे निघाला. तेथें उमापती शंकरांना शरण जाऊन त्यानें घोर तप केलें. त्यानें शंकर संतुष्ट होऊन वर देण्याला तयार झाले असतां सर्व पांच पांडवांना मीं युद्धामध्यें जिंकावें, असा त्यानें वर मागितला.तेव्हां शंकर झणाले, 'असें तर मुळीं होणार नाहीं. ते सर्व अजिंक्य व अवध्य आहेत. तरी अर्जुनाखेरीज इतरांना तूं एक दिवसपर्यंत जर्जर करशील. परंतु बदरी आश्रमामध्यें ज्यानें तप केलें आहे. जो सर्व लोकांना अजिंक्य,एवढेंच नव्हे, पण देवांचीसुद्धां डाळ न शिजूं देणारा आहे; व प्रत्यक्ष मीं ज्याला पाशुपत अस्त्र दिलें आहे, त्या अर्जुनाला तूं कधींही जिंकण्याला समर्थ होणार नाहींस. जगद्गुरु, विश्वमूर्ति, सहस्राक्ष, व सहस्रपाद, ज्यानें अनेक अवतार घेऊन दुष्टांचा संहार केला, तो प्रत्यक्ष भगवान् विष्णु कृष्णरूपानें त्याचें साहाय्य करीत आहे. एवढेंच नव्हे, तर एकाच रथांत बसून तो त्याची पाठ राखीत असतो. तेव्हां अशा अर्जुनापुढें देवांचें देखील कांहीं चालणार नाहीं, मग तुझी ती कथा काय ?' असें झणून सर्व पापहारक उमापती त्याच ठिकाणीं अंतर्धान पावले. मंदबुद्धि जयद्रथही आपल्या नगराकडे गेला.

११२ रामकथा. (३ २७३–२९२)

पुढें कोणे एकेवेळीं धर्मराज मुनिगणासहवर्तमान बसले असतां, 'ही वेदीपासून उत्पन्न झालेली द्रुपदकन्या भाग्यशाली द्रौपदी पंडुराजाची सून असून नेहमीं हिची धर्माकडे प्रवृत्ति आहे. पापकर्म अगर निंद्यकर्म हिच्या हातून कधीं घडलें नाहीं. ब्राह्मणांच्या ठिकाणीं हिची फार धर्मनिष्ठा आहे. असें असून हिला अशीं संकटें भोगावीं लागतात तेव्हां काल व दैव बलवत्तर असून भवितव्यता कोणाला टाळतां येत नाहीं,' असें झणून युधिष्ठिर मनाला वाईट वाटून घेऊं लागला. तेव्हां मार्कंडेयांनीं पुढील भगवान् श्रीरामाची कथा सांगून त्याचें शांतवन केलें, ते झणालेः–

'इक्ष्वाकु कुलामध्यें कोणी अज राजा होऊन गेला. त्याचा शुचिर्भूत व अध्ययनशील मुलगा दशरथ याला राम, लक्ष्मण, भरत, व शत्रुघ्न प्रत्यक्ष देवाचे अवतार असे चार मुलगे झाले. विदेह राजाची कन्या प्रत्यक्ष त्वष्ट्यानें निर्माण केलेली सीता ही त्या रामाची प्रियपत्नी होती.

इकडे प्रत्यक्ष स्वयंभू प्रजापतीचा पुलस्त्य नामक मुलगा होता. त्याला वैश्रवण नामें मोठा सामर्थ्यवान मुलगा झाला. तो बापाला सोडून प्रजापतीला चिकटून राहूं लागल्यामुळें रागानें पुलस्त्यानें दुसरा मुलगा उत्पन्न केला.इकडे प्रजापतीनें वैश्रवणावर प्रसन्न होऊन त्याला अमरत्व, विपुल संपत्ति व लोकपालत्व देऊन राज्य करण्याकरितां लंकाही दिली; व बसण्याकरितां इच्छागामी पुष्पक विमान दिलें. या वैश्रवणाला आपला पिता आपल्यावर रागावला आहे असें कळल्यावर त्याला संतुष्ट करण्याकरितां त्यानें अनेक यत्न केले व दासी झणून तीन राक्षसी त्याकडे पाठविल्या. त्या दासी नृत्यगायनामध्यें कुशल असून कुबेरस्याला तुष्ट करण्यामध्यें नेहमीं दक्ष असत. त्यां-

पैकीं एकीला कुंभकर्ण व दशानन असे दोन राक्षस मुलगे झाले. दुसरीला बिभीषण नामें एकच मुलगा झाला.व तिसरीला खर व शूर्पणखा अशीं दोन अपत्यें झालीं. यांपैकीं, भाग्यशाली बिभीषण मात्र धर्माचें रक्षण करणारा व कर्मनिष्ठ होता. राक्षसश्रेष्ठ रावण उत्साहसंपन्न, वीर्यशाली, महाबलाढ्य व पराक्रमी होता. कुंभकर्ण बलामध्यें सर्वांत अधिक असून रणशूर व मायावी होता. खर धनुर्विद्येमध्यें निपुण व ब्रह्मद्वेष्टा होता. शूर्पणखा ही क्रूर व सिद्धांना विघ्न करणारी होती. हे सर्वही वेदवेत्ते असून स्वकार्यदक्ष होते. हे एकेवेळीं गंधमादनावर बसले असतां नरवाहनाचें वैभव पाहून मत्सरभाव उत्पन्न होऊन घोर तपानें त्यांनीं ब्रम्हदेवांना संतुष्ट केलें. ब्रम्हदेव संतुष्ट होऊन वरदानाची आशा लावून त्यांनीं त्यांना तपश्चर्येपासून परावृत्त केलें. अमरत्वाखेरीज वाटेल तो वर देण्यास ते तयार झाले असतां रावणानें मानवान्यतिरिक्त कोणापासून आपल्याला मरण नसावें असा वर मागितला. कारण मानव त्याच्या जमेंत नव्हते. कुंभकर्णाच्या बुद्धीला मोह पडून त्यानें दीर्घ निद्रा मागून घेतली. बिभीषणानें विकट प्रसंगीं देखील अधर्माकडे बुद्धि वळूं नये व न शिकतां आपल्याला ब्रह्मास्त्र आपोआप यावें असा वर मागितला. राक्षसीच्या ठिकाणीं जन्म झाला असून ही त्याची धर्मबुद्धि पाहून ब्रह्मदेवांनीं त्याला अमरत्वही दिलें. इकडे वरदानानें मत्त होऊन दशाननानें वैश्रवणाला लंकेतून घालवून देऊन ती बळकाविली व त्याचें पुष्पक विमानही घेतलें. 'तेव्हां हें विमान तुला वाहून नेणार नाहीं, परंतु तुझा नाश करणाऱ्या शत्रूला वाहून नेईल,' असा त्याला शाप मिळाला. इकडे पिशाचराक्षसांनीं रावणाला राज्याभिषेक केल्यावर वाटेल तें रूप घेऊन वाटेल तिकडे जाऊन तो देवदैत्यांना पादाक्रांत करून ब्राह्मणांना पीडा देऊं लागला. म्हणून त्याला दशग्रीव हें नांव मिळालें.

इकडे ब्रह्मर्षी, सिद्ध, व सप्तर्षी हे अमीला घेऊन ब्रह्मदेवांकडे गेले. अमीनें रावणाचें अनन्वित वर्तन त्यांच्या कानावर घालून त्यापासून सर्वांचें रक्षण करण्याविषयीं त्यांची प्रार्थना केली. तेव्हां ब्रह्मदेव म्हणाले, 'देव व असुर यांना जरी तो युद्धामध्यें अजिंक्य आहे, तरी त्यासंबंधी व्यवस्था होऊन चुकली आहे. विष्णूनें त्यासाठीं अवतार घेतला आहे, व तें कृत्य तो उरकणार आहे. तुम्हीही सर्व अंशरूपानें अवतार घेऊन त्याला साहाय्य करा.' असें सर्वांना सांगून त्यांनीं दुंदुभी नामक गंधर्वस्त्रीला देवकार्यासाठीं पृथ्वीवर जाण्यास सांगितलें. ते वेळीं सर्व देवगंधर्व वानरयोनींत अंशरूपानें अवतरले; व दुंदुभी कुब्जा नामक मंथरा झाली. हे सर्व वानर आपापल्या अंशाच्या मानानें यशस्वी व बलवान होते. त्यांचीं आयुर्षे झाटलीं झणजे वृक्ष पाषाण असून यांचे देह वज्रासारखे होते; व पर्वतशिखरांना फोडून टाकण्याइतकें यांच्या अंगामध्यें सामर्थ्य होतें. युद्धकलेमध्यें हे सर्व निष्णात होते. वेगांत हे वायूलासुद्धां मागें सारणारे होते. मंथरा ही ब्रह्मदेवांच्या आज्ञेनें वैर उत्पन्न करण्याच्या हेतूनें संधीची वाट पहात होती.

इकडे दशरथाचे चार मुलगे कालगतीनें मोठे वीर्यवान होऊन उपनिषदांसह सर्व वेदांमध्यें, व धनुर्विद्येंत निष्णात झाले. ब्रह्मचर्यव्रत पाळल्यानंतर त्यांचे विवाह करून देऊन दशरथ कृतार्थ झाला. वडील रामाचे काळे भोर डोळे, गुटगुटीत व लांब बाहू पसरट छाती व मानेवर रुळणारे काळेभोर केस असें स्वरूप असून तो श्रीमान व जितेंद्रिय रामभद्र रणामध्यें इंद्रासारखा पराक्रमी, व सर्व धर्मांचें परिशीलन केलेला असा होता. बुद्धीनें बृहस्पतीसारखा असून आत्मगुणांनीं प्रजा रंजवून तो तिचे डोळे निववीत असे. सर्व प्रजेची त्यावर फार भक्ति होती. याप्रमाणें दुष्टांचें शासन करून धर्माचें रक्षण करणाऱ्या कौसल्यानंदवर्धन रामाला पाहून फार संतुष्ट होऊन दशरथ एके दिवशीं आपल्या पुरोहिताला झणाला, 'आज रात्रीं पुष्य नक्षत्राचा चांगला योग येणार आहे व तो उद्यांही रहाणार आहे. तरी सर्व साहित्य तयार करून माझ्या रामाला उद्यां युवराज्याचा अभिषेक करून टाका!' हें दशरथाचें भाषण ऐकून मंथरा कैकेयीला जाऊन झणाली 'महाराजांनीं तुला दीन करून सोडलें आहे. वाहून मोठा विषारी साप चावून मरण आलेलें बाईट नाहीं. कौसल्या खरोखर भाग्यशाली झणून तिच्या मुलाल

अभिषेक होत आहे. तुझ्या मुलाला राज्य मिळत नाहीं, तर मग कसचें तुझें नशीब !'

हें तिचें भाषण ऐकून पतीला एकांतामध्यें गाठून कैकेयी हासत हासत प्रेमदर्शक मधुर शब्दांनीं ह्मणाली, 'आपण जर सत्यप्रतिज्ञ असाल तर आपण मला एक वर दिला आहे, तो माझा मला देऊन टाका.' हें एकून दशरथ ह्मणाला, 'तुला वाटेल तो वर देण्याला मी तयार आहें. कोणत्या अवध्य पुरुषाचा वध करूं अथवा वध्याला सोडूं अथवा कोणाला द्रव्य देऊं अथवा कोणाचें हरण करूं, तें सांग. या पृथ्वीतलावर ब्राह्मणाच्या द्रव्याखेरीज जें कांहीं दुसऱ्या कोणापाशीं द्रव्य आहे तें सर्व माझें आहे. आज मी या पृथ्वीवर राजाधिराज असून चारी वर्णांचा रक्षणकर्ता आहें. तुझी जी इच्छा असेल ती लवकर बोल.' हें राजाचें भाषण ऐकून आपलें सामर्थ्य ओळखून कैकेयी ह्मणाली, 'रामाच्या अभिषेकासाठीं जें साहित्य आपण जमविलें आहे, त्यानें भरताला अभिषेक करा व वल्कलें व कातडीं अंगावर घेऊन जटा वाढवून तापसवेषानें चौदा वर्षें रामाला दंडकारण्यामध्यें राहूं दे.' हे कैकेयीचे अनर्थमूलक शब्द ऐकून दुःखाकुल झाल्यामुळें राजाच्या तोंडून एक शब्दही निघेना. तेव्हां ती बडिलांची स्थिति पाहून त्याची प्रतिज्ञा खरी करण्यासाठीं धर्मात्मा राम वनाला निघाला. धनुर्धारी लक्ष्मण व जनककन्या सीता हींही त्याच्या मागून निघालीं.

इकडे राम वनाला गेल्यावर दशरथाचें देहावसान झालें. भरताला मामाच्या घराहून आणवून कैकेयीनें तें निष्कंटक राज्य त्याला भोगण्यास सांगितलें. तेव्हां तो धर्मात्मा तिला ह्मणाला, 'हें तूं फार दुष्ट कृत्य केलें आहेस. धनलोभानें पतीचा घात करून ह्या कुलाला तूं मातीला मिळवून माझ्या डोक्यावर अपयशाचें खापर फोडलें आहेस. आतां तुझी काय इच्छा असेल ती पूर्ण करून घे. आपल्या भावाबद्दलच्या निष्कपट बुद्धीसंबंधानें मंत्रीवर्गाची खात्री करून देऊन तो रामाला परत आणण्याच्या इरादानें त्याच्या मागून गेला. लक्ष्मणासहवर्तमान त्या धनुर्धारी रामाची आणि त्याची चित्रकूटावर गाठ पडली. पित्याचें वचन सत्य करण्याकरितां त्याची समजूत घालून रामानें त्याला परत पाठविल्यावर नंदिग्रामीं त्याच्या पादुका पुढें ठेवून राहून भरतानें राज्यकारभार चालविला. पौरजन फिरून येऊन आपल्याला त्रास देतील, असें वाटून राम किर्र अशा अरण्यांत शिरला व शरभंगाच्या आश्रमांत त्या ऋषींचा सत्कार करून तो दंडकारण्याला गेला व रम्य अशा गोदावरीच्या आश्रयानें तेथें राहिला. त्या ठिकाणीं राहणाऱ्या लोकांना शूर्पणखा व खर यांपासून फार त्रास होत असे. धर्मवत्सल रामानें तापसांचें रक्षण करण्याकरितां चौदा हजार राक्षस व मोठे बलिष्ठ खर व दूषण यांना ठार मारून त्या धर्मारण्यामध्यें जिकडे तिकडे फिरून स्वस्थता केली. व शूर्पणखेचें नाक व कान कापून तिला सोडून दिलें. याप्रमाणें विरूप झालेली शूर्पणखा लंकेला जाऊन दुःखानें विव्हळ होऊन तिनें रावणाच्या पायांवर डोकें ठेविलें. तिला त्याप्रमाणें छिन्नभिन्न पाहून रावण मंतापून आसनावरून उठला. व दांत खात **मंत्रीवर्गांना तेथून जाण्यास आज्ञा केल्यावर** 'मला न जुमानतां तुला अशी विद्रुप कोणीं केलें, कोण हा मूढ आज आपल्या अंगाला शूल टोंचून घेऊन व मस्तकावर अग्नि ठेवून घेऊन निःशंक झोंप घेत आहे,' असें त्यानें तिला विचारलें. याप्रमाणें तो रागानें बोलत असतां झाडांच्या ढोल्यांतून ज्याप्रमाणें अग्नि बाहेर पडावा त्याप्रमाणें त्याच्या रोमरंध्रांतून अग्नि बाहेर पडत होता. शूर्पणखेनें रामाचा पराक्रम व खरदूषणांसकट सर्व राक्षसांची झालेली दशा त्याला कळविली. तेव्हां आपल्या ज्ञातीचा नाश झालेला ऐकून कालानेंच बुद्धि दिल्यामुळें आपल्या बहिणीचें सांत्वन करून, व काय करावयाचें हें ठरवून तो आकाशमार्गानें निघाला. त्रिकूट व काल पर्वत ओलांडून जलचर प्राण्यांनीं गजबजलेल्या महोदधीच्या ऐलपार शूलपाणी शंकराचें आवडतें स्थान जें गोकर्ण तेथें येऊन पोंचल्यावर रामाच्या भयानें पूर्वीच तापसी बनून राहिलेला त्याचा पूर्वीचा अमात्य मारीच त्याला तो तेथें भेटला. रावणाला पाहून स्मय पावून फलमूलादिकांनीं मारीचानें त्याचा सत्कार केला; आणि 'आपला चेहरा नेहमींप्रमाणें दिसत नाहीं, नगरामध्यें सर्व यथास्थित आहेना,

मंत्रीवर्ग पूर्वप्रमाणेंच आपल्याला भजतातना, येथें येण्याचा उद्देश काय, ' म्हणून त्यानें त्याला विचारलें; आणि 'कशाही प्रकारच्या आपल्या दुर्घट सेवेला हा दास तयार आहे, ' असें तो म्हणाला.तें ऐकून रावणानें रामाचें सर्व वर्तमान त्याला कळवून रागानें व मत्सरानें भरून जाऊन पुढील कार्य त्यानें त्याला थोडक्यांतच कळविलें.तेव्हां मारीच म्हणाला, त्या वाटेला मात्र जाऊं नका. रामाचें वीर्य आपल्याला माहीत नाहीं. त्याच्या बाणाचा तडाखा सहन करण्याची शक्ति कोणाला आहे ? सर्व संग सोडून मी तपस्वी बनलों आहे यांचें करण तरी तोच आहे. आत्मविनाशाला कारणीभूत हें कृत्य कोणी मूढानें आपल्या मनांत भरवून दिलें?' या भाषणानें रावण खवळून गेला व त्याची निर्भर्त्सना करून म्हणाला, ' माझ्या सांगण्यापमाणें न वागशील तर तूं खात्रीनें मरशील. ' तेव्हां मारीचानें विचार केला, ' मरण हें चुकन नाहीं, मग याच्या सांगण्याप्रमाणें करून भल्याच्या हातूस तरी कां न मरा ? ' असा विचार करून त्यानें रावणाला साहाय्य करण्याचें अभिवचन दिलें. तेव्हां रावणानें त्याला रत्नशृंगयुक्त व रत्नमय शरीराचा मृग होऊन सीतेच्या दृष्टीपुढें जाऊन तिला मोह पाडून रामाला तिच्यापासून दूर नेण्यास सांगितलें व त्याच्या मागें आपण तिला घेऊन गेलों असतां स्त्रीवियोगानें तो मरण पावेल असें तो त्याला म्हणाला. यावर आपलें और्ध्वदेहिक आपणच करून घेऊन मारीच आपल्या इच्छेविरुद्ध रावणाच्या मागून निघाला. ठरल्याप्रमाणें रामाच्या आश्रमाजवळ जाऊन त्यानें आपलें मृगरूप प्रगट केलें. त्याला पाहून सीतेनें रामाला तो धरण्याम सांगितलें. तिचें कोड पुरविण्यामध्यें नेहमीं तत्पर असल्यामुळें लक्ष्मणाला तिच्या रक्षणासाठीं ठेवून धनुष्य घेऊन,खांद्यावर तूणीर लटकावून, मृगनक्षत्रामागें लागलेल्या शंकरांप्रमाणें राम त्या मायामृगाच्या मागून चालला. मधून मधून गुप्त होऊन मधून मधून प्रगट होणाऱ्या त्या राक्षसानें रामाला बरेंच दूर नेलें. तो राक्षस आहे हें जाणून विक्रमशाली रामानें अमोघ बाणानें त्याला ठार केलें. बाण लागून पडतांना त्या राक्षसानें, ' हा सीते, हा लक्ष्मणा, ' याप्रमाणें रामासारखा शब्द काढून प्राण सोडला. तो आर्तस्वर ऐकून त्या शब्दामागें सीता धांवूं लागली, तेव्हां लक्ष्मण तिला म्हणाला, ' भिऊं नकोस, रामाला मारणार कोण आहे ? ' हें लक्ष्मणाचें भाषण ऐकून शुद्धाचरणानें जरी ती मंडित होती तरी स्त्रीस्वभावाचा पगडा बसून ती त्याला निष्ठुरतेनें म्हणाली, ' तुझा हेतु कधीं शेवटास जाणार नाहीं. मी शस्त्र घेऊन स्वतःला मारून घेईन किंवा पर्वतावरून उडी घेईन, किंवा अग्नीमध्यें शिरेन. परंतु व्याघ्री ज्याप्रमाणें कोल्ह्याकडे ढुंकून पहात नाहीं तसें रामचंद्रांना सोडून मी तुझा अंगीकार कधीं करणार नाहीं. ' रामावांचून ज्याला अन्य कांहीं प्रिय नाहीं, असा तो धनुर्धर लक्ष्मण हें सीतेचें कर्णकटु शब्द ऐकून कानावर हात ठेवून मागें तिच्याकडे पहात रामाच्या पावलाच्या मागून निघाला. ही संधि पाहून दुष्ट रावण भस्मानें झांकलेल्या अग्नीप्रमाणें भस्म लावून यतिवेषामध्यें त्या निष्पाप सीतेला हरण करण्याकरितां आला. त्याला पाहून अतिथिधर्म ठाऊक असल्यामुळें फलमूलें तिनें त्याच्यापुढें ठेविलीं. तीं न घेतां आपलें रूप प्रगट करून ' मी राक्षसांचा स्वामी जगविख्यात रावण आहें. ह्या महासागराच्या पलीकडे लंका नांवाची माझी रम्य राजधानी आहे. त्या ठिकाणीं स्त्रीसमुदायांत माझ्या समागमांत तूं फारच शोभशील. ह्या तापसी रामाला सोडून देऊन मजबरोबर चल,' असें म्हणून तो तिचें मन बळवूं लागला. तेव्हां कानावर हात ठेवून सीता म्हणाली, 'हे शब्द फिरून उच्चारूं नकोस. सर्व नक्षत्रांसह आकाश कोसळेल किंवा ह्या पृथ्वीचे तुकडे तुकडे होतील, प्रसंगीं अग्नीही थंड पडेल; परंतु मदोत्कट अशा वनचर नागराजाचा आश्रय करून क्षुद्रजीव दुष्कराकडे कधीं पाहणार नाहीं. मधुपुष्पापासून उत्पन्न झालेले मधुरस प्राशन केल्यावर एकाद्या स्त्रीची आवड पेजेवर जडेल काय?' असें म्हणून रागानें ओंठ थरथर कांपत ती हात झाडीत आश्रमांत शिरूं लागली. रावणानें तिच्यामागून धांवत जाऊन तिला अडविलें व ती अगदीं बेशुद्ध झाली असतां तिच्या केशपाशाला धरून तो वर आकाशामध्यें उडाला. 'इकडे दशरथाचा मित्र व संपाती-

चा भाऊ जटायु नांवाचा कोणी गृध्रराज त्या प्रदेशांत होता. आपल्या सुनेसारख्या त्या सीतेला रावण घेऊन चाललेला पाहून तो त्यावर धांवून गेला आणि 'मी जिवंत असतां हिला हरण करण्याची कोणाची छाती नाहीं, तिला न सोडशील तर तूं जिवंत सुटणार नाहींस,' असें ह्मणून त्यानें रावणाला आपल्या नखानें ओरखडलें व पिसांचा व चोंचीचा प्रहार करून त्याला अगदीं जेरीस आणिलें. रावणाच्या अंगांतून पुष्कळ रक्त बाहूं लागलें. पुष्कळ झरे ज्यांतून वहात आहेत अशा त्या पर्वतप्राय रावणाला रामाचें प्रिय करूं इच्छिणारा तो गृध्र मारीत असतां रावण संतापून त्याच्या अंगावर धांवला आणि आपल्या तरवारीनें त्यानें त्याचे दोन्ही बाहू छाटून टाकले. साभ्रशिखर ज्याचें वेगळें केलें आहे, अशा पर्वतप्राय त्या गृध्रराजाला याप्रमाणें घायाळ करून सीतेला बगलेंत घेऊन रावण चालता झाला. जेथें जेथें ह्मणून आश्रम, सरोवर किंवा नदी दृष्टीस पडे त्या त्या ठिकाणीं सीता अलंकार विकरीत चालली. एका पर्वतशिखरावर पांच वानरांना पाहून त्या ठिकाणीं तिनें आपलें दिव्य वस्त्र खालीं टाकलें. मेघमंडळामध्यें दृश्यमान होणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें वाऱ्यानें उडून येणारें तें पीतवस्त्र त्या पांच वानरांमध्यें येऊन पडलें. याप्रमाणें तो महामानी रावण महासागर ओलांडून रम्य, अनेक वेशी, कोट व तट यांनीं शोभायमान अशा विश्वकर्म्यानें निर्माण केलेल्या लंकेमध्यें येऊन पोहोंचला; व तेथें नंदनवनासारख्या रम्य उपवनामध्यें त्यानें सीतेला ठेविलें. इकडे राम त्या मायामृगाला मारून परतला असतां मार्गांत लक्ष्मण त्याच्या दृष्टीस. 'ह्या राक्षसमय वनामध्यें सीतेला एकटी टाकून तूं कसा आलास,' ह्मणून त्यानें प्रश्न केला असतां सीतेनें उच्चारलेले अश्राव्य व निकराचे शब्द लक्ष्मणानें त्याच्या कानावर घातले. मृगरूपधारी राक्षसानें आपल्याला इतक्या लांब ओढून आणिलें व आपला भाऊही आपल्या मागून आला, यामुळें त्याच्या मनाला मोठी चुटपुट लागून मोठ्या झपाट्यानें तें आश्रमाकडे निघाला. मार्गांत त्या पर्वतप्राय गृध्राला पाहून तो कोणी राक्षस असावा असें वाटून ते तेजस्वी रामलक्ष्मण

त्याकडे धांवले. तेव्हां 'मी दशरथाचा सखा गृध्रराज आहें,' असे त्याचे शब्द ऐकून आपल्या पित्याचें नांव हा कोण घेत आहे ह्मणून ते आश्चर्यचकित झाले. त्या गृध्रानें सीतेसाठीं रावणानें आपल्याला मारल्याचें सांगून 'रावण कोठें गेला,' ह्मणून रामानें विचारलें असतां मानेनेंच दिशा दाखवून त्यानें प्राण सोडला. पित्याचा सखा या नात्यानें त्याची और्ध्वदेहिक क्रिया करून ते आश्रमाला येऊन पाहतात तों त्या ठिकाणीं जिकडे तिकडे सर्व अस्ताव्यस्त पडलें असून कोल्ह्यांची त्या ठिकाणीं गर्दी उडाली होती. सीता नाहींशी झाल्यानें शोकाकुल होऊन ते दोघे शत्रुतापन दक्षिण दिशेला चालले. मेघाच्छादित पर्वताप्रमाणें धिप्पाड व शालवृक्षाप्रमाणें ज्याचे खांदे आहेत, असा एक अकाळविकाळ कबंध नांवाचा राक्षस मार्गांत त्यांच्या दृष्टीस पडला. सहज लक्ष्मणाचा हात धरून तो त्याला तोंडाकडे ओढूं लागला. तेव्हां लक्ष्मण दीन होऊन रामाला ह्मणाला, 'सीतादेवी तशी नाहींशी झाली आहे आणि माझी ही अशी दशा होत आहे. सीता देवीसहवर्तमान कौसल देशाला जाऊन वडिलोपार्जित राज्याला मुकलेल्या तुला राज्याभिषेक होऊन मेघमंडलापासून मुक्त झालेल्या चंद्राप्रमाणें तुझें उज्ज्वल वदन पाहाण्याचें माझें नशिबीं नाहीं!' अशा प्रकारें त्याला शोकाकुल पाहून, यत्किंचित् न डगमगतां तो लक्ष्मणाला ह्मणाला, 'बा लक्ष्मणा, घाबरूं नकोस, माझ्यापुढें याचें कांहीं चालणार नाहीं. मी याचा उजवा हात तोडून टाकतों, आणि तूं डावा तोड.' असें ह्मणून रामानें तिळांच्या कांडाप्रमाणें त्याचा हात तरवारीनें छाटून टाकला. तेव्हां लक्ष्मणानेंही आपल्या तरवारीनें त्याचा उजवा हात छाटून वर प्रहार करून त्याला गतप्राण केलें. तेव्हां त्याच्या शरीरापासून एक दिव्य पुरुष निघून आकाशाकडे चाललेला पाहून रामानें तूं कोण ह्मणून त्याला विचारलें तेव्हां तो ह्मणाला, 'मी विश्वावसु नांवाचा गंधर्व आहें. ब्रह्मशापानें मला ही राक्षसयोनि आली होती. लंकाधिपति रावणानें तुझी सीता हरण केली आहे. हें पुढें हंसकारंडवांनीं गजबजलेलें व शुद्ध जलांनीं पूर्ण ऋष्यमूक पर्वताजवळ पंपासरो-

वर दिसत आहे. त्या ठिकाणीं वानरराज वाली याचा भाऊ सुग्रीव आपल्या चार सचिवांसह रहात आहे. त्याला जाऊन तूं आपल्या दुःखाचें कारण सांग. ह्मणजे तो समानशील तुला साहाय्य करील. सुग्रीवाला रावणाचें ठिकाण खात्रीनें ठाऊक आहे. व सीतादेवीची व तुझी गांठही पडेल. इतकेंच मला सांगतां येण्याजोगें आहे. ' असें ह्मणून तो दिव्य पुरुष अदृश्य झाला. पुढें सीतेला हरण केल्यामुळें दुःखाकुल झालेला राम अनेक कमलांनीं संपन्न अशा जवळच असणाऱ्या पंपा सरोवराकडे निघाला असतां शीतळ, सुखस्पर्श व गंधयुक्त असा वारा अंगावर येत असल्यामुळें मनामध्यें सीतेची आठवण होऊन तो फार व्याकुळ झाला. परंतु लक्ष्मणानें नानाप्रकारें शांतवन केल्यावरून तो पूर्वस्थितीला आला. पंपासरोवराला पोहोंचल्यावर व त्याचें स्वच्छ उदक सेवन करून पितरांना पाणी देऊन फलमूलांनीं संपन्न अशा वृक्षांनीं भरलेल्या ऋष्यमूक पर्वताला तो येऊन पोंहोचला. सुग्रीवाने आपला बुद्धिमान सचीव हनुमान त्याकडे पाठविला. त्याच्याशीं संभाषण झाल्यावर रामलक्ष्मण सुग्रीवाला भेटले व त्या वानरराजाशीं त्यांनीं सख्य केलें. रामानें सुग्रीवाला आपलें काम सांगितल्यावर सीतेनें विमानांतून जाते वेळीं खालीं टाकलेलें वस्त्र वानरांनीं रामाला दाखविलें त्यामुळें खात्री पटून सुग्रीवाला वानरांच्या ऐश्वर्याचा स्वामी ह्मणून रामानी स्वतः अभिषेक केला, व युद्धामध्यें वालीला मारण्याचें अभिवचन दिलें. सुग्रीवानेंही सीतादेवीला परत मिळवून देण्याचें वचन दिलें. याप्रमाणें परस्परांचीं अभिवचनें होऊन एकमेकांच्या मनांत विश्वास उत्पन्न झाल्यावर सर्वजण किष्किंधेला येऊन युद्धाची वाट पहात राहिले. सुग्रीवानें मोठा शब्द केला. तो वालीला सहन झाला नाहीं. परंतु 'ज्याअर्थी हा याप्रमाणें मोठा शब्द करीत आहे त्या अर्थी याला कोणी तरी साहाय्य मिळाला आहे, तेव्हा आपण जाऊं नका,' ह्मणून तारेनें न जाण्याविषयीं त्याची प्रार्थना केली. तेव्हां त्या शशिमुखीला वाली ह्मणाला, ' सर्व प्राणिमात्रांचे शब्द तूं पूर्णपणें ओळखतेस व तूं मोठी चतुर आहेस, तेव्हां या माझ्या नांवाला भाऊ झालेल्याला कोणाचा आधार मिळाला आहे हें सांग ? ' तेव्हां तारा क्षणभर विचार करून ह्मणाली, ' ज्याला मुकलेला, महापराक्रमी, दाशरथी राम याचें व सुग्रीवाचें सख्य होऊन परस्परांचे शत्रू व मित्र एकच झाले आहेत. त्याचा भाऊ, ज्याचा कधीं कोणापासून पराभव व्हावयाचा नाहीं असा बुद्धिशाली लक्ष्मण त्याचें कोणतेंही काम शेवटास नेण्यास तयार आहे. तेव्हां त्या रामाच्या वीर्याच्या व बलाच्या आधारावर तो आपला नाश करण्याला समर्थ आहे. ' हें तिचें हितकर भाषण तुच्छ करून मत्सरी वालीला तिचें मन सुग्रीवावर गेलें असावें असें वाटलें. ह्मणून निष्ठुर शब्दांनीं तिला टाकून बोलून तो गुहेच्या बाहेर पडला व माल्यवत्पर्वताच्या जवळ सुग्रीवाला पाहून तो ह्मणाला, ' पूर्वी अनेकवार मीं तुला जिंकलें आहे, पण ज्ञातिसंबंध लक्षांत आणून सोडून दिलें आहे. फिरून असा मरण्याला कां अधीर झाला आहेस ? ' हें ऐकून सुग्रीव त्याला खोचून ह्मणाला, ' तूं माझें राज्य हरण केलें आहेस व स्त्रीही हरण केली आहेस; तेव्हां आतां जगण्यांत तरी काय हांशील ह्मणून मी मरणाला अधीर झालों आहें. ' याप्रमाणें बोलून ते एकमेकांवर तुटून पडले. दोघांनींही एकमेकांना प्रहार केले व दोघेही मधून मधून खालीं येत होते. दोघांचीही मुष्टिप्रहार करीत बडबड चालली होती. नखांनीं व दांतांनीं एकमेकांनीं एकमेकांना ओरखडल्यामुळें रक्तबंबाळ झालेले ते दोघे वीर फुललेल्या पळसाप्रमाणें दिसत होते. त्या दोघांमध्यें जेव्हां कोणाचीच सरशी दिसेना, तेव्हां मारुतीनें सुग्रीवाच्या गळ्यांत एक माळ घातली. तिच्या योगानें मेघमाला पडलेल्या मलयपर्वताप्रमाणें तो शोभूं लागला. याप्रमाणें ही खूण दिल्याबरोबर रामानें आपलें मोठें धनुष्य ओढून वालीवर नेम धरला. व तोफेच्या शब्दाप्रमाणें धनुष्याचा टणत्कार करून रामानें त्याच्या उरावर बाण मारला. त्या योगानें वाली रक्त ओकूं लागला. आपल्यापुढें रामाला पाहून निरपराध्याला मारल्याबद्दल त्यानें त्याची निंदा केली. याप्रमाणें वाली मरण पावल्यावर तारेसह किष्किंधा सुग्रीवाच्या ताब्यांत आली. रामानेंही पुढें चार महिने माल्यवतावर मुक्काम केला.

इकडे अशोकवनिकेजवळ तापसांच्या आश्रमासारख्या गृहामध्यें पतिविरहामुळें जिचें शरीर कृश होत चाललें होतें अशी सीता उपवास व तपश्चर्या करून दिवस काढीत होती. तिच्या बंदोबस्तासाठीं अनेक आयुधांनीं युक्त अशा राक्षसी रावणानें तेथें ठेविल्या होत्या. कोणाला दोन डोळे, कोणाला तीन डोळे, तर कोणाला कपाळावर डोळा, कोणाची जीभ लांब तर कोणाला मुळींच जीभ नाहीं, कोणाला तीन स्तन तर कोणाला एक पाय, अशा प्रकारच्या विद्रुप राक्षसी रात्रंदिवस मोठ्या हुषारीनें तिच्यावर पहारा करीत असून ' हिला खाऊन टाका, हिला फाडा, तिळातिळा एवढें हिचे तुकडे करा, आमच्या स्वामींना तुच्छ करून ही अद्यापि येथें जिवंत कशी आहे, ' अशा निष्ठुर शब्दांनीं त्या तिला टाकून बोलत. तें त्यांचें निष्ठुर भाषण ऐकून पतिशोकानें विव्हळ झालेली सीता दीर्घोच्छ्वास टाकून म्हणे, ' बायानों, मला लवकर खाऊन टाका, या जिवाचा कांहीं मला मोठा लोभ नाहीं. त्या पुंडरीकाक्षांना अंतरल्यामुळें जिवाची आशा न धरतां ताडाला डांवलेल्या हत्तिणीसारखी मी आपला देह सुकवीत आहें. राघवांवांचून अन्य पुरुषाला मी कधीं बळणार नाहीं हें पक्कें जाणून तुम्हांला जें काय करावयाचें असेल तें करा. ' हें तिचें भाषण ऐकून त्या कर्कशा राक्षसी तें सर्व आदरून रावणाला सांगण्याला त्याकडे गेल्या असतां त्रिजटा नांवाची राक्षसी मधुर शब्दांनीं सीतेचें शांतवन करून म्हणाली, ' बाई, माझ्या बोलण्यावर जर तुझा विश्वास असेल तर भीति सोड. अविंध्य नांवाचा वृद्ध राक्षसश्रेष्ठ रामाचें हित पाहणारा आहे. त्यानें मला तुला असें सांगण्याला सांगितलें आहे कीं, लक्ष्मणासहवर्तमान तुझा पती खुशाल आहे, व इंद्रतुल्य वानरराजाशीं सख्य करून तो तुला सोडविण्याची खटपट करीत आहे. या पापी रावणाची तुला बिलकूल भीति नको. पूर्वी या पाप्यानें रंभेवर बलात्कारानें हात टाकला, तेव्हां नलकूबेराचा याला शाप झालेला आहे; त्याच्या योगानें तुझें रक्षण होत आहे. ह्या अजितेंद्रियाची याला अनुकूल न होणाऱ्या स्त्रीवर हात टाकण्याची छाती नाहीं. सुग्रीवासहवर्तमान राम लवकरच येऊन तुला सोडवील. हा पौलस्त्यकुलाला कलंक आणणारा दुर्बुद्धि व निंद्यकर्म करणारा आपल्या स्वभावानें व शीलानें सर्वांनाच भीति उत्पन्न करीत आहे. कालानें याची बुद्धि नष्ट झाल्यामुळें हा सर्व देवांशीं वैर बांधीत आहे. याच्या नाशाची चिन्हें मीं स्वप्नांत पाहिलीं. मुंडून तेल चोपडलेला हा चिखलांत बुडून गाढव जोडलेल्या रथामध्यें नाचतांना माझ्या दृष्टीस पडला. त्याचप्रमाणें कुंभकर्णादिकही नग्न व केस मोकळे सुटलेले रक्तवस्त्र नेसून रक्तचंदन फासलेले दक्षिणेकडे चाललेले मला दिसले.श्वेतछत्र, श्वेतवस्त्र व मुकुट धारण केलेला शुभ्रमालाधारी व चंदनचर्चित असा बिभीषण मात्र एकटा आपल्या चार मंत्र्यांसह शुभ्र पर्वतावर चढतांना माझ्या दृष्टीस पडला. हाडांच्या राशीवर मध व दूध सेवन करीत असणारा लक्ष्मण व तुझें शरीर रक्तानें अरून गेलें असून बाघ जिची पाठ राखीत आहे अशी तूं, असें दोघें उत्तर दिशेकडे चाललेले मला दिसलां. यावरून लवकरच तुझ्या पतीशीं तुझा समागम होऊन तूं आनंदसागरांत बुडून राहशील.' ह्या तिच्या भाषणावरून पतीच्या भेटीची आशा उत्पन्न होऊन ती हरिणाक्षी तेथें काल कंठीत राहिली. याप्रमाणें मलीन वस्त्र परिधान करून मंगलमणीशिवाय बाकीच्या अलंकारांना फांटा देऊन पतिशोकानें व्याकूल झालेली ती तेथें पातिव्रत्यांत दिवस काढीत असतां एके वेळीं शिलातलावर ती बसली असून तिच्या भोंवतीं राक्षसींचा गराडा असतां दानव, गांधर्व यक्षादिकांना देखील युद्धांत हार न जाणारा रावण कामशरानें पीडित होऊन तिच्याजवळ आला.कल्पवृक्षाप्रमाणें वस्त्रालंकारांनीं खुलून जरी तो हिच्याकडे आला होता, तरी स्मशानामध्यें असणाऱ्या पारावरच्या वृक्षाप्रमाणें तो भीति उत्पन्न करीत होता, व त्या तनुमध्येच्याजवळ आला तेव्हां रोहिणीजवळ असणाऱ्या शनीग्रहाप्रमाणें तो दिसूं लागला. हरिणीप्रमाणें घाबरलेल्या त्या अबलेला तो म्हणाला, ' सीते, आतां हा एवढा निग्रह पुरे आहे. तूं आपल्या पतीवर बरीच दया दाखविलीस, आतां अलंकार वगैरे घालून उत्तम वस्त्रभरणांनीं विभूषित होऊन माझा स्वीकार कर. माझ्या स्त्रियांमध्यें पुष्कळ देवकन्या, दै-

त्यकन्या, राक्षसकन्या, इत्यादि आहेत. सहा कोटी यक्ष माझ्या आज्ञेला हात जोडून उभे आहेत. साक्षात् वैश्रवा ऋषींपासून माझा जन्म आहे व लोकपालामध्ये मी पांचवा आहे अशी जगामध्ये माझी कीर्ति आहे. माझ्या घरीं इंद्रभुवनाप्रमाणें नानाप्रकारचीं दिव्य भक्ष्यभोज्यपेयें आहेत. आतां ही कष्टमय वनचरवृत्ति सोडून देऊन मंडोदरी सारखीच तूं माझी प्रियकरी हो. ' हें त्याचें भाषण ऐकून तोंड फिरवून व मध्यें काडी ठेवून आपल्या उन्नत व संलग्न अशा स्तनयुगलाला दुःखाश्रूंनीं न्हवडावीत सीता त्याला ह्मणाली' ' हे राक्षसेश्वरा पति हेंच मला दैवत असतां अशा प्रकारचें तुझें निष्ठुर भाषण ऐकण्याचें मज अभागिणीच्या कपाळीं आलें आहे. सुखलंपट अशा त्वां आतां तरी या निंद्य विचारापासून आपलें मन फिरवावेंस. मी परस्त्री असून पतिव्रता असल्यानें तुला कधीं मिळणार नाहीं. मी गरीब मानवस्त्री तुझी स्त्री होण्याला पात्रही पण नाहीं. आतां मज अबलेवर तूं बलात्कार करीन ह्मणशील तर त्यापासून तरी तुला काय मोठें सुख होणार? प्रजापतिसाररूप्या ब्राह्मणापासून तुझा जन्म असून धर्म राखीत नाहींस तर तुला लोकपाल तरी कसें ह्मणावें? शंकरांचा सखा राजराज कुबेर ह्याला आपला भाऊ ह्मणवितांना तुला लाज कशी वाटत नाहीं?' असें ह्मणून शोकाकूल होऊन तिनें वस्त्रानें तोंड झांकून घेतलें. ते वेळीं तिचें स्तन कंपायमान दिसत असून मस्तकावरील लांब वेणी एकाया कृष्णवर्ण नागिणीप्रमाणें दिसत होती. अशा प्रकारें निष्ठुर भाषणानें तिनें धिक्कारिलें असतांही तो दुर्बुद्धि रावण तिला फिरून ह्मणाला, 'सीते, मदन माझ्या शरीराला बाधेल तितकी पीडा देवो, परंतु तुझ्या मनाविरुद्ध मी तुला हात लावणार नाहीं. आतां माझ्या भक्ष्यस्थानीं असलेल्या रामाचें नांव तूं अजून सोडीत नाहींस त्याला माझा निरुपाय आहे.' असें ह्मणून तो निघून गेला.

इकडे सुग्रीवाच्या आश्रयानें रामलक्ष्मण माल्यवत पर्वतावर रहात असतां एके दिवशीं आकाश स्वच्छ असून त्यामध्यें ग्रहनक्षत्रांसह चंद्रमा प्रकाशमान होता. अशा वेळीं कमलगंधी शीत वायु अंगावर आल्यामुळें एकदम राम जागा झाला व राक्षसाच्या घरीं अडकून पडलेल्या सीतेची आठवण होऊन कष्टी होऊन लक्ष्मणाला ह्मणाला, ' बा लक्ष्मणा, किष्किंधेला जाऊन नित्यव्यवसायामध्यें मग्न झालेला, कृतघ्न व स्वार्थसाधनपटु सुग्रीवाची बातमी घेऊन ये. ह्या कुलाधम मूढाला, याचसाठीं वालीला मारून मीं राज्याभिषेक केला काय? हा वानरजातीला कलंक आणणारा नीच कृतघ्न आहे. हा मूढ मला विसरला; व संकेताचीही याला आठवण नाहीं. जर हा माझ्या कामासंबंधानें कांहीं यत्न न करतां झोंप घेत असेल तर त्याला वालीचीच वाट दाखीव. परंतु माझ्या कामासाठीं त्याचा यत्न चालला असेल तर त्याला लवकर मजकडे घेऊन ये. ' गुरुवचन पाळण्याला एका पायावर तयार असणारा लक्ष्मण हें ऐकून धनुर्बाण घेऊन किष्किंधेला निघाला. तो संतापून आला आहे, असें समजल्यावरून स्त्रीसहवर्तमान त्याला सामोरा जाऊन सुग्रीवानें त्याचा योग्य सत्कार केला. आणि लक्ष्मणाच्या तोंडून रामाचा निरोप ऐकून तो नम्रपणें हात जोडून ह्मणाला, ' मी दुर्बुद्धि नाहीं, कृतघ्न नाहीं, किंवा निष्ठुरही नाहीं. सीतादेवीच्या शोधार्थ मी प्रयत्नांत आहें. हुषार हुषार वानर मीं सर्व दिशांना पाठविले आहेत. आणि महिन्याच्या आंत परत येण्याबद्दल त्यांना सक्त हुकूम दिला आहे. त्यांना कांहीं न सोडतां चोहोंकडे सीतादेवीचा शोध करण्यास सांगितलें आहे. तो महिना पांच दिवसांनीं संपणार आहे; ते वेळीं सुवार्ता तुमच्या कानीं पडेल. ' हें सुग्रीवाचें भाषण ऐकून लक्ष्मणाचा राग शमला व सत्कारपूर्वक त्याला रामाकडे घेऊन येऊन शोध सुरू असल्याचें वर्तमान त्यानें त्याला कळविलें.

इकडे दक्षिण दिशेला गेलेल्या वानरांखेरीज इतर सर्व वानर सागरांत पृथ्वी शोधून सीतादेवीचा शोध लागत नाहीं ह्मणून सांगत परत आले. दक्षिण दिशेला गेलेल्या वानरांवरच रामचंद्राचा सर्व भरंवसा असून त्यावरच मोठी आशा ठेवून तो प्राण धरून होता. इकडे जवळ जवळ दोन महिने लोटताहेत तों कांहीं वानरांनीं सुग्रीवाकडे गडबडीनें येऊन त्यानें मोठ्या काळजीनें राखून ठेवलेल्या, रम्य मधुवनाचा अंगद प्रभृति वानरांनीं येऊन फडशा उड-

विल्याची वर्दी त्याला दिली. ही त्यांची उद्दाम वृत्ति ऐकून सुग्रीवाला आपण कृतकृत्य झालोंसे वाटलें. कारण कामांत यश मिळवून आलेल्या सेवकांकडेच इतरांच्या हातून असें वर्तन घडणें शक्य नाहीं हें तो पक्कें समजून होता. त्यानें रामाला जाऊन ती हकीकत कळविली. इतक्यांत मारुतीप्रभृति वानरही मधुवनांत विश्रांति घेऊन तेथें आले. त्यांची चालण्याची ढब व व प्रफुल्लित मुद्रा पाहूनच सीता मारुतीच्या दृष्टीस पडली असें रामाला खात्रीनें वाटलें. त्यांनीं येऊन रामचंद्रादिकांना विधिपूर्वक नमस्कार केल्यावर मारुती ह्मणाला, 'प्रभो, सीतादेवी माझ्या दृष्टीस पडली. आह्मी सर्व दक्षिण दिशा धुंडाळून थकून गेलों असतां व मुदतही संपली असतां पुष्कळ योजनें लांब व दाट झुडपांनीं किर्र व कीटकांनीं भरलेली अशी एक गुहा आमच्या दृष्टीस पडली, तींत शिरून बरेंच दूर गेल्यावर सूर्यकिरण दिसूं लागून मयासुराचें राहण्याचें एक दिव्य गृह आमच्या पाहण्यांत आलें. त्या ठिकाणीं प्रभावती नांवाची तापसी तप करीत बसली होती. तिनें दिलेलीं नानाविध भक्ष्यपेयें सेवन करून ताजे तवाने होऊन तिनें दाखविलेल्या मार्गानें आह्मी बाहेर पडलों तों लवण समुद्र व त्याजवळच मलय, सह्य व दर्दुर हे महापर्वत आमच्या दृष्टीस पडले. ते बेळीं मलय पर्वतावर चढून शेंकडों योजनेंपर्यंत पसरलेला व मासे, सुसरी, इत्यादिकांनीं भरलेला असा तो विस्तीर्ण महासागर पाहून आह्मी खिन्न व निराश झालों. व प्रायोपवेश करण्याचा निश्चय करून त्या ठिकाणीं बसलों. तेव्हां कथाप्रसंगांत जटायूचें नांव निघालें असतां पर्वतशिखराप्रमाणें धिप्पाड, आकाळविकाळ, व पहाणारांच्या मनांत भीति निपजविणारा प्रति गरुडासारखा एक पक्षी आमच्या पहाण्यांत आला. तो आह्मांला खाणार होता, पण जवळ येऊन "माझ्या भावाचें नांव घेणारे तुह्मी कोण, मी त्याचा वडील भाऊ आहें, आह्मी उभयतां चढाओढीनें सूर्याकडे उड्डाण करीत असतां माझे पंख जळून जाऊन मी या ठिकाणीं पडलों, जटायूचे पंख जळले नाहींत, त्याची माझी गांठ बरेच दिवसांत पडली नाहीं," ह्मणून त्यानें आह्मांला विचारलें. आह्मीं त्याला त्याच्या भावाच्या मरणाची वार्ता थोडक्यांत सांगून आमचा उद्देशही त्याला कळविला. तेव्हां रावणाची माहिती आह्मांला देऊन व पुढें समुद्रापलीकडे त्रिकूट पर्वताच्या दरीमध्यें असलेली लंका दाखवून देऊन त्यानें आह्मांला आमच्या कार्याला प्रवृत्त केलें. आह्मी कालक्षेप न करतां तो समुद्र ओलांडण्याच्या विचाराला लागलों. कोणी तो समुद्र ओलांडण्यास तयार होईना. तेव्हां वायुमार्गानें वांटेत जलराक्षसीला मारून तो शंभर योजनें विस्तीर्ण समुद्र मीं ओलांडिला. त्या ठिकाणीं उपवास करून तपांत काल घालवीत असलेली, पतीदर्शनाविषयीं लालस, केस विसकटलेली, शरीर मलीन व कृश झालेली अशी बिचारी सीतादेवी माझ्या दृष्टीस पडली. व अनेक सूचक चिन्हांनीं ही सीतादेवी असावी, असें अनुमान करून तिची एकांतांत मीं गांठ घेतली; व मी वायुपुत्र मारुती रामदूत तुझी गांठ घेण्याकरितां येथें आलों आहें असें सांगून इकडील कुशल वर्तमान तिला कळविलें. आणि सर्व वानरांसह भगवान रामचंद्र लवकर येऊन तुझी सुटका करतील ह्मणून सांगितलें. तेव्हां क्षणभर विचार करून अविंध सचिवाकडून आमच्या संबंधाची सर्व बातमी तिला समजली असल्याचें तिनें मला सांगितलें, व खुणेसाठीं हा मणी देऊन चित्रकूट पर्वतावर कावळ्यावर इषिकास्त्र सोडल्याची हकीकत मला सांगितली. याप्रमाणें रामा, तुझा दूत असल्याबद्दलची पूर्ण खात्री करून देऊन, लंका जाळून मी निघून आलों. पुढें त्यासहवर्तमान रामचंद्र तेथ बसला असतां सुग्रीवाच्या आज्ञेनें कोणी खर्व, तर कोणी साठ खर्व, तर कोणी महामद्म, याप्रमाणें वानरसेना घेऊन सुषेण, गंधमादन, पनस इत्यादि वानरनायक तेथें येऊन हजर झाले. पर्वतशिखराप्रमाणें ज्यांचे देह आहेत, असे ते वानर सिंहाप्रमाणें गर्जना करून इकडे तिकडे धांवत असतांना सर्व प्रदेश त्यांच्या शब्दांनीं दणाणून गेला. समुद्राप्रमाणें अफाट अशा त्या वानरांच्या सेनेनें तेथें तळ दिला. पुढें उत्तम मुहूर्तावर त्या जमलेल्या सैन्यासहवर्तमान जणूं काय सर्व लोक उलथून टाकण्याला प्रवृत्त झाला आहे कीं काय असा तो वैभवशाली रामचंद्र सुग्रीवा-

सहवर्तमान निघाला. वायुपुत्र मारुतीनें सैन्याचा पुढाकार घेतला असून मागें लक्ष्मण त्याच्या संरक्षणाला होता. सर्वांवर्ती वानरनायक असणारे ते रामलक्ष्मण ग्रहांमध्यें असणाऱ्या चंद्रसूर्यांप्रमाणें लंकेकडे निघाले. साल, ताल, शिला इत्यादि आयुधांनिशीं रामकार्यासाठीं निघालेलें तें वानरसैन्य सूर्योदयाच्या वेळच्या साळीच्या शेताप्रमाणें शोभायमान दिसत होतें. विस्तीर्ण, नानाप्रकाच्या फलमूलांनीं संपन्न व मधुमांसांनीं समृद्ध व स्वच्छ जलांनीं पूर्ण अशा अनेक पर्वतशिखरांवरून कांहीं अडथळा न येतां मुकाम करीत प्रति समुद्रासारख्या त्या अफाट वानरसेनेनें समुद्रकिनाऱ्यावरील जंगलांत येऊन तळ दिल्यावर रामचंद्र सुग्रीवाला ह्मणाला, 'सैन्य फार मोठें असून हा समुद्र दुर्लंघ्य आहे, तेव्हां हा ओलांडून जाण्याला काय उपाय करावा? आतां जरी पुष्कळ नावा आह्मांला नेण्यासाठीं तयार आहेत तरी त्या उपयोगांत आणून त्यापाऱ्यांच्या व्यापाराला अडथळा आणणें हें आमच्यासारख्याला उचित नाहीं. शिवाय हें सैन्य फारच अफाट असल्यामुळें संधि मिळाली असतां शत्रू कदाचित् त्याचा नाश करतील. ह्मणून नावेंतून जाणें मला प्रशस्त वाटत नाहीं; यासाठीं समुद्राची आराधना करून त्याकडून मार्ग मागून घ्यावा, असें मला वाटतें. तो मार्ग नच देईल तर ह्या अमोघ महास्त्रांनीं त्याला जाळून भस्म करण्याला मी तयारच आहें.' असें ह्मणून उदकस्पर्श करून कुशासनावर ते दोघे रामलक्ष्मण पडले असतां समुद्रानें स्वप्नामध्यें रामचंद्राला दर्शन देऊन त्यांना वाटेल तें साहाय्य देण्यास तो कबूल झाला. रामचंद्रानें ज्ञातिसंबंध लक्षांत घेऊन आपल्या सैन्याला रावणाला मारण्यासाठीं लंकेला जाण्याला वाट मागितली. तेव्हां मी तुला विघ्न करूं इच्छित नाहीं. परंतु आज मीं जर तुझ्या आज्ञेनें तुझ्या सैन्याला वाट दिली तर उद्यां दुसरेही आपल्या धनुष्याच्या जोरावर मला याचप्रमाणें आज्ञा करतील. तुझ्या सैन्यामध्यें उत्तम कारागीर विश्वकर्म्याचा पुत्र नल आहे, तो माझ्यामध्यें जें कांहीं लांकूड, दगड, किंवा गवत फेकील तें मी तरवीन. त्याच्या योगानें तुला जाण्याला सेतु तयार होईल,' असें सांगून तो तेथें अदृश्य झाला. व नलानें रामचंद्राच्या आज्ञेनें सेतु तयार केला. तो अद्यापि नलाचा सेतु ह्मणून प्रसिद्ध आहे. रामचंद्र याप्रमाणें त्या ठिकाणीं तळ देऊन असतां विभीषण आपल्या चार मंत्र्यांसहवर्तमान त्यांकडे आला. रामचंद्रानें त्याचें स्वागत करून सत्कार केला. व सर्व राक्षसराज्यावर त्याला अभिषेक करून आपला सल्लागार केला. पुढें रामचंद्र विभीषणाच्या सल्ल्यानें तो समुद्र त्या पुलावरून एक महिन्यांत ओलांडून लंकेंत शिरला. नंतर वानरांकडून त्यानें तेथील अनेक उद्यानाचा नाश करविला. त्यावेळीं रावणाचे दोन शुक व सारण नांवाचे मंत्री वानराचें रूप घेऊन टेहळणी करीत असतां विभीषणानें पकडले. त्या दोघांना रामानें आपलें सैन्य दाखवून सोडून दिलें व सैन्याचा तळ तेथें एका बागेंत देऊन बुद्धिमान अंगदाला रावणाकडे मध्यस्तीला पाठविलें. याप्रमाणें रामचंद्र अन्न, उदक व फलमूलें यांनीं संपन्न अशा त्या वनामध्यें सैन्याचा तळ देऊन राहिला असतां रावणानेंही युद्धाची सर्व तयारी सशास्त्र केली. लंकानगरी मुळचीच कोणाला दाद देणारी नसून तिच्या भोंवतीं मजबूत तट उभारले होते. त्याच्याभोंवतीं सात खंदक असून त्यांत पुष्कळ पाणी व सुसरी वगैरे जलचर प्राणी सोडले होते. व त्याच्यासभोंवतीं खदिराचे डाम रोंवले होते. वेशींना भक्कम दरवाजे असून बुरजांवर तोफा मलमूत्रादि फेंकण्याकरितां पिचकाऱ्या व गोफणीनें मारण्याकरितां धोंडे सांठविले असल्यामुळें हल्ला करणाऱ्यांना ती कांहीं दाद देण्यासारखी नव्हती. अनेक विषारी साप, हत्ती, लढवय्ये, राळ, वगैरे ज्वालामुखी पदार्थ, मुसळ, पलिते, तरवारी, परशु इत्यादि आयुधांची तटावर समृद्धि होती. सर्व वेशींना मजबूत बुरूज असून हत्ती, घोडे व पायदळ संरक्षणाकरितां ठेवले होते. अंगद लंकेच्या वेशीपाशीं आल्यावर रावणाला तो आल्याची वर्दी मिळाली व कोठाबाधि राक्षस त्याला सामोरे आले. त्यांच्या घोळक्यामध्यें निर्भयपणें तो नगरांत शिरत असतां मेघमालांनीं झांकून टाकलेल्या सूर्याप्रमाणें तो दिसत होता. तो महा-

बका रावणाजवळ जाऊन म्हणाला, 'कौसलेंद्र रामचंद्राचें प्रसंगोचित तुला पुढील निरोप सांगितला आहे; तो ऐकून घेऊन काय करणें असेल तें कर 'अन्यायप्रवृत्त उच्छृंखल राजाच्या प्रजेचाही त्याबरोबर नाश होत असतो. तूं एकट्यानें बलात्कारानें सीतेचें हरण करून माझा अपराध केला आहेस, पण हें निरपराधी अशा इतरांच्या मरणाला कारणीभूत होणार आहे.आपल्या बलाच्या घमेंडींत तूं वनवासी ऋषींना मारलें आहेस, देवांचा अपमान केला आहेस, व राजऋषींना मारून त्यांच्या बायकांना रडावयाला लावलें आहेस. त्या अनन्वित कृत्यांचें फळ तुझ्यापुढें वाढून आलें आहे. तुझ्या अमात्यवर्गासह मी तुला मारण्याला आलों आहें. आतां शूराप्रमाणें मजबरोबर युद्ध कर व आज ह्या यःकश्चित् मानवाच्या धनुष्याचें सामर्थ्य किती आहे तें पहा. जानकीला सोडून दे,नाहीं तर माझ्या तावडींतून तूं कधीं जिवंत सुटणार नाहींस. तीक्ष्ण बाणांनीं ह्या जगांत मी एक राक्षस ठेवणार नाहीं.' हे अंगदाचे निष्ठुर शब्द रावणाला सहन न होंता तो रागानें लाल झाला. त्याच्या चार सेवकांनीं, त्याच्या चर्येवरून त्याचा भाव जाणून क्षुद्र पक्ष्यांनीं ज्याप्रमाणें वाघावर झडप घालावी तसें अंगदाला त्यांनीं जाऊन धरलें. अंगद त्यांच्यासह आकाशांत उडाला.त्याच्या त्या वेगानें ते राक्षस जमिनीवर धाडकन् हापटून त्यांचे तुकडे तुकडे झाले. इकडे अंगद लंका सोडून आपल्या सैन्यामध्यें परत आला व झालेला सर्व वृत्तांत त्यानें रामाला सांगितला. नंतर वायुगति वानरसेना पाठवून रामानें लंकेचा कोट फोडविला. लक्ष्मणानें मोठें मजबूत असें तिचें दक्षिण द्वार फोडलें. राखी रंगाची ती समरशाली वानरसेना कोटिशः लंकेंत शिरली. ज्यांचे दंड, मांड्या, हात, वगैरे लांब आहेत, अशीं तीन कोटि धूम्रकर्ण अस्वलेंही त्या मागून आंत शिरलीं. वानरांचें इकडून तिकडे उड्या मारण्याचें काम चाललें असतां धुळीनें सूर्यकिरण झांकले गेल्यामुळें सूर्य दिसेनासा झाला होता. साळींचीं लोंबटें, शिरसीचीं फुलें, प्रभातकालीन सूर्य व ताग यासारख्या भिन्न वर्णाच्या वानरांनीं सर्व तटाला धुरकट रंग आलेला पाहून राक्षस थक झाले. लंकेंतील रत्नखचित खांब, मनोरे, वगैरे सर्व फोडून टाकून बुरुजांवरील तोफा त्यांनीं दूर फेकून दिल्या. तटरक्षक राक्षसांना वानरांनीं पळवून लावल्यामुळें त्यांची चोहोंकडे धांवाधांव सुरू झाली. तेव्हां रावणाच्या आज्ञेनें कामरूपी राक्षस अकाळ रूप धारण करून हजारांच्या टोळ्यांनीं बाहेर पडले व त्यांनीं शस्त्रांचा वर्षाव करून वानरांना पळवून लावून तो तट निर्वानर केला. दोन्ही सैन्यांचें हातघाईचें युद्ध चाललें असतां नखांनीं व दांतांनीं ते एकमेकांना ओरखडून खाऊन टाकीत होते, व कित्येक वीर जखमी होऊन भूमीवर पडत असतांही चिकाटी सोडीत नव्हते. रामानेंही शरवर्षाव चालवून राक्षसांचा फडशा चालविलाच होता.इकडे कांहीं राक्षस अदृश्य राहून युद्ध करूं लागले असतां विभीषणानें त्याची अंतर्धान शक्ति काढून घेतली. तेव्हां ते वानरांना दिसूं लागून त्यांनीं त्यांचा फडशा उडविला. रावणाला हें सहन न होऊन,पिशाचांच्या घोर सैन्यासह येऊन युद्धकलेमध्यें प्रति शुक्राचार्य असल्यामुळें त्यांच्या अनुशासनानुरूप व्यूहरचना करून तो रामसैन्यावर चालून आला. रामानेंही बृहस्पतींच्या अनुशासनानुरूप सैन्यरचना करून राक्षसांशीं युद्ध केलें. रामरावणांचें तुंबळ युद्ध जुंपलें असतां इतर योद्धेही आपापल्या तोडीच्या बरोबर युद्ध करीत होते.भित्र्या लोकांची गाळणच उडावी असें तुंबळ युद्ध चाललें असतां त्रैलोक्यांमधील सर्व चराचर भयकंपित झालें होतें. प्रहस्थ राक्षसानें बिभीषणावर तुटून पडून त्यावर गदेचा प्रहार केला. तेव्हां यत्किंचितही न डगमगतां बलशाली बिभीषणानें शक्ति त्यावर सोडून एका क्षणांत वाऱ्यानें उपटून पाडलेल्या झाडाप्रमाणें त्याला भूमीवर पाडलें. धूम्राक्ष राक्षसानें मोठ्या वेगानें वानरसेनेवर चाल करून त्यांची दाणादाण केली. तेव्हां कपिश्रेष्ठ मारुती पुढें सरसावल्याबरोबर सर्व कपिसेना परतली. फिरून घोर संग्राम सुरू होऊन रक्ताचा पूर वाहूं लागला. तो बलाढ्य राक्षस तुटून येत असतां मारुतीनें त्याला अंगावर घेतलें, व दोघांचें तुंबळ युद्ध जुंपलें, त्यांत मारुतीनें धूम्राक्षाला ठार केलें. तेव्हां वानरांना दम येऊन त्यांनीही पुष्कळ राक्षससेनेचा फडशा उडविला. त्या बलाढ्य वानरांच्या तडाक्यांतून सुटलेले कांहीं हताश राक्षस गर्भगळित होऊन लंकेस

शिरले व त्यांनीं झालेली सर्व हकीकत सायंत रावणाच्या कानावर घातली. आपले दोन वीर मेल्याची बातमी ऐकून दीर्घोच्छ्वास टाकून रावण आसनावरून उठला व कुंभकर्णाला मोठ्या यत्नानें त्यानें जाऊन उठविलें. तो शांतपणानें उठून बसल्यावर त्याच्या त्या गाढ झोंपेबद्दल आश्चर्य करून व कपिसैन्यासह येऊन रामानें सर्व नासाडी मांडल्याचें त्याला कळवून सशस्त्र जाऊन दूषणाच्या धाकट्या भावाच्या साहाय्यानें त्याला जिंकण्यास सांगितलें. तेव्हां कुंभकर्ण आपल्या लोकांसह नगराबाहेर पडला. याला पाहतांच सर्व वानर धनुष्पाणी लक्ष्मणाच्या भोंवतीं गोळा होऊन प्रचंड वृक्ष त्यावर फेंकूं लागले. कांहीं यत्किंचितही न भितां नखांनीं त्याला ओरखडूं लागले. कुंभकर्ण त्या प्रहारांनीं यत्किंचितही न डगमगतां हासत हासत त्यांना गट्ट करीत होता. हें कुंभकर्णाचें पीडाकारक कर्म पाहून वानर घाबरले. तेव्हां मोठ्या धैर्यानें त्यावर धांवून जाऊन सुग्रीवानें शालवृक्ष त्याच्या डोक्यावर हाणला. तो वृक्ष मोडून गेला परंतु त्यापासून कुंभकर्णाला यत्किंचितही इजा झाली नाहीं, मात्र त्यानें त्याची झोंपेची गुंगी जाऊन त्यानें सुग्रीवाला आपल्या बाहूंत धरलें. तेव्हां मित्रानंदकर लक्ष्मणानें धांवून जाऊन सुवर्णपिसांनीं युक्त असा एक भला मोठा बाण कुंभकर्णावर सोडला. तो बाण त्याचें कवच फोडून शरीरांतून निघून जाऊन रक्तानें भरलेला असा जमिनींत शिरला. तेव्हां कुंभकर्णानें सुग्रीवाला सोडून दिलें व हातांत भला थोरला धोंडा घेऊन तो लक्ष्मणावर धांवला. आपल्याकडे धांवून येणाऱ्या कुंभकर्णाचे दोन्ही हात तीक्ष्ण अशा क्षुरप्र बाणांनीं लक्ष्मणानें तोडून टाकले. त्याबरोबर कुंभकर्ण मायेच्या योगानें चतुर्भुज झाला. तेव्हां लक्ष्मणानें आपलें अस्त्रलाघव दाखवून तेही तोडून टाकले. तेव्हां कुंभकर्णानें फिरून मायेनें असंख्य देह व हात पाय धारण केले. नंतर दिव्य अशा ब्रह्मास्त्राचा तडाका देऊन विजेनें चाटलेल्या झाडाप्रमाणें लक्ष्मणानें त्याला भूमीवर गतप्राण पाडलें. यामुळें राक्षसांची पांचावर धारण बसून ते पळाले. व त्यांनीं जाऊन ती बातमी रावणाला दिली. पुढें रावणानें आपला पुत्र जो इंद्राला देखील जिंकणारा इंद्रजित याला जाऊन मायेनें किंवा उघड रामलक्ष्मणांना जिंकून उज्ज्वल कीर्ति मिळविण्यास व कुंभकर्णाला उगवितां न आलेला खराचा सूड उगवून आपल्याला आनंद देण्यास सांगितलें. ती पित्याची आज्ञा होतांच अंगांत कवच घालून रथावर बसून इंद्रजित रणभूमीकडे निघाला; व मोठ्यानें आपलें नांव कळवून त्यानें लक्ष्मणाला युद्धाला बोलाविलें. लक्ष्मणही याप्रमाणें आव्हान होतांच धनुष्याच्या टणत्कारानें सर्व सेनेला गर्भगळित करीत त्याकडे धांवला. जयेशी व दिव्यास्त्रज्ञ अशा त्या दोन वीरांचें मोठें घनघोर युद्ध झालें. बाण सोडण्यामध्यें लक्ष्मणापुढें आपलें कांहीं चालत नाहीं, असें पाहून इंद्रजित रथांतून खालीं उडी घेऊन मायेनें त्या ठिकाणीं अदृश्य झाला. अनेक मायांमध्यें निष्णत अशा त्या राक्षसाला अदृश्य झालेला पाहून राम आपल्या सैन्याकडे येऊन मोठ्या दक्षतेनें त्याचें रक्षण करीत राहिला. इकडे इंद्रजित अदृश्य राहून आपल्या प्रासादिक बाणांनीं लक्ष्मणाच्या सर्व अंगाला जखमा करूं लागला. आतां रामलक्ष्मणांनीं मायेनें अदृश्य झालेल्या इंद्रजिताबरोबर युद्ध चालविलें खरें, परंतु तो अदृश्य असल्यामुळें त्यांचें कांहीं चालेना. इंद्रजितानें बाणांच्या जाळ्यांत त्यांना अगदीं गुरफुटून टाकलें असतां ते दोन नरवीर पिंजऱ्यांत आडकलेल्या पक्ष्याप्रमाणें भांबावलेले दिसत होते. त्यांच्याजवळ येऊन प्रज्ञास्त्राच्या योगानें बिभीषणानें त्यांना शुद्धीवर आणलें. सुग्रीवानें त्यांच्या अंगांतील बाण उपटून काढले. याप्रमाणें ते शुद्धीवर आल्यावर कुबेराकडून गुह्यकानें आणून दिलेलें उदक रामाला देऊन बिभीषण म्हणाला, 'अदृश्य असणारे प्राणी हें उदक नेत्राला लाविलें असतां दिसतील, असें सांगून कुबेरानें हें तुझ्याकडे पाठविलें आहे. कोणाच्याही डोळ्याला हें लाविलें असतां त्याला अदृश्य वस्तु दिसूं लागेल.' तें ऐकून रामानें तें उदक आपल्या डोळ्याला लावून इतर सर्वांनाही तें दिलें. व त्याच्या योगानें त्या सर्वांना अदृश्य वस्तु दिसूं लागल्या. इकडे बिभीषणाच्या सल्ल्यानें आन्हिकविधी आटोपण्याच्या पूर्वीच इंद्रजिताला ठार मारण्याच्या इराद्यानें लक्ष्मण त्याबर चालून गेला. त्या उभयतांमध्यें नानाप्रकारचे आश्चर्यजनक युद्धप्रसंग घडले.

लक्ष्मणानें अग्नीप्रमाणें दाहक असे आपले मर्मभेदी बाण सोडून एकानें इंद्रजिताचा हात, तर दुसऱ्यानें बाहु, तिसऱ्यानें चकचकीत अशा कुंडलांनीं विभूषित मस्तक तोडून टाकलें व त्याच्या सारथ्यालाही मारलें. पुत्रविरहीत रथ पाहून दुःखानें वेडा बनून रावण सीतेला मारण्याला तरवार घेऊन अशोकवनिकेकडे मोठ्या त्वरेनें निघाला. त्या दुष्टाचा तो पापसंकल्प पाहून अविंध्य मंत्र्यानें बुद्धिवाद सांगून त्याला शांत केला. तो म्हणाला, ' आपण एवढ्या थोरल्या दैदीप्यमान राज्याचा उपभोग घेणारे असून स्त्रीला मारणें आपल्याला उचित नाहीं. आपल्या तावडींत सांपडून आपल्या स्वाधीन झाली तेव्हांच ती मेली आहे, तेव्हां आतां तिच्या देहाचें तुकडे करून तिला काय विशेष मारण्याचें उरलें आहे ! तिच्या नवऱ्याला मारलें म्हणजे तिला मारल्यासारखेंच आहे. पराक्रमांत इंद्रही आपल्या तोडीला लागणार नाहीं. ' याप्रमाणें नानाप्रकारच्या बुद्धिवादांनीं अविंध्यानें त्याचा राग शांत केला. तेव्हां उपसलेली तरवार बाजूला ठेवून रणभूमीकडे जाण्याच्या निश्चयानें आपला रथ सज्ज करण्याविषयीं त्यानें आज्ञा दिली. रत्नविभूषित अशा रथामध्यें बसून घोर व नानाविध आयुधें घेतलेल्या राक्षसांसह बाहेर पडून कपिसैन्याशीं युद्ध करीत करीत तो रामावर गेला. त्यावेळीं कपिसैन्यांनीं मोठ्या आवेशानें त्याला गराडा देऊन मोठमोठ्या झाडांनीं त्यांनीं त्याला त्राहि त्राहि करून सोडलें. मायावी रावण आपल्या देहापासून हजारों राक्षस उत्पन्न करीत असे व राम आपल्या दिव्यास्त्रानें त्या सर्वांचा फडशा पाडी. तेव्हां रावणानें कांहीं रामासारखे व कांहीं लक्ष्मणासारखे राक्षस उत्पन्न करून त्यांना रामलक्ष्मणांवर पाठविले. तरी त्यानें बिलकुल न गांगरतां रामानें त्या आत्मरूपधारी राक्षसांना ठार केलें. लक्ष्मणानेंही कांहीं विचार न करतां तोच क्रम चालविला. इतक्यांत मातली इंद्राचा रथ घेऊन त्याठिकाणीं आला; ' मी सारथ्य करतों, आपण या विजयी रथांत बसून रावणाला जिंका, ' असें तो रामाला म्हणाला. रावणाची ही माया असावी अशी रामाला शंका उत्पन्न झाली. तेव्हां बिभीषणानें त्याची शंका दूर करून त्या रथांत बसून लवकर रावणाला जिंकण्यास सांगितलें. पुढें मोठ्या आनंदानें त्या रथांत बसून राम रावणावर चालून जात असतां प्राणिमात्रांमध्यें जिकडे तिकडे हाहाकार उडाला, व आकाशामध्यें सिंहनाद होऊन दुंदुभी बाजूं लागल्या. या दोघांमध्यें झालेल्या युद्धाला उपमा नसून त्या युद्धाला त्या युद्धाचीच उपमा या पलीकडे त्यासंबंधानें कांहीं म्हणतां यावयाचें नाहीं. मायावी रावण अनेक आयुधांचा उपयोग करीत असतां उडालेली वानरांची दाणादाण पाहून रामानें भात्यांतून एक अप्रतिम बाण काढून त्यावर ब्रह्मास्त्राचा प्रयोग करून रावणांतकर जणूं काय ब्रह्मदंडच असा तो अमोघ बाण त्यानें धनुष्याची दोरी आकर्ण ओढून रावणावर सोडला. त्याच्या योगानें रावण, त्याचा सारथि, रथ व घोडे सर्व जळून खाक झाले. पंचमहाभूतांनीं त्या भाग्यशाली रावणाला सोडलें व मांसरुधिरादि जड वस्तूंची भस्माची रास होऊन पडली.

याप्रमाणें रावणाला मारल्यानंतर देव व ऋषिवर्ग यांनीं रामाला जयाशीर्वाद देऊन त्याचा जयजकार केला. इकडे रामानें लंका बिभीषणाला दिली. पुढें अविंध्य सचिव व बिभीषण सीतादेवीला पुढें करून रामाकडे आले आणि तिचा स्वीकार करण्याबद्दल त्यांनीं रामाची प्रार्थना केली. तेव्हां त्या अश्रुपूर्णनयनेकडे पाहून परपुरुषस्पर्शाचा किंतु दाखवून राम म्हणाला, 'सीते, तुझी मुक्तता करून मला जें करावयाचें होतें तें मीं केलें. तुझा पती मी जिवंत असून राक्षसाच्या घरीं कुचमत पडून तुला कलंक लागूं नये म्हणून मीं त्याला मारलें. खरा धर्म कळत असून आमच्यासारख्यांनीं परस्पर्श झालेल्या स्त्रीला क्षणभर देखील आपल्याजवळ करूं नये. तूं तेथें सद्वर्तनानें राहिली ऐस अगर कशीही राहिली ऐस, कुत्र्यानें शिवलेल्या हवीप्रमाणें तूं मजबरोबर राहण्याला कांहीं योग्य नाहींस.' ह्या रामाच्या निष्ठुर भाषणानें शोकाकुल होऊन तोडून टाकलेल्या केळीप्रमाणें ती धाडकन् भूमीवर पडली आणि तिचें तें रामदर्शनानें थोडेबहुत बिकसलेलें मुख फिरून आरशावर मारलेल्या फुंकाऱ्याप्रमाणें क्षणमात्रांत म्लान झालें. सर्व वानर तें रामाचें भाषण ऐकून मू-

तयार झाले. सीतेला तें सहन न होऊन तिनें लक्ष्मणाला विलंब न लावतां अग्नि पेटविण्यास सांगितलें. लोकांची खात्री व्हावी ह्मणून आरंभिलेल्या रामाच्या ह्म कृत्याला आड न येतां ऑडक्यांची एक मोठी रास रचून ती त्यानें चेतविली. नंतर सीतेनें मोठ्या भक्तीनें रामाला प्रदक्षिणा करून निरनिराळ्या देवतांना नमस्कार केला. व अग्नीजवळ जाऊन हात जोडून ती अग्नीला ह्मणाली, 'माझें हृदय कधीं रामापासून दूर झालें नसेल तर सर्व लोकांचा साक्षीभूत तूं माझें रक्षण कर.' असें ह्मणून अग्नीला प्रदक्षिणा करून मनामध्यें यत्किंचितही भीति न आणतां त्या पेटलेल्या अग्नींत तिनें उडी घेतली. त्यापासून कांहीं अपाय न होतां ती बाहेर पडली.त्या वेळीं हा चमत्कार पाहण्यासाठीं जमलेल्या देव व पितर यांनीं सर्व अंतरिक्ष शरद्ऋतूमध्यें तारकांनीं चित्रविचित्र झाल्याप्रमाणें दिसत होतें. अग्नींतून बाहेर पडून सीता रामाला ह्मणाली, 'अहो राजपुत्र, मी आपल्याला मुळीं दोष देत नाहीं. कारण स्त्रियांचें तसेंच पुरुषांचें वर्तन कसें असावें हें आपण जाणतांच. माझ्या हातून जर पापाचरण झालें असेल तर सर्व भूतांचे ठिकाणीं संचार करणारा वायु, त्याचप्रमाचें अग्नि, उदक, आकाश व पृथ्वी हे माझे प्राण हरण करोत.' हें सीतेचें भाषण ऐकून वायु व अग्नि त्याला आपलें अनुमोदन देऊन ह्मणाले, 'वा रामचंद्रा, सीतेच्या हातून यत्किंचितही पापाचरण घडलें नाहीं; तेव्हां तूं हिचा स्वीकार कर. हा आजपर्यंत वरदानानें सर्वांला अवध्य झालेला, देवगंधर्वांचा वैरी, याला मारून तूं आज देवकार्य केलें आहेस. त्यानें आपल्या नाशाकरितांच सीता नेली होती. 'स्त्रीला तिच्या इच्छेविरुद्ध स्पर्श केला असतां तुझें मस्तक शतशः विदीर्ण होईल,' असा त्याला पूर्वी नलकूबराचा शाप झाला होता, त्याच्या योगानें हिचें संरक्षण झालें आहे.' नंतर दशरथ आकाशांतून प्रेमानें रामाला ह्मणाला, 'तात, मी तुझ्यावर संतुष्ट झालों आहें. मी तुला आज्ञा देतों. आतां जाऊन राज्य कर.' नंतर रामानें देवांना नमस्कार करून सीतेचा स्वीकार केला व अविंध्य व त्रिजटा यांचा सत्कार केला. मातलीनेंही रावणाला मारून देवगंधर्वांचें दुःख निवारण केल्याबद्दल रामाचें अभिनंदन केलें व 'जोंपर्यंत पृथ्वी कायम आहे तोंपर्यंत लोक तुझी कीर्ति गातील,' याप्रमाणें वर देऊन तो इंद्रलोकाला निघून गेला. नंतर सुग्रीव व बिभीषण यांसहवर्तमान राम पित्याच्या आज्ञेनें अयोध्येचें राज्य करण्यासाठीं परत निघाले. समुद्राच्या अलीकडे आल्यावर सर्व वानरांना उत्तम उत्तम रत्नांनीं तोषवून रामानें निरोप दिला व सुग्रीवासहवर्तमान पुष्पक विमानांतून सीतेला निरनिराळे प्रदेश दाखवीत तो किष्किंधेला आला. तेथें अंगदाला युवराज्याचा अभिषेक करून नंतर सर्व मिळून अयोध्येला निघाले असतां रामानें मारुतीला दूत ह्मणून पुढें भरताकडे पाठविलें. भरताच्या एकंदर बाह्य चिन्हांवरून त्याचा भाव ओळखून मारुतीनें नंदिग्रामीं त्याला ती प्रियवार्ता निवेदन केली. पुढें रामचंद्र नंदिग्रामाला आला व अंगावर मळ चढलेल्या वल्कलधारी आपल्या पादुकांपुढें ठेवून बसलेल्या भरताची व शत्रुघ्नाची त्यानें भेट घेतली. सर्वांना परस्परांच्या भेटीपासून परम आनंद झाला. मोठ्या काळजीनें जतन केलेली राज्यरूपी ठेव रामचंद्राच्या स्वाधीन करून भरत कृतकृत्य झाला. नंतर उत्तम तिथि नक्षत्र पाहून वसिष्ठवामदेवांनीं रामाला राज्याभिषेक केला. नंतर नानाप्रकारच्या वस्तूंनीं सुग्रीव व बिभीषण यांचा सत्कार करून पुढें कसें वागावयाचें हें त्यांना सांगून रामानें त्यांना फार कष्टी होऊन निरोप दिला व पुष्पक विमानाची पूजा करून कुबेराकडे तें परत पाठविलें.'

वा युधिष्ठिरा, याप्रमाणें अतुल तेजस्वी रामालाही वनवासाचें महत् दुःख सोसावें लागलें, मग तूं शोक कां करावास? ज्याचें फळ मिळालेंच पाहिजे अशा सरळ मार्गाचें तूं अवलंबन केलें आहेस व यत्किंचितही पाप तुझ्याकडून होत नाहीं. तुझे हे चार भाऊ तुला साहाय्य करण्याला एका पायावर तयार असतां तूं असा व्यर्थ कष्टी कां होतोस? हेंच पाहीनास कां जयद्रथाचें द्रौपदीला हरण केलें, तिला यांनीं दुष्कर प्रयत्न करून परत आणिली कीं नाहीं?' याप्रमाणें मार्कंडेयांनीं धर्मराजाचें शांतवन केलें.

११३ सावित्रीआख्यान.
(३. २९३–२९९)

एके वेळीं धर्मराज कष्टी होऊन मार्कंडेयांना ह्मणाला, 'मुनिश्रेष्ठ माझ्याबद्दल, माझ्या भावांबद्दल अगर राज्य गेल्याबद्दल मला इतकें वाईट वाटत नाहीं. परंतु या द्रौपदीसंबंधानें मला फार वाईट वाटतें. दुर्ह्मतीं द्यूतामध्यें आमचा छळ केला तेव्हां आह्मांला त्यांतून तिनेंच सोडविलें. आणि आतां फिरून जयद्रथानें येथें देखील तिचा छळ मांडिला. ह्मणून ह्मणतों हिच्यासारखी भाग्यशाली पतिव्रता अन्न कष्टालू स्त्री कोणी असेल काय ?' यावर मार्कंडेयांनीं राजकन्या सावित्रीची कथा युधिष्ठिराला सांगितली. ते ह्मणालेः—

'मद्रदेशचा परम धार्मिक, जितेंद्रिय, सत्यसंध, दानशूर, प्रजाप्रिय, सर्व भूतांच्या हितामध्यें तत्पर, असा अश्वपति नांवाचा राजा होता. त्याला अपत्य नव्हतें. वृद्धापकाल ह्माला असतांही अपत्यासाठीं, कडक नियम पाळून नियमित वेळीं नियमित आहार ठेवून सावित्री मंत्रानें त्यानें एक लक्ष हवन केलें. पुढें एकवार अन्न सेवन करून तो अठरा वर्षे नियमानें होता.अठरा वर्षे पूर्ण ह्माल्यावर सावित्री त्याच्या व्रतानें, ब्रह्मचर्यानें व भक्तीनें प्रसन्न होऊन वर देण्याच्या हेतूनें त्याकडे आली व तिनें त्याला वाटेल तो वर मागण्यास सांगितलें. संतान हाच श्रेष्ठधर्म समजून धर्मबुद्धीनें अपत्यासाठीं तें व्रत आरंभिलें असल्यानें कुलवर्धन असे आपल्याला पुष्कळ पुत्र तिच्या प्रसादानें व्हावेत ह्मणून अश्वपतीनें वर मागितला. तेव्हां सावित्री ह्मणाली, 'तुझें हेतूत ओळखून पूर्वीच मीं पुत्रासंबंधानें ब्रह्मदेवापाशीं गोष्ट काढली होती आणि त्यांच्याच प्रसादानें तुला एक तेजस्वी कन्या लवकर होईल. आतां यावर कांहीं विचक्षणा मात्र करूं नकोस. ' बरें ह्मणून तो आपल्या नगराला गेला. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर राजाच्या वडील स्त्रीच्या ठिकाणीं गर्भधारण होऊन तो शुक्ल पक्षांतील चंद्रबिंबाप्रमाणें वाढत चालला. पुढें योग्य कालीं तिला कमलनयना कन्या ह्माली. राजाला परम संतोष होऊन त्यानें तिचे सर्व संस्कार केले व सावित्रीनें ही कन्या दिली असल्यामुळें तिचें ब्राह्मणांनीं सावित्री ह्मणून नांव ठेविलें. ती राजकन्या या ठिकाणीं साक्षात् श्रीमाणें वाढत असतां कालानें यौवन दशेला आली. जणूं काय सुवर्णमूर्तीच अशी ती तेजःपुंज असल्यामुळें तिच्या तेजानें दिपून जाऊन कोणी तिला मागणी घालीना. कोणा एका पर्वकाळीं उपोषण करून केसांवरून पाणी सोडून अग्नीला विधिपूर्वक आहुती दिल्यावर ब्राह्मणांकडून स्वस्तिवाचन करवून निर्माल्यप्रसाद घेऊन सावित्री पित्याजवळ आली व पायांवर डोकें ठेवून तो प्रसाद त्याला अर्पण केल्यावर हात जोडून त्याच्याजवळ उभी राहिली. यौवनदशेंत आलेल्या त्या अप्सरेसारख्या आपल्या कन्येला कोणी मागणी घालीत नाहींसें पाहून राजा कष्टी होऊन तिला ह्मणाला, 'बाळे, तुझें लग्न करून देण्याची वेळ आली असून तुला कोणी मागणी घालीत नाहीं. **मुलीचें योग्य कालीं लग्न न करणारा पिता, ऋतुकालीं स्त्रीशीं संबंध न करणारा पती, व पतीच्या मरणानंतर मातेचें संरक्षण न करणारा पुत्र, हे लोकापवादाला पात्र होतात.** आतां तूं तरी **गुणानें तुझ्या तोडीचा एखादा पति पाहून** मला देवतांच्या दोषापासून मुक्त कर. तूं जो पती पसंत करशील तो मला कळीव ह्मणजे विचार करून मी तुला त्याला देईन. याप्रमाणें तिला सांगून वृद्ध मंत्र्यांना तिच्याबरोबर देऊन त्यानें तिला देशयात्रेला पाठविलें. लज्जावनम्रमुख होऊन पित्याचे पाय धरून सावित्री सुवर्णरथांत बसून रम्य अशा राजर्षींच्या तपोवनाकडे निघाली. त्या ठिकाणीं क्रमाक्रमानें अनेक तपोवनें पहात व तीर्थातीर्थांच्या ठिकाणीं पुष्कळ दान करीत फिरल्यावर कोणे एके वेळीं सभेमध्यें नारदांबरोबर राजा गोष्टी बोलत बसला असतां सभेंत येऊन तिनें त्या दोघांच्या पायांवर मस्तक ठेविलें. तेव्हां 'ही कोठें गेली होती, कोठून आली, यौवनदशेंत आली असून हिचें लग्न कां करीत नाहींस,' ह्मणून नारदांनीं विचारलें. 'पती पाहण्याकरितांच हिला पाठविलें होतें, आतां कोणता पति हिनें पसंत केला आहे हें तिच्या तोंडूनच ऐका,' असें अश्वपति ह्मणाला. तेव्हां सावित्री ह्मणाली, 'शाल्व देशाचे कोणी धर्मात्मे द्युमत्सेन नामक राजे अंध ह्मालेल्या-

लें, व त्यांचा पुत्र लहान असल्यामुळें शेजारच्याच कोणी राजानें पूर्ववैर स्मरून त्यांचें राज्य हरण करण्याला ही संधि साधिली. तेव्हां स्त्रीपुत्रांना घेऊन ते महारण्यांत जाऊन तप करीत राहिले. त्यांचें नगरामध्यें झालेले व तपोवनांत वाढलेले सत्यवान पुत्र मला अनुरूप पति असून मीं त्यांना मनानें वरलें आहे.' हें ऐकून नारद म्हणाले, ' न कळतां हिनें गुणवान अशा सत्यवानाला वरलें हें फार वाईट केलें.मात्र याचे मातापितासुद्धां सत्यवादी आहेत. ' तेव्हां राजानें विचारलें; ' हा सत्यवान तेजस्वी, बुद्धिमान, क्षमावान, शूर, पितृवत्सल, दानशूर, रूपवान, व उदार असा आहेना? ' हें ऐकून नारदांनीं उत्तर दिलें; 'सूर्यासारखा तो तेजस्वी असून बुद्धीनें बृहस्पतीसारखा आहे. त्याचप्रमाणें इंद्रासारखा शूर, पृथ्वीसारखा क्षमावान, दानामध्यें रतिदेव, व शिबिराजाप्रमाणें सत्यवक्ता असून ब्राह्मणभक्त आहे ययातीसारखा तो उदार असून चंद्रासारखा आल्हादजनक आहे, व आश्विनीकुमारांसारखा रूपवान आहे.' हें ऐकून अश्वपति म्हणाला, 'आपण जर त्याच्या ठिकाणीं इतके गुण सांगतां तर मग त्याच्यामध्यें असा दोष तरी काय आहे ? ' नारद म्हणाले, ' सर्व गुणांना झांकून टाकणारा त्याच्या ठिकाणीं एक दोष असून तो प्रयत्नानेंही दूर करतां येण्यासारखा नाहीं. हा क्षीणायु आजपासून एक वर्षाने देह ठेवील.' हें नारदाचें भाषण ऐकून राजानें मुलीला दुसरा पति वरण्यास सांगितलें.तेव्हां सावित्री म्हणाली, **'दायविभाग, कन्यादान, ह्या गोष्टी एकवारच होत असतात. तसेंच देतों म्हणून शब्द तोंडांतून एकवारच निघत असतो.** ह्या तिन्ही गोष्टी अनेकवार घडत नाहींत. ते दीर्घायु असोत किंवा अल्पायु असोत, गुणवान असोत किंवा गुणहीन असोत, एकदां मीं त्यांना वरलें तें वरलें. फिरून मी कधीं दुसऱ्याला वरणार नाहीं.व कोणतीही गोष्ट प्रथम मनाशीं ठरून मग वाणीनें ती बाहेर पडत असते व त्याच्यामागून त्याप्रमाणें कृति घडत असते. तर ह्या गोष्टींत माझ्या मनाच्या विरुद्ध आतां मला जातां येत नाहीं.' हें ऐकून नारद म्हणाले, राजा तुझ्या मुलीचा दृढनिश्चय असून कोणालाही त्यापासून तिला ढळावितां येणार नाहीं, व सत्यवानाच्या ठिकाणीं जे गुण आहेत ते गुणही दुसऱ्या पुरुषाच्या ठिकाणीं सांपडणार नाहींत. म्हणून ही त्याला द्यावी. हेंच मला प्रशस्त वाटतें. ' हें ऐकून राजा म्हणाला, ' आपलें हें हितवचन मला उल्लंघन करतां येत नाहीं; आपल्या आज्ञेप्रमाणें करतों. आपण आमचे गुरु आहां. ' यानंतर नारद आशीर्वाद देऊन स्वर्गाला निघून गेल्यावर राजाही लग्नाच्या तयारीला लागला. लग्नाची सर्व तयारी झाल्यावर वृद्ध ब्राह्मण, ऋत्विज व पुरोहित यांना बोलावून चांगलासा दिवस पाहून तपोवनांतील द्युमत्सेनाच्या आश्रमाकडे तो पायींच निघाला. त्या ठिकाणीं जाऊन त्या महाभाग व अंध अशा राजर्षीला शालवृक्षाखालीं दर्भासनावर बसलेला पाहून त्यानें त्याची यथोचित पूजा केली व नम्रतापूर्वक आपलें नांव व येण्याचा उद्देश त्याला कळवून सावित्रीला आपली सून करून घेण्याविषयीं त्यानें त्याची नम्रतापूर्वक विनंति केली. राज्यभ्रष्ट होऊन वनांत तपामध्यें काल काढीत असल्यानें सावित्रीला संवय नसल्यानें ते वनवासाचे कष्ट तिला सहन होणार नाहींत या सबबीवर द्युमत्सेन आपली विनंति अमान्य करीत आहेसें पाहून अश्वपती म्हणाला, ' सुखदुःख आज असून उद्यां नसणाऱ्यापैकीं आहे, हें मला कळतें तसेंच माझ्या मुलीलाही कळतें.आपलें हे भाषण माझ्या ठिकाणीं रुजणार नाहीं. मी मनाचा दृढनिश्चय करून आलों आहें. आपल्या ठिकाणीं प्रेमानें बिनघ्र झालों असतां माझ्या आशेचा भंग करणें आपल्यासारख्याला उचित नाहीं. आपणा उभयतांचा संबंध प्रशस्त आहे; तेव्हां माझ्या मुलीला सून म्हणून आपण पदरीं घेतलीच पाहिजे. ' तेव्हां द्युमत्सेनालाही हा परस्परसंबंध प्रियच असल्यानें अश्वपतीच्या इच्छेला मान देऊन त्यानें ती गोष्ट तेच दिवशीं शेवटास नेली; व सर्व आश्रमवासी द्विजांना आणवून यथाविधि लग्न उरकून घेतलें, जामानिम्यासह मुलगी देऊन अश्वपती संतुष्ट होऊन आपल्या नगराला परत गेला. सत्यवानाला ती अखिलगुणसंपन्न स्त्री मिळाल्यानें व तिला तो मनाजोगा पति मिळाल्यानें परस्पर फार समाधान पावलीं. पिता गेल्यावर सावित्रीनें सर्व अलंकार काढून काषा-

यवस्त्र व वल्कलें धारण केलीं. आपल्या गुणांनीं, विनयानें व आत्मनिग्रहानें सेवेमध्यें तत्पर राहून व सर्व कामांमध्यें दक्षता ठेवून, तिनें सर्वांना संतोष दिला. वस्त्राभरणादि शरीरसत्कारानें सासूला व देवपूजेची सर्व नीट व्यवस्था ठेवून विशेष न बोलतां सासऱ्याला, त्याचप्रमाणें प्रियभाषण हुषारी, शांतपणा व एकांतसेवा यांनीं पतीला तिनें संतुष्ट ठेविलें. याप्रमाणें त्यांचा काल चालला असतां नारदांच्या भाषणाची आठवण होऊन सावित्री मात्र रात्रंदिवस वाळत चालली होती.

याप्रमाणें बरेच दिवस लोटल्यावर सत्यवानाचा मृत्युकाल समीप आला. नारदवाक्य मनांत ठेवून सत्यवती रोजच्या रोज दिवस मोजीत राहिली. आजपासून चवथे दिवशीं पति मरणार असा विचार करून त्रिरात्रव्रत घेऊन तीन दिवस ती रात्रंदिवस व्रतस्थ राहिली. तिचा तो कडक नियम पाहून द्युमत्सेन कष्टी होऊन तिला ह्मणाला, ' मुली, तीन दिवस उपवास करून राहण्याचें हें तूं फार कडक व्रत आरंभिलें आहेस. तुझ्या हातून हें कसें निभणार ? ' सावित्रीनें उत्तर दिलें, ' निश्चयपूर्वक हें व्रत मीं आरंभिलें असून तें शेवटास जाण्यालाही निश्चयच कारण होणार आहे. मी हें व्रत खात्रीनें पार पाडीन. आपण उगीच चिंता करूं नका. ' यावर ' बरें मुली, व्रत मोड ह्मणून कांहीं माझ्यानें सांगवत नाहीं, कसें तरी यांतून पार पड, असेंच ह्मणणें आमच्यासारख्याला शोभणार आहे, ' असें ह्मणून द्युमत्सेन स्वस्थ बसला. इकडे सावित्री व्रताच्या योगानें लांकडी बाहुलीप्रमाणें सुकलेली दिसत होती. उद्यां पतीला मरण येणार ह्मणून सावित्रीची आदली रात्र मोठ्या कष्टानें गेली. मृत्यु येण्याच्या दिवशीं सूर्य चार हात वरतीं आल्यावर प्रातर्विधि आटोपून सावित्रीनें अग्नीला आहुति दिली, व सर्व ब्राह्मण व सासुसासरे यांना नमस्कार करून हात जोडून त्यांच्या पुढें उभी असतां ' सौभाग्यवती हो, ' ह्मणून तपस्व्यांनीं तिला आशीर्वाद दिले. ईश्वराकडे लक्ष लागलेल्या सावित्रीनें ' ठिक आहे, हे आशीर्वाद खरे होवोत, ' ह्मणून ते घेतले. तो वेळ, ती घटका, याची नारदांनीं सांगितल्याप्रमाणें फार चिंतातुर मनानें ती वाट पहात असतां सासुसासऱ्यांनीं व्रत शेवटास गेलें असल्यामुळें तिला अन्न घेण्यास आग्रह केला. तेव्हां सावित्री ह्मणाली, 'सूर्य अस्ताला जाऊन माझे हेतू शेवटास गेल्यावर अन्न घेण्याचा माझा निर्धार आहे. ' इतक्यांत खांद्यांवर कुऱ्हाड घेऊन सत्यवान वनाला निघालेला पाहून सावित्री त्याला ह्मणाली, ' आपण ऐकटे जाऊं नये, मी आपल्याबरोबर येतें. आपणाला आज एकटे मला सोडवत नाहीं. ' यावर ' तूं या पूर्वी कधीं वनाला आली नाहींस; वाट खडतर आहे, व व्रतोपवासानें तूं सुकून गेली आहेस, तर तूं कशी चालशील , ' ह्मणून सत्यवानानें तिची पुष्कळ समजूत घातली असतांही ती जेव्हां ऐकेना तेव्हां वडिलांची आज्ञा घेऊन नंतर आपल्याबरोबर येण्यास सत्यवानानें तिला सांगितलें. तेव्हां तिनें सासुसासऱ्यांना विचारतां द्युमत्सेनानें विचार केला कीं, हिच्या बापानें हिला सून ह्मणून आपल्या स्वाधीन केल्यापासून हिनें आपल्यापाशीं कांहीं मागितलें नाहीं. तर आज हिची ही इच्छा आपण का पूर्ण करूं नये ? असें मनांत आणून ' मुली वाटेंत कांहीं आविचार करूं नकोस, ' असें सांगून त्यानें तिला परवानगी दिली. याप्रमाणें वडिलांची परवानगी घेऊन मनामध्यें कष्टी होती तरी वरून हासतमुख दाखवून सावित्री नाना फलपुष्पांनीं मनोहर प्रदेश पहात पतीबरोबर चालली. वाटेंत त्या शुद्धशील साध्वीचें सर्व लक्ष आपल्या पतीच्या हालचालीकडे होतें. व नारदमुनींच्या वचनाची आठवण होऊन पति तिला मृतप्राय दिसूं लागल्यामुळें त्यामागून चालली असतां तिचें हृदय द्विधा होऊन पतीकडे व त्या कालाकडे लागलें होतें. पुढें त्या दोघांनीं फळें गोळा करून तीं करंडींत भरलीं. नंतर सत्यवान लांकूड तोडूं लागला. लांकूड तोडीत असतां श्रमानें त्याच्या अंगाला दरदरून घाम आला व डोक्यांत वेदना होऊं लागली. श्रमपीडित होऊन तो सावित्रीजवळ येऊन ह्मणाला, 'ह्या श्रमानें माझ्या डोक्यामध्यें वेदना होऊं लागली आहे. अंग शिवशिवूं लागलें आहे, व छाती दुखूं लागली आहे. मला कसेंसेंच होतें. डोक्यामध्यें शूळ टोंचल्याप्रमाणें वेदना होत आहे. मला निजावेंसें वाटतें. माझ्यानें कांहीं उभें रहावत

नाहीं.' हें पतीचें भाषण ऐकून त्याच्याजवळ सरकून तिनें पतीचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें. त्यावेळीं नारदांच्या सांगण्याप्रमाणें तो क्षण, ती वेळ, तिला खुडल्यासारखी वाटूं लागली. इतक्यांत एक रक्त वस्त्र नेसलेला, मस्तकाला फेटा गुंडाळलेला, प्रत्यक्ष सूर्याप्रमाणें कांतिमान, श्यामवर्ण, रक्तनेत्र, असा आकाळविकाळ पुरुष हातांत पाश घेऊन सत्यवानाजवळ उभा असून त्याकडे पाहतांना तिच्या दृष्टीस पडला. त्याला पाहून पतीचें मस्तक हलकें भूमीवर ठेवून ती झटकन् उठली व मनांत चर्र होऊन घाबऱ्या घाबऱ्यानें हात जोडून त्याला म्हणाली, 'या दिव्य देहाबरून आपण कोणी देव असावेत असें मला वाटतें. तेव्हां आपण काय उद्देश धरून आलां आहां तें सांगा.' यमधर्मानें उत्तर केलें, 'सावित्रि, तूं पतिव्रता असून तप केलें आहेस; म्हणूनच मी तुझ्याशीं बोलतों. मी यम आहें, व या तुझ्या पतीची आयुर्मर्यादा सरली असल्यामुळें याला बांधून नेण्याकरितां आलों आहें.' सावित्री म्हणाली, 'मानवांना नेण्याला आपले दूत येतात असें मीं ऐकिलें आहे, मग आपण स्वतः यांना नेण्याकरितां कां आलां?' यमधर्मानें उत्तर केलें, 'हा धर्मसंपन्न, रूपवान, व गुणसागर असल्यामुळें दूतांकडून याला न्यावें हें मला बरें वाटलें नाहीं म्हणून मी स्वतः आलों.' असें म्हणून एक अंगुष्ठमात्र पुरुष यमधर्मानें पाशांत जखडून सत्यवानाच्या शरीरांतून खेचून बाहेर काढून आपल्या ताब्यांत घेतला. त्याला बाहेर काढल्याबरोबर श्वास बंद होऊन शरीर निस्तेज झालें, व त्याची हालचाल बंद होऊन त्याकडे पहाण्याला सुद्धां भीति वाटूं लागली. यम त्या पुरुषाला घेऊन दक्षिण दिशेला चालला. सावित्रीही कष्टी होऊन त्याच्या मागोमाग चालली असतां यम तिला म्हणाला, 'सावित्रि, परत जाऊन याची उत्तरक्रिया कर. पतीचें ऋण तूं फेडलें आहेस; आणि जेथपर्यंत येणें शक्य आहे तेथपर्यंत तूं बरोबरही आली आहेस.' सावित्रीनें उत्तर दिलें, 'पतींना जो कोणी जेथें घेऊन जाईल अथवा स्वतः ते जेथें जातील त्या ठिकाणीं त्यांच्या मागून मीं जावें हा सनातन स्त्रीधर्म आहे. तपामुळें, गुरुभक्तीमुळें, पतिस्नेहामुळें, मला-नें व आपल्या प्रसादानें मला कोठेंही गतिरोध होणार नाहीं. तत्त्वदर्शी लोक सात पावलें बरोबर गेल्यानें मैत्री जुळते म्हणतात; तर ती मैत्री ध्यानांत घेऊन मी कांहीं बोलत आहें त्याकडे लक्ष द्या. त्यानाप्रकारचे जितेंद्रिय वनांमध्यें यज्ञयागादि कर्में, निरनिराळे आश्रम व संन्यास स्वीकारून राहतात. तेही ब्रह्मज्ञानाबरोबरच खरा धर्म म्हणतात. सज्जनांना संमत अशा रीतीनें वरील धर्मांपैकीं एकाचेंही योग्य आचरण झालें असतां त्या सत्यधर्माकडे सर्व वळतात. मग दुसऱ्याची अगर तिसऱ्याची त्यांना अपेक्षा उरत नाहीं. म्हणूनच या खऱ्या धर्माला भले लोक श्रेष्ठ मानतात.' हें ऐकून यमधर्म म्हणाला, 'तुझ्या या गोड अशा मुद्देसूद भाषणानें मी संतुष्ट झालों आहें. तुझ्या पतीच्या जीविताशिवाय बाटेल तो वर घेऊन परत जा.' हें ऐकून 'माझे सासरे राज्यापासून भ्रष्ट होऊन डोळे जाऊन वनांत आश्रमांत राहतात, तर त्यांचे डोळे त्यांना परत येऊन अग्नि व सूर्य यांप्रमाणें ते तेजस्वी व बलवान व्हावेत,' म्हणून सावित्रीनें वर मागितला. बरें म्हणून हा वर देऊन मार्ग चालून थकल्यासारखी दिसत असल्यामुळें यमानें तिला परत जाण्यास सांगितलें. तेव्हां सावित्री म्हणाली, 'पति जवळ असतां मला श्रम कोठून होणार? जिकडे पती तीच माझी वाट, हें खास समजा. आपण आतां पतीला घेऊनच चाललां तर आणखी माझें म्हणणें ऐका. भल्याचा एकवार तरी समागम व्हावा म्हणून लोक फार इच्छा करतात. त्या पुढच्या त्यांच्या संबंधाला मैत्री हें नांव मिळतें. सत्पुरुषाशीं समागम कधीं विफळ होत नाहीं; म्हणून नेहमीं चांगल्याच्या समागमाला असावें.' यमधर्म म्हणाला, 'माझ्या मनाजोगतें व शहाण्याच्या बुद्धीला सुद्धां विकसित करणारें असें हें तुझें हितावह भाषण आहे. सत्यवानाच्या प्राणाशिवाय दुसरा वाटेल तो वर मागून घे.' सावित्री म्हणाली, 'माझ्या सासऱ्यांचें पूर्वी हरण झालेलें राज्य त्यांचें त्यांना मिळून ते धर्माप्रमाणें कधींही न ढळोत.' 'बरें आहे, तुझें आतां काम झालें आहे, तूं माघारी जा,' असें यम तिला म्हणाला असतां सावित्री फिरून म्हणाली, 'स्वकर्मफलानें बद्ध झालेल्या या प्रजेचें नियमन करून,

त्यांच्या त्यांच्या कर्मप्रमाणेंच स्वतःच्या इच्छेचें कांहींच चालूं न देतां आपण त्यांना घेऊन जातां ह्मणून आपणाला यम हें नांव मिळालें आहे. असे आपण थोर माझें ह्मणणें फिरून ऐका. कृतीनें, मनानें, किंवा शब्दानें कोणाचे ठिकाणीं द्रोह न करतां सर्वांवर कृपा करून त्यांना साहाय्य करणें हा सज्जनांचा सनातन धर्म आहे. बहुशा हें सर्व जग माझ्या पतीप्रमाणेंच पराधीन आहे. मनुष्याच्या या अनाथ स्थितीचें निवारण करण्याला समर्थ असे साधूच शत्रु देखील त्यांकडे गेला असतां त्यावर दया करतात.' यमधर्म ह्मणाला, 'तान्हेल्याला ज्याप्रमाणें उदक त्याप्रमाणें हें तूं केलेलें भाषण आहे. सत्यवताच्या प्राणाखेरीज दुसरा वाटेल तो वर मागून घे.' सावित्री ह्मणाली, 'माझ्या तातांना अपत्य नाहीं. तर संतानकर असे त्यांना शंभर औरस मुलगे व्हावेत.' 'बरें आहे, तुझी आतां इच्छा पूर्ण केली आहे, तूं फार दूर आली आहेस, तर आतां माघारी जा,' असें यमधर्माचें भाषण ऐकून सावित्री पुन्हां ह्मणाली, 'पतीच्याजवळ असतां हा प्रवास मला दूर कसचा आला आहे. कारण माझें मन याहीपेक्षां दूर धांवत आहे. जातां जातांच मी काय ह्मणतें हें आपण फिरून ऐकून घ्या.आपण सूर्यपुत्र असून प्रतापवान आहां; ह्मणून आपल्याला वैवस्वत ह्मणतात. आणि आपली प्रजा आपल्यासारखी न्यायबुद्धीनें रहात आहे; म्हणूनच आपल्याला धर्मराज असें नांव आहे. भल्याचे ठिकाणीं जो मनुष्याचा विश्वास असतो तसा त्याचा आपल्या स्वतःच्या ठिकाणीं सुद्धां नसतो. ह्मणूनच सर्व लोक विशेषेंकरून भल्यापुढें तोंड पसरतात. सर्व प्राणिमात्रांचे ठिकाणीं त्यांचा सद्भाव असल्यामुळें विशेषेंकरून सर्व लोक त्यांवर विश्वासतात.' यमधर्म ह्मणाला, 'तूं जें बोललीस अशा प्रकारचें भाषण मीं कोणापासून ऐकिलें नाहीं. मी तुष्ट झालों आहें. याच्या प्राणाखेरीज् वाटेल तो चवथा वर मागून घे.' सावित्री ह्मणाली, 'आमच्या कुलाला नांवारूपाला चढविणारे सत्यवतापासून मला शंभर वीर्यशाली औरस मुलगे व्हावेत, हा मला चवथा वर था.' यमधर्म ह्मणाला, 'तुला तोष देणारे; शंभर वीर्यशाली पुत्र होतील. आतां उगीच श्रम न घेतां माघारी फीर.' सावित्री ह्मणाली, 'भल्यांची नेहमीं धर्माकडे प्रवृत्ति असते. ते कधीं देण्याला कचरत नसून त्यापासून त्यांना बाईटही वाटत नाहीं. भल्यांचा भल्यांशीं समागम झाला असतां तो कधीं व्यर्थ जात नाहीं, व भल्यांपासून भल्यांना कधीं भीतिही नसते. भले लोक आपल्या सत्याचरणानें सूर्याला देखील मार्ग दाखवून तपानें भूमीचें अस्तित्व कायम ठेवितात. गतागतीसंबंधानें लोकांना भल्यांचाच आधार असतो. ह्मणून भल्यांना भल्या लोकांमध्यें आलें असतां वाईट वाटण्याला कारण उरत नाहीं. थोरांनीं स्वीकारलेला हा मार्ग ह्मणूनच ते परोपकार करतात व प्रत्युपकाराची अपेक्षा ठेवीत नाहींत. त्यांचा प्रसाद, त्यांचें द्रव्य अगर त्यांना दिलेला मान हीं कधीं फुकट जात नाहींत;व यामुळेंच ते लोकनायक बनतात. यमधर्म ह्मणाला, 'जसें जसें तूं धर्माला धरून मनाला अनुकूल असें शब्दलालित्य व अर्थगौरवसंपन्न भाषण करतेस तसतशी माझी फार तुझ्यावर भक्ति जडत चालली आहे. हे पतिव्रते, वाटेल तो उत्तम वर मागून घे.' सावित्री ह्मणाली, 'आतांपर्यंतच्या वरांप्रमाणें या वरामध्यें आपण पतीशिवाय ही आडकाठी ठेविली नाहीं. ह्मणून हे माझे पति जिवंत होवोत हा वर मी मागतें. कारण पतीवांचून मी मेल्याप्रमाणें आहें. पतीवांचून मला सुखाची इच्छा नाहीं, स्वर्गाची इच्छा नाहीं, संपत्तीची इच्छा नाहीं व जीवाचीही इच्छा नाहीं. आपणच मला शंभर पुत्र होतील ह्मणून वर दिला आहे व पतीला घेऊन चाललां आहां तरी पतीला जीवदान देऊन आपण आपलाच वर खरा करा ह्मणजे झालें.' 'बरें, तुझा पति चारशें वर्षे जगून तुझ्याबरोबर सुखांत राहील व अनेक यज्ञ करून कीर्ति मिळवील,' असें ह्मणून त्यानें त्याचा पाश सोडला व सावित्रीला परतवून आपण स्वस्थानाला गेला. इकडे सावित्री आपल्या मृतभर्त्या जवळ येऊन त्यास मांडीवर घेऊन बसते तों शुद्धीवर येऊन गांवाहून आल्याप्रमाणें प्रेमहर्षानें तिच्याकडे पहात ह्मणाला, 'मी फार वेळ निजलों, मला हूं जागें कां केलें नाहींस ? जो घोर पुरुष मला ओढीत होता तो कोठें आहे ? तें सर्व स्वप्नच किंवा

खरें ? हें पतीचें भाषण ऐकून सावित्री ह्मणाली, 'रात्र पडत चालली आहे. उठा. सूर्य मावळला. क्रूर शब्द करणारे निशाचर आनंदानें फिरूं लागले आहेत. रानांमधून श्वापदांची चळवळ ऐकूं येत आहे. दक्षिण दिशेला व पश्चिम दिशेला मनाला कांपरें आणणारी कोल्हेकुई चालली आहे; तेव्हां लवकर जाऊन वडिलांची भेट घेऊं. उद्यां मी सर्व आपल्याला सांगेन ! सत्यवान ह्मणाला, 'हें भयंकर अरण्य काळ्या कुट्ट अशा अंधकारानें भरून गेलें आहे.तुला वाट सांपडणार नाहीं व माझ्याच्यानें चालवतही नाहीं. ' हें पतीचें भाषण ऐकून सावित्री ह्मणाली, ' तर मग आज येथें वणव्यानें जळलेल्या वठलेल्या झाडांमध्यें जळत राहिलेला व वाऱ्यानें पेटलेला कोठें कोठें अग्नि दिसत आहे. तो आणून मी येथें ही लांकडें जाळतें व ही रात्र येथें काढून उद्यां सकाळीं दिसूं लागलें ह्मणजे आपण जाऊं.' हें ऐकून सत्यवान घाबरून ह्मणाला, ' माझें डोकें दुखणें बंद झालें आहे व शरीलाही स्वस्थता वाटते. तुझ्या साह्याच्यानें आईबापांजवळ जावें ह्मणतों. उशीरानें मी कधीं आश्रमाला परत गेलों नाहीं. संध्याकाळ होण्याचे वेळीं आई मला कधीं बाहेर जाऊं देत नाहीं आणि दिवसां मी बाहेर पडलों तरी मला उशीर झाला तर ते फार घाबरून जाऊन सर्व आश्रमांमध्यें माझा शोध करतात. उशीरां कां येतोस ह्मणून कष्टी होऊन मला पुष्कळ वेळ ते रागें भरले आहेत. त्यांची आज माझ्यासाठीं काय अवस्था झाली असेल ? पूर्वी मला एक वेळ रात्र झाली असतां तें दुःखानें डोळ्यांत पाणी आणून प्रेमपूर्वक ह्मणाले होते, 'बाळा, तुझ्यावांचून एक घटकाभर देखील आह्मी जिवंत राहणार नाहीं. तूं जिवंत आहेस तोंपर्यंत आह्मी जिवंत आहों समज. आह्मां अंधांना डोळे तूंच असून आमचा वंश, पिंड, कीर्ति व संतान हीं तुझ्यावर अवलंबून आहेत. तर त्यांची रात्रीं मी न गेल्यानें काय दशा होईल ? जिनें माझ्या मातापितरांना संशयांत पाडलें आहे ती शोष सुद्धां मला वैरिणीप्रमाणें वाटूं लागली आहे. खास या वेळेला माझे तात घाबरून जाऊन प्रत्येक आश्रमांत जाऊन शोध करीत असतील. यासाठीं त्यांच्या संबंधानें मला फार दुःख होत आहे. माझ्यासाठीं आज त्यांना फार दुःख झालें असेल. त्यांचें पोषण करणें हें माझें कर्तव्य आहे असें समजून ते जिवंत आहेत ह्मणूनच मीही पण जिवंत आहें. व त्यांच्या मनाप्रमाणें वागावें एवढेंच मी जाणतों. ' असें ह्मणून वर हात करून फार कष्टी होऊन तो मोठ्यानें रडूं लागला. याप्रमाणें पतीला शोकाकुल झालेला पाहून त्याचे डोळे पुसून सावित्री ह्मणाली, ' मी कांहीं तप केलें असेल तर त्याच्या सामर्थ्यानें त्यांना कांहीं रात्रीं ताप होणार नाहीं. आतां आपली इच्छाच असेल तर मी आपल्याला घेऊन जातें. ' असें ह्मणून उठून तिनें केस सावरले व पतीला बाहूनें कवटाळून निघाली. तेव्हां सत्यवानाची दृष्टि झाडीकडे लागलेली पाहून ती त्याला ह्मणाली, 'उद्यां फळें गोळा करतां येतील. आतां प्रसंगासाठीं एवढी कुऱ्हाड मात्र मी बरोबर घेतें.' असें ह्मणून झोळी झाडाच्या फांदीला टांगून कुऱ्हाड बरोबर घेऊन ती पतीजवळ आली. व डाव्या खांद्यावर त्याचा हात घेऊन उजव्यानें त्याला कवटाळून धरून ती निघाली. कांहीं वाट गेल्यावर सत्यवान तिला ह्मणाला, ' नेहमींच्या सरावानें व झाडांच्या पानांतून मधून मधून पडणाऱ्या चांदण्यानें मला रस्ता दिसत आहे. ज्या रस्त्याला आपण फळें गोळा केलीं त्या ठिकाणीं आपण येऊन पोहोंचलों आहों. आतां आल्या मार्गानें सरळ चल. या पळसाच्या झाडींत दोन रस्ते फुटतात त्यांपैकीं उत्तरेच्या रस्त्यानें लवकर चल.

इकडे द्युमत्सेनाला डोळे येऊन सर्व कांहीं त्याला दिसूं लागलें. तो आपल्या स्त्रियेसह सर्व आश्रमांमधून मुलाचा शोध करीत फार चिंताकुल होऊन फिरला. सर्व वनें, आश्रम आणि सरोवरें तीं नवरा-बायको धुंडाळीत चाललीं. पुढें एखादा शब्द ऐकला तर ' सावित्रीसह सत्यवान येत आहे, ' असें त्यांनीं ह्मणावें. याप्रमाणें ते चालले असतां त्यांच्या खरखरीत पायांना देखील दर्भ व कांटे टोंचून त्यांतून रक्त वाहूं लागलें. तेव्हां आश्रमवासी ब्राह्मण त्यांच्या भोंवतीं गोळा होऊन त्यांना धीर देऊन आश्रमाकडे परत घेऊन आले. त्या ठिकाणीं मुलाच्या लहानपणच्या गोष्टींची आठवण काढीत

' बाळा कोठें गेलास, साध्वी सावित्री, कोठें गेलीस, ' म्हणून ते रडत असतां कोणी ' अहो, सावित्री इतकी तपशील व आचारसंपन्न आहे, तेव्हां त्यांना कांहीं अपाय होणार नाहीं, ' कोणी ' मीं एकचित्तानें वायु भक्षण करून तपश्चर्या केली आहे त्या तपश्चर्येच्या बलानें मी सांगतों सत्यवानाला कांहीं अपाय झाला नाहीं, ' कोणी, 'ज्याअर्थी आपल्याला एकदम दृष्टि आली आहे व सावित्रीचा तो कडकडीत नियम, उपाशी जाणें वगैरे लक्षांत घेतां सत्यवान जिवंत आहे, ' कोणी ' प्रसन्न दिशेला अंधार पडला असून पशुपक्षी शब्द करीत आहेत व राजाला अनुरूप अशी आपली मनोदेवता वहात आहे, तेव्हां खात्रीनें सत्यवान जिवंत आहे, ' असें म्हणून अनेकांनीं अनेक प्रकारें पुन्हपुन्हां त्यांचें शांतवन केलें. इतक्यांत सावित्री आपल्या नवऱ्याला घेऊन आश्रमांत शिरली. तिला पाहून सर्वांना आनंद झाला; व सर्व ब्राह्मण अग्नि पेटवून द्युमत्सेनाजवळ बसून जिज्ञासेनें ' यापूर्वी कां नाहीं आलां, अशी रात्र करून कां आलां, वाटेंत तुम्हांला कोणता अडथळा आला, वडिलांना इतका वेळ काळजींत कां पाडलें, ' म्हणून विचारूं लागले. तेव्हां सावित्रीच्या मांडीवर झोंपीं जाईपर्यंतची हकीकत सत्यवानानें त्यांना सांगितली व पुढील हकीकत सावित्रीनें सांगून यमापासून चार वर मिळाल्याचेंही तिनें त्यांना कळविलें. तेव्हां ऋषिवर्गांना संतोष होऊन ते म्हणाले, ' संकटांनीं खचत चाललेलें हें राजाचें कुल तमोमय डबक्यांत सपशेल बुडत असतां सुशील व व्रतशील अशा त्वां कुलीन साध्वीनें त्यास वर काढिलें. ' असें म्हणून त्या स्त्रीरत्नाचें अभिनंदन करून व तिची प्रशंसा करून ब्राह्मण आनंदित होऊन आपापल्या आश्रमांकडे गेले. ती रात्र सरून उजाडल्यावर मंत्रीमंडळ शाल्व नगरीहून राजाकडे येऊन म्हणाले, ' आपल्या आमात्यांनीं आपल्या शत्रूला मारलें आहे, शत्रूसैन्य पळून गेलें आहे, व प्रजाजनांचा आपल्यासंबंधानें एक विचार ठरला आहे. ' ते सचक्षु असोत अगर अंध असोत; तेच आम्हांला राजे पाहिजेत, ' असें म्हणून त्यांनीं चतुरंग सैन्य व रथ देऊन आम्हांला आपल्याकडे पाठविलें आहे. आपल्या नांवाचा जयघोषही शहरांतून पिटविला आहे. आतां तर आपल्याला सचक्षु पाहून त्यांना विशेषच आनंद होणार आहे. तरी पुष्कळ दिवसपर्यंत वडिलोपार्जित राज्याचा उपभोग घेण्याला चला. ' नंतर तेथील वृद्ध अशा आश्रमवासी ब्राह्मणांना अभिवादन करून त्यांचा सत्कार करून राजा आपल्या नगराला आला. त्या ठिकाणीं पुरोहितांनीं मोठ्या प्रीतीनें द्युमत्सेनाला राज्याभिषेक करून त्याच्या मुलाला युवराज्याचा अभिषेक केला. पुढें कांहीं दिवसांनीं सावित्रीला कुलाची कीर्ति वाढविणारे व रणांतून कधींही मागें न फिरणारे असे शंभर मुलगे झाले. याप्रमाणें सावित्रीनें आपल्या पित्याच्या व सासऱ्याच्या कुलाचा उद्धार केला. त्याचप्रमाणें ही शीलसंपन्न द्रौपदी तुम्हांला संकटांतून सोडवील ? असें म्हणून मार्कंडेयांनीं धर्मराजाचें समाधान केलें.

११४ इंद्र कर्णाचें कवच कुंडलें हरण करतो. (३. ३००–३१०)

वनवासाचीं बारा वर्षें संपून तेरावें सुरू झालें असतां पांडवांचा हितकारी इंद्र कवचकुंडलांसाठीं कर्णाकडे भिक्षेला निघाला. तेव्हां त्याचा तो हेतू ओळखून उत्तम आस्तरण टाकलेल्या शय्येवर कर्ण खुशाल पडला असतां पुत्रस्नेहानें मनांत त्याची कींव आणून सूर्य कुंडलांसंबंधानें त्याकडे आला आणि वेदसंपन्न अशा ब्राह्मणाच्या वेशांत स्वप्नांत त्याला भेट देऊन त्याच्याच हितासाठीं मधुर शब्दांनीं तो त्याला म्हणाला, ' सत्य भाषण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ अशा तात कर्णा, स्नेहामुळें मी तुला हिताची गोष्ट सांगत आहें तीं तूं ऐक. इंद्र पांडवांचें हित करण्याच्या इच्छेनें ब्राह्मणवेष घेऊन कुंडलें हरण करण्याकरितां तुजकडे येईल. मल्यांनीं याचना केली असतां तुजपाशीं जें कांहीं असेल तें त्यांना देतोस, नाहीं म्हणत नाहींस व याचना करीत नाहींस. हा तुझा नियम सर्व जगाला माहीत आहे, तसा त्यालाही ठाऊक आहे. तो मागावयाला आला असतां त्याला तूं कुंडलें देऊं नकोस. तुझ्या हातून होईल तेवढें करून त्याला अन्यतऱ्हेनें संतुष्ट कर. त्याला संपत्ति दे, रत्नें दे, वा-

टेल तें दे; परंतु कांहीं तरी सबब सांगून त्याला परत पाठीव. जर हीं अंगचीं कवचकुंडलें तूं त्याला देशील तर तूं क्षीणायु होऊन मृत्युमुखीं पडशील. हीं कवचकुंडलें तुझ्या अंगावर आहेत तोंपर्यंत रणामध्यें तुला कोणी मारण्याला समर्थ नाहीं. अमृतापासून यांची उत्पत्ति आहे. तर तुला जिवाची पर्वा असेल तर तूं यांचें जतन कर.' हें ऐकून 'ब्राह्मणवेषधारी इतकें प्रेम दाखविणारे आपण कोण,' असें कर्णानें त्याला विचारलें; तेव्हां 'वत्सा, मी सूर्य पुत्रप्रेमामुळें तुला हें सांगत आहें, तरी मीं सांगितल्याप्रमाणें वाग,' असें सूर्य ह्मणाला.तें ऐकून कर्ण ह्मणाला, 'सहस्ररश्मी आपण जी मला हीं हिताची गोष्ट सांगत आहां ती माझ्या कल्याणाचीच असली पाहिजे. पण माझें ह्मणणें ऐका. मी आपल्याला सविनय हात जोडून आपण ह्या बतापासून मला फिरवूं नये, एवढें मागणें मागतों. इंद्र जर पांडवांच्या हितासाठीं ब्राह्मणवेषानें मजकडे याचनेला येईल तर त्याला मी आपलीं कुंडलें देणार. तिन्ही लोकांत जाणवलेली माझी कीर्ति जाऊं नये. माझ्यासारख्यांना अपकीर्ति होऊन प्राणरक्षण करणें उचित नाहीं.कीर्ति मिळवून लोकमान्य असें मला मरण पसंत आह. इंद्र पांडवांसाठीं कुंडलें मागावयाला येईल तर तें मला कीर्तिकरच होऊन त्यालाच तें अकीर्तिकर होणार आहे. प्राण देऊनसुद्धां मी कीर्ति मिळवूं इच्छितों. कीर्तिमान पुरुषालाच स्वर्ग मिळतो; नष्टकीर्ति नाश पावतो. मातेप्रमाणें कीर्ति पुरुषाला जन्म देते. उलटपक्षीं शरीरानें जिवंत असणाऱ्यालाही अकीर्ति मरण आणते. परलोकीं पुरुषाला मुख्य आधार कीर्तीचाच असून इहलोकीं आयुष्य वाढविणारी तीच आहे. ह्मणून हीं अंगचीं कवचें देऊन मी शाश्वत कीर्ति मिळवीन व संग्रामामध्यें घोर कर्म करून शत्रूंना जिंकून, भीतांना अभय देऊन बाल, वृद्ध, ब्राह्मण यांना महाभयापासून सोडवून या शरीराची रणामध्यें आहुती देऊन स्वर्ग देणारी कीर्ति वरीन. प्राण खर्ची घालून देखील कीर्ति मिळवावयाची हा माझा संकल्प आहे.' हें ऐकून सूर्य ह्मणाला, 'ह्या कर्णा,आपलें व आपल्या इष्टमित्रांचें अहित करूं नकोस. शरीराला अपाय न करतां प्राणिमात्र यशाची व अक्षय्य कीर्तीची इच्छा करतात. तूं जो-प्राण खर्ची घालून अक्षय्य कीर्ति मिळविण्यास पहात आहेस ती कीर्ति खात्रीनें तुझे प्राण हरण करून जाईल. मनुष्य जिवंत असेल तर आई, बाप, मुलें, इत्यादिकांचें त्याला कल्याण करतां येतें. ह्मणून आपण जिवंत असलों तर कीर्ति मिळविण्यांत फायदा. मेल्यावर या राखेला मिळालेल्या देहाला कीर्ति घेऊन काय करावयाची आहे ? मेलेल्याला कीर्तीचें ज्ञान रहात नाहीं व तिचा त्याला उपभोगही नाहीं. मेलेल्या मनुष्याला ज्याप्रमाणें माळा घालावी त्याप्रमाणेंच त्याला तिचा उपयोग होतो. तूं माझा भक्त आहेस ह्मणूनच तुझ्या ठिकाणीं माझी भक्ति जडून भक्ताचें संरक्षण करावें ह्या हेतूनें मी तुला हिताची गोष्ट सांगत आहें. आणि या बाबतींत कांहीं दैविक गूढही आहे, तें तुला कळणें शक्य नाहीं; व मीही तुला तें सांगूं इच्छित नाहीं. योग्यकालीं तें तुला कळून येईल. ह्मणून मनांत कांहीं विचार न करतां मीं सांगतों तसें कर. मी अणखी एकवार तुला सांगतों. हीं कुंडलें इंद्र मागावयाला आला असतां तूं त्याला तीं देऊं नकोस. या चांगल्या कुंडलांच्या योगानें आकाशांत **विशाखा नक्षत्रामध्यें असणाऱ्या चंद्राप्रमाणें** तूं शोभतो आहेस. त्याची कुंडलांसंबंधाची मागणी अनेक प्रकारच्या सयुक्तिक व गोड शब्दांनीं मोडून काढून त्याला कुंडलें देऊं नकोस. ही माझी बुद्धि ऐक. तूं नेहमीं अर्जुनाशीं स्पर्धा करीत आहेस.तो अर्जुन युद्धामध्यें तुझ्यापुढें उभा राहील. हीं कुंडलें तुझ्या कानांत असलीं ह्मणजे प्रत्यक्ष इंद्रानें जरी त्याला साहाय्य केलें तरी त्याला तुला जिंकतां येणार नाहीं. ह्मणून जर अर्जुनाला युद्धांत जिंकण्याची तुला इच्छा असेल तर हीं कुंडलें तूं इंद्राला देऊं नकोस.' कर्ण ह्मणाला, 'ज्याप्रमाणें मी आपला भक्त आहें हें आपण जाणतां त्याचप्रमाणें मला अदेय कांहीं नाहीं हेंही आपण लक्षांत ठेवा. थोर लोक प्रिय भक्तांचें हित निःसंशय करतात ह्मणूनच 'कर्ण माझा भक्त आहे, याला स्वर्गामध्यें दुसरें दैवत नाहीं,' असें जाणून आपण मला माझ्या हिताची गोष्ट सांगतां ; परंतु फिरून एकवार मी आपल्या पायांवर मस्तक ठेवून सागतों. मी स्तोत्याला जितका भितों तितकी मला मृत्यूचीही भी-

ति नाहीं. सत्याकरितां प्राण खर्ची घालण्यालाही माझ्या मनांत विचार येणार नाहीं. आपण अर्जुनासंबंधानें बोललां त्यासंबंधानें आपल्याला काळजी नको. त्याला मी खात्रीनें जिंकीन. मीं परशुराम व द्रोण यांपासून अस्त्रविद्या मिळविली आहे व ती कशी आहे हें आपणही जाणतांच. परंतु इंद्र मागावयाला आला असतां मात्र त्याला मी आपले प्राण देखील देणार. या माझ्या व्रताच्या आपण कृपा करून आड येऊं नका ! ' हें ऐकून सूर्य म्हणाला, ' ह्या कुंडलांच्या योगानें तूं अवध्य असून अर्जुनाकडून तुझा वध व्हावा म्हणून इंद्र हीं कुंडलें हरण करूं इच्छित आहें; तर जर तूं त्याला हीं कुंडलें देणारच तर तूंही त्याला संतुष्ट करून त्याच्यापासून अमोघ शक्ति मागून घे. तिच्या योगानें रणामध्यें शत्रूंला मारण्याला तूं समर्थ होशील. ती शक्ति एकवार सोडली असतां हजारों शत्रूंचा फडशा उडविल्याशिवाय तुझ्या हातीं ती फिरून परत येणार नाहीं. तर या अटीवर तरी तूं त्याला आपलीं कवचकुंडलें दे.' असें सांगून सूर्य तेथेंच अदृश्य झाला.

कर्ण भर बारा वाजतां पाण्यांतून उठून हात वर करून सूर्याची आराधना करीत असे. त्या वेळीं द्रव्य मागण्याकरितां पुष्कळ ब्राह्मण त्याकडे येत; व तो तेवेळीं कोणाला कांहीं नाहीं म्हणत नसे. कोणे एके दिवशीं अशा समयीं इंद्र ब्राह्मणवेष घेऊन ' भिक्षा दे ' म्हणून त्याकडे आला. कर्णानें त्याचें स्वागत करून ' काय भिक्षा पाहिजे, ' म्हणून विचारिलें. तेव्हां देवेंद्रानें त्याचीं अंगचीं कवचकुंडलें त्यापाशीं मागितलीं. तेव्हां कर्णानें ' दुसरी पाहिजे ती वस्तु मी देतों, पाहिजे असल्यास हें राज्यही देतों, परंतु या अमृतापासून निघालेल्या कवचकुंडलांमुळें मी लोकांमध्यें अवध्य आहें, हीं दिलीं असतां शत्रूंना मी वध्य होईन; तर हीं मागूं नका, ' असें म्हटलें. तरी जेव्हां तो इंद्ररूपी ब्राह्मण दुसरें कांहीं मागेना, तेव्हां कर्ण हासून म्हणाला, 'तूं देवेंद्र आहेस हें मीं पूर्वीच जाणलें. तूं मजपाशीं फुकट याचना करावीस हें तुला शोभत नाहीं. कारण तूं प्रत्यक्ष देवांचा स्वामी आहेस. मीं हीं कवचकुंडलें तुला दिलीं तर त्यापासून मी शत्रूला वध्य होऊन लोकांमध्यें तूंही उपहासाला पात्र होणार आहेस. म्हणून तूं आपली अमोघ शक्ति मला देऊन हीं कवचकुंडलें घे. ' हें कर्णाचें भाषण ऐकून क्षणभर विचार करून इंद्र म्हणाला, ' बरें आहे. पण हीं अट लक्षांत ठेव कीं, ही शक्ति माझ्या हातून सुटली असतां हजारों दैत्यांचा नाश करून फिरून ती माझ्या हातीं येते. तशी ती तुझ्या हातीं न येतां एका प्रबल व तापद शत्रूला मारून ही मजकडे फिरून परत येईल. ' हें ऐकून कर्ण म्हणाला, ' मला तरी तूं म्हणतोस अशा प्रकारचा एकच शत्रु हिच्या साहाय्यानें मारावयाचा आहे. ' तेव्हां इंद्र म्हणाला, ' पण तूं ज्या एकाला मारूं इच्छितोस त्याचें रक्षण तो अचिंत्य भगवान नारायण श्रीकृष्ण करीत आहे.' तें ऐकून कर्ण म्हणाला, ' तें कांहीं असो; तापि देणाऱ्या एका वीराला मारण्यासाठीं मला तुझी शक्ति दे व कवचकुंडलें अंगापासून काढलीं असतां माझ्या अंगाला विद्रुपता येऊं नये असा वर दे आणि हीं कवचकुंडलें घेऊन जा. ' तेव्हां ' बरें ' म्हणून इंद्रानें कर्णाला ती शक्ति दिली, व ' ही अविचारानें भलत्यावर सोडशील तर ती तुझ्यावरच उलट येऊन पडेल, ' असें सांगून कर्णाला यात्रमाणें फसवून कवचकुंडलें घेऊन इंद्र निघून गेला. कर्णानेंही अगदीं आणीबाणीचा प्रसंग आल्याखेरीज ही वासवीशक्ति कोणावर सोडावयाची नाहीं असा मनांत निश्चय केला. इकडे धृतराष्ट्रपुत्र मात्र ही कर्णाला फसविलेली बातमी ऐकून अगदीं दीन व हिरमोड झाले.

---

११९ यमधर्म व युधिष्ठिर यांचा संवाद. (३. ३११–३१९.)

द्रौपदीला जयद्रथापासून सोडविल्यावर पांडव काम्यकवन सोडून द्वैतवनांत येऊन राहिले. तेथें कोणे एके वेळीं एका तपस्वी ब्राह्मणाची आरणी व मंथा एक हरीण झाडाला शिंगें घाशीत असतां त्याच्या शिंगाला अडकल्या. त्यांसह तो पळून चालला असतां अग्निहोत्राला विघ्न येऊं नये म्हणून पांडवांकडे धांव घेऊन त्यांना झालेला वृत्तांत सांगून त्या परत आणून देण्याविषयीं त्यानें त्यांची प्रार्थना केली. तेव्हां सर्व पांडव धनुष्यबाण घेऊन त्या

हरणाच्या मागून गेले. त्यांनीं पुष्कळ बाण सोडले तरी त्यांपैकीं एकही त्या हरणाला न लागतां तो हरीण लवकरच दिसेनासा झाला. हरीण दिसेनासा झाल्यामुळें उद्विग्न होऊन तृषाकुल झाल्यामुळें ते एका वडाच्या छायेखालीं बसले. ते वेळीं नकुल, कष्टी होऊन म्हणाला, 'ह्या कुलामध्यें कुलक्षामुळें सुद्धां धर्मलोप झाला नसून आजपर्यंत कोणाला कांहीं नाहीं असें म्हणण्यांत आलें नाहीं; असें असतां आज हा प्रसंग आमच्यावर यावा तेव्हां दैवगति विलक्षण आहे!' हें ऐकून भीम म्हणाला, 'प्रातिकाम्यानें द्रौपदीला सभेमध्यें दासीप्रमाणें ओढून आणली तेव्हां त्याला मीं ठार केलें नाहीं त्याचें हें प्रायश्चित्त.' अर्जुन म्हणाला, 'त्या सूतपुत्रानें जे कठोर शब्द उच्चारले, ते मी निमूटपणें सहन करून घेतले त्याचें हें फळ.' सहदेव म्हणाला, 'शकुनीनें जेव्हां द्यूतामध्यें धर्मराजांना जिंकलें तेव्हां मीं त्याला ठार केला नाहीं त्यामुळें हें आमच्यावर संकट ओढवलें आहे.' याप्रमाणें ते बोलत असतां युधिष्ठिर नकुलाला म्हणाला, 'बत्सा, हे तुझे सर्व भाऊ थकून तृषाकुल झाले आहेत, तर झाडावर चढून आसपास कोठें पाणी आहे का पहा. बरें म्हणून नकुल झटकन् झाडावर चढला व चोहोंकडे दृष्टि फेकून आपल्या वडील भावाला म्हणाला, 'जलाश्रयानें असणारीं झाडें व सारस पक्ष्यांचा किलकिल शब्द ऐकूं येत आहे. तर येथें जवळ कोठें तरी पाणी असलें पाहिजे.' तें ऐकून युधिष्ठिरानें लवकर त्याला भात्यांत पाणी भरून आणण्याला सांगितलें, व नकुलही वडील भावाच्या आज्ञेनें पाण्याकडे धांवत गेला. जवळच स्वच्छ पाणी त्याला दिसलें. तें पाहून तो तें पिण्याला निघाला असतां 'माझा याच्यावर पूर्वीचा ताबा आहे. माझ्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन मग हें पी व घेऊन जा,' अशी आकाशवाणी झाली. ती न जुमानतां फार तान्हेला असल्यामुळें नकुल तें पाणी प्याला व तावडतोब तेथें मरून पडला. त्याला हशीर लागलासें पाहून युधिष्ठिरानें त्याच्या शोधासाठीं व पाणी आणण्याकरितां सहदेवाला पाठविलें. त्याचीही नकुलासारखीच दशा झाली. पुढें भीम व अर्जुन यांना युधिष्ठिरानें पाठविलें असतां त्यांचीही तीच वाट लागली. तेव्हां ते फारवेळ आले नाहींतसें पाहून मनामध्यें चिंताकुल होऊन त्या निर्जन वनामध्यें तो स्वतः शिरला. पशुपक्ष्यांनीं किलबिलिलेल्या व नाना जातींच्या वृक्षांनीं सुशोभित व भ्रमरांच्या कूजितांनीं नादित अशा त्या वनांत शिरल्यावर कमल, सिंधुवार, बेत, केतकी, कण्हेर, पिंपळ इत्यादि वृक्षांमध्यें झांकून गेलेलें विश्वकर्म्यानें निर्माण केलेलें एक सरोवर त्याच्या दृष्टीस पडलें.

त्या ठिकाणीं प्रलयकालच्या वेळीं आपल्या स्थानापासून भ्रष्ट झालेल्या लोकपालांप्रमाणें आपलें भाऊ मरून पडलेले पाहून दीर्घोच्छ्वास टाकून डोळे पाण्यानें भरून येऊन तो मोठ्यानें रडूं लागला 'बा भीमा, सुयोधनाची मांडी रणामध्यें गदेनें फोडीन म्हणून तूं प्रतिज्ञा केलीस ती अशीच शेवटास नेलीस काय? मनुष्यवाणी कदाचित् खोटी ठरेल, परंतु देववाणीही आज कशी खोटी ठरली? बा धनंजया, तुझ्या सोयरामध्यें तूं इंद्राच्या तोडीचा आहेस अशी दिव्यवाणी झाली व उत्तर पारियात्रेच्या ठिकाणच्या सर्व महाभूतांनीं नष्ट झालेलें वैभव तूं आपल्या सामर्थ्यानें परत मिळविशील व तुला रणामध्यें कोणी जिंकणारा नसून तुला कोणी अजिंक्य नाहीं असें सांगितलें होतें, तो तूं आज मृत्युमुखीं पडून माझ्या सर्व आशा लयाला नेल्यास, तुझ्याच आश्रयानें आह्मीं स्वतःला नाथ समजून हीं दुःखें सहन केलीं; ह्या शास्त्रज्ञ, देशकालज्ञ, तप व क्रिया यांनीं युक्त अशा नकुलसहदेवांना येथें मरून पडलेले पाहून माझें हृदय फाटून जात नाहीं तेव्हां हें खरोखर दुष्ट हृदय अस्सल फत्तरानें घडविलें असलें पाहिजे. बाळानों, तुमच्या योग्यतेनुरूप शौर्य न गाजवितां तुम्ही असे कसे पडलां? बाणांनीं तुमच्या अंगाला कोठें जखम झालेली दिसत नाहीं; तुमचें धनुष्यही मोडलेलें दिसत नाहीं; असें असतां कोणाकडून पराभव न पावतां तुम्ही सगळेच असे भूमीवर निश्चेष्ट कसे पडलां?' याप्रमाणें मुखाने झोंपीं गेल्यासारखे दिसणाऱ्या भावांना पाहून शोक करीत असतां युधिष्ठिराच्या अंगाला दरदरून घाम आला व कष्टी होऊन तो अगदीं दीन झाला. याप्रमाणें शोकसागरामध्यें बुडालेल्या त्या देशकालज्ञ धर्मराजानें ह्यांच्या मरणाच्या कारणासंबंधानें बराच

विचार केला. परंतु कांहीं उलगडा होईना. 'यांच्यावर शस्त्रप्रहार झालेला दिसत नाहीं व येथें कोणाचीं पावलेंही उमटलेलीं दिसत नाहींत. तेव्हां ज्यानें माझ्या भावांना मारलें तें एखादें अलौकिक भूत असलें पाहिजे. नेहमीं कपटबुद्धि धरून असणाऱ्या दुर्योधनाचें तर हें शकुनीकडून करविलेलें गुप्त कृत्य नसेलना ? कारण त्याला सत्कृत्य व दुष्कृत्य हीं दोन्ही सारखींच आहेत.त्या दुरात्म्यावर कोण विश्वास ठेवील ? परंतु त्यानें या उदकांत मात्र विष कालविलें नसावें. कारण हे मेलेले असूनही यांच्या चेहऱ्यांवर कांहीं फरक पडलेला दिसत नाहीं. मोठमोठाल्या सैन्याला एकेकटे तोंड देण्याला समर्थ असणाऱ्या या नरवीरांना कालीं प्राणहरण करणाऱ्या यमाखेरीज दुसरा कोण मारण्याला समर्थ आहे ? असो. जल प्राशन करून एकाग्र चित्तानें विचार करून याचा निर्णय लावला पाहिजे. ' असा विचार करून तो पाण्यांत शिरत आहे तोंच ' मी शेवाळें व मासे खाऊन येथें राहणारा बक असून मींच तुझे भाऊ मारले आहेत, तूं माझ्या प्रश्नाचें उत्तर न देतां पाणी पिशील तर तूं यांच्यापैकीं पांचवा होशील, बा धर्मा,साहस करूं नकोस. याच्यावर अगोदरचा तावा माझा आहे, ह्मणून अगोदर माझ्या प्रश्नाचें उत्तर देऊन पाणी पी व घेऊनही जा, ' अशी आकाशवाणी झाली. ती ऐकून युधिष्ठिर ह्मणाला, ' तूं रुद्र, वसु, अगर देव यांपैकीं कोण प्रधानपुरुष आहेस हें सांग.सामान्य पक्ष्याच्या हातून हें काम झालें नाहीं. हिमाचल, पारियात्र, विंध्य व मलय यांसारिखे तेजस्वी हे चौघे यांच्यापुढें देव गंधर्व, असुर, किंवा राक्षस यांची देखील उभें राहण्याची छाती नाहीं ? तुझा उद्देश किंवा तुझी इच्छा काय आहे तें जाणण्याची मला मोठी हुरहूर लागली आहे. त्याचप्रमाणें माझ्या मनाला उद्विग्नता व मस्तकशूल उत्पन्न झाला आहे. ' हें ऐकून यक्ष ह्मणाला, ' मी जलचर पक्षी नव्हें, तर यक्ष आहें. मींच या तुझ्या भावांना मारलें आहे. ' ही अशुभ व भयंकर वाणी ऐकून युधिष्ठिर दूर सरतो तोंच विकाळ डोळे, भिप्पाड शरीर, ताडासारखा उंच, अग्नी व सूर्य यांसारखा कांतिमान, व कोणाला हार न जाणारा असा एक यक्ष झाडाला टेकून मेघाप्रमाणें मोठ्या शब्दानें त्याला दूर होण्यास सांगत उभा असलेला त्याच्या दृष्टीस पडला. यक्ष ह्मणाला, ' या तुझ्या भावांना मी अनेकवार नको नको ह्मणत असतां बलाच्या घमेंडींत ते पाणी घेऊन जाऊं लागले व त्यांना मीं मारून पाडले. प्राणाची ज्याला पर्वा आहे त्यानें माझ्या प्रश्नांचीं उत्तरें न देतां हें पाणी पितां कामा नये. माझ्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन तें पी व घेऊन जा. ' युधिष्ठिरानें उत्तर केलें, ' ज्यावर तुझा पूर्वीचा तावा आहे त्याची मला गरज नाहीं. स्वतःची स्तुति स्वतः करावी हें भल्यांना संमत नाहीं. परंतु यथामति मी तुझ्या प्रश्नांचीं उत्तरें देईन; विचार. ' तेव्हां यक्षानें विचारलें, ' सूर्याचा उदय कोण करतो ? त्याच्या बरोबर असणारे कोण, त्याला अस्ताला कोण नेतो आणि त्याला आधार कोणाचा आहे ? ' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, ' ब्रह्मा सूर्य उदयाला आणतो, देव त्याचे बरोबर असतात, धर्म त्याला अस्ताला नेतो व सत्याचा त्याला आधार आहे, यक्षानें विचारलें, ' श्रोत्रिय कशानें होतो,ब्रह्मप्राप्ति कशानें होते, मनुष्य साहाय्यवान कशाच्या योगानें होतो व बुद्धिमान कशानें होतो ? युधिष्ठिरानें उत्तर दिलें, ' मनुष्य वेदाच्या योगानें श्रोतिय होतो.तपानें त्याला ब्रह्मप्राप्ति होते; स्थिरबुद्धीनें साहाय्यवान होतो व वृद्धांची सेवा केल्यानें बुद्धिमान होतो. ' यक्षानें विचारलें, ' ब्राह्मणांमध्यें व क्षत्रियांमध्यें देवगुण कोणता ? भल्यांना अनुरूप त्यांचा धर्म कोणचा, त्यांचा मनुष्यगुण कोणता व दुष्टासारखें त्यांचें आचरण कोणतें ? ' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, ' वेदाध्ययन हा ब्राह्मणांचा देवगुण असून तप ही त्यांची साधुसारखी कृती होय. मरण हा त्यांचा मानवधर्म असून लोकाची निंदा करणें हें त्यांचें दुष्टासारखें कृत्य होय. बाण व अस्त्र हे क्षत्रियांचे देवगुण असून यज्ञ हें त्यांचें सत्कृत्य होय. भय हा त्यांचा मानवधर्म असून शरणागताला आधार न देणें हें त्यांचें दुष्टासारखें कृत्य होय. ' यक्षानें विचारलें, ' यज्ञसंबंधी मुख्य साम कोणता, त्यासंबंधी मुख्य यजू कोणता, व तो मुख्यतः कोणाच्या आधारानें असून कोणाच्या तो बाहेर नाहीं ? युधिष्ठिरानें उत्तर दिलें, ' प्राण हा यज्ञसंबंधी साम असून

मन यजुर्मंत्र आहे. यज्ञाला ऋचा मुख्य आधारभूत असून तिच्या बाहेर तो नसतो.' यक्षानें विचारलें, 'पडणारांमध्यें काय श्रेष्ठ, पेरलें जाणाऱ्यामध्यें काय श्रेष्ठ, स्थिरस्थावर इच्छिणारांना काय चांगलें व प्रसवणारांना काय चांगलें? यावर असें युधिष्ठिरानें उत्तर दिलें कीं, पडणारांमध्यें पर्जन्य श्रेष्ठ, पेरलें जाणारांमध्यें बीं श्रेष्ठ, स्थिरस्थावर इच्छिणारांना भाई श्रेष्ठ, व प्रसवणारांना पुत्र श्रेष्ठ आहेत.' नंतर फिरून यक्षानें विचारलें. 'इंद्रियविषयांचा अनुभव घेत असून कोण श्वासोच्छ्वास करीत असून मेल्यासारखा आहे?' युधिष्ठिर ह्मणाला, 'देवता, अतिथि, सेवक, पितर व आत्मा यांना जो कांहीं देत नाहीं तो श्वासोच्छ्वास करीत असूनही मेल्यासारखा आहे.' यक्षानें विचारलें, 'भूमीपेक्षां जड काय? आकाशापेक्षां उंच काय? वायूपेक्षां झपाट्यानें वाहणारा कोण, व गवतापेक्षां लवकर वाढ कोणाची होते?' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, **'माता पृथ्वीपेक्षां जड आहे, पिता आकाशापेक्षां उंच आहे.** मन वायूपेक्षां शीघ्रगामी आहे, व **चिंतेची वाढ गवतापेक्षां झपाट्यानें आहे.'** यक्ष ह्मणाला, 'निजले असतांही कोण डोळे मिटीत नाहीं. जन्मूनही कशाची हालचाल नसते? कोणाला हृदय नाहीं? व झपाट्यानें वाढ कशाची आहे?' युधिष्ठिरानें उत्तर केलें, 'मासा निजला असतांही डोळे मिटीत नाहीं. आंड्यांची जन्मूनही हालचाल नसते. दगडाला हृदय नाहीं व नदी वेगानें वाढते.' यक्षानें विचारलें, 'प्रवाशाला मित्र कोण, घरीं असणाराला मित्र कोण, रोग्याला मित्र कोण आणि मरणाराला मित्र कोण?' युधिष्ठिरानें उत्तर केलें, **"तांडा हा प्रवाशाचा मित्र. स्त्री गृहस्थांना मित्र आहे; रोग्यांचा मित्र औषध व दान हाच मरणाराचा मित्र.'** यक्षानें विचारलें, सर्व भूतांचा अतिथि कोण? सनातन धर्म कोणता? अमृत हें काय आहे व हें सर्व जग हें काय आहे?' युधिष्ठिरानें उत्तर केलें, 'अग्नि हाच सर्वांचा अतिथि, गाईचें दूध हेंच अमृत, **मोक्षधर्म हाच** सनातन धर्म व वायुच सर्व जग.' यक्ष ह्मणाला, 'एकटा कोण संचार करीत आहे? एकवार जन्मून पुन्हां कोण जन्म घेतो? थंडीला मोठें औषध काय? व मोठें भांडार कोणतें?' युधिष्ठिरानें उत्तर केलें, 'सूर्य हा एकटा फिरतो. चंद्राचा फिरून फिरून जन्म होतो. थंडीला औषध अग्नि, आणि पृथ्वी हेंच मोठें भांडार.' यक्षानें विचारलें, 'धर्माचें मुख्य साधन कोणतें, यशाचें कोणतें, स्वर्गाचें कोणचें व सुखाचें कोणचें?' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'दक्षता हें धर्माचें मुख्य साधन होय. दान हें यशाचें, सत्य हें स्वर्गप्राप्तीचें, व शील हें सुखाचें मुख्य साधन आहे.' यक्षानें विचारलें, 'मनुष्याचा आत्मा कोण? दैवानें जोडलेला सखा कोण? जीवनसाधन काय व त्याला मुख्य आधार कोणाचा?' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'पुत्र हा मनुष्याचा आत्मा, स्त्री दैवानें जोडलेला सखा, पर्जन्य हें मुख्य जीवनसाधन व दान हा मुख्य आधार होय.' यक्षानें विचारलें. 'धनप्राप्तीच्या साधनांमध्यें उत्तम साधन कोणतें! धनामध्यें उत्तम धन कोणतें? लाभांमध्यें उत्तम लाभ कोणता? व सुखामध्यें उत्तम सुख कोणतें? सर्वांत श्रेष्ठ धर्म कोणता? सदा फलदायक असा कोणता? कशाचा निग्रह केल्यानें शोक करण्याला कारण उरत नाहीं? कोणाशीं सख्य केलें असतां तें सख्य मोडत नाहीं? कशाचा त्याग केल्यानें मनुष्य लोकांना आवडता होतो? काय सोडल्यानें त्याला दुःख होत नाहीं? काय सोडल्यानें संपत्ति मिळते? व कशाचा त्याग केल्यानें मनुष्य सुखी होतो?' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, **'दक्षता हें धनप्राप्तीचें उत्तम साधन, विद्या हें उत्तम धन. आरोग्यता हा उत्तम लाभ. व संतोष हेंच उत्तम सुख. दया हा श्रेष्ठ धर्म. वैदिकधर्म सदा फलदायक आहे. मनाचा निग्रह केल्यानें दुःख करण्याला कारण उरत नाहीं. ज्यांगल्याशीं स्नेह केला असतां तो कधीं मोडत नाहीं, आणि अभिमान सोडल्यानें मनुष्य लोकांना आवडतां होतो, राग टाकल्यानें दुःखाला कारण उरत नाहीं, वासनेचा त्याग करून मनुष्य संपत्तिवान होतो, व लोभ सोडल्यानें सुखी होतो.'** यक्षानें विचारलें, 'ब्राह्मणाला कशाकरितां यावयाचें, नटनर्तकांना कशासाठीं, व सेवकांना कशासाठीं यावयाचें?' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, **'ब्राह्मणांना धर्मासाठीं, कीर्तीसाठीं नट**

मर्तकांना, पोसण्यासाठीं सेवकांना व अस्तित्वासाठीं राजांना दिलें पाहिजे.' यक्षानें विचारलें, 'हा सर्व लोक कशानें भरला आहे? तो कशानें प्रकाशत नाहीं? मनुष्य मित्र सोडण्याला कशानें तयार होतो? व तो कशानें स्वर्गाला जात नाहीं? जिवंत असून पुरुष मेला असें केव्हां समजावयाचें? राष्ट्र केव्हां मृतवत् होतें? श्राद्ध केव्हां विफल होतें! व यज्ञ केव्हां विफल होतो? दिशा कोणची? जल काय? अन्न काय? विष काय? श्राद्धाचा काल कोणता? युधिष्ठिरानें उत्तर केलें; 'हा लोक अज्ञानानें भरला असून अंधकारामुळें तो प्रकाशत नाहीं. लोभामुळें मनुष्य मित्र सोडण्याला तयार होतो, व संगामुळें स्वर्गाला मुकतो. दरिद्री पुरुष मेल्यासारखा आहे, अराजक राष्ट्र नष्टप्राय समजावें; वैदिक ब्राह्मण ज्या श्राद्धाला नाहीं तें श्राद्ध निष्फळ होय व दक्षिणारहित यज्ञ व्यर्थ होय. साधू ह्याच दिशा असून आकाश, जल, व गाय हें अन्न होय; याचना हेंच विष व ब्राह्मण हाच श्राद्धाचा काल.' यक्षानें विचारलें, 'तप कशा प्रकारचें असतें? दम कशाला ह्मणावें? उत्तम क्षमा कशाला ह्मणावें? लज्जा कशाला म्हणावें? ज्ञान कशाला म्हणावें? शम कशाला म्हणावें? दया कशाला म्हणावें? व सरळपणा कशाला म्हणावें?' युधिष्ठिरानें उत्तर दिलें. स्वधर्मानें वागणें हेंच तप, मनाचा निग्रह करणें हाच दम, सुखदुःखादि द्वंद्वें सहन करणें हीच क्षमा. अकार्य न करणें हीच लज्जा; सत्याचें ज्ञान हेंच ज्ञान; मन स्थिर असणें हाच शम; सर्वांचें सुख इच्छिणें हीच दया; व सर्वांच्या ठिकाणीं समभाव असणें हाच सरळपणा.' यक्षानें विचारलें; 'दुर्जय शत्रु कोणता? कधीं बरा न होणारा व्याधि कोणता? साधु कशा प्रकारचा असतो व दुष्ट कशा प्रकारचा असतो?' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'राग हाच दुर्जय शत्रु, लोभ हाच कधीं बरा न होणारा व्याधि; सर्व भूतांच्या हितामध्यें रत असणारा तोच साधु. आणि निर्दय मनुष्य तोच असाधु.' यक्षानें विचारलें, 'मोह कशाला म्हणावें? मान कशाला म्हणावें? आलस्य कशाला म्हणावें? शोक कशाला म्हणावें? स्थैर्य कशाला म्हणावें? स्नान कशाला म्हणावें? दान कशाला म्हणावें? धैर्य कशाला म्हणावें? शहाणा कोणाला म्हणावें? मूर्ख कोणाला म्हणावें? काम कोणाला म्हणावें? मत्सर कोणाला म्हणावें? अहंकार कोणाला म्हणावें? दंभ कोणाला म्हणावें? दैव कोणाला म्हणावें, व पैशुन्य कशाला म्हणावें?' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'धर्माचें अज्ञान हाच मोह, आत्म्यासंबंधानें अभिमान हा मान, धर्माचरण न करणें हें आलस्य, अज्ञान हाच शोक, स्वधर्मामध्यें दृढपणा हेंच स्थैर्य, मनाचा मळ धुऊन टाकणें हेंच स्नान, प्राणिमात्रांचें रक्षण करणें हें दान, इंद्रियांचे निग्रह हेंच धैर्य, धर्मज्ञ मनुष्य शहाणा, नास्तिक हा मूर्ख, संसाराला हेतुभूत तोच काम, हृदयाला खेद तो मत्सर, मोठें अज्ञान हा अहंकार, धर्माचें निश्चय फडकविणें हा दंभ, दानाचें जें फळ तें दैव, आणि दुसऱ्याची निंदा करणें हेंच पैशुन्य.' यक्षानें विचारलें, 'धर्म, अर्थ व काम हे नित्य परस्परविरोधी असून यांचें एकत्र जमणें केव्हां शक्य आहे?' युधिष्ठिरानें उत्तर दिलें; जेव्हां स्त्रीची धर्माला अनुकूलता असते तेव्हां हे तिघे एकत्र असूं शकतात.' यक्षानें विचारलें, 'मनुष्याला अक्षय्य नरक कशानें मिळतो!' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'भिक्षा मागणाऱ्या गरीब ब्राह्मणाला आपण होऊन हाक मारून पुढें त्याला पाहून नाहीं असें म्हणणारा, त्याचप्रमाणें धर्मशास्त्र, ब्राह्मण, देव, पितर व पितृधर्म यांसंबंधानें यथोचित वर्तन न ठेवणारा, व द्रव्य असून त्याचा उपभोग न घेतां अथवा दान न करतां, जो नाहीं असें म्हणतो हे सर्व अक्षय्य नरकाला जातात.' यक्षानें विचारलें, 'कुल, वर्तन, वेदाध्ययन व वेदज्ञान, यांपैकीं कशानें ब्राह्मणत्व येतें.' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'कुल अगर वेदाध्ययन अथवा वेदज्ञान हीं ब्राह्मणत्वाला कारण होत नाहींत. वर्तन हेंच निश्चयानें ब्राह्मणत्वाला कारण आहे. वर्तनासंबंधानें ब्राह्मणानें विशेष जपलें पाहिजे. वर्तन बिघडलें नाहीं तोंपर्यंत मनुष्य नष्ट झाला असें समजतां येत नाहीं;

परंतु वर्तन बिघडलें कीं तो नष्टप्रायच समजावयाचा. पुष्कळ पढणारे, पढविणारे व शास्त्रांचें चिंतन करणारे हे सर्व केवळ एका प्रकारच्या व्यसनाच्या आधीन झालेले मूर्खच समजावयाचे. ज्याच्या हातून त्याप्रमाणें क्रिया घडते तोच शहाणा, एखादा दुर्वर्तनी मनुष्य चार वेद पढला असला तरी शूद्राहून शूद्र समजला पाहिजे. जो इंद्रियनिग्रह करून नेहमीं अग्निहोत्र करतो तोच ब्राह्मण होय.' यक्षानें विचारलें, 'गोड भाषण करणाराला काय लाभ आहे? विचार करून काम करणाराला काय लाभ आहे? पुष्कळ मित्र असणाराला कोणता लाभ आहे? आणि धर्मामध्यें रत असणाराला काय लाभ आहे? आनंदांत कोण राहतो? आश्चर्य कोणतें? मार्ग कोणता? व वर्तमान काय?' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'गोड भाषण करणारा सर्वांना आवडता होतो. विचार करून कार्य करणारा अधिकाधिक मिळवितो. पुष्कळ मित्र असणारा सुखांत असतो आणि धर्मामध्यें रत असणारा उत्तम गति मिळवितो. कोणाचें कर्ज नसून प्रवास करण्याचा प्रसंग न येतां पांचव्या किंवा सहाव्या दिवशीं आपल्या स्वतःच्या घरीं मिळेल तो भाजीपाला शिजवून खाणारा आनंदांत असतो. रोजच्या रोज प्राणिमात्र यमसदनाला जात आहेत हें पाहून बाकीचे लोक आपण चिरस्थायी असावें अशी इच्छा करीत असतात याहून आणखी आश्चर्य तें काय असावें? तर्काला निर्णय करतां येत नाहीं; श्रुतींचीं निरनिराळीं मतें दिसतात. असे एकही ऋषी नाहींत कीं, ज्यांचें मत प्रमाणभूत धरतां येईल. धर्माचें तत्त्व गूढ ठिकाणीं झांकलें आहे, तरी चारचौघे ज्या वाटेनें गेले तोच अनुकरणीय मार्ग. ह्या भयंकर मोहरूपी कढईमध्यें रात्र आणि दिवस हींच लांकडें घालून महिने आणि ऋतू ह्या पळ्यांनीं सूर्यरूपी अग्नि सर्व प्राणिमात्रांला ढवळून शिजवीत आहे हीच वार्ता.' यक्षानें विचारलें, 'पुरुष कोणाला ह्मणावें, व सर्वधनी मनुष्य कोणाला ह्मणावें?' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'मनुष्याच्या पुण्यकर्माचा शब्द पृथ्वीपासून आकाशापर्यंत जोंपर्यंत ऐकूं येत असतो तोंपर्यंत त्याला पुरुष असें ह्मणावें. प्रिय किंवा अप्रिय, सुख किंवा दुःख, मागचें किंवा पुढचें यांसंबंधानें जो निःकाळजी असतो त्याला सर्वधनी ह्मणावें.' हें ऐकून यक्ष म्हणाला, 'तूं माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दिलींस तरी ह्या तुझ्या भावांपैकीं तुला पाहिजे तो एक उठूं दे.' युधिष्ठिर म्हणाला, 'तर मग हा शामवर्ण, रक्तनेत्र, शालाप्रमाणें उंच, विशाल वृक्ष असा नकुल उठूं दे.' हें ऐकून यक्ष म्हणाला, 'भीम व अर्जुन हे तुला प्रिय असून ते काय ते तुमचा मुख्य आधार आहेत. ज्याचें बल दहा हजार हत्तींबरोबर आहे त्या भीमाला सोडून किंवा ज्याच्या बाहुबलावर सर्व पांडव अवलंबून आहेत त्या अर्जुनाला सोडून हा सवतीचा मुलगा जीवंत होण्याविषयीं तूं कां इच्छितोस?' युधिष्ठिर म्हणाला, 'धर्माच्या पायावर हणलें असतां तो आपला घात करतो व तो राखला असतां आपल्याला तो राखतो. सत्यापेक्षांही समता मी श्रेष्ठ धर्म समजतों. लोक नेहमीं मला धर्मशील समजतात, ह्मणून मी स्वधर्मापासून कधीं ढळणार नाहीं. कुंति व माद्री ह्या दोघीही माझ्या तातांच्या बायका असून त्या दोघींच्या ठिकाणीं माझा जास्तकमी भाव मुळींच नाहीं. त्या दोघांचेंही सारखें कल्याण असावें ह्मणून हा नकुल जिवंत होवो.' हें ऐकून यक्ष ह्मणाला, 'अर्थकामापेक्षांही ज्याअर्थीं तुला समता विशेष वाटली, त्याअर्थीं तुझें सर्व भाऊ उठतील.' असें तो यक्ष ह्मणतांच सर्व पांडव उठून त्यांची तहान नाहींशी झाली. अजिंक्य अशा त्या यक्षाला सरोवरामध्यें एक पाय ठेवून उभा असलेला पाहून युधिष्ठिर ह्मणाला, 'आपण कांहीं मला यक्ष दिसत नाहीं. आमचे कोणी सुहृद किंवा आमचे पिते आहां. लक्षावधि योध्यांशीं एकएकटे युद्ध करणारे हे माझे बंधु, त्यांना आपण पाडले असून सुखानें निजून उठल्याप्रमाणें त्यांचीं इंद्रियें शाबूत दिसतात.' यक्ष ह्मणाला, 'मी तुझा पिता, तुला पाहण्याकरितां आलों होतों. यश, सत्य, दम, शुद्धता, सरलता, लज्जा, स्थिरता, दान, तप व ब्रह्मचर्य ह्या माझ्या तनू आहेत. अहिंसा, समता, शांति, तप, शुद्धता, निर्मात्सर्य हीं माझ्या प्राप्तीचीं द्वारें

आहेत. शांति, निग्रह, उपरति, सहनशीलता व दक्षता ह्या पांच आत्मदर्शनाच्या साधनांमध्यें दक्ष राहून कामक्रोध सहा विकारही तूं जिंकले आहेस हें ठीक झालें. या सहांपैकीं दोन पूर्ववयामध्यें, दोन मध्यवयामध्यें व दोन वृद्धापकालीं संकटाला कारणीभूत होतात. तुझ्या ह्या समबुद्धीनें मी संतुष्ट झालों आहें. वर माग. माझ्या भक्तांना कधीं वाईट गति मिळत नाहीं.' हें ऐकून युधिष्ठिर ह्मणाला, 'अरणी घेऊन हरीण पळून गेला आहे; तरी त्या ब्राह्मणाचा अग्निलोप होऊं नये; त्याचप्रमाणें बारा वर्षें संपून तेरावें सुरू होणार आहे. ह्या तेराव्या वर्षांत आम्हांला कोणी ओळखूं नये; व लोभ, मोह व क्रोध यांना जिंकून दान, तप, व सत्य यांचे ठिकाणीं माझें मन नेहमीं गढलें असावें.' यमधर्मानें उत्तर केलें, 'मीच मृगरूप घेऊन ही अरणी घेऊन पळालों. ही नेऊन ब्राह्मणाला दे. तुझी आपापल्या रूपानें जरी पृथ्वीवर संचार कराल तरी तुह्मांला कोणी ओळखणार नाहीं. तुह्मांला वाटेल तें तें रूप धारण करून तुझी खुशाल विराटाच्या नगरामध्यें हें अज्ञातवासाचें तेरावें वर्ष काढा. आतां क्रोधादिकांचा अभाव व दानादिकांमध्यें रति तुझी स्वभावतःच आहे. तथापि हें ह्मणतोस त्याप्रमाणें होईल.' असें ह्मणून यम अदृश्य झाला. त्याची याप्रमाणें अनुज्ञा मिळाल्यावर विद्वान व पवित्र अशा ब्राह्मणांसहवर्तमान अज्ञातवासासंबंधानें विचार करण्याकरितां सर्व पांडव जुळून बसले असतां युधिष्ठिर ह्मणाला, 'कौरवांनीं कपटानें राज्य हरण केल्यावर आम्हीं आजपर्यंत जे कष्ट सोसले आहेत ते तुह्मांला माहीतच आहेत. आतां तरी पुढें हें तेरावें वर्ष अज्ञातवासांत काढून सुखानें आपलें राज्य मिळविलें तर ठीक आहे.' असें ह्मणत असतां शोकाकुल होऊन त्याचा गळा दाटून आला. त्याचें शांतवन करून धौम्य ह्मणाले, 'बा धर्मा, तुझ्यासारखे सत्याला जागणारे व जितेंद्रिय कोणच्याही प्रकारच्या संकटसमयीं असे घाबरत नाहींत. आपल्या सपत्नांना जिंकण्याकरितां देवांना देखील अनेक संकटें सोसावीं लागून अनेक लपंडाव करावे लागले. इंद्र निषधदेशाला आला तेव्हां गिरिप्रस्थाश्रमीं लपून राहून आपले शत्रू जिंकण्याकरितां त्यानें जें केलें तें तुला ठाऊकच आहेच. विष्णूनें घोड्याचें मस्तक धारण करून दैत्यांना मारण्यासाठीं अदितीच्या गर्भामध्यें पुष्कळ दिवसपर्यंत अज्ञातवास केला, तसेंच कपटानें बटुवेष धारण करून स्वपराक्रमानें बलीचें राज्य हरण केलें. अग्नीनेंही गुप्तपणें जलांत राहून जें देवांचें काम केलें तें तुला ठाऊक आहेच. त्याचप्रमाणें विष्णूनें इंद्राच्या वज्रांत लपून राहून, और्वानें ब्रह्मर्षींच्या मांडींत लपून राहून व विष्णूनें दशरथाच्या घरीं अवतारेंकरून राहून जें कृत्य केलें तें तूं जाणतोसच. त्याचप्रमाणें तूंही युद्धामध्यें आपल्या शत्रूंना जिंकशील. ह्याप्रमाणें धौम्याच्या शब्दांनीं युधिष्ठिरालाही धीर आला व भीमानेंही आपल्या मधुर शब्दानें त्याला आनंदविलें. तो ह्मणाला, 'महाराज, आपला कल धर्माकडे पाहून अंगांत सामर्थ्य असतांही कालाची मार्गप्रतीक्षा करीत आम्हीं आपलें वचन मोडलें नाहीं. आतांही आपण जें आह्मांला सांगाल तें आह्मी मोडणार नाहीं. आपल्याला जें करावयाचें असेल तें सर्व करून घ्या. मग आह्मी आहों आणि शत्रू आहेत. त्यांना हें हें ह्मणतां जिंकूं.' नंतर सर्व ब्राह्मण त्यांना आशीर्वाद देऊन त्यांचा निरोप घेऊन आपापल्या आश्रमांकडे गेले; व धौम्य, कांहीं विद्वान ब्राह्मण, पांडव व द्रौपदी तेथून एका कोसावर जाऊन दुसरे दिवशीं जो अज्ञातवास घ्यावयाचा त्यासंबंधानें विचार करूं लागले.

४ विराटपर्व.

११६ अज्ञातवासाला निघण्यापूर्वी धौम्यांनीं पांडवांना सांगितलेला सेवाधर्म.(४. १—४)

यानंतर अरणी वगैर यज्ञसाहित्य वनवासी ब्राह्मणांच्या स्वाधीन करून धर्मराज भावांना ह्मणाला, 'राज्याला मुकून आज बारावर्षे वनवास तर आपण काढला. पण हें तेरावें वर्ष अज्ञातवासांत काढणें मात्र कठीण काम आहे. पंचाल, चेदि, मत्स्य, शूरसेन, पटच्चर इत्यादि अनेक धनधान्यसंपन्न रम्य देश कुरूच्या आसपास आहेत; परंतु दुसऱ्याच्या नजरेस न येतां एकमेकांनीं एकमेकांच्या विचारानें राहून हें वर्ष काढण्यास यांपैकीं विराट नगरीच यमधर्मांनीं सांगितल्याप्रमाणें मला पसंत आहे; कारण विराटाचें आमच्यावर प्रेम असून तो धर्मशील, दाता व वृद्ध आहे. ह्मणून निरनिराळ्या वेषांत निरनिराळीं कामें करून तेथेंच आपण हें वर्ष घालवूं. आतां तुह्मी प्रत्येक काय काय काम करून रहाणार हें मला सांगा. माझ्यासंबंधानें विचाराल तर मी विराटापुढें जाऊन अक्षज्ञ व अक्षप्रिय असा कंक नांवाचा ब्राह्मण आहें, मला वैदुर्याचे, सोन्याचे, अथवा हस्तिदंताचे काळे, तांबडे डोळे असलेले फासे टाकतां येतात, व मी सोंगट्या खेळण्यामध्यें निष्णात आहें, असें सांगून त्याच्या सभेमधील एक सभासद होऊन त्या राजाचें मनरंजन करीन व त्यानें विचारल्यास मी युधिष्ठिराच्या पदरीं होतों असेंही सांगेन.' भीम ह्मणाला, 'राजापुढें जाऊन मी बल्लवांचा नायक आहें; मुदपाकामध्यें अनेक पाक तयार करण्यांत मी कुशल आहें असें सांगेन, व आजपर्यंत त्याच्या मुदपाकामध्यें निरनिराळे पदार्थ बनले ते कांहींच नव्हत अशा प्रकारें ते बनवून राजाची मर्जी सुप्रसन्न करून घेईन. त्याचप्रमाणें लांकडाचे भले मोठमोठे बिंडे वाहीन, व याप्रमाणें माझी अमानुष शक्ति पाहून तो मला आपल्या पदरीं ठेवील व त्याच्या भृत्यवर्गावरही माझा वचक राहील. मोठे बलवान हत्ती, अगर बैल यांच्याशीं झुंजण्याचा प्रसंग आला असतां मी मागें घेणार नाहीं; व सभेमध्यें कोणी द्वंद्वयुद्ध करण्याच्या इरादानें आला असतां त्याच्याशीं सामना देऊन राजाला संतुष्ट करीन. परंतु माझ्या बरोबर लढणाऱ्या कोणाही मनुष्याला मी ठार न करतां नुसता चीत करून सोडीन; तो विचारील तर युधिष्ठिराचे घरीं मी हत्ती, बैल यांना बठणीला आणण्याच्या व पाकसिद्धि करण्याच्या कामावर असून द्वंद्वयुद्धही करीत असे असें सांगेन.' नंतर युधिष्ठिर ह्मणाला, 'खांडववन जाळण्याच्या इरादानें कृष्णासह जय्यत तयारी करून असणाऱ्या ज्याच्या पुढें प्रत्यक्ष अग्नि ब्राह्मणरूप धरून याचना करण्याला आला व ज्याप्रमाणें सर्व प्रकाश पाडणाऱ्या वस्तूंमध्यें सूर्य, मनुष्यांमध्यें ब्राह्मण, सर्पांमध्यें आशीविष, तेज पाडणाऱ्यांमध्यें अग्नि, आयुधांमध्यें वज्र, बैलांमध्यें वशिंडाचा बैल, जलाशयांमध्यें सागर, गजांमध्यें ऐरावत, प्रियवस्तूंमध्यें पुत्र व सुहृदांमध्यें भार्या श्रेष्ठ आहेत, ह्याप्रमाणें ज्या ह्या माझ्या अर्जुनाच्या तोडीचा धनुर्धरांमध्यें कोणीही नाहीं,तो हा माझा गांडीवधन्वा अर्जुन काय करणार? ज्या ह्यानें पांच वर्षें इंद्राकडे राहून मनुष्यांमध्यें अद्भुत अशी दिव्य अस्त्रविद्या स्ववीर्यानें संपादन केली व जो हा बारावा रुद्र, तेरावा आदित्य, नववा वसु किंवा दहावा ग्रह आहे. तो माझा अर्जुन कोणत्या वेषानें राहणार?' अर्जुनानें उत्तर दिलें. 'महाराज, मी षंढ आहें, असें सांगून मी त्याच्याकडे राहीन. माझ्या हाताला पडलेले धनुष्याचे घट्टे झांकून ठेवतां येणें कठीण आहे. ह्मणून बाहुभूषणांनीं व बांगड्यांनीं त्याचप्रमाणें अग्नीसारखीं लखलखीत कुंडलें कानांत अडकवून ते मी झांकून टाकीन. त्याचप्रमाणें शंखाचे चुडे म-

रीन; केसांची वेणी बनवीन व बृहंनला नांव घेऊन स्त्रीस्वभावाला अनुरूप इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगून राजाला व अंतःपुरांतील इतर जनांना मी रंजवीन. गायन, नर्तन व निरनिराळीं वाद्यें विराटाच्या अंतःपुरांतिल स्त्रियांना शिकवीन, लोकांचे गुण व त्यांचीं कृत्यें यांचे गुणानुवाद गाईन व कोणीं विचारल्यास द्रौपदीची मी दासी होतें, असें सांगून या कपटवेषांत मी हुशारीनें दिवस काढीन.' नकुल ह्मणाला, ' मी विराट राजाचा मोतद्दार होईन. कारण अश्वपरीक्षेंत मी हुशार असून स्वभावतःच हें काम मला फार आवडतें. जे कोणी मला विचारतील त्यांना मी युधिष्ठिराच्या पदरीं मोतद्दार होतों व माझें नांव ग्रंथिक आहे ह्मणून सांगेन.' सहदेव ह्मणाला, ' मी गुराखी होईन. गाईंना आडवून आणणें, त्यांची धार काढणें व त्यांची मोजदाद ठेवणें यांची मला चांगली माहिती आहे. मी तंतिपाल ह्मणून आपलें नांव सांगून त्या ठिकाणीं राहीन. आपण मला नेहमीं गुरांमागें पाठवीतच होता. त्या ठिकाणीं गुरांसंबंधानें पूर्ण ज्ञान मला मिळालें आहे. त्यांचीं लक्षणें, चाल व शुभाशुभ चिन्हें हीं सर्व मी जाणतों. ज्यांच्या मूत्राचा वास घेतला असतां बंध्येला देखील मूल होतें असे शुभलक्षणसंपन्न बैल देखील मला ओळखतां येतात. तेव्हां माझ्या संबंधी काळजी आपल्याला बिलकूल नको.' युधिष्ठिर ह्मणाला, ' ही प्राणापेक्षां अधिक आपली प्रिया, जिचें आम्हीं मातेप्रमाणें परिपालन केलें पाहिजे व वडील बहिणीप्रमाणें जिला पूज्य मानिलें पाहिजे, ती तेथें काय काम करून राहणार? सामान्य स्त्रियांप्रमाणें हिला कांहीं काम माहीत नाहीं; ही सुकुमार असून राजकन्या आहे. उत्तम माळ घालून चंदनादि अंगाला लावून उत्तम उत्तम वस्त्रालंकार घालणें हेंच जिला माहीत आहे, ती ही भाग्यशाली पतिव्रता त्या ठिकाणीं कशी रहाणार याची मला काळजी पडली आहे.' द्रौपदी ह्मणाली, ' लोकांमध्यें ज्यांना कोणी संरक्षण करणारे नसतात अशा सैरंध्री नांवाच्या दासी असतात; त्यांपैकीं मी एक आहें, मला वेणीफणी करण्याचें ठाऊक आहे, व युधिष्ठिराच्या घरीं द्रौपदीची मी दासी होतें, ह्मणून सांगून राजभार्या सुदेष्णेची मी सेवा करीन. ती माझी काळजी घेईल. माझ्या संबंधानें आपण मुळीं बाईट वाटून घेऊं नका.' ह्याप्रमाणें प्रत्येकांनीं आपला बेत कळविल्यावर धर्मराज ह्मणाले, ' धौम्य महाराज, आपण आमचा अग्नि संभाळून आचारी व ह्या द्रौपदीच्या दासी ह्यांना घेऊन द्रुपदाकडे जा; आणि हे इंद्रसेनादि सेवक रथादि वाहनें घेऊन द्वारावतीला जातील. द्वैतवनांतच पांडव आह्मांला सोडून कोठें गेले आह्मांला माहीत नाहीं, असें तुम्हीं सर्वांनीं सांगावें.' याप्रमाणें ठरून सर्वांचे निरोप घेऊन युधिष्ठिर धौम्यांचा निरोप घेऊं लागला असतां धौम्यांनीं त्यांना पुढील उपदेश केला.

' महात्मे पांडव हो, ब्राह्मणांचे ठिकाणीं त्याचप्रमाणें सुहृदांचे ठिकाणीं कसें वर्तन ठेवावें, त्याचप्रमाणें प्रयाण, शस्त्रास्त्रप्रयोग व अभिकार्य हीं सर्व तुम्हांला कळतातच. युधिष्ठिरा, तूं व अर्जुन मिळून ह्या द्रौपदीचें संरक्षण केलें पाहिजे. लोकांत कसें वागावें हें मीं तुम्हांला सांगावयाला नको; तथापि स्नेहार्द्र सुहृदांनीं ह्या गोष्टी आपणांना सांगितल्या ह्मणजे त्यांनीं धर्म, काम व अर्थ या संबंधानें आपली कामगिरी बजावली अशी पूर्वापार वहिवाट आहे; ह्मणून मी सांगतों तें नीट लक्षांत घ्या, ह्मणजे राजकुलामध्यें कोणत्याही प्रकारची तुम्हांला अडचण येणार नाहीं. राजाच्या पदरीं राहणें विशेषतः शहाण्याला मोठें कठीण काम आहे. मानापमानाकडे विशेष लक्ष न देतां कसेंही करून अज्ञातवासामध्यें तुम्ही हें वर्ष काढा, ह्मणजे चवदावें वर्ष सुरू होतांच तुम्हांला सुखोपभोग मिळेल. राजानें हाक मारल्याशिवाय त्याची भेट घेऊं नये, किंवा त्याच्या खासगी माणसांवर विश्वास टाकूं नये; ज्या जागेवर दुसरा येण्याचा संभव नाहीं अशाच ठिकाणीं बसावें. मी राजाच्या प्रीतींतिला आहें, असें समजून त्याच्या वाहनांत, त्याच्या पलंगावर, त्याच्या तख्तावर किंवा त्याच्या हत्तीवर बसूं नये. ज्या ठिकाणीं आपण असूं असा दुष्ट हेरांना संशय येणें संभवनीय आहे, त्या त्या ठिकाणीं कधीं राहूं नये. मुकाट्यानें त्याची सेवा करावी, व प्रसंगीं त्याची स्तुतीही करावी. खोटें बोलणारांचा राजे तिरस्कार करतात व अवमानही करतात, राजस्त्रियांशीं,

अंतःपुरांतील जनांशीं व ज्यांचा राजलोक द्वेष करतात अशांशीं अतिप्रसंग करूं नये. क्षुल्लक गोष्ट देखील राजाच्या कानावर घातल्याशिवाय करूं नये. उच्च स्थान प्राप्त झालें असतां देखील न विचारतां किंवा राजाची आज्ञा न होतां जात्यधर्माप्रमाणें मर्यादा उल्लंघन करूं नये. मर्यादा उल्लंघन करणारा मग तो मुलगा असो, नातु असो अथवा भाऊ असो, त्यावर राजाची इतराजी होते. अग्नि व देव यांप्रमाणें मोठ्या हुषारीनें राजाची सेवा करावी. त्यांत कपटभाव धरला कीं, खात्रीनें प्राणावर गदा येते. जें जें म्हणून राजा सांगेल तें तें करून हलगर्जीपणा, अहंपणा किंवा राग बाजूला ठेवावा. कार्याकार्यसंबंधी प्रश्न उद्भवला असतां राजाला जें प्रियकर व हितकर असेल तेंच सांगावें व अशा प्रसंगीं **प्रियापेक्षां हिताकडे विशेष लक्ष द्यावें.** सर्व कृत्यांत व सर्व गोष्टींत त्याला अनुकूल असावें. त्याला जें अप्रिय व अहितार्चे असेल तें कधींही त्याला सांगूं नये व करूं नये. राजसेवा करतांना मी त्याच्या मर्जीतला आहें हा विचार शहाण्यानें मनांत ठेवूं नये. त्याच्या शत्रूशीं संभाषण करूं नये. राजाच्या उजवीकडे अगर डावीकडे बसावें; कारण पार्श्व भाग हा शस्त्रधारी राजाच्या शरीररक्षकांसाठीं आहे. राजाच्या पुढें उच्च आसनावर बसणें हें कधींच प्रशस्त नाहीं. राजाच्या समक्ष जरी लूट चालली तरी तिच्यांत आपण पडूं नये; कारण गरीबांना याचा परिणाम भोगावा लागतो. राजा एखादी गोष्ट थट्टेत बोलला असतां ती लोकांमध्यें सांगत फिरूं नये. मीच शहाणा, मीच शूर किंवा मीच बुद्धिमान अशी घमेंड कधीं बाळगूं नये; कारण अशांना राजलोक तुच्छ करतात. राजाचें प्रियच करीत राहिल्यानें त्याची मर्जी संपादन होऊन अनेक भोग भोगण्यास मिळतात. दुष्प्राप्य असें ऐश्वर्य राजाकडून मिळाल्याबर त्याच्या प्रियामध्यें व हितामध्यें डोळ्यांत तेल घालून रहावे. ज्याच्या कोपाचा परिणाम मोठा अनर्थकारक होतो, व ज्याचा प्रसाद मोठा फलप्रद होतो अशा राजाचें मनानें सुद्धां शाहण्या मनुष्यानें वाईट इच्छूं नये. राजाशीं संभाषण करतांना तोंड वेंडेवांकडें करूं नये; हातापायांचे चाळे सुरू ठेवूं नयेत; वेंडेवांकडे शब्द बोलूं नयेत; व वायु सोडणें व थुंकणें इत्यादि किंमाही फार जपून कराव्या. एखादी हासण्यासारखी गोष्ट घडली असतांही बेड्यासारखें खदखदा हासूं नये; किंवा फार गंभीरताही आणूं नये; कारण त्यामुळें आपल्याला आळ्य म्हणतात. राजप्रसाद झाला असतां अति आनंद मानूं नये; अगर अप्रतिष्ठा झाल्यानें फार वाईटही वाटून घेऊं नये. हुशारीनें राहून राजाची व राजकुमाची जो नेहमीं स्तुति करतो तोच अमात्यपदाला चढतो व मान मिळवून चिरकाल राजाच्या मर्जीत रहातो. आपल्याला विनाकारण धरून तुरुंगांत टाकलें असतांही जो प्रधान राजाची निंदा करीत नाहीं तोच फिरून वैभवाला चढतो. जो राजाच्या समोर अथवा त्याच्या मागें राजाचे गुणानुवाद गाण्यामध्यें पटाईत असतो तोच राजसेवक होण्याला योग्य आहे. जो अमात्य जुलुमानें राज्य करण्यास राजाला भर देतो, तो लवकरच स्थानभ्रष्ट होऊन प्राणाला मुकतो. राजापासून आपलें कल्याण झालेलें आहे हें लक्षांत ठेवून बोलण्यामध्यें त्याच्याशीं अतिप्रसंग करूं नये; परंतु योग्यप्रसंगीं आपलें वर्चस्व योग्य रीतीनें स्थापित करण्यास मागेंपुढें पाहूं नये. कधींही हिरमुसलें तोंड न करतां नेहमीं छायेप्रमाणें राजाच्या मागून असणाऱ्या बलवान, शूर, सत्यवादी, सौम्य व आत्मनिग्रही मनुष्याची राजापाशीं झाळ शिजते. कोणालाही हाक मारली असतां 'काय आज्ञा आहे,' म्हणून आपण झटकन् पुढें जावें. खासगी अथवा सार्वजनिक कशाही प्रकारचें काम राजानें सांगितलें असतां मागेंपुढें पाहूं नये. आपल्या घरांतील माणसांशीं वियोग झाला असतांही त्याबद्दल खेद करीत बसूं नये, व दुःखामध्येंच सुख मिळवून घ्यावें. राजासारखा पोषाख करूं नये, त्याची एखादी मसलत पुष्कळांच्या कानांवर जाऊं देऊं नये. एखाधा कामावर आपलीं नेमणूक झाली असतां पैशाला शिवूं नये. **पैशाच्या लालुचीनें कारागृह पहाण्याची वेळ येऊन प्रसंगीं मनुष्य प्राणालाही मुकतो.** राजा जें आपल्याला वाहन, वस्त्र किंवा अलंकार देईल तींच आपण नेहमीं वापरावीं, म्हणजे राजाची आपल्यावर मर्जी बसते. याप्रमाणें एक वर्षभर आत्मनियमानें मीं सांगितल्याप्रमाणें वर्तन ठेवा म्हणजे तुमचें राज्य तुमच्या

मिळून पुढें जातेल तसें बागण्याला हुल्ली मोकळे व्हाल.' असें झणून विधिपूर्वक सर्व प्रस्थानविधि आटोपून अग्नि प्रदीप्त करून ऐश्वर्य, वैभव व पृथ्वी प्राप्त व्हावी एतदर्थ त्यामध्यें आहुति देऊन अग्निब्राह्मणांना प्रदक्षिणा केल्यावर द्रौपदीला पुढें करून सहा पांडव एकटेच निघून गेल्यावर धौम्य अग्नीसह पांचालाला गेले, व इंद्रसेनादि सेवक यादवांकडे जाऊन सुखानें राहिले.

---

११७. पांडवांना अज्ञातवासापूर्वी देवीचें दर्शन. (४.५-६)

बनवास पुरा करून आपलें राज्य पुन्हां प्राप्त होण्याची मनीं इच्छा बाळगणारे पांडववीर तरवारी कमरेला लटकावून, भाते, हस्तत्राण व अंगुलित्राण हाताला बांधून पायीं चालत यमुनातीरीं येऊन दाखल झाले. यमुनेच्या दक्षिणतीराला येऊन पोहोंचल्यावर निबिड अरण्यांमधून मुक्काम करीत करीत व अनेक श्वापदांची शिकार करीत, ते बलशाली वीर दशार्णाच्या उत्तरेकडून व पांचालाच्या दक्षिणेकडून यकृल्लोम व शूरसेन ह्या देशांमधून आह्मी पारधी आहों असें सांगत मत्स्यदेशाला येऊन पोहोंचले. त्याजवळ आल्यावर द्रौपदी म्हणाली, 'हीं आपल्यापुढें नानाप्रकारचीं शेतें व पाऊलवाटा दिसत आहेत. यावरून अद्यापि विराटनगरी बरीच दूर असावी. मी फार थकलें आहे. आजची रात्र येथें मुक्काम करून उद्यां पुढें जाऊं.' तें ऐकून युधिष्टिर म्हणाला,' धनंजया, पांचालीला उचलून घे. ह्या वनांतून पार पडून अपण विराटनगरीमध्येंच जाऊन एकदम मुक्काम करूं.' तेव्हां अर्जुनानें गजराजाप्रमाणें एकदम तिला उचलून घेऊन नगराजवळ आणून खालीं सोडलें. नंतर युधिष्टिरानें अर्जुनाला विचारलें, ' हीं आयुधें आपण कोठें ठेवावीं ? आयुधांसह जर आपण नगरांत शिरलों तर लोक खात्रीनें घाबरून जातील. हें तुझें प्रचंड गांडीव कोणाला माहीत नाहीं असें नाहीं; या आयुधांसह जर आपण नगरांत शिरलों तर लोक खात्रीनें आपणाला ओळखतील. आपि मग फिरून बारा वर्षें वनवासांत काढण्याचा प्रसंग येईल. आपणापैकीं एकाला जरी ओळखिलें तरी तसें करण्याची आह्मांची प्रतिज्ञा आहे. अर्जुन म्हणाला, 'ह्या पुढच्या हेकडीवर कोणाला चढतां येणार नाहीं, असें हें मोठें शमीचें झाड स्मशानाच्या बाजूला आहे. याच्या फांद्या चोहोंकडे पसरल्या असून क्रूरश्वापदांचा संचार असलेल्या गर्द झाडींत विशेषेंकरून स्मशानाच्या बाजूला असल्यानें या ठिकाणीं शस्त्रें ठेवतांना आपणाला कोणी पाहणार नाहीं.' नंतर ते त्या झाडावर शस्त्रें ठेवण्याला निघाले. ज्या धनुष्यानें एकट्या वहाद्दरानें सर्व देव व मनुष्य यांना, व वैभवसंपन्न राह्यांना पादाक्रांत केलें होतें त्या भव्य, महाशब्द करणाऱ्या व शत्रुसैन्याचा पूर्ण फडशा उडविणाऱ्या भयंकर गांडीव धनुष्याची दोरी अर्जुनानें उतरली, तसेंच ज्याच्या साधनानें शत्रूला ताप देणाऱ्या युधिष्टिरानें कुरुक्षेत्राचें रक्षण केलें त्या आपल्या धनुष्याची प्रत्यंचा त्यानें उतरली. त्याचप्रमाणें संग्रामामध्यें पांचालांना व अनेक शत्रूंना ज्याच्या साधनानें भीमानें जर्जर केलें होतें, व ज्याचा टणत्कार ऐकून शत्रू रणांगणामधून पळ काढीत, अशा बीज पडून फाटलेल्या पर्वताप्रमाणें महाशब्द करणाऱ्या व ज्यानें सैंधव राजाचा त्यानें समाचार घेतला होता, त्या आपल्या धनुष्याची प्रत्यंचा त्यानेंही उतरली. कुलामध्यें त्याच्यासारखा रूपानें कोणी नसल्यामुळें ज्याला नकुल हें नांव मिळालें होतें त्या ताम्रमुख व मितभाषी अशा शत्रूला रडाबयाला लावणाऱ्या नकुलानेंही ज्याच्या साधनानें त्यानें पश्चिम दिशा जिंकली होती अशा आपल्या धनुष्याची दोरी उतरली. त्याचप्रमाणें ज्याच्या साधनानें सहदेवानें दक्षिण दिशा जिंकली होती त्या आपल्या धनुष्याची दोरी त्यानें उतरली. त्याचप्रमाणें सर्वांनीं आपल्या चमकणाऱ्या तरवारी, बिनमोल भाते व विषाटादि बाण धनुष्यांबरोबर खालीं उतरून ठेवले. नंतर नकुल झाडावर चढून जेथें पावसाचा मारा होणारें नाहीं अशी सुरक्षित ढोली पाहून त्या ठिकाणीं त्यानें तीं हत्यारें दोरीनें घट्ट बांधून ठेवलीं व घाण आल्याबरोबर लोकांनीं दूरून जावें म्हणून त्यावर एक प्रेत बांधून ठेविलें. जे कांहीं गुराखी अथवा मेंढपाळ त्यांना भेटले त्यांना ही आमची एकशेऐशीं वर्षांची देवता आहे; व आमच्या बाड-

बडिलांपासून चालत आलेला हा कुलधर्म आहे, असें सांगून ते विराट नगराजवळ आले. जय, जयंत, जयसेन, व जयद्बल, अशीं खुणेचीं नांवें युधिष्ठिरानें आपल्या भावांना दिलीं. विराट नगरामध्यें शिरण्यापूर्वी त्रिभुवनेश्वरी, यशोदेच्या गर्भापासून उत्पन्न झालेली, नारायणाच्या रूपेची लालसा धरणारी, नंदकुलांत जन्मलेली, मंगलप्रद, कुलवृद्धि करणारी, कंसाला पळवून लावणारी, असुरांचा नाश करणारी, शिलातळाच्या ठिकाणीं फेकली असतां आकाशामध्यें जाणारी, दिव्यमाल्यांनीं विभूषित, दिव्यवस्त्र परिधान केलेली, ढाल, तरवार धारण केलेली व मंगलप्रद असा पृथ्वीचा भार उतरण्यासाठीं जे जे म्हणून तिचें ध्यान करतात त्यांना चिखलांत रुतलेल्या गाईप्रमाणें हात देणारी, अशी देवीचा दर्शनिच्छेनें त्यांनीं धावा केला. धर्मराज म्हणाला, 'हे वरदे कृष्णे, कुमारी, ब्रह्मचारिणी, तुझें तेज प्रभातकालच्या सूर्याप्रमाणें असून पूर्णचंद्राप्रमाणें तुझें मुख आहे. हे चतुर्भुजे, चतुर्वक्त्रे, तुझा कटिभाग व स्तनभाग उन्नत असून केयूरादि बाहुभूषणें धारण केल्यामुळें नारायणपत्नी लक्ष्मीप्रमाणें तूं कांतिमान आहेस; तुझें स्वरूप व ब्रह्मचर्य निर्मल असून नीलवर्ण मेघाप्रमाणें तूं आकाशांतसंचार,करणारी आहेस. इंद्रध्वजाप्रमाणें तुझे बाहू उन्नत व विशाल असून एकामध्यें पात्र, एकामध्यें कमल, एकामध्यें घंटा, धनुष्य, महाचक्र इत्यादि नाना आयुधें धारण केलेल्या तुला अष्टभुजा आहेत. कुंडलांनीं तुझे कर्ण भरगच्च भरले आहेत. या भूतलावरील अत्यंत शुद्ध स्त्री तूंच आहेस. तुझा अद्भुत मुकुट व शोभायमान वेणी ह्यांनीं तूं पहाणारांचे डोळे दिपवून सोडीत आहेस; आणि भुजंगाकृति कमरपट्टा अडकविला असल्यामुळें वासुकीसर्पानें बद्ध अशा मंदार, पर्वताप्रमाणें तूं दिसत आहेस. शिखिपिच्छाच्या उच्च अशा ध्वजानें तुला शोभा आली आहे. कौमार्यव्रत धरून तूं स्वर्गाला सुद्धां पावन केलें आहेस; ह्मणूनच देवसुद्धां महिषासुराचा नाश करणाऱ्या तुझा त्रैलोक्यरक्षणासाठीं धावा करतात. मजवर प्रसन्न होऊन दया कर. जया, विजया, तूंच असून संग्रामामध्यें जय देणारी तूंच आहेस. ह्मणून मलाही या वेळीं तूं विजय दे. नगश्रेष्ठ विंध्य तुझें वसतिस्थान आहे. हे कालि, महाकालि, तुला मद्य, मांस व पशु प्रिय आहेत. संकटसमयीं मनुष्यांनीं तुझा धावा केला असतां त्यांना पुत्र ह्मणा अगर धन ह्मणा कांहींच दुर्लभ नाहीं. दुर्गापासून (संकटापासून) तूं तारतेस ह्मणून तुला 'दुर्गा' हें नांव पडलें आहे. अरण्यामध्यें सांपडलेला, त्याचप्रमाणें महासागरांत बुडालेला, किंवा चोरांच्या तावडींत सांपडलेला यांना सोडविणारी तूंच आहेस. कीर्ति, श्री, धृति, सिद्धि, ह्री, विद्या, संतति, मति, संध्या, रात्री, प्रभा, निद्रा, ज्योत्स्ना, कांति, क्षमा, दया हीं तूंच असून लोकांनीं तुझी पूजा केली असतां त्यांना बंधन, मोह, पुत्रनाश, धनक्षय त्याचप्रमाणें व्याधि, मृत्यु व भय यांपासून सोडविणारी तूंच आहेस. ह्मणून हा मी राज्यभ्रष्ट झालेला तुला शरण येऊन तुझ्यापुढें मस्तक नमवितों. मला तारून तूं आपलें नांव खरें कर. हे भक्तवत्सले, मला आधार दे.' हा युधिष्ठिराचा स्तव ऐकून देवी त्याला प्रत्यक्ष दर्शन देऊन ह्मणाली, 'हे राजा, लवकरच संग्रामामध्यें तुला जय मिळेल, व माझ्या प्रभावानें सर्व कौरवसैन्याचा तूं फडशा उडवून राज्य निष्कंटक करून भावांसह पृथ्वीचा उपभोग घेशील; व तुला सौख्य व आरोग्य प्राप्त होतील. विराटनगरामध्यें तुम्ही असाल तोंपर्यंत कोणी कौरव तुम्हांला ओळखणार नाहींत.' असें ह्मणून पांडवांची रक्षा करून देवी त्याच ठिकाणीं अदृश्य झाली.

---

११८ अज्ञातवासासाठीं पांडवांचा विराटगृहीं प्रवेश. (४. ७–१२)

वैदूर्यरत्नखचित असे सोन्याचे फांसे फडक्यांत गुंडाळून खांकेला घेऊन विराट राजा सभेमध्यें बसला असतां कौरववंशवर्धन कीर्तिमान युधिष्ठिर त्याकडे आला.अभ्रपटलांनीं आच्छादित सूर्य किंवा भस्माच्छादित अग्नि यांसारखा तो महानुभाव सभेंत शिरतांच राजाची त्याच्याकडे नजर गेली व मंत्री, ब्राह्मण, भाट, वैश्य इत्यादि जे त्याच्या भोंवतीं बसले होते त्यांना 'हा राजाप्रमाणें तेजःपुंज कोण सभेमध्यें येत आहे, याच्याबरोबर दासदासी, रथ,

हत्ती वगैरे कांहीं नाहींत. एखादा मदोत्कट हत्ती ज्याप्रमाणें कमलवनामध्यें शिरावा त्याप्रमाणें हा विनदिकत माझ्यापुढें येत आहे,' ह्मणून त्यानें साश्चर्य होऊन विचारलें. युधिष्ठिर याप्रमाणें तो पृच्छा करीत असतां त्याजवळ जाऊन ह्मणाला,' महाराज मी जीवनार्थी आपल्याकडे आलों आहे. माझें सर्वस्व नाहींसें झालें आहे, आपल्या मनाप्रमाणें वागून आपल्या पदरीं राहण्याची माझी इच्छा आहे. मी वैय्याघ्रपद्मविप्र पूर्वी युधिष्ठिराचा मित्र होतों. यूतकलेंत मी निष्णात असून फासे टाकण्यामध्यें माझ्यासारखा कोणी नाहीं. मला कंक ह्मणतात.' विराट ह्मणाला, 'तुला वाटेल तें देण्याला मी तयार आहें. हें सर्व राज्य तुझें आहे. **यूतकारांची मला फार आवड आहे.**' युधिष्ठिर ह्मणाला,' यूतांत हरणारा कधीं कुरापत काढल्यावांचून रहात नाहीं. मी ज्याला जिंकीन त्यानें माझा पैसा ठेवूं नये, एवढेंच मी आपल्यापाशीं मागून घेतों.' विराट ह्मणाला,' कोणीही जर तुझ्या मनाविरुद्ध वागेल तर त्याला मी ठार करीन व **तो ब्राह्मण असेल तर त्याला हद्दपार करीन.** तुला मी आपल्या वाहनांत बरोबर घेत जाऊन अन्नवस्त्राची तुला पंचाईत पडूं देणार नाहीं. माझ्या खासगी किंवा सार्वजनिक सर्व कामांवर तुझी नजर राहील. तुला मज्जाव कोठेंही होणार नाहीं. उदरनिर्वाहाचें साधन नसल्यामुळें जो कोणी तुझ्याकडे येऊन तोंड पसरील त्याचें म्हणणें तूं मला कळीव, म्हणजे ताबडतोब मी त्याची इच्छा पूर्ण करीन. माझ्या पदरच्या कोणाहीपासून तुला त्रास होणार नाहीं.'

पुढें महाशक्तिमान, कांतीनें दैदीप्यमान, सिंहाप्रमाणें विक्रमशाली व सविलासगति भीम हातांत पळा, कलथा व खांड न पडलेली अशी पोलादी नागवी तरवार घेऊन आचाऱ्याच्या वेषानें आपल्या कांतीनें जिकडे तिकडे सूर्याप्रमाणें प्रकाश पाडीत सभेंत शिरला. कृष्णवस्त्र परिधान केलेला, हिमाचलाप्रमाणें शक्तिमान असा तो आपल्यापुढें उभा राहून 'सिंहासारखा भव्य, रूपवान असा हा पूर्वी कधीं न पाहिलेला कोण आहे,' ह्मणून राजानें सभासदांना विचारलें. तेव्हां त्या पुढें जाऊन तो बुद्धिशाली भीम अदैन्यवाणीनें ह्मणाला, 'राजेंद्र, मी बल्लव आहें. मला उत्तम प्रकारचे पाक तयार करतां येतात. माझ्या पाकाची पूर्वी युधिष्ठिरानें रुचि घेतली आहे. बलामध्येंही माझ्या तोडीचा कोणी नाहीं; व युद्धप्रसंग आला असतां मी मागें घेणारा नाहीं. सिंह, हत्ती, वाटेल त्याशीं झुंजून आपलें प्रिय करण्याला मी एका पायावर तयार राहीन.' तेव्हां विराटानें त्याला आपल्या मुदपाकावर मुख्य नेमून मुदपाकांतील सर्व लोकांना त्याच्या आज्ञेंत वागण्यास हुकूम दिला. नंतर काळे कुळकुळीत, मऊ व कुरळे असे केस सांवरून घेऊन मळकट असा काळा शालू नेसलेली द्रौपदी सैरंध्री वेषांत रस्त्यावरून चाललेली विराटाच्या प्रियपत्नी सुदेष्णेला गच्चीवरून दिसली. तिला त्या वेषांत पाहून तिनें तिला वर बोलावून घेतली व 'तूं कोण व काय करूं इच्छितेस' ह्मणून विचारलें. तेव्हां द्रौपदी ह्मणाली,' मी सैरंध्री आहें. जी कोणी मला कामाला ठेवील तिची सेवा करण्याची माझी इच्छा आहे.' सुदेष्णा ह्मणाली,' तुझ्या साररूप दासी मीं कधीं पाहिल्या नाहींत. अनेक दासदासींना हुकूम करणारी तूं कोणी राजस्त्री असावीस. तुझे घोटे बाहेर दिसत नाहींत. मांड्या एकमेकांला चिकटल्या आहेत. वाणी व बुद्धि खोल आहे. नाकपुड्या, डोळे, कान, नखें, कुच व घांटी वर आलेलीं आहेत. हातापायांचे तळवे, डोळ्याचे कोपरे, ओठ, जीभ व नखें कशीं लाल आहेत. तुझें भाषण तर हंसासारखें गोड आहे. केस, सुटसुटीत, स्तन शामवर्ण व उन्नत, त्याचप्रमाणें तुझा कटिभागही पुढें आलेला आहे. **काश्मीर देशच्या घोडीप्रमाणें** तुझे सर्व अवयव जसे असावेत तसे आहेत. तुझ्या भिवया कमानदार, बिंबासारखे ओठ व कंबर बारीक आहे. तुझ्या गळ्यावर शंखासारख्या तीन रेखा असून तुझ्या अंगावरच्या शिरा तर मुळीं दिसत नाहींत. तुझें मुख पूर्णचंद्राप्रमाणें असून शरत्कालीन कमलाप्रमाणें तुझें रूप व गंध असल्यामुळें तूं प्रत्यक्ष श्रीप्रमाणें दिसत आहेत. तूं दासी खचीत नसावीस. कोणी तरी यक्षी, गंधर्वी, देवी, अप्सरा, देवकन्या, नागकन्या, अगर नगररक्षित्री देवता किंवा प्रत्यक्ष ब्रह्मदेवाची स्त्री असावीस.' द्रौपदी

ह्मणाली, ' मी तशी कोणी नसून खरोखरच सैरंध्री आहें. मला वेणीफणी करतां येते. नानाप्रकारच्या उट्या तयार करतां येतात; मालती, कमलें, सौनचांफा इत्यादिकांचे उत्तम उत्तम हार गुंफतां येतात. मी द्रौपदीबाईच्या पदरीं हीं कामें करून त्यांना तोषवून रहात असें. त्या मला उत्तम अन्नवस्त्र देत असत; व त्यांनींच मला मालिनी हें नांव दिलें आहे. ती मी आज आपल्याकडे आलें आहें. आपण मला ठेवून घ्या.' सुदेष्णा ह्मणाली, ' मी मोठ्या संतोषानें तुला आपल्या डोक्यावर देखील ठेवून घेईन. परंतु वाड्यामधील ह्या स्त्रियासुद्धां पहा कशा तुझ्याकडे टकमक पहाताहेत. त्याचप्रमाणें हीं झाडेंही तुझ्यापुढें नमताहेत. तुझें हें अमानुष शरीर महाराजांच्या दृष्टीस पडेल तर तेव्हांच ते मला सोडून तुझ्याशीं लग्न लावतील. ज्याकडे ह्मणून तूं पाहशील त्याला तूं खास मोहून सोडशील. कोण मनुष्य आपल्या हातून आपला नाश करून घेण्याला झाडाच्या शेंड्याला जाऊन बसेल? तुला आपल्या घरीं ठेवून घेणें ह्मणजे खेकडीच्या गर्भारपणासारखें मृत्यूलाच बोलावून घेणें आहे.' द्रौपदी ह्मणाली, ' महाराजांच्या किंवा दुसऱ्या कोणाच्या मी हातीं लागणारी नव्हें. माझे पांच कडाडू गंधर्वपति माझें नित्य संरक्षण करीत असतात. जो मला उष्टें खावयाला लावणार नाहीं, अगर माझ्याकडून पाय रगडून घेणार नाहीं, अशाच्याच घरीं माझें रहाणें माझ्या पतींना संतोषदायक असतें. परंतु सामान्य स्त्रियांप्रमाणें जो मजबर डोळा ठेवील त्याला त्याच रात्रीं हा देह सोडून दुसऱ्या देहांत जाण्याची पाळी येईल. कोणाच्यानेंही मला मोह पाडवणार नाहीं. गुप्त राहून माझे पति नित्य माझें संरक्षण करीत आहेत.' सुदेष्णा ह्मणाली, ' असें असेल तर मग भली, मी तुला ठेवून घेतें.' ह्याप्रमाणें पतिव्रता द्रौपदी सुदेष्णेजवळ दासी होऊन राहिली.

सहदेवही गुराख्याच्या वेषांत भाषणही तशाचप्रकारचें ठेवून गोठ्याजवळ उभा असलेला राजाच्या दृष्टीस पडला. तो कोण, कशाकरितां आला आहे याची चवकशी करण्यासाठीं राजानें पाठविलेले लोक त्याला सभेमध्यें घेऊन आले. तेव्हां शत्रूंना तापद अशा त्या राजाला तो मेघाप्रमाणें गंभीर वाणीनें ह्मणाला, ' मी वैश्य जातीचा गुरखी आहें. मी कुरुपुंगवांच्या पदरीं होतों. त्यांचा हल्लीं पत्ता नाहीं. कामावांचून रिकामा रहाण्याची माझी सोय नाहीं; व आपल्याखेरीज दुसऱ्याच्या पदरीं रहाण्याला माझें मन घेत नाहीं. आसपास दहा योजनेंपर्यंत गाईसंबंधाचें सर्व भूतभविष्यवर्तमान मला कळतें. गाईची वाढ लवकर लवकर कशी करावी, त्यांना कोणताही रोग कसा होऊं देऊं नये, इत्यादि संबंधाचे सर्व उपाय मला माहीत आहेत; ज्यांचें वृत्र हुंगल्यानें वंध्या स्त्रीसही मूल होतें, अशा शुभलक्षणसंपन्न बैलांचीही मला परीक्षा आहे.' विराट ह्मणाला, ' एकाच रंगाचीं व निरनिराळ्या रंगाचीं अशीं मजपाशीं एक लक्ष गुरें आहेत. तीं व त्यांच्यावरचे गुराखी या सर्वांवर मीं तुला मुख्य नेमिलें आहे.

यानंतर कानांत लांब लांब कुंडलें अडकवून हातांत शंखाचे चुडे भरलेला, स्त्रियांचे अलंकार घातलेला, यौवनानें रसरसणारा, असा एक पुरुष तटावर बसलेला रस्त्यानें चाललेल्या लोकांच्या दृष्टीस पडला. त्यानें आपले दीर्घ बाहू व लांब सडक केस खालीं सोडले होते. त्याच्या तोंडावरून हत्तीसारखा तो पराक्रमी दिसत होता. आपल्या चालण्यानें भूमि दरदर हालवून सोडीत तो सभेमध्यें आला. स्त्रीवेषधारी व आपल्या कांतीनें सर्व सभा दिपवून सोडणाऱ्या त्याला पाहून राजा ह्मणाला, ' हा कोण व कोठून आला आहे? सत्वशाली पुरुषाप्रमाणें दिसत असून हातांत यानें चुडे भरले आहेत! वेणी मोकळी सोडली आहे! याच्या कानांत कुंडलें व गळ्यांत माळा आहेत. लुगडें बेडेबांकडें नेसला आहे! हा कवच व धनुष्य धारण केलेला शामवर्ण कृष्णाप्रमाणें दिसत आहे! बा, तूं माझ्या रथामध्यें बसून फिरत जा; तूं मला माझ्या मुलासारखा आहेस; मी आतां ह्मातारा होऊन राज्यभार कोणावर तरी सोंपविण्याची वाट पहात आहें. तर तूं स्वसामर्थ्यानें माझ्या प्रजेचें पालन कर. असे तेजस्वी पुरुष क्लीब नसतात, असें माझें मन मला सांगतें.' अर्जुन ह्मणाला, ' मी नृत्य, गायन व वाद्य यांमध्यें प्रवीण आहें. आपण मला उत्तरेच्या तैनतींत ठेवा. ही स्थिति मला कशानें आली

आहे, हें ऐकून तरी आपल्याला काय करावयाचें आहे ? तें उगीच शोक वाढविण्याला कारण होणार आहे.मला आपण पोरकी मुलगी ह्मणा अगर मुलगा म्हणा, मी बृहन्नला आहें. ' विराट ह्मणाला, ' बृहन्नले, मी तुझ्या इच्छेप्रमाणें करतों. माझ्या मुलीला व तिच्या सख्यांना तूं संगीतादि कला शिकीव; परंतु तुला हें काम यावें असें मात्र माझें मन घेत नाहीं. समुद्रवलयांकित पृथ्वीचा उपभोग घेण्याची तुझी योग्यता दिसत आहे. ' असें ह्मणून तिच्या नृत्य गायनादि कला पाहून व आपल्या अनेक मंत्र्यांना व स्त्रियांना हाक मारून त्यांच्याकडून त्याची परीक्षा करवून तो क्लीब आहे अशी खातरी करून घेतल्यावर मुलीच्या अंतःपुरामध्यें त्यानें त्याला ठेविलें. त्या ठिकाणीं धनंजय विराटाच्या मुलीला, तिच्या सखींना व दासदासींना गायन, नर्तन व वाद्य शिकवून त्यांची मर्जी संपादन करीत वेषांतरांत राहिला.

नंतर अभ्रापासून मुक्त झालेल्या सूर्यमंडळाप्रमाणे एक पुरुष ह्मपाट्यानें विराटाकडे येतांना दिसला. त्याची नजर घोड्यांकडे लागली होती. राजापुढें येऊन तो ह्मणाला, ' महाराज आपला विजय असो. आपल्या आज्ञेनें मी आपल्या घोड्यांवरचा मोतद्दार होऊं इच्छितों. पांच पांडवांमध्यें वडील जो युधिष्ठिर त्याच्या पदरीं मी मोतद्दार होतो. घोड्यांचा स्वभाव मला कळतो व मला त्यांना वठणीला आणून त्यांच्या ठिकाणीं असलेल्या खोडी नाहींशा करतां येतात; व त्यांना कांहीं झालें असतां **त्यासंबंधाचे औषधोपचारही मला माहीत आहेत.** घोडा माझ्या तावडींत आला ह्मणजे त्याचा बुजरेपणा चट निघून जातो व घोडीला सुद्धां मुळींच खोड उरत नाहीं. मग घोड्याची गोष्ट राहिली बाजुला. मला लोक **ग्रंथिक** ह्मणतात.' विराट ह्मणाला; 'जे कांहीं माझे घोडे, मोतद्दार व सारथी आहेत ते सर्व मी तुझ्या ताब्यांत करतों. हेंच काम जर तुला पसंत असेल तर त्याबद्दल तूं बेतन काय घेणार तें सांग. तुला पाहून प्रत्यक्ष युधिष्ठिराला पाहिल्याप्रमाणें मला संतोष होत आहे.' ह्याप्रमाणें पांडव ठरल्याप्रमाणें मत्स्यपुरामध्यें आज्ञातवासांत कङ्कामध्यें काळ कांढीत राहिले.

११९ जीमूतवध. (४. १३.)

याप्रमाणें तृणबिंदु व यमधर्म यांच्या प्रसादानें पांडव विराटनगरामध्यें अज्ञातवासांत राहिले असतां अक्षहृदयज्ञ धर्मराज विराटाच्या सभासदपैकीं एक होऊन सूत्रबद्ध पक्ष्याप्रमाणें त्याला त्याच्या पुत्रासह फांसे टाकण्यामधील आपल्या कौशल्यानें आपल्याकडे आकर्षून घेऊन त्यापासून पुष्कळ पैसा काढून तो तो आपल्या भावांना देत असे.भीमसेनही विराटानें उपभोग घेऊन राहिलेलें नानाप्रकारचें मांसादि खाय, त्याचप्रमाणें अंतःपुरामध्यें अर्जुन नानाप्रकारचीं वस्त्रें, व सहदेव दहीं दूध व तूप विकत घेऊन तीं सर्व ते एकमेकांना मोबदल्यादाखल देत असत. नकुलही घोड्याची कामगिरी उत्तमप्रकारें बजावून राजाला संतुष्ट करून त्यापासून पैसा काढून आपल्या भावांना देत असे. बिचारी द्रौपदी मात्र आपल्या पतींना यात्प्रकारें कष्टांत दिवस काढतांना पाहून त्यांकडे पाहून दुःखाचे सुस्कारे टाकीत दिवस काढीत होती.याप्रमाणें चार महिने लोटल्यावर एके वेळीं ब्रह्ममहोत्सव आला असतां चोहोंकडून विराटनगरीला बरेच लोक आले. त्यांमध्यें मोठे शक्तिमान, धिप्पाड मदोन्मत्त,सिंहाप्रमाणें ज्यांच्या माना,खांदे व कंबरा आहेत, असे पाणीदार बरेच मल्ल आले होते. राजानें त्यांचा यथायोग्य सत्कार केल्यावर ते दंगलेंत शिरले, तेव्हां लोकांचे त्यांकडे डोळे लागून राहिले. त्यांमध्यें एक धिप्पाड मल्ल बलगना करीत सर्व मल्लांना कुस्तीला बोलावीत होता; तें ऐकून बाकीच्या मल्लांच्या तोंडचें पाणी पळून जाऊन त्यांनीं चिमणीएवढें तोंड केलें. तें पाहून विराटानें आपल्या बल्लवाला त्याबरोबर सामना देण्यास सांगितलें. भीमानें त्या राजाज्ञेला नाइलाजास्तव रुकार दिला. कारण उघडपणें त्याला राजाज्ञा मोडतां येईना. वाघासारखा सावकाश पाउलें टाकीत दंगलेंत शिरून विराटाला नमस्कार करून त्यानें आपली कंबर खंचली, व ज्यानें आपली कीर्ति दिगंत स्थापित केली होती, अशा त्या वृक्षतुल्य जीमूतमल्लाला कुस्तीला बोलाविलें. त्या दोघांमध्यें कुस्ती जुंपली असतां बलानें एकमेकांला हार न जाणारे ते एकमेकांवर जय मिळविण्याच्या इच्छेनें एकमेकांला धरण्याला झटत होते. नानाप्रकारचे

पेच, तोडी, दंडाला दंड भिडविणें, भिडणें, फिरून जरा मागें सरणें, स्वारी भरणें, उखाड देणें, टांग मारणें, रग्गे देणें, कसोटा देणें, टकरा देणें व गुद्ध्यानें रेटणें इत्यादिकांनीं त्यांनीं एकमेकांस अगदीं जेरीला आणिलें. त्यानें मजा बाटून ज्याची सरशी होई त्याच्या नांवानें मधून मधून 'शाबास' ह्मणून शब्द मंडळीमधून निघत असे. ओढून आवळणें, ओढून गरगर फिरवून मागें पाडणें इत्यादिकांनीं एकमेकांला जेरीस आणून गुडघ्यांनीं ते एकमेकांला रेटित होते. अशामध्यें कणखर कांबीसारख्या बाहूंनीं शत्रुविनाशक भीमानें त्याला आवळून शंभर वेळां गरगर फिरवून निस्सत्व व गतप्राण करून जमिनीवर आपटून तुडविलें. तें पाहून विराटाला मोठा संतोष झाला. अर्जुनानेंही गायन नर्तनानें विराटाला व अंतःपुरांतील स्त्रियांना खुष केलें. व नकुलानें शिकवून तयार केलेले घोडे पाहून त्यावरही राजाची भक्ति बसली. अनेक गाई, बैल सहदेवानें वठणीला आणलेले पाहून त्यालाही राजानें पुष्कळ द्रव्य दिलें. पण याप्रमाणें त्या सर्वांना रखडतांना पाहून द्रौपदीच्या काळजाला मात्र घरें पडून ती दीर्घ सुस्कारे टाकीत असे.

१२० कीचकवध. (४. १४–२४).

याप्रमाणें अज्ञातवासांत दहा महिने लोटले असतां कोणे ऐके वेळीं द्रौपदी सुदेष्णेच्या तेनातींत असतां विराटाचा सेनापति जो महाबलशाली कीचक, त्याच्या ती दृष्टीस पडली. प्रति देवतेसारखी तिला त्या ठिकाणीं पाहून तो कामशरानें पीडित होऊन पराधीनतेनें हासत हासत आपली बहीण सुदेष्णा हिला ह्मणाला, 'अक्का, मीं पूर्वी कधीं या बाब्यांत हिला पाहिलें नाहीं. हिनें मला अगदीं बेडें करून सोडिलें आहे. हिच्या अंगाचा मधुरवास तर मदिरेप्रमाणें मला माद आणीत आहे. ही अप्सरेसारखी रूपवती कोण, कोणाची, येथें कशी आली हें मला सांग. माझें हृदय ती अगदीं पिळून घेत आहे, व याला दुसरें कांहीं औषधही मला दिसत नाहीं. ही तारुण्यानें रसरसणारी सुंदरी तुझी दासी ह्मणतेस हें कसें? ह्या कामाला ती मुळीं योग्य नाहीं. माझी व जें कांहीं माझें ह्मणून आहे त्या सर्वांची हिला स्वामिनी होऊं दे.' असें ह्मणून सुदेष्णेच्या परवानगीनें तो द्रौपदीपाशीं जाऊन सिंहिणीकडे जाऊन ज्याप्रमाणें कोल्ह्यानें कोल्हेकुई मांडावी त्याप्रमाणें मधुर शब्दांनीं तो तिला ह्मणाला, 'तूं कोण, कोणाची, या विराटनगराला कोठून आलीस तें खरें सांग. तुझें रूप, लावण्य व सौकुमार्य किती तरी अप्रतिम आहे! तुझी मुखकान्ति चंद्राप्रमाणें निर्मल दिसत आहे. तुझे विशाल डोळे, कमानदार भिवया व कमलासारखें तेज पहाणाराला दिपवून टाकीत आहे. त्याचप्रमाणें हे चारुसर्वांगि, तुझें भाषण कसें कोकिलेप्रमाणें मधुर आहे. तुझ्या ठिकाणीं एवढा देखील दोष काढण्याला जागा नाहीं. अशी दुसरी कोणी स्त्री या भूतलावर आजपर्यंत माझ्या पहाण्यांत आली नाहीं, कमलानिवासी तूं लक्ष्मी आहेस, किंवा ऐश्वर्याधिष्ठात्री देवता आहेस, किंवा अशाच प्रकारची कोणी अमानुष स्त्री आहेस, किंवा प्रत्यक्ष रतीच आहेस? चंद्रप्रभेप्रमाणें तूं लावण्यवती असून पापण्या किंचित् उघडल्या असल्यामुळें तुला दिव्यकिरणयुक्त व दिव्यकांतिनें मनोहर असा अप्रतिम सौन्दर्यशाली आल्हाद देणारा मुखचंद्र पाहून या अखिल भूतलावरील कोण पुरुष मोहून जाणार नाहीं? माझ्या मनाला अति पीडा करणारे हे मदनबाण तुझ्या संगमाशारूपी धोंड्यावर घासून सूक्ष्म होऊन जोगनें माझ्या हृदयांत शिरून मला वेदना देत आहेत. नानाविध माळा, वस्त्रें व अलंकार घालून हे विलासिनि, तूं माझ्या समागमामध्यें यथेष्ट सुखोपभोग घे. सुखाला योग्य असतां त्याला मुकून तूं या ठिकाणीं काबाडकष्टामध्यें काळ काढावास हे चांगलें नाहीं. यास्तव हे मत्तगामिनि, माझ्या मुखांतून अमृततुल्य मधुर पेय येथें प्राशन करीत यथेच्छ क्रीडा करून अप्रतिम सुखोपभोग मिळीव. हे सुंदरी, हें तुझें अप्रतिम सौंदर्य फुकट जात चाललें आहे. तूं सुंदर असतांही उत्तम माळा तुझ्या गळ्यांत नसल्यानें जशी शोभावीस तशी तूं शोभत नाहींस. मी आपल्या सर्व स्त्रियांना सोडून देतो. हे चारुहासिनि, त्या सर्व तुझ्या दासी होतील; व मीही तुझा दास बनून तूं सांगशील तें करण्याला एका पायावर तयार राहीन.' द्रौपदी ह्मणाली, 'हे सूतपुत्रा, हलक्या कुळांतली, दासी, अमंगळ वेणी-

फणी करणारी व लोकांचें जिच्याकडे कधीं लक्ष सुद्धां जाणार नाहीं अशा माझी तुला इतकी हाव का बरें सुटली आहे ? मी दुसऱ्याची स्त्री आहें. तुझें हें करणें उचित नाहीं;सर्व प्राणिमात्रांना आपापल्या बायका प्रिय असतात.धर्माचाही विचार कर.**परस्त्री-वर तूं डोळा ठेवूं नयेस**; भलत्या कामाकडे प्रवृत्ति ठेवणें हें भल्याचें काम नव्हे. वेडेपणानें भलती इच्छा करणारा पापी मनुष्य अपकीर्तीला धनी होतो, व प्रसंगीं मोठें संकटही त्यावर येऊन गुदरतें.' हें द्रौपदीचें भाषण ऐकून कामांध झालेला कीचक, परस्त्रीशीं अतिप्रसंग करण्यांत प्राणावर बेतणारे व लोकांनीं छीः थूः करण्याजोगे असले अनेक दोष कळत असून सुद्धां विवशेंद्रिय होऊन तिला म्हणाला, 'हे सुंदरि, तुझ्यामुळें मन्मथानें माझ्यावर एवढा पगडा बसविला असतां तूं मला अशा प्रकारें धिःकारावेंस हें योग्य नाहीं. मी या सर्व राज्याचा स्वामी असून ह्या नगराचें अस्तित्व माझ्यावरच आहे. रूप, यौवन, वैभव, उपभोग्य वस्तू या सर्वांनीं संपन्न माझ्यासारखा दुसरा कोणी पुरुष सांपडावयाचा नाहीं. तर सर्व काम परिपूर्ण करणारे अप्रतिम सुखोपभोग घेण्याच्या ऐवजीं अशी दासी होऊन रहाण्यांत तुला काय गोडी वाटत आहे ? माझा स्वीकार कर, आणि या अप्रतिम सुखांचा उपभोग घे.' हें त्याचें अभद्र भाषण ऐकून त्याच्या त्या भाषणाबद्दल त्याची निंदा करून द्रौपदी म्हणाली, 'हे सूतपुत्रा, असा वेडा होऊन आज उगीच जिवाला मुकूं नकोस. मी तुझ्या हातीं लागणारी नव्हें. माझे पति गंधर्व आहेत. ते रागावले असतां तुला कांहीं जिवंत ठेवणार नाहींत. मानवांना दुर्गम अशा वाटेला तूं जाऊं इच्छीत आहेस. मूढबुद्धि बालक ज्याप्रमाणें नदीच्या एका तीराला उभें राहून पैल तीराला जाण्याची हाव धरतें, तशीच ही तुझी इच्छा आहे. तूं पृथ्वीच्या पोटांत शिरलास किंवा वर आकाशांत उडालास अथवा समुद्राच्या पलीकडे पळालास तरी त्या माझ्या आकाशगामी पतींच्या तावडींतून सुटणार नाहींस. एखाद्या रोगग्रस्त मनुष्यानें ज्याप्रमाणें कालरात्रीला जवळ बोलवावें तशीच तूं मजवर ही अत्यासक्ति दाखवीत आहेस. आईच्या मांडीवर निजलेलें मूल ज्याप्रमाणें चंद्राला धरण्याला धांवत असतें तशा प्रकारची ही तुझी स्थिति आहे. तुझ्या डोळ्याला भुरळ पडली आहे म्हणूनच ती तुला आपल्या बचावाच्या वाटेकडे पाहूं देत नाहीं.' याप्रमाणें द्रौपदीनें धिःकारल्यावर अनिवार्य मदनानें जळत चाललेला कीचक सुदेष्णेकडे येऊन ज्या उपायानें द्रौपदी आपल्याला वश होईल तो उपाय योजण्यास त्यानें तिची विनंति केली. त्याचें तें दीन भाषण ऐकून सुदेष्णेला कींव आली व पुढें काय उपाय करावा म्हणून मनाशीं विचार करून ती म्हणाली, 'एखादी पर्वणी पाहून सुरा आणि अन्न तयार करीव. मजकरितां तें आणण्यासाठीं मी तिला तुझ्याकडे पाठवीन. आणि एकटी अशी ती एकांतांत तुझ्या हातीं सांपडली म्हणजे गोड शब्दांनीं तिला तूं वाटेल तशी वळीव.' ही बहिणीची मसलत बरी वाटून एके दिवशीं त्यानें उत्तम रीतीनें तयार केलेली राजभोग्य अशी दारू आणविली व चांगल्या हुशार आचाऱ्यांकडून उत्तम उत्तम प्रकारचे नानाविध पाक तयार करवून आपल्या बहिणीकडे निरोप पाठविला. तेव्हां ती सैरंध्रीला म्हणाली, 'मुली, मला फार तहान लागली आहे. कीचकाच्या घरीं जाऊन थोडें मैद घेऊन ये.' सैरंध्री म्हणाली, 'मी तिकडे जाणार नाहीं. त्याचा कोडगेपणा आपल्याला माहीत आहेच. येथें स्वैर राहून पतींशीं मी बेमान होऊं इच्छीत नाहीं. आपल्या पदरीं ज्या अटीवर मी राहिलें ती आपल्याला ठाऊकच आहे. आपल्याजवळ पुष्कळ दासी आहेत; दुसरी एखादी पाठवा. तो खचित मला दुखविल्याविना राहणार नाहीं.' 'मीं पाठविलें असतां तो तुला कांहीं करणार नाहीं,' असें म्हणून सुदेष्णेनें भांडें देऊन तिला त्याकडे पाठविलें. द्रौपदीला शंका येऊन देवावर हवाला ठेवून ती रडतच कीचकाच्या घराकडे जातां जातां वाटेंत 'मला जर आपल्या पतींशिवाय दुसरा कोणी माहीत नसेल तर त्या माझ्या सत्यवर्तनानें आज माझी कीचकाच्या तावडींतून सुटका होवो,' असें म्हणून तिनें सूर्याची प्रार्थना केली. सूर्यानें एका राक्षसाला गुप्तपणें तिच्या रक्षणार्थ पाठविलें. ती जिकडे जाईल तिकडे तिच्या मागून तिचें संरक्षण करीत तो फिरत होता. मृगीप्रमाणें कावरीबावरी झालेल्या तिला पाहून पै-

लग्नार जाऊं इच्छिणाऱ्याला नाव मिळाल्यानें जसा आनंद व्हावा त्याप्रमाणें आनंद होऊन कीचक तिच्याकडे धांवून जाऊन ह्मणाला, 'हे सुकेशि, आलीस बरें झालें. आज हा मला सुदिन उगवला ह्मटलें पाहिजे. माझ्या हृदयाची स्वामिनी तूं आज मला मिळालीस. प्रिये, माझें प्रिय कर. सुवर्णमाळा, शंखाचे चुडे, अनेक देशांतून आणलेलीं सुवर्णकुंडलें, उत्कृष्ट रत्नें, रेशमी वस्त्रें व कातडीं हीं तुझ्या सेवेला हजर करण्याला माझे सेवक तयार आहेत. ही पहा उत्कृष्ट शय्या तुझ्याकरितां तयार करून ठेवली आहे. या ठिकाणीं माझ्या समागमामध्यें माधवी सुरा पिऊन मजा कर.' द्रौपदी ह्मणाली, 'बाईसाहेबांनीं मला सुरा आणण्यासाठीं पाठविलें आहे; त्यांना फार तहान लागली असून लवकर सुरा घेऊन येण्यास त्यांनीं सांगितलें आहे.' कीचक ह्मणाला, 'हें तिचें काम करण्याला दुसऱ्या पुष्कळ दासी माझ्या जवळ आहेत. ' असें ह्मणून त्यानें तिच्या उजव्या हाताला धरलें. द्रौपदी ह्मणाली, 'उन्मत्तपणानें मनानेंही जर माझें आजपर्यंत पतीसंबंधानें वांकडें पाऊल पडलें नसेल, तर तें सत्य आज माझ्या कामीं पडून तूं मरशील. ' डोळे वटारून जणूं खावयास निघाली आहे कीं काय अशी ती त्याची निर्भर्त्सना करीत होती; तरी कीचक तिच्या पदराला झोंबतच होता. तिनें जोरानें हिसडा देऊन तो सोडवून घेतला. त्यासरसें समूळ उपटून पडलेल्या झाडाप्रमाणें तो धाडकन् जमिनीवर आपटला. द्रौपदीनें याप्रमाणें त्याच्या कचाट्यांतून सुटल्याबरोबर रक्षणाकरितां सभेमध्ये धांव घेतली. कीचकही तिच्या मागून धांवत गेला, व विराटाच्या समोर त्यानें तिला लाथ मारली.इतक्यांत सूर्यानें बरोबर दिलेल्या राक्षसानें मोठ्या जोरानें त्याला दूर उडवून दिलें. हा कीचकानें केलेला द्रौपदीचा अपमान तेथें हजर असलेल्या भीमयुधिष्ठिरांना सहन झाला नाहीं. भीमसेनाला तर त्याला केव्हां मारीनसें होऊन त्वेषानें तो करकरां दांत खात होता. व त्यानें आपले लाल झालेले डोळे वटारले. त्याच्या कपाळावर व भिवयांवर दरदरून घाम आला. तो संतापून उठणार होता, इतक्यांत युधिष्ठिरानें त्याला आंगठ्यानें दाबलें व मस्त अशा हत्तीप्रमाणें एका झाडाकडे त्याची शून्य दृष्टि लागलेली पाहून ' बल्लवा, झाडाकडे इतका न्याहाळून काय पहात आहेस. तुला सरपण हवें असेल तर नगराबाहेर जाऊन वाटेल तितक्या झाडांचा फडशा उडीव. ' असें मोठ्या खुबीनें सूचक शब्दांनीं त्यानें त्याला निवारिलें. पणानें जखडून जाऊन स्वरूप झांकून ठेवलेल्या आपल्या दीन पतीकडे नजर लावून आपल्या क्रूर दृष्टीनें त्याला जाळूनच टाकीत आहे कीं काय, अशा रीतीनें विराटाकडे पहात द्रौपदी ह्मणाली, ' ज्याच्यामुळें पांच देश मध्यें सोडून सहाव्या देशामध्यें असणाऱ्या शत्रूला देखील स्वस्थ झोंप येत नाहीं, जे नेहमीं दाते असून कधीं याचना करीत नाहींत, व ज्यांच्या दुंदुभीचा ध्वनि व धनुष्याचा टणत्कार रात्रंदिवस कानीं पडत असतो, अशा तेजस्वी, बलवान व मानी वीरांची मी मानिनी स्त्री असून मला ह्या सूतपुत्रानें लाथ मारिली! धर्मपाशानें बद्ध झालेले माझे पति त्रैलोक्याला ठार करण्याला समर्थ आहेत, शरणार्थ्यांना आश्रय देणारे, सर्व भूतलावर गुप्तपणें संचार करणारे ते आज कोठें दडले आहेत न कळे! सूतपुत्र ह्याप्रमाणें आपल्या पतिव्रता स्त्रीचें धिंडवडे काढीत असतां बलवान व तेजस्वी असूनही दुबळ्याप्रमाणें आज ते निमुटपणें कसें हें सर्व सहन करीत आहेत? त्यांचा राग, त्यांचें वीर्य, त्यांचें तेज आज कोणीकडे गेलें? कारण आज अशा स्थितींतसुद्धां माझें संरक्षण करण्याची त्यांना इच्छा होत नाहीं! आपल्यासारखे धर्मराज माझे धिंडवडे भरसभेमध्यें निमुटपणें पहात बसले राहून आपण राजाला शोभेल असें कीचकाला कांहींच शासन न कराल तर मी तरी अबला काय करणार? चोरांच्या नीतीप्रमाणें आपल्या सभेमध्यें हा प्रकार शोभत नाहीं. आतां सभासदच कीचकाचा हा दांडगेपणा पाहून घेवोत. या दुष्टाला तर धर्माचा गंध नाहीं. महाराजही तसेच दिसतात; व हे सभासदही अशांच्या आश्रयानें आहेत, ह्मणून मला सर्व जसें असावें तसेंच दिसत आहे! ' हें तिचें निंदात्मक भाषण ऐकून विराट ह्मणाला, ' माझ्या परोक्ष काय घडलें हें मला ठाऊक नाहीं. ह्मणून सत्य कळल्यावेरीज मीं तरी यासं-

बंधानें काय न्याय वावा ? ' सभासद् या वेळीं द्रौपदीची प्रशंसा करून कीचकाची निंदा करून म्हणाले; ' ही सुंदरी ज्याची स्त्री असेल त्याला याहून आणखी लाभ तो काय पाहिजे ? आणि हिच्याबद्दल त्याला दुःख तरी कां होणार नाहीं ? ' याप्रमाणें सभासद तिची कींव करीत असतां युधिष्ठिराच्या कपाळावर दरदरून घाम येऊन तो आपल्या प्रियेला म्हणाला, ' सैरंध्रि, सुदेष्णेकडे जा; येथें उभी राहूं नकोस. **पतींच्या मनाप्रमाणें वागणाऱ्या वीरस्त्रियांना प्रसंगीं कष्ट सोसावे लागतात खरे**, परंतु पतिसेवेमध्यें सोसलेल्या त्यांच्या कष्टांबद्दल त्यांना पतिलोक मिळतो. अजून राग प्रगट करण्याची वेळ आली नसेल म्हणूनच ते तुझ्या साहाय्याला धांवून येत नाहींत. तुला काळ वेळ समजत नाहीं. एखाद्या नाटकी स्त्रीप्रमाणें सभेमध्यें येऊन रडून तूं येथें जुगारामध्यें मात्र विघ्न आणीत आहेस. जा, ज्यानें तुझें वांकडें केलें त्याला योग्य शासन करून तुझें दुःख तुझे पती दूर करतील. ' सैरंध्री म्हणाली, ' ज्या दयालु पतींसाठीं मी धर्मानें वागून क्लेश सोशीत आहें त्यांच्यातील वडीलच जर जुगारबाज बनले आहेत तर ज्याच्या त्याच्या हातून त्यांचा अपमान व्हावा हें रास्तच आहे ! ' असें म्हणून रडत ती सुदेष्णेकडे गेली व तिनें घडलेला वृत्तांत तिला कळविला. तेव्हां सुदेष्णा म्हणाली, ' कामानें मत्त होऊन अप्राप्य अशा तुझा ज्यानें अपमान केला त्याला पाहिजे तर मी शिक्षा करविते. ' द्रौपदी म्हणाली, ' ज्यांचा त्यानें अपराध केला आहे ते त्याला शिक्षा करण्याला खंबीर आहेत. आज तो यमलोकाला जाणार हें खास. '

याप्रमाणें या भाग्यशाली राजस्त्रीचा सारथ्यानें अपमान केल्यामुळें त्याचा नाश केव्हां होईल म्हणून मनांत जळफळत द्रौपदी अंतःपुराकडे गेली, व **हातपाय, अंग व वस्त्रें धुवून शुद्ध होऊन** आतां या संकटाचें निवारण कसें करावें म्हणून विचारांत गढून गेली. तेव्हां भीमावांचून दुसरा कोणी हें कृत्य करण्याला समर्थ नाहीं, असें वाटून सनाथ असतांही कोणी आपल्याला नाथ मिळेल काय म्हणून आशाळूप्रमाणें त्या विशालाक्षीनें भीमसेनाच्या राहण्याच्या ठिकाणाकडे धांव घेतली. तिच्या त्या उग्र तेजानें तें ठिकाण पेट घेतल्याप्रमाणें दिसूं लागलें. त्या पाकशालेमध्यें **तीन वर्षांच्या वेतगाईप्रमाणें** आतुर होऊन ती त्याकडे धावली; व निबिड अरण्यांत झोंपीं गेलेल्या सिंहाला ज्याप्रमाणें सिंहिणीनें कवटाळावें तसें ह्या नरसिंहाला घट्ट आलिंगन देऊन तिनें जागें केलें; व गांधारस्वर काढणाऱ्या मधुर वीणेप्रमाणें सुस्वरशब्दांनीं ती अनिंदिता त्याला म्हणाली, ' महाराज, उठा; मेल्यासारखे असे कां पडला ? कारण जिवंत माणसाच्या बायकोवर हात टाकून कोणी पापी मनुष्य आजपर्यंत जिवंत राहिला नाहीं. म्हणून मला असें म्हणावें लागत आहे. ' हें तिचें भाषण ऐकून भीमसेन झटकन् जागा झाला व आंथरूण पसरलेल्या त्या खाटेवर उठून बसून म्हणाला, ' इतक्या गडबडीनें तूं मजकडे कां आली आहेस ? तुझा वर्ण नेहमींप्रमाणें दिसत नसून तो कसा फिका पडला आहे. अशाही दुर्घट प्रसंगांत तुझा माझ्यावर पूर्ण भरंवसा आहे ! तुझ्यावर कोणताही प्रसंग आला असला तरी त्यापासून तुला सोडविण्यास मी हा तयार आहें ! बोल तुझ्या मनांत असेल तें झटकन सांगून कोणाच्या दृष्टीस पडण्यापूर्वी लवकर आपल्या ठिकाणीं परत जा. द्रौपदी म्हणाली, ' मला आपल्या वडील भावासारखे पती असल्यामुळें आपल्याला असे कष्ट व्हावेत यांत नवल काय ! माझीं दुःखे आपल्याला कळत नाहींत असें नाहीं. असें असून आपण उगीच मला कांहीं तरी विचारतां दासी म्हणून पूर्वी प्रतिकामीनें मला सभेंत ओढली तें आजून माझ्या मनांत जळत आहेत. त्याचप्रमाणें त्या दुरात्म्या सैंधवानें वनवासामध्यें जे माझे धिंडवडे केले तेंही माझ्याखेरीज दुसरे कोणी सहन करणार नाहीं. आज तर विराटाच्या समक्ष ते जुगारबाज पहात असतां कीचकानें माझ्या अंगावर हात टाकला ! ह्या प्रकारें अनेक दुःखांनीं होरपळलें असून आपल्याला तें जर दिसत नाहीं तर मीं जगून तरी काय करावयाचें आहे ? हा दुर्मति राजशालक सैरंध्रीवेषानें मला अंतःपुरांत पाहून ' माझी बायको हो, ' म्हणून दररोज मला टोचतो: हे शत्रुघातक महाराज, योग्य काल येऊन पक्व झालेल्या फळाप्रमाणें माझें हृदय उकलत चाललें आहे. ज्याच्या कृत्यानें ही दुःखपरंपरा मा-

इथावर ओढवली आहेत, त्या जुगारबाज वडील भावांनाच आपण याबद्दल दोष या. अद्दल जुगारबाजासेरीज दुसरा कोण राज्य व सर्वस्व गमावून वनवास प्राप्त झाला असताही फिरून ह्या भिकार जुगारांत मन घालील ? जरी हजारों मोहरा अथवा निवडक निवडक चीजवस्त पणाला लावून त्यांनीं रात्रंदिवस वर्षानुवर्ष द्यूत खेळलें असतें, तरी पुरण्याजोगती अगणित संपत्ति असून द्यूतामध्यें एका घटकेंत ती सारी गमावून आज हे फिरून ह्याच धंद्यावर पोट भरीत आहेत ! ज्यांना सकाळीं उठविण्याला अनेक भाट तयार असत, व अनेक ब्राह्मण ज्यांच्या घरीं यांचें स्वस्त्ययन करण्याला असत, व जे राष्ट्रामध्यें अंध, वृद्ध, बाल व संकटांत पडलेले यांना दररोज पोषित असत व आपल्या संपत्तीचा नेहमीं सर्वांना उपभोग मिळावा अशी ज्यांची नेहमीं इच्छा असे, असे हे सत्यनिष्ठ, धैर्यशाली स्वतः विराटाचे स्तुतिपाठक दास बनले आहेत. इंद्रप्रस्थामध्यें हजारों राजे ज्यांच्या पुढें करभार घेऊन उभे रहात, ते हे आज दुसऱ्यांनीं दिलेल्या अन्नावर स्वतःचें पोट जाळीत आहेत. सभेमध्यें ऋषिवर्गासह राजे ज्यांच्या दरबारांत हजर असत, ते हे दुसऱ्याच्या दरबारांत हजर राहून गोड बोलून दुसऱ्याची मर्जी संपादन करीत आहेत, हें पाहून माझ्या तळपायाची आग कशी मस्तकाला जाते. या सर्वांहून मोठें दुःख जें मला होत आहे तें तर वेगळेंच. मी बोलतें ह्मणून वाईट वाटूं देऊं नका; मला असह्य दुःख होत असल्यामुळें माझ्यानें बोलल्याखेरीज रहावत नाहीं. स्वतःला आचारी ह्मणवून घेऊन हें नित्य आचाऱ्याचें काम आपण करतांना पाहून माझ्या पोटांत शोक पेट घेतो. ज्यावेळीं पाकशाळेंत पाक तयार करून महाराजापुढें नोकराप्रमाणें आपण उभे राहतां, जेव्हां ते मोठ्या कौतुकानें हत्ती, बैल, सिंह यांशीं आपल्याला झुंजावितात, तेव्हां तर तें पाहून माझ्या पोटांत भडभडून येतें. केकयी व तिच्या दासी त्यावेळीं मला तुमच्याकडे कावरीबावरी पहातांना पाहून ह्मणतात; 'एकमेकांच्या सहवासानें या दोघांचें एकमेकांवर प्रेम जडलें आहे, ह्मणून ह्या वीर्यशाली बल्लवाला युद्ध करतांना पाहून हिला वाईट वाटतें. हीही बरीच देखणी आहे व बल्लवही रूपानें कमी नाहीं. **बायकांच्या मनाचा अंत कोणाला लागणार नाहीं.** सहवासजन्य स्नेहामुळें ही नेहमीं त्याची बाजू उचलते. शिवाय हे दोघे आमच्या वाड्यांत एकाच वेळीं रहावयास आले आहेत. अशा प्रकारें बोलून त्या मला टोंचतात, व मला राग आलेला पाहून त्या आपणा दोघांविषयीं भलभलत्या कल्पना काढतात. त्याचप्रमाणें ज्या एकट्या बहादरांनीं सर्व देव व मानव यांना जिंकलें व प्रत्यक्ष अग्नीला ज्यांनीं खांडववनामध्यें संतुष्ट केले, ते हे नरवीर कुब्यांत झांकून ठेवलेल्या अग्नीप्रमाणें अंतःपुरामध्यें दिवस काढीत आहेत. ज्या नरवीरांना सर्व शत्रु नेहमीं थरथरां कांपतात ते हे लोकांमध्यें गर्ह्य अशा निंद्य वेषामध्यें राहिले आहेत ! प्रत्यंचेच्या आघातानें घट्टा पडलेल्या यांच्या मनगटावर शंखाचे चुडे चढले आहेत ! ज्यांच्या धनुष्याच्या टणत्कारानें शत्रु थरथरां कांपत, त्यांचा मधुर गायनस्वर स्त्रियासुद्धां मोठ्या कौतुकानें ऐकतात ! ज्या मस्तकाला सूर्याप्रमाणें कांतिमान किरीट शोभा देई त्यावर हल्लीं बुचडा चढला आहे.अशा या महावीरांच्याभोंवतीं मुलींचा गराडा पडलेला पाहून तर माझें मन चर होतें. जे सर्व विद्यांचा आधार, त्यांनीं कानांमध्यें कुंडलें घातलीं आहेत ! समुद्र ज्याप्रमाणें आपली मर्यादा सोडीत नाहीं त्याप्रमाणें हजारों एकवटलेल्या राजांची देखील ज्यांच्या अंगावर चालून येण्याची छाती नाहीं असे हे नरवीर या निंद्य वेषांत विराटकन्येचें चाकर बनले आहेत. जे महाभाग जन्माला आले असतां कुंती सासुबाईंचा शोक नाहींसा झाला ते हे आपले धाकटे बंधु सुवर्णकुंडलें, कांचेचे चुडे इत्यादि अलंकार चढवून येतांना पाहून माझ्या पोटांत कसें भडभडून येतें. आपल्या हत्तिणींच्या कळपांमध्यें असलेल्या मत्तगजाप्रमाणें हे धनुर्धारी विराटाच्या पुढें मुलींच्यामध्यें उभे राहून बाजांच्या सुस्वर नादांत जेव्हां आपलें कौशल्य त्याला दाखवीत असतात तेव्हां तर माझ्या डोळ्यांपुढें अंधारी येते. त्याचप्रमाणें आपल्या धाकट्या बंधूना गुरांचे नायक बनून गुरांच्याच्या वेषांत येतांना पाहून मी कशी पांढरी फटफटीत पडतें. फिरून फिरून त्यांचा

व्यवसाय मनांत येऊन मला झोंप येत नाहीं, मग सुखाची गोष्ट बाजूला राहिली. त्या सत्यशाली पुरुषांमध्यें असें एकही दुष्कृत्य माझ्या नजरेला येत नाहीं कीं, ज्यानें अशा प्रकारचें दुःख त्यांवर येऊन पडावें! रक्तवस्त्र नेसून सर्व गुराख्यांच्या अघाडीला भीत भीत राजापुढें येतांना त्यांना पाहून माझ्या अंगाची लाही उडते. थोर सासूबाई नेहमीं शीलसंपन्न, सद्वर्तनी, भिडस्त, मधुर भाषण करणारे, धार्मिक व सर्वांशीं मिळून मिसळून रहाणारे म्हणून यांना नांवाजीत. 'द्रौपदी, हा लहान व नेहमीं आपल्या बडील भावांच्या आज्ञेंत असणारा असल्यामुळें वेळीं अवेळीं सुद्धां तूं याची काळजी घे, व स्वतः हातानीं जेवायाला वाढ,' म्हणून पुत्रवत्सल अशा त्यांनीं डोळ्यांत पाणी आणून आम्ही निघतांना मला सांगितलें. तर अशा त्या वीरश्रेष्ठांना गुरांच्या चाकरींत गुंतलेले, रात्रीं गोठ्यांतच वासराच्या कातड्यावर पडलेले पाहून मीं हे आपले प्राण ठेवावेत असें तुम्हांला वाटतें काय? त्याचप्रमाणें रूप, अस्त्रविद्या व शहाणपणा या तिन्ही गुणांनीं संपन्न हे सर्वांत धाकटे विराटाचे मोतद्दार बनले आहेत. हा कालाचा फेरा तरी केवढा पहा! ज्यांना पहातांक्षणी अनेक शत्रूंची रानोमाळ दाणादाण उडत असे, ते हे घोड्यांना शिकवून विराटराजाच्या शुश्रूषेमध्यें तत्पर राहून त्याला आपले घोडे दाखवीत आहेत! याप्रमाणें हजारों दुःखांनीं मी घेरले असतां महाराज, आपण मला सुखी समजतां काय? आणखीही मी माझीं दुःखें आपल्यापुढें ठेवतें, ऐका. सैरंध्रीवेषांत राहून मला सुदेष्णेला पाय धुण्याला पाणी द्यावें लागतें. मी राजकन्या असून हा मजवर प्रसंग! सर्व लोक दुःखाचा कधीं तरी शेवट होणार म्हणून काळाकडे डोळे लावून असतात. मानवांची अभीष्टसिद्धि त्याचप्रमाणें जयाजय अनित्य आहेत. सुखदुःखें चक्राप्रमाणें एकामागून एक येतात. पुरुषाला जयप्राप्तीला जें कारण होतें, त्यानेंच प्रसंगीं त्याचा मोड होतो म्हणून मी काळाकडे डोळे लावून बसलें आहे. वास्तविक मी मेल्यासारखीच आहें हें आपल्याला दिसत नाहीं काय? दान करणारांनीच याचना करण्याची पाळी येते, मारणारांनाच मरण्याची पाळी येते, त्याच प्रमाणें पाडणारांनाच पडण्याची पाळी येते, असें मीं ऐकिलें होतें त्याचा खरेपणा प्रत्यक्ष दिसून येत आहे. दैवाला जड काहींच नाहीं. व तें कोणाला टाळतांही येणारें नाहीं, असें समजून फिरून चांगला काळ येईल म्हणून मी काळ कंठीत आहें. जिकडचें पाणी फिरून तिकडेच जात असतें म्हणून मी फिरून चांगला काळ येईल म्हणून वाट पहात आहें. मोठ्या विचारानें हातीं घेतलेलें कामही ज्या दैवानें बिघडतें त्याची अनुकूलता मिळविण्यास शहाण्यानें खटपट करावी. आज इतकी मीं आपल्याशीं बडबड चालविली आहे त्याचें कारण विचाराल तर तें ऐका. पांडवांची बायको, द्रुपदाची मुलगी, असें असून ही दशा येऊन माझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला जिवंत राहवेंसें वाटेल? ह्या माझ्या दुःखामुळें सर्व कौरवांना द्रुपदांना व पांडवांना तोंडावर पदर घेण्याची वेळ आली आहे? भाऊ, सासरे व पुष्कळ मुलगे यांचा परिवार असून भाग्याला चढलेल्या दुसऱ्या कोणच्या स्त्रीवर अशी दुःखपरंपरा ओढवणार? खरोखर लहानपणींच त्या विधात्यानें माझ्या हातून कांहीं वांकडें झालें असलें पाहिजे, म्हणून त्याच्या इच्छेनेंच मला ही वाईट दशा आली आहे. महाराज, माझा वर्ण सुद्धां कसा बदलून गेला आहे तो आपल्याला दिसत नाहीं काय? अरण्यामध्यें इतकीं दुःखें सोशीत असतां देखील माझी अशी स्थिति झाली नव्हती. पूर्वी मी किती सुखांत होतें तें आपण जाणतांच. त्या मला आज हा बटीकपणा आल्यामुळें क्षणभर सुद्धां मनाला चैन नाहीं. धनंजयासारखे धनुर्धारी दडपून ठेवलेल्या निखाऱ्याप्रमाणें झांकून राहिले आहेत, तेव्हां हे दैवाशिवाय दुसऱ्या कोणाचे खेळ असावेत? प्राण्यांची गति मानवांना कळून येणें अशक्य आहे. हा आपल्यावरचा प्रसंग कधीं कोणाच्या ध्यानींमनीं सुद्धां नसेल. इंद्रासारखे आपण ज्या माझें तोंड नित्य पहात असां, त्या मला आज क्षुद्र स्त्रियांच्या तोंडाकडे पहावें लागत आहे. ही समुद्रवलयांकित पृथ्वी जिच्या आज्ञेंत असे तिला आज सुदेष्णेच्या आज्ञेंत रहावें लागत आहे. जि-

च्या मागेंपुढें सेवकजन धवांत असत तिला स्वतः-ला आज दुसऱ्याच्या पुढें धांवावें लागत आहे. ज्याचें मला सर्वांत अधिक दुःख होत आहे ती तर गोष्ट निराळीच आहे. ज्या मीं आजपर्यंत कुंति सासुबाईच्या अंगाला लावण्याखेरीज दुसऱ्या कोणाकरितां गंध उगाळिलें नाहीं, त्या मला आज दुसऱ्याकरितां तें उगाळावें लागत आहे. महाराज, हे माझे हात तरी बघा. ह्यांना असें तुम्हीं पूर्वी कधीं तरी पाहिलें होतें काय? ' असें ह्मणून आपले घट्ट पडलेले हात त्याच्यापुढें करून तिनें आपलें भाषण फिरून सुरू केलें; " ज्या मला कुंति सासुबाईची अगर तुम्हा कोणाची भीति वाटत नसे, त्या मला ' महाराज काय ह्मणतील, गंध चांगलें उगाळलें आहे ह्मणतील कीं वाईट ह्मणतील, ' असे विचार मनांत येऊन विराटाच्या पुढें भीत भीत उभें रहावें लागतें! कारण त्याला माझ्याखेरीज दुसऱ्या कोणीं उगाळलेलें गंध आवडत नाहीं! "ह्याप्रमाणें आपलीं दुःखें भीमाला सांगत त्याकडे पहात डोळे पाण्यानें भरून येऊन दीर्घ सुस्कारे टाकीत द्रौपदी रडूं लागली; व ' महाराज, मीं देवांचा यत्किंचित अपराध केलेला मला आठवत नाहीं! मरण्याला माझ्याकडून अडचण नाहीं; परंतु कर्तव्याला जागून मी जिवंत आहें, ' असें ह्मणाली. हें तिचें हृदयद्रावक भाषण ऐकून भीमाचें हृदय फाटलें. व तिचे हात आपल्या तोंडाकडे नेऊन घळघळा अश्रू ढाळून तो शत्रूला ताप देणारा नरवीर रडूं लागला; व शोकाकुल होऊन ह्मणाला, ' आजपर्यंत रक्तवर्ण असलेल्या तुझ्या कोमल हातांना असे घट्टे पडले असतां माझे बाहुबल अगर अर्जुनाचें गांडीव यांचा काय उपयोग ? त्या विराटसभेमध्येंच कचल करून कीचकाचें डोकें मी पायाखालीं चिरडून टाकणार होतों, परंतु धर्मराजांनीं नेत्रकटाक्षानें मला आवरलें ह्मणून गप्प बसावें लागलें. राष्ट्रापासून आह्मांला हुसकून लावणाऱ्या कौरवांचा, कर्णाचा व शकुनीचा नाश करून त्या दुरात्म्या दुःशासनाचें डोकें मीं उडविलें नाहीं ही गोष्ट शल्य टोंचल्याप्रमाणें माझ्या हृदयाला पिळून काढीत आहे. हे सुश्रोणि, धर्म सोडूं नकोस; राग आवर. ही तुझी निंदा जर धर्मराजांच्या कानावर गेली तर ते खचित प्राण ठेवणार नाहींत; व धनंजयादि माझे दुसरे बंधूही प्राण ठेवणार नाहींत. मग माझें जीवित तरी कसें राहणार? पूर्वी च्यवनांची स्त्री सुकन्या बारुळामध्यें बुडून शमवृत्ति धारण केलेल्या आपल्या पतीच्या अनुरोधानें राहिली, त्याचप्रमाणें रूपवती, इंद्रसेना, नारायणी, ह्या आपल्या हजार वर्षांच्या वृद्ध पतीच्या कह्यांत होत्या. जनककन्या सीता ही तर पतीवरोबर वनवास भोगून राक्षसांकडून फार त्रास झाला असतांही ती रामाला विसरली नाहीं. त्याचप्रमाणें वयोरूपसंपन्न लोपामुद्रा सर्व दिव्य सुखोपभोग देखील टाकून अगस्तिऋषींच्या शुश्रूषेमध्यें दक्ष होती. सावित्रीनें द्युमत्सेनपुत्र जो सत्यवत त्याच्यामागून यमलोकाचाही रस्ता धरला; हीं मीं तुला पतिव्रता स्त्रियांचीं नांवें सांगितलीं त्यांच्याहून गुणांनीं तूं कांहीं कमी नाहींस. आतां तुला फार दिवस वाट पहात बसावें लागणार नाहीं. आणखी अर्धा महिना गेला ह्मणजे तेरा वर्षें संपल्याबरोबर तूं राजाची राणी होशील हें मी तुला वचन देतों. ' द्रौपदी ह्मणाली, ' महाराज, दुःख अनावर झाल्यामुळें माझ्या डोळ्यांतून पाणी निघालें व तोंडांतून हे शब्द निघून गेले. महाराजांची निंदा करण्याचा माझा मुळीं हेतु नव्हता. असो. झाल्या गोष्टी बोलून कांहीं उपयोग नाहीं. हल्लींच्या प्रसंगीं जें कांहीं केलें पाहिजे त्याचा विचार करा. सुदेष्णेला माझ्या रूपासंबंधानें मत्सर उत्पन्न होऊन राजाची व माझी गांठ कशी न पडेल ह्मणून ती नेहमीं चिंतेंत असते, आणि तिचा तो हेतु समजूनच हा मेला दुष्ट माझ्यामागें लागला आहे. ' माझे गंधर्वपति रागावले ह्मणजे तुला ठार करतील, ' असें मीं त्याला ह्मटलें ह्मणजे तो मला ह्मणतो, ' मी गंधर्वांबिंधर्वांना भीत नाहीं. हजारों गंधर्व जरी रणामध्यें माझ्यापुढे उभे राहिले तरी त्यांना मारण्याला माझ्या मनगटांत जोर आहे. तूं मात्र माझ्या ह्मणण्याला कबूल हो. ' व ' तूं त्यांच्या तोंडाला लामणार नाहींस. कुलशीलसंपन्न अशी मी धर्मानें वागत असून कोणाला मारण्याचें माझ्या मनांत येत नाहीं, ह्मणून तूं जगला आहेस, ' असें मीं ह्मटलें ह्मणजे तो दुष्ट खदखदा हासतो. त्याच्याच

कान फुंकण्याबरून त्याचे मनोरथ पूर्ण करण्यासाठीं सुदेष्णेनें मला दारू आणण्याकरितां त्याच्याकडे पाठविलें. पुढें घडलेला वृत्तांत आपल्याला माहितच आहे. हा धर्मलंड, दुष्ट, बायकांवर नजर ठेवणारा वाटेल त्याचें द्रव्य किंवा स्त्री उपटण्याला मागेंपुढें पहाणार नाहीं. सन्मार्गानें वागण्याची किंवा धर्म पाळण्याची त्याला मुळींच चाड नाहीं. हा उन्मत्त दुरात्मा मीं धिःकारल्यामुळें जर वरचेवर याप्रमाणें मला लाथा देऊं लागला तर मी आपले प्राण कांहीं ठेवणार नाहीं. मग धर्माकरितां झटणाऱ्या तुमचा जो श्रेष्ठ क्षात्रधर्म तो फुकट जाणार आहे. बायकोचें रक्षण करणें म्हणजे प्रजेचें रक्षण केल्याप्रमाणें आहे, व प्रजेचें रक्षण केलें म्हणजे आत्मरक्षण केल्याप्रमाणें आहे. शिवाय शत्रूला चिरडण्यापलीकडे क्षत्रियांना दुसरा धर्म नाहीं. आपणच पूर्वी मार्से जटासुरापासून संरक्षण केलें, जयद्रथाला आपणच जेर केलें, म्हणून आज ह्या पापी, कामांध झालेल्या दुष्टाचे मडक्याप्रमाणें दगडावर आपटून तुकडे तुकडे करून टाका. उद्यां सूर्योदयानंतर जर मी ह्याला जिवंत पाहीन तर मी श्वास विष कालवून पिईन. पण या मेल्याच्या तावडींत सांपडणार नाहीं. आपल्यापुढें प्राण देणें हें मला त्याहून शतपटींनें अधिक बरें वाटतें.' हें तिचें भाषण ऐकून तिचे पाण्यानें भरलेले डोळे पुसून ओठ चावून अर्थसंपन्न व हेतुपूर्ण अशा शब्दांनीं आपल्या दुःखपीडित प्रियेला भीम म्हणाला, 'हे भीरु, तूं म्हणतेस तसें खात्रीनें करतों समजलीस. कीचकाला त्याच्या बांधवांसह आज ठार करतों. आज संध्याकाळीं सारा शोक बाजूला ठेवून त्याची गांठ घे, आणि जी ती नर्तनशाला विराटराजानें नवीन बांधविली आहे तेथें रात्रीं भेटण्याचा त्याबरोबर संकेत कर. म्हणजे मी जाऊन त्याची व त्याच्या स्वर्गस्थ पूर्वजांची गांठ घालून देतों. त्याच्याशीं संकेत मात्र कोणा देखत न करतां जपून कर.' याप्रमाणें ठरवून दोघांनीं दुःखाश्रू ढाळले. राहिलेली रात्र त्यांना फार कंटाळवाणी गेली. सकाळीं कीचक राजवाड्यांत येऊन द्रौपदीला म्हणाला, 'भरसभेमध्यें राजाच्या देखत तुला मीं लाथ मारली तरी तेथें तुला सोडविण्याला कोणी उभा राहिला नाहीं. या बहीदराशीं गांठ आहे, लक्षांत ठेव. हा विराट केवळ नांवाचा राजा आहे. मत्स्यांचा राजा व सेनापती दोन्ही मीच आहें. म्हणून हे भीरु, माझा अंगीकार कर. मी तुझा दास बनेन.' द्रौपदी म्हणाली, 'बरें पण आपल्या मित्रांना किंवा आप्तांना देखील ही गोष्ट कळतां कामा नये. कारण यशस्वी गंधर्वांच्या नांवाला मी भीत आहें. म्हणून ती जी नर्तनशाला महाराजांनीं तयार करविली आहे त्या ठिकाणीं आपण माझी रात्रीं गांठ घ्या.' हें ऐकून कीचक आनंदभरित होऊन घराकडे गेला. पण त्या मूढाला सैरंध्री रूपानें आपण मृत्यूलाच पाचारण केले आहे, हें कळलें नाहीं. चंदनादि सुवासिक पदार्थ अंगाला लावून अलंकार, माळा इत्यादिकांनीं शरीर विभूषित करण्यामध्यें सर्व दिवसभर तो अगदि गुंग झाला होता. जळणाऱ्या दिव्याच्या विझतावेळच्या ज्योतीप्रमाणें त्याचें त्या दिवशीं सौंदर्य फारच खुलून दिसत होतें. कामानें अंध होऊन तिच्या समागमेच्छेनें सर्व लक्ष तिच्याकडे लागून राहिलें असल्यानें तो दिवस कसा गेला हें सुद्धां त्याला कळलें नाहीं. भीम प्रथमच जाऊन गुप्तपणें सिंह ज्याप्रमाणें दबा धरून मृगाची वाट पहात बसतो, त्याप्रमाणें त्या नृत्यशाळेंत कीचकाची वाट पहात पडला होता. इतक्यांत उत्तमप्रकारें नटलेला हा नराधम अंधारामध्यें त्या ठिकाणीं येऊन त्या अतुल पराक्रमी व द्रौपदीच्या बिटंबनेमुळें जळफडत पडलेल्या भीमाला द्रौपदी समजून त्याजबळ जाऊन त्याला स्पर्श करून कामपीडित होऊन आनंदानें म्हणाला, 'प्रिये, लावण्यसंपन्न स्त्रियांनीं विभूषित, क्रीडेचें अग्रस्थान असें अंतःपुर सोडून हा मी तुझ्यासाठीं येथें आलों आहे पहा. माझ्या अंतःपुरांतील स्त्रिया 'आपलीं वस्त्रें किती तरी मनोहर दिसतात, किती तरी आपण खुलून दिसतां, आपल्यासारखा पुरुष या भूतलावर सांपडावयाचा नाहीं,' म्हणून माझी उगीच स्तुति करीत नाहींत!' भीम म्हणाला, 'तूं खराच देखणा आहेस व ही तुझी आत्मप्रशंसाही उगीच आहे. आतांसारखा स्पर्श तुला आजपर्यंत कधीं मिळाला नसेल. तूं कामशास्त्रांत मोठा निपुण असल्यामुळें तुला स्पर्शज्ञान तरी किती सुरेख आहे! स्त्रियांना बेड लावून सोडणारा तुझ्या-

सारखा दुसरा पुरुष सांपडावयाचा नाहीं यांत संशय नाहीं.' असें ह्मणून क्रूरकर्मशाली भीम एकदम उठून हासत हासत ह्मणाला, 'आज सिंहानें ज्याप्रमाणें महागजाला जमिनीवर लोळवावें, त्याप्रमाणें तुला माती खातांना तुझ्या बहिणीला दाखवितों. तूं मेल्यानें सैरंध्रीला खुशाल निर्धास्त फिराबयाला सांपडेल!' असें ह्मणून त्याच्या गजरे अडकविलेल्या मालाधारी केसाला त्यानें धरलें. तेव्हां बलशाली कीचकानेंही हिसडा देऊन भीमाच्या दंडाला धरलें व वसंतऋतूमध्यें मस्त अशा हत्तिणीसाठीं भांडणाऱ्या दोन हत्तींप्रमाणें ईर्षेला पेटलेल्या ह्या दोघांचें बाहुयुद्ध सुरूं झालें. पांचफडांच्या नागाप्रमाणें हात वर उगारून क्रोधरूप विषानें भरलेले ते दोघे नखें व दाढा यांनीं एकमेकांना प्रहार करीत होते. कीचक जोरानें प्रहार करीत होता तरी सत्यप्रतिज्ञ भीम आपल्या जागेवरून यत्किंचित्ही ढळला नाहीं. मत्तव्याघ्रप्रमाणें नख, दांत, केवळ ह्याच आयुधांनीं त्यांनीं भयंकर प्रहार चालविले. त्या दोन बलशाली वीरांचे दंड एकमेकांना घासले जात असल्यामुळें मोडून पडणाऱ्या कळकाप्रमाणें त्यापासून करकर असा भयंकर शब्द निघत होता. ज्याप्रमाणें प्रचंड वाऱ्यानें झाडांना गदगदा हालवून सोडावें, त्याप्रमाणें भीमानें कीचकाला हालविलें. कीचकानेंही आपली शिकस्त करून भीमाला ओढलें. कीचकाच्या गुडघ्याच्या रग्यांनीं जाग्यावरून पाऊल थोडेसें सरून भीम जमिनीवर येतो न येतो तोंच दंडपाणी यमाप्रमाणें एकदम फिरून ताठ उभा राहून त्यानें कीचकाच्या उरस्थलावर जोराची थाप मारली. ती त्यानें जरी सहन केली तरी तिनें तो जरा खचल्यासारखा दिसूं लागला. तेव्हां भीमानें त्याला छातीवर घेऊन मुष्टिमोदकानें खूप मऊ केलें. याप्रमाणें त्याला छातीवर घेतलें असतां मृगाला पकडलेल्या मांसलोलुप सिंहाप्रमाणें तो दिसत होता. ह्या दमलेल्या कीचकाला दोन्यानें ज्याप्रमाणें पशूला आवळावें त्याप्रमाणें आपल्या बाहूंमध्यें त्यानें घट्ट आवळलें; व फुटलेल्या नगाऱ्याप्रमाणें बदबद शब्द करणाऱ्या मृतप्राय झालेल्या त्याला द्रौपदीचा राग शमावा ह्मणून खालीं पाडून खूप तुडविलें. याप्रमाणें ज्याचें सर्व अंग ठेंचून गेलें आहे, व डोळे बाहेर पडून वस्त्रही सुटून गेलें आहे, अशा त्या कीचकाधमाच्या कंबरेवर गुडघा रेलून ढोपरें रेचून खूप पशूप्रमाणें त्यानें त्याची कणीक तिंबली, व त्याला गरगरां फिरवून ह्मणाला, 'लोकांच्या बायका उपटूं पहाणाऱ्या अधमाची खोड मोडून आज मी ऋणमुक्त झालों.' असें ह्मणून रागानें डोळे लाल करून त्यानें त्याचे हातपाय, मानगुटी व डोकें या सर्वांची गठडी वळली, व मांसाच्या गोळ्याप्रमाणें सर्व अंग ठेंचून त्या स्थितींत त्याला द्रौपदीला दाखवून तो ह्मणाला, 'पहा ह्या कामुकाची कशी दशा उडविली आहे. हे सुशीले, शीलगुणांनीं संपन्न अशा तुझ्यावर जे दृष्टि ठेवतील त्यांची अशी दशा होईल.' असें ह्मणून कीचकवधानें राग शांत होऊन तो वीर द्रौपदीचा निरोप घेऊन परत पाकशाळेकडे गेला. इकडे कीचकाचे बांधव त्या ठिकाणीं त्याच्या भोंवतीं गोळा होऊन दुःख करून त्याला जाळण्याकरितां बाहेर घेऊन निघाले असतां द्रौपदीला जवळच खांबाला टेकून उभी पाहून 'हिच्याकरितां कीचक मेला आहे, तर मेल्यावर तरी त्याचें प्रिय व्हावें यासाठीं हिला याबरोबर जाळून टाकण्याला परवानगी द्या,' ह्मणून त्यांनीं विराटाची परवानगी मागितली व त्याच्या आज्ञेनें त्या सुमध्यमेला तिरडीवर आवळून ते स्मशानाकडे घेऊन चालले. त्या वेळीं तिचा तो दीनस्वर कानीं पडतांच एकदम आंथरुणावरून उठून जांभई देऊन तटावरून उडून भीम नगराबाहेर पडला व त्यानें स्मशानाची वाट धरली. स्मशानभूमीजवळ गेल्यावर शेंड्याला वठलेलें भल्या बुंध्याचें दहा वाव लांब एक ताडाचें झाड त्याच्या दृष्टीस पडलें. तें उपटून खांद्यावर घेऊन अंतकाप्रमाणें तो स्मशानभूमीकडे गेला. सिंहाप्रमाणें खवळलेल्या त्या वीराला पाहून गंधर्व आला असें समजून सर्व सूत घाबरले व भयकंपित होऊन सैरंध्रीला सोडून चिमुकलें तोंड करून नगराकडे पळाले. पळतां पळतां त्यांपैकीं एकशें पांच लोकांना भीमानें यमसदनाची वाट दाखविली, व द्रौपदीला धीर देऊन ह्मणाला, 'हे भीरु, तुझ्यासारख्या साध्वींना जे पीडा देतील त्यांची अशी वाट लागेल. तूं निर्भयपणें आतां नगराकडे जा.' असें सांगून तिला नगराकडे पाठवून आपणही पाकशाळेकडे

निघून गेला. त्यानें मारून टाकलेले सूतपुत्र मोडून पडलेल्या झाडाप्रमाणें त्या ठिकाणीं पडले होते. त्या ठिकाणीं जमलेले स्त्रीपुरुष तें मोठें आश्चर्य पाहून गंधर्वांनीं बलशाली सूतांना मारून सैरंध्रीला सोडविलें व ती परत वाड्याकडे येत आहे' अशी राजाला वर्दी देऊन म्हणाले, 'ह्या नगरावर कोणत्या वेळीं काय प्रसंग गुदरेल याचा नेम नाहीं. सैरंध्री पडली अशी रूपवती, व गंधर्व असे बलशाली आहेत; पुरुषाचें मन अशा प्रिय वस्तूवर स्वाभाविक जाणार. तेव्हां हिच्यापायीं हें राज्य व हें नगर लयास जाणार नाहीं अशी कांहीं तरी तजवीज लवकर व्हावी.' हें त्यांचें भाषण ऐकून सूतांची अंत्यक्रिया त्या पेटलेल्या अग्नीमध्यें करण्यास हुकूम देऊन राजा घाबरल्या घाबरल्या सुदेष्णेकडे गेला व तिला म्हणाला, 'सैरंध्री तुझ्याकडे आली म्हणजे माझ्या वतीनें तूं तिला असें सांग कीं, 'सैरंध्रि, तुझें देव भले करो, तुला वाटेल तिकडे तूं जा. गंधर्वापासून केव्हां काय प्रसंग गुदरेल म्हणून मला मोठी भीति पडली आहे, व गंधर्व तुझें संरक्षण करीत असल्यामुळें तुला हें समक्ष सांगण्याला सुद्धां मला धीर होत नाहीं. परंतु बायकांना तुझ्याशीं बोलण्याला कांहीं हरकत नाहीं, म्हणून हें मी तुला माझ्या बायकोच्याकरवीं कळवीत आहें.' इकडे कीचकाच्या भयापासून द्रौपदीला सोडवून भीम नगराकडे गेल्यावर सिंहानें घाबरून सोडलेल्या हरिणीप्रमाणें त्या सैरंध्रीला वाटेंत पाहून लोक घाबरून दशदिशेला पळूं लागलें, व कांहीं तर गंधर्वांच्या भीतीनें तिला पाहून आपले डोळे झांकून घेऊं लागले. ती नृत्यशाळेजवळ आल्यावर अर्जुन विराटकन्येला नर्तन शिकवीत असतांना तिच्या दृष्टीस पडला. त्या मुली अर्जुनासह नृत्यशाळेंतून बाहेर पडल्या, व हिला कष्टी होऊन चाललेली पाहून त्या म्हणाल्या, 'सैरंध्रि, कीचकांच्या तावडींतून सुटून परत आलीस, बरें झालें. तुला गरिबाला पीडा देणारे दुष्ट मेले चांगलें झालें!' उत्तरा म्हणाली, 'सैरंध्रि, तुझी अशी कशी सुटका झाली, त्या मेल्यांचा नाश कसा झाला, हें सर्व इत्थंभूत सांग पाहूं. तूझ्या तोंडून तें सर्व ऐकण्याची मला फार इच्छा आहे.' सैरंध्रीनें उत्तर दिलें. 'ताईसाहेब, आपल्याला तें ऐकून काय करावयाचें आहे? आपण अंतःपुरामध्यें नेहमीं सुखांत असतां. सैरंध्रीला जें दुःख होत आहे तशा प्रकारचें दुःख आपल्यावर येण्याचा संभव नाहीं, म्हणून हासत हासत आपण गोष्टी करतां!' पुढें त्या मुलींसहवर्तमान द्रौपदी राजवाड्यांत सुदेष्णेजवळ गेली, त्यावेळीं तिनें तिला राजाचा निरोप कळविला. तेव्हां सैरंध्री म्हणाली, 'आणखी तेरा दिवस महाराजांनीं मला कृपा करून ठेवून घेतली म्हणजे गंधर्वांचा हेतू पूर्ण होऊन मग ते मला घेऊन जातील. बाईसाहेब, ते तुह्मां सर्वांचें चांगलें कल्याण करतील.

१२१ पांडवांसंबंधी दुर्योधनाचा शोध व विराटाच्या गाई हरण करण्याचा बेत. (४. २९. ३०)

आप्तवर्गांसह कीचकाला मारल्यामुळें त्या घाडस कृत्यासंबंधानें सामान्य लोकांमध्यें अगदीं चळवळ उडून राहिली. 'हा कीचक शौर्यामुळें राजाला आवडता झाला असून शत्रुसैन्याचा फडशा उडविण्याला खंबीर होता, तरी मूढ दुसऱ्याच्या बायकांवर नजर ठेवणारा असल्यामुळें गंधर्वांनीं या दुरात्म्याला ठार केलें हें ठीक झालें,' असें जे ते म्हणत. इकडे दुर्योधनानें पाठविलेले हेर अनेक स्थळीं पांडवांचा शोध करून ज्या ज्या ठिकाणीं जें जें त्यांनीं पाहिलें त्या सर्वांची नोंद ठेवून आपली कामगिरी झालीसें समजून हास्तिनापुराला परत आले; व द्रोण, कृष्ण, भीष्म इत्यादि महात्म्यांसह धृतराष्ट्र सभेमध्यें बसला असतां त्या ठिकाणीं येऊन त्यांनीं पुढील वर्दी दिली, 'पशुपक्ष्यांनीं गजबजलेल्या नाना वृक्षांनीं दाट, अशा घोर निर्जन अरण्यामधून, त्याचप्रमाणें पर्वतशिखरावरून अनेकें देशोधडी आह्मी पांडवांचा बारकाईनें शोध केला; परंतु त्यांचा मुळीं मागमूस लागत नाहीं. ते बहुतकरून मेले असावे. गाड्यांचे रस्ते देखील आह्मीं धुंडाळले; परंतु त्यांची काय वाट झाली, ते कोठें राहातात, काय करतात याचा आम्हांला पत्ता लागला

नाहीं. तपासांतीं आम्हांला एवढें मात्र कळलें कीं, त्यांचे अनुयायी व सेवकजन एकटे द्वारावतीला गेले आहेत. आतां यापुढें जशी आज्ञा होईल तसें करण्याला आम्ही तयार आहों. जी एक शुभवार्ता आमच्या कानीं आली आहे ती ऐका. ज्यानें त्रिगर्तांना मारलें त्या कीचकाला गंधर्वांनीं ठार केलें आहे.' हें त्यांचें भाषण ऐकून बराच वेळ विचार करून दुर्योधन म्हणाला, 'कोणच्या प्रसंगीं काय केलें पाहिजे हें निश्चयानें ठरवितां येणें फार कठीण आहे. सांप्रत सर्वांनीं पांडवांचा शोध लावण्याच्या कामाला लागलें पाहिजे. त्यांच्या अज्ञातवासाच्या ठरलेल्या तेराव्या वर्षापैकीं बराच भाग निघून जाऊन आतां थोडा बाकी राहिला आहे. एवढा निघून जाईल तर सत्यप्रतिज्ञ पांडव मदोत्कट हत्तीप्रमाणें अथवा विषारी सापाप्रमाणें आपली प्रतिज्ञा पूर्ण करून येथें दत्त म्हणून येऊन उभे राहतील. मग ते खवळलेले वीर खात्रीनें आम्हां कौरवांना फार जड जातील. ते सर्व कालज्ञ असल्यामुळें मोठ्या हुशारीनें वेषांतर करून राग आवरून धरून कोठें तरी वनांत कालाची वाट पहात राहिले असले पाहिजेत. म्हणून लवकर त्यांना हुडकून काढून ते कायमचे नाहींसे होतील अशी तजवीज झाली पाहिजे. ह्मणजे या राज्याला दायादरूपी कांटा न उरतां निर्वैर असें राज्य चिरस्थायी होईल.' हें ऐकून कर्ण म्हणाला, 'वेषांतरामध्यें न ओळखतां येण्यासारखे व आपल्या कामांत हुशार अशा हेरांना धनधान्यानें समृद्ध व लोकांनीं गजबजलेल्या देशांतून फिरून पाठवा. त्या ठिकाणीं मोठमोठ्या सिद्ध संन्याशांनीं युक्त लोकसमाजांमधून, विहारस्थानांतून, तीर्थांमधून, निरनिराळ्या खाणींच्या ठिकाणीं त्यांनीं मोठ्या सावधगिरीनें व दक्षतेनें त्यांना ओळखून काढण्याला यत्न करावा.' नंतर दुर्योधनाचा पाठचा भाऊ, ज्याला पापकर्मची पूर्ण आवड, असा दुःशासन ह्मणाला, 'ज्यांवर आपला भरंवसा आहे अशा हेरांना त्यांचें वेतन आधीं चुकतें करून देऊन फिरून पांडवांच्या शोधाला पाठवावें.' कर्ण ह्मणाला, 'एकंदर व्यवस्था तर अशीच झाली पाहिजे. आतां त्यांचा मुळींच पत्ता लागत नाहीं, यावरून ते मोठ्या हुशारीनें लपले तरी असले पाहिजेत, समुद्रपार झाले असले पाहिजेत अथवा शक्तीची घमेंड बाळगणाऱ्या त्यांना घोर अरण्यामध्यें श्वापदांनीं तरी खाऊन टाकलें असलें पाहिजे. ह्मणून स्वस्थ मनानें जें आपल्याला करावेंसें वाटत आहे तें उत्साहपूर्वक करावें ह्मणजे झालें.' यावर वस्तुस्थिति जाणणारे वीर्यशाली द्रोण ह्मणाले, 'त्यांच्या सारख्यांचा कधीं नाश किंवा कोणाच्या हातून पाडाव होणें शक्य नाहीं. ते सर्व शूर, विद्यासंपन्न, बुद्धिमान, जितेंद्रिय व धर्मज्ञ असून धर्मराजाच्या आज्ञेंत वागणारे आहेत. नीति, धर्म, अर्थ यांचें खरें इंगित ओळखणाऱ्या त्या धर्मराजाला ते पित्याप्रमाणें मानतात. ह्मणून ते मोठ्या हुशारीनें अनुकूल काल येण्याची वाट पहात आहेत. यासाठीं सांप्रत प्रसंगाला उचित असेल तें चांगला विचार करून करा. ते शुद्ध तपानें झांकले असल्यामुळें कधीं कोणाच्या दृष्टीस पडणार नाहींत. शुचिर्भूत, गुणवान, सत्यवक्ता, नीतिमान व तेजोराशि, अशा धर्मराजाची प्रत्यक्ष गांठ पडली असतांही तो दुसऱ्याचे डोळे दिपवून सोडील व त्यांना ओळखूं येणार नाहीं.' देशकालज्ञ, तत्त्वज्ञ व सर्व धर्म जाणणारे शांतनुपुत्र भीष्म द्रोणांचें भाषण संपल्यावर त्याच्याच पुष्टीकरणार्थ युधिष्ठिराला अनुलक्षून, दुष्टांच्या कधीं तोंडीं न येणाऱ्या व भल्यांना संमत अशा शब्दांनीं ह्मणाले, 'सर्वार्थतत्त्व जाणणारे हे द्रोणाचार्य ह्मणाले तें अगदीं यथायोग्य आहे. सर्व गुणांनीं संपन्न, सच्छीलसंपन्न, वडिलांची आज्ञा पाळणारे, क्षात्रधर्मानें वागणारे व नित्य भगवान श्रीकृष्णाच्या अनुरोधानें असणारे कालज्ञ पांडव खास कालाची वाट पहात आहेत. सतांचे अग्रणी अशा त्या पांडवांचा कधीं नाश व्हावयाचा नाहीं. आतां पांडवांसंबंधानें मला वाटतें तें मी तुला सांगतों. उत्तम नीति जाणणाऱ्या लोकांची नीति दुसऱ्याला समजून येणें कठीण आहे. त्यासंबंधानें आपल्याला जें करतां येणार आहे, त्याविषयीं माझा विचार मी सांगतों. यांत द्रोहभाव मुळींच नाहीं; अशा प्रकारची मसलत दुष्टांना सांगणें व्यर्थ आहे. परंतु आमच्यासारख्या वृद्धसेवी, सत्यशील लोकांनीं न्यायाकडे लक्ष देऊन जें रास्त व हितकर असेल तेंच बोललें पाहिजे. ह्या तेराव्या

वर्षी पांडव ज्या ठिकाणीं आहेत त्यासंबंधानें माझें मत इतरांहून भिन्न आहे. ज्या ठिकाणीं धर्मराज युधिष्ठिर रहात असेल त्या ठिकाणीं त्या राजाचें अकल्याण कधीं व्हावयाचें नाहीं. लोक दानशील, उदार, विश्वासू, विनयसंपन्न, प्रिय भाषण करणारे, जितेंद्रिय, सत्यप्रिय, आनंदी, धष्टपुष्ट, शुद्ध व आपल्या कामांत दक्ष असे असतील. ईर्षा, असूया, अभिमान, मत्सर इत्यादि दुर्गुण त्यांचे ठिकाणीं राहणार नाहींत. ब्रह्मघोष सुरू असेल. नेहमीं यज्ञ सुरू राहून अग्नीमध्यें पुण्याहुती पडत राहतील. पाऊस वेळेवर पाहिजे तेवढा पडेल. पृथ्वी धान्यसंपन्न होऊन लोक निष्काळजी असतील. धान्यें जोरानें उगवून फलांमध्यें रसरसीतपणा राहील. फुलांना उत्तम सुवास राहील. लोकांच्या भाषणामध्यें मार्दव दिसून येईल. वायूचाही स्पर्श सुखदायक असेल. तेथें ज्ञानप्राप्तीला कांहीं आडकाठी येणार नाहीं. गाईंची त्या ठिकाणीं समृद्धी असून त्या दुर्बळ व कृश राहणार नाहींत. दूध, तूप, लोणी यांना चव राहून तीं शरीराला मानवतील. पेय, भोज्य इत्यादि पदार्थांनाही गोडी राहील. लोक आपल्या धर्मानें राहून सर्व धर्माचरणांमध्यें गढून संतुष्ट असतील. देव, अतिथी यांच्या पूजेमध्यें त्यांना गोडी वाटेल. मोठमोठे उत्सव सुरू असतील. असत्य भाषण कोणी करणार नाहीं व यज्ञयागादि पवित्र कर्माकडे सर्वांचें लक्ष राहील. थोर ब्राह्मणांनासुद्धां त्या धर्मात्म्याला ओळखण्याची पंचाईत मग सामान्य जनांना तो कसा ओळखणार? ज्याच्या ठिकाणीं सत्य, धैर्य, दानशीलता, उत्तम शांति, क्षमा, विनय श्री, कीर्ति, उत्कृष्ट तेज, आणि सरळपणा आहे, अशा राजाच्या आश्रयानेंच तो गुप्त राहिला असला पाहिजे. ह्याशिवाय त्याला हुडकून काढण्याला दुसरा मार्ग मला दिसत नाहीं. माझ्या भाषणावर जर विश्वास असेल तर ह्या सर्वांचा विचार करून जें केल्यानें दुर्योधना, तुला हितावह होईल तें कर.' नंतर कृप ह्मणाले, 'वृद्ध भीष्मांनीं पांडवांसंबंधानें जें सांगितलें तें योग्य, कालाला अनुरूप, धर्मार्थाला धरून असून स्पष्टोक्तिदर्शक आहे. आतां ह्यासंबंधानें माझें ह्मणणें असें आहे. त्यांची काय वाट आहे, व ते कोठें आहेत याचा शहाण्याकडून विचार झाला पाहिजे. ह्या जगांत राहण्याची ज्याला इच्छा असेल त्यानें सामान्य शत्रूची देखील उपेक्षा करतां कामा नये. मग पांडवांसारख्या सर्व अस्त्रांमध्यें कुशल अशांविषयीं तर बोलावयालाच नको. ते वर्षांतरामध्यें हल्लीं मोठ्या हुषारीनें उदयकालाची वाट पहात छपून राहिले आहेत. योग्यकालीं ते पुढें येणार यांत बिलकूल शंका नाहीं. अतुल पराक्रमी ते पांडव प्रतिज्ञा पुरी करून आले ह्मणजे त्यांच्यामध्यें मोठा उत्साह राहील; ह्मणून त्यांच्याशीं आपणाला तोंड देतां यावें ह्मणून आपल्या सैन्याचा व खजिन्याचा नीट विचार करून ठेव. आपल्या प्रबल व दुर्बल मित्रांपाशीं सैन्य किती आहे, कसलेलें सैन्य आपल्यापाशीं किती आहे, खोगीरभरती किती आहे आणि सरासरी किती आहे, राजी किती आहे, नाराज किती आहे, याचा विचार करून ठेव. साम, दान, भेद, दंड व खंडणी या उपायांनीं बलवान शत्रूंना व दुर्बलांना स्वसामर्थ्यानें आपल्या बाजूला वळवून व मित्रांना खुष ठेवून सर्व सैन्याशीं गोड भाषण ठेव. तुझा खजिना व सैन्य जय्यत असल्यावर बलवान शत्रु जरी पुढें आंला तरी त्यावर जय मिळण्याला तुला कठीण पडणार नाहीं; मग ज्यांच्याजवळ स्वतःचें सैन्य किंवा वाहनें नाहींत अशा निकृष्ट दशेला पोहोंचलेल्या पांडवांची भीति बाळगण्याचें मुळींच कारण उरणार नाहीं. या सर्वांचा विचार करून स्वधर्म जाणून वेळ येईल तसें कर्तव्याला जाग ह्मणजे तुला चिरकाल सुख मिळेल.' नंतर त्रिगर्ताचा राजा सुशर्मा ह्मणाला, 'विराटानें माझ्या राष्ट्राला अनेकवार पीडा दिली आहे. पूर्वी त्याचा सेनानायक बलशाली कीचक होता. त्या दुष्टाला तर गंधर्वांनीं मारून टाकलें आहे. तेव्हां अर्थात् या विराटाचा गर्व कमी होऊन हा निराश्रित व निरुत्साह झाला असला पाहिजे. त्याच्या राष्ट्रावर चाल करून जाणें हें हल्लींच्या प्रसंगाला उचित व आवश्यक आहे असें मला वाटतें. त्याच्या राज्यावर हल्ला करून नानाविध रत्नें, द्रव्य व गाई आपण हरण करूं, व आपल्या सैन्याच्या निरनिराळ्या तुकड्या करून त्यांची शक्ति हाणून पाडूं, व त्याच्या सर्व सैन्याचा फडशा उडवून त्याला आपल्या ता-

व्यांत आणूं.' तें ऐकून कर्ण ह्मणाला, हें ह्मणणें रास्त असून ह्या प्रसंगाला अनुरूप व हितावह आहे. आपण सर्व एकजुटीनें त्या विराटाला आपल्या ताब्यांत आणूं. द्रव्य, सैन्य व सामर्थ्य ह्या सर्व गोष्टींनीं हीन अशा पांडवांची वृथा काळजी वाहण्यांत काय अर्थ आहे? त्यांनीं यमसदनाची वाट धरली असली पाहिजे. त्यासंबंधानें तिळमात्र काळजी न करतां आपण विराटनगरीवर चालून जाऊं.' हें कर्णाचें भाषण ऐकून आपल्या आज्ञेमध्यें नेहमीं तत्पर असणाऱ्या दुःशासनाला वृद्धांचा सल्ला घेऊन लवकर सैन्य तयार करण्यास सांगून दुर्योधन ह्मणाला, 'त्रिगर्तांसह सुशर्म्याला मोठ्या हुशारीनें प्रथम विराटनगरीवर स्वारी करू दे. त्यांनीं जाऊन गुराख्यांना धरून सर्व गाई हरण कराव्या; इतक्यांत आह्मीहीं एक दिवसाच्या अंतरानें सैन्याच्या दोन तुकड्या करून त्यावर चालून येतोंच.' याप्रमाणें मसलत ठरून सशस्त्र व रथारूढ होऊन गाई हरण करण्याच्या मोठ्या आतुरतेनें **कृष्णपक्षाच्या सप्तमीला** सुशर्मा निघाला; व दुर्योधनादि कौरव मंडळीही दुसरे दिवशीं निघाली.

---

१२२. दक्षिणगोग्रहण. (४. ३१-३४)

कीचक मेल्यानंतर शत्रूच्या शक्तीचा नायनाट उडविणाऱ्या विराटाची युधिष्ठिरावर बरीच भिस्त राहिली. अशा समयीं **कृष्णपक्षाच्या त्रयोदशीच्या शेवटीं** गोप मोठ्या लगबगीनें सुशर्म्यानें बलात्कारानें गाई हरण केल्या आहेत, ह्मणून विराटाला सांगण्याकरितां नगराकडे धांवत आला व रथातून उतरून सभेमध्यें राष्ट्रवर्धन विराटराजा बसला असतां त्याजवळ येऊन वांकून ह्मणाला, 'आह्मांला युद्धांत जिंकून हजारों गाई त्रिगर्त हाकून नेत आहेत; त्या हातांतून जाण्यापूर्वी परत मिळण्याचा यत्न व्हावा.' तें ऐकून राजानें रथ, हत्ती, घोडे व पायदळ असें चतुरंग सैन्य सज्ज करण्यास हुकूम दिला. अनेक राजे व राजपुत्र यांनीं नानाप्रकारचीं लखलखित शूरांना शोभणारीं चिलखतें **आपापल्या हुद्द्याप्रमाणें** अंगावर चढविलीं. अभेद्यभाय असें उत्तम कवच मत्स्यराजानेंही आपल्या अंगावर चढविलें;व उत्कृष्ट सामानांनीं युक्त अशा मोठमोठ्या शुभ्र रथांना सोन्याच्या सामानांनीं सजविलेले घोडे जोडून त्यावर विजयशाली ध्वज उभारले. याप्रकारें तयारी झाल्यावर विराट आपल्या धाकट्या भावाला ह्मणाला, 'कंक, बल्लव, तंतिपाल व ग्रंथिक हेही मोठे वीर्यवान दिसतात; ह्यांनाही ध्वजांनीं युक्त रथ, मजबूत व अंगाला न रुतणारीं कवचें व आयुधें द्या. त्यांच्या हातून युद्धप्रसंग होणार नाहीं असें मला वाटत नाहीं. यांच्या अंगांची ठेवण वीरासारखी असून बाहू कसे हत्तीच्या सोंडेप्रमाणें दिसतात. ' हें राजाचें भाषण ऐकून प्रहृष्ट झालेल्या पांडवांना राजाच्या आवडींतल्या सारथ्यांनीं राजाज्ञेप्रमाणें युद्धाची सर्व तयारी करून दिली. त्या वेळीं अंगांत कवचें चढवून युद्धविशारद व अनेक शत्रूंना धुळीला मिळविणारे पांडव सुवर्णरथांत बसून **साठ वर्षांच्या सुळेदार** मदोत्कट हत्तीप्रमाणें राजाच्या मागून चालले. आठ हजार रथ, दहा हजार हत्ती, साठ हजार घोडे यांसह युद्धविशारद असे शेलके सरदार मोठ्या उत्साहानें राजाच्या मागून चालले. गाईंच्या मागून निघालेलें तें सैन्य फारच शोभायमान दिसत होतें. त्या सज्ज झालेल्या सैन्यानें नगराबाहेर पडून सूर्य कलत असतां त्रिगर्तांना गांठलें, गाईंसाठीं ते खवळलेले वीर एकमेकांवर गर्जना करीत निकरानें तुटून पडत होते. अंगावर रोमांच उभे करणारें असें तुंबळ युद्ध चाललें असतां यमपुरीला भर टाकणारी अशी पायदळ, रथी, स्वार यांच्यांमध्यें कत्तल सुरू झाली. एकमेकांवर ते तुटून पडत असतां सैन्याच्या धामधुमीमुळें जिकडे तिकडे धूळ इतकी उडून राहिली होती कीं, कांहींच ओळखूं येत नव्हतें. पक्षी जमिनीचा आधार घेऊं लागले. भिरीरी वर जाणाऱ्या बाणांनीं सूर्य अगदीं झांकून गेला होता. डाव्या व उजव्या हातांनीं धनुर्धारी लोकांनीं सोडलेल्या बाणांनीं आकाश भरून जाऊन ते तेथें काजव्याप्रमाणें चमकत होते. रथाला रथ, हत्तीला हत्ती, पायदळाला पायदळ अगदीं भिडून घनचक्कर युद्ध चाललें होतें. वरचे ओठ तुटून पडलेलीं,केस पार साफ झालेलीं व कुंडलादि भूषणांनीं युक्त अशीं हजारों वीरांचीं शिरें व त्या तुमुल युद्धामध्यें बाणांनीं सर्वांग जखमी झालेलीं लाखों धडें शालवृक्षाच्या खोडा-

प्रमाणें जिकडे तिकडे पसरलीं. नागाच्या फण्याप्रमाणें चंदनचर्चित बाहूंनीं झांकून गेलेल्या त्या भूमीला एक प्रकारची अनुपमेय शोभा आली; व पुढें रक्ताचें पूर बाहूं लागल्यानें जमिनीवरची धूळ दबली. जिकडे तिकडे हाहाकार उडून युद्धसंग्रामाला मर्यादा उरली नाहीं. बाणांनीं संत्रस्त झालेले गरुडपक्षी आकाशमार्गातील त्यांची गति बंद झाल्यामुळें ध्वजाला चिकटून राहूं लागले. लोखंडाच्या कांबीप्रमाणें कणखर बाहूंचे वीर एकमेकांवर मोठ्या निकरानें प्रहार करीत असतां परस्परांना हटविण्याचें कोणाच्या हातून होईना. विराटाच्या भावांनीं त्रिगर्तांचे अनेक वीर मारून ते त्यांच्या अफाट सैन्यामध्यें शिरले व रथाला रथ भिडवून एकमेकांची शेंडी धरून निकरानें लढूं लागले. विराटानेंही पांचशें रथी, आठशें स्वार व पांच महारथी यांना मारून रथांतून त्या गर्दीमधून सुशर्म्याकडे धांवून त्याला गांठलें. त्यावेळीं गोठ्यांतील दोन बैलांप्रमाणें ते एकामेकांवर गुरगुरत होते. युद्धामध्यें कधीं न हार जाणारा त्रिगर्ताधिप सुशर्मा द्वंद्वयुद्धाच्या हेतूनें मत्स्यराजावर चालून आला व त्यांनीं जलवृष्टीप्रमाणें एकमेकांवर बाणवृष्टि सुरू केली. जिकडे तिकडे धूळच धूळ उडून राहिली असल्यामुळें या दोघांच्या सैन्यामध्यें कोणी कोणाला ओळखीना. इतक्यांत अंधार पडूं लागून अंधारानें व धुळीनें सर्व आकाश भरून राहिल्यामुळें योद्ध्यांनीं क्षणभर युद्ध बंद ठेविलें. पण लवकरच चंद्रोदय होऊन अंधकार नाहींसा झाला. निर्मल चांदण्यानें रात्र अगदीं स्वच्छ होऊन त्या वीरांच्या मनाला आल्हाद देऊं लागली. नंतर चंद्रप्रकाशामध्यें फिरून त्यांनीं घोर युद्ध सुरू केलें व त्यावेळीं कोणी कोणाची गय केली नाहीं. मत्स्यराजाच्या सर्व सैन्याचा फडशा उडवून वीर्यशाली विराटराजावर त्रिगर्ताधिपति धांवून गेला. व त्याचा पृष्ठरक्षक व सारथी ह्यांना ठार करून त्याला रथाखालीं ओढून जिवानिशीं पकडलें व त्याला जर्जर करून त्याला आपल्या रथांत बसवून तो रथ वेगानें हांकून घेऊन चालला. याप्रमाणें तो विराटाला घेऊन निघाला असतां विराटसैन्य घाबरलेलें पाहून शत्रूला त्राहि त्राहि करून सोडणाऱ्या भीमसेनाला युधिष्ठिर म्हणाला, 'बा महाबाहो ! मत्स्यराजाला सुशर्म्यानें पकडलें आहे. तो परत न मिळेसा शत्रूच्या हातीं लागण्यापूर्वी त्याची सुटका कर. त्याच्या राष्ट्रामध्यें आपण मोठ्या इतमामानें आजपर्यंत सुखांत राहिलों व यानें आजपर्यंत आपलें मन यत्किंचित्ही खट्टू केलें नाहीं. हे दोघे नकुलसहदेव चक्ररक्षण करतील व यांच्या साहाय्यानें विराटाला सोडीव आणि त्याच्या उपकारांची फेड कर.' भीमसेन म्हणाला, 'अजातशत्रो,आपल्या आज्ञेनें मी यांची सुटका करतों. आपण ह्या ठिकाणीं माझें युद्धकौशल्य पहात स्वस्थ बसा.' असें ह्मणून उत्तम धनुष्य हातांत घेऊन मोठ्या आवेशानें मेघानें ज्याप्रमाणें जलवर्षाव करावा त्याप्रमाणें शत्रुसैन्यावर बाणवृष्टि करून तो अचाट कर्म करणारा भीमसेन सुशर्म्यावर धांवून गेला; व त्याला 'उभा रहा, पळूं नकोस' म्हणून हाक मारूं लागला. कालासमान अशा त्या वीराची ती आरोळी ऐकून मागें वळून त्याचें तें अचाट कर्म पाहतांच आणीबाणीची वेळ आली असें वाटून धनुष्य सज्ज करून सुशर्माही युद्धाच्या तयारीनें परत फिरला. एका निमिषामध्यें हजारों घोडे, रथ, हत्ती, माहुत, त्याचप्रमाणें कधीं हार न जाणारे धनुर्धारी वीर व लक्षाबधि पायदळ यांना भीमसेनानें मारून टाकलें. पांडवांना याप्रमाणें निकरानें लढतांना पाहून विराटपुत्रही परत वळून मोठ्या आवेशानें लढूं लागला. त्रिगर्ताच्या त्या अफाट सेनेचा फडशा उडून धर्मराजांनीं सुशर्म्यावर चालून जाऊन त्यावर बाणांचा भडिमार सुरू केला.सुशर्म्यानेंही खवळून जाऊन बाण सोडून युधिष्ठिराचे घोडे मारून टाकले व युधिष्ठिरावर तो बाणांचा वर्षाव करूं लागला. तें पाहून झटपट काम उरकून टाकण्याच्या इराद्यानें भीमसेनानें सुशर्म्याचे घोडे त्याचप्रमाणें त्याचे पृष्ठरक्षक व सारथी यांना ठार केलें. ह्याप्रमाणें भीमसेनानें घोर युद्ध चालविलें असतां विराटराजाही सुशर्म्याच्या रथांतून खालीं उतरला व त्याचीच गदा घेऊन तो त्याच्यावर तुटून पडला. हातांत गदा घेऊन तो रणांत फिरत असतां वृद्ध असतांही एखाद्या तरुणाप्रमाणें तो दिसत होता. सुशर्म्याला पळ काढतांना पाहून भीमसेन म्हणाला, 'हे राजपुत्रा, परत फिर. अशाप्रकारें पळ काढणें

तुम्यासारख्याला शोभत नाहीं. अशा प्रकारच्या वीर्यानें गाई पळवून नेण्याचा तूं विचार केला होतास हें मोठें नवल आहे! आपल्या अनुयायांना शत्रूच्या तावडींत देऊन याप्रमाणें निराश होऊन परत का चालला आहेस?' हें भीमसेनाचें भाषण ऐकून बलशाली सुशर्मा 'थांब, थांब,' म्हणून आवेशानें भीमावर धांवून गेला. भीमसेनानें त्वेषानें रथाखालीं उडी टाकली; व मन अगदीं स्वस्थ ठेवून सुशर्म्याचा प्राण घेण्याच्या इरायानें सिंह ज्याप्रमाणें एखाद्या क्षुद्र पशूवर चालून जातो त्याप्रमाणें तो त्यावर धांवून गेला. व त्याच्या केसांला धरून मोठ्या त्वेषानें त्यानें त्याला जमिनीवर पाडून तुडविलें. व तो ओरडत असतां त्याला न जुमानतां त्याच्या मस्तकावर खूप लाथा दिल्या; व ढोपरांनीं व कोपरांनीं यथेच्छ त्याला मऊ केला. अशाप्रकारें चांगले गुद्दे खाऊन सुशर्म्याला भोंड आली. याप्रमाणें त्याला विरथ करून पकडल्यावर त्रिगर्ताच्या सैन्याची भयानें दाणादाण झाली. याप्रमाणें सुशर्म्याला जिंकून बलशाली विनयसंपन्न भीमानें त्या दीन सुशर्म्याची मानगुटी धरून त्याच्या तडफडीला न जुमानतां त्या धुळीनें भरलेल्या अधमाला विराटापुढें उभा करून म्हणाला, 'हा अधम जिवंत रहाण्याला योग्य नाहीं. महाराजांचा दास आहे म्हणून त्यानें कबूल केलें पाहिजे.' तें ऐकून त्या रणभूमीला शोभा देणाऱ्या भीमसेनाला युधिष्ठिर म्हणाला, 'या नराधमाला सोडून दे. हा बोलून चालून दास बनला आहे. आतां त्याच्या तोंडांतून आणखी बदविण्यांत काय विशेष अर्थ आहे!' असें म्हणून तो सुशर्म्याला म्हणाला, 'दास न करतां तुला सोडून दिलें आहे. जा. फिरून मात्र असें नींच कृत्य कधीं करूं नकोस.' हें युधिष्ठिराचें भाषण ऐकून लाजेनें तोंड खालीं घालून राजापुढें वाकून सुशर्मा निघून गेला. शत्रूचा याप्रमाणें फडशा उडवून विजयशाली पांडव ती रात्र रणामध्यंच सुखानें राहिले. पांडवांचें तें अलौकिक कृत्य पाहून मान व द्रव्य यांनीं त्यांचा सत्कार करून विराट युधिष्ठिराला म्हणाला,'आपल्याला मत्स्यराज्यावर अभिषेक करतों. ह्या भूतलावर दुर्लभ अशी वाटेल ती वस्तु मी आपल्याला देण्याला तयार आहें. आपण वाटेल त्याला पात्र आहां. आपल्यामुळेंच आज हें राज्य व पुत्रपौत्र मीं पाहिलें. युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'राजा, तुझें हें आल्हाददायक भाषण ऐकून मनाला फार संतोष वाटत आहे. तूं नेहमीं दयाशील व सुखी रहा. नगरामध्यें ही शुभवार्ता कळविण्याला व जयघोष करविण्याला दूत जाऊं देत.' हें त्याचें भाषण ऐकून विराटानें नगरामध्यें दूत पाठविले. त्याची आज्ञा शिरसा मान्य करून मोठ्या संतोषयुक्त मनानें ते नगराकडे गेले व ती रात्र नगरांत काढून उजाडल्याबरोबर त्यांनीं जिकडे तिकडे जयघोष चालविला.

---

१२३ उत्तरगोग्रहण. (४. ३९–६९.)

त्रिगर्ताची सेना परत हटल्यावर इकडे पशू, नगराकडे परततात तोंच भीष्म, द्रोण, कर्ण, अश्वत्थामा, इत्यादि मोठमोठ्या अस्त्रवेत्त्यांना बरोबर घेऊन दुर्योधन विराटनगरीवर येऊन भिडला; व गोपाळांना पळवून अनेक रथांचा गराडा देऊन गोधन त्यानें बलत्कारानें हरण केलें. गुराख्यांचा नायक घाबरून रथांत बसून घाईघाईनें राजवाड्याकडे गेला, व विराटाच्या मानी उत्तर नांवाच्या मुलीची गांठ घेऊन गाई हरण केल्याची इत्थंभूत बातमी त्याला देऊन तो म्हणाला,'छोटे महाराज,राष्ट्राला आधारभूत आपणच आहां. तर उठा आणि आपल्या तीक्ष्ण बाणांच्या वृष्टीनें कौरवांचा फडशा उडवून गाई परत आणा. कारण महाराज मागें आपल्यावरच सर्व भिस्त ठेवून गेले आहेत. सभेमध्यें ते नेहमीं 'माझ्या मुलासारखा शूर, कुलवर्धन, व सर्व अस्त्रांमध्यें निपुण कोणी नाहीं,' म्हणून आपली वाखाणणी करीत असतात.म्हणून उठून धनुष्याचे आंकडे जेला खुंट्या आहेत, प्रत्यंचा ही जिला तार आहे, व धनुष्याची काठी हीच जिची दांडी आहे, बाण हेच जिचे स्वर आहेत, अशी मधुर स्वर देणारी आपली धनुष्यरूपी वीणा शत्रूंमध्यें नादवून सोडा. रुप्याप्रमाणें पांढरे शुभ्र घोडे रथाला जुंपून सिंहाकृति सुवर्णध्वज आपल्या रथावर फडकूं देत, व हस्तकौशल्यपटु अशा आपल्या हातून सुटलेले सोन्याचे अणीदार बाण राजांना दिशाभल पाडून सु-

यांना झांकून टाकूं देत. असुरांना जेरीला आणणाऱ्या इंद्राप्रमाणें कौरवांना जिंकून मोठें यश मिळवून आपण मोठ्या थाटानें नगरामध्यें परत या. पांडवांची ज्याप्रमाणें अर्जुनावर त्याचप्रमाणें ह्या राष्ट्रवासी सर्व जनांची भिस्त आपल्यावर आहे.' हें त्याचें भाषण ऐकून अंतःपुरामध्यें बायकांत तो उत्तर फार बडबडला. तो म्हणाला, 'हा मी गाईंच्या मागून जाण्याला तयार आहें. माझ्या धनुष्याची बळकटी मजपाशी आहे. परंतु घोड्यांना आवरण्याला एखादा सारथी मला पाहिजे. अठावीस रात्री अथवा एक महिना कां म्हणाना नुकतेंच जें घोर युद्ध झालें, त्यामध्यें माझा सारथी मेला. दुसरा एखादा उत्तम सारथी जर मिळेल तर हत्ती, घोडे, रथ यांनीं पूर्ण अशा त्या कौरवसेनेमध्यें शिरून दुर्योधन, भीष्म, कर्ण इत्यादिकांना त्राहि त्राहि करून सोडून ह्याच सुमुहूर्तावर मी गाई परत आणीन. कोणी नाहींसें पाहून कौरव गाई घेऊन चालले आहेत त्याला माझा काय इलाज ? आज कौरवांना मी दोन हात दाखवीन व हा प्रत्यक्ष अर्जुनच आपल्याला पीडा देत आहे कीं काय असें त्यांना भासवीन.' ही त्याची गर्वोक्ति ऐकून प्रतिज्ञेचा काल संपला आहेसें पाहून जिला नांवें ठेवण्याला तिळभरही जागा नव्हती, सत्यादि गुणांनीं संपन्न व आपल्या पतींचे प्रिय करण्यामध्यें जी नेहमीं दक्ष, अशा आपल्या प्रियेला सर्वार्थतत्त्व जाणणारा अर्जुन एकांतामध्यें म्हणाला, 'माझ्या पतीनें उत्तराला जाऊन सांग कीं, हा अर्जुनाचा मोठा प्रीतीतला सारथी होता. मोठमोठ्या युद्धांमध्यें याला चांगला अनुभव आहे. हा तुझें सारथ्य करील.' ही पतीची आज्ञा होतांच ती बिचारी द्रौपदी लाजत हळू हळू उत्तराकडे जाऊन म्हणाली, 'जो हा महागजाप्रमाणें देखणा, बृहन्नला या नांवानें प्रसिद्ध आपल्या पदरीं आहे तो पार्थाचा सारथी होता व धनुर्विद्येंत तो त्याचा प्रिय शिष्य होता हें मीं पूर्वी पांडवांच्या घरीं असतांना पाहिलें आहे. ज्या वेळीं अग्नीनें खांडववन जाळलें त्या वेळीं हाच अर्जुनाचा सारथी होता.' हें ऐकून उत्तर म्हणाला, 'सैरंध्रि, तुला जर तसें ठाऊक असेल तर हा दिसतो आहे तशा प्रकारचा षंढ खात्रीनें नसावा. तरी पण माझे घोडे

आवर म्हणून त्याला माझ्या हातून कांहीं सांगवणार नाहीं.' द्रौपदी म्हणाली, 'आपल्या धाकट्या ताईसाहेब जर त्याला सांगतील तर त्यांचें म्हणणें तो खात्रीनें मोडणार नाहीं. तो आपल्याला सारथी मिळेल तर सर्व कौरवांना जिंकून खचित गाई घेऊन आपलें परत येणें होईल.' हें तिचें भाषण ऐकून उत्तरानें आपल्या बहिणीला बृहन्नलेला घेऊन येण्यास सांगितलें. वडील भावाची आज्ञा होतांच सुवर्णमाला धारण केलेली, वेदीप्रमाणें जिची कंबर बारिक, जी कमलपत्राप्रमाणें कांतिमान, जिचे केस लांबसडक व जिच्या सर्व अवयवांची ठेवण असावी तशी होती, अशी ती हिरेजडित कमरपट्टा घातलेली, सडपातळ, विशालाक्षी, विनयसंपन्न व यशस्वी वीरकन्या वीज ज्याप्रमाणें मेघाकडे निघावी त्याप्रमाणें नृत्यशालेंत अर्जुनाकडे निघाली. हत्तीच्या सोंडेप्रमाणें जिच्या मांड्या व जिला नांवें ठेवण्याला तिळभरही जागा नव्हती, व कोणाही पाहणाराच्या मनाला आल्हाद देणारी, अशी ही इंद्रश्रीसारखी ह्या पृथ्वीवरील रत्नभूत सुदती अर्जुनाजवळ जाऊन उभी राहिली असतां तिला पाहून अर्जुन म्हणाला, 'आपण अशा घाईघाईनें कां आलां? आपलें मुख नेहमींप्रमाणें प्रसन्न दिसत नाहीं?' हें ऐकून जवळ सरून प्रेमदर्शक स्वरानें ती त्या नरश्रेष्ठाला म्हणाली, 'बृहन्नले, कौरव गाई घेऊन चालले आहेत. त्यांना जिंकण्यासाठीं दादा निघाला आहे. नुकताच त्याचा सारथी युद्धामध्यें मेला असल्यानें त्याचें सारथ्य करण्याला योग्य असा सारथी नाहीं. तो सारथ्याच्या चौकशींत असतां तूं त्या कामांत पटाईत असून अर्जुनाचें सारथ्य करीत होतीस असें सैरंध्री म्हणाली. म्हणून कौरव गाई घेऊन लांब जाण्यापूर्वी तूं दादाचें सारथ्य करून ह्या कामाला मदत कर. स्नेहभावानें मी हें सांगत असून तूं जर हें माझें न ऐकशील तर मी आपले प्राण कांहीं ठेवणार नाहीं.' हें तिचें निकराचें भाषण ऐकून वीर्यशाली अर्जुन राजपुत्राकडे गेला. त्याला लांबूनच पाहून उत्तर म्हणाला, 'खांडववनामध्यें अर्जुनानें तुला सारथी घेऊन अग्नीला तृप्त केलें तीं तूं कौरवांशीं युद्ध करून गाई परत मिळवूं इच्छिणा-

न्या माझें सारथ्य कर.' हें ऐकून बृहन्नला ह्मणाली, ' माझ्या हातून रणभूमीवर सारथ्य कसें होणार? गायन नर्तन करीन, किंवा निरनिराळ्या प्रकारचीं वाद्यें सांगाल तर मी वाजवीन. ' उत्तर ह्मणाला, ' बृहन्नले, तूं गायन गा, नर्तन कर किंवा वाद्यें वाजीव, पण ह्या प्रसंगीं लवकर रथावर बसून माझें सारथ्य कर. ' हें त्याचें भाषण ऐकून सर्व कांहीं ठाऊक असतांनाही उत्तरेच्या देखत तिला हासविण्यासाठीं अर्जुनानें वेडगळ चाळे सुरू केले. खालीं पडलेलें कवच उचलून अंगांत उलटेंच घालूं लागला. तें पाहून तेथील मुली खदखदां हसूं लागल्या. त्याला याप्रमाणें गांगरलेला पाहून उत्तरानें स्वतः त्याच्या अंगांत कवच अडकवून त्याला सारथी बनवून उत्तम धनुष्य व पुष्कळ चांगले बाण यांसह बृहन्नलेला सारथी घेऊन तो रथांत बसून निघाला. ' त्या वेळीं ' आमच्या बाहुल्यांसाठीं लढाईत भीष्म, द्रोण इत्यादिकांना जिंकून चित्रविचित्र मऊ, बारीक व चांगलीं वस्त्रें घेऊन ये बरें, ' ह्मणून उत्तरा व मुली बृहन्नलेला ह्मणाल्या. यावर ' युद्धांत उत्तर महाराज मोठमोठ्या योद्धयांना जिंकतील तर मी तुमच्यासाठीं वस्त्रें घेऊन येईल, ' असें ह्मणून नानाध्वजांनीं शोभायमान असा रथ तो हाकूं लागला. तों व उत्तर रथामध्यें बसून निघाले असतां स्त्रिया, मुली व व्रतशील ब्राह्मण यांनीं रथाला प्रदक्षिणा केली. तेव्हां बायका ह्मणाल्या, ' अर्जुनाला ज्याप्रमाणें खांडववन जाळण्याचे वेळीं जय मिळाला त्याचप्रमाणें आज कौरवांवर रणामध्यें बृहन्नले, उत्तराला व तुला जय मिळो. ' नंतर उत्तर बिनदिकत नगराबाहेर पडून बृहन्नलेला ह्मणाला, ' कौरव ज्याठिकाणीं आहेत तिकडे लौकर चल. जयप्राप्तीच्या आशेनें एकत्र जुळलेल्या त्यांना जिंकून परत गाई मिळवूनच मी नगराला परत येईन. ' हें त्याचें भाषण ऐकून अर्जुनानें त्या रथाच्या जातिवंत घोड्यांना चुचकारिलें. त्याबरोबर ते घोडे आकाशाला जाऊन भिडत आहेत कीं काय अशा वायुवेगानें चालले. हे दोघे रथी व सारथी फार दूर गेले नाहींत तोंच स्मशानाजवळ कौरवसैन्य त्यांनीं गांठलें. त्या ठिकाणीं त्यांचें तें सागरासारखें विस्तीर्ण व जय्यत सैन्य पाहून त्या दोघांचें लक्ष शमीवृक्षाकडे गेलें. त्या सैन्याला पाहून असंख्य वृक्षांनीं संपन्न असें वनच आकाशामधून संचार करीत आहे असें त्यांना भासलें व त्या सैन्याच्या हालचालीनें उठून आकाशाला जाऊन भिडलेल्या धुळीच्या योगानें प्राणिमात्रांना दिशाभूल उत्पन्न झाली होती. याप्रमाणें हें अफाट सैन्य पाहून अंगावर रोमांच उभे राहून गर्भगळित झालेला उत्तर अर्जुनाला ह्मणाला, ' बृहन्नले, कौरवांशीं युद्ध करावयास मला धैर्य होत नाहीं. माझ्या अंगावर कसा कांटा उभा राहिला आहे पहा. असंख्य वीरांनीं युक्त, देवांना देखील अजिंक्य व अनेक प्रचंड धनुर्धारी ज्यांमध्यें आहेत, अशा या सैन्यामध्यें मी घुसूं इच्छित नाहीं, हें चतुरंग सैन्य पाहूनच माझ्या मनाची धांदल उडून गेली आहे. ह्या सर्व तेजस्वी, युद्धविशारद व प्रहार करण्याला जय्यत तयार अशा कौरवांना पाहून मी गांगरून गेलों आहें. तात नगरामध्यें मला एकट्याला ठेवून सर्व सैन्य घेऊन त्रिगर्तांना जिंकण्याला गेले आहेत. येथें मजपाशीं सैन्य मुळींच नाहीं. मी एकटा या शस्त्रास्त्रविद्येमध्यें परिश्रम केलेल्या अनेक कौरवांशीं युद्ध कसा करूं? ह्मणून बृहन्नले, नगराला परत चल कशी. ' बृहन्नला ह्मणाली, ' भयानें याप्रमाणें दीन गाईसारखे होऊन आपण केवळ शत्रूचा आनंद वाढवीत आहां. अद्यापि शत्रूकडून रणामध्यें असें कांहींच अचाट कृत्य झालें नाहीं. आपण होऊनच ' कौरवांकडे घेऊन चल ' ह्मणालां. आतां जेथें ते असंख्य ध्वज फडकत आहेत तिकडे मी आपल्याला घेऊन जाणार. आमिषलोलुप असे जिवावर उदार झालेले कौरव पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही गेले तरी मी आपल्याला त्या ठिकाणीं घेऊन जाईन. स्त्रियांमध्यें त्याप्रमाणें शौर्याची मोठी बडबड करून व लांब लांब वचनें देऊन नगराबाहेर पडल्याबरोबर आतां युद्ध कां करीत नाहीं? गाई परत न मिळवितां आपण जर नगराला परत जाल तर सर्व स्त्रीपुरुष आपल्याला हासतील. मोठा उत्तम सारथी ह्मणून माझीही सैरंध्रीनें सर्वांपुढें शिफारस केली आहे. तर मला गाई परत मिळविल्याशिवाय नगराला परत जातां येत नाहीं. सैरंध्रीनें त्याप्रमाणें

माझी प्रशंसा केली असून आपणही माझी पाठ थोपटली होती; तेव्हां कौरवांशीं युद्ध न करतां मी कशी बरें परतूं ? आपण स्वस्थ असा. ' उत्तर म्हणाला, ' आमची बाटेल तेवढी संपत्ति कौरव हरण करोत. त्याचप्रमाणें बायका व पुरुष मला हासोत. त्यांना गाई खुशाल नेऊं देत. मला युद्ध कर्तव्य नाहीं. नगरांत कोणी नाहीं. बाबा रागावतील. त्याची मला भीति वाटते. ' असें ह्मणून तो बावरलेला उत्तर मान, अभिमान, सर्व गुंडाळून ठेवून रथाखालीं उडी घेऊन धनुष्यबाण फेंकून देऊन पळूं लागला. बृहन्नला ह्मणाली, ' क्षत्रियांनीं रणांतून पळ काढावा हा त्यांचा धर्म नव्हे. युद्धांत मरणें याहून फार चांगलें. ' असें ह्मणून स्वतः रथांतून खालीं उडी घेऊन त्या पळणाऱ्या राजपुत्राच्या मागून अर्जुन धांवूं लागला. ज्याची लांब वेणी व रक्तवस्त्र बाऱ्यानें हालत होतीं अशा त्याला उत्तराच्या मागून धांवतांना पाहून कुरुसैन्यांतील लोक हासूं लागले. त्याला त्या वेषांत पाहून ' रांखेमध्यें झांकलेल्या अग्निप्रमाणें स्त्रीवेषधारी हा कोण असावा, याचीं कांहीं लक्षणें पुरुषांसारखीं व कांहीं स्त्रियांसारखीं आहेत. हा हुबेहूब अर्जुनासारखा आहे. परंतु यानें षंढाचा वेष धारण केला आहे. तेंच हें मस्तक, तीच ही मान, तेच हे परिघासारखे बाहू व हा पराक्रमही हुबेहूब त्याच्यासारखा आहे. ज्याप्रमाणें देवांमध्यें देवेंद्र त्याप्रमाणें मानवांमध्यें अर्जुन आहे. त्याशिवाय दुसरा कोण एकटा आमच्यापुढें येण्याला धजणार ? हा विराटपुत्र शुकशुकाट झालेल्या नगरामध्यें बेषांतरांत झांकलेल्या अर्जुनाला सारथी घेऊन नगराबाहेर आला, तो स्वशौर्याच्या मोठ्या भिस्तीवर आला असें कांहीं ह्मणतां येत नाहीं. आणि ह्मणूनच हा भिऊन पळत आहे व खात्रीनें हा अर्जुन याला अडविण्याला त्याच्या मागून धांवत आहे, ' असा तर्क कौरवांमध्यें चालला, व पुढें काय करावें हें कोणाला सुचेना. अर्जुन उत्तराच्या मागून शेंपन्नास पावलें जाऊन त्यानें त्याच्या केसाला धरलें. तेव्हां तो मोठ्या काकुळतीनें रडून ह्मणाला, ' हे कल्याणि ! माझें ऐक. रथ लवकर मागें परतीव. मनुष्य जगूनबांचून राहिला तर सुखाचे दिवस पाहतो. मी तुला शुद्ध सोन्याच्या शंभर मोहोरा देईन व सोन्यांत गुंफलेलीं आठ सतेज वैडूर्यरत्नें देईन. आणखीही बाटेल तें मी तुला देईन. तूं मला सोड! ' बेडा बनून अशा प्रकारें बोलून रडणाऱ्या उत्तराला हासत हासत रथाजबळ आणून अर्जुन त्याला ह्मणाला, ' शत्रूबरोबर युद्ध करण्याला जर तुला धीर होत नसेल तर मी युद्ध करतों. तूं माझे घोडे आवर. मी तुझा पाठराख्या आहें असें समजून ह्या घोर, अजिंक्य व महावीरांनीं रक्षित अशा सैन्यावर रथ हाक. तूं खऱ्या क्षत्रियबीजाचा आहेस, शत्रूंच्या समोर हातपाय कां गाळतोस ? मी कौरवांशीं युद्ध करून गाई परत आणतों. ' याप्रमाणें उत्तराला धीर देऊन भयत्रस्त झालेल्या त्याला अर्जुनानें त्याच्या इच्छेविरुद्ध रथांत बसविलें. त्या क्लीबवेषधारी नरपुंगबाला उत्तराला रथांत घेऊन शमीवृक्षाकडे चाललेला पाहून भीष्मद्रोणप्रमुख कौरवयोद्धे अर्जुनाच्या भीतीनें मनांत घाबरले. त्या सर्वांना उत्साहशून्य झालेले पाहून शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ द्रोणाचार्य ह्मणाले, ' प्रचंड व रुक्ष वारा सुटला असून त्यांतून पाषणवृष्टि होत आहे, भस्मासारख्या काजोरखानें आकाश दाट भरून गेलें आहे, मेघही रुक्ष व विकीर्ण झाले आहेत; म्यानांतून नानाविध हत्यारें पटापट बाहेर निसटताहेत, पेटलेल्या दिशेला कोल्हीं भयंकर शब्द करीत आहेत; घोड्यांच्या नेत्रांतून अश्रू गळत आहेत; व वारा पडला असतांही निशाणें हालत आहेत. ह्या अशा प्रकारच्या दुश्चिन्हांवरून कांहीं तरी मोठें संकट खास येऊन गुदरणार आहे. तरी तुह्मी सर्व तयार राहून सैन्याची नीट व्यवस्था ठेवा व आपापल्या बचावासाठीं हुशार राहून गाईंचें संरक्षण करा. मोठी कत्तल सुरू होणार. हा वीर धनुर्धारी सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ पार्थच क्लीबवेषानें आला आहे यांत बिलकूल संशय नाहीं. अहो भीष्म, रावणाच्या वनाचा नाश करणारा हनुमान ज्याच्या ध्वजावर आहे, असा वृक्षाचें नांव धारण करणारा स्त्रीवेषधारी इंद्रपुत्र आह्मां सर्वांना जिंकून खात्रीनें गाई परत नेणार. हा पराक्रमी, शत्रूंना तापद सव्यसाची संपूर्ण सुरासुरांची जरी गांठ पडली तरी त्यांबरोबर झुंजण्याला मागें घेणार नाहीं. बनवासानें पीडल्यामुळें खवळला असून प्रत्यक्ष इंद्रानें याला सर्व श-

शास्त्रविद्या शिकविली असल्यामुळें याच्याशीं तोंड देणारा मला तरी कोणी दिसत नाहीं. हिमाचलावर प्रत्यक्ष किरातवेषधारी शंकराला युद्धांत यानें संतुष्ट केलें आहे.' कर्ण ह्मणाला, 'नेहमीं आपण आमच्यापुढें अर्जुनाच्या गुणाचें गोडवें गातां. हा अर्जुन माझ्या किंवा दुर्योधनाच्या सोळाव्या हिश्शानें देखील तोडीला लागणार नाहीं.' दुर्योधन ह्मणाला, 'कर्णा, जर हा अर्जुन असेल तर माझा कार्यभागच उरकला. उघडकीस आल्यामुळें फिरून यांना बारा वर्षें वनवास करावा लागेल. आतां हा क्लीववेषधारी जर दुसरा कोणी असेल तर तीक्ष्ण बाण सोडून याला आपण सहज भूमीवर निजवूं.' तो याप्रमाणें बोलत असतां त्या शमीवृक्षाजवळ जाऊन अर्जुन युद्धाची ज्याला फार माहिती नाहीं अशा सुकुमार उत्तराला ह्मणाला, 'माझ्या सांगण्यावरून झटकन् वरचीं धनुष्यें खालीं काढ. हीं तुझीं धनुष्यें माझें बल सहन करण्याला समर्थ नाहींत. ह्मणून ह्या पानांनीं दाट अशा शमीवृक्षावर चढ. या ठिकाणीं पांडवांचीं धनुष्यें, ध्वज, बाण व दिव्य कवचें ठेविलीं आहेत. त्यांपैकीं अर्जुनाचें गांडिव धनुष्य एक लक्षाची बरोबरी करणारें असून यशस्वी आहे व ताडाप्रमाणें मोठें असून कशानेंही मोडणारें नाहीं. सर्व शस्त्रास्त्रांवर याची रामबाण मात्रा चालत असून तें शत्रूचा पूर्ण फडशा उडविणारें आहे. ह्या लांब बिनखांडीच्या गुळगुळीत धनुष्यावर सोन्याचें काम केलेलें आहे व तें दिसण्यांत सुरेख असून बाहेल तेवढा ताण सहन करण्याजोगें आहे.' उत्तर ह्मणाला, 'या वृक्षावर शव बांधून ठेविलें आहे, अशी लोकांत बोलवा आहे, तर मग मी राजपुत्र असून त्याला कसा शिवूं? क्षात्रकुलामध्यें जन्मलेला मी मोठा मंत्रज्ञ आहें. ह्मणून अशा प्रकारच्या अशिव वस्तूला स्पर्श करणें मला उचित नाहीं. प्रेताला शिवून प्रेतवाहकाप्रमाणें अशुद्ध झाल्यावर तुला मला कसें शिवतां येईल?' बृहन्नला ह्मणाली, 'तूं अपवित्र होणार नाहींस. तेथें नुसतीं धनुष्यें आहेत. शव वगैरे कांहीं नाहीं. भिऊं नकोस. विराट राजांच्या औरस व थोर कुलांत जन्मलेल्या अशा तुझ्या हातून नित्य कर्म मी कसें करवीन?' हें अर्जुनाचें भाषण ऐकून उत्तरानें रथाखालीं उडी टाकली व निरुपायास्तव तो शमीच्या झाडावर चढला. अर्जुन रथावरूनच त्याला ह्मणाला, 'झाडाच्या शेंड्याला धनुष्यें आहेत तीं खालीं काढून त्यांचीं वेष्टनें दूर कर.' तो तीं धनुष्यें आणि कवचें काढून खालीं अर्जुनाकडे घेऊन आला. त्यामध्यें दुसऱ्या चारें धनुष्यांबरोबर गांडिव त्याच्या दृष्टीस पडलें. सूर्याप्रमाणें लखलखीत तीं धनुष्यें तो सोडूं लागला असतां उदयकालीन ग्रहांप्रमाणें त्यांची प्रभा फांकली. आंपसरणाऱ्या नागाप्रमाणें त्यांची कांति पाहून उत्तराच्या आंगावर रोमांच उभे राहिले. त्या मोठ्या दैदीप्यमान धनुष्यांना स्पर्श करून तो अर्जुनाला ह्मणाला, 'ज्यावर शंभर सुवर्णचक्रें, त्याचप्रमाणें हत्ती काढले आहेत, असें हें धनुष्य कोणाचें? यावर तीन सूर्य झळकत आहेत, त्याचप्रमाणें सुवर्णालंकार घातलेले नीलवर्ण पतंग काढले आहेत व याला उत्कृष्ट रत्नें जडविलीं आहेत, त्याचप्रमाणें चोहोंकडून ज्याचे कड घासले आहेत व अंगावरून फिरविलें असतां जे अंगावरचा केस राहूं देणारे नाहींत असे विषाट संज्ञक गृध्रपक्षांनीं युक्त, शिळेवर घासलेले, हळदीसारखे पिवळे, अणीदार, पाणीदिलेले हे बाण कोणाचे? त्याचप्रमाणें ज्यावर पांच वाघ काढले आहेत असें हें धनुष्य व डुकराच्या कानाच्या चिन्हांनीं युक्त असे हे दहा बाण कोणाचे? तसेंच हे अर्धचंद्राकृति शत्रूचें रक्त पिणारे सातशें राघूच्या पिसाप्रमाणें ज्यांचा पुढचा भाग आहे असे उत्कृष्ट पिसांनीं शृंगारलेले बाण कोणाचे? ज्याचें मुख व पृष्ठभाग बेडकीप्रमाणें आहे असा महाभार सहन करणारा हा दिव्य बाण कोणाचा? ही व्याघ्रचर्माच्या म्यानांतली, सोन्याचें काम केलेली चित्रविचित्र मूठ जिला आहे अशी सुंदर तरवार कोणाची? त्याचप्रमाणें प्रतिपक्षाकडून वार झाला असतांही जिला खांडी ह्मणून पडणार नाहींत अशी ही आंगठ्याएवढी जाड व पाणीदार तरवार कोणाची? हें प्रचंड प्रकरण पाहून मला मोठा विस्मय वाटत आहे!' अर्जुन ह्मणाला, 'प्रथम मला तूं ज्याविषयीं विचारलेंस तें हें सर्व लोकप्रसिद्ध अर्जुनाचें गांडिव धनुष्य होय. याच्याच साहाय्यानें युद्धांत अर्जुन देवांना व मानवांना अजिंक्य आहे.

पूर्वी हें हजार वर्षे ब्रह्मदेवांजवळ होतें. त्यापुढें पांचशें तीन वर्षे प्रजापतीजवळ होतें. पुढें पंचायशीं वर्षे इंद्रापाशीं होतें. पुढें पांचशें वर्षे चंद्रापाशीं व शंभर वर्षे वरुणापाशीं होतें व नंतर पांच वर्षे अर्जुनानें धारण केलें. देवांना व मनुष्यांना मान्य असें हें सोन्याच्या कोशांत ठेवलेलें उत्कृष्ट धनुष्य भीमाचें आहे. त्याचप्रमाणें हें अप्रतिम धनुष्य युधिष्ठिर महाराजांचें. ज्यावर सोन्याचा सूर्य झळकत आहे असें हें दैदीप्यमान धनुष्य नकुलाचें. त्याचप्रमाणें सोन्याच्या पतंगांनीं चित्रविचित्रित हें धनुष्य सहदेवाचें आहे. हे वस्तान्याप्रमाणें धारेचे अंगावर केस राहूं न देणारे सर्पविषाप्रमाणें जाज्वल्य बाण अर्जुनाचे आहेत. हे लांब व स्थूल अर्धचंद्राकृति शत्रुनाशक तीक्ष्ण बाण भीमाचे; हें हळदीच्या वर्णाचे सुवर्णपंखांनीं युक्त शिलेवर घासलेले पांच वाघाच्या आकृतीचे बाण नकुलाचे; हे सूर्याकृति शत्रूंचा फडशा उडविणारे चित्रविचित्र बाण सहदेवाचे. ज्याचें मुख व पृष्ठभाग बेडकीसारखे आहेत, असा हा भक्कम बाण अर्जुनाचा. पशुचर्माच्या म्यानामध्यें ठेवलेली ही भक्कम तरवार सहदेवाची. ' उत्तर ह्मणाला, ' हीं सोन्यानें चित्रविचित्र केलेली हें हें ह्मणतां काम उरकून टाकणाऱ्या महात्म्या पांडवांचीं सुंदर आयुधें किती तरी चकाकत आहेत, शत्रूंना ताप देणारे ते महात्मे कोठें आहेत न कळे ! द्यूतामध्यें राज्याला मुकल्यापासून त्यांची कांहींच बातमी कळत नाहीं. स्त्रीरत्न द्रौपदी ही त्यांच्या मागूनच वनाला गेली आहे. ' अर्जुन ह्मणाला, ' मीच तो अर्जुन. तुझ्या पित्याच्या सभेमध्यें सभासद होऊन राहिले आहेत ते युधिष्ठिर. तुझ्या वडिलांच्या पाकशालेवर असणारा बल्लव तो भीम. तुझ्या पित्याचा जो मोतद्दार आहे तो नकुल व तुमच्या गाईंवर मुख्य असणारा सहदेव. व जिच्याकरितां कीचक मेला ती सैरंध्रीच द्रौपदी. सर्व देश जिंकून संपत्ति आणून त्यांत मी खेटूं लागलों ह्मणून मला धनंजय हें नांव पडलें. युद्धामध्यें हार न जाणाऱ्यांशीं तोंड देऊन त्यांना न जिंकतां मी कधीं परतलों नाहीं ह्मणून मला विजय हें नांव मिळालें. रणामध्यें युद्ध चाललें असतां माझ्या रथाला सोन्याचें सामान घातलेले पांढरे घोडे जुंपले असतात ह्मणून मला श्वेतवाहन ह्मणतात. उत्तरा व फल्गुनी नक्षत्रांचा योग असतां दिवसां हिमाचलाच्या पृष्ठभागीं माझा जन्म झाला ह्मणून मला फाल्गुन ह्मणतात पूर्वी दानवश्रेष्ठांशीं युद्ध करीत असतां सूर्याप्रमाणें दैदीप्यमान किरीट इंद्रानें माझ्या डोक्यावर घातला ह्मणून मला किरीटी हें नांव मिळालें. देव किंवा मनुष्य यांच्याशीं युद्ध करीत असतां माझ्या हातून निंद्यकृत्य कधीं घडत नाहीं ह्मणून मला बीभत्सु ह्मणतात. गांडिव धनुष्य ओढतांना माझे दोन्ही हात सारखे चालतात ह्मणून मला सव्यसाची ह्मणतात. चतुरंत पृथ्वीच्या ठिकाणीं माझ्या सारखा वर्ण कोणाचा नाहीं, त्याचप्रमाणें माझीं कृत्यें ही नेहमीं अनिंद्य असतात ह्मणून मला अर्जुन ह्मणतात. मी कोणाच्या हातीं न लागणारा अजिंक्य व शत्रूंना जर्जर करणारा आहें, ह्मणून मला जिष्णु हें नांव आहे. माझा उज्वल कृष्ण वर्ण आहे ह्मणून माझ्या पित्यानें बाळपणीं लडिवाळपणानें मला कृष्ण हें दहावें नांव ठेविलें. ओळख पटण्यासाठीं हीं मीं आपलीं नांवें तुला सांगितलीं. आतां तर तुझी खात्री होईल ? ' हें अर्जुनाचें भाषण ऐकून जवळ जाऊन त्याला अभिवादन करून उत्तर ह्मणाला, ' भो पार्थ, आज आपली भेट झाली हें माझें मोठें भाग्यच. अज्ञानानें मी जें कांहीं बोललों असेन त्याची क्षमा करा. आपण जीं विलक्षण व दुष्कर कृत्यें केलीं आहेत तीं मनांत आणून माझें भय चट नाहींसें झालें आहे. आपल्या ठिकाणीं माझें प्रेम फार आहे.ह्या रथामध्यें बसून माझें सारथ्य घेऊन कोणाच्या सैन्यावर चालून जाण्याची आपली इच्छा आहे तें सांगा; ह्मणजे हा मी त्या सैन्याकडे रथ नेण्याला तयार आहें. ' अर्जुन म्हणाला, ' तुझें भाषण ऐकून मी संतुष्ट झालों आहें. आतां तुला भिण्याचें मुळींच कारण नाहीं. स्वस्थ राहून शत्रूंवर तुटून पडून घनघोर संग्राम मी कसे करतों हें पहा. मी कौरवांबरोबर युद्ध करून गाई परत आणीन. रथाची उत्तम व्यवस्था हेच ज्याच्या मार्गाच्या दोहोंबाजूंचे विस्तृत प्रदेश, बाहू हेच ज्याच्या कोटाच्या वेशी, दांड्या व भाते यानें दुष्प्रवेश्य, ध्वजांनीं युक्त, प्रत्यंचा हाच ज्याचा मारा, क्रोधानें विभूषित व रथचक्राचा ध्वनी हाच

जेथें दुंदुभीचा घोष अशा ह्या रथांतर्भागरूपी नगराचें माझ्याकडून उत्तम संरक्षण होईल. गांडिवधन्वा मी युद्धामध्यें रथारूढ झालों असतां शत्रुसैन्याला दाद देणार नाहीं.' उत्तर ह्मणाला, 'केशवासारखे अगर प्रत्यक्ष इंद्रासारखे आपण युद्धामध्यें मुळीं डगमगणार नाहीं, हें जाणूनच आतां मी भीत नाहीं. मात्र अशा प्रकारची शरीराची ठेवण असून अशा आपल्यासारख्या वीर्यशाल्यांना कोणत्या कर्माचें फल म्हणून हें षंढत्व पतकरावें लागलें याचा विचार करतांना माझी मती गुंग होऊन जाते. क्लीबवेषानें फिरणारे आपण प्रत्यक्ष शंकर, कुबेर अथवा इंद्र असावेत असें मला वाटतें.' अर्जुन ह्मणाला, 'वडील भावाच्या आज्ञेनें एक वर्षभर मीं हें व्रत घेतलें आहे. मी क्लीब नाहीं. धर्मानें माझें हातपाय जखडले आहेत. आज मीं त्या व्रतांतून पार पडलों आहे.' उत्तर ह्मणाला, 'हा मजबर मोठा अनुग्रहच मी समजतों. आज मला आपलें साहाय्य मिळाल्यानें मी देवांबरोबर सुद्धां युद्ध करण्याला तयार आहें. शत्रूंना जेरीला आणणारे ह्या रथाचे घोडे मी संभाळतों. सारथ्यकर्मामध्यें उत्तम गुरूपासून मला शिक्षण मिळालें आहे. वासुदेवाचा जसा दारुक, व इंद्राचा जसा मातली त्याप्रमाणें सारथ्यकर्मामध्यें मी पटाईत आहें. चालतांना ज्याचे खूर दिसत नाहींत असा उजवीकडे जुंपलेला हा घोडा सुग्रीवासारखा आहे, त्याचप्रमाणें जो हा रथ वाहणाऱ्यामध्यें श्रेष्ठ डावीकडे जुंपला आहे तो सुंदर घोडा वेगामध्यें मेघपुष्पांसारखा आहे. त्याचप्रमाणें सोन्याचें सामान घातलेला पाठीमागें डाव्या बाजूला जुंपलेला हा शैब्यासारखा आहे, व पाठीमागें उजव्या बाजूला जुंपलेला हा बलाहकापेक्षांही अधिक सामर्थ्यवान आहे. हा आपल्यालाच वाहून नेण्याला योग्य आहे, व आपणच या रथांत बसून युद्ध करण्यास योग्य आहां.' नंतर वीर्यशाली अर्जुनानें हातांतील चुडे व कानांतील सोन्याचीं कुंडलें खालीं काढून ठेवून आपले काळे कुळकुळीत वेणी घातलेले केस शुभ्र वस्त्रांनीं झांकून शुचिर्भूत होऊन शुद्ध मनानें पूर्वाभिमुख बसून सर्व अस्त्रांचें ध्यान केलें. त्या वेळीं सर्व अस्त्रें हात जोडून त्याला ह्मणालीं, 'हे आह्मी आपले दास तयार आहों.' तेव्हां त्यांना नमस्कार करून अर्जुन ह्मणाला, 'प्रसंगीं माझ्या उपयोगीं पडा.' याप्रमाणें त्यांचा प्रतिग्रह घेऊन मोठ्या उत्साहयुक्त मनानें त्यानें झटपट गांडिवाला प्रत्यंचा चढवून त्याचा टणत्कार केला. तेव्हां एकमेकांवर आपटणाऱ्या पर्वतांचा ज्याप्रमाणें मोठा शब्द व्हावा तसा त्याचा शब्द होऊन भूमि फाटली, वारा फार जोराचा वाहूं लागला व मोठा उल्कापात होऊन दिशा उजाड झाल्या. वृक्ष व ध्वज कंपायमान होऊं लागले. अशनिपातासारखा तो भयंकर शब्द कौरवांनीं ओळखला. उत्तरानें अर्जुनाला विचारलें, 'आपण एकटे या सर्व शस्त्रास्त्रांमध्यें निपुण अशा कौरवांबरोबर युद्ध करून त्यांना कसें जिंकणार?' हें ऐकून खदखदा हासून अर्जुन ह्मणाला, 'भिऊं नकोस. घोषयात्रेमध्यें महापराक्रमी गंधर्वांबरोबर त्याचप्रमाणें देवदानवांनीं गजबजलेल्या घोर खांडववनामध्यें युद्ध करतांना किंवा महापराक्रमी निवातकवच व पौलोम यांबरोबर इंद्रासाठीं युद्ध करतांना अगर द्रौपदीच्या स्वयंवराचे वेळीं अनेक राजांबरोबर युद्ध करतांना मला मदत कोणाची होती? गुरु द्रोण, इंद्र, कुबेर, यम, वरुण, अग्नि, रुप, लक्ष्मीपती रुष्ण, व शंकर यांची मीं शुश्रूषा केली असून यांच्याशीं युद्ध करणें मला काय जड जाणार? रथ लवकर त्यांच्याकडे घेऊन चल. चिंता मुळीं करूं नकोस.' याप्रमाणें उत्तरसारथ्यासह शमीवृक्षाला प्रदक्षिणा घालून सर्व आयुधांनिशीं अर्जुन निघाला व सिंहचिन्हानें अंकित त्या रथावरचा ध्वज उतरून प्रत्यक्ष सृष्टिकर्त्यानें याच्या रथासाठीं निर्माण केलेली दैवी मायाच कीं काय अशा सोन्याच्या सिंहपुच्छानें युक्त अग्नीच्या प्रसादरूपी वानरचिन्हानें युक्त अशा ध्वजाचें व रथाचें त्यानें ध्यान केलें. त्याबरोबर अग्नीनें अद्भुत चक्रें, अक्षय्य भाते, प्रचंड शक्ति यांनीं युक्त असा दिव्यरथ व ध्वज आणून देण्यासाठीं भूतांना आज्ञा केली. त्याबरोबर आकाशांतून रथ खालीं आला. तेव्हां त्याला प्रदक्षिणा करून अर्जुन त्यावर बसला व हस्तत्राण व अंगुलित्राण बांधून धनुष्यासह उत्तरेकडे निघाला.

१ रुष्णाच्या रथाच्या घोड्यांचीं नांवें.

तेव्हां शत्रूंच्या अंगावर कांटे उभे करणारा आपला मोठा शंख त्यानें जोरानें फुंकला. त्याबरोबर रणदार घोड्यांनीं देखील गुडघे टेकले व उत्तर भयत्रस्त होऊन रथांत जागच्या जागीं खिळून गेला. तेव्हां घोड्यांचा लगाम ओढून त्यांना उभे करून अर्जुन उत्तराला धीर देऊन ह्मणाला, 'तूं राजपुत्रांमध्यें अग्रणी असून शत्रूंच्यामध्यें असे हातपाय कसे गाळतोस? आजपर्यंत शंखाचे व दुंदुभीचे शब्द तूं अनेकवार ऐकिले असशील, मग या शंखाच्या शब्दाला भिऊन सामान्य जनाप्रमाणें असा कसा घाबरून पांढरा फटफटीत पडलास!' उत्तर ह्मणाला, अहो धनंजय, शंख व दुंदुभि यांचे शब्द माझे कानावर पुष्कळ पडले आहेत. परंतु आजपर्यंत अशाप्रकारचा शब्द मीं कधीं ऐकिला नाहीं; अशा प्रकारचा ध्वजही आजपर्यंत माझ्या पाहण्यांत आला नव्हता; व धनुष्याचा अशा प्रकारचा टणत्कारही मीं आजपर्यंत कधीं ऐकिला नाहीं. या शंखाच्या, शब्दानें, ह्या धनुष्याच्या टणत्कारानें, ह्या ध्वजावर असणाऱ्या भूतांच्या अमानुष शब्दांनीं व ह्या रथाच्या घरघर आवाजानें माझें मन जाग्यावरून उडून जाऊन डोळ्यांपुढें अंधेरी आली आहे. माझें काळीज कसें धडधड उडत आहे. ह्या गांडीवाच्या शब्दानें माझ्या कानठळ्या बसल्या आहेत.' त्या अमानुष शब्दांनीं पृथ्वी कंपायमान झालेली पाहून द्रोणाचार्य ह्मणाले, 'हा रथाचा ध्वनि, आकाशांत अस्त्रें येणें, पृथ्वीचें कंपायमान होणें, शस्त्रें निस्तेज पडणें, जिकडे तिकडे अग्नि पेटणें, इत्यादि भयप्रदर्शक चिन्हांवरून हा निःसंशय पार्थ असला पाहिजे. घोड्यांनीं खेंकाळणें सोडून दिलें आहे, सर्व पशुपक्षी सूर्याकडे तोंड करून घोर शब्द करीत आहेत, कावळे ध्वजावर येऊन बसत आहेत, पक्षी डावी घालीत आहेत, कोणी न उठवितां हीं कोल्हीं सैन्यांतून शब्द करीत धांवत आहेत. तुमच्या अंगावरच्या रोमरंध्रांवर कांटे उभे राहिले आहेत. नक्षत्रेंही प्रकाशहीन झालीं आहेत. क्षत्रियांतकर असे अनेक उत्पात आमच्या सैन्यामध्यें दिसताहेत. पेटलेल्या उल्कांच्या योगानें आमचें सैन्य पीडिलें आहे. गिधाडांची धाड आमच्या सैन्यावर येऊन पडत आहे. आमचें सैन्य घाबरून जाऊन युद्ध करण्याची हुरूप त्यामध्यें दिसत नाहीं योद्ध्यांचीं तोंडें फिकीं पडून ते कर्तव्यतामूढ बनले आहेत. ह्या सर्व चिन्हांवरून घोर संग्राम होऊन त्यामध्यें वा सुयोधना, पार्थानें तुझ्या सैन्याला जर्जर केलेलें पाहून तुला ताप होणार आहे. म्हणून आतां गाई पुढें रवाना करून देऊन आपण सर्व सज्ज होऊन युद्धाला तोंड देण्याला तयार होऊन उभे राहूं.' हें द्रोणाचार्यांचें भाषण ऐकून दुर्योधन भीष्मांना ह्मणाला, 'तात, आजपर्यंत मी जी गोष्ट अनेकवार बोललों आहें तीच हल्लीं ही फिरून बोलत आहें. द्यूतनिर्जित पांडवांनीं बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास करावा ह्याप्रमाणें पूर्वीचा पण आहे. हल्लीं तेरावें वर्ष सुरू असून त्यांतच अर्जुन प्रकट होऊन युद्धाला उभा राहिला आहे. तर मग त्यांनीं फिरून बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास केला पाहिजे कीं नको? आतां स्वार्थानें किंवा अज्ञानानें आम्हांला जरी खरें उमगलें नाहीं तरी आपण तथ्य जाणण्यास समर्थ आहां. अमुक गोष्ट न्यायाची किंवा तमुक न्यायाची ह्याचा निर्णय करण्याचा प्रसंग आला ह्मणजे नेहमींच मनुष्य बुचकळ्यांत पडतो. आपण चिंतावें एक व दैव चिंतितें दुसरें; तशांतली ही गोष्ट झाली. आह्मी विराटाशीं युद्ध करून उत्तरेच्या बाजूनें गाई हरण करण्यासाठीं आलों असतां ह्याठिकाणीं अर्जुन उघाडकीस आला ह्यांत आमचा काय दोष? सातवे दिवशीं त्रिगर्तांनीं दक्षिणेकडून गाई हरण कराव्या व आठवे दिवशीं सकाळच्या प्रहरीं येऊन आह्मीं ह्या गाई हरण कराव्या असें ठरलें होतें. त्रिगर्तांनीं दक्षिणेला गाई हरण केल्या असतील किंवा त्यांचा पराजय झाला असेल, किंवा आह्मांला फसवून त्यांनीं विराटाशीं तह केला असेल, अथवा विराट आपल्या प्रचंड सैन्यासह रात्रीं नगरीमध्यें परतून सकाळीं आमच्याबरोबर युद्ध करण्याला आला असेल व त्यांच्यापैकीं हा एखादा वीर आमच्याशीं युद्ध करण्याला आला असेल; किंवा हा कदाचित् प्रत्यक्ष विराटही असेल किंवा कदाचित् अर्जुनही असेल. परंतु पूर्वी संकेत केल्याप्रमाणें युद्ध करणें आतां आपल्याला भाग आहे. सर्व वीर घाबरले आहेत खरे, पण युद्धावा-

चून मला आतां श्रेयस्कर दुसरें कांहीं दिसत नाहीं. आह्मीं हरण केलेल्या गाई प्रत्यक्ष इंद्रानें किंवा यमानें जरी परत मिळविण्याचा यत्न केला तरी त्यांच्याशीं दोन हात केल्याशिवाय हास्तिनापुराला कोण बरें परत जाईल. ह्या निबिड अरण्यामध्यें सैन्यांतील पायदळ बाण लागून पडलें असतां त्यानें कसें बरें जिवंत रहावें. आतां स्वारांचा मात्र ह्या ठिकाणीं निभाव लागण्याचा संभव आहे.' हें ऐकून कर्ण ह्मणाला, 'द्रोणाचार्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देतां जें करणें असेल तें आपण करूं या. जेव्हां तेव्हां आमचा हिरमोड करून पांडवांचे बाजूला जोरा आणण्याचेंच कायतें त्यांना ठाऊक आहे. अर्जुनावर ह्यांची सर्वांपेक्षां अधिक प्रीति आहे. म्हणूनच अर्जुनाला पाहिल्याबरोबर यांनीं त्याच्या स्तुतिपाठाला सुरुवात केली आहे. आतां आपल्या सैन्याची जेणेंकरून फाकाफाक न होईल अशी तजवीज ठेवणें इष्ट आहे. घोड्यांचें खेंकाळणें ऐकिल्याबरोबर द्रोणाचार्यांचें सर्व सामर्थ्य गळून जातें! ह्या उन्हाच्या कडाक्यांत अशा घोर अरण्यांत सांपडून नायकाभावीं आमच्या सैन्याला शत्रूच्या तावडींत जाण्याचा प्रसंग येऊं देऊं नका. ह्या पांडवस्तुतिपाठकांना त्यांनींच आमच्याकडे ठेवलें असावें म्हणून हें येथें राहून त्यांचें प्रिय करीत आहेत. नाहींपेक्षां केवळ घोड्यांचें खेंकाळणें ऐकून कोण त्यांची प्रशंसा करीत सुटेल. घोड्यांना ठाणावर बांधलें असतां किंवा चालत असतां नेहमींच खेंकाळण्याची संवय असते. वारा नेहमींच सुटतो, पाऊसही वाटेल तेव्हां पडतो, मेघगर्जनाही अशीच अनियमित काळीं होते; पण ह्या गोष्टींशीं पार्थाचा अर्थाअर्थीं संबंध कसा पोंहोचतो व त्याबद्दल तो स्तुतीला कसा पात्र होतो हें मात्र कळत नाहीं. पांडवांसंबंधाच्या यांच्या प्रेमामुळें व आमच्यावरच्या द्वेषामुळेंच यांचें असें वर्तन होत असलें पाहिजे. पण हा वृथा आरोप तरी कशाला? आचार्य ह्मणजे नेहमीं कोंवळ्या मनाचे व पापभीरू. संकटसमयीं यांचा सल्ला घेत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सुशोभित राजवाड्यामध्यें, गफ्फांच्या आखाड्यांत व रम्य उद्यानामधून गोड गोड गोष्टी बोलून अनेक चमत्कार करून दाखविणाऱ्या यज्ञिय अस्त्रांची पूर्ण माहिती असलेल्या पंडितांचा, दुसऱ्यांचें उणें काढणें, मनुष्याचे नित्य व्यवहार, हत्तीवर, घोड्यावर, व रथांत बसून रपेट करून येणें, गाढव, उंट, शेळ्या, ह्यांची चिकित्सा करणें, गोधन, रस्ते, नगरद्वारें, अन्नसंस्कार व अन्नदोष इत्यादिसंबंधी प्रश्न आला असतां चांगला उपयोग होतो. ह्मणून अशा स्तुतिपाठक पंडितांचा विचार न घेतां शत्रूचा नाश करतां येण्याजोगा कांहीं उपाय योजला पाहिजे. गाईंना रक्षक बरोबर देऊन पाठवून द्या, व सैन्य सज्ज करून लढाईला तयार व्हा. मला तर सर्व योद्धे घाबरलेले दिसत आहेत. कोणामध्यें युद्ध करण्याची हुरूप दिसत नाहीं व सर्वांची अगदीं गाळण उडून गेली आहे. हा विराट असो अगर अर्जुन असो, ज्याप्रमाणें वेला सागराला थोपवून धरते तसा मी ह्याला थोपविण्यास समर्थ आहें. माझ्या धनुष्यापासून सुटलेले तीक्ष्ण बाण सरसर सरणाऱ्या सापाप्रमाणें कधीं व्यर्थ जावयाचे नाहींत. माझ्या हातून चलाखीनें सुटलेले बाण टोळधाडींनीं ज्याप्रमाणें झाड झांकून टाकावें त्याप्रमाणें अर्जुनाला झांकून टाकतील, व प्रत्यंचेपासून सुटलेल्या त्यांचा सूं सूं आवाज नगाऱ्याच्या शब्दाप्रमाणें तुमच्या कानठळ्या बसवील. आज तेरा वर्षें स्वस्थ बसल्यानें युद्धाला आतुर झालेला अर्जुन खात्रीनें आज माझ्यावर शरवर्षाव करील; व सत्पात्र ब्राह्मणाप्रमाणें गुणवान कौंतेय मीं सोडलेल्या हजारों बाणांचा प्रतिग्रह घेईल. हा त्रैलोक्यांत नाणावलेला आहे व मीही ह्याच्याहून कांहीं कमी नाहीं. आह्मां दोघांच्या गृध्रांचीं पिसें लावलेल्या बाणांनीं काजव्याप्रमाणें आकाश भरून गेलेलें तुह्मांला दिसेल. उगीच तोंडानें वचन देऊन तें फेडण्याचें आज फार दिवस बाकी राहिलें होतें त्या ऋणाची आज मी युद्धांत अर्जुनाला मारून फेड करतों. कौरवांना गोधन घेऊन खुशाल जाऊं दे. अथवा रथांत स्वस्थ बसून माझें युद्ध पाहूं दे.' हें ऐकून कृपाचार्य ह्मणाले, 'राधेया, नेहमींच युद्ध करण्याची दुष्ट बुद्धि तुझ्यामध्यें दिसून येते. कार्याचें स्वरूप अथवा त्याचा परिणाम ह्याकडे तूं मुळींच दृष्टि देत नाहींस. शास्त्राला धरून असणाऱ्या अनेक नीति सांगितल्या आहेत. त्यांमध्यें वृद्ध लोक युद्ध फार

नित्य समजतात. देशकाल पाहून आरंभिलेलें युद्ध विजयप्रद होतें. पण तेंच अकालीं आरंभिलें असतां त्याचे विपरीत परिणाम होतात. देशकाल अनुकूल असतील तरच कामें सिद्धीला जातात. केवळ सुताराबर अबलंबून त्यानें तयार केलेल्या रथाबर मदार ठेऊन शहाणे लोक काम हातीं घेत नाहींत. हल्लीं बिचार केला असतां अर्जुनावर अविचारानें तुटून पडणें आपल्याला श्रेयस्कर होईलसें मला वाटत नाहीं. जो हा एकटा कौरवांवर चालून आला आहे, त्या एकट्यानेंच खांडववनांत अग्नीला तृप्त केलें आहे. पांच वर्षं यानें ब्रह्मचर्य पाळलें आहे. या एकट्यानेंच सुभद्रेला रथावर बसबून कृष्णाला युद्धाला बोलाविलें. किरातरूपी शंकरांशीं याच बहाद्दरानें एकट्यानें युद्ध केलें. ह्याच बनामध्यें जयद्रथानें द्रौपदीला हरण केलें असतां तिला परत मिळविणारा व इंद्रापाशीं पांच वर्षं राहून सर्व अस्त्रविद्या संपादन करणारा हाच एवढा बहाद्दर आहे.ह्या एकट्यानेंच शत्रूंना जिंकून कौरवांचें यश कायम केलें आहे. चित्रसेन गंधर्वाच्या दुर्धर सैन्याशीं टक्कर देऊन चित्रसेनाला यानेंच जिंकलें. व देवतांना देखील अवध्य अशा निवातकवचांचा फडशा या एकट्यानें पाडला. प्रत्यक्ष इंद्र देखील युद्धामध्यें याच्यापुढें उभा रहाण्याला समर्थ नाहीं. आतां तूं एकट्यानें असें कोणतें कृत्य केलें आहेस ह्मणून अर्जुनाशीं युद्ध करण्याची तूं हाव धरतोस ? तुला वायु झाला आहे त्याला कांहीं मात्रा दिली पाहिजे. उजवा हात सांवरून बोट तोंडांत घालून बिषारी सापाची दाढ काढण्यासारखी अगर अकुंश न घेतां वन्यगजावर बसून त्याला नगराला घेऊन जाण्यासारखी ही तुझी हाव आहे. अंगाला वस्त्रें गुंडाळून त्यावर तूप ओतून घेऊन मग तूप व चरबी यांनीं भडकलेल्या अग्नीमधून जाण्यासारखी ही तुझी हाव आहे. स्वतःला जखडून घेऊन आणखी वर गळ्यांत मोठीं धोंडा बांधून घेऊन दंडाच्या जोरावर समुद्र पोहून जाण्याची हाव धरण्यांत काय मोठा पुरुषार्थ आहे? आज तेरा वर्षेपर्यंत आह्मी याची खोडी काढीत आलों आहों. तो हा आज जाळ्यांतून सुटलेल्या सिंहाप्रमाणें आमची बाकी ठेवणार नाहीं. बिहिरींत झांकून राहिलेल्या अग्नीबमाणें कानाकोपऱ्याला पडून राहिलेल्या अर्जुनाशीं न कळत गांठ पडल्यामुळें आह्मीं आपल्याला मोठ्या संकटांत पाडून घेतलें आहे. ह्मणून आतां युद्धामध्यें कोणाला हार न जाणाऱ्या अशा यांशीं सर्वांनीं मिळून लढण्यांत शहाणपणा आहे. सर्व सैन्य चिलखत वगैरे घालून प्रहार करण्याला तयार असूं या. अद्यापि गाई हरण केल्या नाहींत किंवा शत्रूच्या हद्दींतून पार पडून हास्तिनापुरालाही जाऊन पोंहोचलों नाहीं. मग तुझी ही वृथा फुशारकी पाहिजे कशाला ? अनेक संग्रामांमध्यें विजय मिळवून विपुल संपत्ति मिळवून शत्रुसैन्याचा फडशा उडविला असतांही थोर लोक एक चकार काढीत नाहींत. अग्नि कांहीं एक न बोलतां जाळून टाकीत असतो, सूर्यही मुकाट्यानेंच प्रकाश देत असतो व ही पृथ्वी चराचरांना कांहीं बडबड न करितां धारण करते.ब्रह्मदेवानें चारी वर्णांना आपापलीं कामें नेमून दिलीं आहेत तीं तीं करून राहिल्यानें धनप्राप्ति होऊन मनुष्य दोषांतून मोकळा होतो. शास्त्राला अनुसरणारे थोर लोक ही पृथ्वी न्यायानें मिळवून देखील आपल्या गुणहीन गुरूंना सुद्धां मान देतात. द्यूतानें राज्य मिळविणारा कोणता क्षत्रिय आजपर्यंत स्तुतीला पात्र झाला आहे ? व्याधाप्रमाणें कपटानें फसवून तशाप्रकारें संपत्ति मिळवून कोण शहाणा मनुष्य आत्मप्रशंसा करील ? आज तूं पांडवांपैकीं कोणाला एकट्यानें जिंकिलें आहेस ? रजस्वला द्रौपदीला एका वस्त्रानिशीं सभेंत आणिलेंस त्यांत तरी काय मोठा पराक्रम केलास ? चंदनाची इच्छा करणारानें ज्याप्रमाणें चंदन समूळ तोडून टाकावा त्याप्रमाणें तुह्मीं हा मुळाशीं घाव दिला तेव्हां विदुर काय ह्मणाले याची तुह्मांला आठवण आहे काय? मनुष्याच्याच नव्हे तर किडे, मुंग्या इत्यादि प्राण्यांच्या सहनशीलतेला देखील कांहीं मर्यादा आहे. द्रौपदीला दिलेला क्लेश अर्जुन यापुढें सहन करणार नाहीं. सर्व धार्तराष्ट्रांचा उच्छेद करण्याकरितां तो पुढें सरसावला आहे, आणि तूं मोठ्या शहाण्यासारख्या लांबलांब गप्पा झोकूं लागला आहेस ! देव, गंधर्व अगर राक्षस यांपैकीं कोणाच्याही भीतीनें अर्जुन युद्ध करण्याला कचरणार नाहीं. ज्या ज्यावर ह्मणून हा

तुटून पडेल त्याला त्याला तो ठार केल्याशिवाय सोडणार नाहीं. ' अश्वत्थामा ह्मणाला, ' पुत्र व शिष्य यांमध्यें भेद नाहीं असें शहाणे समजतात, ह्याही कारणानें तातांना अर्जुन प्रिय आहे यांत नवल नाहीं. दुर्योधना, ज्याप्रमाणें तूं द्यूत केलेंस, इंद्रप्रस्थ हरण केलेंस व द्रौपदीला सभेमध्यें आणिलेंस तसेंच आज पांडवांबरोबर युद्ध कर ह्मणजे झालें; आणि ह्या तुझ्या क्षात्रधर्म जाणणाऱ्या धूर्तामध्यें मोठ्या पटाईत मामाला मदतीला घे. अर्जुनाच्या गांडिवापासून फाशामध्यें जसे दोनचार पडतात तसे दोनचार पडत नाहींत; परंतु तीक्ष्ण बाण सुटत असतात व ते पर्वतांना देखील फोडण्याला समर्थ असल्यामुळें मध्येंच अडकून राहतील याचीही बिलकुल शंका नको. यम, वायु, मृत्यु व वडवाग्नि यांच्या हातून देखील एखादा सुटेल, परंतु अर्जुनाच्या तावडींतून कोणी सुटण्याची आशा नको. शकुनीचा पाठिंबा घेऊन सभेमध्यें जसें द्यूत खेळलां तसेंच आतांही खुशाल युद्ध करा. अर्जुनाबरोबर मी कांहीं युद्ध करूं इच्छित नाहीं. गाई परत नेण्याकरितां जर विराट येईल तर त्याबरोबर आह्मी युद्ध करूं. ' भीष्म ह्मणाले, ' अश्वत्थाम्यांचें तसेंच कृपाचार्यांचें ह्मणणें रास्त आहे. कर्णाची मात्र क्षात्रतेजानुरूप युद्ध करण्याची उत्कट इच्छा दिसते. शहाण्यानें गुरूची निंदा कधीं करूं नये व देशकाल पाहून युद्धाला प्रवृत्त व्हावें. सूर्यासारखे पांच भाऊ भांडावयाला तयार झाले असतां ते उदयाला आलेले पाहून शहाणा देखील वेडा बनेल. कर्तव्यासंबंधानें धर्मज्ञांची देखील अकल गुंग होते. ह्मणून दुर्योधना, तुला हें मी वारंवार सांगत आहें. रुचेल तर घे. नाहींतर सोडून दे. कर्ण तुला जें बोलला तें फक्त तुला चढविण्याकरितां बोलला असें समज. ' अश्वत्थाम्याला दुर्योधन ह्मणाला, ' अश्वत्थामन्, हल्लीं प्रसंग आणीबाणीचा असतां परस्परांशीं भांडण करण्याची ही वेळ नव्हे. आपण सर्वांनीं या वेळीं क्षमा धरली पाहिजे. सूर्यप्रभेप्रमाणें आपला अस्त्रप्रभाव आहे व चंद्रकांतीप्रमाणें कधीं कमी न पडणारें आपलें तेज आहे. एकीकडे चार वेद व एकीकडे क्षात्रबल असें दोन्ही एका ठिकाणीं एकवटलेले तुम्हा दोघा. पितापुत्रांखेरीज दुसऱ्या कोणांमध्येंही मीं आजपर्यंत पाहिलें नाहीं. उपनिषदें, पुराणें, इतिहास त्याचप्रमाणें ब्रह्मास्त्र यांमध्यें परशुरामांखेरीज द्रोणाचार्यांहून अधिक कोण आहे ? ह्मणून या वेळीं क्षमा धरून आपसांत कलह माजवूं नका. हा अर्जुन आला आहे याच्याशीं आपण सर्व एकदिलानें युद्ध करूं. **सैन्याचे जे अनेक दोष शहाण्यांनीं सांगितले आहेत त्यांमध्यें फूट हा मुख्य व घातक दोष आहे.** ' अश्वत्थामा ह्मणाले, ' आमच्या सरळ भाषणाला कोणीं दोष देऊं नये. रागाच्या आवेशामध्यें वडील अर्जुनाचे खरे गुण बोलून गेले; शिवाय शत्रूचे सुद्धां गुण ध्यावेत व गुरु असला तरी त्याचे दोष दाखवावेत व हरप्रसंगीं हरतऱ्हा करून पुत्राचें आणि शिष्याचें हित तें बोलावें. " नंतर दुर्योधनानें अश्वत्थाम्यांची क्षमा मागितली, तेव्हां ते ह्मणाले, ' या भीष्माचार्यांच्या भाषणानेंच मी संतुष्ट झालों आहें. ज्यायोगानें पार्थ दुर्योधनावर तुटून पडणार नाहीं अशी तजवीज करा. वनवास पूर्ण झाल्याखेरीज तो कधीं प्रगट व्हावयाचा नाहीं आणि गोधन सोडविल्याखेरीज तो कधीं मागेंही हटावयाचा नाहीं. पांडवांचा वनवास पूर्ण झाला आहे किंवा नाहीं याबद्दल दुर्योधनानें भीष्मांना प्रश्न केलाच आहे व त्याचें योग्य उत्तर ते देतीलच. ' हें ऐकून भीष्म ह्मणाले, ' कला, काष्ठा, मुहूर्त, दिवस, पक्ष, मास, व नक्षत्रें ऋतू आणि संवत्सर इत्यादिकांची कालगणनेमध्यें योजना होऊन त्यांच्या कालविभागानें हें कालचक्र फिरत आहे. कालगतीनें नक्षत्रांमध्यें अंतर पडत असल्यानें दर पांचव्या वर्षाला दोन महिने अधिक पडतात व याप्रमाणें तेरा वर्षांमध्यें पांडवांचे पांच महिने बारा दिवस ज्यास्त झाले आहेत असें मला वाटतें. यांनीं आपली वनवासाची प्रतिज्ञा बराबर शेवटास नेली आहे. आणि हेंच जाणून अर्जुनही प्रगट झाला आहे. ते सर्व शूर व धर्मज्ञ असून युधिष्ठिर त्यांचा पुढारी आहे. तेव्हां धर्मामध्यें त्यांची चूक कशी होईल ? त्यांच्यामध्यें लोभाचा लेशही नसून त्यांनीं आज मोठें दुष्कर कृत्य केलें आहे. आणि योग्य उपायाखेरीज राज्य मिळविण्याची ते कधीं खटपट करणार नाहींत. तसें नसतें तर त्याच वेळीं त्यांनीं आपला पराक्रम दाखविला असता. प-

रंतु धर्मपाशानें जखडले गेल्यानें क्षत्रियवृत्तीपासून ते अणुभर देखील ढळले नाहींत. त्यांना अन्यायानें दोष देणारच नाश पावले. प्रसंगीं ते मृत्यु वरतील, परंतु असत्याचा कधीं अंगीकार करणार नाहींत. परंतु योग्य वेळीं त्यांना मिळावयाचें तें न मिळेल तर प्रत्यक्ष इंद्र रक्षण करण्याला अमलेल्या शत्रूला देखील ते जुमानणार नाहींत.आज सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ अर्जुन त्याच्याशीं गांठ आहे. ह्मणून जो श्रेयस्कर व थोरांनीं घेतलेला मार्ग असेल तोच आपल्याला स्वीकारला पाहिजे. आपल्या गोष्टी दुसऱ्याच्या कानावर जाऊं देऊं नका. संग्रामामध्यें खात्रीनें जय मिळेल असें मला सांगतां येत नाहीं. संग्राम सुरू झाला असतां मारणें किंवा मरणें, जय किंवा अपजय हे एकाला खात्रीनें येणार. तेव्हां आतां ह्या प्रसंगीं उचित तें करा.' तेव्हां ' पांडवांना मी राज्य कधीं देणार नाहीं, युद्धाची जी कांहीं तयारी करणें असेल ती झटपट करा,' असें दुर्योधनाचें भाषण ऐकून भीष्म फिरून म्हणाले, ' तर मग माझें सांगणें तुह्मांला रुचेल तर ऐका. जें हिताचें असेल तेंच मला सांगितलें पाहिजे. सैन्याचा चौथा हिस्सा घेऊन तूं नगराकडे जा. दुसरा चौथा हिस्सा गाई घेऊन जाऊं दे. राहिलेल्या अर्ध्या सैन्यानें मी, द्रोणाचार्य वगैरेमंडळी युद्ध करण्याच्या निश्चयानें आलेल्या अर्जुनाशीं युद्ध करूं. विराट अगर प्रत्यक्ष इंद्र आला तरी वेळा ज्याप्रमाणें मागराला थोपवून धरते त्याप्रमाणें त्यांना मी थोपवून धरीन.' हें भीष्माचार्यांचें भाषण सर्वांना पसंत पडून त्याप्रमाणें दुर्योधन सैन्य वगैरे घेऊन गेला; व भीष्माचार्यांनीं सर्व सेनानायकांना व्यवस्थित उभे करून सेना नीट तयार ठेविली. याप्रमाणें कौरवसैन्य सज्ज उभें राहिल्यावर रथघोषानें ती भूमि दणाणून सोडीत अर्जुन क्षणमात्रांत तेथें आला. तो ध्वजाग्रभागीं होणारा मोठा शब्द व अंगावर शहारे अणणारा गांडिवाचा शब्द ऐकून त्या गांडिवधन्व्या अर्जुनाला येतांना पाहून द्रोणाचार्य ह्मणाले, ' हा अर्जुनाचा ध्वजाग्र दुरूनच झळकत आहे. रथाचा त्याचप्रमाणें त्यावर वानरांचा शब्द ऐकूं येत आहे. या सर्व श्रेष्ठ रथामध्यें बसून हा गांडिवधन्वा आपलें वज्रासारखें शब्द करणारें गांडिव धनुष्य पहा कसा वर उचलीत आहे ! हे पहा त्याचे दोन बाण माझ्या पायाशीं येऊन पडले आहेत व हे दोन माझ्या कानाला चाटून जात आहेत. जणूं काय वनामधून अमानुष रूप्य करून आलेला अर्जुन मला प्रणिपात करून माझ्या कानाला लागून मला युद्धाची अनुज्ञाच मागत आहे ! आप्तबांधवांना प्रिय असा हा अर्जुन फार दिवसांनीं आपल्या दृष्टीस पडला. हा कांतीनें पहा कसा दैदिप्यमान दिसत आहे !' याप्रकारें इकडे द्रोणाचार्य विस्मय करीत असतां अर्जुन उत्तराला म्हणाला, ' उत्तरा, कौरवसैन्य माऱ्याच्या टप्यांत आलें आहे. आतां घोडे आवरून धर. कोण कोण कुरुकुलाधम या सैन्यामध्यें आहेत तें मला पाहूं दे. त्या सर्वांना सोडून त्या अहंता पिशाचानें झपाटलेल्या दुर्योधनावर चालून जाऊं. म्हणजे यांचा मोड झाल्यासारखा आहे. पुढें द्रोणाचार्य, अश्वत्थामा, कृप, कर्ण वगैरे मला दिसत आहेत. परंतु राजा कोठें दिसत नाहीं. आपल्या जिवाला जपणारा तो दक्षिण दिशेनें गाई घेऊन निघून गेला असवा असें मला वाटतें. म्हणून ह्यांना सोडून दे आणि दुर्योधन ज्या ठिकाणीं असेल तिकडे रथ घेऊन चल. तेथेंच मी युद्ध करीन, खाऊशिवाय युद्धांमध्यें कांहीं विशेष गोडी नाहीं.' हें अर्जुनाचें भाषण ऐकून दुर्योधन जिकडे पळाला होता तिकडे उत्तरानें घोडे वळविले. याप्रमाणें तो रथसमुदाय सोडून अर्जुन निघून गेला असतां कृपाचार्य त्याचा अभिप्राय ताडून ह्मणाले, ' राजाशिवाय दुसऱ्याशीं युद्ध करण्याचा अर्जुनाचा बेत दिसत नाहीं. म्हणून त्याच्या मागोमाग निघालेल्या अर्जुनाच्या पाठोपाठ आपण जाऊं. या खवळलेल्या अर्जुनाबरोबर युद्धामध्यें इंद्र अगर श्रीकृष्ण यांखेरीज दुसरा कोणीही एकटा टिकाव धरूं शकणार नाहीं. पार्थरूपी जलामध्यें दुर्योधनरूपी नौका बुडत चालली असतां गाई किंवा धन घेऊन आम्हांला काय करावयाचें आहे ?' इकडे अर्जुनानें पुढें जाऊन नांव घेऊन टोळधाडीप्रमाणें बाण सोडून ती सर्व सेना झांकून टाकली. त्याचा तो वर्षाव सुरू असतां त्यानें झांकून गेला नाहीं असा भूमीचा अगर आकाशाचा यत्किंचितही भाग बाकी नव्हता. अर्जुनाच्या शंखाच्या व रथाच्या चा-

काच्या शब्दानें, गांडिवाच्या टणत्कारानें व ध्वजावरील भूतांच्या आरोळ्यांनीं पृथ्वी कंपायमान होऊन गाई आपलीं शेपटें उभारून हंबरडा फोडीत दक्षिण दिशेनें परत वळल्या.

याप्रमाणें स्वसामर्थ्यानें शत्रूच्या सैन्याची दाणादाण करून गाई परत मिळविल्यावर दुर्योधनाशीं युद्ध करण्याच्या हेतूनें धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ अर्जुन त्याकडे वळला. तेव्हां सर्व कौरवयोद्धे एकदम त्याकडे निघाले. तें युद्धाला सज्ज झालेलें शत्रुसैन्य पाहून अर्जुन उत्तराला हाक मारून म्हणाला, 'सोन्याच्या लगामांनीं जखडलेले हे पांढरे घोडे त्या तिकडे वळीव. हत्तीला हत्ती भिडवून हा दुरात्मा सूतपुत्र माझ्याबरोबर युद्ध करण्याच्या इच्छेनें येत आहे. दुर्योधनाच्या संगतीनें गर्विष्ठ बनलेल्या याकडे रथ वळीव.' हें अर्जुनाचें भाषण ऐकून त्या वायुगति घोड्यांना, शत्रुसैन्याचा फडशा उडवीत उत्तरानें कर्णाकडे वळविलें. अनेक कौरववीर कर्णाचें रक्षण करण्याकरितां विशिख, विषाठ इत्यादि बाणांचा वर्षाव करीत अर्जुनाकडे धांवले. ज्याप्रमाणें अग्नीनें अरण्य जाळून टाकावें त्याप्रमाणें अर्जुनानें धनुष्यरूपी ज्वाळा व बाणांच्या वेगरूपी दाहकशक्ति यांच्या योगानें त्यांच्या रथांना जाळून टाकिलें. वर्षाकालाच्या आरंभीं वाऱ्याच्या सपाट्यानें ज्याप्रमाणें मोठमोठीं अरण्यें हालूं लागतात त्याप्रमाणें त्या श्रेष्ठ नरवीराच्या हातून पराभव पावलेले वीर थरथर कापत होते. इंद्रासारखे वीर्यशाली हिमाचलावरील धिप्पाड हत्तीप्रमाणें दिसणारे मोठमोठे दानशूर योद्धेही अर्जुनापुढें डगमगले. वसंतऋतूमध्यें पानें आणि ढग यांना चोहोंकडे उडवीत. ज्याप्रमाणें वारा वहात असतो तसा हा शत्रुसैन्यामध्यें फिरत होता. त्यानें कर्णाच्या भावाला मारून त्याचें डोकें उडविलें. आपल्या भावाला याप्रमाणें मारलेला पाहून, माजलेल्या वैलाला सुळ्यानें धरूं इच्छिणाऱ्या गजराजाप्रमाणें कर्ण अर्जुनावर धांवून गेला. आपल्या अंगावर आवेशानें तुटून पडणाऱ्या कर्णावर चित्रविचित्रित पंख असलेला गरुड ज्याप्रमाणें मोठ्या सापावर झडप घालतो त्याप्रमाणें तो तुटून पडला. शत्रूला दाद न देणाऱ्या बलशाली धनुर्धरश्रेष्ठ कर्णार्जुनांचें युद्ध चाललें असतां सर्व कौरववीर तें पहात तटस्थ उभे होते. रागानें लाल झालेल्या अर्जुनानें अपराधी कर्णाकडे उत्साहयुक्त मुद्रेनें पाहून एका क्षणांत त्याला त्याचा घोडा, रथ व सारथी यांसह बाणवृष्टीनें झांकून काढलें. इकडे कर्णही धनुष्यबाण सज्ज करून ठिणग्या बाहेर टाकणाऱ्या अग्नीप्रमाणें अर्जुनाकडून येणाऱ्या बाणांचा प्रतिकार करीत होता. त्यांचा तो पराक्रम पाहून शंख, दुंदुभि, पणव इत्यादि वाद्यांचा कौरवसैन्यामध्यें एकच गजर चालला होता. ज्याच्या ध्वजाग्रभागीं भुतें खेचाखेचीनें बसलीं असून त्यांनीं उभारलेल्या शेपट्या पताकांचें काम करीत होत्या व त्याच्यायोगानें रथाला एक प्रकारचें उग्र स्वरूप देत होत्या, त्या अर्जुनाच्या गांडिवाचा टणत्कार ऐकून कर्णानेंही मोठी गर्जना केली. दोघांनीं असंख्य बाणांनीं एकमेकांला झांकून सोडलें. ते अतितीक्ष्ण बाणांचा वर्षाव करीत असतां त्या शरवर्षावामध्यें ते दोघे मेघमंडळामधून दृष्टीस पडणाऱ्या सूर्यचंद्रांप्रमाणें दिसत होते. नंतर झटपट काम उरकून घेण्याच्या इराद्यानें कर्णानें चार बाण सोडून अर्जुनाचे घोडे व सारथी जाया केले. त्यानें खवळून जाऊन निजलेला सिंह ज्याप्रमाणें फिरून जागा व्हावा त्याप्रमाणें अर्जुन नेमके जाऊन लागणारे बाण सोडीत सोडीत कर्णावर चालून गेला व सूर्य ज्याप्रमाणें आपल्या किरणांनीं सर्व लोक झांकून टाकतो त्याप्रमाणें भात्यांतून बाण काढून व धनुष्य कानापर्यंत ओढून त्यानें कर्णाचे बाहु, उरस्थल, कपाळ, मस्तक, मान, त्याचप्रमाणें अनेक मुख्य मुख्य अवयव घायाळ केले. याप्रमाणें पार्थशरांनीं जाया झालेला कर्ण रणभूमि सोडून मागें फिरला. याप्रमाणें त्यानें पाय मागें घेतला असतां दुर्योधनप्रभृति मंडळी आपापल्या सैन्याच्या तुकड्यानिशीं अर्जुनावर बाण सोडूं लागली. त्यांना न जुमानतां दिव्यास्त्र सोडीत अर्जुन पुढें सरसावला. ज्याप्रमाणें सूर्यकिरणांनीं पृथ्वी झांकली जावी त्याप्रमाणें गांडिवापासून सुटलेल्या बाणांनीं दशदिशा व्याप्त झाल्या. रथ, घोडे, हत्ती व कवचें यांच्या ठिकाणीं अर्जुनाचा बाण लागला नाहीं अशी दोन बोटें सुद्धां जागा मोकळी राहिली नाहीं. अर्जुनाचें तें अलौकिक काम पाहून प्रेक्षक त्याची वाहवा करूं

लागले. सर्वप्रजांतक अशा त्या अर्जुनावर शत्रूची नजर ठरेना. अर्जुनाच्या बाणांनीं झांकलेली ती सेना सूर्यकिरणयुक्त मेघ जसे पर्वताच्या बाजूला शोभतात तशी शोभत होती. ज्यांतील सोन्याचीं फुलें गळून पडत होतीं अशा त्याच्या बाणांनीं तुटलेल्या माळा, छत्रें आणि पताका न खळतां आकाशांत वाऱ्यांत उडत होतीं. सैन्याची त्रेधा उडाल्यामुळें घाबरलेले व जूं तोडून निसटलेले रथाचे घोडे रथाचा जो जो झणून भाग त्यांना चिकटून आला त्या त्यासकट दशदिशेला पळाले. त्याचप्रमाणें त्या नरवीरानें हत्तींना कर्ण, कक्षा, दांत, अधरोष्ठ व इतर मर्मस्थळें या ठिकाणीं प्रहार करून खालीं पाडलें व ज्याप्रमाणें मेघांनीं सर्व आकाश झांकून जातें तसें एका क्षणामध्यें कौरवांच्या मेलेल्या हत्तींनीं सर्व भूमि झांकून गेली. युगाच्या शेवटीं ज्याप्रमाणें अत्यंत जाज्वल्य अग्नि कालगतीनें क्षय पावणाऱ्या सर्व स्थावरजंगमांना जाळून टाकतो तसा तो शत्रूंना जाळीत चालला. त्याच्या अस्त्रांचें तेज, त्याच्या धनुष्याचा टणत्कार, ध्वजावर असणाऱ्या अमानुष भूतांचा शब्द, मारुतीची अंगावर कांटे उभे करणारी गर्जना आणि देवदत्त शंखाचा शब्द यांच्या योगानें अर्जुनानें दुर्योधनाच्या सैन्याला कांपरें भरविलें. आकाशामध्यें संचार करणाऱ्या पक्ष्यांसारख्या अर्जुनाच्या तीक्ष्ण बाणांनीं आकाश झांकून गेलें असतां शत्रू एकवारच काय ते मरण्याला त्याकडे रथ आणूं शकत होते. ज्याप्रमाणें त्याचे बाण शत्रूंच्या शरीराला अडकून रहात नव्हते तसाच त्याचा रथ शत्रुसैन्यांत कोठें अडून न राहातां थेट पुढें चालला होता. असंख्य फणांचा नाग ज्याप्रमाणें महासागरामध्यें क्रीडा करीत राहतो त्याप्रमाणें आपल्या पराक्रमानें तो शत्रुसैन्य अगदीं खळबळून सोडीत होता. एकाला एक असे तेथें चिकटून उभे असलेल्या हत्तींच्या मधून बाण जात असतां सूर्यकिरणांना शिरकाव देणाऱ्या मेघांप्रमाणें ते शोभत होते. अर्जुनाचें गांडिव डाव्या व उजव्या बाजूनें आलातचक्राप्रमाणें नेहमीं फिरत राहून त्यापासून सुटणारे बाण शत्रूच्या मर्मस्थळाखेरीज दुसऱ्या कोठेंच जाऊन पडत नव्हते. जुटीनें चाललेल्या हजारों हत्तींनीं वनामध्यें ज्याप्रमाणें मार्ग काढावा तसा अर्जुनाचा रथ शत्रुसैन्यांत वाट काढीत चालला होता. अर्जुनाला जय मिळावा अशा इच्छेनें प्रत्यक्ष इंद्रच येऊन आपल्याशीं लढत आहे कीं काय असें शत्रूंना वाटूं लागलें. वनस्पतींच्या शिरोभागाप्रमाणें शत्रूंचीं डोकीं तो कापून काढीत असतां भयानें कौरवांचे वीर्य अगदीं गळून चाललें. अर्जुनरूपी वायूनें कौरवसेनारूपी वन उपटलें जात असतां रक्ताच्या पाटांनीं पृथ्वी भरून गेली व रक्तमिश्रित धुळीनें आकाश भरून गेलें असल्यामुळें सूर्यकिरणेंही लाल दिसत होतीं. तसेंच सूर्य व आकाश यांनाही संधिकालाप्रमाणें तांबडेपणा आला होता. सूर्यास्ताच्या वेळीं तरी रणांगणांतून सूर्य नाहींसा होण्याचा संभव होता. परंतु अर्जुनाचा मात्र अस्त होण्याचा रंग बिलकुल दिसत नव्हता. त्याच्या दिव्यास्त्रांच्या तडाक्यांतून कोणी धनुर्धर सुटत नव्हता. त्यानें कर्णावर कर्णी बाण सोडून त्याचे घोडे, सारथी व रथ यांचा फडशा उडाविला. याप्रमाणें शत्रुसैन्याची दाणादाण करीत असतां तांबडे घोडे जोडलेल्या वाघाच्या चामड्यानें मढविलेल्या कृपाचार्यांच्या रथाच्या बाजूच्या तुकडीकडे, प्रथम त्यांना आपलें हस्तलाघव दाखवावयाचें असल्यानें अर्जुनानें रथ वळविण्यास उत्तराला सांगितलें. पुढें ज्यांच्या ध्वजावर सोन्याचा कमंडलू काढला होता त्या द्रोणाचार्यांच्या रथाकडे रथ वळवून सनातन धर्माला अनुसरून त्यांच्या रथाला प्रदक्षिणा घालून खालीं उतरून त्यांना मान देण्यास उत्तराला सांगून त्यांच्याजवळच अश्वत्थाम्याचा रथ दिसत होता त्याकडे रथ नेऊन फिरून तो त्यानें परतविण्यास सांगितला. कारण तो मोठा बलाढ्य व कोणास हार न जाणारा असून द्रोणाचार्यांच्या शिष्यांमध्यें लवकर अस्त्र सोडण्यांत पहिला गणला गेला असल्यानें त्याला आपलें अस्त्रलाघव दाखविण्याचा त्याचा विचार होता. नंतर ज्याच्या ध्वजावर रुचिर गजबंधन होतें त्या कर्णाच्या रथाजवळ जातांना तो नेहमीं आपला हेवा करीत असल्यानें मोठी सावधगिरी ठेवण्यास त्यानें उत्तराला सांगून पुढें नीलवर्ण व पांच तारे काढलेला ध्वज ज्यांच्या रथावर फडकत होता, ज्यांच्या डोक्यावर पांढरें छत्र धरलें होतें व अनेक ध्वज

ज्यांवर फडकत होते अशा रथसमुदायामध्यें मेघमंडळांतील सूर्याप्रमाणें ज्यांचा रथ सर्वांच्या अग्रभागीं झळकत होता व सूर्यचंद्राप्रमाणें ज्यांचें सुवर्णकवच लखलखत होतें व ज्यांचें सोन्याचें शिरस्त्राण याच्या मनाला चिंता उत्पन्न करीत होतें त्या सर्वांना वडील अशा राजश्रींत वाढलेल्या भीष्मांकडे त्यानें आपला रथ सर्वांच्या मागून नेण्यास सांगितलें. कारण त्यानीं कधीं दुर्योधनाची बाजू सोडली नव्हती तरी ते आपल्याला कांहीं विघ्न करणार नाहींत अशी त्यांची खात्री होती. परंतु यांच्याशीं युद्ध करीत असतां घोडे मात्र मोठ्या हुशारीनें आवरण्यास त्यानें उत्तराला सांगून ठेविलें. तेव्हां उत्तरानें प्रथम कृपाचार्यांकडे रथ वळविला. उन्हाळ्याच्या शेवटीं हलक्या वाऱ्यानें सरणाऱ्या ढगाप्रमाणें ती कौरवसेना पुढें सरतांना दृष्टास पडत होती. या सैन्याच्या पुढच्या भागीं ज्यांवर महा महा योद्धे स्वार झाले आहेत असे घोडे, व दिमण्यांत क्रूर व चित्रविचित्रित झुला घातलेले, ज्यांवर बसून माहुत त्यांना अंकुश टोंचताहेत असे हत्ती होते. यांच्यामधील अद्भुत युद्ध पाहण्यासाठी देव, राक्षस, गंधर्व, पितर व महर्षी यांसह प्रत्यक्ष इंद्र हजर होता व देवांचीं विमानें आकाशामध्यें जिकडे तिकडे चकाकत होतीं. वसंताच्या आरंभीं ज्याप्रमाणें वनामधून पुष्पांचा घमघमाट सुटावा तसा दिव्य पुष्पांचा पुण्यकारक सुवास जिकडे तिकडे पसरला होता. भूमीवरील वर उडालेली धूळ देवांच्या दिव्य रत्नाभरणांच्या व वस्त्रांच्या किरणांनीं झांकून गेली होती व वारा देखील दिव्य गधांनीं योद्धयांची जणूं सेवाच करीत आहसें दिसत होतें. उत्तर निर्भयपणें कृपाचार्यांच्या रथाजवळ जाऊन त्यांना उजवी घालून उभा असतां अर्जुनानें आपला श्रेष्ठ देवदत्त शंख जोरानें फुंकून आपलें नांव कळविलें. कृपाचार्यांना तें असह्य होऊन त्यांनींही मोठ्या त्वेषानें आपला शंख फुंकून त्यानें तीन लोक दणाणून सोडले; व हातांत धनुष्य घेऊन त्याचा टणत्कार केला. सूर्याप्रमाणें तेजस्वी ते दोन वीर युद्ध करतांना शरद्ऋतूंतील मेघाप्रमाणें दिसत होते. अर्जुनानें पुष्कळ नाराच बाण कृपाचार्यांवर सोडले. त्या रक्तशोषक बाणांचे त्यांनीं मध्येंच तुकडे तुकडे उडवून दिले. त्यामुळें त्वेषाला चढून अनेक प्रकारचें अस्त्रकौशल्य दाखवून अर्जुनानें दिशा व उपदिशा झांकून टाकून जिकडे तिकडे बाणांचीच सावली करून सोडून त्यांत कृपाचार्यांना झांकून टाकलें. त्याच्या त्या तीक्ष्ण बाणांनीं घाबरलेले घोडे एकदम उधळले व कृपाचार्य स्थानभ्रष्ट झाले. तेव्हां त्यांचा मान राखण्यासाठीं अर्जुनानें त्यांवर बाण सोडण्याचें बंद ठेवलें. परंतु फिरून लवकरच जाग्यावर येऊन कृपाचार्य कंकपत्रयुक्त बाण अर्जुनावर सोडूं लागले. तेव्हां अर्जुनानें एका तीक्ष्ण भल्लबाणानें त्यांचें हस्तत्राण दूर करून अनेक मर्मभेदी बाणांनीं त्यांच्या देहाला कांहीं इजा होऊं न देतां त्यांचें कवच उडवून दिलें. याप्रमाणें अंगावरील कवच उडून गेल्यामुळें वेळ आली असतां कात टाकणाऱ्या सापाप्रमाणें त्यांचें शरीर तेजःपुंज दिसूं लागलें. पुढें अर्जुनानें त्यांचें धनुष्य मोडलें असतां त्यांनीं बोल बोल ह्मणतां दुसरें धनुष्य सज्ज करून पाहणाराना थक्क करून सोडलें. अर्जुनानेंही त्यांचीं अनेक धनुष्यें मोडून टाकलीं. तेव्हां कृपाचार्यांनीं प्रदीप्त अशा विद्युल्लतेसारखी रथशक्ति घेऊन ती अर्जुनावर सोडली. आकाशांतील मोठ्या उल्केप्रमाणें त्या सुवर्णविभूषित शक्तीला येतांना पाहून अर्जुनानें दहा बाण सोडून ती सुद्धां तोडून टाकली; व आपल्या अमितुल्य दैदीप्यमान बाणांनीं जूं, घोडे, सारथ्याचें डोकें, रथाच्या दांड्या, कणा, ध्वज इत्यादि मोडून उडवून दिलें. याप्रमाणें विरथ झालेल्या कृपाचार्यांनीं हातांत गदा घेऊन ती अर्जुनावर फेंकली; परंतु अर्जुनानें ती वाटेंतच कापून काढल्यामुळें परत कृपाचार्यांकडेसच गेली. याप्रमाणें कृपाचार्यांची दुर्दशा उडाली असतां सर्व कौरववीर त्यांच्या साहाय्याला येऊन एकदम अर्जुनावर बाण सोडूं लागले. परंतु उत्तरानें आपल्या घोड्यांना फिरवून **यमक करून** त्या सर्वांचें निवारण केलें. तेव्हां कौरववीर कृपाचार्यांना घेऊन मागें हटले. याप्रमाणें कृपाचार्य मागें हटल्यावर ज्यांच्या ध्वजावर सुवर्ण वेली काढल्या असून ज्यांच्या रथावर मजबूत काठीवर उभारलेली पताका फडकत होती, व तुळतुळीत, पोंवळ्याच्या रंगाचे, युद्धकलेंत तरबेज व पाहतांक्षणीं मनाला आनंद देणारे असे भव्य घोडे ज्यांच्या र-

थाला जोडले आहेत व जे स्वतः महातेजस्वी व पराक्रमशाली असून बुद्धीनें शुक्राचार्यासारखे व विद्येनें बृहस्पतीसारखे होते; व चतुर्वेद, ब्रह्मचर्य, उपसंहारासह सर्व दिव्यास्त्रें यांचें ज्यांना पूर्ण ज्ञान; क्षमा, दम, सत्य, अनिष्ठुरता, सरलता इत्यादि गुणांचें ज्यांच्यामध्यें वास्तव्य, असे द्रोणाचार्य धनुष्यबाण घेऊन पुढें सरसावले. व शंभर नगाऱ्यांसारखा मोठा शब्द देणारा आपला शंख फुंकून सर्व सैन्याला त्यांनीं हलवून सोडलें. त्यावेळीं त्यांचे ते उत्तम तांबूस रंगाचे घोडे, मनोजवानें धांवणाऱ्या अर्जुनाच्या पांढऱ्या घोड्यांशीं जाऊन भिडले असतां तो एक मोठा प्रेक्षणीय देखावा दिसत होता, ते दोन वीर्यशाली अस्त्रनिपुण गुरुशिष्य याप्रमाणें एकमेकांशीं भिडले असतां अर्जुनाला मोठा आनंद होऊन हासत हासत तो गुरूंना नमस्कार करून मधुर शब्दांनीं ह्मणाला, 'महाराज, आह्मीं आजपर्यंत सूड घेण्याचा काल येईल ह्मणून आशा धरून वनवास काढला, ह्मणून यावेळीं या व्यतिक्रमाबद्दल आपण मनांत राग मानूं नये. तरी पण युद्धांत अजिंक्य असे आपण मजवर प्रथम बाण सोडाल तेव्हांच आपल्यावर मी बाण सोडणार असा माझा निश्चय आहे. ह्मणून आपल्याकडून आरंभ व्हावा. तेव्हां द्रोणांनीं विसांहून अधिक बाण त्यावर सोडले. ते अर्जुनानें जवळ न येऊं देतां मध्येंच कापून काढले. पुढें द्रोणाचार्यांनीं हातचलाखीनें हजारों बाण सोडून जणूं काय अर्जुनाला त्वेष चढविण्याकरितांच कीं काय त्याच्या घोड्यांना झांकून काढलें. ह्याप्रमाणें दोघे विख्यात, विक्रमशाली, दिव्यास्त्रज्ञ गुरुशिष्य एकमेकांवर बाण सोडीत असतां तेथें जमलेल्या सर्व राजांची अक्कल गुंग होऊन गेली. व मोठ्या चलाखीनें त्यांचा शरवर्षाव चालला असतां 'वाहवा, वाहवा,' ह्मणून जिकडून तिकडून शब्द निघत होता. 'अर्जुनाशिवाय युद्धांत द्रोणाचार्यापुढें दुसरा कोण उभा राहणार? अहो, जो गुरूंशीं देखील युद्ध करावयाला लावतो तो हा क्षात्र धर्म फार क्रूर आहे,' असे जिकडे तिकडे लोक उद्गार काढूं लागले. ते दोघे खवळलेले वीर एकमेकांशीं भिडले असतां मेघानें ज्याप्रमाणें वृष्टीनें पर्वत फोडून टाकावा त्याप्रमाणें द्रोणाचार्यांनीं अर्जुनावर जोराचा शरवर्षाव चालविला होता. अर्जुनही गांडिवापासून नानाप्रकारचे बाण सोडून त्यांचा प्रतिकार करीत होता. त्याच्या धनुष्यापासून बाण इतक्या जलदीनें सुटत होते कीं, तें पाहून प्रेक्षक थक्क होऊन गेले होते. एकाचवेळीं दाहीदिशेला अस्त्रकौशल्य दाखवीत त्यानें आकाश बाणांनीं अगदीं झांकून काढलें. त्या वेळीं त्याचें रूप चोहोंकडून पेट घेतलेल्या पर्वताप्रमाणें दिसत होतें. यामुळें द्रोणांनाही त्वेष चढून मेघगर्जनेप्रमाणें टणत्कार करणाऱ्या आपल्या धनुष्याची प्रत्यंचा ओढून द्रोणांनीं बाण सोडले. ते जळणाऱ्या कळकांप्रमाणें सूं सूं शब्द करीत थेट अर्जुनाकडे जात होते. फिरलेल्या टोकांचे बाण आकाशांत इतके दाट पसरले होते कीं, धनुष्यापासून सुटणाऱ्या बाणांपासून आकाशांत जाऊन भिडलेल्या बाणांपर्यंत त्यांची एकच रांग लागून राहिली होती. याप्रमाणें त्या दोन वीरांनीं बाणसमुच्चयांनीं उल्केप्रमाणें आकाश झांकून टाकलें. कंक व मोर यांचीं पिसें ज्यांला लावलीं आहेत असे त्यांचे बाण आकाशामध्यें संचार करीत असतां जणूं काय ते खेचर हंसच आहेत कीं काय असे भासत होते. ते दोन क्षुब्ध झालेले वीर आळीपाळीनें दिव्यास्त्रें सोडीत धर्मयुद्ध करीत होते. सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असे द्रोणाचार्य फिरलेल्या टोकाच्या बाणांनीं जणूं काय अर्जुनाशीं क्रीडाच करीत आहेत अशारीतीनें त्याच्या दिव्यास्त्रांचा प्रतिकार करीत त्याच्याबरोबर युद्ध करीत होते. इकडे इंद्रास्त्र, वायव्यास्त्र, आग्नेयास्त्र इत्यादि द्रोणांनीं सोडलेल्या अस्त्रांचा अर्जुन तत्काळ फडशा उडवीत होता. याप्रमाणें दोघांचें तुंबळ युद्ध चाललें असतां रक्तानें भरलेले हत्ती, घोडे, रथ इत्यादि सर्व फुललेल्या पळसाप्रमाणें दिसत होते. त्या दोघांच्या घोर संग्रामांत सुवर्णानें चित्रविचित्रित कवचें ध्वज व योद्धे यांचा भूमीवर सडा पडलेला पाहून सैन्यामध्यें मोठी गडबड उडून गेली होती. ह्या प्राणहारक युतांत धनुष्य आकर्ण ओढून त्यांनीं एकमेकांवर शरवर्षाव चालविला असतां 'देवदैत्यांना जिंकणाऱ्या अर्जुनाशीं द्रोणांनीं टिकाव धरला आहे हें मोठें आश्चर्य आहे,' ह्मणून आकाशामध्यें द्रोणाचार्यांची वाहवा होत होती

युद्धांत न डगमगणें, उत्तम प्रकारचें अस्त्रशिक्षण, हस्तलाघव, व दूरचा नेम मारण्यांत पटाईतपणा वगैरे गुण अर्जुनाच्या ठिकाणीं पाहून भीष्माचार्य देखील थक्क झाले. गांडिव सांवरून त्यांतून टोळधाडीप्रमाणें तो बाणांचा वर्षाव करीत असतां सर्व कौरव त्याची वाहवा करून त्याविषयीं पूज्यभाव दाखवीत होते. त्याच्या धनुष्यापासून सुटणाऱ्या बाणांमध्यें बाऱ्याचा देखील शिरकाव होत नव्हता. तो बाण काढतो केव्हां, धनुष्याला जोडतो केव्हां व सोडतो केव्हां याची देखील कोणाला कल्पना होत नसे. बाणांनीं अर्जुनानें द्रोणाचार्यांना झांकून काढलेलें पाहून कौरवसैन्यांत जिकडे तिकडे हाहाकार उडाला. इतक्यांत पुष्कळ रथांसहवर्तमान येऊन अश्वत्थाम्यानें अर्जुनाला थोपविलें. त्याला सुद्धां हें अर्जुनाचें अलौकिक कृत्य मनापासून आवडलें. तरी तो त्वेषानें त्याच्या अंगावर पर्जन्याप्रमाणें शरवर्षाव करूं लागला. इकडे अर्जुनानें आपले घोडे अश्वत्थाम्याकडे वळविल्यामुळें द्रोणाचार्यांना निसटण्याला संधि मिळाली.

अश्वत्थाम्यानें अर्जुनाशीं युद्ध चालविलें असतां अर्जुनानें सोसाट्याच्या वाऱ्यामध्यें पर्जन्यवृष्टि करणाऱ्या मेघाप्रमाणें बाण सोडून त्याला प्रथम सलामी दिली. आकाश बाणांनीं भरून गेल्यामुळें जिकडे तिकडे सावली पडून सूर्य मुळींच दिसत नव्हता व वाराही बंद पडला होता. फक्त सुटणाऱ्या बाणांचा सोंसों आवाज मात्र कांनीं येत होता. अर्जुनानें अश्वत्थाम्याच्या घोड्यांना अगदीं बेदम करून सोडल्यामुळें ते अगदीं गांगरून जाऊन त्यांना दिशा सुद्धां उमगेनात. इतक्यामध्यें अश्वत्थाम्यानें संधि साधून रणभूमीवर विद्युल्लतेप्रमाणें फिरणाऱ्या अर्जुनाच्या धनुष्याचीं प्रत्यंचा तोडली. व आपलें श्रेष्ठ धनुष्य ओढून कंकपत्रयुक्त बाण अर्जुनाच्या छातीवर सोडले.तेव्हां हासून अर्जुनानें गांडिवाला नवी प्रत्यंचा चढविली व अर्धचंद्राकृति वळण घेऊन तो अश्वत्थाम्यावर चालून गेला. पृथ्वीवरील ह्या दोन वीरश्रेष्ठांचें याप्रमाणें तुंबळ युद्ध चाललें असतां प्रेक्षकांच्या अंगावर कांटा उभा रहात होता. अर्जुनाचे भात्यांत बाणांना कधीं खंड पडत नसल्यामुळें बिलकुल न डगमगतां तो स्वस्थ उभा होता. परंतु अश्वत्थाम्याचे बाण वरचेवर सोडल्यानें सरत चालले होते; त्यामुळें अर्जुनाची सरशी दिसूं लागली;तेव्हां कर्णानें आपलें प्रचंड धनुष्य ओढून टणत्कार केला. त्या बाजूला दृष्टि फेकून कर्णाला तेथें पाहून अर्जुनाचें पित्त खवळलें व डोळे वटारून त्वेषानें त्याला मारण्याच्या उद्देशानें अश्वत्थाम्याला सोडून तो त्याकडे धांवला, व त्याच्याशीं द्वंद्वयुद्ध करण्याच्या हेतूनें तो त्याला ह्मणाला, ' कर्णा, युद्धामध्यें माझ्या जोडीचा कोणी नाहीं अशी तूं सभेमध्यें फार बडबड चालविली होतीस. परीक्षेची वेळ आतां येऊन ठेपली आहे. या युद्धांत माझ्याशीं दोन हात केल्यावर स्वतःचा दुबळेपणा तुझ्या ध्यानांत येईल. आणि मग तूं फिरून याप्रमाणें दुसऱ्याला तुच्छ करणार नाहींस. धर्माधर्म न पाहतां वाटेल तसें कठोर भाषण तूं केलेंस तें सर्व ठीक होतें. परंतु आतां जें हें तूं युद्ध करण्याचें मनांत आणलें आहेस तें मात्र तितकें सोपें नाहीं. सभेमध्यें दुष्टांनीं द्रौपदीला छळलें असतां मोठ्या आनंदानें पहात होतास त्याचें प्रायश्चित्त आतां तुला देतों. त्यावेळीं धर्मपाशानें जखडला गेलों असल्यामुळें मला आपला राग आवरून धरावा लागला. वनामध्यें जे आह्मीं बारा वर्षें क्लेश सोसले त्याचा वचपा आज काढून घेतों. ' यावर कर्ण ह्मणाला, ' पार्था, तोंडानें बडबड चालविली आहेस तसें कृतीनें करून दाखीव. कृतीपेक्षां तुझी बडबडच फार दिसते. जगाचीच ही रीतच दिसून येते. आजपर्यंत जें तूं निमुटपणें सहन केलेंस तें तुझ्या अंगीं शक्ति नसल्यामुळें सहन केलेंस असें को ह्मणत नाहींस ? धर्मपाशानें जखडल्यामुळें त्यावेळीं आह्मीं तें सर्व निमुटपणें सहन केलें ह्मणतोस तर आतां कोठें तो मोकळा झाला आहे ? शिवाय बारा वर्षें वनवासांत काढलेला तूं आज माझ्याबरोबर युद्ध करणार. प्रत्यक्ष इंद्र जरी तुझ्या पक्षानें युद्ध करण्याला आला तरी त्याला देखील मी आपला पराक्रम दाखवीन. माझ्याशीं दोन हात करण्याची ही हाव तुला आतांच उत्पन्न झाल्यासारखी दिसते. बरें, तुला माझें बल आज दिसून येईल. ' अर्जुन ह्मणाला, ' नुकताच रणांतून तोंड मागें घेऊन पळाल्यामुळें तूं जगलास. तुझ्या भावाला तर यमसदनाची वाट

दाखविलीच आहे. तुझ्याशिवाय दुसरा कोण वीर आपल्या भावाला रणामध्यें मरावयाला सोडून रणांतून पळून जाईल ? ' याप्रमाणें बोलून कवचभेद करणारे बाण सोडीत अर्जुन कर्णावर धांवून गेला. व धनुष्य कानापर्यंत ओढून सोडलेल्या तीक्ष्ण बाणांनीं त्याचे घोडे त्यानें मारून खालीं पाडले व एक बाण कर्णाच्या उरस्थलावर सोडून त्याला जखमी केलें. तो बाण त्याचें कवच फोडून त्याच्या शरीरामध्यें शिरला. असतां कर्ण घायाळ होऊन तीव्र वेदना होऊं लागल्यामुळें रणभूमि सोडून परतला. याप्रमाणें कर्णाला जिंकल्यावर सुवर्णतालाचें निशाण जेथें फडकत होतें अशी सैन्याची एक तुकडी येऊन देवतुल्य भीष्माचार्य याच्यापाशीं युद्ध करण्याला जेथें तयार होते त्या बाजूला रथ वळविण्यास अर्जुनानें उत्तराला सांगितलें. रथ, हत्ती, घोडे यांनीं भरगच्च असें तें अफाट सैन्य पाहून पुष्कळ बाण लागलेला उत्तर अर्जुनाला म्हणाला, ' पार्थ, त्या ठिकाणीं आपले घोडे आवरणें माझ्या हातून होणार नाहीं; माझे प्राण व्याकूळ होऊन मन जाग्यावरून उडालें आहे. आपल्या व कौरवांच्या हातून सुटणाऱ्या दिव्यास्त्रांच्या प्रभावानें माझे डोळे दिपून गेले आहेत व रक्त, मांस व चरबी यांचा दर्प माझ्या नाकामध्यें भरून राहिला आहे. वीरांच्या गदाप्रहारांनीं, शंखांच्या शब्दांनीं, शूरांच्या सिंहनादांनीं व हत्तींच्या गर्जनांनीं आणि आपल्या गांडिवाच्या टणत्कारानें माझे कान बधिर झाले आहेत. आपण आलातचक्राप्रमाणें मंडल करून चारी दिशेला गांडीव ओढून बाण सोडीत असतां माझ्या डोळ्याला अंधेरी येऊन हृदय फाटतें. साक्षात् शंकराप्रमाणें खवळलेल्या आपल्या उग्र देहाकडे पाहून मला कांपरें सुटलें आहे. ही पायांखालची जमीन दरदरते आहे. चाबूक किंवा लगाम सांवरण्याची मला शक्ति नाहीं. ' हें त्याचें भाषण ऐकून अर्जुन त्याला धीर देऊन म्हणाला, ' नरश्रेष्ठा, तूंही रणामध्यें अचाट कृत्यें केलीं आहेस. राजपुत्र असून तुझा जन्म प्रसिद्ध मत्स्यकुलामध्यें झाला आहे. तेव्हां असा भिऊन धीर सोडूं नकोस. जरा माझे घोडे सांवरून मी युद्ध करतांना आज माझ्या दिव्यास्त्रांचा प्रयोग तर पहा. ह्या सर्व जमलेल्या शत्रूंना मी उजव्या हातानें बाण सोडतों किंवा डाव्या हातानें सोडतों हें कळूं न देतां थक्क करून सोडतों ! रक्तरूपी जलानें तुडुंबलेली रथरूपी भोंवरें व हत्ती हेंच जिच्यांत सुसरी आहेत अशी परलोकवाहिनी अगाध नदी मी आज निर्माण करतों पहा. हात, पाय, मुंडकें, पाठ ह्याच ज्याच्या असंख्य व दाट शाखा आहेत अशा कौरववनाचा अणकुचीदार बाणांनीं, अग्नी ज्याप्रमाणें हजारों वाटांनीं वनामध्यें शिरून त्याचा फडशा उडाविती, त्याप्रमाणें फडशा उडाविते. हें सर्व सैन्य चक्रांत घालून फिरावयालाच लावलें आहे कीं काय असें तुला वाटेल. धनुर्विद्येमध्यें मला मिळालेलें उत्तम शिक्षण आज तुझ्या दृष्टीस पडेल. कसाही प्रसंग आला तरी न डगमगतां रथावर स्वस्थ ऐस. आकाशाला जाऊन भिडलेला पर्वत देखील मी आपल्या बाणानें फोडून काढीन. देवेंद्राच्या आज्ञेनें पूर्वी मीं युद्धांत हजारों पौर व कालखंज दैत्य मारले आहेत. इंद्रापासून दृढमुष्टि, ब्रह्मदेवापासून हस्तलाघव व प्रजापतीपासून विकट प्रसंगीं देखील दाखवावयाचें अचाट कृत्य ह्या गोष्टी मी शिकलों आहें. ध्वजरूपी झाडें, पायदळरूपी गवत व रथरूपी सिंह यांनीं भरलेलें हें कौरववन आज मी आपल्या अस्त्रतेजानें जाळून भस्म करतों. मी एकटा आज या सर्वांचा समाचार घेऊन यांना विरथ करतों. रुद्रादि देवांपासून मला मोठमोठीं अस्त्रें मिळालीं आहेत. तूं भिऊं नकोस ' याप्रमाणें धीर मिळाल्यावर भीष्मांनीं रक्षण केलेल्या त्या प्रचंड सैन्याच्या तुकडीमध्यें उत्तर शिरला. अर्जुनाला येतांना पाहून भीष्मांनींही न गडबडतां त्याला तोंड दिलें. जवळ जातांच अर्जुनानें त्याचा ध्वज उडवून खालीं पाडला. तेव्हां चित्रविचित्र माळा घातलेले धनुर्विद्येमध्यें विनीत दुःशासन. विकर्ण, दुःसह व विविंशति या चौघांनीं येऊन त्याला घेरलें. दुःशासनानें एका भल्लबाणानें उत्तराला जखमी करून दुसरा एक त्यानें अर्जुनाच्या वक्षस्थळावर सोडला. अर्जुनानें आपल्या गृध्रपक्ष लावलेल्या तीक्ष्ण बाणांनीं त्याचें सुवर्णविभूषित धनुष्य तोडून टाकलें. विकर्णानेंही नेमके जाऊन भिडणारे आपले तीक्ष्ण बाण अर्जुनावर सोडले.

परंतु यत्किंचित् न डगमगतां अर्जुनानें आपल्या बाणांनीं त्याचे घोडे मारून टाकले. त्याबरोबर अंगाला अनेक जखमा लागलेल्या त्या धृतराष्ट्रपुत्रांना त्यांच्या सेवकांनीं मागें नेलें. नंतर सर्व कौरवयोद्धे एकवटून अर्जुनाबरोबर युद्ध करूं लागले. अर्जुनानेंही न गडबडतां धुक्यांनीं ज्याप्रमाणें डोंगर झांकून टाकावा त्याप्रमाणें आपल्या बाणांनीं त्यांना झांकून टाकलें. मोठ्या वेगानें बाण सोडीत रणामध्यें फिरणारा तो अर्जुन शरद्ऋतूंतील दुपारच्या सूर्याप्रमाणें प्रखर भासत होता. रथी रथांसह, स्वार घोड्यांसह, व पायदळ जमिनीवरून सैरावैरा धांवत असतां त्यांचीं तांब्याचीं, रूप्याचीं व लोखंडाचीं कवचें अर्जुनाच्या बाणांनीं फुटून त्यांपासून खणखण अवाज निघत होता. बाण लागून मरून पडलेल्या हत्तींनीं, घोड्यांनीं व लोकांनीं भूमि झांकून गेली होती. गांडिवाचा टणत्कार करीत त्या रणभूमीवर अर्जुन जणूं काय नाचतच आहेसें दिसत होतें. तें अफाट सैन्य घाबरून जाऊन रणांगणांतून मागें फिरत असतां कुंडल व शिरस्त्राण असलेलीं शिरें व सुवर्णमाला, रणांत गळून पडत होतीं. तीं शिरें खालीं येत असतां आकाशांतून जणूं घोंड्यांचाच वर्षाव होत आहेसें वाटत होतें. याप्रमाणें आपलें रुद्रस्वरूप प्रगट करून घोर पराक्रम करणारा अर्जुन तेरा वर्षें आवरून धरलेला क्रोधाग्नि धृतराष्ट्रपुत्रांवर सोडीत रणांगणांतून फिरत होता. याप्रमाणें त्याचा तो पराक्रम पाहून थक्क झालेल्या योद्ध्यांना पळवून लावून शोणितजलानें पूर्ण, अस्थि व केशरूपी शेवाळ्यानें भरलेली, धनुष्यबाण हेच जिच्यामध्यें होडगीं आहेत, हत्ती व तीक्ष्ण आयुधें जिच्यामधील कासवादिजलचर प्राणी असून, चरबी, वसा व रक्त यांचा जिच्यामधून पाट वहात आहे, मौक्तिकहाररूपी लाटांनीं उचंबळलेली, मोठमोठे रथ हेच जिच्यामधले दीप आहेत, व शंख व दुंदुभि यांचा शब्द हाच जिचा घों घों आवाज आहे, अशी प्रलयकालीन घोर नदी निर्माण करून तो परत वळला. पुढें कृप, कर्ण, द्रोणप्रभृति योध्यांनीं त्या वीर्यशाली अर्जुनाला घेरून वर्षाऋतूंतील मेघाप्रमाणें त्यावर शरवर्षाव चालविला. तेव्हां अर्जुनानें हासून सूर्याप्रमाणें कांतिमान असें ऐंद्रास्त्र गांडीवाला जोडलें. व बाणरूप किरणांनीं रश्मिमान असा तो सूर्याप्रमाणें पुढें सरसावला व मेघमंडळामधील विद्युल्लतेप्रमाणें किंवा पर्वतावरील अग्नीप्रमाणें त्यानें आपल्या बाणांनीं कौरवांना दिपवून टाकिलें. ज्याप्रमाणें पर्ज्यन्यकाळीं बीज आकाशामध्यें चकाकून सर्व दिशा प्रकाशमान करते, तसा त्याच्या गांडिवाचा उजेड सर्वांना दिपवून सोडीत होता. हत्ती, रथी, वगैरे सर्व वेडे बनले; व हताश होऊन ते रणभूमीमधून परत फिरले व आपला प्राण कसा वाचणार या विवंचनेंत दशदिशेला धांवूं लागले. नंतर भारताचे पितामह सुवर्णविभूषित असें श्रेष्ठ धनुष्य घेऊन अर्जुनावर चालून आले, व त्यांनीं मर्मभेदी तीक्ष्ण बाण अर्जुनावर सोडले. तेव्हां तो सूर्योदयाच्या वेळच्या पर्वताप्रमाणें शोभत होता. शत्रूच्या सामर्थ्याचें कांहीं चालूं न देणाऱ्या अर्जुनानें पर्वत ज्याप्रमाणें पाऊस अंगावर घेतो त्याप्रमाणें मोठ्या प्रेमानें त्या बाणांचा परामर्श घेतला. भीष्मांनीं सोडलेले सर्पासारखे वेगवान बाण अर्जुनाच्या ध्वजावर येऊन पडून त्यावरील कांतिमान वानरांना व भूतांना लागले. तेव्हां चांगल्या पाणीदार भल्ल बाणांनें अर्जुनानें त्यांचें छत्र, ध्वज, शीघ्रगामी घोडे, पृष्ठरक्षक आणि सारथी यांना मारून पाडलें. भीष्माचार्यांना हें सहन न होऊन अर्जुनाला पूर्ण ओळखत असतांही अर्जुनावर त्यांनीं पुष्कळ दिव्यास्त्रें सोडण्यास सुरवात केली. परस्परांचे भल्लबाण आकाशांत परस्परांशीं भिडत असतां ते काजव्याप्रमाणें चमकत होते. उजव्या व डाव्या हातांनीं मोठ्या झपाट्यानें बाण सोडीत असतां अर्जुनाचें गांडिव फिरणाऱ्या आलातचक्राप्रमाणें दिसत होतें. अर्जुनानें आपल्या बाणांनीं भीष्मांना झांकून टाकलें असतां वाहून चाललेल्या तीराप्रमाणें भीष्म त्यांना आपल्या बाणांनीं तोडून परत पाठवीत होते व ते उलटून अर्जुनाच्या रथावर जाऊन पडत होते. टोळधाडाप्रमाणें येऊन पडणारे अर्जुनाचे बाण भीष्म आपल्या तीक्ष्ण बाणांनीं उडवून देत असतां कौरवसेनेमध्यें 'शाबास, शाबास ! भीष्माचार्य ह्मणूनच अर्जुनाशीं टिकले ! अर्जुन पराक्रमी, तरुण, हुशार व चलाख आहे तेव्हां रणामध्यें त्याच्यापुढें यांच्या शिवाय कोण टिक-

णार ? ' असा स्तुतिवाद ऐकूं येत होता. परस्परांच्या अस्त्रांचें निवारण करीत जणूं काय त्या रणभूमीवर क्रीडाच करीत आहेत असे ते विक्रमशाली भरतर्षभ सर्व प्रेक्षकांना थक्क करून सोडीत होते. प्राजापत्य, ऐन्द्र, आग्नेय, रौद्र, कौबेर, वारुण, वायव्य इत्यादि महान् महान् अस्त्रांचा प्रयोग करीत ते संग्रामभूमींतून संचार करीत होते. त्यांचें अस्त्रयुद्ध संपल्यावर ते एकमेकांवर बाण सोडूं लागले. अर्जुनानें जवळ जाऊन भीष्माचार्यांचें सुवर्ण धनुष्य आपल्या तीक्ष्ण बाणानें तोडून टाकलें. एका निमिषांत दुसरें धनुष्य घेऊन सज्ज करून भीष्माचार्यांनीं खवळून अर्जुनावर बाणवृष्टि करण्याचा झपाटा चालविला. दिव्यास्त्रांचें पूर्ण ज्ञान असणारे ते दोघे एकमेकांवर प्रखर बाण सोडीत असतां त्या दोघांमध्यें कमीजास्तीपणा मुळीं दिसून येत नव्हता. ते दोघेही परस्परांला भारी होते. शत्रूचा शेष न ठेवूं इच्छिणारे गांडिवापासून सुटलेले अर्जुनाचे बाण आकाशांत भिडले असतां हंसाच्या पंक्तीप्रमाणें दिसत होते. तें अर्जुनाचें दिव्यास्त्रकौशल्य आकाशामधून देव, गंधर्व मोठ्या कौतुकानें पहात होते. दुपारचे वेळीं रखरखीत प्रकाशणाऱ्या आकाशांतील सूर्याप्रमाणें त्या भीष्मार्जुनांवर लोकांचे डोळे ठरेनात. दोघेही अलौकिक कर्म करणारे असल्यामुळें इकडे अर्जुनाचे बाण सुटत असतां त्याला न जुमानतां भीष्माचार्यांनीं त्याच्या डाव्या कुशींत बाण मारला. याप्रमाणें ते आपली शिकस्त करीत असतां अर्जुनानें त्यांच्या वक्षस्थळावर दहा बाण मारून त्यांना घायाळ केलें, त्यांनीं जेर येऊन युद्धामध्यें कोणाला हार न जाणारे भीष्माचार्य कांहीं वेळ रथाचा दांडा धरून स्वस्थ होते. याप्रमाणें त्यांना बेसावध पाहून त्यांच्या सारथ्यानें सारथीधर्माला अनुसरून त्यांना एकीकडे नेलें. भीष्म याप्रमाणें रणांतून परतल्यावर दुर्योधन ध्वज फडकावीत हातांत धनुष्य घेऊन गर्जना करीत अर्जुनावर चालून आला, व अतुल वीर्यशाली धनुर्धरश्रेष्ठ अर्जुन शत्रुसैन्यांत फिरत असतां धनुष्य आकर्ण ओढून भल्लबाण त्यानें त्याच्या कपाळावर सोडला. तो बाण कपाळांत शिरला असतां तो अतुल पराक्रमी अर्जुन एकशृंगयुक्त अशा पर्वताप्रमाणें शोभत होता. बाणानें फुटलेल्या याच्या कपाळांतून उष्ण रक्ताच्या चिळकांड्या लागल्या होत्या; व त्याचें कपाळ फोडणाऱ्या त्या बाणालाही एक प्रकारची विशेषच शोभा आली होती. पार्थाला दुर्योधन व दुर्योधनाला पार्थ असे ते परस्परांशीं टक्कर देणारे आजमीढ कुलांतील दोघे वीर एकमेकांवर मोठ्या त्वेषानें चाल करीत असतां आपल्यावर चालून येणाऱ्या एका हत्तीच्या गंडस्थळाच्या मधोमध अर्जुनानें मोठा लोखंडी बाण सोडला. तेव्हां इंद्रानें सोडलेल्या वज्रानें ज्याप्रमाणें पर्वताचें शिखर फोडावें त्याप्रमाणें तो पिसापर्यंत आंत शिरला. याप्रमाणें घायाळ झालेला तो हत्ती चीं चीं करीत खालीं पडला. तेव्हां विकर्ण धावरून जाऊन त्यावरून एकदम खालीं उतरला व विवंशतीच्या रथावर जाऊन बसला. इकडे अर्जुनानें तशाच प्रकारचा आणखी एक बाण सोडून दुर्योधनाचें वक्षस्थळ फोडलें तेव्हां आपला रथ परत फिरवून दुर्योधन रणांतून रक्त ओकत झपाट्यानें परतला असतां धनुष्याचा टणत्कार करीत अर्जुन त्याला म्हणाला; ' कीर्ति व यश टाकून रणांतून असा पळ कां काढतोस ? तुझीं तीं जयसूचक वाद्यें कोठें वाजत नाहींत ? राज्यभ्रष्ट केलेल्या त्या युधिष्ठिराचा आज्ञानुकारी हा तिसरा पार्थ सामन्याला उभा आहे मागें वळून जरा तोंड तरी दाखीव. आपल्या मागील छतीवर नजर फेक. तुझें दुर्योधन हें नांव व्यर्थ आहेसें मला दिसतें. रण सोडून पळून जाणाऱ्या तुझी दुर्योधनता मला कोठें दिसत नाहीं ? मागें पुढें कोणी तुझें रक्षण करणारें दिसत नाहीं. म्हणून पळ काढून कसा तरी आपल्या आवडत्या प्राणांचा बचाव करून घे. ' मस्त हत्तीला ज्याप्रमाणें अंकुशानें मागें वळवावें त्याप्रमाणें अर्जुनानें असें वाग कुशानें टोचलें असतां साप ज्याप्रमाणें पाय वर पडला असतां चवताळून परत फिरतो त्याप्रमाणें दुर्योधन परत फिरला. तेव्हां जखमांनीं घायाळ झालेल्या त्याला थांबवून उत्तरेच्या बाजूनें कर्ण अर्जुनावर चालून आला. भीष्मही पश्चिमेच्या बाजूनें धावून आले व द्रोणादि दुसरे वीरही दुर्योधनाचें संरक्षण करण्याकरितां परतले. महापुराप्रमाणें ती सेना आपल्यावर लोटतांना पाहून सूर्य ज्याप्रमाणें मेघाला तापवितो तसें अर्जुनानें त्यांना हाय हाय करावयाला लावून

कोणाला निवारण करतां येणार नाहीं असें संमोहन अस्त्र त्यांवर सोडलें.तेव्हां सर्वांची प्रचंड धनुष्यें गळून पडून ते स्तब्ध झाले. याप्रमाणें त्यांना मूढ बनलेले पाहून उत्तरेच्या भाषणाची आठवण होऊन 'कौरवसैन्यांत शिरून द्रोणाचार्य व कृपाचार्य यांचीं पांढरीं वस्त्रें, कर्णाचें दिव्य असें पिंवळें वस्त्र, व अश्वत्थामा व दुर्योधन यांचीं निळीं वस्त्रें जाऊन हरण करून घेऊन ये,' ह्मणून अर्जुनानें उत्तराला सांगितलें. **संमोहन अस्त्राचा प्रतिकार भीष्मांना माहीत असल्यामुळें** त्यांची संज्ञा गेली नव्हती ह्मणून त्यांना डावी घालून कौरवसेनेमध्यें शिरण्यास त्यानें उत्तराला सूचना दिली. नंतर उत्तर लगाम खालीं ठेवून रथांतून चटकन् खालीं उतरला व कौरवांचीं वस्त्रें हरण करून फिरून रथावर येऊन बसला. नंतर सोन्याचें खोगीर घातलेल्या आपल्या घोड्यांना चुचकारून ध्वज फडकावीत कौरवसेनेमधून तो अर्जुनासह परतला. शुद्धीवर आल्यावर कौरवसैन्यांतून पार बाहेर निघालेल्या अर्जुनाला पाहून 'आपल्या तावडींतून सुटणार नाहीं, अशा रीतीनें याला घेरून सोडा,' असें दुर्योधन ह्मणाला असतां भीष्म हासून ह्मणाले, 'ज्यावेळीं आपापलीं धनुष्यें टाकून देऊन चित्रासारखे स्तब्ध उभे होतां तेव्हां ही बुद्धि कोठें गेली होती किंवा तुझा पराक्रम कोठें दडला होता? पार्थाच्या हातून एकादें निंद्य कृत्य कधीं घडावयाचें नाहीं किंवा त्याच्या मनामध्यें पापही कधीं यावयाचें नाहीं व त्रैलोक्यासाठीं सुद्धां तो कधीं धर्म सोडणार नाहीं ह्मणूनच त्यानें तुह्मांला ठार केलें नाहीं. आतां लवकर कुरुदेशाची वाट धरा. अर्जुनाला गाई घेऊन परत जाऊं दे. अशा वेडगळ नादाला लागून स्वार्थाला मुकूं नकोस. परिणामीं सुखावह अशाच गोष्टी मनुष्यानें कराव्या.' हें भीष्माचार्यांचें भाषण ऐकून तो क्रोधनशील दुर्योधन हताश होऊन दीर्घोच्छ्वास टाकून गप्प बसला.तें भीष्माचार्यांचें हिताचें भाषण ऐकून व धनंजयरूपी अग्नि पेटलेला पाहून सर्व कौरव योध्यांना देखील दुर्योधनाच्या हितासाठीं परत फिरणेंच बरें वाटूं लागलें. त्यांना परत फिरतांना पाहून भीष्माचार्यादि मान्यांना शरांनीं अभिवादन करून व दुर्योधनाचा मुकुट फोडून आपल्या देवदत्त शंखाच्या शब्दानें शत्रूंना गर्भगळीत करून सोडीत अर्जुन विराटनगरीकडे परतला. धार्तराष्ट्रांचा मोड होऊन ते परत गेले असतां भयानें घाबरलेले, मुक्तकेश, व परदेशांत सांपडून भुकेनें व तहानेनें व्याकुळ झालेले कौरवसैनिक निबिड वनांतून बाहेर पडून 'आह्मांला काय आज्ञा आहे,' ह्मणून भीत भीत अर्जुनापुढें हात जोडून उभे राहिले. **'तुह्मी खुशाल परत जा. मनामध्यें भीति मुळीं बाळगूं नका.मी संकटांत सांपडलेल्यांना कधीं पीडा देत नसून उलट त्यांना धीर देत असतों.'** असें अर्जुनाचें अभयवचन ऐकून 'आपण दीर्घायु व्हा, आपल्याला कीर्ति व यश मिळोत,' असे अभिनंदनपर आशीर्वाद देऊन ते कुरुदेशाला निघाले. इकडे अर्जुन उत्तराला ह्मणाला, 'तुझ्या पित्याच्या आश्रयाला पांडव रहात आहेत हें एक तुलाच कळलें आहे. ह्मणून नगरांत गेल्यावर पित्यापाशीं याचा परिस्फोट करूं नकोस. नाहीं तर मत्स्यराज घाबरून जाऊन कदाचित् त्याच्या प्राणावरही प्रसंग गुदरेल. हें सर्व कृत्य तुझ्या हातूनच घडलें असें तूं पित्याला सांग.' हें ऐकून उत्तर ह्मणाला, 'आपल्या हातून घडलेलें हें कृत्य दुसऱ्याच्या हातून घडणें शक्य नाहीं. मी तें करण्याला अगदीं असमर्थ आहें. तरी आपली इच्छा असेल तर मी तातांना आपलें नांव सांगणार नाहीं.' बाणांनीं जखमा लागलेले ते वीर गोधन परत मिळवून याप्रमाणें बोलत बोलत शमीवृक्षाजवळ येऊन उभे राहिले. ते वेळीं अग्नीसारखा तो कपिश्रेष्ठ सर्व भूतांसहवर्तमान आकाशामध्यें उडून गेला व इतर मायेचाही तोच प्रकार होऊन उत्तराच्या रथावर पूर्ववत् सिंहाकृति ध्वज फडकूं लागला. युद्धांत यश देणारें तें गांडीव, भाते व बाण जागच्या जागीं ठेवून अर्जुनसारथ्यासह उत्तर मोठ्या आनंदानें आपल्या नगराकडे वळला. अर्जुनानें फिरून वेणी बांधून लगाम हातांत धरला. चालतां चालतां अर्जुन ह्मणाला, 'उत्तरा, गोपालांसह परत आणलेला गोसमुदाय कसा दमला आहे पहा. घोड्यांना पाणी पाजून घुसून विसावा देऊन मग आपण दुपारच्या वेळीं नगरांत शिरूं. तूर्त

त्या गोपालांना नगरांत जाऊन जयाची बातमी देऊन जयघोष सुरूं करण्यास आज्ञा दे.'

इकडे सेनानी विराट युद्धांत त्रिगर्तांना जिंकून चार पांडवांसह गोधन परत मिळवून नगराला परत आला होता. सुहृदांच्या मनाचा आनंद वाढविणारा तो वीर सिंहासनारूढ झाल्यावर पांडवांसह शत्रुतापन योद्ध्यांनीं व प्रधानमंडळांनीं त्याचा जयजयकार केल्यावर विराटानें त्यांना निरोप देऊन उत्तर कोठें आहे म्हणून विचारलें; तेव्हां वाड्यांतील स्त्रिया व मुली म्हणाल्या, 'कौरवांनीं गाई हरण केल्या हें ऐकून खवळून जाऊन तो एकटाच बृहन्नलेला घेऊन मोठ्या धैर्यानें त्यांना जिंकण्याकरितां गेला आहे.' याप्रमाणें भीष्मद्रोणादिमहावीरांना जिंकण्याकरितां बृहन्नलेला घेऊन आपला मुलगा एकटाच गेला आहे असें ऐकून राजाला फार काळजी लागली. म्हणून त्रिगर्तांच्या युद्धामध्यें ज्यांना जखमा झाल्या नव्हत्या अशा चतुरंग सैन्याला त्यानें आपल्या मुलाच्या साहाय्याला धाडून 'त्याच्या षंढ सारथ्याची जिवंत असण्याची मुळीं आशा नसल्यानें मुलाची तरी कुशल वार्ता लवकर घेऊन या,' म्हणून त्यानें त्याला आज्ञा केली. याप्रमाणें विराट घाबरलेला पाहून धर्मराज हासून म्हणाला, 'हे राजा, बृहन्नला जर सारथी होऊन गेला असेल तर तुझ्या गाई हरण करून नेण्याची शत्रूची छाती नाहीं. तुझ्या मुलाला तो सारथी मिळाल्यावर राजांनाच काय, परंतु देव, असुर व यक्ष यांना देखील जिंकण्याला तो समर्थ होईल.' इकडे उत्तरानें पाठविलेले शीघ्रगामी दूत नगरांत येऊन त्यांनीं राजाला जयाची बातमी कळविली. तेव्हां धर्मराज म्हणाला, 'कौरवांना पळवून गाई परत आणण्यामध्यें मला आश्चर्य कांहींच वाटत नाहीं. तुझ्या मुलानें कौरवांना जिंकलें यांत नवल तें काय ? ज्याचा सारथी बृहन्नला आहे त्याला जय हा ठेवलेलाच.' हा आपल्या मुलाचा विजय झालेला ऐकून विराटाच्या अंगावर हर्षरोमांच उभे राहिले व ती बातमी घेऊन येणाऱ्या दूतांना वस्त्रें देऊन तो मंत्र्यांना म्हणाला, 'राजमार्गावर गुढ्या उभ्या करा. सर्व कुमार, योद्धे, व गणिका उत्तम उत्तम अलंकार करून अनेक वाद्यांसह माझ्या मुलाला सामोरे जाऊं देत. एका मनुष्याला मस्त अशा हत्तीवर बसून चवाट्यांच्या जागीं हा जयाचा दांडोरा पिटूं या. अनेक मुलींसह उत्तरा उत्तम उत्तम शृंगार करून वस्त्राभरणें घालून माझ्या मुलाला सामोरी जाऊं दे.' ही राजाज्ञा ऐकून नगरांतील लोक मांगलिक घेऊन नौबदी, तुताऱ्या, शंख, उत्तम शृंगारलेल्या स्त्रिया, नांदी म्हणणारे भाट इत्यादिकांसह उत्तराला सामोरे निघाले. याप्रमाणें सर्व व्यवस्था करून मोठ्या उत्साहानें विराटानें सैरंध्रीला फासे आणावयाला सांगून कंकाला द्यूत सुरू करण्यास सांगितलें. तेव्हां युधिष्ठिर म्हणाला, 'अत्यानंद झालेल्या मनुष्यानें द्यूत खेळूं नये. म्हणून आज मला आपल्याबरोबर द्यूत खेळावेंसें वाटत नाहीं. पांडुपुत्र युधिष्ठिरानें आपलें मोठें राज्य द्यूतांत घालविलें हें आपण ऐकलेंच असेल. तरी आपली मर्जी मात्र मला मोडतां येत नाहीं.' असें म्हणून त्यानें द्यूत सुरू केलें. तें चाललें असतां आज युद्धामध्यें माझ्या मुलानें अशा अशा प्रकारच्या मोठमोठ्या कौरवयोध्यांना जिंकलें म्हणून विराट फुशारकी मारीत असतां युधिष्ठिर म्हणाला, 'बृहन्नला ज्याला सारथी म्हणून मिळाला तो युद्धामध्यें काय करणार नाहीं ?' हें त्याचें भाषण ऐकून राजाला फार राग येऊन तो म्हणाला, 'नीच ब्राह्मणा, माझ्या मुलाबरोबर त्या षंढाची स्तुति करतोस अं ! कोठें काय बोलावें, काय न बोलावें हें सुद्धां तुला कळत नाहीं? भीष्मद्रोणादिकांची माझ्या मुलापुढें काय मोठी बिशाद आहे ? तुझ्या वयाकडे पाहूनच मी या अपराधाची क्षमा करतों. जिवाची पर्वा असेल तर असें भाषण फिरून करूं नकोस.' युधिष्ठिर म्हणाला, 'ज्या ठिकाणीं भीष्म, द्रोण, अश्वत्थामा, कर्ण असे मोठमोठे वीर जमले आहेत त्या ठिकाणीं बृहन्नलेशिवाय दुसरा कोण मग तो सर्व देवांनिशीं प्रत्यक्ष इंद्र असला तरी टिकाव धरणार ? याच्या बाहुबलाची बरोबरी करणारा आजपर्यंत झाला नाहीं व पुढें होणार नाहीं. रणभूमि पाहिल्याबरोबर ज्याच्या हृदयांत आनंदाच्या उकळ्या फुटतात अशाचें साहाय्य मिळाल्यावर आपला पुत्र प्रत्यक्ष देवांना देखील कां जिंकणार नाहीं ?' हे ऐकून विराट म्हणाला, 'असें अभद्र बोलूं नकोस

ह्मणून अनेकवार सांगत असतां तूं आपलें तोंड आवरीत नाहींस, शास्ता नसेल तर कोणी सरळ वागणार नाहीं. ' असें ह्मणून राजानें रागानें त्याच्या तोंडावर फासा फेंकला. तो जोरानें लागल्यामुळें युधिष्ठिराच्या नाकांतून रक्त वाहूं लागलें. त्या रक्ताला जमिनीवर पडूं न देतां आपल्या हातांत धरून युधिष्ठिरानें आपल्या पाठीमागें उभी असलेल्या द्रौपदीकडे पाहिलें. त्या पतिव्रतेनें त्याचा अभिप्राय जाणून जलपूर्ण सुवर्णपात्र घेऊन त्यामध्यें तें नाकांतून गळणारें रक्त धरलें. इतक्यांत मंगलदायक नानाप्रकारचीं फुलें ज्याच्यावर उधळलीं जात आहेत असा उत्तर आनंदानें नगरामध्यें शिरून पौरजनांचा जयजयकार घेत वाड्यापुढें येऊन दाखल झाला. बृहन्नलेसह पुत्र द्वारामध्यें आल्याची वर्दी द्वारपालांनीं दिल्याबरोबर विराटानें, मोठ्या आनंदानें त्या दोघांना त्यांना भेटण्याला आतुर झाला असल्यामुळें आंत घेऊन येण्यास सांगितलें. परंतु ' उत्तराला एकट्यालाच घेऊन ये. बृहन्नलेला आणूं नकोस. माझ्या अंगावर युद्धाखेरीज इतर प्रसंगीं जो कोणी रक्त काढील त्याला जिवंत ठेवावयाचें नाहीं असें त्याचें व्रत असून तो रागावला ह्मणजे कोणाला क्षमा करणार नाहीं, विराटाची सुद्धां तो पर्वा करणारा नव्हे, ' असें युधिष्ठिरानें सारथ्याच्या कानांत सांगितलें. नंतर उत्तर आंत शिरून त्यानें पित्याला अभिवादन केलें; व कंकाला नमस्कार करून त्याला रक्तबंबाळ झालेला पाहून ' यांचा कोणी अपराध केला, हें पापकृत्य कोणीं केलें, ' ह्मणून कावऱ्याबावऱ्यानें त्यानें पित्याला विचारलें. विराट ह्मणाला, ' मींच ह्या अभद्र बोलणाऱ्याला शिक्षा केली. तुझ्यासारख्या शूराच्या स्तुतीबरोबर त्या षंढाची यानें स्तुति चालविली होती.' उत्तर ह्मणाला, 'तात, आपण हें फार वाईट केलें. यांना लवकर प्रसन्न करून घ्या, नाहीं तर हे घोर ब्रह्मविष आपल्याला समूळ जाळून टाकील!' हें पुत्राचें भाषण ऐकून भस्मामध्यें झांकून ठेवलेल्या अग्नीसारख्या त्या युधिष्ठिराचें राष्ट्राची वृद्धि इच्छिणाऱ्या विराटानें शांतवन केलें. तेव्हां युधिष्ठिर ह्मणाला, ' राजा मीं तुला केव्हांच क्षमा केली आहे. मला राग मुळीं माहीत नाहीं. माझ्या नाकांतून गळणारें रक्त जर जमिनीवर पडलें असतें तर सर्व राष्ट्रासहवर्तमान तुझा नाश झाला असता. राजा, मला निरपराध्याला शिक्षा केल्याबद्दल मी तुला बिलकुल दोष देत नाहीं. **कारण प्रभुत्व आणि बल यांची सांगड जुळली कीं दुष्ट कृत्य करण्याकडे प्रवृत्ति व्हावयाचीच.** ' रक्त बंद झाल्यावर बृहन्नला आंत शिरून विराटाला अभिवादन करून कंकापुढें हात जोडून उभी राहिली. तेव्हां तिच्यापुढें रणांतून आलेल्या आपल्या मुलाची विराटानें प्रशंसा चालविली. तो ह्मणाला, ' कैकयीच्या आनंदवर्धना, तुझ्यामुळेंच आज मी पुत्रवान झालों. तुझ्यासारखा पुत्र मिळणें दुर्मिळ. एकाच वेळीं हजारों नेम धरून त्यांतला एकही नेम ज्याचा चुकत नाहीं अशा त्या कर्णाशीं तूं कसें युद्ध केलेंस ? त्याचप्रमाणें त्या सर्व भूलोकामध्यें ज्यांच्या तोडीचा कोणी नाहीं अशा भीष्मांशीं व जे सर्व वृष्णी व कौरव यांचे गुरू आहेत त्या सर्व शस्त्रधरांमध्यें श्रेष्ठ द्रोणांशीं, त्या जगविख्यात अश्वत्थाम्याशीं, तसेंच, हतवित्तवणिजाप्रमाणें शत्रू ज्यापुढें खचून जातात अशा कृपांशीं व पर्वतालासुद्धां फोडण्याची ज्याची शक्ति आहे अशा त्या दुर्योधनाशीं, बा वत्सा, तुझा युद्धप्रसंग कसा काय झाला ? ज्याअर्थीं कौरवांनीं गिळून टाकलेलें माझें गोधन तूं परत आणलें आहेस त्याअर्थीं माझे शत्रू आज भग्नाश झाले आहेत ! वारासुद्धां कसा आज सुखावह वहात आहे पहा! वाघानें ज्याप्रमाणें आमिष हरण करावें त्याप्रमाणें तूं आज गोधन त्यांच्या हातून परत आणलें आहेस. ' उत्तर ह्मणाला, ' तात, गोधन मीं परत मिळविलें नाहीं किंवा शत्रूंना जेरही मीं केलें नाहीं. तें सर्व कृत्य एका देवपुत्रानें मजकरितां केलें. मी भिऊन पळत असतां मला त्यानें मागें परतविलें व वज्रासारखें कठिण कवच चढविलेला तो माझ्या रथावर येऊन बसला. त्यानें ह्या गाई परत मिळविल्या व कौरवांचा मोड केला. दुर्योधनाचा पाडाव होऊन तो गर्भगळित झाला असतां त्याला तो शक्तिमान वीर ह्मणाला, ' हास्तिनापुरामध्यें आतां तुला आस्रा मिळेल असें मला वाटत नाहीं; कोठें तरी रानोमाळ हिंडून आपल्या जिवाचें र-

क्षण कर. कोठेंही पळालास तरी तूं माझ्या तावडींतून सुटणार नाहींस. ह्मणून आतां युद्ध करण्याचाच निश्चय कर. त्यांत तुला जय मिळेल तर पृथ्वीचा उपभोग वेशील. मेलास तर स्वर्गसुख भोगशील. त्या एकट्यानें सहा कौरव महारथांना जिंकलें.' हें ऐकून विराट ह्मणाला, 'तो महायशस्वी देवपुत्र आहे कोठें ? त्याचें दर्शन घेऊन त्याचा मी गौरव करूं इच्छितों.' उत्तर ह्मणाला, 'तो अंतर्धान पावला. उद्यां अगर परवां तो आपल्याला भेट देईल.' याप्रमाणें वेषांतरामध्यें झांकून तेथें असून अर्जुन विराटाला उमगला नाहीं. युद्धांतून आणलेलीं वस्त्रें स्वतः त्यानें उत्तरेच्या हवालीं केलीं. व उत्तराच्या सल्लयानें युधिष्ठिरासंबंधानें पुढें काय काय करावयाचें तें ठरवून ठेवलें.

१२४ उत्तराअभिमन्युविवाह.

(४. ७०-८४)

नंतर तिसरे दिवशीं पांच पांडव स्नान करून पांढरीं शुभ्र वस्त्रें नेसून वतोयापनादि मंगल कार्यें आटोल्यावर उत्तम वस्त्राभरणें अंगावर घालून मत्तगजांप्रमाणें विराट सभेमध्यें शिरले व स्थंडीलाच्या ठिकाणीं विराजमान होणाऱ्या अग्नीप्रमाणें राजासनावर जाऊन बसले. ते तेथें बसले असतां राजकीय कामें पाहण्याकरितां विराट सभेमध्यें आला व श्रीमान अशा पांडवांना राजासनावर बसलेले पाहून किंचित् रागावल्यासारखा होऊन, देवगणांनीं वेष्टित अशा देवेंद्राप्रमाणें शोभणाऱ्या कंकाला तो ह्मणाला, 'अक्षद्यूतामध्यें निपुण असल्यामुळें तुला मी सभासद ह्मणून ठेऊन घेतलें तो तूं आज राजासनावर चढून बसलास ! हें विराटाचें भाषण ऐकून अर्जुन हासत हासत ह्मणाला, 'राजा, जे इंद्राच्या अर्धासनावर बसण्याला पात्र आहेत असे हे ब्राह्मणप्रिय, बहुश्रुत, दानशूर, यज्ञशील, महाव्रत, दूरदर्शी, महातेजस्वी, पौरजनप्रिय, सत्यवाक्, जितेंद्रिय, मूर्तिमान धर्म आहेत. बुद्धीनें यांच्या तोडीचा कोणी नसून तपाचे हे भांडार आहेत. यांना नानाप्रकारच्या अस्त्रांचें ज्ञान असून त्रैलोक्यामध्यें यांच्यासारखा कोणी ज्ञाता नाहीं व पुढेंही होणार नाहीं. उदय पावलेल्या सूर्यकिरणांप्रमाणें यांच्या कीर्तींचीं किरणें सर्व जगतावर पसरलीं आहेत. कुरुदेशामध्यें असतांना दहा हजार शीघ्रगामी हत्ती व सोन्याच्या उत्तम मालांनीं मंडित असे असंख्य घोडे जुंपलेले तीस हजार रथ, हे बाहेर निघाले असतां यांच्या बरोबर असत. ज्याप्रमाणें स्तुतिपाठक इंद्राचा स्तुतिपाठ करतात त्याप्रमाणें रत्नकुंडलधारी आठशें भाट यांचा स्तुतिपाठ गात असत. **स्वतंत्र असून परतंत्र** असणाऱ्या वैश्याप्रमाणें सर्व राजांकडून यांनीं करभार घेतले आहेत. अठ्याऐंशी हजार स्नातक ब्राह्मण यांच्या पदरीं असत. वृद्ध, अनाथ, पंगू व आंधळे अशांचें यांनीं पुत्राप्रमाणें पालन केलें आहे. ज्यांना ताप दिल्यामुळें कर्ण व शकुनि यांच्याबरोबर दुर्योधनाला लवकरच प्रायश्चित्त भोगावें लागणार आहे, ज्यांच्या गुणांचें वर्णन करणें शक्य नाहीं, असे हे राजर्षभ युधिष्ठिर राजाला योग्य अशा आसनावर बसण्याला कसें बरें पात्र नाहींत?' हें अर्जुनाचें भाषण ऐकून विराट ह्मणाला, 'हे जर कुंतीपुत्र युधिष्ठिर आहेत तर यांचे भीम वगैरे भाऊ कोठें आहेत ? तशीच यशस्विनी द्रौपदी कोठें आहे ? द्यूतांत त्यांना जिंकल्यापासून त्यांची कांहींच हकीकत मला कळली नाहीं.' यावर अर्जुन ह्मणाला, 'जो हा बल्लव ह्मणून आपल्या पदरीं आचारी आहे तोच हा पराक्रमी भीम. यानेंच सर्व कीचकांना मारलें. आपल्या घोड्यांच्या तबेल्यावर मुख्य असणारा हा नकूल व जो गुराख्यांचा नायक बनला आहे तो हा सहदेव. ही कमलपत्राक्षी सुमध्या चारुहासिनी सैरंध्री हीच द्रौपदी. हिच्यासाठींच कीचक मेले, व मीच अर्जुन. प्रजा ज्याप्रमाणें गर्भवासामध्यें सुखानें काळ काढते त्याप्रमाणें आपल्या आश्रयाखालीं आह्मी सुखांत राहिलों.' नंतर उत्तरानें अर्जुनाचा सर्व पराक्रम आपल्या पित्याला सांगितला. तो ह्मणाला, 'मृगांना मारणाऱ्या सिंहाप्रमाणें हेच शत्रुघाती अर्जुन शत्रूचा सप्पा उडवीत शत्रूसैन्यामध्यें फिरत होते. युद्धांत कौरवांना जिंकून गाई परत यांनींच मिळविल्या. यांच्याच शंखाच्या शब्दानें माझे कान बधिर झाले होते.' याप्रमाणें तें पुत्राचें स्तुतिपर भाषण ऐकून पांडवांना प्रसन्न करण्यासाठीं विराट ह्मणाला, 'मी-

ही युद्धांत शत्रूच्या तावडींत गेलों असतां या भीमानें मला व गाईंना सोडविलें. यांच्याच बाहुवीर्यानें युद्धांत आह्मी सर्व विजयी झालों. ' असें ह्मणून स्नेहपूर्वक पुत्राशीं विचार करून सर्व सैन्य व खजिना यांसह आपलें राज्य त्यानें युधिष्ठिराला देण्याचें ठरविलें; व त्या सर्वांचें मस्तक हुंगून त्यांना कितीही दृढालिंगन दिलें तरी त्याची तृप्ति न होतां मोठ्या प्रेमानें तो ह्मणाला, ' तुह्मी वनांतून खुशाल परत आला बरें ह्मालें व त्या दुष्ट कौरवांना न डगमगतां अज्ञातवास निर्विघ्नपणें काढलांत हेंही चांगलें ह्मालें. हें राज्य व जें कांहीं माझें ह्मणून आहे तें सर्व तुमचें आहे. निःशंक तुम्ही त्याचा स्वीकार करा. ही उत्तरा मीं अर्जुनाला देण्याचें ठरविलें आहे. कारण तोच तिला पति योग्य आहे.' हें विराटाचें प्रेमळ भाषण ऐकून धर्मराजानें अर्जुनाकडे पाहिलें. तेव्हां अर्जुन ह्मणाला, ' सून ह्मणून मी हिचा स्वीकार करण्याला तयार आहें. आपला परस्पर संबंध बावगा नाहीं. ' विराटानें विचारिलें, ' मी तुला ती बायको ह्मणून देत असतां सून ह्मणून कां घेतोस? ' अर्जुन ह्मणाला, **' मी नेहमीं अंतःपुरामध्यें आपल्या कन्येच्या दृष्टीसमोर रहात आलों आहें आणि गुप्त किंवा उघड गोष्टी हिनें बापाप्रमाणें निःशंकमनानें मजपाशीं सांगितल्या आहेत. नृत्य, गायन शिकविणाऱ्या गुरूप्रमाणें ती मला मानीत आली आहे. तर अशा वयांत आलेल्या हिच्याशीं एक वर्षभर मी एकत्र राहिलों असल्यानें आपल्याला व लोकांना संशयाला जागा उरूं नये**, ह्मणून मी सून ह्मणून हिला मागणी घालतों. ह्मणजे मी जितेंद्रिय व शुद्ध राहिल्याची चीज होऊन कोणालाच यापासून लोकापवादाची भीति नको. कृष्णाचा आवडता भाचा व सर्व अस्त्रांमध्यें निष्णात असा माझा पुत्र अभिमन्यु आपल्याला योग्य जावई असून आपल्या मुलीलाही तो योग्य वर आहे.' हें ऐकून विराट ह्मणाला, 'नित्य धर्मानें वागणाऱ्या तुझ्यासारख्या शहाण्याला हें भाषण उचितच आहे. तुला जसें बरें वाटेल तसें होऊं दे. आज अर्जुनासारखा संबंधी मला मिळाल्यानें माझ्या सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या असें मी समजतों. नंतर धर्मराजांनींही या संबंधाला आपली अनुमति दिल्यावर सर्व मित्र व आप्तवर्ग, त्याचप्रमाणें भगवान श्रीकृष्ण यांकडे विराटानें दूत पाठविले. अनर्तापासून दाशार्हांना आणविलें. काशिराज, शैब्य, त्याचप्रमाणें, यज्ञसेन, धृष्टद्युम्न, द्रौपदीचे मुलगे, शिखंडी इत्यादि पांडवांवर प्रेम करणारे महावीर आपल्या अक्षौहिणी सैन्यासह लग्नाला आले. त्याचप्रमाणें भगवान श्रीकृष्ण, बलराम, कृतवर्मा, हार्दिक्य, सात्यकि, सांब इत्यादि यादवमंडळी, सुभद्रा. व अभिमन्युसहवर्तमान दहा हजार हत्ती, एक लक्ष घोडे, एक कोटी रथ व एक निखर्व पायदळ घेऊन लग्नाला आले. कृष्णानें पांडवांना अहेर दिले. व स्त्रियांनींही सर्वांना वस्त्रें व अलंकार दिले. नंतर लग्नसमारंभ मोठ्या कडाक्यानें उडाला. विराटाच्या वाद्यामध्यें शंख, नगारे, संबळ, चौघडे, आडंबर इत्यादि वाद्यें लग्नसमारंभाच्या वेळीं वाजत होतीं. **लहान मोठे मृग व सहस्रावधी पवित्र** पशु यांचा वध चालला होता. **सुरा, मैरेय** इत्यादि पेयांची रेलचेल उडाली होती. गवई कथेकरी, नट, भाट इत्यादिकांची मजलस चालली होती. उत्तमोत्तम वस्त्रालंकार केलेल्या मत्स्यराजाच्या स्त्रिया सुदेष्णेला पुढें करून लग्नमंडपांत येऊन उत्तम वस्त्रालंकारांनीं विभूषित अशा इंद्रकन्येप्रमाणें दिसणाऱ्या उत्तरेला पुढें करून तिला पूर्ण घेरून उभ्या होत्या. अर्जुनानें त्या विराटतनयेला अभिमन्यूची बायको ह्मणून घेऊन विवाहविधि उरकल्यावर **सात हजार वायुगति घोडे व दोनशें हत्ती वधुधन ह्मणून विराटानें दिले. पेटलेल्या अग्नीमध्यें यथाविधि आहुती दिल्यावर** भगवान श्रीकृष्णांनीं आणलेली संपत्ति युधिष्ठिरानें ब्राह्मणांचा सत्कार करून त्यांना अर्पण केली. नंतर मनाला आल्हाद देणारे जेवणाखाणाचे प्रकार मोठ्या थाटानें उरकले. यावेळीं जिकडे तिकडे महोत्सव चालला असून त्या हृष्टपुष्ट नगराला अवर्णनीय शोभा आली.

५ उद्योगपर्व.

१२५ अज्ञातवासानंतर पांडवपक्षीयांचा पुढील कार्यक्रमासंबंधानें विचार. (५. १-६.)

अभिमन्यूचा विवाह उरकल्यावर कुरुवीर पांडव एकेदिवशीं प्रातःकाळीं उत्कृष्ट हिरेमाणकांनीं चित्रविचित्रित व विविध आसनें टाकून त्यावर सुवासिक पुष्पें पसरलेल्या विराट राजाच्या भव्य सभागृहामध्यें आप्तस्वकीय मिळून विचार करण्याकरितां बसले. वृद्ध व राजेलोकांना मान्य असे विराट व द्रुपद आपापल्या आसनावर बसल्यावर सात्यकि, बलराम, श्रीकृष्ण, युधिष्ठिर, दुसरे पांडव, धृष्टद्युम्न वीर्यामध्यें व बलामध्यें पित्यांच्या तोडीचे असे शूर पांडवपुत्र आसनावर दुतर्फा बसले. उत्तम वस्त्राभरणांनीं विराजमान ते महारथी याप्रमाणें आपापल्या आसनावर बसले असतां तेजस्वी ग्रहांनीं भरलेल्या अशा आकाशाप्रमाणें त्या सभेला शोभा आली. ते सर्व नरवीर नानाप्रकारच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी केल्यावर क्षणभर श्रीकृष्णाकडे पहात बसले. तेव्हां पांडवांच्या कामासाठीं जमविलेल्या त्या राजासिंहाच्या कानावर श्रीकृष्णानें महत्त्वाची अर्थसंपन्न व महाफलदायक अशी गोष्ट घातली. तो म्हणाला, 'कौरवांनीं ह्या युधिष्ठिराला कपटानें जिंकून याचें राज्य हरण करून याच्याबरोबर वनवासाचा पण केला. स्वसामर्थ्यानें सर्व पृथ्वी जिंकण्याला समर्थ असूनही केवळ सत्यासाठीं या श्रेष्ठ पांडुपुत्रांनीं तें उग्र व्रत तेरा वर्षं पाळलें. तेरावें तर कठीण वर्ष अज्ञातवासांत तुमच्याजवळच घालविलें. दुसऱ्याचे दास बनून आपलें वडिलार्जित राज्य मिळेल म्हणून या महात्म्यांनीं अनेक प्रकारचे असह्य क्लेश सोसले. हें सर्व तुम्हांला ठाऊकच आहे. अशी वस्तुस्थिति असतां धर्मराजाचें त्याचप्रमाणें दुर्योधनाचें ज्यानें हित होईल असा कांहीं योग्य, न्याय्य व कीर्तिवर्धक विचार काढा. अन्यायानें देवांचें आधिपत्यसुद्धां धर्मराज मिळवूं इच्छीत नाहीं. धर्म व अर्थ हीं साधून एखाद्या सामान्य गांवाचें स्वामित्व सुद्धां त्याला पुरे आहे. त्याचें वडिलोपार्जित राज्य धृतराष्ट्रपुत्रांनीं अन्यायानें कसें बळकाविलें व त्याला किती असह्य संकटें सोसावीं लागलीं हें तुम्हांला माहीत नाहीं असें नाहीं. या पार्थांना त्यांनीं रणांत बाहूंच्या पराक्रमानें जिंकलें नाहीं, तथापि हे त्यांचें वाईट इच्छीत नाहींत. जें या पांडवांनीं राजांना जिंकून मिळविलें आहे तेंच परत मिळावें अशी यांची इच्छा आहे. हे लहान असतां दुष्ट व क्रूर अशा यांच्या राज्यापहार करूं इच्छिणाऱ्या शत्रूंनीं नाना उपायांनीं यांना मारण्याची खटपट केली हेंही तुम्ही पूर्णपणें जाणतां. तेव्हां हा त्यांचा वाढत चाललेला लोभ, युधिष्ठिराची धर्मनिष्ठा व यांचा परस्पर संबंध लक्षांत घेऊन सर्व मिळून काय तो विचार करा. सत्याविषयीं दक्ष अशा या पांडवांनीं केलेला पण बरोबर पाळला असून आतां जर ते यांच्याशीं अन्यायानें वागूं लागतील तर त्या सर्व धृतराष्ट्रपुत्रांना हे खास ठार मारतील. त्यांनीं पाप मनांत आणलेलें ऐकून यांचे मित्र कदाचित् यांच्या भोंवतीं गोळा होतील आणि ते युद्ध करून यांना त्रास देऊं लागले असतां त्यांना मारतीलही. आतां हे संख्येनें थोडे असल्यामुळें यांना त्यांना जिंकतां येणार नाहीं असें तुम्हांला वाटत असेल, तर आपल्या सुहृदांसहवर्तमान त्यांचा नाश करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय मात्र हे राहणार नाहींत. तरी पण दुर्योधनाचा विचार कळल्याखेरीज पुढें काय करावयाचें हें तुम्हांलाही ठरवितां येणार नाहीं. म्हणून धर्मशील, शुचिर्भूत, कुलीन व कामाला योग्य असा एखादा उत्तम दूत या दोघांची समेट करून त्यांकडून अर्धें

राज्य युधिष्ठिराला देवविण्यासाठीं धृतराष्ट्राकडे प्रथम पाठवा.'

हें श्रीकृष्णाचें धर्मार्थाला धरून असणारें, निःपक्षपाती, मधुर भाषण ऐकून त्याची वाहवा करून बलराम ह्मणाला, 'तुह्मीं हें युधिष्ठिराला व दुर्योधनाला हितावह असणारें श्रीकृष्णाचें भाषण ऐकिलेंच. अर्धें राज्य सोडून देऊन अर्ध्याकरितां ह्यांचा हा यत्न आहे. तर तें अर्धें राज्य देऊन सुखी होऊन दुर्योधनानें आनंदांत नांदावें. अर्धें राज्य मिळून आपले प्रतिस्पर्धी आपल्याशीं योग्य वागूं लागले ह्मणजे हे पांडवही सुखानें स्वस्थ राहतील. व प्रजेचेंही कल्याण होईल. ह्मणून दुर्योधनाचा विचार काढून घेऊन व युधिष्ठिराचे विचार कळवून या दोघांमध्यें सख्य जुळविण्यासाठीं कोणी जाईल तर तें मलाही संमत आहे. त्यानें भीष्म, द्रोण, विदुर, शकुनि, कर्ण, व विशेषेंकरून बलानें श्रेष्ठ असे न्यायप्रिय जे दुसरे कांहीं धृतराष्ट्रपुत्र असतील त्यांना जमवून नम्रतेनें युधिष्ठिराचा हेतु ज्यानें सिद्धीस जाईल अशा रीतीनें बोलावें. कसाही प्रसंग आला असतां त्यांना यानें खवळूं नये. त्यांनीं आपल्या हिकमतीनें ती संपत्ति हरण केली आहे. विभवसंपन्न असून आप्तवर्ग नको नको ह्मणत असतां व द्यूताचें यत्किंचितही ज्ञान नसून त्यांत आसक्ति दाखवून यानें आपलें राज्य घालविलें; शिवाय कर्ण, दुर्योधन इत्यादि हजारों जुगारबाज, कीं ज्यांना याला सहज जिंकतां आलें असतें, तेथें असून यानें फाशामध्यें निपुण अशा शकुनीलाच आपल्याबरोबर द्यूताला बोलाविलें व वारंवार फासे उलट पडत असतांही अधिक अधिकच वेडा होऊन हा पण लावून खेळूं लागला व शकुनीनें याला जिकलें. यांत शकुनीचा अपराध तो कोणता? ह्मणून गोड शब्दानेंच दूतानें धृतराष्ट्राला बोलावें; ह्मणजे त्याला दुर्योधनाला ताळ्यावर आणतां येईल. जर कौरवांशीं युद्ध होऊं नये अशी तुमची इच्छा असेल तर दुर्योधनाशीं गोडीनेंच बोला. **सामानें साधलेला हेतु हितावह होतो तसा तो युद्धानें जिंकून साधला असतांही होत नाहीं.**'

बलराम असें बोलत असतां सात्यकि एकदम खवळून उठून त्याची निर्भर्त्सना करून ह्मणाला, 'मनुष्याचें हृदय जसें असतें तसें तो बोलत असतो. कांहीं शूर पुरुष असतात, व कांहीं भितरे असतात. ज्याप्रमाणें एकाच वृक्षावर फलसंपन्न व फलरहित अशा फांद्या दृष्टीस पडतात त्याचप्रमाणें एकाच कुलामध्यें वीर्यशाली व षंढ असे पुरुष जन्मलेले दृष्टीस पडतात. मला ह्या भाषणासंबंधानें कांहीं इतकें वाईट वाटत नाहीं; परंतु हें भाषण जे मुकाट्यानें ऐकत बसले आहेत त्यांच्यासंबंधानेंच मला फार वाईट वाटतें. धर्मराजाचा यत्किंचितही दोष काढणाराला निःशंकपणें या सभेमध्यें बोलण्याची मुभा मिळावी याचें मला आश्चर्य वाटतें. या भोळसर महात्म्याला फाशाचें यत्किंचित् ज्ञान नसतां बोलाबून अक्षधूर्तानीं जिंकिलें हा त्यांचा धर्मजय कसा ह्मणावा? जर युधिष्ठिर आपल्या घरीं खेळत असतां त्यांनीं जिंकलें असतें तर तें न्यायाचें ह्मणतां आलें असतें. क्षात्रधर्मामध्यें रत असणाऱ्या ह्या राजाला बोलाबून कपटानें त्यांनीं जिंकलें यांत त्यांनीं मोठें नांवाजण्यासारखें तें काय केलें? वनवासांतून मुक्त होऊन वडिलोपार्जित राज्य यानें न्यायानें फिरून मिळविलें आहे तर आतां यानें आणखी त्यांच्यापुढें तोंड कां वेंगावें? यदा कदाचित् पापानें द्रव्य मिळविण्याचें जरी यानें मनांत आणलें तरी हा शत्रूपुढें कधीं तोंड पसरणार नाहीं! पांडवांनीं वनवास संपविला असतां अज्ञातवासांतच ओळखले गेले असें जे ह्मणतात त्यांना न्यायानें वागणारे कसे ह्मणावे? व ते राज्यापहार करणारे कसे नव्हत? भीष्म, द्रोण व विदुर यांनीं गोडीगुलाबीनें सांगून जर पांडवांचें वडिलोपार्जित द्रव्य यांना देण्याला ते तयार न होतील तर त्यांना मी रणामध्यें तीक्ष्ण बाणांनीं मऊ आणून युधिष्ठिराच्या पायांवर नाक घासावयाला लावीन व तसें करण्याला ते तयार न होतील तर आपल्या आमात्यवर्गासह यमसदनाची त्यांना वाट दाखवीन. गांडिवधन्वा अर्जुन, चक्रायुध श्रीकृष्ण, कोणाला हार न जाणारा भीम, यम व काल यांसारखें हे विराट व द्रुपद व आमच्या बाजूची इतर मंडळी यांचा यत्किंचित् पराक्रमही त्यांना सहन होणार नाहीं. आह्मी सर्व आज शकुनि व कर्ण यांसह सर्व धृतराष्ट्र-

पुत्रांना मारून युधिष्ठिराला राज्याभिषेक करूं. आतताई शत्रूंना मारण्यांत अधर्म मुळींच नाहीं. पण शत्रूपुढें तोंड वेंगाडणें हें मात्र बाईट व कीर्तीला कलंक आणणारें आहे. आतां धर्मराजाचा विचार घेऊन जें करणें तें करा. आज युधिष्ठिराला राज्य मिळालें पाहिजे. नाहीं तर त्या सर्वांना रणामध्यें कायमची झोंप घेण्याची पाळी येईल.'

हें ऐकून द्रुपद म्हणाला, 'वीर्यशाली सात्यके, तूं म्हणतोस असें हें खात्रीनें होणार. **दुर्योधन कधीं गोडीगुलाबीनें राज्य देणार नाहीं. धृतराष्ट्र आपल्या मुलावरच्या प्रेमामुळें, भीष्म-द्रोण मिंदेपणामुळें, व कर्ण व शकुनि मूर्खपणामुळें** त्याच्या अनुषंगानें वागणार. बलरामाचें म्हणणें माझ्या समजुतीनें बरोबर नाहीं. **आपला हेतु साधण्यास दुर्योधनाशीं गोड भाषण करून उपयोगी नाहीं.** गोड भाषणानें हा पापबुद्धि कधीं ताळ्यावर येईल असें मला वाटत नाहीं. याच्याशीं गोड भाषण करणें म्हणजे गाढवाला गोंजारून गाईवर हत्यार उपसण्याप्रमाणें आहे. **दुष्ट मनुष्य मृदुभाषण करणाऱ्याला दुर्बल समजतो.** ह्या मूढाशीं मृदुभाषण केलें असतां हा आपला कार्यभाग साधला असें समजूं लागेल. आपण या वेळीं असें केलें पाहिजे. आपल्या इष्टमित्रांकडे दूत पाठवून आपल्याला आपलें सैन्य तयार ठेवलें पाहिजे. शल्य, धृष्टकेतु, जयत्सेन इत्यादि अनेक राजांकडे विलंब न लावतां दूत पाठविले पाहिजेत. दुर्योधनही चोहोंकडे दूत पाठवील आणि **थोर लोक प्रथम जे त्यांच्याकडे येतात त्यांची विनंति मान्य करतात.** म्हणून सर्वांकडे लवकर दूत पाठवा. पुढें मोठें काम शेवटास न्यावयाचें आहे असें मला वाटतें. ह्या माझ्या विद्वान पुरोहिताला युधिष्ठिराचा निरोप घेऊन, त्यानें दुर्योधनाला काय सांगावें, भीष्मांना काय सांगावें, धृतराष्ट्राला काय सांगावें, द्रोणांना काय सांगावें हें नीट ठरवून धृतराष्ट्राकडे पाठवा.' हें ऐकून श्रीकृष्ण म्हणाला, 'सोमकांचा भार वाहणाऱ्या आपल्यासारख्याला पांडवांचा हेतु सिद्धीस नेण्याला योग्य असें हें भाषण उचितच आहे. **जशास तसा पेंच घालूं इच्छिणाऱ्या** आपल्याला असेंच केलें पाहिजे. याहून निराळ्या रीतीनें वागणें म्हणजे मूर्खपणा आहे. परंतु कौरवपांडव परस्परांशीं कसे वागले तरी आमचा त्या दोघांचे ठिकाणीं संबंध सारखाच आहे. व तूर्त त्यांना जसें लग्नाला बोलाविले होतें त्याचप्रमाणें आम्हांलाही बोलाविलें होतें. म्हणून लग्न आटोपल्यामुळें आम्हीं परत जातों. राजांमध्यें वयानें व ज्ञानानें आपण सर्वांत वृद्ध आहां व आम्ही आपल्या शिष्यांसारखें आहों; धृतराष्ट्रालाही आपल्यासंबंधानें फार आदरबुद्धि आहे; तसेंच द्रोण व कृप यांचे तर आपण परम मित्र आहां. तेव्हां पांडवांचा हेतु ज्यानें शेवटास जाईल असा निरोप आपण त्यांना पाठवा. जर दुर्योधन सरळ रीतीनें संधि करील तर **भाऊबंदकीमुळें कौरवपांडवांचा समूळ नाश होणार नाहीं.** परंतु अहंकारानें त्यानें तसें न केलें तर आधीं इतरांकडे दूत पाठवून मग आम्हांला बोलावणें पाठवा. अर्जुन खवळला असतां मूढ दुर्योधनाचा सर्व आप्तवर्गासह पूर्ण नाश होण्याला निःसंशय एक क्षणही लागणार नाहीं.' नंतर विराटानें श्रीकृष्णाचा सत्कार करून त्याला त्याच्या आप्तवर्गासह द्वारकेला पाठवून दिल्यावर युधिष्ठिरप्रभृति मंडळी युद्धाच्या तयारीला लागली. विराट व द्रुपद यांनीं चोहोंकडे दूत पाठविले व त्यांच्या बोलाविण्यावरून चोहोंकडून राजे त्यांच्या साहाय्याला येऊं लागले. दुर्योधनानेंही आपल्या बाजूच्या राजांना बोलावणें पाठवून आणविलें. चतुरंग सैन्याच्या हालचालींनें पृथ्वी दुमदुमून राहून दरदर हालत आहेसें वाटत होतें. नंतर ज्ञानानें व वयानें वृद्ध अशा आपल्या पुरोहिताला बोलावून द्रुपद म्हणाला, 'भूतमात्रांमध्यें प्राणधारी श्रेष्ठ, प्राणधाऱ्यांमध्यें बुद्धिमान श्रेष्ठ, बुद्धिमानामध्यें मनुष्य श्रेष्ठ, मनुष्यांमध्यें ब्राह्मण श्रेष्ठ, ब्राह्मणांमध्यें वेदज्ञ श्रेष्ठ, वेदज्ञांमध्यें त्यांवर परिश्रम केलेले श्रेष्ठ व परिश्रम केलेल्यांमध्यें त्याप्रमाणें वागणारे श्रेष्ठ व त्यामध्यें देखील ब्रह्मवेत्ते श्रेष्ठ आहेत. वेदांत परिश्रम केलेल्यांमध्यें आपण श्रेष्ठ असून कुल, वय, व वेदाभ्यास यानें आपण श्रेष्ठतर आहां. बुद्धीमध्यें तर शुक्राचार्य आणि बृहस्पति यांसारखे आहां. दुर्योधन कसा आहे, युधिष्ठिर कसा आहे, युधिष्ठिराला कळत असून दायादांनीं पांडवांना फसविलें.

विदुरांनीं पुष्कळ सांगितलें असतांही धृतराष्ट्र आपल्या मुलाच्या मतानेंच वागतो. दुर्बुद्धि शकुनीनें युधिष्ठिराला फाशाची कांहीं माहिती नसतां कसें बोलाबून फसविलें हें सर्व आपल्याला ठाऊकच आहे. अशी सर्व हकीकत असल्यानें कसाही प्रसंग आला तरी दुर्योधन आपण होऊन कांहीं राज्य देणार नाहीं. आपण धृतराष्ट्रापुढें न्यायाच्या गोष्टी बोलून त्यांच्या बाजूच्या योद्धयांचीं मनें त्यांच्याविरुद्ध करा. विदुरांचा आपल्याला दुजोरा मिळेलच. **भीष्म, द्रोण, कृप, इत्यादिकांचीं मनें बिथडून मंत्रीवर्गामध्यें फूट पाडिली ह्मणजे त्यांना पुन्हां वळविण्याचें काम दुर्योधनावर पडणार. आणि तेवढ्या अवकाशामध्यें पांडव स्वस्थपणें एकाच गोष्टीकडे लक्ष देऊन सैन्य व द्रव्य यांची जमवाजमव करतील. शिवाय त्यांच्याकडे आपलें स्वतःचें सैन्य असल्यामुळें आपण त्या ठिकाणीं असल्यानें सैन्याच्या जुळवाजुळवीला लागण्याचें त्यांना प्रयोजन वाटणार नाहीं. आपल्याला पाठविण्याचा मुख्य हेतु एवढाच.** आपण जवळ असाल तोंपर्यंत धृतराष्ट्राला आपल्या उलट जातां येणार नाहीं. त्याच्याशीं न्याय लढवून कोमल अंतःकरणाचे लोक भेटले असतां त्यांच्यापुढें पांडवांना सोसावीं लागलेलीं दुःखें सांगत बसा, आणि वृद्ध भेटले असतां पूर्वापार चालत आलेला कुलाचा व्यवहार त्यांना सांगा. याप्रमाणें सर्वांचीं मनें दुर्योधनाविरुद्ध कलुषित करा. आतां आपल्याला तो कांहीं अपाय करील याची बिलकुल भीति बाळगावयाला नको. कारण **आपण वेदज्ञ ब्राह्मण असून दूतत्व पतकरून जात आहां, व त्यांत वृद्ध आहां.** म्हणून आपण **पुष्य नक्षत्रावर सिद्धिकारक असा मुहूर्त धरून** युधिष्ठिराचें कार्य साधण्याकरितां हास्तिनापुराला निघा.' याप्रमाणें द्रुपदाचा निरोप ऐकून घेऊन शीलसंपन्न व नीतिशास्त्रकुशल तो पुरोहित हास्तिनापुराला धृतराष्ट्राकडे गेला.

---

१२६ अर्जुन व दुर्योधन कृष्णसाहाय्याकरितां स्वतः त्यांकडे जातात. (५. ७.)

पुरोहिताला हास्तिनापुराला पाठवून दूतांना चोहोंकडे निरानिराळ्या राजांकडे पाठविल्यावर कुंतिपुत्र अर्जुन द्वारकेला भगवान श्रीकृष्णाकडे स्वतः गेला. इकडे बलराम व कृष्ण द्वारकेला ज्या वेळीं जाऊन पोंहोचले त्याच वेळीं दुर्योधनाच्या गुप्त हेरांकडून त्याला पांडवांच्या सर्व हालचाली कळून चुकल्या होत्या. अर्जुन श्रीकृष्णाकडे निघाला आहे ही बातमी ठेवून वायुगती घोडे रथाला जुंपून तोही अर्जुन ज्या दिवशीं द्वारकेला आला तेच दिवशीं तेथें येऊन पोहोंचला. ते दोघे कृष्णाकडे गेले तेव्हां भगवान श्रीकृष्ण निद्रिस्त होता. प्रथम दुर्योधन आंत जाऊन त्याच्या उशाशीं बसला. अर्जुनही त्याच्यामागून जाऊन नम्रपणें त्याच्या पायथ्याशीं बसला. भगवान उठला तेव्हां प्रथम अर्जुनाकडे त्याची दृष्टि गेली. त्या दोघांचें स्वागत करून भगवानानें त्यांना येण्याचें कारण विचारलें. तेव्हां दुर्योधन हासत हासत ह्मणाला, 'तुला मी व अर्जुन सारखेच असून आमच्या दोघांचा संबंध तुमच्याशीं सारखाच आहे. ह्मणून आतां होणाऱ्या युद्धामध्यें तूं मला साहाय्य दिलें पाहिजेसं. मीं आधीं आलों आहें व थोर लोक आधीं येणाराच्या प्रार्थनेला मान देतात. तूं आज जगामध्यें श्रेष्ठ आहेस तर थोरांचें हें व्रत तुला पाळलें पाहिजे.' श्रीकृष्ण ह्मणाला, 'तूं निःसंशय आधीं आला आहेस. पण या अर्जुनाला मीं आधीं पाहिला. ह्मणून तुझ्या प्रथम येण्यानें व याला प्रथम पाहिल्यानें मला दोघांनाही साहाय्य केलें पाहिजे. परंतु लहानाची समजूत प्रथम घालावी हा सामान्य नियम आहे. ह्मणून अर्जुनाची समजूत मला आधीं केली पाहिजे. माझ्या तोडीचें नारायण नांवाचे प्रसिद्ध अर्बुद गोपाळ एकीकडे देऊन मी एकटा एकीकडे येईन; आणि मी रणांत युद्ध करणार नाहीं अगर शस्त्रही हातांत धरणार नाहीं. तर या दोहोंपैकीं अर्जुना, तुला कोण पाहिजे मागून घे. धर्मानें व न्यायानें पाहिलें असतां ह्या तुला दिलेल्या सवलतीच्या आड कोणाला येतां येणार नाहीं.' हें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून, 'तूंच मजकडे ये तर

मग, युद्ध न करतां स्वस्थ बसलास तरी चालेल,' असें अर्जुनानें भगवानापाशीं मागणें केलें. दुर्योधनानें तें सर्व नारायण सैन्य पतकरलें. आणि याप्रमाणें कोटि सैन्य मिळवून श्रीकृष्णाला फसविलें असें बाटून मोठ्या आनंदानें बळरामाकडे जाऊन त्याला त्यानें येण्याचा हेतु कळविला. तेव्हां बळराम ह्मणाला, 'पूर्वी विराट नगरीमध्यें लग्नाचे वेळीं आपण जमलों असतां मी जें बोललों होतों तें तूला माहीत आहेच. तुमच्या दोघांचाही संबंध आह्मांला सारखाच ह्मणून ते वेळीं मीं कृष्णाला निक्षून सांगितलें. परंतु त्याच्या मनांत तें कांहीं भरलें नाहीं. कृष्णाला सोडून मी क्षणभर देखील राहणार नाहीं; ह्मणून तुह्मां दोघांनाही साहाय्य करावयाचें नाहीं असा कृष्णाकडे नजर देऊन मी निश्चय केला आहे. तूं जगमान्य अशा भरतकुलामध्यें जन्मला आहेस. तर जा, क्षात्रधर्मानें युद्ध कर.' असें ह्मणून आलिंगन देऊन बलरामानें त्याला निरोप दिला. नंतर तो कृतवर्म्याकडे आला व त्याजवळून अक्षौहिणी सेना घेऊन मोठ्या आनंदानें आपल्या नगराला परतला. दुर्योधन परत गेल्यावर जगदुत्पादक जनार्दन श्रीकृष्णानें अर्जुनाला विचारलें, 'युद्ध न करणाऱ्या अशा मला कोणच्या हेतूनें तूं मागून घेतलेंस ?' अर्जुनानें उत्तर दिलें, 'बा कृष्णा, त्या सर्वांना मारण्याला तूं एकटा समर्थ आहेस, आणि मीही पण एकटा त्यांना मारूं शकेन. परंतु या लोकामध्यें तूं **कीर्तिवान असल्यामुळें यश हें तुह्याच बाजूला येणार.** आणि मला यशावांचून दुसरें कांहीं नको आहे. ह्मणून मीं तुला मागून घेतलें. तूं माझें सारथ्य करावेंस असें माझ्या मनांतून फार दिवसांपासून आहे, ती माझी इच्छा तूं परिपूर्ण कर.' हें ऐकून श्रीकृष्ण ह्मणाला, 'तूं माझ्याशीं स्पर्धा करूं पाहतोस हें तुला उचितच आहे. मी तुझें सारथ्य करून तुझी इच्छा परिपूर्ण करीन.' याप्रमाणें परस्पर संतुष्ट होऊन अर्जुन परत गेला.

१२७ शल्याचा हिरमोड व त्याची आणि युधिष्ठिराची भेट. वृत्राचा इतिहास. (५. ८–१८)

दूतांकरवीं निरोप आल्यावर आपल्या महारथ पुत्रांसहवर्तमान मोठी सेना घेऊन शल्य पांडवांकडे निघाला. त्याच्या सैन्याचा तळ सहा सहा मैलपर्यंत पडत असे. ज्यांच्या अंगावर चित्रविचित्रित चिलखतें व त्या त्या देशाला अनुरूप अशीं वस्त्रें व भूषणें होतीं, अशा प्रकारचे हजारों वीर त्याच्या सैन्याचे नायक होते. या सर्वांसह जणूं काय भूतमात्रांना त्रासवून सोडीत व पृथ्वीला कांपवीत तो मजल दरमजल करीत पांडवांच्या गोटाकडे निघाला. दुर्योधनाला ही बातमी लागून स्वतः त्याकडे लगबगीनें जाऊन त्यानें त्याचा सत्कार केला.आणि मार्गामध्यें त्याची नीट व्यवस्था ठेवण्यासाठीं रत्नानें चित्रविचित्र केलेलीं त्यानें जिकडे तिकडे ठाणीं तयार करविलीं. इतकेंच नव्हे तर अनेक प्रकारच्या उत्तम कारागिरांकडून त्यांत क्रीडास्थानें, सुवासिक पुष्पें, उत्तम प्रकारचीं मांसादिभक्ष्यें व पेयें तयार ठेवविलीं. दुर्योधनाच्या सचिवांकडून या निरनिराळ्या ठाण्यांमध्यें सत्कार घेत घेत शल्य चालला असतां त्याला धन्यता वाटून इंद्र देखील आपल्यापुढें त्याला तुच्छ वाटूं लागला. व 'हीं ठाणीं तयार केलेले युधिष्ठिराचे लोक कोठें आहेत, त्यांना माझ्यापुढें घेऊन या, त्यांना बक्षीस द्यावयाचें आहे,' असें संतुष्ट होऊन तो नोकर लोकांना ह्मणे व ती इत्थंभूत हकीकत सेवक दुर्योधनाच्या कानावर घालीत. शल्य संतुष्ट होऊन वाटेल तो वर देण्याला तयार झाला आहे असें समजल्यावर त्यावेळपावेतों गुप्त असलेला दुर्योधन त्याला भेटला. त्याला पाहून व ती सर्व व्यवस्था त्यानें ठेविली आहे हें कळून मोठ्या संतोषानें त्याला आलिंगन देऊन वाटेल तें मागून घे ह्मणून शल्य त्याला ह्मणाला. 'हे शब्द खरे करून माझ्या सर्वसैन्याचें आधिपत्य आपण स्वीकारा, एवढाच मला वर द्या,' असें दुर्योधन ह्मणाला, 'ठीक आहे,आणखी काय इच्छा आहे,' ह्मणून शल्यानें विचारलें असतां 'एवढेंच पुरें आहे,' असें दुर्योधन ह्मणाला. नंतर 'तूं आपल्या नगरीला जा, मी जाऊन युधिष्ठिराला भेटून येतों, कसें झालें तरी मला त्याला भेटलेंच पाहिजे,' असें ह्मणून दुर्योधनाला निरोप देऊन शल्य ही घडलेली हकीकत युधिष्ठिराला सांगण्यासाठीं उपप्लव्य येथें पांडवांच्या गोटाकडे गेला व सर्वांची

भेट घेऊन पाद्य, अर्घ्य, कुशल प्रश्न इत्यादि सत्कार झाल्यावर त्यानें सर्वांना प्रेमपूर्वक आलिंगन दिलें. नंतर आसनावर बसल्यावर तो ह्मणाला, 'बा युधिष्ठिरा, तुझें कुशल आहेना! अरण्यवासापासून मुक्त झालास फार चांगलें झालें. सर्वांसह निर्जनबनांत राहणें व घोर अज्ञातवास काढणें ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. राज्यापासून भ्रष्ट झाला असल्यामुळें आजपर्यंत तुला कष्टच झाले असले पाहिजेत. सुख कोठून मिळणार? ह्या दुर्योधनाच्या पापीं अनुभवलेल्या ह्या महदुःखाबद्दल शत्रूंचा नाश करून तूं मोठें सुख अनुभवशील. जगांतील व्यवहार तूं जाणतोच आहेस. आणि ह्मणूनच लोभानें तुझ्या. हातून अयोग्य वर्तन घडणार नाहीं. तुझ्यासारख्या राजर्षीला उचित अशा राजधर्मांचें अवलंबन कर.' असें ह्मणून वाटेंत पडलेली दुर्योधनाची गांठ, त्यानें ठेवलेली बरदास्त, व त्यामुळें आपण त्याला चुकून दिलेला बर, हें सर्व त्यानें युधिष्ठिराच्या कानावर घातलें. तेव्हां युधिष्ठिर ह्मणाला, 'खुषींत येऊन आपण दुर्योधनाला वचन दिलें तें ठीकच झालें. आतां आपल्याला हें सांगणें जरी उचित नाहीं तरी आपण माझ्यासाठीं एक काम करावें. युद्धांत आपण भगवान श्रीकृष्णाच्या तोडीचे आहां. अर्जुन व कर्ण यांचें युद्ध चाललें असतां कर्णाचें आपण सारथ्य करणार हेंही निःसंशय ठरल्यासारखें आहे. तर माझें प्रिय व्हावें अशी जर आपली इच्छा असेल तर आपण त्यावेळीं अर्जुनाचें रक्षण करावें. आह्मांला जय मिळेल अशा रीतीनें कर्णाचा आपण तेजोभंग करावा. **हें सांगणें जरी अनुचित आहे** तरी एवढें आपण आमच्यासाठीं करावें.' शल्यानें उत्तर दिलें, 'तूं जो मला कर्णाचा तेजोभंग करावयाला सांगत आहेस त्यासंबंधानें सांगतों ऐक. युद्धामध्यें खचित मला त्याचें सारथ्य करण्याचा प्रसंग येईल. **व तो वीरश्रीनें लढूं लागला असतां त्याचें उणें काढून त्याचा हिरमोड होईल अशा रीतीनें मी त्याला बोलत जाईन. आणि त्यामुळें त्याचा गर्व खालीं** होऊन तेजोभंग झाला असतां त्याला मारणें सुलभ होईल. हें तुझें काम मी खास करीन. आणखीही माझ्या हातून तुझें प्रिय करणें शक्य असेल तें मी करीनच. तूं जे आजपर्यंत अनेक प्रकारें क्लेश सहन केले आहेस त्याचा शेवट खास गोड होईल. मनाला वाईट वाटून घेऊं नकोस. दैव बलवत्तर आहे. थोरांना देखील दुःख प्राप्त होतें. देवांवर देखील दुःखें आलीं आहेत. इंद्रानेंही आपल्या स्त्रीसहवर्तमान मोठें दुःख अनुभवलें आहे. ती हकीकत तुला माहीत असेलच. देवश्रेष्ठ महातपस्वी त्वष्टा प्रजापति होता. त्यानें इंद्राशीं स्पर्धा धरून एक तीन मस्तकांचा पुत्र उत्पन्न केला. तो एका मस्तकानें वेदाध्ययन करी, दुसऱ्यानें मद्य प्राशन करी, व तिसऱ्यानें सर्व दिशा गट्ट करून टाकतो आहे कीं काय अशा रीतीनें जगताकडे पहात इंद्रपदाची इच्छा धरून मोठ्या तपामध्यें निमग्न असे. त्यामुळें इंद्राला चिंता पडली. तपापासून पराङ्मुख करून विषयोपभोगाकडे याचें लक्ष कसें लावावें, हा वाढला असतां सर्व पृथ्वी गिळून टाकील, असा मनांत विचार करून त्रिशिराला मोहवून विषयोपभोगाकडे त्याचें लक्ष लावविण्याकरितां इंद्रानें अप्सरांना आज्ञा केली. सर्व अप्सरा त्याच्या आज्ञेनें निघाल्या व नानाप्रकारच्या आविर्भावांनीं व अंगसौष्ठवांनीं त्यांनीं त्याला मोह पाडण्याची खटपट केली. परंतु पूर्वसागराप्रमाणें सर्व इंद्रियें आपल्या स्वाधीन ठेवून असलेल्या त्याच्या मनाला त्यापासून यत्किंचितही विकार झाला नाहीं. 'त्याला निश्चयापासून ढळविण्याची खटपट व्यर्थ आहे,' असें सांगत त्या इंद्राकडे परत आल्या. नंतर इंद्र त्याला मारण्याच्या उपायासंबंधानें विचार करूं लागला. कारण यःकश्चित् शत्रु असला तरी तो वाढत चालला असतां बलवानानें त्याची उपेक्षा करूं नये ही नीति लक्षांत घेऊन अग्नीसारखें आपलें घोर वज्र मोठ्या त्वेषानें त्यानें त्यावर फेंकलें. त्यानें छिन्नभिन्न होऊन पर्वतशिखराप्रमाणें तो पृथ्वीवर पडला. त्याचें तेज अंगांत शिरून इंद्राच्याही मनाची स्वस्थता नाहींशी झाली. रणांत कापून टाकलेलीं त्याचीं शिरें पाहून तीं सजीव असल्याप्रमाणें त्याला त्रास होऊं लागला. याप्रमाणें तो अगदीं घाबरला असतां खांद्यावर कुऱ्हाड टाकून एक सुतार तेथें आला. त्याला लवकर तीं शिरें तोडून टाकण्याला इंद्रानें सांगितलें. तें ऐकून सुतार ह्मणाला, 'ही निंद्य गोष्ट माझ्या हातून होणार नाहीं. असें घोर कर्म कर-

ण्यास सांगणारा हूं आहेस तरी कोण ? ह्या ऋषिपुत्राला मारून ब्रह्महत्येची भीति तुला मुळींच नाहीं काय!' हें ऐकून इंद्र ह्मणाला, ' मागून प्रायश्चित्तार्थ मी कांहीं तरी धर्म करीन. हा बलाढ्य शत्रु मीं आपल्या वज्रानें मारला आहे. अद्यापि मला त्याचें भय वाटत आहे. तेव्हां हीं शिरें तोड. मी तुझ्यावर कृपा करीन. लोक यज्ञामध्यें तुला पशूचें शीर यज्ञभाग देतील. हा मी तुला वर देतों. ' हें ऐकून त्या सुतारानें इंद्राच्या सांगण्यावरून आपल्या कुऱ्हाडीनें त्याचीं शिरें तोडलीं. त्याबरोबर ज्या तोंडांतून तो वेदाध्ययन करीत होता त्यापासून कपिंजल, ज्यानें मद्यप्राशन करीत होता त्यापासून कलविंक व गिधाड व ज्यानें तो सर्व दिशांकडे पहात होता, त्यापासून तित्तिर असे पक्षी बाहेर पडले. याप्रमाणें तीं डोकीं कापून निश्चिंत होऊन आपल्याला कृतकृत्य मानून इंद्र स्वगृहाला गेला. त्वष्टा प्रजापतीला हें वर्तमान कळून त्याचे नेत्र रागानें लाल झाले. त्यानें इंद्राचा नाश करण्याकरितां एक दैत्य उत्पन्न करण्यासाठीं अग्नीमध्यें आहुती देऊन घोर असा वृत्र उत्पन्न केला. आणि ' हे इंद्रशत्रो, माझ्या तपाच्या सामार्थ्यानें तूं वाढ, ' असें ह्मटल्याबरोबर सूर्यासारखा तेजस्वी तो वृत्र आकाशाला जाऊन भिडला, व उदयाला आलेल्या प्रलयकालच्या सूर्याप्रमाणें उग्र असा तो ' काय आज्ञा आहे, ' असें प्रजापतीला ह्मणाला. ' इंद्राला जिंक, ' अशी त्याला त्याची आज्ञा होतांच तो स्वर्गाला गेला व तेथें दोघांचें घोर युद्ध जुंपलें. त्यामध्यें इंद्राला त्यानें त्वेषानें गरगरां फिरवून तोंडांत टाकलें. याप्रमाणें इंद्राला त्यानें गिळलेलें पाहून देव घाबरून गेले. वृत्राचा नाश करणारी मोठी शक्तिमान **जृंभिका** त्यांनीं उत्पन्न केली. त्याच्यायोगानें वृत्रानें जांभई दिली व त्याबरोबर आपलें अंग संकुचित करून घेऊन इंद्र त्याच्या तोंडांतून बाहेर पडला. तेव्हांपासून ही **जृंभिका लोकांचा आश्रय करून राहिली आहे.** नंतर फिरून इंद्र व वृत्र यांचें घोर युद्ध झालें. त्वष्ट्याच्या तेजोबलानें मोड होऊन इंद्र परतला. तेव्हां देव घाबरले व मुनींसहवर्तमान मंदरपर्वताच्या शिखरावर याला मारण्याला पुढें काय करावें ह्मणून विष्णूचें ध्यान करीत बसले. इंद्र ह्मणाला, ' हें सर्व जग वृत्रानें व्यापून टाकलें आहे. जिनें याला मारतां येईल अशी वस्तु जगामध्यें कांहींच दिसत नाहीं. मी पूर्वी समर्थ होतों, पण हल्लीं अगदीं असमर्थ झालों आहें. हा मला अजिंक्य आहे असें वाटतें. हा अतुलपराक्रमी दैत्य त्रिभुवनाला गिळून टाकणार. ह्मणून आपण विष्णूकडे जाऊन त्याच्या विचारानें याला मारण्याचा कांहीं उपाय काढूं. ' असें ह्मणून वृत्राच्या भयानें पीडिलेले देव व ऋषिगण शरण्य व महाबलशाली विष्णूकडे जाऊन ' भगवन्, पूर्वी आपण आपल्या विक्रमशाली पावलांनीं तिन्ही लोक व्यापून टाकले, दैत्यांना मारून अमृत हरण केलें, महादैत्य बलीला बांधून इंद्राला देवांचें आधिपत्य दिलें, सर्व देवांचे स्वामी आपणच आहां, वृत्तानें सर्व जग व्यापून टाकलें आहे तर ह्या वेळीं आह्मांला हात द्या, ' ह्मणून त्याची प्रार्थना केली. भगवान विष्णु ह्मणाला, ' तुमचें हित मला अवश्य करणें आहे ह्मणून त्याच्या नाशाचा उपाय सांगतों ऐका. सर्व ऋषिगंधर्वांसह त्याकडे जाऊन त्याच्याशीं संधि करा. ह्मणजे मग इंद्र माझ्या तेजानें त्याला जिंकण्याला समर्थ होईल. मी इंद्राच्या वज्रामध्यें शिरून त्याचा नाश करीन. ' हें त्याचें भाषण ऐकून सर्व दिशांच्या ठिकाणीं प्रकाश पाडणाऱ्या सूर्यचंद्रांप्रमाणें तेजःपुंज, तिन्ही लोकांना जणूं काय आपल्या तेजानें ग्रासूनच टाकीत आहे कीं काय अशा त्या वृत्राकडे येऊन ऋषी ह्मणाले, ' हे वीरा, तूं आपल्या तेजानें सर्व जग व्यापून टाकलें आहेस तरी इंद्राला जिंकण्याला कांहीं तूं समर्थ नाहींस. तुमचें दोघांचें युद्ध आज बरेच दिवस चाललें आहे, व प्रजेला त्यापासून फार पीडा झाली आहे. तुमच्या दोघांमध्यें सख्य होऊं दे. त्यामुळें तुला सुख होऊन शाश्वत असे इंद्रलोक मिळतील. ' हें ऋषिवाक्य ऐकून वृत्र ह्मणाला, ' तुह्मी थोर ह्मणतां तें मीं ऐकलें. आतां माझें ह्मणणें ऐकून घ्या. आह्मा दोघांमध्यें सख्य व्हावें कसें ? दोन भिन्न प्रकारच्या तेजांचें एकवटणें तुह्मीं कधीं ऐकलें आहे काय ? ' हें ऐकून ऋषी ह्मणाले, ' भल्याची संगति एकवार तरी करण्याची इच्छा करावी. पुढें होणार तें कांहीं चुकत नाहीं.

सत्पुरुषाचा समागम कधीं व्यर्थ जात नाहीं. सत्संगति संकटसमयीं उत्तम प्रकारचें सुटकेचें साधन आहे ह्मटलें तरी चालेल. व सत्पुरुषसमागम मोठा फलदायक आहे. शहाण्यानें भल्याला कधीं मारूं नये. इंद्र हा भल्यांना मान्य असून थोरांचा आश्रय आहे. सत्यवादी, नियकर्म न करणारा, धर्मज्ञ, व सारासारविचार करणारा आहे. ह्मणून आमच्यावर विश्वास ठेवून त्याच्याशीं सख्य कर. याहून दुसरा विचार मनांत आणूं नकोस.' वृत्रानें उत्तर दिलें, 'तुह्मी मला मान्य आहां. मी जें जें ह्मणतों तें तें सर्व करण्याला देव तयार असतील तर तुमचें ह्मणणें मी कबूल करीन. ओल्या अगर वाळल्या वस्तूनें दगड अगर लांकूड, शस्त्र अगर अस्त्र यांनीं, दिवसां अगर रात्रीं, इंद्राकडून अगर इतर देवतांकडून मला मरण नसावें. अशा अटीवर मी इंद्राबरोबर सख्य करीन. त्यांनीं बरें ह्मणून या अटींवर दोघांचें ऐक्य झालें. परंतु इंद्र वृत्राला मारण्याचा विचार करीत चिंतातुर मनानें संधीची वाट पहात होता. एके वेळीं संध्याकाळच्या समयीं त्या वृत्राला समुद्रकांठीं पाहून व वराची आठवण होऊन इंद्राला वाटलें, 'हा दिवस अगर रात्र नसून भयंकर संध्यासमय आहे. माझें सर्वस्व गट्ट करून बसण्याला तयार झालेला हा शत्रु वृत्र याला तर कसेंही करून मारलेंच पाहिजे. याला आज फसवून न मारीन तर माझें बरें होणार नाहीं.' असा विचार करून विष्णूचें स्मरण केल्याबरोबर समुद्रावर पर्वतप्राय फेंस त्याच्या दृष्टीस पडला. हा ओलाही नसून वाळलाही नाहीं व हें शस्त्रही नव्हे; म्हणून हा फेंकून वृत्राला ठार करावें असा विचार करून वज्रासह तो फेंस त्यानें वृत्रावर फेंकला. तेव्हां त्यांत शिरून विष्णूनें वृत्राला मारलें. वृत्र मेल्याबरोबर सर्व दिशा स्वच्छ झाल्या. वारा सुखकर वाहूं लागला व प्रजा आनंदी झाल्या. परंतु देवांना भयकंप उत्पन्न करणाऱ्या वृत्राला मारल्यानें खोट्या प्रतिज्ञेमुळें इंद्र वेडा बनला. त्याचप्रमाणें त्रिशीर्षाला मारून ब्रह्महत्या केली असल्यामुळें त्यानें तो अगदीं ग्रासला गेला होता. नष्टसंज्ञ होऊन तो दिशेच्या अगदीं शेवटाला कोणाला न कळत जाऊन तडफडणाऱ्या सर्पाप्रमाणें पाण्यांत लपून राहिला. देवेंद्र नाहींसा झाल्यामुळें अरण्यामध्यें झाडें सुद्धां वाळून जाऊं लागलीं. नद्या व सरोवरें यांचें पाणी आटलें. अनावृष्टीमुळें सर्व प्राणिमात्र घाबरून गेले व सर्व जग अराजक होऊन अनेक पीडांनीं त्रस्त झालें. देवही भयभीत होऊन राजा कोणाला करावा या विचारांत पडले. कोणाचेंही तें पद स्वीकारण्याला मन घेईना. तेव्हां श्रीमान नहुष राजा तेजस्वी, यशस्वी, व धार्मिक असल्यामुळें त्याला तें पद यावें असा विचार करून देव व ऋषी मिळून त्याकडे जाऊन 'तूं आमचा राजा हो,' असें त्याला ह्मणाले. नहुष ह्मणाला, 'मी दुर्बल आहें. तुमचें रक्षण करण्याला मी समर्थ नाहीं. बलवान राजा होण्याला योग्य असतो. शिवाय इंद्राच्या ठिकाणीं नित्यशाक्ति असते ती माझ्यामध्यें नाहीं.' ऋषींनीं उत्तर दिलें, 'आमच्या तपाच्या सामर्थ्यानें स्वर्गाचें राज्य तूं संभाळ. परस्परांना घोर भय उत्पन्न झालें आहे, तेव्हां तुला अभिषेक होऊं दे. देवादिकांचें सर्व तेज तुझ्या ठिकाणीं येईल आणि त्याच्या सामर्थ्यानें धर्मानें तूं सर्वांचें रक्षण कर.' असा त्यांचा आग्रह पडल्यावरून नहुष स्वर्गाचा राजा झाला. तशा प्रकारचा दुर्लभ वर व स्वर्गाचें राज्य मिळाल्यानें तो धर्मात्मा विषयासक्त झाला. अनेक विहारस्थानांतून अप्सरा व देवकन्या यांसहवर्तमान श्रुतिमनोहर अशा कथा व सुस्वर गायन व वादन ऐकून विहार करीत असतां सहा ऋतू मूर्तिमान त्याच्या सेवेला हजर असत. अशाप्रकारें तो विहार करीत असतां कोणे एके वेळीं इंद्राची पट्टराणी त्याच्या भेटीला आली. तेव्हां तो पापी तिला पाहून सभासदांना ह्मणाला, 'मी इंद्र आहें, तर हिनें माझ्याकडे यावें. तें त्याचें भाषण ऐकून देवी खिन्न होऊन बृहस्पतींना शरण गेली व नहुषापासून आपलें रक्षण करण्याविषयीं त्यांना विनवूं लागली. तिला घाबरलेली पाहून बृहस्पति ह्मणाले, 'माझें वचन सत्य होऊन लवकरच तुझी व इंद्राची गांठ पडेल. नहुषाला यत्किंचितही तूं भिऊं नकोस.' इकडे इंद्राणी बृहस्पतींना शरण गेल्याची वार्ता ऐकून नहुष फारच खवळला. त्याचें तें उग्र स्वरूप पाहून 'महाराज राग आवरा. आपण रागावल्यामुळें सर्व जग त्रस्त झालें आहे, आपल्यासारखे लोक असे रागावत नाहींत, ती परस्त्री आहे तेव्हां परस्त्रीवर हात

टाकण्याच्या हा पापकर्मापासून मन काढा व धर्माने प्रजेचे पालन करा,' याप्रमाणें देव त्याची पुष्कळ समजूत घालू लागले असतां नहुष म्हणाला, 'पूर्वी अविचारी अहिल्या हिच्यावर तिचा पती जिवंत असतां इंद्रानें हात टाकला व अशाच प्रकारचीं अनेक दुष्कृत्यें त्यानें केलीं; तेव्हां तुम्हीं त्यापासून त्याचें निवारण केलें नाहीं! इंद्राणी मजकडे आली तरच ठीक आहे.' हें त्याचें भाषण ऐकून, 'बरें, तिला घेऊन येतों,' म्हणून देव बृहस्पतीकडे गेले व तिला नहुषाच्या स्वाधीन करण्याविषयीं त्यांनीं त्यांची प्रार्थना केली. तेव्हां दीन गाईसारखी होऊन इंद्राणीला रडतांना पाहून बृहस्पती म्हणाले, 'धर्म मला कळत असून सत्याचा मार्ग मी कधीं सोडणार नाहीं. शरणागताला टाकणें हें अनुचित कर्म मी करणार नाहीं. जो शरणागताला टाकतो त्यानें पेरलेलें बी वेळेवर उगवत नाहीं व त्याच्याकरितां पाऊसही वेळेवर पडत नाहीं. त्याला दुसऱ्याचें साहाय्य पाहिजे असेल तेव्हां मिळत नाहीं. खाववयाला चांगलें अन्न मिळत नाहीं. त्यानें दिलेले हवी देव घेत नाहींत. त्याची प्रजा अकालीं मरण पावते. त्याचे पितर नरकांत वास करतात व इंद्रादिदेव त्याजवर वज्रप्रहार करतात. तेव्हां हिला मी सोडणार नाहीं. आतां नीतीला अनुसरून उभयतांच्या हिताची गोष्ट मी तुम्हाला सांगतों ती ऐका. हिनें नहुषाकडे जाऊन कांहीं काल मुदत मागून घ्यावी. तेवढ्या अवधीमध्यें अनेक विघ्नें येतील व येऊन खेळ पार पाडून नेईल. हा नहुष तपोयोगानें बलवान होऊन गर्विष्ठ झाला आहे. तेव्हां त्या योगानेंच त्याचा नाश होणार आहे.' हें त्याचें भाषण ऐकून देव बरें म्हणून इंद्राणीसहवर्तमान नहुषाकडे गेले. तो कामपीडित दुष्ट तिला पाहतांक्षणीं हर्षयुक्त होऊन म्हणाला, 'हे शुचिस्मिते मी तिन्ही लोकांचा इंद्र आहें, तेव्हां तूं मला पति वर.' हें त्याचें भाषण ऐकून त्यानें लटलट हालणाऱ्या केळीप्रमाणें मनानें कांपत ती पतिव्रता पुढें काळासारख्या दिसणाऱ्या त्याला हात जोडून म्हणाली, 'माझ्या पतीची कांहींच वार्ता कळत नाहीं. तेव्हां त्याचें काय झालें, कोठें गेले, हें कळण्यासाठीं मला थोडा अवकाश द्या. त्यानंतर मी आपला अंगीकार करीन.'

हें तिचें भाषण ऐकून संतुष्ट होऊन नहुष म्हणाला, 'ठीक आहे. त्याचा निकाल कळल्यावर माझ्या वचनाची आठवण ठेवून मजकडे ये.' असें म्हणून त्यानें तिला जाण्यास आज्ञा दिली. नंतर सर्व देव मिळून उद्विग्न मनानें विष्णूकडे जाऊन म्हणाले, 'देवेश, इंद्राला ब्रह्महत्येनें ग्रासून टाकलें आहे. सर्व प्राणिमात्रांच्या रक्षणासाठीं आपण निर्माण झालों आहों. आपल्या सामर्थ्यानेंच वृत्राचा नाश झाला असून ब्रह्महत्येचें पातक तेवढें देवेंद्राला लागलें आहे. तर त्यांतून त्याची मुक्तता होण्याचा मार्ग आपण आम्हाला सांगा. आम्हाला गति आपणच आहां.' हें त्यांचें भाषण ऐकून विष्णु म्हणाला, 'पवित्र अशा अश्वमेधानें इंद्राला माझें यजन करूं द्या म्हणजे मी त्याला पापापासून मुक्त करीन. नंतर निर्भयपणें त्याला फिरून इंद्रपद प्राप्त होईल. नहुष आपल्या कर्मानेंच नाश पावेल. थोडा वेळपर्यंत तुम्हाला मोठ्या हुशारीनें हल्लींच्या स्थितींत राहिलेंच पाहिजे.' हें विष्णूचें अमृतमयी भाषण ऐकून सर्व देवर्षी मिळून ज्या ठिकाणीं इंद्र होता तेथें गेले व शुद्धीसाठीं त्यांनीं ब्रह्महत्याविनाशक अश्वमेध केला. तेव्हां वृक्ष, नद्या, पर्वत, स्त्रिया व प्राणिमात्र यांचे ठिकाणीं ब्रह्महत्या अंशानें विभागून जाऊन इंद्र पापापासून मुक्त झाला. परंतु वरदानानें नहुष सर्वांना अनावर झाला असून सर्व प्राणिमात्रांचें तेज तो हरण करीत असेंपाहून इंद्र फिरून अदृश्य होऊन योग्य संधीची वाट पहात राहिला. इंद्र नाहींसा झाल्यामुळें शोकाकुल होऊन उत्तरायणाच्या आरंभींच्या पुण्यकारक अशा रात्रीं देवीला नमस्कार करून आपल्या मनोरथसिद्धीसाठीं इंद्राणीनें तिची उपासना केली. तिच्या पातिव्रत्यामुळें व सत्यनिष्ठेमुळें श्रीमान उपश्रुति देवीनें तिला प्रत्यक्ष दर्शन दिलें. इंद्राणीनें मोठ्या हर्षानें तिची पूजा केली. तेव्हां उपश्रुति तिला म्हणाली, 'मी उपश्रुति देवी तुला दर्शन देण्याला आलें आहें. तुझ्या सत्यनिष्ठेनें, पातिव्रत्यानें व नियमानें संतुष्ट होऊन मीं तुला प्रत्यक्ष दर्शन दिलें आहे. तुझ्या पतीची आणि तुझी गांठ घालून देतें.' असें म्हणून तिला घेऊन ती निघाली. अनेक देवारण्यें व पर्वत ओलांडून हिमालयाच्या उत्तर

भागला अनेक योजनेंपर्यंत पसरलेल्या समुद्रतीराला ती आली. त्या ठिकाणीं नानापक्ष्यांनीं गजबजलेलें शंभर योजनें औरसचौरस असें एक सरोवर त्यांनीं पाहिलें. त्या ठिकाणीं पंचरंगी अनेक प्रफुल्लित कमलें असून त्यावर भ्रमरांचा गुंजारव चालला होता व त्या सरोवराच्या मध्यभागीं ज्यांचा देठ उंच वर गेला आहे असें एक कमलपुष्प त्यांच्या दृष्टीस पडलें. तो देठ चिरून तीं देवी इंद्राणीसह आंत शिरली. तेव्हां बिसतंतूमध्यें सूक्ष्मरूप धारण करून बसलेला इंद्र त्यांच्या दृष्टीस पडला. इंद्राणीला पाहून इंद्र म्हणाला, 'तूं कां आलीस? तुला मी येथें आहें हें कसें कळलें?' तेव्हां इंद्राणी नहुषाचा सर्व वृत्तांत सांगून म्हणाली, 'मीं त्याच्याशीं अवकाश मागून घेतला आहे तेवढ्या अवधींत जर आपण माझें रक्षण केलें नाहीं तर तो मग मला आपली करणार. ह्या घोर नहुषाला मारून इंद्रपद चालवा.' हे तिचें भाषण ऐकून इंद्र म्हणाला, 'प्रिये, पराक्रम करण्याचा हा वेळ नव्हे; ऋषींनीं हव्यकव्यांनीं वाढवून त्याला बलवान करून ठेविलें आहे. म्हणून ह्या ठिकाणीं मी कांहीं युक्ति योजणार आहें तीं तूं शेवटास ने. नहुषाकडे जाऊन 'ऋषींना वाहक करून त्या वाहनांत बसून मजकडे ये म्हणजे मोठ्या आनंदानें मी तुला अंगीकार करीन,' असें तूं त्याला म्हण.' हे ऐकून इंद्राणी नहुषाकडे गेली. तिला पाहून हर्षभरित होऊन नहुष म्हणाला, 'बः आलीस, ठीक आलें! आतां माझा अंगीकार कर म्हणजे तूं मागशील तें करण्याला मी तयार आहें. आतां उगीच लाजूं नकोस. मजवर पूर्ण विश्वास ठाक. सत्यपूर्वक मी सांगतों कीं, तुझे वचन मी मोडणार नाहीं.' हे त्याचें आतुरतेचें भाषण ऐकून इंद्राणी म्हणाली, 'आजपर्यंत मी वाट पाहिली. आतां मी आपल्याला वरतें. परंतु माझ्या मनांत एक गोष्ट आहे तेवढी आपण करील तर माझें प्रिय होणार आहे! माझें एवढें प्रेमवाक्य आपण केलें म्हणजे मी आपलीच आहे. हत्ती, रथ, घोडे, इत्यादि इंद्राचीं वाहनें नेहमींचींच आहेत. परंतु ज्या प्रकारचें वाहन विष्णूना, रुद्रांना अगर दुसऱ्या कोणालाही नाहीं अशा प्रकारचें अपूर्व वाहन आपले असावें असें मला वाटतें. ऋषींनीं आपला रथ वाहावा असें माझ्या मनांत आहे. म्हणजे आपल्यासारखा वीर्यशाली देवांमध्यें अथवा असुरांमध्यें कोणी न उतरतां स्वबीर्यानें आपण सर्वांचें तेज हरण कराल.' हें तिचें भाषण ऐकून नहुषालाही तें वरें वाटून तो म्हणाला, 'प्रिये हें अपूर्व वाहन मला देखील फार आवडलें. मुनींना आपले वाहक करणारांचें सामर्थ्य कांहीं लहानसहान होणार नाहीं. मी तपस्वी, बलवान व भूतवर्तमानभविष्याचा स्वामी आहें. मी रागावलों असतां जग नाहींसें होईल. सर्व कांहीं माझ्यावरच अवलंबून आहे. ज्याच्याकडे मी आपल्या नेत्रांनीं पाहीन त्याचें मी तेज हरण करीन. म्हणून सप्तर्षी माझा रथ वाहतील, समजलीस.' असें म्हणून तिला जाण्याम सांगून कामानें वेडा झालेल्या त्या दुरात्म्यानें बलाच्या गर्वाखाली ऋषींना आपले रथ वहावयाला लावलें. इकडे बृहस्पतींनी आतां नहुषाची वेळ जवळ आली आहे म्हणून त्याच्या नाशार्थ व इंद्राच्या शोधार्थ इष्टी सुरू केली. त्यापासून प्रत्यक्ष अग्नि स्त्रीवेषानें प्रगट होऊन 'काय आज्ञा आहे,' म्हणून म्हणाला. तेव्हां त्यांनीं इंद्राच्या शोध लावण्याम त्याला सांगितलें. नंतर अदृश्य होऊन सर्व दिशा, पर्वत, वन, पृथ्वी, अंतरिक्ष ह्या ठिकाणीं एका निमिषांत शोध करून परत येऊन अग्नि बृहस्पतीना म्हणाला, 'जलाशिवाय इतर सर्व ठिकाणीं मी त्याचा शोध केला, पण कांहीं पत्ता लागत नाहीं. जलांत मात्र माझ्यानें प्रवेश करवत नाहीं. कारण तेथें शिरलों असतां माझा नाश होईल. कारण **जलापासून अग्नीची, ब्राह्मणापासून क्षत्रियाची व दगडापासून लोखंडाची उत्पत्ति** असल्यामुळें ह्यांचें चोहोंकडे चालणारें तेज आपल्या उत्पत्तिस्थानाकडे आलें असतां चालत नाहीं.' यावर बृहस्पती म्हणाले, 'हे अग्ने, तूं सर्व देवांचें मुख असून ज्यांचा त्यांचा भाग त्यांना तुझ्याकडूनच पोहोंचतो. सर्व प्राणिमात्रांमध्यें साक्षीभूत राहून त्यांच्या ठिकाणीं तुझा गुप्त संचार आहे. एक रूपानें व तीन रूपांनीं तूं दृश्यमान असतोस. तूं टाकल्यानें जग क्षणांत नाहींसें होईल. तुझ्याच भक्तीनें स्त्रीपुरुषांसह लोकांना स्वकर्मार्जित शाश्वत लोक मिळतात. ज्ञानी लोक तुलाच मेघ व विद्युत समजतात. तुझ्यापासून निघणाऱ्या ज्वाला सर्व भूतांना बाहून

नेतात. उदक व हें सर्व जग तुझ्या ठिकाणीं असून त्रैलोक्यामध्यें तुला अगम्य असें कांहीं नाहीं. सर्व भूतमात्र फिरून स्वयोनीलाच मिळतात म्हणून तूं निःशंक जलामध्यें प्रवेश कर.' अशी बृहस्पतीची स्तुति ऐकून अग्नि समुद्र, तलाव, इत्यादि जलाशयांमध्यें शिरून इंद्र होता त्या सरोवरांतही शिरून व इंद्राचा शोध लावून परत येऊन त्यानें ती हकीकत बृहस्पतीला कळविली. नंतर देवांसहवर्तमान बृहस्पति इंद्राकडे गेले; व स्तुतिपूर्वक त्यांनीं त्याला इंद्र होण्याम विनति केली. तें म्हणाले, 'तू नाहींसा झाल्यामुळें देवांनीं नहुषाला इंद्र केलें व 'ज्याकडे तें पाहशील त्याचें तूं तेज हरण करशील,' असा त्यांनीं त्याला वर दिला. ह्या वराने व त्याच्या तपाच्या सामर्थ्यानें तो फारच उद्दाम झाला आहे व महर्षींना इंद्रील आपल्या रथाला लाव लागला आहे तर त्याला मारण्याचा कांहीं तरी उपाय कर.' ह्याप्रमाणें यांचा एकंदे विचार चालला असतां 'नहुष पदभ्रष्ट होऊन तुझा फिरून भाग्योदय झाला आहे म्हणून मी तुझें अभिनंदन करण्याला आलो आहे' असें म्हणत अगस्त्य इंद्राकडे आले व 'तो पदभ्रष्ट कसा झाला हें मी तुला सांगतो ऐक,' असें म्हणून यांनीं घडलेला वृत्तांत सांगितला तें म्हणाले, 'गाईच्या प्रोक्षणादि संस्कारांविषयीं जे मंत्र श्रुतींत सांगितले आहेत ते तुझा मान्य आहेत किंवा नाहींत, म्हणून नहुषाला बाहून नेत असतां ऋषींनां त्याला विचारलें. डोळ्यांवर धुंदी आल्यामुळें नहुष 'मला ते मान्य नाहींत,' असें म्हणाला व मुनींच्या डोक्यावर पाय देऊन 'सर्प, सर्प' असें म्हणाला. तेव्हां 'ब्रह्मर्षींच मंत्र ज्याअर्थी तुला मान्य नाहींत व ज्याअर्थी ब्राह्मणांच्या डोक्यावर पाय ठेवून 'सर्प, सर्प, म्हणतोस त्याअर्थी तुझें पुण्य क्षय पावून सर्पटणारा सर्प होऊन तूं पृथ्वीवर दहा हजार वर्षें राहशील. नंतर फिरून तुला स्वर्गप्राप्ति होईल असा ऋषींनीं त्याला शाप दिला. तर हे इंद्रा, तूं आतां स्वर्गाला चल, व सर्व लोकांचें पूर्ववत रक्षण कर. नंतर इंद्र स्वर्गाला जाऊन फिरून इंद्रपद भोगू लागला. ह्याप्रमाणें दुर्योधनादि दुष्टांना मारून तूंही स्वर्गसुख लवकरच भोगशील, असा धर्मराजाला धीर देऊन शल्य दुर्योधनाकडे निघून गेला.

इकडे सात्वतांचा राजा सात्यकि एक अक्षौहिणी चतुरंग सेना घेऊन युधिष्ठिराकडे आला. त्याच्या सैन्यांतील वीर्यशाली योद्धे नाना देशचे असून नाना प्रकारच्या आयुधांनीं युक्त होते. परशु, भिंदिपाल, शूल, तोमर, मुद्गर, परिघ, यष्टी, पाश, चक्रकचकीत पट्टे, तरवारी, व धनुष्यें इत्यादि आयुधें त्यांच्या हातांत चमकत होतीं. सुवर्णभूषणांनीं मंडित ती सेना विद्युल्लतेबरोबर असणाऱ्या मेघाप्रमाणें जरी लांबवर पसरली होती तरी समुद्रांत शिरतांक्षणीं ज्याप्रमाणें लहानशा नदीचा मागमूस राहत नाही त्याप्रमाणें युधिष्ठिराच्या अफाट सैन्यांत तें गडप होऊन गेलें. त्याचप्रमाणें **चेदि राजा व जरासंधपुत्र** एक एक अक्षौहिणी सैन्य घेऊन युधिष्ठिराकडे आले. तसाच मागरतीरवासी योद्धयांना घेऊन पाण्ड्य त्याकडे आला व विराट व द्रुपद यांचें सैन्य मिळून पांडवांचे एकंदर सात अक्षौहिणी सैन्य कौरवांशीं युद्ध करण्याला सज्ज झालें. इकडे भगदत्त कर्णिकार वृक्षाच्या वनाप्रमाणें दुर्भेद्य **चीन व किरात** वीरांची एक अक्षौहिणी सेना घेऊन दुर्योधनाकडे आला. त्याचप्रमाणें भूरिश्रवा, शल्य, भोज, अंध, कुकुर, हार्दिक्य, जयद्रथ, इत्यादि राजे आपापली सेना घेऊन दुर्योधनाकडे आले. क्रीडा करणाऱ्या मत्तगजाप्रमाणें भूमि दणदणा हालवून मोडणारी ती सेना वाऱ्यानें उसळणाऱ्या खवळलेल्या समुद्राप्रमाणें दिसत होती. कांबोजाधिपती टोळधाडीप्रमाणें जरी आपली यवन व शक या लोकांची असंख्य सेना घेऊन आला होता तरी दुर्योधनाच्या सैन्यामध्यें त्याचा मागमूस सुद्धां दिसेना. त्याचप्रमाणें माहिष्मतीचा नील, अवंतीदेशचे विंद व अनुविंद व कैकेय देशाचे पांच बंधुराजे एक एक अक्षौहिणी घेऊन दुर्योधनाकडे आले. चोहोंकडून जमलेली दुर्योधनाची सेना अकरा अक्षौहिणी होती. पचनद, कुरुजांगल, रोहितकारण्य, मरुभूमि, अहिच्छत्र, कालकूट, गंगातीर, वारण, वाटधान, व यामुन पर्वत इत्यादि सर्व धनधान्यसंपन्न प्रदेश कौरवांकडच्या सैन्यांनीं मजबूत राहिले होते.

१२८ द्रुपदपुरोहिताचें दौत्य.
(५. १०–२०)

द्रुपदाचा पुरोहित धृतराष्ट्राकडे आल्यावर त्याचा विदुर, धृतराष्ट्र, इत्यादिकांनीं योग्य सत्कार केला. नंतर अन्योन्यकुशल प्रश्न झाल्यावर सर्व सेनानायकांच्या समक्ष तो पुरोहित म्हणाला, ' तुह्मां सर्वांना सनातन राजधर्म ठाऊक आहेच. तरी उपोद्घात करण्यासाठीं मी बोलतों. धृतराष्ट्र व पांडु हे एकापासून झाले असल्यामुळें वडिलोपार्जित मिळकतीवर दोघांचा सारखाच हक्क आहे. असें असून धार्तराष्ट्राला वडिलोपार्जित मिळकत मिळून ती पांडवांना यापूर्वी कां मिळाली नाहीं हें तुह्मांला ठाऊकच आहे. त्यांचा प्राण घेण्याचे अनेक उपाय यांनीं केले तरी यांना त्यांना मारतां आलें नाहीं. व ते अद्यापि जिवंत आहेत ! त्यांनीं आपलें राज्य आपल्या मनगटाच्या जोरावर वाढविलें तेंही कौरवांनीं कपटानें हरण केलें; व त्या अनुचित कृत्याला धृतराष्ट्राची संमति मिळाली. बारा वर्षें घोर अरण्यामध्यें व एक वर्ष विराट नगरीमध्यें त्यांनीं नानाप्रकारचे क्लेश सोसले तरी ते मागील सर्व अपराध विसरून कौरवांबरोबर स्नेहानेंच राहूं इच्छीत आहेत. त्यांचें वर्तन त्याचप्रमाणें दुर्योधनाचें वर्तन लक्षांत घेऊन दुर्योधनाला ताळ्यावर आणणें हें तुह्मां भल्या लोकांचें काम आहे. कौरवांबरोबर युद्ध करण्याचा त्यांचा मुळीं हेतु नसून लोकांचा नाश न होतां आपलें स्वत्व आपल्याला मिळावें अशी त्यांची इच्छा आहे. आतां युद्ध करण्यांत दुर्योधनाचा जो हेतु आहे तिकडेही तुह्मीं लक्ष देतां कामा नये. कारण ते सर्व वीर्यशाली असून सात अक्षौहिणी सेना धर्मराजाच्या बाजूला जमली आहे; व कौरवांबरोबर युद्ध करण्यासाठीं युधिष्ठिराच्या आज्ञेची ती वाट पहात आहे. शिवाय सात्यकि, भीमसेनप्रभृति मंडळी प्रत्येक हजार हजार अक्षौहिणीच्या तोडीचे आहेत व तुमच्या ह्या अकरा अक्षौहिणी एका बाजूला व एकटा अर्जुन एका बाजूला असला तर तुमच्या एवढ्या सर्व सैन्याला तो पुरून उरणार आहे. तर ह्या सर्व गोष्टींचा विचार करून वेळ गेली नाहीं तोंवर त्यांचें त्यांना देऊन टाकाल तर बरें, '

पुरोहिताच्या ह्या भाषणाची प्रशंसा करून भीष्म म्हणाले, ' पांडव खुशाल असून त्यांना एवढें थोरलें साहाय्य मिळालें ही मोठी आनंदाची गोष्ट आहे; व असें असूनही स्नेह जोडण्याची त्यांची इच्छा आहे हें त्यांच्या थोरपणाला अनुरूपच आहे. ब्राह्मणबादाला अनुरूप तुमचें भाषण जरी जरा खरमरीत झालें आहे तरी तें सर्वांशीं खरें आहे. खरोखरच त्यांना फार क्लेश झाले आहेत व न्यायानेंच वडिलोपार्जित संपत्तीवर त्यांचा हक्क आहे. कृतास्त्र अशा बलवान अर्जुनापुढें प्रत्यक्ष इंद्र सुद्धां टिकाव धरणार नाहीं. मग इतरांची कथा काय ? ' असें भीष्म म्हणताहेत तोंच कर्ण दुर्योधनाकडे पाहून भीष्मांना म्हणाला, 'आपण म्हणतां ह्या मोठी जमांत कोणाला माहीत नाहीत असें नाहीं. मग त्या वरचेवर बोलून दाखविण्यांत काय अर्थ आहे ? दुर्योधनासाठीं शकुनीनें पूर्वी युधिष्ठिराला जिंकलें व तो पण करून अरण्याला गेला. पण आतां विराट व पांचाल यांच्या जोगवर तो पण पाठून वडिलोपार्जित राज्य मिळविण्याची त्याची इच्छा हिंमत नाहीं. भीतीनें दुर्योधन चतुर्थांश सुद्धां देणार नाहीं. परंतु न्यायानें सर्व पृथ्वी देखील तो शत्रूला देण्याला तयार होईल. त्यांना वडिलोपार्जित राज्य पाहिजे असेल तर आणखी बारा वर्षें वनवास करूं द्या आणि मग खुशाल दुर्योधनाच्या मांडीवर पडून राज्योपभोग घेऊं द्या. मूर्खपणानें अशी अन्यायाकडे त्यांनीं प्रवृत्ति ठेवूं नये. आतां न्यायाला झुगारून देऊन ते जर युद्धालाच उभे राहतील तर कौरवांची गांठ पडल्यावर त्यांना माझ्या भाषणाची आठवण होईल. ' हें ऐकून भीष्म म्हणाले, ' कर्णा, वृथा बडबड करण्यांत मोठा पुरुषार्थ नाहीं. एकट्या पार्थानें सहा रथ्यांना जिंकून तुला जेव्हां पळावयाला लावलें तेव्हां तुझा पराक्रम दिसून आलाच. त्याची आठवण कर म्हणजे झालें. आतां हा ब्राह्मण म्हणतो आहे त्याप्रमाणें जर आपण केलें नाहीं तर युद्धामध्यें मरून पडून माती खाण्याची वेळ मात्र खास येणार. ' धृतराष्ट्र भीष्मांचें शांतवन करून व कर्णाची निर्भर्त्सना करून म्हणाला, ' भीष्म म्हणतात तेंच पांडवांच्या व सर्व जगाच्या हिताचें आहे. विचार करून मी लवकरच पांडवांकडे संजयाला

पाठविलें. बरवा, आपला आतां परत जा ' असें ह्मणून त्याला निरोप देऊन त्यानें संजयाला सभेमध्यें आणविलें.

१२९ संजयशिष्टाई. (९. २२–३२)

संजय सभेंत आल्यावर धृतराष्ट्र त्याला ह्मणाला, ' बा संजया, पांडव उपप्लव्य येथें आहेत असें ऐकतों तर तेथें जाऊन धर्मराजाचा बहुमान करून आमचे कुशल त्याला कळीव. कपट कधीं माहीत नसून सर्वांच्यावर उपकार करणाऱ्या त्या साधूच्या मनांत आमच्या संबंधानें स्नेहभावच अणमात्र. त्याचे वांकडे पाऊल माझ्या कधीं पाहण्यांत आलें नाही. एवढी थोर संपत्ति मिळवून त्यांनीं ती सर्व माझ्या पायांवर ठेवली. मी पुष्कळ विचार करतो तरी तिळभर सुद्धां त्यांचा दोष मला दिसत नाहीं. कामक्रोधादिकांच्या झटक्यांत सुख किंवा इष्ट वस्तु मिळविण्याकडे त्यांची उडी कधीं नसते. उन्ह, थंडी, भूक, तहान, झोंप, आळस, काम, क्रोध, अथवा चुकी विचारपूर्वक टाळून धर्मार्थीला धरूनच वागण्याला ते यत्न करीत असतात. मित्रांना प्रसंगीं द्रव्य देऊन साहाय्य करतात. सहवासानें त्यांच्या स्नेहामध्यें कधीं व्यत्यय येत नाहीं. मान्यांना मान देऊन आपला कार्यभाग साधून घेणाऱ्या ह्या पांडवांचा द्वेष मंदबुद्धि,पापी दुर्योधन व क्षुद्रबुद्धि कर्ण यांवांचून आजमीढाच्या बाजूला मला कोणी दिसत नाहीं. हे दोघे मात्र सुखाचा व इष्टवस्तूचा पर्वा न करणाऱ्या त्या विचाऱ्याचा राग द्विमानुद्विषम वाढवीत आहेत. माहसी व सुखांत वाढलेल्या दुर्योधनाला पांडवांच्या जिवंतपणीं त्यांचा हिस्सा उपटतां येण्याजोगी कोणी मुरकिल्ली दिल्याम बरें असें मूर्खपणाने वाटत आहे. ज्याला अर्जुन, श्रीकृष्ण, भीम यांसारखे वीर कधीं सोडणार नाहींत त्या युधिष्ठिराचा हिस्सा युद्ध करण्यापूर्वीच देऊन टाकणें मला बरें वाटतें ज्यानें एकट्यानें एवढीं अलौकिक कृत्यें केलीं आहेत त्या अर्जुनाचा पराक्रम मीं तुला सांगावयाला पाहिजे असें नाहीं. गदाधाऱ्यांमध्यें तर भीमाच्या तोडीचा कोणी नाहीं व रथ्यांमध्येंही तो अर्जुनापेक्षां कमी नाहीं. सदा कोपनशील तो प्रत्यक्ष इंद्राला देखील जिंकण्याला कठीण जाणार आहे. त्याचप्रमाणें माद्र्याकि, धृष्टद्युम्न प्रभृति वीर युधिष्ठिराकरितां प्राण देण्याला तयार आहेत. विराटाचा व त्यांचा तर एक वर्षभर सहवासच झाला असल्यानें पांडवांवर त्याची पूर्णभाक्त जडली असली पाहिजे. शिवाय तो वृष्णिसिंह श्रीकृष्ण ज्याचा नायक आहे त्या युधिष्ठिरापुढे कोण टिकणार ? ह्मणून वर निर्दिष्ट केलेले वीरश्रेष्ठ नरवीर भक्तीनें व प्रेमपुरःसर युधिष्ठिराच्या बाजूला मिळाले असतां त्यांच्यापुढें आमचें एवढें थोरले सैन्य आहे तरी तें मला कांहींच नाहींसें वाटत आहे त्या अतुल पराक्रमी कृष्णार्शी दोन हात करण्याच्या इराद्यानें जो त्याबर चालून जाईल तो वाऱ्यानें उपटून टाकलेल्या कर्णिकारच्या झाडाप्रमाणें त्याच्या हातून नाश पावून खालीं आल्यावांचून कधीं राहणार नाहीं. तर अशा त्या श्रीकृष्णाला मार्गी घेऊन अर्जुनासारखा वीर युद्ध करूं लागला ह्मणजे कर्में होणार हा विचार मनांत येऊन माझें हृदय थरथर कांपत आहे. त्यांच्यावरोबर हा माझा मंदबुद्धि दुर्योधन युद्धाला न उठेल तरच त्याची धडगत आहे. त्यांच्या हातून हा कांहीं जिवत सुटणार नाहीं. त्यांनाही मी इतका भीत नाहीं. पण त्या तपोनित्य अशा सत्यपरायण युधिष्ठिराचे यानें वारंवार अनेक अपराध केले आहेत, तर तो याला आपल्या रागानें जाळून भस्म न करो ह्मणजे झालें. त्याच्या मनांत येण्याला अवकाश, मग ही गोष्ट घडून येण्याला क्षणही लागणार नाहीं. ह्मणून तूं जाऊन त्यांच्यापाशीं प्रीतिपूर्वक बोल. श्रीकृष्णाचें ह्मणणें युधिष्ठिर कधीं मोडणार नाहीं; कारण तो त्यांच्या प्रीतीतिला असून ते त्याला आपल्याप्रमाणें मानतात, व तोही नेहमीं त्यांचें हित साधण्यांत गढला असतो. ह्मणून प्रसंगीं जें हितावह वाटेल तें त्यांना राग न आणतां बोल व युद्धप्रसग टाळ ह्मणजे झालें.'

याप्रमाणें धृतराष्ट्राच्या आज्ञेनें संजय उपप्लव्याला अतुल पराक्रमी पांडवांकडे आला व युधिष्ठिराची गांठ घेऊन अभिवादनानंतर त्याला प्रेमपूर्वक ह्मणाला, 'तुम्ही खुशाल असून तुम्हांला साहाय्यकर्ते मिळाले आहेत हें पाहून मला संतोष होत आहे. राजानें तुमचें सर्वांचें कुशल विचारलें आहे.' युधिष्ठिर ह्मणाला, 'आमचें सर्वांचें कुशल आहे. आ-

पल्या भेटीमुळें आम्हां सर्वांना आनंद झाला आहे. आज फार दिवसांत कौरवांकडील कुशल वर्तमान समजलें नव्हतें. या प्रेमाच्या भेटीमुळें प्रत्यक्ष राजाची भेट झाल्यासारखें वाटत आहे. वृद्ध, शहाणे, सर्व धर्म जाणणारे आमचे पितामह भीष्म कुशल असून त्यांची वृत्ति पूर्वीप्रमाणेच आहे ना? तात धृतराष्ट्र आपल्या पुत्रांसह कुशल आहेत ना? तसेंच द्रोणकर्णादि सर्व कुशल आहेत ना? पृथ्वीवर जे जे ह्मणून श्रेष्ठ धनुर्धर आहेत त्या सर्वांना कौरव हवेसे वाटतात ना? त्या सर्वांना राजाकडून योग्य मान मिळतो ना? तसेच ते सर्व निरोगी आहेत ना? भरतकुलांतील स्त्रीपुरुष व दासदासी निष्कपटानें वागत आहेत ना? तातांची ब्राह्मणांच्या ठिकाणीं वृत्ति पूर्वीप्रमाणेच असून मी ब्राह्मणांना दिलेले त्यांनं हरण करून घेतले नाहींना व ब्राह्मणांचा कोणीं अपमान केल्यास त्याकडे दुर्लक्ष करून स्वर्गमार्गरूप अशा त्यांच्या वृत्तीसंबंधानें हयगय दाखवीत नाहींत ना? कारण ही अनुपम व स्वच्छ ज्योती विधात्यानें ह्या जगांत लोकांसाठीं निर्माण केली आहे. ब्राह्मणांचे अपराध जर राजा बेधडक करूं लागेल, तर त्यामुळें सर्व कौरवांचा नाश होईल. राजा व त्याचे पुत्र अमात्यवर्गाची वृत्ति कायम ठेवण्याला यत्न करतात ना? तसाच अमात्यवर्गाच्या मनांत बाईट अमून वरून स्नेहभाव दाखवून मिलाफानें ते यांच्याविरुद्ध वागत नाहींत ना? आमच्यासबधानें कोणी बाईट बोलत नसून सर्व कौरव राजाला व त्यांच्या मुलांना आमच्याशीं सख्य करण्याला सल्ला देत आहेत ना? **चोरांचा उपद्रव झाला असतां** मेघगर्जनेसारख्या अर्जुनाच्या गांडिवाच्या टणत्कारांची त्यांना आठवण होते ना? गदा घेऊन शत्रुसैन्यांत शिरला असतां शत्रूचा थरकांप करून सोडणारा भीम, कलिंगराजाला दोन्ही हातांनीं बाण सोडून जर्जर करणारा सहदेव, व ज्यानें पूर्व पश्चिम दिशेकडच्या शिबि व त्रिगर्त याना जिंकिलें तो नकुल ह्यांनाही ते विसरले नाहींत ना? घोषयात्रेच्या वेळीं दुर्बुद्धि दुर्योधनप्रभृति शत्रूच्या तावडींत सांपडले असतां भीमार्जुनांनीं पराक्रम करून त्यांना सोडविल्याचें ते अद्यापि विसरले नसतीलच. बाहेर तसें दुर्योधनाला जिंकण्याचें जर आमच्या अंगांत सामर्थ्य नसतें तर तुमच्या सामानें तो बळेल असें मला वाटत नाहीं.' हें ऐकून संजय ह्मणाला, 'बा युधिष्ठिरा, कौरवांसंबंधानें सर्व विचारल्याप्रमाणें ठीक आहे. आतां दुर्योधनाजवळ जसे वृद्ध आहेत तसेच त्याला बाईट बुद्धि देणारेही आहेत हें तूं लक्षांत ठेव. पूर्वी महाराजांच्या मुलांनीं अपराध केले असतांही तुम्हीं ते निमुटपणें सोसले असून हल्लीं त्यांचा कांही अपराध नसून त्यांच्याशी वैऱ्यासारखें निष्ठुर होणें तुम्हांला बरें दिसतें काय? तुमच्यासारख्या भल्यांचा जर ते द्वेष करण्याला प्रवृत्त होतील तर त्यांना मित्रद्रोहाचें पातक लागेल. आतां दुर्योधन जें कांहीं करतो त्याला महाराजांची संमति नसून त्याबद्दल त्यांना फार बाईट वाटत आहे. ब्राह्मणांपासून मित्रद्रोहापेक्षां दुसरें मोठें पातक नाहीं असें ते ऐकत असतात. तुमची सर्वांची त्यांना पूर्ण आठवण आहे. अशा रीतीनें पूर्ण धर्मानें वागणाऱ्या तुह्यावर असें बिकट संकट येऊन पडलें तर मनुष्यावर कोणत्या वेळीं कसा प्रसंग गुदरेल हें सांगतां येत नाहीं. ऐहिक सुखाकरितां तुम्ही धर्म कधीं सोडणार नाहीं. म्हणून ज्या योगानें त्यांचे कल्याण होईल अशा रीतीनें तूंच त्यांच्याबरोबर मस्य कर. तुझे वडील जे महाराज त्यांनी मजपाशीं रात्रीं जो निरोप सांगितला आहे तो सर्व कौरवांचें कल्याण मनांत आणून तुम्ही सर्व नीट ऐकून घ्या. तुम्हां दोघांमध्यें सख्य असावें असें महाराजांना वाटत असल्यानें वेळ न दवडतां त्यांनीं मला तुमच्याकडे पाठविलें आहे. म्हणून युधिष्ठिरा, तुम्हा सर्वांना मी म्हणतों हें पसंत पडो. मनोनिग्रह, मनाचा कोमलपणा, सरळपणा इत्यादि गुण तुमच्यांत आहेत. तुमचा जन्म थोर कुलांत झाला आहे. तुमच्या ठिकाणीं कौर्य नसून तुम्ही दानशूर व विनयसंपन्न आहां. कोणत्या कृत्याचा काय परिणाम होईल हें तुम्ही जाणतां. आतां एवढें प्रचंड सैन्य जरी तुम्हीं जमविले आहे तरी तुमच्या हातून एखादें बाईट कृत्य घडलें असतां पांढऱ्या शुभ्र वस्त्रावरील डागाप्रमाणें तें स्पष्टपणें लोकांच्या दृष्टीपुढें येणार आहे. सर्वांचा नाश पापाला व नरकाला मात्र साधन होणार. ज्यांत जय किंवा अपजय यांपासून सारखाच फायदा होणार असें काम कोणीं तरी घ्यावें? जे तुम्ही घोषयात्रेच्या वेळीं

ज्ञातीच्या उपयोगीं पडलां ते तुम्ही धन्य आहां व पुत्र, सुहृद आणि बांधव हे सर्व तुम्हीच आहां. तर तुम्हीं लोकनिंदेला पात्र झालेल्या जीविताचा देखील त्याग करण्यास तयार असून कुरूंचें अस्तित्व ज्यानें खात्रीनें कायम राहील असेंच कृत्य केलें पाहिजे. त्यावेळीं कौरवांना तशा प्रकारचा उपदेश करून आतां जर तुम्ही युद्ध करून त्यांना मारण्याला तयार व्हाल तर ज्ञातीला मारून जिवंत राहणें हें तुम्हांला मरणप्रायच होणार आहे. धृष्टद्युम्नासारखा तुमचा पाठराख्या असतां, तुम्हांला, भगवान श्रीकृष्णाला, चेकितानाला अगर सात्यकीला इंद्रादि देवांचें साहाय्य घेऊन सुद्धां कोण जिंकण्याला समर्थ होणार आहे? तसेंच भीष्म, द्रोण, अश्वत्थामा, कर्ण यांसारख्या वीरांचें ज्यांना पाठबळ आहे त्या कौरवांना तरी कोणाच्यानें जिंकवणार? आपला नाश करून न घेतां दुर्योधनाच्या त्या प्रचंड सैन्याचा मोड कोणाच्यानें करवणार? ह्मणून ह्या जयांत किंवा अपजयांत नफानुकसान मला सारखेंच दिसतें. ह्मणून हीन कुलांत जन्मलेल्या नीच लोकांप्रमाणें ज्यांत धर्म किंवा अर्थप्राप्ति मुळींच नाहीं असें कृत्य तुमच्यासारख्यांनीं कां करावें? याकरितां मी वासुदेवाच्या व वृद्ध द्रुपदांच्या पायांवर मस्तक ठेवून हात जोडून तुम्हांला विनवितों: कुरु व सृंजय ह्या दोघांचें कल्याण होईल असे वागा. याचना केली असतां जे स्वतःचे प्राण देखील देण्यास तयार होतील ते कृष्णार्जुन माझें ह्मणणें मोडतील असें कधीं होणार नाहीं. ह्मणूनच महाराजांच्या मनांत तुम्हां दोघांमध्यें सख्य असावें असें आहे हें मी तुम्हांला कळविण्याला आलों आहे.' युधिष्ठिरानें उत्तर केलें, 'अहो संजय, माझें आपण असें कोणतें भाषण ऐकिलें आहे कीं, ज्यांत माझी युद्धाची इच्छा दिसून आली, ह्मणून आपल्याला युद्धाची एवढी भीति पडली आहे? युद्ध होण्यापेक्षां तें न व्हावें हेंच अधिक हितावह असून तें न करितां जर इष्ट हेतु साधत असेल तर युद्ध कोणाला पाहिजे? देवांची ज्यावर अवकृपा झाली असेल तोच पुरुष मग युद्धाला उठेल. पांडवांना जरी सुखाची इच्छा आहे तरी तें मिळविण्यामाजीं धर्माच्या आड न येणारें सर्व लोकांना हितावह असेंच कृत्य त्यांच्या हातून घडेल. केवळ इंद्रियविषयांच्या मागें लागून सुख तेवढें मिटवून दुःख तेवढें ढोळण्याची ज्यांची खटपट चालली असते त्यांच्या हातून प्रायः परिणामीं दुःखकारक असेंच कृत्य घडत असतें. व त्यापासून त्यांच्या स्वशरीरालाही कष्ट होतात. तुपानें पेटलेल्या अग्नीच्या ज्वाळा ज्याप्रमाणें वाढतच जातात, तसेंच हवें तें मिळाल्यानें कामवासना अधिकाधिकच पेट घेते, आमच्या ह्या सुखाशीं धृतराष्ट्राचें सुख ताडून पहा. पुरुष भाग्यशाली असल्यावांचून दुसऱ्याबरोबर कलह करून त्यांत त्याला यश येत नाहीं. तो भाग्यशाली असल्यांचून मधुर गायन, सुवासिक पुष्पांचा उपभोग, चंदनानुलेपन अगर उत्तम उत्तम वस्त्रें त्याला मिळत नाहींत. हा दुर्योधन भाग्यशाली नसता तर कुरुदेशांतून त्याला आह्मांला कसें घालवून देतां आलें असतें? तरी ऐहिक सुखाच्याच मागें लागणें हें अप्रबुद्धाचें काम आहे. कारण ही सुखेच्छा मनांत आणल्यापासून त्याला उर्गाच ताप मात्र होतो. हा दुर्योधन स्वतः संकटांत सांपडला असतां मात्र दुसऱ्याच्या साहाय्यानें त्यांतून सुटण्याची इच्छा धरतो. मग त्यानेंही दुसऱ्यासंबंधानें तसें कां न वागावें? दाट गवतानें निबिड अशा अरण्यांत ऊष्णकालीं आपल्या जवळचा अग्नि फेंकून देऊन मग वाऱ्यानें त्यानें पेट घेतला ह्मणजे त्यांतून सुरक्षितपणें बाहेर पडतां येत नाहीं ह्मणून रडण्याची पाळी येते, त्याचप्रमाणें आज ऐश्वर्य प्राप्त झालें असूनही दुर्बुद्धि, कुटिल, मूढ व अविचारी मुलांच्या मतानें चालल्यामुळें महाराजांना शोक करण्याची पाळी आली आहे. दुसऱ्याच्या अप्रतिष्ठेंत आपली प्रतिष्ठा वाढवून घेणारा, परोत्कर्षासहिष्णु, तापट, धर्मकामाची पर्वा न करणारा, दुर्भाषण करणारा, रागाच्या आधीन होणाऱ्यांच्या मतानें वागणारा, कामाधीन झालेला, दुष्टांची वाहवा घेणारा, सदुपदेशाचें कांहीं चालूं न देणारा, दुर्भाग्यवान, दीर्घद्वेषी, मित्रद्रोही अशा पापबुद्धि मुलाचें कोड पुरविण्याच्या मागें लागून समजून उमजून हितार्थवादी विदुराचें भाषण कडू वाटून महाराजांनीं धर्म व काम बाजूला झुगारून दिले आहेत. द्यूताचे वेळीं विदुराचें पोक भाषणही जेव्हां दुर्योधनाला पटलें नाहीं तेव्हांच

कौरव नामशेष होण्याची वेळ जवळ आली आहे असें मला वाटलें. जोंपर्यंत हा त्यांच्या विचारानें चालत होता तोंपर्यंत राष्ट्राची भरभराट होत चालली होती व जेव्हां तो त्यांचें ऐकनासा झाला तेव्हांच राष्ट्राला उतरती कळा लागली. अर्थलुब्ध या दुर्योधनाचे सल्लागार कोण आहेत म्हणाल तर दुःशासन, कर्ण व शकुनि! व यांचा लोभही दिवसानुदिवस वाढत चालला आहे. तेव्हां मी पुष्कळ विचार करून पाहतों तरी कुरु व सृंजय या दोघांचें कल्याण ज्यानें होईल असा मार्ग कांहीं मला दिसत नाहीं. दुसऱ्याचें ऐश्वर्य हरण करून दीर्घदर्शी विदुरांनाही हाकलून देऊन या सर्व पृथ्वीचें राज्य निष्कंटक आपल्याला असावें असें त्याला वाटत आहे. आम्हांला वनाला हाकलल्यानें सर्व संपत्ति आपलीच झाली असें त्याला वाटूं लागलें आहे. तेव्हां त्याबरोबर खरें सख्य जुळणें फार कठीण आहे. शस्त्रधारी अर्जुनाबरोबर टक्कर देण्याला आपण समर्थ आहों असें कर्णाला वाटत आहे, तरी अर्जुनाच्या तोडीचा धनुर्धर नाहीं हें तोही पूर्ण जाणून आहे व शत्रूला जर्जर करून सोडणारा अर्जुन जिवंत असतां दुर्योधनानें राज्य कपटानें बळकाविलें आणि त्याच तत्त्वाला पुढें अनुसरून पांडवांचें स्वस्व कायमचें हरण करतां येईल असें त्याला वाटत आहे. परंतु अर्जुनाच्या गांडिवाचा टणत्कार जोंपर्यंत ऐकला नाहीं तोंपर्यंतच कौरव जिवंत आहेत असें समजा. भीमसेनाची क्रोधदृष्टि फिरली नाहीं तोंवर दुर्योधनाला आपला हेतु साधला या घमेंडींत असूं दे: अगर सहनशील नकुलसहदेव जिवंत असून आमच्या स्वस्वाचा अपहार करण्याला प्रत्यक्ष इंद्रही समर्थ नाहीं. म्हणून हा सर्व विचार महाराजांच्या व दुर्योधनाच्या मनांत भरला तरच पांडवांच्या कोपानें रणांत जळून खाक होण्याची कौरवांवर पाळी येणार नाहीं. आम्हांला आजपर्यंत सोसावे लागलेले क्लेश व त्यांचें आमच्याशीं वर्तन व आमचें त्यांच्याशीं वर्तन हें सर्व आपण जाणतांच. तरी दोघांचें सख्य जुळून पूर्वीप्रमाणें दोघांनीं स्नेहानें असावें अशीच माझीही पण इच्छा आहे. सुयोधनाला मला इंद्रप्रस्थ देऊं दे व तेथें मी राज्य करीत राहीन.'

हें युधिष्ठिराचें भाषण ऐकून संजय म्हणाला, 'हा युधिष्ठिरा, तुझें प्रत्येक कृत्य नेहमीं धर्माला अनुसरून असतें अशी कीर्ति आहे व तें मला प्रत्यक्ष दिसून येत आहे! हें जीवित फार अशाश्वत आहे हें लक्षांत घेऊन महाराजांचा नाश करण्यास प्रवृत्त होऊं नकोस. युद्धाखेरीज दुसऱ्या उपायांनीं कौरव तुझा अंश तुला देण्याला जर तयार होणार नाहींत तर अंधक आणि वृष्णि यांच्या राज्यांत भिक्षा मागून उदरनिर्वाह करणें हें देखील युद्ध करून राज्य मिळविण्यापेक्षां तुला अधिक श्रेयस्कर आहे. मनुष्याचें जीवित थोडे दिवस टिकणारें आहे म्हणून असें करणें तुझ्या सारख्याच्या कीर्तीला शोभत नाहीं. म्हणून तूं हें पाप करण्याला प्रवृत्त होऊं नकोस. ह्या विषयवासना मनुष्यामध्यें उत्पन्न झाल्या असतां त्या त्याला पाशांत गुंतविण्याला कारण होतात व त्यांच्या पाठी लागल्यानें धर्मामध्यें व्यत्यय येतो, म्हणून प्रथमच त्यांचें नियमन करणारा शहाणा मनुष्य लोकस्तुतीला पात्र होतो. धर्माला धरून चालणाराच या जगांत शहाणा होय. विषयांमध्यें मन घालणारा मनुष्य अर्थाच्या मागें लागून नाश पावतो. सर्व श्रेष्ठ अशा धर्माचरणानें मनुष्य सूर्याप्रमाणें झळकतो पण तोच धर्मभ्रष्ट झाला असतां ही सर्व पृथ्वी त्याला मिळाली तरी तो दुर्गतीलाच मिळतो. तूं वेदाध्ययन करून **ब्रह्मचर्य पाळलें आहेस** व यज्ञयागादि कर्में करून त्यांत ब्राह्मणांना पुष्कळ दान दिलें आहेस. सर्वांत श्रेष्ठ असें उत्तम स्थान नेहमीं डोळ्यांपुढें ठेवून वर्षेच्या वर्षे तें मिळविण्यामाठीं तूं आपलें शरीर कष्टविलें आहेस. अनेक काल सुखोपभोगांत गढून योगाभ्यास ज्याच्या हातून होत नाहीं तो द्रव्यहीन होऊन शेवटीं सुखाला मुकतो व मग विषयवासनांच्या तीव्र वेदना सहन करीत त्याला दुःखांत चिरकाल काल काढावा लागतो. तसेंच ब्रह्मचर्याकडे दुर्लक्ष करून परलोकसुखाची पर्वा न करितां जो धर्मभ्रष्ट होऊन अधर्माचरण करतो त्या मंदबुद्धीला मरणानंतर परलोकीं गेल्यावर आत्मकृत्यावद्दल पश्चात्ताप होतो. पुण्यकर्में असोत वा पापकर्में असोत, तीं करीबाईट कर्में प्रथम परलोकीं जात असून कर्ता त्यांच्या मागून तीं भोगण्याला तेथें जात असतो. परलोकीं

मनुष्याच्या हातून कांहीं नवीन कर्में होत नसून कृतकर्मांचींच तो तेथें फलें भोगतो. भल्यांना मान्य असें पारलौकिक पुण्यकर्म तुझ्या हातून घडलें आहे. मृत्यु, जरा, भय, क्षुधा, तृषा, प्रियाप्रिय या सर्वांपासून मनुष्य तेथें मुक्त असतो. तथापि आत्म्याला संतुष्ट करणाऱ्या ह्या कर्मसुखाला देखील मी चांगलें मानीत नाहीं. ह्मणून रागापासून चिरकाल मिळणाऱ्या नरकाच्या अगर हर्षापासून मिळणाऱ्या स्वर्गसुखाच्या पाठीं न लागतां ज्ञानानें मोक्षप्राप्ति करून घेण्याला झट; व सत्य, दम, सरलता आणि दया सोडून पापकर्माच्या फिरून वाटेला जाऊं नकोस. आतां इतक्या दिवसांच्या शांतीनंतर जर सूड घेण्याचें पातक करण्याला तुम्ही प्रवृत्त झालां आहां तर इतकीं वर्षें तुह्मांला वनवासदुःख भोगावयाला दुर्योधनानें लाविलें यांत तरी त्यानें कोणता अधर्म केला? शिवाय तुमचा पहिल्यापासून जर हा उद्देश होता तर तुम्ही वनवासाला तरी कशाला गेलां? कारण त्या वेळीं सर्व सैन्य व मंत्री तुमच्या ताब्यांत होते. व श्रीकृष्ण, सात्यकि, विराटप्रभृति मंडळी तर पहिल्यापासूनच तुमच्या बाजूला आहेत, व ज्या राजांना तुम्हीं पूर्वी जिंकिलें होतें ते तुह्मालाच मिळाले असते. ह्मणून पूर्वी याप्रमाणें समर्थ असल्यानें त्या सभेंतच दुर्योधनाची खोड मोडून त्याचा गर्व खालीं केला अमता तर बरें झालें असतें. आतां आपलें सामर्थ्य कमी करून घेऊन व शत्रूचें बाहूं देऊन व अनेक वर्षें वनबास काढून वेळ निघून गेल्यावर युद्धाची इच्छा कशाला मनांत आणतोस? कधीं कधीं अन्यायानें चालणारा मूर्ख युद्धाच्या योगानें वैभवाला चढतो व न्यायानें चालणारा शहाणा रागाच्या तावडींत सांपडून त्याला मुकतो. तर ह्या गोष्टी कांहीं अंशीं दैवाधीन आहेत. बा पार्था, अधर्माकडे तुझी बुद्धि कधी वळली नसून रागाच्या झपाट्यांत तुझ्या हातून कधीं पाप घडलें नाहीं. असें असून तुझ्या नांवाला न शोभणारें हें कृत्य करण्यास तूं कसा बरें उठलास? व्याधीवांचून तोंडाला कडूपणा आणणारा, मस्तकशूळ उत्पन्न करणारा, यश हरण करणारा व अखेर पापरूप फल पदरीं बांधणारा व भल्यांनाच गिळून टाकतां येण्याजोगा असा हा राग शांतपणें आवर. पापाली मूळ अशा रागाच्या कोणीं वाटेला जावें? ज्यासाठीं भीष्मद्रोण प्रभृतींना मारावें लागणार अशा सुखोपभोगापेक्षां क्षमाच विशेष श्रेयस्कर आहे. आतां यांना मारून तुला जरी वैभव मिळालें तरी त्यापासून तुला कितीसें सुख होणार हें तूंच पहा. ही सागरांत पृथ्वी जरी तुला मिळाली तरी जरा, मरण, इष्टानिष्ट, सुखदुःख हीं तुला कधीं सोडणार नाहींत. हें पक्कें लक्षांत घेऊन युद्धाला उठूं नकोस. आतां आप्तवर्गाच्या इच्छेसाठीं ह्मणून जर तूं हें काम हातीं घेतलें असशील तर त्यांवरच तें सोंपवून देऊन तूं वनाला निघून जा, पण स्वर्गमार्गापासून भ्रष्ट होऊं नकोस.' हें संजयाचें भाषण ऐकून युधिष्ठिर ह्मणाला, 'अहो संजय, सर्व कर्मांमध्यें धर्म श्रेष्ठ आहे अमें जें आपण ह्मणतां तें अगदीं खरें आहे परंतु माझ्या हातून धर्म घडत आहे किंवा अधर्म घडत आहे ह्याचा विचार करून मग आपण मला दोष द्या. धर्माला कोठें अधर्माचें स्वरूप येत असतें व अधर्माला धर्माचें येत असतें व कोठें धर्म हाच धर्माप्रमाणें दिसत असतो. शहाणे लोकच आपल्या बुद्धीच्या बलानें सारासारविचार करूं शकतात. प्रत्येकानें आपला वर्णाश्रमधर्म पाळावा हें उचित आहे. परंतु आपत्कालीं धर्माधर्माचें स्वरूप पालटतें. मनुष्य निर्वाहाच्या साधनाला मुकला अमतां ज्याच्या योगानें वर्णाश्रमधर्म योग्य रीतीनें त्याला पाळतां येईल असें वाटेल तें कृत्य त्यानें करावें. परंतु सुस्थितींतील मनुष्य आपत्कालाप्रमाणें व आपत्कालांतील मनुष्य सुस्थितीप्रमाणें जर वागूं लागेल तर त्या दोघांचेंही तें वर्तन गर्ह्यच आहे. ब्राह्मणांना जें कर्म उचित नाहीं तें त्यांनीं आत्मसंरक्षणार्थ केलें असतां त्याबद्दल ब्रह्मदेवानें त्यांना केवळ प्रायश्चित्तच सांगितलें आहे. यावरूनच **लोकांनीं वर्णाश्रमाला सांगितलीं नाहींत अशीं कर्में आपत्कालीं करावीं** हें सिद्ध होतें. सामान्यकालीं आपल्या धर्माप्रमाणें वागणारे व आपत्काली तसें न वागणारे हे दोघेही स्तुतीलाच पात्र आहेत. उलट ते तसे न वागतील तरच निंदेला पात्र होतील. इंद्रियनिग्रह करून बुद्धीला चिदात्म्यापासून वेगळें करण्याकरितां सदा भल्यांचा घरीं याचना करून उदरनिर्वाह करणें ही ब्राह्मणांची वृ-

त्ति ब्राह्मणांनाच योग्य आहे, परंतु जे ब्राह्मण नाहींत अगर ज्ञानी नाहींत, त्यांनीं सामान्य कालाला व अपत्कालाला उचित असा स्वधर्म आचरावा हेंच त्यांना योग्य आहे. आमचे वाडवडील, त्यांच्याही पूर्वी होऊन गेलेले थोर, तसेच इतर ज्ञानेच्छु यांनीं अशाच प्रकारचें कर्म केलें आहे. तेव्हां माझ्या हातून कांहीं यांत विपरीत घडत नाहीं असें मला तरी वाटतें. ह्या पृथ्वीवरील सर्व संपत्ति एवढेंच नव्हें तर देवांची अगर त्यांनाही दुर्लभ अशी संपत्ति, त्याचप्रमाणें स्वर्गलोक अगर ब्रह्मलोक हीं सुद्धां मी अधर्मानें मिळवूं इच्छित नाहीं. ब्राह्मणभक्त, बुद्धिमान, नीतिमान, सर्व क्षत्रियांचा स्वामी व सर्व धर्म जाणणारा भगवान श्रीकृष्णच सांगूं दे कीं, मानें काम होत असून दुराग्रह धरून मी लोकनिंदेला पात्र होत आहें व युद्ध करण्यांत माझ्या हातून स्वधर्म सुटत आहे ह्मणून हे सर्व वृष्णि, अंधक, सृंजय इत्यादि कुलांतील सत्यपरायण, बलशाली, इंद्रतुल्य अमेशत्रूंची खोड जिरवून मित्रांना आनंद देणारे यादव याच्याच आज्ञेंत आहेत. उष्णकालाच्या शेवटीं जलवृष्टीनें आल्हाद देणाऱ्या मेघासारखा हा प्राज्ञ भगवान कोणत्याही कृत्याचे परिणाम पूर्ण ओळखतो. तर तो सांगेल तसें वागण्याला मी तयार आहें.' हें ऐकून भगवान ह्मणाले, 'बा, संजया, पांडवांचा नाश न होतां त्यांनीं वैभवाला चढून त्यांचें प्रिय व्हावें अशी माझी इच्छा आहे; तरी दुर्योधनही वैभवशाली असावा अशीच माझी नेहमीं इच्छा आहे. ह्मणून दोघांमध्यें मध्य असूं द्या, असें न मी वज्रेवर दोघांनाही सांगत आलों आहे. राजाचीही दोघांमध्यें सख्य असावें अशीच इच्छा दिसते. युधिष्ठिरानें तर आजपर्यंत विलक्षण शांति धरली आहे. परंतु धृतराष्ट्र व त्याचा पुत्र यांचा लोभ दिवसानुदिवस वाढतच चालला असल्यानें दोघांमध्यें भांडण कां वरें जुंपणार नाहीं? माझ्याकडून किंवा युधिष्ठिराकडून धर्माला सोडून वर्तन झाल्याचें तुझ्या कधीं तरी कानावर आलें आहे काय? असें असून यथाशास्त्र स्वधर्म पाळण्याची इच्छा असणाऱ्या युधिष्ठिराला तूं कसा वरें दोष दिलास? यानें स्वीकारलेल्या ह्या यथायोग्य मार्गासंबंधानें ब्राह्मणांचा मतभेद असेल. कोणी परलोक कर्मानें मिळतो ह्मणतात, कोणी त्याला कर्माची अपेक्षा नसून ज्ञानानेंच तो प्राप्त होतो ह्मणतात. परंतु ही गोष्ट सर्वांना मान्य आहे कीं मनुष्याला भक्ष्यभोज्याचें केवळ ज्ञान असून तीं तो सेवन न करील तर त्यांपासून त्याची तृप्ति कधीं व्हावयाची नाहीं. **कर्म करावयाला लावणारें ज्ञानच इहलोकीं उपयोगीं पडतें.** कर्माचें फलही प्रत्यक्ष दिसून येतें. कारण पाणी प्याल्यावरच तहान भागते. ह्मणून **ज्ञानाची व कर्माची सांगड घातल्यानेंच कर्माचा उच्छेद होतो. कर्माव्यतिरिक्त दुसऱ्याला जो कोणी चांगलें ह्मणत असेल त्या अविचारी मनुष्याचा बाष्कळपणा मी फुकट समजतों.** स्वर्गीं देव कर्मानेंच प्रकाशमान आहेत; वायु कर्मानें वाहतो; सूर्य कर्मानें न चुकतां दिवस व रात्र असे विभाग करून नेहमीं उदय पावतो; त्याचप्रमाणें मास, पक्ष, नक्षत्रयोग यांचा चंद्राशीं योग कर्मानेंच होतो; अग्नीचें जळणें, पृथ्वीचें हा मोठा भार सहन करणें, व सर्व अंतरिक्ष व दिशा गर्जून सोडून इंद्राचें पाऊस पाडणें इत्यादि गोष्टी कर्मानेंच होतात. सुख व इष्ट वस्तु यांची पर्वा न करतां कर्मानेंच त्यानें देवांवर श्रेष्ठत्व मिळविलें आहे. मुनींना देखील ब्रह्मविद्या, ब्रह्मचर्य व एक प्रकारचें तेज क्रिया पाळण्यानेंच प्राप्त होतात. तर हा सर्व प्राणिमात्रांचा धर्म तुला कळत असून कौरवांसाठीं ही वृथा खटपट तूं कां चालविली आहेस? युधिष्ठिराचें लक्ष जर्में वेद, अश्वमेध, राजसूय इत्यादिकांकडे आहे, तसेंच धनुष्य, घोड्यावर बसणें, हत्तीवर बसणें, रथांत बसणें व शस्त्रधारण करणें इत्यादिकांकडेही आहे. परंतु कौरवांचा नाश न होता आपला हेतु साधण्याला त्याला जर एखादा उपाय दिसेल तर धर्महानि न होतां पुण्य पदरीं घेतल्यासारखें होणार आहे व त्या थोर कृत्याला भीमसेनाचेंही मन वळवितां येईल. परंतु परंपरागत युद्धकर्म करण्याचा प्रसंग येऊन तें यथाशक्ति बजावीत असतां त्यांत त्यांना दैवयोगानें मृत्यु आला तरी तोही त्यांना श्रेयस्करच आहे. यांनीं शांतिच धरावी असा तुझा आग्रह असेल तर राजांनीं प्रसंग पडला असतां युद्ध करणें, वाजवी आहे का तें न करणें वाजवी आहे हें तूंच सांग. चारी वर्णांला बांधून दिलेले कर्मविभाग लक्षांत आणून, व तुम्हां उभय-

तांचें वर्तन लक्षांत घेऊन मग तूं बाटेल तर युधिष्ठिराची स्तुति कर किंवा त्याला दोष दे. स्वतः जितेंद्रिय राहून राजानें मोठ्या दक्षतेनें प्रजेचें पालन करून तिची कर्माकडे प्रवृत्ति ठेवावी, लोभानें धर्मलंडांना आश्रय देऊं नये, हा राजाचा मुख्य धर्म आहे आणि अशाप्रकारें राज्य करण्याला एक युधिष्ठिरच योग्य आहे. एखाद्या दुष्ट राजाला स्वतः त्याच्या मनगटाच्या जोरावर दुसऱ्याच्या पैशाचा अपहार करण्याची बुद्धि उत्पन्न होईल ह्मणनच युद्धरूप कर्म व त्याबरोबरच शस्त्रास्त्रादिक अनेक आयुधें इंद्रानें निर्माण केलीं आहेत. **दुष्ट राजांना शासन करण्यांत पाप मुळीं नसून उलट पुण्यच आहे.** आतां या कौरवांच्या हातून केवढालीं घोर पातकें घडलीं आहेत हें तुला ठाऊक नाहीं असें नाहीं. एक तर वंचनारूपी घोर पातक करून सनातन धर्माकडे लक्ष न देतां न्यायानें पांडवांचें असलेल्या राज्याचा हे अपहार करूं पहात आहेत **अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष जो दुसऱ्याचें द्रव्य हरण करतो तो चोरच समजावयाचा.** या दृष्टीनें पाहतां हें कौरवांचें कृत्य चौर्यकर्माहून निराळें ह्मणतां येणार नाहीं. आमचा राज्याचा हिस्सा कौरवांपाशीं ठेव ह्मणून ठेवला असून त्याचा अपहार करण्याची त्यांनीं इच्छा कां धरावी? आणि तो परत मिळविण्यासाठीं युद्ध करून आह्मांला मरण्याची पाळी आली तरी आह्मीं कां मागें घ्यावें ? एखादें नवें राज्य मिळविण्यापेक्षां परंपरागत राज्याची कांहीं विशेष मातबरी आहे. द्रौपदीचें भरसभेंत दुःशासनादिकांनीं जे धिंडवडे केले त्यांकडे भीष्मादिकांसारख्यांनीं सुद्धां कानाडोळा केला. धर्माला अनुसरून न्याय्य तें बोलून त्या बिचारीला हात देण्याला त्या एवढ्या थोरल्या सभेंत एकटे विदुर निघाले! त्या वेळीं 'तुला स्वतंत्रता नाहीं, तूं दासी आहेस, तेव्हां आतां तूं दुर्योधनाच्या वाड्यांत जा; पांडव आतां तुझे पती नव्हत, एखादा दुसरा पति तूं वर,' इत्यादि कर्णाचे हृदयाला झोंबणारे शब्द त्याचप्रमाणें 'तुझ्या घाकट्या भावानाही पणांत जिंकलें आहे, आतां कायती द्रौपदी उरली आहे तिला पणाला लाव,' ह्मणून शकुनीचें टोचून बोलणें लक्षांत घेऊन मग आतां न्यायन्यायाचा उपदेश धर्मराजाला कर ह्मणजे झालें. इतकें झालें तरी ही बिघडलेली घडी बसून दोघांचें सख्य जुळवून देण्याची खटपट करण्यासाठींच मी स्वतः हास्तिनापुराला येणार आहें. पांडवांचें हित जाऊं न देतां या दोघांमध्यें सख्य जुळवून आणण्यांत जर मला यश आलें तर हें एक मोठें पुण्यच माझ्या पदरीं पडल्यासारखें होणार आहे व कौरवही मृत्यूच्या तावडींतून सुटतील. धृतराष्ट्र मनापासून माझें धर्मार्थाला धरून असणारें भाषण ऐकून घेईल तर चांगलें होणार आहे, नाहींपेक्षां स्वकर्मानेंच जळून भस्म झालेले हे पापी कौरव नरवीर अर्जुन व स्वकर्मदक्ष भीमसेन यांच्याकडून वैभवाला मुकतील व मग योग्य वेळीं भीमसेन आपण बोललेल्या शब्दांची आठवण दुर्योधनाला देईल. तापट दुर्योधन हा एक मोठा वृक्ष असून कर्ण त्याचें खोड आहे; शकुनि त्याच्या शाखा व दुःशासन फलपुष्पांचा बहार आहे; धृतराष्ट्र हा त्या वृक्षाचें मूळ आहे. इकडे धर्मात्मा युधिष्ठिर हा एक महावृक्ष असून अर्जुन त्याचें खोड आहे; भीमसेन शाखा व नकुलसहदेव समृद्धिमान फलपुष्पें आहेत, मी, देव व ब्राह्मण त्याचीं मुळें आहों. धृतराष्ट्र व त्याचे मुलगे हें एक मोठें वन असून पांडव त्यांत असणारे वाघ आहेत. ह्मणून वाघांसकट वनाचा उच्छेद होणें अगर वनांतून त्यांना हुसकून लावणें या दोन्ही गोष्टी इष्ट नाहींत. कारण वाघ वनाशिवाय उघडे पडतील तर त्यांचा नाश होईल व वनाचाही वाघ नसतील तर उच्छेद होईल ह्मणून वाघांनीं वनाचें रक्षण करावें व वनानें वाघांना जपावें, यांतच उभयतांचें हित आहे. धार्तराष्ट्र लतेप्रमाणें असून पांडवशालवृक्षासारखे आहेत. मोठ्या वृक्षाचा आश्रय केल्यावांचून लतेची वाढ कधीं होत नाहीं. पांडव सख्य करण्याला तयार असून प्रसंग पडल्यास युद्धालाहि तयार आहेत. ह्मणून धृतराष्ट्राच्या मनांत असेल तसें त्यानें करावें.' हें कृष्णाचें भाषण ऐकून घेऊन सर्वांचें कल्याण चिंतून संजय त्यांचा निरोप घेऊं लागला असतां युधिष्ठिर ह्मणाला, 'अहो संजय, आपल्या मनाविरुद्ध आमच्याकडून कधीं वर्तन होणार नाहीं. आपण शुद्ध अंतःकरणाचे असे मध्यस्थ आहां हें ते तसेंच आह्मीही जाणतों, शीलसंपन्न, हि

तवादी, समाधानशील व आमचें हित पाहणारे असे मध्यस्थ या नात्यानें आपण आह्मांला फार प्रिय आहां. कोणी वांकडें बोलला असतां त्याचा आपल्याला कधीं राग येत नाहीं. मर्मभेदक, निष्ठुर, व कटु असें भाषण आपल्या मुखांतून निघण्याची मुळीं शंका नको. मध्यस्थीसाठीं आमचेकडे एक आपण किंवा एक विदुर आले असतांच आह्मांला संतोष वाटतो. शुद्ध, वेदाध्ययनसंपन्न, धर्मवेत्ते, कुलीन व तपस्वी अशा वनवासी ब्राह्मणांना व वृद्ध पौरांना भेटून त्यांना आमचें अभिवादन सांगून आमचें कुशल त्यांना कळवा. व इतर सर्व लहानमोठ्यांना आम्हीं विचारलें आहे म्हणून सांगा. गांव न सोडतां जागच्या जागीं व्यापार करून राहणाऱ्या वैश्यांनाही कुशल विचारल आहे म्हणून सांगा. शौर्य, सौजन्य, तप, बुद्धि, शील, विद्या, धैर्य इत्यादि गुणांनीं संपन्न भीष्मांच्या व नीतिवेत्ते, चतुर्वेद पगयण, चार प्रकारचें अस्त्रज्ञान ज्यांना पूर्ण अवगत आहे, अशा धनुर्वेत्या द्रोणांच्या पायांवर मस्तक ठेवून मीं त्यांना फार फार विचारलें आहे म्हणून सांगा. त्याचप्रमाणें अंध, बहुश्रुत, वृद्धसेवी राजाला माझा नमस्कार सांगून दुर्योधनादिकांना मीं कुशल विचारलें आहे म्हणून सांगा. आमचे गुरु, वडील, सुहृद, मंत्री, अशा आमच्यावर भक्ति असणाऱ्या अगाधबुद्धि व दूरदर्शी विदुरांना मीं विचारलें आहे म्हणून सांगा. तसेंच राजघराण्यांतील वृद्ध स्त्रियांना आमचा नमस्कार सांगून सद्वर्तनशील अशा सर्व पतिव्रता राजस्त्रियांना तुह्मी आपल्या गृहकृत्यांत निमग्न असून सासुसासऱ्यांच्या व पतीच्या सेवेंत दक्ष आहांना ह्मणून विचारलें आहे ह्मणून सांगा व आमचें कुशल वर्तमान त्यांना कळवा. त्याचप्रमाणें राजवाड्यांतील कन्यावर्गाना आलिंगनपूर्वक तुह्मांला तुमच्या मनाप्रमाणें पति मिळोत ह्मणून आशीर्वाद दिला आहे ह्मणून सांगा. त्याचप्रमाणें दासदासी, अंध, कुबडे, लंगडे इत्यादि आश्रितवर्गांना आमचें कुशल कळवून राजा तुमचें यथायोग्य पालनपोषण करीत आहेना ह्मणून विचारलें आहे ह्मणून सांगा; आणि त्यांना असेंही कळवा कीं, दुःखदायक व कष्टमय अशा त्वरितार्थाला कंटाळूं नका. पूर्वजन्मीं केलेल्या पापाचें हें फळ आहे, मी लवकरच शत्रूंना जिंकून मित्रांवर अनुग्रह करून अन्नवस्त्रानें तुमची यथायोग्य काळजी घेईन. तेथें दुर्योधनाकडे जे अनेक राजे व वकील निरनिराळ्या देशांहून आले असतील त्यांच्याशीं ज्यांज्याशीं जसें बोलावयाचें तसें बोलून त्यांनाही आमचें कुशल कळवा. आतां दुर्योधनाच्या बाजूला जमलेल्या राजांच्या तोडीचे योद्धे जरी जगांत दुसरे नाहींत तरी **धर्माचें फल कधीं मिळाल्यावांचून रहावयाचें नाहीं. आणि त्याच्याच बलावर मी शत्रूचा नाश करण्याची आशा करतों.** ' मी ह्या पृथ्वीचें निष्कंटक राज्य करीन ह्मणून तूं जी हाव धरली आहेस ती व्यर्थ आहे' कारण, त्याला आह्मी कधीं मुकाट्यानें कबूल होणार नाहीं; ह्मणून आह्मांला इंद्रप्रस्थ तरी दे, नाहीपेक्षां युद्धाला तयार हो, ' ह्मणून माझा निरोप तुह्मी दुर्योधनाला कळवा. त्याला असेंही सांगा कीं, ' सुजन असो, दुर्जन असो; लहान असो वा थोर असो; दुर्बल असो वा बलवान असो; सर्वांना ईश्वर आपल्या मुठींत ठेवतो. सर्वांना प्राक्तनफल देणारा तोच बालाला पंडित करून पंडिताला मूर्ख करतो. ' वाटेल तर आमच्या सैन्याचाही त्याला नीट अंदाज द्या. महाराज सर्व कुरुवृद्धांमध्यें बसले असतां ' आपल्याच सामर्थ्यानें पांडव सुखांत रहात आहेत. पूर्वी आपल्याच कृपेत ते वाढले असून आतां निरुद्दिष्ट शेत त्यांना टाकणें आपल्याला शोभत नाहीं. हें सर्व ब्रह्मांडही एकट्याला मिळून कधीं कोणाची तृप्ति व्हावयाची नाहीं. एकजुटीनें आपण सर्व आनंदांत नांदूं. व्यर्थ आज कालाच्या तावडींत जाऊं नका, ' असा माझा निरोप त्यांना कळवा. तसेंच भीष्मांनाही शांतनूचा बुडालेला वंश आपण वर काढला आहे, तर आपले नातू परस्परांशीं स्नेहानें राहतील असा कांहीं उपाय योजा ह्मणून सांगा. आणि कौरवांचे मंत्री जे विदुर यांना आमचें हित लक्षांत ठेवून युद्धप्रसंग टाळण्याविषयीं कौरवांना उपदेश करण्याला सांगा. कौरवांचा उच्छेद होऊं नये ह्मणून मनगटांत जोर असतांही भरसभेमध्यें दुःशासनानें कुंतीकडेही न पाहतां द्रौपदीचे जे हाल केले ते आह्मीं निमुटपणें सहन करून बनवासही काढला. आतां आमचा हिस्सा आह्मांला मिळाला पाहिजे. ' परद्रव्यापहार

करण्याची ही लोभबुद्धि सोडून दे म्हणजे दोघांचें सख्य जुळून प्रेम वाढणार आहे. दीर्घांत तंटा नसावा अशी आमची इच्छा असल्यानें कांहीं तरी भाग तूं आह्मांला दे म्हणजे झालें. अविस्थल, वृकस्थल, माकंदी, वारणावत व आणखी एखादें पांचवें अशीं पांच गांवें तूं आह्मांला राहण्याला दे. एवढेंही तुझ्यानें देववत नसेल तर पांचांना मिळून एक गांव दिलेंस तरी पुरें आहे.' असाही निरोप तुह्मी दुर्योधनाला कळवा. कारण ज्ञातीमध्यें सलोखा असावा, भावाभावांनीं एकमेकांच्या मतानें वागावें, पितापुत्रांनीं परस्परांशीं मिळून असावें, कौरव व पांचाल यांनीं सुखांत नांदावें व यांना सुरक्षित असलेले मीं पहावें,एवढीच माझी इच्छा आहे.परंतु संधि करण्याला जसा मी तयार आहें तसाच युद्धालाही पण तयार आहें. मला धर्मही पाहिजे आहे व अर्थही पाहिजे.' याप्रमाणें पांडवांचा निरोप घेऊन संजय हास्तिनापुराला परत येऊन धृतराष्ट्राला भेटून घरीं गेला.

१३० संताप पावलेल्या धृतराष्ट्राला विदुरांचा उपदेश. (५. ३३–४०)

संजय निघून गेल्यावर धृतराष्ट्रानें विदुरांना लवकर आपल्याकडे घेऊन येण्यास द्वारपालाला आज्ञा केली. द्वारपाल विदुरांकडे जाऊन तावडतोब त्यांना धृतराष्ट्राकडे घेऊन आला. विदुरांना राजबाड्यांत प्रतिबंध केव्हांच नसल्यामुळें ते तडक आंत शिरून 'राजा तुझ्या आज्ञेनें मी विदुर आलों आहे काय आज्ञा आहे,' म्हणून विचारांत मग्न झालेल्या धृतराष्ट्राला म्हणाले. तेव्हां धृतराष्ट्र म्हणाला, 'विदुरा, संजय पांडवांकडून परत येऊन माझी निंदा करून 'उद्यां भरसभेंत सर्वांसमक्ष त्यांचा निरोप सांगेन,' म्हणून सांगून घराकडे निघून गेला. त्यामुळें युधिष्ठिराचा विचार मला न कळल्यानें माझ्या सर्व अंगाचा दाहा होत आहे. मला झोंप येत नाहीं. अशा स्थितींत जें कांहीं योग्य दिसेल तें तूं मला सांग. कारण धर्मार्थांमध्यें कुशल असा तुझ्याखेरीज मला दुसरा कोणी दिसत नाहीं. संजय पांडवांकडून आल्यापासून माझ्या मनाला चुटपूट लागून राहिली आहे. सर्व गावें गळून जाऊन तो काय सांगणार याकडे एकसारखें लक्ष लागून राहिलें आहे.' विदुर म्हणाले, 'बलवानांनीं गांठलेला दुर्बल,हीनसाधन, स्वस्थाला मुकलेला,कामी व चोर इतक्यांना झोंप येत नसते. म्हणून ह्या महादोषांपैकीं एखादा जर तुला चिकटला असेल तर पहा. परस्वाचा अभिलाष धरल्यामुळें तर हा संताप तुला होत नाहींना? असें जर असेल तर त्याला योग्य औषध मी सांगतों ऐक. सर्व राजलक्षणांनीं संपन्न असा युधिष्ठिर त्रैलोक्याचा स्वामी होण्याला पात्र असून त्याला जवळ करण्याच्या ऐवजीं तूं त्याला वनाला पाठविलेंस. तूं जरी धर्मात्मा व धर्मज्ञ आहेस तरी राजगुण तुझ्या ठिकाणीं नसून अंध असल्यामुळें तूं राजपदाला अपात्र आहेस. सौम्यपणा, दया, धर्म, सत्य, पराक्रम, व वडीलपणा इत्यादि कारणांमुळें तुझ्याकडे पाहून तो अनेक क्लेश सहन करीत आहे. दुर्योधन, शकुनि, कर्ण, व दुःशासन यांच्या हवालीं ऐश्वर्य करून चांगले दिवस पाहण्याची इच्छा कशी धरतोस? स्वतःला बरोबर ओळखणें, आपली शक्ति जाणून काम हातीं घेणें, सोशिकपणा; धर्मनिष्ठपणा, यांच्यायोगानें पुरुषार्थापासून जो दूर होत नाहीं, प्रशस्त अशाच गोष्टी करून निंद्य कृत्यांकडे जो ढुंकून पहात नाहीं, आस्तिकबुद्धि धरून गुरु व वेदवाक्य यांवर जो विश्वास ठेवतो, ज्याला राग, हर्ष, गर्व, भीड, मस्ती व मीपणा कर्तव्यापासून मुकवींत नाहींत, ज्याचें कर्तव्य किंवा त्यासंबंधानें केलेला विचार दुसऱ्यांना न कळतां काम झाल्यावरच तें त्यांना कळतें, शीत, उष्ण, भय, आनंद, संपत्ति अथवा विपत्ति यांच्यामुळें ज्याच्या कामांत अडथळा येत नाहीं,ज्यांचा ऐहिकबुद्धि एकमेकांशीं अविसंगतपणें धर्मार्थांकडे असून विषयसुखापेक्षां पुरुषार्थालाच जो विशेष चहातो, सामर्थ्यानुरूप कोणतेंही काम करण्याचें मनांत आणून जो तें तडीस नेतो व कशाकडेही दुर्लक्ष करीत नाहीं, जो दुसऱ्याचें शांतपणें ऐकून घेतो, ज्याची समजूत लवकर पडते व ती पडल्याबर कोणत्याही गोष्टीकडे जो निरभिलाष बुद्धीनें प्रवृत्ति ठेवतो, जो दुसऱ्याच्या कामांत विनाकारण हात घालीत नाहीं, तसेच जो अप्राप्य वस्तूची इच्छा

करीत नाहीं व नाहींशा झालेल्या वस्तूविषयीं हुरहूर बाळगीत नाहीं, विपत्तींत जो घाबरून जात नाहीं, निश्चयपूर्वक काम हातीं घेऊन जो तें मध्येंच सोडीत नाहीं, ज्याचा वेळ व्यर्थ जात नाहीं, ज्याचें मन स्वाधीन आहे, जो सत्कर्मामध्यें गढला राहून कल्याणप्रद अशींच कामें हातीं घेतो व कोणाच्याही हिताच्या आड येत नाहीं, मानापमानानें ज्याला हर्ष किंवा विषाद वाटत नाहीं, जो अगाध डोहाप्रमाणें गंभीर असतो, सर्व भूतमात्रांना जो बरोबर ओळखतो व कोणत्याही कृत्याचा परिणाम नीट जाणतो, तसेंच कोणत्याही कार्यसिद्धीला मनुष्यांना अवश्य अशा उपायांचें ज्याला पूर्ण ज्ञान आहे, ज्याचें भाषण अस्खलित, नानाप्रकारच्या गोष्टी ज्याला माहीत, कोणत्याही विषयाचा उत्तम प्रकारें खल करण्याला जो समर्थ, ज्याला स्फूर्ति चांगला आहे, ज्याचें अध्ययन बुद्धीला अनुरूप असून अध्ययनाच्या अनुरूप ज्याची बुद्धि आहे, व भल्यांनीं घालून दिलेल्या मर्यादेचें ज्याकडून उल्लंघन होत नाहीं, तोच शहाणा म्हणविला जातो. विद्वत्ता नसून ज्याला शहाणपणाची घमेंडी, दरिद्री असून जो मोठमोठे विचार मनांत आणतो, निंद्य कर्मापासून जो अर्थप्राप्तीची हाव धरतो, जो स्वार्थाकडे लक्ष न देतां दुसऱ्याच्या कामांत मन घालतो, मित्राच्या कामांत जो अनुचित वर्तन ठेवतो, आपल्याशीं निष्प्रेम असणाऱ्यांना जवळ करून सप्रेम असणाऱ्यांना जो दूर करतो, जो बलवानांशीं द्वेष करतो व शत्रूंशीं मैत्री व मित्रांशीं वैर करून त्यांचा नाश करतो, जो वाईट कृत्यें हातीं घेतो, जो आपलीं सर्व कामें दुसऱ्यावर सोंपवितो व ज्याच्या त्याच्यावर गैरभरंवसा ठेवितो, लबकर उरकून घेण्याच्या कामाला दिरंगाई लावतो, पितरांचें श्राद्ध करीत नाहीं, देवतांची पूजा करीत नाहीं, खऱ्या अंतःकरणाचे मित्र जोडीत नाहीं, बोलाविल्यावांचून दुसऱ्याच्या घरांत शिरून विचारल्याशिवाय उगीच बडबड चालवितो, जो गैरभरंवशाच्या मनुष्यांवर विश्वास ठेवतो व आपल्या ठिकाणीं असलेले दोष दुसऱ्यामध्यें पाहून त्याला दोष देतो, आपलें बल न ओळखून धर्मार्थहीन दुर्लभ वस्तु अनायासें मिळण्याची जो इच्छा धरतो, त्याचप्रमाणें जो दंडाला अपात्र असणाऱ्याला दंड करतो, मनुष्य न ओळखतां त्याची शुश्रूषा करतो व जो कृपणाच्या नादीं लागतो त्याला मूर्ख समजावें. मोठी संपत्ति, विद्या ऐश्वर्य असूनही जो निरभिमानानें वागतो तोच खरा शहाणा. वैभवकालीं आपल्या सेवकांना वांटा न देतां जो स्वतः एकटा उत्तम अन्न खातो व उत्तम वस्त्र नेसतो त्याहून निष्ठुर दुसरा कोणी नाहीं. पाप एकटा मनुष्य करतो, त्यापासून होणाऱ्या लाभाचा फायदा सर्व घेतात व शेवटीं फाययाला धनी होणारे सुटून जाऊन एकट्या पाप करणाऱ्यालाच दोषाला धनी व्हावें लागतें. धनुर्धरानें सोडलेला बाण एकाचा प्राण घेईल किंवा प्रसंगीं तेंही त्याच्या हातून होणार नाहीं. पण बुद्धिमान पुरुषानें केलेल्या बुद्धीच्या प्रयोगानें राजाचा व त्याच्या राष्ट्राचा फडशा पडतो. स्वतःच्या बुद्धीनें विचार ठरवून मित्र, तटस्थ व शत्रु ह्यांना, साम, दान, भेद व दंड ह्या चार उपायांनीं आपल्या ताब्यांत ठेवावें, व पंच ज्ञानेंद्रियें जिंकून संधि, विग्रह, यान, आसन, द्वैध व आश्रय या सहांचें ज्ञान करून घेऊन स्त्रिया, द्यूत, मृषया, पान, निष्ठुर भाषण निष्ठुर दंड व द्रव्याचा अपव्यय हीं सात सोडून देऊन सुखी व्हावें. विष किंवा शस्त्र ह्यांच्या योगानें एकाचा नाश होतो पण मंत्रभेद झाला असता त्याच्या योगानें सर्व राष्ट्र व सर्व प्रजा यांचा फडशा उडतो. मिष्टान्न एकट्यानें खाऊं नये, कार्याचा विचार एकट्यानें कधीं करूं नये, एकट्यानें प्रवास करूं नये व दुसरे सर्व झोंपीं गेले असतां एकट्यानें जागत राहूं नये. जे अनन्य असें अद्वितीय सत्यस्वरूप परब्रह्म आहे त्याला तूं ओळखत नाहींस. समुद्रांतून तरून जाण्याला ज्याप्रमाणें नौका तसा भवसागर तरून जाण्याला हा सोपान आहे. क्षमाशीलांना लोक दुर्बल समजतात एवढाच त्यांच्यासंबंधानें दोष आहे. शहाण्यानें हा दोष समजूं नये. कारण क्षमा हेंच श्रेष्ठ बल आहे. अशक्तांना ती फायदेशीर असून शक्तिमानाचे ठिकाणीं तें भूषण मानलें जातें. ह्या जगांत क्षमा हें मोठें वशीकरण आहे. क्षमेच्या योगानें काय साध्य होत नाहीं ? क्षमारूपी तरवार ज्याच्या हातांत आहे त्याला दुर्जन काय करणार ? ज्या ठिकाणीं गवत मुळीं नाहीं अशा प्रदेशीं अग्नि पडला असतां तो

आपल्याआपणच बिहून जातो. तापट मनुष्य आपल्याला व दुसऱ्याला संकटांत पाडून घेतो. धर्म हाच मोठा कल्याणप्रद असून क्षमा हीच कायती उत्तम शांति आहे; त्याचप्रमाणें विद्या हीच उत्तम समाधान देणारी आहे. उत्तम सुखाला साधन अहिंसा. ज्याप्रमाणें बिळांत पडून राहणाऱ्यांना साप गिळतो त्याप्रमाणें तोंडाला तोंड देऊन युद्ध न करणाऱ्या राजाला व प्रवास न करणाऱ्या ब्राह्मणाला पृथ्वी गिळते. निष्ठुर भाषण न करणारा, दुष्टांच्या नादीं न लागणारा हे दोघे ह्या जगांत योग्यतेला चढतात. दुसऱ्या स्त्रियांचें एखाद्या पुरुषावर मन आहे ह्मणूनच ज्या स्त्रियांचें त्यावर मन असतें व दुसरे एखाद्याला मान देतात ह्मणूनच जे त्याला मान देतात ह्या दोघांना स्वबुद्धि नाहीं. द्रव्य नसून मोठमोठे बेत मनांत आणणें व सामर्थ्य नसतां रागावणें हीं दोन शरीराला वेदना देणारीं तीक्ष्ण शल्यें होत. कांहीं न करतां स्वस्थ बसणारा गृहस्थ व खटपटी संन्यासी हे दोघे परस्परविरोधी कृत्यांनें जगांत वर येत नाहींत. क्षमाशील प्रभु व दानशील दरिद्री हे दोघे स्वर्गाच्याही वर जाऊन बसतात. कुपात्रीं दान व सत्पात्रीं अदान असे न्यायार्जित द्रव्यासंबंधानें दोनच दोष घडण्याचा संभव असतो. दान न करणारा धनिक व तपश्चर्या न करणारा दरिद्री ह्या दोघांना गळ्यांत धोंडा बांधून जिवंत बुडवावें. योगयुक्त संन्यासी व रणामध्यें तोंडाला तोंड देऊन मरणारा योद्धा हे दोघेच सूर्यमंडळ भेदून वर जातात. साम, दान व भेद आणि दंड असे हे उत्तम, मध्यम व कनिष्ठ उपाय सांगितले आहेत. उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा तीन प्रकारच्या लोकांची त्या त्या प्रकारच्या कामांत योजना करावी. **स्त्री, दास व पुत्र ह्यांना स्वस्व असें द्रव्य नसून ते ज्यांचे असतात त्यांचाच त्यांच्या मालमत्तेवर हक्क असतो.** परस्व हरण करणें, दुसऱ्याच्या बायकोवर हात टाकण व मित्रांना सोडणें हे तीन आत्मघाती दोष आहेत, काम, क्रोध व लोभ हीं आपल्या नाशाचीं द्वारें आहेत. शत्रूला संकटांतून सोडविणें या एकाचें फल वरप्रदान, राज्यप्रदान व पुत्रजन्म ह्या तिघांच्या फलांच्या तोडीचें आहे. आपल्याहून ज्याची भक्ति होती, ज्याची आहे व जो मी आपला आहें असें ह्मणतो हे तिघे शरण आले असतां त्यांना आपत्काळींसुद्धां सोडूं नये. कोत्या बुद्धीचे, चेंगट, अविचारी व खुशामती अशा चौघांबरोबर बलशाली राजानें सल्लामसलत करूं नये. वृद्ध, नातेबाईक, निकृष्टदशेस आलेला कुलीन पुरुष, दरिद्रदशेस आलेला मित्र व **निपुत्रिक बहीण** ह्या चौघांचें आपल्या घरीं वास्तव्य असावें. **देवतांचा संकल्प, बुद्धिमानांचें बुद्धिवैभव, विद्वानांचा विनय व पापी लोकांचा नाश,** हे चार तात्काळ फळणारे आहेत. अग्निहोत्र, मौन, अध्ययन व यज्ञ हीं चार मूळचीं अभयप्रद असून पाळावीं तशीं न पाळलीं असतां भीतिप्रद होतात. पिता, माता, अग्नि, आत्मा व गुरू ह्या पंचाग्नींची मनुष्यानें मोठ्या काळजीनें उपासना करावी. त्याचप्रमाणें देव, पितर, मनुष्य, संन्यासी व अतिथि या पांचांना योग्य मान दिला असतां मनुष्याला ह्या जगांत कीर्ति मिळते. मित्र, शत्रु, त्रयस्थ, आश्रित व सेवक हे पांच तूं जेथें जेथें जाशील तेथें तेथें तुझ्यामागून असणार. पंचेंद्रिययुक्त मनुष्याचे एक इंद्रिय जरी सछिद्र असेल तरी पखालींतून ज्याप्रमाणें पाणी गळून जातें तसें त्यांतून त्याच्या बुद्धीचा निकाल लागतो. निद्रा, तंद्रा, भय, क्रोध, आलस्य, व चेंगटपणा हे सहा दोष अभ्युदयेच्छु पुरुषानें आपल्यापासून दूर करावे. तसेंच शिकवितां येत नाहीं असा गुरु, अशिक्षित ऋत्विज, रक्षण करण्याला असमर्थ असा राजा, अप्रिय भाषण करणारी स्त्री, गांवकोंबडा गुराखी व रानांत राहूं इच्छिणारा न्हावी ह्या सहांना मनुष्यानें फुटक्या नांवेप्रमाणें सोडून द्यावें. सत्य, दान, उद्योगशीलता, निर्मत्सरता, क्षमा व धैर्य ह्या सहा गुणांनां पुरुषानें कधीं सोडूं नये. द्रव्यप्राप्ति, सदा आरोग्य, आवडती व गोड भाषण करणारी स्त्री, मनाप्रमाणें वागणारा मुलगा, व अर्थप्राप्ति करून देणारी विद्या, हीं सहा ह्या मृत्युलोकीं सुखें आहेत. काम, क्रोध, शोक, मोह, मद व मत्सर ह्या आपल्या शरीरांत नित्य वास्तव्य करणाऱ्या शत्रूंवर जो आपला पगडा बसवितो त्या जितेंद्रिय पुरुषाला पापाचा लेश लागत नाहीं; मग संकटाची गोष्ट राहिली बाजूला. चोर निःकाळजी

मनुष्यावर, वैद्य रोग्यावर, तरुणी कामिजनांवर, याजक यज्ञ करणारावर, राजा परस्परांशीं भांडणारांवर, व शहाणे मूर्खावर, ह्याप्रमाणें ह्या सहांचें उपजीवन ह्या सहांवर असून दुसऱ्यावर ह्यांच्यासारखा उपजीविका करणारा सातवा मिळावयाचा नाहीं. **गुरें, सेवा, शेती, स्त्री, विद्या व शूद्रस्नेह ह्या सहांकडे एक क्षण दुर्लक्ष केल्यानें देखील हीं नाश पावतात.** अध्ययन पूर्ण झालेले शिष्य गुरूची, लग्न होऊन बायको मिळालेले पुरुष आईची, निष्काम झालेले स्त्रीची, काम झालेले काम साधून देणाराची, पाण्यांतून पार पडलेले नावेची, व रोगी वैद्याची ह्याप्रमाणें हे सहा त्यांवर पूर्वी उपकार केलेल्यांची पर्वा बाळगीत नाहींत. आरोग्य, ऋण नसणें, प्रवासाची पाळी न येणें, सज्जनाशीं समागम, निश्चित उपजीविकेचें साधन, व निर्भय आश्रयाला जागा, हीं सहा मनुष्यांच्या सुखाला कारणीभूत आहेत. **परोत्कर्षासहिष्णु, मत्सरी, नेहमीं असंतुष्ट, रागीट, संशयी व परभाग्यावर उपजीविका करणारा हे सहा नेहमीं दुःखी असतात. स्त्रिया, द्यूत, मृगया, मद्यपान, निष्ठुर भाषण, कडक शिक्षा व पैशाचा दुर्व्यय हे सात दोष नाशाला कारण आहेत.** नाश होऊं घातलेल्या पुरुषामध्यें, ब्राह्मणद्वेष, ब्राह्मणाशीं विरोध, ब्रह्मस्व हरण करणें, त्यांना मारण्याची इच्छा धरणें, त्यांची निंदा आवडूं लागणें, त्यांची स्तुति बरी न वाटणें, **महत्कार्याचे वेळीं त्यांची आठवण न होणें**, व ते याचना करूं लागले असतां त्यांची हेटाळणी करणें, हे आठ दोष पूर्वीच दिसूं लागतात. मित्रसमागम, विपुल द्रव्यप्राप्ति, पुत्राचें आलिंगन, रतिकालीं समकालीं रेतस्खलन, समयानुरूप प्रिय भाषण, स्वजनांमध्यें थोरवी, इष्ट वस्तूचा लाभ, व लोकांत मानमान्यता, ह्या गोष्टी मनुष्याच्या आनंदाला व सुखाला कारण आहेत. बुद्धि, कुलीनता, इंद्रियनिग्रह, अध्ययन, पराक्रम, मितभाषण, यथाशक्ति दान, व कृतज्ञता हे गुण पुरुषाची योग्यता वाढवितात. **पांच ज्ञानेंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार, व देह ह्या नवद्वारांनीं युक्त अशा अविद्या, वासना व कर्म ह्या तीन खांबांवर उभारलेल्या ह्या गृहांत चित्तात्म्याचा वास आहे हें जो जाणतो तोच ज्ञानी.** धुंद, बेसावध, वेड लागून बरळणारा, दमलेला, रागावलेला, उपासानें पीडलेला, गडबड्या, लोभी, भितरा व विषयलंपट ह्यांना धर्माधर्म कळत नाहीं ह्मणून शहाण्यानें ह्यांच्याशीं संबंध ठेवूं नये. जो राजा कामक्रोध टाकून सत्पात्रीं द्रव्याचा विनियोग करतो, विद्वान असून ज्याला तारतम्य समजतें व जो कर्तव्य करण्याला विलंब लावीत नाहीं त्याच्या ह्मणण्याप्रमाणें सर्व वागतात. लोकांचा आपल्यावर विश्वास कसा बसवून घ्यावा हें ज्याला समजतें, अपराध कळल्यावर जो दुसऱ्याला शिक्षा करतो, व तीही क्षमा केव्हां करावयाची, केव्हां किती शिक्षा यावयाची हें जाणून करतो, अशा मनुष्याच्या लक्ष्मी सर्वस्वीं आधीन असते. अगदीं दुर्बलालाही जो तुच्छ करीत नाहीं. शत्रूसंबंधानें दक्ष राहून जो विचारानें वागतो, बलवानाबरोबर कलह ज्याला आवडत नाहीं, व प्रसंगीं जो आपला पराक्रम दाखवितो तोच शहाणा. आपत्ति आली असतां ज्याला वाईट वाटत नाहीं, जो नेहमीं दक्षतेनें उद्योग करीत असतो व प्रसंगीं दुःख निमुटपणें सहन करतो, त्यानें शत्रू जिंकले असें समजावें. जो विनाकारण घर सोडीत नाहीं, दुष्ट लोकांबरोबर स्नेह करीत नाहीं. परस्त्रीवर हात टाकीत नाहीं, व ढोंग, चोरी, चहाडी, आणि मद्यपान, यांच्या वाटेला जात नाहीं, तो नेहमीं सुखी असतो. शहाणा मनुष्य कधीं धर्मार्थकामाकडे अविचारानें लक्ष देत नाहीं, विचारलें असतां खरें सांगतो, क्षुल्लक बाबतींत तंटा करीत बसणें त्याला आवडत नाहीं व कोणीं आपली अप्रतिष्ठा केली असतांही तो रागावत नाहीं. जो कोणाचा मत्सर न करतां सर्वांवर दया करतो, दुर्बलाबरोबर भांडण्याला कंबर बांधीत नाहीं, मर्यादेबाहेर कांहीं न बोलतां आपल्या विरुद्ध भाषण जो निमुटपणें सहन करतो, असा मनुष्य चोहोंकडे स्तुतीला पात्र होतो. जो कधीं उद्दाम वेष घेत नाहीं, आपल्या शक्तीच्या बलावर दुसऱ्याला तुच्छ करीत नाहीं व उन्मत्तपणानें कोणाला टाकून बोलवत नाहीं, तो नेहमीं लोकांना आवडतो. निमालेला वैरागी जो फिरून पेटवीत नाहीं, गर्वानें फुगून जात नाहीं अगर दुःखानें खच-

तही नाहीं, व विपत्तींत सांपडलों आहें या सबबीवर ज्याच्या हातून भलतीसलती गोष्ट घडत नाहीं, स्वतःच्या सुखानें किंवा दुसऱ्याच्या दुःखानें ज्याला आनंद होत नाहीं व दुसऱ्याला कांहीं दिल्यावर त्याबद्दल ज्याला पश्चात्ताप होत नाहीं, त्यालाच सज्जन शीलवान ह्मणतात. देशाचार, निरनिराळ्या भाषा, निरनिराळे जातिधर्म ज्याला ठाऊक आहेत व जो चांगलें कोणतें, वाईट कोणतें हें जाणतो, तो जाईल तेथें भल्या लोकांत देखील वर्चस्व मिळवितो. दंभ, मोह, मत्सर, पापकृत्य, राजाला नावडती गोष्ट, चहाडी, समाजवैर ह्या गोष्टी व मद्यपानानें मत्त, उन्मादग्रस्त व दुर्जन यांच्याबरोबर बाद जो समंजस टाळतो तो शहाणा. दानधर्म, देवताराधान, मंगलकार्यें व जनापवादाबद्दल नानाविध प्रायश्चित्तें जो नेहमीं करतो त्याला देवताच वैभवाला चढवितात. **विवाह, मैत्री, व्यवहार व गोष्टी नीच लोकांशीं न करितां जो हीं आपल्या बरोबरीच्याशीं करतो** व आपल्यापेक्षां श्रेष्ठ असतील त्यांचें अनुकरण करतो, त्याचे बेत उत्तम तऱ्हेनें शेवटाला जातात. आश्रितांना देऊन नंतर जो मिताहार करतो, पुष्कळ श्रम करून मग जो थोडी झोंप घेतो, व मागावयाला आला असतां शत्रूला सुद्धां जो नाहीं ह्मणत नाहीं, त्या जितेंद्रिय पुरुषावर कोणतेंही संकट गुदरत नाहीं. ज्याचा मंत्र गुप्त राहून त्याप्रमाणें सर्व व्यवस्था होत असल्यानें ज्याचा कोणताही बेत अथवा सूड शेवटास गेल्याखेरीज लोकांना कळून येत नाहीं त्याचा एवढा सुद्धां उद्देश फसत नाहीं. सर्व प्राणिमात्रांच्या सुस्थितीमध्यें जो निमग्न असतो, जो नेहमी सत्यानें राहून कधीं कोणाशीं निष्ठुरतेनें वागत नाहीं व निर्मल अंतःकरणानें दुसऱ्याची मानमान्यता ठेवतो, तो जातिवंत अशा शुद्ध हिऱ्याप्रमाणें ज्ञातिमध्यें चमकतो. आपल्या दुष्कृत्याचा परिस्फोट झाला नाहीं तरी त्याची ज्याला शरम वाटते तो शुद्ध व शांत पुरुष सर्वांचा गुरु होऊन सूर्याप्रमाणें झळकतो. आजपर्यंत या पांडवांना तूं मुलाप्रमाणें वागविलें आहेस, तर त्यांचा हिस्सा त्यांना देऊन टाक ह्मणजे कोणाला तुझ्यासंबंधानें कुतर्क करण्यास जागा उरणार नाहीं. ज्याचा नाश होऊं नये अशी आपली इच्छा असेल त्याला एखादी गोष्ट मग ती प्रिय असो वा अप्रिय असो, आपण न विचारतां सांगावी असें आहे, ह्मणून कौरवांच्या जें हितावें मला वाटतें तें मी तुला सांगतों. दुष्ट कृत्यें विशेष खटपटीवांचून जरी शेवटाला जाण्यासारखीं असलीं तरी त्यांत मन घालूं नये, त्याचप्रमाणें सरळ मार्गानें योग्य प्रयत्नानें चालविलेलें एखादें काम जरी फसलें तरी शहाण्यानें त्याबद्दल वाईट वाटून घेऊं नये. कोणत्याही कृत्याचें निश्चित फल असतेंच. हें लक्षांत घेऊन एखादें काम हातीं घेण्यापूर्वी त्याचा उद्देश, व त्याचा परिणाम लक्षांत घेऊन कोणत्याही कामांत शहाण्यानें हात घालावा. उगीच अविचारानें एखादें काम हातीं घेऊं नये. देश, नफातोटा, खजिना, मनुष्यबल व शिक्षा यांचा अंदाज ज्या राजाला बरोबर होत नाहीं तो राज्यावर फार दिवस टिकत नाहीं. पण जो हें बरोबर समजून धर्मार्थाकडे लक्ष देतो त्याला राज्योपभोग चिरकाळ मिळतो. राज्य हातीं आलें ह्मणून कोणीं गैरवर्तन करूं नये; कारण जरेच्या योगानें जसें उत्तम रूप असलें तरी नाहींसें होतें, त्याप्रमाणें उद्दामपणानें संपत्ति नाहींशी होते. लोखंडी गळाला अडकविलेल्या उत्तम अन्नाला भुलून मासा लोभानें तो गिळतो, पण परिणामाकडे लक्ष देत नाहीं. जो घास गिळतां येईल, व गिळला असतां पचेल व पचल्यावर त्याचा हितावह परिणाम होईल, असाच घास अभ्युदयेच्छूनें घ्यावा. जो झाडाचीं कच्चीं फळें तोडतो, त्याला त्यापासून रसप्राप्ति न होतां उलट बीजही नाहींसें होतें; तेंच फळ पिकूं देऊन योग्य कालीं तें तोडलें असतां त्यापासून रस मिळून बीच्या बी कायम रहातें. **ज्याप्रमाणें भ्रमर पुष्पांपासून पुष्परस गोळा करतो, त्याप्रमाणें लोकांपासून त्यांचा नाश न करतां द्रव्य काढून घ्यावें. माळ्याप्रमाणें एक एक फुल तोडावें. लोणाऱ्याप्रमाणें झाडाच्या मुळाला घाव देऊं नये.** अमुक एक काम केल्यानें काय परिणाम होईल, न केल्याने काय परिणाम होईल, याचा पूर्ण विचार करून मग एखादें काम हातीं घ्यावें किंवा न घ्यावें, कांहीं गोष्टी अशा असतात कीं, त्या हातीं घेण्याच्याच लायकीच्या नसतात; तेव्हां अशा संबंधानें

केलेला सर्व यत्न व्यर्थ जातो. ज्याच्या रूपेपासून नफा नाहीं व रागापासून नुकसान नाहीं असा स्वामी, स्त्रिया ज्याप्रमाणें षंढ पती इच्छीत नाहींत त्याप्रमाणें लोकांना नकोसा वाटतो. अल्पायासानें मोठें फल मिळणारीं कामें शहाणा मनुष्य झटकन् हातीं घेतो व दुसऱ्यांनीं तशा प्रकारचीं कामें हातीं घेतलीं असतां त्यांच्या आड येत नाहीं. गट्ट न करून टाकणारी सरळ दृष्टि जो सर्वांवर ठेवतो तो स्वस्थ असला तरी प्रजा त्यावर सप्रेम असते. प्रफुल्ल असलें तरी फल दाखवूं नये, फल दाखविलें तरी तीं फळें सहज दुसऱ्याला तोडतां येऊं नयेत व अपक्व असूनही पक्वासारखें दाखवावें ह्मणजे कधीं आपला ऱ्हास होत नाहीं. दृष्टीनें, मनानें, शब्दानें व हातानें जो लोकांना संतुष्ट ठेवतो त्यावर लोक संतुष्ट असतात. पारध्याला पाहून कापणाऱ्या मृगांप्रमाणें ज्याला पाहून सर्व कांपतात त्याला ही सागरांत पृथ्वी मिळाली असतांही त्याचा नाश होतो. वडिलोपार्जित राज्य मिळालें तरी अनीतीचें अवलंबन करून स्वकर्मानें मनुष्य, वाऱ्यानें ज्याप्रमाणें ढग विस्कळतात त्याप्रमाणें स्थानभ्रष्ट होतो. भल्यांनीं धरलेला सन्मार्ग जो राजा घेतो त्याकरितां ही वैभव वाढविणारी वसुमंपूर्ण पृथ्वी वाढतच राहते. तेंच धर्म सोडून अधर्माचें त्यानें अवलंबन केलें असतां अर्थामध्यें टाकलेल्या चामड्याप्रमाणें त्याचा भूविस्तार संकुचित होतो. **परराष्ट्राचा फडशा उडविण्यासंबंधानें जी खटपट होते तितकीच स्वराष्ट्राचें संरक्षण करण्यासंबंधानें झाली पाहिजे.** न्यायानें राज्य मिळवून धर्मानें प्रजेचें परिपालन करावें. कारण न्यायार्जित संपत्ति कधीं आपल्याला सोडीत नाहीं बे कमी होत नाहीं. ज्याप्रमाणें मातीपासून सोनें काढून घेतात त्याप्रमाणें उन्मत्त, बरळणारें, बडबडणारें पोर, या सर्वांपासून सार तेवढें काढून घेत असावें. शेतांतून धान्यकण वेचून त्यावर राहणाऱ्या मनुष्याप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणीं उच्चारलीं जाणारीं सद्वचनें गोळा करीत असावीं. पशूंना वासानें दिसतें, व ब्राह्मणांना वेदाच्या योगानें दिसतें, राजांना हेरांच्या द्वारें दिसतें, व सामान्य लोकांना चर्मचक्षूंनीं पहावें लागतें. धारेच्या वेळीं लाथ मारणाऱ्या गाईला त्रासही फार सोसावा लागतो; पण जी धारेच्या वेळीं मुळीं त्रास देत नाहीं तिच्या कोणी वाटेला जात नाहीं. तापविल्यावांचून जें आपल्यापूण वांकतें त्याला कोणी तापविण्याच्या भानगडींत पडत नाहीं. जें लांकूड आपल्यापूण लवतें त्याला प्रयासानें वांकविण्याच्या भरीस कोणी पडत नाहीं. व हाच नियम लक्षांत ठेवून शहाण्यानें बलवानापुढें वांकावें. पशूंचा हित पाहणारा पाऊस आहे, राजाचें हित पाहणारे मंत्री होत, तसेंच स्त्रियांचें हित पाहणारे पती व ब्राह्मणांचें हित पाहणारे वेद आहेत. सत्यानें धर्माचें रक्षण होतें, अभ्यासानें विद्येचें, शुद्धतेनें रूपाचें, सद्वर्तनानें थोर कुलाचें, मोजमाप ठेवल्यानें धान्याचें, रंगणाला काढल्याने घोड्याचें, योग्य देखरेखीनें गुरांचें, व जाड्याभरड्या वस्त्रानें स्त्रियांचें संरक्षण होतें. सदाचारहीन अमा पुरुष उत्तम कुलांत झाला ह्मणूनच कांहीं तो आदराला पात्र होत नाहीं. पुरुष नीच कुलांत झाला असला तरी त्याचें चोख वर्तनच विशेष आदरणीय आहे. दुसऱ्याचें द्रव्य, रूप, वीर्य, कुल, सुख, दैव व सत्कार यांसंबंधानें ज्याला मत्सर वाटत असतो तो आमरणांत रोगग्रस्तच समजला पाहिजे. **भलतेंच हातून घडण्याची, कर्तव्य टळण्याची व मंत्रभेद होण्याची ज्यांला भीति आहे, त्यांनीं मादक पदार्थ कधीं सेवूं नये. विद्येचा मद, पैशाचा मद व थोर कुलांत झाल्याचा मद, हे तीन मद गर्विष्ठांना जरी मादक होतात** तरी भल्यांना तें विनम्रच करतात. सज्जनांनीं एखाद्या कामांत एखाद्या दुर्जनाचें साहाय्य मागितलें असतां आपलें दुर्जनत्व लोकविश्रुत असूनही तें काम नीट तडीस पोहोंचविण्याच्या पूर्वीच तो दुर्जन आपल्याला सज्जन समजूं लागतो. भल्यांना, वाईटांना किंवा त्यांचे त्यांना सज्जनच आधार असतात. दुष्टांच्या हातून कधीं तें निभावयाचें नाहीं. उत्तम वस्त्रें अंगावर असणाऱ्यास सभेंत मान मिळतो; गाई बाळगणाऱ्याची मिष्टान्न खाण्याची इच्छा तृप्त होते; वाहनें जवळ असणाराच वाटेल ती वाट क्रमून जाऊं शकतो; व शीलसंपन्न आहे तोच सर्व कांहीं जिंकतो. पुरुषांमध्यें शील हें श्रेष्ठ आहे. तें ज्याच्यामध्यें नाहीं त्याला बंधु अपार द्रव्य असून कांहीं

उपयोग नाहीं. व त्याच्या जीवितामध्येंही कांहीं अर्थ नाहीं. **श्रीमंताच्या जेवणांत मांस मुख्य आहे, मध्यम स्थितींतल्या लोकांच्या जेवणांत दूध मुख्य आहे, तसें सामान्य लोकांच्या जेवणांत तेल मुख्य आहे; तरी गरीबच नेहमीं मिष्टान्न खातात ह्मटलें पाहिजे. कारण भूक** जी त्यांना रुचि देते ती रुचि श्रीमंतांना येणें कठीण. प्रायः श्रीमानांना खाण्यालाच शक्ति नसते तेंच गरीब लोक लांकूड देखील पचवितात. कनिष्ठ लोकांना पोटाला कसें मिळेल ही काळजी असते, मध्यम स्थितींतल्यांना मरणाची काळजी असते व उत्तमांना अवमानाची मोठी काळजी वाटत असते. **मद्यपानादिकांनीं येणाऱ्या मदांमध्यें ऐश्वर्यमद सर्वांत वाईट आहे. कारण ऐश्वर्यमदानें माजलेला मनुष्य सपशेल ठार झाल्याशिवाय सावध होत नाहीं.** ग्रहांच्या योगानें ज्याप्रमाणें नक्षत्रांना ताप होतो त्याप्रमाणें स्वैर सोडलेल्या विषयासक्त इंद्रियांच्या योगानें मनुष्याला ताप होतो. ह्या जीवात्म्याला सहज भलतीकडे ओढून नेणाऱ्या पंचेंद्रियांच्या नादीं मनुष्य लागला असतां शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें त्यांचीं संकटें वाढत्या प्रमाणावर असतात. मनोनिग्रह न करतां अमात्याला आपल्या ताब्यांत ठेवूं पाहणारा, तसेंच अमात्याला न जिंकतां शत्रूला जिंकूं पाहणारा, अखेरीस नाइलाज होऊन नाश पावतो. ह्मणून प्रथम मनालाच जो शत्रु समजून जिंकतो व नंतर अमात्यांना जिंकतो त्याची विजयेच्छा व्यर्थ जात नाहीं. जो जितेंद्रिय मनोनिग्रह करून अपकार करणारांवर शस्त्र धरतो व जो कोणतीही गोष्ट विचार करून करतो त्या शहाण्या मनुष्याचा लक्ष्मी आश्रय करते. शरीर हा ह्या पुरुषाचा रथ अमून आत्मा सारथी आहे व इंद्रियें घोडे आहेत; तेव्हां मोठ्या हुशारीनें ह्या भल्या घोड्यांना सरळ मार्गाला लाविलें असतां शहाणा मनुष्य सुखानें मार्ग क्रमण्यास समर्थ होतो. नाहीं तर वठणीला न आणलेले अडमोट घोडे ज्याप्रमाणें अनाडी सारथ्याला मारून टाकतात त्याप्रमाणें हे पुरुषाचा नाश करूं शकतात. इंद्रियनिग्रह न झालेल्या मूढाला अहिताची गोष्टच हिताची वाटून हिताचीला तो अहिताची समजतो आणि दुःखाला तो सुख समजतो. धर्म व अर्थ यांना झुगारून देऊन जो इंद्रियांचा दास बनतो तो हें हें ह्मणतां संपत्ति, प्राण, वैभव व स्त्री यांना मुकतो. इंद्रियांचा दास बनून जो श्रीमान होतो तो इंद्रियांवर स्वामित्व न उरल्यामुळें ऐश्वर्याला मुकतो. मन, बुद्धि, व इंद्रियें स्वाधीन ठेवून स्वतःला आधीं ओळखावें. कारण आपणच आपल्या स्वतःचें मित्र किंवा शत्रु आहों. स्वतःच स्वतःला जिंकलें असतां आपणच आपले हितकर्ते होतों, तेव्हां आपणच आपले मित्र किंवा शत्रु ह्मणण्याला काय हरकत आहे. बारीक भोंकांच्या जाळ्यांत सांपडलेल्या मोठ्या माशाप्रमाणें हे कामक्रोध अमून हे आपली अक्कल गुंग करून सोडतात. धर्मार्थाकडे लक्ष देऊन त्याप्रमाणें जो आपली तयारी ठेवतो तो नेहमीं सुखोपभोग घेतो. मनावर अवलंबून असणाऱ्या पंचेंद्रियांना न जिंकतां जो दुसऱ्या शत्रूंना जिंकण्याची हाव धरतो त्याचाच शत्रूंकडून मोड होतो. इंद्रियांवर दाब नसल्यानें महात्मे राजे देखील राज्यमोह पाडणाऱ्या स्वकर्मांनीं नाश पावतात. दुष्ट लोकांची संगत न टाळल्यानें भल्यांना देखील त्यांच्या सहवासानें तशीच शिक्षा भोगावी लागते. वाळल्याशीं संबंध झाल्यानें ओलें देखील जळून जातें. ह्मणून दुष्टांशीं स्नेह करूं नये. शब्दादि पांच विषयांसाठीं उचल खाणाऱ्या स्वतःच्या पंचेंद्रियरूपी शत्रूला जो मूर्खपणानें आवरून धरीत नाहीं त्याला आपत्ति घेरते. निर्मात्सर्य, सरळता, शुद्धता, संतोष, मधुरभाषण, इंद्रियदमन, सत्य व स्थिरता हीं दुष्ट लोकांचे ठिकाणीं कधीं दिसून येत नाहींत. आत्मज्ञान, स्थिरता, सहिष्णुता, धर्मशीलता, वाक्संयमन व दान हे गुण हलक्या ठिकाणीं नसतात. शहाण्यांच्या नांवानें खडे फोडून व त्यांची निंदा करून मूर्ख लोक त्यांचा घात करीत असतात. पण ते निंदकच पापाचे धनी होतात आणि सहन करणाऱ्यांचें पाप त्याला लागून तो पापापासून मुक्त होत असतो. घात करणें हें दुष्टांचें बल अमून शासन करणें हेंच राजाचें बल आहे. तसेंच पतिसेवा बायकांचें बल आहे व क्षमा हें गुणी लोकांचें बल आहे. तोंड आवरून धरणें फार कठीण आहे. अर्थसंपन्न अमून विचित्र असें फार भाषण करतां येणें शक्य

नाहीं. सुभाषणानें नानाप्रकारचे फायदे होतात व कटु भाषणानें अनेक अनर्थ ओढवतात. बाणांनीं पाडलेलें किंवा कुऱ्हाडीनें तोडलेलें वन फिरून वाढतें. परंतु तोंडांनीं वाईट शब्द उच्चारून पाडलेली जखम कधीं बरी होत नाहीं. कर्णिनालिकादि बाण शरीरांतून काढतां येतात. परंतु वाग्बाण काढतां येत नाहींत. कारण ते हृदयामध्यें जाऊन गडप झालेले असतात. वाग्बाण तोंडांतून सहज निघून जातात खरे, परंतु ते ज्याला लागतात तो रात्रंदिवस तळमळत असतो. शत्रूच्या मर्मस्थळाशिवाय दुसऱ्या ठिकाणीं ते कधीं जाऊन पडत नाहींत, ह्मणून शहाण्यांनीं शत्रूंवर ते कधीं सोडूं नयेत. देवांना ज्याचा नाश करावयाचा असतो त्याची ते प्रथम बुद्धि हरण करतात, मग त्याला सर्वच विपरीत दिसूं लागतें. आणि याप्रमाणें विनाशकाळ जवळ येऊन बुद्धीला भ्रम पडला असतां अन्यायच न्यायासारखे भासूं लागून हृदयाला घट्ट धरून बसतात. याप्रमाणें तुझ्या मुलांची बुद्धि विपरीत झाली आहे. पांडवांशीं द्वेषभाव जडल्यामुळें तूंही त्यांना ओळखीनासा झाला आहेस. हा तुझा शिष्य सर्व राजलक्षणसंपन्न युधिष्ठिर त्रैलोक्याचा स्वामी होण्याला पात्र आहे व दैववान असून तेजानें व शहाणपणानें तुझ्या सर्व मुलांहून जास्त आहे. तर ह्याला पृथ्वीचा स्वामी कर. दया, अक्रुरता व तुझ्याविषयीं थोर बुद्धि असल्यामुळें तो हे सर्व क्लेश सहन करीत आहे. सर्व तीर्थांमध्यें स्नान व सर्व भूतांच्या ठिकाणीं समदृष्टि हीं दोन्ही कदाचित् सारखीं ठरतील किंवा कदाचित समदृष्टिच श्रेष्ठ ठरेल. ह्मणून पुत्रांच्या ठिकाणीं समदृष्टि ठेव ह्मणजे ह्या लोकीं कीर्ति मिळवून स्वर्गप्राप्ति करून घेशील. लोकांमध्यें मनुष्याची पुण्यकीर्ति जोंपर्यंत गाइली जात आहे तोंपर्यंत त्याला स्वर्गी मान्यमान्यता मिळते. ह्यासंबंधानें तुला सुधन्वा व केशिनी यांचा संवाद झाला तो सांगतों ऐक.

कोणी एक अप्रतिम लावण्यवती केशिनी नांवाची कन्या स्वयंवराला तयार झाली असतां विरोचन नामक कोणी दानव तिला मिळविण्यासाठीं तिच्याकडे आला. त्याच ठिकाणीं सुधन्वा नामक ब्राह्मण आला होता. तेव्हां केशिनीनें सुधन्वा तुझ्याबरोबर मंचकावर कां बसत नाहीं ह्मणून विरोचनाला विचारलें असतां तो ह्मणाला, 'हे लोक आमचे असून येथें ब्राह्मणांचें किंवा देवांचें कांहीं ठेवलें नाहीं. एखादा पाट, कूर्च किंवा दर्भासन हेंच ब्राह्मणांना बसावयाला योग्य आसन आहे.' तें ऐकून सुधन्वा ह्मणाला, 'पितापुत्र, दोन ब्राह्मण, दोन क्षत्रिय, दोन वैश्य किंवा दोन शूद्र यांनाच एका आसनावर एकत्र बसण्याचा अधिकार आहे. मी बसलों असतां तुझा पिता देखील उभा राहूनच माझ्या सेवेला दक्ष असे. तूं बाल असून घरीं वाढला असल्यामुळें तुला कांहीं लौकिक कळत नाहीं.' तेव्हां बाटेल तो पण लावून याचा निर्णय कोणातरी जाणत्याकडून करून घेण्याला विरोचन तयार झाला. पण त्याबद्दल एखाद्या देवाला किंवा मनुष्याला विचारावयाचें मात्र त्यानें नाकारलें. तेव्हां सुधन्वा ह्मणाला, 'आपण प्राण पणाला लावून तुझ्या पित्याकडेसच याचा निर्णय विचारावयाला जाऊं.' असें ठरवून ते दोघे प्रल्हादाकडे गेले. विरोचन व सुधन्वा यांना एकत्र पाहून प्रल्हाद आश्चर्यचकित झाला. त्यानें त्या ब्राह्मणाचा सत्कार करण्यासाठीं उदक व मधुपर्क, आणण्यास सांगितलें. तेव्हां सुधन्वा ह्मणाला, 'मला उदक, मधुपर्क, सर्व कांहीं पोंहोचलें. आह्मां दोघांमध्यें प्राणाचा पण लागला आहे. तेव्हां मी विचारतों त्या प्रश्नाचें यथार्थ उत्तर दे.' हें ऐकून प्रल्हाद बुचकळ्यांत पडला. तें पाहून सुधन्वा ह्मणाला, 'तूं आपल्या पुत्राचें अन्यतरेनें बाटेल तसें प्रिय कर, पण आमच्या ह्या वादग्रस्त प्रश्नाचा योग्य तो निकाल दे. सवत असलेल्या स्त्रीला, द्यूत निर्जिताला, अथवा चिंताग्रस्ताला जशी रात्र जाते त्याप्रमाणें जो प्रश्नाचें खरें किंवा खोटें कांहींच उत्तर देत नाहीं अथवा खोटें उत्तर देतो त्याला रात्र दुःखांत काढावी लागते. खोटी साक्ष देणाराला आपल्या गांवींच प्रतिबंधांत रहावें लागतें व भुकेनें व्याकूळ होऊन तो दाराबाहेर पाहूं लागला असतां त्याच्या दृष्टीस शत्रूच पडतात. एखाद्या पशूसाठीं खोटें बोलणाराच्या पांच पिढ्या नरकांत जातात. गाईसाठीं खोटें बोलणाराच्या दहा पिढ्या नरकांत जातात, घोड्यासाठीं खोटें बोलणाऱ्याच्या शंभर व पुरुषासाठीं खोटें बोलणाऱ्या-

च्या हजार पिढ्या नरकांत जातात. सोन्यासाठीं खोटें बोलणाराच्या मागील व पुढील कुळी नरकांत जातात व भूमीसाठीं खोटें बोललें असतां सर्व नाश होतो. हें लक्षांत घेऊन काय तें उत्तर दे.' असें ह्मणून त्यानें ब्राह्मण श्रेष्ठ कां क्षत्रिय, ह्मणून प्रश्न विचारला असतां सुधन्वाच आपल्या पुत्रापेक्षां श्रेष्ठ आहे असें प्रल्हादाचें उत्तर आलें. तेव्हां त्याच्या सत्यप्रियतेनें तुष्ट होऊन विरोचनानें केशिनीचे समक्ष माझे पाय धुवावे एवढ्याच अटीवर विरोचनाचे दुर्लभ प्राण त्याला परत दिले.

तेव्हां हे राजा, भूमीसाठी खोटें काम करणें तुला शोभत नाहीं. पुत्रप्रेमानें हें दुष्कृत्य करून पुत्र, आमात्य यांसह नाश पावूं नकोस. देव गुराख्याप्रमाणें हातांत दंडुका घेऊन लोकांवर नजर ठेवीत नसतात. त्यांच्या मनांतून ज्याचें रक्षण करावयाचें असतें त्याला ते सद्बुद्धि देतात. जसा जसा मनुष्य सत्कृत्याकडे मन लावीत जातो तसे तसे त्याचे सर्व हेतू निःसंशय सिद्धीला जातात. वेद देखील कपटानें वागणाराचें पापापासून संरक्षण करीत नाहींत. पंख फुटलेले पक्षी ज्याप्रमाणें घरटीं सोडून जातात त्याप्रमाणें अंतीं ते त्याला सोडून जातात. दारू पिणें, तंटा करणें, लोकांशीं वैर बांधणें, जातीशीं वांकडें धरणें, व राजा ज्याचा द्वेष करतो अशा पुरुषाशीं संगत करणें, नवऱ्याबायकोची ताटातूट करणें, नवऱ्याबायकोमध्यें भांडण लावून देणें व निंद्य मार्ग धरणें, इतक्या गोष्टी सोडून द्याव्या. सामुद्रिक, पूर्वी चोर असून पुढें व्यापारी बनलेला, पारधी, वैद्य, शत्रु, मित्र व नट या सातांची साक्ष कधीं घेऊं नये. अग्निहोत्र, मौन, अध्ययन व यज्ञ ह्या गोष्टी मूळच्या जरी भीतिदायक नाहींत तरी अहंकारपूर्वक आचरल्या असतां भीतिदायक होतात. घराला आग लावणारा, विष देणारा, पतीच्या मरणानंतर जार कर्मानें झालेल्याबरोबर जेवणारा, सोम विकणारा, चहाड, मित्रद्रोही परस्त्रीशीं जाणारा, गर्भाचा नाश करणारा, गुरुपत्नीबरोबर जाणारा, सुरापी ब्राह्मण, निष्ठुर मनुष्य, दुःखावर कावळ्याप्रमाणें टोंचीत बसणारा, परलोक न मोजणारा, वेदनिंदक, राजापासून हक्क मिळवून सर्व व्यापाऱ्यांपासून पळापळा धान्य खोतां घेणारा, योग्य काळीं मुंज न झालेला, गुरांचा नाश करणारा, शक्ति असून कोणी संरक्षणासाठीं आला असतां त्याचें रक्षण न करणारा हे सर्व ब्रह्महत्या करणाराच्या तोडीचे आहेत. आंच दिल्यानें सोन्याची परीक्षा होते, व्यवहाराच्या योगानें मनुष्य बरावाईट कळून येतो, शीलानें त्याच्यामधील धर्मबुद्धि कळते, भयाच्या वेळीं शूराची परीक्षा होते, विपत्तींत धैर्याची व विकट समयीं मित्राची तशीच शत्रूची परीक्षा होत असते. जरा रूप नाहींसें करते, अशाळू मनुष्य धैर्याला मुकतो, मृत्यु प्राण हरण करतो, मत्सर धर्माचरणाला मुकवितो, राग संपत्तीला मुकवितो, दुष्ट सेवेनें शील बिघडतें, कामवासना लज्जेला मुकविते व अभिमानामुळें मनुष्य सर्व सुखाला मुकतो. शुद्धाचरणापासून संपत्तीचा उगम असून धैर्याच्या योगानें तिची वृद्धि होते, हुशारीनें ती मूळ धरून मनोनिग्रहानें तिला कायमपणा येतो. बुद्धि, कुलीनता, इंद्रियनिग्रह, वेदाचें ज्ञान, पराक्रम, मित भाषण, यथाशक्ति दान व कृतज्ञता हे आठ गुण मनुष्याला प्रसिद्धीला आणतात; व हे आठ थोर गुण दुसऱ्या एकाच गुणाला धरून असतात. राजा ज्यावेळीं एखाद्या पुरुषाचा सत्कार करतो तेव्हां हे आठ गुण त्यामध्यें दिसूं लागतात. हे आठ गुण ह्या मृत्युलोकीं स्वर्गमार्गदर्शक असून यांपैकीं पहिले चार भल्यांच्या ठिकाणीं स्वाभाविक असतात व दुसऱ्या चारांच्या ते मागें लागले असतात. यज्ञ, दान, अध्ययन व तप हीं चार भल्याशीं नेहमीं खिळलीं असून इंद्रियनिग्रह, सत्य भाषण, सरलता व दया हीं चार प्राप्त करून घेण्याचा त्यांचा नेहमीं यत्न असतो. यजन, अध्ययन, दान, तप, सत्य, क्षमा, दया व निर्लोभता हे धर्माचे आठ मार्ग आहेत. यांपैकीं पहिल्या चारांचें दंभासाठींही अवलंबन होतें. परंतु दुसरीं चार मात्र थोरांच्या ठिकाणींच दिसून येतात. ज्या सभेंत वृद्ध नाहींत ती सभा नव्हे. जे धर्माला अनुसरून बोलत नाहींत ते वृद्ध नव्हत. ज्यांत सत्याचा भाग नाहीं तो धर्म नव्हे व ज्यांत कपटाचा भाग आहे तें सत्य नव्हे. सत्य, रूप, वेदाचें ज्ञान, विद्या, कुलीनता, शील, बल, धन, शौर्य, अनेक विषयांवर बोलण्याचें सामर्थ्य हे दहा स्वर्गाला साधनीभूत आहेत. दुर्लौकिकवान पुरुष पाप करून त्याचें वाईट फलच भोगतो व

लौकिकवान पुरुष पुण्यकृत्य करून त्याचें निश्चित उत्तम फल अनुभवतो. यासाठीं सदाचारसंपन्न पुरुषानें पाप कधीं करूं नये. वरचेवर पापाचरण झाल्यानें बुद्धि बिघडते. व एकवार बुद्धि बिघडली ह्मणजे वरचेवर पापकृत्येंच त्याच्या हातून घडतात. पुण्यकर्मानें बुद्धि विकास पावून वरचेवर त्याच्या हातून पुण्यकर्में घडतात. मत्सरी, मर्मभेदक भाषण करणारा, निष्ठुर, वैर धरणारा, दुष्ट व कपटी ह्यांवर त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल मोठें संकट ओढवतें. निर्मत्सर व विवेकी पुरुष नेहमीं सत्कृत्यें करून संकटांत सांपडत नाहीं व सर्वत्र कीर्ति मिळवितो. जो शहाण्यापासून ज्ञान मिळवून घेतो तोच शहाणा व शहाण्यालाच धर्मार्थलाभ होऊन सुख मिळतें. ज्याच्या योगानें रात्र सुखांत काढतां येईल असा व्यवसाय दिवसां करावा व ज्यानें पर्जन्यकाळ सरवांत जाईल असा व्यवसाय आठ महिने करावा. वृद्धापकाळीं सुखांत रहातां येईल असा व्यवसाय तारुण्यांत करावा व परलोकीं ज्याच्या योगानें सुखानें राहतां येईल असा उद्योग आमरणांत करीत रहावें. पचलेलें अन्न चांगलें; बायकोचा चांगुलपणा यौवनावस्था निघून गेल्यावर; लटाई जिंकल्यावर शूरांची भलाई; तपस्व्याची वाहवा तत्त्वज्ञान प्राप्त झाल्यावर. अधर्मानें मिळविलेल्या द्रव्यानें पुण्यसंचय करणें ह्मणजे त्यापासून पुण्यसंचय न होतां पापालाच आणखी भर पडते. मनोनिग्रही गुरु लोकांना वाटेवर आणतो; दुष्ट लोकांना राजा वाटेवर आणतो व ज्यांचीं पापकर्में उघाडकीस येत नाहींत त्यांना दंड करणारा यम आहे. ऋषी, नद्या, कुळ, महात्मे व स्त्रियांचें दुराचरण यांच्या मुळाकडे कधीं जाऊं नये. द्विजांच्या पूजेंत दक्ष, दानशूर, ज्ञातीशीं सरळ वागणारा व शीलसंपन्न असा क्षत्रिय चिरकाळ ह्या पृथ्वीचें पालन करतो. शूर, विद्यासंपन्न, व सेवाधर्म जाणणारा हे तिघेच सुवर्णपुष्पांनीं संपन्न अशा पृथ्वीपासून फुलें तोडून घेण्याला समर्थ होतात. **मोठ्या विचारानें केलेलीं कृत्यें श्रेष्ठ होत. मनगटाच्या जोरावर होणारीं मध्यम, कपटानें होणारीं कनिष्ठ व जीं परिणामीं संकट ओढवून आणणारीं तीं फारच वाईट.** दुर्योधनप्रभृति चौघांवर ऐश्वर्य सोपवून अभ्युदयाची इच्छा तूं कशी धरतोस? सर्वगुणसंपन्न पांडव तुला पित्यासमान मानीत आहेत. तर पुत्रांच्या ठिकाणीं असावें तशा प्रकारचें वर्तन तूं त्यांच्याशीं ठेव. ह्या संबंधानें महामुनी आत्रेय व साध्य यांचा संवाद लक्षांत ठेवण्यासारखा आहे. साध्यांनीं नारदांना ज्ञान होणारा कांहीं उपदेश करण्यास विनंति केली असतां ते ह्मणाले, 'धैर्य व शांति धरून खऱ्या धर्मप्रमाणें चालावें व हृदयांतील सर्व पाश दूर करून प्रिय किंवा अप्रिय वस्तूंच्या ठिकाणीं एकच भाव ठेवावा. आपल्या नांवानें कोणी खडे फोडीत असला तर आपण उलट तसें करूं नये. दुसऱ्याचा अवमान करूं नये, मित्रद्रोह करूं नये. हलक्या लोकांची सेवा करूं नये. अभिमान बाळगूं नये. निंद्य आचरण ठेवूं नये. निष्ठुर व रागाचें भाषण करूं नये.' ह्मणून धर्मानें वागणाऱ्या पुरुषानें देहदाही कठोर भाषण सोडून द्यावें. मर्मभेदी निष्ठुर भाषण करणारा सतत आपल्या मुखामध्यें मृत्यूलाच बाळगीत असतो ह्मटलें तरी चालेल. ह्मणून अशीप्रमाणें प्रखर अशा दुसऱ्यांनीं सोडलेल्या वाग्बाणांनीं घायाळ झाला असतांही विचारी पुरुषानें तो आपलें पुण्यच वाढवीत आहे ह्मणून स्वस्थ रहावें. **वस्त्रावर ज्याप्रमाणें वाटेल तो रंग चढूं शकतो त्याप्रमाणें सज्जन, दुर्जन, गरीब, चोर यांच्या संगतीनें मनुष्याला तो तो गुण येत असतो.** कांहीं तरी बोलण्यापेक्षां मौन बरें, मौनापेक्षां सत्य भाषण बरें, सत्य असून प्रिय त्याहून चांगलें व सत्य व प्रिय असून धर्माला अनुसरून असणारें भाषण सर्वांत उत्तम. मनुष्य ज्याच्या बरोबर लगट करतो, ज्याच्या मागून असतो व ज्याच्यासारखा होऊं इच्छितो त्यासारखा तो होतो. ज्या ज्या ह्मणून बाह्य विषयांपासून तो पराङ्मुख होतो त्या त्यापासून तो मुक्त होऊन त्याला अंतीं यत्किंचित देखील दुःख होत नाहीं. अशा मनुष्याचा कोणाच्या हातून पराभव होत नाहीं व तो दुसऱ्याचा करूं इच्छित नाहीं; कोणाचें वैर करीत नाहीं; कोणाचा घात करीत नाहीं, कोणी निंदा अगर स्तुति केली असतां ती त्याला सारखीच वाटते; व त्याला दुःखही होत नाहीं किंवा आनंदही होत नाहीं. जो सत्यवादी सौम्य पुरुष सर्वांच्या कल्याणाची इच्छा धरून कोणाच्या अकल्याणामध्यें मन घालीत

नाहीं तोच उत्तम पुरुष. खोटें बोलून जो दुसऱ्याला **संतुष्ट करीत नाहीं**, वचन देऊन जो तें पूर्ण करतो व दुसऱ्याचे दोष ज्याला कळतात तो मध्यम पुरुष. ज्याचा राग अनावर असून तो त्याच्या तावडींत जातो, जो घाबरून जातो, जो कृतघ्न असून कोणाचा मित्र होत नाहीं, ज्याचें अंतःकरण दुष्ट असतें, दुसऱ्यांनीं आपलें चांगलें केलें तरी ज्याला बरें वाटत नाहीं, स्वतःचा देखील ज्याला नेहमीं संशय वाटतो, व खऱ्या मित्रांना जो आपल्यापासून दूर करतो तो अधम समजावा. ज्याला आपल्या कल्याणाची इच्छा असेल त्यानें उत्तमांचीच सेवा करावी, प्रसंगविशेषीं मध्यमांची करावी, पण अधमांची सेवा कधीं करूं नये. पुरुषाला **अन्यायाच्या जोरावर, उद्योगशीलतेनें, बुद्धीनें किंवा पराक्रमानें द्रव्य मिळणें शक्य आहे. परंतु मानमान्यता व थोर कुलाची चाल मात्र यांना कधीं मिळणें** शक्य नाहीं. धर्मार्थविषयीं नित्य दक्ष असे देवसुद्धां ज्या थोर कुलांची इच्छा करीत असतात तीं थोर कुलें कोणचीं सांगतों ऐक. तप, इंद्रियनिग्रह, वेदाध्ययन व वेदाध्यापन, यज्ञयागादिकर्म, मंगल विवाह, सतत अन्नदान व सदाचरण हे सात प्रकार जेथें दिसून येतात तीं थोर कुलें समजावीं. ज्यांच्या वागणुकींत कधीं बिघाड पडत नाहीं, व ज्यासाठीं त्यांच्या पूर्वज्यांना कधीं खेद करण्याची पाळी येत नाहीं, प्रसन्न अंतःकरणानें जे नेहमीं धर्म आचरण करीत असतात व खोटें सोडून देऊन ज्यांचा नेहमीं विशिष्ट कीर्ति मिरविण्याकडे कल असतो तीं थोर कुलें होत. याग न केल्यानें, वाईट संबंध, वेदाचा उच्छेद, धर्माचें अतिक्रमण, देवद्रव्याचा अपव्यय व ब्रह्मस्व हरण केल्यानें, ब्राह्मणांना योग्य मान न देतां त्यांची निंदा केल्यानें व ठेव गप्प केल्यानें, कुलांना कमीपणा येतो. गुरें, माणसें, संपत्ति यांनीं गजबजलेलीं कुलें देखील त्यांनीं चाल सोडल्यावर कुल ह्या नांवाला पात्र होत नाहींत. तींच चाल न बिघडलेलीं घराणीं गरीब असलीं तरी त्यांना कुल हें नांव मिळून तीं मोठीं नांवलौकिक मिळवितात, चाल संभाळण्याला मोठी खबरदारी घेतली पाहिजे. पैसा काय येतो व जातो ह्मणून धनहीन खरोखर हीन नसून ज्याची चाल बिघडली तो मात्र खरा नाहींसा होतो, **परस्वहारक राजा अथवा अमात्य**, दुसऱ्याशीं वैर करणारा, मित्रद्रोही, कपटी, खोटा, व देव, पितर व अतिथि यांना देण्यापूर्वी खाणारा, असा पुरुष आमच्या कुलांत कोणी न निपजो. आमच्या कुलांत ब्रह्मघाती किंवा ब्रह्मद्वेष करणारा व **शेतकीला कोणत्याही प्रकारें अडथळा आणणारा असा जो असेल** तो आमच्यांतला ह्मणवून घेण्याला पात्र नाहीं. तृणासन, भूमि, उदक व गोड शब्द यांची भल्यांच्या घरीं कधीं वाण पडत नाहीं व धार्मिकांनीं मोठ्या श्रद्धेनें हीं दिलीं असतां त्यानें अतिथिसत्कार होतो. स्यंदनवृक्ष सूक्ष्म आहे तरी तो जसा भार सोसण्याला समर्थ आहे तसे दुसरे वृक्ष नसतात, त्याचप्रमाणें एकोप्यानें एकत्र असलेले कुलीन जसे भार सोसण्याला समर्थ असतात तसे दुसरे सामान्य लोक नसतात. **ज्याच्या रागाची पर्वा करावी लागते किंवा ज्याबरोबर भिऊन वागावें लागतें त्याला मित्र ह्मणतां येत नाहीं; तर बापाप्रमाणें ज्यावर विश्वास टाकून राहतां येतें तोच मित्र; बाकीचे केवळ ओळखीचे.** जो कोणी कांहीं संबंध नसतां आपल्यापाशीं मित्रत्वानें वागतो तोच आपला बंधु, मित्र व आपला शेवट लावणारा असून तोच आपला आधार असतो. ज्याची बुद्धि स्थिर नाहीं, ज्याच्या हातून वृद्धसेवा घडली नाहीं, अशा चंचल स्वभावाच्या मनुष्याच्या हातून मित्र जोडले जाणें कठीण आहे. हंस ज्याप्रमाणें शुष्क सरोवराला सोडून जातात, त्याप्रमाणें चलचित्त, अविचारी व इंद्रियांच्या आधीन होणाऱ्या पुरुषाला संपत्ति सोडून जाते. दुर्जनांचा राग किंवा लोभ हे दोन्ही अकारण असतात. क्षणिक मेघाप्रमाणें दुर्जनांचें हें शीलच होय. मित्राकडून मान मिळून कार्यसिद्धि झाली असतांही जे उपकार जाणत नाहींत असे लोक मेले असतां मांसभक्षक पक्षी देखील त्यांची कृतघ्नता आपल्याला चिकटेल ह्मणून अशांना खात नाहींत. **द्रव्य आपल्यापाशीं असो किंवा नसो, मित्रापाशीं शब्द टाकावा. मागितल्याखेरीज मित्राच्या खरेखोटेपणाची कसोटी लागत नाहीं**, संतापापासून कृपाला धक्का पोहोंचतो, बल कमी होतें, ज्ञान नाहींसें होतें.

संतापापासून रोग जडतो व हा कधीं न मिळणारा देह शोकानें पीडित होऊन त्यापासून शत्रूंना आनंद होतो. म्हणून शोकांत मन घालूं नये. मनुष्याला जननमरण, उच्चनीच अवस्था, मागण्याची व देण्याची, दुःख करण्याची व करविण्याची पाळी, सुखदुःख, उन्नति, अवनति, लाभ व हानि हीं आळीपाळीनें ठेवलींच आहेत. म्हणून शाहण्यानें याबद्दल आनंद मानून घेऊं नये किंवा दुःखही करूं नये. हीं सहा इंद्रियें चंचल आहेत व यांपैकीं ज्यांचें ज्यांचें ज्या ज्या विषयांकडे विशेष लक्ष वेधतें त्या त्या द्वारानें सच्छिद्र भांड्यांतील पाण्याप्रमाणें त्याची बुद्धि गळून जात असते.' धृतराष्ट्र म्हणाला,' लांकडांत झांकलेल्या अग्नीप्रमाणें सूक्ष्म धर्मानें जखडलेल्या धर्मराजाशीं मी कपटानें वागलों आहें तेव्हां तो माझ्या मंदबुद्धि मुलांचा युद्धांत ग्रास निकाल लावणार, म्हणून हें सर्व जग मला उदास भासत असून मनाला चैन नाहीं, तरी चिंतेचें वारेसुद्धां ज्या ठिकाणीं नाहीं असें ठिकाण मला सांग.' हें ऐकून विदुर म्हणाले, 'विद्या, तप, इंद्रियनिग्रह व लोभत्याग यांखेरीज तुला शांति मिळेलसें मला वाटत नाहीं. ज्ञानानें भय नाहींसें होऊन तपानें ब्रह्मप्राप्ति होते; व गुरुसेवेनें ज्ञानप्राप्ति होऊन योगसाधनानें शांति मिळते. दान व वेद यांच्या पुण्याच्या फलाची पर्वा न धरतां रागद्वेष यांपासून मुक्त होऊन मुमुक्षु या भूलोकांत वावरतात. चांगल्या रीतीनें केलेल्या अध्ययनाच्या, शौर्य गाजविलेल्या युद्धाच्या, हातून घडलेल्या सत्कृत्याच्या किंवा उत्तम रीतीनें आचरलेल्या तपाच्या अंतीं सुख आहे. ज्ञातींशीं विरोध करणारांना उत्तम आस्तरणांनीं झांकलेल्या शय्येवर देखील झोंप येत नाहीं व स्त्रीपासून किंवा भाटांच्या स्तुतिपाठानें सुख होत नाहीं. त्यांकडून कधीं धर्म पाळला जात नाहीं. ते सुखाला मुकतात; नांवालौकिकाला चढत नाहींत व शांति त्यांना आवडत नाहीं. सांगितलेली हिताची गोष्ट त्यांना रुचत नाहीं, कोणतेंही मिळविण्याची शक्ति रहात नाहीं, जवळचेंही त्यांना संभाळवत नाहीं, व नाशासारिज त्यांना गत्यंतरच उरत नाहीं. गाईच्या ठिकाणीं पुष्कळ दूध, ब्राह्मणाच्या ठिकाणीं तप, स्त्रियांच्या ठिकाणीं बेइमानीपणा व ज्ञातीपासून भय या गोष्टी शक्य आहेत. सूक्ष्म तंतूही दिवसानुदिवस जुळत जाऊन वाढले असतां त्यांच्या बाहुल्यामुळें ते अनेक प्रसंगांना टकर देतात. हीच गोष्ट सर्वत्र लागूं पडते. जळकीं लांकडें वेगळीं केलीं असतां नुसतीं धुमसतात, पण तींच जुळवून ठेविलीं असतां पेट घेतात; अशीच ज्ञातीची स्थिति आहे. **ब्राह्मण, स्त्रिया, ज्ञाति, व गाई यांजवर जे शिपाईगिरी दाखवितात ते पिकलेलें फळ ज्याप्रमाणें देठापासून गळून पडतें त्याप्रमाणें नाश पावतात.** एखादें चांगलें जमिनींत गेलेलें भक्कम झाडही जर एखाद्या ठिकाणीं एकटेंच वाढलें असेल तर त्याला जोराचा वारा बुंध्यासकट खालीं पाडूं शकतो. परंतु जीं एकत्र उगवलीं असून जुटीमुळें ज्यांना बळकटी आली असते तीं एकमेकांच्या आश्रयामुळें जोराच्या वाऱ्याला देखील जुमानीत नाहींत. त्याप्रमाणें एकटा मनुष्य अनेक गुणांनीं संपन्न असला तरी शत्रूंना जिंकतां येतो. एकमेकांच्या जोरावर एकमेकांच्या आश्रयानें असणाऱ्या ज्ञाति सरोवरांतील कमलांप्रमाणें वृद्धि पावतात. ब्राह्मण, गाई, ज्ञाति, मुलें, स्त्रिया, ज्यांचें अन्न खालें आहे ते व शरण आलेले लोक इतके अवध्य आहेत. पैसा असल्याशिवाय मनुष्याच्या ठिकाणीं कोणत्याही गुणांचा प्रकाश पडत नाहीं. तसेंच मनुष्य निरोगी असेल तरच त्याला आपलें कल्याण करून घेतां येईल. व्याधिग्रस्त लोक मेल्यासारखे होत. जो साधूनाच गिळण्याजोगा असून अन्यांना गिळतां येत नाहीं असा सहजासहजीं येणारा, कडू, मस्तकशूल उत्पन्न करणारा, पापाला कारणीभूत, कठीण, तीक्ष्ण व संतापदायक राग गिळून शांत व्हावें. रोगग्रस्त लोक फलांचा आदर करीत नाहींत व विषयांच्या ठिकाणींही त्यांना गोडी नसते. ते नेहमीं दुःखी राहून द्रव्याचा उपभोग किंवा अन्न यांपासून त्यांना सौख्य होत नाहीं. पूर्वी द्रौपदीला सभेंत जिंकली असतां **'राजा, शहाणे लोक द्यूत पसंत करीत नाहींत, तेव्हां दुर्योधनाला द्यूतापासून वार.'** म्हणून मी सांगत असतां तूं ऐकिलें नाहींस. सौम्य पाहून त्याच्याशीं विरोध करणें हें कांहीं खऱ्या बलाचें लक्षण नव्हें. सूक्ष्म धर्म मोठ्या हुशारीनें पाळला पाहिजे. क्रूराजवळची संपत्ति नाश पाव-

ते. तीच सौम्यापाशीं असेल तर पुत्रपौत्रांना तिचा उपभोग मिळतो. तुझे मुलगे व पांडव परस्परांचें रक्षण करून दोघांचे मित्र व शत्रू एकच असूं देत व दोघांचें लक्ष एकाच कार्याकडे वेधून दोघे सुखानें नांदोत. कौरवकुलाचा आधारभूत तूं असून हें कुल आज तुझ्या ताब्यांत आहे. वनवासामुळें कष्टी झालेल्या पांडवांचें संरक्षण करून कीर्ति मिळव. पांडवांबरोबर संधि कर. तुझ्या ठिकाणीं छिद्र पहात बसण्याची शत्रूला संधि देऊं नकोस. ते सर्व न्यायानें वागणारे आहेत. दुर्योधनाला मात्र ताळ्यावर आण. उपदेशाला नालायक अशाला उपदेश करणारा, आहे त्यांत संतोष मानून राहणारा, वैऱ्याबरोबर फार बेळ संबंध ठेवणारा, बायकोच्या जिवावर चैनू मारणारा, ज्याच्यापुढें तोंड पसरूं नये त्याच्यापुढें तोंड पसरणारा, थोर कुलांत जन्मून करूं नये असें काम करणारा, दुर्बल असून बलवानाबरोबर वैर बांधणारा, विश्वास न ठेवणाऱ्याला एखादी गोष्ट सांगणारा, भलत्या गोष्टीवर लक्ष ठेवणारा, सुनेशीं थट्टामस्करी करणारा, सुनेमुळें भीतीतून मुक्त झाला असून तिच्याकडून मानाची हाव धरणारा, परस्त्रीशीं जाणारा, वारंवार आपल्या बायकोला टाकून बोलणारा, एखादी वस्तु घेऊन आठवण नाहीं ह्मणणारा, मागणाराला कांहीं देऊन त्याची बढाई मारणारा, खोट्याला खरें ठरवीत बसणारा, ह्या सतरांना मनूनें आकाशाला मुठीनें मारीत बसणारे, तसेच बाकीचीं न येणारें इंद्रधनुष्य नमविणारे किंवा सूर्यकिरणांना हात लावणारे ह्मटलें आहे. हातांत पाश घेतलेले यमदूत यांना नरकाकडे नेत असतात. जो मनुष्य ज्याच्याशीं जसें वागतो त्यानें त्याच्याशीं तसें वागावें हा धर्म आहे. कपटी मनुष्याशीं कपटानें वागावें, सरळाशीं सरळ असावें. जरा रूप,आशा धैर्य, मृत्यु प्राण, मत्सर धर्माचरण, कामवासना लज्जा, दुष्टसेवा सदाचरण, राग संपत्ति व अभिमान सर्वच कांहीं लयाला नेतो.' यानंतर 'मनुष्य शतायु आहे असें सर्व वेदांतून सांगितलें असतां तीं पूर्ण शंभर वर्षे त्याला कोणत्या कारणांनीं मिळत नाहींत,' ह्मणून धृतराष्ट्रानें विचारल्यावरून विदुर ह्मणाले, 'फार अभिमान, दुसऱ्याला वाटेल तसें बोलणें, मोठ्मोठे गुन्हे करणें, राग, अप्पलपोटेपणा व मित्रद्रोह हीं सहा शतायु न होण्याला कारणें आहेत. ह्याच सहा धारेच्या तरवारी मारण्याचें आयुष्य तोडून कमीकमी करून त्याला मारीत असतात. मृत्यु कांहीं त्याला मारीत नाहीं. आपल्याशीं विश्वासानें असणाऱ्याच्या बायकोशीं किंवा गुरुपत्नीशीं जो जातो, जो द्विज (पहिल्या तीन वर्णांतील मनुष्य) रजोदर्शन झालेल्या (शूद्राच्या मुलीबरोबर लग्न करतो, मद्यपी, ब्राह्मणांना आज्ञा करणारा, त्यांची वृत्ति हरण करणारा त्यांना हेर करणारा, व शरण आलेल्यांचा प्राण घेणारा हे सर्व ब्रह्महत्या करणाऱ्याच्या तोडीचे असून यांच्याशीं संसर्ग झाला असतांही प्रायश्चित्त घ्यावें अशी श्रुति आहे. शहाण्याचें ऐकणारा, नीतिज्ञ, दाता, देवतादिकांना अर्पण करून शेष राहिलेलें अन्न भक्षण करणारा, हिंसा न करणारा, कोणत्याही अनर्थावह कृत्यांत मन न घालणारा, कृतज्ञ, सत्यानें वागणारा व सौम्य अशा विद्वानाला स्वर्ग मिळतो. नेहमीं गोड बोले मिळणें फार सोपें आहे. परंतु अप्रिय असून हिताची गोष्ट सांगणारा मिळणें कठीण व ऐकणाराही दुर्लभ. जो धर्माला अनुसरून धन्याला काय आवडतं काय नाहीं याची पर्वा न धरतां कडू पण स्वामीच्या हिताची गोष्ट बोलतो तोच राजाचा खरा हितकर्ता. कुलासाठीं एका पुरुषाला, एका गांवासाठीं एका कुलाला, एका प्रांतासाठीं एका गांवाला व स्वतःसाठीं पृथ्वीला सोडावें. आपत्कालासाठीं द्रव्यसंचय करून ठेवावा. द्रव्य खर्ची घालूनसुद्धां बायकोचा सांभाळ करावा, व द्रव्य व बायको खर्ची घालून देखील स्वतःचें संरक्षण करावें. अगदीं जुन्या कालापासून द्यूत हें वैर उत्पन्न करणारें आहे, असा अनुभव आला आहे; ह्मणून शहाण्यानें मौजेखातर देखील द्यूत खेळूं नये. द्यूताचे वेळीं देखील ह्याच योग्य सल्ला तुला मीं दिला नाहीं काय ? परंतु रोग्याला जसें गुणकारी औषध गोड लागत नाहीं तसें माझें भाषण तुला गोड वाटत नाहीं.ह्या कावळ्याकडून विचित्र पिसांनीं मनोहर अशा मोरांचा तूं पाडाव करविला आहेस. तेव्हां सिंहांना सोडून कोल्ह्यांना कवटाळूं पाहणाऱ्या तुला बेळ आली असतां रडावें लागेल. जो आपल्यावर अनुरक्त असणाऱ्या भक्ति-

मान सेवकांवर सदासर्वकाळ रागावत नाहीं त्या यजमानाशीं सेवक विश्वासानें वागून त्याला कधीं सोडीत नाहींत. सेवकांची वृत्ति हरण करून राज्य किंवा द्रव्यसंग्रह करूं नये. अशा रीतीनें तोंडघशीं दिल्यानें त्यांच्या वस्तूचा त्यांना उपभोग मिळेनासा झाल्यामुळें पूर्वी सस्नेह असले तरी निःस्नेह होऊन ते आपल्याला सोडून जातात. आपलीं सर्व कामें नीट ठरवून व जमाखर्चाच्या मानानें योग्य वेतन ठरवून राजानें साहाय्यकारी मिळवावेत. कारण साहाय्यानें दुष्कर कामें देखील शेवटाला जातात. स्वामीचा अभिप्राय ओळखून जो स्वामीचीं सर्व कार्यें मोठ्या हुशारीनें पार पाडतो, जो हितावह असेल तेंच सांगतो, जो थोर असून आपलें सामर्थ्य ओळखून असतो व ज्याची आपल्या स्वामीवर भक्ति असते त्यावर स्वतःप्रमाणेंच स्वामीनें लक्ष ठेवावें. सांगितलेलें न ऐकतां गर्वानें जो नेहमीं आपल्या उलट बोलत असतो अशा सेवकाला लागलींच दूर करावा. गर्वहीन, समर्थ, चेंगट नसणारा, दयाळू, शुद्ध, कोणाला न फितणारा, रोगट कुलांत न झालेला, व भाषणांत प्रौढता ठेवणारा, अशा आठ लक्षणांनीं संपन्न दूत असावा. शहाण्या मनुष्यानें अवेळीं शत्रूच्या घरीं विश्वासानें जाऊं नये. चवाठ्यावर रात्रीच्या वेळीं छपून राहूं नये. राजाची नजर असलेल्या स्त्रीच्या मागें लागूं नये. पुष्कळांची सल्ला घेणाऱ्या कुसंगती मनुष्यांची सल्ला घेतली असतां त्याविरुद्ध कधीं बोलूं नये, व त्यावर गैरभरंवसा दाखवूं नये. त्याच्या सल्लयाप्रमाणें न वागण्याला उगीच कांहीं तरी कारण दाखवावें. भिडस्त राजा, जारिणी स्त्री, राजसेवक, मुलगा, भाऊ, लहान मुलें असलेली विधवा, सैन्यावर पोट भरणारा, व कामावरून दूर केलेला, यांना व्यवहागच्या वेळीं मध्यें घेऊं नये. बल, रूप, चांगला आवाज, स्पष्ट उच्चार, मृदुपणा, सुवास, शुचिता, संपत्ति, लावण्य, उत्तम स्त्रिया, हे दहा गुण स्नानशील पुरुषाला आश्रय करून असतात; तसेंच आरोग्य, आयुष्य, बल, सुख, निरोगी संतति, व मितभोजीपणा हे गुण मिताहाऱ्याच्या ठिकाणीं असतात. आळशी, खादाड, लोकांच्या द्वेषाला पात्र झालेला, कपटानें भरलेला, निर्दय, देशकाल न जाणणारा, विद्रुप वेषानें असणारा, इतक्यांना घरांत आश्रय देऊं नये. मनुष्य प्रसंगांत असला तरी त्यानें कृपण, निंदक, मूर्ख, वनवासी, लुच्चा, मान्यांना मान न देणारा, क्रूर, आपल्याशीं वैरानें वागणारा, व कृतघ्न यांच्यापुढें तोंड वेंगूं नये. कोणत्याही कामांत गोंधळ करून सोडणारा, कामांत दुर्लक्ष करणारा, नित्य खोटें बोलणारा, आपल्यावर दृढभक्ति न करणारा, आपल्या वरचें प्रेम कमी केलेला व स्वतःला शहाणा समजणारा ह्या सहा नराधमांशीं संबंध ठेवूं नये. साहाय्यावांचून अर्थसिद्धि होत नाहीं व अर्थावांचून साहाय्य करणारे मिळत नाहींत. हे परस्पर परस्परांवर अवलंबी आहेत. पुत्रोत्पादनानंतर त्यांना उपजीविकेचें साधन करून देऊन त्यांच्या ऋणांतून मोकळें व्हावें. तसेंच मुलींना योग्य स्थळ पाहून देऊन आपण ब्रह्मचिंतनासाठीं अरण्यवास घ्यावा. जें सर्व प्राणिमात्रांच्या हिताचें व आपल्याला सुखावह होईल असेंच कृत्य करीत असावें. कारण श्रीमंताचे हेतु सफल होण्याला हेंच मूळ आहे. अभ्युदय, सामर्थ्य, शौर्य, वीर्य, उत्साह व निश्चय ज्याच्या ठिकाणीं दिसून येतात त्याला आपलें कसें चालेल याची काळजी कोठून उरणार? पांडवांबरोबर वैर करण्यांत किती नुकसान आहे हें तूंच पहा. मुलांशीं वैर, नेहमीं संशयात्मक जीवित, कीर्तीची हानि, शत्रूंना हर्ष इतक्या गोष्टींना हें कारण होणार आहे. भीष्म, तूं, द्रोण व युधिष्ठिर खवळला असतां **समोरासमोर उगवणाऱ्या धूमकेतूप्रमाणें** तुमचा राग सर्व जगताचा फडशा पाडण्याला पुरें आहे. तेच तुझे शंभर मुलगे, कर्ण व पांच पांडव मिळून ह्या सागरांत पृथ्वीवर अधिकार चालविण्याला समर्थ आहेत. तुझे मुलगे एखाद्या वनाप्रमाणें असून पांडव त्या वनांतले वाघ आहेत. वाघांवाचून वन किंवा वनावांचून वाघ असणें शक्य नाहीं. तेव्हां वाघांना वनांतून हुसकून लावून वनाचा व वाघांचा नाश करण्याला प्रवृत्त होऊं नकोस. दुष्ट लोक दुसऱ्याचे दोष काढण्याला जितके तयार असतात तितके ते त्यांचे चांगले गुण कढून घेण्याला नसतात. उद्देश चांगल्या तऱ्हेनें शेवटास जावा अशी इच्छा असणाऱ्यानें धर्माला सोडतां कामा नये. असूत जसें कधीं स्वर्गाला सोडून

नसतें त्यामाणें अर्थ कधीं धर्माला सोडून नसतो. ज्यानें आपलें मन पापापासून काढून चांगल्या कृत्याकडे लावलें आहे त्यानेंच जिला प्रकृति ह्मणतात किंवा जिला विकृति ह्मणतात तें सर्व जाणलें, जो धर्मार्थकामांचें यथाकालीं सेवन करतो त्याचीच त्यांच्याशीं उभयलोकीं सांगड जुळते. राग किंवा आनंद यांचा उमाळा ज्याला दाबतां येतो व संकटांत जो गोंधळून जात नाहीं तोच वैभवाला चढतो. बाहुबल, अमात्यबल, द्रव्यबल, जातिबल व बुद्धिबल असे पांच प्रकारचें बल असून त्यांत बाहुबल सर्वांत कनिष्ठ व बुद्धिबल सर्वांत श्रेष्ठ आहे. अपकार करण्याला समर्थ अशाशीं वैर करून त्याजपासून मी दूर आहें या समजुतीबरच शहाण्यानें निश्चिंत बसूं नये. **बुद्धिमानाचे हात लांब असून त्यांनीं तो डवचणाराचा फडशा उडवितो. स्त्रिया, राजे, सर्प, वेदाध्ययन, यजमान, शत्रु, विषयोपभोग व आयुष्य यांवर कोण शहाणा पुरुष विसंबून राहील.** बुद्धिरूप बाण लागून घायाळ झालेल्या प्राण्याला बरें करण्याला वैद्य, औषधें, मंत्र, पुण्यप्रद कृत्यें, अथर्वणवेद व सिद्ध रसायनें हीं मुळीं उपयोगीं पडत नाहींत. **सर्प, अग्नि, सिंह व आपल्या कुलांतील पुरुष यांच्या वाटेला शहाण्यानें कधीं जाऊं नये.** अग्नि लांकडांत झांकलेला असतो तो त्या लांकडाला जाळीत नाहीं. तेंच घर्षणानें त्याला चेतविलें असतां तो त्या लांकडालाच जाळून रहात नाहीं; तर त्याबरोबर आसपासच्या अरण्याचा व इतर वस्तूंचाही जाळून फडशा उडवितो. तसेच अग्नितुल्य तेजस्वी हे पांडव लांकडांतल्या अग्नीप्रमाणें स्वस्थ आहेत. एखाद्या गृहस्थाचें हृदय वृद्ध व सन्माननीय पाहुणा घरीं आला असतां उडूं लागतें तें त्याला उठून सत्कार दिल्याबरच स्वस्थ होतें. शहाण्यानें घरीं आलेल्या सज्जनाचे पाय धुवून त्याला आसन द्यावें व त्याला कुशल विचारून आदरपूर्वक भोजन द्यावें. घेतलेल्या प्रतिग्रहाचा उपभोग आपल्याला मिळेल किंवा नाहीं या भीतीनें किंवा देशाराचा लोभ व नास्तिकी यांना भिऊन मंत्रज्ञ पुरुष ज्याचे घरीं उदक, मधुपर्क, किंवा गोदान घेत नाहीं त्याचें जीवित व्यर्थ आहे. परंतु अतिथि किती जरी इष्ट असला तरी वैद्य, शस्त्रें करणारा, ब्रह्मचर्यापासून भ्रष्ट झालेला, चोर, क्रूर, दारू पिणारा, गर्भाचा घात करणारा, सेवेबद्दर उपजीविका करणारा व वेदविक्रय करणारा हे अतिथ्याला योग्य नाहींत. मीठ शिजविलेलें अन्न, दूध, दहीं, मध, तेल, तूप, मांस फलमूलें, भाजीपाला, रंगीत वस्त्र, सुगंधी पदार्थ व गूळ हे पदार्थ विकूं नयेत. ज्याला राग नाहीं, जो माती, दगड, किंवा सोनें सारखेंच समजतो, ज्याला शोक ठाऊक नाहीं, जो कोणाबरोबर मित्रत्व किंवा वैर करीत नाहीं, स्तुति किंवा सुखदुःख यांची ज्याला पर्वा नाहीं, असा जो उदासीन वृत्तीनें असतो त्याला भिक्षू ह्मणावें. सावा, मुळें, इंगुदिप्रभृति भाज्या यावर राहून इंद्रियनिग्रह करून अग्निकार्यांत जो वनामध्यें राहून गढला असतो त्याला तपस्वी ह्मणावें. गैरभरंवशाच्या मनुष्यावर कधीं विश्वास ठेवूं नये व भरंवशाच्या मनुष्यावरही फाजील विसंबून राहूं नये. भरंवसा टाकल्यानें उत्पन्न होणारें भय विश्वासून राहणाराचीं पाळेंमुळें खणून काढतें. मनुष्यानें मत्सर करूं नये. आपल्या बायकोचें संरक्षण करावें. आपल्याला मिळेल तें आपल्यावर विसंबून असणारांना वांटून द्यावें. गोड बोलून सर्वांशीं चांगलें असावें. स्त्रियांबरोबरही गोड बोलावें, पण त्यांच्या ताब्यांत जाऊं नये. **घराला शोभा देणाऱ्या पुण्यवान अशा भाग्यशाली स्त्रियांचा मान ठेवावा. स्त्रिया घरच्या लक्ष्म्या ह्मटल्या आहेत. तेव्हां विशेष काळजीनें त्यांचें संरक्षण करावें. मनुष्यानें अंतःपुराची देखरेख पित्याकडे सोपवावी, आपल्या सारखाच स्त्रीचा मनुष्य असेल त्याला गुरांकडे ठेवावा. व शेतकीचें काम स्वतः पहावें.** नोकरांकडून दुकानदारी करवावी; मुलांकडून ब्राह्मणांची सेवा करवावी; कारण उदकापासून अग्नीची, ब्राह्मणापासून क्षत्रियांची व दगडापासून लोखंडाची उत्पत्ति झाली असल्यामुळें यांचें सर्वांवर चालणारें तेज आपल्या जन्म देणाऱ्याकडे आलें असतां कमी पडतें. कुलवान, क्षमाशील, थोर लोक लांकडांत झांकून असलेल्या अग्नीप्रमा-

णें स्वस्थ राहून आपलें स्वरूप प्रकट करीत नाहींत. त्यांची मसलत घरच्यांना किंवा बाहेरच्यांना कधीं कळत नाहीं. हेरांकडून चोहोंकडील बातमी ज्या राजाला असते तोच चिरकाल ऐश्वर्याचा उपभोग घेतो. धर्म, काम व अर्थ यांसंबंधीं उद्देशिल्या कार्याचा परिस्फोट कधीं न होऊं देतां शेवटास गेल्यावरच ते लोकांच्या दृष्टोत्पत्तीस यावे. त्याचप्रमाणें मंत्र न फुटण्याची खबरदारी घ्यावी. पर्वतावर, राजवाड्याच्या गच्चीवर किंवा ज्या ठिकाणीं गवतही उगवलें नाहीं अशा अरण्यांत जाऊन मसलत ठरवावी. महत्वाची गोष्ट जो मित्र नाहीं त्याला, ज्ञानहीन मित्राला किंवा ज्ञानवान व मित्र असून ज्याचें मन स्वाधीन नाहीं अशाला कधूं देऊं नये. राजानें परीक्षा केल्याशिवाय कोणाला आपला मंत्री करूं नये. कारण द्रव्यप्राप्तीची इच्छा शेवटास जाणें व मंत्ररक्षण ह्या दोन्ही गोष्टी मंत्र्यावर अवलंबून आहेत. मंत्रगुप्ति कार्यसिद्धीला अत्यावश्य आहे. अविचारानें भलतीं कामें हातीं घेतल्यानें मनुष्य प्रसंगीं प्राणालाही मुकतो. तेंच क्षेपणारीं कामें हातीं घेतल्यानें सुख होऊन तीं हातीं न घेणेंच पश्चात्तापाला कारण होतें. वेद न म्हटलेला ब्राह्मण ज्याप्रमाणें श्राद्धाला उपयोगी नाहीं त्याप्रमाणें संधिविग्रहादि सहा गुण ठाऊक नसलेला सल्ला विचारण्याला योग्य नाहीं. आपली स्थिति व नफानुकसान कळत असून वरील सहा गुणांच्या योगानें स्वतःचें स्वरं ज्ञान ज्याला आहे व ज्याच्या शीलासंबंधानें लोकांत चहा आहे अशा मनुष्याच्या ताब्यांत ही पृथ्वी असते. ज्याचा राग किंवा आनंद फुकट जात नाहींत, तसेंच जो करावयाच्या गोष्टींकडे व खजिन्याकडे स्वतः लक्ष पुरवीत असतो त्याला ही वसुंधरा सदा वसुमान करते. राजा हें नांव व वर राहणारें छत्र यांवरच राजानें संतुष्ट राहून सेवकांना द्रव्य द्यावें. एकट्यानें सर्वांचा उपभोग घेऊं नये. ब्राह्मण ब्राह्मणाला ओळखतो. नवरा बायकोला ओळखतो, राजा मंत्र्याला ओळखतो. पण राजाला राजानें स्वतःच ओळखलें पाहिजे. ठार करण्याला पात्र असा शत्रु तावडींत आला असतां त्याला जिवंत सोडूं नये. सामर्थ्य नसेल ते वेळीं वध्य अशा शत्रूपुढें दर्खाल डोकें लववावें. परंतु सामर्थ्य आलें असतां त्याला ठार केल्यावांचून सोडूं नये. कारण त्याला न मारल्यानें लवकरच मोठें भय उत्पन्न होतें. देवता, राजे, ब्राह्मण, थोर, लहान, व रोगग्रस्त यांच्यापुढें मोठ्या यत्नानें आपला राग आवरून धरावा. मूर्खाप्रमाणें शहाण्यानें व्यर्थ तंटा कधीं करूं नये. त्यामुळें कीर्ति वाढून त्यावर कांहीं अनर्थ ओढवत नाहींत. स्त्रियांना ज्याप्रमाणें षंढ पति आवडत नाहीं तसेंच ज्याची कृपा किंवा राग व्यर्थ असतो असा स्वामी सेवकांना आवडत नाहीं. शहाणपणाच्या योगानें द्रव्य मिळतेंच किंवा मूर्खाला तें मिळत नाहीं असा कांहीं नियम नाहीं. परंतु इहलोकीं प्राप्त होणाऱ्या गोष्टी पूर्वसंचितावर अवलंबून असतात हें मात्र शहाण्यानेंच कळत असतें. 'विद्या, शील, वय, बुद्धि, धन, व कुल यांनीं जे थोर अमतील त्यांचा मूर्खच नेहमीं अवमान करीत असत. ह्मणून गैर चालीचा, मूर्ख, मत्सरी, धर्मलंड, दुर्भाषण करणारा व रागीट अशांवर संकटें हं हं ह्मणतां ओढवतात. सरळ बुद्धीनें दिलेलें दान, वचन न मोडणें, व विचार करून बोलणें यांच्या योगानें प्राणिमात्र आपलेसे करून घेतां येतात. निष्कपटी, दक्ष, कृतज्ञ, विचारी, व सरळ असा मनुष्य द्रव्यहीन असला तरी त्या भोंवतीं परिवार गोळा होतो. धैर्य, शांति, इंद्रियनिग्रह, शुचिर्भूतता, दया, मृदु भाषण, व मित्राशीं अद्रोहबुद्धि हे सात गुण संपत्ति वाढविणारे आहेत. आपल्या मिळकतीचा वांटा आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांना न देणारा, मनाचा दुष्ट, कृतघ्न, निर्लज्ज अशा राजापासून दूर असावें. स्वतः दोषी असून जो घरांतील माणसांना राग आणीत असतो त्याला साप असलेल्या घरांत राहिल्याप्रमाणें रात्रीं स्वस्थ झोंप येत नाहीं. जे बिघडल्यामुळें योगक्षेमाला अडथळा येतो त्यांना देवतांप्रमाणें नेहमीं संतुष्ट ठेवावें. ज्या गोष्टी स्त्रिया, निःकाळजी लोक, पतित व दुर्जन यांवर अवलंबून असतात त्या घडून येण्याची वानवाच असते. जुगार, स्त्रिया व बाल यांचा ज्यावर अंमल चालतो ते नदींत बुडणाऱ्या दगडाच्या होडग्याप्रमाणें नाश पावतात. फाजील शहाणपणा दाखविण्याच्या भरीस न पडतां आपल्या कामाकडे जे लक्ष पुरवितात तेच

शहाणे. काजील शहाणपणांत पडणारे तंटे उत्पन्न करतात. जुगारबाज, भाट, व वैश्या ज्याची स्तुति गातात असा मनुष्य कांहीं जिवंत समजावयाचा नाहीं. त्या महाभागांना सोडून दुर्योधनावर तूं ऐश्वर्य सोपविलें आहेस. तेव्हां तो त्रैलोक्यापासून भ्रष्ट झालेला तुझ्या लवकरच दृष्टीस पडेल.' धृतराष्ट्र ह्मणाला, 'दोऱ्यांत गोंवलेल्या कळसूत्री बाहुलीप्रमाणें लाभहानीसंबंधानें मनुष्याला ब्रह्मदेवानें दैवाच्या आधीन करून ठेविलें आहे, हें लक्षांत ठेवून तुला काय सांगावयाचें असेल तें सांग. मी ऐकण्याला तयार आहें.' विदुर ह्मणाले, 'अप्रासंगिक भाषण करणारा मग तो बृहस्पति असला तरी अपमान पावून तिरस्काराला पात्र होतो. आपल्याला जो नावडता असतो तो कधीं आपल्याला भला, बुद्धिमान किंवा शहाणा वाटत नाहीं. कारण आपल्याला आवडता असतो त्याची सर्व कृत्यें चांगलीं वाटत असून नावडत्याचीं कृत्यें वाईट वाटत असतात. दुर्योधन जन्माला आला तेव्हांच त्याला सोडून देण्याविषयीं मीं तुला सांगितलें. त्याला सोडल्यानें तुझे शंभर पुत्र सुखांत नांदणार आहेत. त्याला धरून बसल्यानें या शंभरांचा नाश होणार आहे. जी भरभराट परिणामीं नाशाला कारणीभूत होणार अशा भरभराटीचा अभिमान बाळगूं नये. तसेंच ज्याच्या नाशाच्या योगानें परिणाम सुखावह होणार तो नाश समजूं नये. कांहीं गुणांनीं संपन्न असतात. कांहीं धनांनीं संपन्न असतात. गुणहीन अशा धनसंपन्नांना दूर कर.' धृतराष्ट्र ह्मणाला, 'तूं शहाण्यांना मान्य असें परिणामदर्शक सांगत आहेस व धर्म तेथें जय हेंही तत्त्व मला कळतें. तरी दुर्योधनाला माझ्यानें सोडवत नाहीं.' विदुर ह्मणाले, 'जो फार गुणवान असून विनयसंपन्न आहे, भूतांच्या यत्किंचितही उपमर्दाकडे त्याचें दुर्लक्ष होत नाहीं. परनिंदा व दुसऱ्याला दुःख देणें यांत जे गढले असतात, ते परस्परांमध्यें विरोध उत्पन्न करण्याला नेहमीं मोठ्या दक्षतेनें खटपट करीत असतात. ज्यांना पाहणें दोषाला कारण असून ज्यांच्याबरोबर राहण्यांत मोठी भीति असत, ज्यांच्यापासून कांहीं घेणें किंवा ज्यांना कांहीं देणें हीं दोन्ही मोठ्या भीतीला कारण असतात, भांडण लावून देणें ज्यांचें शील असून जे विषयलंपट, निर्लज्ज, लुच्चे व दुष्ट असतात, अशा प्रकारच्या लोकांपासून मनुष्यानें दूर असावें. मैत्री जुळण्याचें कारण संपल्याबरोबर त्या नीच लोकांची प्रीति, मैत्रीपासून मिळणारी फलप्राप्ति व सुख संपुष्टांत येतात; एवढेंच नव्हे तर यत्किंचित् त्यांचें वांकडें झाल्याबरोबर ते आपली निंदा करूं लागून आपला नाश करण्याला उठल्याविना त्यांची समाधानी होत नाहीं. ह्मणून ज्यांचें मन त्यांच्या ताब्यांत नाहीं अशा निष्ठुर नीचांशीं संगति शहाण्यानें मुद्दाम टाळावी. जो आपल्या गरीब, दीन व गरजू अशा ज्ञातीवर कृपा करतो त्याचे पुत्र व पशू वृद्धिंगत होऊन अक्षय्य सुखाचा तो उपभोग घेतो. ज्यांना कल्याणाची व कुलवृद्धीची इच्छा असेल त्यांनीं ज्ञातीचे लोक वाढवावे. ज्ञातीवर आदर दाखविल्यानें तुझें कल्याण होईल. गुणहीन अशा ज्ञातींचें सुद्धां संरक्षण करणें आपलें काम आहे. मग पांडव तर तुझ्या कृपेसाठीं आपसरून आहेत, तर त्यांवर कृपा कर. त्यांच्या उदरनिर्वाहाला कांहीं गांवें तोडून दे. असें केल्यानें लोकांत लौकिक मिळविल्यासारखें होणार आहे. तूंच वडील असल्यामुळें मुलांचें पारिपत्य तुला केलें पाहिजे. आणि मलाही तुझ्या हिताची गोष्ट असेल तीच सांगितली पाहिजे. तुझ्या हिताचीच काळजी मला आहे हें पक्कें लक्षांत ठेव. ज्ञातींशीं कधीं भांडूं नये, व जीं कांहीं सुखें मिळण्याजोगीं असतील त्यांचा उपभोग ज्ञातींशीं मिळून घ्यावा. जेवणखाण, भाषण वगैरे सर्व ज्ञातींशीं मिळून करावें, ज्ञातींवर प्रेम ठेवावें. ज्ञातींशीं विरोध कधीं करूं नये. कारण ज्ञातीच तारण्याला किंवा बुडविण्याला कारण होतात. ते भले असले तर तारतात, वाईट असले तर मारतात. ह्मणून पांडवांशीं चांगलें वर्तन ठेव. त्यांचा पाठिंबा मिळाल्यानें तुझे शत्रू तुझ्यापुढें डोकें काढणार नाहींत. हातांत तीर असणाऱ्या पारध्यासमक्ष मरणाऱ्या मृगाप्रमाणें श्रीमान ज्ञातींच्यापुढें त्याच ज्ञातींतला जो मनुष्य निरुष्ट दर्शेत असतो त्याचें पाप त्या श्रीमान ज्ञातीला लागतें. शेवटीं तरी ते किंवा तुझे मुलगे मेलेले ऐकून तुला दुःख होणारच. याचा पूर्वीच विचार कर. हें जीवित क्षणभंगुर असल्यामुळें ज्याच्या यो-

गानें पुढें खाटेवर रडत बसण्याची पाळी येईल असें कृत्य प्रथमच करूं नये. शुक्राचार्यांच्यांतून दुसरा कोणी मनुष्य चुकीला पात्र नाहीं असें नाहीं. ह्मणून पुढचा विचार नीट करणें हेंच शहाण्याचें काम आहे. दुर्योधनानें जें त्यांना पूर्वी दुखविलें आहे तें तूं कुलवृद्धानें पुसून काढलें पाहिजे. त्यांना राज्यपद दिल्यानें तुझा दुर्लौकिक दूर होऊन शहाण्या लोकांना तूं सन्माननीय होशील. शहाण्याच्या सदुपदेशाच्या परिणामाचा नीट विचार करून जो कामें हातीं घेतो तो चिरकाल यश मिळवितो. उपदेश मनांत भरला नाहीं किंवा मनांत भरून त्याप्रमाणें वर्तन झालें नाहीं तर मोठ्या शहाण्यांनीं केलेला उपदेशसुद्धां व्यर्थ आहे. परिणामीं अनिष्ट असें काम जो हातीं घेत नाहीं तोच वैभवाला चढतो. एकवार केलेल्या दुष्कृत्याचा विचार न करितां जो पुढें तसेंच वर्तन सुरूं ठेवतो तो दुस्तर अशा खोल चिखलांत रुततो. माद, स्वप्न, अज्ञान, तोंडावरचे विकार, दुष्ट मंत्र्यावर विश्वास, व अडाणी दूतासंबंधानें खात्री हीं सहा मंत्रस्फोट होण्याचीं द्वारें असून अभिवृद्धीची इच्छा करणाऱ्या शहाण्यानें यासंबंधानें नेहमीं खबरदारी घ्यावी. हीं द्वारें संभाळून धर्मार्थकामांत जो दक्ष असतो तो शत्रूवर वर्चस्व मिळवितो. वेदाचें ज्ञान असल्यावांचून व वृद्धसेवा केल्यावांचून धर्मार्थाचें यथार्थ ज्ञान बृहस्पतीना देखील असणें शक्य नाहीं. समुद्रांत पडलेली वस्तु फुकट जाते, आत्मनिग्रह नसणाऱ्याचे ठिकाणीं श्रुति फुकट जाते, रानेंत दिलेली आहुति फुकट जाते, तद्वत न ऐकणाराला केलेला उपदेश फुकट जातो. मनानें परीक्षा करून बुद्धीनें चांगला अनुभव घेऊन व कान, डोळे आणि विचारशक्ति नीट कामीं लावून मग शहाण्यावरोबर मैत्री करावी. विनयानें अपकीर्ति दूर होते, पराक्रमानें अनर्थ टळतो, क्षमेनें राग शांत होतो व सदाचारानें अशुभ गोष्टी टळतात. भोग्य वस्तु, जन्मभूमि, घर, आचार, त्याचप्रमाणें भोजन व आच्छादन यांच्या योगानें कुळाची परीक्षा करावी. विषय पुढें येऊन उभे असतांना जीवन्मुक्ताच्या हातूनही त्यांना दूर करवत नाहीं. मग विषयासक्त मनुष्याची कथा काय? शहाण्याजवळ असणारा, विद्वान, धार्मिक, दिसण्यांत भला, गोड बोलणारा व ज्याला पुष्कळ मित्र आहेत असा मित्र जवळ करावा. जो मर्यादा उल्लंघन करीत नाहीं व धर्माची ज्याला चाड आहे व जो नेहमीं सौम्य असून विनयशील असतो तो वाईट कुलांत झाला असो वा कुलीन असो, शेंकडों कुलीनांहून श्रेष्ठ आहे. ज्यांचें मनाशीं मन, बुद्धीशीं बुद्धि मिळून जाऊन परस्परांचें हितगुज परस्परांना कळत असतें त्यांची मैत्री कधीं नाहींशी होत नाहीं. दुर्बुद्ध व अविचारी मनुष्याला तृणाच्छादित कूपाप्रमाणें शहाण्यानें सोडून द्यावें. कारण त्याची मैत्री कधीं रहावयाची नाहीं. गर्विष्ठ, मूर्ख, तापट अविचारी, व धर्मभ्रष्ट यांच्याबरोबर शहाण्यानें मैत्री करूं नये. कृतज्ञ, धार्मिक, सत्यानें वागणारा, जो क्षुद्र नाहीं, दृढभक्ति करणारा, जितेंद्रिय, मर्यादेनें वागणारा व आपल्याला कधीं न सोडणारा असा मित्र जोडावा. त्या त्या विषयांपासून इंद्रियांना परतविणें हें काम मृत्यूपेक्षांही विशेष दुःखदायक आहे. परंतु त्यांत पूर्ण गढून गेल्यानें देवतांचा देखील नाश होतो. सर्व प्राणिमात्रांशीं गोडीनें वागणें, निर्मात्सर्य, क्षमा, धैर्य व मित्रांचा अवमान न करणें ह्या गोष्टी आयुष्यवर्धक आहेत. दृढनिश्चय करून मोठ्या हुशारीनें फसलेली गोष्ट सुधारून घेणें हेंच शहाण्याचें काम आहे. येणारा प्रसंग कसा टाळावा, तसेंच तो आला असतां दृढ निश्चय कसा ठेवावा, व तो येऊन गेल्यावर पुढें काय करावें हें ज्याला कळतें त्याचे उद्देश कधीं फसत नाहींत. कायावाचामनानें मनुष्याचा ज्याकडे नेहमीं ओढा असतो तेंच त्याला आपल्याकडे ओढून नेत असतें; ह्मणून नेहमीं चांगल्याकडे लक्ष पुरवावें. शुभ कृत्यें हातीं घेणें, देशकाल, वेदज्ञान, उद्योग, सरळपणा व नेहमीं सज्जनसमागम हीं कल्याणप्रद होतात. **सतत उद्योग हें संपत्तीचें, लाभाचें व कल्याणाचें माहेर घर आहे व सतत उद्योग करणारा योग्यतेला चढून श्रेष्ठ सुखाचा उपभोग घेतो.** सत्ता चालविण्याची ज्याला इच्छा आहे त्याचे ठिकाणीं सर्वत्र व सदा क्षमा असणें ह्यासारखी वैभवाला चढविणारी व हितावह गोष्ट दुसरी नाहीं. दुर्बलांनें सर्वांना क्षमा करावी. शक्तिमानानें धर्मबुद्धीनें क्षमा धरावी, तसेंच लाभहानि ज्याची सामान आहे त्यानेंही क्षमा धरल्यांतच हित आहे. ज्या सुखसेवनापासून ध-

मर्यादेला बाध येत नाहीं असें सुख खुशाल यथेच्छ सेवन करावें. परंतु मूर्खाप्रमाणें इंद्रियें स्वैर मात्र सोडूं नयेत, दुःखाकुल, मत्त, नास्तिक, आळशी, उच्छृंखल व उत्साहहीन अशापाशीं लक्ष्मी रहात नाहीं. जो सरळ वागतो व सरळपणामुळें ज्याला निंद्य कृत्याची लाज वाटते अशाला मूर्ख लोक दुबळा समजून त्याच्या वाटें जातात. अति सभ्य, अति दाता, अति शूर, अति व्रतशील, शहाणपणाची घमेंड असणारा यांच्यापाशींही लक्ष्मी भयानें जात नाहीं. तेव्हां ही मोठ्या गुणवानापाशीं असते असेंही नाहीं किंवा अत्यंत निर्गुणापाशीं असते असेंही नाहीं. हिला गुणाचीही मोठी पर्वा नाहीं. किंबा निर्गुणावरही हिचें प्रेम नाहीं. तर गोजिऱ्या गाईप्रमाणें डोळे मिटून ही कोठें तरी राहते झालें. वेदाचें फल अग्निहोत्र असून सुशीलपणा व सदाचरण हें अध्ययनाचें फल आहे.रतिसुख व पुत्रप्राप्ति हें स्त्रीपासून मिळणारें फळ आहे; व दान आणि उपभोग हें द्रव्याचें फळ आहे. अन्यायानें मिळविलेल्या द्रव्यानें जो मेल्यानंतर उपयोगीं पडणारीं यज्ञयागादि कर्में करतो त्याला तें द्रव्य अन्यायार्जित असल्यामुळें त्याचें फळ परलोकीं मिळत नाहीं. अनेक विकट वनें व अरण्यें, कठीण विपत्ति, प्रसंग व उगारलेली शस्त्रें यांपासून धीरांना भीति वाटत नाहीं. उद्योग, इंद्रियनिग्रह, दक्षता, हुशारी, धैर्य, आठवण व विचारपूर्वक एखादें काम हातीं घेणें हें वैभाबाला चढण्याचें लक्षण आहे. तप हें तापसांचें बल आहे, ब्रह्मवेत्त्यांचें ब्रह्म हें बल आहे, पीडा देणें दुष्टांचें बल आहे, व गुणवानाचें बल म्हटलें म्हणजे क्षमा आहे. पाणी, फलमूल, दूध, हवि, ब्राह्मणाची इच्छा, गुरूची आज्ञा, आणि औषध ह्या आठांच्या योगानें उपवासादि व्रत मोडत नाहीं. आपल्याला जें आवडत नाहीं तें दुसऱ्यासंबंधानें करूं नये, हा धर्माचा सामान्य नियम झाला. आतां अधर्म वासनेपासून घडत असतो. राग सोडून देऊन रागाला जिंकावें, तसेंच दुष्टाला भलेपणानें, कृपणाला लालुचीनें व खोट्याला खऱ्यानें जिंकावें. स्त्री, लुच्चा, आळशी, भित्रा, तापट, वृथा पराक्रमाचा डौल मिरविणारा, चोर, कृतघ्न व नास्तिक यांबर विश्वास ठेवूं नये, थोरांना, मान देऊन नेहमीं त्यांच्या संगतीनें राहणाऱ्याची कीर्ति, आयुष्य, यश व बल बाढत असतात. ज्या गोष्टी पुष्कळ सायासानें, धर्माचा अतिक्रम केल्यानें अथवा **शत्रूपुढें नाक घासून मिळण्याजोग्या असतात,** अशा गोष्टींत मन घालूं नये. विद्याहीन पुरुष, संततिहीन मैथुन, **उपजीविकेला साधन नसणारी प्रजा हीं शोचनीय होत.** तसेंच अराजक राष्ट्र कींव करण्यासारखें समजलें पाहिजे. प्रवासानें मनुष्याला, झऱ्यांच्या योगानें पर्वतांना, संभोग न मिळाल्यानें स्त्रियांना, निष्ठुर भाषणानें मनाला कृशता येते.अध्ययन न ठेवल्यानें वेदांवर,व्रतशील न राहिल्यानें ब्राह्मणत्वावर मालिनता चढते.**पृथ्वीला मलिनता आलणारा बाल्हीक देश आहे.** खोटें बोलणें हें पुरुषाला मलिनता आणतें. प्रबल इच्छेच्या आधीन होणें हीच साध्वींना मलिनता आहे. प्रवास स्त्रियांना मलिनता आणतो. रुप्याच्या भेसळीनें सोन्याला, कथिलानें रुप्याला, शिशानें कथिलाला, माती वगैरेच्या योगानें शिशाला मलिनता येते. निजून झोंपेची, कामवासना पूर्ण करून स्त्रियांची, जळण घालून अग्नीची, तसेंच यथेच्छ पिण्यानें मद्याची शांति करण्याच्या भरीस कधीं पडूं नये. दानानें मित्र, युद्धानें शत्रू, व अन्नपानानें स्त्री ज्यानें स्वाधीन ठेवले आहेत त्याचेंच जीवित सफल समजावें. हजारों जवळ राखून असणारा जगतो, तसेंच शेंकडों असणाराही जगतो. कशावर म्हणजे जगतां येत नाहीं असें कांहीं नाहीं. मग ही वृथा हाव कशाला? ह्या पृथ्वीवरील धनधान्य, पशू, स्त्रिया इत्यादि सर्व जरी एकाला मिळालीं तरी त्याला पुरें होणार नाहीं हें ज्याला कळतें तो ह्या पाशांत पडत नसतो. तुझ्या ठिकाणीं जर समता असेल तर तुझे पुत्र व पांडव यांच्यासारखा बाग. अभिमान न धरतां सज्जनांना मान्य होऊन हातून होईल तेवढें जो करतो त्याला यश मिळतें. कारण सज्जन प्रसन्न झाले असतां सुखाला कमी नाहीं. अधर्मानें मोठा हेतु साधत असून त्याला कोणाकडून अडथळा नसतां जो तो साधून घेत नाहीं तो मोठ्या दुःखातून सुटून कात टाकलेल्या सापाप्रमाणें सुखानें झोंप घेतो. खोटेपणानें मोठेपणाला चढणें, राजाचे कान

फुंकणें, आणि गुरूशीं वांकड्या मार्गानें वागणें हीं ब्रह्महत्येच्या तोडीचीं पातकें आहेत. मत्सर हा बहुतांशीं मृत्यु आहे. टाकून बोलणें लक्ष्मीला मारण्यासारखें आहे. दुर्लक्ष, गडबड व गर्वोक्ति हीं तीन विद्येचा नाश करणारीं आयुधें आहेत. तसेंच आळस, दुर्लक्ष, बिसराळूपणा, चळवळ, चकाट्याचे अड्डे, उद्धटपणा, गर्व व दुसऱ्याला विद्या न सांगणें हे विद्यार्थ्याचे ठिकाणीं दोष आहेत. **सुख ज्याला पाहिजे त्याला विद्या कोठून येणार व विद्या पाहिजे त्याला सुख कोठून मिळणार!** ह्मणून ज्याला सुख पाहिजे त्यानें विद्येला फाटा दिला पाहिजे किंवा ज्याला विद्या पाहिजे त्यानें सुखाला फाटा दिला पाहिजे. कितीही जळण घातलें तरी अग्नीची तृप्ति होत नाहीं, कितीही नद्या मिळाल्या तरी समुद्राची तृप्ति होत नाहीं. सर्व प्राणिमात्रांचा संहार करूनही मृत्यूची तृप्ति होत नाहीं; तसेंच कितीही सुंदर स्त्रिया मिळाल्या तरी पुरुषांची तृप्ति होत नाहीं. आशा धैर्याला मुकविते, मृत्यु समृद्धीला मुकवितो, राग संपत्तीला मुकवितो, दैन्य यशाला मुकवितें, व एकटा ब्राह्मण रागावला असतां सर्व राष्ट्राला मुकवितो, मेंढ्या, कांसें, रुपें, मध, कसोटीचा धोंडा, पक्षी, श्रोत्रिय, कुलवृद्ध, व निकृष्ट दरोला पोंहोचलेला कुलीन यांचें तुझ्या घरीं सदा ठाणें असो. मेंढ्या, बैल, चंदन, वीणा, आरसा, तूप, मध, लोखंड, ताम्रपात्र शंख, स्वर्णनाभ, शाळिग्राम व गोरोचन ह्या मंगलवस्तूंचा, देव, ब्राह्मण व अतिथि यांच्या सन्मानार्थ घरामध्यें संग्रह असावा, कामानें, भयानें, लोभानें किंवा जीविताशेनें धर्म सोडण्याला तयार न होणें हा उत्तम मार्ग पुण्यलोक मिळण्याला साधनीभूत आहे. धर्म हा नित्य आहे व सुखदुःखें अनित्य आहेत. तसेंच जीव नित्य असून त्याचा हेतु जो अज्ञान तो अनित्य आहे. ह्मणून अनित्य टाकून नित्यांत संतोष मानून जें मिळेल त्यांतच सुखी असावें. महाबलशाली व महापराक्रमी राजांना देखील ही धनधान्यसंपूर्ण पृथ्वी, तसेंच अफाट राज्य, व नानाप्रकारचे विषयोपभोग टाकून मृत्यूच्या तावडींत जावें लागलें आहे. अनेक कष्ट सोसून पोसलेल्या पोराला देखील मेल्यावर घरांतून बाहेर काढून चितेवर ठेवावें लागतें व पुढें केस विस्कटून रडत बसण्यापलीकडे कांहीं उरत नाहीं. मेल्याच्या पैशाचा उपभोग तिसराच घेतो व पक्षी व अग्नि त्याच्या शरीरांतील द्रव्यांचे मालक बनतात. पुण्यपापाची जोडीच कायती त्याबरोबर परलोकाला जाते. पुष्पफलहीन वृक्षाला ज्याप्रमाणें पक्षी सोडून जातात त्याप्रमाणें आप्त, मित्र, पुत्र, चटसारे त्याला सोडून परततात. अग्नींत टाकून दिलेल्या मनुष्याबरोबर त्यानें स्वतः केलेलें कर्म जात असतें. ह्मणून हलकें हलकें धर्मसंग्रह करीत असावा. ह्या लोकाच्या वर व खालीं अंधकारमय असे इंद्रियांना मोह पाडणारे लोक आहेत, ते तुला न मिळोत. माझें हें सर्व भाषण नीट ऐकून तसें वागशील तर मोठी कीर्ति मिळवून तुला इहपरलोकीं भीति उरणार नाहीं. पुण्यजलानें भरलेल्या ह्या जीवरूप नदीचा सन्यापासून उगम असून धैर्य हेंच तिला तीर आहे व दया तिच्यांतील लाटा आहेत. पुण्यवान पुरुष हिच्यामध्यें स्नान करून पावन होतो. कारण आत्मा सदैव पवित्र आहे. लोभ सोडून देणें हेंच मोठें पुण्य आहे. पंचेंद्रियजलानें भरलेली, कामक्रोधादि जलचरांनीं व्याप्त अशी संसाररूपी नदी तिच्यांतील अनेक जन्मांच्या भोंवऱ्यांसह धैर्यरूपी नावेनें तूं तरून जा. शहाणपणानें, धैर्यानें, वयानें व विद्येनें थोर अशा आप्ताचा कार्याकार्यविचारांत मान देऊन जो सल्ला घेतो तो कधींही संकटांत सांपडत नाहीं. निश्चयाच्या योगानें कामवासना व भूक आवरून धराव्या. हात व पाय यांचें डोळ्यानें रक्षण करावें. मनानें डोळे, व कान यांना संभाळावें व कृतीनें मन व तोंड यांना दाबांत ठेवावें. नित्य उदकक्रिया करून यज्ञोपवीत धारण करणारा, तसेंच वेदाध्ययन करणारा, पतिताचे हातचें अन्न न खाणारा, सत्य भाषण ठेवणारा, गुरुसाठीं कर्म करणारा, असा ब्राह्मण ब्रह्मलोकांपासून ढळत नाहीं. वेदाध्ययन करून अग्निहोत्र व यज्ञयाग करणारा, तसेंच प्रजापालन करून गोब्राह्मणासाठीं संग्रामांत शस्त्रानें मरण येऊन पवित्र झालेला क्षत्रिय स्वर्गलोकाला जातो. वेदाध्ययन करून ब्राह्मण, क्षत्रिय व आश्रित यांना द्रव्य बांटून देऊन गार्हपत्य, आहवनीय, व दक्षिणाग्नि या तीन अग्नींच्या पवित्र

धुरानें पूत झालेला वैश्य स्वर्गलोकीं दिव्यसुखाचा उपभोग घेतो. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांची क्रमानें यथायोग्य सेवा करून यांना संतुष्ट ठेवल्यानें शूद्र पापमुक्त होऊन स्वर्गसुख घेतो. हे चारी वर्णांचे धर्म मीं तुला सांगितले व ते सांगण्यांत माझा हेतु काय आहे तो ऐक. पांडुपुत्र युधिष्ठिर क्षात्रधर्माला मुकत चालला आहे. त्याला राजधर्माकडे लाव. ' हें ऐकून धृतराष्ट्र ह्मणाला, ' तूं जो हा मला नेहमीं उपदेश करीत आहेस तो अगदीं बरोबर असून माझें मनही मला असेंच सांगतें. परंतु पांडवांसंबंधानें झालेली ही सुबुद्धि दुर्योधनाची गांठ पडली कीं फिरते. दैवाच्या उलट जाणें कोणाला शक्य नाहीं. दैव हेंच खरें असून मनुष्याची खटपट व्यर्थ आहे. तुझें भाषण फार मोहक असल्यामुळें अद्यापि तुला कांहीं सांगावयाचें असल्यास सांग, मी ऐकण्याला तयार आहें. ' विदुर ह्मणाले, ' माझा शूद्रयोनींत जन्म झाला असल्यानें इतउत्तर तुला उपदेश करण्याचा माझा अधिकार नाहीं. म्हणून अमर, पुराण व सनातन जे सनत्कुमार ते तुझ्या हृदयांतील गूढ व उघड प्रश्नाचा उलगडा करतील. ' असें ह्मणून विदुरांनीं त्या मुनींचें चिंतन केलें व ते प्रगट झाल्यावर ज्याच्यायोगानें लाभ, हानि, प्रिय, अप्रिय, जरा, मरण, भय, मत्सर, क्षुधा, तृषा, मद, ऐश्वर्य, खेद, आळस, कामक्रोध, पापपुण्य इत्यादि विकारांची बाधा धृतराष्ट्राला होणार नाहीं असा त्याला उपदेश करण्याविषयीं त्यांनीं त्या मुनींची प्रार्थना केली.

---

१३१ सनत्कुमारांचा आत्मानात्मोपदेश. (५. ४२–४५)

धृतराष्ट्र राजानें एकांतांत ' मृत्यु नाहीं असें आपलें मत असल्याचें ऐकतों पण देवासुरांनीं मृत्यु टाळण्यासाठीं ब्रह्मचर्य आचरण केल्याबद्दलही माझ्या ऐकण्यांत आहे. तेव्हां यांतलें खरें मत कोणतें हें मला सांगा,' म्हणून सनत्सुजातांना ब्रह्मज्ञानपर प्रश्न केला असतां मुनि ह्मणाले; ' विवक्षित कर्मांनीं मृत्यु टाळतां येतो असें कांहींचें मत आहे व जगांत मृत्युच नाहीं असें कांहींचें मत आहे. अतां त्यासंबंधानें माझें मत ऐक.या विरोधासंबंधानें मनांत कांक्षा धरूं नकोस.हीं दोन्ही मतें खरीं आहेत.विद्वानांच्या मतानें मृत्यूचा उद्भव अज्ञानापासून आहे.मोहालाच मी मृत्यु ह्मणतों व मोहातीत होणें हेंच मी अमुतत्व (अमरत्व) समजतों. मोहामुळें असुर मृत्युवश झाले. मोह दूर झाल्यामुळें देव मृत्यूच्या तावडींत सांपडले नाहींत. मृत्यु प्राण्यांना व्याघ्रापमाणें कधीं प्रत्यक्ष गिळून टाकीत नसतो. कारण त्याचें स्वरूपच कळून येत नाहीं. कोणी बुद्धीमध्यें लीन झालेला यम ह्मणून दुसराच कोणी मृत्यु असून तो पितृलोकांवर अधिकार चालवितो व पुण्यवानांना सुख देऊन पाप्यांना दुःख देतो व ब्रह्मज्ञानाच्यामार्गे लागणें हेंच खरें अमृतत्व आहे, असें ह्मणतात. ह्या यमाच्या आज्ञेनेंच क्रोधमोहलोभरूपी त्याचे कायमचे दास मनुष्यांपासून उद्भवतात. अहंकारयुक्त होऊन भलत्या मार्गाला लागल्यामुळें कोणीही आत्मस्वरूपाला पावत नाहीं. ते मूढ बनून यांच्या आधीन होतात व येथून वर गेले तरी फिरून खालीं येतात. कर्में त्यांच्यामागून नेहमीं असतात. व ह्याच अज्ञानाला मरण ही संज्ञा मिळते. कर्मफलावर आसक्ति ठेवून असणारे प्राणी कर्मफलाचा उपभोग घेण्याची वेळ आली असतां त्यांमागून स्वर्गास जातात. यामुळें ते मृत्यूच्या फेऱ्यांतून सुटत नाहींत. ब्रह्मज्ञानाच्या अभावामुळें व भोगांशीं स्वतःला याप्रमाणें जखडून घेतल्यानें देहाला त्यांमागून चोहोंकडे भटकावें लागतें. मिथ्या विषयांकडे मन लावून सदा त्याच्या मागें लागणें हीच इंद्रियांना मोह पाडणारी गोष्ट आहे. मिथ्या विषयांकडे लागलेलें मन नेहमीं त्यांमध्येंच तल्लीन होऊन आपल्याभोंवतीं असणाऱ्या विषयांवरच त्याची आसक्ति जडते. याप्रमाणें मनुष्याचें मन विषयांकडे लागलें असतां हेंच त्याच्या नाशाला मुख्य कारण होतें. व कामक्रोध मागून याला पकडून आपली कामगिरी बजावतात, व या अज्ञान्याला मृत्यूकडे नेऊन पोहोंचवितात. मात्र धैर्यवान लोक मृत्यूला टाळून भवसमुद्रांतून पार पडतात. जो यांच्या संबंधाचा विचार मनांत न आणतां ब्रह्मचिंतन करीत राहून उड्डाणशील कामांना तुच्छ मानून त्यांचाच नाश करतो तो विद्वानच मृत्यूचा

मृत्यू बनतो. विषयांच्यामागें लागलेला पुरुष त्या विषयांबरोबरच नाश पावतो. वासनेला झुगारणारा सर्व दुःखांनाही त्याबरोबर झुगारून देतो. मायेनें ज्ञात हा भूतमात्रांचा देह केवळ नरक आहे. व मोठ्या लोभानें त्याच्याकडे धांवणारे, वर पाहून चालणारे, ज्याप्रमाणें खड्ड्यांत पडतात त्याप्रमाणें या नरकांत पडतात. यांव्यतिरिक्त इतर कांहीं न जुमानतां जे आत्मज्ञान करून घेण्याच्या भानगडींत पडत नाहींत त्यांचा देह पेंढ्यानें बनलेल्या वाघाप्रमाणें व्यर्थ होय. राग, लोभ, मोह, व भय यांनीं पूर्ण असा जो कोण देहामध्यें दृश्यमान असतो तोच वास्तविक मृत्यु आहे. याप्रमाणें उद्भवणाऱ्या अज्ञानरूपी मृत्यूला ओळखून ज्ञानमार्गाकडे लागलेला पुरुष मृत्यूला भीत नाहीं. मृत्यूच्या तावडींत आलेला मर्त्य ज्याप्रमाणें नाश पावतो त्याप्रमाणें त्याच्या तावडींत गेलेला मृत्यूच नामशेष होतो.' यावर 'जे पुण्यवान व सनातन लोक यागादि कर्मांनीं मिळतात म्हणून सांगितलें आहे त्याचा शेवट तरी ब्रह्मप्राप्तींतच वेदांत सांगितला आहे, हें लक्षात आणतां कर्मसाधनांकडे कां धांव घेऊं नये,' म्हणून धृतराष्ट्रानें प्रश्न केल्यावरून सनत्सुजातांनीं उत्तर दिलें, 'अज्ञानी लोक तूं म्हणतोस त्या मार्गानें जातात; व वेदही श्रेष्ठ सुख व मोक्ष कर्मामध्यें आहे म्हणून सांगतात हें खरें आहे. पण ज्ञानी या वाटेनें जात नाहीं. तो ब्रह्माला आपले ठिकाणींच ओळखून ज्ञानमार्गानें इतर कर्मादि आड मार्ग सोडून देतो.' धृतराष्ट्र म्हणाला, 'ही सृष्टि उत्पन्न करून त्यांत संचार करीत राहणारा जर दुसरा कोणी नसून तो अज व पुराणपुरुष परमात्माच आहे, तर त्याला हें करण्याला लावणारा कोण? यांत त्याचा हेतु तरी काय व त्याला यांत सुख तरी काय? सनत्सुजातांनीं उत्तर केलें, 'ब्रह्माच्या ठिकाणीं भिन्नत्व मानण्यांत मोठा दोष आहे. मायेच्या योगानें जीव' ईश्वर इत्यादि नित्य आहे व मायेनें याप्रमाणें परमात्म्याचें भिन्नत्व कल्पण्यांत त्याला कांहीं कमीपणा येत नाहीं. मायेच्या योगानें अनेक जीव होतात. तेव्हां नित्य जो परमात्मा तो मायेच्या योगानें विश्व निर्माण करीत असून त्याच्या त्या शक्तीला मायाशक्ति ही संज्ञा येते. त्याची ही शक्ति असून तो जगाच्या उत्पत्तीला कारणीभूत असल्याबद्दल वेद प्रमाण आहेत.' धृतराष्ट्र म्हणाला, 'कोणी त्या मोक्षप्राप्तीसाठीं सर्वसंन्यास करतात, कोणी अग्निष्टोमादि पुण्यकर्मे करतात; तेव्हां रागादि दोषांनीं धर्महानि होते किंवा धर्मानें ते नाहींसे होतात?' सनत्सुजातांनीं उत्तर केलें, 'पापपुण्यात्मक कर्म करीत असला तरी ज्ञानी त्या दोहोंचा ज्ञानानें नाश करतो हें ठरलेलेंच आहे. तसेंच जो अज्ञानी आहे त्या देह्याला दोन्हींचें फल मिळतें. परलोकीं गेल्यावर अज्ञानी पुरुषाला कर्माच्यायोगानें त्याच्या शुभ किंवा अशुभ कर्माचें फल भोगावें लागतें. परंतु ज्ञानी मात्र पुण्यकर्मानें रागादि दोषांचा नाश करूं शकतो. म्हणून धर्म श्रेष्ठ आहे. बलासंबंधानें ज्याप्रमाणें बलवानाची नेहमीं झटापट असते त्याप्रमाणें केवळ धर्माविषयींच निःस्पृह बुद्धीनें ज्यांची खटपट असते ते ब्राह्मण येथून स्वर्गीं गेल्यावर प्रकाशमान होतात. तसेंच ज्यांची धर्मामध्यें स्पर्धा दिसून येत नाहीं त्यांचें तें कर्म चित्तशुद्धीच्या द्वारानें ज्ञानाला साधनीभूत होतें. व ते ब्रह्मवेत्ते येथून गेल्यावर त्रयीपासून मुक्त अशा ब्रह्मपदाला पावतात. पुत्रकलत्रादि कुटुंबांतील व मित्रप्रभृति बाहेरील माणसांच्या दृष्टीपुढें न राहणें हेंच ज्ञान्याचें यथोचित आचरण असें वेदवेत्त्यांचें मत आहे. शरत्कालीं तृणोदकाप्रमाणें ज्या ठिकाणीं अन्नपानाची समृद्धि असेल तेथें त्या विप्रश्रेष्ठानें त्यावर उपजीविका करून रहावें म्हणजे संतापाला कारण उरणार नाहीं. तसेंच आपण कोण वगैरे न सांगितल्यामुळें ज्या ठिकाणीं अपमान व भीति असते तेंच स्थळ त्यानें राहण्याला पसंत करावें. कारण अवमानपूर्वक तुच्छ करणारे लोक त्याला जसे हितकारक होतात तसे दुसरे होत नाहींत. तसेंच ह्या स्वतःसंबंधानें मौन धरणाराला जो ताप देत नाहीं आणि जो ब्रह्मवेत्त्याचीं वल्कलादि हरण करीत नाहीं अशा पुरुषानें दिलेलें अन्नच साधूंना संमत समजलें आहे. नेहमीं आपण अज्ञातचर्येत राहिलें पाहिजे हें तत्त्व ब्रह्मवेत्त्यानें ध्यानांत ठेवलें पाहिजे. ज्ञातीमध्यें राहणाराचें कांहीं कल्याण होणें शक्य नाहीं. कोण ब्रह्मवेत्ता ज्ञातीमध्यें राहून ह्या सूक्ष्म, अचल, शुद्ध व निर्द्वंद्व अशा अंतरात्म्याला ओळखण्याला समर्थ

झाला आहे ? आत्मा एका प्रकारचा असून तो निराळ्या प्रकारचा आहे असें प्रतिपादन करणाऱ्या आत्मचोरानें आणखी तें काय पाप करावयाचें उरलें ? देह व इंद्रियें यांच्या ठिकाणीं आत्मबुद्धि न ठेवणाऱ्या विद्वान ब्रह्मवेत्त्यानें संसाराच्या खटपटींत पडूं नये. प्रतिग्रह घेऊं नये. निरुपद्रवी असून शिष्टांना संमत असा शिष्टाचार ठेवावा. मात्र त्याची लोकांत टिमकी वाजवीत सुटूं नये. ज्याप्रमाणें कुत्रे स्वतः ओकून टाकलेला ओक खात असतात त्याप्रमाणें स्वसामर्थ्याचें प्रदर्शन करून त्यावर उपजीविका करणारे ब्रह्मवेत्ते परिणामीं हानिकारक असा स्वतःचा ओक खातात. लौकिक द्रव्यावर थोरपणा न मिरवितां वेदज्ञानानेंच जे स्वतःला श्रीमान समजतात अशा द्विजांपुढें कोणाचें कांहीं चालत नसून त्यांच्या स्थितीबद्दल कींव करण्याला कारण उरत नाहीं. त्यांना ब्रह्मस्वरूपच समजावें. एखाद्याला उत्तम प्रकारें यज्ञयागादि करून त्या त्या देवांची प्राप्ति झाली तरी त्यांत त्याला आयास करावे लागत असल्यामुळें ब्रह्मवेत्त्याची सर त्याला कधीं येणार नाहीं. कांहीं खटपट न करतां स्वस्थ असणाऱ्या ब्रह्मवेत्त्याला दुसरे मान देऊं लागलें असतां त्याबद्दल त्यानें अभिमान वाटून घेऊं नये व अवमान झाला असतां त्याबद्दल वाईटही वाटून घेऊं नये. मान मिळाला असतां विद्वान मान देतात हा **निमेषोन्मेषाप्रमाणें** त्यांचा स्वभावच आहे असें त्यानें समजावें व मान न मिळेल तर धर्म न कळणारे शास्त्रहीन मूर्ख मान्याला देखील मान देत नाहींत हा गोष्ट लक्षांत घेऊन त्यानें स्वस्थ रहावें. मान व मौन यांचें एकत्र वास्तव्य कधीं असत नाहीं. हा लोक मानाचा असून परलोक मौनाचा आहे. **लक्ष्मी मानाला चिकटून असते परंतु ती मोक्षाच्या आड येणारी आहे.** ब्रह्मज्ञानाला अनुरूप अशी लक्ष्मी बुद्धिहीनाला प्राप्त होणें शक्य नाहीं. सत्य, सरळपणा, ह्री, दम, शौच आणि विद्या हीं निरनिराळीं उत्तम, पण गांठण्याला कठीण अशीं ब्रह्मलक्ष्मीचीं द्वारें आहेत.' हें ऐकून धृतराष्ट्रानें विचारलें, 'तुम्ही सांगतां ह्या मौनाचा उद्देश काय, वाङ्नियमाला मौन म्हणतात किंवा आत्मस्वरूपाला. मौनाचें लक्षण काय, विद्वानाला निर्विकल्पपद मौनानें मिळतें किंवा दुसऱ्या कशानें, व जगांत मौन कसें पाळतात ?' हे धृतराष्ट्राचे पांच प्रश्न ऐकून सनत्सुजात म्हणाले, 'मान व वेद यांचा ज्या ठिकाणीं प्रवेश होत नाहीं अशा परमात्म्याचें प्रत्यक्ष स्वरूपच मौन होय. त्यापासूनच वेद शब्दाची व्युत्पत्ति असून हा प्रकाश आत्मस्वरूपानेंच भासमान आहे.' धृतराष्ट्रानें विचारलें, 'ऋक्, यजु व साम हे वेद पढणारा द्विज पापाचरण करीत असेल तर त्याला तें पाप लागतें किंवा नाहीं ?' सनत्सुजातांनीं उत्तर केलें, 'ह्या कपटाचारी अविचारी पुरुषाला सामादि वेद यापासून मुक्त करूं शकत नाहींत. परंतु पक्षी ज्याप्रमाणें पंख फुटल्यावर आपलीं घरटीं सोडून जातात त्याप्रमाणें अंतकाळीं ते ह्याला सोडून जातात.' धृतराष्ट्रानें विचारलें, 'वेदज्ञाला तारण्याला जर वेद समर्थ नाहींत तर मग ब्रह्मवेत्त्यांचा हा वृथा प्रलाप कशासाठीं ?' सनत्सुजातांनीं उत्तर केलें, 'परमात्म्याच्याच मायेनें निरनिराळ्या नांवानें कल्पिलेल्या रूपांनीं हें जग भासमान आहे व वेद जे त्याचे निरनिराळ्या रूपांनीं वर्णन करतात ते त्याचेंच स्वरूप नीट स्पष्ट करीत असतात म्हणण्याला हरकत नाहीं. तप व यज्ञ त्यासाठींच सांगितले असून त्यामुळेंच विद्वानाला पुण्यप्राप्ति होते व त्या योगानें पापाचा नाश करून ज्ञानानें प्रकाशमान असा तो आत्मा बनतो. ज्ञानानें पुरुष आत्म्याशीं सारूप्यतेला पावतो. पण तसें न होतां इंद्रियभोगफलांची आशा तो धरील तर इहलोकीं केलेल्या कर्माचें सर्व गांठोडें तो आपल्याबरोबर परलोकाला घेऊन जातो व तेथें त्याच्या फलांचा उपभोग घेऊन परत संसारमार्गाला लागतो. ह्या लोकीं केलेल्या तपाचें फल परलोकीं भोगण्यास मिळतें. परंतु सामान्य जनांना त्याचें जेवढें सांगितलें असेल तेवढेंच फल मिळत असून ब्रह्मवेत्याला मात्र त्याचें विशेष फल मिळतें.' धृतराष्ट्र म्हणाला, 'एकच तप कमी अधिक फल देणारें कसें होतें ?' सनत्सुजातांनीं उत्तर केलें, 'जें तप दोषरहित असतें तेंच कैवल्याला साधनीभूत असल्यानें त्याला केवल ही संज्ञा आहे. परंतु तेंच ज्यावेळीं सदोष असतें तेव्हां तें उत्तम असूनही त्याला कमीपणा येतो. तूं जें मला विचारीत आहे-

स तें सर्व तपोमूल असून तपानेंच वेदवेत्त्यांनीं परलोक साधून मोक्षप्राप्ति करून घेतली आहे. आतां संतोष कशाला ह्मणावें हें सांगतों ऐक. ब्रह्मज्ञानात्मक वेद एकच असून त्याच्या आज्ञानामुळें ऋगादि त्याला साधनीभूत असणाऱ्या अनेकांना वेद संज्ञा आली आहे. सत्य ह्या पायरीला पोहोंचलेला मनुष्य क्वचित् ढळतो. सत्यापासून ढळलेल्या पुरुषांचे सर्व प व्यर्थ होतात. त्यांच्या ह्या सत्यासंबंधी क्षामुळें कर्में वाढतात. पुष्कळ पढणारा केवळ वाचाळ समजावा. जो सत्यापासून भटकत नाहीं तोच ब्राह्मण. सत्यस्वरूप ब्रह्मसंबंधानें वेदच स्वतंत्र रीतीनें प्रमाण आहेत आणि ह्मणूनच वेदज्ञ थोर पुरुषांना ब्रह्मप्राप्ति झाली असून ते प्रपंचमार्गांत कधीं पडले नाहींत. वेदांना पूर्ण कोणी ओळखत नाहीं. जड स्वरूपानें ब्रह्माचें किंवा प्रपंचाचें कशाचेंच ज्ञान होत नाहीं. व ज्यानें ब्रह्म ओळखलें तो प्रपंचालाही ओळखतो. परंतु प्रपंचाला ओळखणारा मात्र सत्यस्वरूपाला ओळखीत नाहीं. ज्याला वेदांचें ज्ञान होतें त्याला प्रपंचाचें ज्ञान होतें. परंतु ते वेदांना ओळखणारे किंवा प्रत्यक्ष वेद यांना त्या सत्यस्वरूप परमात्म्याचें ज्ञान होत नाहीं. ह्मणून वेदाच्या साहाय्यानें जे ब्रह्मवेत्ते ब्रह्माला ओळखतात तेच देवाला ओळखतात. प्रतिपदेच्या चंद्राची कोर पहाण्याला ज्याप्रमाणें वृक्षाची खांदी मदत होते, त्याप्रमाणें त्या नित्य परमात्म्याला पहाण्याला वेद साधनीभूत होतात. वेदाच्या साहाय्यानें ब्रह्मप्रतिपादन करणाऱ्या हुशार पुरुषाला मी ब्रह्मवेत्ता समजतों. कारण याप्रमाणें वेदप्रतिपादन करणारा त्या सर्वातीत परब्रह्माला ओळखत असतो. आत्म्याहून अगदीं भिन्न असलेल्या ह्या देहेंद्रियादिक विषयांच्या ठिकाणीं त्याला हुडकीत न बसणाराला वेदांतील तत्त्वमसि इत्यादि वाक्यांनीं या परमात्म्याची ओळख पटते. मनानें देखील विषयादिकांकडे लक्ष न पुरवितां स्वस्थ राहून जो उपासना करतो त्याला ब्रह्माचा साक्षात्कार होऊन त्या श्रेष्ठतम परमात्म्याचा लाभ होतो. मौनानें किंवा अरण्यवासानें मनुष्य मुनी होत नाहीं. अविनाशी परमात्म्याचें ज्याला ज्ञान झालें आहे तोच श्रेष्ठ मुनी समजावा. सर्व शब्दांचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या पुरुषाला वैयाकरणी ह्मणतात, अशी वैयाकरण्याची व्युत्पत्ती असल्यामुळें ब्रह्मस्वरूप प्रगट करणारा विद्वानही वैयाकरणीच समजावा. भूरादि सर्व लोक प्रत्यक्ष पहाणारा पुरुष सर्वदर्शी असतो तसेंच सत्याच्या ठिकाणीं तल्लीन होऊन ब्रह्म ओळखणाराही सर्वदर्शी समजावा. ज्ञानादिकांचें अवलंबन करून वेदांतश्रवणानें ब्रह्मज्ञान होतें. आतां हें ब्रह्म उतावीळपणानें कधीं प्राप्त व्हावयाचें नाहीं. बुद्धीच्या ठिकाणीं मनाचा लय लावून ब्रह्मचर्य आचरल्यानें तें चिंत्य ब्रह्म प्राप्त होतें. ही आद्यविद्या ब्रह्मचर्यानें प्राप्त झाल्यावर पुरुष ह्या मृत्युलोकाला सोडतो. ही विद्या गुरूनीं योग्यतेला चढविलेल्या शिष्यांनाच प्राप्त होते. आतां हें ब्रह्मचर्य कसें असतें ह्मणशील तर ऐक. आचार्याकडे जाऊन निष्कपट सेवेनें त्याच्या विश्वासाला पात्र होऊन जे ब्रह्मचर्यानें रहातात, ते इहलोकीं शास्त्रकार होऊन देह ठेवल्यानंतर सत्यस्वरूपी परमात्म्याच्या सारूप्यतेला पावतात. ब्रह्माचे ठिकाणीं मन निश्चल राहण्यासाठीं जे इहलोकीं प्रत्यहीं सर्व कांहीं सहन करून वासनांना जिंकतात ते मोळापासून काडीप्रमाणें विवेकानें देहापासून आत्म्याला वेगळा करतात. मातापिता केवळ हें शरीर निर्माण करतात. गुरूपासून जो जन्म मिळतो तोच खरा व अविनाशी आहे. तो आत्मत्वानें ब्रह्मप्राप्ति करून शिष्याला पूर्णत्वाला पोहोंचवितो. ह्मणून गुरूंशीं द्रोह कधीं करूं नये. त्यांना नेहमीं अभिवादन करून दक्षतेनें त्यांपासून वेद शिकण्याची इच्छा धरावी. **शुचिर्भूत राहून शिष्यत्वानें विद्या प्राप्त करून घेणें ही ब्रह्मचर्यव्रताची पहिली पायरी होय.** गुरूप्रमाणेंच गुरुपत्नी व गुरुपुत्र यांच्याशीं वर्तन ठेवणें ही दुसरी पायरी होय. वेदार्थज्ञान देऊन ब्रह्मस्वरूपानें त्यानें आपल्याला जन्म दिला हा उपकार जाणून त्याविषयीं प्रसन्नबुद्धि ठेवण्यांतच आपल्याला कृतार्थ मानून घेणें ही तिसरी पायरी होय. प्राण किंवा द्रव्य देखील खर्ची घालून कृतीनें, मनानें व शब्दानें गुरूचें प्रिय करणें ही चवथी पायरी होय. एकचतुर्थांश विद्या गुरुसमागमापासून प्राप्त होत असून चतुर्थांश स्वतःच्या बुद्धीनें प्राप्त होते. त्याचप्रमाणें कालानें एकचतुर्थांश व

शाखाच्या व्यासंगानें एकचतुर्थांश प्राप्त होते. ज्ञानादिक ज्याचें रूप, इतर अंगें व बल आहेत तें ब्रह्मचर्य आचार्याच्या सहवासांत ब्रह्मार्थाकडे लक्ष लावल्यानें प्राप्त होतें. ह्याच ब्रह्मचर्याच्या योगानें देवांना देवत्व प्राप्त झालें आहे व ऋषींना थोरपणा आला आहे. व ह्याच्याच योगानें गंधर्व व अप्सरा यांना रूप प्राप्त झालें आहे. ह्याच ब्रह्मचर्याच्या योगानें सूर्य लोक प्रकाशित करण्याकरितां उदय पावतो. भिन्नभिन्न रुचींच्या याचकांची ती ती इच्छा परिपूर्ण करण्याचें ह्याच्या अंगीं सामर्थ्य असल्यामुळें निरनिराळ्या फलाची इच्छा धरून ह्यांनीं ब्रह्मचर्य आचरल्यामुळें त्यांना तें तें फल मिळालें आहे. परंतु सहेतुक कर्म आचरणाऱ्या अशा प्रकारच्या लोकांनां विनाशी लोक प्राप्त होतात. आत्मभूत अनंत लोक त्यांना कधीं मिळत नाहीं. तो विद्वानालाच ज्ञानानें मिळतो. त्याला मात्र दुसऱ्या लोकांच्या वाटेकडे जावें लागत नाहीं.' नंतर ज्या अविनाशी श्रेष्ठ ब्रह्माला विद्वान ओळखतो तें कोठें व कसें आहे, त्याचा वर्ण शुक्ल, रक्त, कृष्ण, नील किंवा धूम्र आहे,' ह्याणून धृतराष्ट्रानें प्रश्न केला. त्यावर सनत्सुजातांनीं उत्तर दिलें, 'याचा शुक्ल, रक्त, कृष्ण, नील किंवा धूम्र वर्ण नसून पृथ्वी किंवा अंतरिक्ष यांचा आश्रय करूनही हें नाहीं. तें ह्या संसारामध्यें पंचभूतात्मक देह धारण करीत नाहीं. ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद किंवा निर्मल सामवेद यांमध्यें तें नसून रथंतर व बृहद्रथ या सामांमध्येंही तें नाहीं. महायज्ञामध्येंही तें दिसावयाचें नाहीं. अगोचर व अज्ञानाच्या पलीकडे असणाऱ्या ह्या ब्रह्माच्या ठिकाणीं प्रलयकालीं विश्व लीन होतें. हें सूक्ष्माहून सूक्ष्म असून पर्वतापेक्षां मोठें आहे. हें सर्व जग प्रकाशरूपानें ब्रह्माचे ठिकाणीं संस्थित असून तद्रूपानेंच भासतें. त्याच्या ठिकाणीं हें सर्व जग लीन आहे हें जो विद्वान जाणतो तो ब्रह्मरूप होतो. शोककोधादि बारा मनुष्यांचे प्राणनाशक दोष असून त्यांपैकीं प्रत्येक मनुष्यावर हल्ला करण्याला संधीची वाट पहात असतो; व त्यांनीं घेरला गेल्यामुळें मनुष्य मूर्ख बनून पापाचरण करूं लागतो. आशाळू, उग्र, निष्ठुर भाषण करणारा, मनांत राग धरणारा, बडबड्या, व दुष्ट कृत्य करणारा, हे सहा संपत्तिवान झाले असतां दुसऱ्याला मान देत नाहींत. संभोगाकडेस नेहमीं लक्ष देणारा, अभिमानी, दान करून त्याची थोरवी गात बसणारा, कृपण, दुर्बल, फार आत्मप्रशंसा तसाच स्त्रीचा द्वेष करणारा हे सात सदा पापशील समजले गेले आहेत. धर्मादि बारा ब्राह्मणांचे ठिकाणीं महाव्रत समजले आहेत. जो यांपासून ढळत नाहीं तो ह्या सर्व पृथ्वीचें शासन करण्याला पात्र ठरतो. यांपैकीं तीन, दोन किंवा एकही गुण ज्याच्या ठिकाणीं वसत आहे त्याला कोणत्याही वस्तूवर आपलाच तेवढा हक्क आहे असें वाटत नाहीं. दम, त्याग आणि प्रमादराहित्य यांमध्यें मोक्ष आहे. आणि ब्रह्मनिष्ठ ब्राह्मणामध्यें हे असतात. दुसऱ्याची निंदा, मग ती खरी असो वा खोटी असो, करणें ब्राह्मणाला चांगलें नाहीं. आणि जे ती करतात ते नरकाची शिदोरी बांधून घेतात. लोकांच्या द्वेषाला पात्र होणें, प्रतिकूलाचरण, असूया, असत्य भाषण, काम, क्रोध, पारतंत्र्य, निंदा, चहाडी, अर्थहानि, कलह, मत्सर, प्राण्यांना पीडा देणें, ईर्ष्या, अत्यानंद, व मान्यांसंबंधानें अनादर हे अठरा आतांपर्यंत न सांगितलेले नित्य निंद्य दोष मद्यामध्यें दिसून येतात. ह्याणून शहाण्यानें कधीं माजूं नये. मित्राच्या ठिकाणीं पुढील सहा गुण दिसून येतात. मित्राचें बरें झालें असतां त्याला आनंद होऊन त्याचें वाईट झालें तर त्याला वाईट वाटतें. मित्रानें कांहीं मागितलें असतां तें त्याला प्रिय असून देण्यासारखें नमलें तरी तें देण्याला तो मागेंपुढें पहात नाहीं. आवडते मुलगे, वैभव व आपली बायकोसुद्धां प्रसंगीं तो देण्याला तयार होतो. आपली संपत्ति त्याला देऊन टाकल्यावर तो आपल्या मित्राच्या घरीं कधीं रहात नाहीं. स्वतःला जें कांहीं मिळेल तेवढ्यावरच तो उदरनिर्वाह करतो. मित्रासाठीं आपली नुकसानी करून घेण्याला सुद्धां मागेंपुढें पहात नाहीं. जो धनवान पुरुष हे गुण अंगांत आणून दानशील व सात्विक बनतो तो आपल्या पंचेंद्रियांना आपापल्या विषयांपासून परावृत्त करण्याला समर्थ होतो. परंतु हें उत्तम असलें तरी याला स्वर्गप्रदच तप समजावें. ज्ञानाप्रमाणें येथेंच मोक्ष देणारे हे नव्हत. व सत्यापासून भ्रष्ट झालेल्यांची

त्यांच्या संकल्पामुळें अशा प्रकारच्या तपाकडे प्रवृत्ति होते. ज्यापासून यज्ञ प्रवृत्त होतात अशा ब्रह्मरूपी सत्याचें आकलन करण्याचें सामर्थ्य अंगीं असल्यानें योगी कोणी मनानें तर कोणी वाणीनें व कोणी कर्मानें यज्ञ करण्यास समर्थ होतात. ब्रह्माला सगुण समजणारेही सत्य ओळखतात, पण त्याला निर्गुण समजणारांच्या ठिकाणीं तें विशेष बिंबलें आहे असें समजावें. हें सर्व योगसिद्धांतांत सिद्ध केलें आहे. व जे तें जाणतात त्यांना मृत्युची बाधा होत नाहीं. केवळ कर्मानेंच ब्रह्मसाधन व्हावयाचें नाहीं. ज्ञानहीन पुरुष वाटेल तितक्या आहुति देवो अगर यज्ञ करो केवळ कर्मानें त्याला मोक्ष कधीं मिळावयाचा नाहीं किंवा अंतीं श्रेष्ठ सुखही मिळावयाचें नाहीं. इंद्रियनिग्रह करून संन्यासानें ब्रह्मशोधन करावें. स्तुतिनिंदेसंबंधानें सुखदुःख वाटून घेऊं नये. जें शुक्लवर्ण, फार प्रकाशमान, दैदीप्यमान **महद्यशा** नांव धारण करणारें आहे व ज्याची देव उपासना करतात, सूर्यही ज्याच्या योगानें प्रकाशमान होतो, ज्याची उत्पत्ति व वाढ शुक्लापासून आहे, ज्योतींमध्यें कोणी त्याला प्रकाशमान करीत नसून दुसऱ्यांना प्रकाश देणारें तें शुक्ल ब्रह्म स्वयंप्रकाशमान आहे. पूर्णस्वरूपी परमात्म्यापासून निराळा काढलेल्या जीवात्म्यालाही पूर्णत्वच आहे. याप्रमाणें पूर्णापासून पूर्ण काढून घेतल्यावरही बाकी सच्चिदानंदस्वरूप ब्रह्म पूर्णच राहतें. आकाशामध्यें ज्याप्रमाणें पोकळी, गंगेमध्यें ज्याप्रमाणें लाटा त्याप्रमाणें सर्व चराचर ब्रह्मापासून उत्पन्न होऊन ब्रह्मामध्येंच लय पावतें. प्रथम सूक्ष्म पंचमहाभूतें उत्पन्न होऊन त्यांपासून स्थूलभूतपंचक उत्पन्न झालें. परमात्मा व जीवात्मा हे उभयतां त्यांपासून बिलग राहून ह्या देहरूपी उदकामध्यें हृदयाकाशांत दिशा व उपदिशा व्यापून रहात असतात. जीवात्मा आपण स्वतः सच्चिदानंदस्वरूप अद्वितीय ब्रह्म आहों हें न ओळखतां देहादिकांचे ठिकाणीं आत्मभावना करून रहात असल्यानें भूतभौतिकस्वरूप कर्मफलानुरूप सुखदुःखात्मक देह धारण करीत असतो व परमात्मा यांपासून अलग असतो. अक्षय कर्मानें युक्त परमात्म्याचें त्रैलोक्यरूपी शरीर हाच कोणी एक रथ आहे. त्याच्या चलनात्मक देहरूपी चक्राच्या ठिकाणीं रहात असणाऱ्या प्रज्ञावान, दिव्य व जरामरणादि धर्मशून्य जीवाला इंद्रियरूप घोडे प्रकाशमय ब्रह्माकडे नेत असतात. या परमात्म्यासारखें दुसरें कांहीं नसून डोळ्यानें हा कोणाला दिसत नाहीं. बुद्धि, मन व अंतःकरण यांच्या योगानें मुमुक्षू याला ओळखून अमर होतात. परमात्म्याचीं नजर असलेलीं प्रसरणशील बारा इंद्रियें आपापल्या विषयांवर पगडा ठेवून असतात व डोळे मिटून त्यामार्गे लागणारे पुरुष ह्या घोर संसारामध्यें भटकत राहतात. अर्धमासपर्यंत सांठविलेला मध ज्याप्रमाणें भ्रमर पुढें अर्धमास खात रहातो त्याप्रमाणें पूर्वसंचित कर्माचें फल प्राणी पुढच्या जन्मीं उपभोगीत रहातो. कारण परमेश्वरानें प्रत्येक प्राण्याला आपल्या कर्मानुरूप अन्नादिकांची योजना करून ठेविली आहे. हिरण्य (हितावह व रमणीय अशा वेदरूपी) पर्णांनीं युक्त अशा देहरूपी अश्वत्थाकडे आलेले ज्ञानरूप पंखहीन प्राणी त्या ठिकाणींच घिरट्या घालीत रहातात व (ज्ञानरूप) पंख फुटल्यावर मुक्त होतात. (समाधीचे वेळीं अपानाचा प्राणाचे ठिकाणीं, प्राणाचा मनाचे (चंद्राचे) ठिकाणीं, मनाचा बुद्धीचे (आदित्याचे) ठिकाणीं उपसंहार होतो. अविद्या व तिचें कार्य यांचा नाश करणारा परमात्मा (हंस) स्वतः या संसाररूपी उदकाच्या बाहेर संचार करीत आपला एक (जीवात्मरूपी) पाद यांतून कधीं काढून घेत नाहीं. सतत यज्ञ चालविलेल्या त्या पादाला जर तो काढून घेईल तर मग मरण किंवा अमृतत्व कशाचाच संभव नाहीं. अंगुष्ठमात्र हा परमात्मा लिंगदेहाच्या संयोगानें आंत संचार करीत असतो. अशा ह्या आद्य, सर्वांच्या ठिकाणीं शिरून आत्मत्वानें भासविणाऱ्या स्तुत्य शास्त्याला मूर्ख ओळखत नाहींत. आपल्या वर्तनानें सर्पाप्रमाणें मर्त्यांचा नाश करून इंद्रियरूपी सर्प (श्रवणादि) बिलांत दडतात. नंतर विषयरूपी विषानें लोक मोहून जातात. व त्यांनीं अर्पण केलेले ते भोग संसाराच्या फेऱ्यांत पाडण्याला कारणीभूत होतात. आपल्या ठिकाणीं असणाऱ्या परमात्म्याला न ओळखतां ह्या संसारकूपांत भटकणारा विवेकशून्य मनुष्य प्रत्यक्ष गाईचा समजला पाहिजे. मनुष्य शमदमादि साध-

नांनीं युक्त किंवा त्यांनीं हीन असो, मुक्त असो वा संसारी असो, हें आत्मस्वरूप ब्रह्म त्यांच्या ठिकाणीं सारखेंच असतें. परंतु त्यांपैकीं मुक्त असतात त्यांनाच पूर्णानंदस्वरूप ब्रह्माची प्राप्ति होते. अशा प्रकारचा हा महात्मा ब्रह्मस्वरूप पुरुष अग्नीचा आपल्या ठिकाणीं उपसंहार करून आहे. व जो ह्या पुरुषाला जाणतो त्याचा ह्या देहांतील आत्मा कधीं नाश पावत नसतो. अशाचा सदासर्वदा सत्कार होत असतो व त्याजवळ मृत्यूचीच वार्ता नसल्यानें अमृतत्वाची तरी कोठून येणार ? सत्यासत्य हीं दोन्ही सत्यावरच अवलंबून आहेत. कारण लौकिक व अलौकिक ह्या दोहोंचेंही कारण एक सत्यस्वरूप ब्रह्मच आहे. हा हृदयांमध्यें असलेला अंगुष्ठमात्र पुरुष दिसत नाहीं. हा जन्मरहित व चराचरांचा आत्मभूत आहे हें जो विद्वान रात्रंदिवस हुशारीनें राहून जाणतो त्याच्या मनावर उजेड पडतो. वायूची उत्पत्ति त्यापासून असून त्याचा लयही त्याच्या ठिकाणींच होतो. त्याचप्रमाणें अग्नि, सोम व प्राण त्यापासूनच उत्पन्न झाले आहेत. सर्व विश्वाचीच उत्पत्ति त्यापासून आहे. तें सर्व सांगत बसण्याला कोणी समर्थ नाहीं. ह्या सनातन परमात्म्याचें स्वरूप योगीच ओळखतात. सर्वांचा आधार, अमृतत्व, त्रैलोक्याला व यशाला कारणीभूत तोच असून सर्व भूतांची उत्पत्ति त्यापासूनच आहे. व त्याच्या ठिकाणीं ते प्रलय पावतात. जीव व ईश्वर, पृथ्वी, स्वर्ग, आकाश, दिशा व ब्रह्मांड यांना तोच धारण करतो. दिशा व नद्या याच्यापासूनच निघतात व मोठमोठे समुद्र यानेंच उत्पन्न केले आहेत. कोणी कोट्यावधि पंखे धारण करून मनोजवगतीनें उडूं लागला तरी त्याला ह्या सर्वांच्या कारणभूत ब्रह्माचा अंत लागणार नाहीं. याचें रूप जरी दृष्टिगोचरतेच्या पलीकडे आहे तरी ज्याच्या अंतःकरणांत चांगला प्रकाश पडला आहे असा रागद्वेषविरहित विद्वान त्याला पाहूं शकतो व त्याला ओळखून मुक्त होतो. देहेंद्रियादियुक्त सर्व भूतमात्रांचे ठिकाणीं जो ह्या परमात्म्याला पाहूं लागतो त्याला त्यापुढें कशा संबंधानेंच शोक करण्याचें कारण उरत नाहीं. जलानें पूर्ण भरलेला मोठा जलाशय गाठला असतां ज्याप्रमाणें अल्प जलाशयाचें कारण उरत नाहीं त्याप्रमाणें सर्व भूतांचे ठिकाणीं ब्रह्मस्वरूप पाहूं लागणाराला कर्मांचें प्रयोजन उरत नाहीं. आत्मा हाच अधिष्ठान असून सर्व प्राणिमात्रांच्या जन्माचें कारणही तोच आहे. कार्यरूपी या जगतामध्यें तो ओतप्रोत भरला आहे, त्याला जरा, जन्म, मरण, वगैरे कांहीं नाहीं. त्याचें सर्व प्राणिमात्रांच्या हृदयीं वास्तव्य आहे व याची पूर्ण ओळख ब्रह्मवेत्त्यांना पटली आहे. '

---

१३२ संजयाचा उलट निरोप व पुढील कार्याची प्रवृत्ति (५. ४७–७१)

याप्रमाणें सनत्सुजात व बुद्धिमान विदुर यांच्याशीं संभाषणांत ती रात्र निघून गेली. उजाडल्यावर पांडवांकडून संजयानें आणलेला धर्मार्थसंपन्न निरोप ऐकण्याच्या उत्कट इच्छेनें सर्व राजमंडळ पांढऱ्या शुभ्र, विस्तीर्ण, व सोन्यानें जिची जमीन मढवून काढली आहे अशा मंगल सभेमध्यें शिरलें. चंद्रप्रभेप्रमाणें शोभायमान अशा त्या सभेमध्यें जिकडे तिकडे चंदनाचा सडा टाकून, सोन्याच्या, लांकडी, रत्नखचित व हस्तिदंती उत्तम उत्तम बैठकी व्यवस्थेनें टाकल्या असून त्यांवर गालीचे पसरले होते. भीष्म, द्रोण, कृप, विदुरप्रभृति मंडळी धृतराष्ट्राच्या मागून त्या सभेंत शिरली. इकडे दुःशासन, शकुनि, कर्ण वगैरे मंडळी दुर्योधनाला पुढें करून सभेंत शिरली. परिघाप्रमें दीर्घबाहू असणारें हें राजमंडळ त्या सभेमध्यें शिरलें असतां सिंहांनीं ज्याप्रमाणें पर्वताच्या गुहेला शोभा यावी त्याप्रमाणें त्या सभेला विलक्षण शोभा आली. व हे सूर्यतुल्य राजे आपापल्या आसनांवर जाऊन बसल्यावर द्वारपालानें संजय आल्याची वर्दी दिली, व तो रथांतून खालीं उतरून राजांनीं गजबजलेल्या त्या सभेंत शिरला, व सर्व लहानथोरांना पांडवांचा अभिनंदनपूर्वक आशीर्वाद नमस्कार सांगून दुष्टांचा संहार करणाऱ्या वीरनायक अर्जुनाचा निरोप ऐकण्याला आतुर झालेल्या धृतराष्ट्राला तो ह्मणाला, ' युद्धाविषयीं आतुर असणाऱ्या अर्जुनानें युधिष्ठिराच्या विचारानें श्रीकृष्णासमक्ष स्वतःचें बाहुबल ओळखून निर्भयपणें तुह्मां सर्वांना जमवून ज्याचे दिवस भरले

आहेत त्या मंदबुद्धि, व दुर्भाषण करणाऱ्या कर्णाच्या व पांडवांबरोबर युद्ध करण्यासाठीं जमविलेल्या राजांच्या समक्ष हा निरोप मला तुह्मांला सांगण्यास सांगितला आहे.सर्व पांडव व सृंजय त्यांचें तें यथोचित भाषण निमुटपणें ऐकत होते. तो निरोप याप्रमाणें आहे. 'दुर्योधन जर धर्मराजांना राज्य देण्याला तयार नसेल तर खात्रीनें कौरवांनीं कांहीं पातक केलें असून त्याचें फल अजून यावयाचें राहिलें असलें पाहिजे. वाईट करण्याचें मनांत आलें असतां पृथ्वी व स्वर्ग जाळून टाकण्याची ज्यांची शक्ति आहे असे देवेंद्रतुल्य युधिष्ठिर, त्याचप्रमाणें भगवान श्रीकृष्ण, सात्यकि, धृष्टद्युम्न, शिखंडीसारख्यांशीं तोंड देण्याला तुह्मी उभे राहणार! दुर्योधन आमच्याशीं युद्धाला उठला तर यांतच आमचा सर्व हेतु साधल्यासारखा आहे. आमच्याच फायद्यासाठीं आह्मांला अर्धराज्य न देतां आमच्याशीं त्याला युद्धाला उठूंदे. धर्मानें वागणाऱ्या युधिष्ठिरांना वनवासांत जी कष्टद शय्या मिळाली त्याहून कष्टतर व दुःखदायक शय्या युद्धांत प्राणाला मुकून दुर्योधनाला मिळेल. भीड, विद्या, मनोनिग्रह, तप, शौर्य इत्यादि गुणांनीं संपन्न कुरुकुलोत्पन्न पांडवांना दुर्योधनानें पायाखालीं तुडविलें आहे. सरळपणा, धर्माचें पाठबळ, शक्ति इत्यादि सर्वांचें आनुकूल्य असतांही सत्यवचनी धर्मराजांनीं मायावी भाषणाला भुलून जाऊन फार दिवसपर्यंत मुकाट्यानें क्लेश सोसले आहेत. ज्यावेळीं अनेक वर्षपर्यंत आवरून धरलेला राग अनावर होऊन ते बाहेर सोडतील तेव्हां पेटलेल्या आगीचा लोळ ज्याप्रमाणें उन्हाळ्यांत वनाचा फडशा उडवितो त्याप्रमाणें सर्व कौरवसेनेचा तो फडशा उडवील. त्याचप्रमाणें शत्रूंच्या योद्ध्यांचा फन्ना उडविणारा जोमदार व तापट भीमसेन रथावर चढून क्रोधविष बाहेर टाकीत कालाप्रमाणें सैन्याच्या पुढें सरसावून जेव्हां पर्वतशिखरप्राय हत्तींचीं गंडस्थळें फोडून त्यांना रक्त ओकावयाला लावून खालीं पाडील, व कशाही प्रसंगाला न डगमगणारा असा तो एकटा निर्भयपणें शत्रूच्या सैन्यांत शिरून अनेक रथ्यांचा व पायदळांचा आपल्या गदेनें, कुऱ्हाडीनें वनाचा सप्पा उडविणाऱ्या एखाद्या काळपुरुषाप्रमाणें फडशा उडवूं लागेल तेव्हां जेथें सर्व गवताचीं घरें आहेत अशा एखाद्या गांव जसा अग्नीनें अगर वीज पडून जळून खाक व्हावा तशी आपल्या सैन्याची स्थिति होऊन मुख्य मुख्य वीर मरून पडून छातीचा वीर कोणी न उरल्यामुळें त्यांच्या सैन्याची जेव्हां दाणादाण उडेल तेव्हां दुर्योधनाला माझ्या ह्या बोलण्याची आठवण होऊन आपण युद्ध आरंभिलें हें वाईट केलें असें वाटूं लागेल. सुखांत वाढलेल्या चित्रयोधी नकुलाला पुष्कळ दिवस दुःखांत काढावे लागल्यामुळें खवळलेल्या सापाप्रमाणें विष ओकूं लागून जेव्हां मुंडकीं उडवून त्यांचे व मोडून पडलेल्या रथांचे तो ढीग पाडील, अस्त्रनिपुण द्रौपदीचे बालवीर प्राणाची पर्वा न करतां जेव्हां कौरवांवर तुटून पडतील, ज्याची गति अनुकूल, ज्याच्या कण्यापासून बिलकुल आवाज निघत नाहीं व ज्याला सुवर्णरज्जूंनीं बांधलेले असे शिकविलेले घोडे जुंपले आहेत अशा रथांत बसून जेव्हां सहदेव बाणसमुदायांनीं राजांचीं मुंडकीं उडवील व त्या घोर संग्रामामध्ये नानाप्रकारचीं मंडलें करीत तो गर्दीमधून शकुनीकडे धांव घेईल, तसाच कृष्णासारखा सुभद्रेचा तनय अभिमन्यु जेव्हां बाणवृष्टि करून मृत्यूप्रमाणें शत्रूला गिळून टाकील, वृद्ध, महारथी द्रुपद व विराट निरनिराळ्या सैन्यानिशीं शत्रूंवर हल्ला करून त्यांच्यांत शिरून तरण्या बांडांचीं मुंडकीं कापून काढतील, विराटाचा सात्विक व सुशील असा वडील मुलगा पांडवांच्या बाजूनें चिलखत चढवून जेव्हां युद्धाला तयार झालेला दिसेल व जेव्हां सेनाधिपति शिखंडी रथ्यांचा फडशा उडवीत रथांत बसून भीष्मांवर चालून जाऊन रणांत त्यांना मारील व असें झाल्यामुळें तुमच्या सैन्याचा जेव्हां धीर सुटेल–व हें होणार हें मी खात्रीनें सांगतों–शत्रूपुढें मागें न हटणारा अतुलपराक्रमी सेनापति धृष्टद्युम्न जेव्हां रणांत द्रोणांवर चालून जाईल, तेव्हां दुर्योधनाला कृतकर्माचा पश्चात्ताप होईल. ज्ञानी, बुद्धिमान, बलवान व लक्ष्मीवान असा सोमकांचा नायक वृष्णिसिंह ज्यांचा अग्रणी असेल त्यांच्यापुढें शत्रूची डाळ शिजणार नाहीं. दीर्घबाहु, विशालवक्ष, उत्तम उत्तम अस्त्रांचें पूर्ण ज्ञान असणारा, युद्धामध्ये ज्याच्या तोडीचा कोणी नाहीं असा शत्रूला

जर्जर करून सोडणारा व भीति ह्मणून ज्याच्या स्वप्नींही नाहीं असा बलशाली शिनीचा नातू आह्मीं आधींच आमच्या बाजूला घेतला असल्यामुळें आतां दुर्योधनाला राज्याची आशा धरूं नकोस ह्मणून सांगा. जेव्हां युद्ध करण्याचें मनावर घेऊन हा दीर्घबाहु हातांत धनुष्य बळकट धरून बाणवर्षाव करूं लागून मोठमोठ्या योद्धयांना झांकून काढील तेव्हां सिंहाचा बास लागल्याबरोबर जशी गाईंची रानोमाळ पळापळ होते तसे शत्रू रणामध्यें याच्या पुढून पळूं लागतील. एकदां धनुष्य यानें हातांत बळकट धरलें ह्मणजे पर्वतांना फोडून काढण्याचें किंवा लोकपालांचा फडशा उडविण्याचें त्याच्या अंगीं सामर्थ्य आहे. हा अस्त्रज्ञ आपलें हस्तलाघव दाखवीत असतां आंकाशामध्यें असणाऱ्या सूर्याप्रमाणें भासत असतो. नानाप्रकारच्या सूक्ष्म अस्त्रांत भगवान श्रीकृष्णाचें जें कौशल्य तें सर्व ज्याला ठाऊक आहे. तेव्हां ह्या वैभवशाली सात्यकीचा चार घोडे जुंपलेला सोन्याचा रथ रणांत जेव्हां दृष्टीस पडेल तेव्हां मंदबुद्धि दुर्योधनाला रडण्याचीच पाळी येईल. जेव्हां सुवर्ण व रत्नें यांच्या गोगानें कांतिमान अशा पांढरे शुभ्र घोडे जुंपलेल्या माझ्या उग्र कपिध्वज रथावर भगवान बसलेला त्याच्या दृष्टीस पडेल, त्याचप्रमाणें मी गांडीव पेलूं लागलों असतां प्रत्यंचेपासून निघणारा वज्रासारखा भयंकर शब्द कानीं पडेल, माझ्या बाणवृष्टीच्या योगानें जिकडे तिकडे अंधकार पडून गाईंच्या कळपाप्रमाणें सैन्य जेव्हां रणामधून सैरावैरा धांवूं लागेल, ज्या वेळीं मेघांतून बाहेर पडणाऱ्या उग्रस्वरूप विद्युल्लतेप्रमाणें माझे हजारों शत्रूंचीं हाडें फोडून काढणारे, उत्तम पिसें लावलेले, गांडिवापासून सुटणारे मर्मभेदी बाण शत्रूवर जाऊन पडून हत्ती, घोडे, पायदळ यांचा स्वाहा करूं लागतील, जेव्हां शत्रूंनीं सोडलेले बाण माझ्या पृषत्क बाणांनीं माघारे फिरूं लागतील किंवा छिन्नभिन्न होऊन मोडून पडूं लागतील, जेव्हां झाडाच्या शेंड्यापासून पक्षी ज्याप्रमाणें फळें खालीं तोडून पाडतात त्याचप्रमाणें माझे विषाठ बाण तरण्या तरण्या बांडांचीं मुंडकीं उडवून हत्ती, रथ, घोडे यांपासून त्यांना खालीं आणतील, जेव्हां धार्तराष्ट्रांचा फडशा पाडल्यानें शत्रूच्या माऱ्यांत येण्यापूर्वीच युद्धांत कांहीं शौर्य न गाजवितां भीतीनें रथ, हत्ती, घोडे, श्रेष्ठ वीर घायाळ होऊन, थकून तान्हेनें व्याकूळ होऊन वेडे होऊन इकडे तिकडे सैरावैरा धांवतांना दृष्टीस पडतील, व वाजपेय यज्ञांत प्रजापतीला दिलेल्या पशूप्रमाणें कापून काढलेल्या व काढीत असलेल्या सैन्याचे केस, हाडें व कवट्या चोहोंकडे पसरल्या जाऊन त्यांचा आर्तस्वर ज्या वेळीं कानीं पडेल व माझ्या रथामध्यें वासुदेव, गांडीव, दिव्य पांचजन्य शंख, अक्षय्य भाते यांसह मला जेव्हां दुर्योधन पाहील, तेव्हां त्याला युद्ध कशाला आरंभिलेंसें होईल. एकत्र जमलेल्या चोरांच्या टोळीची दाणादाण करून युगांतकाळीं निराळें युग सुरू करण्याच्या बेतांत असलेल्या अग्नीप्रमाणें पुत्रपौत्र, बांधव, अमात्य, सेवक यांसहवर्तमान कौरवांचा जाळून फडशा उडवीन. मग रागाच्या तावडींत सांपडलेल्या मंदबुद्धि दुर्योधनाला ऐश्वर्याला मुकून गर्व खालीं झाल्यानें तडाखे बसूं लागल्यावर पश्चात्ताप होईल. एके वेळीं पूर्वाधकाळीं जपजाप्य आटोपून मी बसलों असतां कोणा एका ब्राह्मणानें मजकडे येऊन 'पार्था, शत्रूंबरोबर होणाऱ्या युद्धांत तुझ्या हातून दुर्घट कृत्य होऊन तूं शत्रूंचा फडशा उडवीत असतां इंद्र तुझ्यापुढें राहून किंवा वासुदेव मागें राहून तुझी पाठ राखील,' असा मला वर दिला असतां भगवान श्रीकृष्णाला मीं मागून घेतला आहे व या चोरांचा फडशा उडविण्याला तो माझ्या बाजूला मिळालाही आहे. देवतांनींच ही गोष्ट मजसाठीं घडवून आणिली असें मी समजतों. युद्ध न करतां केवळ मनानें तो ज्याचा जय व्हावा ह्मणून इच्छील त्या पुरुषाला आपल्या शत्रूवर मग तो प्रत्यक्ष इंद्र असला तरी जय मिळवितां येणार आहे. ह्या तेजस्वी कृष्णाला युद्धांत जिंकण्याची जो इच्छा करील त्याची ती इच्छा अपार महासागर केवळ मनगटाच्या जोरावर पोहून पैलपार जाण्याच्या किंवा ज्याबर असंख्य धोंड्यांच्या राशी पडल्या आहेत त्या श्वेत कैलासाला बुक्कीनें फोडण्याच्या इच्छेप्रमाणेंच व्यर्थ समजली पाहिजे. हा प्रयत्न करणाराची फजीतिच उडावयाची. असा वेडगळ प्रयत्न करणें ह्मणजे रसरखोत निखारा किंवा सूर्यचंद्र हातानें धरण्यासारखें आहे. ह्या कृष्णानें युद्धांत भोजांचा

एकट्यानें फडशा उडवून रुक्मिणीला हरण केलें आहे, गांधारांचा रणांत चुराडा उडवून नग्नजिताच्या मुलांना जिंकून बंदींत रखडत पडलेल्या देवांनाही ललामभूत सुदर्शन राजाची सुटका केली आहे, छातीच्या ठोशानें पांड्य राजाला मारलें आहे, कलिंग देशच्या राजाचा फडशा उडविला आहे, व यानें जाळून टाकलेली वाराणसी पूर्वी कित्येक वर्षपर्यंत उजाड होऊन पडली होती. कोणालाही जिंकतां न येणाऱ्या निषादांच्या एकलव्य राजाबरोबर युद्ध करण्याचें याच्या मनांत फार होतें; परंतु पर्वताबरोबर प्रसंग केल्यामुळें त्याच्या बेगानें ज्याप्रमाणें जंभासुर मरून पडला त्याप्रमाणें याच्याशीं प्रसंग येतांच हा एकलव्य मरून पडला. त्याचप्रमाणें अतिदुष्ट उग्रसेनपुत्र कंसाला भर सभेंत एकट्या बलरामांच्या साहाय्यानें मारून उग्रसेनाला यानें राज्य दिलें. अंतरिक्षांतील सौभ नगरीच्या शाल्व राजाशीं यानें युद्ध करून त्याचा मोड केला. त्या शाल्वानें सोडलेली शतघ्नी नांवाची शक्ति त्याच्याच वेंशीशीं चेंडूप्रमाणें खेलली. असुरांच्या प्राग्ज्योतिष नांवाच्या कोणाचाही शिरकाव न होऊं देणाऱ्या असह्य व घोर अशा नगरीमध्यें भूमिपुत्र नरकासुरानें अदितीचीं कुंडलें हरण करून नेलीं असतां मृत्यूला न भिणाऱ्या इंद्रादि देवांना सुद्धां युद्धांत त्याच्यापुढें टिकाव धरवला नाहीं म्हणून त्यांनीं ह्या कृष्णाचा पराक्रम, सामर्थ्य व अनिवार्य अस्त्रलाघव ओळखून त्या चोराच्या वधासाठीं याची योजना केली असतां वाटेल तें काम पार पाडण्याचें ज्याच्या अंगीं सामर्थ्य आहे अशा ह्या कृष्णानें तें दुष्कर काम आपल्या शिरावर घेतलें. निर्मोचन नगरीच्या भोंवतालचे क्षुरयुक्त पाश तोडून सहा हजार राक्षसांची यानें कत्तल उडविली व मूर व ओघरक्ष राक्षसांना मारून नगरांत शिरला व तेथें महाबलाढ्य नरकासुराबरोबर युद्ध करून वाऱ्यानें उमळून पाडलेल्या कर्णिकाराप्रमाणें त्यानें त्याला मारून पाडलें. तेव्हां ह्या श्री व कीर्ति यांनीं संपन्न अशा श्रीकृष्णाला त्याचें तें घोर कर्म पाहून 'युद्धानें तुला बिलकूल थकवा येणार नाहीं व आकाश व प्राणी या ठिकाणीं तुझी गति अकुंठित राहील असा देवांनीं वर दिला आहे. ह्या विक्रमशाली कृष्णाच्या ठिकाणीं गुणलक्ष्मी नेहमीं वास्तव्य करीत आहे. तर अशा अनंतवीर्य, अतुल तेजस्वी कृष्णाला जिंकण्याचा दुर्योधनानें विचार चालविला आहे, त्याला बांधण्याचा या मूढाचा विचार चालला आहे! पण भगवान श्रीकृष्ण हें सर्व आमच्याकडे बघून निमूटपणें सहन करीत आहे. माझ्यामध्यें व कृष्णामध्यें वितुष्ट उत्पन्न करण्याला तो खटपट करीत आहे. हल्लीं पांडवांवर असलेलें श्रीकृष्णाचें प्रेम नाहींसें करतां येईल असें त्याला वाटत आहे. परंतु युद्धांत जेव्हां गांठ पडेल तेव्हांच त्याला या सर्वांची ओळख पटणार आहे. भीष्म, द्रोण अश्वत्थामा व ज्यांच्या तोडीचा दुसरा वीर नाहीं अशा कृपाचार्यांना नमून राज्य मिळविण्यासाठीं मी युद्ध केल्यावांचून कधीं रहाणार नाहीं. जो पापबुद्धि पांडवांबरोबर युद्धाला उठेल त्यानें न्यायानेंच मृत्यूला कवटाळलें असें मी समजेन. आह्मां राजपुत्रांना कपटद्यूतामध्यें जिंकून इतके दिवस आह्मांला वनवास व अज्ञातवास भोगावयाला लावलें आहे; तर आम्ही जिवंत असून ते तरी राज्याचा कसा सुखानें उपभोग घेतात पाहूं. इंद्रादिकांचेंही साहाय्य घेऊन ते जर आह्मांला युद्धांत जिंकूं शकतील तर न्यायानें वागण्यापेक्षां अन्यायानेंच वागणें उत्तम ठरून सरळ मार्गानें जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें सिद्ध होणार आहे. ह्या जगांत पुरुषाला आपापल्या कर्मांचें फल मिळत नाहीं असें दुर्योधनाला वाटत असेल तर कदाचित त्याला जय येईल. आणि तसें नसेल तर श्रीकृष्णसाहाय्यानें त्याला त्याच्या अनुयायांसह यमसदनाला पाठविण्याची मी आशा बाळगून आहें. इहलोकीं केलेलें कर्म फुकट जात नसून सत्कर्म करणें जर व्यर्थ नसेल तर त्याचें हल्लींचें व त्या वेळचें कृत्य लक्षांत आणतां त्याचा परामवच झाला पाहिजे. युद्ध न करतील तरच कौरव जिवंत रहाण्याचा संभव आहे. युद्धाला पुढें उभे राहिले असतां त्यांपैकीं कर्णासुद्धां एकही शिल्लक रहाणार नाहीं, हें मी खास सांगून ठेवतों. तेव्हां आतां तुम्हांला जें कांहीं करून घ्यावयाचें असेल तें करून घ्या. आमच्याजवळ नक्षत्र, योग वगैरे वर्षफल ज्योतिष ठाम वर्तविण्यांत निष्णात असे बहुश्रुत वृद्ध ब्राह्मण आहेत, त्यांना दृष्टादृष्ट, बरें वाईट फळ,

तसेंच दिव्यप्रभ व ज्योतिश्चक्रांची माहिती पूर्ण आहे. ते कौरवांचा पूर्ण नाश होऊन आमचा जय होणार म्हणून सांगत आहेत. व शत्रूंना वेसण घालण्यास तयार झालेल्या अजातशत्रु युधिष्ठिरांच्या होऱ्यांतही असेंच येत आहे. व भूतभविष्यज्ञ श्रीकृष्ण परमात्म्यालाही यांत संशय वाटत नाहीं, व शांतपणें विचार करतां माझीही अनुभवशीर दृष्टि खात्रीनें कौरवांचा नाश होईल ह्मणूनच सांगत आहे. कारण हात न लावतां माझ्या गांडिवाला ताण बसत आहे, प्रत्यंचा थरथर कांपत आहे व बाण भात्यांतून निसटून बाहेर पडत आहेत. जुनी कात टाकून बाहेर पडणाऱ्या सापाप्रमाणे तरवार प्रसन्नतेनें म्यानांतून बाहेर पडत आहे व 'रथ केव्हां तयार करणार' ह्मणून ध्वजावर घोर शब्द उठत आहेत. रात्रींतून कोल्ह्यांची कोल्हेकुई सुरू होते व राक्षस आकाशांतून धडपडत खालीं येत असतात. हरणें, कोल्हीं, मोर, कावळे, गिधाडें, वगैरे प्राणी माझ्या पांढरे घोडे जोडलेल्या रथामागून धांवत आहेत. उन्हाळ्यांत रानांत पेट घेतलेला अग्नि ज्याप्रमाणें कांहीं बाकी ठेवीत नाहींत, त्याप्रमाणें मी एकटा अनेक दिव्य अस्त्रें सोडून सर्वांचा फडशा उडवीन सर्वांना मारल्यावांचून स्वस्थ बसावयाचें नाहीं असा माझा कृतसंकल्प आहे. इंद्रादिदेवांशीं युद्धांत प्रसंग पडला असतांही ज्यांना विजयश्री माळ घालणार त्या पांडवांबरोबर हा दुर्योधन युद्ध करण्याचें मनांत आणीत आहे!' याप्रमाणें संजयानें आपलें भाषण संपविल्यावर भीष्म ह्मणाले, 'पूर्वी एके वेळीं सर्व देवगंधर्वादिक मंडळी ब्रह्मदेवापुढें आली असतां जणूं काय आपल्या तेजानें त्यांचें मन व तेज आकर्षणच करून घेत आहेत असे नरनारायण ऋषी मात्र निराळे दूर होते. ते पाहून हे कोण, आपल्या जवळ कां येत नाहींत ह्मणून बृहस्पतीनीं ब्रह्मदेवांना विचारलें असतां ब्रह्मदेव ह्मणाले, 'जे हे देदीप्यमान तपस्वी पृथ्वी व आकाश यांना प्रकाशमान करीत दूर राहिले आहेत ते नरनारायण ऋषी होत. स्वतःच्या तपानें योग्यतेला चढून त्यांनीं ब्रह्मलोक मिळविला आहे. हे मोठे सत्वशील, पराक्रमी असून आपल्या कर्मानें त्यांनीं जगाला आनंदित केलें आहे. देवासुरांच्या युद्धामध्यें इंद्राला मोठें संकट पडलें असतां हे तप करीत असलेल्या ठिकाणीं जाऊन त्यानें त्यांचें साहाय्य मागितलें व त्यांनीं तें कबूल केल्यावर इंद्रानें त्यांच्या साहाय्यानें दैत्यदानवांना जिंकलें. परंतप नरानें शेंकडों हजारों पौलोम, व कालखंज यांना मारून यःकश्चित् डळमळणाऱ्या रथांत बसून, सर्व गिळंकृत करावयाला निघालेल्या जंभाचें डोकें यानें युद्धांत भल्लबाणानें उडविलें आहे. ह्यानेंच समुद्राच्या पैलतीरीं साठ हजार निवातकवचांचा रणांत मारून हिरण्यपुर उध्वस्त केलें आहे व देवांना देखील युद्धांत जिंकून यानें अग्नीला तृप्त केलें आहे. तसेंच या नारायणानेंही पुष्कळांना मारलें आहे. याप्रमाणें हे महावीर्यशाली नरनारायण कृष्णार्जुन रूपानें ह्या मृत्युलोकीं अवतरले असून ते इंद्रादिक देवांना देखील अजिंक्य आहेत. यांना स्वकर्मानें अक्षय्य व शाश्वत लोक मिळाले असून युद्धकालीं हे भूमीवर येत असतात. ह्मणून शंख, चक्र, गदा, धारण केलेला भगवान कृष्ण व धनुर्धारी अर्जुन यांना एका रथांत बसलेले पाहून बा दुर्योधना, तुला माझ्या बोलण्याची आठवण होईल. धर्मार्थापासून भ्रष्ट होऊन तूं माझें भाषण न ऐकशील तर पुष्कळ स्वकीयांचा नाश झालेला तुला पहावा लागेल. परशुरामांचा शाप झालेल्या ह्या हीनकुलोत्पन्न कर्णाच्या व दुःशासनशकुनींच्या भरीला पडून तूं त्यांच्या मतानें वागत आहेस.' हें भीष्मांचें मर्मभेदक भाषण ऐकून कर्ण ह्मणाला, 'आपण उगीच माझ्या नांवानें खडे फोडता. मी क्षत्रधर्मानें वागत असून स्वधर्मापासून माझें पाऊल एवढें देखील वांकडें पडलेलें नाहीं. असा कोणता दोष माझ्यामध्यें आपल्याला दिसतो ह्मणून आपण माझी निंदा करतां? माझ्या हातून कधीं वाईट कृत्य घडल्याचें कौरवांना माहीत नसून दुर्योधनाचें मीं कांहीं वांकडें केलें नाहीं. रणामध्यें दंड थोपटून पुढें उभे राहतील तर पांडवांचा मी फडशा पाडीन. एकदां वैर पडल्यावर शहाण्यांनीं त्यांबरोबर पुढें सख्य करूं ठेवावें? हा दुर्योधन गादीचा मालक असल्यानें याचें व धृतराष्ट्राचें जें कांहीं हिताचें असेल तें मला केलें पाहिजे.' ही कर्णाची फुशारकी ऐकून भीष्म धृतराष्ट्राला बजावून ह्मणाले, 'मी पांडवांना मार-

णार म्हणून हा नेहेमीं उगीच बडबड लावीत असतो, परंतु त्यांच्या षोडशांशाची सुद्धां याला सर नाहीं. तुझ्या मुलांवर जो प्रसंग ओढवणार आहे तो ह्या दुर्बुद्धि सूतपुत्राच्या पायीं हें तूं खास समजून ठेव. याच्या मसलतीनें दुर्योधनानें त्या देवपुत्रांचा अवमान केला आहे. पांडवांनीं एक एकट्यांनीं जसें शौर्य गाजविलें आहे तसें हा एकटा आजपर्यंत काय शौर्य रडला आहे? घोषयात्रेमध्यें गंधर्वांनीं तुमची दुर्दशा उडविली असतां बैलाप्रमाणें डुरक्या फोडणारा हा सूतपुत्र कोणीकडे गेला होता. त्या वेळीं त्या बिचाऱ्या पांडवांनाच येऊन तुमची सुटका करावी लागली. ह्या धर्मार्थाकडे न बघणाऱ्या बढाईखोराच्या फुशारक्या आम्हीं आजपर्यंत पुष्कळ ऐकिल्या आहेत.' हें भीष्मांचें भाषण ऐकून 'अर्जुनाचा जो निरोप संजयानें सांगितला तें सर्व तो खरें केल्यावांचून सोडणार नाहीं ह्मणून युद्धाला प्रवृत्त होण्यापूर्वी भीष्म ह्मणतात तसें पांडवांबरोबर सख्य करणेंच चांगलें' म्हणून द्रोणांनींहि धृतराष्ट्राला बजाविलें. परंतु त्या दोघांच्या भाषणाकडे लक्ष न देतां धृतराष्ट्र जेव्हां संजयाला पांडवांसंबंधानें खोदून खोदून विचारूं लागला तेव्हांच सर्व कौरवांना आपल्या जीवितासंबंधानें निराशा वाटूं लागली. 'बरें, आह्मांला संतुष्ट करण्यासाठीं ही अपार सेना जुळल्याचें ऐकून युधिष्ठिर काय म्हणाला, युद्धाच्या इरायानें त्याची काय तयारी चालली आहे, त्याच्या बाजूनें लढण्याला कोण कोण एका पायावर तयार आहेत, युद्ध न करण्याविषयीं याला कोण कोण सल्ला देत आहेत, कोण कोण याला युद्धाला उत्तेजन देत आहेत, कोणावर मदार ठेवून हा युद्धाला उठला आहे,' म्हणून धृतराष्ट्रानें विचारलें असतां संजय म्हणाला, 'सर्व पांचाळ व पांडव राजाच्या तोंडाकडे पहात असून रथांत बसून त्याला येतांना पाहून त्याचें अभिनंदन करतात. गुराखी, धनगर धरून सर्व पांचाल, केकय व मत्स्य त्याला पाहून आपला संतोष प्रकट करतात. ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्यकन्या खेळत असतांना देखील तो खेळ सोडून त्याला युद्धाला तयार झालेला पाहण्याला येतात. आपल्या अतुल पराक्रमी भावांवर, मुलांवर व पुतण्यांवर मदार ठेवून, तसेंच मरूनही जिनें भीष्मांच्या बधाच्या इच्छेनें घोर तप केलें व जी पांचाळाच्या पोटीं जन्माला येऊन पुढें दैवयोगानें पुरुष बनली आणि ह्मणूनच जिला स्त्री व पुरुष अशा दोघांचेही गुणावगुण ठाऊक आहेत त्या अस्त्रनिपुण शिखंडीच्या आधारावर, तसेंच पांच कवचधारी महाधनुर्धारी केकयबंधु, अस्त्रनिपुण वृष्णिवीर युयुधान, संकटसमयीं आधार देणारा विराट, महारथि काशिराज, वीर्यामध्यें श्रीकृष्णाच्या तोडीचा अभिमन्यु, रणांत कोणाला न आटपणारा शिशुपालपुत्र धृष्टकेतु, देवांना इंद्राप्रमाणें पांडवांना आधारभूत असलेला वासुदेव, अतिरथि धृष्टद्युम्न या सर्वांच्या आधारावर धर्मराज युद्धाला उठला असून हे व अशा प्रकारचे हजारों राजे पांडवांसाठीं आपल्या जिवावर पाणी सोडून शिरकमल हातावर घेऊन त्याच्या बाजूनें युद्धाला तयार झाले आहेत.' धृतराष्ट्र म्हणाला, 'हे सर्वच मोठे उत्साहयुक्त आहेत खरे तरी हे सर्व एका बाजूला व भीम एका बाजूला. अपराधाची कधीं क्षमा न करणाऱ्या ह्या नरव्याघ्राची मला मोठी भीति वाटत आहे. दुःखानें दीर्घ सुस्कारे टाकीत मी रात्री जागून काढीत असतों. इंद्रासारख्या त्या वीरापुढें उभा राहणारा माझ्या सैन्यांत तर मला कोणी दिसत नाहीं. हाडवैर धरून कधीं क्षमा न करणाऱ्या ह्या नरवीराला थेटेंत देखील हासें येत नसून तो नेहमीं क्षुब्ध असतो. तेव्हां उत्साहसंपन्न हा वीर युद्धांत माझ्या मंदमति मुलांचा खास फडशा उडविणार. साक्षात् कृष्णानें हातीं धरलेला हा दंडपाणी युद्धांत प्रत्यक्ष यमाची बरोबरी करील. लोहमय ती त्याची अष्टपैलू उग्र गदा मला उगारलेल्या प्रत्यक्ष ब्रह्मदंडासारखी वाटते. लहानपणापासूनच माझ्या मुलांशीं द्वेषानें वागणारा तो नरवीर पशूंच्या कळपांत शिरलेल्या एखाद्या बलाढ्य सिंहाप्रमाणें माझ्या सैन्यांत धुमाकूळ उडवून सोडील. लहानपणीं सुद्धां दुर्योधनादिकांशीं भांडतांना तो त्यांचा चेंदा उडवी. अस्त्रामध्यें द्रोण व अर्जुन यांची, वेगामध्यें वायूची, व रागांत शंकरांची बरोबरी करणाऱ्या ह्या भीमाला कोण मारणार! यापूर्वीच यानें माझ्या मुलांना नाहींसें केलें नाहीं हें मी आपलें मोठें भाग्य

समजतों. लहानपणींसुद्धां तो मला अनावर होता. आतां तर माझ्या मुलांनीं त्याचे इतके हाल केले आहेत तेव्हां तो मोठेंस कसें ऐकणार? हा अभिमानी प्राण गेल्यानें कोणापुढें वांकणार नाहीं. तेव्हां हा अतुल बलशाली भिवया चढवून वक्रदृष्टीनें पाहणारा शूर भीमसेन शांत कशानें होणार? ज्याच्या तोडीचा दुसरा वीर नाहीं असा हा ताडासारखा अर्जुनापेक्षां बोटभर उंच भीमसेन वेगांत घोड्यांना व बलांत हत्तींना मागें सारणारा आहे असें याच्या लहानपणींच. मीं व्यासांच्या तोंडून ऐकिलें आहे. होडग्याचें ज्यामध्यें कांहीं चालणार नाहीं व शररूप जलचरांनीं भरलेला असा हा अपार व अगाध भीमसेनरूपी समुद्र माझे मंदबुद्धि मुलगे तरून जाऊं इच्छितात! मी ओरडतों आहें तरी शहाणपणाच्या घमेंडींत ते माझें ऐकत नाहींत. यांना मध तेवढा दिसत आहे, परंतु भयंकर अधःपतन त्यांच्या लक्षांत येत नाहीं! जे ह्या नररूपी मृत्यूबरोबर झुंजण्याला सिद्ध होतील त्यांना सिंहाच्या तोंडांत जाऊन पडूं पाहणाऱ्या श्वापदाप्रमाणें दैवानेंच तशी बुद्धि दिली आहे झटलें पाहिजे. शिंक्यावर टांगून ठेवलेली चार हात लांब, सहा टोकांनीं युक्त अशी दुसऱ्यांना हात लावण्याला सुद्धां भीतिबाटण्याजोगी मोठी गदा फिरवीत ओठ चावून डोळ्यांतून रागाचे अश्रु ढाळीत व भयंकर गर्जना करून मस्त हत्तीवर हा तुटून पडूं लागला असतां व रथमार्ग आडवून ठळक ठळक वीरांचा फडशा उडवूं लागला असतां माझी प्रजा पेटलेल्या अग्नीप्रमाणें त्याच्या तडक्यांतून कशी वांचणार? हातांत गदा घेऊन माझ्या सैन्यामधून वाट काढीत फुललेल्या झाडांना मोडून पाडणाऱ्या हत्तीप्रमाणें तो रथी, सारथी, ध्वज, इत्यादिकांचा नाश करणार व माझ्या मुलांच्या सैन्याचा पूर्ण मोड होऊन सैनिक भीमसेनाच्या भयानें दशदिशेला पळूं लागणार. ज्या बलशाली जरासंधानें ह्या संपूर्ण पृथ्वीला पीडून सोडलें होतें व ज्याच्या तावडींत भीष्मांच्या प्रतापानें कौरव व नीतीच्या जोरावर वृष्णि व अंधक मात्र सांपडले नाहींत, प्रत्यक्ष त्याच्या अंतःपुरांत शिरून कृष्णसाह्यानें कांहीं एक हत्यार न घेतां त्यानें त्याला ठार केलें! घातुक साप ज्याप्रमाणें फार दिवस साठविलेलें विष बाहेर सोडतो, त्याप्रमाणें तो रणांत माझ्या मुलांवर आपलें तेज सोडणार. असह्य, अनिवार्य, मोठा वेगवान व पराक्रमशाली असा तो लाल डोळे करून हातांत गदा, धनुष्य, बगैरे कांहीं न घेतां व कवच न घालतां माझ्या सैन्याबर तुटून पडून केवळ मनगटाच्या जोरावर युद्ध करूं लागला तरी त्याच्यापुढें कोण उभा राहणार? हे भीष्म, द्रोण, कृप, इत्यादि मंडळी त्याचा पराक्रम पूर्ण ओळखून आहेत. आतां थोरांचें व्रत ठाऊक असणारे हे युद्धाचा शेवट लागेपर्यंत तोंड देऊन युद्ध करतील; तरी अखेरीस पांडवांचाच जय होणार. आतां हें मला कळत असूनही जेव्हां मला आपल्या मुलांना आवरतां येत नाहीं, तेव्हां दैवच बलवत्तर समजलें पाहिजे. हे नरवीर क्षात्रयश संभाळण्यासाठीं युद्धांत प्राण जाईतोंपर्यंत लढल्यावांचून कधीं राहणार नाहींत. माझ्या मुलांप्रमाणेंच हे पांडव भीष्मांचे नातू व द्रोण व कृप यांचे शिष्य आहेत. आतां आमच्याजवळ अशून त्यांच्या इच्छेनुरूप आमचेकडून जें थोडेंबहुत त्यांचें हित झालें आहे त्याची हे तिघे वृद्ध थोर असल्यानें फेड करतीलच. शस्त्र धरून क्षत्रियधर्मानें युद्धामध्यें मरण येणें चांगलें झणतात परंतु पांडवांबरोबर युद्ध करून अशांना मरण येणार त्याबद्दल मला वाईट वाटतें. आजपर्यंत तूं ज्यासंबंधानें रडत होतास तो प्रसंग येऊन ठेपला. ज्ञानाच्या योगानें दुःख आवरतां येणें कठीण आहे असें मला वाटतें. उलट हें प्रबल दुःखच ज्ञानाच्या आड येतें. ऐहिक बंधापासून मुक्त झालेले ऋषी देखील लोकसंग्रह करून त्यांच्या सुखदुःखाचा त्यांवर परिणाम होतो. मग आप्त, पुत्रपौत्र, राज्य, स्त्रिया, इत्यादि मोहपाशांत सांपडलेल्या मनुष्याची काय कथा? आतां ह्या बिकट प्रसंगीं काय केलें असतां कल्याण होणार? द्यूतामुळें कौरवांवर हें मोठें संकट ओढवलें आहे. ऐश्वर्यलोभानें माझ्या मंदबुद्धि मुलानें हें पापकृत्य केलें आहे. वाटेल तें घडवून आणण्याचें सामर्थ्य असणाऱ्या कालाचा न चुकवितां येणारा हा कोरडाच मी समजतों. चाकाशीं जखडलेल्या धावेप्रमाणें यांतून सुटतां येणें कठीण. उन्हाळ्यांत वाऱ्याच्या जोरानें पेट घेणाऱ्या अग्नीप्रमाणें भीमार्जुनरूपी कालाच्या तावडींत सांपडले-

ल्या माझ्या मंद मुलांचा फडशा उडून त्यांच्या बायकांचें रडणें ऐकत बसावें लागणार त्यापेक्षां मला मरण येईल तर बरें होईल. ज्याच्या तोंडांतून असत्य भाषण कधीं निघालें नाहीं व ज्याच्या बाजूनें लढणारा अर्जुन आहे त्याला त्रैलोक्य देखील मिळणें अशक्य नाहीं. रात्रंदिवस विचार करतों आहें तरी गांडीवधारी अर्जुन हृदयभेदक बाण सोडूं लागला असतां त्यावर आपला रथ चालवील असा कोणी योद्धा मला दिसत नाहीं. युद्धांत कधीं हार न खाणारे द्रोण व कर्ण हे त्याला तोंड देतील तेव्हां प्रसंग मोठा आणीबाणीचा गुदरेल खरा; पण जय कांहीं आमच्या बाजूला येणार नाहीं. कारण कर्ण दयाळू व अविचारी आहे व द्रोण ह्यातारे आहेत. अर्जुन पाहिला तर बलाढ्य, शक्तिमान, धनुष्य कधीं हातून ढळूं न देणारा, श्रमाला न जुमानणारा असा आहे. तेव्हां किंहीही निकराचें युद्ध झालें तरी तो कांहीं हटणार नाहीं. एक ह्यांच्या किंवा एक अर्जुनाच्या मरणानें युद्ध थांबणार. हें युद्ध यांनाच काळ होणार आहे. त्यानें आजपर्यंत सर्व देवांना देखील जिंकलें असून पराभव ह्मणून त्याला ठाऊक नाहीं. तसेंच शील व वृत्त यानें त्याच्या बरोबरीचा कृष्ण त्याचा सारथि आहे. एका रथावर सज्ज झालेले कृष्णार्जुन व तें गांडीव धनुष्य हीं तीन तेजेंच एकदम एके ठिकाणीं एकवटलीं आहेत ह्मणण्याला हरकत नाहीं. तशा प्रकारचा योद्धा, तशा प्रकारचा सारथि किंवा तशा प्रकारचे धनुष्य ह्यांपैकीं कांहींच आमच्या बाजूला नाहींत. दुर्योधनाच्या अनुरोधानें वागणाऱ्या मूर्खांना हे कळत नाहीं, डोक्यावर पडलेली वीज देखील एखादे वेळीं बाकी ठेवील, पण त्यानें सोडलेल्या बाणांसंबंधानें मुळीं शंका देखील नको. यानें सोडलेल्या बाणांनीं शत्रूंचीं डोकीं धडांपासून वेगळीं होत आहेत व याच्या गांडिवापासून निघणाऱ्या तेजानें सर्व सैन्य होरपळून निघत आहे असें मला आतां दिसूं लागलें आहे. भारतीसेना त्याच्या रथघोषानें गर्भगळित होऊन पळत सुटलेली मला दिसूं लागली आहे. ह्या युद्धामध्यें कौरवांवर गुदरणारे घोर प्रसंग मला धरांत बसून ऐकावे लागणार आहेत. भरतकुलाचा नाश खात्रीनें जवळ आला आहे.'

ज्याप्रमाणें सर्व पांडव पराक्रमी असून विजयाची इच्छा धरून आहेत त्याचप्रमाणें त्यांच्या बाजूचे सर्व योद्धेही पराक्रमी असून पांडवांसाठीं प्राण देण्याला तयार होऊन उभे आहेत. पांचाल, मत्स्य इत्यादिकांचा पराक्रम संजया, तूंच तुकता सांगितला आहेस. मनांत आलें असतां त्रैलोक्य पायाखालीं तुडविण्याची शक्ति असणारा भगवान श्रीकृष्ण तर त्यांना जय देण्याचा संकल्पच करून बसला आहे. अर्जुनशिष्य सात्यकि व महारथि परमास्त्रज्ञ धृष्टद्युम्न त्यांच्या बाजूनें आमच्याशीं लढणार! विचारी वैभवशाली, ब्रह्मतेजानें युक्त, शहाणे, मित्रामत्यांनीं संपन्न, युद्धकला जाणणारे महारथी व शूर अशा भावांचें व व्याह्यांचें ज्याला साहाय्य आहे असा विनयसंपन्न, व मंत्ररक्षणामध्यें कुशल युधिष्ठिररूपी अग्नि माझ्या कपटाचरणानें अल्पकाल दबून राहिला होता तो आतां जोरानें पेट घेऊन त्यामध्यें माझीं मुलें पतंगाप्रमाणें पडून भाजून निघणार. युधिष्ठिराच्या रागापासून व भीमार्जुन आणि नकुलसहदेव यांच्या पराक्रमापासून मोठेंच संकट येऊन गुदरणार आहे. युद्धामध्यें सर्व कुलाचा पूर्ण नाश होणार. त्यांच्याशीं युद्धाला प्रवृत्त न व्हावें हेंच मला बरें दिसते आणि त्यायोगानेंच माझ्या मनाला स्वस्थता मिळणार आहे. तुह्मांला हें पसंत असेल तर संधीकरितां खटपट करतां येईल. आमचें दुःख पाहून युधिष्ठिर कधीं आमची उपेक्षा करणार नाहीं; कारण अन्यायानें उकरून काढलेल्या ह्या युद्धाला मीच कारण आहें ह्मणून तो मला दोष देत आहे.'

हें ऐकून संजय ह्मणाला, 'महाराज, आपण ह्मणतां हें अगदीं असेंच होणार आहे. युद्धांत गांडिवाच्या योगानें क्षात्रकुलाचा नाश धडधडीत दिसत आहे. परंतु अर्जुनाला आपण पक्कें ओळखत असून आजपर्यंत मुलांच्या अनुरोधानें आपण वागत आलां याचेंच मला आश्चर्य वाटतें. आजपर्यंत त्यांचे अपराध करून आतां ही संधि करण्याची वेळ नव्हे. वडिलांच्या जागीं असणाऱ्या आपल्यासारख्या हुशार सुहृदांनीं त्यांचें हितच करावयाला पाहिजे होतें. द्रोहबुद्धि धरणाराला गुरु कोणी ह्मणत नाहींत. द्यूतांत 'हें जिंकलें, हें मिळविलें,' ह्मणून पांड-

बांचा पराभव होतांना पाहून आपल्याला लहान पोराप्रमाणें गुदगुल्या होत होत्या. त्यांच्यावर निष्ठुर शब्दांचा भडिमार होत असतां संपूर्ण राज्य मिळत आहे म्हणून त्यांची आपण उपेक्षा केली. त्यावेळीं परिणामाकडे लक्ष पोहोंचविलें नाहीं. कुरु आणि जांगल हें आपलें बडिलोपार्जित राज्य आहे. परंतु सर्व पृथ्वी त्या वीरांनीं जिंकलेली आपण घेतली आहे. स्वतःच्या बाहुवीर्यानें जिंकलेली भूमि देखील त्यांनीं आपल्या पायावर अर्पण केली असतां त्या-संबंधानें देखील स्वतःचाच तुह्माला मोठेपणा वाटत आहे. गंधर्व राजानें घेरून दुःखसागरांत गटंगळ्या खाणाऱ्या आपल्या मुलांची सुटकाही अर्जुनालाच करावी लागली. अर्जुन तीक्ष्ण बाण सोडूं लागला असतां समुद्रसुद्धां कोरडा पडेल, मग मांसपिंडयुक्त ह्या शरीराची कथा काय? अर्जुनासारखा धनुर्धरी, गांडिवासारखें धनुष्य, केशवासारखा सारथि, सुदर्शनासारखें आयुध, कपिध्वज, अशी ही अतुल सांगड जुळली असल्यानें उगारलेल्या कालचक्राप्रमाणें तो श्वेतवाहन रणांत आमचा फडशा खास उडवील. भीमार्जुन ज्यासाठीं लढण्याला तयार आहेत त्यांचीच सर्व पृथ्वी निःसंशय समजली पाहिजे. मत्स्य, पांचाल, केकय हे आज आपल्याला मानीनातसे झाले आहेत. तसेंच शाल्वेय,शूरसेनप्रभृति शहाणपणानें त्यांचें वीर्य ओळखून आपल्याला तुच्छ करून त्यांच्या बाजूला मिळाले आहेत. पांडवांवरच्या त्यांच्या भक्तीमुळें आपल्या पुत्रांचा ते द्वेष करीत आहेत. धर्मनिष्ठ व कपटानें नाश न व्हावा अशा पांडवांना ज्यानें आजपर्यंत दुःख दिलें व अजूनही जो त्यांचा द्वेष करीत आहे अशा आपल्या पापी मुलाला त्याच्या अनुयायीवर्गासह हरतऱ्हेनें कोंडून ठेवणेंच इष्ट होतें. आतां रडत बसण्यांत अर्थ नाहीं. द्यूताच्या वेळीं मीं व विदुरांनीं हें भाकित आपल्याला सांगितलें होतें. पांडवांसंबंधाचा आपला हा सर्व आक्रोश आतां व्यर्थ आहे.'

ह्याप्रमाणें धृतराष्ट्र उद्विग्न झालेला पाहून दुर्योधन ह्मणाला, 'तात, आपण असें घाबरून जाऊन आमच्याबद्दल बाईट वाटून घेऊं नका. समरामध्यें शत्रूंना जिंकण्याला आह्मीं समर्थ आहों. आह्मीं पांडवांना वनांत हाकलून दिल्यावर परराष्ट्रांचा उच्छेद करण्याला समर्थ अशा मोठ्या सैन्यासह श्रीकृष्ण व त्याचे अनुयायी धृष्टद्युम्नप्रभृति त्यांच्यामागून जाऊन आपल्यासुद्धां सर्व कौरवांची निंदा करूं लागले व आपला समूळ नाश करून राज्य परत घेण्याच्या गोष्टी बोलूं लागले. तेव्हां ज्ञातींचा क्षय होणार ह्मणून भिऊन मी भीष्म, द्रोण, कृपांना ह्मणालें, 'पांडव कदाचित् वचनाला जागतील; पण वासुदेवानें आमचा पूर्ण उच्छेद करण्याचें योजिलें असून विदुर व धर्मवेत्ते धृतराष्ट्र महाराज यांखेरीज कोणाला शिल्लक न ठेवतां कौरवांचें एकछत्री राज्य युधिष्ठिराला मिळवून देण्याचा त्याचा विचार चालला आहे. त्यांपुढें वांकावें, पळून जावें किंवा जिवावर उदार होऊन समोरासमोर उभें राहून लढावें, हें कांहीं मला समजत नाहीं. सर्व राजे युधिष्ठिराच्या आज्ञेंत वागणारे असून सर्व राष्ट्र आमच्यासंबंधानें विरक्त आहे. आमचे मित्र आमच्यावर रागावले आहेत व राजे व स्वजन यांनीं आह्मांला तुच्छ केलें आहे. तेव्हां समोर उभें राहून लढण्यांत आमचा पराभव होणार हें मी जाणून आहें. त्यांच्यापुढें वांकण्यांत कांहीं दोष नसून आमच्यामध्यें कायमचें सख्य होणार आहे. माझ्यासंबंधानें अनंत क्लेश सोसावे लागून दुःखद स्थितीला प्राप्त झालेल्या तातावद्दल मला वाईट वाटत आहे. 'तुझ्या मुलांनीं दुर्योधनाचें प्रिय करण्यासाठीं आमचे पुष्कळ अपराध केले आहेत,' असें ह्मणून ते कुलाचा समूळ नाश करून महाराजांचा सूड उगवतील.' तेव्हां मला त्याप्रमाणें मोठ्या चिंतेंत बुडालेला पाहून ते ह्मणाले, 'शत्रूंनीं जरी आमच्याशीं कंबरा बांधल्या तरी तुला भिण्याचें कारण नाहीं. आह्मीं रणांत उभे राहिलों असतां आह्मांला जिंकण्याला ते समर्थ नाहींत.आह्मी एक एकटे सर्व राजांना जिंकण्याला समर्थ आहों. येऊं देत त्यांना. त्यांचा गर्व तीक्ष्ण बाणांनीं दूर करूं!' तेव्हां अशा प्रकारची ही मंडळी रणांत दृढ निश्चयानें आमच्या बाजूनें शत्रूंशीं लढण्याला तयार असतां आपल्याला काळजी कशाला पाहिजे! पूर्वी एकवार ही सर्व पृथ्वी त्यांच्या ताब्यांत होती. पण आज त्यांची बाजू लंगडी पडून ते कीर्तिहीन झाले आहेत. पृथ्वी सर्व आज आमच्या ताब्यांत असून

सर्व राजे सुखदुःखाचे सारखेच वांटेकरी होऊन आमच्या बाजूला मिळाले आहेत, व ते माझ्यासाठीं आगींत उडी घेण्याला किंवा समुद्रांत देखील शिरण्याला तयार आहेत. कष्टी होऊन व भिऊन जाऊन शत्रूची प्रशंसा करतांना आपल्याला पाहून मात्र ते हासत आहेत. ह्यांपैकीं प्रत्येक एक एकटा आपल्याला पांडवांना जिंकण्याला समर्थ समजत आहे. तेव्हां आपल्याला भिण्याचें कारण नाहीं. माझ्या ह्या अक्षय्य सेनेचा पाडाव प्रत्यक्ष इंद्राच्या किंवा ब्रह्मदेवाच्या हातून सुद्धां होणें शक्य नाहीं. माझ्या सैन्यानें व माझ्या स्वतःच्या पराक्रमानें भिऊन जाऊन नगर मागावयाचें सोडून देऊन युधिष्ठिर पांच गांवें मागूं लागला आहे. भीमाचा जो आपल्याला इतका बाऊ वाटत आहे तो पोकळ आहे. आपण माझा पराक्रम पूर्ण ओळखत नाहीं. गदायुद्धांत माझ्या तोडीचा या पृथ्वीमध्यें दुसरा कोणी नाहीं. मोठे हाल सोसून लक्ष लावून ही विद्या मीं पूर्ण मिळविली आहे. बलरामांपाशीं शिष्यत्वानें रहात असतां 'दुर्योधनासारखा गदाविर्येत कोणी नाहीं,' असें प्रत्यक्ष त्यांनीं उद्गार काढले आहेत. गदेंत मी बलरामांच्या तोडीचा असून बलानें तर माझ्या तोडीचा पृथ्वीवर कोणी सांपडणार नाहीं. युद्धामध्यें माझ्या गदेचा एक प्रहार भीमाला सहन न होतां त्यानें त्याला यमपुरीची वाट धरावी लागेल. गदेमध्यें त्याच्याशीं दोन हात करण्याची माझी फारा दिवसांपासून इच्छा आहे. पर्वताप्रमाणें कांहीं वेळ न लागतां गदेनें त्याचे तुकडे तुकडे करून पाडीन. गदेमध्यें माझ्या सारखा कोणी नाहीं हें तोही जाणत आहे व कृष्णार्जुनांनाही माहीत आहे ! मी त्याला वेळ न लागतां मारून पाडीन याबद्दल बिलकुल काळजी करूं नका. आणि हा वांटा मी उचलल्यावर अर्जुनाच्या तोडीचे व त्याहून विशिष्ट वाटेल तितक्या रथ्यांना भीष्म, द्रोण, कृप, अश्वत्थामा, कर्ण, भूरिश्रवा, शल्य, जयद्रथ, ह्यांपैकीं प्रत्येक मारण्याला समर्थ आहे. तेव्हां हे सारे एकत्र जमल्यावर पांडवांना यमसदनाला पाठविण्याला किती उशीर लागणार ? एकट्या अर्जुनाचा पराभव करण्याला ह्या राजांची सर्व सेना देखील पुरी नाहीं असें आपल्याला कां वाटावें कळत नाहीं. भीष्म, द्रोण, कृप व अश्वत्थामा यांनीं बाणांनीं घेरल्यावर एकट्या अर्जुनाचें काय चालणार आहे ? पितामह भीष्म शंतनूपासून ब्रह्मर्षीसारखे उत्पन्न झाले असून 'तुझ्या मनांत आल्याखेरीज तूं मरणार नाहींस,' असा त्यांना बडिलांचा प्रसन्न होऊन वर मिळाला आहे. आचार्यांची द्रोणापासून उत्पत्ति असून सर्वश्रेष्ठ सर्व अस्त्रें जाणणाऱ्या अश्वत्थाम्यांची आचार्यांपासून उत्पत्ति आहे. आचार्यश्रेष्ठ कृपही गौतमापासून शरबनांत जन्मले आहेत. तेव्हां ज्यांचे मातापिता व मातुल हे अयोनिज आहेत असे हे अश्वत्थामे आमच्या बाजूला आहेत ! तसाच हा कर्णही माझ्या मतानें यांच्याच तोडीचा आहे. परशुरामांनीं सुद्धां 'तूं माझ्या तोडीचा आहेस,' असें ह्यासंबंधानें कबूल केलें आहे. त्याचप्रमाणें ह्यानें रुचिर अंगचीं कुंडलें इंद्रानें मागितल्यावरून त्याला देऊन त्यापासून उग्र अशी अमोघ शक्ति मिळविली आहे ? तेव्हां त्याच्या त्या अमोघशक्तीच्या तावडींतून अर्जुन कां सुटावा ? हे भीष्म तर एका दिवसांत दहा लक्ष सैन्य मारण्यास समर्थ आहेत. तेव्हां हातांत ठेवलेल्या फळाप्रमाणें मला जय खात्रीनें येणार व शत्रूचा पूर्ण मोड होणार. तसेंच संशप्तक क्षत्रियमंडळी मोठे वीर अर्जुनाला आपण मारूं किंवा अर्जुन आपल्याला मारील अशा हिमतीनें लढण्याला तयार आहेत. असें असून आपल्याला उगीच चिंता कां पडली आहे समजत नाहीं ? भीमार्जुन मेल्यावर शत्रुपक्षाकडील कोण युद्धाला उठणार तेवढें सांगा. पांच पांडव, धृष्टद्युम्न व सात्यकि हे सातच कायते शत्रुपक्षामध्यें उत्तम वीर आहेत. परंतु आमच्याकडे तर भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, अश्वत्थामा, सोमदत्त, बाल्हीक, विकर्तन, शल्य, जयद्रथ, दुःशासनप्रभृति हजारों उत्तम वीर आहेत. त्याचप्रमाणें आमची अकरा अक्षौहिणी सेना असून शत्रूची काय ती सातच आहे. **एक तृतीयांशानें कमी असलेल्या सैन्यावरोबर युद्ध करावें असें प्रत्यक्ष बृहस्पतीचें वचन आहे.** त्याचप्रमाणें शत्रुपक्षामध्यें कांहीं विशेष गुण दिसत नसून आमच्यामध्यें गुणसमुदायही त्याचेपेक्षां अधिक आहे. ह्याप्रमाणें माझें सैन्य अस्सल दर्जाचें असून पांडवांचें धडधडीत कमी दर्जाचें अ-

सतां माझा पराभव कां व्हावा व आपल्याला तरी त्या संबंधानें असा मोह कां पडावा ? ' इतकें बोलून पुढें काय करणें अवश्य आहे हें ठरविण्यासाठीं ' राजे लोक व सात अक्षौहिणी सैन्य जमवून युद्धाच्या संबंधानें युधिष्ठिराचा काय बेत चालला आहे व त्यांची हुरूप कशी आहे, ' ह्मणून त्यानें संजयाला विचारलें. तेव्हां संजय ह्मणाला, ' युद्धाचा समय येऊन ठेपल्यामुळें युधिष्ठिराला फारच उत्साह वाटत आहे. आपलें अस्त्रमंत्रज्ञान कसें काय साधलें आहे हें पाहण्यासाठीं सर्व दिशा तेजोमय करून सोडणारा आपला रथ जोडून विजेनें युक्त मेघाप्रमाणें तयार होऊन त्यांत बसून ' आह्मी जिंकणार त्याचें हें पूर्वरूप पहा, ' ह्मणून आनंदभरित होऊन अर्जुनानें आपलें अस्त्रलाघव मला दाखविलें. व तसें होणार हें मीही पक्कें जाणून आहें. मय, इंद्र, त्वष्टा व धाता यांनीं देवमायेनें अनेक आश्चर्यजनक लहानमोठ्या मौल्यवान वस्तू निर्मून त्या अर्जुनाच्या ध्वजावर ठेविल्या आहेत. भीमसेनाच्या विनंतीवरून मारुती आपली प्रतिमा त्या ध्वजावर ठेवणार आहे. वर खालीं चोहोंबाजूला त्या ध्वजानें आपल्या तेजानें एक योजनपर्यंत व्यापलें असून वृक्षादिकांनीं युद्धां त्याची गति कुंठित होऊं नये अशी कांहीं मयासुरानें तजवीज करून ठेविली आहे. आकाशांत चमकणाऱ्या इंद्रधनुष्याप्रमाणें त्याचा रंग अनेक रंगांचें मिश्रण आहे. अग्नीपासून निघणारा धूर ज्याप्रमाणें अप्रतिबद्ध संचार करतो त्याप्रमाणें ह्या ध्वजाची अप्रतिबद्ध स्वैरगति आहे व रथाला त्याचा भार बिलकुल होत नाहीं. चित्ररथ गंधर्वानें दिलेले वायुगति पांढरे शुभ्र घोडे या रथाला जोडले आहेत. त्यांची गति कोठेंच कुंठित होत नसून वारंवार हे किती जरी मेले तरी वरप्रभावानें त्यांच्या जागीं शेकडो दुसरे तयार असतात. भीमादिकांच्या रथाचे घोडेही अशाच प्रकारचे तेजस्वी अमून वेगवान आहेत.

आतां त्यांच्या बाजूला जमलेल्या योद्ध्यांमध्यें युयुधान व सात्यकि ह्या दोन अभिमानी वीरांची गणना महारथ्यांमध्यें आहे. द्रुपद, सत्यजित, धृष्टद्युम्न, त्याचप्रमाणें आपल्या पुत्रांसह व सैन्यासह विराट, जरासंधपुत्र, धृष्टकेतु वगैरे राजे आपापल्या सैन्यानिशीं त्यांच्या बाजूनें लढण्याला सज्ज होऊन राहिले आहेत. **दैवी, मानुष, आसुर, गांधर्व, इत्यादि व्यूहरचना जाणणारा धृष्टद्युम्न त्यांचा मुख्य सेनापती आहे.** भीष्म हा शिखंडीचा वांटा ठरविला असून विराट त्याच्या मदतीला असणार आहे. शल्य हा युधिष्ठिराचा भाग त्यांनीं ठरविला असून ही जोडी बरोबर नाहीं असें त्यांच्यामध्यें बोलणें चालतें. शंभर भावांसह दुर्योधन व पूर्व व दक्षिण दिशेचे राजे हे भीमसेनाचा भाग ठरले आहेत. तसेंच कर्ण, अश्वत्थामा, विकर्ण, जयद्रथ, व स्वतःला शूर समजणारे पृथ्वीवरील दुसरे अजिंक्य राजे अर्जुनानें आपल्या वांट्याला उचलले आहेत. मोठे धनुर्धारी पांच केकयबंधु केकय व त्रिगर्तातील योद्धे, मालव व शाल्वक यांना आपला भाग समजत आहेत. दुर्योधनाचे व दुःशासनाचे पुत्र व राजा बृहद्बल यांना अभिमन्यु आपला वांटा समजत आहे. धृष्टद्युम्न द्रोणांवर चालून जात असतां द्रौपदीचे पुत्र त्याला साहाय्य करणार आहेत. चेकितान सोमदत्ताशीं व युयुधान कृतवर्म्याशीं सामना देणार आहेत. युद्धांत ज्याला त्याला युद्धाला बोलावणाऱ्या सहदेवानें शकुनीला आपला भाग ठरवून ठेविलें आहे. जे जे ह्मणून त्यांच्या उलट बाजूनें युद्धाला उभे रहाणार आहेत त्या सर्वांची नांवनिशीवार त्यांनीं वाट लावून ठेविली आहे. तेव्हां आतां तुह्मांला जें करावयाचें असेल तें करा. ' धृतराष्ट्र ह्मणाला, ' भिकार द्यूत खेळणाऱ्या ह्या माझ्या मूर्ख मुलांचा भीमाबरोबर प्रसंग जुळणार हें ऐकून मी यांना मेल्याप्रमाणेंच समजतों; व कालधर्मानें प्रोक्षण करून ठेवलेले हे सर्व राजे अग्नींत पडणाऱ्या पतंगाप्रमाणें गांडिवाग्नींत पडणार ? ते सर्व अतिरथी, महारथी, असून, कीर्तिमान, प्रतापी व समरविजयी आहेत. युधिष्ठिर त्यांचा नायक असून कृष्ण त्यांचा रक्षक आहे व अर्जुन, भीम, धृष्टद्युम्न, सात्यकि प्रभृति योद्धे त्यांच्या बाजूनें युद्ध करण्याला एका पायावर तयार आहेत. ज्या रणधीर वीरांच्या मनाविरुद्ध ही पृथ्वी हरण करण्याला प्रत्यक्ष इंद्रही समर्थ नाहीं, त्या सर्वगुणसंपन्न देवतुल्य पराक्रमी पांडवांशीं माझा दुष्ट मुलगा मी नको नको ह्मणत असतां युद्धाला उ-

ठला आहे.' हें ऐकून दुर्योधन मध्येंच ह्मणाला, 'ज्यांना इंद्रही जिंकण्याला समर्थ नाहीं असे पितामह, द्रोण प्रभृति, वीर आमच्या बाजूला असतांना पांडवांचाच जय होणार हें आपण काय घेऊन बसलां आहां? ज्यांच्याकडे पांडवांची तुसती पाहण्याची सुद्धां छाती होणार नाहीं, असे शस्त्रधारी शूर योद्धे माझ्या बाजूनें पांडवांशीं युद्ध करण्याला तयार असून पाशानें ज्याप्रमाणें हरणांना आवरावें त्याप्रमाणें हे त्यांना संभाळतील. मी स्वतः आपल्या मुलांनिशीं त्यांचा समाचार घेण्याला तयारच आहें.' धृतराष्ट्र ह्मणाला, 'बा संजया, वायु झालेल्या मनुष्याप्रमाणें हा कांहीं तरी बरळत आहे. धर्मनिष्ठ व यशस्वी पांडवांचें सामर्थ्य जाणूनच भीष्मांना त्यांच्याबरोबर युद्ध करणें रुचत नाहीं. असो. पांडवांची एकंदर हालचाल व आगंति तूप ओतल्याप्रमाणें तेजस्वी अशा त्यांना प्रोत्साहन कोण देत आहे वगैरे सांग पाहूं.' संजय ह्मणाला, 'महाराज,' भरतकुलोत्तंसहो, युद्ध करा. भीऊं नका. दुर्योधनाच्या बोलण्यावरून जे कोणी राजे त्याच्या बाजूला आले असतील त्या सर्वांना त्यांच्या अनुयायांसह घनघोर संग्रामांत, मी जलांत तिमिमासा ज्याप्रमाणें किरकोळ माशांना गट्ट करून टाकतो त्याप्रमाणें गट्ट करून सोडीन. समुद्राला थोपवून धरणाऱ्या वेलेप्रमाणें भीष्म द्रोणादिकांना सुद्धां मी थोपवून धरीन,' याप्रमाणें धृष्टद्युम्न नेहमीं त्यांची उठावणी करीत असतो व तो असें बोलूं लागला ह्मणजे 'सर्व पांडव, पांचाल तुम्हाच धैर्यावर अवलंबून आहेत, आह्मांला यांतून पार पाडणारा तूंच आहेस, हे महाबाहो, तूं क्षात्रधर्माला पूर्ण जागत असल्यानें सर्व कौरवांना तूं एकटा पुरा आहेस, युद्धाच्या तयारीनें कौरव आले नाहींत तोंच जी काय व्यवस्था लावावयाची असेल ती लावून ठेव, पराभव पावून सैन्यानें पळ काढला असतांही जो मागें पाय न घेतां रणांत उभा असतो अशा एका वीगला हजार लोक देखील खर्ची घालून संग्रही करावा असें नीतिज्ञांचें मत आहे, तूं स्वतः शूर असून युद्धामध्यें भीतांना पाठिंबा आहेस,' याप्रमाणें युधिष्ठिर त्याला चढवीत असतो. निर्भयपणें धृष्टद्युम्नानें 'जो सज्जन असेल त्यानें युधिष्ठिराकडे वळलें पाहिजे, देवरक्षित अर्जुनाच्या हातून तुमचा वध न होवो, धर्मराजांच्या पायीं राज्य अर्पून त्यांला शरण या, अमोघवीर्य अर्जुनाचा कोणाच्या हातून पराभव होणें शक्य नाहीं, असें भीष्म द्रोणादिकांना जाऊन सांगा,' ह्मणून सांगितलें आहे.' हें संजयाचें भाषण ऐकून धृतराष्ट्र दुर्योधनाला फिरून ह्मणाला, 'आकौमार ब्रह्मचर्य धारण केल्यानें क्षात्रतेज ज्याच्या अंगीं रसरसतें आहे अशा पांडुपुत्राबरोबर बा दुर्योधना, मी नको नको ह्मणत असतां तूं वैर जोडीत आहेस. युद्धाचा विचार बाजूला ठेव. कारण कोणत्याही कारणानें युद्ध कोणीं कधीं चांगलें ह्मटलें नाहीं. तुझें यथास्थित चालण्याला अर्धी पृथ्वी पुरी आहे. महात्म्या पांडवांशीं सख्य करावेंस हेंच धर्माला अनुसरून असून सर्व कौरवांना संमत आहे. जरा विचार कर ह्मणजे ही तुझी सेनाच तुझ्या नाशाला कारणीभूत आहे असें तुला कळून येईल. व्यर्थ मोहामुळें हें अद्यापि तुझ्या ध्यानांत येत नाहीं. मला, भीष्मद्रोणादिकांना, कोणालाच युद्ध करणें प्रशस्त वाटत नाहीं. तूं तरी स्वतः कांहीं करीत नसून कर्ण, दुःशासन व शकुनि हेच तुला चिथविणारे आहेत.' दुर्योधन ह्मणाला, 'मी तरी कोठें भीष्मादिकांच्या जिवावर शत्रूबरोबर युद्ध करण्याला उठलों आहें? मीं व कर्ण या दोघांनीं मिळून युधिष्ठिराला पशु कल्पून या रणयज्ञाला प्रारंभ केला आहे. ह्या यज्ञांत रथ ही वेदी, तरवार स्रुव, गदा, स्रुचि, कवच सद, घोडे ऋत्विज, बाण दर्भ व कीर्ति हवि, याप्रमाणें यज्ञसाधनें आहेत. या यमयज्ञामध्यें आत्माहुतीनें सिद्धि मिळवून शत्रूंचा नाश करून श्रीसंपन्न होऊन आह्मी फिरून एकत्र जुळूं. कर्ण, दुःशासन व मी मिळून पांडवांना मारूं. त्यांना मारून मी तरी या पृथ्वीचा एकटा उपभोग घेईन किंवा मला मारून ते तरी घेतील. जीवित, राज्य व संपत्ति या सर्वांवर मीं पाणी सोडलें आहे. पांडव आणि मी मिळून जुळून राहण्याची वेळ गेली. सुईच्या टोंकाएवढी देखील भूमि मी त्यांना देणार नाहीं.' हा दुर्योधनाचा निश्चय ऐकून धृतराष्ट्र आपल्या इतर मुलांना ह्मणाला, 'बाबांनो, दुर्योधनाची तर मीं आशा सोडली आहे. पण तुह्मां सर्वांसाठीं

मला वाईट वाटत आहे. यमपुरीची वाट धरलेल्या त्या मूढाच्यामागून तुह्मी जात आहां. हरणांच्या कळपांत शिरून वाघ ज्याप्रमाणें त्या मधल्या निवडक निवडक हरणांचा फडशा उडवितात त्याप्रमाणें पांडव तुह्मांपैकीं वीरमुख्यांचा खात्रीनें फडशा उडवितील. मला सर्व विपरीत भासत आहे. ह्या अस्ताव्यस्त पडलेल्या भारतीसेनारूप स्त्रीवर युयुधान आपले लांब हात टाकून तिचा समाचार घेणार. सात्यकि तर रणांत बिर्यांप्रमाणें बाण पेरीत उभा राहणार! मोठमोठ्या सैन्याच्या अग्रभागीं भीमसेन तटाप्रमाणें उभा राहून त्यांची सेना त्याच्या आश्रयानें राहील. पर्वतप्राय हत्तींचीं गंडस्थळें फोडून व सुळ्यांचा चुराडा उडवून तो रक्ताचे पाट वाहवील तेव्हां ह्या माझ्या बोलण्याची आठवण होईल? त्यांच्याशीं संधि न कराल तर तुह्मांवर मोठें भय येऊन गुदरणार आहे. तोडून पाडलेल्या मोठ्या अरण्याप्रमाणें तुमची सर्व सेना मरून पडणार.' याप्रमाणें सर्वांना सुचवून 'कृष्णार्जुनांनीं मिळून काय निरोप सांगितला आहे,' ह्मणून त्यानें फिरून संजयाला विचारलें. संजय ह्मणाला, 'शुचिर्भूततेनें अंतःपुरामध्यें शिरून त्या नरदेहधारी देवांना मीं आल्याचें कळविलें. त्यावेळीं तेथें कृष्णार्जुन द्रौपदी व सत्यभामा एवढेच कायते होते. नरश्रेष्ठ कृष्णार्जुनांच्या अंगाला चंदन फासलें असून मधुर आसवाच्या गुंगींत उत्कृष्ट वस्त्रालंकार करून मालाधारी ते नाना आस्तरणांनीं मंडित अशा रत्नांनीं चित्रविचित्र केलेल्या पर्यंकावर पडले होते. भगवान श्रीकृष्णाचे पाय अर्जुनाच्या मांडीवर असून अर्जुनाचा एक पाय द्रौपदीच्या व एक सत्यभामेच्या अंगावर टाकले होते. तेथें असलेला सोन्याचा चौक त्यांनीं मला बसण्यासाठीं पुढें सारला. त्याला नुसता हात लावून मी खालींच बसलों. तो चौक माझ्यापुढें सारून अर्जुनानें आपला पाय मागें घेतांना त्या पायावर शुभलक्षणयुक्त ऊर्ध्वरेषा व इतर चिन्हें मला दिसलीं. शालवृक्षासारखें उंच ते श्यामवर्ण कृष्णार्जुन एका मंचकावर इंद्र व विष्णूप्रमाणें बिराजले होते. भीष्मद्रोणांच्या आधारावर व कर्णाच्या फुशारकीमुळें दुर्योधन मात्र त्यांना पूर्ण ओळखत नाहीं. ज्या धर्मराजाचे हे आज्ञांकित दास आहेत त्याचे सर्व हेतु सिद्धीस जाणार हें मला त्या वेळींच कळून चुकलें. असो. माझा यथोचित सत्कार केल्यावर माझा निरोप मीं त्यांना कळविला. तेव्हां भगवान श्रीकृष्ण इंद्रध्वजाप्रमाणें उठून बसून वक्त्यांमध्यें श्रेष्ठ त्या भगवानानें दिसण्यांत मृदु पण फारच उग्र, कौरवांना कांपरें भरविण्यासारखें असें मनाला आल्हादजनक व उपदेशपूर्ण भाषण सुरू केलें. तो ह्मणाला, 'संजया, जे कोणी वडील असतील त्यांना अभिवादन व लहानांना कुशल कळवून भीष्म द्रोणांसमक्ष तूं हा आमचा निरोप कौरवांना कळीव. 'तुमच्यावर आतां मोठा प्रसंग येऊन गुदरणार असल्यामुळें नानाप्रकारचे यज्ञ उरकून घ्या. त्याचप्रमाणें स्त्रीपुत्रसुखही यथेच्छ भोगून घेऊन संतती वैगेरे उत्पन्न करून ठेवा. धर्मराज जयश्रीची वाट पहात असून माझ्या मागें जी 'गोविंदा' ह्मणून द्रौपदीनें माझी करुणा भाकिली तें तिच्या ऋणाचें ओझें माझ्या डोक्यावर आहे. ज्याकडे केवळ दृष्टि फेकणें दुर्घट असें तेजस्वी गांडीव ज्याचें धनुष्य आहे त्या अर्जुनाबरोबर तुह्मीं वैर बांधलें आहे. एखाद्याला कालानें घेरल्यावांचून प्रत्यक्ष इंद्रसुद्धां माझें साहाय्य ज्याला आहे तो अर्जुन प्रतियोद्धा असावा अशी इच्छा करणार नाहीं. समरामध्यें अर्जुनाला जिंकण्याला जो समर्थ होईल तो ही पृथ्वी हातानें सहज उचलील, खवळला असतां सर्व प्रजा जाळून टाकील, व प्रसंगीं देवांनाही वरून खालीं आणील. एकट्या बहादरानें विराट नगरींत तुह्मां सर्वांना पळवून लावलें एवढी गोष्ट त्याच्या सामर्थ्यासंबंधानें खात्री पटण्याला पुरी आहे. बल, तेज, वीर्य, चपलता, हस्तलाघव, अनुद्विग्नता, इत्यादि गुण त्यासारखें इतरांमध्यें सांपडणें कठिण!' अर्जुनाचा हर्ष वाढवीत गंभीर शब्दांनीं असा निरोप श्रीकृष्णानें सांगितल्यावर श्वेतवाहन अर्जुनही त्याला अनुमोदन देऊन ह्मणाला, 'भगवान श्रीकृष्णाचें ह्मणणें सर्वथैव खरें होणार. धर्मराजाचा इष्ट वांटा तुह्मी देऊन न टाकाल तर ज्या महाभयंकर बाणांच्या परस्पर आघातानें उत्पन्न होणाऱ्या अग्नीचा धूर हाच होमधूर होऊन रथांच्या धावांचा घडघड आवाज हाच मंत्रघोष होईल, व त्या ठिकाणीं अस्त्रवीर्यानें पुढें सरसावणारें चाप स्रुवाचें काम करतील; याचा पूर्ण विचार करा.' हें संज-

यांचें भाषण ऐकून धृतराष्ट्र, याचा मनांत सारासार विचार करून उभय पक्षांचें बलाबल व पांडवांची दैविक व मानवी शक्ति त्याचप्रमाणें त्यांचें तेज व त्या मानानें आपल्या मुलांचा कमजोर लक्षांत घेऊन दुर्योधनाला ह्मणाला, 'बा दुर्योधना, सर्व भूतमात्रांचें आपल्या मुलावर अत्यंत प्रेम असतें ही गोष्ट केवळ अनुमानसिद्ध नसून मी तुला प्रत्यक्ष अनुभवसिद्ध सांगत आहें. उपकारासंबंधानें प्रायः हीच गोष्ट दिसून येते. आपलें कोणी प्रिय केलें असतां सज्जन त्याची पूर्णपणें फेड करूं इच्छितात. खांडवामधला उपकार आठवून अग्नि या भयंकर प्रसंगीं अर्जुनाला खात्रीनें साह्य करणार, व पितृप्रेमामुळें प्रसंगीं धर्मादि देवांचेंही त्यांना साह्य मिळणार आहे. भीष्मद्रोणादिकांच्या भीतीपासून त्यांचें संरक्षण करण्याच्या इच्छेनें ते विजेप्रमाणें खवळून जातील व याप्रमाणें त्यांना देवांचें साह्य मिळाल्यावर मनुष्याच्यानें त्यांकडे कसें पाहववणार? ज्याच्या दिव्य गांडिवाजवळ जातां येणें कठिण, अक्षय्य व उग्र अशा दिव्य बाणांनीं ज्याचे भाते नेहमीं भरलेले, धुराप्रमाणें ज्याची गति कोठें कुंठित नाहीं असा वानर ज्याच्या ध्वजावर, चतुरंग पृथ्वीवर ज्याच्या रथाच्या तोडीचा रथ नाहीं, मेघाप्रमाणें ज्याच्या रथाचा घडघडाट, विजेच्या गडगडण्याप्रमाणें ज्याच्या प्रत्यंचेचा टणत्कार, वीर्यामध्यें ज्याच्या तोडीचा कोणी नसून देवांचा देखील पराजय करण्याला जो समर्थ, व एका निमिषांत जो पांचशें बाण काढून सोडतो, त्या अर्जुनाची युद्धांत कोणी बरोबरी करणारा नाहीं असें भीष्मद्रोणादि उदासीन वृत्तीच्या मंडळीचें ठाम मत आहे. तेव्हां वीर्यानें कार्तवीर्यासारखा, इंद्र व विष्णु यासारखा पराक्रमी, महाधनुर्धारी अर्जुन ह्या मोठ्या रणकंदनामध्यें सर्वांचा फडशा उडवीत चालला आहे हेंच माझ्या डोळ्यांपुढें दिसत असून रात्रंदिवस कौरवांसंबंधाच्या काळजीनें डोळ्याला डोळा लागत नाहीं. त्यांबरोबर सख्य करून हें भांडण मिटवावें हें मला बरें दिसतें.' हें बापाचें भाषण ऐकून तापट दुर्योधन संतापून जाऊन ह्मणाला, 'राग, द्वेष, लोभ, क्रोध इत्यादि विकारांपासून मुक्त असल्यानेंच देवांना देवत्व आलें आहे. सामान्य मानवांप्रमाणें या विकारांना वश होऊन ते कोणतीही गोष्ट करीत नसतात. आतां अग्नि आदिकरून देव कामवश होऊन पांडवांचें साहाय्य करतील तर पांडव संकटात कदाचित् पडणार नाहींत. पण हे देव शमादि दैविक गुणांची नित्य इच्छा धरून असून कामक्रोधादि आसुरी गुणांना भीक घालणारे नव्हत. ते विकारवश होतील तर त्यांनींच घालून ठेवलेल्या नियमांनीं त्यांचें साहाय्य व्यर्थ जाणार आहे. शिवाय त्यांची तशी प्रवृत्ति होणार असती तर आज तेरा वर्षेपर्यंत पांडवांना कष्ट कां सोसावे लागते? शिवाय सर्व लोकांना जाळूं इच्छिणारा अग्नि मी अभिमंत्रण करण्याबरोबर शांत होत असतो; पृथ्वी किंवा पर्वत फाडूं लागले असतां अभिमंत्रणानें तें मी बंद पाडतों; तसेंच सर्व चराचरांच्या नाशाला प्रवृत्त झालेला पाषाण वर्षाव करणारा प्रचंड वाराही मी बंद पाडतों; मी स्तंभित केलेल्या पाण्यावरून रथ व पायदळ खुशाल जातात; याप्रमाणें दैविक व असुरी गोष्टींचा मी प्रवर्तक असून माझें तेज आपण पांडवांच्यापेक्षां कमी कां समजतां! सैन्यासहवर्तमान कांहीं कामासाठीं एखाद्या ठिकाणीं जाण्याचें माझ्या मनांत आल्याबरोबर माझे घोडे त्या दिशेनें चालूं लागतात. माझ्या राष्ट्रांत सर्पादि क्रूर प्राण्यांचीसुद्धां क्रूरता निघून गेली आहे. कारण मंत्रानें मीं सर्वांचा बंदोबस्त केला आहे. माझ्या प्रजेला वाटेल तेव्हां वाटेल तितका पाऊस मिळत असून अतिवृष्टि, अनावृष्टि इत्यादि संकटें माझ्या प्रजेवर येऊन गुदरत नाहींत, व ती सर्व धर्मनिष्ठ आहे. आजपर्यंत मीं कोणाचें वाईट करण्याचें मनांत आणल्यावर–मग तो मित्र असो किंवा शत्रु असो–तें कधींच फसलें नाहीं, किंवा अमुक एक होईल ह्मणून ह्मटलें असतां त्याच्या उलट कधीं झालें नाहीं. अमें माझें तेज असून माझ्यापुढें पांडवांचें काय चालणार? आतां हे उद्गार आपली खात्री करून देण्यासाठीं मला काढावे लागत आहेत. स्वतःची बढाई मिरविण्यासाठीं मीं ते काढले नाहींत. कारण आपली बढाई आपणच मिरविणें हें भल्याचें काम नव्हे. तेव्हां सर्व पांडवपक्षीयांसह त्यांचा नाश झालेला खात्रीनें आपल्या कानीं पडेल. नया समुद्राशीं भि-

ब्रह्मा असतां त्या त्यांतच गडप झाल्या पाहिजेत. माझी बुद्धि, माझें तेज, माझें वीर्य, माझी विद्या कमी नसून माझें योगसामर्थ्य विशेष आहे.' या दुर्योधनाच्या भाषणाला दुजोरा देऊन कर्ण ह्मणाला, 'माझी शुश्रूषा आणि पराक्रम यांनीं संतुष्ट झाल्यामुळें कपटानें ब्रह्मास्त्र त्यांपासून संपादन करण्यांत माझ्या हातून मोठा अपराध घडला असतां आपल्या उग्रतेजानें जाळून भस्म करण्यास समर्थ असूनही तुला अंतकालीं याची आठवण राहणार नाहीं एवढाच कालावधीचा गुरूनीं मला शाप दिला आहे. तेव्हां तो काल येईपर्यंत तीं अस्त्रें मजपाशीं अद्यापि कायम असल्यानें पांडवांना मारून मी आपल्या डोक्यावरील ओझें कमी करण्याला समर्थ आहें. निमिषमात्रांत गुरूंच्या प्रसादानें पांचाल, मत्स्य, पांडव प्रभृतींना शस्त्रानें मरून मिळणाऱ्या लोकांना पाठवीन. भीष्मद्रोणादिकांना उगीच जवळ असून मौज पहात राहूं दे.' ही बढाई ऐकून भीष्म ह्मणाले, 'कालानें तुझी बुद्धि नेल्यानें तुला उमग पडत नाहीं. तूं मेल्यानें सर्व धार्तराष्ट्र मेल्यासारखे आहेत. तेव्हां तूं आपली नीट खबरदारी घे ह्मणजे झालें. अर्जुनाचा प्रभाव तूं अद्यापि ओळखत नाहींस. महात्म्या महेंद्रानें तुला दिलेल्या शक्तीचा रणांत केशवाच्या चक्रानें केव्हांच चुराडा उडून जाणार आहे. नेहमीं मोठ्या काळजीनें पुजून ठेवलेल्या ह्या तुझ्या सर्पमुख बाणाचा अर्जुनाच्या हातून केव्हां नाश होईल याचा पत्तासुद्धां लागणार नाहीं. बाणासुर, नरकासुर प्रभृति दैत्यांचा, नाश करणारा, वासुदेव त्या अर्जुनाच्या पाठीवर आहे समजलास! ही निंदा ऐकून कर्णानें संतापून आपलीं शस्त्रें खालीं ठेवलीं व मी युद्धामध्यें भीष्मांच्या दृष्टीस पडणार नाहीं, विजयी होऊन येऊन सभेमध्येंच फिरून त्यांची गांठ घेईन,' याप्रमाणें प्रतिज्ञा करून सभा सोडून तो निघून गेला. तेव्हां भीष्म हासत हासत दुर्योधनाला ह्मणाले, 'कर्ण सत्यप्रतिज्ञ असल्यानें त्याला हा भार कसा सहन होणार! आतां व्यूहावर प्रतिव्यूहाची योजना करून भीम सर्व लोकांचा फडशा कसा उडवितो हें तरी पहा. ज्यावेळीं त्या पवित्र भगवान रामांपाशीं मी ब्राह्मण आहें असें सांगून त्यानें कपटानें अस्त्र मिळविलें तेव्हांच त्याचा धर्म व तप लयाला गेलीं आहेत.' हें भीष्मांचें उपरोधिक भाषण ऐकून दुर्योधन संतापून ह्मणाला, 'आह्मां सर्वांचाच मनुष्ययोनींत जन्म झाला आहे. वीर्य, पराक्रम, वय, बुद्धि, विद्या, अस्त्रें, लाघव, कौशल्य या सर्वांमध्यें आह्मी सारखे असून दोघांकडे वीरही समसमान आहेत. शिवाय द्रोण, कृप, बाल्हीकादिकांवर अवलंबून कांहीं मीं हें काम हातीं घेतलें नाहीं. मी, कर्ण, व दुःशासन हे तिघे पांडवांना मारण्याला समर्थ आहों. पारधी ज्याप्रमाणें जाळ्यामध्यें मृगांना अडकवितो त्याप्रमाणें माझे सैनिक जेव्हां कृष्णासह त्या पांडवांना घेरतील तेव्हां त्यांचें नाक खालीं होईल.' ही गर्वोक्ति ऐकून विदुर ह्मणाले, 'पुढील परिणाम पूर्ण पाहणाऱ्या वृद्धांनीं जें कल्याणप्रद असेल तेंच बोलावें. दम हा सनातन धर्म असून ज्या पुरुषाच्या दान, तप, वेदाध्ययन, ज्ञान या गुणांमागून हा असतो त्यालाच दानफल व क्षमा प्राप्त होतात. याच्या योगानें तेजाची वृद्धि होऊन पुरुष धूतपाप होऊन ब्रह्म मिळवितो. हिंस्रपशूपासून ज्याप्रमाणें भूतमात्रांना भीति वाटत असते त्याप्रमाणें अजितेंद्रियापासून सर्वांना भीति उत्पन्न होत असून अशासाठींच विधात्यानें क्षत्रिय जाति निर्माण केली आहे. चारी आश्रमांमध्यें श्रेष्ठव्रत मानलेल्या दमाचें लक्षण पुढें दिल्याप्रमाणें आहे. क्षमा, धैर्य, अहिंसा, समता, सत्य, सरळपणा, इंद्रियांवर पगडा, धीर, मृदुता, लज्जा, स्थिरपणा, औदार्य, शांतवृत्ति, संतोष, श्रद्धालुपणा हीं दमाचीं मुख्य लक्षणें असून काम, लोभ, गर्व, क्रोध, सुस्ती, आत्मस्तुति, अहंपणा, ईर्ष्या, शोक, कुटिलता, कपट इत्यादि गुण दमपर मनुष्याचे ठिकाणीं नसतात. तो निर्लोभ व थोडक्यांत संतुष्ट असून विषयांकडे लक्ष देत नाहीं. तो समुद्राप्रमाणें गंभीर असतो. सदाचारी, सुशील, प्रसन्न अशा त्या विद्वानाला आत्मज्ञान होऊन इहलोकीं मान मिळून परलोकीं उत्तम गति मिळते. ज्यापासून कोणाला भीति वाटत नसून ज्याला कोणाची भीति वाटत नाहीं असा परिपक्व बुद्धीचा मनुष्य सर्वांबरोबर मित्रत्वानें वागून पूर्व कर्मफलावरच संतुष्ट राहून शांतपणें सदाचारांत

दिवस घालवितो. असा जितेंद्रिय पुरुष अपरोक्ष ज्ञानावरच संतुष्ट असून कायावाचामनानें कांहीं कर्म न करतां कालाची वाट पहात राहून ब्रह्मस्वरूप होण्याला पात्र होतो. आकाशामध्यें ज्याप्रमाणें पक्ष्यांचीं पाउलें उमटलेलीं दिसत नाहींत त्याचप्रमाणें या विशिष्ट ज्ञानानें तृप्त झालेल्या मुनीचा मार्ग दृग्गोचर होत नसतो. अशा मोक्षमार्गाचें अवलंबन करणाऱ्यासाठीं बरतीं अक्षय्य व तेजोमय लोक तयार आहे. जुने लोक अशी एक गोष्ट सांगतात कीं, एका पारध्यानें पक्षी पकडण्याठीं एक जाळें जमिनीवर पसरून ठेविलें. एकजुटीनें फिरणारे दोन पक्षी त्यांत सांपडले. परंतु ते दोघे मिळून तें जाळें घेऊन उडून गेले. तेव्हां तो पारधी खिन्न होऊन त्यांच्या मागून धांवूं लागला. त्याला त्याप्रमाणें धांवतांना पाहून आन्हिक आटोपून आश्रमांत बसलेल्या एका ऋषींनीं 'त्या आकाशांतून उडणाऱ्या पक्ष्यांच्या मागून तूं कां धांवत आहेस.' ह्मणून त्याला विचारलें. तेव्हां तो पारधी ह्मणाला, 'हे एक विचारानें उडत आहेत ह्मणून माझ्या जाळ्यासकट उडण्याला समर्थ आहेत. पण हे दोघे जेव्हां आपसांत भांडूं लागतील तेव्हां खात्रीनें माझ्या तावडींत येतील,' पुढें कालाच्या घेऱ्यांत सांपडलेले ते पक्षी आपसांत भांडूं लागून जमिनीवर पडले व त्या पारध्याच्या हातांत सांपडले. ह्याप्रमाणें ज्ञातीचे लोक जेव्हां अर्थलोभानें परस्परांशीं भांडूं लागतात तेव्हां ते ह्या पक्ष्यांप्रमाणें शत्रूच्या तावडींत जातात. एकत्र भोजन करणें, एकत्र जुळून गोष्टी करणें, कुशल प्रश्न विचारणें व परस्परांच्या गांठी घेणें हीं ज्ञातीचीं कर्तव्यें होत. परस्परांबरोबर विरोध करणें नव्हे. शुद्ध मनानें प्रसंगीं जे बृद्धसेवा करतात त्यांच्यापुढें सिंहानें रक्षण केलेल्या वनाप्रमाणें शत्रूचें कांहीं चालत नाहीं. नेहमीं अर्थप्राप्तीकडे लक्ष ठेवून जे क्षुद्राप्रमाणें वागतात ते आपलें वैभव शत्रूच्या स्वाधीन करतात. जळक्या लांकडाप्रमाणें ज्ञाती वेगळे झाले असतां धुमसूं लागतात. तेच एकत्र जुळले ह्मणजे जोरानें पेटतात. एका पर्वतावर आणखी एक गोष्ट माझ्या दृष्टीस पडली ती ऐक. किरात व तंत्रमंत्र व औषधी साधनें जाणणारे देवसुल्य ब्राह्मण यांसह एके वेळीं आम्ही सिद्धगंधर्वांनीं सेवित अशा लतावेलींनीं भरलेल्या उत्तरेकडील गंधमादनावर गेलों असतां एका अवघड कड्यावर माशांनीं फुलांतून मध गोळा करून ठेवलेला आमच्या दृष्टीस पडला. कुबेराला तो फार प्रिय असल्यानें मोठमोठे सर्प त्याचें संरक्षण करीत होते. शिवाय मर्त्यांना अमरत्व, अंधांना डोळे व वृद्धांना तारुण्य आणण्याचा त्याच्या अंगीं गुण असल्यानें किरातांना त्याचा लोभ सुटून तो मिळविण्याच्या खटपटींत कड्यामध्यें ते नाश पावले. त्याप्रमाणें एकट्यालाच ही सर्व पृथ्वी असावी असा लोभ सुटलेल्या तुझ्या मुलाला मध तेवढा दिसत आहे, पण कडा दिसत नाहीं ! अर्जुनापुढें आजपर्यंत कोणाचें चालल्याचें मला ठाऊक नाहीं. द्रुपद, मत्स्य, विराट व रागावलेला अर्जुन हे समरामध्यें वाऱ्याची जोड मिळालेल्या अग्नीप्रमाणें कांहीं देखील बाकी ठेवणार नाहींत.' हें विदुरांचें भाषण ऐकून धृतराष्ट्रानें फिरून दुर्योधनाची कानउघाडणी करण्याचा प्रयत्न केला. तो ह्मणाला, 'दुर्योधना, अनाडी वाटसराप्रमाणें सरळ वाट सोडून वांकड्या वाटेला लागूं नकोस. पांडवांचें तेज हरण करण्याची तुझी खटपट लोकांना आधारभूत पंचमहाभूतांचें तेज हरण करण्याच्या खटपटीसारखी आहे. धर्मनिष्ठ युधिष्ठिराला जिंकण्याच्या तुझ्या हावेनें तूं खास ठार बुडणार. भीमार्जुन, धृष्टद्युम्न व सात्यकि खास तुझ्या सैन्याचा सत्यानाश करणार. त्रैलोक्यांत ज्याच्या बरोबरीचा कोणी नाहीं अशा कृष्णाशीं युद्ध करण्याला कोण शहाणा उठेल ? व ह्या कृष्णाला स्त्री, आप्त, बांधव, हे सर्व एकीकडे व अर्जुन एकीकडे आहे. ह्मणून विराटनगरींत अर्जुनानें उडविलेल्या तुमच्या फाजितीकडे लक्ष देऊन भीष्म, द्रोण, कृप, विकर्ण, बाल्हीक यांच्या विचाराला मान देऊन पांडवांना अर्धं राज्य देऊन युधिष्ठिराचा गौरव कर.' हा उपदेश जेव्हां दुर्योधनाला रुचला नाहीं तेव्हां सभेंतील प्रमुख प्रमुख मंडळी उठून चालती झाली. नंतर पांडवांचें लढाऊ व फालतु सैन्य किती आहे हें सर्व कळून घेण्याच्या इच्छेनें धृतराष्ट्रानें संजयाला फिरून खोडून प्रश्न सुरू केले असतां संजय ह्मणाला, 'महाराज, आपल्या एक-

व्यापुढें या गोष्टी सांगितल्या असतां आपल्या मनांत मत्सर पेट घेईल ह्मणून व्यास महाराज व देवी गांधारी यांना बोलावून घ्या; म्हणजे त्यांच्या समक्ष मी आपल्याला सर्व सांगेन.' नंतर धृतराष्ट्रानें गांधारीला बोलावून घेतलें व त्याची इच्छा जाणून व्यासही तेथें आले, तेव्हां व्यासांच्या आज्ञेनें संजय ह्मणाला, 'हे दोन्ही ईश्वरांश महामान्य धनुर्धारी कृष्णार्जुन कारणाशिवाय ह्या भूतलावर अवतरले नाहींत. ह्या वासुदेवाचें इच्छेनें फेकलेलें चक्र आसपास बाव जागा सोडून मायेनें फिरत असतें. पांडवांचें सारासार बल किती आहे हें जाणण्याची आपल्याला मोठी उत्सुकता दिसते, तर मी सांगतों कीं, हें एकटें चक्र सर्व कौरवांचा फडशा उडविण्याला पुरें आहे. हें तेजःपुंज चक्र हातांत घेऊन व महाबलशाली माधवानें शंबरासुर, कंस, शिशुपाल प्रभृतींना मारलें. हा विशिष्टात्मा पुरुषोत्तम केवळ आपल्या इच्छेनेंच पृथ्वी, अंतरिक्ष व आकाश आपल्या ताब्यांत घेण्याला समर्थ आहे. सर्व जग एकीकडे व हा जनार्दन एकीकडे. केवळ इच्छामात्रेंकरून हा हें सर्व जग भस्म करण्याला समर्थ आहे. परंतु सर्व जग जरी एकवटलें तरी तें त्याला भस्म करण्याला समर्थ नाहीं. सत्य, धर्म, अकार्य करण्याची लाज व सरळपणा ह्या गोष्टी जेथें तेथें हा जनार्दन व जेथें हा जनार्दन तेथें जय हें ठरले आहे. केवळ मौजेनें यानें सर्व विश्वाचा व्यापार चालविला आहे. ह्या पांडवांच्या मिषानें अधर्मात गढलेल्या आपल्या मुलांना हा जाळूं इच्छित आहे. हा आपल्या मायेनें हें कालचक्र, जगच्चक्र व युगचक्र सतत फिरवीत आहे. काल, मृत्यु व सर्व चराचर यांचा स्वामी असूनही धाव्याची वाढ करणाऱ्या शेतकऱ्याप्रमाणें लोकांना कित्ता घालून देण्यासाठीं हा कर्म करीत असतो. यामुळें ह्या त्याच्या मायेनें लोक फसत असतात. पण जे याला शरण जातात ते मोहजालांत सांपडत नाहींत. ज्ञानहीन असा अज्ञानतमानें अंध झालेला पुरुष याला ओळखीत नाहीं. तिन्ही युगांमध्यें असणारा हा स्वतःसिद्ध देव भूतांचा उत्पत्तिलय करणारा आहे हें ज्ञानवानच जाणतात. कपटभाव न धरतां किंवा दांभिक धर्म न पाळतां शुद्धभावानें भक्ति ठेविली असतां याचें खरें ज्ञान होतें.' हें संजयाचें भाषण ऐकून 'संजय आपल्या हिताची गोष्ट सांगणारा असल्यानें बा दुर्योधना, तूं कृष्णाला शरण जा,' ह्मणून धृतराष्ट्र दुर्योधनाला फिरून ह्मणाला असतां दुर्योधन ह्मणाला, 'अर्जुनाशीं आपल्या सरख्याची टिमकी बाजवीत हा जर सर्व लोकांना मारण्यालाच निघाला असेल तर त्यापुढें नाक घासण्यांत तरी काय अर्थ आहे?' हा त्याचा हट्ट पाहून गांधारी ह्मणाली, 'ऐश्वर्याचा लोभ सुटल्यानें तुझें काळीज दुष्ट बनलें आहे. थोरांचें ह्मणणें तूं बिलकुल ऐकत नाहींस. भीमसेनाचा तडाका बसून ऐश्वर्य, जीवित, वडील व मी या सर्वांना सोडून जाण्याची पाळी येऊन तुझ्या वैऱ्यांना आनंद व मला दुःख देण्याची पाळी येईल, तेव्हां वडिलांच्या ह्या ह्मणण्याची तुला आठवण होईल.' हा सर्व प्रकार पाहून व्यास ह्मणाले, 'बा धृतराष्ट्रा, हा संजय श्रेष्ठ अशा पुराणपुरुषाला पूर्ण ओळखतो आहे. एकाग्रमनानें तूं ह्याचें भाषण ऐकशील तर तो तुला मोठ्या संकटांतून सोडवील. राग, आनंद, इत्यादि विकारांनीं ग्रासून गेलेले लोक आपल्या जवळ असलेल्या द्रव्यावर संतुष्ट रहात नाहींत व लोभानें मूर्ख बनून जाऊन आंधळ्या वाटाड्याच्या मागून जाणाऱ्या आंधळ्याप्रमाणें स्वकर्मानुरूप ते यमाच्या तावडींत जातात. शहाणे लोक ज्या मार्गानें जातात तोच तेवढा खरा मार्ग होय. थोर लोक तोच दृष्टीपुढें ठेवून संसारांत बिलगून न राहतां मृत्यूला मागें सारतात.' पुढें 'ज्या मार्गानें हृषीकेशाकडे गेलें असतां त्यांत खास सिद्धि मिळेल असा मार्ग मला सांग,' ह्मणून धृतराष्ट्रानें विचारलें असतां संजय ह्मणाला, 'ज्यांनीं मनोनियह केला नाहीं आशांना ह्या वशी केशवाचें ज्ञान होणें शक्य नाहीं. तो मिळण्यासाठीं इंद्रियनिग्रहाबांचून केलेले क्रियादि उपाय फुकट आहेत. इंद्रियें अनावर झालीं असतां हुशारीनें राहून त्यांच्या वासना न पुरविणें व वागण्यांत न चुकतां कोणाला न दुखविणें हेंच ज्ञानप्राप्तीचें खात्रीचें साधन आहे. मन इकडे तिकडे धांवूं लागलें असतां त्याला आवरून धरणें या इंद्रियधारणेलाच ब्रह्मवेत्ते ज्ञान ह्मणतात; व शहाणे लोक त्याच मार्गानें जातात. इंद्रियनिग्रह केल्यावांचून मनुष्यांना के-

शव कधीं मिळावयाचा नाहीं. वेदान्त व योग यांच्या साधनांनीं निग्रही पुरुष तत्त्व ओळखून आनंद पावतो. ह्या केशवाच्या पवित्र नांवाचा निर्देश मीं ऐकला आहे त्यासंबंधानें माझ्या अल्प ज्ञानाप्रमाणें मी आपल्याला सांगतों ऐका. कारण तो अप्रमेय असल्यानें त्याचें पूर्ण वर्णन देतां येणें शक्य नाहीं. सर्व भूतांना तो मायेमध्यें गुरफटून टाकीत असल्यामुळें, त्याच्या अलौकिक तेजामुळें व देवांना तो आधार व आश्रय असल्यामुळें त्याला **वासुदेव** ह्मणतात. त्याच्या सर्वव्यापकत्वामुळें त्याला **विष्णु** हें नांव आहे. मौन, ध्यान व योग हीं याच्यामध्यें दिसून येत असल्यामुळें याला **माधव** म्हणतात. हा सर्व चोवीस तत्त्वांनीं परिपूर्ण असून मधु दैत्याला मारणारा असल्यामुळें याला **मधुसूदन** हें नांव आहे. **कृषि** हा शब्द सत्तावाचक असून **ण** हा शाश्वत सुखवाचक आहे ह्मणून या सात्वत कुलोत्पन्नाला **कृष्ण** हें नांव मिळालें आहे. **पुंडरीक** हें याचें नित्य, अक्षय्य व अविनाशी राहण्याचें ठिकाण असल्यामुळें याला **पुंडरीक** व चोरांना हा पीडा देणारा असल्यामुळें याला **जनार्दन** ह्मणतात. हा कधीं सत्वगुणापासून निराळा नसून सत्वगुणही कधीं याला सोडून असत नाहीं ह्मणून याला **सत्वत** व **सात्वत** म्हणतात. हा वेदज्ञेय असल्यामुळें याला **वृषभेक्षण** ह्मणतात. या सर्व सैन्याला जिंकणाऱ्याला जन्म नसल्यामुळें **अज** हें नांव आहे. हा निग्रही असून देवांमध्यें स्वयंप्रकाश असल्यामुळें ह्याला **दामोदर** नांव आहे. हर्ष, सुख व सुखाचें स्वामित्व याजकडे असल्यामुळें याला **हृषीकेशत्व** आलें आहे. आपल्या बाहूंनीं हा स्वर्ग व पृथ्वी धारण करीत असल्यामुळें याला **महाबाहु** ह्मणतात. कधी हा अधोगतीला जात नसल्यामुळें याला **अधोक्षज** व लोकांचा आधारभूत असल्यानें याला **नारायण** ह्मणतात. हा सर्व कांहीं पूर्णत्वाला आणून लयाला नेणारा असल्यामुळें याला **पुरुषोत्तम** ह्मणतात. सर्व स्थूल व सूक्ष्म जगाचा हा उत्पत्ति व लय त्यांचें स्थान असून याला सर्वांचें ज्ञान असल्यामुळें याला **सर्व** ह्मणतात. हा सत्याच्या आधारावर असून सत्य याच्या आधारानें आहे व सर्व सत्यांहून हा श्रेष्ठ सत्य आहे ह्मणून याला **सत्य** हें नांव आहे. याला विक्रमशीलत्वामुळें **विष्णु** व जयनशीलत्वामुळें **जिष्णु** ह्मणतात. हा शाश्वत असल्यामुळें याला **अनंत** ह्मणतात व सर्व प्रकारचें शब्दज्ञान याला असल्यामुळें **गोविंद** ह्मणतात. खोट्याला खऱ्याप्रमाणें भासवून हा जगाला मोह पाडतो. अशा प्रकारचा धर्मनित्य मधुसूदन कौरवांचा नाश न व्हावा म्हणून येथें येणार आहे.' हें ऐकून धृतराष्ट्र म्हणाला 'दिव्य देहानें झळकत माझ्या मुलांना मोह पाडणारा, सर्व दिशा व उपदिशा प्रकाशमान करणारा व शत्रूंना ईर्षेला पेटवून त्यांचा नाश करून यश हरण करणारा यादवश्रेष्ठ येथें येऊन संजयांना कल्याणप्रद, भारतांना सन्माननीय, अभ्युदयेच्छु पुरुषांना ग्राह्य व मरणोन्मुखांना न रुचणारें असें दोष ठेवण्याला जागा नाहीं अशा प्रकारचें भाषण करीत असतां जे येथें जमलेले कौरव त्याला डोळे भरून पाहतील अशांना त्यांच्या डोळसपणाबद्दल मी धन्य मानतों. असो. हा जो ऋषी, पुराणज्ञानी, वाग्भांडार, यतींना सुलभ, जगाचा आधारभूत, सहस्रशीर्ष, आदिमध्यांतरहित, मोठा कीर्तिमान, व बीजारोपण करणारा, या पुराणपुरुषालाच मी अनन्यभावानें शरण आहें.'

१३३ भगवानाचें शिष्टाईसाठीं प्रयाण. (५. ७१–८३)

इकडे संजय परत गेल्यावर सर्व सात्वतांमध्यें श्रेष्ठ श्रीकृष्णाला युधिष्ठिर ह्मणाला, 'हे मित्रवत्सला, तुझ्या मित्रांना संकटांतून उद्धरण्याची आतां वेळ येऊन ठेपली आहे. ह्या संकटांतून आम्हांला वर काढणारा तुझ्यावांचून मला दुसरा कोणी दिसत नाहीं. तुझ्या आश्रयानेंच आम्ही निर्भय असून गर्वानें फुगून गेलेल्या दुर्योधनाशीं युद्ध करूं इच्छितों. ज्याप्रमाणें वृष्णींचें सर्व संकटांत तूं रक्षण करतोस त्याचप्रमाणें ह्या मोठ्या संकटांतून पांडवांचें रक्षण तुझ्या हातूनच झालें पाहिजे,' भगवान म्हणाला, 'हे महाबाहो, तूं सांगशील तें करण्याला हा मी तयार आहें. तुझ्या मनांत काय आहे बोल.' युधिष्ठिर ह्मणाला, 'धृतराष्ट्राच्या व त्याच्या मुलां-

च्या मनांत काय आहे तें संजयानें सांगितलेलें तूं ऐकलेंच आहेस. त्याच्या सांगण्यावरून धृतराष्ट्राचें हृदय उघड झालें आहे. कारण भलतेंसलतें सांगणारा दूत वध्य होत असल्यामुळें दूत जशाच्या तसाच निरोप कळवीत असतो. हा लोभी स्वतःला साजेलसें न वागतां पापबुद्धि धरून राज्य न देतां सख्य जुळवून आणण्याचा घाट घालीत आहे! हे पुढें संकेताप्रमाणें वागतील या आशेनें संकेत पाळून आह्मीं बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास काढला हें ब्राह्मणांनाही ठाऊक आहे. ह्या लोभी राजाला स्वधर्म दिसत नाहीं व पुत्रलोभानें पूर्णपणें त्याच्या आधीन होऊन त्या मूर्खाच्या नादानें हा वागत आहे. दुर्योधनाच्या सल्लूचानें वागून यानें आमच्याशीं कपट मांडलें आहे. बा जनार्दना, आपल्या मातेची व मित्रांचीसुद्धां योग्य रीतीनें मला काळजी घेतां येत नाहीं, याहून अधिक दुःखकारक काय असलें पाहिजे? काशी, चेदी, पांचाल व मत्स्य ह्या राजांचा तसाच तुझा पाठिंबा असताही मीं अविस्थल, वृकस्थल, माकंदी, वारणावत व आणखी एखादें पांचवें अशीं पांच गांवें किंवा पांच नगरें भरतांचा फुकट उच्छेद होऊं नये ह्मणून राहण्यासाठीं मागितलीं. पण तो दुरात्मा सर्वांचा आपणच मालक आहों अमें समजून तींही देण्याला कबूल नाहीं. तेव्हां यापेक्षां वाईट गोष्ट आणखी काय असली पाहिजे? उत्तम कुलांत जन्म झालेला वृद्ध पुरुष दुसऱ्याच्या द्रव्याची हाव धरूं लागला असतां लोभानें त्याची बुद्धि जाते. बुद्धि गेली असतां भीडभाड बाजूला राहते, भीडभाड गेल्याबर धर्मावर गदा येते; धर्मावर गदा आल्यानें वैभवाला मनुष्य मुकतो; व तो वैभवहीन झाला ह्मणजे त्याचा नाश होतो. पुरुषाजवळ द्रव्य नाहींसें झालें असतां ज्ञाती, मित्र व द्विज पक्षी ज्याप्रमाणें फलपुष्पहीन वृक्षाला सोडून जातात त्याप्रमाणें त्याजपासून दूर होतात. मृतप्राण्याला प्राण जसे सोडून जातात तसे पतिताप्रमाणें आप्त मला सोडून जात आहेत हें मरणच नव्हे काय? ज्या अवस्थेमध्यें आजच्या किंवा उद्यांच्या पोटाची सोय डोळ्यांपुढें दिसत नाहीं त्याहून वाईट स्थिति दुसरी नाहीं असें शंबराचें मत आहे. पैसा हाच काय तो श्रेष्ठ धर्म असून सर्व काय तें त्यावर अवलंबून आहे. ह्या जगांत पैसे असणाराच जिवंत असून निर्धन मनुष्य मेल्यासारखा आहे. जे आपल्या मनगटाच्या जोरावर दुसऱ्याचा पैसा बुचाडून घेतात ते त्याबरोबर त्याच्या धर्मार्थकामालाही चिरडून टाकतात. अशी स्थिति आल्यावर कोणी मृत्यु पतकरला आहे, कोणी ग्राम तर कोणी वन स्वीकारलें आहे व कोणी अंगाला राख फांसून देशांतरीं नाश पावले आहेत. कांहीं वेडे बनले आहेत. कांहीं शत्रूच्या तावडींत गेले आहेत व कांहीं पैशासाठीं दुसऱ्याचे गुलाम बनले आहेत. संपत्ति ही धर्मार्थांचें मुख्य साधन असल्यानें निरुद्यावस्था हें मनुष्याला मरण आहे. स्वाभाविक रीतीनें येणारें मरण हा नेहमींचा राजमार्ग आहे. कारण, तें कोणालाही टाळतां येत नाहीं. उत्तम संपत्ति मिळून सुखांत बाढल्यावर ती नाहींशी झाल्यानें मनुष्याला जें दुःख होतें तें स्वभावतः निर्धन असणाराला होत नाहीं. असा मनुष्य आत्मदोषानें मोठी निकृष्ट दशा आली असतां इंद्रादि देवांनाही दोष देऊं लागतो पण आपल्याला कधीं दोष लावून घेत नाहीं. आणि यांचें दुःख कमी करावयाला अनेक शास्त्रांचासुद्धां कांहीं उपयोग होत नाहीं. तो नोकरांवर रागावतो, मित्रांचा हेवा करूं लागतो, व याप्रमाणें रागाच्या तावडींत जाऊन वेडा बनतो; व वेडांत भलतेंसलतें करण्याला तयार होतो व याप्रमाणें संकराला मदत करतो. संकर हा पापकर्माचा कळस असून नरकाला साधन आहे, ह्मणून हा वेळेवर जागा न होईल तर नरकाला जातो. ज्ञान हीच त्याची जागृति असून प्रज्ञाचक्षु त्यांतून तरून जातो. ज्ञान झालें असतां तो शास्त्र पाहूं लागतो, व शास्त्राकडे लक्ष लागलें असतां फिरून धर्माकडे त्याची प्रवृति होऊन अकार्यापासून तो मागें फिरतो. अकार्यापासून निवृत्त झालेला पुरुष पापाचा द्वेष करूं लागून त्याचें वैभव वाढतें. मनुष्य जोंपर्यंत श्रीमान आहे तोंपर्यंतच पुरुष या संज्ञेला तो पात्र असतो. धर्मनिष्ठ पुरुषाचें मन शांत राहून नेहमीं आपल्या कर्तव्यांत तो दक्ष असल्यानें अधर्माकडे त्याची बुद्धि न जातां पाप करण्याला तो प्रवृत्त होत नाहीं. अकार्य करणारा मूर्ख स्त्री अगर पुरुष ह्मणण्याला पात्र न-

सतो व याला धर्मांत अधिकार पोहोंचत नाहीं. तो शूद्रासारखाच समजला पाहिजे. अकार्य करण्याची ज्याला लाज वाटते तो देव, पितर, यांचा व स्वतः-चा बचाव करून मोक्ष मिळवितो. हेंच पुण्यक-र्माचें उत्कृष्ट फल होय. तेव्हां मीं राज्यापासून भ्रष्ट होऊन दिवस कसे काढले हें तूं प्रत्यक्ष पहात आ-हेस; व आतां कोणत्याही न्यायानें संपत्तीला मुकणें आह्मांला वाजवी नसून त्यासाठीं झटत असतांना प्राण गेले तरी हरकत नाहीं. तरी दोघांमधील वैर नाहींसें होऊन सलोख्यानें दोघांनीं या संपत्तीचा उपभोग घ्यावा हें आह्मांला अधिक संमत आहे. आतां कौरवांना मारून जे आह्मी राज्य घेणार ह्मणतों ही क्रूर कर्माची परमावधिच आहे ह्मटलें पा-हिजे. ज्यांचा कांहीं संबंध नसून जे अनार्य शत्रू अस्मतात त्यांना सुद्धां मारणें दृष्ट नाहीं. मग ज्यां-चा अशा प्रकारचा संबंध आहे त्यांना कसें मारावें? त्यांमध्यें आमचे पुष्कळ ज्ञातीचे, साहाय्यकर्ते व गुरू आहेत. तर त्यांना मारणें अत्यंत पापमूलक आहे. हा क्षात्रधर्म मोठा वाईट असून आमचा तर या दुष्ट क्षात्रकुलांत जन्म झाला आहे: आणि तो आमचा स्वधर्म अधर्ममय असला तरी दुसरा धर्म पतकरणें नित्य समजलें आहे. शूद्र सेवा करून रा-हतो, वैश्य व्यापारावर राहतो, ब्राह्मणानें भिक्षापात्र पसंत केलें आहे, परंतु आमच्या नशीबीं मात्र दु-ष्ट्यांला मारून उपजीविका करण्याचें ठेवलें आहे! क्षत्रिय क्षत्रियाला मारतो, मासा माशावर राहतो व कुत्रा कुत्र्याला मारतो; तेव्हां हा परंपरा-गत धर्म कसा आहे पहा! युद्धामध्यें नेहमीं वैर माजून प्राणहानि होत असते. असें आहे तरी नी-तिबलाबर मी युद्ध करणार. आतां प्राणिमात्रांचें जीवित किंवा मरण ज्याप्रमाणें त्यांच्या इच्छेवर अवलंबून नाहींत त्याप्रमाणें जय किंवा पराजय हेही इच्छेवर अवलंबून नाहींत. इतकेंच नव्हे तर मनुष्याला सुखदुःखें सुद्धां वेळ आल्यावांचून मि-ळाण्याचीं नाहींत. कधीं एकटा पुष्कळांना मारूं शकतो. कधीं पुष्कळ एकट्याला मारतात. कधीं भित्रा शूरला मारतो, कधीं अयशस्वी यशस्वी पुरुषाला मारतो. युद्धामध्यें दोघांचा जय किंवा दो-घांचा पराजय कधीं होत नाहीं. बरें पराभवाच्या भीतीनें माघार घेतली तरी अलौकिक, द्रव्यहानि व त्यावरोबर प्राणहानि आहेतच. युद्ध हें सर्वस्वीं पापमूलक आहे. युद्धांत दुसऱ्याला मारणारा स्वतः उलट मारला जाणार नाहीं अशी काय हमी आहे? व आपण मेल्यावर मरणाराला जय व पराजय सा-रखेच आहेत. दुसरें, पराजय हा मरणाहून कमी नाहीं. बरें ज्याला जय येतो त्याचीही खराबी व्हा-वयाचीच; व तो स्वतः जिवंत निभावला तरी दु-सरे कोणी त्याच्या आवडत्या आप्तांना मारणारच; व ह्याप्रमाणें बलहीन होऊन मुलगे व भा-ऊ यांना मुकल्यावर त्याला सर्व वस्तूचा व जीवि-ताचा सुद्धां वीट वाटूं लागतो. धैर्यवान, भिडस्त अशा परदुःख ओळखणाऱ्यांचाही युद्धांत नाश होत असतो. शत्रूला मारणें देखील पश्चात्तापाला व परि-णामीं दुःखाला कारण होतें. व किती केलें तरी शत्रू कांहीं शिल्लक राहतातच. व हे बाकी राहिलेले शत्रू साहाय्य मिळवून आपली बाकी ठेवीत नाहींत. वै-राग्नि शमविण्यासाठीं पूर्ण फडशा पाडण्याला ते झट-त असतात. जयानें वैर सुरू होतें. व पराजय झाले-ल्याला दुःखांत दिवस कंठावे लागतात. मात्र जया-पजयाची पर्वा न करणारा स्वस्थपणें सुखांत झोंप घेतो. ज्याला वैरी उत्पन्न झाला आहे अशा मनु-ष्याच्या मनाला कधीं स्वस्थता नसून घरांत साप अमल्याप्रमाणें तो नेहमीं चिंतेत असतो. बरें जो शत्रूचा पूर्ण फडशा उडवितो तो लौकिकाला मुकून लोकांमध्यें त्याची कायमची अपकीर्ति होते. पुष्क-ळ दिवस लोटले तरी वैर कधीं शमत नाहीं. कुलांत पुरुष जिवंत असला ह्मणजे गतगोष्टी सांगून वैर पे-टवून देणारे लोक भेटतात. वैरानें वैर कधीं शमत नसून तूप ओतलेल्या अग्नीप्रमाणें तें अधिकच पेट घेतें. ह्मणून नाश करण्याच्या हेतूनें छिद्र बघत ब-सणारांपैकीं एकाचा पूर्ण बीमोड झाल्याखेरीज कधीं शांति व्हावयाची नाहीं; व नेहमीं एकमेकांचें छिद्र बघत बसणारांना छिद्र मिळाल्यावांचूनही रहावया-चें नाहीं. आपल्या मनगटाच्या जोराची धमक हा-च मानसिक रोग त्याच्या हृदयाचा सोबती बनून राहतो व त्याला सोडल्यावांचून किंवा मरणावांचून शांतीचें नांव मिळत नाहीं. आतां कदाचित् शत्रूचा बीमोड करून झळझळीत वैभव मिळालें ह्मणून

काय त्याला क्रूर कर्म समजावयाचें नाहीं ? बरें राज्य सोडून देऊन जी शांति मिळणार ती आपला सर्वस्वीं घात करून आणखी शत्रूच्या नेहमीं संशयाला कारणीभूत होत असल्यानें मरणासारखीच आहे. ह्मणून राज्य सोडण्यालाही आमचें मन घेत नाहीं व कुलक्षय व्हावा अशीही पण इच्छा नाहीं. ह्मणून या स्थितींत थोडी पड घेऊन सख्य जुळेल तर बरें. आतां युद्धाचा प्रसंग न यावा ह्मणून होईल तेवढी समेटाची खटपट करीत असतां ती फसेल तर युद्ध केलेंच पाहिजे व त्यांत पराक्रमही पण गाजविला पाहिजे. सामोपाय फसला असतां भयंकर प्रसंग ओढवतो व त्यामध्यें कुत्र्याच्या झटापटीचीं सर्व लक्षणें शहाण्यांच्या दृष्टोत्पत्तीस येत असतात. शेपटी ह्मालविणें, गुरगुरणें, एकमेकांच्या अंगावर भोंकणें, लोळण घेणें, दांत विचकणें इत्यादि पूर्व विधीनंतर सामन्याला सुरवात होते; आणि मग दोघांत जो बळी ठरेल तो दुसऱ्याचा तुकडा हिसकाबून घेऊन खात बसतो. बलवानांनीं दुर्बलाकडे लक्ष न देतां त्यांच्याशीं कंबर बांधूं नये हेंही ठीक नव्हे. धृतराष्ट्र हा आमचा वडील, राजा, व वृद्ध असल्यामुळें तो आह्मांला पूज्य असून आह्मीं त्याला मान द्यावा हें रास्त आहे; पण त्याला पुत्रस्नेह मोठा जबर पडला असल्यानें तो आमच्या वांकण्यालाही जुमानणार नाहीं. तेव्हां पुढें काय करावें असें तुझें मत आहे ? धर्माला व अर्थाला आह्मीं कसें बरें मुकावें ? बिकट प्रसंगीं आमची कळकळ बाळगणारा व कोणत्याही कृत्याचा परिणाम ओळखून निश्चय ठरविणारा तुझ्यावांचून दुसरा सुहृद आह्मांला कोण आहे ? ' याप्रमाणें युधिष्ठिराचें भाषण ऐकून श्रीकृष्ण ह्मणाला, ' तुह्मां दोघांच्यामाठीं मी कौरवांकडे जातों, व तुमचा उद्देश जाऊं न देतां सख्य जुळल्यास पहातों. असें झाल्यानें मोठें पुण्य माझ्या पदरीं पडणार आहे, व आज खवळलेल्या कौरव, संजय प्रभृतींना मृत्यूच्या जबड्यांतून सोडविता येणार आहे. ' हें ऐकून युधिष्ठिर ह्मणाला, ' बा कृष्णा, तुझें हितावह भाषण सुद्धां दुर्योधन ऐकणार नाहीं; तेव्हां तूं त्या ठिकाणीं जावेंस हें मला पसंत नाहीं. तुझ्यावर एखादा भलतासलता प्रसंग गुदरूं देऊन आह्मांला द्रव्य किंवा देवत्व एवढेंच नव्हे, तर सर्व देवांचें ऐश्वर्य मिळालें तरी तें नको आहे. ' श्रीकृष्ण ह्मणाला, ' दुर्योधनाची पापबुद्धि मी ओळखतों. परंतु असें केल्यानें लोकांत राजांच्या अपवादापासून आपण सुटणार आहों. शिवाय सिंहापुढें ज्याप्रमाणें यःकश्चित् मृगांची ह्माळ शिजत नाहीं त्याप्रमाणें सर्व राजे जरी एकवटले तरी त्यांच्या हातून माझें कांहीं वांकडें व्हावयाचें नाहीं. ते जर माझ्याशीं वेडेंबांकडें वागूं लागतील तर मी सर्व कौरवांचा जाळून फडशा उडवीन. माझें तेथें जाणें केवळ व्यर्थ होईल, असें मला वाटत नाहीं. कदाचित् आपला कार्यभाग साधेल. निदान लोकापवादापासून तरी आपण सुटूं. ' हें ऐकून युधिष्ठिर ह्मणाला, ' तुला जसें बरें वाटेल तसें कर. तूं आमचा भाऊ व सखा असल्यामुळें आह्मांला आतां बिलकुल काळजी नाहीं. काम फत्ते करून सुरक्षित परत ये ह्मणजे झालें. तूं आह्मांला ओळखतोस, त्यांना ओळखतोस, उद्देशही तुला माहीत आहे व बोलावें कसें हें कांहीं तुला सांगावयाला नको. ज्यानें आमचें हित होईल असें करून ये ह्मणजे झालें. ' श्रीकृष्ण ह्मणाला, ' संजयाचेंही ह्मणणें मीं ऐकिलें आहे व तुझेंही ऐकिलें. तुमचा व त्यांचा सर्व अभिप्राय मी जाणतों. तुझी बुद्धि धर्माकडे असून त्यांची वैराकडे आहे. युद्ध न करतां जें मिळेल तेंच तुला पुष्कळ वाटत आहे. आजन्मपर्यंत याप्रमाणें ब्रह्मचर्यांत घालविणें हा क्षत्रियाचा धर्म नव्हे. क्षत्रियांनीं भिक्षा मागूं नये असें सर्व आश्रमी लोकांचें ह्मणणें आहे. युद्धांत जय येवो, किंवा मरण येवो, युद्ध हाच विधात्यानें क्षत्रियाचा धर्म ठरवून ठेविला आहे. हा क्षत्रियाचा स्वधर्म असून दैन्य हें क्षत्रियाला योग्य नाहीं; व दैन्यवृत्ति धरून पोट भरतां येणेंही शक्य नाहीं. पराक्रम गाजवून शत्रूंना चिरडून टाक. धार्तराष्ट्र हे फार लोभी असून त्यांनीं मित्र मिळविले आहेत व त्यांच्या सहवासांत फार दिवस राहिल्यामुळें त्यांमध्यें परस्पर प्रेमही जडलें आहे; तसेंच त्यांनीं सैन्यही जमविलें आहे. तेव्हां तुझ्याशीं सख्य करण्याचा कांहीं रंग दिसत नाहीं. भीष्मद्रोणादिकांच्या जोरावर आपण मोठे बलवान आहों असें त्यांना वाटत आहे. जों जों तूं त्यांच्याशीं सामोपचारानें वागूं पाहशील तों तों ते

तुला पूर्ण नागविल्याबांचून राहणार नाहींत. दयेनें, भीतीनें किंवा धर्मार्थाचा विचार मनांत आणून ते तुझ्या इच्छेप्रमाणें वागण्याला तयार होतील असें समजूं नकोस. प्रत्यक्ष भीष्म, विदुर प्रभृति शहाण्यांच्या व इतर राजे व कौरव यांच्या समक्ष दानशील, सौम्य, धर्मशील अशा तुला द्यूतांत कपटानें जिंकून तुला लंगोटी घालावयाला लावून त्या दुष्ट कृत्याबद्दल त्यांना एवढी सुद्धां लाज वाटली नाहीं, ही एकच गोष्ट माझ्या ह्मणण्याची साक्ष पटविण्याला पुरी आहे. तर अशा प्रकारचें ज्यांचें शील व वर्तन आहे त्यांची फुकट कींव करूं नकोस. सर्व जगांनीं त्यांना ठार करावें अशा योग्यतेचे ते आहेत. मग तुझ्यासंबंधानें प्रश्न कशाला पाहिजे? भलत्या शब्दांनीं त्या दुर्योधनानें तुला व तुझ्या भावांना दुखविलें व त्याची मोठी फुशारकी मानून आनंदानें तो दुष्ट ह्मणतो, 'ह्या जगांत पांडवांचें स्वस्व ह्मणून कांहीं उरलें नाहीं. त्यांचें नांव व गोत्रसुद्धां बाकी राहिलीं नाहींत. माझ्यापुढें त्यांचे शौर्यादि गुण नष्टप्राय झाले आहेत!' द्यूत चाललें असतां त्या दुष्ट दुःशासनानें द्रौपदीला ती रडत असतां अनाथाप्रमाणें केसांला धरून सभेमध्यें राजे लोकांत ओढून आणली. भीष्मद्रोणांच्या समक्ष तिच्या तोंडून हीन म्हणविलें. विक्रमशाली व कडव्या तुझ्या सर्व भावांचें तूं निवारण केल्यामुळें धर्मपाशानें जखडले जाऊन त्यांना गप्प बसावें लागलें. तुला वनवासाला पाठवून ज्ञातींमध्यें त्याची तो फुशारकी मिरवीत आहे. त्यानें जे राजे तेथें जमविले आहेत त्यांची देखील तूं निरपराधी आहेस अशी खात्री होऊन अश्रूंनीं गळा दाटून येऊन त्या सभेंत ते नेहमीं दुःख करीत असतात. राजे, ब्राह्मण, कोणी याला बरें ह्मणत नसून सभेमध्यें ते त्याची निंदाच करीत असतात. कुलीनाला निंदा मरणप्रायच आहे.प्रसंगीं मरण बरें परंतु जीवित कष्टमय करून सोडणारी निंदा चांगली नाहीं. ह्या निर्लज्जाची जेव्हां पृथ्वीवरील सर्व राजांनीं निंदा केली तेव्हांच तो मेल्यासारखा झाला आहे. ज्याचें चरित्र अशा प्रकारचें आहे त्याला आतां मारणें हें सर्व मुळें तुटून जाऊन केवळ पाराच्या आधारानें असणाऱ्या झाडाला तोडून टाकण्याप्रमाणें अगदीं सोपें काम आहे. हा अनार्य दुर्बुद्धि सापाप्रमाणें वाटेल त्यांनीं झोडपावा असा आहे. धृतराष्ट्र व भीष्म यांच्यापुढें तूं बांकांवेंस हें मला ठीक दिसत नाहीं. दुर्योधनासंबंधानें ज्याचें मन अद्यापि साशंक आहे अशा सर्वांकडे जाऊन मी त्यांचा संशय दूर करीन. त्या ठिकाणीं जाऊन राजांमध्यें तुझ्या थोर गुणांचा गुणानुवाद गाऊन त्यानें आजपर्यंत केलेलीं दुष्ट कृत्यें उघड करून दाखवीन. धर्मार्थाला धरून असें हितकर भाषण मी त्या ठिकाणीं करूं लागलों असतां तें ऐकून त्या ठिकाणीं जमलेले चोहोंकडचे राजे तुला न्यायी व दुर्योधनाला लोभी असेंच ह्मणूं लागतील. सर्व नगरवासी व ठिकठिकाणीं जमलेले लोक यांच्यामध्यें त्याची निंदा करीन आणि तुझ्याकडून संधीचा प्रयत्न होत असल्यानें तुला कोणी तेथें दोष देणार नाहीं. धृतराष्ट्रासकट सर्व कौरवांची राजे लोक निंदा करूं लागतील व लोकांनीं त्याला याप्रमाणें मोडल्यावर करावयाचें तें काय उरलें? ह्मणून मी कौरवांकडे जाऊन तुमचा अर्थ जाऊं न देतां शक्य तेवढी खटपट करतों व युद्धासंबंधानें त्यांच्या काय खटपटी चालल्या आहेत हेंही पाहून घेऊन तुला जय देण्याला परत येतों. त्यांच्याबरोबर युद्धाचाच प्रसंग येणार असें मला घोरण दिसतें; व त्यामारखे शकुनही होऊं लागले आहेत. संध्याकाळच्या वेळीं मृग व पक्षी मोठमोठ्या हत्तींच्या व घोड्यांच्या मध्यें येऊन घोर शब्द करीत आहेत व त्यांचीं स्वरूपेंही उग्र दिसूं लागलीं आहेत. अग्नीमध्यें अनेक प्रकारचीं निरनिराळीं घोर रूपें दिसूं लागलीं आहेत. मानवजातीचा पूर्ण नाश होणारा भयंकर काल आला नसता तर अशीं चिन्हें झालीं नसतीं. ह्मणून सर्व शस्त्रें, चिलखतें, रथ, घोडे यांनिशीं सर्व योद्धे मनाचा निश्चय करून युद्धाला तयार असूं देत; आणि लढाईची तुला जी कांहीं तयारी करावयाची असेल ती सर्व करून ठेव. जें तुझें समृद्ध राज्य त्यानें पूर्वी द्यूतांत हरण केलें आहे तें आतां तो जिवंत असे तोंपर्यंत कांहीं तसें परत देणार नाहीं.' यावर भीम ह्मणाला, 'ज्याच्या योगानें कौरवाशीं समेट होईल अशाच रीतीनें तूं दुर्योधनाबरोबर बोल. उगीच युद्धाची गोष्ट काढून त्याला चिडवूं नकोस. रागीट, खवळणारा, हित-

शत्रु, मोठा अभिमानी अशा त्याशीं निष्ठुर भाषण न करतां गोडीगुलाबीनेंच बोल. जात्या तो दुर्बुद्धि असून त्याचें हृदय चोराप्रमाणें बनलें आहे. ऐश्वर्याचा धूर त्याच्या डोळ्यांवर आला असून पांडवांशी त्यांचें वैर बनून राहिलें आहे. तो अदूरदर्शी व परनिंदक असून वाटेल तें करण्याला मागें घेणारा नाहीं. तो दीर्घद्वेषी, कोणाचें न ऐकणारा व कपटप्रिय असून मरेल पण कोणापुढें वांकणार नाहीं व आपला हेका सोडणार नाहीं. तर अशाबरोबर संधि जुळणें कठीणच आहे. सुहृदांबरोबर सुद्धां वांकडें वर्तन ठेवून धर्माची चाड न धरतां खोट्याची गोडी त्याला लागली असल्यामुळें तो सुहृदांच्या उपदेशाच्या उलट जातो. रागाच्या आधीन होऊन मूळचाच दुष्ट स्वभाव अमलयामुळें गर्वतांत दडून असलेल्या सापाप्रमाणें स्वभावतःच पापकृत्याकडे त्याची प्रवृत्ति आहे. त्याचें शील कसें आहे, त्याचा स्वभाव कसा आहे, त्याचें बळ किती आहे, त्याचा पराक्रम किती आहे, त्याचें सैन्य किती आहे, हें सर्व तुला ठाऊकच आहे. पूर्वी पुत्रपौत्रांसह सर्व कौरव व आह्मीं आमच्या बांधवांमध्यें मोठ्या आनंदांत दिवस काढले. आतां हिंवाळ्याच्या अखेरीस वणव्यांनीं जळून फडशा होणाऱ्या वनाप्रमाणें दुर्योधनाच्या रागानें सर्व भरतकुल जळून खाक होणार आहे. धर्माचा ऱ्हास झाला असतां वैभवानें झळकणाऱ्या असुरांमध्यें भांडण उत्पन्न होऊन सर्व नाश होत असतो. त्यांमध्येंच आजपर्यंत हैययांमध्यें मुदावर्त, नीपांमध्यें जनमेजय, तालजंघांमध्यें बहुल, ऊर्मींमध्यें उद्धत व वसु, सुवीरांमध्यें अजबिंदु, सुराष्ट्रांमध्यें रुषद्धिक, बलीहांमध्यें अर्कज, चीनांमध्यें धौतमूलक, विदेहांमध्यें हयग्रीव, महौजांमध्यें वरयु, सुंदरवंशांमध्यें बाहु, दीप्ताक्षांमध्यें पुरूरवा, चेदिमत्स्यांमध्यें सहज, प्रवीरांमध्यें वृषध्वज, चंद्रवक्त्रांमध्यें धारण, मुकुटांमध्यें विगाहन व नंदिवेगांमध्यें शम असे अठरा कुलांगार निपजले आहेत. त्यांपैकीं तर हा दुर्योधन एक कौरवकुलाचा फडशा पाडण्याकरितां या कुलांत जन्मला नसेल ना! हा दुर्योधन, कुलांगार, नीच व पापी आहे म्हणून याच्याशीं धर्मार्थकामांला अनुसरून हितावह असें मऊ भाषणच कर. उगीच कडक भाषण करून त्याला खवळवूं नकोस. आम्ही सर्व स्वतःला कमीपणा घेऊन मुकाट्यानें त्याच्या मागून राहण्याला तयार आहों; पण भरतकुलाचा मात्र नाश होऊं नये. आम्हांला कौरवांशीं परक्याप्रमाणें राहतां येण्याजोगें जरी केलेंस तरी चालेल; परंतु अनीतीचा विटाळ कौरवांना न लागो. भावांमध्यें सख्य राहून आम्हीं सर्वांनीं सुखानें नांदावें अशी आमची सर्वांची इच्छा आहे, म्हणून तूं पितामहांना त्याचप्रमाणें तेथें जुळलेल्या दुसऱ्या लोकांना कळीव.' पर्वताच्या ठिकाणीं आलेल्या हलकेपणाप्रमाणें किंवा अग्नीमध्यें आलेल्या थंडपणाप्रमाणें भीमाच्या भाषणांत पूर्वी कधीं दिसून न आलेला हा मऊपणा पाहून भगवान शौरि अग्नीला ज्याप्रमाणें वाऱ्यानें चेतवावें त्याप्रमाणें संदीपक शब्दांनीं त्याला हासत हासत ह्मणाला, 'बा भीमा, आजपर्यंत तुह्मांला चिरडण्यांत आनंद मानून घेणाऱ्या क्रूरकर्मी धृतराष्ट्राच्या मुलांना चिरडून टाकण्याच्या इच्छेनें युद्धाविषयीं आतुर असून तूं कधीं झोंप देखील न येतां नेहमीं तळमळत पडत होतास व नेहमीं रागाचें व कठोर भाषण करीत असस; व तुझा राग अनावर झाल्यामुळें धुमसणाऱ्या अग्नीप्रमाणें तुझ्या मनाला कधीं शांति नसून दीर्घ सुस्कारे टाकीत ओझ्याखालीं दडपलेल्या दुबळ्याप्रमाणें कोंठें तरी एकटा पडला असस. तुला त्या स्थितींत पाहून तुझी खरी स्थिति न ओळखणाऱ्यांना तूं वेड लागल्यासारखा सुद्धां वाटत असशील. वनाचा फडशा उडविणाऱ्या हत्तीप्रमाणें झाडें मुळासकट उपटीत व जमिनीवर पाय आदळीत तूं धांवत असस. दिवसां रात्रीं केव्हांही कोणाबरोबर बोलण्यालासुद्धां तुला आवडत नसे. एकांतांत हासतां हासतां तूं रडूं लागून गुडघ्यांत मान घालून डोळे मिटून बोलेनासा होत असस. त्याचप्रमाणें भिवया चढवून दांतओठ खातांना दिसत होतास? याप्रमाणें आजपर्यंत अनेकवार रागाचीं चिन्हें तुझ्या ठिकाणीं दिसून आलीं असून 'सूर्य आपल्या लाल किरणांनीं पूर्वेस उगवून पश्चिमेला मावळण्यापासून जसा ढळत नाहीं त्याप्रमाणें मी प्रतिज्ञा करतों कीं त्या तापट दुर्योधनाला मी आपल्या गदेनें मारीन,' असें आपल्या भावां-

मध्यें बोलून एकदां तूं आपली गदाही उचलली होतीस. त्या तुझी बुद्धि आज संधीकडे वळावी हें मोठें आश्चर्य आहे ! मला वाटतें युद्ध करूं इच्छिणारांची बुद्धि युद्धाची वेळ येऊन ठेपली असतां कचरत असते. झोंपेंत व जागेपणीं तुला कांहीं विपरीत चिन्हें दिसूं लागलीं असलीं पाहिजेत; म्हणून तुला संधि करण्याची बुद्धि होऊं लागली आहे ! स्त्रीस्वभावाप्रमाणें कांहीं पौरुष न दाखविण्याच्या आधींच भीतीनें तुझें मन खचलें आहे, छाती धडधडूं लागली आहे व मनाला खिन्नता येऊन पाय लटपटूं लागले आहेत. वाऱ्याच्या तावडींत सांपडलेल्या शेवरीच्या बोंडांतील कापसाप्रमाणें मनुष्याचें मन चंचल आहे. तुझी ही पालटलेली बुद्धि गाईच्या ठिकाणीं दिसून येणाऱ्या मनुष्यवाणीप्रमाणें विलक्षण असून, ती होडगें वगैरे कांहीं सुटकेचें साधन नसून समुद्रांत सांपडलेल्या मनुष्याप्रमाणें पांडवांना निराशारूपी सागरांत बुडवीत आहे. पर्वत ज्याप्रमाणें जाग्यावरून ढळावा त्याप्रमाणें अशा प्रकारचें भाषण भीमाला शोभत नाहीं ! म्हणून आजपर्यंत आपल्या हातून घडलेल्या गोष्टी, ज्या कुलांत तुझा जन्म झाला आहे तें कुल, या सर्वांचा विचार करून युद्धाला तयार हो. धीर खचूं देऊं नकोस ! अशा प्रकारचें औदासिन्य तुला शोभत नाहीं. क्षत्रिय बाहुबलानें मिळविलेल्या खेरीज दुसऱ्या कशाचा उपभोग घेत नसतो.' याप्रमाणें भगवानाचें विरेला पेटाविणारें भाषण ऐकून तापट व अपमान सहन न होणारा भीमसेन पाणीदार घोड्याप्रमाणें चवताळून म्हणाला, 'माझा उद्देश निराळा असून तूं माझ्या संबंधानें भलतीच शंका घेत आहेस. युद्ध मला पाहिजे असून मी कचरणारा गडी नव्हे हें आज इतक्या दिवसांच्या सहवासानें तुला कळलें पाहिजे होतें. आतां अंत न लागलेल्या तलावांत पोहोणाऱ्याप्रमाणें माझा तुला अंत कळला नसला तर कोणास ठाऊक ? या भीमसेनाला पूर्ण ओळखणाऱ्या कोणा गृहस्थाला तूं बोललास अशा प्रकारें टाकून बोलण्याला धीर होईल ? आणि ह्मणूनच आपली स्तुति आपणच करणें हें जरी शिष्टांना संमत नाहीं तरी या निंदेनें मनाला घेरें पडलीं असल्यामुळें बोलतों कीं कलांत किंवा पराक्रमांत प्रतिपक्ष्यांपैकीं कोणाची माझ्याशीं बरोबरी होणार नाहीं. ह्या सर्व प्रजांचे आधारभूत हे भूलोक व स्वर्ग पहा. हें निराधार असून अचल व अनंत असे सर्वांना मातृस्थानीं असणारे हे लोक जर कदाचित् खवळून जाऊन दोन दगडांप्रमाणें एकमेकांवर आपटूं लागतील तर यांना आवरून धरण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य आहे. कांबीसारख्या ह्या माझ्या बाहूंमधील अंतर तूं पाहिलेंस का ? यांमध्यें सांपडून कांहीं अपाय न होतां सुटेलसा कोणी प्राणी मला दिसत नाहीं. माझ्या तावडींत सांपडलेल्यास सोडविण्याला प्रत्यक्ष हिमाचल, समुद्र किंवा बलासुराला मारणारा इंद्र देखील समर्थ नाहीं, पांडवांबरोबर कंबर बांधलेल्या सर्व क्षत्रियांना पायाखालीं चिरडून भूमींत गाडून टाकीन. पूर्वी राजांना जिंकून मीं आपल्या ताब्यांत कसें आणिलें हें तुला माहीत नाहीं वाटतें ? अजून तूं जर मला ओळखत नसशील तर घनघोर युद्ध ज्यावेळीं सुरू होईल तेव्हां तूं मला ओळखशील. जखमेवरची खपली काढून ज्याप्रमाणें तिला खाजवावें तसें तूं मला आज खिजवीत आहेस. परंतु घोर युद्धांत उत्तम उत्तम हत्ती, रथी, स्वार व श्रेष्ठ श्रेष्ठ वीर यांना छाटून काढतांना तूं मला पाहशील तेव्हां कळेल. माझ्या शिरा अद्यापि आखडल्या नाहींत व मनही बावरलें नाहीं. सर्व लोक जरी खवळून माझ्यावर चालून येतील तरी त्यांचीही मला खातर नाहीं. परंतु सर्व भरतकुलाचा फडशा पडूं नये ह्मणून हें सर्व मी सोसण्याला तयार आहें.' हें ऐकून भगवान ह्मणाले, 'बा भीमा, तुला खिजवावें ह्मणून, किंवा स्वतःचें पांडित्य दाखवावें अगर रागांत कांहीं तरी बोलावें म्हणून मी हें बोललों नाहीं. तर स्नेहामुळें तुझा उद्देश काढून घेण्यासाठीं बोललों. तुझ्या मनाचा थोरपणा, तुझें बल, तुझीं कृत्यें, हीं सर्व मी जाणतों. तुला तुच्छ करण्याचा माझा मुळीं हेतु नव्हता. तुला वाटत आहे त्यापेक्षां हजार पटींनें पांडवांचें कल्याण करण्याचें तुझ्या अंगीं सामर्थ्य आहे हें मी पकें जाणतों. सर्व सुहृद्धांधवांना व राजांना मान्य अशा ज्या कुलांत तुझा जन्म झाला आहे त्याला साजण्यासारखाच तूं आहेस. परंतु गोष्ट अशी आहे कीं, पापपुण्य व वरेंबाईट यांसंबंधानें

संशयात्मक धर्माचा छडा काहूं पहाणाऱ्यांना त्यांचा निर्णय होत नाहीं. मनुष्याचा जो एखादा अनिश्चित प्रयत्न बेतेला त्याचें काम शेवटास नेतो तोच दुसऱ्या प्रसंगीं त्याच्या नाशाला कारण होतो. कोणत्याही गोष्टींतील गुणदोष कळणारे शहाणे एक दिशा ठरवून ठेवतात व त्याचा वायुवेगाप्रमाणें भलताच परिणाम होत असतो. मोठ्या विचारानें नीतितत्व लक्षांत घेऊन बरोबर हातीं घेतलेलें मानवी कृत्य दैवानें निष्फल होतें. त्याचप्रमाणें शीतोष्णादि जीं दैवानें घडून येणारीं कृत्यें त्यांचाही मनुष्ययत्नानें प्रसंगीं प्रतिकार होत असतो. यावरून काय सिद्ध होतें कीं दैवाहून निराळें जें पूर्वसंचित त्याबांचून इतर सर्व कृत्यांचा प्रतिकार करतां येणें शक्य आहे व अशाच प्रकारचा उल्लेख श्रुतिस्मृतींमधूनही आढळतो. ह्मणून पुरुषप्रयत्नावांचून केवळ दैवाचें कांहीं चालावयाचें नाहीं हें पक्कें लक्षांत ठेवून पुरुषानें प्रयत्न करीत राहिलें पाहिजे. आतां त्याचें फल मात्र पुरुषप्रयत्न व दैव या दोहोंवर अवलंबून राहतें. हीं गोष्ट लक्षांत ठेवून जो केवळ कर्तव्य ह्मणून काम हातीं घेतो त्याला यश मिळालें नाहीं तरी वाईट वाटत नाहीं व यश मिळालें असतां आनंदही होत नाहीं. माझा तरी ह्मणण्याचा हेतु एवढाच होता. युद्धांत शत्रूशीं भिडलें असतां आपल्याला खात्रीनें जयच येईल असें मानण्यांत कांहीं अर्थ नाहीं, व जय आला नाहीं ह्मणून वाईट वाटून घेण्याचेंही कारण नाहीं. आतां उद्यां मी धृतराष्ट्राकडे जाऊन तुमचा हेतु जाऊं न देतां संधि करण्याचा यत्न करतों. ते जर संधि करण्याला तयार होतील तर मला मोठेंच यश मिळाल्यासारखें होणार आहे. तुमचेंही काम होऊन त्यांचेंही त्यांत हित होणार आहे. परंतु हट्टास पेटून ते जर माझें ऐकणार नाहींत तर मग मात्र घोर युद्धावांचून दुसरा परिणाम नाहीं. आणि बा भीमा, ह्या युद्धांत सर्व भिस्त तुझ्यावर आहे; व हें जूं तूं मानेवर घेतलेंस ह्मणजे बाकीचें काम अर्जुन उरकील. युद्धाचाच प्रसंग आल्यास मी अर्जुनाचें सारथ्य करणार हेंही ठरलेंच आहे.तेव्हां तुझें तें दैन्ययुक्त भाषण ऐकून मनांत शंका आली ह्मणून तुला उत्तेजन देण्यासाठीं मी बोललों.' याबर अर्जुन ह्मणाला, 'युधिष्ठिर महाराजांनीं जें सांगावयाचें होतें तें सर्व सांगितलेंच आहे; परंतु बा कृष्णा, तुझें एकंदर भाषण मनांत घेतां धृतराष्ट्राच्या लोभामुळें व आह्मांला तूर्त आलेल्या निकृष्ट दशेमुळें दोघांमध्यें संधि जुळून येणें कठीण वाटूं लागलें आहे. तसेंच केवळ पुरुषप्रयत्नानेंच कोणतीही गोष्ट घडून येते असें नाहीं. तरी पुरुषप्रयत्नावांचूनही कोणती गोष्ट घडत नाहीं; असाही तुझ्या ह्मणण्याचा आशय दिसतो. हें तुझें ह्मणणें अगदीं बरोबर आहे. कोणतीही गोष्ट केवळ असाध्यच मानतां येत नाहीं. शिवाय आमच्या निकृष्ट दशेमुळें युद्धावांचून परिणाम नाहीं असें तुला वाटत असलें तरी ज्यांची फलप्राप्ति होणार नाहीं असें वाटत असतें अशाही गोष्टी अनेकवार हातीं घ्याव्या लागतात. शिवाय कोणतीही गोष्ट योग्य रीतीनें हातीं घेतली असतां त्यांत यश येण्याचा संभव असतो. ह्मणून तूं त्यांच्याबरोबर असाच वाग कीं ज्याच्या योगानें दोघांचें सख्य जुळून दोघांचेंही हित होईल. कारण प्रजापती जसे देवदानवांचे हितचिंतक आहेत त्याप्रमाणेंच तूं आह्मां दोघांना आहेस. तुला हें काम कठीण नसून गेल्याबरोबर तूं तें साधशील अशी माझी खात्री आहे. आतां ह्या दुरात्म्यासंबंधानें आणखी कांहीं विचार तुझ्या मनांत असेल तर तसेंही घडून आल्यावांचून राहणार नाहीं. तुझा विचार आह्मांला प्रमाणभूत असणार. ज्याला धर्मराजाचें वैभव सहन न होतां न्यायानें तें आपलेंसें करून घेतां येईना ह्मणून दुष्ट अशा कपपटूताची त्यासाठीं मदत घ्यावी लागली व ज्या दुष्टानें भर सभेंत द्रौपदीचे तशा प्रकारें धिंडवडे काढले तो ह्मणजे न मरावा असें कोणाला वाटेल? खडकाळ जमिनींत पेरलेल्या बीजाप्रमाणें तो पांडवांशीं योग्य रीतीनें वागण्याला तयार होईल असें मला मुळींच वाटत नाहीं. तेव्हां तुला जें न्यायाचें व आमच्या हिताचें दिसेल तें कर व आह्मांलाही पुढें काय करावयाचें तें सांगून टाक.' भगवान, ह्मणाला, 'महाबाहो, तूं ह्मणतोस तें अगदीं बरोबर आहे. दोघांचें हित करण्याला मी झटेन व दूत या नात्यानें ही गोष्ट माझ्या स्वाधीन आहे यांत ही थोडें तथ्य आहे. तरी त्याला दैवाचें साहाय्य

पाहिजे. जमीन जरी सुपीक व चांगली मिळाली तरी पावसाबांचून तींत धान्य उगवणार नाहीं. तिला पाणी पाजणें हा जरी पुरुषप्रयत्न असला तरी असें करूनही जें शोषण पडतें त्यालाच दैव ह्मणाबयाचें. ह्मणून शहाण्यांनीं असें ठरवूनच ठेविलें आहे कीं, जगांतील सर्व गोष्टी दैव व मनुष्यप्रयत्न या दोहोंवर अवलंबून आहेत. पुरुषप्रयत्नानें जेवढें ह्मणून शक्य आहे तेवढें मी करीन. परंतु दैविक गोष्ट घडवून आणणें माझ्या हातीं नाहीं. तो दुर्मती धर्माला घाबूला गुंडाळून ठेवून वागत आहे व तशा प्रकारचीं कामें करून त्याला पश्चात्तापही होत नाहीं; व शकुनि, कर्ण, दुःशासन प्रभृति त्याचे सल्लागार त्याच्या त्या दुर्बुद्धीला भरच देत आहेत. सर्व बंधुवर्गासह मेल्याबांचून कांहीं तो राज्य देऊन टाकण्याला तयार होणार नाहीं व धर्मराजही त्याच्यापुढें हार खाऊन राज्य सोडून देण्याला तयार नाहीं. तोंड पसरलें असतां जर तो राज्य देण्याला तयार होणार नाहीं तर धर्मराजाचा निरोप त्याला सांगण्यांत कांहीं अर्थ नाहीं खरा; तरी सर्व जगापुढें तो यानें दोषी ठरणार आहे. लहानपणापासून तुमच्याशीं वैर बांधून आतां ज्यानें तुमचें राज्य गट्ट केलें आहे त्या ह्या दुष्टाला युधिष्ठिराचें वैभव पाहून तळमळ होत असे. तुझ्यापासून मळा फोडण्याची त्यानें पुष्कळदां खटपट केली. त्याचा तसाच माझा मुख्य हेतु तुला ठाऊकच आहे. शिवाय स्वर्गामध्यें आपलें जें ठरलें आहे तेंही तुला ठाऊकच आहे. तेव्हां अज्ञान्याप्रमाणें असें भाषण कां बरें करतोस ? शब्दानें व हातानें जेवढें कांहीं शक्य असेल तेवढें मी करीन. परंतु त्यांच्याशीं सख्य जुळेल असें मला वाटत नाहीं. वर्षापूर्वी गोहरणाच्या वेळीं परततांना भीष्मानीं काय या हितावह संधिसंबंधानें त्याला थोडें सांगितलें ? राज्याचा यत्किंचितही भाग एका क्षणाकरितां देखील सोडण्याला तो तयार नाहीं. तूं निश्चय केलास त्याच वेळीं त्याचा पराभव झाला आहे; परंतु मला धर्मराजाच्या सांगण्याप्रमाणें वागलें पाहिजे व तो काय करतो हेंही पाहिलें पाहिजे.' नकुल ह्मणाला, 'धर्मवेत्त्या उदार धर्मराजांचा तसाच भीमार्जुनांचा विचार तुला कळलाच आहे. तेव्हां तें सर्व ध्यानांत घेऊन शत्रुपक्षाचेंही ह्मणणें ऐकून तुला जें प्रसंगाला उचित वाटेल तें कर. निरनिराळ्या कारणांनीं निरनिराळ्यांचा निरनिराळा विचार पडतो. परंतु मनुष्यानें प्रसंगाला उचित तेंच केलें पाहिजे. मनामध्यें एक विचार आणावा व भलतेंच घडून यावें अशा गोष्टी ह्या जगांत होत असतात, लोकांची बुद्धि चंचल असते. आह्मी वनवासी असतांना लोकांची बुद्धि आमच्यासंबंधानें निराळी होती; अज्ञातवासांत असतांना निराळी झाली व आतां कांहीं निराळीच आहे. आमचीही हल्लीं इतकी वनवासांत असतांना राज्यावर आसक्ति नव्हती. आह्मी वनवासांतून परतल्याचें ऐकल्याबरोबर तुझ्या रूपेनें सात अक्षौहिणी सैन्य आमच्या बाजूला जमा झालें आहे. ह्या पुरुषव्याघ्रांना रणांत शस्त्र धरून उभे पाहून कोणाला कांपरें भरणार नाहीं ? ह्मणून कौरवांकडे जाऊन तो दुर्मति दुर्योधन घाबरणार नाहीं अशा रीतीनें गोडीगुलाबीनें प्रसंग कोणाबरोबर आहे हें तूं त्याला नीट समजावून सांग; व तूं धर्मराजांचा इष्ट उद्देश विदुर, भीष्मप्रभृतींना समजावून सांग; ह्मणजे ते धृतराष्ट्राची व त्या दुराचारी दुर्योधनाची समजूत घालतील. तुझ्यासारखा बोलणारा व विदुरांसारखे ऐकणारे असल्यावर कोणती बिघडलेली घडी फिरून बसणार नाहीं?' सहदेव ह्मणाला, 'महाराजांनीं तुला जें सांगितलें तो जरी सनातन धर्म आहे तरी जेणेंकरून युद्धाचा प्रसंग येईल अशीच तजवीज तूं कर. कौरवांचा सख्य करण्याचा विचार असला तरी तूं युद्धाचाच घाट आण. पांचालीला तशा प्रकारें सभेंत आणलेली पाहून दुर्योधनाला मारल्याबांचून माझा राग कसा बरें शांत व्हावा? भीम, अर्जुन तसेंच महाराज जरी धार्मिक बनले तरी धर्माला गुंडाळून ठेवून त्याच्याबरोबर युद्ध करण्याचीच माझी इच्छा आहे.' सात्यकीनेंही ह्या सहदेवाच्या ह्मणण्याला अनुमोदन देऊन सर्व योद्ध्यांना हीच गोष्ट मान्य आहे ह्मणून सांगितलें. त्याबरोबर सर्व वीरांमध्यें 'होय, होय,' ह्मणून भयंकर सिंहनाद निघाला आणि 'शाबास, शाबास.' ह्मणून सर्वांनीं त्याच्या भाषणाची वाहवा केली. धर्मराजाचें धर्मार्थयुक्त भाषण ऐकून जिचे काळे सडक केस पाठीवर पडले आहेत अशी शोकानें बाळत चाल-

लेली द्रौपदी सहदेव व सात्यकि यांची बाहवा करून व भीम थंड पडलेला पाहून डोळे पाण्यांनीं भरून येऊन ह्मणाली, 'धर्म तुला कळत असून पांडवांना कसें कपटानें सुखापासून दूर केलें आणि संजयांना काय पढवून इकडे पाठविलें होतें हें सारें तूं जाणतोसच. आणि संजयांपाशीं महाराजांनीं अविस्थल, वृकस्थल, माकंदी, वारणावत व पांचवें कोणतें तरी अशीं पांच खेडीं मागितलीं असतां तीं सुद्धां त्यांनीं देण्याचें नाकारलें ! तर कांहीं न देतां दुर्योधनाच्या मनांतून संधि करण्याचें अमेल तर त्याला मात्र तूं मुळीं कबूल होऊं नकोस. सृजयांच्या साहाय्यानें पांडव आज धृतराष्ट्राचें किती मोठें सैन्य असलें तरी त्याचा फडशा पाडण्याला समर्थ आहेत. सामदानांचें जर त्यांच्यापाशीं कांहीं चालत नाहीं तर त्यांवर आपल्या जिवाची पर्वा बाळगणाऱ्यानें कृपा न करतां दंडाचाच उपयोग केला पाहिजे. आणि असें करशील तरच तें सर्व राजांना व तुला यशस्कर होणार अमून क्षत्रियांना सुखावह होणार आहे. क्षत्रियानें स्वधर्माला जागून लोभाच्या मार्गे लागलेल्याचा-मग तो क्षत्रिय असो वा दुसरा कोणी असो-फडशाच उडविला पाहिजे. अवध्याला मारण्यांत जसा दोष सांगितला आहे तसाच वध्य असून त्याची गय करण्यांतही दोष आहे. ह्मणून तुह्मां सर्वांकडे या कामांत दोष न येईल अशा प्रकारानें वाग. कृष्णा, माझ्यासारखी हतभागी स्त्री ह्या पृथ्वीवर तरी कोणी असेल काय ? द्रुपदराजाची मुलगी ! वेदीमधून माझा जन्म ! धृष्टद्युम्नाची बहीण ! तुझी आवडती सखी ! आजमीढकुलाशीं संबंध जुळून पंडुराजांची सून व पांच इंद्रासारख्या वीर्यशाली पांडवांची पट्टराणी झालें ! आणि या पांचांपासून मला पांच महारथ मुलगेही झाले ! अमें सारें असून कृष्णा, पांडुपुत्रांच्या देखत व तूं जिवंत असून माझ्या केसांला ओढून माझे घिंडवडे काढून मला सभेंत नेली ! आणि पांडव व पांचाल जिवत असून सभेमध्यें मी त्या दुष्टांची दासी झालें अं ! पांडवांना त्याची मुळीं चीड न येतां हातपाय न हालवितां ते मुकाट्यानें पहात बसलेले पाहून 'कृष्णा, यावेळीं माझी लाज राख,' ह्मणून मीं मनांत तुझा धांवा

केला. ते वेळीं 'पांचालि, तूं वराला पात्र आहेस, वर माग,' ह्मणून मामंजी मला ह्मणाले. तेव्हां 'पांडव आपल्या रथांसकट व आयुधांसकट दास्यापासून मुक्त असोत,' असा वर मागून मीं यांना दास्यांतून सोडविलें. पण वनवास यांच्या कपाळीं आला तो आलाच. तर अशा प्रकारचे कष्ट सोसावे लागले असल्यामुळें आतां आह्मां सर्वांना यांतून सोडविणारा तूंच आहेस. कृष्णा, मी भीष्मांची व धृतराष्ट्रांची धर्मानें सून ना ? त्या मला बलात्कारानें दासी केली ! हा दुर्योधन क्षणभर कां होईना जिवंत राहिल्यानें पार्थमहाराजांच्या धनुर्विद्येला तसेंच भीममहाराजांच्या बलाला मी धिक्कार समजतें. जर माझी तुला कींव असेल, तसेंच माझ्यावर तुझी कृपा असेल तर धृतराष्ट्रांच्या मुलांवर तूं पूर्ण आग पाखड.' असें ह्मणून आपला मऊ, शेवटाला कुरळे झालेला, काळेभोर व मोठ्या भुजंगाप्रमाणे तुळतुळीत असा प्रेक्षणीय पेड बांधलेला केशपाश डाव्या हातानें पुढें करून ती गजगामिनी कमलनयना कृष्णाच्या जवळ सरकून डोळे पाण्यांनीं भरून येऊन ह्मणाली, 'कृष्णा, प्रतिपक्ष्याशीं संधीचें बोलणें लावतांना दुःशासनानें ओढलेल्या ह्या वेणीची आठवण ठेव ! आज गरीब बनून भीमार्जुन व महाराज यांच्या मनांत जरी युद्ध करण्याचें नसेल तरी माझे वृद्ध बाबा आपल्या मुलांना घेऊन युद्ध करण्याला खंबीर आहेत. तसेंच माझे हे पांच वीर्यशाली बाळ, अभिमन्यूला पुढें करून कौरवांबरोबर लढतील. दुःशासनाचे मोडून तोडून काळे पडलेले व रक्तानें व मातीनें भरलेले हात पाहिल्यावांचून माझ्या मनाला शांति कशी बरें मिळणार ? पेटलेल्या आगीप्रमाणें रागाला पोटांत ठेवून मीं हीं तेरा वर्षं काढलीं आहेत ! ज्या ह्या भीममहाराजांना आज धर्म दिसूं लागला आहे त्यांचे हे शल्याप्रमाणें टोचणारे शब्द माझ्या हृदयाला घर पाडीत आहेत.' असें ह्मणून घसा दाटून येऊन मोठ्यानें ती रडूं लागली व एकमेकांशीं आपले चिकटलेले स्तनयुग्म नेत्रांतील उष्ण जलानें तिनें भिजवून काढले. भगवान तिची समाधानी करून ह्मणाला, 'बये, ज्यांवर तूं इतकी रागावली आहेस त्या सर्व भरतस्त्रिया त्यांचे ज्ञातिबांधव मारले गे-

ल्यानें अशाच रडतांना लवकर तुझ्या दृष्टीस पडतील. भीमार्जुन व नकुलसहदेव यांच्या साहाय्यानें धर्मराजाच्या आज्ञेनें व दैवलिखिताच्या नियमाप्रमाणें हें सर्व मी उरकून टाकणार आहें. कालानें परिपक्व झालेले धृतराष्ट्राचे मुलगे जर माझें म्हणणें ऐकणार नाहींत तर ते भूमीवर कोल्ह्याकुत्र्यांना खाद्य होऊन पडतील. हिमाचल आपली जागा सोडील, पृथ्वीचे शेंकडो तुकडे होतील, सर्व नक्षत्रांसह आकाश कोसळून खालीं येईल, पण माझे शब्द कधीं खोटे पडणार नाहींत. रडूं नकोस. आपल्या वैऱ्यांना मारून वैभवाला चढलेले अशा आपल्या पतींना तूं लवकरच पाहशील.' यावर 'तूं सर्व कौरवांचा हितचिंतक असून दोन्ही पक्षांचा संबंधी आहेस तेव्हां कौरवपांडवांचें ज्यांत हित आहे अशीच गोष्ट तूं प्रथम कर. येथून गेल्यावर आमचा तापट भाऊ जो दुर्योधन त्यापाशीं संधीचें बोलणें लाव, आतां धर्मार्थाला धरून असणारें क्षेमकर व हिताचें तुझें भाषण तो नच ऐकेल तर मग त्याच्या नशिबीं असेल तें तो भोगील,' असें अर्जुनाचें भाषण ऐकून श्रीकृष्ण म्हणाला, 'धर्माला धरून असून आमच्या हिताची व कौरवांना क्षेमकर अशीच गोष्ट घडवून आणण्याकरितां हा मी धृतराष्ट्राकडे चाललों.' नंतर सुखकर कार्तिक महिन्याला सुरवात होऊन शरदृतु सरून हेमंताला आरंभ झाल्यामुळें जिकडे तिकडे उभीं शेतें लोकांच्या मनाला आनंद देत होतीं; अशा वेळीं रात्र सरून निर्मल सूर्य आपल्या कोमल किरणांनीं आकाशांत झळकूं लागला असतां रेवती नक्षत्राच्या मैत्र सुमुहूर्तावर सात्वतांमध्यें श्रेष्ठ भगवानानें ब्राह्मणांच्या मंगल निर्घोषामध्यें स्नान करून व शुद्ध अलंकारांनीं विभूषित होऊन प्रातर्विधि उरकून घेतल्यावर सूर्योपस्थान व अग्नीची पूजा केली; व अग्नीला प्रदक्षिणा केल्यावर ब्राह्मणांना अभिवादन करून बैलाच्या पाठीला हात लावून पुढें ठेवलेल्या मंगलप्रद वस्तूंकडे पहात युधिष्ठिराचें भाषण मनांत ठेवून पुढें असणाऱ्या सात्यकीला म्हणाला, 'शंख, चक्र, गदा, भाते, शक्ति व दुसरीं सर्व आयुधें रथांत तयार ठेव. कारण दुर्योधन, कर्ण, शकुनि हे फार दुष्ट आहेत. शत्रु दुर्बल असला तरी बलवानानें त्या संबंधानें निष्काळजी असतां कामा नये.' याप्रमाणें भगवानाचा विचार समजल्यावर त्याचे नेहमीं जवळ असणारे सेवक रथ तयार करण्यासाठीं निघून गेले. पेट घेतलेल्या कालाग्नीप्रमाणें झळकणाऱ्या त्या वायुगति रथाला चंद्रसूर्यांप्रमाणें दैदीप्यमान चाकांनीं विलक्षण शोभा आली होती. अर्धचंद्र, चंद्र, मृग, पक्षी, मासे, नानाप्रकारचीं फुलें यांनीं तो चोहोंबाजूंनीं सुशोभित केला होता. पुष्कळ रत्नांनीं व सोन्यानें व व्याघ्रचर्मानीं तो मढविला असून उत्तम ध्वज व पताका त्यावर उभारल्या होत्या. अशा सकाळच्या वेळच्या सूर्याप्रमाणें कांतिमान, शत्रूची कीर्ति हरण करून यादवांना आनंद देणाऱ्या त्या रथाला सर्ववैभवसंपन्न, धुतलेले शैब्य, सुग्रीव, मेघपुष्प व बलाहक नांवाचे चार घोडे जोडले होते. त्याचा घरघर आवाज कानाला फारच मधुर लागत होता. त्याच्या ध्वजावर गरुड बसल्यावर तर त्यानें भगवानाचे मोठेंच वैभव दिसून येऊं लागलें. अशा मेरुशिखराप्रमाणें उंच व मेघनादाप्रमाणें घरघर शब्द करणाऱ्या इच्छागामी विमानासारख्या त्या रथांत भगवान जाऊन बसला, व सात्यकीला वर घेऊन पृथ्वी व अंतरिक्ष दणाणून सोडीत तो निघाला. तेवेळीं जिकडे तिकडे आकाश निरभ्र होऊन वारा अनुकूल सुटला, व मंगलसूचक मृगपक्षी त्यांना उजवी घालून जात होते. सारस, राघू व हंस शुभ सुचवीत बरोबर चालले होते. आहुति दिलेल्या होमाग्नीच्या शुद्ध व प्रसन्न ज्वाळा उजवीकडे वहात होत्या. वसिष्ठ, वामदेवप्रभृति ब्रह्मर्षी व देवर्षी यांनीं त्याला उजवी घातली. नंतर या महाभाग ऋषिमंडळीचा सत्कार घेऊन श्रीकृष्ण कौरवांकडे निघाला. पांडव व द्रुपदप्रभृति राजेमंडळी त्याला पोहोंचवायाला त्याच्या मागून निघाली. वाटेंत तेजस्वी युधिष्ठिर राजेलोकांसमक्ष ज्याला लोभ म्हणून ठाऊक नाहीं अशा स्थिरबुद्धि, सरळ व सर्व भूतांचा स्वामी सनातन भगवानाला आलिंगन देऊन म्हणाला, 'ज्या बिचाऱ्यानें आम्हांला लहानाचें थोर केलें, जो नेहमीं उपवासव्रतामध्यें काल कंठून स्वस्त्ययनें देण्यांत, व देवता, अतिथि व वडील यांच्या शुश्रूषेंत गढला असतो, ज्या पुत्रवत्सलेनें समुद्रांतल्या नौकेप्रमाणें सुयोधनापासून आम्हांला वांचविलें व जि-

च्यावर दुःखें गुदरूं नयेत असें अमतांही आमच्या-पायीं जिनें आजपर्यंत नेहमीं दुःखें सोशिलीं, त्या कुंतीला कुशल विचारून व आमचें कुशल सांगून कडकडून भेट. लग्न झाल्या दिवसापासून बिचारीला आजपर्यंत दुःखच कपाळीं लागलें आहे. कृष्णा, हे दुःखाचे दिवस सरून मी आपल्या कष्टाळू मातेला सुख देईन काय? आह्मी वनाला निघालों असतां गाईप्रमाणें हंबरडा फोडीत आमच्या मागून येणाऱ्या बिच्याऱ्या पुत्रवत्सलेला रडत टाकून आह्मी निघून आलों. धृतराष्ट्रप्रभृति वयानें थोर कौरव व कौरवांना मसलत देणारे शहाणे व अगाधबुद्धि विदुर या सर्वांना तूं भेट.याप्रमाणें निरोप सांगून श्रीकृष्णानें परत जाण्यास सांगितल्यावरून त्याला प्रदक्षिणा करून सर्व परत फिरले.

१३४ सर्वांच्या भेटी. (५. ८३–९३)

मंडळी परत फिरल्यावर भगवान श्रीकृष्ण रथांत बसून आनंदभरित होऊन पुढें चालला. दारुक घोड्यांना चुचकारून हाकीत असतां ते ती वाट गट्ट करून वर आकाशही गिळूं पहात आहेत कीं काय असें वाटत होतें. मार्गात ब्रह्मतेजानें झळकणाऱ्या ऋषींना दोहों बाजूंनीं उभे पाहून भगवानानें रथांतून खालीं उतरून त्यांना अभिवादन करून सत्कारपूर्वक विचारलें; 'लोकांमध्यें सर्व ठीक असून धर्म यथास्थित पाळला जात आहेना? तसेंच तिन्ही वर्णांचे लोक ब्राह्मणांच्या आज्ञेंत वागतात ना? आपण कोणीकडे निघालां? आज ह्या पृथ्वीवर कोणत्या उद्देशानें आलां आहां?' हें ऐकून देवासुरांचे मित्र जामदग्न्य त्याला ह्मणाले, 'हे दाशार्हा, हे सर्व पुण्यशील, तपस्वी, व बहुश्रुत ब्राह्मण व राजर्षी तुला बहुमान देऊन कौरवसभेंत चोहोंकडून जमलेल्या राजांना पाहण्याकरितां व तेथ तुझें धर्मार्थयुक्त असें हितावह भाषण ऐकण्याकरितां निघाले आहेत.'

यावेळीं भगवानाबरोबर परपक्षीय वीरांना पीडा उत्पन्न करणारे असे दहा हत्यारबंद महारथी, हजार पायदळ व हजार स्वार, त्याचप्रमाणें पुष्कळ अन्नसामुग्री व शेकडों नोकर लोक होते. ते जात असतां त्यांना पुढील शकुन होत होते. आकाश स्वच्छ असतां एकाएकी त्यामध्यें विजा चमकूंलागून मेघगर्जना होऊन मोठा पाऊस पडूं लागला. सिंधुप्रभृति सात पूर्वाभिमुखी वहाणाऱ्या महानद्या उलट दिशेनें वाहूं लागल्या. सर्व दिशा सुंद झाल्या. कुठें कांहींच स्पष्ट दिसेना. जिकंडे तिकडे वणवा लागून भूमि कांपूं लागली. शेंकडों विहिरींतील व भांड्यांतील पाण्याला ऊत येऊन पाणी बाहेर पडूं लागलें. जिकडे तिकडे अंधार व धूळच होऊन राहिली. आकाशांतून भयंकर गर्जना होत होती. कोणाचा कोणाला उमग पडेना. सर्व प्रांतभर हा अद्भुत चमत्कार दिसूं लागला. हास्तिनापुराला तर मोसाळ्याचा वारा दक्षिणेकडून व पश्चिमेकडून झोडून काढीत होता. मात्र भगवान चालला होता तेवढ्या प्रदेशांतून तो अनुकूल वहात होता, व भगवानावर पुष्पांचा व कमलांचा यथेच्छ वर्षाव चालला होता. मार्ग साफ व सुखकर राहून त्यांवरील कांटे वगैरे पार नाहींसे झाले होते. ठिकठिकाणीं हजारों ब्राह्मण स्तुतिपाठ गाऊन मधुपर्क व इतर द्रव्यांनीं भगवानाचा सत्कार करीत होते; व बायका रस्त्यावर येऊन सुवासिक अशीं वन्य फुलें त्यावर उधळीत होत्या. मनाला आल्हाद देणारीं अनेक गांवें, शहरें पहात पहात नानादेश ओलांडल्यावर अनेक प्रकारच्या धान्यांनीं संपन्न अशा रम्य शालीभवनाला ते येऊन पोहोचले. नेहमीं आनंदी व उल्हासवृत्तीचे, तसेच भारतांनीं संरक्षण केल्यामुळें परचक्राची भीति बिलकूल न राहतां संकटांची आणि त्यांची कधीं ओळख देखील नव्हती असे उपप्लव्यांतील नागरिक जन श्रीकृष्णाची भेट घेण्याकरितां नगर सोडून बाहेर वाटेवर येऊन उभे होते. ह्या आपल्या देशाला आलेल्या अतिथुल्य व मानार्ह भगवानाचा त्यांनीं यथोचित सत्कार केला. पुढें वृकस्थलाला येऊन पोहोंचतांच सूर्यनारायणानें आपल्या प्रसरणशील किरणांनीं आकाश लाल करून सोडल्यामुळें सारथ्याला रथाखालीं उतरून रथ सोडण्यास आज्ञा देऊन आपण शुद्ध होऊन भगवान संध्येला बसला. दारुकानें घोडे सोडून रीतीप्रमाणें त्यांच्या पाठीवरून व हात फिरवून पट्टेबिट्टे सोडून त्यांना मोकळे केलें. ती रात्र तेथें काढण्याचा भगवानांचा विचार दिसल्यावर हं हं ह्मणतां लोकांनीं उतरण्याच्या जागेची व खाण्यापिण्याची तजवीज केली. त्या गांवां

त जे आर्य, कुलीन, व ब्रह्मज्ञानांत काल घालीवणारे ठळक ठळक लोक होते त्यांनीं या मानार्हाकडे येऊन सत्कारपूर्वक यांला आशीर्वाद दिले व आपल्या रत्नमय घरांतून भगवानाचे पाय लागावे ह्मणून त्याची विनंति केली. तेव्हां 'ठीक आहे' ह्मणून त्यांचा सत्कार करून श्रीकृष्ण त्या सर्वांच्या घरीं जाऊन परत आपल्या बिऱ्हाडीं आला. पुढें भोजन आटोपून ती रात्र त्यानें तेथें काढली.

दूतमुखांतून ही भगवान निघाल्याची बातमी ऐकून धृतराष्ट्राच्या अंगावर रोमांच उभे राहून महाबाहु भीष्म, द्रोण, संजय व विदुर यांना एकत्र जमवून त्यांच्यासमक्ष दुर्योधनाला तो ह्मणाला, 'मोठी आश्चर्यकारक गोष्ट कानावर येत आहे. बायका, मुलें, ह्मातारे, घरोघर, त्याचप्रमाणें सभांतून व चवाट्यांवरून एकत्र जमून नानाप्रकारें बोलत आहेत. पराक्रमी दाशार्ह पांडवांच्या वतीनें इकडे येण्यास निघाला आहे असें सर्वतोमुखीं झालें आहे. तो सर्वमान्य व पूज्य असून ही लोकयात्रा, त्यावरच अवलंबून आहे. तो सर्व भूतांचा स्वामी असून धैर्य, वीर्य, व प्रजा यांचीही भिस्त त्यावरच आहे. त्याचा यथोचित मान ठेवणें हा सनातन धर्म आहे. त्याचा सत्कार केला असतां तें सुखावह होणार असून तसें न करणें दुःखाला कारण होणार आहे. उपचारांनीं तो तुष्ट झाला असतां त्यापासून आपल्याला त्याचा सर्व उद्देश काढून घेतां येईल. ह्मणून त्याच्या सत्काराची सर्व तयारी बरोबर ठेव. त्याच्या बाटेंत सर्व गोष्टींनीं यथास्थित अशीं त्याला अगदीं खुष करून सोडणारीं ठिकठिकाणीं उतरण्याला ठाणीं तयार असूं द्या. कां पितामह आपलें मत कसें काय आहे?' भीष्मप्रभृति मंडळींना त्याचें हें भाषण पसंत पडलें.तेव्हां दुर्योधनानें उतरण्याला निरनिराळीं ठाणीं व तेथें उत्तम उत्तम नानावस्तू तयार ठेवण्यास हुकूम सोडला. त्यावरून निरनिराळ्या रमणीय प्रदेशीं उत्तम उत्तम राहण्याला ठाणीं तयार करून त्या ठिकाणीं छान छान अनेक बैठकी ,स्त्रिया, सुगंधि पदार्थ, अलंकार, बारीक वस्त्रें व उत्तम उत्तम खाण्यापिण्याचे पदार्थ, माळा वगैरे तयार ठेवण्यांत आले. विशेषेंकरून वृकस्थलीं अनेक रत्नांनीं मनोरम अशी जागा तयार करण्यांत आली होती. परंतु या सर्वांकडे नुसती नजरही न फिरवितां भगवान थेट हास्तिनापुराला कौरवांकडे निघाला. तें ऐकून धृतराष्ट्र विदुराला ह्मणाला, 'भगवान वृकस्थलाहून इकडे येण्याला निघाल्याची बातमी आहे. वसु, रुद्र व आदित्य ज्याप्रमाणें बृहस्पतींच्या सांगण्याप्रमाणें वागत असतात त्याप्रमाणें सर्व वृष्णि व अंधक ज्याच्या कधीं बाहेर नाहींत त्या धैर्यशाली धर्मवेत्त्या महात्म्याचा मी पुढें सांगितल्याप्रमाणें सत्कार करीव. एकरंगी सोन्यानें मढवून काढलेले सुंदर बाल्हीक देशचे घोडे जोडलेले सोळा रथ व नेहमीं मस्त असे नांगराच्या फाळाप्रमाणें सुळे असलेले माहुतांसह आठ हत्ती, त्याचप्रमाणें सोन्यानें नखशिखांत मढवून काढलेल्या शंभर दासी व तितकेच दास, डोंगरी लोकांनीं आणलेलीं आठ हजार लोकरी वस्त्रें, चीन देशचीं अजिनें व अहोरात्र चमकणारा हा पाणि हीं सर्व त्याला नजराणा देण्याचें माझ्या मनांत आहे. एका दिवसामध्यें छपन्न कोस जाणारा व खेचरें जोडलेला एक रथ मजपाशीं आहे तोही मी त्याला देईन. त्यापाशीं असणाऱ्या लोकांना लागणाऱ्याच्या आठपट शिधासामुग्री त्याला पोहोंचली पाहिजे. दुर्योधनाशिवाय बाकीचे माझे सर्व पुत्रपौत्र उत्तम वस्त्रालंकार करून दैदीप्यमान रथांत बसून त्याला सामोरे गेले पाहिजेत. तशाच हजारों सुंदर श्रेष्ठ श्रेष्ठ वारांगना पायांनीं त्याला सामोऱ्या जाऊं देत; व ज्या कांहीं नगरांतील भल्या मुली श्रीकृष्णाला पहाण्याला जातील त्याही तोंडावर बुरखा न घेतां जाऊं देत. नगरांतील सर्व आबाल स्त्रीपुरुषांना उदय पावणाऱ्या भगवानाचें भक्तियुक्त अंतःकरणानें दर्शन घेऊं दे. चोहोंकडे मोठमोठ्या पताका उभारून पाणी शिंपडून रस्त्यांतील धूळ बसवून टाका. दुर्योधनाच्या घरापेक्षां वरचढ असें दुःशासनाचें घर यांला रहाण्यासाठीं झाडूनझुडून शृंगारून ठेवीव.' विदुर ह्मणाले, 'राजा, तूं सर्वांना मान्य व त्रैलोक्यांत श्रेष्ठ आहेस तेव्हां अशा वृद्धापकालीं तूं जें बोलशील तें शास्त्राला व सुयाला धरूनच असणार. चंद्राच्या ठिकाणीं कला, सूर्याच्या ठिकाणीं प्रभा, समुद्रांत मोठमोठ्या लाटा यांप्रमाणें तुझ्या ठिकाणीं धर्म, अशी तुझ्या प्रजेची खात्री असून तुझ्या अनेक

गुणांनींच तुझी प्रजा सुखी आहे. ह्मणून त्या गुणांचा सांभाळ करण्याला झटून सरळपणा धर, मूर्खपणानें सर्व पुत्रपौत्रादिकांचा नाश करून घेऊं नकोस. 'मी कृष्णाचा मोठा अतिथिसत्कार करीत आहें,' ह्मणून तुला वाटत आहे. पण एवढ्याच नव्हे तर त्याहून पुष्कळ अधिक सत्काराला तो पात्र आहे. परंतु तुझें हें करणें धर्मबुद्धीनें किंवा त्याला संतुष्ट करण्याच्या हेतूनें नाहीं हें मी खात्रीपूर्वक सांगतों. हें तुझें केवळ कपट असून वरकरणी कृत्यानें खरा उद्देश लपवून ठेवण्याचा हा तुझा प्रयत्न आहे. पांडव नुसतीं पांच गांवें मागत आहेत त्यांना तीं देऊन टाकून तुझ्यानें त्यांच्याशीं सख्य करवत नाहीं; आणि द्रव्यलोभ दाखवून त्याला त्यांपासून फोडून आपल्या बाजूला वळवूं पहात आहेस ! द्रव्यानें, इतर खटपटींनीं, किंवा पांडवांची निंदा करून त्याला अर्जुनापासून फोडतां येणें शक्य नाहीं हें मी तुला सांगून ठेवतों. त्याचा थोरपणा, पांडवांसंबंधानें त्याचें दृढ प्रेम हीं मला माहीत असल्यानें प्राणासमान त्या धनंजयाला तो कधीं सोडणार नाहीं. पाय धुण्याला लोटाभर पाणी व गोड शब्द यांशिवाय तो तुझ्यापाशीं कांहीं मागत नाहीं. ह्या माननीयाला जें आतिथ्य प्रिय आहे तें मात्र त्याला दे. सर्वांचें कल्याण असावें या उद्देशानें दोघांचें सख्य जुळविण्यासाठीं तो येत आहे, तेवढा त्याचा हेतु शेवटाला ने. आणि जे पांडव तुझ्याशीं मुलांप्रमाणें वागत आले आहेत त्यांच्याशीं वडिलाला साजेलसें वाग ह्मणजे झालें.' हें ऐकून दुर्योधन ह्मणाला, 'कृष्णासंबंधानें विदुर जें कांहीं ह्मणाले तें सर्व खरें आहे. पांडवांवर त्याचें पूर्ण प्रेम असून त्यांपासून त्याला फोडतां येणें शक्य नाहीं. ह्मणून तो जरी सत्काराला पात्र आहे तरी त्याच्या सत्काराकडे जें द्रव्य आपण खर्चण्याचें योजलें आहे तें खर्चूं नये. कारण त्याला ही वेळ व हा प्रसंग ठीक नाहींत. आह्मी भयानें त्याचा सत्कार करीत आहों असें त्याला वाटणार आहे. ज्यामुळें क्षत्रियाचा अपमान होण्याचा संभव आहे अशी गोष्ट करूं नये असें माझें मत आहे. तो जरी तिन्ही लोकांला मान्य असला तरी सख्यांचा प्रसंगच असा आहे कीं त्याला कांहीं देणें रास्त होणार नाहीं. हा तंटा आतां गोडीगुलाबीनें मिटणें शक्य नाहीं.' हें त्याचें भाषण ऐकून भीष्म धृतराष्ट्राला ह्मणाले, 'जनार्दनाचा तूं सत्कार कर किंवा करूं नकोस. त्यानें कांहीं तो रागावणार नाहीं. परंतु त्याचा अवमान करणें मात्र योग्य होणार नाहीं. त्यानें मनांत योजलेलें कोणालाही कोणत्याही उपायानें मोडून काढतां येणार नाहीं; ह्मणून त्याच्यासारख्या योग्य पुरुषाच्या साहाय्यानें पांडवांशीं सख्य करून तो सांगेल तसें मनांत कांहीं विचार न आणतां करून टाक. धर्मार्थाला धरून असेल तेंच तो खात्रीनें सांगेल. तुह्मी त्याच्याशीं गोड बोलावें.' दुर्योधन ह्मणाला, 'मी आपल्या संपत्तीचा उपभोग पांडवांशीं मिळून घेईन अशी तर गोष्ट जिवांत जीव आहे तोंपर्यंत घडावयाची नाहीं. आतां मीं जें मनांत आणिलें आहे तें ऐका. उद्यां कृष्ण येथें येईल तेव्हां मी त्याला बांधून ठेवीन; ह्मणजे सर्व वृष्णि, पांडव, येवढेंच नव्हे तर सर्व पृथ्वी माझ्या मुठींत आलीच ह्मणावयाची. मात्र येथें आतां ठरलेला विचार त्याच्या कानावर जातां कामा नये.' कृष्णासंबंधानें त्याचे हे घोर विचार ऐकून धृतराष्ट्राला फार वाईट वाटून तो त्याला ह्मणाला, 'बा तात, तूं प्रजेचा पालक आहेस, तेव्हां असें बोलूं तरी नकोस. हा सनातन धर्म नव्हे. हृषीकेश दूताच्या नात्यानें येथें येत असून तो आमचा संबंधी व आह्मांला प्रिय आहे. कौरवांसंबंधानें त्याच्या मनांत पाप नसतां तूं त्याला बांधीन कसा ह्मणतोस ?' यावर 'तुझा मंदबुद्धि मुलगा दुष्टाच्या संगतीनें अनर्थाला कवटाळूं पहात आहे व आह्मांचें हितवचन त्याला गोड वाटत नसून वांकड्या वाटेला तो जाऊं इच्छीत आहे; आणि तूंही सुहृदांचें न ऐकतां त्याच्याच तंत्रानें वागत आहेस; सरळ हेतु असणाऱ्या श्रीकृष्णाशीं गांठ पडली असतां अमात्यवर्गासह ह्या तुझ्या मुलाची एका घटकेंत राखरांगोळी उडेल; धर्माला झुगारून दिलेल्या ह्या दुष्टाचें भाषण माझ्यानें आतां ऐकवत नाहीं,' असें ह्मणून सत्यपराक्रमी भीष्म तेथून संतापून उठून निघून गेले. भगवान श्रीकृष्ण सकाळीं उठून सर्व आह्निक आटोपून ब्राह्मणांची परवानगी घेऊन हास्तिनापुराकडे निघाला. तेव्हां वृकस्थलवासी जन

त्याला निरोप देऊन परतले. दुर्योधनाशिवाय इतर धृतराष्ट्रपुत्र त्याचप्रमाणें भीष्मद्रोणप्रभृति मंडळी उत्तम पोषाख करून त्याला सामोरी गेली. पुष्कळ पौरजनही निरनिराळ्या वहानांतून, त्याचप्रमाणें पायांनीं त्याला पहाण्याच्या इच्छेनें सामोरे निघाले. नेहमीं चोख वर्तन असणाऱ्या भीष्मादिकांची वाटेंत गांठ पडल्यावर त्याच्या घोळक्यामधून भगवान नगरांत शिरला. त्याच्या सन्मानासाठीं नगर सुशोभित करून नानाविध रत्नांनीं मढवून काढलें होतें. कोणत्याही घरांत चिटपांखरूं न उरतां, बायका, मुलें, म्हातारेकोतारे सर्व राजमार्गांत खालीं येऊन त्याची स्तुति करीत होते; व ते नगरामध्यें शिरतेवेळीं रस्त्यावरील मोठमोठे वाडे सुंदर स्त्रियांनीं फुलून जाऊन त्यांच्या भारानें जणू काय डुलताहेतसे दिसत होते. भगवानाच्या मोठ्या वेगवान घोड्यांची गति राजमार्गांत आल्यावर लोकांच्या गर्दीत अगदीं मंद झाली होती. शत्रुकर्शन भगवान गच्चांनीं शोभायमान अशा सफेती दिलेल्या राजवाड्यांत शिरून तीन चौक ओलांडून प्रथम धृतराष्ट्राकडे गेला. तो आल्याचें समजल्याबरोबर प्रज्ञाचक्षु धृतराष्ट्र द्रोण, भीष्म प्रभृति मंडळीसहवर्तमान उठून उभा राहिला. पुढें यशस्वी धृतराष्ट्राजवळ जाऊन भगवानानें त्याचा व भीष्मादिकांचा न्यायाप्रमाणें शब्दांनीं आदर करून सर्व राजांच्या त्यांच्या त्यांच्या वयाप्रमाणें क्रमानें भेटी घेतल्या, व तेथें ठेवलेल्या एका सुशोभित केलेल्या भव्य सुवर्णासनावर धृतराष्ट्राच्या सांगण्यावरून तो बसला. पुरोहितांनीं गाय, मधुपर्क व उदक पुढें आणून ठेविलें. याप्रमाणें आतिथ्य घेऊन तेथें कुरुमंडळामध्यें ज्याच्या त्याच्या नात्याप्रमाणें सर्वांशीं कांहीं वेळ विनोदपर भाषण करून राजाचा निरोप घेऊन व सभेमध्यें सर्वांची यथान्यायानें भेट घेऊन भगवान रम्य अशा विदुरगृहाला आला. तेव्हां विदुर त्याला सामोरे गेले व मंगल वस्तूंनीं भगवानाचा सन्मान करून म्हणाले, 'हे पुंडरीकाक्षा, तुझ्या दर्शनापासून मला जो संतोष झाला आहे तो सांगतां येणें शक्य नाहीं. सर्व प्राणिमात्रांचा तूं अंतरात्मा असल्यानें तो तुला कळतच आहे.' नंतर सर्व धर्म पूर्णपणें जाणणाऱ्या त्या विदुरांनीं त्याचें आतिथ्य करून त्याला पांडवांसंबंधीं कुशल विचारलें. तेव्हां सर्व प्रत्यक्ष दिसणाऱ्या भगवानानें, विदुर बुद्धिमानांमध्यें श्रेष्ठ असून पांडवांवर त्यांची भक्ति आहे, व नेहमीं त्यांची धर्मार्थिकडे प्रवृत्ति आहे हें जाणून पांडवांची इत्थंभूत हकीकत त्यानें त्यांना सांगितली. याप्रमाणें दुपारच्या वेळीं विदुरांची गांठ घेऊन तो पितृभगिनी कुंतीकडे गेला. निर्मल सूर्याप्रमाणें तेजःपुंज अशा भगवानाला आलेला पाहून मुलांची आठवण होऊन त्याच्या गळ्याला मिठी मारून कुंती मोठ्यानें रडूं लागली; त्या आपल्या सत्वशील मुलांमध्यें नेहमीं असणाऱ्या श्रीकृष्णाला पाहिल्याबरोबर तिच्या डोळ्यांतून घळघळा अश्रु वाहूं लागले. अतिथीसत्कार घेऊन भगवान बसल्यावर रडण्यानें गळा दाटून येऊन ती त्याला म्हणाली, 'हे केशवा, लहानपणापासून जे थोरांची शुश्रूषा करण्यांत दक्ष असून एकमेकांशीं प्रेमभावानें व सरळ वागत आले, व ज्यांना कपटानें राज्यापासून भ्रष्ट झाल्यानें त्यांनीं लोकांत रहावें असें असून त्यांना निर्जन वन पहावें लागलें, ज्यांचा राग व आनंद नेहमीं स्वाधीन असून ज्यांची ब्राह्मणांवर सदोदित भक्ति आहे, ते सत्यवचनापासून कधीं न ढळणारे आणि म्हणून प्रिय वस्तू व सुख यांना व तशीच रडणाऱ्या मला टाकून ज्यांना वनाला जावें लागलें व ज्यांनीं जातांना आपल्याबरोबर माझें हृदय नेलें, असे ते माझे वनवासी पांडव कसे आहेत ? सिंह, वाघ व हत्ती यांनीं भरलेल्या वनामध्यें त्यांनीं आजपर्यंत दिवस कंठले ! लहानपणींच वडिलांना मुकलेल्या त्या माझ्या बाळांना मीं नेहमीं लडिवाळपणांत वाढविलें. आतां याप्रमाणें दोघांनाही मुकल्यामुळें वनांत ते कसे बरें राहिले असतील ? जे घरीं असतांना शंख, नोबद, मृदंग, अलगूज इत्यादिकांच्या मधुर शब्दांनीं, त्याचप्रमाणें हत्तीच्या गरजण्यानें, घोड्यांच्या खेंकाळण्यानें व ब्राह्मणांच्या स्तुतिपाठानें भव्य हवेल्यांमधून रंकू नांवाच्या हरणाच्या कातड्यावर निजले असतां जागे होत, त्यांना कधीं संवय नसल्यानें घोर वनांत श्वापदांचा भयंकर शब्द ऐकून झोंपसुद्धां रे आली नसेल ! स्त्रियांच्या मधुर गायनांनीं व भाटांच्या स्तुतिपाठांनीं जागे होणाऱ्या नरवीरांना आज श्वापदांच्या आरोळ्यांनीं जागे होण्या-

ची पाळी यावी अं ! जो विनयशील, सत्यनिष्ठ, जितेंद्रिय, व सर्वभूतांवर दया करणारा, कामद्वेष स्वाधीन ठेवून सत्यमार्गानें वागत आला व अंबरीष, मांधाता, ययाति, नहुष, भरत, दिलीप, शिबि व औशीनर या राजांचें जड जूं ज्यानें आपल्या मानेवर घेतलें, तो शील व वृत्त यांनीं संपन्न,धर्मज्ञ व सत्यप्रतिज्ञ सर्वगुणसंपन्न धर्मराज त्रैलोक्याचा राजा होण्याला योग्य आहे. तर तो माझा शुद्धशील धर्मात्मा अजातशत्रु युधिष्ठिर कसा आहे? ज्या त्याला दहा हजार हत्तींचें बळ असून जो बलशाली वायूसारखा वेगवान आहे, व जो तापट असूनही भावांचें नेहमीं प्रिय करण्यांत दक्ष असून त्यांना तो फार आवडता आहे, ज्यानें कीचकाचा सर्व त्याच्या जातीसकट व तसेंच बकहिडिंबादिकांचा संहार केला, तो माझा पराक्रमी, बलशाली, तापट व तेजोराशी भीम कसा आहे? जो सहस्रार्जुन आज केवळ नामशेष आहे, त्याच्यावर सुद्धां जो आपल्या दोनच बाहूंनीं नेहमीं वरचढ करूं पहात आहे, जो एकसारखे पांचशें बाण सोडतो, जो बाण सोडण्यांत कार्तवीर्याच्या तोडीचा, तेजामध्यें सूर्यासारखा, इंद्रियनिग्रहामध्यें महान् महान् ऋषींसारखा, क्षमेमध्यें पृथ्वीसारखा व पराक्रमांत इंद्रासारखा आहे, ज्यानें आपल्या वीर्यानें सर्व राजांवर कौरवांना सार्वभौमत्व मिळवून दिलें आहे, ज्याच्या बाहुबलावर सर्व पांडव अवलंबून आहेत, जो सर्व रथ्यांमध्यें श्रेष्ठ व सत्यपराक्रमी युद्धाला उभा राहिला असतां त्याच्यापुढून जिवंत परत येण्याची कोणाची छाती नाहीं व देवांचा जसा इंद्र तसा जो सर्व पांडवांचा आधारभूत आहे तो तुझा भाऊ व सखा धनंजय कसा आहे? सर्व भूतांवर दया करणारा, विनयसंपन्न, सर्व अस्त्रांची पूर्ण माहिती असणारा, सौम्य, सुकुमार, धार्मिक व मला फार आवडता, रणभूमीला शोभा आणणारा, महाधनुर्धर, हुशार, जो आपल्या भावांच्या शुश्रूषेंत नेहमीं दक्ष असून ज्याचें वर्तन वाखाणण्यासारखें आहे तो माद्रीतनय सहदेव कसा आहे? जो सुकुमार, तरुण, शूर व दर्शनीय असून पांडवांचा बाहेरचा प्राण आहे, असा नानाप्रकारच्या युद्धकलेंत कुशल व सुखांत वाढलेला माझा नकुल खुशाल आहना? ज्याच्या कपाळीं दुःख कधीं न येतां नेहमीं ज्यानें सुखच भोगावें त्या महारथ नकुलाला मी कधीं पाहीन का? जो एक निमिषभर डोळ्याआड झाल्यानें मला चुकल्या चुकल्यासारखें होई ती मी अजून जिवंत तरी कशी राहिलें! सर्व गुणांनीं व रूपानें संपन्न व कुलीन द्रौपदी माझ्या सर्व मुलांपेक्षांही मला आवडती आहे. ज्या सत्यभाषिणीला पुत्रलोकांपेक्षां पतिलोकच आवडते असून प्रिय पुत्रांना देखील टाकून जी पांडवांच्याबरोबर आहे आणि ह्मणूनच बा अच्युता, जिच्या आजपर्यंत सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या आहेत ती कल्याणी द्रौपदी कशी आहे? हिचे पांच शूर महाधनुर्धारी पती अग्नीसारखे असतांही हिला दुःख भोगावें लागत आहे! ह्या पुत्रादिकांना आंचवलेल्या द्रौपदीला पाहून आज चवदा वर्षें झालीं! चांगलीं कृत्यें केल्यानेंच मनुष्याला सुख मिळतें असें खात्रीनें ह्मणतां येत नाहीं. कारण द्रौपदीचें वर्तन तशा प्रकारचें असून तिला कायमचें सुख मिळालें आहे काय? राग व लोभ यांच्या अनुरोधानें वागणाऱ्या दुष्टानें ती रजस्वला असतां एका लुगड्यानिशीं तिला सभेंत सासऱ्यांच्या पुढें आणून उभी केली व सर्व कौरव तें निमुटपणें पहात उभे राहिले, तेव्हां जें मला वाईट वाटलें त्याहून अधिक दुःख मला पूर्वी कधींच झालें नव्हतें! त्या वेळीं धृतराष्ट्र महाराज, बाल्हीक, कृप प्रभृतींचीं तोंडें उतरून गेलीं. पण त्या सभेंत विदुरांनाच मी सर्वांहून थोर समजतें. **मनुष्य वर्तनानेंच श्रेष्ठ ठरत असून पैशानें किंवा विद्येनें त्याला थोरपणा येत नाहीं.** त्या गंभीर महाबुद्धि महात्म्या विदुरांचा शीलरूपी अलंकार सर्व लोकांवर विशेष झळकत आहे ह्मटल्यास चालेल. ' याप्रमाणें शोकाकुल झालेल्या कुंतीनें कृष्णदर्शनानें आनंदभरित होऊन आपलीं नानाविध दुःखें त्याच्या पुढें ओकलीं. ती आणखी ह्मणाली, ' पूर्वीच्या दुष्ट राजांनीं केलेलीं अक्षद्यूत, मृगवध इत्यादि दुष्टकृत्यें यांना सुखावह होतील काय? धृतराष्ट्रांच्या मुलांनीं जे सभेमध्यें द्रौपदीचे धिंडवडे काढले ते जी माझ्या अंगाची लाही उडवीत आहेत तशी लाही प्रत्यक्ष मरण आल्यानें सुद्धां उडणार नाहीं! मुलांना नक्षत्रांतून घालवून देणें व त्यांचा वनवास यांचा अनु-

भव मला प्रत्यक्ष आला आहे. मी आपल्या मुलांजवळ असतें तर त्यांचा तो दुसऱ्याच्या घरीं गुलामाप्रमाणें राहून अज्ञातवास काढणें मला इतक्या दुःखाला कारण झालें नसतें. दुर्योधनानें माझ्या मुलांना संकटांत पाडल्याला हें चवदावें वर्ष आहे आणि सुख जर पुण्यकर्माची फेड असेल तर या दुःखानंतर आह्मांला सुख मिळालें पाहिजे. धृतराष्ट्राचे मुलगे व पांडव यांना मीं कधीं कमी जास्ती लेखिलें नाहीं. आणि त्या सत्यानें मी सांगतें कीं, पांडवांसहवर्तमान शत्रूंना मारून या प्रसंगांतून पार पडून लक्ष्मीसंपन्न असा मी तुला पाहीन. त्यांचा कधीं पाडाव होणार नाहीं. कारण त्यांचें वर्तनच तशा प्रकारचें आहे. मी लहान असून चेंडूनें खेळत असतां तुझ्या आजोबांनीं आपला मित्र जो कुंतीभोज त्याला मला देऊन टाकली. याप्रमाणें बापानें व सासऱ्यांनीं टाकलेल्या दुःखशील अशा माझ्य जगण्यांत तरी काय अर्थ आहे सांग? अर्जुनाला प्रसवलें तेव्हां सोहेरामध्यें रात्रीच्या वेळीं जी आकाशवाणी झाली कीं, तुझा मुलगा पृथ्वी जिंकील, त्याची कीर्ति स्वर्गाला जाऊन पोहोंचेल, व सर्व कौरवांना मारून भावांसहवर्तमान तो तीन अश्वमेध करील, ती खोटी कशी बरें व्हावी ? प्रत्यक्ष धर्मच अशा महात्म्या श्रीकृष्णस्वरूपी विधात्याला माझा नमस्कार असो. धर्मावरच सर्व प्रजा अवलंबून आहे. धर्मामध्यें जर कांहीं तथ्य असेल तर ज्याप्रमाणें आकाशवाणी झाली आहे तें सर्व तूं घडवून आणशील. मुलांचा वियोग ज्याप्रमाणें मला पिळून काढीत आहे तितकें दुःख वैधव्य आल्यानें किंवा संपत्तीला मुकल्यानें सुद्धां मला कधीं झालें नाहीं. तो सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ गांडिवधन्वा माझ्या डोळ्याआड झाल्यानें माझ्या मनाला स्वस्थता कशी ती नाहीं. आज चवदा वर्षें मीं आपल्या मुलांना बघितलें नाहीं ! कुडींतून निघून जाऊन प्राण नाहींसे झाल्यावर मात्र लोक श्राद्ध करतात. परंतु वास्तविक पाहिलें असतां ते मला व मी त्यांना मुकल्या सारखेच झालों आहों. माझ्या त्या धर्मात्म्या युधिष्ठिराला सांग कीं, तुझ्या धर्माचें अवडंबर फारच माजत चाललें आहे. उगीच त्याच्या भानगडींत आतां पडूं नकोस. जिला पोटासाठीं दुसऱ्यावर अवलंबून रहावें लागतें तिचें जगणें फुकट आहे. यापेक्षां मरणें काय वाईट ? तसेंच त्या धनंजयाला व नेहमीं एका पायावर तयार असणाऱ्या त्या वृकोदराला सांग कीं, **क्षत्रिय स्त्री ज्या कारणाकरितां मुलांना जन्म देते ती वेळ आतां आली आहे; आणि ही आलेली पर्वणी जर फुकट दवडाल तर आजपर्यंत लोकमान्य असलेले तुह्मी लोकांच्या छीः थूःला पात्र व्हाल व जर का तुह्मी एकवार तसे झालां तर मी तुह्मांला कायमचीं मुकलें समजा. वेळ आली असतां प्राणाची देखील पर्वा कामाची नाहीं.** नेहमीं क्षात्रधर्माला जागणाऱ्या माद्रीच्या मुलांना सांग कीं, **प्राणसुद्धां खर्ची घालून पराक्रमानें मिळविलेले भोग पसंत करा. पराक्रमानें मिळविलेलें वैभव क्षात्रधर्मानें राहूं इच्छिणाऱ्या पुरुषाच्या मनाला नेहमीं संतोष देत असतात.** येथून गेल्यावर सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ जो अर्जुन त्याला सांग कीं, द्रौपदी सांगेल त्या वाटेनें जा. ते दोघे वीर भीमार्जुन खवळले असतां देवांनासुद्धां शेवटची गति देण्याला ते समर्थ आहेत हें तुला मी सांगावयाला नको. द्रौपदी सभेमध्यें असतां कर्णदुःशासन तिला टाकून बोलले हा अपमान त्या दोघांचाच आहे. ठळक ठळक थोर वीर पहात असतां दुर्योधन भीमावर चालून गेला त्याचें फळ त्याला आतां कळून येईल. एकवार वैर पडल्यावर तें भीमाचें वैर पुष्कळ दिवस मध्यें लोटले तरी शत्रूचा पूर्ण फडशा उडविल्याखेरीज निवणारें नव्हे. कौरवांनीं द्यूतामध्यें राज्य बुचाडून घेऊन माझ्या मुलांना वनवासाला पाठविल्याचें मला इतकें दुःख होत नाहीं; परंतु त्या साध्वीला ती रजस्वला असतां सभेमध्यें जावें लागून जे कर्णकटु शब्द ऐकावे लागले तें माझ्या मनाला फार झोंबत आहे. क्षात्रधर्माला जागणाऱ्या त्या स्त्रीधर्म जाणणारीला सनाथ असतांही ते वेळीं कोणी नाथ मिळाला नाहीं. ज्या मला तूं, सर्व बलवानांमध्यें श्रेष्ठ राम, व महारथ प्रद्युम्न नाथ आहां ती मी ज्यापुढें कोणाची मात्रा चालावयाची नाहीं, असा भीम व कधीं न डगमगणारा अर्जुन जिवंत असून अशीं दुःखें सोशीत आहे पहा ! ' याप्रमाणें पुत्रशोकानें पीडलेल्या आपल्या आतेचें शांतवन करून

भगवान म्हणाला, 'आते ' तुझ्यासारखी सीमंतिनी सर्व लोकांमध्यें कोण आहे? तूं शूर राजाची मोठी कुलीन कन्या असून एका सरोवरापासून दुसऱ्या सरोवराप्रमाणें आजमीढाच्या घरीं येऊन पडली आहेस व या पृथ्वीची स्वामिणी व सर्वमंगला अशी तूं पतीला परम पूज्य होतीस. वीरपुत्र प्रसवणारी वीरपत्नी तूं सर्व गुणांनीं मंडित आहेस. तुझ्यासारख्या मोठ्या शहाण्या स्त्रीनें येऊन पडणारीं सुखदुःखें सोसलींच पाहिजेत. क्षोप, सुस्ती, राग, आनंद, भूक, तहान, थंडी, ऊन्ह ह्या सर्वांना न जुमानतां पांडव ग्राम्यसुखाकडे लक्ष न देतां वीरसुखांत गढून आहेत; व ते फार उत्साहसंपन्न व मोठे बलशाली असल्यानें त्यांची थोड्याथोडक्यानें तृप्ति व्हावयाची नाहीं. **थोर लोक कोणताही शेवट पतकरतात. ग्राम्यसुखाला सवकलेले मात्र मध्यम स्थितींत संतुष्ट असतात.** शहाण्या लोकांनीं कोणत्याही स्थितीच्या कळसांतच आजपर्यंत सुख मानून घेतलें असून मधली स्थिति त्यांना दुःखमयच वाटते. द्रौपदीनें आणि सर्व पांडवांनीं अभिनंदनपूर्वक आपलें कुशल कळविण्याम सांगून तुझें कुशल विचारलें आहे. ते सुरक्षित असून सर्व हेतू परिपूर्ण होऊन आपल्या शत्रूंना मारून सर्व लोकांवर आधिपत्य मिळवितील. ' त्यानें तिचें याप्रमाणें शांतवन केलें असतां मुलांसंबंधी चिंतेनें वेडी बनलेली कुंती मनांत आलेले वेडगट दुष्ट विचार दाबून ठेवून म्हणाली, ' हे कृष्णा, धर्मलोप होऊं न देतां सरळपणें त्यांच्या हिताचें असेल तेंच तूं कर. तुझी कर्तुमकर्तुं शक्ति, तुझा खेरेपणा, तुझें शुद्धकुल, त्याचप्रमाणें मित्रांचें ठाकठीक जुळवून देण्यासंबंधी तुझी बुद्धि व सामर्थ्य हीं सर्व मला ठाऊक आहेत. आह्मांला आतां कायतो तूंच आहेस. तूं म्हणतोस हें खरें झाल्यावांचून कधीं राहणार नाहीं. ' नंतर तिला प्रदक्षिणा करून तिचा निरोप घेऊन भगवान दुर्योधनाच्या वाड्याकडे गेला. मोठ्या वैभवानें गजबजलेल्या त्या इंद्रभुवनासारख्या वाड्यांत शिरून द्वारपालांकडून मज्जाव न होतां तीन चौक ओलांडल्यावर पाण्यानें ओथंबलेल्या मेघासारख्या पर्वतशिखराप्रमाणें उंच अशा त्या वाड्यांतील शृंगारलेल्या गच्चीवर हजारों राजे व कौरव यांमध्यें आसनावर बसलेल्या महाबाहु दुर्योधनाकडे तो गेला. दुःशासन, कर्ण व शकुनि हे त्याच्या जबळच बसले होते. भगवानाला येतांना पाहून दुर्योधनानें उठून त्याला मान दिला. नंतर सर्वांची भेट घेऊन नानाविध कपड्यांनीं मढविलेल्या सुवर्ण मंचकावर भगवान बसला. त्याला गाय, मधुपर्क व उदक देऊन दुर्योधनानें आपला वाडा व राज्य त्याच्या पायांवर अर्पण केलीं, व तेजस्वी सूर्याप्रमाणें तेथें बसलेल्या भगवानापुढें सेवेला हजर उभा राहिला. त्यानें त्याला जेवावयाला बोलाविलें. श्रीकृष्णानें तें नाकारलें असतां कर्णाच्या विचारानें दुर्योधन क्षुद्र पण निष्ठुर शब्दांनीं त्याला म्हणाला, ' जनार्दना, तुझ्यासाठीं सर्व तयारी केली असून तूं नाहीं का म्हणतोस ? दोघांच्या कल्याणामध्यें दक्ष असून दोघांना साहाय्य देण्याचें तूं कबूल केलें आहेस. तसेंच तातांचा तूं संबंधी असून त्यांची तुजवर फार भक्ति आहे. तूं धर्मार्थाचें खरें इंगित जाणणारा असल्यानें याचें कारण सांगशील तर बरें होईल. ' हें दुर्योधनाचें भाषण ऐकून महाशय भगवान हात वर करून, आकाशांत येणाऱ्या ढगाप्रमाणें स्वर खळूं न देतां अस्खलित स्वरानें मोठ्यानें उद्देशाला धरून प्रसंगोचित बोलला. तो म्हणाला, ' दूतांचा हेतु सफल झाल्यावरच ते जेवणखाण वगैरे सत्कारांकडे लक्ष देत असतात. म्हणून माझी इच्छा पूर्ण करून मग वाटेल तितका तूं माझा सत्कार कर. ' हें ऐकून दुर्योधन म्हणाला, ' आमच्याशीं असें वांकडेपणानें वागणें तुला शोभत नाहीं. तुझा हेतु शेवटास जावो वा न जावो. आम्ही मोठ्या संतोषानें तुझा सत्कार करीत असतां तूं त्याची पर्वा करीत नाहींस हें मात्र बाईट. तुझ्याशीं आमचें वैर नसतां असें बोलणें तुला शोभत नाहीं. ' हें ऐकून भगवानानें हासत हासत त्याला उत्तर दिलें, ' काम, राग, द्वेष, लोभ किंवा पैसा यांसाठीं किंवा लटपटीच्या बोलण्यानें मी कधीं धर्मावर पाणी सोडण्याला तयार होणार नाहीं. प्रेम असेल तेथें अन्न घ्यावें किंवा अन्न न मिळेल. तर वाटेल तेथें एखाद्यानें अन्न घ्यावें. तुझें आमच्यावर प्रेम नाहीं व आह्मी अनार्थीही अजून बनलों नाहीं. सर्व गुणांनीं संपन्न व तुझ्या मनाप्रमाणेंच

बागत असणाऱ्या पांडवांबरोबर आजन्म कांहीं कारण नसून तूं वैर करीत आला आहेस. विनाकारण असा त्यांचा द्वेष करणें तुला शोभत नाहीं. ते नेहमीं धर्मानें बागत असून त्यांच्यामध्यें एवढें देखील उणें काढण्याची कोणाची छाती नाहीं. त्यांचा जो द्वेष करतो तो माझाच द्वेष करतो असें मी समजतों. धर्मानें बागणारे पांडव व मी एकच आहों असें समज. कामक्रोधांच्या तावडींत जाऊन जो गुणवानांशीं विरोध करून त्यांचा द्वेष करतो तो मनुष्य नीच समजला पाहिजे. उत्तम गुणांनीं संपन्न अशा ज्ञातींकडे लोभदृष्टीनें जो पहातो त्या क्रोधाधीन झालेल्या अजितेंद्रिय पुरुषापाशीं संपत्ति फार दिवस टिकत नाहीं. जो गुणवानांना जोडतो तो चिरकाल सुखी असतो. हें दुष्टांचें अन्न घेण्यालायक नाहीं. एकट्या विदुराकडेसच अन्न घ्यावें असें माझें मन घेतें. ' ह्याप्रमाणें बोलून तेथून भगवान बाहेर पडून विदुराकडे निघून गेला. विदुरांनीं मोठ्या कळकळीनें वाटेल ती वस्तु पुरवून भगवानाचा सत्कार केला; अनेक प्रकारचे उत्तम मानवणारे पदार्थ त्यांनीं तयार करवून आणविले. रात्रीं भोजनानंतर भगवान स्वस्थ बसला असतां विदुर त्याला ह्मणाले, ' केशवा, तूं आलास हें कांहीं बरें केलें नाहींस. हा मंदबुद्धि तापट दुर्योधन धर्मार्थाला न जुमानतां दुसऱ्याचा पाणउतारा करून स्वतःचा बडेजाव माजवून घेणारा आहे; व थोरांच्या उपदेशाचें याच्यापुढें कांहीं चालावयाचें नाहीं. धर्मशास्त्राची याच्यापुढें डाळ शिजावयाची नाहीं. हा मोठा दुराग्रही आहे. हिताच्या वाटेकडे वळणारा नव्हे. विषयलंपट व मित्रांचा द्वेष करणारा असा असून हा मोठा संशयखोर आहे. हा कोणावर उपकार करणारा नसून केलेला उपकार स्मरणाराही पण नव्हे. धर्माला झुगारून देऊन यानें कपटाला कवटाळलें आहे. याची बुद्धि स्थिर नसून इंद्रियांवर याचा ताबा नाहीं. हा मनःपूत बागणारा आहे. अशा अनेक दोषांनीं याला घेरून टाकलें असल्यामुळें तूं हिताची गोष्ट सांगितलीस तरी हा दुराग्रहानें ती ऐकणार नाहीं. भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, अश्वत्थामा, जयद्रथ यांवर त्याची मोठी मदार असल्यानें संधि करण्याला याचें मन घेणार नाहीं. भीष्मद्रोणप्रभृतींकडे पांडव नुसते पाहण्याला सुद्धां समर्थ नाहींत असें कर्णदुर्योधनांना वाटत आहे. त्याचप्रमाणें हा स्वतःला न ओळखणारा मूढ पृथ्वीवरील सर्व सैन्य गोळा करून स्वतःला कृतकृत्य समजत आहे. एकटा कर्ण सर्व पांडवांचा फडशा पाडण्याला समर्थ आहे असें याला वाटत आहे. तूं यांचें बंधुप्रेम जोडूं पहात आहेस पण वाजवी रीतीनें जें त्यांना द्यावयाला पाहिजे तें सुद्धां देण्याला हा कबूल नाहीं. हा विचार त्यांनीं आपसांत ठरवून टाकला आहे. तुझे शब्द त्या ठिकाणीं फुकट जाणार. ज्या ठिकाणीं सदुपदेश व दुरुपदेश सारखेच विकले जातात तेथें शहाण्यानें बहिऱ्यापुढें गाण्याप्रमाणें कांहीं बोलूं नये हेंच चांगलें. चांडाळाबरोबर ज्याप्रमाणें ब्राह्मणानें बोलणें रास्त नाहीं त्याचप्रमाणें निर्मर्याद अशा अजाण मूर्खांमध्यें जाऊन बोलणें तुला ठीक नाहीं. सत्तेच्या घमेंडींत हा दुर्योधन तुझें ह्मणणें ऐकणार नाहीं; आणि तुझें सर्व बोलणें फुकट जाणार आहे. त्या चांडाळचौकडीमध्यें तूं जावेंस हें मला बरोबर वाटत नाहीं. दुर्बुद्धि, लौकिकज्ञानहीन अशा ह्या पापकर्माकडे कल असलेल्यांमध्यें जाऊन त्यांच्या उलट बोलत बसणें मला ठीक दिसत नाहीं. वृद्धसेवा ठाऊक नसून संपत्तीचा डोळ्यावर धूर आला असल्यामुळें, किती जरी याच्यापुढें कंठशोष केलास तरी तुझ्यासंबंधानें याचें मन बिघडलें असल्यानें तुझें ऐकण्याला हा कधीं तयार होणार नाहीं. आपलें राज्य युद्ध करून इंद्रादिकांना सुद्धां घेतां येणार नाहीं असें त्यांच्या मनानें घेतलें आहे. अशी स्थिति असून कामक्रोधादिकांच्या अनुरोधानें वाटेल तसें वागणारा असल्यानें तुझ्या योग्य भाषणांचेंही याच्यापुढें कांहीं चालणार नाहीं. हत्ती, घोडे, रथ, पायदळ यांच्यामध्यें आपण सुरक्षित आहों असें समजून पृथ्वी याला आपणच जिंकिल्यासारखी वाटत आहे. याच्याशीं सख्य होणें अगदीं अशक्य आहे. कारण आपल्या ताब्यांतील परस्व देखील तो स्वतःचेंच समजतो. दिवस भरल्यामुळें ह्या पृथ्वीची ग्रहदशा फिरली आहे ह्मणूनच पृथ्वीवरील सर्व राजे दुर्योधनाबरोबर पांडवांवर उठले आहेत. ह्या सर्वांनीं पूर्वी तुझ्याशीं वैर केलें असतां यांचें तूं सर्वस्व हरण केलें असल्यामुळें भीतीनें कर्णाची का-

स धरून ते कौरवांच्या बाजूला मिळाले आहेत. तेव्हां ह्या दुष्टांमध्यें तूं जावेंस हें मला ठीक दिसत नाहीं. तुझें सामर्थ्य, तुझी बुद्धि, तुझा पराक्रम हीं सर्व मी जाणून आहें. देवांनाही तूं अजिंक्य आहेस हें मी जाणतों. पांडवांहून तूं मला विशेष प्रिय आहेस, ह्मणून प्रेमामुळें, तुझ्यासंबंधी आदरामुळें, तसेंच जिव्हाळ्यामुळें हें मी तुला सांगत आहें. मला मात्र तुझा हा मोठा अलभ्य लाभ झाला आहे.' भगवान ह्मणाले, 'आपल्यासारख्या दूरदर्शी शहाण्यांनीं मला जसा उपदेश करावा त्याला अनुरूपच हें आपलें भाषण आहे. धर्मार्थाला धरून थोडिलाप्रमाणें मोठ्या कळकळीचा आपण उपदेश केला आहे. आपलें ह्मणणें जरी खरें आहे तरी माझ्या येण्याचा उद्देश आपण नीट लक्षांत आणा. कौरवांचा दुष्टपणा व क्षत्रियांचें मजसंबंधाचें वैर या सर्व गोष्टी लक्षांत ठेवूनच मी येथें आलों आहें. ह्या पृथ्वीची घडी बिघडली असतां तिला कालपाशांतून जो सोडवील त्याच्या पदरीं उत्तम पुण्य पडणार आहे. शिवाय रास्त गोष्ट हातीं घेऊन जो त्यासंबंधानें यथाशक्ति झटतो त्याला जें शेवटास नेल्याचें पुण्य लागतें. तसेंच मनांत कितीही पाप असून कृतीनें तें जर घडून न येईल तर त्याचें फळ भोगावें लागत नाहीं हेंही पण सर्वांना माहीत आहे. ह्मणून युद्धामध्यें मरूं घातलेल्या कौरवसृंजयांमध्यें सख्य जुळवून आणण्याची निरपेक्ष खटपट करण्याची माझी इच्छा आहे. कर्णदुर्योधनांमुळें हें महासंकट कौरवांवर ओढवलें असून तेही डोळे मिटून त्याच्या मागून जात आहेत. संकटांत बुडत असलेल्या मित्राला जो यथाशक्ति हात देत नाहीं त्याला शहाणे दुष्ट ह्मणतात. मित्राला शेंडी धरून सुद्धां संकटांतून वर काढण्याची जो यथाशक्ति खटपट करतो त्यावर कोणाचा बोल उरत नाहीं. ह्मणून माझा योग्य, चांगला व हितकर सल्ला दुर्योधन व त्याचे सल्लागार यांनीं ऐकावा हें रास्त आहे. कौरवांच्या, पांडवांच्या तसेंच पृथ्वीवरील क्षत्रियांच्या हितासाठीं मी सरळ रीतीनें झटेन. आतां त्याच्या हितासाठीं मी झटत असतां जर दुर्योधनाला माझा संशय येईल तर तेंही पण मला पाहिजेच आहे. आपलें कर्तव्य केल्यानें मी तरी ऋणांतून मोकळा होईन. ज्ञातींमध्यें भांडण उपस्थित झालें असतां जो मित्र मध्यस्थी करून तें मिटविण्याला झटत नाहीं त्याला शहाणे खरा मित्र ह्मणत नाहींत. धर्मलंड, मूर्ख अशा माझ्या वाईटावर असणारांनीं या खवळलेल्या कौरवपांडवांना आळा घालण्याचें सामर्थ्य कृष्णामध्यें असून त्यानें तेवढें सुद्धां केलें नाहीं असें पुढेमागें ह्मणूं नये. ह्मणून दोघांचाही उद्देश शेवटास नेण्याच्या हेतूनें मी आलों आहें व त्या दिशेनें यत्न केल्यानें मी लोकापवादापासून सुटेन. माझें रास्त व हितकर भाषण ऐकून तें जर तो मूढ घेणार नाहीं तर त्याच्या नशिबीं असेल तें तो भोगील. आतां पांडवांचा उद्देश जाऊं न देतां मला जर दोघांचें सख्य जुळवून आणतां आलें तर पुण्य माझ्या पदरीं पडून कौरवही मृत्यूच्या तडाक्यांतून सुटतील. धर्माला धरून असणाऱ्या माझ्या भाषणावर विचार करून तें त्यांना पटल्यास ठीक आहे. आतां माझें बाईट करण्याचें जर ते मनांत आणतील तर सिंहापुढें ज्याप्रमाणें कितीही श्वापदें एकत्र जुळलीं तरी त्यांचें कांहीं चालत नाहीं, त्याप्रमाणें पृथ्वीवरील सर्व राजे एकवटले तरी त्यांची माझ्यापुढें डाळ शिजावयाची नाहीं.' ह्याप्रमाणें दोघांचें संभाषण होऊन भगवान मऊ बिछान्यावर पडला.

१३५ श्रीकृष्णशिष्टाई. (५. ९४–१३१).

याप्रमाणें गोष्टींमध्यें त्या दोन बुद्धिमानांची ती मंगलप्रद रात्र निघून गेलेली सुद्धां त्यांना कळली नाहीं. उजाडल्यावर नानारागांचें पूर्ण ज्ञान असलेल्या भाटांनीं व शंख व नोबती यांच्या शब्दांनीं भगवान जागा झाला, उठून सर्व आवश्यक प्रातर्विधि आटोपून स्नान, जपजाप्य व अग्नीला आहुति दिल्यावर त्यानें शरीरसंस्कार करून सूर्योपस्थान केलें. भगवान याप्रमाणें संध्या करीत असतां दुर्योधन, कर्ण, व शकुनि त्यांकडे येऊन त्यांनीं धृतराष्ट्र, भीष्म प्रभृति मंडळी सर्वेत येऊन वाट पहात बसल्याची वर्दी दिली. गोड शब्दांनीं 'ठीक आहे' ह्मणून सूर्य स्वच्छ उगवल्यावर भगवान ब्राह्मणांना गाई, द्रव्य, सुवर्ण, वस्त्र, इत्यादि दान देऊन तयार होतात तों दारुकानें पांढरा शुभ्र रथ तयार करून आणला. अग्नीला व ब्राह्मणांना प्रदक्षिणा करून

भगवान रथारूढ झाला. त्या श्रेष्ठ भगवानाच्या मागून सर्व धर्म जाणणारे विदुर त्याच रथावर चढले. दुर्योधनप्रभृति मंडळी मागून दुसऱ्या रथांत बसून चालली; व सात्यकि, कृतवर्मा व दुसरी मंडळी कोणी रथांतून, कोणी हत्तीवरून, कोणी घोड्यावरून, त्याच्या मागून चालली. याप्रमाणें नानारथांच्या घरघर आवाजामध्यें झाडून पाणी शिंपडलेल्या राजर्षिसेवित राजमार्गावर वैभवानें झळकणारा भगवान ठरल्या वेळीं येऊन थडकला. भगवान चालला असतां त्याच्यापुढें नौबती, शंख व इतर वाद्यें यांचा गजर चालला होता. सिंहासारखे पराक्रमी शत्रुतापन तरणेबांड वीर तरवारी व भाले घेऊन भगवानाच्या रथाभोंवतीं चालले होते; व सर्व आबालवृद्ध पौरजन भगवानाला पहाण्याच्या उत्सुकतेनें रस्त्यावर येऊन उभे राहिले होते. अनेक घरांचे सज्जे स्त्रियांनीं गच्च भरले असून त्यांच्या भारानें ते जणूं डुलताहेतसें वाटत होतें. याप्रमाणें कौरवांचा सत्कार घेत त्यांचे अनुकूल शब्द ऐकत चोहोंकडे बघत भगवान सभेंत आला. सभामंडपाच्या दरवाजांत आल्यावर कैलासशिखरासारख्या उंच अशा रथांतून खालीं उतरून विदुर व सात्यकि यांचा हात धरून त्या इंद्रभुवनाच्या तोडीच्या राजसभेंत भगवान शिरला. ग्रहनक्षत्रांना ज्याप्रमाणें सूर्य आपल्या तेजानें झांकून टाकतो त्याप्रमाणें सर्व कौरव त्यांच्यापुढें फिके पडले. कर्णदुर्योधन भगवानाच्या पुढें असून सर्व वृष्णिमंडळ व कृतवर्मा त्याच्या मागें होते. तो सभेमध्यें शिरल्याबरोबर धृतराष्ट्रप्रभृति मंडळी आपापल्या आसनावरून उठून उभी राहिली. धृतराष्ट्राच्या आज्ञेनें तेथें भगवानासाठीं एक सोन्यानें शृंगारलेलें आसन तयार ठेविलें होतें. भगवानानें धृतराष्ट्र, भीष्म, व द्रोण यांच्याशीं हासत हासत चार गोष्टी बोलून तेथें जमलेल्या इतर राजांचीही त्यांच्या त्यांच्या वयाप्रमाणें यथाक्रमानें भेट घेतली. याप्रमाणें सत्कारविधि चालला असतां वर आकाशांत नारदप्रभृति ऋषींना उभे पाहून त्यांना बोलावून आसनें देण्यास भगवानानें भीष्मांना सांगितलें. आज्ञेप्रमाणें सर्व व्यवस्था होऊन ऋषिमंडळ त्यांवर येऊन बसल्यावर बाकीची मंडळीही आपापल्या जागीं बसली. महामति विदुर भगवानाजवळच बसले. परोत्कर्षासहिष्णु कर्णदुर्योधनही भगवानाच्या बाजूलाच होते. भगवानाची फार दिवसांनीं गांठ पडल्यामुळें त्याला पाहून अमृताप्रमाणें तेथें जमलेल्या राजांची तृप्ति होईना. जवसाच्या पुष्पाप्रमाणें तकतकीत पीतांबरधारी भगवान सोन्यांत बसविलेल्या हिऱ्याप्रमाणें त्या ठिकाणीं झळकत होता. सर्व मंडळींची मनोवृत्ति त्याकडे लागून राहिली असल्यामुळें कोणाच्या तोंडांतून एक अक्षर निघत नसून जिकडे तिकडे शांतता होती. नंतर तोंडाचा खंबीर अशा भगवानानें नगाऱ्याप्रमाणें मोठ्या स्वरानें भाषणास सुरवात केली. तो म्हणाला, ' हे भरतकुलोत्पन्न धृतराष्ट्रा, कौरवांमध्यें सख्य जुळून वीरांचा फडशा उडूं नये एवढेंच मागण्यासाठीं मीं आलों आहें. तुला सगळें कळतें. हें कौरवकुल सर्वांमध्यें श्रेष्ठ असून विद्या, वृत्ति, इत्यादि गुणांनीं संपन्न आहे. दुसऱ्याचें दुःख पाहून कळवळून तें नाहींसें करून त्यांच्या सुखासाठीं झटणें, तसेंच दयाभूतपणा, सरळ वर्तन, क्षमा व सत्य यांकरितां कौरवकुल विशेषेंकरून प्रसिद्ध आहे. तर अशा ह्या नांवाजलेल्या कुळांत विशेषेंकरून हल्लींसारख्या गोष्टी घडण्याला कारण तूं व्हावेंस हें ठीक नाहीं. उघड किंवा गुप्त रीतीनें आड मार्गाला जाणाऱ्या कौरवांना ताळ्यावर आणणारा तूं आहेस. तुझे दुर्योधनप्रभृति मुलगे धर्मार्थांना झुगारून देऊन कोणी शास्ता न उरतां लोभामुळें मर्यादा मोडून मनाला वाटेल तसें आपल्या भावांशीं वागण्याला प्रवृत्त झाले आहेत. कौरवांवर हा मोठा बिकट प्रसंग आला आहे व याकडे डोळेझांक केल्यानें सर्व कौरवांचा फडशा उडणार आहे. आपल्या कुळाचा नाश व्हावा अशी जर तुझी इच्छा नसेल तर सख्य जुळून येणें मला सोपें काम दिसतें. ही गोष्ट आपल्या दोघांच्या हातीं आहे. तूं आपल्या मुलांना ताळ्यावर आण म्हणजे मी पांडवांसंबंधानें खबरदारी घेतों. तुझ्या मुलांनीं तुझ्या आज्ञेप्रमाणें वागावें यांतच त्यांचें कल्याण आहे. दोघांमध्यें सख्य राहण्यांतच तुम्हां दोघांचें कल्याण आहे. त्यांच्याशीं वैर चांगलें नव्हे; ही गोष्ट लक्षांत घेऊन त्यांच्या बरोबर सख्य करून त्यांच्या साह्याच्यानें धर्मार्थ जोड.

तूं कितीही झटलास तरी असे साहाय्यकारी तुला मिळणें कठीण आहे. पांडवांचा तुला पाठिंबा मिळाल्याबद्दल प्रत्यक्ष इंद्रादि देवांची सुद्धां तुला जिंकण्याची छाती नाहीं. भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, विविंशति, अश्वत्थामा, विकर्ण, सोमदत्त, बाल्हीक, जयद्रथ, कलिंग, कांबोज, सुदक्षिण, युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव, सात्यकि, युयुत्सु, यांच्याशीं कोण दुर्बुद्धि लढण्याला तयार होईल. कौरवपांडवांचें तुला साहाय्य मिळेल तर सार्वभौमत्व तुला मिळून शत्रूची तुझ्यापुढें डाळ शिजणार नाहीं; व तुझ्या बरोबरीचे राजे देखील मग तुझें कल्याण करण्याकरितांच झटतील व याप्रमाणें पुत्रपौत्र, वडील भाऊ, मित्र या सर्वांचा तुला पाठिंबा मिळाल्यावर मग तुला सुखाला काय कमी आहे ? पूर्वीप्रमाणें यांना योग्य मान देऊन हातीं घेशील तर सर्व पृथ्वीचा तुला खास उपभोग मिळेल व तुझे शत्रू वर तोंड काढणार नाहींत. हा तुझाच स्वार्थ यांत साधणार आहे. तुझ्या मुलांची तुला नीट समजूत घालतां येईल तर पांडवांनीं मिळविलेली भूमि तुला भोगावयाला मिळेल. युद्धामध्यें मोठा नाश होणार. दोन्ही पक्षांचा याप्रमाणें फडशा उडण्यांत कोणता धर्म तुझ्या पदरीं पडणार ? महाबलवान पांडवांनीं किंवा तुझ्या मुलांनीं युद्धांत एकमेकांना मारल्यानें तुला काय सुख मिळणार तें सांग पाहूं ? सर्व पांडव तसेच तुझ्या बाजूचे शूर व अस्त्रनिपुण युद्धाची वाट पहात आहेत. तर मोठ्या संकटापासून त्यांना वांचीव. ह्या सर्व पांडवकौरवांच्या हातून दोन्ही पक्षांकडील शूरांचा फडशा पडलेला पाहण्याचें आमच्या कपाळीं येऊं नये. येथें जुळलेले सर्व राजे खवळतील तर सर्व प्रजेचा फडशा पाडतील. तूं शुद्धीवर येशील तरच हें संकट टळणार आहे. हे शुद्ध, उदार, विनयसंपन्न थोर व उत्तम कुलांत जन्मलेले राजे परस्परांचे साहाय्यकर्ते आहेत; तेव्हां यांना राग व वैर विसरून शुद्ध मनानें परपस्परांना भेटून प्रीतिभोजनानंतर उत्तम वस्त्रें व माळा यांचा सत्कार घेऊन आपापल्या घरांकडे जाऊं देत. पांडवांच्या ठिकाणीं पूर्वी जें तुझें प्रेम होतें तेंच तुझ्या आयुष्याच्या शेवटच्या घटकेला त्यांजवर कायम राहूं दे. लहानपणींच बढिलांला आंचवल्यामुळें तूच त्यांना वाढविलें आहेस. त्यांचें व तुझ्या मुलांचें तुला सारखेच अशा रीतीनें पालन कर. त्यांना संकटांत हात देण्यास मुख्यत्वेंकरून तूंच आहेस. ह्मणून आपल्या बुद्धीला तूं हरताळ लावूं नकोस. अभिवादनपूर्वक विनवून पांडवांनीं तुला निरोप सांगितला आहे कीं, आपल्याच आज्ञेनें आह्मीं आजपर्यंत दुःखें सोसलीं आहेत. आपण बोलल्याप्रमाणें वागाल या भरंवशावर ते वेळीं आपली आज्ञा न मोडतां बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास आह्मीं काढला. तेव्हां धर्मार्थ आपल्याला पूर्ण कळत असल्याने आतां वचनाप्रमाणें आमचा हिस्सा आह्मांला देऊन आपण आमचा सांभाळ करावा. आपल्या ठिकाणीं असलेला वडीलपणा लक्षांत घेऊनच आह्मीं कष्ट सोसले. तर आपणही आतां त्या वडीलपणाला साजेलसें आमच्याशीं वागा. गुरूच्या ठिकाणीं जें शिष्याचें योग्य वर्तन असावें तसें आह्मीं आपल्या ठिकाणीं ठेवीत आलों. तर आपणही गुरूचें कर्तव्य बजवा. आह्मी आड मार्गाला जाऊं लागलों तर आह्मांला वाटेवर आणण्याचें काम आपलें आहे; तर स्वतः सरळ मार्ग धरून आह्मांला वळण लावा.' ह्या सभासदांनाही त्यांनीं पुढील निरोप कळविला आहे; 'सर्व सभासद धर्मज्ञ असतां ह्या ठिकाणीं कोणतीही अन्यायाची गोष्ट घडणें योग्य नाहीं. सभासदांच्या डोळ्यांदेखत धर्माची अधर्माकडून व सत्याची असत्याकडून पायमल्ली होईल तर त्याच्या योगानें त्या सभासदांचाच नाश होतो. अधर्मरूपी बाणानें घायाळ होऊन धर्म सभेंत आला असतां त्याचा तो बाण जर सभासद काढणार नाहींत तर तो त्यांनाच घायाळ करतो व ज्याप्रमाणें तीरावरील झाडांचा नदी फडशा उडविते त्याप्रमाणें धर्म यांचा नाश करतो.' जे धर्माकडेच डोळे लावून त्यावर विचार करीत बसले आहेत त्या पांडवांचें हें भाषण खरें, धर्माला धरून व यथार्थ आहे 'त्यांचें त्यांना देतों' या पलीकडे तुला काय उत्तर देतां येणार आहे ? जे ह्या सभेंत बसले आहेत त्यांनाच सांगूं देत कीं धर्मार्थाचा विचार करून मी हें खरें ह्मणतों किंवा खोटें ! रागाच्या तावडींत न सांपडतां संधि करून या क्ष-

त्रियांना मृत्यूच्या कचाट्यांतून सोडीव. त्यांचा वडिलोपार्जित हिस्सा त्यांना देऊन कृतार्थ हो. धर्मराज नेहमीं भल्याचा कित्ता वळवून आहे व त्याचें तुझ्या व तुझ्या मुलांच्या ठिकाणीं कसें वर्तन आहे हें तूं जाणतोसच. त्यांना जाळलें, घालवून दिलें, तरी ते तुमच्या बाहेर नाहींत. इंद्रप्रस्थाला तुह्मीं त्यांना घालविलें तरी तेथून सुद्धां सर्व राजांना तुझ्या बाजूला वळवून त्यानें तुमचें हितच केलें. तो असें वागत असतां त्याचें राज्य व धनधान्य लुबाडण्यासाठीं शकुनीनें कपट मांडलें व त्याचा कळस करून द्रौपदीला सभेमध्यें आणली. तेव्हां देखील तो गंभीर धर्मराज क्षात्रधर्मापासून ढळला नाहीं. माझी तर तुझें आणि त्यांचें कल्याण व्हावें अशी पूर्ण इच्छा आहे. ह्या प्रजेला धर्म, अर्थ व सुख यांपासून मुकवूं नकोस. अनर्थाला हित समजून हिताला अनर्थ समजणाऱ्या तुझ्या लोभी मुलांना आवर. पांडव तुझी सेवा करण्याला तयार आहेत व ते युद्धालाही तयार आहेत. तुला जें पटेल तें पतकर. ' याप्रमाणें भगवानांचें भाषण ऐकून सर्व सभासदांच्या अंगावर हर्षरोमांच उभे राहिले. कोणाचाही यावर बोलण्याला धीर होईना. तेव्हां परशुराम ह्मणाले, ' राजा, मनांत कांहीं किंतु न आणतां ही माझी दृष्टांतपर प्रत्यक्ष घडलेली गोष्ट ऐक; मग तुला ती पटल्यास घे.

पूर्वी दंभोद्भव नांवाचा कोणी सार्वभौम राजा होऊन गेला. तो नित्य सकाळीं उठल्यावर युद्धांत माझ्यापेक्षां अधिक किंवा माझ्या तोडीचा कोणी आहे काय ह्मणून भेटेल त्याला विचारीत सुटे. याप्रमाणें गर्वानें माजून तो ह्या पृथ्वीवर फिरत असतां कोणी निर्भीड व निर्नय असे वेदवेत्ते ब्राह्मण त्याचा निषेधही करीत; तरी त्याला न जुमानतां त्याचा आपला पूर्वीचा क्रम सुरू होता. तें पाहून कांहीं तपस्वी महात्मे रागानें त्याला ह्मणाले, ' युद्धांत वाटेल त्यांना जिंकण्याला समर्थ जे दोन पुरुषश्रेष्ठ नरनारायण त्यांच्या बरोबरीला तूं कधीं लागणार नाहींस. ते ह्या मृत्युलोकीं अवतरले असून गंधमादनावर घोर तप करीत आहेत. त्यांबरोबर तूं युद्ध कर. हें भाषण त्याला सहन न होऊन रथ, हत्ती, घोडे, पायदळ, गाड्या, व उंट असें सहाप्रकारचें सैन्य घेऊन तो त्यांकडे निघाला. व त्या अवघड व घोर वनांत त्यांचा शोध करीत निघाला असतां भूकतहानेनें वाळून शरीराचा सांपळा उरलेले व थंडी, वारा, व उन्ह यांनीं सुकलेले असे ते तपस्वी पुरुषश्रेष्ठ त्याला आढळले. जवळ जाऊन अभिवादनपूर्वक कुशल विचारून त्यानें आपला उद्देश त्यांना कळविला. तेव्हां ते नरनारायण ह्मणाले, ' ह्या आश्रमांत राग व लोभ यांचें वारें सुद्धां नाहीं. तेव्हां तेथें युद्धाची गोष्ट कशाला व आयुधें किंवा प्रतिस्पर्धी तरी कोण सांपडणार ? ह्मणून आणखी कोठें तरी जाऊन ही युद्धाची तुझी इच्छा तृप्त करून घे. पृथ्वीवर क्षत्रिय पुष्कळ आहेत. ' याप्रमाणें अनेकवार गोडीनें सांगितलें असतां सुद्धां जेव्हां तो ऐकेना तेव्हां हातांत मूठभर काड्या घेऊन नरानीं त्याला आपल्या सर्व आयुधांनिशीं व सैन्यांनिशीं युद्धाला बोलाविलें. दंभोद्भवानें चोहोंकडून त्यांवर बाणांचा भडिमार चालविला. त्यांचें कांहीं चालूं न देतां दंभोद्भवावर व त्याच्या सैन्यावर त्यांनीं ईषिकास्त्र सोडून मायेनें त्या सैन्याचे डोळे, कान, नाक फोडून काड्यांनीं भरून काढले. काड्यांनीं सर्व आकाश भरून गेलेलें पाहून राजा त्यांच्या पाया पडून ' मला तारा ' ह्मणून करुणा भाकूं लागला. तेव्हां तो शरण आला असतां नर त्याला ह्मणाला, ' धर्मबुद्धि ठेवून फिरून असें करूं नकोस. गर्वानें बलाबल न ओळखतां यापुढें कोणाचा-मग तो लहान असो किंवा थोर असो-मुळींं देखील धिक्कार करूं नकोस. शहाणपणाची, निर्लोभी, निरहंकारयुक्त, मनोनिग्रही, जितेंद्रिय, क्षमाशील, कोमल व सौम्य अशी वृत्ति धरून प्रजेचें पालन कर. ' नंतर तो राजा त्यांच्या पायांवर डोकें ठेवून आपल्या नगराला परतला. हें नराचें कृत्यच फार अलौकिक होतें. नारायण तर याहूनही पुष्कळ गुणांनीं विशेष आहे. ह्मणून जोंपर्यंत धनुःश्रेष्ठ गांडिवाला काकुदीक, शुक, नाक, अक्षिसंतर्जन, संतान, नर्तक, घोर, व आस्यमोदक हीं आठ अस्त्रें लागलीं नाहींत तोंपर्यंत गर्व सोडून धनंजयाकडे जा. कोणी मनुष्य त्याला हीं अस्त्रें एकदां लागलीं असतां जिवंत राहणार नाहीं. यांनाच काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मान, मत्सर, अहंकार अशीं क्रमा-

नें दुसरीं नावें असून यांचा प्रयोग ज्यांवर होतो ते क्रमानें निद्रावश, मूढ, उन्मत्त, मूत्रस्राव करणारे, घाबरे, नाचूं बागडूं लागणारे, हासरे व रडवे बनतात. सर्व जगताला निर्माण करणारा व सर्व कृत्यें जाणणारा ईश्वर ज्याचा बंधु आहे तो अर्जुन त्रैलोक्यांत कोणाला हार जाणार नाहीं. अर्जुनाच्या ठिकाणीं असंख्य गुण असून जनार्दन त्याहून श्रेष्ठ आहे. जे ते नरनारायण तेच हे केशवार्जुन समज; आणि हें तूं ओळखलेंस तर माझ्या ह्मणण्याची तुला खात्री पटेल. कुटुंबांत फूट न होतां कल्याण व्हावें अशी जर तुझी इच्छा असेल तर थोर बुद्धि धरून पांडवांशीं सख्य कर व युद्धांत मन घालूं नकोस. तुझें कुल लोकांत थोर मानलें जात आहे तर त्यांचा तो थोरपणा कायम राख. स्वार्थाचाच यांत तूं विचार कर.'

यावर कण्व दुर्योधनाला ह्मणाले, 'लोकपितामह ब्रह्मदेवाप्रमाणें नरनारायण अक्षय्य व अविनाशी आहेत, सर्व आदित्यांमध्यें सनातन प्रभु विष्णुच अजिंक्य, अविनाशी व शाश्वत असून चंद्रसूर्यप्रभृति दुसरे सर्व निमित्तानें नाश पावणारे आहेत. जगताच्या नाशाबरोबर या सर्वांचा नाश होऊन फिरून फिरून यांची उत्पत्ति होते. मनुष्यें, पशु, पक्षी, व इतर नीच योनींतील प्राणी तर क्षणभंगुर आहेत. तसेंच राजे संपत्तीचा उपभोग घेऊन आयुष्य संपलें असतां आपल्या पापपुण्याचें फल भोगण्यासाठीं फिरून जन्माला येतात. यासाठीं धर्मराजाशीं सख्य करणेंच तुला उचित आहे. पांडव व कौरव मिळून ह्या पृथ्वीचें रक्षण करोत. मी बलवान आहें ही घमेंडी उपयोगाची नाहीं. शेराला नेहमीं सव्वाशेर भेटत असतात; व नेहमींच आपलें बल आपल्याला उपयोगीं पडत नसतें. शिवाय ते देवतुल्य पराक्रमी पांडव कांहीं कमी नाहींत. ह्यासंबंधानें एक जुनी गोष्ट सांगतों. ऐक.

इंद्रसारथी मातलीच्या कुलांत फार रूपवती गुणकेशी नांवानें प्रसिद्ध एक मुलगी होती. कांतीनें व शरीरानें ती दुसऱ्या सर्व स्त्रियांना मागें सारणारी होती. तिला देऊन टाकण्याची वेळ आली असतां मातली आपल्या स्त्रीसहवर्तमान तोच विचार करूं लागला. त्याला देव, दानव, गंधर्व, मनुष्य व अनेक ऋषी यांमध्यें कोणी अनुरूप पति आढळून न आल्यामुळें 'उत्तम शील, योग्यता व कीर्ति असलेल्या कुलांत मुलगी जन्माला येणें फार बाईट आहे, मातृकुल, पितृकुल व जेथें ती पडते तें अशा भल्यांच्या कुळाला ती संकटांत पाडते,' याप्रमाणें विचार करून नागलोकामध्यें तिच्या अनुरूप कोणी वर असेल ह्मणून तिकडे जाण्याचा विचार त्यानें मनांत आणला; व सुधर्मेचा निरोप घेऊन मुलीचें मस्तक हुंगून तो पृथ्वीमध्यें शिरला. वाटेंत वरुणाला भेटण्याला निघालेल्या नारदांची व त्याचा सहज गांठ पडली, व त्यांनीं त्याला कोठें निघालास ह्मणून विचारलें. तेव्हां मातलीनें आपला उद्देश त्यांना कळविला. पुढें ते दोघे बरोबरच निघाले. भूमींत शिरल्यावर लोकपाल वरुण त्यांच्या दृष्टीस पडला. त्या दोघांचा तेथें यथोचित सन्मान होऊन मातलीनें आपला हेतु वरुणाला कळवून ते नागलोकांत हिंडूं लागले; व सर्व जगांतील इत्थंभूत माहिती असणाऱ्या नारदांनीं त्याला सर्व वस्तूंनीं समृद्ध असें वरुणाचें स्थान दाखवून शील, वर्तन व शुचिर्भूतता यांनीं संपन्न, पुरुष नांवाचा वरुणपुत्र व त्याची प्रतिलक्ष्मीसारखी सोमकन्या ज्योत्स्नाकाली नांवाची बायको दाखविली; तसेंच ज्याच्या योगानें देवांना देवत्व आलें आहे असें वरुणाचें सुवर्णमय ठिकाण व ज्यांचीं राज्यें हरण केलीं आहेत त्या दैत्यांचीं झळझळीत अक्षय्य व फेकणाऱ्याच्या हातीं परत येणारीं पराक्रमी पुरुषांनीं उपयोगांत आणलेलीं दैत्यराक्षसानिर्मित आयुधें दाखविलीं. तसेंच ज्याच्या स्वच्छ तेजानें विष्णूचें चक्र भरून राहिलें आहे तो वरुणसरोवरांतील मोठा पेटलेला अग्नि, व ज्यापासून गांडिवांची उत्पत्ति आहे तें देवतांनीं संरक्षण केलेलें लोकसंहारक गांडिवमय धनुष्य दाखवून ते ह्मणाले, 'ह्या धनुष्याच्या ठिकाणीं प्रसंगानुसार हजारों, लाखों धनुष्यांचें सामर्थ्य येत असून ब्रह्मवेत्या ब्रह्मदेवांना ज्यांना शिक्षा करण्याचें काम दुरापास्त होतें अशा राक्षसराजांना शिक्षा करण्यासाठीं हें निर्माण केलें आहे व ती आपली कामगिरी हें नीट बजावांत असतें.' पुढें ज्यापासून मेघाप्रमाणें वर्षाव होत असून त्यापासून पडणारें पाणी चंद्राम-

मार्ग स्वच्छ असताही अंधकारानें झांकलें गेलें असल्यामुळें दिसत नव्हतें अशी छत्रगृहांत असलेली वरुणाची छत्री दाखवून, मातलीच्या मूळ उद्देशाला फार अडथळा न यावा म्हणून ते तडक पुढें निघाले. पुढें दैत्यदानव ज्या ठिकाणीं रहात होते अशा नागलोकांतील पातालाला पोंहोचल्यावर नारद म्हणाले, ' पाण्याबरोबर पृथ्वीवर फिरणारे प्राणी येथें येऊं लागले असतां भयभीत होऊन मोठ्यानें ओरडतात. पाण्यावर राहणारा असुराग्नि येथें नेहमीं पेटलेला असतो व देवाज्ञेनें आपण येथें जखडलों आहों असें समजून तो येथून कोठें जात नाहीं. शत्रूला मारून अमृत पिऊन बाकीचें अमृत देवांनीं येथें ठेविलें आहे व या ठिकाणाहूनच चंद्राचा क्षय व वृद्धि दृष्टोत्पत्तीस येतात. ह्याच ठिकाणीं हयग्रीव रूपी भगवान विष्णु पर्वापर्वाला सुवर्णसंज्ञक जग आपल्या बाणांनीं भरून काढण्यास अवतार घेत असतात. आणि ज्या अर्थी चंद्रादि सर्व देवता येथें एकत्र मिळतात त्याअर्थी याला पाताल हे नांव पडलें आहे. जगाचें हित करणारा ऐरावण हत्ती येथूनच पाणी नेऊन मेघांमध्यें. ठेवतो व त्याचाच इंद्र पाऊस पाडतो. चंद्रकिरणांवर राहणारे नाना आकृती, नानाप्रकारचे तिमी वैगेरे जलचर प्राणी येथें असतात. सूर्यकिरण लागून दिवसा मरून रात्रीं फिरून जिवंत होणारे पुष्कळ प्राणी येथें आहेत. तेथें नेहमीं प्रकाशणारा चंद्र आपलीं किरणें अमृताला लावून त्यांनीं सर्व प्राण्यांना जिवंत ठेवितो. येथेंच ज्याची संपत्ति हरण करून इंद्रानें त्यांना जखडून ठेविलें आहे असे कालपीडित दैत्य रहात असतात. येथेंच सर्व भूतांचा स्वामी भूतपतीनें सर्व भूतांच्या अभ्युदयासाठीं मोठें तप केलें आहे. मिळेल तें खाऊन व मिळेल तें नेसून वाटेल तेथें पडून गोव्रत आचरण करून वेदाध्ययनानें देह झिजवून प्राण टाकलेले जितस्वर्ग ऋषी येथेंच रहात असतात. सुप्रतीकाच्या वंशांत झालेले ऐरावणप्रभृति हत्ती येथें आहेत.त्यांमध्यें एखादा वर तुला पसंत असेल तर पहा, म्हणजे त्याला मागणी घालतां येईल. हें कांतीनें डोळे दिपविणारें अंडें जगाच्या आरंभापासून येथें ठेविलें असून तें कधीं उकलत नाहीं किंवा हालत नाहीं. त्याची उत्पत्ति किंवा स्वभाव कोणाच्या तोंडून मीं कधीं ऐकला नाहीं; व त्याचा जनक किंवा जननी कोण हेंही मला ठाऊक नाहीं. ह्यापासून प्रलयकालीं उत्पन्न होणारा मोठा अग्नि सर्व चराचराला जाळून टाकीत असतो असें म्हणतात. ' मातलीला त्या ठिकाणीं कोणी वर पसंत न पडल्यामुळें अनेकविध मायावी दैत्यांच्या रहाण्याच्या मयानें आखून विश्वकर्म्यानें उत्पन्न केलेल्या हिरण्यपुराला ते गेले. इंद्रप्रभृति देवांनासुद्धां अजिंक्य अशा कालखंजप्रभृति असुरांचें तें राहण्याचें ठिकाण असून अनेक मायापूर्ण ठाऊक असलेल्या तेथील निवातकवचप्रभृति दैत्यांनीं इंद्राचासुद्धां अनेकवार पराभव केला होता. तेथील वाडे सोनें, रुपें, वैडुर्यरत्न इत्यादिकांनीं शास्त्रोक्त रीतीनें गुणवान कारागिरांकडून उठविले होते; व ते सूर्यकांतमण्याप्रमाणें पांढरे शुभ्र असून हिऱ्याप्रमाणें चमकत होते. कांहीं वाडे मातीचे असून कांहीं परागाचे, कांहीं दगडी व कांहीं लाकडीही होते. ते सर्व उंच असून त्यांचा आकार व आंतील वस्तु यासंबंधानें कांहीं तर्क करतां येत नव्हता. मेघांसारखे तुळतुळीत पर्वत, झरे व वाटेल त्या प्रकारचीं फलपुष्पें असलेलीं फिरतीं झाडें तेथें होतीं. वराकरितां शोध करीत निघालेले ते दोघे येथून चालले असतां देवांबरोबर नेहमीं वैर बांधून असणाऱ्या दैत्यांशीं संबंध करणें मातलीला इष्ट न वाटल्यानें ते तेथून पुढें चालले. नंतर कश्यपापासून उत्पन्न झालेल्या विनतानंदकरांनीं जीं कुलें पुढें झपाट्यानें वाढविलीं होतीं व ज्यांना वाटेल तेथें जाऊन पराक्रम करणें व भार सहन करणें म्हणजे कांहींच वाटत नव्हतें, अशा सर्पभक्षक गरुडपक्ष्यांच्या राहण्याच्या ठिकाणाकडे नारद मातलीला घेऊन गेले व तेथील अनेक पराक्रमशाली वैभवसंपन्न पक्ष्यांची कुलें व नांवें सांगून त्यांत एखादा वर निवडून काढण्यास त्यांनीं त्याला सांगितलें. पण तेथेंही कोणी वर त्याला पसंत पडला नाहीं. तेव्हां जिच्यापासून अमृताची उत्पत्ति होते असें गोमाता सुरभीचें राहण्याचें ठिकाण जें रसातल नामक सातवें भूमितल तेथें ते त्याला घेऊन गेले. पृथ्वीच्या साराप्रसून उत्पन्न झालेल्या दुधाचा ती सतत स्राव करीत असून तें दूध म्हण-

जे षड्रसयुक्त असें एक अनुपम रसच आहे. पूर्वी अमृत पिऊन तृप्त झालेले ब्रह्मदेव अमृतरसाच्या ढेकरा देऊं लागले असतां त्यांपासून ही निर्दोष सुरभि उत्पन्न झाली. हिचें दूध जमिनीवर पडलें व त्यापासून एक दुधाचा डोह उत्पन्न झाला. तो फार पवित्र मानण्यांत येत असून फेंसानें फुललेला त्याचा तीरही दुधानें भरलेला असतो व हा फेंस भक्षण करून राहणारे ऋषी ह्या तीरावर उग्र तप करीत असतात. त्यामुळें देव देखील यांना भितात. हिच्या सुरूपा, हंसिका, वारुणी व सर्वकामदुघा नामक चार संतती क्रमानें पूर्व, दक्षिण, पश्चिम व ऐलविल नांवाच्या धर्मस्थानभूत उत्तर दिशांचे आधारभूत आहेत. ह्यांच्याच दुधानें मिश्र अशा समुद्राचें मंदाराला रवि करून देवदानवांनीं मंथन करून वारुणी, लक्ष्मी, अमृत, उच्चैःश्रवा, कौस्तुभमणी हीं रत्नें काढलीं. ह्या सुरभीच्या दुधापासूनच सुधेवर राहणाऱ्या नागांना सुधा, स्वधेवर राहणाऱ्या पितरांना स्वधा व अमृतावर राहणाऱ्या देवांना अमृत मिळतें. 'रसातलामध्यें रहाणाऱ्यांना जें सुख आहे तें दुसरें कोठेंही राहणारांना नाहीं,' अशी म्हणच पडली आहे. पुढें वासुकीनें रक्षण केलेली अमरावतीतुल्य भोगावती त्यांनीं मातलीला दाखविली. शेष नामक प्रसिद्ध नागही तेथेंच राहून आपल्या तपश्चर्येनें प्राणिमात्रांसह ह्या पृथ्वीचा आधारभूत झाला आहे. धवलगिरीसारखा याचा आकार भव्य असून हा दिव्य भूषणांनीं विभूषित आहे. ह्या महाबलाढ्य नागाला ज्वाळा सोडणाऱ्या अनेक जिभा व हजार डोकीं आहेत. मणि, स्वस्तिक, चक्र, कमंडलु, इत्यादि लक्षणांनीं युक्त नानाभूषणांनीं विभूषित, स्वभावतः क्रूर व बलशाली असे नानारूपी हजारों नाग येथें रहात असतात. त्यांमध्यें कोणाला हजार तर कोणाला पांचशें, कोणाला शंभर, कोणाला तीन, कोणाला दोन, कोणाला सात अशीं डोकीं असून त्यांचा देह व विस्तार पर्वतप्रमाणें मोठा आहे. एका वंशापासून झालेल्या वासुकिप्रभृति नागांचीं कोट्यावधि कुळें येथें आहेत. त्यांमध्यें कोणी योग्य वर पाहण्यास नारदांनीं मातलीला सांगितलें. तेव्हां ऐरावत कुलांतील आर्यकाचा नातू चिकुरपुत्र शील, शुद्धता, इंद्रियदमन इत्यादि गुणांनीं संपन्न सुमुख मातलीला पसंत पडला. त्यावरून त्यासंबंधानें नारदांनीं आर्यकाला मागणी घातली. तेव्हां आर्यक म्हणाला, 'इंद्रसख्याशीं संबंध कोणाला नकोसा असणार. परंतु सांप्रतसारख्या माझ्या निकृष्टावस्थेंत थोडा विचार पडला आहे. शिवाय ह्याच्या बापाला गरुडानें नुकतेंच खाऊन टाकलें असून आणखी एक महिन्यानें ह्यालाही खाऊन टाकण्याचें तो बोलून गेला आहे. याप्रमाणें मुलाला मुकून नातवालाही त्याची मागणी पडली असतां ही मागणी मान्य करून गुणकेशीला सून करून घेण्याला माझें मन घेत नाहीं.' परंतु मातली आग्रहाला पडून सुमुखप्रभृतींना इंद्राकडे घेऊन जाऊन त्यानें सर्व हकीकत इंद्राच्या कानावर घातली; तेव्हां इंद्रानें त्याला अमृत देऊन अमर करण्याच्या ऐवजीं पुष्कळ आयुष्य दिलें व सुमुख प्रसन्न होऊन लग्न करून घेऊन आपल्या घराला परत आला.

इकडे हें इत्थंभूत वर्तमान बलाशाली गरुडास समजतांच आपल्या प्रचंड पंखाच्या वाऱ्यानें त्रैलोक्य भरून सोडीत तो खेचर पक्षिराज इंद्राकडे येऊन म्हणाला, 'माझी पर्वा न करतां माझ्या पोटावर आपण पाय कां आणला? आपण होऊनच मला वर देऊन तो असा पाळतां वाटतें! ह्या विधिनिर्मित माझ्या खायाला मीं पूर्वीच निवडून ठेवला असून याची वेळही ठरवून टाकली आहे. आपण हा मनःपूतं खेळ मांडला आहे; व याचा परिणाम मला सहकुटुंब प्राण सोडण्याची पाळी आली आहे. परंतु आपल्याकडे तरी काय दोष? त्रैलोक्याचा स्वामी असून दुसऱ्याच्या गुलाम बनलेल्या मला एवढेंच काय याहून मोठें प्रायश्चित्त पाहिजे! आतां विष्णूकडे जर आपण मला जाण्यास सांगत असाल तर आपण त्रैलोक्यांचें स्वामी असतां मी त्याकडे कशाला दाद मागण्याला जाऊं? दक्षकन्या आपली तशीच माझी आई असून कश्यप माझे तात आहेत व हें त्रैलोक्य वाहून नेण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य आहे! माझें बल कमी नसून दैत्यांबरोबर झालेल्या युद्धांत शुतश्रीप्रभृति दैत्यांना मारून मीही पराक्रम गाजविला आहे. परंतु वस्तुतः असा श्रेष्ठ असतांही मी आपल्या धाकट्या भावाच्या ध्व-

जावर राहून त्याला वाहून नेत असतों ह्मणून मी आपल्याला असा तुच्छ वाटत आहें. आज आपण मला अन्नावरून काढल्यानें माझें महत्व अगदीं कमी झालें आहे.' याप्रमाणें गरुडाचें उग्र व ऐटीचें भाषण ऐकून त्याला चिडविण्याच्या उद्देशानें तेथेंच हजर असलेला भगवान विष्णू ह्मणाला, 'स्वतःला मोठा बलवान समजून मला तुच्छ करून ही जी तुझी बढाई चालली आहे ती बस्स कर. माझ्या देहाचा भार सोसण्याला हें त्रैलोक्यही समर्थ नाहीं. मीच मला स्वतःला वाहून शिवाय तुलाही वाहून नेत असतों. एवढा हा ह्या माझ्या उजव्या हाताचा भार सोस ह्मणजे तुझें बोलणें कांहीं तरी शोभेल.' असें ह्मणून विष्णूनें त्याच्या खांद्यावर हात ठेवला. त्या ओझ्यानें खचून गरुड मूर्च्छा येऊन खालीं पडला. सर्व पर्वतांसह ह्या पृथ्वीच्या भाराएवढा तो एकटा हात त्याला जड वाटला. विष्णूनें हाताचा सुद्धां सर्व भार त्यावर टाकला नव्हता ह्मणूनच तो वांचला. अंग विगलित होऊन पिसें गळूं लागून तोंड वासून तो खालीं पडला. आपली चुकी कबूल करून भगवानाला तो शरण गेला. तेव्हां फिरून असा गर्व करूं नकोस ह्मणून सांगून भगवानानें आपल्या पायाच्या आंगठ्यानें सुमुखाला गरुडाच्या छातीवर उडवून दिलें. तेव्हांपासून ते दोघे एकत्र असतात. तेव्हां दुर्योधना, याप्रमाणें रणांत त्या वीर्यशाली पांडुपुत्रांची गांठ पडली नाहीं तोंपर्यंतच तूं जिवंत आहेस. विष्णु, वायु, इंद्र यमधर्म, व अश्विनीकुमार ह्या देवांकडे कोणाची पाहण्याची सुद्धां छाती नाहीं व तेच ह्या पृथ्वीवर कृष्ण व पांडव रूपानें अवतरले आहेत. ह्मणून तूं आतां ही विरोधबुद्धि बाजूला ठेवून पांडवांशीं मरय करून वासुदेव तीर्थानें कुलाला उद्धार.'

हें कण्वांचें भाषण ऐकून कपाळाला आठ्या घालून दुर्योधनानें दीर्घ सुस्कारा टाकला व तें मुनींचें भाषण तुच्छ करून कर्णाकडे पाहून खदखदां हासत हत्तीच्या सोंडेसारखी आपली मांडी थोपटून ह्मणाला, 'ज्याकरितां परमेश्वरानें मला उत्पन्न केलें असेल व जी माझी पुढें गति व्हावयाची असेल तसा मी वागेन.' दुसऱ्याला बुचाडण्याची हाव सुटून दुष्कर्म करून अनर्थ ओढवून घेण्याला हट्टानें तयार झालेल्या ह्या मित्रतापन व शत्रुनंदन मूढाच्या ठिकाणीं कोणाचा उपदेश रुजत नाहींसा पाहून नारद त्याला फिरून ह्मणाले, 'जिव्हाळ्याचा हितवादी सांपडणें कठीण. तसेंच हिताची गोष्ट ऐकणाराही मिळणें कठीण. जिव्हाळ्याचा मनुष्य ज्या प्रसंगाला जवळ येतो त्या प्रसंगाला बांधव वाऱ्याला उभे रहात नाहींत. ह्मणून जिव्हाळ्याच्या मनुष्याचें ऐकावें. हट्टाला पेटूं नये. कारण हट्टाचा परिणाम फार भयंकर होतो. यासंबंधी गोष्ट ऐक.

पूर्वी विश्वामित्र ऋषी तप करीत असतां त्यांची परीक्षा पाहण्यासाठीं सप्तर्षींपैकीं वसिष्ठांचें रूप घेऊन धर्मराज भुकेनें पीडलेले असे त्याकडे आले. विश्वामित्रांनीं लागलींच चरू चुलीवर ठेवला. परंतु तो शिजेपर्यंत वाट न पहातां दुसऱ्या तपस्व्यांनीं दिलेलें अन्न भक्षण करून धर्मराज निघून गेले. विश्वामित्र तो उन्हून चरू तसाच डोक्यावर घेऊन वायु भक्षण करून तप करीत राहिले. ते वेळीं त्या लोकमान्य आपल्या गुरूवरील निस्सीम भक्तीमुळें त्यांचे शिष्य गालव त्यांची शुश्रूषा करीत राहिले. पुढें शंभर वर्षांनीं धर्मराज त्याच वेषानें फिरून आले असतां विश्वामित्रांना त्या प्रकारें तप करतांना पाहून त्या चरूतील अन्न भक्षण करून ते संतुष्ट होऊन निघून गेले. तेव्हांपासून विश्वामित्रांना ब्राह्मणत्व आलें. आपल्या शिष्याच्या शुश्रूषेनें व भक्तीनें प्रसन्न होऊन विश्वामित्रांनीं गालवांना इच्छेस वाटेल तेथें जाण्याला परवानगी दिली. परंतु दक्षिणायुक्त कर्मच सफल होत असून दक्षिणाच सर्व संकटें दूर करणारी आहे, असा गालवांचा ग्रह असल्यानें विश्वामित्रांनीं अनेकवार जाण्यास सांगितलें असतांही 'जाण्यापूर्वी आपल्याला काय दक्षिणा देऊं तें सांगा,' ह्मणून गालव आग्रह धरून बसले. तेव्हां रागावून एका कानाचे चंद्राप्रमाणें कांतिमान असे आठशें घोडे विश्वामित्रांनीं मागितले. ही गुरूंची दुर्घट मागणी ऐकून गालवांना खाणें, पिणें, कांहींच सुचेना, व ह्या काळजीनें ते अगदीं अस्थिपंजर होऊन शोकानें होरपळून गेले. 'मित्र किंवा द्रव्य मजपाशीं कोठें आहे कीं ज्यानें अशा प्रकारचे घोडे विकत घेतां येतील,' अशा विवंचनेंत मग्न हो-

ऊन त्यांना आयुष्य देखील नकोसें झालें व कोठें तरी लांब समुद्रतीरीं जाऊन प्राण सोडण्याचा त्यांनीं निश्चय केला. दुसऱ्यापासून कल्याण करून घेऊन त्याला वाटेल तें देतों ह्मणून वचन देऊन निर्धनतेमुळें भ्रष्टप्रतिज्ञ होऊन ऋणांत राहणें त्यांना बरें वाटेना. कारण अशा भ्रष्टप्रतिज्ञाचीं सर्व कर्मे निष्फळ होत असतात व कृतघ्न पुरुष रूप, संतति, संपत्ति, उत्तम गति, सुख, यश या सर्वांना मुकतो, त्याबर कोणी विश्वास ठेवीत नाहीं, त्याच्या त्या दुष्ट कृत्याला प्रायश्चित्त सुद्धां नाहीं, हें ते पक्कें जाणून होते. देवापाशीं तरी आजपर्यंत कांहीं न मागितल्यामुळेंच त्यांना त्याजपाशीं मान असल्यानें त्यांपाशीं सुद्धां तोंड पसरण्याला त्यांचें मन घेईना. याप्रमाणें ते चिंताकुल होऊन बसले असतां त्यांचा सखा जो गरुड तो वाटेल तिकडे घेऊन जाऊन त्यांचे मनोरथ पूर्ण करून देण्याच्या उद्देशानें भगवान विष्णूच्या आज्ञेनें त्यांकडे येऊन ह्मणाला, 'ही पहा पूर्व दिशा. सर्व जगावर प्रकाश पाडणारा सूर्य ह्याच दिशेला उगवत असतो. संध्यासमयीं साध्य ह्याच दिशेला तप करीत असतात. ब्रह्मदेवांच्या मनांत प्रथम हीच दिशा उतरली असून हिनेंच सर्व जग व्यापलें आहे. चक्षुषी नामक आज्यभाग यज्ञ संरक्षणासाठीं याच दिशेला राहिले असून ह्या दिशेला दिलेले हवी सर्व दिशांना वांटले जातात. दिवसाचें तसेंच परलोकाचें हें द्वार आहे. दक्षकन्यांपासून पूर्वी याच दिशेला प्रजा उत्पन्न झाल्या. व कश्यपांपासून उत्पन्न झालेल्या प्रजाही याच दिशेला वाढल्या. लक्ष्मीचें राहणें येथेंच असून इंद्रालाही अभिषेक याच दिशेला झाला व देवांनीं तपश्चर्या याच दिशेला केली. **फार प्राचीनकाळापासून देव ह्याच दिशेला रहात आल्यामुळें ह्या प्रशस्त दिशेला पूर्व हें नांव मिळालें आहे.** ब्रह्मदेवांनीं पूर्वी वेदाध्ययन याच दिशेला केलें असून सूर्यानें ब्रह्मबेऱ्यांना सावित्री मंत्राचा उपदेश याच दिशेला केला व याज्ञवल्क्यांना वेद येथेंच दिले; आणि सोमाला वर येथेंच मिळाल्यामुळें देव यज्ञामध्यें सोम पीत असतात. येथेंच यज्ञाचे अग्नी तृप्त होऊन उदकामध्यें मिळून सोम, आज्य प्रभृतींचा उपभोग घेतात व वरुणाला पातालाच्या आश्रयानें लक्ष्मी याच दिशेला मिळाली. पुरातन वसिष्ठमुनींच्या उत्पत्ति, स्थिति व लय यांचें ठिकाण हीच दिशा आहे. प्रणवाचे शंभर भेद पूर्वी येथेंच उत्पन्न झाले; व धूम्रपान करणाऱ्या मुनींनीं हविर्धूमाचें सेवन पूर्वी येथेंच केलें. येथेंच वनांत वराहादि पशु इंद्रानें प्रोक्षण करून देवतांच्या यज्ञभागासाठीं नेमून ठेविले. हितशत्रू व कृतघ्न अशा मानव व असुरांचा सूर्य रागावून येथेंच नाश करीत असतो. त्रैलोक्य, स्वर्ग व सुख यांच्या प्राप्तीचें हें द्वार असून सर्व दिशांचा हा अग्रभाग आहे ह्मणून सुखेच्छूनें याच दिशेला देवकार्यें करावीं. त्याचप्रमाणें ही दक्षिण दिशा. सूर्यानें प्रथम ही सशास्त्र गुरूला दक्षिणा ह्मणून दिल्यानें हिला **दक्षिण** ह्मणतात. सर्व पितृगण उष्मप नामक देव व विश्वेदेव येथेच रहात असून या विश्वेदेवांना पितरांसह येथें उत्तम भाग मिळत असतात. धर्माचें हें दुसरें द्वार आहे व कालाची ह्या ठिकाणीं अगदीं त्रुटीपासून लवापर्यंत गणना होत असते. देवर्षी पित्रर्षी व राजर्षी येथें निर्भयपणें रहात असून धर्म, सत्य व कर्म यांचा निवाडा होऊन सर्व कर्मांचा निकाल येथेंच लागत असतो. सर्वांना याच दिशेला जावें लागतें. अज्ञान झाल्यानें ही दिशा वांड्याला येत असल्यामुळें येथें सुखाचें नांव नाहीं. अजितेंद्रियांना येथें उत्पन्न करून ठेवलेल्या हजारों राक्षसांना पहावें लागतें. येथेंच मंदारपर्वतांतील कुंजांत व ब्रह्मर्षींच्या आश्रमांत बसून गंधर्व मनाला व बुद्धीला मोह पाडणारीं गाणीं गात असतात. येथेंच सामें व गीतें ऐकून रैवतदैत्य बायको, अमात्य व राज्य यांना मुकून वनाला निघून गेला. येथेंच सावर्णिमनु व यवक्रीतपुत्र यांनीं मर्यादा ठरवून ठेविली आहे. जिच्यापलीकडे सूर्य जात नाहीं. येथेंच राक्षसश्रेष्ठ रावणानें तप करून देवांपासून अमरत्व मागितलें व येथेंच वृत्र आपल्या वर्तनानें इंद्राचा शत्रु बनला. सर्व प्राण येथें आल्याबरच पंचतत्वांमध्यें फिरून वेगळे होतात. पापकर्म करणारे येथेंच दुःख भोगतात व नरकाला जाणणाऱ्यांनीं भरलेली वैतरणी नदी ह्या ठिकाणीं आहे. येथें गेल्याबरच सुखदुःखांचा निकाल लागत असतो. ह्याच दिशेला पोहोंचल्यावर सूर्य सुरस जलाचा वर्षाव करतो व पुढें उत्तर दिशेला पोहोंचल्यावर थंडी पाडतो. पूर्वी

मी भुकेनें पीडलों असतां येथेंच मला हत्ती व कासव खाण्याला मिळाले. येथेंच चक्रधनु नामक महर्षी सूर्यापासून उत्पन्न झाले. हेच कपिल या नांवानें प्रसिद्ध असून यांनींच सागरपुत्रांना जाळलें. ह्याच ठिकाणीं शिवमंत्रक सिद्धांनीं वेदांत पारंगतता मिळवून वेदाध्ययनानें मोक्ष मिळविला. वासुकि, तक्षक व ऐरावत यांनीं रक्षित भोगावती नगरी ह्याच दिशेला आहे. व सूर्याला किंवा अग्नीला सुद्धां नाहींसा करतां न येणारा मरणकालचा मोठा अंधकार येथेंच पसरत असतो.

तशीच ही पश्चिम दिशा. जलाचा स्वामी वरुण याची ही दिशा असून सूर्य दिवस मरतां मरतां आपलीं किरणें ह्या दिशेकडे वळवून अस्ताला जातो ह्मणून याला पश्चिम ह्मणतात. उदकांचें रक्षण करण्याकरितां भगवान कश्यपांनीं वरुणाला सर्व जलचरांचा स्वामी ह्मणून येथें अभिषेक केला आहे. येथेंच वरुणाच्या षड्रससेवनानें तमोगुद चंद्र शुक्लपक्षाच्या आरंभीं तरुण होतो. मागें हटवून वाऱ्यानें जखडून टाकलेले दैत्य येथेंच सुस्कारे टाकीत पडले आहेत. सूर्य या दिशेला वळूं लागला असतां अस्त नामक पर्वत त्याला घेतो व तेव्हांपासून संध्याळकाळच्या तिनीसांजेला प्रारंभ होतो. दिवसाच्या अखेरीस जणूं प्राण्यांचें अर्धे आयुष्य हरण करण्याकरितांच कीं काय गात्र व निद्रा सर्व प्राणिमात्रांना गाठतात. येथेंच दिति गर्भारपणीं निद्रिस्त असतां तिचा गर्भ काढून घेतला व त्यापासून मरुत झाले. हजारों वर्षांनीं सुद्धां ज्याचा अंत लागत नाहीं असें हिमाचलाचें मूळ येथेंच मंदाराला जाऊन पोहोंचलें आहे. येथेंच सुवर्णगिरी व सुवर्णकमलें यांनीं युक्त अशा समुद्राच्या तीरावर सुरभि दुधाची धार सोडीत असते. चंद्रसूर्यांचा नाश करूं इच्छिणाऱ्या सूर्यतुल्य गरुडचें धड येथेंच समुद्रांत दिसत असतें. अदृश्य व अप्रमेय अशा नेहमीं तारुण्यावस्थेंत असणाऱ्या सुवर्णशिर मुनींचें गायन येथेंच ऐकूं येत असतें. 'थांब, थांब,' अशी सूर्याची आज्ञा झाल्यानें हरिमेध ऋषींची कन्या ध्वजवती येथेंच आकाशांत राहिली आहे. याच ठिकाणीं सकाळसंध्याकाळ वायु, अग्नि, उदक व आकाश सुखावह असतात. सूर्याची गति येथूनच वक्र होऊं लागते. येथेंच सर्व ग्रह, तारे सूर्यमंडळांत शिरून अठ्ठावीस रात्रींपर्यंत सूर्यासह फिरून, फिरून चंद्राबरोबर फिरण्यास सूर्यापासून बाहेर पडतात. समुद्राला भर घालणाऱ्या सर्व नद्या येथूनच निघतात. वरुणाच्या ताब्यांतील त्रैलोक्याला पुरणाऱ्या पाण्याचा सांठा येथेंच आहे. नागराज अनंत व भगवान विष्णु यांचें स्थान हेंच आहे. तसेंच अग्नीचा मित्र वारा, कश्यप व मारीच येथेंच असतात.

त्याचप्रमाणें ही उत्तर दिशा. ह्या मार्गानें गेलें असतां पापापासून मुक्त होऊन मनुष्य मोक्ष मिळवितो व ही सर्वांत श्रेष्ठ दिशा आहे, ह्मणून हिला उत्तर असें ह्मणतात. तसेंच उत्तम सोन्याचें हें स्थान असून पूर्वपश्चिम दिशांच्या मधून स्वर्गाला जाण्याचा हा मार्ग आहे. दुष्ट, अजितेंद्रिय व धर्मलंड लोकांना येथें थारा नाहीं. येथेंच बदरिकाश्रमामध्यें नरोत्तम नारायण व ब्रह्मदेव रहात असतात. व हिमाचलावर पुरुष महेश्वर प्रकृति जी उमा हिच्यासह रहात असतात. नरनारायणव्यतिरिक्त दुसऱ्या कोणालाही त्यांचें दर्शन होत नाहीं. हजारों हात, पाय, डोकीं यांनीं युक्त श्रीमान विष्णु येथूनच मायेनें सर्व पहात असतो. चंद्राला येथेंच विप्रराज्याचा अभिषेक झाला असून आकाशांतून पडणाऱ्या गंगेला शंकरांनीं येथेंच मस्तकावर घेऊन पृथ्वीवर सोडून दिली. येथेंच काम, क्रोध, शैल, व उमा यांची उत्पत्ति असून उमेनें महेशप्राप्तीसाठीं येथेंच तप केलें. येथेंच कैलासपर्वतावर कुबेराला राक्षस, यक्ष, गंधर्व यांचा स्वामी ह्मणून अभिषेक झाला. येथेंच रम्य चैत्ररथ वन, वैखानसाश्रम, मंदाकिनी नदी व मंदर पर्वत आहेत. केळीच्या खुंटांनीं हिरवें गार सौगंधिक वन येथेंच असून राक्षस त्याचें रक्षण करीत असतात; व कल्पवृक्षही येथेंच आहेत. इंद्रियनिग्रहानें स्वेच्छाचारी सिद्धांचीं त्यांना अनुरूप यथेष्ट उपभोग घेतां येण्यासारखीं विमानें येथेंच आहेत. सप्तर्षी, अरुंधती व स्वातीनक्षत्र येथेंच असून त्या नक्षत्रांचा उदयही येथेंच होत असतो. यज्ञाच्या आश्रयानें ध्रुवाजवळ पितामह येथेंच असतात. व सूर्यचंद्रांसह नक्षत्रें येथेंच फिरत असतात. धाममंत्रक सत्यनिष्ठ मुनि गंगाद्वाराचें रक्षण करीत असतात. ह्याचा पिंड, आकार, हालचाल, ह्यांना मिळणारें इच्छालभ्य अन्न व यांचें तप हीं कांहींच दिसून येत नाहींत. जों जों मनुष्य ह्या

पलीकडे जाऊं पहातो तों तों तो तन्मात्र होऊन जातो. नारायण व नेहमीं विजयशाली नर यांवांचून दुसरे कोणी येथें अद्यापि गेले नाहींत. विद्युत्प्रभा नामक अप्सरांची उत्पत्ति येथेंच आहे. त्रैलोक्य पादाक्रांत करण्याच्या इच्छेनें पाऊल टाकण्यास निघालेल्या विष्णूचें विष्णुपद नामक एक पाऊल येथें उमटलें आहे. मरुत्त राजानें उशीरबीज येथें यज्ञ केला तें ठिकाण व जांबुनद सरोवर येथेंच आहेत. हिमाचलावरील पुण्यप्रद व निर्मल अशी सोन्याची खाण येथेंच जीमूत ब्रह्मर्षींच्या पुढें प्रकट झाली. ब्राह्मणांनीं मिळविलेलें, मनाला मोह पाडणारे विपुल द्रव्य आपल्या नांवानें प्रसिद्ध असावें असा त्यांनीं वर मागितल्यावरून तें जीमूत नांवानें प्रसिद्ध आहे. येथेंच दररोज सकाळसंध्याकाळीं दिक्पाल 'कोणाचें कांहीं काम आहे काय' ह्मणून मोठ्यानें विचारीत असतात.

ह्याप्रमाणें चारी दिशांचें विस्तारानें वर्णन मीं आपल्याला दिलें. आहे. ह्यांपैकीं ज्या दिलेला आपली जाण्याची इच्छा असेल तिकडे मी आपल्याला घेऊन जाण्याला तयार आहें. ही सर्व पृथ्वी मी आपल्याला दाखवितों. माझ्यावर बसून चला.'

हें ऐकून गरुडावर बसून देवतांचें सांनिध्य व सत्य आणि धर्म नांदत असणारी अग्नीषोम नांवाच्या धर्मचक्षूंचें राहण्याचें ठिकाण जी पूर्व दिशा तिकडे देवतांचें दर्शन व्हावें ह्या हेतूनें गालवांनीं गरुडाला आपल्याला घेऊन जाण्यास सांगितलें. त्यावर बसून गालव निघाले असतां त्या उडणाऱ्या गरुडाचें रूप सहस्ररश्मी भगवान सूर्यनारायणासारखें दिसत होतें. त्याच्या त्या अलौकिक गतीमुळें त्याच्या पंखांच्या वाऱ्यानें उमळून निघालेलीं झांडें त्याच्या बरोबरच निघालीं असून सर्व पर्वतवनासहवर्तमान ही पृथ्वी तो आपल्या मागून ओढून नेत आहेसें दिसत होतें. व तिमि, तिमिंगल इत्यादि मोठमोठे मनुष्य व घोडे यांसारखीं तोंडें असलेले मासे, साप, सुसरी इत्यादि जलचर प्राण्यांसहवर्तमान समुद्राचें पाणी आकाशांत उसळून सांठविलें जात आहे कीं काय असा भास होत होता. गालवांच्या कानठळ्या बसून त्यांच्या डोळ्यांपुढें अगदीं अंधेरी आली व आपण कशाकरितां व कोठें चाललों आहों यांचेंही त्यांना भान उरलें नाहीं. पदोपदीं गरुडाच्या शरीरांतून निघणाऱ्या ठिणग्या त्यांचे डोळे दिपवून सोडीत होत्या. तेव्हां मोठ्या काकुळतीनें गालवांनीं त्याला आपला वेग कमी करण्यास विनंति केली. ह्मणून ऋषभ पर्वतावर ते विसावा घेण्याकरितां थांबले; तेव्हां शांडिली नांवाच्या तपोनिष्ठ ब्राह्मणीनें त्यांचें स्वागत करून शिजलेलें अन्न त्यांच्यापुढें ठेवलें. बलिमंत्रानें प्रोक्षून तें खाल्ल्यावर त्याच्या योगानें त्यांना अंमल येऊन त्यांचा डोळा लागला. उठून पहातात तो गरुडाचीं पिसें गळून तो अगदीं मांसाच्या गोळ्यासारखा दिसूं लागला; तेव्हां चिंतातुर होऊन त्यांनीं त्या ब्राह्मणीला त्याचें कारण विचारलें. ती ह्मणाली, 'ह्या गरुडानें मनामध्यें माझ्यासंबंधानें कुबुद्धि आणली. कोणत्याही दोषाचा मला विटाळ नसून मी सदाचरणानें वागत असल्यानेंच मला ही सिद्धि मिळाली आहे. सदाचरणानेंच सर्व संकटें टळून धर्म, अर्थ व वैभव मिळतात.' तेव्हां गरुड ह्मणाला, 'आपल्या संबंधानें माझ्या मनांत भलतेंसलतें कांहीं न येतां ब्राह्मण, ब्रह्मदेव, विष्णु, महेश्वर, धर्म आणि सत्य हे ज्या ठिकाणीं आहेत तेथें आपण रहावें एवढेंच माझ्या मनांत आलें.' नंतर तिच्या आज्ञेनें त्याला फिरून पिसें फुटून पूर्वीप्रमाणें तो वीर्यवान झाला व गालवांना घेऊन गुरुदक्षिणा कशी साध्य होणार याचा विचार करीत पुढें निघाला. वाटेंत तो गालवांना ह्मणाला, 'अग्नीनें उत्पन्न करून वायूनें वाढविलेलें सर्व कांहीं ज्या अर्थीं हिरण्मय आहे त्या अर्थीं या द्रव्याला हिरण्य अशी संज्ञा असून सर्वांला धारण करणारे व जीविताला आधारभूत हें असल्यानें याला धन ह्मणतात. तें हें त्रैलोक्यांत अक्षय असणारें धन शुक्रवारीं पूर्वाभाद्रपदा व उत्तराभाद्रपदा यांचा योग आला असतां अग्नि कुबेराचा खजिना वाढविण्यामाठीं मनुष्यांना देत असतो व त्याचें कुबेर मोठ्या काळजीपूर्वक रक्षण करीत असतो. फार दुर्लभ असें हें धन सहज मिळणारें नव्हे, व तें मिळाल्यावांचून आपल्याला हवे असलेले घोडे मिळणेंही शक्य नाहीं. ह्मणून प्रजेला पिळून न काढतां आपली इच्छा पूर्ण क-

रील अशा एखाद्या राजापाशींच यासाठीं तोंड पसरलें पाहिजे. नहुष कुलांतील एक सोमवंश राजा माझा स्नेही आहे त्याकडे आपण जाऊं. तो ह्या पृथ्वीवर कुबेरासारखा मोठा वैभवशाली आहे, त्यापाशीं गोष्ट काढली असतां आपले मनोरथ पूर्ण होतील. याप्रमाणें दान घेऊनच गुरुदक्षिणा देतां येणार आहे.' याप्रमाणें विचार करून प्रतिष्ठान नगराला ययाति राजाकडे ते आले. तेथें अर्घ्यपाद्यादि सत्कार होऊन राजानें येण्याचें कारण विचारलें असतां गरुडानें आपला उद्देश त्याला कळविला; व 'गुरुदक्षिणेची फेड करून हे ऋषी फिरून तप करूं लागले असतां त्याचा अंश तुलाही मिळेल ह्मणून,' ह्मणाला. तेव्हां तो हजारों यज्ञ करणारा दानशूर उदारधी काशीराज ह्मणाला. 'गरुडा, आज सारे सूर्यवंशी राजे सोडून तुझी मजकडे आल्यानें मी आपल्या जन्माचें सार्थक झालें असें समजतों. याच्या योगानें माझ्या कुलाचा उद्धार झाला आहे. परंतु हल्लींची माझी स्थिति तुह्मांला वाटत आहे तशी नाहीं. माझें सर्व द्रव्य संपलें आहे. परंतु तुह्मांला निराश करून तुमचें मन दुखविण्याची माझी इच्छा नाहीं. ह्मणून ज्यायोगानें तुमचा हेतु शेवटास जाईल अशी वस्तु मी तुह्मांला देतों. कारण याचक हिरमोड होऊन परत गेला असतां सर्व कुल जळून भस्म होतें. 'द्या' ह्मणून मागितलें असतां 'नाहीं,' ह्मणून आशाभंग करण्याहून मोठें दुसरें कोणतेंच पातक नाहीं. काम न झाल्यानें भल्या मनुष्याची निराशा झाली असतां त्याला फारच दुःख होतें. त्याची इच्छा परिपूर्ण न करणाऱ्याच्या पुत्रपौत्राचा नाश होतो. ह्मणून आई, बाप, नवरा व नवऱ्याची आई असे चार वंश उभी करणारी सर्व धर्माला कारणीभूत देवकन्येसारखी ही माझी मुलगी, जिच्या रूपाला भुलून सर्व देव, दैत्य व मानव तिची इच्छा करीत आहेत ती मी यांना देतों. हिच्यासाठीं राजे कन्याधन ह्मणून सर्व राज्य देखील देण्याला तयार होतील, मग आठशें घोड्यांची गोष्ट कशाला? मात्र हिच्यापासून मला एक नातू अमावा एवढें माझें मागणें आहे.' नंतर त्या मुलीला घेऊन 'आह्मी फिरून भेटूं,' असें सांगून गालव गरुडासहवर्तमान निघून गेले, व 'घोडे मिळण्याला हें साधन मिळालें,' असें ह्मणून गरुडही निघून गेला. पुढें कोण राजा हिच्याबद्दल पैसा देण्याला तयार होईल याबद्दल विचार करून गालव सूर्यवंशांतील धनधान्यसंपन्न जो अयोध्याधीश हर्यश्व त्याकडे जाऊन 'स्त्रीधन देऊन हिचा तूं स्वीकार कर,' असें ह्मणाले. जे सहा भाग वर आले असतां त्याला पाहिजेत ते वर आलेले, तसेच जे सात सहापातळ असायाला पाहिजेत ते सहापातळ जे तीन खोल पाहिजेत ते खोल व जे पांच रक्त पाहिजेत ते रक्त याप्रमाणें त्या देवगंधर्वांनाही मोहित करणाऱ्या सर्वांगसुंदरीला पाहून दीर्घ सुस्कारा टाकून हिच्याबद्दल काय स्त्रीधन पाहिजे ह्मणून राजानें विचारलें. तेव्हां गालवांनीं हवे होते तसे आठशें घोडे मागितले. तें ऐकून राजा दीन स्वरानें ह्मणाला, 'आपल्याला पाहिजे तशा प्रकारचे घोडे मजपाशीं दोनशेंच आहेत. ते देऊन हिच्यापासून एकच अपत्य उत्पन्न करून घेऊन ही मी आपल्याला परत देईन.' नंतर 'वारंवार प्रसूति होऊनही तूं फिरून फिरून कुंवारीच राहशील,' असा त्या मुलीला एका ब्रह्मवेत्त्यांचा वर मिळाला असल्यानें गालवांनीं ते दोनशें घोडे घेऊन ती मुलगी त्या राजाच्या स्वाधीन केली. पुढें योग्य कालीं त्या राजाला तिच्यापासून एक सूर्याप्रमाणें तेजस्वी मुलगा झाला. व तोच पुढें वसुमना नांवाचा राजा झाला; व अष्टवसूंपेक्षांही तो धनवान असून मोठा दाता असल्यानें वसु या नांवानेंच तो प्रसिद्ध आहे. पुढें गालवांनीं येऊन ती मुलगी परत नेली. ते घोडे राजापाशीं तशीच ठेव ठेवून गालव पुढें काशिराज भीमसेन पुत्र जो धार्मिक, सत्यनिष्ठ व जितेंद्रिय दिवोदास त्याकडे गेले व त्याकडे त्याला पूर्ववत् विनंति केली. तेव्हां त्याच्यापाशींही दोनशेंच घोडे असल्यानें त्यानेंही पूर्वीच्याच अटीवर तिला घेतली. तो राजा तिच्याबरोबर रममाण झाला अमतां तिला प्रतर्दन नांवाचा एक मुलगा झाला; व पुढें गालव येऊन ते घोडे राजापाशीं ठेव ठेवून त्या मुलीला घेऊन भोजनगराला उशीनर राजाकडे गेले; व त्यापाशीं पूर्ववत् मागणी केली. तेव्हां पूर्वीच्याच अटीवर दोनशें घोड्यांसाठीं तिला त्या राजाच्या स्वाधीन करून गा-

लव निघून गेले. द्रव्यद्वारां बाकींच्या घोड्यांची भरती करण्यास त्याजवळ द्रव्य होतें. परंतु प्रजेची आपल्यापाशीं ती ठेव आहे, असें त्याला वाटत असल्यानें त्याचा भलत्या कामीं विनियोग करण्याला त्याचें मन घेईना. प्रजेचें द्रव्य आपल्या कामीं लावणारा राजा धर्म व कीर्ति यांना मुकतो असा त्याचा समज होता. एखादा पुण्यवान पुरुष ज्याप्रमाणें श्रीचा उपभोग घेतो तसा तो राजा तिच्या समागमामध्यें अनेक विहारस्थानांमधून रममाण झाला असतां प्रभातकालीन सूर्याप्रमाणें कांतिमान असा शिबि नामक मुलगा त्या राजाला तिच्यापासून झाला. पुढें गालव येऊन त्या मुलीला परत घेऊन निघाले असतां फिरून त्यांची व गरुडाची गांठ पडली. तेव्हां गरुड हासत हासत त्यांना म्हणाला, 'आपला हेतु बराच सिद्धीस गेला; आतां चतुर्थांश राहिला आहे त्याबद्दल आपण यत्न करण्यांत अर्थ नाहीं. कारण त्यांत आपल्याला यश येणार नाहीं. पूर्वी कान्यकुब्ज देशांत गाधिराजाला झालेल्या सत्यवतीला ऋचीकांनीं मागणी घातली असतां त्या राजानें तिच्याबद्दल हजार श्यामकर्ण पांढरे घोडे मागितले. तेव्हां ऋचीकांनीं अश्वतीर्थीं हजार तशा प्रकारचे घोडे उत्पन्न करून ते त्यांनीं त्या राजाला दिले, व त्या राजानें पुंडरीक यज्ञांत ते ब्राह्मणांना देऊन टाकले. वरील राजांनीं ब्राह्मणांपासून दोनदोनशेंच विकत घेतले व बाकीच्या चारशेंना वितस्ता नदीच्या उतारांतून ते घेऊन चालले असतां ते तिच्यांत बुडाले. म्हणून बाकीच्या दोनशेंबद्दल ही मुलगीच आपण गुरूंना देऊन टाका.' बरें म्हणून गालव सहाशें घोडे व ती मुलगी घेऊन विश्वामित्रांकडे गेले व घडलेली सर्व हकीकत त्यांना कळवून ते सहाशें घोडे व ती मुलगी घेऊन आपणास ऋणमुक्त करण्याबद्दल त्यांनीं त्यांची प्रार्थना केली. विश्वामित्र त्याला कबूल झाले व त्यांपासून त्या मुलीला अष्टक नांवाचा मुलगा झाला. याला धर्मोपदेश करून त्या मुलीला गालवांच्या स्वाधीन केल्यावर विश्वामित्र वनाला निघून गेले व गालवही याप्रमाणें गुरूच्या ऋणांतून मुक्त होऊन त्या मुलीला फिरून तिच्या बापाच्या स्वाधीन करून वनाला निघून गेले.

पुढें गंगायमुनेच्या संगमावरील आश्रमाला जाऊन आपल्या मुलीचा फिरून स्वयंवर करावा असें ययाति राजाला वाटलें व त्याचे पुरु व यदु हे दोघे मुलगे तिला पुष्पमाला घालून रथांतून फिरवूं लागले. तेथें नाग, यक्ष, मनुष्य, गंधर्व, मृग, पक्षी, पर्वत, वृक्ष व वन यांमध्यें राहणारे सर्व जमले होते; व निरनिराळ्या प्रदेशचे राजे व ब्रह्मतुल्य ऋषी यांनीं तें वन गजबजून गेलें होतें. निरनिराळे वर तिला दाखविले जात असतां त्या सुंदरीनें सर्वांना टाकून वनाचाच अंगीकार केला; व रथावरून खालीं उतरून बंधूंना नमस्कार करून सिंह, अस्वल, वाघ, दावाग्नि व ब्राह्मण यांनीं भरलेल्या पुण्यप्रद व निर्जन वनांत जाऊन उपवास, दीक्षा, व नियम यांनीं देह झिजवीत वैदुर्याच्या अंकुराप्रमाणें हिरवेंचार असें मऊ व तजेलदार गवत खात पुण्यकारक अशा झऱ्यांचें गोड, गार, शुद्ध व स्वच्छ पाणी पिऊन हरणांच्या समागमामध्यें कडकडीत ब्रह्मचर्य पाळून तप करीत राहिली. ययाति राजाही पूर्वजांप्रमाणें हजारों वर्षें राहून पुरु व यदु यांच्या योगानें वंश कायम करून कालधर्माला अनुसरून हें जग सोडून उत्तम स्वर्गफल भोगण्याला गेला. याप्रमाणें हजारों वर्षें लोटलीं असतां एके वेळीं मोठमोठे वैभवशाली राजर्षी बसले असतां मूर्खपणा, अज्ञान, व अहंता यांनीं भरून जाऊन त्यानें सर्व मनुष्य, देव व ऋषी यांविषयीं तुच्छभाव मनांत आणला. हें त्यांचें हृद्गत ओळखून 'हा कोण, कोणाचा, स्वर्गाला कसा आला, कोणत्या कर्मानें याला सिद्धि मिळाली, यानें कुठें तप केलें, कशासंबंधानें याची येथें ख्याति आहे, याला ओळखतो कोण, ' वगैरे धिक्कारमुक्त प्रश्न सुरू झाले; व शेकडों विमानरक्षक, द्वारपाल, सभास्थानरक्षक यांच्याही बुद्धीला भ्रम पडून कोणीसुद्धां त्याला न ओळखल्यामुळें क्षणामध्यें तो तेजहीन होऊन स्थानभ्रष्ट झाला. त्याचें मन अगदीं अस्वस्थ होऊन शोकाग्नीनें त्याला घेरलें. त्याच्या माळा सुकून जाऊन अज्ञानपटल त्याच्या डोळ्यांवर आलें. मुकुट, बाहुभूषणें वस्त्रालंकार सर्व गळून पडून तो लटपटला, त्याकडे कोणी पाहीना. आपण अहंतेनें दुसऱ्यांना तुच्छ केल्यामुळें स्वर्गाला मुकलों आहोंमें पाहून भल्यांमध्यें तरी जाऊन पडावें, अशी ययातीनें इच्छा दर्शविली;

व त्याप्रमाणें तो नैमिषारण्यांत प्रतर्दन, वसुमान, शिबि व अष्टक हे चार श्रेष्ठ राजे वाजपेययज्ञानें इंद्राला तृप्त करीत होते त्या यज्ञाच्या धुराच्या अनुरोधानें भूमीवर येत होता. त्याला खालीं येतांना पाहून 'आपण कोण, आपली काय इच्छा आहे,' ह्मणून त्या राजर्षींनीं त्याला विचारलें. तेव्हां 'मी ययाति राजा आहें, माझें पुण्य सरल्यामुळें खालीं येत आहें, खालीं तरी भल्यांमध्यें जाऊन पडावें ह्मणून मीं इच्छा दर्शविल्यामुळें येथें तुमच्यामध्यें येऊन पडत आहें,' असें त्यानें त्यांना कळविलें. तेव्हां त्याची इच्छा सफल करण्यासाठीं आपल्या यज्ञाचें फळ घेऊन त्यांनीं त्याला परत स्वर्गाला जाण्याला सांगितलें. तेव्हां राजा ह्मणाला, 'मी प्रतिग्रह घेऊन द्रव्य मिळविणारा ब्राह्मण नव्हें. मी क्षत्रिय असल्यानें दुसऱ्यांचें पुण्य अपहार करून घेण्याकडे माझें लक्ष नाहीं.' इतक्यांत हरणांबरोबर फिरत फिरत त्याची मुलगी माधवी तिकडे आली. पित्याला नमस्कार करून मुलांच्या डोक्यांवरून हात फिरवून ती ह्मणाली, 'मी आपली माधवी मुलगी असून हे माझे मुलगे कोणी परके नसून आपले नातूच आहेत. नातवांनीं आजाचा उद्धार करावा ही गोष्ट पूर्वापार चालत आलेली आहे. तेव्हां हें ह्मणतात त्याप्रमाणें त्यांचें पुण्यफल आपण घ्या व माझ्या तपाचेंही अर्धं फळ आपण घेऊन फिरून स्वर्गाला जा.' इतक्यांत गालव तेथें येऊन त्यांनीही आपल्या तपाचा अष्टमांश राजाला दिला. नंतर सर्वांकडून भला ह्मणवून घेतलेला दानशील व क्षमावान वसुमान, धर्म व युद्ध यांविषयी दक्ष प्रतर्दन, सत्यसंध शिबि व अनेक पुंडरीक, गोसव, वाजपेय प्रभृति मोठमोठे यज्ञ करणारा अष्टक यांनीं आपलें सर्वपुण्य ययातीला देऊन आपल्या पुण्यानें त्याचा पृथ्वीवर पाय लागूं न देतां तमाच फिरून त्या मोठ्या ज्ञानी मातामहाला स्वर्गाला पाठविलें; व स्वतः सत्कर्मशील असणारा ययाति आपल्या नातवांच्या ह्या पुण्यानें स्वर्गात फारच झळकूं लागला. देवांनीं अभिनंदनपूर्वक त्याचा सत्कार केला, व मधुर शब्दांनीं तोषून ब्रह्मदेव त्याला ह्मणाले; 'उत्तम लोक मिळण्यासारखा तूं चतुष्पाद धर्मसंचय करून अक्षय्य स्वर्ग मिळविला होतास. परंतु तुझ्याच उद्दाम वर्तनानें स्वर्गवासी लोकांचें मन दुखवून तूं त्याला मुकलास. परंतु तुझ्या नातवांनीं फिरून तुझा उद्धार केल्यामुळें तुला अविनाशी, अढळ व शाश्वत स्थान मिळालें आहे.' हें एकून 'अनेक यज्ञांनीं व दानांनीं मिळवून प्रजापालनानें वाढविलेल्या माझ्या विपुल पुण्याच्या सांठ्याचा क्षय एकदम कसा झाला,' ह्मणून ययातीनें विचारलें असतां ब्रह्मदेव ह्मणाले, 'अहंपणामुळें तुझ्या सर्व पुण्याचा एकदम क्षय झाला. अभिमान, हिंसा, कपट, माया, शक्तीची घमेंड यांपैकीं एक अंगीं असलें तरी अक्षय्य स्थान मिळणें शक्य नाहीं. उत्तमाधममध्यमांपैकीं कोणाचाही अवमान करणें रास्त नाहीं. अहंतापिशाचानें झपाटलेल्या पुरुषाला सुख मुळीं मिळत नाहीं.

तेव्हां हे राजा, पूर्वी अहंतेमुळें ययातीला व दुराग्रहामुळें गालवांना असें प्रायश्चित्त मिळालें. ह्मणून हित सांगणाऱ्या हितेच्छु जिव्हाळ्यांच्या लोकांचें ह्मणणें मोडूं नये. हट्ट फार वाईट असून परिणामीं घात करणारा आहे. ह्मणून अहंता, राग व अविचार सोडून पांडवांशीं सख्य कर. पुरुष जें देतो, करतो, अथवा जें तप किंवा हवन करतो त्याचा नाश अथवा क्षय कधीं होत नसून करणाराशिवाय दुसऱ्याला त्याचें फळ कधीं मिळत नाहीं. रागद्वेष टाकलेल्या बहुश्रुत पुरुषांचें हें अनुपम हितवचन जो लक्षांत घेतो त्याचें धर्मार्थकामांकडे उत्तम लक्ष राहून तो सर्व पृथ्वी आपलीशी करतो.'

यावर धृतराष्ट्र ह्मणाला, 'मुने, आपलें ह्मणणें सत्य असून माझी इच्छाही पण तशीच आहे. परंतु या दुर्योधनापुढें माझें कांहीं चालत नाहीं.' असें ह्मणून तो भगवान कृष्णाला ह्मणाला; 'केशवा, तुझें ह्मणणें धर्म व न्याय यांना धरून असून इह लोकीं सन्मान व स्वर्ग मिळवून देणारें आहे. जें कांहीं चाललें आहे तें मला पसंत नाहीं. पण या बाबतींस माझें कांहींच चालत नाहीं. तेव्हां तुला ह्या न्यायाला सोडून वागणाऱ्या, मनानें व बुद्धीनें दुष्ट, क्रूर, व विचारशून्य अशा मंदमति दुर्योधनाचें मन वळवितां आल्यास पहा. गांधारी, पोक्त विदुर, भीष्म प्रभृतींनीं याच्यापुढें हात टेकले आहेत. आतां तुझ्या हातून एवढें

काम होईल तर मोठेंच सुहृत् कार्य घडवून आण-ल्याचें श्रेय तुला येणार आहे.' हें एकून सर्व धर्म-तत्व जाणणारा भगवान तापट दुर्योधनाकडे वळून ह्मणाला, 'हे बुद्धिमान दुर्योधना, तुझ्या अनुयायां-सह तुला शांति मिळावी ह्मणून मी तुला सांगतों तें ऐकून घेऊन त्याप्रमाणें वाग. थोर कुलांत तुझा जन्म झाला असून विद्या, आचार व इतर गुण तु-झ्या ठिकाणीं वसताहेत. तूं मनांत योजलें आहेस तशाप्रकारचें काम नीच कुलांत ज्यांचा जन्म झा-ला आहे त्यांनींच करावें. सज्जनांचें वर्तन धर्म व अर्थ यांना सोडून कधीं असत नाहीं. नेहमीं या-च्या उलट दिसून येणाऱ्या ह्या तुझ्या कृतीचा परि-णाम फार घोर व अनिष्टकारक होणार आहे. एक-दां यां कामाला सुरवात झाल्यावर मग तें कोणाला आवरतां येणें कठीण. तर आधींच सावध होऊन हा अनर्थ टाळशील तर तुझें व तुझ्या आप्तबांध-वांचेंच त्यांत कल्याण होईल व अपयशाचें खापर तुझ्यावर फुटणार नाहीं. शहाणे शूर, उत्साहसंपन्न व मनोनिग्रही अशा पांडवांबरोबर सख्य करण्याला तुला भीष्म, विदुर प्रभृति मंडळी सांगत असून तुझ्या वडिलांचेंही तुला तेंच सांगणें आहे. तूं स्वतः विन-यशील, कुलीन व बहुश्रुत आहेस. तुझा स्वभाव दुष्ट नाहीं. तेव्हां वडिलांच्या आज्ञेप्रमाणें वाग. बाप जो उपदेश करीत असतो तो हिताचा असून को-णालाही संकटसमयीं त्याची आठवण होत असते. सुहृदांच्या उपदेशाप्रमाणें न वागणाराला, बरोबर न शिजलेलें अन्न खाणाराला ज्याप्रमाणें पुढें तें निस्त-रावें लागतें त्याप्रमाणें परिणामीं फार ताप होतो. बुद्धीला भ्रंश पडून जो हितवचन ऐकत नाहीं तो स्वार्थाला मुकतो. आपल्या मनाजोगें नसल्यामुळें आपल्या हितेच्छूंचें भाषण न ऐकतां त्याच्या उलट मागणाऱ्यांच्या उपदेशाप्रमाणें जो वागतो तो लव-करच संकटांत सांपडून त्याबद्दल त्याच्या मित्रांना रडण्याची पाळी येते. चांगला मंत्री टाकून दुर्म-त्याच्या सल्ल्याने जो वागतो तो घोर संकटांत सांपडून त्यांतून त्याला पार पडतां येत नाहीं. **जो सज्जनांचा उपदेश न ऐकतां दुर्जनांच्या तं-त्रानें वागतो, खोटें वर्तन ठेवतो व परकी-यांच्या नादीं लागून स्वकीयांचा द्वेष करतो त्याला ही भूमाता सोडते.** त्या वीरांशीं विरोध धरूं नकोस. इंद्रासारख्या महारथी आपल्या भावां-ना सोडून दुसऱ्याच्या साहाय्याची तूं अपेक्षा ध-रतोस ह्या वेडेपणाला काय ह्मणावें? जन्मापासून त्यांना तुच्छ करून तूं त्यांच्याबरोबर कपटानें वागत आहेस तरी ते न रागावतां तुझ्याशीं सरळ वागत आहेत. तेव्हां तूंही त्यांच्याशीं तसाच वाग. शहा-ण्यांनीं हातीं घेतलेलें काम धर्म, अर्थ, काम ह्या तिहींना धरून असतें. व या तिहींशीं जेव्हां त्यांचा मेळ बसवितां येत नाहीं तेव्हां तें धर्म व अर्थ या दोहोंला तरी धरून असतें. या तिघांमध्ये विरोध दिसूं लागला असतां शहाणा धर्मालाच धरतो. म-ध्यम पुरुष तंट्याला मूळ जो पैसा त्याच्या मागें लागतो, व जो मूर्ख असेल तोच केवळ कामाकडे नजर देतो. सामान्य मनुष्य लोभानें केवळ इंद्रियां-च्या आधीन होऊन भलत्या उपायानें काम व अ-र्थ मिळविण्याच्या नादीं लागून नाश पावतो. काम व अर्थ मिळवूं इच्छिणारानें देखील धर्माचीच कास धरली पाहिजे. कारण ते देखील धर्माला सोडून क्वचितच असतात. धर्म हेंच त्रिवर्ग प्राप्तीचें उत्तम साधन आहे. तेव्हां धर्मानें अर्थकाम मिळवूं इच्छिणारा शुष्क अरण्यांतील अग्नीप्रमाणें लवकर वाढतो. तूं भलत्या उपायानें सर्व राजांवर उज्ज्वल व श्रेष्ठ स्वामित्व मिळवूं इच्छीत आहेस. आपल्या-शीं सरळ वागणाराबरोबर जो वांकड्या रीतीनें वा-गतो तो कुऱ्हाडीनें वन तोडणाराप्रमाणें आपलाच घात करून घेतो. ज्याचा मोड होऊं नये अशी आपली इच्छा असते त्याच्या बुद्धीला भ्रम कधीं पाडूं नये. त्याची बुद्धि कायम राहील तरच हिता-च्या गोष्टीकडे त्याचें मन वळेल. ज्याचा आपल्या-मनावर दाब आहे अशा पुरुषानें यःकश्चित सामा-न्य मनुष्याला सुद्धां तुच्छ करूं नये. मग पांडवां-सारख्यांची गोष्ट राहिली बाजूला. रागाच्या तावे-डींत गेलेल्या मनुष्याला सारासार विचार नसतो. जें जें ह्मणून भलतीकडेस अव्यवस्थित रीतीनें प-सरत असेल त्या सर्वाला कापून काढावें लागतें. हें तुला ठाऊक असलें पाहिजे. दुर्जनापेक्षां पांडवांशीं स्नेह करणें तुझ्याच कल्याणाचें आहे. त्यांच्याशीं तूं नीट वागूं लागलास, ह्मणजे तुझे सर्व हेतु पूर्ण

होतील. त्यांनीं मिळविलेल्या पृथ्वीचा तूं उपभोग घेत असून त्यांना टाकून दुःशासनप्रभृतींवर अधिकार सोंपवून तूं वैभवामध्यें राहूं इच्छीत आहेस! पांडवांची बरोबरी करणारा तुझ्या बाजूला कोण आहे? तुझें हें सर्व राजमंडळ त्या खवळलेल्या भीमसेनाकडे पाहण्याला सुद्धां समर्थ नाहीं; व त्या धनंजयापुढें उभें राहण्याला भीष्म, द्रोणप्रभृति मंडळी सुद्धां समर्थ नाहींत. अर्जुनाचा पराभव सर्व देवदानवांच्या हातूनही होणें शक्य नाहीं. आजपर्यंत त्या एकट्या वीरानें जीं शौर्याचीं कामें केलीं आहेत व विराट नगरामध्यें जी तुमची दशा उडाविली ती तुला ठाऊकच आहे. सर्व ज्ञातीचा बुड्ड्यासाठीं फडशा पडूं नये ह्मणून विचार कर. कौरव कांहीं शिल्लक राहूं देत. कुलाचा समूळ नाश करून घेऊन कीर्तीला मुकून कुलघातकी हें नांव मिळवूं नकोस. पांडव धृतराष्ट्राला राज्यावर ठेवून तुला युवराज करतील. तर ही चालत आलेली लक्ष्मी लाथळूं नकोस. अर्ध राज्य देऊन त्यांच्याशीं सख्य करून मित्र जोडून सुखोपभोग घेत आनंदांत नांद.'

यावर भीष्म ह्मणाले, 'सुहृदांमध्यें सख्य इच्छिणाऱ्या कृष्णाच्या सांगण्याप्रमाणें वागण्यांतच तुझें कल्याण आहे. तेव्हां याप्रमाणें न वागल्यामुळें या झकझकींत भारतराजलक्ष्मीचा धृतराष्ट्राच्या हयातींतच तुझ्या दुष्टपणामुळें नाश होऊं देऊं नकोस. तूं स्वतः प्राणाला मुकून तुझ्याबरोबर दुसऱ्यांलाही प्राणाला मुकविशील. पित्याचें, कृष्णाचें, तसेंच विदुराचें ह्मणणें न जुमानतां कुलघातकी नीच बनून आईबापांना शोकसागरीं बुडवूं नकोस.' यानंतर संतापानें दीर्घ सुस्कारे टाकणाऱ्या दुर्योधनाला द्रोण ह्मणाले, 'बुद्धिमान, ज्ञानी, जितेंद्रिय, हितेच्छु व बहुश्रुत अशा ह्या दोघांचा उपदेश फुकट जाऊं देऊं नकोस. बुद्धीला भ्रम पडूं देऊन श्रीकृष्णाला तुच्छ करूं नकोस. तुला जे चढवून देत आहेत त्यांचा युद्धामध्यें तुला कांहीं उपयोग न होतां वैराचें लोढणें हे आमच्यासारख्या तिन्हाइतांच्याच गळ्यांत अडकवून देतील. मुलगे, भाऊ इत्यादि सर्वांना व्यर्थ बळी पाडूं नकोस. कृष्णार्जुनांचा पराभव कोणाच्या हातून होणें शक्य नाहीं. या कृष्णभीष्मांचें ह्मणणें अगदीं खरें असून तें जर तूं न ऐकशील तर फुकट पश्चात्ताप पावशील. तुला हिताची सरळ गोष्ट सांगून काय उपयोग? मला सांगावयाचें होतें तें अखेरचें मीं तुला सांगितलें. आतां तुला वाटेल तसा वाग.' नंतर त्या तापट दुर्योधनाकडे दृष्टि लावून विदुर ह्मणाले, 'दुर्योधना, तुझ्याबद्दल मला बिलकुल वाईट वाटत नाहीं. या धृतराष्ट्रगांधारीसंबंधानेंच मला वाईट वाटत आहे. दुर्बुद्धि असा जो तूं त्या तुझाच काय तो त्यांना आधार असल्यानें तुम्हां सर्वांचा नाश झाल्यावर पिसें उपटलेल्या पांखरांप्रमाणें त्यांची अनाथ दशा होणार आहे; व अशा कुलघाती दुष्टाला जन्म दिल्याबद्दल त्यांना दीन होऊन रडत सर्व पृथ्वीभर भटकण्याची पाळी येणार आहे!' यावर धृतराष्ट्र ह्मणाला, 'हा कृष्णाचा उपदेशच तुझ्या हिताचा व योगक्षेमकर आहे. या शुद्धाचरणसंपन्न कृष्णाचें तुला साहाय्य मिळाल्यावर तुझे कोणतेही हेतू सफल झाल्यावांचून राहणार नाहींत. कृष्णाच्या मध्यस्थीनें पांडवांशीं स्नेह करून तूं आणि युधिष्ठिर यांनीं एक व्हावें हेंच या प्रसंगाला मला ठीक दिसतें. सख्य करण्याच्या हेतूनें प्रत्यक्ष श्रीकृष्ण आला असतां त्याचें न ऐकतां त्याला तुच्छ करशील तर तुला जय कधीं येणार नाहीं.'

यावर भीष्मद्रोण फिरून त्या हेकट दुर्योधनाला ह्मणाले, 'जोंपर्यंत कृष्णार्जुन युद्धाला तयार झाले नाहींत, जोंपर्यंत गांडीव स्वस्थ पडून आहे, जोंपर्यंत धौम्यांनीं रणाग्नींत शत्रूंची आहुति देण्याला सुरवात केली नाहीं, जोंपर्यंत विनयशील महाधनुर्धारी युधिष्ठिरानें तुझ्या सैन्याकडे रागाकून दृष्टि फेंकिली नाहीं, जोंपर्यंत चित्रगति गदापाणी भीमसेन तुझ्या सैन्यांत फिरूं लागून वीरांचा फडशा उडविणाऱ्या आपल्या गदेनें गजयोद्ध्यांचीं मुंडकीं सपशेल उडवूं लागला नाहीं, जोंपर्यंत नकुल, सहदेव, धृष्टद्युम्न, पार्षत, विराट, शिखंडिप्रभृति अस्त्रपटु वीर महासागरांत शिरणाऱ्या सुसरीप्रमाणें रणामध्यें शिरून गृध्रपक्षयुक्त बाण तुझ्या सैन्यावर सोडून त्याचा फडशा उडवूं लागले नाहींत, व जोंपर्यंत ह्यांच्या हं हं ह्मणतां दूरदूर जाऊन पडणाऱ्या प्रचंड बाणांनीं हार, पदकें वर असलेल्या चंदन व अगुरू

फासलेल्या योद्धयांच्या छातीवर बिन्हाड केलें नाहीं, तोंपर्यंतच ह्या वैराचा बऱ्या रीतीनें निकाल लाबून टाक. तूं त्या सरळ बागणाऱ्या युधिष्ठिराच्या पायांवर डोकें लवविशील तर तो मोठ्या प्रेमानें तुला कवटाळील व आपला उजवा हात स्नेहपूर्वक तुझ्या खांद्यावर टाकील; व आपला आरक्त तळहात तो तुझ्या पाठीवरून फिरवील. शालस्कंधी महापराक्रमी भीमसेनही तुला कडकडून भेटून तुझ्याशीं गोड बोलेल. अर्जुन व नकुलसहदेव तुला नमस्कार करूं लागले असतां तूं त्यांचें शिर हुंगून त्यांच्याबरोबर प्रेमानें बोलशील. पांडवांशीं एक होऊन दोघे मिळून ह्या पृथ्वीचा उपभोग घेऊं लागल्याबद्दल सर्व राजधान्यांमधून दांडोरा पिटून ही सुवार्ता ऐकून त्यांना आनंदाश्रु ढाळूं देत. '

याप्रमाणें कौरवांच्या सभेमध्यें बडबड ऐकून दुर्योधन श्रीकृष्णाला ह्मणाला, ' तूं जें बोलतो आहेस हें नीट विचारपूर्वक बोलशील तर बरें पडेल, तूं, विदुर, तात, भीष्म, द्रोण हे सर्वच नेहमीं पांडवांच्या गुणांचे गोडवे गाऊन माझी निंदा करीत असतां व हे सर्व राजेही माझा द्वेष करतात. परंतु सूक्ष्म बिचारांतीं देखील असा कांहीं मीं मोठा अपराध केला असावा असें मला वाटत नाहीं. आपसुषीनें जुगारांत पडले असतां शकुनीनें त्यांचें राज्य हरण केलें त्यांत माझा अपराध कोणता? शिवाय द्यूतांत बारीक सारीक जय येऊन त्यांनीं जें द्रव्य मिळविलें होतें तें सुद्धां त्यांचें त्यांना मीं तेव्हांच देऊन टाकलें! कोणाला हार न जाणाऱ्या त्या पांडवांना द्यूतांत हार खाऊन बनाला जावें लागलें हा कांहीं आमचा अपराध नाहीं! प्रतिपक्ष धरून उठलेल्या वैऱ्याप्रमाणें ते दुर्बल असतां कशासाठीं मोठ्या हौसेनें आमच्याशीं विरोध करीत आहेत व संजयांच्या जोरावर आमचा फडशा उडवूं पहात आहेत? अवडंबर माजविल्यानें किंवा बागुलबोवा दाखविल्यानें भिऊन जाऊन राज्य सोडून देऊन आम्ही प्रत्यक्ष इंद्रापुढें सुद्धां वांकणार नाहीं. युद्धांत आम्हांला जिंकणारा तर कोणी क्षत्रिय मला दिसत नाहीं. भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, यांचा युद्धांत पाडाव प्रत्यक्ष देवांच्या हातून होणें नाहीं. शिवाय स्वधर्मानें चालत असतांना रणांत जरी आम्हांला मरण आलें तरी तें सुद्धां स्वर्ग मिळण्यालाच कारण होणार आहे. **रणांगणामध्यें शरशय्येवर कायमचा विसावा घेणें हा क्षत्रियांचा मुख्य धर्म आहे!** तेव्हां शत्रूच्या पुढें मान न वांकविता युद्धांत आम्हांला वीरांना उचित अशी शय्या मिळेल तर त्याबद्दल वाईट वाटण्याचें कारण काय? थोर कुलांत जन्मलेला कोण क्षत्रिय प्रसंग पडला ह्मणून या टीचभर खद्धीसाठीं भीतीनें दुसऱ्यापुढें मान वांकविण्याला तयार होईल! 'न नमतां छाती वर करून चालणें व स्वाभिमान बाळगणें हेंच पौरुष. कळक ज्याप्रमाणें बिनकांड्याच्या ठिकाणीं मोडून जातो त्याप्रमाणें मोडून जावें पण कोणापुढें वांकूं नये,' हें मातंगवचन आत्महितेच्छु पाळीत असतात. माझ्यासारख्यानें धर्मापुढें व ब्राह्मणांपुढें मस्तक ठेंगणें करावें, व इतर कोणाची पर्वा न धरतां वरील मातंगवचनाप्रमाणें वागावें, हाच क्षात्रधर्म असून माझेंही सदा असेंच मत आहे. पूर्वी तातांनीं जो राज्याचा अंश देण्याचें कबूल केलें होतें तो सुद्धां मी जिवंत असे तोंपर्यंत मिळणार नाहीं. महाराज जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत दोघेही शस्त्र ठेवून स्वस्थ त्यांच्या आज्ञेंत राहूं. पण पूर्वी न कळत भीतीनें मी लहान असतां जें त्यांनीं देऊं केलें होतें त्यापैकीं सुईच्या टोकाएवढा देखील भाग मी पांडवांना देणार नाहीं. '

नंतर रागानें डोळे लाल होऊन कांहीं वेळ विचार करून भगवान ह्मणाला, 'खरोखरच तर मग वीरांना उचित अशी शय्या तुला मिळून तुझी इच्छा पूर्ण होईल. धीर धरून ऐस. घोर युद्ध कांहीं आतां टळत नाहीं. आतां पांडवांचा तूं कांहीं अपराध केला नाहीं ह्मणतोस यांत तथ्य किती आहे याचा येथें जमलेले राजेच विचार करतील.त्या महात्म्यांच्या संपत्तीनें तुझ्या अंगाची तळमळ होऊं लागल्यामुळें तूं शकुनीच्या मसलतीनें द्यूताचा घाट घातलास.शिष्टांना मान्य, श्रेष्ठ व निष्कपटी असे तुझे ते भाऊ मात्र जशास तसें या न्यायानें कपट्यांशीं कपटानें वागण्यास तयार होत नाहींत. द्यूत हें भल्याच्या बुद्धीला सुद्धां मोह पाडणारें आहे; व दुर्जनामध्यें तर यांच्या योगानें तंटे माजून संकटें ओढवतात. भल्यांचा विचार न घेतां दुष्टांच्या सल्लूचानें तूं हें

यूत आरंभून आपल्यावर संकट ओढवून घेतलेस. नाहींपेक्षां कुलीन, सुशील पांडवांना प्राणापेक्षां प्रिय अशा भावजयेला सभेमध्यें आणून तिला टाकून बोलून तिचा छळ करण्याला कोण बरें धजला असता? शत्रुतापन पांडव वनाला निघाले असतां दुःशासन त्यांना टाकून बोलतो! लोभहीन, सदाचारी व धर्मनिष्ठ अशा प्रत्यक्ष भावांबरोबर कोण भला मनुष्य असें अयोग्य वर्तन ठेवील? दुष्ट व अनार्य पुरुषांना शोभणारें काम ह्या कर्णदुःशासनांनीं अनेक वेळां केले आहे. वारणावतामध्यें कुंतीसह त्या बिचाऱ्यांना जाळून टाकण्याची सुद्धां तुम्हीं आपल्या हातून होईल तेवढी खटपट केली; परंतु ती दैवयोगानें शेवटास गेली नाहीं! ते वेळी बराच कालपर्यंत पांडवांना एका नगरांत लपून रहावें लागलें. विष देऊन, साप बांधून, अशा अनेक उपायांनी त्यांना मारण्याचा तूं यत्न केलास तोही निष्फळ झाला. नेहमीं अशा बुद्धीनें त्यांच्याशी कपटानें वागून त्यांचा अपराध केला नाहीं ह्मणतोस हे कसें बरें? वडिलोपार्जित राज्याचा हिस्सा ते मागत असतां त्यांना तो तूं देत नाहींस. माती खावयाला लागून ऐश्वर्याला मुकलास ह्मणजे मग याला तूं कबूल होशील. पांडवांचे तूं एक नाहीं असख्य अपराध केले असून अजूनही त्यांच्याशी तूं कपटानें व दुष्टपणानें वागत आहेस; एवढेंच नव्हे तर त्यांच्या बरोबर भांडणाला कबर बांधिली आहेस सर्व तुला त्यांच्याबरोबर सख्य करण्याला सांगत असून तूं ऐकत नाहींस. सख्य केल्यानें दोघांचेही कल्याण होणार आहे परंतु ते तुला रुचत नाहीं. तेव्हां याला तुझ्या बुद्धीचा दुष्टपणा हेच कारण, दुसरें काय? सुहृदांचे न ऐकतां हें अकीर्तिकर व धर्मविरुद्ध कृत्य करण्याला तूं प्रवृत्त झाला आहेस; पण यापासून तुला सुख होणार नाहीं.' याप्रमाणे भगवान बोलत असतां 'दादा, तूं पांडवांबरोबर सख्य केलें नाहींस तर पितामहप्रभृति मंडळी तुला, मला व कर्णाला धरून पांडवांच्या हवालीं करतील,' असे दुःशासन ह्मणाला. तें ऐकून दुर्योधन खवळला व मोठ्या नागाप्रमाणें सुस्कारा टाकीत सभेमधून मान्यांचा अनादर करून हलकटासारखा उठून चालता झाला. तेव्हां त्याचे भाऊ व राजेही त्याच्या मागून निघाले. ते वेळीं त्या खवळलेल्या दुर्योधनाचें शांतवन करून भीष्म ह्मणाले, 'धर्मार्थाला झुगारून देऊन जो अविचाराला कवटाळतो तो लवकरच संकटांत सांपडून शत्रूला आनंद देतो. हे सारें राज्य आपलेच आहे या दुराग्रहानें हा कोणाचें ऐकत नाहीं. तेव्हां सर्व क्षत्रियांचा अंतकाळ जवळ आला आहे सर्व राजेही मुकाट्यानें याच्या अनुरोधाने चालले आहेत!' यावर भीष्म, द्रोणप्रभृति मंडळींना अनुलक्षून भगवान ह्मणाला, 'ह्या ऐश्वर्यानें मस्त झालेल्या मूर्खाला तूर्त्तां सर्व वृद्ध कौरव बांधून ठेवित नाहीं हा तुमचाच दोष आहे. अशा प्रसंगीं काय केलें असतां हित होणार आहे ते सांगतों ऐका. वृद्ध भोजराजाच्या हयातीत इंद्रियांच्या तावडींत गेलेला त्याचा मुलगा त्याचे ऐश्वर्य बळकावून मृत्युमुखीं पडला तसेंच उग्रसेनाचा मुलगा कंस याला त्याच्या बांधवांनीं सोडून दिलें. कुलाकरितां त्या एकट्याला टाकून सर्व अंधक, वृष्णि व यादव यांना सुख झालें. देवदानवांचें युद्ध सुरू होऊन दोघांनीं शस्त्रें उपसलीं असतां दोन्ही बाजूंची प्रजा फुकट मरूं लागली. तेव्हां सर्व नाशीं न व्हावा ह्मणून ब्रह्मदेवांनीं धर्माला दानवांना बांधून वरुणाच्या स्वाधीन करण्यास सांगितलें; तेव्हांपासून दानव, धर्म व वरुण यांच्या पाशांनीं जखडले जाऊन समुद्रामध्यें बंदोबस्तानें अटकेंत आहेत. त्याचप्रमाणें या वेळीं दुर्योधन, कर्ण, शकुनि व दुःशासन या चौकडीला बांधून तुम्ही पांडवांच्या स्वाधीन करा. कारण, कुलासाठीं एकाला टाकावें, गांवासाठीं एका कुलाला सोडावें, देशासाठी एकां गांवावर पाणी सोडावें व आपल्यासाठी सर्व पृथ्वीला सोडण्याला तयार व्हावें.

यावर लोभग्रस्त दुर्योधनापुढें आपलें कांहीं चालत नाहींमें पाहून गांधारीकडून तरी त्याचें कांहीं मन वळल्याम पहावें ह्मणून धृतराष्ट्रानें विदुराकडून तिला सभेंत आणविलें व 'कह्यांतून गेलेला दुर्योधन जिव्हाळ्याच्या लोकांच्या उपदेशाला न जुमानतां सर्वांचा अनादर करून सभेंतून निघून गेला आहे, त्याची तूं तरी कांहीं समजूत घाल,' ह्मणून तिला सांगितलें. तेव्हां त्याला आणविण्यास सांगून ती धृतराष्ट्राला ह्मणाली, 'धर्मभ्रष्ट झालेल्या हलक-

टाच्या हातीं राज्य जावें हेंच मुळीं रास्त नसतां या दांडगेश्वराच्या हातीं लाडानें राज्य सोपवून त्याचा दुष्टपणा ठाऊक असतांही नेहमीं आपण त्याच्या मनाप्रमाणें वागत आलां; तेव्हां आतां या कामीं दोष कोणाकडे येतो ? कामक्रोधलोभांच्या पूर्ण तावडींत गेलेल्या ह्याला आतां आवरतां येणें कठीण आहे. वाईट सल्लागारांच्या नादानें वागणाऱ्या या मूर्ख पोरकट लोभी मुलाच्या हातीं राज्य सोपविल्याचें हें प्रायश्चित्त मिळत आहे ! स्वजनामध्यें फूट पडत असतां तिकडे राजानीं डोळेझाक करून कर्में चालेल? आपल्याला स्वजनाशीं विरोध करतांना पाहून आपले शत्रू देखील आपल्याला हासतील. जें संकट सामभेदादि उपायांनीं टाळतां येण्याजोगें असेल त्यासाठीं स्वजनांवर हत्यार उपसणें ठीक नव्हे. ' इतक्यांत विदुर दुर्योधनाला सभेंत घेऊन आले त्याला उद्देशून ती म्हणाली, ' माझें म्हणणें तूं ऐकशील तर त्यांत तुझें हित होऊन तुला सुख मिळेल. वडिलांचें सांगणें तूं तोडूं नकोस. केवळ दुराग्रहानेंच कोणी आजपर्यंत राज्य मिळविलें, राखलें अगर उपभोगिलें आहे काय ? इंद्रियांच्या तावडींत गेलेल्या पुरुषाला राज्याचा उपभोग फार दिवस मिळत नाहीं. जो जितेंद्रिय व विचारी असतो त्याच्या हातूनच राज्याचें संरक्षण होतें. काम, क्रोध हे मनुष्याला वैभवापासून दूर ओढीत असतात व ज्याला ह्या दोन शत्रूंना जिंकतां येतें तोच पृथ्वी जिंकूं शकतो. राजाधिराजपद मिळणें फार कठीण आहे. मिळालेलें राज्यसुद्धां दुष्टांना राखतां येत नाहीं. राज्य पाहिजे असेल त्यानें इंद्रियांना धर्मार्थाकडेसच वळविलें पाहिजे. इंद्रियें स्वाधीन झालीं असतां पेटणाऱ्या अग्नीप्रमाणें बुद्धि दिवसानुदिवस विकसतच जाते. सारथ्याच्या आटोक्याबाहेर गेलेले घोडे ज्याप्रमाणें वाटेंत सारथ्याला देखील खड्ड्यांत पाडूं शकतात त्याप्रमाणें ज्याचीं इंद्रियें त्याच्या ताब्यांत नाहींत त्याचा त्या इंद्रियांकडूनच नाश होत असतो. मनाला ताब्यांत न ठेवतां मंत्र्यांना व मंत्र्यांना ताब्यांत न आणतां शत्रूंना ताब्यांत आणण्याची खटपट करतो तो निरुपाय होऊन नाश पावतो. मन हाच आपला मुख्य शत्रु समजून प्रथम याला जिंकून मग. मंत्री व शत्रु यांना ताब्यांत आणण्याची खटपट केली तर ती फुकट जात नाहीं. जितेंद्रिय, जितामात्य, अपराध्यांसाठीं नेहमीं शस्त्र तयार ठेवून असणारा व कोणतेंही काम विचार करून करणारा अशा विचारी पुरुषाला लक्ष्मी चिकटून असते.बारीक भोकांच्या जाळ्यांत गुरफटलेल्या दोन माशांप्रमाणें हे कामक्रोध शरीरामध्यें असून शहाणपणावर ते दडपण घालीत असतात. स्वर्गमार्ग सुधारणाऱ्या विरक्त पुरुषांपासून भिऊन जाऊन ह्या दोघांनाच त्यांच्या ठिकाणीं वाढूं देऊन देवांनीं यायोगानें त्यांना स्वर्गद्वार बंद केलें आहे.काम, क्रोध, लोभ, दंभ, अहंकार ह्यांना जिंकण्याचें ज्या राजाला ठाऊक असतें तो पृथ्वी जिंकतो. धर्म, अर्थ व शत्रूचा पराभव हे ज्याला पाहिजे आहेत त्यानें इंद्रियें ताब्यांत ठेवण्याला प्रथम झटलें पाहिजे. कामक्रोधांच्या आधीन होऊन जो कोणी स्वकीय किंवा परके यांबरोबर कपटानें वागूं लागतो त्याला कोणी साहाय्य होत नाहीं. शत्रूचा फडशा पाडणाऱ्या शूर व विचारी पांडवांशीं एकी झाली असतां दोघांनाही चांगलें सुख मिळेल. वडिलांचें सांगणें खोटें नाहीं. ह्मणून शुद्धाचारसंपन्न महापराक्रमी कृष्णाला तूं शरण जा. तो प्रसन्न होईल तर दोघांनाही सुख देईल. विचारी, शहाण्या अशा हितचिंतक जिव्हाळ्याच्या लोकांच्या सांगण्याप्रमाणें जो वागत नाहीं तो शत्रूंना आनंद देतो. युद्धापासून फायदा होण्याचा संभव नसून त्यांत धर्मार्थलाभही नाहीं. शिवाय युद्धांत नेहमींच जय येतो असेंही नाहीं. तेव्हां हा युद्धाचा विचार सोडून दे. तुझ्या वडिलांनीं पूर्वी भांडणाला भिऊन त्यांना हिस्सा दिला त्याचेंच फळ पांडवांनीं निष्कंटक केलेल्या पृथ्वीचा तुला अद्यापि उपभोग मिळत आहे. ह्मणून त्यांचा निम्मा हिस्सा त्यांना देऊन टाक. तुला यथेच्छ सुखोपभोगाला अर्धं राज्य पुरें आहे. जिव्हाळ्याच्या लोकांच्या उपदेशाप्रमाणें वागशील तर तुझें मोठें कल्याण होईल. त्यांच्याबरोबर भांडण्याला उठशील तर खात्रीनें सुखाला मुकशील. त्यांचें त्यांना देऊन टाकून आपलें नीट संभाळ. तेरा वर्षं त्यांना दुःख भोगण्याला लावलेंस तें पुरें आहे. तुझ्या हव्यरेषणानें व रागानें त्यांना होत चाललेलें दुःख आतां कमी कर. त्यांचा पैसा गिळंकृत करण्याची तु-

ही इच्छा करतां, पण त्या करण्याला तुमच्या अंगांत पुरेसें सामर्थ्य नाहीं. भीष्ममामंजी, दोघे आचार्य, कर्ण, भीमसेन व धनंजय खवळले असतां सर्व जगाचा फडशा उडवितील. तेव्हां कौरवांच्या तसेंच सर्व पृथ्वीच्या नाशाला तूं कारण होऊं नकोस. भीष्ममामंजी, वैगेरे आपली सर्व शक्ति खर्चून तुझ्या बाजूनें लढतील असें तुला वाटत आहे तो निव्वळ तुला भ्रम आहे. दोघांचें नातें सारखेंच असून राज्यावर हक्कही दोघांचा सारखाच असल्यामुळें त्यांचें प्रेम तुह्मां दोघांवर सारखेंच असणार. शिवाय धर्म हा पांडवांच्या बाजूला अधिक जोरा आहे. आपला पिंड ह्या राजान्नाचा आहे ह्मणून भिडेनें जरी ही मंडळी तुझ्या बाजूनें लढून मरण्याला तयार झाली तरी युधिष्ठिराकडे नुसतें पाहण्याचें सुद्धां यांना धैर्य होणार नाहीं. शिवाय अतिलोभानें कधीं मनुष्याला संपत्ति मिळत नसते. ह्मणून लोभ सोडून देऊन तूं त्यांबरोबर सख्य कर.'

गांधारीच्या या यथोचित भाषणाचाही अनादर करून दुर्योधन सभेंतून रागारागानें निघून गेला व द्यूतनिपुण शकुनि, कर्ण, दुःशासन यांना घेऊन भीष्मादिकांच्या साहाय्यानें या लठ्ठ कृष्णानें आपल्याला बांधण्याच्या पूर्वीच ज्याप्रमाणें इंद्रानें बलात्कारानें बळीला बांधून टाकलें त्याप्रमाणें ज्यावर सर्व पांडवांचें सुख व खुशाली अवलंबून आहे त्या कृष्णालाच आपण बांधून ठेवावें ह्मणजे दांत पाडलेल्या सापाप्रमाणें दीन व उत्साहहीन होऊन ते स्वस्थ बसतील, असा विचार त्यानें ठरविला. आकारावरून इंगित ओळखणाऱ्या हुशार सात्यकीनें हा त्यांचा बेत जाणून कृतवर्म्याला सैन्य तयार ठेवण्यास इशारत दिली व स्वतः चिलखत चढवून सभेमध्यें जाऊन त्यानें ती हकीकत भगवानाच्या कानावर घातल्यावर हासत हासत विदुरांना उद्देशून तो धृतराष्ट्राला ह्मणाला, 'धर्मार्थकामाच्या दृष्टीनें भल्यांनीं नित्य मानलेलें कृत्य हे मूढ येथें करूं पहात आहेत, पण हा त्यांचा बेत कधींही शेवटाला जाणार नाहीं. कामक्रोधांच्या आधीन होऊन लोभानें खोडसाळ मूल ज्याप्रमाणें जळणारा विस्तव पदरांत धरण्याला प्रयत्न करतें त्याप्रमाणें भगवानाला हे पकडण्याचा विचार करीत आहेत!' यावर विदुर धृतराष्ट्राला ह्मणाले, 'राजा, तुझ्या सर्व मुलांचा अंतकाळ जवळ येऊन ठेपला आहे, ह्मणून हें दुर्घट व अयशस्कर काम हातीं घेण्याचें त्यांनीं मनांत आणलें आहे. या कमलनयन कृष्णाला हे बांधूं इच्छीत आहेत, परंतु ज्याकडे नुसतें पहाणें सुद्धां शक्य नाहीं त्याची गांठ पडल्याबरोबर पतंगाप्रमाणें हे जळून खाक होतील. तुझ्या सर्व मुलांचा फडशा पाडण्याला तो एकटा समर्थ आहे; परंतु धर्माचें उल्लंघन करून निंद्य असें पापकर्म त्याच्या हातून कधीं घडावयाचें नाहीं ह्मणूनच ते वांचले आहेत.' यावर भगवान ह्मणाला, 'राजा खवळलेली दुर्योधनप्रभृति मंडळी बलात्कारानें मला बांधूं पहात असतील तर ठीक आहे. कोण कोणाला बांधून ठेवतो, पाहूं. तुझी आज्ञा असेल तर या सर्वांच्या मी मुसक्या बांधतों. कसाही प्रसंग आला तरी धर्माला सोडून वागण्याचें माझ्या मनांत नाहीं. पांडवांची संपत्ति गट्ट करूं पहाणारे हे अधम प्राणाला मात्र मुकतील. मला बांधण्याचा विचार ते करीत असतील तर युधिष्ठिराचे हेतू सफल झाले असें मी समजतों. दुर्योधनाच्या मनांतून आहे तसेंच सर्व जुळून येईल. मी आतां निरोप घेतों.' यावर फिरून एकवार कानउघडणी करण्यासाठीं त्या राज्यलोभी दुर्योधनाला धृतराष्ट्रानें आणण्याला सांगितल्यावरून विदुर त्याला घेऊन आले. तेव्हां कर्णप्रभृति चौकडीसह त्याला पाहून तो ह्मणाला, 'हे दुष्ट पाप्या, नीच कर्माला प्रवर्तक वाईट लोक तुझे सल्लागार आहेत. थोर कुलांत तुझा जन्म असून नीचांच्या संगतीनें दुर्घट व अयशस्कर असें नीचकर्म करण्याला तूं निघाला आहेस. तुझ्यासारख्या कुलांगाराच्या मनांत अशीच गोष्ट येणार! नीच साथीदारांच्या मदतीनें ज्याकडे नुसतें पहाणें सुद्धां दुरापास्त त्याला तूं बांधीन ह्मणतो आहेस. चंद्राला धरूं पाहणाऱ्या एखाद्या अल्लड मुलाप्रमाणें ज्याच्यापुढें इंद्रादिदेवांचें सुद्धां कांहीं चालावयाचें नाहीं त्याला तूं धरूं पहात आहेस. तूं याला अजून बरोबर ओळखलें नाहींस. वाऱ्याला मुठींत धरणें, चंद्राला हात लावणें, तसेंच पृथ्वी डोक्यावर घेणें ह्या गोष्टी

जशा असाध्य आहेत तसेंच श्रीकृष्णाला बांधून ठेवणें दुर्घट आहे.' यावर विदुरांनीं फिरून पुढील उदाहरणें घेऊन त्याची कानउघाडणी केली. ते म्हणाले, 'पूर्वी सौभद्वारीं द्विविद नामक प्रसिद्ध वानरराजानें दगडांनीं झांकून टाकून श्रीकृष्णाला अडविण्याचा बेत केला होता, प्राग्ज्योतिषामध्यें नरकासुरानें तशाच प्रकारचा बेत केला होता, पण त्यांचा तो बेत शेवटास गेला नाहीं. निर्मोचन नगरामध्यें सहा हजार महादैत्यांनीं याला पकडण्याची खटपट केली; तीही व्यर्थ गेली. लहानपणींच पूतना, शकुनी यांना मारून यानें गोवर्धन मस्तकावर घेतला. चाणूर, अश्वराज, कंस, जरासंध, वक्र, शिशुपाल, बाण, वरुणराज, अग्नि अशा महापराक्रमी राजांचा यानें फडशा पाडला आहे, व पारिजात हरण करते वेळीं प्रत्यक्ष इंद्राचा यानें पराभव केला आहे. त्याचप्रमाणें जिकडे तिकडे जलमय झालें असतां पाण्यावर पडून राहणाऱ्या या कृष्णानें मधुकैटभांचा समाचार घेतला आहे व दुसरा अवतार घेऊन हयग्रीवालाही यानें मारलें आहे. सर्वांचा उत्पादक हा असून ह्याला उत्पन्न करणारा कोणी नाहीं. सर्व पराक्रमाचें मूळ हाच असल्यानें हा जें जें म्हणून मनांत आणील तें तें शेवटास जात असतें. ह्या महातेजस्वी कृष्णावर तूं हात टाकूं पाहशील तर दिव्यावर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणें तुझी दशा होईल.' हें विदुरांचें भाषण संपल्यावर 'मी एकटा आहें असें समजून जर तूं मला धरण्याचा विचार करीत असशील तर सर्व वृष्णि, अंधक, महर्षिसमवेत वसु, रुद्र, आदित्य येथेंच आहेत,' असें म्हणून भगवान मोठ्यानें हासला. तेव्हां त्यांच्या शरीरांतून विद्युल्लतेप्रमाणें कांतिमान लांकडांतून पाडणाऱ्या अग्नीप्रमाणें तेजःपुंज अंगुष्ठाएवढे देव बाहेर पडले. कपाळांतून ब्रह्मदेव, उरांतून रुद्र, हातांतून लोकपाल, तोंडांतून अग्नि, आदित्य, साध्य, वसु, अश्विनीकुमार, मरुद्गण, इंद्र, विश्वेदेव, यक्ष, गंधर्व, राक्षस बाहेर पडले. उजवीकडे धनुर्धर अर्जुन व डावीकडे हलधर बळराम प्रकट झाले. पृष्ठभागीं भीम, युधिष्ठिर, नकुल व सहदेव व पुढें वृष्णि, अंधक, प्रद्युम्नप्रभृति यादव उभे दिसले. व त्याच्या सहस्रावधि हातांत शंख, चक्र वगैरे आयुधें झळकूं लागलीं. डोळे, कान, नाक व सर्व रोमरंध्रें यांमधून धुराच्या लोळासह अग्नीच्या ज्वाळा बाहेर पडूं लागल्या. हें विक्राळ स्वरूप पाहून राजांनीं आपले डोळे मिटले. फक्त द्रोण, भीष्म, विदुर, भाग्यशाली संजय व तपोधन ऋषी हे त्या भगवानांच्या ह्या रूपाकडे आपल्या दिव्य दृष्टीनें पाहूं शकले. आकाशांत दुंदुभि वाजूं लागून भगवानावर पुष्पवृष्टि होऊं लागली. हा अद्भुत विश्वरूपचमत्कार पाहण्यासाठीं धृतराष्ट्रानें भगवानापाशीं डोळे मागितले व त्याच्या प्रसादानें दुसऱ्या कोणाला न दिसतील असे डोळे धृतराष्ट्राला मिळून तो हा चमत्कार पाहूं लागला. या वेळीं पृथ्वी दरदरूं लागून समुद्र अगदीं खवळून गेला होता व सर्व राजे विस्मयानें चकित होऊन गेले. पुढें हें डोळ्याला दिपवून सोडणारें अद्भुत दिव्यरूप काढून घेऊन ऋषिवर्गाच्या अनुमतीनें भगवान सात्यकि व हार्दिक्य यांसह बाहेर पडला. नारदप्रभृति ऋषी गुप्त झालें. भगवान बाहेर पडला असतां सर्व कौरवही त्याच्या मागोमाग गेले. नंतर तयार केलेल्या रथांत हार्दिक्य चढला असतां धृतराष्ट्र भगवानाला म्हणाला, 'मुलांवर माझी किती सत्ता चालते हें सर्व तूं पाहिलेंसच. दोघांमध्यें सरळ असावें अशी माझी मनापासून इच्छा असून त्या दिशेनें शक्य तेवढी खटपटही मी करीत आहें.हें लक्षांत घेऊन माझ्यासंबंधानें मात्र मनांत वाईट ग्रह आणूं नकोस. पांडवांसंबंधानें माझ्या मनांत वाईट हेतु मुळीं नाहीं.' यावर 'सभेंतील हा सर्व प्रकार व माझा निरुपाय आहे हें धृतराष्ट्राचें भाषण तुझी ध्यानांत ठेवा, मी आतां निरोप घेतों,' असें सांगून भगवान कुंतीकडे निघून गेला.

१३६ कुंतीचा पांडवांना निरोप.
(५. ३२–१३७)

कुंतीच्या वाड्यांत शिरल्यावर तिच्या पायांवर डोकें ठेवून कौरवसभेंत घडलेली सर्व हकीकत थोडक्यांत तिच्या कानांवर घालून पुढील कार्यासाठीं पांडवांकडे जाण्याला भगवान निरोप मागूं लागला असतां कुंती म्हणाली, 'बा कृष्णा, युधिष्ठिराला सांग कीं, 'तुझा

धर्म फार कमी पडत चालला आहे. आतां उगीच त्याच्या विशेष नादीं लागूं नकोस. अर्थ कळत नसून उगीच वेद पढणाऱ्या अज्ञान ब्राह्मणांप्रमाणें तूं केवळ एक धर्माचें वेड घेऊन बसला आहेस. अरे, ज्या वर्णामध्यें तुझा जन्म झाला आहे त्याचे कर्तव्य मनांत आण. अचाट कृत्यें करून प्रजेचें पालन करण्यासाठीं ब्रह्मदेवांच्या बाहूंपासून क्षत्रियांची उत्पत्ति असल्यानें आपल्या बाहुवीर्यावरच त्यांनीं पोट भरलें पाहिजे. यासंबंधीं वृद्धांच्या तोंडून ऐकलेली पुढील गोष्ट त्याला सांगा.

पूर्वी कुबेरानें प्रसन्न होऊन मुचकुंद गजर्षीला ही पृथ्वी दिली असतां मी आपल्या बाहूच्या पराक्रमानें मिळविलेल्या राज्याचाच उपभोग घेऊं इच्छितों असें स्पष्ट सांगून त्यानें ती घेतली नाहीं. हें ऐकून कुबेराला मोठा संतोष होऊन तो आश्चर्यचकित झाला. पुढें मुचकुंदानें आपल्या बाहूच्या पराक्रमानें सर्व पृथ्वी जिंकून क्षात्रधर्माप्रमाणें तिचें राज्य केलें. राजाकडून उत्तम रक्षण होऊन प्रजा जो धर्म आचरण करते त्याचा चवथा भाग राजाला मिळत असतो. याशिवाय आणखी राजा जर स्वतः धर्म आचरण करील तर त्याला दैवत्व येतें; परंतु तो अधर्माचरण करील तर नरकाला जातो. राजानें काळजीपूर्वक पाळलेली दंडनीति चारी वर्णांना अधर्मापासून पराङ्मुख करून आपापल्या धर्माकडे लावीत असते. राजा जेव्हां दंडनीतिबरोबर पाळीत असतो तेव्हां कृतनामक श्रेष्ठ काल सुरू होतो. काल हा राजाला कारण आहे किंवा राजा कालाला कारण आहे यासंबंधानें संशय ठेवूं नकोस. **राजा हाच कालाला कारण आहे. कृत. त्रेता, द्वापार व कलि या चारी कालांचा उत्पादक राजा आहे. कालाला कृतयुग करून टाकणारा राजा श्रेष्ठ अशा स्वर्गसुखाचा उपभोग घेतो.** त्रेतायुग प्रवर्तक राजाला सामान्य स्वर्गसुख मिळतें द्वापार सुरू केल्यानें सुखदुःख त्याला सममसान मिळतें व तो कलियुग प्रवर्तवील तर मोठ्या पापाला धनी बनतो, व त्या योगानें अनेक कालपर्यंत त्याला नरकांत रहावें लागतें. राजाच्या पापाचें फळ जगाला व जगाच्या पापाचें फळ राजाला खात्रीनें भोगावें लागतें. आपल्या बाडबिडिलांना शोभेलशा क्षात्रधर्माकडे लक्ष दे. ज्यानें तूं राहूं इच्छीत आहेस हें वर्तन कांहीं राजर्षीला शोभणारें नव्हे. तुझें हृदय कोंवळें असल्यानें निरुपद्रवी मार्ग तूं पतकरला आहेस खरा; पण त्यामुळें प्रजापालनापासून मिळणाऱ्या अप्रतिम सुखाला तूं मुकला आहेस. ज्या बुद्धीनें तूं वागत आहेस ती ही बुद्धि तुला येवो म्हणून तुझ्या कोणी वडिलानीं तुला कधी आशीर्वाद दिला नसेल. यज्ञ, दान, तप, शौर्य, दृढबुद्धि, मोठेपणा, बल व तेज यांची मीं तुझ्या ठिकाणीं आशा केली होती. कल्याण ज्यांच्या हातीं आहे अशा देवांची व मनुष्यांची बरोबर भक्ति केली असतां पुष्कळ आयुष्य, द्रव्य व पुत्र देऊन ते देवकर्म व पितृकर्म यथास्थित चालवितात. दान, अध्ययन, यश, व प्रजापालन हीं मुलांच्या हातून घडावीं अशी देवांची व पितरांची आशा असते. ह्या गोष्टी धर्म्य असोत वा अधर्म्य असोत, जन्मतःच त्या तुझ्या पाठीमागें लागल्या आहेत. सर्व पांडव विद्वान व थोर कुलांत जन्मले असून पोटाला न मिळाल्यामुळें दीन झाले आहेत. अन्नान्न करीत पृथ्वीवर भटकणारे लोक ज्या शूर व दानशील राजाकडे येऊन संतुष्ट होऊन परत जातात त्याहून आणखी श्रेष्ठ धर्म तो कोणता ? धार्मिक राजानें राज्य मिळालें असतां कोणाला पैशानें तर कोणाला बलानें व कोणाला गोड शब्दांनीं याप्रमाणें लोकांना आपल्याकडे वळवून घ्यावें. ब्राह्मणानें भिक्षा मागावी, क्षत्रियानें प्रजापलन करावें, वैश्यानें द्रव्यार्जन करावें व शूद्रानें सेवा करावी. म्हणून तुझ्यासारख्या क्षत्रियाला भिक्षा रास्त नाहीं व शेतीही करतां येत नाहीं. क्षतापासून त्राता असा तूं **क्षत्रिय** असल्यानें आपल्या मनगटाच्या जोरावरच तूं आपलें पोट भरलें पाहिजेस ! गडप झालेला बडिलोपार्जित वांटा साम, दान, भेद, दंड व नीति यांपैकीं वांटेल त्या उपायानें तुला बाहेर काढला पाहिजे. तुम्हांला अशी दीन दशा आल्याने तुझ्यासारख्या अरिनंदन मुलाला जन्म देऊन मला तुकड्यासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावें लागत आहे, याहून ती बाईट स्थिति काय असावी ? राजधर्माला अनुसरून युद्ध कर. पूर्वजांना नरकांत घालूं नकोस, आणि स्वतः क्षीणपुण्य होऊन दुर्गतीला जाऊं नकोस. त्यासंबंधानें खालील बिदुले-

चा व तिच्या मुलाचा संवाद त्याला लक्षांत ठेवण्याम सांग.

कुलीन, तापट, वाचाळ, क्षात्रधर्माला जागणारी, जितेंद्रिय अशी दूरदर्शी यशस्विनी विदुला नांवाची कोणी स्त्री होती. ती बहुश्रुत असून राजेलोकांत नांवाजलेली होती. सिंदुराजानें जिंकल्यामुळें हताश होऊन राहिलेल्या आपल्या मुलाला ती याप्रमाणें लागून बोलली, 'हे शत्रूनंदना कुपुत्रा, माझ्यापासून किंवा तुझ्या बापापासून कांहीं तुझा जन्म झाला नाहीं ! ज्याला कधीं राग येत नाहीं असा हतवीर्य पुरुष कोणाच्या खिजगणतींत नसतो. आजन्म असा निराश होऊन न बसतां आपल्या कल्याणासाठीं हातपाय हालीव. स्वतःला कमी समजून घेऊन नीच स्थितींत संतोष मानून पडूं नकोस. धीर धरून भीति सोडून दे. कंबर बांध. मातीला मिळालास असून आपल्या बांधवांना शोक व शत्रूंना आनंद देत असा पडून राहूं नकोस. ओढ्यांना पूर तेव्हांच येतो. उंदराची मूठ तेव्हांच भरते. थोडक्यांत संतोष पावणारा नीच पुरुष एवढ्यातेवढ्यांत खुष होतो. सापाची दाढ पाडण्याच्या खटपटींत मेलास तर बेहेनर; पण कुत्र्यासारखा मरूं नकोस. कसाही प्रसंग आला तरी जिवाची पर्वा न धरतां पराक्रम गाजविल्यावांचून राहूं नकोस. आकाशांत फिरणाऱ्या बहिर्गिममाण्याप्रमाणें हिमतीनें विचार करीत राहून स्वस्थ शत्रूचें छिद्र पहात बस. विजेचा धक्का बसलेल्या मनुष्याप्रमाणें असा प्रेतासारखा गार कां पडला आहेस ? उठ. अमा पंगू बनून मावळूं नकोस. नांव गाजीव. मामदानभेदांचा विचार न करतां हातांत दंडुका घेऊन गर्जत रहा. **टेंभुरणीच्या कोलतीप्रमाणें क्षणभर चमकलास तरी पुरें आहे. परंतु जिवाच्या आशेनें भातेणाच्या ज्वालाहीन अग्नीप्रमाणें धुमसत राहूं नकोस.** फार वेळपर्यंत धुमसत राहण्यापेक्षां थोडा वेळच कां होईना चमकणें चांगलें. कोणालाही गाढवासारखा सोशीक मुलगा न होवो. आपल्या हातून शक्य तेवढी शिकस्त केल्यानें मनुष्य धर्माच्या ऋणांतून सुटतो. मग उद्योगाचें फळ न मिळालें तरी विचारी पुरुषाला त्यापासून दुःख होत नाहीं. अशा न धरतां तो फिरून फिरून यत्न करीत राहतो. पराक्रम गाजवून त्या शाश्वत गतीला जाऊन मिळालास तरी हरकत नाहीं. तुझीं सर्व धर्मकृत्यें व कर्तव्यें नष्टप्राय झालीं आहेत, व भोगाचें मूळही छाटून निघालें आहे. मग उगीच धर्माचें घोडें पुढें ढकलून जिवंत कशाला राहिला आहेस ? बुडण्याचें किंवा पडण्याचें जरी कपाळीं आलें तरी शत्रूच्या कंबरेला मिठी मारून बुडावें, व आपलीं मुलेंपालें खणून निघालीं तरी निराश होऊं नये. जातिवंत घोडे न कचरतां गाडी ओढतात हें त्यांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून अंगांत असेल नसेल तेवढें सामर्थ्य खर्ची घाल. स्वाभिमानाला जागून स्वतःचा पराक्रम ओळख. तुला तसेंच तुझ्यामुळें बुडालेल्या कुळाला बाहेर काढ. ज्याचे हातून एखादें अलौकिक कृत्य घडून आल्याचें लोक बोलत नाहींत, तो पुरुष किंवा स्त्री नसून केवळ खानेसुमारीला भर घालण्याला कारण होतो. दान, तप, सत्य, विद्या व द्रव्यार्जन यांत ज्याच्या नांवाचा डंका बाजत नाहीं त्याची योग्यता मातेच्या विष्ठेपेक्षां अधिक नाहीं. विद्या, तप, संपत्ति व पराक्रम यांत जो बाकीच्यांना मागें टाकतो तोच पुरुष. ही नित्य भिक्षावृत्ति तुला उचित नाहीं. सदोष, अपकीर्तिकर व कष्टद अशी ही वृत्ति नीचांनाच शोभते. ज्याच्या दुबळेपणामुळें शत्रूला आनंद होत असतो. आसन अथवा वस्त्र नमल्यामुळें ज्याला मान मिळत नाहीं, यःकश्चित् लाभानेंही जो कृतार्थ होतो, व अल्प साधनावर निकृष्ट दर्जेत जो काल काढतो, असा बंधु मिळाल्यानें बांधवांना कधीं सुख होत नसतें. भल्यांना न शोभणारें कृत्य करून सबंध कुलाचा नाश करणाऱ्या तुला जन्म देऊन मुलगा ह्मणून मीं प्रत्यक्ष कलीलाच जन्म दिला आहे ह्मणावयाचें. असा मुलगा कोणीही विचारी न प्रसवो. उगीच धुममत पडूं नकोस. निकराचा पराक्रम करून शत्रूला ठार कर, आणि क्षणभर कां होईना शत्रूच्या डोक्यावर झळकत रहा. जो तापट असून वाटेल त्याला मुकाट्यानें डोके देत नाहीं तोच पुरुष. समाधान, मनाचा कोंबडेपणा, हातपाय न हालविणें, व भित्रेपणा ह्या गोष्टी वैभवाला मुकवितात. हातपाय न हालविणारा कधीं मोठेपणाला चढत नाहीं. ह्मणून नाशाला मूळ अशी स्वस्थवृत्ति सोडू-

न मनाचा घडा करून स्वस्थ परत मिळविण्याच्या खटपटीला लाग. पराला (दुसऱ्याला) सहन करतो (तोंड देतो) ह्मणूनच पुरुष हें नांव मिळालें असल्यानें जो बायकाप्रमाणें दिवस काढतो त्याला पुरुष हें नांव फुकट आहे. शूर, महापराक्रमी व सिंहासारखा व्यवसायशील राजा जरी दैवाच्या फेऱ्यांत सांपडला तरी त्याची प्रजा गांगरत नाहीं. व स्वतःच्या सुखाकडे न पहातां थोरपणाच्या मार्गे लागलेला आपल्या मंत्रिवर्गांना आनंदाला कारण होतो. ' आजच काय घाई, ' या दिरंगाईच्या तत्त्वावर राहणाऱ्यांना जे लोक मिळतात ते आपल्या शत्रूंनाच लखलाभ असोत; तसेंच स्वाभिमान बाळगुन असणाऱ्यांना जे लोक मिळतात त्यांचा लाभ आपल्या इष्टमित्रांना मिळो. नोकर ज्यांना सोडून जात आहेत, ज्यांना परपिंडावर उपजीविका करण्याची पाळी आली आहे, अशा दुबळ्या दीनांचा रस्ता धरूं नकोस. सर्व प्राणिमात्र ज्याप्रमाणें पावसावर किंवा सर्व देव ज्याप्रमाणें इंद्रावर तसे सर्व ब्राह्मण व जिव्हाळ्याचे लोक उदारनिर्वाहासाठीं तुझ्यावर अवलंबून असोत. पिकल्या फळांनीं भरलेल्या झाडाप्रमाणें ज्यावर सर्व प्राणिमात्र उपजीविकेसाठीं अवलंबून राहतात त्यांचेंच जीवित सफल समजलें पाहिजे. इंद्राच्या पराक्रमावर ज्याप्रमाणें देवतांना सुख होत असतें त्याप्रमाणें ज्याच्या पराक्रमावर सर्व बांधवांना सुख होतें त्याचेंच जीवित लोकांत स्तुत्य गणलें आहे. आपल्या बाहुपराक्रमावर जो रहातो त्याला इहलोकीं कीर्ति मिळून परलोकीं उत्तम गति मिळते. अशी गोष्ट असतां तूं जर खटपट करणार नाहींस तर लवकरच तुला हलक्या लोकांची वाट धरावी लागेल. जिवाच्या आशेनें जो क्षत्रिय यथाशक्ति आपलें तेज दाखवीत नाहीं त्याच्यामध्यें व चोरामध्यें कांहीं अंतर नाहीं. मरूं घातलेल्याला औषधाप्रमाणें हें माझें यथायोग्य भाषण तुला आवडल्यासारखें दिसत नाहीं. ज्यानें तुझा पराभव केला आहे त्या सिंदुराजापाशीं लोक पुष्कळ असतील. पण ते तसेच संतुष्ट नाहींत. केवळ दुबळेपणामुळें ते मूर्ख संकटांची परंपरा ओढवून घेण्याची वाट पहात आहेत. ते व दुसरे त्याचे उघड शत्रु तुला हातपाय हालवितांना पाहून आपल्या अनुयायांसह तुझ्या बाजूला येऊन मिळतील. त्यांशीं जुळून डोंगराळ किल्ल्यांतून शत्रू पेंचांत येण्याची वाट पहात रहा. कारण तो कांहीं जरामरणापासून सुटलेला नाहीं. नांवानें तूं संजय असून नांवाप्रमाणें कृति मात्र तुझ्यांत दिसून येत नाहीं. तर आपलें नांव राख. ' मोठा विचारी व शहाणा असा हा मुलगा मोठ्या संकटांत सांपडून फिरून वैभवाला चढेल, ' असें तुझ्या लहानपणीं ब्राह्मण बोलल्याचें मला स्मरत आहे. ह्मणून तूं विजयी होण्याची मी आपसरून वाट पहात बसलें आहें; आणि ह्मणूनच फिरून फिरून हा उपदेश मी तुला करीत आहें. सरळ मार्गानें कोणताही हेतु साधण्यासाठीं उद्योग करीत असतां तो सफल झाल्यामुळें आपले संबंधी तृप्त झाले ह्मणजेच सार्थक झालें ह्मणावें. पूर्वजांसह तूं चढणार किंवा पडणार हें नीट डोळ्यांपुढें ठेवून युद्धाला तयार हो. मार्गे सरूं नकोस. आजउद्यांची खाण्याची पंचाईत असणें याहून भिकार दुसरी दशा नाहीं असें शंबराचें मत आहे; दारिद्र्य ह्मणून जें पर्यायमरण आहे तें पतिपुत्रांच्या मरणापेक्षां फार कष्टद आहे. माझा जन्म थोर कुलांत झाला असून थोर कुलांतच मी येऊन पडलें आहें. सर्वमंगला मी सर्वस्वामिनी होतें. पतीची माझ्या ठिकाणीं पूर्ण भक्ति असे. उत्तम वस्त्रालंकार घालून आप्तांमध्यें गेलें असतां त्यांना मला पाहून आनंद होत असे. अन्नाच्च होऊन वाळलेल्या मला व आपल्या बायकोला व सेवा करणारे नोकर, आचार्य, ऋत्विज व पुरोहित यांना पोटाला न मिळाल्यामुळें तुला सोडून जातांना पाहण्याचें तुझ्या कपाळीं येऊन मग तुझ्या जगण्यांत तरी काय अर्थ आहे ? पूर्वीप्रमाणें कीर्तिकर कांहींच जर आज तुझ्या हातून घडत नाहीं तर मग माझ्या मनाला शांति करी मिळावी ? मी किंवा तुझ्या पित्यानें ब्राह्मणाला कधीं कांहीं नाहीं असें ह्मटलें नसल्यानें आतां तो प्रसंग आला असतां माझें हृदय फाटेल. दुसऱ्याला आम्ही आश्रय देणारे आहों. दुसऱ्याचा आश्रय करणारे नव्होंत. तेव्हां तसा प्रसंग येईल तर मी प्राणच सोडीन. ह्मणून ह्या अपार समुद्रांतून नौकासाधनहीन अशा आह्मांला पार पडण्याला नौका होऊन पाय टेक-

ण्याला जागा नाहीं ती जागा करून आम्ही जे मेलों आहों त्या आह्मांला फिरून जिवंत कर. तुझ्या सर्व शत्रूंचा रात्रीनें पूर्ण मोड होईल. खिन्न व हताश होऊन अशी क्लीबवृत्ति धरून जिवंत राहण्यापेक्षां ह्या निंद्य अशा आयुष्याचा एकदांचा शेवट तरी लाव. केवळ एका शत्रूला मारून देखील शूर नांवालौकिकाला चढतो. इंद्र एका वृत्राला मारून महेंद्र झाला व माहेंद्रग्रह (सोमपानाला वाटी,) मिळून सर्वांचा स्वामी बनला. दंड थोपटून शत्रूला युद्धाला बोलावून त्याच्या सैन्याच्या पुढच्या फळीची दाणादाण करून एखाद्या प्रसिद्ध पुरुषाला मारल्यानें एखाद्याला एकदम मोठें नांव मिळून त्याचे शत्रू गर्भगळित होऊन नामशेष होतात. नीच लोक हातपाय गाळून रणामध्यें आपली आहुती देऊन आपल्या कामांत दक्ष असणाऱ्या शत्रूच्या इच्छा पूर्ण करून त्याला तृप्त करतात. राज्य सपशेल बुडण्याचा किंवा प्राणावर प्रसंग आला असतांही शहाणे लोक हातीं लागलेल्या शत्रूंची बाकी ठेवीत नाहींत. हें राज्य ह्मणजे स्वर्गद्वार किंवा अमृत आहे, तेव्हां हें उत्तम द्वार तुला बंद झालें आहे हें मनांत धरून शत्रूंवर आगीसारखा तुटून पडून त्यांना मारून स्वधर्माला संभाळ. शत्रूचा चळकांप करून सोडणारा तूं दीन झाल्यामुळें आतांना शोक करण्याची व शत्रूंना दिल्या बडविण्याची पाळी आलेली पहाण्याचा मला प्रसंग न येवो. सौवीर कन्याच्या समागमांत पूर्वीप्रमाणें आनंदांत नादूं लागून आपल्या संपत्तीच्या योगानें नांवालौकिकाला चढ. गुलाम होऊन सैंधवकन्यांच्या तावडींत जाऊं नकोस. तुझ्या सारख्या कीर्तिमान व लोकविख्यात पुरुषानें ओझें वाहण्यामध्यें कुचराई करणाऱ्या बैलाप्रमाणें कचरावें हें मी मरणच समजतें. शत्रूची मनधरणी करण्यासाठीं गोडगोड बोलत त्याच्या मागून तुला हिंडतांना पाहून माझ्या मनाला फार सुख होईल नाहीं बरें ! दुसऱ्याच्या मागून शेपूट हलवीत जाणारा दिवटा या कुलांत कोणी झाला नाहीं, आणि तुलाही असा प्रसंग येऊन जिवंत राहणें उचित नाहीं. पूर्वीच्यांनीं व अलीकडच्यांनीं सांगितलेला नेहमीं क्षत्रियांमध्यें असणरा ब्रह्मनिर्मित शाश्वत क्षात्रधर्म मी जाणतें. घोर कुलांत झालेला क्षत्रियांचें कर्तव्य ओळखणारा कोणीही क्षत्रिय भयानें किंवा पोटासाठीं दुसऱ्यापुढें वांकणार नाहीं. नेहमीं उद्योग करीत राहून कधींही कोणापुढें वांकूं नये. कारण उद्योग हेंच पौरुष होय. बिन कांड्याचे ठिकाणीं सुद्धां मोडून जावें पण वांकूं नये. मस्त झालेल्या हत्तीप्रमाणें गुर्मीनें राहवें. मात्र धर्म व ब्राह्मण यांना नमून राहून आपल्याला कोणी साहाय्य असो वा नसो बाकीच्या वर्णांना दाबांत ठेवून दुष्टांचा संहार करीत रहावें. मुलगा ह्मणाला, ' वीरमातेला शोभण्यासारखें तुझें शहाणपण आहे. तरी तूं तापट व निष्ठुर असल्यानें काळ्याभोर लोखंडानें तुझें हृदय बनविलें असावेंसें दिसतें. किती तरी हा क्षात्रधर्म निष्ठुर कीं ज्याच्या योगानें एखाद्या तिऱ्हाइताप्रमाणें आईनें प्रत्यक्ष मुलाला असा उपदेश करावा ! तुझ्या एकुलत्या एका मुलाला तूं असें बोलावेंस हें नवल नाहीं काय ? मी तुझा आवडता मुलगा रणांत मरून दृष्टिआड झाल्यावर ही सर्व पृथ्वी, अलंकार, भोग एवढेंच नव्हे तर प्राण तरी घेऊन तुला काय करावयाचें आहे ? ' आई ह्मणाली, ' मनुष्याचीं सर्व कृत्यें धर्म व अर्थ यांसाठीं होत असतात. तेव्हां तें लक्षांत घेऊनच मी तुला ही भर देत आहें. शौर्य गाजविण्याची योग्य वेळ येऊन ठेपली आहे तर अशा वेळीं जर तूं हातपाय हालविणार नाहींस तर संभाविताला न शोभणारें निंद्य कृत्य करण्याची तुला पाळी येईल व तुझ्या नांवाला असा कलंक लागण्याची वेळ आली असून मी जर तुझी नीट कानउघडणी करणार नाहीं तर तें माझें प्रेम गाढवीच्या आपल्या पोरावरील प्रेमाप्रमाणें व्यर्थ होणार आहे. शहाण्यांनीं निंद्य समजलेला व मूर्खांनीं पतकरलेला हा मार्ग सोडून दे. देह व आत्मा यांचा ऐक्यभावरूप अज्ञान मोठें असून त्या अज्ञानानेंच हा लोक भरून राहिला आहे. तेव्हां आत्म्याचा देहाशीं कांहीं संबंध नाहीं या भावानें धर्मार्थाला धरून जर तूं भल्यांनीं घेतलेल्या वाटेनें जाशील तरच तूं मला अवडता होशील. जो भलीं मुलें व नातवंडें मिळाल्यानें आनंदांत असतो तोच खरा सुखी. परंतु आळशी, आडदांड व दुर्बुद्धि अशा मुलांनीं ज्याला आनंद होतो त्याचा सुपुत्रिकपणा

फुकटच समजला पाहिजे. कर्तव्यें न करणारे तसेंच निंद्य गोष्टी करणारे अशा निंद्य पुरुषांना इहपर सुख मिळत नाहीं. युद्ध करून त्यांत जय मिळविण्यासाठीं क्षत्रियांचा जन्म आहे. मग त्यांत त्याला जय मिळो किंवा मृत्यु येवो. तो इंद्रलोकाचा धनी होतो. शत्रूंबर जय मिळविल्यानें जें सुख क्षत्रियाला होतें तशाप्रकारचें सुख पवित्र स्वर्गांतही मिळत नाही. उत्साहसंपन्न क्षत्रियाचा शत्रूंकडून अनेकवार पराभव झाला तरी उलट त्याला जिंकण्यासाठीं त्यानें तळमळत राहिल पाहिजे. आपला प्राण दिल्याशिवाय किंवा शत्रूला मारल्याशिवाय दुसऱ्या कशानें त्याच्या मनाला समाधानी होतां कामा नये. ह्या जगांत शहाण्यांना थोड्याथोड क्यानें कधीं समाधान होत नाही. ज्याचें थोडक्यांत समाधान होते तें थोडके खात्रीनें अनिष्ट परिणामाला कारण होतें. इष्ट वस्तु त्याला कधी मिळत नाही व मागराला मिळून गेलेल्या गर्गप्रमाण तो नामशेष होतो.' यावर 'आई, अमे उद्गार प्रत्यक्ष मुलापुढें काढणें तुला शस्त नाही. मूर्ख किंवा मुक्यासारखें राहून दया दाखविणेंच याप्रसंगीं अधिक चांगलें आहे,' असें मुलाला बोलतांना ऐकून ती फिरून म्हणाली, 'तुला माझे कर्तव्य मला सांगतांना पाहून मला फार आनंद होतो. मलाही जें आपले कर्तव्य वाटत आहे तेंच मी तुला सांगतें. सर्व सैधवांना मारून तूं जेव्हां आणीबाणीने जय मिळविशील तेव्हांच मला तूं मुलगा असा वाटशील' यावर मुलगा म्हणाला, 'मजपाशीं द्रव्यबळ, मनुष्यबळ कांहींच नाहीं; तेव्हां मला जय कसा मिळणार ? म्हणून ही शोचनीय स्थिति मनांत आणून पापी मनुष्याच्या मनांत ज्याप्रमाणें स्वर्गाचा विचार कधीं येत नाही त्याप्रमाणें मीं राज्यासंबंधी सर्व विचार सोडून दिला आहे.' आई म्हणाली, 'बाळा; ज्यांच्याजवळ पैसा नाहीं त्यांनीं याप्रमाणें स्वतःला कमी समजून घेतां कामा नये. कधीं कधीं साधनें मुळीं नसतां तीं कशीं जुळून येतात हें कळत नाहीं. उलट पक्षीं पुष्कळ साधनें असूनही कधीं कधी एखाद्याचा फडशा उडतो. मात्र कोणतींही कामें अविचारानें हातीं घेऊं नयेत. म्हातीं हातीं घेतलेल्या कामांच्या फलासंबंधानें अनिश्चितपणा हा नेहमी असावयाचाच. म्हणून कोणत्याही कृत्याचें फल अनिश्चित आहे हें जाणून बुजून काम हातीं घेणारांचे उद्देश प्रसंगीं शेवटास जातात, प्रसंगीं जात नाहींत, परंतु जे फल अनिश्चित आहे असें समजून कोणतेंही काम हातीच घेत नाहींत त्यांचे उद्देश कधींच शेवटाला जात नाहींत. याप्रमाणें हातपाय जोडून बसण्यांत मुळींच फल न मिळणें एवढा एकच फायदा अमून हातपाय हालवीत राहण्यांत कदाचित् तें मिळण्याचा संभव असतो. जो सर्व कामांचा अनिश्चितपणा आधींच ठरवून टाकतो तो उद्योगाला व वैभवाला मुकतो. कल्याणप्रद गोष्टींसंबंधानें तें खात्रीने शेवटास जाईल असा निर्धार करून जागरूकतेनें हातपाय हालवीत राहिलें पाहिजे. मंगल कार्य करून देवब्राह्मणांच्या माहात्म्यानें जो कोणतेंही काम हातीं घेतो त्यांत तो खात्रीनें सिद्धि पावतो व सूर्य ज्याप्रमाणे पूर्वेला धरून असतो त्याप्रमाणें लक्ष्मी त्याला सोडीत नाही. असो. याप्रमाणे अनेक प्रोत्साहक उदाहरणांनीं व उपायांनीं लोकवत्त मी तुझ्यापुढें ठेवलें आहे. आतां तुला पराक्रम गाजवितांना मला पाहूं दे म्हणजे झालें. गर्गाट लोभी, निकृष्ट दशेला आलेले, अभिमानी, अपमान पावलेले, हवेखोर असे जे कोणी तुझ्या बाजूला अमतील त्यांना हुशारीनें नीट ओळखून ठेव; व त्यांचा पगार आधीं चुकवून टाकून त्यांच्याशीं गोड बोलत जा, म्हणजे ते तुझ्या मनाप्रमाणें वागूं लागून तुला खात्रीने पुढारी करतील व असा तूं ज्याप्रमाणें प्रचड वावटळ वाटेल त्याचा फडशा उडविते त्याप्रमाणें मोठमोठ्या शत्रूच्या फळीचा फडशा पाडण्याला समर्थ होशील. नेहमीं पहाटे उठण्याचा परिपाठ ठेव. आपला प्रतिपक्षी जिवावर उदार झाला आहे असें शत्रूला समजल्याबरोबर घरांत शिरलेल्या सापाप्रमाणें तो त्यासंबंधानें कांपूं लागतो. शत्रू पराक्रमी आहे असें समजून त्याला जिंकण्याच्या भरीस जर एखादे वेळीं आपण पडलों नाही तरी गोडीगुलाबीनें आपलें कार्य साधून घ्यावें. त्याला हेंही एक प्रकारचें वशीकरणच आहे. व याप्रमाणे तात्पुरत्या सलोख्यानें पैसा जोडण्याला फुरसत मिळते. कारण पसेवानालाच मित्र मिळून ते

त्याला चिकटून राहतात. तेंच पैसा नाहींसा झाल्याबरोबर ते त्याला सोडून जातात. एवढेंच नव्हे, तर त्यासंबंधानें गैर भरंवसा दाखवून त्याला दोष देऊं लागतात. **शत्रूशीं कायमचें सख्य करून जो त्याबर विसंबून राहतो तो आपलें राज्य परत मिळवील ही आशा केवळ फुकट आहे.** राजानें कसाही प्रसंग आला तरी कधीं भिऊन जाऊं नये, व कदाचित घाबरण्याची पाळी आली तरी घाबरल्यासारखें कधीं दाखवूं नये.राजाला घाबरलेला पाहून राष्ट्र, सैन्य, अमात्य सर्वच त्याच्या मागून घाबरून जाऊन भलभलते विचार मनांत आणूं लागतात. कोणी आपल्याला सोडून जातात तर कोणी शत्रूला जाऊन मिळतात व ज्या कोणाचा पूर्वी आपल्याकडून अपमान झाला असेल ते आपल्यावरच उलटण्याचें मनांत आणूं लागतात. मात्र ज्यांचा आपल्याकडे पूर्ण ओढा आहे असे लोक मात्र वासरूं बांधून ठेविलेल्या गाईप्रमाणें अशक्त असले तरी कल्याण करण्याच्या इच्छेनें आपल्याला धरून असतात. विपन्नावस्थेंत असलेल्या आपल्या बांधवांप्रमाणेंच आपल्या कष्टी राजाबरोबर ते दुःख करीत राहतात. तूं आजपर्यंत पुष्कळांना मान दिला असून संकटांत पडूं घातलेल्या तुझ्या राज्याचा अभिमान् बाळगणारे थोर जिव्हाळ्याचे लोक तुझ्या बाजूला पुष्कळ आहेत. तर स्वतः घाबरून जाऊन त्यांनाही घाबरवून सोडूं नकोस. तुझ्या अंगांत पाणी, पराक्रम, व बुद्धि किती आहे हें पाहण्यासाठीं व तुला हुरूप आणून तुझा उत्साह वाढविण्यासाठीं मी हें बोललें आहें. तर माझें बोलणें तुला पटलें असेल तर मनाचा धडा करून जयासाठीं कंबर बांध. फक्त मलाच ठाऊक असलेला एक खजिनाही आपल्यापाशीं आहे; व रणांतून पाय माघारा न घेणारे व तुझ्याबरोबर सुखदुःखाला वांटेकरी होणारे जिव्हाळ्याचे लोकही तुला पुष्कळ आहेत. व अभ्युदयाला चढूं इच्छिणाराला अशाच प्रकारचे लोक लागतात.' कळवळ्याच्या माणसाच्या तोंडून आलेलें हें अमोलिक उपदेशामृत चाखतां चाखतां त्या मुलाची तृप्ति होईना व त्या जडबुद्धि मुलाच्या मनाबर देखील चाबूक बसलेल्या पाणीदार घोड्याप्रमाणें या वाक्प्रहाराचा चकन् उजेड पडून तो तिच्या सांगण्याप्रमाणें वागून शत्रुरूपी समुद्रांत बुडून गेलेली परंपरागत भूमि वर काढण्याला तयार झाला, शत्रूची खोड मोडून जय मिळविण्यासाठीं त्यानें कंबर बांधली.'

ही उत्साहजनक व तेजोवर्धक गोष्ट युधिष्ठिराच्या मनावर ठसबून अर्जुनाला तुझ्या मोहरींत 'हा इंद्रासारखा होऊन भीमसेनाच्या साहाय्यानें सर्व जुळलेल्या कौरवांना जिंकील व इकडचें जग तिकडे करून सोडून आपला यशोदुंदुभि स्वर्गाला नेऊन भिडवील व गडप झालेला वडिलोपार्जित हिस्सा परत मिळवून अश्वमेध करील,' म्हणून आकाशवाणी झाली आहे ती खरी करण्याची वेळ आली आहे असें सांग. आणि कृष्णा, हें सर्व घडवून आणणारा तूंच आहेस. तसेंच त्याला व भीमाला असेंही सांग कीं 'क्षत्रियस्त्री ज्याकरितां प्रसूत होत असते त्याची वेळ आतांच आली आहे. एकदां वैर जुंपल्यावर थोर लोक मध्यें कधीं हातपाय गाळीत नाहींत.' भीमसेनाचें मनही तूं ओळखतच आहेस. शत्रूचा शेवट लावल्यावांचून तो कधीं शांत होणार नाहीं. सर्व धर्मांतील बारीक सारीक भेद देखील लक्षांत घेणाऱ्या कल्याणी द्रौपदीला सांग कीं, 'माझ्या मुलांशीं जसें वागावें तसें तूं वागली आहेस हें तुझ्यासारख्या कुलीन, भाग्यशाली स्त्रीला उचितच आहे.' त्याचप्रमाणें क्षात्रधर्मांत दक्ष असणाऱ्या त्या नकुलसहदेवांना सांग कीं, 'जीव देखील धोक्यांत टाकून शौर्य गाजवून संपादलेले भोग भोगा. कारण अशा प्रकारानें मिळविलेले भोगच क्षत्रियाच्या मनाला आनंद देतात. सर्व धर्मांची अभिवृद्धि करणाऱ्या तुह्मां सर्वां देखत पांचालीला तसें टाकून बोललेलें कोण सहन करून घेईल. राज्य गेलें, द्यूतांत जिंकलां गेलां किंवा तुह्मांला वनाला जावें लागलें यांचें मला इतकें वाईट वाटत नाहीं; परंतु सभेमध्यें डोळ्यांतून टिपें गाळीत त्या थोर कृष्णेला निष्ठुर भाषण ऐकून घ्यावें लागलें तेंच माझ्या मनाला फार झोंबून राहिलें आहे. क्षत्रधर्मांत दक्ष अर्जुन स्त्रीधर्माला जागणाऱ्या त्या बिचारीला नाथ असून ते वेळीं हात देण्याला कोणीच उभा राहिला नाहीं.' या पुरुषसिंह अर्जुनाला सांग कीं, 'द्रौपदीच्या सांगण्याप्रमाणें वाग.' हे भीमार्जुन खवळतील तर

देवांनाही अंत्यगति दाखवितील हें तुला सांगावयाला नको. द्रौपदीला सभेंत आणली ते वेळीं दुःशासन भीमाला अनुलक्षून जे मर्मभेदक शब्द बोलला हा त्या दोघांचाच अपमान आहे. तेव्हां त्याची त्यांना चांगली आठवण दे. मी खुशाल आहें म्हणून सांगून त्यांचें कुशल विचारलें आहे म्हणून सांग. निर्विघ्नपणें तूं खुशाल जाऊन पोहोंच.' यावर तिला अभिवादन करून प्रदक्षिणा केल्यावर भीष्मप्रभृतींना निरोप देऊन भगवान कर्णाला रथांत घेऊन सात्यकीसह निघाला.

१३७ शिष्टाईनंतर दुर्योधनाची फिरून कानउघाडणी. (५. १३८–१३९)

श्रीकृष्णानें कुंतीचा निरोप ऐकल्यावर बेताल झालेल्या दुर्योधनाला महारथ भीष्मद्रोण फिरून म्हणाले, 'हे पुरुषव्याघ्रा, कुंतीनें कृष्णापाशीं पांडवांना सांगितलेला यथार्थ, धर्माला धरून असणारा भयप्रद निरोप तूं ऐकलासच; आतां पांडव त्या निरोपाप्रमाणें वागल्यावांचून कधीं राहणार नाहींत व कृष्णालाही तेंच संमत आहे. राज्य घेतल्यावांचून ते कधीं स्वस्थ बसणार नाहींत. सभेमध्यें आणून द्रौपदीचे व धर्मशापानें जखडलेल्या त्या वीरांचे तूं फार हाल केलेस ते सर्व त्यांनीं आजपर्यंत मुकाट्यानें सोसले आहेत. अस्त्रविद्यासंपन्न अर्जुन व निश्चयानें दंड थोपटून उभा राहिलेला भीम, तसेच बलशाली नकुलसहदेव व भगवान वासुदेव इतक्यांचा आधार असतां युधिष्ठिर खात्रीनें स्वस्थ बसणार नाहीं. अर्जुनाचीं आजपर्यंतचीं अनेक अलौकिक कृत्यें तुझ्या कानावर आलीं असून विराट नगरीमध्यें त्याचा प्रत्यक्ष अनुभवही आला आहे. घोषयात्रेमध्यें त्यांनीं तुझ्याला सोडविलें एवढें सुद्धां तुझी खात्री पटविण्याला पुरें आहे. ह्मणून ह्या तुझ्या भावांबरोबर सख्य करून मृत्यूच्या दाढेंत सांपडलेल्या ह्या पृथ्वीला सोडीव. पापबुद्धि बाजूला ठेवून धर्मबुद्धीनें आपल्या प्रेमळ वडील भावाकडे धांव घे. धनुष्य खालीं ठेवून, भिवया खालीं करून तूं प्रेमानें युधिष्ठिराला भेटशील तर त्यांत ह्या कुलाचें कल्याण आहे. असा त्याकडे जाशील तर तो सप्रेम तुला ओळ्यांत घेईल. त्याचप्रमाणें ज्याचे खांदे सिंहासारखे असून बाहू गुटगुटीत व लांब आहेत असा प्रहार करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ भीमसेन तुला कडकडून भेटून त्या कंबुग्रीव कमलनेत्र अर्जुनानें तुला अभिवादन केलें व त्या अलौकिकरूपसंपन्न माद्रीतनयांनीं वडीलभाव धरून प्रेमपूर्वक उठून तुला मान दिला ह्मणजे आणखी तुला काय पाहिजे ? असें घडून येऊन दाशार्ह प्रभृति राजांना आनंदाश्रू ढाळण्याचा प्रसंग येवो. अभिमान सोडून त्यांबरोबर सख्य कर आणि त्यांच्या हातांत हात घालून या सर्व पृथ्वीवर अंमल गाजीव. राजांना आनंदानें परस्परांना भेटून परत जाऊं देत. हे राजेंद्रा, हें युद्धाचें वेड पुरें झालें. आतांचें ऐक. युद्धांत क्षत्रियांचा नाश धडधडीत दिसत आहे. ग्रहनक्षत्रांचीं प्रतिकूलता, मृगपक्ष्यांचें उग्र स्वरूप व नानाप्रकारचे उत्पात उघड उघड क्षत्रियांचा नाश सुचवीत आहेत. विशेषेंकरून आपल्या बाजूला हीं सर्व चिन्हें होत असून तुझ्या सैन्यांत जिकडे तिकडे उल्कापात होत आहेत. हत्ती, घोडे, पशू आक्रोश करीत आहेत. सैन्यांच्यावरून गिधाडांच्या घिरट्या चालल्या आहेत. नगर व राजवाडा निस्तेज दिसूं लागलीं आहेत. तशींच अमंगळ शब्द करणारीं कोल्हीं पूर्वेकडे धांवताहेत. तेव्हां तुझ्या वडिलाच्या व हितचिंतकाच्या सल्ल्याप्रमाणें वाग. जर तूं आम्हांचें न ऐकशील तर अर्जुनाच्या बाणांनीं तुझें सैन्य जर्जर झालेलें पाहून मग तुला वाईट वाटेल. आतां जरी माझें भाषण तुला पटलें नाहीं तरी त्या रगदार भीमाची गर्जना व त्या गांडिवाचा टणत्कार ऐकून मग माझ्या ह्या भाषणाची तुला आठवण होईल. '

१३८ कर्ण श्रीकृष्णसंवाद. (५. १४०–१४३.)

कर्णाबरोबर रथांत बसून नगराबाहेर पडल्यावर भगवान कर्णाला ह्मणाला, 'हे कर्णा, मनोनिग्रहानें व निर्मत्सरबुद्धीनें वेदपारंगत ब्राह्मणांची शुश्रूषा करून तत्त्वज्ञानासंबंधानें त्यांपासून तूं माहिती करून घेतली आहेस, व श्रुतिवचनें काय आहेत व धर्म-

शास्त्रांतील सूक्ष्म निर्णय काय आहेत हें तुला ठाऊक आहे. लग्नाच्यावेळीं मुलीच्या पोटांत असणारा कुमारिकेला झालेला ह्या दोघांचाही बाप तिच्याबरोबर लग्न करणाराच होतो असें शास्त्र सांगतें तेव्हां तूं पंडूचा सशास्त्र मुलगा असल्यानें धर्मशास्त्राच्या आधारानेंच तुला राज्य मिळेल. पांडव तुझ्या पितृकुलांतले असून वृष्णि मातृकुलांतले आहेत. तेव्हां हा संबंध लक्षांत घेऊन मजबरोबर चल. तूं युधिष्ठिराचा वडील भाऊ आहेस हें त्यांना कळलें म्हणजे पांच पांडव, सर्व द्रौपदीचे मुलगे, अजिंक्य अभिमन्यु, व पांडवांसाठीं जुळलेले सर्व राजे व राजपुत्र, तसेच सर्व वृष्णि व अंधक तुझे पाय धरतील; व सर्व राजे व राजकन्या ओषधि, बीजें, वल्लें, लता यांसह अभिषेकासाठीं सोन्यारुप्याचे व मातीचे घडे भरून आणून तुला अभिषेक करतील. त्याचप्रमाणें वर्षाच्या सहाव्या भागांत दोन महिनेपर्यंत द्रौपदी तुझी असेल. पवित्र अशा धौम्य पुरोहितांकडून होमविधि उरकून चार वेद जाणणारे ब्राह्मण तुला अभिषेक करतील. ब्राह्मकर्मामध्यें दक्ष असणारे पांडवांचे पुरोहित धौम्य पांच पांडव व त्यांचे मुलगे व मी स्वतः तुझ्यावर अभिषेक करून तुला सर्व पृथ्वीचें स्वामित्व देऊं. कडकडीत नियम पाळणारा धर्मात्मा धर्मराज तुझा युवराज होईल व रथामध्यें तुझ्या मागें बसून तुझ्यावर पांढरी शुभ्र चवरी वारील. त्याचप्रमाणें तुझ्या अभिषिक्त मस्तकावर महाबलशाली भीम पांढरें छत्र धरील, व ज्यांच्या गळ्यांत घुणघुण घांट्या वाजत आहेत असे पांढरे घोडे जोडलेला तुझा रथ स्वतः अर्जुन हाकील. अभिमन्यु तुला कधीं सोडून अमणार नाहीं. त्याचप्रमाणें द्रौपदीचे मुलगे, नकुलसहदेव, पांचाल, महारथ शिखंडि, मी तसेच वृष्णि व अंधक तुझ्या मागें राहूं. दाशार्ह व दाशार्ण हे तुझा लवाजमा होतील. तुझे भाऊ जे पांडव यांच्याबरोबर जप, होम, व निगनिराळे मंगलविधि यांमध्यें गढून राहून तूं राज्याचा उपभोग घे. द्रविड, कुंतल, आंध्र, तालचर, चूचुप, वणुप हे तुझ्यापुढें धांवतील. सूत, मागध नानाप्रकारें तुझा स्तुतिपाठ गातील व तुझा विजयाचा डंका पांडव सर्वत्र पिटवीत राहतील. नक्षत्रांमध्यें झळकणाऱ्या चंद्राप्रमाणें पांडवांमध्यें राहून कुंतीला तूं आनंद दे.' हें भगवानाचें भाषण ऐकून कर्ण म्हणाला, 'हे केशवा, खरोखर जिव्हाळ्यामुळें, प्रेमामुळें, स्नेहसंबंधानें व माझें कल्याण व्हावें या बुद्धीनें तूं हें मला कळकळीनें सांगत आहेस. तूं म्हणतोस तसा मी पांडूचा शास्त्रानें मुलगा आहें खरा, परंतु लोकापवादाच्या भीतीनें कुंतीनें मला टाकलें व सूताच्या दृष्टी पडून त्यानें मला घरीं घेऊन जाऊन प्रेमानें आपली बायको जी राधा हिच्या स्वाधीन केलें; ते वेळीं मजवरच्या प्रेमाच्या उमाळ्यामुळें तिला एकदम पान्हा फुटला! तिनें माझा गुप्त काढला. तर माझ्यामारख्या धर्मवेत्या नेहमीं धर्मशास्त्र दक्षपूर्वक ऐकणाऱ्यानें तिला पिंडाला कमें बरें मुकवावें? त्याचप्रमाणें अधिरथ सूत मला मुलगा समजत आहे व मीही प्रेमामुळें त्याला बाप म्हणून समजत आलों आहें. पुत्रप्रेमानें त्यानें माझे जातकर्मादि सारे संस्कार सशास्त्र केले आहेत; व ब्राह्मणांकडून माझें वसुषेण म्हणून नांवही ठेविलें आहे. त्याच्या रूपेमुळेंच यौवनदशेंत आलों अमतां लग्न होऊन मी गृहस्थ बनलों व त्या बायकोपासून मला पुत्रपौत्र होऊन त्यांशीं प्रेमपाशानें मी बांधला गेलों आहें. **सोन्याचा ढीग पुढें आणून ठेविल्यानें किंवा सर्व पृथ्वी मिळाल्यानें अथवा हर्षभयादिविकारांनीं हें सर्व विसरून जातां येईल काय?** त्याचप्रमाणें दुर्योधनाच्या आश्रयानें आज तेरा वर्षे मी निष्कंटक राज्याचा उपभोग घेत आलों आहे; व सूतांमध्यें अनेक यज्ञ करून कुलाचार व विवाह संबंधादिक घडले आहेत. माझ्या आधारावरच दुर्योधनानें पांडवांशीं वैर जोडून युद्धाला कंबर बांधली आहे आणि रणामध्यें अर्जुनाशीं तोंड देण्याला त्यानें मला निवडून ठेविलें आहे. म्हणून मरणाचा अथवा कैदी होण्याचा प्रसंग येतल्यानें किंवा भयानें अथवा लोभाने त्या बुद्धिमान दुर्योधनाबरोबर मी कपट कसें बरें करूं? आज जर मी अर्जुनापुढें दंड थोपटून उभा राहणार नाहीं तर त्यांत आह्मां दोघांचेंही नांव जाणार आहे. कारण दोघेही एकमेकांना मारण्याची प्रतिज्ञा करून बसलों आहों. हितबुद्धीनें खरोखरच तूं ही गोष्ट पांडवांपाशीं काढशील तर ते सर्व तुझे आज्ञांकित असल्यानें खा-

नीनें ते तुझ्या सांगण्याबाहेर बागणार नाहींत. ही गोष्ट तूं त्यांच्यापाशीं फोडली नाहींस तरच ठीक होणार आहे. धर्मात्म्या युधिष्ठिराला मी कुंतीचा मुलगा आहें असें समजल्यावर तो राज्य कधीं पतकरणार नाहीं, व केवढेही झगझगीत राज्य मला मिळालें तरी मी तें फिरून दुर्योधनाच्याच पायावर ठेवणार. ह्मणून ज्याचा मंत्री तूं आहेस तो युधिष्ठिरच कायम राज्य करो. अर्जुन, भीम, तूं, सात्यकि, धृष्टद्युम्नप्रभृति मंडळी ज्याच्या वतीनें युद्धाला तयार आहां त्याचीच निःसंशय ही पृथ्वी होणार. पांडवांकडे राजांचा जमावही चांगला मिळाला आहे. तेव्हां युधिष्ठिराला राज्य मिळाल्यासारखेंच आहे हें सर्व राजे जाणून आहेत. यापुढें दुर्योधनाचा शस्त्रयज्ञ सुरू होणार असून त्यांत अध्वर्यु तुलाच व्हावें लागणार आहे व तयार होऊन उभा राहिलेला कपिध्वज अर्जुन होता होईल. त्यांत गांडीव धनुची व पुरुषांचें वीर्य आज्य होतील, व अर्जुनानें सोडलेलीं ऐन्द्र, पाशुपत, ब्राह्म व स्थूणाकर्ण ही अस्त्रें मंत्रांचें काम करतील. पराक्रमांत बापाच्या तोडीचा किंवा त्याहून कांकणभर जास्त असा सुभद्रातनय अभिमन्यु हाच योग्य सामसत्र होईल. रण गर्जून सोडून असंख्य सैन्याचा फडशा पाडणारा बलशाली भीम उद्गाता व प्रस्तोता होईल. व तो जपहोमांनीं संपन्न चिरकाल राज्यपद भोगणारा युधिष्ठिर यांत ब्रह्मत्व करील. शख, मृदंग, नगारे यांचे शब्द, तसेंच रणांगणांत निघणारे मोठमोठे सिंहनाद मृत्युरूपी अतिथीला निमंत्रणादाखल सुब्रह्मण्य होतील. तसेंच या यज्ञांत यशस्वी नकुलसहदेव पशुमारणकर्म (शामित्र) उत्तम प्रकारें बजावितील व चित्रविचित्रित ध्वजांनीं शोभणारा चकचकीत रथ समुदाय हेच पशु बांधण्याला डांब (यूप) होतील, वांसरांच्या दांतांसारखे कर्णी, नालीक व नाराच बाण सोम वाढण्याचे चमचे (उपबृहण) होतील; तोमर सोमपात्रे होतील; धनुष्ये बोटांत अडकविण्याचीं पवित्रें होतील; पुरोडाश तयार करण्याच्या मडक्यांचें काम तरवारी करतील व वीरांची छाटून काढलेलीं मुंडकीं पुरोडाश होतील; तसेंच रक्त हेंच हवीचे काम करील; शुद्ध अशा शर्का इध्में व गदा परिधि होतील; द्रोण व कृप यांचे शिष्य सदस्य होतील; गांडीवधन्वा अर्जुन, द्रोण, अश्वत्थामा व दुसरे महारथी यांनीं सोडलेले बाण सोम वाढण्याचे पळे (परिस्तोम) होतील; सात्यकि प्रतिप्रास्थात्याचे (अध्वर्यूला मुख्य मदत करणाराचें) काम करील; या यज्ञांत दुर्योधन दीक्षा घेऊन बसेल व अफाट सेना त्याची बायको होईल; तसेंच या महायज्ञांतील रात्रीचें कर्म सुरू झालें असतां घटोत्कच पशुमारणकर्म (शामित्र) करील. श्रौतयज्ञांत कर्मद्वारानें अग्नीपासून उत्पन्न झालेला प्रतापशाली धृष्टद्युम्न या यज्ञाची दक्षिणा होईल; मी पांडवांना आजपर्यंत जे लागून बोललो त्या अनुचित कृत्याबद्दल ह्मणजे मला वाईट वाटत नाहीं असें नाहीं. परंतु तें केवळ दुर्योधनाला खूष करण्यासाठीं मी बोलत आलों. अर्जुन ज्या वेळी मला मारील त्या वेळीं या यज्ञाच्या पुनश्चितीला (यज्ञानंतरच्या शेष कर्माला) सुरवात होईल. टाहो फोडणाऱ्या दुःशासनाचे रक्त जेव्हां भीम प्राशन करील त्या वेळीं सोमप्राशनविधि यथामाग शेवटास जाईल. तसेंच ज्या वेळी पांचाल राजपुत्र धृष्टद्युम्न व शिखंडि द्रोणाचार्य व भीष्म यांना मारतील तेव्हां यज्ञावसान (यज्ञांत मध्ये विसावा घेण्याचा) काल येईल. व बलशाली भीमसेन ज्या वेळी दुर्योधनाला मारील तेव्हांच या यज्ञाचा शेवट होईल. आपले स्वामी, मुलगे व नवरे मेल्यामुळें धृतराष्ट्राच्या सुना व नातसुना गांधारीसहवर्तमान एकत्र जुळून कुत्रे, गिधाडें कुररी यानीं किच भरलेल्या या रणयज्ञांत जेव्हां रडूं लागतील त्या वेळी तें ह्या यज्ञाचे अवभृत (यज्ञसमानीनतरच) स्नान होईल. तुझ्या ह्या एकी करण्याच्या खटपटीनें विद्यावृद्ध व वयोवृद्ध अशा क्षत्रियांना फुकट मरून जाण्याची पाळी न येतां त्रैलोक्यांत पुण्यकारक अशा ह्या कुरुक्षेत्रांत जमलेल्या अवाढव्य क्षत्रसमुदायाला शस्त्रानें मरण येऊन खात्रीनें स्वर्ग मिळेल अशी तजवीज कर ह्मणजे जोंपर्यंत हे पर्वत व नद्या कायम आहेत तोंपर्यंत तुझ्या कीर्तीचा डंका वाजत राहील; व हें क्षत्रियांचें यशरूप धन वाढविणारें महाभारतयुद्ध ब्राह्मण सांगत राहतील. आतां तुला माझे इतकेच हात जोडून मागणें आहे की, मी कुंतीचा वडील मुलगा आहें ही गोष्ट न फोडतां तूं अर्जुनाला माझ्याबरोबर युद्धाला उठीव.

हें कर्णाचें भाषण ऐकून भगवान हासत हासत ह्मणाला, ' हा राज्यप्राप्तीचा उपाय तुला रुचत नसून मीं दिलेल्या ह्या पृथ्वीवर राज्य करण्याची तुझी इच्छा दिसत नाहीं. बरें तर मग पांडवांना खात्रीनें जय मिळणार यांत बिलकुल शंका नाहीं. वरती वानरराज मारुती बसलेला अर्जुनाचा अग्नीसारखा हा विजयध्वज फडकूं लागला असून जयप्रद अशा भयानक भूतांनीं आपलीं ठाणीं त्यावर घेतलीं आहेत. कृष्णसारथि अर्जुनाला रणांत ऐंद्र, आग्नेय, वायव्य इत्यादि अस्त्रांचा प्रयोग करून कडकडणाऱ्या विजेप्रमाणें गांडिवाचा टणत्कार करतांना तसेंच जपहोमसंपन्न सूर्यासारखा दुष्प्रेक्ष्य युधिष्ठिर आपल्या अफाट सैन्याचें रक्षण करून शत्रुसैन्याला ताप देतांना जेव्हां तूं पाहशील, जेव्हां ममोर उभा राहिलेल्या हत्तीला मारून मदमस्त झालेल्या हत्तीप्रमाणें संग्रामांत बलशाली भीमाला दुःशासनाचें रक्त पिऊन थयथय नाचतांना पाहशील, जेव्हां तुटून पडणाऱ्या भीष्म, द्रोण, कृप, दुर्योधन, जयद्रथप्रभृतींना थोपवितांना अर्जुनाला पाहशील, जेव्हां घनघोर शस्त्रप्रहार चालले असतां शत्रूकडील वीरांच्या रथांना पीडा देणाऱ्या बलशाली नकुलसहदेवांना हत्तीप्रमाणें शत्रुसैन्य खळबळून सोडतांना पाहशील, तेव्हां मग कृत, द्वापार, त्रेता हे विसरून जा. तेव्हां कलीचीच तुला पूर्ण ओळख पटेल. कर्णा येथून जाऊन दुर्योधनाला सांग कीं, ' हा महिना मोठा रम्य असून अन्नपाणी, लांकूडफाटा यांची या दिवसांत समृद्धि आहे. सर्व प्रकारच्या वनस्पतींनीं वनें जोमदार फुललीं आहेत. फळांनीं झाडें गच्च असून माशांचा त्रास बिलकुल नाहीं. चिखल नाहींसा झाला आहे व पाण्याला मोठी गोडी आली आहे, व फार उष्मा अगर थंडी नसल्यानें हा महिना मोठा सुखकर आहे. **सात दिवसांनीं अमावास्या आहे त्या मुमुहूर्तावर युद्धाला सुरवात होईल.** कारण इंद्र हा अमावास्येची देवता आहे. ' तसेंच युद्धाकरितां जुळलेल्या सर्व राजांना सांग कीं, ' तुमची इच्छा परिपूर्ण होईल. दुर्योधनाची कास धरलेल्या सर्व राजांना व राजपुत्रांना शस्त्रानें मरण येऊन उत्तम गति मिळेल. ' हें भगवानाचें कल्याणप्रद भाषण लक्षपूर्वक ऐकून कर्ण आदरपूर्वक ह्मणाला, ' कृष्णा, मला तूं ओळखत असून अशी भुरळ कां घालूं पाहतोस ? हा जो पृथ्वीचा संपूर्ण नाश होण्याचा काल आला आहे, त्याला शकुनि, मी, दुःशासन अगर दुर्योधन केवल निमित्तमात्र आहों. रक्ताचा चिखल उत्पन्न करणारें कौरवपांडवांचें हें घनघोर युद्ध खात्रीनें टळत नाहीं; व दुर्योधनाच्या छंदानें वागणारे राजे व राजपुत्र शस्त्रांच्या अग्नीनें खाक होऊन यमसदन खास पहाणार. मला भयंकर स्वप्नें पडत आहेत. तसेंच पांडवांचा जय होऊन कौरवांचा पराजय सुचविणारीं अंगावर कांटा उभा करणारीं घोर चिन्हें व उत्पात होत आहेत. महातेजस्वी उग्र शनिग्रह रोहिणीला पीडा देऊन प्राण्यांना विशेष पीडा सुचवीत आहे. तसेंच मंगळ मित्रनाश सुचवीत ज्येष्ठामधून अनुराधेकडे वक्र होत आहे, कौरवांना खात्रीनें मोठें भय उत्पन्न झालें आहे; कारण महापातग्रह चित्रानक्षत्राला पीडा देत आहे; चंद्राच्या डागाचें स्थळ बदललें आहे; व राहू सूर्याकडे जात आहे. आकाशांतून महान शब्द करीत वायुवेगानें उल्कापात होत आहे. हत्ती भयंकर चीं चीं करीत आहेत व घोडे दाणापाण्याकडे मोठ्या संतोषानें न पहातां डोळ्यांतून पाणी काढीत आहेत. हीं सर्व लक्षणें भयंकर प्राणिनाशक दुश्चिन्हें समजलीं आहेत. ह्या दुर्योधनाच्या सैन्यांत हत्ती, घोडे व लोक यांचें अन्न कमी झालें असून मलविसर्जन मात्र फार होत आहे. शहाणे लोक याला पराभवाचें एक चिन्ह समजतात. त्याचप्रमाणें पांडवांकडील हत्ती, घोडे वगैरे उत्साहसंपन्न दिसत आहेत व मृग त्यांना उजवी घालीत आहेत हें त्यांना जय येणार हें सुचवीत आहेत. दुर्योधनाला ते सर्व डावी घालीत आहेत. तसेंच सुचिन्हदर्शक मोर, हंस, सारस, चाष, जीवंजीव पक्ष्यांचा घोळका पांडवांच्या मागून जात आहे व गिधाड, कंक, बगळे, ससे, लांडगे, राक्षस व माशांच्या झुंडी कौरवांच्या मागून जात आहेत. दुर्योधनाच्या सैन्यांत नौबतींना आवाजच नाहींसा झाला असून पांडवांच्या सैन्यांत त्या न वाजवितां घुमत आहेत. दुर्योधनाच्या गोटांतील कर्ण्यांमधून मोठमोठ्या बैलांच्या डुरकण्याप्रमाणें शब्द निघत आहेत. इंद्र दुर्योधनाच्या सैन्यावर

रक्तमांसाचा पाऊस पाडीत आहे व तट, खंदक, बुरूज व मनोहर वेशी यांनीं युक्त असें दैदीप्यमान नगर आकाशांत दिसूं लागलें आहे व सकाळ-संध्याकाळीं उदयास्ताचे वेळीं सूर्याभोंवतीं दिसणारें काळें कडें महाभय सुचवीत आहे. कोल्ह्यांची भयंकर कोल्हेकुई चालते व एक पेल, एक डोळा व एक पाय अमलेले पाकोळी मलमूत्र टाकीत आहेत. कृष्णकंठ व रक्तपाद भयानक पक्षी संध्यासमयीं कौरवसैन्याकडे धांव घेत आहेत. तसेंच ब्राह्मण, गुरू व भक्तिमान सेवक यांचा द्वेष करूं लागणें हेंही पराभवाचेंच चिन्ह आहे. पूर्व दिशेचा तांबूस दक्षिणेचा शस्त्रांच्या रंगाचा, पश्चिमेचा कच्चा मडक्याचा व उत्तरेचा शंखांचा असा जरी दिशांचा सामान्य रंग आहे असा समज आहे तरी दुर्योधनाच्या गोटाभोंवतीं सर्वच दिशा जाज्वल्य दिसत आहेत.निजून उठण्याच्या वेळीं स्वप्नांत युधिष्ठिर व त्याचे भाऊ पांढरा फेटा चढवून शुभ्र वस्त्र नेसलेले हजार खांबांच्या एका भव्य वाड्यावर चढतांना माझ्या दृष्टीस पडले. तसेंच तुझें शरीरही आंतडीं व रक्त यांनीं भरलेलें मीं पाहिलें. व महातेजस्वी युधिष्ठिर हाडांच्या ढिगावर बसून **तूप घातलेली खीर पीत पीत** पृथ्वीला गिळून टाकतांना माझ्या दृष्टीस पडला. तेव्हां तूं दिलेल्या ह्या पृथ्वीचा तो उपभोग घेणार हें उघड आहे. त्याचप्रमाणें अचाट कृत्यें करणारा भीम हातांत गदा घेऊन पर्वतशिखरावर चढून ही सर्व पृथ्वी गिळून टाकतांना मला दिसला; यावरून युद्धांत तो सर्वांचा फडशा उडविणार हें स्पष्ट होतें. **धर्म तिकडे जय हें तुला सांगावयाला नको.** त्याचप्रमाणें तेजानें झळकणारा गांडिवधन्वा अर्जुन तुझ्यासह पांढऱ्या शुभ्र हत्तीवर बसलेला मीं पाहिला. तेव्हां युद्धांत दुर्योधनप्रभृति सर्व राजांना तुझी मारणार हें ठरल्यासारखेंच आहे. तसेंच नकुलसहदेव व महारथि सात्यकि पांढरीं बाहुभूषणें व कंठ्या घालून पांढरीं शुभ्र वस्त्रें नेसून पालखींतून चाललेले मीं पाहिले. यांच्या डोक्यांला पांढरे फेटे होते. आतां दुर्योधनाकडचे लोक मला याप्रमाणें दिसले. अश्वत्थामा, कृप, कृतवर्मा व सर्व राजे यांच्या डोक्यांला तांबडे फेटे होते.तसेच दुर्योधन व भीष्मद्रोण उंट जोडलेल्या रथांत बसले असून आम्ही सर्व दक्षिण दिशेकडे चाललों आहों असें मला स्वप्न पडले. तेव्हां आम्हां सर्वांची गांडिवरूपी अग्नींत आहुति पडून आम्ही लवकरच यमसदनाची वाट धरणार यांत शंका नाहीं.' यावर भगवान म्हणाला, 'कर्णा, माझें भाषण ज्याअर्थीं तुला रुचत नाहीं त्याअर्थीं या पृथ्वीचा विनाशकाल जवळ आला आहे यांत संशय नाहीं. प्राणिमात्रांचा विनाशकाल जवळ आला असतां अन्यायच न्याय भासून त्याला ते कवटाळतात. यावर कर्ण म्हणाला, 'कृष्णा, ज्यांत वीरक्षत्रियांचा फडशा पडणार अशा या महारणांतून जिवंत पार पडून तुला भेटण्याची तर आशा बिलकुल नाहीं. असो. स्वर्गामध्यें मात्र फिरून खात्रीनें आपली भेट होईल! म्हणून इहलोकीं मला तुला एकवार शेवटचें कडकडून भेटूं दे.' असें म्हणून भगवानाला कडकडून भेटून त्याचा निरोप घेऊन कर्ण परतला व भगवान सात्यकीसह उपप्लव्याकडे निघाला.

१३९ कर्णकुंतीसंवाद. (५. १४४-४६)

संधीचा उद्देश सिद्धीस न जातां भगवान पांडवांकडे परत निघून गेल्यावर विदुर कुंतीकडे येऊन वाईट वाटून म्हणाले,'हे जीवत्पुत्रि' युद्ध न व्हावें असें मला मनापासून वाटत आहें हें तुला ठाऊकच आहे; व मी त्यासंबंधानें ओरडत आहे तरी हा दुर्योधन माझें म्हणणें ऐकत नाहीं. युधिष्ठिराजवळ बलसामर्थ्य चांगलें असून उपप्लव्य येथें तो तळ देऊन बसला आहे. तरी ज्ञातींच्या कळवळ्यानें बलवान असतांही दुबळ्याप्रमाणें धर्माकडेसच त्याचा ओढा आहे. पण हा धृतराष्ट्र वयोवृद्ध असून सुद्धां सख्य करण्याला तयार नाहीं. मुलांच्या जोरावर डोळ्यांवर धूर येऊन आडमार्गाकडे तो वळत आहे. जयद्रथ, कर्ण, दुःशासन व शकुनि यांच्या वाईट सल्ल्यानें आपसांत फूट पडणार. या भलत्या कृत्याला ज्यांनीं बळेंच न्यायाचें स्वरूप दिलें आहे त्यांना ह्या कृत्याचें फळ लवकरच मिळणार. कौरवांकडून धर्माचा असा छळ चाललेला पाहून कोणाची बरें तळमळ उडणार नाहीं? सख्य जुळविण्याची खटपट फुकट

जाऊन केशव निघून गेल्यानें पांडव युद्धाला तयार होतील व ह्या कौरवांच्या अन्यायाचा परिणाम वीरांचा फडशा हा होणार! भल्या लांबलचक अशा रात्रींतून ह्या गोष्टी मनांत घोळत असल्यामुळें माझ्या डोळ्याला डोळा लागत नाहीं.' विदुरांनीं हितबुद्धीनें केलेलें हें भाषण ऐकून कुंतीनें दुःखानें मोठा सुस्कारा टाकून मनांत विचार केला; 'ज्यासाठीं ज्ञातींचा नाश होणार त्या संपत्तीला धिक्कार असो. या युद्धांत आमचा खास फडशा पडणार. पांडव, चेदी, पांचाळ व यादव ही मंडळी एकत्र जुळून भारताबरोबर युद्ध करणार यापेक्षां खेदकारक आणखी काय असलें पाहिजे? तेव्हां या युद्धांत सर्व नाश मला निःसंशय दिसत आहे. गरिबींत मरणें बरें.पण ज्ञातींचा फडशा पडून मिळालेलें वैभव कांहीं चांगलें नाहीं. हा विचार मनांत येऊन पोटांत कसें भडभडून येतें. पितामह भीष्म, योध्यांचें अग्रणी द्रोणाचार्य व कर्ण दुर्योधनाच्या बाजूला झाल्यानें मला मोठी भीति उत्पन्न करीत आहेत. आतां द्रोणाचार्य कांहीं आपल्या शिष्यांशीं मनापासून युद्ध करणार नाहींत. तसेंच पितामहांचें हृदय तरी पांडवांविषयीं कसें कळवळणार नाहीं? मात्र हा एकटा कर्ण भलत्याच समजुतीवर दुर्बुद्धि मूर्ख दुर्योधनाच्या नादीं लागून नेहमीं पांडवांचा द्वेष करीत आहे व या बाबतींत त्याचाच विशेष हट्ट असून तो तसा पराक्रमीही आहे. तेव्हां त्याची भेट घेऊन त्याला पांडवांच्या बाजूला ओढतां येईल तर पहावें. हा प्रत्यक्ष माझा मुलगा असल्यानें आपल्या व आपल्या भावांच्या हिताची गोष्ट हा बहुशा नाकरणार नाहीं!' याप्रमाणें मनाशीं ठरवून कोंवळ्या मनाचा व सत्यवचनी कर्ण गंगातीरीं पूर्वाभिमुख वर सूर्याकडे हात करून वेदाध्ययन करीत असतां तें संपेपर्यंत वाट पहात त्याच्यामागें जाऊन ती उभी राहिली. सूर्यकलेपर्यंत जप करून कर्ण मागें वळतो तो कुंती त्याच्या दृष्टीस पडली. तिला अभिवादन करून हात जोडून तो बाजूला उभा राहिला व नम्रपणें हासत हासत 'हा राधापुत्र तुला अभिवादन करीत आहे, काय काम आहे तें सांग,' असें ह्मणाला. यावर कुंती ह्मणाली, 'बा कर्णा, तूं राधापुत्र नसून प्रत्यक्ष सूर्यापासून मला झालेला तूं माझाच मुलगा आहेस. मी लहानपणीं बाबाकडे असतां कुंवारपणीं तूं मला झालास. मीच तुला ह्या आपल्या पोटांत बागविलें आहे. तेव्हां आपल्या भावांना न ओळखतां अज्ञानानें धृतराष्ट्रांच्या मुलांना धरून राहणें तुझ्यासारख्याला शोभत नाहीं. ज्यांचे डोळे आपल्या मुलांकडे लागले असतात, त्या आईबापांना संतुष्ट ठेवणें हाच उत्तम धर्म समजला आहे. पूर्वी अर्जुनानें मिळविलेली व पुढें धृतराष्ट्राच्या दुष्ट मुलांनीं लोभानें हिसकावून घेतलेली युधिष्ठिराची संपत्ति फिरून या कौरवांपासून हिसकावून घेऊन तिचा तूं उपभोग घे. बंधूप्रेमानें तूं व अर्जुन एकत्र जुळलां असतां मग हे दुष्ट खरोखर वांकतील. रामकृष्णांप्रमाणें तुह्मी दोघे एकत्र जुळल्यावर मग तुह्मां दोघांना असाध्य असें ह्या जगांत काय असणार? खरोखरच महायज्ञांतील वेदीमध्यें देवांमध्यें असणाऱ्या ब्रह्मदेवांप्रमाणें तूं पांच पांडवांमध्यें शोभशील.' अशी कुंती बोलते आहे तोंच 'कुंतीचें ह्मणणें खरें आहे, हा आईचा शब्द ऐकशील तर तुझें कल्याण होईल,' अशी पुत्रवत्सल सूर्याची वाणी कर्णानें ऐकली. याप्रमाणें आईबापांचा आग्रह पडला असतांही त्या सत्यनिष्ठ कर्णाचें मन न डगमगतां तो ह्मणाला, 'हे क्षत्रिये, माझ्या सांगण्याप्रमाणें वागणें हें धर्माचें द्वार आहे,' असें जें तूं ह्मणालीस त्यावर माझा विश्वास कसा बसावा? जन्मतांच मला टाकून देण्यांत तूं जें घोर पाप केलेंस तेंच माझ्या यशाला व कीर्तीला हानिकारक झालें आहे. मी क्षत्रिय कुलांत झालों असेन तर क्षत्रियाला उचित असे संस्कार तुझ्यामुळेंच मला मिळाले नाहींतना? तेव्हां एखादा मोठा दुष्ट शत्रु माझें याहून अधिक वाईट तें काय करूं शकणार? याप्रमाणें त्या वेळीं चुप्प बसून मला योग्य संस्कारही मिळूं न देतां आज तूं आईचा अधिकार बजावण्याला आली आहेस! पूर्वी आईला साजेलसें माझ्या हिताकडे लक्ष न देतां केवळ स्वार्थाकडे दृष्टि देऊन आज तूं मला उपदेश करीत आहेस! अर्जुन व कृष्ण यांना एकत्र जुळलेले पाहून कोण बरें घाबरणार नाहीं? तेव्हां आज मी पांडवांना जाऊन मिळालों असतां मी भ्यालों असें कोण समजणार नाहींत? आजपर्यंत कोणी

भाऊ ठाऊक नसून आतां युद्धाच्या वेळीं जर भावांचें नातें लावून मी पांडवांना जाऊन मिळालों तर सर्व क्षत्रिय मला काय म्हणतील ? कोणत्याही भोग्य वस्तूंचा माझ्याबरोबर उपभोग न. घेतां धृतराष्ट्रपुत्रांनीं यथायोग्य माझा मान राखला असून तें सर्व मीं फुकट कसें जाऊं द्यावें ? जे माझ्या बलावर शत्रूंशीं वैर बांधून त्यांचा शेवट लावण्याची आशा धरून आहेत त्यांचा आशाभंग आयत्या वेळीं मी कसा करूं ? हा दुस्तर रणसागर मला नौका करून जे तरून पार जाऊं इच्छीत आहेत त्यांना कसें बरें मी मध्येंच सोडून देऊं ? धार्तराष्ट्रांचें अन्न खाऊन त्याची चीज करण्याची वेळ आली असतां प्राणाची पर्वा न धरतां मला त्याची फेड केली पाहिजे. उत्तम रीतीनें पोसून सुख दिलेले जे लोक प्रसंगीं चंचल मनानें निमकहराम बनतात ते स्वामिपिंडापहारी स्वामिद्रोही इहपरलोकांना मुकतात. म्हणून बुद्धि व बल दोन्ही खर्ची घालून त्यांच्यासाठीं, कृतज्ञता व भल्यांना उचित असें वर्तन ओळखून, मला तुझ्या मुलांबरोबर युद्ध केलें पाहिजे. आणि म्हणून तूं सांगत आहेस ही गोष्ट जरी हिताची असली तरी ती मला करतां येत नाहीं. तरी पण तुझा हा यत्न अगदीं मी फुकट जाऊं देत नाहीं. ज्यांना मारणें मला बिलकूल जड नाहीं अशा अर्जुनाखेरीज बाकीच्या तुझ्या चार मुलांना मी मारणार नाहीं. मी फक्त एकट्या अर्जुनाशीं युद्ध करीन व त्याला जर मला मारतां आलें तर माझ्या जन्माचें सार्थक होईल व तसें न होतां त्यानें मला मारलें तर त्यांतही माझी कीर्तिच होणार आहे. शिवाय भाग्यशाली तुला अर्जुनाशिवाय कर्ण धरून किंवा कर्णाशिवाय अर्जुन धरून पांचच्या पांच मुलगे कायम राहतील.' हें ऐकून लटलट कांपणाऱ्या कुंतीनें त्याला कवटाळलें व 'दैव बलवत्तर असल्यानें सर्व कौरवांचा फडशा पडणार तेव्हां ह्या दिलेल्या वचनाची तरी आठवण ठेव,' असें म्हणून 'ठीक आहे,' म्हणून त्याचें आश्वासन घेऊन ती घराकडे परतली.

१४० शिष्टाईचा निकाल.

(ख. १४७–४९)

भगवान हास्तिनापुराहून उपप्लव्याला परत आल्यावर त्यांनीं तेथें घडलेली सर्व हकीकत युधिष्ठिराच्या कानावर घालून बराचवेळ त्याच्याशीं विचार केल्यावर विसाव्याला आपल्या बिऱ्हाडीं गेला.पुढें सूर्य मावळल्यावर विराटप्रभृति राजांना निरोप देऊन संध्योपासना आटोपल्यावर कृष्णांकडेसच सर्व लक्ष लागून तोच विचार मनांत घोळत असल्यामुळें त्याला पुन्हां बोलावून घेऊन हास्तिनापुराला गेल्यावर घडलेली सर्व हकीकत सविस्तर सांगण्यास सांगून 'आतां उगीच वेळ फुकट दवडण्यांत अर्थ नाहीं, आम्हांला गति तूंच आहेस,' असें युधिष्ठिर म्हणाला. त्यावर भगवान म्हणाला, 'हास्तिनापुराला जाऊन भर सभेंत मीं रास्त, चांगली व हिताची गोष्ट सांगितली असतां ती जेव्हां दुर्योधनाला न पटतां तो हासला तेव्हा. भीष्मै संतापून त्याला म्हणाले, 'दुर्योधना, कुलासाठीं मी मागतों तें ऐकून कुलाचें हित कर. लोकविख्यात अशा माझ्या पित्याला मी एकुलता एकच मुलगा होतों. परंतु एक पुत्र असणें शहाणे अपुत्रासारखेंच समजत असल्यामुळें दुसरा असावा, कुळ न बुडतां यश वाढावें, असें त्यांना वाटूं लागलें; व त्यांचा तो हेतु उमगून राजचिन्ह सोडून ऊर्ध्वरेत राहण्याची घोर प्रतिज्ञा मीं केली व त्यांना सत्यवती मिळवून दिली. पुढें त्यांपासून माझा धाकटा भाऊ कुरुकुल चालविणारा श्रीमान विचित्रवीर्य झाला. वडील स्वर्गवासी झाल्यावर मी स्वतः त्याला राज्याभिषेक करून त्याचा आज्ञांकित बनलों व राजमंडळांना जिंकून त्याला शोभणाऱ्या बायका मिळवून दिल्या. पुढें परशुरामाचें व माझें युद्ध जुंपलें असतां त्यांच्या भीतीनें नगरवासी लोकांनीं त्याला नगरांतून दूर नेऊन ठेविलें; व तेथें तो विषयासक्त होऊन राहिल्यामुळें क्षय जडून मरण पावला. अशा रीतीनें राज्य अराजक झाल्यामुळें पाऊस पडेनासा होऊन प्रजा भुकेनें व्याकुळ झाली. तेव्हां प्रजेचा ऱ्हास न होतां त्यांचें दुःखनिवारण होऊन कल्याण व्हावें म्हणून प्रजेनें काकुळत येऊन मला बिनविलें व माझी माता, पुरोहित, आचार्य, व बहुश्रुत ब्राह्मण यांचाही मला प्रतिज्ञा मोडून प्रजेचें हित करण्याविषयीं आग्रह पडला. तेव्हां मोठ्या दुःखांत पडून काय करावें हें मला सुचेना व माझ्या पितृप्रे-

मामुळें बडिलांना दिलेलें वचन मोडण्यालाही माझें मन घेईना. व ' विशेषतः कुलामाठींच ही घोर प्रतिज्ञा केली असल्यामुळें राज्यशकटाच्या जुंबाला मला जखडून कुरुवंशाचें नांव राखूं इच्छिणाऱ्या माझ्याकडून प्रतिज्ञाभंग करवूं नकोस, ' ह्मणून हात जोडून मीं तिची प्रार्थना केली. याप्रमाणें कशीबशी सर्वांची समजूत घालून व्यासांपासून भावाच्या बायकांना संतति करून घेण्याचें ठरविलें. पुढें त्यांच्या प्रसादानें तिघींना तीन मुलगे झाले. पैकीं तुझा पिता अंधत्वामुळें राज्याला अनधिकारी अमल्यानें पांडु राजा झाला. तेव्हां त्याचे मुलगे त्याच्या दौलतीचे न्यायानेंच मालक आहेत. ह्मणून भांडणतंटा न करतां त्यांना तूं अर्धं राज्य यावेंस हे दुर्योधनाच्या हिताचें आहे. मी जिवंत असतां मला न जुमानतां कोण बरें राज्य करील ? तेव्हां माझें ह्मणणें तूं मोडूं नकोस. मला तूं व पांडव सारखेच आहां. अरे, वृद्धांचें मागणें मोडूं नये व त्यामबंधानें कुशंका घेत बसूं नये. आपला व आपल्या बरोबरच सर्वांचा नाश करून घेण्याला उठूं नकोस; यावर वाक्पटु द्रोणाचार्य ह्मणाले, ' बा, शांतनु व देववत भीष्म हे या कुलाकरितां जसे वागले तसाच सत्यसंध, जितेंद्रिय व प्रजापालनदक्ष पांडूही वागला. तो कुरुवंशवर्धन हें राज्य धृतराष्ट्र व विदुर यांच्या स्वाधीन करून धृतराष्ट्राला राज्याभिषेक केल्यावर आपल्या दोन बायकांसह वनाला निघून गेला व तेव्हांपासून हे विदुर नम्रतेनें सेवकाप्रमाणें राहून हें राज्य संभाळीत आहेत; व खजिना, दान, सेवकांवर देखरेख, व सर्वांची यथायोग्य व्यवस्था तेव्हांपासून हे करीत आहेत. संधिविग्रह व राजांना नजराणे पाठविणें हीं कामें शत्रूंची डाळ शिजूं न देणारे हे भीष्म पहात आले आहेत. गादीवर असलेला धृतराष्ट्र नेहमीं विदुरांच्याच मतानें वागत आहे. तेव्हां या कुलांत जन्माला येऊन आपसांत फूट पाडण्याची खटपट तूं का करीत आहेस ? भावांबरोबर जुळून त्यांच्यासहवर्तमान अनेक भोगांचा उपभोग घे. भीतीनें किंवा द्रव्यलोभानें मी हें बोलत आहें असें समजूं नकोस. भीष्म देतील तें मला पुरें आहे. तुझ्या देण्याची मीं पर्वा धरली नाहीं, व पोटाचें कांहीं साधन तुझ्यापासून मिळावें अशीही मीं आशा केली नाहीं. भीष्म तिकडे मी हें ठरलें आहे. तेव्हां त्यांच्या मताप्रमाणें वाग. पांडवांना अर्धं राज्य देऊन टाक. तुझ्याशीं व त्यांच्याशीं माझें गुरुत्वाचें नातें सारखेंच असून जसा माझा अश्वत्थामा तसा मला तो अर्जुन आहे. फार कशाला बोलूं. जिकडे धर्म तिकडे जय हें तूं पक्कें लक्षांत ठेव. ' यावर सत्यप्रतिज्ञ धर्मवेत्ते विदुर भीष्मांकडे वळून ह्मणाले, ' अहो देववत, मी ह्मणतों तें ऐका, नाश पावलेला कुरुवंश आपण फिरून वर काढला. ह्या कुलांत जो हा धर्मार्थाकडे लक्ष पुरविणाऱ्या बापाचा उपदेश सुद्धां धाब्यावर बसवीत आहे तो हा कुलांगार दुर्योधन कोण ह्मणून लोभाने वेडा बनलेल्या ह्या कृतघ्न राक्षसाच्या मर्जीप्रमाणें आपण वागत आहां ? ह्याच्या कृत्यामुळें सर्व कौरव नाश पावत आहेत; तेव्हां ज्याच्या योगानें त्यांचा नाश न होईल असेंच आपल्याला केलें पाहिजे. चितारी ज्याप्रमाणें चित्र तयार करतो त्याप्रमाणें माझ्या व धृतराष्ट्राच्या स्थितीला आपणच पूर्वी कारण झाला आहां. तेव्हां ज्याप्रमाणें ब्रह्मदेव प्रजा उत्पन्न करून पुढें स्वतःच तिचा नाश करतो, त्याप्रमाणें ह्या कुलक्षयाची डोळे उघडे ठेवून आपण हयगय करूं नका. आतां विनाशकाल येऊन ठेपला असल्यामुळें आपली बुद्धिही जर गेली असेल तर मला व धृतराष्ट्राला घेऊन एक आपण वनाला तरी चला, नाहींपेक्षां ह्या कपटपटु दुर्बुद्धीला बांधून ठेवून पांडवांच्या रक्षणाखालीं हें राज्य नीट चालवा. मी हात जोडतों. कौरवपांडवांचा व अतुलपराक्रमी राजांचा कृपा करून भयंकर फडशा उडूं देऊं नका. ' असें बोलून विदुर थांबले. हाच विचार मनांत घोळवीत दुःखानें ते वरचेवर दीर्घ सुस्कारे टाकीत होते. तेव्हां सुबलराजकन्या गांधारी संतापून कुलाचा नाश होणार या भीतीनें आपल्या पापमति दुष्ट मुलाला ह्मणाली, ' दुष्ट अशा तूं व तुझ्या बगलबच्चांनीं आजपर्यंत जे जे अपराध केले आहेत ते येथें जमलेल्या लोकांपुढें मी मांडीत आहें. ह्या परंपरेनें आलेल्या राज्याचा परंपरेनें उपभोग व्हावा ही ह्या कुलाची पूर्वापार चाल आहे. परंतु दुष्ट कृत्य करण्याला तयार झालेला तूं पापबुद्धि अन्याय करून कौरवांचें राज्य लयाला नेऊं पहात आ-

हेस. बुद्धिमान महाराज राज्यावर असून दूरदर्शी विदुर त्यांचे पाठचे भाऊ आहेत. यांना टाकून मूर्खपणानें राज्यांत ढवळाढवळ करण्याला तुला काय अधिकार आहे ? शिवाय महाराज व विदुर हे जरी समर्थ आहेत तरी मामंजी जिवंत आहेत तोंवर ह्यांना सुद्धां वास्तविक स्वतंत्रपणें कांहीं करतां येत नाहीं. मामंजींनीं धर्माला जागून राज्य नाकारलें तेव्हां हे राज्य पांडु भावोजींना मिळालें. वंशपरंपरेनें पुत्रपौत्रांकडे जाणाऱ्या ह्या राज्यावर त्यामुळें हल्लीं पांडवांचाच हक्क आहे. तेव्हां प्रजापालक अशा आह्मी धर्माला जागून हे सत्यसंध महात्मे मामंजी सांगतील तसेंच वागलें पाहिजे. तेव्हां ह्यांच्या सांगण्याप्रमाणें न्यायानें युधिष्ठिराचें असलेलें हें राज्य महाराजांच्या विचारानें त्यालाच करूं दे. ' यावर धृतराष्ट्र दुर्योधनाला ह्मणाला, ' तात, मी सांगतों तें ऐकशील तर त्यांत तुझें कल्याण असून माझाही मोठेपणा राखल्यासारखा होणार आहे. कुरुवंशवृक्ष वाढविणाऱ्या मूळ पुरुष सोमापासून सहावे नहुषपुत्र ययाति झाले. त्यांना राजर्षिश्रेष्ठ महातेजस्वी पांच पुत्र झाले. पैकीं वडील यदु हे देवयानीला झाल्यामुळें ते दैत्यगुरू शुक्राचार्याचे नातु होत. हा वंश वाढविणारे पुरुष धाकटे असून वृषपर्वकन्या शर्मिष्ठेपासून झाले. वीर्यानें सर्वमान्य झालेले यदु यादवांचे मूळपुरुष झाले. हे गर्वानें फुगून सर्व क्षत्रियांना तुच्छ करूं लागून पित्याचेंही ऐकेनासे झाले व सर्व भावांचा अपमान करून व राजांना पादाक्रांत करून हास्तिनापुरांत राज्य करूं लागले. तेव्हां ययातीनीं रागानें त्यांना शाप देऊन राज्यावरून काढून टाकलें; व शक्तीच्या घमेंडीवर त्यांच्या तंत्रानें वागणाऱ्या त्यांच्या भावांनाही त्यांनीं शाप दिला व आपल्या आज्ञेंत वागत असणाऱ्या पुरूंना गादी दिली. यावरून तुझ्या लक्षांत आलें पाहिजे कीं, वडील असून सुद्धां गर्वामुळें एक राज्याला मुकतो व धाकटा असूनही थोराच्या आज्ञेंत राहिल्यानें दुसरा राज्याला मालक होतो. माझे पणजे प्रतीपही सर्व धर्म जाणत होते. देवापि त्यामध्यें वडील असून बाल्हीक दुसरे व तुझे आजोबा शांतनु सर्वांत धाकटे होते. देवापींना कुष्ठ होतें तरी ते महातेजस्वी, धर्मनिष्ठ व सत्यसंध असून वडिलांच्या सेवेमध्यें दक्ष असत. सर्वांना हे मान्य असून भले यांना मान देत व आबालवृद्ध त्यांना चहात. कारण ते उदार व प्राणिमात्रांच्या हितामध्यें दक्ष असून पिता व ब्राह्मण यांच्या आज्ञेंत वागत असत. पुढें वृद्धापकाल झाल्यावर प्रतीपांनीं या देवापीला यथाविधि, राज्याभिषेक करण्याची तयारी करून मंगलकार्यांनाही सुरवात केली. परंतु ' अविकलेंद्रिय राजा देवांना मान्य नाहीं, ' या सबबीवर विद्वानांनीं याला आपली संमति न दिल्यामुळें प्रतीपांना फार दुःख होऊन त्या मुलासह ते वनाला निघून गेले. व बाल्हीकही मामाकडे जाऊन राहिले. व या सर्वांच्या संमतीनें शांतनूंना राज्य मिळालें. त्याचप्रमाणें मी आंधळा असल्यामुळें पांडूला राज्य मिळालें. तेव्हां त्याच्यामागें हें राज्य त्यांच्या मुलांचें आहे. मलाच जर राज्य नाहीं तर तें तुला तरी कोठून येणार ? न्यायानें हें राज्य महात्म्या युधिष्ठिराचें असून कौरवकुलाचा स्वामी व नियंता होण्याला तोच पात्र आहे. कारण तो सत्यसंध व हुशार असून धर्माकडे त्याचें पूर्ण लक्ष आहे. बंधुजनांशीं गोड असून सुहृदांची तो कींव करणारा आहे. तसाच तो आत्मनिग्रही व सज्जनांचा पोशिंदा आहे; क्षमादि सर्व राजगुण त्याच्यामध्यें आहेत, व प्रजेलाही तो आवडता आहे. आतां तूं राजाचा मुलगा नाहींस, तुझी वागणूक चांगली नाहीं व बांधवांशीं नेहमीं तूं वांकडेपणानें वागतोस. तूं फार मस्त आहेस. हें परस्व तुला कसें लुबाडतां येणार याचा नीट विचार कर. याकरितां मी सांगतों कीं हा मूर्खपणा सोडून देऊन मुकाट्यानें युधिष्ठिराला अर्धराज्य देऊन टाक. ह्मणजे तूं आणि तुझे भाऊ कांहीं दिवस जिवंत रहाल. ' याप्रमाणें सर्वांनीं सांगितलें तरी मूढमति दुर्योधन उमजला नाहीं व रागानें डोळे लाल करून या उपदेशाला न जुमानतां तो निघून चालता झाला; व ज्यांचे घडे भरले आहेत असे राजेही त्याच्या मागून गेले. ' आज **पुष्य नक्षत्र आहे तेव्हां या सुमुहूर्तावर कुरुक्षेत्राकडे चला, ' ह्मणून** त्यानें आज्ञा दिली. त्याबरोबर भीष्मांना सेनापति करून अकरा अक्षौहिणी सैन्यासह ते निघाले आहेत. याप्रमाणें तेथील हकीकत आहे. ह्या कुलांत फूट न

पडतां तुह्मां भावांमधील प्रेम वाढावें व लोकांचें कल्याण व्हावें ह्मणून हा सामोपाय मीं करून पाहिला. परंतु याची डाळ शिजत नाहींसें पाहून अद्भुत व अमानुष प्रकारही तेथें दाखविले. त्याचीही जेव्हां कांहीं दाद लागेना तेव्हां उघड रीतीनें व खुबीनें राजांचीं मनें वळवून दुर्योधनप्रभृतींची आजपर्यंतच्या त्यांच्या वर्तनाबद्दल खूप खरडपट्टी काढली. 'शूर पांडव मान बाजूला ठेवून राज्यावर पाणी सोडून गरिबींत विदुरभीष्मांच्या आश्रेंत राहण्याला तयार आहेत; त्या पांचांना पोटासाठीं तरी पांच गांवें द्याल कीं नाहीं,' असेंही मी अखेरीस ह्मणालों. तेव्हां तो दुष्ट साफ ह्मणतो कीं, या पृथ्वीचा एवढासा तुकडा सुद्धां त्यांना मिळणार नाहीं!' तेव्हां आतां दंडुक्याखेरीज दुसरा कांहीं उपाय त्याच्यापुढें उरला. नाहीं. युद्धावांचून ज्याअर्थीं तुझें राज्य तुला मिळत नाहीं तेव्हां त्यांचा विनाशकाल खास जवळ आला आहे व स्वतःच्या नाशाला ते स्वतःच कारण होणार आहेत!'

---

१४१ सेनापतीची निवड व पांडवांचा कुरुक्षेत्रीं तळ. (५. १५१–५२)

हें भगवानाचें भाषण ऐकून युधिष्ठिर त्याच्या समक्षच भावांना ह्मणाला, 'भगवानाचें हें सर्व भाषण तुह्मीं ऐकिलेंच आहे.तेव्हां आतां आपल्या सैन्याच्या निरनिराळ्या तुकड्या करा.ह्या सात अक्षौहिणी सेना आपल्याकडे जुळल्या आहेत त्या सातांवर माझ्यामतें द्रुपद, विराट, धृष्टद्युम्न,शिखंडी, सात्यकि, चेकितान, व भीमसेन हे सात नांवाजलेले सेनानायक नेमावे असें आहे. हे सर्व वेदज्ञ, शूर, ब्रह्मचर्य पाळलेले, विनयशील, नीतिमान, युद्धविशारद, बाण सोडण्यांत व सर्व अस्त्रांमध्यें हुशार असून प्रसंगीं प्राण खर्ची घालण्याला मागें पुढें पाहणारे नाहींत. आतां या सातही तुकड्यांचें बलाबल ओळखून त्याप्रमाणें त्यांची व्यवस्था लावून शररूपी ज्वालामय भीष्मरूपी अग्नीला तोंड देणारा सेनाधिपति कोणाला निवडावें हें तुह्मी सांगा.' हें ऐकून सहदेव ह्मणाला, 'ज्यांच्या साहाय्यानें आह्मी आपला हिस्सा परत मिळवूं इच्छीत आहों ते हे आमचे संबंधी वीर्यशाली विराट ज्यांचें आमचें सुखदुःख एकरूप झालें आहे त्यांना सेनाधिपति करावें. कारण हे बलवान, कृतास्त्र व युद्धांत कोणाला हार न जाणारे असे असून भीष्म व दुसरे महारथ यांच्याशीं तोंड देण्याला समर्थ आहेत.' यावर नकुल ह्मणाला, 'वय, शास्त्र, धैर्य, कुल, व जन्म या सर्वांनीं आमचे सासरे द्रुपद श्रेष्ठ असून ते विनयशील, बलवान, श्रीमान व सर्वशास्त्रविशारद आहेत. भरद्वाजांपासून त्यांनीं अस्त्रविद्या संपादन केली आहे; ते सत्यसंध व कोणाचें कांहीं चालूं न देणारे आहेत; तसेंच भीष्मद्रोणांशीं त्यांची नेहमीं स्पर्धा चालते. पुत्रपौत्रांचा परिवार मोठा असल्यानें पुष्कळ शाखा असलेल्या झाडासारखे ते आहेत. रणांगणाला शोभा देणाऱ्या या वीरांनीं द्रोणाचार्यांना मारण्यासाठीं घोर तप केलें आहे. तेव्हां त्यांनीं आमच्या सैन्याचें सेनाधिपतित्व पतकरावें. कारण दिव्यास्त्रांची त्यांना पूर्ण माहिती असून द्रोणाचार्यांची व त्यांची मैत्री आहे. तेव्हां भीष्मद्रोणांबरोबर सामना देण्याला तेच योग्य आहेत असें मला वाटतें.' नंतर अर्जुन ह्मणाला, 'जो हा अग्निवर्ण आजानुबाहु तपाच्या प्रभावानें व ऋषी संतुष्ट झाल्यानें धनुष्य, कवच, तरवार यांनिशीं दिव्य रथांत बसून अग्नीपासून निघाला आहे; व ज्याच्या घरघर आवाजांत मिळून गेला असतां ज्याची गर्जना मेघगर्जनेप्रमाणें घुमत रहाते; ज्याचा पराक्रम, बांधा, खांदे, बाहु, छाती, बल सिंहासारखें असून ज्याच्या भिवया, दाढा, हनुवटी, बाहू, तोंड, मान, विशाळ डोळे व पाय जसे असावेत तसे आहेत, असा हा सडपातळ व धीराचा कोणत्याही शस्त्राला अवध्य व केवळ द्रोणांनाच मारण्यासाठीं उत्पन्न झालेला जितेंद्रिय व सत्यसंध मत्तगजासारखा धृष्टद्युम्नच यमदूतासारखे वेगवान व ठिणग्यांप्रमाणें येऊन लागणारे भीष्मांचे विद्युल्लतेसारखे बाण सहन करण्याला समर्थ आहे व याचें युद्धकौशिशल्यही अलौकिक आहे; तेव्हां ज्याचें कवच अभेद्य आहे अशा ह्या श्रीमानालाच सेनाधिपति करावें असें मला वाटतें. यावर रणांत दिव्य अस्त्रांचा प्रयोग करूं लागला असतां ज्याकडे महात्म्या रामांप्रमाणें लोक टकमक पहात रहातात अशा भीष्मांना मारण्यासाठींच उ-

त्पन्न झालेल्या शिखंडीला सेनाधिपति करण्याची भीमानें सूचना केली. याप्रमाणें सर्वांचें मत ऐकून घेऊन युधिष्ठिर म्हणाला, 'बाबांनो, सर्व जगताचें सारासार व बलाबल भगवान जाणतो व तुम्हां सर्वांचें मतही त्यानें ऐकिलेंच आहे. तेव्हां तो सांगेल त्यालाच सेनाधिपति करण्याचें माझ्या मनांत आहे. मग तो कृतास्त्र असो व नसो, वृद्ध असो वा तरुण असो. आमच्या जयाजयाला एवढेंच नव्हे तर आमच्या प्राणाला, राज्याला व आमच्या अस्तित्वाला किंवा नामशेष होण्याला, सर्वांला कारण हा आहे. धाता, विधाता सर्व हाच असून कोणत्याही कार्याची सिद्धि यावर अवलंबून आहे. तेव्हां रात्र पडत चालली असल्यानें त्याच्या मतानें कोणाला सेनाधिपति करावयाचा हें ठरवून उजडल्यावर गंधफुलादिकांनीं शस्त्रांची पूजा करून आपण रणांगणाकडे कुच करूं.' हें युधिष्ठिराचें भाषण ऐकून अर्जुनाकडे पाहून भगवान म्हणाला, 'तुम्हीं ज्यांचीं नांवें घेतलीं आहेत ते सर्वच शूर तुझ्या सैन्याचे सेनाधिपति होण्याला लायख असून शत्रूला त्राहि त्राहि करून सोडण्याला समर्थ आहेत. हे वीर घोर संग्रामामध्यें इंद्राचा देखील चळकांप करून सोडतील मग ह्या पापबुद्धि लोभी धार्तराष्ट्रांची कथा काय? तुझ्या मर्जीसाठीं सख्यांची खटपट होईल तेवढी मीं केली. आतां आपण धर्माच्या ऋणांतून मुक्त झालों आहों व टीकाकारांच्या टीकेतूनही सुटलों आहों. युद्धाकरितां आतुर झालेल्या ह्या अविचारी मूर्खाला आपण मोठे अस्त्रपटु व बलाढ्य आहों असें वाटत आहे. परंतु अर्जुनप्रभृति आमच्या वीरांकडे यांच्यानें नुसतें पाहववणार देखील नाहीं! आमचें सैन्य कसलेलें असून त्यावर हल्ला किंवा त्याला अटकाव करणें दुरापास्त आहे. तेव्हां दुर्योधनाच्या सैन्याचा रणांत खात्रीनें फडशा पाडील. धृष्टद्युम्नाला सेनाधिपति करावा असें मला वाटतें.' ह्याप्रमाणें भगवान बोलला असतां राजांना फार आनंद झाला व त्यांच्या आनंदाच्या आरोळ्यांनीं सर्व वातावरण दुमदुमून राहिलें. 'जुळा, जुळा,' म्हणून लगबगीनें इकडून तिकडे धांवणाऱ्या सैनिकांच्या आरोळ्या व हत्ती, घोडे यांचे शब्द व रथांच्या चाकांचा घरघर आवाज, शंख, नगारे इत्यादि वाद्यांचा गजर यांनीं सर्व वातावरण भरून गेलें. हत्ती, रथ, घोडे व पायदळ यांनीं भरलेलें तें इकडून तिकडे धांवणारें पांडवांचें अफाट सैन्य मोठमोठ्या भयंकर लाटांनीं खवळलेल्या समुद्राप्रमाणें दिसत होतें. चिलखतें चढवून एकमेकांना हाक मारीत सुटलेलें तें सैन्य गंगेप्रमाणें दुस्तर दिसत होतें. नकुल, सहदेव व भीमसेन चिलखतें चढवून सर्व सैन्याच्या पुढें होते. अभिमन्यु, द्रौपदीचे मुलगे, धृष्टद्युम्न, प्रभद्रक व पांचाल भीमसेनाच्या मागें होते. उत्साहयुक्त होऊन आनंदानें ओरडत चाललेल्या ह्या सैन्याचा सिंहनाद पौर्णिमा व अमावास्या यांना उसळणाऱ्या समुद्राच्या घों घों शब्दाप्रमाणें आकाशाला जाऊन भिडत होता. शत्रूच्या सैन्याच्या ठिकऱ्या उडविणाऱ्या आनंदभरित होऊन चिलखतें चढवून चाललेल्या ह्या सैन्याच्या मधून खटारे, दुकानें, डेरे, राहुट्या, गाड्या, खजिना, तोफखाना, शस्त्रवैद्य, वैद्य, विकलांग व दुबळे शिपाई व नोकरचाकर यांसह युधिष्ठिर चालला होता. द्रौपदी व इतर स्त्रिया दासदासींसह उपप्लव्यांतच राहिल्या. सभोंवार कांहीं शिपाई कायमचे व कांहीं फिरते या स्त्रियांच्या व पैशाच्या संरक्षणासाठीं ठेवून अफाट सैन्यानिशीं पांडव निघाले. रत्नांनीं शृंगारलेल्या रथांतून पांडव चालले असतां ब्राह्मण त्यांभोंवतीं जमून जयाशीर्वाद देत होते. केकय, धृष्टकेतु, काश्यपुत्र अभिभु, वसुदान व अजिंक्य शिखंडि हर्षभरित होऊन युधिष्ठिराच्या बाजूनें चालले होते. विराट, द्रुपदपुत्र सौमकि, सुधर्मा, कुंतिभोज, व धृष्टद्युम्नाचे मुलगे हे पिछाडीला होते. पांडवांबरोबर चाळीस हजार रथ, दोन लक्ष घोडे, चार लक्ष पायदळ व साठहजार हत्ती होते. अनाधृष्टि, चेकितान व सात्यकि कृष्णार्जुनांच्या भोंवतीं जुळून चालले होते. याप्रमाणें व्यवस्थित रीतीनें सर्व सैन्यानिशीं कुरुक्षेत्राला येऊन पोहोंचल्यावर सर्व वीरांनीं आपापले शंख फुकले. तेव्हां विजेच्या कडाडण्याप्रमाणें भगवानाच्या पांचजन्याचा शब्द ऐकून सर्व सैन्याच्या अंगावर हर्षरोमांच उभे राहिले. नंतर सपाट, छायाळ, रम्य, नापीक, शुद्ध, पुण्यप्रद गवत व लांकूडफांटा यांची रेलचेल असलेल्या अशा प्रदेशांत स्मशानें, देवळें, मोठमोठ्या ऋषींचे

आश्रम व तीर्थांचीं ठिकाणें सोडून युधिष्ठिरानें आपल्या सैन्याचा झुजबी तळ दिला व जनावरांना पाहिजे तेवढा विसावा मिळाल्यावर हजारों राजांसहवर्तमान तो पुढें निघाला. अर्जुन व कृष्ण दुर्योधनानें वाटा रोखण्यासाठीं ठेवलेल्या शेंकडों सैन्याच्या तुकड्यांना पळवून लावीत सैन्याच्या भोंवतालून चालले होते. धृष्टद्युम्न, सात्यकि व युयुधान यांनीं जिच्या कांठीं खडे बिलकुल नसून जिचें पाणी रेंदाळ वगैरे नसून स्वच्छ होतें अशा कुरुक्षेत्रांतील हिरण्वतीच्या कांठीं तळासाठीं जागा आखली व भगवानानें तिच्या भोंवतालीं खंदक खणविला व संरक्षणासाठीं योग्य सूचना देऊन संत्री ठेविले. पांडवांकरितां जशा प्रकारचीं शिबिरें तयार केलीं होतीं तशाच प्रकारचीं अन्नपाणी व लांकूडफांटा यांनीं भरगच्च व शत्रूच्या हल्ल्याचें ज्यावर कांहीं चालणार नाहीं अशीं शेंकडों निरनिराळीं शिबिरें दुसऱ्या राजांकरितां तयार करविलीं; हीं सर्व शिबिरें जणूं राजवाड्यांसारखीं दिसत होतीं. पगार देऊन ठेवलेले शेंकाडों हुशार कारागीर व शास्त्रवेत्ते वैद्य आपापल्या सर्व हत्यारांनिशीं व सामानानिशीं तेथें हजर होते. प्रत्यंचेच्या दोऱ्या, धनुष्यें, चिलखतें, हत्यारें, मधु, तूप, व राळ यांच्या पर्वतप्राय राशी तेथें पडल्या होत्या व प्रत्येक शिबिरांतून पाणी, गवत, अन्न, भूस, कोळसे, मोठमोठीं यंत्रें, तोफा, भाले, कुऱ्हाडी, धनुर्ष्यें, चिलखतें, तरवारी, भाते यांचा युधिष्ठिरानें यथेच्छ पुरवठा केला होता. शंभराबरोबर तसेंच हजारांबरोबर झुंजणारे पोलादी कांटेरी झूल चढविलेले पर्वतप्राय हत्ती जिकडे तिकडे दिसत होते. या ठिकाणीं पांडवांचा तळ पडल्यावर ब्रह्मचर्य पाळलेले व सोमप्राशन केलेले आणखी पुष्कळ राजे त्यांना जय मिळावा ह्मणून आपापल्या सैन्यानिशीं त्यांना येऊन मिळाले.

---

१४२ भीष्मसेनाधिपत्य कौरवांचा तळ. (५. १५३-१६)

इकडे भगवान हास्तिनापुराहून निघून गेल्यावर दुर्योधन कर्ण, दुःशासन व शकुनि यांना ह्मणाला, 'केशव इष्ट हेतु सिद्ध न होतां संतापून निघून गेला आहे तेव्हां तो पांडवांना खात्रीनें खवळवून सोडील. पांडवांचें आणि माझें युद्ध व्हावें हें त्याला इष्टच आहे; व भीमार्जुन नेहमीं त्याच्या अनुरोधानें वागणारे आहेत, व अजातशत्रु युधिष्ठिर नेहमीं भीमाच्या मुठींत असतो. शिवाय आजपर्यंत मीं त्यांचे पुष्कळ अपराध केले आहेत. विराट व द्रुपद यांचेंही माझ्याशीं वैरच आहे. श्रीकृष्णाच्या आज्ञेप्रमाणें ते सेनानायक झाले आहेत असें ऐकतों. तेव्हां दोघांमधील हा घोर संग्राम अंगावर रोमांच उभे करण्यासारखा होणार यांत संशय नाहीं. म्हणून मोठ्या काळजीपूर्वक सर्व युद्धाची तयारी ठेवा. ज्याच्या त्याच्या बेताचीं शत्रूंची मात्रा चालूं न देणारीं असंख्य शिबिरें तयार ठेवून त्याला पाण्याचा व अन्नाचा पुरवठा जवळ असूं द्या; व सामुग्री पुरविण्याच्या त्याच्या वाटा शत्रूंना बंद करतां येऊं नयेत अशा ठिकाणीं तीं असूं द्या. त्यांत नानाप्रकारचीं आयुधें तयार ठेवा व त्यांवर पताका व ध्वज फडकावून द्या. नगरापासून तेथपर्यंतच्या वाटा नीट करवा; व उद्यां कूच करावयाचें ह्मणून आज दांडोरा पिटवा.' 'बरें आहे' ह्मणून त्यांनीं मोठ्या उत्साहानें सांगितल्याप्रमाणें सर्व व्यवस्था ठेवून दिली. राजेलोकही ती राजाज्ञा ऐकून मोठ्या आवेशानें आपापल्या आसनांवरून उठले. कांहीं सोन्याच्या बाहुभूषणांनीं झळकणाऱ्या चंदन व अगुरू चोपडलेल्या कांबीसारख्या कणकर बाहूंवरून हात फिरवूं लागले; कांहीं आपल्या कमलासारख्या हातांनीं फेटे आवळूं लागले; कोणी आंतील व वरचे कपडे साफसूफ करूं लागले; कोणी आपलीं भूषणें सांवरूं लागले. रथी रथ, स्वार घोडे, व गजयोधी आपले हत्ती सजवूं लागले व सर्व नानाप्रकारचीं चित्रविचित्रित सोन्याचीं चिलखतें व निरनिराळीं हत्यारें अंगावर चढवूं लागले. त्याचप्रमाणें पायदळांतले लोकही नानाप्रकारच्या सोन्याच्या आयुधांनीं आपल्याला सजवून घेऊं लागले. तेवेळीं उल्हाससंपन्न लोकांनीं भरलेली दुर्योधनाची ती भव्य नगरी एखाद्या उत्सवाच्या प्रसंगाप्रमाणें गजबजून राहिली होती. जनसमूह हेच ज्याचे मोठमोठे भोंवरे, रथ, हत्ती, घोडे हेच ज्यामधील

मासे, शंख व नौबती यांचा शब्द हाच ज्यांतील चौघौं शब्द, खजिन्याच्या पेट्या हींच ज्याच्यांतील रत्नें, नानाप्रकारचीं भूषणें व चिलखतें ह्याच ज्याच्या लाटा, लखलखीत हत्यारें हाच ज्याचा फेंस, उंच उंच वाडे हेच ज्याच्या किनाऱ्यावरील पर्वत, व रस्ते व बाजार हेच ज्यांतील मोठमोठे डोह, असा वीरचंद्रोदयानें खवळलेला कौरवमहासागर चंद्रोदयाच्या वेळच्या सागराप्रमाणें भासत होता.

रात्र उजाडल्यावर दुर्योधनानें आपल्या अकरा अक्षौहिणींची त्यांतील पायदळ, हत्तीदळ, घोडेदळ व रथदळ यांमध्यें कसलेले, मध्यम व कनिष्ठ असे सर्व तुकड्यांमध्यें तीन भाग करून त्यांची व्यवस्था लाविली. तोडजोडीसाठीं रथाला बांधलेले लांकडी तुकडे, रथांत घेतलेले प्रचंड भाते, रथांना झांकण्यासाठीं घेतलेले चिवट कातडी पडदे, तोमर, घोड्यांच्या व हत्तींच्या पाठींवरून घातलेले लहान लहान भाते, लोकांनीं पाठीवर घेतलेले जड सोटे, ध्वज, पताका, धनुर्ये, भक्कम बाण, नानारंगाच्या दोऱ्यांचे फास, पथाऱ्या वगैरे सामान, केसांला धरून शत्रूला उलथून पाडण्याचे शेवटाला चिकट पदार्थ लावलेले सोडगे, तेल, काकवी, वाळू, विषारी सापांनीं भरलेले घडे, राळ व दुसरे ज्वालाग्राही पदार्थ, धुंगरे लावलेल्या ढाली लोखंडी हत्यारें, कढत काकवी, पाणी व गोळे फेकण्याच्या बंदुका वगैरे साधनें, गोफणी, गोळे, गोळ्या, तापवून फेकण्यासाठीं मध, गुग्गुल, फाळ लाविलेले सोटे, नांगर, विषाचें पाणी दिलेले बाण, पिचकाऱ्या, पेटारे, परशु वगैरे हत्यारें, आंतडीं बाहेर काढणारे वांकडीं टोकें असलेले बाण, करवतें, गुप्त्या, कांटे, खिळे, वाघ व चिने याच्या चामड्यांनीं मढविलेले रथ, दांड, शिंग, प्रास वगैरे आयुधें, कुऱ्हाडी, कुदळी, तेलांत भिजविलेले रेशमी कपडे, तूप इत्यादि पदार्थ बरोबर घेऊन निघालेली सुवर्ण रत्नांनीं मढवून काढलेली, टापटिपीत अशी दुर्योधनाची नानाविधसेना अशीप्रमाणें झळकत होती. तसेंच घोड्याच्या जातींची परीक्षा असून शस्त्रास्त्रांत निपुण अशा चिलखतें चढविलेल्या शूर व कुलीन वीरांकडे सारथ्याचें काम दिलें होतें. रथाला कंडे, ताईत वगैरे बांधलें असून त्याच्या बाजवा चांगल्या तऱ्हेनें आवळल्या होत्या. पदकें, माळा, मोत्यांचे गुच्छ यांनीं घोडे सजवून काढले होते. रथावर ध्वज, पताका चढवून वर मेहेरपी लावून दिल्या होत्या. त्यांत ढाली, तरवारी व पट्टे ठेविले होते. प्रत्येक रथाला चार चार जातिवंत घोडे जोडले होते. त्याचप्रमाणें प्रत्येक रथांत भाले, दंड, शेंकडों धनुर्ये ठेवलीं होतीं. पुढें जोडलेल्या दोन घोड्यांना एक व दोन चाकांच्या बाजूंच्या दोन घोड्यांना दोन असे प्रत्येक रथाला तीन सारथी होते व चक्ररक्षक दोन सारथीही उत्तम योद्धे असून रथ्यालाही घोड्यासंबंधी ज्ञान चांगलें होतें. शत्रूच्या हल्ल्याचें कोहीं न चालूं देणाऱ्या तटबंदी शहराप्रमाणें सोन्यानें मढवून काढलेले हजारों रथ याप्रमाणें तयार होते. रथाप्रमाणेंच चांगले शृंगारून वर झुली घालून त्यांवर सात सात लोक बसलेले हत्ती रत्नमय पर्वताप्रमाणें झळकत होते. या सातांपैकीं दोन अंकुशधारी माहुत, दोन उत्तम धनुर्धारी, दोन तरवारीच्या फेकांमध्यें हुशार व एक शक्ति व त्रिशूल घेतलेला असे होते. त्याचप्रमाणें अंगांवर चिलखतें व अलंकार चढविलेले स्वार ज्यावर स्वार झाले आहेत असे लाखों घोडे त्या सैन्यांत होते. हे सर्व सोन्यानें मढवून काढले असून चांगले शिकविलेले व बिनखोडीचे असून स्वारांच्या पूर्ण कह्यांतले होते. नानाप्रकारच्या तोंडावळ्याच्या पायदळांनें नानाप्रकारचे पोषाक करून निरनिराळ्या प्रकारचीं चिलखतें चढविलीं होतीं व नानाप्रकारचीं हत्यारें घेतलीं होतीं व ते स्वतः सोन्यामध्यें फुलून निघाले होते. एका रथाबरोबर दहा हत्ती, एका हत्तीबरोबर दहा घोडे, एका घोड्याबरोबर दहा शिपाई, अशी सैन्याची व्यवस्था लावून दिली असून एका रथाच्या बरोबर पन्नास हत्ती, एका हत्तीच्या बरोबर शंभर घोडे, व एका घोड्याच्या बरोबर सात सात शिपाई पडलेली उणीव भरून काढण्याला शिल्लक फौज म्हणून ठेवलेली होती. **पांचशें हत्ती, पांचशें रथ, पंधराशें घोडे व पंचवीसशें पायदळ मिळून एक सेना होते. अशा दहा सेना म्हणजे एक पृतना व दहा पृतना म्हणजे एक वाहिनी होते.** तथापि व्यवहारांत सेना, वाहिनी, पृतना, ध्वजिनी, चमू, अक्षौहिणी, हे पर्यायवाचकच समजले जातात.

याप्रमाणें बुद्धिमान दुर्योधनानें आपल्या अकरा अक्षौहिणींची व्यवस्था लाविली होती. पंचावन्न लोकांची एक पचि होत असून, तीन पत्तींनीं एक सेनामुख होतें. सेनामुखालाच गुल्म अशीही संज्ञा आहे; व तीन गुल्म ह्मणजे एक गण. असे गण दुर्योधनाच्या सैन्यांत दहा हजारांनीं मोजतां येण्यासारखे होते. यांमध्यें शूर व पराक्रमी लोक निवडून त्यांना दुर्योधनानें सेनापती केले. व याप्रमाणें निरनिराळ्या अक्षौहिणीवरच्या नायकांना आपल्याकडे आणवून मानमान्यतापूर्वक त्यांची भेट घेऊन तो त्यांच्याशीं गोड बोलला. कृप, द्रोण, शल्य, जयद्रथ, सुदक्षिण, कृतवर्मा, अश्वत्थामा, कर्ण, भूरिश्रवा, शकुनि व बाल्हीक यांची तर तो रोजच्यारोज गांठ घेऊन यांचा मानमरातब ठेवीत असे; व त्यांच्या नोकरचाकरांची देखील त्यानें उत्तम बंदोबस्त ठेविली होती.

याप्रमाणें सैन्याची व्यवस्था लावल्यावर सर्व राजांच्या समक्ष दुर्योधन भीष्मांना हात जोडून ह्मणाला, 'सेना वाटेल तेवढी मोठी असली तरी तिच्यावर कोणी अनुभवशीर सेनाधिपति नसेल तर मुंग्यांच्या घोळक्याप्रमाणें युद्धाचे वेळीं तिची फाकाफाक होऊन जाते. शिवाय पुष्कळ सेनापती असले तर कोणाही दोघांचें एकमत कधीं न होतां एकमेकांविषयीं त्यांच्या मनांत मत्सरभाव असतो. कोणे एके वेळीं आपले कुशध्वज झेंडाकावीत ब्राह्मण हैहय क्षत्रियांशीं युद्धाला उभे राहिले व वैश्य शूद्रही ब्राह्मणांना जाऊन मिळाले. याप्रमाणें तीन वर्ण एका बाजूला व क्षत्रिय एका बाजूला झाले असतांही तिन्ही वर्णांचा फिरून फिरून मोड होऊन क्षत्रिय एकटे असतांही यांवर त्यांस जय मिळूं लागले. तेव्हां ब्राह्मणांनीं क्षत्रियांनाच जाऊन यांचें कारण विचारलें. तेव्हां त्या धर्मज्ञ क्षत्रियांनी खरी गोष्ट त्यांना सांगितली कीं 'आह्मी बुद्धिमान अशा एकाच्या सल्लूचानें चालतों आणि तुह्मी सर्व आपापल्या मतांप्रमाणें वागतां.' हें ऐकून ब्राह्मणांनीं नीतिकुशल, शूर अशा एकाच ब्राह्मणाला सेनापति करून क्षत्रियांना जिंकलें. याप्रमाणें जे शूर, जिद्दाळाचा, शुद्ध अशाला आपला सेनाधिपति करतात त्यांनाच रणांत शत्रूवर जय येतो. आपण शुक्राचार्यांच्या तोडीचे असून माझे हितचिंतक आहां; तसेच धर्मनिष्ठ व कोणाच्या हातून व मरणारे असे आहां. तेव्हां आपण आमचे सेनाधिपति व्हावें अशी माझी इच्छा आहे. इंद्राचें पाठबळ असलेल्या देवांप्रमाणें आपल्या आधाराकर आह्मी देवांना सुद्धां खात्रीनें अजिंक्य होऊं. ह्मणून कार्तिकस्वामीप्रमाणें आपण आमचें नायकत्व पतकरा ह्मणजे बैलांमागून जाणाऱ्या खोंडांप्रमाणें आह्मी आपल्या मागून येऊं.' भीष्म ह्मणाले, 'तूं ह्मणतोस तें खरें आहे. परंतु मला तुह्मी आणि पांडव सारखेच अमल्यानें करारप्रमाणें जरी मला तुझ्या बाजूनें लढलें पाहिजे तरी त्यांनाही त्यांच्या हिताची गोष्ट मला सांगितलीच पाहिजे. त्या नरव्याघ्र धनंजयासारीज माझ्या तोडीचा योद्धा मला कोणी दिसत नाहीं. महाबुद्धिमान अशा त्या एकव्यालाच काय ती सर्व दिव्यास्त्रांची पूर्ण माहिती आहे. परंतु तो कांहीं माझ्याशीं निर्भीडपणें लढणार नाहीं. एका क्षणार्धांत माझ्या शस्त्रसामर्थ्यानें सर्व देव, असुर, राक्षस यांसकट हें जग निर्मानुष करण्याचें माझ्या अंगांत सामर्थ्य आहे; तरी पांडवांना कांहीं मी मारणार नाहीं. ह्मणून युद्धाच्या झटापटींत त्यांच्या हातून आधींच जर मी मेलों नाहीं तर मी दररोज दहा हजार योध्यांचा फडशा पाडीन. आतां कर्णाला तरी प्रथम एकटा लढूं दे किंवा मी तरी लढेन, का अटीवर मी सेनाधिपतित्व पतकरण्याला तयार आहें. कारण युद्धांत तो नेहमीं माझ्याशीं स्पर्धा करीत असतो.' यावर 'भीष्म जिवंत आहेत तोंपर्यंत मी लढणार नाहीं, ते मेल्यावर मागून मी अर्जुनाबरोबर युद्ध करीन,' अशी कर्णानें प्रतिज्ञा केली. नंतर दुर्योधनानें भीष्मांना सेनाधिपतीचा अभिषेक केला. तेवेळीं भीष्म फारच शोभायमान दिसूं लागले. शेंकडों हजारों नौबती व शंख राजांनीं वाजूं लागले. सिंहनाद सुरू झाले. इतक्यांत आकाशांत ढग वगैरे कांहीं नसतां रक्ताचा पाऊस पडून जिकडे तिकडे चिखलच चिखल होऊन गेला. वावटळ, धरणीकंप इत्यादि दुश्चिन्हांनीं योध्यांचीं मनें खचून गेलीं. घोर आकाशवाणी व उल्कापात होऊं लागले. व कोल्ह्यांचीही भयसूचक कोल्हेकुई सुरू झाली. अशीं शेंकडों दुश्चिन्हें होऊं लागलीं असतां

ब्राह्मणांना पुष्कळ गाई व मोहोरा देऊन त्यांच्याकडून स्वस्तिवाचन करवून त्यांकडून जयाशीं घेत दुर्योधन सर्व प्रचंड सैन्यानिशीं भीष्मांना पुढें करून नगराबाहेर पडून कुरुक्षेत्राला येऊन दाखल झाला. पुढें कर्णासहवर्तमान कुरुक्षेत्र हिंडून सपाट, रम्य, तृणकाष्ठांनीं संपन्न असा उखीर प्रदेश पाहून त्याठिकाणीं त्यानें शिबिरांकरितां जागा आखल्या.

---

१४३ बलरामांचें सरस्वतीतीर्थाला प्रयाण. (५. १५४–५७.)

युधिष्ठिर हिरण्वतीच्या तीरीं तळ देऊन राहिला असतां तो एकेवेळीं भगवानाला ह्मणाला, 'बा कृष्णा, दुर्योधनादिक कौरवांचा अभिप्राय तुला समजलाच आहे, तेव्हां आतां कशा रीतीनें वागलों असतां धर्मापासून भ्रष्ट होणार नाहीं हें तूं आह्मांला निश्चयानें सांग.' यावर भगवान ह्मणाला, 'माझें धर्मार्थयुक्त भाषण त्या कपटबुद्धि मूढाला न रुचतां भीष्मविदुरांच्या उपदेशालाही त्यानें धाब्यावर बसविलें आहे. त्याला धर्माची किंवा अब्रूची चाड मुळीं नाहीं. कर्णाच्या पाठिंब्यामुळें सर्व त्याला तुच्छ वाटत आहे. त्या मूर्खानें मला सुद्धां बांधून ठेवण्याचा प्रयत्न केला. भीष्मद्रोणही त्याला भिऊनच बोलतात. विदुरांशिवाय बाकीचे सर्व त्याच्या अनुरोधानें वागत आहेत. हा मूढ तुझ्या संबंधीं जें कांहीं बोलला तें सांगून तरी काय फायदा? तुझ्याशीं सरळ वागण्याचा त्याचा बिलकुल इरादा नाहीं. तुझे सैनिक ह्मणून जे येथें राजे जमले आहेत त्या सर्वांमध्यें मिळून जी पापबुद्धि नाहीं तितकी सर्व त्या एकट्याच्या ठिकाणीं भरली आहे. आमचीही आज सर्वांवर पाणी सोडून देखील त्याबरोबर संधि करण्याची इच्छा नाहीं. तेव्हां आतां युद्धावांचून काय गत्यंतर आहे?' हें भगवानाचें भाषण ऐकून सर्व राजे मुकाट्यानें युधिष्ठिराच्या तोंडाकडे पाहूं लागले. तेव्हां त्यांचा अभिप्राय ताडून त्यानें युद्धाच्या तयारीचा हुकूम केला. तो ऐकून सर्व सैन्यांत गूलबलाट उडून जाऊन आनंदी आनंद झाला. युधिष्ठिराला मात्र ज्यांना आपण मारूं नये अशांना मारावें लागणार ह्मणून वाईट वाटून तो कष्टी होऊन ह्मणाला, 'जो टाळण्यासाठीं पडेल तें दुःख सोसून वनवासही काढला तो कुरुक्षयरूपी अनर्थकारक प्रसंग अखेरीस येऊन गुदरलाच. ज्यांना आपण मान दिला पाहिजे अशा वृद्धांना व गुरूंना मारावें तरी कसें व त्यांना मारून मग जयाची तरी काय चीज?' यावर भगवानाच्या भाषणांची आठवण देऊन अर्जुन ह्मणाला, 'याला अधर्म ह्मणत नाहींत व आपल्यासारख्यांना आतां कचरणें रास्त नाहीं.' यावर युद्धाचा निश्चय करून पांडवपक्षीयांनीं ती रात्र आनंदांत काढली.

बुद्धीनें प्रतिबृहस्पति, पृथ्वीसारखे क्षमाशील, सागरासारखे कधीं न खवळणारे, हिमाचलाप्रमाणें न डगमगणारे तेजामध्यें सूर्यासारखे व शरवृष्टि करून सर्व शत्रूंचा फडशा पाडण्यांत प्रतिइंद्र अशा सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ भीष्मांना अंगावर शहारे उत्पन्न करणाऱ्या ह्या घोर रणयज्ञामध्यें कायमची सेनाधिपतित्वाची दीक्षा दिल्याची बातमी ऐकून प्रसंग व काळ पूर्ण ओळखणारा युधिष्ठिर आपले भाऊ व श्रीकृष्ण यांना म्हणाला, 'चिलखतें चढवून तयार होऊन एकदां सर्व सैन्यांतून फिरा. पहिला प्रसंग पितामहांबरोबर जुळणार आहे!' नंतर श्रीकृष्णाच्या विचारानें द्रुपद, सात्यकि, विराट, धृष्टद्युम्न, धृष्टकेतु, शिखंडि व मगधाधिपति सहदेव या सातांना सात तुकड्यांचे सेनापती करून प्रदीप्त अग्नींतून द्रोणांना मारण्यासाठीं उत्पन्न झालेल्या धृष्टद्युम्नाला युधिष्ठिरानें सेनाधिपति केला; व कोणत्याही प्रसंगीं मनाला मोह न पडणाऱ्या अर्जुनाला सरसेनाधिपती करून महाबुद्धिमान भगवानाला त्याचा व त्याच्या रथाचा नियंता केलें.

याप्रमाणें ज्यांत भयंकर फडशा पडणार असा हा युद्धप्रसंग जवळ येऊन ठेपला असतां नीलवर्ण दुकूलधारी कैलासशिखराप्रमाणें उंच व मदानें डोळे लाल झालेला बलराम अक्रूरादिकांसह सिंहगतीनें सावकाश पाउलें टाकीत पांडवांच्या गोटाकडे आला. त्याला पाहून सर्व पांडव उठून उभे राहिले. हातांत हात घालून यथोचित नमस्कारचमत्कार होऊन सर्व आपापल्या जागीं बसल्यावर श्रीकृष्णाकडे पाहून बलराम ह्मणाला, 'हा भयंकर संहारच

काळ आला आहे. मला हा खात्रीनें विधीचाच नियमानियम दिसतो. म्हणून हा टाळतां येणें शक्य नाहीं. तेव्हां ह्यांतून कांहीं अपाय न होतां तुम्हांला व तुमच्या जिव्हाळ्याच्या लोकांना पार पडलेले पाहण्याचा सुदिन येईल तो खरा. तुम्ही व दुर्योधन दोघेही आम्हांला सारखेच असल्यानें आम्हांला दोघांनाही साहाय्य दिलें पाहिजे होतें, व हें मीं कृष्णाला अनेकवार सांगितलें असतां तुझ्यासाठीं त्यानें माझें म्हणणें न ऐकतां अर्जुनाकडे दृष्टि देऊन मनोभावानें तो तुमच्या बाजूला वळला आहे. तेव्हां कृष्णाच्या मनाप्रमाणें जय तुम्हांला मिळणार हें खास. आतां कृष्णावांचून मल हें जग तुच्छ आहे; आणि यासाठींच मी त्याच्या मर्जीप्रमाणें वागत असतों. दुर्योधन व भीमसेन हे दोघेही माझे प्रिय शिष्य शूर व गदायुद्धांत निष्णात आहेत. यासाठीं कौरवांचा नाश स्वस्थपणें पहात बसणें माझ्या हातून होणार नाहीं. म्हणून मी आपला सरस्वतीच्या तीरावरील तीर्थें हिंडत फिरतों.' असें म्हणून बलराम तीर्थयात्रेला निघून गेला.

१४४ रुक्मीचा हिरमोड. (५. १५८)

याचवेळीं वाटेल ती गोष्ट शेवटास नेण्याचा मनगटांत जोर असलेला प्रसिद्ध भोजवंशांतील दाक्षिणदेशचा हिरण्यरोमा नांवानें प्रसिद्ध असलेला राजा जो इंद्रसखा भीष्मक त्याचा रुक्मि नांवाचा मुलगा प्रथम पांडवांकडे आला. हा रुक्मि गंधमादन पर्वतावर राहणाऱ्या किंपुरुषांचा स्वामी जो द्रुम त्याचा शिष्य होता व यानें त्यापासून चारी प्रकारच्या धनुर्विद्यांचें ज्ञान पूर्ण मिळविलें होतें. याला गांडिव व शार्ङ्ग यासारखें तेजस्वी इंद्राचें विजयधनुष्य मिळालें होतें. वरुणाचें गांडिव, इंद्राचें विजय, व विष्णूचें शार्ङ्ग हीं तीनच देवांचीं मुख्य धनुष्यें गणलीं गेलीं आहेत. पैकीं शत्रुसैन्याचा चळकांप करून सोडणारें शार्ङ्ग मुराचे पाश तोडून स्वसामर्थ्यानें त्याला मारल्यावर, तसेच भूमिपुत्र नरकाला जिंकून रत्नकुंडलें, सोळा हजार स्त्रिया व नानाविध रत्नें मिळविल्यावर श्रीकृष्णाला मिळालें होतें. खांडववन जाळल्यावर गांडिव अग्नीपासून अर्जुनाला मिळालें होतें, व हें मेघासारखा शब्द करणारें विजय द्रुमापासून रुक्मीला मिळालें होतें. श्रीकृष्णानें रुक्मिणीच हरण केलें असतां आपल्या बळाचा गर्व असणाऱ्या या वीराला तें सहन झालें नाहीं; व 'कृष्णाला मारल्याखेरीज मी परतणार नाहीं,' अशी प्रतिज्ञा करून तो धनुर्धरश्रेष्ठ चतुरंग सेनेसह कृष्णावर चालून गेला. या झटापटींत त्याचा पूर्ण मोड होऊन त्याला लाजून कुंडिनपुराला परतावें लागलें. ज्या ठिकाणीं या रुक्मीचा पराभव झाला त्या जागेवर भोजकटक नांवाचें शहर वसविलें आहे. असा हा रुक्मि एक अक्षौहिणी सैन्य घेऊन पांडवांकडे आला असतां यथोचित सत्कार झाल्यानंतर तो अर्जुनाला म्हणाला, 'अर्जुना, तूं घाबरूं नकोस. हा पहा मी तुझ्या साहाय्याला आलों आहें. तुझें साहाय्य करून तुझ्या शत्रूला मी हाय हाय करून सोडीन. शौर्यांत माझ्या बरोबरीला कोणी लागणार नाहीं. जो कोणी माझ्या वांट्याला तूं देशील त्याला रणांत ठार करीन. मग ते द्रोण असोत, भीष्म असोत, कृप असोत किंवा कर्ण असो. एवढें कशाला? तुझी सर्व पाहिजे असल्यास स्वस्थ बसा. मी एकटा शत्रूंना मारून सर्व पृथ्वी तुमच्या स्वाधीन करतों.' ही त्याची गर्वोक्ति ऐकून कृष्णयुधिष्ठिरांकडे पाहून किंचित् हासून अर्जुन म्हणाला, 'कौरव कुलांत माझा जन्म झाला असून पांडूंचा मी बचा आहें. तसाच मी आपल्याला द्रोणशिष्य म्हणवून घेत असतों व श्रीकृष्णासारख्याचें मला साहाय्य आहे. तेव्हां मी घाबरल्याची तुला शंका तरी कशी आली? आजपर्यंत या एकट्या बहाद्दरानें जे जे पराक्रम केले आहेत ते तुला ठाऊक नाहींत वाटतें? ज्यानें अनेक देवांना तोषविलें आहे तो हा बहाद्दर हातांत गांडिव, तसेच अक्षय्य बाण व दिव्यास्त्रें आहेत तोंपर्यंत प्रत्यक्ष इंद्राशीं सुद्धां दोन हात करण्याला डगणार नाहीं; म्हणून सांगतों कीं मी घाबरलों नाहीं व मला कोणाच्या साहाय्याचीही अपेक्षा नाहीं. वाटेल तर आमच्या बाजूला रहा, नाहीं तर कौरवांकडे जा.' हें अर्जुनाचें तुच्छ भाषण ऐकून रुक्मि आपलें सैन्य परतवून त्याचपायीं-दुर्योधनाकडे गेला, व तिकडेही त्याच्या गर्वोक्तीबद्दल मानी दुर्योधनाकडून तशीच संभावना झाल्यानें त्याला या भारतयुद्धापासून अलग रहावें

लागलें. याप्रमाणें या महायुद्धापासून बलराम व रुक्मि हे दोघेच काय ते निराळे होते.

इकडे धृतराष्ट्राला ह्या सर्व तयारीसंबंधानें दुःख होऊन तो संजयाला ह्मणाला, 'या युद्धांत सर्व नाश होणार हें कळत असून ज्या अर्थी या खोडसाळ मुलाला आवरून मला आपलें हित करून घेतां येत नाहीं त्या अर्थी मनुष्याची धडपड व्यर्थ असून दैवच बलवत्तर आहे असें ह्मणावें लागतें. पुढचा परिणाम कळत असून सुद्धां दुर्योधनाची गांठ पडल्याबरोबर मी लुला पडतों. असो, रणांत मरणें हेंही कांहीं बाईट नाहीं!' संजय ह्मणाला, 'आपण ह्मणतां तें ठीकच आहे. परंतु सर्वच दोष दुर्योधनावर ढकलून देणें मात्र ठीक नाहीं. आपल्या दोषामुळें संकट गुदरल्यावर मग कालावर किंवा दैवावर दोष ढकलीत बसण्यांत अर्थ नाहीं. जो दुसऱ्यांशीं निंद्य आचरण ठेवतो त्याचा त्यांच्याकडून नाश व्हावा हा ह्या जगाचा व्यवहार आहे. आपल्या मुलांचें कपटाचें वर्तन पांडवांनीं आपल्याकडे पाहून विमुटपणें सोसलें. हा घडून येणारा अनिवार्य घोर प्रसंग लक्षांत आणतां बऱ्याबाईट कर्मांचें कर्तृत्व मनुष्याकडे नसून कळसूत्री बाहुलीप्रमाणें पराधीनतेनें त्याकडून ह्या गोष्टी घडून येत असतात असेंच ह्मणावें लागतें. कोणी ईश्वराच्याच प्रेरणेनें, कोणी इच्छेच्या प्रेरणेनें व कोणी पूर्वकर्मप्रमाणें आपल्या हातून कृत्यें घडून येतात ह्मणतात.

१४५ उलूकसंदेश व प्रतिसंदेश.

(उ. १६०-६४)

याप्रमाणें कौरवपांडव कुरुक्षेत्रांत तळ देऊन राहिल्यावर दुर्योधनानें राजांचा यथायोग्य सन्मान करून सैन्याच्या तुकड्यांची योग्य व्यवस्था लावल्यावर उलूकाला एकांतांत बोलावून तो त्याला ह्मणाला, 'उलूका, पांडवांना जाऊन सांग कीं, 'आज अनेक वर्षे विचारांत असलेला पांडवकौरवांचा घोर युद्धप्रसंग येऊन ठेपला. श्रीकृष्णाच्या जोरावर उड्या मारणाऱ्या तुमच्या निरोप जो संजयानें सांगितला ती वेळ आली आहे. तेव्हां पूर्वी प्रतिज्ञा केल्याप्रमाणें आतां सर्व उरकून घ्या.' त्या युधिष्ठिराला विचार कीं, 'आजपर्यंत मोठ्या धर्मनिष्ठपणाचा दंभ माजवून आज ही अधर्माकडे प्रवृत्ति कां? नीचाप्रमाणें सर्वांच्या नाशाकडे अशी कशी बुद्धि वळली? गुप्त रीतीनें पातकें करून जाहेरून धार्मिकपणाचा ध्वज फडकावणाराला वैडालव्रती ह्मणतात. एक दुष्ट मांजर गंगातीरीं हात वर करून प्राण्यांचा विश्वास बसण्यासाठीं कांहीं हातपाय न हालवितां मी धर्माचरण करीत आहें असें सर्वांना सांगत स्वस्थ असे. कांहीं काल लोटल्यावर पक्ष्यांचा त्यावर विश्वास बसला, व त्याजवळ जाऊन ते त्याची स्तुति करूं लागले. पक्ष्यांना गट करूं पाहणाऱ्या या बोकोबांना सर्वांकडून याप्रमाणें मान मिळूं लागल्यावर त्याला आपलें काम झालेंसें वाटूं लागलें. याप्रमाणें कांहीं दिवस लोटल्यावर त्या ठिकाणीं कांहीं उंदीर आले असतां तो व्रताचरण करून राहिलेला धार्मिक बोका त्यांच्या दृष्टीस पडला. त्या दांभिकाला पाहून त्यांच्या मनांत आलें कीं, आपल्याला पुष्कळ शत्रू असल्यानें हा आपल्याला बरा मामा भेटला? आपल्यांतील लहान व ह्यातारे ह्यांची हा काळजी घेईल. ह्मणून त्याजवळ जाऊन ते ह्मणाले, 'आपल्या प्रसादानें आह्मी सुखांत राहूं इच्छितों. आह्मांला आधार आपलाच आहे. तेव्हां सदा धर्मनिष्ठ आपण आमचा सांभाळ करा.' तेव्हां त्या बोक्यानें त्यांचें तें ह्मणणें परोपकारार्थ मोठ्या मिनतवारीनें कबूल करतोंसें दाखवून तपानें आपल्याला कशता आली असल्यानें दररोज त्यांपैकीं एकानें आपल्याला स्नानासाठीं नदीतीरीं घेऊन जावें असें ठरविलें. उंदरांनीं तें त्याचें ह्मणणें कबूल करून सर्व ह्यातारेकोतारे त्यांनीं त्याच्या स्वाधीन केले. तेव्हां तो दुरात्मा त्यांना गट्ट करूं लागल्यामुळें लठ्ठ फुगूं लागला व त्याच्या अंगावर तेज चढत चाललें व शिराविरा बळकट झाल्या. इकडे उंदरांची संख्या मात्र दिवसानुदिवस कमी होत चालल्यामुळें सर्व उंदीर एकत्र जमून विचार करूं लागले कीं, आपला मामा रोजच्या रोज फुगत चालला असून आपली संख्या रोडावत चालली आहे. तेव्हां डिंडिभ नांवाचा एक शहाणा उंदीर ह्मणाला, 'तुह्मी सर्व जमून नदीतीराला जा, मी मामाला घेऊन तुमच्या मागून

येतों.' वरें ह्मणून सर्वांनीं त्याप्रमाणें केलें. इकडे बोकोबाला तें कपट ठाऊक नसल्यानें त्यानें त्या डिंडिमाला खाऊन टाकलें. नंतर बाकीचे सर्व विचार करूं लागले असतां त्यांमधला कोणी वृद्ध कोलिक नांवाचा उंदीर ह्मणाला, 'ह्या आपल्या मामाची धर्माकडे खरोखर प्रवृत्ति नसून हें केवळ त्याचें ढोंग आहे. कारण फलमूलांवर राहणाराच्या विष्ठेंत केस कधीं नसतात. तसाच हा सतत फुगतही चालला आहे, व अलीकडे सात आठ दिवस डिंडिमही दिसत नाहीं.' असा विचार करून सर्व उंदरांनीं पळ काढला. बोकोबाही निजधामाला परत गेले. याप्रमाणें तूंही बैडालव्रत धरलें असून त्या बोक्याचें उंदरांशीं जसें वर्तन होतें तसा तूं ज्ञातीशीं वागत आहेस. तुंझ्या बोलण्यांत व कृतींत मेळ मुळीं नाहीं. तूं पढलेले वेद व धारण केलेली शांति केवळ लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्यासाठीं आहेत. तेव्हां आतां तरी हें पांघरूण फेकून देऊन उघडपणें क्षत्रधर्माला जागून जें कांहीं करावयाचें असेल तें कर, आपल्या मनगटाच्या जोरावर ही पृथ्वी जिंकून ब्राह्मणांना व पितरांना यथोचित तृप्त कर. आईच्या हितांत इतका दक्ष आहेस तो तूं आजं अनेक वर्षं क्लेश सोशीत असलेल्या तिचे अश्रु रणांत जय मिळवून पुसून काढ व तिची प्रतिष्ठा वाढीव. तुह्मीं मोठ्या गरिबीनें पांच गांवें मागितलीं; परंतु तुह्मांला राग येऊन आमचे तुमचे दोन हात होण्यासाठीं तीं सुद्धां मीं नाकारलीं. तुझ्याकरितां आमच्याशीं दुष्टत्वानें वागणाऱ्या विदुरांनाही आह्मीं घालवून दिलें व लाक्षागृहाला आग लाविली. तेव्हां त्या सर्व गोष्टींची आठवण ठेवून मर्द हो. सभेंत हांसत हांसत कृष्णानें जो तुझ्या पतीनें 'आह्मी सख्य करण्यालाही तयार आहों, तसेंच युद्धालाही तयार आहों' ह्मणून निरोप सांगितला, त्या युद्धाची वेळ आली आहे आणि तेवढ्यासाठींच तर मीं हें सारें केलें आहे. क्षत्रियाला युद्धाहून आणखी लाभ तो काय पाहिजे? शिवाय तुझा क्षत्रियकुलांत जन्म असून लौकिक मिळविला आहेस, व द्रोण व कृप यांपासून सर्व अस्त्रें शिकला आहेस. आपण दोघे एकाच कुलांत जन्मलों असून आपलें बलाबल सारखें असतां आपणसी तुला कृष्णाचा आश्रय आहे.' त्या कृष्णाला सांग कीं, 'स्वतःचें तसेंच पांडवांचें नांव राखण्यासाठीं नीट कंबर बांधून माझ्यापुढें उभा रहा. सभेमध्यें बहुरूप्याचें सोंग आणलें होतेंस तेंच सोंग घेऊन अर्जुनाला घेऊन माझ्यावर चालून ये. इंद्रजाल, माया, गारुड्याचें खेळ हे कधीं कधीं लोकांना भिवडावतात खरे, परंतु शस्त्र घेऊन रणांत उभे राहिलेल्या लोकांना ह्या गोष्टी विशेष खबळाविण्यालाच कारण होतात. आह्मांलाही मायेनें आकाशांत किंवा अंतरिक्षांत उडतां येत असून रसातलामध्यें किंवा इंद्रलोकीं जातां येतें; तसेंच आह्मांलाही बहुरूपीपणा धरतां येतो. परंतु या प्रकारानीं कधीं कार्यसिद्धि होत नसते. तो जगन्नियंताच स्वेच्छेनें सर्वांना आपल्या स्वाधीन ठेवीत असतो. 'युद्धांत धृतराष्ट्रपुत्रांना मारून उज्ज्वल राज्य युधिष्ठिराला देईन,' अशी जी तुझी फार बडबड चालली असते ती खरी करून दाखीव व पांडवांसाठीं तरी पराक्रम रड. रणांत आह्मांला तुझा पराक्रम पाहूं दे. जो शत्रूला पूर्ण ओळखून केवळ मणगटाच्या जोरावर त्याला रडवितो त्याच्याच जगण्यांत अर्थ आहे. बडविलेल्या शिंगाड्या बैलाप्रमाणें ज्ञातिमध्यें तुझें फुकट स्तोम माजलें आहे. तुझ्यासारख्या कंसाच्या गुलामाबरोबर युद्धाला उभें राहणें मला शोभत नाहीं.' त्या अक्षरशून्य पायलीभर खाणाऱ्या मुसरु देखील न फुटलेल्या भीम पोराला सांग कीं, 'विराट नगरांत तुला जें आचारी बनावें लागलें तो ह्या बहादराचाच पराक्रम. पूर्वी सभेंत दुःशासनाचें रक्त पिईन ह्मणून जी प्रतिज्ञा केलीस ती वायफळ नसून अंगांत ताकद असेल तर तें पी. रणांत दुर्योधनाला एका झपाट्यासरशीं मारीन ह्मणून जी वल्गना केलीस ती वेळ आली आहे. खाण्यापिण्याच्या कामांत तेवढा पहिला नंबर पटकावशील, पण युद्ध व सर्व भक्ष्यामि यांमध्यें महदंतर आहे. तेव्हां आतां वीराप्रमाणें सामना देऊन ती सभेंतील बडबड कशी खरी करतोस तें पाहूं.' त्या नकुलसहदेवांनाही 'सर्व युधिष्ठिरावरचें तुमचें प्रेम, माझ्यासंबंधाचा द्वेष व द्रौपदीला सोसावे लागलेले हाल ह्या सर्वांची योग्य आठवण ठेवून नं कचरतां युद्ध करा,' ह्मणून सांग. तसेंच त्यां विराटपुत्रांना सांग कीं,

'ब्रह्मदेवानें सृष्टि निर्माण केल्यापासून गुणवान सेवकांना असे धनी व धन्यांनाही असे सेवक मिळाले नाहींत; मी राजा कुचकामी आहें असें तुह्मांला वाटत आहे. तेव्हां आतां तुह्मी व पांडव मिळून आह्मांला मारण्याला झटा.' तसेंच त्या धृष्टद्युम्नाला सांग कीं, 'आतां संधि आली आहे ती तूं साधून घे. रणांत द्रोणांची गांठ पडल्यावर आपलें खरें हित काय हें तुला कळून येईल. पार्थाच्या वतीनें युद्ध करून मनांत योजलेलें घोर कर्म उरकून घे.' तसेंच त्या शिखंडीला सांग कीं, 'स्त्री ह्मणून भीष्म तुला मारणार नाहींत. तेव्हां बिनदिक्कत युद्ध करून नांव मिळीव.' शेवटीं हासून तो उलूकाला ह्मणाला, 'उलूका, वासुदेवासमक्ष त्या धनंजयाला सांग कीं, 'आमचा पराभव करून ह्या पृथ्वीवर आपला अंमल गाजीव. नाहीं तर आमच्या हातून मार खाऊन कायमचा विसावा तरी मिळीव. राष्ट्रांतून घालवून दिल्याचें दुःख, वनवास, द्रौपदीचे सोहाळे या सर्वांची नीट आठवण बाळगून मर्द हो. क्षत्रियस्त्री ज्यासाठीं प्रसवते तें सर्व आतां जुळून आलें आहे. बल, वीर्य, उत्कृष्ट अस्त्रलाघव व पराक्रम युद्धांत दाखवून संताप शमवून घे. ऐश्वर्याला मुकून फार दिवसपर्यंत क्लेश सोसावे लागल्यानें कोण खवळून जाणार नाहीं? व परद्रव्याचा अभिलाष न धरणाऱ्या कोणा कुलीन शूराचा राग हातांत आलेल्या राज्याला मुकल्यानें पेट घेणार नाहीं? आजपर्यंत जी मोठमोठी वल्गना केलीस ती सारी आतां कृतीनें खरी करून दाखीव. हातानें कांहीं न करतां उगीच फुशारक्या मारणाराला शहाणे नीच समजतात. तुमचें राज्यच नव्हे तर तुमचें जीवित सुद्धां शत्रूच्या तावडींत गेलें आहे. तर त्यांना वर काढ. द्यूतांत तुह्मांला जिंकलें आहे! द्रौपदीला सभेंत आणविली! तेव्हां पुरुष ह्मणविणाराला राग यावा हें ठीकच आहे. पूर्ण बारा वर्षेपर्यंत घराला मुकवून तुह्मांला वनाला हाकलून लाविलें व एक वर्षभर विराटाची गुलमगिरी करावयाला लावलें. तेव्हां या सर्वांची आठवण तुला खास बुजणार नाहीं. याप्रमाणें तुला त्रास देणाराबर खरा मर्द असशील तर आग पाखड. शस्त्रांची पूजा वगैरे नुकतीच उरकली आहे. कुरुक्षेत्रही वाळून खणखणीत झालें आहे. तुझे योद्धे व घोडे खाऊन पिऊन मस्त असले पाहिजेत, तेव्हां उगा युद्धाला सुरवात कर. भीष्मांची रणांत गांठ पडण्यापूर्वीच गंधमादन चढूं इच्छिणाऱ्या मूढाप्रमाणें उगीच बडबड कशाला चालाविली आहेस? कोणाला हार न जाणारा कर्ण, बलवानांमध्यें श्रेष्ठ शल्य, इंद्राचे तोडीचे द्रोण, यांना जिंकल्याशिवाय तुला राज्य कसचें मिळणार? आचार्य ब्राह्म व क्षात्र असे दोन्ही धर्म पूर्ण जाणत आहेत. रणांत पुढाकार घेऊन कशाही प्रसंगाला डगमगून रणांतून हे माघार घेणारे नव्हत. ह्या महातेजस्वी आचार्यांचा पराभव करण्याचें तुझ्यासारख्यानें मनांत आणणें मूर्खपणा होय. वाऱ्यानें कधीं मेरु पर्वत उपटून काढला आहे काय? तुझ्या मनाप्रमाणें घडून येईल तर मग वाऱ्यानें मेरूला कां उडवून देऊं नये? किंवा आकाश पृथ्वीवर कां कोसळून पडूं नये? यांच्यापुढें कोण जिवंत सुटणार? ज्यावर भीष्मद्रोणांची वक्रदृष्टि होऊन यांच्या शस्त्रांचा घाव बसेल तो मग रणांतून जिवंत परतण्याची आशा कशाला? त्याचप्रमाणें देवसेनेप्रमाणें पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण अशा चारी दिशांच्या राजांनीं सुरक्षित अशा ह्या माझ्या सैन्याची कूपमंडूकाप्रमाणें तुला अद्यापि नीट ओळख पटली नाहीं. अफाट फुगलेल्या गंगेच्या जोराचा प्रवाह ज्याप्रमाणें पैलपार जाण्यास कठीण तशाप्रकारच्या ह्या माझ्या प्रचंड सैन्याच्या ओघामध्यें सुस्थ असलेल्या माझ्याबरोबर युद्ध करण्याचें तूं मनांत आणीत आहेस! तुझ्या अक्षय्य भात्याचा, अग्नीनें दिलेल्या रथाचा व दिव्य ध्वजाचा प्रभाव मी पाहून घेईन. मनोरथसिद्धि बडबडीनें होत नसून त्याला दोन हात करावे लागतात. नुसत्या बडबडीनें जर मनोरथ शेवटास जाऊं लागले तर निराशा हा शब्दच जगांत उरला नसता. कारण बडबडतां कोणाला येत नाहीं? तुझ्या सहाय्याला कृष्ण आहे, तुझें गांडीव ताडाएवढें आहे, व तूं पहिल्याप्रतीचा योद्धा आहेस, ह्या सर्व गोष्टी जाणत असून मीं तुझें राज्य बळकाविलें आहे, तुला रडत बसावयाला लावून तेरा वर्षे मीं राज्याचा उदभोग घेतला व पुढेही तुला व तुझ्या बांधवांना मारून राज्य करीन. तुला द्यूतांत जिंकून जेव्हां गुलाम केला त्यावेळीं तुझें गांडिव

कुठें गेलें होतें, किंवा भीमाचें बल तरी कुठें गेलें होतें, ह्मणून त्यावेळीं शुद्धशील द्रौपदीशिवाय गदाधारी भीमाच्या अगर गांडिवधारी अर्जुनाच्या हातून तुह्मां पांडवांची सुटका झाली नाहीं! तेव्हां नीचांना उचित अशी गुलामगिरी पतकरलेल्या तुह्मांला मीं 'षंढतिल' ह्मणून ह्मटलें तें काय खोटें? विराटनगरांत तुला बुचडा ठेवावा लागला व त्याच्या मुदपाकांत भीमाला मेव्याकुटीला येईपर्यंत सैयपाक्याचें काम करावें लागलें. त्या साऱ्याला कारण या बहाद्दरांचून दुसरा कोणी नाहीं समजलास? क्षत्रियांनीं क्षत्रियांवर आजपर्यंत असाच दंडुका धरला आहे. षंढवेषांत बुचडा बांधून मुलींना नाचायला नाचावयाला शिकवीत बस. वासुदेवाच्या किंवा तुह्या भीतीनें मी कधीं राज्य सोडणार नाहीं. हजारों वासुदेव येवोत किंवा शेंकडों फाल्गुन येवोत, ज्याचा एकही बाण फुकट जाणार नाहीं अशा माझ्यापुढें आल्यावर ते दशदिशेलाच पळ काढतील. भीष्मांपुढें युद्धाला उभा राहिलास ह्मणजे तें तुला डोक्यानें पर्वत फोडणें किंवा मनगटाच्या जोरावर अगाध समुद्र तरून जाणें यासारखें कठीण जाणार आहे. कृप, शल व शल्य हेच ज्यांतील मोठे मासे, विविंशति, सुषेण व चित्रायुध हेच विक्राळ साप व सुसरी, बृहद्बल प्रचंड भरती, सोमदत्ती तिमिंगल, युयुत्सु व दुर्मर्षण पाणी, भगदत्त ज्यावरील वावटळ, भीष्म वेग, श्रुतायु व हार्दिक्य यांच्या योगानें जो तुफान झाला आहे, द्रोणरूप मगरानें ज्यांत शिरकाव होणें कठीण, कर्ण व शल्य ज्यांतील भोंवरे, कांबोज ज्यांतील वडवानल, जयद्रथ ज्यांतील पर्वत, पुष्पमित्राच्या योगानें जो गंभीर, व शकुनि हाच ज्यांतील दग्याफटक्याची जागा व शस्त्ररूपी ओघानें नेहमीं वाढणारा अशा कौरवसेनारूपी समुद्रांत शिरल्यावर थकून वेडा बनून आपले सर्व बांधव मेलेले पाहशील तेव्हां मग तुला ह्या गोष्टीबद्दल वाईट वाटेल, व पापी मनुष्याचें मन ज्याप्रमाणें स्वर्गापासून माघार घेतें त्याप्रमाणें तुला मग राज्य नकोसें वाटूं लागेल. तप ज्याला ठाऊक नाहीं अशाला स्वर्गाची इच्छा असून तो जसा त्याला मिळत नाहीं तसें तुला राज्य मिळणें अशक्य आहे.'

याप्रमाणें निरोप घेऊन उलूक पांडवांच्या गोटांत आला व सर्व पांडव एकत्र जमले असतां त्यांमध्यें त्यानें तो निरोप शब्दशः त्यांना कळविला. त्या वेळीं उलूकाचें तें कर्णकटु भाषण ऐकून अर्जुन अगदीं संतापून जाऊन कपाळ पुसूं लागला. अर्जुनाच्या त्या वेळच्या स्वरूपाकडे कोणाच्यानें पहावेना देखील. अर्जुनाची व श्रीकृष्णाची तीं निंदा ऐकून सारे रागानें संतापून आपापल्या जाग्यावरून एकदम उठले. रागानें सर्वांचे डोळे लाल झाले. रक्तचंदन चोपडलेले अंगदादि भूषणांनीं विभूषित आपले हात पुढें करून ओठ चावून ते दांत करकरां खाऊं लागले. त्यांची मुद्रा व आशय ओळखून दांत करकरां वाजवीत व हात चोळीत भीम संतापानें उलूकाला ह्मणाला, 'आह्मांला दुबळे समजून चेव आणण्यासाठीं दुर्योधनानें हा तुझ्याबरोबर निरोप पाठविला आहे. ठीक आहे. आतां सर्व राजांसमक्ष मी सांगतों तें त्या हट्टी दुर्योधनाला जाऊन कळीव. वडील भावाच्या इच्छेबाहेर जावयाचें नाहीं या संकल्पामुळें आह्मी आजपर्यंत जो कांहीं तुझा दुष्टपणा सोसून घेतला तें तूं आपलें भाग्यच समजावयाला पाहिजें होतेंस. कुलाचा नाश होऊं नये ह्मणून विचारी धर्मराजांनीं सख्य जुळविण्यासाठीं केशवालाही तुह्मांकडे पाठविलें. परंतु कालानेंच बुद्धि दिल्यामुळें तूं यमसदनाला जाऊं इच्छीत आहेस. ठीक आहे. उद्यां युद्धाला तयार हो. मीं जी प्रतिज्ञा केली आहे ती निःसंशय खरी करीन याबद्दल तुला मुळीं काळजी नको. समुद्र आपली मर्यादा सोडील, पर्वताचे तुकडे तुकडे होतील, पण माझी प्रतिज्ञा कधीं खोटी होणार नाहीं. तुझ्या साहाय्याला स्वर्गातून देव जरी उतरले तरी पांडव आपली प्रतिज्ञा खरी केल्याशिवाय सोडणार नाहींत. तुला हस्तिनापुरांत राहण्याची पाळी येते कीं गिधाडांच्या पोटांत राहण्याची येते पहा. मी दुःशासनाचें रक्त मनमुराद पिणार व तुझी मांडी फोडून तुझ्या डोक्यावर प्राय देणार. भीष्मांना पुढें करून जरी कोणी माझ्याबरोबर युद्धाला उठला तरी त्याला यमसदनाला पाठविल्याशिवाय मी सोडणार नाहीं. तूं निरोप पाठविला आहेस त्यापैकीं कांहीं एक केल्या-

वांचून बाकी ठेवणार नाहीं बरे!' यावर सहदेवही संतापून वीराला शोभेलशा शब्दांनीं ह्मणाला, 'धृतराष्ट्राचा व तुझा मुळीं संबंध नसतां तर कौरवांवर आज हा प्रसंग कधीं गुदरला नसता. धृतराष्ट्रकुलाचा व त्याबरोबर जगाचा फडशा पाडण्यालाच तूं कुलघाती दुष्ट निपजला आहेस. आजन्म तुझी आमच्या वाईटावर बसलीं आहां, परंतु त्या सर्वांचा आतां मी शेवटचा निकाल लावून टाकतों. शकुनीच्या समक्ष आधीं तुला मारून मग त्याचा मी शेवट लावीन.' या दोघांचें भाषण ऐकून अर्जुन हासत हासत ह्मणाला, 'भीमा, तुझ्याशीं ज्यांचें वैर जुळलें ते जगाला मुकल्यामारखेच मी समजतों. ते घरांमध्यें आपल्याला जरी सुरक्षित समजत असले तरी यमपाश त्यांच्या गळ्यांत आधींच जाऊन पडला आहे. वीरहो, दुर्योधनाचें चीड आणणारे, विशेषेंकरून माझ्या व कृष्णासंबंधाचें निंदात्मक भाषण तुह्मीं ऐकलेंच आहे. तुह्मी आमच्यासाठीं कंबरा बांधून तयारच आहां; आणि ह्मणूनच कृष्णाच्या व तुमच्या जोरावर मी दुर्योधनाला हा निरोप पाठवितों.', असे ह्मणून 'उद्यां तुझ्या निरोपाचें उत्तर गांडिवाच्याच वाटें मिळून मी षंढ कां कोण तुला कळून येईल,' असा निरोप दुर्योधनाला सांगण्याला सांगून तो ह्मणाला, 'अरे, जो आपल्या मनगटाच्या जोरावर शत्रूला आमंत्रण देऊन न कचरतां त्याबरोबर युद्ध करतो तोच मर्द. जो दुसऱ्याच्या जिवावर गरजतो त्या वीर्यहीन क्षत्रियाधमाला नीचच समजलें पाहिजे. तेव्हां स्वतः तूं दुसऱ्या कोटींतला असून दुसऱ्याच्या जोरावर तिसऱ्याला टाकून बोलतो आहेस. कारण आज जिव्हाळ्याचे, मनोनिग्रही, मोठे शहाणे अशा सर्व राजांमध्यें वृद्ध त्या बापड्या भीष्मांना मरणाची दीक्षा देऊन तूं ह्या फुशारक्या चालविल्या आहेस. हे कुलकलंक्या, तुझा भाव आह्मीं ओळखला. द्येनें पांडव भीष्मांना मारणार नाहींत व त्यांच्या जिवावर वाटेल तशा आपल्याला उड्या मारतां येतील या घमेंडींत तू आहेस. परंतु मी खास सांगतों कीं, ज्यांच्या आधारांवर तुझ्या ह्या उड्या चालल्या आहेत त्या भीष्मांनाच अगदीं आधीं मी मारीन. तुझ्या हुकुमाप्रमाणें उद्यां भल्या सकाळीं युद्ध सुरू करून संजय व शाल्वेय सैन्याचा खुद्द मी फडशा पाडीन. हें काम मीं आपल्या शिरावर घेतलें आहे. द्रोणांवांचून सर्व जगाचा मी एकटा फडशा पाडीन. 'तुझा पांडवांपासून भीति बिलकुल नको' असें भीष्म बोलल्याबरोबर राज्य आपल्या हातीं येऊन पांडव धुळीला मिळाले असें तुला वाटूं लागलें आहे! गर्वानें आंधळा होऊन स्वतःवर तूं केवढा अनर्थ ओढवून घेत आहेस हें तुला अद्यापि कळत नाहीं. ह्मणून सूर्योदय झाल्याबरोबर तुझ्या देखत प्रथम मी त्या भीष्मांनाच मारतों. त्यांना रथाखालीं आणून बाणांनीं झांकून काढलेले पहाशील तेव्हां ह्या फुशारकीचें महत्त्व तुला कळून येईल. कोत्या बुद्धीचा, धर्मलंड, नेहमीं वैर बांधून राहणारा अशा दुष्ट दुःशासनासंबंधानें भीमानें जी सभेंत प्रतिज्ञा केली आहे ती उद्यां खरी ठरलेली तुला दिसून येईल. हे नराधमा, अहंपणा, गर्व, राग, मर्मभेदक भाषण, निष्ठुरपणा, बढाई, उद्धटपणा, मीपणा, क्रूरपणा, तिखटपणा, धर्मद्वेष, अधर्म, दुसऱ्याला तुच्छ करणें, वृद्धांचें न ऐकणें, वांकडी दृष्टि व अशाच प्रकारचे अनेक अपराध यांचें घोर प्रायश्चित्त तुला लवकरच भोगावें लागेल. ज्या मला कृष्ण माहाऱ्याला आहे तो मी खवळलों असतां मग तूं प्राणाची आशा ठेवूं नकोस. भीष्मद्रोण गार पडून कर्णानें हें जग सोडल्यावर मग तुला प्राण, राज्य, व पुत्र या सर्वांसंबंधानें निराशा वाटूं लागेल. तुझे भाऊ व मुलगे यांचा भीमानें फडशा पाडल्यावर मग आपल्या दुष्कृत्यांची तुला आठवण होईल. माझा शब्द फिरल्याचें मला कधींच आठवत नाहीं. तेव्हां मी जें कांहीं ह्मणतों हें सारें खरें होणार.' नंतर सापासारखे सुस्कारे टाकीत व कृष्णांकडे पहात युधिष्ठिर ह्मणाला, 'उलूका, आमच्याशीं नेहमीं वैरानें व वांकडेपणानें वागणाऱ्या त्या कृतघ्न मूढाला कळीव कीं, 'दुबळ्याप्रमाणें दुसऱ्याच्या जोरावर एखाद्याला युद्धाला बोलावण्यांत काय अर्थ आहे व सगळ्यांना मान्य अशा वृद्धांना पुढें करून लढण्यांत तरी काय अर्थ आहे? क्षत्रिय होऊन आपल्या व आपल्या सेवकांच्या जोरावर युद्धाला तयार हो! स्वतःच्या अंगांत कांहीं सामर्थ्य नसून

ही गर्जना केवढी चालविली आहेस ? आपल्यावरून जगाची परीक्षा करणें ठीक नव्हे. न्यायान्यायामधला भेद मला कळतो. किडेमुंग्यांना सुद्धां दुखविण्याची माझी इच्छा नाहीं. मग जातीचा नाश व्हावा अशी कशी असणार ? आणि पांच गांवें मागण्यांत तरी माझा हेतु हाच. तुझ्यावर मोठें संकट गुदरल्याचें पाहण्याची पाळी कशी टळणार या विवंचनेंत मी आहें तों तूं मदांध होऊन मूर्खासारखा मला चिडवूं लागला आहेस ! भगवानाचें हिताचें भाषणसुद्धां तुला पटेनासें झालें आहे. आतां उगीच फार बोलण्यांत तरी काय अर्थ ? आपल्या सर्व इष्टमित्रांसह पुढील कार्याला तयार हो. तुझा निरोप कळला, त्यांतील उद्देशही लक्षांत आला. सर्व कांहीं तुझ्या मनाप्रमाणें घडून येईल. '

' आह्मी भल्याचे दास होण्यास नेहमीं मनापासून इच्छितों, आह्मी गुलाम असूं किंवा कोणी असूं त्याचें तुला काय करावयाचें आहे ? ' कोणाचा किती पराक्रम आहे हें लवकरच दिसून येईल,' असा निरोप विराटद्रुपदांनीं, ' भीष्मांना मारण्यासाठींच माझा जन्म असल्यानें मी त्यांना खात्रीनें मारीन, ' असा शिखंडीनें, व ' द्रोणासाठींच मी जन्मलों असल्यानें त्यांचा माझ्याहातूनच शेवट लागणार, ' असा धृष्टद्युम्नानें दुर्योधनाला निरोप कळविण्यास सांगितलें. याप्रमाणें सर्वांचे निरोप झाल्यावर भगवान ह्मणाला, ' माझाही त्याला लहानसा निरोप कळीव कीं, ' उद्यां या वेळीं पुरुषाप्रमाणें युद्धाला तयार हो. अर्जुनानें केवळ सारथ्य करण्यासाठीं मागून घेतल्यामुळें हा कांहीं युद्ध करणार नाहीं या समजुतीवर तूं निर्भय आहेस. पण एक पळभर देखील या विचाराला मनांत थारा देऊं नकोस. मी खवळलों असतां अग्नी ज्याप्रमाणें गवताला त्याप्रमाणें सर्व राजांना मी जाळून टाकीन. युधिष्ठिराच्या आज्ञेनें अर्जुन युद्ध करीत असतां त्याचें मी सारथ्य करीन. जरी तूं तिन्ही लोक उडून वर गेलास किंवा पातालांत शिरलास तरी त्या त्या ठिकाणीं उद्यां सकाळीं तुला अर्जुनाचा रथ दिसूं लागेल. दुःशासनाचें रक्त पिईन हें भीमाचें भाषण जें तू वायफळ समजतोस तें रक्त तो प्याला आहे असें समज. पांडवांपैकीं कोणीच तुझी खातर बाळगीत नाहींत.' शेवटीं ' ज्ञातीचा नाश होऊं नये असें माझ्या मनापासून आहे, परंतु तुझ्यामुळें हें सर्व आतां न मागतां वाढून येणार आहे,' असा निरोप सांगून युधिष्ठिरानें उलूकाला निरोप दिला. उलूकानें परत येऊन त्यांचा निरोप अक्षरशः दुर्योधनाला कळविला. तेव्हां उजाडण्यापूर्वी सर्व सैन्याची तयारी ठेवण्याम त्याचा हुकूम होतांच कोणी उंटांवरून तर कोणी घोड्यांवरून दूत ती बातमी सर्व सैन्यांमधून देत फिरले.

इकडे युधिष्ठिरानेंही पृथ्वीप्रमाणें न डगणारी प्रचंड चतुरंग सेना धृतद्युम्नाच्या हातासालीं देऊन त्याला निरोप दिला. त्या धृष्टद्युम्नाच्या आज्ञेखालीं कुच करणाऱ्या त्या सैन्याचें संरक्षण भीमार्जुनप्रभृति वीर करीत असल्यानें सागराप्रमाणें ती संथ दिसत होती. धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ युद्धांत कधीं कोणाला हार न जाणारा धृष्टद्युम्न द्रोणांची गांठ घेण्यला उत्सुक होऊन चालला असून त्याच्या मागून ती सेना चालली होती वीरांच्या बलाबलाचा व उत्साहाचा यथायोग्य विचार करून सूतपुत्र कर्णावर अर्जुन, दुर्योधनावर भीम, शल्यावर धृष्टकेतु, कृपाचार्यावर उत्तमौजा, अश्वत्थाम्यावर नकुल, कृतवर्म्यावर शैब्य, जयद्रथावर युयुधान, भीष्मावर शिखंडि, शकुनि, शल व त्रिगर्त यांच्यावर अनुक्रमें सहदेव चेकितान व द्रौपदीचे पांच पुत्र, वृषसेन व दुसरे राजे यांवर अर्जुनाहून कांकणभर जास्त अभिमन्यु, याप्रमाणें निरनिराळ्या टोळीवर निरनिराळ्या योध्यांची योजना करून अग्नीसारख्या तेजस्वी द्रोणांना धृष्टद्युम्नानें स्वतःच्या वांट्याला ठेवून घेतलें; व याप्रमाणें सैन्याची यथायोग्य व्यवस्था लावून ठेवून जयाला आतुर झालेला धृष्टद्युम्न तयार राहिला.

१४६ कर्णप्रतिज्ञा. (९. १६५–१७२)

इकडे भीष्मांना सेनाधिपतित्व मिळाल्यावर दुर्योधनाला संतुष्ट करण्यासाठीं ते त्याला ह्मणाले, ' शक्तिधर सेनानी कार्तिकेयांना नमस्कार करून आज मीं तुझें सेनाधिपतित्व स्वीकारलें आहे. सैन्याची व्यवस्था लावणें, पगारी व स्वयंसेवक शिपायांकडून काम करून घेणें, कुच करणें, शत्रूला तोंड देणें व शत्रूंच्या शस्त्रास्त्रांचा प्रतिकार करणें, इत्यादि

गोष्टी बृहस्पतीप्रमाणें मला ठाऊक आहेत. दैविक, गांधर्व व मानवी सर्व प्रकारच्या व्यूहरचनांची मला पूर्ण माहिती आहे. यांच्या योगानें मी पांडवांना घाबरवून सोडीन. सशास्त्र व मनापासून युद्ध करून तुझ्या सैन्याचें मी उत्तम रक्षण करीन. तूं काळजी करूं नकोस.' दुर्योधन म्हणाला, 'कोणाला हार न जाणारे आपण माझें सेनाधिपत्य स्वीकारून युद्धाची हौस असणारे द्रोणाचार्य माझ्या बाजूनें युद्ध करण्याला असल्यावर मला भीति कसली असणार? आपलें साहाय्य मिळाल्यावर विजयच काय पण देवांचें राज्य सुद्धां दुर्लभ नाहीं. आतां दोन्ही बाजूंला रथी, अतिरथी कोण कोण आहेत हें आपल्या तोंडून सविस्तर ऐकण्याची इच्छा आहे.' भीष्म म्हणाले, 'आपल्या व शत्रूच्या सैन्यांत कोव्यावधि रथी, अतिरथी आहेत, त्यांपैकीं मुख्य मुख्यांचीं नांवें सांगतों ऐक. तूं व तुझे सारे शंभर भाऊ चांगले रथी असून प्रहार करण्यांत, छाटण्यांत, व तुकडे तुकडे उडविण्यांत तुम्ही हुशार आहां. त्याचप्रमाणें रथांत बसण्यांत, हत्तीवर बसण्यांत गदा, प्रास, तरवार व ढाल पेलण्यांत तुमच्या सारखे कोणी नाहीं. शिवाय तुम्ही चांगले सारथी व अस्त्रज्ञ असून कोणत्याही प्रसंगाला डोकें देण्याला योग्य आहां. धनुर्विद्येंत तुम्ही कृप व द्रोण यांचे शिष्य असल्यानें पांचालांचा तुम्ही फडशा पाडाल. मीही पांडवांना न जुमानतां शत्रुसैन्याचा चुराडा उडविण्याला समर्थ आहें. आतां ही आत्मस्तुति होणार. भोजपति कृतवर्म्यापुढें कोणाचें कांहीं चालावयाचें नाहीं. दूरचा नेम अचूक मारणारा असा तो शस्त्रयुद्धांत फार निष्णात आहे. इंद्र ज्याप्रमाणे दानवांचा फडशा पाडतो त्याप्रमाणें तो शत्रुसेनेचा नायनाट उडवील. मद्राधिपति शल्यांना मी अतिरथि समजतों. नेहमीं युद्धप्रसंगांत कृष्णाशीं त्यांची स्पर्धा असते, व आपल्या भाचांना सोडून ते तुझ्या बाजूला मिळाले आहेत. समुद्राच्या लाटांप्रमाणें बाण सोडणारा तुझा सखा अस्त्रज्ञ भूरिश्रवाही उत्तम रथी आहे. सिंधुराज जयद्रथ तर दोन रथ्यांच्या तोडीचा आहे. द्रौपदीचें हरण केलें असतां पांडवांनीं केलेली याची फजीति लक्षांत ठेवून हा त्यांबरोबर निकरानें लढेल, व मुद्दाम यासाठीं त्यानें बरही मिळविला आहे. कंबोजाधिपति सुदक्षिण एक रथी असून रणांत इंद्रासारखा त्याचा पराक्रम दिसून येईल. भराभर घाव देणारी रथिमंडळी त्याजवळ इतकी आहे कीं, टोळधाडाप्रमाणें बराच मोठा प्रदेश त्यांनीं झांकून जाईल. माहिष्मतीचा नीलकवचधारी नीलही एक मोठा रथी आहे. सहदेवाचें तर पांडवांबरोबर पूर्ववैरच आहे. तसेच अवंति नगरचे विंद व अनुविंद हेही श्रेष्ठ रथी असून वीर्यशाली व महापराक्रमी आहेत. आपल्या अस्त्रांनीं शत्रूंना जाळून टाकणारे हे युद्धप्रिय सेनापति रणांत जणूं काय क्रीडाच करीत आहेत, अशा रीतीनें शत्रुसैन्यांत काळाप्रमाणें फिरत असतात. त्रिगर्त देशचे पांच भाऊही उत्तम रथी असून विराट नगरांत पांडवांशीं तसेंच दिग्विजयाचे वेळीं अर्जुनाशीं यांचें वैर पडलें आहे. तेव्हां लाटा उसळत असलेल्या गंगेला जसे मगर उसळून सोडतात तसे हे पांडवांच्या सैन्याला हालबून सोडतील, व त्यांतील बऱ्याच नांवाजलेल्या वीरांचा समाचार घेतील. तुझा कुमार लक्ष्मण व दुःशासनाचा मुलगा, हेही रणांतून पाय मागें घेणारे नव्हत. हे तरुण व सुकुमार आहेत तरी यांच्या अंगांत आवेश फार असून युद्धकला यांना पूर्ण अवगत आहे. हे रथी असून क्षात्रधर्माला जागणारे आहेत. तेव्हां हे मोठा पराक्रम गाजवितील. दंडधार हा एक रथी आहे. त्याचप्रमाणें मोठा आवेशसंपन्न रथिश्रेष्ठ महापराक्रमी कोसलदेशचा बृहद्बल हाही एक रथी मी समजतों. उग्र आयुधें व प्रचंड धनुष्य धारण करणारा हा आप्तीयांना रणांत आनंद देईल. शारद्वत कृप अतिरथी आहेत. हे शरद्वत्पुत्र शरस्तंबापासून उत्पन्न झाले असून कार्तिकेयाप्रमाणें कशाही प्रकारची सेना यांच्यापुढें उभी राहिली तरी प्राणाची देखील पर्वा न धरतां तिच्याबरोबर झुंजून तिला हे जाळून टाकतील. त्याचप्रमाणें तुझा मामा शकुनि हा एक रथी असून पांडवांबरोबर हा मोठ्या त्वेषानें लढेल यांत शंका नाहीं. हा शत्रूवर चाल करून निघाला असतां याची नानाशस्त्रसंपन्न व आवेशयुक्त सेना कधीं हार खाणार नाहीं. सर्व धनुर्धाऱ्यांमध्यें श्रेष्ठ, अस्त्रविद्येंत निपुण द्रोणपुत्र अश्वत्थामा हे एक महारथी असून रणांत हे आश्चर्यजनक युद्ध करतील.

अर्जुनाप्रमाणें यांनीं सोडलेले बाण एकमेकांना भिडून चालले असतात. या रथश्रेष्ठ वीरांची गणना कोणामध्यें करावी हेंच मला कळत नाहीं. यांच्या मनांत येईल तर हे तिन्ही लोकांना जाळून खाक करतील. आश्रमवाश्यांच्या तपोबलानें तेज व त्वेष यांचा हे मूर्तिमान गोळा उत्पन्न झाले आहेत व यांवर द्रोणाचार्यांनीं दिव्यास्त्रांचा पूर्ण अनुग्रह केला आहे. परंतु जिवावर यांची फार भक्ति असून फार दिवस जगण्याची यांना इच्छा आहे व ह्या मोठ्या दोषामुळें यांना रथी किंवा अतिरथी कशांतच गणतां येत नाहीं. बाकी दोन्ही सैन्यांत यांच्या तोडीचा कोणी नसून हे आपल्या रथांत बसून युद्ध करूं लागले असतां प्रत्यक्ष देवांच्या सैन्याचा फडशा उडविण्याला किंवा पर्वत फोडून टाकण्याला समर्थ आहेत. ह्या अतितेजस्वी वीरांच्या अंगीं असंख्य गुण असून हे रणामध्यें कोणाला हार न जातां दंडपाणि यमाप्रमाणें फिरत राहतील. प्रलयकालीन अग्नीप्रमाणें खवळून या घोर युद्धाच्या शेवटीं जो सैन्याचा शेष राहील त्याचा हे फडशा उडवितील. ह्यांचे महातेजस्वी वडील वृद्ध आहेत तरी तरण्यांना ऐकणार नाहींत. त्यांच्या हातून रणांत खात्रीनें अलौकिक काम होणार आहे. यांच्या अस्त्रांच्या वेगरूपी वाऱ्यानें पेट घेतलेला रणांत ठाणें घेतलेला अग्नि सैन्याच्या कक्षरूपी सरपणानें भडकून पांडवसैन्याला जाळून टाकील. हे रथ्यांच्या नायकसमूहांचे अग्रणी अतिरथी तुझ्या हिताचें घोर कर्म करतील. सर्व मूर्धाभिषिक्त राजांचे गुरु हे सर्व सृंजयांचा फडशा पाडतील. पण अर्जुन यांचा आवडता असल्यामुळें त्याच्या गुणांना लुब्ध होऊन गुरुप्रेमामुळें त्या वाटेल तें काम सहज उरकून टाकणाऱ्या पार्थाला मात्र हे कधीं मारणार नाहींत. अर्जुनाच्या गुणांचा ह्यांना मोठा गौरव वाटत असून खुद्द स्वतःच्या मुलापेक्षां त्यावर यांचें प्रेम विशेष आहे. केवळ एका रथाच्या साहाय्यानें सर्व देव, गंधर्व, मानवांना मारण्याला हे समर्थ आहेत. तसेंच तुझ्या नृपश्रेष्ठ पौरवाला मी एक महारथ समजतों. हा शत्रूच्या शूर रथ्यांचा फडशा पाडून अग्नीप्रमाणें पांचालसैन्याला भाजून काढील. प्रसिद्ध राजपुत्र बृहद्बलही एक रथी आहे. त्याचा जो लौकिक झाला आहे तो कांहीं फुकट नाहीं. हा कालासारखा शत्रुसैन्यांत फिरत राहील. नानाविध चिलखतें घातलेले याचे सैनिक नानाप्रकारच्या आयुधांनीं तुझ्या शत्रूचा फडशा उडवितील. कर्णपुत्र वृषसेन पहिल्या नंबरचा रथी आहे. तसाच रणांत प्राणाची पर्वा न करणारा मधुकुलांत जन्मलेला जलसंधही उत्तम रथी आहे. हत्तीवर तसाच रथांत बसण्यांत पटाईत हा महाबाहु शत्रुसैन्याचा नायनाट उडवील. रणांत विलक्षण पराक्रम दाखविणारा हा वीर आपल्या सैन्यासह तुझ्यासाठीं प्राण देईल. रणांतून पाय माघारा न घेणारा हा कालस्वरूपी शूर बाल्हीक अतिरथी आहे. रणांत याला थोपविण्याला कोणी समर्थ नाहीं. रणांत अचाट कृत्य करणारा महारथी सत्यवान एक रथी आहे. रणांत याला थोपविण्याला कोणी समर्थ नाहीं. रणांत अचाट कृत्य करणारा महारथी सत्यवान एक रथी आहे. रण पाहून भीति म्हणून याला मुळीं ठाऊक नाहीं. याच्या रथाच्या टप्यांत आलेल्या शत्रूवर मोठ्या आनंदानें हा तुटून पडत असतो. शत्रूवर पराक्रम गाजविणारा हा तुझ्यासाठीं रणांत भल्यांना साजणारें घोरकर्म करील. पूर्ववैर स्मरून क्रूरकर्म करणारा हा राक्षसराज अलंबुषही एक महारथी आहे. हा मोठें मायायुद्ध करील. प्राग्ज्योतिषाचा प्रतापी भगदत्त हत्तीवरून युद्ध करणारांमध्यें श्रेष्ठ आहे. पूर्वी अर्जुनाबरोबर याचें बरेच दिवस युद्ध झालें असून त्या वेळीं कोणी कोणाला हार गेला नाहीं. शेवटीं इंद्राला मान देऊन यानें त्याशीं सख्य केलें. अचल व वृषक हे शत्रूला कधीं हार न जाणारे दोघे गांधारमुख्य बलशाली भाऊ रथी असून तुझ्या शत्रूंचा ते विध्वंस करून सोडतील. हा रणांत तुटून पडणारा तुला वाट दाखविणारा मंत्री तुझा कलीजा, जो तुझी नेहमीं पांडवांवर उठावणी करून देत असतो, तो हा बढाईखोर निष्ठुर कर्ण नीच, अभिमानी, चढेल व परनिंदक आहे व अंगच्या कवचकुंडलांना आंचवून याला गुरुशाप व ब्रह्मशाप झाले आहेत ह्मणून याला मी रथी तर नाहींच पण अर्धरथीही समजत नाहीं. अहंपणामुळें युद्धांत हा नेहमीं चुका करून पाठ दाखवीत असतो. अर्जुनाची गांठ पडून हा जिवंत सुटण्याची आशा नाहीं.'

या भीष्मांच्या मताला द्रोणांनींही आपली संमति दिल्यावरून कर्ण संतापून डोळे लाल करून चाबकासारखे वाक्प्रहार झोडीत म्हणाला, 'अहो भीष्म, मज गरीबावर आपण केवळ द्वेषभावानें पदोपदीं असें वाग्बाण सोडीत असतां. दुर्योधनाकडे पाहूनच मी तें सारें सोसून घेतों. एखाद्या नीचाप्रमाणें मला मूर्ख समजून मी अर्धरथी सुद्धां नाहीं म्हणून जें आपण आपलें मत ठोकून दिलें त्यामुळें आपल्या खरेपणाचा डंका सर्व जगभर गाजत असल्यानें साऱ्या जगाला हें खरेंच वाटणार आहे. नेहमीं कौरवांचें आपण अहित करीत असून राजाला तें उमगत नाहीं. माझे गुण असह्य वाटून माझा हिरमोड करण्यासाठीं आपण जसे तयार आहां अशा प्रकारचा हिरमोड अचाट कृत्य करण्याला समर्थ अशा आपल्या तोडीच्या राजांमध्यें फूट पाडण्याच्या हेतूनें कोण बरें करण्याला तयार होईल? वयानें, केस पिकल्यानें, पैशानें किंवा पुष्कळ गोतावळ्यामुळें कोण रथी, कोण अतिरथि हें सांगण्याचा कोणाला अधिकार पोहोंचत नसतो, मोठेपणा क्षत्रियांमध्यें बलावर अवलंबून असतो, ब्राह्मणांमध्यें त्यांच्या मंत्रबुद्धीवर अमतो, वैश्यांमध्यें पैशावर व शूद्रामध्यें मात्र वयावर अवलंबून असतो. कामद्वेषांनीं घेरल्यामुळें आपण हा मूर्खपणा करीत आहां. दुर्योधना, नीट विचार कर. या भीष्मांच्या मनांत दुष्टभाव असून ते तुझें बाईट करूं पहात आहेत. परंपरागत सेवकांमधील फूट सुद्धां सांधतां येत नाहीं, मग नानादेशांतील एकत्र जुळलेल्या सैन्यांमध्यें फूट पडेल तर ती कशी जुळून येणार? आतां या युद्धांत योद्ध्यांमध्यें फुटीचें बीं तर रुजलेंच आहे. कारण आतां आमच्या तोंडापुढेंच आमचा हिरमोड होऊं लागला आहे! रथी, अतिरथी, ओळखण्याचें ज्ञान कोणीकडे व हे महद भीष्म कोणीकडे? मी एकटा सर्व पांडवसेनेला बस्स आहें. वाघासमोर आलेल्या बैलाप्रमाणें ज्याचा एकही बाण कधीं वाया जावयाचा नाहीं अशा माझ्यापुढें आल्यावर पांडव, पांचाल, सर्व देशोधडीला पळ काढतील. कोठें युद्ध, कोठें आणीबाणीचा प्रसंग, कोठें सल्लामसलतीचे वेळीं प्रसंगोचित भाषण, कोठें मरूं पडलेले खल्लड व महद भीष्म? सर्व जगापेक्षां आपण श्रेष्ठ असून आपल्या तोडीचा कोणीच नाहीं अशी यांना घमेंड आहे. वृद्धांचें म्हणणें ऐकावें असें वचन आहे खरें. पण फारच वय झालेल्या म्हाताऱ्याचें ऐकून घेण्याला मात्र कोठें शास्त्रांत वचन नाहीं. कारण फार म्हातारपणीं फिरून बाळपण येत असतें असें शास्त्र आहे. सर्व पांडवसेना मी एकटा नाहींशी करीन. पण युद्धाचें यश सर्व सेनाधिपतीला जात असतें, म्हणून भीष्म जिवंत आहेत तोंपर्यंत कशाही प्रसंगीं मी युद्ध करणार नाहीं. यांच्या मागून मला जें करावयाचें तें मी करीन.' हें ऐकून भीष्म म्हणाले, 'ह्या घोर प्रसंगांत सर्व भार माझ्यावर पडणार हें स्वप्न मला कैक दिवस पडलें होतें. ह्या प्रसंगीं आपसांत फूट पाडण्याची माझी बिलकुल इच्छा नाहीं. नाहींपेक्षां ह्या म्हाताऱ्यानें तुझ्या तरण्याबांडाची युद्धाची खुमखुमी केव्हांच जिरविली असती. परशुरामांनीं मोठमोठीं दिव्यास्त्रें सोडलीं तेवेळीं सुद्धां मी मुळीं डगलों नाहीं तों तूं मला काय करणार आहेस? आपल्या पराक्रमाची आपणच फुशारकी मारणें भल्यांना संमत नाहीं. तरी हे नीचकुलाला देखील कलंकभूत कर्णा, तूं मला चिडविल्यामुळें सांगतों कीं, काशिराजाच्या घरीं स्वयंवराच्या वेळीं सर्व पृथ्वीवरील क्षत्रिय जुळले असतां त्यांना जिंकून मी त्या मुलींना घेऊन आलों. दुसऱ्याचें वैर करणाऱ्या तुझ्यामुळें कौरवांवर त्यांच्या नाशासाठीं हा मोठा प्रसंग गुदरला आहे तर पुरुषत्व धरून ज्या पार्थाबरोबर स्पर्धा करीत आहेस त्याबरोबर कटून युद्ध कर. यांतून जिवंत कसा पार पडतोस पाहीन.'

यावर 'तुह्मी दोघेही अचाट कृत्य करून दाखवाल, प्रसंग आणीबाणीचा आहे, तेव्हां माझें कल्याण ज्यानें होईल ती दिशा तुह्मीं दोघांनीं धरली पाहिजे.' असें म्हणून दुर्योधनानें भीष्मांना शांत करून रथी, महारथी यांची माहिती पुढें चालविण्यास त्यांची विनंती केली. तेव्हां भीष्म म्हणाले, 'तुझ्या बाजूचे अतिरथी, रथी, अर्धरथी मीं तुला सांगितले. आतां पांडवांच्या बाजूचे सांगतों ऐक. कुंतिनंदन युधिष्ठिर स्वतः एकरथी असून युद्धांत तो अग्नीसारखा फिरत राहील. एकटा भीमसेन आठ

रथ्यांच्या तोडीचा असून गदायुद्धांत त्याची बरोबरी करणारा कोणी नाहीं. त्याला दहा हजार हत्तींचें बल असून त्याचें तेज अमानुष आहे. दोघेही माद्रीपुत्र रथी असून तेजस्वी आहेत. त्यांना दिलेल्या असह्य क्लेशाची आठवण धरून रुद्राप्रमाणें सैन्याची ते बाट लावतील. ते सर्वच मालाच्या खोडासारखे उंच असून सामान्य पुरुषांपेक्षां प्रमाणानें टीचभर अधिक आहेत. त्यांचा बांधा सिंहासारखा आहे. सर्वांनीं ब्रह्मचर्य पाळलें असून तप आचरलें आहे. बलानें वाघासारखे, मुसमुसणारे विनम्रसंपन्न असे ते हातघाईच्या प्रसंगीं अचाट शौर्य गाजवितील. दिग्विजयाच्या वेळीं त्या सर्वांनीं सर्व राजांचा पूर्ण मोड केला आहे. यांचीं आयुधें सर्वांना असह्य आहेत, एवढेंच नव्हे तर ती तोलण्याचें सुद्धां कोणाच्या अंगीं सामर्थ्य नाहीं. लहानपणींच, आवेश, नेम मारणें, मुष्टिप्रहार करणें, इत्यादिकांमध्यें त्यांनीं तुह्मांला मागें टाकलें आहे. तेव्हां बलोत्कट असे ते रणांत तुझ्या सैन्याचा विध्वंस उडवितील. ह्मणून त्यांच्याशीं युद्धप्रसंग न आणणें बरें! राजसूय यज्ञाचे वेळीं घडलेली हकीकत तूं विसरला नसशील. द्रौपदीला सोसावे लागलेले क्लेश व सभेमधील मर्मभेदक शब्द मनांत आणून रणांत ते रुद्राची कामगिरी बजावितील. आरक्तवर्ण अर्जुनासारखा वीर रथी दोन्ही सैन्यांत एकही नसून प्रत्यक्ष नारायणाचें त्याला पाठबळ आहे. वासुदेव सारथि, अर्जुन योद्धा, दिव्य गांडिव धनुष्य, वायुगति घोडे, अभेद्य दिव्य कवच, अक्षय्य भाते, इंद्र, वरुण, कुबेर, यम व रुद्र यांपासून मिळालेला अस्त्रसमूह, इतकी सामुग्री जमल्यावर त्याच्यापुढें कोणाची डाळ शिजणार? हा एकटा खवळला ह्मणजे आपली बाजू संभाळून तुझ्या सैन्याचा फडशा उडवील. याबरोबर टिकाव धरण्याला काय तो मी किंवा द्रोणाचार्य समर्थ आहों. उष्णकाल संपल्यावर सोसाट्याच्या वाऱ्यानें जमणाऱ्या ढगांप्रमाणें शरवर्षाव करीत हा येऊन भिडेल तेव्हां ह्या कसलेल्या तरण्या कुंतिपुत्रापुढें आह्मां दोघां ह्यातान्यांना उभें रहावें लागणार.' हें भीष्मांनीं दिलेलें पांडवांचें वर्णन ऐकून व त्यांच्या पूर्वपराक्रमाची सभय आठवण होऊन जणूं यावेळीं त्यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळत आहे अशा रीतीने दुर्योधन गळला. पुढें भीष्म ह्मणाले, 'द्रौपदीचे पुत्र महारथी आहेत. तसाच विराटपुत्र उत्तर उत्तम रथी आहे. शत्रुविनाशक अनेक रथिवर्गांचा पाठराखा महाबाहु अभिमन्यु तर पार्थ व वासुदेव यांच्या तोडीचा आहे. याचें अस्त्रलाघव विलक्षण असून नानाप्रकारच्या युद्धकलेंत तो निष्णात आहे. तसाच तो बुद्धिमान व योजलेलें काम तडीस नेणारा आहे. तेव्हां पित्याला झालेले क्लेश स्मरून तो प्रताप गाजविल्यावांचून राहणार नाहीं. ज्याला भय ह्मणून ठाऊक नाहीं असा वृष्णिकुलश्रेष्ठ तापट वीर वीर्यशाली सात्यकि एक उत्कृष्ट अतिरथी आहे. उत्तमोजा व युधामन्यु हेही चांगले रथी आहेत. यांपाशीं हजारों रथ, हत्ती व घोडे असून युधिष्ठिराचें प्रिय करण्याच्या इच्छेनें ते प्राणाची देखील पर्वा न करितां युद्ध करतील. विराट व द्रुपद जरी वृद्ध आहेत तरी ते युद्धांत अजिंक्य आहेत. तेव्हां हे महावीर्यशालीही महारथीच आहेत. वयोवृद्ध असले तरी ते क्षात्रधर्माला जागणारे व सदाचारसंपन्न असल्यामुळें आप्तसंबंध व पांडवांवरील त्यांचें प्रेम,लक्षांत घेऊन वीरांना उचित मार्ग पतकरल्यावर आपल्या वीर्याला शोभेल अशी शक्य तेवढी ते कसोशी करतील. आप्तसंबंध घट्ट करण्यामाठीं आपापल्या अक्षौहिणी सैन्यानिशीं हे मोठ्या निकरानें लढतील. शत्रूंचा फन्ना उडविणारा पंचालतनय शिखंडि हाही युधिष्ठिराच्या सैन्यांतील एक श्रेष्ठ रथी आहे. तो आपल्या पंचाल व प्रभद्रक नामक विपुल सैन्याच्या रथसमुदायांनिशीं रणांत मोठा पराक्रम करून आपल्या पूर्व स्त्रीस्वरूपाचा विसर पाडून आपलें नांव कायम करील. तसाच महारथी ह्मणून नांवाजलेला द्रोणशिष्य धृष्टद्युम्न माझ्या मतें अतिरथी आहे. प्रलयकालीन खवळलेल्या शंकरांप्रमाणें हा एकटा रणांत शत्रूंचा संहार करीत सुटेल. याची रथसेना सागरासारखी अफाट असल्यामुळें रणप्रिय मोठमोठे योद्धे देखील तिला देवांसारखी ह्मणून वाखाणतात. धृष्टद्युम्नपुत्र क्षात्रधर्मी अद्यापि लहान असून त्यानें फार परिश्रम केले नसल्यामुळें मी त्याला अर्धरथी समजतों. पांडवांचा सबंधी वीर शिशुपालपुत्र चेदिराज धृष्टकेतु हा महारथी असून महारथ्यांच्याच हातून घ-

डून येणारें अमें अनाट कृत्य याच्या हातून घडेल. तसाच क्षात्रधर्माला जागणारा क्षत्रदेव हा उत्तम रथी आहे. पांचालश्रेष्ठ जयंत, अमितौजा, व सत्यजित हे महात्मे अतिरथी खवळलेल्या हत्तीप्रमाणें रणांत लढतील. विक्रमशाली शूर अज व भोज हे आपल्या सामर्थ्यानें शत्रूचा फन्ना उडवितील. अस्त्रलाघवयुक्त नाना युद्धचमत्कार करून दाखविणारे, ज्यांच्या अंगीं न ढळणारा पराक्रम आहे असे पांच केकय बंधु, तसेच काशिक, सुकुमार, नील, सूर्यदत्त, शंख, मदिराश्व, वार्धक्षेमी, चित्रायुध, चेकितान, सत्यधृति, व्याघ्रदत्त, चंद्रसेन हे सर्वच श्रेष्ठ रथी असून युद्धप्रसंगाला अवश्य असे गुण यांच्या ठिकाणीं वसत आहेत. तसाच क्रोधहंता नांवानें प्रसिद्ध असलेला सेनाबिंदु तर श्रीकृष्णाची किंवा भीमसेनाची बरोबरी करणारा आहे. ज्याचें अस्त्रलाघव विलक्षण आहे असा स्तुतीस पात्र काश्य एकरथी आहे. द्रुपदाचा धाकटा मुलगा रणांत नांवाजलेला सत्यजित धृष्टद्युम्नाच्या तोडीचा असून आठ रथ्यांबरोबर आहे ह्मणून मी त्याला अतिरथी समजतों. पांडवांना यश यावें अशी त्याची इच्छा असल्यानें रणांत तो अलौकिक कर्म करील. पांडवपक्षीयांचा पुढाकार घेणारा महारथी पांड्य मोठा वीर्यशाली असून पांडवांवर याचें मोठें प्रेम आहे. धनुष्य ज्याच्या हातून कधीं ढळावयाचें नाहीं असा महाधनुर्धारी श्रेणिमान व राजा वसुदान हे अतिरथी आहेत. रोचमान महारथी आहे. भीमाचा मामा बलशाली कुंतिभोज अतिरथी आहे. हा वीर अनुभवशीर, हुशार व आश्चर्यजनक युद्ध करणारा आहे. दानवांशीं युद्ध करणाऱ्या इंद्राप्रमाणें तो रणांत पराक्रम करील. त्याचप्रमाणें हिडिंबेला झालेला भीमपुत्र घटोत्कच हा अतिरथी असून नाना प्रकारच्या माया याला ठाऊक आहेत व याला युद्धाची मोठी आवड आहे. याचे सल्लागार पुष्कळ राक्षस याच्या पूर्ण आज्ञेंत आहेत. हे व दुसरे अनेक देशचे वासुदेव प्रभृति राजे पांडवांसाठीं एकत्र जुळले आहेत. हे पांडवसेनेंतील मुख्य.मुख्य रथी, अतिरथी, व अर्धरथी असून अर्जुनरक्षित पांडवांच्या प्रचंड सेनेचें हे सेनापतित्व करतील. आतां अनेक माया जाणणाऱ्या या जयेच्छु राजांबरोबर जय किंवा मरण येईपर्यंत मी युद्ध करीन. संध्यासमयाच्या सूर्यचंद्रांप्रमाणें एकत्र जुळलेल्या चक्रगांडिवधारी कृष्णार्जुनांवर मी चालून जाईन आणि हे व दुसरे जे जे ह्मणून माझ्या नजरेच्या टप्प्यांत येतील त्यांना त्यांना मी अटकावीन. मात्र पंचालपुत्र शिखंडी रणांत हत्यार उपसून जरी माझ्यावर चालून आला तरी त्यावर मी शस्त्र धरणार नाहीं किंवा त्याला मारणार नाहीं. पित्याचें प्रिय करण्यासाठीं राज्य सुद्धां सोडून मी ब्रह्मचर्यानें राहिलों आहें हें सर्व जगाला ठाऊक आहे. तेव्हां स्त्रीला किंवा पूर्वी स्त्री असून पुरुष झालेल्याला मी कधीं मारणार नाहीं. '

१४७ शिखंडीचा इतिहास.

(५. १७३–१९२)

यावर ' पूर्वी सर्व पांचाल व सोमक यांचा फडशा पाडीन असें बोलून आतां शिखंडि बाण उपसून मजवर तुटून पडला तरी मी त्याला मारणार नाहीं असें कां ह्मणतां ? ' ह्मणून दुर्योधनानें विचारल्यावरून भीष्म ह्मणाले, ' माझे जगविख्यात वडील शंतनु यांनीं कालेंकरून देह ठेविला ते वेळीं माझा भाऊ चित्रांगद याला राज्याभिषेक झाला. तो मेल्यावर प्रतिज्ञेला जागून सत्यवतीच्या सल्लूचानें धाकटा भाऊ विचित्रवीर्य याला मीं यथाविधि राज्याभिषेक केला; व तोही धर्मात्मा माझ्याच मतानें वागत असे. पुढें आपल्या योग्यतेच्या कुलाशीं त्याचा लग्नसंबंध जोडून देण्याकडे माझें लक्ष लागलें असतां काशिराजाच्या अप्रतिम रूपवती अंबा, अंबिका व अंबालिका या तीन मुलींचें स्वयंवर होत असल्याचें माझ्या कानावर आलें. मी फक्त एका रथानिशीं तेथें जाऊन तेथें असलेल्या सर्व राजांचा मोड करून वीर्यरूप शुल्क देऊन त्यांना हास्तिनापुराला घेऊन आलों व त्यांना सत्यवतीच्या पुढें नेऊन सादर केल्या. पुढें तिच्या विचारानें लग्नाची सर्व तयारी झाली असतां त्यांमधील वडील अंबा ह्मणाली, ' मीं मनानें शाल्वदेशचा राजा पति वरला असून त्यानेंही मला एकांतांत वरलें आहे. आपणाला सारा धर्म ठाऊकच आहे. तेव्हां

यापुढें आपल्याला योग्य दिसेल तें करा व राजधर्माला हरताळ लावूं नका. आपण सत्यधर्मानें वागणारे आहां असा आपला लौकिक आहे.' हें तिचें भाषण ऐकून मातेचा तसाच मंत्रिपुरोहितांचा विचार घेऊन मीं तिला जाण्याला परवानगी दिली, व ह्मातारे ब्राह्मण प दाई बरोबर संरक्षणाला देऊन तिची शाल्वराजाकडे रवानगी करून दिली. शाल्वाकडे जाऊन 'आपल्यासाठीं मी आलें आहें ह्मणून ती त्याला ह्मणाली असतां शाल्व तिला ह्मणाला,'दुसऱ्याकरितां ह्मणून भीष्मांनीं तुला बलात्कारानें हरण करून नेली असल्यामुळें आतां तुझ्याबरोबर मी लग्न करणार नाहीं. त्यांनीं तुला रथांत घालून नेली त्या वेळीं तुला परपुरुषाचा स्पर्श झाला आहे. तेव्हां आमच्यासारख्या शास्त्रज्ञ व धर्मोपदेशक राजांनीं परपुरुषाचा स्पर्श झालेल्या स्त्रीला कसें बरें घरीं घ्यावें?' यावर अंबा ह्मणाली, 'भीष्मांनीं माझ्या शरीराला आणि तेंही बलात्कारानें नेलें. माझ्या मनाची त्याला कधींच कबुली नव्हती. मनांतही आपल्यावांचून कोणी न आणतां त्यांच्या परवानगीनें मी आपल्याकडे आलें आहे. याच्या स्वरेपणाबद्दल पाहिजे तर छातीला हात लावून सांगतें. तेव्हां आपण होऊन चालत आलेल्या मला आपण पदरीं घेतलें पाहिजे. मीं परपुरुष कधीं वरला नसून आपल्यासाठीं उत्कंठ आहें.' याप्रमाणें तिनें काकुळतीनें विनविलें तरी सापानें ज्याप्रमाणें जुनी कात टाकावी त्याप्रमाणें त्यानें तिला कायमची सोडली. तेव्हां रागानें लाल होऊन डोळे पाण्यानें भरून येऊन ती ह्मणाली, 'आपण मला सोडली तेव्हां आतां मी वाट फुटेल तिकडे जातें. जर माझें ह्मणणें खरें असेल तर जिकडे जिकडे ह्मणून मी जाईन तिकडे तिकडे साधू माझी पाठ राखतील.' याप्रमाणें शाल्वानें तिला निष्ठुरतेनें सोडून दिल्याबर कुररीप्रमाणें दीन होऊन रडत ती नगराबाहेर पडली. जातां जातां ती आपल्या मनाशीं ह्मणाली, 'माझ्यापेक्षां अधिक संकटांत सांपडलेली कोणी स्त्री असेल काय, मी बांधवांना मुकलें, शाल्वानीं मला सोडली व हास्तिनापुरालाही आतां मला परत जातां येत नाहीं! कारण माझ्या विनवणीवरूनच भीष्मांनीं मला शाल्वाकडे जाण्याला मोकळीक दिली. तेव्हां आतां याबद्दल मीं दोष तरी कोणाला यावा. बलात्कारानें मला हरण करणाऱ्या भीष्मांना, का वीर्यशुल्क घेऊन मला विकणाऱ्या बाबांना, का अशा निष्ठुरतेनें मला सोडणाऱ्या शाल्वांना मला भीष्म बलात्कारानें घेऊन निघाले तेव्हांच मीं रथाखालीं कां उडी घेऊं नये? असो. मनुष्याला आपल्या पूर्वसंचिताप्रमाणें फळ मिळत असतें. तरी हा सर्व अनर्थ ओढवण्याला मूळ कारण भीष्म आहेत तेव्हां त्यांवर मात्र मी आपला सूड उगविल्यावांचून रहणार नाहीं. आतां एक तपानें किंवा युद्धानें असे दोन सूड उगविण्याचे मार्ग आहेत. पैकीं युद्धांत भीष्मांचा पराजय करण्याला कोणी समर्थ नाहीं.' याप्रमाणें मनांत विचार करीत पुण्यशील तापसांच्या आश्रमांकडे ती गेली व तिनें आपली सर्व घडलेली हकीकत सविस्तर त्यांना कळविली. त्या ठिकाणीं कर्मकांड व ज्ञानकांड यांत श्रेष्ठ शुद्धशील शैखावत्य नामक कोणी ब्राह्मण होते. त्यांना तिचा शोक व दुःखाचे सुस्कारे तसेंच दुष्कर तप करण्याचा तिचा निर्धार पाहून तिची दया आली. हिच्यासंबंधानें आतां पुढें काय कराव्रें ह्मणून सर्व तपस्व्यांचा विचार चालला असतां कोणाचें तिला तिच्या पित्याकडे पाठविण्याचें तर कोणाचें आमच्याकडे पाठविण्याचें व कोणाचें शाल्वाकडे पाठविण्याचें असें निरनिराळ्यांचें निरनिराळें मत पडलें. व विचारांतीं तिनें पित्याकडे जावें असें सर्वानुमतें ठरवून ते तिला ह्मणाले, 'मुली, आमचें हिताचें भाषण ऐक. वैराग्य धरून येथें राहूं नकोस. तूं आपल्या पित्याकडे जा. तो तुझें पुढें काय करावयाचें असेल तें करील. तुझें बापापाशीं राहणें जसें वाजवी होईल तसें दुसऱ्यापाशीं राहणें होणार नाहीं. बायकांना एक नवरा किंवा दुसरा बाप हेच काय ते आधार आहेत. सर्व ठीक असतांना तिनें नवऱ्यापाशीं रहावें व प्रसंग पडला असतां बापापाशीं रहावें. यावांचून दुसऱ्या कोणाजवळ रहाणें उचित नाहीं. शिवाय या वैराग्यांत फार कष्ट आहेत, व तूं सुकुमार राजकन्या असल्यानें तुला तर ते विशेषच कष्टद होणार आहेत. या आश्रमांत तुला अनेक दुःखें भोगावीं लागतील व येथें तुझ्यासारख्या सुंदरीला एकटीला पाहून अनेक राजांच्या तुला माग-

ण्याही पडतील. तेव्हां हा विचार सोडून दे.' याप्रमाणें त्यांनीं सांगितलें तरी त्यांच्या रक्षणाखालीं त्या ठिकाणीं तपश्चर्या करण्याचा तिचा निश्चय ढळेना. याप्रमाणें त्या ब्राह्मणांचा योग्यायोग्य विचार चालला असतां तपस्वी राजर्षि होत्रवाहन त्या ठिकाणीं आला. तापसांनीं त्याचें स्वागत करून उदक, आसन देऊन तो बसला असतां त्या अंबेची गोष्ट त्याच्या कानावर पडून त्यालाही वाईट वाटलें. व त्याला दया येऊन तो तिला ह्मणाला, 'तूं आतां बापाकडे जाऊं नकोस. मी तुझ्या आईचा बाप आहें. तूं मजजवळ रहा. ज्याअर्थीं क्लेश सोसून तप करण्याचा तुझा निश्चय झाला आहे त्याअर्थीं तूं जमदग्निपुत्र परशुरामांकडे जा. ते तुझा दुःखभार कमी करतील. भीष्म जर त्यांचें ह्मणणें ऐकणार नाहींत तर ते त्यांना मारल्याबांचून सोडणार नाहींत. ते तुझें सर्व ठाकठीक जुळवून देतील.' नंतर डोळ्यांतून पाणी काढीत आपल्या मातामहाच्या पायांवर डोकें ठेवून 'आपल्या आज्ञेप्रमाणें मी करतें,' असें ह्मणून 'त्या जगविख्यात थोरांचें मला कुठें दर्शन होईल' ह्मणून तिनें त्याला विचारलें. तेव्हां होत्रवाहन ह्मणाला, 'परशुराम ब्रह्मवेत्ते ऋषी, गंधर्व, अप्सरा यांसह महेंद्रपर्वतावर राहतात. तेथें जाऊन त्यांना नमस्कार करून तूं आपली हकीकत त्यांना कळीव ह्मणजे ते तुझा हेतु शेवटास नेतील. कारण ते माझे मित्र असून मजवर त्यांचें प्रेम आहे व सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें ते श्रेष्ठ आहेत.' इतक्यांत परशुरामांचें प्रिय शिष्य अकृतव्रण त्या ठिकाणीं आले. त्याबरोबर सर्वांनीं उठून त्यांचा आदर केला. नंतर सत्कार वगैरे होऊन ते सर्व बसल्यावर 'परशुरामांची सध्यां गांठ कोठें पडेल,' ह्मणून होत्रवाहनानें त्यांना विचारलें. तेव्हां 'ते नेहमीं तुझीच आठवण काढीत असून तुझ्याच भेटीसाठीं उद्यां ते येथें येणार आहेत,' ह्मणून अकृतव्रणांनीं त्याला कळविलें. नंतर जवळ असलेली मुलगी कोणाची वगैरे माहिती त्यांनीं विचारल्यावरून होत्रवाहनानें तिच्यासंबंधाची इत्थंभूत हकीकत त्यांच्या कानावर घातली. तेव्हां अकृतव्रण ह्मणाले, 'तूं जी ह्या दोन दुःखांत सांपडली आहेस त्यांपैकीं कोणत्याचें निवारण परशुरामांच्या हातून व्हावें अशी तुझी इच्छा आहे? त्यांनीं शाल्वाला तुझें पाणिग्रहण करावयाला लावावें कां रणांत भीष्मांचा त्यांनीं पराभव करावा? यांपैकीं तूं सांगशील तें करण्याला ते तयार होतील.' यावर 'माझें मन शाल्वांवर जडलेलें जरी भीष्मांना ठाऊक नव्हतें तरी ते बलात्कारानें मला घेऊन गेले ही गोष्ट लक्षांत घेऊन तुह्मांला जें न्यायाचें दिसेल तें तुह्मी ठरवा,' असें तिचें ह्मणणें ऐकून अकृतव्रण ह्मणाले, 'याप्रमाणें धर्माला धरून तूं बोलावेंस हें ठीकच आहे. आतां माझें मत ऐक. भीष्मांनीं तुला हास्तिनापुराला नेली नसती तर परशुरामांच्या सांगण्यावरून शाल्वानें तुला आपल्या डोक्यावर धरली असती. पण भीष्मांनीं तुला बलात्कारानें नेल्यामुळें त्याचें मन साशंक झालें आहे. तेव्हां मीच एक पुरुष आहें असा अभिमान असणाऱ्या या भीष्मांवरच सूड उगविला पाहिजे.' हें ऐकून अंबा ह्मणाली, 'भीष्मांचा नाश करावा असें माझ्याही मनांतून आहे. तेव्हां ज्यामुळें मला हें दुःख सोसावें लागत आहे त्यांना आपण शिक्षा करवा.' याप्रमाणें बोलण्यांत त्याचा तो दिवस निघून गेल्यावर दुसरे दिवशीं जटावल्कलधारी तेजानें डोळे दिपवून सोडणारे परशुराम आपल्या शिष्यवर्गासहवर्तमान तेथें आले. त्या महाशय व शुचिर्भूतांच्या हातांत धनुष्य, तरवार, व परशु हीं आयुधें होतीं. ते दृष्टी पडल्याबरोबर राजा व ती मुलगी हात जोडून त्यांच्यापुढें उभीं राहिलीं. नंतर मोठ्या दक्षतेनें मधुपर्कादिकांनीं त्यांची पूजा केल्यावर होत्रवाहनानें त्या मुलीची सविस्तर हकीकत त्यांना कळविली व तिनेंही आपल्या कमलासारख्या हातानें त्यांचा पादस्पर्श करून 'शोकरूप चिखलांत रुतलेल्या मला वर काढा,' ह्मणून त्यांची दया भाकली. ती ऐकून दयार्द्र होऊन परशुराम ह्मणाले, 'ब्रह्मवेत्या ब्राह्मणांच्या कामाशिवाय शस्त्र धरावयाचें नाहीं असा जरी माझा संकल्प आहे, तरी शाल्व किंवा भीष्म यांपैकीं कोणीच माझी आज्ञा मोडणार नाहींत. तेव्हां तूं शोक करूं नकोस. ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र यांपैकीं कोणाही ब्रह्मद्वेष्ट्याला मारल्याशिवाय सोडावयाचें नाहीं व शरणागताला अंतर द्यावयाचें नाहीं अशीही माझी प्रतिज्ञा आहे. तेव्हां 'चल मी

तुला भीष्माकडे घेऊन जातों. सामोपचारानें तो न ऐकेल तर मी त्याला मारल्यावांचून सोडणार नाहीं,' असें ह्मणून ते ब्रह्मवेत्या ऋषींसहवर्तमान तिला घेऊन कुरुक्षेत्रामध्यें येऊन सरस्वतीच्या तीरीं राहिले व तेथून तिसऱ्या दिवशीं आपण आलेल्या कामासंबंधानें निरोप त्यांनीं मजकडे पाठविला. ते थोर पुरुष इतक्या जवळ आल्याचें वर्तमान ऐकून गाय घेऊन मी त्यांना सामोरा गेलों. तेव्हां मीं त्या मुलीचें हरण केलें असल्यामुळें तिचा स्वीकार करण्याबद्दल त्यांनीं मला आज्ञा केली. ती ऐकून मी ह्मणालों, ' हिनेंच होऊन ' मीं मनानें शाल्वाला वरलें आहे, ' असें मला सांगितल्यावरून मीं हिला शाल्वाकडे पाठवून दिली. आतां फिरून आपल्या भावाकरितां मी हिचा कधीं स्वीकार करणार नाहीं. भीतीनें,दयेनें किंवा द्रव्यलोभानें क्षात्रधर्म कधीं सोडावयाचा नाहीं असें माझें व्रत आहे. ' यावर रागाने डोळे लाल करून ' माझें ऐकणार नाहींस तर तुला मी ठार करीन,' अशी त्यांनीं मला धमकी घातली. तेव्हां गोड शब्दांनी त्यांचे शांतवन करून ' आपण मला चारी प्रकारची धनुर्विद्या सांगितली असून आपला मी शिष्य आहें, तर आपण माझ्याबरोबर युद्ध करण्याचें मनांत कां आणतां,' ह्मणून मी त्यांना विनयपूर्वक ह्मणालों. त्यावर ते ह्मणाले, ' तूं मला गुरु समजत असून माझें प्रिय करण्यासाठीं या काशिराज कन्येचा स्वीकार करीत नाहींस. तू भ्रष्ट केल्यामुळें हिला कोणी पतकरत नाहीं. तेव्हां माझें ऐकून कुलाचें रक्षण कर.' हें त्यांचे आणीबाणीचें भाषण ऐकून मी ह्मणालों, 'जिचें मन दुसऱ्यावर गेलें आहे अशा स्त्रीला सर्पिणीप्रमाणें घरांत ठेवून घेण्याची माझी इच्छा नसल्यानें आपली आज्ञा मला मान्य करतां येत नाहीं. स्त्रियांमधला हा दोष मोठा अनर्थकारक आहे. शिवाय प्रत्यक्ष इंद्राच्या भीतीनेंही मी धर्म सोडण्याला तयार होणार नाहीं. तेव्हां आपल्याला जें करावयाचें असेल तें करा. गर्वानें फुगून जाऊन कार्याकार्य न जाणणारा प्रत्यक्ष गुरु अमला तरी त्याला जुभानूं नये असें महात्म्या मरुत्त राजाचें वचन आहे. गुरु ह्मणून प्रेमानें आपल्याला फार मान दिला. परंतु गुरूंचें कर्तव्य आपण ओळखीत नाहीं. माझ्या हातून गुरूंच्या-विशेषेंकरून ब्राह्मण व तपोवृद्ध अशा गुरूंचा-घात होऊ नये ह्मणून मीं हा नेहपावेतों सर्व सहन केलें. आतां युद्ध करण्याचेंच आपल्या मनांत असेल तर त्यालाही माझ्याकडून तयारी आहे. मागें पाय न घेतां बाण मज्ज करून जो युद्धाला उभा राहतो अशा ब्राह्मणाला क्षत्रियाप्रमाणे मारण्यांत ब्रह्महत्येचा दोष बिलकुल नाहीं, असे धर्मशास्त्राचेच मत आहे. मी क्षत्रियधर्मानें वागणारा आहें व जशाशीं तसें वागणें वावगें नसून त्यांत पापही नाहीं. देशकाल कळत असून एखादी गोष्ट किंवा कर्तव्य करण्यास समर्थ असणाऱ्या पुरुषाला त्या गोष्टीसंबंधानें संशय वाटत असेल तर ती न करतां त्यानें कर्तव्याला जागावें हे विशेष हिताचे असतें. आणि ज्याअर्थी संशयात्मक गोष्ट आपण मजकडून जुलुमाने करवूं पहातां त्याअर्थी आपल्याबरोबर युद्ध करणेंच मला श्रेयस्कर वाटतें. तेव्हां आतां या कुरुक्षेत्रीं आपल्याबरोबर युद्ध करण्याला मी तयार आहें, माझें बाहुवीर्य व पराक्रम आपल्याला दिसून येईल. तेव्हां आपणही मजबरोबर द्वंद्वयुद्धाला तयार व्हा, ह्मणजे माझ्या शेंकडों बाणांनीं आपण पावन व्हाल. पूर्वी ज्या ठिकाणीं क्षत्रियांना मारून त्यांच्या रक्तानें पितरांना तर्पण करून आपण शुद्ध झालां त्याच ठिकाणीं आपल्याला मारून मी क्षत्रियांना तृप्त करतों. युद्धाची इच्छा बाळगणाऱ्या केवळ नांवाच्या ब्राह्मणाचा आपला फार दिवसांचा गर्व मी खालीं करतों. मीं एकट्याने सर्व क्षत्रियांना मारलें ह्मणून जी आपल्याला प्रौढी वाटत आहे त्यासंबंधानेंही ऐका. त्या वेळीं भीष्म किंवा भीष्मासारखा कोणी क्षत्रिय निपजला नव्हता.क्षत्रिय त्यानंतर जन्मले आहेत. आपण केवळ गर्वताच्या ठिकाणी आपला प्रकाश पाडलात.आपली प्रौढी पूर्ण दूर करणारा हा भीष्म जन्माला आला आहे.' यावर त्यांनीं माझा उपहास करून युद्धाची आपली तयारी दाखविली. नंतर हास्तिनापुराला परत येऊन मातेचा निरोप घेऊन पांढरें शुभ्र चिलखत चढवून सर्व आयुधांनीं पूर्ण अशा रथांत अनुभवशीर अशा सारथ्यासह बसून मी युद्धाला निघालों. ते वेळीं पांढरा शुभ्र छत्र माझ्यावर धरलें असून पांढऱ्या पंख्यानें सेवक मला वारा घालीत हो-

ते. माझा पोषाखही त्यावेळीं पांटराच होता. ब्राह्मण विजयसूचक आशीर्वाद देऊन माझा स्तुतिपाठ गात होते. अशा थाटानें नगर सोडून वाऱ्याप्रमाणें पळणारे घोडे रथाला जुंपले असल्यामुळें मी हं हं ह्मणतां रणभूमीवर येऊन दाखल झालों व परशुराम दृष्टीच्या टप्पांत आल्याबरोबर मीं आपला शंख मोठ्यानें फुंकला. अरण्यवासी तापस व इंद्रासह सर्व देव तें अलौकिक रण पाहण्याला आले होते. दिव्य पुष्पांचा चोहोंकडे वर्षाव होऊं लागून दिव्य वाद्यें वाजूं लागलीं व आकाशांत ढग दिसूं लागले. परशुरामांबरोबर आलेली मंडळी रणभूमीभोंवतीं प्रेक्षकाच्या नात्यानें उभी राहिली. सर्व प्राणिमात्रांचें हित इच्छिणारी माझी माता गंगा प्रत्यक्ष रूपानें प्रकट होऊन परशुरामाबरोबर युद्ध न करण्याविषयीं माझें मन वळवूं लागली. तेव्हां घडलेला सर्व वृत्तांत तिच्या कानावर घातल्यावर तिनेंही जाऊन 'शिष्याबरोबर युद्ध करूं नका' ह्मणून परशुरामांना विनविलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. नंतर 'मी रथावर असून आपण खालीं आहां, अशा स्थितींत आपल्याबरोबर युद्ध करणें न्यायाचें होणार नाहीं, तेव्हां आपणही रथांत बसा ह्मणजे आपल्यासीं युद्ध करण्याला ठीक पडेल,' असें मी परशुरामाला ह्मणालों. तेव्हां त्यांनीं हासत हासत मला उत्तर केलें, 'भीष्मा, पृथ्वी हाच माझा रथ असून वेद रथाचे घोडे आहेत. वेदमाता गायत्री, सावित्री, व सरस्वती ह्या उत्कृष्ट चिलखतानें मी झांकलों आहें. तेव्हां ह्या रथांत बसून मी तुझ्याबरोबर युद्ध करण्याला हा तयार आहें.' असें ह्मणून बाणवर्षाव करून त्यांत त्यांनीं मला झांकून सोडलें. इतक्यांत मनानें निर्माण केलेल्या सुवर्णभूषणांनीं विभूषित, दिव्य घोडे जोडलेल्या व सर्व आयुधांनीं संपूर्ण अशा नगराप्रमाणें विस्तीर्ण व आश्चर्यजनक रथांमध्यें बसलेले व सूर्यचंद्र चिन्हांनीं अंकित चिलखत चढविलेले असे परशुराम माझ्या दृष्टीस पडले. त्यांचा सखा अकृतव्रण त्यांचें सारथ्य करीत होता. त्यांनीं 'चल, चल,' ह्मणून मला युद्धाला बोलाविलें, तेव्हां त्या क्षत्रियविनाशक सूर्यासारख्या तेजस्वी अजिंक्य रामाशीं मी एकटा भिडलों, व बाणाच्या माऱ्याच्या तिप्पट अंतरावर परशुरामांना पाहून धनुष्य खालीं ठेवून रथाखालीं उतरून त्या ऋषिवर्यांचा सत्कार करण्यासाठीं त्यांकडे गेलों व यथाविधि अभिनंदन करून 'आपण माझे गुरु व मजपेक्षां श्रेष्ठ आहां, मी आपल्याबरोबर युद्ध करणार त्यांत मला जय येण्याबद्दल आपला मला आशीर्वाद पाहिजे,' असें ह्मणालों. तेव्हां प्रेमानें ते ह्मणाले, 'अभ्युदयेच्छूनें असेंच वागलें पाहिजे. थोरांबरोबर युद्ध करणारांचा हा धर्मच आहे. तूं याप्रमाणें मजकडे न येतास तर मीं तुला शाप दिला असता. धैर्य धरून हुषारीनें मजबरोबर युद्ध कर. आतां तुला जिंकण्याच्या उद्देशानें मी येथें उभा असल्यानें तुला जय येण्याबद्दल मला आशीर्वाद देतां येत नाहीं. संतुष्ट झालों आहें.' नंतर त्यांना नमस्कार करून परस्परांना जिंकण्याच्या इच्छेनें आमचें युद्ध बरेच दिवस चाललें. प्रथम त्यांनीं नऊशें सांठ कंकाचीं पिसें लावलेले चापट टोंकाचे बाण मजवर सोडले; त्यांनीं माझे घोडे व सारथी अगदीं झांकून गेले तरी मी डगमगलों नाहीं. नंतर देवब्राह्मणांना नमस्कार करून मी त्यांना ह्मणालों, 'आपण जरी मर्यादेबाहेर गेलां तरी आपल्या गुरुपणाला मीं मान दिला. धर्म जोडण्यासाठीं आणखीही मी काय करणार तें एका. आपल्या शरीरांत असलेले वेद, आपलें ब्राह्मणत्व व आपलें प्रचंड तप यांना उद्देशून मी प्रहार करणार नाहीं; तर जो क्षात्रधर्म आपण स्वीकारला आहे त्याला उद्देशून मी प्रहार करीन. कारण ब्राह्मणानें शस्त्र धरलें कीं त्याला क्षत्रियत्व येतें. हें पहा तीक्ष्ण बाण सोडून मी आपलें धनुष्य तोडून टाकतों.' असें ह्मणून एका बाणानिशीं मी त्यांचें धनुष्य मोडून खालीं पाडलें. नंतर शेंकडों अणकुचीदार बाण त्यांवर जाऊन बसल्यानें त्यांच्या अंगांतून रक्तस्राव सुरू झाला. तेवेळीं अनेक धातू ज्यांतून बाहेर पडताहेत अशा मेरू पर्वताप्रमाणें ते दिसूं लागले. तेव्हां अगदीं खवळून जाऊन साप, अग्नि किंवा विष यांचीच उपमा ज्यांना शोभेल असे मर्मभेदक तीक्ष्ण बाण मजवर सोडून माझी त्यांनीं धांदल उडवून दिली. परंतु न डगमगतां शेंकडों बाणांनीं मीं त्यांना झांकून काढलें त्यावेळची स्थिति पाहून दयेनें 'धिक्कार असो या क्षात्रधर्माला कीं ज्याच्यायोगानें गुरूंवर देखील या-

प्रमाणें बेताल उठावें लागतें,' असें मला वाटलें. ह्मणून त्या दिवशीं कांहीं त्यांवर मीं जास्त बाण सोडले नाहींत व सहस्ररश्मि सूर्य आपल्या करांनीं पृथ्वी संतप्त करून दिवस सरल्यानें अस्ताला चालल्यामुळें युद्ध थांबलें. त्यानंतर कुशल सारथ्यानें आपल्या घोड्यांच्या व माझ्या शरीरांतले बाण काढून घोड्यांना धुवून पाणी पाजून खरारा केला. याप्रमाणें त्यांना विसावा दिल्यावर फिरून उजाडल्यावर युद्धाला सुरवात झाली व पूर्वीप्रमाणें रथाखालीं उतरून त्यांना अभिवंदन करून निर्भयपणें मी त्यांच्यापुढें युद्धाला उभा राहिलों. व दिव्यास्त्रें सोडून आह्मीं एकमेकांना जेरीस आणूं लागलों. तेवेळीं परशुरामांनीं माझ्या डावीकडून जातां जातां माझें वक्षःस्थळ फोडलें. त्यांनीं मी घायाळ होऊन मूर्च्छा येऊन पडलों. तेव्हां सारथी मला बाजूला घेऊन जाऊं लागला. मी रणांतून बेशुद्ध होऊन जात आहेंसें पाहून अरुतवण, अंबाप्रभृतींना आनंद झाला. इतक्यांत शुद्धिवर येऊन सारथ्याला मीं रथ माघारा फिरविण्याम सांगितलें. त्याबरोबर बायुगति घोडे जणूं काय नाचत आहेत अशा रीतीनें रणाकडे निघाले; व मीं खवळून जाऊन परशुरामांना असंख्य बाणांनीं झांकून काढलें व त्यांना ठार करण्याच्या उद्देशानें एक कालासारखा दैदीप्यमान बाण त्यांवर सोडला. त्यासरसे ते मूर्च्छित होऊन भूमीवर पडले. त्याबरोबर सूर्यच खालीं आला कीं काय अशा रीतीनें सर्व जग भयाण दिसूं लागून जिकडे तिकडे हाहाकार उडाला. सर्व तापस व अंबाप्रभृति त्यांकडे धांवून जाऊन त्यांनीं त्यांच्या डोळ्यांला पाणी लावलें. नंतर सावध होऊन घाबऱ्या घाबऱ्यानें 'थांब. भीष्मा, मेलास,' असें ह्मणून त्यांनीं माझ्यावर एक बाण सोडला. तो माझ्या डाव्या बरगडींत घुसून मीं घायाळ होऊन एखाद्या झाडाप्रमाणें झोकें खाऊं लागलों. नंतर त्या घोर युद्धांत शीघ्रास्त्र सोडून त्यांनीं माझे घोडे मारून रोमरंध्रांतही शिरणाऱ्या बाणांनीं मला झांकून काढलें. त्यांच्या प्रतिकारार्थ मींही शीघ्रगामी बाण सोडले. तेव्हां आह्मां दोघांच्या बाणांनीं आकाश भरून जाऊन सूर्य झांकून गेला व ढगांची हालचाल बंद होऊन वाराही बंद पडला. बाऱ्याच्या एकमेकांवर आदळण्यानें व सूर्यकिरणांच्या योगांनीं त्या सर्व बाणांनीं पेट घेतला व जळून राख होऊन ते जमिनीवर येऊन पडले. लाखांनीं, कोटींनीं, मोजतां येण्यासारखे बाण त्या खवळलेल्या परशुरामांनीं मजवर सोडले व मीही आपल्या सर्पतुल्य बाणांनीं ते तोडून खालीं पाडले. याप्रमाणें आमचें बरेच दिवस युद्ध चाललें. अनेक अस्त्रांचा मजवर कांहीं परिणाम होत नाहींसा पाहून जणू कालानेंच सोडलेली अशी भयंकर शक्ति त्यांनीं मजवर सोडली. तिच्या लखलखीत टोंकामुळें जणू उल्कापातच होत आहे असा भास झाला. प्रलयकालच्या पेट घेतलेल्या सूर्यासारख्या त्या शक्तीचेही मी बाणांनीं तीन तुकडे केले. तेव्हां संतापून जाऊन त्यांनीं बारा घोर शक्ती मजवर सोडल्या. त्या कांतिमान व शीघ्रगामी असल्यामुळें प्रलयकालीन बारा सूर्याप्रमाणें भासत होत्या. परंतु त्यांचाही बारा बाणांनीं मीं चुराडा उडविला. याप्रमाणें शक्तींचें कांहीं चालत नाहींसें पाहून त्या कार्तवीर्याला मारणाऱ्या परशुरामांनीं फिरून सूर्याप्रमाणें प्रखर बाणांची टोळधाडाप्रमाणें माझ्यावर वृष्टि सुरू केली. त्याच्या योगानें माझा सारथि मूर्छित होऊन रथाखालीं आला व पुढें त्यानें लवकर प्राण सोडला. तरी मला धैर्यानें बाण सोडतांना पाहून त्यांनीं मजवर एक कालासारखा बाण सोडला. तो माझ्या छातीवर लागून तेथील रक्त तो पिऊं लागला व माझ्यामकट तो खालीं आला. तेव्हां मी मेलों असें समजून परशुराम हर्षभरित होऊन गर्जूं लागले. माझ्या बाजूच्या कौरवांना व प्रेक्षकांना फार वाईट वाटलें. इतक्यांत आठ सूर्याप्रमाणें कांतिमान ब्राह्मणांनीं येऊन मला अंतराळीं धरलें व माझ्या अंगावर पाणी शिंपडून 'भिऊं नको,' ह्मणून मला धीर दिला, व प्रत्यक्ष गंगामाता स्त्रीरूपानें माझ्या घोड्यांचें व आंतील सर्व सामानासह रथाचें संरक्षण करीत होती. तिला हात जोडून स्वस्थानाला जाण्याबद्दल विनवून मी आपले घोडे स्वतःच आवरून फिरून युद्ध चालविलें, व एक मोठा शक्तिमान बाण सोडून परशुरामांच्या हातांतील बाण खालीं पाडून त्यांना मूर्छित करून खालीं पाडलें. याप्रमाणें ते गुडघ्यांवर खालीं आले असतां आकाश ढगांनीं भरून जाऊन रक्ताचा पा-

ऊस पडूं लागला. शोंकडों उल्कापात होऊं लागले. निर्मल अशा सूर्याला एकदम ग्रहण लागलें. अंगाला झोंबणारा वारा वाहूं लागला व पृथ्वी कांपूं लागली. गिधाडें, वगळे, कंक पक्षी आनंदानें वर घिरट्या घालूं लागले. प्रकाशमान अशा पूर्व दिशेला कोल्हीं मोठ्यानें ओरडूं लागलीं. कोणी वाजविल्याशिवाय नगारे घुमत राहिले. याप्रमाणें परशुरामांना थोडी मूर्च्छा येतांच अशीं भयंकर दुश्चिन्हें होऊं लागलीं. इतक्यांत परशुराम एकदम उठून आपल्या बलानुरूप प्रचंड धनुष्य उचलून मजवर बाण सोडणार तो महर्षींना माझी दया येऊन त्यांनीं त्यांना निवारिलें. तेव्हां त्या महाशय परशुरामांनीं मजकरितां काढलेला तो प्रलयकालीन अग्नीसारखा बाण फिरून भात्यांत ठेवला. इतक्यांत मंत्रमय किरणांनीं युक्त असा धुळीने झांकलेला सूर्य अस्ताला जाऊन रात्र पडून सुखकर व गार वारा सुटला. त्यामुळें युद्ध बंद पडलें. सर्व पितर, ब्राह्मण, देव, निशाचर व क्षत्रिय यांना प्रणाम करून मी एकांतांत शय्येवर 'या महावीर्यशाली परशुरामांशीं माझा आज बरेच दिवस घोर व अनर्थकारक युद्धप्रसंग चालला असून यांचा पराजय होण्याचें कांहीं लक्षण दिसत नाहीं; तर माझ्या हातून यांचा पराभव व्हावयाचा असेल तर देवतांनीं मला दर्शन देऊन तमें कळवावें,' म्हणून मनांत विचार करीत पडलों. याप्रमाणें संकल्प करून घायाळ झालेला मी उजव्या कुशीवर पडलों असतां ते दिवशीं सकाळीं मी रथांतून मूर्छित होऊन खालीं आलों असतां ज्यांनीं मला अधांतरीं धरून धैर्य दिलें होतें तेच आठ महानुभाव स्वप्नांत माझ्यापुढें येऊन ह्मणाले, 'ऊठ, भिऊं नकोस. तूं आमचाच अंश असल्यानें आह्मी तुझें संरक्षण करीत आहों. परशुरामांच्या हातून तुझा कधीं पराभव होणार नाहीं. तूंच त्यांचा पराभव करशील. विश्वकर्म्यानें निर्माण केलेले प्रजापतीजवळ असणारें प्रस्वाप नांवाच्या अस्त्राचें ज्ञान परशुरामांना किंवा दुसऱ्या कोणालाही या जगांत नाहीं. पूर्व जन्मींच तें तुला ठाऊक असल्यानें त्याची आठवण केल्याबरोबर त्याची तुला स्फूर्ति होईल, व त्याच्या योगानें महावीर्यवान पुरुषांना दंड करण्याला तूं शक्तीशील. मात्र परशुराम अमर असल्यानें त्यानें ते मरण पावणार नाहींत. परंतु त्यानें जर्जर होऊन ते निद्रावश होतील. निद्रिस्त काय मृत काय एकच असल्यानें असें झाल्यानें त्यांचा पराभव झाल्याप्रमाणें होईल. तेव्हां या अस्त्राचा तूं त्यांवर प्रयोग कर.' असें सांगून ते गुप्त झाले. नंतर दुसरे दिवशीं अंगावर रोमांच उभे करणारें घोर युद्ध सुरू झालें. परशुरामांनीं मोठ्या त्वेषानें वज्राप्रमाणें येऊन बसणारी, यमदंडाप्रमाणें कांतिमान व अग्नीप्रमाणें दैदीप्यमान एक घोर शक्ति मजवर सोडली. ती ताऱ्याप्रमाणें मान व खांक यांच्यामध्यें एकदम येऊन लागली व त्या योगानें रक्तस्राव सुरू झाला. तेव्हां मीही विद्युल्लतेप्रमाणें दैदीप्यमान शक्ति त्यांवर सोडली. ती त्यांच्या छातीवर बसून तिनें ते घायाळ झाले. पुढें त्यांनीं मजवर ब्रह्मास्त्र सोडलें. मीही ब्रह्मास्त्रानेंच त्याचा प्रतिकार केला. तेव्हां त्या दोघांची आकाशांत टक्कर लागून विलक्षण तेज उत्पन्न झालें. देव, ऋषी व सर्व प्राणिमात्र घाबरून जाऊन खिन्न झाले. आकाश पेटून दशदिशांमधून धूर निघूं लागला. पक्ष्यांचा आकाशांत निभाव लागेना. सर्व जगतांमध्यें जिकडे तिकडे हाहाकार उडून राहिला. तेव्हां पूर्वरात्रीच्या स्वप्नाची आठवण होऊन त्या ब्रह्मवेत्त्या ऋषींच्या आज्ञेप्रमाणें मी प्रस्वाप अस्त्र सोडण्याला तयार झालों. तेव्हां 'भीष्मा प्रस्वाप सोडूं नकोस' ह्मणून अंतरिक्षांत एकच गडबड उडून राहिली. त्याला न जुमानतां मी ते अस्त्र सोडणार तों प्रत्यक्ष नारदमुनींनीं येऊन 'परशुरामांसारख्या ब्रह्मनिष्ठ ब्राह्मणांवर–विशेषतः तुझ्या गुरूंवर–हें अस्त्र सोडूं नकोस,' ह्मणून मला निवारिलें. इतक्यांत आकाशांत दृग्गोचर होणाऱ्या आठ ब्रह्मवेत्त्यांनीं 'नारदमुनींच्या आज्ञेप्रमाणें वागण्यांतच माझें हित आहे,' ह्मणून सांगून मला तें अस्त्र सोडण्यास प्रतिबंध केला. तेव्हां मीं त्याचा उपसंहार केला. तें पाहून परशुरामांना आनंद होऊन बिचाऱ्यांच्या तोंडांतून 'आज भीष्मानें मला जिंकलें' असे उद्गार निघून गेले. ते वेळीं त्यांचे वडील व आजोबा ह्यांनीं त्यांना प्रत्यक्ष दर्शन देऊन युद्ध हा क्षात्रधर्म असून ब्राह्मणांचें मुख्य धन वेदाध्ययन व तपश्चर्या असल्यानें फिरून अशा प्रकारचें साहस विशेषत

माझ्यासारख्या क्षत्रियांशीं न करतां फिरून तपश्चर्या करीत राहण्यास सांगितलें व देवांनीं मजकडे येऊन मला परशुरामांसारख्या गुरूंशीं युद्ध न करतां ब्राह्मणाचा मान राखण्यास सांगितलें. व त्यांनीं परशुरामांना असेंही सांगितलें कीं, ' हा भीष्म वसु असून याचा पराभव दुसऱ्या कोणाच्या हातून होणें शक्य नाहीं. अनादि नर सव्यसाची या नांवानें प्रसिद्ध असलेला इंद्रपुत्र अर्जुन मात्र योग्य प्रसंगीं याला मारण्याला समर्थ होईल. ' असें आह्मां दोघांना यांनीं सांगितलें तरी रणांतून पराभव पावून परताबयाचें नाहीं अशी आह्मां दोघांचीही प्रतिज्ञा असल्यानें आह्मी तसेंच युद्धाच्या तयारीनें उभे होतों. इतक्यांत गंगेसहवर्तमान नारदप्रभृति सर्व मुनि आह्मां दोघांमध्यें येऊन उभे राहिले व त्यांनीं आह्मी दोघेही परस्परांना अवध्य असल्यानें यापुढें युद्ध चालविण्यांत अर्थ नाहीं असें आग्रहपूर्वक सांगितलें. तेव्हां परशुरामांनीं माघार घेतली व तें पाहून मीही त्यांकडे जाऊन त्यांना अभिवदन केलें. तेव्हां ते हासत हासत ' ह्या जगांत तुजसारखा क्षत्रिय नाहीं, तूं मला युद्धांत संतुष्ट केलेस, ' असें ह्मणून माझ्यासमक्षच त्या काशिराजाच्या मुलीला दीनवाणीनें ह्मणाले, ' मुली, सर्वांदेखत यथाशक्ति युद्ध करून मीं आपली शिकस्त केली. परंतु या धनुर्धरश्रेष्ठ भीष्मापुढें माझ्या अप्रतिम अस्त्राचेंही कांहीं तेज पडलें नाहीं. आतां यापुढें माझा नाइलाज आहे. तेव्हां आतां तूं तुला वाटेल तिकडे जा. भीष्मालाच शरण गेल्याबांचून तुला गत्यंतर नाहीं.' असें ह्मणून दीर्घोच्छ्वास टाकून ते गप्प झाले. यावर ' आपण ह्मणतां तें सर्व ठीकच आहे. परंतु कसाही प्रसंग आला तरी भीष्मांकडे जाऊन तोंड पसराबयाचें नाहीं असा माझाही पण संकल्प असल्यानें माझ्या स्वतःच्याच हातून त्यांना मारण्याच्या उपायाच्या वाटेला मी लागणार, ' असें म्हणून ती घोर तपश्चर्या करण्याला निघून गेली. माझ्या प्रीतींतले व माझ्या हितांमध्यें दक्ष असलेले लोक मला तिच्या हालचालीची बातमी आणून देत असत. केवळ बीर्यानें कोणाच्या हातून माझा पराभव होणें जरी शक्य नव्हतें तरी तपाच्या सामर्थ्यानें काय होईल न कळे म्हणून मी चिंतेत असतां नारद व व्यास यांनीं ' तूं काळजी करूं नकोस. पुरुषप्रयत्नानें दैव फिरविता येणें शक्य नाहीं ' असें सांगून मला धीर दिला.

असो. ती तपोधन कुमारिका यमुनेच्या तीरावरील आश्रमांकडे जाऊन तेथें अन्न देखील सोडून अलौकिक तपामध्यें शरीर झिजवीत राहिली, व तिच्या अंगावर माती चढूं लागली. सहा महिनेपर्यंत ती वायु भक्षण करून स्थाणूप्रमाणें अचल होती. पुढें एक वर्ष यमुनेच्या पाण्यांत बसून काहीं न खातां पाण्यावर तिनें काढलें. पुढें एक वर्ष झाडांच्या गळून पडणाऱ्या पानांवर तिनें काढलें. पुढें तीव्र कोपानें भरलेली ती एक वर्षपर्यंत पायाच्या अंगठ्याच्या टोंकावर उभी होती. याप्रमाणें बारा वर्षें आपल्या उग्र तपानें भूलोक व स्वर्गलोक यांना ताप देऊन तिचे सर्व नातेवाईक त्या तपापासून तिला फिरवीत असतां त्याला न जुमानतां सिद्धचारण जेथें राहतात अशा वत्सभूमीला पुण्यशील महात्म्यांच्या आश्रमांकडे ती गेली. त्या ठिकाणीं स्वेच्छेनें सकाळसंध्याकाळ पवित्र तीर्थीमध्यें स्नान करीत नंदाश्रम, उलूकाश्रम, च्यवनाश्रम, ब्रह्मदेवांचें स्थान, प्रयाग, कुरुक्षेत्र; देवारण्यें, भोगवती, कौशिकाश्रम, मांडव्याश्रम, दिलीपाश्रम, परशुरामसरोवर, पैलगर्गाचा आश्रम, या ठिकाणीं दुष्कर व्रतानें राहून ती फिरत राहिली; तेव्हां माझी माता गंगा हिला तिचा उद्देश कळून ती तिला म्हणाली, ' तूं वांकडा हेतु धरून हें तप आचरीत आहेस तेव्हां हा तुझा हेतु शेवटास जाणार नाहीं व तप करतां करतांच जर तूं मेलीस तर पावसाळ्यांतच जिला पाणी राहतें अशी तूं कुटिल नदी होऊन बाकीच्या आठ महिन्यांत तुझा मागमूस राहणार नाहीं व पावसाळ्यांत तुझ्या पात्राला उतार राहणार नाहीं. तुझ्या पात्रांत भयंकर मगर राहिल्यानें सर्व लोकांना तूं भयप्रद होशील. ' याप्रमाणें सांगून माझी माता निघून गेल्यावर तीर्थांच्या लोभानें कधीं कधीं आठ महिने कधीं कधीं दहा महिनेपर्यंत पाणीसुद्धां न घेतां तीर्थें हिंडत फिरून ती वत्सभूमीला आली. तेथें ती माझ्या मातेच्या शापानें वर सांगितल्याप्रमाणें तिच्या तपाच्या प्रभावामुळें केवळ अर्ध्या शरीरानेंच अंबा नामक प्रसिद्ध नदी होऊन

बाकीच्या अर्ध्यानें पूर्ववत् कुमारी राहिली.तपासंबंधीं तिचा अढळ निश्चय पाहून 'आतां तूं पुढें काय करणार ह्मणून तापसांनीं तिला विचारलें. तेव्हां ती ह्मणाली, 'ज्या भीष्मांनीं टाकल्यामुळें मी पतिधर्माला मुकलें आहे व ज्याच्यामुळें धड स्त्री ना धड पुरुष अशी स्थिति होऊन इहलोकच्या सुखाला मुकून मी पतिलोकालाही मुकलें आहें, त्या भीष्मांवर सूड उगवून त्यांना मारण्यासाठीं हा माझा यत्न असून तो कशानेंही ढळणार नाहीं. स्त्रीपणाचा आतां मला कंटाळा आला असून पुरुषत्व मिळवून भीष्मांवर सूड घेण्याच्या निश्चयानें मी घोर तप करणार. मला उत्तम लोक वगैरे कांहीं नको आहेत. तेव्हां आतां या तपापासून माझें मन वळविण्याचा तुमचा प्रयत्न फुकट आहे.' याप्रमाणें निश्चयानें ती तप करीत असतां उमापति शंकरांनीं स्वप्नांत तिला दर्शन देऊन वर मागण्यास सांगितलें. तेव्हां 'मीं आपल्या हातानें भीष्मांना मारावें,' असा तिनें वर मागितला. तेव्हां महादेवांनीं त्या दृढनिश्चयी मुलीला वर ह्मणून तो वर दिला. तेव्हां ती फिरून त्यांना ह्मणाली, 'मला स्त्रीला युद्धांत जय कसा येणार? स्त्रीस्वभावानें माझें मन अगदीं शांत झालें आहे.' यावर महादेव ह्मणाले, 'मी ह्मणालों तें सत्य होईल. अन्य देह प्राप्त झाल्यावर तुला पुरुषत्व प्राप्त होईल व पूर्वजन्मींची आठवण राहून तूं भीष्माला मारशील. अस्त्रप्रयोगांत निष्णात असा विचित्रयोधी महारथी तूं होशील. प्रथम स्त्रीच्या जन्माला येऊन कांहीं कालानें तूं पुरुष होशील.' असें सांगून ते अंतर्धान पावल्यावर अंबेनें मोठी चिता पेटविली व रागानें मन अनावर झालेल्या तिनें 'भीष्मांना मारण्यासाठीं' एवढेंच ह्मणून तिच्यांत उडी घेतली,

इकडे द्रुपदराजाच्या पट्टराणीला मूल नव्हतें ह्मणून याच सुमारास द्रुपदानें मुलासाठीं घोर तपश्चर्या करून शंकरांना तोषविलें होतें; व ते प्रसन्न झाले असतां माझ्यावर सूड घेण्यासाठीं त्यानें एक मुलगा मागितला. तेव्हां 'प्रथम मुलगी जन्मून पुढें पुरुष होणारें तुला एक अपत्य होईल,' असें सांगून त्यांनीं त्याला परत पाठविलें. पुढें पोक्त व जितेंद्रिय अशा द्रुपदाच्या बायकोला योग्यकालीं गर्भ राहिला. मुलाला हापापला असल्यानें राजानेंही तिची चांगली जोपासना ठेवून तिचे सर्व डोहाळे पुरविले. पुढें तिला एक रूपवती मुलगी झाली. परंतु त्या राणीनें सर्वांना 'मला मुलगा झाला आहे,' असें सांगून खरी गोष्ट झांकून ठेविली. त्या राजानेंही त्या मुलीचे जातकर्मापासून सर्व संस्कार मुलाप्रमाणें करून त्याचें शिखंडि हें नांव ठेवलें. राणीनें ती गोष्ट मोठ्या खबरदारीनें गुप्त ठेवली असल्यामुळें नगरांत देखील कोणाला ती मुलगी आहे हें ठाऊक नव्हतें. मात्र नारदांच्या सांगण्यावरून, अंबेच्या हालचालीवरून, व **हेरांच्या बातमीवरून** मला एकट्याला ही गोष्ट ठाऊक होती.

द्रुपदानें या मुलीला लेखन, शिल्प वगैरे कला शिकविल्या, व धनुर्विद्येंत ती द्रोणशिष्य झाली. पुढें तिचें लग्न करून तिला बायको करण्याविषयीं देवीनें राजाला सुचविलें. तेव्हां ती यौवनदशेंत आली असल्यामुळें आतां मुलगी ह्मणून लोकांना कळून येणार ह्मणून राजाला चिंता पडली. परंतु त्रैलोक्यकर्त्या शंकरांचें भाषण असत्य होणार नाहीं, ह्मणून राणीनें त्याला धीर दिला. नंतर दोघांचा विचार ठरून त्यांनीं दशार्ण देशाच्या राजाच्या मुलीला मागणी घातली व दशार्ण देशच्या प्रसिद्ध हिरण्यवर्म्यानें आपली मुलगी शिखंडीला दिली. हा राजा दुसऱ्यांना दुर्धर्ष व अजिंक्य असून याचें सैन्यही मोठें होतें. लग्न झाल्यावर शिखंडि कांपिल्य नगराला परत आला. पुढें लवकरच त्या मुलीला व शिखंडीला यौवनदशा आली व पुढें हिरण्यवर्म्याच्या मुलीला शिखंडि स्त्री असल्याचें कळून येऊन तिला व तिच्या दासींनीं ती बातमी हिरण्यवर्म्याला कळविली. तेव्हां तो फार संतापून गेला तरी प्रथम त्यानें द्रुपदाकडे दूत पाठविला. राजाची एकांतांत गांठ घेऊन तो दूत त्याला म्हणाला, 'महाराज, दशार्ण महाराजांना आपण फसविल्यामुळें अगदीं संतापून जाऊन त्यांनीं आपल्याला कळविलें आहे कीं, 'माझा जो हा तूं अवमान केला आहेस तो विचार करून केला नाहींस. अविचारानें जी मुलीला मुलीची मागणी घातलीस त्या कपटाबद्दल तुला प्रायश्चित्त लवकरच मिळेल. तुझा पूर्ण उच्छेद केल्यावांचून मी

कधीं राहणार नाहीं. ' हा दूताचा निरोप ऐकून मुद्देमालासकट पकडलेल्या चोराप्रमाणें द्रुपदाचें तोंड बंद पडलें. त्यानें गोड बोलणारे दूत पाठवून ' गोष्ट आपण म्हणतां तशी नाहीं ,' म्हणून आपल्या व्याह्याची समजी घालण्याची खटपट केली. परंतु खरा वृत्तांत बरचेवर त्या राजाच्या कानावर जात असल्यानें त्यानें आपल्या महाबलाढ्य मित्रांकडे दूत पाठवून आपल्या मुलीशीं द्रुपदानें केलेलें कपट त्यांना कळविलें, व त्या सर्वांनीं आपलीं सैन्यें एकत्र करून ही गोष्ट खरी असल्यास द्रुपद व शिखंडि यांना धरून ठार करून पांचालगादीवर दुसऱ्या कोणाला तरी बसवावयाचें अशा निश्चयानें पांचालांवर स्वारी करण्याचा बेत केला. द्रुपद जात्याच भित्रा असल्यामुळें यावेळीं तरु त्याच्या हातून अपराध घडला असल्यामुळें तो विशेषच घाबरला. त्यानें हा वृत्तांत आपल्या बायकोला एकांतांत कळविला व पुढें काय करावें म्हणून तो मंत्र्यांशीं विचार करूं लागला. विचारांतीं कशाही प्रसंगीं नगराचा बचाव करावयाचा असा निश्चय ठरवून पुरुषप्रयत्नाला दैवी प्रयत्नाची जोड देण्यासाठीं इष्ट देवतेचें त्यानें आराधन चालविलें.कारण या दोहोंची जोड मिळाल्यानें यश खात्रीनें येतें. याचा विरोध जेथें असेल तेथें यशाची शंकाच असते. इकडे शिखंडीला आपल्या आईबापांना यात्प्रमाणें आपल्यासाठीं संकटांत पडलेले पाहून जीव नकोसा झाला व घर सोडून ती एका निबिड अरण्यांत निघून गेली. स्थूणाकर्णनामक श्रीमान यक्षाची त्या वनावर देखरेख होती, व त्याच्या भयानें कोणी तेथें जात नसे. त्या वनांत स्थूणाकर्णाचा वाडा होता. त्याला चुन्याचा गिलावा असून त्याच्या भिंती व दरवाजे उंच होते. त्यामध्यें लाह्याच्या धुराचा घमघमाट सुटला होता. शिखंडि त्यांत शिरून पुष्कळ दिवस अन्न न घेतां शरीर सुकवीत राहिली. स्थूणाकर्णाचें लक्ष तिकडे जाऊन त्याला दया आली व त्यानें तिला तिचा उद्देश विचारल्यावरून तिनें त्याला आपला हेतु कळविला. तेव्हां दैवाच्या फेऱ्यांत सांपडलेल्या त्या यक्षानें ती वेळेवर परत येईल या भिस्तीवर मुदतीच्या अटीवर आपलें पुरुषत्व तिला देऊन तिचें स्त्रीत्व घेतलें; व नगराकडे जाऊन सर्व यथास्थित झाल्यावर फिरून तिला आपल्याकडेस येण्यास सांगितलें. तें कबूल करून एकमेकांच्या जातिबोधक चिन्हांची त्यांनीं अदलाबदल केली. स्थूणाकर्ण तेथें स्त्री होऊन राहिला व शिखंडि कांतिमान असा पुरुष बनून नगराकडे गेली. हें घडलेलें वर्तमान ऐकून राजाला आनंद झाला, व त्यानें दूताकरवीं ' माझा मुलगा पुरुष आहे, वाटेल तर तुम्ही याची उघड उघड परीक्षा करा, ' असा निरोप दशार्णराजाला पाठविला. तो निरोप ऐकून दशार्णराजानें कांहीं लावण्यवती तरुणी पाठवून त्यांच्याकडून खरी हकीकत कळवून घेतली. शिखंडि महावीर्यवान पुरुष आहे असें त्या राजाला त्यांच्याकडून कळल्यावर त्याला मोठा आनंद झाला व प्रेमानें त्यानें द्रुपदाची भेट घेऊन संपत्ति, असंख्य गाई, हत्ती, घोडे व दासी शिखंडीला दिल्या. याला कांहीं काळ लोटतो आहे तों इकडे नरवाहन कुबेर यात्राप्रसंगानें स्थूणाकर्णाच्या राहण्याच्या ठिकाणाकडे आला. तो वाडा नानाप्रकारें शृंगारला असून सुगंधिक द्रव्यांनीं तो धुपविला होता व लाह्या चोहोंकडे उधळल्या होत्या. ध्वज, पताका यांनीं तो विभूषित केला असून भक्ष्य, अन्न, पेय व दांतांनीं चावून खाण्याचे पदार्थ यांनीं तो भरला होता. सुवर्णरत्नाच्या माळा टांगल्या असून फुलांचा त्या ठिकाणीं घमघमाट सुटला होता, घ सडासंमार्जन केलें असल्यामुळें त्याला अलौकिक शोभा आली होती. कुबेर यांत शिरला असतां स्थूणाकर्ण त्याला सामोरा आला नाहीं. तेव्हां तो फारच संतापला. पुढें ज्यासाठीं तो त्याला सामोरा आला नव्हता तें खरें कारण त्याला सेवकांकडून समजल्यावर त्याला तसेंच आपल्यापुढें आणवून तो लाजेनें तोंड खालीं घालून पुढें उभा असतां कुबेरानें रागावून ' तुझें स्त्रीपण कायम राहून जिला तूं आपलें पुरुषत्व दिलेंस ती कायम पुरुष राहील. ' असा त्याला शाप दिला. नंतर कांहीं अवधीनें तरी शापनिवृत्ति असावी म्हणून यक्षांनीं प्रार्थना केल्यावरून ' शिखंडि मेल्यावर त्याचें पुरुषत्व याला मिळेल, ' असें सांगून कुबेर निघून गेला. पुढें ठरल्याप्रमाणें शिखंडि त्या यक्षाकडे लगबगीन गेला. तेव्हां बोलल्याप्रमाणें त्यानें वचन पाळल्यानें यक्षाला संतोष होऊन त्या-

च्या पश्चात् घडलेला सर्व वृत्तांत त्यानें त्याला कळविला आणि पश्चात् कुबेरानें येऊन आपल्याला शाप द्यावा अशा अपरिहार्य नियमानियमानें त्या सर्व गोष्टी घडून आल्या असल्यानें त्यानें त्याला खुशाल परत जाण्यास सांगितलें. याप्रमाणें शिखंडी कृतकृत्य होऊन नगराला परत आला. तेव्हां नानाप्रकारचीं गंधपुष्पें व रत्नें यांनीं, ब्राह्मण, देवता, ग्रामवृक्ष व चवाठ्यांच्या जागा यांचें मोठ्या थाटानें पूजन होऊन सर्व बांधवांसह द्रुपद आनंदित झाला; व त्या शिखंडीला द्रोणांच्या स्वाधीन करून त्यांकडून धृष्टद्युम्नाबरोबर त्याला चतुरंग विद्या शिकविली. **वेडेखुळे, आंधळे, बहिरे यांचीं सोंगें घेऊन द्रुपदनगरींत फिरणाऱ्या माझ्या हेरांनीं मला ही सर्व बातमी दिली आहे. तेव्हां स्त्री किंवा पूर्वी स्त्री असून पुढें पुरुष झालेला यांवर शस्त्र धरावयाचें नाहीं अशी माझी जगप्रसिद्ध प्रतिज्ञा असल्यामुळें हा रणांत शस्त्र उगारून मजवर चालून येईल तर यावर मात्र मी शस्त्र धरणार नाहीं.** इतकेंच नव्हें तर त्याकडे मी पाहणार सुद्धां नाहीं. मी त्याला मारीन तर भल्यांच्या निंदेला मी पात्र होईन.'

---

१४८ भारत युद्धाचे वेळील रणव्यवस्था व युद्धाचे नियम. (५. १९३–९६)

पुढें पहाटेच्या प्रहरीं 'असंख्य हत्ती, घोडे व वीर यांनीं गजबजलेल्या भीमार्जुनधृष्टद्युम्नप्रभृति महाधनुर्धारी वीरांनीं संरक्षित व कोणाचीं मात्रा चालूं न देतां देवांनासुद्धां न भिणाऱ्या ह्या खळबळून युद्धाला उठलेल्या सागरासारख्या युधिष्ठिराच्या सैन्याचा तुझीं एकेकटे किती दिवसांत फडशा पाडाल,' ह्मणून दुर्योधनानें भीष्म, द्रोण, कृप, अश्वत्थामा व कर्ण यांना विचारलें असतां भीष्म ह्मणाले, 'शत्रूच्या बलाचा यावेळीं तूं अंदाज घेणें रास्तच आहे. रणांत शस्त्रास्त्रांत व शरीरकष्टांत मी आपली शिकस्त करीन. **स्त्रीयावी पुरुषांशीं मायेनें व सरळ युद्ध करणाराशीं सरळ युद्ध रीतीनें करणें हा जो क्षात्रधर्म** त्याला मी अनुसरेन. दररोज सकाळचें आन्हिक आटोपल्यावर रोजीं दहा हजार रथी मी मारीत जाईन. याप्रमाणें नित्यक्रम ठेवून ती प्रचंड सेना पार उडविण्यास मला बराच काळ लागेल. तरी मोठमोठ्या अस्त्रांचा मी प्रयोग करून एका महिन्यांत मी त्याचा फडशा उडवीन.' नंतर द्रोण हासत हासत ह्मणाले, 'ह्मातारपणामुळें माझें सामर्थ्य व हुशारी हीं दोन्ही कमी झालीं आहेत, तेव्हां शस्त्राग्नीनें हें सर्व सैन्य जाळून पाडण्याला भीष्मांप्रमाणेंच मलाही एक महिना तरी लागेल. माझ्या बलाची एवढीच परमावधि आहे.' नंतर कृपांनीं दोन महिन्यांत, अश्वत्थाम्यानें दहा दिवसांत व बढाईखोर कर्णानें पांच दिवसांत आपण त्याचा फडशा उडवूं ह्मणून सांगितलें. तेव्हां तें कर्णाचें भाषण ऐकून भीष्म त्याला ह्मणाले, 'धनुष्य, बाण व शंख घेऊन वासुदेवासहवर्तमान अर्जुनाला रथावर पाहिला नाहींस तोंवरच तुझी ही घमेंड. मग एवढेंच कां आणखी कां वाटेल तेवढी मारून घेईनास फुशारकी?' **ही बातमी रात्रींतून दुर्योधनाच्या सैन्यांतून फिरणाऱ्या गुप्त हेरांनीं येऊन युधिष्ठिराला दिली.** तेव्हां 'तूं कौरवसैन्याचा फडशा किती दिवसांत उडविशील ह्मणून त्यानें अर्जुनाला विचारलें. हा प्रश्न ऐकून कृष्णाकडे पाहून अर्जुनानें उत्तर दिलें, 'कौरवांकडील वरील सर्व योद्धे मोठे अस्त्रपटु व चित्रयोधी असून ते बोलल्याप्रमाणें करतील यांत संशय नाहीं. परंतु आपण त्याची मनांत बिलकुल काळजी बाळगूं नका. श्रीकृष्णाच्या साहाय्यानें मी एकटा एका रथानिशीं देवांसह स्थावरजंगमात्मक तिन्ही लोकांना एका निमिषांत उडवून देईन. किरातावरोबर झालेल्या त्या द्वंद्वयुद्धांत जें पाशुपतास्त्र मला मिळालें आहे, त्याचा उपयोग युगांतसमयीं सर्वसंहाराला होत असतो. त्या अस्त्राची माहिती कौरवपक्षाकडील कोणालाच नाहीं. **परंतु अशा दिव्यास्त्रानें सामान्य लोकांना मारणें अशास्त्र असल्यानें सरळ मार्गानेंच युद्ध करून आपण शत्रूला जिंकूं.** धर्मराज, माझी गोष्ट बाजूला ठेविली तरी आपले सर्वच साहाय्यकर्ते वीर दिव्यास्त्र जाणणारे असून युद्धाविषयीं आतुर आहेत.

सर्वांनींच वेद परिपूर्ण पढून अवभृतस्नानें केलीं असल्यानें ते सर्वच अजिंक्य आहेत. एवढें कशाला पाहिजे, इंद्रासारखे आपण ज्याकडे रागानें पहाल त्याला केवळ त्या नजरेनेंच नाहींसें करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं असून त्रैलोक्याचाही फडशा पाडण्याला आपण एकटे समर्थ आहां.'

नंतर फटफटीत उजाडल्यावर कौरवांकडील सर्व योध्यांनीं स्नान करून पांढरीं शुभ्र वस्त्रें नेसल्यावर माला वगैरे घालून पुण्याहवाचनपूर्वक अग्नीला आहुती दिल्या व सर्व आयुधें बरोबर घेऊन दुर्योधनाच्या आज्ञेनें ध्वज फडकावीत ते निघाले. ते सर्व शूर व वेदवेत्ते असून व्रतस्थ राहिले होते. सर्वांच्या ठिकाणीं वीरचिन्हें दिसून येत असून ते महाबलशाली होते व शत्रूंना केव्हां जिंकूंसें त्यांना झालें होतें. त्यांचें मन केवळ रणाकडे लागून राहिलें असून परस्परांचा परस्परांवर पूर्ण विश्वास होता. अवंतीचे विंद, अनुविंद, बाल्हीक व केकय हे द्रोणांच्या मागून चालले होते. अश्वत्थामा, सिंधुराज जयद्रथ, दक्षिण व पश्चिम देशाचे व डोंगराळ प्रदेशांतील राजे, शकुनि, पूर्वेकडील व उत्तरेकडील राजे शक, किरात, यवन, शिबि व वसाति हे आपापल्या लोकांसह भीष्माच्या अनुरोधानें सैन्याची तुकडी करून चालले होते. कृतवर्मा, त्रिगर्त, शल, भूरिश्रवा, शल व कोसल देशाचा बृहद्रथ धृतराष्ट्र पुत्रांच्या मागून चालले होते. धृतराष्ट्रपुत्र ज्याच्या-त्याच्या योग्यतेप्रमाणें सर्वांना भेटून कुरुक्षेत्राच्या पश्चिमेकडील अर्ध्या भागांत सैन्यामहवर्तमान चिलखतें चढवून तयार होऊन उभे राहिले. त्या ठिकाणीं दुर्योधनानें सर्व राजांकरितां शेंकडों हजारों शिबिरें इतक्या उत्कृष्ट रीतीनें शृंगारिलीं होतीं कीं, नेहमीं शहरांत राहण्याची संवय असणारांना देखील हास्तिनापुरांत व त्यांत फरक दिसून येईना. दुर्योधनाचें सैन्य तेथें पांच योजनेंपर्यंत वर्तुलाकार पसरून तळ देऊन पडलें होतें. व एकेक गोटांत शेंकडों तुकड्यांचा समावेश झाला होता. या हजारों धनधान्यसंपन्न शिबिरांतून राजे आपापल्या योग्यतेप्रमाणें शिरले. दुर्योधनानें सर्व सैन्य, रखवालदार, हत्ती, घोडे यांवरील नोकरचाकर या सर्वांची उत्तमप्रकारें खाण्यापिण्याची बडदास्त ठेविली होती. त्याचप्रमाणें या सैन्याबरोबर निरनिराळे कारागीर, भाट, वाणी, वेश्याजन, हेर व प्रेक्षक होते, त्यांचीही त्यानें चांगली व्यवस्था ठेविली होती.

इकडे युधिष्ठिरानें आपल्याकडील वीरांना निघण्याची सूचना दिली, त्यावेळीं सर्व योद्धे आनंदानें अंगावर मामान चढवूं लागून इकडे तिकडे धांवूं लागले असतां उसळलेला गोंगाट जणू स्वर्गाला जाऊन भिडत होता कीं काय असें वाटत होतें. महावीर अभिमन्यु, द्रौपदीचे मुलगे इत्यादिकांना धृष्टद्युम्नाच्या तुकडीबरोबर देऊन युधिष्ठिरानें त्यांना पुढें पाठविलें; व द्रुपद, विराट वगैरे बाकीचे राजे घेऊन तो स्वतः निघाला. भीमपराक्रमी महाधनुर्धारी वीर जिच्यामधून फिरताहेत अशी ती धृष्टद्युम्नाच्या हाताखालची सेना चालली असतां तुडुंब भरून संथ वाहणाऱ्या गंगेप्रमाणें भासत होती. दुर्योधनाला चकविण्यासाठीं सैन्याच्या निराळ्या तऱ्हेनें फिरून फिरून तुकड्या केल्या जात होत्या. द्रौपदीचे मुलगे, अभिमन्यु, नकुलसहदेव, व सब प्रभद्रक यांचीं, दहा हजार स्वार, दोन हजार हत्ती, दहा हजार पायदळ, व पांचशें रथी यांनिशीं एक तुकडी करून भीमाच्या ताब्यांत दिली होती. मधल्या तुकडींत विराट, जयत्सेन, व पांचालाधिपति युधामन्यु, उत्तमौजा यांची योजना केली असून याच तुकडीबरोबर कृष्णार्जुन चालले होते. या तुकडींत वीस हजार स्वार, पांच हजार हत्ती व सर्व बाजूंनीं रथसमुदाय असून हजारों पायदळ पुढे चाललें होतें. ज्या सागरतुल्य तुकडीबरोबर स्वतः युधिष्ठिर होता त्यांत निरनिराळ्या ठिकाणचे राजे असून हजारों स्वार, पायदळ, हत्ती व रथ होते. चेकितान, चेदीचा राजा धृष्टकेतु हेही याच तुकडीबरोबर होते. वृष्णिश्रेष्ठ महाधनर्धारी सात्यकि एक लक्ष रथ्यांना बरोबर घेऊन सर्व सैन्यांना हुकूम सोडीत चालला होता. ब्रह्मदेव व क्षत्रदेव हे दोघे पृष्ठभाग राखीत मागून चालले होते. सामानाचे खटारे, व्यापारी, वेश्या, रथादि वाहनें, स्त्रिया, युद्धाला निरुपयोगी, दुबळे, पंगु, खजिना व धान्याचा संग्रह यांबरोबर धर्मराज चालला होता. युद्धाची धुंदी चढणारा खरा धैर्यशाली सौचित्ति, श्रेणिमान, वसुदान व काश्यपुत्र विभु हे त्याच्या मागून चाल-

ले होते. सेवकांमह वीस हजार हत्ती, दहा कोट स्वार, नांगरासारखे दांत असलेले मेघाप्रमाणे फिरणारे वीस हजार मस्त हत्ती व साठ हजार सामान्य हत्ती होते. यांच्या गंडस्थलांतून मदस्राव होत असल्यानें वर्षाव करणाऱ्या जणू मेघाप्रमाणें हे दिसत होते. सर्व सैन्यांत हजार हजार, दहा दहा हजार सैनिक एकत्र जुळून आनंदानें हामत खेळत चालले होते. सैन्यामधून नौबती व हजारों शंख बाजत होते. सेवक, कारागीर वगैरे लोकही बरोबर असून सर्वांची खाण्यापिण्याची युधिष्ठिराने उत्तम व्यवस्था ठेविली होती. विजयाला आतुर झालेले पांडव सोमकांमह करुक्षेत्रामध्यें शिरल्यावर ते हल्ल्याचें कांहीं चालूं न देणाऱ्या कौरवसैन्याच्या अगदीं समोर जाऊन उभे राहिले, व पश्चिमेच्या बाजूला पूर्वाभिमुख त्यांनीं तळ दिला. सर्वांच्या तोंडावर रणोत्साह दिसून येत होता. युधिष्ठिरान समंतपंचकाच्या बाहेरच्या बाजूला हजारों यथाशास्त्र शिबिरें तयार करविलीं. सर्व पृथ्वीवर पुरुष, हत्ती, घोडे किंवा रथ बाकी न राहतां काय तीं मुलें व म्हातारीं तेवढीं शिल्लक राहिलीं होतीं. जंबुद्वीपाच्या जेवढ्या म्हणून भागांत सूर्य प्रकाशत होता त्या सर्व भागांतून युद्धाला सैन्य गोळा झालें होते. **सर्व जातीचे लोक नद्या, पर्वत, वनें व्यापून पुष्कळ योजनेंपर्यंत तळ देऊन एकत्र पडले होते, कैवर्तम्लेच्छांध्रादि सरहद्दीवरील निरनिराळ्या जातींच्या लोकांची युधिष्ठिरानें खाण्यापिण्याची व पथाऱ्यांची उत्तम व्यवस्था ठेविली होती.** अमुक अमुक खुणा माहीत असणारा पांडवपक्षाकडील म्हणून युद्धाच्या वेळीं ओळखतां यावा यासाठीं निरनिराळ्या खुणा व अलंकार ठरविले. युधिष्ठिराच्या निशाणाचे शेवट दिसूं लागतांच ज्यावर पांढरे शुभ्र छत्र धरलें होतें व जो हजारों हत्तींमध्ये आपल्या भावांमध्यें होता त्या महाबुद्धिशाली दुर्योधनानेंही आपल्या सैन्याची व्यवस्था प्रतिपक्ष्याच्या सैन्याच्या तोडीची लाविली. रणोत्साहानें भरलेले पांचाल, दुर्योधन दृष्टीस पडतांच, मोठ्या आनंदानें मधुर नाद देणारे मोठमोठे शंख व नौबती वाजवूं लागले; याप्रमाणें आपल्या सैन्याला उत्साहसंपन्न पाहून पांडव व भगवान वासुदेव यांनाही मोठा संतोष झाला, व कृष्णार्जुनांनीही आपले दिव्य पांचजन्य व देवदत्त शंख मोठ्या आनंदानें फुंकले. त्यांचा शब्द ऐकल्याबरोबर सिंहाच्या शब्दानें ज्याप्रमाणें सामान्य श्वापदांची धांदल उडावी त्याप्रमाणें सर्व योद्धयांची गाळण उडून ते मलमूत्रादि विसर्जन करूं लागले. भयंकर धूळ उसळून कोठें कांहीं ओळखूं येईनासें झालें. सूर्य त्यांत झांकला गेल्यामुळें मावळल्यासारखा झाला. रक्तमांसाचा पाऊस पडूं लागला. सैन्यांची चोहोंकडे धावपळ उडून एकच आश्चर्य उडून राहिलें. पृथ्वीवरील रजःकण बरोबर वाहून नेणारा सोसाट्याचा वारा सुटून पृथ्वीवरील खडे त्याबरोबर उडत होते व शेकडों हजारों लाकांचा त्यानें फडशा चालला होता. सागराप्रमाणें क्षुब्ध झालेल्या त्या दोन सेना मोठ्या उत्साहानें युद्धाला त्या ठिकाणीं तयार होऊन उभ्या राहिल्या अमतां प्रलयकालीन दोन समुद्रांच्या संगमाप्रमाणें तो त्यांचा संगम मोठा अलौकिक दिसत होता. नंतर कौरव, पांडव व सोमक यांनीं परस्परांच्या विचाराने युद्धाचे नियम ठरविले :— रोजच्या रोज संध्याकाळीं युद्ध संपून परतल्यावर परस्परांनीं परस्परांशीं स्नेहानें असावें. प्रत्येकानें आपापल्या तोडीच्या योद्धयाबरोबर युद्ध करावें. कमी अधिकाबरोबर युद्ध करणें अन्यायाचें समजलें जावें. तोंडाच्या भांडणाचा तोंडाच्या भांडणानेंच प्रतिकार करावा. सैन्य सोडून कोणी माघार घेतली असतां त्याला मारूं नये रथ्यानें रथ्याबरोबर, हत्तीवरच्याबरोबर, स्वारानें स्वाराबरोबर, व पायदळानें पायदळाबरोबर युद्ध करावें. ज्याच्या त्याच्या जोडीप्रमाणें, ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें, ज्याच्या त्याच्या दुरुपीप्रमाणें व ज्याच्या त्याच्या शक्तीप्रमाणें प्रथम सूचना देऊन प्रहार करावा. भरवशानें असणाराबर किंवा घायाळ झालेल्यावर कधीं प्रहार करूं नये. दुसऱ्याशीं भिडलेला, शरण आलेला, पाठ फिरवून परत चाललेला, शस्त्र किंवा चिलखत गळून पडलेला यांवर कधीं प्रहार करूं नये. सारथी, गाड्या वाहणारी जनावरें, शस्त्रें आणून देणारे, नौबती व शंख वाजविणारे यांवरही प्रहार करूं नये. याप्रमाणें नियम करून उभयपक्षानीं विस्मयपूर्वक परस्परांकडे पहात मोठ्या उत्साहवृत्तीनें आपापलीं सैन्यें त्या ठिकाणीं तयार ठेवलीं.

National Library